# आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास
# १८१८ - १९४७

## खंड दुसरा

लेखक

**डॉ. के. के. चौधरी**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
२०१८

एन ४१४६—अ

➢ **पुस्तकाचे नाव :** आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (१८१८ ते १९४७) खंड दुसरा

➢ **लेखक :** डॉ. के. के. चौधरी

➢ **प्रथमावृत्ती :** २०१८

➢ **प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

➢ **© प्रकाशकाधीन**

➢ **मुद्रक :**

व्यवस्थापक
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय
चर्नी रोड, मुंबई ४०० ००४.

➢ **किंमत :** रु. १५०९/-

या ग्रंथातील मजकुराशी महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ सहमत असेलच असे नाही. ब्रिटिश सरकारचे दस्तऐवज व इतिहास साधनसामग्रीच्या आधारावर लेखकाने हे लेखन केलेले आहे.

# आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास

## खंड दुसरा

### अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| अध्यक्षांचे निवेदन | पंधरा |
| लेखकाचे मनोगत | सतरा |
| **प्रकरण १ : सत्याग्रह पर्व—** | १ |
| नवीन युगाचा उदय | १ |
| सरकारचे आत्मसमर्थन | ६ |
| रौलट सत्याग्रहाची पूर्वतयारी—रौलट विधेयक कायदेमंडळात संमत ; बॅ. जिना व खापर्डे यांची भूमिका ; संकल्पित कार्यक्रम ; दिल्लीतील गोळीबार | १० |
| मुंबईतील सत्याग्रह | १९ |
| मराठी भाषिक सत्याग्रही | २४ |
| पंजाबमधील दडपशाही | २५ |
| जालियनवाला बाग हत्याकांड—ब्रिटिशांचे अकथित अंतरंग | २७ |
| सरकारी अत्याचार—हंटर कमिशनने केलेली रंगसफेदी ; ब्रिटिश असंवेदनशीलतेचे नमुने | ३२ |
| सत्याग्रह स्थगित | ३६ |
| **प्रकरण २ : असहकार चळवळ—** | ४१ |
| चळवळीची पूर्वतयारी | ४१ |
| असहकार चळवळीचा प्रारंभ | ४५ |
| कायदेमंडळाची निवडणूक | ५० |


एन ४१४६—अअ

## **अनुक्रमणिका**—चालू

पृष्ठ

राष्ट्रीय शिक्षणाची मोहीम—मुंबईतील मोहीम ; अर्धनागरी भागातील मोहीम ५२

पुण्यातील असहकार चळवळ ५५

आंदोलनाची प्रगती ६२

नागपूर काँग्रेसचे महत्त्व ६८

बॅ. जिनांचा राजीनामा ७४

आंदोलनास लोकप्रतिसाद—विदेशी कपड्यांची होळी ; विद्यार्थ्यांचा प्रतिसाद ७४

चळवळीपुढील समस्या ८०

अहमदाबाद काँग्रेस अधिवेशन ८३

आंदोलनाच्या कार्यक्रमात बदल ८६

आंदोलन संस्थगित ८७

**प्रकरण ३ : असहकार चळवळीला प्रतिसाद—** ९५

असहकार आंदोलनाची फलनिष्पत्ती—विदेशी कपड्यांच्या होळ्या ; ब्रिटिश युवराजांवर बहिष्कार ; महानगरपालिकेतील पडसाद ; स्वयंसेवक चळवळ ९५

असहकार चळवळीनंतर—ब्रिटिशांचे मनोगत ११२

बॅकबे स्कँडल १२०

आर्थिक हितसंबंध व स्वातंत्र्य चळवळ १२४

सावरकरांची मुक्तता १२७

**प्रकरण ४ : स्थानिक सत्याग्रह—** १३५

मुळशी सत्याग्रह—मुळशी सत्याग्रह मंडळ १३६

## अनुक्रमणिका—चालू

पृष्ठ

नागपूरचा झेंडा सत्याग्रह १४८

शस्त्रास्त्र व स्फोटकांच्या कायद्याविरुद्ध चळवळ १५४

बार्डोलीचा सत्याग्रह १५५

राष्ट्रीय पाठशाळा १५९

बेळगावचे काँग्रेस अधिवेशन १६१

**प्रकरण ५ : समाजसुधारणा अभियानाचे नवे स्वरूप—** १६५

सत्यशोधक चळवळीचे दुसरे पर्व—स्वतंत्र मतदारसंघांची मागणी ; ब्राह्मणेतरांची वृत्तपत्रे १६७

सातारा, पुणे व सोलापूर जिल्ह्यांतील चळवळ ; सत्यशोधकांचे जलसे व प्रचार १७६

डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी—अखिल भारतीय अस्पृश्यतानिवारक संघ १८२

शाहू महाराजांचे कार्य १९०

वेदोक्त प्रकरण १९४

प्रबोधनकार ठाकरे व कर्मवीर भाऊराव—धर्मनिरपेक्ष कर्मवीर १९९

**प्रकरण ६ : ब्राह्मणेतर पक्षाची चळवळ—** २०९

ब्राह्मणेतर पक्षाची स्थापना २०९

पक्षाचे ध्येय व कार्यपद्धती २१०

ब्राह्मणेतर वर्तमानपत्रे २१३

पक्षाचे नेते व मतभेद—सत्यशोधक-ब्राह्मणेतर मतभेद २१५

## **अनुक्रमणिका—**चालू

पृष्ठ

शाहू महाराजांचे निधन २२०

पक्षात विसंवाद—छत्रपती मेळा ; प्रांतिक कायदेमंडळाची निवडणूक (१९२३) ; पुतळे व स्मारकांचे वाद ; ग्रामजोशी वतन विधेयक ; कायदेमंडळाची १९२६ ची निवडणूक २२१

ब्राह्मणेतरांचा कल काँग्रेसकडे २२७

कृषी अर्थव्यवस्था व ब्राह्मणेतर पक्ष २३०

ब्राह्मणेतर लोक काँग्रेसच्या आंदोलनात २३४

**प्रकरण ७ : स्वराज्य पक्ष व प्रांतिक राजकारण—** २४१

स्वराज्य पक्षाची स्थापना २४२

स्वराज्य पक्षाची मुंबई शाखा २४७

महाराष्ट्र स्वराज्य पक्ष २४९

कायदेमंडळाची निवडणूक २५०

स्वराज्य पक्षापुढील समस्या २५२

स्वराज्य पक्ष व जातीयवाद—राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्थापन २५४

गांधीजींच्या सुटकेनंतर २५८

तांबे प्रकरण २५९

प्रतिसहकार पक्ष २६२

मुंबई कायदेमंडळातील राजकारण—मुंबई स्वराज्य पक्षाचे विघटन २६३

मध्यप्रांत-वऱ्हाड कायदेमंडळातील घडामोडी—वेगळ्या विदर्भ प्रांताची मागणी २७०

**प्रकरण ८ : सायमन आयोग व नवचैतन्य—** २७७

सायमन आयोगाची घोषणा २७८

## **अनुक्रमणिका**—चालू

| | पृष्ठ |
|---|---|
| सायमन आयोगाची पहिली फेरी—मोतीलाल नेहरू समितीचा अहवाल | २८१ |
| आयोगाची दुसरी फेरी—मुंबई व पुणेकरांची निदर्शने ; नागपुरातील निदर्शने | २८४ |
| लाहोरचे रणकंदन | २८८ |
| लखनौमधील बहिष्कार | २९२ |
| आयोगाची फलनिष्पत्ती—युवकांचा विचारप्रणालीवर भर | २९४ |
| भगतसिंग यांचे मराठी साथी | २९८ |
| मध्यवर्ती कायदेमंडळात बाँबस्फोट | ३०० |
| क्रांतिकारकांवरील खटला | ३०३ |
| भुसावळ बाँब खटला | ३०८ |
| **प्रकरण ९ : कामगार चळवळ —** | ३१३ |
| श्रमिकसंघांचे आद्य स्वरूप | ३१४ |
| ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस | ३१९ |
| कम्युनिस्टांचा उदय | ३२१ |
| कामगार चळवळीत कम्युनिस्टांचा प्रवेश—कामगार व शेतकरी पक्ष | ३२८ |
| गिरणी कामगारांचा अभूतपूर्व संप | ३३२ |
| चळवळ कसोटीला लागली—मीरतचे कटकारस्थान | ३३७ |
| १९२९ सालातील संप व चळवळीत दुही | ३४२ |
| विदर्भातील कामगार चळवळ | ३४६ |
| आर्थिक महामंदी व कामगार | ३५१ |

## **अनुक्रमणिका**—चालू


| | पृष्ठ |
|---|---|
| प्रांतिक स्वायत्तता व कामगार चळवळ | ३५७ |
| कामगार चळवळीत साने गुरुजी | ३६० |
| दुसरे महायुद्ध व कामगार | ३६३ |
| रॅडिकल डेमॉक्रॅटिक पक्ष | ३६४ |
| **प्रकरण १० : युवक व कम्युनिस्टांच्या चळवळी—** | ३६७ |
| हिंदुस्तानी सेवादल | ३६९ |
| नौजवान भारत सभा | ३७४ |
| युवकांच्या परिषदा—पुण्यातील नवी विचारसरणी | ३७६ |
| कम्युनिस्ट पक्षाची चळवळ | ३८६ |
| काँग्रेस व कम्युनिस्ट—फैजपूर काँग्रेसमध्ये अपूर्व युती; कम्युनिस्टांच्या कारवाया | ३९६ |
| **प्रकरण ११ : सविनय कायदेभंग आंदोलन—** | ४०५ |
| संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा | ४०५ |
| पहिला स्वातंत्र्य दिन | ४०८ |
| गांधीजींच्या अकरा मागण्या—अकरा कलमी सनद | ४११ |
| आंदोलनाची रणनीती व दांडीयात्रा | ४१३ |
| महाराष्ट्र काँग्रेसमधील दुही—सत्याग्रह मंडळ | ४१६ |
| मुंबईतील सविनय कायदेभंग | ४१८ |
| आंदोलन पसरले—खुदाई खिदमतगारांचा लढा ; सरकारी अत्याचार | ४२१ |
| वडाळा मिठागारांवरील छापे | ४३० |

## अनुक्रमणिका—चालू


| | पृष्ठ |
|---|---|
| महात्मा गांधींना अटक | ४३३ |
| सोलापुरातील लढा—लष्करी कायद्याचा अंमल | ४३७ |
| शिरोडा सत्याग्रह | ४४३ |
| बाबू गेनूचे हौतात्म्य | ४४५ |
| चिरनेर जंगल सत्याग्रह | ४४६ |
| जंगल सत्याग्रहाची प्रगती—बिळाशीचे बंड; ठिकठिकाणचे सत्याग्रह | ४५२ |
| मध्यप्रांत-वऱ्हाडमधील आंदोलन | ४५९ |
| देश सेविका संघ | ४६८ |
| आंदोलनात मुंबई अग्रेसर—काँग्रेसच्या अनुनयाचे प्रयत्न | ४६९ |
| गांधी-आयर्विन करार | ४७३ |
| **प्रकरण १२ : आंदोलनातील मध्यन्तर—** | ४७९ |
| विरामसंधीनंतरची अशांतता—भगतसिंग यांना वाचवण्यात अपयश | ४७९ |
| विरामसंधीची फलश्रुती | ४८६ |
| कराची काँग्रेसचे महत्त्व | ४९१ |
| महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचे पुनर्संघटन | ४९४ |
| अर्नेस्ट हॉटसनच्या खुनाचा प्रयत्न—पुन्हा दडपशाही | ४९५ |
| दिल्ली कराराचे उल्लंघन | ४९८ |
| दुसरी गोलमेज परिषद | ५०२ |
| समेटाची इतिश्री | ५०७ |
| आर्थिक महामंदी व कायदेभंग लढा | ५१० |
| जातीय राजकारण—मुस्लीम लीगचे राजकारण ; हिंदुमहासभेची वाढ | ५१४ |

## अनुक्रमणिका—चालू


| | पृष्ठ |
|---|---|
| **प्रकरण १३ : सविनय कायदेभंगाचे दुसरे सत्र—** | ५२१ |
| आंदोलन अपरिहार्य—समेटाचे प्रयत्न | ५२१ |
| प्रातःकालीन झडप | ५२९ |
| आर्थिक राष्ट्रवाद—बाँबे काँग्रेस बुलेटिन | ५३५ |
| आर्थिक नाकेबंदी | ५४० |
| सत्याग्रहींवर अत्याचार | ५४६ |
| महाराष्ट्र प्रांतिकची चळवळ | ५४७ |
| सोलापूर मार्शल लॉ | ५५७ |
| वऱ्हाड-मध्यप्रांतातील आंदोलन—वर्धा आघाडीवर ; वऱ्हाडचा सहभाग | ५६२ |
| सविनय कायदेभंगाची फलनिष्पत्ती | ५७० |
| लॉर्ड विलिंग्डनचे अंतरंग | ५७२ |
| **प्रकरण १४ : दलित मुक्तिआंदोलन—** | ५७७ |
| सवर्णांचे चळवळीस योगदान—श्रीधर टिळक व दलित चळवळ | ५७७ |
| महाडचा धर्मसंगर—मनुस्मृतीचे दहन | ५८६ |
| महार वतन विधेयक | ५९३ |
| मंदिरप्रवेशासाठी सत्याग्रह—वर्ध्यातील लक्ष्मीनारायण मंदिरप्रवेश ; अमरावतीचे अंबादेवी मंदिर ; पुण्यातील पर्वती मंदिर सत्याग्रह | ५९५ |
| काळाराम मंदिर सत्याग्रह | ६०१ |

## **अनुक्रमणिका**—चालू


| | |
|---|---|
| | पृष्ठ |
| गांधीप्रणीत अस्पृश्योद्धार—गांधीजींचा हरिजन दौरा | ६०७ |
| पंढरपूर मंदिर सत्याग्रह | ६१६ |
| येवला परिषदेतील घोषणा–धर्मान्तरास विरोध | ६१९ |
| दलित चळवळीतील कलह | ६२४ |
| महार रेजिमेंटची निर्मिती | ६२५ |
| आंबेडकरांना अधिकारप्राप्ती | ६२६ |
| वेठबिगारी मुक्ती चळवळ | ६२८ |
| ब्रिटिशांनी केली प्रतारणा | ६३१ |
| **प्रकरण १५ : डावपेचांबाबत मतभेद—** | ६३७ |
| जातीय निवाडा | ६३७ |
| महात्मा गांधींचे उपोषण | ६४० |
| गांधी-आंबेडकर पुणे करार | ६४२ |
| कायदेभंग आंदोलनात कोंडी | ६४५ |
| कारावासातील वैचारिक जडणघडण | ६४९ |
| काँग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना | ६५२ |
| लोकशाही स्वराज्य पक्ष | ६५४ |
| गांधी हत्येचा पुण्यातील प्रयत्न | ६५५ |
| मुंबईतील काँग्रेस अधिवेशन | ६५७ |
| गांधीजींची काँग्रेसमधून निवृत्ती | ६५९ |
| निवडणुकीसाठी हालचाली—प्रांतिक काँग्रेस समित्या | ६६३ |
| स्वातंत्र्य आंदोलनात सेवाग्राम | ६६५ |

## अनुक्रमणिका—चालू


पृष्ठ

फैजपूर काँग्रेस अधिवेशन—फैजपूरची फलश्रुती ६६७

स्वतंत्र मजूर पक्ष—क्रिप्सशी निराशाजनक भेट ६८०

अखिल भारतीय शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशन ६८४

**प्रकरण १६ : प्रांतिक स्वायत्तता व काँग्रेस मंत्रिमंडळे—** ६८९

नवीन संविधानास विरोध ६८९

प्रांतिक कायदेमंडळांची निवडणूक ६९१

नरिमन प्रकरण ६९५

आचारसंहिता ६९९

मुंबईचे काँग्रेस मंत्रिमंडळ—क्रांतिकारक व राजबंद्यांची मुक्ती ; कामगार विषयक धोरण ७०१

मध्यप्रांत-वऱ्हाडचे मंत्रिमंडळ ७१०

मुंबई इलाख्यातील दारूबंदी ७१५

सुभाषबाबूंचे मराठी अनुयायी ७१७

दुसरे महायुद्ध व काँग्रेस मंत्रिमंडळे—सुभाषचंद्र बोस निसटले ७१९

राष्ट्र सेवादल ७२६

**प्रकरण १७ : संस्थानी प्रजाजनांची चळवळ—** ७२९

ब्रिटिश साम्राज्याचे आधारस्तंभ ७२९

हैदराबादमधील सरंजामशाही ७३१

अंधारातील उजेडाची तिरीप—वऱ्हाड प्रकरण ; साहित्य संस्था व राजकीय परिषदा ७३४

महाराष्ट्र परिषद ७४१

## अनुक्रमणिका—चालू

| | |
|---|---|
| | पृष्ठ |
| हैदराबाद स्टेट कॉँग्रेसवर बंदी—सेनापती बापट सत्याग्रहात | ७४४ |
| स्टेट कॉँग्रेसचा सत्याग्रह | ७५३ |
| हिंदू निःशस्त्र प्रतिकार मंडळ | ७६१ |
| आर्यसमाजाचे आंदोलन | ७६२ |
| वंदे मातरम् आंदोलन | ७६७ |
| मराठवाड्यातील वैयक्तिक सत्याग्रह | ७७४ |
| निजाम—इंग्रज संबंध | ७७६ |
| कोल्हापुरातील चळवळ—इचलकरंजी प्रजासंघ | ७७७ |
| भोर संस्थानातील प्रजापरिषद | ७८२ |
| सांगली—मिरजमधील चळवळ | ७८३ |
| औंध व फलटण पुरोगामी | ७८५ |
| हैदराबाद स्टेट कॉँग्रेस बंधमुक्त | ७८८ |
| मराठवाड्यातील कम्युनिस्ट | ७९१ |
| **प्रकरण १८ : जनआंदोलनाकडे——** | ७९५ |
| महायुद्ध व नवीन राजनीती | ७९५ |
| मुस्लीम लीगचा द्विराष्ट्रवाद | ८०१ |
| हिंदुमहासभेची भूमिका | ८०५ |
| रॅडिकल डेमॉक्रॅटिक पक्षाचे धोरण | ८०६ |
| महायुद्धकालीन कम्युनिस्ट चळवळ | ८०७ |
| कम्युनिस्टांना नवा साक्षात्कार | ८१२ |
| वैयक्तिक सत्याग्रह | ८१९ |

## **अनुक्रमणिका**—चालू

पृष्ठ

धुमसता असंतोष व ढासळती स्थिती ८२७
निष्फळ क्रिप्स योजना ८३३
काँग्रेस समाजवाद्यांची पुण्यातील शिबिरे ८४२
'छोडो भारत' संकल्पनेचा उगम—मुंबईतील गोपनीय बैठक ८४६
मुंबईतील पूर्वतयारी ८५१

**प्रकरण १९ : छोडो भारत क्रांतिलढा—** ८५९

आंदोलनाचा संकल्प—व्हाइसरॉयशी संपर्क साधण्याचा प्रयत्न ८५९
आंदोलनाची पूर्वतयारी ८६४
ऐतिहासिक अधिवेशन—गांधीजींचे भाषण ८६७
पूर्वरचित सरकारी हल्ला—सरकारी अपप्रचार ; देशाबाहेर तडीपारीची योजना ; पुढाऱ्यांची धरपकड ८७७
मुंबईत क्रांतिलढा पेटला—लढ्यासाठी बारा कलमी योजना ; देवू गणपतचे हौतात्म्य ८८६
महाराष्ट्रातील पूर्वतयारी ८९७
पुण्यातील लढा—मिलिटरी डेपोंमधील घातपात ९००
प्रादेशिक घातपात केंद्र ९०९
सिनेमागृहांमधील बाँबस्फोट—कॅपिटॉल बाँब प्रकरण ; सरोष चित्रपटगृहातील बाँबस्फोट ९१२
इतर भागांमधील आंदोलन ९१९
आंदोलनातील समन्वय यंत्रणा ९२३
नंदुरबारचा लढा—सरकारी खजिन्याची लूट ९२४
रायगडमधील धाडसी लढा—महाडचे बंड ; भाई कोतवालांचे भूमिगत आंदोलन ९२७

## **अनुक्रमणिका**—चालू

| | पृष्ठ |
|---|---|
| पूर्व खानदेशातील आंदोलन | ९३५ |
| दहशतीचे अधिराज्य—शिक्षात्मक उपाययोजना | ९४१ |
| दहशतीचा मुकाबला व प्रत्युत्तर | ९४७ |
| **प्रकरण २० : क्रांतिलढ्याचा झंझावात—** | ९५३ |
| भूमिगत काँग्रेस रेडिओ—क्रियाशील कार्यकर्ते; रेडिओ स्टेशनचे गूढ ; पुन्हा काँग्रेस रेडिओ ; पुण्यातील काँग्रेस रेडिओ | ९५३ |
| जनआंदोलनास मुंबईचा प्रतिसाद | ९६१ |
| मुंबईतील सेंट्रल डिरेक्टोरेट—संघटनेचे प्रमुख पुढारी ; संघटनेचा शोध ; केंद्रीय संचालनालयाची कार्यपद्धती | ९६५ |
| गांधीजींचे तुरुंगातील उपोषण | ९७० |
| ऑगस्ट क्रांतीचा पहिला वर्धापन दिन | ९७५ |
| सातारा प्रतिसरकार—प्रतिसरकार स्थापन ; दरोडेखोरांचा बंदोबस्त ; प्रतिसरकारचे कार्य | ९७७ |
| संस्थानांमधील लढा—कोल्हापूर-सांगलीतील चळवळ ; औंध व फलटण | ९९५ |
| नागपुरातील तुंबळ लढा—राष्ट्रसंत तुकडोजी ; सरकारला शिकवला धडा | ९९९ |
| यावलीचा संग्राम | १००७ |
| काही नमुनेदार घटना | १००९ |
| वर्ध्याचे योगदान—आंदोलन पेटले | १०१२ |
| आष्टी व चिमूरची शोकांतिका—चिमूरमधील जुलूमशाही—जे. पी. भन्साळी यांचा अन्नसत्याग्रह | १०१७ |
| नालवाडी-पवनार आश्रम खटला | १०२८ |

## **अनुक्रमणिका**—चालू

| | पृष्ठ |
|---|---|
| **प्रकरण २१ : सत्तांतराची प्रक्रिया—** | १०३३ |
| बेचाळीसचे यश—राजकीय व आर्थिक कोंडी | १०३३ |
| महात्मा गांधी बंधमुक्त—काँग्रेस कार्यकारिणी बंधमुक्त ; सिमला परिषद | १०४२ |
| गांधी-जिना वाटाघाटी | १०४९ |
| मुंबई बंदरातील भयानक स्फोट | १०५० |
| काँग्रेसमधून कम्युनिस्टांची हकालपट्टी | १०५२ |
| मध्यवर्ती कायदेमंडळाची निवडणूक | १०५५ |
| आझाद हिंद फौजेवरील खटले | १०५७ |
| नाविक दलाचे बंड—मुंबईतील दंगल | १०५८ |
| ब्रिटिश कॅबिनेट मिशन | १०६३ |
| निवडणूक व प्रांतिक मंत्रिमंडळे—मुंबई प्रांत; वऱ्हाड-मध्यप्रांत | १०६४ |
| हैदराबाद स्टेट काँग्रेसचा स्वातंत्र्यसंग्राम—गोविंदराव पानसरे यांचा खून | १०७० |
| स्टेट काँग्रेस बंधमुक्त—ऐतिहासिक अधिवेशन | १०७४ |
| निजामाची दडपशाही—कायदेभंगाची चळवळ ; जंगल सत्याग्रह | १०७६ |
| भूमिगतांची सशस्त्र चळवळ | १०८१ |
| उमरी बँकेवरील कारवाई | १०८२ |
| स्थानिक लोकलढे | १०८५ |
| **ऑपरेशन पोलो** | १०८८ |
| **समारोप—स्वातंत्र्याचा आनंदोत्सव** | १०९१ |
| **संदर्भ ग्रंथ सूची** | १०९७ |
| **विषय व नाम सूची** | १११५ |

# अध्यक्षांचे निवेदन

सत्यनिष्ठ व परखड परंतु संयमशील अशी विचारसरणी असलेले इतिहासकार डॉ. चौधरी यांनी मंडळाच्या इतिहास मालिकेसाठी लिहिलेला हा 'आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास : खंड दुसरा' प्रकाशित करताना मला आनंद होत आहे. डॉ. चौधरींनी दिल्लीतील राष्ट्रीय अभिलेखागार व महाराष्ट्रातील सर्व अभिलेखागारांमधील ब्रिटिशांच्या दस्तऐवजांचा सखोल अभ्यास करून भारतीयत्व व राष्ट्रवादाच्या दृष्टिकोणातून सर्व महत्त्वाच्या घटनांचे व प्रसंगांचे वर्णन केले आहे. भारताचा स्वातंत्र्यलढा चिरडण्यासाठी इंग्रजांनी अवलंबिलेली 'डिव्हाइड अँड रूल ' राजनीती, निजाम वगैरे संस्थानिक व जातीय निहित हितसंबंधींचा इंग्रजांनी करून घेतलेला दुरूपयोग याचे मार्मिक विवेचन या ग्रंथात आहे. भारताला अत्यंत बिकट परिस्थितीत बलशाली साम्राज्यशहांशी लढा द्यावा लागला. काही वेळा स्वकीयांशीही संघर्ष करणे या देशाच्या नशिबी होते. अशा प्रकारचे विश्लेषण करताना डॉ. चौधरींनी चिकित्सकपणा बरोबरच संयम व पारदर्शकपणाही जपला आहे.

स्वातंत्र्य आंदोलनाबरोबरच या बृहत् ग्रंथात संपूर्ण महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास, समाजसुधारणा अभियान, शैक्षणिक विकास, सांस्कृतिक चळवळी आणि आर्थिक राष्ट्रवाद अशा विषयांना स्थान दिलेले आहे. सत्ताधाऱ्यांनी राजकीय प्रमाणेच आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक खच्चीकरण करून सर्व बाजूंनी शोषण केले हे लेखकाने दाखवून दिले आहे. सरकारी शोषणाचा मुकाबला करण्यासाठीच १९३० च्या स्वातंत्र्य आंदोलनात गांधीजींनी केलेल्या अकरा मागण्यांपैकी आठ आर्थिक मागण्या होत्या, हे लेखकाने दाखवून दिले आहे. ग्रंथाचे लेखक इतिहासकार तर आहेतच, पण शिवाय अर्थशास्त्रात एम. ए. आहेत. या ग्रंथात त्यांच्या मनातील संगीत व कलाप्रेम व्यक्त झाल्याशिवाय राहिले नाही.

डॉ. के. के. चौधरी प्रदीर्घ काळ महाराष्ट्र शासनाच्या गॅझेटिअर विभागाचे प्रमुख राहिलेले संशोधक वृत्तीचे इतिहासकार आहेत. राष्ट्रीय अभिलेखागार आणि

महाराष्ट्र शासन अभिलेखागारांचे ते जाणकार आहेत. त्यामुळे आधुनिक महाराष्ट्राचा या दर्जाचा इतिहास लिहिणे त्यांना शक्य झाले. अशा या महत्त्वाच्या इतिहास ग्रंथाचे प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ करीत आहे, याचा आम्हाला आनंद आहे. या बृहत् इतिहास प्रकल्पातील खंड पहिला आम्ही यापूर्वीच प्रकाशित केलेला असून सर्व शासकीय ग्रंथ भांडारांमध्ये उपलब्ध आहे.

**बाबा भांड**

अध्यक्ष

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

२९ नोव्हेंबर २०१७

# लेखकाचे मनोगत

मुंबईला राष्ट्रवादी जाणिवांची प्रदीर्घ परंपरा असून इथे लोकशाहीवादी विचारसरणीचे केंद्रक होते. आधी गोखले-फिरोजशहांनी देशाचे नेतृत्व केले होते. इथे राष्ट्रीय काँग्रेस ही एक जिवंत वस्तुस्थिती होती. १९१९-२० पासूनही कलोनिअल राजवटीविरुद्धचा लढा येथूनच उभारला गेला. हिंदुस्तानभरच्या आंदोलनासाठी मुख्यतः मुंबई शहरानेच प्रचंड निधी पुरविला. तथापि आंदोलनातील सैनिक केवळ याच भूमीतले नव्हते. ते अखिल भारतातील होते. या ग्रंथात महाराष्ट्र केंद्रबिंदू असला, तरी हा अखंड हिंदुस्तानचा इतिहास होय. या दृष्टिकोणातून या इतिहासाकडे पहावे.

१८५७ च्या विद्रोहानंतर प्रथमच राष्ट्रव्यापी असा झालेला रौलट सत्याग्रह व असहकार चळवळीचे मुख्यालय मुंबईत होते. तसेच कायदेभंग लढा व छोडो भारत क्रांतिलढ्याचा प्रारंभच नव्हे, तर देशभरचे सूत्र संचालन व नियमन मुंबईतूनच करण्यात आले. मुंबई इलाख्याचा मुत्सद्दी व अभ्यासू गव्हर्नर रॉजर लम्ले याने महात्माजींचा येथील राजकीय प्रभाव व लोकप्रियतेविषयी व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांना सुनावले होते की, " Here, Gandhi is a religion to very large numbers of people and ordinary standards of logic and religion cannot be applied, where he is concerned. "

बोल्शेविक राज्यक्रांतीच्या भयाने घेरल्यामुळे ब्रिटिशांना तेव्हा गांधीजी आणि पंजाब-बंगालमधील गधर व युगांतर क्रांतिकारकांचे अवास्तव भय वाटे. भयगंडातूनच त्यांनी जालियनवाला बाग हत्याकांड केले. त्याच्या निषेधासाठी गांधीजींनी असहकार चळवळ केली. तिच्यातूनच पुढील राष्ट्रीय आंदोलनाची दिशा ठरली. त्यातून चित्तरंजन दास, मोतीलाल नेहरू, जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल, राजेंद्र प्रसाद, मौलाना आझाद इ. नेते उदयास आले. तसेच सुभाषबाबू, शंकरराव देव, युसुफ मेहेरअली, डांगे, जोगळेकर, घाटे, नरेंद्र देव यांचा उदय झाला. सरकारी शिक्षणसंस्थांचा निषेध करून राष्ट्रीय शिक्षणसंस्था व विद्यापीठे स्थापन करण्यात आली.

चरित्रकाराला असलेले स्वातंत्र्य इतिहासकाराला नसते. इतिहास सत्य, वस्तुनिष्ठ व पारदर्शक असावा लागतो. तो दस्तऐवजांवर आधारित असणे आवश्यक असते. म्हणून सत्यनिष्ठ व दस्तऐवजांवर आधारलेले काही लेखन अप्रिय वाटण्याची शक्यता असते. मात्र राजकीय, सामाजिक व आर्थिक आंदोलनांचा इतिहास लिहिताना दस्तऐवजांच्या आधारानेच मी संतुलन केलेले आहे. विविध घटना, वादविवाद व संबंधित अभिजनांचे संघर्ष आणि त्यांचे योगदान स्पष्टपणे सांगून त्याचे मी मूल्यमापनही केलेले आहे. कारण इतिहास, अर्थकारण आणि त्यापेक्षा महत्त्वाचे राष्ट्रहित हे निकष लावणे मला आवश्यक वाटले. हेच पहा ना. महात्मा गांधींच्या प्रभावामुळे टिळकांचे नेतृत्व व मोठेपणा ढासळून पडेल, अशा भावनेतून गांधीजींना व त्यांच्या राष्ट्रीय चळवळीला उघड अथवा छुपा विरोध करणारा एक वर्ग महाराष्ट्रात होता. त्याचे दुष्परिणाम कसे झाले याचा परामर्श इतिहासकार या नात्याने घ्यावाच लागला.

त्यागी आणि खऱ्या अर्थाने क्रांतिकारक असलेले सेनापती बापट, शंकरराव देव, युसुफ मेहेरअली, खुर्शिद नौरोजी, विनायकराव भुस्कुटे यांना प्रकाशित साहित्यात पुरेसा न्याय दिलेला आढळला नाही. म्हणून ब्रिटिशांच्या दस्तऐवजांच्या आधारे या ग्रंथात मी त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. माझे मित्र य. दि. फडके यांचे बापट चरित्र मात्र वाचायला मिळाले.

छोडो भारत क्रांतिलढ्याच्या यशाचा पाया सविनय कायदेभंग जनआंदोलनाने रचला होता. पेशावरपासून चितगावपर्यंत व कन्याकुमारीपर्यंत यशस्वी झालेल्या कायदेभंग आंदोलनामुळे व्हाइसरॉय आयर्विनला गांधीजींशी समानतेच्या पातळीवरून व विनम्रपणे वाटाघाटी कराव्या लागल्या (१९३१). म्हणून चर्चिलचे माथे भडकले होते. वस्तुतः चर्चिल महोदय गांधीजी यांच्या लुंगीविषयी बोलण्याइतके व्हल्गर अथवा ग्राम्य नव्हते. तथापि चर्चिल महाशयांना पंचाधारी गांधीजींनी उभारलेल्या देशव्यापी आंदोलनाचे यश विव्हळ करत होते. हिंदुस्तानला लवकरच स्वातंत्र्य द्यावे लागेल याचे त्यांना मनस्वी दुःख वाटले. म्हणून त्यांनी 'नेकेड फकीर' असे तिरस्काराने म्हटले होते.

भारताच्या राज्यघटनेत नमूद केलेले नागरिकांचे मूलभूत हक्क व शासकीय धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे हे सर्व १९३१ च्या कराची काँग्रेसनेच विहित केलेले होते.

मंदिर प्रवेशासाठी डॉ. आंबेडकरांनी, काही काँग्रेसजनांसह, नाशिकच्या काळाराम मंदिराभोवती सतत तीन वर्षे सत्याग्रह केला. तथापि तीन वर्षानंतरही काळारामची दारे व कर्मठ हिंदू मने उघडली नाहीत. साहजिकच त्यांनी मंदिरांचा नाद सोडला. यामुळे व्यथित झालेल्या गांधीजींनी, राजकारणाकडे दुर्लक्ष करून, भारतभरच्या अस्पृश्यांना मंदिरांमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी तब्बल २०,००० किलोमीटरचा **हरिजन दौरा** केला. या मॅरॅथॉन पदयात्रेत महात्माजींनी गुरुवायुर, तिरुपती, पद्‌मनाभम्, मीनाक्षी, कन्याकुमारी, तिरुअनंतपुरम् अशी कित्येक मोठमोठी मंदिरे हरिजनांसाठी बंधमुक्त केली. त्या काळी ही महान उपलब्धी होती. पंढरपूरचा विठोबा राहिला. त्याला साने गुरुजींनी मुक्त केले.

व्यक्तिगत सत्याग्रह खरेतर छोडो भारतचा पूर्वरंग ! महात्मा गांधींनी या सत्याग्रहातील यश तसेच काकिनाडा, विशाखापटण्म्, कोलंबोवरील जपानी बाँबहल्ले यामुळे छोडो भारत लढ्याचा निर्णय घेतला. शिवाय संभाव्य जपानी आक्रमणामुळे पूर्व भारताकडून पश्चिमेकडे माघार घेण्याची जन. मोल्सवर्थची दग्धभू योजना गांधीजींच्या हातात पडताच, त्यांनी ब्रिटिशांना भारतातून 'चालते व्हा' असे फर्मावण्याचा अविचल निर्धार केला. काँग्रेस अध्यक्ष मौलाना आझाद, जवाहरलाल नेहरू, राजाजी वगैरे दोलायमान मनःस्थितीत असताना त्यांनी हा निर्धार केलेला होता. मुंबईतील अगदी गुप्त बैठकीत प्रथम सरदार पटेल, युसुफ मेहेरअली, खेर, मोरारजी देसाई, स. का. पाटील, द. ना. वांद्रेकर इत्यादींना गांधीजींनी आपला अपरिवर्तनीय निर्धार सांगितला— "आताच्या हतवीर्य अवस्थेपेक्षा अराजक बरे !" ........... " I say leave India to God .... Therefore I say leave India to anarchy. We shall have to face it ..... I am prepared to take any great or grave risk. "

ज्या अति गोपनीय सरकारी फायलीतून मी हा मजकूर मिळविला, ती फाईल दुसऱ्या एकाही इतिहास अभ्यासकाने पाहिलेली नव्हती. अशा कित्येक फायली न पाहिल्यामुळे इतिहासात खूपच उणीवा राहिलेल्या आढळतात.

१९४२ साली ब्रिटिशांची कलोनिअल राजनीती नवी नव्हती. बॅ. जिनांचा द्विराष्ट्रवाद नवा नव्हता. त्यांना पंतप्रधान पदाची ऑफरही मान्य नव्हती. काँग्रेसची स्वातंत्र्याची मागणीही नवी नव्हती. मात्र गांधीजी व अनुयायांनी बजावलेली स्वातंत्र्याची निकड, अफाट उत्कटता व ताकद नवी होती. त्यांनी भारतीयांना स्पष्ट बजावले की, आता आपण गप्प राहिलो, तर सत्ताधीश शिरजोर होतील व आमच्या मागणीचा विचारच करणार नाहीत. लगेच देशाचा पूर्व किनारा व पूर्व हिंदुस्तानातील युद्धविषयक परिस्थितीचे सर्वेक्षण करण्यासाठी त्यांनी पाच निकटवर्तीयांना पाठविले. आंदोलनासाठी काँग्रेस समाजवादी आधीपासूनच आतूर होते.

काँग्रेस कार्यकारिणीच्या वर्धा बैठकीत प्रदीर्घ चर्चा होऊन छोडो भारतचा ठराव झाला व तोच मुंबईत जाहीर झाला. गांधीजींचे पुढील शब्दच लोकांच्या काना-मनात निनादत होते.—“ Do or Die. I would prefer anarchy to the present slavery ...... This is an open rebellion of a non-violent character. ”

छोडो भारतवर अनेकांनी पुस्तके लिहिली होती. पण माझा **क्विट इंडिया रिव्हॉल्युशन** (४४० पाने) हा ग्रंथ प्रकाशित होईपर्यंत देशातील कोणीही या ‘क्रांतिलढ्याचे केंद्रीय सूत्रसंचालन’ या विलक्षण महत्त्वाच्या अंगाबद्दल लिहिले नव्हते. मुंबईत केंद्रीत असलेल्या या यंत्रणेस भारताच्या इतिहासात दुसरे उदाहरण नाही. तरीही याबाबत कोणी लिहिलेले दिसत नाही. अभ्यासकांनी ध्यानात ठेवावे की, क्रांतिकारकांनी मुंबईतून उभारलेल्या डिरेक्टोरेटने येथून संपूर्ण देशभर अधिकृत आदेश, निधी व मार्गदर्शन यंत्रणा १९४४ पर्यंत चालवली होती. यामुळेच लढा इतका काळ चालू राहिला. सरकारला याचा दाट संशय होता. मात्र गुप्तचरांना कधीच शोध लागला नाही. याविषयीच्या कित्येक फायली

दिल्लीतील राष्ट्रीय अभिलेखागारात आहेतच. त्या पाहिल्याशिवाय या क्रांतिलढ्याचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. विशेष असे की, डिसेंबर १९४५ मध्ये नेहरू वगैरे नेते बंधमुक्त होईपर्यंत त्यांनाही ही यंत्रणा माहीत नव्हती. मात्र या यंत्रणेतील नेत्या अरुणा असफ अली व सुचेता कृपलानी गांधीजींना तुरुंगात भेटल्या होत्या.

हा इतिहास लिहिताना मी सत्यनिष्ठा, तटस्थता व पारदर्शकता जपण्याचा प्रयत्न केलेला आहे. कलोनिअल सरकारचे दस्तऐवज वापरताना अंमलदारांची अरेरावी व गैरसमज यांबाबत काळजी घेतली आहे. सरकारी अहवालांमधील निरीक्षणे चरित्र वाङ्मय व देशी साधनसामग्रीच्या आधारे तपासून घेतली. इंग्रजीतील मजकुराचे मराठीकरण करताना अर्थहानी टाळण्यासाठी मूळ मजकूरच दिला आहे. अलीकडे इतिहास लेखनशास्त्रात नवीन परिभाषा वापरली जाते. मी ती वापरली आहे.

छोडो भारत आंदोलन काळात सुभाषचंद्र बोस यांनी जर्मन व नंतर जपानी रेडिओवरून स्वातंत्र्य आंदोलनास उत्तेजन दिले हे खरे. तसेच त्यांनी हिंदुस्तानात आपले अनेक दूत पाठविले असेही दिसते. तथापि त्या दूतांनी काँग्रेस नेते अथवा सेंट्रल डिरेक्टोरेटच्या एकाही नेत्याशी संपर्क साधला नाही. जयप्रकाश नारायण वा लोहियांशी देखील नाही. याचे मला आश्चर्य वाटते.

या इतिहासासाठी मी नवी दिल्लीतील राष्ट्रीय अभिलेखागार व महाराष्ट्र शासनाच्या तिन्ही अभिलेखागारांमधील दस्तऐवजांचा पुरेपूर उपयोग केलेला आहे. त्यापेक्षाही महत्त्वाचे मुंबई पोलीस कमिशनरच्या संग्रहातील गुप्तचरांचे अहवाल, दैनिक व पाक्षिक पोलीस अहवाल उपलब्ध झाल्याने मला इतिहासात मौलिक भर टाकणे शक्य झाले. काँग्रेसच्या सिक्रेट रेडिओवरील प्रसारणांची टिपणे देखील लाभली. मात्र पोलीस ॲबस्ट्रॅक्ट ऑफ इंटेलिजंसचा उपयोग करताना सत्यांशाच्या दृष्टीने पुरेशी खबरदारी घ्यावी लागली. यातील बरेच दस्तऐवज बहुसंख्य लेखकांना दुर्लभ आहेत. बरेच अप्रकाशित अस्सल कागदपत्र माझ्या संग्रही असल्याने मला इतिहासाच्या ज्ञानात मौलिक योगदान देणे शक्य होत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या गॅझेटिअर विभागाचा प्रमुख व त्यातील ३८ वर्षांच्या कार्यकालात या भूमीचा इतिहास, समाज व अर्थव्यवस्थेवर मी गॅझेटिअरांसाठी हजारो पाने लिहिली होती. त्याव्यतिरिक्त मी सोर्स मटेरिअल फॉर हिस्टरी ऑफ फ्रीडम मुव्हमेंट या मालिकेतील तीन खंड काढले होते. त्या अभ्यासाचा व अनुभवाचा ठेवा माझ्याकडे आहेच. त्या प्रदीर्घ विद्याव्यासंगातून व आधारसाहित्यातून उपजलेला हा इतिहास ग्रंथ, पहिल्या ग्रंथाप्रमाणेच, उपयुक्त ठरेल असा मी विश्वास बाळगतो. इथे स्पष्ट करतो की, माझी कोणत्याही राजकीय पक्षाशी अथवा पंथाशी वैचारिक बांधिलकी नाही. माझे आधीचे लेखनही अशाच भूमिकेतून झालेले आहे.

हा बृहत् इतिहास प्रकल्प फलद्रुप करण्यासाठी मला साक्षेपी इतिहास संशोधक व प्रतिथयश लेखक व मुंबई विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे माजी प्रमुख प्रा.डॉ. अरविंद गणाचारी यांनी मोलाची मदत केलेली आहे. माझे हस्तलिखित बारकाईने वाचून त्यांनी मला चांगल्या सूचना देऊन उपकृत करून ठेवले आहे. त्यांचा मी आभारी आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष श्री. बाबा भांड यांनी मला वेळोवेळी मदत केली व माझ्या सर्व सूचनाही स्वीकारल्या. त्यासाठी मी त्यांचा आभारी आहे. तसेच मंडळाच्या सचिव मीनाक्षी पाटील यांनी माझ्याशी सदैव सहकार्य करून मदत केल्याबद्दल त्यांचे आभार मानतो. तसेच या ग्रंथाची सुबक, सुंदर व दर्जेदार छपाई आणि टिकाऊ बांधणी करून घेतली म्हणून मी श्री. प. ज. गोसावी, संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, तसेच श्री. रूपेंद्र मोरे, व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई आणि त्यांचे सर्व सहकारी यांचेही मनोभावे आभार मानतो.

२६ जानेवारी २०१८ **डॉ. के. के. चौधरी**

नील सागर, बांद्रा रेक्लमेशन,
बांद्रा (पश्चिम), मुंबई-४०००५०,
दूरध्वनी-०२२-२६५११२९३.

प्रकरण १

# सत्याग्रह पर्व

## नवीन युगाचा उदय

**टिळक पर्वाचा अस्त आणि गांधी युगाचा उदय** ही भारताच्या इतिहासातील एकसमयावच्छेदी महान घटना होय. मुंबईच्या एका रस्त्यावरून लोकमान्यांची अंत्ययात्रा जाते, आणि त्याचवेळी नजीकच्या रस्त्यावरून नवोदित व महत्तम राष्ट्रीय नेत्याची स्वातंत्र्यप्राप्तीसाठी निर्धार करणारी मिरवणूक येते! दोघांमध्ये ना संघर्ष ना विचारविनिमय! हा नियतीचा विस्मयकारक संकेत असावा! जगाच्या इतिहासात दुसरे असे उदाहरण आम्हास माहीत नाही. गांधीजी व टिळकांना एकमेकांची बलस्थाने, आत्मसमर्पणभाव, ध्येयवाद, राष्ट्रभक्ती याविषयी आदरभाव वाटतच होता. बलस्थानांबरोबरच आपापल्या मर्यादा व दोषांचेही दोघांना भान होते. आपापली विचारप्रणाली व रणनीती भिन्न असल्याची दोघांनाही चांगली जाण होती. रौलट विधेयकांच्या रूपाने आलेले संकट व कलोनिअल राजसत्तेने अंगीकारलेले दडपशाहीचे धोरण व नादिरशाहीचा प्रतिकार करण्यासाठी काँग्रेस पक्ष पुरता हतबल आणि अगतिक झालेला आहे, हे टिळकांनीही ओळखले होते. त्याबरोबरच महात्मा गांधींची सुप्त शक्ती व बलस्थाने टिळकांनी पूर्णपणे ओळखली होती. अशी सर्व वस्तुस्थिती कृ. प्र. खाडिलकरांना सांगून टिळक १९२० मध्ये हिंदुस्तानातून बाहेर निघून जाण्याचाही विचार करीत होते. त्या टिळक-खाडिलकर मुलाखतीचे ऐतिहासिक महत्त्व फार मोठे आहे.[१]

जून १९१९ पर्यंत महात्मा गांधी राष्ट्रवादी राजकारणाच्या रंगमंचावरील एक परिवीक्षाधीन (प्रोबेशनरी) राजकारणी होते. ते स्वतःहून परिसीमेवर राहूनच काँग्रेसचे काम करीत. मात्र अत्यंत सुनिश्चित ध्येयधारणा समोर ठेवून त्यांनी चंपारण, खेडा, अहमदाबादेत सत्याग्रह करून अन्याय व अत्याचारांविरुद्ध यशस्वी आंदोलन केले होते. वस्तुतः गांधीजींना ना राजकीय महत्त्वाकांक्षा ना कोणत्याही पदाची लालसा ! अच्युत बळवंत कोल्हटकर या विचारवंत लेखकाने

म्हटल्याप्रमाणे गांधीजींना 'लोकमान्यता' देखील नको वाटे, कारण तीही एक शृंखलाच! गांधीजींनी गोपाळ कृष्ण गोखलेंना आपले गुरु मानले. तथापि गोखलेंच्या अनुयायांनी गांधींना त्यांच्या सर्व्हन्ट्स ऑफ इंडिया सोसायटीचे सदस्य करण्यासही नकार दिला होता. म्हणून गांधींनी आपला अर्ज मागे घेतला. पण त्यांनी सोसायटीच्या कार्यासाठी सदैव मदत केली. सदस्य न होता! असो.

इथे मुद्दा असा की. नामदार गोखलेंचे अनुयायीच काय पण तथाकथित जहाल पंथाचे काँग्रेसजनदेखील गांधीजींचे सत्याग्रहाचे तंत्र स्वीकारण्यास तयार नव्हते. खरे तर समर्थ नव्हते. टिळक रौलट विधेयकांवर धारदार टीका करीत, हे सत्य! तथापि त्यांनी हयातभर कोणत्याच कायद्याचा कधीच भंग केला नव्हता. कायदेभंग लढा उभारला नव्हता. भारतात रौलट प्रकरण धुमसत असताना, टिळक चिरोलवरील खटल्यात पराभूत झाल्यावरही, इंग्लंडमध्येच कालापव्यय करीत होते. तिथे टिळक मजूर पक्षाशी मैत्री जमविण्याचे 'प्रयत्न' करीत होते. तथापि तो पक्ष निवडणुकीत पराभूत झाला. आणि ते प्रयत्न वाया गेले. मजूर पक्ष भारताचा मित्र झाला नाही.

स्वतः काँग्रेस अध्यक्ष पं. मदन मोहन मालवीय तर राजकीय आंदोलनाबाबत मवाळ! त्यांनी आंदोलनाचा सल्ला देण्याची शक्यताच नव्हती. बॅ. महंमद अली जिनांचा रौलट विधेयकांना सक्त विरोध होता. तथापि कोणत्याही प्रश्नावर इंग्रजांविरुद्ध लढा देण्यास ते कधीच तयार झाले नाहीत. एरव्ही गर्जना करणारे टिळक रौलटच्या आणीबाणी प्रसंगी परत आले नाहीत, याविषयी शंकरराव देवांनी खंत व्यक्त केली होती. काँग्रेसचे अध्यक्षपद उपभोगलेल्या (१९१७) तसेच होमरूल लीगच्या संस्थापक व पुढारी म्हणून मिरवलेल्या ॲनी बेझंट यांनी गांधीजी-लिखित सत्याग्रह प्रतिज्ञापत्रावर सही करून मोठेपणा मिळवला. तथापि लवकरच या आयरिश महिलेने महात्मा गांधींची प्रतारणा केली. बेझंट यांनी रौलट सत्याग्रहास उघडपणे विरोध केला.

रौलट उपाख्यान व प्रस्तावित 'डायार्की' म्हणजे द्विदल राज्यपद्धती आसमंतात असताना व नंतरही प्रस्थापित काँग्रेस नेतृत्व कमालीचे हतबल आणि अगतिक झालेले होते. या दोन प्रकरणांमुळे भारतीय राजकारण्यांचा विसकळीतपणा, बोलघेवडेपणा व पोकळपणा तसेच हतबलता उघड झाली. नेते शाब्दिक निषेध करीत. लेख लिहीत. न्यायालयांमध्ये प्रदीर्घ भाषणे करीत. काही राजकारणी कलोनिअल राजनीतीवर टीका करू लागले. तर लिबरल मतवादी पुढारी ब्रिटिशांशी सहमती घडवून आणून सत्तेमध्ये सहभाग मिळवता येईल, अशी आशा बाळगून होते. पण रौलट प्रकरण, काँग्रेसची भूमिका व गांधीजींचा सत्याग्रहाचा निर्धार पाहून मवाळ मतवादी नेते भारतीय काँग्रेस पक्षातून बाहेर पडले. त्यांनी 'ऑल इंडिया लिबरल फेडरेशन' नामक राजकीय पक्ष काढला. त्यात बॅ. मुकुंदराव रामराव जयकर हे मराठी पुढारी होते. तथापि अतिशिक्षितांच्या या पक्षास जनमानसात स्थान नव्हते. बॅ. जिनांनी म्हटल्याप्रमाणे " या पक्षात सर्वच जण सेनापती, पण एकही सैनिक नव्हता ". असो. पण हा पक्ष काँग्रेसपासून परागंदा झाला. संस्थानिकांचा कॉम्प्रेडोर वर्ग म्हणजे आधारस्तंभाचा वर्गही कलोनिअल सत्ताधीशांच्या अधिकच निकट गेला. चेंबर ऑफ प्रिंसेस ही त्यांची संघटना ब्रिटिशधार्जिणी बनली.

रौलट प्रकरणी भारतीय राजकारण्यांच्या एकमताचे अक्षरशः विघटन झाले. लक्तरे झाली. त्यांचे राजकारण किती उथळ व मर्यादित स्वरूपाचे आणि दरिद्री आहे, हे उघड झाले. त्यांनी मानलेली गृहीते किती फोल ठरली, यामुळे ते चक्रावून गेले. कलोनिअल सत्ताधीश अविचल राहिल्यामुळे भारतीय नेत्यांना कोणताच तरणोपाय नव्हता. ते अक्षरशः किंकर्तव्यमूढ झाले. कायदेमंडळात व जाहीर सभांमधील निषेध व टीका व्यर्थ ठरली. पंजाबी गधर क्रांतिकारक व बंगालमधील युगांतर पक्षाच्या लढाऊ युवकांमध्येही हिंसाचाराने ब्रिटिशांचा प्रतिकार करण्याची ताकद उरलेली नव्हती. अशा परिस्थितीत भारतीय राजकारणी अगदी हतबल, अगतिक आणि किंकर्तव्यमूढ झालेले होते.

अशा बिकट समयी, संकट समयी महात्मा गांधींनी भारतीय पुढाऱ्यांपुढे नवीन मार्ग व अभिनव पर्याय ठेवला— **'सत्याग्रह'!** मात्र गांधीजींची 'सत्याग्रहाची रणनीती व आचारसंहिता' पेलणे काँग्रेसला शक्य वाटले नव्हते. काँग्रेस अथवा कोणत्याच पक्षात तितकी ताकद नव्हती. तथापि सरकारी अन्यायांचा प्रतिकार करण्याच्या ठाम विचाराने पेटलेले गांधीजी कलोनिअल सत्ताधीशांपुढे झुकण्यास अजिबात तयार नव्हते. तसेच गांधीजी काँग्रेसचे किंवा टिळकांचे मतपरिवर्तन करण्यासाठी थांबण्यासही तयार नव्हते. महात्म्याने काँग्रेसच्या साध्या समर्थनाचीही अपेक्षा न ठेवता अगदी स्वबळावर सत्याग्रह लढा उभारला. या लढ्याचे विरोधक असलेल्या श्रीनिवास शास्त्रींना गांधीजींनी आधीच बजावले, " I can no longer render peaceful obedience to the laws of a power that is capable of such a piece of devilish legislation as these two Bills."[२] या सत्याग्रहाचे दुसरे विरोधक व काँग्रेसचे मोठे पुढारी दिनशा वाच्छा यांना गांधीजींनी आपल्या कर्तव्याची जाणीव करून देताना म्हटले, " I think the growing generation will not be satisfied with petitions, etc. We must give them something effective. Satyagraha is the only way, it seems to me, to stop terrorism. "[३]

आपल्या संकल्पित चळवळीचे तर्कशास्त्र स्पष्ट करताना गांधीजी म्हणाले, " रौलट विधेयके हा केवळ अन्याय नसून, हा प्रच्छन्न आणि निर्धारपूर्वक अशा दडपशाही राजनीतीचा पुरावा होय ". अशा कलोनिअल दडपशाहीच्या प्रतिकारासाठी फक्त प्रासंगिक निषेध पुरेसा नाही. सद्यःकालीन अधिकारशाहीशी झुंज देण्याची क्षमता व इच्छाशक्ती प्रस्थापित काँग्रेस नेतृत्वामध्ये नाही, अशी गांधीजींची मनोमन खात्री पटली होती. प्रस्थापितांशी साधलेल्या संपर्कातून त्यांना जाणवले-—ही मंडळी विसकळीत, अगतिक व हतबल झालेली आहे. पण प्रस्थापित नेते गांधीजींची सत्याग्रहाची रणनीती स्वीकारण्यास मुळातच तयार नव्हते. काही नेते उदासीन, तर काही कुंपणावर उभे होते. काही काँग्रेस नेत्यांनी सत्याग्रहामुळे हिंसाचार माजेल अशी भीती घातली, तर काही पुढाऱ्यांनी महात्मा गांधींची चव्हाट्यावर टिंगल-टवाळी केली. या प्रवर्गामध्ये मुंबईबाहेरच्या महाराष्ट्रातील नेतेही होते.

प्राप्त परिस्थितीत गांधीजी कलोनिअल सत्ताधीशांच्या झोटिंगशाहीपुढे झुकण्यास अथवा तडजोड करण्यास अजिबात तयार नव्हते. तद्वतच ३५ वर्षांच्या झालेल्या अखिल भारतीय काँग्रेस पक्षाच्या सहमतीची अथवा मदतीची प्रतीक्षा न करता महात्मा गांधींनी स्वबळावर 'रौलट सत्याग्रह लढा ' उभारला. **त्याच दिवशी हिंदुस्तानच्या इतिहासात गांधी युगाची पहाट झाली.**

इतिहासाच्या अभ्यासकांनी ध्यानात ठेवावे की, पैशांचा अभाव व अत्यंत मर्यादित संघटनकार्यातून उपजलेला एप्रिल १९१९ चा रौलट सत्याग्रह हा १८५७ च्या विद्रोहानंतरचा सर्वात मोठा लढा होता. दरम्यानच्या कोणत्याही चळवळीपेक्षा १९१९ चा लढा अधिक गाजला. दरम्यानच्या चळवळींपेक्षा हे आंदोलन अधिक तीव्र व परिणामकारक ठरले, हे निर्विवाद होय.

ब्रिटिशांनी रौलट सत्याग्रहाचा प्रतिकार केला तो भयंकर भयगंडातून! कलोनिअल सत्ताधीशांना रशियातील बोल्शेविक राज्यक्रांतीच्या भयाने पछाडले होते. १९१८-१९१९ पासूनच्या सरकारी अहवालांमध्ये बोल्शेविक विचारसरणीचे संदर्भ आढळतात, हे अभ्यासकांनी ध्यानात ठेवावे. चमत्कारिक असे की, गांधीजी व चित्तरंजन दास यांच्यावर बोल्शेविक विचारसरणीचा प्रभाव आहे, असा एका इंग्रजाने 'शोध लावला.' ५ मे १९१८ च्या टिपणीत मुंबईचा गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन याने गांधीजींचे वर्णन पुढील शब्दांत केले होते. " Honest, but a Bolshevik and for that reason very dangerous ".

महात्मा गांधी अनेक कारणांसाठी रौलट विधेयकांविरुद्ध संघर्ष करीत होते. त्यांचा युक्तिवाद होता की, व्हाइसरॉयला वटहुकुमांद्वारे अनेक प्रकारचे अतिरिक्त अधिकार व आणीबाणीकालीन विशेषाधिकार प्राप्त होत असतात. अशा प्रकारचे अमर्याद विशेषाधिकार असताना आणखी अतिरिक्त अशा रौलट विधेयकांची आवश्यकता काय? असा गांधीजींचा सरळ सवाल होता. त्यांनी सरकारवर रास्त आरोप केला— काल्पनिक अशा संभाव्य धोक्याचे विनाकारण निमित्त करून विधेयके पास करण्यात येत आहेत. संभाव्य धोक्यापेक्षा त्यावरील उपाययोजना महाभयंकर दडपशाहीची आहे, असे त्यांनी सरकारला बजावले. शिवाय

दडपशाहीच्या तरतुदींपेक्षाही ज्या झोटिंगशाही पद्धतीने लोकमत पायाखाली तुडवून ती विधेयके या देशावर लादली जात होती, ती ब्रिटिश अरेरावी गांधीजींना कमालीची आक्षेपार्ह वाटली. आपली अशी भूमिका गांधीजींनी नंतर हंटर कमिशनलाही सांगितली, आणि तिला **'बॉंबे क्रॉनिकल'** पत्रकाने २० जानेवारी १९२० च्या अंकात उचित प्रसिद्धी दिली. गांधीजींनी सत्याग्रहाची निकड व कार्यपद्धतीचा सर्वशक्तीनिशी प्रचार केला.

## सरकारचे आत्मसमर्थन

पहिले महायुद्ध समाप्त झाल्यावर डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्ट सर्वथा असमर्थनीय ठरल्यामुळे, कलोनिअल सत्ताधीशांना दडपशाहीचे अधिकार गमावण्याची भीती वाटत होती. म्हणून व्यपगत झालेल्या महायुद्धकालीन दडपशाहीच्या उपाययोजनांचे भिन्न स्वरूपात पुनरुज्जीवन करावे, असा तगादा मुंबई इलाख्याचे गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन, मद्रासचे पेटलंड व बंगालचे लॉर्ड रोनाल्डशे तसेच पंजाबचे मायकल ओडवायर यांनी व्हाइसरॉयकडे लावला होता. या चार गव्हर्नरांचा युक्तिवाद (खरे तर अतिशयोक्त) असा होता की, 'युगांतर व गधर क्रांतिकारकांच्या कारवायांमुळे सरकारला धोका संभवतो. म्हणून त्या क्रांतिकारकांचा बीमोड करण्यासाठी तसेच जहाल काँग्रेस युवकांना वठणीवर आणण्यासाठी खास कायदे करणे आवश्यकच आहे.' विशेष म्हणजे व्हाइसरॉय लॉर्ड चेम्सफर्ड यांनाही या युध्यमान गव्हर्नरांची आणि सनदी नोकरशाहीची ही मागणी पटली होती.

त्यानुसार व्हाइसरॉय महोदयांनी क्रांतिकारक व जहाल काँग्रेस युवकांना वठणीवर आणण्यासाठी प्रभावी कायदे करण्याची मागणी भारतमंत्री एडविन एस. मॉंटेग्यू यांच्याकडे केली. चेम्सफर्ड यांचा युक्तिवाद पाहा :—वायव्य सरहद्द प्रांतात कमालीची स्फोटक परिस्थिती असून पंजाब व बंगालमधील क्रांतिकारक त्या राज्यांमध्ये भयंकर अराजक माजवतील. संभाव्य अराजक टाळण्यासाठी आणि उठाव अथवा क्रांतिकारकांचा बीमोड करण्यासाठी विशेषाधिकार देणारे कायदे विनाविलंब करणे आवश्यक होय, असा चेम्सफर्डने मॉंटेग्यू यांच्यापुढे आग्रह धरला. मात्र यामागील सत्य जाणून घेणे आवश्यक आहे. महायुद्धकाळात

डी.आय.आर. च्या संरक्षणाखाली सनदी नोकरशाही आणि विशेषतः पंजाबचा गव्हर्नर मायकेल ओडवायर व मुंबई, बंगाल व मद्रासचे उपरोक्त गव्हर्नर यांना अमर्याद विशेषाधिकार लाभलेले होते. मागील पाच वर्षे त्यांना अरेरावी व मनमानी कारभार करण्याची सवय लागलेली होती. शांतता काळातही या सत्ताधीशांना आपले अधिकार कमी होणे असह्य वाटत होते. म्हणून विशेषाधिकार प्राप्तीसाठी गधर क्रांतिकारक आणि युगांतर क्रांतिकारक तसेच जहाल काँग्रेस युवकांच्या संभाव्य धोक्याचे निमित्त पुढे करण्यात आले. या संपूर्ण प्रकरणात अतिशयोक्ती व अधिकारशाहीबरोबरच अवास्तव भयगंडाचाही बराच मोठा भाग होता.

या पार्श्वभूमीवर ब्रिटिश सरकारने इंग्लंडमधील न्यायाधीश सिडनी रौलट, मुंबई हायकोर्टाचे न्या. बेसिल स्कॉट व न्या. व्हर्नी लोवॅट, मद्रास हायकोर्टाचे न्या. सी. बी. कुमारस्वामी आणि कोलकात्याचे राजनिष्ठ वकील प्रोभासचंद्र मित्र यांची समिती नेमली होती. (डिसेंबर १९१७). सेडिशन कमिटी असे नाव असलेल्या या समितीने आपला अहवाल एप्रिल १९१८ मध्ये सादर केला होता. इथे नमूद करतो की, या समितीच्या अहवालाने कित्येक इतिहास लेखकांचे अपसमज निर्माण केले. समितीने चुकीचे अनेक ‘ शोध लावले ’. कारण सनदी नोकरशाहीने ‘आपणास सोयीचे ’ असेच कागदपत्र, अपुरी माहिती व त्रोटक अहवाल समितीला सादर केलेले होते. या समितीच्या शिफारसींनुसार चेम्सफर्डच्या सरकारने दोन विधेयके तयार केली होती. त्यांनाच रौलट विधेयके म्हटले जाते.

वस्तुतः महायुद्धकाळात भारतमंत्री एडविन एस. माँटेग्यू यांनी हिंदुस्तानातील प्रमुख राजकारण्यांशी समक्ष चर्चा केली होती. येथील राजकीय, आर्थिक व सामाजिक स्थितीचे समक्ष अवलोकन केलेले होते. काही भारतीयांशी त्यांनी जवळीक साधली होती. एडविन साहेबांना सेडिशन कमिटीने लावलेले बरेच ‘शोध व कमिटीच्या शिफारशी ’ अमान्य होत्या. पण त्यापेक्षाही व्हाइसरॉय चेम्सफर्ड यांनी सादर केलेल्या रौलट विधेयकाच्या मसुद्यातील तरतुदी एडविन साहेबांना फारच जाचक व अनावश्यक वाटल्या. त्याबाबत त्यांनी तीव्र नापसंती व्यक्त करून चेम्सफर्डचे मन वळवण्याचाही प्रयत्न केला. दोन्ही विधेयके सौम्य करावी

आणि शक्यतो सध्याच्या कायद्यांचाच उपयोग करावा असा त्यांनी पोक्त सल्ला दिला. तथापि रौलट अहवालात बंगालमधील कटकारस्थाने, पंजाबातील गधर क्रांतिकारकांच्या कारवाया व महाराष्ट्रातील चितपावन ब्राह्मणांच्या राष्ट्रवादी कारवायांचा खास उल्लेख केलेला होता. म्हणूनही चेम्सफर्ड महोदयांना संभाव्य उठावांची व क्रांतिकारकांची भीती वाटत होती. चेम्सफर्डवर पंजाबच्या मायकेल ओडवायरचा प्रचंड दबाव होता. शिवाय रौलटनेही इंग्रजांच्या संशयजन्य भयात भर घातली होती. म्हणून रौलट कमिटीने शिफारस केलेल्या आणीबाणीकालीन उपाययोजना आवश्यक आहेत, असा चेम्सफर्डने आग्रह धरला होता.

हिंदुस्तानातील संभाव्य उठाव अथवा राज्यक्रांती ठेचून काढण्यास्तव सर्वस्वी मदत करण्यास एडविन एस. मॉंटेग्यू तयार होते. मात्र त्यांनी व्हाइसरॉय चेम्सफर्डला खडसाविले, " But I loathe the suggestion at first sight of preserving the Defence of India Act in peace time to such an extent as Rowlatt and his friends think necessary. Why cannot these things be done by normal or even exceptional processes of Law. I hate to give the Petlands of this world or the O'Dwyers the chance of locking a man up without trial."[४]

मॉंटेग्यूंच्या या पत्रातील आशय स्वयंस्पष्ट आहे. मात्र यातील पेटलंड व ओडवायर यांनी खटले न भरता अनेकांना डांबून ठेवलेले होते. ॲनी बेझंटचाही त्यांत समावेश होता. ओडवायरच्या हुकूमशाहीस पारावार नव्हता.

मॉंटेग्यू यांनी विवेक व संयतपणाचा सल्ला दिल्यावरही व्हाइसरॉय चेम्सफर्डने भारतमंत्र्यांना ठामपणे कळविले—" सेडिशन कमिटीच्या शिफारसींनुसारच अत्यंत कडक कायदे करण्याशिवाय इथे सरकार चालविणे अशक्य आहे. सरहद्द प्रांत, पंजाब व बंगालमधील स्थिती अत्यंत स्फोटक असून, तिथे क्रांतिकारक अराजक माजवतील." अखेरीस अगदी नाखुषीने मॉंटेग्यू महोदयांनी रौलट विधेयकांना संमती दिली. मात्र हे कायदे फक्त तीन वर्षे अमलात ठेवायचे होते.[५] या प्रकरणात चेम्सफर्डला बादशहा पाचवे जॉर्ज यांचा व्यक्तिगत पाठिंबा होता, हाही एक महत्त्वाचा मुद्दा होता हे लक्षात ठेवावे.

## सरकारचे आत्मसमर्थन 

बंगालमधील युगांतर पक्षाचे युवक व पंजाबातील गधर क्रांतिकारक बोल्शेविक राज्यक्रांतीने प्रभावित झालेले आहेत, हे इंग्रजांनी ओळखले होते. म्हणूनच ते प्रमाणाबाहेर आत्मसंरक्षणाचे प्रयत्न करू लागले. पूर्वी लॉर्ड मिटोंवर झालेला बॉंबहल्ला व नंतरचा लॉर्ड हार्डिंजवरील बॉंब याबाबतच्या आठवणींना सेंट्रल सेक्रटेरिअटमध्ये उजाळा मिळत असे. अशा अनेक भयसूचक आठवणी, अहवाल आणि हिंदुस्तानवर आपली राज्यसत्ता शाश्वत व अबाधित ठेवण्याची लालसा या दृष्टिकोणातून रौलट कमिटी नेमलेली होती.

भारतमंत्र्याने अनुमती देताच हिंदुस्तान सरकारने रौलट कमिटीच्या शिफारसींवर आधारलेली दोन विधेयके मध्यवर्ती कायदेमंडळात मांडली (६ फेब्रुवारी १९१९). बिनसरकारी सदस्यांनी विधेयकांना विरोध करून निषेधही केला. शंकरन नायर यांचा अपवाद वगळता सर्व बिनसरकारी सदस्यांनी विधेयकांचा धिक्कार केला. नायर यांनी मात्र विधेयकांना पाठिंबाही दिला नाही व विरोधही केला नाही. सरकारचा उघड निषेध करणाऱ्यांमध्ये अग्रेसर होते—विठ्ठलभाई पटेल, बॅ. महंमद अली जिना, बॅ. तेजबहादूर सप्रू, महमुदाबादचे राजे, बी. टी. शुकूल, गणेश श्रीधर खापर्डे, मिया महमद शफी व मझरूल हक. मात्र बहुसंख्य सभासद सरकारी अथवा राजनिष्ठ असल्याने सरकारपुढे समस्या नव्हती. विधेयकांबाबतचे राजकारण आपण नंतर पाहू. रौलट उपाख्यानाच्या प्रारंभापासूनच प्रस्थापित काँग्रेस पुढाऱ्यांची हतबलता, कमकुवतपणा व विसकळीतपणा उघड झाला. त्यांच्यात ऐक्यभाव नव्हता. पक्ष व ध्येयाशी बांधीलकी नव्हती. अनेक महत्त्वाच्या मुद्यांवर एकमत नव्हते. रौलट प्रकरणी सर्वांनी शाब्दिक निषेध केला, टीकाही केली, पण लोकमत संघटित करण्याचे प्रयत्न केले नाही. त्यांच्यातील एकमताचे विघटन झाले. त्यांचे राजकारण अगदी मर्यादित स्वरूपाचे आहे, हे उघड झाले. काँग्रेस अध्यक्ष पं. मदन मोहन मालवीय प्रभावहीन असल्याचे पुन्हा दिसून आले. काही राजकारण्यांना वाटत होते की, ब्रिटिशांशी सहमती घडवून आणून सत्तेत वाटा मिळविता येईल. मात्र त्यांचा भ्रमनिरास झाला.

होमरूल चळवळीमुळे प्रसिद्धी मिळालेल्या व काँग्रेसचे अध्यक्षपद उपभोगलेल्या ॲनी बेझंट यांना, वर म्हटल्याप्रमाणे, भारताला स्वातंत्र्य मिळावे ही कल्पना मुळातच मान्य नव्हती. बॅ. जयकर वगैरे लिबरल पक्षीय नेते हिरमुसले झाले. टिळक इंग्लंडमध्येच राहिल्याने त्यांचे अनुयायी किंकर्तव्यमूढ झाले.

## रौलट सत्याग्रहाची पूर्वतयारी

महात्मा गांधींनी सत्याग्रहाच्या आचारप्रणालीनुसार **बॉम्बे क्रॉनिकल** पत्रकात चार लेख लिहून सत्याग्रहाची कारणमीमांसा स्पष्ट केली. या विधेयकांमुळे होणारा घोर अन्याय व राष्ट्राची गळचेपी मागे घेण्याचे आवाहनही गांधीजींनी या लेखांद्वारे केले होते. त्यांनी आर्जव केले. विधेयकांच्या संभाव्य दुष्परिणामांची सरकारला व भारतीयांनाही कल्पना दिली. गांधीजींनी विधेयकांचा पुनर्विचार करण्यास व्हाइसरॉयला पुरेसा अवधी दिला. त्यादृष्टीने सविस्तर पत्रही पाठविले. याव्यतिरिक्त भारतमंत्री एडविन माँटेग्यू यांनाही आर्जव केले.

दुसऱ्या बाजूने गांधीजींनी साबरमती आश्रमात वल्लभभाई पटेल, सरोजिनी नायडू, बेंजामिन जी. हॉर्निमन, चंदुलाल देसाई, जमनादास द्वारकादास, उमर सोभानी, अनसूया साराभाई इत्यादी निष्ठावंतांशी विचारविनिमय करून ‘सत्याग्रह सभा’ नामक संघटना गठित केली. या केंद्रक संघटनेने संकल्पित, सत्याग्रहाची आचारप्रणाली निर्धारित केली आणि जाहीरनामा तयार केला. तसेच प्रत्येक सत्याग्रही व्यक्तीने सही करावयाच्या प्रतिज्ञापत्राचा मसुदा तयार केला (२४ फेब्रुवारी १९१९). त्याचदिवशी गांधीजींनी लॉर्ड चेम्सफर्डला पत्र पाठवून विधेयकांवर पुनर्विचार करण्याची गळ घातली. नंतर गांधीजींनी भारतमंत्री माँटेग्यू यांना सुनावले, “ This retention of Rowlatt legislation in the teeth of universal opposition is an affront to the nation. It’s repeal is necessary to appease national honour ”.[६]

गांधीजींच्या स्वबळावरील सत्याग्रह मोहिमेला मुंबई व उपनगरे आणि गुजरातमध्ये प्रारंभापासूनच चांगला प्रतिसाद लाभला होता. त्यांचा चाहता वर्ग मुंबई, खेडा, सुरत, अहमदाबादमध्ये उत्साहाने सक्रिय झालेला होता. गांधीपूर्व काळात

गुजरातमध्ये राजकीय चळवळ झालेली नव्हती. महाराष्ट्राला गांधी अद्याप नवीन होते. मात्र त्यांच्या चंपारण सत्याग्रहात शंकरराव देव वगैरे मराठी युवक सामील झाल्याचे विवेचन आम्ही पहिल्या खंडात केलेले आहे. बडोद्याच्या गंगनाथ विद्यालयातील मराठी भाषिक कार्यकर्ते गांधीजींना येऊन मिळाले. गांधीजी मुंबई-गुजरातव्यतिरिक्त दिल्ली प्रदेश, पंजाब, सिंध व मद्रास प्रांतांमध्ये सत्याग्रहास अनुकूल प्रतिसाद मिळविण्यासाठी अहोरात्र झटत होते. विविध नेत्यांना पत्रे लिहीत होते. गांधीजींना टिळकांच्या प्रभावक्षेत्रात मोठा प्रतिसाद मिळण्याची शक्यता कमी हाती. " गांधी हा गोखलेंचा माणूस, आपला नव्हे", इति खापर्डे ! महाराष्ट्रातील सत्यशोधक समाज व ब्राह्मणेतर पक्ष गांधीजींना अनुकूल नव्हते.

गांधीजींनी स्वबळावर राष्ट्रव्यापी लढा उभारला यामागे त्यांचे तर्कशास्त्र होते. राजकीय कारणे व कलोनिअल अधिकारशाहीप्रमाणेच आर्थिक हलाखीमुळेही जनमानस प्रक्षोभित झालेले आहे, हे गांधीजींनी ओळखले होते. महायुद्धानंतर आलेली आर्थिक हलाखी, बेरोजगारी, अन्नधान्याच्या अफाट किंमती आणि सरकारची अनास्था यामुळे जनता हवालदिल झालेली होती. १९१७-१९१९ दरम्यान धान्याचे भाव १०० टक्के वाढले, पण मजुरी मात्र २५ टक्के इतकीच वाढली. आर्थिक असंतोष सारखा वाढत होता. डी.आय.आर. च्या दडपणाखाली असंतोष चिरडला गेला होता, हे गांधीजींनी ओळखले होते. दुसरी बाब पाहा. १९१२ साली हिंदुस्तानची राजधानी कलकत्ता येथून हेतुतः दिल्लीत स्थलांतरित झाल्यापासून दिल्लीत विशेष राजकीय जागृती झाली. त्यामुळे फेब्रुवारी १९१७ मध्ये तिथे होमरूल लीगची शाखा सक्रिय झाली. या शाखेच्या माध्यमातून मुखतार अहमद अन्सारी यांनी उत्तम राजकीय संघटन करून हिंदू-मुसलमान ऐक्यावर भर दिला. अन्सारी गांधीजींचे सहकारी बनले, आणि त्यांनी सत्याग्रहाचा प्रचार केला.

ब्रिटिशांनी जागतिक महायुद्धासाठी विपुल आश्वासने देऊन प्रचंड वॉर फंड वसूल केला होता. नागरिकांकडून देणग्या उपटल्या. सरकारने शेतकऱ्यांकडून सक्तीने लेव्ही पद्धतीने धान्य घेतले होते. व्यापाऱ्यांनाही वेठीस धरले होते. तथापि, युद्धसमाप्तीनंतर सरकारने कोणत्याही प्रकारे परतफेड अथवा अनुतोष दिला नाही.

करांचे ओझे कमी केले नाही. सरकारच्या कृतघ्न वर्तनाचा राग जनमानसात लपून राहिला नव्हता. सरकारने महायुद्धासाठी सक्तीची लष्करभरती केली होती. तथापि युद्धानंतर इंग्रजांनी सैनिकांच्या अथवा त्यांच्या कुटुंबीयांसाठी काहीच केले नव्हते. पहिल्या महायुद्धात ब्रिटिश साम्राज्याच्या संरक्षणासाठी तब्बल बारा लाख भारतीय सैनिक लढले होते, आणि त्यांच्यापैकी ७४,००० हिंदी सैनिक मारले गेले होते. भारतीयांच्या या प्रचंड प्राणार्पणाचे फळ ना त्यांच्या कुटुंबांना ना या देशाला! याचा राग, विषाद जनमानसात होता. गांधीजींनी हे ओळखले होते.

हिंदुस्तानात क्रांतिलढा उभारण्यासाठी अमेरिका-कॅनडामधून मायदेशी परतलेल्या पंजाबी गधर क्रांतिकारकांचा लढा ब्रिटिशांनी चिरडून टाकला होता (१९१५). शेकडो गधरांना फाशी दिले होते व हजारोंना कारावासात यातना भोगायला लावल्या होत्या. पंजाबच्या त्या यातना लक्षात घेऊन महात्मा गांधींनी पंजाबमध्ये हिंदू-शीख-मुसलमान यांच्यात अभूतपूर्व ऐक्यभाव घडवून आणला होता. हे पाहून गव्हर्नर मायकेल ओडवायर आणि ब्रिटिश अधिकारी सत्याग्रहापूर्वी भयग्रस्त झालेले होते.

गांधीजींच्या सत्याग्रह संघटन कार्यात होमरूल चळवळीतील कार्यकर्ते आघाडीवर होते. त्यांनी ॲनी बेझंटची मुंबईतील होमरूल लीग व नवीनच निर्माण केलेला पॅन-इस्लामिक गट तसेच स्वतः साबरमतीला काढलेली सत्याग्रह सभा यांचे एकत्रीकरण केले. या विस्तारित सत्याग्रह सभेच्यातर्फे जमनादास द्वारकादास, शंकरलाल बँकर, उमर सोभानी व बेंजामिन हॉर्निमन यांनी सत्याग्रहासाठी सर्वाधिक निधी व मनुष्यबळ उभारले. वल्लभभाई पटेल, अनसूया साराभाई व इंदुलाल याज्ञिक वगैरे गुजरातमध्ये सत्याग्रहाचा प्रचार आणि निधी संकलनाची आघाडी लढवत होते. हा सत्याग्रह व्यापक करण्याचे उद्दिष्ट असले, तरी प्रारंभापासून मुंबई व गुजरात हेच मुख्य केंद्र होते. गांधीजींना इथे सर्वाधिक प्रतिसाद लाभला. दिल्ली व संयुक्त प्रांतात (यू.पी.) निधी व मनुष्यबळ उभारण्याची कामगिरी अब्दुल बारी व मुख्तार अहमद अन्सारी यांनी समर्थपणे पार पाडली. मद्रासमध्येही सत्याग्रह सभेची शाखा स्थापन केली. गांधीजी तिचे

अध्यक्ष, तर कस्तुरी रंगा अय्यंगार उपाध्यक्ष आणि विजिआराघवचारीअर सचिव झाले. बंगालमधून बी. चक्रवर्ती व फझलुल हक यांनी पाठिंबा देणारे संदेश पाठविले.

सरकारी अहवालावरून दिसते की, पंजाबमध्ये सत्याग्रह प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षऱ्या मिळविण्यात स्वयंसेवकांना फारसे यश लाभले नव्हते. फक्त लाहोर व अमृतसरसारख्या मोठ्या शहरात विधेयकांच्या विरोधात राग खदखदत होता. प्रारंभीच्या काळात बहुतेक कार्यकर्ते गांधींकडे उत्सुकतेने पाहत होते. पंजाबात ‘ हिंदू व हिंदी ’ या वादामुळे परिस्थिती गुंतागुंतीची झालेली होती.

रौलट सत्याग्रह मुंबई व गुजरातमध्येच सर्वाधिक यशस्वी होणार असा प्राथमिक अंदाज होता. सत्याग्रह प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरी करणाऱ्या पहिल्या मराठी भाषिकांमध्ये डॉ. दिनकर धोंडो साठे, डॉ. मोतीराम बी. वेलकर, रामभाऊ मंडलिक, ल. ग. खरे, अवंतिका गोखले, बबनराव गोखले, पंढरीनाथ काशीनाथ तेलंग, नारायण दामोदर सावरकर वगैरे होते. त्यांच्यातील बरेच जण टिळकांचेही समर्थक होते. गांधीजींनी या सर्वांचा सत्याग्रह सभेच्या कार्यकारिणीत समावेश केला. लवकरच शंकरराव देव, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, शिवराम महादेव परांजपे, वीर वामनराव जोशी (अमरावतीचे), न. वि. गाडगीळ गांधीजींचे अनुयायी बनले. तसेच भूतपूर्व गंगनाथ विद्यालयाशी संबंधित काका कालेलकर, बॅ. केशवराव देशपांडे, विनोबा भावे, मामा फडके वगैरे निष्ठावंत कार्यकर्ते गांधीजींचे सहकारी बनले.

उपरोक्त मराठी भाषिक सभासदांव्यतिरिक्त संघटनेच्या कार्यकारिणीत पुढील सक्रिय सभासदांचा समावेश होता :— आयरिश वंशाचे तडफदार पत्रकार बेंजामिन हॉर्निमन, उमर सोभानी, शंकरलाल बँकर, जमनादास एम. मेहता, जमनादास द्वारकादास, सरोजिनी नायडू, मनु सुभेदार, लक्ष्मीदास तेरसी, व्ही. ए. देसाई, चुनिलाल उजमसी, जेठमल नारनदास, हंसराज प्रागजी ठाकरसी, विठ्ठलदास जेराजनी, सी. एम. देसाई व कांजी द्वारकादास हे सर्वच मुंबईकर आपापल्या क्षेत्रात प्रभावी व्यक्ती असल्याने या शहरात सत्याग्रहास चांगला

प्रतिसाद मिळणे स्वाभाविक होते. मात्र ॲनी बेझंटच्या होमरूल शाखेचे सभासद असलेले हे व इतर अनेक सभासद १९१९ मध्ये गांधीजींचे अनुयायी झाल्याकारणाने, त्या बाई गांधीजींच्या विरोधात गेल्या. ही बाब गुप्तचरांच्याही त्वरित लक्षात आली. या कार्यकर्त्यांनी शहरातच नव्हे तर मुंबई इलाख्यातील गावोगावी शाखा स्थापन केल्या व सत्याग्रहाचा प्रचार केला. सत्याग्रहाची रणनीती लोकांना समजावून सांगण्यात या मंडळीने मोठे योगदान दिले, असे या अहवालात नमूद केलेले आहे.

सत्याग्रहास पाठिंबा न देणारे प्रस्थापित काँग्रेस पुढारी दिनशा वाच्छा, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, सप्रू, एम. एम. शफी, सर फझलभाई करीमभाई व श्रीनिवास शास्त्री या सर्वांनी सत्याग्रहास पाठिंबा न देण्याची कारणे उघड केली होती. त्यांच्या मते सत्याग्रहामुळे भावी राज्यसुधारणांना बाधा पोहोचेल. शिवाय हिंसाचार होऊ शकेल. सप्रू व श्रीनिवास शास्त्री यांनी महात्मा गांधींविषयी विलक्षण व्यक्तिगत आदर, सद्‌भाव व पूज्यभाव व्यक्त केला होता. तथापि नागपूरचे ग. श्री. खापर्डे यांनी सभ्यता व शिष्टाचाराच्या मर्यादा सोडून गांधीजींबाबत तिरस्कार व राग व्यक्त केला, सत्याग्रहाच्या मार्गाचा उपहास केला. शिवाय सत्याग्रह प्रतिज्ञापत्रावर सही करणाऱ्या गुजरात्यांचा संशय घेतला. याची गुप्तचरांनी नोंद घेतली होती. गांधींमुळे टिळकांचे नेतृत्व ढासळून पडेल, अशी खापर्डे यांना भीती वाटत असल्याचे गुप्तचरांनी नोंदून ठेवले होते. गांधीजींच्या अनुयायांविषयी दादासाहेबांनी संशय व्यक्त केला होता.[७]

राष्ट्रवादी आसमंतात सत्याग्रह-समर्थकांचा प्रचार आणि प्रस्थापितांचा उदासीन विरोध चालू असताना दोनपैकी ‘‘फौजदारी कायदा—आणीबाणी अधिकार ’’ हे दुसऱ्या क्रमांकाचे विधेयक मध्यवर्ती कायदेमंडळाच्या चिकित्सा समितीकडे पाठविण्यात आले. समितीने मूळ विधेयक थोडे सौम्य केले, असे श्रीनिवास शास्त्रींचे मत बनले होते. सरकार मात्र कोणाचीही पर्वा न करता विधेयक पास करून घेण्यास कटिबद्ध होते. एक प्रामाणिक प्रयत्न यादृष्टीने गांधीजींनी ५ मार्च १९१९ रोजी व्हाइसरॉय चेम्सफर्ड यांच्याशी या विधेयकावर तब्बल दोन

तास चर्चा केली. परंतु ती विफल ठरली. १२ मार्चला विधेयकावरील चिकित्सा समितीचा अहवाल कायदेमंडळात सादर केला जाणार होता. त्याआधी ११ मार्चला पुन्हा एकदा विधेयकाचा पुनर्विचार करण्यासाठी गांधीजींनी व्हाइसरॉयला आग्रहाची विनंती केली. तरीही व्हाइसरॉय अविचल राहिले. दिल्लीतील याच मुक्कामात गांधीजी प्रथमच कायदेमंडळात गेले ते या विधेयकावरील चर्चा ऐकण्यासाठी. यानंतर मात्र महात्माजी प्रेक्षक म्हणूनही कायदेमंडळाची पायरी चढले नाहीत.

**रौलट विधेयक कायदेमंडळात संमत** :—मध्यवर्ती कायदेमंडळात प्रथमच हिंदी सभासदांनी या विधेयकांना केलेला विरोध ही एक समाधानाची बाब मानता येईल. वीस सभासदांनी विरोध केला, तरी ३५ सरकारी आणि ब्रिटिशनिष्ठ सभासदांच्या पाठिंब्याने १८ मार्च १९१९ रोजी हे 'काळे विधेयक' पास झाले. या प्रकरणात बऱ्याच भारतीय सदस्यांच्या ब्रिटिश राजनिष्ठा स्पष्ट दिसून आल्या. संस्थानिकांचे प्रतिनिधी, सावकार, भांडवलदार व जमीनदारांचे प्रतिनिधी आणि साम्राज्यशाहीच्या आधारस्तंभांनी व्हाइसरॉयच्या इच्छेप्रमाणे मतदान केले होते. या विधेयकाच्या निमित्ताने हिंदी राजकारण्यांमधील विसंवाद, मतैक्याचा अभाव, मर्यादित राजकारणातील दरिद्री अवस्था आणि अनेक काँग्रेसजनांचा कणाहीनपणा स्पष्ट दिसून आला.

अधिकारशाहीचा विजय झाला. या नवीन कायद्यास 'अनार्किकल अँड रिव्हॉल्युशनरी क्राइम्स ॲक्ट ' म्हणजे ' अराजक माजवणाऱ्या क्रांतिकारकांच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी केलेला कायदा ' असे नाव देण्यात आले होते. शस्त्राचाराने बादशहांचे राज्य उलथून पाडण्याचा आणि अराजक माजवण्याचा प्रयत्न करणाऱ्या क्रांतिकारकांवरील तसेच अशा प्रयत्नांना चिथावणी देणाऱ्यांवरील खटले खास न्यायालयांकडून शक्य तितक्या लवकर निकालात काढण्याची तरतूद या दडपशाहीच्या कायद्यात करण्यात आली होती. आणीबाणीकालीन बेबंद दडपशाहीचे अधिकार सरकारने स्वतःकडे घेतले. क्रांतिकारकांच्या कारवायांना आळा घालण्यासाठी स्पेशल कोर्ट व समरी ट्रायल म्हणजे संक्षिप्त न्यायपद्धती, गुप्त सुनावणी व केवळ संशयावरून अटक, दडपशाही आणि मनमानी

कारभाराचे अधिकार पोलीस व नोकरशाहीस मिळाले. खास न्यायालयांच्या निकालांविरुद्ध अपील करण्यासही परवानगी नाकारण्यात आली. वॉरंटाशिवाय अटक व स्थानबद्ध करणे, घरदारांची झडती घेणे वगैरे अधिकार बहाल करण्यात आले होते.

रौलट विधेयकांपैकी क्रमांक दोनचे विधेयक संमत झाले, परंतु क्रमांक एकचे लांबणीवर पडले. प्राप्त परिस्थितीत क्रमांक दोनच्या 'अनार्किकल अँड रिव्हॉल्युशनरी क्राईम्स ॲक्ट' विरुद्ध सत्याग्रह आंदोलन करण्याचा निर्णय गांधीजींनी दक्षिण भारतातील एका सभेत जाहीर केला.

**बॅ. जिना व खापर्डे यांची भूमिका**ः— महात्मा गांधींचे कायदेभंगाचे आवाहन व सत्याग्रहाची घोषणा आणि तत्त्वज्ञान बॅ. जिनांना पसंत नव्हते. जिना तेव्हा वजनदार कॉंग्रेस पुढारी व मुंबईचे प्रतिष्ठित नेते होते. त्यांनी रौलट विधेयकास मध्यवर्ती कायदेमंडळात विरोध केला होता. सनदशीर मार्गाने विरोध करावा अशी त्यांची भूमिका होती. त्यानुसार ब्रिटिश सरकारचा निषेध म्हणून जिनांनी कायदेमंडळाच्या सभासदत्वाचा राजीनामा दिला. व्हाइसरॉयला लिहिलेल्या पत्रात जिनांनी सडेतोडपणे म्हटले होते की, " शांततेच्या काळात असला कायदा मंजूर करणाऱ्या सरकारला स्वतःस सुसंस्कृत सरकार म्हणवून घेण्याचा अधिकार उरत नाही........... या काळ्या विधेयकाला मान्यता देऊ नये असा सल्ला भारतमंत्री बादशहांना देतील अशी मला आशा आहे." जिनांच्या पत्राचा काही भाग **बॉंबे क्रॉनिकल** पत्रकाने छापला. तथापि जिनांची आशा भारतमंत्री तसेच बादशहांनी फोल ठरवली.

हैदराबादेतील विवेकवर्धिनी विद्यालय व मराठी जनांचे नेते वामनराव नाईक यांनी बॅ. जिनांचे व्याख्यान घडवून आणले होते. (१५ एप्रिल १९१९). ब्रिटिश सरकारचा एक आधारस्तंभ असलेल्या आला हजरत निजामास बॅ. जिनांची राजकीय विचारसरणी पूर्णतः नापसंत होती. म्हणून जिनांना निजाम संस्थानात इतरत्र जाण्यास आणि हैदराबाद शहरात राजकीय भाषण करण्यास मज्जाव करण्यात आला होता. होमरूलवादी जिना निजामाला धोकाकारक वाटत होते, मुसलमान असूनही!

ब्रिटिश मुलखात रौलट सत्याग्रह सुरू होताच त्याचा प्रसार आपल्या संस्थानात होऊ नये यासाठी निजामी प्रशासनाने सर्व उपाययोजना केलेली होती. एक फर्मानही जारी केले होते.

बॅ. जिनांप्रमाणे टिळकांचे अनुयायी दादासाहेब खापर्डेही मध्यवर्ती कायदेमंडळाचा राजीनामा देतील अशी अपेक्षा अनेकांनी व्यक्त केली होती. तथापि राजीनामा देण्यास दादासाहेबांनी नकार दिला. विलायतेस जाणाऱ्या काँग्रेस शिष्टमंडळाच्या माध्यमातून आपण समक्ष बादशहाकडे दाद मागू, असे म्हणून त्यांनी वेळ निभावून नेली. दादासाहेबांनी राजीनामा द्यावा असे डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे, उधोजी, अळेकर वगैरे नागपूरच्या टिळकपक्षीयांचेही मत होते. हा राजीनाम्याचा प्रश्न टिळकांवर सोपवावा असे काही नागपूरकर म्हणत होते. तथापि खापर्डे यांनी आपल्या रोजनिशीत नोंदविलेले त्यांचे खरे मत पुढीलप्रमाणे होते, " राजीनामा देणे हे अयोग्य असून धोरणीपणाचे होणार नाही ".[८]

याउलट दादासाहेबांचे मवाळ पक्षातील मित्र बी. डी. शुकूल यांनी मात्र रौलट विधेयकाचा निषेध करण्यासाठी कायदेमंडळाचा राजीनामा दिला होता.

**संकल्पित कार्यक्रम** :—सत्याग्रहाचा प्रारंभिक कार्यक्रम म्हणून विनापरवानगी वर्तमानपत्र काढणे व सरकारने आक्षिप्त ठरविलेले प्रचार साहित्य प्रकाशित करणे आणि सभाबंदीचा निषेध करणे या बाबी निर्धारित करण्यात आल्या होत्या. त्यानंतर मिठाचा कायदा झुगारून लावणे व शेतसारा भरण्यास नकार देणे या दुसऱ्या पायऱ्या निर्धारित केल्या होत्या. महात्मा गांधींनी रौलट कायद्याचा निषेध करण्यासाठी 'राष्ट्रीय सुतकदिन' म्हणून रविवार दिनांक ३० मार्च १९१९ रोजी हरताळ पाळावा व जाहीर उपोषण करावे आणि विनापरवानगी सभा भरवाव्या असे मुंबईतील सत्याग्रह सभेला तारेने कळवले होते. तथापि कार्यकर्त्यांना पूर्वतयारीसाठी पुरसा वेळ मिळणे आवश्यक असल्याचे त्रिचनापल्लीत मुक्कामी असलेल्या गांधीजींना सांगावे लागले. त्यामुळे संकल्पित राष्ट्रीय सुतकदिनाचा कार्यक्रम ३० मार्च ऐवजी ६ एप्रिल १९१९ रोजी निश्चित करण्यात आला. हा दिवस राष्ट्रीय सुतक दिन म्हणून पाळून त्या काळ्या कायद्याचा निषेध करणे हा उद्देश होता.

त्या दिवशी स्त्री-पुरुषांनी काळा वेश परिधान करून सरकारच्या दडपशाहीचा निषेध करणे ही कल्पना होती.

**दिल्लीतील गोळीबार** :—सत्याग्रहाच्या तारखेत करण्यात आलेला उपरोक्त बदल उत्तर भारतात अनेक ठिकाणी कळवला गेला नव्हता. त्यामुळे दिल्ली, लाहोर, अमृतसर इ. शहरांमध्ये हरताळ ३० मार्च रोजीच पाळला गेला. त्यादिवशी महात्मा मुनशीराम ऊर्फ स्वामी श्रद्धानंद व हकीम अजमल खान यांनी दिल्लीत ५०,००० जनसमुदायाच्या विराट सभेत ब्रिटिश सरकारचा आणि जाचक रौलट कायद्याचा कडक शब्दांत निषेध केला. त्यांनी टीकेचे आसूड ओढले. त्यामुळे नोकरशाही व पोलीस संतापले. सरकारी आदेशानुसार गुरखा सेनादलाने सभेनंतर परत जाणाऱ्या नागरिकांवर प्रच्छन्नपणे गोळीबार केला. त्यात तीन हिंदू व तीन मुसलमान जागीच ठार झाले. सैनिकांनी स्वामी श्रद्धानंद यांच्या छातीवर ८-१० बंदुका रोखल्या आणि शस्त्रबलाचे प्रदर्शन केले. त्याची प्रतिक्रिया म्हणून हिंदू-मुसलमानांनी असाधारण ऐक्यभाव निर्माण करून शहीदांचे मृतदेह एकमेकांच्या खांद्यावरून मिरवणुकीने नेले. दोन्ही जमातींनी परस्पर ऐक्यभाव व्यक्त केला.

यामुळे दिल्लीप्रमाणेच पंजाबातही सरकारविरुद्ध भयंकर तणाव निर्माण झाला. अमृतसरमध्ये डॉ. सत्यपाल आणि बॅ. सैफुद्दीन किश्चलू या राष्ट्रवादी पुढाऱ्यांनी ४०,००० नागरिकांची सभा आयोजित केली होती. त्या सभेवरही सेनादलाने हल्ला करून जनतेचा प्रक्षोभ वाढविला होता. दिल्ली व अमृतसरमध्ये गुरखा सेनादलाकडून सरकारने करवून घेतलेल्या अनाठायी हत्या व नागरिकांची धरपकड आणि पंजाब सरकारचा युध्यमान (बेलिजरंट) पवित्रा या कारणांमुळे पंजाब प्रांत भयंकर प्रक्षोभित झाला. या प्रक्षोभाचे पडसाद पुढील काळातील घटनांवर पडले. ६ एप्रिल १९१९ च्या राष्ट्रीय सुतकाचे उद्दिष्ट रौलट कायद्याचा धिक्कार तसेच सरकारी हिंसाचाराचा निषेध करणे असे ठरविण्यात आले.

या व्यतिरिक्त पंजाब व वायव्य प्रांतातील राजकीय ताण-तणावांना वेगळी पार्श्वभूमी होती. तिचे अखिल हिंदुस्तानच्या राजकारणावरही तरंग पसरत असत. ब्रिटन व अफगाणिस्तानचे संबंध शत्रू राष्ट्रांसारखे असत. पहिल्या महायुद्धात

तुर्कस्तान हे जर्मनीचे दोस्त राष्ट्र असल्यामुळे ब्रिटिशांनी तेथील सुलतानाचे अधिकारपद हिरावून घेतले होते. त्यामुळे सर्व मुस्लीम जगत भयंकर दुखावले होते. परिणामतः वायव्य प्रांत व पंजाब प्रांतात तुरळक प्रक्षोभ निर्माण होत असे. मात्र पंजाबचा गव्हर्नर मायकेल ओडवायर प्रत्येक प्रसंगी अत्यंत कठोरपणे उपाय योजून दडपादडपी करीत असे.

युध्यमान प्रवृतीचा गव्हर्नर ओडवायर आगामी डायार्की व राज्य सुधारणांकडेही केवळ कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टिकोणातूनच पाहत होता. अशी जाणीव असलेल्या भारतमंत्री माँटेग्यू यांनी पंजाब सरकारच्या संकुचित धोरणावर टीका केली. त्यांनी व्हाइसरॉय चेम्सफर्डला लिहिले, " He sat hard on all, and often on quite legitimate political work. He put a ring fence round the Punjab and refused to allow into it political leaders. He used all the powers that the war gave him and he made a great success of it. But if that sort of a thing went on ............. so certainly would you find that the Punjab became one of the most inflammable Provinces of India. ".[१]

लॉर्ड माँटेग्यू यांनी ८ मार्च १९१९ रोजी वर्तवलेली ही भविष्यवाणी महिन्याभरातच सत्य ठरली.

संपूर्ण पंजाबात जनमत प्रक्षोभित झाले आणि मायकेल ओडवायरने आपले आक्रमक धोरण अमलात आणले. त्याने युद्धकालीन अधिकार ग्रहण केले. अशा तापलेल्या वातावरणात महात्मा गांधींना सत्याग्रह हा एकमेव तरणोपाय आहे याची खात्री वाटली.

## मुंबईतील सत्याग्रह

रौलट सत्याग्रहाचे मुख्यालय व केंद्रकच मुळात मुंबईत होते. मार्च १९१९ मध्येच गांधीजींनी मुंबईत सत्याग्रह सभेच्या रूपाने एक आघाडी, ब्रिगेड निर्माण केली होती. त्याबाबतची पूर्वतयारी फेब्रुवारीपासूनच सुरू केलेली होती. गांधींच्या मागावर असलेल्या मुंबईच्या पोलीस कमिशनरने ३ मार्च १९१९ रोजी गृह सचिवास

कळवले होते, " रौलट बिल्स आर द टाक ऑफ द टाऊन ! " पूर्वी मुंबईत स्थापन झालेल्या होमरूल शाखेचे रूपांतर सत्याग्रह सभेत करण्यात आले. त्याबरोबर सर्व 'होमरूलर' आता सत्याग्रह सभेचे पुरस्कर्ते झालेत. होमरूल शाखेचे सर्व सभासद महात्मा गांधींचे खंदे समर्थक व अनुयायी झाल्यामुळे ॲनी बेझंट संतापल्या होत्या. वस्तुतः त्यांनी प्रथम सत्याग्रहाच्या प्रतिज्ञापत्रावर सही केली होती. पण गांधीजींना मिळत राहिलेला जनाधार पाहून त्यांच्या मनात मत्सर निर्माण झाला. मात्र या बाईंचा काही नेत्यांना वाईट अनुभव आलेला असल्याने, अनेकांनी त्यांना गांभीर्याने घेतलेले दिसत नाही. बॅ. जिनांना या बाईंचा आधीही बराच उपद्रव झाला होता. लोकमान्य टिळकांवरही बेझंट बाईंना 'पुतना मावशी' म्हणण्याचा प्रसंग गुदरला होता. खरे तर भारताला पूर्ण स्वराज्य मिळावे ही कल्पनाही एकदा कॉंग्रेस अध्यक्षपद भूषविलेल्या बेझंट बाईंना पसंत नव्हती.

गांधीजींना मुंबई व परिसर आणि गुजरातमधील परिस्थितीची पुरेशी माहिती होती. त्यामुळे निदान प्रारंभी तरी सत्याग्रहाचा प्रारंभ येथे करावा असा त्यांचा मानस होता. त्याकाळात मुंबईत देशातील सर्वात मोठी कापडाची बाजारपेठ होती. महायुद्धानंतर आर्थिक मंदीत पडलेल्या या बाजारपेठेचा कलोनिअल आर्थिक धोरणांवर रोष होता. स्वाभाविकपणे घाऊक कापड व्यापाऱ्यांचा सरकार-विरोधी आंदोलनास पाठिंबा होता. सत्याग्रह सभा स्थापन झाल्यापासून सर्व गांधीवादी कार्यकर्ते मुंबई व परिसरात तसेच मुंबई इलाख्यात प्रचारकार्यास लागले. त्यांतील प्रमुख व्यक्तींची नावे पाहा :—सरोजिनी नायडू, बेंजामिन हॉर्निमन, जमनादास द्वारकादास, उमर सोभानी, दि. धों. साठे, शंकरलाल बँकर, डॉ. एरूळकर, मनु सुभेदार, लक्ष्मीदास तेरसी, जमनादास मेहता, अवंतिकाबाई गोखले, रा. ना. मंडलिक, पंढरीनाथ तेलंग, हंसराज प्रागजी ठाकरसी, कांजी द्वारकादास, ल. ग. खरे, नारायण दा. सावरकर. ही सर्व नावे मुंबई पोलिसांच्या अहवालांमध्ये नमूद आहेत.

सहा एप्रिल १९१९ रोजी राष्ट्रीय सुतकदिनाचा कार्यक्रम असल्याने त्या दिवशी सकाळपासूनच गिरगाव चौपाटीवर स्त्री-पुरुषांची रीघ लागली होती. चौपाटीवर

जनसागर लोटला होता. काळ्या रंगाच्या साड्या नेसलेल्या हजारो महिला मिरवणुकीने आल्या होत्या. त्या दिवशी उपवास करून चौपाटीवर समुद्रस्नान करण्याचा गांधीजींचा आदेश होता. दुपारपर्यंत दीडलाख लोक या गांभीर्यपूर्वक कार्यक्रमात सहभागी झाले होते. चौपाटीवरील जाहीर सभेत गांधीजींनी दिल्लीतील गोळीबाराचा निषेध केला. माधवबागेत प्रार्थना म्हणण्यात आल्या. गांधीजी ग्रँट रोडवरील एका मशिदीत गेले आणि हिंदू बांधवांशी एकजूट करून स्वातंत्र्यासाठी लढण्याचे त्यांनी मुसलमानांना आवाहन केले. उपवास, समुद्रस्नान आणि प्रार्थना व चित्तशुद्धीचे आवाहन यामुळे या सत्याग्रहास पवित्र धार्मिक आचरणाचा रंग आला. ६ एप्रिल रोजी शहरात कडकडीत हरताळ पाळण्यात आला. मंदिर व मशिदींमध्ये देशासाठी प्रार्थना म्हणण्यात आल्या. मुंबईच्या पोलीस कमिशनरने दिलखुलास लेखी कबुली दिली की, “ द होल इफेक्ट वाज अ स्ट्रॅटेजिक सक्सेस फॉर मिस्टर गांधी ! ”.

जॉन रस्किन यांच्या Unto This Last या जगप्रसिद्ध इंग्रजी ग्रंथाचे गांधीजींनी गुजरातीत भाषांतर करून त्यास **सर्वोदय** हे शीर्षक दिले होते. त्यावर इंग्रज सरकारने आधीच बंदी घातलेली होती. **हिंदस्वराज्य** या स्वतःच्या पुस्तकात गांधीजींनी अंहिसावादी सत्याग्रहाची तत्त्वे आणि रणनीती विशद केलेली होती. या दोन्ही पुस्तकांवर सरकारने बंदी घातलेली होती. सरकारला आक्षेपार्ह वाटलेली ही दोन्ही पुस्तके विकण्याचा उपक्रम मुंबईतील ६ एप्रिलच्या संध्याकाळच्या विराट सभेत करण्यात आला. बंदी असूनही दोन्ही पुस्तकांची एकही प्रत शिल्लक उरली नाही. हा पोलिसांदेखत केलेला सामुदायिक कायदेभंग होता ! शिवाय सरकारची परवानगी न घेता त्याच दिवशी गांधीजींनी **सत्याग्रह** नामक वर्तमानपत्रही प्रसिद्ध केले. हा दंडनीय गुन्हा होता. तरीही सरकारने गांधीजींना अटक करण्याचे धाडस केले नाही ! कारण त्याचे दुष्परिणाम होण्याचा संभव गव्हर्नरला दिसत होता.

गांधीजींचा सत्याग्रहाचा आवेश आणि त्यांना मुंबईत लाभलेला भव्य प्रतिसाद पाहून गव्हर्नर जॉर्ज लॉयड यांनी त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई केली नव्हती. तथापि पंजाबचा गव्हर्नर मायकेल ओडवायर तिकडे आत्यंतिक ‘ बेलिजरंट ’

आणि आक्रमक पवित्रा घेऊन उभा होता. तेथील परिस्थिती स्फोटक बनल्याने जवाहरलाल नेहरूंनी तार पाठवून गांधीजींना तिकडे जाण्याचा आग्रह केला. त्यानुसार ८ एप्रिलला गांधीजी मुंबईहून दिल्लीला गेले. तथापि ओडवायर त्यांना पंजाबच्या हद्दीत प्रवेश करू देण्यास तयार नव्हता. इतकेच नव्हे तर 'गांधींच्या कायदेभंग मोहिमेमुळे परिस्थिती गंभीर व गुंतागुंतीची बनल्यामुळे गांधींना १८१८ सालच्या कायद्याचा आधार घेऊन ब्रह्मदेशात हद्दपार करावे' असे ओडवायरने हिंदुस्तान सरकारला सुचवले होते. पण मध्यवर्ती सरकारने ही अविवेकी सूचना मान्य न करता, गांधीजींना पंजाब, संयुक्त प्रांत अथवा दिल्लीत प्रवेश करण्यावर बंदी घातली. त्यांना पलवल स्थानकात अटक करून दिल्लीहून मुंबईला जाणाऱ्या गाडीत बसविण्यात आले. **बॉम्बे क्रॉनिकल** च्या १० एप्रिलच्या खास पुरवणीतील गांधीजींच्या अटकेचे वृत्त तसेच हरताळ पाळण्याचे आवाहन वाचताच, मुंबईतील सर्व बाजारपेठा बंद झाल्या. ११ एप्रिल १९१९ रोजीही कडकडीत हरताळ पाळण्यात आला.

गांधीजींना अटक केल्यामुळे मुंबईत तीव्र लोकक्षोभ झाला होता. सशस्त्र पोलीस पथके, घोडदळ, सेनादलातील पायदळ आणि प्रचंड फौज घेऊन पोलीस आयुक्त एफ. सी. ग्रिफिथ शहरात शांतता प्रस्थापित करण्यासाठी फिरत होता. तथापि सेनादल व पोलिसांचे प्रयत्न असफल झाले होते. मुंबईत लाठीहल्ला करून जमावास पांगविण्याचे प्रयत्न यशस्वी होत नव्हते. गांधीजी मुंबईत परत आल्याची बातमी उमर सोभानींनी घोषित केली. एवढ्यात घोडदळाची कुमक आलेली पाहून जमाव अधिकच खवळला. तुफान दगडफेक व लाठीमार चाललेला असताना जमावाला शांत करण्यासाठी खुद्द गांधीजी मुंबईच्या पायधुणी भागात आले. आणि चौपाटीवरील सभेत आपण भाषण करणार आहोत, असे त्यांनी जाहीर केले. तरीही दगडफेक, मोडतोड आणि दंगल चालू राहिली. तथापि सायंकाळची गाधींजींची सभा मात्र शांतपणे पार पडली. पोलिसांनी केलेला शस्त्रबलाचा अतिरेक व हिंसाचार तसेच नागरिकांनी केलेली दंगल यांचा धिक्कार करून गांधीजींनी लोकांना सुनावले की, त्यांचे वर्तन सत्याग्रहाच्या कार्यप्रणालीचा भंग करणारे आहे. हे सर्व विवेचन माझ्या **हिस्टरी ऑफ बॉम्बेः मॉडर्न पिरिअड**

या ग्रंथात केलेले असल्याने त्याची द्विरुक्ती इथे करीत नाही. चौपाटीवरील भाषणातील गांधीजींचे पुढील शब्द मात्र लिहिलेच पाहिजे —" I do not see what penance I can offer excepting that it is for me to fast and if it need be, by doing so, to give up this body and thus prove the truth of Satyagraha....... "[१०].

एप्रिलच्या १० तारखेपर्यंत अमृतसर व एकूण पंजाबातील स्थिती भयंकर बिघडली होती. गांधीजींचा सल्ला घेण्यासाठी जवाहरलाल नेहरू मुंबईला आले. पंजाबला आवर घालण्यासाठी, गांधीजींनी बंदी झुगारून लावून त्यांनी अमृतसरला जावे, असा नेहरू आग्रह करीत होते. तथापि तसे केल्यास गांधीजींना अटक करण्यात येईल हे उघड होते. आणि त्यांच्या अटकेमुळे लोकक्षोभ पराकोटीला जाऊन हिंसाचाराचा भयंकर प्रादुर्भाव होईल, हे गांधीजी ओळखून होते. म्हणून तो धोका न पत्करता गांधीजी अहमदाबाद, नडियाद आणि विरमगावमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी गुजरातमध्ये गेले.

गांधीजींना अटक करून (९ एप्रिल) त्यांना पंजाब-बंदी केल्यामुळे अहमदाबाद इतके खवळले होते की, तिथे ' मार्शल लॉ ' चा अंमल लादण्यात आला होता. विरमगावचे रेल्वे स्थानक जाळून लोकांनी तेथील शासकीय कोषागार लुटला होता. त्यामुळे तिथेही लष्कराने लोकांचा खूप छळ केला होता. गांधीजींनी मुंबईप्रमाणेच अहमदाबाद, विरमगाव व एकूण गुजरातमध्ये शांतता प्रस्थापित करण्यात अत्यंत मोलाची कामगिरी केली. मुंबईचा गव्हर्नर व नोकरशाही तसेच पोलीस प्रशासनानेही याबाबतचे गांधीजींचे योगदान मान्य केलेले आढळले.[११]

याच काळात गांधीजींनी उमर सोभानी यांच्याकडून **यंग इंडिया** हे इंग्रजी पत्रक आणि इंदुलाल याज्ञिक यांच्याकडून **नवजीवन** हे गुजराती नियतकालिक विकत घेतले. नंतर जगप्रसिद्ध झालेल्या या नियतकालिकांमधून गांधीजींनी स्वातंत्र्य आंदोलन व आपली विचारप्रणाली आणि तत्त्वज्ञानाचा प्रसार केला. मुंबईतील मणि भवन हे त्यांचे एक मुख्यालय याआधीच प्रसिद्ध झालेले होते. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात मुंबईचे महत्त्व अधिकच वाढले!

## मराठी भाषिक सत्याग्रही

महात्मा गांधींच्या सत्याग्रहांमध्ये सहभागी झालेल्या आद्य मराठी सत्याग्रहींमध्ये सासवडचे शंकरराव दत्तात्रय देव (१८९५–१९७४), विनायक नरहर ऊर्फ विनोबा भावे, दत्तात्रय बाळकृष्ण ऊर्फ काका कालेलकर यांचा समावेश होता. बडोद्याच्या गंगनाथ विद्यालयातील बॅ. केशवराव देशपांडे व त्यांचे आणखी एक सहकारी विठ्ठल लक्ष्मण ऊर्फ मामा फडके हेही गांधीजींच्या मार्गाकडे वळले. पालीचे (सुधागड) केदारनाथ अप्पाजी कुलकर्णी हे प्रारंभीच गांधीजींचे अनुयायी झालेले होते. गांधीजींच्या १९१७ मधील चंपारण (बिहार प्रांत) सत्याग्रहात बबन गोखले व त्यांच्या पत्नी अवंतिकाबाई, शंकरराव दत्तात्रय देव, आनंदीबाई वैशंपायन, धुळ्याचे विष्णू सीताराम रणदिवे आणि एकनाथ वासुदेव क्षीरे तसेच बेळगावचे सदाशिव लक्ष्मण सोमण आणि नारायण तम्माजी ऊर्फ पुंडलिकजी कातगडे हे सहभागी होते. गंगाधरराव देशपांडे यांनी देव, कातगडे आणि सोमणांना चंपारण सत्याग्रहासाठी पाठविले होते. अहमदाबादमध्ये वकिलीचा व्यवसाय करणारे गणेश वासुदेव ऊर्फ दादासाहेब मावळंकर हेही अगदी प्रारंभीच्या काळातच महात्मा गांधींच्या सत्याग्रह आंदोलनात उतरले होते. हेच मावळंकर पुढे स्वतंत्र भारताच्या पहिल्या लोकसभेचे स्पीकर या पदावर निवडून आले. या सर्व गांधीवादी निष्ठावंतांनी अनेक राजकीय व सामाजिक मूल्ये निर्माण केली.

गांधीजींच्या आवाहनानुसार महाराष्ट्रातील सत्याग्रहाचे नेतृत्व शिवराम महादेव परांजपे, शंकरराव देव, गंगाधरराव देशपांडे, पुंडलिकजी कातगडे, कृ. प्र. खाडिलकर वगैरेंनी केले. सेनापती बापट, गजानन नारायण ऊर्फ बाळूकाका कानिटकर (१८८६-१९५९), गोविंदराव याळगी आणि वामन गोपाळ जोशी ऊर्फ वीर वामनराव जोशी (नाटककार) वगैरे टिळकभक्तही या चळवळीत सहभागी झालेत. यांच्यापैकी बहुसंख्य टिळकभक्तांची धारणा बनली की, गांधीजींच्या आंदोलन प्रणालीचा स्वीकार आपल्या टिळक-निष्ठेशी अजिबात विसंगत नाही. किंबहुना टिळक आणि गांधी यांच्या आचार-विचारप्रणालीत समन्वय व जवळीक साधणे हेच राष्ट्रहिताचे होय, असे अनेक टिळकभक्तांचे मत होते. गंगाधरराव

देशपांडे, कातगडे, याळगी वगैरे बेळगाव, उत्तर कर्नाटकातील नेते असले तरी ते महाराष्ट्राचेच प्रतिनिधी मानले जात. आतापर्यंत ज्या टिळकांचे आदेश या सर्व कार्यकर्त्यांनी शिरसावंद्य मानले होते, ते टिळक आता सत्याग्रहात नसताना, त्यांनी गांधीजींचे मार्गदर्शन घेतले व सत्याग्रह केला. तथापि बहुसंख्य टिळकभक्त सत्याग्रहाबाबत उदासीन होते. त्यामुळे टिळकांच्या प्रभावक्षेत्रात रौलट सत्याग्रहाला फारसा प्रतिसाद मिळाला नाही.

टिळकभक्त व व्यासंगी पत्रकार अच्युत बळवंत कोल्हटकर यांनी समकालीन राजकीय स्थितीवर प्रकाशझोत टाकला होता. १९१९ साली प्रस्थापित पुढाऱ्यांचे मार्ग खुंटले होते व त्यांच्या राजकारणाचा गाडा अडला होता. त्यातून गांधींनी पर्यायी मार्ग सुरू केला, हे सांगताना कोल्हटकरांनी लिहिले, " चळवळ म्हणजे सभा, भाषणे, वर्तमानपत्रे, ठराव, फंड..... सगळ्यात शेवटची गोष्ट म्हणजे डेप्युटेशने..... लोकमान्यांजवळ पुढचा मार्ग नाही! ते असेच म्हणणार की हेच पुनःपुन्हा करा....टिळक..... गांधी यांच्या जोडीत जेथे टिळकांचा मार्ग संपतो तेथे गांधींचा मार्ग सुरू होतो, हे उघड आहे. गांधी हे टिळकांच्या यत्नरेषेचे दीर्घीकरण आहे. टिळकांची यत्नरेषा डेप्युटेशनपाशी खलास झाली.... जेथे राजकरणाचे गाडे खात्रीने अडणार तेथे गांधींचा मार्ग सुरू होतो..... गांधींना लोकमान्यता नको! तीही एक शृंखलाच आहे ", असे त्यांनी म्हटले.[१२] या विवेचनात पुष्कळ खोल अर्थ दडलेला आहे.

## पंजाबमधील दडपशाही

संपूर्ण भारत आर्थिक हलाखीने आणि इंफ्लूएंझाच्या अभूतपूर्व साथीने ग्रस्त झालेला होता. देशातील दीड कोटी लोक उपचाराच्या अभावामुळे मरण पावले होते. जागतिक युद्धासाठी भारतीय मनुष्यबळ आणि युद्धसामग्री हस्तगत करण्यासाठी इंग्रजांनी उदार आश्वासने दिली होती. तथापि त्यांची परिपूर्ती अजिबात केली नव्हती. अशा अनेक बाबी होत्या. हिंदुस्तानातून दहा कोटी पौंड स्टर्लिंग एवढा युद्ध-निधी ब्रिटिशांनी वसूल केला होता. वर म्हटल्याप्रमाणे बारा लाख हिंदी सैनिक ब्रिटिश साम्राज्याच्या रक्षणासाठी लढले आणि त्यापैकी

७४,००० महायुद्धात मारले गेले होते. त्यांच्या नातलगांसाठी इंग्रज सरकारने अक्षरशः काहीच केले नव्हते. ना सैनिकांचे कल्याण ना गौरव ना जनतेला अनुतोष लाभला ! याचे वैषम्य सार्वत्रिक स्वरूपाचे होते. ब्रिटनने केलेल्या आश्वासनभंगाचे व कृतघ्नतेचे दुःख देशभर होते.

तथापि या दुःखाची तीव्रता पंजाबात सर्वाधिक होती. येथील लेफ्टनंट गव्हर्नर मायकेल ओडवायरने सक्तीची सेनाभरती करून हजारो युवकांचा छळ केला होता. शेकडो कुटुंबे उद्ध्वस्त झाली. संगिनीच्या टोकावर सक्तीने युद्धनिधी व सामग्री गोळा केली होती. त्याने केवळ संशयावरून शेकडोंना स्थानबद्ध केले होते. ब्रिटिश-अफगाणिस्तान संबंधांच्या पार्श्वभूमीवर सर्रास धरपकड केली होती. ओडवायरचा दहशतवाद सतत वाढत होता. त्याच्या अधिकाऱ्यांनी काही कर्मठ पण स्वार्थी शीख सेवेकऱ्यांना हाताशी धरून शिखांमध्ये दुहीचे राजकारण चालविले होते. ओडवायरने अमृतसरच्या अतिपवित्र गुरुद्वारातही अंतर्गत संघर्षाचे राजकारण पेरून ठेवले होते. गुरुद्वारा प्रबंधक समितीवर ब्रिटिश सरकारचे नियंत्रण आणले. त्यातून सुटका करण्यासाठी प्रागतिक विचारसरणीचे शीख विचारवंत प्रयत्न करीत होते. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन शिखांमध्ये ऐक्यभावना निर्माण झाली. त्यातून हिंदू-मुसलमान-शीख यांच्यात ऐक्यभाव निर्माण झाला. हे पाहून मायकेल ओडवायरचे माथे भडकले होते. डिव्हाईड अँड रूलच्या कपटनीतीचा हा पराभव होत असल्याचे त्याला वैषम्य जाणवले. आणि प्रतिहिंसेच्या भावनेने त्याच्या सरकारने १० एप्रिलपासून अत्याचार सुरू केले.

वस्तुतः ३० मार्च आणि ६ एप्रिल १९१९ या दिवशी डॉ. सत्यपाल व बॅ. किश्चलू यांच्या नेतृत्वाखाली अमृतसरमध्ये अगदी शांततेत हरताळ पाळले गेले होते. रामनवमीच्या निमित्ताने ९ एप्रिलला निघालेल्या मिरवणुकीत हिंदूंबरोबर मुसलमानही सामील झाले होते. यामुळे इंग्रजांचे माथे भडकले आणि १० एप्रिल रोजी डॉ. सत्यपाल आणि बॅ. किश्चलू यांना सरकारने हद्दपार केले. त्याचा निषेध म्हणून अमृतसरमध्ये हरताळ पाळला गेला. वस्तुतः ३० मार्चची जालियनवाला बागेतील ४०,००० देशप्रेमींची विराट सभा तसेच ६ एप्रिलचा संपूर्ण अमृतसरातील

हरताळ या दोन्ही उपरोक्त घटना हिंसासूचक नव्हत्या. पण तरीही सरकारने त्या दोन्ही लोकनेत्यांना अटक करून लोकक्षोभ वाढविला. लोकांना चिथावणी दिल्यासारखे केले. त्या नेत्यांची सुटका करण्याची मागणी करण्यासाठी मोठा जमाव दुपारी कलेक्टरच्या बंगल्याकडे घोषणा देत निघाला. गांधीजींना पलवल स्टेशनात अटक केल्याची बातमी मोर्चाला वाटेतच समजल्यामुळे लोक अधिकच भडकले. हा मोर्चा निःशस्त्र असूनही त्यावर अमृतसरातील हालगेट पुलाजवळ पोलिसांनी विनाकारण गोळीबार करून दोन माणसांना ठार मारले.

अधिकाऱ्यांनी अशी आगळीक केल्याकारणाने जमाव संतापला. जमावाने परतीच्या वाटेतील बँका, डाक कार्यालये, टेलिफोन एक्सचेंज, चर्च वगैरेंवर हल्ला केला. त्यात चार गोरे लोक मारले गेले आणि दोन गोऱ्या महिलांनाही मारहाण करण्यात आली. म्हणून अमृतसर शहरातील परिस्थिती हाताळण्यासाठी ब्रिगेडियर जनरल रेजिनाल्ड एडवर्ड हॅरी डायर यास तार पाठवून जालंदरहून लष्कराची कुमक मागवण्यात आली. ३०० सैनिकांच्या पाठोपाठ डायर येऊन पोहोचला. पंजाब सरकारने नंतर असा अगदी खोटा दावा केला होता की, डायरच्या आगमनापूर्वीच अमृतसरमधील कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी लष्करावर सोपविल्याचे एका परिपत्रकाद्वारे जाहीर केलेले होते. तसेच सभा व मिरवणुकींना मनाई करणारा हुकूम जारी करून गोळीबाराचाही इशारा देण्यात आला होता. तथापि उपलब्ध आधारसाहित्यातून सरकारच्या या प्रतिपादनास दुजोरा मिळत नाही. सरकारचा तसा आदेश कागदपत्रांत कोणालाही दिसला नाही.

## जालियनवाला बाग हत्याकांड

उपलब्ध आधारसाहित्यातून दिसते की, जन. डायरने गोळीबारासाठी आपणास हवी तशी मोक्याची जागा घेऊन व संधी मिळताच जालियनवाला मैदानातल्या सभेतील पंचवीस-तीस हजार लोकांना कसलीही पूर्वसूचना अथवा इशारा न देता अगदी प्रच्छन्नपणे गोळीबार केला.

पंजाब सरकारने पुढे सांगितले की, १२ एप्रिलला डायरच्या ३०० सैनिकांनी शहरभर संचलन केले त्या दिवशीही जनतेला इशारा दिला होता. १३ एप्रिलला

बैसाखी उत्सवानिमित्त जवळच्या गावांमधून पुष्कळ लोक अमृतसरात आलेले होते. त्या दिवशीही सभा-मिरवणुकींना बंदी असल्याची डायरच्या वतीने शहरात १९ ठिकाणी दवंडी पिटवली, पण ती लोकांनी हसण्यावारी नेली, असे पंजाब सरकारचे म्हणणे खोटे होते. या दवंडीपाठोपाठ दोन नागरिक त्याच दिवशी म्हणजे '१३ एप्रिलला दुपारी चार वाजता जालियनवाला बागेत जाहीर सभा होणार असल्याचे' ओरडून लोकांना सांगत होते. तथापि डायर अमृतसरला येण्याआधी ते शहर लष्कराच्या ताब्यात दिले होते या उपायुक्त म्हणजे कलेक्टरच्या दाव्याचा पुरावा कधीच कोणाला मिळाला नाही.

सर्व बाजूंनी इमारतींनी वेढलेल्या या मैदानात केवळ एक व तेही फारच अरुंद प्रवेशद्वार होते. तेथे चार वाजता सभा भरणार अशी खबर डायरला आधीच मिळालेली होती. तथापि लष्करी अधिकाऱ्यांनी प्रतिबंधक उपाय मुद्दाम योजले नव्हते. उलट, हंसराज नामक पोलीस खबऱ्याचा उपयोग करून, सभा भरेल अशी व्यवस्था करण्यात आली होती. सभा भरली म्हणजे लोकांची कत्तल करून चळवळ करणाऱ्यांना कायमची अद्दल घडवावयाची असा डायरचा डाव होता, अशी लोकांनी नंतर तक्रार केली होती. शिवाय स्वतः डायरने म्हटलेही होते की, "गांधींच्या सोल फोर्सला आपण शस्त्रबलाने उत्तर देऊ." डायरचा चरित्रकार इयान कॉल्विन याच्या मते या मैदानात सभा भरल्याचे कळताच डायरला आनंदच झाला होता. डायर व लष्कर मैदानात येण्यापूर्वी एक विमान सभेच्या जागेची टेहळणी करून गेले तेव्हा राष्ट्रद्रोही हंसराजने श्रोत्यांना दिलासा दिला होता की, "लोकांनी शांतपणे बसून राहावे, सरकार गोळीबार करणार नाही." जनरल डायर नव्वद गुरखा सैनिकांना घेऊन सभास्थानी पोहोचेपर्यंत फसव्या हंसराजसह सभेत सात वक्त्यांची भाषणे झालेली होती. डायर आल्यानंतर हंसराज तेथून पसार झाला. आणि नंतर तो सरकारच्या वतीने माफीचा साक्षीदार झाला.

आपल्याला हवी तशी जागा निवडून जन. डायरने जालियनवाला बागेत शांत बसलेल्या २५,००० ते ३०,००० लोकांना कसलीही चेतावनी वा सूचना न देता त्यांच्यावर नेम धरून गोळीबार करण्याचा सक्त हुकूम दिला. सहा ते दहा मिनिटे

अखंड गोळीबार झाला. आणलेला सर्व दारूगोळा संपल्यावर क्रूरकर्मा डायर व त्याचे सैनिक शेकडो प्रेते आणि जखमींना तसेच तडफडत ठेवून परत गेले. हे अतिभयानक दृश्य समक्ष पाहिलेल्या एका इंग्रजाने त्याचे पुढीलप्रमाणे वर्णन केलेले आहे :— " Towards the exits on either flank, the crowd converged in their frantic efforts to get away jostling, clambering, elbowing and trampling over each other...... Dyer directed the fire of the troops straight at them........ In places the dead and wounded lay in heaps, men would go down the wounded, to find themselves immediately buried beneath a dozen others...... ".[१३]

काही नागरिकांनी मैदानात विव्हळणाऱ्या जखमींना वाचविण्याचा प्रयत्न केला. पण सशस्त्र पोलिसांनी त्यांना मज्जाव केला. सरकारने मृतांचा आकडा प्रथम २९१ दिला आणि टीका झाल्यावर ३७९ जण मरण पावल्याचे व १२०० माणसे जखमी झाल्याचे जाहीर केले. वस्तुतः काँग्रेसच्या चौकशीत मृतांचा आकडा १००० आढळला, तर खाजगी चौकशीमध्ये हा आकडा १५०० पर्यंत दिसला.

अमृतसरमध्ये मार्शल लॉ लागू नसताना डायरने हे हत्याकांड केलेले होते. नंतर पंधरा एप्रिलपासून अमृतसर व लाहोरात मार्शल लॉ जारी केला आणि त्याची व्याप्ती कासूर, गुजरानवाला, ल्यालपूर वगैरे शहरांमध्ये वाढवण्यात आली. तदनंतरही गोऱ्यांच्या वधांचा सूड घेण्यासाठी अमृतसरमध्ये लष्कराने महाभयानक अत्याचार केले. ज्या रस्त्यावर शेरवूड नामक गौरांगनेला लोकांनी मारहाण केली होती, तेथील लोकांना रस्त्यातून सरपटत जायला लावले. शिवाय तेथेच रस्त्यात लोकांना फटके मारण्याच्या शिक्षा देण्यात आल्या. हिंदी नागरिकांना एप्रिलच्या उन्हात तासन्तास उभे करणे व बेड्या घालून अंगावर प्रहार करणे आणि रस्ते साफ करायला लावणे असेही अमानुष प्रकार लादण्यात आले. अमृतसरप्रमाणेच पंजाबातील इतर अनेक शहरांवर लष्कराचे जुलमी प्रशासन लादण्यात आले होते.

गुजरानवाला शहर आणि जवळपासच्या खेडेगावांवर विमानातून बाँबवर्षाव करण्यात आला. ब्रिटिशांना हत्याकांडासाठी बंदुकीपेक्षा मशीनगन अधिक उपयोगी वाटली. म्हणून ब्रिटिश लष्कराने मख्खपणे अनेक मशीनगन उपयोगात आणून निरपराध नागरिकांना ठार केले. गांधीजींच्या 'सोल फोर्स' ला आपण शस्त्रबलाने उत्तर देऊ, असे प्रथम गव्हर्नर मायकेल ओडवायर ७ एप्रिल रोजी बडबडला होता. आणि नंतर जन. डायरने त्याचा पुनरुच्चार केला होता. उद्दाम ओडवायरने आपली उक्ती खरी करून दाखवण्याचा चंग बांधला होता. या क्रौर्यामुळे गुजरानवाला शहरात दंगल उसळली (१४ एप्रिल १९१९). तिचा सूड घेण्यासाठी व दंगल थांबविण्यासाठी विमानातून शहरातील खालसा विद्यालयावर बाँब टाकण्यात आला. त्या बाँब हल्ल्यात शाळकरी मुले मरण पावली तर अनेक मुले जखमी झाली. ओडवायरने या बाँबवर्षावाचेही समर्थन केले होते.

मायकेल ओडवायरने पंजाबची इतकी मुस्कटदाबी केली होती की, त्या प्रांतातील कोणतीही बातमी बाहेर जाऊ शकतच नव्हती. शिवाय कोणालाही प्रांताबाहेर जाता येत नव्हते आणि कोणालाही पंजाबात प्रवेश दिला जात नव्हता. कडक लष्करी अमलामुळे तेथील परिस्थिती देशाला बरेच दिवस समजलीच नव्हती. २४ एप्रिल १९१९ च्या **बॉम्बे क्रॉनिकलमध्ये** प्रथमच पंजाबातील अत्याचारांची माहिती प्रकाशित झाली. त्यासाठीच या पत्रकाचे संपादक बेंजामिन हॉर्निमन यांना हिंदुस्तानाबाहेर घालविण्यात आले होते. (२६ एप्रिल १९१९).[१४]

उद्दाम व क्रूर जन. डायर आणि मायकेल ओडवायर यांना संरक्षण देणारा व्हाइसरॉय चेम्सफर्ड भारतीयांना कधीच प्रिय झाला नाही.

काही दिवसांनी जवाहरलाल नेहरू रात्रीच्या गाडीने अमृतसरहून दिल्लीला प्रवास करीत असताना, त्यांच्याच पहिल्या वर्गाच्या डब्यात जनरल डायरदेखील होता. त्यांच्याबरोबर असलेल्या लष्करी अधिकाऱ्यांपुढे डायरने मारलेली बढाई नेहरूंनी समक्ष ऐकली होती. आपल्या आत्मकथेत याविषयीची नोंद घेताना नेहरूंनी डायरचे पुढील अर्थाचे शब्द उद्धृत केले, "सर्व शहर माझ्या अगदी मुठीत होते. एकदा माझ्या मनात आले की, हे बंडखोर शहर पार धुळीस

मिळवावे; पण म्हटले जाऊ द्या आणि मग तो विचार मी सोडून दिला. ” डायरचे सर्वच वक्तव्य नेहरूंना वेदना देऊन गेले.[१५] विस्तारभयामुळे ते वक्तव्य इथे उद्धृत करत नाही. पण ते वाचून वाटतेच की, डायर सॅडिस्ट म्हणजे परपीडा-आनंद मानणारा क्रूर दानव होता.

**ब्रिटिशांचे अकथित अंतरंग :—**पंजाबात व विशेषतः अमृतसरमध्ये जनक्षोभ उसळण्यास मायकेल ओडवायरचा अमुत्सद्दीपणा, अविवेकीपणा व युध्यमान आवेश कारणीभूत होता, असे अनेक इंग्रजांच्या गोपनीय टिपणांमध्येही नमूद असल्याचे आम्हास आढळले. अमृतसरमध्ये जमावाने युरोपियनांवर हल्ला केला तो गोळीबारानंतर, आधी नव्हे ! तो गोळीबार अनाठायी होता. जमाव प्रक्षोभित झाला गोळीबारामुळे, हे अमृतसरच्या प्रशासनाचेही मत होते. अमृतसरच्या डेप्युटी कमिशनरच्या गोपनीय अहवालात हे नमूद केलेले आहे. त्यातील शब्द पाहा, “ In fact the resolution to attack the Europeans was a sudden and unpredictable impulse, which arose after the crowd had been fired upon......... (and) there was no reason to believe that there would be a demonstration which could not be kept back with the horses of the mounted troops ”.[१६]

भारतमंत्री एडविन मॉंटेग्यू यांनादेखील या सर्व शोकांतिकेची पूर्वकल्पना आलेलीच होती. त्यांनी व्हाइसरॉय चेम्सफर्ड यांना कळविताना म्हटले, “ Jallianwala tragedy has convinced me that our old friend, firm government, the idol of Club smoking room, has produced its invariable and inevitable harvest.”.[१७]

तरीसुद्धा चेम्सफर्ड साहेबांनी ओडवायरच्या अत्यंत कडव्या कारभाराचे समर्थन केले. शिवाय सेनाबलाच्या जोरावर पंजाबचा देशाशी एकूण संपर्क तोडला याची त्यांनी कारणमीमांसा केली. तथापि व्हाइसरॉय यांनी ओडवायरच्या काही आदेशांचा धिक्कार केला. तसेच गंभीर आरोप असलेल्या काही पंजाबी वीरांना

खुल्या मैदानामध्ये नागरिकांच्या हजेरीत फाशी देण्यास व्हाइसरॉयने परवानगी नाकारली. त्यामुळे ओडवायरला आपल्या आदेशात बदल करावा लागला. मात्र चेम्सफर्डदेखील कडवा साम्राज्यवादीच होता. शस्त्रबलाचा अतिरेक केलेल्या सेनाधिकाऱ्यांना आणि त्यांना पाठिंबा देणाऱ्या सर्व सनदी नोकरशाहीला उचित शिक्षा द्याव्या, ही काँग्रेस व काही लिबरल व्यक्तींनी मागणी केली होती. तथापि चेम्सफर्डने ही मागणी तडकाफडकी नाकारली. शिवाय अमृतसरातील उठावाची त्यांनी १८५७ च्या विद्रोहाशी तुलना केली आणि ओडवायर व डायरच्या क्रौर्याचे समर्थनच केले. चेम्सफर्ड अत्यंत दुटप्पीपणे वागले. संयुक्त प्रांताचा गव्हर्नर हारकोर्ट बटलर याने त्याच्या आईला लिहिलेल्या पत्रात म्हटले, ‘‘ओडवायर हॅज ड्रगून्ड द पंजाब’’.

## सरकारी अत्याचार

काँग्रेसच्या चित्तरंजन दास व मोतीलाल नेहरू समितीच्या अहवालातून उघड झाले होते की, पंजाबातील घटनांचा रौलट सत्याग्रहाशी थेट संबंधच नव्हता. तिथे रौलट सत्याग्रह सुरू केलेला नव्हता. गव्हर्नर ओडवायरने चालविलेली भयानक मुस्कटदाबी, दडपशाही व सुशिक्षितांची अवहेलना यामुळे जनमत खवळले होते. त्यात फार मोठी भर घातली होती सक्तीच्या लष्कर-भरतीमधील अन्यायांनी! याव्यतिरिक्त वॉर फंड गोळा करताना लष्करी प्रशासनाने भयंकर अरेरावी केली होती. शिवाय वॉर फंडात अनेकांनी भ्रष्टाचार केल्याची वदंता होती. मात्र लष्करी प्रशासन असंतोष दडपून टाकत होते. वर्तमानपत्रांच्या मुस्कटदाबीमुळे याबाबत देशाला फारशी माहिती मिळत नसे.

डॉ. सत्यपाल व किश्चलू यांना विनाकारण तडीपार केल्यामुळे प्रक्षोभ वाढला, हा समितीचा निष्कर्ष होता. तसेच गांधीजींना पंजाबात प्रवेश करू न देता, त्यांना वाटेतच अटक केल्यामुळे जनमत भयंकर प्रक्षोभित झाले, असा समितीने निष्कर्ष काढला. सरकारच्याच दुराचारामुळे व दडपशाहीमुळे जनता पेटून उठली होती.

खरे तर सत्याग्रहींनी बंडखोरांना आवरले होते. चित्तरंजन दास यांच्याकडे पुरावा होता की, जन. डायरने 'अगदी ठरवून' जालियनवाला बागेत वंशविच्छेद करण्याचा सापळा रचला होता. हंसराज हा राष्ट्रद्रोही माणूस त्याचा हस्तक होता. मार्शल लॉ प्रशासकाने या वंशविच्छेदाचे समर्थन केले. काँग्रेसच्या अहवालातील हे निरीक्षण पाहा :— " The massacre was a calculated piece of inhumanity towards the utterly innocent and unarmed men, including children, unparalleled for its ferocity in the history of modern British Administration. ".[१८]

ज्या रस्त्यावर जमावाने एका इंग्रज महिलेस मारहाण केली होती, त्यावर डायरने प्रतिहिंसा म्हणून परिसरातील सर्व लोकांना हनवटी टेकवून सरपटण्याचा हुकूम दिला होता. डायरची ही क्रॉलिंग ऑर्डर जगभर प्रसिद्धी पावली. मोतीलालजी व चित्तरंजन दास यांनी जालियनवाला बागेतील विहिरीत, दोन अडीच महिन्यानंतरही, अगणित मृतदेह कुजत पडलेले पाहिले होते. ते बाहेर काढण्यास कोणीच तयार नव्हते. मशीन गन फायरिंगच्या खुणा आम्ही स्वतः अलीकडे पाहिल्या.

काँग्रेसने रीतसर चौकशी करून पुढीलप्रमाणे मागण्या केल्या होत्या.— (१) मायकेल ओडवायर व डायरला पदच्युत करावे. (२) जबाबदार नोकरशाही व सेनाधिकाऱ्यांवर कारवाई करावी. (३) व्हाइसरॉयने ओडवायरशी हातमिळवणी केल्यामुळे त्यांना येथून मायदेशी परत न्यावे. (४) रौलट कायदा रद्दबातल करावा. (५) समरी कोर्टांनी ठोठावलेले दंड माफ करावे. इत्यादी.

तथापि याउलट नोकरशाहीच्या व लष्करशहांच्या प्रचंड दडपणाखाली कलोनिअल राजसत्तेने इंडेम्निटी ॲक्ट पास केला. त्यानुसार नोकरशहा व लष्करशहा यांनी केलेले अतिरेकी वर्तन व दुराचार क्षमापित करण्यात आले. सर्व हिंसाचारी इंग्रज दोषमुक्त ठरले.

**हंटर कमिशनने केलेली रंगसफेदी** :—पंजाबातील हत्याकांड, सरकारी अन्याय व अत्याचारांच्या चौकशीसाठी नेमलेल्या हंटर आयोगाने सक्तीची लष्करभरती, खंडण्या व वॉर फंडाबाबत पंजाब सरकारने केलेले अन्याय दुर्लक्षित व क्षमापित केले. याउलट महागाई, खिलाफत प्रश्न, देशातील जनजागृती, भारत संरक्षण कायदा व रौलट चळवळीमुळे पंजाबात जनक्षोभ झाला, असे आयोगाने म्हटले. पंजाबात खुले बंड पेटल्यामुळे मार्शल लॉ आवश्यक होता, असे समर्थन करून जखमांवर मीठ चोळले. प्रशासनाच्या अत्याचारांवर सौम्य टीका केली. डायरने दिलेल्या क्रूर क्रॉलिंग ऑर्डरवर टीका करून, चौकाचौकांमध्ये अधिकाऱ्यांनी नागरिकांना मारलेल्या फटक्यांविषयी आयोगाने फक्त नापसंती नमूद केली. आयोगाने डायरवर ठपका ठेवला की, त्याने सभेवर गोळीबार करण्यापूर्वी सभेचे विसर्जन करण्याचा हुकूम देणे आवश्यक होते ; तसेच इतका वेळ गोळीबार करण्यात डायरने गंभीर चूक केली. तथापि हंटर आयोगाने जनरल डायरला संरक्षण देण्याच्या उद्देशाने ''डायरने भयंकर क्रौर्य केले '' या आरोपाचे खंडन केले. **खरे तर हा आयोग म्हणजे कलोनिअल बनाव होता. रंगसफेदी होती.**

हंटर अहवाल एकमताचा नव्हता. आयोगाचे भारतीय सदस्य सर चिमणलाल सेटलवाड व सुलतान अहमद यांनी भिन्नमतपत्रक जोडले होते. तथापि इंग्रजांच्या मताधिक्याने अहवाल जाहीर झाला. वस्तुतः जालियनवाला बागेतच खुद्द इंग्रज अधिकाऱ्यांना ४०० मृतदेह आढळले होते. तरीही हंटर अहवालात हा आकडा ३७९ इतकाच देण्यात आला. काँग्रेसने केलेल्या सर्वेक्षणात मृतांचा आकडा एक हजारावर होता. तर खाजगी अभ्यासकांच्या मते यापेक्षा जास्त लोकांना डायर आणि कंपनीने शहीद बनविले होते.

**ब्रिटिश असंवेदनशीलतेचे नमुने** :—सरकारी दस्तऐवजांचा अभ्यास करताना मला फक्त भारतमंत्री एडविन मॉँटेग्यू यांनी अमृतसरमधील त्या पीडितांविषयी व्यक्त केलेली संवेदना आढळली. त्यांनी डायरचा स्पष्टपणे धिक्कार केला होता. त्यांनी चेम्सफर्डला खडसावले होते—" लष्करी कायद्याच्या अत्याचारांद्वारे इंग्रजांनी भारतीय वंशाचा अपमान केला. तथापि व्हाइसरॉय चेम्सफर्ड व संपूर्ण नोकरशाहीने

जन. डायरला अभय दिले. मायकेल ओडवायरला संरक्षण दिले. ” ब्रिटनच्या हाऊस ऑफ लॉर्ड्समध्ये तब्बल १२९ सभासदांनी जन. डायरला पाठिंबा देऊन त्याची प्रशंसा केली होती. फक्त ८६ सदस्यांनी डायरचा निषेध केला होता. भारतातील कित्येक इंग्रजी वर्तमानपत्रकांनी डायरने केलेल्या मानवसंहाराचे समर्थन केले होते. तसेच त्यांनी पक्षपाती व चुकांनी भरलेल्या हंटर कमिशनच्या अहवालाचेही समर्थन केलेले होते.

व्हाइसरॉय चेम्सफर्ड हे पूर्णांशाने इंपिरिआलिस्ट व साम्राज्यवादी होते, हे उघड होते. त्याचबरोबर त्यांचे बादशहा पाचवे जॉर्ज यांच्याशी व्यक्तिगत सौहार्दाचे संबंधही होते. चेम्सफर्डच नव्हे तर बादशहा पाचवे जॉर्ज हेही भारतीय प्रजाजनांविषयी किती असंवेदनशील व निर्दय होते, ही वस्तुस्थिती नव्यानेच उपलब्ध झालेल्या लंडनमधील रॉयल अभिलेखागारामधील अस्सल दस्तऐवजांमधून मला दिसून आली. चेम्सफर्ड काय आणि पाचवे जॉर्ज काय, त्यांना प्रजेच्या सुखाचे अथवा संरक्षणाचे देणे-घेणे नव्हते. त्यांना केवळ साम्राज्य अबाधित ठेवण्यात रस होता. त्या दोघांच्या पत्रांमधून स्पष्ट दिसते की, त्यांना पंजाबातील मानवसंहाराचे अजिबात दुःख वा संवेदना वाटली नाही. चेम्सफर्डने जन. डायरच्या शौर्याची प्रशंसा करून बादशहांना लिहिले, “ Gen. Dyer is an officer of great distinction. The story goes that to this day women hush their crying children with the name of General Dyer. ”[१९]

चेम्सफर्ड यांनी एका पत्रात मायकेल ओडवायरची दिलखुलास प्रशंसा करून पंजाबमध्ये आपल्या राजवटीवर गुदरलेल्या भयंकर संकटावर त्याने मात केली, असे म्हटले. आणि आपल्या बादशहाला ओडवायरविषयी कृतज्ञता भाव कळविला, “ Sir Michael O’Dwyer has acted with his accustomed courage and promptness, and we must be grateful to him for the fact that we had him at the head of affairs in the Punjab, when this outbreak took place. Sir George Lloyd has similarly faced the ugly situation in Bombay with great courage and judgement.”.[२०]

बादशहा पाचवे जॉर्ज यांनी या पत्रांना उत्तर देताना, आपल्या मारल्या गेलेल्या वा यातना भोगत असलेल्या प्रजाजनांविषयी कणव व सहानुभूतीचा एकही शब्द लिहिला नाही. त्यांनी चेम्सफर्डला लिहिले, ‘‘डायर सेव्हड इंडिया ’’. अन्यथा १८५७ सारखी महाभयंकर आपत्ती कोसळली असती ![२१] याचा अर्थ डायर, चेम्सफर्ड अथवा पाचवे जॉर्ज, या सर्वच साम्राज्यशहांना त्यांचे साम्राज्य शाश्वत ठेवावयाचे होते. त्यांना प्रजाजनांविषयी प्रेम वा सहानुभूती नव्हती.

पंजाबातील गधर क्रांतिकारकांना प्रथम १९१५ साली आणि आता १९१९ मध्ये जोरदार धक्के बसले हे खरे. तथापि जालियनवाला हत्याकांड आणि इंग्रजांचे क्रौर्य याची जबरदस्त प्रतिक्रिया म्हणून, पंजाब व संयुक्त प्रांतातील बरेच युवक क्रांतिमार्गाकडे झुकले. सरदार भगतसिंग, सुखदेव, चंद्रशेखर आझाद, शिवराम हरी राजगुरू वगैरे क्रांतिकारकांची नवी पिढी उदय पावली. इथे एक गोष्ट सांगायला पाहिजे. गधर क्रांतिकारक सरदार उधमसिंग हे जालियनवाला बाग शोकांतिका समक्ष पाहिल्यापासून त्या हत्याकांडाचा सूड उगविण्यासाठी पेटून उठले होते. १९१९ पासून ते सतत प्रयत्न करीत राहिले. त्यांनी या ध्येयाचा ध्यास घेतला होता. अखेरीस १३ मार्च १९४० रोजी सरदार उधमसिंग यांनी लंडनमधील प्रसिद्ध कॅक्सटन सभागृहात मायकेल ओडवायरला गाठले. त्यांनी ओडवायरचा वध केला! **मात्र उधमसिंग पकडले गेले. आणि १२ जून १९४० रोजी ‘ आपण धन्य झालो ’ असे म्हणत फासावर चढले! आपले क्रांतिकार्य सफल झाल्याचा त्यांनी आनंद व्यक्त केला.**

## सत्याग्रह स्थगित

पंजाबमधील मानवसंहार व रौलट सत्याग्रह चालू असताना लोकमान्य टिळक ब्रिटनमध्येच होते. पंजाबमधील अत्याचारांची माहिती देशाला सर्वप्रथम व तपशिलाने दिली होती फक्त **बॉंबे क्रॉनिकल** पत्रकाने. बेंजामिन हॉर्निमनच्या या पत्रकाव्यतिरिक्त देशातील दुसऱ्या एकाही पत्रकाने हे धैर्य दाखवले होते.

म्हणून पत्रकाचे झुंजार संपादक बेंजामिन हॉर्निमन यांना व्हाइसरॉयच्या आदेशानुसार मुंबई सरकारने अटक केली. आणि त्यांना २६ एप्रिल १९१९ रोजी सक्तीने बोटीत घातले व हिंदुस्तानातून तडीपार केले. मायदेशी परत पाठविलेले आयरिश वंशाचे हॉर्निमन महान भारतमित्र होते.

रौलट सत्याग्रह हा काँग्रेसचा कार्यक्रम नव्हता. त्यास टिळक-खापर्डे, न. चिं. केळकर व टिळकपंथीय मंडळीचा पाठिंबा नव्हता. तसेच सुरेंद्रनाथ बॅनर्जी, बिपिनचंद्र पाल, श्रीनिवास शास्त्री, दिनशा वाच्छा वगैरे प्रस्थापित पुढाऱ्यांचाही पाठिंबा नव्हता. तथापि कविवर्य गुरुदेव रविंद्रनाथ टागोरांनी ३१ मे १९१९ रोजी पंजाबातील सरकारी अत्याचारांचा जाहीर निषेध केला. आणि इंग्रजांनी दिलेला 'सर' हा किताब धिक्कारला. सरकारला हा धक्का वाटला. मात्र महाराष्ट्रातील किताबधारकांना अशी सद्‍बुद्धी तेव्हा झाली नाही.

सरकारची दडपशाही व पंजाबातील हत्याकांडाचा निषेध जसा मुंबई शहरात झाला, तसा व त्यापेक्षाही जास्त गुजरातमध्ये झाला. गुजरातमधील खेडा, विरमगाव, नडियाद आणि अहमदाबाद भागात सत्याग्रहास मोठा प्रतिसाद लाभला. मात्र त्या भागात दंगे झाले. गुजरातच्या काही शहरांमध्ये सरकारच्या निषेधास हिंसाचाराचे गालबोट लागले. म्हणून तेथे लष्करी कायद्याचा अंमल जारी करावा लागला होता. त्यामुळे महात्मा गांधी खूप व्यथित झाले होते. त्यांना पटले की, सत्याग्रहाच्या तत्त्वानुसार शांततापूर्ण प्रतिकार चालविण्यास अद्याप समाजमन परिपक्व झालेले नाही. हिंसाचार हा सत्याग्रहाचा शत्रू होता. जनतेला नीती-अनीतीचे भान आल्याखेरीज अहिंसा सफल होणार नाही. लोकांना अहिंसा व सत्याग्रहाचे पुरेसे शिक्षण देण्याआधी आपण जनतेला सविनय कायदेभंग करण्यास सांगितले, याचे गांधीजींना मनस्वी दुःख झाले. कायदेभंगास आवश्यक असलेली प्रगल्भता साध्य करण्याआधीच आपण त्यांना कायदेभंग करायला प्रवृत्त केले ही आपली चूक झाली, असे त्यांनी कबूल केले. त्यानुसार महात्मा गांधींनी

प्रथम नडियादमध्ये ' हिमालयन ब्लंडर ' हे प्रसिद्ध शब्द जाहीरपणे उच्चारले. आणि रौलट सत्याग्रह मागे घेतला. तथापि १८ एप्रिल १९१९ रोजी ' प्रलंबित केला ' तो केवळ 'सामुदायिक' आंदोलनाचा ऑपरेटिव्ह भाग होता. सत्याग्रहातील प्रवर्ती भाग म्हणजे सत्य व अहिंसेच्या विचारप्रणालीद्वारे स्वराज्य-प्राप्तीचा प्रचार चालूच राहिला.[२२]

दादासाहेब खापर्डे कायदेमंडळातील सभासदत्वाचा त्याग करण्यास तयार झाले नाही. सत्याग्रहात सामील झाले नाही. पुढेही कधीच ते स्वातंत्र्य आंदोलनात उतरले नाही. तथापि रौलट सत्याग्रहातून महाराष्ट्रात व विदर्भातही बांधील स्वातंत्र्य सैनिकांची पिढी उदयास आली. मुंबईत के. एफ. नरिमन, बाळ गंगाधर खेर, स. का. पाटील, शंकरलाल बँकर, जमनादास द्वारकादास, जमनादास मेहता, उमर सोभानी, मिया महंमद छोटानी वगैरे अनेक कार्यकर्ते उदयास आले. टिळकांचे मुंबईतील अनुयायी डॉ. दि. धों. साठे, डॉ. वेलकर, एम. सी. जावळे, व्ही. एम. पवार, इ. गांधींचे अनुयायी झाले. स्वतः टिळक इंग्लंडहून मायदेशी परत आल्यावर त्यांच्या त्वरित ध्यानात आले की, महात्मा गांधी यांचा मोठे पुढारी म्हणून उदय झालेला आहे. पुणे व महाराष्ट्रात शंकरराव देव, नरहर वि. गाडगीळ, पांडुरंग महादेव बापट, वासुदेव विठ्ठल दास्ताने आणि जळगावचे देवकीनंदन नारायण इत्यादींनी राष्ट्रकार्यास वाहून घेतले. या सत्याग्रहामुळे केशव नीळकंठ जोगळेकर, श्रीपाद अमृत डांगे वगैरे युवक प्रभावित होऊन आगामी असहकार चळवळीत निष्ठापूर्वक सहभागी झाले. तसेच वऱ्हाड-मध्यप्रांतात जमनालाल बजाज, ब्रिजलाल बियाणी, रविशंकर शुक्ला, वीर वामनराव, राघवेंद्रराव वगैरे नेते उदय पावले. राजकारणात बांधीलकीची भावना आली.

विशिष्ट उद्दिष्टासाठी उभारलेली राजकीय चळवळ यादृष्टीने रौलट सत्याग्रह असफल झाला. मात्र त्यातून आगामी आंदोलनाचा पाया रचला गेला. या सत्याग्रहाची फलश्रुती मर्यादित असली, तरी खंडप्राय भारतभर प्रत्यक्ष झालेले

हे पहिलेच आंदोलन होते. या आंदोलनात मुस्लीम लीगने सक्रिय भाग घेतल्यामुळे स्वराज्य चळवळीला व्यापक रूप आले. विविध धर्मांचे युवक चळवळीत उतरल्याकारणाने साम्राज्यशाहीला हादरा बसला. युवक व महिलांच्या सहभागामुळे नोकरशाही चकित झाली होती. मुंबई इलाख्याच्या पोलीस महानिरीक्षकाने दिलखुलासपणे कबूल केले. ''गांधी अनडाऊटेडली ऑब्टेन्ड अ होल्ड ऑन द इमॅजिनेशन ऑफ द मासेस ''. केंब्रिजच्या इतिहासकार ज्युडिथ ब्राऊन यांनी सत्याग्रहाचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करताना म्हटले, " The Rowlatt Satyagraha showed Gandhi as an All-India leader of immense potential. His personality, his ideology, his novel approach to politics, and his technique of satyagraha enabled his campaign to become the focus of multifarious local grievances and gave him access to the power they generated."[२३]

❑❑

## संदर्भ

१. पाळंदे एम. आर. व फाटक एन. आर. (संपा.), **सोर्स मटेरिअल फॉर हिस्टरी ऑफ फ्रीडम मुव्हमेंट इन इंडिया,** खंड दोन, पृ. ३३०-३१, मुंबई सरकार, १९५८.
२. **कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी,** खंड १५, पृ. ८७-८८, भारत सरकार.
३. कित्ता, पृ. १०७.
४. एडविन मॉंटेग्यू, भारतमंत्री यांचे व्हाइसरॉय चेम्सफर्डला पत्र, ज्युडिथ ब्राऊन, **गांधीज् राइझ टू पॉवर : इंडियन पॉलिटिक्स : १९१५-१९२२,** केंब्रिज, १९७२, पृ. १६१ वर उद्‌धृत.
५. कित्ता, पृ. १६१-६३.
६. कित्ता, पृ. १६४, महात्मा गांधींचे मॉंटेग्यू यांना पत्र, १४ जून १९१९.
७. कित्ता, पृ. १६८-६९.
८. बी. जी. कुंटे (संपा.), **सोर्स मटेरिअल फॉर हिस्टरी ऑफ फ्रीडम मुव्हमेंट इन इंडिया, खंड सात : डायरी ऑफ दादासाहेब खापर्डे,** पृ. ५५२.
९. एडविन मॉंटेग्यू यांचे व्हाइसरॉय चेम्सफर्डला ८ मार्च १९१९ चे पत्र, ब्राऊन, उपरोक्त, पृ. २३१ वर उदधृत.
१०. के. के. चौधरी, **हिस्टरी ऑफ बॉम्बे : मॉडर्न पिरिअड,** महाराष्ट्र सरकार, १९८७, पृ. १२४ वर उद्‌धृत.
११. बॉम्बे प्रेसिडेंसी पोलीस ॲबस्ट्रॅक्ट ऑफ इंटेलिजंस, १९१९, परि. ५९८.
१२. **संदेश,** २३ सप्टेंबर १९१९.
१३. भीषम सहानी, **जालियनवाला बाग,** नवी दिल्ली, २००३, पृ. ४७-४८.
१४. य. दि. फडके, **विसाव्या शतकातील महाराष्ट्र,** खंड दुसरा, २००५, पृ. ११६-१९.
१५. जवाहरलाल नेहरू, **ॲन ऑटोबायोग्राफी,** नवी दिल्ली, २००१ आवृत्ती, पृ. ४३-४४.
१६. सहानी, उपरोक्त, पृ. ४०.
१७. मॉंटेग्यू यांचे व्हाइसरॉय चेम्सफर्डला १ मे १९१९ चे पत्र, ब्राऊन, उपरोक्त, पृ. २३१.
१८. **कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी,** खंड १७, पृ. २८६, २९१, भारत सरकार.
१९. पी. एन. चोप्रा (संपा.), **सिक्रेट पेपर्स फ्रॉम ब्रिटिश रॉयल आर्चिव्हज् इन लंडन,** दिल्ली, १९९८, पृ. १९८.
२०. कित्ता, पृ. १९७.
२१. कित्ता, पृ. २०४.
२२. मोहनचंद करमचंद गांधी, **आत्मकथा,** अहमदाबाद, २००५, पृ. ४४५-४६, मराठी भाषांतर.
२३. ब्राऊन, उपरोक्त, पृ. १८७.

प्रकरण २

# असहकार चळवळ

## चळवळीची पूर्वतयारी

पंजाबातील नादिरशाही व झोटिंग पातशाहीमुळे भारतीय जनता प्रक्षुब्ध झाली होती. मायकेल ओडवायरने सुरू केलेली खास न्यायालये प्रत्यक्षात त्याच्याच आदेशानुसार चालणारी 'सरकारी मंडळे' होती. चार्लस अँड्र्युज यांनी समक्ष पाहून गांधीजींना कळविले की, लष्करी कायद्याचा पंजाबातील जुलूम वर्तमानपत्रांतील बातम्यांपेक्षा भयंकर जुलमी स्वरूपाचा होय. स्वतः गांधीजी व्हाइसरॉयची लेखी परवानगी घेऊन पंजाबात गेले असता, त्यांना तेथील सरकारी जुलूम, कलोनिअल अराजक व अंमलदारांची अरेरावी कल्पनेपेक्षा खूपच जास्त असल्याचे आढळलेले होते. सरकारी अत्याचारांवर प्रकाश टाकणाऱ्या हॉर्निमन यांना भारतातून हद्दपार केल्यावर त्यांचे **बॉंबे क्रॉनिकल** पत्रक सरकारने बंद पाडले होते. आपल्या पत्रकांवरदेखील तशीच कुऱ्हाड पडणार या भयाने उमर सोभानी आणि शंकरलाल बँकर यांनीही आपली अनुक्रमे **यंग इंडिया** आणि **नवजीवन** ही पत्रके गांधीजींकडे हस्तांतरित केली. काही दिवसांनी **बॉंबे क्रॉनिकल** पत्रक त्यांच्याकडेच आले. त्यांद्वारे गांधीजींनी बरेच दिवस सत्याग्रहाची शिकवण दिली. **यंग इंडिया, नवजीवन** या पत्रकांचा खप प्रत्येकी ४०,००० पर्यंत जाऊन पोहोचला. त्या आणीबाणीच्या काळी या पत्रकांनी लोकशिक्षण देतानाच राष्ट्रवाद, स्वातंत्र्य, सत्यधर्म व बंधुभावाचे प्रसारण करण्यात मोठे योगदान दिले. लष्करी कायदा प्रशासनावर त्यांनी टीका केल्याने ओडवायरलाही नरमाईचे धोरण पत्करावे लागले. पंजाबातील अत्याचारांचा काँग्रेस पक्षाचा अहवाल गांधीजींनी ठोस पुराव्यांसह लिहिला होता. त्यामुळे केंद्र सरकारला तो खोडून टाकणे शक्य झाले नव्हते.

याच सुमारास खलिफाच्या 'गादी' विषयी ब्रिटिश बादशहाने युद्धकाळात दिलेल्या आश्वासनांचा भंग केल्यामुळे, मुसलमानांमध्ये तीव्र असंतोष पसरला

होता. त्यातून खिलाफत चळवळ उभी राहिली. या चळवळीचे नेते मौलाना अब्दुल बारी यांनी घोषित केले, " हिंदूंची खिलाफतीला मदत होवो अगर न होवो, आपण सर्व एकाच मुलखातील असल्यामुळे मुसलमानांनी हिंदूंच्या समाधानास्तव गोवध करणे बंद केले पाहिजे". म्हणूनच गांधीजींनी खिलाफत चळवळीचे नेतृत्व करण्यास संमती दिली. जाहीर सभेत त्यांनी घोषित केले, "ब्रिटिशांनी खिलाफत प्रकरणी न्याय न दिल्यास, सर्वच भारतीयांनी सरकारी किताब व सरकारी नोकरी वगैरेंचा त्याग करणे राष्ट्रीय स्वाभिमानाशी सुसंगत ठरेल". याच सभेत गांधीजींनी प्रथमच 'नॉन-कोऑपरेशन' ही संज्ञा वापरली.[१]

२३ डिसेंबर १९१९ रोजी बादशहाच्या जाहीरनाम्याद्वारे गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्ट घोषित झाला. तत्पूर्वी नेमस्त पक्षाचे नेते संभाव्य राज्यसुधारणांकडे व नवीन कायदेमंडळांकडे आशाळभूतपणे नजर लावून बसले होते. ते सत्ताप्राप्तीची स्वप्ने पाहत होते. तथापि घोषणेमुळे चित्तरंजन दास, मोतीलाल नेहरू वगैरे नेते व सुशिक्षित वर्गाची घोर निराशा झाली. 'घायाळ झालेला पंजाब', मदतीची याचना करत होता. तरीही पंजाबची आसवे पुसण्यास मवाळांचा 'लिबरल पक्ष' प्रस्थापित काँग्रेसशी हात मिळवणी करण्यास तयार नव्हता. अशा वातावरणात १९१९ ची काँग्रेस अमृतसरमध्ये भरली होती. अधिवेशनातील बहुसंख्य प्रतिनिधी आणि काँग्रेस कार्यकर्ते 'गांधीजींनी पक्षाचे नेतृत्व करावे', अशी मागणी करीत होते. 'गांधीजी की जय' नारा तिथे दुमदुमला. नुकतेच बंधमुक्त झालेले मौलाना महंमद अली व शौकत अली हे मुस्लीम लोकप्रिय नेते काँग्रेसला येऊन मिळाले. त्यामुळे राजकारणाला नवे स्वरूप व नवी दिशा मिळाली. खिलाफत प्रकरणी न्याय मिळविण्यासाठी व त्यास्तव पाचवे जॉर्ज यांना साकडे घालण्यासाठी महंमद अली यांचे शिष्टमंडळ लंडनला गेले.

पंजाबमधील हत्याकांड व अत्याचार आणि खिलाफत प्रकरणी ब्रिटिशांनी केलेला वचनभंग यामुळे जनमत प्रक्षोभित झाले होते. त्यात युद्धनिर्मित महागाई, मालाची टंचाई व नफ्यावरील जबर कर यामुळे भर पडली. फ्ल्यूच्या साथीच्या वेळी सरकारने चांगली उपाययोजना न केल्यामुळेही असंतोष तीव्र झाला होता.

दुष्काळ व साथीच्या भयंकर हाहाकारामुळे जनता पीडाग्रस्त झाली होती. इस्लामचे भवितव्य धोक्यात आल्याची भावना पसरली होतीच.

अशा दारुण परिस्थितीतही, आणि सरकार यास जबाबदार असल्याचे सर्वश्रुत असूनही, काँग्रेसचे नेमस्त नेते सरकारशी लढा करण्यास अजिबात तयार नव्हते. तसेच चित्तरंजन दास, मालवीय, बॅ. जिना, टिळक, नरसिंह चिंतामण केळकर हे प्रस्थापित काँग्रेस नेतेही चळवळ करू इच्छित नव्हते. स्वतः टिळक भाषणबाजी व लेख लिहिण्याच्या पुढे जात नव्हते. देशाचे नेते अगतिक, हतबल व दोलायमान अवस्थेत होते. मुस्लीम लीगचे बरेच चाहते सरकारी नोकरीत असल्यामुळे त्या पक्षाचे प्रस्थापित नेते संभाव्य चळवळीत उतरण्याची शक्यता नव्हती. जवाहरलाल नेहरूंनी आत्मकथेत लिहिले आहेच की, मुस्लीम लीग कधीच बहुसंख्य मुसलमानांची प्रातिनिधिक संघटना नव्हती. मात्र १९२०-१९२२ या काळात खिलाफत कमिटी ही त्यांची प्रातिनिधिक व प्रभावी संघटना बनली.

टिळकांचा पक्ष डळमळीत अवस्थेत होता, तर नारायण गणेश चंदावरकर, रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे व चिमणलाल सेटलवाड हे लिबरल नेते एकूणच चळवळीविरुद्ध होते. एकटे सयाजीराव गायकवाड वगळता महाराष्ट्रातील संस्थानिक व सरंजामदार व जमीनदार कॉम्प्रेडोर वर्गात होते. ब्राह्मणेतर पक्ष व सत्यशोधक समाज आपल्या वर्गीय मागण्यांना यश मिळविण्यासाठी सरकारशी सहकार्य करीत होते.

दुसऱ्या बाजूला मायकेल ओडवायरविरुद्ध महाभियोगाची कडक कारवाई करण्यास व्हाइसरॉयने नकार दिला होता. व्हाइसरॉयने गुन्हेगार अधिकारशहांना अभय दिले. इतकेच नव्हे तर सेनादल व नोकरशाहीने केलेले बेकायदा कृत्य व अत्याचार क्षमापित करण्यासाठी व्हाइसरॉयने क्षमापूर्तीच्या कायद्यासाठी (इन्डेम्नीटी ॲक्ट) भारतमंत्र्यांची परवानगी मागितली होती. त्यासाठी दोन खलिते पाठविले होते. पंजाब प्रकरणावरील सरकारी अहवालांच्या प्रत्येक पानावर व अत्याचारांवर रंगसफेदी केलेली होती.

त्या सर्व दृष्कर्मांचा सर्वाधिक धिक्कार केला गांधीजींनी! वानगीदाखल त्यांची विधाने पाहा :—

" A Scandle of this magnitude cannot be tolerated by the Nation if it is to preserve its self-respect and become a partner in the Empire." [२]

" It would be a folly to wait for the Congress pronouncements. On the contrary one must act and demonstrate its (Non-Cooperation's) efficacy so as to command acceptance by the Nation" [३].

अशी आक्रमक भूमिका घेऊन गांधीजींनी पंजाबातील अत्याचार, सरकारचा बेगुमानपणा आणि खिलाफतबाबतचा अन्याय व वचनभंग वगैरे सरकारच्या दुष्कर्मांचा तीव्र निषेध करण्यासाठी 'नॉन-कोऑपरेशन' आंदोलन उभारले. त्यांनी ३० जून १९२० रोजी आंदोलनाची घोषणा केली. भारतीय अस्मिता व स्वाभिमान जपण्यासाठी तसेच स्वराज्यप्राप्तीसाठी आंदोलन हाच उपाय आहे, असे त्यांनी ठासून सांगितले. जानेवारी १९२० पासूनच गांधीजी सत्याग्रहासाठी लोकशिक्षण देत होते.

याउलट टिळकांनी २६ जून १९२० रोजी काँग्रेस पुढारी विठ्ठलभाई पटेलांना (तेव्हा इंग्लंडमध्ये असलेल्या) लिहिलेल्या पत्रातून दिसते की, टिळक अजूनही ब्रिटिश संसदेच्या लोकहितेच्छू धोरणाकडे आशाळभूतपणे पाहात होते. ११ जुलै १९२० रोजी दोन तास टिळकांनी कृ. प्र. खाडिकरांशी मनमुराद चर्चा केली होती. **(पाहा : के. के. चौधरी, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, खंड पहिला, प्रकरण २०).**— टिळक हे गांधींच्या असहकार आंदोलनात भाग घेणार नाहीत, असे टिळकांनी तेव्हाच स्पष्ट केले होते.

तथापि गांधीजी व जहाल नेते मौलाना महंमद अली व शौकत अली यांनी आंदोलनाची घोषणा केली होती. गांधीजींचे तर्कशास्त्र असे होते :—ब्रिटिश सत्ता मुळातच भारतीयांचे सहकार्य आणि प्रजाजनांच्या मूकसंमतीवर उभी आहे. म्हणून

त्यांनी ब्रिटिशांचा हा भारतीयांच्या सहकारावर आधारित पाया खिळखिळा करणे, तसेच संमती नाकारणे हे चळवळीचे उद्दिष्ट समोर ठेवले. "नॉन-कोऑपरेशन इज द अँटिथेसिस ऑफ कोलॅबोरेशन," हा नारा त्यांनी घोषित केला. [४]

मात्र प्रस्थापित काँग्रेस नेते दोलायमान मनःस्थितीत असल्याकारणाने गांधीजींनी स्वतःच्याच जबाबदारीवर आंदोलन उभारले.

## असहकार चळवळीचा प्रारंभ

पंजाबमधील हत्याकांड व त्याविषयी दिसून आलेली ब्रिटिशांची असंवेदना यामुळे प्रस्थापित काँग्रेस नेतृत्व अगतिक झालेले होते. ब्रिटिशांनी खिलाफत प्रकरणी मुसलमानांची प्रतारणा केलेली होती. नवीन राज्यघटनेमुळे भारतीयांचा भ्रमनिरास झालेला होता. मात्र गधर आणि युगांतर क्रांतिकारक तुरळक लढाऊ कारवाया करीतच होते. अशा वातावरणात प्रस्थापित काँग्रेस नेते देशव्यापी चळवळ करण्यास अनुकूल नसले, तरी मधल्या फळीतील काँग्रेसजन व मुसलमान नेते चळवळ उभारण्यास अनुकूल होते. जानेवारी १९२० पासून महात्माजी सत्याग्रहाचा प्रचार करीत होते. सत्याग्रहाच्या मार्गाने सरकारला वठणीवर आणण्यासाठी न्यायालये, महसूल यंत्रणा व कायदेमंडळे व निवडणुका, शासकीय समारंभ आणि शासनमान्य शिक्षणसंस्थांवर बहिष्कार घालण्याचा जोरदार प्रचार करण्यात आला.

जालियनवाला बाग हत्याकांडाच्या दुःखद स्मृती आणि पंजाबात हुतात्मा झालेल्या अगणित भारतीयांचे स्मरण करण्यासाठी गांधीजींच्या सूचनेनुसार मुंबईप्रमाणे महाराष्ट्रात अनेक ठिकाणी ६ ते १३ एप्रिल १९२० हा पहिला 'राष्ट्रीय सप्ताह' गांभीर्यपूर्वक पाळण्यात आला. या निमित्ताने मुंबईत विराट सभा भरली (६ एप्रिल). त्यात शहरातील बहुतेक संघटनांचा समावेश होता. बॅ. जिना, ॲनी बेझंट, दिनशा पेटिट हे विरोधकही हजर होते. शहरातील व्यापाऱ्यांनी चळवळीसाठी काही लाखांचा निधी उभा केला होता. आर्थिक मंदीची बाधा झालेल्या व्यापाऱ्यांनी देखील पुष्कळ मदत दिली.

स्वतः महात्मा गांधींनी, त्यांना ब्रिटिश क्रॉऊनकडून लाभलेली झुलु आणि बोअर 'युद्ध-पदके' तसेच 'कैसर-इ-हिंद' हे महत्त्वाचे सुवर्ण पदक व्हाइसरॉयकडे परत पाठविले आणि ब्रिटिशांचा असला सन्मान नको, असे कळविले. त्या ऐतिहासिक रविवार १ ऑगस्ट १९२० रोजी गांधीजींनी असहकार आंदोलनाचे रणशिंग मुंबईतून फुंकले. मुंबईतील त्यांच्या सत्याग्रहाच्या विराट मिरवणुकीत महात्मा गांधींबरोबर तरुण जवाहरलाल नेहरूही होते. त्याच दिवशी मुंबईतील सरदारगृहात लोकमान्य टिळकांचे निधन झाले होते. त्यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी सर्वप्रथम येणाऱ्यांमध्ये गांधीजी होते. शहरातील एका रस्त्याने टिळकांची अंत्ययात्रा गेली, तर दुसऱ्या मार्गाने गांधीजींच्या चळवळीची मिरवणूक निघाली. हा दिवस ऐतिहासिक होता.

सत्याग्रहाच्या कार्यक्रमानुसार मुंबईतील कित्येकांनी त्यांच्या मानद पदव्या, पदके, मानद मॅजिस्ट्रेटशिप, किताब वगैरेंचा त्याग केला. विठ्ठलभाई पटेल, देवजी कांजी यांनी कायदेमंडळाचा राजीनामा दिला. डॉ. मोतीराम बी. वेलकर, डॉ. दिनकर धोंडो साठे, डॉ. एम. सी. जावळे, व्ही. एम. पवार, एच. पी. ठाकरसी, विठ्ठलदास दामोदर, जोसेफ बॅप्टिस्टा आणि बॅ. जिनवाला यांनी कायदेमंडळाच्या निवडणुकीसाठी घोषित केलेली आपली उमेदवारी मागे घेतली.

विख्यात वकील मुकुंदराव रामराव जयकर, जमनादास माधवजी मेहता आणि जहांगीर बी. पटेल यांनी असहकाराचे तत्त्व म्हणून वकिलीचा त्याग केला. सोळा जस्टिस ऑफ पीस (त्यांच्यातील १४ मुसलमान) यांनीही पदत्याग केला. मुंबईतील शासकीय शिक्षणसंस्थांमधील चार शिक्षक आणि एका अभिव्याख्यात्याने राजीनामा दिला. अत्यंत हुशार विद्यार्थी रघुनाथ शिवराम निंबकर, बी. आर. मोडक, जे. पी. भंसाळी यांनी महाविद्यालयीन शिक्षण व सरकारी शिष्यवृत्तीचा त्याग केला व आपला राष्ट्रीय बाणा दाखवून दिला. असहकार चळवळीला मुंबईत चांगला प्रतिसाद मिळाला. उर्वरित महाराष्ट्रापेक्षा मुंबईतील लोकप्रतिसाद उत्तम असल्याचे पोलीस कमिशनरनेही मान्य केले होते. **(सोर्स मटेरिअल : नॉन-कोऑपरेशन मुव्हमेंट इन बॉंबे सिटी** : १९२०-२५, महाराष्ट्र शासन, १९७८, पृ. ९-१०)

महात्मा गांधींनी स्वबळावर आंदोलन सुरू केले, तरी काँग्रेस पक्ष अद्याप निर्णयाप्रत यावयाचा होता. त्याबाबतचा निर्णय ४ सप्टेंबर १९२० पासून भरणाऱ्या कोलकात्यातील खास काँग्रेसमध्ये होणार होता. या खास अधिवेशनाचे अध्यक्ष लाला लजपतराय तसेच इतर पुढारी सुरेंद्रनाथ बॅनर्जी, बिपिनचंद्र पाल, मोतीलाल घोष, बी. चक्रवर्ती, विजयराघवाचारियर, ॲनी बेझंट, चित्तरंजन दास, मदन मोहन मालवीय, कस्तुरीरंग अय्यंगार, दादासाहेब खापर्डे, न. चिं. केळकर आणि बहुसंख्य टिळकपंथीय सदस्य पहिल्यापासूनच या आंदोलनाच्या विरोधात होते. याउलट काँग्रेसमधील नवी पिढी व प्रामुख्याने मुसलमानांचा आंदोलनास जोरदार पाठिंबा होता. काँग्रेसच्या खुल्या अधिवेशनात आपले मताधिक्य असावे यासाठी उभय पक्षांनी पैसा खर्च करून कोलकात्यात प्रतिनिधी नेलेले होते. या कामी दासबाबूंनी खूप पैसा खर्च केला होता. गांधीजींच्या बाजूने जमनालाल बजाज व बिर्ला बंधूंनी १२०० प्रतिनिधींची कोलकात्यात सोय केली होती. कर्नाटक केसरी गंगाधरराव देशपांडे यांना खापर्डे व केळकरांच्या भयानक दबावामुळे अनिच्छेने गांधीजींच्या ठरावाच्या विरुद्ध मत द्यावे लागले होते. तथापि देशपांडे यांनी असहकार चळवळीला सक्रिय पाठिंबा दिला. तसेच पुढील हयातभर देशपांडे गांधीजींबरोबरच राहिले.

कोलकाता खास अधिवेशनात गांधीजींच्या आंदोलनविषयक ठरावास प्रतिपक्षापेक्षा ८०० मते जास्त पडली व असहकाराचा ठराव प्रचंड मताधिक्याने मंजूर झाला. मात्र ही मंजुरी तात्पुरती होती. डिसेंबर १९२० च्या रीतसर नागपूर काँग्रेसमध्ये त्यावर अंतिम शिक्कामोर्तब व्हावयाचे होते.

टिळकांच्या पश्चात सप्टेंबर १९२० पासून त्यांच्या 'काँग्रेस डेमोक्रॅटिक पक्षाची' बरीच वाताहत झाली. नवीन कायद्यानुसार नोव्हेंबर १९२० मध्ये कायदेमंडळांच्या निवडणुका व्हावयाच्या होत्या. त्यासाठी अनेक टिळकभक्तांनी आपली उमेदवारी जाहीर केलीही होती. वस्तुतः निवडणूक लढवणे आणि कायदेमंडळात जाणे हे असहकार तत्त्वाचा भंग करणे असे होते. आणि कोलकाता काँग्रेसने गांधीजींचा असहकाराचा ठराव मंजूर केल्याने निवडणूक लढवणे हा शिस्तभंग झाला असता.

म्हणून कायदेमंडळात जाऊ इच्छिणाऱ्या अनेक काँग्रेसजनांचा गांधीजींवर राग होता. त्यांच्यात महाराष्ट्रातील न. चिं. केळकर, दादासाहेब खापर्डे, अणे वगैरे प्रमुख होते. केळकरांनी **केसरीत** लिहिले होते की, "आम्ही गांधींची समजूत घालण्याचा खूप प्रयत्न केला ; पण तो सिद्धीस गेला नाही. असहकारिता यशस्वी करण्याला राष्ट्र जितके तयार आहे असे गांधींना वाटते, तितके ते तयार आहे असे आम्हाला वाटत नाही. त्यात व्यावहारिक अडचणी पुष्कळ आहेत. कायदे कौन्सिलांवरील बहिष्कार ही तर सर्वांत मोठी मतभेदांची बाब आहे........ ठरावाचा आदर करणे ही गोष्ट शिष्टाचाराची असली, तरी तो ठराव दुरुस्त करण्याचा आग्रह सोडण्याची सक्ती किंवा नैतिक बंधनही आमच्यावर नाही." केळकर व काही टिळकपंथीयांनी पक्ष शिस्तीच्या कारणास्तव निवडणुकीतील उमेदवारी मागे घेतली. पण मनापासून नव्हे! याउलट मुंबईतील उपरोक्त साठे, जावळे, पवार, वेलकर वगैरेंनी विनाअट उमेदवारी मागे घेतली होती.

७ ऑगस्ट १९२० च्या बॉंबे प्रेसिडेंसी पोलीस ॲबस्ट्रॅक्टमध्ये उल्लेख केल्याप्रमाणे चळवळीच्या पहिल्या दिवशी (१ ऑगस्ट) मुंबईभर कडकडीत हरताळ होता. सर्व गिरण्या व बाजारपेठा बंद होत्या. टिळकांच्या निधनाचाही तो शोकदिन होता. जवळपास अशीच स्थिती अकरा-बारा दिवस होती.

सुपुत्रामुळे परिवर्तन झालेले पंडित मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली २ ऑक्टोबर १९२० रोजी मुंबईत भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या बैठकीत असहकार चळवळीचे मोतीलालजींनी समालोचन केले. पंजाब व खिलाफत प्रकणांमध्ये न्याय मिळेपर्यंत आणि स्वराज्याची मागणी सफल होईपर्यंत चळवळ चालू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच स्वदेशीचा पुरस्कार आणि खादी व ग्रामोद्योगांचे प्रयत्नपूर्वक पुनरुज्जीवन करण्याचेही ठरविण्यात आले. राष्ट्रीय चळवळीसाठी निधी संकलन करण्यासाठी स्वराज फंड उभारण्याचा निर्णय या बैठकीतच घेण्यात आला. गांधीजींच्या सूचनेप्रमाणे या निधीला 'टिळक स्वराज फंड' हे नाव देण्यात आले. मुंबईत असहयोग चळवळ बरीच यशस्वी

होत असतानाही भारतीय पुढाऱ्यांमधील मतभेद व्यक्त होत होते. मात्र गांधीजींच्या पाठीशी बहुमत असल्याने त्यांनी आपले ठराव पास करून घेतले.

दादासाहेब ग. श्री. खापर्डे यांनी कोलकाता काँग्रेसच्या ठरावाकडे दुर्लक्ष करून मध्यवर्ती कायदेमंडळाच्या वरिष्ठ सभागृहाच्या निवडणुकीसाठी आपली उमेदवारी जाहीर केली. माधव श्रीहरी अणे, शामराव देशपांडे, बाबासाहेब परांजपे वगैरे टिळकभक्तांनी असहकाराचा कार्यक्रम अमान्य करून, खापर्डे आणि अण्णासाहेब जतकर यांना निवडून आणण्यात महत्त्वाची कामगिरी बजावली. तथापि बाळकृष्ण शिवराम मुंजे वगैरे मराठी भाषिक आणि मध्यप्रांतातील हिंदी भाषिक नेते तेव्हा गांधीजींच्या बाजूला होते.

गांधीजी, शौकत अली, डॉ. साठे वगैरेंच्या प्रयत्नांमुळे ऑक्टोबरच्या पहिल्या सप्ताहात असहकार चळवळ मुंबईत फोफावली. इंडियन मर्चंट चेंबरने चळवळीस योगदान दिले. खिलाफत प्रकरणी न्याय मिळविण्यासाठी इंग्लंडमध्ये गेलेले शिष्टमंडळ न्याय न मिळता ४ ऑक्टोबरला परतल्यावर मुसलमानांनी असहयोग चळवळीस दिलदारपणे मदत केली. गिरणी कामगारही गांधीजींच्या आवाहनानुसार चळवळीत आले. डॉ. साठे व नारायण दामोदर सावरकर हे दोघे जण कामगार व नागरिकांना निवडणुकीत मतदान न करण्याचे आवाहन करीत होते. होमरूल लीगचे ‘स्वराज्य सभा’ असे नामांतर करण्यात आले. ही संघटना काँग्रेसचे उपांग म्हणून कार्य करू लागली. मात्र गांधीजींचा प्रभाव सहन न झाल्यामुळे बॅ. जयकर, जमनादास द्वारकादास, कांजी द्वारकादास, जमनादास मेहता, मंगलदास पक्वासा, कन्हैयालाल मुन्शी, दिवेटीया व गुलाबचंद देवचंद हे जिनांबरोबर राहिले.

कायदेमंडळांवर बहिष्कार हे या चळवळीचे महत्त्वाचे अंग असल्याकारणाने मतदारांना मतदानापासून परावृत्त करण्यासाठी सभा-संमेलने आयोजित करण्यात येत. विल्सन कॉलेजातील कित्येक विद्यार्थी स्वयंसेवक झाले होते. बॅ. जिनवाला, शौकत अली मोठमोठ्या सभा घेऊन चळवळीचा प्रचार करीत. स्वराज फंडासाठी मुंबईत खूप प्रयत्न करण्यात झाले. मूळजी जेठा मार्केटमधील कापड व्यापाऱ्यांनी या फंडासाठी १,२५,००० रुपये दिले होते.[५]

## कायदेमंडळाची निवडणूक

मुंबई कायदेमंडळाच्या निवडणुकीवर काँग्रेसने बहिष्कार घातल्यामुळे मवाळ व ब्राह्मणेतर पक्षांचे उमेदवार फार कष्ट न घेता निवडून आले. मुंबई विद्यापीठासाठी राखीव असलेल्या जागेवर रँग्लर र. पु. परांजपे निवडून आले. त्यांना शिक्षणमंत्री पदावर नियुक्त करण्यात आले. ब्राह्मणेतर पक्षाचे सीताराम केशव बोले, आनंदराव नारायण सुर्वे, नाशिकचे कीर्तिवान निंबाळकर, पुण्याचे गंगाजी काळभोर, साताऱ्याचे पांडुरंग जाधव, बेळगावचे पंडितप्पा चिकोडी आणि अण्णाप्पा चौगुले, रत्नागिरीचे दाजीराव विचारे, सोलापूरचे शामराव लिगाडे निवडून आले. अण्णासाहेब लठ्ठे व बागडे मध्यवर्ती कायदेमंडळावर निवडून आले.

ही निवडणूक मुंबई इलाखा कायदेमंडळाच्या एकूण १११ जागांपैकी ८६ जागांसाठी १६ नोव्हेंबर १९२० रोजी झालेली होती. उर्वरित २५ जागा सरकारनियुक्त नोकरशहा व पदसिद्ध सभासद आणि बिगरसकारी सरकारनियुक्त सभासदांसाठी राखीव होत्या. ज्या ८६ जागांसाठी निवडणूक झाली त्यांतही मुंबई विद्यापीठ, जमीनदार, व्यापारी अगर उद्योगपतींसाठी खास मतदारसंघ होते. शिवाय मुसलमान आणि युरोपियनांसाठी अनुक्रमे २७ व २ जागा राखीव होत्या. हे २९ सभासद सामान्यतः सरकारनियुक्त २५ सभासदांशी हातमिळवणी करीत. त्यामुळे सरकारचा कोणताही प्रस्ताव सहजपणे पास होत असे. केवळ ४६ सदस्य सर्वसाधारण मतदारसंघांमधून निवडले जात. त्यांपैकी ३५ ग्रामीण भागांतून तर ११ शहरांमधून निवडून येत असत. मुंबई प्रांताला मध्यवर्ती विधानसभेत २२ जागा मिळालेल्या होत्या, तर वरिष्ठ सभागृहात म्हणजे राज्य परिषदेत ८ जागा देण्यात आल्या. तिथेही सरकारनियुक्त सनदी नोकरशहा व सरकारनियुक्त बिनसरकारी सभासद असल्यामुळे तसेच मुसलमान, जमीनदार, व्यापारी व युरोपियनांसाठी खास जागा असल्यामुळे इंग्रज सरकारला आपली मनमानी सहज करता येत असे.

मुंबई इलाख्याच्या कायदेमंडळाच्या निवडणुकीसाठी प्रांतातील केवळ ५,४८,२९३ जणांना मताधिकार होता. मध्यवर्ती विधानसभेच्या निवडणुकीसाठी १,२९,२९४ जणांना मताधिकार होता. राज्य परिषदेच्या आठ जागांसाठी केवळ २,६७६ माणसांनाच मताधिकार होता. एकाही महिलेला मताधिकार नव्हता. पुरुषांसाठी शैक्षणिक पात्रता आणि मालमत्ता वगैरे अनेक अटी होत्या. एकूणच निवडणूक व कायदेमंडळ हा सर्व प्रकार जनतेला लाभदायक नव्हता. १९२० मधील मुंबई इलाखा कायदेमंडळाच्या निवडणुकीत राज्यातून फक्त १,६३,१८० मतदारांनीच मत देण्याची तसदी घेतली होती. मतदान करण्याचे प्रमाण २० टक्के इतकेही नव्हते. म्हणूनच १९२० ची ही पहिली निवडणूक म्हणजे केवळ एक प्रहसन, फार्स होता. जे चित्र मुंबई इलाख्याचे तेच मध्यप्रांत-वऱ्हाडाचेही होते. १९२० सालात नागपूर विद्यापीठ अस्तित्वात नसूनही विद्यापीठासाठी एक जागा राखीव होती. त्या राज्यात फक्त ४ टक्के मुसलमान असताना त्यांना १५ टक्के प्रतिनिधित्व दिले होते. त्या प्रांतात १,४४,७३७ पुरुषांना मताधिकार होता. त्यापैकी केवळ ११,५६६ मतदारांनी मते देण्याचे श्रम घेतले होते. कोणतेही कायदेमंडळ खऱ्या अर्थाने लोकांचे प्रतिनिधित्व करीत नव्हते. हा सारा प्रकार हास्यास्पद होता हे खरे !

निवडून आलेल्या सभासदांचा आवाज राज्यकर्ते गांभीर्याने घेत नसत. बरेच सभासद गव्हर्नरकडे पाहून हात वर करीत. अनेकांना ब्रिटिशांचे इंग्रजी समजत नसे. अशा परिस्थितीत कायदेमंडळांमध्ये निवडून जाणे विफल असल्याचे महात्मा गांधी व त्यांचे अनुयायी सांगत होते.

१९१९ चा सांविधानिक कायदा अमलात येण्यापूर्वी वऱ्हाड-मध्यप्रांताचा राज्यकारभार चीफ कमिशनर करीत असे. गव्हर्नर नव्हे. महत्त्वाच्या अनेक बाबींसाठी त्याला अधिकार नसल्याने त्याला व्हाइसरॉयकडून आदेश घ्यावे लागत. म्हणजे त्याला आदेशासाठी १९११ पर्यंत कोलकात्याला व तदनंतर दिल्लीला धाव घ्यावी लागे. १९१९ च्या कायद्यान्वये वऱ्हाड-मध्यप्रांतास गव्हर्नर मिळाला. सर फ्रँक स्लाय हे गृहस्थ या प्रांताचे पहिले गव्हर्नर झाले. त्यापूर्वी या प्रांताचे

कायदेमंडळ फारच लहान म्हणजे फक्त २५ सभासदांचेच होते. हे कायदेमंडळ शोभेच्या वस्तूसारखे होते. १९२० मधील निवडणुकीमुळे थोडा बदल झाला इतकेच.

डिसेंबर १९२० मध्ये नवीन कायद्यानुसार अस्तित्वात आलेल्या गव्हर्नर स्लाय यांच्या मंत्रिमंडळात बी.पी.स्टँडेन आणि मोरोपंत जोशी हे राखीव खात्याचे मंत्री झाले. जोशींकडे गृह विभागाचा कारभार होता. निवडून आलेले एस.एम. चिटणवीस सोपीव खात्याचे मंत्री झाले. हे चिटणवीस नागपूरच्या धनवान परिवारातील असून याच परिवारातील गंगाधरराव चिटणवीस यांना कायदेमंडळाचे अध्यक्षपद लाभले होते. तेव्हा मध्यप्रांत-वऱ्हाडच्या राजकारणावर मराठी भाषिक नेत्यांची जबरदस्त पकड होती. एक गोरा सदस्य वगळता तीन मंत्री व कायदेमंडळाचे अध्यक्ष मराठी भाषिक होते. गांधी निष्ठेने बी. डी. शुकूल यांनी निवडणुकीवर बहिष्कार घातल्याने, एकही हिंदी भाषिक सत्तास्थानावर आरूढ होऊ शकला नव्हता. असहकार चळवळीला पाठिंबा न दिलेले दादासाहेब खापर्डे कौन्सिल ऑफ स्टेटचे सदस्य म्हणून निवडून आले. दादासाहेबांप्रमाणेच बापूजी अणेदेखील जाहीर सभा भरवून गांधीजी व चळवळीला विरोध करीत. मात्र त्यामुळे नागपुरातील एका सभेत अणेंना पादत्राणांचा अहेर मिळाला होता.

## राष्ट्रीय शिक्षणाची मोहीम

**मुंबईतील मोहीम :—**सरकारदत्त किताब आणि मानद पदव्यांचा जाहीर परित्याग याप्रमाणेच सरकारी शिक्षणसंस्था व सरकारी अभ्यासक्रम शिकविणाऱ्या शाळा-महाविद्यालयांवर बहिष्कार टाकणे हासुद्धा असहकार चळवळीचा महत्त्वाचा भाग होता. किंबहुना हा एक अविभाज्य भाग होता. शिक्षणसंस्थांवरील बहिष्काराचा चळवळीचे एक आयुध म्हणून उपयोग करण्याचा गांधीजींचा प्रयत्न होता. १९०५ व १९०६ च्या काँग्रेस अधिवेशनांमध्ये टिळक व त्यांच्या समविचारी पुढाऱ्यांनी राष्ट्रीय शिक्षणासाठी कमालीचा आग्रह केला होता. तथापि त्यांनी त्या दिशेने खास प्रयत्न केले नव्हते. विजापूरकरांचे समर्थ विद्यालय आणि बडोद्याचे गंगनाथ विद्यालय हे दोन्ही प्रयोग अल्पायुषी ठरले होते.

तथापि १९२०-२१ मध्ये गांधीजींनी व्यापक कार्यक्रम आखला व त्याचा परिणामकारक प्रचार केला. उपरोक्त स्वराज्य सभेने चळवळीच्या सर्व अंगांना चालना दिली. राष्ट्रीय अभ्यासक्रम शिकविणाऱ्या शाळा मुंबईत स्थापन केल्या. अच्युतराव कोल्हटकरांचे चाहते श्रीपाद अमृत डांगे व रघुनाथ निंबकर या विद्यार्थ्यांनी मुंबईतील विल्सन कॉलेजमध्ये **बायबलचे** शिक्षण ऐच्छिक ठेवावे, या मागणीसाठी चळवळ उभारली होती. ते विद्यार्थ्यांचे लढाऊ नेते म्हणून ओळखले जाऊ लागले. ब्रिटिश सरकारशी सलोखा असलेल्या पुढाऱ्यांच्या सभा उधळून लावण्यासाठीही ते प्रयत्न करीत. मात्र या नवोदित युवाशक्तीला विधायक वळण लावण्यासाठी गांधीजींनीच प्रयत्न केले. गांधीजींच्या सांगण्यावरून बिनशर्त माफी मागणाऱ्या रघुनाथ निंबकरांना गांधीजींनी खरा बहादूर म्हटले होते. त्या वातावरणात विल्सन कॉलेजात निष्ठावंत युवकांची जडणघडण झाली होती.[६]

गांधीजी, शौकत अली व निंबकरांनी मुंबईत ३०० कॉलेज विद्यार्थ्यांची **यंग नॅशनॅलिस्ट लीग** स्थापन केली. यातील युवकांनी राष्ट्रीय शिक्षणाचा जोरदार प्रचार केला. गोकुळदास तेजपाल हायस्कूलमधील युवकांनी या शाळेचा विद्यापीठाशी असलेला संबंध तोडण्यासाठी आणि सरकारी अनुदानाचा धिक्कार करण्यासाठी चळवळ केली. त्यातूनच २९ नोव्हेंबर १९२० रोजी गुजराती नॅशनल शाळा निर्माण झाली. या शाळेला सुप्रसिद्ध मारवाडी विद्यालय व गंधर्व महाविद्यालयात आश्रय देण्यात आला. नागपूर काँग्रेसनंतर या शाळेने प्रगती करून वर्षभरात ६५० विद्यार्थी मिळविले. मुंबईतील पहिली मराठी राष्ट्रीय शाळा ६ जानेवारी १९२१ रोजी सुरू झाली. २२ जून १९२० रोजी गांधीजींनी लोकमान्य टिळक राष्ट्रीय कन्याशाळा सुरू केली होती. मात्र १९२४ पासून या राष्ट्रीय शाळांचा ऱ्हास झाला.

राष्ट्रीय शिक्षण चळवळीतील सर्वाधिक यशस्वी व लोकप्रिय झालेला उपक्रम म्हणजे मुंबईतील नॅशनल मेडिकल कॉलेज होय. आघाडीवरील देशप्रेमी डॉक्टर आर. एच. भडकमकर, ए. पी. कोठारे व दि. धों. साठे यांनी हा महत्त्वाकांक्षी उपक्रम उभारला व जुलै १९२३ मध्ये विद्यार्थ्यांची संख्या ४३० पर्यंत वाढविली.

तत्पूर्वी मुंबईत फक्त ग्रँट मेडिकल कॉलेज हे एकमेव वैद्यकीय महाविद्यालय होते. लोकवर्गणी व मुंबई प्रदेश काँग्रेस समितीने दिलेल्या कर्जातून नॅशनल मेडिकल कॉलेजची इमारत मुंबई सेंट्रल स्थानकाजवळ उभी राहिली. प्रारंभी हे कॉलेज स्वतःचा अभ्यासक्रम अमलात आणून स्वतःच्या पदव्या देत असे. आता या संस्थेला टोपीवाला नॅशनल मेडिकल कॉलेज व नायर रुग्णालय म्हणतात. गांधीजींच्या प्रेरणेनुसार डॉ. भडकमकर, डॉ. कोठारे आणि डॉ. साठे यांनी सुरू केलेल्या या उपक्रमाचे महत्त्व सदैव कायम राहील. प्रा. एस. व्ही. पुणतांबेकर आणि सहा-सात राष्ट्रवादी प्राध्यापकांनी मुंबईत सुरू केलेले नॅशनल कॉलेज (१ फेब्रुवारी १९२१) हाही दुसरा एक उत्तम उपक्रम होता. मात्र हा धाडसी प्रयत्न १९२५ मध्ये अपयशी ठरला.[७]

**अर्धनागरी भागातील मोहीम :—**राष्ट्रीय शिक्षणाच्या कार्यक्रमानुसार महाराष्ट्रात अनेक ठिकाणी राष्ट्रीय शाळा निर्माण झाल्या होत्या. गांधीजींच्या आवाहनानुसार जळगाव, भुसावळ व अमळनेरला देशभक्तांनी अशा शाळा काढल्या होत्या. जळगावजवळच्या पिंपराळे शाळेत निष्ठावंत गांधीवादी गोपाळराव वाळुंजकर, देवकीनंदन नारायण व वि. ग. कुलकर्णी शिक्षक होते. भुसावळच्या शाळेत वा. वि. दास्ताने व ना. मा. गोखले, तर अमळनेरला सुप्रसिद्ध आपटे गुरुजी राष्ट्रीय शिक्षण देत. दानशूर व्यापारी मोतीलाल माणेकचंद ऊर्फ प्रतापशेठ यांनी या मोहिमेस मदत दिली होती. या कामासाठी देवकीनंदन नारायण यांनी बी. ए. च्या अंतिम वर्षातील शिक्षणाचा त्याग केला होता. पुढील काळात शंकरराव देवांना काँग्रेसच्या राजकारणात बरीच मदत करणाऱ्यांमध्ये दास्ताने व देवकीनंदन नारायण यांचा समावेश होता. गांधीजींनी १९२१ मध्ये जळगाव, नाशिक, सातारा व सोलापूरमध्ये केलेल्या दौऱ्यामुळे बरीच जनजागृती झाली होती. त्यावर्षी मुंबई इलाख्यातील चळवळीसाठी सर्वात जास्त खटले भरण्यात आले पूर्व खानदेशातील व सातारा जिल्ह्यांतील स्वातंत्र्यसैनिकांवर ! शंकरराव देव, त्र्यंबकराव देवगिरीकर, गंगाधरराव देशपांडे, दास्ताने व देवकीनंदन नारायण हे समकालीन महाराष्ट्र काँग्रेसचे व **'काँग्रेस कार्यप्रणालीचे पंचायतन'** समजले जात. **(पाहा : चौधरी, जळगाव जिल्हा गॅझेटिअर,** (पृ.क्र.११९-२०).

जमनालाल बजाज यांच्यामुळे गांधीजींनी, पुढील काळात, आपले केंद्रस्थान वर्ध्याला नेले. पण १९२० सालातही जमनालालजींनी या ठिकाणी चळवळीला चालना दिली होती. गांधीजींच्या आवाहनानुसार नीळकंठराव देशमुखांनी प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुकीतील आपली उमेदवारी मागे घेतली होती (१९२०). एकट्या वर्धा तालुक्यातील शासकीय आणि निमशासकीय शाळांमधून १२०० मुलांनी असहयोग चळवळीनुसार शाळा सोडल्या होत्या. या तालुक्यात २२ राष्ट्रीय शाळा स्थापन करण्यात आल्या. जमनालालजींच्या मारवाडी विद्यालयाने (स्थापना १९१०) सर्वस्वी राष्ट्रीय शिक्षणाचा अभ्यासक्रम अंगीकारला. त्यांनी वर्धा तालुक्यात तंटे निवारण्यासाठी १६ राष्ट्रवादी लवाद न्यायमंडळे उभारली. आर्वी व हिंगणघाट तालुक्यांमध्येही शेकडो मुलांनी शासकीय शाळांवर बहिष्कार घातला व राष्ट्रीय शाळांमध्ये प्रवेश घेतला. गांधीजींनी उभारलेल्या टिळक स्वराज फंडासाठी जमनालालजींनी एक लाखाची देणगी दिली, तर सामान्य लोकांनी १७,८१० रुपयांचा निधी दिला होता. आर्वीतही १२,००० रुपये गोळा झाले होते.[८]

असहकार आंदोलनासाठी ज्यांनी महाविद्यालयीन शिक्षण सोडले आणि नंतर राष्ट्रीय शाळांमध्ये अध्यापन कार्य केले त्या युवकांमध्ये महाडचे सखाराम जनार्दन भागवत होते (१९०३-१९७३). हाच युवक पुढे आचार्य स. ज. भागवत म्हणून विख्यात झाला. कुलाबा जिल्ह्यात या चळवळीचा प्रसार करण्यात शि. म. परांजपे अग्रेसर होते. असहकार चळवळीमुळे देशात नवीन पर्व उदयास आले असता 'जस्टिस' नामक नियतकालिकाच्या ८ जानेवारी १९२१ च्या अंकात शाहू महाराजांनी चळवळविरोधी पत्रक प्रसिद्ध केले होते. मात्र त्यांच्या ब्रिटिश मित्रांनाही ते आवडले नव्हते.[९]

## पुण्यातील असहकार चळवळ

टिळकांच्या अनुयायांना प्रारंभापासूनच महात्मा गांधींची चळवळ पसंत नव्हती. टिळकांनी मांडलेली Responsive Cooperation म्हणजे 'प्रतियोगी सहकारिता' ही संकल्पना त्यांना पसंत होती. सरकारशी प्रतियोगी सहकार करून पाहिजे तेव्हा कायदेमंडळात विरोध करण्याचे हे लवचीक धोरण असावे. तथापि माजी

टिळक पंथीय असलेले शंकरराव देव, शि. म. परांजपे, कृ. प्र. खाडिलकर, वासुकाका जोशी, हरीभाऊ फाटक, गंगाधरराव देशपांडे, चिंतामणराव वैद्य, पुंडलिकजी कातगडे, सदाशिव लक्ष्मण सोमण, गोविंदराव याळगी, वीर वामनराव जोशी या सर्वांनी मनस्वी गांधींचे नेतेपद शिरसावंद्य मानले. या सर्वांनाच मनोभावे पटले की, महात्मा गांधी हेच लोकमान्यांचे खरेखुरे वारसदार असून, आपण त्यांच्याच मार्गदर्शनानुसार चळवळ चालवावी. मुख्यतः या मंडळींनी महाराष्ट्रातील असहकार चळवळीस चालना दिली. या कार्यकर्त्यांव्यतिरिक्त पुढील टिळकभक्तांचाही चळवळीत सहभाग होता :—डॉ. नारायणराव सावरकर, डॉ. एरूळकर, डॉ. मोतीराम वेलकर, रामभाऊ नारायण मंडलिक, ल. ग. खरे, पंढरीनाथ तेलंग, दतात्रय वेंकटेश बेळवी, श्रीनिवास वेंकटेश कौजलगी, अ. ब. कोल्हटकर, विनायक बी. जोशी, दामोदर विश्वनाथ गोखले, सदाशिव खंडो आळतेकर, गणेश बल्लाळ फणसाळकर, शंकर श्रीकृष्ण देव, जोसेफ बॅप्टिस्टा, कुंदनमल सोभाचंद फिरोदिया, विष्णू सीताराम रणदिवे, केदारनाथ अप्पाजी कुलकर्णी, विठ्ठल लक्ष्मण फडके, आनंदीबाई वैशंपायन इ.

काही पुणेकरांना सरकारशी सर्वंकष असहकाराचा लढा अमान्य असल्याने केळकरांनी पुण्यात २४ ऑगस्ट १९२० रोजी सर्व टिळक अनुयायांची सभा घेऊन संदिग्ध निर्णय घेतला. त्यात ठरले की, गांधीजींच्या चळवळीस उघड विरोध न करता विठ्ठलभाई पटेल इंग्लंडहून परत येईपर्यंत थांबावे व नंतर अंतिम निर्णय घ्यावा. याच सभेत काही विचारी पुरुषांनी आठवण करून दिली की, **"गांधी ही एक मोठी राजकीय शक्ती असून आपण त्यांना बेफिकिरपणे विरोध करू नये. कारण तसे केल्यास पश्चिम भारतातील राजकारणात टिळक पक्षाचे वर्चस्व धोक्यात येईल,"** असे टिळकांनी बजावले होते. डॉ. मुंजे यांनीही मान्य केले की, गांधींना पाठिंबा न दिल्यास वऱ्हाड-मध्यप्रांतातील राजकारणातील त्यांचे स्वतःचे नेतृत्व धोक्यात येईल.

सरकारी दस्तऐवजांच्या संशोधनातून दिसले की, केवळ आपद्धर्म म्हणून व पक्षाची इभ्रत राखण्यासाठी केळकर वगैरेंनी चळवळीस पाठिंबा दिला. केळकरांनी

गांधीजींना लिहिले की, " कायदेभंगाबद्दल तुमच्या आमच्यात यत्किंचितही मतभेद नाही. फक्त कार्यक्रमाच्या इतर बाबतींमध्ये आम्हाला काही फेरफार हवे आहेत. शाळा, कोर्ट यांजवर बहिष्कार घालण्यात फारसे शहाणपण आहे असे मला वाटत नाही." याचा अर्थ, या चळवळीतील महत्त्वाचा भाग टिळकभक्तांना मान्य नव्हता. परिणामतः या मंडळीचे चळवळीतील योगदान मर्यादितच राहिले. वकिली तात्पुरती सोडणारे वकील पुण्यात बरेच निघाले. आघाडीचे धनिक वकील ल. ब. भोपटकरांनी केवळ काँग्रेसचा कार्यक्रम म्हणून एक वर्षापुरती नवीन वकिली थांबविली. पण जुने सर्व खटले चालविण्यासाठी ते नियमितपणे कोर्टात जात. मात्र काँग्रेसच्या आवाहनानुसार वकिली कायमची सोडणारा एकही वकील पुणे जिल्ह्यात नव्हता. म्हणजे सरकारी न्यायालयांवर बहिष्कार हे चळवळीचे महत्त्वाचे अंग पुणेकरांनी कमकुवत ठेवले.

तथापि चळवळीचा इतर कार्यक्रम राबविण्यासाठी पुण्यात पुष्कळ होते. त्यांनी बरेच काम केले. पत्रकार अ. ब. कोल्हटकरांनी गांधीजींच्या उत्तेजनाने पुणे व मुंबईत मद्यपान निषेध हा उपक्रम हाती घेऊन दारूच्या दुकानांसमोर निदर्शने करण्यावर भर दिला. या अतिरिक्त उपक्रमात, त्यांनी पुण्यातील बरेच युवक सामील करून घेतले. असहकाराची मुख्य सूत्रे पुढीलप्रमाणे होती :–सरकारी शाळा व महाविद्यालयांवर बहिष्कार, राष्ट्रीय शाळांची स्थापना, दारूबंदी, स्वदेशीचा अंगीकार, विदेशी वस्तूंवर बहिष्कार, इंग्रजांनी बहाल केलेल्या किताबांचा त्याग व गांधीजींनी उभारलेल्या टिळक मेमोरियल स्वराज फंडास देणग्या. पुणेकर वकिलांनी मात्र वकिलीचा त्याग केला नाही.

या कार्यक्रमांपैकी सरकारी तसेच अनुदानप्राप्त शाळा महाविद्यालयांवरील बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या नवीन संस्था स्थापन करण्याच्या उपक्रमाला मात्र पुणे जिल्ह्यात चांगला प्रतिसाद मिळाला. अनेक युवकांनी शिक्षणाचा तात्पुरता किंवा कायमचा त्याग करून स्वातंत्र्यलढ्यास वाहून घेतले. या त्यागाचे मोल महान होते. त्यात समर्पण भावना होती. एखादी संस्था किंवा संस्थानिकांच्या मदतीने त्यांचेपैकी कोणी विदेशी शिक्षणासाठीही गेले नाहीत. पुण्यातील राष्ट्रवादी

आदर्शवादाची याबाबतीत चांगली प्रचिती आल्याशिवाय राहिली नाही. पुण्यातील आंदोलनाचे महत्त्वाचे व चिरस्थानी फलित म्हणजे **टिळक महाराष्ट्र महाविद्यालय** हे होय. डिसेंबर १९२० मध्ये गांधीजींनी रीतसर उद्घाटन केलेल्या या महाविद्यालयात राष्ट्रीय अभ्यासक्रम राबविला जाई. याच उपक्रमाचे उन्नतीकरण करून त्यानंतर **टिळक महाराष्ट्र विद्यापीठ** हे नाव देण्यात आले. ८७ विद्यार्थीसंख्येने सुरू झालेल्या या विद्यापीठात आजही विविध प्रकारचे विद्यादान केले जात आहे. युवक कार्यकर्ते हरीभाऊ फाटक, घारेशास्त्री, बाळूकाका कानिटकर व केळकरांनीही या संस्थेच्या स्थापनेत पुढाकार घेतला होता.

वि. प्र. लिमये, वि. कृ. गोसावी, बाळकृष्ण चिंतामण लागू व अतीतकरांसारख्या हुशार युवकांनी महाविद्यालयीन शिक्षणातील उत्तम यशाकडे पाठ फिरवून शासनपुरस्कृत कॉलेजांवर बहिष्कार घालून राष्ट्रीय महाविद्यालयाचा खडतर मार्ग पत्करला. तेथील अध्यापन कार्यास शंकरराव द. जावडेकर आणि सखाराम जनार्दन भागवत अशा बुद्धिमान व व्यासंगी युवकांनी वाहून घेतले. तसेच गांधीवादी विचार व आचारप्रणालीचे निरूपण केले. त्यांनी केलेल्या प्रबोधन व अध्यापन कार्यांमुळे या दोघांना आचार्य हे गुणनाम देण्यात आले. तद्वतच वि.प्र.लिमये यांनी संस्कृत अध्यापनास वाहून घेतले. या विद्यापीठाची एक शाखा म्हणून पुण्यातूनच पुरुषोत्तमशास्त्री नानल, मा. पु. जोशी, डॉ. बा. चिं. लागू इत्यादींनी **लोकमान्य टिळक आयुर्वेदिक महाविद्यालय** स्थापन करून देशी औषधशास्त्राच्या संशोधनात भर टाकली. हे महाविद्यालय आज एक नामवंत संस्था मानली जाते.

चिंचवडच्या अशाच राष्ट्रीय शाळेच्या स्थापनेत गजानन नारायण उर्फ बाळूकाका कानिटकर व घारेशास्त्रींचा पुढाकार होता. त्यांनी बऱ्याच युवकांना स्वातंत्र्यलढ्यासाठी संघटित केले. राष्ट्रीय शिक्षणदान हे मोठे राष्ट्रकार्य अंगावर घेऊन बांधीलकीच्या भावनेने लढ्यात भाग घेतला. ही राष्ट्रीय पाठशाळा स्वातंत्र्यलढ्याचे एक महत्त्वाचे केंद्र बनले. शेकडो युवकांची तेथे जडणघडण झाली. कानिटकरांनी केवळ कारावास पत्करला नाही, तर अनाथ विद्यार्थीगृहदेखील चालविले. या पाठशाळेचे

नामांतर करून ४ सप्टेंबर १९२४ पासून ती स्वावलंबन राष्ट्रीय पाठशाळा बनली व तिला गांधीजींकडून पंचवीस हजारांचे साहाय्य लाभले. पुढे फार मोठे स्वातंत्र्य सैनिक म्हणून नाव मिळविलेले गो. आ. देशपांडे, अनंत वासुदेव सहस्रबुद्धे, काका कारखानीस यांनी या पाठशाळेत अध्यापन केलेले होते. येथील शेकडो विद्यार्थी व शिक्षकांनी पुढील सर्व स्वातंत्र्य आंदोलनांमध्ये चांगले काम केले. त्यामुळे या पाठशाळेवर गुप्तचरांची नेहमीच पाळत असे.

राष्ट्रीय आंदोलनास बरेच योगदान देणारे **समर्थ विद्यालय** प्रा. अण्णासाहेब विजापूरकरांनी तळेगावला पूर्वीच स्थापन केलेले होते. त्यांना ध्येयवादी शिक्षक सी. गो. रानडेंनी साथ दिल्यामुळे समर्थ विद्यालयात पुष्कळ राष्ट्रवादी युवक तयार झाले. पुढे १९३० च्या सविनय कायदेभंग आंदोलनात सी. गो. रानडेंनी आपल्या विद्यार्थ्यांचे मोठे पथक उतरवून चळवळीस योगदान दिले. येथील काही विद्यार्थी टिळक महाराष्ट्र विद्यालयात जाऊन जावडेकर व भागवत या दोन्ही आचार्यांचे शिष्य बनलेत ते सर्वार्थाने! त्यातील बहुसंख्य जण पुढील स्वातंत्र्यलढ्यांमध्येही उतरले. राष्ट्रीय शिक्षणाच्या या मोहिमेत विनायकराव भुस्कुटे यांचेही योगदान लाभले. त्यांनी असहकार चळवळ व नंतरच्या मुळशी सत्यग्रहातही समर्पण भावनेने काम केले. जन्मभर प्रखर संग्राम केला.

स्वदेशी व बहिष्कार हा पूर्वी टिळकांनी संकल्पित केलेला कार्यक्रम गांधीजींनी व्यापक स्वरूपात राबविल्याने तेच टिळकांचा वारसा चालवीत असल्याचे अनेक पुणेकरांना वाटून गेले. त्यांपैकी एकाने गांधीजींना निनावी पत्र लिहून आपल्या भावना कळविल्या होत्या. उत्तरादाखल गांधीजींनी लिहिलेले पुढील खुले पत्र गांधी-टिळकांमधील साम्यभेद व्यक्त करणारे आहे. ‘‘लोकमान्य टिळकांचा अनुयायी असण्याचा सन्मान मला लाभला आहे असा मी दावा करू शकत नाही. लोकमान्यांच्या लाखो देशबांधवांप्रमाणे त्यांची दुर्दम्य इच्छाशक्ती, त्यांची प्रचंड विद्वत्ता, त्यांचे देशप्रेम आणि त्याहीपेक्षा जास्त महत्त्वाचे म्हणजे त्यांचे विशुद्ध खाजगी जीवन आणि केलेला महान त्याग या बाबींची मी तारीफ करतो. सध्याच्या राज्यव्यवस्थेचे दुष्परिणाम टिळकांना जितके जाणवले होते तितके कदाचित अन्य

कोणालाही जाणवले नव्हते. त्यांच्या सर्वोत्तम शिष्यांप्रमाणे मीही त्यांचा संदेश देशभर पोहोचवीत असल्याचा विनम्रपणे दावा करतो. मात्र माझी पद्धती म्हणजे टिळकांची पद्धती नाही, याची मला जाणीव आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या काही नेत्यांचा पाठिंबा मिळवताना मला अडचणी येत आहेत.''

महात्मा गांधींनी केलेल्या या विश्लेषणात बरीच सौम्योक्ती (युफेमिझम) होती. विनय जास्त होता. मुंबईबाहेरच्या महाराष्ट्रात, अगदी पुण्यातही असहकार चळवळीला मिळालेला प्रतिसाद बराच कमकुवत होता. टिळकपंथीयांनी चळवळीला उदासीनपणे साथ दिली. केळकर वगैरेंनी केवळ आपद्धर्म म्हणून चळवळीस अत्यल्प साथ दिली.

पुण्याच्या पुढाऱ्यांची भूमिका वसईत भरलेल्या (६ मे १९२१) पहिल्या महाराष्ट्र प्रांतिक राजकीय परिषदेत अधिक स्पष्ट झाली. असहकार चळवळीत महाराष्ट्र इतर प्रांतांपेक्षा मागे असल्याचे गांधीजींनी तेथेच बजावले. गांधीजींचा रोख न. चिं. केळकरांच्या गटावर होता हेही स्पष्ट झाले.

असहकार चळवळीतून श्रीपाद अमृत डांगे, केशव नीळकंठ जोगळेकर, रघुनाथ शि. निंबकर, धुंडिराज ठेंगडी, एस. व्ही. देशपांडे, मिरजकर, व्ही. डी. साठ्ये इ. रॅडिकल युवकांची पिढी निपजली. त्यांचा पुण्याशी नेहमीच संपर्क असे. एप्रिल १९२२ मध्ये डांगेंनी लिहिलेल्या **गांधी व्हर्सस लेनिन** या पुस्तकात त्यांनी गांधी, टॉलस्टॉय व लेनिन यांची विचारधारा विशद केली. विशेष म्हणजे सुप्रसिद्ध मराठी कादंबरीकार नारायण सीताराम फडके यांनीही या सत्याग्रहात निष्ठापूर्वक भाग घेतला. पुणे जिल्ह्यातील बरेच पाटील, तलाठी आंदोलनास अनुकूल झालेले दिसले. शिवाय विधिमंडळे व शासनपुरस्कृत संस्थांच्या निवडणुकांवर बहिष्कार घालण्यासाठी निष्ठावंत पुढाऱ्यांनी व युवकांनी जनमत तयार केले होते. त्यामुळे फारच कमी मतदान होऊ शकले. ही जमेची बाजू होती.

नोव्हेंबर १९२० च्या लेजिस्लेटिव कौंसिलच्या निवडणुकीवर बहिष्कार घालणे हा चळवळीचा महत्त्वाचा भाग होता. याबाबत अनेकांच्या कॉँग्रेस-निष्ठेला कसोटी

लागली. वस्तुतः न. चिं. केळकर व नारायणराव रामजी गुंजाळ यांनी आपली उमेदवारी आधीच घोषित केलेली होती. परंतु पक्षशिस्त म्हणून त्यांनी उमेदवारी मागे घेतली. केळकरांनी २१ सप्टेंबर १९२० च्या **बाँबे क्रॉनिकल** मधील लेखात लिहिले की, "आम्हास खेद वाटत असूनही काँग्रेसच्या निर्णयाचे आम्ही निष्ठापूर्वक अनुपालन करावयास हवे."

टिळकांचे अनुयायी असल्यामुळेच गांधीजींच्या सूचनेनुसार केळकरांना काँग्रेस कार्यकारिणीच्या १५ सभासदांमध्ये समाविष्ट करण्यात आले. डिसेंबर १९२१ मध्ये नेमलेल्या कार्यकारिणीतही त्यांचा समावेश झाला. म्हणजे ते अखिल भारतीय पातळीवर पोहोचले. मात्र टिळकांच्या पुण्याईमुळे व गांधीजींच्या कृपाप्रसादामुळे ! तसेच देशात ज्या २१ भाषावार प्रांतिक समित्या नेमल्या त्यांतील महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस समितीचे मुख्यालय पुण्यात ठेवून तिचे अध्यक्षपद केळकरांना तर चिटणीसपद शंकरराव देव यांना देण्यात आले. याच बरोबर पुणे जिल्हा काँग्रेस समिती गठित करण्यात आली.

स्वातंत्र्य आंदोलनासाठी उभारलेल्या टिळक स्वराज फंडाच्या नावावरून त्याच्या जनकत्वाबद्दलचा संभ्रम वाटू नये म्हणून खुलासा करणे आवश्यक आहे. ३१ मार्च १९२१ च्या बेझवाडा काँग्रेसमध्ये चळवळीसाठी निधी उभारण्यासाठी ठराव करण्यात आला होता. ३० जून १९२१ पर्यंत एक कोटी रुपये जमा करावयाच्या या निधीस टिळकांचे नाव देण्याचा ठराव स्वतः महात्मा गांधींनीच मांडला होता. भारतातून एक कोटीपेक्षाही अधिक रक्कम मुदतीत पूर्ण झाली. परंतु उद्योगपती किंवा दानशूर मंडळींच्या अभावी पुणे जिल्ह्याने निधीसाठी अगदीच थोडे योगदान दिले. मात्र मराठी नाटकांच्या प्रयोगांमधून काही पैसा जमा झाला. या निधीसाठी मुंबईच्या बालिवाला थिएटरमध्ये खाडिलकरांच्या **संगीत मानापमान** नाटकाचा फार उपयोग झाला. बालगंधर्वांची गंधर्व नाटक मंडळी आणि केशवराव भोसले व बापुराव पेंढारकरांची ललितकलादर्श या प्रतिस्पर्धी नाटक कंपन्यांनी संयुक्तरीत्या हे नाटक ८ जुलै १९२१ रोजी रंगभूमीवर गाजवून दाखविले. **संयुक्त मानापमान** हे नाव दिलेल्या या ऐतिहासिक

नाट्यप्रयोगातून १६,६०० रुपयांचे अभूतपूर्व निव्वळ उत्पन्न मिळाले होते. अत्यल्प उत्पन्न मिळणाऱ्या त्या काळात मिळालेले हे नाटकाचे उत्पन्न केवळ नाटकाचे नव्हते. त्यात असहकार चळवळ व राष्ट्रप्रेमाचा भाग मोठा होता. हा सर्व निधी टिळक स्वराज फंडात जमा करण्यात आला. या अभिनव प्रयोगासाठी नारायणराव राजहंस ऊर्फ बालगंधर्व व केशवराव भोसले, बापुराव यांचेव्यतिरिक्त शेकडो मुंबई-पुणेकरांनी मोठेच योगदान दिले. संगीत रंगभूमीच्या वैभवाचा व लोकप्रियतेचा तो परमोच्च बिंदू होता. हा आनंद सोहळा पहिलाच आणि शेवटचाही! मात्र त्यास दृष्ट लागलीच! ४ ऑक्टोबर १९२१ रोजी केशवराव भोसले नावाचा संगीतसूर्य मावळला.[१०]

## आंदोलनाची प्रगती

लोकमान्य टिळक व ॲनी बेझंट वगैरेंनी संबोधित केलेल्या होमरूल लीग सभांमधील उपस्थितीची आकडेवारी पोलिसांनी संकलित केलेली होती. मात्र त्यांतील उपस्थितीपेक्षा महात्मा गांधींच्या असहकार सभांमध्ये खूपच जास्त लोक हजर असल्याचे गुप्तचरांना आढळून आले होते. गांधीजींचा करिश्मा अल्पावधीत खूपच वाढला, असे त्यांनी केंद्र सरकारला कळवले. मध्यवर्ती सरकारच्या गृह विभागाच्या गोपनीय अहवालात कबुली दिलेली आहे की, मधल्या फळीतील पुढाऱ्यांनी वायव्य सरहद्द प्रांत व सिंधपासून पूर्वेस आसाम व दक्षिणेस मद्रास इलाख्यापर्यंत राजकीय संघटनांचे जाळे तयार केले व व्यापक चळवळ उभारली होती. गुजरात आणि पंजाबातील चळवळ अधिक व्यापक होती. अहमदाबाद, खेडा, सुरत याप्रमाणे कराची व लारखाना भागात पहिल्याच दिवशी कडकडीत हरताळ होता. टिळकांच्या प्रभावक्षेत्रात मात्र सोलापूरचा अपवाद वगळता कमी प्रतिसाद मिळाला. जबलपूरमध्ये अंशतः प्रतिसाद लाभला. बंगळुरमध्ये हिंदूंना बरोबर घेऊन मुसलमानांनी चांगला सत्याग्रह केला. तेथील महानगरपालिकेच्या आयुक्ताने पदत्याग करून सरकारला चकित केले होते. मद्रासचे एस. सत्यमूर्ती व कस्तुरीरंग अय्यंगार चळवळीस अनुकूल नसूनही मरिना बीचवर दहा हजार श्रोत्यांनी असहकार चळवळीस उत्स्फूर्त पाठिंबा दिला होता.

अपेक्षेप्रमाणे बंगालमध्ये आंदोलनास मुसलमानांचा व्यापक प्रतिसाद लाभला होता. कोलकात्यात प्रचंड सभा झाली आणि ब्रिटनच्या युवराजांच्या प्रत्येक समारंभावर बहिष्कार घालण्याचा निर्णय झाला. अनेक विद्यार्थ्यांनी आपली पदवी प्रमाणपत्रे परत करण्याची घोषणा केली. सुरेंद्रनाथ बॅनर्जी चळवळीच्या विरुद्ध असले, तरी बंगाल प्रांतिक काँग्रेसने १५ ऑगस्टला निर्णय जाहीर केला की, असहकार हे एकमेव आयुध उपलब्ध असून कायदेमंडळात प्रवेश मिळविणे व्यर्थ होय. खिलाफत प्रश्नामुळे भडकलेले दक्षिणेकडील मुसलमान चळवळीत उतरले. मलबारमधील मोपलांच्या चळवळीस अनिष्ट वळण लागले हे खरे. पण त्यास शोषक वृत्तीचे सावकार व जमीनदार यांविरुद्ध शेतकरी-कामकरी यांच्यातील तणावाची पार्श्वभूमी होती. मद्रास राज्यातील ब्राह्मणेतरांची जस्टिस पार्टी मात्र कायदेमंडळात अधिक जागा मिळविण्यासाठी कटिबद्ध होती. आपले सत्ताछत्र धोक्यात आल्यामुळे भूतपूर्व काँग्रेस अध्यक्षा बेझंटबाई पिसाळल्या व त्यांनी मत्सराने महात्मा गांधींना 'डेंजरस मॅन' म्हटले. त्यांच्यामते असहकार ही 'क्रांतिकारी चळवळ' होती. तेव्हापासून सत्ता मिळविण्यासाठी त्यांनी इंग्रज सरकारशी सर्वंकष सहकार्य करणे सुरू केले. **या बाई कधीच स्वराज्यवादी नव्हत्या!**

आसामसारख्या प्रांतातही बऱ्याच शहरांमध्ये हरताळ पाळण्यात आले. डॉ. राजेंद्र प्रसादांच्या बिहार व विशेषतः पटना शहरात असहकार चळवळीस चांगला प्रतिसाद मिळाला. सत्याग्रहाच्या पहिल्याच दिवशी तीन सरकारी कर्मचाऱ्यांनी नोकरीचा त्याग केला होता. नंतर अनेकांनी त्यांचे अनुकरण केले. बिहारात एक हजार असहकार सभा भरल्याची सरकारी नोंद आहे. उत्तर प्रदेशात जवाहरलालजींनी स्वराज्याचा हा लढा किसानांपर्यंत नेला.

पंजाबच्या मध्यवर्ती भागात हा लढा पुष्कळ व्यापक प्रमाणात पसरला. पंजाबातील लाहोर, अमृतसर, लुधियाना, मुलतान, सरगोधा, रोहटक, सिमला व इतर शहरांमध्ये प्रारंभापासूनच आंदोलन जोरात होते. बऱ्याच ठिकाणी कडकडीत हरताळ पाळण्यात आले. बाजूच्या वायव्य सरहद्द प्रांतातील चार

शहरांमध्ये कडकडीत हरताळ झाले आणि इतर शहरांमध्ये अंशतः हरताळ झाले. खान अब्दुल गफारखान यांच्या पठाणांनी शांततापूर्ण लढा दिला. पेशावरमधील सर्व शिक्षकांनी आणि कोहटमधील बारा पोलिसांनी राजीनामे देऊन स्वातंत्र्यलढ्यास योगदान दिले.[११]

ही स्वार्थत्यागाची भावना १९३० च्या कायदेभंग आंदोलनातही प्रकट झाली.

शेकडो मराठी भाषिक कार्यकर्ते युक्तिवाद करत होते की, गांधीजींनी घडविलेल्या राष्ट्रीय प्रवाहापासून दूर राहण्याचा धोका पत्करण्यापेक्षा गांधींशीच युती करणेच श्रेयस्कर होय. न. चिं. केळकरांच्या गटानेही आधी ही भूमिका स्वीकारली होती. ऑगस्टच्या अंतापूर्वी मध्यप्रांत प्रादेशिक समितीने निर्णय जाहीर केला की, असहकार हा एकमेव पर्याय असून कायदेमंडळात जाऊन फारसे साध्य होणार नाही. मद्रासचे गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन यांनी ८ ऑगस्ट १९२० रोजी माँटेग्यू महोदयांना आपली व्यथा कळविली, **"गांधी इज ऑऊट फॉर अवर ब्लड". इतके ते त्रस्त झाले होते.**[१२]

कोलकाता स्पेशल काँग्रेस अधिवेशनात गांधीजींना विरोध करणाऱ्या प्रस्थापित अभिजनांचा विरोध मुख्यतः कायदेमंडळावरील बहिष्काराबाबत होता. तथापि जवाहरलाल नेहरूंमुळे असेल बहुधा, मोतीलालजी व बंगालचे एक पुढारी फझलुल हक हे कोलकात्यात गांधीजींचे समर्थक बनले. मौलाना अबुल कलाम आझादांनी बंगाली विद्यार्थांना चळवळीत ओढले आणि त्यांना सक्रिय बनविले. बंगालातील ' भद्रलोकां 'च्या स्वदेशी वा सशस्त्र क्रांतिकारी चळवळीचा स्पर्श न झालेले गरीब हिंदू व शेतकरी-कामकरी, छोटे दुकानदार आणि विशेषतः मुसलमान असहकार चळवळीत सहभागी झालेत. त्यामुळे स्वाभाविकपणे भद्रलोक अभिजनांना आपले राजकीय व सामाजिक स्थान गमावण्याची भीती वाटू लागली. शिवाय त्यांना आगामी निवडणूक लढविणे धोक्याचे वाटू लागले. आधीच्या पिढीतील सुरेंद्रनाथ बॅनर्जी, मोतीलाल घोष, बिपिनचंद्र पाल, वगैरे आता एकाकी पडल्याने चित्तरंजन दास सजग झाले. म्हणून चित्तरंजन बाबूंना खिलाफत कमिटी व गांधीजींशी सहयोग करणे आवश्यक वाटू लागले. असहकारवादी

कार्यकर्ते गावोगावी जोरदार प्रचार करीत. ठिकठिकाणी गांधीजींचा जयजयकार व झंझावात पाहून बंगालचे गव्हर्नर रोनाल्डशे यांना आश्चर्य वाटले. दासबाबूंचे समर्थक बी. एन. सस्मल यांनी उभारलेल्या नो-टॅक्स मोहिमेस मोठेच यश मिळाले. बंगाल सरकारने नंतर भारतमंत्र्यास कबुली दिली की, बंगालच्या काही भागात पोलीस व महसूल यंत्रणा पार कोसळली होती.

बंगालमध्ये चित्तरंजन दास व त्यांचे अनुयायी कास्तकारांच्या गाऱ्हाण्यांचा चळवळीसाठी उपयोग करून घेत होते. त्यामुळे असंतोष पसरला होता. शिवाय तिथे काँग्रेस व खिलाफत संघटनेची युती झाल्यामुळे असहकारवादी प्रचारयंत्रणा प्रभावी झाली होती. त्यामुळे अभिजनांच्या निवडणूकविषयक अभिलाषा धूसर झाल्या, असे गव्हर्नर रोनाल्डशेने भारतमंत्र्यांना कळविले होते.[१३]

कोलकाता, ढाका व मिदनापूरच्या विद्यार्थ्यांनी सरकार प्रमाणित शाळा-कॉलेजांचा फार मोठ्या प्रमाणात त्याग केला. नागपूर काँग्रेसनंतर दासबाबूंनी कोलकात्यात राष्ट्रीय शिक्षण देणारे नॅशनल कॉलेज व विद्यापीठ कार्यरत केले व आपले शिष्य सुभाषचंद्र बोस यांना प्राचार्यपदी नेमले. तेथेच तेजस्वी सुभाषबाबूंची जहाल राष्ट्रवादी अशी जडणघडण झाली. असहकार चळवळीच्या पार्श्वभूमीवरच बनारसमध्येही राष्ट्रवादी भूमिकेचे आणि भारतीय साहित्य आणि कलांचे शिक्षण देणारे **काशी विद्यापीठ** स्थापन करण्यात आले. गुजरातमधील कित्येक विद्यार्थांनी सरकारच्या गुजरात कॉलेजचा त्याग केला. त्यांच्यासाठी गांधीजींनी **गुजरात विद्यापीठ** स्थापन केले. खिलाफत कमिटी व काँग्रेसने अलिगडमध्ये **जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठ** सुरू केले. नंतर ते दिल्लीत स्थलांतरित झाले. हे सर्व उपक्रम आजही कार्यरत आहेत. याच चळवळीच्या विद्यमाने **बिहार विद्यापीठ** व ओरिसात ४४२ राष्ट्रीय शाळा-संस्था स्थापन झाल्या. त्यांची संख्या उत्तर प्रदेशात १३७, बंगालमध्ये १९० व मुंबई इलाख्यात १८९ होती. मुंबई-पुण्यातील अशा संघटनांची माहिती वरील पृष्ठांमध्ये दिलेलीच आहे. त्यापैकी बऱ्याच संस्था अल्पायुषी ठरल्या हे खरे. तथापि त्यांच्यातून हजारो देशभक्त आणि स्वातंत्र्यसैनिकांची नवी ‘कमिटेड’ पिढी निर्माण झाली व त्यांनी स्वातंत्र्यलढा चालविला. त्यांनी शिक्षणाचा त्याग करून

लढा व रचनात्मक राष्ट्रीय कार्यास वाहून घेतले. त्यांपैकी ज्या संघटना अधिक काळ कार्यरत राहू शकल्या, त्यांना **'व्हॅल्युएबल सेमिनरीज ऑफ नॅशनॅलिझम'** हे बिरुद लाभले.

ऑक्टोबर १९२० मध्ये गांधीजींनी शीख लीग संघटनेच्या चाहत्यांना असहकार चळवळीत सहभागी करून घेतले, आणि त्यामुळे त्यांना पंजाबच्या बऱ्याच भागात कार्यकर्त्यांचे जाळे उपलब्ध झाले. ही त्यांची फार मोठी उपलब्धी मानावी लागते. खालसा कॉलेजवर सनदी नोकरशाहीचे प्रभुत्व होते. दुर्दैवाने अमृतसरच्या पवित्र सुवर्ण मंदिराच्या व्यवस्थापनातही सरकारधार्जिण्यांचे प्राबल्य होते. हा प्रकार शीख भाविकांना दुःखकारक वाटत होता. शिवाय महायुद्धात प्राणपणाने लढूनही आणि हजारोंनी प्राणांचे बलिदान देऊनही मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांनी पंजाबला काहीच दिले नव्हते. जालियनवालाच्या महाभयानक स्मृती ताज्या होत्या. ओडवायर व डायर या दोघांना ब्रिटिशांनी काहीच शिक्षा दिली नव्हती. त्यामुळे पंजाबच्या वेदनांवर फुंकर घालणाऱ्या गांधी व खिलाफतवाद्यांना पंजाबचा चांगला पाठिंबा लाभणे स्वाभाविक होते. बऱ्यांच देशांमधून शेकडो सुप्त गधर क्रांतिकारक व त्यांचे हजारो समर्थक पंजाबात आले. यामुळे जलंदर आणि होशियारपूर जिल्ह्यांमध्ये भरलेल्या प्रचंड सभांमध्ये आक्रमक प्रवृत्तीचे दर्शन घडले. शिवाय लोकांच्या वेदनांची दखल न घेता प्रांतिक सरकारने लाहोर, अमृतसर, शेखपुरा व जलंदर जिल्ह्यांमध्ये आणि अनेक शहरांमध्ये सिडिशिअस मिटिंग ॲक्ट लागू केला. त्यामुळे असहकार लढा अधिकच व्यापक झाला. जुन्या नेत्यांना चळवळीस विरोध करणे धोक्याचे वाटत होते. यामुळे पंजाबातील निवडणुकांमध्ये केवळ ८.५ टक्के आणि लाहोरातील निवडणुकीत फक्त ५ टक्के मतदान झाले. बॅं. असफ अली, अरीफ हसुरी, शंकरलाल व हकीम अजमल खान यांनी दिल्लीतील चळवळ यशस्वी करून निवडणुकीवरील बहिष्कार यशस्वी करून दाखविला.

राजकीय निरीक्षकांना पटले की, चळवळीला भरघोस पाठिंबा लाभला. देशातील जुन्या व नवोदित राजकीय गटांपर्यंत महात्मा गांधी जाऊन पोहोचले.

त्यांच्या अनुयायांचे जाळे पसरले. जेथे उदासीनता व सुस्ती होती, तेथेही चळवळ पसरली. चळवळीचे विरोधक नारायणराव चंदावरकर यांनी महात्मा गांधी यांना प्रॉफेट म्हटले. त्यांच्याच प्रमाणे पुरषोत्तमदास ठाकूरदास यांनाही कबूल करावे लागले की, अनुयायांच्या मेहनतीद्वारे गांधीजींनी प्रथम गुजरातवर अक्षरशः मोहिनी घातली. वऱ्हाडचे दादासाहेब खापर्डे यांनी स्वतःच्या रोजनिशीत नोव्हेंबर १९२० रोजी नोंद केली, 'पीपल आर औट ऑफ हँड. ॲन्ड दे थिंक ऑफ नथिंग बट नॉन-कोऑपरेशन'. विरोधकांची ही निरीक्षणे खूपच बोलकी आहेत. खापर्डे यांच्या प्रभावक्षेत्रात नवे नेते घडले, हे त्यांच्या लक्षात आले.

लंडनमध्ये वि. दा. सावरकरांना मदत केलेल्या रविशंकर शुक्ला यांनी नागपूर व मागास मध्यप्रांतात असहकार चळवळीस भरघोस प्रतिसाद मिळविला आणि राजकारणात आपले स्थान भक्कम केले. म्हणून १९३७ मध्ये हेच शुक्ला वऱ्हाड-मध्यप्रांताचे मुख्यमंत्री झाले. इकडे १९१९ पावेतो टिळकभक्त असलेल्या मराठी भाषिकांचा प्रभाव होता. त्यावर मात करून रविशंकरजींनी हिंदी भाषिकांना राजकीय प्रांगणात आणले. ई. राघवेंद्रराव, ठाकूर छेडीलाल, जी. एस. गुप्ता यांनी निवडणुकीची उमेदवारी मागे घेतली. द्वारकाप्रसाद मिश्रा हेही पुढे आले आणि त्यांनी आपले स्थान भक्कम केले. बी. डी. शुकूल यांना बाजूला व्हावे लागले.

असहकार आंदोलनातून जमनालाल बजाज यांच्या रूपाने काँग्रेसमध्ये एक मोठी शक्ती निर्माण झाली. नागपूर अधिवेशनापूर्वीही या मंडळींनी चळवळ उभारली होती. त्यांनी मागासलेल्या हिंदी मध्यप्रांतात राजकीय जागृती निर्माण करून या प्रदेशास नवीन राष्ट्रीय प्रवाहात आणले. नागपूरच्या कलेक्टरने दिल्लीस कळविल्यानुसार प्रांतातील धनिक मारवाडी व गुजराती व्यापारी व मालगुजारांनी पुढाकार घेऊन चळवळीस योगदान दिले.[१४] मालगुजार हा अत्यंत धनवान व प्रभावी जमीनदारांचा संघटित वर्ग असूनही, त्यांनी गांधीजी व जमनालालजी यांच्या प्रेरणेनुसार असहकार चळवळीस मदत केली. मात्र त्यांना ब्राह्मणेतर पक्षीयांनी सहकार्य केले नाही. या प्रांतातील ५२ पैकी सात मतदारसंघांमध्ये निवडणुकीसाठी

एकही उमेदवार पुढे आला नाही, तर ३३ मतदारसंघांमध्ये बिनविरोध निवडणूक होऊन इंग्रजांशी प्रतियोगी सहयोग करणारे काँग्रेस विरोधक निवडून आले. चळवळीचे हेही मोठे यश होते. टिळकभक्त वीर वामनराव जोशींनी (नाटककार) आपण महात्मा गांधींचे शिष्य आहोत, हे घोषित केले.[१५]

## नागपूर काँग्रेसचे महत्त्व

असहकार चळवळीला कोलकाता काँग्रेसकडून हंगामी मंजुरी लाभली होती. तथापि डिसेंबर १९२० मध्ये भरणाऱ्या वार्षिक नागपूर काँग्रेसमध्येच त्यावर अंतिम निर्णयाची मोहर उठणार होती. गांधीजींची सत्त्वपरीक्षा व्हावयाची होती. म्हणूनच २६ डिसेंबरपासून भरलेले हे अधिवेशन काँग्रेसच्या तसेच महाराष्ट्राच्या इतिहासातील एक महत्त्वाच्या टप्पा होता. या अधिवेशनामुळे काँग्रेसच्या तसेच देशाच्या इतिहासाला नवीन वळण मिळणार होते. या पार्श्वभूमीवर काँग्रेस स्वागत समितीचे अध्यक्षपद गांधीजींनी जमनालाल बजाज यांना स्वीकारण्यास सांगितले. कोलकाता अधिवेशनात बजाज यांनी या चळवळीचा जोरदार पुरस्कार केला होता. राय बहादुर या सरकारदत्त किताबाचा त्याग करून बजाज यांनी इतरांनाही किताबांवर बहिष्कार घालण्यास प्रोत्साहन दिले होते. त्यांच्या दानशूर व उदार धोरणामुळे वर्ध्याभोवती क्रियाशील संघटना व कार्यकर्त्यांचे मोहोळ निर्माण झाले होते. बजाज यांना आपले कौशल्य व निष्ठा सिद्ध करण्याची डिसेंबरमध्ये सुसंधी होती. त्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

नागपूर अधिवेशन सर्वतोपरी यशस्वी करण्यासाठी वर्धा-नागपूर परिसरातील सर्व व्यापारी, धनिक, प्रगतिशील व्यक्ती व स्वयंसेवकांनी अधिवेशनाच्या यशासाठी खूप परिश्रम घेतले. राजस्थानातील पंडित भगवानदीन व अर्जुनलाल सेठी आणि उत्तर प्रदेशातील पंडित सुंदरलाल यांना बजाज यांनी इकडे आणले. वीर वामनराव जोशी (नाटककार) आणि डॉ. केशव बळीराम हेडगेवार हे दोघे टिळकभक्त क्रांतिकारी मतवादी होते. पण गांधीजींचा त्यांच्यावर प्रभाव पडल्यामुळे ते असहकार चळवळीचा प्रचार करू लागले. गांधीजी हेच टिळकांचे खरे उत्तराधिकारी आहेत असा रोखठोक प्रचार झाला. आर. एस. रुईकर, रविशंकर

शुक्ला, पुनमचंद रांका, नीळकंठराव घटवाई, व्ही. एस. दांडेकर, एम. जे. कानेटकर, समिउल्ला खान वगैरेंनी या अधिवेशनासाठी पुष्कळ काम केले.

राष्ट्रभरच्या उत्कंठेमुळे नागपूर अधिवेशनासाठी १४,५८२ प्रतिनिधी आले होते. ही संख्या अभूतपूर्व होती. त्यांमध्ये १,०५० मुसलमान आणि १६९ महिला प्रतिनिधी होत्या. पूर्वीच्या एकाही अधिवेशनात मुसलमान व महिला इतक्या मोठ्या प्रमाणात आल्या नव्हत्या. एवढेच नव्हे तर १९२० नंतरही बरीच वर्षे हा उच्चांक मोडता आला नाही. मौलाना महंमद अली व शौकत अली या बंधूंनी अगणित मुसलमानांना काँग्रेसमध्ये आणले होते. खिलाफत प्रकरणी ब्रिटिशांनी केलेल्या घोर अन्यायाची यास पार्श्वभूमी होती. त्या अन्यायाच्या परिमार्जनार्थ त्यांनी महात्मा गांधींचे नेतृत्व शिरोधार्य मानले होते.

अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी [२६ डिसेंबर १९२०] अध्यक्ष विजयराघवाचारियर व बंगालचे पुढारी चित्तरंजन दास व बिपिनचंद्र पाल आणि सत्यमूर्ती, पं. मदन मोहन मालवीय, बॅ. जिना वगैरे पुढारी गांधीजींच्या मुख्य ठरावाला विरोध करतील हे दिसू लागले. विषयनियामक समितीमधील कामकाजाचे विवरण प्रतिनिधींना कथन करण्याचे काम शंकरराव देव यांच्याकडे होते. यामुळेही प्रतिनिधींचा प्रतिसाद घडत गेला. असहकाराचा कार्यक्रम अंतिमतः मंजूर करण्याआधी काँग्रेसचे ब्रीदवाक्य व घटना यात दुरुस्त्या करणे क्रमप्राप्त होते. सर्व अनुज्ञेय (Legitimate) आणि शांततापूर्ण मार्गांनी स्वराज्य मिळविणे हे काँग्रसचे उद्दिष्ट आहे, असे गांधीजींच्या प्रस्तावात म्हटले होते. त्यावर चित्तरंजन दास यांनी दुरुस्ती-सूचना मांडली. पण ती ३७ विरुद्ध १८२ मतांनी फेटाळली गेली. तरी देखील आपली दुरुस्ती-सूचना विषयनियामक समितीला पटवून देण्यासाठी मदन मोहन मालवीय व बॅ. जिना यांनी आपले सर्व वाक्चातुर्य पणाला लावले. तथापि गांधीजींच्या प्रस्तावास विरोध करणे बहुसंख्य सभासदांना अजिबात पसंत नव्हते. मालवीय व जिना या दोघांच्याही भाषणांमध्ये व्यत्यय आणण्यात आला.

समितीमध्ये जिना आणि मौलाना महंमद अली यांच्यात तीव्र वादावादी व व्यक्तिगत आरोप झाले. जिनांची पाश्चिमात्य राहणी व त्यांच्या पत्नी रतनबाई

(त्या पारशी होत्या) यांची आधुनिक जीवनशैली यावरही महंमद अलींनी टीका केली. या रतनबाई आणि हसरत मोहानींची पत्नी फातिमाबाई या बुरखा न घालता काँग्रेस अधिवेशनांमध्ये सहभागी होत असत. वस्तुतः महंमद अलीही कर्मठ नव्हते. पण जिना साहेबांवर त्यांचा रोख होता. विषयनियामक समितीत दादासाहेब खापर्डे यांनी गांधीजींची टर उडवली, तेव्हा महंमद अलींनी दादासाहेबांबर खूप तोंडसुख घेतले. खापर्डे व मुंजेंच्या भाषणांचा चळवळ समर्थकांनी तीव्र धिक्कार केला होता.

अपेक्षेप्रमाणे महाराष्ट्र व मध्यप्रांत-वऱ्हाडमधील मराठी भाषिक सभासदांमध्येही दोन गट पडले होते. गंगाधरराव देशपांडे, काका कालेलकर, दिवेकर शास्त्री, वामनराव जोशी, शंकरराव देव, दि. धों. साठे वगैरे गांधीजींच्या ठरावाचे खंदे समर्थक होते. तर खापर्डे, मुंजे, माधव श्रीहरी अणे व दत्तोपंत बेळवी ठरावाचे विरोधक होते. मात्र विरोधक अल्पमतात असल्याने त्यांच्यापैकी काही जण खुल्या अधिवेशनात उपस्थितच राहिले नाहीत. त्यांच्यातच खापर्डे होते.

विषयनियामक समितीमधील चर्चेतून काँग्रेस पक्ष व संपूर्ण भारताच्या अंतरमनाची कल्पना आल्याकारणाने, चितरंजन दास, मोतीलाल नेहरू, बिपिनचंद्र पाल, लजपतराय, कस्तुरीरंग अय्यंगार वगैरे प्रस्थापित नेत्यांनी खुल्या अधिवेशनात महात्मा गांधींना अगदी असंदिग्ध पाठिंबा दिला. गांधीजींमागे बहुसंख्य सभासद ठामपणे उभे असूनही, बॅ. जिनांनी असहकारास असलेला आपला विरोध निर्भयपणे स्पष्ट शब्दांत खुल्या अधिवेशनातही नोंदविला. या कारणास्तव उपस्थितांमधील एका गटाने जिनांचा उपमर्द व अपमान केला. कारण गांधीजींचा उल्लेख ‘महात्मा गांधी’ असा न करता बॅ. जिना त्यांना केवळ ‘मिस्टर’ गांधी म्हणू लागले. तेव्हा ‘महात्माजी म्हणा’ अशी वारंवार मागणी होऊ लागली. जिनांनी माफी मागावी असाही आग्रह धरण्यात आला. जिनांनी सशर्त माफी मागूनही सभागाराचे समाधान झालेच नाही. शिवाय त्यांनी नुसते ‘मिस्टर महंमद अली’ असा उल्लेख केल्यावर, ‘मौलाना महंमद अली’ म्हणा असा जिनांवर वर्षाव करण्यात आला. यावर मात्र बॅ. जिना संतापले आणि त्यांनी आपलाच

हेका चालू ठेवला. या सर्व प्रकारात हिंदू-मुसलमान श्रोत्यांनी जिनांची विपुल हेटाळणी केली.

मुंबईतील ताजमहाल हॉटेल आणि क्लबांमध्ये वावरणाऱ्या गर्विष्ट बॅ. महंमद अली जिनांना असहकार चळवळीचा कार्यक्रम, कायदेमंडळांवरील बहिष्कार, गांधीवादी आंदोलन, महात्माजींची कार्यप्रणाली आणि विचारप्रणाली मानवणे अगदी अशक्य होते. त्यांच्याशी गाढ स्नेहभाव असलेले लोकमान्य टिळक व गोपाळ कृष्ण गोखले आता हयात नव्हते. १९२०-२१ मध्ये भारत राष्ट्र महात्मा गांधी यांच्याकडून मोठ्या अपेक्षा बाळगून होते. म्हणून नागपूर अधिवेशनात असहकाराचा कार्यक्रम प्रचंड बहुमताने मंजूर झाल्यावर जिनांनी काँग्रेसचा राजीनामा दिला. वीस-पंचवीस वर्षे काँग्रेसशी असलेले घनिष्ट संबंध त्यांनी तोडून टाकले. स्वतः गांधीजी यांनी व जिनांची विलक्षण सौंदर्यवती पत्नी रतनबाई तसेच अनेक पुढाऱ्यांनी त्यांची मनधरणी केली. तरीही त्यांनी स्वतःचा निर्णय बदलला नाही.

नागपूरच्या मुख्य ठरावात खिलाफत समस्या आणि पंजाबातील अन्यायांबद्दल ब्रिटिशांशी असहकार करणे याबरोबरच स्वराज्याची मागणी नमूद केलेली होती. ज्येष्ठ पुढाऱ्यांपैकी मोतीलालजी यांनी ठरावात काही शाब्दिक बदल करून, तसेच चित्तरंजन दास यांचे मन वळवून गांधीजींना सर्वाधिक मदत केली होती. लालाजीदेखील असहकारात पुरेपूर सामील झाले नागपुरातच ! त्यांच्या आग्रहावरून शाळा-कॉलेजांबाबतच्या ठरावात गांधीजींनी किंचित फेरफार मान्य केला. दासबाबूंनीही काही बदल करून घेतले. याच अधिवेशनात स्वराज्यप्राप्ती, हिंदुमुसलमान ऐक्य, अस्पृश्यतानिवारण आणि खादीविषयीचे ठराव पास झाले. तेव्हापासूनच अस्पृश्यता दूर करणे व खादी कार्याद्वारे दीनदुर्बल जनतेशी संबंध जोडण्यास खरा प्रारंभ झाला. खिलाफतीच्या निमित्ताने सरकारशी असहकार हा राष्ट्रीय ऐक्य साधण्याचा मोठा प्रयत्न होता.[१६]

काँग्रेस स्थापनेपासूनच्या इतिहासातील हे सर्वाधिक महत्त्वाचे अधिवेशन ठरले. तत्त्वप्रणालीचे अधिष्ठान, ठोस कार्यक्रम, पक्ष संघटना तसेच अधिकाधिक कार्यकर्त्यांचा सहभाग या सर्वच कसोट्यांवर नागपूर अधिवेशन पूर्वीच्यापेक्षा सरस

ठरले. फलनिष्पत्तीच्या कसोटीवरही ते अद्वितीय होते. नागपूरला एकूण २४ ठराव मंजूर झाले. एका ठरावान्वये अखिल भारतीय काँग्रेसचे मुख्यालय अलाहाबादमधील मोतीलाल नेहरूंच्या निवासस्थानी म्हणजे आनंद भवनात थाटण्यात आले. यालाच नंतर **'स्वराज्यभवन'** हे यथार्थ नाव मिळाले व स्वातंत्र्य लाभेपर्यंत काँग्रेस मुख्यालय तेथेच कार्यरत राहिले. मोतीलालजी, डॉ. एम. ए. अन्सारी आणि राजगोपालाचारी यांना सरचिटणीसपदी नेमण्यात आले (१९२१).

नागपूरमधील एका ठरावात 'एका वर्षात स्वराज्य' ही लोकप्रिय घोषणा नमूद होती. १९१९ च्या कायद्यानुसार १९२१ च्या प्रारंभी अस्तित्वात येणाऱ्या कायदेमंडळाचे उद्‌घाटन करण्यासाठी ड्यूक ऑफ कनॉट येणार होते. असहकाराच्या कार्यक्रमानुसार त्यांच्या सर्वच कार्यक्रमांवर बहिष्कार घालण्याचा ठराव मंजूर झाला. भांडवलदारांच्या हितासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी बळजबरीने अधिग्रहीत करण्यात येत. याबाबत शेतकऱ्यांना संरक्षण तसेच औद्योगिक कामगारांना संरक्षण देण्याचा निर्णय नागपुरातच घेण्यात आला. शिखांचे हितसंबंध जपण्यासाठीही ठराव करण्यात आला. मुस्लीम लीग पक्षाने गोवधबंदीचा ठराव केला होता. त्यासाठी एका ठरावान्वये त्यांच्या संघटनांचे आभार मानण्यात आले.

नागपूर काँग्रेस अधिवेशनात जसे पक्षाचे ब्रीदवाक्य बदलले, तसेच नवीन ३१ कलमी घटना संमत करण्यात आली. त्यानुसार हिंदुस्तानचे २१ भाषावार प्रांत निर्धारित करून देशात २१ प्रांतिक काँग्रेस समित्या निर्माण करण्यात आल्या. तत्कालीन महाराष्ट्रासाठी पुणे, वऱ्हाडसाठी अमरावती व मध्यप्रांतासाठी नागपूरला स्वतंत्र काँग्रेस समित्या निर्माण झाल्या. मुंबईत गुजराती व पारशी मंडळीही प्रभावी असल्यामुळे मुंबई शहरासाठी स्वतंत्र काँग्रेस समिती निर्माण केली. टिळक-गोखलेंचा वारसा चालवणाऱ्या न. चिं. केळकर, शंकरराव देव, गंगाधरराव देशपांडे व सेनापती बापट तसेच डॉ. मुंजे, खापर्डे यांना काम करण्यास वाव मिळावा हाही गांधीजींचा एक उद्देश होता.[१७] काँग्रेसची नवीन पक्ष घटना बनवणाऱ्या समितीत केळकर होते. टिळकांच्या नावाचा त्यांना नेहमीच फायदा झाला आणि म्हणूनच महाराष्ट्र प्रांतिकचे ते अनेक वर्षे अध्यक्ष राहिले.

नागपूर ठरावानुसार काँग्रेस पक्षाची संघटना चार स्तरांमध्ये बांधण्यात आली— अखिल भारतीय काँग्रेस समिती, प्रांतिक काँग्रेस समिती, जिल्हा काँग्रेस समिती व तालुका काँग्रेस समिती. या आकृतिबंधात पुढेही मूलभूत बदल झाले नाहीत. अ. भा. काँग्रेस समितीत पाठवावयाच्या प्रतिनिधींची संख्या पुढीलप्रमाणे निर्धारित करण्यात आली—मुंबई शहर ७, तत्कालीन महाराष्ट्र १६, वऱ्हाड ६, व मध्यप्रांत १०. पक्षाच्या सर्वोच्चपदी काँग्रेस वर्किंग कमिटी असेल असा निर्णय झाला. या कार्यकारिणीत महाराष्ट्राचे प्रतिनिधी म्हणून केळकर, बाळकृष्ण शिवराम मुंजे, शंकरलाल बँकर व स्वीकृत सदस्य म्हणून गंगाधरराव देशपांडे यांची निवड झाली होती. महाराष्ट्र प्रांतिकचे पहिले अध्यक्ष म्हणून केळकर तर चिटणीस पदावर शंकरराव देव यांची निवड झाली होती.[१८] जमनालाल बजाज व मिया महंमद छोटानी यांना काँग्रेसचे कोषाध्यक्षपदी नेमले होते. मुंबई प्रांतिक काँग्रेस समितीचे पहिले अध्यक्षपद सरोजिनी नायडू यांना दिले होते. तर चिटणीस पदांवर उमर सोभानी, शंकरलाल बँकर आणि डॉ. दिनकर धोंडो साठे यांना नियुक्त केले होते.

नागपूर अधिवेशनाचे निरीक्षण केलेल्या बॅ. मुकुंदराव जयकरांनी मार्मिक उद्गार काढला– "Gandhi had made one of his finest conquests in Jamnalal." या अधिवेशनाचे दूरगामी परिणाम झाले. विदर्भाच्या सार्वजनिक जीवनात अपूर्व तरतरी आली. नागपूर काँग्रेसच्या यशामुळे विदर्भ-मध्यप्रांताच्या आशाआकांक्षांची दखल घेणे गव्हर्नर सर फ्रँक स्लाय यांना भाग पडले. मुंबई-नागपूर लोहमार्ग एकेरी होता. या मार्गाचे दुहेरीकरण करणे १९१८ मध्ये सुरू करून सरकारला हे काम १९३२ पर्यंत पूर्ण करावे लागले. तसेच सरकारने नागपुरातून जाणारा दिल्ली-मद्रास लोहमार्ग बांधून पुरा केला. हिंदी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने राष्ट्रीय पुढारी इकडे येऊ लागले. महत्त्वाचे हे की, १९२३ साली सरकारला नागपूर विद्यापीठ स्थापन करावे लागले. मराठी लेखक व विद्यावंतांनी १९२३ साली **नागपुरात विदर्भ साहित्य संघ स्थापन करून एक जिवंत राजकीय व साहित्यिक व्यासपीठ निर्माण केले. त्याचा राजकीय प्रचारासाठीही उपयोग होणे स्वाभाविकच होते."**[१९]

## बॅ. जिनांचा राजीनामा

नागपूर अधिवेशनानंतर मुंबईचे प्रिन्स म्हणजे बॅ. जिना काँग्रेसमधून बाहेर पडले. असहकारितेचे तत्त्व आणि काँग्रेसला अधिक लोकप्रिय व प्रातिनिधिक बनवण्याची धडपड त्यांना सर्वस्वी नापसंत होती. परंतु काँग्रेसमधून बाहेर पडण्यास राजकीय मतभेद हे एकच कारण नव्हते. सभांमधील हिंदी व देशी भाषांमधील भाषणे व खादीचा पोषाख आणि साधी राहणी यांत वावरणे त्यांना गुदमरल्यासारखे वाटे. अहंकारी व अभिजनवादी जिना सामान्य जनतेच्या जवळ जाण्यास मुळातच तयार नव्हते. काँग्रेसमध्ये फक्त मॅट्रिक पास झालेल्यांनाच घ्यावे, असे त्यांचे मत होते. खेडूत, कामगार व अर्धशिक्षितांना काँग्रेसमध्ये घेण्यास त्यांचा विरोध होता. शिवाय क्लब संस्कृतीत वावरणाऱ्या जिनांना कर्मठ मुसलमान व गांधीजींच्या अनुयायांचे अजिबात आकर्षण नव्हते. म्हणूनही त्यांनी काँग्रेस सोडली. नेमस्त व जातीय अभिनिवेश असलेल्या नेत्यांचाही काँग्रेसशी संबंध राहिला नाही. नवीन राज्यसुधारणांचा फायदा घेऊन अशा नेत्यांनी अधिकाराच्या जागा पटकावल्या व ते सरकारशी एकरूप झाले. स्वराज्याच्या चळवळीच्या विरोधात त्यांनी सरकारला मदत केली.

## आंदोलनास लोकप्रतिसाद

तथापि जनता अपूर्व एकजुटीने चळवळीत सामील झाली होती. जवाहरलाल नेहरूंनी आत्मकथेत म्हटल्याप्रमाणे "जनतेत स्वातंत्र्याचे नवे वारे खेळू लागले. आणि फार मोठे ओझे मानेवरून दूर भिरकावून दिल्याचा आनंद लोकांना मिळाला होता. त्यानंतर दडपून टाकणारी भीती पार नाहीशी झाली आणि मान वर करून ते हिंडूफिरू लागले. दूरदूरच्या खेड्यांतून काँग्रेस, स्वराज्य, पंजाब प्रकरण आणि खिलाफत वगैरेंबद्दल सामान्य लोकांतही चर्चा होऊ लागली." नेहरू व युवकांच्या स्वातंत्र्याच्या भावना उदित झाल्या आणि त्यामुळे त्यांचा स्वाभिमान जागृत झाला. परवशता व निराशेची जाणीव धुऊन निघाली. अधिकाऱ्यांविषयीची भीती दूर होऊन, स्पष्टपणे बोलणे व वागणे सुरू झाले. युवकांचा आत्मविश्वास वाढला. युवकांना हक्कांची जाणीव झाली. कारावासाची भीती कमी झाली. स्वातंत्र्यासाठी आम्ही लढत आहोत असा आत्मगौरव वाटू लागला. गांधीजींबद्दल,

त्यांनी दाखविलेल्या मार्गाबद्दल युवकांना अभिमान वाटे. त्यांचे नैतिक-धैर्य वाढल्यामुळे सरकारची हिम्मत खचू लागली. दडपशाहीचा परिणाम विपरीत होतो हे सरकारच्या लक्षात आले. ब्रिटिश सत्तेची प्रतिष्ठा कोलमडण्याच्या बेताला आली होती. मोठ्या पुढाऱ्यांना अटक करताना अधिकाऱ्यांची द्विधा मनःस्थिती होई. डिसेंबर १९२१ मध्ये व्हाइसरॉय लॉर्ड रीडिंग यांनी म्हटल्याप्रमाणे सरकार गोंधळले होते. बुचकळ्यात पडले होते. चळवळ शांततापूर्ण असल्यामुळे दडपशाहीचा परिणाम विपरीत ठरत होता. नोकरशाहीला १९२१ साल मोठे जिकिरीचे व तणावाचे गेले. खिलाफत प्रकरणामुळे मुसलमान १८५७ नंतर प्रथमच राष्ट्रीय चळवळीत उतरल्यामुळे सरकारची चिंता वाढली होती. **गांधीजी म्हणजे जनतेच्या संमिश्र आकांक्षांचे मूर्तिमंत प्रतीक झालेले होते.** डिसेंबर १९२१ ते जून १९२२ पावतो देशातील अदमासे ३०,००० लोक असहकारिता चळवळीसाठी तुरुंगात गेले. महात्मा गांधींना पकडण्याचे धाडस सरकारने अद्याप केले नव्हते. प्रतिदिनी ते चळवळ-प्रवण युवकांना प्रोत्साहन देत होते. जनतेचे मनोधैर्य वाढवतच होते.[२०]

विशेषतः मुंबईत चळवळ जोरात चालू असताना नेमस्त पुढाऱ्यांनी असहकार-विरोधी चळवळ सुरू केली. पूर्वी काँग्रेसचे अध्यक्षपद उपभोगलेले सर दिनशा वाच्छा आणि सर नारायणराव चंदावरकर यांना पुढे करून, नॅशनल लिबरल असोसिएशन आणि कापड गिरणीमालक संघाने या विरोधी चळवळीस उत्तेजन दिले. चमत्कारिक असे की, न्या. चंदावरकर यांनी एक पत्रक प्रसिद्ध करून गांधीजींची चळवळ कशी धर्मद्रोही व धर्माचरणाविरुद्ध आहे, हे दाखविण्यासाठी आपले धर्मज्ञान वृथा खर्च केले. वस्तुतः ते प्रार्थनासमाजाचे नेते व १९०० च्या लाहोर काँग्रेसचे अध्यक्ष होते. पण हायकोर्टाचे न्यायाधीश पद लाभलेल्या इंग्रजधार्जिण्या चंदावरकरांनी टीकात्मक फलक लावून स्वतःची प्रतिमा डागाळली, असे प्रबुद्ध लोकांना वाटत होते. त्यांना गांधीजींनी ४ ऑगस्ट १९२० च्या **यंग इंडिया** पत्रकातून आणि व्याख्यानांमधूनही सडेतोड उत्तर दिले. सर होमी मोदी, पुरषोत्तमदास ठाकूरदास, एफ. ई. दिनशा, सर चिमणलाल सेटलवाड आणि

हिंद सेवक समाजाचे काही सभासद या सत्याग्रह-विरोधी चळवळीचे पुढारी होते. त्यांना १९१९ चा राज्यसुधारणा कायदा यानुसारच्या नवीन कायदेमंडळांमध्ये आपले प्राबल्य प्रस्थापित करावयाचे होते. या मोहिमेसाठी त्यांना टाटा कंपनीकडून वित्तबळ लाभत असल्याचे अनेकांना माहीत होते. काँग्रेसचे अध्यक्षपद उपभोगलेल्या ॲनी बेझंट आणि त्यांचे चाहतेही या विरोधी चळवळीस पाठिंबा देत. सत्ता व कायदेमंडळांचे आकर्षण असलेले बॅ. जिना, सप्रू, जमनादास द्वारकादास, मावजी गोविंदजी सेठ व टिळकांचे पूर्वीचे मित्र जोसेफ बॅप्टिस्टा यांचाही असहकार चळवळीस विरोध होता. विशेष म्हणजे गुजराती व मारवाडी लोक या लढ्यास सातत्याने सक्रिय मदत करीत, तर बहुसंख्य उद्योगपती विरोध करीत राहिले.

ब्रिटिश राजघराण्यातील कनॉटचे ड्यूक फेब्रुवारी १९२१ मध्ये मुंबईत आले असता संस्थानिक, उद्योगपती व प्रतिगामी धनिकांनी त्यांचे सत्कार समारंभ आयोजित करून आपल्या प्रच्छन्न राजनिष्ठेचे प्रदर्शन केले. मात्र सर्व स्वराज्यवादी घटकांनी, त्यांच्यावर बहिष्कार घातला व त्यांना काळे झेंडे दाखविले.

काँग्रेसने ३१ मार्च १९२१ रोजी जाहीर केलेल्या 'बेझवाडा कार्यक्रमानुसार' असहकार आंदोलनासाठी एक कोट रुपयांचा निधी उभारण्याचे उद्दिष्ट राष्ट्रासमोर ठेवले होते. एक कोट स्वयंसेवकांची सेना उभारावयाची होती. तसेच जून १९२१ पर्यंत वीस लाख घरांमध्ये चरखे कार्यान्वित करायचे उद्दिष्ट ठरविले होते. एक कोटी निधीपैकी साठ लाख रुपये मुंबई शहराने व उर्वरित चाळीस लाख रुपये उर्वरित हिंदुस्तानने संकलित करावयाचे, असा 'गांधीजींचा प्रेमळ आदेश' होता. अच्युतराव कोल्हटकर, रघुनाथ शिवराम निंबकर, डी. आर. मयेकर व जमनादास मेहता यांनी यासाठी खूप परिश्रम घेतले. जालियनवाला बाग हत्याकांड फंडासाठीही मुंबईने सर्वाधिक निधी दिला होता. तीच परंपरा १९२१ मध्येही चालू ठेवायची होती. मोठे कापूस व्यापारी व कापड गिरण्यांचे मालक उमर सोभानी यांनी शौकत अलींच्या हजेरीत गांधीजींना एक कोट रुपयांचा धनादेश दिला. ही बातमी सरकारला मिळताच सरकारने मुंबईत देशातून कापसाच्या कित्येक आगगाड्या आणून सोभानींचे तीन कोटी चौसष्ट लाख रुपयांचे नुकसान केले.

१९२६ मध्ये निधन होईपर्यंत उमरभाई गांधीजींचे निष्ठावंत अनुयायी राहिले. सरकारी पदांवर बहिष्कार घालण्याच्या तत्त्वानुसार त्यांनी मुंबईच्या शेरिफ पदाच्या निवडणुकीत स्वतःच्या वडिलांचा पराभव घडवून आणला होता. [२१]

जयनारायण इंदुमल दानी यांनी निधीसाठी पाच लाख, ए. बी. गोदरेज यांनी तीन लाख व आनंदीलाल पोदार यांनी दोन लाख रुपयांच्या देणग्या दिल्या होत्या. शहरातून भरघोस देणग्या मिळाल्या. अंतिम दिनांकास एक कोट रुपयांचे लक्ष्य गाठण्यात आले. गांधीजींनी ६ जुलै १९२१ च्या **यंग इंडिया** पत्रकातून या शहरास **"बॉम्बे द ब्युटिफूल"** ही उपाधी दिली. निधी जमविण्याची मोहीम जमनालाल बजाज, शंकरलाल बँकर, उमर सोभानी वगैरेंनी संघटित केली होती. या निधीतून देशव्यापी चळवळ, खादीचा प्रसार, अस्पृश्योद्धार, नशाबंदी व राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या शाळांवर खर्च करण्यात आला. वर उल्लेख केल्याप्रमाणे संदेशकार अ. ब. कोल्हटकरांनी दारूबंदी मोहिमेस बरेच योगदान दिले. शौकत अली, पी. जी. सहस्रबुद्धे वगैरेंनीही शहरातील दारूच्या दुकानांवर निदर्शने घडवून आणली. तेव्हापासून मद्यपानाचा निषेध हे चळवळीचे एक अतिरिक्त अंग बनले.

हिंदुस्तान सरकारचे चलन आणि विदेशी विनिमयाचा दर यांबाबतचे धोरण पारंपरिक वसाहतवादी स्वरूपाचे होते. खरे तर याबाबतचे सरकारी धोरण प्रथम ब्रिटनमधील भांडवलदार ठरवत. ब्रिटिश अर्थव्यवस्थेचे हितसंबंध सुरक्षित ठेवणे हे मूलभूत तत्त्व होते.

**विदेशी कपड्यांची होळी :**—जानेवारी १९२१ पासून असहकार चळवळीस स्वदेशी व बहिष्कार चळवळीचे स्वरूप आले. खादी व हातमागाचे कापड वापरण्यासाठी जोरदार प्रचार करण्यात आला. मुंबईत कार्यरत असलेल्या स्वराज्य सभेने त्यासाठी अविरत प्रयत्न केले. गिरणीमालकांनी आपल्या नफ्याचे नियमन करून किफायतशीर दराने कापड विकावे असेही स्वराज्य सभेने आवाहन केले. जुलै, ऑगस्ट व सप्टेंबरमध्ये मुंबईत मुक्काम करून गांधीजींनी स्वदेशी व बहिष्काराची मोहीम अधिक परिणामकारक केली. विदेशी कापड आयात न

करण्यासाठी त्यांनी व्यापाऱ्यांना आवाहन केले. जमनालालजी, शंकरलाल बँकर, नारनदास पुरषोत्तमदास यांनी याकामी खूप मदत केली. युवकांनी घरोघर जाऊन प्रचार केला. उमर सोभानी यांच्या एलफिंस्टन मिलमध्ये वीस फूट उंचीची विदेशी कपड्यांची चिता रचून तिला गांधीजींनी अग्नी दिला होता (३१ जुलै १९२१). ही पहिली होळी बारा हजार उपस्थितांच्या साक्षीने पेटविलेली होती. यानंतर ९ ऑक्टोबरच्या रात्री त्याच स्थळी लाला लजपतराय, मौलाना आझाद, सरोजिनी नायडू आणि डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या भाषणांनंतर गांधीजींनी दुसरी मोठी होळी पेटविली. या प्रसंगाला पार्श्वभूमी होती शौकत अलींच्या मुंबईतील अटकेची (१६ सप्टेंबर १९२१). मौलाना महंमद अली यांचेवर सेनादलात राजद्रोह निर्माण केल्याचा आरोप ठेवून, त्यांनाही वाल्टेअर येथे अटक करण्यात आली होती. याचे पडसाद मुंबईप्रमाणे देशातही दिसून आले. कामगारांनी संप केले.

विदेशी मालावरील बहिष्काराचा भाग म्हणून एलफिंस्टन मिलच्या आवारातच १७ नोव्हेंबर १९२१ रोजी प्रिंस ऑफ वेल्स यांना दिसेल, अशा बेताने तिसरी कापडाची होळी पेटविली होती. युवराज महाशयांचे अपोलो बंदरात आगमन झाले तेव्हा त्यांनी बोटीतून ही तिसरी होळी पाहिली होती. इतकी ती उंच होती. या प्रसंगी पंचवीस हजारांचा समुदाय असल्याचे आणि भाषण करताना गांधीजींनी अश्रू ढाळल्याने जमाव गहिवरल्याचे गुप्तचराने नोंदविलेले आहे. विदेशी कपड्यांचे हे दहन प्रतीकात्मक होते. हा स्वराज्यासाठी यज्ञ होता!

**विद्यार्थ्यांचा प्रतिसाद** :—असहकार आंदोलनास विद्यार्थ्यांचा अपूर्व प्रतिसाद होता! मालवण, वेंगुर्ला, रत्नागिरी, सातारा, अहमदनगर, येवला, अमळनेर, चिंचवड वगैरे ठिकाणीही राष्ट्रीय शाळा काढलेल्या होत्या. अशा शाळांमध्ये विद्यादान करणाऱ्या स. का. पाटील, अप्पासाहेब पटवर्धन, नाथ घाणेकर, दादा चौधरी, पां. श्री. आपटे गुरुजी, बाळूकाका कानिटकर वगैरेंनी पुढील काळात स्वातंत्र्यलढ्यात हिरीरीने भाग घेतला. विदर्भातही यवतमाळ, अकोला, खामगाव, वर्धा, नागपूरला निघालेल्या राष्ट्रीय शाळांनी देशकार्याचे धडे देऊन लढ्यासाठी नवे नेतृत्व घडविले. आनंदीलाल पोदारांच्या अंधेरीतील वाडीत बॅ. केशवराव देशपांडे यांनी काढलेल्या साधकाश्रमातून प्रतिज्ञाबद्ध स्वातंत्र्यसैनिकांचा प्रवर्ग

निर्माण झाला. डॉ. त्र्यं. रा. नरवणे, श्रीपाद शंकर नवरे, काकासाहेब तांबे, जगन्नाथ मोरेश्वर अधिकारी, श्री. ल. काशीकर, मामा क्षीरसागर यांनी चळवळीत सतत भाग घेतला. मराठा हायस्कूलचे आर. एस. पडबिद्री यांनी माधवबाग (मुंबई) येथे चालविलेल्या राष्ट्रीय शाळेत श्री. अ. डांगे, शांताराम सावळाराम मिरजकर व शं. वा. देशपांडे हे कम्युनिस्ट युवक काही दिवस शिक्षक होते. मुंबईतील मारवाडी विद्यालयात प्रा. श्री. व्यं. पुणतांबेकर यांनी चालविलेल्या राष्ट्रीय महाविद्यालयात जरी ६० विद्यार्थीच असले, तरी शहरातील सात-आठशे विद्यार्थ्यांनी असहकार आंदोलनात सक्रिय सहभाग घेण्यासाठी आपली नावे आधीच नोंदविली होती. यांचा अर्थ, राष्ट्रीय विद्यालयांमध्ये शिकणाऱ्या मुलांच्या कित्येक पटींनी युवकांनी आंदोलनात उडी घेतली होती. या चळवळीवर टीका करणाऱ्या श्रीनिवास शास्त्री यांच्यासारख्या मवाळ देशभक्तांच्या सभा बंद करण्यात मुंबईतील युवक आघाडीवर होते. दा. वि. गोखले, गंगाधरराव देशपांडे, शंकरलाल बँकर, सरोजिनी नायडू यांनी आवाहन केल्यावर राष्ट्रीय शाळांमधील संख्या वाढू लागली. एकूणच असहकार आंदोलनास लाभलेला युवकांचा व महिलांचा प्रतिसाद अभूतपूर्व होता. त्यांतून पुढे हजारो स्वातंत्र्यसेनानी तयार झाले.

उपरोक्त गंधर्व नाटक मंडळी आणि ललितकलादर्श नाटक कंपन्यांनी केलेल्या **संयुक्त मानापमान** नाटकाच्या प्रयोगातून लाभलेले १६,६०० रुपये म्हणजे मराठी नाट्यरसिकांचे चळवळीस योगदान होते. अवंतिका गोखले यांनी टिळक स्वराज फंडासाठी सामान्य मुंबईकरांकडून १०,००० रुपये जमविले होते. २५,००० रुपयांची एकरकमी थैली देणारे मुकुंदराव जयकर हे एकमेव मराठी भाषिक होते. मुंबईव्यतिरिक्तच्या महाराष्ट्रातून जेमतेम ४,५०,००० रुपये या फंडासाठी मिळाले होते. गुजरात प्रांतिक समितीने ८,००,००० रुपये मदत जमवून चळवळीला बळ दिले होते. सोलापूर या कारखानदारी शहरातून स्वराज फंडाला मिळालेली २०,००० ची देणगी गांधीजींना निराशाजनक वाटली होती. एकूणच महाराष्ट्र प्रांतिक व वऱ्हाड प्रांतिक समित्यांना स्वराज फंडासाठी फारसा चांगला प्रतिसाद मिळाला नाही. मुंबईने मात्र नेत्रदीपक प्रतिसाद दिला होता. जमनालाल बजाज यांची देणगी खूपच खुलून दिसली होती.

## चळवळीपुढील समस्या

दरम्यान ब्रिटिश युवराजांचे आगमन झाल्यावर राजनिष्ठ मंडळी आणि पारशी धनिकांनी त्यांचे मुंबईत भव्य स्वागत व दिमाखदार सत्कार समारंभ केले. विदेशी पेहेरावातील पारशी लोक राष्ट्रवादी युवकांच्या डोळ्यांत सलत होते. कित्येक नागरिकांनी त्यांना लोकभावनांचा आदर करण्याच्या विनवण्या केल्या. पण व्यर्थ ! मुंबईतील दारूची बहुसंख्य दुकाने पारशांच्या मालकीची होती. काळाचा ओघ ओळखून ती दुकाने बंद करावी अशा त्यांना विनंत्या करण्यात आल्या. पण त्याही व्यर्थ ठरल्या. त्यामुळे मुंबईत हिंदू व मुसलमान विरुद्ध पारशी असा तणाव वाढलेलाच होता. अशा तापलेल्या वातावरणातही पारशांनी युवराजांचे सत्कार चालविले. याचा परिणाम म्हणून हिंदुमुसलमान लोक विरुद्ध पारशांनी आणलेले गुंड यांच्यात बाचाबाची झाली आणि त्याचे पर्यवसान भयंकर मारामारी व दंग्यात झाले. गिरगावात बॅ. जयकरांसारख्या मान्यवर व शांत पुढाऱ्याला पारशी गुंडांनी नाहक झोडपल्यामुळे ते बेशुद्ध पडले होते.

एका पोलीस अधिकाऱ्याने मालेगावात प्रक्षोभक वर्तन केल्याने, हातमाग व्यवसाय असलेल्या मालेगावातही दंगा झाला होता. नागपुरातही दारूची दुकाने जाळल्यावर पोलिसांनी गोळीबार करून नऊ इसम ठार केले व चौदा निदर्शकांना जखमी केले. अलीबंधूंची भाषणे प्रक्षोभक असून ते पोलीस व सैनिकांना चिथावणी देतात आणि ते राजद्रोहाचा प्रसार करतात, असा सरकारचा असत्य आरोप होता.

केरळातील धर्माभिमानी मोपला मुसलमानांनी असहकार चळवळीत सक्रिय भाग घेतला होता. इंग्रजांची त्यांच्याकडे नेहमीच वक्रदृष्टी असे. तिरूरंगडीच्या काही खिलाफतवादी मुसलमानांना पोलिसांनी अटक केल्यामुळे मोपल्यांनी हिंसाचार केला आणि सरकारी मालमत्ता नष्ट करण्यास सुरुवात केली. त्यांनी सरकारविरुद्ध बंड पुकारले. या संघर्षात हिंदू जमीनदार व सावकार हे इंग्रजांना साहाय्य करीत असलेले पाहून मोपले त्यांच्यावर हल्ले करू लागले. बलात्कार व धर्मांतरासाठी बलप्रयोग असेही प्रकार झाले. मलबार प्रदेशात भयंकर दंगे झाले. ब्रिटिशांनी मलबारात लष्करी कायदा अमलात आणला. त्यामुळे मोपले आणि स्थानिक

हिंदू व सरकार यांच्यातील या संघर्षास ओंगळ स्वरूप आले. मलबारातील हिंदू-मुस्लीम दंगल शमविण्यासाठी जात असलेल्या महंमद अलींना वाटेत वाल्टेर येथे अटक करण्यात आली. आणि सरकारने महात्मा गांधींनादेखील मलबारात प्रवेश करण्यास बंदी केली. याचेही खूप गंभीर परिणाम झाल्यावाचून राहिले नाहीत.

मुंबई सरकारने अलीबंधूंच्या अटकेची कारणे कथन करणारे पत्रक काढले. कराचीतील खिलाफत परिषदेत त्यांनी सैनिकांना व पोलिसांना सरकारी नोकरीचे राजीनामे देण्याचे आवाहन करून बंडाला चिथावणी दिली, असा मुंबई सरकारचा आरोप होता. वस्तुतः हा आरोप अतिरंजित असला, तरी अंशतः खरा होता. अलीबंधू यांच्याप्रमाणेच गांधीजी, लाला लजपतराय, मोतीलाल नेहरू, न. चिं. केळकर, जयकर, गंगाधरराव देशपांडे, दा. वि. गोखले, डॉ. मुंजे, अणे वगैरे ५० नेत्यांनीही एका घोषणा पत्रकात जाहीर केले की, आपणही लष्कर व सरकारी नोकरीतील भारतीयांना राजीनामे देण्यास आवाहन करू. या जाहीरनाम्यास मुंबईत भरलेल्या कॉंग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत पाठिंबा मिळाला (५ ऑक्टोबर १९२१). दिनांक १ नोव्हेंबरला अलीबंधूंच्या खटल्याचा निकाल लागून त्यांना निष्कारण दोन वर्षांची शिक्षा फर्मावण्यात आली. त्यामुळे देशभर असंतोष पसरला. या शिक्षेचा निषेध म्हणून दिल्लीत भरलेल्या अखिल भारतीय कॉंग्रेस समितीने (४ व ५ नोव्हेंबर) प्रत्येक प्रांताला परिस्थितीनुसार आपल्या जबाबदारीवर सविनय कायदेभंगाची मोहीम सुरू करण्याचा अधिकार दिला.

मुंबई शहरात असहकार आंदोलनास चांगला प्रतिसाद होता. मात्र महाराष्ट्र प्रांतिक व विदर्भातील काही घटकांनी चळवळीस अर्धवट पाठिंबा देऊन ती मनापासून चालवली नव्हती. महाराष्ट्र प्रांतिक परिषदेच्या वसईतील बैठकीत खेद व्यक्त करताना गांधीजी म्हणाले, "असहकार आंदोलनाबाबत महाराष्ट्राने पूर्णतया श्रद्धा बाळगली तर माझे काम होईल, हे मी जाणतो. ज्ञान संपादन करण्याच्या बाबतीत तसेच स्वार्थत्याग करण्याच्या बाबतीत महाराष्ट्रातील लोकांत जितकी धमक असल्याचे आढळले, तसे दृश्य मला अन्यत्र कोठेही दिसले नाही.......

महाराष्ट्राजवळ पैसा नाही हे मला माहीत आहे. पण महाराष्ट्राजवळ मोठी शक्ती आहे. तुमचा असहकारावर विश्वास नसेल तर गांधींचे म्हणणे वेडेपणाचे आहे, असे तुम्ही जाहीर करा. मात्र तुम्हाला जे काही स्वीकारावेसे वाटते ते प्रामाणिकपणे व मनापासून स्वीकारा.'' [२२]

शि. म. परांजपेंना विद्यार्थी व वकील यांच्याबाबतची कलमे वगळावी असे वाटे, तर केळकर व भोपटकरांना (अण्णासाहेब) असहकाराच्या कार्यक्रमात फेरफार करावेत असे वाटे. मात्र परांजपेंनी आपली सूचना लगेच मागे घेतली. त्यानुसार परांजपे, खाडिलकर आणि शंकरराव देव यांच्या गटाला गांधीजींच्या मूळ कार्यक्रमात कोणताही बदल करू नये, असे वाटत होते. हा वाद तेव्हा बराच रंगला होता. या वादामुळे केळकरांच्या गटाला **फेरवादी** ही संज्ञा देण्यात आली आणि परांजपे व देवांच्या गटाला **नाफेरवादी** हे नाव मिळाले. या दोन गटांच्या भांडणामुळे महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसमध्ये फूट पडणे अटळ होऊन बसले. त्याचे गंभीर दुष्परिणाम झालेच.

गांधीजींनी लोकप्रिय केलेल्या 'एका वर्षात स्वराज्य' या घोषणेला एक वर्ष लोटत असूनही स्वराज्य दृष्टिपथात आलेले नव्हते. म्हणून चळवळीचे समालोचन करण्यास्तव बॅ. जयकरांच्या अध्यक्षतेखाली शहापूरला ठाणे जिल्हा परिषद घेण्यात (२०-२२ नोव्हेंबर १९२१) आली. न्यायालये व शाळाकॉलेजांवर बहिष्कार हे दोन्ही कार्यक्रम असफल झाले असून असहकार कार्यक्रमात **फेरफार** करावे, असे जयकारांनी परिषदेत प्रतिपादन केले. मात्र कायदेमंडळांच्या निवडणुका झाल्यास त्या लढण्यासाठी काँग्रेसजनांना परवानगी द्यावी, पण प्रांतांना स्वायत्तता लाभेपावेतो मंत्रिपदे स्वीकारू नये, असे जयकरांचे मत होते. शिवाय अली बंधूंनी न्यायालयात केलेला बचावाचा प्रयत्न असहकार तत्त्वाशी विसंगत होता, अशी जयकरांनी टीका केली. यावरून महाराष्ट्रात कोणत्या दिशेने वारे वाहत होते याची कल्पना येते.

यानंतर लगेच वऱ्हाडमधील अकोल्यात न. चिं. केळकरांच्या अध्यक्षतेखाली 'अखिल महाराष्ट्र परिषद' भरली (१-२ डिसेंबर १९२१). असहकार चळवळीच्या

कार्यक्रमात फेरफार करावे या आपल्या भूमिकेला बहुसंख्य मराठी जनतेचा पाठिंबा आहे, हे काँग्रेसला दाखविणे हा केळकरांचा प्रयत्न होता. या परिषदेला फक्त आगामी काँग्रेस अधिवेशनासाठी निवडलेले महाराष्ट्रातील प्रतिनिधी आणि अखिल भारतीय काँग्रेस समितीचे व प्रांतिक समित्यांचे सभासद इतक्यांनाच निमंत्रण दिले होते. त्यांच्या या चलाखीमुळे अकोला परिषदेत केळकर, जयकर, भोपटकर, दा. वि. गोखले, अणे, मुंजे, एम. आर. चोळकर या फेरवाद्यांचेच प्रभुत्व राहिले. त्यानुसार फेरवादी गटास पाहिजे तसाच प्रस्ताव मंजूर झाला. मात्र याबाबत अणेंनी केलेली मखलाशी कोणालाच पसंत पडली नाही. या परिषदेनंतर दुसऱ्याच दिवशी मराठी विदर्भातील मंडळींची राजकीय परिषद जयकरांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. त्यातही फेरवाद्यांना हवा तसाच ठराव झाला. या सर्व परिषदांचा उद्देश आगामी अहमदाबाद काँग्रेसमध्ये गांधीजींना कडवा प्रतिकार करणे व आपला फेरवादाचा पर्याय पुढे करणे हाच होता.

या फेरवादी धोरणामुळे महाराष्ट्रातील असहकार चळवळ, मुंबईचा अपवाद सोडता, कुंठित झाली. याउलट दासबाबूंच्या प्रभावाखाली बंगालमधील चळवळ चांगलीच फोफावली होती. युवराज एडवर्डच्या तेथील सत्कार समारंभांवर बहिष्कार घालून कडकडीत हरताळ झाला. त्यामुळे बंगालचा गव्हर्नर रोनाल्डशे फारच अस्वस्थ झाला होता. कायदेभंग केल्याच्या आरोपावरून चित्तरंजन दास यांचे सुपुत्र, बहीण उर्मिलादेवी व पत्नी वासंतीदेवी आणि अनेक नेत्यांना सरकारने तुरुंगात टाकले. दासबाबूंशी गव्हर्नरने केलेल्या वाटाघाटी असफल झाल्या. आणि म्हणून १० डिसेंबरला दासबाबूंना म्हणजे काँग्रेस अध्यक्षांना अटकेत टाकण्यात आले. ते बंगालचे सर्वोच्च पुढारी होते. बंगालमध्ये याच्या तीव्र प्रतिक्रिया उमटणे स्वाभाविक होते.

## अहमदाबाद काँग्रेस अधिवेशन

या तणावांच्या पार्श्वभूमीवर २७ व २८ डिसेंबर १९२१ रोजी अहमदाबादमध्ये भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाचे नियोजित अध्यक्ष चित्तरंजन दास यांच्याठिकाणी हकीम अजमलखान यांची निवड झाली. काँग्रेस कार्यकारिणीच्या सदस्यांच्या

नेमणुकीचे त्यांना अधिकार दिलेले असूनही त्यांनी गंगाधरराव देशपांडे व फेरवादी केळकरांनाही नियुक्त केले. मलबारमध्ये मोपल्यांनी केलेले अत्याचार व दंगली म्हणजे असहकार आणि खिलाफत चळवळीचा भाग नाही, असा महत्त्वाचा ठराव जाहीर करण्यात आला. गांधीजींना पंजाबप्रमाणेच (१९१९) मलबारात जाण्यास मज्जाव केल्यामुळे तेथील परिस्थिती चिघळली, असेही ठरावात नमूद होते. अहमदाबाद अधिवेशनात हसरत मोहानी या रॅडिकल मतवादी सभासदाने काँग्रेस पक्षाचे ब्रीदवाक्य बदलण्याचा ठराव मांडून चांगलीच सनसनाटी निर्माण केली. काँग्रेसचे उद्दिष्ट स्वराज्य म्हणजे 'संपूर्ण स्वातंत्र्य' मिळविणे हे असून भारताने ब्रिटिश साम्राज्यातून बाहेर पडावे, असा मोहानींचा प्रस्ताव होता.[२३] अर्थात अशी जहाल विचारसरणी असलेले निंबकर, डांगे, भगतसिंग वगैरे काही युवक तेव्हाही होते. मात्र इतका रॅडिकल विचार तेव्हा मान्य होणे अशक्यच होते.

प्रत्येक स्वयंसेवकाने अहिंसा, स्वदेशी, तुरुंगवास भोगण्याची तयारी, खादीचा पेहेराव आणि अस्पृश्यतानिवारण कार्यात सहभागी होण्याची तयारी दर्शविणाऱ्या प्रतिज्ञापत्रकावर सही करणे अनिवार्य करण्यात आले.

या अधिवेशनाचे महत्त्व असे होते की, आंदोलन चालविण्यासाठी पक्षाने महात्मा गांधींना सर्वाधिकारी म्हणजे 'डिक्टेटर' नेमले. असहकार कार्यक्रमावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले. त्यामुळे केळकरांच्या **फेरवादी** गटाची निराशा झाली व त्यांना निवडणुका लढविण्याचे मनसुबे पुढे ढकलावे लागले. दरम्यान गांधीजींनी बार्डोलीत (सुरत जिल्हा) सामुदायिक सविनय कायदेभंगाचा लढा उभारण्याचा व्हाइसरॉय रीडिंग यांना अंतिम इशारा दिला. तथापि गांधीजींनी केलेल्या सर्व मागण्या व्हाइसरॉयने फेटाळल्या आहेत, असे ६ फेब्रुवारी १९२२ रोजी सरकारने जाहीर केले. यामुळे बार्डोलीत सामुदायिक सविनय कायदेभंगाचे अभियान सुरू करणे क्रमप्राप्त झाले.

जवाहरलाल नेहरू व काँग्रेसच्या दृष्टीने १९२१ हे साल अपूर्व होते. त्या साली राष्ट्राभिमान, राजकारण, कडवेपणा व अध्यात्मभाव या सर्वांचे अभूतपूर्व मिश्रण

पाहावयास मिळाले, असे नेहरूंनी आत्मकथेत लिहिले. त्यामागे शेतकऱ्यांचा असंतोष व मोठ्या शहरांमधील कामगारांच्या चळवळीचीही पार्श्वभूमी होती. राष्ट्रवाद व अस्पष्ट पण देशभर पसरलेल्या ध्येयवादाच्या धगीने असंतोषाचा संयोग होऊन युवाशक्ती निर्माण झाली होती. तथापि या राष्ट्रवादातही अनेक स्तर होते. तेव्हा राष्ट्रवादाचे हिंदी राष्ट्राभिमान, हिंदू राष्ट्राभिमान आणि पॅन इस्लामिक म्हणजे सरहद्दीच्या पलीकडे पाहाणाऱ्या मुसलमानांचा राष्ट्राभिमान असे तीन भिन्न थर होते. गांधीजींच्या विलक्षण प्रभावामुळे काही वेळपर्यंत हिंदु-मुसलमान एकतेचा नारा घुमत राहिला व एकजुटीने लढा चालू राहिला. पण वसाहतवादी शासनयंत्रणा हा ऐक्यभाव फार काळ टिकू देणारच नव्हती. मात्र गांधीजींचा सर्व वर्गांवर आणि विविध गटांवर विलक्षण प्रभाव पडलेला होता. जनतेला आपली शक्ती व स्वातंत्र्याची जाणीव झाली आणि चळवळ लवकरच यशस्वी होणार असा आशावाद पसरवला होता. तथापि चळवळीची शिस्तबद्ध बांधणी, विचारप्रणाली व साध्य ध्येयाबाबत एकवाक्यता नव्हती असे नेहरू म्हणतात. युवकांना स्वराज्य म्हणजे संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य आणि प्रजासत्ताक पद्धती असा अर्थ अभिप्रेत होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शेतकरी-कामकरी वर्गाचे शोषण बंद होईल, असे नेहरूंसारख्यांना तेव्हा वाटे. तथापि बहुतेक पुढाऱ्यांना पूर्ण स्वातंत्र्याहून कमी प्रतीची राज्यव्यवस्था अभिप्रेत होती.

प्रिन्स ऑफ वेल्सच्या भेटीवरील बहिष्कार आणि नेहरू पितापुत्रांच्या व शेकडो राष्ट्रवाद्यांच्या अटकेमुळे स्वराज्याचा लढा जितका यशस्वी झाला, तितका दुसरे काहीही केले असते तरी तो यशस्वी झालाच नसता, असे दिसते. देशात जेथे जेथे युवराज गेले, तेथे हरताळांनी व ओस पडलेल्या रस्त्यांनी त्यांचे स्वागत केले! मुंबई, अलाहाबाद, कोलकाता, दिल्ली अशा सर्वच ठिकाणी युवराजांना बहिष्काराची तीव्रता जाणवली! मनोधैर्य खचलेल्या पोलिसांनी कित्येक हजार निदर्शकांना अटक केली, पण युवकांचे नीतिधैर्य बरेच महिने टिकून राहिले, असे नेहरूंनी लिहून ठेवले आहे.[२४]

## आंदोलनाच्या कार्यक्रमात बदल

प्रथमच भारतभर पसरलेल्या या चळवळीतील अनुभवानुसार गांधीजी व काँग्रेसने रणनीतीत काही बदल केले. आंदोलनाचा भाग म्हणून देशातील ९४ पोलीस व ८७ मानद दंडाधिकाऱ्यांनी पदत्याग केलेला होता. १८० वकिलांनी वकिली काही काळ सोडली होती. तथापि मोतीलाल नेहरू, चित्तरंजन दास यांच्यासारखे महत्तम वकील विरळा की ज्यांनी आंदोलनासाठी वकिलीचा कायमचा त्याग केला. महाराष्ट्रातील जयकर, वासुदेव वि. दास्ताने (भुसावळचे) आणि माधवराव आर. गोसावी (अलिबाग) या फक्त तीन वकिलांनी वकिलीचा कायमचा त्याग केला. पण राष्ट्रीय शाळा-कॉलेजांच्या प्रमाणपत्रांनुसार नोकरी मिळणार नाही, या भीतीपोटी बरेच विद्यार्थी पुन्हा सरकारमान्य संस्थांमध्ये परत गेले. राष्ट्रीय संस्था बंद पडू लागल्या. या वस्तुस्थितीचा आढावा घेऊन गांधीजींनी न्यायालयांवरील व शाळांवरील बहिष्काराचे धोरण शिथिल केले. आणि स्वदेशीचा पुरस्कार, विदेशी मालावर बहिष्कार, खादीला उत्तेजन, काँग्रेस स्वयंसेवकांची प्रचंड भरती व नशाबंदी हे मुद्दे अमलात आणले. या रचनात्मक कार्यक्रमावर व त्याच्या अंमलबजावणीवर भर देण्यात आला.

१९०५-१९०८ च्या स्वदेशी चळवळीपेक्षा १९२१-२२ ची चळवळ खूप यशस्वी झाली. भारतात विदेशी कापडाची आयात १९२० मध्ये १०२ कोटी रुपये होती, ती पुढील वर्षी ५७ कोटीपर्यंत घसरली. विदेशी कापड व मद्यविक्री करणाऱ्या दुकानांपुढे मुख्यतः विद्यार्थी व महिला कडक निदर्शने करीत. त्यांनी काही दुकाने बंद करायला भाग पाडले. विशेषतः मुंबईतील कापड आयातदारांना आयात न करण्यास फर्मावले. दुकानदारांनी ही शिस्त अनेक महिने पाळली. मुंबई, कोलकाता व मद्रासच्या व्यापाऱ्यांनी पाळलेल्या बंधनांमुळे सरकारी महसूल तर कमी झालाच, पण त्याची मोठी झळ इंग्लंडमधील कापड गिरण्यांना सोसावी लागली.

काँग्रेसच्या आर्थिक बहिष्कारामुळे ब्रिटिशांना भारतीय प्रतिनिधी असलेले फिस्कल कमिशन नेमावे लागले (१९२१). त्यानुसार देशी उद्योगांना थोडे प्रशुल्क

संरक्षणही द्यावे लागले. गांधीजींनी राजकीयपेक्षा आर्थिक मागण्या व आर्थिक समस्या यांवर जोर दिला, आणि त्यानुसार रणनीती अवलंबिली. काँग्रेसने काही प्रदेशांमध्ये शेतसारा-बंदी करून शेतकऱ्यांचा चळवळीतील सहभाग वाढविला व सरकारला हैराण केले. काही ठिकाणी विशेषतः उत्तर प्रदेश व बिहारमध्ये किसानांनी सरकारविरुद्ध दंगे केले. कारखान्यांमधील कामगारांनी बरेच संप केले. अलीबंधूंना अटक केल्यामुळे खवळलेल्या मुंबईतील गिरणी कामगारांनी संप केला. पोलिसांशी झालेल्या झटापटीत शहरात वीस जण मारले गेले (१७ नोव्हेंबर १९२१). असहकार आंदोलन व अशा संघर्षातून श्री. अ. डांगे, निंबकर वगैरेंचा जहाल गट निर्माण झाला. मालेगावमधील खिलाफतवाद्यांनी तीन आक्रमक पोलिसांना २५ एप्रिल १९२१ रोजी जिवंत जाळून टाकले होते. अशा अनेक कारणांमुळे महात्मा गांधींना चळवळीतील कार्यक्रम बदलावा लागला.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी गोखले, टिळक व लजपतराय यांनी 'नेशन इन द मेकिंग' ही प्रक्रिया सुरू केली होती. तिला असहकार आंदोलनानेच खरी गती दिली. तसेच दादाभाई नौरोजी व महादेव गोविंद रानडे यांनी भारतीय धननिःसारणाचा जो प्रमेय मांडला होता, त्याचे लढ्यासाठी उपयोजन केले महात्मा गांधी व नेहरूंनी!

## आंदोलन संस्थगित

देशातील काही भागांमधील असहकार लढा म्हणजे ब्रिटिशांना भयंकर वाईट अनुभव होता. एक दुःस्वप्न होते! स्थानिक गाऱ्हाणी, वाईट प्रशासन, आर्थिक समस्या आणि सरकारी शोषण व सावकार-जमीनदारांनी चालविलेले अविरत शोषण ही वस्तुस्थिती होतीच. अशा स्थितीत संपूर्ण देशभर लढा पसरल्यामुळे मध्यवर्ती सरकारचे नियमन विघटित झाले, काही ठिकाणी शासन कोसळलेही! सरकारला हा अनुभव नवा होता. मात्र गांधीवादी सत्याग्रहाच्या तंत्रानुसार पाहाता हिंसाचार हा चळवळीचा प्रबळ शत्रू होता. जातीय व धर्मीय सलोखा आणि सहिष्णुता राखणे हे नेत्यांपुढील प्रचंड आव्हान होते. या बहुभाषिक, बहुधार्मिक व बहुलवादी खंडप्राय देशात ऐक्यभाव टिकवून ठेवणे आणि साम्राज्यशाहीशी

लढा देणे विलक्षण अवघड होते. हे राष्ट्रव्यापी असहकार आंदोलन खऱ्या अर्थाने अगदी पहिलेच जनआंदोलन होते. सनदी नोकरशाहीलाही हा अनुभव तसा नवाच होता. देशातील विविध स्तरांमधील लहानमोठ्या पुढाऱ्यांना देशव्यापी एकात्मिक चळवळीचा हा पहिलाच अनुभव होता. त्यामुळे चळवळीचे विनियमन करण्यात काँग्रेसच्या काही उणिवा राहिल्या वा चुकाही झाल्या.

ऑगस्ट-डिसेंबर १९२१ या काळात ठिकठिकाणी दंगे उद्‌भवले. ओरिसातील काही शाळांमधील हिंसाचार व मलबारमधील भयानक हिंसाचार असा विविध श्रेणींचा हिंसाचार व उद्रेक चळवळीला मारक ठरला. ब्रिटनचे युवराज आठवे एडवर्ड १७ नोव्हेंबर १९२१ रोजी मुंबईत आले. आणि त्यांचा निषेध करण्याच्या निमित्ताने सरकारचे आधारस्तंभ असलेले घटक (विशेषतः पारसी) आणि असहकारवादी जमाव यांच्यात दंगल पेटली होती. काही संस्थानिकांचाही सरकारी अधिकाऱ्यांना पाठिंबा होता. मुंबईत तीन दिवस ही दंगल चालली. सरकारी अहवालानुसार शहरात १३० ठिकाणी दंगल झाली व तिच्यात ५८ जण ठार तर ३२१ माणसे जखमी झाली. शिवाय शेकडोंना शिक्षा झाल्या. उपोषण करून गांधीजींनी मुंबईतील उद्रेक थांबविला होता. चित्तरंजन दास आणि त्यांच्या पत्नी व कन्या यांना अकारण अटक केल्यामुळे बंगालमध्येही दंगे झाले (डिसेंबर १९२१). सरकारी दडपशाहीचा निषेध करण्यासाठी एकट्या कलकत्ता शहरातील ३,००० देशभक्तांनी स्वखुषीने कारावास पत्करला होता.

१९१६ पासून मलबारमधील मोपला मुसलमान आपणास शेती कसणारे कूळ म्हणून उचित संरक्षण मिळावे यासाठी संघर्ष करीत होते. सरकारच्या संरक्षणाखाली मोठे जमीनदार व सावकार शोषण करत होते. जमीनदारांचे शोषक धोरण थांबविण्याचा वा शोषितांना अनुतोष देण्याचा सरकारने कधीच प्रयत्न केला नव्हता. त्यामुळे असंतोष वाढतच राहिला. खिलाफत चळवळीच्या निमित्ताने असंतोषास वाचा फोडण्याची त्यांना संधी मिळाली. प्रस्थापित स्थानिक काँग्रेस व खिलाफत नेत्यांना अटक झाल्याने (८ फेब्रुवारी १९२१) जहाल मोपला कार्यकर्त्यांनी संघटना उभारली व शस्त्रे जमा केली. पोलीसांनी शस्त्रसाठा असलेल्या मशिदींवर हल्ला केल्यामुळे २० ऑगस्ट १९२१ रोजी मोठा विद्रोह

झाला. मोपल्यांनी चिडून अनेक पोलीस ठाणी, सरकारी कार्यालये, रस्ते व दळवळणाची साधने यांवर हल्ले केले. शोषणकर्त्या जमीनदारांच्या घरांवर हल्ले केले. मोपल्यांचा प्रभाव असलेल्या काही तालुक्यांवरील ब्रिटिशांचे नियंत्रण व प्रशासन कोसळले. दक्षिण मलबारमध्ये काही महिने त्यांनी 'खिलाफत रिपब्लिक' नावाने समांतर शासन उभारले होते. युद्धसदृश स्थिती निर्माण झाल्याने विभागीय सेनाप्रमुखाने वरिष्ठ सरकारकडून तोफखाना मागविला. दहा हजार बंडखोर मोपले सेनादलाशी गनिमी पद्धतीचे युद्ध करीत राहिले. मात्र बलाढ्य ब्रिटिश सेनेपुढे त्यांचा फार दिवस टिकाव लागणे शक्यच नव्हते.

आर्यसमाजाने यास हिंदू-मुसलमान लढा असे स्वरूप दिले. आणि या संघर्षात ६०० हिंदू मारले गेले आणि २५०० हिंदूंना मोपल्यांनी जबरीने धर्मांतर करायला लावले, असा प्रचार केला. इतके मात्र खरे की, त्या भागातील बहुसंख्य जमीनदार व सावकार हिंदू होते आणि ते बहुतेक ब्रिटिशधार्जिणे होते. अधिकाऱ्यांच्या संरक्षणाखाली ते किसान कुळांचे शोषण करीत. के. एन. पणिक्कर या इतिहास संशोधकाच्या मते मोपला शेतकऱ्यांची पथके गावोगाव जाऊन सावकार-जमीनदारांकडील खतावण्या व जमीन धारणाधिकाराचे अभिलेख व कागदपत्रे ताब्यात घेऊन नष्ट करीत. कागदपत्रे न देणाऱ्यांना ते मारझोड करीत. जेथे त्यांना विरोध झाला तेथे त्यांनी हिंसाचार केला. मात्र मोपला पथकांमध्ये एक नंबुद्री व चार नायर लोक होते. या हिंसाचारातील सत्य हेच आहे की, साम्राज्यशाहीविरुद्धच्या त्या व्यापक उद्रेकात सेनादल व मोपल्यांनी केलेल्या हिंसाचारात तब्बल २,३३७ बंडखोर मारले गेले, १,६५२ जखमी झाले आणि ४५,४०४ जणांना कारावासात टाकण्यात आले. ब्रिटिशांचे क्रौर्य पाहा :— रेल्वेच्या एका मालडब्यात ६६ मोपल्यांचे छिन्नविच्छिन्न मृतदेह नंतर सापडले!

या शोकांतिकेची दुसरी बाजू अशी की, मोपल्यांचे बंड आवरण्यासाठी गांधीजी व महंमद अली निघाले. तथापि वाटेत वाल्टेर स्टेशनवर १४ सप्टेंबरला सरकारने महंमद अली व शौकत अली यांना अटक केली आणि गांधीजींनाही मलबारात जाण्यास बंदी घातली. सरकारच्या या चुकीच्या कृतीमुळे आक्रमक मोपल्यांना आवरू शकणारा तिथे एकही पुढारी नव्हता. त्यामुळे हिंसाचार वाढला.

हिंसाचारामुळे गांधीजी कमालीचे व्यथित झाले होते. शांतता व अहिंसेसाठी ते निर्वाणीचे प्रयत्न करीत होते. अनेक ठिकाणी चळवळीला अनुचित स्वरूप आले होते. करिश्मा असलेले पुढारी कारावासात होते. हिंदुमुसलमान सलोखा भंग पावत होता. अशा परिस्थितीत **चौरी चौरा** प्रकरण उद्‌भवले.

गोरखपूरजवळच्या चौरी चौरा गावात दारूविक्रीचा अतिरेक व अन्नधान्याच्या अफाट वाढलेल्या किमती याविरुद्ध काँग्रेस स्वयंसेवक व खेडूत निदर्शने करीत होते. सर्व निदर्शक बाजारात शांततापूर्ण घोषणा देत असताना स्वयंसेवकांचा पुढारी भगवान अहीर (सेवानिवृत्त सैनिक) यास पोलिसांनी कारण नसताना शिवीगाळ व मारझोड केली. त्याचा निषेध करण्यासाठी गावकरी लोक पोलीस ठाण्यावर आले. गावकऱ्यांमध्ये बहुतेक शोषित वर्गातील शेतकरी-कामकरी होते. पोलीस ठाण्यावर आल्यावर त्यांची समजूत घालण्यासाठी कोणीही पोलीस अधिकारी समोर आला नाही. अशा वातावरणात प्रक्षोभित व अपमानित झालेल्या जमावाने पोलीस स्टेशनला आग लावली. आत २२ पोलीस होते. ते जळून मेले. तत्पूर्वी जमावाला पोलिसांनी प्रक्षोभित केलेले होते हे सत्य होते. असहकारवाद्यांनी मिरवणूक काढून निदर्शने केली असताना पोलिसांनी गोळीबार केला होता. आपल्याजवळची काडतुसे संपल्याने पोलीस ठाण्यावर परतले होते. यानंतर मोठा जमाव ठाण्यावर चालून आला आणि जमावाने ठाणे पेटवून दिले (५ फेब्रुवारी). वस्तुस्थिती अशी होती.

या शोकांतिकेची बातमी ८ तारखेच्या वर्तमानपत्रात प्रथम प्रसिद्ध झाली. ती हकीकत वाचून गांधीजी विलक्षण व्यथित झाले. त्यांनी ११ फेब्रुवारीस काँग्रेस कार्यकारिणीची बैठक घेतली. मिया महमद छोटाणी, जमनालाल बजाज, विठ्ठलभाई पटेल, केळकर, मालवीय, नटराजन व जयकरांच्या उपस्थितीत महात्मा गांधींनी असहकार चळवळ निलंबित केल्याचे घोषित केले. सहकाऱ्यांचा व अनुयायांचा तीव्र रोष पत्करून महात्म्याने हा अप्रिय निर्णय घेतला होता. त्याबद्दल नेहरू पितापुत्र विलक्षण दुःखी झाले, अर्थात तुरुंगात! पण गांधीजींचा निर्णय संपूर्ण वस्तुस्थितीवरच आधारित होता.

पिसाळलेल्या ब्रिटिश सत्ताधीशांच्या दबावाखाली सेशन्स कोर्टाने त्या गावातील २२५ आरोपींपैकी १७२ जणांना फाशीची शिक्षा दिली. जळालेल्या २२ पोलिसांच्या बदल्यात १७२ शेतकऱ्यांचा जीव घेणे हा भयानक अन्याय होता. म्हणून दिल्ली सरकारला पुनर्विचार करावा लागला. अंतिमतः त्यांपैकी १९ जणांना फाशी तर उर्वरितांना अंदमान वगैरे ठिकाणी आजन्म यातना भोगाव्या लागल्या. इंग्रजांनी चौरी चौरामध्ये मेलेल्या पोलिसांचे स्मारक उभारले, पण हुतात्मा झालेल्या शेतकऱ्यांचे नव्हे.[२५]

तोपर्यंत गांधीजींना हात लावण्याचे धैर्य सरकारात नव्हते. इतर सर्व मोठे पुढारी कारागृहांमध्येच होते. तथापि असहकार आंदोलनाचे भय नाहीसे झाल्यावर गांधीजींना १० मार्च १९२२ रोजी सरकारने अटक केली. आणि त्यांना टिळकांप्रमाणे सहा वर्षे कारावासाची शिक्षा देण्यात आली.

बंगालने भारतीय स्वातंत्र्यलढ्यास दिलेल्या योगदानाच्या इतिहासात १९२१-२२ मधील काँग्रेस व खिलाफत युती आणि हिंदू-मुसलमान या दोन धर्मियांमधील ऐक्यभाव लक्षणीय व स्पृहणीय होता. त्यातून मौलाना आझाद, फझलुल हक, सुभाषचंद्र बोस यांची जडणघडण झाली. २ मार्च १९२१ च्या **यंग इंडियात** स्वतः गांधीजींनी नमूद केल्याप्रमाणे असहकार आंदोलनास सर्वाधिक भरघोस योगदान दिले बिहारने. त्यातून डॉ. राजेंद्र प्रसाद यांची घडवणूक होऊन ते गांधीजींचे खंदे पुरस्कर्ते बनले. त्या प्रांतात काँग्रेसने ३,५०,००० सभासद नोंदविले होते. याच आंदोलनात उत्तर प्रदेश म्हणजेच संयुक्त प्रांताने काँग्रेसला भक्कम अधिष्ठान व सामर्थ्य मिळवून दिले. त्या प्रांतात काँग्रेसला १९२०-१९२२ मध्ये ३,२८,९६६ सभासद मिळाले. जवाहरलाल, पुरषोत्तमदास टंडन, गणेश शंकर विद्यार्थी, गोविंद वल्लभ पंत, लाल बहादुर शास्त्री हे भावी राष्ट्रीय पुढारी या चळवळीने घडविले. या प्रदेशातील विद्यावंत वर्गावरदेखील गांधीजींचा सखोल प्रभाव पडला. याचा प्रत्यय सुप्रसिद्ध कादंबरीकार मुन्शी प्रेमचंद यांच्या राष्ट्रवादी विचारप्रवर्तक कादंबऱ्यांमधूनही येतो. लांबवरच्या आसाममध्ये असहकार चळवळीस लाभलेला चांगला प्रतिसाद तेथील नंतरच्या एकाही चळवळीस मिळाला नाही.

तेथील चहाच्या मळ्यांतील कामकऱ्यांनी भांडवलदार मालकांनाही वठणीवर आणले होते. आसामातील शेतकऱ्यांनी शेतसाराबंदी मोहीम उभारून सरकारला धडा शिकवला होता.

पंजाबी विद्यार्थ्यांच्या जोरदार चळवळीतून सरदार भगतसिंग, चंद्रशेखर आझाद हे जहाल क्रांतिकारक उदय पावले. त्याचे श्रेय लालाजींनाही देय ठरते. सिंधमधील हिंदू-मुसलमान युतीतून जयरामदास दौलतराम व जे. बी. कृपलानी यांची जडणघडण झाली. स्वाभाविकपणे गुजरातमधील चळवळ सर्वाधिक यशस्वी झाली. शेतकरी वर्गात अपूर्व राजकीय जाणीव व राष्ट्रीय भान निर्माण झाले. वल्लभभाई पटेलांच्या रूपाने राष्ट्रीय पातळीवरील लढ्यास झुंजार सरदार मिळाला. मुंबईमध्ये असहकार लढा यशस्वी केला मुख्यतः गुजराती भाषिकांनी आणि डांगे, निंबकर यांच्यासारख्या विद्यार्थी पुढाऱ्यांनी. उर्वरित महाराष्ट्रात चळवळ कमकुवत राहिली, पण शंकरराव देव, न. वि. गाडगीळ, सेनापती बापट, डांगे, वा. वि. दास्ताने वगैरे पुढे आले. या आंदोलनात कसाला लागलेले शंकरराव, गंगाधरराव देशपांडे, त्र्यंबक र. देवगिरीकर, दास्ताने आणि देवकीनंदन नारायण हे पुढील काळात महाराष्ट्र काँग्रेसचे व काँग्रेस कार्यप्रणालीचे 'अध्वर्यु' मानले गेले. जमनालाल बजाज हे गांधीजींचे पाचवे पुत्र मानले गेले. १९२० ची नागपूर काँग्रेस यशस्वी करण्यासाठी तसेच विदर्भात स्वराज्यवादी जाणिवा निर्माण करण्यात बजाज यांनी फार मोठे योगदान दिले होते.

❑❑

## संदर्भ


१. मोहनदास करमचंद गांधी, **आत्मकथा,** सीताराम पुरुषोत्तम पटवर्धन (अनु.), पुनर्मुद्रण, २००५, पृ. ४४८-४९, ४५२, ४५६.

२. एम. के. गांधी, **यंग इंडिया**, ९ जून व १२ मे १९२०.

३. कित्ता, ४ ऑग. १९२०.

४. कित्ता, १२ जाने. १९२०.

५. के. के. चौधरी, **हिस्टरी ऑफ बाँबे,** १९८७, पृ. १३१-३५.

६. य. दि. फडके, **विसाव्या शतकातील महाराष्ट्र,** खंड दोन, पृ. १८०-८६,२२६.

७. चौधरी, उपरोक्त, पृ. १३५-३६.

८. चौधरी, **वर्धा गॅझेटिअर,** १९९२, पृ. ६८-६९.

९. चौधरी, **रायगड गॅझेटिअर,** १९९३, पृ. १५८-५९.

१०. चौधरी, **झुंजार पुणे,** २००८, पृ. १९२-९७.

११. हिंदुस्तान सरकार, फाईल, होम पोलिटिकल बी., ऑग. १९२०, क्र. ३३८-६७.

१२. हिंदुस्तान सरकार, फाईल, होम पोलिटिकल डिपॉझिट, ऑग. १९२०, क्र. ३८ व के. डब्ल्यू.

१३. गव्हर्नर रोनाल्डशे यांचे भारतमंत्री ई. एस. मॉँटेग्यू यांना पत्र, ३० जून १९२१.

१४. ज्युडिथ ब्राऊन, **गांधीज राईझ टू पॉवर: इंडियन पोलिटिक्स,** केंब्रिज, १९७२, पु. २८१-८६.

१५. हिंदुस्तान सरकार, फाईल, होम पोलिटिकल डिपॉझिट, फेब्रुवारी १९२१, क्र. ३५.

१६. गांधी, **आत्मकथा,** पृ. ४७०-७२.

१७. एआयसीसी, **इंडियन नॅशनल काँग्रेस : १९२०-१९२४,** पृ. ४०, ४१, ५३.

१८. फडके, उपरोक्त, पृ. १९०-९२.

१९. चौधरी, **वर्धा गॅझेटिअर,** १९९२, पृ. ६७-६९.

२०. जवाहरलाल नेहरू, **आत्मकथा,** ना. ग. गोरे (अनु.), पुणे, २००१, पृ. ६९-७६, ८२.

२१. चौधरी, **हिस्टरी ऑफ बाँबे,** पृ. १३६-३९.

## संदर्भ

२२. बी. जी. कुंटे (संपा.), **सोर्स मटेरिअल**, खंड नऊ, १९८०, पृ. ९३-९५.

२३. फडके, उपरोक्त, खंड तीन, पृ. ४४, ४८-४९, ५२-५४.

२४. नेहरू, उपरोक्त. पृ. ७६-८१.

२५. सुमित सरकार, **मॉडर्न इंडिया : १८८५-१९४७**, पृ. २१६-१७, २२४-२५.

प्रकरण ३

# असहकार चळवळीला प्रतिसाद

असहकार चळवळीने राजकीय चळवळीची आर्थिक राष्ट्रवादाशी उत्तम सांगड घातली आणि त्याद्वारे गांधीजींनी आंदोलनाचा स्तर उंचावला. असहकाराच्या राष्ट्रव्यापी प्रयोगामुळे भारताचे एकूण राजकीय रंगदृश्य बदलले! व्हाइसरॉय लॉर्ड रीडिंग यांनी कबूल केल्याप्रमाणे त्यांना ' असहकाराविरुद्ध ' कारवाई करणे शक्य झाले नव्हते. काँग्रेसच्या आर्थिक राष्ट्रवादामुळे ब्रिटिश साम्राज्याचे आर्थिक नुकसान झाले आहे, असे लिहिताना गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन यांनीही कबूल केले होते :— " गांधी इज आऊट फॉर अवर ब्लड." स्वदेशी व बहिष्कारामुळे अबकारी कर व शुल्क आणि सरकारचा महसूल खूप घसरला होता. निर्यातीतही घट झाली होती.[१]

नवनिर्मित राष्ट्रीय स्पिरिटमुळे अनेक स्थानिक चळवळी उदय पावल्या. कलोनिअल दंडुकेशाहीला आव्हान देण्याची प्रवृत्ती निर्माण झाली. युवकांच्या संघटना निर्माण झाल्या. महाराष्ट्रात युसुफ मेहेरअली, श्री. अ. डांगे, निंबकर, शंकरराव देव, न. वि. गाडगीळ, सेनापती बापट वगैरे युवकांची पिढी तयार झाली. जवाहरलाल नेहरू आणि बाबा रामचंद्र नावाचा मराठी ब्राह्मण यांनी संयुक्त प्रांतात किसानांचे आंदोलन उभारून प्रांतिक सरकारला जेरीस आणले. आंध्र प्रदेशातही शेतकरी व युवकांनी आंदोलन करून सरकारला रंजिस केले होते.[२] म्हणून हिंसाचाराच्या निमित्ताने गांधीजींनी चळवळ स्थगित ठेवली, तरी तिचे निश्चित असे फलित होतेच. चळवळीला लाभलेला साद व प्रतिसाद अभूतपूर्व होता!

## असहकार आंदोलनाची फलनिष्पत्ती

शासकीय अथवा शासनमान्य शिक्षण संस्था व शिक्षण पद्धतीवरील बहिष्कार आणि त्याचबरोबर राष्ट्रीय शिक्षण संस्थांचा प्रसार ही असहकार आंदोलनाची फार मोठी फलनिष्पत्ती होती. चळवळीच्या या अंगाचे कोलकाता, मुंबई, पाटणा, काशी, अहमदाबाद, अलीगढ व पुणे शहरांमधील यश अपूर्व होते. या

चळवळीतून चित्तरंजन दास यांचे शिष्य सुभाषचंद्र बोस यांची राजकीय जडणघडण झाली. सुभाषबाबूंना नॅशनल कॉलेज व विद्यापीठाचे प्रमुख म्हणून नेमण्यात आले होते. १९२१ च्या प्रारंभापासून कित्येक हजार कॉलेज विद्यार्थी व माध्यमिक शाळांमधील मुले सरकारी संस्थांमधून बाहेर पडली. मध्यवर्ती सरकारच्या बामफर्ड नामक इंटेलिजन्स अधिकाऱ्याने १९२५ मध्ये सादर केलेल्या **हिस्टरी ऑफ द नॉन कोऑपरेशन अँड खिलाफत मुव्हमेंट** नामक अहवालात बरीच खळबळजनक माहिती दिलेली आहे. बंगालमधील शासनमान्य शाळा-कॉलेजांमधील १,०३,१०७ विद्यार्थ्यांपैकी ११,१५७ जणांनी त्यांच्यावर बहिष्कार टाकला होता. अलीगढला राष्ट्रीय शिक्षणासाठी **जामिया मिलीया इस्लामिया विद्यापीठ** स्थापन करण्यात आले. नंतर ते दिल्लीत स्थलांतरित करण्यात आले. बनारसचे **काशी विद्यापीठ** असहकार आंदोलनातच स्थापन करण्यात आले होते. अहमदाबादचे **गुजरात विद्यापीठ** म्हणजे ब्रिटिशांवरील बहिष्कारातूनच झालेली निर्मिती होय. काही काळ गांधीजी स्वतः गुजरात विद्यापीठाचे कुलगुरु होते. पाटना येथील **राष्ट्रीय विद्यापीठाचे** कर्तेकरविते डॉ. राजेंद्र प्रसाद होते. लाहोरमध्येही **नॅशनल कॉलेज** स्थापन करण्यात आले होते.

उपरोक्त बामफर्ड याने सरकारला दिलेल्या माहितीनुसार १९२१-२२ मध्ये काँग्रेसजनांनी स्थापन केलेल्या शाळा आणि महाविद्यालयांमध्ये ८०,४६४ विद्यार्थी शिकत होते. अशाच राष्ट्रीय महाविद्यालयांपैकी मुंबईतील **टोपीवाला नॅशनल मेडिकल कॉलेज** व पुण्यातील **टिळक आयुर्वेदिक महाविद्यालय** या नामवंत संस्था आहेत. त्यांचा इतिहास मागील प्रकरणात दिलेलाच आहे.

इतिहासकार ब्राऊन यांच्या संशोधनावरून दिसते की, जानेवारी १९२१ पर्यंत कोलकात्यातील बहुसंख्य सरकारी व सरकार-मान्य शिक्षणसंस्था ओस पडल्या होत्या. एकूण बंगालमधील शैक्षणिक बहिष्कारास उत्तम प्रतिसाद लाभला होता. आणि म्हणूनच पुढील दोन वर्षे बंगालमधील शिक्षण क्षेत्र विस्थापित स्थितीत राहिले. काँग्रेसच्या दृष्टीने हे यश मोठेच होते. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी, ब्रिटिशांनी दिलेले किताब आंदोलनाच्या प्रारंभीच परत केले होते. रवींद्रनाथ व

त्यांच्या सहकाऱ्यांच्या उत्तेजनाने **शांतिनिकेतन** या आंदोलनात आघाडीवर होते. विद्यार्थी व तेथील शिक्षकांनी चळवळीत निष्ठापूर्वक भाग घेतला. बंगालमध्ये कॉंग्रेसने १९० राष्ट्रीय शिक्षणसंस्था स्थापन केल्या होत्या.

कॉंग्रेसने मुंबई इलाख्यात १८९ राष्ट्रीय शाळा व महाविद्यालये स्थापन करून सरकारला चकित केले होते. मात्र त्यात सर्वात मोठा वाटा मुंबई शहराचा व गुजरात विभागाचा होता. संयुक्त प्रांतात १३७ राष्ट्रीय शाळा-महाविद्यालये कॉंग्रेसजनांनी उघडली होती. बिहार व ओरिसा तेव्हा एकच राज्य असून त्या मागास राज्यातही ४४२ राष्ट्रीय संस्था काढण्याचा कॉंग्रेसने मोठा विक्रम केला होता. म्हणूनही गांधीजींनी या राज्याची प्रशंसा केली होती.[३] बनारसच्या **काशी विद्यापीठाने** आपली अस्मिता निर्माण करून ती टिकवून ठेवली होती.

भूतपूर्व गंगनाथ विद्यालयाचे शिक्षक व विद्यार्थी असहकार चळवळीत निष्ठापूर्वक सामील झाले होते. त्यांच्यापैकी काही जण नंतर शांतिनिकेतनमध्ये काही काळ असले, तरी महाराष्ट्र ही त्यांची कर्मभूमी राहिली. पुढील सर्वच राष्ट्रीय आंदोलनांमध्ये त्यांनी गांधीजींच्या प्रेरणेप्रमाणे योगदान दिले. शांततेच्या काळात काही जणांनी अस्पृश्यतानिवारण, साक्षरताप्रसार, खादीचा प्रसार अशा सामाजिक कार्यास वाहून घेतले. तर काहींनी कुष्ठरोग निर्मूलन आणि नशाबंदी मोहिमेत महान योगदान दिले.

नागपूर भागातही जमनालाल बजाज यांच्या नेतृत्वाखाली सरकारी व सरकारमान्य शिक्षणसंस्थांवर बहिष्कार टाकून राष्ट्रीय शाळा काढण्याची मोहीम जोरात सुरू झाली. पंडित सुंदरलाल, भगवानदीन, दादासाहेब उधोजी, गोपाळराव देव, शिवरामपंत बारलिंगे यांनी नागपुरात असहयोगाश्रम व टिळक राष्ट्रीय विद्यालय आणि नॅशनल एज्युकेशन बोर्डाशी संलग्न असे **नॅशनल कॉलेज** स्थापन केले होते. या विभागात आणखीही काही राष्ट्रीय शाळा सुरू केल्या होत्या. केवळ राष्ट्रीय संस्था न काढता त्यांचा जोरदार प्रचार करण्यात आला. सरकारी दडपशाही काही कमी नव्हती. तथापि त्यामुळे राष्ट्रीय शिक्षण मोहिमेस अधिक प्रतिसाद मिळू लागला. गुजरात व मुंबईचे अनुकरण करून वर्धा व नागपुरातील

शेकडो मुले सरकारी शाळांच्या वर्गांमधून ' बाहेर ' पडले. डॉ. मुंजे यांचे अनुयायी डॉ. एम. आर. चोळकर आणि डॉ. ल. वा. परांजपे हे नागपुरातील विद्यार्थिवर्गाला शाळांच्या बाहेर काढत. काही ठिकाणी दहशत बसवण्यासाठी गोळीबारही झाले, पण मुले घाबरली नाही. नागपुरातील असहयोगाश्रम व टिळक विद्यालयाचा सर्व खर्च स्वतः जमनालाल बजाज भागवित असत. १९२१-२२ सालात मध्यप्रांत-वऱ्हाड प्रांतात ८६ राष्ट्रीय शिक्षणसंस्था असून, त्यांच्यात ६,३८८ विद्यार्थी शिकत होते.

असहकार चळवळीने विदर्भात अनेक तरुण स्वातंत्र्यसैनिक घडविले. त्यातूनच नीळकंठराव एम. घटवाई हे एक जहाल मतवादी स्थानिक पुढारी निर्माण झाले. विनायक सखाराम दांडेकर हे तर छोडो भारत लढ्यात मोठे क्रांतिकारक म्हणून कीर्ती पावले. पी. डी. मराठे वकील हेही पुढील आंदोलनांमध्ये सक्रिय राहिले. रामभाऊ रुईकर सातत्याने क्रांतिलढ्यात राहिले व सुभाषबाबूंचे सहकारी बनले. मंचरशा आवारी हे स्वातंत्र्यसैनिकांचे नेतृत्व करत असत. कोष्टी समाजाला स्वातंत्र्य आंदोलनात आणण्याचे श्रेय उदेराम यांना द्यावे लागते. विनोबा भावे, भगवानदीन, सेठी, नीळकंठराव देशमुख यांची जडणघडण याच चळवळीतून झाली. मा. ज. कानेटकर हे पुढे मोठे पत्रकार म्हणून प्रसिद्धी पावले.

वऱ्हाड प्रांतात वीर वामनराव जोशी यांनी गांधीजींचे नेतृत्व मनोभावे स्वीकारून जोमाने लोकांचे प्रबोधन केले. राजद्रोहाच्या आरोपाखाली त्यांना दीड वर्षाची सजा झाली. त्यांच्याप्रमाणेच नरहर शिवराम ऊर्फ बाबासाहेब परांजपे यांनाही राजद्रोहासाठी दीड वर्षाची सजा झाली. अमरावतीच्या पार्वती पटवर्धन व चंद्राताई शेवडे यांनी जिल्ह्यात प्रचार केला. एलिचपूरचे नथूजी महाजन व भगवानसिंग यांनाही कारावास भागोवा लागला. अकोल्याचे मामासाहेब जोगळेकर, नानाभाई इच्छाराम वगैरेंनी काँग्रेसचा प्रसार केला. या जिल्ह्यातील चळवळीच्या प्रचारात बापूसाहेब सहस्रबुद्धे, विश्वनाथ कंठे, बापट, देवीदास देशपांडे, दाजीसाहेब बेदरकर यांनी उत्साहाने भाग घेतला होता. यवतमाळ जिल्ह्यात शामराव देशपांडे यांनी तर बुलढाण्यात पन्नालाल व्यास, डॉ. पारसनीस व भिकमसिंह यांनी प्रचार

केला. अमरावतीचे स. नी. मोहरीर यांनी वकिलीचा त्याग करून वऱ्हाड प्रांतिक समितीचे पदाधिकारी म्हणून काम केले.

बापूजी अणे, दयाळदास चौधरी, अब्दुल रौफ शहा यांनी काही काळ वकिली सोडली होती. खामगाव, अकोला वगैरे ठिकाणी राष्ट्रीय शाळा काढून भाऊसाहेब सोहोनी, पंढरीनाथ अंबूलकर, मनोहर दिवाण, पुरवार यांनी चळवळीत काम केले. अकोल्यातील राष्ट्रीय शाळेचा तेव्हा बराच बोलबाला झाला होता. असहकारितेच्या कार्यक्रमाबरोबरच वऱ्हाडातील वेठबिगारीच्या अन्यायाविरुद्ध वीर वामनराव यांच्यासह अनेकांनी सामाजिक कार्य केले होते. १९३० च्या कायदेभंग आंदोलनात आघाडीवर राहिलेल्या ब्रिजलाल बियाणी यांनी असहकार प्रसंगी सरकारमान्य शाळांवर बहिष्कार घालण्यात पुढाकार घेतला होता. १९२३ साली झालेल्या नागपूर झेंडा सत्याग्रहात वऱ्हाडातील काही जणांनीही भाग घेतला. स्वराज्य पक्ष स्थापन झाल्यावर बियाणी, पुरुषोत्तम बळवंत गोळे व पन्नालाल सिंघई त्या पक्षाचे काम करू लागले. असहकार चळवळीची लक्षणीय फलनिष्पत्ती अशी की, पुढील काळातील स्वातंत्र्य चळवळीसाठी विदर्भात हजारो कार्यकर्ते घडविण्यास मोठी मदत झाली.

टिळकांच्या मुंबईतील अंत्ययात्रेत दोन लाख लोक सामील झालेले होते. महाराष्ट्रात टिळकांच्या स्मृती बरेच दिवस जागृत राहणे स्वाभाविकच होते. म्हणूनही मराठी ब्राह्मणांच्या मनात महात्माजींविषयी संशयाचे धुके होते. तरीही रशियातील बोल्शेविक क्रांती आणि १९१६ मधील आयर्लंडमधील उठाव यामुळे काही मराठी ब्राह्मण विद्यार्थी प्रभावित झालेले होते. बॉंबे स्टुडन्ट्स ब्रदरहूड या युवकांच्या संघटनेचे नेते डांगे, निंबकर, व्ही. डी. साठ्ये आणि आर. व्ही. नाडकर्णी यांना टिळकांच्या विचारप्रणालीपेक्षा गांधीजींच्या कायदेभंग आंदोलनाचे आकर्षण वाटू लागले होते. लवकरच या उत्साही युवकांना केशवराव जोगळेकर, शं. वा. देशपांडे (मास्तर), मिरजकर, एल. एम. पेंडसे, घाटे वगैरे येऊन मिळाले. या जहाल युवकांना तेव्हाही गांधीजींचे सर्व तत्त्वज्ञान मान्य होते असे नव्हे. विशेषतः डांगे, जोगळेकर, निंबकर गांधीजींशी वादविवाद करत. तथापि

असहकार आंदोलनात या युवकांनी निष्ठापूर्वक काम केले होते. सरकारी शाळा-कॉलेजांवर बहिष्कार घालण्यात ते अग्रेसर होते. त्यांनी राष्ट्रीय शाळांमध्ये शिक्षक म्हणून सेवा केली. साक्षरता प्रसारासाठी काम केले. विदेशी कपड्यांवरील बहिष्कारातही हे युवक आघाडीवर असत. ते पुढाऱ्यांच्या सभांचे आयोजनही करत असत.

हे युवक प्रारंभापासून कम्युनिस्ट होते असे नव्हे, पण त्यांचा कल जहाल समाजवादाकडे होता. मात्र असहकार आंदोलनात या आणि अशा शेकडो युवकांची जडणघडण झाली, हे निश्चित. स्वातंत्र्यलढा आणि देशकार्य या ध्येयाने प्रेरित होऊन शेकडोंनी शिक्षणाचाही त्याग केला.

महाराष्ट्राच्या दृष्टीने असहकार आंदोलनाची एक मोठी फलश्रुती म्हणजे लवकरच बहुजनसमाज काँग्रेसकडे ओढला गेला. त्यापूर्वी कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे वगैरे सोडल्यास अब्राह्मण समाज काँग्रेस व स्वातंत्र्यलढ्यापासून लांब होता. शिंदेंच्या नंतर कर्मवीर भाऊराव पायगोंडा पाटील गांधीजींकडे आकर्षित झाले. गांधीजींमुळेच प्रभावित होऊन केशवराव मारुती जेधे, खंडेराव बागल वगैरेंनी पुण्यातील जेधे भवनात ४ सप्टेंबर १९२४ रोजी गांधीजींसाठी स्वागत सोहळा आयोजित केला होता. हे सर्व पुढारी आणि नाना पाटील, केशवराव विचारे वगैरेंच्या प्रयत्नांमुळे ब्राह्मणेतर लोकांना काँग्रेसमध्ये जाण्यास परवानगी मिळाली होती.

१९२०-१९२२ या काळात काँग्रेसने ब्रिटिशांवर घातलेला ‘ आर्थिक बहिष्कार ’ १९०५-१९०८ या काळातील बहिष्कारांपेक्षा अनेक पटीने तीव्र आणि यशस्वी ठरला हे विशेष होय. १९२०-२१ मध्ये विदेशी कापडाची आयात १०२ कोटी रुपये किंमतीची होती. १९२१-२२ साली कापडाची आयात घटून केवळ निम्म्यावर म्हणजे ५७ कोटी रुपयांपर्यंत घसरली. एकूण देशापेक्षा मुंबईत विदेशी कापडावरील बहिष्कार फारच तीव्र व यशस्वी झाला होता. विदेशी कपड्यांच्या मुंबईतील सर्व होळ्या केवळ प्रतीकात्मक नसून त्यांना व्यापक जनाधार आणि लोकप्रतिसाद होता. त्यामुळे लँकेशायरचे धाबे दणाणले होते. काँग्रेसला व्यापाऱ्यांचा

भरभक्कम पाठिंबा लाभला. अ. भा. काँग्रेसकडे १९२० मध्ये केवळ ४३,००० रुपये होते. मात्र आंदोलनकाळात व्यापाऱ्यांनी देणग्या दिल्याने १९२१-१९२३ या काळात गंगाजळीत १३० लाख रुपयांची भर पडली. एक कोटी रुपयांच्या टिळक स्वराज्य फंडात एकट्या जुन्या मुंबई शहराने ३७,५०,००० रुपयांची भर घातली होती.

असहकार आंदोलनास मुंबईतील व्यापारी वर्गाने जोरदार पाठिंबा दिल्याने ब्रिटिश सरकारला चिंता वाटू लागली होती. म्हणून सरकारने ऑक्टोबर १९२१ मध्ये फिस्कल कमिशन नेमले व त्यात भारतीय प्रतिनिधींचाही समावेश केला.[४]

सरकारमान्य शिक्षणसंस्थांवरील बहिष्काराइतके यश न्यायालयांवरील बहिष्काराला लाभले नाही हे सत्य होय. शेकडो वकिलांनी वकिली सोडली, पण बहुतेक वकील पुन्हा व्यवसायात व्यग्र झाले. पण तरीही या बहिष्काराचा परिणाम नाट्यमय व नेत्रदीपक झाला होता. देशातील अग्रेसर वकील चित्तरंजन दास, मोतीलाल नेहरू, जयकर, सैफुद्दिन किश्चलू, वल्लभभाई पटेल, राजगोपालाचारी, टी. प्रकासम आणि असफ अली यांनी आपल्या उत्कर्षशाली व्यवसायाचा देशासाठी त्याग केला होता.

मात्र असहकार मोहिमेला सर्वात मोठे यश प्राप्त झाले ते विदेशी मालावरील बहिष्कारात आणि स्वदेशीचा पुरस्कार करण्यातच. मुंबई व उपनगरे, गुजरातमधील सर्वच शहरे, कोलकाता, ढाका, मिदनापूर, मद्रास, लाहोर, अमृतसर, दिल्ली, पाटना, अलाहाबाद, नागपूर वगैरे शहरांमध्ये विदेशी मालाची विक्री मोठ्या प्रमाणात घटली होती. चळवळीला लाभलेला साद व प्रतिसाद पाहून गांधीजी व काँग्रेसने प्राथम्यक्रमात काही बदल केला. निधीच्या अभावी राष्ट्रीय शिक्षणसंस्था सतत चालू ठेवणे सोपे नव्हते. नोकरीच्या आकांक्षा बाळगणारे विद्यार्थी फार काळ शिक्षणाचा त्याग करू शकले नव्हते. त्यांच्यावर पालकांचे नियंत्रण असणेही स्वाभाविकच होते. पूर्वी बहुसंख्य वकिलांच्या दृष्टीने राजकीय कार्य म्हणजे टेनिस व बिलिअर्ड्स या क्रीडा प्रकारांमध्ये रमण्यासारखे फुरसतीच्या वेळी करावयाचे एक काम होते. काँग्रेसच्या स्थापनेपासून पक्षावर वकिलांचे प्रभुत्व होते हे खरे.

पण ते व्यवसाय सांभाळून फुरसतीच्या वेळी काँग्रेसकडे बघत. पक्षशिस्त म्हणून अनेकांनी १९२०-१९२१ मध्ये वकिलीचा त्याग केला. पण त्यांचेपैकी बहुसंख्य पुन्हा व्यवसायरत झाले. शेकडो उदाहरणांपैकी पुण्यातील एक उदाहरण पोलीस अहवालांमध्ये नमूद आहे. अण्णासाहेब भोपटकरांनी वकिली ‘ सोडली ’ असे जाहीर झाले होते. पण ते दररोज कोर्टात जात असत. महाराष्ट्रात भुसावळचे वा. वि. दास्ताने, अलिबागचे गोसावी व एम. आर. जयकर यांच्यासारखे अगदीच थोडे होते की, ज्यांनी वकिली व्यवसायाचा त्याग केला.

न्यायालयांवरील बहिष्कार आणि वकिलांच्या मानसिकतेच्या मर्यादा ओळखून काँग्रेसने विधायक कार्यावर भर देणे सुरू केले. विशेषतः मुंबई, वर्धा, नागपूर आणि गुजरात प्रांतात खादीच्या प्रसारावर भर देण्यात आला. हिंदुस्तानात अल्पावधीतच दोन लाखांपेक्षा अधिक चरखे कार्यान्वित करण्यात आले. स्वदेशीचा जास्तीत जास्त पुरस्कार करून कापडाची आयात कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. उपरोक्त आकडेवारीवरूनही हे सिद्ध होते. स्वातंत्र्य आंदोलनास आर्थिक राष्ट्रवादाचे परिमाण जोडण्यात आले.

चळवळीच्या विविध अंगांबरोबरच आंदोलनासाठी निधी उभारण्याची मोहीम गांधीजींनी हाती घेतली. या कार्यातही मुंबईचे योगदान सर्वोत्कृष्ट होते. हिंदुस्तानात परतल्यावर गांधीजी सांताक्रुजमध्ये वकिलीचा व्यवसाय करीत. त्या सांताक्रुजने आंदोलनासाठी जसे कार्यकर्ते पुरविले तसे गांधीजींच्या स्वराज्य फंडासाठी ३०,००० रुपये मिळवून दिले होते. घाटकोपरने ४०,००० तर मांडवीने ६०,००० रुपयांचे दान दिले होते. बाँबे कॉटन ब्रोकर असोसिएशनने गांधीजींना अडीच लाख रुपयांची थैली या फंडासाठी दिली होती. फातिमा इस्माईल यांच्या साक्षीनुसार त्यांचे बंधू उमर सोभानी यांनी मौलाना शौकत अली यांच्या हजेरीत गांधीजींच्या हातात एक कोटी रुपयांचा धनादेश ठेवला होता. त्यावर गांधीजींची प्रतिक्रिया होती की, एकाच व्यक्तीने इतके मोठी रक्कम देण्यापेक्षा तिच्यात अनेकांचा सहभाग असायला हवा. तत्कालीन एक कोटीची किंमत आजच्या कित्येक अब्ज रुपयांपेक्षा मोठी होती. हे गुपित सरकारला समजताच शासनाने

सोभानींचे तीन कोटी चौसष्ट लाखांचे नुकसान केले होते. याआधीच्या प्रकरणात कथन केल्याप्रमाणे जयनारायण इ. दानी, ए. बी. गोदरेज, आनंदीलाल पोदार या कट्टर राष्ट्रवादी दात्यांनी निधीसाठी आपल्या तिजोऱ्या रिकाम्या केल्या होत्या.[५]

हिंदुस्तान सरकारच्या वाणिज्यवादी धोरणामुळे भारतीय उद्योग व व्यापाराचे अतोनात नुकसान होई. चलन व विनिमय धोरणामुळेही १९२०-२१ साली आर्थिक मंदीचे सावट वाढले होते. याविरुद्ध दाद मागण्यासाठी इंडियन मर्चंट्स असोसिएशन आणि कापड विक्रेत्यांचा संघ इ. सात संघटनांनी काँग्रेसला विनंती केली होती. जुलैपासून सप्टेंबर १९२१ पर्यंत गांधीजी मुंबईतच राहिले. अ. भा. काँ. समितीने आर्थिक मंदी हा विषय हाती घेतला. यास प्रतिसाद म्हणून मुंबईतील सर्वच संघटनांनी विदेशी मालावरील बहिष्काराच्या अभियानास मनापासून मदत केली. गांधीजींनी गिरणीमालकांना भेटून कापड उत्पादनावरील नफ्याचे प्रमाण कमी करावे व भारतीय बाजारपेठेसाठीच कापड तयार करावे, यासाठी त्यांचे मन वळवले. तसेच विदेशी कापडाची आयात थांबवावी असे त्यांनी व्यापाऱ्यांना आवाहन केले ; सध्या असलेला विदेशी कापडाचा साठा दुसऱ्या देशांकडे पाठवावा अशी सूचना केली. त्यांनी नागरिकांना फक्त खादी वापरण्याचे आवाहन केले. जमनालाल बजाज व नारनदास पुरषोत्तम यांनी सर्व मारवाडी कापड व्यापारी व अडत्यांना विदेशी कापड विकण्यापासून परावृत्त केले. या सर्व प्रयत्नांना घाऊक व्यापार करणाऱ्या मूळजी जेठा कापड पेठेने सर्वाधिक प्रतिसाद दिला.

**विदेशी कपड्यांच्या होळया :—**गांधीजींच्या पुढाकाराखालील स्वराज्य सभेने मुंबईतून विदेशी कपड्यांचे ढीग गोळा केले. १९०६ साली शि. म. परांजपे, टिळक व केळकरांनी बैलगाडीभर विदेशी कपडे गोळा करून पुण्याच्या लकडी पुलाजवळ होळी केली होती. मात्र मुंबईत काही ट्रकभर कपडे होळीसाठी जमवले गेले. एकट्या उमर सोभानी यांनी ३०,००० रुपयांचे विदेशी कपडे दहनासाठी दिले होते.

मुंबई प्रांतिक काँग्रेस समितीने व स्वयंसेवकांनी ही मोहीम यशस्वी करण्यासाठी प्रयत्नांची शर्थ केली होती. अहर्निश प्रचार सभा व घरोघरी जाऊन कार्यकर्त्यांनी मुंबईकरांचे प्रबोधन केले, कपड्यांचे ढीग जमवले. ३१ जुलै १९२१ रोजी उमर सोभानींच्या एलफिंस्टन मिलमध्ये (एलफिंस्टन पुलाजवळील) वीस फूट उंचीचा कपड्यांचा ढीग रचण्यात आला. या ढिगाला गांधीजींनी अग्नी दिला. या प्रसंगी काही अखिल भारतीय पुढारी व बारा हजार नागरिक उपस्थित होते. यानंतर ९ ऑक्टोबर रोजी त्याच स्थळावर गांधीजी, लजपतराय, मौलाना आझाद, डॉ. राजेंद्र प्रसाद, सरोजिनी नायडू वगैरेंनी कपड्यांची अधिकच मोठी होळी पेटविली.

नवीन राज्यसुधारणा कायद्यानुसार मुंबई कायदेमंडळ निर्माण व्हावयाचे होते. त्याच्या उद्‌घाटनासाठी पाचवे जॉर्ज यांचे राजपुत्र जहाजाने मुंबईत येणार, असे सरकारने जाहीर केले होते. त्या प्रसंगी युवराजांना बंदरातूनच होळी दिसावी अशी कल्पना मिया महंमद छोटानी यांनी मांडली. म्हणून राजपुत्राच्या डोळ्यांत अंजन घालावे या उद्देशाने विदेशी कपड्यांची तिसरी होळी पेटविण्याचा निर्णय झाला. या होळीची संकल्पना अशी होती की, एलफिंस्टन मिलमधील होळीच्या ज्वाळा युवराजाला अपोलो बंदरामधील त्याच्या जहाजातूनही दिसायलाच हव्या. त्या योजनेनुसार १७ नोव्हेंबर १९२१ च्या त्या ऐतिहासिक रात्री पंचवीस हजार नागरिक व देशातील पुढाऱ्यांच्या उपस्थितीत एलफिंस्टन मिलमध्ये अजस्र होळी गांधीजींनी पेटविली. या होळीच्या ज्वाळा युवराजांनी अपोलो बंदरामधून पाहिल्या. युवराज अथवा तेथे हजर असलेले गव्हर्नर सर जॉर्ज लॉयड काय म्हणाले, हे प्रस्तुत इतिहासकारास माहीत नाही. तथापि तिथे उपस्थित असलेल्या पोलीस अधिकाऱ्याने एका पत्रकाराने काढलेले पुढील उद्‌गार लिहून ठेवले,"Extremely impressive ! The vast audiences, the burning clothes and the passionate speakers under God's sky in the growing night!"[६]

मुंबईतील या तीन होळ्या हा काही आनंद सोहळा नव्हता. ती स्वातंत्र्य प्राप्तीसाठी जिद्द होती. त्यात वाणिज्यवादी ब्रिटिशांचा निषेध होता. त्यात गांभीर्य होते. शिस्त होती व करुणा होती. महात्म्याच्या डोळ्यांतील आसवे पोलिसांनी पाहिली होती.

**ब्रिटिश युवराजांवर बहिष्कार :—**युवराजांच्या आगमनाप्रीत्यर्थ सजविलेली मुंबई नगरी आणि येथील रोषणाई व दिमाखदार आनंद सोहळे व जलसे यांचा निषेध करणे हाही १७ नोव्हेंबरला उद्देश होताच. येथूनच युवराजांचा भारत दौरा सुरू होणार होता. म्हणून युवराजास भारतीयांचा निषेध, राग व निर्धार दाखववावयाचा होता. आनंद सोहळ्यासाठी हजर असलेल्या मराठी संस्थानिकांनाही आम जनतेच्या भावना कळाव्या हाही एक उद्देश होता. वैचारिक पातळीवरून पाहता बहिष्कार व या होळ्या पेटविण्याचा उपक्रम म्हणजे स्वदेशी आणि आर्थिक राष्ट्रवादाचा लढा होता.

मे १९२१ पावेतो 'मद्यपान निषेध' हा चळवळीच्या आयुधांमध्ये समाविष्ट नव्हता. मात्र १९ मे १९२१ च्या **संदेश** पत्रकातून अच्युतराव ब. कोल्हटकरांनी यावर लेख लिहिताच गांधीजींनी त्यांना याबाबतच्या प्रचारकार्याची धुरा उचलण्यास सांगितले. त्यानुसार दादरमध्ये या मोहिमेचा प्रारंभ झाला. जूनच्या मध्यापासून गिरगाव, गोलपीठा, मांडवी, फ्रिअर रोड, माझगाव, धोबी तलाव, जेकब सर्कल, आर्थर रोड वगैरे भागांमध्ये स्वयंसेवकांनी प्रचार केला. मद्यविक्रीच्या सर्व दुकानांसमोर त्यांनी निदर्शने केली, विक्रेत्यांचा निषेध केला. कोल्हटकरांनी बरेच काम केले. बीपीसीसीने मोहल्ला समित्या नेमल्या. दरम्यान थोडी हुल्लडबाजी झाल्याने मोहीम थोडे दिवस स्थगित ठेवली. पण २० ऑगस्टपासून शौकत अली व पी. जी. सहस्रबुद्धेंच्या देखरेखीखाली पुन्हा मोहीम व्यवस्थित सुरू केली. दारू व ताडीची अनेक दुकाने निदर्शकांनी जाळून टाकली होती. नोव्हेंबरमधील पारशी विरुद्ध हिंदू-मुसलमान यांमधील भीषण दंग्यांमध्ये दारूची असंख्य दुकाने जाळून टाकली अथवा त्यांची मोडतोड झाली. या प्रकरणी कित्येक निदर्शकांवर खटले भरून त्यांना जबर शिक्षा झाल्या होत्या.[७]

**या मोहिमेमागची पार्श्वभूमी अशी होती :—**मुंबईतील बहुसंख्य मद्य-विक्रेते व उत्पादक पारशी समाजातील होते. ते पाश्चिमात्य जीवनशैलीचे अनुकरण करीत. त्यांच्यातील पुष्कळांचा दारू हा व्यवसाय होता. म्हणून काँग्रेसच्या नशाबंदी कार्यक्रमास त्यांनी विरोध केला. मुंबई, पालघर, डहाणू

भागातील अनेक पारशी अफूच्या व्यापारात अफाट धनिक झालेले होते. त्यांच्या व्यवसायावर काँग्रेसने हल्ला केल्यामुळे ते चवताळले. त्यांनी शेकडो ' सराईत ' पठाण व बलदंड माणसांना पैसे देऊन काँग्रेस स्वयंसेवकांवर हल्ले करवून घेतले, स्वसंरक्षणाच्या नावाखाली! शिवाय धनिक पारशी मंडळी व त्यांच्या बहुसंख्य संघटनांनी ब्रिटिश युवराजांच्या स्वागताचे सोहळे संपन्न केले. त्यांनी दिमाखदार सरकारी सोहळ्यांत अतिउत्साहाने भाग घेतला. पार्ट्या, डान्स वगैरे घडवून आणले. याचाही आम जनतेला भयंकर राग आला होता. अत्यंत शांत जीवन जगणाऱ्या पारशांचे हे वर्तन जनताजनार्दनाच्या क्रोधाचे कारण झाले. पारशांना सर्व अँग्लो-इंडियन व काही ज्यू लोकांची साथ होती. अल्पावधीत दक्षिण मुंबई, भेंडी बाजार, मदनपुरा, ग्रँट रोड वगैरे भागांमध्ये भीषण दंगे झाले. ही मंडळी एका बाजूला तर हिंदू व मुसलमान दुसऱ्या बाजूला अशी लढाई झाली. कित्येक नागरिक व पोलीसही मारले गेले. गांधीजी यांनी हा हिंसाचार थांबविण्यासाठी अन्नसत्याग्रह केला. आपला मुलगा देवदास गांधी यास दंगलीमध्ये स्वतःचा ' बळी ' देण्यास पाठविले, अगदी निःशस्त्र! याचा परिणाम होऊन चवथ्या दिवशी दंगे थांबले (२१ नोव्हेंबर).[८]

**महानगरपालिकेतील पडसाद :—**मुंबईत असहकारास चांगला साद प्रतिसाद लाभला हे सत्य होय. तथापि चळवळीस सर्वसंमती होती, असे नव्हे. मागील प्रकरणात कथन केल्याप्रमाणे 'सर' हा किताब लाभलेले नारायण चंदावरकर, होमी मोदी, पुरषोत्तमदास ठाकूरदास, चिमणलाल सेटलवाड, इब्राहिम रहिमतुल्ला आणि दिनशा वाच्छा, एफ. ई. दिनशा, ॲनी बेझंट व महंमद अली जिना वगैरे अभिजन नॅशनल लिबरेशन असोसिएशनच्या विद्यमाने चळवळीस विरोध करीत. त्यांना हिंद सेवक समाजाचे काही पुढारी, अनाकलनीय कारणांसाठी, साथ देत. विशेष म्हणजे व्यापारी वर्गाचा चळवळीत सक्रिय सहभाग होता, तर बहुतांश उद्योगपती, बडे जमीनदार व घरमालक चळवळीच्या विरोधात होते. मुंबई महानगरपालिका कायद्यात १९२२ साली सुधारणा होण्यापूर्वी महानगरपालिकेवर जमीनदार व घरमालक आणि उद्योगपतींचे प्रभुत्व होते. म्हणून मुंबई प्रांतिक

काँग्रेस समितीला (बीपीसीसी) महानगरपालिकेचा एकमुखी पाठिंबा मिळणे असंभव होते. बड्या जमीनदार-घरमालकांमध्ये समावेश असलेले सर इब्राहिम रहिमतुल्ला मुंबईच्या मंत्रिमंडळात असल्यामुळे ते चळवळीच्या विरोधात असणे स्वाभाविक होते. मात्र गृहनिर्माण योजनेबाबत त्यांचा गव्हर्नर जॉर्ज लॉयड यांच्याशी संघर्ष झाला. अशा परिस्थितीत मुंबई महानगरपालिकेत राजकीय ध्रुवीकरण झाले. आणि या प्रक्रियेतून राष्ट्रवादी चळवळीला अनुकूल परिस्थिती प्राप्त झाली. पालिकेच्या सभागृहात काँग्रेसजनांचा प्रवेश झाला. नवीन कायद्याचीही मदत झाली. यातून म्युनिसिपल नॅशनॅलिस्ट पार्टी स्थापन झाली. या पक्षाने काँग्रेसला आपली निष्ठा वाहिली.[९]

जानेवारी १९२३ च्या निवडणुकीत महानगरपालिकेत या पक्षाचे ४७ उमेदवार निवडून आले. त्यांत विठ्ठलभाई पटेल, मिया महंमद छोटानी, डॉ. वेलकर, सरोजिनी नायडू, नरिमन, जमनादास मेहता, व्ही. एल. नापू, एच. पी. ठाकरसी, जिनवाला, अवंतिकाबाई गोखले, जोसेफ बॅप्टिस्टा, उमर सोभानी, डॉ. जी. व्ही. देशमुख, डॉ. साठे, सयाजीराव सिलम, एल. आर. तेरसी, बी. एन. मोतीवाला, खत्री, व्ही. ए. देसाई, पी. जी. सहस्रबुद्धे वगैरेंचा समावेश होता. तरीही सरकार व राजनिष्ठांच्या समर्थनामुळे सर होमी मोदी मुंबईचे मेयर झाले व त्यांनी पटेलांचा पराभव केला. नवीन कायद्याने नागरिकांवर लादलेला कर-भार कोणी कसा उचलावा हा म्युनिसिपल राजकारणातील कळीचा मुद्दा होता. भाडेकरू व घरमालक यांच्यात संघर्ष निर्माण झाला. हे राजकारण फार गुंतागुंतीचे असून इथे त्याचे विवेचन करण्याची गरज नाही. जॉर्ज लॉयड यांच्या सेवानिवृत्तीच्या निमित्ताने आणि सर लेस्ली विल्सन यांचे गव्हर्नर म्हणून स्वागत करण्याच्या निमित्ताने महानगरपालिकेत राष्ट्रवादी पक्ष व राजनिष्ठ अभिजन आणि धनिक यांच्यात बराच संघर्ष झाला. यात राजनिष्ठांचा विजय झाला. मात्र पटेलांच्या राष्ट्रवादी पक्षाने चौपाटी व अनेक ठिकाणी निषेधाच्या सभा गाजविल्या.[१०]

पुढे एप्रिल १९२४ मध्ये विठ्ठलभाई पटेल मुंबईचे मेयर झाले. त्यांच्यापूर्वी फिरोजशहा मेहता, रहिमतुल्ला सयानी, जव्हेरीलाल उमियाशंकर याज्ञिक, भालचंद्र

कृष्ण भाटवडेकर, दिनशा वाच्छा, वसंतराव दाभोळकर वगैरे भूतपूर्व काँग्रेस अध्यक्ष अथवा राष्ट्रवादी विचाराचे पुढारी मुंबईचे मेयर म्हणून मान्यता पावले होते, हे सत्य होय. त्यांनीही मुंबईसाठी व देशासाठीही कार्य केले होते, हेही मान्य. **तथापि सत्याग्रही बाण्याने ब्रिटिशांशी आणि हितसंबंधी समाजघटकांशी लढा करणारे विठ्ठलभाई पटेल हे मुंबईचे पहिलेच मेयर होते!** सरदार पटेलांचे ज्येष्ठ बंधू म्हणूनच नव्हे, तर गांधीजींचे निकटचे सहकारी म्हणूनही त्यांचा स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वाचा सहभाग होता. नरिमन हे मुंबई महानगरपालिका राष्ट्रवादी पक्षाचे पक्षनेते म्हणून निवडून आले होते. मुंबईत व्हाइसरॉय महाशयांचा एक सोहळा झाला (२९ ऑगस्ट १९२४). त्यावर पटेलांनी, मेयर असूनही जाहीर बहिष्कार घातला होता. तेव्हा हे धैर्य असामान्य होते! पुढील सालातही त्यांना मेयरपदी निवडण्यात आले. त्यांच्याच मेयर म्हणून कार्यकालात के. एफ. नरिमन यांनी भयंकर बॅकबे महाघोटाळा (स्कँडल) उघड केला व ब्रिटिश अधिकाऱ्यांचा भ्रष्टाचार कोर्टात आणि चव्हाट्यावर मांडला होता. या गंभीर प्रकरणात लढल्यामुळे त्यांना वीर नरिमन हे गुणनाम लाभले. हेदेखील असहकार आंदोलनातील एक लक्षणीय प्रकरण मानावे लागते. [११]

असहकार चळवळीत बरीच मरगळ निर्माण होऊनही आणि गांधीजींनी चळवळ 'निलंबित' केल्यावरही जमनालालजी, सरोजिनी नायडू, विठ्ठलभाई व वल्लभभाई पटेल हे मुंबई शहरात चळवळीचा कार्यक्रम अमलात आणतच राहिले. त्यांनी स्वराज्य फंडासाठी निधी मिळवला. निधीला मिळालेल्या रकमा व दात्यांची नावे **बाँबे क्रॉनिकल** पत्रकातून प्रकाशित होत. शिवाय खादी व रचनात्मक कार्य आणि अस्पृश्यतानिवारणाची मोहीम त्यांनी चालू ठेवली. गिरगावातील मारवाडी विद्यालय हे चळवळीचे केंद्र होते. चळवळीतील सैनिक आणि शासकीय सेवा गमावलेल्या तरुणांसाठी मुंबईत 'काँग्रेस सेवायोजन केंद्र' उभारण्यात आले होते. यास गांधीजी व पटेलांचे आशीर्वाद असून मथुरादास त्रिकमजी त्याचे सचिव होते. डॉ. साठे, भाई डांगे व एल. जी. खरे यांच्या अधिकाराखाली काँग्रेस पक्षाची कामगार उपसमिती कामकरी वर्गात राष्ट्रवादी प्रबोधन करीत असे व

संप घडवून आणत असे. मात्र गिरणी कामगारांमध्ये काँग्रेसला फार मोठे समर्थन लाभले नाही. पण त्यावर वेगळ्या प्रकरणांमध्ये विवेचन केलेले आहे.

**नागपूरचा झेंडा सत्याग्रह व मुळशीचा सत्याग्रह** हे असहकार चळवळीतून उद्‌भवलेले लढे होते व या चळवळीला फुटलेले धुमारेच होते. त्यांची कार्यपद्धती व तत्त्वे सारखीच होती. त्यांची कारणे स्थानिक होती इतकेच. बीपीसीसी संघटनेने त्यांसाठी कित्येक स्वयंसेवक नागपूरला पाठवले होते. त्यांपैकी कित्येक मुंबईकरांना सक्तमजुरी भोगावी लागली होती. त्यांच्यात सुप्रसिद्ध बिर्ला परिवारातील एक जण सुद्धा होता.[१२] या सत्याग्रहांचेही विवेचन स्वतंत्र प्रकरणात केलेले आहे. मुळशी सत्याग्रहाप्रमाणेच झेंडा सत्याग्रहाचीही खास विशेषतः होती. या सत्याग्रहांनीही शेकडो स्वातंत्र्यसैनिक घडविले.

**स्वयंसेवक चळवळ :—**भारतभर प्रसार पावलेली स्वयंसेवक चळवळ व सेवादलांची साखळी निर्माण झाल्यामुळे त्या काळात पुढच्या काळातील स्वातंत्र्यलढ्यासाठी प्रचंड मनुष्यबळ तयार झाले. नागपूर काँग्रेसच्या आवाहनानंतर राष्ट्रकार्यासाठी सेवा समित्या संघटित केलेल्या होत्या. हिंदुस्तान सरकारच्या अनुदार अंदाजानुसारही ऑगस्ट १९२१ मध्ये १५,१८६ सभासद असलेले ३४५ स्वयंसेवक दल होते. त्यांव्यतिरिक्त १५,२६९ सभासद असलेल्या ४०४ सेवा समित्या कार्यरत होत्या. त्यांपैकी जवळपास निम्म्या सेवा समित्या मुंबई व बंगाल इलाख्यांमध्ये होत्या. असहकाराचा जोर वाढविण्यासाठी त्यांनी चांगले काम केले होते. म्हणूनही बंगाल सरकार व मुंबईचा पोलीस आयुक्त संत्रस्त झाला होता. दुसऱ्या अहवालानुसार मुंबई इलाख्यात प्रत्येकी दहा ते शंभर स्वयंसेवक असलेली १२५ पथके सत्याग्रहात होती. त्यांची एकूण सभासद संख्या ८०,००० होती. मुंबई व कोलकाता शहरांमध्ये जेव्हा ब्रिटिश युवराजांचे आगमन झाले, तेव्हा या शहरांवरील सरकारचे नियंत्रण तात्पुरते तरी सुटून अराजकासारखी स्थिती उद्‌भवली होती. त्यात स्वयंसेवकांचा सहभाग असल्याची अधिकाऱ्यांची तक्रार होती.

गांधीजींनी नशाबंदीची मोहीम प्रज्वलित केली आणि हजारो हिंदू व मुसलमानांना या व्यसनापासून परावृत्त केले होते. मध्यप्रांत-वऱ्हाडमध्ये ही मोहीम इतकी रुजली की, त्यामुळे अनेक शहरांमध्ये दारूच्या दुकानांचे परवाने घेण्यास दुकानदार तयार नव्हते. मद्रासमध्येही याचा सरकारला फटका बसला. म्हणून तेथील गव्हर्नरने दिल्लीस कळवले, "अवर पोझिशन इज रिअली डेस्परेट." मागास समजल्या गेलेल्या आंध्रमधील गुंटूरच्या शेतकऱ्यांनी १९२२ साली शेतसारा बंदीची मोहीम यशस्वी केली होती. असहकार चळवळीमुळे प्रबोधन झालेल्या बार्डोली व आणंद तालुक्यांमधील तीन-चार हजार शेतकऱ्यांनी काँग्रेस कार्यकारिणीकडे अर्ज पाठवून शेतसारा बंदीच्या चळवळीस परवानगी मागितली होती. गांधीजींना तशी परवानगी द्यावीच लागली. शेतकऱ्यांना अंशतः यश लाभले, हे विशेष. तेथे अशी भूमिका तयार असल्यामुळे १९२८ मध्येही बार्डोलीत यशस्वी सत्याग्रह झाला.[१३]

असहकार चळवळीचे साकल्याने व समतोल मूल्यमापन करताना मान्य करावे लागते की, चळवळीचे यश नेत्रदीपक नसले, तरी तिची फलनिष्पत्ती महत्त्वाची होती. चळवळीला अपेक्षित यश न मिळण्यास अनेक कारणे होती. लोकमान्यांचे अनेक अनुयायी कुंपणावर बसून होते. त्यांचा स्थायिभाव असाच होता की, त्यांनी नागपूर काँग्रेसमध्ये धरलेली सत्ताप्राप्तीची अभिलाषा या चळवळीतून सफल न झाल्यामुळे त्यांचा रस संपला. त्यांना सत्याग्रह म्हणजे प्रतिपक्षाला नमविण्याचा एक राजकीय डावपेच वाटत नव्हता. सत्याग्रह म्हणजे पॅसिव रेझिस्टंस असा त्यांचा अपसमज होता. टिळकांचे तथाकथित जहालमतवादी सहकारी असलेले बिपिनचंद्र पाल यांनी मार्च १९२१ मध्ये नागपुरात महात्मा गांधींशी युती व सलोखा केला होता. शिवाय बंगाल प्रांतिक परिषदेचे ते अध्यक्ष होते. तथापि लवकरच बिपिनचंद्र चळवळीतून फुटून बाहेर पडले. त्यांनी गांधीजींविरुद्ध बंड पुकारले आणि जाहीर केले की, खरीखुरी राजसत्ता हस्तगत करण्यासाठी ब्रिटिश सरकारबरोबर सलोखा व तडजोड करणे हेच हितावह होईल. मात्र देशाचे भाग्य की, तेव्हा बिपिन बाबू हे एकाकी व प्रवाहाबाहेर पडलेले एक बंडखोर ठरले.

मात्र याउलट चित्तरंजन दास बंगालमध्ये सुयोग्य अशी चळवळ लढवत राहिले. त्यांनी सुभाष बाबूंना घडविले. मुसलमानांना बरोबर घेऊन त्यांनी चळवळ चालवली.

असहकारिता हा जहाल संघर्षाचा पर्यायी मार्ग होता. १९१९-१९२० मध्ये हिंदुस्तान देश राजकीय व्यूहामध्ये सापडला होता. त्यातून सुटका करण्याचा हा मार्ग होता. पारंपरिक राजकारणाच्या मर्यादा उल्लंघून देशाचे विमोचन करण्याची ही नवीन कार्यप्रणाली व रीती होती. म्हणून राजकीय स्वराज्यासाठी गांधीजींनी स्वदेशी, हिंदू-मुसलमान ऐक्यभाव, पूर्णवेळ स्वातंत्र्यसैनिक व पुढाऱ्यांचा राष्ट्रव्यापी संवर्ग उभारणे आणि नेते घडविणे तसेच राष्ट्रभाषा हिंदी, भाषावार प्रांतरचना असा कार्यक्रम घोषित केला. राजकीय कार्य म्हणजे फुरसतीच्या वेळचे काम नसून निष्ठापूर्वक बांधीलकी होय, असे त्यांनी कार्यकर्त्यांच्या मनावर बिंबवले. तथापि अनेक नेते या कार्यक्रमाचे अनुपालन व अनुयोजन करण्यात कमी पडले.

मात्र हे मान्य करायला हवे की, खिलाफत प्रकरणी हिंदू समाजाचा पाठिंबा मिळविण्यासाठी गांधीजींचा उपयोग होईपर्यंत खिलाफतवाद्यांनी त्यांच्या सत्याग्रहाचा आदर्श अमलात आणला. एक राजकीय डावपेच म्हणून त्यांनी सत्याग्रह व अहिंसा मार्गाचा स्वीकार केला होता. तथापि या मार्गाशी ते बांधील राहिले नाहीत. खुद्द हिंदू समाजातील ब्राह्मणेतर पक्ष, जातीयवादी गट, मद्रासमधील जस्टिस पार्टी, संस्थानिक, उद्योगपती वगैरेंनी चळवळीला विरोध केला. जातीयवाद हा चळवळीचा शत्रू होता.

चौरी चौरा घटनेनंतर गांधीजींनी जवाहरलाल नेहरूंना लिहिलेल्या १९ फेब्रुवारी १९२२ च्या पत्रात म्हटले, "सकल भारतात अहिंसेचे आचारविचार सुगंधी गुलाबाच्या अत्तराप्रमाणे पसरले हे निःसंशय सत्य होय. तथापि हिंसाचाराची विषारी दुर्गंधी अजूनही तीव्र आहेच. आणि तिच्याकडे दुर्लक्ष करणे अथवा तिला कमी लेखणे शहाणपणाचे ठरणार नाही. म्हणून आपण पत्करलेल्या समयोचित माघारीने आपल्या कार्याची प्रगती होईलच. नकळतपणे चळवळ सुयोग्य मार्गापासून ढळलेली होती. आता आपले जहाज नांगर टाकून सुरक्षित आहे."[१४]

## असहकार चळवळीला प्रतिसाद

असहकार चळवळ सुरू झाली तेव्हाच सर तेजबहादूर सप्रू ब्रिटिशांचे कायदा मंत्री झाले. तर काँग्रेसच्या पित्यांपैकी एक असलेले सुरेंद्रनाथ बॅनर्जी बंगालमध्ये मंत्रिपद उपभोगू लागले. गांधीजी, नेहरू पितापुत्र, पटेल, राजेंद्र प्रसाद, दास बाबू यांनी नेतृत्व केलेली चळवळ मात्र निलंबित केल्यावरही जिवंत राहिली. तिने देशाला साऱ्या विश्वात मानाचे स्थान प्राप्त करून दिले. जवाहरलाल नेहरूंनी म्हटले होते की, 'गांधीजींनी स्वातंत्र्य चळवळीस नवीन आकार दिला व नवीन आशय प्राप्त करून दिला. गांधीजींनी काँग्रेसचे पूर्वीचे अभिजनवादी स्वरूप बदलून तिच्यात मध्यम वर्ग, शेतकरी व कामकरी आणि वंचितांनाही स्थान मिळवून दिले. तसेच काँग्रेसचे डिबेटिंग क्लबासारखे स्वरूप बदलून तिला कार्यप्रवण करण्याचाही प्रयत्न केला'.

## असहकार चळवळीनंतर

असहकार लढा प्रायः राष्ट्रव्यापी असा पहिला लढा होता. असहकार चळवळीमुळे स्वराज्य मिळाले नाही हे खरे. ' एका वर्षात स्वराज ' ही घोषणा केवळ प्रतीकात्मक ठरली हेही सत्य. तथापि ही घोषणा करणाऱ्या महात्म्याने विहित केलेले नियम, आत्मनियमन व निकष हा खंडप्राय देश अधिक काळ पाळू शकला नाही. शिवाय घोषणा फलद्रूप करण्यासाठी जुन्या प्रस्थापित काँग्रेस नेत्यांमध्ये ठाम निर्धार नव्हता, मतैक्य नव्हते. तसेच समर्पण भावनाही नव्हती. प्रस्थापित नेते पहिले सात महिने स्वतःबाबत अथवा आपल्या भूमिकेबद्दल ठाम नव्हते. त्यांच्या अनिर्धारित भूमिकेमुळे कित्येक जण ठोस काम करू शकले नाहीत. प्रादेशिक व स्थानिक नेतृत्व आपल्या प्रयत्नांत कमी पडले. मुंबई व्यतिरिक्तच्या महाराष्ट्राप्रमाणेच कर्नाटक, केरळ, राजस्थान, पंजाबचा काही भाग आणि संस्थानिकांनी व्यापलेला एकपंचमांश हिंदुस्तान अपेक्षेपेक्षा बराच कमी पडला. व्यवस्थापरायण हितसंबंधीय लोक व राजनिष्ठ मंडळी, वाचाळवीर आणि आमदार-खासदार पदांसाठी आतुर असलेले पुढारी देशात कमी नव्हते. तेजबहादूर सप्रू व बॅनर्जी यासारखे लालसी लोक मंत्रिपदे उपभोगू लागले होते. जन. डायरला 'ऑनररी शीख' करून घेणारेही शीख होते. शिवाय हिंसाचार हा आम चळवळीचा प्रबळ शत्रू होताच. त्याचे प्राबल्य कमी झाले नव्हते.

तरीदेखील सामर्थ्यवान ब्रिटिशांना या चळवळीने जबरदस्त हादरा दिला, हे मान्य करावेच लागते. व्हाइसरॉय लॉर्ड रीडिंग यांना भारतमंत्री मॉंटेग्यू यांस आपली कबुली कळवावी लागली, "असहकार चळवळीविरुद्ध कारवाई करणे चुकीचे ठरेल." मद्रासचा मुत्सद्दी गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन साहेबालाही कबूल करावे लागले, "Our position is really desperate." नशाबंदीमुळे त्या प्रांताचा उत्पादनशुल्क महसूल ६५ लाख रुपयांनी घसरला होता. गया, मोंघीर, कोलकाता, पाटना वगैरे ठिकाणी मद्यपींवर सामाजिक बहिष्कार घालण्यात आला. मद्यपींच्या मुलामुलींची लग्ने जमवणे अवघड झाले होते. काही मद्यपी माणसांच्या पत्नींचे बाळंतपण करण्यास काही सुईणींनी, आश्वासन मिळेपर्यंत, नकार दिला होता. विदेशी कापडाची आयात घटून स्वदेशी व हातमागावरील कापडास बरीच मागणी वाढली. जवाहरलालजींनी आत्मकथेत नोंदविल्याप्रमाणे खादीचा प्रसार वाढून खादी ही ' लायव्हरी ऑफ फ्रीडम ' बनली. शेतसारा बंदीमुळे सरकारचा महसूल घटला. चळवळीची ही फलनिष्पत्ती स्पृहणीय अशीच होती.[१५]

छोडो भारतप्रमाणे असहकार लढा मोनोलिथिक राजकीय लढा होऊ शकला नाही, हे खरे. तथापि यामुळे राष्ट्रीय चळवळीस दिशा मिळाली व ताकद वाढली. राष्ट्रीय बांधीलकी असलेला युवकांचा संवर्ग निर्माण होण्यास प्रारंभ झाला. बंगालमधील माजी क्रांतिकारक व जहाल युवकांना पूर्णा दास यांनी पुन्हा संघटित केले. पंजाबमध्येही याचे अनुकरण झाले. बंगाली युगांतर व अनुशीलन संघटना पुन्हा कार्यरत झाल्या. चित्तरंजन दास यांनी अनेक क्रांतिकारकांना तुरुंगांमधून सोडवले.

गांधीजींच्या असहकार आंदोलनामुळे महाराष्ट्रास एक वेगळेच फळ लाभले ते असे. असहकार चळवळीमुळे ब्रिटिश सत्ताधीश फारच अस्वस्थ झाले होते. अशा परिस्थितीत इंग्रजांना गांधींपासून जास्त धोका वाटत होता. खुद्द महात्मा गांधींनी २६ मे १९२० रोजीच्या **यंग इंडिया** पत्रकात लेख लिहून ' सावरकर बंधूंची सरकारने त्वरित सुटका करावी ', असे आग्रहाने प्रतिपादन केले होते. त्यामुळे मार्च १९२१ पासून वि. दा. सावरकर आणि ग. दा. सावरकरांच्या

सुटकेबाबत केंद्र सरकार सहानुभूतीने विचार करण्यास राजी झालेले होते. मार्च महिन्यातच केंद्रीय कायदेमंडळाच्या वरिष्ठ सभागृहात 'सावरकर बंधूंनाही बादशहाने माफी देऊन मुक्त करावे', असा ठराव रंगास्वामी अय्यंगार यांनी मांडला होता. त्यावर उत्तर देताना गृहमंत्र्यांनी आपण याबाबत मुंबई शासनाशी सल्लामसलत करून निर्णय घेऊ, असे निवेदन केले. मात्र मुंबई शासन या प्रस्तावाच्या विरोधावर ठाम होते. म्हणून मुंबई सरकारच्या मताविरुद्ध जाऊन हिंदुस्तान सरकारने दोघा सावरकर भावांना अंदमानातून मुक्त करून हिंदुस्तानातील तुरुंगात आणण्याचा निर्णय अमलात आणला. अखेर सप्टेंबर १९२२ मध्ये गणेशरावांची बिनशर्त सुटका करण्यात आली आणि विनायकरावांच्या सुटकेची प्रक्रिया मुंबई सरकारला सुरू करावी लागली. काकीनाडा काँग्रेस अधिवेशनातही (१९२३) काँग्रेसने तसा ठराव मंजूर केला.[१६] याविषयी याच प्रकरणात स्वतंत्र विवेचन करण्यात येईल.

असहकार चळवळीच्या यशाविषयी लिहिताना एस. ए. डांगे यांनी प्रतिपादन केले, "The British Government in India is morally extinct; now only the military Government is existing by which we are coerced into submission to it".[१७] या प्रतिपादनातील अतिशयोक्ती वगळली, तरी त्यात तथ्य आहे.

सकृतदर्शनी मार्च १९२२ पासून एकूण चळवळीचा अपकर्ष सुरू झाला होता. गांधीजींना राजद्रोहाच्या आरोपाखाली शिक्षा झाली, हे खरे. तथापि शिक्षा फर्माविण्याआधी सत्र न्यायाधीश आर. एस. ब्रूमफिल्ड यांनी वाकून व सद्‌गदित होऊन महात्म्याला अगदी विनम्रपणे नमस्कार केला होता. कोर्टातच त्यांचे गुणगान केले! गांधीजी व शंकरलाल बँकर यांनी आरोप मान्य केल्यामुळे अवघ्या १०० मिनिटांत खटल्याचा निकाल लागला. असे पूर्वी कधीच घडले नव्हते. याचे श्रेय गांधीजींच्या तत्त्वनिष्ठेला व प्रांजळपणालाच होते.

गांधीजींनी असहकार चळवळ निलंबित करण्यामागे चौरी चौराची दुर्दैवी घटना हे एकच कारण नव्हते. देशात तसा अपसमज झाला होता. वस्तुस्थिती अशी

होती की, हिंदू-मुसलमान यांची युती व सलोखा भंग पावण्याची पूर्वलक्षणे दिसतच होती. गांधीजी व अली बंधू यांचे मनोमीलन भंगले होते. महाराष्ट्रात व मुंबईत काही ठिकाणी पण उत्तरेत व दक्षिणेत अनेक ठिकाणी या धर्मीयांमध्ये दंगे झाले होते. मलबारमधील हिंसाचाराचा इतिहास वरील प्रकरणात दिलेलाच आहे. तद्वतच शोषक वृत्तीचे जमीनदार आणि सावकार यांच्यावर किसानांनी हल्ले केले होते. काँग्रेसचे बळ लाभलेले किसान न्यायासाठी उद्रेक करू लागले. औद्योगिक कामगार संप वा उद्रेक पेटवित होते. महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर पक्ष व तामिळनाडूतील जस्टिस पार्टी सरकारशी सलोखा ठेवून वागत. स्वराज्यवादी जनतेला त्यांचा राग वाटत होता. त्याचे पडसाद रस्त्यावरही पडत असत. टिळकपक्षीय नेते आगामी निवडणूक लढवून कायदेमंडळात जाण्यास अधीर झालेले होते. आम जनतेचे नीतिधैर्य फार काळ टिकून राहण्याची शक्यता दिसत नव्हती. युद्धकालीन आर्थिक हलाखी १९२२ पावेतो चालू राहिली. सामाजिक सलोखा आणि सामंजस्याच्या ज्या अधिष्ठानावर गांधीजींनी चळवळ उभारली होती, ते ढासळण्याची लक्षणे दिसत होती.

अशा परिस्थितीत गांधीजींनी जनमानसाची परीक्षा करून जनतेच्या सहजप्रवृत्तींचा कौल घेतला. त्यानुसार त्यांनी आपल्या भांबावलेल्या व चिडलेल्या सहकाऱ्यांच्या समजुतीखातर 'बुद्धिजन्य' असे समर्थन करणारे कारण पुढे केले. **त्यांच्या स्वतःच्याच तर्कशास्त्रानुसार चौरी चौराचा हिंसाचार हे चळवळ निलंबित करण्याचे केवळ निमित्त होते.** चळवळीचा बाह्य देखावा कसाही असला, तरी चळवळीचा पाया आतून कमकुवत होत चालला होता. जनाधार असलेले चांगले कार्यकर्ते कारावासात अडकलेले असल्यामुळे संघटनेची ताकद घटत चालली होती. काही कार्यकर्ते बेशिस्त क्षमापित करत होते. म्हणून अंतिम ध्येयास बाधा येऊ नये यासाठी गांधीजींनी 'अल्पकालिक पीछेहाट' पत्करली.

अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या (इतःपर अ. भा. काँ. स.) अहवालानुसार चळवळीत कायदेमंडळावरील बहिष्कार यशस्वी झाला, असे दिसते. तथापि सरकार-प्रमाणित शाळा-कॉलेजांवर दीर्घकाळ बहिष्कार टाकण्याच्या कार्यक्रमाला

पुरेसा प्रतिसाद लाभला नव्हता. त्या शिक्षणसंस्थांमधून बाहेर पडलेले बरेच विद्यार्थी परत गेले. काही राष्ट्रीय शाळा बंदही पडल्या होत्या. वकिलांनी व पक्षकारांनी न्यायालयांवर प्रारंभी बहिष्कार घातला खरा. तथापि वर्षभरात चळवळीचे हे आयुध निष्प्रभ झाले. इतके मात्र निर्विवाद की, मानद किताबांचा त्याग आणि विदेशी कापडावरील बहिष्कार यशस्वी झाला. सामुदायिक सविनय कायदेभंगाच्या दृष्टीने देशात पुरेशी योजना व पूर्वतयारी झालेली नव्हती. स्थानिक काँग्रेस संघटनांची बांधणी झालेली नव्हती. काँग्रेसच्या चौकशी समितीच्या अहवालात याची कबुली नमूद आहे. याचा साकल्याने विचार करूनच गांधीजींनी चळवळ निलंबित केली होती.

आंदोलन निलंबित करताना गांधीजींना प्रस्थापित नेत्यांचा व नवोदितांचाही रोष पत्करावा लागला. परंतु गांधीजींचे तर्कशास्त्र होते की, सरकारची वाढती दडपशाही, चळवळीची होऊ पाहणारी वाताहत व जनतेच्या नीतिधैर्यावर होणारा अनुचित परिणाम टाळण्यासाठी चळवळ निलंबित करणेच श्रेयस्कर होय! शिवाय टिळकांच्या प्रतियोगी सहकारिता या संकल्पनेनुसार न. चिं. केळकर, ल. ब. भोपटकर वगैरे कायदेमंडळांमध्ये प्रवेश करण्यास आतुर झालेले होते. याउलट शंकरराव देव, विनायक भुस्कुटे, शि. म. परांजपे, कृ. प्र. खाडिलकर, त्र्यं. र. देवगिरीकर, नरहर वि. गाडगीळ, बाळूकाका कानिटकर, त्र्यं. ब. हरोलीकर हे काँग्रेसजन असहयोगाच्या नीतीशी एकनिष्ठ राहिले. आपल्या **स्वराज्य** नामक पत्रकातून देव, हरोलीकर व भुस्कुटे हे कायदेमंडळात जाण्यास उत्सुक असलेल्या केळकर, भोपटकर, जयकर, मुंजे, माधव श्रीहरी अणे, मोतीराम वेलकर व शंकर श्रीकृष्ण देव यांच्यावर कडक टीका करीत. नोव्हेंबर १९२३ च्या निवडणुकीत केळकर व पुण्याचेच डॉ. कृष्णाजी लोहोकरे मध्यवर्ती कायदेमंडळात निवडून गेले. निष्ठावंत काँग्रेसजनांना ही अधिकाराची लालसा नापसंत होती.

वस्तुतः टिळकांच्या प्रतियोगी सहकारितेच्या संकल्पनेनंतर भारताच्या राजकीय क्षितिजावर बरेच परिवर्तन झालेले होते. महात्मा गांधी रंगमंचावर आल्यानंतर संपूर्ण राजकीय रंगदृश्य बदलले होते. तरी या मराठी भाषिक राज्यात सुंदोपसुंदी

चालू राहिली. असहकारवादी गट व केळकर गट यांच्यात बरीच खडाजंगी झाली. त्यामुळे स्वातंत्र्य चळवळीची कोंडी झाली. दरम्यान तळेगाव दाभाडे, सोलापूर वगैरे ठिकाणी जातीय दंगली झाल्या. या दंगलींमागे सरकारची ' डिव्हाइड अँड रूल ' ही कपटनीती असल्याचे देवांनी **स्वराज्य** पत्रकात दाखवून दिले. या पत्रकातील एका लेखाचे निमित्त साधून सरकारने शंकरराव व त्र्यं. ब. हरोलीकर यांच्यावर राजद्रोह व बादशहांच्या वधासाठी चिथावणी दिली, असा गंभीर आरोप ठेवला. तथापि देवांनी कोणीही वकील न लावता स्वतःचे निवेदन गांधीवादी बाण्याने न्यायाधीशांना वाचून दाखविले. त्यांनी स्वतःच्या बचावाचा प्रयत्नही केला नाही. देव व हरोलीकरांचा पवित्रा पाहून न्यायाधीशही सद्‌गदित झाले होते. मात्र कायद्याचे बंधन म्हणून सत्र न्यायालयाने दोघांना दोन वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली. आणि दोघे स्वखुशीने तुरुंगात गेले. या दोघा सत्याग्रहींची प्रशंसा करण्यासाठी गांधीजींनी **यंग इंडिया**मध्ये खास लेख लिहिला. शंकरराव देव व हरोलीकर आणि न. चिं. केळकरांच्या गटात असा फरक होता.[१८]

**ब्रिटिशांचे मनोगत :—**आधुनिक भारताच्या इतिहासात १९२० चे नागपूरचे काँग्रेस अधिवेशन हे एक नवे पर्व ठरले. आर्जव व विनंत्या आणि असहाय राग व उद्रेकाची जागा नवीन जबाबदारीची भावना व आत्मनिर्भरतेच्या स्पिरिटने घेतली. स्वराज्य मिळवायचे असेल तर आपणच साम्राज्यशाहीला जबर धडक दिली पाहिजे, हा गांधीजींचा निर्धार तेव्हापासून प्रकट व्हायला लागला. हा निर्धार व वस्तुस्थितीची जाणीव झाल्यामुळे ब्रिटिश कॅबिनेटने नवीन कायदेमंडळांचे विधिवत उद्‌घाटन करण्यासाठी ब्रिटिश युवराजांना भारतात पाठविले होते. युवराजांची ही भारत भेट हा मुत्सद्देगिरीचा भाग होता. हे ओळखूनच काँग्रेसने या भेटीचा सार्वत्रिक निषेध करण्याचा निर्धार केला होता. हिंदुस्तानातील सरकार ज्या कारणांमुळे युवराजांच्या भेटीला अतिरिक्त महत्त्व देत होते, त्याच कारणांस्तव राष्ट्रवादी भारतदेखील युवराजांच्या आगमनाचा निषेध करत होता. बादशहाचा दिखाऊ व गोंडस संदेश युवराजांनी आणला होता. त्यामागील सत्य, पोकळपणा व फसवेगिरी उघड होती. म्हणूनच त्याविरुद्ध लढा उभारला होता.

ब्रिटिश सरकारची प्रतिष्ठा व विश्वसनीयता टिकवणे हा इंग्रजांचा हेतू असल्याचे ओळखून, काँग्रेसने लढा उभारला होता!

एप्रिल १९२१ मध्ये व्हाइसरॉय पदावर आल्यापासून लॉर्ड रीडिंग हे महात्मा गांधींचा प्रांजळपणा व त्यांना लाभलेला पाठिंबा पाहून आश्चर्यचकित झालेले होते. त्यांनी भारतमंत्र्यांना कळविले, "इट वूड बी अन्वाईज ऑन माय पार्ट टू टेक ॲक्शन अगेंस्ट नॉन-कोऑपरेशन मुव्हमेंट ॲज सच!" त्यांनी काही वेळा कबूलही केले, " आय ॲम पझल्ड् ॲंड परप्लेक्सड् "! याउलट असहकार चळवळ दडपून टाकण्याच्या कामी लॉर्ड रीडिंग डळमळीत धोरण पत्करत आहेत हे पाहून, लंडनमधील त्यांचे वरिष्ठ व टीकाकार त्यांना दूषणे देत होते. पंतप्रधान लॉर्ड लॉयड जॉर्ज आपल्या सहकाऱ्यांना आश्वासन देत होते, "A challenge to our position and rule in India would be taken up by the whole country with a strength and resolution that would amaze the world".[१९]

इंग्रजांना १९२३ पर्यंत हिंदुस्तानातील राजकीय जागृतीची पूर्ण कल्पना आलेली होती. म्हणूनच ऑक्टोबर १९२४ मध्ये डांगे, जोगळेकर वगैरे कम्युनिस्टांना अटक करून मीरतमध्ये बंदिस्त केले. त्यांच्या अपराधामुळे नव्हे! या देशात किसान वर्ग खूप जागृत झालेला होता. याचा प्रत्यय त्यांना गुजरात व संयुक्त प्रांतात आलेला होता. म्हणून संभाव्य उद्रेक दडपण्याचा इंग्रज निर्धाराने प्रयत्न करीत होते. भारतमंत्री लॉर्ड बर्कनहेड १९२७ मध्ये ऑक्सफर्डच्या विद्यार्थ्यांना सांगत होते, "India is our prize possession. We in England have to live on it; the Indians may live in it... It is the task for you, the younger generation, to hold India to the last drop of your blood."[२०]

संयुक्त प्रांतातील किसान कुळे जमीनदार व महसूल प्रशासनाशी जबर लढा देत होते. त्यांना पोलिसांचा धाक उरला नव्हता. त्यांची संघटना जबरदस्त असून ते केव्हाही उठाव करतील अशी अधिकाऱ्यांना भीती वाटत होती. ते गोऱ्या

अधिकाऱ्यांचा उघडपणे तिरस्कार करीत. ताजुद्दिनपूर गावाने समांतर शासन यंत्रणा उभारली. संपूर्ण १९२१ सालात अवध प्रांतातील अनेक जिल्ह्यांमध्ये किसान आंदोलनाचा मधून मधून विस्फोट झाला. अधिकाऱ्यांना त्यांच्या आंदोलनात बोल्शेविक आंदोलनाची झलक असल्याचे दिसत होते. बोल्शेविक आचारविचार पसरत आहेत, असे त्यांना वाटे. शेतकऱ्यांनी गोळीबाराचीही तमा बाळगली नव्हती. ब्रिटिश राज संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे असा उघडपणे प्रचार चालू होता. रायबरेली जिल्ह्यातील उद्रेकाची पाहणी करून तोडगा काढण्यासाठी गांधीजींनी नेहरूंना पाठविले होते. मात्र तिकडे पोलिसांनी तारतम्यहीन गोळीबार केल्यामुळे शेतकरी वर्ग कायमचा सरकारच्या विरुद्ध गेलेला होता. इथपर्यंत स्वतंत्रपणे संघर्ष करणारी किसानसभा व तिची चळवळ पूर्णपणे असहकार आंदोलनात शक्तिनिशी उतरली होती.[२१]

याकारणाने सरकार बुचकळ्यात पडले. या उद्रेकामागे मोठा कट असल्याचा अधिकाऱ्यांना संशय आला. म्हणून इतःपर चळवळ गांधीजी व नेहरू पितापुत्रांच्याच नेतृत्वाखाली राहावी असे सरकारला वाटू लागले. कारण उपरोक्त बाबा रामचंद्र शेतकऱ्यांना आदेश देत होते की, त्यांनी सरकारी शेतसारा भरू नये व खंडही देऊ नये. मात्र नेहरूंनी खंडकरी व जमीनदारांमध्ये सलोखा निर्माण करून या दोन्ही वर्गांना फक्त सरकारविरुद्धच लढा करण्याचा सल्ला दिला. जवाहरलाल यांनी गांधीजी व बर्ट्रांड रसेल यांचा स्वीकार केला होता. त्यांनी उभारलेली प्रशिक्षित स्वयंसेवक पथके लखनौ, अलाहाबाद, कानपूर व काही मोठ्या शहरांमध्ये गेल्यावर विदेशी माल व मद्यविक्री करणारी सर्व दुकाने बंद पडली. लॉर्ड रीडिंग यांनी लॉर्ड मॉंटेग्यूंना लिहिलेल्या पत्रात कबुलीच दिली, "The non-cooperators put forward the full strength of an undoubtedly powerful organization... They have at places managed to prevent the visit of the Prince of Wales, it being their unqualified and triumphant success..."[२२]

चळवळ अधिक तीव्र करण्यासाठी संयुक्त प्रांत काँग्रेस समितीने काही तालुक्यांमध्ये ' सविनय कायदेभंग ' करण्याची घोषणा केली. त्याप्रमाणे सर्व जिल्हा काँग्रेस समित्यांना आदेश दिले. म्हणून नेहरू पिता-पुत्रांना डिसेंबर १९२१ मध्ये अटक करण्यात आली. अलाहाबाद विभागात पोलिसांची जागा गणवेषधारी काँग्रेसजनांनी घेतली होती. गांधीजींनी चळवळ निलंबित केल्यावरही ती निधन पावली नाही. ती मरणारही नव्हती. दरम्यान झाले ते मध्यंतर!

## बॅकबे स्कँडल

बॅकबे स्कँडल हा केवळ लोकापवाद अथवा लोकप्रवाद नव्हता. ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या लाजिरवाण्या भ्रष्टाचाराचे हे मोठे प्रकरण होते. भारतीयांना संताप आणणारे व ब्रिटिशांनाही सुन्न करणारे हे प्रकरण होते. मुंबईच्या विकासासाठी एकोणिसाव्या शतकापासून रेक्लमेशन म्हणजे समुद्रात भर टाकून भूमिसंपादन करण्याच्या योजना कार्यान्वित झालेल्या होत्या. त्यांचा इतिहास **आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास : पहिल्या खंडात** दिलेला आहेच. हे बॅकबे प्रकरण १९२० पासूनच्या रेक्लमेशनशी संबंधित आहे.

भारतमंत्री लॉर्ड मॉँटेग्यू यांचे स्नेही असलेले सर जॉर्ज लॉयड हे मेहनती गृहस्थ १९१८ मध्ये मुंबईच्या गव्हर्नरपदी आरूढ झाले. त्याच सुमारास मुंबईच्या विकासाबाबत धनिक, घरमालक, उद्योगपती व महानगरपालिका यांच्यात प्रचंड वादंग पसरले होते. इतरही हितसंबंधीय गट आपली मते मांडत होते. अशा वातावरणातही मध्यवर्ती सरकारमधील सनदी नोकरशाही संवेदनाशून्य झालेली होती. महानगरपालिकेच्या सिटी इंप्रुव्हमेंट ट्रस्टचे काम संतोषकारक नसल्यामुळे वातावरण संतप्त झालेले होते. प्लेग, कॉलरा व रोगराईमुळे नागरिक संत्रस्त झालेले होते. या पार्श्वभूमीवर जॉर्ज लॉयड यांनी मित्रवर्य मॉँटेग्यू यांना पत्र पाठवून कळविले की, ' गृहनिर्माण व कार्यालयांसाठी जागेच्या अभावामुळे मुंबईत राजकीय असंतोष पसरला असून काँग्रेस त्याचा फायदा घेते. येथील परिस्थिती अत्यंत तणावग्रस्त असल्यामुळे मुंबईची वाढ उत्तरेकडे करणे आणि बॅकबे रेक्लमेशन करणे हे दोनच पर्याय आहेत.' त्यानुसार गव्हर्नरने बृहत्योजना आखली

आणि महानगरपालिकेच्या उपरोक्त ट्रस्टवर विसंबून न राहता विकास कामासाठी सरकारच्याच अधिकारक्षेत्रात नवीन खाते तयार केले. त्यानुसार १९२० साली बॉंबे डेव्हलपमेंट डिपार्टमेंट म्हणजेच बी.डी.डी. निर्माण केले. त्यावर सनदी नोकरशहा नेमून निधीच्या तरतुदीसाठी ‘ By Bombay for Bombay ’ नामक कर्ज उभारले आणि शहरात येणाऱ्या कापसावर खास जकात कर लादला.

लॉयड यांनी मोठे व्यापारी, उद्योगपती व महानगरपालिकेला बाजूला सारून सरकारने अधिकारसूत्रे घेतल्यामुळे महानगरातील राजकारणात मोठी गुंतागुंत निर्माण झाली. हितसंबंधीयांचे गट निर्माण झाले. या बी.डी.डी. विभागाने वरळी, शिवडी व मध्य मुंबईत कित्येक चाळी बांधल्या. कामगारांसाठी आणि पोलिसांसाठी शेकडो गाळे बांधले. त्यांना बी.डी.डी. चाळी म्हणतात. मुंबईच्या पश्चिम किनाऱ्यावरही रेक्लमेशन केले. महर्षी कर्वे रोडच्या पश्चिमेकडील भूभागाचा त्यात समावेश होता. बांधलेल्या चाळी व इमारतींचा प्रश्न नव्हता. समकालीन वर्तमानपत्रांवरून दिसते की, महानगर पालिकाच नव्हे तर संपूर्ण शहराचा रोष पत्करून मुंबई सरकारने अधिकाराचा अधिक्षेप केला, मर्यादाभंग केला. त्या काळात युद्धोत्तर मंदी आलेली होती, आणि कर्जाचा बोजवारा उडाला होता. मोठे घरमालक व व्यापारी दुखावलेले होते. मात्र दरम्यानच्या काळात उद्योगपतींनी कायदेमंडळात सरकारला ठाम पाठिंबा दिला होता. तथापि १९२४ साली काँग्रेस व स्वराज्य पक्ष आणि मोठ्या व्यापारी कंपन्यांनी बॅकबे प्रकल्पावर झोड उठविण्यास प्रारंभ केला. एक तर हा प्रकल्प भयंकर खर्चाचा व नागरिकांवरील करांचा बोजा वाढवणारा होता. त्यातील भ्रष्टाचाराच्या तक्रारी वाढत होत्या. पर्यावरणाच्या समस्या दिसत होत्या. समुद्र हटवण्याचे दुष्परिणाम इतरत्र दिसत होते. धनिकांची घरे बांधण्याकरिता आम जनतेच्या पैशावर हे होत आहे असा लोकांना विषाद वाटत होता.

अशा वातावरणात काँग्रेस पक्षाचे पुढारी के. एफ. नरिमन यांनी बॅकबे प्रकल्पाविरुद्ध लढा उभारला आणि धर्मयुद्धाच्या स्पिरिटने तो लढवला. नरिमन यांनी हा लढा महानगरपालिका, कायदेमंडळ, वर्तमानपत्रे व मुंबईच्या मैदानांवर

सभा गाजवून लढवला. दरम्यान सर लेस्ली विल्सन गव्हर्नर पदावर आले होते (१९२३-१९२८). नरिमन यांच्या टीकेमुळे नगरपालिकेने प्रकल्पावर अंकुश ठेवण्यासाठी दक्षता समिती नेमली. टाटा आणि वालचंद हिराचंद यांना कंत्राटे न मिळाल्यामुळे त्यांनी नरिमनला चेतवून पुढे केले, असे आरोप **टाइम्स ऑफ इंडिया** या पत्रकाने दोनदा केले.[२३] वालचंद शेठ यांनी बॅकबे चौकशी समितीपुढे शहरातील सर्वच कंत्राटदारांच्या वतीने सरकारला धारेवर धरले होते (१९२६). गव्हर्नर विल्सनने भारतमंत्री लॉर्ड बर्कनहेडला ८ ऑक्टोबर १९२६ रोजी अहवाल पाठवला की, या प्रकल्पावर टीका करणाऱ्यांमागे असंतुष्ट कंत्राटदार आहेत. तथापि विल्सन साहेबांचा हा अपसमज होता.

या प्रकरणातील भ्रष्टाचाराचे आरोप सिद्ध करणे अवघड होते. नरिमन यांच्या तक्रारीत तीन मुख्य मुद्दे होते :—(१) भारत सरकारच्या १९१९ च्या सांविधानिक कायद्यानुसार हा विकासप्रकल्प 'पब्लिक वर्क' मानून प्रांतिक सरकारने हा सोपीव विषय म्हणून हाती घ्यायला हवा होता; (२) चाळी बांधण्याच्या कार्यक्रमासाठी महानगरपालिका कापसावरील जकातीचा भरणा करत असूनही बी.डी.डी. संघटनेत महापालिकेला प्रतिनिधित्व नाकारण्यात आले; (३) बॅकबे योजना कमालीची महाग व कंबर्डे मोडणारी आहे. नरिमन यांनी बॅकबे चौकशी समितीला ऐकविले, "This mad and chimerical venture has practically mortgaged the resources of the Presidency for at least a generation to come."[२४]

महापालिका आणि गिरणीमालक संघानेही नरिमन यांना ठाम पाठिंबा दिला. प्रागतिक पक्ष आणि म्युनिसिपल नॅशनॅलिस्ट पक्षानेही एक संयुक्त निवेदन दिले आणि चौकशी समितीपुढे साक्षी दिल्या. या प्रकल्पाच्या विरोधाबाबत व्यापाऱ्यांची संतप्त भूमिका इंडियन मर्चंट्स चेंबरनेही मांडली. १९२६ साल या स्कँडलने गाजले. हा विषय वर्तमानपत्रांमध्ये एक वर्षभर गाजला. या विभागाचे प्रमुख अधिकारी हेप्पर आणि अधीक्षक अभियंता हार्वे यांच्यावर नरिमन यांनी टीकेची तोफ डागली. काँग्रेसला सरकारचे हे भयंकर दुष्कर्म उघड करण्याची संधी

मिळाली. सरकारची विश्वसनीयता धोक्यात आली. नरिमन व स्वराज्य पक्षाने कायदेमंडळात सरकारला धारेवर धरले.

नरिमन यांची टीका असह्य झाल्यामुळे हार्वेने त्यांच्यावर अब्रूनुकसानीची फिर्याद दाखल केली. हा खटला एक वर्षाहून अधिक काळ चालला. स्वतः बॅरिस्टर असलेल्या नरिमन यांनी स्वतः समर्थपणे कोर्टात आपला बचाव केला. या प्रकरणामुळे सरकार अडचणीत पडले. म्हणून हार्वे दीर्घ मुदतीची रजा घेऊन इंग्लंडला गेला, पण पुन्हा कधीच भारतात आला नाही. नरिमन निर्दोष सुटले. त्यानंतर त्यांनी हेप्पर या दोषी अधिकाऱ्यावर दुसरा खटला भरला. पण तो साहेबही हिंदुस्तानातून कायमचा पळून गेला. अत्यंत खंबीरपणे व धाडसाने नरिमन यांनी अधिकारशाहीशी लढा देऊन विजय मिळविला. त्यामुळे त्यांना ‘ वीर नरिमन ’ हे बिरुद मिळाले. त्यांनी या प्रकरणी कायदेमंडळातही लढत दिली. याबाबतचे सखोल विवेचन **“ स्वराज्य पक्ष ”** यावरील प्रकरणात करण्यात आले आहे.

नरिमन यांनी हे प्रकरण यशस्वीरीत्या धसास लावल्यामुळे बॅकबे रेक्लमेशनचे भराव घालण्याचे काम इंग्रज सरकारला थांबवावेच लागले. ज्या बिंदूला हे काम थांबवले होते त्यालाच नंतर **‘ नरिमन पॉईंट ’** हे नाव देण्यात आले. बॅकबेच्या कामात इंग्रज अधिकाऱ्यांनी केलेला गैरकारभार आणि गैरव्यवहाराची झळ अनेकांना लागली होती. इंग्रजांनी भ्रष्टाचारी मार्गाने कंत्राटदार निवडले हा कलंक कधीच पुसला गेला नाही. काँग्रेस स्वराज्य पक्षाने हे प्रकरण कायदेमंडळात व प्रसार माध्यमांमध्ये धसास लावून सरकारला धारेवर धरले होते. इंग्रजांच्या या **भयंकर मोठ्या भ्रष्टाचार प्रकरणाने १९२०-१९३० च्या दशकात मुंबईतील काँग्रेस राजकारण्यांना फार मोठा विजय मिळवून दिला होता. ब्रिटिशांच्या सचोटीची लक्तरे बाहेर पडली होती. अर्थातच त्यामुळे नरिमन यांचे राजकारणातील स्थान उंचावले होते.**[२५]

## आर्थिक हितसंबंध व स्वातंत्र्य चळवळ

हिंदुस्तानाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत राजकारण व अर्थकारण यांच्यात अतूट नाते असणे स्वाभाविकच होते. विशेषतः पहिल्या जागतिक महायुद्धानंतर उद्‌भवलेल्या समस्यांपासून व्यापारी वर्गाला आपले हितसंबंध सुरक्षित ठेवण्याची अधिक गरज वाटू लागली. महात्मा गांधींनी सुरू केलेली स्वदेशीची चळवळ व तिला जोड दिलेली विदेशी मालावरील बहिष्काराची मोहीम यांमुळे युद्धोत्तर काळातील मंदीचा फटका व्यापारी वर्गाला सुसह्य प्रमाणात बसला होता. स्वाभाविकपणे व्यापाऱ्यांनी काँग्रेसच्या स्वदेशी व बहिष्कार चळवळीत सक्रिय भाग घेतला. या बाबतचे विवेचन वरील एका प्रकरणात केलेलेच आहे. इथे मुद्दा असा की, मुंबईतील वाणिज्यवादी वर्गाने काँग्रेसला व विशेषतः गांधीजींना जो भरघोस पाठिंबा दिला, त्या पाठिंब्यामागे गांधीभक्ती व देशप्रेमाव्यतिरिक्त इतरही कारणे होती.

जागतिक महायुद्धामुळे परकीय चलनाचा गंभीर तुटवडा भासत होता. या स्थितीला ‘ टर्ब्यूलंट करन्सी क्रायसिस ’ असे नाव मिळाले होते. सरकारने १९१७ साली अमलात आणलेला नवा आयकर कायदा आणि त्यात वेळोवेळी केलेल्या बदलांचा फटका सर्वांनाच बसला होता. अविभक्त कुटुंबांच्या व्यापारी पेढ्यांना पारंपरिक लेखांकन पद्धतीची सवय होती. पण आता सरकार त्यावर ब्रिटिश पद्धतीचे रोपण करत होते. भारतीय पद्धतीवर केले जात असलेले हे ब्रिटिश रोपण व्यापाऱ्यांना वेदनाकारक वाटत होते. जागतिक महायुद्धाच्या वित्तीय गरजांमुळे सरकारने अगणित व्यापारी, दलाल व अडते प्रथमच आयकराच्या जाळ्यात अडकविले होते. त्यांना अनुतोष मिळविण्यासाठी भुलाभाई देसाई, वेलजी लखमसी नापू, लालजी गोविंदजी, गोकुळदास जीवराज दयालू वगैरे वकील आयकर आयुक्त व व्हाइसरॉयकडे तक्रारी व विनंतीअर्ज करीत. गांधीजींची मदतही घेणे सुरू झाले. एकूण करन्सी क्रायसिस आणि आर्थिक धोरण व नवीन करांच्या दायित्वामुळे व्यापारी वर्ग राष्ट्रवादी चळवळीत ओढला गेला. याउलट मुंबईतील उद्योगपतींचे निहित हितसंबंध वेगळे होते. हेच उदाहरण

पाहा—काँग्रेसने मुंबईत बांधलेल्या जिना मेमोरिअल हॉलसाठी देणग्या देणाऱ्या ५१७ देणगीदारांमध्ये हंसराज प्रागजी ठाकरसी हे एकमेव उद्योगपती होते.[२६]

सत्याग्रहासाठी गांधीजींनी विहित केलेल्या प्रतिज्ञापत्रकावर ६८० मुंबईकरांनी उत्स्फूर्तपणे स्वाक्षरी केली होती. त्यांत ७४ टक्के व्यापारी व कंपन्या होत्या. १९२० पासूनचे स्वातंत्र्य चळवळीतील मोर्चे व मिरवणुका काळबादेवी, गिरगाव, शेख मेमण गल्ली या व्यापारी भागातून जात. त्यांना मूळजी जेठा कापड पेठ, मोरारजी गोकुळदास कापड बाजार वगैरेंमधील कामगारांचा प्रतिसाद लाभत असे. मुंबईतील चळवळीत असलेला व्यापारी वर्गाचा सक्रिय सहभाग सरकारच्या डोळ्यांत नेहमीच खुपत असे. गांधीजी स्वतः व्यापाऱ्यांच्या पुढाऱ्यांशी संपर्क ठेवत व त्यांना उत्तेजन देत. मुंबई श्रॉफ असोसिएशन, धान्य व्यापारी संघटना, कापड व्यापारी संघ हे वित्तदानाव्यतिरिक्त काँग्रेसला चळवळीचे संघटन करण्यातही मदत करीत. **बाँबे क्रॉनिकल** पत्रक नेहमी आर्थिक राष्ट्रवादाचा प्रसार व समर्थन करीत असे.

सन १९२२ पूर्वी काँग्रेस आणि मुंबईतील उद्योगपती यांच्यात सख्य तर नव्हतेच, याउलट परस्परविरोधाची भावना मात्र होती, अर्थातच काही अपवाद वगळता! तथापि उद्योगपती तसेच कापूस अडत्यांना अत्यंत जाचक वाटणाऱ्या १९२२ च्या कॉटन काँट्रॅक्ट कायद्यामुळे त्यांचे काँग्रेसशी असलेल्या परस्परसंबंधांमध्ये विलक्षण परिवर्तन झाले. गिरणीमालकांना काँग्रेसचा अनुनय करावा लागला; प्रांतिक काँग्रेसची सक्रिय मदत घेणे भाग पडले. त्यांचा काँग्रेसबरोबर झालेला हा पुनर्मेळ (rapprochement) १९३० पर्यंत कायम टिकला. त्यानंतर उद्योगपतींनी स्वार्थाकरिता पुन्हा ब्रिटिशांची कास धरली. १९२२ च्या कायद्यामुळे मुंबईतील उद्योगपतींना व्यापारी संघटनांशीही युती करावीच लागली. कारण या दोन्ही पक्षांचा 'समान शत्रू' सरकारमध्येच होता. १९२०-१९३० च्या संपूर्ण दशकात मुंबईतील आर्थिक प्रश्न व त्यांबाबत सरकारशी चालू असलेला संघर्ष यात गांधीजी समक्ष लक्ष घालत आणि स्वातंत्र्य चळवळीला आर्थिक राष्ट्रवादाची जोड देत असत. त्यासाठी गांधीजी मणि भवनात मुक्काम करीत. १९२२ चा

काळा कायदा निष्कांचित करून कापूस अडते व व्यापाऱ्यांच्या समस्या कमी करण्यासाठी १९२९ साली काँग्रेस आमदारांनी इतर राष्ट्रवाद्यांसह कायदेमंडळात विधेयक मांडले होते. भुलाभाई देसाई यासाठी बरेच दिवसांपासून प्रयत्न करीत होते.[२७]

कापड उद्योगातील मंदीमुळे चिमणलाल सेटलवाड, लालजी नारनजी, इब्राहिम रहिमतुल्ला वगैरे अनेक जण घसरणीला लागले. फक्त वाडिया व टाटा समूह यांसारखे गिरणीमालक ताकदीने उभे राहिले. १९२४-१९३२ दरम्यान या उद्योगात भयानक मंदीचे सावट होते. अनेक गिरण्या विकल्या गेल्या किंवा बंद पडल्या. कामगारांमधील असंतोष, तंटे, संप, बेरोजगारी यांवर वर्तमानपत्रांमध्ये दररोज चर्चा असे. संपांना आवर घालण्यासाठी गिरणीमालक व त्यांची असोसिएशन काँग्रेस पुढाऱ्यांना विनंत्या करीत असे. कामगार चळवळीवर **प्रकरण-९** मध्ये विवेचन करण्यात आलेले आहे.

प्राप्त परिस्थितीत आर्थिक महामंदीमुळे हैराण झालेल्या मुंबईतील उद्योगपतींनी ब्रिटिशांचे आर्थिक धोरण आणि गोऱ्या भांडवलदारांचे निहित हितसंबंध यांच्याशी मुकाबला करण्याच्या हेतूनेच व्यापारी संघटना व काँग्रेस पक्षाशी युती केली. त्यांनी गांधीजी, मोतीलाल नेहरू, सरदार पटेल यांची मदत घेतली. राष्ट्रीय विचारसरणीच्या वर्तमानपत्रांचा अनुनय केला. या माध्यमांद्वारे त्यांनी सरकारला पटवून देण्याचा प्रयत्न केला की, ब्रिटिशधार्जिणे चलन विनियमाचे दर, राजकोषीय धोरण आणि लँकेशायरच्या उद्योगास सरकारने दिलेले संरक्षण ही मुंबईतील महामंदीची कारणे आहेत. काँग्रेसनेही सरकारला असेच बजावले होते. याबाबत पुरषोत्तमदास ठाकूरदास यांनी काँग्रेसच्या मदतीने कायदेमंडळात दोन वित्तविषयक विधेयके मांडली होती. या महत्त्वाच्या विधेयकांना राष्ट्रवादी विचारसरणीचे अर्थशास्त्रज्ञ प्रा. सी. एन. वकील, प्रा. के. टी. शहा, प्रा. पी. ए. वाडिया, प्रा. जी. एन. जोशी, जे. ए. वाडिया आणि बी. एफ. मादन यांनी व्यासपीठ व लेखांद्वारे जोरदार समर्थन दिले होते. या प्रकरणी सरकारने कायदेमंडळात स्वराज्य पक्षाच्या सभासदांना फितविण्याचेही प्रयत्न केले. मात्र

सरकारचे प्रयत्न विफल होऊन विधेयके संमत झाली. उद्योगपतींच्या मदतीने पत्रकारांनी १९२४ साली 'फ्री प्रेस ऑफ इंडिया' ही वृत्तसंघटना सुरू केली.

या काळापासून काँग्रेस व स्वराजिस्ट आणि उद्योगपती यांच्यात नवीन नाते निर्माण होऊन अन्योन्य साहाय्य करण्याची प्रथा सुरू झाली. पक्षाला राजकीय चळवळीसाठी पैसा हवा होता, तर उद्योगपतींना कायदेमंडळांमध्ये सक्रिय पाठिंबा आवश्यक होता. १९२४ पासून जे. बी. पेटिट स्वराज्य पक्षाला देणगी देत. टाटा समूह तर विपुल निधी देत असे. **हिंदुस्तान टाइम्स** पत्रक विकत घेण्यासाठी गिरणीमालकांनी मोतीलाल नेहरू व मदन मोहन मालवीय यांना मदत म्हणून बरेच पैसे दिले होते.[२८]

१९२०-१९३० या दशकात सरकारने मुद्रांक शुल्क, कोर्ट फी व उत्पादन शुल्कात बरीच वाढ केल्यामुळेही संबंधित लोकांना फटका बसला. जपानी मालाच्याही स्पर्धेमुळे येथील उद्योगाला मरगळ आली. मुंबईचे गव्हर्नर लेस्ली विल्सन यांनाही पटले की, वाढीव उत्पादन शुल्कामुळेही येथील गिरण्या आजारी पडत आहेत. म्हणून १९२५ साली त्यांनी व्हाइसरॉय तसेच भारतमंत्र्यालाही ही व्यथा कडक शब्दांत सांगितली होती. यानंतरचे गव्हर्नर फ्रेडरिक साईक्स यांनीही चलन विनिमयाचा दर व जबरदस्त प्रशुल्काविरुद्ध व्हाइसरॉय व भारतमंत्र्यांना सत्य कळवताना त्या दरांचा निषेध केला. यामागील वस्तुस्थिती अशी होती की, या सर्व दरांवर व आर्थिक धोरणांवर व्हाइसरॉयपेक्षा ब्रिटिश पार्लमेंट व तिकडील भांडवलशाही आणि उद्योगपतींचेच अधिक नियंत्रण होते.[२९]

## सावरकरांची मुक्तता

विनायक दामोदर सावरकरांना खिलाफत व असहकार या दोन्ही चळवळी नापसंत होत्या. खिलाफत ही त्यांना एक आत्मघातक आफत वाटत होती. असहकार चळवळीला त्यांनी कल्पनाविलासाने 'आत्मघातक उन्मादाचा अशुभ झंझावात' म्हटले. अंदमानातून सुटल्यावर त्यांनी लिहिलेल्या आत्मकथेत या चळवळींना अशी विशेषणे लावली होती. त्यांनी असेही लिहिले, " हा बुद्धिभ्रमाचा

अेक रोग, अेक साथ सुरू झाली आहे."[३०] महात्मा गांधी यांच्या अहिंसा विचारधारेनुसारची चळवळ सावरकरांना कधीच पसंत नव्हती हे सर्वश्रुतच आहे. तरीही स्वतः गांधीजींनी २६ मे १९२० च्या **यंग इंडिया** पत्रात लेख लिहून सावरकर बंधूंची सरकारने सुटका करावी, असे अत्यंत आग्रहाने प्रतिपादन केले होते. क्रांतिकारकांचा शस्त्राचार गांधीजींना नापसंत होता. पण तरीही ते क्रांतिकारकांचे धैर्य, देशभक्ती व आत्मसमर्पण भावनेची प्रशंसा करीत. ज्या मदनलाल धिंग्रांच्या उपाख्यानापासून विनायकरावांच्या मनात गांधीविरोध निर्माण होणे सुरू झाले, त्या धिंग्रांच्या कृत्याचा निषेध करून त्यांची देशभक्ती, आत्मसमर्पण व धैर्याचे गांधीजींनी लंडनमध्येही जाहीर कौतुकही केले होते. गांधीजींनी राजकीय परिस्थिती पाहून अनेक क्रांतिकारकांना वाचविले अथवा मुक्त केले होते. तथापि ही वस्तुस्थिती सावरकरभक्त किंवा गांधीजींचे टीकाकार समजून घेण्याचा प्रयत्नच करीत नाही.

गोपाळ कृष्ण गोखले, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, रंगास्वामी अय्यंगार, कीर हार्डी, सर इब्राहिम रहिमतुल्ला आणि १९२३ च्या काकिनाडा काँग्रेसचे अध्यक्ष मौलाना महंमद अली आणि अशा कित्येक पुढाऱ्यांनी सावरकर बंधूंच्या सुटकेसाठी प्रयत्न केले होते. त्यात गांधीजींचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा होता, हे मान्य करायलाच हवे. विठ्ठलभाई पटेल यांनीही एका सभेत सावरकरांच्या सुटकेचा ठराव संमत केला होता. काकिनाडा काँग्रेसने तसाच ठराव मंजूर केला होता. असे ठराव मंजूर करून घेण्यासाठीच नारायणराव सावरकर काँग्रेसमध्ये राहून चिकाटीने प्रयत्न करीत होते. पण सावरकरपंथीय लोक त्याबाबत महात्मा गांधी व काँग्रेसला श्रेय देत नाही.

मात्र राष्ट्रीय पुढाऱ्यांचे दडपण म्हणा अथवा बदलत्या राजकीय परिस्थितीमुळे म्हणा सावरकर बंधूंची सुटका करण्याच्या प्रश्नावर १९२३ मध्ये सरकारी गोटात विचार होऊ लागला. तथापि तत्पूर्वी स्वतः सावरकरांनी आपल्या सुटकेसाठी केलेल्या प्रदीर्घ प्रयत्नांचा अगदी संक्षिप्त पण सत्याधारित आढावा येथे घ्यावा लागेल.

दोन जन्मठेपेच्या शिक्षा झाल्यामुळे ५० वर्षे पूर्ण झाल्यावर २३ डिसेंबर १९६० रोजी सावरकरांची सुटका होणार होती. इतका काळ व्यर्थ घालवण्यापेक्षा सुटका करून घेण्यासाठी सावरकर युक्तियोजना करीत होते. आपली मुक्तता करून घेण्यास्तव ते सतत प्रयत्न करीत. याबाबतचे दस्तऐवज मुंबई सरकारने १९५८ मध्ये प्रकाशित केलेल्या **सोर्स मटेरिअल फॉर अ हिस्टरी ऑफ फ्रीडम मुव्हमेंट इन इंडिया : १८८५-१९२०,** खंड दोन यामध्ये छापलेले आहेत. त्यात सावरकरांनी ३० मार्च १९२० रोजी अंदमान-निकोबार बेटांच्या चीफ कमिशनरास सादर केलेला अर्ज प्रसिद्ध केलेला आहे. त्या प्रदीर्घ अर्जातून व इतर कागदपत्रांतून स्पष्ट अर्थ निघतो की, सावरकर सरकारकडे क्षमायाचना करत होते व कृतकृत्यांचा पश्चात्ताप व्यक्त करत होते; तसेच आपल्यावरील खटला आणि दिलेली शिक्षा योग्य आहे, अशी त्यांनी लेखी कबुलीही दिली.[३१] हे दस्तऐवज वाचून या इतिहासकारालाही दुःखच वाटले. तथापि, सावरकरांची ही कबुली व भाषा खरी धरता कामा नये. त्यांनी वेळोवेळी केलेले अर्ज, त्यांमागील राजकीय संदर्भ तसेच सरकारची त्यावरील प्रतिक्रिया विचारात घेता लक्षात येते की, 'तुरुंगातून सुटण्यासाठी सावरकर चाल खेळत होते.' अंदमानात कुजत राहण्यापेक्षा ब्रिटिशांशी जुळवून सशर्त का होईना पण मुक्त होण्यासाठी ते अंदमानातून प्रयत्न करीत व सरकारला आश्वासने देत आणि सहकार्याचे आमिषही दाखवीत होते. हा खेळ १९३७-३८ पर्यंत चालू होता. पण धूर्त सरकारलाही याची पूर्ण जाणीव होती आणि गुप्तचरांचा त्यांच्यावर कधीच विश्वास नव्हता.

सत्यस्थिती अशी की, अंदमानातील सेल्यूलर जेलमध्ये ४ जुलै १९११ रोजी दाखल झाल्यावर ३० ऑगस्टपासून त्यांना सहा महिन्यांसाठी एकलकोंडीत ठेवले होते. त्याच दिवशी विनायकरावांनी दया दाखवावी असा अर्ज केला. तो अर्थातच तात्काळ फेटाळला गेला. त्यानंतर २९ ऑक्टोबर १९१२ रोजी व १४ नोव्हेंबर १९१३ आणि ३१ जुलै १९१४ रोजी त्यांनी काही सवलतींसाठी अर्ज केले. पहिल्या महायुद्धात इंग्रजांच्या सैन्यात भरती होऊन जर्मनीशी लढण्यास आपण तयार आहोत, असे विनायकरावांनी इंग्रजांना लेखी वचन दिले होते. पण सरकारचा त्यांच्या एकाही वचनावर विश्वास बसला नाही.

हिंदुस्तानातील दुसऱ्या तुरुंगात बदली करावी अथवा अंदमानात पाच वर्षांनंतर अनुज्ञेय असलेले तुरुंगाबाहेरील सापेक्ष स्वातंत्र्य मिळावे, यासाठी गणेशराव सावरकरांनीही अर्ज केला होता. पण व्यर्थ! म्हणून त्यांच्या पत्नी येसूबाई व विनायकरावांच्या पत्नी यमुनाबाई यांनीही भारताच्या गृहमंत्र्यांकडे अर्ज केले होते. तथापि, अशा सर्वच अर्जांना मुंबई सरकारचा ठाम विरोध होता. सावरकरांनी अर्ज करणे व ते फेटाळले जाणे, हे नित्याचे झालेले होते. याबाबतचे दस्तऐवज उपरोक्त **सोर्स मटेरिअल** खंड दोनमध्ये दिलेले असल्याने त्यांचा तपशील येथे देत नाही.

पहिल्या महायुद्धात ब्रिटिशांचा विजय झाल्यामुळे राजकीय बंदिवानांना सर्वक्षमा (ॲमनेस्टी) मंजूर करण्यात आली. हजारोंना एक तर मुक्त करणे किंवा शिक्षेत लक्षणीय सूट देण्याचे धोरण आले. शिवाय मॉंटेग्यू-चेम्सफर्ड राज्य सुधारणांवर आधारलेला सांविधानिक कायदा संमत झालेला होता. त्याच्या अमलबजावणीस पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी सर्वक्षमेचा लाभ अधिकाधिक राजबंद्यांना द्यावा, असे धोरण ठरले. त्यानुसार अलीपूर बॉंब खटल्यातील बारींद्रकुमार घोष, हेमचंद्र दास कानुनगो वगैरेंचे गुन्हे अधिक गंभीर असूनही त्यांना मुक्त करण्यात आले होते. जॅक्सन खून प्रकरणातील वामन नारायण जोशींना १९१८ मध्ये अंदमानातून सोडले होते. शिवाय भयंकर 'आगखाऊ' म्हणून गाजलेल्या अत्यंत कडव्या गधर क्रांतिकारकांना चार-पाच वर्षांत सरकारने मुक्त केले होते. मुंबई इलाख्यातील चांदवडकर, मरीवाला, दुर्गादास अडवानी आणि जेठमल परसराम हे राजबंदीही सुटले. या सर्व क्रांतिकारकांना सोडल्यावर सावरकर सुटकेसाठी अधिक जोरदार प्रयत्न करू लागले. सावरकरांनी उपरोक्त ३० मार्च १९२० च्या पत्रात सत्यकथन केले होते की, बारींद्रकुमार घोष, हेमचंद्र दास वगैरेंनी प्रत्यक्ष बॉंब बनविले व त्यामुळे अनेक जण मरणही पावले होते. पण तरीही त्यांना मुक्त केले. अनेक कट-कारस्थाने व बॉंब प्रकरणांमध्ये गुंतलेल्या सचिंद्रनाथ संन्याल, भाई परमानंद वगैरेंना सरकारने सोडले, ही वस्तुस्थिती त्यांनी कथन केली.[३२] तरीही दुराग्रही मुंबई सरकार त्यांना सोडावयास अजिबात तयारच नव्हते.

नंतर गांधीजींच्या राष्ट्रव्यापी असहकार चळवळीमुळे मात्र ब्रिटिश सरकार भयंकर अस्वस्थ झाले. **अशा परिस्थितीत सरकारला गांधीजी व काँग्रेसकडून जास्त धोका आहे, असे वाटू लागले होते. गुप्तचर तसेच संकेत देत होते. म्हणून सावरकर बंधूंच्या सुटकेचा विचार करण्यास मध्यवर्ती सरकार राजी झाले.** तथापि, मुंबई सरकारचे आधीचे मत कायम होते. अशा वातावरणात केंद्रीय कायदेमंडळाच्या वरिष्ठ सभागृहात रंगास्वामी अय्यंगार यांनी ठराव मांडला होता की, बादशहांनी सावरकर बंधूंनाही सर्वक्षमा मंजूर करावी (२६ मार्च १९२१). तेव्हा याविषयी मुंबई सरकारशी विचारविनिमय करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले. तथापि, मुंबई सरकार विरोधातच राहिल्यामुळे हिंदुस्तान सरकारने एकतर्फी निर्णय घेऊन, सावरकर बंधूंना अंदमानातून हिंदुस्तानातील तुरुंगात आणले. विनायक व गणेश सावरकर या दोन भावांमध्ये गुन्ह्यांच्या दृष्टीने फरक आहे, अशी केंद्र सरकारची भूमिका होती. पुढे प्रकृतीच्या कारणास्तव गणेशरावांची साबरमती जेलमधून सप्टेंबर १९२२ मध्ये विनाशर्त सुटका झाली.

उपरोक्त पुढाऱ्यांचे दडपण व काँग्रेसचा ठराव म्हणा अगर बदलत्या राजकीय परिस्थितीमुळे मुंबई सरकारात सप्टेंबर १९२३ मध्ये वि. दा. सावरकरांची सुटका करण्याचा विचारविनिमय सुरू झाला. त्यात अंदमानात त्यांना सहानुभूती दाखवणारा मेजर जे. एच. मरे नावाचा अधिकारीही होता. बरेच आठवडे चाललेल्या गुऱ्हाळानंतर २७ डिसेंबर १९२३ रोजी सावरकरांकडून पुढील लेखी निवेदन घेण्यात आले :—

“माझ्यावर योग्य तऱ्हेने खटला भरला गेला आणि मला दिलेली शिक्षाही न्याय्य होती, हे मला मान्य आहे. पूर्वायुष्यात मी अवलंबिलेल्या हिंसक मार्गाचा मी मनापासून निषेध करतो. माझ्या शक्तीनुसार प्रचलित कायदा व राज्यघटना उचलून धरणे हे माझे कर्तव्य आहे, असे मला वाटते...”[३३]

अखेरीला ६ जानेवारी १९२४ रोजी त्यांची येरवड्यातून सशर्त सुटका करून त्यांना रत्नागिरी जिल्ह्यातच संचार करण्यास सरकारने मुभा दिली. तसेच सामाजिक कार्यात व्यग्र राहण्याचा सल्ला दिला.

रत्नागिरीत स्थानबद्ध असल्यापासून वि. दा. सावरकर राजकीय विषयावरील लेख टोपण नावाने अथवा निनावी प्रसिद्ध करीत असत. हिंदुमहासभेच्या संघटन व शुद्धी कार्यक्रमात ते भाग घेत. शिवाय सामाजिक व धार्मिक सुधारणा कार्यास हातभार लावत असत. अस्पृश्यतानिवारणासाठीही ते प्रयत्न करत असत. अस्पृश्यता, समाजसुधारणा तसेच राजकारणावरील त्यांचे निनावी लेख त्यांचे बंधू नारायणराव चालवीत असलेल्या **श्रद्धानंद** या नियतकालिकातून प्रसिद्ध होत. त्या काळात हिंदुमहासभेच्या विचारधारेवर त्यांनी लेखन केले, हे खरे. तथापि त्या पक्षाच्या कार्यात डॉ. मुंजे, न. चिं. केळकर, भोपटकर वगैरेंप्रमाणे सावरकरांना सहभागी होणे सरकारी निर्बंधांमुळे शक्य नव्हते.

❑❑

## संदर्भ


१. लॉर्ड विलिंग्डन यांचे व्हाइसरॉयला पत्र, ८ ऑग. १९२०, ब्राऊन, **गांधीज् राईझ टू पॉवर : १९१५-१९२२**, केंब्रिज, १९७२, पृ. २६१ वर उद्‌धृत.

२. मृदुला मुखर्जी, " नॉन-कोऑपरेशन मुव्हमेंट : १९२०-२२ ", **इंडियाज् स्ट्रगल फॉर इंडिपेंडन्स, १९८९**, पृ. १८९-९०, १९७-९८.

३. ब्राऊन, उपरोक्त, पृ. ३१२.

४. सुमित सरकार, **मॉडर्न इंडिया : १८८५-१९४७**, नवी दिल्ली, २००१, पृ. २०६-०७.

५. के. गोपालस्वामी, **गांधी अँड बाँबे**, मुंबई, १९६९, पृ. १४९-५०.

६. बाँबे प्रेसिडेंसी पोलीस अॅबस्ट्रॅक्ट ऑफ इंटेलिजन्स, नोव्हें. १९२१.

७. **सोर्स मटेरिअल : नॉन-कोऑपरेशन मुव्हमेंट इन बाँबे सिटी : १९२०-२५,** मुंबई, १९७८, पृ. ७०-७३.

८. के. के. चौधरी, **हिस्टरी ऑफ बाँबे,** १९८७, पृ. १४२-४५.

९. कित्ता, पृ. १३६-३७, १४६-४७.

१०. **सोर्स मटेरिअल,** उपरोक्त, पृ. १२४-२५, १४७-५०.

११. चौधरी, उपरोक्त, पृ. १४६-४८, १५८-५९, ३२७-२९.

१२. कित्ता, पृ. १४८-४९.

१३. ब्राऊन, उपरोक्त, पृ. ३१५-१७, ३१९.

१४. महात्मा गांधींचे जवाहरलाल नेहरूंना पत्र, १९ फेब्रु. १९२२, जवाहरलाल नेहरू पेपर्स, नवी दिल्ली, फाईल क्र. जी-११, १९२२/दोन.

१५. ब्राऊन, उपरोक्त, पृ. ३०९-१७.

१६. य. दि. फडके, **शोध सावरकरांचा**, पुणे, २०००, पृ. ५५-५६.

१७. एस. ए. डांगे, **गांधी व्हर्सस लेनिन**, मुंबई, १९२२, पृ. ५६.

१८. चौधरी, **झुंजार पुणे**, २००८, पृ. २०३.

१९. अलगरनून रम्बोल्ड, **वॉटरशेड इन इंडिया : १९१४-१९२२,** लंडन, १९७९, पृ. २९४.

२०. फ्रँसिस गुंथर, **रिव्हॉल्यूशन इन इंडिया,** अलाहाबाद, १९४६, पृ. ५४.

२१. जनरल डिपार्टमेंट, फाईल क्र. ५०/१९२१ केडब्ल्यू, राष्ट्रीय अभिलेखागार.

२२. व्हाइसरॉय रीडिंग यांचे माँटेग्यू यांना पत्र, २३ फेब्रु. १९२२, राष्ट्रीय अभिलेखागार.

२३. **टाइम्स ऑफ इंडिया,** ३१ ऑक्टो. व ७ नोव्हें. १९२७.
२४. बॅकबे एन्क्वायरी कमिटी रिपोर्ट, १९२६, एक.
२५. चौधरी, **हिस्टरी ऑफ बाँबे,** पृ. १५८-५९.
२६. कित्ता, पृ. १६१-६२.
२७. कित्ता, पृ. १६५-६७.
२८. कित्ता, पृ. १६६.
२९. कित्ता, पृ. १६६-६७.
३०. वि. दा. सावरकर, **माझी जन्मपेठ,** मुंबई, १९९४, पृ. ४८२.
३१. व्ही. डी. सावरकरांचा अंदमानच्या कमिशनरला अर्ज, ३० मार्च १९२०, **सोर्स मटेरिअल फॉर हिस्टरी ऑफ फ्रीडम मुव्हमेंट इन इंडिया,** खंड दोन, १९५८, पृ. ४७२-७६.
३२. कित्ता.
३३. वि. दा. सावरकरांचे निवेदन, फडके, उपरोक्त, पृ. ६१.

प्रकरण ४

## स्थानिक सत्याग्रह

असहकारिता चळवळीला सर्व देशभर भरती आलेल्या त्या वर्षांमध्ये जनमानसात स्वातंत्र्याचे नवे वारे वाहू लागले होते. कलोनिअल अधिकारशाहीचे ओझे मानेवरून भिरकावून देण्याची वृत्ती वाढू लागली. दडपून टाकणारी भीती कमी होऊन लोक मान वर करून चालू लागले. खेडेगावांमधूनही पंजाब प्रकरण, जालियनवाला बाग हत्याकांड, रौलट सत्याग्रह आणि महात्मा गांधी, मुंबईतील असहकारिता चळवळ आणि ब्रिटिश-निर्मित आर्थिक अन्याय अशा अनेक प्रश्नांबाबत सामान्य जनता चर्चा करू लागली होती. काँग्रेसचे प्रचारक लोकांना अन्यायाविरुद्ध सत्याग्रह करण्याचे शिक्षण देत होते. स्वतः महात्मा गांधींनी श्रीपाद अमृत डांगे, रघुनाथ निंबकर, केशव जोगळेकर, युसुफ मेहेरअली वगैरे युवकांना या कामी लावले होते. काँग्रेसच्या प्रचारकांची मने आशावाद वा उत्साहाने बेहोष झाली होती. जवाहरलाल नेहरूंनी आत्मकथेत लिहिल्याप्रमाणे देशकार्याच्या आनंदानुभवाची गोडी चाखणारे बरेच युवक उत्साहाने जनजागृती करीत होते.

राष्ट्रव्यापी असहकारिता चळवळीचे सामर्थ्य व तिच्यातील कच्चे दुवे उघड होत गेले. मात्र असहकाराच्या तंत्रानुसार स्थानिक अन्याय आणि समस्यांचे निराकरण करण्याचा विचार पुणे-महाराष्ट्रातील गांधीवादी कार्यकर्ते करू लागले. त्यानुसार विनायक भुस्कुटे, शंकरराव देव, शि. म. परांजपे यांनी प्रांतिकचे नेते न. चिं.केळकर यांना मुळशी प्रकरणी सत्याग्रह करण्याची गळ घातली. स्वतःस शेतकऱ्यांचा पक्ष म्हणविणारा ब्राह्मणेतर पक्ष या प्रकरणी केवळ जातीयवादी राजकारण करीत होता. म्हणूनही मुळशीचा प्रश्न डिसेंबर १९२० च्या नागपूर काँग्रेसपुढे मांडण्याचा देव व केळकरांनी निर्णय घेतला. दरम्यान हे कार्यकर्ते गांधीजींना भेटल्यावर महात्मा गांधींनी टाटांना समंजसपणा दाखविण्याची विनंती केली. जोपर्यंत शेतकरी स्वखुषीने जमीन देण्यास तयार होणार नाहीत, तोपर्यंत टाटांनी जमीन हस्तगत करू नये, अशी गांधीजींनी त्यांना सूचना केली. शिवाय भू-संपादन करताना शेतमालकांना उचित बाजारभावाने भरपाई द्यावी, असेही गांधीजींनी टाटांना विनविले. त्यांनी गव्हर्नरलादेखील अशीच विनंती केली होती.

पण त्याकडे दुर्लक्ष करून मुंबई सरकारने १८९४च्या जमीन संपादन कायद्यानुसार बळजबरीने भू-संपादन करण्याचा सपाटा लावला. १८५० सालापासून रेल्वे, रस्ते, सेनादलाच्या छावण्या अशा अनेक प्रयोजनांसाठी कित्येक कोटी एकर शेतजमीन सरकारने हस्तगत केलेली होती.

देव, परांजपे, भुस्कुटे व केळकरांनी मुळशीचा प्रश्न नागपूर काँग्रेस अधिवेशनात मांडला. त्यावर विचार होऊन रीतसर सत्याग्रह करण्याचा गांधीजींनी सल्ला दिला. या सत्याग्रहास प्रारंभापासूनच सरोजिनी नायडूंचा पाठिंबा होता. यानंतर महाराष्ट्रात बरेच स्थानिक सत्याग्रह झाले.

## मुळशी सत्याग्रह

निळा व मुळा नद्यांच्या संगमाजवळील मुळशी धरणामुळे विस्थापित होणाऱ्या ५४ गावांमधील शेतकरी व अभावग्रस्तांनी केलेला हा अभूतपूर्व आणि प्रदीर्घ लढा म्हणजे असहकार आंदोलनातील एक नमुनेदार उपाख्यान होय. सत्य व अहिंसेच्या मार्गाने झालेला हा सत्याग्रह केवळ टाटा पॉवर कंपनीविरुद्ध नव्हता. हा लढा वसाहतवादी ब्रिटिश सरकारशीही होता. कुणबी, गरीब मावळे आणि अभावग्रस्त दलितांनी केलेला हा सत्याग्रह राजकीय हक्कांपेक्षा आर्थिक व सामाजिक अस्तित्वासाठी आणि जगण्याच्या हक्कासाठी होता. आपली शेतजमीन व निवारा वाचवून उदरनिर्वाहाचा व्यवसाय करण्यासाठी हा जीवनमरणाचा संग्राम होता. या परिसरातील ८० टक्के लोक केवळ शेतीवरच अवलंबून होते. त्यांच्यात ६६ टक्के जण कुणबी-मराठा आणि १०.५ टक्के महार जातीचे होते. त्यांच्यात साक्षरतेचे प्रमाण केवळ २ टक्के होते. त्यांना भूमिहीन होऊन रोजगारासाठी मुंबईत जाऊन मोलमजुरी करून भकास जीवन जगणे हाच पर्याय होता. तरीही लोकक्षोभाची पर्वा न करता आणि विस्थापितांच्या पुनर्वसनाची पर्वा न करता तसेच पर्यायी शेतजमीन उपलब्ध करून न देता मुंबई सरकारने जलविद्युत प्रकल्पासाठी मुळशीजवळ धरण बांधण्यास टाटा कंपनीस मंजुरी देऊन टाकली (२४ मार्च १९१९). शिवाय शेतजमिनीच्या भरपाईचे दर घोषित केले नव्हते. काही जमीन ब्राह्मण आणि गुजरांची असली, तरी तिच्यावर हजारो कुणबी कुळे व शेतमजूर अवलंबून होते. शेतकऱ्यांना

भरपाई देण्यासाठी पुरेशी पर्यायी शेतजमीन उपलब्ध नाही, असे पुण्याच्या कलेक्टरने आधीच जाहीर केले होते.

शिवाय टाटा कंपनी व सरकारने विस्थापितांना कसे वाऱ्यावर सोडून उदासीनता दाखविली, याची दोन जुनी उदाहरणे समोर उभी होती. टाटा हायड्रो-इलेक्ट्रिक पॉवर सप्लाय कंपनीने खोपोली वीजनिर्मिती केंद्रासाठी लोणावळ्याजवळ धरण बांधले होते. १९११ मध्ये या केंद्राच्या उभारणीचे काम सुरू करून १९१५ पासून वीजनिर्मितीस सुरुवात केली होती. त्यामुळे मुंबईतील रेल्वे, ट्राम आणि धनिकांचा फायदा झाला. धनिकांच्या घरात उजेड पडला. पण धरणग्रस्त लोक अंधारात बुडाले होते, वणवण फिरत होते. पहिल्या महायुद्ध काळात विजेची मागणी वाढली. म्हणून टाटांनी १९१६ मध्ये 'आंदर व्हॅली पॉवर सप्लाय कंपनी' स्थापन केली, आणि त्यासाठी १२, ८५२ दशलक्ष घनफूट जलक्षमता असलेले दुसरे धरण भिवपुरी-कर्जतजवळ बांधले. तथापि टाटा पॉवर कंपनीने विस्थापित केलेल्या धरणग्रस्तांना टाटांकडून भरपाई मिळाली नव्हती. लोणावळा भागातील आंदर खोऱ्यातील बारा गावे १९१६ साली धरणाखाली गेली होती. तथापि तेथील जमिनीचे साधे मोजमापही झालेले नव्हते. लोकांचे पुनर्वसनही केलेले नव्हते. मुळशी प्रकरण उपस्थित होईपर्यंत राज्यातील कोणत्याही धरणग्रस्तांना भरपाई दिलेली नव्हती. मुळशीकरांपुढे ही दोन ज्वलंत उदाहरणे असल्यामुळे ते अस्वस्थ झाले. आणि त्यांनी पुण्याच्या पुढाऱ्यांकडे कैफियत मांडली. न. चिं. केळकरांनी हा विषय डिसेंबर १९२० च्या नागपूर काँग्रेसपुढे मांडला. त्यावर गांधीजींनी सत्याग्रह करण्याचा सल्ला दिला. केळकरांनी आपल्या पत्रकांमधून टाटा कंपनीवर कडक टीका केली.

या टीकेला उत्तर देताना रतन दोराबजी टाटांनी या प्रकल्पाचे सार्वजनिक हिताचे काम म्हणून महत्त्व सांगितले. मुळशी धरणामुळे वीज उपलब्ध होऊन कोळसा वाचेल; कापड गिरण्यांना ऊर्जा लाभेल; आणि रेल्वे गाड्या विजेवर चालू लागल्यावर दक्षिण मुंबईतील लोक उपनगरांमध्ये घरे बांधतील वगैरे फायदे सांगितले. शिवाय धरणाखाली बुडणारे क्षेत्र फक्त साठ चौरस मैल इतकेच असून, त्यापैकी ७५ टक्के जमिनी सावकारांकडे गहाण पडलेल्या असल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही, असा

त्यांनी मुद्दा मांडला. मात्र टाटांचा हा मुद्दा म्हणजे धुळफेक होती. कर्जापोटी जमिनी गहाण ठेवलेल्या असल्या तरी मूळ मालक असलेले शेतकरीच त्या कसत होते व त्यावर उदरनिर्वाह करीत होते. जमीन बुडाल्यावर शेतकरी उद्‌ध्वस्त होणार होते. शिवाय धरणात पाणी अडवल्यावर मुळा नदी कोरडी पडून तिच्यावर अवलंबून असलेल्या अगणित शेतकऱ्यांचे नुकसान होणार होते.

पुण्याच्या कलेक्टरने धरणाच्या जागेवर शेतकऱ्यांची १ फेब्रुवारी १९२१ रोजी सभा घेऊन गरीब शेतकऱ्यांना स्वार्थत्यागाचा उफराटा उपदेश केला. लाखो मुंबईकरांचे जीवन सुखावह व्हावे आणि कारखानदारांचा मोठा फायदा व्हावा यासाठी मुळशी पेट्यातील सहा हजार लोकांनी त्याग करावा, असा कलेक्टरने गरीब शेतकऱ्यांना उपदेश केला. धरणग्रस्तांना शक्यतो पर्यायी जमीन देऊ किंवा नुकसान भरपाई देऊ असे त्याने मोघम सांगितले. तथापि सर्वांना जमीन देणे शक्यच होणार नाही असेही त्याने बजावले. म्हणजे आमिष दाखवतांना देखिल दम दिला. टाटा कंपनीने धरणाचे काम सुरू केले असून जमिनीचे भाडेही सरकारला दिलेले असल्याने कंपनीच्या कामात व्यत्यय आणणाऱ्या लोकांना बेकायदेशीर कृत्यांबद्दल शिक्षा केली जाईल, असा कलेक्टरने सज्जड दमही दिला.[१] इंग्रजांची ही प्रशासनाची नित्याची नीती होती. कलेक्टरच्या या भाषणानंतर "आम्ही जीव देऊ, पण जमीन सोडणार नाही" असे लोकांनी सभेत सुनावले. आवळस गावच्या एका महार शेतकऱ्याने कलेक्टरला विनवणी केली. पण व्यर्थ!

प्राप्त परिस्थितीत मुळशीच्या लोकांपुढे सत्याग्रह हा एकमेव पर्याय होता. त्यावेळी असहकार चळवळ देशभर जोरात होती. विनायकराव भुस्कुटे, शंकरराव देव व शि. म. परांजपे यांना गांधीजींनी सत्याग्रहाची सूचना केली होती. पण सत्याग्रह करू म्हणणाऱ्यांना महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचे प्रमुख असलेले न. चिं. केळकर सबुरीचा सल्ला देत होते. तरीही विनायकराव, दत्तू साठे, शंकर रानडे, शंकरराव देव, अण्णासाहेब भोपटकर 'जान किंवा जमीन' असा निर्धार व्यक्त करीत होते. सत्याग्रहाबाबत ब्राह्मण व गुजर सावकार आणि शेतकरी यांच्यात काही मतभेद होते. याउलट विनायकराव, साठे व रानडे अडीच महिने मुळशी पेट्यात पायपीट

करून शेतकऱ्यांचे मनोबल वाढविण्याचा प्रयत्न करीत होते. सत्याग्रहाचा प्रचार करीत होते. पण बारामतीस भरलेल्या पुणे जिल्हा परिषदेच्या अधिवेशनात (२०-२१ मार्च १९२१) सत्याग्रहवाद्यांना केळकरांमुळे निराशा पत्करावी लागली. भुस्कुटे व देव मात्र सत्याग्रहाची तयारी करू लागले. नुकसान भरपाईबाबतचे सरकारचे धोरण जाहीर होईपर्यंत सत्याग्रह करू नये, अशी केळकरांची भूमिका कायम होती. शेतकऱ्यांचा मात्र सत्याग्रहासाठी आग्रह होता. म्हणून न. चिं. केळकर ६ एप्रिलच्या सभेतून निघून गेले. अशा स्थितीत भुस्कुटे व देव यांनी १६ एप्रिल १९२१ हा सत्याग्रहाचा मुहूर्त जाहीर केला.

त्याआधी २२ मार्च १९२१ रोजी पुण्याचे आमदार वासुदेव राजाराम गुप्ते यांनी मुळशीच्या शेतकऱ्यांच्या गाऱ्हाण्यांना मुंबई कायदेमंडळात वाचा फोडली होती. त्यांनी सरकारपुढे कैफियत मांडली की, सरकारने जमीन ताब्यात घेण्यापूर्वी रीतसर चौकशी न करता टाटा कंपनीवर अनुग्रह केला. लोणावळ्यानजीक आंदर खोऱ्यात टाटांनी धरण बांधले तेव्हाही धरणात बुडालेल्या बारा गावांतील जमिनीची मोजणीही केली नव्हती. तसेच विस्थापितांना नुकसान भरपाईही दिली नव्हती. यामुळे शेतकऱ्यांचा रोष वाढणे स्वाभाविकच होय. मुळशीचे शेतकरी पर्यायी सुपीक जमीन पुणे जिल्ह्याबाहेरही घ्यावयास तयार आहेत, असा गुप्तेंनी निर्वाळा दिला होता. पण सरकारने पर्यायी जमिनी शोधण्यासाठी दिलेले आश्वासन पाळले नाही. त्यामुळे सर्व प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत धरणाचे काम कंपनीने थांबवावे असा गुप्तेंनी ठराव मांडला. त्यांच्या ठरावास चारपाच आमदारांनी पाठिंबा दिला.[२] आमदारांचा सत्याग्रहास पाठिंबा नव्हता. जमीनसंपादन कायद्यातील कलमे काटेकोरपणे पाळली जात नाही, व शेतकऱ्यांचे नुकसान होते, हा त्यांचा मुद्दा होता.

गांधीजींशी चर्चा केल्यावर हरीभाऊ फाटक, बाळूकाका कानिटकर व परांजपे हे पांडुरंग महादेव बापटांना भेटले. शेतकऱ्यांवरील अन्याय दूर करण्यासाठीबापट, श्री. व्यं. केतकरांच्या ज्ञानकोश कार्यालयातील नोकरीचा त्याग करून, सत्याग्रहासाठी मुळशीला पोहोचले. बाँब तयार करणारे व सशस्त्र लढ्यावर विश्वास असलेले आणि रशियन क्रांतीचे गोडवे गाणारे तसेच एके काळचे जहाल क्रांतिकारक असलेले बापट सत्याग्रहात उतरले. १६ एप्रिल १९२१ रोजी सत्याग्रह सुरू झाला.

**सत्याग्रहाची पहिली फेरी :—** मुळा नदीच्या पात्रात पाया खोदण्याचे आणि भराव घालण्याचे काम चालू असताना विनायकराव भुस्कुटे, बापट, देशदास रानडे, ज. स. करंदीकर वगैरेंच्या नेतृत्वाखाली शेतकरी, कुणबी, महार व स्वयंसेवकांची पथके एकमेका मागे एक आली व त्यांनी काम बंद पाडले. अधिकाऱ्यांनी पुन्हा काम सुरू केल्यावर पुन्हा सत्याग्रह करण्यात आला. स्वयंसेवकांवर चटके देणाऱ्या गरम पाण्याचा मारा करण्यात आला. तरीही सत्याग्रहींनी आपला अहिंसात्मक प्रतिकार चालू ठेवला. हा प्रतिकार बारा दिवस चालू राहिला. सत्याग्रहींचा निर्धार पाहून २८ एप्रिलपासून ७ नोव्हेंबरपर्यंत कंपनीला धरणाचे काम बंद ठेवण्याची घोषणा करावीच लागली. मात्र कंपनीने पौड-मुळशी रस्त्यावर रेल्वे रूळ टाकण्याचे काम चालूच ठेवले. त्यामुळे रूळ टाकण्याचे काम बंद करण्यासाठी पाच मैलावरील शेरे गावाजवळ सेनापती बापटांनी सत्याग्रह घडवून आणला. हा सत्याग्रह त्यांनी १९ मे पर्यंत चालू ठेवला होता.

गांधीजींनी टाटांना समंजसपणा दाखवण्याची आणि उचित नुकसान भरपाई देण्याची पुन्हा विनंती केली. जोपर्यंत शेतमालक स्वखुषीने जमीन देण्यास तयार नाहीत,तोपर्यंत टाटांनी जमीन हस्तगत करू नये, असेही गांधीजींनी वसईतील महाराष्ट्र प्रांतिक परिषदेत टाटांना विनविले. या परिषदेस आलेल्या सरोजिनी नायडूंनी सत्याग्रहींचे कौतुक केले व त्यांना उत्तेजन दिले. या परिषदेत भुस्कुटे व बापट या नेत्यांप्रमाणे विठू महार, ग्यानू पळासकर वगैरे शेतकरीही हजर होते. पुण्यातील एस. पी. कॉलेजातील एक प्राध्यापक दत्तोपंत घारपुरे व थोर कादंबरीकार ना. सी. फडके हे दोघे असहकार चळवळीत उतरले होते. तेही या परिषदेत हजर होते. या परिषदेत महाराष्ट्र प्रां. कॉं. समितीची पुनर्रचना करताना शंकरराव देवांना महाराष्ट्र प्रांतिकचे चिटणीस करण्यात आले.

त्याच आठवड्यात सरकार व टाटा कंपनी यांच्यात करार झाला व नुकसान भरपाईचे दर जाहीर करण्यात आले. म्हणजे सत्याग्रहाच्या पूर्वरंगानंतर! सरकारचा हा देकार सत्याग्रहींना आवडला नाही. शिवाय भरपाईचे दर अत्यंत कमी होते.

पौडजवळचे रेल्वे रूळ उखडून टाकल्यामुळे सेनापती बापट, रानडे, हिरवे, बेलसरे व शेऱ्याचे देशमुख वगैरे वीस जणांवर खटला भरण्यात आला. बापट व रानडेंना सहा महिने कारावासाची शिक्षा झाली. बापट, पांडुरंग महिपत देशमुख, शेरेकर, देशदास रानडे, वासुदेव विठ्ठल दास्ताने, विश्वास डावरे, दत्तोपंत बाभळे, रघुनाथ शिवराम निंबकर, धुंडिराजपंत देव व गजानन नारायण कानिटकर यांनी प्राणांतिक सत्याग्रह करण्याचा निर्धार जाहीर केला. या सुमारास सेनापती बापटांनी सत्याग्रहाचे आपले खास तत्त्वज्ञान जाहीर केले. त्यानुसार त्यांनी सत्याग्रहाचा कार्यक्रम तयार केला.

**मुळशी सत्याग्रह मंडळ :—** बापट, दास्ताने व कानिटकर यांनी हे स्वतंत्र मंडळ २३ सप्टेंबर १९२१ रोजी स्थापन केले. प्रकल्पाच्या जागेव्यतिरिक्त मराठी भाषिक प्रदेशात अनेक ठिकाणी सत्याग्रह करावे, व वऱ्हाड-नागपूर भागातही सत्याग्रहींची नोंदणी करून अर्थसाहाय्य मिळवावे असा निर्णय घेतला. शिवाय टाटा कंपनीची मुंबई शहरातील कार्यालये व कारखान्यांमध्येही लाक्षणिक सत्याग्रह करण्याची योजना आखली. बापटांनी सत्याग्रहाची व्याप्ती वाढवली. बापट सत्याग्रहाची व्याप्ती वाढवण्याचे प्रयत्न करीत असताना धरणग्रस्तांनी नुकसान भरपाई लवकरात लवकर स्वीकारावी, असा टाटा कंपनी व सरकार प्रचार करू लागले. तथापि, नुकसान भरपाई दर बाजारभावापेक्षा फारच कमी होते. नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यात ७०० एकर जमीन विस्थापितांना दिली जाईल, असे सरकारने कायदेमंडळात जाहीर करून टाकले. भरपाईचे अथवा पर्यायी जमीन स्वीकारण्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त करण्यासाठी सरकारने एक सेवानिवृत्त मामलेदार व कर्मचारी यांना कामाला लावले. शिवाय सत्याग्रही शेतकऱ्यांचा बुद्धिभेद करण्यासाठी टाटा कंपनीने 'सत्यशोधक तमाशांचा' दुरुपयोग केला. **ब्राह्मणेतर पक्षाने शेतकऱ्यांच्या या जीवनमरणाच्या लढ्याला साथ न देता, तमाशांद्वारे ब्राह्मण-ब्राह्मणेतर असे जातीय राजकारण केले.** म्हणूनही टाटा कंपनी व सरकारच्या कारवायांना व भेदनीतीला अंशतः यश लाभले. त्या अभावग्रस्तांनी नुकसान भरपाई स्वीकारण्यास सुरुवात केली. त्यांच्यातील ऐक्यभाव कमी होत गेला.

वर कथन केल्याप्रमाणे बापट सहा महिने कैदेत गेल्यामुळे सत्याग्रहाचे नेतृत्व विनायकराव भुस्कुटे यांच्याकडे आले. ब्रिटनचे युवराज (आठवे एडवर्ड) पुण्याला येणार असल्याने (१९ नोव्हेंबर १९२१) त्यावेळी सत्याग्रहाची धामधूम नको म्हणून सरकारने सांगितल्याप्रमाणे मार्च १९२२ पर्यंत धरणाचे काम प्रलंबित ठेवण्यात आले. दरम्यान कंपनीतर्फे बॅ. जयकरांनी समेटासाठी वकिली व शिष्टाई केली. पण व्यर्थ!

मार्च १९२२ मध्ये कंपनीने पुन्हा काम सुरू करताच मावळ्यांनी बांधकाम बंद पाडले. कंपनीने बसविलेला पंप भुस्कुटे, साठे, गो. वि. देशपांडे व भवानी म्हार यांनी काढून टाकल्याबद्दल त्यांना सहा महिन्यांची शिक्षा झाली. म्हणून शंकरराव देव, कमलाकर सुमंत, बाळूकाका कानिटकर व वा. वि. दास्ताने यांनी सत्याग्रहाचे नेतृत्व स्वीकारले. टाटांच्या भाडोत्री गुंडांनी सत्याग्रहींना मारहाण केली. सरकारने कित्येकांवर खटले भरले किंवा खटले न भरताच त्यांना कारावासात धाडले.

**सत्याग्रहाची दुसरी फेरी :—** बापट सजा भोगून आल्यावर सत्याग्रहाचे नेतृत्व पुन्हा त्यांच्याकडे आले व त्यांना **सेनापती** हे बिरुद देण्यात आले. पुण्यातील सत्याग्रह साहाय्यक मंडळाचे अध्यक्ष शि. म. परांजपे व चिटणीस वि. दा. फाटक यांचेबरोबर वासूकाका जोशी, हरीभाऊ फाटक, सीताराम केशव दामले सत्याग्रहात सामील झाले. टाटा कंपनीच्या गुंडांनी सत्याग्रहींना मारहाण करणे चालू ठेवले. याशिवाय कंपनीच्या मजुरांनी शाहू महाराजांचा जयजयकार करून मारहाण केली. गुंडांनी सत्याग्रहीशेतकरी महिलांचे केस ओढले व त्यांचा विनयभंग केला, तर काही गुंड नागवे होऊन त्या महिलांसमोर नाचले. आणि हा घाणेरडा प्रकार ब्रिटिश सरकारच्या अधिकाऱ्यांनी शांतपणे पाहिला. मारहाणीमुळे काही सत्याग्रही बेशुद्ध पडले, पण त्यांनी शांतपणे अत्याचार सहन केले. या अत्याचारांवर कवी कुंजविहारी (हरिहर गुरुनाथ कुलकर्णी) यांनी 'मुळशीचा पाळणा' ही कविता लिहिली. या कवितेत कंपनीच्या गुंडांच्या कामुक चेष्टा व नग्न होऊन महिलांची विटंबना यांचे शब्दचित्र रेखाटलेले आहे[३]. प्रस्तुत इतिहासकाराने ही कविता स्वातंत्र्य आंदोलन काळात अनेक वेळा ऐकली होती.

१ जूनपर्यंत पोलिसांनी २०० सत्याग्रहींना पकडले, पण अत्याचारी गुंडांना नव्हे. सत्याग्रहींना येरवडा कारागृहात डांबण्यात आले. त्यांच्यात जयाबाई भोई या महिलांच्या नेत्या होत्या. ज. स. करंदीकर व शि. म. परांजपे तुरुंगात गेल्यामुळे सत्याग्रहाची तिसरी फेरी आखण्याचे काम बापटांकडे आले. पाऊस पडल्यामुळे धरणाचे काम थांबले, आणि सत्याग्रहदेखील!

**सत्याग्रहाचा तिसरा टप्पा** :— सेनापती बापटांनी मुंबईतून निधी गोळा केला. २ सप्टेंबर १९२२ रोजी सत्याग्रहाची तिसरी फेरी सुरू झाली. बापट पकडले गेले. आणि भुस्कुटेंनी जबाबदारी पत्करली. या सत्याग्रहासाठी कलकत्ता, नागपूर, वर्धा व धारवाड येथून ३७ स्वयंसेवक आले होते. लढाईचे स्वरूप पूर्वीसारखेच होते. मावळ्यांचा प्रतिसाद मात्र कमी झाला. आर्थिक हलाखीच्या जाचामुळे काही मावळे नुकसान भरपाई स्वीकारू लागले. भुस्कुटे व त्यांच्या पत्नीने २२ जानेवारी १९२३ रोजी सामुदायिक सत्याग्रह केल्यामुळे विनायकरावांना एक वर्षाची सक्तमजुरी भोगावी लागली. महाराष्ट्राच्या काही भागांमधून सत्याग्रही येऊ लागले. एकट्या भुसावलमधून दास्तानेंच्या सूचनेनुसार १५ युवक मुळशीत आले होते. इतक्या प्रदीर्घ काळपर्यंत सत्याग्रहाच्या तीन फेऱ्या होऊनही सरकार अथवा कंपनी अन्याय दूर करीत नव्हती. म्हणून ल. ब. भोपटकर व केळकरांसारखे पुढारी सत्याग्रह थांबवावा असे म्हणू लागले. तरी सेनापती बापटांचा निर्धार कायम होता:— तीन वर्षे सत्याग्रह करावयाचा व त्यासाठी तीन लाख रुपये खर्च करावयाचे आणि तीन हजार स्वयंसेवकांनी कारावासात जावयाचे. ही तिन्ही लक्ष्ये गाठण्यापर्यंत सत्याग्रह चालू ठेवायचा. मात्र मावळ्यांची आर्थिक हलाखी लक्षात घेऊन सेनापती बापटांनी त्यांना नुकसान भरपाई स्वीकारण्यास परवानगी दिली. कारण मावळ्यांवर उपासमारीची पाळी आलेली होती.

**सत्याग्रहाची चौथी फेरी** :— सत्याग्रहींना टाटा कंपनीचे गुंड लाथाबुक्क्यांनी तुडवत असत. तरीही १ एप्रिल १९२३ रोजी सत्याग्रहाची चौथी फेरी सुरू करण्यात आली. भुस्कुटेदांपत्य, शंकरराव देव, वा. वि. दास्ताने, पां. वा. गाडगीळ, कमलाकर सुमंत, बाळूकाका कानिटकर, जनार्दन सखाराम करंदीकर, डॉ. पळसुले, हरीभाऊ फाटक, भाऊसाहेब गोखले, देवराव देशमुख, सीताराम केशव दामले,

डॉ. फाटक, वासूकाका जोशी, इ. तुरुंगात गेले. तसेच वाईचे एस. एन. जोशी, अकोल्याचे के. व्ही. सहस्रबुद्धे, कराडचे मारूलकर वकील व धुळ्याचे शेख इब्राहिम शेख महंमद इत्यादी स्वातंत्र्य सैनिकांनी कारावास सोसला. शंकरराव देवांसारखे काही जण दोनदा, तीनदा कारावासात गेले.[४] कारागृहातही सरकारी अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर अत्याचार केले. बहुतेकांनी अत्याचारांचा निषेध अन्न सत्याग्रह करून केला. अन्न सत्याग्रहासाठी शंकरराव देव आणि देवराव देशमुख यांना कारागृहात फटके मारण्यात आले होते.

उत्तरोत्तर मावळे शेतकरी व जमीनदार आर्थिक हलाखीमुळे नुकसान भरपाई स्वीकारू लागले. शंकरराव देवांना अमानुषपणे तीस फटके मारण्यात आले होते. देवांनी सतरा दिवस अन्न सत्याग्रह केला. अशा स्थितीत महात्मा गांधींच्या सल्ल्यानुसार दास्ताने, वि. दा. फाटक व शंकरराव भाजेकर यांनी २४ एप्रिल १९२४ रोजी सत्याग्रह मंडळ बरखास्त केले.

अहिंसेचा मार्ग विफल ठरल्याने सेनापती बापटांनी शस्त्र हाती घेतले. ९ डिसेंबर १९२४ रोजी मुळशी धरणाचा मुख्य अभियंता कॅमेरॉन याची हत्या करण्यासाठी बापट आपले पथक घेऊन निघाले. परंतु तो धरणाच्या जागेजवळ न आल्यामुळे वाचला. तथापि मजुरांना घेऊन येणाऱ्या आगगाडीचा इंजिन ड्रायव्हर बापटांवर फावड्याने विस्तव फेकण्याच्या तयारीत असल्यामुळे, बापटांनी गोळी घालून त्याला जखमी केले. सत्याग्रहाच्या तंत्रानुसार बापट आपल्या पथकासह पौड पोलीस ठाण्यावर गेले आणि त्यांनी स्वतःस अटक करून घेतली. सेनापती बापटांच्या सत्याग्रह प्रणालीनुसार ही 'शुद्ध सत्याग्रहाची' अंतिम फेरी होती.

सेनापती बापट, बळवंत शिवराम गोरे, दत्तात्रय विनायक बाभळे, आत्माराम वासुदेव मोडक, पांडुरंग प्रल्हाद कुकडे आणि धुंडीराज विष्णू देव यांच्यावर 'मनुष्य वधाचा प्रयत्न' असा आरोप ठेवून सत्र न्यायालयात खटला भरण्यात आला. मात्र या आरोपींनी बचावासाठी वकील लावला नाही हे विशेष. त्या न्यायालयाने खटल्याचा निर्देश देण्यासाठी हे प्रकरण मुंबई उच्च न्यायालयाकडे सोपविले. उच्च न्यायालयाने बापटांना दोन कलमांखाली सात व तीन वर्षांची सक्तमजुरी दिली. उर्वरित पाचही

सत्याग्रहींनादेखील शिक्षा दिल्या. सात वर्षांची सक्तमजुरी भोगून बापट १९३१ मध्ये मुक्त झाले. शेतकऱ्यांच्या आंदोलनाचे सेनापतीपद झुंजारपणे भूषविल्यामुळे व अनासक्त लढा चालविल्यामुळे त्यांना महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्षपद देणे क्रमप्राप्तच होते. इतरांप्रमाणे त्यांनी हे अधिकारपद मागितलेले नव्हते. मुळशी सत्याग्रहात उदासीन राहिल्यामुळे तसेच स्वातंत्र्य आंदोलनातील एकूणच संदिग्ध भूमिकेमुळे टिळकांचे शिष्य न. चिं. केळकर हे लोकमान्यांचा वारसा चालविण्यास समर्थ नाहीत हे स्पष्ट झाले. त्यामुळे केळकरांचा काँग्रेसमधील प्रभाव लोप पावून आचार्य शंकरराव देव आणि न. वि. ऊर्फ काकासाहेब गाडगीळ हे क्रियाशील नेते उदयास आलेत.

मुळशी आंदोलन प्रदीर्घ काळापर्यंत चालवूनही व शेकडोंनी कारावास पत्करूनही आंदोलकांना यश आले नाही. ज्या आवळस गावापासून लढा सुरू झाला त्यासह पंधरा गावे धरणात बुडाली. दहा-बारा गावांची फक्त नावे राहिलीत. अगदीच थोड्या शेतकऱ्यांना पर्यायी जमीन मिळाली. बाकी सर्व लोक देशोधडीला लागून मुंबईत मोलमजुरीसाठी धडपडू लागले. टाटा कंपनीने जनतेला दिलेल्या अनेक आश्वासनांचा भंग केला. टाटांचा पैसा व इंग्रजांच्या सत्ताबलाने मुळशीचे आंदोलन चिरडून टाकले. हजारोंचे जीवन अंधकारमय केले. राष्ट्रवादी दृष्टिकोणातून पाहिल्यास दिसते की, सेनापती बापट, देव, गाडगीळ, भुस्कुटे, पां. वा. गाडगीळ इत्यादींव्यतिरिक्त नारायणराव गुंजाळ, बाबुराव फुले, चिंतामणराव वैद्य, ग्यानू पळासकर, विठू महार, भवानी महार, हिरवे, बेलसरे, पांडुरंग महिपत देशमुख, शेरेकर, विश्वास डाबरे, रघुनाथ शिवराम निंबकर, जिजाबाई भोई, कुसाबाई सुतार, गो. वि. देशपांडे, विष्णू परांजपे, लालजी पेंडसे, शंकरराव भाजेकर वगैरे स्वातंत्र्य सैनिक या आंदोलनाने घडविले.

विनायकराव भुस्कुटे यांनी आत्मसमर्पण भावनेने मुळशी सत्याग्रह लढविला होता त्यामुळे सत्याग्रहातील अपयश त्यांच्या जिव्हारी लागले. या संघर्षात त्यांना सेनापती बापटांच्या खालोखाल शिक्षा झाली होती. जीवनकलहात बांधील माणसांच्या संसाराची वाताहत होत असते. ध्येयवादी विनायकरावांचीही तशीच वाताहत झाली. निष्ठावान विनायकराव अनेक वर्षे काँग्रेसमध्ये राहून स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी झाले. नंतर

काँग्रेस समाजवादी झाले. पुढे या ध्येयवादी गृहस्थांनी कम्युनिस्ट पक्ष अंगीकारला आणि फॉरवर्ड ब्लॉक व शेतकरी कामकरी पक्षासाठी देह झिजविला. मात्र शेतकरी व वंचितांच्या हक्कांसाठी केलेल्या मुळशीच्या लढ्यात सातत्याने कार्य करूनही अपयश आल्याचे शल्य त्यांना कायम बोचत राहिले.

जीवनमरणाचा लढा लढण्याची तयारी असली, तरी गरिबीमुळे शेतकरी वर्गाचा तीन-चार वर्षांच्या प्रदीर्घ सत्याग्रहात निभाव लागणे शक्यच नव्हते. तरीही मावळे शेतकऱ्यांनी हालअपेष्टा सोसून पुष्कळ तग धरली. टाटांसारख्या सुसंस्कृत कंपनीच्या अधिकाऱ्यांनी गुंड व पठाणांकडून महिलांवर अत्याचार करवून घेतले. पुरुषांप्रमाणेच शेतकरी महिला व अल्पवयीन मुलांनाही पोलीस अटक करण्याआधी गुंड लाथाबुक्क्यांनी तुडवीत असत. कारावासातही त्यांचा छळ करण्यात येई. त्याविरुद्ध शंकरराव देवांना येरवाडा कारागृहात सतरा दिवस अन्नसत्याग्रह करावा लागला. मात्र हा लढा कमकुवत होण्यास भांडवलदार टाटा व इंग्रजांच्या दडपशाहीशिवाय आणखीही कारणे घडली होती. महात्माजींनी या सत्याग्रहाबद्दल लिहिल्याप्रमाणे दिसते की, बहुसंख्य मावळे व सावकार-जमीनदारांनी नुकसान भरपाईचा मोबदला स्वीकारल्यामुळे तसेच धरणाचे अर्ध्याहून अधिक बांधकाम मार्च १९२४ पर्यंत झालेले असल्यामुळे मोहीम पुढे चालविण्यात अर्थ उरला नाही. शिवाय चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या सेनापती बापटांची अहिंसेवर श्रद्धा नसल्यामुळे चळवळीत दोष निर्माण झाला. मोहिमेतून शंकरराव देवांनी शेवटी अंग काढून घेतले होते, ते याच कारणामुळे. मात्र उपजीविकेच्या प्रश्नावरून निरक्षर व गरीब शेतकऱ्यांनी सुशिक्षित मध्यमवर्गीय नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली हा आपल्या मूलभूत हक्कांसाठी केलेला लढा होता, हे खास महत्त्वाचे होय. **विस्थापितांच्या पुनर्वसनाच्या मुद्यावर तत्पूर्वी या देशात एकही आंदोलन झालेले नव्हते. मात्र पहिल्या-वहिल्याच मुळशी आंदोलनातून पुनर्वसनाचा प्रश्न प्रथमच ऐरणीवर आला.**[५]

मुळशी धरण बांधले जात असतानाच टाटा कंपनीने सह्याद्री पर्वताच्या खोऱ्यांमध्ये वीस धरणे बांधण्याच्या योजना आखल्या होत्या. त्यांत कोयना धरणाचाही समावेश होता. मात्र टाटा कंपनीने करारनाम्यातील अनेक अटी पाळल्या नाही. सरकारने

त्याबद्दल काहीच कार्यवाही केली नाही. धरणाजवळील वळवणे गावापासून आंबवणेपर्यंतचा रस्ता बांधून देण्याचे आश्वासन कंपनीने कधीच पाळले नाही. दवाखाने, शाळा व इतर सोयी उभारण्याचे आश्वासन कंपनीने पूर्ण केले नाही. शेतकरी-कामकऱ्यांचे जीवन उद्ध्वस्त झाले. याची आधीपासून कल्पना असलेले ग. ह. खरे (विख्यात इतिहास संशोधक) गावोगाव पायपीट करत शेतकऱ्यांना त्यांचे हक्क समजावून सांगत होते. त्यासाठी त्यांनाही एक वर्षाचा कारावास भोगावा लागला होता. बंधमुक्त झाल्यावरही त्यांनी संकल्पित कोयना धरणाविरुद्ध प्रचार कार्य चालू ठेवले. अखेर १९२९ साली कोयना खोऱ्यातील लोकमत अनुकूल होईपर्यंत कोयना प्रकल्पास परवानगी देणार नाही, असे मुंबई सरकारने घोषित केले. तथापि सरकारने प्रतिकूल लोकमताचे सांगितलेले कारण हे केवळ निमित्त होते. १९२९-१९३० ची जागतिक आर्थिक महामंदी आणि सरकारची उदासीनता ही खरी कारणे होती. भारताचा आर्थिक विकास करण्यात सरकारला रस वाटत नव्हता. वस्तुतः मुळशी सत्याग्रह शेतकरी, कामकरी व अभावग्रस्तांचे हितरक्षण करण्यासाठी होता. तथापि महाराष्ट्रातील ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादामुळे ब्राह्मणेतर पक्षाने या सत्याग्रहास पाठिंबा दिला नाही किंवा विस्थापितांच्या पुनर्वसनासाठी काही काम केले नाही.

कालांतरानंतर फेरवादी व नाफेरवादी यांच्यात समेट झाल्यावर शंकरराव देव काँग्रेसची सदस्य संख्या वाढवणे आणि खादीचा प्रचार करण्याचे काम करीत. **स्वराज्य** नामक साप्ताहिकाचे संपादक म्हणून ते सरकारवर कडक टीका करीत. सोलापूर, तळेगाव दाभाडे वगैरे ठिकाणी पेटलेल्या जातीय दंगलींमागे सरकारचे 'फोडा व झोडा' धोरण असल्याचा त्यांनी सरकारवर आरोप ठेवला होता. यासाठी शंकरराव देव व **स्वराज्य** पत्रकाचे मुद्रक प्रकाशक त्र्यं. ब. हरोलीकर यांच्यावर टिळकांप्रमाणेच भारतीय दंड संहितेच्या १२१ आणि १२४-अ या कलमांखाली खटला भरण्यात आला. या खटल्याची विशेषता ही की, गांधीजींच्या सत्याग्रही बाण्यानुसार देव व हरोलीकरांनी वकील घेतला नाही अथवा स्वतः आपला बचाव केला नाही. त्यांनी आपली भूमिका स्पष्ट करणारे निवेदन न्यायालयास दिले व ते स्वतः वाचून दाखवले. दोघेही १२१ कलमाखाली निर्दोष सुटले, पण १२४-अ खाली कोर्टाने त्यांना दोन

वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावली व त्यांनी ती विनाआर्जव भोगली (जानेवारी १९२८). त्यांचे अभिनंदन करण्यास्तव गांधीजींनी २४ फेब्रुवारी १९२८ च्या **यंग इंडियात** लेख लिहिला व दोघांचा मुक्तकंठाने गौरव केला.

## नागपूरचा झेंडा सत्याग्रह

व्यापक असहकार आंदोलनामुळे सत्याग्रह रणनीतीला उत्तेजन मिळाले, आणि स्थानिक अन्यायांविरुद्ध लहानमोठे सत्याग्रह झाले. नागपूरचा झेंडा सत्याग्रह त्यांपैकीच एक प्रसिद्धी पावलेला लढा होय. विशेष म्हणजे या सत्याग्रहात मुळशीच्या संघर्षापेक्षा राष्ट्रीय स्तरावरील जास्त नेतेही सहभागी होते. मुळात नागपूर झेंडा प्रकरण जबलपूरमध्ये इंग्रजांनी तिरंगा राष्ट्रध्वजाचा केलेल्या अपमानातून निर्माण झालेहोते. कॉंग्रेसने गांधीजींच्या सूचनेनुसार १९२१ साली चरखा हे चिन्ह असलेला तिरंगा झेंडा हा राष्ट्रध्वज म्हणून स्वीकारला होता. तेव्हापासून हा ध्वज राष्ट्रप्रेम व राष्ट्रीय अस्मितेचे प्रतीक बनला. साम्राज्यशाहीविरुद्धच्या बंडाचे ते एक प्रेरणास्थान बनले.

१८ मार्च १९२३ रोजी गांधीजींच्या अटकेला एक वर्ष पूर्ण झाले होते. त्यानिमित्ताने कॉंग्रेसजनांनी त्या दिवशी जबलपूरमध्ये राष्ट्रध्वजासह भव्य मिरवणूक काढून इंग्रजांचा निषेध केला होता. मात्र तत्पूर्वी १७ ऑगस्ट १९२२ रोजी मध्यप्रांत-वऱ्हाड सरकारने नगरपरिषदांच्या इमारतींवर झेंडा लावण्यास वा त्याची मिरवणूक काढण्यास बंदी केलेली होती. हा बंदी हुकूम धुडकावण्याचा विचार तेव्हापासून युवकांच्या मनात घोळत होता.[६] जबलपुरातील १८ मार्च १९२३ रोजीची राष्ट्रध्वजाची मिरवणूक त्याच संकल्पाचे प्रात्यक्षिक होते. त्या दिवशी कॉंग्रेसजनांनी ध्वजाची मिरवणूक काढून जबलपुरातील सिव्हिल लाईन्स नामक सरकारी विभागातील नगरपरिषदेवर राष्ट्रध्वज फडकवला. मात्र पोलिसांनी ध्वज खाली खेचला व पायदळी तुडवला. जबलपुरात या उपक्रमाची पुनरावृत्ती अनेक दिवस चालू राहिली. याच सत्याग्रहाचे लोण नागपूरला लवकरच पोहोचले.

झुंजार कॉंग्रेस नेते मंचरशा आवारी वगैरेंनी जालियनवाला बाग हत्याकांडाचा स्मरणदिन (१३ एप्रिल १९२३) या निमित्ताने नागपुरात सभा भरविली. तिच्यात

'राष्ट्रध्वजावर बंदी' या हुकुमाविरुद्ध सविनय कायदेभंग करण्याचा निर्धार करण्यात आला. आवारी व युवकांनी १४ एप्रिलला नागपुरात राष्ट्रध्वजाची जंगी मिरवणूक काढली. मिरवणूक सिव्हिल लाईन्स भागात जाताच पोलिसांनी व गोऱ्या अधिकाऱ्यांनी आगळीक करून आवारींना अटक केली. कारण काय तर शांततेचा भंग झाला आणि तिरंग्यामुळे युनियन जॅकचा अपमान झाला! वस्तुतः तिरंगा झेंडा फडकावणे हा कायद्यानुसार दंडनीय गुन्हा नव्हताच. तथापि सरकारने सूडबुद्धीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १४४ अनुसार तसेच पोलीस कायद्यातील कलम ३० नुसार मिरवणुकीस दोन महिने बंदी घातली. त्यामुळे संपूर्ण प्रांतभर असंतोष वाढला.

सत्याग्रहाच्या आचारप्रणालीनुसार, २ मे १९२३ रोजी, काँग्रेस कार्यकर्त्यांनी जमनालाल बजाजांच्या नेतृत्वाखाली सिव्हिल लाईन्स भागात मिरवणूक काढून सत्याग्रह केला. बजाज, नीळकंठ देशमुख व विनोबा भावे यांनी या सत्याग्रहाचे नेतृत्व केले. मिरवणुकीवर पोलिसांनी निर्दयपणे लाठीमार केला. कित्येकांनाअटकेत टाकले. पोलीस अत्याचारांची बातमी पसरताच संपूर्ण प्रांतातून या सत्याग्रहात येगदान देण्यासाठी स्वयंसेवकांची अगणित पथके नागपुरात आली. त्यांतील काहींना पोलिसांनी वाटेतच अडवले अथवा अटकेत टाकले. मात्र सरकारी दडपशाहीमुळे सत्याग्रहींचा आवेश अधिकच वाढला. एकट्या बालाघाट जिल्ह्यातून ३०० जणांची तुकडी नागपुरास आली होती. त्याचप्रमाणे मुंबई, आंध्र प्रदेश, बिहार, बंगाल, गुजरात व कर्नाटक राज्यांमधूनही सत्याग्रही आले होते. चंदुलाल शहा, नारायण हर्डीकर, डॉ. घिया, गोपाळदास तलाठी, मोहनलाल पंड्या, दुर्गाशंकर मेहता, जठार, वरदाचारी, सेठ घीसालाल वगैरे सत्याग्रहासाठी आलेले होते. महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसतर्फे त्र्यं. ब. हरोलीकर हे एक पथक घेऊन आले होते. १३ जून १९२३ पर्यंत सरकारने नागपुरात ५३७ सत्याग्रहींना अटकेत टाकले होते. नीळकंठ देशमुख, जमनालालजी, अबीद अली जाफरभाई व भगवानदीन या प्रमुख नेत्यांना पकडल्यानंतर सत्याग्रहाला अधिकच जोर चढला. त्यानुसार १८ जून रोजी सत्याग्रह व्यापक झाला व त्यासाठी १११ जणांना शिक्षा झाली.[७] काँग्रेस पुढारी डॉ. एम. ए. अन्सारी यांच्या आवाहनाला मोठा प्रतिसाद लाभला.

१८ जूनचा सत्याग्रह पाहण्यासाठी जवाहरलाल नेहरू, पुरुषोत्तमदास टंडन, गोपाळदास देसाई, वासूकाका जोशी, जॉर्ज जोसेफ आणि विठ्ठलदास जेराजनी वगैरे नागपुरात आले होते. जमनालाल बजाज तुरुंगात गेल्यानंतर सरदार वल्लभभाई पटेलांनी झेंडा सत्याग्रहाची सूत्रे स्वीकारली. जून ते ऑगस्ट १९२३ मध्ये सत्याग्रह उत्तरोत्तर वाढत राहिला. मध्यप्रांत-वऱ्हाडमधील फेरवादी स्वराजिस्ट कार्यकर्ते सत्याग्रहास फारसे अनुकूल नसल्यामुळे इतर प्रांतांमधून दहा-बारा हजार स्वयंसेवक नागपूरला येत आहेत, असे सरदार पटेलांनी घोषित केले. त्यांचे ज्येष्ठ बंधू विठ्ठलभाई पटेल फेरवादी स्वराजिस्ट असूनही वल्लभभाईंना मदत करण्यासाठी मुद्दाम नागपुरास आले होते. या प्रांताचे गव्हर्नर सर फ्रँक स्लाय हे इंग्लंडमध्ये विठ्ठलभाईंचे सहाध्यायी व मित्र होते तर गृहमंत्री मोरोपंत जोशी हेही त्यांचे स्नेही होते.

नागपूर शहरात सत्याग्रह जोरात चालू असताना मध्यप्रांत-वऱ्हाडच्या कायदेमंडळात कलम १४४ खाली जारी केलेला मनाई हुकूम रद्द करावा असा ठराव चर्चेसाठी आला. हा ठराव मोठ्या बहुमताने संमत झाला हे विशेष होय. याव्यतिरिक्त सत्याग्रहींवरील कोर्टातील सर्व खटले मागे घ्यावे, तसेच झेंडा आंदोलनासाठी कारावास भोगणाऱ्या स्वयंसेवकांना बिनशर्त मुक्त करावे, असे दोन ठराव मांडलेले होते. इंग्रज सत्ताधीशांचा यास विरोध असूनही हे ठराव कायदेमंडळात संमत झाले. पटेलबंधूंनी गव्हर्नर व गृहमंत्री यांच्याशी अनौपचारिकरीत्या बोलणी केली होती. ही बोलणी फलदायी होण्यासाठी गव्हर्नरला पटेलांनी आश्वासन दिले की, युनियन जॅकचा अवमान केला जाणार नाही. तसेच पोलीस अधीक्षकांची परवानगी काढून शांततामय मिरवणूक काढण्यात येईल.

त्यानुसार १८ ऑगस्ट १९२३ रोजी नागपुरात प्रचंड मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीनंतर जमलेल्या विराट सभेत झेंडा सत्याग्रह थांबवण्यात येत आहे, असे सरदार पटेलांनी घोषित केले. ३ सप्टेंबर १९२३ रोजी सरकारने सर्व सत्याग्रहींना बंधमुक्त केले. **याप्रमाणे 'झेंडा सत्याग्रहाची यशस्वी सांगता' झाली.** पं. माखनलाल चतुर्वेदी हे साहित्यिक आणि गणपत टिकेकर हेही सत्याग्रहासाठी खूप झटले होते. सत्याग्रहाच्या शोभायात्रेत वल्लभभाई पटेलांबरोबर डॉ. राजेंद्र प्रसाद, शंकरलाल पारेख, सुभद्राकुमारी चव्हाण, वासुदेव सुभेदार, पूनमचंद रांका, ठाकूर

लक्ष्मणसिंग व इंद्रसिंग हे मान्यवर नेतेही होते. नागपूरचा झेंडा सत्याग्रह अपेक्षोक्षाही अधिक यशस्वी झाला होता.

मात्र विठ्ठलभाई व वल्लभभाई पटेल यांच्याशी वाटाघाटी करून हे झेंडा सत्याग्रहाचे प्रकरण समंजसपणे मिटवण्याची प्रांतिक सरकारची कृती भारतमंत्री तसेच मध्यवर्ती सरकारला मुळातच आवडली नाही. शिवाय गव्हर्नर फ्रँक स्लाय यांनी दिल्ली सरकारशी साधा विचार-विनिमयदेखील केलेला नव्हता. वाटाघाटी यशस्वी झाल्याची बातमी भारतमंत्री व व्हाइसरॉयला वर्तमानपत्रांमधूनच समजली होती. शिवाय या प्रकरणी पटेल बंधू व काँग्रेसला लाभलेले घवघवीत यश आणि सत्याग्रहाचा विजय साम्राज्यवाद्यांना सहन न होणे स्वाभाविक होते. इतकेच नव्हे तर हिंदुस्तान सरकारच्या गृह सचिवाने नागपुरातील सरकारकडे विचारणा केली, तेव्हाच प्रांतिक सरकारने वाटाघाटींचा तपशील कळवला. मात्र वाटाघाटीत पटेलांनी मान्य केलेल्या अटींना लेखी कराराचे रूप दिले नाही, ही प्रांतिक सरकारची चूक झाली, असा गव्हर्नरवर ठपका ठेवण्यात आला.

नागपुरातील या सत्याग्रहाचे पडसाद लांबवर उमटले होते. त्यास जनआंदोलनाचे स्वरूप आले होते. मुंबईतील व्यापाऱ्यांनी कडकडीत हरताळ पाळला, झेंड्याच्या मिरवणुका निघाल्या. पंजाबात अकाली दलाच्या नेतृत्वाखाली चाललेले आंदोलन अधिक तीव्र झाले. सरकारवर आपण असेच दडपण आणल्यास आपलेही प्रकरण वाटाघाटी करून यशस्वी होईल, असा विचार करून अकाली दलानेही सत्याग्रह केला. या सत्याग्रहास अखिल भारतीय स्वरूप आले. स्वातंत्र्य आंदोलनातील हे आणखी एक यशस्वी उपाख्यान ठरले. **या सत्याग्रहामुळे वल्लभभाई पटेल व जमनालाल बजाज यांना राष्ट्रीय पुढाऱ्यांमध्ये मानाचे स्थान प्राप्त झाले.** पोलिसांची मारझोड व दडपशाहीस तोंड देत निर्धाराने सत्याग्रह करण्याचे मनोबल युवकांनी आत्मसात केले. या सत्याग्रहाने स्वातंत्र्यलढ्यातील युवकांची नवी पिढी घडविली.

सत्याग्रहाच्या पडसादाचे हे एक उदाहरण पाहा. जमनालालजींना कारावासाव्यतिरिक्त ३,००० रुपयांचा दंड झाला होता. तो भरण्यास त्यांनी नकार दिल्यामुळे सरकारने

त्यांची मोटार गाडी जप्त करून लिलावात काढली होती. पण ती घेण्यासाठी एकही ग्राहक पुढे आला नाही. सरकारने विदर्भात व मुंबईतही लिलावाच्या जाहिराती दिल्या पण ते प्रयत्नही व्यर्थ ठरले. शेवटी जमनालालजींची गाडी सरकारला काठेवाड भागात नेऊन एका सरकारधार्जिण्या व्यक्तीला विकावी लागली. त्यामुळे जशी जमनालालजींची प्रतिमा उजळली, तसाच सत्याग्रहाचाही प्रभाव दिसून आला. झेंडा सत्याग्रहामुळे काँग्रेसचे बळ वाढले. पूर्वी राजकीय दृष्टीने अप्रगत असलेल्या वऱ्हाड-मध्यप्रांतात नवा उत्साह संचारण्यास मदत झाली.

झेंडा सत्याग्रहात सहभागी झाल्याबद्दल १३ जून १९२३ पर्यंत नागपुरात ५३७ सत्याग्रहींना अटक करण्यात आली होती. त्यांचेपैकी १६८ जण नागपूर जिल्ह्यातून, ९१ वर्ध्याहून, ६२ शिवणीतून, १२८ बालघाटमधून आणि ८८ इतर जिल्ह्यांतून आलेले होते. त्यांच्यात ब्राह्मणांबरोबर कुणबी, मुसलमान, गोंड व दलितही होते. सत्याग्रहींमध्ये ब्राह्मणेतरांचे प्रमाण बरेच मोठे होते, ही एक समाधानाची बाब होती. महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसने पाठविलेल्या स्वयंसेवकांचे नेतृत्व त्र्यं. ब. हरोलीकर यांनी केले होते. १३ जूनच्या सत्याग्रहासाठी गुजरातमधून ७५ सत्याग्रही आलेले होते. बजाज व मुंबईचे अबीद अली जाफरभाई, नीळकंठ देशमुख आणि भगवानदीन या प्रमुख नेत्यांना १७-१८ जूनला अटक केल्यावर सत्याग्रहाला अधिक जोरदार प्रतिसाद लाभला. मात्र न. चिं. केळकर वगैरेंच्या स्वराज्य पक्षाने या सत्याग्रहास प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे केळकर गटाची महाराष्ट्रात नामुष्की झाली.

झेंडा सत्याग्रहाच्या यशाचा गौरव करण्यासाठी ८-१० जुलै १९२३ ला अ. भा. काँग्रेस समितीचे खास अधिवेशन नागपुरात भरवण्यात आले. जमनालाल बजाज व दोघा पटेलबंधूंचे विशेष अभिनंदन करण्याचा ठराव एकमताने पास करण्यात आला. या आंदोलनामुळे मंचरशा आवारी, नीळकंठ देशमुख, भगवानदीन, डॉ नारायण भास्कर खरे, पुरुषोत्तम गोळे, ब्रिजलाल बियाणी व रामभाऊ रुईकर वगैरे काँग्रेस युवक बरेच चमकून उठले. त्यांची काँग्रेस श्रेष्ठींनी खास नोंद घेतली. या आंदोलनासाठी मुंबईने खास मदत पाठवली होती, त्याचीही नोंद घेतली. आंदोलनासाठी

मुंबईतील धान्य व्यापारी संघटना, मारवाडी बाजार, सोने-चांदी बाजार संघटन, शेअर बाजारातील मंडळी व इतर व्यापारी संघटनांनी निधी तर दिलाच, पण कार्यकर्तेही नागपूरला पाठवले होते.

या सत्याग्रहाचे सर्वात मोठे यश यात होते की, सत्याग्रहापुढे प्रांतिक सरकार नमले आणि सरकारने शांततापूर्ण झेंडा मिरवणुकांना परवानगी दिली. हा सत्याग्रह प्रणालीच्या विजयाचा कळस होता. झेंडा हाती घेऊन मिरवणूक काढण्याचा प्रश्न म्हणजे सविनय कायदेभंग पुन्हा सुरू करण्यासाठी शोधलेले एक निमित्त होय, असे हिंदुस्तान सरकारला वाटत होते. या आणि इतर विचारांमुळे प्रांतिक सरकार विरुद्ध व्हाइसरॉय व भारतमंत्र्याचे मन कलुषित झाले होते. यातही या सत्याग्रहाचे यश सामावलेले होते.

जमनालाल बजाज यांनी असहकार आंदोलन व हा झेंडा सत्याग्रह या दोन्ही आंदोलनांमध्ये आपली राजकीय पात्रता व संघटन-कौशल्य तसेच माणसे जमविण्याची क्षमता दाखवून दिली होती. केवळ दातृत्वाने किंवा औदार्यामुळे ते गांधीजी अथवा काँग्रेस श्रेष्ठींना जवळचे वाटत, असे नव्हे. त्यांनी केवळ चार वर्षांतच दोन्ही आंदोलनांच्या यशात मोठे योगदान दिलेले होते. डिसेंबर १९२० च्या नागपूर काँग्रेसच्या यशात त्यांचा मोठा वाटा होता. स्वदेशी व बहिष्काराच्या आंदोलनात मुंबईतील व्यापारी वर्गाचा सहभाग मिळवण्यातही त्यांचे योगदान होते. राजस्थानातील स्वातंत्र्य चळवळीत त्यांचा मोठा वाटा होता. बजाज यांचे वऱ्हाड-मध्यप्रांतातील नशाबंदी मोहिमेतही योगदान होते. म्हणून प्रांतिक पातळीपेक्षा राष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाच्या राजकारणात जमनालाल बजाज यांचा उपयोग करून घेणे स्वाभाविकच होते. म्हणून १९२५ मध्ये ते राष्ट्रीय पातळीवर गेले. संघटन कौशल्यातून त्यांनी आंदोलनास मोठे योगदान दिले. मोतीलाल नेहरूंच्या सूचनेनुसार त्यांच्या ठिकाणी प्रांतिकसमितीवर नागपूरच्या मोरेश्वर अभ्यंकर यांना काँग्रेसने घेतले. अभ्यंकर व वीर वामनरावजोशी यांची युती होऊन प्रांतिक काँग्रेसमध्ये डॉ. नारायण भास्कर खरे, पुरुषोत्तम बळवंत गोळे, ब्रिजलाल बियाणी, समिउल्ला खान व रामभाऊ एस. रुईकर यांनी नवीन जोश निर्माण केला.[८]

## शस्त्रास्त्र व स्फोटकांच्या कायद्याविरुद्ध चळवळ

नागपूरचे मंचरशा आवारी हे जहाल विचारप्रणाली असलेले गृहस्थ झेंडा सत्याग्रहात विशेष चमकले होते. राष्ट्रफौज नामक युवक दल उभारल्यामुळे त्यांना 'जनरल' ही उपाधी लाभली होती. हे जहाल जनरल नागपूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष होते. शस्त्रास्त्र व स्फोटकांसंबंधीच्या कायद्याचा दुरुपयोग करून पोलीस निरपराध नागरिकांना अटक करून खटले भरत असत. म्हणून आवारींनी संकल्पित सत्याग्रहाची नागपुरात तयारी करून मिरवणूक काढणे व सभा भरविण्याची अधिकाऱ्यांना नोटीस दिली होती (एप्रिल १९२७). मात्र पुनमचंद रांका यांना हा प्रयत्न पसंत नव्हता. मंचरशा आवारी यांनी १३ एप्रिल १९२७ रोजी नागपुरात काढलेल्या मिरवणुकीत त्यांच्या चार अनुयायांनी हातात नंग्या तलवारी घेतलेल्या होत्या. हा शस्त्रास्त्र कायद्याचा भंग असल्याने पोलिसांनी तलवारी जप्त करून चौघांना अटक केली. तरीही आवारींनी निर्धाराने सत्याग्रह चालूच ठेवला. म्हणून २४ मे १९२७ रोजी जनरल आवारींना अटक करण्यात आली. त्यांच्यावर खटला भरून ४ जून १९२७ रोजी त्यांना चार वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा देण्यात आली. प्रारंभी हा लढा काँग्रेसचा अधिकृत कार्यक्रम नव्हता. परंतु काँग्रेस कार्यकारी समितीने आवारींच्या सत्याग्रहाची चौकशी करून अहवाल तयार करण्यासाठी सरदार पटेलांना नागपूरला पाठविले. त्यांच्या शिफारसीनुसार आवारींच्या कारावास काळात नागपूर शहर काँग्रेस समितीने हा सत्याग्रह चालू ठेवण्याचा निर्णय घेतला. कारण स्फोटकांसंबंधीचा कायदा खूप अन्यायकारक होता. काँग्रेसशी संबंध नसलेली एक महिलाही या सत्याग्रहात होती व तिला एक वर्षाची शिक्षा झाली होती.

नागपूर काँग्रेस समितीत या सत्याग्रहाबाबत एकमत नव्हते. गजाननराव ढवळे व रामभाऊ रुईकरांनी अंग काढून घेतल्यावर तिजारे व नीळकंठराव घटवाई यांनी या सत्याग्रहाची सूत्रे हातात घेतली. हा सत्याग्रह बरेच दिवस चालू राहिला. तथापि त्यात सातत्य नव्हते. त्यात अधूनमधून खंड पडत राहिला. कारावासात असताना मंचरशा आवारींनी ७५ दिवसांचे उपोषण केले होते. मद्रास काँग्रेस अधिवेशनात (डिसेंबर १९२७) या सत्याग्रहाबाबत सहानुभूती व्यक्त करणारा ठराव मंजूर झाला होता. शेवटी जुलै १९२८ मध्ये नागपूर शहर काँग्रेस समितीने हा सत्याग्रह मागे घेतला. तथापि सत्याग्रहाचे स्पिरिट जिवंत राहिले.

## बार्डोलीचा सत्याग्रह

असहकार चळवळीतून स्फुरण पावलेला मुळशी सत्याग्रह शेतकऱ्यांच्या उपजीविकेच्या व कामाच्या मूलभूत हक्कांसाठी होता. त्यानंतर १९२८ साली झालेला बार्डोली सत्याग्रह ब्रिटिश कलोनिअल सरकारच्या शोषक व अरेरावी हुकूमशाहीविरुद्ध होता. शेतकऱ्यांकडून सक्तवसुली ही व्यथा फक्त बार्डोलीची नव्हती. ती साऱ्या भारताची होती. वस्तुतः आपला कायदेभंग लढा बार्डोलीतूनच सुरू करण्याचा गांधीजींचा आधीपासून विचार होता. पण तो बेत लांबणीवर टाकला होता.

देशातील शेतीविषयक प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी सरकारने २३ एप्रिल १९२६ रोजी लॉर्ड लिनलिथगोच्या अध्यक्षतेखाली रॉयल कमिशन नेमले. त्यात चार गोरे व पाच भारतीय राजनिष्ठ सभासद होते. त्यांत बाळकृष्ण सीताराम कामत हे अभ्यासू मराठी सदस्य असले, तरी आयोगाची कार्यकक्षा अगदीच मर्यादित असून लिनलिथगो हे वाणिज्यवादी अध्यक्ष होते. म्हणून हे कमिशन अगदी निरुपयोगी ठरले.

इंग्रज सरकारने शेतसाऱ्यात स्वेच्छानुसारी पद्धतीने २५ टक्के वाढ केली व ती बळजबरीने आणि हिंसाचारी मार्गाने वसूल करणे सुरू केले. म्हणून १९२८ मध्ये सत्याग्रह करणे भाग पडले. हा बार्डोलीचा सत्याग्रह केवळ एका तालुक्याचा न राहता संपूर्ण पश्चिम महाराष्ट्र त्यात सामील झाला. विशेषतः मुंबई प्रांतिक काँग्रेस समिती, युवा नेते युसुफ मेहेरअली, स. का. पाटील, नरिमन यांनी सत्याग्रहास मोठी मदत दिली. काँग्रेसचे इतिहासकार पट्टाभी सीतारामय्या यांनी म्हटल्याप्रमाणे हा सत्याग्रह भव्यदिव्य होता. शेतसारा वाढवू नये असे शेतकऱ्यांचे म्हणणे नव्हते. तथापि कृषी अर्थव्यवस्था व शेतकऱ्यांचे श्रम, शेतमजुरीची स्थिती, रस्ते, भावपातळी व जागतिक स्थिती अशा घटकांचा अभ्यास करूनच महसुलाचे दर व वसुलीची पद्धती निर्धारित करण्याची शेतकऱ्यांची मागणी होती. तसे काही न करता ठरावीक काळाने महसुलाचे दर स्वेच्छानुसारी पद्धतीने वाढवले जात असत. जाणकारांची स्वतंत्र समिती नेमून व सर्व बाजूंनी विचार करूनच महसुलाचे दर ठरवावे अशी त्यांची मागणी होती. सरकार जमाबंदी अधिकाऱ्यांचे अहवाल गोपनीय ठेवत असे. बार्डोलीच्या शेतकऱ्यांवर सरकारने २५ टक्के दरवाढ, एकही कारण न देता, लादली होती. अचानक घोषित केलेली शेतसाऱ्यातील वाढ असमर्थनीय होती.

याविरुद्ध अर्ज करून रीतसरपणे दाद मागण्याचे लोकांनी प्रयत्न केले होते. तथापि अधिकाऱ्यांनी दाद दिली नाही. म्हणून शेतकऱ्यांनी शेतसारा बंदीची नोटीस दिले. तरीही सरकार अविचल! तोपर्यंत काँग्रेसने हस्तक्षेप केलाच नव्हता. म्हणून शेतकऱ्यांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. तथापि सरकारने हे आव्हान मानून बळाचा दुरुपयोग केला. शेतसाऱ्याच्या वसुलीकरिता शेतकऱ्यांची गुरेढोरे, शेतीची अवजारे व घरांमधील सामान जप्त करण्याचा अधिकाऱ्यांनी पवित्रा घेतला. म्हणूनच आपले नेतृत्व करण्यासाठी लोकांनी सरदार वल्लभभाईंना निमंत्रण दिले. पटेलांनी सत्याग्रहाचे संघटन केले. पटेलांनी निमंत्रण स्वीकारले ते रागाने नव्हे, त्वेषाने अगर आवेशी वृतीने नव्हे; तर काहीसे नाखुषीने, विचारमंथनपूर्वक, गांभीर्याने आणि आचारविचार विमर्शाने.

सरकारने शेतकऱ्यांना मारहाण करण्यासाठी पोलिसांव्यतिरिक्त ४० भाडोत्री पठाण आणले होते. 'फोडा आणि झोडा' या नित्याच्या धोरणाचाही पुरेपूर उपयोग केला. सरकारने सर्व शक्तिनिशी बलोपयोग केला. स्वतः गव्हर्नर सर लेस्ली विल्सन महाशयाने पुण्यात भरलेल्या विधिमंडळात जाहीर केले की, "ऑल द रिसोर्सेस ऑफ द एम्पायर वुड बी युजड् टू क्रश द नो टॅक्स कँपेन ऑफ बार्डोली". गव्हर्नरच्या या धमकीविरुद्ध मध्यवर्ती कायदेमंडळाचे अध्यक्ष विठ्ठलभाई पटेलांनी राजीनामा देण्याची धमकी दिली. त्यांचे बंधू सरदार पटेल यांनी सत्याग्रहाचे चांगले संघटन करून लढा दिला आणि तोही सत्याग्रहाच्या तंत्रानुसारच! अखेरीस हा लढा यशस्वी झाला. सरकारला एक खास न्यायालय स्थापन करावे लागले. शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य कराव्या लागल्या. जप्त केलेले पशुधन व मालमत्ता मालकांना परत करावी लागली. अटक केलेल्यांना मुक्त करावे लागले. महत्त्वाचे म्हणजे शेतसारा वाढविणे शासनाला शक्य झाले नाही. साऱ्यांचे दर तसेच राहिले.[१]

बार्डोली सत्याग्रहामुळे हिंदुस्तानभर चांगला संदेश पोहोचला. सत्याग्रहाचे सामर्थ्य दिसून आले. वल्लभभाई पटेल खऱ्याअर्थी आम जनतेचे 'सरदार' झालेत. काँग्रेसमधील त्यांचे स्थान उंचावले. स्वातंत्र्य आंदोलनाच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचे म्हणजे १९२३ पासून काँग्रेसमध्ये व आंदोलनात जी मरगळ आली होती ती दूर

झाली. काँग्रेस पक्षाची मान उंचावली. स्वराज्य पक्ष व प्रतियोगी सहकारिता पक्षातील हिंदुत्ववादी मंडळींना काँग्रेसमध्ये स्थान उरले नाही. त्यांतील बरेच हिंदुमहासभेत गेले. काहींनी राजकारणच सोडले.

बार्डोली सत्याग्रहाला पाठिंबा देण्यासाठी लालजी नारायणजी व के. एम. मुन्शी वगैरे आमदारांनी कायदेमंडळाचा राजीनामा देऊन सरकारी धोरणाचा निषेधही केला होता.

बार्डोली सत्याग्रहामुळे गुजरातप्रमाणे महाराष्ट्रातही किसान जागृती होण्यास मोठी मदत झाली. आपल्या हक्कांसाठी शेतकरी जागा होऊ लागला. हा नवीन प्रभाव बार्डोलीप्रमाणे संयुक्त प्रांतातील किसान आंदोलनाचाही होता. विशेषतः बार्डोलीनंतर मुंबई प्रांतातील नोकरशाहीचे कडवे धोरण थोडे नरम झाले. त्यामुळे लोकांना सत्याग्रहाचे महत्त्व पटले. प्रांतिक सरकारने मांडलेल्या 'जमिनीचे तुकडे बंदी' विधेयकाविरुद्धही शेतकऱ्यांनी आंदोलन केले होते. बार्डोली आणि तुकडे बंदीची चळवळ यशस्वी झाल्यानंतर किसानांचे प्रश्न सोडविण्यासाठी सरदार पटेलांनी १९२९ साली 'मुंबई इलाखा लँड लीग' स्थापन केली. शेतकऱ्यांच्या आग्रहानुसार पटेलांना अध्यक्षपदी नेमण्यात आले. बार्डोलीमुळे गांधीजी व पटेलांच्या सत्याग्रहरूपी अमोघ शस्त्राचे बळ शेतकऱ्यांना तसेच ब्राह्मणेतर पक्षालाही पूर्णपणे कळून आले. तेव्हापासून ब्राह्मणेतर पुढारी व शेतकरी स्वातंत्र्य चळवळीकडे आकर्षित झाले. सरकारलाही या बदलाची दखल घ्यावी लागली.

इतके मात्र खरे की, कर्जाच्या विळख्यात सापडलेला शेतकरी जागतिक मंदीमुळे आणखी गुरफटला. बंधमुक्त सावकारी व कर्जबाजारीपणा ही ब्रिटिश सरकारची जीवघेणी देणगी होती. म्हणूनही ते सरकार घालवायचे असा विचार पसरू लागला.

मुळशीच्या सत्याग्रहास रूढ अर्थाने शेतकरी चळवळ म्हणता येत नाही हे खरे. तथापि शेतजमिनीशी निगडित प्रश्नावर अशिक्षित व निर्धन शेतकऱ्यांनी नागरी भागातील सुशिक्षित वर्गातील नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या हक्कासाठी, उदरनिर्वाहासाठी आणि अस्तित्वासाठी केलेला हा सत्याग्रह होता. बार्डोली सत्याग्रह मुळशीची पुढील आवृत्ती होती. या दोन्हीही सत्याग्रहांमध्ये पुरुषांच्या जोडीला महिला

होत्या. बार्डोलीच्या शेतकऱ्यांना शोषक प्रवृत्तीच्या परकीयांविरुद्ध न्यायासाठी लढावे लागले. त्यांना वाणिज्यवादी व वसाहतवादी शोषकांशी संघर्ष करावा लागला. त्यांचे नेतृत्व वल्लभभाई नामक सरदाराने केले. मुळशीकरांचा लढा शेतकऱ्यांचे सर्वस्व आणि एकूण अस्तित्वासाठी होता. हा संघर्ष केवळ भांडवलदारांविरुद्ध नव्हता, तो वाणिज्यवादी ब्रिटिश सत्ताधीशांशीही होता. हे दोन्ही सत्याग्रह महात्मा गांधी यांनी स्वराज्यासाठी उभारलेल्या असहकार चळवळीतूनच उपजले होते. मुळशीकरांचे नेतृत्व बापट नामक सरदाराने व भुस्कुटे नावाच्या भावी मार्क्सवाद्याने केले. मुळशीमुळे कोयना धरण व इतर काही योजना लांबणीवर पडल्या हे खरे. पण त्यामुळे नुकसन भरपाई आणि पुनर्वसनाचे तत्त्व पुढे आले. तत्पूर्वी रेल्वे, रस्ते, सरकारी इमारती, सेनादलाच्या छावण्या व कारखान्यांसाठी हजारो लाख एकर जमीन सरकारने सत्तेच्या जोरावर आपल्या ताब्यात घेतली होती. शेतकऱ्यांची संमती, नुकसान भरपाई अथवा पुनर्वसनाचा विचारही झाला नव्हता. १८९४ चा भूसंपादनाचा कायदा हा भयंकर अन्यायकारक होता. त्याविरुद्ध मुळशीकर लढले. त्यांचा पराभव झाला, तर बार्डोलीकरांचा विजय झाला. पण दोन्ही संग्रामांनी ब्रिटिशांना आपल्या अरेरावीचे व धोरणांचे पुनर्विलोकन करावे लागले. स्वतः व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विनने गव्हर्नर विल्सनला शेतसारा वाढीबाबत जाब विचारला होता.

मुळशी, नागपूरचा झेंडा सत्याग्रह, शस्त्रास्त्रांच्या कायद्याविरुद्धचा संघर्ष आणि बार्डोली सत्याग्रह यांमुळे महाराष्ट्रात हजारो स्वातंत्र्य सैनिकांची जडणघडण झाली. अहिंसावादी आंदोलनाचे तंत्र व महत्त्व लाखोंना पटले. याचा प्रत्यय सायमन कमिशनविरोधी आंदोलनात लवकरच आला. मुंबईतील गिरणीकामगार वेतन-संरक्षणासाठी तेव्हा संपावर होते, तर या इलाख्यातील किसान शेतसारा कमी करण्यासाठी भांडत होते.

कृषी अर्थव्यवस्थेची दुःस्थिती ओळखून केशवराव जेधे, नाना पाटील व दिनकरराव जवळकर यांनी ब्राह्मणेतर चळवळीचे मूळ स्वरूप बदलून ब्रिटिश-विरोधी पवित्रा घेतला. ती काळाची गरज होतीच आणि पुढील दशकात ही चळवळ महाराष्ट्र काँग्रेसमध्ये विलीन झाली. परिणामतः १९४२ च्या क्रांतिलढ्यात सातारा हा काँग्रेसचा एक बालेकिल्ला ठरला.

## राष्ट्रीय पाठशाळा

असहकार चळवळीपासूनच्या काळात महाराष्ट्रात जशी स्वातंत्र्यसैनिकांची नवी पिढी उदय पावली तशाच अनेक राष्ट्रीय पाठशाळा आणि विधायक कार्य करणाऱ्या संघटना व सत्याग्रह आश्रम स्थापन झाले. साबरमती आश्रमाच्या आकृतिबंधानुसार वर्ध्यात सत्याग्रह आश्रम स्थापन करण्यात आला (जुलै १९२१). विनोबा भावेंच्या मार्गदर्शनानुसार तेथे महारोगी सेवासंघ, खादी निर्मिती केंद्र कार्यरत झाले. राष्ट्रीय जागृती हे मूलभूत ध्येय ठेवून तेथे सत्याग्रही घडवण्याचे काम अखंडपणे चालू असे. नागपूरचा झेंडा सत्याग्रह हे सत्याग्रह आश्रमाचे मोठे योगदान होते. असहकार चळवळीत कसाला लागलेले शंकरराव देव, गंगाधरराव देशपांडे, वामन विठ्ठल दास्ताने, त्र्यंबकराव देवगिरीकर आणि जळगावचे देवकीनंदन नारायण हे नजीकच्या दिवसांत महाराष्ट्र काँग्रेसचे व काँग्रेसच्या चळवळीचे 'पंचायतन' मानले जाऊ लागले. प्रत्येक सत्याग्रहात त्यांनी योगदान दिले. ज्या काळात प्रत्यक्ष आंदोलन नसायचे तेव्हा ते युवकांच्या संघटना उभारत व त्यांना मार्गदर्शन करीत व जनजागृती करीत. लोकांमध्ये आत्मनिर्भरता निर्माण करण्यासाठी झटत. खादी व नशाबंदीच्या कार्यास वाहून घेत.

मुंबईत सरोजिनी नायडू, बॅ. के. एफ. नरिमन व बा. गं. खेर तसेच युवा नेते युसुफ मेहेरअली यांनी जनजागृती अभियान उभारले होते. याचा प्रत्यय सायमन आयोग आंदोलनात आला.

१९२५ साली गांधीजींनी अखिल भारतीय चरखा संघ स्थापन केल्यावर महाराष्ट्र चरखा संघ स्थापन करण्यात आला. वा. वि. दास्ताने हे या संघटनेचे संचालक झालेत. ही संघटना केवळ खादी निर्माण करीत नसे. स्वातंत्र्य आंदोलनास आवश्यक अशी आधारभूत संरचना निर्माण करणे हे तिचे महत्त्वाचे ध्येय होते. पुढील काळात स्थापन झालेला सेवाग्राम आश्रम, पवनार आश्रम (१९३७) वगैरे जगप्रसिद्ध आहेतच. अशा अनेक संघटनांमधील शिक्षक व विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्याची प्रेरणा जागृत करून आम जनतेला स्वातंत्र्यलढ्यात आणले. त्यांची खादी-निर्माण केंद्रे केवळ कापड निर्माण करीत नसत. त्यांनी स्वातंत्र्य सेनानी निर्माण केले. चळवळीसाठी वित्तबळ

उभारले. अस्पृश्यांना अनेक हिंदू मंदिरे खुली केली. फेब्रुवारी १९२७ मध्ये गांधीजींनी केलेल्या प्रदीर्घ महाराष्ट्र दौऱ्यामुळे या प्रांतात राष्ट्रीय चळवळीला व्यापक स्वरूप प्राप्त झाले. त्याचा प्रत्यय सायमन आयोग आंदोलन प्रसंगी आला. बार्डोली सत्याग्रहासाठीही पुणे, जळगाव, धुळे, नाशिक, मुंबई व ठाणे जिल्ह्यांमधूनही सत्याग्रही गेले होते.

सरकारी शिक्षणसंस्थांवर बहिष्कार घालणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच निराधार मुलांना राष्ट्रीय बाण्याचे शिक्षण देण्यासाठी महाराष्ट्रात अनेक राष्ट्रीय पाठशाळा निर्माण झाल्या होत्या. काही पाठशाळा विहित अभ्यासक्रमाबरोबरच स्वावलंबनाचे शिक्षण देत असत. बाळूकाका कानिटकर यांनी सेवाभावे चिंचवडला असे एक अनाथ विद्यार्थिगृह दहा वर्षे चालविले होते. गांधीजींनी या संस्थेला 'स्वावलंबन राष्ट्रीय पाठशाळा' असे नाव देण्याची सूचना करून २५,००० रुपयांचे वार्षिक अनुदान दिले होते. गो. आ. देशपांडे, काका कारखानीस, अण्णासाहेब सहस्रबुद्धे वगैरे या पाठशाळेत शिक्षक होते. नाथ घाणेकर अशीच राष्ट्रीय पाठशाळा साताऱ्याला चालवत. नगरला राष्ट्रीय शाळा चालवणारे दादा चौधरी, सड्डा आणि चिंचोरकर तसेच जळगावला राष्ट्रीय शाळा चालवणारे देवकीनंदन नारायण या सर्वांनीच आंदोलनासाठी अनेकदा कारावास भोगला होता. रत्नागिरीस राष्ट्रीय शाळा चालवणारे अप्पासाहेब पटवर्धन हेही असहकार चळवळीपासूनच्या प्रत्येक आंदोलनात होते. जळगाव जिल्ह्यातील खिरोदा या लहानशा गावात १९३१-३२ सालात राष्ट्रीय शाळा काढणाऱ्या धनाजी नाना चौधरींनी शेकडो स्वातंत्र्य सैनिक घडविले होते.

वाईच्या प्राज्ञ पाठशाळेचे प्रमुख नारायणशास्त्री मराठे (केवलानंद सरस्वती) हे वाई तालुका काँग्रेस समितीचे अध्यक्ष होते. या संघटनेने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, दिनकरशास्त्री कानडे, महादेवशास्त्री दिवेकर, श्रीपाद शंकर नवरे, भय्याशास्त्री वाटवे व श्रीराम सावरगावकर वगैरे विख्यात विद्वान व स्वातंत्र्य सैनिक घडविले होते. या सर्वच मंडळींच्या हालचालींवर पोलिसांची नजर असे. महाराष्ट्रात अशा कित्येक राष्ट्रीय पाठशाळा निर्माण झाल्या व त्यांनी १९४२-४३ पर्यंत हजारो स्वातंत्र्य सैनिक घडविले. विशेष म्हणजे त्यांच्यातील बहुसंख्य जण निष्ठापूर्वक स्वातंत्र्यलढ्यात उतरले होते.

## बेळगावचे काँग्रेस अधिवेशन

बेळगावचा भाग आज महाराष्ट्रात नसला तरी ऐतिहासिकदृष्ट्या उत्तर कर्नाटकातील मराठी भाषिक प्रदेश हा महाराष्ट्राचा अविभाज्य भाग होता. न्या. रानडे, गोखले व टिळकांच्या कार्यकाळातील सर्वच चळवळींमध्ये या भागाचा सहभाग होता. गंगाधरराव देशपांडे, गोविंदराव याळगी, शामराव विठ्ठल काळकुंद्री, कानविंदे, दत्तोपंत बेळवी, केशवराव रामचंद्र जोशी, गोडबोले वगैरे मंडळींचे टिळक हे श्रद्धास्थान होते. टिळकांनंतर **कर्नाटक केसरी** गंगाधरराव देशपांडे हे महात्मा गांधींचे निष्ठावंत अनुयायी झाले. असहकार चळवळीत गंगाधरराव व त्यांच्या सहकाऱ्यांनी जिद्दीने करून दाखवलेल्या चांगल्या कामगिरीमुळे २६ डिसेंबर १९२४ पासून भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाचा मान बेळगावला लाभला. गंगाधररावांप्रमाणेच हिंदुस्तानी स्वयंसेवकदलाचे प्रमुख डॉ. नारायणराव हर्डीकर यांचेही यात फार मोठे योगदान होते. महात्म गांधी या यशस्वी अधिवेशनाचे अध्यक्ष होते.

बेळगाव काँग्रेसच्या पूर्वसंध्येला सविनय कायदेभंगाचा कार्यक्रम मान्य नसलेले अनेक टिळकवादी पुढारी होते. वकिलांना जसा आपला व्यवसाय करायचा होता, त्याचप्रमाणे काही राजकारण्यांना कायदेमंडळांमध्ये जायचे होते. तर काहींना खादीचे कपडे आवडत नव्हते इत्यादी. म्हणूनच काँग्रेसमध्ये दुफळी होण्याचाही संभव दिसत होता. देशभर जातीय दंगे पसरले होते. दिल्ली, गुलबर्गा, नागपूर, लखनौ, शहाजहानपूर, अलाहाबाद, जबलपूर आणि कोहट येथील जातीय दंग्यांमुळे देश अस्वस्थ झालेला होता. सरहद्द प्रांतातील कोहटने तर 'भारताचा कणा मोडला होता'. तो शमविण्यासाठी गांधीजींनी २१ दिवस उपोषण केले होते.

तथापि गांधीजींनी एका समितीच्या मदतीने सर्व वादग्रस्त ठरावांबाबत अधिवेशनात एकमत घडवून आणले, आणि फेरवादी व नाफेरवादी यांच्यामध्ये होणारी संभाव्य रणधुमाळी टाळली. मात्र विसंवादी सूर निघाले हे खरे. सरकारने देऊ केलेले मंत्रिपद स्वीकारावयाचे नाही, हे बंधन पाळण्यास स्वराज्य पक्षाच्या सभासदांनी मान्यता दिली.

काँग्रेस अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष गंगाधरराव देशपांडे, स्वयंसेवकदलाचे प्रमुखडॉ. नारायणराव एस. हर्डीकर, काका कालेलकर, कृष्णराव व जीवनराव हे याळगी बंधू, बाबासाहेब सोमण वगैरेंनी अत्यंत मेहनत घेऊन हे काँग्रेस अधिवेशन यशस्वी केले. विशेष म्हणजे अधिवेशन संपताच स्वागताध्यक्षांनी खर्चाचा हिशेब चोख देऊन काँग्रेसचे खजिनदार जमनालाल बजाज यांच्याकडून प्रशंसा मिळवली होती. अधिवेशनाचा खर्च काटकसर करून भागवल्यामुळे पंचवीस-तीस हजार रुपये शिल्लक राहिले होते. असे क्वचित घडत असे. बेळगाव अधिवेशनात लष्करावरील खर्च, नोकरशाहीवरील अतोनात खर्च आणि न्यायालयांवरील खर्चात कपात करण्याच्या मागण्या सरकारकडे करण्यात आल्या होत्या. याच अधिवेशनात सरकारी प्रशासन देशी भाषांमधून करण्यात यावे आणि हिंदीला राष्ट्रभाषेचा दर्जा देण्यात यावा यासाठी ठराव संमत करून ते सरकारकडे पाठवले होते. चित्तरंजन दास, मोतीलाल नेहरू आणि महात्मा गांधी यांच्यात नोव्हेंबर १९२४ मध्ये जो तडजोडीचा करार झाला होता, त्यावर बेळगाव काँग्रेसने शिक्कामोर्तब केले होते.[१०]

स्वराज्य पक्षास नेस्तनाबूत करण्याचा सरकारचा प्रयत्न होता. तो हाणून पाडण्याच गांधीजी प्रयत्न करीत होते. तसेच कायदेमंडळातील प्रवेशाबाबतचे मतभेद विसरून, फेरवादी व नाफेरवादी यांच्यामध्ये समेट घडवून आणण्यासाठी गांधीजी झटत होते. फक्त विदेशी कापडावरील बहिष्काराबाबत मात्र ते अविचल होते. असहकारितेच्या इतर कार्यक्रमाबाबत त्यांनी काँग्रेसजनांना स्वातंत्र्य दिले होते. तरीही न. चिं. केळकर, बॅ. जयकर, डॉ. मुंजे, अणे वगैरे मराठी पुढाऱ्यांनी गांधीजींच्या सूचनांना नेहमीच प्रखर विरोध केला होता. कोलकात्यात झालेल्या समेटास मराठी नेत्यांनी अनिच्छेने संमती दिली, ती केवळ तडजोड म्हणून.[११]

❑❑

## संदर्भ


१. **केसरी**, ८ फेब्रुवारी १९२१.

२. बाँबे लेजिस्लेटिव कौन्सिल डिबेटस्, २२ मार्च १९२१.

३. य. दि. फडके, **विसाव्या शतकातील महाराष्ट्र**, खंड तिसरा, पृ. ८०-८२.

४. के. के. चौधरी, "ट्रायल ऑफ सेनापती बापट", ६ मे १९९२, **इंडियन एक्सप्रेस**.

५. चौधरी, **झुंजार पुणे**, पृ. २००-०२.

६. हिंदुस्तान सरकार, होम पोलिटिकल, फाईल क्र. २८० (१९२३), डेव्हिस यांचे टिपण, १२ ऑक्टोबर १९२३.

७. मा. ज. कानिटकर (संपा.), **नागपूर प्रांताचा इतिहासः १८८५-१९३५**, भाग २, पृ. ३५-३६.

८. चौधरी, **वर्धा गॅझेटिअर**, १९९२, पृ. ७१-७२; फडके, उपरोक्त, पृ. ९८-१००.

९. पट्टाभी सीतारामय्या, खंड पहिला, पूर्वोक्त, पृ. ३२५.

१०. कित्ता, पृ. २७६-७८.

११. फडके, उपरोक्त, पृ. १०८.

प्रकरण ५

## समाजसुधारणा अभियानाचे नवे स्वरूप

एकोणिसाव्या शतकातील त्या सामाजिक प्रबोधन पर्वात महाराष्ट्रात पाच-सहा विचारप्रणाली प्रसवल्या. त्या पर्वात महात्मा जोतीबा फुले, न्या. महादेव गोविंद रानडे, लोकहितवादी व आगरकरांनी आपापल्या विचारधारेनुसार जे अपूर्व प्रबोधन अभियान उभारले होते, त्यास अखिल भारतात तोड नव्हती. त्यांनी प्रस्थापित धर्मकल्पना तसेच परंपरावादी समाज घटकांना जबरदस्त आव्हान दिले होते. त्यांनी वंचित व शोषित बहुजनसमाज तसेच पांढरपेशा वर्गाच्या सामाजिक व परंपराजन्य समस्यांना लक्ष्य केले. सामाजिक प्रश्नांच्या सर्व अंगांवर पुण्या-मुंबईत प्रखर वाद झाले. विचारमंथन झाले. त्या मंथनातून महाराष्ट्रात विविध विचारप्रणाली प्रसवल्या, काही समांतर तर काही परस्पर छेदक! पुढील काळात टीका प्रखर झाली, पण ती समाजकारणात राजकारण आल्यामुळे आणि ब्रिटिशांच्या डिव्हाइड अँड रूल राजनीतीमुळे! मात्र त्यातून नवीन सामाजिक जाणिवा निर्माण झाल्या. याबाबतचे सखोल विश्लेषण मी **खंड पहिला** यात केलेले आहे. अभ्यासकाला त्यातून दिसेल की, सुधारकांची ती पिढी सत्यशोधक समाज, राष्ट्रीय सामाजिक परिषद, प्रार्थनासमाज वगैरे संघटनांच्या विद्यमाने एका बाजूने जनमत घडवत होती व दुसऱ्या बाजूनेकायदे करण्यासाठी, उदासीन वृत्तीच्या, ब्रिटिशांवर दडपण आणत होती. त्यांचा तो लढा केवळ सनातनी वर्गाविरुद्धच नव्हता तर टिळकांसारखे प्रस्थापित नेते यांच्याशीही होता. आणि दैवदुर्विलास असा की, इंग्रजांचे त्यांना फारसे साहाय्य मिळत नसे.

जोतीबा फुले व रानडे या दोघांनी अनेक माणसे घडवली, त्यांना समर्थ केले. आपल्यानंतर आपले कार्य अविरत चालू राहावे यासाठी विशेषतः रानडेंनी कर्तबगार माणसे तर घडवलीच, पण शिवाय अनेक संस्था, क्लब, वाचनालये स्थापन केली. सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी, सेवासदन व सोशल सर्व्हिस लीग या संघटना त्यांपैकीच. १९१८ सालातील एका सभेत शाहू महाराजांनी न्या. रानडे व गोपाळ कृष्ण गोखलेंचे ऋण मान्य करताना जाहीर केले, “ ज्यांच्या मरणामुळे जनतेला अतिशय तळमळ लागून राहिली असे माझे मित्र न्या. रानडे आणि गोपाळराव

गोखले यांनी मागासलेल्या लोकांची सुधारणा करण्यासाठी प्रयत्न केले होते. मागासलेल्या लोकांमध्ये शिक्षणप्रसार करण्यासाठी महत्प्रयास केले पाहिजे ही गोष्ट मी प्रथम त्यांच्यापासून शिकलो."[१]

हे जितके सत्य होते, तेवढा हे मान्य करण्यात महाराजांच्या मनाचा मोठेपणाही होता.

शाहू महाराज व सयाजीराव गायकवाड महाराज या दोघा राजपुरुषांनी महाराष्ट्राच्या समाजसुधारणा अभियानास मोठे योगदान दिले. बरेचसे समकालीन असलेल्या या राजांनी आपली सत्ता, शक्ती व वित्तबळ बहुजनसमाजाच्या कल्याणासाठी वापरले. दोघांची विचारप्रणाली आणि कार्यपद्धती भिन्न स्वरूपाची असली, तरी दोघांचाही समाजास लाभ झाला. सयाजीराव जरी बडोदा संस्थानाचे अधिपती असले, तरी पुणेच नव्हे तर महाराष्ट्राशी त्यांचे घनिष्ट संबंध होते. न्या. रानडे, सार्वजनिक काका व टिळकांशीही त्यांची जवळीक होती. सयाजीराव महाराजांनी मराठी क्रांतिकारकांना शक्य ते साहाय्य दिले. आश्रय दिला. दोघांनी कला व कलावंतांना उत्तम आश्रय दिला. शाहू महाराज व सयाजीराव हे दोघेही संगीत व सप्तकलांचे रसिक होते मात्र दोघांत बराच फरक होता. शाहू राजे बेडर व चाणाक्ष होते, तर सयाजीराव आपली मते निश्चित असूनही शांतपणे विचार करून व संबंधितांचा सल्ला घेऊन त्यानुसार कार्यवाही करीत. पहिले कर्मवीर होते तर दुसरे तत्त्वचिंतक! शाहू क्षत्रियत्वाचा अभिमान बाळगणारे व देवपूजा करणारे धर्माभिमानी होते. सयाजीराव मुळातच अज्ञेयवादी, बुद्धीखेरीज कशावरच विश्वास न ठेवणारे, परंतु लोकाराधनेसाठी सारे काही करणारे आणि करविणारे होते. शाहू कट्टर ब्राह्मणेतर तर सयाजीरावांचा ओढा मानवतावाद व विश्वबंधुत्वाकडे होता. मात्र आपल्या प्रजेवर त्यांचे सदैव प्रेम होते.

समबुद्धीने पाहता दिसते की, शाहू महाराजांनी जे कार्य केले ते सारेच सयाजीरावांनी केले. इतकेच नव्हे तर आधीच केलेले होते. वेदोक्त प्रकरण आधी सयाजीराव महाराजांनी सुरू केले. शाहू महाराजांनी पुढे ते धसास लावले. सयाजीरावांनीआपल्या पंगतीला अस्पृश्यांना घेतले. त्यांना नोकऱ्या दिल्या. त्यांनी बाबासाहेब आंबेडकरांच्या

शिक्षणासाठी पाण्यासारखा पैसा खर्च केला. शिवाय अलिप्त भावनेने व दृष्टीने! साहजिकच सयाजीरावांच्या सामाजिक किंवा जातीसाठी केलेल्या महान कार्याचा गाजावाजा झाला नाही. आणि त्यांच्यावर टीकेचा वर्षावही झाला नाही. याउलट शाहू महाराजांनी ब्राह्मणेतर चळवळ हे आपले एकमेव उद्दिष्ट मानले व चळवळीत आपला प्राण ओतला. चळवळीसाठी राजपद सोडण्याची आणि कोणतीही आपत्ती भोगण्याची त्यांची तयारी होती. या दोन राजर्षींचा परिणाम असा झाला की, सयाजीरावांना नितांत आदर लाभला, तर शाहू महाराजांना अपूर्व प्रेम मिळाले. दोघांनीही ब्राह्मणेतरांच्या शिक्षणासाठी पैसा खर्च केला, त्यांना नोकऱ्या दिल्या, वसतिगृहे काढली. अस्पृश्यांना मानाचे स्थान दिले.[२]

## सत्यशोधक चळवळीचे दुसरे पर्व

जोतीबा फुले यांच्या कार्यकालात सत्यशोधक समाज ही सांपार्श्विक बंधुभावाची विचारप्रणाली अंगीकारलेली उपक्रमशील संघटना होती. म्हणूनच प्रस्थापित धर्मसंघटनांना ते जबरदस्त आव्हान वाटत होते. सर्वच वेद व वैदिक परंपरा त्यांनी धिक्कारली. चातुर्वर्ण्य व्यवस्थाच नाकारली होती. अगदी सरळसोट व जहाल विचार व आचार निःसंदिग्ध भाषेत प्रकट करीत असता, त्यांना समाजाचा प्रखर विरोध पत्करावा लागला व त्यांचा निषेधही झाला. तथापि विरोधाला तोंड देण्याचे आणि विरोधकांना समर्थपणे उत्तर देण्याचे जोतीबांमध्ये सामर्थ्य होते. त्यांच्यात नैतिक धैर्य होते. त्यामुळे त्यांच्यानंतर सावित्रीबाई फुले, नारायणराव लोखंडे, कृष्णाजी पांडुरंग भालेकर वगैरेंनी साधारणपणे मूळ स्वरूपात व अपेक्षित स्पिरिटमध्ये सत्यशोधक चळवळ चालू ठेवली. त्याच काळात रानडेंची सामाजिक परिषद व प्रार्थनासमाजही सामाजिक सुधारणा कार्य करीत होता.

तथापि याच नव्हे तर जगातील सर्वच सामाजिक चळवळींना तेजी-मंदीच्या व प्रगती-दुर्गतीच्या चक्रातून जावे लागले. मात्र तरीही त्यांची उपयुक्तता कधीच संपली नाही. त्यांचे मूल्य कायम राहिले. या न्यायानुसार जोतीरावांना अभिप्रेत असलेली मानवतावादी व विश्वबंधुत्वाची विचारप्रणाली त्याच स्वरूपात कायम राहणे असंभव होते. तरीही त्यांच्या अभियानाचा महाराष्ट्राला चांगला उपयोग झाला. विसाव्या

शतकाच्या तिसऱ्या दशकापासून राष्ट्रीय काँग्रेसला बहुजनसमाजाच्या आशाआकांक्षा व गरजांकडे आस्थेने पाहणे भाग पडले! महात्मा गांधी यांनी कर्मवीर वि. रा. शिंदे, भाऊराव पाटील वगैरेंना उत्तेजन दिले ते याच भूमिकेतून!

समाजसुधारक व दुर्धारकांमधील संघर्षात कलोनिअल राज्यकर्ते हा तिसरा पक्ष होताच. हा संघर्ष चालू ठेवण्यात आणि सामाजिक भेदाभेदांना उत्तेजन देण्यात ब्रिटिशांना रस होता. डिव्हाइड अँड रूल ही राजनीती मुसलमान व संस्थानिकांपुरतीच मर्यादित नव्हती, ती त्यांना जातिभेदांसाठीही उपयुक्त वाटत होती. काही समाजघटकांना नोकरीच्या जादा संधी देणे व मराठे आणि ब्राह्मणांमध्ये कलह पेटवण्यात ब्रिटिशांनी कसूर ठेवली नाही. अशा अनेक कारणांमुळे महाराष्ट्रात सांस्कृतीकरणाची मोहीम पुन्हा उसळली. जोतीबांनी धिक्कारलेली ही मोहीम वाढल्यामुळे मूळ सत्यशोधक चळवळीचे स्वरूप बदलले. ती खंडित झाली नाही, पण तिच्यात मतभेद निर्माण झाले. संघटनेच्या इष्ट कार्यातील प्राथम्यक्रमाबाबत एकवाच्यता राहिली नाही. नवोदित सत्यसमाजिस्टांना आता राजाश्रयाची गरज वाटू लागली.

त्यांना अपेक्षित असा राजाश्रय प्रथम सयाजीराव गायकवाड महाराजांनी दिला. जोतीबांना त्यांनी आर्थिक व इतर मदत दिल्याची माहिती मी **पहिल्या खंडात** दिली आहे. नंतरही त्यांनी बरीच मदत दिली. वेदोक्त संस्कार करून घेण्याबाबत सयाजीराव महाराजांनी पाच वर्षे (१८९१-९६) तोड काढण्याचे प्रयत्न केले होते. पण पुरोहितांच्या बागुलबोवाने भेदरण्याइतके सयाजीराव कमकुवत वा भावनाप्रधान नव्हते. त्यांनी भटांच्या नेमणुका रद्द केल्या, पगार बंद केले. आणि विवेकी पुरोहितांकडून हे ते वेदोक्त संस्कार करून घेतले. वर्णव्यवस्था ही उत्पत्तिसिद्ध अथवा जन्माधिष्ठित नसून ती गुणकर्मावर अवलंबून आहे, ही भूमिका त्यांनी ठामपणे मांडली होती.

शाहू महाराजांनीही काही वर्षे सत्यशोधक संघटनेला राजाश्रय दिला, आर्थिक मदत दिली. कालांतराने सयाजीरावांच्या कार्याचा प्राथम्यक्रम बदलल्यामुळे त्यांनी चळवळीतील आपला सहभाग कमी केला. त्यानंतर शाहू महाराजांनी काही काळ चळवळीचा भार स्वीकारला. तथापि पुरोहितशाहीशी चाललेल्या संघर्षात सयाजीरावांपेक्षा शाहू महाराजांना अधिक प्रखर टीका, विरोध व निंदेला तोंड द्यावे लागले. बडोदा संस्थान

बरेच मोठे असून महाराजांचा जनमतावर मोठा प्रभाव होता. महाराणी व्हिक्टोरियापासून ब्रिटिश राजघराणे व राजकारणी तसेच काँग्रेस पुढाऱ्यांशी त्यांची जवळीक होती. सयाजीराव स्वतःला बादशहा पंचम जॉर्ज यांच्या बरोबरीचे मानत. त्यांना १९०६ सालच्या कलकत्ता काँग्रेसचे अध्यक्षपद देण्याचाही प्रस्ताव होता. अशा अनेक कारणांमुळे टिळकदेखील सयाजीरावांवर टीका करण्यास धजावत नसत. तथापि शाहू महाराजांविषयी टिळकांची भूमिका उदार नव्हती. चिंतामणराव वैद्यांचे मत होते की, मराठे क्षत्रिय आहेत, आणि संस्कारलोपामुळे ते शूद्रतुल्य झाले असे मानल्यास, प्रायश्चित घेऊन वैदिक संस्कार करण्यास त्यांना धर्मशास्त्रानुसार अडचण नाही. टिळकांनी अशी भूमिका घेतली असती, तर वेदोक्ताचा वाद विकोपाला गेला नसता. कडवटपणा टळला असता.[३]

महत्त्वाचा मुद्दा असा की, १९१० च्या सुमारास सत्यशोधक चळवळीत दोन विचारप्रवाहांची युती झाली. मराठ्यांना क्षत्रियत्वाचे व वेदोक्त संस्कारांचे हक्क मिळण्यासाठी झगडणारे शाहू महाराज आणि वैदिक परंपरा व व्यवस्थेविरुद्ध बंड करणारे सत्यशोधक यांनी हातमिळवणी केली. याविषयी सत्य समाजाचे नेते रामया अय्यावारू यांनी १९११ मधील वार्षिक सभेत आपली व्यथा व्यक्त केली होती. त्यांच्या मते जोतीबांना कोणत्याही धर्मकार्यात ब्राह्मण किंवा स्वजातीय पुरोहिताच्या मध्यस्थाची गरज वाटत नव्हती. तथापि जोतीबांच्या शिकवणुकीचा विपर्यास झाला. आणि लोकांनी वेदोक्त व पुराणोक्त पद्धतींच्या नादी लागून ब्राह्मणाऐवजी स्वजातीच उपाध्याय पुढे करणे सुरू झाले. म्हणून खऱ्या फुलेवाद्यांना सत्यशोधक समाजाची सांप्रतची स्थिती विसकळीत व शोचनीय वाटू लागली. वेदोक्तावर भर देणारे व श्रावणी करणारे सर्वच अब्राह्मण सत्यशोधक विचारधारणेचा भंग करीत आहेत, असे रामय्या व्यंकय्या अय्यावारूसारख्यांना वाटत होते. त्यांना क्षत्रियत्वाचा अहंकारही आक्षेपार्ह वाटत होता. पुरोहिताप्रमाणेच शेतकऱ्याला नाडणारा गावचा ९६ कुळी पाटीलदेखील तितकाच निंदनीय वाटत होता.

वेदोक्त वादातील काशीनाथ वामन लेले, चिंतामणराव वि. वैद्य, महादेवशास्त्री दिवेकर व टिळक यांच्यातही बरीच मतभिन्नता होती. सयाजीराव व शाहू महाराज यांच्याही वेदोक्तविषयक भूमिकांमध्ये एकवाक्यता नव्हती. त्यांचे मतभेद उघड होते.

बहुजनसमाजाच्या चळवळीविषयी क्षेत्रीय संशोधन करून गेल ऑमवेट या मराठी भाषिक महिलेने विश्लेषण करून दाखवून दिले की, या चळवळीत दुरंगीपणा म्हणजेच ड्यूअलीझम आला, दोन प्रवाह निर्माण झाले होते. एक प्रवाह अगदी विशुद्ध, आमूलाग्र परिवर्तनवादी असा आमजनतेचा होता. हा प्रवाह " अ मोअर जेनुइन मासबेसड् रॅडिकल " म्हणजे खराखुरा जनाधार असलेला अस्सल आमूलाग्र परिवर्तनवादी गट होता. हा मूलगामी सत्यशोधक गट शहरांपेक्षा ग्रामीण भागात कार्य करीत होता व मराठी भाषेतून जातिव्यवस्थेवर हल्ला चढवत राहिला. या गटाचा भर क्षत्रियत्वाचे अधिकार मागण्यांवर नसून त्यांचा लढा शेटजी व भटजींशी होता. बहुजनहितासाठी त्यांची चळवळ होती. ब्राह्मण विरोध हा जरी त्यांच्या चळवळीचा एक भाग असला, तरी तो शेतकरी-कामकरी वर्गाच्या शोषणाविरुद्धचा लढा होता. भटजी जरी एक लक्ष्य असले, तरी सावकार हे दुसरे लक्ष्य होते. ऑमवेट यांच्या मते सत्यशोधक चळवळीतील दुसरा प्रवाह उच्चभ्रू सांस्कृतीकरणवादी आणि स्वतःस क्षत्रियत्वाचे धार्मिक हक्क म्हणजे वैदिक संस्कारांचे हक्क प्रस्थापित करणाऱ्यांचा होता. गेल ऑमवेट यांच्या मते हा प्रवाह ' एलाईट-बेसड् कॉंझर्वेटिव ट्रेंड' या स्वरूपाचा होता. या मंडळीचे बरेच साम्य मद्रास इलाख्यातील जस्टिस पक्षाच्या चळवळीशी होते. त्यांचा भर शिकलेल्या ब्राह्मणेतरांना सरकारी नोकरीत अधिक संधी व राजकीय हक्क मिळण्यावर होता. या गटातील नेत्यांना समाजकारणाइतकाच राजकारणातही रस होता.

**सत्यशोधक समाज व नंतर स्थापन झालेला ब्राह्मणेतर पक्ष यांची महाराष्ट्रात संदिग्धपणे गल्लत केली जाते.** शाहू महाराजांनी ब्राह्मणेतर पक्ष स्थापन केला तो १९१७ सालात. आणि त्यांचे उद्दिष्ट राजकीय चळवळ सुरू करणे हेही होते. सत्यसमाज आणि ब्राह्मणेतर पक्ष यांची गल्लत करण्याचे कारण असे की, ब्राह्मणेतर पक्षाचे प्रमुख नेते भास्करराव जाधव, अण्णा बाबाजी ऊर्फ अण्णासाहेब लठ्ठे, भाऊराव पाटील, केशवराव मारुती जेधे, दिनकरराव शंकर जवळकर, मुकुंदराव गणपत पाटील हे सर्वच मुळी सत्यशोधक विचारसरणीचे होते. फुलेंच्या सत्यशोधक समाजास महाराजांचा राजाश्रय साधारणपणे १९०९-१९१० पासून मिळू लागला. आणि

२४ सप्टेंबर १९१२ ला फुलेंच्या संघटनेचा स्थापना-दिन कोल्हापुरात साजरा करण्यात आला. १९१३ सालाच्या आरंभी कोल्हापुरात सत्यशोधक समाजाची रीतसर स्थापना करण्यात आली. महाराजांनी या चळवळीस आर्थिक व नैतिक बळ दिले तसेच राजाश्रय दिला. त्या काळी कोल्हापुरात आर्यसमाज, प्रार्थना समाज वगैरे संघटनाही होत्या. त्यांनाही महाराजांनी आर्थिक मदत केली होती. महाराज समाजकार्यास मदत देतच असत. असाच लाभ, थोडा जास्तच, सत्यशोधक समाजालाही मिळाला हे खरे. तेव्हा महाराजांचा या संघटनेस पाठिंबा होता.[४]

१९०७ पासून कोल्हापुरात मराठा शिक्षण परिषद दरवर्षी भरू लागली, म्हणून त्याच धर्तीवर १९१० सालापासून माळी शिक्षण परिषदही दरवर्षी भरू लागली. शिक्षणात मागासलेल्या जातींमध्ये शिक्षणप्रसार करणे हा या परिषदांचा उद्देश होता. एप्रिल १९११ मध्ये सत्यशोधक समाजाची पहिली परिषद पुण्यात व्यंकय्या अय्यावारूंच्या अध्यक्षतेखाली भरली. बहुजनसमाजात शिक्षणप्रसार करणे व त्यासाठी सरकारकडे पाठपुरावा करणे ही या संस्थांची कामगिरी म्हणता येते. फुलेंचे ज्येष्ठ सहकारी कृष्णाजी पांडुरंग भालेकर ७ मे १९१० रोजी मरण पावल्यावर त्यांचे चिरंजीव मुकुंदराव पाटील बहुजनसमाजाची उन्नती करण्यासाठी झटू लागले. मुकुंदराव पाटील हे भालेकरांचेच भाचे गणपतराव पाटलांचे दत्तक पुत्र झाल्यामुळे मुकुंदराव पाटील झाले. वडिलांची बहुजनसमाजाभिमुख पत्रकारिता अंगीकारून त्यांनी २३ नोव्हेंबर १९१० पासून नगर जिल्ह्यातून **दीनमित्र** हे सत्यशोधकांचे एकुलते एक साप्ताहिक चालविले. एकोणिसाव्या शतकातील **दीनबंधू** बंद पडले. **दीनमित्र** पत्रकाने निस्तेज झालेल्या सत्यशोधक समाजात चैतन्य व जोम आणला. त्यासाठी भास्करराव जाधव आणि लट्ठे व महादेवराव डोंगरे या कोल्हापूर दरबारातील अंमलदारांचे साहाय्य मिळविले होते. हे पत्रक सत्यशोधकांचे मुखपत्र बनले.

समकालीन पुराव्यांवरून दिसते की, मुकुंदराव पाटील हे पुरागामी विचारसरणीचे होते. शेतकरी व कामकरींच्या आर्थिक विकासासाठी व त्यांचे सरकारकडून होणारे शोषण थांबविण्यासाठीच ते आपली लेखणी व वाणी झिजवत असत. सामाजिकपेक्षा आर्थिक प्रश्नांवर त्यांचा जोर असे. भटजीपेक्षा शेट सावकार हे त्यांचे लक्ष्य असे.

कोल्हापूर दरबाराकडून साहाय्य मिळविण्यासाठी १९१३ सालातील तिसऱ्या सत्यशोधक समाज परिषदेचे अध्यक्षपद महादेव डोंगरे यांना देण्यात आले होते. डोंगरे, लठ्ठे व जाधव या संघटनेचा प्रचार करण्यासाठी कधीकधी गावोगावी जात असत. कोल्हापुराचा सत्यशोधक समाज स्थापन होऊन पाच-सहा महिनेच झाले असले तरी ही संघटना उत्साहाने कार्य करीत होती. कारण महाराजांची मदत ! कुरुंदवाड, सतारा, ठाणे वगैरे जिल्ह्यांतूनही काम चालू होते. १९ नोव्हेंबर १९१३ च्या**दीनमित्र** पत्रकात नमूद केले होते की, कोल्हापूरच्या या संघटनेच्या १५० सभासदांपैकी तीन जण कुलकर्णी होते. याचा अर्थ या काळापर्यंतही सत्यशोधक चळवळीत काही ब्राह्मण होतेच. ही परंपरा फुलेंपासून चालू होती.[५]

सत्यशोधक समाजाचे एक खंदे पुरस्कर्ते व समकालीन विचारवंत केशव सीताराम ठाकरे यांनी शाहू महाराजांच्या योगदानाचे विवेचन करताना स्पष्ट निर्वाळा दिलेला आहे. तो पाहा : ‘‘सन १९१५ च्या पुढे कै. शाहू छत्रपती महाराज कोल्हापूर यांचे लक्ष (सत्यशोधक) समाजाकडे चांगलेच वेधले. अज्ञान आणि बहुजनसमाजात लोपलेला मनुष्यपणा शिक्षणप्रसाराने जागृत होईल तेव्हा होवो. पण सत्यशोधक समाजाच्या तत्त्वांचा फैलाव केला तर ही जागृती फार लवकर होईल, हे मर्म जाणून शाहू महाराजांनी समाजास सढळ हाताने मदत केली. त्यामुळे अवघ्या पाच वर्षांत महाराष्ट्रभर एकदम जागृतीची लाट उसळली. पण या मदतीचा पुष्कळांनी दुरुपयोग केला. सत्यशोधक समाजाचा अभिमान दाखविला की महाराजांकडून पैशाची मदत मिळण्याची सोय होते, हे मर्म ओळखून पुष्कळ पोटार्थी लोक समाजात बळेच शिरले. कोणी वक्ता तर कोणी प्रचारक, तर कोणी पत्रकर्ता तर कोणी कवी, तर कोणी ग्रंथकर्ता अशा विविध व्यवसायांचे वेश धारण करून त्यांनी मारे जिकडे तिकडे धुमाकूळ उडवून दिला ; पण दुर्दैवाने महाराज कालवश होताच, या सर्व समाजसेवकांची शक्ती निघून गेल्याप्रमाणे झाली.’’[६] प्रबोधनकारांचा हा निर्वाळा स्वीकारण्यास पर्याय दिसत नाही. सत्यशोधक असलेले केशवराव ठाकरे पोटतिडीकीने बोलत व लिहीत.

१९३० सालातील सत्यशोधक समाजाच्या चौदाव्या परिषदेच्या अध्यक्षपदावरून मुकुंदराव पाटील यांनीही काहीसा असाच निर्वाळा दिलेला दिसतो. शाहू महाराजांचा आश्रय मिळू लागल्यानंतर स्वतःला सत्यशोधक म्हणवून घेणारे बरेच लोक त्यात शिरले होते.

बादशहा सातवे एडवर्ड (१९०१-१९१०) व महाराणी अलेक्झांड्रा यांच्या कोल्हापुरातील पुतळ्यांना अज्ञात लोकांनी १४ फेब्रुवारी १९१४ च्या रात्री डांबर फासले. यामुळे संपूर्ण ब्रिटिश यंत्रणेला संशयाने घेरले. यामुळे स्वतः शाहू महाराज अडचणीत सापडले. या दुर्दैवी प्रकरणाचे व संस्थानाच्या दरबारातील अंतस्थ सुंदोपसुंदीचेविवेचन करण्याचे हे स्थळ नव्हे. इथे इतकेच सांगायचे की, या डांबर प्रकरणामुळे काही दिवस महाराजांची सत्यसमाजावर इतराजी झाली. आणि भास्करराव जाधव, लठ्ठे व कर्मवीर भाऊराव पाटलांना संस्थानातून परगंदा व्हावे लागले. हे वृत्त **केसरी** ने छापले. नंतर जाधवांनी मुकुंदरावांना कळविले की, "सत्यशोधक समाजासंबंधाने आमची कोणतीच आस्था कमी झालेली नाही." परंतु समाजाचे काम तूर्त कोल्हापुरात चालविणे कठीण झाले ! (१४ ऑक्टोबर १९१४ चे पत्र).

कोल्हापुरातील सत्यशोधक शाखेचे काम थंडावले, तरीही उर्वरित महाराष्ट्रात सत्यशोधक समाजाचे कार्य सुरू राहिले. निष्ठावंत कार्यकर्ते मुकुंदराव पाटील, धोंडिराम नामदेव कुंभार, भाऊराव पाटील, अण्णासाहेब लठ्ठे वगैरे सत्यशोधक प्रचाराचे काम करीत राहिले. त्यांना भास्करराव जाधव मदत करीत. शाहू महाराजांचीही त्यांना थोडीफार आर्थिक मदत लाभत असे. महाराजांनी विशिष्ट हेतूने ब्राह्मणेतर पक्ष स्थापन केल्यावरही काही सत्यशोधक त्यांना भेटत असत. १९१७ साली या पक्षाची स्थापना झाल्यावरही सर्व सत्यशोधक कार्यकर्ते ब्राह्मणेतर चळवळीत सामील झाले. तथापि ब्राह्मणेतर पक्षात सामील झालेले सर्व जण सत्यशोधक विचारसरणीचे नव्हते. प्रारंभापासून सत्यशोधक समाज ब्रिटिश राजवटीशी एकनिष्ठ होता, काँग्रेसपासून अलिप्त होता. पण तरीही विठ्ठल रामजी शिंदे आणि नारायण मल्हार जोशी यांच्यासारखे काँग्रेसजन सत्यशोधक समाजाच्या परिषदांमध्ये भाग घेत व भाषणेही करीत. मुंबईतील कामगारांमध्ये ते सत्यशोधक विचारांचा प्रचार करीत.

अस्सल सत्यशोधकांना पुरोगामी ब्राह्मणांचे वावडे नव्हते. काही ब्राह्मण या संघटनेचे सभासद होते. शाहू महाराजांचे मतभेद असूनही ते समाजिस्टांच्या वर्तमानपत्रांना पैशाची मदत करीत. नाशिकचे रामचंद्र वंडेकर, मुकुंदराव पाटील, लठ्ठे, सी. के. बोले, वालचंद कोठारी व कवी नारायण वामन टिळक यांनी ऑगस्ट १९१६ मध्ये काढलेल्या डेक्कन रयत समाज नामक संघटनेने सरकारशी सलोखा राखला होता. या संघटनेने भारतमंत्री माँटेग्यू यांना दिलेल्या निवेदनात म्हटले होते की, हिंदुस्तानातील उच्च पदांवर इंग्रज माणसांनाच नेमावे. कारण गोरे अधिकारीच रयतेला चांगली वागणूक देतात. मात्र या चुकीच्या मागणीला अनेक सत्यसमाजिस्टांनी विरोध केला होता.

**स्वतंत्र मतदारसंघांची मागणी :—** संभाव्य राज्यसुधारणांबाबत चर्चा चालू असताना मराठ्यांना स्वतंत्र मतदारसंघ देण्यात यावे, अशी एक मागणी होती. ही मागणी मूळच्या सत्यशोधक विचारसरणीशी विसंगत होती. तरीही अण्णासाहेब लठ्ठे व वालचंद कोठारी वगैरेंनी माँटेग्यू यांच्याकडे मागणी सादर केली की, शिक्षणात मागासलेल्या जातींना स्वतंत्र मतदारसंघातून आपले प्रतिनिधी निवडून देण्याचा अधिकार असावा. तथापि या मागणीस टिळक पक्षातील अब्राह्मणांनी जाहीर विरोध केला. अमरावतीचे मराठा नेते बॅ. रामराव देशमुख, तसेच त्र्यंबक हरी आवटे, काशीनाथ ठकूजी जाधव, नारायणराव गुंजाळ, बॅ. व्ही. एम. पवार वगैरेंनी या मागणीस विरोध केला. कर्मवीर वि. रा. शिंदे हे तर खंदे सत्यशोधक! पण ही मागणी म्हणजे मूळ रोगापेक्षाही हा इलाज भयंकर असा अभिप्राय देऊन त्यांनी या मागणीचा निषेध केला. बडोद्यातील प्रभावी मानकरी खासेराव जाधव व भगवंत पाळेकर यांनीही जातीय मतदारसंघांची मागणी घातक असल्याचा इशारा दिला होता. अशी विचारसरणी असलेल्या मराठ्यांना 'राष्ट्रीय मराठे' म्हटले जाई.

मराठ्यांची स्वतंत्र मतदारसंघांची मागणी माँटेग्यू व चेम्सफर्ड यांनी अमान्य केली होती. म्हणून ब्रिटिश संसद सदस्यांना या मागणीची न्याय्यता पटवून देण्यासाठी भास्करराव जाधव विलायतेला गेले (जुलै १९१९). परंतु लंडनमध्ये त्यांचे मत बदलले. ही मागणी राष्ट्रहिताविरुद्ध आहे असे त्यांना तिथे उमगले.

मराठा लीग आणि डेक्कन रयत समाज हे गट मराठा जातीसाठी मुंबई कायदेमंडळात दहा जागा तसेच लिंगायत व अस्पृश्य लोकांसाठी प्रत्येकी चार आणि इतर मागास जातींसाठी दहा जागांची मागणी करत होते. जैनांसाठीही एका जागेची मागणी केली होती. तथापि, ब्रिटिश सरकार इतक्या जागा देण्यास तयार नव्हते. या विषयाचा विचार करण्यासाठी नेमलेल्या साऊथबरो समितीने ' मराठा आणि तत्सम जाती ' असा नवाच प्रवर्ग सुचविला. या प्रवर्गात मराठा, कुणबी, माळी, कोळी, भंडारी, शिंपी, लोहार, कुंभार, धनगर, भोई, बारी, लोहारी, भावीण वगैरे जातींचा समावेश करण्याचा सरकारने निर्णय घेतला. साऊथबरो समितीने या प्रवर्गासाठी केवळ सात जागा राखून ठेवण्याची शिफारस केली होती. शिवाय या प्रवर्गात आणखीही काही जातींचा समावेश करण्याचा अधिकार सरकारने आपल्याकडे घेतला. सरकारने स्वीकारलेल्या ' मराठा आणि तत्सम जाती ' या प्रवर्गातून लिंगायत व जैन यांना वगळले. लिंगायत आणि दक्षिण महाराष्ट्रातील दिगंबर जैन शिक्षणात मागास असूनही त्यांना स्वतंत्र मतदारसंघाचा लाभ सरकारने नाकारला. वस्तुतः हे लोक ब्राह्मणेतर चळवळीत नेहमीच सक्रिय राहिले होते.

**ब्राह्मणेतरांची वृत्तपत्रे :—**मद्रासच्या **हिंदू** या ब्राह्मणी वर्तमानपत्राला आव्हान देणाऱ्या **जस्टिस** पत्रासारखे वृत्तपत्र महाराष्ट्रात असावे, असे शाहू महाराजांना वाटत होते. विशेषतः **केसरीशी** झुंज करून बहुजनसमाजाची बाजू मांडण्यासाठी एखादे वृत्तपत्र असावे, असे महाराजांप्रमाणे शेकडो लोकांनाही वाटत होते. तथापि **मराठा** वगैरे जहाल साप्ताहिकेसुद्धा स्वतःच्या पायावर उभी राहू शकत नव्हती. आगरकरांचे **सुधारक** तर बंदच पडले होते. अशा परिस्थितीत सत्यशोधक चळवळीत एकाकीपणे त्राण निर्माण करणाऱ्या मुकुंदराव पाटलांनी **दीनमित्र** साप्ताहिक १९१० च्या अखेरीस अहमदनगर जिल्ह्यातील सोमठाणे नामक गावी सुरू केले होते. त्यांनी घस सोसून ते जिद्दीने चालवले. १९११-१२ मध्ये या पत्राच्या छापखान्यावर जप्ती आली होती. विकत घेऊन वर्तमानपत्र वाचणारे कुणबी-मराठा तेव्हा किती होते ? पाटलांचा छापखाना सावकाराकडे गहाण पडला होता. हे पत्रक अखेरचा श्वास घेत होते. अखेरीस भास्करराव, अण्णासाहेब लट्ठे, डोंगरे यांच्या तसेच महाराजांच्या साहाय्याने **दीनमित्र** मरता मरता वाचले.

बहुजनसमाजाची कैफियत सरकारपुढे आणि इंग्रजी समजणाऱ्या ब्राह्मणांसमोर मांडण्यासाठी १९१८ साली अण्णासाहेबांनी **डेक्कन रयत** नावाचे इंग्रजी पत्रक पुण्यात सुरू केले. परंतु वर्गणीदारांच्या अभावी तेही लवकरच बंद पडले. केशव सीताराम ठाकरे यांनी १६ ऑक्टोबर १९२१ रोजी **प्रबोधन** पाक्षिक सुरू करून मोठ्या हिंमतीने अनेक वर्षे चालविले. या प्रभावी पत्रकाने अब्राह्मणांच्या एका पिढीचे प्रबोधन केले. **प्रबोधन, दीनमित्र, जागरूक, विजयी मराठा, शिव छत्रपती, गरिबांचा कैवारी, तरुण मराठा** वगैरेंनी सत्यशोधक विचारधारा प्रसारित केली. सत्यशोधकांनी काही प्रसंगी ब्राह्मणेतर पक्षावरही टीका करण्याचे धैर्य दाखवले. ब्राह्मणेतरांच्या पत्रकांबाबत पुढील प्रकरणात अधिक विवेचन केले आहे.

## सातारा, पुणे व सोलापूर जिल्ह्यांतील चळवळ

ऑगस्ट १९२० पासूनच्या काळात भारतभर असहकार आंदोलनाला अपूर्व प्रतिसाद मिळाला होता. त्या काळात आणि नंतरही सातारा, सोलापूर व पुणे जिल्ह्यांत सत्यशोधक समाजिस्टांनी ब्राह्मण आणि विशेषतः न. चिं. केळकरांचे वर्चस्व झुगारून लावण्याची उग्र चळवळ उभारली. त्यामुळे शेकडोंना ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाची आर्थिक व सामाजिक झळ लागली. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत होत्या. पुण्यात शाहू महाराजांची सभा उधळल्यामुळे चिडलेल्या ब्राह्मणेतरांनी सातारा जिल्ह्यातील बोरखळ गावी केळकरांचा समारंभ उधळला होता. त्यातून केशवराव विचारे विरुद्ध केळकर आणि सातारा जिल्हा सत्यशोधक शाखेचे चिटणीस विरुद्ध केळकर असे दोन खटले भरले गेले. तथापि त्यातून चळवळ अधिकच उग्र झाली. भाऊराव पाटलांचा सत्यशोधक जलसा विलक्षण लोकप्रिय झाला. त्यात जातीय विद्वेष नव्हता हे मात्र खरे.

गांधीजी असहकार आंदोलनाच्या प्रचारासाठी ४ नोव्हेंबर १९२० पासून महाराष्ट्राच्या झंझावाती दौऱ्यावर असताना त्यांना जातीय विद्वेष स्पष्ट जाणवला होता. म्हणून त्यांना पश्चिम महाराष्ट्रातील काही सभांमध्ये या वादंगाचा परामर्श घेणे अटळ झाले. ५ नोव्हेंबरला गांधीजींना पुण्यातील भवानी पेठेत तीस हजार श्रोत्यांच्या विराटसभेत यावर भाष्य करावे लागले. सातारा जिल्ह्यातील ब्राह्मणांच्या शेतांमधील उभी पिके

लुटणे अथवा जाळून टाकणे व टवाळी करणे आणि ब्राह्मण महिलांची विटंबना करणे या प्रकारांचा निषेध करणे त्यांना भाग पडले. जातीय विद्वेष पसरवणे अविवेकीपणाचे ठरेल असा गांधीजींनी पुण्यामध्ये सक्त इशारा दिला होता. गांधीजींनी वाई, सातारा, निपाणी, बेळगाव, नाशिक वगैरे ठिकाणीही जातीय सद्‌भाव आणि सहिष्णुतेवर विशेष भर दिला. स्वातंत्र्य चळवळीत ब्राह्मणांनी केलेले नेतृत्व व त्यागाची त्यांनी प्रशंसा केली होती.

मुंबई सरकारने नेमलेल्या चौकशी समितीच्या अहवालात पंढरपूरच्या ब्राह्मण्यसंरक्षक सभेने केलेल्या लेखी तक्रारीत पुढील बाबींचा समावेश होता. सत्यसमाजिस्ट लोक ब्राह्मणांना शिवीगाळ करतात, बीभत्स तमाशे करतात, हिंदू दैवते व पुरोहितांची निंदा करतात, धमक्या देतात, शेतमजुरांना कामावरून पळवून लावतात, तसेच पाणवठे व देवळांना विटाळतात, गुरे पळवून लावतात, पिकांची नासधूस करतात इ. यात सत्य काय असेल ते असेल. पण साताऱ्याच्या कलेक्टरने मुंबई सरकारला ६ जुलै १९२१ रोजीच्या पत्रानुसार कळविले होते की, ब्राह्मण विरुद्ध अब्राह्मण या सामाजिक वादाखेरीज ब्राह्मण जमीनमालक विरुद्ध शेतकरी कुळे असे या संघर्षाला आर्थिक परिमाणही आहे. किंबहुना आर्थिक परिमाण व शोषण ही कारणेच या संघर्षाच्या मुळाशी असणार, असा कलेक्टरचा अभिप्राय होता.[७]

सातारा जिल्ह्यातील सत्यशोधकांच्या प्रचारामुळे शेती कसणाऱ्या बऱ्याच कुळांनी ब्राह्मण जमीनमालकांच्या जमिनी खंडाने कसण्यास नकार दिला होता. काही कुळांनी जमीनमालकांना एकूण खंडाचा अर्धा भाग देण्याची तयारी दाखवली. अनेकांनी धार्मिक विधींसाठी पुरोहितांना बोलवणे बंद केले. या सामाजिक संघर्षास आर्थिक तसेच राजकीय परिमाण व स्वरूप आले. कुंभारांनी ब्राह्मणांना मडकी देऊ नये, तसेच नाभिकांनी त्यांचे केस कापू नये, सर्वच बलुतेदारांनी ब्राह्मणांवर बहिष्कार घालावा, असाही प्रचार करण्यात आला. पाटण तालुक्यातील गारवडे या लहानशा गावी फेब्रुवारी १९२१ मध्ये सत्यशोधकांचा जलसा झाल्यावर, तिथे सामाजिक तणाव निर्माण झाला.

या परिसरातील सामाजिक पर्यावरण फारच बिघडल्यामुळे सरकारला सरदार मुतालिक, दादासाहेब र. पां. करंदीकर, रा. ग. ऊर्फ भाऊसाहेब सोमण, सदाशिव आळतेकर व सीताराम गोपाळ पाटील या पाच प्रतिष्ठित पुढाऱ्यांना तणावाबाबत चौकशी करण्यास सांगावे लागले होते. सातारा जिल्ह्यातील पेठ, सागाव व तासगावजवळील सोनी वगैरे गावांमध्येही ब्राह्मणांची शेती कसणाऱ्या कास्तकारांना मारहाण करून कित्येक शेतांमधील पिके सत्यशोधकांनी जाळल्याचे अहवाल सरकारकडे आले होते. अशा प्रकारांकडे कलेक्टर मॉयसी व पाटणचा मामलेदार यांनी दुर्लक्ष केले होते. म्हणून त्या दोघांची बदली करावी, अशी **केसरी** पत्राने मागणी केली होती. नोकरदार नेहमी सत्यशोधकांना पाठीशी घालतात, असा केसरीचा आरोप होता. रावजी रामचंद्र काळे यांनी सत्यशोधकांच्या अशा कृत्यांविषयी मुंबई कायदेमंडळात प्रश्न विचारला होता. उत्तरादाखल सरकारने सांगितले की, गारवडे गावातील ब्राह्मणांकडून अब्राह्मणांनी जबरीने पैसे घेतले होते. म्हणून त्या रकमा परत करण्यासाठी शासनाला कारवाई करावी लागली.[८]

**सत्यशोधकांचे जलसे व प्रचार :—**महात्मा फुलेंची विचारधारा व आचरणाचा प्रचार करण्यासाठी काले गावातील रामचंद्र घाटगे या गरीब सत्यशोधक अनुयायाने १९१५ साली एक फड काढला होता. तेव्हापासून सातारा व शेजारच्या जिल्ह्यांमध्ये या कलापथकांचा प्रसार होऊ लागला. या प्रसारमाध्यमास सत्यशोधक जलसे ही संज्ञा देण्यात आली. १९२५ साली पश्चिम महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या एकूण २९ पैकी १२ सत्यशोधक जलसे एकट्या सातारा जिल्ह्यात होते. या पथकांचे बहुसंख्य संघटक कुलीन मराठे असले, तरी न्हावी, सोनार व ब्राह्मणांचाही प्रत्येकी एक तमाशा होता. ही पथके तमाशासारखी असली, तरी त्यांतून समाजसुधारणांचा प्रचार करण्यात येई. त्यांतील संवाद व गीते समकालीन रचनाकारांनी लिहिलेली असत. मात्र त्यात पोथी-पुराणे, रूढी, अंधश्रद्धा, भाकड कथा व परंपरांचा उपहास व टीका असे. त्यातून सुधारणावाद, आधुनिक शास्त्र व सुधारणावाद आणि शिक्षणप्रसाराचा जोरदार पुरस्कार करण्यात येई. शिवाय अस्पृश्यतानिवारण करण्याचा संदेश देण्यात येई. खंडेराव हे एक दैवत स्वीकारले होते. मात्र बऱ्याच सत्यशोधकांनी वारकरी पंथचा

पुरस्कार केला. सातारा जिल्ह्यातील रामचंद्र घाटगे, जोतीराव फाळके, तात्याबा पाटील व भाऊराव पाटोळे (भिलवडी) यांनी शेतकऱ्यांचे प्रबोधन केले होते. कर्मवीर भाऊराव पाटलांचा जलसा ऐकण्यासाठी मोठा जनसमुदाय जमत असे. त्यांनी त्यासाठी बरीच गीते व लावण्या रचल्या होत्या. सोलापूर जिल्ह्यातील मेडद गावच्या सोनोपंत रामचंद्र कुळकर्णी या ब्राह्मणाचाही तमाशा तेव्हा खूप लोकप्रिय होता. वर्णाश्रम धर्माचा त्याग करून सोनोपंत स्वतः निष्ठापूर्वक सत्यसमाजिस्ट झालेले होते. स्वजातीयांनी त्यांना त्रास दिला हे ओघानेच आले.

भाऊराव पाटलांनी विकासाभिमुख कार्य हाती घेतल्यामुळे त्यास विशेष महत्त्व प्राप्त झाले. जैन परिवारात जन्मलेले भाऊराव पायगोंडा पाटील शांततावादी होते. जलशाच्या माध्यमातूनही त्यांनी अस्पृश्यतानिवारण कार्यास चालना दिली. हे कार्य आणि बहुजनसमाजाचे उद्‌बोधन व समाजसुधारणा कार्यास त्यांनी अग्रक्रम दिला. सामुदायिक शिक्षणाशिवाय हे साध्य होणार नाही, हा विचार मनाशी बाळगून त्यांनी या कार्यास वाहून घेतले. त्यांना राजकारणाचे आकर्षण नव्हते. कोल्हापुरातील जैन वसतिगृहातून त्यांना पदमुक्ती मिळाल्यानंतर भाऊरावांनी सातारा जिल्ह्यातील ग्रामीण भागात वसतिगृहे काढून आपल्या कार्याचा प्रारंभ केला. 'कमवा आणि शिका' या तंत्रानुसार गरीब मुलांना शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी **'मुष्टी फंड'** ही अभिनव योजना हाती घेतली. गावातील घरोघरी त्यांनी रिकाम्या पिशव्या वाटल्या. प्रत्येक घरातील व्यक्तीला त्यांनी विनंती केली की, कुटुंबासाठी जात्यावर दळण दळण्याआधी एक मूठभर धान्य पिशवीत टाकावे. भाऊरावांचा आवेश व प्रेमभाव पाहून या योजनेला प्रतिसाद लाभला. प्रत्येक आठवड्यात वसतिगृहातील विद्यार्थी सर्व घरांकडे जाऊन त्या पिशव्यांमधील धान्य गोळा करून वसतिगृहात नेत. धान्यनिधीला लोकांनीही उस्फूर्त प्रतिसाद दिला. धान्यदानामुळे आपलेपणा तर वाढलाच पण त्यापेक्षाही या पवित्र कार्यात आपणही सहभागी आहोत ही भावना निर्माण झाली.

शाहू महाराजांनी याआधीच विविध जातींच्या मुलांसाठी वसतिगृहे काढून शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली होती. पण ती जातनिहाय होती. कर्मवीरांनी आणखी पुढे पाऊल टाकून जातिनिरपेक्ष अशी कॉस्मॉपॉलिटन वसतिगृहे स्थापन केली. त्यामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये बंधुभाव निर्माण झाला. भाऊरावांच्या कार्यात आपणही

सहभागी आहोत, हा विचार रुजू लागला. त्याचा चळवळीवरही चांगला परिणाम झाला. 'विकासकार्यात लोकांचा सहभाग' ही नवी कार्यप्रणाली निर्माण झाली.

भाऊरावांनी ग्रामीण भागात सामुदायिक शिक्षणाची मोहीम उभारली. दक्षिण महाराष्ट्रात त्यांनी जोरदार प्रचार करून अनेक शाळा व वसतिगृहे उभारली. भाऊरावांनी आपल्या सर्व उपक्रमांमधून विद्यार्थी वर्गात बंधुभाव आणि सहजीवनाची कल्पना रुजवण्याचा खूप प्रयत्न केला. स्वतः जैन असलेल्या भाऊरावांच्या विद्यार्थांमध्ये मराठा, ब्राह्मण, महार, मांग, धनगर, जैन यांच्यासह मुसलमान व ख्रिस्ती मुलेही होती. जाती व धर्माचा विचार बाजूला सारून सहजीवनाचे वातावरण निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. विचार परिवर्तनाद्वारे सर्वधर्मसमभावाचे तत्त्व रुजवण्याचा हा प्रयत्न होता. भाऊरावांनी अस्पृश्यांसाठी वेगळी वसतिगृहे काढण्याचा विचार त्याज्य ठरविला. स्वाभाविकच त्यामधून युवकांवर चांगले संस्कार झाले. धर्मनिरपेक्ष वसतिगृहे काढून कर्मवीरांनी ब्राह्मणेतर चळवळीच्या संघर्षात्मक व लढाऊ पवित्र्याला मुरड घालून विकासप्रवण दृष्टिकोण घडवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी वसतिगृहे, सहजीवन व शिक्षण हे सामाजिक विकासासाठी माध्यम वापरले. आणि जातिधर्मनिरपेक्षतेचे तत्त्व पाळले.

संस्थेस लागणाऱ्या पैशांसाठी मुलांनी अंगमेहनत करणे त्यांनी आवश्यक ठरविले. संस्थेच्या जमिनीची मशागत मुले करीत. त्यातून आत्मनिर्भरता व स्वावलंबनाचे धडे देण्यात येत. १९२० पासून भाऊरावांनी स्वावलंबन, स्वाध्याय, स्वाभिमान, स्वातंत्र्य ही चतु:सूत्री आपल्या सर्व संस्थांमध्ये आचरणात आणली. प्रारंभापासूनच भाऊरावांनी गांधीवादाचा नुसताच स्वीकार न करता आचरणात आणला व संस्थांमध्ये अमलात आणला. सर्वच कोनांमधून पाहता दिसते की, भाऊराव इतर सत्यशोधक नेत्यांपेक्षा निराळे होते. ब्राह्मणेतर पक्षाचा जातीय अभिनिवेश त्यांना स्पर्श करू शकला नाही. म्हणून गांधीजींनी त्यांच्या मिश्र वसतिगृहांची व कार्याची प्रशंसा तर केलीच, शिवाय हरिजन सेवक फंडातून दरसाल ५०० रुपयांचे अनुदान देण्यास प्रारंभ केला. भाऊराव पाटील खऱ्या अर्थाने गांधीवादी सामाजिक कर्मवीर ठरले.[१]

कर्मवीर वि. रा. शिंदे यांची भाऊराव पाटलांशीच तुलना संभवते. या दोन्ही कर्मवीरांनी स्वातंत्र्य आंदोलनास देखिल सक्रिय पाठिंबा दिला. शिंदे तर अनेकदा कारावास भोगून आले. १९४२-१९४४ मधील सातारा प्रतिसरकारचे बरेच सैनिक भाऊरावांच्याच पठडीत घडलेले होते. प्रतिसरकारच्या बहुसंख्य सैनिकांची प्रारंभिक जडणघडण भाऊरावांच्या सान्निध्यात झालेली होती.

सत्यशोधक जलशांमध्ये ब्राह्मणांवर अश्लील टीका, उपहास व टिंगल-टवाळी करणारे संवाद आणि गाणी असतात, असा एक आक्षेप होता. अनेक बाबतीत हे सत्य होते. तथापि तितकीच अश्लीलता गणेशोत्सवातील संवादांमध्ये व पदांमध्येदेखील व्यक्त होई. गणेश मेळेवाल्यांचा असभ्यपणा व शिवराळपणा स्वतः टिळकांच्या हजेरीतही खपवून घेतला जात असे. खुद्द पुण्यातील तत्कालीन गणेशोत्सवातील कार्यक्रमांचे अत्यंत घाणेरडे चित्र पोलीस अहवाल व समकालीन पुस्तकांमध्ये रेखाटलेले आम्हाला आढळले. वरिष्ठ वर्णीयांच्या मेळ्यांमधील प्रचाराला तशाच भाषेत उत्तर देण्यासाठी केशवराव जेधे यांनी छत्रपती मेळा सुरू केला होता.

खऱ्या सत्यशोधकांना वेद व वैदिक परंपरा अमान्य होती. त्याकारणाने क्षात्र-जगद्गुरूचे धर्मपीठही त्यांना पसंत नव्हते. त्या पीठावर मुकुंदराव पाटील व प्रबोधनकार ठाकरेंनी बरीच टीका केली होती. अनेक मुद्द्यांवर सत्यशोधकांमध्ये वादावादी होत असे. शिवाजी महाराजांचे स्मारक पुण्यात उभारण्यावरूनही मतभेद झाले. या कामी खासेराव पवार आणि खासेराव जाधव यांनी प्रथम कल्पना मांडली होती (१९१७). पुण्यात स्मारकाची कोनशिला बसविण्यास १९२१ चा काळ यावा लागला. तेव्हा असहकार चळवळ जोरात सुरू होती. म्हणून वि. रा. शिंदे यांनी सुचविले होते की, हे कार्य महात्मा गांधी किंवा दुसऱ्या काँग्रेस नेत्यांच्या हस्ते करून घ्यावे. पण राजनिष्ठ सत्यशोधकांनी या समारंभास ब्रिटिश युवराजास बोलावले. पहिल्या महायुद्धात वीरगती प्राप्त झालेल्या मराठी सैनिकांच्या पुण्यातील स्मारकाचेही अनावरण याचवेळी (नोव्हेंबर १९२१) ब्रिटिश युवराजाच्याच हस्ते करून घेतले. त्यामुळे राष्ट्रवादी विचारसरणी असलेल्या लोकांना दुःख झाले होते. अशा घरभेद्या राजकारणापायी पुण्यातील शिवस्मारकाचे काम खूप दिवस रखडले होते. जेव्हा

स्मारक बांधून झाले, तेव्हा शिवरायांच्या पुतळ्याचे अनावरण थोर राष्ट्रीय पुढाऱ्याऐवजी गव्हर्नर सर लेस्ली विल्सनच्या हस्ते करण्यात आले. अशी अनेक दुःखद उदाहरणे आहेत. त्यामुळे सत्यशोधक चळवळीत सुसंवाद व सुसंगती राखणे दिवसेंदिवस कठीण होत गेले.

इतके मात्र खरे की, कर्मकांडाच्या नावाखाली शेतकऱ्याला नाडणारा जोशी व लेखणीच्या जोरावर अडचणीत आणणारा कुलकर्णी यांचा प्रभाव नष्ट करण्यात सत्यशोधक चळवळीच्या धुरीणांना बरेच यश लाभले. आम जनता याबाबत जागृत झाली. तथापि शेतकरी व कामकऱ्यांवर दामदुप्पट व्याज लादणारे सावकार तसेच लोकांवर प्रभाव गाजविणारा पाटील यांना वठणीवर आणण्याचे प्रयत्न झाले नाहीत. त्यासाठी लढा उभारण्यात आला नाही. मारवाडी व गुजर हे सत्यशोधकांच्या टीकेचे लक्ष्य होते. तथापि सावकारी व पाटीलकीशी लढा उभारण्यासाठी त्यांनी सुसंगत असे प्रयत्न केलेले दिसत नाही. वस्तुतः शेती व्यवसाय आणि शेतकऱ्याचे सर्वाधिक आर्थिक शोषण ब्रिटिशच करीत. तथापि शेतकऱ्यांचे हितरक्षण करण्यासाठी त्या काळातील सत्यशोधकांनी कधीच लढा उभारला नाही.

## डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी

प्रार्थनासमाज आणि ब्राह्मोसमाज या संघटनांनी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना उच्च शिक्षणासाठी विलायतेत पाठविले होते. ते प्रार्थनासमाजाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते. न्या. रानडे व डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर आणि न्या. नारायण गणेश चंदावरकर या सुधारकांशी त्यांचे निकटचे संबंध होते. यामुळे असेल कदाचित सत्यशोधक समाजाचे पुढारी शिंदेंना “ आपले ” मानत नसत. तथापि शिंदे यांचे साहित्य आणि सामाजिक कार्य पाहता लक्षात येते की, शिंदेंना समाजसुधारणा अभियानात काम करण्याची प्रेरणा महात्मा फुले व प्रार्थनासमाजाकडून मिळालेली होती. त्याप्रमाणे त्यांनी सामाजिक सुधारणा कार्य केले.

महाराष्ट्रात अस्पृश्यतानिवारणाचा सामुदायिकरीत्या संघटित व पद्धतशीर असा प्रयत्न करण्याचा पहिला मान शिंदे यांनाच द्यावा लागतो. डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया म्हणजे भारतीय निराश्रित साहाय्यकारी मंडळी ही सुप्रसिद्ध

संघटना त्यांनी १८ ऑक्टोबर १९०६ रोजी सुरू केली होती. प्रार्थनासमाजाचे उपाध्यक्ष शेट दामोदरदास गोवर्धनदास सुखडवाला यांनी दिलेल्या एक हजार रुपयांच्या देणगीतून त्यांनी ही संस्था त्याच दिवशी सुरू केली होती. अस्पृश्य मानल्या गेलेल्या मुलामुलींना प्राथमिक शिक्षणाबरोबर व्यवसाय शिक्षणही द्यावे आणि त्यांच्यासाठी स्वतंत्र शाळा न काढता संमिश्र शाळा काढाव्यात ; यामुळे सवर्ण आणि अस्पृश्य मुले यांच्यात परस्पर सौहार्द निर्माण होईल, अशी शिंदेंची वैचारिक भूमिका होती. त्यानुसार त्यांनी हा उपक्रम सुरू केला होता. म्हणून त्यास खास महत्त्व द्यावे लागते. अस्पृश्यांवरील अन्यायांकडे समाजाचे लक्ष वेधून घेण्यासाठी शिंदे १९०७ सालापासून मुंबई इलाखा आणि इतर प्रांतांतही अस्पृश्यताविरोधी परिषदा भरवत होते. मुंबई प्रांतिक परिषदेतही ते दलितांचे प्रश्न मांडून त्याबाबत ठराव संमत करण्याचा अग्रह करीत असत.

निराश्रित साहाय्यकारी मंडळीचे पहिले अध्यक्ष न्या. नारायण गणेश चंदावरकर असून, त्यांनी हे पद अनेक वर्षे भूषविले होते. शिंदेंना या कामात सय्यद, वामनराव सोहोनी, प्रभावतीबाई वगैरे मदत करीत. याशिवाय दामोदरदास सुखडवाला, नरायण भास्कर पंडित, डॉ. संतुजी रामजी लाड, लक्ष्मण सत्तूर हे सक्रिय कार्यकर्ते होते. या संस्थेने पहिल्या तीन वर्षांतच संघटनेच्या शाखा मुंबईतील परळ, कामाठीपुरा, मदनपुरा व देवनारला सुरू केल्या. काही ठिकाणी रविवारच्या शाळा सुरू केल्या. भजनसमाज, चामड्याचा लहानसा कारखाना व निराश्रित सेवासदनही सुरू केले. शिंदेंनी पुण्यातही शाळा सुरू केली आणि मनमाड, इगतपुरी, अकोला, अमरावती, दापोली, महाबळेश्वर, नाशिक, मंगळुर व मद्रासमध्येही मिशनच्या शाखा काढल्या. त्यांनी ए. एम. टी. जॅक्सनसारख्या अंमलदारांचेही साहाय्य मिळविले होते. शिंदेंच्या मिशन सोसायटीच्या मुंबईसह एकूण बारा शाखा कार्यरत होत्या. त्यांच्या विविधांगी शिक्षणकार्यात सोळा प्राथमिक शाळा, सहा रविवारच्या शाळा, चार उद्योग शाळा आणि पाच भजनसमाजांचा सहभाग होता. त्या काळी हे कार्य चालू ठेवण्यासाठी प्रचंड इच्छाशक्ती व महत्प्रयासांची गरज होती, हे लक्षात ठेवावे. या कार्यात त्यांना सात कार्यवाह मदत करीत. संघटनेची मध्यवर्ती शाखा मुंबईत असून या कार्यास

प्रार्थनासमाजाचा व काही मुसलमानांचाही पाठिंबा होता. थोर समाजसुधारक बेह्रामजी मलबारी, दयाराम गिडुमल, न्या. चंदावरकर आणि व्हाइसरॉय हार्डिंज यांच्या पत्नी लेडी हार्डिंज यांचीही शिंदेंना मोलाची मदत लाभली होती.[१०]

कर्मवीर शिंदे दलितांच्या समस्या काँग्रेसपुढे मांडण्याचे प्रयत्न करीतच असत. ३० जून १९१६ रोजी त्यांनी आयोजित केलेल्या सभेत अस्पृश्यांची सेनादलात भरती करावी, ही जुनी मागणी मुंबईचे गव्हर्नर विलिंग्डनपुढे मांडली. दुसऱ्याही संबंधित मागण्या सादर केल्या. त्यांना प्रतिसाद देऊन विलिंग्डनने हा विषय व्हाइसरॉयपुढे मांडला. त्यामुळे सरकारने महार वगैरेंच्या लष्कर भरतीवरील जुने निर्बंध रद्दकरून ६ फेब्रुवारी १९१७ रोजी अनुकूल अध्यादेश काढला. शिंदे व शिवराम जानबा कांबळे यांच्या पुढाकाराने मुंबईच्या टाऊन हॉलमध्ये सभा भरली व तिच्यात याबाबतची कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. आंबेडकर-पूर्व काळातील ही मोठी कामगिरी होती.

शिंदेंचे अस्पृश्योद्धाराचे कार्य म्हणजे त्यांच्या कार्याचा मेरुमणी होय. महाराष्ट्राबरोबर कर्नाटक, मद्रास आणि गुजरातमध्येही त्यांच्या मिशन सोसायटीने केलेल्या भरीव कामगिरीस ऐतिहासिक महत्त्व आहे, हे मान्य करावे लागते. आंबेडकर वगैरे त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांनी अधिक व्यापक कार्य केले. तथापि नंतरच्या सर्व सुधारकांच्या या क्षेत्रातील कार्याची पूर्वपीठिका शिंदे यांनीच तयार करून ठेवलेली होती, हे विसरता येत नाही. त्यांच्यापूर्वी काही प्रांतांमध्ये या कार्याचा आरंभ झाला होता. त्या प्रयत्नांचा इतिहास त्यांनी आपल्या पुस्तकात कथन केलेला आहे. पण या कार्यास अखिल भारतीय स्वरूप देण्याचे व संघटना उभी करण्याचे कार्य फक्त कर्मवीर शिंदेंचे आहे, असा ज्येष्ठ अभ्यासक वि. भि. कोलते यांनी अभिप्राय दिलेला आहे. प्रार्थनासमाजाचे व अस्पृश्यतानिवारणाचे कार्य करताना अवर्णांना ब्राह्मधर्मात ओढण्याचा त्यांनी कधीच प्रयत्न केला नाही. कार्य करत असतानाच त्यांच्या लक्षात आले की, राष्ट्रीय काँग्रेसच्या व्यासपीठावरून व प्रचार मोहिमेतूनच हे कार्य तडीस नेणे संभवनीय आहे, अन्यथा नाही. प्रारंभी काँग्रेस पक्ष अनुकूल नव्हता. पण ॲनी बेझंट बाईंना शिंदे यांनी पटवून दिल्यामुळे त्यांना सहानुभूती लाभली व काँग्रेसची मदत

मिळू लागली. १९१७ पासून अस्पृश्यतानिवारणाचा विषय सभापरिषदांमधून फोफावत गेला. पण अस्पृश्यतानिवारणाचे कार्य व्यापक व संघटित स्वरूपात व पद्धतशीरपणे प्रथम सुरू केले शिंदेंनीच. या कार्यासाठी त्यांनी संघटना उभारून सामुदायिकरीत्या प्रयत्न केले. शाहू महाराजांनीही या कामात मोठे योगदान दिले. पुढील काळात गांधीजींनी अस्पृश्यतानिवारण कार्यातील संकुचितपणा व एकांगीपणा नाहीसा केला व त्याला व्यापक स्वरूप दिले. गांधीजींचे कार्य गुप्त नव्हते, दिखाऊ नव्हते. १९२० च्या नागपूर काँग्रेसमध्ये महात्मा गांधींनी या विषयाची कड घेऊन या कार्यास राष्ट्रीय प्रश्नाचे स्वरूप दिले. त्यामुळे शिंदेंना अधिक हुरूप आला.

मिशन सोसायटीच्या कार्यक्रमामध्ये पुण्यातील सर्व्हन्ट्‌स ऑफ इंडिया सोसायटीचाही सहभाग असे. या दोन्ही संघटनांचे कार्य सहयोगाच्या तत्त्वानुसार चालत असे. रमाबाई रानडे, लक्ष्मीबाई रानडे, सीता भांडारकर व काशीबाई कानिटकर यांच्या पुढाकारखाली महिलांच्या सभांमधूनही दलितोद्धाराचा प्रचार होत असे. काही इंग्रज महिलाही थोडेफार योगदान देत असत. शिंदेंच्या विनंतीनुसार लेडी म्युर मॅकेंझी या मिशन सोसायटीच्या महिला समितीच्या अध्यक्ष झाल्या. गोपाळ कृष्ण देवधर, धोंडे केशव कर्वे, प्रा. गो. चि. भाटे, न. चिं. केळकर, आर. जी. प्रधान, केशव रामचंद्र कानिटकर, इचलकरंजीचे संस्थानिक बाबासाहेब घोरपडे, बी. एस. कामत, भावनगर संस्थानाचे दिवाण प्रभाशंकर पट्टणी, डॉ. हॅरॉल्ड मॅन, मौलवी रफिउद्दिन, दयाराम गिडुमल, भास्करराव जाधव व गणेश आकाजी गवई अशा विविध स्तरांमधील धुरीणांचा मिशनच्या विधायक कार्यात सहभाग होता. शिंदेंनी ‘ कमवा व शिका ’ या आचारप्रणालीनुसार व्यवसाय शिक्षणाची सुविधा निर्माण केली होती. या अभिनव कार्यासाठी त्यांनी जमशेटजी जिजीभाई आणि बॅ. एच. ए. वाडिया या दानशूरांकडून अठरा हजार रुपयांची देणगी मिळविली होती. वंचितांच्या कल्याणासाठी शिंदे यांनी मिळवलेल्या देणग्या कौतुकास्पद होत्या. **शिवाय त्यांना विविध सामाजिक स्तरांकडून मिळालेला प्रतिसाद फार थोड्या समाजसुधारकांना लाभला.**

विधायक कार्यामुळे कर्मवीर शिंदे यांना मोठी समाजमान्यता होती. म्हणूनच स्वतः टिळकांनी आपल्या होमरूल चळवळीचा बहुजनसमाजात प्रचार करण्यासाठी शिंदेंचा पुरेपूर उपयोग करून घेतला होता. मात्र टिळकांशी असलेले त्यांचे निकटचे संबंध आणि स्वराज्याच्या चळवळीतील त्यांचा सहभाग या दोन कारणांमुळे मराठा पुढाऱ्यांचा शिंदेंना मोठा रोष पत्करावा लागला. त्यांनी उभारलेल्या **नॅशनॅलिस्ट लीग ऑफ मराठाज्** या संघटनेने राष्ट्रवादी कार्य केल्यामुळे मराठा पुढारी विनाकारण नाराज झाले होते.

शिवाय मराठे व मागासवर्गासाठी स्वतंत्र मतदारसंघांची मागणी शिंदेंना आक्षेपार्ह वाटत होती. या मुद्यावरून त्यांचे शाहू महाराज व भास्कर जाधव वगैरे नेत्यांशी तीव्र मतभेद झाले. त्यांना समाजोद्धार कार्याइतकाच स्वराज्याचा लढादेखील महत्त्वाचा वाटे. वस्तुतः ब्राह्मणेतर पक्षाच्या पाठिंब्यावर मुंबई कायदेमंडळाच्या राखीव जागेवर निवडून येणे शिंदेंना अगदी सोपे होते. तथापि राष्ट्रवादी तत्त्वासाठी राखीव जागेचा त्याग करून त्यांनी सर्वसाधारण खुल्या प्रवर्गासाठी असलेली उमेदवारी लढविली. त्यामुळे शाहू महाराज खूपच दुखावले गेले.

**अखिल भारतीय अस्पृश्यतानिवारक संघ :—** गांधीपूर्व काळात काँग्रेसने अस्पृश्यतानिवारणाचा प्रश्न हाती घ्यावा यासाठी महर्षी शिंदे दशकभर प्रयत्न करीत होते. ॲनी बेझंट आणि महात्मा गांधींच्या मदतीने त्यांना डिसेंबर १९१७ च्या काँग्रेसमध्ये थोडे यश लाभले. त्या यशाच्या जोरावर त्यांनी १९१७ मध्येच पुण्यात अ. भा. अस्पृश्यतानिवारक संघ ही स्वतंत्र संघटना स्थापन केली. या उपक्रमास गांधीजी, बेझंटबाई, सयाजीराव गायकवाड, न्या. चंदावरकर, शाहू महाराज वगैरेंचे आशीर्वाद लाभले. त्यांनी या संघाची विशाल परिषद मुंबईत भरवण्याचा निर्णय जाहीर केला. सयाजीराव महाराजांनी परिषदेसाठी उदार देणगी दिली व अध्यक्षस्थान भूषवण्याचे मान्य केले. महत्त्वाची बाब म्हणून शिंद्यांनी टिळकांची मिनतवारी करून त्यांनी सभेत भाषण करावे अशी खास विनंती केली. अनेक काँग्रेस नेते, टिळक सोडून, या संघाची वर्गणी देऊन सभासद झाले. रवींद्रनाथ टागोरही वर्गणीदार झाले. गांधीजी तर देणगीदार होतेच! अस्पृश्यतानिवारण हा विषय प्रथम राजकीय स्तरावर आला होता.

२३ पासून २५ मार्च १९१८ पर्यंत मुंबईतील फ्रेंच पुलाजवळच्या मंडपात संपन्न झालेल्या अ. भा. अस्पृश्यतानिवारण संघाच्या परिषदेत अनेक राष्ट्रीय नेते व समाजसुधारक आणि विचारवंत हजर होते. पहिल्या दिवशी ५,००० तर, तिसऱ्या दिवशी ७,००० जण उपस्थित होते. सयाजीराव गायकवाडांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या या अभूतपूर्व परिषदेस विठ्ठलभाई पटेल, सी. व्ही. मेहता, बिपिनचंद्र पाल, एस. आर. बोमनजी, जमनादास द्वारकादास, बॅ. मुकुंदराव जयकर, भुलाभाई देसाई, पंढरीनाथ तेलंग, आर. जी. प्रधान, लक्ष्मीदास तेरसी, दिनकरराव धों. साठे, मोतीराम वेलकर, न्या. चंदावरकर, बेळवी, न. चिं. केळकर वगैरे मान्यवर हजर होते. टिळकांना अगदी खास निमंत्रण दिल्यामुळे तेही आले होते. पूर्वनियोजित कामामुळे गांधीजी व रवींद्रनाथ टागोर येऊ शकले नाही. मात्र परिषदेच्या ठरावांवर आपण संमतिदर्शक सही करू, असे त्यांनी लेखी आश्वासन दिले होते. शाहू महाराजांनी तार पाठवून पाठिंबा कळवला होता.

अध्यक्ष सयाजीरावांची प्रकृती बरी नसल्यामुळे परिषदेचा पुढील अर्थाचा ठराव बॅ. जयकरांनी मांडला:–"पददलित वर्गावर लादलेली अस्पृश्यता यापुढे ताबडतोब नष्ट करण्यात यावी आणि यासाठी प्रत्येक प्रांतातील वजनदार व विचारी कार्यकर्त्या पुढाऱ्यांनी एक अस्पृश्यतानिवारणाचा जाहीरनामा काढून, अंत्यज वर्गास शाळा, दवाखाने, न्यायकचेऱ्या व सार्वजनिक खर्चाने चालविलेल्या सर्व सार्वजनिक संस्थांमध्ये तसेच विहिरी, तळी, म्युनिसिपालिटीचे नळ अशा सार्वजनिक पाणवठ्यांवर आणि व्यवहाराची व करमणुकीची ठिकाणे व देवालयांसारख्या सार्वजनिक ठिकाणी कोणत्याही प्रकारे प्रतिबंध न करता पूर्ण मोकळीक करून द्यावी, असा या परिषदेचा ठराव आहे."

शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांनी पत्राद्वारे कळविले की, शास्त्राज्ञा लक्षात घेतल्याशिवाय आपण या प्रश्नांचा विचार करणार नाही. द्वारकापीठाच्या शंकराचार्यांने तार पाठवून शिंदेंचा निषेध केला आणि वि. रा. शिंदे व सयाजीराव महाराजांना " आधुनिक कालातील कलिपुरुष " असे विशेषण लावले. बडोदा शहरात राहायला जागा न मिळाल्यामुळे मुंबईत आलेले आंबेडकर संतापलेले होते. म्हणून ते या

परिषदेला हजर राहिले नाही. लो. टिळक दुसऱ्या दिवशी परिषदेला आले. ते काय बोलणार याविषयी परिषदच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राला विलक्षण उत्सुकता वाटत होती. टिळकांनी जोरदार भाषण ठोकले. " अस्पृश्यतेला शास्त्राधार नाही व राष्ट्रीय कार्यात अस्पृश्यांना बरोबर नेणे अपरिहार्य झाले आहे." असे मतप्रदर्शन केले. नेहमीप्रमाणे आवेशाने भाषण करण्याच्या भरात टिळकांनी गर्जना केली," अस्पृश्यता देवास मान्य असेल तर मी त्यास देवच म्हणणार नाही." या गर्जनेमुळे सभेत टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. सर्वांना आनंदाचे भरते आले. तथापि, लवकरच सर्वांचा साफ भ्रमनिरास झाला ! **गर्जनेनंतर अँटिक्लाइमॅक्स झाला. त्यांच्या भाषणाचा वृत्तान्त तर सोडाच, पण बातमीदेखील केसरीने छापली नाही. " रविवारी सकाळी टिळक हे अस्पृश्यतानिवारक परिषदेस गेले होते" हे एकमेव वाक्य केसरीने छापले. सयाजीराव महाराजांच्या भाषणालाही केसरीत जागा मिळाली नाही.**

टिळकपक्षाचे बिपिनचंद्र पाल, खापर्डे व केळकरांनी या परिषदेत भाग घेऊन, भाषणे दिली होती. परिषदेत संमत झालेला ठराव व जाहीरनाम्यावर ३०० पेक्षा अधिक प्रतिनिधींनी बांधीलकीच्या भावनेने सह्या केल्या होत्या. या तीन टिळकपंथीयांनीही सह्या केल्या. परिषदेला हजर नसलेल्या गांधीजी व रवींद्रनाथांनीदेखील जाहीरनामा बंधनकारक मानून त्यावर सह्या केल्या. **तथापि खरा प्रश्न होता टिळकांचा! त्यांना शिंदे यांनी खास विनंती केली. तरीही टिळकांनी सही करण्यास साफ नकार दिला. कर्मठ, सनातन्यांचा अनुनय करणारे टिळक आणि आपल्या अनुयायांना दुखावण्यास तयार नसलेले लोकमान्य हे कर्मठ परंपरावादी आहेत, असा या प्रकरणातून निष्कर्ष काढण्यात आला.**[११]

मराठा वगैरे जातींसाठी स्वतंत्र वा राखीव मतदारसंघांना विरोध आणि कर्मवीर शिंदेंचे काँग्रेसधार्जिणे धोरण व इतर काही मुद्यांवरून बहुजनसमाज चळवळीचे बेस्र नेते शिंदेंच्या विरोधात गेले होते. त्यामुळे त्यांना विषाद वाटतच होता. पणत्यापेक्षाही ज्या दलितांकरिता आपण जिवाचे रान केले आणि त्यांच्या सामाजिक विमोचनासाठी संस्था उभारल्या, त्या दलितांच्या नवोदित नेत्यांना आपले कार्य रुचत नाही याचे

शिंदेंना अतीव दुःख वाटू लागले. **मूकनायक** पत्रक निघाले (१९२०) तेव्हा कर्मवीर शिंदेंविरुद्ध आंबेडकर अशी लढत जुंपली होती. एप्रिल १९२० मध्ये मुंबईच्या टाऊन हॉलमध्ये भरलेल्या अस्पृश्यांच्या सभेत शिंदेंच्या निराश्रित साहाय्यकारी मंडळाच्या धोरणावर कडक टीका करण्यात आली. ' हे मंडळ नष्ट झाले तर बरे ', असे एका माणसाने म्हटले. मिशन महार व मांगांमध्ये कॉलेज शिक्षणाचा प्रचार करीत नाही, असा असत्य आरोप करण्यात आला. शिंदे हे तरुण दलितांच्या टीकेचे जसे लक्ष्य बनले, तसेच ते सनातनी माणसांच्याही माऱ्याचे लक्ष्य बनले. दलित युवक पुढे येऊ लागताच काही जणांना क्षत्रिय मराठा जातीतील शिंदे म्हणजे गळ्यात अडकवून घेतलेले लोढणे वाटू लागले. त्यांच्या मराठा जातीमुळे शिंदे दलितांना नकोसे झाले.

निराश्रित साहाय्यकारी मंडळाच्या नियामक समितीत एकही अस्पृश्य सभासद नाही, याबद्दल आंबेडकरांनी संताप व्यक्त केला होता. मात्र ही टीका स्वाभाविक होती. अशाच विचारातून शाहू महाराजांनी दलितांचे नेतृत्व आपल्या हाती न घेता आंबेडकरांकडे सोपविले होते. 'आपल्याला चालता येईपर्यंतच परजातीचा पुढारी घ्यावा' असे महाराजांनी गणेश आकाजी गवई यांनाही सांगितले होते. कर्मवीर शिंदेंच्या संघटनेत ही एक त्रुटी राहिलेली होती. ती त्यांनी वेळीच दुरुस्त केली नाही.

फुलेंप्रमाणेच शिंदे जातिभेद मानत नसत अथवा पाळीत नसत. तसेच अण्णासाहेब हे काँग्रेस व प्रार्थनासमाजाचे आणि ब्राह्मोसमाजाचेही निष्ठावंत सभासद होते. त्यामुळे मराठे व विशेषतः ब्राह्मणेतर पक्षाचे नेते त्यांच्याकडे संशयी नजरेने पाहत. दुसरीकडे पाव शतकावर काळ त्यांनी अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी अक्षरशः देह झिजवला होता. पण तरीही उपरोक्त कारणांमुळे ते दलित युवकांना नकोसे झाले. शिंदेएकटे पडू लागले होते. ते ज्यांचे नेतृत्व करण्याची हिंमत करीत होते, त्यांना ते नकोसे होते. म्हणून त्यांना वैफल्य वाटू लागले. अंगीकृत कार्यात चांगले यश आले नाही, याची त्यांना खंत वाटू लागली. अस्पृश्योद्धाराचे त्यांचे प्रामाणिक कार्य सवर्णांना तसेच अवर्णांनाही रुचले नाही. या कार्यात राजकारणाचे नवे वारे शिरले आणि म्हणून अवर्ण युवानेते त्यांची उपेक्षा करू लागले.

साक्षेपी अभ्यासक वि. भि. कोलते यांच्या मते दलितांनी त्यांचे महत्त्व ओळखले नाही. ब्राह्मोसमाज व प्रार्थनासमाजाच्या पायावरून त्यांनी सामाजिक समस्येला हात घातलेला असल्यामुळे त्यांची शोकांतिका झाली. आणि त्या शोकांतिकेला ते स्वतः जबाबदार नसताना! मोठ्या पुढाऱ्यांनी चुकीचे समज करून घेतले. राजकारणात त्यांनी ब्राह्मणेतर पक्षाशी सूत न जमविता काँग्रेसशी संबंध ठेवला. शिवाय संस्थेचा संचलनात सर्वांच्याच अनुभवाला येणारे मतभेद, पूर्वग्रह आणि विरोध अशा कारणांमुळे शिंदेंना यश लाभले नाही. कारणे काहीही असोत. पण कोलते म्हणतात त्याप्रमाणे **कर्मवीर शिंदे हे " महाराष्ट्राचे एक उपेक्षित मानकरी ठरले! "** निराश्रित साहाय्यकारी मंडळाचा निरोप घेताना शिंदेंनी व्यक्त केलेले आपले मनोगत **दलित मुक्तिआंदोलन** या प्रकरणात चितारले आहे. शिंदे अखेरपर्यंत स्वातंत्र्य आंदोलनात असले, तरी त्यांची धडाडीची सार्वजनिक कामगिरी १९३३ च्या अखेरीस संपली. [१२] तोपावेतो शिंदे प्रार्थनासमाजाच्या मुंबई, पुणे, सातारा व अहमदनगरच्या शाखांमधून काम करत होते.

## शाहू महाराजांचे कार्य

महात्मा फुले, न्या. रानडे, आगरकर वगैरे समाजसुधारकांच्या कार्यावर अनेक मर्यादा होत्या. त्यांच्याकडे उत्तुंग ध्येयवाद व विचारप्रणाली आणि तळमळ होती. अभावग्रस्त, वंचित व शोषित वर्गाला ते वाट दाखवत व समाजप्रबोधन करीत. पण समाजपरिवर्तन घडविण्यासाठी आवश्यक असलेली साधनसामग्री त्यांच्याकडे नव्हती. कोणत्याही परिवर्तनासाठी उदासीन असलेल्या समाजास वळण लावण्यास आवश्यक तसे कायदे करण्यास ब्रिटिश सरकार पुढाकार घेत नसे. मोठ्या मुश्कीलीने केलेल्या सुधारणाविषयक कायद्यांची अंमलबजावणी किती उदासीनपणे केली जाई याचा वृत्तान्त आम्ही **पहिल्या खंडात दिलेला आहे.** समाजसुधारकांकडे ना सत्ता ना वित्तबळ होते. मात्र त्यांचे उत्तराधिकारी असलेले सयाजीराव गायकवाड व शाहू महाराजांकडे राजसत्ता व वित्तबळ होते. या दोघांनी समाजसुधारणांसाठी आपल्याकडील साधनसामग्री उपयोगात आणली. त्यांनी आपापल्या प्रदेशात कायदे करून ते अमलात आणले.

शाहू महाराजांचा इंग्रज अधिकाऱ्यांशी सलोखा असल्यामुळे त्यांना इच्छित कार्य, निदान संस्थानात, तडीस नेणे शक्य झाले. महाराजांनी शिक्षण, आरोग्य वगैरे क्षेत्रांत सुधारणा केल्या. विशेषतः अभावग्रस्त व वंचितांसाठी कल्याणकारी योजना अमलात आणल्या. त्यांना नोकरी व कामधंदा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले. ग्रामीण भागातील मुलांना कोल्हापुरातील शिक्षण सुविधांचा लाभ घेणे शक्य व्हावे, यासाठी मुलांच्या निवासासाठी व्यवस्था उभारणे गरजेचे होते. हे ओळखून त्यांनी वसतिगृहे काढण्याचा प्रारंभ केला. १९०१ साली कोल्हापुरात मराठा बोर्डिंग काढून महाराजांनी वसतिगृहांची मोहीम सुरू केली. त्याकाळापर्यंत जातीय विलग्नीकरण कायम होते म्हणून महाराजांनी सार्वजनिक किंवा संमिश्र वसतिगृहे न काढता जातवार वसतिगृहे काढण्यावर भर दिला. प्रत्येक सत्ताधीशाचा आपापला दृष्टिकोण असतो! त्यानुसार मराठा बोर्डिंगनंतर जैन, लिंगायत, शिंपी, सोनार, जिनगर, कायस्थ प्रभू व सारस्वत ब्राह्मण तसेच मुसलमान मुलांसाठी जातीनिहाय वसतिगृहे काढली. तदनंतर महार मुलांसाठी वसतिगृह सुरू केले. या सुविधांसाठी त्यांनी मुबलक वित्तदान दिले,जमिनी दिल्या. काहींना शेतजमिनी इनाम म्हणून दिल्या, तर काहींना वर्षासने मंजूर केली. अशी वसतिगृहे त्याकाळी अत्यल्प होती.

तत्कालीन कोल्हापुरातील दलितांना स्वाभाविकपणे महाराजांविषयी मोठा आदर व प्रेम वाटे. अस्पृश्यतानिवारण हेही महाराजांचे एक उद्दिष्ट होते. त्यानुसार स्वतःपासून प्रारंभ करून त्यांनी आपल्या शाही घोडागाडीचा कोचमन महार जातीतून निवडला होता. आपल्या हत्तीचा माहूतही महारच निवडला. काही गावचे तलाठी म्हणून शिक्षित महारांच्या नेमणुका केल्या. जातवार पुढारी तयार करण्यावर त्यांचा कटाक्ष होता. १९२० साली महार जातीतील काही जणांनी त्यांचे नेते होण्याची महाराजांना विनंती केली होती. तथापि अत्यंत धोरणीपणाने महाराजांनी ही विनंती नाकारली. आणि त्यांना सांगितले, " आपल्या जातीचेच पुढारी नेमले पाहिजे. पशुपक्षीदेखील हीच गोष्ट करतात."

शाहू राजे मुलांची वसतिगृहे काढून थांबले नाहीत. त्यांत राहून शिक्षण घेतलेल्या अब्राह्मण युवकांच्या उपजीविकेसाठी आपल्या संस्थानात नोकऱ्या देण्याचे धोरण

त्यांनी अमलात आणले. ब्राह्मण मुलांशी अब्राह्मण मुलांना स्पर्धा करणे शक्यच नव्हते. म्हणून १९०१ साली महाराजांनी जातनिहाय नोकऱ्या देणारा व राखीव जागांची तरतूद करणारा पुढील आदेश काढला. “ संस्थानात ज्या जागा रिकाम्या होतील, त्यापैकी शेकडा पन्नास जागा मागासलेल्या वर्गांतील उमेदवारांना देण्यात येतील. ज्या ज्या ऑफिसात मागासलेल्या लोकांचे प्रमाण हल्ली शेकडा पन्नासपेक्षा कमी आहे, त्या त्या ऑफिसात इतःपर रिकाम्या होणाऱ्या जागा ‘मागासलेल्या’ वर्गांतील इसमांना देण्यात येतील.” त्याकाळी हे धोरण फारच पुरोगामी होते. त्यामुळे महाराष्ट्रात प्रचंड वादंग माजले. आपल्या परंपरागत हितसंबंधावर हे आक्रमण होय, अशी ब्राह्मण व वरिष्ठ जातींचे नेते टीका करू लागले.

ब्राह्मणेतर चळवळीचे सूत्रधार शाहू महाराज यांनी अस्पृश्यतानिवारणासाठी आयुष्यभर प्रयत्न केले. कर्मवीर भाऊराव पाटील तसेच प्रबोधनकार ठाकरे या ब्राह्मणेतर नेत्यांनीही या कार्यास हातभार लावला. मात्र ब्राह्मणेतर पक्षाच्या अनेक नेत्यांनी या कार्यात भाग घेतला नाही, हे मान्य करावे लागते.

निवासाची व्यवस्था आणि नोकऱ्यांमधील आरक्षणामुळे कोल्हापूर संस्थानात उत्साह निर्माण झाला. राजाराम कॉलेजमध्ये आधीपासून ब्राह्मण मुलांचा भरणा असून अब्राह्मण मुले अत्यल्प होती. पण महाराजांनी अमलात आणलेल्या धोरणामुळे त्यांची संख्या वाढली. संस्थानाच्या शासनसेवेतही मागासवर्गाचे प्रमाण उत्तरोत्तर वाढत गेले.

सातारा, सांगली, धारवाड, सावंतवाडीपेक्षा कोल्हापुरात आधीपासूनच शैक्षणिक सुधारणा व शिक्षणाची परंपरा होती, सुविधा होती. कोल्हापुरात वसतिगृहांची नवी सुविधा उपलब्ध झाल्यावर तर ते पुण्याखालोखाल नवे शैक्षणिक केंद्र बनले. ग्रामीण महाराष्ट्रातून मागासलेल्या वर्गातील मुले कोल्हापुरास येऊन शिकू लागली. एकबाब स्पष्ट करायला हवी की, या संपूर्ण विवेचनातील ब्राह्मण, पारशी, कायस्थ प्रभु व सारस्वत या वरिष्ठ व पुढारलेल्या जाती वगळता इतर सर्व जातींचा समावेश तेव्हा ‘मागासलेल्या’ वा ब्राह्मणेतर जाती समूहात केलेला होता. अशा जातींची मुले कोल्हापुरात शिकल्यामुळे त्यांच्यात स्वाभाविकपणे नवीन ब्राह्मणेतर जाणिवा निर्माण झाल्या. त्यांच्यावर विशिष्ट संस्कार होणे स्वाभाविक होते. मूळ गावी परतल्यावर त्यांनी कोल्हापुरातील आचारविचार आपल्या गावी पसरविले. याचा वर्धिष्णू (स्पायरलिंग)

परिणाम घडणे क्रमप्राप्त होते. कोल्हापुरातील वसतिगृहांना बहुधा 'मराठा बोर्डिंग' म्हणत. कालांतराने महाराष्ट्रात कोल्हापूरचे लोण पसरले.

शाहू महाराजांच्या चळवळीत दलितांनाही स्थान होते. महाराजांनी दूरदृष्टीने अस्पृश्यांना बहुजन संघटनेतून फुटून जाऊ दिले नाही, त्यांना धरून ठेवले. प्रारंभी शाहूंनी फुलेंप्रमाणेच दलितांचा ब्राह्मणेतरांमध्येच समावेश करून चळवळीत सामील करून घेतले. तथापि आंबेडकर पुढारी झाल्यावर त्यांनी आपल्या दलित अनुयायांना ब्राह्मणेतरांपासून अलग ठेवले, हा फरक होता. आंबेडकरांच्या मते हिंदू समाजाच्या एका टोकावर ब्राह्मण आणि दुसऱ्या टोकावर दलित व मध्ये उरलेला बहुजनसमाज होता. हे अनुभवजन्य मत होय.

ब्राह्मण व अब्राह्मण यांजबरोबर वसाहतवादी ब्रिटिश हा तिसरा पक्ष होताच, हे विसरता कामा नये. खोलात जाऊन वेध घेतला तर दिसते की, ब्रिटिशांना कोणाचीच सुधारणा करायची नव्हती, निदान त्या काळात तरी. भारतीयांच्या दृष्टीने मोठा प्रश्न पोटापाण्याचा होता, नोकरी व व्यवसायाचा प्रश्न होता. सरकारी नोकऱ्यांमध्ये हिंदूंचे प्रमाण फार मोठे आहे अशी मुस्लीम लीगची तक्रार होती. तर हिंदूपैकी केवळ ब्राह्मणच नोकरीचा लाभ घेतात अशी सत्यशोधक पक्षाची तक्रार होती. या दोन्हीही तक्रारी सत्य होत्या. काँग्रेस पक्ष हिंदू लोकांचा पक्ष असे लीग म्हणत असे. तर काँग्रेस म्हणजे ब्राह्मणांचाच पक्ष असल्याची टीका ब्राह्मणेतर करीत. संपूर्ण महाराष्ट्रापुरते हेही सत्य होते. त्यामुळे स्वराज्य म्हणजे पेशवाईचे पुनरुज्जीवन होईल, अशी त्यांना भीती वाटे. वस्तुतः निदान १९३०-१९३२ पर्यंत तरी स्वराज्य लाभण्याची सुतराम शक्यता नव्हती. म्हणून हे वाद वृथा होते.

तिसरा पक्ष असलेले इंग्रज महाधूर्त होते. इंग्रज महाराष्ट्रातील ब्राह्मणांच्या तथाकथित कारस्थानी, कुटिल वृत्तीचा खराखोटा निर्देश करून काँग्रेसची चळवळ महाराष्ट्रात पसरू नये यासाठी कसून प्रयत्न करीत. 'डिव्हाइड अँड रूल' ही सनातन ब्रिटिश नीती जशी मुसलमान व संस्थानिक आणि जमीनदारांच्या बाबतीत होती, तशीच ती अब्राह्मण समाजाच्या बाबतीतही होती, असे आम्हाला वाटते.

अशा वातावरणात विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात सरकारी नोकरीतील अब्राह्मणांना नोकरीची संधी हा पोटापाण्याचा प्रश्न ऐरणीवर आला. शिक्षणप्रसारामुळे हा प्रश्न जटिल होणे स्वाभाविकही होते. सनदी नोकरशहा ली वार्नर, कर्नल फ्रेजर, म्युर मॅकेंझी व गव्हर्नर सिडनहॅम, लॉर्ड विलिंग्डन वगैरे अनेक मुत्सद्दी साम्राज्य रक्षणासाठी कुटिल भूमिका वठवत व राजकीय कारवाया करीत. आगामी माँटेग्यू-चेम्सफर्ड राज्य सुधारणा विधेयकाबाबत तीन वर्षे चाललेल्या अतिप्रदीर्घ चर्चेमुळे देशभर 'आरक्षण' या विषयावर वादप्रतिवादांचा धुराळा खूपच उडाला. देशातील सामाजिक व राजकीय वातावरण दूषित झाले. त्यामुळे सरकारचे फावले.

या पार्श्वभूमीवर शाहू महाराजांनी मागासलेल्या वर्गासाठी राखीव ठेवलेल्या नोकऱ्या पुढारलेल्या वर्गाच्या डोळ्यांत सलू लागल्या. वस्तुतः संस्थानात मागासलेल्या लोकांची संख्या व्याख्येप्रमाणे शेकडा ९० तरी असेल. मग त्यांच्यासाठी ५० टक्के जागा राखीव ठेवण्यात गैर काय, हा खरा सवाल होता. आरक्षणापूर्वी सरकारी सेवांमध्ये त्यांचे प्रमाण पाच-सात टक्के असणार. शिवाय राजेंनी अपात्र जणांना नेमले नाही. हे प्रतिस्पर्धी असलेल्या **समर्थ** या पत्रानेही कबूल केले. म्हणून टिळकपक्षाचे आक्षेप गैर लागू ठरतात. या वादंगाला आर्थिक परिमाण होते व वेदोक्त वादाची पार्श्वभूमी होती.[१३]

## वेदोक्त प्रकरण

छत्रपती शिवाजीचा राज्याभिषेक तसेच साताऱ्याचे छत्रपती प्रतापसिंह आणि सयाजीराव गायकवाड यांच्या कार्यकालातही मराठ्यांना वेदोक्त धर्मसंस्कारांचा हक्क याबाबत वादंग माजले होते. १९०० सालापासून शाहू महाराजांनाही कर्मठ पुरोहितांशी तशीच लढत द्यावी लागली. परंपरानिष्ठ पुरोहितांविरुद्धचा हा लढा अत्यंत निकराचा झाला. यालाच 'वेदोक्त प्रकरण' ही संज्ञा देण्यात आली. या प्रकरणास महाराजांच्या व्यक्तिगत जीवनातच नव्हे, तर महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासातही महत्त्व देण्यात येते. १९०१ पासून वेदोक्त वाद आणि ताईमहाराज वारसा प्रकरण ही दोन्ही प्रकरणे एकमेकांत गुंतली. त्यामुळे महाराष्ट्रात ब्राह्मण व मराठे यांच्यात एकात्मभाव निर्माण होणे अथवा पूर्वीची जवळीक कायम ठेवणे अशक्य झाले. टिळक व शाहू महाराज

यांच्यात प्रारंभी असलेला सलोखा व सहयोग या प्रकरणांमुळे संपुष्टात आला. या मातब्बर नेत्यांमधील प्रखर लढत व वादंगाचे महाराष्ट्रातील समाजकारण व राजकारणावर दूरगामी परिणाम झाले. मराठे व ब्राह्मणेतर जाती व ब्राह्मण वर्ग यांच्यातील तेढ वाढत गेली. याचे पडसाद महाराष्ट्रभर उमटले. याचे दुष्परिणाम स्वराज्याच्या चळवळीवरही पडू लागले. मात्र या वादामुळे अब्राह्मणांमध्ये जागृती होण्यास चालना मिळाली. मराठे व कुणब्यांची अस्मिता जागृत होण्यास मदत मिळाली. शिवाजीनंतर शाहू महाराज मराठा अस्मितेचे प्रतीक बनले. ते बहुजनसमाजाचे पुढारी झालेत.

वेदोक्त प्रकरणाची सुरुवात लहान कारणानेच झाली. महाराज धर्मविधी कटाक्षाने पाळत. एकदा कार्तिक-स्नानासाठी शाहू महाराज पंचगंगेवर गेले असता, त्यांच्यासमवेत मुंबईचे प्रसिद्ध समाजसुधारक आणि विद्वान ग्रंथकार राजारामशास्त्री भागवत होते. विधी करताना नारायण भट वेदोक्त मंत्र न म्हणता पुराणातील मंत्र म्हणत असल्याचे भागवतांनी महाराजांच्या लक्षात आणून दिले. याबाबत महाराजांनी सवाल केल्यावर त्या भटाने म्हटले, “भोसले शूद्र वर्णातील असल्याने त्यांना पुराणोक्त मंत्रच सांगावे लागतात आणि ते सांगण्यापूर्वी पुरोहिताने स्वतः स्नान करण्याचीही गरज नसते.” मात्र आपण क्षत्रिय आहोत व त्यामुळे आपल्या घराण्यातील धर्मविधी वेदोक्त मंत्रांनुसारच व्हावा असा शाहू महाराजांचा आग्रह होता. वस्तुतः त्या पुरोहितांना विधींसाठी वर्षासने दिलेली होती. म्हणून वठणीवर न आलेल्या पुरोहितांची वर्षसने व नेमणुका महाराजांनी रद्द केल्या. त्यातून वेदोक्ताचा वाद पसरला. काही व्यक्तींना वर्णश्रेष्ठत्व व वेदाभ्यासाचा अहंकार होता, तर काहींना आपले चातुर्वर्ण्यातील स्थान टिकवणे महत्त्वाचे वाटत होते. प्रकरण विकोपास गेले. अशा गरम वातावरणात महाराजांनी सकृतदर्शनी अनुकूल वाटणाऱ्या राजोपाध्ये यास राजवाड्यातील विधी वेदोक्त पद्धतीने करण्याचा आदेश दिला. या एकाच कामासाठी राजोपाध्याला वंशपरंपरा पंचवीस-तीस हजार रुपयांचे वर्षासन होते. पण या माणसानेही या वतनावर पाणी सोडून वेदोक्ताला विरोध केला. शेवटी महाराजांनी त्याचेही वतन खालसा करून शिक्षा दिली.

वस्तुतः शाहू महाराजांनी केवळ आपल्या राजघराण्यापुरताच वेदोक्ताचा आग्रह धरला होता. सर्व मराठ्यांचे धर्मविधी वेदोक्त करा असा त्यांचा आदेश नव्हता. मात्र सर्वांना तो मिळावा असे ते म्हणत. गागाभट्टापासून भोसले घराणे क्षत्रिय आहे असे मान्य झाले होते. तथापि महाराजांचे घाटगे हे 'जनक घराणे' क्षत्रिय नाही, असे ब्राह्मण म्हणत. लोकमान्य टिळक जीर्णोद्धारवादी होते. महाराजांविरुद्ध टीकेची मोहीम सुरू झाली. त्यासरशी हे प्रकरण आणखी विकोपास गेले. महाराजांचे मित्र राजारामशास्त्री भागवत आधीपासून दरमहा मुंबईहून कोल्हापुरास येऊन भास्करराव जाधवांकडे उतरत आणि मराठा विद्यार्थ्यांना गायत्री मंत्र शिकवीत. राजारामशास्त्री भागवत स्वतः सुधारणावादी कोकणस्थ ब्राह्मण होते. ते धर्मज्ञानी होते. अगदी जाहीर सभांमधूनही ते प्रतिपादन करीत की, सर्व मराठे क्षत्रिय असल्यामुळे त्यांना द्विजांप्रमाणे म्हणजे ब्राह्मणांप्रमाणेच गायत्री मंत्रासह उपनयन करण्याचा धार्मिक हक्क आहे. शास्त्रानुसार उपनयनासारखे संस्कार पार पाडण्यासाठी ते तयार असत. त्यांनी अनेक मराठ्यांच्या मुंजी लावल्या होत्या. महिलांनाही मुंज करण्याचा हक्क आहे, असेही त्यांचे मत होते. इराण्याच्या रेस्टॉरंटमध्ये चहापान करणे त्याकाळी ब्राह्मणांनी निषिद्ध मानले होते. अशी खुळचट बंधने झुगारून राजारामशास्त्री रेस्टॉरंटपुढे उभे राहून बेलाशक पावभजी खात व चहा घेत असत. स्वाभाविकपणे सनातनी ब्राह्मण त्यांचा उपहास करत. भागवतांच्या पुरोगामी आचारविचारांमुळे त्यांच्याशी शाहू महाराजांची मैत्री जडली.

सनातनी पुरोहितांच्या मते कलियुगात ब्राह्मण आणि शूद्र हे दोनच वर्ण अस्तित्वात असून क्षत्रिय आणि वैश्य हे दोन्ही वर्ण क्षय पावलेले आहेत. म्हणजे जो माणूस ब्राह्मण नाही तो शूद्र! या कर्मठांच्या धर्मज्ञानानुसार काही अल्पसंख्य समाजघटक यास केवळ अपवाद म्हणून असू शकतील! तथापि त्या महाभागांनी असे किती अपवाद शोधून काढले, या नोंदी सापडत नाही. त्या सनातन्यांच्या मतानुसार भोसले, घाटगे, बडोद्याचे गायकवाड म्हणजे सयाजीरावदेखील व देवासचे पवार राजे ही सर्वच मंडळी क्षत्रिय नसून शूद्र होत! **मग प्रश्न उपस्थित होतो— मुघलांशी, आदिलशाहीशी व निजामाशी लढले ते कोण होते? का ते शूद्रच होते! हा**

**साराच प्रकार हास्यास्पद अथवा अज्ञानमूलक होता.** कोल्हापूरचे कर्मठ पुरोहित केवळ शाहू महाराजांनाच वेदोक्ताचा हक्क नाकारात होते, असे नव्हे. हा सवाल क्षत्रियांच्या **'वर्गीय अस्मितेचा'** असल्यामुळे शाहू महाराजांनी वेदोक्त अधिकाराचा आग्रह धरला होता.[१४]

त्या कर्मठ पुरोहितांना शिक्षा म्हणून शाहू महाराजांनी सयाजीरावांचे अनुकरण करून, संबंधित भिक्षुकांच्या नेमणुका, वर्षासने व इनाम जमिनी खालसा केल्या. ज्या पुरोहितांनी वेदोक्त संस्कार केले, त्यांचा राजाश्रय चालू ठेवला. मात्र कालानुरूप चालण्यास तयार असलेले काही पुरोहित कोल्हापुरातही होते. धर्मसुधारणेस अनुकुल असेलेले काही शास्त्री वाईच्या प्राज्ञपाठशाळेत तेव्हा होते. पुण्यातही असे काही अनुकूल पंडित होते. याबाबत काही जणांनी आपल्या आठवणी लिहून ठेवलेल्या दिसतात. तथापि त्यांत उतारवयातील स्मरण-विस्मरणाचा गलबला आणि सवंगपणाची बरीच मिलावट असल्याने या सामाजिक इतिहासात त्यांना स्थान देणे मला शक्य नाही. हे मात्र निर्विवाद आहे की, शाहू महाराजांच्या परिवारातील धर्माचरणात वेदोक्त पद्धतीचा अवलंब करणाऱ्या पुरोहितांना इतर ब्राह्मणांनी वाळीत टाकले. सार्वजनिक नळाचे पाणी घेण्यासही त्यांना मनाई केली. आपल्या नेमणुका व इनामे पूर्ववत चालू ठेवण्यासाठी राजोपाध्येसारख्यांनी महाराजांकडे अपिले केली. येथून नकार मिळाल्यावर त्यांनी इंग्रज रेसिडेंट आणि नंतर सरकारकडे अर्ज केले, तक्रारी केल्या. हे प्रकरण गव्हर्नरपर्यंतच न थांबता व्हाइसरॉय व भारतमंत्री महोदयापर्यंत जाऊन पोहेचले. चौकशा झाल्या. तथापि तेथे महाराजांनाच पाठिंबा मिळाला.

पुणेकर सनातनी ब्राह्मणांचे अध्वर्यू असलेले सरदार बाळासाहेब नातू यांचा कोल्हापुरातील ब्राह्मणांना मोठा आधार वाटत असे. येथील सनातनी ब्राह्मणांनी नातूंशी हातमिळवणी करून राजेंविरुद्ध चळवळ सुरू केली. म्हणून महाराजांनी निरनिराळ्या इंग्रज अंमलदारांच्या भेटीगाठी घेतल्या. या प्रकरणात महाराजांनी खंबीरपणे कारवाई केल्याने तसेच टिळक व त्यांचा पक्ष या प्रकरणात गुंतल्यामुळे मुंबई सरकार महाराजांवर खूष आहे असे कर्नल फेरीसने त्यांना कळवले. टिळकांसकट ब्राह्मणांचा

जुलूम व विरोध मोडून काढण्यासाठी शाहू राजेंनी केलेल्या प्रत्येक कृतीला सरकारचा पूर्ण पाठिंबा मिळेल, असा फेरीसच्या पत्राचा (१ मे १९०२) निर्वाळा होता. या वेदोक्त प्रकरणात अंतिम विजय राजेंनाच मिळेल याची ग्वाही ए.एम.टी. जॅक्सनच्या पत्रातही आढळते.[१५] ब्राह्मण ही कारस्थानी व उपद्रवकारक जात आहे, असे मत असलेल्या स्टॅन्ले एजरली या मुंबईच्या गृह सचिवानेही महाराजांच्या खंबीर धोरणाविषयी आनंद व्यक्त करून, त्यांची पत्राद्वारे पाठ थोपटली होती.[१६]

टिळकांप्रमाणेच राजोपाध्येंनीही लॉर्ड कर्झनला लिहिलेल्या अर्जात वेदोक्त वादाला एक फॅड म्हणजे खूळ म्हटले. या अर्जात राजोपाध्ये म्हणतात, आपल्या कुटुंबाला २०० वर्षांपूर्वी मराठा कालखंडात तेव्हाच्या राजवटीने दिलेल्या इनाम जमिनी जप्त करण्याचा शाहू राजेंना अधिकार नाही; कोल्हापुरात ब्राह्मणांचे जीवित व वित्त सुरक्षित राहणार नाही अशीही भीती वाटते. म्हणून स्वतंत्र न्यायाधीशाकडून न्यायचौकशी व्हावी, अशी राजोपाध्येंनी कर्झनकडे मागणी केली (५ जानेवारी १९०५). या प्रकरणी रेसिडेंटपासून व्हाइसरॉयच्या सल्लागारांपर्यंतच्या इंग्रज अंमलदारांनी दिलेला अभिप्राय पाहा : " शाहू राजे मराठ्यांमध्ये शिक्षण प्रसार करीत असल्याने ब्राह्मण दुखावलेले आहेत. मुंबई सरकारचा निर्णय केंद्र सरकारने फिरवला तर महाराजांच्या प्रतिष्ठेला फार मोठा धक्का बसेल. वेदोक्त प्रकरण म्हणजे 'कुविख्यात' टिळकांच्या पाठिंब्याने ब्राह्मणांनी महाराजांविरुद्ध चालवलेली लढत आहे." सरकारचा हा अभिप्राय स्वीकारून कर्झन साहेबांनी ९ मे १९०५ च्या पत्रानुसार तसा निर्णय मुंबई सरकारला कळविला. मात्र टिळकांना 'कुविख्यात' असे म्हणून इंग्रजांनी त्यांना दिलेले दूषण चुकीचे वाटते, पूर्वग्रहदूषित वाटते.

शाहू महाराज व ब्राह्मण यांच्यातील वाद आणि एकूण वेदोक्त प्रकरण हा केवळ धार्मिक अथवा सामाजिक वाद राहिला नाही. या वादाला कलोनिअल सत्ताधीशांनी मतलबी राजकीय रंगरूप दिले. या वादंगामुळे ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांच्यात नवीन कलह निर्माण करण्याची इंग्रजांना संधी लाभली. या प्रकरणात कोल्हापूरचा रेसिडेन्ट व मुंबईतील सनदी अंमलदारांचा सक्रिय सहभाग होताच. वस्तुतः धार्मिक वा सामाजिक स्वरूपाच्या या वादाचे इंग्रजांना सोयरसुतक नव्हते. लॉर्ड कर्झनने शाहू

**राजांना न्याय दिला तो केवळ राजकीय हेतूनेच! जहाल काँग्रेस नेता असलेल्या लोकमान्य टिळकांना शह देणे व त्यांचा प्रभाव कमी करणे ही कर्झनशाहीची राजनीती होती. आणि ही राजनीती किती सफल झाली याबाबत बरेच पुरावे आम्हाला ब्रिटिश सरकारच्या दस्तऐवजांमध्ये आढळले.** इतके मात्र खरे की, या प्रकरणात शाहू राजांचा विजय झाला.

सयाजीराव महाराज मात्र कर्झनशीही फटकून वागले. त्यांनी कर्झनलाही जुमानले नाही, आणि काँग्रेसशी सलोखा राखून त्यांनी समाजसुधारणा केल्या.

१८९४ साली कोल्हापूर संस्थानात पाच शाळा होत्या. ही संख्या शाहू महाराजांनी १९१२-१३ सालापर्यंत १७ वर नेली. १९११ साली दलित मुलांना मोफत शालेय शिक्षण देण्याची तजवीज केली. १९१७ पासूनच्या काळात आपले खाजगी उत्पन्न व दरबाराच्या तिजोरीतून त्यांनी दलित मुलांसाठी सात वसतिगृहे चालवली होती. या वर्षापासून त्यांनी पोलीस, कारकून व तलाठी या पदांसाठी दलितांना पसंतीदेण्याचे धोरण स्वीकारले. तसेच शाळा, कॉलेज व सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांनाही समान वागणूक देण्याचे धोरण स्वीकारले.

सयाजीराव गायकवाड यांनी दिलेल्या पैशातून बाबासाहेब अमेरिकेला गेले आणि कोलंबिया विद्यापीठाची पदवी मिळवून २१ ऑगस्ट १९१७ रोजी भारतात परत आले. नंतर जुलै १९२० मध्ये शाहू महाराजांनीही पैसा दिल्यामुळे बाबासाहेबांना उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला जाणे शक्य झाले. यामुळे बाबासाहेब महाराजांकडे आकर्षित झाले. एका जाहीर सभेत शाहू महाराजांनी घोषित केले. "आम्ही दलितांच्या उद्धारासाठी सक्रिय मदत केली. पण तुमचा खरा पुढारी डॉ. आंबेडकरच होय." या प्रोत्साहनाने आंबेडकर खूप भारावले होते. या प्रेरणेतून बाबसाहेबांनी दलित चळवळीची धुरा वाहिली.[१७]

## प्रबोधनकार ठाकरे व कर्मवीर भाऊराव

सत्यशोधक समाज व ब्राह्मणेतर पक्षाने बहुजनसमाजाचा उद्धार करण्याचे अभियान अनेक दशके चालविले. त्यास कमी अधिक प्रतिसाद लाभला, वाद-प्रतिवाद झाले.

आणि विरोधही झाला. चळवळीची उपयुक्तता संपली असेही कित्येकांना वाटले. अशा वातावरणात केशव सीताराम ठाकरे आणि भाऊराव पाटील यांनी ब्राह्मणेतर पक्षाचा उदय व विलय पाहिला, पण आपले कार्य वेगवेगळ्या मार्गांनी चालू ठेवले. भाऊरावांनी बहुजनसमाजासाठी शैक्षणिक अभियान उभारले, आणि त्यासाठी महात्मा गांधी यांचीही मदत घेतली. महाराष्ट्रातील समाजाचे सूक्ष्मावलोकन केलेल्या ठाकरेंनी आपली प्रभावी वाणी व धारदार भाषेद्वारे समाजाचे प्रबोधन केले. त्यामुळेच त्यांना 'प्रबोधनकार' हे गुणनाम प्राप्त झाले.

ठाकरेंच्या पत्रकारितेचा प्रारंभ नारायण नरसिंह फडणिसांच्या उत्तेजनाने जळगावात झाला. काव्यरसिक फडणिसांनी मराठी कवी, कविता आणि रसिकांना सक्रिय उत्तेजन देण्यासाठी **काव्यरत्नावली** हे मासिक अनेक वर्षे नेटाने व निर्धाराने चालविले होते. त्यामुळे बरेच मराठी काव्य प्रकाशित झाले, चिरंजीव झाले आणि जिवंत राहिले. एकही संस्था वा समाजाचा आश्रय नसूनही त्यांनी काव्यसेवा केली होती. फडणिसांच्या **प्रबोधचंद्रिका** साप्ताहिकानेही समाजप्रबोधन केले होते. त्यांच्याच उत्तेजनाने के. सी. ठाकरेंनी **सारथी** मासिक सुरू करून जळगावात पत्रकारितेचा शुभारंभ केला होता.

ठाकरेंनी पाहिलेल्या महाराष्ट्रात स्त्रीजन्माची पारंपरिक करुण कहाणी फारशी बदलली नव्हती. भर मे महिन्यातील कडक उन्हातही रस्त्यातून चालणाऱ्या महिलांना पादत्राण घालण्याची मुभा नव्हती. पादत्राण घालून चालणाऱ्या ब्राह्मण महिलांना ' हुंडगी अथवा वेश्या ' या सदरात टाकण्यात येत असे. ठाकरे लिहितात, तीन बायका मेलेल्या साठ वर्षांच्या थेरड्याचा नऊ-दहा वर्षांच्या कोवळ्या कुमारकेशी लग्नाचा सौदा ठरला, तरी त्याचा निषेध होत नसे. पांढरपेशा समाजातही लग्नाचे असे व्यवहार जमवणारे होतेच. अगदी आठ-नऊ वर्षांच्या बालविधवांचे केशवपन करण्यात येई. तिचे हातपाय बांधून व तोंडात बोळा कोंबून अथवा मारहाण करून न्हाव्याला वस्तरा चालवण्यास भाग पाडण्यात येई. अशा क्रूरपणाचे समर्थन करणारे धर्ममार्तंड विपुल होते. मुली पाहण्यास जाण्याचा प्रघातही वाईटच होता. बायका-पुरुषांचे तांडे मुलीला पाहण्याला येत. शिवाय नवरा महिन्याभरात मेल्यावर केशवपनाचे भयानक दिव्य आणि शतमुखी छळ करण्यात येई. ठाकरेंच्या घराशेजारी

दहा-अकरा वर्षांच्या बालिकेचा विवाह पासष्टीच्या म्हाताऱ्याशी होणार होता. ठाकरेंनी या लग्नाचा मंडप जाळून टाकला व आपला निषेध व्यक्त केला होता. तेव्हापासून ठाकरे क्रियाशील समाजसुधारक झाले, आणि त्यांनी लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांना गुरू मानले. तसेच पुण्यात **लोकहितवादी** हे साप्ताहिक एक वर्ष चालविले होते.[१८]

पहिल्या महायुद्धात युद्धनिधी आणि सैनिक भरती सक्तीने करण्यात येई. याचाही त्यांनी निषेध केला होता. न्या. नारायण चंदावरकर, जमशेटजी जिजीभाई, भालचंद्र भाटवडेकर, फजलभाय करिमभाय, नारायण मल्हार जोशी, आगाखान, दोराब टाटा, रतन टाटा, नरोत्तम मोरारजी गोकुळदास यांसारख्या मान्यवरांनी ११ मार्च १९११ रोजी **सोशल सर्व्हिस लीग** ही संघटना काढली होती. या संघटनेने विधायक सामाजिक कार्य करून समाजसुधारणा, शिक्षणप्रसार, रुग्णसेवा व वाचनसंस्कृतीचा विस्तार केला. या संस्थेने मोफत वाचनालये, रात्रीच्या शाळा, अँब्युलन्स सेवा, व्यायाम शाळा व पतपेढ्या उभारून भरीव कार्य केले. नारायण मल्हार जोशींनी या संस्थेमार्फत कामगार वर्गासाठी बरेच रचनात्मक कार्य केले. गिरगाव व गिरणगावातील जनतेच्या सर्वांगीण जागृतीचा पाया या लीगनेच घातला. लीगने गाजावाजा न करता सामाजिक कार्य केले. तरुण वयात के.सी. ठाकरेंनीदेखील या लीगच्या कार्यात भाग घेतला होता. अशा अनेकांना लीगने समाजसेवा करण्याची संधी दिली.

ख्रिस्ती मिशनरींच्या बळजबरीच्या धर्मान्तरातून सुटका करून घेण्यासाठी १९१८ साली काही हिंदू समाजसुधारकांनी मुंबईत **हिंदू मिशनरी सोसायटी** काढली होती. या संघटनेने सुटसुटीत असा वैदिक विवाहविधी तयार करून त्याचा प्रचार केला. हिंदुधर्मात पुनःप्रवेश आणि वैदिक विवाह करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. के. सी. ठाकरेंनी या कार्यासाठी खानदेश, वऱ्हाड आणि नागपुरापर्यंत प्रचार दौरे केले होते. नागपुरातही हिंदू मिशनरी परिषद भरविण्यात आली.

साधारणपणे १९१८ मध्ये ठाकरे ब्राह्मणेतर चळवळीकडे आकर्षित झाले आणि शाहू महाराजांनी त्यांना कोल्हापुरात बोलावले. महाराजांनी त्यांचे सत्त्व पाहिले. जातीय अभिनिवेश व स्पृश्यास्पृश्यतेचा मनस्वी तिटकारा असलेल्या ठाकरेंचा महाराजांनी

आपल्या चळवळीत उपयोग करून घेण्यास सुरुवात केली. सप्टेंबर १९२१ मध्ये ठाकरेंनी **प्रबोधन** पाक्षिक सुरू केले. ब्राह्मण जगद्‌गुरुचे दास्य नको म्हणून महाराजांनी क्षात्र जगद्‌गुरुचे धर्मपीठ निर्माण केले होते. दरबारातील प्रत्येक असामीने क्षात्र जगद्‌गुरुला मुजरे करावे, असे महाराजांनी मौखिक फर्मान सोडले होते. तथापि महाराजांच्या हजेरीतच त्यांचा हा हुकूम बाजूला ठेवून भास्करराव जाधवांनी जगद्‌गुरुला मुजरा करण्यास नकार दिला. आणि महाराजांना नम्रपणे उत्तर दिले, " एक प्रामाणिक सत्यशोधक आणि स्वर्गीय महात्मा जोतीराव फुलेंचा इमानी शागीर्द या नात्याने, जगदगुरु व त्यांचे पीठ या संस्थाच मला अमान्य आहेत. सबब मुजरा करण्याचे मला काही कारण नाही ". हे प्रकरण बरेच गाजले. याबाबत ठाकरेंनी १६ जानेवारी १९२२ च्या **प्रबोधन** पत्रकात त्या पीठावर खरमरीत टीका केली होती. हा प्रकार " म्हणजे जुन्या गुलामगिरीच्या त्रासातून मुक्त होण्यासाठी नव्या गुलामगिरीचे जोखड पत्करण्यासारखेच आहे..... (मठपतीची) ही कल्पनाच मुळी मानसिक दास्याची स्पष्ट निशाणी आहे. गुलामगिरीचा नायनाट गुलामगिरीने होत नसतो." या लेखाने मराठा मंडळात खूपच खळबळ उडाली होती. महाराजांच्या सुधारवादी चळवळीस ठाकरेंचा पाठिंबा होता. पण प्रबोधनकारांनी अंधानुकरण केले नाही.[१९]

सर व्हॅलेंटाइन चिरोल या साम्राज्यवादी पत्रकारास मुंबईतील कोर्ट खटल्यात शाहू महाराजांनी लोकमान्य टिळकांविरुद्ध सर्वतोपरी मदत करावी, अशी दोन पत्रे मुंबई सरकारचा सचिव एल. रॉबर्टसन याने लिहिली होती. या प्रकरणी गौप्यस्फोट करताना महाराजांनी ठाकरेंना सांगितले की, त्या पत्रांच्या सही नकला आपणच टिळकांकडे पाठवल्या होत्या. ठाकरेंनी ही नोंद करून ठेवली. ती नोंद आम्हाला त्यांच्या आत्मचरित्रात केलेली आढळली.

प्रबोधनकार व भाऊराव पाटलांची मैत्री प्रथम १९२२ मध्ये साताऱ्यातील शिवजयंती उत्सवात जमली. लोकसेवा आणि दलितांचा विकास याविषयी दोघांच्याही भावना व कल्पना समान असल्याने त्यांचा स्नेहभाव बळकट झाला. त्यांच्या समक्ष भेटीपूर्वी **प्रबोधन** पाक्षिक गाजत होते. कारण आगरकरांच्या **सुधारक** पत्रकानंतर महाराष्ट्रात

समाजसुधारणांना वाहिलेली **सुबोधपत्रिका, ज्ञानप्रकाश** यानंतर **प्रबोधन** हेच प्रभावी नियतकालिक होते. म्हणूनच ठाकरेंना अनेक समाजसुधारणा धुरीणांचा पाठिंबा मिळत गेला. सोशल सर्व्हिस लीगचे गोपाळराव देवधर, गो. मा. चिपळूणकर, प्रा. भाटे, प्रा. टिपणीस, भाऊराव पाटील, नाना बेहेरे (नागपूर), तात्यासाहेब कोल्हटकर (खामगाव), अण्णासाहेब लठ्ठे, भास्करराव जाधव आणि विठ्ठल गणेश प्रधान (कराची) यांचेही लेख **प्रबोधनात** येत असत. कठोर निंदा नालस्तीला तोंड देऊन ठाकरेंनी 'हुंडा विध्वंस संघ' कार्यरत केला होता. एका धनिकाच्या लग्नात गाढवाची मिरवणूक काढून त्यांनी या प्रथेचा निषेध केला होता. पूर्वोक्त 'मराठ्यांची मते मराठ्यासच ' असा प्रचार करणाऱ्या भास्करराव जाधवांवर ठाकरेंनी टीका केली व दलितांनाही सावध केले होते.

ठाकरेंशी असलेल्या परस्परसंबंधांविषयी भाऊराव पाटलांनी दिलेला पुढील निर्वाळा पुरेसा बोलका आहे. " माझ्या शिक्षणप्रसाराच्या कार्याचा अखिल हिंदुस्थानात आज मोठा बोलबाला होऊन राहिला आहे. पण आज मी एक गुपित बाहेर फोडतो. रयत शिक्षणाची कल्पना माझी असली, तरी त्या बीजाला चैतन्याचे, स्फूर्तीचे नि उत्साहाचे पाणी घालून त्याला अंकुर फोडणारे आणि सुरुवातीच्या संकटाच्या प्रसंगी धीर देऊन, विरोधाचे पर्वत तुडविण्याचा मार्ग दाखविणारे माझे गुरु फक्त प्रबोधनकार ठाकरे! ते माझे गुरु तर खरेच.... ठाकरे मुंबईला राहत असले तरी मुंबई ही त्यांची कर्मभूमी नाही. त्यांची कर्मभूमी सातारा जिल्हा ······ साताऱ्याच्या आजच्या या जागृतीचा पाया २५ वर्षांपूर्वी ठाकऱ्यांच्या मुलुख मैदानी व्याख्यानांनी घातलेला आहे."[२०]

**धर्मनिरपेक्ष कर्मवीर :—**महात्मा फुले, विठ्ठल रामजी शिंदे आणि महात्मा गांधींचाही प्रभाव असलेले भाऊराव पाटील हे सामुदायिक शिक्षण व लोकहिताचे कंकण बांधलेले धर्मनिरपेक्षता आणि मानवतावादाचे कैवारी होते. सामुदायिकशिक्षण व सर्वधर्मसमभाव आणि जातिनिरपेक्ष वसतिगृहांचे त्यांचे प्रयोग तसेच त्यांनी करून दाखविलेली कार्यसिद्धी यामुळे त्यांना 'कर्मवीर' हे अत्यंत समर्पक गुणनाम देण्यात आले. त्यांनी बौद्ध धर्मातील मानवतावाद, जैन धर्मातील त्याग व निःस्वार्थीपणा

आणि अपरिग्रही वृत्ती धारण केली होती. शिवाय त्यांच्यात ख्रिस्ती मिशनरींचा उत्साह होता. रंजले व गांजले यांच्याविषयी करुणा व प्रेम ही त्यांच्या जीवनाची प्रेरणा होती. अज्ञान व गरिबीतून बहुजनसमाजाचे विमोचन करण्याचे मोठे साधन म्हणून त्यांनी शिक्षणप्रसाराचे कार्य हाती घेतले. भाऊरावांनी सामाजिक व राजकीय बदल घडवून आणण्याचे एक प्रभावी साधन म्हणूनच शिक्षणाकडे पाहिले. लोकशिक्षणाचे ध्येय उराशी बाळगून त्यांनी उत्साहाने काम केले.

त्या काळात वि. रा. शिंदे यांची दलितोद्धाराची चळवळ फोफावत होती. शिंदेंना भाऊराव आपल्या थोरल्या भावाप्रमाणे मानत आणि त्यांच्या कार्यात सहभागी होत. शिंदेंच्या डिप्रेसड् क्लासेस मिशन सोसायटीसाठी त्यांनी काम केले. थोर समाजसुधारक ठक्कर बाप्पा यांनी भाऊरावांचा महात्मा गांधींशी परिचय करून दिला होता. गांधीजींचे व्यक्तिमत्त्व, अन्यायाविरुद्ध झगडण्याची अफाट शक्ती व सत्याग्रही बाणा यामुळे भाऊराव खादीधारी झाले. विशेष म्हणजे पुढे १९३८ च्या हरीपुरा काँग्रेसमध्ये भाऊराव सहभागी झाले, तेव्हा काँग्रेस अध्यक्ष सुभाषचंद्र बोस यांनी भाऊरावांशी समक्ष चर्चा केली होती. अशा अनेक राष्ट्रीय पुढाऱ्यांशी संपर्क आल्याकारणाने भाऊरावांच्या कार्यावर चांगला परिणाम झाला. आणि ते निखळ धर्मनिरपेक्षतावादी झाले.[२१]

भाऊराव प्रथम सत्यशोधक व बहुजनसमाज चळवळीचे कंकण बांधून समाजापुढे आलेले होते. शाहू महाराजांविषयी त्यांना आदर होता. म्हणून हितसंबंधीय आणि विशेष अधिकार लाभलेल्या अनेकांशी त्यांना मुकाबला करावा लागला होता. समकालीन महाराष्ट्रात सर्वधर्मसमभाव व जातीय सलोखा अशा विचारसरणीला पोषक वातावरण नव्हते. समाजाच्या सर्वांगात जातीयवाद भिनलेला होता. शाहू महाराजांनी सक्रिय केलेल्या चळवळीला राजसत्ता व आर्थिक शक्तीचे बळ होते व मराठा वर्ग त्यांच्या पाठीशी होता. शिंदेंना प्रार्थनासमाजाचा पाठिंबा होता. तसा भाऊरावांना नव्हता. मात्र कालांतराने बऱ्याच सुशिक्षित ब्राह्मणांना बहुजनसमाजाच्या चळवळीतील आंतरिक प्रेरणा कळू लागली व त्यांनी संघर्षाची भूमिका सोडली. काँग्रेसची चळवळ अधिकाधिक व्यापक होतच होती. या सर्व कारणांमुळे महाराष्ट्र मानसामध्ये सावकाशपणे परिवर्तन होऊन भाऊराव पाटलांचे कार्य सुकर होत गेले.

प्रारंभी भाऊरावांनी सत्यशोधक तमाशांद्वारे अस्पृश्यतानिवारण कार्यास चालना दिली. दलित वा बहुजनसमाजाची सुधारणा करण्यासाठी शिक्षणप्रसार करणे अगत्याचे आहे, हे त्यांनी ओळखले व या कार्यास त्यांनी वाहून घेतले होते. यासाठी त्यांनी पूर्वोक्त मुष्टिफंड ही अभिनव कल्पना आचरणात आणली व लोकांचाही सहभाग मिळवला. त्यातून सामुदायिक शिक्षणाची मोहीम उभारली. पश्चिम महाराष्ट्रभर त्याचा अपेक्षित परिणाम होणे स्वाभाविक होते. विविध जातींमधील मुलांचे वसतिगृहांमधील सहजीवन हा त्यांच्या उपक्रमाचा गाभा होता. जातिविरहित समाज घडविणे हा भाऊरावांचा प्रयत्न नव्हता. ते साध्य करणे अशक्य असल्याचे त्यांना भान होते. पण अशा सहजीवनातून सामंजस्य व सामाजिक सलोखा निर्माण होईल, असा विचार होता. धर्म व जातीचा विसर पाडण्याची कल्पना होती.

ठक्कर बाप्पा यांनीही आदिवासी व वंचित लोकांसाठी अशाच प्रकारचे कार्य करून ग्रामीण पुनर्रचना करण्याचे काम हाती घेतले होते. हजारो कुटुंबांमध्येसमता, सामाजिक न्याय आणि धर्मनिरपेक्षता बिंबवण्याचे हे प्रयत्न होते.

येथे नमूद केलेच पाहिजे की, जातिनिरपेक्ष वसतिगृहांच्या माध्यमातून भाऊराव पाटलांनी ब्राह्मणेतर चळवळीच्या संघर्षात्मक आणि लढाऊ पवित्र्याचा त्याग केला. आणि चळवळीचे सामुदायिक शिक्षणाच्या विधायक कार्यात रूपांतर केले. संघर्षाऐवजी सहजीवन व सहजीवनातून सामंजस्य साधणे असा त्यांचा प्रयत्न होता. त्यांनी मुलांना आयुष्याशी झगडण्यास शिकविले. संक्रमणावस्थेत असलेल्या बहुजनसमाजाची उन्नती घडवून आणण्याचा त्यांचा प्रयत्न होता. त्यानुसार शैक्षणिक कार्याचा प्रचंड विस्तार केल्यानंतर देखील वसतिगृहातील सहजीवन, बंधुभाव निर्मिती आणि शारीरिक श्रम यावर भाऊरावांनी अधिकाधिक भर दिला. विद्यार्थांनी संस्थेस लागणाऱ्या पैशासाठी शारीरिक श्रमाद्वारे भर घालावी यावर त्यांचा कटाक्ष होता. संस्थेकडे असलेल्या जमिनीवर शेती करून त्यातून निधी उभा करण्याचे कार्य अधिक व्यापक केले. त्याचा परिणाम असा झाला की, विद्यार्थ्यांच्या पालकांचाही संस्थेच्या कार्यामध्ये सहभाग मिळू लागला. आपल्याच मुलांची जडणघडण करून त्यांचे भविष्य निर्माण करणाऱ्या कार्यामध्ये आपण अल्प प्रमाणात का होईना सहभागी व्हावे, असा भाऊराव

प्रचार करीत असत. अशा प्रकारचा लोकांचा सहभाग आणि भाऊरावांच्या कार्याचे कौतुक यामधूनच एक प्रकारची लोकशाही संस्कृती निर्माण होण्यास मदत झाली.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी काढलेले पुढील उद्‌गार उचितच आहेत. "अस्पृश्यांसह सर्व जातींच्या मुलांसाठी वसतिगृहे उभारून भाऊराव यांनी लोकशाही संस्कृती निर्मितीसाठी पोषक वातावरण निर्माण केले. आपल्या सामाजिक संबंधांमध्ये जातिभेद विसरून सर्वांशी सलोख्याने वागण्याची शिकवण त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. त्यांच्या वसतिगृहातील जीवनातून सामाजिक एकतेचे महत्त्व त्यांनी पटवून दिले. अशा प्रकारच्या सामाजिक एकतेच्या श्रद्धेतून समाजवादावर विश्वास ठेवण्याची प्रेरणा निर्माण होते." भाऊराव पाटलांची ग्रामीण सामुदायिक शिक्षण चळवळ प्रामुख्याने आत्मनिर्भरता, शारीरिक श्रम आणि धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वांवर आधारित होती. या तत्त्वांचा उगम महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानामध्ये सापडतो. सन १९२० पासून कर्मवीर या तत्त्वज्ञानाचे बारकाईने निरीक्षण करीत होते. आपल्या आयुष्यातील तीस वर्षे भाऊरावांनी या तत्त्वांची यशस्वीरीत्या अंमलबजावणी केली.[२२]

परकीयांचे सरकार शिक्षणावर अत्यल्प खर्च करीत असे. १९२३ साली प्राथमिक शिक्षण कायदा पास झाला खरा. तथापि १९२३ ते १९२६ दरम्यान भास्करराव जाधव शिक्षण मंत्री असताना सक्तीच्या आणि मोफत प्राथमिक शिक्षणासाठी सरकारकडून अत्यल्प प्रयत्न झाले. मुंबई इलाख्यातील केवळ चोवीस गावांनाच ही योजना लागू करण्यात आली. या पार्श्वभूमीवर भाऊरावसारख्यांनी करून दाखविलेले कार्य फार मोलाचे होते. त्यांची डिसेंबर १९२६ मध्ये महात्मा गांधीजींशी पहिली भेट झाल्यापासून त्यांचा उत्साह वाढला. त्यांच्या शैक्षणिक कार्यास गांधीजींनी हरिजनसेवक संघाच्या वतीने वार्षिक ५०० रुपयांचे अनुदान दिले होते (१९३४). पण मुंबई सरकारने पाटलांना अट घातली की, गांधीजींकडून मिळणारे अनुदान नाकारले तरच सरकारी अनुदान चालू राहील. मात्र भाऊरावांनी गांधीजींचीच मदत चालू ठेवून सरकारला तसे कळविले. अखेरीस सरकारला सक्तीची अट मागे घ्यावी लागली.

शाहू महाराजांकडून त्यांना पैशाची मदत मिळाली नव्हती. तरी त्यांनी महाराजांच्या नावे संस्था स्थापन केल्या. सयाजीराव गायकवाड महाराजांनी मात्र भाऊरावांना बरीच आर्थिक मदत दिली होती. उच्च शिक्षणापेक्षा प्राथमिक शिक्षणावर भर देणे ग्रामीण जनतेच्या हिताचे आहे हा विचार भाऊरावांनी प्रसारित केला.

हरिजनसेवा कार्यासाठी आपले भावी आयुष्य वाहून घेण्याची लेखी शपथ गांधीजींना कळविणारे भाऊराव पाटील हे महाराष्ट्रातील थोड्याच सुधारकांपैकी एक होते.त्यांच्या वसतिगृहांचा लाभ घेणारे वीस गरीब विद्यार्थी १९३५ पर्यंत पदवीधर झाले होते. तेव्हाच्या काळात ही प्रगती उल्लेखनीय होती.[२३]

❑❑

## संदर्भ


१. विठ्ठलराव द. घाटे, **दिवस असे होते,** मुंबई, १९६१, पृ. २८९-९०.

२. कित्ता, पृ. २८६-८८.

३. य. दि. फडके, **शाहू छत्रपती व लोकमान्य,** पुणे, १९८६, पृ. ५१, ५२, ५५, ५६.

४. कित्ता, पृ. १९०-९१.

५. कित्ता, पृ. १९१-९४

६. **प्रबोधन,** मार्च १९३०.

७. कलेक्टरचे पत्र, मुंबई सरकार, रेव्हेन्यू डिपा. फाईल क्र. १९२१, मुंबई पुराभिलेख.

८. **केसरी,** ६ डिसेंबर १९२१.

९. **सातारा जिल्हा गॅझेटिअर,** १९९९, पृ. १८५, ६७७.

१०. विठ्ठल रामजी शिंदे, **माझ्या आठवणी व अनुभव,** पुणे, १९५८, पृ. २२०-२२.

११. कित्ता, पृ. २९१-९४.

१२. कित्ता, प्रस्तावना, वि.भि. कोलते, पृ. २-५, ७-१०.

१३. घाटे, उपरोक्त, पृ. २८७-८९.

१४. फडके, उपरोक्त, पृ. ४७-४८

१५. ए.एम.टी. जॅक्सनचे शाहू महाराजांना पत्र, ११ मे १९०२, मुंबई पुराभिलेख.

१६. एजर्लीचे शाहू महाराजांना पत्र, २१ एप्रिल १९०२.

१७. फडके, उपरोक्त, पृ. ७३-७५, १९२, २४४-५५.

१८. प्रबोधनकार ठाकरे, **माझी जीवनगाथा,** महाराष्ट्र शासन, १९७३, पृ. १६०-६३.

१९. कित्ता, पृ. २०७, २१०-११.

२०. कित्ता, पृ. २४९-५०.

२१. के. के. चौधरी, **लोकराज्य,** १ जुलै १९८७.

२२. कित्ता.

२३. बा. म. ठोके, **मला समजलेले कर्मवीर भाऊराव पाटील,** सातारा, १९९३, पृ. ३५, १०९, १३०.

प्रकरण ६

# ब्राह्मणेतर पक्षाची चळवळ

## ब्राह्मणेतर पक्षाची स्थापना

महाराष्ट्रात उदय पावलेल्या ब्राह्मणेतर पक्षाला विशिष्ट राजकारणाचा आणि कलोनिअल राजनीतीचा संदर्भ होता. प्रामुख्याने मद्रास इलाख्यातील जस्टिस पार्टीच्य आकृतिबंधानुरूप कार्य करणारा हा राजकीय व सामाजिक पक्ष होता. ब्राह्मणेतर पक्षाला राजकारण पराङ्मुख राहून सुधारणावादी कार्य करणाऱ्या सत्यशोधक पक्षाची पार्श्वभूमी होतीच. मात्र पहिले महायुद्ध पेटलेले असताना भारतात आणि विशेषतः महाराष्ट्रात होमरूल चळवळ चालू झाली होती. या प्रांतात टिळकांचे 'राजकारणात पुनरागमन' झाले व त्यांचा खराखुरा झंझावात सुरू झाला होता. महात्मा गांधी यांनी आपल्या सत्याग्रहाची संभाव्य शक्ती दाखविली होती. भारतमंत्री एडविन माँटेग्यू यांनी समक्ष भारतभेटीत येथील राजकीय संवेदना व स्थितीचे अवलोकन केलेले होते. कलोनिअल सत्ताधीशांना रशियन राज्यक्रांतीच्या भारतावरील संभाव्य परिणामांची जाणीव झालेली होती.

या पार्श्वभूमीवर भारतीयांना काही आश्वासन देण्याच्या दृष्टीने माँटेग्यू यांनी ब्रिटनच्या पार्लमेंटला सांगितले होतेः— " The policy of His Majesty's Government is ....... the gradual development of self-governing institutions with a view to the progressive Realization of Responsible Government in India as an integral part of the British Empire."[१] या मोघम आश्वासनाचे मूल्य इतकेच की, होमरूलची मागणी राजद्रोहात्मक ठरणार नव्हती आणि भारतीयांना मर्यादित मताधिकार मिळणार होता.

मात्र निवडणुकांच्या आश्वासनामुळे ब्राह्मणांप्रमाणेच राज्यातील अब्राह्मण वर्गाच्याही राजकीय महत्त्वाकांक्षा पल्लवित झाल्या. अब्राह्मणांना आपल्या राजकीय हक्कांची व वर्गीय अस्मितेची जाणीव झाली. वरिष्ठ वर्णाच्या राजकीय प्राबल्यास आव्हान देऊन सत्तेत वाटा मिळावा यासाठी स्वतंत्र राजकीय पक्ष असावा, असा विचार करण्यात आला. मराठ्यांना आपल्या ऐतिहासिक अस्मितेचे भान आले. या सर्व

बाबींमधून महाराष्ट्राच्या राजकीय जीवनात परिवर्तनास प्रारंभ झाला. ब्राह्मणेतर पक्ष हा त्याच प्रक्रियेतील एक मोठा भाग होय.

कोल्हापूरचे मुत्सद्दी राजे शाहू महाराज यांचे मद्रासमधील जस्टिस पक्षाशी आणि त्या पक्षाचे पुढारी असलेल्या ब्राह्मणेतर वकिलांशी व पत्रकारांशी आधीपासूनच निकटचे संबंध होते. मद्रासमधील ही मंडळी बहुजनसमाजाचे राजकीय व सामाजिक हित साध्य करण्यासाठी ब्रिटिशांशी सलोखा साधत असत. कलोनिअल सत्ताधीश जस्टिस पक्षाचा आपल्या वसाहतवादी राजनीतीसाठी उपयोग करून घेत. माँटेग्यूंच्य घोषणेनंतर जस्टिस पक्षाने सप्टेंबर १९१७ मध्ये साऊथ इंडियन लिबरल असोसिएशन नामक राजकीय पक्ष स्थापन केला. या पक्षाने **जस्टिस** हे पत्रक चालविले. या पत्रकाच्या नावावरून पक्षास जस्टिस पक्ष या नावाने ओळखले जाते.

शाहू महाराजांनी जस्टिस पक्षाची ध्येयधारणा, उद्दिष्ट व कार्यप्रणालीनुसार १९१७ साली ब्राह्मणेतर पक्ष स्थापन केला. बदलती राजकीय समीकरणे, ब्रिटिशांचे धोरण व मराठी ब्राह्मणांचा वाढता प्रभाव तसेच गोपाळ कृष्ण गोखले आणि फिरोजशहा मेहतांच्या निधनानंतर काँग्रेसमध्ये जातीय समतोल ढळला, अशी एक जाणीव निर्माण झाली होती. अशा विविध कारणांमुळे ब्राह्मणेतर पक्षाची स्थापना स्वाभाविक होती. मराठे, कुणबी व वंचितांचे हितरक्षण करणे व त्यांना राजकीय स्पेस मिळवून देणे हे ध्येय होते. मात्र सत्यशोधक समाज ही राजकारणातीत अशी समाजपरिवर्तनवादी संघटना होती. तिचा राजकारणासाठी फारसा उपयोग नव्हता. म्हणून महाराजांनी आक्रमक पवित्रा घेऊन ब्राह्मणेतर पक्ष काढला.

## पक्षाचे ध्येय व कार्यपद्धती

ब्राह्मणेतर पक्षाचे ध्येय प्रायः राजकीय हक्क व आरक्षण-प्राप्ती हे असले, तरी बहुजनसमाजाचे सामाजिक हितवर्धन करणे हेही उद्दिष्ट होते. मुसलमानांप्रमाणे मराठ्यांनाही भावी कायदेमंडळांत व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये विभक्त मतदारसंघ पाहिजे होते. मुंबई इलाख्यात २५,००,००० पेक्षा अधिक मराठे होते, तर १६,५०,००० कुणबी होते (१९११ ची जनगणना). या दोन्ही जातींची संख्या ब्राह्मणांपेक्षा बरीच जास्त होती. तथापि १९१७ पर्यंत कायदेमंडळात अथवा कोणत्याच सत्तास्थानी या जातिवर्गास प्रतिनिधित्व नव्हते. स्थान तर अजिबात नव्हते. म्हणून या मोठ्या

समाजाच्या समस्या, आशाआकांक्षा व मागण्या सत्ताधीशांपर्यंत पोहोचवण्यासाठी एकही माध्यम नव्हते. तसे माध्यम व त्यासाठी आपली संघटना असावी, असा शाहू राजांचा मूलभूत विचार होता. मराठ्यांप्रमाणे कुणबी समाजासाठीही विभक्त मतदारसंघ असावे अशीही दुसरी मागणी पुढे आली. भारतमंत्री महोदयांनी राज्यसुधारणाविषयक धोरण घोषित केल्यामुळे तसेच पूर्वोक्त डायार्की पद्धतीचेसंकेत दिल्याकारणाने हा पक्ष स्थापन करण्याची निकड निर्माण झाली. कारण नवीन राज्यपद्धतीत निवडणुकांचे तत्त्व समाविष्ट होते.

मात्र स्वतः माँटेग्यू महोदय ' स्वतंत्र अथवा विभक्त ' मतदारसंघ मंजूर करण्यास तयार नव्हते. भारतीय समाजाचे विघटन करण्याचा विचार त्यांना अमान्य होता. तथापि लॉर्ड सभागृहाचे साम्राज्यवादी सभासद लॉर्ड सिडनहॅम, लॉर्ड कर्झन, लॉर्ड लँड्सडाऊन वगैरेंनी स्वतंत्र व विभक्त मतदारसंघांची मागणी लावून धरली. विद्यमान व्हाइसरॉय चेम्सफर्डची त्यांना फूस होती. याबाबत उलटसुलट प्रदीर्घ चर्चा झाली याविषयी अधिक खोलात न जाता, इतके सांगायचे की, शाहू महाराजांनी हिंदुस्तान सरकारकडे मराठा जातीसाठी ' स्वतंत्र मतदारसंघांची ' मागणी केलेली होती. ब्रिटिशांनी ती नामंजूर करून मराठा जातीसाठी कायदेमंडळात काही जागा ' आरक्षित ' करण्यास मंजुरी दिली, आणि शाहू महाराजांचे समाधान केले.

या संपूर्ण प्रक्रियेत ब्राह्मणेतर समाजातील नेत्यांमध्ये अनेक मतभेद होते. सरकारमधील काही घटक व भारतीयांच्या मते मराठा व अन्य मागासवर्गाचे कायदेमंडळातील प्रतिनिधी ब्रिटिशांनी नेमावेत. पण शाहू राजांना ही सूचना मान्य नव्हती. महाराजांच्या मते मताधिकार मर्यादित ठेवून ब्राह्मणेतरांचे प्रतिनिधी निवडून देणे, हाच उपाय परिणामकारक ठरेल. महाराज हे जातीवर आधारित स्वतंत्र मतदारसंघांच्या मागणीचे समर्थन सत्ताधीशांशी खाजगी पत्रव्यवहारातून तर करीत होतेच. पण त्याव्यतिरिक्त जाहीर सभांमधूनही तसे करीत. विशेष म्हणजे महाराजांची स्वतंत्र मतदारसंघांची मूळ मागणी भारतमंत्री व व्हाइसरॉयने अमान्य केल्यावर, ब्रिटनमधील संसद सदस्यांना ती व्यक्तिशः पटवून देण्यासाठी महाराजांनी भास्करराव जाधवांना जुलै १९१९ मध्ये विलायतेस पाठविले होते. तथापि जाधव विलायतेत

गेल्यावर कोणाचेही मतपरिवर्तन करू शकले नाही. इतकेच नव्हे तर ब्रिटनमधील चर्चेवरून स्वतः जाधवांचे मत बनले की, ' मराठा ज्ञातीने जातवार प्रतिनिधींची मागणी करणे राष्ट्रहिताच्या दृष्टीने अत्यंत घातक होईल". (**जागृती**, ५ जानेवारी १९१७)

शाहू महाराजांच्या मते, सत्ताधीश इंग्रज असले तरी प्रशासनातील सर्वच स्तरांमध्ये ब्राह्मण भरलेले असल्याने, ब्राह्मणेतरांची गाऱ्हाणी ब्रिटिश वरिष्ठांपर्यंत पोहोचत नाहीत. शिवाय ब्राह्मणांच्या प्रभावामुळे अडाणी इतरेजन ब्राह्मण उमेदवारांनाच मतदान करतात. म्हणून महाराज प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होते.

स्वतंत्र मतदारसंघ मिळण्याची आशा मावळल्यानंतर, भास्करराव जाधवांनी संयुक्त संसदीय समितीपुढे साक्ष देताना पुढीलप्रमाणे मागणी केली:— मुंबई इलाखा कायदेमंडळातील एकूण जागांपैकी ३० टक्के जागा आणि मुंबई शहरातील ६ पैकी २ जागा मराठा व तत्सम वर्गाच्या प्रतिनिधींसाठी राखीव ठेवण्यात याव्या. तसेच एकसदस्य मतदारसंघांऐवजी बहुप्रातिनिधिक मतदारसंघ असावेत, असेही त्यांनी सांगितले. पुण्यात मराठा लीगच्या वतीने जाधवांनी दिलेल्या या साक्षीत जाधवांनी मुंबई कायदेमंडळात मराठा जातीसाठी दहा राखीव जागा मागतानाच, इलाख्यातील लिंगायत आणि अस्पृश्य वर्गातील लोकांनी प्रत्येकी चार व इतर मागासलेल्या हिंदू जातींसाठी १० जागांची मागणी केली होती. मात्र जैनांसाठी त्यांनी केवळ एक जागा मागितली होती. तथापि इंग्रज राज्यकर्ते इतक्या राखीव जागा देण्यास तयारच नव्हते. म्हणून सरकारने नेमलेल्या साऊथबरो समितीने" मराठा आणि तत्सम जाती " अशी फसवी शक्कल काढली व या वर्गासाठी केवळ सात जागा राखीव ठेवण्याची शिफारस केली. त्यामुळे मराठे व मराठेतर नाराज झाले. या प्रवर्गात सरकारनेमराठा, कुणबी, माळी, कोळी, भंडारी, शिंपी, लोहार, कुंभार, धनगर, भोई, बारी, भावीण, देलोई अथवा शिंदे इ. जातींचा समावेश केल्याचे जाहीर केले. शिवाय इतर जातींच्या समावेशासाठी ही यादी खुली ठेवली. विशेष म्हणजे चळवळीतील लिंगायत व जैनांना राखीव प्रवर्गातून सरकारने वगळले होते. त्यामुळे पंडितप्पा चिकोडी, हुलकोटी, लठ्ठे, चौगुले वगैरे नेते जातीऐवजी शैक्षणिक मागासलेपणाच्या निकषावर स्वतंत्र/राखीव मतदारसंघ मागत. एकूण आरक्षणाचा प्रश्न बराच अवघड झालेला होता.

बहुजनसमाजात शिक्षणप्रसार हे शाहू महाराजांचे मोठे ध्येय होते. त्याचे विवेचन वरील प्रकरणात केलेले आहे. शिवाय त्यांनी हयातभर अस्पृश्यतानिवारण व सहभोजनांची मोहीम उभारली होती. तथापि या मोहिमेला लाभलेले यश मर्यादित स्वरूपाचेच होते. चळवळीतील अनेक नेते या प्रथेविरुद्ध सभा-परिषदांमध्ये जोरदार भाषणे देत. तथापि उपवासाचे निमित्त सांगून तेथे जेवत नसत. सभा संपल्यावर घरी सचैल आंघोळ करीत. वालचंद कोठारी व लठ्ठेदेखील यास अपवाद नव्हते. महाराज स्वतः सर्व प्रयत्न करीत. तरीही ब्राह्मणेतर चळवळीत असे विपथगामी प्रकार नेहमी घडत. पक्षाचे नेते अण्णासाहेब लठ्ठे यांच्या मते सहभोजनाच्या एका मुद्यावरून ब्राह्मणेतर पक्षात फूट पाडण्यास प्रतिपक्षास उत्तम साधन मिळेल, म्हणून त्याचा फार आग्रह नको.

## ब्राह्मणेतर वर्तमानपत्रे

कोणतीही विचारधारा व राजकीय विचार अथवा समाजप्रबोधन कार्यासाठी प्रसारमाध्यम म्हणून वर्तमानपत्रे व नियतकालिकांची नितांत गरज असतेच. ब्राह्मणेतर पक्षाची ही गरज उच्चवर्णीयांची पत्रके भरून काढणे असंभव होते. म्हणून **जस्टिस** पत्रकाप्रमाणेच मराठी मुलखातील बहुजनसमाजाचे प्रश्न आणि आशाआकांक्षा सरकारपर्यंत पोहोचविण्यासाठी वर्तमानपत्र असावे असा महाराजांचा विचार होत. लोकांचे मनोगत प्रकट करणारे तसेच सरकारचीही बाजू मांडणारे एखादे पत्रकमुंबई सरकारने सुरू करावे, अशी त्यांनी अधिकाऱ्यांना सूचना केली. त्यानंतर स्वतः मुंबई सरकारनेच एक वर्तमानपत्र चालवावे असे शाहू महाराजांनी मुंबईचे गव्हर्नर विलिंग्डन यांना एकदा सुचविले होते. पण वर्तमानपत्रावर महायुद्धाच्या काळात पैसा खर्च करणे गव्हर्नरला अनुचित वाटले होते. स्वतः महाराजांनाही ब्राह्मणेतर चळवळीचा प्रचार गावोगावी करण्यासाठी स्वतंत्र वर्तमानपत्र काढणे शक्य नव्हते. म्हणून ब्राह्मणेतरांच्या पत्रकांना आर्थिक मदत अथवा नैतिक पाठबळ देण्याचे काम त्यांनी १९१७ पासून १९२२ पर्यंत चालू ठेवले. **दीनमित्र, जागरूक, विजयी मराठा, विश्वबंधु, भगवा झेंडा, तरुण मराठा, कैवारी, संजीवन, सत्यप्रकाश, राष्ट्रवीर, प्रबोधन, शिवछत्रपती** ही सारी पत्रके महाराजांना व ब्राह्मणेतर चळवळीस जमेल तितकी प्रसिद्धी व योगदान देत असत. याव्यतिरिक्त बाबासाहेब आंबेडकरांचा

**मूकनायक** (३१ जानेवारी १९२०) आणि गणेश आकाजी गवई यांचे नागपूरहून चालणारे **बहिष्कृत भारत** या वृत्तपत्रांनाही शाहू महाराजांचे साहाय्य मिळत असे. या सर्व पत्रकांनी ब्राह्मणेतर पक्षाचा प्रचार केला. शिवाय टिळकांवर टीका करणाऱ्या **संदेश** यासारख्या ब्राह्मणी पत्रकांनाही महाराजांची आर्थिक मदत करण्याची तयारी असे. लठ्ठे व वा. रा. कोठारी यांनी पुण्यात काढलेले (३ ऑक्टोबर १९१८) **डेक्कन रयत** नामक इंग्रजी साप्ताहिक फ्रेझर यासारख्या इंग्रजाच्याही पसंतीला उतरले होते.

या सर्वच पत्रकांचे संपादक या पक्षाच्या प्रसाराचे काम करीत असत. त्यांच्यात पुढील नावांचा उल्लेख करावा लागेल :—मुकुंदराव पाटील, श्रीपत लक्ष्मण शिंदे, वालचंद्र रामचंद्र कोठारी, भगवंत बळवंत पाळेकर, अण्णासाहेब लठ्ठे, बळवंत पिसाळ, दत्ताजी यशवंत कुरणे, दिनकरराव जवळकर, बाबुराव यादव, दत्तात्रय रणदिवे, नारायण रामचंद्र विभुते, शामराव देसाई, केशव सीताराम ठाकरे, केशवराव बागडे, कीर्तिवान निंबाळकर, पांडुरंग नंदराम भटकर, इत्यादी.

बहुजनसमाजात शिक्षणाचा अत्यल्प प्रसार झालेल्या त्याकाळात पुरेसा ब्राह्मणेतर वाचक वर्ग मिळणे सोपे नव्हते. यामुळे वर्गणीदारांची संख्या फारच कमी असे. म्हणूनच त्यांना महाराजांच्या साहाय्याची गरज भासत असे. अब्राह्मणांची पत्रके चालावी व त्यांनी ब्राह्मणी पत्रकांविरुद्ध प्रचार मोहीम चालवून आपल्या चळवळीचा प्रसार करावा, या उद्देशाने महाराज त्यांना आर्थिक मदत देत. शिवाय त्यांचे परस्परांमधील संघर्ष मिटवित. ब्राह्मणेतरांमध्ये लेखक या नात्याने नाव मिळवलेले अत्यल्प होते. निदान त्या काळात तरी. मात्र प्रबोधनकार ठाकरे व दिनकरराव जवळकर हे पत्रकार अत्यंत प्रभावीपणे लिहीत, तसेच प्रभावी भाषणांनी सभा गाजवत असत. हे दोघे प्रतिपक्षाची आव्हाने घेत व आव्हाने देत असत. स्वाभाविकपणे महाराजांनी त्यांचा चळवळीच्या प्रसारासाठी पुष्कळ उपयोग करून घेतला. त्यानुसार महाराजांच्या निधनानंतरही या मान्यवरांनी ब्राह्मणेतर चळवळ पुढे चालू ठेवली.[१] पण ठाकरेंनी राजेंच्या पैशाचा लाभ घेतला नाही.

शाहू राजांच्या राजकारणावर व समाजकारणावरही ब्राह्मणांची नियतकालिके सणसणीत टीका करीत असत. अशी पत्रके सांगली, मिरज, कुरुंदवाड, औंध संस्थानांच्या राजांना अथवा इचलकरंजी, विशाळगड, जमखिंडी येथील जहागीरदारांना नेहमी झुकते माप देत असत. म्हणून कोल्हापूरकरांचा दावा होता की, हे संस्थानिक व जहागीरदार ब्राह्मण असल्यामुळे त्यांच्याबाबत **केसरी** व तत्सम पत्रके सहानुभूतीची भूमिका घेतात. महाराजांच्या या आरोपात पुष्कळ सत्यांश होता. याच कारणास्तव महाराज म्हणत की, ब्राह्मणेतरांच्या मालकीची आणि अब्राह्मण संपादक असलेली वर्तमानपत्रे काढणे अगत्याचे होय. त्यांना साहाय्य देण्यास महाराज तयार असत. कारण हे प्रसारमाध्यम चळवळीचा शक्तिवर्धक भाग होता.

१९१० पासून मुकुंदराव पाटील चालवित असलेले **दीनमित्र** अनेकदा बंद पडण्याच्या मार्गावर असे. १९२० च्या प्रारंभी **दीनमित्रचा** छापखाना सावकाराकडे गहाण पडला असता, शाहू राजे, लठ्ठे, जाधव व डोंगरेंनी हे साप्ताहिक मरता मरता वाचवले होते. **तरुण मराठा, विश्वबंधू** या पत्रकांनीही बरेच प्रचारकार्य केले होते. **डेक्कन रयत** या इंग्रजी पत्रकामुळे पक्षाची भूमिका व मते अधिकारी व सरकारपर्यंत जाऊ शकत. तथापि खपाच्या अभावी बंद पडलेले हे पत्रक पुन्हा चालू करणे राजकारणाच्या दृष्टीने गरजेचे असल्याने महाराजांनी ४ ऑक्टोबर १९२० रोजी ४,००० रुपयांचा धनादेश देऊन ते काही काळ तरी चालू ठेवले होते.

मात्र हेही सत्यच आहे की, ब्राह्मणेतर पत्रकांची पक्षाच्या धोरणाबाबत एकवाक्यता सतत टिकून राहत असे, असे नव्हे. त्यात गैरसमज व व्यक्तिगत अभिनिवेशामुळे बाधा येई.

## पक्षाचे नेते व मतभेद

शाहू राजे हेच ब्राह्मणेतर पक्षाचे सर्वेसर्वा होते हे निर्विवाद! त्यांच्या वाणीनुसार व कटाक्षानुसार पक्षाचे कार्य चालत असे. सातारचे भास्करराव जाधव मराठा जातीतील पहिले बी.ए. व बुद्धिमान असल्याने त्यांना उचित स्थान होते. अण्णासाहेब लठ्ठे हे जैन नेते एक मान्यवर नेता होते. शिवाय महादेव डोंगरे, वालचंद कोठारी, सीताराम केशव बोले, आनंदराव नारायण सुर्वे, कीर्तिवान निंबाळकर (नाशिक),

पुण्याचे गंगाजी काळभोर, पांडुरंग जाधव (सातारा), दाजीराव विचारे (रत्नागिरी), शामराव लिगाडे (सोलापूर), बेळगावचे पंडितप्पा चिकोडी व अण्णाप्पा चौगुले यांचा कार्यकर्ते वा पक्षाचे आमदार म्हणून उल्लेख आढळला.[३]

विशेष म्हणजे कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, प्रबोधनकार ठाकरे, कर्मवीर भाऊराव पाटील वगैरे महान समाजसुधारक व समाजप्रबोधनकार ब्राह्मणेतर पक्षाच्या मूलभूत सुधारणा कार्यात मौलिक योगदान देत असत. काही मुद्यांवर त्यांचे पक्षश्रेष्ठींशी मतभेद होते. पण ते पक्षाचे कार्य निःस्पृहपणे करीत असत. मात्र खऱ्या अर्थी या तिघांचे योगदान ब्राह्मणेतरपेक्षा सत्यशोधक समाज आणि समाजसुधारणा अभियानास अधिक घवघवीत आणि शाश्वत स्वरूपाचे होते. त्यांनी संघटना निर्माण केल्या, कार्यकर्ते घडविले आणि राष्ट्रीय चळवळीतही योगदान दिले. शिंदे, भाऊराव, प्रबोधनकार, मुकुंदराव पाटील वगैरे सर्वच सत्यसमाजिस्ट कार्यकर्ते ब्राह्मणेतर चळवळीत सक्रिय योगदान देत राहिले. तथापि एक भेद लक्षात ठेवावा की, महाराजांच्या ब्राह्मणेतर पक्षातील कित्येक सभासद वा कार्यकर्ते सत्यशोधक समाजाच्या मूलभूत विचारसरणीचे नव्हते. त्यामुळे एकूण चळवळीत अनेक विषयांवर मतभेद होत. त्या संघटनेची आचारसंहिता अनेक जणांना मान्य नव्हती. महाराजांनाही याची पूर्ण जाणीव होती. पण ते जिवंत असेपर्यंत तडजोड करीत.

पुण्याचे केशवराव मारुती जेधे व त्यांचे बंधू बाबुराव जेधे हे बहुजनसमाजाचे व ब्राह्मणेतर पक्षाचे मोठे पुढारी झालेत. त्यांचे पूर्वज शिवाजी महाराजांचे सेनाधिकारी असताना प्रतापगडाच्या अटीतटीच्या लढाईत अफझल खानाशी लढले होते. महाराजांच्या आग्रा भेटीतही ते सरदार महाराजांबरोबर होते. जिंजीतही त्यांनी पराक्रम केला होता. त्यामुळे जेधे बंधूंना समाजात मानमान्यता होती! त्याच कारणाने शाहू महाराजांचा जेधेंवर विलक्षण लोभ होता. जेधेंनी लोकमान्य टिळक व त्यांच्या राजकारणाशी झुंज देण्यात मोठी भूमिका पार पाडली होती. पुण्यातील सरदार जेधे भवन बहुजनसमाज चळवळीचे व ब्राह्मणेतर पक्षाचे मोठे केंद्र बनले. जेधे भवन व टिळकांचा गायकवाड वाडा एकमेकांवर तोफा डागत! नंतरच्या काळात केशवराव जेधेंनी ब्राह्मणेतरांना काँग्रेसच्या मुख्य प्रवाहात आणले आणि ते महाराष्ट्राचे एक पुढारी बनले.

या पक्षात मराठे जास्त असले, तरी कुणबी, माळी, सी.के.पी., जैन, लिंगायत वगैरे जातींचेही कार्यकर्ते सहभागी होते. त्यांच्यापैकी काही नेते आमदारदेखील झाले.

ब्राह्मणेतर पक्षाचा पश्चिम महाराष्ट्राखालोखाल विदर्भातही बराच प्रभाव पडल्याचे दिसते. मात्र सयाजीराव गायकवाड व खासेराव जाधव अत्यंत प्रभावी असलेल्या बडोदा संस्थानात या पक्षाला कितपत प्रतिसाद लाभला, याविषयी माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. मात्र स्वतः सयाजीरावांनी महाराष्ट्रातील बहुजनसमाजाच्या उद्धारासाठी विपुल आर्थिक व व्यक्तिगत योगदान दिल्याचे विवेचन वरील प्रकरणात व **पहिल्या खंडात** केलेले आहे.

तत्कालीन महाराष्ट्रातील राजकीय समीकरणे पाहता दिसते की, राजकीय व सामाजिक राजमंचावर शाहू राजे व ब्रिटिश सत्ताधीश यांच्यात जवळीक निर्माण झाली होती. दोघांनाही ब्राह्मणांना आव्हान द्यावयाचे होते. तथापि काही खानदानी मराठे स्वतःस राष्ट्रीय मराठा या प्रतिष्ठादर्शक प्रवर्गातील मानत. त्यांचा काँग्रेसशीही सलोखा होता. काँग्रेसच्या धोरणानुसार ते स्वराज्यवादी होते. अनेक प्रतिष्ठित मराठ्यांना स्वतंत्र मतदारसंघांची मागणी अमान्य होती. कर्मवीर शिंदे यांची भूमिका जगजाहीर होती. खासेराव जाधव यांचेही विचार स्वतंत्र होते. खंडेराव बागल व अण्णासाहेब लठ्ठे हे पुढारी वकिलीच्या व्यवसायात व्यग्र झाले. तेव्हापासून त्यांचा ब्राह्मण-विरोध पूर्वीसारखा कडवा राहिला नाही. ही सर्व वस्तुस्थिती महाराजांच्याही लक्षात आली होती. प्राप्त परिस्थितीत महाराजांना ध्येय साध्य करण्यासाठी कलोनिअल सत्ताधीशांचीही मदत घ्यावी लागली.

बहुसंख्य मराठा पुढाऱ्यांना शाहू महाराजांची पक्षनिर्मिती मान्य असली तरी काही मराठे स्वतःस मागासलेले अथवा ब्राह्मणेतर अशा अभिमान-विरहित नावांनी संबोधून घेण्यास तयार नव्हते. त्यांना क्षत्रियत्वाचा व अस्मितेचा अभिमान वाटे. काँग्रेसने केलेल्या स्वराज्याच्या मागणीला त्यांचा पाठिंबा होता. वऱ्हाडचे पुढारी बॅ. रामराव देशमुख क्षत्रिय मराठा असा अभिमान बाळगून टिळक पक्षाचे अनुयायी होते. तसेच त्र्यंबक हरी आवटे, काशीनाथ ठकूजी जाधव, नारायणराव गुंजाळ व बॅ. व्ही. एम. पवार हेही टिळक पक्षाचे असून, ही सर्व माणसे स्वतःस 'राष्ट्रीय मराठा' म्हणवून

घेत. मात्र आपली स्वतंत्र ओळख कायम ठेवूनही ही मंडळी ब्राह्मणेतर पक्षातच राहिली. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे मात्र सत्यशोधक समाज व ब्राह्मणेतर पक्षात राहूनही त्यांनी आपला स्वतंत्र बाणा जोपासला. "मागासलेल्या जातींसाठी राखीव मतदारसंघ मागणे हे मूळ रोगापेक्षा इलाज भयंकर" असे त्यांनी शाहू महाराजांना ऐकवले होते. अशा बाणेदारपणातून शिंदेंनी महाराजांचा रोष ओढवून घेतला.महाराज पुण्यात निवडणुकीच्या शिंदेविरोधी प्रचारासाठी गेले व त्यामुळे शिंदे पराभूत झाले.

मॉंटेग्यू घोषणेपासूनच केशवराव जेधेंची मराठा लीग राखीव मतदारसंघांच्या मागणीसाठी जोरदार प्रचार करीत होती. विशेषतः पुण्यात रणधुमाळी माजली. वलचंद कोठारींचे **जागरूक** पत्रक हे काम करीतच होते. डिसेंबर १९१९ मध्ये श्रीपतराव शिंदेंनी पोलीस विभागातील नोकरी सोडून **विजयी मराठा** पत्रक सुरू केले. ब्राह्मणेतर चळवळीचे मुखपत्र म्हणण्यास पात्र असे हेच पत्रक होते. शिंदेंनी अत्यंत तळमळीने या माध्यमातून व व्यासपीठावरून लोकमत जागृतीचे कार्य केले. आणि तेही चळवळीच्या संपूर्ण कालखंडात! फारशी आर्थिक मदत नसताना शिंदेंनी ध्येयवाद व सेवाभावे समाजप्रबोधन केले. अस्मिता नसलेल्या लोकांना आत्मनिष्ठ बनविणे आणि प्रस्थापितांविरुद्ध संघर्ष करणे असे दुहेरी काम त्यांनी केले. १९१९ सालच्या नवीन राज्यघटना कायद्यानुसार झालेल्या निवडणुकीत ब्राह्मणेतर पक्षाला बरेच यश लाभले होते. त्याप्रसंगी **विजयी मराठा–केसरी** अशी लढत झाली होती. निवडणुकीतील यश व त्या लढतीचे श्रेय प्रामुख्याने शाहू महाराज व **विजयी मराठा** पत्रकाला दिले गेले.

दिनकरराव शंकर जवळकर हे जहाल पत्रकार व ब्राह्मणेतर चळवळीचे तडफदार प्रचारक होते. त्या काळी जेधे-जवळकर ही आघाडीवरची जोडी होती. या जोडीने अनेक प्रचार-सभांचे फड जिंकले होते. दिनकरराव अत्यंत धारदार व भडक भाषेतून प्रतिपक्षावर हल्ला चढवत. या क्षमतेमुळे महाराजांनी त्यांना कोल्हापुरात **तरुण मराठा** पत्रक काढण्यास मदत केली होती. मात्र त्यांचा आत्यंतिक जहालपणा महाराजांनाही आवडला नाही. म्हणून ते पत्रक बंद करावे लागले होते. त्यानंतर दिनकरराव पुण्यातील **मजूर** पत्रकातून चळवळीचा प्रचार करू लागले. लवकरच जेधे व

जवळकर हे पुण्यातील ब्राह्मणेतर पक्षाचे सर्वोच्च पुढारी झाले. ते अनेक सामाजिक प्रश्न, वादविवाद सोडवत आणि त्यांनी चळवळीत भरपूर जोम आणला. म्हणूनही महाराजांच्या निधनानंतरही त्यांचे नेतृत्व कायम होते.

ब्राह्मणेतर पक्षाच्या टीकेला **केसरी** उत्तर देतच असे. पण त्याव्यतिरिक्त गणपत नलावडे यांनी पुण्यात **संग्राम** नावाचे साप्ताहिक पत्रक काढून ब्राह्मणेतरांच्या टीकेला तोंड दिले. नलावडे तेव्हा टिळकांचे अनुयायी होते, पण नंतर सावरकरवादी झाले. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद पेटलेला असताना पुण्यात **मजूर-संग्राम** पत्रकांमधील वादंग खूपच गाजले होते. मात्र या वादंगातून महाराष्ट्रात ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद खूप प्रखर झाला आणि त्याचे दुष्परिणाम या भूमीला भोगावे लागले.

**सत्यशोधक-ब्राह्मणेतर मतभेद :—**सत्यशोधक समाजाने ब्राह्मणेतर पक्षात विलीनीकरण न करता आपले समाजसुधारणा व जनजागरणाचे कार्य चालू ठेवले होते. या कार्याबाबत या दोन्ही संघटनांमध्ये सर्वसंमती होती हे खरे. दोन्ही पक्षांचे उद्दिष्ट बहुजन व वंचितांचे सामाजिक दास्यातून विमोचन करणे व त्यांची उन्नती करणे हे होते. तथापि ब्राह्मणेतर पक्षाला राजकारणात रस होता व महत्त्वाकांक्षा होती. या पक्षाला उच्चवर्णीयांशी संघर्ष करून कायदेमंडळांमध्ये जाणे आणि त्या माध्यमातून हक्क मिळविण्याची महत्त्वाकांक्षा होती. या व अशा काही कारणांमुळे या दोन्ही पक्षांमध्ये मतभेद उद्‌भवणे स्वाभाविक होते. सत्यशोधक नेते महात्मा फुलेंच्या विचारसरणीशी बांधीलकी मानत. मात्र याबाबत खोलात जाण्याचे हे स्थळ नव्हे.

शाहू महाराजांनी शंकराचार्याचे धर्मपीठ म्हणून रांगणा किल्ल्याजवळच्या पाटगाव येथील मठाचे पीठाधिपती म्हणून सदाशिवराव लक्ष्मण पाटील (बेनाडीकर) यांना क्षत्रिय मराठा जगद्‌गुरु या पदी नेमले (ऑक्टोबर १९२०). म्हणजे करवीर पीठाचे ते क्षात्रजगद्‌गुरु झाले. वस्तुतः महाराजांचे अत्यंत निकटवर्ती असलेल्या सत्यशोधक भास्करराव जाधवांना ही कल्पना अजिबात पसंत नव्हती. म्हणून त्यांनी क्षात्रजगद्‌गुरूंना मुजरा करण्याचे नाकारले, आणि त्याचे परिणाम भोगले. तसेच महात्मा फुलेंना मानणाऱ्या मुकुंदराव पाटलांच्या निष्ठावंत सत्यशोधकांच्या गटालाही क्षात्रजगद्‌गुरुंचे

पीठ आणि वेदांचे शिक्षण अमान्य होते. त्यांनी वेदांचे अधिष्ठान झुगारून लावलेले होते. म्हणून या गटाला वेदांचे शिक्षण देण्यासाठी आणि मराठा पुरोहित तयार करण्यासाठी काढलेल्या पाठशाळा नापसंत होत्या. वेदोक्त श्रावणीचा अंगीकार त्यांना सुधारणावादाशी विसंगत वाटत होता. कर्मवीर शिंदे यांनीही वेदप्रामाण्य झुगारले होते. त्यांनाही असे वैदिक व धार्मिक आचारविचार पूर्णतया अमान्य होते. वेदप्रामाण्य व धर्मपीठ हे मतभिन्नतेचे मुद्दे होते. प्रबोधनकार ठाकरेंची टीका अधिकच फटकळ होती. त्यांच्या मते 'ब्राह्मण जगद्‌गुरुचे दास्य नको म्हणून क्षात्रजगद्‌गुरुचे पीठ निर्माण करणे म्हणजे जुन्या गुलामगिरीच्या त्रासातून मुक्त होण्यासाठी नव्या गुलामगिरीचे जोखड पत्करण्यासारखे आहे'.[४] यावरून बराच वाद झाला. त्यातून ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाच्या जोडीला मराठा-मराठेतर असाही वाद निर्माण झाला. 'मराठ्याचे मत मराठ्याला' असाही संकुचित विचार प्रसारित झाला आणि तो निवडणूक प्रचारातही मांडला गेला.

## शाहू महाराजांचे निधन

महाराज डायबेटिसग्रस्त झाल्याने त्यांचा देह ताण सहन करू शकत नव्हता. तरीही ते गणेश आकाजी गवई यांनी दिल्लीत आयोजित केलेल्या अ. भा. अस्पृश्य परिषदेस फेब्रुवारी १९२२ मध्ये हजर राहिले. नंतरही प्रकृती खराब असूनही २७ एप्रिल १९२२ रोजी महाराज सयाजीराव गायकवाडांच्या नातीच्या विवाह समारंभासाठी बडोद्याला गेले. तेथून कोल्हापूरला परत येत असताना ते वाटेत मुंबईत थांबले. मुंबईतील याच मुक्कामात शाहू महाराजांचे ६ मे १९२२ रोजी निधन झाले.

महाराजांना आदरांजली वाहताना प्रबोधनकारांनी लिहिले 'सर्चलाईट विझला'. 'अस्पृश्यांच्या मुक्तीसाठी लढणारा हिंदुस्तानचा अब्राहम लिंकन गेला', असे गवई यांनी म्हटले. कर्मवीर शिंदे, श्रीपतराव शिंदे वगैरे सर्व जण हळहळले.'दीन दुनियेचा वाली गेला', असे बहुसंख्य ब्राह्मणेतरांनी दुःख व्यक्त केले. मुंबईपासून बेळगाव व धारवाडपर्यंत शोकसभा झाल्या. **मात्र केसरी वगैरे ब्राह्मणी वर्तमानपत्रांनी शाहू महाराजांवर मृत्युलेख लिहिण्याचेही सौजन्य दाखविले नाही. किंबहुना काही लोकांनी आनंद व्यक्त करून अनुचित वर्तन केले. त्यामुळे ब्राह्मण-**

**ब्राह्मणेतर वाद अधिक** तीव्र झाला. आपण पोरके झालो, अशी बहुजनसमाजाची भावना झाली. ही भावना केवळ कोल्हापूर संस्थानापुरतीच मर्यादित नव्हती. सातरा, सांगली, बेळगाव, कोकण, ठाणे, खानदेश, वऱ्हाड, नाशिक व मुंबईच्या कामगार भागात उत्स्फूर्त दुखवटा व्यक्त झाला होता. पुण्याच्याही बऱ्याच भागात दुःखाचे वातावरण होते. मात्र पुण्याच्या काही भागात अनुचित प्रतिक्रिया प्रकट झाल्या. विशेषतः **केसरी** पक्ष मात्र पूर्वीचे वैर विसरू शकला नाही. त्यामुळे पूर्वीच्या जखमा ताज्या झाल्या. जे विसरणे सार्वजनिक हिताचे होते,त्याचे पुनःस्मरण झाले. महाराष्ट्राच्या राजकारणात व समाजकारणात कटुता आली. महात्मा गांधी व शंकरराव देवांनी यथोचित शोकसंदेश पाठविले. परंतु पुण्याचे पुढारी व नरसोपंत केळकरांनी नाही!

## पक्षात विसंवाद

महाराजांच्या निधनानंतर ब्राह्मणेतर पक्ष अनाथ झाला, कमालीचा असंघटित व किंकर्तव्यमूढ झाला! मूळ सूत्रसंचालक गेल्यामुळे पक्षांतर्गत कलह व गटबाजी वाढली. महाराज असेपर्यंत ते विविध हितसंबंधीयांचे गट व अंतर्गत विरोधकांना आळा घालत. कधी समन्वय तर कधी तहाच्या अटी लादत. ब्रिटिश नोकरशाहीशी असलेला आपला सलोखा व राजसत्ता आणि वित्तबळाच्या आधारे शाहू राजे पक्षातील बेशिस्त घटकांना वठणीवर आणत. पक्षाची रणनीती व सामाजिक कार्यक्रम महाराज आखून देत. ते जरी संस्थानाचेच अधिपती असले, तरी स्वतः पक्षाच्या महाराष्ट्रातील धोरणाचेही नियमन करीत. शाहूंच्याच डावपेचांनुसार १९१९ साली ब्राह्मणेतर पक्षाने मवाळ म्हणजे लिबरल पक्षाशी युती करून मुंबई कायदेमंडळात चांगले बस्तान बसवले होते. त्यांच्या हयातीतही ही युती नंतर क्षीण झाली होती. पण १९२२ पासून ती अधिकच कमकुवत झाली.

महाराष्ट्राचे मे-जून १९२२ पासूनचे राजकीय रंगदृश्य पाहता म्हणता येते की, ब्राह्मणेतर पक्षाचे सभासद कमालीचे असंघटित होते. पक्षाला एकमुखी नेतृत्व राहिले नाही. निश्चित कार्यक्रम व धोरणही राहिले नाही. वस्तुतः काँग्रेसने निवडणुकीवर संघटितरीत्या बहिष्कार घातल्यामुळेच ब्राह्मणेतर पक्ष व लिबरल पक्षाला मुंबई कायदेमंडळात बरेच यश मिळाले होते हे सत्य. मात्र कायदेमंडळात जाऊनही

ब्राह्मणेतरांच्या पदरात काही पडलेले नाही, असे अण्णासाहेब लठ्ठे यांनीही कबूल केले होते. पुढील कायदेमंडळात पक्षाची स्थिती अधिकच वाईट होईल, असा त्यांनी अंदाज वर्तविला. आपल्या पक्षाचे उमेदवार जर चांगले संघटन करू शकले नाहीत, तर १९२३ च्या निवडणुकीत जहाल काँग्रेसमन कायदेमंडळात शिरून नारायणराव गुंजाळ व बाबूराव फुले तिथे प्रभाव दाखवतील, ही लठ्ठेंना भीती वाटत होती.

पक्षामधील बेशिस्त व धोरणशून्यता या व्याधीमुळे पक्ष दुर्बल झाला होता. जबरदस्त नेतृत्वाची नितांत गरज होती. म्हणून शाहू महाराजांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी अण्णासाहेबांनी राजाराम महाराजांना विनंती केली. तथापि शाहू महाराजांची धडाडी व ध्येय अथवा संघटन कुशलता त्यांच्या या सुपुत्रात नव्हती. त्यांना राजकारणात रस नव्हता.[५]

**छत्रपती मेळा :—**१८९४-१८९५ पासून गणेश मेळे हे प्रचाराचे माध्यम आपला प्रभाव दाखवत होते. या माध्यमातून प्रसारित होणारा राष्ट्रवाद, पण त्याचबरोबर होणारे अश्लील वर्तन व चारित्र्यहनन आणि घाणेरडे प्रसारण याचा आढावा **खंड पहिला** यात घेतलेला आहे. पुढील काळात ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाचा प्रादुर्भाव झाल्यावर हा वाद मेळ्यांच्या रंगमंचावर आला. या दृष्टीने शाहू महाराजांच्या मरणानंतर १९२२ च्या गणेशोत्सवात केशवराव जेध्यांनी पुण्यात छत्रपती मेळा सुरू केला. करमणुकीबरोबरच प्रतिपक्षावर टीका करणे व राजकारण हे हेतू होते. रंगमंचावर म्हणावयाची गीते प्रसिद्ध करण्यात आली. बऱ्याच पदांमध्ये टिळक, न. चिं. केळकर व ब्राह्मण पुढाऱ्यांवर तसेच समर्थ रामदास, नाना फडणीस, राघोबा दादा वगैरे ब्राह्मणांचा उपहास व टिंगल करणारा आशय असायचा. याउलट ब्राह्मणी मेळ्यांमधून समाजसुधारक व मवाळ पक्षीय यांच्यावर टीका असे. जेध्यांच्या मेळ्यात शाहू महाराज, शिवाजी महाराज यांच्याबरोबर महात्मा गांधी यांची स्तुती करणारी पदे म्हटली जात असत. सुधारणावादाबरोबर गांधीवादही आला.

**प्रांतिक कायदेमंडळाची निवडणूक (१९२३) :—**अधिकृत काँग्रेस पक्षाने १९२३ च्या कायदेमंडळांच्या निवडणुकीवर बहिष्कार घातलेला होता. त्यामुळे ब्राह्मणेतर, मराठा, लिंगायत वगैरे मंडळी प्रामुख्याने निवडणुकीच्या रिंगणात होती.

भास्करराव जाधव, धनजीशहा कूपर साताऱ्यातून, सिद्दप्पा तोटप्पा कंबळी धारवाडमधून, दळवी व अंगडी बेळगावातून, आर. जी. शिंदे नाशिकमधून, शंकरराव झुंजारराव ठाण्यातून, नामदेवराव नवले व सरदार थोरात नगरमधून व गं. मु. काळभोर हे पुण्यातून निवडून आले. मात्र ब्राह्मणेतर पक्षाचे लठ्ठे, चिकोडी, आचरेकर, शामराव लिगाडे, दाजीराव विचारे वगैरे उमेदवार पराभूत झाले. बहुतेक उमेदवारांच्या पराभवाची कारणे पक्षातील ऐक्यभावाचा अभाव, व्यक्तिगत हेवेदावे व जातीय अभिनिवेश यातच होती. जातपात तोडण्याची भाषणे करणारे आणि सत्यशोधक म्हणून नावलौकिक मिळवणारे भास्करराव जाधव यांनी स्वतः 'मराठ्यांची मते मराठ्याला' मिळावीत, असाही प्रचार केला. शिवाय आचरेकर मराठा असले तरी ते 'कमअस्सल' आहेत, असाही प्रचार केला. त्यामुळे पक्षात वादंग उठू लागले.[६]

**पुतळे व स्मारकांचे वाद :—**शिवस्मारकाचाही वाद प्रज्वलित झाला. ग्वाल्हेरचे अलिजाबहादूर शिंदे यांनी शिवाजी महाराजांचे राष्ट्रीय स्वरूपाचे स्मारक असावे, असा प्रस्ताव मांडला होता. स्मारक समितीत सांगलीचे राजे पटवर्धन व गोपाळ कृष्ण देवधर या ब्राह्मणांसह सर्व पुरोगाम्यांचा समावेश करावा असे ठरले. तथापि जेधे वगैरे शाहूभक्तांनी प्रस्तावास विरोध केला. तरीही पांडुरंग चिमणाजी पाटील (जन. एस.पी.पी. थोरातांचे वडील), भास्करराव जाधव, कर्मवीर शिंदे, कीर्तिवान निंबाळकर वगैरे सभासद ब्राह्मणांचेही सहकार्य घ्यावे, असा सुविचार मांडत होते त्यांच्यावर दिनकर जवळकरांनी जोरदार हल्ला चढवला. या प्रकारांमुळे शिवस्मारकाचे काम रखडून पडले. दरम्यानच्या काळात स्मारकाचे मूळ प्रवर्तक असलेले अलिजाबहादूर शिंदे व खासेराव जाधव हे दोघेही मरण पावले. वस्तुतः विरोधकही काही करत नव्हते. म्हणून राजाराम महाराज पुढे आले आणि त्यांनी स्मारकाची जबाबदारी पत्करली. अखेरीस चार वर्षांच्या विलंबानंतर पुण्यात छत्रपती शिवाजींचा पहिला अश्वारूढ पुतळा तयार झाला व १६ जून १९२८ रोजी त्याचे अनावरण झाले. पण त्यातही संकुचित वृत्तीचे प्रदर्शन झाले. हिंदवी स्वराज्यासाठी लढलेल्या शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या महात्मा गांधींच्या हस्ते व्हावे, अशी कर्मवीर शिंदे वगैरे राष्ट्रवाद्यांनी सूचना केली. **पण ब्राह्मणेतर राजनीतीनुसार पुतळ्याचे अनावरण शत्रुपक्षातील गव्हर्नर लेस्ली विल्सनच्या हस्ते करण्यात आले.**

पुण्यातील तत्कालीन पुतळ्यांचे सर्वच राजकारण घाणेरडे होते. महात्मा फुलेंची कर्मभूमी असलेल्या पुण्यात त्यांचा पुतळा उभारणे विचारी लोकांना आवश्यक वाटत होते. त्यानुसार नऊ सभासदांनी फुलेंचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी पुणे नगरपालिकेत ठराव मांडला. पण त्यालाही प्रखर विरोध झाला. विरोधकांमध्ये ब्रह्मण होते, हे आपण समजू शकतो. तथापि विरोधकांमध्ये अब्राह्मणदेखील होते. म्हणजे फुलेंच्या पुतळ्यास टिळक पक्षाप्रमाणेच अब्राह्मण सभासदांचाही प्रखर विरोध होता. या प्रकरणात विपुल अपशब्द व शिवराळ भाषेची उधळण झाली. परंतु १९२४ साली न. चिं. केळकर स्वतः पुणे नगरपालिकेचे अध्यक्ष असल्यामुळेच पुण्यात लोकमान्य टिळकांचा पुतळा होऊ शकला आणि त्याचे अनावरण कोणातरी इंग्रजाऐवजी पंडित मोतीलाल नेहरू यांच्या हस्ते होऊ शकले. तसेच विष्णुशास्त्री चिपळूणकरांचाही पुतळा तयार झाला. त्यालाही ब्रिटिशांचा हात न लागता पुतळ्याचे अनावरण गांधीजींच्या हस्ते पार पडले. पुण्यातील पुतळ्यांबाबत जे राजकारण झाले, त्यात अत्यंत झणझणीत भाषा वापरली गेली. बाचाबाची झाली. अनेकांचे चारित्र्यहननही झाले. पुतळ्याचे अनावरण इंग्रजाने करावे असे बरेच प्रयत्न झाले.

'देशाचे दुष्मन' नावाच्या पुस्तकात चिपळूणकर व टिळकांची बदनामी करण्यात आली (जुलै १९२५). याउलट 'सत्यशोधक का ख्रिस्तसेवक' पुस्तकात महात्मा फुलेंची बदनामी करणारी विधाने होती. या प्रकारांबाबत न्यायालयात खटले भरण्यात आले होते, इत्यादी.[७]

अशा बाबींमध्ये काव्यविक्रम करणारे पुरुष कन्या शिक्षणाबाबत मात्र उदासीन होते. रमाबाई रानडे, पंडिता रमाबाई, सेवा सदन सोसायटी वगैरेंना याचा अनेकदा वाईट अनुभव आला होता. म्हणून ही मंडळी ब्राह्मण व ब्राह्मणेतरांच्या यादवी संघर्षापासून खूप लांब राहिली. आणि त्यांनीच चांगले रचनात्मक कार्य केले.

**ग्रामजोशी वतन विधेयक :—**ग्रामजोशींच्या हक्काला प्रथम आव्हान दिले होते महात्मा फुलेंनी! धार्मिक विधीसाठी जोशीला बोलावले नाही तर त्याला मोबदला नाही, अशी सत्यसमाजिस्टांची सरळ भूमिका होती. पण तरीही जोशी लोक पैसे मागत. १८८४ पासून याबाबत कोर्टात दावे-प्रतिदावे दाखल होत राहिले. मुंबई

हायकोर्टानेही याबाबत कधीच असंदिग्ध निवाडा केला नाही. अखेरीस सीताराम केशव बोले यांनी १९२६ मध्ये जोशी वतन नष्ट करण्यासाठी मुंबई कायदेमंडळात सर्वंकष विधेयक मांडले. १९ मार्चला मांडलेले हे विधेयक ३ ऑगस्ट १९२६ रोजी प्रचंड बहुमताने संमत झाले. ब्राह्मणेतर असलेले बोले यांच्याप्रमाणे वीर नरिमन यांनीही यासाठी प्रयत्न केले.

सामाजिक समतेचे उद्दिष्ट असलेले आणखी एक विधेयक सी. के. बोले यांनी यापूर्वीच कायदेमंडळात मांडले होते. अस्पृश्य मानलेल्या सर्वच जातींच्या लोकांना सार्वजनिक पाणवठे, विहिरी आणि धर्मशाळा यांचा उपयोग करू द्यावा; तसेच शाळा, दवाखाने, कार्यालये व न्यायालये वगैरे ठिकाणी अस्पृश्यतेच्या कारणावरून प्रवेश नाकारू नये अशा आशयाचा हा ठराव होता. हा महत्त्वाचा ठराव ४ ऑगस्ट १९२३ रोजी कायदेमंडळाने संमत केला. त्यानुसार सरकारी व सरकारने अनुदान दिलेल्या सर्व संस्थांमध्ये त्याची अंमलबजावणी करण्यात यावी, असा आदेश सरकारने निर्गमित केला. मात्र त्याची अंमलबजावणी झाली असे नव्हे. पुणे नगरपालिकेतही त्याची अंमलबजावणी झाली नव्हती. पाणवठ्याबाबत ल. ब. भोपटकर यांचा ठराव व त्यानंतर केशवराव जेधे यांचा ठराव हे दोन्ही प्रस्ताव पालिकेत असंमत झाले. **एकूण समाजाची मानसिकता भयंकर कर्मठ व पुच्छगामी होती याचा नेहमीच प्रत्यय येत असे.**

मुंबई इलाख्यात प्राथमिक शिक्षण मोफत करावे ही मागणी प्रथम जोतीबा फुलेंनी केली होती. त्यानंतर विरोधी पक्षनेते गोपाळ कृष्ण गोखले यांनी यासाठी मध्यवर्ती कायदेमंडळात अनेकदा मागणी केली होती. पण त्यांना अपयश आले होते. शेवटी रँगलर परांजपे शिक्षणमंत्री झाल्यावर सरकारने एक समिती नेमली. त्यानुसार मुंबई इलाख्यात १९२३ साली प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याचा कायदा संमत झाला. तथापि हा कायदा म्हणजे ब्रिटिशांनी केलेली फसवणूक होती. या कायद्याची अंमलबजावणी जिल्हा लोकल बोर्डावर सोपवली होती. भास्करराव जाधव शिक्षणमंत्री झाल्यावर त्यांनीही काही केले नाही. म्हणून त्यांच्यावर आंबेडकर तसेच प्रबोधनकारांनी प्रखर टीका केली होती.

**कायदेमंडळाची १९२६ ची निवडणूक :**—नोव्हेंबर १९२६ मध्ये झालेल्या मुंबई कायदेमंडळाच्या निवडणुकीत ब्राह्मणेतर पक्षात कमालीची गटबाजी व बेशिस्त झाली होती. सत्तेसाठी नवी समीकरणे रचण्यात आली. तत्त्व व ध्येयवादाला गौण स्थान देण्यात आले. महात्मा फुलेंच्या काळात सत्यशोधक समाज मद्यपानाचा निषेध करीत असे. नंतरच्या काळातील सत्यशोधक जलशांमधूनही मद्यपान बंदीचा प्रचार करण्यात येई. शाहू महाराज जिवंत असताना मद्यपान मर्यादित होते. १९२३ च्या निवडणुकीत दारूचा उपयोग करण्यात आला नव्हता, असा दावा करण्यात आला होता. मात्र १९२६ मध्ये पक्षात बेशिस्त माजली. काही उमेदवारांनी मतदारांना दारू पाजून मते मिळविली, याची आठवण प्रबोधनकारांनी नोंदवून ठेवलेली आम्हाला आढळली. दारूचा व्यापार करणारे धनजीशहा कूपर शेट हे स्वतःच ब्राह्मणेतर पक्षाचे एक पुढारी व उमेदवार होते. मुकुंदराव पाटलांनी ब्राह्मणेतर नेते आणि दारूगुत्तेवाले यांच्यामधील मदिरायण संबंधाबद्दल टीका केली होती. अगदी पुराव्यांसह!

या निवडणुकीत मुंबई कायदेमंडळावर ब्राह्मणेतर पक्षाचे पुढील १२ उमेदवार निवडून आले :-रामचंद्र आसवले, शंकरराव झुंजारराव, सदाशिव ऊर्फ खासेराव जिवाजीराव पवार, रा. वि. वंडेकर, शामराव लिगाडे, डोंगरसिंग पाटील, नामदेव एकनाथ नवले, भास्करराव जाधव, पंडितप्पा चिकोडी, षण्मुखप्पा अंगडी, संगप्पा सरदेसाई व सिद्दप्पा तोटप्पा कंबळी. यांत सात मराठा व पाच लिंगायत होते. म्हणजे मराठा आमदारांची संख्या घटली. शोचनीय बाब ही की, पक्षांतर्गत गटबाजीमुळे ब्राह्मणेतर पक्षाच्या कोणालाच मंत्रिपद लाभले नाही. त्यामुळे नाराज झालेल्या खासेसाहेब पवारांनी शपथविधीतही भाग घेतला नाही. भास्करराव जाधव नोव्हेंबर १९२६ पासून सप्टेंबर १९२८ पर्यंत मंत्रिपदासाठी आशाळभूतपणे ताटकळत उभे होते. ब्रिटिशांनी त्यांना लाचार बनविले, आणि नंतरच त्यांना मंत्रिपद दिले. जाधवांना शिक्षण मंत्रिपद देण्यास आंबेडकरांचा ठाम विरोध होता. शिक्षण मंत्री असताना त्यांनी केलेल्या कामाचा अस्पृश्य वर्गाला वीट आला आहे, असे आंबेडकरांनी एका पत्रात लिहिले होते (१८ डिसेंबर १९२६). अशा कारणांमुळे गव्हर्नरने जाधवांना शिक्षण खाते न देता शेती व अबकारी खाती दिली.

मध्यप्रांत-वऱ्हाडमध्ये नवीन असलेल्या ब्राह्मणेतर पक्षास तेथील कायदेमंडळात केवळ सहा जागा जिंकणे शक्य झाले.

महाराष्ट्राच्या राजकीय मंचावर या पक्षाचे निराशाजनक चित्र दिसत होते. एकूण वस्तुस्थिती व जनमताची जाणीव झालेल्या धुरीणांना ब्राह्मणेतर पक्षाच्या भवितव्याची फारशी आशा उरली नाही.

## ब्राह्मणेतरांचा कल काँग्रेसकडे

टिळकयुगात महाराष्ट्रातील राजकारणावर व समाजकारणावरही ब्राह्मणांचेच प्रभुत्व होते. काँग्रेसचे राजकारण म्हणजे उच्चवर्णीयांची मक्तेदारी असा बहुजनसमाजाचा समज होता. शाहू महाराज हयात असताना महाराष्ट्र, वऱ्हाड व मध्यप्रांतासाठी असलेल्या तिन्ही प्रांतिक काँग्रेस समित्यांचे सदस्य प्रामुख्याने ब्राह्मणच होते. त्यामुळे स्वराज्य मिळाल्यावर मूठभर ब्राह्मण सत्तेचा उपयोग आपल्या स्वार्थी हितसंबंधांची जोपासना करण्यासाठीच करून घेणार, आणि वंचित व शोषित वर्ग तसाच वंचित ठेवणार, अशी त्यांना भीती वाटत होती. म्हणूनच ब्राह्मणेतर पक्षाने ब्रिटिशांशी निष्ठा राखून आपले वर्गीय हित जोपासण्यासाठी ब्राह्मणेतर संघटना उभारली होती. अशी या राजकीय पक्षामागची जाहीर कारणमीमांसा होती.

तथापि १९२२-२३ पासून भारताचे राजकीय रंगदृश्य बदलले. काँग्रेसचे नेते असलेले महात्मा गांधी, सरदार वल्लभभाई पटेल, विठ्ठलभाई पटेल, डॉ. राजेंद्र प्रसाद, बॅ. चित्तरंजन दास वगैरे कोणीच ब्राह्मण नव्हते. गांधीजींच्या समर्थकांमध्ये ब्राह्मणांपेक्षा पारशी, मारवाडी, भाटिये, खोजा, पाटीदार, वाणी, मुसलमान वगैरे समाजांमधील लोकच जास्त होते. त्यांची असहकार चळवळ सर्वार्थाने धर्मनिरपेक्ष व वर्गनिरपेक्ष तर होतीच. पण शिवाय चळवळीचे उद्दिष्ट व ध्येय गांधीजींनी आधीच स्पष्ट केलेले होते. त्यात लपंडाव नव्हता. ब्राह्मण किंवा कोणाचेही हितसंबंध जोपासण्याचा प्रयत्न नव्हता. ब्राह्मणेतर युवा पुढाऱ्यांच्या लक्षात आले की, गांधी भाषणबाज किंवा डेमॅगॉग राजकारणी नव्हेत, ते वाग्‌विलासी वा घोषणाबाज पुढारी नव्हेत. किंवा गांधी वचाळ राजकारणी नव्हेत! १८ मार्च १९२२ रोजी गांधीजींना सत्र न्यायाधीशापुढे उभे केले असता, साधा खादीचा पंचा नेसलेल्या गांधींनी आपल्यावरील आरोप त्वरित मान्य

केला. स्वतःच्या बचावासाठी त्यांनी प्रदीर्घ भाषण केले नव्हते. गांधीजींनी आरोप कबूल केल्याने हा राजद्रोहाचा संपूर्ण खटला केवळ शंभर मिनिटांत आटोपला. मात्र न्यायाधीशाने गांधीजींना सहा वर्षांचीच शिक्षा फर्मावली होती. गांधीजी व टिळकांमधील असा फरक ब्राह्मणेतर युवकांच्या लक्षात आला. दोघांच्या बलस्थानांचे मूल्यमापन करण्यात आले. त्यामुळे महात्मा गांधींच्या चळवळीशी दुरावा चालू ठेवणे हे व्यर्थ होय, अशी ब्राह्मणेतरांमध्ये जाणीव वाढत राहिल्याचे गुप्तचरांच्याही लक्षात आले.[६]

पुण्यात शंकरराव देव व नरहर विठ्ठल गाडगीळ हे दोघे केशवराव जेधे व बाबूराव या बंधूंशी संपर्क ठेवून सलोखा साधण्याचा प्रयत्न करू लागले. गांधीजींची सत्याग्रहाची कार्यपद्धती, तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र आणि जातिधर्मातीत धोरण याबाबत चर्चा होऊ लागली. त्याआधीपासूनच कर्मवीर भाऊराव पाटील गांधी-मार्गाकडे आकर्षित झालेले होते. एका दौऱ्यात गांधीजींनी भाऊरावांच्या संस्थेस भेट देऊन वार्षिक देणगी देणे सुरू केले होते. केशवराव स्वतः गांधीजींच्या खादी व रचनात्मक कार्याकडे आकर्षित झालेले होते. गांधीजींची प्रशंसा करणारे एक गीत रचून ते जेधेंनी आपल्या मेळ्यात म्हटले जाण्याची व्यवस्था केली. ४ सप्टेंबर १९२४ रोजी पुण्यातील जेधे भवनात गांधीजींच्या आगमनानिमित्त पानसुपारीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. केशवरावांनी गांधीजींवर रचलेले गीत छत्रपती मेळ्यात म्हटले जाई. या प्रसंगास पुण्यातच नव्हे तर संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रात प्रसिद्धी मिळाली. यामुळे सनदी नोकरशाही बुचकळ्यात पडली. **हंटर** पत्रकाचे संपादक खंडेराव बागल यांचेही मतपरिवर्तन झाले.

शाहू महाराजांपासून ब्राह्मणेतर पक्षाची धोरणे व रणनीती मद्रासमधील जस्टिस पक्षाच्या रणनीतीनुसार आखण्यात येई. मात्र १९२६ च्या कायदेमंडळांच्या निवडणुकीत जस्टिस पक्षाला यश मिळाले नाही. म्हणून मद्रास राज्यात त्या पक्षाच्या सभासदांना काँग्रेसमध्ये प्रवेश करण्यास मुभा देणे भाग पडले होते. जस्टिस पक्ष कमकुवत झाला होता. मुंबई इलाखा व विदर्भातही निवडणुकीत फार थोडे ब्राह्मणेतर उमेदवार निवडून आले होते. जातपातीचे राजकारण करून समाजाचे हित साध्य होत नव्हते. कार्यक्रमविहीन व कर्तव्यच्युत झालेला हा पक्ष कालबाह्य झालेला होता. ब्रिटिशांच्या

कच्छपी लागून शेतकऱ्यांचे शोषण कमी झाले नव्हते. परिणामतः पक्षात वैफल्याची भावना निर्माण झाली. म्हणून इथेही इच्छुक पुरोगामी व्यक्तींना काँग्रेसमध्ये जाण्यास परवानगी देणे भाग पडले. त्यासरशी ब्राह्मणेतरांचा काँग्रेसमध्ये जाण्याचा कल वाढत गेला.

शंकरराव देव, गाडगीळ, कर्मवीर शिंदे, के. एफ. नरिमन, युसुफ मेहेरअली, सेनापती बापट वगैरे नेते मराठा कार्यकर्त्यांचे मतपरिवर्तन करण्याच्या कामी लागले. सर्व फोर्सेसचा परिपोष होऊन केशवराव जेधे, भाऊराव पाटील व खंडेराव बागल काँग्रेसमध्ये आले. बागलांनी **हंटर** मध्ये अग्रलेख लिहिला तो अत्यंत दिलखुलासपणे :- – "राष्ट्रीय काँग्रेस ही आमची माता आहे. तिच्यात अद्याप अनेक दोष आहेत. परंतु तिजकडे पाठ फिरवून ब्राह्मणेतर पक्षाला यश येणे शक्य नाही. काँग्रेसच्या विचारांची दिशा उत्क्रांतीच्या नियमाप्रमाणे बदलत चालली आहे. आमच्या पक्षाची दृष्टी अद्याप सर्वव्यापी समतेवर गेली नाही. धार्मिक व सामाजिक समता एवढेच आपले ध्येय अशी आपली समजूत झाली आहे. आज सर्व पक्षाला एकत्र आणण्यास खादीसारखे दुसरे साधन नाही. साऱ्या ब्राह्मणेतर लोकांनी शुद्ध खादीच वापरावी. ब्राह्मणेतरांनी नोकरीची आशा टाकली पाहिजे. इंग्रज सरकारच्या कच्छपी जाणारा पक्ष देशाला केव्हाही प्रिय होणार नाही".[९]

बागलांनी केलेल्या या विश्लेषणात सर्व काही आलेले होते. शेतकरी व बहुजनसमाजाचे ज्वलंत प्रश्न सोडविण्यात ब्राह्मणेतर पक्षाच्या आमदारांना अत्यल्प यश लाभले होते. बाबासाहेब आंबेडकरांनी खासेराव पवारांना १८ डिसेंबर १९२६ रोजी पाठविलेल्या पत्रात तीव्र नापसंती व्यक्त करताना लिहिले, "जाधवांनी शिक्षण मंत्री म्हणून जे कार्य केले त्याचा अस्पृश्यांना वीट आलेला आहे. म्हणून अस्पृश्य समाजाला दुसरा शिक्षणमंत्री पाहिजे......" त्यामुळे गव्हर्नरने जाधवांना शिक्षणखाते न देता शेती व अबकारी खात्यांचे मंत्री केले होते.[१०]

भास्करराव जाधव आणि सी. के. बोले अशा काहींचा अपवाद वगळता ब्राह्मणेतर आमदारांना इंग्रजीत बोलता येत नसे. म्हणून त्यांच्याकडे गव्हर्नर व नोकरशाहीलक्ष देत नसे. त्यामुळे शासन स्वेच्छाचारी निर्णय घेत असे. सरकारला पाहिजे तशी

विधेयके पास होत असत. नोकरकपात, करमणुकीवरील करात वाढ, अबकारी करातील ब्रिटिशधार्जिणे बदल, सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाबाबतचे उदासीन धोरण व गांधीजींच्या अटकेवर शिक्कामोर्तब अशा अनेक महत्त्वाच्या विषयांबाबत त्या आमदारांनी काहीच केले नव्हते. जातपात तोडण्याची भाषा करणारे 'मराठ्यांची मते मराठ्यालाच' मिळावी असा निवडणुकीत प्रचार करीत. अशा अनेक कारणांमुळे अनेकांचा भ्रमनिरास होऊ लागला.

सायमन आयोगावर बहिष्कार घालण्याच्या प्रश्नावर ब्राह्मणेतर पक्षात बरेच रण माजले. कर्मवीर शिंदे, भाऊराव पाटील, जेधे बंधू, श्रीपतराव शिंदे व बागडे यांना या प्रश्नी काँग्रेसचीच भूमिका पसंत होती. नारायणराव गुंजाळ, बाबूराव फुले व राजमल लखीचंद हेही याच मताचे होते. याउलट भास्करराव जाधव, जवळकर, नानासाहेब अमृतकर व के. एस. नायडू यांना आयोगाशी सहकार्य करावयाचे होते. या काळात दुभंगलेल्या ब्राह्मणेतर पक्षात मराठा-मराठेतर असा नवीन वाद उत्पन्न झाल्यामुळे तिसरी फळी निर्माण झाली. फाटाफूट शमविण्याचे प्रयत्न झाले. पण व्यर्थ! शेतकऱ्यांच्या मुळशी सत्याग्रहात आपल्या पक्षाने भाग घेतला नाही, याचे सार्थ वैषम्य जेधे, मुकुंदराव पाटील, भाऊराव पाटील व खंडेराव बागल यांनावाटतच होते. गरीब शेतकऱ्यांनी आपली शेती वाचविण्यासाठी जिद्दीने प्रदीर्घ काळ चालविलेल्या मुळशी सत्याग्रहात ब्राह्मणेतर या शेतकऱ्यांच्या पक्षाने भाग घेतला नाही, याचे त्यांना दुःख वाटे.

## कृषी अर्थव्यवस्था व ब्राह्मणेतर पक्ष

शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत काही ब्राह्मणेतर नेते काँग्रेसशी सहकार्य करून ब्रिटिश सरकारशी संघर्ष करीत असत. मात्र सत्ताधारी वर्गातील भास्करराव जाधवांसारखे काही जण जर-तर अशी संदिग्ध भूमिका घेत, उदासीन असत. पण ब्रिटिशांना विरोध करत नसत. १९२८ सालात मुंबई सरकारने शेतजमिनीच्या विखंडनाबाबतचे एक विधेयक आणि जमीन महसूल वाढ करण्याबाबतचे दुसरे विधेयक कायदेमंडळात मांडले होते. आगामी जागतिक महामंदीचे फटके महामंदीपूर्वीपासूनच भारतीय कृषी अर्थव्यवस्थेला बसत होते. कापूस व नगदी पिकांचे भाव कोसळत होते. शेती हा

न परवडणारा व्यवसाय झालेला होता. त्यामुळे सारावाढीचा प्रस्ताव जीवघेणा होता. शिवाय नवीन विधेयकामुळे शेतकऱ्याच्या मालकीहक्कांवर प्रहार पडणार होता. म्हणून विधेयकांना विरोध करणे स्वाभाविक, नव्हे आवश्यक झाले होते. त्यासाठी ब्राह्मणेतर पक्षातील कर्मवीर शिंदे, रामराव शिंदे व जेधे बंधूंनी काँग्रेस कार्यकर्ते गंगाधरराव देशपांडे, शि. म. परांजपे व न. चिं. केळकर यांच्या सहकार्याने २५ जुलै १९२८ रोजी पुण्यात 'मुंबई इलाखा शेतकरी परिषद' भरविली. याच सुमारास वल्लभभाई पटेलांचा सुप्रसिद्ध **'बार्डोली सत्याग्रह'** चालू होता. या सत्याग्रहाचे महत्त्व मोठेच आहे. सरकारने २० टक्के सारावाढ तर केलीच. पण त्याच्या वसुलीसाठी इंग्रजांनी बार्डोलीत गुंड व पठाणांना मोकाट सोडले होते.

पुण्यातील २५ जुलैच्या परिषदेच्या निमित्ताने इंग्रजांचे अनेक दुराचार व शोषक धोरण उघड झाले. नवीन विधेयकानुसार खंडाच्या निम्मी रक्कम शेतसारा म्हणून घेण्याचा हक्क सरकारला लाभणार होता. त्यामुळे शेतकरी संकटात सापडला होत. अशा परिस्थितीत ब्राह्मणेतर पक्षाच्या आमदारांनी दोन्ही विधेयकांच्या विरुद्ध मतदान करावे, असे परिषदेचे अध्यक्ष कर्मवीर शिंदे यांनी आवाहन केले. काँग्रेस स्वराज्य पक्षाचे नेते बॅ. नरिमन यांनी विधेयकांना कसून विरोध करण्याचे निःसंदिग्ध आश्वासन दिले. तथापि बहुजनसमाजाचे पुढारी म्हणून मिरवणाऱ्या भास्कर जाधवांनी आपले स्वतःचे मत सरकारी विधेयकांना अनुकूल असल्याचे परिषदेत जाहीर केले. पण जर-तर अशी भाषा वापरून म्हटले की, विधेयकांना विरोध करावा असा ठराव जर परिषदेने बहुमताने मंजूर केला, तर आपण व इतर ब्राह्मणेतर सभासद विरोधात मत नोंदवतील. यातून त्यांची दांभिक व शेतकरी विरोधीभूमिका दिसून आली.[११]

ज्यांच्या कलानुसार जाधव चालत त्या गव्हर्नर विल्सनने किसानांना ठेचून टाकण्याची भाषा कायदेमंडळातही केली होती, "All the resources of the Empire would be used to crush the No-tax campaign of Bardoli". (P. Sitaramayya, op-cit., Vol. I, p. 325)

त्या अन्यायकारक विधेयकांचा निषेध करण्यासाठी गंगाधरराव देशपांडे, केळकर व परांजपे यांना बरोबर घेऊन शिंदे, जेधेबंधू व जवळकरांनी कौन्सिल हॉलवर ५०००

शेतकऱ्यांचा मोर्चा नेला होता. त्यांच्या शिष्टमंडळाने ४० आमदारांशी चर्चा केली, आणि ६०,००० शेतकऱ्यांच्या सह्या असलेले निवेदन त्यांना दिले. शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा अस्तित्वाचा प्रश्न होता. या प्रकरणी सरदार पटेल व महात्मा गांधी यांनी मुंबई सरकारशी बराच संघर्ष केला. शेवटी सरकारलाही आपला आडमुठेपणा व शोषक धोरणाला आवर घालावा लागला. सरकारला विधेयके लांबणीवर टाकावी लागली. **मात्र या प्रकरणामुळे भास्कर जाधव व त्यांच्या कंपूचे सरकारधार्जिणे आणि शेतकऱ्यांविषयी उदासीनतेचे धोरण अधिक स्पष्ट झाले. परिणामतः किसान वर्गाला ब्राह्मणेतर पक्षाविषयी आस्था उरली नाही.**

शेतकऱ्यांचे प्रश्न सरकारपुढे मांडण्यासाठी काँग्रेसने सरदार पटेलांच्या अध्यक्षेखाली मुंबई इलाखा लँड लीग स्थापन केली (२३ जुलै १९२९). महाराष्ट्र प्रांतिकचे अध्यक्ष या नात्याने केळकर या लीगचे उपाध्यक्ष झाले. या संघटनेशी ब्राह्मणेतर पक्षाच्या मुंबई शेतकरी परिषदेने सहकार्य केल्यास शेतकऱ्यांची बाजू अधिक बळकट होईल, असा कर्मवीर शिंदेंचा युक्तिवाद जेधे व भाऊराव पाटलांना पटला. त्यानुसार ते लँड लीगचे काम उत्साहाने करू लागले. इतर नेते मात्र या कामात उत्साह दाखवत नव्हते.

ऑगस्ट १९२९ मध्ये एका सभेत शिंदे, केशवराव जेधे वगैरे कार्यकर्त्यांनी शाहू महाराजांच्या निधनानंतर ब्राह्मणेतर पक्षाने केलेल्या कार्याचा आढावा घेतला. महाराजांनंतर ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनी फक्त कायदेमंडळांतील कार्यावरच लक्ष एकवटले, आणि त्यामुळे बाहेरचे म्हणजे समाजसुधारणांचे काम थंडावले होते. त्यांच्या टीकेचा रोख भास्कर जाधवांवर होता. या पक्षाने शेतकऱ्यांच्या हितासाठी कधीच लढा दिला नाही. अथवा शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत काँग्रेसशी सहकार्यही केले नाही. ब्राह्मणेतर पक्षाचे जातिनिदर्शक नाव बदलून 'शेतकरी पक्ष' असे ठेवावे, अशी एक सूचना होती. पण ती स्वीकारली गेली नाही. शेतकरी संघ असाही एक पर्याय सुचविला गेला. पण तो स्वीकारला नाही.

महाराष्ट्रातील बाबा रामचंद्र या ब्राह्मण भटक्याने अवध प्रांतात व विशेषतः प्रतापगड, जौनपूर व फैजाबाद जिल्ह्यांमध्ये **'किसान सभा'** व किसानांचे आंदोलन

उभारले व जवाहरलाल नेहरूंनाही त्यात प्रवृत्त केले. त्यानंतर राजस्थान व बिहारमध्येही किसान आंदोलन पसरले. कम्युनिस्ट पक्षाला उघड काम करणे अशक्य असल्याने कम्युनिस्टांनी काँग्रेसच्या छताखाली शेतकरी व कामगार पक्ष संघटित केला. बंगाल, पंजाब, उत्तर प्रदेश व मुंबई शहरात या पक्षाने कामगार वर्गाचा लढा उभारला. या पक्षाने कामगारांच्या प्रश्नांवर अनेकदा सरकारला कोंडीत पकडले. तथापि महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर पक्षाने अशा कोणत्याच संघटनांशी सहयोग साधला नाही. त्यांची मदतही घेतली नाही. नेहरू, बाबा रामचंद्र व गौरीशंकर मिश्रांनी उत्तर प्रदेशात अवध किसान सभेच्या ३३० शाखा उभारल्या. प्रतापगड, फैझाबाद, सुलतानपूर व रायबरेली जिल्ह्यांमध्ये त्यांचे किसान आंदोलन व्यापक झाले. आणि त्याच पायावर तेथे काँग्रेस संघटना भक्कम झाली. त्यांनी जमीनदारांविरुद्ध 'न्हावी-धोबी बंद' असेही आंदोलन उभारले.[१२]

महाराष्ट्रात मात्र तसे झाले नाही. ब्राह्मणेतर पक्षाने देशाचे दुष्मन, सत्यशोधक का ख्रिस्तसेवक व ब्राह्मण-मराठा अशा अनुत्पादक वादांवर शक्ती वाया घालविली. त्यामुळे किसान आंदोलन उभे राहू शकले नाही. मात्र १९२७-२८ पासून केशवराव जेधे, नाना पाटील, मुकुंदराव पाटील वगैरेंनी ब्राह्मणेतर चळवळीला वेगळी दिशा दिली. एक नवीन व्यासपीठ तयार केले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारविरोधी पवित्रा घेतला. अभूतपूर्व जागतिक मंदीमुळे कृषी व्यवसायावर पडलेले आघात व शेतकऱ्यांची दैनावस्था हा महत्त्वाचा सरकारविरोधी मुद्दा अस्सल सत्यशोधक असलेल्या नाना पाटलांनीच हाती घेतला. या नवीन वास्तववादी विचारप्रवाहामुळे **पुढील दशकात शेतकरी व कामकरी वर्गाने काँग्रेसशी नाते जुळवले व बहुजनसमाजाला १९३०-३२ व १९४२ च्या राष्ट्रव्यापी स्वातंत्र्यलढ्यात उतरवले. प्रतिसरकारच्या रूपाने नाना पाटील यांनी इंग्रजांना जे आव्हान दिले, त्याची ही पार्श्वभूमी होती.** नाना पाटील पुढे कम्युनिस्ट विचारसरणीचे शेतकरी पुढारी म्हणून विख्यात झाले ते या पार्श्वभूमीवर.

निष्ठावान सत्यशोधकांचा एक वेगळा गट होता. पण इतरांची या प्रागतिक विचारांशी बांधीलकी नव्हती. गरीब शेतकऱ्यांचे शोषण करणारे शेट सावकार व गावावर हुकूमत गाजवणारा पाटील यांच्याविरुद्ध इतरांनी कधीच झुंज दिली नाही.

जातिनिर्मूलन करण्याची भाषा बोलत ब्राह्मणांवर हल्ला करणे सोपे होते. तथापि वर्ग नष्ट करण्याची भाषा परवडण्यासारखी नव्हती. कारण त्यासाठी अब्राह्मण धनिक आणि सावकार व जमीनदारांना आव्हान देणे भाग पडले असते.

## ब्राह्मणेतर लोक काँग्रेसच्या आंदोलनात

६ एप्रिल १९३० पासून सविनय कायदेभंग आंदोलन सुरू होताच महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस समितीने विले पारले येथील मुख्य केंद्रातून मिठाच्या सत्याग्रहाचे प्रसारण व सूत्रसंचालन सुरू केले होते. त्यानुसार काँग्रेसजन सत्याग्रह करीत असताना कर्मवीर वि. रा. शिंदे, केशवराव जेधे व प्रा. धर्मानंद कोसंबी यांनीही ब्राह्मणेतरांचा एक गट संघटित केला. १० एप्रिल ते १६ एप्रिल सलग सात दिवस ही मंडळी पुण्याभोवतीच्या २६ गावांमध्ये पायपीट करीत फिरली. त्यांनी स्वातंत्र्यासाठीच्या सत्याग्रहाचा प्रचार केला. लोकांशी ते गणबोलीत बोलले. त्यांनी लोकांना गांधीजींचा संदेश दिला. येरवडा तुरुंगासमोर गेल्यावर त्यातील राजबंदी काँग्रेसजनांचा राष्ट्रीय बाणा शिंदेंच्या पथकाने समक्ष पाहिला. आतील २००० कैदी राष्ट्रपित्याचा जयजयकार करीत असल्याची शिंदेंची आठवण २० एप्रिल १९३० च्या **ज्ञानप्रकाशने** नोंदलेली आहे.

शिंदे, कोसंबी व जेधे यांच्या प्रचार दौऱ्याची सांगता पुण्यातील शिवाजी मंदिरात भरलेल्या सभेत झाली. या प्रसंगी आंदोलनाच्या सर्व आयुधांना व प्रतीकांना उचित अशी प्रसिद्धी देण्यात आली आणि नागरिकांचा प्रतिसाद मिळविण्यात आला. अज्ञानी, गरीब व शेतकरी वर्गांकरिता स्वराज्य पाहिजे हा विचार प्रसारित करण्यात आला.

२२ एप्रिल १९३० पासून कर्मवीर शिंदे व एस. एम. जोशी आणि जेधे वगैरेंनी पुणे जिल्ह्यातील इतर गावांमध्ये प्रचारसभा घेऊन मिठाचा कायदेभंग केला. म्हणून शिंदे व जोशींना सहा महिन्यांची शिक्षा झाली. तेव्हा माफी मागून सुटका करून घ्यावी, हे सांगण्यासाठी मंत्रिपदी असलेले भास्करराव जाधव शिंदेंना कारागृहात समक्ष भेटले होते. तथापि शिंदे या प्रलोभनास बळी पडले नाहीत.

बदललेल्या राजकीय परिस्थितीत ब्राह्मणेतर पक्षाने सरकारी दडपशाहीचा निषेध केला, आणि खादीचा प्रसार व दारूबंदी या धोरणांना पाठिंबा जाहीर केला. तसेच मध्यप्रांत-वऱ्हाडातील शेतसारा वाढ व जंगल कायद्याबाबतच्या अन्यायांची चौकशी करण्यासाठी पक्षाची समिती नेमली. करबंदी मोहिमेत मात्र शेतकऱ्यांनी सहभागी होऊ नये असे पक्षाचे धोरण होते. माधव खंडेराव बागलांच्या मते या पक्षाने किसानांसाठी भरीव काम केले नाही. त्यांच्या मते थोडीफार विधायक कामगिरी केली ती गुरुवर्य वि. रा. शिंदे, पंढरीनाथ पाटील, जेधेबंधू, भाऊराव पाटील व आनंदस्वामी यांनीच!

जुलै १९३० मध्ये दिनकरराव जवळकर विलायतेतून परत आले तेव्हा त्यांना वेगळाच साक्षात्कार झाल्याचे दिसले. त्यांनी मराठा बांधवांना पत्रकाद्वारे आवाहन केले की, सुरू झालेल्या नव्या महात्मा गांधी युगात जुने राजकीय पक्षोपपक्ष विसरून आपण स्वराज्यासाठी झटून प्रयत्न करूया. **"केवळ शिवाजीच्या नावाचा उच्चार करून स्वतःचा मोठेपणा मिरवण्याचे दिवस आता राहिले नाहीत.** स्वदेशी, ब्रिटिश मालाचा बहिष्कार, खादी प्रसार इत्यादी अनेक कार्यक्रमांतून आपापल्या परिस्थितीप्रमाणे जो कोणता कार्यक्रम आपल्याला रुचेल तो आपण नेटाने व मनःपूर्वक चालविला पाहिजे. सरकारशी सहकार करण्याच्या कार्यक्रमाचे मोहपटल माझ्या डोळ्यावरून तरी साफ दूर झाले आहे".[१३]

दहा वर्षांपूर्वी हा मोहपटल दूर झाला असता तर स्वातंत्र्य चळवळीला बळ लाभले असते.

ब्राह्मणेतर पक्षाने तरीही गोलमेज परिषदेला पाठिंबा दिला. पण सायमन कमिशनच्या अहवालास निराशाजनक म्हटले.

१९३० च्या मुंबई कायदेमंडळाच्या निवडणुकीत यशस्वी झालेल्या ब्राह्मणेतर पक्षाचा नेता म्हणून सिद्दप्पा कंबळी व उपनेता म्हणून नामदेवराव नवले यांची आमदारांनी एकमताने निवड केली खरी. तथापि हे एकमत सातआठ दिवसांत भंगले. नवलेंना मंत्री व्हावयाचे होते, तसेच गोलमेज परिषदेत ब्राह्मणेतर पक्षाचे प्रतिनिधी

म्हणून विलायतेची आनंदयात्रा करावयाची होती. मात्र भास्कर जाधवांना 'कंबळी मंत्री व्हावे आणि विलायतची वारी कोल्हापूरच्या दादासाहेब सुर्वे यांना लाभावी,' असे वाटत होते. यामुळे पक्षात दुफळी माजली. याच वेळी केशवराव जेधे यांनी पुण्यात जाहीर सभेत गोलमेज परिषदेचा निषेध करणारा ठराव मांडला. त्यांच्य अटकेचे वॉरंट निघताच ते मिरवणुकीने फरासखान्याकडे गेले. त्यांना तीन महिन्यांची सक्त मजुरी झाली व शिवाय एक हजार रुपयांचा दंड झाला. त्यांच्या शिक्षेचा निषेध म्हणून पुण्यात कडकडीत हरताळ पाळला गेला. त्या प्रसंगी भरलेल्या सभेत कर्मवीर शिंदे व बाळूकाका कानिटकरांनी जाहीर केले की, केशवरावांच्या तुरुंगात जाण्याने महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर वादास मूठमाती मिळाली.[१४]

दरम्यानच्या काळात दिनकरराव जवळकर, काँग्रेसच्या एका भागाचे डिक्टेटर झाले होते. १२ जानेवारी १९३१ रोजी मल्लाप्पा धनशेट्टी, जगन्नाथ शिंदे, श्रीकिशन सारडा व अब्दुल रसूल कुर्बान हुसेन या सोलापूरच्या क्रांतिकारकांना फाशी देण्यात आले. त्यांना काँग्रेसतर्फे हुतात्मे म्हणून जाहीर करण्यासाठी मुंबईत १६ जानेवारीला सोलापूर-दिन पाळण्यात आला. आझाद मैदान व परिसरात विराट जनसागर जमला होता. हायकोर्टासमोर उग्र निदर्शने झाली. गृहमंत्री हॉटसनच्या देखरेखीखाली सेनादल तैनात केलेले होते. संध्याकाळी बंदीहुकूम झिडकारून दिनकरराव जवळकर व चौघांनी आझाद मैदानावर राष्ट्रध्वज फडकावला, आणि सोलापूरच्या क्रांतिकारकांच्या स्वार्थत्यागाविषयी त्यांना अभिवादन करणारे भाषण सुरू केले. लगेच जवळकरांना व सहकाऱ्यांना अटक करण्यात आली. प्रत्येकाला १५ महिने सक्तमजुरीची शिक्षा झाली. मात्र लवकरच गांधी-आयर्विन करार झाल्यामुळे जवळकर दीड महिन्यात सुटले.

१९३० पासून ब्राह्मणेतर पक्षात मराठा विरुद्ध मराठेतर अशी दुफळी माजली. ही भावना पसरल्यामुळे सत्यशोधकांचे सामाजिक महत्त्व घटले. तसेच ब्राह्मणेतर पक्षाची राजकीय ताकद कमी होऊ लागली. ही प्रक्रिया प्रबोधनकार ठाकरे, कर्मवीर शिंदे व जवळकरांनी थांबवण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना फारसे यश लाभले नाही. ३ मे १९३२ रोजी जवळकरांचे अकाली निधन झाल्यामुळे हे प्रयत्न कमी

पडले. कंबळी व नवले यांच्यात सत्तेसाठी संघर्ष निर्माण झाला. एकूण ब्राह्मणेतर पक्षातील अंतर्कलहांमुळे या पक्षास कामगार आणि किसानांच्या समस्या सोडवण्यासाठी फारसे काही करता येत नव्हते. वि. रा. शिंदे, जेधे व माधवराव बागल यांना काँग्रेसमार्फत शेतकऱ्यांचे हित साधता येईल असे वाटे. पण काँग्रेसमध्ये निर्णायक स्थान निर्माण केलेले ब्राह्मणेतर पुढारी १९३२ पर्यंत कमीच होते. आणि जे थोडे होते त्यांचे पाय ओढण्यात येत.

२६ जानेवारी १९३२ रोजी वासूकाका जोशी व हरोलीकर पतिपत्नी या काँग्रेसजनांबरोबर सविनय कायदेभंगाच्या दुसऱ्या सत्रात भाग घेतल्याबद्दल केशवराव जेधे यांना अटक झाली. श्रीपतराव शिंदे यांचे **विजयी मराठा** साप्ताहिक त्याच वर्षी बंद पडले. नवलेंचा गट ब्राह्मणेतर पक्षातून बाहेर पडला.

१९३४ च्या कायदेमंडळाच्या निवडणुकीत केशवराव जेधे काँग्रेसचा प्रचार करू लागले. मध्यवर्ती कायदेमंडळासाठी काँग्रेसने जेधे व न. वि. गाडगीळ यांना उमेदवारी दिली. अणे-मालवीय यांच्या राष्ट्रीय पक्षातर्फे मराठा जातीच्या नारायणराव गुंजाळ यांनी निवडणूक लढवली. काँग्रेसच्या जेधेंना ब्राह्मणेतर पक्षातील कंबळी गटाने शह देण्यासाठी सरदार पाटणकर या मराठा धनिकाला पाठिंबा दिला. मात्र बहुसंख्य ब्राह्मणेतर नेत्यांनी जेधेंनाच पाठिंबा दिला. जेधे व गाडगीळ यांच्या निवडणूक मेहिमेची जबाबदारी त्र्यंबक र. ऊर्फ मामा देवगिरीकरांवर होती. **केसरी** वगैरे ब्राह्मणी पत्रके गाडगीळांच्या पराभवासाठी प्रयत्नशील तर कंबळी गट जेधेंच्या पराभवासाठी उत्सुक होता. पण दोघेही उमेदवार विजयी झाले. परिणामतः ब्राह्मणेतर पक्ष अधिक क्षीण झाला. तसेच कायदेमंडळांच्या निवडणुकीत या पक्षाला आणखीच ओहोटी लागली.

मालेगावचे तरुण वकील भाऊसाहेब हिरे काँग्रेसमध्ये आले. कंबळी व भास्करराव जाधव यांच्या ब्रिटिशधार्जिण्या आणि क्रियाहीन धोरणावर धारदार टीका होऊ लागली. कुणबी, धनगर, माळी, भंडारी, आगरी, शिंपी वगैरे ३३ तत्सम जातींना राखीव जागांचा लाभ होऊ न देता मराठेच त्या जागा पटकवतात ही जुनी तक्रार अधिक बोलकी झाली. सी. के. बोले, डोंगरसिंग पाटील व नारायण नागूजी पाटील यांनी मराठा पुढाऱ्यांची दंडेली बंद करण्याचा प्रयत्न सुरू केला. अण्णासाहेब लठ्ठे यांनी

१९३६ सालात दिवाणबहादूर किताबाचा त्याग करून १ ऑगस्ट रोजी आपल्या मित्रांसह ते काँग्रेस पक्षात आले. १९३७ सालातील मुंबई कायदेमंडळाच्या निवडणुकीत ब्राह्मणेतर पक्षाचे फक्त अकरा आमदार निवडून आले. त्यांपैकी सातारच्या शंकरराव मोहितेंनी सरकारी नोकरीचा राजीनामा दिल्यामुळे या पक्षाचे केवळ दहा सभासद उरले. १९३७ साली काँग्रेसचे मंत्रिमंडळ स्थापन झाल्यावर केशवराव बागडे व शंकरराव मोरे यांनी आपण काँग्रेसचे सभासद झाल्याचे पत्रक काढले.

पारनेर तालुक्यातील आनंदस्वामी हे मराठा गृहस्थ व महात्मा फुले यांचे चरित्रकार पंढरीनाथ सीताराम पाटील मध्यप्रांत-वऱ्हाडमध्ये ब्राह्मणेतर चळवळ चालवित होते. पण तेथील चळवळ महाराष्ट्राइतकी जोरात नव्हती. १९३७ साली काँग्रेसचे मंत्रिमंडळ स्थापन झाल्यावर, पण डॉ. ना. भा. खरे यांचे उच्चाटन केल्यावर, पंढरीनाथ पाटलांनी सरदार पटेलांशी वाटाघाटी करण्यासाठी त्यांना पत्र लिहिले. पटेल आणि जमनालाल बजाज यांनी पंढरीनाथ पाटील यांना पुढीलप्रमाणे सल्ला दिला :—'काँग्रेसचे ध्येय, कार्यक्रम व शिस्त मान्य असल्यास ब्राह्मणेतरांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करावा आणि पक्ष संघटना काबीज करावी. पण अटी अथवा वाटाघाटींचा प्रश्नच उद्भवत नाही'.

याआधी जुलै १९३७ मध्ये आनंदस्वामी काँग्रेसमध्ये आलेले होते. २० ऑक्टोबर १९३६ रोजी आनंदस्वामी व पंढरीनाथ पाटील वगैरेंनी नागपुरात केशवराव जेधेंच्या अध्यक्षतेखाली मध्यप्रांत-वऱ्हाड ब्राह्मणेतर परिषदेचे अधिवेशन भरवले होते. आपल्या पक्षाचे उद्दिष्ट व मागास समाजाचे हित साध्य करण्यासाठी काँग्रेसमध्ये प्रवेश करणेच उचित असल्याचा ठराव नागपुरात मंजूर झाला होता. वऱ्हाडमधील काँग्रेसवर असलेले ब्राह्मणांचे वर्चस्व जवळजवळ नष्ट झाल्याने, ब्राह्मणेतर पक्षाच्या सभासदांनी काँग्रेसचे सदस्य व्हावे, असा दुसरा ठराव झाला. अशा रीतीने मुंबई आणि मध्यप्रांत-वऱ्हाडमधील ब्राह्मणेतर पक्ष व चळवळीचा अस्त झाला. उरलेली थोडीशी धुगधुगी १९३९ सालात नष्ट झाली.[१५]

बहुजनसमाजातील कार्यकर्ते १९२९-३० पासूनच काँग्रेसमध्ये दाखल होत होते. बरेच जण ब्राह्मणेतर व काँग्रेस या दोन्ही पक्षांचे सभासद असत. मात्र १९३४ पासून अनेकांनी फक्त काँग्रेसबरोबर राहून राजकीय कार्य केले.

तत्कालीन महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस समितीच्या कार्यकक्षेत पुणे, ठाणे, कुलाबा, रत्नागिरी, सातारा, सोलापूर, अहमदनगर, नाशिक, पूर्व खानदेश, पश्चिम खानदेश व मुंबईची उपनगरे हे अकरा जिल्हे होते. मुख्यालय पुण्यात असून शंकरराव देव हेच प्रांतिकचे अध्यक्ष म्हणून चांगले कार्य करीत होते. तथापि काँग्रेसचे स्वरूप केवळ ब्राह्मणांचा पक्ष अशी टीका होऊ नये म्हणून शंकररावांनी उदारपणे अध्यक्षपदाची माळ केशवराव जेधेंच्या गळ्यात घातली. ते नाही म्हणत असतानादेखील ! काँग्रेस मंत्रिमंडळ अधिकारारूढ होताच बाळासाहेब खेर यांनी माजी प्रांताध्यक्ष सेनापती बापटांची कारावासातून सुटका केली. (२३ जुलै १९३७). तेव्हा बापटांनी अधिकाराचे पद न स्वीकारता त्यांनीही आग्रह धरला की, इतःपर प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्षपद ब्राह्मणेतरांकडेच जावे. देव, बापट व गाडगीळांचा आग्रहच होता की, आपला पक्ष ग्रामीण भागांमध्ये रुजविण्यास्तव व पक्षाची ताकद वाढविण्यासाठी जेधेंसारखा नेताच अधिक उपयोगी पडेल. **काँग्रेसमध्ये तेव्हा ही त्यागाची भावना होती.** त्याचे फलित म्हणून महाराष्ट्रातील अकरा जिल्हा लोकल बोर्डांपैकी दहा काँग्रेसने जिंकले. पुणे जिल्हा बोर्डातील पन्नासपैकी छत्तीस जागा मिळविल्या. शंकरराव मोरे पुन्हा बोर्डाचे अध्यक्ष झाले. या मंडळींनी पुणे नगरपालिकाही हस्तगत केली व एक भूखंड विकत घेऊन पुण्यात काँग्रेस भवन बांधले. १ ऑगस्ट १९३८ रोजी या वास्तूची पायाभरणी जेधे-गाडगीळांच्या पुढाकाराने झालेली होती.[१६]

समारोप करताना लिहिले पाहिजे की, क्षत्रियत्वाचा अहंकार, मूर्तिपूजा, धार्मिक रूढींशी बांधीलकी व वेदोक्ताचा अधिकार अशा अनिष्ट प्रवृत्तींमधून अनेक ब्राह्मणेतर पुढाऱ्यांची सुटका झालेली नव्हती. बरेच ब्राह्मणेतर पक्षाचे लोक स्वतःला दुय्यम दर्जाचे ब्राह्मण समजत. ब्राह्मणेतर नेत्यांनी मंत्रिपदे उपभोगली, परंतु शेतकरी व कामकऱ्यांसाठी कायदे पास करून घेण्याचे कष्ट घेतले नाही. म्हणून हा पक्ष निरुपयोगी ठरला होता. अखेरीस तो राष्ट्रीय काँग्रेसच्या प्रवाहात आला आणि या पक्षाने बहुजनसमाजाचे कल्याण केले.

❑❑

## संदर्भ

१. एस. आर. मेहरोत्रा, **इंडिया अँड द कॉमनवेल्थ** : १८८५-१९२९, लंडन, १९६५, पृ. १०३.

२. य. दि. फडके, **शाहू छत्रपती व लोकमान्य,** पृ. २३२-३९.

३. फडके, **विसाव्या शतकातील महाराष्ट्र,** खंड दुसरा, पृ. २२६.

४. केशव सीताराम ठाकरे, **माझी जीवनगाथा,** महाराष्ट्र शासन, १९७३, पृ. २१०-११.

५. **लट्ठे पत्रव्यवहार,** लट्ठे यांचे राजाराम महाराजांना पत्र, ७ सप्टेंबर १९२२.

६. ठाकरे, उपरोक्त, पृ. २४४-४५.

७. फडके, **विसाव्या शतकातील महाराष्ट्र,** खंड तिसरा, पृ. २२७-३१.

८. बॉंबे प्रेसिडेंसी पोलीस ॲबस्ट्रॅक्ट ऑफ इंटेलिजंस, २४ मार्च १९२२.

९. **हंटर,** २२ जुलै १९२७.

१०. फडके, उपरोक्त, खंड तिसरा, पृ. २३७.

११. **विजयी मराठा,** २७ ऑगस्ट १९२८.

१२. सुमित सरकार, **मॉडर्न इंडिया,** पृ. २०४.

१३. **केसरी,** २ ऑगस्ट १९३०.

१४. कित्ता, २९ नोव्हेंबर १९३०.

१५. फडके, उपरोक्त, खंड ४ था, पृ. २५२-६७.

१६. के. के. चौधरी, **झुंजार पुणे,** पृ. २६१.

प्रकरण ७

## स्वराज्य पक्ष व प्रांतिक राजकारण

मॉंटेग्यू-चेम्सफर्ड राज्यसुधारणा कायद्यानुसार (१९१९) प्रांतिक कायदेमंडळांच्या निवडणुका नोव्हेंबर १९२० मध्ये झाल्या. तरी प्रांतिक कायदेमंडळांचे कामकाज सुरू होण्यास बरीच प्रतीक्षा करावी लागली. बादशहा पाचवे जॉर्ज यांचे युवराज मुंबईत आल्यावर २३ फेब्रुवारी १९२१ रोजी मुंबई इलाखा कायदेमंडळाचे औपचारिक उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले होते. पूर्वीच्या सेलर्स होमच्या दगडी इमारतीत तेव्हा कायदेमंडळ भरले होते. हा शासकीय सोहळा भव्य व दिमाखदार असला, तरी त्यावर अखिल मुंबईकरांचा बहिष्कार होता. मुंबई शहर कॉंग्रेस, कामगारांचे प्रतिनिधी व युसुफ मेहेरअली, बॅ. के. एफ. नरिमन वगैरेंची विद्यार्थी सेना यांनी युवराजांना परत जाण्यास फर्मावले होते. शहरभर युवराजांच्या निषेधाचे नारे गाजत होते. तेव्हा असहकार आंदोलनाचा प्रभाव सर्वत्र दिसत होता. **प्रकरण दोनमध्ये** म्हटल्याप्रमाणे एल्फिन्स्टन मिलमधील विदेशी कपड्यांची उंच होळी स्वतः युवराजांनी मुंबई बंदरातूनही पाहिली होती. नवीन सांविधानिक कायद्यानुसार भारतीयांनाअत्यल्प लाभ होणार असे कॉंग्रेसचे मत होते. म्हणून त्यावर बहिष्कार टाकलेला होता.

हा राज्यसुधारणा कायदा अमलात येईपर्यंत मध्यप्रांत-वऱ्हाड या प्रदेशास स्वतंत्र प्रांताचा दर्जा नव्हता. म्हणून या प्रदेशावर गव्हर्नरचा अंमल नसून चीफ कमिशनर हाच प्रादेशिक प्रमुख म्हणून प्रशासन चालवत असे. या कायद्यानुसारच मध्यप्रांत-वऱ्हाडला प्रथमतः प्रांताचा दर्जा लाभला आणि सर फ्रँक स्लाय हे पहिले गव्हर्नर नेमले गेले. विशेष असे की, ही लहानशी प्रशासकीय सुविधा मिळण्यासाठीही, कॉंग्रेसला बरीच वर्षे ब्रिटिशांशी झगडावे लागले लागले होते. लाहोरमध्ये १९०९ मध्ये भरलेल्या कॉंग्रेस अधिवेशनात ठराव करण्यात आला होता की, मध्यप्रांत-वऱ्हाड प्रदेशास पूर्ण प्रांताचा दर्जा देण्यात यावा. तेव्हापासून दरवर्षी कॉंग्रेस अधिवेशनात याबाबत सतत मागणी करण्यात येई. अमरावतीचे रघुनाथराव मुधोळकर व नागपूरचे डॉ. हरीसिंग गौर यासाठी सतत कॉंग्रेसच्या व्यासपीठावरून मागणीकरीत. ८ नोव्हेंबर १९१३ रोजी मध्यप्रांत-वऱ्हाड कायदेमंडळाची घोषणा झाली व नागपुरात

विधानभवनाची कोनशिला बसविण्यात आली. तथापि इमारत बांधून झाली नव्हती. म्हणून १६ ऑगस्ट १९१४ रोजी कायदेमंडळाची पहिली बैठक नागपूरमधील सेक्रटेरिअटच्या वाचनालयात भरली होती. एकूणच विधानभवनाची प्रगती मंदमंद होती. गव्हर्नरच्या नेमणुकीनंतरच प्रगती झाली. १९२१ साली येथेही कायदेमंडळ अस्तित्वात आले. पण त्यावर काँग्रेसचा बहिष्कार होता.[१]

## स्वराज्य पक्षाची स्थापना

महात्मा गांधींच्या आवाहनानुसार वकिलीचा समृद्ध आणि उत्कर्षशाली व्यवसाय व गडगंज कमाईवर चित्तरंजन दास (ज. १८७०) आणि मोतीलाल नेहरू (ज. १८६१) यांनी कायमचे उदक सोडले होते. या दोघांनी अनुक्रमे कोलकाता व अलाहाबादमधील आपले राजमहालांसारखे प्रासाद राष्ट्राला अर्पण केले. दोघेही गांधीजींचे प्रांजळ स्तुतिपाठक व चाहते होते. राजकारणातील समतुल्य नेते होते, विलक्षण बुद्धिवान संसदपटु व वक्ते होते. दोघेही अंतर्बाह्य धर्मनिरपेक्षतावादी व पुरोगामी विचारसरणीचे होते. दोघांची मते भिन्न असली, तरी ते राजकारणात एकमेकांना पूरक होते. तत्कालीन भारताच्या राजकारणात त्यांची युती अभेद्य होती. चित्तरंजन दास मित्रांप्रमाणे शत्रूंवरही प्रभाव पाडत. मोतीलालजी विलक्षण ठाम पण शांतपणे विश्लेषण करणारे आणि शिस्तप्रिय संघटनपटु होते. त्यांच्यात आणि गांधीजींमध्ये परस्पर विश्वास होता. गांधीजी कारावासात असतानाही, दास व नेहरूंचा त्यांच्याशी कोणत्या तरी माध्यमातून विचारविनिमय होतच असे.

असहकार चळवळ निलंबित केल्यावरही असहकार व स्वदेशी आणि बहिष्कार कार्यक्रम तसेच विधायक कार्य पूर्ववत चालू ठेवावे, असा बहुसंख्य गांधीवाद्यांचा आग्रह होता. या काँग्रेसजनांना 'नो-चेंजर' म्हणजे **ना-फेरवादी** अशी संज्ञा होती. मात्र राजद्रोहाच्या आरोपाखाली गांधीजींना सहा वर्षांची शिक्षा झाल्यामुळे (१८ मार्च १९२२) राष्ट्रवादी गोटात मतभेद, विभाजन, विग्रह व विघटन होण्याचा आणि नीतिधैर्य खचण्याचा संभव होताच. स्वराज्याची चळवळ क्षय पावेल आणि शस्त्रवादी युवक हिंसक कृत्ये करतील, अशीही भीती होती. शस्त्रवाद दडपण्यासाठी साम्राज्यशहा समर्थ होतेच. अशा अगतिक स्थितीतून वाट काढण्यासाठी चित्तरंजन दास,

मोतीलालजी, विठ्ठलभाई पटेल व हकीम अजमल खान यांनी वसाहतवादी सत्ताधीशांशी संघर्ष करण्यासाठी काँग्रेसपुढे वेगळे धोरण सादर केले. त्यांनी सुचविले की, लेजिस्लेटिव्ह कौन्सिलांवरील बहिष्कार मागे घेऊन त्यांच्यात प्रवेश करावा अणि नवीन कायद्यानुसार निर्माण झालेल्या कायदेमंडळांची विफलता(Sham Parliaments) उघड करावी. तसेच नोकरशाहीची दुष्कर्मे कायदेमंडळांमध्ये उघड करावी आणि सरकारची कोंडी करावी, असा विचार दास बाबू व मोतीलालजी यांनी मांडला. डिसेंबर १९२२ मधील काँग्रेसच्या गया अधिवेशनाचे अध्यक्ष चित्तरंजनजी आणि सरचिटणीस मोतीलालजी यांनी " Either mending or ending the Councils ", " Swaraj for the masses and not for the Classes " अशी राजकीय भूमिका मांडली.

जवाहरलालजी अद्याप तुरुंगातच होते. मात्र वल्लभभाई पटेल, राजेंद्र प्रसाद, डॉ. अन्सारी, राजगोपालाचारी, कस्तुरीरंगा अय्यंगार, शंकरराव देव यांनी हा प्रस्ताव १७४८ विरुद्ध ८९० मतांनी गया अधिवेशनात फेटाळून लावला. त्यामुळे गांधीजींनी विहित केलेले धोरणच पुढे चालू ठेवण्याचा प्रस्ताव अमलात आला. याचे विवेचन प्रकरण क्रमांक दोनमध्ये आलेले आहेच.

गया काँग्रेसच्या निर्णयानुसार चित्तरंजन दास, मोतीलालजी वगैरेंनी पक्षपदांचे राजीनामे दिले आणि १ जानेवारी १९२३ रोजी 'काँग्रेस-खिलाफत स्वराज पार्टी' स्थापन करण्याची घोषणा केली. हिलाच 'स्वराज्य पक्ष' हे नाव मिळाले. चित्तरंजन दास या पक्षाचे पहिले अध्यक्ष तर मोतीलाल नेहरू एक चिटणीस झाले. मात्र स्वराज्य पक्ष हा काँग्रेसमधीलच 'चेंजर' म्हणजे फेरवादी गट म्हणून कार्यरत राहिला.

मात्र नाफेरवादी आणि फेरवादी या गटांमध्ये नंतर अत्यंत उग्र स्वरूपाचे वाद निर्माण झाल्यावाचून राहिले नाहीत. मुंबईव्यतिरिक्तचा महाराष्ट्र व विशेषतः पुण्यातील राजकीय वादंगाला अनेक वेळा अत्यंत अनिष्ट वळण लागले. पण ते नंतर पाहू. अखिल भारतीय पातळीवर या दोन गटांमध्ये वादंग माजले, तरी त्यांच्यात पुष्कळ समान दृष्टिकोण आणि उद्दिष्टांबाबत एकमत होते. गांधीजी कारावासात असल्यामुळे 'सविनय कायदेभंग लढा' उभारणे अशक्य होते ही वस्तुस्थिती होती. 'मास मुव्हमेंट' अमर्याद काळापर्यंत चालू ठेवणेही शक्य नव्हते. म्हणून तात्पुरती माघार घेऊन

पुनर्संघटन करावे व साम्राज्यशाहीविरुद्धचे सर्व राजकीय गट एकत्र करून फळी उभारावी असा फेरवादी गटाचा विचार होता. वस्तुतः काँग्रेसजनांचे नीतिधैर्य खचले होते आणि आमजनतेचा प्रतिसाद घटला होता. चळवळीत आलेली अगतिकता व विभाजन आणि संघटनेत आलेली शिथिलता या समस्या उद्‌भवल्या होत्या. राजकीय जनजागृती करून चळवळीचा पाया अधिक व्यापक करण्याची गरज होती. प्रचारयंत्रणा कार्यक्षम करणे, मोठा जनाधार मिळवणे व सुसज्ज मनुष्यबळ उभारणे आणि स्वयंसेवकांची भरती करणे, प्रशिक्षण देऊन पथके तयार करणे, निधी गोळा करणे वगैरे प्रश्न समोर होते. राष्ट्रीय चळवळीपुढे अशा अनेक समस्या होत्या. म्हणून १९२३ सालातील निष्क्रिय अवस्थेत राजकीय कार्य कसे चालवायचे हा गहन प्रश्न होता.

काँग्रेसमधील दोन्ही गटांनी या प्रश्नांचे उत्तर भिन्न भिन्न पद्धतीने दिले. राजकारणत उद्‌भवलेली तात्पुरती पोकळी भरून काढण्यासाठी कायदेमंडळांमध्ये प्रवेश करून नोकरशाहीला नमवावे ; शासनाच्या 'कमिशन अँड ओमिशनच्या' चुका उघड कराव्या आणि 'कायदेमंडळांची सुधारणा करावी अथवा त्यांचा अंत घडवावा' हे दास बाबू व मोतीलाल नेहरूंचे उत्तर होते. यामुळे जागृत भारतीयांचे नीतिधैर्य टिकून राहील व वर्तमानपत्रांमधील कोरे रकाने भरून राहतील व लोकांमध्ये उत्साह कायम राहील असे ते म्हणत. निवडणूक समयीचा प्रचार आणि कायदेमंडळांमधील भाषणांमधून राजकीय आशाआकांक्षा मांडता येतील व प्रचार करता येईल असे त्यांचे तर्कशास्त्र होते.[२]

याउलट नाफेरवादी गटाला कायदेमंडळांचे आकर्षण नव्हते. किंबहुना त्यांना तो मार्ग विफल वाटत होता. त्यांना असे वाटे की, एक तर हटवादी व आत्मकेंद्रित सनदी नोकरशाही आपला दुराग्रह सोडणार नाही किंवा इंग्लंड-परायण आर्थिक व वाणिज्यवादी धोरणापासून सरकार हटणार नाही. खरे तर ब्रिटिश प्रशासन पद्धतीचा इतिहास तसाच होता. याशिवाय कायदेमंडळांमधील सरकारी सभासद, सरकारनियुक्त सभासद आणि राखीव मतदारसंघांचे सभासद, संस्थानिक व व्यापारी यांचे प्रतिनिधी यांचे स्पष्ट व हुकमी बहुमत असल्याने, लोकनियुक्त सभासदांचा प्रभाव पडण्याची

शक्यताच नव्हती. याशिवाय मद्रासमधील जस्टिस पार्टी, महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर पक्ष यांसारखे हितसंबंधीय गट सरकारच्या विरोधात जाण्याची शक्यता नव्हती. नाफेरवाद्यांना वाटत होते की, कायदेमंडळांमध्ये जाण्याने राष्ट्रीय जनजागरण कार्य व क्रांतिकार्याचा उत्साह नष्ट होईल ; राजकीय भ्रष्टाचार वाढेल ; गटबाजीचे राजकारण वाढेल ; निवडणुकीत पराभूत झालेले उमेदवार निष्क्रिय होतील. काँग्रेसजन सांविधानिक कामातच व्यग्र होऊन सरकारने देऊ केलेली लहानसहान सुधारणांची आमिषे स्वीकारतील. म्हणजे कायदेमंडळांमध्ये जाऊन ती सुधारण्याचे अथवा त्यांचा अंत घडवून आणण्याचे उद्दिष्ट पराभूत होईल. म्हणून या फंदात न पडता लवकरच सविनय कायदेभंग लढा उभारण्याचीच तयारी करावी, असा नाफेरवाद्यांचा पवित्रा होता.

गया काँग्रेसमध्ये गांधीवादी नेत्यांनी ‘विधायक कार्यक्रम’ आणि ग्रामीण भागात राजकीय प्रबोधन चालू ठेवावे, असा ठराव संमत केला. कुशाग्र बुद्धिमत्ता व युक्तिवाद करण्याचे कौशल्य असलेल्या राजाजींनी गया अधिवेशनाचा फड गाजविला आणि जिंकलाही ! अखेर नाफेरवाद्यांचा विजय झाला. गौतम बुद्धाच्या गयेमधील महत्त्वाची फलनिष्पत्ती ही होती की, कायदेमंडळांवरचा बहिष्कार पुढेही चालूच ठेवावा; तसेच शाळा-कॉलेजांवरील बहिष्कार व न्यायालयांवरीलही बहिष्कार सुरू ठेवावा, अशा आशयाचे ठराव काँग्रेसने संमत केले.

गया अधिवेशनातील माहोल पाहता आपण अल्पमतात असून बहुमत नाफेरवाद्यांच्याच (१७४० विरुद्ध ८९०) बाजूने आहे, याची स्पष्ट कल्पना दास बाबू व मोतीलाल नेहरूंच्या गटाला आली. त्यानुसार त्यांनी स्वराज्य पक्ष स्थापन केला. (जानेवारी १९२३).

टिळकभक्त न. चिं. केळकर, भोपटकर, बॅ. जयकर, मुंजे, अणे, खापर्डे वगैरे मराठी नेते आधीपासूनच नवीन पक्ष काढण्याच्या मताचे होते. पण त्यांची मोठी समस्या होती जनाधार मिळवण्याची. टिळकांचे उत्तराधिकारी म्हणून महात्मा गांधींनी केळकरांना महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस समितीचे अध्यक्षपद १९२१ मध्ये बहाल केलेले होते. पण नवीन परिस्थितीत या नेत्यांना कायदेमंडळांमध्ये अधिकारपदे हवी होती. याबाबतचा संघर्ष आधीपासून सुरू झालेला होता. केळकरांनी आपली भूमिका

स्पष्टपणे मांडण्यासाठी आणि स्वतःचा बचाव करण्यास मोकळीक मिळावी यासाठी महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आणि त्या पदावर आपलेच समविचारी असलेले जमनादास मेहता यांना बसविले होते. ही एक राजकीय खेळी होती. म्हणून त्यामुळे प्रांतिकच्या फेरवादी भूमिकेत बदल झालाच नाही.

वऱ्हाड आणि मध्यप्रांतातील दोन्ही प्रांतिक काँग्रेस समित्या फेरवादी गटाच्याच ताब्यात होत्या. काही काळ गांधीजींचे अनुयायी झालेले वीर वामनराव जोशी पूर्ववत केळकरांच्या गटात जाऊन बसले होते. दादासाहेब खापर्डे, मुंजे, अणे, जोशी आणि या प्रदेशातील इतर मराठी काँग्रेसजन हे तर फेरवादी गटातच होते. विदर्भातील फेरवादी व नाफेरवादी गटांमधील मतभेद मिटविण्यासाठी काँग्रेस अध्यक्ष हकीम अजमल खान, टी. प्रकासम् आणि अनेक नेत्यांनी पुष्कळ प्रयत्न केले. पण त्यांना यश आले नाही.

२८ नोव्हेंबर १९२२ रोजी विरारमध्ये महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस समितीची बैठक घेण्यात आली होती. या बैठकीत दोन गटांमध्ये सामोपचार अथवा समेट तर झाला नाहीच, पण जोरदार संघर्ष मात्र झाला. गांधीजींचे शिष्य आणि निष्ठावंत नाफेरवदी असलेल्या शंकरराव देवांनी त्या फेरवादी व नाफेरवादी गटांमधील लढाईस 'कौरव-पांडवांचे युद्ध' म्हटले आहे. त्यांनी लिहिले आहे की, ''विरारच्या कुरुक्षेत्राचा शंख नाफेरवाद्यांनी पुणे शहर व पुणे जिल्हा काँग्रेस कमिटी आपल्या ताब्यात घेऊन फुंकला ..... मी तर नाफेरवाल्या पक्षाचा अर्जुनच''. विरारमध्ये फेरवादी लोक खूप आक्रमक होते. तरीही नाफेरवादी काँग्रेस गटाचे वामन विठ्ठल दास्ताने (भुसावलचे) यांनी अध्यक्षपद पटकावले होते. बैठकीत धक्काबुक्कीही झाली होती. नाफेरवादी गटाचे निष्ठावंत कार्यकर्ते शिवराम महादेव परांजपे यांनी दोन गटांमधील सख्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केलेही होते. तथापि केळकर गट समेटास तयारच नव्हता. परिपामतः काही काळ पश्चिम महाराष्ट्रातच दोन प्रांतिक काँग्रेस समित्या होत्या. त्यांच्यातील तंटे काँग्रेस श्रेष्ठींना त्रासदायक ठरत असत.[३]

त्यातून महाराष्ट्राचे राजकीय नुकसानही होत असे. शंकरराव देव आणि केळकरांनी १ ऑगस्ट १९२७ रोजी टिळक पुण्यतिथीच्या पुण्यातील मेळाव्यात धोरणात्मक समेट घडवून आणला, तेव्हापर्यंत ही परिस्थिती चालू राहिली. पण त्यानंतर ही सहकार्याची

भावना फार काळ टिकली नाही. स्वदेशी व बहिष्कार आणि कायदेमंडळात प्रवेश अथवा अधिकारपदे स्वीकारणे याबाबत या उभय पक्षांमध्ये एकमत झाले नाही. नंतरही कधी त्यांची राजकीय सहमती होऊ शकली नाही.

गया काँग्रेस अधिवेशनातही केळकर वगैरेंच्या महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस समितीने आपले हसे करून घेतले होते. तेथे उपस्थित असलेले कट्टर नाफेरवादी पुढारी शंकरराव देव लिहितात, "महाराष्ट्राची स्थिती (तेथे) तर अगदी केविलवाणी म्हणा अथवा लाजिरवाणी अशी होती. ....... जणू महाराष्ट्रात भाऊबंदकी चालू होती ......... इतके निश्चित ठरले होते की, महाराष्ट्राचे नाव पुकारले गेले की, प्रतिनिधींमध्ये हास्यध्वनी उमटावयाचा". [४] पूर्वाश्रमीचे टिळकभक्त व सहकारी असलेले गंगाधरराव देशपांडे, शिवरामपंत परांजपे, कृ. प्र. खाडिलकर वगैरे नेते नाफेरवादी गटात विराजमान झाले. गया अधिवेशनानंतरही देशपांडे व परांजपे यांनी केळकर गटास समजवण्याचा खूप प्रयत्न केला, पण त्यांना अपयश आले. गया अधिवेशनानंतरही कित्येक महिने महाराष्ट्रात दोन समांतर काँग्रेस प्रांतिक समित्या अस्तित्वात राहिल्या.

शंकरराव देव हे या प्रांताचे काँग्रेस नेते मानले जाऊ लागले. मुंबई काँग्रेसची स्थिती मात्र अधिक चांगली होती. शंकररावांचे राष्ट्रीय काँग्रेसमधील स्थान उत्तरोत्तर वाढतच गेले. ठाम काँग्रेसनिष्ठ नेता म्हणून देवांची प्रतिमा चमकत राहिली. छोडो भारत लढ्यापर्यंत प्रत्येक आंदोलनात तसेच रचनात्मक कार्यात त्यांचा पुढाकार होता. कोणत्याही पदाची अभिलाषा न बाळगता शंकररावांनी सातत्याने स्वातंत्र्यलढ्याला वाहून घेतले होते.

## स्वराज्य पक्षाची मुंबई शाखा

मुंबईचे राजकीय व आर्थिक महत्त्व ओळखून स्वराज्य पक्षानेही मुंबई प्रांतिक स्वराज्य पक्षाची शाखा स्थापन करण्याचा निर्णय घेतला होता. ही शाखा मुं. प्रां. काँग्रेस समितीच्या आकृतिबंधानुसारच असणे स्वाभाविक होते. गया अधिवेशनानंतर काँग्रेस अध्यक्ष चित्तरंजन दास यांच्या सूचनेनुसार बॅ. जयकर, जमनादास मेहता, विठ्ठलभाई पटेल, जे. के. मेहता, के. नटराजन, पुरषोत्तम त्रिकमदास, झाबवाला,

बाळ गंगाधर खेर, ए. जी. मुळगावकर, शांताराम नारायण दाभोळकर, एम. डी. नानावटी, के. एफ. नरिमन वगैरेंनी ८ मे १९२३ रोजी मुंबई स्वराज्य पक्षाची शाखा स्थापन केली. या शाखेत हिंदू व पारशी असले, तरी शहरातील प्रमुख मुसलमान तिच्यात नव्हते. गांधीवादी मौलाना महंमद अली व शौकत अलींच्या प्रभावामुळे समितीत मुसलमान नसावे. निधी गोळा करणे व अधिकाधिक सभासद नोंदविण्यासाठी या पक्ष शाखेने शहरात चार उपशाखा उघडल्या. गांधीजींच्या असहकार चळवळीमुळेच राष्ट्रीय जनजागरण झाले, असा प्रचार स्वराज्य पक्षानेही मनापासून केला. तथापि त्या चळवळीमुळे ब्रिटिश सत्ताधीशांना आपली शक्ती संग्रहित करणे व दृढ करणे शक्य झाले, असा दावा करण्यात आला. त्या शक्तीला पायबंद घालणे शक्य व्हावे यासाठी आमचा पक्ष कायदेमंडळात ताकद लावेल, असे या पक्षाने जाहीर आश्वासन दिले. न्यायालये आणि शाळा-महाविद्यालयांवरील बहिष्कार अल्पप्रमाणात यशस्वी झाला होता. म्हणून त्याचा पाठपुरावा करणे विफल ठरेल हा त्यांचा एक मुद्दा होता. सुधारणा करण्याचे भासवून सरकार अन्यायकारी कायदे करते, हे त्यांचे मत सत्याधारित होते. शिवाय राजनिष्ठ आणि हितसंबंध जोपासणारे सभासद कायदेमंडळांमध्ये जाऊन बसलेले होतेच. त्यांचा मुकाबला करणे गरजेचे होऊन बसले आहे, असे मुंबईतील स्वराजिस्ट उघड करू लागले. याच वेळेला बाळ गंगाधर खेर यांचा उदय झाला आणि ते पुढे १९३७ व १९४६ मध्ये मुंबई इलाख्याचे पंतप्रधान झाले.[५]

महाराष्ट्र स्वराज्य पक्षापेक्षा मुंबई शाखेत मतभेद कमी असले, तरी इथेही अल्पावधीत मतभेद निर्माण झालेच. एका बाजूला बॅ. जयकर आणि नटराजन तर दुसऱ्या बाजूला विठ्ठलभाई पटेल व जमनादास मेहता असे दोन गट निर्माण झाले. मतभेदांचा मुख्य मुद्दा कायदेमंडळांच्या निवडणुकीसाठी उमेदवार निवडण्यातूननिर्माण झाला होता. पक्षाने अनुसरावयाचे तत्त्व व कार्यपद्धती या कारणांवरूनही मतभेद उद्भवले. अशा परिस्थितीत जयकर, नटराजन, दाभोळकर व इतर आठ जणांनी राजीनामे दिले. ९ जुलै १९२३ च्या **टाइम्स ऑफ इंडिया** पत्रकाने म्हटले की, या पक्षातील मतभेद मूलभूत स्वरूपाचे होते. अखेरीस स्वराज्य पक्षाच्या कार्यकारिणीने मुंबई शाखेचे पुनर्घटन केले. त्यानुसार विठ्ठलभाई पटेल अध्यक्ष झाले आणि

जमनादास मेहता, मोतीराम वेलकर व भुलाभाई देसाई उपाध्यक्ष झाले. रामभाऊ ना. मंडलिक, जे. के. मेहता, आर. एच. भडकमकर आणि अप्पाभाई देसाई यांना मुंबई पक्ष शाखेचे चिटणीस करण्यात आले. त्यानंतर स्वराज्य पक्षाचा निवडपूक प्रचार मुंबईत जोरात सुरू झाला.

अधिकृत काँग्रेस पक्षाने आगामी १४ नोव्हेंबर १९२३ च्या कायदेमंडळांच्या निवडणुकींवर बहिष्कार घातलेलाच होता. त्यामुळे स्वराजिस्टांना ही निवडणूक सोपी झालेली होती. शिवाय नारायण मल्हार जोशी वगैरेंच्या मॉडरेट पक्षाची बरीच पडझड झालेली होती. म्हणून विठ्ठलभाई पटेल मुंबईतून स्वराज्य पक्षाचे उमेदवार म्हणून मध्यवर्ती कायदेमंडळावर सहज निवडून आले होते. तथापि याच पक्षाचे हुसेनभाई ए. लालजी यांना मुस्लीम मतदारसंघात पराभव पत्करावा लागला होता. मुंबई इलाखा कायदेमंडळात मुंबईसाठी असलेल्या नऊ जागांपैकी सहा जागा स्वराज्य पक्षाने जिंकल्या होत्या. वीर नरिमन, जे. के. मेहता, पुंजाभाई ठाकरसी, मोतीराम वेलकर, जफरभाई लालजी व बॅ. जयकर यशस्वी झाले होते. जयकर मुंबई विद्यापीठ मतदारसंघातून विजयी झाले होते.

## महाराष्ट्र स्वराज्य पक्ष

न. चिं. केळकर, ल. ब. भोपटकर, डॉ. मुंजे, अणे, जयकर, बॅ. मोरेश्वर अभ्यंकर, बाबासाहेब परांजपे, शंकर श्रीकृष्ण देव वगैरे महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे प्रमुखहोते. परप्रांतीय देशभक्तांनी त्यांच्यावर टीका करताना त्यांना सत्तापिपासू आणि सत्तेसाठी उतावीळ अशी विशेषणे लावली होती. त्याबाबत खुलासा करताना केळकरांनी उत्तर दिले की, “ महाराष्ट्राला कपटी म्हणण्यात येते. मी राजकारणात हे भूषणच मानतो. महाराष्ट्र राजकारण जाणतो.......... ”[६]

गांधीनिष्ठ गंगाधरराव देशपांडे, कृ. प्र. खाडिलकर आणि शि. म. परांजपे व त्यांचे चाहते मात्र अधिकृत काँग्रेसमध्येच राहिले. त्यांनी हयातभर कोणत्याही पदाची अभिलाषा बाळगली नाही. त्यांनी कायदेमंडळात जाणे हे अपमानास्पद मानले आणि आपले ब्रीद पाळले.

दरम्यान जवाहरलाल नेहरू व मौलाना आझाद यांनी फेरवादी आणि नाफेरवादी या गटांमध्ये तात्पुरती दिलजमाई घडवून आणली. पण ती टिकली नाही. पंजाबात हिंदू-मुसलमान दंगे उसळले. मार्च १९२३ मध्ये व्हाइसरॉयने खास अधिकार वापरून वित्तविषयक विधेयक मंजूर करून घेतले होते. शिवाय मिठावर जबर कर बसवला. तथापि दोन गटांमधील सुंदोपसुंदीमुळे दुर्बल झालेली काँग्रेस त्याविरुद्ध लढादेऊ शकली नव्हती. म्हणूनच बदललेल्या परिस्थितीत निदान कायदेमंडळांचा मार्ग खुला करावा या उद्देशाने कायदेमंडळांच्या निवडणुका लढवण्यास काँग्रेस श्रेष्ठींनी परवानगी दिली.

## कायदेमंडळाची निवडणूक

मुंबई इलाख्यातील महाराष्ट्राच्या सात जिल्ह्यांकरिता मिळून मध्यवर्ती कायदेमंडळात केवळ दोन जागा होत्या. न. चिं. केळकर कायदेमंडळाची निवडणूक लढविण्यासाठी १९२० पासूनच मनसुबा करीत होते. वस्तुतः शंकरराव देव, त्र्यंबकराव हरोलीकर व विनायकराव भुस्कुटे यांचे **स्वराज्य** पत्रक केळकरांविषयी व त्यांच्या स्वार्थी मनसुब्यांविषयी नापसंती व्यक्त करत असे. तरीही केळकरांनी आपली उमेदवारी ऑगस्ट १९२३ च्या प्रारंभीच घोषित केली होती. या दोन्ही जागांवर स्वराज्य पक्षाने आपले उमेदवार म्हणून केळकर व डॉ. कृष्णाजी गो. लोहोकरे यांची नावे घोषित केली. हे दोन्ही उमेदवार विजयी झाले (१४ नोव्हेंबर १९२३). केळकरांना सर्वाधिक मते मिळाली होती. मध्यप्रांत-वऱ्हाडातून बॅ. मोरेश्वर अभ्यंकर व माधवराव अणे आणि मराठी कर्नाटकातून दत्तोपंत बेळवी हे स्वराजिस्ट विजयी झाले. अन्य खास मतदारसंघांमधून साताऱ्याचे सरदार मुतालिक आणि कौन्सिल ऑफ स्टेट या वरिष्ठ सभागृहात रघुनाथ पांडुरंग करंदीकर निवडून आले. कामगारांचे प्रतिनिधी म्हणून सरकारने नारायण मल्हार जोशी यांची नेमणूक केली. मध्यवर्ती कायदेमंडळासाठी मुंबई शहराचे दोन उमेदवार निवडावयाचे होते. यांपैकी एका जागेवर स्वराज्य पक्षाचे नेते विठ्ठलभाई पटेल मोठ्या मताधिक्याने निवडून आले होते.

मध्यवर्ती कायदेमंडळात स्वराज्य पक्षाचे हिंदुस्तानातून एकूण ४५ सभासद निवडून आले होते. सभागृहातील या खासदारांच्या संसदीय पक्षाचे नेते म्हणून मोतीलाल

नेहरू तर उपनेतेपदी विठ्ठलभाई पटेल, चिटणीस ए. रंगास्वामी अय्यंगार आणि प्रतोद म्हणून केळकरांची निवड झाली.

मुंबई कायदेमंडळाच्या एकूण १११ जागांपैकी २५ जागा सरकारी अधिकाऱ्यांसाठी, तर २७ जागा मुसलमानांसाठी राखीव होत्या. शिवाय ६ जागा व्यापाऱ्यांसाठी, २ युरोपियनांसाठी, ३ युरोपियन व्यापाऱ्यांसाठी व २ सरदार-इनामदारांसाठी राखीव होत्या. उरलेल्या केवळ ४६ जागांसाठीच स्वराज्य पक्षाला निवडणूक लढविणे अनुज्ञेय होते. मात्र या पक्षाने यापैकी केवळ २८ जागांसाठीच उमेदवार उभे केले. यापैकी २३ स्वराजिस्ट निवडून आले. हे यश कमी नव्हते. स्वराज्य पक्षाच्या विजयी उमेदवारांमध्ये बॅ. जयकर, लक्ष्मण ब. भोपटकर (अण्णासाहेब), बॅ. के. एफ. नरिमन, डॉ. मोतीराम बाळकृष्ण वेलकर, शंकर श्रीकृष्ण देव, नारायणराव गुंजाळ हे प्रमुख होते.

मध्यप्रांत-वऱ्हाडसाठी एकूण ७० जागा होत्या. त्यापैकी २ सदस्य राखीव खात्यांचा कारभार पाहणारे गव्हर्नरच्या कार्यकारिणीचे सदस्य होते. हे दोन्ही पदसिद्ध सभासद होते. त्यांव्यतिरिक्त १५ सभासदांची नियुक्ती ब्रिटिश सरकारने केली. म्हणजे १७ सरकारी सदस्य वगळता ५३ जागांसाठीच निवडणूक झाली होती. त्यांपैकी स्वराज्य पक्षाने ४१ जागांवर विजय मिळविला आणि या पक्षाला पाठिंबा दिलेले ४ स्वतंत्र उमेदवारही निवडून आणले. स्वराज्य पक्षाचे हे यश नेत्रदीपक मानले गेले होते. स्वराज्य पक्षाच्या विजयी आमदारांमध्ये राघवेंद्रराव, डॉ. बा. शि. मुंजे, डॉ. ना. भा. खरे, रविशंकर शुक्ला, श्रीपाद बळवंत तांबे, रामचंद्र अनंत कानिटकर, रामराव माधवराव देशमुख, बाळकृष्ण गणेश खापर्डे वगैरे होते. सभागृहात यापक्षाचे एकूण ४५ सभासद असल्याने पक्षास निर्विवाद बहुमत होते, हे विशेष. मुंबईप्रमाणेच मध्यप्रांत-वऱ्हाडातही लिबरल पक्षाचे उमेदवार बहुतेक ठिकाणी पराभूत झाले. मध्यप्रांत-वऱ्हाडच्या स्वराज्य पक्षाचे नेते या नात्याने डॉ. मुंजे यांना गव्हर्नरनेमंत्रिमंडळ बनविण्यासाठी पाचारण केले. तथापि त्यांच्या पक्षास बहुमत मिळाले, तरी त्यांना पक्षाच्या ठरावानुसार अधिकारपद स्वीकारणे अनुज्ञेय नव्हते. म्हणून मुख्यमंत्रीपदाची संधी मुंजेंना गमवावी लागली. मात्र त्यामुळे लिबरल पक्षाचे गंगाधरराव चिटणवीस

यांना या प्रांताच्या कायदेमंडळाचे अध्यक्ष होण्याची संधी लाभली. एस. एम. चिटणवीस व सय्यद हिफाजत अली यांची सोपीव खात्यांचे मंत्री म्हणून नियुक्ती झाली. **मध्यप्रांत-वऱ्हाड या देशातील एकमेव प्रांतात स्वराज्य पक्षाला निर्विवाद मताधिक्य लाभले होते.** त्याचा लाभ पक्षाला तसेच जनतेलाही होणे स्वाभाविक होते. बंगाल व मुंबई इलाख्यांत स्वराज्य पक्ष बहुमतात नसला, तरी अन्य पक्षांशी हातमिळवणी करून सरकारला काही प्रसंगी विरोध करणे त्यास शक्य झाले होते.

वर सांगितले आहेच की, शाहू महाराजांच्या निधनानंतर (१९२२) ब्राह्मणेतर पक्ष कमकुवत झाला होता. महाराज हयात असेपर्यंत पक्षांतर्गत कलहांना ते आळा घालीत असत. नंतर मात्र एकमुखी नेतृत्व वा निश्चित धोरण राहिले नाही. ब्राह्मणेतर पक्षात बेशिस्त वाढली. महाराजांचे सुपुत्र राजाराम महाराज यांना राजकारणात रस नव्हता. १९२१-१९२३ या काळात मध्यवर्ती कायदेमंडळाचे सभासद असलेले अण्णासाहेब लठ्ठे १९२३ च्या मुंबई प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुकीसाठी उभे राहिले, पण पराभूत झाले. सत्यशोधक म्हणून कीर्ती व लोकप्रियता मिळविलेल्या भास्करराव जाधवांनी जातीयवादी प्रचार केल्याने के. सी. *ऊर्फ* प्रबोधनकार ठाकरे यांनी १६ डिसेंबर १९२३ च्या **प्रबोधनच्या** अंकात जाधवांवर टीका केली होती. १९२३ च्या मुंबई कायदेमंडळाच्या निवडणुकीत ब्राह्मणेतर पक्षाचे भास्करराव जाधव, धनजीशा कूपर, सिद्दप्पा तोटप्पा कंबळी, आर. जी. शिंदे, शंकरराव झुंजारराव (ठाणे), नामदेवराव नवले, सरदार थोरात (नगरमधून) व गं. मु. काळभोर निवडून आले. पण लठ्ठे, पंडितप्पा चिकोडी, दाजीराव विचारे, आचरेकर, लिगाडे वगैरे ब्राह्मणेतर पक्षाचे उमेदवार पराभूत झाले होते.[७]

## स्वराज्य पक्षापुढील समस्या

पक्ष संघटनेतील दुय्यम नेत्यांची मनमानी, बेशिस्त व विसंवादी भूमिका या स्वराज्य पक्षाच्या प्रमुख समस्या होत्या. मद्रास व पंजाबच्या पाठोपाठ मुंबई इलाख्यातही बेशिस्तीचे विष भिनल्याचे वरिष्ठ नेत्यांना दिसून आले. पक्षाचे सर्वोच्च नेते मोतीलाल नेहरू यांना पक्षाच्या विघटनाची रास्त भीती वाटू लागली. त्यांनी जयकरांना लिहिले,

"मी प्रथम असहकारवादी आहे आणि नंतर स्वराज्यपक्षीय आहे! खराखुरा असहकार संपुष्टात आला होता. त्यामुळे कायदेमंडळात जाऊन खऱ्याखुऱ्या असहकाराचा पाया घालता येईल, अशी मला आशा वाटत होती. पण मी निराश झालो आहे."

सरकारने गांधीजींना ५ फेब्रुवारी १९२४ रोजी स्वतःहून बिनशर्त मुक्त केल्यावरही त्यांना स्वराज्य पक्षीयांचा कायदेमंडळातील प्रवेश अनुचितच वाटत होता. कायदेमंडळात प्रवेश केल्यावर निदान सरकारने खादी खरेदी करणे, दारूबंदी करणे, लष्करावरील खर्च कमी करणे अशा विषयांचे ठराव स्वराज्य पक्षाने कायदेमंडळात मांडून सरकारला ते करण्यास भाग पाडायला हवे होते. पण स्वराजिस्टांनी तसे काहीच केले नव्हते, याचीही गांधीजींना खंत वाटत होती. खादी, अस्पृश्यतानिवारण, नशाबंदी, हिंदू-मुसलमान ऐक्यभाव वगैरे विधायक कार्यक्रम अमलात आणण्यासाठी काँग्रेसजनांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी, असा त्यांचा आग्रह होता. तथापि काँग्रेसजनांनी तसे काहीच केले नव्हते, याचे गांधीजींना दुःख वाटत होते.

सरकारने सुभाषचंद्र बोस व ८० युवकांना दहशतवाद्यांशी संबंध असल्याच्या केवळ संशयावरून पकडले व त्यांच्यावर खटला न चालवता त्यांना तुरुंगात डांबले होते. पण त्याविरुद्ध चित्तरंजन दासबाबू आणि स्वराज्य पक्ष काहीच करू शकला नव्हता. स्वराज्य पक्षातर्फे निवडून आलेल्या मंत्र्यांना अत्यल्प अधिकार होते. आणि म्हणून स्वराजिस्ट प्रभावी कार्य करू शकलेच नव्हते. नागपूर कायदेमंडळातील श्री. ब. तांबे यांनी पक्षशिस्त धुडकावून ऑक्टोबर १९२५ मध्ये मंत्रिपद स्वीकारले होते. त्यांच्यावर मोतीलाल नेहरूंनी तीव्र टीका केली. तथापि न. चिं. केळकर, मुंजे, बॅ. जयकर यांनी तांबेंच्या बेशिस्तीचेही समर्थन केले व त्यांना पाठिंबा दिला. पक्षातील सुंदोपसुंदी वाढतच गेली. चित्तरंजनजींच्या निधनानंतर उत्तराधिकारी नेमण्यावरून पक्षात भयंकर संघर्ष झाला. जे. एम. सेनगुप्तांनी बिरेंद्रनाथ सासमल या निष्ठावान पुरुषाचे पक्षातून उच्चाटन केले. लवकरच सुटून आलेल्या सुभाषबाबूंनाही पक्षाशी संघर्ष करावा लागला. **दासबाबूंनी एका करारानुसार बंगालमध्ये मुसलमानांशी सलोखा करून त्यांना स्वराज्यानंतर बंगालमध्ये ५५ टक्के अधिकाराची पदे**

**देण्याचे व त्यांच्या भावना सहिष्णुपणे जपण्याचे लेखी आश्वासन दिले होते. पण त्यांच्या निधनानंतर त्या आश्वासनाचा भंग करण्यात आला. त्याचे दुष्परिणाम १९४७ मध्ये भोगावे लागले.** मोतीलालजींचे जुने प्रतिस्पर्धी पं. मदन मोहन मालवीय यांनी लालाजींच्या मदतीने 'इंडिपेंडंट काँग्रेस पार्टी' स्थापन केली (१९२६). या पक्षाने राजकीय मवाळपणा आणि हिंदू जातीयवादास मदतच केली. काही स्वराजिस्टांनी उद्योगपती व मोठ्या व्यापाऱ्यांशीही युती केली होती.[८]

## स्वराज्य पक्ष व जातीयवाद

असहकारानंतरच्या काळात उफाळलेला जातीयवाद व हिंदू-मुसलमानांमधील कलहाचे स्वातंत्र्य चळवळीवर गंभीर परिणाम झाले होते. १९१९-१९२२ मधील बंधुभाव आणि एकतेचा नारा हवेत विरला होता. खिलाफत-असहकार चळवळीत साध्य झालेले बंधुत्व लयाला गेले. मदन मोहन मालवीय यांनी आपल्या व्यक्तिनिष्ठ राजकारणाचा एक भाग म्हणून काही पंजाबी हिंदूंच्या मदतीने हरिद्वारच्या कुंभमेळ्याच्या प्रसंगी (१९१५) हिंदू महासभा स्थापन केली होती. मात्र काँग्रेसच्या असहयोग पर्वात ती मृतप्राय झाली होती. वस्तुतः खिलाफत व असहयोग चळवळीत बरेच कर्मठ मौलवीही राष्ट्रीय चळवळीत उतरले होते. चळवळीस त्यांची मदतही झालीच होती. तथापि चळवळीचा जोर ओसरल्यावर आणि गांधीजी व अलीबंधू कारावासात अडकल्यानंतर ते प्रणयनाट्य ओसरले. १९२१ सालात असहयोग आंदोलनास कडवा विरोध करणारे मदन मोहन मालवीय 'हिंद-हिंदी-हिंदू' या विभाजनवादी विचारधारेचे जनक बनले होते. इस्लामवाद आणि हिंदू राष्ट्रवादामुळे ब्रिटिश साम्राज्यशाहीला बळ मिळाले. उत्तरेत फोफावलेल्या शुद्धी व संघटन मोहिमेला कर्मठ मुसलमानांनी तब्लीग आणि तांझीम म्हणजे प्रचार आणि संघटन या चळवळीने उत्तर दिले. या सनातनवादी मोहिमांमुळे फायदा झाला फक्त ब्रिटिशांना !

सप्टेंबर १९२४ मध्ये वायव्य सरहद्द प्रांतातील कोहट शहरात कर्मठ मुसलमानांनी हिंदूंवर हिंसक हल्ले केले. या हिंसाचारात १५५ जणांची हत्या झाली. कोलकात्यात जातीय कलहात एप्रिल-जुलै १९२६ दरम्यान, १३८ जणांचे प्राण गेले. याच वर्षात ढाका, पाटना, रावळपिंडी व दिल्लीतही जातीय दंगे झाले. संयुक्त प्रांतात ९१ वेळा जातीय उद्रेक होऊन खूप प्राणहानी झाली. १९२३ आणि १९२७ सालांदरम्यान हा सामाजिक कॅन्सर सर्वाधिक भीषण झाला होता. कित्येक जातीय संघटना जन्मल्या व फोफावल्या, आणि जाती-धर्माच्या आधारावर राजकीय हातमिळवणी व ध्रुवीकरण झाले.

मॉंटफर्ड सुधारणांनी मताधिकाराचा विस्तार वाढविला, परंतु स्वतंत्र राखीव मतदारसंघ कायम ठेवले. खरे तर वाढविले. त्यामुळे राष्ट्रीय जीवनात सांप्रदयिक व जातिविशिष्ट नारे जोरात घुमू लागले. त्याबरोबरच शिक्षणाच्या प्रसारामुळे नोकरीची संधी व राखीव जागा हे प्रश्न ज्वलंत होऊ लागले. म्हणूनही जातीय व वर्गीय संघर्ष वाढला.

बंगालमधील हिंदू जमीनदार व त्यांची शेती कसणारे मुसलमान किसान यांच्यात आर्थिक कलह पेटला होता. कोकणातील खोत व विदर्भातील मालगुजार आणि पंजाबातील जमीनदार व त्यांची कुळे यांच्यातही कलह पेटला होता. स्वराज्य पक्षाच्या बंगाल व पंजाबमधील नेत्यांनी हिंदू जमीनदारांची कड घेतली. डावी विचारप्रणाली बोलणारे सुभाषचंद्र बोस हेही यास अपवाद नव्हते. बंगाल टेनन्सी ॲक्ट अमेंडमेंट विधेयक याबाबत सुभाषबाबूंनी घेतलेली भूमिका मुसलमान कुळांना मारक वाटत राहिली. म्हणूनही मुसलमान त्यांच्यापासून शेवटपर्यंत लांब राहिले होते.

कोहटमधील उद्रेकामुळे (१९२४) जातीय द्वेषभावना वाढली होती. त्या तप्त वातावरणात स्वामी श्रद्धानंद यांचा खून झाला. कोहटचा उद्रेक थांबविण्यासाठी महात्माजींनी २१ दिवस अन्नसत्याग्रह केला. 'गाईचे प्राण' वाचविण्यासाठी प्रचंड मानव संहार करणाऱ्या तेथील अपराधाला त्यांनी 'बारबॅरिक फॉली' म्हटले होते.

धर्मनिरपेक्ष अशी ख्याती असलेले आणि मशिदीत न जाणारे व प्रतिदिनी सॉसेजेस् खाणारे महंमद अली जिना तेव्हापासून मुसलमानांना आपले वाटू लागले. १९१६ पासून मुस्लीम लीगचे प्रत्येक अधिवेशन वार्षिक काँग्रेसला जोडूनच भरत असे. कारण बरेच जण दोन्ही पक्षांचे सदस्य होते. तथापि लीगचे १९२४ चे अधिवेशन बेळगाव काँग्रेसबरोबर न भरवता लाहोरला भरविले आणि जिनांना अध्यक्षपद बहाल केले. या राजकारणात खोल जाण्याचे इथे प्रयोजन नाही. मुद्दा हा आहे की, दोन्ही बाजूंनी संकुचितपणा, जातीयवाद व सांप्रदायिकता वाढवली. या प्रक्रियेस वसाहतवादी सनदी नोकरशाहीने प्रोत्साहन दिले. यामागची भूमिका म्हणजे लॉर्ड डफरिनचा प्रमेय ! हिंदुमुसलमान ऐक्यभाव राहू नये! हा इंग्रजांचा सतत प्रयत्न असे.

मोतीलाल नेहरूंशी वैरभाव असलेल्या पं. मदन मोहन मालवीय यांनी त्यांना सतावण्यासाठी जातीयवादाचा उपयोग करून घेतला. हे माहीत असूनही पुरषोत्तमदास टंडन व लाला लजपतराय हे मालवीयांशी निकटचे संबंध ठेवत. सरदार भगतसिंग व सहकाऱ्यांना याबाबत सदैव दुःख वाटत राहिले.

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्थापन :—** बनारस वगैरे ठिकाणी स्वराज्य पक्ष व हिंदुसभा यांचे अभेद्य नाते होते. स्वराजिस्टांच्या निवडणुकीचा प्रचार हिंदुसभावाले करीत. मालवीय व लजपतराय यांचा इंडिपेंडंट काँग्रेस पक्ष आणि हिंदुसभा यांची जवळपास युती झालेली होती. उत्तर भारतातील हिंद-हिंदी-हिंदू ही आघाडी नागपूरलाही आली. डॉ. मुंजे यांचे चाहते केशव बळीराम हेडगेवार यांनी १९२५ साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आर.एस.एस.) स्थापन केला. मात्र हा संघ तेव्हा राजकारणात नव्हता.[१] पण त्याआधीच नागपूर, मुंबई, पुणे, रत्नागिरीत हिंदुसभेच्या शाखा सुरू झालेल्या होत्या.

डॉ. मुंजेंनी पुढाकार घेऊन ११ नोव्हेंबर १९२३ रोजी नागपुरात हिंदुसभा स्थापन केली होती. मुंबईत माटुंगा भागात ११ डिसेंबर १९२३ रोजी आणि पुण्यात २ मार्च १९२४ रोजी हिंदुसभा स्थापन झाल्या. न. चिं. केळकर, डॉ. मुंजे वगैरे लजपतराय मालवीय, स्वामी श्रद्धानंद यांच्याचप्रमाणे हिंदुसंघटन करण्यावर भर देऊ लागले. गणेश दामोदर सावरकर यांच्या प्रेरणेमुळे रत्नागिरीत २३ जानेवारी १९२४ रोजी

हिंदुसभा सुरू झाली होती. विनायक दामोदर सावरकरांची सुटका झाल्यावर ते रत्नागिरीत स्थानबद्ध होते. त्यांनी रत्नागिरीतून ही हिंदुसभा अधिकच सक्रिय करून हिंदुसंघटन व शुद्धीकरण मोहीम उभारली. राजकारणात अजिबात भाग न घेण्याच्या लिखित अटीवरच सावरकरांची सुटका झाली होती. मात्र सामाजिक व धार्मिक कार्यात भाग घेण्यास सरकारने त्यांना प्रतिबंध केला नव्हता.[१०]

त्या काळात सोलापूर, नागपूर, आर्वी, अकोला आणि वाशीम वगैरे शहरांमध्ये जातीय दंगली उसळल्या. नागपुरातील १९२३ पासूनचे जातीय ताण-तणाव आणि दंगलींच्या पार्श्वभूमीवर तिथे प्रथम हिंदुसभा स्थापन झाली होती. आणि नंतर १९२५ मध्ये दसऱ्याच्या दिवशी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्थापन झाला. या संघटना मूलतः सामाजिक व धार्मिक स्वरूपाचे कार्य करणाऱ्या आहेत असे समजून, आरंभीच्या काही वर्षांत सरकारी कर्मचाऱ्यांनाही त्यांच्या कामात भाग घेण्यास सरकारने हरकत घेतली नव्हती. आरंभीच्या काळात हिंदुसभा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या दोन्ही संघटनांचे पुढारी काँग्रेसच्या स्वातंत्र्य चळवळीत भाग घेऊन कारावासातही जात असत. १९३७ च्या निवडणुकीनंतर ब्रिटिश सरकारने राजकीय कारणांसाठी सावरकरांना बंधनमुक्त केले. त्यानंतर अखिल भारतीय हिंदुमहासभा उघडपणे राजकीय पक्ष म्हणून काम करू लागली.

संघाचे संस्थापक डॉ. हेगडेवार, भाऊजी कावरे, अनंत गणेश सोहोनी, विश्वनाथ केळकर, बाळाजी हुद्दार, बापुराव भेदी वगैरे सर्वच मुंजेंचे अनुयायी असल्याने ते हिंदुसभेचेही काम करीत. म्हणून पहिल्या आठदहा वर्षांत संघ ही हिंदुसभेचीच एक आघाडी आहे, असा बहुतेकांचा समज होता. गणेश सावरकरांचे हेगडेवारांशी सख्य होते. त्यांनी स्थापन केलेली तरुण हिंदुसभा आणि पाचलेगावकर महाराजांचा मुक्तेश्वर दल या दोन्ही संघटना गणेशरावांमुळे आर. एस. एस. मध्ये विलीन झाल्या. त्यांच्या आग्रहामुळे भालजी पेंढारकरांसारखे अनेक जण संघात सामील झाले. १९२५ मध्ये संघाचे नामकरण झालेले नव्हते. १७ एप्रिल १९२६ रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ असे नामकरण करण्यात आले. १९२९ सालापर्यंत संघाचे काम मुख्यतः नागपूर, वर्धा, चांदा व भंडारा या चार मराठी भाषिक जिल्ह्यांपुरतेच मर्यादित होते.[११]

१९२३-१९२५ या काळातील जातीय दंगलींमुळे महाराष्ट्रात हिंदुसभा व आर. एस. एस. यांचा प्रसार करण्यास अनुकूल वातावरण होते. ही स्थिती १९२९ पर्यंत कायम राहिली. एप्रिल १९२६ ते ऑगस्ट १९२७ या काळात मुंबई इलाख्यात नऊ आणि मध्यप्रांत-वऱ्हाडात एक दंगा झाला. परिणामतः मुसलमानांचा काँग्रेसमधील आणि स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग कमी झाला. खिलाफतीच्या प्रश्नामुळे काँग्रेसमध्ये शिरलेले मुसलमान हळूहळू बाहेर पडू लागले. तथापि ते मुस्लीम लीगमध्येही गेले नाहीत. १९२२ मध्ये लीगची सभासद संख्या केवळ १०९३ इतकीच होती. लीगची सभासद संख्या १९२७ मध्ये केवळ १३३० इतकीच झाली. जिनांचे अनुयायी असलेल्या मुंबई इलाख्यातील मुसलमानांची संख्या त्या काळात अत्यल्प होती. तेव्हा एम. सी. छागला व मिर्झा अली अहमदखान हे दोघेच जिनांचे निकटवर्ती होते. मध्यप्रांत-वऱ्हाडात अब्दुल कादिर, गुलाम मोहिउद्दीन, महमद यासीन हे मुस्लीम लीगचे पुढारी होते. **इतके मात्र निश्चित की, खुद्द लीगमधील अनेक नेत्यांचा तेव्हा जिनांशी मनापासून सलोखा नव्हता. तत्कालीन राजकीय विश्लेषकांना पूर्णपणे उमगले होते की, काँग्रेसमधून बाहेर पडल्यामुळे जिनांचे महत्त्व फारच कमी झालेले होते. खुद्द त्यांच्या पत्नी रतनबाई पेटिट यांना जिनांचा काँग्रेसचा राजीनामा मुळातच पसंत नव्हता.**

## गांधीजींच्या सुटकेनंतर

कारावासात असतानाच गांधीजींवर अचानक शस्त्रक्रिया करावी लागल्यामुळे मुंबई सरकारने स्वतः त्यांना ५ फेब्रुवारी १९२४ रोजी बिनशर्त मुक्त केले होते. दरम्यान स्वराज्य पक्षासमोर अनेक समस्या उभ्या राहिल्या होत्या. गांधीजी विरुद्ध स्वराज्य पक्ष अशीही स्थिती निर्माण झाली होती. देशाचे राजकारण अत्यंत चमत्कारिक अवस्थेतून जात असल्यामुळे उपरोक्त बेळगाव काँग्रेसचे अध्यक्षपद भूषविण्याचा गांधीजींना आग्रह करण्यात आला होता. त्यांनी हे अधिवेशन विलक्षण कौशल्याने यशस्वी केले होते. हे त्यांचे पहिलेच आणि शेवटचेही अध्यक्षपद होते. याविषयीचे विवेचन **प्रकरण ४** मध्ये केलेले आहे.

काकिनाडा काँग्रेसच्या ठरावानुसार नारायण सुब्बाराव हर्डीकर व जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाखाली हिंदुस्तानी सेवादल स्थापन करण्यात आला होता. हा दल

म्हणजे राष्ट्रीय काँग्रेसची युवक आघाडीच होती. या दलाने बरेच रचनात्मक कार्य केले व राष्ट्रकार्यास वाहून घेणाऱ्या युवकांचा शिस्तबद्ध संवर्ग तयार केला. धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद आणि संपूर्ण स्वातंत्र्याचा प्रचार करणे हे या दलाचे मुख्य उद्दिष्ट होते. बहुतेक प्रांतांमध्ये हिंदुस्तानी सेवादलाच्या शाखा निर्माण झाल्या. याबाबतचे विवेचन **युवक व कम्युनिस्टांच्या चळवळी** या प्रकरणात येणारच आहे. जबरदस्त नेते चित्तरंजन दास १६ जून १९२५ रोजी दार्जिलिंग येथे मरण पावल्यामुळे स्वराज्य पक्षाची अपरिमित हानी झाली. या पक्षातील विविध प्रवृत्तींच्या व स्वैरपणे वागणाऱ्या माणसांना आवरण्याची क्षमता जितकी दासबाबूंमध्ये होती तितकी मोतीलाल नेहरूंमध्ये तेव्हा तरी नव्हती. त्यांचे चिरंजीव जवाहरलाल नेहरू त्यांच्या पक्षातनव्हते. परिणामतः दासबाबूंच्या निधनानंतर स्वराज्य पक्षात तंटे निर्माण झाले. जातीयवद वाढला. या पक्षाचे सदस्य कायदेमंडळांत जाऊन काँग्रेसच्या कायदेभंग करण्याच्या मूलभूत धोरणाचे उल्लंघन करून ब्रिटिशांशी सहकार्य करू लागले. नागपुरातील तंबे प्रकरण हे त्यातलेच एक दुःखद प्रकरण होय.

## तांबे प्रकरण

मध्यप्रांत-वऱ्हाड राज्यात मोरोपंत जोशी यांच्याकडील गृहमंत्रिपद श्रीपाद बळवंत तांबे यांनी स्वीकारून पक्षशिस्तीचा भंग केला होता. त्यामुळे पक्षातील फूट स्पष्ट झाली. यालाच तांबे प्रकरण म्हणतात. स्वराज्य पक्षाच्या घटनेनुसार कोणाही सदस्यने सरकारी नोकरी अथवा लाभाचे पद स्वीकारू नये असे सक्त बंधन होते. पण श्रीपाद तांबेंनी हा नियम धुडकावून लावला, आणि पक्षाची पूर्वसंमती न घेता किंवा पक्षाचा राजीनामा न देता, त्या प्रांताचे गृहमंत्रिपद स्वीकारले. हा उघड शिस्तभंग होता. या शिस्तभंगाचा वऱ्हाड स्वराज्य पक्षाच्या कार्यकारिणीने निषेधही केला. तरीदेखील न. चिं. केळकर व बॅ. जयकरांनी तांबेंच्या कृतीची तरफदारी केली. आपल्या अधिकारलालसेचे समर्थन करताना तांबे म्हणाले, गव्हर्नरने देऊ केलेले गृहमंत्रिपद आपण व्यक्तिशः स्वीकारलेले असून स्वराज्य पक्षाचा सभासद म्हणून स्वीकारलेले नाही. मध्यप्रांतातील स्वराज्य पक्षाच्या मराठी भाषिकांच्या प्रांतिक समितीचे अध्यक्ष बॅ. मोरेश्वर अभ्यंकर यांनी तांबेंप्रमाणे बाळकृष्ण ग. खापर्डे,

डॉ. मुंजे व राघवेंद्रराव यांचा कडाडून निषेध केला. याविषयी बरेच वादंगही माजले. वऱ्हाडातील स्वराज्य पक्षाच्या आमदारांनी अधिकारपदांची बाळगलेली लालसा याचा निषेध म्हणून ठाकूर छेदीलाल आणि के. पी. पांडे या स्वराज्य पक्षाच्या महाकोशलमधील आमदारांनी मध्यप्रांतापासून वऱ्हाड प्रांत विभक्त करावा अशी मागणी केली. आणि त्याबाबत हिंदुस्तान सरकारला शिफारस करणाऱ्या ठरावाची पूर्वसूचना दिली. तसेच तांबेंनी पक्ष नेत्यांना आधी विश्वासात घेण्याचे सौजन्यही दाखवले नाही, याचा अनेकांना राग आलेला होता.

तांबे प्रकरणामुळे ब्रिटिशांची विपुल करमणूक झाली. स्वराज्य पक्षात धुमसत असलेल्या असंतोषाने जोरात पेट घेतला. नोव्हेंबर १९२६ च्या प्रांतिक कायदेमंडळाच्या आगामी निवडणुकीत स्वराज्य पक्षास बहुमत मिळाल्यास, पक्षाने मंत्रिमंडळ बनवावे आणि राखीव खात्यांची मंत्रिपदे लाभली, तर त्यांचाही स्वीकार करावा, असे मनसुबे केळकर, भोपटकर, अणे, मुंजे व जयकर हे महाराष्ट्रातील स्वार्थी सत्तातुर स्वराजिस्ट आखत होते. याशिवाय लोकमान्य टिळकांनी १९१९-१९२० मध्ये मांडलेले 'प्रतियोगी सहकारितेचे धोरण' आता पुनरुज्जीवित करावे, अशी या मंडळींनी भूमिका घेतली. वस्तुतः या मंडळींचे धोरण आणि अधिकारपदाची लालसा गांधीजी आणि अधिकृत काँग्रेसच्या असहकार चळवळीशी व रणनीतीशी अगदी विसंगत होती. तांबे प्रकरण व केळकर गटाबाबतचा तीव्र विषाद व घृणा व्यक्त करताना पं. मोतीलालजींनी पुढील झणझणीत भाष्य केले. "प्रतियोगी सहकारिता हे विष असून, ते स्वराज्य पक्षाच्या एका अंगात पुरते भिनले असल्याने जे अंग कुजले आहे. आणि म्हणून ते कापून टाकले पाहिजे." काही स्वराजिस्टांची सत्तालालसा हेच त्या विषादाचे कारण होते. मात्र स्वराज्य पक्षाच्या कार्यकारिणीत केळकर-जयकरांचा प्रतियोगी सहकारितेचा ठराव धुडकावला गेला. त्यामुळे या दोघांनी कार्यकारिणीचा राजीनामा दिला. मोतीलालजींनी मुंबई व विदर्भात सभा घेऊन प्रतिसहकारवाद्यांवर झोड उठवली. चिडलेल्या केळकर व जयकरांनी मोतीलाल नेहरूंच्या मनात 'महाराष्ट्राविषयी आकस आहे' असा अपप्रचार केला. या दोन गटांमधील संघर्ष बरेच दिवस चालू राहिला. कानपूर काँग्रेसमध्येही (१९२५) जयकर गटाचा पराभव झाला. यानंतर केळकर-जयकर गटाने स्वराज्य पक्षाला समांतर असा 'प्रतिसहकार पक्ष' स्थापन केला. [१२]

उपरोक्त तांबे प्रकरणावर विचार करण्यासाठी मध्यप्रांत व वऱ्हाडातील स्वराज्य पक्षाच्या सभासदांची संयुक्त बैठक घेण्यासाठी मोतीलाल नेहरू, बॅ. सेनगुप्ता, केळकर व जयकर नागपुरात आले. ८ नोव्हेंबर १९२५ च्या या बैठकीत नागपूर प्रांतिक काँग्रेसमधील असहकारवादी आणि प्रतिसहकारवादी यांच्यातील मतभेद वाढीस लागले. प्रतिसहकारवादी मंडळी कायदेमंडळांमध्ये जाण्यासाठी प्रयत्न करीत, तर काँग्रेसच्या अधिकृत धोरणानुसार असहकारवादी त्यास विरोध करीत. अशा परिस्थितीत अभ्यंकर व ना. भा. खरे यांच्या असहकारवादी गटाने मुंजे गटास आळा घातला खरा, पण त्यांच्यात सलोखा नांदणे अशक्य होते. मुंजेंनी आपली शक्ती पणास लावली. परंतु मोतीलालजींच्या पाठिंब्याने अभ्यंकरांनी १९२६ सालात समांतर प्रांतिक काँग्रेस समिती स्थापन केली. प्रतिपक्षाला आळा घालण्यासाठी अखिल भारतीय काँग्रेस कार्यकारिणीने मुंजेंचे प्रांतिक समितीमधील वजन कमी करून अभ्यंकरांच्या प्रांतिक समितीला पाठिंबा जाहीर केला. अभ्यंकरांनी जिल्हा व तालुका समित्यांच्या निवडणुका घेऊन आपले बहुमत प्रस्थापित केले.

१९२६-१९२९ या काळात अभ्यंकर, डॉ. खरे व बजाज यांनी विदर्भातील मराठी व हिंदी भाषिकांमध्ये काँग्रेसचा प्रभाव बराच वाढविला. रामभाऊ रुईकरांनी काँग्रेसला गिरणी कामगारांचा पाठिंबा मिळवून दिला. समिउल्ला खान यांनी काँग्रेसला मुसलमानांचे समर्थन मिळवून दिले. रुईकर व डॉ. खरेंनी नागपुरात ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसची शाखा स्थापन केली. त्यामुळे पुढील काळात काँग्रेसच्या आंदोलनास संघटित मनुष्यबळ लाभले.

या प्रांतातील स्वराज्य पक्षात तीव्र मतभेद झाले हे मान्य करूनही म्हणावे लागते की, असहकारिता चळवळ स्थगित झाल्यानंतरच्या काळात स्वराज्य पक्षाने आपली सभासद संख्या वाढविली. शिवाय ब्रिटिश नोकरशाहीने व सत्ताधीशांनी कायदेमंडळात मांडलेले काही अनुचित प्रस्ताव धुडकावून लावले होते. ब्रिटिशांच्या धोरणांवरकडक टीका केली होती.

डॉ. मुंजे विरुद्ध अभ्यंकर हा वाद विकोपास गेल्याशिवाय राहिला नाही. त्याचे अनेक दुष्परिणाम होणे अपरिहार्य होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख केशवराव

हेगडेवार हे मुंजेंचे पाठीराखे होते. **अभ्यंकरांनी मुंजे गटाला नामोहरम केल्यामुळे मुंज्यांनी १९३० साली काँग्रेसबरोबरचे संबंध कायमचे तोडले.** त्यापुढील काळात डॉ. मुंजे हिंदुमहासभेचे प्रमुख नेते बनले व सभेतर्फे राजकीय कार्य करीत राहिले. [१३]

## प्रतिसहकार पक्ष

गांधीजींच्या मौनकाळात फेब्रुवारी १९२६ मध्ये बॅ. जयकर, केळकर, जोसेफ बॅप्टिस्टा, दा. वि. गोखले, मुंजे, अणे वगैरे टिळकपंथीयांनी प्रतिसहकार पक्ष स्थापन केला. नोव्हेंबर १९२६ च्या मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळांच्या निवडणुकीत प्रतिसहकारवादी राजकारणी स्वराज्य पक्षातून फुटून बाहेर पडल्याने स्वराज्य पक्षाला चांगले यश मिळाले नाही. लहान लहान गटांच्या युती झाल्या. मध्यवर्ती कायदेमंडळावर मुंजे, बापूजी अणे व मुंबईतून जयकर, पश्चिम महाराष्ट्रातून न. चिं. केळकर व साराभाई हाजी निवडून आले. ते मालवीय आणि लजपतराय यांच्या नॅशनॅलिस्ट पक्षाशी सामील झाले. गोविंदराव प्रधान, आर. जी. प्रधान, हरिभाऊ पाटसकर, नारायणराव गुंजाळ, लक्ष्मण महादेव देशपांडे, व्ही. ए. सुर्वे व भाऊसाहेब चंद्रचूड हे प्रतिसहकार पक्षातर्फे निवडून आले. इंडियन नॅशनल पार्टीचे रावजी रामचंद्र काळे व रँग्लर परांजपे यशस्वी झाले. ब्राह्मणेतर पक्षाच्या बारा यशस्वी उमेदवारांमध्ये भास्करराव जाधव, खासेराव पवार, रामचंद्र शांताराम आसवले, शंकरराव झुंजारराव, रामचंद्र वि. वंडेकर, नामदेवराव नवले, डोंगरसिंग पाटील, पंडितप्पा चिकोडी, एस. एन. अंगडी व एस. टी. कंबळी वगैरेंचा समावेश होता. गव्हर्नरने नेमलेल्यांमध्ये बाबासाहेब आंबेडकर, डॉ. सोळंकी हे दलित नेते आणि सी. के. बोले व एस. सी. जोशी हे कामगारांचे प्रतिनिधी होते. रँ. परांजपे व हरिलाल देसाई हे सोपीव खात्यांचे मंत्री झाले. परांजपे लवकरच भारतमंत्र्याच्या सल्लागार मंडळावर लंडनला गेले. त्यामुळे गोविंदराव प्रधानांना मंत्रिपद लाभले. मार्च १९२८ मध्ये मध्यप्रांत-वऱ्हाडच्या गव्हर्नरने अनसूयाबाई काळे यांना प्रतिनिधित्व दिले. **महाराष्ट्रात महिलेला मिळालेला हा पहिलाच मानसन्मान होता.** स्वराज्य पक्ष व प्रतिसहकारवादी पक्ष यांच्यातील संघर्षामुळे गव्हर्नर कधी चुचकारून, तर कधी दाबदबाव तंत्राने स्वेच्छाचारी

पद्धतीने निर्णय घेत असे, हे मात्र खरेच. दोन्ही प्रांतांमधील गव्हर्नरांना आमदारांमधील ऐक्यभावाच्या अभावामुळे आमदारांचा विरोध दडपून टाकणे सहज शक्य होई.[१४] शिवाय या मंडळींच्या पार्लमेंटरी कर्तृत्वाने स्वातंत्र्य आंदोलनास कितपत योगदान मिळाले हा प्रश्न आहेच.

दरम्यान राजकीय घटनांबाबत गांधीजींनी एक वर्षभर मौन पाळले होते. गोहाटी काँग्रेसच्या सहा दिवसांआधी त्यांनी मौन सोडले (२० डिसेंबर १९२६). गोहाटीला जाताना वाटेत अमरावती, नागपूर, गोंदिया वगैरे शहरांमध्ये त्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. गोहाटी अधिवेशनाची सर्व सूत्रे गांधीजींच्याच हातात होती. या अधिवेशनात कायदेमंडळांबाबतच्या काँग्रेसच्या धोरणासंबंधी सहा कलमी ठराव मंजूर झाला होता. त्यानुसार मंत्रिपदे किंवा लाभाची पदे स्वीकारण्यास काँग्रेस सदस्यांना मनाई करण्यात आली होती. तसेच सरकारचा अर्थसंकल्प व खर्चाच्या मागण्या फेटाळून सरकारची अडवणूक करावी, असा आदेश होता. १९२७ च्या प्रारंभापासून काँग्रेस परिसीमेतील विविध गटांमध्ये समेट करण्याचे प्रयत्न सुरू होते. त्यांचाच एक भाग म्हणून केळकर व शंकरराव देव यांनी १ ऑगस्ट १९२७ रोजी पुण्यात मेळावा भरवून उपरोक्त समेट घडवून आणला. आपापसातील यादवीमुळे काँग्रेसची चळवळ क्षीण झाली, हे ओळखून हा समेट घडवणे अटळ झाले होते. पण तो अल्पजीवी ठरला.

## मुंबई कायदेमंडळातील राजकारण

१९२१ ते १९२३ या काळात मुंबई कायदेमंडळातील लोकनियुक्त सदस्यांचा सहभाग समाधानकारक नव्हता. मुंबईचे सीताराम केशव बोले, साताऱ्याचे भास्करराव जाधव, पुण्याचे काशिनाथ रामचंद्र गोडबोले आणि नगरचे जी. के. चितळे यांचा अपवाद सोडल्यास इतर आमदारांच्या बोलण्यास सरकार फारशी किंमत देत नसे. या चौघांचा लोकल बोर्ड किंवा स्थानिक संस्थांमधील अनुभव आणि अभ्यास यामुळे त्यांचा थोडाफार प्रभाव पडत असे. इतर आमदारांमध्ये इंग्रज मंत्र्यांशी वादविवाद करण्याची क्षमता नव्हती. ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर आमदारांमध्ये फारसा समन्वय अथवा सौहार्द नव्हता. शिवाय सरकारच्या मर्जीतील सदस्य सभागृहात प्रश्न उपस्थित करण्यासही कचरत असत. काही सभासद नॉन-एंटिटी स्वरूपाचे होते.

१९१९ च्या राज्यसुधारणा कायद्यानुसार अस्तित्वात आलेल्या या कायदेमंडळाच्या कामकाजाचे मूल्यमापन करणारे गोपनीय अहवाल व्हाइसरॉय लॉर्ड रीडिंग यांनीएप्रिल १९२३ मध्ये मागविले होते. मात्र महसूल विभागाचे आयुक्त आणि कलेक्टरांनी पाठवलेल्या अहवालांमध्ये अनेक आमदारांबाबत असमाधान व्यक्त केले होते. त्यांनी म्हटले, कायदेमंडळात संघटित राजकीय पक्ष नव्हते व त्यांच्याकडे निश्चित कार्यक्रमही नव्हता. ब्राह्मणेतर पक्षाच्या काही आमदारांना इंग्रजी समजत नसे. दुसऱ्याही काहींची स्थिती अशीच होती. के. एस. हजरतखान, सलगर, शामराव लिगाडे, कीर्तिवान निंबाळकर, एच. एन. शिदोरे वगैरे आमदार एक तर अभ्यासू नव्हते अथवा ते कामकाजात लक्ष घालीत नसत याची अहवालांमध्ये नोंद आढळते.

१९१९ च्या कायद्यानुसार स्थापन झालेल्या पहिल्या कायदेमंडळात मुंबई सरकारला नोकरकपात करण्यास, करमणुकीवर कर लादण्यास व अबकारी करात बदल करण्यास विरोध झालाच नाही. प्राथमिक शिक्षणाविषयीच्या कायद्याने काहीच प्रगती झाली नाही. हा कायदा म्हणजे शुद्ध फसवणूक आहे, अशी कडक टीका पुढे बाबासाहेब आंबेडकरांनी केली होती. महात्मा गांधी यांच्यावर सरकारने भरलेला खटला (१८ मार्च १९२२) तसेच मौलाना महंमद अली व शौकत अली यांच्यावरही सरकारने भरलेल्या खटल्यांबाबत आमदारांनी साधी नापसंती देखील व्यक्त केली नव्हती. किंबहुना सरकारची ही कारवाई योग्य असल्याचे या आमदारांचे मत होते.[१५] १९२१-१९२३ या काळात या कायदेमंडळाचा नागरिकांना उपयोग झाला नाही हे स्पष्ट होते.

मुंबई कायदेमंडळासाठी झालेल्या १९२३ च्या निवडणुकीत स्वराज्य पक्षाचे २३ आमदार व त्यांच्याशी सहकार्य करणारे ११ सदस्य असा ३४ आमदारांचा गट निर्माण झाला. मात्र १११ सभासदांच्या कायदेमंडळात हा गट अल्पमतात असला, तरी तो सरकारची अडवणूक करू लागला. किंबहुना स्वराजिस्ट हे काँग्रेसमधील असल्यामुळे हे त्यांचे धोरणच होते. सरकार-नियुक्त २५ सभासद आणि २७ मुसलमान व ६ युरोपियन यांच्या युतीला ब्राह्मणेतर पक्षाचे १३ आमदार आणि ६ नेमस्त अनेक प्रसंगी साथ देत असत. मात्र काही प्रसंगी स्वराज्य पक्ष सरकारची अडवणूक करण्यात यशस्वी होत असे. या कायदेमंडळात निश्चित कार्यक्रम

असलेला स्वराज्य पक्ष हाच एक सुसंघटित व शिस्तबद्ध पक्ष असल्याचा निर्वाळा मुंबई सरकारने दिला होता.[१६] १९२३ ते १९२६ या काळात स्वराज्य पक्षाने कारावासात अडकलेल्या अथवा तडीपार करण्यात आलेल्या देशभक्तांची सुटका करण्यासाठी वा त्यांच्यावरील वारंट मागे घेण्यासाठी कायदेमंडळात मागणी केली होती. तुरुंगातल्या वॉर्डरला लाच दिल्याचा खोटा आरोप ठेवून मौलाना हसरत मोहानींना सक्तमजुरी ठोठावण्यात आली होती. तेव्हा सरकारच्या विरोधाला न जुमानता त्यांना मुक्त करावे, असा ठराव मुंबई कायदेमंडळाने बहुमताने संमत केला होता. या ठरावाचे मोल त्या काळी फार मोठे होते. प्रसिद्ध लेखक रंगराव दिवाकर यांनी राजद्रोहात्मक पुस्तक छापल्याच्या आरोपावरून त्यांना दोन वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा झाली होती. त्यातून त्यांची सुटका करावी असा प्रस्ताव शंकर श्रीकृष्ण देव यांनी मांडला असता, मुंबई सरकारने दिवाकरांची सुटका करण्याची तयारी दाखवली होती. यांत आमदारांचे यश सामावलेले होते.

सरकारने स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकरांची सशर्त सुटका केल्यावर त्यांनी रत्नागिरी जिल्ह्यातच राहण्याचे व राजकीय कार्यात भाग न घेण्याचे निर्बंध त्यांच्यावर लादलेले होते. त्यांच्यावर लादण्यात आलेले हे निर्बंध काढून टाकावे, याबाबतचा एक ठराव स्वराज्य पक्षाचे आमदार डॉ. मोतीराम बी. वेलकर व रामचंद्र गणेश प्रधान यांनी मुंबई कायदेमंडळात मांडला होता. या ठरावास ब्राह्मणेतर पक्षाचे आनंदराव सुर्वे यांनी उपसूचना सुचविली. रत्नागिरी जिल्ह्यातच राहण्याचे निर्बंध काढून टाकावे, पण राजकीय हालचालींवरील निर्बंध चालूच ठेवावे, अशी आनंदरावांची उपसूचना होती. बॅ. के. एफ. नरिमन, जी. के. मावळणकर, प्रधान वगैरे स्वराज्य पक्षीय आमदारही कायदेमंडळात ही मागणी करीत होते. तथापि ब्रिटिशांनी प्रत्येक वेळी ही मागणी फेटाळून लावली होती. (याबाबतचे विवेचन स्वतंत्रपणे करण्यात आले आहे). काँग्रेस स्वराज्य पक्षाचे नरिमन व त्यांच्या सहकाऱ्यांनी बेंजामिन हॉर्निमन यांच्यावरील अन्याय दूर करण्यासाठीही ठराव मांडला. या भारतप्रेमी आयरिश पत्रकारास भारतीय स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतल्याबद्दल या देशाबाहेर घालविले होते. तसेच इथे परत येण्यासाठी त्यांनी मागितलेला व्हिसा ब्रिटिशांनी नाकारला होता. यासाठी नरिमन यांचेच नव्हे तर महात्मा गांधी यांचेही प्रयत्न असफल झाले होते.

एका बाजूला स्वराज्य पक्ष कायदेमंडळात सरकार आणि ब्राह्मणेतर पक्षाशी संघर्ष करीत होता. तर दुसऱ्या बाजूला मुंबई कायदेमंडळ स्वराज्य पक्षाचे नेते बॅ. मुकुंदराव जयकर हे स्वराज्य पक्षाचे सर्वोच्च पुढारी मोतीलाल नेहरूंशी "गनिमी काव्याने" लढत होते. गनिमी काव्याने लढण्याची अमर्याद कुवत आपणाकडे असल्याची कबुली स्वतः जयकरांनी पत्रात दिली होती.[१७]

**प्रकरण ३** मध्ये विवेचन केल्याप्रमाणे मुंबईच्या व स्वराज्य पक्षाच्या इतिहासात गाजलेले एक मोठे प्रकरण हार्वे-नरिमन खटला हे होय. १९२६ सालातील अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुंबईच्या बॅकबे रेक्लमेशन योजनेबाबत तसेच त्याबाबत कर बसवण्याच्या प्रस्तावाबाबत वादळी चर्चा झाली. यात स्वराज्य पक्षाने हिरिरीने भाग घेतला. सरकारच्या बॉंबे डेव्हलपमेंट डिपार्टमेंटतर्फे औद्योगिक कामगारांसाठी चाळी बांधण्याच्या आणि रेक्लमेशन करण्याच्या महत्त्वाकांक्षी योजना राबविल्या जात होत्या. काही हजार घरकुले वा सदनिका बांधल्या जात होत्या. दक्षिण मुंबईच्या पश्चिम किनाऱ्यालगतच्या समुद्रात भराव टाकून जमीन पुनःप्रापण करण्याच्या या योजनेवर प्रचंड पैसा खर्च करण्यात येत होता. मात्र या योजनांच्या कार्यवाहीत प्रचंड भ्रष्टाचार होत असल्याची चर्चा मुंबईपासून दिल्ली आणि लंडनपर्यंत चालली होती. भ्रष्टाचाराबरोबरच या कामातील त्रुटींवरही बरीच टीका झाली. स्वराज्य पक्षाचे झुंजार आमदार बॅ. के. एफ. नरिमन यांनी या विषयावर कायदेमंडळात आणि बाहेरही टीकेची झोड उठवली. या विकास विभागाचे प्रमुख मि. हेप्पर आणि अधीक्षक अभियंता मि. हार्वे हे नरिमन यांच्या टीकेचे मुख्य लक्ष्य बनले होते. सभागृहातील व वर्तमानपत्रांतील टीका असह्य झाल्याने हार्वेने त्यांच्यावर अब्रूनुकसानीचा खटला भरला. फिर्यादीची सुनावणी इलाखा दंडाधिकाऱ्यासमोर एक वर्षाहून अधिक काळ चालू राहिली. स्वतः नामांकित बॅरिस्टर असलेल्या नरिमन यांनी स्वतः हा खटला समर्थपणे लढवून हार्वे व त्याच्या समर्थकांना नामोहरम केले. फिर्याद हरलेलाहार्वे दीर्घ मुदतीची रजा घेऊन मायदेशी पळाला आणि नंतरही परत आलाच नाही. विजयी झालेल्या नरिमन यांनी हेप्पर याचेवरही दुसरा खटला भरून कोर्टात त्याच्यावरील आरोप सिद्ध केले. त्यामुळे हा अधिकारीही येथून पळाला व पुन्हा हिंदुस्तानात आलाच नाही.

या सुप्रसिद्ध खटल्यात नरिमन यांनी आपली झुंजार वृत्ती व सचोटी दाखवून इंग्रजांवर विजय मिळवला. यामुळे त्यांना 'वीर नरिमन' हे गुणनाम प्राप्त झाले आणि ते काँग्रेसचे झुंजार पुढारी या लौकिकास पात्र झाले. युवकांचे संघटन आणि मुंबई प्रदेश काँग्रेस समितीची बांधणी करून नरिमन यांनी पुढील स्वातंत्र्य आंदोलनासाठी संरचना निर्माण केली. आणि ते उच्च स्तरापर्यंत जाऊन पोहोचले होते.

'ग्राम जोशी' वतन याबाबतचे सी. के. बोले यांचे विधेयकसुद्धा मुंबई कायदेमंडळात खूपच गाजले होते. या विधेयकावरील संघर्ष सरकारशी संबंधित नसून ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर यांच्यात होता. ब्राह्मणेतर पक्षाचे एक पुढारी सी. के. बोले यांनी मांडलेल्या या विधेयकात एक महत्त्वाची तरतूद होती की, धार्मिक विधीसाठी ग्रामजोशींना न बोलावल्यास, त्यांना दक्षिणा मागण्याचा हक्क असू नये. परंपरेनुसार विधी केल्यावर ब्राह्मणास दक्षिणा देणे भाग पडत असे. सत्यशोधक पक्षाचे थोर पुढारी जोतीबा फुले कर्मकांडाच्या विरोधात प्रचार करीत. त्यामुळे काही ब्राह्मणेतर लोक कर्मकांड करीत नसत. किंवा आपल्यातीलच जाणकाराकडून धार्मिक विधी पार पाडत. पण तरीही ग्रामजोशी लोक दक्षिणा मागतच असत. या प्रश्नावरून महाराष्ट्रात खूप वादावादी झाली, मारामाऱ्या झाल्या. हा प्रकार टिळकांपासून चालू होता. पुरोहितांच्या गैर मागणीस कायदेशीर विरोध करणे हे विधेयकाचे उद्दिष्ट होते. स्वराज्य पक्षात ब्राह्मणांचे प्राबल्य होते. स्वराज्य पक्षाचे सचिव अण्णासाहेब भोपटकर व शंकर श्रीकृष्ण देव, पी. जी. जोशी, जी. के. मावळणकर यांनी हा विषय लावून धरला आणि सामाजिक परंपरेत कायद्याचा हस्तक्षेप नको अशी भूमिका घेतली. त्यांच्या पक्षातील ब्राह्मण आमदारांनी बोलेंच्या विधेयकाला अखेरपर्यंत विरोध केला तरीही हे ग्रामजोशी वतन विधेयक ३ ऑगस्ट १९२६ रोजी कायदेमंडळाने संमत केले. हे एक प्रागतिक पाऊल होते. पन्नास वर्षांच्या वादाचा निकाल १९२६ साली लागला हे विशेष.

**मुंबई स्वराज्य पक्षाचे विघटन :** नोव्हेंबर १९२६ मध्ये झालेल्या मुंबई प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुकीत कोणत्याही पक्षास बहुमत मिळाले नाही. एकूण १११

सदस्यांमध्ये २५ सरकार-नियुक्त, ६ युरोपियन व २८ मुसलमान असून स्वराज्य पक्षाचे १० सभासद होते, तर प्रतियोगी सहकार पक्षाचे ७, ब्राह्मणेतर १२, इंडियन नॅशनल पार्टीचे २ आणि अपक्ष २० आमदार होते. टिळकभक्त न. चिं. केळकर, भोपटकर, जयकर यांनी प्रतियोगी सहकार हा वेगळा पक्ष स्थापन केल्याने, स्वराज्य पक्षाचे विभाजन झालेले होते. मात्र प्रतियोगी सहकार पक्षालाही मोठे समर्थन मिळवता आले नाही. गांधीजी व काँग्रेसशी एकनिष्ठ असलेल्या लोकांचे या दोन्हींही पक्षांना समर्थन लाभणे शक्यच नव्हते. प्रतियोगी सहकार पक्षाचे ठाण्याचे सभासद जी. बी. प्रधान, नाशिकचे रामभाऊ प्रधान, खानदेशचे हरीभाऊ वि. पाटसकर व पुण्याचे नारायणराव गुंजाळ हे प्रमुख आमदार होते. स्वराज्य पक्षाचे नेतृत्व नरिमन यांनी केले. रावजी रामचंद्र काळे (सातारा) व रँ. परांजपे हेही वजनदार असून रँगलर परांजपेंना पुन्हा मंत्रिपदाचा लाभ झाला. फेब्रुवारी १९२७ मध्ये त्यांची भारतमंत्र्याच्या लंडनमधील सल्लागार समितीचे एक सदस्य म्हणून नेमणूक झाल्यावर परांजपेंच्या जागी जी. बी. प्रधान यांना मंत्रिपद लाभले. ब्राह्मणेतर पक्षाच्या प्रमुख आमदारांमध्ये खासेराव पवार, भास्करराव जाधव, पंडितप्पा चिकोडी, सिद्दप्पा कंबळी, रा. वि. वंडेकर, शंकरराव झुंजारराव, नामदेव नवले आणि डोंगरसिंग पाटील यांचा समावेश होता. बाबासाहेब आंबेडकर आणि डॉ. पी. जी. सोळंकी हे दलितांचे प्रतिनिधी म्हणून सरकारने त्यांना नियुक्त केलेले होते. सी. के. बोले व एस. सी. जोशी हे कामगारांचे प्रतिनिधित्व करीत होते. आणखीही दोन लहान पक्ष कायदेमंडळात होते.

स्वराज्य पक्षाचे विघटन झाल्यामुळे ब्रिटिश सरकारला विरोध करण्याचे प्रसंग फारसे उद्भवणे अशक्य होते. सायमन आयोगास काही पक्षांनी कायदेमंडळात विरोध केला हे खरे. तरीही अर्थमंत्री चुनीलाल मेहता यांनी त्या आयोगाशी सहकार्य करण्यासाठी नेमावयाच्या समितीसाठी मांडलेला ठराव ६४ विरुद्ध ४० मतांनी संमत झाला होता. मुंबई कायदेमंडळाने सायमन आयोगाबरोबर सहकार्य करण्यासाठी नेमलेल्या समितीस सरदार मुजुमदार, भास्करराव जाधव, डॉ. आंबेडकर आणि सिंधमधील भुट्टो यांचा समावेश होता.

स्वराज्य पक्षाने प्रारंभी चित्तरंजन दास यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय पातळीवर विरोधी पक्षाची भूमिका वठविली होती. त्यांच्यानंतर मोतीलाल नेहरूंनीही स्वराज्य पक्षाच्या विद्यमाने काँग्रेसचा कार्यक्रम बऱ्याच अंशी अमलात आणण्याचा प्रयत्न केला. तथापि महाराष्ट्रातील स्वराज्य पक्षात प्रतियोगी सहकारिता ही विचारधारा भिनली. मध्यप्रांत-वऱ्हाडात तांबे प्रकरण उद्भवले. केळकर, भोपटकर, जयकर, अणे, मुंजे वगैरे प्रतियोगी सहकारवादी मंडळींना असहकारिता व कायदेभंग आंदोलन करण्याची काँग्रेसची रणनीती नापसंत होती. उदाहरणार्थ, बॅ. नरिमन यांनी करबंदी आणि कायदेभंग आंदोलन उभारण्यासाठी पालघरमध्ये भरलेल्या परिषदेत ठराव मांडला असता, तो बहुमताने फेटाळण्यात आला होता. टिळकवादी प्रतियोगीवाल्यांमुळे राजकारणात शीतयुद्धाची स्थिती उद्भवली होती.

ब्राह्मणेतर व स्वराज्य पक्ष यांच्यात समन्वय व सहकार्याची भावना नसल्याने मुंबई कायदेमंडळात परस्परांचे अनेक चांगले ठराव पराभूत होत असत. **बाँबे क्रॉनिकलचे** संपादक व भारतमित्र बेंजामिन हॉर्निमन यांना सरकारने भारताबाहेर हद्दपार केले होते. त्यांना पुन्हा भारतात येण्यास परवानगी द्यावी असा प्रशंसनीय ठराव स्वराज्य पक्षाच्या नरिमन यांनी मांडला असता, तो कायदेमंडळात ३७ विरुद्ध ४३ मतांनी फेटाळण्यात आला. स्वराज्य पक्षाच्या पी. जी. जोशी यांनी जिल्हा लोकल बोर्डाबाबतच्या कायद्यात दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव मांडला (जुलै १९२५). परंतु ब्राह्मणेतर पक्षाच्या विरोधामुळे हा प्रस्ताव पराभूत झाला. त्याचा बदला म्हणून मुंबई महापालिका कायद्यात दुरुस्ती सुचवणारे एका ब्राह्मणेतर आमदाराचे विधेयक स्वराज्य पक्षाने हाणून पाडले. जुलै १९२५ पासून १९२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या प्रारंभापर्यंत स्वराजिस्टांनी कायदेमंडळात मौन धारण केले होते. ब्राह्मणेतर पक्षाचे सीताराम केशव बोले यांनी कायदेमंडळात मांडलेल्या उपरोक्त ‘ ग्रामजोशी वतन ’ विधेयकास स्वराज्य पक्षाच्या आमदारांनी अखेरपर्यंत कसून विरोध केला. तरीही हे विधेयक मंजूर झाले होते.

१९२६ च्या निवडणुकीनंतर अस्तित्वात आलेल्या मुंबई कायदेमंडळातील ३० आमदारांनी जातीयवादाला विरोध करण्यासाठी ‘ संयुक्त राष्ट्रीय पक्ष ’ काढला खरा. पण हा पक्ष राजनिष्ठ असाच होता. अस्पृश्य लोक व कामगारांचे प्रतिनिधित्व

करणाऱ्या दहा आमदारांनी आपला स्वतंत्र गट तयार केला. रामभाऊ ग. प्रधान यांनीही लोकपक्ष काढला. अशा परिस्थितीत स्वराज्य पक्षाचे विघटन झाले आणि १९२६-१९२९ या काळात ब्रिटिश सरकारला विरोध करणारा काँग्रेसव्यतिरिक्त दुसरा संघटित पक्ष उरला नाही.

वऱ्हाडकडून अधिक महसूल मिळत होता. मात्र मध्यप्रांत विभाग वऱ्हाडचे आर्थिक शोषण करतो अशी तेथेही भावना निर्माण झालेली होतीच.[१८]

## मध्यप्रांत-वऱ्हाड कायदेमंडळातील घडामोडी

१९२१-१९२३ या काळातील मध्यप्रांत-वऱ्हाडच्या कायदेमंडळातही सुसंघटित, निश्चित कार्यक्रम असलेला व शिस्तबद्ध असा राजकीय पक्ष नव्हता. या प्रांताच्या एकूण एक कोटी चाळीस लाख लोकसंख्येत साक्षरतेचे प्रमाण पाच टक्क्यांहूनही कमी होते. गोंड, महार, चांभार, कुणबी आणि तेली यांची संख्या एकूण लोकसंख्येच्या जवळजवळ पन्नास टक्के होती. आणि त्यांच्यापैकी केवळ दोन टक्के लोक साक्षर होते. बाकीचे सर्वच निरक्षर होते. एकूण लोकसंख्येत जेमतेम एक टक्का लोकांनाच मतदानाचा हक्क होता. कायदेमंडळाच्या एकूण ७० सदस्यांमध्ये ५३ जण लोकांनी निवडलेले होते. पण एक टक्का लोकांनाच मताधिकार असल्यामुळे त्या ५३ जणांना लोकनियुक्त म्हणणे हा विनोदच होता. गव्हर्नरच्या कार्यकारिणीत बी. पी. स्टँडार्ट आणि मोरोपंत जोशी हे सभागृहाचे पदसिद्ध सदस्य होते. तर १५ जण सरकारनियुक्त सभासद होते. बहिष्कारामुळे काँग्रेस पक्षाचा एकही आमदार नव्हता. या प्रांतातील आमदारांमध्ये हिंदू, दलित, मुसलमान असे गट होते. मराठी व हिंदी भाषिक असे तट होते. शिवाय वऱ्हाडातील मराठी भाषिक आमदार व नागपूर भागातील मराठी आमदार असा भेदही होता. त्यामुळे ब्रिटिश नोकरशाहीला मोकळे रान होते. त्यामुळे गांधीजी व काँग्रेसने घातलेला निवडणुकीवरील बहिष्कार तर्कसंगतच होता, असे वाटते. हेच पाहाना, या प्रांताची राजधानी नागपूरला असूनही विद्यापीठ नागपूरऐवजी जबलपूरला स्थापन करावे अशी सूचना प्रांतातील हिंदी भाषिक आमदारांनी केली होती. मात्र जनतेचे भाग्य की, कायदेमंडळाने विद्यापीठ नागपूरलाच स्थापन करण्याचा ठराव पास केला. पण हा ठराव संमत झाल्यावरही विद्यापीठ अस्तित्वात येण्यास

राजकारणामुळे बराच विलंब लागला. माध्यमिक शाळा व नगरपालिका याबाबतचे कायदे गव्हर्नर फ्रँक स्लायच्या कारकिर्दीत झाले.

फ्रँक स्लाय या पहिल्यावहिल्या गव्हर्नरने लोकनियुक्त मंत्र्यांना मुंबईच्या गव्हर्नरपेक्षा थोडी जास्त मोकळीक दिली असे दिसते. तथापि सत्य हेच होते की, गोरे वरिष्ठ अधिकारी आपल्या तंत्रानेच कारभार करीत.

डिसेंबर १९२३ मध्ये झालेल्या निवडणुकीत मध्यप्रांत-वऱ्हाडच्या कायदेमंडळात स्वराज्य पक्षाला निर्विवाद बहुमत प्राप्त झाले. म्हणून आधीच्या टर्ममध्ये असलेली मरगळ दूर झाली. राष्ट्रीय स्तरावर स्वराज्य पक्ष बराच सक्रिय झाल्याचाही हा परिणाम होता. १५ जानेवारी १९२४ रोजी शपथविधी आटोपल्यावर कायदेमंडळाचे अध्यक्ष गंगाधरराव चिटणवीस व गव्हर्नर फ्रँक स्लाय यांची भाषणे झाली. डॉ. मुंजे स्वराज्य पक्षाचे नेते असल्यामुळे त्यांनी पक्षाची सरकारविरोधी रणनीती ठरविली. १६ जानेवारी पासून सरकार विरुद्ध स्वराज्य पक्ष यांच्यात लढतीचा प्रारंभ झाला. त्यामुळे प्राथमिक शिक्षण आणि जमाबंदी यासंबंधीची विधेयके सरकारला पुढे ढकलावी लागली. स्वराज्य पक्ष बहुमतात आल्यापासून प्रांतिक सरकारची अडवणूक होऊ लागली, आणि स्लाय यांची परिस्थिती विचित्र झाली. सरकार अगतिक झाले. हिंदुस्तानातील दुसऱ्या कोणत्याही गव्हर्नरला असा सामना करावा लागला नव्हता, हे विशेष होय. राघवेंद्रराव यांनी स्वराज्य पक्षाच्यावतीने एस. एम. चिटणवीस व हिफाजत अली या दोन मंत्र्यांवर अविश्वासाचा ठराव मांडला आणि तो ४४ विरुद्ध २४ मतांनी मंजूरही झाला. मंत्रिमंडळाची बरीच नामुष्की झाली होती.

मार्च १९२४ मध्ये सरकारचा सर्वच अर्थसंकल्प स्वराज्य पक्षाने बहुमताच्या आधारे फेटाळून लावला. लोकनियुक्तांमधून मंत्रिपद लाभलेल्या मंत्र्यांनी दरसाल केवळदोनच रुपये पगार घ्यावा अशा आशयाचा प्रस्ताव कायदेमंडळात मांडला. आणि तो संमतही झाला. याबद्दल महात्मा गांधींनी संबंधितांचे कौतुकही केले होते. आणखी महत्त्वाचे हे होते की, ब्रिटिश मालावर बहिष्कार घालावा असा स्वराज्य पक्षाचा ठराव सभागृहात ४० विरुद्ध २० मते पडून संमत झाला. त्यामुळे नागपूरपासून लंडनपर्यंतचे ब्रिटिश सत्ताधीश संकटात पडले होते. चित्तरंजन दास व मोतीलाल नेहरू यांनी स्वराज्य

पक्षाने कायदेमंडळात जाऊन ब्रिटिशांची कोंडी करणे आणि 'मेंडिंग ऑर एंडिंग द कौन्सिल' हे धोरण स्वीकारले होते. **या धोरणास मध्यप्रांत-वऱ्हाडाइतके यश दुसऱ्या कोणत्याही प्रांतात मिळाले नव्हते. या कायदेमंडळाने ब्रिटिशांची अडवणूक केली होती.**

अशा प्रकारचे यश लाभल्यावर कायदेमंडळातील स्वराज्य पक्षाच्या आणि विशेषतः पक्षाच्या वऱ्हाडमधील आमदारांना आपण अधिकाराची पदे स्वीकारावी असे जानेवारी १९२५ पासून वाटू लागले. काँग्रेस पक्षाने असहकार करण्याचे धोरण स्थगित केलेले होते. त्यामुळे १९२५-२६ या वर्षाचा अर्थसंकल्प फेटाळू नये असाही एक विचार पुढे आला. बा. ग. खापर्डे यांनी डॉ. चोळकर यांना लिहिलेल्या पत्रात लिहिले होते की, "जेव्हा आपल्या पक्षाला अधिकारपदे देऊ करण्यात आली तेव्हा ती नाकारण्यात आपल्या पक्षाने चूक केली. आताही आपण अधिकारपदे नाकारली तर ती कधीही न भरून येणारी चूक ठरेल." स्वतः मुंजे यांनाही अधिकारपदे स्वीकारावी असेच वाटत होते. तथापि पक्षातील बहुसंख्य आमदारांना हे धोरण अमान्य होते. स्वराज्य पक्षाच्या अखिल भारतीय कार्यकारिणीलाही अधिकारग्रहण करणे पसंत नव्हते. कारण अधिकारग्रहण हे असहकार धोरणाच्या विरुद्ध होते.

सर फ्रँक स्लायनंतर जानेवारी १९२५ मध्ये मॉंटेग्यू बटलर मध्यप्रांत-वऱ्हाडचे गव्हर्नर झाले. त्यांनी कायदेमंडळाचे निवृत्त होणारे सभापती गंगाधरराव चिटणवीस यांच्यामार्फत मुंजेंना आपलेसे करण्याचा प्रयत्न केला. त्यानुसार चिटणवीस यांनी मुंजेंशी विचारविनिमय सुरू केला. मुंजेंनी राघवेंद्रराव यांना तसे कळवले देखील. पण गव्हर्नरने पुढील बोलणी करण्यासाठी आपणास बोलवावे असे मुंज्यांना वाटत होते. मात्र गव्हर्नरला प्रथम हमी हवी होती की, स्वराज्य पक्ष अर्थसंकल्प संमत करेल व लोकनियुक्त मंत्र्यांना दर्जानुसार पगार मंजूर करण्यात येईल, आणि मंत्रिमंडळ बनवण्यात ते गव्हर्नरशी सहकार्य करतील. गंगाधररावांनी तसा अर्ज कायदेमंडळाच्या बैठकीपूर्वी दिल्यास गव्हर्नर स्वतः मुंजे व त्यांच्या सहकाऱ्यांना भेटण्यास तयार होते. त्याप्रमाणे मुंज्यांनी राघवेंद्रराव आणि रविशंकर शुक्ला यंचे मन वळवून त्यांना अधिकारग्रहण करण्यास राजी केले. तथापि हे प्रकरण वाटते

तसे सरळ नव्हते. डॉ. खरे यांनी या तिघांचा डाव उधळला. फक्त श्री. ब. तांबे यांना सभापती पदाची निवडणूक लढवण्याची परवानगी देण्यात आली. तांबे यांना ४१ विरुद्ध २१ मते मिळाल्याने ते सभापती झाले. लवकरच बटलर साहेबांनी ऑक्टोबर १९२५ मध्ये मोरोपंत जोशींच्या ऐवजी तांबेंना राखीव खात्याचे मंत्री बनवले. त्यांच्या नेमणुकीचा काळ पाच वर्षांचा असल्याने त्यांना पुन्हा निवडणूक लढविण्याची गरज नव्हती. मात्र तांबेंच्या नेमणुकीमुळे स्वराज्य पक्षातील बेबनाव उघड झाला.

अधिकारपदे मिळविण्यासाठी आतुर असलेल्या टिळकपंथीयांच्या प्रतिसहकार पक्षातर्फे स्वराजिस्टांनी निवडणूक लढवून राघवेंद्ररावांशी हातमिळवणी केली. त्यमुळे राघवेंद्रराव व रामराव देशमुख सोपीव खात्यांचे मंत्री झाले. या मंत्र्यांनी एक वर्षभर सहकार्याने काम केले. पण पुढे मतभेद उद्‌भवले. ते त्यांनी मिटविले, परंतु पुन्हा मतभेद उद्‌भवले. दरम्यान कायदेमंडळातील राष्ट्रीय पक्षात फूट पडली व काही आमदारांनी पक्षाचाच राजीनामा दिला. यामुळे प्रतिसहकार पक्षाचे बळ घटले. सुंदोपसुंदीच्या राजकारणात १८ ऑगस्ट १९२८ रोजी रामराव देशमुखांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला.

राघवेंद्ररावांनीही राजीनामा दिला, पण आठच दिवसांनी ते पुन्हा मंत्री झाले. २७ आमदारांच्या पाठिंब्याने त्यांनी ‘ डेमॉक्रॅटिक पार्टी ’ नावाचा पक्ष स्थापन केला. त्यांनी प्रतिसहकार पक्षाचे आमदार तुकाराम ज. केदार यांच्याशी सलोखा करून त्यांना मंत्री बनवले. केदार यांनी आपल्या पक्षाची संमती न घेताच मंत्रिपद स्वीकारले होते. म्हणून प्रतिसहकार पक्षाने त्यांचा निषेध केला. शेवटी १७ जानेवारी १९२९ रोजी राघवेंद्र राव-केदार मंत्रिमंडळ कोसळले. प्रांतातील राजकारणाचे रंग असे बदलत असताना रामराव देशमुखांना पुन्हा मंत्री बनवणे गव्हर्नरला भाग पडले.

**वेगळ्या विदर्भ प्रांताची मागणी :—**राघवेंद्रराव व केदार यांचे मंत्रिमंडळ कोसळल्यानंतर (१७ जानेवारी १९२९) वऱ्हाड व मध्यप्रांतातील मराठी भाषिक भाग एकत्र करून स्वतंत्र विदर्भ प्रांत निर्माण करण्याचा ठराव बाबासाहेब खापर्डे यांनी कायदेमंडळात मांडला होता. या **इतिहासाच्या खंड क्रमांक एकमध्ये** म्हटल्याप्रमाणे, निजामाकडून अभ्यर्पित केलेले वऱ्हाडचे चार जिल्हे—बुलढाणा, अकोला, अमरावती

व यवतमाळ—आणि हिंगोली जिल्हा हा मराठी भूभाग लगतच्या मुंबई इलाख्यातच समाविष्ट करावा अशी दादासाहेब खापर्डे, टिळक, गोपाळ कृष्ण गोखले वगैरेंची मागणी होती. तथापि हा भूभाग टिळक व गोखलेंच्या प्रभावाखालील राजकीय दृष्टीने जागृत अशा महाराष्ट्राशी संलग्न न करता, मागास असलेल्या हिंदी प्रदेशात विलीन करावा असा व्हाइसरॉय लॉर्ड कर्झनने धूर्त निर्णय घेतला होता. याबाबत रघुनाथराव मुधोळकर यांनीही प्रयत्न केले होते. कदाचित त्या प्रयत्नांची आठवण आल्याने बा. ग. खापर्डे यांनी हा ठराव मांडला असावा. या ठरावास मिर्झा रहमान बेग आणि महमद शरीफुद्दीन या मुसलमान आमदारांनीही पाठिंबा दिला. मात्र काँग्रेस स्वराज्य पक्ष आणि राघवेंद्रराव व केदार यांनीही स्वतंत्र विदर्भ प्रांताच्या मागणीला विरोध केला. प्रांतांची भाषिक तत्त्वावर पुनर्रचना करण्याची वेळ अजून आलेली नाही आणि हा प्रश्न स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच सोडवता येईल, असा विचार तेव्हा व्यक्त करण्यात आला. शिवाय स्वतंत्र विदर्भ प्रांत झाल्यावर राजकीय सत्तेचे पारडे कुणबी लोकांच्या बाजूला झुकेल आणि ते बा. ग. खापर्डे यांच्यासारख्या ब्राह्मणांना परवडणार नाही, असा युक्तिवाद धूर्त इंग्रजांनी केला. ठरावावरील सर्व चर्चेचा रोख पाहून खापर्डेनी आपला ठराव मागे घेतला. जातीयवादी भावनाही होत्याच. म्हणून विदर्भ होता तिथेच राहिला.

सन १९२६-१९२९ या काळात मोरेश्वर अभ्यंकर, डॉ. ना. भा. खरे आणि जमनालाल बजाज यांच्या समर्थकांनी मराठी तसेच हिंदी भाषिकांमध्ये काँग्रेसचा प्रभाव वाढविला. रामभाऊ रुईकरांनी गिरणी कामगारांचा तर समिउल्ला खान यांनी मुसलमानांचा काँग्रेसला पाठिंबा मिळविण्यासाठी मोठी कामगिरी केली. रुईकर व खरे यांच्या प्रयत्नांमुळेच १९२८ सालात नागपूरला ‘ आयटक ’ या कामगार संघटनेची शाखा स्थापन झाली. त्यामुळे पुढील काळात काँग्रेसच्या स्वातंत्र्य आंदोलनासाठी सुसंघटित मनुष्यबळ उपलब्ध झाले. रामभाऊ राष्ट्रपातळीवरील विख्यात कामगार पुढारी झाले. [१९]

बॅ. अभ्यंकर, मुंजे, डॉ. खरे आणि या. मा. काळे यांनी वेळोवेळी ब्रिटिशांच्या धोरणांवर आघात करून सरकारचे वाभाडे काढले. असहकारिता आंदोलन प्रलंबित

झाल्यानंतरच्या काळात स्वराज्य पक्षाने आपली सदस्यसंख्या वाढविली. आणि निवडणुकांच्या निमित्ताने आपला कार्यक्रम लोकांपुढे मांडला होता. शिवाय महत्त्वचे म्हणजे ब्रिटिशांनी कायदेमंडळात मांडलेले अनेक अनुचित प्रस्ताव पक्षश्रेष्ठींच्या आदेशानुसार धुडकावून लावले होते. सायमन आयोग दुसऱ्यांदा हिंदुस्तानात येण्यापूर्वी देशातील आठ प्रांतिक कायदेमंडळांनी आयोगाला सहकार्य देण्यासाठी समित्या नियुक्त केल्या होत्या. तथापि एकमेव मध्यप्रांत-वऱ्हाडच्या कायदेमंडळाने आयोगावर बहिष्कार घालण्याचा ठराव मोठ्या बहुमताने संमत केला. हा ठराव काँग्रेस सदस्य ब्रिजलाल बियाणी यांनी मांडला होता. त्यास स्वराज्य पक्षाने पाठिंबा दिला होता.

❑❑

## संदर्भ


१. **नागपूर जिल्हा गॅझेटिअर,** भाग १, २००५, पृ. २००.

२. बिपन चंद्रा, **इंडियाज् स्ट्रगल फॉर इंडिपेंडन्स,** पृ. २३५-३७.

३. शंकरराव देव, **दैव देते पण कर्म नेते,** १९७६, पृ. ११५.

४. कित्ता, पृ. ११८-१९.

५. के. के. चौधरी, **हिस्टरी ऑफ बाँबे,** पृ. १४९-५१ ; बाँ. प्रे. पोलीस अँबस्ट्रॅक्ट ऑफ इंटेलिजन्स, मे १९२३.

६. य. दि. फडके, **विसाव्या शतकातील महाराष्ट्र,** खंड तिसरा, पृ. ९३.

७. कित्ता, पृ. १००-०३, २२५-२७.

८. सुमित सरकार, **मॉडर्न इंडिया,** पृ. २३१-३३.

९. कित्ता, पृ. २३३-३७.

१०. फडके, उपरोक्त, पृ. १६१-६२.

११. कित्ता, पृ. १६१-६२, १६४-६६, १७०-७३.

१२. कित्ता, पृ. १०९-११.

१३. कित्ता, पृ. १४५-४६.

१४. कित्ता, पृ. ११७-१८.

१५. मुंबई सरकार, होम डिपार्ट. स्पेशल ब्रँच फाईल, क्र. १४३डी, १९२१-१९२४, टिपणे.

१६. मुंबई सरकारने राज्यसुधारणा चौकशी समितीला पाठवलेला अहवाल, १९२५, पृ. १२४.

१७. फडके, उपरोक्त, पृ. १८५-८९.

१८. कित्ता, पृ. १८९-९८.

१९. चौधरी, **वर्धा जिल्हा गॅझेटिअर,** १९९२, पृ. ७३-७४. काँग्रेसच्या आंदोलनाशी समरस होणे डॉ. मुंजे यांना शक्य नव्हते. म्हणून त्यांनी १९२७ पासून हिंदुमहासभेच्या कार्यास वाहून घेतले आणि ते मध्यवर्ती कायदेमंडळाचे सभासद बनले.

प्रकरण ८

## सायमन आयोग व नवचैतन्य

१९२६ साली स्वातंत्र्य चळवळीत मरगळ आलेली होती. देशावर आर्थिक मंदीचेही सावट होते. हिंदुस्तानभर हिंदू-मुसलमानांमध्ये मधूनमधून दंगे उसळत असत. कायदेभंगवादी काँग्रेस, उदासीन स्वराज्य पक्ष आणि प्रतियोगिता सहकार पक्ष या तीन गटांमध्ये काँग्रेसचे विभाजन झालेले होते. कायदेमंडळांमध्ये जाऊन ब्रिटिशांशी संघर्ष करण्याचे स्वराज्य पक्षाचे धोरण कालांतराने विफल ठरले होते. स्वराज्यपक्षाची शकले पडून विघटन झाले. बॅ. जयकर व केळकरांचा प्रतियोगी सहकारवादी गट अगदी प्रभावहीन ठरला होता. स्वतः केळकर वगैरे टिळकभक्त हिंदुमहासभेत सामील झालेले होते. अशा वातावरणात राष्ट्रीय आंदोलनात उदासीनता आलेली होती. यात्त राष्ट्रीय काँग्रेस मूलभूत राष्ट्रवादी जनजागृतीचे कार्य करीतच होती. स्वातंत्र्य आंदोनलात आलेली अगतिकता व कोंडी फोडण्यास साधारणपणे तीन कारणे कारणीभूत झाली– बार्डोली सत्याग्रह, सायमन आयोग व युवकांच्या संघटनांचा लढा.

यशस्वी झालेल्या पूर्वोक्त **बार्डोली सत्याग्रहाचा** संदेश काँग्रेसने वेदवाक्यासारखा (गॉस्पेलसारखा) प्रसारित केला. स्वातंत्र्य चळवळीला जनतेच्या आर्थिक समस्यांची जोड दिल्याने हा सत्याग्रह यशस्वी झालेला होता. जमीन महसुलाचा अन्याय हा केवळ बार्डोलीतच स्थानसीमित नव्हता. तो प्रश्न संपूर्ण इलाख्याचा होता. म्हणूनच मुंबई, ठाणे, कुलाबा, कोकण, नाशिक, नगर आणि खानदेशातून अगणित शेतकरी व युवक बार्डोलीत गेले होते. युसुफ मेहेरअली व बॅ. नरिमन यांच्या बाँबे प्रेसिडेंसी यूथ लीगने विस्थापित झालेल्या शेतकऱ्यांना या सत्याग्रहात अन्नधान्य, कपडे व जीवनावश्यक वस्तू पुरवल्या होत्या. या सत्याग्रहामुळे युवकांमध्ये राष्ट्रवादी जाणिवा व संघटन-कुशलता निर्माण झाली. सत्याग्रहाच्या यशामुळे यूथ लीगचा आत्मविश्वास वाढला, हे लीगच्या अहवालातूनही दिसते. गांधीजींनी तर बार्डोलीविषयी पुष्कळ लिहून ठेवलेले आहे.

## सायमन आयोग व नवचैतन्य

राष्ट्रीय आंदोलनात जिवंतपणा आणण्यास सायमन आयोगाविरुद्धचे रणकंदनही कारणीभूत झाले. या आयोगाच्या निषेधार्थ संपूर्ण काँग्रेस संघटित झाली. जनजागृती अभियान सुरू करण्यात आले. पक्षातील गटा-तटाचे राजकारण कमी झाले. विशेषतः बाँबे प्रेसिडेंसी यूथ लीग, पुणे यूथ लीग आणि इतरही युवकांच्या संघटनांनी या आयोगावर बहिष्कार टाकण्यासाठी मोठी चळवळ उभारली. देशातील राष्ट्रवादी वृत्तीचे युवक संघटित झाले व त्यांनी चळवळीत उडी घेतली. त्यांनी विरोधकांचे पितळ उघडे पाडले. यातून हजारो स्वातंत्र्यसैनिकांची जडणघडण झाली. महाराष्ट्रातील युवा संघटनांप्रमाणे नौजवान भारत सभा व सरदार भगतसिंग वगैरे क्रांतिकारकांच्या इतर संघटना निर्माण झाल्या. राष्ट्रीय जीवनात नवचैतन्य निर्माण झाले. याच सुमारास कॅथरिन मेथो या अमेरिकन लेखिकेचे **मदर इंडिया** नामक भारतद्वेषाने भरलेले पुस्तक प्रकाशित झाले होते. हीन अभिरुचीच्या या पुस्तकासाठी भारतमंत्र्याने लेखिकेला खास सुविधा व पैसे दिले होते. गांधीजींनी या घाणेरड्या पुस्तकास 'गटार निरीक्षकाचा अहवाल' म्हटले होते. पण त्यामुळे सुशिक्षित भारतीयांची राष्ट्रीय अस्मिता जागृत झाली. तसेच सायमन आयोग हे एक राष्ट्रीय आव्हान वाटू लागले. गर्जनेला चांगले निमित्त लाभले!

## सायमन आयोगाची घोषणा

कलोनिअल सरकारच्या कॅबिनेटने इंग्लंडमधील १९२९ च्या निवडणुकीतील हुजूर पक्षाची राजकीय गरज म्हणून सायमन आयोग नेमला होता. भारताने आयोगाची मागणी केलेली नव्हती. लंडनच्या आदेशानुसार ८ नोव्हेंबर १९२७ रोजी व्हाइसरॉय आयर्विन यांनी आयोगाची घोषणा केली. १९१९ च्या राज्य सुधारणा कायद्यानुसार केलेल्या सुधारणांच्या यशापयशाची चिकित्सा व मूल्यमापन करून सांविधानिक सुधारणा सुचविण्यासाठी आयोग नेमला आहे, अशी ही घोषणा होती. सकृतदर्शनी घोषणा गोंडस वाटली, तरी ती अत्यंत फसवी व भारताला अपमानकारक होती. आयोगाचे सातही सभासद ब्रिटिश पार्लमेंटचे सभासद होते. सायमन व इतर पाच सदस्य काँझर्वेटिव्ह पक्षीय असून एकटे क्लेमंट ॲटली हे लेबर पक्षाचे होते. काँग्रेसने भारतीय सदस्याची मागणी केली. पण ती फेटाळण्यात आली.

लॉर्ड आयर्विन घोषणा करणार तेव्हा गांधीजी दिल्लीपासून सुमारे १,९०० मैलांवरील मंगलोरमध्ये होते. म्हणून तारसंदेश पाठवून त्यांना ताबडतोब दिल्लीला बोलावले. आपला महत्त्वाचा दौरा अपुरा सोडून परत आलेल्या गांधीजींच्या हातात आयर्विनने भारतमंत्र्याच्या घोषणेचा एक कागद ठेवला! गांधीजींनी विचारले, "इतकेच"! आयर्विनने "होय" या एका शब्दात उत्तर देताच, गांधीजींनी त्यांना ऐकवले, "ही बातमी एक आण्याच्या पोस्ट-कार्डामधूनही कळवता आली असती!" इतकी ती गांधीजींना क्षुल्लक वाटली.

कट्टर साम्राज्यवादी असलेला भारतमंत्री लॉर्ड बर्कनहेड याने हुजूर पक्षाची निकड म्हणून सायमन मंडळ पाठवले होते. बर्कनहेडला वाटे की, भारतीयांमध्ये स्वतःची राज्यघटना बनविण्याची पात्रताच नाही. त्यांची दर्पोक्ती पाहा :— "म्हणून आम्ही तुम्हास जे देतो ते नाकारण्याचे धाडस करू नका. तुम्ही नाकारल्यास आम्ही बघून घेऊ"[१]. अशी धमकी देणाऱ्या बर्कनहेड साहेबांचा तसाच उर्मट पूर्वज व भारतमंत्री असलेल्या सर जॉन स्ट्रॅची याने केंब्रिजच्या विद्यार्थ्यांना ज्ञानामृत पाजले होते की, इंडिया हा एक देश अथवा राष्ट्र नव्हेच नव्हे! "नो इंडियन नेशन, नो पीपल ऑफ इंडिया". अशी ही मंडळी हिंदुस्तानला कशा प्रकारची राज्यघटना देणार हा खरा सवाल होता. तेव्हा इंग्लंडमध्येच असलेल्या मोतीलाल नेहरूंना हे कमिशन केवळ धुळफेक असल्याचे पटले होते.

गांधी-नेहरूंनी याबाबत किंचितही अपेक्षा बाळगलेली नव्हती. तद्‌वतच भारतातील सर्वच स्वातंत्र्यप्रेमी पक्षांनी सायमनच्या 'गौरकाय सप्तका' चा व्हाइसरॉयच्या घोषणेपासून निषेध केला. मात्र निषेध करण्याची प्रत्येक पक्षाची कारणे निरनिराळी होती. जालियनवाला बागेत झालेल्या हत्याकांडाच्या वेळी जसा देशव्यापी प्रक्षोभ झाला होता, त्याखालोखाल हा निषेध व्यापक होता. तथापि तरीही या आयोगाकडे आशाळभूतपणे पाहाणारेही भारतात होतेच. अगदी आमच्या महाराष्ट्रातही बरेच होते. महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर पक्ष, मतलबी मराठी संस्थानिक, जातीय पक्षांचे नेते, भांडवलदार, हैदराबादचा निजाम व कॅाँप्रेडोर वर्गातील जहागीरदार वगैरे आपले हितसंबंध जपण्यासाठी आधीपासूनच स्वागतासाठी सिद्ध झाले होते. राजनिष्ठ मंडळी

आपल्या योजना आखत होतीच. मुस्लीम लीगचे धोरण काहीही असले, तरी महंमद अली जिनांनी स्वतःची राष्ट्रवादी भूमिका घोषित केली होती, “वुई आर सन्स ऑफ धिस लँड, वुई हॅव टू लिव्ह टुगेदर ........ बिलिव मी देअर इज नो प्रोग्रेस फॉर इंडिया अन्टील द मुसलमानस् अँड हिंदूज आर युनायटेड”. **तेव्हा जिना अखंड हिंदुस्तानवादी होते.**[२]

**ब्रिटिश पार्लमेंटने सायमन आयोगाकडे सोपविलेले काम साधारणपणे पुढीलप्रमाणे होते :—**हिंदुस्तानातील राज्यव्यवस्थेचे मूल्यमापन करणे; कायदेमंडळांची उपयुक्तता ठरविणे, शिक्षणाचा विकास, जबाबदार राज्यव्यवस्था निर्माण करण्याची गरज ठरविणे ; प्रांतिक कायदेमंडळांमध्ये वरिष्ठ सभागृहांची गरज आहे काय; प्रांतिक व मध्यवर्ती सरकारमधील संबंध इ. याबाबत चर्चा करण्यासाठी आयोगाने प्रमुख शहरांमधील राज्यकर्त्यांच्या व राजकारण्यांच्या भेटीगाठी घ्यावयाच्या होत्या.

महाराष्ट्रातील प्रतियोगी सहकार गटाचे नेते न. चिं. केळकर, बॅ. जयकर, अणे आणि मुंजे यांनी या आयोगामध्ये एकही भारतीय सदस्य नाही, या मुद्यावर सरकारचा निषेध जाहीर केला. तथापि केवळ या एका कारणासाठी आयोगावर बहिष्कार घालावयास हे नेते तयार नव्हते. मात्र कायदेमंडळांतील समित्यांशी आयोगाचे संबंध कसे होतात, हे स्पष्ट होईपर्यंत आपण थांबू, असे केळकरांनी मोघमपणे जाहीर केले. बॅ. जयकरांनीही असाच वकिली पवित्रा घेतला. या पक्षाने संदिग्ध भूमिका घेतली. तथापि देशातील राष्ट्रवादी पक्षांच्या आयोगाविरोधी प्रतिक्रिया स्पष्ट होताच, त्यांनी आपली जाहीर भूमिकाही बदलली. आणि सायमनवर बहिष्कार घालण्याचे ठरविले. त्याचे व्हायचे ते परिणाम झाले.

विशेष म्हणजे नेमस्त पुढाऱ्यांच्या नॅशनल लिबरल फेडरेशनने २७ डिसेंबर १९२७ रोजी मुंबईत भरवलेल्या वार्षिक अधिवेशनात सायमन कमिशनशी सहकार्य न करण्याचा निःसंदिग्ध ठराव मंजूर केला होता. तेजबहादूर सप्रू यांनी ही घोषणा करताच युसुफ मेहेरअली आणि स. का. पाटील यांनी त्यांचे मनःपूर्वक आभारही मानले होते. यामुळे मुंबईचे सरकार खूपच अस्वस्थ झाले होते. तथापि मद्रासमधील जस्टिस पक्षाप्रमाणेच महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर पक्षाचे भास्कर जाधव यांनी सायमनशी सहकार्य करण्याचे घोषित केले. पण त्याच पक्षाच्या केशवराव जेधे, विठ्ठल रामजी शिंदे,

भाऊराव पाटील, नाना पाटील वगैरेंना आपल्या पक्षाचे धोरण अमान्य होते. तेव्हाही मुंबईत राजकीय वजन असलेले बॅ. जिना सायमनवर बहिष्कार घालण्यावर ठाम होते. तथापि मुस्लीम लीगमधील सर महंमद शफी यांचा पंजाब आणि बंगाल प्रांतांमधील एक मोठा गट बहिष्कार घालण्यास प्रारंभी तरी तयार नव्हता. मात्र त्यांनाही राष्ट्रीय प्रवाहाबाहेर फेकले जाण्याचा धोका जाणवला. आणि म्हणून पुनर्विचार करून लीगमधील दोन्ही गटांनी आयोगावर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला. दलितांचे नेते बाबासाहेब आंबेडकर व एम. सी. राजा यांनी मात्र दलित वर्गीय हितासाठी सायमन आयोगाला सहकार्य देण्याचे ठरविले. परंतु नंतर त्यांना सायमनचा वाईट अनुभव आला.

काही राजकीय घटकांनी बोटचेपी आणि अनियतरूप अशी भूमिका घेतली होती. त्यांचे मन वळविण्याचे प्रयत्न काही अंशी सफल झाले. तरी ठाकरसींसारख्या उद्योगपतींनी सायमन मंडळाच्या सोहळ्यात सामील न होण्याचे आश्वासन दिले. मुंबई व पुण्यातील यूथ लीग व सरदार भगतसिंग आणि त्यांच्या साथीदारांच्या संघटनांनी आयोगावर बहिष्कार घालण्याच्या योजना आधीच आखलेल्या होत्या. त्याचप्रमाणे नेहरू व डॉ. हर्डीकर यांच्या हिंदुस्तानी सेवादलानेही बहिष्काराची तयारी केलेली होती.

## सायमन आयोगाची पहिली फेरी

जॉन सायमन यांचे गौरकाय मंडळ ३ फेब्रुवारी १९२८ रोजी प्रथम मुंबई बंदरात उतरले. त्यांच्या निषेधाचा कार्यक्रम आधीच ठरलेला होता. त्यांची बोट मुंबई बंदरात शिरण्यापूर्वीच तिला दहा होड्यांमधून काळी निशाणे व फलक दाखवून घेरावे, अशी रघुनाथराव निंबकर वगैरेंची योजना होती. पण होडीवाल्यांनी खूपच पैसे मागितल्यामुळे हा बेत सोडावा लागला होता. बंदराबाहेर जमावबंदी हुकूम लादलेला असूनही तिथे दोनशे जणांचा जमाव जोरदार निषेध करत होता. शौकत अली, नरिमन, मेहेरअली, निंबकर, मिरजकर, झाबवाला, स. का. पाटील, बा. गं. खेर वगैरेंनी मुंबईतील निदर्शनांचे नेतृत्व केले होते. अ. भा. काँग्रेस कार्यकारिणीच्या आदेशानुसार मुंबईत व सर्व शहरांमध्ये हरताळ पाळण्यात आला. देशप्रेमींनी पंतप्रधान रॅम्से मॅकडोनल्ड,

भारतमंत्री बर्कनहेड, जॉन सायमन वगैरेंच्या प्रतिमा ठिकठिकाणी जाळल्या. हिंदूंप्रमाणेच मुसलमानांनीही हरताळात भाग घेतला. माटुंगा रेल्वे वर्कशॉप, २८ कापड गिरण्या व काही कारखान्यांमध्ये संप झाला. त्याच दिवशी मद्रासमध्ये तीन जण पोलीस गोळीबारात ठार झाले होते.

सायमन आयोग ४ फेब्रुवारीला रेल्वेने दिल्लीला गेला. तेथेही रेल्वे स्थानकाबाहेर, मुंबई प्रमाणेच, 'सायमन गो बॅक' या घोषणांनी आयोगाचे स्वागत झाले. हॉटेलमध्ये सायमनच्या निजण्याच्या दालनाजवळ रात्री चाललेल्या घोषणांनी त्यांची झोपमोड झाली, अशी एक कथा शहरात पसरली होती. लाला लजपतराय यांनी १६ फेब्रुवारीस केंद्रीय कायदेमंडळात सायमनच्या निषेधाचा ठराव मांडला, तो ६८ विरुद्ध ६२ मतांनी मंजूर झाला व त्यामुळे सरकारचा पराभवही झाला हे विशेष!

**मोतीलाल नेहरू समितीचा अहवाल :—**आयोग आख्यानात थोडा विराम घेऊन सांगायचे की, सायमन आयोगावर बहिष्कार घालण्याचे ठरले, तरी हिंदुस्तानची नवी राज्यघटना कशी असावी याविषयी भारतीयांमध्ये सहमती असणे आवश्यक होते. संपूर्ण स्वातंत्र्याचे ब्रीदवाक्य समोर ठेवून नवी घटना तयार करावी, अशी काँग्रेसचे सरचिटणीस जवाहरलाल नेहरूंची सूचना होती. त्यासाठी १२ फेब्रुवारीपासून सर्वपक्षीय परिषद भरवण्यात आली. जवाहरलाल नेहरूंनी मांडलेली संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करण्यात अर्थ नाही, असे सप्रू व जिनांचे मत होते. मात्र एकमत होण्यास खरी अडचण हिंदू-मुसलमान यांच्यातील एकमताचा अभाव ही होती. मुंबई इलाख्यात असलेला सिंध प्रांत अलग करून त्याचा वेगळा प्रांत बनवावा ही मुसलमानांची मागणी होती. परंतु सिंधचे सर्वोच्च पुढारी जयरामदास दौलतराम व डॉ. चोइतराम गिडवाणी यांना हे पसंत नव्हते. त्या प्रांतात मुसलमान बहुसंख्य असल्याने, तेथेही त्यांच्यासाठी राखीव जागा असाव्या असा मुसलमानांचा दुसरा आग्रह होता. मोतीलाल नेहरू आणि श्रीनिवास अय्यंगार हे मुसलमान नेत्यांशी तडजोड करण्यासाठी झटत होते. तथापि एकमत न झाल्याने मे १९२८ मध्ये पुन्हा भेटावे असे ठरवण्यात आले. पुढील तोडगा काढण्यासाठी गांधीजींच्या सूचनेप्रमाणे मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय समिती नेमण्यात आली.

नवीन राज्यघटना तयार करण्याची कामगिरी या नेहरू समितीकडे सोपवण्यात आली. या समितीमध्ये गोविंदराव प्रधान, ना. म. जोशी व मा. श्री. अणे हे मराठी भाषिकही होते. समितीचे सचिव जवाहरलाल असून महत्त्वाच्या काही मुद्यांवर त्यांचे मोतीलालजींशीही मूलभूत मतभेद होते. पण तरीही या समितीने महत्त्वाची कामगिरी केली होती.

नेहरू समितीने सर्वसहमती मिळविण्यासाठी खूप प्रयत्न केले. वस्तुतः ही तारेवरील कसरत होती. समितीने संसदेच्या दोन सभागृहांची रचना, प्रौढ मतदानपद्धतीनुसार ५०० सभासदांची निवडणूक घेणे, संसदेच्या दोन्ही सभागृहांसाठी संयुक्त मतदारसंघ, मुसलमानांसाठी राखीव मतदारसंघ व मुसलमान-बहुल प्रांतांमध्ये इतर धर्मीयांसाठी राखीव मतदारसंघ वगैरे तरतुदी घटनेत असाव्या, असे सुचवले होते. मुंबई इलाख्यातून सिंध प्रांत अलग करून वेगळा प्रांत बनवावा असेही सुचवले. वायव्य सरहद्द प्रांत व बलुचिस्तानलाही नवीन सुधारणा लागू कराव्या असे म्हटले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे समितीने हिंदुस्तानात 'संपूर्णतः जबाबदार सरकार' स्थापन करण्याची तरतूद सुचवली. तथापि 'संपूर्ण स्वातंत्र्य हे अंतिम उद्दिष्ट आहे', असे स्पष्टपणे नमूद करण्यास नेहरू समितीने नकार दिला. कारण त्यासाठी सर्व पक्षांची सहमती नव्हती. त्याकारणाने समितीचे सभासद सुभाषचंद्र बोस आणि काँग्रेसचे सरचिटणीस जवाहरलाल नेहरू नाराज झाले होते.

जवाहरलालजी व सुभाषबाबू हे देशातील पुरोगामी व जहाल राष्ट्रवाद्यांचे नेते होते. तरीही या मुद्यावर बंड उभारून परिषद उधळण्यापेक्षा विरोध नोंदवावा, असे त्यांनी ठरविले. तसेच उद्दिष्टपूर्तीसाठी प्रागतिक युवकांची संघटना म्हणून या दोघांनी **'इंडिपेंडन्स ऑफ इंडिया लीग'** स्थापन केली. नोव्हेंबर १९२८ मध्ये या जहाल मतवादी लीगचे रीतसर उद्घाटन केले. बहुतेक प्रांतात या लीगच्या शाखा काढल्या. मुंबई व नागपूरमध्येही शाखा स्थापन झाल्या. या लीगची मुंबईतील शाखा व युसुफ मेहरअली यांची मुंबई इलाखा यूथ लीग तसेच पुणे यूथ लीग यांनी एकोपा करून स्वातंत्र्य आंदोलनात अभूतपूर्व जोश निर्माण केला. त्यांनी हजारो युवकांना स्वातंत्र्यलढ्यात उतरवले. आणि तेवढेच महत्त्वाचे असे की, या युवा संघटनांनी 'संपूर्ण स्वातंत्र्य' हे काँग्रेसचे ब्रीदवाक्य असावे, यासाठी महात्मा गांधींचे मन वळविले. याची प्रचिती १९२९ च्या लाहोर काँग्रेसमध्ये आली.

**नेहरू समितीचा अहवाल संस्मरणीय राहण्याचे कारण की, राज्यघटना तयार करण्याचा हा भारतीयांचा पहिलाच मोठा व प्रशंसनीय प्रयत्न होता.**

दरम्यानच्या काळात हिंदुस्तानातील प्रांतिक कायदेमंडळांमध्ये सायमनशी सहकार्य करण्याबाबत चलबिचल झाली. देशातील एकूण नऊ प्रांतिक कायदेमंडळांपैकी आठमध्ये राजनिष्ठ आमदार बहुमतात होते. त्यांत सरकारी व सरकार-नियुक्त सदस्य आणि ब्रिटिशधार्जिण्या सभासदांचे बहुमत होते. अपवाद होता फक्त मध्यप्रांत-वऱ्हाड प्रांताचा ! परिणामतः गव्हर्नरांच्या आदेशानुसार मुंबई प्रांतासह आठ प्रांतिक कायदेमंडळांनी सायमन आयोगाशी सहकार्य करण्यासाठी निवडक सभासदांच्या समित्या नेमल्या होत्या. बिहार-ओरिसा, संयुक्त प्रांत व मद्रास प्रांतांमध्ये अल्पमताने समित्या नेमल्या होत्या. त्या प्रांतांचे गव्हर्नर, नोकरशाही आणि व्हाइसरॉय यांचाही सभासदांवरदबाव होता. ब्रिटिशांच्या दबावाखाली हा प्रकार घडत असल्याचा काँग्रेसचा व विरोधकांच आरोप होता. **मात्र एकट्या मध्यप्रांत-वऱ्हाड प्रांतिक कायदेमंडळाने सायमन आयोगावर बहिष्कार घालण्याचा ठराव प्रचंड बहुमताने मंजूर केला होता.** विशेष म्हणजे या ठरावाचा पुनर्विचार करावा अशी विनंती गव्हर्नर करू शकला नव्हता. किंबहुना काँग्रेस सदस्य ब्रिजलाल बियाणी यांनी आयोगावर अविश्वास व्यक्त करणारा आणि आयोगाचा निषेध करणारा ठराव कायदेमंडळात मांडला होता. सर्व पक्षांच्या सभासदांनी त्यास पाठिंबा दिला होता. यास त्याकाळी बरेच महत्त्व प्राप्त झाले होते.

भारताच्या दौऱ्यातील बरे वाईट अनुभव घेऊन सायमन आयोगाने पहिली फेरी १९२८ च्या मार्चअखेर पूर्ण केली. या फेरीत आयोगाचे सदस्य थोड्याच ठिकाणी गेले होते. मुंबई व दिल्लीप्रमाणेच कोलकात्यातही आयोगाला उग्र निदर्शनांना तोंड द्यावे लागले होते.

## आयोगाची दुसरी फेरी

आयोगाचे सदस्य इंग्लंडहून सप्टेंबर १९२८ मध्ये पुन्हा मुंबईत येणार अशी बातमी कळताच बहिष्काराच्या योजना आखण्यात आल्या. सर्व काँग्रेसजन व विशेषतः

युवकांच्या संघटना आपापल्या योजना आखू लागल्या. मुंबई बंदरात उतरल्यावर कमिशन लगेच पुण्यास जाणार हे समजलेले होते. त्यादृष्टीने बहिष्काराचा कार्यक्रम आखलेला होता.

**मुंबई व पुणेकरांची निदर्शने:—**बाँबे प्रेसिडेंसी यूथ लीग आणि मुंबईतील विद्यार्थ्यांच्या अनेक संघटना, कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते व मुंबई शहर काँग्रेस समितीचे सभासद तसेच पुणे यूथ लीग यांनी आयोगाविरुद्ध संघटितरीत्या निदर्शने करण्याचा कार्यक्रम आखलेला होता. या मंडळींनी मुंबई प्रांतिक काँग्रेस समितीकडे या कार्यक्रमासाठी पैशाची मागणी केली होती. पण ती डावपेचाच्या कारणासाठी नाकारण्यात आली. म्हणून युवकांनी लहानसा निधी उभारला होता. मुंबईतील या योजनेचे नेतृत्व युसुफ मेहेरअली, नरिमन, निंबकर, सुंदर काबाडी, घाटे, अर्जुन आळवे, शौकत अली, सदाशिव का. पाटील, बा. गं. खेर वगैरेंनी केले होते. जमावबंदीचा हुकूम असूनही सारी मुंबई 'सायमन गो बॅक' या घोषणेने निनादत होती.

आक्रमक युवकांनी सरकारच्या हस्तकांचा आणि राजनिष्ठांचा निषेध करणारी पत्रके मुंबईत वाटली होती. राष्ट्रव्यापी बहिष्काराच्या या चळवळीत फूट पाडण्याचा प्रयत्न करणारेही होते. त्यांच्यापैकी खान बहादूर भुत्तो, हाजी हजरत खान, बाबासाहेब आंबेडकर, भास्करराव जाधव, सरदार मुजुमदार वगैरेंवर या पत्रकात बोचरी टीका होती. सायमन आयोगावर बहिष्कार घाला असे आवाहन करणारी छापलेली वीस हजार तिकिटे विकण्यात आली. ७ ऑक्टोबरला मुंबईत यूथ लीगने घेतलेल्या सभेत पुण्याच्या जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या मनाई हुकूमाचा निषेध करण्यात आला होता. या निषेधाचा ठराव कुमारी प्रेमाताई कंटक यांनी मांडला होता.[३]

सायमन आयोग ज्या गाडीने जाणार होता ती गाडी उडवून देण्यासाठी काही बाँब मुंबईला आणण्याचाही प्रयत्न झाला. पण अपघाताने ८ ऑक्टोबरलाच मनमाडजवळ आगगाडीच्या डब्यात स्फोट होऊन तीन प्रवासी मरण पावले व आठ जण जखमी झाले. म्हणून हा प्रयत्न विफल झाला. पण त्यामागील भावना स्पष्ट झाली.[४]

११ ऑक्टोबर १९२८ रोजी रात्री नऊ वाजता मुंबई बंदरात सायमन आयोगाचे आगमन झाले. या प्रसंगी मेहेरअली, नरिमन, निंबकर, सुंदर काबाडी, सच्चिदानंद घाटे, अर्जुन आळवे, शौकत अली यांच्या नेतृत्वाखाली मुंबई बंदरासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. त्यात मुसलमानही सहभागी असल्याची पोलीस कमिशनरने नोंद केलेली आहे.[५]

सायमन मंडळ मुंबईहून पुण्यास जाणार असल्यामुळे बॅ. नरिमन यांच्या नेतृत्वाखाली तेथे निदर्शने आयोजित केलेली होती. त्यासाठी मुंबईतून सव्वाशे युवक पाठविण्यात आले. आयोगाचे सदस्य ज्या आगगाडीने मुंबईहून पुण्याकडे निघाले, तिच्या मार्गात घोषणा देण्यासाठी व्यवस्था केलेली होती. पुणे यूथ लीगचे युवक त्यासाठी खंडाळा घाटातही गेले होते. त्यांतील अनेकांना पोलिसांनी पकडलेही होते. या निदर्शनांमध्ये पुढाकार घेतलेल्या रघुनाथराव खाडिलकरांनी आठवण नोंदून ठेवलेली आहे की, "आम्ही स्वतः घोषणा द्यायला घाटात गेलोच. पण त्याचबरोबर पुणे ते खंडाळा या मार्गावर प्रत्येक गावाजवळ आम्ही दोन दोन मालमोटारी ठेवल्या होत्या. त्यावर 'सायमन गो बॅक' असे फलक लावले होते. तसेच आत काही माणसेही ठेवली होती. पुणे-मुंबई मार्गावर बऱ्याच ठिकाणी वाहनांचा रस्ता रेल्वे रुळांना समांतर जातो. तेव्हा आम्ही असं केलं की, आमच्या मोटारी सायमन साहेबांच्या रेल्वे गाडीशी समांतर पळत ठेवल्यामुळे सायमन साहेबानं जरा खिडकीबाहेर तोंड काढलं की त्याला 'सायमन गो बॅक' चे फलक दिसत आणि आतले लोकही त्याच्याविरुद्ध घोषणा देत."[६] मुंबई व पुण्यातील यूथ लीगच्या निदर्शकांनी सायमन प्रकरणी विलक्षण कल्पकता व योजकता दाखविली. मात्र येथील निदर्शने लाहोर अथवा लखनौसारखी हिंसाचारकारक झाली नाही.

सायमन जेथे जेथे गेला व जेथून गेला तेथे सर्वत्र त्याला काळे झेंडे पाहावे लागले. सर्वत्र त्याचे स्वागत निषेधाने झाले. मुंबई व पुणे या दोन्ही शहरांमध्ये सायमन व सदस्यांना युवाशक्तीचे दर्शन झाले. युवक संघटनांनी त्यांना व पोलिसांना सळोकी पळो केले होते.

**नागपुरातील निदर्शने:—**मध्यप्रांत-वऱ्हाडची राजधानी म्हणून आयोग तेथे गेला होता. आयोगाचा निषेध करणाऱ्या ब्रिजलाल बियाणी यांच्या कायदेमंडळातील ठरावाने मध्यप्रांत-वऱ्हाडच नव्हे तर देशभर खळबळ उडाली होती. त्या ठरावावर टी. जे. केदार, बी. जी. खापर्डे, ना. भा. खरे व घनश्यामदास गुप्ता यांची जोरदार भाषणे झाली व ठराव गव्हर्नरच्या देखत संमत झाला. प्रारंभापासूनच प्रांतिक काँग्रेसचे नेते मोरेश्वर अभ्यंकर या मोहिमेची तयारी करीत होते. यूथ लीग व के. एफ. नरिमन यांनी नागपुरात मराठी भाषिक मध्यप्रांताची पहिली राजकीय परिषद भरवून वातावरण निर्मिती केली होती. नागपूर स्टेशनवर आयोगाचे आगमन झाले तेव्हा अभ्यंकर, जमनालाल बजाज, ना. भा. खरे, नीळकंठ देशमुख, रामभाऊ रुईकर, गोविंद देशमुख, डॉ. चोळकर, सेठ गोविंददास, माखनलाल चतुर्वेदी आणि डी. पी. मिश्रा यांच्या नेतृत्वाखाली अदमासे तीन हजार लोकांनी सायमन आयोगाचा निषेध केला होता. नागपूरकरांनी केलेला आयोगाचा बहिष्कार खूप प्रभावी ठरला होता.

मराठी मध्यप्रांत काँग्रेस समितीचे अध्यक्षपद बॅ. अभ्यंकरांना लाभल्यामुळे त्यांनी अत्यंत उत्साहाने सायमन कमिशनच्या निषेधाची तयारी केली होती. अशीही एक आठवण सांगितली जाते की, निदर्शनांच्या कार्यक्रमाची नागपुरात रंगीत तालीम करण्यात आली होती. या कामी के. एफ. नरिमन यांनी मदत केली होती. शिवाय त्यांनी मराठी मध्यप्रांताची पहिली राजकीय परिषद भरवली होती. १४ मार्चला आयोगाचे सदस्य नागपूरला येत असताना त्यांच्या आगगाडीला अपघात घडवण्याचाही प्रयत्न झाला होता. पण हा घातपाताचा प्रयत्न आधीच लक्षात आला होता. सायमनबरोबर रावबहादूर एम. सी. राजा, सर शंकरन नायर वगैरे मध्यवर्ती कायदेमंडळाचे सदस्य नागपूरला आलेले होते. दलितांचे नेते गणेश आकाजी गवई, ब्राह्मणेतर पक्षातर्फे के. एस. नायडू व नानासाहेब अमृतकर आणि मुसलमानांचे पुढारी विलायतुल्ला व बॅरिस्टर एम. वाय. शरीफ यांनी मात्र कमिशनपुढे साक्षी दिल्या.[७] वर्गीय हित साधणे हा त्यांचा उद्देश होता. इतके मात्र निर्विवाद की, नागपूरकरांनी आयोगावर घातलेला बहिष्कार प्रशंसनीय होता, प्रभावी होता.

मुंबई, पुणे व नागपूरव्यतिरिक्त महाराष्ट्रातील इतर शहरांमध्ये सायमन मंडळी गेली नव्हती. पण तरी बहुतेक सर्व शहरांमध्ये आयोगाचा निषेध करण्यात आला. स्थानिक पुढारी व मुंबई व नागपुरातून आलेल्या काँग्रेस नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली गावोगावी सायमन गो बॅक हा नारा निनादला आणि काळे झेंडे फडकवण्यात आले होते. शाळा-कॉलेजांच्या पटांगणांवर तो नारा निनादत होता. शंकरराव देव, देवगिरीकर, हरोलीकर, न. वि. गाडगीळ यासाठी युवकांना प्रेरणा देत असत. महाडसारख्या लहान गावातही सायमनचा जाहीर सभेत धिक्कार करण्यात आला होता. 'सायमन गो बॅक' हा इंग्रजी नारा महाराष्ट्रातील निरक्षर लोकांच्या व आदिवासींच्याही मुखांमधून घुमला होता.

मुंबई कायदेमंडळाने सायमन कमिशनशी सहकार्य करण्यासाठी नेमलेल्या राजनिष्ठ समितीत बाबासाहेब आंबेडकर, सरदार मुजुमदार, भास्करराव जाधव आणि सिंधमधील खानबहादूर भुत्तो यांचा समावेश होता. तथापि भास्कररावांचे सहकारी केशवराव जेधे, भाऊराव पाटील, वि. रा. शिंदे यांनी मात्र आयोगाचा भर सभांमधून निषेध केला होता.

## लाहोरचे रणकंदन

सायमन आयोगाच्या विरोधात देशातील उग्रतम रणकंदन घडले लाहोरला! ब्रिटिशांविरुद्धचा राग तीव्र झालेला होता. आयोगावर बहिष्कार घालण्याचा ठराव लाला लजपतरायांनी मध्यवर्ती कायदेमंडळाच्या विधानसभेत मांडला होता, आणि तो मंजूरही झालेला होता. ब्रिटिश सरकारच्या मानी मनाला या पराभवाचे शल्य बोचतच होते. या पराभवाचा बदला घेण्यास पंजाब सरकार कटिबद्ध झालेले होते. त्यानुसार जनआंदोलनाचे वाढते यश पाहून ते दडपण्याची पंजाब सरकारला पुन्हा खुमखुमी आली. नौजवान भारत सभा, लाहोर विद्यार्थी संघ व सरदार भगतसिंग वगैरे युवक नेत्यांचा वाढता प्रभाव पाहून पंजाब सरकारचे माथे भडकले होते या संघटना व नेहरूंची **लीग अगेंस्ट इंपिरिअलिझम** व हिंदुस्तानी सेवादल आणि कीर्ती किसान पक्षाच्या मोहिमा दडपण्यासाठी पंजाब सरकारने आत्यंतिक तयारी चालविली होती.

या पार्श्वभूमीवर सायमन मंडळ ३० ऑक्टोबर १९२८ रोजी लाहोरला येणार असे वृत्त पसरले. प्रतिबंधक उपाय म्हणून लाहोरला १४४ कलम जारी करण्यात आले. या हुकूमाचा निषेध करण्यासाठी २९ ऑक्टोबरला सभा भरली असता, लालाजींनी ओजस्वी भाषण करताना सरकारवर तोफ डागली होती. ३० ऑक्टोबरच्या सकाळी दुसरी सभा झाल्यावर लालाजी व पं. मदन मोहन मालवीय यांच्या नेतृत्वाखालील शेकडो निदर्शक लाहोर रेल्वे स्थानकावर गेले. तिथे त्यांनी सायमन मंडळाचा निषेध केला. निदर्शकांमध्ये सरदार भगतसिंग, सुखदेव, भगवतीचरण वर्मा, यशपाल, धन्वंतरी वगैरे युवा क्रांतिकारक होते. शिवाय डॉ. सत्यपाल, शार्दूलसिंग कविशर, लाला हंसराज हे अनुभवी पुढारीही लालाजींसोबत होते. नागपूरचे विनायक सखाराम दांडेकरही निदर्शकांमध्ये होते.

निदर्शने हिंसाचारी नव्हती. तरीही निदर्शक पोलिसांचे कडे तोडून पुढे घुसण्याचा प्रयत्न करीत आहेत, असे कारण देऊन ज्येष्ठ पोलीस अधीक्षक स्कॉट व निरीक्षक सॉंडर्स यांनी निःशस्त्र निदर्शकांवर अमानुष लाठीहल्ला केला. हा प्रकार चालू असताना वयोवृद्ध लाला लजपतराय उन्हापासून संरक्षण म्हणून छत्री घेऊन चालत होते. पण तरीही स्कॉट या ज्येष्ठ अधिकाऱ्याने स्वतः आपल्या हातातील लाठीने लालाजींवर प्रहार केले. सॉंडर्स यानेही लालाजींना झोडपले. त्यांची छत्री मोडली. पण त्यापेक्षा लालाजींचा खांदा व मानेवरील प्रहार जोरदार होते. त्यांची बोटे मोडली व हृदयाजवळ बराच मार बसला. आयोगाचे सदस्य तेथून गेल्यावर मोरी गेटजवळ निदर्शकांची प्रचंड सभा भरली. जखमी झालेल्या लालाजींना ताप असूनही त्यांनी लाठीमाराचा निषेध करणारे व्याख्यान दिले. लालाजींनी इंग्रजांना ताकीद दिली होती की, लाठीमाराचे प्रकार असेच चालू राहिल्यास कॉंग्रेसच्या क्रीडमध्ये अहिंसेऐवजी हिंसेला स्थान देणे अटळ होईल. "आज आमच्यावर करण्यात आलेला लाठीचा प्रत्येक प्रहार म्हणजे हिंदुस्तानातील ब्रिटिश साम्राज्याच्या शवपेटिकेस ठोकलेला खिळा होता, असे नजीकच्या भविष्य काळात सिद्ध होईल"[६]. आणि ही भविष्यवाणी १९४७ साली सत्य ठरली! लालाजींना वाचवण्याचा प्रयत्न करणारे लाला हंसराज, शार्दूलसिंग कविशर व डॉ. सत्यपालदेखील पोलिसांच्या लाठीमारात जखमी झालेले होते. लाहोरात भयंकर रणकंदन माजले.

आधीपासून प्रकृती बरी नसलेले लालाजी पोलिसांच्या प्रहारांमुळे १७ नोव्हेंबर १९२८ रोजी मरण पावले. भारताच्या दृष्टीने ते हुतात्मा झाले. त्यांच्या अंत्ययात्रेत एक लाखाहून अधिक लोक हजर होते. लालाजींना श्रद्धांजली वाहताना चित्तरंजन दास यांच्या पत्नी वासंतीदेवी दास त्वेषाने उद्‌गारल्या होत्या की, 'लालाजींची चिता थंड होण्यापूर्वी हिंदुस्तानातील एखादा तरुण त्यांच्या खुनाचा सूड घेईल'. देशातील लाखो माणसांचे हे मनोगत असावे. **लाला लजपतराय यांच्याकडून ज्या सरदार भगतसिंग, सुखदेव, चंद्रशेखर आझाद वगैरेंनी स्वातंत्र्यलढ्याचे प्राथमिक शिक्षण घेतले होते, त्यांनी लालाजींच्या 'खुनाचा' सूड घेण्याचा निर्धार केला.** लाहोरचा डी. एस. पी. स्कॉट याचा वध करण्याचा प्रस्ताव भगतसिंग यांनी हिंदुस्तान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मीच्या बैठकीत १० डिसेंबर १९२८ रोजी मांडला आणि तो सर्वसंमत झाला.

सरदार भगतसिंग यांच्या सूचनेनुसार चंद्रशेखर आझादांनी स्कॉटच्या वधाची योजना आखली होती. या योजनेत भगतसिंग व चंद्रशेखर यांच्यासह भगवतीचरण व्होरा, सुखदेव, यशपाल, जयगोपाळ वगैरे उत्तर भारतीय जसे होते, तसेच काही मराठी भाषिकही सहभागी झाले होते. शिवराम हरी राजगुरू हे त्या मराठी क्रांतिकारकांमध्ये प्रमुख होते. स्वतः शिवरामपंतांनी समक्ष गोळ्या झाडल्या होत्या. राजगुरू (जन्म २४ ऑगस्ट १९०८) मूळचे पुण्याजवळील खेड गावचे असून त्यांनी सरदार भगतसिंगांच्या क्रांतिकार्यात भाग घेतला. या प्रकरणात त्यांचा भगतसिंग व आझादांइतकाच सहभाग होता. श्रीराम बळवंत सावरगावकर हे रामप्रसाद बिस्मिल व चंद्रशेखर यांच्या काकोरी रेल्वे लूट प्रकरणातील (१९२५) क्रांतिकारक होते. तेही लाहोर प्रकरणात भगतसिंगांचे साथीदार होते.

लाहोरमधील रणकंदन आणि लाला लजपतराय यांच्या हौतात्म्यामुळे सायमन व सरकारविरुद्धचा लोकप्रक्षोभ तर वाढलाच, पण त्यामुळे भारतभर आणि महाराष्ट्रातही राष्ट्रवादी भावना प्रज्वलित झाल्या. स्वातंत्र्य आंदोलनाबाबत नवीन पोटतिडीक निर्माण झाली. युसुफ मेहेरअली, नरिमन, नेहरू, सुभाषचंद्र बोस, जांभेकर, डांगे वगैरे पेटून उठले.

काकोरी कटातील क्रांतिकारकांच्या बलिदानाचा स्मृतिदिन असलेल्या १५ डिसेंबर रोजी स्कॉटचा वध करण्याची योजना होती. पण त्या दिवशी स्कॉट न आल्यामुळे १७ डिसेंबर १९२८ रोजी कटाची पूर्तता करावयाचे ठरले. त्या दिवशी लालाजींच्या निधनाला एक महिना पूर्ण झाला होता. म्हणूनही तोच दिवस निवडला. स्कॉटचे कार्यालय लाहोरमधील सुप्रसिद्ध अनारकली भागात होते. भगतसिंग, राजगुरू आणि आझाद भरलेली पिस्तुले खिशात घेऊन तिथे सज्ज होते. दुपारी चारच्या सुमारास सॉंडर्स कार्यालयातून निघून मोटारसायकलवर बसला. पण सॉंडर्सला स्कॉट समजून जयगोपाळने भगतसिंग व राजगुरू यांना खूण केली. सॉंडर्सची मोटारसायकल बाहेर पडताच त्यावर बसलेला स्कॉट नव्हे हे भगसिंगांच्या लक्षात आले. त्यानुसार त्यांनी राजगुरूंना सांगितले देखील. परंतु राजगुरूंनी ते ऐकले नसावे. अचूक नेमबाजीसाठी क्रांतिकारकांच्या वर्तुळात ख्यातनाम असलेल्या राजगुरूंनी झाडलेल्या पहिल्याच गोळीने सॉंडर्सचा बळी घेतला. तरीही तो मेला अथवा नाही याची शंका आल्याने भगतसिंग यांनी क्षणार्धात आठ गोळ्या झाडून त्याच्या देहाची चाळण केली. लाहोरच्या कडक पोलीस बंदोबस्तातून भगतसिंग, राजगुरू वगैरे वेषांतर करून लाहोरातून निसटले व रेल्वे गाडीतून लखनौला गेले. यानंतर भगतसिंगांचा निरोप घेऊनराजगुरू कानपूर, आग्रा वगैरे ठिकाणी जाऊन राहिले.

जानेवारी १९२९ मध्ये भगतसिंग, राजगुरू, सुखदेव वगैरेंना जतींद्रनाथ दास यांनी आग्रा शहराजवळ बॉंब बनवण्याचे तंत्रज्ञान शिकवले. बॉंबविषयीच्या त्यांच्या कारवायांमध्ये सदाशिव मलकापूरकर, गजानन सदाशिव पोतदार, विश्वनाथ वैशंपायन हे मराठी भाषिकही होते. या कामात ते भगतसिंग व चंद्रशेखर आझाद यांना मदत करीत असत. या सर्व तपशिलात न जाता सांगायचे की, राजगुरू हे अकोला वगैरे ठिकाणी भ्रमंती करून पुण्यात आले.

सरदार भगतसिंग यांना मिळालेली असामान्य लोकप्रियता याविषयी जवाहरलाल नेहरूंनी दिलेला पुढील अभिप्राय खूपच बोलका वाटतो. **"भगतसिंग लोकांना विलक्षण प्रिय झाले, ते त्यांच्या हिंसक कृतीमुळे नव्हे, तर त्यांनी लाला लजपतराय यांचे उज्ज्वल मोठेपण व राष्ट्राच्या अस्मितेचे प्रतिसमर्थन केले**

**म्हणून. भगतसिंग एक प्रकारे प्रतीक बनले.** त्यांच्या कृत्याचे लोकांना विस्मरण झाले, पण प्रतीक अवशिष्ट राहून अगदी थोड्याच महिन्यांच्या अवधीत पंजाबातील सर्वच शहरांमध्ये आणि खेड्यांमध्येही व मोठ्या प्रमाणात संपूर्ण उत्तर भारतात त्यांचे नाव दुमदुमू लागले. त्यांच्यावर हिंदुस्तानातील विविध भाषांमध्ये असंख्य कवने रचण्यात आली. आणि भगतसिंग यांना इतकी विलक्षण लोकप्रियता लाभली की, आपण आश्चर्यचकित होतो."[९] नेहरूंनी केलेले हे मूल्यमापन अगदी समर्पक होय.

## लखनौमधील बहिष्कार

लाला लजपतराय यांचे १७ नोव्हेंबर १९२८ रोजी निधन झाल्यामुळे सारे राष्ट्र पेटून उठले. सर्वत्र ब्रिटिशांचा निषेध झाला. गावोगावी प्रचंड निदर्शने झाली. सायमन आयोगाचा निषेध उग्र स्वरूप धारण करू लागला. आधीपासूनच नोकरशाहीचा जवाहरलाल नेहरूंवर राग होताच. तशात सायमन मंडळी लखनौला गेली आणि तेथेही रणकंदन झाले. सायमन मंडळी येण्यापूर्वी सात दिवस आधीपासून संयुक्त प्रांतातील युवक मिरवणुका काढत होते आणि सभांमधून आयोगाचा निषेध करीत होते. जवाहरलालजी व गोविंद वल्लभ पंत यांनी प्रांतातील युवकांना चांगल्या रीतीने संघटित केलेले होते. युवक व काँग्रेसजनांचा आवेश पाहून सरकार आक्रमक पवित्र्यात उभे होते. ३० नोव्हेंबर १९२८ रोजी सायमन मंडळी येणार होती. वाहतुकीला अडथळा होतो या सबबीवर सरकारने आधीपासूनच मिरवणुकींना बंदी केली होती. अशा परिस्थितीत नेहरू व पंत यांच्या नेतृत्वाखाली निदर्शकांची पथके सभास्थानी जात असताना त्यांच्यावर घोडेस्वार पोलिसांनी हल्ला केला. त्यांनी स्वयंसेवकांना दंडुक्यांनी झोडपून काढण्यास सुरुवात केली (२९ नोव्हेंबर). पाठलाग करून युवकांना मार देण्यात आला. नेहरू यांनी आपल्या आत्मकथेत नमूद केलेले आहे की, पोलीस घोडेस्वाराने त्यांच्यावरही दोन सणसणीत रट्टे लगावले होते. त्यांना भोवळ आली व त्यांचे सर्व शरीर थरथरू लागले होते. पोलिसांनी रस्ता अडवला. कित्येक स्वयंसेवकांची डोकी फुटून ते रक्तबंबाळ झाले. पंतांनाही जबरदस्त मार लागला. जखमींना जागच्या जागी बसवून ठेवल्याने त्यांना वैद्यकीय उपचार मिळणे अशक्य झाले. हा प्रकार अंधार पडेपर्यंत चालू राहिला. ही अत्याचारांच्या पहिल्या दिवसाची

रंगीत तालीम होती. नेहरू म्हणतात, "इतर कशानेही झाली नसती इतकी जागृती लखनौमध्ये झालेल्या या प्रसंगाने झाली होती. त्यामुळे लोकांचे आत्मबल वाढले होते."

आयोगाचे आगमन झाले त्या दिवशी सूर्योदयापूर्वीच हजारो लोक लखनौ रेल्वे स्थानकाजवळ जमले होते (३० नोव्हेंबर). शहराच्या विविध रस्त्यांवरून अनेक मिरवणुका काँग्रेस कार्यालयावर आल्या व एकत्रित मिरवणूक निघाली. चारचार जणांच्या रांगा शिस्तीत मिरवणुकीत चालत आल्या. स्टेशनजवळच्या विस्तीर्ण मैदानात पोलिसांनी मिरवणुकीला अडवले. मैदानावर पायदळ व घोडदळ सज्ज होते. या सेनादलाने रेंगाळणाऱ्या लोकांना मारपीट केली. काही घोडेस्वार भरधाव निघाले व त्यांनी अनेक स्वयंसेवकांना घोड्यांखाली तुडविले. काही जण विव्हळत होते, काही कळवळत होते. सर्व मैदानाचा देखावा रणभूमीसारखा दिसत होता. घोडदळाची एक लाट नेहरूंच्या पथकावरही आली, आणि दौडतीची थडक अग्रभागी असलेल्या निदर्शकांवर आदळली. तरीही स्वयंसेवक हटत नाहीत हे पाहिल्यावर घोडेस्वारांनी आपले घोडे त्यांच्यावरच चढवले. नंतर मारपीट करताना दंडुक्यांचे तडाखे लगावले. पायदळ व घोडदळ बेछूटपणे प्रहार करीत सुटले. तथापि स्वतः जवाहरलाल व साथीदारांनी प्रतिकार केला नाही, उलटवारही केला नाही. आणि तसे करणे शक्यही नव्हते. सायमन कमिशन लखनौमधून चोरट्याप्रमाणे निघून जाईपर्यंत ही घनघोर लढाई चालू राहिली.

**नेहरूंचे सर्व शरीर ठणकत होते. अंगभर मुकामार बसला व वळ उठले होते. गोविंद वल्लभ पंत यांना खरपूस मार लागल्यामुळे त्यांचे दुखणे कित्येक दिवस लांबले, त्यांना पाठ सरळ करता येईना. त्यांना कायमचा अधूपणा आला.** युरोपियन सार्जंटांनी हिंदी शिपायांपेक्षा अधिक निर्दयपणे मारहाण केली होती. रक्तपिपासुपणा व वैमनस्याच्या भावनांनी त्यांनी प्रहार केले होते.[१०]

सायमन मंडळ पाटन्यास गेले असता त्यांच्या स्वागतासाठी फक्त काही शासकीय कर्मचारी व चपराशी आणि भाडोत्री लोक स्टेशनात उपस्थित होते. मात्र त्यांचा निषेध करण्यासाठी पन्नास हजारांहून अधिक निदर्शक आलेले होते. सरकारने पैसे

देऊन आणलेले भाडोत्री लोक हळूच निदर्शकांच्या चमूमध्ये दाखल झाले. एकीकडे निदर्शक अहिंसेच्या तत्त्वानुसार काळी निशाणे दाखवून निषेधाच्या घोषणा देत होते, तर दुसऱ्या बाजूने सरकारी छावणी सुतकी मनाने सायमनचे स्वागत करीत होती. पाटन्यातील रंगदृश्य असे ब्रिटिश-विरोधी होते.

## आयोगाची फलनिष्पत्ती

सायमन आयोगात एकही भारतीय नसल्यामुळे भारतीय अस्मिता दुखावली गेली होती. ब्रिटिशांच्या वंशश्रेष्ठत्वामुळे येथील समाजमन दुखावले. हिंदुस्तानात इल्बर्ट विधेयकानंतर (१८८३) ब्रिटिशांवर वंशवादीपणाचा एवठा आरोप ठेवला गेला नव्हता. आता मात्र समाजातील सर्व स्तरांना व विविध जाती-धर्माच्या लोकांना ब्रिटिश वंशश्रेष्ठत्वाचा वीट आला. या आयोगाच्या नेमणुकीमुळे काँग्रेस, नॅशनल लिबरल फेडरेशन, कम्युनिस्ट आणि मुस्लीम लीग हे सर्व पक्ष आणि हिंदुत्ववादी घटक प्रथमच एका व्यासपीठावर आले होते. आपापले हेवेदावे बाजूला ठेवून त्यांना प्रकर्षाने राष्ट्रीयत्वाची जाणीव झाली. १९२६-१९२७ मधील कडवट आठवणी व तंटे विसरून त्यांनी आयोगाचा निषेध केला. मोतीलाल नेहरू व लाला लजपतराय आणि महात्मा गांधी यांनी सरकारशी लढा दिला. आयोगावरील बहिष्कार केवळ राजकीय पातळीवरच न राहता सामाजिक स्तरावरूनही झाला. भांडवलदार व संस्थानिक वगैरे वगळता समाजाच्या पुढाऱ्यांनी आयोगासाठी फारसे सत्कार समारंभ आयोजित केले नाहीत. सायमन मंडळ पुन्हा भारतात आल्यामुळे लोकांना मंडळाचा अधिकच तिरस्कार वाटला. दुसऱ्या फेरीच्या वेळी अधिक व्यापक निषेध करण्यात आला. आयोग मुंबईत आला असता नाइटहूड प्राप्त केलेल्या वजनदार महनीयांपैकी एकानेही आयोगाची भेट घेण्याचे श्रम घेतले नाही.

सायमन साहेब राजकीय मुत्सद्देगिरी करीत होते. तथापि लॉर्ड बर्नहॅम यासारखे आयोगाचे सदस्य भारतीय बाजारपेठेचा अभ्यास करून आपला स्वतःचा व्यापार वाढविण्यात अधिक रस घेत होते. पंजाबातील शेती पाहून तेथे ट्रॅक्टर, मालमोटारी, मशिनरी व अवजारांसाठी बाजारपेठ वृद्धिंगत करण्याचा ते विचार करीत होते. व्यापारी एजंटांवरच अवलंबून न राहता ब्रिटिश उत्पादकांनी जातीने इथे येऊन धंदा वाढवावा, असेही ते म्हणाले होते. हे त्यांचे वाणिज्यवादी मत प्रसिद्धही झाले होते.

लाला लजपतराय यांचे हौतात्म्य वाया तर नाहीच गेले. पण त्यामुळे भारतीय लोक आणि विशेषतः युवक स्वातंत्र्यलढ्यासाठी सिद्ध झाले. त्यांनी कंबर कसली. लालाजींना शारीरिकपेक्षा मानसिक यातना अधिक झाल्या होत्या. स्वतःची मानहानी म्हणून नव्हे, तर आपल्यावरील हल्ल्यामुळे भारताची अपरिमित मानहानी झाली, हा मनातील विचार त्यांनी जाहीर सभेतही व्यक्त केला होता. त्यांना अरेरावी व राष्ट्रीय अपमानाचा तीव्र संताप व खेद वाटला होता. ही राष्ट्रीय अपमानाची भावना जनतेच्या मनाला झोंबली व लवकरच लालाजींच्या निधनानंतर लोक हल्ल्याचा आणि त्यांच्या मरणाचा कार्यकारणभाव जमवू लागले. त्यांच्या निधनामुळे दुःख होण्यापेक्षा राग आणि चीड या भावनांचा उद्रेक झाला.

त्यानंतर झालेला जे. पी. साँडर्सचा वध, केंद्रीय कायदेमंडळात केलेले बाँबस्फोट व लाहोर कट खटला आणि देशात घडलेले प्रसंग यांचे यथार्थ आकलन होण्यासाठी ही वस्तुस्थिती समजून घेणे आवश्यक होय. त्याशिवाय सरदार भगतसिंग यांचे प्रकरण आणि भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, चंद्रशेखर आझाद यांना भारतभर मिळालेली असामान्य लोकप्रियता आणि युवकांना चढलेले स्फुरण यांचे गूढ उकलणार नाही. हे चार देशभक्त आणि जतींद्रनाथ दास हे देशात झालेल्या इतर क्रांतिकारकांपेक्षा भारतीयांना अधिक प्रिय वाटले ते त्यांच्या हिंसक कृत्यामुळे किंवा धैर्यामुळे नव्हे तर राष्ट्रीय अपमानाचा त्यांनी बदला घेतल्यामुळे आणि त्यांच्या पुरोगामी विचारप्रणालीमुळे ![११]

लालाजींवरील प्रहार व त्यांचे निधन यांच्या योगाने सायमन कमिशनवरील बहिष्काराचा जोर अधिकच वाढला. भारतातील जे समाजघटक अन्यथा बहिष्कारात सामील झाले नसते, ते या चळवळीत उतरले आणि चळवळ सर्व सामाजिक स्तरांमध्ये जाऊन पोहोचली.

सायमन उपाख्यानाची महत्त्वाची फलनिष्पत्ती ही होती की, कित्येक हजार लोक स्वातंत्र्यलढ्यात उतरले. सर्व जण तुरुंगात गेले असे नव्हे. तथापि व्यापक जनजागृती झाली. ब्रिटिशांना भारतीयांच्या भावना प्रकर्षाने जाणवल्या. विरोधकांचे व राजनिष्ठांचे पितळ उघडे पडले. सायमनविरोधी आंदोलनाने जसा केळकर, जयकर, भोपटकर व मुंजे यांचा गट उघडा पडला, तशीच फाटाफूट ब्राह्मणेतर पक्षातही झाली.

वि. रा. शिंदे, केशवराव जेधे, भाऊराव पाटील, वगैरेंनी शेकडो ब्राह्मणेतरांना काँग्रेसमध्ये नेले. सायमन आयोगास विरोध करावा अशी त्यांनी भाषणे करून लोकजागृती केली. काँग्रेसशी जवळीक असलेला 'राष्ट्रीय ब्राह्मणेतर पक्ष' निर्माण झाला. अल्पावधीत मुंजे व केळकर वगैरे कायमचे हिंदुमहासभेत गेले. त्यांना काँग्रेसमध्ये स्थान उरले नाही.

बाबासाहेब आंबेडकरांनी सायमन आयोगाशी सहकार्य केल्यामुळे त्यांना लोकांचा रोष पत्करावा लागला होता. बहिष्कृत हितकारिणी सभेतर्फे बाबासाहेबांनी मागासवर्गीय लोकांच्या शैक्षणिक समस्यांविषयीचे एक खास निवेदन आयोगाला सादर केले होते पण त्यातून काहीच साध्य झाले नाही. त्यांनी सायमनला आणखी दुसरा अहवाल सादर केला होता. परंतु तोही निष्फळ ठरला. आयोगाच्या फलनिष्पत्तीबाबत बाबासाहेबांना अजिबात समाधान वाटले नाही. इंग्रज व आयोगाबाबतचा त्यांचा अंदाज साफ चुकला होता.

भारत दौऱ्यात आयोगाचे सदस्य राजकीय चौकशीव्यतिरिक्त आपले वाणिज्यवादी व आर्थिक हितसंबंध वाढवण्यातच भरपूर रस घेत होते. हे काम व कॅबेरा डान्स, संस्थानिकांच्या पार्ट्या, नाचगाणी व वन्यप्राण्यांची शिकार वगैरे आटोपून सायमन मंडळ १४ एप्रिल १९२९ रोजी मायदेशी जाण्यासाठी निघाले. आयोगाचा अहवाल तयार करण्याचे काम सुरू झाले असतानाच, मे १९२९ मध्ये ब्रिटिश पार्लमेंटच्या निवडणुका पार पडल्या. या निवडणुकांमध्ये हुजूर पक्षाचे सरकार पराभूत झाले जे श्रेय मिळविण्यासाठी बर्कनहेड यांनी घाईने जॉन सायमनला हिंदुस्तानात पाठवले होते, ते श्रेय त्या पक्षास लाभले नाही. लेबर पक्ष अधिकारूढ झाला. रॅम्से मॅकडोनाल्ड पंतप्रधान झाले तर वेजवूड बेन भारतमंत्री झाले. सायमनचे अहवाल लेखन नजरेआड गेले. या निष्फळ नाटकाचा सर्व खर्च भारतावर लादण्यात आला.

सायमन कमिशनच्या अहवालाचे दोन खंड जून १९३० मध्ये प्रकाशित झाले. त्यावर चर्चा करण्यासाठी हिंदुस्तानचे व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन लंडनला गेले. सायमन अहवालातील शिफारशी लक्षात घेऊन हिंदुस्तानातील राज्य सुधारणांबाबत तोडगा काढण्यासाठी लंडनमध्ये परिषद भरविण्याचा ब्रिटिशांनी निर्णय घेतला. १२ नोव्हेंबर १९३० रोजी पहिली गोलमेज परिषद भरली. ब्रिटिशधार्जिणे व निहित हितसंबंध

असलेले व सरकारने निवडलेले लोक परिषदेसाठी गेले. त्यात महाराष्ट्रातलेहीहोते. तथापि गांधीजी, नेहरू, पटेल वगैरे देशाचे नेते अद्याप कारागृहांमध्येच होते.या परिषदेचे **हॅम्लेट** नाटक, म्हणजे **"हॅम्लेट विदाऊट द प्रिंस ऑफ डेन्मार्क"** या स्वरूपाचे निरर्थक ठरले!

**युवकांचा विचारप्रणालीवर भर :**—संपूर्ण १९२८ सालात जवाहरलाल नेहरू युवक-युवतींना स्वातंत्र्यलढा व समाजवादी विचारप्रणालीने प्रेरित करण्यासाठी अविरत झटले. महाराष्ट्रातही त्यांना चांगला प्रतिसाद लाभला. नेहरू स्वतः तेव्हा रशिया आणि लेनिनच्या विचारधारेने प्रभावित झालेले होते. भारतीय युवकांवर लेनिनवादाचा प्रभाव पाडण्यासाठी नेहरू प्रयत्न करीत होते, असे त्यांचे विख्यात चरित्रकार एस. गोपाल म्हणतात. भारतात अद्याप मार्क्सवादाचा अभ्यास केलेले युवक नाहीत, याची त्यांना पूर्ण कल्पना होती. म्हणूनच जवाहरलालजी हिंदुस्तानी सेवादल, काँग्रेस स्वयंसेवक दल आणि विद्यार्थ्यांच्या संघटनांना प्रोत्साहन देत असत. शेतकरी व कामकऱ्यांमध्ये राष्ट्रीय जागृती करण्यासाठी नेहरू ध्येयवादी युवकांचा शोध घेत होते. आणि पूर्णकालिक कार्यकर्ते घडवत होते. सायमन आयोगामुळे जो राष्ट्रवादी अग्नी भडकला त्याचा उपयोग नेहरूंनी या कामी करून घेतला, आणि आक्रमक युवकांचा संवर्ग घडविला.[१२]

हिंदुस्तान सरकारलाही याची स्पष्ट कल्पना आली. नेहरू व सुभाषचंद्र बोस यांची युती साम्राज्याला धोकादायक आहे असे नोकरशाहीचे मत बनले. म्हणून केंद्रीय गृह सचिवाने सर्व राज्य सरकारांना आदेश दिले की, कम्युनिस्टांचा उपद्रव कामगार चळवळीत अधिक आहे. तथापि त्यांच्यापेक्षा नेहरू व बोस सरकारला अधिक धोकादायक आहेत. शिवाय या दोघांना कम्युनिस्टांचा पाठिंबा आहे. म्हणून गृह सचिवाने आदेशात म्हटले की, कम्युनिस्टांच्या कामगार चळवळीपेक्षा नेहरू व बोस यांच्या कारवायांवर विशेष लक्ष ठेवावे.[१३]

युसुफ मेहेरअली, नरिमन, न. वि. गाडगीळ, केशवराव जोगळेकर वगैरेंच्या युवक संघटनांची नेहरू, सुभाषबाबूंशी विचारप्रणालीच्या पातळीवर युती झालेली होती. याबाबत नौजवान भारत सभा वगैरे पुरोगामी युवा संघटनांशीही त्यांचा विचारविनिमय

होत असे. १९२७ पासून १९२९ पर्यंत या युवकांनी 'संपूर्ण स्वातंत्र्य' हेच काँग्रेसचे ब्रीदवाक्य असावे, यासाठी व्यापक चळवळ उभारली होती. या चळवळीचे नेतृत्व मुख्यत्वे नेहरू, मेहेरअली व सुभाषबाबूंकडे होते. सायमनविरोधी आंदोलनाच्या निमित्ताने युवकांची चळवळ आणि संपूर्ण स्वातंत्र्याचे ब्रीदवाक्य या दोन्ही बाबींना उत्तेजन लाभले. युवकांच्या हाकेला प्रतिसाद देताना गांधीजींनी म्हटले की,**"यापुढील स्वातंत्र्यलढा युवकांनीच लढावयाचा असून, त्यांना जवळ करणे अपरिहार्य होय."** म्हणून गांधीजींनी काँग्रेसचे अध्यक्षपद सर्वोच्च युवक नेते जवाहरलाल नेहरू यांना स्वीकारावयास भाग पाडले. काँग्रेसचे आगामी धोरण कसे असेल हे त्यातून ध्वनित झाले होते.

## भगतसिंग यांचे मराठी साथी

जहाल क्रांतिकारक सरदार भगतसिंग, चंद्रशेखर आझाद, सुखदेव, भगवतीचरण व्होरा, यशपाल, विजयकुमार सिन्हा, जतींद्रनाथ दास यांच्या हिंदुस्तान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मीमध्ये प्रामुख्याने पंजाब, बंगाल आणि संयुक्त प्रांतातील क्रांतिकारकांचा समावेश होता हे खरे. तथापि महाराष्ट्रातील शिवराम हरी राजगुरू, श्रीराम बळवंत सावरगावकर, दत्तात्रय बळवंत करंदीकर, विश्वनाथ गंगाधर वैशंपायन, सदाशिव मलकापूरकर, गणेश सदाशिव पोतदार वगैरे क्रांतिकारकसुद्धा भगतसिंग आणि चंद्रशेखर आझादांचे विश्वासू सहकारी होते. त्याकाळी झाशीत मराठी भाषिकांची मोठी वस्ती होती. त्यातील र. वि. धुळेकर, आ. गो. खेर आणि सीताराम भागवत हे तिघे जण झाशीच्या परिसरात नावे व वेष बदलून राहणाऱ्या चंद्रशेखर आझाद यांना क्रांतिकार्यात हरतऱ्हेने साहाय्य करत असत. लखनौजवळील काकोरी स्टेशनजवळ रेल्वे गाडी अडवून तिच्यातील सरकारी पैसा क्रांतिकारकांनी लुटला होता. या प्रकरणात रामप्रसाद बिस्मिल यांच्याबरोबर आझादसुद्धा होते. थोर क्रांतिकारक रामप्रसाद बिस्मिल वगैरे फासावर चढले, पण आझाद मात्र फरार झाले होते. तेव्हापासून पाच साडेपाच वर्षे चंद्रशेखर आझाद झाशीच्या परिसरात भूमिगत राहत असत. त्यांना मराठी क्रांतिकारकांनी मदत केली होती.

शिवराम हरी राजगुरू हे हिंदुस्तान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मीतील मराठी क्रांतिकारकांचे अग्रणी होते. पुणे जिल्ह्यातील खेड म्हणजे राजगुरूनगर येथे त्यांचा जन्म झाला होता (२४ ऑगस्ट १९०८). घरातून पलायन करून शिवरामपंत काशीला गेले. त्या काळी काही मराठी लोक संस्कृत शिकण्यासाठी काशीला जात असत. त्यांची काशीत श्रीराम सावरगावकरांशी ओळख झाली. या सावरगावकरांनी आणि विठ्ठल सहस्रबुद्धे यांनी मुळशी सत्याग्रहात भाग घेऊन कारावास भोगलेला होता. ते दोघेही वाईच्या प्राज्ञ पाठशाळेचे विद्यार्थी होते. त्यांना दत्तात्रय बळवंत करंदीकरांची साथ मिळाली. गणेश सावरकर अंदमानातून सुटल्यावर कधीकधी काशीस जात असत. तेव्हाच गणेशरावांचा चंद्रशेखर आझादांशी संपर्क आला. त्यांच्या सल्ल्यानुसार राजगुरू अमरावतीमधील हनुमान व्यायाम शाळेत गेले व तेथे ते शस्त्रविद्याही शिकले होते. सावरगावकरांनी निजामी प्रदेशात जाऊन काही रिवॉल्वर व काडतुसे विकत घेतली आणि चंद्रशेखर आझादांना दिली. कानपूरचे शिव वर्मा यांनाही राजगुरूंनी मदत केली. अशा प्रकारे राजगुरू, सावरगावकर, वैशंपायन, सदाशिव मलकापूरकर, पोतदार वगैरे मराठी युवक आझादांचे सहकारी बनले. हे सर्व धाडसी युवक सरदार भगतसिंग व चंद्रशेखर आझादांच्या क्रांतिकार्यात सहभागी झालेत.

वस्तुतः समाजवादाने प्रभावित झालेले भगतसिंग शस्त्राचारवादी अथवा हिंसावादी नव्हते. त्यांच्या हिंदुस्तान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मीला समाजवाद व धर्मनिरपेक्षतेच्या विचारप्रणालीचे खास अधिष्ठान होते. या संघटनेचे सभासदत्व मिळविण्यासाठी प्रत्येकाला धर्मनिरपेक्षतेची लेखी प्रतिज्ञा घ्यावी लागे. वैयक्तिक शौर्य गाजवणे अथवा ब्रिटिशांचे खून करणे, हे त्यांचे उद्दिष्ट नव्हते. लालाजींवरील प्राणघातक प्रहारांचा बदला म्हणून या क्रांतिकारकांनी स्कॉटचा वध करावयाचे ठरवले, हे खरे. "पण लालाजींवरील हल्ला हा केवळ एका राजकीय नेत्यावरील हल्ला नसून, तो अमानुष व अन्यायी साम्राज्यशाहीने केलेला भारत राष्ट्राचा अपमान होय व भारताला आव्हान होय. या कारणास्तव आम्ही सॉंडर्सचा वध केला", असे भगतसिंग यांनी स्पष्ट केले होते. शिवाय सॉंडर्सच्या वधाबद्दल त्यांनी दिलगिरीही व्यक्त केली होती. ब्रिटिश महासत्तेचा प्रतिनिधी म्हणून त्यांनी त्याला ठार केले होते.

या घटनेनंतर हिं. सो. रि. आर्मीने आपले उद्दिष्ट व ध्येयधारणा नव्याने निर्धारित केली. हिंसेचा मार्ग सोडून हे युवक 'मास पॉलिटिक्स' म्हणजे व्यापक जनआंदोलन उभारण्याच्या राजकारणाकडे वळले. संपूर्ण स्वातंत्र्य हेच ध्येय समोर ठेवून शेतकरी व कामगारांचा लढा यशस्वी करणे आणि हिंदुस्तानात धर्मनिरपेक्ष आणि समाजवादी समाजव्यवस्था प्रस्थापित करणे हे त्यांच्या संघटनेचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी घोषित केले. हेच ध्येय साध्य करण्यासाठी भगतसिंगांनी क्रांतीचा नारा दिला होता.[१४]

## मध्यवर्ती कायदेमंडळात बाँबस्फोट

कम्युनिस्ट व क्रांतिकारकांच्या वाढत्या हालचालींना पायबंद घालण्यासाठी लॉर्ड आयर्विनचे सरकार पब्लिक सेफ्टी बिल आणि ट्रेड डिस्पुट बिल ही दोन विधेयके पास करण्यासाठी प्रयत्नशील होते. त्याअन्वये भारतीयांचे नागरी स्वातंत्र्य आणि विशेषतः कामगारांचे हक्क दडपून टाकणे हे सरकारचे उद्दिष्ट होते. कामगारांना संप अथवा निदर्शने करण्याचा हक्क साफ नाकारण्याचा सरकारचा हेतू होता. या सेफ्टी विधेयकाला तेव्हा 'बोल्शेव्हिक बिल' म्हणत असत. हे बिल इंग्रज लोक आणि संस्थानी प्रजेला लागू नव्हते. मात्र साम्यवादाचा प्रसार करण्यासाठी इथे आलेल्या विदेशी कम्युनिस्टांना हे बिल लागू होते. मात्र ४ सप्टेंबर १९२८ रोजी सरकारने केंद्रीय कायदेमंडळात मांडलेले विधेयक विधानसभा अध्यक्ष विठ्ठलभाई पटेल यांच्या निर्णायक मतामुळे पराभूत झाले.

यानंतर कम्युनिस्टांच्या वाढत्या कारवाया व संपांना पायबंद घालण्यासाठी सरकारने सार्वजनिक सुरक्षा विधेयक सुधारित स्वरूपात पुन्हा मांडले (जानेवारी १९२९). त्यावरील चर्चा पूर्ण होण्याआधीच २० मार्च १९२९ रोजी मीरत कट खटल्यासाठी ३१ कम्युनिस्टांना पकडणे सुरू झाले होते. कॉ. डांगे, जोगळेकर वगैरे कम्युनिस्ट पकडले गेले होते. या वेळेलाही विधानसभा अध्यक्ष विठ्ठलभाई पटेल यांनी तांत्रिक मुद्दे उपस्थित करून सरकारला अडवण्याचा चांगला प्रयत्न केला. ८ एप्रिल १९२९ रोजी पटेल याबाबतच्या वादावर निर्णय देणार होते. अध्यक्ष विठ्ठलभाई यांच्यासह मोतीलाल नेहरू, बॅ. जिना, न. चिं. केळकर, जयकर, मदन मोहन मालवीय, बमनजी

दलाल वगैरे खासदार सभागृहात बसलेले होते. प्रेक्षकांच्या व इतर गॅलऱ्यांमध्ये खूप गर्दी होती. सायमन कमिशनवाले जॉन सायमन हे देखील विधेयकावरील चर्चा ऐकण्यासाठी अध्यक्षांच्या गॅलरीत बसलेले होते.

एच. एस. आर. ए. च्या निर्णयानुसार सरदार भगतसिंग व बटुकेश्वर दत्त हे दोघे प्रेक्षकांच्या गॅलरीत गेले. उपरोक्त विधेयकावर वाद चालू असताना भगतसिंा यांनी एक अहिंसक बाँब व्हाइसरॉयच्या दिशेने सभागृहात फेकला. तेथे हजर असलेल्या न. चिं. केळकरांनी लिहिले आहे की, "तोफेचा गोळा सुटल्यासारखा एक मोठा आवाज झाला. पुरुषभर उंचीची एक ज्वाळा निघाली व धुराचा लोळ उठला. त्यामुळे सभागृह भरून गेले. शेजाऱ्याला शेजारी दिसेना. धावपळ व गोंधळ झाला. धूर कमी झाल्यावर सभासदांना दोन युवक दिसले. त्यातील दुसरा युवक दुसरा बाँब फेकीत असल्याचे दिसले. दुसरा बाँबस्फोट झाला. या क्रांतिकारकांनी लाल रंगाची छापील पत्रके सभागृहात फेकली. पिस्तुलातून आवाजही काढले." इतके केल्यावर वीर भगतसिंग यांनी आपली हॅट घातली आणि पोलिसांच्या स्वाधीन होण्यासाठी ते जागच्या जागी स्वस्थ उभे राहिले. विठ्ठलभाई पटेल, मोतीलाल नेहरू व जिना यांनी जागेवर बसून ही घटना शांतपणे पाहिली होती.[१५]

गृहमंत्री व काही जणांना अगदी किरकोळ जखमा झाल्या. कुणालाही जखमी करणे हा या क्रांतिकारकांचा इरादाही नव्हता. तेव्हा सभागृहात हजर असलेल्या बॅ. असफ अलींनी नंतर स्पष्ट केले की, बटुकेश्वर दत्त यांनी दुसरा बाँब फेकला नव्हताच. पण भगतसिंगांबरोबरच तुरुंगात राहणे किंवा फाशी जाणे शक्य व्हावे म्हणूनच त्यांनी आपल्या जबानीत सांगितले की, 'दुसरा बाँब मी फेकला'. मात्र ती लाल पत्रके दत्त यांनीच फेकली होती हे खरे. वस्तुतः सभागृहात उडालेल्या प्रचंड गोंधळात या दोघा क्रांतिकारकांना तेथून निसटून जाणे अगदी सहज शक्य होते. तथापि न्यायालयाच्या व्यासपीठावरून त्यांना क्रांतीचा आणि क्रांतिकारी विचारप्रणालीचा प्रसार करावयाचा होता. तसेच देशबांधवांना जागृत करावयाचे होते आणि अमानुष ब्रिटिश सरकारचे न्यायालयात वाभाडे काढावयाचे होते. गॅलरीत बसलेल्या जॉन सायमनला ठार मारावयाचे नव्हते.

या क्रांतिकारकांनी सभागृहात टाकलेल्या पत्रकांचा उद्देश आम जनतेला आगामी क्रांतीसाठी सज्ज करणे व आपल्या हक्कांसाठी झगडणे हे शिकवणे हाच होता. त्या आवेशपूर्ण पत्रकात म्हटले होते, "बहिऱ्यांना ऐकू यावे यासाठी मोठा आवाज करावा लागतो ............. आम्ही आमच्या कृत्याचे जोरदार समर्थन करतो ............ व्यक्तींना ठार मारणे सोपे आहे, पण तुम्ही तत्त्वांना मूठमाती देऊ शकत नाही. फ्रान्समधील बुर्बान राजे आणि रशियातील झार यांचा पाडाव झाला व क्रांती विजयोन्मादात त्यांच्या शवावरून नाचत पुढे गेली."[१६]

दिल्लीतील न्यायालयात असेंब्ली बाँब खटल्याच्या वेळी भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनी दिलेल्या लेखी निवेदनात (६ जून १९२९) त्यांनी पुढीलप्रमाणे प्रतिपादन केले होते :-" The bomb was necessary to awaken England from her dreams. We dropped the bombs on the floor of the Assembly Chamber to register our protest on behalf of those who had no other means left to give expression to their heart-rending agony....... Force used in furtherance of a legitimate cause had its moral justification."

**दिल्लीतील न्यायालयाचा तसेच लाहोर कट खटला चालविणाऱ्या खास न्यायाधिकरणाचा भगतसिंग, सुखदेव, राजगुरू आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सार्वजनिक व्यासपीठासारखा उपयोग करून घेतला. भर कोर्टात ते उच्चरवात क्रांतिवादाचे नारे घोषित करीत.** 'इन्किलाब जिंदाबाद', 'डाऊन विथ इंपिरिआलिझम' अशा घोषणा देत. ते क्रांतीचे व धर्मनिरपेक्षतेचे गोडवे गाणारी कवने भर कोर्टात म्हणत. त्यांनी शिक्षेची अथवा मरणाचीही तमा बाळगली नाही. मोतीलाल नेहरू आणि जवाहरलाल नेहरू, सुभाषबाबू वगैरे अनेक राष्ट्रीय पुढारी त्यांना भेटावयास कारागृहात गेले होते. त्यांचे साथीदार जतिन (जतिंद्रनाथ) दास पूर्णतः अन्नत्याग करून कारागृहातच स्वर्गवासी झाले. मरण पावल्याच्या आधल्या दिवशी त्यांनी अंतिम इच्छा व्यक्त केली, "माझ्या मृतदेहावर कोणतेही धार्मिक संस्कार करण्यात येऊ नये. मी बंगाली नाही, मी भारतीय आहे."[१७]

संहार करणे हा या बॉंब गोळ्यांचा अजिबात उद्देश नव्हता हे ब्रिटिश सत्ताधीशांनीही कबूल केले. स्वतः व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन यांनीही एका पत्रात कबूलच केले की, केंद्रीय विधानसभेतील बॉंबस्फोट हे एक वरदानच होय. या प्रकरणामुळे आम्हाला हवे असलेले पुष्कळच जहाल चळवळे पकडणे शक्य झाले. या प्रकरणानंतर पोलीस व गुप्तचरांनी धरपकड करण्याचे सत्र अव्याहत चालू करून, हिंदुस्तान सोशालिस्ट आर्मीच्या बहुसंख्य क्रांतिकारकांना पकडले. गुप्तचरांनी या आर्मीच्या पंजाब व संयुक्त प्रांतातील शाखांची बदलती मुख्यालये व बॉंब कारखान्यांवर छापे घातले. सरकारने कुप्रसिद्ध लाहोर कॉंस्पिरसी केस रचण्यासाठी पुरावे हस्तगत केले. पण सरकारने दोन्ही अन्यायकारक विधेयकांचा आग्रह सोडून दिला नाहीच. उलट १२ एप्रिल १९२९ रोजी व्हाइसरॉय महाशयांनी एक खास वटहुकूम काढून विधेयकांतील दडपशाही करणाऱ्या सर्व तरतुदी लागू केल्या.

## क्रांतिकारकांवरील खटला

'लाहोर कॉंस्पिरसी केस' म्हणून कुप्रसिद्ध असलेल्या राक्षसी खटल्यात असेंब्लीतील बॉंबस्फोट प्रकरण तसेच लाहोर, सहराणपूर, आग्रा व कलकत्ता येथील बॉंब निर्माण केंद्रे आणि पंजाब नॅशनल बॅंक लुटण्याचा कट, जे. पी. सॉंडर्स व हवालदार चनानसिंग यांचे खून अशी अनेक कोर्ट प्रकरणे हेतूतः एकत्र करण्यात आली. ही सर्व प्रकरणे समरी ट्रायल रीतीने चालवण्यासाठी सरकारने विशेष न्यायाधिकरण नेमले. एका खास वटहुकुमान्वये नेमलेले हे खास न्यायाधिकरण मुळातच स्वेच्छाचारी व दडपशाही स्वरूपाचे असल्याने सरकारला हवा तसाच निकाल लागणार होता.

केंद्रीय विधानसभेत बॉंबस्फोटामागे बटुकेश्वर दत्त यांच्याऐवजी आपली निवड करावी असा राजगुरूंचा आग्रह होता. पण मूळ योजनेत बदल करणे अमान्य झाले. त्यामुळे निराश होऊन राजगुरू काशीत परत गेले होते. भगतसिंग आणि बटुकेश्वर दत्त यांना पकडल्यावर पोलिसांनी काही संशयितांना पकडले. माहितीचे धागेदोरे जमवून पोलिसांनी भगवतीचरण व्होरा, सुखदेव, जयगोपाळ व किशोरीलाल यांनाही ताब्यात घेतले. सुखदेव यांच्याकडून चुकून वाच्यता झाल्यामुळे जयगोपाळ, हंसराज, फणींद्रनाथ घोष माफीचे साक्षीदार होण्यास तयार झाले. त्यामुळे आपल्या गुप्त

संघटनेच्या उलाढाली महाराष्ट्रातून करण्याचे चंद्रशेखर आझाद, वैशंपायन, मलकापूरकर यांनी ठरवले होते. शिवाय उत्तरेत गुप्तचरांचा ससेमिरा वाढला होता. प्रथम अमरावतीस व नंतर अकोल्यास गेलेल्या राजगुरू व सावरगावकरांना वैशंपायन अकोल्यात भेटले. हे तिघे व सदाशिव मलकापूरकर आणि भगवानदास माहौर वगैरे चंद्रशेखर आझादांना अकोल्यात भेटणार होते. तेथे नवीन क्रांतिकारी केंद्र उघडण्याची योजना होती. तथापि अकोल्यात राहणेही धोक्याचे वाटू लागल्याने राजगुरू व सावरगावकर पुण्यात गेले. आणि तेथे राजगुरू आपल्या खऱ्या नावाने फिरू लागले (जुलै १९२९). त्यांनी गुप्ततेची खबरदारी घेण्याचे कमी केले.

चंद्रशेखर आझादांच्या योजनेप्रमाणे मलकापूरकर व माहौर जिवंत बॉंब, पिस्तुले, काडतुसे व बॉंब बनविण्याचे साहित्य बरोबर घेऊन, ग्वाल्हेर आणि झाशीवरून अकोल्यास जात असताना ११ सप्टेंबर १९२९ रोजी भुसावळ स्टेशनात पकडले गेले. त्यामुळे अकोल्याची योजना साकार झाली नाही. भुसावळ बॉंब खटल्याचे विवेचन स्वतंत्रपणे करावे लागेल. हा खटला त्या काळात बराच गाजला होता.

पुण्यात असलेले राजगुरू व सावरगावकर गुप्ततेची अत्यावश्यक दक्षता न घेता उघडपणे फिरू लागले. शि. म. परांजपे यांच्या अंत्ययात्रेतही ते सामील झाले. गव्हर्नर फ्रेडरिक साईक्स यांचा वेध घेण्यासाठी २८ सप्टेंबर १९२९ रोजी ते पुणे रेसकोर्सवरही गेले होते. लाहोर कटातील माफीचा साक्षीदार झालेल्या जयगोपाळ यास पंजाबच्या पोलिसांनी पुण्यात आणले होते. त्याने रेसकोर्सवरच पोलिसांना राजगुरू यांची ओळख दिली. त्याच्याच मदतीने २९ सप्टेंबरच्या मध्यरात्री पंजाब पोलिसांनी राजगुरू व सावरगावकर या क्रांतिकारकांना पकडले. त्या दोघांना लाहोरला नेऊन तेथे त्यांचा अमानुष छळ केला. तरीही कटाबद्दल त्यांनी चकार शब्दही काढला नाही. दत्तोपंत करंदीकरही पुण्यातच पकडले गेले.

सरदार भगतसिंग व बटुकेश्वर दत्त विधानसभेच्या गॅलरीत स्वतःहून पोलिसांच्या स्वाधीन झालेलेच होते. राजगुरू व सावरगावकर पुण्यात पकडले गेले. गुप्तचर व पोलिसांनी तऱ्हेतऱ्हेच्या उपायांनी हिंदुस्तान सोशालिस्ट आर्मीच्या तसेच नौजवान भारत सभा व लाहोर स्टुंडट्स युनियनच्या कित्येक सभासदांना पकडले. सरकारने

लाहोर कट खटला रचला. रीतसर न्यायालयात सरकारला हेतू साध्य करणे कठीण जाणार असल्यामुळे, सरकारने स्पेशल ट्रिब्यूनल नेमले. त्या खास ट्रिब्यूनलने सरदार भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना फाशीची शिक्षा ठोठावली. काही क्रांतिकारकांना काळेपाणी तर काहींना सश्रम कारावासाच्या शिक्षा देण्यात आल्या. काही जण माफीचे साक्षीदार बनल्यामुळे सरकारचे फावले. बहुसंख्य क्रांतिकारकांनी कारागृहात अन्नत्याग्रह केला व देशाला त्यागाची प्रेरणा दिली. त्यांनी अधिकाऱ्यांना त्रस्त करण्याचा व आपल्या क्रांतिवादी विचारप्रणालीचा प्रचार करण्याचा विडा उचलला.

या क्रांतिकारकांवरील खटल्याची विशेषता अशी की, त्यांनी क्रांतिवादाचा व मार्क्सवादी विचारप्रणालीचा भारतभर प्रसार करण्याचे अभिनव माध्यम म्हणून कारावास व न्यायालयाचा उपयोग करून घेतला. स्वतःचा बचाव न करता कोर्टरूमच्या व्यासपीठावरून वसाहतवादी इंग्रजांवर जोरदार हल्ले केले. अमानुषव अन्यायी सरकारवर त्यांनी प्रहार केले. भारताला क्रांतीचा संदेश दिला. त्यांनी भारतात राज्यक्रांती घडवून आणण्याचा युवकांना संदेश दिला. देशासाठी बलिदान करण्याची शिकवण दिली. तसेच ब्रिटिशनिष्ठ भारतीय लोक, मवाळ पुढारी आणि मूलतत्त्ववादी व धर्मवादी भारतीयांचा निषेध करण्यावर त्यांनी भर दिला. भगतसिंगांनी लोकशही समाजवाद आणि मार्क्सवादी अर्थकारणाचा पुरोगामी विचार प्रसारित केला. भगतसिंग यांनी कारावासातही कार्ल मार्क्सचा सखोल अभ्यास केला, आणि सहकाऱ्यांनाही मार्क्सवादाची शिकवण दिली.

बॉबतज्ञ जतिंद्रनाथ दास यांनी ६३ दिवस अन्नाचा पूर्णतः त्याग करून आपला देह देशार्पण केला. चंद्रशेखर आझाद आपल्या प्रतिज्ञेला जागले आणि सरकारशी लढता लढता शहीद झाले. त्यांना पोलिसांशी झालेल्या समोरासमोरच्या लढाईतमरण आले. काही क्रांतिकारकांच्या नातलगांनी प्रिव्ही कौन्सिलकडे अपील करण्यासाठी अर्ज केले, पण सरकारने ते तात्काळ फेटाळले. भगतसिंग यांचे पिताजी किशनसिंग यांनीही अर्ज केला होता. हे कळताच भगतसिंग यांनी स्वतः सरकारकडे मागणी केली की, 'माझ्या वडिलांचा अर्ज फेटाळून लावावा व मला फासावर चढवावे.' शिवाय अपील करणाऱ्या वडिलांनाही त्यांनी प्रेमाने समज दिली. त्यांनी समक्ष

मरणालाच कवटाळले. **आपल्या हौतात्म्यातून भारत राष्ट्राला प्रेरणा मिळावी ही त्यांची मनस्वी जिद्द होती. क्रांतिसाठी आत्माहुती हा भगतसिंग व साथींचा संदेश होता.**

**महात्मा गांधी यांनी या तिघा क्रांतिकारकांना वाचविण्यासाठी व त्यांना जीवदान देण्यासाठी अत्यंत मनःपूर्वक कसोशीचे प्रयत्न केले. व्हाइसरॉय आयर्विनला दोनदा समक्ष भेटून खूप आर्जव केले. क्रांतिकारकांना फाशी दिल्यास होणाऱ्या सर्व दुष्परिणामांचीही कल्पना दिली.** शांतता प्रस्थापित करण्याच्या उभयतांच्या प्रयत्नांना कशी बाधा येईल यावर गांधीजींनी चर्चा केली. देहदंडाऐवजी जन्मठेप द्यावी अशीही त्यांनी विनंती केली. निदान फाशी काही दिवस तरी पुढे ढकलावी यासाठीही गांधीजींनी प्रयत्नांची शिकस्त केली. पण आयर्विनचे हात बांधलेले होते. पंजाबचा लेफ्टनंट गव्हर्नर ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हता. २३ मार्च १९३१ च्या सायंकाळी लाहोर जेलमध्ये पंजाब सरकारने तिघा थोर क्रांतिकारकांना फासावर लटकवले.[१८] या प्रकरणी गांधीजींवर केलेले सर्वच आरोप अगदी असत्य अथवा द्वेषमूलक आहेत.

भगतसिंग यांना लाहोरमध्ये कोठे फाशी दिली याबाबत मागील दशकात वाद उपस्थित झाल्यामुळे त्या जागेविषयी पाकिस्तानात चौकशी चालू होती. तिच्यातून काय निष्पन्न झाले हे माहीत नाही. पण तत्कालीन कागदपत्रांतून दिसते की, या क्रांतिकारकांचे मृतदेह नातलगांना न देता पोलिसांनी लाहोरपासून लांब फिरोजपूरजवळ सतलज नदीच्या काठी निर्जन ठिकाणी नेले आणि रातोरात त्यांचे दहन केले होते. बऱ्याच विलंबाने नातलगांच्या हाती पडली त्यांची रक्षा!

सारा भारत शोकसागरात बुडाला होता. महात्माजी व नेहरूंसह सर्व भारतीय सुन्न झाले होते. तथापि या महान क्रांतिकारकांचे आत्मबलिदान व्यर्थ न जाता त्यांनी हजारो युवकांना निकोप राष्ट्रवादाची प्रेरणा दिली. त्यांची हिंदुस्तान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मी जिवंत राहिली. या संघटनेने पंजाबात १९४२चा छोडो भारत लढा अधिक परिणामकारक केला. भगतसिंगांचे वडील सरदार किशनसिंग हे पुत्र वियोगचे दुःख जपूनही गांधीजींच्या सविनय कायदेभंग लढ्यात उतरले.

सरदार भगतसिंग व त्यांचे सहकारी सकृतदर्शनी सशस्त्रवादी क्रांतिकारक वाटतात. तथापि त्यांनी स्वतः मान्य केले की, "मी प्रारंभी दहशतवादी कृती केली. पण मी दहशतवादी नाही. दहशतवादाची विफलता मला माहीत आहे. माझी ठाम खात्री झालेली आहे की, त्या मार्गाने काहीही साध्य होणार नाही." भगतसिंग यांचा अधिक महत्त्वाचा 'वारसा' विचारप्रणालीच्या क्षेत्रात आहे, त्यांच्या विचारसंचितात आहे. न्यायासनापुढे त्यांनी प्रतिपादन केले, "Revolution to me is not the cult of the bomb and pistol, but a total change of society culminating in the overthrow of both foreign and Indian capitalism and the establishment of the dictatorship of the proletariat. Revolution is the inalienable right of mankind. Freedom is the imprescriptible birthright of all. The labourer is the real sustainer of society ...... To the altar of this revolution we have brought our youth as incense, for no sacrifice is too great for so magnificent a cause.... We await the advent of revolution."[१९]

तेवीस वर्षांच्या भगतसिंग यांनी मार्क्सवादाचा पद्धतशीर अभ्यास करून लोकशाही समाजवादी विचारप्रणालीची शिकवण दिली. 'आम जनतेच्या व्यापक आंदोलनातूनच क्रांती यशस्वी होऊ शकेल. आम जनतेने आम जनतेसाठी उभारलेल्या व्यापक लढ्यातूनच क्रांतीचा विजय होईल. शोषित व पददलित भारतीयांनी उभारलेल्या जनआंदोलनातूनच क्रांतीचे उद्दिष्ट साध्य होईल', असे विचार त्यांनी मांडले. भगतसिंग परिपूर्ण मार्क्सवादी बनले, असा प्रस्तुत अभ्यासकाचा दावा नाही. तथापि त्या अल्पवयात त्यांनी कार्ल मार्क्सचे विचारसंचित आत्मसात केले होते.

मात्र सरदार भगतसिंग यांच्या विचारसंचिताचा पुन्हा अर्थउकल करणे आम्हास आवश्यक वाटते. असहकार चळवळीनंतर त्यांचा सत्याग्रहावरील विश्वास उडाला, व स्वातंत्र्यासाठी बलप्रयोगही करावा लागेल, असे त्यांना वाटू लागले होते. मात्र तेव्हाही महात्मा गांधींचा धर्मनिरपेक्षतावाद, अपरिग्रह आणि वर्गातीत चळवळीचा बाणा याविषयी त्यांना गांधीजींविषयी नितांत आदर होता हे निश्चित! पण भगतसिंग यांची

प्रिझन डायरी आणि न्यायालयातील निवेदने (१९२९) व एक पुस्तिका यातून दिसते की, हा क्रांतिकारक त्याच्या अभ्यासकांना व लोकांना ज्या स्वरूपात दिसला, त्याहून भिन्न होता. भगतसिंगांच्या विचारप्रणालीत वेगाने परिवर्तन होत राहिले. हिंसावादावरचा त्यांचा विश्वास साफ उडाला होता. त्या मार्गाने स्वातंत्र्य मिळणार नाही अशी त्यांची खात्री पटली. त्यांनी कायदेमंडळाच्या सभागृहात नुसता आवाज करणारे बाँब फेकले होते. भगतसिंग मार्क्सवादाकडे झुकले होते, यावर लिहिले गेले आहेच. **मात्र त्यांचे आणखी वैचारिक संक्रमण होत राहिले. आणि भगतसिंग आणखी काही काळ जगले असते, तर त्यांचे गांधीवादी समाजवादाकडे संक्रमण झाले असते असे मला वाटते.**

## भुसावळ बाँब खटला

हिंदुस्तान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मी या क्रांतिकारक संघटनेच्या पंजाबमधील आक्रमक घटनांची चौकशी चालू असताना ‘लाहोर राजद्रोह’ कटातील पुढारी चंद्रशेखर आझाद, सदाशिव रघुनाथ मलकापूरकर (वय २१), भगवानदास तुलसीदास माहौर इत्यादी सशस्त्र क्रांतिकारक भूमिगत झालेले होते. पंजाब व उत्तर भारतामध्ये गुप्तचरांनी व्यापक जाळे पसरल्यामुळे या आर्मीचे ग्वाल्हेरमधील बाँब केंद्र वऱ्हाडातील अकोल्यास स्थलांतरित करण्याची चंद्रशेखर आझादांनी योजना आखली. तेव्हा शिवराम हरी राजगुरू अकोल्यात होते. चंद्रशेखर आझाद यांच्या मार्गदर्शनानुसार सदाशिव मलकापूरकर आणि भगवानदास माहौर ग्वाल्हेरच्या कारखान्यातील बाँब बनविण्याची साधनसामग्री, दोन जिवंत बाँब, दोन पिस्तुले, काडतुसे व स्फोटक रसायने बरोबर घेऊन अकोल्यास शिवराम राजगुरू यांच्याकडे जाण्यास ग्वाल्हेरहून निघाले. प्रथम ते झाशीला जाऊन तेथील विश्वनाथ गंगाधर वैशंपायन यांचेकडून उपरोक्त साधनसामग्री घेऊन रेल्वेने भुसावळला आले. भुसावळला रेल्वेगाडी बदलून ते अकोल्यास निघण्यापूर्वी भुसावळ स्थानकाच्या प्लॅटफॉर्मवर सीमाशुल्क विभागाच्या निरीक्षकास त्यांच्या हमालाजवळच्या जड अशा ट्रंकांचा संशय आला. म्हणून निरीक्षकाने तपासणी सुरू केली. तितक्यात भगवानदास माहौरांनी कपड्यात गुंडाळलेले भरलेले पिस्तुल खिशात घातले. मात्र या गडबडीत ट्रंकेतील काडतुसांचे एक पुडके खाली पडले. त्यामुळे निरीक्षकाचा संशय बळावला व त्याने पोलिसांना

बोलाविले. म्हणून माहौरांनी आपल्या खिशातील स्वयंचलित पिस्तुलाने गोळ्या झाडत झाडत निसटून जाण्याचा प्रयत्न केला. पण तो अपयशी ठरला. त्याचप्रमाणे बाँब बनविण्याच्या साधनसामग्रीची मणभर वजनाची ट्रंक घेऊन रेल्वे लाईनवरून पलायन करताना सदाशिव मलकापूरकरांचा पाय सिग्नलच्या तारांमध्ये अडकून ते खाली पडले. त्यामुळे भगवानदास माहौर व सदाशिवराव मलकापूरकर ११ सप्टेंबर १९२९ रोजी भुसावळ स्थानकात पकडले गेले.

सरकारने सदाशिव मलकापूरकर व माहौर यांच्यावर जळगावच्या न्यायालयात राजद्रोहाच्या आरोपाखाली खटला भरला. सरकारने हा प्रश्न प्रतिष्ठेचा मानला व खटल्याखाली पुरावे मिळविण्यासाठी सर्व प्रांतांमध्ये तपासाचे जाळे पसरवले. दोन्ही आरोपी धुळे मध्यवर्ती कारागृहात बंदिवान होते. मात्र या दोन्ही आरोपींचे तसेच हिंदुस्तान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मीच्या क्रांतिकारकांचे साथीदार असलेले जयगोपाळ आणि फणींद्र घोष हे दोघे माफीचे साक्षीदार झाले. त्यांच्या साक्षीमुळे सदाशिवराव व माहौर हे दोघे क्रांतिकारक लाहोर बाँब प्रकरण व पंजाब कटातील गुन्हेगार असल्याचे सिद्ध होणार होते. ही वार्ता सदाशिवराव व माहौरांना धुळे कारागृहातच समजली व त्यांनी या देशद्रोहींचा न्यायालयातच वध करण्याचा निर्धार केला. प्रत्यक्ष खटल्यासाठी त्यांना जळगावच्या कारागारात आणल्यावर बाहेरून जेवणाचा डबा मागविण्यासाठी त्यांनी परवानगी मिळवली.

या संधीचा फायदा घेऊन सदाशिवरावांचे वडील बंधू शंकरराव मलकापूरकर यांनी जेवणाच्या डब्यातून सदाशिवरावांना भरलेले पिस्तुल पुरविले. पिस्तुल मिळाल्यावर भगवानदास माहौरांनी माफीचे साक्षीदार बनलेल्या फितुरांवर बेभान होऊन गोळीबार केला. आणि तोही भर न्यायालयातच. मात्र गोळ्या अचूक वर्मी न लागल्यामुळे जयगोपाळ व फणींद्र घोष जखमी झाले, मरण पावले नाहीत. या प्रकरणी सदाशिवराव व भगवानदास माहौर यांना १५ वर्षे सक्तमजुरी आणि दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली. ते दोघे प्रथम सिंध प्रांतातील सक्कर व नंतर अहमदाबादच्या कारागृहात डांबले गेले. ज्या पिस्तुलाने न्यायालयात गोळीबार झाला ते पुरविण्याचा ठपका जळगावचे पुढारी देवकीनंदन नारायण व इतर नऊ व्यक्तींवर ठेवण्यात आला.

त्यांच्यावर सरकारने खटला भरला. तथापि त्यांच्यावरील आरोप सिद्ध तर झाले नाहीच, पण पिस्तुल कोणी पुरविले हे अखेरपर्यंत स्पष्ट झाले नाही.

मात्र अगदी अलीकडे म्हणजे मार्च १९८६ मध्ये शंकरराव मलकापूरकरांनी जळगावला जाहीर सभेतच गौप्यस्फोट केला की, त्यांनीच जेवणाच्या डब्यातून पिस्तुल पुरविले होते ![२०]

वरील दोन्ही क्रांतिकारक सक्तमजुरीची शिक्षा भोगत असताना १९३७ मध्ये अधिकारारूढ झालेल्या काँग्रेस मंत्रिमंडळाने या खटल्याचे पुनर्विलोकन केले आणि दोघांना मार्च १९३८ मध्ये मुक्त केले.[२१]

लॉर्ड आयर्विनच्या सरकारने बलप्रयोगाच्या आधारे शस्त्रवादी क्रांतिकारकांची चळवळ दडपून टाकली. अलाहाबादच्या आलफ्रेड पार्कमध्ये समोरासमोर झालेल्या चकमकीत चंद्रशेखर आझादांना वीर मरण आले (फेब्रुवारी १९३१). थोर बंगाली क्रांतिकारक सूर्य सेन हेही शहीद झाले. अशा सर्व अग्रणी क्रांतिकारकांच्या पश्चात क्रांतिकारकांची चळवळ क्षीण झाली. उर्वरित युवकांमध्ये पुनर्विचार सुरू झाला. त्यांच्यापैकी बरेच मार्क्सवादाकडे आकर्षित झाले व त्यांनी शेतकरी आणि कामकऱ्यांच्या चळवळीला वाहून घेतले. ते कम्युनिस्ट पक्ष व रिव्हॉल्युशनरी सोशालिस्ट पार्टीला जाऊन मिळाले. मात्र तरीही गांधीजी व नेहरूंकडे आकर्षित झालेल्यांची संख्या अधिक होती.

या क्रांतिकारकांविषयी सहानुभूती असलेल्या जवाहरलालजी यांनी म्हटल्याप्रमाणे शस्त्रवादाचा पुनरोद्‌भव मधून मधून झाला, तरी हिंदुस्तानातील युवकांना इतःपर शस्त्रवादाविषयी फारसे स्वारस्य वाटेनासे झाले. नेहरू म्हणतात, "सतत पंधरा वर्षे अहिंसेचा गजर कानाशी होत राहिल्यामुळे हिंदुस्तानाची पार्श्वभूमी पार बदलून गेली असून, आम जनतेला राजकीय संग्रामाची कार्यप्रणाली म्हणून शस्त्रवादाचे आकर्षण उरले नाही. किंबहुना जनता या आचारप्रणालीस विरोध करीत आहे. शस्त्रवाद्यांचा भरणा ज्या वर्गातून होतो त्या पांढरपेशा वर्गावरही काँग्रेसच्या मतप्रचाराचा पुष्कळच परिणाम झाला आहे. शस्त्रवादाने क्रांती होणे शक्य नाही. दहशतवादाचे शस्त्र जुनाट

व बोथट झालेले असून त्यामुळे खऱ्या क्रांतीच्या मार्गात विघ्नेही उत्पन्न होतात, याची जाणीव पांढरपेशा वर्गातील सक्रिय व अधीर झालेल्या युवकांनाही झाली आहे. भारतात व इतरत्रही शस्त्रवाद लयाला जात आहे, तो जागतिक परिस्थिती बदलल्यामुळे होय. सरकारच्या दडपशाहीमुळे शस्त्रवाद लयाला जात नसून जागतिक परिवर्तनामुळे तसे घडत आहे. सरकार त्यास दडपू शकेल, पण उच्चाटन करू शकणार नाही. बहुशः क्रांतिवादी मनोवृत्तीच्या प्रारंभकालात दहशतवाद आढळून येतो ............... भारत निश्चितच त्या टप्प्याच्या पुढे गेलेला आहे. प्रसंगोत्पात होत असलेला उद्रेकदेखील हळूहळू कमी होईल. सर्व भारतीयांचा हिंसेवरील विश्वास उडाला असे नव्हे. व्यक्तिगत हिंसेवर मात्र जनतेची श्रद्धा उरलेली नाही."[१२] जवाहरलाल नेहरूंनी कारागृहात केलेले हे हिंसा व दहशतवादाचे मूल्यमापन १९३२-१९३३ सालांमधील आहे.

क्रांतिकारक युवक आम जनतेपर्यंत पोहोचले नाही, हे खरे. तरीही देशाच्या स्वातंत्र्यलढ्यास त्यांनी बरेच योगदान दिले. त्यांची देशभक्ती, धैर्य व निर्धार आणि निस्सीम त्यागभावना यामुळे जनमानसात राष्ट्रप्रेम व स्वातंत्र्याची आकांक्षा निर्माण झाली. लोकशाही व समाजवादाची जाणीव उत्पन्न झाली.

❑❑

## संदर्भ

१. पट्टाभी सीतारामय्या, खंड १, उपरोक्त, पृ. ३१५-१६.

२. सुमित सरकार, **मॉडर्न इंडिया : १८८५-१९४७**, पृ. २६२-६३.

३. मुंबई सरकार, होम डिपार्ट. स्पेशल, फाईल क्र. १४३ (के), भाग सात, विशेष शाखेचे टिपण.

४. य. दि. फडके, **विसाव्या शतकातील महाराष्ट्र,** खंड तिसरा, पृ. १३३-३५.

५. मुंबई सरकार, उपरोक्त फाईल, पोलीस कमिशनरचा अहवाल, १२ ऑक्टोबर १९२८.

६. र. के. खाडिलकर, **गेले ते दिवस,** पुणे, १९८०, पृ. १७.

७. **नागपूर जिल्हा गॅझेटिअर,** भाग १, २००५, पृ. २१०-११, २२०.

८. **टाइम्स ऑफ इंडिया,** १ नोव्हेंबर १९२८.

९. जवाहरलाल नेहरू, **ॲन ऑटोबायोग्राफी**, नवी दिल्ली, २००१, पृ. १७५-७६.

१०. कित्ता, पृ. १७७-८१.

११. कित्ता, पृ १७४-७५.

१२. एस. गोपाल, **जवाहरलाल नेहरू : अ बायोग्राफी,** खंड एक, मुंबई, १९७६, पृ. ११५-१६, १२२-२३.

१३. हिंदुस्तान सरकार, होम डिपार्ट. पोल. फाईल क्र. १६८, १९२९, २१ फेब्रुवारी १९२९ चे पत्र.

१४. जगमोहन सिंग व चमनलाल (संपा.), **भगतसिंग और उनके साथीयोंके दस्तावेज,** नई दिल्ली, १९८६, पृ. २६६.

१५. न. चिं. केळकर, **समग्र केळकर वाङ्मय,** खंड ६, १९३८, पृ. ६१०-११.

१६. कमलेश मोहन, **मिलिटंट नॅशनॅलिझम इन द पंजाब : १९१९-१९३५,** नवी दिल्ली, १९८५, पृ. १७२-७४.

१७. बिपन चंद्रा, **"भगतसिंग अँड हिज कॉम्रेडस्", चाप्टर्स फ्रॉम इंडियन नॅशनल मुव्हमेंट,** संपा. रवि दयाल, नवी दिल्ली, १९९५, पृ. १४४-४५.

१८. हिंदुस्तान सरकार, होम डिपार्ट. फाईल क्र. ४/३१, १९३१, स्पेशल ट्रिब्यूनलचा निर्णय, ७ ऑक्टोबर १९३०.

१९. भारत सरकार, दिल्ली, पुनर्मुद्रण, १९७४, **टेररीझम इन इंडिया : १९१७-३६**.

२०. के. के. चौधरी, **जळगाव जिल्ह्यातील स्वातंत्र्यलढा,** मुंबई, १९९७, पृ. ४६-४७.

२१. मुंबई सरकार, होम डिपार्ट. स्पेशल ब्रँच, फाईल क्र. ७४२ बी. आय. १९३७-३८.

२२. नेहरू, उपरोक्त, पृ १७५.

प्रकरण ९

## कामगार चळवळ

कामगार वर्गात जातिधर्माची जाणीव असली तरी असहकार आंदोलनापर्यंत कामगारांमध्ये वर्गजाणिवेचा अभाव होता. गांधीपूर्व काळात शोषक आणि शोषितांचे अस्तित्व गृहीत धरले जात असे. वर्ण-कलहाचे भान असले तरी कामगार विश्वात वर्ग-कलहाचे भान येण्याचा काळ अद्याप यावयाचा होता. बाल्यावस्थेत राष्ट्रीय काँग्रेसने कामगारांच्या समस्यांना पुरेसा वेळ दिला नव्हता. आपल्या हितासाठी सरकारशी संघर्ष करण्याचे बळ कामगारांमध्ये निदान पहिल्या महायुद्धापर्यंत तरी नव्हते. संघटनेचे बळ समजण्याचा काळ त्या नंतरचा! लोकमान्य टिळक आक्रमक विचारप्रणालीचे राजकारणी असूनही, मुंबईत एकवटलेल्या कामगारांना स्वराज्याच्य चळवळीत ओढण्याचा टिळकांनी ऑक्टोबर १९०५ पर्यंत कधीच प्रयत्न केला नव्हता. टिळक किंवा त्यांच्या अनुयायांनी कामगार संघटना उभारण्याचाही प्रयत्न केला नव्हता. स्वदेशी व बहिष्काराची चळवळ महाराष्ट्रात पसरवत असताना कामगारांचा चळवळीसाठी उपयोग करावा, ही कल्पना प्रथम शिवराम महादेव परांजपेंनी मांडली होती. मुंबईत एकवटलेल्या कामगार वर्गास राष्ट्रीय चळवळीत आणण्यासाठी आणि श्रमिकांची शक्ती ब्रिटिशविरोधी राजकारणासाठी वापरण्याचा आग्रह परांजपेंनी टिळकांना केला होता. कामगारांच्या आर्थिक समस्यांचा उपयोग सरकारविरुद्ध असंतोष पसरवण्यासाठी करावा, असे त्यांनी टिळकांना पटवल्यामुळे टिळक मुंबईतील कामगार विश्वात आले (१९०५). त्यानुसार टिळकांनी चिंचपोकळी, परळ वगैरे भागात सभा घेतल्या. म्हणून टिळकांना सहा वर्षांची काळ्यापाण्याची शिक्षा झाल्यावर गिरणी कामगारांनी सहा दिवस संप केला होता.

या **इतिहासाच्या पहिल्या खंडातील** एका प्रकरणात विवेचन केल्याप्रमाणे टिळकांच्या शिक्षेची बातमी समजल्यावर मुंबईतील ८५ कापड गिरण्यांमधील एक लाख कामगारांनी सहा दिवस संप केला होता. ना संघटना ना पुढारी तरीही कामगारांनी सर्वच गिरण्या बंद पाडल्या. मुंबईत दंगे झाले. हा पहिला राजकीय संप मानला

जातो. पण तरीही कबूल करावे लागते की, प्रमुख राजकीय पुढारी पुढील बरीच वर्षे कामगार चळवळीपासून अलिप्त राहिले. १९१५-१६ पासून टिळकांनी विठ्ठल रामजी शिंदे व व्ही. एम. पवार यांना हाताशी धरून कामगारांना होमरूल चळवळीत आणण्याचा प्रयत्न केला. मात्र स्वतः टिळकांनी कामगार विश्वासाठी वेळ दिला नाही.[१]

ज्याबद्दल दस्तऐवजाचा पुरावा आहे असा मुंबईतील पहिला संप कुर्ल्यातील स्वदेशी मिलमधील कामगारांनी १८८७ साली केला होता. मजुरीचे दर अत्यल्प असल्याने कामगारांनी स्वबळावर संप केला होता. संघटना अथवा पुढारी नसतानाही मुंबईत असे पुष्कळ संप झाले. पण खऱ्या अर्थी ती कामगार चळवळ नसून कामगार स्वबळावर आपले प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत. मात्र त्यात फारसे यश लाभत नसे. गिरणीमालक ब्रिटिशांच्या मदतीने संप दडपून टाकत.

## श्रमिकसंघांचे आद्य स्वरूप

महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाचे एक पुढारी व **दीनबंधू** पत्रकाचे संपादक नारायण मेघाजी लोखंडे यांनी एस. एस. बेंगाली यांच्या मदतीने मुंबईतील गिरणी कामगारांना संघटित करण्याचे प्रयत्न केले. लोखंडेंनी (१८४८-१८९७) बाँबे मिलहँड्स असोसिएशन ही पहिली कामगार संघटना १८८४ मध्ये स्थापन करून ती १८९३ पर्यंत चालू ठेवली. म्हणून लोखंडेंना महाराष्ट्रातील कामगार चळवळीचे जनक मानले जाते. ही संघटना आणि **दीनबंधू** पत्रक यांद्वारे सत्यशोधक समाजाचा प्रचार करण्यात येई. बहुतांश मजूर अब्राह्मण जातींमधील असल्याने त्यांचे सामाजिक प्रबोधन करण्यासाठी ही संघटना व पत्रक अत्यंत उपयोगी होते. लोखंडे स्वतः काही काळ मांडवी मिलमध्ये स्टोअरकीपर असल्याने त्यांना गिरणी कामगारांची दुःस्थिती माहीतच होती. त्या काळी कामगारांना पंधरा तास काम करावे लागे. सेवेच्या शर्ती अनारोग्यकारक तर होत्याच, पण अत्यंत जाचक होत्या. जोतीराव फुले, न्या. महादेव गोविंद रानडे वगैरे समाजसुधारकांच्या मागणीप्रमाणे मुंबई सरकारने १८८४ साली 'फॅक्टरी कमिशन' नेमले होते. या आयोगाला लोखंडे यांनी साडेपाच हजार कामगारांच्या स्वाक्षरीनिशी मागण्यांचा अर्ज सादर केला होता. दर रविवारी सुटी, जेवणासाठी अर्धा तास मध्यंतर, सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंतच काम, महिन्याच्या

पंधरा तारखेपर्यंत पगार, कार्यस्थळी दुखापत झाल्यास भरपगारी रजा आणि हातपाय तुटल्यास कामगारांच्या निर्वाहाची तजवीज, अशा त्यांनी मागण्या केल्या होत्या. यावरून कामगारांची दु:स्थिती स्पष्ट दिसते.

प्रामुख्याने जोतीराव फुले व सत्यशोधक सहकाऱ्यांच्या मदतीने लोखंडेंनी ही संघटना बांधलेली होती. ती खऱ्या अर्थी ‘ श्रमिकसंघ ’ स्वरूपाची नसून कामगार कल्याण मंडळी या स्वरूपात होती. औपचारिक सभासदत्व, निधी व नियम नसलेली ही संघटना सत्यशोधक समाजाच्या आचारविचार प्रणालीनुसार कार्य करत असे. तिला या समाजाकडून थोडे आर्थिक साहाय्य मिळत असे. तिचे कार्य सनदशीर मार्गानेच चाले. सरकारशी सलोखा राखून मजुरांच्या हितासाठी मालक वर्गाशी वाटाघाटी करण्यात येत असत.

नारायण मेघाजी लोखंडे, भिवाजी रामजी नरे, सीताराम केशव बोले, बॅ. हरिश्चंद्र तालचेरकर हे सर्वच कामगार नेते सत्यशोधक समाजाचे पुढारी होते. सत्यशोधक नेते प्राय: राजनिष्ठ असल्याकारणाने ब्रिटिश सरकारशी अथवा सरकारच्या धोरणाविरुद्ध लढा देत नसत. कामगारांना शिक्षण, व्यसनमुक्ती, आरोग्य, कामाचे तास कमी करणे अशा स्वरूपाचे काम ते करत. लोखंडेंच्या निधनानंतर (१८९७) भिवाजी नरे व मराठा ऐक्य सभेचे कार्यकर्ते कामगारांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत. नरे यांनी सी. के. बोले, बॅ. हरिश्चंद्र आनंदराव तालचेरकर यांच्या मदतीने कामगार हितवर्धक सभा स्थापन केली (१९०९). तिचे ध्येय कामगारांचे कल्याण साधणे हेच होते. कामगारांसाठी शिक्षण, व्यसनमुक्ती, कामगारांना कायदेशीर सल्ला आणि मालकांबरोबर होणाऱ्या तंट्यात त्यांना मदत करणे ही या सभेची उद्दिष्टे होती. मात्र कामगारांच्या हक्कांसाठी सदैव संघर्षाची भूमिका घेणारी ही लढाऊ संस्था नव्हती. कल्याणकारी कार्य हे ध्येय होते. मुंबईचा पोलीस आयुक्त एस. एम. एडवर्ड्स किंवा इतर अधिकाऱ्यांची मध्यस्थ म्हणून ते मदत घेत असत. ब्रिटिशांची निष्ठा बाळगणे हे या नेत्यांचे एक ध्येय होते. डिलाईल रोड व चिंचपोकळी भागातील गिरण्यांमधील कामगार व परेलचे रेल्वे वर्कशॉप आणि महानगरपालिकेचे कर्मचारी या सभेचे सभासद होते. तिचे दहा हजार सभासद असल्याचा एक उल्लेख प्रस्तुत

इतिहासकारास मिळाला. या कामगार सभेलाही सत्यशोधक समाजाकडून अर्थसाहाय्य मिळत असे. श्रमिकसंघ (ट्रेड युनियन) असे स्वरूप असलेली ही पहिली कामगार हितवर्धक सभा होय. तथापि १९२० पासून तिचा ऱ्हास होऊन ती १९२५ मध्ये बंद पडली.[२]

या सभेप्रमाणेच कामगार हितवर्धन करणारी सोशल सर्व्हिस लीग मुंबईत ११ मार्च १९११ रोजी स्थापन झाली. मुंबईतील नेमस्त पुढारी (काँग्रेसशी संबंधित) आणि गोपाळ कृष्ण गोखले यांच्या सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे सभासद नारायण मल्हार जोशी, गोपाळ कृष्ण देवधर व नटेश अप्पाजी द्रवीड हे या लीगचे कार्य चालवत असत. त्यांच्या प्रयत्नांमुळे करीमभॉय इब्राहिम आणि दोराब टाटा यांनी कामगारांसाठी शाळा काढल्या. पहिल्या महायुद्धाच्या काळात मालक व मजुरांमध्ये अनेक वेळा ताणतणाव निर्माण झाले होते. अनेक संप झाले. त्यांत ही लीग व विशेषतः ना. म. जोशी यांनी कामगारांची बाजू मांडली होती. म्हणून १९१८ पासून ना. म. जोशी कामगार नेते म्हणून हिंदुस्तानभर प्रसिद्धी पावले. सरकारनेही पुढारी म्हणून त्यांचा आदर केला. त्यानुसार ऑक्टोबर १९१९ मधील वॉशिंग्टनच्या आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या (आय. एल. ओ.) परिषदेत भारतीय कामगारांचे प्रतिनिधी म्हणून मवाळ नारायणरावांना पाठविले होते. वस्तुतः ते कोणत्याही श्रमिकसंघाचे पदाधिकारी नव्हते. तसेच एकाही संपाचे त्यांनी नेतृत्व केले नव्हते. तरीही सरकारच्या सहकार्याने मालक-मजूर तंटे सोडविण्यावर त्यांचा भर असल्यामुळे कामगार नेते म्हणून त्यांच्या कार्याला सरकारने मान्यता दिली.

तोपर्यंत स्वातंत्र्य चळवळीच्या परीघाबाहेर असलेल्या कामगार चळवळीत पहिल्या महायुद्ध काळात बदल होणे स्वाभाविक होते. महायुद्ध सुरू झाल्यावर मुंबईत घबराट पसरून कामगार आपल्या गावी जाऊ लागले होते. तेव्हा कामगार हितवर्धक सभेने अनेक ठिकाणी सभा घेऊन कामगारांमध्ये विश्वास निर्माण केला आणि सरकारला मदत केली. तथापि जीवनावश्यक वस्तूंचे भाव वाढून मजुरांचे कंबर्डे मोडले होते. शिवाय भाववाढीच्या प्रमाणात कामगारांचे वेतन वाढले नाही. त्यामुळे असंतोष वाढला. याची परिणती संपांची संख्या व तीव्रता वाढविण्यात झाली. मुंबई शहरात

१९१७ साली ४७ संप झाले. १९१८ मध्ये ६१ तर १९२० मध्ये ६३ संप झाले. १९१९ सालात गिरण्यांमधील दीड लाख कामगारांनी ९ जानेवारीपासून २५ तारखेपर्यंत उत्स्फूर्त संप केला, तो कोणीही पुढारी नसूनही.[३] रविंदरकुमार यांनी या संपाची तुलना शेतकऱ्यांच्या उत्स्फूर्त उठावाशी केलेली आहे. वर्गजाणिवेचा अभाव असूनही कामगारांनी तो उभारला होता.[४] महात्मा गांधींनी यशस्वी करून दाखवलेल्या चंपारण, खेडा व अहमदाबादमधील कामगारांच्या सत्याग्रहांमुळेही कामगार वर्गाचा आत्मविश्वास वाढला होता, हे त्याचे एक कारण दिसते.

पहिल्या महायुद्ध काळात गिरण्यांनी प्रचंड नफा मिळविला होता. वाढत्या मागणीप्रमाणे कापडाचे भाव वाढले होते. शिवाय काळ्या बाजारात कापड विकल्यानेही नफा वाढला होता. उदाहरणार्थ, वीस लाख रुपयांच्या भांडवल गुंतवणुकीवर १९१४ साली दीड लाख रुपयांचा नफा कमावणाऱ्या सेंच्युरी मिलच्या मालकांना १९१८ साली तब्बल साडेबावीस लाख रुपये नफा मिळाला होता. सर्वच मिलमालक गबर झाले. १९१४ साली भागधारकांना ६ टक्के लाभांश मिळाला होता. तो १९१७ मध्ये ३० टक्क्यांहूनही जास्त होता. सेंच्युरीच्या मालकांनी कारकून व तंत्रज्ञांचे वेतन वाढवून त्यांना शांत केले. मात्र ज्यांच्या श्रमावरच हे सारे शक्य झाले त्या कामगारांना केवळ १५ टक्के वेतनवाढ दिली. वस्तुतः महायुद्धकाळात जीवनावश्यक मालाच्या किंमती ७५ टक्क्याने वाढल्या होत्या. म्हणून कामगारांनी मागितलेली २५ टक्के पगारवाढ आणि एक महिन्याचा बोनस देऊनही त्यांचे निव्वळ उत्पन्न वाढणारच नव्हते. पण त्यांना मिळाली फक्त १५ टक्के वाढ.

अशा परिस्थितीत कामगारांना संपाशिवाय दुसरा पर्याय नव्हता. रशियन राज्यक्रांती आणि होमरूल चळवळीमुळे मुंबईतील काही जहाल विचारसरणीचे वकील कामगारांच्या प्रश्नांमध्ये मध्यस्थी करण्यास तयार असत. पण त्यांनाही मालक दाद देत नसत. म्हणून मुंबईतील अनेक गिरण्यांमध्ये संप पसरला. होमरूल चळवळीचे पुढारी डॉ. दिनकर धोंडो साठे, मोतीराम वेलकर व जमनादास द्वारकादास यांनी कामगारांना सक्रिय पाठिंबा दिला होता. म्हणून कामगारांच्या एका मिरवणुकीत दगडफेक झाली व तिला दंगलीचे रूप आले. दंगलीत एक पोलीस व दोन कामगार ठार झाले.

अशा प्रकारे न्याय मिळविण्यासाठी कामगार चळवळीत संघर्ष करून रक्त सांडण्यास प्रारंभ झाला.

संपास लागलेले हिंसक वळण व दीड लाख कामगारांचा ठाम निर्धार पाहून मुंबई सरकारने मध्यस्थी करण्याची तयारी दाखविली. या संपाबरोबरच व्यापाऱ्यांकडील कर्मचारी, गोदी कामगार आणि रेल्वे कामगारही संपावर गेले. शंभर कामगारांचे एक शिष्टमंडळ गव्हर्नर सर जॉर्ज लॉयड यांना भेटले. त्यांनी कामगार व मालकांची बाजू ऐकून घेऊन उभयपक्षी समझोता घडवून आणण्याचे काम पोलीस आयुक्त व्हिंसेंटकडे सोपविले. त्यांच्या मध्यस्थीनुसार ३५ टक्के महागाई भत्ता आणि एका महिन्यात वीस रुपये बोनस म्हणून देण्याचे मालकांनी कबूल केले. त्यानंतर हा संप मिटला.

पंजाबमधील व विशेषतः जालियनवाला बागेतील हत्याकांड आणि १९२०-१९२१ मधील राष्ट्रव्यापी असहकार चळवळ यांमुळे देशभर अन्यायाविरुद्ध लढा उभारण्याची मानसिकता निर्माण झाली होती. परिणामतः मुंबई, सोलापूर, पुणे, बार्शी, नागपूर व हिंगणघाट या शहरांप्रमाणेच मद्रास, मदुराई, पाटणा, मुझफ्फरपूर, बरेली, सहराणपूर, झाशी, अलाहाबाद, कानपूर, कोलकाता, अहमदाबाद, गोध्रा आणि कराची वगैरे शहरांमध्ये लहानमोठे संप झाले. मुंबई, सोलापूर व नागपूरमधील गिरणी संपात जवळजवळ सर्व कामगार सामील झाले होते. त्यांना पुष्कळ यशही लाभले होते. त्याच वर्षात इंग्लंडमध्येही औद्योगिक अशांतता तीव्र स्वरूपात पसरली होती. त्यामुळेही मुंबईतील कामगारांमध्ये जागृती झाली.

कामगारांमध्ये जागृती झाल्यामुळे त्यांनी ४ जानेवारी १९२० पासून व्यापक संप उभारून मुंबईतील सर्वच गिरण्या बंद पाडल्या. १० जानेवारीला न्या. नारायणराव चंदावरकर, जोसेफ बॅप्टिस्टा, बॅ. जिनवाला, बॅ. व्ही. एम. पवार, बॅ. तालचेरकर, सी. के. बोले आणि काशीनाथ कोरगावकर वगैरेंची 'मुंबई कामगार समिती' स्थापन करण्यात आली. या समितीने कामगारांच्या मागण्यांना नेमके रूप दिले. मात्र मागण्या फेटाळण्यात आल्या. त्यामुळे संप चिघळला. कामगारांनी दगडफेक व लूटमार केल्यामुळे पोलिसांनी गोळीबार केला. त्यात एक कामगार ठार झाला. पोलीस दंगल

थांबवू न शकल्यामुळे लष्करास बोलवावे लागले. कामगार समितीच्या नेत्यांनी गव्हर्नरशी वाटाघाटी केल्या. या संपाची फलश्रुती अशी की, कामगारांचे कामाचे तास बाराऐवजी दहा करण्यात आले ; बोनस देण्यास मालक तयार झाले ; महागाई भत्ता ३५ टक्क्यांवरून ५५ टक्क्यांपर्यंत वाढविण्याचे मालकांनी मान्य केले. अदमासे ३९ दिवस चाललेला हा संप १२ फेब्रुवारी १९२० रोजी मिटला, अंशतः यशस्वी होऊन मिटला. त्यामुळे सोलापूर व अहमदाबादमधील गिरण्यांनाही कामाचे तास दहा करणे भाग पडले. गिरणीमालकांना रास्त भावाची धान्य दुकाने काढावी लागली. या संपाचे यश पाहून जी. आय. पी. रेल्वेचे कामगार, ट्राम कर्मचारी, गॅस व तेल कंपन्यांमधील कामगार व महानगरपालिकेचे सफाई कामगार यांनीही ऑगस्टपासून ऑक्टोबर १९२० पर्यंतच्या काळात संपाचे हत्यार उचलले. या सर्व संपांमध्ये बॅप्टिस्टा, जिनवाला, बोले, तालचेरकर, एस. एच. झाबवाला, पवार, एम. के. आझाद इ. कामगारांचे कैवारी म्हणून पुढे आले. उपरोक्त वॉशिंग्टन परिषदेहून परत आल्यवर आयुष्यभर नारायण मल्हार जोशी हे कामगार चळवळीत कार्यरत राहिले. पुण्याचे सेनापती बापट सफाई कामगारांचे कैवारी होते. मुंबई महानगरपालिकेच्या सफाई कामगारांच्या संपात बापटांनी सफाई कामगार मित्रमंडळ स्थापन करून, त्यांच्यासाठी आर्थिक साहाय्य गोळा केले होते. त्या अभावग्रस्तांचा संप निदान अंशतः तरी यशस्वी करण्यात त्यांचे योगदान होते.[५]

## ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस

स्वातंत्र्य चळवळीमुळे श्रमिक वर्गात जागृती होणे स्वाभाविकच होते. बरेच जहाल विचारसरणीचे वकील मुंबईतील कामगारांना सल्ला देत होते. पहिल्या महायुद्धकाळात मुंबईत शेकडो संप झाले होते. अमेरिकेत काही वर्षे राहिल्यानंतर लाला लजपतराय यांच्या विचारसरणीत थोडेफार परिवर्तन झालेले होते. इंग्लंडमधून स्वदेशी परतल्यावर (२७ नोव्हेंबर १९१९), टिळकांना कामगारांतर्फे मानपत्रे देण्यात आली होती. १९१९-१९२० मधील देशभरातील संपांच्या लाटेमुळे नेत्यांना अखिल भारतीय स्वरूपातील प्रातिनिधिक कामगार संघटना उभारण्याची गरज तीव्रतेने जाणवली. शिवाय वॉशिंग्टनच्या परिषदेनंतर दरवर्षी भरावयाच्या आय.एल.ओ. च्या परिषदांसाठी भारतीय कामगारांचे

प्रतिनिधी निवडण्यासाठी देश पातळीवर महासंघ असावा, असा विचार पुढे आला. संकल्पित महासंघाचे अध्यक्षपद टिळकांना देण्याचा एक प्रस्ताव होता. आणि टिळकांनी हा देकार स्वीकारलाही होता. तथापि दरम्यान टिळकांचे निधन झाले. म्हणून मुंबईतील परळमध्ये भरलेल्या जाहीर सभेत लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली या महासंघाचे पहिले अधिवेशन भरवण्याचा ठराव पास झाला. यास महात्मा गांधी यांचा असहकार सत्याग्रह व रशियातील राज्यक्रांतीचीही पार्श्वभूमी होती.

दिनांक ३१ ऑक्टोबर १९२० रोजी मुंबईत एंपायर नाट्यगृहात लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसचे **(आयटक)** पहिले अधिवेशन भरले. ही अत्यंत महत्त्वाची घटना म्हणावी लागते. कामगार चळवळीस त्यामुळे चांगले वळण लागले. अधिवेशनानंतर निवडण्यात आलेल्या ८२ सभासदांच्या स्थायी समितीत तब्बल ३२ मराठी भाषिक सभासद होते. त्यांच्यात डॉ. दि. धों. साठे, ना. म. जोशी, मोतीराम वेलकर, व्ही. एम. पवार, ल. गो. खरे, नारायण दामोदर सावरकर, जि. के. गाडगीळ, ए. व्ही. परांजपे, जे. टी. गोखले, अच्युत बळवंत गोखले, अवंतिकाबाई गोखले वगैरेंचा समावेश होता. त्वहा महाविद्यालयात विद्यार्थी असलेले श्रीपाद अमृत डांगे, रघुनाथ शिवराम निंबकर वगैंसी पहिल्या अधिवेशनात आपली चुणूक दाखवली होती. आणि काही वर्षांतच ते कामगारांचे नेते झाले.

या पहिल्या अधिवेशनात मोतीलाल नेहरू, ॲनी बेझंट, महंमद अली जिना, इंग्लंडमधील लेबर पार्टीचे नेते कर्नल वेजवूड, चार्लस ॲंड्र्यूज, पत्रकार सय्यद अब्दुल्ला ब्रेलवी, बी. पी. वाडिया, के. एफ. नरिमन, नागूताई जोशी व लक्ष्मीदास तेरसी हजर होते. शिवाय लल्लूभाई सामळदास, लालजी नारायणजी, हंसराज ठाकरसी, मावजी गोविंदजी, उमर सोभानी असे उद्योगपती व व्यापारीही उपस्थित होते. ब्रिटिश लेबर पार्टीशी संबंध आलेले बॅप्टिस्टा व दिवाण चमनलाल हे तर सक्रिय कार्यकर्ते म्हणून गाजले.

या अधिवेशनातून दिसून आले की, काही जहाल युवक मार्क्सवादी विचारसरणीकडे आकर्षित झालेले असून, त्यांना लालाजी वा बॅप्टिस्टांची भाषणे फारच मिळमिळीत वाटली. याच अधिवेशनाच्या वेळी १,४०,८५४ इतके एकूण सभासद असलेल्या ६४ कामगार संघांना आयटक या महासंघाशी संलग्न करून घेण्यात आले. तेव्हापासून भारतीय कामगार चळवळ उभी राहिली.

प्रारंभापासूनच आयटकचे नेते विद्याविभूषित अभिजन होते. बहुतेक नेते संघर्षाची भाषा बोलत असले तरी वाटाघाटी करणे, तंटे मिटवून समेट घडवून आणणे व सामोपचारावरच त्यांचा भर होता. स्वातंत्र्य चळवळीशी कामगार चळवळीचा सांधा जोडावा आणि साम्राज्यशाहीविरुद्ध लढण्यासाठी कामगार वर्गाचा पुरेपूर उपयोग करावा, असे काहींचे विचार होते. तथापि आयटक १९२० साली स्थापन झाली, तरी १९२४ पर्यंत मुंबईतील कामगार संघटना प्रभावी नव्हत्या. त्यांची सदस्यसंख्या अत्यल्प होती. कामगार चळवळ राजकारणापासून अलिप्त असावी असे तेव्हा गांधीजींचे मत होते. १९२०-१९२४ या काळातील कामगार नेते ना. म. जोशी, बखले व बॅप्टिस्टा हे कामगार कल्याणासाठी कायदे करण्यावर आणि कामगारांचे प्रतिनिधी कायदेमंडळात पाठविण्यावरच भर देत होते. संघर्षापेक्षा सामोपचाराने कारखान्यांमधील कलह मिटविण्याचे ते प्रयत्न करीत असत. १९१९-१९२४ या काळातील मुंबईतील औद्योगिक कलहांचे कारण कम्युनिस्ट युवक अथवा मार्क्सवादी विचारप्रणाली हे नसून उसळती महागाई आणि आर्थिक हलाखी हेच होते. तसेच राजकीय चळवळीमुळे असंतोष पसरलेला नव्हता. सरकारी दस्तऐवजांमधून मात्र आम्हाला आढळून आले की, स्वातंत्र्यलढा आणि मार्क्सवादी विचारांच्या प्रसारामुळे मुंबईतील पुढारी व शिकलेल्या कामगारांची प्रवृत्ती बदलली आणि ते अधिक सतर्क झाले.[६]

## कम्युनिस्टांचा उदय

रशियन राज्यक्रांतीच्या प्रेरणांची स्पंदने सुशिक्षित जगतात निनादत होती. राज्यक्रांतीनंतर तेथे अधिकारावर आलेल्या लेनिनच्या सरकारने साम्यवादी समाजरचना आणि सरकार प्रस्थापित करण्यासाठी चालवलेले प्रयत्न जगजाहीर झालेले होते. फेबिअन समाजवादाची विचारप्रणाली वाचायला मिळत होती. आर्थिक व सामाजिक शोषणाविरुद्ध लढा

करण्याचा विचार भारतीय स्वातंत्र्य चळवळीतूनही प्रसार पावत होता. रशियन क्रांतीमुळे प्रभावित झालेले सेनापती बापट व हेमचंद्रदास कानुनगो काही मराठी युवकांना परिचित झालेले होते. विद्यार्थी व युवकांनी राष्ट्रीय चळवळीत आपली भूमिका वठवावी हा विचार रूढ झालेला होता. अशा वातावरणात गांधीजींनी असहकार आंदोलन पुकारले होते. सरकारी व सरकार–प्रमाणित शाळा व महाविद्यालयांवर बहिष्कार घालण्याची मोहीम मुंबई-पुण्यासह अनेक शहरांमध्येसुरू करण्यात आली होती.

अशा वातावरणात काही मराठी युवक १९२०-१९२२ दरम्यान मुंबई प्रांतिक काँग्रेस समितीच्या परिघात तसेच कामगार वस्तीमध्ये वावरू लागले होते. ते ब्रिटिशांशी असहकाराचा प्रचार करू लागले. या युवकांमध्ये प्रमुख होते श्रीपाद अमृत डांगे व रघुनाथ निंबकर. मुंबईच्या विल्सन कॉलेजात ख्रिस्ती नसलेल्या मुलांनाही**बायबल** अध्ययनाचा तास सक्तीचा असे. त्याविरुद्ध डांगे-निंबकर गटाने तो तास ऐच्छिक करावा अशी मागणी केली. व्यवस्थापनाने यास नकार दिल्यावर त्यांनी विद्यार्थी चळवळ उभारली, आणि मागणी मान्य करण्यास भाग पाडले. यासाठी त्यांनी गांधीजींचीही मदत घेतली होती. मात्र त्यासाठी त्यांना कॉलेजातून काढून टाकले होते.

निंबकर व डांगे अल्पकाळ टिळक व लाला लजपतराय यांचे अनुयायी होते. पण असहकार चळवळीत त्यांनी गांधीजींचा असहकारवादी बाणा स्वीकारला, आणि काही दिवस त्यांनी राष्ट्रीय शाळेत अध्यापन कार्य पार पाडले. स्वतः डांगे १९२१ च्या उत्तरार्धात विठ्ठलभाई पटेलांचे सचिव होते. त्या काळी मानवेंद्रनाथ रॉय जर्मनीत राहून कम्युनिस्ट विचारप्रणालीचा प्रचार करीत होते. रॉय यांना लेनिन आणि स्टॅलिन यांचा सहवास लाभला होता. म्हणून त्यांना पहिले भारतीय कम्युनिस्ट म्हटले जाते. रॉय तेव्हा क्रांतिकारी विचारसरणीचे होते. त्यांनी मार्क्सवाद व लेनिनवादाचाअभ्यास केला होता. डांगे यांची **गांधी व्हर्सस लेनिन** ही इंग्रजी पुस्तिका एप्रिल १९२२ मध्ये प्रकाशित झाल्यामुळे, ते मानवेंद्रनाथांच्या नजरेत भरले. त्यांनी या पुस्तिकेचे आपल्या **व्हँगार्ड** नामक साप्ताहिकात परीक्षण केल्यामुळे डांगेंना प्रसिद्धी लाभली.

त्यामुळे डांगे हेच भारतातील कम्युनिस्ट विचारसरणीचे आद्यप्रवर्तक आहेत, अशी इंग्रजांची धारणा झाली. साधारणपणे जून १९२२ पासून **व्हँगार्ड** साप्ताहिकाचे अंक गुप्तपणे भारतात येऊ लागले. त्यामुळे जहाल युवक कम्युनिझमकडे आकर्षित होऊ लागले. ऑगस्ट १९२२ पासून डांगे **सोशालिस्ट** हे साप्ताहिक प्रसिद्ध करू लागले. रॉय त्यांना उत्तेजन देत, प्रशंसा करीत. रणछोडदास लोटवाला हे मुंबईतील देशी वृत्तपत्रांचे व एका छापखान्याचे मालक व श्रीमंत गृहस्थ होते. त्यांनी डांगेंना भक्कम पाठिंबा दिला होता. हे लोटवाला दरवर्षी विलायतेला जात आणि येताना समाजवादावरची पुस्तके आणत. अशा वाङ्मयातून हिंदुस्तानात समाजवाद व साम्यवादाचा प्रसार झाला.

असहकार आंदोलनातून डांगे व निंबकरांप्रमाणेच केशव नीळकंठ जोगळेकर, धुंडीराज ठेंगडी, शं. वा. देशपांडे, शांताराम सावळाराम मिरजकर, सच्चिदानंद घाटे, व्ही. डी. साठे, लालजी पेंडसे, वासुदेव हरी जोशी, त्र्यं. वि. पर्वते वगैरे कम्युनिस्टांची पिढी निपजली. यांतील बहुतेक जण डांगेंच्या **सोशालिस्ट** पत्रकास मदत करीत. १९२१-१९२२ मध्ये देशात ठिकठिकाणी कम्युनिस्ट युवकांचे गट उदय पावले. डांगेंनी मद्रासमधील सिंगारवेलू, पंजाबातील ‘ इन्कलाब ’ पत्राचे संपादक सिद्दीकी, कोलकात्यातील मुकुंदलाल सरकार आणि मुझफ्फर अहमद यांच्याशी संपर्क साधून कम्युनिस्ट गट तयार केला. तिकडे ताश्कंदमध्ये मानवेंद्रनाथ रॉय व त्यांची पत्नी एव्हलीन यांनी महमद अली व महमद शफिक नामक मुसलमान मुजाहिद क्रांतिकारकांच्या मदतीने १७ ऑक्टोबर १९२० रोजी भारतीय कम्युनिस्ट पक्ष स्थापन केला होता, हे सत्य! तथापि डांगे व त्यांचे मराठी साथीदार आणि सिंगारवेलू, मुझफ्फर अहमद यांनी स्थापन केलेला हा गट स्वतंत्र होता. ती रॉय यांच्या ताश्कंदमधील पक्षाची शाखा नव्हती. डांगे व सिंगारवेलू हे वास्तववादी होते. अजून भारतात ‘ कम्युनिस्ट पक्ष ’ स्थापन करण्याची वेळ आलेली नाही, याचे त्यांना भान होते. **भारतीय समाजाला कम्युनिझमची विचारसरणी पचनी पडण्याची वेळ अद्याप आलेली नाही, याची त्यांना पूर्ण जाणीव होती. ही जहाल तरुण मंडळी काँग्रेसवर व गांधीजींवर टीका करीत. पण तरीही त्यांनी तेव्हा काँग्रेसमध्ये व गांधीजींच्या परीघात राहणेच पसंत केले.**

वि. दा. सावरकर कसे बाजूला फेकले गेले हे त्यांनी समक्ष पाहिलेले होते. रॉय यांना अतिजहाल कम्युनिस्ट कार्यक्रम अमलात आणावयाचा होता. पण डांगेंना ते शक्य वाटत नव्हते. रॉय यांचा कार्यक्रम आणि डांगेंची विचारसरणी यांत अत्यल्प तफावत होती. तथापि सार्वजनिक संप व निदर्शने आणि सामुदायिक प्रतिकार करण्याइतका कामगार वर्ग प्रबुद्ध व संघटित नव्हता. म्हणूनच रॉय यांच्याशी आपण सहमत नाही, असे डांगेंनी जाहीर केले होते.

डांगे व केशवराव जोगळेकरांनी हिंदुस्तान लेबर सोशालिस्ट पार्टी स्थापन केली (१९२३). तथापि फेब्रुवारी १९२४ मध्ये कानपूर कट खटल्यातील आरोपी म्हणून त्यांना अटक झाल्यावर, त्यांचा हा पक्ष आणि **सोशालिस्ट** साप्ताहिकही अल्पायुषी ठरले. या अटकेपूर्वी डांगे, जोगळेकर, ल. गो. खरे, टी. व्ही. पर्वते, आर. व्ही. नाडकर्णी वगैरे युवक मुंबई प्रांतिक काँग्रेसचे सदस्य म्हणून निवडून आले होते हे युवक मजूर वर्ग आणि दलितांच्या आर्थिक व सामाजिक समस्या दूर करण्यासाठी प्रांतिक काँग्रेस समितीने नेमलेल्या गटाचेही सभासद होते. या गटाच्या विद्यमाने मुंबईतील कामगार भागात ते विधायक काम करीत होते. त्यामुळे डांगे गुप्तचर विभागाच्या अविरत संनिरीक्षणाखाली होते. कम्युनिस्ट पुढारी शौकत उस्मानी, सिंगारवेलू, मुजफ्फर अहमद वगैरेंबरोबरचा त्यांचा पत्रव्यवहार पोस्टात फोडून वाचला जाई. त्यांतील आक्षेपार्ह पत्रे सरकारी दप्तरात जात. गुप्तचरांनी हस्तगत केलेली पत्रे पुरावा म्हणून सरकारने कानपूर कट खटला तसेच कुप्रसिद्ध मीरत कट खटल्यात न्यायालयास सादर केली होती.

डांगेंनी आपल्या एका समविचारी युवकाला पत्रातून कळविले होते की, आम्ही दोन जिल्हा काँग्रेस समित्या काबीज केल्या आणि मुंबई प्रांतिक काँग्रेस समितीत आम्ही पेचप्रसंग निर्माण करीत आहोत. अर्थात हे इमामउद्दीन रिझवी यास लिहिलेले पत्र सरकारने डांगेंविरुद्ध उपयोगात आणले. प्रेस कायद्याचा भंग करणारी हस्तपत्रिका काढली यासाठी डांगे, पर्वते व जोगळेकर यांना मुंबईच्या पोलीस आयुक्ताने कार्यालयात बोलावून ताकीद दिली. आपण शौकत उस्मानीस भेटलो नाही, पण त्यांना अनेक पत्रे लिहिली, असे डांगेंनी कबूल केले. यानंतर दोनच दिवसांनी हिंदुस्तान

सरकारने शौकत उस्मानी, मुझफ्फर अहमद व गुलाम हुसेन यांना तुरुंगात डांबले तसेच डांगेंनाही अटक करण्याचा आपला मानस आहे असे केंद्र सरकारने मुंबई सरकारला तारेने कळवले होते.[७]

मात्र पोलीस आयुक्ताचे टिपण वाचल्यावर मुंबईचे गृह सचिव मॉंटगोमेरी या निर्णयाप्रत आले की, डांगेंवर खटला भरण्यासारखे त्यात काही नाही. **गांधी व्हर्सस लेनिन** या पुस्तिकेत पढिक पांडित्य असले, तरी डांगेंनी त्यात फार चांगला युक्तिवाद केला आहे, असा गृह सचिवांनी अभिप्राय दिला. तथापि कम्युनिस्ट विचारप्रणालीचा प्रचार तसेच सार्वत्रिक संप घडवून आणणे हा फौजदारी कायद्यानुसार गुन्हा नाही, असाही अभिप्राय दिला. डांगे बुद्धिमान असून त्यांची पत्रकारिता सर्वसामान्य पत्रकारांपेक्षा खूपच वरच्या दर्जाची आहे, असे मॉंटगोमेरींनी प्रतिपादन केले. डांगे यांना अटक करणे अनुचित ठरेल, हे हिंदुस्तान सरकारला पटवताना मॉंटगोमेरींनी पुढे लिहिले की, त्यांना अटक केल्यास एम. एन. रॉय आणि इतर कम्युनिस्ट यांच्यामधील पत्रव्यवहार सरकारच्या हातात पडणार नाही. शिवाय रॉय यांचे निकटवर्ती नलिनी गुप्ता यांचेशी झालेल्या समक्ष चर्चेचा संपूर्ण वृत्तान्त डांगेंनी दिलखुलास आपणास सांगितला, असे नमूद करून डांगेवर खटला न भरता फक्त सक्त नजर ठेवावी असा त्यांनी अभिप्राय दिला होता. म्हणूनच गव्हर्नरने त्यांच्यावर कारवाई केली नाही.[८]

हाच मॉंटगोमेरी साहेब वि. दा. सावरकर यांच्यावरील खटल्याचा एक रचनाकार होता. मात्र डांगेपासून आपल्याला जितका धोका आहे त्यापेक्षा जास्त त्यांचा आपल्याला उपयोग आहे, असे मत असलेल्या गृह सचिवाचा रास्त सल्ला धुडकावून हिंदुस्तान सरकारने **डांगेंना कानपूर कट खटल्यात अडकवण्याचा निर्णय घेतला.** दंड संहितेच्या १२१-अ कलमान्वये त्यांना अटक करण्याविषयीचा कानपूरच्या जिल्हा दंडाधिकाऱ्याचा पकड वॉरंट घेऊन कानपूरचे पोलीस मुंबईत येताच, डांगेंना पकडण्यात आले (१६ फेब्रुवारी १९२४), आणि त्याच दिवशी त्यांना कानपूरला नेण्यात आले.

त्या काळी लंडनमधील आणि नवी दिल्लीतीलही ब्रिटिश सरकारला आणि काही इतिहास संशोधकांना वाटत होते की, प्रत्येक कम्युनिस्ट गट हा मॉस्कोतील पुढाऱ्यांची

निर्मिती असून रशियन बोल्शेविकांनी रचलेल्या आंतरराष्ट्रीय कटाचा आविष्कारच आहे. तथापि हे सत्य नव्हे. सत्य हेच आहे की, भारतात राहणारा कोणीही कम्युनिस्ट माणूस रशियाशी तेव्हा मुळीच संबंधित नव्हता. त्यांना मास्कोची कोणत्याही प्रकारची मदत वा साहाय्य मिळाले नव्हते. **भारतीय कम्युनिझमचा जन्म भारतीय राष्ट्रवादी चळवळीतूनच झाला होता. असहकार चळवळ, खिलाफत चळवळ, कामगार व शेतकऱ्यांच्या चळवळींमध्ये भ्रमनिरास झालेल्या जहाल युवकांनी हा पंथ तयार केला.** या युवकांनी महात्मा गांधींकडे फार मोठ्या आशेने पाहिले होते. त्यांनी शाळा वा महाविद्यालयांवर बहिष्कार घालून शिक्षणावर तिलांजली सोडली होती. मातृभूमीचे विमोचन करण्यासाठी ते कटिबद्ध झालेले होते. तथापि त्यांना आणि गांधीजींनाही जनतेने व हितसंबधीयांनी साथ न दिल्याने तेव्हा मोहीम असफल झाली.

हा विषाद १९२२ पासून तीव्र झालेला होता. मानवेंद्रनाथ रॉय व अवनी मुखर्जी हे असहकार काळात भारतात नसले, तरी त्यांना युगांतर क्रांतिकारी पक्षाची पार्श्वभूमी होती. ताश्कंदमधील त्यांच्या सहकाऱ्यांनाही खिलाफत चळवळीची पार्श्वभूमी होती. त्या सुमारास सरोजिनी नायडू यांचे बंधू वीरेंद्रनाथ चट्टोपाध्याय, भूपेंद्रनाथ दत्त आणि बरकतउल्ला खान हे हाडाचे क्रांतिकारक मार्क्सवादाने प्रभावित झालेले होते. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यास सोविअतांची मदत घेण्यासाठी ते बर्लिनमधून प्रयत्न करीत होते. त्यांनी बर्लिनमध्ये ‘ इंडिया इंडिपेन्डन्स पार्टी ’ स्थापन केली होती. याशिवाय गधर आंदोलनातून परागंदा झालेले संतोक सिंग, तेजा सिंग आणि रतन सिंग यांच्यासारखे गधर क्रांतिकारक कालांतराने कम्युनिस्ट झाले. या सर्वांच्या प्रेरणाव मन भारतीयच होते. हे सर्वच भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनातूनच घडलेले होते. अभ्यासकांनी ही वस्तुस्थिती लक्षात ठेवायला हवी.

मात्र इतके मान्य करावेच लागते की, नलिनी गुप्ता व शौकत उस्मानी हे रॉय यांचे दूत मुंबईत डांगे, कोलकात्यात मुझफ्फर अहमद, मद्रासमध्ये सिंगारवेलू आणि लाहोरमध्ये गुलाम हुसेन या असहकार चळवळीतील जहाल युवकांशी संपर्क साधत होते. वीरेंद्रनाथ चट्टोपाध्याय यांचेही दूत अवनी मुखर्जी हेही असा, पण कमी यशस्वी, प्रयत्न करीत होते. २ नोव्हेंबर १९२२ च्या पत्रानुसार एम. एन. रॉय यांनी डांगेंना

कायदेशीर आणि बेकायदेशीर अशी दुहेरी संघटना स्थापन करून 'कम्युनिस्ट केंद्रक' उभारण्याची योजना सुचवली होती, हे खरे. तथापि त्याआधीच १६ सप्टेंबर १९२२ च्या **सोशालिस्ट** पत्रकात डांगे यांनी 'सोशालिस्ट लेबर पार्टी ऑफ द इंडियन नॅशनल काँग्रेस' ही संघटना स्थापन करण्याचा मनोदय जाहीर केला होता. हेही लक्षात ठेवावे की, डांगे यांचे **सोशालिस्ट** पत्रक हेच भारतात प्रसिद्ध झालेले अस्सल कम्युनिस्ट पत्रक होते. डांगे , एस. व्ही. घाटे, जोगळेकर, निंबकर हे सर्व कम्युनिस्ट, निदान १९४० पर्यंत तरी, काँग्रेसमध्ये होते. मात्र काँग्रेसच्या अधिवेशनांमध्येही ते आपल्या जहाल मतवादाचे उघडपणे दर्शन घडवत. तथापि महात्माजींविषयी पूर्ण आदर राखून !

१९२० च्या दशकातील केंद्र व राज्य सरकारच्या गृह विभागांच्या गोपनीय फायलींमधून दिसते की, ब्रिटिश सरकारने हिंदुस्तानातील लहान लहान कम्युनिस्ट गटांचा धसका घेतला होता. त्यांना 'बोल्शेविक संकटाने' घेरले होते. वस्तुतः सरकारचा हा धसका अनाठायी होता. अशाच भयगंडाच्या मनोवृत्तीतून सरकारने कानपूर कट खटला रचलेला होता. तरीही सत्यभक्त यांनी डिसेंबर १९२५ मध्ये भारतीय कम्युनिस्टांची परिषद संपन्न केली होती. पण त्यांचाही मॉस्कोशी संबंध नव्हता. जानेवारी १९२७ मध्ये मिरजकर, जोगळेकर व एस. व्ही. घाटे यांनी वर्कर्स अँड पीझंट्स पार्टी स्थापन करून **क्रांती** हे मराठी पत्रक सुरू केले. या पक्षाचे कार्यकर्ते कामगारांच्या संपर्कात राहून त्यांचे प्रश्न काँग्रेससमोर व सरकारपुढेमांडत असत. त्यासाठी झगडत असत. तथापि हे कार्यकर्ते ग्रामीण भागापर्यंत गेले नाहीत. ते शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी लढा देऊ शकले नाहीत. महात्मा गांधींनी ही आपली व्यथा शापूर्जी सकलतवाला या ब्रिटिश पार्लमेंटमधील डाव्या खासदाराला सांगितली होती. त्यांचा मूळ भारतीय असलेल्या सकलतवालांशी चांगला सलोखा जमून आला होता.

बादशहाविरुद्ध युद्ध करण्याचा कट रचला असा काल्पनिक आरोप ठेवून सरकारने सात कम्युनिस्टांवर कानपूरला खटला रचला आणि डांगे, शौकत उस्मानी, मुझफ्फर अहमद आणि नलिनी गुप्तांना कोर्टाने प्रत्येकी चार वर्षांची शिक्षा ठोठावली.

## कामगार चळवळीत कम्युनिस्टांचा प्रवेश

१९२३-१९२७ या काळात महाराष्ट्रातील कामगार चळवळीत सहा उल्लेखनीय घटना घडल्या. फेब्रुवारी १९२४ मध्ये डांगेंना कानपूर कट खटल्यात गोवण्यात आले. वस्तुतः या प्रकरणात गुप्तचरांनी चोरून फोडलेली (इंटरसेप्टेड) डांगेंची पत्रे एवढाच तकलादू पुरावा होता. या पुराव्याच्या ग्राह्यतेबाबत सरकारी अधिकाऱ्यांमध्येही एकमत नव्हते. तरीही शौकत उस्मानी, मुझफ्फर अहमद, नलिनी गुप्ता यांच्यासह श्री. अ. डांगेंना चार वर्षांची सजा ठोठावली. त्यांना अटक झाली तेव्हा मुंबईत बोनस मिळवण्यासाठी गिरणी कामगारांचा संप जोरात चालू होता. एकूण ७३ गिरण्यांमधील कामगार संपावर होते. याउलट मालकांनी ३१ जानेवारीपासून १८ फेब्रुवारी १९२४ पर्यंत टाळेबंदी जाहीर केली. १९२२ सालापासून कापड उद्योगात मंदी आल्याचे कारण सांगून मालकांनी बोनस देण्यास नकार दिला. त्यांनी संप फोडण्याचाही प्रयत्न केला. यामुळे मुंबईत दंगल उसळली व कामगारांनी प्रेसिडेंसी मिल जाळून टाकली.

यानंतर जून १९२५ मध्ये गिरणीमालकांनी महागाई भत्ता कमी करण्याचा घाट घातला. १ सप्टेंबरपासून ही वेतनकपात करण्याचे जाहीर केले. याचा निषेध म्हणून एकापाठोपाठ बहुतेक सर्व गिरण्यांत संपाचे वारे पोहोचले. संपावरील कामगारांना आपापल्या गावी परत जाण्यासाठी आगबोटी, रेल्वे व बसची तिकिटे देण्याची व्यवस्था ना. म. जोशींच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली होती. मुंबईतच राहणाऱ्यांना धान्य देण्यात आले. या प्रकरणी मुंबई सरकारची कोंडी झालेली पाहून हिंदुस्तान सरकारने १ डिसेंबरपासून कापडावरील अबकारी कराची वसुली स्थगित केली. त्यानंतर मालकांनी वेतनकपात रद्द केली. यामुळे हा संप मागे घेतला गेला.

कामगार संघटनांमध्ये मतभेद होणे हे नित्याचेच होते. कामगार हितवर्धक सभा निष्प्रभ झाली होती. लहानसहान संघटना उभारण्यात येत होत्या. दुफळी व मतभेदांचा फायदा मालक घेत. म्हणून ना. म. जोशी, रघुनाथराव बखले, आसवले, जिनवाला, झाबवाला व सी. के. बोले यांनी २३ जानेवारी १९२६ रोजी बॉंबे टेक्स्टाईल लेबर युनियन स्थापन केली. या संघटनेचे दहा हजार कामगार सभासद होते. मात्र द. रा. मयेकरांच्या गिरणी कामगार महामंडळाने आपले अस्तित्व कायम ठेवले.

राष्ट्रीय काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन २५-२८ डिसेंबर १९२५ ला कानपुरात संपन्न होत असतानाच तेथे सिंगारवेलू, सत्यभक्त, मौलाना हसरत मोहानी, केशवराव जोगळेकर, सच्चिदानंद घाटे, निंबकर, मुझफ्फर अहमद, जानकीप्रसाद आणि बागेरहट्टा यांनी युवकांची परिषद भरविली. या परिषदेतच 'भारतीय कम्युनिस्ट पक्ष' औपचारिकरीत्या स्थापन करण्यात आला. तेव्हा डांगे कारावासात होते. मात्र हा पक्ष बोल्शेविक स्वरूपाचा नाही, असा निर्वाळा देण्यात आला. तथापि कम्युनिस्ट पक्षावर ब्रिटिशांनी ब्रिटनमध्ये बंदी घातलेली असल्याने या पक्षाला उघडपणे काम करणे अशक्य होते. तेव्हाही सारे कम्युनिस्ट युवक काँग्रेसचे सभासद होतेच.

**कामगार व शेतकरी पक्ष :—**कम्युनिस्टांना उघडपणे काम करणे अशक्य असल्याने त्यांनी फेब्रुवारी १९२६ मध्ये 'वर्कर्स अँड पेझंट्स' पक्ष स्थापन केला. बंगाल, पंजाब, राजपुताना, संयुक्त प्रांत आणि मुंबई इलाख्यात प्रादेशिक पक्ष या स्वरूपात तो कार्यरत झाला. डिसेंबर १९२८ च्या सुमारास त्यास अखिल भारतीय कामगार व शेतकरी पक्ष असे स्वरूप देण्यात आले. या पक्षाच्या मध्यवर्ती कार्यकारिणीत घाटे, निंबकर, जोगळेकर आणि शिक्षा भोगून सुटलेले डांगे यांचा समावेश होता. या कम्युनिस्टांनी महाराष्ट्रातील कामगार आंदोलनात चांगली कामगिरी केली. गोदी, महानगरपालिका, ट्राम वाहतूक, छापखाने आणि कापड उद्योगातही त्यांनी कामगारांचे संघटन केले. श्रमिकसंघ स्थापन केले. त्यांनी आपल्या पक्षाचा पाया व्यापक केला, मात्र काँग्रेसमध्येच राहून! त्या काळात मुंबईतील गिरणीमालक उत्पादन खर्च कमी करण्यासाठी 'इष्टतमीकरण' योजना आखत होते. त्यानुसार ते कामगारकपात करीत होते. आगामी जागतिक महामंदीची पूर्वलक्षणे दिसत असताना, उद्योगांचे सुसंघटन (रॅशनॅलायझेशन) करण्याची तेव्हा गरज होती. पण त्यामुळे कामगार वर्गावर बेरोजगारीचे संकट कोसळले. अशा परिस्थितीत जोगळेकरांनी टेक्स्टाईल लेबर युनियन आणि गिरणी कामगार महामंडळ यांच्यात ऐक्यभाव साधण्यासाठी बरेच प्रयत्न केले.

विशेषतः डांगे व जोगळेकर कामगार व शेतकरी पक्षाच्या माध्यमातून काँग्रेसला समाजवादी आणि जहाल भूमिका स्वीकारण्यास प्रवृत्त करीत होते. मातृ पक्षावर

असलेला धनिकांचा प्रभाव नष्ट व्हावा, असा त्यांचा प्रयास होता. डांगेंनी त्यानुसार आपल्या पक्षाच्या वतीने तसा व्यापक ठराव पाठविला होता. आर्थिक विचारप्रणालीबरोबरच या ठरावात संपूर्ण स्वातंत्र्य हेच काँग्रेसने ब्रीदवाक्य म्हणजे 'क्रीड' घोषित करावे, असाही आग्रह होता. हा दुसरा मुद्दा तसा नवीन नव्हता. कारण नेहरू, सुभाषचंद्र व मेहेरअली इ. त्याविषयी आधीपासूनच आग्रही होते. तथापि कामगार व शेतकरी पक्षाचा ठराव काँग्रेस पक्षाने मंजूर केला नाही. नंतर जोगळेकरांनी १९२७ च्या मद्रास काँग्रेस अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्य हे काँग्रेसचे ब्रीदवाक्य म्हणून घोषित करण्याचा ठराव अधिवेशनाच्या विषय नियामक समितीत मांडला आणि जवाहरलाल नेहरूंनी त्यास अनुमोदन दिले. हाच ठराव जवाहरलालजींनी खुल्या अधिवेशनात सादर केला आणि जोगळेकरांनी त्यास अनुमोदन देणारे व्याख्यान दिले होते. १९२७ पर्यंत जोगळेकर प्रांतिक पातळीवरून राष्ट्रीय स्तरावर पोहोचले होते. युवक काँग्रेसमध्येही त्यांनी स्थान मिळविले.

विलक्षण बुद्धिमत्ता आणि वक्तृत्वाच्या बळावर डांगे व निंबकर मुंबईच्या सार्वजनिक जीवनात चांगलेच चमकले होते. तेव्हा निंबकर हे जहाल वृत्तीचे आणि फलप्राप्तीसाठी अधीर होते. मात्र डांगे शांत, धीर धरणारे आणि काटेकोरपणे योजना आखणारे व अभ्यासू होते. डांगे हे गूढ व्यक्तिमत्त्वाचे होते. कामगारांचे संघटन करण्यात त्यांना जोगळेकर आणि लालजी पेंडसेंची नेहमी साथ लाभत असे. हे युवक गांधीजींच्या असहकार चळवळीतूनच पुढे आलेले होते. निंबकर दोन वर्षे महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस समितीचे एक चिटणीस होते. त्यांनी व पेंडसेंनी मुळशीच्या सत्याग्रहातही भाग घेतला होता. एक यशस्वी व्यापारी असलेले रणछोडदास लोटवाला या युवकांसाठी इंग्लंडमध्ये समाजवादी व मार्क्सवादी वाङ्मय विकत घेत. त्यांनी यासाठी मुंबईत एक ग्रंथालयसुद्धा काढले होते. वाक्चातुर्याच्या जोरावर मिरजकरांनी अनेक श्रमिकसंघ संघटित केले. हे सर्वच युवक कम्युनिस्ट झाले, तरी मूलतः ते काँग्रेसमन होते. त्यांनी भारतीय श्रमिक संघ चळवळीत साम्यवादी आचारविचार रुजवण्याचे प्रयत्न केले नाहीत.

मुंबईतील कम्युनिस्टांनी प्रायः कोणत्याही राजकीय विचारप्रणालीशी अथवा रणनीतीशी बांधीलकी न मानता राष्ट्रीय चळवळीत भाग घेतला. हे तत्त्व त्यांनी १९४० पर्यंत कायम ठेवले. भारतातील बहुभाषिक आणि बहुधार्मिक समाजात राज्यक्रांती करण्याची क्षमता नाही, हे त्यांनी आधीच ओळखले होते. ते गांधीजींवर व त्यांच्या कार्यपद्धतीवर टीका करीत. तथापि कम्युनिस्टांनी १९४१ पावेतो कधीही गांधीजींशी संबंध तोडले नव्हते. तोपर्यंत ते राष्ट्रीय प्रवाहातच राहिले. १९२५ च्या सुमारास बहुतांश कम्युनिस्ट मुंबईतील जिल्हा काँग्रेस समित्यांचे पदाधिकारी वा सभासद झाले होते. त्यांच्यापैकी २७ जण प्रांतिक काँग्रेस समितीचे सभासद होते. त्यांनी १९३० च्या दशकात काँग्रेसमधील विविध रंगांच्या गटांचा ठाव घेतला, पण पक्षातच राहून त्यांनी समाजवादाचा पुरस्कार केला.

कानपूर प्रकरणामुळे झालेली शिक्षा भोगून डांगे मे १९२७ मध्ये मुक्त झाले. मुंबईतील कम्युनिस्टांना प्रामुख्याने ब्रिटिश कम्युनिस्ट पक्षाकडून मदत व उत्तेजन मिळत असे. ब्रिटिश कम्युनिस्टांच्या सल्ल्यानुसार त्यांनी कामगार व शेतकरी पक्ष काढला होता. या पक्षाने मुंबईतील गोद्या, छापखाने, ट्राम, गिरण्या व महानगरपालिकेच्या कामगारांच्या संघटना उभारल्या. आयटकमध्ये ना. म. जोशी आणि नेमस्त काँग्रेसजनांना निष्प्रभ करण्यासाठी त्यांनी कंबर कसली. कामगार वर्गास आपल्या प्रभावक्षेत्राखाली आणण्यास वाहून घेतले. 'भांडवलशाहीमुळे निर्माण झालेला आर्थिक विरोधाभास' दाखवून देणे आणि कामगारांमध्ये जागृती निर्माण करणे यावर त्यांच्या प्रचारकार्याचा भर होता.[९]

कापड उद्योगावर १९२२ पासूनच आर्थिक मंदीचे सावट स्पष्ट दिसत होते. तेव्हापासून वाढत जाऊन मंदीला १९२९-१९३० मध्ये 'जागतिक महामंदीचे' स्वरूप आले. जगातील कम्युनिस्ट देश वगळता सारे विश्व अभूतपूर्व महामंदीच्या कचाट्यात सापडले. हा काळ चिंताकारक होता. मुंबईतील कामगार व शेतकरी पक्षाच्या कारवायांचा सारांश असा होताः—मजुरांच्या गाऱ्हाण्यांचा उपयोग श्रमिकसंघ उभारण्यासाठी करून घेणे, श्रमिकांमध्ये आपले नेतृत्व प्रस्थापित करणे, पक्षाच्या व्यासपीठावरून वर्ग-जाणिवा निर्माण करणे, आणि राष्ट्रीय काँग्रेसमध्ये कम्युनिस्टांना उचित स्थान

मिळवून देणे. तेव्हा मुंबईचे कांजी द्वारकादास हे कामगारांचे प्रतिनिधी म्हणून कायदेमंडळात कामगारांचे प्रश्न मांडत.

सन १८७५ मध्ये स्थापन झालेली बाँबे मिलओनर्स असोसिएशन ही गिरणीमालकांची अत्यंत प्रभावी संघटना होती. मालकांचा नफा व हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी ती कायम कटिबद्ध होती. प्रचंड आर्थिक बळाच्या आधारावर कामगारांच्या व त्यांच्या नेत्यांच्या कारवाया हाणून पाडणे, संप फोडणे, कलागती लावणे वगैरे सर्व प्रकारांत ही संघटना अग्रेसर होती. या संघटनेच्या सर्वच कारवायांमध्ये तिला ब्रिटिश सरकारचा भक्कम पाठिंबा होता. कामगारांचे संप तसेच दंगलींमध्येही पोलिसांची भूमिकाकेवळ कायदा व सुव्यवस्था राखणे इतकीच नसायची. त्याव्यतिरिक्त पोलीस संप फोडणे, कामगारांचे नीतिधैर्य नष्ट करणे आणि नेत्यांना नामोहरम करणे अशीही कामगिरी पार पाडत असत. म्हणून कामगारांना आपल्या हितासाठी केवळ मालकांशीच लढावे लागत नसे. त्यांना गिरणीमालकांची संघटना तसेच सरकारशीही लढावे लागत असे. मालक-मजूर आणि गिरणीमालक संघ-मजूर हा संघर्ष ही अत्यंत गुंतागुंतीची बाब होती. त्यामुळे महात्मा गांधींनी पहिली काही वर्षे स्वातंत्र्यलढा कामगार चळवळीपासून अलिप्त ठेवण्याचा प्रयत्न केला होता. कामगार पुढाऱ्यांना याचे बऱ्याच वेळी वैषम्य वाटत असे. डांगे, जोगळेकर व निंबकरांनी ही व्यथा गांधीजींना भेटून कथन केली होती. गव्हर्नर गिरणीमालकांना दुखावत नसत आणि कामगार पुढाऱ्यांनी गव्हर्नरला मध्यस्थी करण्याची विनंती केली, तरी ते काहीच करत नसत. वेतनकपात अथवा कामगारकपात करण्याचे निर्णय बहुधा गिरणीमालक संघ करीत असे. हा संघ कापड उद्योगाचा प्रवक्ता व नियंत्रक अशी भूमिका करत असे.

## गिरणी कामगारांचा अभूतपूर्व संप

मुंबईत कामगार व शेतकरी पक्षातील कम्युनिस्टांचा प्रभाव वाढत होता. गिरणी कामगार संघ व मदनपुरा युनियन व बाँबे टेक्स्टाईल वर्कमेन युनियन यांचे एकीकरण करून बाँबे टेक्स्टाईल लेबर युनियन तयार झाली होती. एका बाजूला कामगार नेत्यांचा उत्साह वाढत होता. तर दुसऱ्या बाजूला कापड उद्योगात मंदी आलेली होती. जपानच्या स्पर्धेमुळे मुंबईतील गिरण्यांचे कापड गोदामांमध्ये पडून होते. म्हणून

मालकांनी उत्पादन बंद ठेवण्याचा किंवा आठवड्यातून पाच दिवसच गिरण्या चालू ठेवण्याचा निर्णय घेतला. १९२८ च्या प्रारंभी मुंबईतील सहा गिरण्या पूर्णतया बंद होत्या. या पार्श्वभूमीवर मुंबई प्रांतिक काँग्रेस समितीमधील कम्युनिस्ट आक्रमक झाले. ससून समूहाच्या गिरण्या तसेच स्प्रिंग मिल, कोहिनूर, अपोलो व मँचेस्टर गिरण्यांमध्ये अधून-मधून संप झाले. संप फोडण्यासाठी मालकांनी चालविलेल्या कारवायांमुळे हिंसाचार सुरू झाला. यामुळे केशवराव जोगळेकर, मिरजकर वगैरेंना सार्वत्रिक संप करावा असे वाटू लागले.

म्हणून बेन ब्रॅडले, मिरजकर, निंबकर व डांगे हे सदस्य असलेली एक समिती संप चालवण्यासाठी नेमण्यात आली (१८ एप्रिल १९२८). ना. म. जोशी हे पुढारी संप हा निर्वाणीचा उपाय मानत. त्यामुळे सार्वत्रिक संपाचे आवाहन करण्यास ते राजी नव्हते. परंतु कम्युनिस्टांचा निर्धार ठाम होता. दरम्यान मिलमालकांनी उत्पादन खर्च कमी करण्यासाठी रॅशनॅलायझेशन म्हणजे उद्योगाचे सुसंघटन करण्यास प्रारंभ केला होता. त्यामुळे कामगारकपात, वेतनकपात वगैरेंची कामगारांना झळ पोहोचली होती. म्हणून गिरणगावात बराच ताणतणाव पसरला होता. आणीबाणी निर्माण झाली. २३ एप्रिलला काळाचौकी भागात जमलेल्या हजारो कामगारांवर पोलिसांनी गोळीबार केला. त्यात एक कामगार ठार झाल्याने कामगारांनी त्याचा मृतदेह ताब्यात घेऊन त्याची शहरात अंत्ययात्रा काढली. वातावरण तंग झाले. त्यामुळे त्या दिवशी मुंबईतील ५१ गिरण्या संपामुळे बंद पडल्या.

वस्तुतः १६ एप्रिलपासूनच सार्वत्रिक संपाची लढाई आकार घेत होती. नेत्यांना ब्रिटिश कम्युनिस्टांकडून उत्तेजन व मदत मिळाली होती. रॅशनॅलायझेशनमुळे कामगार दुसऱ्या कोणत्याही पुढाऱ्यापेक्षा डांगे, मिरजकर व निंबकरांकडे आशाळभूतपणे पाहू लागले होते. संपवाल्यांचा आवेश व प्रचार पाहून ना. म. जोशी यांच्या संघटनेचे प्रतिनिधीही संयुक्त समितीत सामील झाले. बाँबे टेक्स्टाईल युनियन व गिरणी कामगार महामंडळ यांचे ध्रुवीकरण होणे क्रमप्राप्त होते. त्यामुळे गिरणी कामगार महामंडळातील कम्युनिस्टांच्या ताब्यातील प्रभादेवी भागातील गटाला गिरणी कामगार युनियन (जी.के.यू) असे नाव धारण करून, कायदेशीर नोंदणी करणे भाग पडले.

२२ मे १९२८ रोजी स्थापन झालेल्या या श्रमिकसंघास लालबावट्याची युनियन म्हणत असत. अर्जुनराव आळवे हे या संघटनेचे अध्यक्ष तर डांगे चिटणीस होते. नोंदणीच्या दिवशी तिचे केवळ ३२४ सभासद होते. ही संख्या डिसेंबर १९२८ मध्ये ५०,००० झाली, आणि पुढील तीन महिन्यांत ६५,००० पर्यंत वाढली. तेव्हा मुंबई राज्यातील ही सर्वात मोठी कामगार संघटना होती.

या संपाचे नियमन करण्यासाठी नेमलेल्या संयुक्त गिरणी संप समितीत ना. म. जोशी, जिनवाला, आसवले, सईद मुनावर आणि एस. व्ही परुळेकर यांसारखे समन्वयवादी कामगार नेते आणि डांगे, निंबकर, मिरजकर, ब्रॅडले हे लढाऊ वृत्तीचे कम्युनिस्ट होते. याशिवाय आळवे, झाबवाला, के. ए. देसाई, के. आर. आवसेकर व पी. टी. ताम्हणेकर हेही समितीत होते. या समितीने १७ मागण्या घोषित केल्या. भिन्न विचारसरणीच्या व वयात बरेच अंतर असलेल्या जोशी व डांगेंनी परस्पर समजूतदारपणा दाखवला. आणि या औद्योगिक कलहातील सर्व मुद्यांवर एकमत निर्माण केले.

गिरणीमालक संघाने संप फोडण्यासाठी व नेतृत्वात दुफळी निर्माण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले, पण व्यर्थ. या संघाने कामगार नेत्यांवर आरोप-प्रत्यारोप केले, आमिषे दाखवली. त्याविरुद्ध संप समितीने निदर्शने केली, संपग्रस्तांना धान्य व पैसे दिले. मे महिन्यापासून कामगार आपल्या मूळगावी जाऊ लागले. सरकारी आकडेवारी दाखवते की, ५०,००० कामगार संपकाळात मुंबई सोडून मूळगावी गेले होते. कामगारांच्या पीडानिवारणासाठी लोकवर्गणीतून निधी उभारला होता. ना. म. जोशींनी फ्रान्स, इंग्लंड, बेल्जम व रशियातील आपल्या मित्रांनाही निधी उभारण्यास प्रवृत्त केले. आणि त्या निधीचा सदुपयोग केला. जोशी व नटेश अप्पाजी द्रवीड यांच्या सोशल सर्व्हिस लीगने पीडानिवारण कार्यास मोठे योगदान दिले. एक आगबोट भाड्याने घेऊन संप समितीने कामगारांना कोकणात पाठवले. मुंबई प्रांतिक काँग्रेसच्या अध्यक्षा सरोजिनी नायडू यांच्याकडून डांग्यांनी कामगारांच्या निर्वाहासाठी सहा हजारांची देणगी मिळविली होती. जोशींनी यापूर्वीच्या संप-निधीतून शिल्लक राहिलेले तीस हजार रुपये या संपाच्या समितीस दिले होते. हिंदुस्तानात संपकरी कामगारांना

धान्य वाटण्याची (दोन लाख रुपयांचे) ही पहिलीच कृती होती. गांधीजींच्या महिला सत्याग्रहींचे अनुकरण करून स्वयंसेविका कामावर जाणाऱ्यांना प्रतिबंध करण्यासाठी गिरण्यांच्या प्रवेशद्वारांजवळ त्यांना आर्जव करत. मुंबईतील हा संप अतुलनीय होता!

संप निर्धाराने चालू असताना मालकांच्या एजंटांनी संप फोडण्यासाठी हरतऱ्हेचे प्रयत्न केले. मालकांनी भक्कम फळी उभारलेली होती. तरी कामगार नेत्यांचा आवेश व एकी पाहून काही मालक विचलित झाले. कमी कार्यक्षमता असलेल्या गिरण्यांच्या मालकांना रॅशनॅलायझेशनचा भार सोसणे शक्य नव्हते. म्हणून ते गिरणी सुरू करण्यास उत्सुक झाले. काही मालकांनी संप समितीशी वाटाघाटी करण्याची तयारी दाखवली. आपला हटवादीपणा सोडावा असे काही मालक म्हणू लागले. सरकारी अधिकारीही खाजगीरीत्या मालकांना समेट करण्याचा सल्ला देऊ लागले. शेवटी गव्हर्नरने गिरणीमालक व संप समितीच्या नेत्यांची एक बैठक बोलावली, आणि कामगारांच्या मागण्यांबाबत अभ्यास करण्यासाठी एक समिती नियुक्त केली. समितीचा अहवाल येईपर्यंत वेतनकपात न करता, मार्च १९२७ मध्ये असलेल्या दरांनुसार कामगारांचे वेतन व मजुरीचे दर चालू ठेवावे, असाही निर्णय झाला. ४ ऑक्टोबर १९२८ रोजी झालेल्या करारावर मुंबईचे एक मंत्री व ना. म. जोशी आणि मालकांतर्फे जे. बी. पेटिट यांनी सह्या केल्या, आणि ६ ऑक्टोबर १९२८ रोजी सर्व मिलांचे दरवाजे उघडले.[१०]

कामगार व गिरणीमालकांची ताकद निःशेष होत असताना डांगे व ना. म. जोशी यांनी कापड उद्योगातील मानकीकरणाची म्हणजे स्टँडर्डायझेशनची योजना तयार केली होती. ती सखोल अभ्यास करून तयार केलेली होती. त्या योजनेनुसार त्यांनी गिरणीमालक संघास दाखवून दिले की, मालकांनी देय केलेले मजुरीचे दर मानकापेक्षा तीस टक्क्यांनी कमी आहेत. याचा अर्थ, मालक मानकापेक्षा फारच कमी दर देऊ पाहत होते. कामगार नेत्यांनी अशा प्रकारचा सखोल अभ्यास पूर्वी कधीच केला नव्हता. म्हणूनही गिरणीमालकांना विद्यमान समझोता स्वीकारणे भाग पडले. वेतनकपातीचा आग्रह त्यांना सोडावा लागला.

कामगार चळवळीच्या इतिहासात हा संप आणि त्याची यशस्वी सांगता ही एक अतिमहत्त्वाची घटना मानावी लागते. कामगारांचा हा ऐतिहासिक विजय होता. हिंदुस्तानात कामगारांना इतका मोठा विजय फारच थोड्या प्रसंगी मिळाला. वाटाघाटींच्या प्रारंभी गिरणीमालक संघाने ज्या अटी नाकारल्या होत्या, त्या त्यांना स्वीकाराव्या लागल्या. मालकांना वेतनकपात व कामगारकपातीचा आग्रह सोडावा लागला. मजुरीचे व वेतनाचे दर १९२५ मधील दरांच्या पातळीवर आणण्याचे मालकांना मान्य करावे लागले. रॅशनॅलायझेशन योजनेतून सुटका झाल्यामुळे कामगारकपातीचे व बेरोजगारीचेही संकट टळले. वेतनाचे दर, सेवाशर्ती आणि कार्यपद्धती हे महत्त्वाचे विषय आता शासन-नियुक्त चौकशी समितीकडे सोपविण्यात आल्यामुळे डांगे, निंबकर आणि ना. म. जोशींसारख्या पुढाऱ्यांना फावले. कामगारांचे प्रश्न समितीपुढे मांडणे त्यांना शक्य झाले. त्यांना अशी संधी पूर्वी कधीच मिळाली नव्हती. मालकांना कामगारांकडे उदासीनपणे पाहणे अशक्य झाले.

मात्र १९२८ च्या या संपाची सर्वाधिक लक्षणीय विशेषता म्हणजे कामगार व त्यांच्या पुढाऱ्यांची वर्तणूक ही होय! त्यांनी हिंसाचारास थारा दिला नाही. संपकऱ्यांनी सत्याग्रहींसारखे वर्तन करून, त्यांनी आपली ताकद विधायक कामासाठी उपयोगात आणली. दोन कोटी वीस लाख कामांचे दिवस वाया घालून त्यांनी मालकांना हैराण केले. पण त्यासाठी त्यांनी साडेतीन कोटी रुपयांच्या मजुरीवर उदक सोडले होते. सहा महिन्यांच्या संपकाळात कामगारांनी भयानक आर्थिक व सामाजिक यातना सोसल्या होत्या. त्यांनी वणवण केली, सावकारांचे उंबरठे झिजवले. लाचारी पत्करून हमालीसारखी कामेही केली. कोकणात वा अन्यत्र जाणाऱ्या मनिऑर्डरी बंद झाल्या. त्यामुळे तिकडेही हलाखी पसरली. संपाचे दूरगामी परिणाम झाले! मात्र गिरणी कामगारांची संपाशी असलेली बांधीलकी चित्तवेधक होती. नोकरशाहीचा थिल्लरपणाचा आरोप होता की, हा संप आर्थिक कारणांपेक्षा राजकीय कारणांमुळे उद्‌भवला. मात्र नोकरशाहीचा हा आरोप कामगारांनी खोटा ठरविला. कम्युनिस्टांनी प्रारंभीच संपाची अपरिहार्यता अधोरेखित केली व घरोघर जाऊन प्रचार केला, हे खरे. तथापि संप सुरू केला कामगारांनीच! कम्युनिस्टांनी संघटन केले. मार्गदर्शन केले हेही खरे. तथापि आपल्या बांधवांचे नीतिधैर्य टिकविले स्वतः कामगारांनी व जॉबर कर्मचाऱ्यांनीच!

या संपामुळे महाराष्ट्रातील श्रमिकसंघांच्या बलाबलाचा समतोल पार बदलून गेला. काँग्रेसमध्ये एक जहाल गट असलेले कम्युनिस्ट युवक अल्पावधीतच लोकप्रिय हिरो झाले. वस्तुतः संप त्यांनी घडवून आणला नव्हता. पण संपाने त्यांना घडवले. स्वतः डांगेंनी दिलेली प्रांजळ कबुली पाहा " The strike was not our creation, but we were the creation of the strike. " (Meerut Communist Conspiracy Case, Statement, page 2426, Gokhale Institute Library, Pune). या संपापूर्वीच्या सात वर्षांत काँग्रेसच्या परीघावर फिरणारे हे युवक तेव्हापासून कम्युनिस्ट म्हणून उर्जितावस्थेत आले. कामगार वर्गात त्यांना मोठा श्रोतृवर्ग लाभला.[११]

सखोल अभ्यास करणाऱ्या ना. म. जोशींशी डांगे व निंबकरांची युती झाल्याने कम्युनिस्टांच्या पुढारीपणात भरीवपणा आला. जोशींचे तर मालक वर्ग व कामगार वर्गातही वजन वाढले. जोशी व पुण्याच्या हिंदसेवक सोसायटीच्या नेमस्तांनी गोळा केलेल्या निधीवर संप तगून राहिला होता. त्यांनीच गोळा केलेले धान्य व पैसे कामगारांना दिले जात. त्यांनी कामगारांचे पीडानिवारण केले. त्यांचे योगदान फार मोठे होते. महाराष्ट्रातील कामगार संघांमध्ये डांगे, निंबकर, मिरजकर, जोगळेकर वगैरेंना स्थान प्राप्त झाले. त्यांचा दबदबा वाढला. **क्रांती** हे कम्युनिस्ट पक्षाचे मुखपत्र बनले. देशाच्या इतर राज्यांमध्येही त्यांचा श्रोतृवर्ग विस्तार पावला. त्यांची नेमस्तांशी युती झाल्याने कामगारांचे प्रवक्ते म्हणून कम्युनिस्टांचा मालकवर्गाला स्वीकार करावा लागला. ही संपाची फार मोठी देणगी होती. मालक व मजूर यांच्यातील कलहाला वेगळी दिशा मिळाली.[१२]

## चळवळ कसोटीला लागली

वरील संपात कामगार तसेच श्रमिकसंघाच्या नेत्यांना मोठा विजय मिळाला होता. तथापि मुंबईतील औद्योगिक क्षेत्रात शांतता प्रस्थापित न होता कलह निर्माण झाले 'विवाद तडजोडीच्या करारातील' संदिग्ध मुद्दे लवकरच उघड होऊ लागले. कामगारांना व पुढाऱ्यांनाही वैषम्य जाणवू लागले. काही मुद्यांचा अर्थ गिरणीमालक आपल्या पद्धतीने लावू लागले. तो अर्थ नेत्यांना मान्य नव्हता. परिणामतः

तडजोडीपासून पुढील सात महिन्यांमध्ये मुंबईत ७७ संप झाले. ३८ गिरण्यांमधील ४३ संपांमध्ये मालकांनी डांगे, निंबकर, मिरजकर, लालजी पेंडसे वगैरेंना बोलणी करण्यासाठी बोलावले होते. कामगार आपल्या तक्रारी या नेत्यांसमोर मांडत. त्यांचा प्रभाव पाहून गिरणीमालक या कम्युनिस्टांना वाटाघाटी करण्यासाठी बोलावू लागले होते. कामगारांच्या लक्षात आले की, त्यांना रॅशनॅलायझेशन कार्यपद्धतीनुसारच काम करावे लागणार. म्हणून लवकरच कम्युनिस्ट नेते तडजोडीच्या अटींबद्दल वाद घालू लागले आणि रॅशनॅलायझेशनच्या विरोधात बंड करण्यासाठी तयारी करू लागले. रॅशनॅलायझेशन हा खडतर व वादाचा मुद्दा झाला.

कामगारांचे संघटन करून आपले प्रभावक्षेत्र वाढवणे हेच कम्युनिस्टांचे मूलभूत ध्येय होते. त्यानुसार प्रत्येक गिरणीप्रमाणेच मुंबईतील चाळीचाळींमध्ये त्यांनी युनियनच्या समित्या काढल्या. सभासदांकडून वर्गणी गोळा करण्यासाठी त्यांनी कामगार भागात सहा केंद्रे उघडली. परिणामतः कामगार निर्भय झाले. पण त्यामुळे गिरण्यांमध्ये तंटे वाढले. आपला प्रभाव वाढवत असताना कम्युनिस्टांनी मुंबई गिरणी कामगार युनियन हस्तगत केली. त्यामुळे ना. म. जोशी आणि बखले यांचा प्रभाव कमी झाला. ही युनियन इतकी ताकदवान झाली की, भांडखोर कामगारांना आवरण्यासाठी मालकांना डांगे व निंबकरांची मदत घ्यावी लागे. गिरणगावातील ताणतणाव खूप वाढले. ब्रिटिश सरकारला ही स्थिती आवडणे अशक्य होते.

दरम्यान २० डिसेंबर १९२८ रोजी करीमभॉय गटाच्या पर्ल गिरणीत एका अधिकाऱ्याला कामगारांनी ठार मारले होते. या प्रकरणी दोषी असलेल्या दोन कामगारांना फाशीची शिक्षा झाली, तर आठ जणांना निरनिराळ्या शिक्षा झाल्या. पण डांगेंनी दिलेल्या संपाच्या धमकीमुळे हे प्रकरण मिटवण्यात आले. मुंबईतील तंग वातावरणामुळे फेब्रुवारी १९२९ मध्ये जातीय दंगा झाला. पठाण सावकारांनी जी. के. यू. च्या कार्यालयावर हल्ला चढवण्याचा प्रयत्न केला. सुरक्षेच्या कारणास्तव डांगे हे लालजी पेंडसेंच्या घरी राहावयास गेले. पण तेथेही डांगेंवर प्राणघातकहल्ला करण्याचा प्रयत्न झाला, परंतु तो फसला. ही जातीय दंगल आवरण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीत डांगे, मिरजकर, पेंडसे वगैरे होते. या कामी त्यांनी चांगले काम केले अशी नोंद आढळते.

संप चौकशी समिती विविध तंट्यांबाबत लवादाचे काम करीत होती. तथापि समितीला व्हिक्टिमायझेशन या महत्त्वाच्या मुद्यावर अधिकार नव्हता. वरिष्ठांच्या आज्ञांचा भंग करणाऱ्यांना दिलासा नव्हता. यामुळे कामगारांना जी. के. यू. कडे धाव घ्यावी लागे. यामुळे ही युनियन खूप बलवान बनली. परिणामतः जानेवारी १९२९ मध्ये तिची सदस्यसंख्या एक लाखावर जाऊन पोहोचली. तिच्या शाखा वाढल्या. **क्रांती** पत्रकातून पक्षाचा प्रचार अविरत चालू होता. मात्र जी. के. यू. चा प्रभाव वाढत असला, तरी मुसलमान व उत्तर भारतीय श्रमिक आणि दलित वर्गातील कामगार तिचे कधीही सभासद झाले नाही. शिवाय ब्राह्मणेतर पक्षाचे दिनकरराव जवळकर व भास्करराव जाधव या युनियनच्या विरोधात होते. जाधव तेव्हा मंत्री होते. बहुसंख्य कम्युनिस्ट नेते ब्राह्मण जातीचे असल्यामुळे त्यांच्या चळवळीस ते ' ब्राह्मणांचे कारस्थान ' म्हणत असत. या कारस्थानास कामगारांनी बळी पडू नये, असा जाधव प्रचार करीत. या प्रचाराची झळ कामगार व शेतकरी पक्षास आणि जी. के. यू. ला लागली होती. उपरोक्त जातीय दंगलीचीही झळ कम्युनिस्टांना लागणे स्वाभाविक होते.

**मीरतचे कटकारस्थान :—**मुंबईतील कामगार क्षेत्रात कम्युनिस्टांचा वाढता प्रभाव ब्रिटिशांना सहन होणे शक्यच नव्हते. १९२७ तसेच १९२८ च्या काँग्रेस अधिवेशनांमध्येही केशवराव जोगळेकर वगैरे कम्युनिस्टांनी आपला इंग्रज-विरोधी लढाऊ बाणा दाखवला होता. काँग्रेसने ' संपूर्ण स्वातंत्र्य ' हे पक्षाचे ब्रीदवाक्य घोषित करावे या मागणीसाठी ते जवाहरलाल आणि सुभाषचंद्र बोस यांना जोरदार पाठिंबा देत असल्याचे जगजाहीर होते. मुंबईप्रमाणेच कोलकाता, कानपूर, लाहोर, अमृतसर वगैरे औद्योगिक क्षेत्रांमध्येही कामगार वर्ग कम्युनिस्टांकडे आकर्षित होत होता. ब्रिटिशांना हे सहन झाले नाही. त्यामुळे हिंदुस्तान सरकारने कम्युनिस्टांच्या वाढत्या कारवायांना पायबंद घालण्याचे ठरवले. त्यानुसार २० मार्च १९२९ रोजी विविध ठिकाणच्या ३१ कम्युनिस्ट कामगार पुढाऱ्यांना पकडण्यात आले. ' मीरत कट खटला ' म्हणून प्रसिद्ध झालेल्या या कट खटल्यातील ३१ पैकी ११ आरोपी मराठी भाषिक कम्युनिस्ट होते. त्यांच्यात श्री. अ. डांगे, केशवराव जोगळेकर, रघुनाथराव निंबकर, शांताराम मिरजकर,

सच्चिदानंद घाटे, गंगाधरराव अधिकारी, मोतीराम गजानन देसाई, अर्जुन आत्माराम आळवे, गोविंद रामचंद्र कासले, लक्ष्मण कदम आणि धुंडीराज ठेंगडी यांचा समावेश होता.[१३]

या आरोपींना ज्युरी पद्धतीचा फायदा मिळू नये यासाठी त्यांच्यावर मीरतच्या न्यायालयात खटला भरण्यात आला. कम्युनिस्टांना ठेचून काढणे हा सरकारचा हेतू असल्यामुळे, सरकारने तशी व्यवस्था केली होती. मीरतच्या दंडाधिकाऱ्यांपुढे या खटल्याची मार्च १९२९ मध्ये सुरू झालेली प्राथमिक चौकशी १९३० च्या प्रारंभापर्यंत चालू राहिली. खटल्याची पुढील सुनावणी जवळजवळ साडेचार वर्षे चालू राहिली होती. या प्रकरणात लालजी पेंडसे, वासुदेव हरी जोशी आणि बी. टी. रणदिवे यांना मात्र गोवण्यात आले नव्हते. बुद्धिमान व प्रभावी वक्ते असलेले रणदिवे नुकतेच मुंबई विद्यापीठातून पदवी प्राप्त करून कामगार चळवळीत उतरले होते. मीरत प्रकरणामुळे महाराष्ट्रातील कामगारांचा लढा तसेच स्वराज्यासाठीच्या चळवळीवर खूपच दूरगामी परिणाम झाले. अनुभवी व समतोल विचारसरणीच्या पुढाऱ्यांची कारागृहात रवानगी झाल्यावर त्यांची जागा नवोदितांनी घेतली.

मुंबईतील गिरण्यांव्यतिरिक्त इतर क्षेत्रांमध्ये लाखो कामगार होते. त्यांच्या गाऱ्हाण्यांची दखल घेण्यास पुरेशी यंत्रणा नव्हती. त्यामुळे तेही संप करीत असत. अपुरे वेतन, जाचक सेवाशर्ती, कामाचे प्रदीर्घ तास, सेवेची अशाश्वती इत्यादी त्यांच्याही समस्या होत्या. प्रारंभीचा फॅक्टरी कायदा अत्यंत सदोष होता. गिरण्या व कारखान्यांमध्ये दिवसात कामाचे पंधरा तास असत. १९११ मध्ये नवीन फॅक्टरी कायदा आल्यानंतर कारखान्यांमध्ये कामाचे तास प्रथमच बारा करण्यात आले होते. १८७५ मध्ये स्थापन झालेली बॉंबे मिलओनर्स असोसिएशन आणि बॉंबे चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (१८३६) या संघटनांचा सरकारवर विलक्षण प्रभाव होता. या दोन्ही संघटना सरकारधार्जिण्या होत्या. इंडियन फॅक्टरीज् ॲक्ट १९२२ मध्ये दुरुस्त करण्यात आला आणि स्मोक नुइसन्स कमिटी नेमण्यात आली. गिरण्यांच्या व्यतिरिक्त मुंबईतील रेल्वे वर्कशॉप, गोद्या, ट्राम कंपनी, मुंबई गॅस कंपनी, पोस्ट व तारसंदेश यंत्रणा, पेट्रोल कंपन्या व महानगरपालिका या क्षेत्रांमध्येही अनेक संप उद्‌भवले होते.

श्रमिकसंघांची संख्या वाढत राहिल्यामुळे त्यांचे नियमन करण्यासाठी १९२६ चा इंडियन ट्रेड युनियन कायदा करण्यात आला. प्रारंभी या कायद्यानुसार नोंदणी करणे ऐच्छिक होते. पण नंतर ते अनिवार्य करण्यात आले. महाराष्ट्रातील श्रमिकसंघांची चळवळ मुख्यतः कापड उद्योग, वाहतूक व दळणवळण आणि छपाई उद्योगांमध्ये अधिक सक्रिय होती.

रेल्वे कामगारांची युनियन १८९७ पासून अस्तित्वात असली तरी तिला १९२८ मध्ये संघटित रूप प्राप्त झाले. १९१९ मध्ये निर्माण झालेली जी. आय. पी. रेल्वे युनियन १९२८ मध्ये जी. आय. पी. रेल्वे जनरल एंप्लॉइज युनियनमध्ये विलीन झाली. इंडियन सीमेन युनियन १९२१ साली स्थापन झाल्यावर १९२६ मध्ये बाँबे सीमेन युनियन अस्तित्वात आली. १९०७ मध्ये बाँबे पोस्टल युनियन स्थापन झाल्यावर १९२५ साली बाँबे पोस्टमेन युनियन स्थापन झाली. १९२० साली बाँबे पोर्ट ट्रस्ट कामगार युनियन आणि बाँबे पोर्ट ट्रस्ट रेल्वेमेन युनियन स्थापन झाल्या होत्या. १९२७ सालात बाँबे म्युनिसिपल वर्कमेन युनियन आणि बाँबे म्युनिसिपल ऑफिसर्स असोसिएशन या संघटना स्थापन झाल्या. ना. म. जोशींच्या पुढाकाराखाली सोशल सर्व्हिस लीग व हिंद सेवक समाज (पुणे) यांच्या विद्यमाने बॉम्बे म्युनिसिपल कामगर संघ अस्तित्वात आला. हा संघ कामगारांना बराच दिलासादायक होता. स्वराज्य चळवळीच्या त्या उत्साहवर्धक वातावरणात १९२७-१९२८ मध्ये मुंबईत इतर सर्व क्षेत्रांमध्येही असे कल्याणकारी संघ निर्माण झाले. तथापि, सरकारी यंत्रणा त्यांच्याकडे उदासीनपणे, नव्हे संशयाच्या नजरेने पाहत असे.

गिरणी कामगार युनियन ही मात्र मुंबईतील सर्वात मोठी युनियन होती. काही काळ तिचा कामगार वर्गावरील प्रभाव तसेच गिरणीमालकांवरील वजन अबाधित होते. या कामगार संघाने कामगारांव्यतिरिक्त मुंबईच्या सार्वजनिक जीवनातहीआपला प्रभाव प्रस्थापित केला. कामगार वर्ग कम्युनिस्टांकडे आदर भावनेने पाहू लागला. १९२९ चा आगामी संप अयशस्वी झाला तरी कामगार विश्वात कम्युनिस्टांना आपले स्थान कायम ठेवणे शक्य झाले. याचे कारण १९२८ च्या संपातील विजय हे होते![१४]

१९२८ च्या संपाची चौकशी करणाऱ्या समितीचा अहवाल २४ मार्च १९२९ रोजी प्रकाशित झाला. वेतनकपात अथवा कामगारांची कपात करू नये, अशी त्यात शिफारस होती. त्यामुळे कामगार संतुष्ट झाले. तथापि कामगारांना व युनियनला गिरण्यांमधील रॅशनॅलायझेशन करण्याची समितीची शिफारस साफ अमान्य होती. म्हणून युनियनने याबाबत मुंबई गिरणीमालक संघाशी वाटाघाटी केल्या. कामगार मालक परस्परसंबंधात रॅशनॅलायझेशन हा नेहमीच वादंगाचा मुद्दा असे. त्यावर वाद झाले. शिवाय संपकऱ्यांवर सूड घेतले गेले. विशेषतः मुंबईतील वाडिया व करीमभॉय समूहाच्या कापड गिरण्यांमध्ये संपकऱ्यांवर सूड घेण्याचे प्रकार घडले. हा मोठा वादाचा मुद्दा उपस्थित झाला. सर होमी मोदी हे कणखर गृहस्थ गिरणीमालक संघाचे अध्यक्ष होते. सूड घेण्याच्या कारवाईवर ते ठाम राहिले, आणि हा मुद्दा कामगार कलहास कारणीभूत ठरला. औद्योगिक शांतता भंग पावली. संपात भाग घेतल्याबद्दल आकस ठेवून युनियनच्या अनेक कार्यकर्त्यांना कामावरून काढून टाकले होते. त्यामुळे जी. के. यू. नाराज झाली. शिवाय रॅशनॅलायझेशन हा कामगारांच्या दृष्टीने वादाचा मुद्दा होता.

## १९२९ सालातील संप व चळवळीत दुही

सरकारने महाराष्ट्रातील प्रमुख कम्युनिस्ट पुढाऱ्यांना मीरत कट खटल्यात हेतूपूर्वक अडकवून ठेवल्यामुळे चळवळीत प्रचंड पोकळी निर्माण झाली. किंबहुना इंग्रजांचा तोच हेतू होता. पुढाऱ्यांच्या गैरहजेरीत गिरणी कामगार युनियन मुख्यतः गणपत कांदळकर, लालजी पेंडसे, उषाताई डांगे, वासुदेव जोशी, शं. वा. देशपांडे आणि बी. टी. रणदिवे यांच्या मार्गदर्शनानुसार चालत होती. त्यांच्यात डांगे वगैरेंचे कौशल्य, अनुभव आणि डावपेचांची क्षमता नव्हती. १९२८ मधील संपाच्या यशामुळे बेमुर्वतखोरपणा व साहसी वृत्ती निर्माण झाली होती. शिवाय गटातटाचे राजकारण व गटबाजी निर्माण झाली. कामगारांमध्ये बंडखोरपणा पसरला होता. सरकारने नेमलेल्या संप चौकशी समितीच्या अहवालानुसार गिरणीमालक संघ व युनियनच्या प्रतिनिधींची बैठक झाली, तेव्हा लालजी पेंडसेंनी एक निवेदन दिले. त्यात

संपकऱ्यांविषयीचा मालकांचा आकस आणि युनियनची वर्गणी वसूल करण्यास अधिकाऱ्यांचा प्रतिबंध इत्यादी तक्रारी होत्या. काही तक्रारी वस्तुस्थितीवर आधारित होत्या. मात्र सर होमी मोदींसारखे कणखर लोक त्यांना दाद देत नव्हते.

मालकांचा पक्षपातीपणा पाहून युनियनने २६ एप्रिल १९२९ पासून सार्वत्रिक संप केला जाईल असे जाहीर केले. स्वतः पेंडसेंना संपाची कल्पना पसंत नव्हती. परंतु देशपांडे व रणदिवे यांच्या अतिजहाल गटाने आक्रमक भूमिका घेतली. ३० एप्रिलला कामगारांनी शहरातील ६१ गिरण्या बंद पाडल्या. हा संप दोन महिने चालला. मात्र ना. म. जोशी यांच्या प्रभावाखालची युनियन आणि झाबवालांची युनियन तसेच मयेकरांचे गिरणी कामगार महामंडळ या संपात मुळीच सहभागी झाले नाही. त्यासाठी कम्युनिस्टांनी प्रयत्नही केलेले दिसत नाही. त्याचप्रमाणे मदनपुरा संघटनेतील मुसलमान तसेच विविध गिरण्यांमधील दलित कामगार संपात सामील झालेच नाहीत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांची भूमिका स्पष्ट करताना लिहिले, "युनियनपासून कामगारांना दोन पैसे अधिक मिळायला पाहिजे, त्यांची स्थिती सुधारली पाहिजे. परंतु कम्युनिस्टांच्या लाल बावटा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या युनियनच्या पाचवीलाच संप पुजलेला असल्यामुळे गिरणी कामगारांना दोन पैसे अधिक मिळण्याऐवजी त्यांची सांपत्तिक स्थिती दिवसेंदिवस खालावत आहे. संप केव्हा व कशाकरिता करावयाचा याविषयी काही ताळतंत्रच उरलेले नाही. हे इतर वर्गातल्या कामगारांना तूर्त कळत नाही. म्हणून बहिष्कृत वर्गातल्या कामगारांनी त्यांच्याबरोबर नाचून कसे चालेल? " डॉ. आंबेडकरांनी आपली भूमिका अधिक स्पष्ट केली ती अशी, " कम्युनिझम व कामगारवर्गाची चळवळ एक नव्हेत. आम्हाला कामगार संघांची चळवळ अवश्य पाहिजे आहे. भांडवलशाहीशी कामगारांच्या वतीने झगडण्याची आवश्यकताही आम्हाला पूर्णपणे मान्य आहे. इतकेच नव्हे तर संप हे सुद्धा कामगारांचे एक कायदेशीर शस्त्र आहे, असेच आम्ही समजतो. परंतु या शस्त्राचा जपून व योग्य वेळीच उपयोग करावयाचा असतो". परिणामतः दलित कामगार १९२९ च्या संपात सहभागी झाले नाही.[१५]

गिरणी कामगार युनियनने आपल्या स्वतःच्या अस्तित्वाचे समर्थन करण्यासाठी आदेश देऊन सुरू केलेला हा संप महाराष्ट्रातील पहिलाच होय! उतावीळ नेत्यांच्या आदेशानुसार कामगारांनी संप सुरू केला, पण प्रशंसनीय शिस्त पाळली. मिरवणूक नाही, निदर्शने किंवा हिंसाचार नाही! अनुभवी व विचारी नेत्यांच्या गैरहजेरीत नवोदितांनी अविचारीपणाने केलेली ही कृती होती. शिवाय नेत्यांमध्ये दुफळी होती. नेमस्त कामगार पुढारी व विचारवंत वसंतराव कर्णिक यांनी युनियनच्या पुढाऱ्यांवर बेफामपणा, सांप्रदायिकता आणि कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या क्रांतिवादाचे अंधानुकरण केल्याचा ठपका ठेवला.[१६]

हा संप सुरू झाल्यापासून गिरणीमालक संघाने आक्रमक भूमिका घेतली; संपाच्या विरोधात जोरदार मोहीम उभारली व निळ्या झेंड्याची युनियन उभारली होती. त्यांनी बंगळूर, अहमदाबाद व इंदूर भागांतून कामगार आणून संप फोडण्यासाठी शक्ती पणाला लावली. या डावपेचांच्या आधारे मालक वर्गाने संप क्षीण केला. त्यामुळे जी. के. यू. ला आपल्या अस्तित्वासाठी लढा करावा लागला. गिरणगावात प्रचंड तणाव पसरला. काही गिरणीमालकांनी जातीयवादाचे विष पसरवून मुसलमानांची भरती केली. त्यातून शहरात जातीय दंगाही उसळला. आरोप-प्रत्यारोप झाले. कामगार चळवळीच्या इतिहासात बहुतेक वेळा पोलीस केवळ कायदा व सुव्यवस्था राखण्याची भूमिका पार न पाडता, गुप्तपणे संप फोडत असत. या संपात त्यांनी हे केलेच.

संपाचे अपयश दिसताच अपयशाचे खापर निरपराध लालजी पेंडसेंच्या डोक्यावर फोडण्यात आले. त्यांना युनियनमधून घालवण्यात आले. वस्तुतः ते संपाला राजी नव्हते. संपाच्या अपयशाने नीतिधैर्य खचलेल्या काही युनियन नेत्यांनी लालजी पेंडसेंना लक्ष्य करून त्यांचेवर आरोप करणारे हस्तपत्रक २ जून १९२९ रोजी प्रसिद्ध केले. त्यात पुढील आरोप होते :— लालजींनी संप फोडला व कामगारविरोधी कारवाया केल्या; वाडिया कंपनीच्या गिरण्यांमधील संपाबाबत समेट करताना त्यांनी मालकांसमोर शरणागती पत्करली; आणि काही मालकांशी पेंडसेंनी गोपनीय वाटाघाटी केल्या. तसेच त्यांचा संपाला सुरुवातीपासूनच विरोध असल्यामुळे संप बारगळला. अशा प्रकारचे असत्य आरोप करून त्यांना युनियनमधून काढून टाकले. लालजींनी **बाँबे**

**क्रॉनिकल** पत्रकात (१२ जून १९२९) लेख लिहून सर्व आरोपांना उत्तर दिले. तरीही लालजींवरील आरोपांची माहिती डांगे व कम्युनिस्ट बंदिवानांना सांगण्यासाठी वसुदेव जोशी मीरत कारागृहात गेले. त्यानंतर लालजींचे स्पष्टीकरण समक्ष ऐकून घेण्यासाठी त्यांना मीरतला बोलावून घेण्यात आले. सर्व कम्युनिस्टांना जरी त्यांची बाजू पटली नाही, तरी ठेंगडी, आळवे, जोगळेकर, निंबकर आणि शौकत अली यांनी 'लालजी सरकारचे हस्तक अथवा चळवळीचे द्रोही असतील असे आम्हास वाटत नाही', असा लेखी निर्वाळा दिला. वस्तुतः हे प्रकरण इथेच थांबायला हवे होते. पण तसे झाले नाही. पेंडशांच्या सचोटीबाबत रणदिवे, देशपांडे आणि डांगे यांच्या पत्नीउषाताई यांचे एकमत होते. पण अनेक समज-गैरसमज निर्माण झाले. यामुळे युनियनमध्ये दुही झाली. आणि या प्रकाराचा फायदा झाला फक्त भांडवलदारांना व सरकारला! कामगार चळवळीत असे प्रकार घडतच असत.

अखिल भारतीय पातळीवरील आयटक डिसेंबर १९२९ मध्ये दुभंगली. मात्र सभासदसंख्येच्या निकषानुसार जी. के. यू. ला आयटकशी संलग्न करून घेण्यात आले. आयटकमध्ये जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस तसेच कम्युनिस्ट व डावी विचारसरणी असलेले काँग्रेस नेते बहुमतात होते.

१९२९-१९३० सालांमध्ये जागतिक व्यापार आणि उद्योगांना महामंदीने ग्रासले होते. या महामंदीचे महाराष्ट्रावर दूरगामी दुष्परिणाम झाले. मागणीच्या अभावी अनेक कारखाने बंद पडले. कामगार वर्गावर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली होती. वस्तुतः महामंदीचे सावट १९२२-१९२३ पासूनच वाढत राहिले. याचा परिणाम कामगार वर्गालाही भोगावा लागला. जहाल नेत्यांनाही याची दखल घ्यावी लागली. शिवाय सर्व प्रमुख कम्युनिस्ट नेते तुरुंगात असल्यामुळे मुंबईतील कामगार चळवळीवर संकट कोसळले. ब्रिटिश सरकारला हेच हवे होते.

दोन्ही संपांना काँग्रेसचा तात्त्विक व आर्थिक पाठिंबा होता. मुंबई प्रांतिक समितीने थोडे पैसेही दिले होते. तथापि काँग्रेसचा त्यात सक्रिय सहभाग नव्हता. तेव्हा स्वतः गांधीजींचे मत होते की, औद्योगिक कामगारांचे प्रश्न आणि कामगार-मालक यांचे परस्परसंबंध गुंतागुंतीचे असल्यामुळे, काँग्रेसने कामगारांना स्वातंत्र्य आंदोलनात मुद्दाम

गोवू नये. कामगारांची गोवणूक टाळावी. पण तरीही १९२८ च्या संपाच्या यशाबद्दल गांधीजींनी संबंधित कम्युनिस्टांचे मन:पूर्वक अभिनंदन केले होते, भविष्यासाठी सुयश चिंतिले होते!

## विदर्भातील कामगार चळवळ

आधुनिक उद्योगधंद्यांमध्येच कामगार चळवळ संभवते. आणि लोहमार्गाच्या सुविधेविना उद्योगधंदे मूळ धरणे संभवत नाही. या तत्त्वानुसार विदर्भात लोहमार्गाचे आगमन झाल्यावरच एखादी कापड गिरणी काढण्याचा विचार जमशेटजी नसरवानजी टाटा या विलक्षण कल्पक आणि धाडसी पारशाने केला होता. मुंबई ते नागपूर हा लोहमार्ग नागपुरास १८६७ साली येऊन पोहोचल्यावरच नागपुरात औद्योगिक संरचना निर्माण होण्याचा शुभारंभ झाला. जमशेटजी यांनी प्राप्तसंधीचा फायदा घेऊन १ जानेवारी १८७७ रोजी महाराणी व्हिक्टोरियाच्या नावे नागपुरात **एम्प्रेस मिल** ही पहिली कापड गिरणी स्थापन केली. त्या परिसरात विपुल कापूस पिकत असे. शिवाय तेथे विणकरांची परंपरा प्राचीन काळापासूनच असल्याने मुंबईपेक्षा मजुरीचे दर कमी होते. आधीच्याच वर्षात (१८७६) नागपुरात पहिला छापखाना अवतरला होता. त्यापाठोपाठ आगकाड्या व बर्फाचा एकएक कारखाना निर्माण झाला. १८९०-९१ सालात दुसरी सूत गिरणी सुरू झाली. १८९२ साली मध्यप्रांतात स्वदेशी कापड गिरण्या सुरू झाल्या. १९१० सालात टाटांच्या एम्प्रेस मिलने 'नागपूर स्वदेशी विव्हिंग अँड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी' विकत घेतली. तिचे नूतनीकरण केले. दरम्यान १९०८ मध्ये बँक ऑफ बेंगालची शाखा नागपुरात स्थापन झाल्याने आणखी एक सुविधा उपलब्ध झाली होती. 'विदेशी कापडावर बहिष्कार आणि स्वदेशीचा पुरस्कार' ही चळवळ गांधीजींनी १९२० मध्ये उभारल्यामुळे देशी कापड गिरण्यांना उत्तेजन लाभले. याचा फायदा घेऊन १९२२ साली नागपुरात मॉडेल मिल स्थापन झाली. आणि तिने १९२३ पासून उत्पादन सुरू केले. १९६१ सालात एम्प्रेस मिल आणि मॉडेल मिल या दोन कापड गिरण्या नागपुरात कार्यरत होत्या.[१७]

आद्य दलित पुढारी असलेल्या किसन फागू बंदसोडे यांनी नागपुरातील गिरणी कामगारांचे संघटन प्रथम केले होते. नागपुरात १९२१ साली प्रथमच वीज आली.

पण तिच्यासाठी अमरावतीच्या धनिकांनाही १९३१ पर्यंत प्रतीक्षा करावी लागली. नागपूरपाठोपाठ हिंगणघाट, पुलगाव, बडनेरा व अकोला शहरांमध्येही कापड गिरण्या सुरू झाल्या. अमरावती जिल्ह्यातील अचलपूरमध्येही विदर्भ मिल स्थापन झाली. तथापि विदर्भात औद्योगीकरणाचा विकास व नागरीकरण संथगतीने झाले. १९२१-१९२७ या काळात विदर्भात सर्वाधिक लक्षणीय वाढ झाली ती विडी उद्योगाची. १९३१ साली विदर्भात ८६६ विडी कारखाने असून त्यांत ४२,२४० कामगारांना रोजगार मिळत होता. त्यांतील बहुसंख्य कामगार महार जातीचे पुरुष व महिला होत्या. विडी कामगारांना कामाची शाश्वती नसे. कार्यस्थळ भयंकर अनारोग्यकारक असे. त्यांना कायद्याचे संरक्षण नसे. अशीच दुरवस्था खाणींतील कामगारांचीही होती या कामगारांचे आर्थिक शोषण व शारीरिक पीडा या नित्याच्या बाबी होत्या.

नागपूरचे धुंडीराजपंत ठेंगडी नजीकच्या काळात एक निष्ठावान कम्युनिस्ट पुढारी म्हणून कीर्ती पावले. श्रीपाद अमृत डांगे, केशवराव जोगळेकर वगैरेंच्या बरोबरीने ते कामगार चळवळीत आणि स्वातंत्र्यलढ्यात लढले. त्यांनी कामगार पुढारी म्हणून आपल्या कार्याचा प्रारंभ नागपुरात गिरणी कामगारांची पहिली- वहिली संघटना स्थापन करून केला. मुंबईत काँग्रेस पुढाऱ्यांनी ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस स्थापन केल्यावर (३१ ऑक्टोबर १९२०) कामगार चळवळीस संघटित स्वरूप येऊ लागले. त्याच सुमारास ठेंगडींनी नागपुरात कामगार संघ स्थापन केला. नागपूरचे प्रतिनिधी म्हणून ते १९२० मधील आयटकच्या स्थापनासभेत उपस्थित होते. कॉ. लेनिन व रशियन क्रांतीने प्रभावित झालेले ठेंगडी यांना आयटकच्या चौथ्या अधिवेशनाचे अध्यक्षपद लाभले हे विशेष होय. मुंबईतील कामगार चळवळ व राष्ट्रीय स्तरावर काम करण्यासाठी धुंडीराजपंतांनी १९२४-२५ मध्ये नागपूर सोडले, आणि तेथील चळवळीची धुरा त्यांनी रा. स. ऊर्फ रामभाऊ रुईकरांवर सोपविली.

मूळचे कोल्हापूर जिल्ह्यातील रुई गावचे रुईकर यांनी नागपुरातील चळवळीचा विकास केला. ठेंगडींनी पेरलेले बीज वाढवले रुईकरांनीच. मात्र त्यांनी आपले कार्यक्षेत्र विदर्भामध्येच मर्यादित न ठेवता देशभर पसरवले. मुंबईचे कीर्तिवानकामगार पुढारी नारायण मल्हार जोशी यांच्या मते **“ भारतीय कामगार चळवळीला वळण**

**लावणाऱ्या पहिल्या प्रतीच्या पाच पुढाऱ्यांत रुईकरांना स्थान आहे".**[१८] कामगार चळवळीप्रमाणे त्यांनी स्वातंत्र्यलढ्यासही मोठे योगदान दिले.

आयटक संघटनेच्या धर्तीवर नागपूरलाही 'प्रांतिक ट्रेड युनियन काँग्रेसची' स्थापना झाली (१९२८). या संघटनेचे अध्यक्ष डॉ. ना. भा. खरे, उपाध्यक्ष ओगले तर सरचिटणीस रुईकर झालेत. या संघटनेत व्ही. आर. कल्लप्पा, फुले, ढवळे यांची कामगार पुढारी म्हणून जडणघडण झाली. पुढे **भारताचे राष्ट्रपती झालेल्या व्ही. व्ही. गिरी यांनी १९२५** साली बेंगाल-नागपूर रेल्वे कामगारांचा अत्यंत व्यापक संप उभारला होता. या संपाच्या यशात गिरी यांच्याप्रमाणेच रुईकर व कल्लप्पा यांचेही योगदान होते.

डिसेंबर १९२५ मध्ये रुईकर व सहकाऱ्यांनी नागपूर टेक्सटाईल युनियन ही मध्यप्रांत-वऱ्हाडमधील खरीखुरी अशी पहिली कामगार संघटना स्थापना केली. शिवाय त्यांनी ४०,००० सभासद असलेला या प्रांतातील गिरणी कामगारांचा महासंघ स्थापन केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे १९२९ साली नागपुरात आयटकचे अधिवेशन जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली भरले. या अधिवेशनातच सुभाषचंद्र बोस यांची आयटकचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. कॉ. एस. व्ही. देशपांडे सरचिटणीसपदी निवडले गेले. दिवाण चमनलाल, व्ही. व्ही. गिरी व ना. म. जोशी हे मवाळपंथी होते. डावी विचारसरणी असलेले सुभाषबाबू, नेहरू व रुईकरांना मवाळांची रणनीती नापसंत होती. म्हणून आयटकमध्ये नागपूरला फूट पडली आणि गिरी, जोशी या मवाळांनी स्वतंत्र इंडियन ट्रेड युनियन फेडरेशन स्थापन केली. नागपूरमधील आयटकने कामगारांना किमान वेतन, कामाचे तास, साप्ताहिक सुटी, पुरुष आणि महिलांना समान पगार, कामगारविरोधी कायद्यांचा तीव्र निषेध, संप-निदर्शने करण्याचा हक्क, कामगार संघ काढण्याचा अधिकार मागणारे ठराव पास करून सरकारकडे पाठवले होते. याशिवाय वृत्तस्वातंत्र्य व राजकीय बंदिवानांच्या सुटकेचीही मागणी केली. कामगार चळवळीतील हे पुढचे मोठे पाऊल होते.

रुईकर स्वतः डाव्या विचारसरणीचे असूनही त्यांनी कम्युनिस्टांच्या अनेक धोरणांना विरोध केला. नागपुरातील दोन्ही कापड गिरण्यांना त्यांनी विदेशी सूत न वापरण्याची

आग्रहाची गळ घातली. तसेच कामगारांनी फक्त स्वदेशीच कापड वापरावे असा आग्रह केला होता. त्यानुसार एम्प्रेस मिलच्या व्यवस्थापनाने उचित प्रतिसाद दिला व ८ मे १९३० पासून विदेशी सूत घेणे बंद केले. म्हणून रुईकर हे राष्ट्रहित जपणारे कामगार नेते मानले जाऊ लागले. सविनय कायदेभंग आंदोलनात भाग घेतल्याने रामभाऊंना अटक झाली, तेव्हा सरकारचा निषेध म्हणून कामगारांनी संप केला होता. विशेष म्हणजे या संपास व्यवस्थापनानेही पाठिंबा दिला व संपावरील कामगारांन वेतन दिले होते. एप्रिल १९३० मध्ये कल्याणमध्ये सभाबंदीचा आदेश न जुमानता त्यांनी सभा घेतली व रेल्वे कामगारांना संप करण्याचे आवाहन केले होते. त्यामुळे त्यांना अटक झाली होती.[१९]

रुईकरांनी गिरणी कामगारांच्या संघटनांप्रमाणेच मध्यप्रांतातील कोळसा खाणींमधील कामगारांना संघटित करण्याचे अत्यंत अवघड काम हाती घेतले. त्यांनी छिंदवाडा, रामटेक, चंद्रपूर, कांद्री परिसरातील कोळसा व मॅगनीजच्या खाणींभोवती पायपीट करून, लाल झेंड्याखाली कोळसा खाण मजूर संघ स्थापन केला. त्या संघाने रास्त मागण्या मिळविण्यासाठी सात दिवसांचा संप केला व तो यशस्वी करून दाखवला. त्यांनी ब्रिटिश सरकारला एक सत्यशोधन समिती नेमायला भाग पाडले. संपाची ताकद पाहून ब्रिटिश सरकारला एक करार करावा लागला आणि समितीचा निवाडा स्वीकारणे भाग पडले होते. यामुळे कोळसा कामगारांचा चांगलाच फायदा झाला होता. याव्यतिरिक्त रुईकरांनी नागपूर नगरपालिका कर्मचारी व कामगारांचा संघ स्थापन केला होता. तसेच त्यांनी गुमास्ता कामगार आणि प्राथमिक शिक्षकांचे संघ स्थापन केले होते. शिवाय त्यांच्या मागण्यांची तड लावली होती.

काँग्रेसच्या सविनय कायदेभंग आंदोलनामुळे कामगार वर्गही जागृत झाला व त्यामुळे १९३०-३१ पासून कामगार चळवळ अधिकाधिक व्यापक होऊ लागली. काँग्रेस पुढारी कामगारांना उत्तेजन व बळ देऊ लागले. विशेषतः रेल्वे, कापड गिरण्या व खाण कामगारांच्या मागण्यांबाबत ते अधिक ठाम भूमिका घेऊ लागले. मुंबईतील पूर्वोक्त १९२८ मधील अभूतपूर्व गिरणी संपाचा चांगला संदेश विदर्भातही पोहोचला होता.

आयटक या शिखर संघटनेच्या बांधणीत मदत केल्यामुळे रामभाऊंचे वजन वाढले. त्यामुळे त्यांना १९३२ आणि १९३५ सालांमध्ये कोलकात्यात भरलेल्या आयटकचे अध्यक्ष होण्याचा मान प्राप्त झाला होता. कापड उद्योगात १९३०-१९३५ मध्ये मंदीची लाट उसळली असता, मिल मालकांनी कामगारकपात आणि वेतनकपात यांतून एक पर्याय स्वीकारण्याचा प्रस्ताव पुढे केला. सोलापूर व मुंबईतही याबाबत अत्यंत वाईट परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र रुईकरांनी वेतनकपातीचा पर्याय स्वीकारून कामगारांना बेरोजगारीतून वाचविले होते.

मूलतः डाव्या विचारसरणीचे रामभाऊ रुईकर अंतर्बाह्य काँग्रेसजन होते. तथापि सुभाषचंद्र बोस यांनी फॉरवर्ड ब्लॉक हा पक्ष काँग्रेसच्या अंतर्गत काढल्यावर ते सुभाषबाबूंकडे वळले. १९३९ पासून महायुद्धजन्य महागाई भयंकर वाढल्यामुळे असंतोष तीव्र झाला. त्यामुळे रुईकर वगैरे सर्व नेत्यांनी आग्रह केल्यामुळे सरकारला पी. सी. महालनोबिस यांची समिती नेमावी लागली. 'किमतींच्या निर्देशांकानुसार कामगारांना महागाई भत्ता' हे तत्त्व या समितीला व सरकारला स्वीकारावे लागले. हे तत्त्व मान्य झाले, परंतु कामगारांचे 'रिअल इन्कम' वाढले नाही. म्हणून लढा पुढे चालवावा लागला. दुसरे महायुद्ध सुरू झाल्यावर प्रमुख कम्युनिस्टांना वटहुकमांखाली अटकेत टाकण्यात आले होते. सरकारने रामभाऊंना मात्र मोकळे ठेवले होते. तथापि **छोडो भारत** क्रांतिलढ्यात रामभाऊ सक्रिय झाल्यामुळे त्यांना कारावासात जावे लागले.

रामभाऊ ११ सप्टेंबर १९४५ रोजी कारावासातून मुक्त झाल्यावर दीड महिन्यातच त्यांनी पुन्हा कामगारांचे आंदोलन उभारले. १९४६ साली झालेल्या विधिमंडळाच्या निवडणुकीत रामभाऊ प्रचंड बहुमताने निवडून आले. त्यांच्या आमदारकीच्या कार्यकाळात सी. पी. अँड बेरार इंडस्ट्रिअल डिस्प्यूट्स ॲक्ट व गुमास्ता कायदाही पास झाला. पुढील काळात कामगार पुढारी म्हणून पुढे आलेले कॉ. ए. बी. वर्धन, नरेंद्र तिडके व वसंतराव साठे यांची जडणघडण रामभाऊ रुईकरांच्या मार्गदर्शनाखाली झाली, असे मानले जाते. वसंतराव साठे पुढे केंद्रीय मंत्री म्हणून गाजले, तर नरेंद्र तिडके महाराष्ट्रात अनेक वर्षे मंत्री होते. मुळात

नागपूरचेच असलेले वर्धन अनेक वर्षे नागपूरच्या चळवळीत सक्रिय होते. पुढे ते कम्युनिस्ट पक्षाचे सुप्रसिद्ध पुढारी झाले. रामभाऊ रुईकरांचे २९ मार्च १९५४ रोजी निधन झाले.[२०]

## आर्थिक महामंदी व कामगार

भांडवलशाहीचा प्रभाव असलेल्या साऱ्या विश्वात १९२९ पासून आर्थिक महामंदी अवतरली होती. ही आंतरराष्ट्रीय ट्रेड सायकलची परिणती असून त्यात काँग्रेसच्या आंदोलनाने भर घातली, असे ब्रिटिश सत्ताधीश म्हणत. तथापि काँग्रेस तसेच भारतीय व्यापारी वर्ग आणि जी. डी. बिर्ला, नारनजी व अंबालाल साराभाई यांच्यासारख्या राष्ट्रवादी विचारांच्या उद्योगपतींनी ब्रिटिशांच्या तर्कशास्त्राचे सप्रमाण खंडन केले होते. त्यांच्या मते ब्रिटिशांच्या फिस्कल पॉलिसीमुळे तसेच अवास्तव एक्सचेंज रेट यामुळे आर्थिक मंदीचा आघात अधिक तीव्र झाला. याशिवाय भारतीय रुपयाची स्टर्लिंगशी सोयरीक केल्यामुळे आणि संपूर्ण अर्थव्यवस्थेवर करभार वाढवल्यामुळे मंदीची तीव्रता वाढली होती.[२१]

जागतिक आर्थिक मंदीमुळे हिंदुस्तानची अर्थव्यवस्था मोठ्या संकटात सापडली होती. १९२९ पासून १९३२ च्या अंतापर्यंत किमती झपाट्याने घटल्या आणि उत्पादनात प्रचंड घट झाली. शहरांमध्ये बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढली. श्रमिक वर्गापुढे कमी वेतन स्वीकारणे किंवा नोकरीवर उदक सोडणे हेच पर्याय होते.मुंबईतील हजारो सीमांतिक श्रमिकांना पुरेशा मजुरी अभावी शहरातून स्थलांतर करून मूळ गावी जावे लागले होते. १९२१-१९३१ च्या दशकात शहरातील लोकसंख्या वाढण्याऐवजी ती १४,००० नी घटली, ती स्थलांतरामुळे. मुंबई शहरातील अडीच लाख औद्योगिक कामगारांपैकी निदान एक लाख कामगारांवर बेरोजगाराचे संकट कोसळले होते. कापड गिरण्या झपाट्याने बंद पडल्या. कापड उद्योगात १९२६ मध्ये १,५०,००० कामगार होते. मार्च १९३४ मध्ये ही संख्या ९६,००० पर्यंत खाली घसरली, अशी कबुली सरकारला कायदेमंडळातदेखील द्यावी लागली होती. मुंबईपेक्षा अहमदाबादमध्ये कापड उद्योगाची स्थिती जरा बरी होती. मुंबईतील काही गिरण्या बंद पडल्या होत्या. अशा बिकट परिस्थितीत कामगारांना तीस ते चाळीस टक्के

वेतनकपात स्वीकारावी लागली. सीमांतिक उत्पादन क्षमता असलेल्या गिरण्यांमध्ये ५० टक्के वेतनकपात करावी लागली होती. सोलापुरातील गिरणी कामगारांना तर पूर्वीही कमी वेतनावर काम करावे लागे. मंदीच्या काळात त्यात आणखी कपात करण्यात आली. तेथील महिला कामगारांना दरमहा ७ रुपये मजुरी मिळत असे. पहिले महायुद्ध सुरू झाल्यापासून १९२१-२२ पर्यंत गिरणीमालकांनी प्रचंड नफा मिळविला होता. तथापि १९३० मध्ये गिरण्यांनी भागधारकांना केवळ ६ टक्के लाभांश दिला. काही गिरण्या बंद पडल्या, तर काहींनी कामगारकपात व वेतनकपात केली. कामगारांना कमी वेतनावर काम करणे भाग पडले. शिवाय महामंदीच्या संकटामुळे कामगारांना संपाचे हत्यार वापरणे अशक्य झाले. जहाल व अनुभवी कामगार नेते मीरतच्या कारागृहात असल्याने १९२९ च्या संपाची शोकांतिका झाली होती. बाहेर राहिलेल्या नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोप व सुंदोपसुंदी फोफावल्यामुळे कामगार वर्ग अगतिक झाला. अशा वातावरणात ना. म. जोशी, आर. आर. बखले, लालजी पेंडसे व खंडेराव आत्माराम देसाई हे नेते कामगारांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत होते.

मीरत खटल्यात अडकलेल्या आघाडीच्या कम्युनिस्ट नेत्यांमध्येही चळवळीच्या डावपेचांविषयी तीव्र मतभेद निर्माण झाले. डांगे यांना भेटावयास गेलेल्या त्यांच्या पत्नी उषाताई आणि वासुदेव हरी जोशी यांना डांगे चुकीचा सल्ला देऊन जी. के. यू. मधील गटबाजीला उत्तेजन देतात, असा त्यांच्या सहकाऱ्यांचा खोटा आरोप होता. इतकेच नव्हे तर डांगेंना कम्युनिस्ट पक्षातून निलंबित करण्याचाही मनसुबा चालू होता. एप्रिल १९३० पासून देशभर जोरात चालू असलेल्या सविनय कायदेभंग आंदोलनात गांधीजी व काँग्रेसशी सहकार्य करावे, असे डांगे पतिपत्नी, वासुदेव जोशी वगैरेंचे मत होते. तथापि पोथीनिष्ठ कम्युनिस्टांनी ते अमान्य केले. वस्तुतः वसंतराव कर्णिक, लालजी पेंडसे, एम. एन. रॉय, मणिबेन कारा, रामभाऊ रुईकर, सुंदर काबाडी, ए. टी. शेख वगैरेंनाही वाटत होते की, सर्व कामगार नेत्यांप्रमाणे कम्युनिस्टांनीही काँग्रेसच्या जनआंदोलनात सामील व्हावे. तथापि कम्युनिस्ट नेत्यांनी हा विधायक सल्ला ऐकला नाही. काँग्रेस खऱ्या अर्थाने साम्राज्यविरोधी पक्ष नाही, असा कडव्या कम्युनिस्टांचा गैरसमज होता. कम्युनिस्टांमधील सुंदोपसुंदीमुळे देशपांडेंनी

'लढाऊ कामगार संघ' नामक नवीन संघटना काढली. १९३१ सालात बी. टी रणदिवे कारावासातून सुटून आले. तथापि त्यांनी देशपांडे गटाशी सख्य साधले नाही. एकूणच कम्युनिस्टांमध्ये एकमत राहिले नाही, दुही माजली.

कामगार व कम्युनिस्ट चळवळीचे विघटन होत असताना, **थोर युगांतर क्रांतिकारक नरेंद्रनाथ भट्टाचार्य ऊर्फ मानवेंद्रनाथ रॉय** पंधरा वर्षांच्या देशांतरानंतर डिसेंबर १९३० मध्ये डॉ. महमूद या नावाने भारतास परतले. आणि ते मुंबईत अत्यंत गुप्तरीत्या राहू लागले. दोन दिवसांतच त्यांनी कामगार पुढारी वसंतराव कर्णिकांशी संपर्क साधला. रॉय यांचे जोसेफ स्टॅलिनशी तीव्र मतभेद झाल्यामुळे ते पंधरा वर्षांनंतर इथे आलेले होते. महाराष्ट्रात रॉय यांचे बरेच अनुयायीअसल्यामुळे त्यांच्या पक्षाचा परामर्श स्वतंत्ररीत्या घेतलेला आहे. इथे इतकेच म्हणावयाचे आहे की, व. भ. कर्णिक, द्वा. भ. कर्णिक हे बंधू, मणिबेन कारा, अब्दुल मजीद यांनी रॉय यांच्या मार्गदर्शनानुसार मुंबईतील गोदी कामगार व महानगरपालिकेच्याकामगारांच्या संघटना उभारल्या. त्यांच्या कामगार संघटना हिंदुस्तानला स्वातंत्र्य लाभल्यावरही अनेक वर्षे कार्यरत राहिल्या. इतर पक्षांच्या संघटनांमध्ये होत असलेले तीव्र मतभेद व बेबनाव रॉयवाद्यांच्या कामगार संघटनांमध्ये होत नसत. वस्तुतः रॉय हे लेनिनच्या विचारप्रणालीचे पुरस्कर्ता होते. तरीही रशियाची विचारधारा स्वीकारलेल्या कडव्या कम्युनिस्टांना ते पंचमस्तंभी वाटत होते. मार्च १९३१ च्या कराची काँग्रेसमध्ये ते डॉ. महमूद याच नावाने उपस्थित होते. महात्मा गांधी, नेहरू, सरदार पटेल वगैरेंना भेटून ते राष्ट्रीय आंदोलनाबाबत विचारविनिमय करीत असत. मात्र देशपांडे गटाच्या कारवायांमुळे रॉय पकडले गेले (२१ जुलै १९३१), असा उषाताई डांगे, गणपत कांदळकर वगैरे कामगार नेत्यांनी एका जाहीर सभेत आरोप केला होता.[२२] मुंबईतील कामगार चळवळीत १९३२ व १९३३ मध्ये देशपांडे मास्तर, रणदिवे आणि रॉयवाद्यांचा गट असे तीन गट स्पर्धा करीत होते. त्यामुळे चळवळीत एकसंधपणा राहिला नाही, मतभेद खूप वाढले.

आर्थिक महामंदीच्या फटक्यामुळे १९३४ मध्ये मुंबईतील पाच गिरण्या कायमच्या बंद पडलेल्या होत्या आणि २९ गिरण्या तात्पुरत्या बंद ठेवलेल्या होत्या. तीन गिरण्या

मधून-मधून चालत असत. त्यामुळे ६०,००० हून जास्त कामगार बेकार झाले, असे रघुनाथराव बखलेंनी एका लेखात लिहिले होते. कामगारांच्या वेतनात ७ ते ४४ प्रतिशत कपात करण्यात आली होती. मंदीच्या सावटाखाली सोलापूरच्या कामगारांची स्थिती आणखीच वाईट झाली होती. म्हणून दाद मागण्यासाठी रघुनाथराव कऱ्हाडकर, त्यांच्या पत्नी मीनाक्षी, भाई बेके व काँग्रेस समाजवादी पक्षाचे शिरुभाऊ लिमये यांनी सोलापुरात दोन महिन्यांपेक्षाही जास्त दिवस संप लढवला होता. त्यात त्यांना रॉयवाद्यांनी मदत केली होती. पुण्याचे शिरुभाऊ लिमये तेव्हाही जहाल मतवादी असून ते जवाहरलाल नेहरूंना अलाहाबादमध्ये भेटत. मात्र प्रदीर्घ काळ चालविलेला सोलापुरातील संप अयशस्वी झाला.

वस्तुतः १९३२ चा बॉंबे स्पेशल (इमर्जंसी) पॉवर्स ॲक्ट सरकारने मुळातच सविनय कायेदभंग, सशस्त्र क्रांतिकारक आणि कम्युनिस्टांना चिरडण्यासाठी पास केलेला होता. त्याचा उपयोग सनदशीर चळवळ वा कामगार आंदोलनाविरुद्ध केला जाणार नाही, असे आश्वासन सरकारने कायदेमंडळात दिले होते. तथापि हे आश्वासन इंग्रजांनी क्वचितच पाळले. दाद मागण्यासाठी कम्युनिस्टांचे दोन-तीन गट आणि रॉयवाद्यांनी ऐक्य करून २३ एप्रिल १९३४ पासून मुंबईतील गिरण्यांमध्ये संप घडवून आणला होता. साठ हजारांवर कामगार संपावर गेले. मात्र सरकारने आपल्या आश्वासनाचा भंग करून हा संप दडपून टाकण्यासाठी हा इमर्जंसी कायदा उपयोगात आणला. संप बेकायदा ठरवून २२७ कामगारांना अटक केली व ८९ जणांना शिक्षा भोगावयास लावली. अशीच दडपशाही धुळे व अमळनेरमध्येही करण्यात आली होती. औद्योगिक कलहात कम्युनिस्टांचा संबंध आढळल्यास, सरकार आणीबाणीच्या काळातील विशेषाधिकारांच्या कायद्याचा नेहमी दुरुपयोग करीत असे.

२३ एप्रिल १९३४ पासून सुरू झालेल्या संपासाठी रॉयिस्ट नेत्या मणिबेन कारा यांना अटक झाली होती. त्यांची व इतर नेत्यांची सुटका झाल्यावर संप मिटवण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. मुंबईतील ससून, सेंच्युरी व कोहिनूर या गिरण्यांमधील कामगार कामावर जायला लागले. संपास एक महिना झाल्यावर संपकऱ्यांनी काढलेल्या (२३ मे) मिरवणुकीवर पोलिसांनी लाठीमार करून गोळीबारही केला. उषाताई डांगे,

डॉ. गंगाधर मो. अधिकारी, भय्याजी कुलकर्णी यांना अटक केली. सरकारने मागण्यांबाबत चौकशी करण्यासाठी चौकशी समिती नेमली. पण सरकारच्या दुराराध्य धोरणाचा रागरंग पाहून हा संप बिनशर्त मागे घेण्यात आला. तथाकथित चौकशी समितीने १९२६ सालच्या राहणीमानाचा खर्च जमेस धरून, त्याच्या तुलनेत १९३४ मध्ये खर्च कसा कमी झाला हे दाखवण्यासाठी आकडेवारीचा आधार घेतला. आणि गिरणीमालकांनी आधीपासूनच केलेल्या वेतनकपातीचे समर्थनच केले. ही तर धुळफेकच होती. दोन महिन्यांच्या संपानंतरही काहीच न लाभल्यामुळे स्वाभाविकपणे कामगार त्यांच्या नेत्यांवर रागावले. त्यांनी केशवराव जोगळेकर, दि. के. बेडेकर, डॉ. एम. आर. शेट्टी, वामनराव कुलकर्णी यांना टीकेचे लक्ष्य केले होते.[२३]

२८ जून १९३४ रोजी गव्हर्नर बेबर्न यांनी भारतमंत्री सॅम्युएल होअर यांना सुचविले होते की, कम्युनिस्टांना मूलतः प्रभावहीन करण्यासाठी सरकारला अमर्याद अधिकार देणारा स्थायी स्वरूपाचा नवीन कायदा करावा. त्यांच्या सूचनेत स्पष्ट होते की, गव्हर्नरला संप होण्याचे दुःख वाटत नव्हते. तथापि, संप होऊ दिल्याने कम्युनिस्टांचा प्रभाव वाढतो याचे ब्रेबर्नला दुःख वाटत होते. मात्र तसा कायदा करणे तेव्हा मुत्सद्दीपणाचे नव्हते. कारण काँग्रेसने कायदेभंग आंदोलन निलंबित केलेले होते. तसेच काँग्रेसने आगामी सांविधानिक कायद्यानुसार निवडणुका घेण्यास अनुकूलता दर्शवली होती. म्हणून सरकारने आततायीपणा टाळून गांधीजींची मर्जी संपादन केली. आणि तसा कायदा केला नाही. हिंदुस्तान सरकारच्या फायलीत याची नोंद आहे.[२४]

इलाखा सरकारने काँग्रेस व कामगारांचे वरकरणी समाधान करण्यासाठी 'बॉंबे ट्रेड डिस्प्यूट कंसिलिएशन ॲक्ट' केला. औद्योगिक कलहात तडजोड करण्यासाठी व कामगारांच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी खास अधिकारी नेमण्याची त्यात तरतूद होती. तथापि याचा अत्यल्प उपयोग झाला. मुंबई सरकारने उपरोक्त आणीबाणी विशेषाधिकार कायद्याचा कालावधी मार्च १९३५ पर्यंत वाढवला. शिवाय सप्टेंबर १९३५ मध्ये त्यात दुरुस्ती करून कम्युनिस्ट व दहशतवादी आणि साराबंदीची चिथावणी देणारे तसेच सविनय कायदेभंग करणारे या चार वर्गातील चळवळ्यांना साफ प्रतिबंध करणारा नवा कायदा सरकारने केला. परंतु अशा प्रकारच्या विधेयकांवर कायदेमंडळात टीका करणाऱ्या देशी आमदारांचे काहीच चालत नसे.

१९३४ सालीच हिंदुस्तानात कम्युनिस्ट पक्ष बेकायदा ठरविण्यात आला. त्यामुळे आयटक संघटनेतून अलग झालेल्या कम्युनिस्टांना पुन्हा आयटकशी संलग्न व्हावे लागले.

१९३४ मध्ये बहुतेक सर्व कम्युनिस्ट नेते विविध कारागृहांमध्ये अडकलेले होते. तसेच १९३४ च्या संपात कामगार वर्गाचा दारुण पराभव झाला होता. त्यामुळे १९३५ साली मुंबईतील कापड गिरण्यांमध्ये फारच कमी कलह झाले. दरम्यान मीरत कट खटल्यातून मुक्त झाल्यावर रघुनाथ निंबकरांनी कम्युनिस्ट पक्षाशी असलेले संबंध तोडले होते. या खटल्यातील शिक्षा भोगून श्रीपादराव डांगे १२ मे १९३५ रोजी मुंबईला परतले, परंतु ऑगस्ट महिन्यात उषाताईंसह ते पुण्यात राहायला गेले. एस. व्ही. घाटे मंगलोरमध्ये स्थानबद्ध होते. २ फेब्रुवारी १९३६ रोजी बी. टी. रणदिवेंची कारावासातून सुटका झाली. तथापि आर्थिक कारणांमुळे कामगार चळवळीवर पराभवाचे सावट होते. म्हणून नेत्यांचा भ्रमनिरास झालेला होता. रॉयवादी कामगार पुढारी मणिबेन कारा यांच्या पुढाकाराने आयटक संघटनेच्या १७ मे १९३६ रोजीच्या मुंबईतील अधिवेशनात आयटक आणि नॅशनल ट्रेड युनियन फेडरेशन या दोन्ही कामगार संघटनांचे एकीकरण करण्यात आले. चळवळीत ऐक्यभाव राहावा हा त्यांचा हेतू होता. लवकरच २० नोव्हेंबर १९३६ रोजी मानवेंद्रनाथ रॉय यांचीही कारावासातून सुटका झाली. त्यामुळे रॉयवाद्यांचा प्रागतिक विचारसरणी असलेला गट कामगार चळवळीत अधिक सक्रिय झाला.

ऑगस्ट १९३५ मध्ये ब्रिटिश पार्लमेंटने हिंदुस्तान सरकारविषयीचा सांविधानिक कायदा मंजूर केला. त्यानुसार येऊ घातलेली संघराज्याबाबतची योजना काँग्रेसने साफ फेटाळली. तरी त्या कायद्यानुसार मिळणारी प्रांतिक स्वायत्तता स्वीकारण्यास काँग्रेस पक्ष तयार होता. त्याप्रमाणे निवडणूक होऊन पहिली लोकनियुक्त काँग्रेस मंत्रिमंडळे अधिकारारूढ होणार होती. मुंबई इलाख्यात बाळ गंगाधर खेर आणि मध्यप्रांत-वऱ्हाडात रविशंकर शुक्ला यांची मंत्रिमंडळे अधिकारारूढ व्हायची होती.

## प्रांतिक स्वायत्तता व कामगार चळवळ

कापड उद्योगाची आर्थिक स्थिती १९३६ पासून सुधारू लागली होती. मार्च १९३६ च्या लखनौ काँग्रेसमध्ये अध्यक्ष जवाहरलाल नेहरू आणि डावी विचारप्रणाली असलेल्या युवकांनी समाजवादाचा नारा घोषित केला होता. त्यामुळे युवकांच्या आशाआकांक्षा उंचावल्या होत्या. प्रांतिक स्वायत्तता अवतरल्यामुळे १९३७ मध्ये त्यांत मोठीच भर पडली. राजकीय परिवर्तनाच्या त्या काळात औद्योगिक क्षेत्रातील कामगारांच्याही आशाआकांक्षा खूपच वाढल्या. त्याबरोबर कामगारांमध्ये असंतोष वाढला. १९३७ साली मुंबई इलाख्यात ८८ कामगार तंटे उद्‌भवले आणि त्यात अदमासे १,१०,००० कामगारांनी संप केला. १९३८ मध्येही १११ कामगार कलह झाले व त्यांत ६२,००० कामगारांनी संप केले.

फैजापूरला डिसेंबर १९३६ मध्ये भरलेल्या काँग्रेस अधिवेशनात श्री. अ. डांगे, ई. एम. एस. नंबुद्रिपाद, मानवेंद्रनाथ रॉय, दोन्ही कर्णिक बंधू, चार्लस मस्करेन्हस, जयप्रकाश नारायण, राम मनोहर लोहिया, युसुफ मेहेरअली, अशोक मेहता, अच्युतराव पटवर्धन, कमलादेवी चट्टोपाध्याय, एम. आर. मसानी, दिनकर मेहता, आर. ए. खेदगीकर, साने गुरुजी, पी. व्ही. घाणेकर, विष्णू चितळे, सोली बाटलीवाला वगैरे काँग्रेस समाजवादी व कम्युनिस्ट आवर्जून उपस्थित होते. त्यांनी कामगार व शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्या सोडवण्याची जोरदार मागणी केली होती. काँग्रेसला त्यांची दखल घेणे भाग पडले.[३५] फैजपूरच्या ठरावानुसार काँग्रेसच्या कामगारविषयक समित्यांनी कामगार कल्याणाचे अनेक कार्यक्रम अमलात आणण्यासाठी उचित ठराव मंजूर केले (ऑक्टोबर १९३७). त्यास अनुसरून खेर मंत्रिमंडळाने गिरणी कामगारांच्या वेतनाबाबत चौकशी करण्यासाठी जयरामदास दौलतराम, वैकुंठलाल मेहता, धनंजयराव गाडगीळ आणि सय्यद अब्दुल्ला ब्रेलवी यांची समिती नेमली. समितीच्या अंतरिम अहवालानुसार मुंबईतील कामगारांचे वेतन ११.९ टक्के दराने वाढवण्याची शिफारस होती.

प्रांतिक स्वायत्तता आल्यावरही कारावासात असलेल्या सर्व कम्युनिस्टांना मुक्त करावे अशी मागणी पुढे आली. व्हाइसरॉय लिनलिथगो तसेच गव्हर्नर महाशय या मागणीच्या विरुद्ध होते. नोकरशाहीने तयार केलेल्या अहवालात म्हटले होते:— कम्युनिस्टांना मुक्त केल्यास बदललेल्या राजकीय परिस्थितीचा ते फायदा घेतील; विरोधकांना नष्ट करतील ; म्हणून कोणाही कम्युनिस्टावरचे किंवा संघटनेवरील निर्बंध उठवूच नये. किंबहुना त्यांना वठणीवर आणण्यासाठी आणीबाणीत वापरावयाच्या विशेष अधिकारांचा उपयोग करावा. मात्र या प्रकरणी जवाहरलालजींनी के. एम. मुन्शी यांना जोरात फटकारले होते. गांधीजींनीदेखील आणीबाणीतील विशेष अधिकार वापरू नये असा आदेश दिला. अखेर कम्युनिस्टांवरील निर्बंध उठवावेत व त्यांना मुक्त करावे अशी खेर मंत्रिमंडळाने गव्हर्नरला शिफारस केली. त्यामुळे गव्हर्नरला १९ ऑक्टोबर १९३७ रोजी कम्युनिस्टांवरील निर्बंध रद्द करावे लागले. हा कामगारांना मोठा दिलासा होता.

मराठी भाषिक कम्युनिस्टांना परप्रांतातील पी. सी. जोशी, अजय घोष, सोमनाथ लाहिरी येऊन मिळाले. त्यामुळे मुंबई शहर हेच भारतीय कम्युनिस्ट चळवळीचे मुख्यालय बनले. इतर प्रांतांमधील कम्युनिस्ट चळवळ मुंबईइतकी जोरदार नव्हती. डांगेंनी पुन्हा सुरू केलेले **क्रांती** हे साप्ताहिक कामकऱ्यांना आपल्या हक्कांबाबत जागृत करत होते. दरम्यान शासनाने नेमलेल्या चौकशी समितीने मुंबईतील कामगारांना ११.९ टक्के, सोलापुरातील कामगारांना १४.३ आणि अहमदाबादकरांना ९ प्रतिशत वेतनवाढ जाहीर केली. शिवाय आजारपणात भरपगारी रजा आणि मोफत औषधोपचारांची तरतूद करण्यात आली.

६ जून १९३३ रोजी मुंबईत कामगार आयुक्ताचे स्वतंत्र कार्यालय सुरू होईपर्यंत फॅक्टरी विभाग मुंबईच्या कलेक्टरच्या देखरेखीखाली होता. या विभागास फारसे महत्त्व दिले जात नसे. कामगार आयुक्त ही स्वतंत्र यंत्रणा निर्माण झाल्यावर कामगारांविषयीचे सर्व प्रश्न व रजिस्ट्रार ऑफ ट्रेड युनियन्स आणि स्टिम बॉयलर ॲंड स्मोक नुइसन्स हे विषय कामगार आयुक्ताच्या अधिकाराखाली आले. कॉंग्रेसचे मंत्रिमंडळ अधिकारावर आल्यामुळे कामगारांच्या अपेक्षा वाढल्या. कॉंग्रेसने आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात

अनेक आश्वासने दिलेली होती. म्हणून आर्थिक मंदीच्या काळात मुस्कटदाबी झालेल्या कामगारांच्या अपेक्षा वाढणे स्वाभाविक होते. दिल्लीतील मध्यवर्ती सरकारचा विरोध व आर्थिक मंदीची स्थिती आणि अनेक अडचणींच्या मर्यादेत कामगारांच्या कल्याणासाठी काँग्रेस मंत्रिमंडळाने पुष्कळ काम केले होते.

औद्योगिक कलहांबाबत चौकशी करून लवकरात लवकर समेटासाठी यंत्रणा उभारणे, हे काँग्रेसचे ध्येय होते. यासाठी मद्रास इलाख्याचे कामगार मंत्री व्ही. व्ही. गिरी यांनी एक मसुदा तयार केला होता. (पुढे गिरी महोदय भारताचे राष्ट्रपती झाले). गिरींच्या मसुद्यात सुधारणा करून बा. गं. खेर यांनी मुंबईच्या विधानसभेत एक विधेयक सादर केले. त्यावर बरीच जाहीर टीका-टिपणी झाली. संप किंवा टाळेबंदी जाहीर करण्यापूर्वी समेटाचे प्रयत्न करण्याचे मालक व कामगारांवर बंधन घालण्यात आले. समेट घडवून आणण्यासाठी यंत्रणा निर्माण करण्याची विधेयकात तरतूद होती. या समेट मंडळाचे तसेच औद्योगिक लवाद न्यायालयाचे प्रमुख म्हणून हायकोर्टाच्या न्यायाधीशाची नेमणूक करण्याची तरतूद होती. पण संप करण्याच्या प्रच्छन्न अधिकारावर बंधन येईल या कारणास्तव कम्युनिस्टांनी विधेयकास विरोध केला. मात्र विरोध पत्करून खेर मंत्रिमंडळाने १९३८ चा बॉंबे इंडस्ट्रीअल डिसप्यूट ॲक्ट पास करून घेतला. **कामगार पुढारी गुलझारीलाल नंदा या कायद्याचे जनक होते.**

या कायद्यात समेट आणि लवाद निवाडा करण्यासाठी व्यवस्थित तरतूद होती. या राज्याचा हा कायदा अखिल भारतातील पहिलाच औद्योगिक विवाद अधिनियम होता. औद्योगिक संबंध सुधारण्याचा हा देशातील पहिला प्रयत्न होता. या कायद्यानुसार देशातले पहिले औद्योगिक न्यायालय मुंबईत जन्माला आले. या अधिनियमात वेळोवेळी सुधारणा करून त्याची उपयोगिता वाढविली. याच प्रक्रियेतून १९४६ साली बॉंबे इंडस्ट्रीअल रिलेशन्स ॲक्ट अस्तित्वात आला. पण त्यातही १९३८ च्या कायद्यातील मूलभूत तत्त्वांना धक्का दिला गेला नाही. मुंबई सरकारच्या या कायद्याचे इतर प्रांतांनी अनुकरण केले आणि औद्योगिक कलह मिटवण्यासाठी आदर्श कार्यप्रणाली निर्धारित करण्यात आली. तरीही कम्युनिस्टांनी याविरुद्ध एक दिवसाचा

संप केला. तथापि समेट आणि लवाद निवाडा करण्याची यंत्रणा निर्माण झाल्यावर कामगारांनी कम्युनिस्टांचे आवाहन झिडकारून या यंत्रणेचा पुरेपूर उपयोग करून घेतला.[२६]

मुंबईतील कामगार वर्गात दलित महारांचा मोठा समावेश होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांचे कैवारी म्हणून जगभर कीर्ती पावले होते. दलित व एकूण श्रमिक वर्गाला राजकीय व सामाजिक हक्क मिळवून देण्यासाठी **बाबासाहेबांनी १५ ऑगस्ट १९३६ रोजी 'स्वतंत्र मजूर पक्ष'** स्थापन केला होता. या पक्षाच्या ध्येयधारणेत उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण, खोती पद्धती नष्ट करणे, शेती कसणाऱ्या कुळांना संरक्षण, सावकारी व घरभाड्याचे नियंत्रण, कामाचे तास, निवृत्तिवेतन व बोनस निश्चित करण्यासाठी कायदे करणे वगैरे उद्दिष्टे अंतर्भूत होती. ७ नोव्हेंबर १९३८ च्या सार्वत्रिक संपात या पक्षाने कम्युनिस्टांशी युती करून कामगारांचा संपाच हक्क अबाधित राहावा, ही आपली भूमिका मांडली होती. मुंबईतील कामगार चळवळीत या पक्षानेही आपले स्थान निर्माण केले होते.

## कामगार चळवळीत साने गुरुजी

तळमळीचे स्वातंत्र्यसैनिक, क्रांतिकारक, थोर साहित्यिक आणि समाजवादी विचारवंत म्हणून भारताला परिचित असलेले पांडुरंग सदाशिव साने यांनी कामगार चळवळीतही योगदान दिले. धुळे व जळगाव जिल्ह्यांमध्ये कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी सत्याग्रही मार्गाने लढा उभारला होता. खेर मंत्रिमडळाने नेमलेल्या उपरोक्त जयरामदास दौलतराम, न्या. दिवेटिया, धनंजयराव गाडगीळ व ब्रेलवी यांच्या समितीने शिफारस करूनही धुळे व जळगाव जिल्ह्यांमधील गिरणीमालकांनी कामगारांचे वेतन वाढविण्यास नकार दिला होता. प्रा. मोहनलाल दातवाला यांनीही वेतनवाढीची शिफारस केली होती. तीही मालकांनी धुडकावली होती म्हणून साने गुरुजी, पुरषोत्तम त्रिकमदास, डांगे, रणदिवे व मिनू मसानी यांनी कामगारांनासंघटित केले. त्यांनी संयुक्त खानदेश कामगार फेडरेशन उभारून धुळे व अमळनेरला परिषदा भरविल्या. विशेषतः साने गुरुजींनी खानदेशातील १०,००० गिरणी कामगारांना न्याय

मिळवून देण्यासाठी जिवाचे रान केले. जळगाव,अमळनेर, चाळीसगाव व धुळ्यातील कामगारांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. त्यानुसार कामगारांनी सत्याग्रह करून पगारवाढ मिळाल्याखेरीज पगार घेण्याचे नाकारले. गुरुजींचे काँग्रेस समाजवादी सहकारी बॅ. पुरषोत्तम त्रिकमदास, मसानी व हरीभाऊ पाटसकर यांनीही हा विषय धसास लावला. उपरोक्त कामगार फेडरेशनच्या परिषदेसाठी स्वामी सहजानंद यांच्यासारखे थोर काँग्रेस समाजवादी नेते आणि भारतीय किसान परिषदेचे चिटणीस बिहारमधून खानदेशात आले होते. अखेरीस साने गुरुजींच्या नेतृत्वामुळे कामगारांना यश लाभले. पुढील काळातही सानेंनी गिरणी कामगारांसाठी बरेच काम केले. त्यांनी छोडो भारत लढ्यातही कामगारांचा सहभाग मिळविला. मात्र पक्ष निष्ठेपायी कम्युनिस्टांनी दुसऱ्या महायुद्धाला ‘ पीपल्स वॉर ’ म्हणून ब्रिटिशांना पाठिंबा घोषित केल्यामुळे साने गुरुजींनी कम्युनिस्टांचा धिक्कार केला. तेव्हापासून कम्युनिस्ट लोक साने गुरुजींचे निंदक बनले.[२७]

स्वातंत्र्यपूर्व काळात विदर्भात औद्योगीकरण फारसे झालेले नव्हते. नागपूरव्यतिरिक्त हिंगणघाट, पुलगाव व अकोला आणि अचलपूरला कापड गिरण्या होत्या. सी. पी. मँगनीज ही कंपनी ब्रिटिशांच्या मालकीची असल्यामुळे तिच्यात कामगार चळवळीस वावच नव्हता. जुलै १९३७ पर्यंत नागपुरात कम्युनिस्ट पक्षाची शाखा नव्हती. अशा कारणांमुळे विदर्भात कामगार चळवळीचा विकास कमी झाला. मात्र वर कथन केल्याप्रमाणे रामभाऊ रुईकर यांनी तिकडे पुढील अनेक वर्षे जिद्दीने कामगार चळवळ चालवली. स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी झाल्यामुळे रामभाऊंना कारावास भोगावा लागत असे. तुरुंगातून मुक्त झाल्यावर ते पुन्हा कामगार चळवळीचे नेतृत्व करीत असत. त्यांच्या कार्याचे मोल म्हणून त्यांना अखिल भारतीय आयटक संघटनेचे अध्यक्षपद देण्यात आले होते. १९३७ मध्ये नागपुरातील मॉडेल मिलमध्ये झालेल्या संपाचे नेतृत्व रुईकरांनी केले होते. पी. डी. मराठे, बंकिम मुकर्जी, मधुकर लक्ष्मण जयवंत, श्रीपाद यशवंत कुलकर्णी, जी. एम. मोटे हे त्यांचे सहकारी होते. सुभाषचंद्र बोस यांच्याशी जवळीक असल्यामुळे रुईकर फॉरवर्ड ब्लॉक पक्षाचे नेते बनले.

काँग्रेसचे मंत्रिमंडळ पक्षाच्या विचारप्रणालीनुसार औद्योगिक कलह सोडवण्याचे कसोशीने प्रयत्न करीत असे. काँग्रेसचा भर समेट व लवाद निवाड्यांवर असे. काँग्रेसची भूमिका वर्गसमन्वयाची होती, तर कम्युनिस्टांचा भर वर्गविग्रहावर होता. त्या काळात मुंबईतील कम्युनिस्ट सोलापूरमध्येही सक्रियपणे कार्यरत होते. सोलापुरात रघुनाथराव कऱ्हाडकर, त्यांच्या पत्नी मीनाक्षी कऱ्हाडकर, जी. डी. साने, श्रीनिवास सरदेसाई हे त्यांचे साथीदार होते. प्रांतिक स्वायत्तता प्रस्थापित झाल्यावरही कम्युनिस्ट पक्षावर बंदी होती. तरीही काँग्रेस मंत्रिमंडळाने निमित्त साधून बऱ्याच कम्युनिस्टांना कारावासातून मुक्त केले. गव्हर्नरचा रोष पत्करूनही त्यांची सुटका केली. यानंतर १९३८ च्या औद्योगिक कलहांसंबंधीच्या कायद्यानुसार निर्माण झालेल्या सुविधांचा उपयोग करून घेण्यावर कम्युनिस्टांनी भर दिला. गिरणी कामगार युनियन पुन्हा सक्रिय झाली.

१९३८ च्या अखेरी कम्युनिस्टांच्या लक्षात आले की, स्वतंत्र संघटना ठेवण्यातून आपले उद्दिष्ट साध्य होणे असंभव होय. आणि म्हणून काँग्रेसचाच 'डावा गट' म्हणून काम करण्याचे त्यांनी पसंत केले. त्यानुसार कम्युनिस्टांनी आपली रणनीति बदलली आणि काँग्रेसचे सदस्य वाढविण्यासाठी वाहून घेतले. काँग्रेसच्याच व्यासपीठावरून श्रमिक वर्गाचे हित साध्य करणे आणि साम्राज्यशाहीशी लढा देणे चालू ठेवले. त्यामुळे विशिष्ट मुद्यांबाबत काँग्रेस व कम्युनिस्ट यांच्यात सहकार्याची भावना निर्माण झाली. तथापि हा सलोखा व सहकार्य अल्पायुषी ठरले, आणि कम्युनिस्ट पुन्हा संप आणि औद्योगिक कलह निर्माण करण्याकडे वळले.

१९३९ हे वर्ष उजाडले ते कापड उद्योगातील मंदीने. गिरण्यांमध्ये कापडाच्या गाठी पडून होत्या. मालाला मागणी नव्हती. त्यामुळे काही गिरण्या बंद पडल्या, तर काहींनी रात्र-पाळी बंद केली. त्या कारणाने कामगारकपात होऊ लागली. यासाठी कम्युनिस्टांनी चळवळ उभारली. त्यामुळे अनेक कामगार नेत्यांना तुरुंगात जावे लागले.

## दुसरे महायुद्ध व कामगार

जागतिक महामंदीमुळे (१९२९-१९३०) कापड उद्योग खचला होता. मात्र १९३६-१९३८ दरम्यान हा उद्योग सावरून त्याचे रिव्हायव्हल म्हणजे पुनरुज्जीवन झाले. पण जानेवारी १९३९ पासून पुन्हा मंदीचे पुनरागमन झाले. तथापि जागतिक महायुद्धाचा भडका होताच आर्थिक तेजी अवतरली. जगातील तेजीमंदीच्या चक्रानुसार [ट्रेड सायकल] भारताच्या अर्थव्यवस्थेतही असे चढ-उतार होतच होते. उपलब्ध आकडेवारीवरून दिसते की, मुंबई इलाख्यातील कापड गिरण्यांनी १९४२ सालात २० कोटी रुपये नफा मिळविला होता. त्यांच्या नफ्याची रक्कम १९४३ मध्ये ३८ कोटी, १९४४ साली ३० कोटी आणि १९४५ सालात २१ कोटी होती. त्यामुळे कामगारांच्या अपेक्षा वाढणे स्वाभाविकच होते. मात्र नेहमीप्रमाणे मालकवर्ग कामगारांना आपल्या नफ्यात भागीदार करून घेण्यास तयार नव्हता. संपूर्ण युद्धकाळात तेजी असूनही कामगारांना दोन महिन्यांचा पगार इतकाच बोनस मिळालेला होता. आणि तोही कामगार संघांच्या आंदोलनामुळेच लाभला होता. कम्युनिस्टांच्या गिरणी कामगार युनियनचा दावा होता की, राहणीमानाचा खर्च ४० प्रतिशत वाढला, तर मालकांच्या मते तो निर्देशांक केवळ साडेसात टक्के होता. अशा वातावरणात बाळासाहेब खेरांच्या सरकारने मालक व कामगार यांच्यातील तंटा समेट व लवाद निवाडा या पद्धतीने सोडविण्यासाठी रीतसर प्रयत्न केला.

जागतिक महायुद्ध सुरू होताच ब्रिटिशांनी डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्ट म्हणजे भारत संरक्षण कायदा लादलेलाच होता. कोणलाही या कायद्याखाली डांबून ठेवले जाई. तरीही गिरणी कामगारांनी महागाई भत्ता वाढविण्यासाठी ३ मार्च १९४० रोजी संप पुकारला. ब्रिटिश सरकार कम्युनिस्टांकडे सतत वक्रदृष्टीने पाहत असे. त्यानुसार भारत संरक्षण कायद्याखाली डांगे, मिरजकर, रणदिवे यांना येरवडा कारागृहात डांबण्यात आले. तरीही संप चालूच राहिला. याशिवाय मुंबईतील रेशमी व लोकरी कापड तयार करणाऱ्या गिरण्याही कामगारांनी बंद पाडल्या. अमळनेरचे कामगार तसेच सोलापूरचे हातमाग विणकरही संपात उतरले. २९ मार्च १९४० रोजी मुंबईतील संपकऱ्यांवर पोलिसांनी गोळीबार केला. कोणताही संप म्हणजे ब्रिटिशांच्या 'युद्ध

प्रयत्नांमध्ये व्यत्यय' मानला जाई. व्यत्यय आणणाऱ्यांसाठी भारत संरक्षण कायदा निर्दयपणे वापरला जाई. त्याविरुद्ध अपील करता येत नसे. डांगे वगैरेंच्या पाठोपाठ शं. वा. देशपांडे, एल. के. ओक, एस. आर. तावडे, श्यामराव परुळेकर, गोदावरी गोखले, भिसे, आर. एम. जांभेकर, सावळाराम जी. पाटकर, ना. वा. फडके वगैरे कम्युनिस्टांना अटक करण्यात आली. मुंबईचे महापौर व काँग्रेस पुढारी यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ!

हा संप अयशस्वी झाल्यावर गंगाधर अधिकारी, अजय घोष व पूरणचंद्र सी. जोशी हे प्रमुख कम्युनिस्ट नेते भूमिगत झाले. अजय घोष लखनौत पकडले गेल्यावरही (२४ ऑगस्ट १९४०) पी. सी. जोशी व गंगाधर अधिकारी गुप्तपणे मुंबईतील चळवळीस मार्गदर्शन करत राहिले. जुलै १९४० पासून १३ जून १९४१ पर्यंत आणखी अटक झालेल्या कम्युनिस्टांमध्ये पुढील मराठी भाषिक होते :—बी. जी. भांडारकर, पी. बी. दोंदे, जे. एस. माहीमकर, पी. बी. वैद्य, श्रीनिवास सरदेसाई, प्रल्हाद कुरपे, भोगले, विठ्ठल चौधरी, बाळकृष्ण ऊर्फ बंडू, उषाताई डांगे, खंडेराव सुळे, सेनापती बापटांचे सुपुत्र वामनराव बापट, केशवराव जोगळेकर आणि रघुनाथ निंबकर इत्यादी. या सर्व मंडळींना भारत संरक्षण कायद्याखाली कारावासात डांबण्यात आले.

## रॅडिकल डेमॉक्रॅटिक पक्ष

स्वतंत्र लोकशाही समाजवादी विचार व आचारप्रणाली असलेल्या रॅडिकल डेमॉक्रॅटिक पक्षाचे कार्य प्रामुख्याने महाराष्ट्रात केंद्रित होते. वस्तुतः हा विचारवंतांचा पक्ष होता. वर कथन केल्याप्रमाणे मानवेंद्रनाथ रॉय, वसंतराव कर्णिक हे सर्वच काँग्रेसमध्येच राहून राजकीय लढा व कामगार चळवळीत योगदान देत होते. विचारप्रणालीच्या पातळीवर त्यांची मुख्यतः नेहरू आणि सामान्यतः महात्मा गांधींशी जवळीक होती. किंबहुना फैजपूरला व हरिपुरा येथेही रॉय यांनी समाजवादी युवक व कम्युनिस्टांना सुनावले होते की, स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत त्यांनी साम्यवादी विचारसरणीचा आग्रह न धरता गांधीजींच्या नेतृत्वाखालील आंदोलनात निरपवाद झोकून द्यावे. सर्वांनी काँग्रेसच्या मुख्य प्रवाहामध्येच सामील व्हावे!

तथापि दुसऱ्या जागतिक महायुद्धाचा अपघात झाला. हिटलर व मुसोलिनीने ब्रिटनशी युद्ध पुकारल्यावर रॉय यांनी ब्रिटिशांशी समझोता केला. हिटलर विजयी झाल्यास जगात लोकशाही नांदू शकणार नाही, असे त्यांना वाटू लागले. या विषयावर शोधप्रबंध लिहिण्याचे हे स्थळ नव्हे. मात्र महायुद्धाच्या भयानक अपघाताच्याप्रसंगी मानवेंद्रनाथ रॉय यांनी ब्रिटिश व त्यांच्या युद्ध-उपक्रमांना पाठिंबा जाहीर केला. ही त्यांची भूमिका काँग्रेसच्या अगदी विरुद्ध होती. म्हणून संयुक्त प्रांत काँग्रेस समितीने त्यांच्यावर रीतसर कारवाई केली व त्यांना पक्षातून हाकलून लावले. महाराष्ट्रातील काँग्रेस समित्यांनीही रॉयवाद्यांचे पक्षातून उच्चाटन केले.

त्यामुळे डिसेंबर १९४० मध्ये रॉय, कर्णिक, मणिबेन कारा यांनी मुंबईत रॅडिकल डेमॉक्रॅटिक पक्ष स्थापन केला. या पक्षाने काही चांगल्या कामगार संघटना निर्माण केल्या. विशेषतः मुंबईतील मोठमोठ्या गोद्या, पोर्ट ट्रस्ट, संरक्षण क्षेत्रातील आस्थापना वगैरे क्षेत्रांमध्ये रॉयवादी नेत्यांच्या कामगार संघटना अत्यंत प्रभावी होत्या. त्यांचा भर संपाचे हत्यार कमीत कमी वापरून कामगारांचे हित संपादन करण्यावर होता.

❑❑

## संदर्भ


१. रिचर्ड न्यूमन, **वर्कर्स अँड युनियन्स इन बाँबे,** कॅनबेरा, पृ. ९२-९४.

२. कित्ता, पृ. १११-१२.

३. व्ही. बी. कर्णिक, **एन. एम. जोशी : द सर्व्हन्ट ऑफ इंडिया,** मुंबई, १९७२, पृ. ५०.

४. रविन्दरकुमार (संपा.), **एसेज ऑन द सोशल हिस्टरी ऑफ इंडिया,** १९८३, पृ. २१५.

५. य. दि. फडके, **विसाव्या शतकातील महाराष्ट्र,** खंड दुसरा, २००५, पृ. २३-२९.

६. मुंबई सरकार, होम डिपा. स्पेशल, फाईल क्र. ५४३ (२) डी.

७. कित्ता, फाईल क्र. ५४३ (२) ए.

८. कित्ता, गृह सचिव माँटगोमेरीचे टिपण.

९. के. के. चौधरी, **हिस्टरी ऑफ बाँबे**, महाराष्ट्र शासन, १९८७, पृ. १७६-८०.

१०. कित्ता, पृ. १८०-८२.

११. कित्ता, पृ. १८२-८३.

१२. न्यूमन, उपरोक्त, पृ. २०७-०९.

१३. चौधरी, उपरोक्त, पृ. १८२-८५.

१४. चौधरी, **ग्रेटर बाँबे गॅझेटिअर,** खंड दोन, महाराष्ट्र शासन, १९८७, पृ. ३३३-३७.

१५. फडके, उपरोक्त, खंड तिसरा, १९९१, पृ. १८.

१६. कर्णिक, **स्ट्राइक्स इन इंडिया,** मुंबई, १९६७, पृ. १९९-२००.

१७. **नागपूर जिल्हा गॅझेटिअर,** खंड १, मुंबई, २००५, पृ. ४७९-८०, ४९८.

१८. कित्ता, पृ. ५८२-८४.

१९. कित्ता.

२०. कित्ता, पृ. ५८४-८८.

२१. चौधरी, **हिस्टरी ऑफ बाँबे,** पृ. १६७-६८.

२२. **बाँबे क्रॉनिकल,** २९ जुलै १९३१.

२३. फडके, खंड ४था, १९९३, पृ. १०-११.

२४. हिंदुस्तान सरकार, होम पोलिटिकल, फाईल क्र. ७/२/१९३४, राष्ट्रीय अभिलेखागार, नवी दिल्ली.

२५. चौधरी, **क्रांतिपर्व : महाराष्ट्राचे योगदान,** मुंबई, २०१३, पृ. ५७-५८.

२६. कर्णिक, **स्ट्राइक्स इन इंडिया,** पृ. २७८, २८३.

२७. चौधरी, **जळगाव जिल्ह्यातील स्वातंत्र्यलढा,** मुंबई, १९९७, पृ. ९७-९८.

प्रकरण १०

## युवक व कम्युनिस्टांच्या चळवळी

पहिल्या जागतिक महायुद्धाच्या काळात बहुतेक गधर क्रांतिकारक व युगांतर शस्त्रवादी जहालांना सरकारने दमननीतीचा उपयोग करून कारावासात डांबले होते. अथवा त्यांच्यापैकी शेकडो एक तर परागंदा झाले वा भूमिगत झाले होते. तत्कालीन युवकांना मार्क्सवादाचेही आकर्षण वाटत होते. अनेक युवक रशियन राज्यक्रांतीने आणि लेनिनच्या यशामुळे भारावले होते. मात्र या वस्तुस्थितीची यथार्थ जाणीव असलेल्या ब्रिटिशांनी संकल्पित माँटेग्यू-चेम्सफर्ड राज्यसुधारणांना व सुधारणांच्या यशाला सुसंवादी असे वातावरण निर्माण करण्यासाठी व्यापक सर्वक्षमा करण्याच्या (ॲमनेस्टी) धोरणानुसार बहुसंख्यांना बंधमुक्त केले. सावरकरांसारखे फारच थोडे कारागृहांत होते. त्यानंतर अल्पावधीत महात्मा गांधींनी उपरोक्त असहकार चळवळ उभारली आणि सप्टेंबर १९२० मध्ये राष्ट्रीय काँग्रेसने डावपेचात्मक असहकारास सहमती घोषित केली. हा लढा राष्ट्रव्यापी झाला. गांधीजी, चित्तरंजन दास, मोतीलालजी आणि लजपतराय यांच्या आवाहनास प्रतिसाद देऊन बहुसंख्य शस्त्रवादी व जहाल पंथाचे युवक नवीन दमाच्या असहकारिता आंदोलनात मनोभावे उतरले होते. काहींनी गांधीजीप्रणीत जनआंदोलनास संधी देण्यासाठी भूमिगत कारवाया निलंबित केल्या होत्या. त्यांनी गांधीजींकडे मोठ्या आशाआकांक्षांच्या दृष्टीने पाहिले व चळवळीत स्वतःला झोकून दिले होते.

त्या वातावरणात जोगेशचंद्र चॅटर्जी, सूर्य सेन, जतिंद्रनाथ दास, चंद्रशेखर आझाद, सरदार भगतसिंग, सुखदेव, शिव वर्मा, भगवतीचरण व्होरा व जयदेव कपूर यांनी अहिंसात्मक असहकार चळवळीत उत्साहाने उडी टाकली होती. युवकांनी कोलकाता, बनारस, लाहोर, मुंबई, अहमदाबाद, पाटना आदी शहरांतील सरकारमान्य शाळा-कॉलेजांवर बहिष्कार घातला. काँग्रेसच्या राष्ट्रीय शिक्षण संस्थांमध्ये शेकडो युवक दाखल झाले होते. पंजाब, संयुक्त प्रांत, महाराष्ट्र व बंगालमधील शेकडो युवक राष्ट्रवादाने प्रभावित झालेले होते. त्यांच्यात अभूतपूर्व चैतन्य संचारले होते. असहकारामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला होता. गधरवादी युवकही काँग्रेसकडे

वळत होते. चळवळ मध्यम वर्गातून शेतकरी व कामकऱ्यांपर्यंत पोहोचली होती तथापि चौरी चौरा येथील हिंसाचाराचे निमित्त झाल्याकारणाने गांधीजींनी असहकार चळवळ निलंबित केली होती. याबाबतचे विवेचन वरील प्रकरणांमध्ये केलेलेच आहे. पण असहकार चळवळ जोरात असतानाच ती निलंबित केल्यामुळे जहालांचा मनोभंग झाला. एका अर्थाने त्यांचा तेजोभंग झाला. युवक गांधीजींवर रागावले. स्वतः जवाहरलाल नेहरूंनाही चळवळ खंडित करणे पसंत नव्हते.

अशा वातावरणात देशात वैचारिक अभिसरण व संघर्ष सुरू झाला. जहाल विचारप्रणाली असलेले युवक विविध पर्याय शोधू लागले. राष्ट्रीय काँग्रेसमध्ये गांधीनिष्ठ काँग्रेस आणि स्वराज्य पक्ष असे दोन मुख्य तट पडले. गांधीनिष्ठांचा रचनात्मक कार्यक्रम आणि लोकजागृतीचा कार्यक्रम जहालांना मानवणे शक्यच नव्हते तसेच स्वराज्य पक्षाचा सांविधानिक संघर्षाचा कार्यक्रम व कायदेमंडळांमधील झगडेही विफल असल्याचे जहालांना वाटत होते. या दोन्ही गटांचे राजकारण उपरोक्त युवा पुढाऱ्यांना आकर्षक वाटणे संभवनीय नव्हते. या वातावरणात युवाशक्तीचे ध्रुवीकरण झाले. त्यातून गांधीनिष्ठ असलेल्या अधिकृत काँग्रेसमध्ये जवाहरलाल नेहरू व सुभाषबाबूंचा एक गट निर्माण झाला. शस्त्रवादी क्रांतिकारकांच्या गोटातही पंजाब, संयुक्त प्रांत व बिहारमधील युवकांचा एक गट तयार झाला आणि बंगालमधील युगांतर व अनुशीलन समित्यांच्या जहालांचा दुसरा गट उत्पन्न झाला.

अशा परिस्थितीत राष्ट्रवादी विचारसरणीच्या युवकांचे नीतिधैर्य व उत्साह वाढविणे आणि त्यांची शक्ती राष्ट्रकार्यासाठी योग्यपणे चॅनलाईज करणे आवश्यक झालेले होते. काँग्रेसला पटले की, युवाशक्तीला दिशा दाखविणे अगत्याचे झालेले आहे. अन्यथा सुयोग्य दिशादर्शनाअभावी युवाशक्ती हिंसाचार आणि क्रांतिकारी शस्त्रवादाकडे झुकण्याची रास्त भीती होतीच. त्याच काळात जवाहरलालजींनी संयुक्त प्रांतात शेतकऱ्यांची चळवळ उभारून ती बहुतांश यशस्वी केली होती. सुभाषचंद्र बोस मोठे विद्यार्थी नेता म्हणून चमकले होते. हे दोघे युवावर्गाचे प्रतिनिधी व युवाशक्तीचे प्रतीक बनले होते. मदन मोहन मालवीयांची हिंदुसभा व स्वामी श्रद्धानंद यांचा ‘ हिंदू व हिंदी भाषा ’ हा नारा संयुक्त प्रांत व पंजाबमध्ये लोकप्रिय होत होता. यामुळे काँग्रेसची युवक आघाडी उभारणे काँग्रेसला अत्यंत गरजेचे वाटले.

## हिंदुस्तानी सेवादल

त्यानुसार डिसेंबर १९२३ चे काँग्रेस अधिवेशन काकिनाडा येथे चालू असताना अधिवेशनाला जोडूनच जवाहरलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय काँग्रेस स्वयंसेवकांची परिषद भरली. ज्येष्ठ काँग्रेसजनांना अधिवेशनात आणि नैमित्तिक सभा आयोजित करण्यासाठी स्वयंसेवकांची गरज भासतच असे. या व अशा अनेक कारणांसाठी प्रशिक्षित व शिस्तबद्ध तरुणांची पथके उभारणे अगत्याचे होऊन बसले होते. शिवाय काँग्रेसची विचारसरणी व प्रचारतंत्राची जाण असलेले स्वयंसेवक हवे होते. काँग्रेसमधील युवा नेत्यांनाही आपले प्रभावक्षेत्र वाढवायचे होते. म्हणूनत्यांचा आग्रह व ज्येष्ठांची गरज यानुसार काकिनाडा काँग्रेसमध्ये एक ठराव मंजूर करून पक्षाने ‘ हिंदुस्तानी सेवादल ’ स्थापन केला. मात्र हा सेवादल काँग्रेसच्या अधिकृत धोरणानुसारच चालवावा व त्यावर काँग्रेसचे पूर्ण नियंत्रण राहावे असे ठरविण्यात आले. त्यानुसार १९२४ मध्ये हिंदुस्तानी सेवादलाचे कार्य काँग्रेसची अधिकृत युवक आघाडी याच नात्याने सुरू झाले. काँग्रेसची विचारप्रणाली आणि कार्यपद्धती यानुसारच सेवादलाने काम करावे आणि काँग्रेस कार्यकारिणीचे सर्व आदेश पाळावे अशी अनेक बंधने पक्षाच्या मूळ ठरावात नमूद केलेली होती.

लोकशिक्षण व राष्ट्रीय प्रबोधन करणे आणि अधिकाधिक लोकांना चळवळीत उतरवणे व युवकांना आंदोलनासाठी सक्रिय करणे हे सेवादलाचे ध्येय होते. प्रशिक्षित व शिस्तबद्ध स्वयंसेवकांचा संघ उभारण्यासाठी तरुणांना विहित केलेले प्रशिक्षण देणे व प्रचार करणे तसेच देशभर शाखा उभारणे हेही उद्दिष्ट होते. काँग्रेसच्याच अंतर्गत राहून काम करण्याचे बंधन असल्यामुळे, या संघटनेची घटना पक्षाच्या कार्यकारिणीने विहित केली होती. प्रत्येक सभासदाला पक्षाशी बांधीलकी मान्य करून विहित प्रतिज्ञापत्रावर सही करावी लागे. काँग्रेस कार्यकारिणीच्या मुंबईतील बैठकीत सेवादलाच्या सभासदांचे वैचारिक व शारीरिक प्रशिक्षण, समाजसेवा व खादीचा प्रचार वगैरे रचनात्मक कार्य याविषयीचा आकृतिबंध तयार करण्यात आला. काँग्रेसचे अधिवेशन व समितीच्या बैठकांना जोडून दल-नायकांच्या बैठका होत असत. ठिकठिकाणी युवकांची शिबिरे भरविण्यात येत. आपत्तीच्या वेळी ते नागरिकांना मदत देत असत.

स्वातंत्र्य आंदोलनाच्या बहुसंख्य इतिहासकारांनी या सेवादलाकडे लक्ष दिलेले नाही. तथापि या सेवादलाने हजारो कार्यकर्ते घडविले हे सत्य होय. सावरकर बंधूंचा अभिनव भारत यासारखी ही गुप्त संघटना नव्हती. जाहीर शिबिरे व सभा भरवून जनजागृती करणे व विधायक कार्य करणे यावर सेवादलाचा भर होता. कवायती शिक्षण दिले जात असले, तरी अहिंसात्मक पद्धतीनुसार लढा देणे हे विहित केलेले धोरण होते. मात्र मुंबई सरकारला गुप्तचरांनी सादर केलेल्या काही अहवालांमध्ये नमूद केलेले प्रस्तुत इतिहासकारास आढळले की, सेवादलाच्या काही शाखांमध्ये तलवारी व पिस्तुलांचेही प्रशिक्षण दिले जाई. काही कार्यकर्ते गोवा व कोकणातून लहानसहान आयुधे मिळवत. काहींनी हातबाँब व पिस्तुल बनविण्याचे तंत्रज्ञान आत्मसात केले, असे गुप्तचरांच्या अहवालांमध्ये नमूद आहे. तथापि गुप्तचरांची अशी माहिती लोकप्रवादांवर आधारित असल्याने तिला महत्त्व देण्याचे कारण नाही.

अमेरिकेत वैद्यकीय शिक्षण घेतलेले डॉ. नारायण सुब्बाराव हर्डीकर हे युवकांचे पुढारी होते. काही इतिहासकार त्यांना हिंदुस्तानी सेवादलाचे पिता मानतात. इतके मात्र सत्य आहे की, प्रारंभापासून हर्डीकर हेच हिंदुस्तानी सेवादलाचे चिटणीस होते. मात्र जवाहरलाल नेहरू प्रारंभापासून या संघटनेचे अध्यक्ष होते. काँग्रेसचे सरचिटणीस असल्याने पक्षाने नेहरूंवर हिंदुस्तानी सेवादल आणि भारतातील सर्वच काँग्रेस स्वयंसेवक संघटनांवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी सोपविली होती[६].

अशा संघटनांमध्ये बेशिस्त झाल्यावर त्याबाबत सरदार पटेल वगैरे नेते नेहरूंकडे तक्रार करीत. अशा काही तक्रारी **वल्लभभाई पटेल संकलित वाङ्मयात** मला पाहायला मिळाल्या. नारायणराव हर्डीकरांनी स्थळांची निवड केल्याप्रमाणे अखिल भारतीय हिंदुस्तानी सेवादलाचे मुख्यालय मराठी भाषिक हुबळीत ठेवण्यात आले होते. लवकरच सेवादलाच्या शाखा देशभर उघडण्यात आल्या. ‘ कर्नाटक केसरी ’ गंगाधरराव देशपांडे हर्डीकरांना मार्गदर्शन करीत, मदत देत. हर्डीकरांनी भारतातील शेकडो स्वयंसेवकांना प्रशिक्षण दिले. त्यांत एकट्या कर्नाटकातील १७०० युवक होते. त्यांच्या बळावर गंगाधररावांनी गांधीजींना गळ घालून १९२४ चे काँग्रेसचे अधिवेशन जवळच्या बेळगावला भरवून यशस्वी केले. त्यांच्याच आग्रहानुसार या काँग्रेसचे अध्यक्षपद महात्मा गांधींनी भूषविले होते.

त्या काळी म्हैसूर संस्थानात काँग्रेस पक्ष नव्हता. ही पोकळी तिकडे हिंदुस्तानी सेवादलाने, काही अंशी, भरून काढली होती. म्हैसूर काँग्रेसच्या स्थापनेपूर्वी सेवादलाने काही कणखर काँग्रेसजन घडविले होते. मुंबई-कर्नाटकाच्या बेळगाव, धारवाड, विजापूर व उत्तर कॅनरा या चार जिल्ह्यांमध्ये सेवादलाच्या कार्यकर्त्यांनी १९३० आणि १९३२ सालांतील कायदेभंग आंदोलनात करबंदी मोहीम यशस्वी करून दाखविली होती. या शिस्तबद्ध स्वयंसेवकांनी सरकारी अधिकाऱ्यांना चकित केले होते. छोडो भारत आंदोलनातही सेवादलाच्या सभासदांनी जोरदार लढा दिला. पोलीस दलावर मात करून सातशे मुलांमुलींनी रेल्वे सेवा खंडित केली आणि बेळगावात विंस्टन चर्चिल साहेबांची प्रतिमा दहन केली.

हिंदुस्तानी सेवादलास प्रारंभीच्या काळात गणेश शंकर विद्यार्थी, सत्यभक्त, हसरत मोहानी, महेंद्र प्रताप, लाला हरदयाल व केशवराव जोगळेकर यांच्यासारखे डाव्या विचारसरणीचे पुढारीही मदत करीत. मुंबई सरकारच्या २० डिसेंबर १९२८ च्या गोपनीय अहवालात नमूद केलेले आम्हास दिसले की, संपूर्ण देशभर युवकांच्या संघटनांचे जाळे पसरले होते. त्यातील काही संघटना जर्मनी व इतर युरोपीयदेशांतील युवा संघटनांप्रमाणे अनुज्ञेय सामाजिक व शैक्षणिक कार्य करीत असल्या, तरी त्यांतील बहुसंख्य संघटना क्रांतिकारी विचारधारा आणि राजद्रोह पसरवत. जवाहरलाल नेहरूंसारखे जहाल युवा नेते प्रक्षोभक भाषणांद्वारे राजद्रोहाचा प्रचार करीत. नेटिव वर्तमानपत्रांमधून त्यांच्या भाषणांचे प्रसारण होत असल्याने तरुणांची डोकी भडकली आणि त्यातून सरकारच्या अधिकाराचा अधिक्षेप वाढत असल्याचे गुप्तचरांचे मत बनले. वयस्कर पुढाऱ्यांच्या मतांकडे दुर्लक्ष करून, युवा पिढीने आयर्लंड, इजिप्त व रशियातील पुढाऱ्यांप्रमाणे 'लिव्हिंग डेंजरसली' हा बाणा धारण करावा आणि ब्रिटिश सरकार उलथून टाकावे, असे आवाहन केले जात असे. १९२८ सालात नेहरू व सुभाषचंद्रांसारखे जहाल नेते युवकांच्या सभा ठिकठिकाणी भरवून सुसंघातपणे राजद्रोहाचे जोरदार आवाहन करतात, अशी तक्रार या अहवालात गुप्तचरांनी केलेली आम्हाला आढळली.[२]

मुंबई सरकारच्या गृह विभागाच्या गोपनीय अहवालातून दिसते की, जहाल युवकांच्या अगणित संघटना भारतभर कार्यरत होत्या. त्यापैकी काहींचा आयर्लंड व रशियातील संघटनांशी संपर्क होता. त्या राजद्रोहाचा प्रसार करण्यात व्यग्र होत्या. त्यांच्यामुळे राजद्रोहाचा प्रादुर्भाव वाढत गेला. नेहरू व सुभाषबाबू प्रक्षोभक भाषणे करून लोकांना भडकवत असत. संस्कारक्षम वयातील मुलांना चळवळीत ओढण्यात हे दोघे पुढारी अग्रेसर होते. १९२८ सालात युवकांच्या विराट सभा भारतभर गाजत होत्या. युवकांचे मन चेतवणे हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट होते. म्हणून गुप्तचर खात्याने नेहरू व सुभाषबाबूंच्या भाषणांची प्रतिवृत्ते लिहून घेऊन अगत्याने सरकारकडे पाठवत असत.[३]

हिंदुस्तानी सेवादल म्हणजे काँग्रेसच्या युवकांची क्रांतिकारक आघाडी होय, असा सरकारचा समज झाला. या संघटनेकडून युवकांना कवायतीबरोबर शस्त्राचाराचीही शिकवण दिली जाते, असाही सरकारचा गैरसमज झाला होता. वस्तुतः नारायण हर्डीकरांनी हा आरोप साफ फेटाळला होता. १८ जुलै १९२५ रोजी **बाँबे क्रॉनिकल** पत्रकानेही हा आरोप खोटा ठरविला. दलात कवायती शिक्षण दिले जात असले तरी, प्रत्येक सभासदाला अहिंसेची लेखी प्रतिज्ञा घेणे बंधनकारक होते. **व्हॉलंटिअर** हे या संघटनेचे मुखपत्र होते. त्यातील लिखाण चेतना निर्माण करणारे असले, तरी त्यात हिंसाचाराला उत्तेजन देणारे विचार नव्हते. ज्येष्ठ नेमस्त नेते मोतीलाल नेहरू वगैरे सेवादलास मार्गदर्शन करीत. त्यांनीही हिंसाचाराचा आरोप फेटाळून लावला होता.

ऑगस्ट १९२८ मध्ये काँग्रेसने विजापूर जिल्ह्यात ‘ हिंदुस्तानी सेवादल नॅशनल अकादमी ’ सुरू केली. जनजागृती, राष्ट्रीय शिक्षण व शरीर स्वास्थ्य संवर्धन आणि काँग्रेसचा रचनात्मक कार्यक्रम राबविणे हे या संघटनेचे ध्येय होते. नोकरशाहीच्या दडपशाहीमुळे संघटनेचे कार्य मधून मधून थंडावत असे. वित्तबळाच्या अभावी सेवादलाचे काम चालू ठेवणे अवघड होते, हे कबूल करावेच लागते. रुग्णसेवा या उद्दिष्टासाठी डॉ. हर्डीकर नेहमीच झटत. चीनमध्ये चालू असलेल्या स्वराज्य आंदोलनात कित्येक स्वातंत्र्य सैनिक जखमी होत. पण तेथील सरकार त्यांच्यासाठी उपचार करीत नसे. म्हणून चीनमधील अशा जखमींवर उपचार करण्यासाठी सेवादलाने

प्रशिक्षित पथक उभारले होते. तथापि या पथकाला पारपत्र देण्यास हिंदुस्तान तसेच मुंबई सरकारने नकार दिला होता.[४]

संदर्भाधीन सरकारी फायलीत हिंदुस्तानी सेवादलाचे उद्दिष्ट व काँग्रेसने विहित केलेला अभ्यासक्रम, सभासदांनी सही करावयाचे प्रतिज्ञापत्र (अहमदाबाद प्लेज), नियमावलीत कार्यकारिणीने केलेले वेळोवेळीचे बदल, डॉ. हर्डीकरांचा व **बॉंबे क्रॉनिकलचा** मूळ खुलासा आणि **हिंदुस्तान टाइम्स** व फॉरवर्ड या पत्रकांचे भाष्य अवतरणामध्ये दिलेले आहे. मात्र विस्तारभयामुळे त्यांतील तपशील इथे देणे शक्य नाही. पंडित मोतीलाल नेहरूंनी सभासदांच्या स्वार्थत्याग भावनेचे केलेले कौतुकही या फायलीत नमूद आहे. या सेवादलाच्या सेवाकार्यासाठी वाहून घेतलेले स्वयंसेवक मिळवणे प्रायः अवघड होते. कारण स्वयंसेवकांकडून लोकसेवा करून घेण्यात येई; मात्र त्यांना मोबदला देण्यात येत नसे.

१९३० च्या कायदेभंग आंदोलनात काँग्रेस अध्यक्ष जवाहरलालजी यांनी हिंदुस्तानी सेवादलावर फार मोठी जबाबदारी टाकली होती. गृह विभागाने केलेल्या गोपनीय टिपणात नमूद केलेले आम्हाला आढळले की, गाजावाजा न करता शांतपणे प्रशिक्षण दिलेल्या या स्वयंसेवकांना नेहरूंनी 'सोल्जर्स ऑफ फ्रीडम' बनवून त्यांना कामाला जुंपले. त्यांनी नेतेपदाची अभिलाषा न बाळगता पडेल ते राष्ट्रकार्य केले. गुप्तचरांनी इंटरसेप्ट केलेल्या पत्रव्यवहारातून मुंबई सरकारला समजले की, कायदेभंगाचा कार्यक्रम ठरविण्यासाठी अहमदाबादमध्ये भरलेल्या काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत (१४-१६ फेब्रुवारी १९३०) हर्डीकरांना मुद्दाम बोलावून घेतले होते. स्वयंसेवकांची कार्यक्षम पथके उभारण्याची जबाबदारी त्यांचेवर सोपविण्यात आली होती. महात्मा गांधींच्या सूचनेनुसार सेवादलाच्या सर्व शाखांना सखोल मार्गदर्शक सूचना देणारे परिपत्रक स्वतः हर्डीकरांनी पाठवून चोख यंत्रणा उभारली. काँग्रेसच्या विचारप्रणालीशी बांधीलकी मानून प्रतिज्ञा घेण्याचे बंधन सर्व स्वयंसेवकांवर घालण्यात आले. प्रत्येक जवानाने अहिंसेचे पालन करणे अनिवार्य होते. प्रत्येकाला खादीचे कपडे वापरणे बंधनकारक होते. संपूर्ण स्वातंत्र्यासाठीच्या या आंदोलनात शांतपणे कारावास भोगण्यासाठी तत्पर असण्याचेही स्वयंसेवकांवर बंधन होते.

हिंदुस्तानी सेवादलाच्या या सैनिकांनी प्रारंभापासून मिठाच्या सत्याग्रहात भाग घ्यावा असे ठरलेले होते. हिंदुस्तानी सेवादलाच्या अखिल भारतीय मंडळाच्या आदेशानुसार सर्व पथके प्रांतिक मंडळाच्या नियंत्रणाखाली कार्यरत करण्यात आली.[५]

अखिल भारतीय काँग्रेस समितीकडून सेवादलास अर्थसाहाय्य मिळत असे. पण देणगीदारांकडूनही पैसा मिळवावा लागे. सेवादलास राजकीय दरोड्यांद्वारे निधी मिळत असल्याचा मुंबई सरकारचा आरोप राजनिष्ठ लोकांच्या असत्य माहितीवर आधारलेला होता. बंगाली क्रांतिकारक शंभुनाथ डे स्वतः सेवादलाच्या हुबळीतील मुख्यालयात जानेवारी १९२४ मध्ये येऊन गेल्यापासून गुप्तचरांचे संनिरीक्षण सरकारने कायमठेवले होते. सेवादलाचे काही कार्यकर्ते कम्युनिस्ट विचारसरणीचे होते. तर काही सभासद हिंदुस्तान असोसिएशन ऑफ अमेरिका तसेच फ्रान्स आणि जर्मनीतील क्रांतिकारकांकडून आर्थिक मदत मिळवत असत.[६]

## नौजवान भारत सभा

१९२६ पासून नौजवान भारत सभा ही भारतातील अग्रेसर जहाल मतवादी व क्रियाशील युवा संघटना होती. प्रारंभापासून तिच्यावर गधर पक्षाच्या विचारप्रणालीचा प्रभाव होता. वस्तुतः ही संघटना म्हणजे सरदार भगतसिंग, चंद्रशेखर आझाद व सुखदेव यांच्या हिंदुस्तान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मीचे प्रकट स्वरूप होते. आर्मीचे कार्य प्रामुख्याने गुप्तपणे चाले, तर नौजवान सभा उघडपणे प्रचार करीत असे. पंजाबातील कीर्ती किसान पक्षाचीही मूलभूत विचारसरणी या दोन्ही संघटनांसारखीच होती. त्यामुळे संपूर्ण स्वातंत्र्याचे उद्दिष्ट आणि शेतकरी वर्गाचे हक्क या मुद्यांवर या तिन्ही संघटना एकजुटीने कार्य करीत. भाई संतोकसिंग, सोहनसिंग जोश, सरदार भगतसिंग व डॉ. सत्यपाल हे नौजवान सभेचे पुढारी मानले जात. चंद्रशेखर आझाद गुप्तपणे सूत्रे हलवत. नौजवान भारत सभा केवळ पंजाबातील नव्हे तर बहुतांश उत्तर भारतातील युवकांची मध्यवर्ती संघटना होती असे आम्हाला सरकारी दस्तऐवजांमधून आढळले. अमृतसरमध्ये तिचे मुख्यालय असून पंजाबच्या सर्व शहरांमध्ये शाखा होत्या.

मुंबई शहरातही नौजवान भारत सभेची शाखा सक्रियपणे चळवळ करीत होती. कम्युनिस्ट व डाव्या विचारसरणीच्या काँग्रेसजनांचे, कार्यक्रमाच्या दृष्टीने, नौजवानांशी सख्य व जवळीक होती. त्यामुळे स्वाभाविकपणे कॉ. डांगे, केशव जोगळेकर, के. एफ. नरिमन, मेहेरअली, पुरषोत्तम त्रिकमदास, र. के. खाडिलकर, न. वि. गाडगीळ वगैरे नौजवान सभेच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होत असत. मुंबई व पुण्यातीलबरेच कॉलेज विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून काम करतात, असे गुप्तचरांचे अहवाल सांगतात

**सरदार भगतसिंग व साथींचा हा पक्ष मूलतः क्रांतिकारी समाजवादी व निखळ धर्मनिरपेक्षतावादी होता. आर्थिक व सामाजिक परिवर्तन घडविणे हे या पक्षाचे उद्दिष्ट होते. भगतसिंगांनी क्रांतिवादाचा जयघोष केला तो या उद्दिष्टपूर्तीसाठी! त्यांच्या विचारपंथाच्या कोणाही क्रांतिकारकाने फासावर चढताना, इतरांप्रमाणे भगवद्‌गीतेचे पठण केले नाही किंवा देवाचे नाव घेतले नाही !**

नवोदित युवक चळवळीत भारतात दोन प्रवर्ग निर्माण झाले. त्यांच्यात काही साम्य व भेद होतेच. पहिल्या प्रवर्गात निखळ मार्क्सवादी व धर्मनिरपेक्षतावादी सरदार भगतसिंग, चंद्रशेखर आझाद वगैरेंच्या हिंदुस्तान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मीचा समावेश होता. या मंडळींना भगतसिंगांचे सख्खे काका सरदार अजितसिंग परदेशातूनही आर्थिक मदत पाठवत. ब्रिटिशांनी हद्दपार केलेले अजितसिंग भारताच्या पहिल्या स्वातंत्र्यदिनाला डलहौसीला परत आले. असो. दुसरा प्रवर्ग जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र, युसुफ मेहेरअली, नारायणराव हर्डीकर या काँग्रेसमधील युवा नेत्यांचा होता. पहिल्या प्रवर्गात महाराष्ट्रातील शिवराम हरी राजगुरू, विश्वनाथ गंगाधर वैशंपायन, दत्तात्रय बळवंत करंदीकर, श्रीराम बळवंत सावरगावकर, काशीनाथ विठ्ठल सहस्रबुद्धे इ. होते. दुसऱ्या पक्षात केशवराव जोगळेकर, डांगे, धुंडीराज ठेंगडे, लालजी पेंडसे, रघुनाथ शिवराम निंबकर, के. एन. फडके, मिरजकर वगैरे कम्युनिस्ट आणि न. वि. गाडगीळ, रघुनाथ के. खाडिलकर, अनंत काणेकर, एस. एम. जोशी, आर. बी. चिकेरूर वगैरे होते. या दोन्ही विचारप्रवाहांमध्ये ज्या बाबींमध्ये एकमत होते त्या म्हणजे काँग्रेसने ' संपूर्ण स्वातंत्र्य ' हे ब्रीदवाक्य निर्धारित करणे ; मार्क्सवादी समाजवादी विचारप्रणाली स्वीकारणे; धर्मवादी अथवा मूलतत्त्ववादी मंडळींचे

काँग्रेसमधून उच्चाटन करणे आणि ब्रिटिशांविरुद्ध अधिक तीव्र लढा उभारणे. सांविधानिक मागण्यांचा मार्ग त्यांना मान्य नव्हता.

काँग्रेसच्या परिसीमेतही वावरणारे 'प्रतियोगी सहकार' या कार्यपद्धतीचा पुरस्कार करणारे स्वराज्य पक्षाचे पुढारी आणि घटनात्मक सुधारणांवर भर देणारे बॅ. जयकर व न. चिं. केळकर यांच्यासारखे अनियतरूप व सत्ताभिलाषी नेते यांना काँग्रेसने थारा देऊ नये, अशी वरील दोन्ही पक्षांची ठाम भूमिका होती. त्याचप्रमाणे काँग्रेसच्या परिसीमेत वावरणारे मदन मोहन मालवीय, तेजबहादूर सप्रू, स्वामी श्रद्धानंद, ल. ब. भोपटकर, डॉ. मुंजे, माधव श्रीहरी अणे वगैरेंनाही काँग्रेसने थारा देऊ नये, अशी या दोन्ही गटांची मागणी होती. त्यांना हवी होती समाजवादी व धर्मनिरपेक्ष लोकशाही.

## युवकांच्या परिषदा

हिंदुस्तानी सेवादलाच्या आकृतिबंधानुसार भारतभर युवकांचे संघ, यूथ लीग व युवकांच्या सोसायट्या निर्माण झाल्या. त्याव्यतिरिक्त अनेक जाती संघटना अस्तित्वात आल्या. हिंदू महासभा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखा निर्माण झाल्या. राष्ट्रप्रेम जागृत करणे हे सर्वच संघटनांचे एक समान उद्दिष्ट होते. तथापि त्यांच्या विचारव आचारप्रणालीत खूपच फरक होता. युसुफ मेहेरअली यांनी १९२५ साली समाजवादी विचारप्रणाली व धर्मनिरपेक्षता या विचारधारेशी बांधीलकी मानणाऱ्या प्रवर्गात मोडणारी **'यंग इंडिया सोसायटी'** मुंबईत स्थापन केली होती. युवकांमध्ये जागृती करणे व स्वातंत्र्य चळवळीचा प्रसार करणे हे या सोसायटीचे ध्येय होते. मुंबईतील महाविद्यालये व विशेषतः विल्सन कॉलेजमध्ये राष्ट्रवादी युवकांचा एक प्रागतिक गट होता. या सोसायटीला व्यापक स्वरूप देण्याच्या उद्देशाने मेहेरअली आणि के. एफ. नरिमन यांनी तिचे रूपांतर १९२७ सालात **'बॉंबे यूथ लीग'** मध्ये केले. या संघटनेने मुंबई, पुणे व संपूर्ण इलाख्यातील अनेक शहरांमध्ये युवक चळवळीस मुक्त व्यासपीठ उपलब्ध करून दिले. त्यामुळे मुंबई-पुण्यातील जागृत तरुण अशा संघटित चळवळीकडे ओढले गेले.

१९२७ च्या मद्रास काँग्रेस अधिवेशनाला जोडूनच जवाहरलाल नेहरू, सुभाषबाबू, केशवराव जोगळेकर वगैरे काँग्रेसमधील तरुण आणि कम्युनिस्टांनी ' यूथ काँग्रेस कॉन्फरन्स ' भरविली. दिनांक २३-२४ डिसेंबर १९२७ च्या या मद्रास परिषदेचा मूळ उद्देश काँग्रेस पक्षाचे ब्रीदवाक्य बदलण्यासाठी पक्षश्रेष्ठींवर दबाव आणणे हा होता. गोपाळ कृष्ण गोखले व टिळकांना अभिप्रेत असलेली स्वराज्याची संकल्पना फारच मर्यादित होती. **ब्रिटिशांना हिंदुस्तानातून घालविणे टिळकांना कधीच अभिप्रेत नव्हते.** पूर्ण स्वातंत्र्याची पुसटशी कल्पना सर्वप्रथम मांडली होती स्वातंत्र्यवीर सावरकर आणि युगांतर क्रांतिकारकांनी! पण त्यांच्या चळवळीस वेगळेच वळण लागले होते. त्यानंतर नोव्हेंबर १९१३ मध्ये गधर क्रांतिकारकांनी ' पूर्ण स्वराज्याची ' संकल्पना अधिक स्पष्ट केली. पुढे महात्मा गांधींनी काँग्रेसला ब्रीदवाक्य दिले. पण त्यातही ' संपूर्ण स्वातंत्र्य ' अशी संकल्पना स्पष्ट नव्हती! या ध्येयधारणेत बदल करून काँग्रेसचे ध्येय ' संपूर्ण स्वातंत्र्य ' मिळवणे हेच आहे, असा निःसंदिग्ध बदल देशातील प्रागतिक युवकांना पाहिजे होता. त्यासाठी मद्रासमधील युवक परिषदेत (१९२७) जोरदार आग्रह करण्यात आला होता. या परिषदेपासून युवक आंदोलनास व्यापक राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले आणि त्याचबरोबर युवक आंदोलनाचे नवे पर्व सुरू झाले. संपूर्ण हिंदुस्तानात आणि विशेषतः मुंबई व बंगाल इलाखे व पंजाब आणि उत्तर प्रदेशात यूथ लीग, असोसिएशन, संघ वा युनियन अशा नावांनी अनेक संघटना निर्माण झाल्या.

१९२७ च्या मद्रास अधिवेशनातच काँग्रेस श्रेष्ठींना युवाशक्ती जागृत झाल्याची स्पष्ट कल्पना आली. या अधिवेशनानंतर लगेच २१ व २२ जानेवारी १९२८ रोजी नरिमन, मेहेरअली, नरहर विठ्ठल गाडगीळ, डांगे, जोगळेकर, धुंडीराज ठेंगडी, मिरजकर वगैरेंनी मुंबईत इलाखा युवक परिषद भरवली. या परिषदेतच सुप्रसिद्ध **' बॉंबे प्रेसिडेन्सी यूथ लीग '** स्थापन करण्यात आली. इलाखा स्तरावरील या लीगमध्ये गाडगीळ, आ. रा. भट, एस. बी. शृंगारपुरे, नरिमन व मेहेरअली यांच्याबरोबर कम्युनिस्ट पुढारी खूप क्रियाशील होते. लीगचे पहिले अध्यक्ष बॅ. नरिमन, तर उपाध्यक्ष गाडगीळ आणि सरचिटणीस मेहेरअली होते. फेब्रुवारीच्या १८ व १९

तारखांना मुंबईच्या उपनगरांमधील तरुणांनीही बाळ गंगाधर खेरांच्या अध्यक्षतेखाली मराठी युवकांची परिषद भरवली. लालजी पेंडसे व साहित्यिक अनंत काणेकर यांचाही तिच्यात पुढाकार होता.[७]

युरोप व रशियात जाऊन आल्यावर जवाहरलाल नेहरूंनी **' इंडिपेंडन्स ऑफ इंडिया लीग '** स्थापन करून (१९२८) पुरोगामी समाजवाद व मार्क्सवादाचे विचारप्रवर्तन सुरू केलेले होते. मेहेरअली, नरिमन व जमनादास मेहता यांनी या संघटनेची शाखा मुंबईत स्थापन केली (२७ ऑक्टोबर १९२८). इथे नमूद करावेसे वाटते की, राजकीय जीवनातील पहिली तेरा-चौदा वर्षे जवाहरलाल नेहरूंवर मार्क्सवादी विचारप्रणालीचा मोठा प्रभाव होता. मात्र भारतीय राजकीय व सामाजिक वास्तव आणि मर्यादा पूर्णपणे लक्षात आल्यावर, तो प्रभाव पुढील काळात कमी झाला. तथापि धर्मवादी मंडळी आणि भांडवलशाहीविषयी त्यांना हयातभर तिरस्कार वाटत होता. असो. या सर्व संघटनांच्या सहकार्यातून यूथ लीगची नवीन पुरोगामी चळवळ आकार घेऊ लागली.

३ मे १९२८ रोजी पुण्यात भरलेली महाराष्ट्र प्रांतिक परिषद ही तर उघडउघड युवकांची परिषद होती. परिषदेसाठी सुभाषचंद्र बोस यांना मुद्दाम बोलावलेहोते. त्यांच्या उपस्थितीमुळे युवकांमध्ये उत्साह संचारला, आणि पुण्यात सुभाषबाबूंचा मोठा चाहता वर्ग निर्माण झाला. तेव्हापासून अखेरपर्यंत बाबूजींना मानणारा युवा वर्ग पुण्यात होता. त्यामुळे त्यांना काँग्रेसचे अध्यक्षपद लाभावे यासाठी पुढील काळात पुणेकरांनी जबरदस्त आग्रह धरला. पुढे काँग्रेस अध्यक्षपदाच्या दोन्ही वेळच्या निवडणुकींमध्ये पुण्याने सुभाषचंद्रांना उत्तम पाठिंबा दिला. त्यांच्या लोकप्रियतेचे आणखीही एक कारण होते. प्रारंभी सुभाषबाबू जहालमताचे नसूनही त्यांना १८१८ च्या रेग्युलेशन (तीन) या दडपशाहीच्या अत्यंत जुनाट कायद्याखाली अटक करून मंडालेच्या कारागृहात डांबून ठेवण्यात आले होते. वैद्यकीय कारणास्तव त्यांना अडीच वर्षांनंतर १६ मे १९२७ रोजी मुक्त केले होते. नंतर त्यांनी ' अखिल बंगाल युवक परिषदेचे ' अध्यक्ष या नात्याने बंगालमध्ये युवा चळवळ उभारली होती. आय.सी.एस. संवर्गातील नोकरीचा त्याग करून सुभाषबाबू स्वातंत्र्य चळवळीत उतरलेले होते.

हिंदुस्तानातील कोणत्याही राज्यापेक्षा मुंबई इलाख्यात अहिंसावादी चळवळ अधिक वेगात व जोमदारपणे फोफावली. मुंबई सरकारने या चळवळीचा धसका घेऊन युवकांच्या कारवायांची माहिती मिळविण्यासाठी पोलिसांचे खबरे नेमले होते. अशा खबऱ्यांची नरिमन, मेहेरअली, गाडगीळ, र. के. खाडिलकर व सर्वच कम्युनिस्टांवर करडी नजर असे. युवक पुढाऱ्यांना आलेली पत्रे इंटरसेप्ट करण्यात येत. विशेषतः नेहरू व सुभाषबाबूंची पत्रे फोडून वाचण्यात येत.[९]

पुणे यूथ लीगच्या विद्यमाने बॉंबे प्रेसिडेन्सी यूथ लीगचे अधिवेशन १२ व १३ डिसेंबर १९२८ रोजी पुण्यात भरले होते. नियोजित अध्यक्ष जवाहरलाल नेहरू यांचे पुण्यात आगमन झाल्यावर दोन हजारांवर विद्यार्थ्यांनी विलक्षण उत्साहात त्यांची मिरवणूक काढली होती. लाल बावटा आणि राजद्रोहात्मक फलक असलेली ही मिरवणूक पुणे शहरभर फिरली होती. तिच्यातील प्रक्षोभक घोषणा ऐकून पोलीसही स्तंभित झाले होते. या परिषदेच्या प्रारंभापासून तिची सांगता होईपर्यंत पुण्यात क्रांतिकारी आवेश होता. अध्यक्ष नेहरूंचे भाषण राजद्रोहात्मक व कम्युनिस्ट वळणाचे असल्याची गुप्तचरांनी नोंद घेतली होती. युवकांमध्ये क्रांतिकारी विचारप्रणालीनिर्माण करणे हेच या परिषदेचे उद्दिष्ट होते. स्वातंत्र्यासाठी हिंसाचाराचे समर्थन न करता आक्रमक राष्ट्रवादाची शिकवण देणे हे या युवा नेत्यांचे ध्येय होते.[१०]

१८५७ च्या विद्रोहाचे स्मरण करण्यासाठी १० मे हा विद्रोहाचा स्मरणदिन दरवर्षी साजरा करण्याचा या अधिवेशनात निर्णय झाला. लालाजींच्या निधनाच्या पार्श्वभूमीवर ब्रिटिशांविरुद्ध संताप व्यक्त होणे स्वाभाविकच होते. विशेषतः नेहरू व मेहेरअली यांनी पुण्यात क्रांतिवादी वातावरण निर्माण केले, असा मुंबई सरकारचा ठाम समज झाला. विशेष म्हणजे गुप्तचरांचा हा अहवाल लाहोरात झालेल्या सॉंडर्सच्या वधापूर्वी लिहिलेला होता.

पुण्यातील या परिषदेत वयस्कर नेते न. चिं. केळकर, शि. म. परांजपे व ल. ब. भोपटकर हजर असूनही, त्यांनी श्रवणभक्तीपलीकडे काहीच केले नव्हते. यावरून युवक नेत्यांनी त्यांना निष्प्रभावित करून बाजूला सारले असा सरकारने निष्कर्ष काढला होता. आणि तो बरोबरच होता. कारण त्याआधी केळकर व भोपटकर

काँग्रेसमध्ये असूनही हिंदुमहासभेत सामील झालेले होते. त्यामुळे पुरोगामी युवकांनी त्यांना लांब ठेवले. पुण्यातील या परिषदेत पुढील ठराव करण्यात आले :–(१) १८५७ चा वर्धापनदिन दरवर्षी साजरा करावयाचा ; (२) लालाजींच्या निधनाचा जनजागृतीसाठी उपयोग करून घेणे ; (३) आर्म्स ॲक्टचा निषेध ; (४) यूथ गार्ड्स निर्माण करणे ; (५) संपूर्ण स्वातंत्र्य हे काँग्रेसचे क्रीड निर्धारित करणे ; आणि (६) आयर्लंड, इजिप्त व चीनमधील आंदोलनांचा आदर्श समोर ठेवणे. परिषदेत न. वि. गाडगीळ व नेहरूंनी केलेली भाषणे गुप्तचरांना अत्यंत प्रक्षोभक वाटली होती. गुप्तचरांनी मुंबई सरकारला सादर केलेल्या नेहरूंच्या भाषणातील निवडक वाक्यांवरून भाषणाचा टोन समजतो.

" The problem before us is the problem of the conquest of power..... The fundamental fact of the situation is the bayonet and baton. How can you argue or be sweetly reasonable with cold steel or dead wood ? ....... The voice that claims it (freedom) must be the voice of revolt, the dull and threatening roar from a hundred thousand and a million throats, not the sweetly modulated tones of an accomplished debater. When that voice is raised, England...... will bow to the inevitable "[१०].

पुण्यातील या परिषदेपासून ब्रिटिश नोकरशाही नेहरूंना ' डेंजरस यंग मॅन ' हे विशेषण लावू लागली. तेव्हापासून नेहरू, मेहेरअली आणि न. वि. गाडगीळांवर गुप्तचर करडी नजर ठेवू लागले. यूथ लीग अधिक सक्रिय झाली. वयस्कर काँग्रेस नेत्यांना यूथ लीगच्या चळवळींची दखल घ्यावी लागली. या लीगमुळे आ. रा. भट, रघुनाथराव के. खाडिलकर, नारायण ग. गोरे, श्रीधर पुरुषोत्तम लिमये, एस. एम. जोशी वगैरे तरुण स्वातंत्र्य चळवळीत ओढले गेले. एस. एम. जोशी पुणे यूथ लीगचे चिटणीस होते. त्यांनी आपल्या आत्मचरित्रात नोंद केल्याप्रमाणे याच परिषदेपासून " खऱ्या अर्थाने मी सार्वजनिक जीवनात भाग घेऊ लागलो."[११]

ज्या काळात श्री. म. जोशी, ना. ग. गोरे, र. के. खाडिलकर वगैरे युवक राजकारणाची दीक्षा घेत होते, त्या काळात नौजवान भारत सभा, सरदार भगतसिंग, केदारनाथ सेहगल, जवाहरलालजी व सुभाषचंद्र बोस हे सर्वच उपलब्ध उपाय योजून नवीन युवकांची जडणघडण करीत होते. मुंबई सरकारच्या **पोलीस ॲबस्ट्रॅक्टस् ऑफ इंटेलिजन्समध्ये** प्रस्तुत इतिहासकारास अनेक पत्रकांचा उल्लेख आढळला. ती पत्रके प्रामुख्याने पंजाब व संयुक्त प्रांतातून आलेली होती. एका बाजूने ब्रिटिश सरकारने ' फोडा आणि झोडा ' ही राजनीती अवलंबिली होती ; विशेषतः हिंदू व मुसलमान यांच्यामध्ये सतत तेढ राहावी यासाठी सरकारच्या कारवाया चालू होत्या. तर दुसऱ्या बाजूने हिंदुत्ववादी मंडळी शुद्धी व धर्माचे संघटन या कामावर भर देत. यासाठी वि. दा. सावरकर **श्रद्धानंदमधून** निनावी लेख लिहीत. त्यांनी रामप्रसाद बिस्मिल यांच्या हौतात्म्याचे कौतुक करणारा लेख लिहिला. तथापि रामप्रसादांचे सहकारी व मित्र व शूर क्रांतिकारक असलेले हुतात्मा अशफाकउल्ला खान यांचा सावरकरांनी एका शब्दानेही उल्लेख केला नाही. वस्तुतः या महान शायराचीच विलक्षण स्फूर्तिदायक कवने म्हणतच रामप्रसाद बिस्मिल, भगतसिंग वगैरे महान क्रांतिकारक आवेशाने फासावर चढले. या पार्श्वभूमीवर तत्कालीन युवकांची धर्मनिरपेक्षतावादी व समाजवादी जडणघडण महत्त्वाची होती.

या दृष्टीने महाराष्ट्रात युसुफ मेहेरअली, केशवराव जोगळेकर, कॉ. डांगे, धुंडीराज ठेंगडी आदींनी प्रयत्न केले. एस. एम. जोशी, ना. ग. गोरे आणि खाडिलकर यांनाही मेहेरअलींनी मांडलेली भूमिका पटली. त्यामुळे हे तिघे यूथ लीगचे सभासद झाले काही काळ हिंदुत्ववादाचे आकर्षण वाटणाऱ्या एस. एम. जोशींच्या जीवनाला यूथ लीगमुळे आमूलाग्र वेगळे वळण लागले होते. यूथ लीगने पुढील प्रतिज्ञा विहित केलेल्या होत्या :— (१) भारताला संपूर्ण स्वातंत्र्य मिळावे यासाठी लढणे, (२) जातीयवादाशी लढा देणे व (३) केवळ स्वदेशी वस्तूंचाच उपयोग करणे.

खादीचा पोशाख केलेले सेनापती बापट बोलताना त्यांच्या शब्दांतून अंगार फुलत असे. त्यांनी स्वराज्य चळवळीची सांगड आर्थिक राष्ट्रवादाशी घातली होती हे विशेष होय. पुण्यातील उपरोक्त युवक परिषद व तेव्हा आलेला जवाहरलाल नेहरूंचा संपर्क

आणि नेताजींशी जमलेली जवळीक यांतून पुण्यातील युवकांची वैचारिक भूमिका घडली. मात्र यांच्यापेक्षा पुण्याच्याच श्रीधर पुरुषोत्तम ऊर्फ शिरुभाऊ लिमयेंची वैचारिक भूमिका वेगळी होती. त्यांना क्रांतिकारकांविषयी विलक्षण आकर्षण होते. त्यांच्यावर काशी विद्यापीठातील आचार्य नरेंद्र देव यांचा वैचारिक प्रभाव होता. ते चंद्रशेखर आझादांनाही भेटले होते. मेहेरअलींचे कार्य आणि त्यांची बुद्धिमत्ता व उमदा स्वभाव यामुळे ते मुंबईतील विद्यार्थांमध्ये प्रिय झालेले होते. तसेच मेहेरअली पुण्यातही लोकप्रिय झालेले होते. त्यातून पुण्यात राष्ट्रकार्य करण्याची भावना निर्माण झाली.

न. चिं. केळकर हे **केसरीचे** संपादक या नात्याने गांधीजींच्या विरोधी अशी नकारात्मक भूमिका मांडत. तथापि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात राज्यशास्त्र शिकविणारे आचार्य शंकर दत्तात्रय जावडेकर **लोकशिक्षण** या मासिकातून लेख लिहून न. चिं. केळकरांच्या भूमिकेचे प्रभावीपणे खंडन करीत. लोकमान्य टिळकांचा वारसा चालवण्यास केळकर समर्थ नसून तो महात्मा गांधीच चालवत आहेत, असे त्यांनी ठाम प्रतिपादन केले होते. जावडेकरांची ही भूमिका जोशी, गोरे, खाडिलकर व लिमयांना मनोमन पटली. केळकरांची संकुचित हिंदुत्ववादी भूमिका ही स्वातंत्र्य चळवळीला विघातक आहे, याबद्दल जोशी, गोरे आणि खाडिलकर यांचे एकमत झाले. पुण्यातील हे चार-पाच युवक आणि मुंबईतील मेहेरअली, मिनू मसानी व डांगे यांची पुरोगामी व सर्वसमावेशक वैचारिक भूमिका तयार झाली.

याच सुमारास महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय जीवनात विठ्ठल रामजी शिंदे यांच्यामुळे आणखी एक विचारप्रवाह निर्माण झाला. शिंदे यांनी महात्मा गांधींची सर्वांगीण पुरोगामी भूमिका स्वीकारली, आणि त्यांनी बहुजनसमाजाला काँग्रेसच्या स्वातंत्र्य चळवळीत आणण्याचे प्रयत्न केले. स्वातंत्र्यलढ्याच्या मुख्य प्रवाहाबाहेर राहाणे जसे राष्ट्रहिताचे नाही तसेच बहुजनसमाजाच्याही हिताचे नाही, असे त्यांनी अनेकदा कळकळीचे आवाहन केले होते. 'स्वातंत्र्यासाठी चळवळ करताना आपण समाजातील दोष दूर केले पाहिजे आणि अस्पृश्यतेचे निर्मूलन केले पाहिजे', या गांधीजींच्या भूमिकेचा शिंदे यांनी मनोभावे प्रचार केला. त्यामुळे वर्गीय हितवादी

मंडळींच्या गैरसमजांचा ससेमिरा आयुष्यभर महर्षी शिंदे यांच्या पाठीमागे लागलेला होता. तथापि हे सत्यच आहे की, त्यांच्या समाजसुधारणा कार्याविषयी महाराष्ट्रात मोठा आदर होता व आजही आहे. शिंदे यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे केशवराव व बाबुराव जेधे हे बहुजनसमाजाचे तडफदार नेते काँग्रेसकडे आकर्षित झाले. टिळकांचा राष्ट्रवाद आणि आगरकरांचा विवेकाधिष्ठित सुधारणावाद या दोन्ही भूमिका एकत्र असल्या पाहिजेत असे जोशी, गोरे आणि खाडिलकरांना वाटत होते. महर्षी शिंदे यांनीही तीच भूमिका सुस्पष्टपणे मांडल्यामुळे या तिन्ही युवकांच्या विचारांमध्ये अधिक स्पष्टपणा आला. अशा व्यापक वैचारिक भूमिकेवरूनच या तीन तरुणांनी पुणे यूथ लीग स्थापन करून स्वातंत्र्यलढ्यास योगदान दिले.[१२]

केशवराव जेधे, खंडेराव बागल, नाना पाटील व केशवराव विचारे वगैरेंना काँग्रेसच्या चळवळीत ओढण्याचे श्रेय विठ्ठलराव शिंदे यांच्याप्रमाणेच शंकरराव देव, न. वि. ऊर्फ काकासाहेब गाडगीळ आणि सेनापती बापट या ब्राह्मणांनाही द्यावे लागते. शिवाय कर्मवीर भाऊराव पाटलांचेही या कामी प्रयत्न होतेच. विशेषतः महात्मा गांधी हेच एकमेव राष्ट्रीय पुढारी म्हणून विराजमान झाल्यावर सर्वच वर्णांचे लोक काँग्रेसमध्ये जात होते. गांधीजी स्वतः भारतीय समाजाचे पुनर्घटन करून सुसंवादी अशी समाजरचना करण्याचा प्रयत्न करीत आहेत, असे लक्षात आल्यामुळे जेधे व खंडेराव बागल यांनी पुण्यात ४ सप्टेंबर १९२४ रोजी जेधे भवनात गांधीजींचा सत्कार सोहळा साजरा केला होता. तेव्हापासून अनेक मराठा नेते काँग्रेसच्या चळवळीत आले. त्यामुळे राष्ट्रीय हित, राजकीय वस्तुस्थिती आणि ब्राह्मणेतर पक्षातील उणिवा लक्षात घेऊन ब्राह्मणेतर पक्षाने सभासदांना काँग्रेसमध्ये जाण्यास परवानगी दिली.

पुण्यात १२ व १३ डिसेंबर १९२८ रोजी भरलेल्या पूर्वोक्त इलाखा यूथ लीगच्या अधिवेशनात जेधे वगैरेंनी सक्रिय भाग घेतला. या अधिवेशनामुळे मुंबईसह महाराष्ट्रातील युवक व काँग्रेस कार्यकर्ते अधिवेशनाचे अध्यक्ष जवाहरलालजी आणि सुभाषचंद्र बोस वगैरेंच्या संपर्कात आले. आणि त्यांच्यात वैचारिक आपुलकी निर्माण झाली. या प्रसंगी युवकांनी पुणे शहरभर मिरवणूक काढून कलेक्टरला आव्हान दिले

होते. विशेषतः नेहरूंचा 'रिव्होल्ट, रिव्हॉल्युशन, काँग्रेस क्रीड आणि संपूर्ण स्वातंत्र्य' वगैरे संकल्पनांवरील जोर व सडेतोडपणा यामुळे युवक प्रभावित झाले होते. पण त्यामुळेच पुण्याचा कलेक्टर व इलाखा सरकार अत्यंत अस्वस्थ झाले होते. काँग्रेसमधील युवकांनी या अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्यासाठी खडतर संघर्ष करण्याचा निर्धार केला होता. यूथ लीगचे पुण्यातील हे अधिवेशन अनेक कारणांसाठी गाजले. युवकांची स्वातंत्र्य लढ्यातील बांधीलकी निश्चित झाली. महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर लोक काँग्रेसकडे आकर्षित झाले.

'संपूर्ण स्वातंत्र्य' हेच काँग्रेसचे ब्रीद निर्धारित करण्यासाठी यूथ लीगने काँग्रेस श्रेष्ठींवर दबाव आणला. मद्रास काँग्रेसपासून १९२९ च्या लाहोर काँग्रेसपर्यंत युवकांचा लढा चालू राहिला. हा लढा सोपा नव्हता. केळकर, भोपटकर, जयकर, मालवीय, तेज बहादूर सप्रू, श्रीनिवास शास्त्री वगैरे कर्मठ पुढारी युवकांची मागणी स्वीकारण्यास तयार नव्हते. मुस्लीम लीग, लिबरल पक्ष, उद्योगपती व भांडवलदारांचाही विरोध होता. काँग्रेसमध्ये फूट पडण्याची शक्यता होती. बॅ. महंमद अली जिना हे काँग्रेसचे सदस्य नसले तरी तोपावतो ते काँग्रेसपासून फार दूर गेलेले नव्हते. जिना काँग्रेसपासून अंतिमतः दूर गेले ते या दिवसांपासूनच! त्यांना संपूर्ण स्वराज्याची मागणी नापसंतच होती. हा काळ अतिशय अटीतटीचा व निर्णायक होता. गांधीजींपुढे अशा अनेक समस्या निर्माण झाल्या होत्या.

मात्र मुंबईत व पुण्यात भरलेल्या युवकांच्या दोन्ही परिषदांमध्ये ब्रीदवाक्य बदलणे व त्यासाठी लढा उभारणे हाच सर्वांत महत्त्वाचा विषय होता. ऐतिहासिक लाहोर ठरावाचा कच्चा मसुदा पुण्यातील अधिवेशनात तयार झाला, असे सरकारी दस्तऐवजांमधून दिसून येते. जवाहरलालजींचे पुण्यातील भाषण भारतभरच नव्हे तर सर्व पाश्चिमात्य जगतामध्येही गाजले होते. इंग्लंडमधील राजकारण्यांना तोमोठा धक्का वाटला होता. नेहरूंनी पुण्यातून ठणकावले होते की, "भारतीय समाजाला गतिशील आणि क्रांतिकारी घटक पुरविणे व दुष्ट प्रवृत्तींच्या विरोधात करावयाच्या विद्रोहाची मशाल हाती घेणे हे युवकांचे कर्तव्य आहे. तसेच सामाजिक प्रगती व राष्ट्रीय आंदोलन निष्क्रिय करून त्याची पायमल्ली करणाऱ्या वयस्कर काँग्रेस पुढाऱ्यांना प्रतिबंध घालणे हेही युवकांचेच कर्तव्य होय".[१३]

आपल्या पिताजींच्या समितीने तयार केलेल्या प्रसिद्ध नेहरू रिपोर्टावर जवाहरलाल नेहरू आणि युवक नेत्यांनी जोरदार टीका केली होती. त्यांच्या तडाखेबाज भाषणने आणि पुण्यातील परिषदेमुळे ब्रिटिश सरकार कमालीचे अस्वस्थ झाले होते. स्वातंत्र्य आंदोलनातील हा टप्पा सरकारला ‘ धोकादायक होय, ’ असे गुप्तचरांनी स्पष्ट नमूद केलेले आहे.

व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन यांच्या आदेशानुसार जवाहरलाल नेहरूंची सर्वच वक्तव्ये गुप्तचरांनी लिहून ठेवली होती. नेहरूंनी युवकांना विलक्षण जबरदस्त विद्रोहाची चिथावणी दिली आणि त्यासाठी संघटना उभारण्याचा सल्ला दिला, असा हिंदुस्तानच्या गृह सचिवाने अर्थ काढला होता. याशिवाय भांडवलशाही नष्ट करून समाजवादी कॉमनवेल्थ उभारण्याचा नेहरूंनी मनोदय व्यक्त केला, हे फायलीत नमूद केले. शिवाय नेहरूंवर राजद्रोहाचे आरोप ठेवून त्यांचा बंदोबस्त करावा अशी गृह सचिवाची सूचना होती. तथापि मुंबई सरकारने ही सूचना नाकारली.[१४]

**पुण्यातील नवी विचारसरणी :—**पुणे यूथ लीग व टिळक राष्ट्रीय विद्यालयातील बहुतेक शिक्षक हे गांधी समाजवादाचे पुरस्कर्ते असल्याने त्यांनी कामगार व श्रमिकांमध्ये जागृती करण्यासाठी आणि जमीनदार व भांडवलदारांविरुद्धचे विवाद आणि तंटे सोडवण्यासाठी पुण्यात ‘ लेबर लीग ’ स्थापन केली. तिच्यात न. वि. गाडगीळ, र. के. खाडिलकर, एस. एम. जोशी. श्री. पु. लिमये, आचार्य शं. द. जावडेकर, आचार्य स. ज. भागवत, विनायक भुस्कुटे, पां. वा गाडगीळ, व्ही. व्ही. परांजपे, जी. आर. इनामदार वगैरे क्रियाशील सदस्य असल्याची गुप्तचरांनाही माहिती होती. नंतर रॉयवादी म्हणून प्रसिद्धी पावलेले वसंतराव भ. कर्णिक हेही पुणे यूथ लीगमध्ये सक्रिय होते.[१५]

पंजाब व संयुक्त प्रांतात अत्यंत क्रियाशील असलेल्या भगतसिंगांच्या नौजवान भारत सभेचे समर्थक पुण्यातही होते. मीरत कट प्रकरणात अडकलेले केशवराव एन. जोगळेकर नोव्हेंबर १९३३ मध्ये मुक्त झाल्यावर पुण्यातून कार्य करीत. येथील कम्युनिस्टांमध्ये जी. आर. इनामदार समाविष्ट होते. तसेच पुण्यातील ‘ यंग सोशालिस्ट लीग ’ चे जी. पी. खरे, ह. रा. महाजनी व पी. एन. दांडेकर हमालांच्या मागण्यांकरिता नगरपालिकेशी संघर्ष करीत. ना. ग. गोरे, विष्णू बी. चितळे,

के. एन. फडके यांच्यासारखे पुणेकर युवक मार्क्सवादाचेही समर्थक असल्याचा गुप्तचरांना संशय वाटे. कु. गोदावरी गोखले (नंतर परुळेकर) या तर प्रथमपासूनच कम्युनिस्ट विचाराच्या होत्या. सेनापती बापट हे तर रशियन विचारप्रणालीनुसार समाजरचना घडवावी अशी भाषा १९३७ पासून करू लागले. इंडियन प्रोग्रेसिव्ह रायटर्स असोसिएशन ही समाजवादी-लोकशाही विचारसरणीतून लेखन करणाऱ्या प्रागतिक लेखकांची संघटना होती. तिच्या पुणे शाखेचे तेव्हाचे सभासद होते डॉ. श्री. व्यं. केतकर, कु. बाळुताई खरे, एस. जी. वझे, शं. द. जावडेकर, ह. रा. महाजनी, प्रल्हाद केशव अत्रे, श्री. के. क्षीरसागर, के. एन. फडके, वामन मल्हार जोशी, गं. भा. निरंतर, गोपीनाथ तळवलकर, व्ही. व्ही. हडप वगैरे. त्यांच्या सर्वच लेखनावर गुप्तचरांची नजर असे. पूर्वाश्रमीचे टिळकभक्त असलेले वामन मल्हार जोशी आता समाजवादी विचारसरणीचे झाले होते हे विशेष.[१६]

## कम्युनिस्ट पक्षाची चळवळ

डिसेंबर १९२५ च्या कानपूर काँग्रेस अधिवेशनाला जोडून कम्युनिस्ट युवकांनी तिथे एक परिषद भरवली. या परिषदेत सिंगारवेलू, सत्यभक्त, मौलाना हसरत मोहानी, मुझफ्फर अहमद यांच्याबरोबर जोगळेकर, सच्चिदानंद घाटे, निंबकर हे मराठी भाषिकही होते. या मंडळींनी तेव्हा कम्युनिस्ट पक्ष स्थापन केला. मात्र डांगे कारावासात होते. पण सरकारने या पक्षावर बंदी घातल्यामुळे पक्षाला उघडपणे कार्य करणे अशक्य होते. म्हणूनच पक्षाचे प्रकट स्वरूप म्हणून 'वर्कर्स अँड पेझंट्स पार्टी' स्थापन करण्यात आली. हा पक्ष एक बहुवर्गीय आघाडी असून बेकायदेशीर ठरविण्यात आलेल्या कम्युनिस्ट पक्षाचेच काम करत होता. हाही पक्ष काँग्रेस अंतर्गतच काम करत असे. या पक्षाच्या कार्यकारिणीत घाटे, निंबकर, जोगळेकर आणि नंतर डांगे यांचाही समावेश झाला.

मुंबईच्या कामगार चळवळीत कम्युनिस्टांनी चांगले बस्तान बसवले होते. १९२६ पासून त्यांनी गोदी कामगार, महापालिकेचे कामगार, ट्राम कामगार, छापखान्यांमधील कामगारांना संघटित केले. याशिवाय गिरणी कामगारांच्या संघटनांमध्ये प्रवेश करून त्यांनी त्या संघटना काबीज केल्या. कामगार व शेतकरी पक्षाचा पाया व्यापक

करण्यात आला. आधीपासून अस्तित्वात असलेल्या गिरणी कामगार महामंडळाच्या कार्यक्रमातही जोगळेकर व निंबकर योगदान देत असत. कामगारांचे प्रबोधन करीत असत.

काँग्रेसमध्ये धनिक आणि मालमत्ताधारकांचे प्रतिनिधी पूर्वीपासूनच होते. त्याला विरोध करण्यासाठी जोगळेकरांनी कामगार व शेतकरी पक्षाचे प्रवक्ते या नात्याने काँग्रेसचे स्वरूप बदलण्यासाठी मद्रास काँग्रेसमध्ये ठराव मांडला होता. तसेच सविनय कायदेभंग आणि प्रत्यक्ष कृती या साधनांचा अवलंब करून काँग्रेसने संपूर्ण स्वातंत्र्याचे ब्रीदवाक्य घोषित करावे असा ठराव सादर केला होता. मद्रास काँग्रेसमध्ये (१९२७) संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करणारा ठराव जोगळेकरांनी प्रथम विषय नियामक समितीत मांडला आणि त्यास जवाहरलाल नेहरूंनी अनुमोदन दिले. या काँग्रेसच्या खुल्या अधिवेशनात हाच ठराव जवाहरलालजींनी मांडला व त्यास जोगळेकरांनी दुजोरा देणारे भाषण केले होते.

वरील प्रकरणात विवेचन केल्याप्रमाणे महाराष्ट्रातील कामगार चळवळीच्या इतिहासात १९२८ चा गिरणी कामगारांचा संप अपूर्व होता. हा संप कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखाली जवळजवळ सहा महिने चालू राहिला होता. लाल बावट्याची युनियन म्हणून ओळखलेल्या या युनियनचे अध्यक्ष अर्जुनराव आळवे व चिटणीस डांगे होते. युनियनची २३ मे रोजी नोंदणी झाली तेव्हा केवळ ३२४ सभासद होते. तर मार्च १९२९ मध्ये ही संख्या ६५,००० झाली. याच संपातून कम्युनिस्टांनी महाराष्ट्रात आपले स्थान भक्कम केले, अढळ केले. त्यांनी हा संप यशस्वी करून दाखवला. त्यामुळे काँग्रेस पक्षालाही त्यांच्याकडे आदराने पाहावे लागले.[१७]

कम्युनिस्टांनी काँग्रेसचा प्रभाव पाहून गांधीजींच्या असहकारिता व कायदेभंग आंदोलनास विरोध न करता त्यात सहभागी होण्याचे धोरण अंगीकारले. गांधीजींचे अहिंसा, खादी, भांडवलदारांविषयीचे धोरण आणि काही आचारविचार यावर ते टीका करीत असत. तथापि त्यांनी अनेक वर्षे गांधीजींना साथ दिली होती. शिवाय वंचितांच्या प्रचंड समस्या सोडविण्यासाठी कम्युनिस्ट पक्ष सक्षम नसल्यामुळे

काँग्रेसच्याच परिघात राहणे त्यांना भाग पडले. शिवाय त्यांच्या कामगार व शेतकरी पक्षाची झेप शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली नव्हती. एका बाजूने ताकदवान सरकारी यंत्रणा कम्युनिस्टांचे हातपाय व तोंडास आवर घालत असे. त्यांच्यावर गुप्तचरांची अविरत नजर असे. शिवाय खेडेगावातील शेतकऱ्यांना साम्यवादी विचारप्रणाली तेव्हा समजली नव्हती. म्हणून कम्युनिस्टांना ' काँग्रेसमधील जहाल ' गट अशी भूमिका स्वीकारावी लागली होती. १९२४ पासून १९४० पर्यंत त्यांनी अशी भूमिका वठवली.

कम्युनिस्टांना बहुतांश ब्राह्मणांच्या प्रभावाखाली असलेल्या महाराष्ट्रातील स्वराज्य पक्षाचे आकर्षण वाटले नाही. या राज्यातील ब्राह्मणेतर पक्षाचे पुढारी मात्र कम्युनिस्ट तसेच कामगार व शेतकरी या दोन्ही पक्षांना ' ब्राह्मणी युवकांचे कारस्थान ' असे म्हणून हिणवत असत. या भूमिकेतून भास्करराव जाधव व त्यांचे समविचारी लोक मुंबई-पुण्यातील कामगार वर्गात फितुरी निर्माण करीत. यास दोन कारणेहोती. एकतर ब्राह्मणेतर पक्ष राजनिष्ठ होता आणि दुसरे असे होते की, बहुसंख्य कम्युनिस्ट चळवळे ब्राह्मण जातीतील होते. ही नावे पाहा :—श्रीपाद अमृत डांगे, जोगळेकर, उषाताई डांगे, पर्वते, धुंडीराज ठेंगडी, दत्तात्रय करंदीकर, विष्णू चितळे, रानडे, परशुराम भागवत, राम व संध्या उटगी, वसंत तुळपुळे, दत्ता देशमुख, कमल भिडे, वामन बापट, शांता वैद्य, मधुकर कात्रे, डी. एस. कुलकर्णी, (सर्व पुणे जिल्ह्यातील). त्यांच्यामुळे एस. के. लिमये, भाऊ फाटक, कमलाताई तुळपुळे वगैरे पुण्यात कम्युनिस्ट पक्षातर्फे कार्य करीत. शिवाय रघुनाथ निंबकर, लालजी पेंडसे, जी. एम. अधिकारी, शं. वा. देशपांडे, एस. जी. पाटकर वगैरे कम्युनिस्ट १९४०-४१ पर्यंत काँग्रेसच्या परिघातच राहून स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झालेले होते. मात्र कित्येक अब्राह्मण युवकही कम्युनिस्ट चळवळीत होते, हे मान्य करावेच लागते. शिवाय कम्युनिस्टांमध्ये अनेक मुसलमान व काही ख्रिस्तीदेखील होते. त्यामुळे ब्राह्मणेतर पक्षाने केलेला ' ब्राह्मणी युवकांचे कारस्थान ' हा आरोप साफ चुकीचा होता.

कामगार व शेतकरी पक्षाच्या केंद्रीय कार्यकारिणीतील १६ सदस्यांपैकी दहा जण कणखर कम्युनिस्ट होते. त्यांच्यात घाटे, निंबकर, जोगळेकर आणि कानपूर प्रकरणात शिक्षा भोगून आलेले डांगे यांचा समावेश होता. विशेषतः जोगळेकर हे युवक

काँग्रेसच्या चळवळीत पुष्कळच सक्रिय झाले होते. जवाहरलाल नेहरू व सुभाषबाबूंच्या काँग्रेसमधील ' जिंजर गटात ' त्यांचा समावेश झालेला होता. त्या काळात कापड उद्योगात मंदी जाणवत होती. म्हणून गिरणीमालक उत्पादनखर्चात बचत करण्याचे प्रयत्न करीत. त्यासाठी कामगारकपात व वेतनकपात करण्यावर मालकांचा भर होता. याविरुद्ध सर्वात मोठा संघर्ष उभारला कामगार व शेतकरी पक्षानेच. या पक्षाने १९२६ पासून मुंबईतील कामगारांच्या चळवळीत आपले स्थान भक्कम केले. त्यांनी गोद्या, महानगरपालिका, ट्राम कंपनी, छापखाने आणि कापड गिरण्यांमध्ये अनेक श्रमिकसंघ उभारले. दुसऱ्या पक्षांकडील संघ त्यांनी काबीज केले. एकूण आपली पक्ष संघटना त्यांनी व्यापक केली होती.

१९२८ मधील अभूतपूर्व गिरणी कामगार संपाचे विवेचन **कामगार चळवळ** या प्रकरणात केलेले आहे. या संपासाठी संघटन केलेल्या संयुक्त नियामक समितीत ना. म. जोशी यांच्यासह ब्रिटिश कम्युनिस्ट नेते बेन ब्रॅडले, डांगे, निंबकर व मिरजकर हे सदस्य होते. कम्युनिस्टांनी कामगारांमध्ये आपला प्रभाव खूप वाढविला. त्यांच्या गिरणी कामगार युनियनने हा संप निकराने सहा महिने चालविला आणि तो यशस्वी करून दाखविला. हे यश अपूर्व होते. या संपामुळे कामगारांमध्ये व एकूण मुंबईत कम्युनिस्टांचे स्थान भक्कम झाले. त्यांना प्रतिष्ठा लाभली. गिरणीमालकांना युनियनच्या मागण्या मान्य कराव्या लागल्या.

३८ गिरण्यांमधील संपात बोलणी करण्यासाठी मालकांनी ना. म. जोशी, डांगे, निंबकर, लालजी पेंडसे, मिरजकर यांना बोलावले होते. हा तर त्यांचा सन्मानच होता. फेब्रुवारी १९२९ मध्ये मुंबईत उसळलेल्या हिंदू-मुसलमान दंगलीच्या वेळी नेमलेल्या शांतता समितीतही त्यांचा समावेश करण्यात आला होता. तथापि कम्युनिस्टांचा वाढत चाललेला हा प्रभाव ठेचून टाकण्यासाठी ब्रिटिश सत्ताधीश धूर्तपणे वाट पाहतच होते. **त्यांना ठेचून काढण्यासाठीच सरकारने निमित्त शोधून काढले. आणि सरकारने कुप्रसिद्ध मीरत कट खटला रचला.** या खटल्यात त्यांना ज्युरी पद्धतीचा फायदा नाकारण्यात आला.

कम्युनिस्टांनी समर्थपणे चालवून यशस्वी करून दाखविलेल्या १९२८ मधील गिरणी कामगार संपामुळे मुंबईचा गव्हर्नरही आश्चर्यचकित झाला होता. आपल्या गोपनीय पत्रात गव्हर्नरने भारतमंत्र्यास लिहिले की, " It is really amazing how the men are holding out ....... I have been considerably disturbed by the fact that the millowners opened a section of their mills on several occasions, and although adequate police protection was given, not a single man returned to work" [१८]

मागण्या मान्य झाल्यावरच संप मिटला होता. त्यावेळी नारायण मल्हार जोशींच्या युनियनचे ९८०० सभासद असताना लालबावटा युनियनचे ६०,००० सभासद होते. त्याविरुद्ध भांडवलदार व सरकारनेही अनेक उघड व छुपे आघात करण्यासाठी सर्व शक्ती पणाला लावली होती. कम्युनिस्टांना काँग्रेसचा आर्थिक पाठिंबा होता. तथापि ब्राह्मणेतर पक्षाचे नेते भास्करराव जाधव मात्र कामगार वर्गात जातीयवादी भावना निर्माण करून फूट पाडण्यासाठी प्रयत्न करीत होते. गोविंद कासले यांना फोडण्यात त्यांना यश प्राप्त झालेही होते. तेव्हा अशी एक वदंता होती की, याकामी भास्कररावांना गिरणीमालकांचे पुढारी सर होमी मोदी यांनी पैसे दिले होते, असे इतिहासकार सुमित सरकार सांगतात (पृ. २७१).

विल्सन आणि साईक्स या दोन्ही गव्हर्नरांनी व्हाइसरॉय आयर्विन यांना १९२७-१९२९ दरम्यान पाठविलेल्या पत्रांमधून ब्रिटिशांना कम्युनिस्टच नव्हे, तर काँग्रेसमधील जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र, मेहेरअली वगैरे युवा नेत्यांकडूनही सरकारलागंभीर धोका असल्याचे सूचित करण्यात आलेले आम्हाला आढळले. म्हणूनच भांडवलदारांचा पुरेपूर अनुनयदेखील करण्यात आला. याच सुमारास फिलिप स्प्राट व बेन ब्रॅडले हे दोन ब्रिटिश कम्युनिस्ट मुंबई व बंगालमधील कामगारांना संघटित करण्यात डांगे, निंबकरांना मदत करीत होते. त्यास पायबंद घालण्यासाठीच उपरोक्त कुप्रसिद्ध पब्लिक सेफ्टी बिल सरकारने पुढे रेटले होते. तसेच संप वगैरे टाळण्यासाठीसरकारने ट्रेड्स डिस्पुट्स बिल मांडले होते.

मीरत खटल्यामुळे कामगारांमधील जहालपणा वितळला असे नव्हे. तथापि १९३० मध्ये कामगार चळवळीचा ऱ्हास होत असल्याचे दिसते. कम्युनिस्ट केवळ दडपशाहीने नरमले असे नव्हे. तशी त्यांची संख्या कमीच होती. परंतु त्यांनी आपल्या धोरणात बदल केला. जोसेफ स्टालिनच्या धोरणांचा अर्थ लावून कम्युनिस्ट प्रथमच काँग्रेसपासून लांब जाऊ लागले. स्वातंत्र्यलढ्यात भाग घेण्याबाबत त्यांच्यात थोडा संभ्रम निर्माण झाला.

मात्र कम्युनिस्ट चळवळीतील मंदीचे मुख्य कारण मीरत खटला हेच होते. या खटल्यात एकूण ३१ आरोपी होते. त्यापैकी डांगे, जोगळेकर, निंबकर, मिरजकर, घाटे, गंगाधर अधिकारी, मोतीराम गजानन देसाई, अर्जुन आत्माराम आळवे, गोविंद रामचंद्र कासले, लक्ष्मण कदम व धुंडीराज ठेंगडी हे अकरा मराठी भाषिक होते. त्यांच्या गैरहजेरीमुळे मुंबई व एकूण महाराष्ट्रातील चळवळ कमकुवत झाली.

प्रमुख कम्युनिस्ट नेते मीरतमध्ये अडकले असताना गिरणी कामगार युनियनचे सभासद गणपत कांदळकर, लालजी पेंडसे, उषाताई डांगे, वासुदेव जोशी, विश्राम तावडे, शं. वा. देशपांडे आणि बी. टी. रणदिवे यांच्या नेतृत्वाखाली एप्रिल १९२९ मध्ये गिरणी कामगारांचा दुसरा संप सुरू झाला. पण संघटनेत गटबाजी व हेवेदावे निर्माण झाले. आरोप-प्रत्यारोप झाले. गिरणीमालकांनी सरकारच्या मदतीने ‘ फोडा आणि झोडा ’ हे तंत्र पद्धतशीरपणे अमलात आणले. दुफळी माजली. त्यामुळे मालक आक्रमक झाले. याबाबतचे विवेचन **‘ कामगार चळवळ ’** या प्रकरणात केलेले असल्याने इथे द्विरुक्ती करीत नाही. आरोप-प्रत्यारोपांमुळे कामगारांचे नीतिधैर्य खचले. परिणामतः संप बारगळला. त्यामुळे कम्युनिस्ट पक्षातही दुफळी माजली. मीरतमधील कम्युनिस्ट बंदिवानांमध्येही डावपेच व रणनीतीबाबत तीव्र मतभेद निर्माण झाले. कारागृहात कॉ. डांगेंना भेटावयास गेलेल्या त्यांच्या पत्नी उषाताई व वासुदेव हरी जोशी यांना डांगे चुकीचा सल्ला देतात, असा त्यांच्यावर चुकीचा आरोप करण्यात आला. या गैरसमजातून कम्युनिस्ट श्रेष्ठींनी कॉ. डांगेंची पक्षातून हकालपट्टी केली.

कारागृहाच्या भिंतीआड झालेल्या या चुकीच्या कारवाईचे परिणाम मीरत खटल्यावरही होणे स्वाभाविक होते. या काळात काँग्रेसचे सविनय कायदेभंग आंदोलन जोरात चालू होते. त्यासाठी काँग्रेसला शक्य तेवढे सहकार्य द्यावे आणि कम्युनिस्टांनी आंदोलनात सहभागी व्हावे, अशी डांगे पतिपत्नी व वासुदेव जोशींची भूमिका होती. वसंतराव भ. कर्णिक, मणिबेन कारा, रामभाऊ रुईकर, सुंदर काबाडी, ए. टी. शेख यांचीही काँग्रेसच्या जनआंदोलनात कम्युनिस्टांनीही भाग घ्यावा अशीच सूचना होती. आणि त्याप्रमाणे रॉयवाद्यांनी सक्रिय भाग घेऊन कारावास भोगला होता. तथापि देशपांडे मास्तरांच्या अविवेकी गटाने हा विधायक कार्यक्रम अमान्य केला.

थोर युगांतर क्रांतिकारक मानवेंद्रनाथ रॉय परागंदा होऊन पंधरा वर्षे परदेशांमध्ये वास्तव्य करीत होते. रॉय यांचे जोसेफ स्टालिनशी तीव्र मतभेद झाल्यामुळे त्यांना कडव्या रशियन कम्युनिस्टांशी जमवून घेणे अशक्य झाले होते. म्हणून डिसेंबर १९३० मध्ये ते गुप्तपणे भारतात परत आले. हिंदुस्तान सरकारचा त्यांच्यावर पकडवारंट असल्याने ते मुंबईत भूमिगत अवस्थेत राहत होते. रॉय वेषांतर करून डॉ. महमूद या नावाने मुंबईत डाव्या विचारसरणीच्या युवकांना मार्गदर्शन करीत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कर्णिक, मणिबेन कारा, डॉ. एम. आर. शेट्टी, अब्दुल माजीद वगैरेंनी मुंबई गोदी कामगार व महानगरपालिका कामगार यांचे श्रमिकसंघ उभारले. रॉय यांना भेटलेले सर्वजण सविनय कायदेभंग आंदोलनात उतरले. गांधीजी वसरदार पटेलांशी त्यांचा संबंध प्रस्थापित झाला. मार्च १९३१ च्या कराची काँग्रेसमध्येही त्यांनी डॉ. महमूद नावाने भाषण केले. तथापि कम्युनिस्टांनी गुप्तचरांना दिलेल्या माहितीमुळे ते २१ जुलै रोजी पकडले गेले. उषाताई डांगे व गणपत कांदळकरांनी मुंबईतील एका जाहीर सभेतच आरोप केला की, मूळचे नरेंद्रनाथ भट्टाचार्य ऊर्फ मानवेंद्रनाथ रॉय हे देशपांडे गटाच्या कारवायांमुळे पकडले गेले. सरकारने रॉय यांच्यावर कानपूर न्यायालयात खटला भरून त्यांना सजा दिली.[११] १९३२-१९३३ साली मुंबईच्या कामगार चळवळीत शं. वा. देशपांडे मास्तर, बी. टी. रणदिवे आणि रॉयवाद्यांचा गट असे तीन गट कार्यरत होते.

कम्युनिस्टांच्या हालचाली व सविनय कायदेभंग आणि सशस्त्र स्वातंत्र्यसैनिक यांच्या कारवाया दडपून टाकण्यासाठी ब्रिटिश सरकारने आणीबाणीतील विशेष अधिकारांविषयीचा कायदा पास केला व दडपशाहीचे धोरण अंगीकारले. १९३२ च्या या क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्टचा सरकारने सर्रास उपयोग करून घेतला. वस्तुतः या विशेष अधिकारांचा औद्योगिक कलहांत उपयोग केला जाणार नाही, असे सरकारने कामगार नेते रघुनाथराव बखले यांना लेखी स्वरूपात आश्वासन दिले होते. तथापि हे आश्वासन सरकारने कधीच पाळले नाही. डावी विचारसरणी व जहाल राष्ट्रवादाचा पुरस्कार करणाऱ्या सर्वांनाच झोडपणे हे सरकारी धोरण होते.

असे कायदे अस्तित्वात असूनही गव्हर्नर ब्रेबर्नने मुंबईतील कम्युनिस्टांचा प्रभाव कायमचा नष्ट करण्यासाठी सरकारला अधिक व्यापक अधिकार देणारा नवीन कायम स्वरूपाचा कायदा केला जावा, असे भारतमंत्री सॅम्युअल होअर यांना २८ जून १९३४ च्या पत्राद्वारे सुचविले होते. संप सुरू करणे हेच कम्युनिस्टांना अशक्य करून ठेवावे असा गव्हर्नरचा इरादा होता.[२०]

मुंबई सरकारला संपाचे दुःख वाटत नव्हते, पण संपामुळे कम्युनिस्टांचा प्रभाव वाढतो याचे दुःख वाटत होते. दुसऱ्या राज्यांपेक्षा मुंबई परिसरातच कम्युनिस्टांचे मुख्य केंद्र आहे, याचे सनदी नोकरशाहीला वैषम्य वाटत असे. मात्र हिंदुस्तान सरकार व भारतमंत्र्यास असा कायदा करणे अनुचित वाटले. शिवाय १९३४ सालात सविनय कायदेभंग आंदोलन काँग्रेसने स्थगित केले होते. म्हणून १९३५ च्या संकल्पित कायद्यानुसार होणाऱ्या निवडणुकीत काँग्रेसला एक मुद्दा मिळेल, अशी व्हाइसरॉयला सार्थ भीती वाटत होती.[२१]

व्हाइसरॉयचे मत सत्याधारित असूनही, मुंबई सरकारने आणीबाणीकालीन विशेषाधिकारांच्या उपरोक्त कायद्याचा कालावधी मार्च १९३५ पर्यंत वाढवून घेतला. शिवाय त्यात दुरुस्ती करून घेतली. गृहमंत्र्याने कायदेमंडळात कबूलच केले की, या नवीन कायद्याच्या चार उद्दिष्टांपैकी कम्युनिस्टांना पायबंध घालण्यास आपण जास्त महत्त्व देतो. वस्तुतः सरकारचे कम्युनिस्टांबाबतचे भयसूचक धोरण निष्कारण भयग्रस्त व दडपशाहीचे होते.

कम्युनिस्टांचा श्रमिकसंघ काही वर्षांपूर्वी ' आयटक ' मधून बाहेर पडला होता. तथापि १९३४ साली भा.क.प. बेकायदा ठरविण्यात आल्याकारणाने, त्यावर्षी कम्युनिस्टांना आयटकशी पुन्हा सलोखा करावा लागला. कामगार चळवळीसाठी असे करणे आवश्यक होते. तरीही मुंबई सरकारने आपल्या विशेषाधिकारांचा दुरुपयोग करून १९३४ चा संप चिरडून टाकला. या काळात काँग्रेसचे नेहरूंसारखे नेते कम्युनिस्टांना अघोषित पाठिंबा देत असत. १९३५ सालातही काही कम्युनिस्ट कारावासातच होते. म्हणून त्या वर्षी कापडगिरण्यांमध्ये सर्वात कमी संप झाले. अशी स्थिती मुंबईत १९२१ साली प्रथमच उद्‌भवली होती.

वस्तुतः रघुनाथराव निंबकरांनी मीरत खटल्यातून मुक्त झाल्यावर कम्युनिस्ट पक्षाशी काहीच संबंध ठेवले नाही. ते काँग्रेसच्या परिसीमेतच वावरले. तथापि त्यांचा पूर्वेतिहास लक्षात घेऊन काँग्रेसने त्यांना पक्षातर्फे निवडणुकीसाठी उमेदवारी दिली नाही. कॉ. डांगे मीरतची शिक्षा भोगून १२ मे १९३५ रोजी मुंबईत परतले. मात्र येथील पक्षाची हलाखी पाहून उषाताईंसह पुण्यात राहायला गेले. तेव्हा घाटे मंगलोरच्या जेलमध्ये होते. बी. टी. रणदिवे २ फेब्रुवारी १९३६ रोजी कारावासातून मुंबईला परतले. क्रांतिकारक मानवेंद्रनाथ रॉय यांचीही २० नोव्हेंबर १९३६ रोजी सुटका झाली.

कम्युनिस्ट व कामगार चळवळीत फूट पडली. सरकारचा समज झाला की, ही फूट आयटकच्या कोलकाता व नागपूरच्या अधिवेशनांतील वादंगामुळे झाली. तथापि मुंबई गुप्तचरांच्या गोपनीय अहवालांमध्ये स्पष्ट नमूद आहे की, कम्युनिस्ट संख्येने कमी असूनही, मुंबईतील कामगार वर्ग कम्युनिस्टांच्या कामगारधार्जिण्या आचारांमुळे त्यांच्याकडे आशेच्या नजरेने पाहत असे. कम्युनिस्टांनी मुंबईत १९३१ च्या सुमारास ' यंग वर्कर्स लीग ' स्थापन करून साम्यवादाचा प्रचार सुरू केला होता. ही लीग मीरत खटल्यासाठी मुंबईतून निधी गोळा करीत असे. प्रचार करीत असे. सुभाषबाबू व नागपूरच्या रामभाऊ रुईकरांनी कामगार वर्गात ऐक्यभाव निर्माण करण्यासाठी व काँग्रेस-कम्युनिस्ट मजबुतीकरणासाठी मुंबईत जंगी परिषद भरवली होती. कामगार वर्ग राष्ट्रीय आंदोलनात सामूहिकरीत्या सहभागी झाला नाही, ही खंत या दोघांनी

व्यक्त केली. याउलट बी. टी. रणदिवे मात्र उफराटा प्रचार करत की, कामगारांनी काँग्रेसच्या चळवळीत व कायदेभंग आंदोलनात सहभागी होऊ नये.[२२]

त्याकाळी मुंबईत संपूर्ण भारतातून कम्युनिस्ट कार्यकर्ते येत असत. इथे त्यांचे मोठे केंद्र साकार झालेले होते. १९३२ च्या अखेरीस या महानगरात ' फ्रेंड्स ऑफ सोविएत युनियन ' तसेच ' हिंदुस्तानी साम्यवादी संघ ' नामक संघटना स्थापन झाल्या. शस्त्राचाराचा पुरस्कार करणारी मंडळी व काँग्रेसमधील डावे युवक आणि कम्युनिस्ट यांच्या या स्वतंत्र संघटना होत्या. शस्त्राचारांचाही पुरस्कार करणाऱ्यांचा त्यात समावेश असल्याने गुप्तचरांचे त्यांच्यावर अविरत संनिरीक्षण असे. श्रीनिवास सरदेसाई, अधिकारी व आर. एम. जांभेकर यांनी मुंबईत ' मार्क्सवादी वाङ्मय प्रचारक मंडळ ' स्थापन केले होते. इंग्लंडमधून इथे आणलेले कम्युनिस्ट साहित्य वाचकांना दिले जात असे. काही पुस्तिकांचे मराठी भाषांतरही करण्यात येई.

मीरतमधील बंदिवानांची सावकाशपणे सुटका करण्यात आली. झाबवाला, आळवे, गोविंद कासले, जी. एम. अधिकारी, एम. जी. देसाई व हुचिनसन यांची प्रथम सुटका झाली. त्यानंतर लवकरच झाबवाला यांनी वसंतराव कर्णिक, जी. वाय. चिटणीस आणि मणिबेन कारा यांच्याशी सहकार्य करून मुंबईत ' वर्कर्स पोलिटिकल पार्टी ' स्थापन केली. संपूर्ण कामगार वर्गाला संघटित करून एक जोरदार मध्यवर्ती संघटना उभारणे आणि या वर्गाचे हित साध्य करणे हे त्यांचे उद्दिष्ट होते. हिंदुस्तानच्या आगामी राज्यघटनेत कामगारांचे हितसंबंध सुरक्षित राहावे हा या संघटनेचा दुसरा उद्देश होता. तथापि बी. टी. रणदिवेंच्या कामगार संघाने इतरांशी सहकार्य न केल्याकारणाने झाबवालांच्या व कर्णिकांच्या या प्रयत्नांना फारसे यश लाभले नाही. आयटकला रणदिवे म्हणजे एक ' गूढ समस्या ' वाटत होते.

नोव्हेंबर १९३३ मध्ये मिरजकर, जोगळेकर, घाटे, ब्रॅडले यांची सुटका झाली. दरम्यान ऑक्टोबरमध्ये शं. वा. देशपांडे मीरतमधून मुक्त झालेले होते. १९३४ सालात कम्युनिस्टांनी बरेच सार्वत्रिक संप घडवून आणले. बऱ्याच गिरण्या बंद पाडल्या, हिंसाचारही झाला. तथापि हिंसाचारामुळे कामगारांचे नुकसानच झाले.[२३]

## काँग्रेस व कम्युनिस्ट

ऑक्टोबर १९३४ मधील काँग्रेस अधिवेशन हा विलक्षण सनसनाटी व उत्सुकतेचा प्रसंग ठरला. मार्च १९३१ च्या कराची अधिवेशनानंतरचे हे पहिलेच कायदेशीर व खुले अधिवेशन होते. शिवाय सविनय कायदेभंग आंदोलनानंतर आणि तिन्ही गोलमेज परिषदा विफल झाल्यानंतरचे हे पहिले अधिवेशन होते. कामगार वर्गाच्या काँग्रेसकडूनच्या अपेक्षा वाढलेल्या होत्या. मुंबईच्या वरळी भागात म्हणजे कामगार क्षेत्रात हा सोहळा होणार होता. म्हणून कामगार जगतात अपूर्व संवेदना व अपेक्षा वाढल्या. रणदिवे गटाच्या हटवादी वर्तनामुळे व प्रचारामुळे कम्युनिस्टांना अधिवेशनाच्या मंडपात प्रवेश नाकारला जाईल, अशी बातमी होती. त्यानुसार कम्युनिस्टांचा मंडपात बलप्रयोगाने घुसखोरी करण्याचा प्रयत्न होता, योजना होती. त्यानुसार शक्तिप्रदर्शन व ताकद दाखविण्याचाही त्यांनी कसून प्रयत्न केला. त्या दिवसांत मुंबईतील कामगारांचे तीन गट होते :—जोगळेकर, मिरजकर व फिलिप स्प्राट यांचा कम्युनिस्ट गट ; मणिबेन कारा व कर्णिक यांचा रॉयिस्ट पक्ष ; आणि आळवे व कांदळकर यांची लेबर पार्टी. या पक्षांमध्ये ऐक्यभाव तर नव्हताच, पण आरोप-प्रत्यारोप करण्याची प्रखर भावना होती. प्रत्येक पक्षाची कार्यपद्धती वेगळी असून त्यांच्यात परस्पर विश्वासाचा अभाव होता. त्यामुळे मुंबईतील कामगार भागांमध्ये ताणतणाव निर्माण झाले होते. म्हणून शहरातील काही भागांमध्ये २६-२८ ऑक्टोबर १९३४ रोजी जमावबंदीचा हुकूम जारी करावा लागला होता. काँग्रेस स्वागत समितीचे अध्यक्ष नरिमन व स. का. पाटील तणाव कमी करण्यासाठी झटत होते.

या ताणतणावांचा अनिष्ट परिणाम काँग्रेस अधिवेशनावर पडू नये यासाठी काँग्रेस अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद व श्रेष्ठींनी झाबवाला व कांदळकर यांच्या नेतृत्वाखाली त्यांच्या ४०० कामगार कार्यकर्त्यांना काँग्रेसच्या कामगारविषयक चर्चेत भाग घेण्यास्तव काँग्रेस मंडपात प्रवेश दिला. राजेंद्रबाबूंनी त्यांना संबोधित करून काँग्रेस पक्षाचे धोरण स्पष्ट केले. आवश्यक असेल ते करण्याचे आश्वासनही दिले. त्यामुळे मुंबईतील कामगार विश्वात चांगला संदेश गेला. मात्र या घटनेमुळे काँग्रेसला आपल्या कामगार धोरणातील उणिवा दिसून आल्या आणि या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज पटली.[२४]

मुंबईतील कामगारांच्या आर्थिक प्रश्नांवर युसुफ मेहेरअली, पुरषोत्तम त्रिकमदास, एम. आर. मसानी व एफ. एम. पिंटो यांनीही विचारविनिमय करून पक्षश्रेष्ठींना याबाबत कार्यवाही करण्याची गळ घातली. याच वेळी व. भ. कर्णिक व मणिबेन कारा यांनी रॉयवादी विचारसरणीची गिरणी कामगार युनियन (रॉय गट) ही संघटना स्थापन केली.

१९३४ मधील काँग्रेस अधिवेशनाप्रमाणेच आयटकचे १७ नोव्हेंबर १९३६ पासूनचे मुंबईतील अधिवेशन कामगार चळवळीसाठी महत्त्वाचे ठरले. जागतिक महामंदीमुळे १९२४ पासूनच अर्थव्यवस्थेला मरगळ आलेली होती. कामगारांवर बेरोजगार, बेकारी व वेतनकपातीचे आघात अविरतपणे होत होते. कम्युनिस्ट व डावे काँग्रेसजन कामगारांच्या हितासाठी प्रयत्नशील असले, तरी आयटक अद्याप श्रमिक वर्गाचे हितरक्षण करण्यास असमर्थच होती. शिवाय तिच्यात सुंदोपसुंदी व गटबाजी फोफावली होती. म्हणूनही या राष्ट्रीय स्तरावरील संस्थेला कामगार कलहांबाबत उचित कार्य करता आले नव्हते. शिवाय कम्युनिस्टांचा वर्गलढ्याचा पवित्रा आयटकला तेव्हा मानवत नव्हता. वाटाघाटी करण्यापलीकडे आयटक काहीच करत नव्हती. कामगार वर्गात ऐक्यभाव आणि जबाबदारीचे भान रुजले नव्हते. ही संघटना कामगारांना ' आपली ' अशी वाटत नव्हती. म्हणून गतिशील नेतृत्वाची तेव्हा नितांत गरज होती.

अशा परिस्थितीत मणिबेन कारा यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत भरलेल्या आयटकच्या १९३६ च्या अधिवेशनास काँग्रेसचे अध्यक्ष जवाहरलाल नेहरू आणि डाव्या विचारसरणीचे जयप्रकाश नारायण तसेच अच्युतराव पटवर्धन, इंदुलाल याज्ञिक व काही वजनदार काँग्रेस पुढारी इथे आलेले होते. दहा हजारांची उपस्थिती असल्याची पोलिसांनी नोंद करून ठेवली होती. या अधिवेशनात आयटक संघटना अखिल भारतीय काँग्रेस पक्षाशी संलग्न करून घेण्याचा ठराव पास झाला. आणि भांडवलशाही व साम्राज्यशाहीच्या विरोधात एकोप्याने लढा देण्याचा अत्यंत महत्त्वाचा निर्णयही घेण्यात आला. या दोन्ही संघटनांनी इंग्रज व भांडवलशाहीशी लढा देण्यासाठी संयुक्त आघाडी उभारण्याचा निर्धार केला. स्वातंत्र्यलढ्यात कामगारांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे काँग्रेस अध्यक्ष नेहरूंनी कळकळीचे आवाहन केले. परकीय

राजसत्ता तसेच भांडवलशाहीने चालवलेल्या शोषणाविरुद्ध एकत्रितपणे लढल्याशिवाय पर्याय नाही असे नेहरूंनी दहा हजार श्रोत्यांच्या मनावर बिंबवले होते. पटवर्धन यांनी आपल्या काँग्रेस समाजवादी पक्षाच्या वतीने काँग्रेस आणि कामगार संघांना एकत्र लढा उभारण्याचे जोरदार आवाहन केले होते.

देहरादूनच्या जेलमधून २० नोव्हेंबर १९३६ रोजी सुटका झाल्यावर मानवेंद्रनाथ रॉय हे सरदार पटेल व स. का. पाटील यांना भेटले आणि त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. **त्यामुळे काँग्रेस व कामगार संघटनांमध्ये अधिक जवळचे संबंध प्रस्थापित झाले. महाराष्ट्रात त्यांनी कित्येक सभांमधून क्रांतिकारी राष्ट्रवादाची शिकवण दिली.** म्हणून रॉय साहेबांच्या सर्वच हालचालींकडे सरकार करड्या नजरेने पाहू लागले.

सविनय कायदेभंग आंदोलनात कारावासात गेलेल्या काही काँग्रेसजनांनी तेथे मार्क्सवादाचा अभ्यास केला होता. त्यांच्यातले काही कारावासातून सुटल्यावर त्यांनी कम्युनिझमची दीक्षा घेतली. मात्र ज्यांना रशियासारखी हुकूमशाही अमान्य होती ते रॉयवादी झाले. मुळशी सत्याग्रह व कायदेभंगासाठी अनेकदा कारावासात गेलेले विनायकराव भुस्कुटे तुरुंगात मार्क्सवादी झाले. साताऱ्याचे नाथ घाणेकर हेही डाव्या विचारसरणीकडे वळले. १९४० नंतर ते कम्युनिस्ट झाले.

यूथ लीगचे नेते युसुफ मेहेरअली, र. के. खाडिलकर. एस. एम. जोशी यांच्यावरही रॉय यांच्या विचारांचाही प्रभाव पडला होता. मणिबेन कारा, एम. आर. शेट्टी व दोघे कर्णिक बंधू आणि मस्करेन्हास हे आधीच रॉयवादी झालेले होते. वाईच्या प्राज्ञ पाठशाळेतील ४४ शिक्षक व विद्यार्थी १९३० साली तुरुंगात गेले होते. त्यापैकी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी व महादेव वासुदेव वाटवे (भय्याशास्त्री) हे १९३२ च्या आंदोलनातदेखील तुरुंगात गेले होते. तेही रॉयवादी झाले. तसेच वामनराव कुलकर्णी, ह. रा. महाजनी, यशवंतराव चव्हाण, आत्माराम पाटील, अनंत केरू भोसले, जी. डी. पारीख हेही रॉयवादी झाले. समाजवादी विचारसरणीच्या सर्वांनीच पक्षीय अभिनिवेश न बाळगता काँग्रेसमध्ये प्रवेश करून जवाहरलाल नेहरूंशी सहकार्य करावे, असे तेव्हा रॉय प्रतिपादन करीत होते. हा विचार त्यांनी फैजपूर काँग्रेसमध्ये अधिक प्रभावीपणे मांडला.

**फैजपूर काँग्रेसमध्ये अपूर्व युती :—** १९३६ सालातही कम्युनिस्ट पक्षावर बंदी असल्यामुळे सर्व कम्युनिस्ट काँग्रेसमध्ये सामील झाले. त्यांचा कामकरी व शेतकरी पक्ष अद्याप किसानांपर्यंत पोहोचला नव्हता. म्हणून नवीनच स्थापन झालेल्या अ. भा. किसान सभेतही ते दाखल झालेत. भारतीय राजकारणातील असे सर्व घटक आणि रॉय व त्यांचे अनुयायी फैजपूरच्या अधिवेशनास मुद्दाम आले. महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस समितीने सर्व डाव्या पक्षांचा मूड पाहून एम. एन. रॉय वगैरे वरिष्ठांबरोबर कॉ. डांगे यासारख्या कम्युनिस्टांचीही प्रतिनिधी म्हणून निवड केलेली होती. उषाताई डांगेंनाही आवर्जून निमंत्रण दिले होते. ई. एम. एस. नंबुद्रिपाद, रणदिवे, विष्णूचितळे, श्रीनिवास सरदेसाई, दि. के. बेडेकर, डी. बी. कुलकर्णी, डी. एस. वैद्य व सोलापूरचे कम्युनिस्ट पुढारी रघुनाथराव कराडकर वगैरे कम्युनिस्ट आमच्या फैजपुरात उपस्थित होते. हे सर्व जहाल पुरुष अधिवेशनात आपला प्रभाव दाखवत असल्याचे गुप्तचरांनी नोंदून ठेवले. रॉय महोदयांच्या इशाऱ्यानुसार वसंतराव व त्यांचे बंधू द्वारकानाथ कर्णिक आणि सर्वच रॉयवादी युवक अधिवेशनाच्या प्रचारासाठी झटत असल्याचे गुप्तचरांनी नमूद करून ठेवले होते.

वस्तुतः स्टालिनशी मतभेद झाल्यामुळे असेल बहुधा, रॉयवादी आणि कम्युनिस्ट यांचे परस्परसंबंध सलोख्याचे राहिले नव्हते. तथापि कम्युनिस्टांनी रॉय साहेबांना विरोध करण्याचे धाडस केले नाही. आताशा जयप्रकाश नारायण मार्क्सवादी झालेले होते. मात्र त्यांचे साथी असलेले आचार्य नरेंद्र देव मार्क्सवादी नसूनही कम्युनिस्टांशी युती करण्यास तयार झाले. **अखेरीस रॉयवादी, समाजवादी आणि साम्यवाद्यांनी फैजपूरला युती केली होती. भारतातील हे अपूर्व राजकीय एकात्मीकरण होय!**

रॉय यांनी अधिवेशनातील भाषणात सर्वच डाव्या घटकांना परखडपणे समज दिली होती की, प्रत्येक जहालमतवादी गटाची विचारप्रणाली काहीही असली, तरी इतर कोणताही प्रश्न उपस्थित न करता सर्वांनी काँग्रेसच्याच आंदोलनात बिनशर्त सहभागी व्हावे. त्यांनी जहालांना ठणकावले की, हिंदुस्तानास पूर्ण स्वातंत्र्य लाभेपर्यंत समाजवादी आकृतिबंधाचा आग्रह करणे आणि समाजवादी अर्थव्यवस्थेच्या मुद्यावर रण माजविणे या दोन्ही गोष्टी तर्कसंगत तर नाहीतच. शिवाय त्या उचितही नाहीत.

या मतावर समाजवाद्यांनी आक्षेप घेतले. मात्र जयप्रकाशजींनी या वादास आवर घातला. म्हणजे गांधीजींना जे हवे तेच रॉय व जयप्रकाश या दोघांनी केले. कारण रॅडिकल गटांच्या सर्वच मागण्या पूर्ण करणे काँग्रेसला शक्य नव्हते. काही मागण्यांना काँग्रेसने प्रतिसाद दिला. आर्थिक नियोजनाचे धोरण ठरले. काँग्रेसने कृषी अर्थव्यवस्था, शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वगैरेंबाबत महत्त्वाचे ठराव संमत केले.

लखनौ व फैजपूर काँग्रेसच्या अध्यक्षीय भाषणांमधून नेहरूंनी सोशालिझमची संकल्पना स्पष्ट करताना म्हटलेच होते की, भारताच्या समस्या सोडविण्यासाठी समाजवादी समाजरचना हा एकमेव मार्ग होय. " आपण समाजवाद हा शब्द केवळ भोंगळ मानवतावादी भूमिकेतून न वापरता शास्त्रोक्त विचार व आर्थिक धोरण या अर्थाने वापरला " असेही त्यांनी प्रतिपादन केले होते. म्हणूनच १९३६-१९३७ मध्ये काँग्रेसमधील डावे, समाजवादी, रॉयवादी आणि कम्युनिस्टांच्या अपेक्षा खूप उंचावल्या होत्या. **त्याच वातावरणात अखिल भारतीय विद्यार्थी संघ, प्रोग्रेसिव रायटर्स असोसिएशन आणि इंडियन पीपल्स थिएटर अशा कित्येक पुरोगामी विचारसरणीच्या संघटना निर्माण झाल्या.** मुंबईत त्यांच्या शाखा आल्या. व्यासपीठ, रंगभूमी आणि साहित्यातून समाजवादी विचारधारा प्रसारित झाली. याचा परिपाक असेल म्हणून मुंबई प्रांतिक काँग्रेस समितीने १ मे १९३७ च्या मे दिन सोहळ्यात सक्रिय भाग घेतला. बहुतेक कम्युनिस्ट काँग्रेसवर टीका करीत असले, तरी ते काँग्रेसचेही सदस्य होते.

**कम्युनिस्टांच्या कारवाया :—**१९३७ साली मुंबई शहर हे भारतातील कम्युनिस्टांचे मुख्यालय होते. येथून देशातील कम्युनिस्ट चळवळीचे सूत्रसंचालन करण्यात येई स्थानिक कम्युनिस्टांबरोबर अजयकुमार घोष, पी. सी. जोशी वगैरे परप्रांतीय नेते येथून भूमिगत चळवळीची सूत्रे हलवत असत. ते मुंबईत तसेच इतर शहरांमध्ये अगदी अचानक संप घडवून आणत. प्रांतिक स्वायत्तता आणि १९३० च्या मंदीनंतरची आर्थिक कारणे यांमुळे औद्योगिक क्षेत्रात असंतोष वाढला होता. १९३७ सालात मुंबई इलाख्यात ८८ औद्योगिक तंटे उद्‌भवले व त्यांत एक लाख दहा हजार कामगार संपात अडकले होते. १९३८ साली झालेल्या १११ कलहांचा फटका ६२,०००

कामगारांना बसला. मंदीनंतरचे आर्थिक पुनरुज्जीवन होत असताना, असे कलह अर्थव्यवस्थेला व कामगारांनाही हानिकारक होते. म्हणून खेर मंत्रिमंडळाने गिरणी कामगारांच्या वेतनाबाबत सखोल चौकशी करण्यासाठी जयरामदास दौलतराम (अध्यक्ष), वैकुंठलाल मेहता, धनंजयराव गाडगीळ आणि एस. ए. ब्रेलवी यांची समिती नेमली. चार जणांच्या कुटुंबाला मुंबईत जगण्यासाठी दरमहा किमान ५५ रुपये लागतात असे समितीने अहवालात नमूद केले होते. त्यानुसार मुंबईतील कामगारांच्या वेतनात १२.५ टक्के वाढ करावी (फेब्रुवारी १९३८) अशी समितीने शिफारस केली होती. मात्र यामुळे कम्युनिस्टांचे समाधान झाले नाही.

मीरत खटल्यातील शिक्षा भोगून सुटल्यावरदेखील इंग्रज सरकारने अनेक कम्युनिस्टांना काही कारणास्तव पुन्हा कारावासात डांबले होते अथवा हद्दपार केले होते. खेर मंत्रिमंडळाने सत्ताग्रहण करेपर्यंत मुंबई राज्यातील वीस कम्युनिस्ट कामगार नेते तुरुंगातच होते व इतर काही हद्दपारीमुळे परागंदा झालेले होते. काँग्रेसच्या निवडणूक आश्वासनानुसार राजबंद्यांची सुटका करावी अशी मागणी करण्यात आली होती. जवाहरलाल नेहरू याबाबत अत्यंत आग्रही होते. मात्र याबाबत बाळासाहेब खेर व गृहमंत्री के. एम. मुन्शी कम्युनिस्टांचे विरोधक असून मुद्दाम दिरंगाई करीतआहेत, असा गैरसमज पसरला. वस्तुस्थिती अशी होती की, खेर व मुन्शी कम्युनिस्टांवरील सर्व निर्बंध रद्दबातल करून त्यांना सोडण्याचे रीतसर प्रयत्न करीतच होते. तथापि व्हाइसरॉय लिनलिथगोंच्या आदेशानुसार गव्हर्नर ब्रेबर्न कालहरणाचा डाव खेळतहोते. इतकेच नव्हे तर मुन्शी यांनी हे प्रकरण धसास लावण्यासाठी सादर केले असता ब्रेबर्न साहेब म्हणाले होते, " You can do it only on my dead body". या ग्रंथातील **मुंबईचे काँग्रेस मंत्रिमंडळ** या विभागात याबाबत अधिक विवेचन केलेले आहे. म्हणून इथे इतकेच म्हणावयाचे की, खेर व त्यांचे सहकारी सर्व कम्युनिस्टांना मुक्त करण्यास प्रयत्नशील होते. नेहरू व गांधीजींच्या सूचनांचा अनादर करणे त्यांना शक्य नव्हते. सरकारी कागदपत्रांमधून आम्हास आढळले की, कामगार विभागाचा अधिकारी ए. डब्ल्यू. प्राईड याने मुंबईच्या मुख्य सचिवास शिफारस केली होती की, कोणाही कम्युनिस्टावरचे व त्यांच्या संघटनेवरचे निर्बंध

उठवू नये ; आणि त्यांना वठणीवर आणण्यासाठी आणीबाणी काळात उपयोगात येणारे सर्वच विशेष अधिकार वापरावेत. कारण कुशल कम्युनिस्ट नेते बदललेल्या राजकीय परिस्थितीचा गैरफायदा घेतील व त्यांच्या विरोधकांना नेस्तनाबूत करतील.[२५]

अखेर खेर, गुलझारीलाल नंदा व स्वतः महात्मा गांधींनी गव्हर्नरला पटवून दिल्यानंतर १९ ऑक्टोबर १९३७ पासून कम्युनिस्टांवरील सर्व निर्बंध रद्दबातल करण्यात आले.

डांगे यांनी बंद पडलेले **क्रांति** साप्ताहिक ४ सप्टेंबर १९३७ पासून सुरू करून कामगार चळवळीला मार्गदर्शन केले. मिरजकर यांनीही फेब्रुवारी १९३८ मध्ये **नॅशनल फ्रंट** नामक पत्रक सुरू केले. अधिकारी बंधूंपैकी जगन्नाथ मोरेश्वर अधिकारी २४ एप्रिल १९३७ रोजी अकाली निधन पावले आणि ऑक्टोबरात गंगाधर मोरेश्वर अधिकारी भूमिगत अवस्थेतून प्रकट झाले. नवीन वातावरणात डांगे, गंगाधरराव, रणदिवे व मिरजकर यांच्या बरोबरीने पी. सी. जोशी, अजय घोष, सोमनाथ लाहिरी वगैरे परप्रांतीय कम्युनिस्ट नेत्यांनी भारतभरच्या कम्युनिस्ट चळवळीचे केंद्र मुंबईत उभारले. संपूर्ण देशातील चळवळीचे सूत्रसंचालन मुंबईतून करण्यात आले. कम्युनिस्ट पक्ष वेतनवाढ मिळविण्यासाठी सार्वत्रिक संप घडवून आणण्याची तयारी करत असताना उपरोक्त जयरामदास दौलतराम समितीने मुंबईतील कामगारांना १२.५ टक्के, सोलापुरातील कामगारांना १४.३ टक्के व अहमदाबादसाठी ९ टक्के वेतनवाढीची शिफारस केली. काँग्रेस सरकारने ही वाढ देण्यास गिरणीमालकांना सक्ती केली होती. त्यामुळे कम्युनिस्टांनी आपला संपाचा बेत मागे घेतला होता. काँग्रेसच्या या प्रयत्नांमुळे या इलाख्यातील गिरणी कामगारांना एकूण एक कोट रुपयांपेक्षा अधिक अतिरिक्त लाभ झाला होता. याशिवाय कामगारांना आजारपणाची पगारी रजा व मोफत औषधोपचारांचाही लाभ झाला.

कम्युनिस्टांना काँग्रेसच्या परिसीमेबाहेर स्वतंत्र असा राजकीय पक्ष चालविणे अवघड होते. १९३८ च्या अंतकाळात डांगे, जोगळेकर, निंबकर व पाटकरांना याची जाणीव झाली. म्हणूनच कम्युनिस्ट पुन्हा डावा गट म्हणून काँग्रेसवादी झाले. त्यांनी रणनीती बदलून काँग्रेसची सदस्यसंख्या वाढविण्याच्या मोहिमेत भाग घेतला. या काळात कम्युनिस्ट सभासद काँग्रेसच्याच चर्चापीठावरून ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध

लढा देण्याचे इरादे घोषित करू लागले. तसेच कामगारांचा लढा लढण्याचे मनसुबे करू लागले. या कारणाने कम्युनिस्ट-काँग्रेस यांच्यात सहमतीचे धोरण तयार झाले, असे गुप्तचरांच्या लक्षात आले.[२६] या धोरणामागे जवाहरलाल व समाजवादी मंडळीही होती. मेहेरअली तसे स्पष्ट बोलतही!

तथापि ही सहमती वा तह अल्पायुषी ठरला. कम्युनिस्ट पुन्हा संप व औद्योगिक कलह माजवू लागले, क्रांतीचा नारा घुमवू लागले. म्हणून काँग्रेसला या मंडळीपासून लांब राहावे लागले. काँग्रेसला प्रांतिक स्वायत्ततेनुसार सरकार चालवणे आवश्यक होते ; जबाबदारपणे प्रशासन करणे गरजेचे होते. म्हणून काँग्रेसला कम्युनिस्टांपासून लांब राहावे लागले. बाळासाहेब खेर व मुन्शी यांच्या सरकारला कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या काही कम्युनिस्टांना अटक करावी लागली ; त्यांच्या प्रचारसाहित्यावर बंदी घालावी लागली. आणि ब्रिटिशांनी सुटकेचा निश्वास सोडला.

दुसरे महायुद्ध पेटल्यावर जोगळेकर, लालजी पेंडसे व आर. ए. खेदगीकरांनी प्रांतिक ट्रेड युनियन काँग्रेसतर्फे युद्धाबाबतची कम्युनिस्टांची भूमिका जाहीर करताना, व्हाइसरॉयच्या सर्व वटहुकमांचा कडक निषेध केला. त्यात पुढे म्हटले, “ It is necessary to resort to direct immediate action in the interest of the Independence of India, and we request the Congress Working Committee to form a united front and chalk out a fighting programme to resist all attempts to impose a war on India...... British Imperialism at present is tantamount to committing an offence against democracy and the Indian masses”. [२७]

❑❑

## संदर्भ

१. मुंबई सरकार, होम स्पेशल, फाईल क्र. ७२४-ए, २० डिसें. १९२८ चा अहवाल
२. कित्ता.
३. कित्ता.
४. मुंबई सरकार, होम स्पेशल, फाईल क्र. १८/आयएनसी/३०, २० सप्टेंबर १९३० चे टिपण.
५. कित्ता.
६. कित्ता, फाईल क्रमांक १८/आयएनसी/३१.
७. बाँ. प्रे. पोलीस ॲब्स्ट्रॅक्ट ऑफ इंटेलिजन्स, फेब्रुवारी १९२८.
८. मुंबई सरकार, होम स्पेशल, फाईल क्र. ७२४-ए, २० डिसें. १९२८ चा अहवाल.
९. कित्ता.
१०. कित्ता.
११. एस. एम. जोशी, **मी—एस. एम.,** पुणे, १९८४, पृ.३२.
१२. ग. प्र. प्रधान, **महाराष्ट्राचे शिल्पकार : ना. ग. गोरे,** मुंबई, २००६, पृ. ७-१२.
१३. **सिलेक्टेड वर्क्स ऑफ जवाहरलाल नेहरू,** खंड ३, नवी दिल्ली.
१४. हिंदुस्तान सरकार, होम पोलिटिकल, फाईल क्र. १७९/२९, १९२९.
१५. बाँ. प्रे. पोलीस ॲब्स्ट्रॅक्ट ऑफ इंटेलिजन्स, २५ जुलै १९३१, पृ. १६२४.
१६. के. के. चौधरी, **झुंजार पुणे,** पृ. २४०.
१७. रिचर्ड न्यूमन, **वर्कर्स अँड युनियनस् इन बाँबे : १९१८-१९२९,** पृ. २०९, २१६.
१८. गव्हर्नर साईक्स यांचे भारतमंत्र्यास पत्र, १६ ऑगस्ट १९२८, राष्ट्रीय अभिलेखागार.
१९. **टाइम्स ऑफ इंडिया,** २९ जुलै १९३१.
२०. हिंदुस्तान सरकार, होम पोलिटिकल फाईल क्र. ७/२/१९३४.
२१. कित्ता, सॅम्युएल होअरचे उत्तर, २० जुलै १९३४.
२२. बाँ. प्रे. पोलीस ॲब्स्ट्रॅक्ट ऑफ इंटेलिजन्स, १९३२, पृ. १४३-४५.
२३. कित्ता, १९३३-३४, पृ. ३५६-५७.
२४. कित्ता, १९३४, पृ. ६०४.
२५. बी. जी. खेर कागदपत्र, के. के. चौधरी खाजगी संग्रह, फाईल क्र. २, प्राईडचे मुख्य सचिवास पत्र, ५ ऑक्टोबर १९३७.
२६. बाँ. प्रे. पोलीस ॲबस्ट्रॅक्ट ऑफ इंटेलिजन्स, १९३८, पृ. ११९.
२७. कित्ता, १९३९, पृ. ४२४.

प्रकरण ११

# सविनय कायदेभंग आंदोलन

## संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा

'संपूर्ण स्वातंत्र्य' हेच काँग्रेसचे ब्रीदवाक्य व समुद्दिष्ट म्हणून घोषित करण्यासाठी जवाहरलालजी, सुभाषबाबू, मेहेरअली वगैरे युवा नेते १९२७ पासून आक्रमक पवित्र्यात होते. याबाबतचा ठराव जवाहरलालजी व केशवराव जोगळेकरांनी मद्रास काँग्रेसमध्ये (१९२७) मांडला होता. गांधीजी त्या अधिवेशनास उपस्थित नव्हते. पण ठरावास त्यांचा अनुकूल प्रतिसाद लाभला होता. पुढील वर्षीच्या कोलकाता अधिवेशनात काही अटींवर या ठरावावर तडजोड झाली. कर्मठ काँग्रेसजन, लिबरल पक्षाचे नेते, उद्योगपती व भांडवलदारांचा विरोध या गांधीजींपुढील समस्या होत्या. संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव तात्काळ संमत करावा, ही सुभाषबाबूंची दुरुस्तीची सूचना १३५० विरुद्ध ९७३ मतांनी फेटाळली गेली होती. पुणे व मुंबईच्या निंबकर, जोगळेकर, मेहेरअली, न. वि. गाडगीळ वगैरेंनी या सूचनेचा जोरदार प्रचार केला होता. बॅरिस्टर जिना व त्यांच्या पक्षाला हा ठराव मुळातच मान्य नव्हता. म्हणून या दिवसांपासून ते काँग्रेसपासून अंतिमतः दूर गेले.

१९२९ सालात गांधींजींनी ग्रामीण भागांमध्ये विधायक कार्य, नशाबंदी, ब्रिटिश मालावर बहिष्कार आणि किसान वर्गाला न्याय मिळवून देण्यावर अधिक भर दिला. विदेशी कपड्यांच्या अनेक होळ्या पेटवण्यास त्यांनी उत्तेजन दिले. काँग्रेसची घटलेली सभासदसंख्या हेही गांधीजींच्या या महिन्यांमधील अलिप्ततेचे एक कारण होते. मे, १९२९ मध्ये पक्षाचे फक्त ५६,००० सभासद होते. मात्र पुढील सहा महिन्यांमध्ये जवाहरलाल नेहरू व साथीदारांनी जबरदस्त मोहीम उभारून सभासदसंख्या पाच लाखांवर नेली. सर्वच युवक नेते झुंजारपणे जनजागृती करीत होते.

मात्र त्या उत्साहवर्धक वातावरणात युवक संघटनांच्या ज्वलंत हाकेला प्रथम प्रतिसाद दिला गांधीजींनी ! त्यांनी घोषित केले :— "पुढील लढा युवकांनीच लढावयाचा असून, त्यांना अधिकार देणे अपरिहार्य होय." ऐतिहासिक लाहोर

काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठी हिंदुस्तानातील अठरा प्रांतिक काँग्रेस समित्यांपैकी दहा समित्यांनी महात्माजींच्याच नावाचा आग्रह धरला होता. पाच प्रांतिक समित्यांनी सरदार पटेलांना पसंती दिली, तर केवळ तीन समित्यांना नेहरू पसंत होते. सर्व ज्येष्ठ पुढारी व पक्षांतर्गत दबाव गट आणि काँग्रेसशी सख्य असलेले भांडवलदार असे सर्वच वर्ग गांधीजींवर दबाव आणत होते की, त्यांनी प्रांतिक समित्यांच्या कौलानुसार स्वतःच लाहोरचे अध्यक्षपद भूषवावे. सरदार पटेलांचीही इच्छा तशीच होती. तथपि महात्मा आपल्या निर्णयावर ठाम राहिला. हुकूमशहा असा आरोप पत्करूनही! कोणी म्हणतात मोतीलाल नेहरूंनी आपल्या सुपुत्रास अध्यक्षपद मिळावे, अशी गांधीजींना विनंती केली. पण त्यात तथ्य नाही, त्यास पुरावाही नाही !

वस्तुतः गांधीजीच अध्यक्षपदी निवडले गेले, असे काँग्रेस कार्यकारिणीने घोषितही केले होते. परंतु गांधीजींनी तात्काळ राजीनामा दिला होता. म्हणून पेचप्रसंग सोडवण्यासाठी २८ सप्टेंबर १९२९ रोजी लखनौमध्ये अ.भा.काँ. समितीचे अधिवेशन घेण्यात आले. त्याआधी १३ सप्टेंबरला क्रांतिकारक जतिंद्रनाथ दास ६४ दिवसांचा अन्न सत्याग्रह करताना शहीद झाले होते. राष्ट्रवादी युवकांचे डोळे व कान सरदार भगतसिंग यांच्यावरील खटल्याकडे लागलेले होते. काँग्रेसजनांप्रमाणे स्वराज्य पक्षीयांनाही कायदेमंडळांचा वीट (डिसगस्ट) आला होता. मग पुढे काय? सविनय कायदेभंग हाच तर्कसंगत उपाय होता. तथापि हा न चोखाळलेला मार्ग आणि रणनीतीचे नेतृत्व करणार कोण? गांधी आणि फक्त गांधी! म्हणूनच लखनौमध्ये त्यांच्यावर प्रचंड दबाव टाकून त्यांना काँग्रेसचे अध्यक्षपद स्वीकारण्याचा अपूर्व आग्रह करण्यात आला. तथापि वस्तुनिष्ठ विचारसरणीच्या गांधीजींनी काँग्रेसचे तख्त युवकांच्या पुढाऱ्याकडे देण्याचा आपला सर्वाधिकार वापरला. मात्र पटेल या निर्णयाच्या आड आले नाहीत.[१]

या निर्णयामुळे ब्रिटिशांशी कडवा लढा होणार ही कल्पना काँग्रेसप्रमाणेच ब्रिटिशांनाही आली. त्याबरोबर महात्मा गांधींना हाताळणे अधिकच कठीण होईल हे सरकारला अंतर्बाह्य पटले.

३१ ऑक्टोबर १९२९ रोजी व्हाइसरॉय लार्ड आयर्विन यांनी वसाहतीच्या स्वराज्याचा मोघम देकार जाहीर केला. सायमन आयोगाचा अहवाल प्रसिद्ध झाल्यावर निवडक भारतीय प्रतिनिधींची बैठक लंडनला घेण्याचा मनसुबा या आयर्विन देकारात होता. आयर्विन साहेबांनी जिला 'लंडन कॉन्फरन्स' म्हटले होते, तिला भारतीय मवाळ पक्षीयांनी 'राऊन्ड टेबल कॉन्फरन्स' असे नाव दिले. हा सर्व गोल-गोल प्रकार झाला हे नंतर लक्षात आले, असो. आयर्विन साहेबांबरोबर काँग्रेस नेत्यांनी चर्चा केली, पण ती विफल ठरली (२३ डिसेंबर १९२९). इकडे आयर्विनचा दुटप्पीपणा दिसत होता, तर तिकडे पार्लमेंटमध्ये लॉर्ड बर्कनहेड निरंकुश शासनपद्धतीसाठी आवाज लावत होते. २३ डिसेंबर रोजीच नवी दिल्लीत आयर्विनच्या आगगाडीला बॉंबद्वारे घातपात करण्यात आला, पण ते वाचले. अशा वातावरणात २९ डिसेंबर १९२९ रोजी अत्यंत कडाक्याची थंडी असताना लाहोरात काँग्रेसचे ऐतिहासिक अधिवेशन संपन्न झाले.

ब्रिटिशांच्या साम्राज्यशाहीतून आणि वर्चस्वापासून पूर्णतः मुक्ती हा आपणास हव्या असलेल्या संपूर्ण स्वातंत्र्याचा अर्थ आहे, असे जवाहरलाल नेहरूंनी निःसंदिग्धपणे लाहोरच्या अविस्मरणीय अध्यक्षीय भाषणात घोषित केले. " I must frankly confess that I am a socialist and a republican and am no believer in kings and princes or in the order which produces the modern kings of industry."

काँग्रेसने शेतकरी व कामगारांचे प्रश्न हाती घेऊन या वर्गास संघटित करावे असे आवाहन केले. तेव्हाच नेहरूंनी गांधीजींच्या विश्वस्त (ट्रस्टीशीप) प्रमेयावर लाहोरमध्ये टीका केलेली होती. अहिंसेच्या आचारप्रणालीचा नेहरूंनी जोरदार पुरस्कार केला, पण तो एक व्यावहारिक धोरण म्हणून! हिंदुस्तानला संघटितरीत्या हिंसक मार्ग पत्करणे शक्य नाही हे मान्य केले. ब्रिटिशांविरुद्ध आर्थिक बहिष्कार, कायदेमंडळावर बहिष्कार वगैरे सूचना त्यांनी अध्यक्षीय भाषणात मांडल्या.[२] सुभाषबाबूंनी तीन प्रस्ताव मांडले होते :—(१) तात्काळ करबंदीची मोहीम उभारावी ; (२) शक्य तेथे संप घडवून आणावे ; आणि (३) समांतर सरकारे स्थापन करावी. तथापि या अव्यवहार्य सूचना असंमत झाल्या.

मात्र लाहोरला झालेला सर्वात महत्त्वाचा ऐतिहासिक ठराव होता 'संपूर्ण स्वातंत्र्य' हेच काँग्रेसचे ब्रीदवाक्य (क्रीड) व समुद्दिष्ट घोषित करण्याचा! या ठरावाचा मसुदा जवाहरलालजी यांनी केला असला, तरी तो अधिवेशनात महात्मा गांधींनी मांडला. स्वराज्य या संज्ञेचा अर्थ संपूर्ण स्वातंत्र्य असल्याचे स्पष्ट करून मोतीलाल नेहरू कमिटीचा अहवाल कालबाह्य झाल्याचे स्पष्ट करण्यात आले.

पक्षाने कायदेमंडळांतील काँग्रेस सभासदांना राजीनामे देण्याचा आदेश लाहोरात दिला. सरकारवर बहिष्कार टाकण्याचे ठरले. आणि अत्यंत महत्त्वाचे म्हणजे सविनय कायदेभंग लढा सुरू करण्याचे अधिकार अ.भा.काँ. समितीला व मूलतः गांधीजींना देण्यात आले.

डिसेंबर संपून १ जानेवारी १९३० च्या मंगल पहाटेला रावी नदीच्या तीरावर लाहोरला जवाहरलाल नेहरूंनी हजारोंच्या साक्षीने पूर्ण स्वातंत्र्याचा जयघोष करीत राष्ट्रध्वज फडकावला. पारतंत्र्याचा निबिड अंधकार जाऊन स्वातंत्र्याची पहाट उगवणार, असा थरार उमटला. तेव्हा काँग्रेसमध्ये एक नवीन नारा आला, " इन्किलाब जिंदाबाद! "

## पहिला स्वातंत्र्य दिन

लाहोरच्या घोषणेनुसार संपूर्ण स्वातंत्र्यासाठी लढा उभारण्यासाठी पूर्वरंग म्हणून राष्ट्राच्या मानसिक तयारीची परीक्षा घेण्यास्तव गांधीजींनी प्रारंभ केला. २६ जानेवारी १९३० रोजी स्वातंत्र्याची प्रतिज्ञा घेण्याचा कार्यक्रम तयार केला. त्यांनी लिहिलेली स्वातंत्र्याची पुढील प्रतिज्ञा काँग्रेस कार्यकारिणीने संमत केली. " ब्रिटिशांनी भारताचे आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक तसेच नैतिक खच्चीकरण केले; हा देश उद्ध्वस्त केला ; ब्रिटिशांची ही कृत्ये म्हणजे मानवजात व परमेश्वराविरुद्धचा गुन्हा होय; अशा राजसत्तेला न जुमानता तिच्याविरुद्ध सविनय कायदेभंग आणि करबंदी करण्याची आमची प्रतिज्ञा आहे. "

सरकारच्या मते या प्रतिज्ञेचे जाहीर वाचन हा मोठाच राजद्रोह होता. भारतीयांचे सरासरी दैनिक उत्पन्न केवळ पावणे दोन आणे होते. सरकारच्या एकूण उत्पन्नापैकी २० टक्के उत्पन्न शेतकऱ्यांकडून महसुलाद्वारे हस्तगत केलेले होते. मिठावरील करातून सरकारला ३ टक्के उत्पन्न मिळत असे. हा अन्याय होता. त्यामुळे त्याविरुद्ध

लढा उभारावयाचा होता. पहिल्या स्वातंत्र्य दिनाचा हा प्रतीकात्मक सोहळा कित्येक शहरांमध्ये उत्साहाने साजरा झाला. मात्र त्यास सर्वाधिक प्रतिसाद मिळाला मुंबईतच ! गिरगाव चौपाटीवर तीस हजारांवर लोकांनी ही प्रतिज्ञा घेतली. तिरंगी झेंडा ठिकठिकाणी फडकवण्यात आला. संपूर्ण १९२९ सालात मुंबईत विदेशी कापडावर बहिष्कार, खादीचा प्रचार आणि स्वयंसेवकांची दले उभारण्यावर भर दिलेला होता. मुंबई यूथ लीगचे कार्य वाढले होते. विदेशी कापडावर बहिष्कार आणण्याचे प्रयत्न सुसंघटित करण्यासाठी एक समितीही गठित केलेली होती. मणि भवनाभोवती कार्यकर्त्यांचे जणू मोहोळ जमले होते. त्यामुळे मुंबईतील स्वातंत्र्य दिनाचा प्रयोग चांगलाच यशस्वी झाला. पुण्यात वि. म. भुस्कुटे, न. वि. गाडगीळ, शंकरराव देव व बाळूकाका कानिटकर यांनी असाच कार्यक्रम केला. गुजरात, अलाहाबाद, कोलकाता, नागपूर, वर्धा वगैरे ठिकाणीही प्रतिज्ञावाचनास चांगला प्रतिसाद मिळाला.

यातून काँग्रेसची खात्री पटली की, देश सविनय कायदेभंगाच्या जनआंदोलनास तयार आहे. कायदेभंगासाठी गांधीजींनी 'अन्याय्य करांचे प्रतीक' म्हणून मिठाचा कायदा निवडला. ब्रिटिश मीठ हिंदुस्तानात आयात करण्यासाठी सॉल्ट कमिशनने १८३६ साली हिंदी मिठावर कर लादण्याची शिफारस केली होती.

**या पहिल्याच स्वातंत्र्य दिनाच्या स्मरणार्थ स्वतंत्र भारताची राज्यघटना २६ जानेवारी १९५० रोजी अमलात आणण्यात आली, आणि तोच दिवस प्रजासत्ताक दिन म्हणून पाळला जातो. या तारखेला ऐतिहासिक महत्त्व आहे.**

२६ जानेवारी १९३० च्या स्वातंत्र्य दिनाला लाभलेल्या विपुल प्रतिसादाचा अर्थ लावून अ.भा.काँ. समितीने १४ फेब्रुवारीला अहमदाबादमध्ये गांधीजींना सर्वाधिकार बहाल केले. आगामी आंदोलन गांधीजींनी त्यांच्या पद्धतीने लढवावयाचे होते. न्यायालयांवर व शिक्षणसंस्थांवर बहिष्कार याचीही शिफारस समितीने केलेली होती.

जनआंदोलनांच्या रणनीतीवर गांधीजी चिंतन करीत असताना त्यांच्याकडे युवक काँग्रेस आणि काँग्रेसच्या परिसीमेतील युवकांच्या संघटना साम्राज्यशाहीवर जोरदार धडक मारण्याची मागणी करीत होत्या. वसाहतीच्या स्वराज्यासाठी वकिली करणाऱ्या बॅरिस्टर जयकर, सप्रू वगैरे मवाळांची मुंबईतील बैठक बॉम्बे यूथ लीग व युवकांनी

उधळली होती. अखिल भारतीय नौजवान भारत सभेने ' कामगार व किसानांचे लोकशाही प्रजासत्ताक राज्य स्थापन करणे ' हेच उद्दिष्ट असल्याचे घोषित केले. अनेक पत्रके छापली जात होती.

पहिल्या स्वातंत्र्य दिन सोहळ्याला सर्वात उत्साहवर्धक प्रतिसाद मुंबई, अलाहाबाद, अहमदाबाद, लखनौ, आग्रा, कानपूर, कोलकाता, वर्धा आणि चितगाव शहरांमध्ये मिळाला. विद्यापीठे व महाविद्यालयांवर तिरंगा फडकवण्यात आला. मुलांनी वसतिगृहांमध्ये जल्लोष केला. आधीपासूनच पंजाबातील विद्यार्थी विलक्षण संवेदनक्षम झालेले होते. त्याप्रमाणे पंजाबातील सर्वच शहरांमध्ये स्वातंत्र्य दिनाचा सोहळाअत्यंत उत्साहात साजरा झाला. दिल्लीकरांनी विराट सभा भरवून आगामी लढा निकराने लढण्याचा संकल्प जाहीर केला. संयुक्त प्रांतांत विद्यार्थी आणि युवकांच्या संघटनांनी मिरवणुका काढल्या आणि आंदोलनासाठी सज्ज राहण्याचा निर्धार जाहीर केला.

त्या दिवसांमध्ये जवाहरलाल नेहरू दररोज युवकांच्या सभांमध्ये प्रेरणादायी भाषणे करीत. भारत जागृत झालेला होता. परंतु किसानांच्या संघटना उभारणे आवश्यक होते. विशेषतः शेतसारा बंदीची मोहीम यशस्वी करण्यासाठी व शेतकऱ्यांच्या संघटना बांधण्यासाठी नेहरू झटत होते. त्या दिवसांमध्ये गांधीजी व नेहरूंचा भर केवळ राजकीय स्वातंत्र्यावर नसून आर्थिक परिवर्तनावरही होता. नेहरू तर मार्क्सवाद व आर्थिक क्रांतीच्या परिभाषेत बोलत होते[३]. कारण आर्थिक सुधारणांच्या आश्वासनाशिवाय लोकांचा राजकीय चळवळीत फारसा सहभाग मिळण्याची शक्यता नव्हती. तेव्हा काँग्रेसला लोकशाही समाजवादाचा पुरस्कार करणे शक्य नव्हते. तथापि आर्थिक प्रश्नांची उचित दखल घेणे आवश्यक होते. नेहरू तेव्हा तेच करीत असत.

लाहोर काँग्रेसने अखिल भारतीय काँग्रेस समितीला सविनय कायदेभंग आंदोलन (शेतसारा बंदीच्या मोहिमेसह) उभारण्यास अधिकार दिले होते. पण याचा अर्थ असा की, आंदोलनाचे संचालन गांधीजींनी करावयाचे होते. त्यानुसार काँग्रेस कार्यकारिणीने आंदोलनाचे सर्वाधिकार त्यांना बहाल केले होते.

## गांधीजींच्या अकरा मागण्या

सविनय कायदेभंगाचा ठोस कार्यक्रम व रणनीती अपरिणत किंवा अंकुरावस्थेत असताना, साम्राज्यशाहीशी करावयाच्या मुकाबल्याची पहिली अवस्था या दृष्टीने गांधीजींनी आपल्या मागण्या व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विनला सादर केल्या. ३० जानेवारी १९३० च्या **यंग इंडिया** च्या अंकाद्वारे त्यांनी ती अकरा कलमी चार्टर व्हाइसरॉयला सादर केली. शोषित भारताच्या या सर्व मागण्या मंजूर केल्या तर सविनय कायदेभंगाची आवश्यकता उरणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. या मागण्या प्राप्त झाल्या तर स्वातंत्र्याचे सार मिळेल, असे गांधीजींचे गृहीतक होते. अकरापैकी आठ मागण्या आर्थिक स्वरूपाच्या होत्या. **याचा अर्थ, गांधीजी 'आर्थिक राष्ट्रवादाला' अधिक महत्त्व देऊन वाणिज्यवादी ब्रिटिशांची आर्थिक कोंडी करत होते.**

**अकरा कलमी सनद** :- (१) देशभर पूर्णतः दारूबंदी करण्यात यावी. (२) विनिमयाचा दर एक रुपयास एक शिलिंग व सहा पेन्स हा अन्यायकारक असल्यामुळे तो कमी करून एक शिलिंग व चार पेन्स करावा. (३) जमीन महसूल कमीतकमी ५० टक्क्यांनी कमी करून त्यावर कायदेमंडळाचे नियमन असावे. (४) मिठावरील कर रद्दच करावा. (५) लष्करावरील खर्च कमी करावा. (६) आय. सी. एस. अधिकाऱ्यांचे पगार निम्मे करावे. (७) विदेशी कापडापासून देशी कापडाला संरक्षण देण्यास्तव आयातीवर जकात बसवावी. (८) हिंदुस्तानच्या किनारपट्टीवरील जलवाहतुकीचे परवाने फक्त हिंदी नाविक किंवा आगबोट मालकांनाच द्यावे व त्यासाठी काँग्रेसने मांडलेले विधेयक मंजूर करावे. (९) खुनी नसलेल्या सर्व राजबंद्यांना मुक्त करावे. राजकीय खटले मागे घ्यावे. भारतीय दंडसंहितेतील १२४-अ हे कुविख्यात कलम आणि १८१८ चे भयावह रेग्युलेशन रद्द करावे. परदेशात आश्रय घेतलेल्या स्वातंत्र्य सैनिकांवरील पकड वॉरंट रद्द करावे. (१०) गुप्तचर विभाग बंद करावा. (११) स्वसंरक्षणासाठी शस्त्रे वापरण्याचे परवाने द्यावे, मात्र त्यावर लोकांचे नियंत्रण असावे.[४] या मागण्या आयर्विन संमत करणे असंभवनीय होते.

गांधीजींनी मागितलेली ही अकरा कलमी सनद प्रथम बॉंबे यूथ लीग व बहुसंख्य संघटनांना अपुरी व निराशाजनक वाटली. **व्हॅन्गार्ड** या मेहेरअलींच्या पत्रकाने त्यावर टीका केली, “इट रीड्स मोअर लाइक टीट-बीट्स दॅन अ सेल्फ-रिस्पेक्टिंग रिव्हॉल्युशनरी कॉऊन्टर ऑफर.” अनेक लोक बुचकळ्यात पडलेत. कॉंग्रेस अध्यक्ष जवाहरलाल नेहरू यांनाही या अकरा कलमांचे महत्त्व प्रारंभी पटले नाही.[५] त्यांनीच म्हटल्याप्रमाणे घटना इतक्या वेगाने घडत गेल्या की, कोणालाही वाद घालणे शक्य झाले नाही. कित्येक हजार कार्यकर्ते व पुढारी दांडी यात्रेच्या मॅरॅथॉनमध्ये चालत होते, धावत होते आणि गांधीजींची भाषणे ऐकत होते. आवेश अभूतपूर्व होता. इतिहासातील ही अपूर्व घटना होती.

सत्याग्रहाच्या आचारप्रणालीनुसार आंदोलनाची पूर्वसूचना म्हणून गांधीजींनी व्हाइसरॉयला ३१ जानेवारी १९३० रोजी निर्वाणीचा खलिता पाठविला. त्यात त्यांनी संपूर्ण स्वातंत्र्याचे सार स्पष्ट करणाऱ्या वरील अकरा मागण्या मांडल्या होत्या. व्हाइसरॉयने त्याकडे दुर्लक्ष केल्यावर गांधीजींनी मिठावरील कर हा कसा अमानुष प्रकार आहे, याभोवती रणनीती तयार केली. २ मार्च १९३० रोजी गांधीजींनी पाठपुरावा करताना आयर्विन यांना पाठविलेल्या दुसऱ्या ऐतिहासिक खलित्यात ब्रिटिश राज हा कसा ‘शाप’ आहे यावर सविस्तर भाष्य केले. “It has impoverished the dumb millions by a system of progressive exploitation.... It has reduced us politically to serfdom. It has sapped the foundations of our culture.” त्यांनी आयर्विनला हेही सुनावले की, दरिद्री शेतकरी व गरिबांवर लादलेल्या जबदरस्त करांद्वारे हस्तगत केलेल्या पैशातून “तुम्ही दरमहा २१,००० रुपये पगार व इतर भत्ते घेता. ब्रिटिश पंतप्रधानांचा पगार दरमहा फक्त ५,४०० रुपये असताना तुम्ही मात्र खुशाल २१,००० रुपये घेता! हिंदी प्रजेचे सरासरी दैनिक उत्पन्न पावणे दोन आणे असताना तुम्ही मात्र प्रतिदिनी ७०० रुपये पगार घेता! इंग्लंडमधील सरासरी दरडोई दैनिक उत्पन्न दोन रुपये असून तेथील पंतप्रधान दैनिक १८० रुपये पगार घेतात. म्हणजे या गरीब देशावर अमानुष कर लादून तुम्ही सत्ताधीश लोक भारताच्या सरासरी उत्पन्नाच्या पाच हजार पट पगार घेता! गुढगे टेकून मी विनंती करतो की, या वस्तुस्थितीचा तुम्ही विचार करावा.” या निर्वाणीच्या पत्रातून गांधीजींनी व्हाइसरॉयला आपल्या सत्याग्रहाच्या योजनेची स्पष्ट कल्पना दिली.[६]

गांधीजींनी लॉर्ड आयर्विन यांना असेही सांगितले की, "हिंदुस्तानातील कोट्यवधी मूक जनतेला ज्या स्वातंत्र्याची जरूरी आहे ते हिंसाचारी शक्तीच्या द्वारा मिळू शकणार नाही. आणि दिवसेंदिवस माझी श्रद्धा अधिकाधिक दृढ होत आहे की, शुद्ध अहिंसेविना दुसरा कोणताही मार्ग ब्रिटिश सरकारच्या संघटित हिंसेला रोखू शकणार नाही. पुष्कळांना वाटते की, अहिंसा ही एक निष्क्रिय शक्ती आहे. परंतु स्वानुभवाने मला माहीत आहे की, अहिंसा ही एक अत्यंत क्रियाशील शक्ती होऊ शकते. ब्रिटिश सरकारची संघटित हिंसक शक्ती आणि देशातील असंघटित हिंसक शक्ती यांचा सारखाच मुकाबला करण्यासाठी जबरदस्त अहिंसक शक्ती उभी करणे हा माझा उद्देश आहे." गांधीजींनी हे पत्र रेजिनाल्ड रेनाल्डस नामक ब्रिटिश भारत-मित्राच्या हस्ते आयर्विन यांच्याकडे पाठवले.[७]

विठ्ठलभाई पटेल यांनी वरील अकरा मागण्या पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड आणि भारतमंत्री वेजवूड बेन यांच्यापर्यंत एस. आर. बोमनजी यांच्यामार्फत पोहोचवल्या. तथापि त्यांनी जर-तर अशी भाषा वापरून साम्राज्यशाही बाणा दाखवून दिला. म्हणजे लेबर पक्षदेखील भारताविषयी उदासीनच होता.

कायदेमंडळावर बहिष्कार हे काँग्रेसचे धोरण ठरलेले होते. तथापि केळकर, मा. श्री. अणे व भोपटकरांना ते मंजूर नव्हते. मात्र परिस्थितीवशात त्यांनीही नंतर कायदेमंडळाचा त्याग केला. या मुद्यावरून महाराष्ट्र काँग्रेसमध्ये दुही निर्माण झाली. ती आपण नंतर पाहू.

## आंदोलनाची रणनीती व दांडीयात्रा

राष्ट्रीय लढा उभारण्यासाठी मिठाच्या कायद्याचा भंग ही रणनीती निवडल्यामुळे हिंदवासीय प्रारंभी संभ्रमात पडले खरे. तथापि नेहरूंनी आत्मचरित्रात लिहिल्याप्रमाणे, "अचानक मीठ हा शब्द गूढ मंत्रासारखा बनला. तो शब्द शोषक राजसत्तेचा निदर्शक बनला." विशेष म्हणजे रॅम्से मॅकडोनाल्ड जेव्हा पंतप्रधान नव्हते, तेव्हा त्यांनी आपल्या पुस्तकात कबूल केले होते, "हिंदुस्तानातील मिठावरील कर म्हणजे लूट आणि धादांत जुलूम होय." मिठावरील करातून हिंदुस्तान सरकारला वार्षिक पाच कोटी सात लाख रुपयांचा निव्वळ महसूल लाभत असे. मिठाचा घाऊक भाव ८२ पौंडाच्या मणाला केवळ दहा पैसे असून सरकार मणावर सव्वा रुपया

कर लादत असे. शिवाय वाहतूक व इतर खर्चामुळे गरिबांवर बोजा पडत असे. कर चुकवून मीठ तयार करणे व विकणे हे शिक्षापात्र गुन्हे समजले जात. पण लेबर पुढारी रॅम्से मॅकडोनाल्ड पंतप्रधान होताच त्यांचे हे तथाकथित समाजवादी विचार त्यांच्या अभ्यासिकेत कोंडले गेले. सारेच दांभिक! मिठाचा कायदा अन्यायकारक होताच. शिवाय मीठ या प्रतीकाबाबत कोणत्याही जाती-पंथाचा आक्षेप असण्याची शक्यता नव्हती. मुसलमानांचाही त्याबाबत आक्षेप नव्हता.

आंदोलन पूर्णतया अहिंसेच्या आचारप्रणालीनुसार करावयाचे असल्यामुळे गांधीजींनी आधीच स्पष्ट केले होते की, " माझ्या सहकाऱ्यांपैकी ज्यांचा अहिंसेवर एक जीवननिष्ठा म्हणून विश्वास असेल त्यांच्या हाती चळवळीची सूत्रे राहतील." त्यानुसार १२ मार्च १९३० रोजी सकाळी महात्माजी साबरमती आश्रमातून निवडक ७८ सत्याग्रहींच्या समवेत दांडी येथे मिठाच्या कायद्याचा भंग करण्यासाठी निघाले. साबरमतीपासून दांडीचा समुद्र किनारा ही २४० मैलांची (३८४ किलोमीटर) पदयात्रा खऱ्या अर्थी महान ऐतिहासिक घटना होय. संपूर्ण स्वातंत्र्यप्राप्तीस्तव निर्धार, आत्मबल आणि आत्मसमर्पणाच्या भावनेने जिद्दीला पेटलेले गांधीजी पुढील शपथ घेऊनच निघालेले होते. "संपूर्ण स्वातंत्र्य मिळवल्याशिवाय आपणास प्रिय असलेल्या साबरमती आश्रमात मी पाय ठेवणार नाही." आणि ही शपथ त्यांनी १९४७ साली पूर्ण केली.

अहमदाबादचा इंग्रज कलेक्टर स्वतः काही अंतर या पदयात्रेमागे चालला होता! तो इतका भारावला की, **त्याने गांधीजींची तुलना जेरुसलेमकडे प्रयाण करण्यास निघालेल्या येशू ख्रिस्ताशी केली!** " येशू आणि महात्मा गांधी यांच्या उपक्रमांमधील साम्याने आपण आदरपूर्वक भारावून गेलो आहोत," असे त्याने मुंबईच्या गव्हर्नरला कळविले होते. " येशूसारख्या धार्मिक वलयामुळे गांधीजींच्या पातळीपर्यंत कुणीही दुसरा पुढारी पोहोचू शकणार नाही," असे आपले मनोगत त्याने गव्हर्नरला कळविले.[८] एका इंग्रज आय. सी. एस. अधिकाऱ्याचे हे मनोगत खचितच बोलके आहे.

गांधीजींनी दांडी मोर्चा व सविनय कायदेभंगाचा प्रारंभ केला तो आध्यात्मिक भूमिकेतून ! आर्थिक शोषण व अन्यायाविरुद्ध एक धर्मयुद्ध उभारणे आणि

प्रतिपक्षाला जिंकण्यासाठी कर्मयोगी लढा देणे ही त्यांची विचारसरणी होती. त्यांनी केलेल्या संपूर्ण स्वातंत्र्याच्या मागणीस नैतिक अधिष्ठान होते. म्हणूनच सत्याग्रहाच्या या प्रयोगाकडे सर्व सुसंस्कृत जग मोठ्या उत्कंठेने आणि बारकाईने पाहत होते. या प्रयोगात महात्मा गांधी यशस्वी होणार, का ही त्यांची राजकीय स्टंटबाजी ठरेल यादृष्टीनेही ही त्यांची सत्त्वपरीक्षा होती. म्हणूनच जगातून अनेक वर्तमानपत्रांचेवार्ताहर इथे आलेले होते.

दांडी यात्रेत गांधीजींबरोबर हरिभाऊ मोहनी, पंडित खरे, गणपतराव गोडसे,गोविंद हरकारे, विनायकराव आपटे, केशव चित्रे, वगैरे तेरा मराठी भाषिक सत्याग्रही होते. या पहिल्या तेरामध्ये नंतर अगणित सत्याग्रही सामील झाले. जळगाव, पुणे, नाशिक, धुळे, सातारा, वर्धा, नागपूर व मुंबईतूनही शेकडो जण या मोर्चात सामील झाले. मात्र ज्यांच्यावर संघटनात्मक जबाबदाऱ्या सोपविलेल्या होत्या ते यात्रेत नव्हते. वल्लभभाई पटेल दांडी यात्रेत नव्हते. कारण त्यांना ७ मार्च रोजी अटक झालेली होती. तथापि जवाहरलाल नेहरू मात्र काही अंतर मोर्चात चालले. डी.जी. तेंडुलकरांच्या गांधी चरित्र ग्रंथाच्या प्रस्तावनेत नेहरूंनी कबूल केले आहे की, दांडी यात्राप्रसंगीचे महात्माजींचे दर्शन चिरकाल संस्मरणीय आणि कमालीचे भारावून टाकणारे होते.

काही महिलांना या यात्रेत सामील व्हावयाचे होते. पण त्यांच्यावर विदेशी कापडावरील बहिष्कार आणि मद्यविक्रीच्या दुकानांविरुद्ध निदर्शने करण्याची कामगिरी सोपविण्यात आली होती. पंचवीस दिवसांच्या या मॅरथॉन पदयात्रेत राजकीय प्रमणेच सामाजिक, सांस्कृतिक आणि नैतिक परिवर्तनासाठी मूलगामी स्वरूपाचा प्रचार करण्यात आला. नीतिमूल्यांचा प्रचार करणे हेही उद्दिष्ट होते. अतिरिक्त रक्तदाबाने पीडित असलेले ६२ वर्षांचे महात्मा गांधी दुर्दम्य आत्मविश्वास आणि उत्साहाने बोलत व चालत असल्याचे गुप्तचरांनी नोंदवून ठेवले आहे.**भगवद्‌गीता, कुराण, बायबलचे** पठण आणि पुस्तकांची विक्रीही करण्यात येई. एकूणच या यात्रेस जनतेचा प्रतिसाद अपेक्षांपेक्षा उत्तम होता. गावेची गावे मोर्चाच्या मार्गावर आली होती. हे राजकीय व सामाजिक चित्र अभूतपूर्व होते.

६ एप्रिल १९३० च्या सकाळी गांधीजी व सहकाऱ्यांनी दांडी किनाऱ्यावर मिठाच्या कायद्याचा प्रतीकात्मक भंग केला. त्या अज्ञात किनाऱ्यावरून त्यांनी दिलेल्या संदेशानुसार देशभर सविनय कायदेभंग चळवळ सुरू झाली. प्रथम मिठाच्या कायद्याचा भंग आणि नंतर परिस्थितीनुरूप प्रांतिक व स्थानिक पुढाऱ्यांनी आपापले डावपेच आखावयाचे ठरलेले होते. तथापि अशा डावपेचांमध्ये जंगलविषयक कायद्यांचा भंग, दारू आणि विलायती कापडाच्या दुकानांसमोर निदर्शने आणि करबंदीचा प्रचार, न्यायालये व शासनमान्य शिक्षणसंस्थांवर बहिष्कार आणि सरकारी कर्मचाऱ्यांना राजीनामे देण्यास प्रवृत्त करणे अशा अनेक बाबींवर भर देण्यास सांगितले होते. याव्यतिरिक्त खादी व स्वदेशीच्या प्रचारासही महत्त्व देण्यात आले.

## महाराष्ट्र काँग्रेसमधील दुही

मुंबई प्रांतिक काँग्रेस समिती (बी.पी.सी.सी.) बरीच एकसंध असून तिच्यात दुहीचे प्रसंग उद्‌भवत नसत. तथापि महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस समितीत १९२३ पासून ऐक्यभावनेचा अभाव होता. कायदेमंडळांवरील बहिष्काराच्या मुख्य मुद्यावरून टिळकपंथीय फेरवादी आणि गांधीभक्त नाफेरवादी यांच्यात शीतयुद्धासारखी स्थिती होती. वस्तुतः टिळकपंथीयांना महाराष्ट्रातील बहुजनसमाजात स्थान नव्हते. तथापि टिळकांच्या पुण्याईमुळेच केळकर, भोपटकर वगैरे पदांवर टिकून होते. केळकरांनी कधीही तुरुंगवास भोगला नव्हता. दरम्यान १ ऑगस्ट १९२७ रोजी केळकर आणि शंकरराव देव यांनी दोन पक्षांमधील तंटा मिटविला होता. मात्र ही तडजोड म्हणजे वरपांगी मलमपट्टी होती. कायदेमंडळाचे वा पक्षातील पदाचे आकर्षण नसलेल्या देवांनी कोणतीच निवडणूक लढविली नाही. तथापि बऱ्याचदा कारावास भोगला. दोन वर्षांचा कारावास भोगून शंकरराव देव आणि हरोलीकर ऑक्टोबर १९२९ मध्ये मुक्त झाले होते. गांधीजींच्या अनुमतीनुसार १९३० सालातही महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस समिती ‘केसरी गटाच्या’ ताब्यात होती. तथापि या गटाला सविनय कायदेभंग लढा मुळातच पसंत नव्हता.

**सत्याग्रह मंडळ :**—महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसमधील दुफळीमुळे सत्याग्रह आंदोलनावर निष्ठा असणाऱ्या महाराष्ट्रातील काँग्रेस पुढाऱ्यांचे सत्याग्रह मंडळ नेमण्यात आले

होते. गांधीजींच्या सल्ल्यानुसार १३ मार्च १९३० रोजी पहिले युद्धमंडळ (वॉर कौन्सिल) संघटित केलेले होते. पुढाऱ्यांना अटक झाल्यानंतर त्यांची जागा दुसरे पुढारीघेऊ लागले. मात्र ग. वि. केतकरांसारखे थोडे अपवाद वगळता टिळकभक्त केसरी गटातील पुरुष या मंडळात नव्हते. त्यांनी जे काय केले ते स्वतंत्र व अत्यल्प होते. पहिल्या युद्धमंडळात शंकरराव देव, आचार्य शं. द. जावडेकर, डॉ. वा. कि. आठले (सातारा), सी. पु. पटवर्धन (अप्पासाहेब) आणि वा. वि. दास्ताने (भुसावळ) हे प्रमुख होते. त्यांनी जिल्हा-तालुका व स्थानिक स्तरांवर युद्धमंडळे व डिक्टेटर नेमले होते. अनेक ठिकाणी सत्याग्रहाची शिबिरे व छावण्यांची मालिका उभारली. आंदोलनाचा कार्यक्रम व रणनीती विहित केलेली होती. शक्य असेल तेथे मिठाचा सत्याग्रह, जंगल कायद्यांचा भंग, विदेशी माल व दारूवर बहिष्कार वगैरे कार्यक्रम आखून दिलेला होता.

युद्धमंडळांच्या सभासदांव्यतिरिक्त पश्चिम महाराष्ट्रातील सविनय कायदेभंग लढा प्रामुख्याने पुढील मान्यवरांनी लढवला होता. त्यांचे व्यक्तिशः व सामुदायिक योगदान बरेच महत्त्वाचे होते. मात्र पुढे दिलेली नामावली परिपूर्ण नसून केवळ प्रातिनिधिक होय :—गंगाधरराव देशपांडे, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, त्र्यं. र. देवगिरीकर, नरहर विष्णू गाडगीळ, धर्मानंद कोसंबी, गजानन नारायण कानिटकर, अच्युत सीताराम पटवर्धन, पुरुषोत्तम हरी पटवर्धन (रावसाहेब), अच्युत बळवंत कोल्हटकर, जमनादास मेहता, दत्तात्रय नथोबा वांद्रेकर, पोपटलाल शहा, वामन पांडुरंग काबाडी, गोविंदराव धर्माजी वर्तक, एम. आर. गोसावी, कुंदनमल सोभाचंद फिरोदिया, के. आर. सुमंत, कृष्णराव भि. अंत्रोळीकर, काका कालेलकर, ह. वि. तुळपुळे, प. स. भागवत, शामराव पाटील, केशवराव जेधे, वि. रा. शिंदे, देवकीनंदन नारायण, भाऊ रानडे, मीर शुक्रुल्ला, नाथ घाणेकर, विनायकराव भुस्कुटे, अण्णासाहेब सहस्रबुद्धे, बा. चिं लागू, अप्पा नाबर, विष्णुपंत खटखटे, लक्ष्मण हरी वराडकर, लालजी पेंडसे, श्रीपाद शंकर नवरे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, श्रीनिवास सरदेसाई, दादासाहेब गद्रे, सीतारामशास्त्री (महंत), बाबूराव चरणकर, नाना पाटील, द. का. कुंटे, विनायक उपाध्ये, वामन लिमये, परचुरेशास्त्री, वसंत महादेव वेदक, त्रिंबक नारायण बेडेकर, केशव गणेश गुप्ते, नारायण धोंडो खरे, साखवळकर इत्यादी.

एन ४१४६—२७

केळकरांच्या गटाला सविनय कायदेभंग लढा पसंत नसल्यामुळे तसेच त्यांना कायदेमंडळांमधील अधिकाराची पदे सोडावयाची नसल्यामुळे त्यांच्याशी सलोखा ठेवणे अशक्य झाले. म्हणून वाद घालत बसण्यापेक्षा निष्ठावंत काँग्रेस नेते शंकरराव देव, गंगाधरराव देशपांडे, न. वि. गाडगीळ, वि. रा. शिंदे, यांनी मूळ काँग्रेसच्या अंतर्गत 'महाराष्ट्र काँग्रेस पक्ष' स्थापन केला. शंकरराव देवांना या पक्षाचे अध्यक्ष नेमण्यात आले. पुणे यूथ लीगचे सर्व कार्यकर्ते या पक्षात आले. महाराष्ट्रात नवीन ध्रुवीकरण होऊन केशवराव जेथे व शिंदे वगैरेंच्या आवाहनानुसार अनेक ब्राह्मणेतर पुढारी काँग्रेसमध्ये दाखल झाले. गांधीजींनी दांडीयात्रा सुरू केल्यावर केळकर संघाचा त्याग करून अधिकाधिक काँग्रेसजन कायदेभंग लढ्यासाठी अनुकूल होऊ लागलेले होते. अशा सर्व मंडळींना बरोबर घेऊन शंकरराव देवांच्या अध्यक्षतेखाली उपरोक्त 'महाराष्ट्र सत्याग्रह मंडळ' निर्माण करण्यात आले होते. मात्र या मंडळाचे मुख्यालय पुण्यात ठेवणे अनिष्ट वाटल्याने जुहू (विले पार्ले) येथे ठेवण्यात आले. तेव्हा हा भाग मुंबईत नव्हता. मुंबई व महाराष्ट्रासाठी हे केंद्र होते. शंकरराव देवांच्या पक्षाशी संबंध नको म्हणून केळकरांनी वेगळी समिती नेमली होती. तिच्यात भोपटकर,दा. वि. गोखले, पांडुअण्णा शिराळकर, गोपाळराव पळसुले, दि. वा. दिवेकर, रामभाऊ मंडलिक, ग. वि. केतकर, जमनादास मेहता वगैरे सीमांतिक जण होते.

## मुंबईतील सविनय कायदेभंग

सविनय कायदेभंग आंदोलनाचे सर्वाधिक उत्स्फूर्त स्वागत मुंबई शहरानेच केले. गांधीजींनी आंदोलनाचे सुतोवाच करताच इथे राजकीयच नव्हे तर आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रामध्येही ध्रुवीकरण सुरू झाले. जागतिक महामंदीचे तीव्र चटके अर्थव्यवस्थेला व लोकांना लागत होते. ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणांमुळे आणि विशेषतः चलन विनिमयाचा दर व कर विषयक धोरणांमुळे आर्थिक मंदीची तीव्रता वाढली, अशी भावना पसरली होती. सरकारचे कामगार धोरण मालकधार्जिणे होते. आर्थिक महामंदीमुळे बेरोजगारी वाढली हे खरे. पण तशात कारखान्यांचे पुनर्संघटन करून कामगारकपात व वेतनकपात करण्यास सरकारने उद्योगपतींना मुभा दिली होती. त्यामुळे शहरातील कामगार वर्ग बेजार झाला होता. मुंबईच्या आर्थिक व

सामाजिक समस्या सोडविण्यात सरकार अयशस्वी ठरले होते. कामगारांची ससेहोलपाट करण्यात सरकारचा सहभाग असल्याचे लपून राहिले नव्हते. म्हणून सविनय कायदेभंगाच्या मार्गक्रमणात हिंसाचारी घटक प्रकट होणे स्वाभाविक होते.

दुसरे असे की, या आंदोलनात मुंबईत विदेशी मालाप्रमाणेच विदेशी कंपन्यांवरही बहिष्कार टाकण्यात आला. मध्यवर्ती आणि प्रांतिक सरकार तसेच उद्योगपती व त्यांचे संघ काँग्रेसवर वर्तमानपत्रांमधून आरोप करीत की, जागतिक महामंदीचेआघात सविनय कायदेभंग आंदोलनामुळे अधिक तीव्र झाले. तथापि या आरोपात सत्यांश नव्हता. कारण मुंबईतील सर्वात मोठा उद्योग असलेल्या कापड उद्योगातील उत्पादन १९३० मध्ये फारसे घटलेले नव्हते. काँग्रेस व काँग्रेसचा श्रोतृवर्ग जोरदार प्रतिपादन करीत होता की, ब्रिटिश सरकारचे वित्तीय धोरण आणि सरकारने भारताची ब्रिटिश भांडवलशाहीशी केलेली सोयरीक यामुळेच भारताला जागतिक मंदीचे आघात सोसावे लागले. या प्रतिपादनास मुंबईतील एकूण व्यापारी वर्ग व मध्यम वर्गाचे समर्थन होते.[९]

मुंबईतील आंदोलनाचे नियोजन अत्यंत विचारपूर्वक व काटेकोरपणे केलेले होते. सुसंघटित स्वरूप कायम ठेवण्यासाठी मुंबईसाठी 'वॉर कौन्सिल' आणि 'डिक्टेटर' नेमलेले होते. पुढारी पकडले जाण्याची शक्यता लक्षात घेऊन त्यांची जागा घेण्यासाठी उत्तराधिकाऱ्यांच्या याद्या आधीच तयार केलेल्या होत्या. अशी पूर्वनियोजित संघटना कित्येक महिने चालू राहिली. तालुका पातळीपासून राष्ट्रीय पातळीपर्यंतच्या काँग्रेस समित्यांच्या अध्यक्षांच्याही याद्या तयार होत्या. मुंबई प्रांतिक आणि महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस समित्यांच्या विद्यमाने सत्याग्रहाचे मुख्यालय जुहू (विले पार्ले) इथे निश्चित करण्यात आले होते.

जुहू व मुंबईतील मिठाच्या सत्याग्रहाचे उद्‌घाटन स्वतः गांधीजी यांनीच करावे, असा कार्यकर्त्यांचा आग्रह होता. पण त्यांच्याच आदेशानुसार जमनालाल बजाज यांना मुंबईचे पहिले डिक्टेटर नेमण्यात आले. त्यांच्याबरोबर पहिल्या दिवसापासून छावणी असेपर्यंत तेथे कस्तुरबा गांधी होत्या. बजाज व कस्तुरबा यांनी ६ एप्रिल १९३० रोजी जुहू सत्याग्रह छावणीजवळ मिठाच्या अधिनियमांचा भंग करून

आंदोलनास सुरुवात केली. जालियनवाला हत्याकांडापासून गांभीर्यपूर्वक पाळण्यात आलेल्या राष्ट्रीय सप्ताहाचा तो पहिला दिवस होता. त्या दिवशी मुंबईतील बाजासेठा बंद ठेवून चौपाटीवर प्रचंड सभा घेण्यात आली. सभेत चळवळीचा कार्यक्रम कथन करण्यात आला. सात एप्रिल रोजी मुंबई प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष के. एफ. नरिमन व अवंतिकाबाई गोखले, कमलादेवी चट्टोपाध्याय, युसुफ मेहेरअली, बजाज, प्रा. डी. आर. घारपुरे, पंडित सुंदरलाल, सरदार शार्दूलसिंग कविश्वर, अली बहादूर खान, मोहिऊद्दिन कसूरी वगैरेंनी मुंबईत सत्याग्रह घडवून आणले. हाजी अली उद्यानात मोठमोठ्या कढयांमध्ये समुद्राचे पाणी आटवून बरेच मीठ तयार केले. विशेष म्हणजे हे मीठ लिलाव करून आणि पुन्हा पुन्हा लिलाव पद्धतीने विकून चळवळीसाठी निधी गोळा केला होता. म्हणून नरिमन यांना त्याच रात्री अटक करण्यात आली. त्यांच्या अटकेची प्रतिक्रिया म्हणून मुंबईत हरताळ पाळण्यात आला.[१०]

मुंबईतील कायदेभंग आंदोलनाचा प्रत्येक दिवसाचा वस्तुनिष्ठ तपशील देणारे मुंबई पोलीस कमिशनरचे दैनिक अहवाल प्रस्तुत इतिहासकारास प्राप्त झालेले आहेत. हे अहवाल मुंबई सरकारच्या गृह सचिवास प्रतिदिनी पाठविलेले होते. या दुर्मिळ आधारसाहित्यावर व दस्तऐवजांवर हे विवेचन आधारलेले आहे. शिवाय या अहवालांसोबत बी. पी. सी. सी. ने प्रसिद्ध केलेले **बाँबे काँग्रेस बुलेटिनचे** अंक आहेत. त्यांचाही मी उपयोग केलेला आहे.

मुंबई सत्याग्रह समिती प्रारंभापासूनच आक्रमक पवित्र्यात होती. शहरात ठिकठिकाणी समुद्राच्या पाण्यापासून मीठ तयार करण्यात येई. त्याचा राष्ट्रीय मीठ किंवा 'गांधी नमक' म्हणून पुन्हा पुन्हा लिलाव करण्यात येई. कायद्याच्या नजरेतून हा दुहेरी गुन्हा होता. या कार्यात महिला, मुली व मुलांचा मोठा सहभाग होता. तेव्हा मेहेरअली बाँबे यूथ लीगचे उपाध्यक्ष असून अबिदअली जाफरभाई मुंबई प्रा. काँ. समितीचे सचिव होते. ते युवकांचे नेते असल्यामुळे महाविद्यालयांमधील शेकडो विद्यार्थी तसेच प्रागतिक विचारसरणीचे मुसलमान या चळवळीला प्रतिसाद देत असत. एम. सादिक हे वॉर कौन्सिलचे तिसरे सभासद होते. त्यांना १० एप्रिल रोजीच पकडण्यात आले. सरकारने शहरातील काँग्रेसची सर्व मिठागरे उद्ध्वस्त केली.

अटकसत्र जोरात सुरू केले. पण व्यर्थ! नवीन मिठागरे निर्माण झाली. अटक केलेल्यांची जागा दुसऱ्यांनी घेतली. कमलादेवी चट्टोपाध्याय, अवंतिकाबाई, लक्ष्मीबाई भिडे, पेरिन कॅप्टन (दादाभाई नौरोजींची नात), लक्ष्मीबेन दोसानी, रतनबेन मेहता वगैरेंनी कित्येक मुली व महिलांना या आंदोलनात उतरवले. अबिदअली जाफरभाईंबरोबर त्यांच्या पत्नी चळवळीत आल्या. या सर्व जणींना सरोजिनी नायडू व कमलादेवी मार्गदर्शन करीत असत.

राष्ट्रीय सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी (१३ एप्रिल) चौपाटीवर एक हजार महिलांसह ५०,००० लोकांची सभा गाजली होती. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर व डॉ. दिनकर धोंडो साठे यांच्यासारखे माजी टिळकभक्त व सरोजिनी नायडू, जे. एन. चोकशी, गणपती शंकर देसाई यांनी ही सभा गाजवली होती. हरताळ अधिक कडक करण्यात आले. जवाहरलाल नेहरूंना १४ एप्रिलला पकडल्याची बातमी येताच मुंबईत तीव्र प्रक्षोभ उसळला. सर्व बाजारपेठा बंद पडल्या. महानगरपालिकेनेही निषेध केला. भुलाभाई देसाई यांच्यासारख्या अनेक ज्येष्ठ वकिलांनी वकिलीचा त्याग केला. कन्हैयालाल मुन्शी यांनी मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचा राजीनामा दिला. स. का. पाटील, हंसा मेहता, बी. एफ. भरुचा यांचा उदय झाला व पाटील राजकारणात पुढे आले.[११]

## आंदोलन पसरले

दरम्यानच्या काळात दांडी यात्रेमुळे नागरी तसेच ग्रामीण भागात शोषणकर्त्या सरकारविरुद्ध अहिंसक लढा करण्याची प्रेरणा रुजलेली होती. देशात अभूतपूर्व चैतन्य निर्माण झाले. प्रभात फेऱ्या, प्रचार सभा, भाषणे, निदर्शने, बहिष्कार, खादीचा प्रसर, सरकारमान्य शिक्षणसंस्थांवर बहिष्कार, राजनिष्ठ लोकांची निर्भर्त्सना, पोलिसांनावश करणे इत्यादी आंदोलनाची उपांगे अवलंबिली जात होती. पोलीस यंत्रणा आणि महसूल प्रशासन मेटाकुटीला आले होते. अहिंसेच्या डावपेचामुळे शासन हतबल झाले होते. अटक केलेल्या स्वातंत्र्य सैनिकांवर कोणते आरोप ठेवावे असाही शासनापुढे प्रश्न होता. मात्र गोरे व्यापारी व उद्योगपती तसेच ब्रिटिशधार्जिणी वर्तमानपत्रे महात्मा गांधींना पकडून तुरुंगात डांबावे, असा ओरडा करत होते. बंगाल, संयुक्त प्रांत,

बिहार आणि मुंबई प्रांतांचे गव्हर्नर गांधींना तुरुंगात टाकावे यासाठी व्हाइसरॉय आयर्विनला पत्रे आणि तारा पाठवू लागले.

तथापि व्हाइसरॉयची अवस्था विलक्षण बिकट झालेली होती. 'आपण दडपशाहीचा अवलंब केला, तर गांधी व काँग्रेस निषेध करतील, आणि कडक कारवाई न केली तर त्यांचा विजय झाला असे ते म्हणतील' अशी व्हाइसरॉयची अवस्था झाली. स्वतः गांधीजींनी सरकारच्या अवस्थेचे यथार्थ वर्णन करताना म्हटले, "उंदीर गिळल्यावर त्रस्त झालेल्या सापासारखी सरकारची स्थिती झालेली आहे. मला बाहेर मोकळे फिरू देणे किंवा तुरुंगातील कोठडीच्या गजाआड डांबून ठेवणे यापैकी कोणत्याही कृतीचा अवलंब करणे सरकारला अवघड झालेले आहे."[१२]

आंदोलनाची व्याप्ती व तीव्रता वाढत राहिली. गावपातळीवरील सरकारी कर्मचारी राजीनामे देऊ लागले. कार्यकर्त्यांच्या मागणीमुळे शेतसारा बंदी करण्यासही गांधीजींना परवानगी द्यावी लागली. मीठ या प्रतीकाविषयी प्रारंभी भारतीयांना शंका वाटत होती. तथापि त्याचा परिणाम आश्चर्यजनक झाला. नेहरूंनी कबूल केले की, "सॉल्ट सडनली बिकेम अ मिस्टरीअस वर्ड, अ वर्ड ऑफ पॉवर"![१३]

जवाहरलालजींना १४ एप्रिलला अटक केल्याची बातमी पसरताच कलकत्ता, कराची व मद्रासमध्ये जनप्रक्षोभ भडकला. १८ एप्रिल रोजी बंगाली क्रांतिकारक सूर्य सेन यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या शस्त्रधारी देशभक्तांच्या पथकाने चित्तगावला लढा देऊन सरकारी शस्त्रागार ताब्यात घेतले होते. शस्त्रागारावर ताबा मिळवून सूर्य सेन यांनी **'इंडियन रिपब्लिकन आर्मी'** च्या नावाने स्वातंत्र्य घोषित केले होते. यानंतर २२ एप्रिल रोजी जलालाबाद टेकडीजवळ त्यांचे सरकारी सेनादलाशी तुंबळ युद्ध होऊन त्यात बारा क्रांतिकारक हुतात्मा झाले होते. सूर्य सेन व त्यांच्या सहकाऱ्यांचा हा लढा गांधीवादी नव्हता हे सत्य! तथापि शस्त्रागार हस्तगत करून स्वातंत्र्य घोषित करताना त्यांनी जाहीर केले की, "गांधी राज्याचे आगमन झाले." चित्तगावच्या या प्रेरणादायी घटनेनंतर १९३० सालात बंगालमध्ये बंगाली स्वातंत्र्य सैनिकांनी असे लहानमोठे ५६ संघर्ष घडवून आणले. बंगाल सरकारचे मुख्यालय असलेल्या सुप्रसिद्ध रायटर्स बिल्डिंगवरही ८ डिसेंबर १९३० रोजी असाच सशस्त्र हल्ला झाला. सरदार

भगतसिंग व त्यांचे साथी कारावासातून व न्यायालयाच्या पिंजऱ्यातून क्रांतीच्या घोषणा देत असताना, त्यांची हिं.सो.रि. आर्मी आणि नौजवान भारत सभा कायदेभंग आंदोलनात खूपच सक्रिय झाली होती. १९३० सालात पंजाबात त्यांनी २६ ठिकाणी पोलीस व सेनादलाशी संघर्ष केला होता.[१४] भगतसिंग यांच्या क्रांती व क्रांतिवादाच्या घोषणांना उत्तर भारतात जोरदार प्रतिसाद लाभतच होता.

**खुदाई खिदमदगारांचा लढा** :— ब्रिटिश सरकारच्या दृष्टीने हिंदुस्तानातील सर्वात मोठा निकराचा लढा अब्दुल गफार खान ऊर्फ सरहद्द गांधी यांच्या खुदाई खिदमदगार ऊर्फ 'रेड शर्ट्स' संघटनेशी ब्रिटिशांना करावा लागला. एकूण लोकसंख्येत ९२ टक्के मुसलमान असलेला वायव्य सरहद्द प्रांत इंग्रजांना सदैव चिंता निर्माण करीत असे. तेथील पहाडासारखे पठाण स्वतंत्र व स्वैर वर्तनाचे असून, शासन यंत्रणा झुगारून लावण्याकडे त्यांचा कल होता. नौजवान भारत सभा पेशावर परिसरात कम्युनिझमचा प्रचार करते असे सरकारला वाटे. तथापि गफार खान यांच्यावर गहिरा प्रभाव पडला महात्माजींचा. शिवाय गफार खान देवबंद मुस्लीम राष्ट्रवादी विचारधारा व खिलाफत चळवळीतून घडलेले गांधीवादी होते. त्यांनी पठाणांमधील हिंसाचारी प्रवृत्तींना आळा घालून पठाणांमध्ये सत्याग्रह व अहिंसेचे तत्त्वज्ञान रुजविले. गफार खानांनी पठाणांमधील अमर्याद ताकद राष्ट्रकार्यासाठी लावण्यासाठी खूप प्रयास केले. त्यांची खुदाई खिदमदगार ही ब्रिगेड १९२९ च्या प्रारंभी स्थापन झाल्यापासून स्वातंत्र्यलढ्यात आवेशाने सहभागी झाली होती. या धर्मनिरपेक्ष संघटनेच्या सभासदांची संख्या अवघ्या सहा महिन्यांत ५०० वरून ५०,००० पर्यंत वाढली. ही अचानक वाढ लाहोर काँग्रेसमुळे झालेली होती. गफार खान यांनी लाल डगला (रेड शर्ट) हा गणवेश घातलेले हजारो पठाण स्वयंसेवक लाहोरला नेले होते. गणवेशावरून संघटनेला रेड शर्ट हे नाव पडले. संपूर्ण स्वातंत्र्याच्या घोषणेने ते प्रभावित झाले होते.

हिंदुस्तानभर सविनय कायदेभंग लढा सुरू झाल्यावर खुदाई खिदमदगार व काँग्रेस संघटनेने वायव्य सरहद्द प्रांतात मिठाचा सत्याग्रह आणि जंगल सत्याग्रह सुरू केला. त्यांनी सरकारी कर्मचारी व पोलिसांना राजीनामे देण्यास प्रवृत्त करण्याची मोहीम

हाती घेतली. आंदोलनाचा इतर कार्यक्रमही शांततेच्या मार्गाने हाती घेतला. तथापि त्या प्रांताच्या गव्हर्नरने अनावश्यक आक्रमक पवित्रा घेऊन, गफार खान आणि अनेक काँग्रेस नेत्यांना अटक केली. सरकारने ही आगळीक केल्याने पेशावर शहरातील वातावरण तंग झाले. २३ एप्रिल १९३० रोजी पेशावरमध्ये लष्कराने शक्तिप्रदर्शन केले आणि शहरात रणगाड्यांवरून तोफांचा भडीमार केला. सरकारच्या विनाकारण आक्रमणामुळे जनतेत भयंकर प्रक्षोभ उसळला. पेशावरमधील किस्साकहानी बाजार भागात तीन तास तोफा व बंदुकांचा भडीमार चालू होता. त्यात तीस नागरिक मारल्याचे सरकारने कबूल केले. तथापि खाजगी निरीक्षकांनी मृतांचा आकडा २५० असल्याचे पुराव्यांसह म्हटले. पण खुदाई खिदमदगारांचे उपाख्यान इथे संपले नाही.

त्यांनी आपला लढा चालू ठेवला. पहाडासारख्या खुदाई खिदमदगार पठाणांनी लष्कराचा मारा स्वराज्यासाठी परमेश्वरी इच्छा म्हणून आत्मसमर्पणाच्या भावनेने सहन केला. त्यांच्यावर गोळीबार करण्यासाठी गढवाल रायफल्सचे सैन्य तैनात करण्यात आले. परंतु सेनादलाने निःशस्त्र देशबांधवांवर गोळीबार करण्यास नकार दिला. " आम्ही हिंदुस्तानच्या शत्रूशी लढण्यासाठी आहोत, पण देशबांधवांना ठार मारण्यासाठी हिंदुस्तानी सेनादल नव्हे. तुम्हास हवे तर आम्हास तोफांच्या तोंडी द्या. तथापि आमच्या निःशस्त्र बांधवांवर आम्ही गोळ्या घालणार नाही " असे त्यांनी नंतर कोर्ट मार्शल-पुढे निवेदन दिले. **२४ एप्रिलपासून ४ मे १९३० पर्यंत पेशावर शहरावर ब्रिटिशांचे अधिपत्य नव्हते.** गढवाल रायफल्सने पेशावर काबीज करण्यास नकार दिला. त्रस्त झालेल्या इंग्रजांना दुसरीकडून गुरखा फौज आणून पेशावरचा प्रदेश 'राष्ट्रवादी पठाणांकडून जिंकून' घ्यावा लागला.[१५]

**सरकारी अत्याचार** :— एका ब्रिटिश पत्रकाराने **नेकेड फकीर** या आपल्या पुस्तकात लिहिले आहे की, " विस्तृत कत्तल आणि फाशी गेलेल्यांच्या काही कहाण्यांनी माझ्यासारख्या अत्यंत कणखर आणि सर्वतुच्छक पत्रकाराला लाजेने स्वतःचे डोके खाली वाकायला लावले. " गांधीजीदेखील नंतर म्हणाले, " पठाणांनी अहिंसेचा अर्थ इतका अनन्वित अन्याय सहन करण्याची निष्क्रियता असा घ्यायला नको होता. "[१६]

वाढत्या दडपशाहीचा एक भाग म्हणून सरकारने मुद्रण स्वातंत्र्य कुंठित करण्यासाठी वटहुकूम काढला. त्यामुळे पेशावर भागातील परिस्थितीची माहिती इतर प्रांतांमध्ये सत्यस्वरूपात कित्येक दिवस समजली नव्हती. मात्र या वटहुकमाचा मुंबईत व महाराष्ट्रात तीव्र निषेध करण्यात आला. भारतीय पत्रकार संघ, मुंबई पत्रकार संघ वगैरे संघटनांनी निषेध व्यक्त करण्यासाठी सभा घेतल्या. मात्र दैवदुर्विलास असा की, देशभरचे सत्याग्रही अहिंसेचे लक्षणीय दर्शन घडवत असताना सरकार युध्यमान पवित्र्यात उभे होते. सरकारी दडपशाहीने लवकरच एवढी पातळी गाठली की, गांधीजींनी सरकारला 'गुंडाराज' असे दूषण दिले. त्यांनी जनतेला आवाहन केले, "सरकारच्या या संघटित गुंडगिरीला त्यामधील सर्व दुःखे सोसून उत्तर द्यावे."

आत्मक्लेशातून स्वातंत्र्यासाठी झटणाऱ्या देशभक्तांवर इंग्रज सरकार प्रच्छन्न हिंसाचार करत होते. गुजरातमधील खेडा जिल्ह्यातही सत्याग्रहींवर अत्याचार करण्यात आले. विशेषतः महिला सत्याग्रहींवर पोलिसांनी केलेल्या अत्याचारांपेक्षा गोळीबारच्या जखमा कमी दुःखद झाल्या असत्या. लोक दडपशाहीमुळे फार चिथावले गेले, तरीही ते शांतच राहिले होते. मुंबई इलाख्यातील कराची येथील गोळीबार सर्वतया अनावश्यक होता. शिवाय गोळीबाराचा हेतू जमाव पांगवण्यापेक्षा दहशत निर्माण करणे हाच असल्याचे स्पष्ट दिसत होते. भारतातील शेकडो गावांमध्ये सत्याग्रही काँग्रेसजनांवर सेनादलाने अत्याचार केले.

लोकांना चिथावणी देण्याची एकही संधी पोलिसांनी सोडली नाही. अनेक सदाचारी आणि स्वार्थत्यागी नागरिकांना विनाकारण पकडून त्यांना तुरुंगांमध्ये डांबून ठेवले. सारख्याच आरोपांसाठी दंडाधिकाऱ्यांनी आपल्या लहरीनुसार वेगवेगळ्या शिक्षा दिल्या. अल्पावधीत प्रस्थापित झाले वटहुकमांचे अधिराज्य आणि प्रच्छन्न हुकूमशाही! नागरी स्वातंत्र्याचा लवलेशही राहू नये असा जणू सरकारने निर्धारच केला होता आपली ताकद व प्रस्थापित हितसंबंध राखण्यासाठी वसाहतवादी सरकारी यंत्रणा कोणत्याही थराला जाण्यास तयार होती.[१७]

**मात्र काँग्रेस अशा सर्वाधिकारशाहीशी नेटाने मुकाबला करत होती. आणि तोही अहिंसेच्या मार्गानेच!** डिक्टेटरांच्या मालिका तयार होत्या. काँग्रेस अध्यक्ष

जवाहरलालजी पकडले गेले तेव्हा त्यांनी गांधीजींची अध्यक्षपदी नेमणूक केली. आणि त्यांनी नकार दिल्यास मोतीलाल नेहरूंचे नामांकन केले होते. वस्तुतः मोतीलाल नेहरूंची तब्येत बिघडलेली होती. तरीही त्यांनी जिवापाड मेहनत करून चळवळ चालू ठेवली. मोतीलालजींच्या वृद्ध पत्नी स्वरूप राणी नेहरू तसेच आजारी असलेल्या कमला नेहरू, तसेच विजयालक्ष्मी पंडित, कृष्णा हाथीसिंग वगैरेंनी जिवाची पर्वा न करता भरउन्हात सभा व मिरवणुकीचे नेतृत्व केले. या संपूर्ण परिवाराने भरपूर कारावास भोगला. या आंदोलनाच्या थोड्याच दिवसांआधी मोतीलालजींनी आपले 'आनंद भवन' राष्ट्राला अर्पण केलेले होते. जवाहरलालजींच्या मातोश्री स्वरूप राणी आणि आजारी असलेल्या पत्नी कमलाबाई भरउन्हात विदेशी मालाच्या दुकानांसमोर निरोधने करीत. महिलांचा चळवळीतील सहभाग हा या आंदोलनातील एक आश्चर्यकारक भाग होता. घराच्या एकांतातून त्यांनी सार्वजनिक जीवनात उडी घेतली. विशेषतः विदेशी मालाची आणि दारूची दुकाने यांच्यासमोर निरोधने करण्याची जबाबदारी त्यांनी घेतली होती. या क्षेत्रातील त्यांची कामगिरी पुरुषांपेक्षा अधिक नेत्रदीपक ठरली. सर्व शहरांमधील सभा व मिरवणुकांमध्ये महिला अग्रभागी असत. पोलिसांच्या दंडेलीला त्या दाद देत नसत. बऱ्याच ठिकाणी महिला काँग्रेस डिक्टेटरही होत्या.

विविध वटहुकूम तसेच बंदीहुकमांमधून काँग्रेस कार्यकर्त्यांना त्यांचे उल्लंघन करण्याची संधी मिळत असे. म्हणून जे थांबविणे हा त्या वटहुकमांचा उद्देश असायचा, तेच करण्यावर सत्याग्रहींचा कटाक्ष होता. किंबहुना वटहुकमांचा हेतू पराभूत करणे यावर सविनय कायदेभंगात भर देणे सुरू झाले. त्यामुळे अनेक वटहुकमांचा उद्देश पराभूत झाला. त्यातून मार्ग म्हणून व्हाइसरॉय नवीन-नवीन वटहुकूम काढू लागला. काँग्रेस कार्यकारिणीचे बहुतेक सभासद पकडले गेल्यावर त्यांची जागा दुसऱ्यांनी घेतली. प्रत्येक वटहुकूम कसा धुडकावयाचा याविषयी कार्यकर्ते मार्गदर्शन करीत. वर्तमानपत्रांची मुस्कटदाबी करण्यासाठीही सरकारने वटहुकूम काढला व त्यांच्याकडून जामीन मागितला. तथापि काँग्रेसच्या आदेशानुसार बऱ्याच पत्रकांनी जामीन भरण्यास नकार दिला व काही काळ व्यवसाय थांबविला. मात्र या आदेशाचे अनुपालन करणे

बऱ्याच मालकांना अवघड वाटले होते. म्हणून काँग्रेसनिष्ठ पत्रके काही दिवस बंद पडली, तर इतरांनी सरकारशी जमवून घेतले.[१८]

सत्याग्रहासाठी निवडलेल्या मीठ या प्रतीकामागील तर्कशास्त्राचा व्हाइसरॉयलाही लवकरच प्रत्यय आला. २४ दिवसांच्या दांडीयात्रेतील ४० गावांमध्ये अपूर्व जनजागृती झाली होती. मोठमोठ्या सभा झाल्या. नवसारी व नडियादमध्ये प्रत्येकी वीस हजारांच्या सभा झाल्या तर, सुरतेत तीस हजार श्रोते उपस्थित असल्याचे गुप्तचरांनी कबूल केले. या सत्याग्रहाच्या निमित्ताने हिंदुस्तानात पाच हजार सार्वजनिक सभा झाल्याची सरकारने नोंद घेतली. तर एकूण पन्नास लाख हिंदवासीयांनी या सत्याग्रहात भाग घेतला होता हे सरकारने कबूल केले. आंदोलनाचे हे यश अभूतपूर्व होते

सत्याग्रहासाठी प्रतीकाची निवड करताना महात्मा गांधींपुढे अनेक समस्या होत्या. त्यांची शृंगापत्ती मिठाने सोडविली. कारण मिठाच्या कायद्याचा भंग म्हणजे वसाहतवादी राजसत्ता किंवा भारतीय निहित हितसंबंधींना (व्हेस्टेड इंटरेस्टस्) फार मोठा धोका नव्हता. त्यामुळे मुसलमानही चळवळीत येऊ शकले. प्रत्येक माणसाच्या जीवनाश्यक वस्तूवरील कराचा निषेध यास नैतिक अधिष्ठानही होते. यास भावनिक समर्थनही होते. त्यातून परकीय राजकर्त्यांच्या शोषक धोरणावर आघात करण्याचे साधन हाती आले. या आंदोलनाविषयी इंग्लंड, अमेरिका व युरोपमध्ये सहानुभूती वाटण्याची शक्यता गांधीजींना आधीपासूनच दिसत होती. या व इतर अनेक कारणांमुळे या आंदोलनास उच्च नैतिक दर्जा लाभेल असा गांधीजींचा अंदाज होता. मीठ करमुक्त करावे ही मागणी मुघल व मराठा काळातही करण्यात आली होती. डॉ. एम. ए. अन्सारी यांना ३ मार्च १९३० रोजी लिहिलेल्या पत्रात गांधीजींनी असे काही महत्त्वाचे मुद्दे कथन करून मिठाच्या सत्याग्रहाचे समर्थन केले होते. मिठाचा क्रूर कायद्याचा अंत करणे हिंदूप्रमाणेच मुसलमानांच्याही हिताचे आहे, असे त्यांनी ठासून म्हटले होते. हा लढा देशातील गरीब व वंचितांकरिताच आहे, असे लिहिले होते.[१९] फेब्रुवारी १९३१ मध्ये व्हाइसरॉय आयर्विन यांनीही गांधीजींपुढे कबूलच केले की, “You planned a fine strategy round the issue of salt”.

उपरोक्त अकरा कलमांद्वारे गांधीजींनी भारताच्या लढ्याला नवे दिशानिदेशन दिले. २ मार्च १९३० रोजी त्यांनी आयर्विनला निर्वाणीचा खलिता पाठवून त्या अकरा कलमी चार्टरचाच पाठपुरावा केला होता. वसाहतवादी राजसत्तेने टाकलेल्या वित्तीय ओझ्यावर त्यात विशेष भर दिला. भूतपूर्व भारतमंत्री सर चार्लस वूडचा नातू असलेला हा आयर्विन कोणतीही तडजोड करण्याच्या मन:स्थितीत नव्हता. गांधीजींविषयीची त्याची सहनशक्ती संपुष्टात आली होती. हेही चळवळीच्या यशाचे एक गमक होते.

**इकडे मुंबई प्रांताचे गव्हर्नर फ्रेडरिक साईक्स अकरा कलमी चार्टरमुळे कासावीस झाले होते. त्यांच्या प्रशासनाला चिंता वाटत होती की, "द इलेव्हन पॉईन्टस् मेड ब्रिटिश रूल मॉरली इन्डिफेंसिबल अँड इकॉनॉमिकली इन्टॉलरेबल". आणि ही चिंता अगदी वस्तुनिष्ठ होती.** कारण हिंदूंप्रमाणेच मुसलमानांनाही प्रकर्षाने जाणवले होते की, विविध मार्गांनी शोषण करणाऱ्या इंग्रजांना इथे राज्य करण्याचा नैतिक अधिकार उरलेला नाही.

मुंबई सरकारची इभ्रत लयास जाऊन जनतेचा सरकारवरील विश्वास नाहीसा झाला, अशी मुंबई सरकारला चिंता वाटत होती. १६ एप्रिल १९३० रोजी सहा कॉंग्रेस कार्यकर्त्यांवर कराचीच्या न्यायालयात खटला चालू असताना आठ हजारांच्या जमावाने त्या न्यायालयावरच धडक मारली होती. त्यामुळे सरकारी कर्मचाऱ्यांचे नीतिधैर्य खचले. इंग्रजांचे समर्थकही कॉंग्रेसचे समर्थक बनत होते. जो पारंपरिक कॉम्प्रेडोर वर्ग आणि ज्या भावनिक सहयोगावर ब्रिटिश सत्ता उभी होती, तो सहयोग डळमळीत होत असल्याची इंग्रजांना जाणीव झाली.[२०]

या आंदोलनात चळवळीच्या कार्यक्रमाचा १९२०-१९२१ सारखा अखिल भारतीय आराखडा नव्हता, हे सत्य. तथापि या वेळी कॉंग्रेस कार्यकारिणीने प्रांतिक समित्यांना कार्यक्रम व डावपेच विषयक स्वातंत्र्य दिलेले होते. एक मुद्दा मात्र स्पष्टच दिसतो की, १९३० सालात वसाहतवादी ब्रिटिश यंत्रणेशी आर्थिक संघर्ष व 'अनुशास्ती' या रणनीतीचा कॉंग्रेस पक्ष व युवक संघटनांनी चांगला उपयोग केला. विदेशी कापड व मालावरील बहिष्कार, दारूची दुकाने, जमीन महसूल, मिठाचे कायदे व

जंगलविषयक कायदे हे सर्वच कायदेभंगाचे विषय होते. शिवाय पोस्टातील बचत रकमा परत घेणे, पोलीस, सैनिक व कर्मचाऱ्यांना राजीनामे द्यायला लावणे तसेच वटहुकमांचे उल्लंघन करणेही नित्याचे झाले होते.[२१]

हिंदुस्तानातील प्रांतिक संघटनांपैकी मुंबई प्रांतिक कॉंग्रेस समिती सर्वात सुसंघटित आणि सर्वच बाबतीत सुसज्ज संघटना होती. इथे पुरेसा पैसा व मनुष्यबळ होते. महात्मा गांधींना व वल्लभभाई पटेलांना निष्ठा वाहिलेले शेकडो जण या शहरात होते. व्यापाऱ्यांचे रास्त प्रश्न सोडविण्यासाठी गांधीजींसह पटेल बंधू, नरिमन व स. का. पाटील मदत करीत असत. म्हणून १९२०-१९२१ प्रमाणे कायदेभंग आंदोलनातही मुंबईतील वाणिज्य वर्गाने सक्रिय भाग घेतला. त्यांनी आंदोलनासाठी पैसा व मनुष्यबळही पुरविले. या नगरातील वाणिज्य वर्गाने नुसते वित्तबळच दिले नाही त्यांनी उत्स्फूर्तपणे हरताळ पाळला, अनेकदा व्यवहार बंद ठेवला. सत्याग्रह समितीचे आदेश पाळले. आपल्या नोकरांना मोर्चांमध्ये भाग घेण्यास परवानगी दिली.

मुंबईतील सॉलिसिटर व वकिलांनी गांधीजींना अविचल पाठिंबा दिला. त्यांच्यातील किमान १०२ जणांनी स्वदेशी चळवळीच्या मुद्रित प्रतिज्ञेवर सह्या केल्या होत्या. १९ एप्रिल १९३० च्या **बॉंबे क्रॉनिकल** पत्रकाने त्यांची नावे जाहीर केली होती. २० एप्रिल रोजी एक लाखावर नागरिकांच्या मिरवणुकीचे चौपाटीवरील सभेत रूपांतर झाले होते. लीलावती व कन्हैयालाल मुन्शी, घारपुरे, स. का. पाटील, के.के. मास्टर, हंसा मेहता, जी. एन. देसाई. बा. गं. खेर, जमनादास मेहता वगैरे नेते शहरात आंदोलनाचे रान उठवत होते. त्यामुळे त्यांना अटक होणे क्रमप्राप्त होते.

विदेशी कापड व दारूच्या दुकानांविरुद्ध निरोधने करण्यासाठी आणि नशाबंदीचा प्रचार करण्यासाठी गांधीजींनी महिलांना खास निवडले होते. निरोधने करताना स्वयंसेविका दुकानदारांचे व ग्राहकांचे पाय धरून किंवा त्यांच्या घरी जाऊन धरणे धरत असत. या सत्याग्रही मार्गाला अंशतः यशही आले. त्यामुळे विदेशी कापडाची व दारूची विक्री बरीच घटलीही होती. कॉंग्रेसच्या अंतर्गत स्थापन झालेला देश सेविका संघ १९३० पासूनच्या आंदोलनात नेहमीच अत्यंत सक्रिय राहिला. लीलावती मुन्शी, अवंतिकाबाई गोखले, कमलादेवी चट्टोपाध्याय, हंसा मेहता, जानकीबाई बजाज,

रतनबेन मेहता, गंगाबेन पटेल, पेरिन कॅप्टन, रामीबाई कामदार, कुमारी खंडवाला, श्रीमती गज्जर या देश सेविका संघाच्या पुढारी होत्या. त्या स्वतः व कॉलेजमधील मुली दुकानांसमोर तसेच घरोघरी जाऊन प्रचार करीत. आंदोलनासाठी वित्तबळ उभारण्यासाठी कित्येक महिलांनी सोन्याचे व हिऱ्यामोत्यांचे दागिने महात्मा गांधींना सभांमध्ये अर्पण केले. मुंबईतील अशा सभांमध्ये त्या दागिन्यांचे लिलाव आणि पुन्हा पुन्हा लिलाव करून मोठा निधी उभा राहिला होता. मुंबईतील सभांमध्ये अनोखा उत्साह व देशभक्तीची भावना प्रकट होत असे. स्वातंत्र्याचे ध्येय गाठण्यासाठी नागरिकांचा ठाम निर्धार व्यक्त होत असे. हे दृश्य समक्ष पाहून मुंबईचा पोलीस आयुक्तही एकदा भारावून गेला, आणि तसे त्याने सरकारला कळवलेही होते.[२२]

## वडाळा मिठागारांवरील छापे

मिठाच्या कायद्याविरुद्धचा मुंबईतील सर्वात मोठा प्रत्ययकारी लढा सरकारच्या वडाळा मिठागारांमध्ये लढला गेला. पोर्तुगिजांनी मुंबईचा ताबा घेईपर्यंतच्याकाळात मीठ तयार करणे हा मुंबईचा सर्वात मोठा उद्योग होता. तेव्हा येथून उत्तर हिंदुस्तान व परदेशांमध्येही मीठ निर्यात करण्यात येई. शिवडीपासून भांडूपपर्यंत उत्तम दर्जाचे मीठ तयार होत असे. इंग्रजांनी सरकारचा महसूल वाढविण्यासाठी योजना तयार केल्या. त्यासाठी १८३२ सालात एक आयोगही नेमला होता. महसुलात आणखी वाढ करण्यासाठी १८७२ सालात सरकारने बाँबे सॉल्ट डिपार्टमेंटची पुनर्रचना केली होती. तेव्हा मुंबईच्या प्रमुख एकवीस मिठागारांमध्ये दरवर्षी सरासरी साडेसहा लाख मण मीठ तयार होत असे. त्यानंतरही सरकारने काही धनिकांना परवाने देऊन मीठ बनविण्यास जमीन दिली आणि त्या बदल्यात त्यांना ब्रिटिशांचे आधारस्तंभ बनवले होते. शिलोत्री वतनदारांमध्ये प्रभू, पारसी, मुसलमान व ख्रिस्ती लोक असून त्यांच्या कामगारांमध्ये आगरी, कोळी, ख्रिस्ती व आदिवासींचा भरणा होता.[२३] मुंबईपेक्षा चेंबूर, घाटकोपर, विक्रोळी व भांडूप भागांत अधिक मीठ तयार होत असे. त्यातून सरकारला बराच महसूल प्राप्त होत असे.

वडाळ्याची मिठागरे म्हणून ज्ञात असलेल्या सरकारी मिठागारांवर १६ एप्रिल १९३० रोजी कमलादेवींच्या नेतृत्वाखाली एक हजार युवक व युवतींनी पहिला छापा घातला, आणि बरेच मीठ ताब्यात घेतले. पोलिसांच्या लाठीमाराची त्यांनी तमा बाळगली नाही. लगेच तीन दिवसांनी त्यांनी दुसरा छापा घातला. या सत्याग्रहास दोन हजारांच्या जमावाने उत्तेजनही दिले होते. पोलिसांनी या खेपेला गोळीबारही केला. तेव्हापासून वडाळ्याच्या मिठागरांवरील छापे हे १९३० च्या आंदोलनातील एक महत्त्वाचे उपाख्यान म्हणून प्रसिद्धी पावले. २२ मे पासून १ जून १९३० पर्यंत बहुतेक दररोज शेकडो युवक व देश सेविका तेथे मोठ्या निर्धाराने आणि निर्भयपणे संप करीत होत्या.

लंडनच्या **डेली हेराल्ड** पत्रकाचा प्रतिनिधी जॉर्ज स्लोकोंब मिठागरांमध्ये सत्याग्रहींच्या समवेत समक्ष उभा राहून अथवा नजीकच्या टेकडीवरून आपली निरीक्षणे टिपून घेऊन ती दररोज लंडनला पाठवित होता. अत्यंत उत्कट भावनेने सत्याग्रह करणाऱ्या युवक व युवतींच्या मित्रत्वाने तो खूप भारावला होता आणि इंग्रज सत्ताधीशांची त्याला लाज वाटली, असेही त्याने आपल्या संपादकाला कळविले होते. "It was humiliating for an Englishman to stand among the ardent, friendly, but deeply moved crowd of volunteers and sympathisers, and watch the representatives of the country's administration engaged in this ludicrous and embarrassing business". याच विवेकनिष्ठ पत्रकाराने नंतर गांधीजींची पुण्यात तुरुंगात भेट घेतली आणि लंडनच्या आपल्या पत्रकात उत्तम संदेश पाठविला. या संदेशाने पार्लमेंटच्या कॉमन्स सभागृहाची झोप उडाली होती.[२४]

२२ एप्रिल १९३० पासून शेकडो स्वयंसेवक व देश सेविका दररोज वडाळा आगारांमधून मीठ नेत असत. ते लाठीमार व गोळीबारालाही न जुमानता सत्याग्रह करीत. शेकडोंना अटक करण्यात आली, तर शेकडो जखमी झाले. तरीही सत्याग्रहींनी शिस्तभंग न करता कायदेभंग केला. मात्र त्यांना पाहायला येणारे लोकांचे व प्रेक्षकांचे थवे शिस्तभंग करीत. मुंबईच्या पावसात मिठाचा सत्याग्रह करणे शक्य नव्हते. म्हणून १ जून १९३० रोजी मिठागारांवर सर्वात मोठी अंतिम धडक मारण्याचा निर्णय वॉर कौन्सिलने घेतला. त्यासाठी व्यवस्थित नियोजन करण्यात आले.

लीलावती मुन्शी व श्रीमती हरनाम कौर यांच्या नेतृत्वाखाली स्त्री-पुरुष मिळून १५,००० सत्याग्रहींची शांती सेना मिठागरांवर चाल करण्यास निघाली. या व्यतिरिक्त हजारो प्रेक्षकही जमा झाले. सत्याग्रहींची शिस्तबद्ध पथके बनविलेली होती. पोलिसांची साखळी असूनही स्वयंसेवकांची डझनावारी पथके आणि नागरिकांचे थवे सत्याग्रहाच्या निग्रहाने धडक मारत आले. मुंबई पोर्ट ट्रस्ट रेल्वेच्या लेव्हल क्रॉसिंगजवळ १५,००० सत्याग्रही आणि त्यापेक्षा अधिक मोठा जमाव धडक मारत होता. पोलिसांना मार्गदर्शन करण्यासाठी स्वतः गृहमंत्री तेथे हजर होते. पोलिसांची प्रचंड फौज असूनहीस्वयंसेवकांनी गनिमी पद्धतीने हेतू साध्य केला आणि बरेच मीठ हस्तगत केले.

वडाळा सत्याग्रहींना अटक करून वरळीच्या तात्पुरत्या डिटेन्शन छावणीत ठेवलेले होते. त्यांची संख्या चार हजारांवर होती. दुसऱ्या कोणत्याच कारागृहात जागा नसल्यामुळे अशा स्थानबद्ध राजबंदींना तात्पुरत्या आणि अत्यंत गलिच्छ छावण्यांमध्ये डांबून ठेवण्यात येत असे. तेथे त्यांना अमानुष वागणूक दिली जाई. वरळीची छावणी म्हणजे मुंबईतील 'अंदमानचे कारागृह' असे म्हटले जाई. ३ जून १९३० रोजी वरळीच्या छावणीतील स्वातंत्र्य सैनिकांनी तिथे विद्रोह उभारला. मात्र हा विद्रोह निःशस्त्र होता. तरीही परिस्थिती आटोक्यात आणणे पोलिसांना अशक्य झाल्याने सरकारने सेनादल तैनात केले. सेनादलाने छावणीतील तब्बल २५ स्वातंत्र्य सैनिकांना ठार मारून स्मशान शांतता प्रस्थापित केली. तथापि त्यामुळे मुंबईत व विशेषतः वरळी भागात प्रक्षोभ उसळला. अधिकाधिक लोक आंदोलनात भाग घेऊ लागले. वडाळा व वरळी येथील परिस्थिती समक्ष पाहिलेल्या जॉर्ज स्लोकोंबने लंडनच्या **डेली हेराल्ड** पत्रकास पाठविलेल्या संदेशात म्हटले होते की, "ब्रिटिश सरकारला जर काँग्रेसची मागणी मान्य करावयाची नसेल, तर संपूर्ण हिंदुस्तानभर मार्शल लॉ लागू करून मशिन गन आणि तोफांच्या बळांवरच इथे ब्रिटिशांना राज्य करणे शक्य होईल. पण ब्रिटिशांनी असा शस्त्राचाराचा मार्ग पत्करणेही किती धोक्याचे आहे याचाही विचार करावा." परिस्थिती इतकी गंभीर होती.[२५]

वडाळा आणि वरळीप्रमाणेच बोरीबंदरजवळील भाटिया बाग व आझाद मैदानातही मोठ्या सत्याग्रहाचे दर्शन घडले होते. शहरात ठिकठिकाणी ध्वजवंदन झाले. शिवाजी

पार्क व चौपाटीवर मोठमोठ्या सभा गाजल्या. कमलादेवी, सरोजिनी नायडू, सी. के. नारायणस्वामी, प्रा. धर्मानंद कोसंबी, पुपाला, जोहरी, महमद इब्राहिम, वामन काबाडी वगैरेंनी कामगार विभागामध्ये सभा घेऊन आंदोलनाबाबत उत्साहनिर्माण केला.

विशेष म्हणजे या चळवळीत काही परदेशी नागरिकदेखील सहभागी झालेत. उदाहरणार्थ, ऑस्ट्रेलियन युवक सायरील वाल्टर थॉर्नटन सत्याग्रहात भाग घेण्यासाठी मुंबईला आला होता. त्याला काँग्रेस हाऊसमध्ये मिठाच्या सत्याग्रहाची रीतसर दीक्ष दिली होती. एका जाहीर सभेत त्याने आपण सत्याग्रहाच्या मार्गाने कसे प्रभावित झालो आणि भारताला स्वातंत्र्य का देण्यात यावे याविषयीचे आपले मनोगत मुंबईकरांना सांगितले. सत्याग्रहाच्या प्रतिज्ञापत्रकावर सही करून तो कार्यकर्ता झाला होता.

मुंबईतील महिलांचा तसेच गुजरात व अलाहाबादमधील महिलांचा आवेश पाहून सरकारने त्यांना निरोधनांपासून रोखण्यासाठी ३० मे १९३० रोजी खास वटहुकूम जारी केला. मात्र त्याचा महिलांवर फारसा परिणाम झाला नाही, हे लगेच वडाळा व वरळीला सिद्ध झाले. कारण सरकारी दडपशाहीचा मुकाबला त्यांनी सत्याग्रहाने केला.[२६]

## महात्मा गांधींना अटक

गुजरातमधील धारासणा येथील मिठागाराचा कब्जा घेण्यासाठी आपण तेथे जाणार असल्याचे गांधीजींनी १ मे रोजी जाहीर केले. ब्रिटिश पत्रकार जॉर्ज स्लोकोंब व ब्रेल्सफर्ड यांनी हिंदुस्तानातून लंडनला पाठविलेल्या संदेशांवर पार्लमेंटच्या कॉमन्स सभागृहात चर्चा झाली. इकडे व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन खूपच त्रस्त झाले. भारतमंत्र्यांना पाठविलेल्या अहवालात त्यांनी आपली शृंगापत्ती व्यक्त केली. कारण प्राप्त परिस्थितीत सरकारने काहीही केले, तरी ते गांधीजी व काँग्रेसच्या पथ्यावर पडत होते. त्यांना अटक केली तर देशभर अधिक लोकक्षोभ पसरण्याचा धोका होता. आणि त्याच कारणाने गांधीजींना अटक करण्याचे व्हाइसरॉयने इथपर्यंत

टाळले होते. तथापि त्यांना मोकळे ठेवल्यामुळे त्यांचा प्रभाव सारखा वाढत राहिला. २१ एप्रिल १९३० पासून गांधींना अटक करा असा व्हाइसरॉयवर सर्वच प्रांतिक गव्हर्नरांकडून दबाव येत होता. मुंबईचे गव्हर्नर साईक्स हे तर कमालीचे अस्वस्थ झाले होते. मुंबईतील एक मुत्सद्दी गृहस्थ पुरषोत्तमदास ठाकूरदास यांनी आयर्विनला मित्रत्वाचा सल्ला देताना गांधीजींशी तडजोड करण्याची सूचना केली. आयर्विन यांना पटले की, सरकारला मोठा धोका आहे. केंद्रीय गृहमंत्र्यांनी मुंबईच्या गृहमंत्र्यांना लिहिले :– "In spite of all that has been done, Government may not be retaining that essential moral superiority, which is perhaps the most important factor in this struggle".[२७]

वादळामध्ये सापडलेला मुंबईचा गव्हर्नर साईक्स इतका अगतिक झाला की, त्याने आयर्विन साहेबांना कबूलच केले :—" It is now necessary to frankly recognize that we are faced with a more or less overt rebellion, for which the term non-violence is merely a camouflage, and it is supported either actively or passively by a very large section of the population. We have, for one reason or another, practically no openly active friends".[२८]

तरीही आयर्विन महाशय गांधीजींविषयी निर्णय घेऊ शकत नव्हते. त्यांना अटकेत टाकल्याने आंदोलनाची तीव्रता कमी होणे असंभवनीय होते. मात्र पेशावरमधील खुदाई खिदमदगारांचा लढा आणि चित्तगावमधील विद्रोह, कराचीतील कोर्टावरील छापा, कोलकाता व मद्रासमधील घटना तसेच मुंबईत प्रतिदिनी यशस्वी होत गेलेला सत्याग्रह यामुळे आयर्विनला निर्णय घेणे अटळ आहे, असे नोकरशाही म्हणू लागली. सरकारने कित्येक ठिकाणी निर्घृण गोळीबार केला होता. त्याविषयी गांधीजींनी ४ मे १९३० रोजी व्हाइसरॉयला पत्रातून फटकारले की, सरकारने आरंभिलेला उद्योग म्हणजे " प्रच्छन्न स्वरूपातील लष्करी कायदा आहे. ....... सरकारला अहिंसा न समजल्यामुळे ती सहन झाली नाही आणि म्हणून सदर सरकारने मनुष्य स्वभावास स्वाभाविक अशी हिंसा करण्यास प्रवृत्त केले."

अशा वातावरणातच धारासणा मिठागरे ताब्यात घेण्यासाठी आपण जाणार आहोत, हे गांधीजींनी घोषित केलेले होते. त्यामुळे आयर्विन व गृहमंत्री हेग यांचा मानसिक समतोल ढळला आणि त्यांनी गांधींजींना गुप्तपणे अटक करण्याचा हुकूम दिला. त्या ४ मे १९३० च्या रात्री **महात्माजी दांडीपासून तीन मैलावरील कराडी येथील सत्याग्रहींच्या छावणीच्या खुल्या प्रांगणात झोपलेले होते. ती मध्यरात्र उलटल्यावर सुरतचा कलेक्टर गुपचुप छावणीत शिरला. आणि त्याने महात्माजींना उठवून १८२७ मधील कुप्रसिद्ध अधिनियमाखाली त्यांना अटक केल्याचे सांगितले.** लगेच मुंबईकडे जाणाऱ्या रेल्वेगाडीत बसविले आणि पुढे पुण्यातील येरवडा कारागृहात नेले.

गांधीजींच्या अटकेची बातमी समजताच मुंबईत त्याचे गंभीर पडसाद उमटले. सर्वत्र स्वयंस्फूर्त हरताळ पाळण्यात आला. सर्व व्यवहार थांबले. कापड बाजार, जव्हेरी बाजार, मांडवीचा बाजार या सर्व बाजारपेठा तर दोन दिवस बंद राहिल्या. सरकारचा तीव्र निषेध करण्यात आला. आझाद मैदान, दाणाबंदर, लालबाग येथेही निषेधाच्या सभा झाल्या. काँग्रेसप्रणीत गिरणी कामगार युनियनच्या आवाहनानुसार गिरणी कामगार हरताळमध्ये सामील झाले. रेल्वे वर्कशॉप, रेल्वे गुड्स यार्ड, गोद्या येथील कामकाजसुद्धा विस्कळीत झाले. मुंबई महापालिकेची सभा स्थगित करण्यात आली. या हरताळामध्ये बॉम्बे शॅरा असोसिएशन, मुंबई कॉटन मर्चंट असोसिएशन, मुंबई सीड मर्चंट असोसिएशन, इंडियन मर्चंट चेंबर, मारवाडी चेंबर ऑफ कॉमर्स या संस्था सहभागी झाल्या. महिलांच्या नेतृत्वाखाली एक मैल लांबीची प्रचंड निषेध मिरवणूक निघाली. मिरवणुकीमध्ये गिरणी कामगार, त्याचप्रमाणे पठाण आणि शीख समाजातील लोकसुद्धा फार मोठ्या संख्येने सहभागी झालेले होते. विदेशी बनावटीचे कापड गाढवावर लादून त्याची धिंड काढण्यात आली आणि नंतर त्या विदेशी कापडाची होळी करण्यात आली.

त्याच दिवशी मुंबई महापालिका इमारतीसमोरील युनियन जॅक खाली उतरवून तेथे तिरंगा राष्ट्रध्वज फडकविण्यात आला. हा कार्यक्रम महापालिका अधिकाऱ्यांच्या उपस्थितीतच घडला. परंतु त्याला कोणीही हरकत घेतली नाही. ब्रिटिश कापडाविरुद्ध स्त्रियांचे पिकेटिंगचे कार्यक्रम सुरू होते. महिला कार्यकर्त्यांची धरपकडही झाली. मुंबई प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या वतीने सायक्लोस्टाईल **काँग्रेस बुलेटिन** दररोज निघत होते.

या बुलेटिनच्या एक लाखाहून अधिक प्रतींचे रोजचे होणारे वितरण हा या चळवळीचा भाग होता.

गांधीजींना अटक केल्यावर मुंबई प्रांतात दडपशाहीचा नंगानाच सुरू झाला. कमलादेवी, बॅरिस्टर नरिमन, आर. एम. पडबिद्री, लक्ष्मण निफाडकर, सी. के. नारायणस्वामी हे युद्धमंडळाचे सदस्य पकडले गेले. तरीही सत्याग्रहींचे मनोधैर्यकायम राहिले. वडाळ्याचा सत्याग्रह नियोजनाप्रमाणे चालू राहिला.

गांधीजींच्या गैरहजेरीत सरोजिनी नायडू, इमामसाहेब, प्यारेलाल आणि मणिलाल गांधी यांच्या नेतृत्वाखाली **अडीच हजार स्वयंसेवकांनी सुप्रसिद्ध धारासणा सत्याग्रह** यशस्वी करून दाखवला. सत्याग्रहींनी पोलिसांचे पाशवी अत्याचार सोसून, आपला अहिंसा आणि सत्याग्रहाचा बाणा साऱ्या जगाला दाखवून दिला. ज्येष्ठ अमेरिकन पत्रकार वेब मिलर याने समक्ष पाहिलेल्या पोलिसांच्या पाशवी अत्याचारांचे सत्यवर्णन पाश्चिमात्य जगापर्यंत पोहोचवले होते. इस्पितळात जाऊन त्याने ३२० जखमी स्वयंसेवकांची स्थिती पाहिली होती. त्याने लिहिलेली माहिती कोणत्याच वर्तमानपत्रात प्रसिद्ध होऊ नये, यासाठी इंग्रजांनी खूप प्रयत्न केले होते. मात्र मिलरची बातमीपत्रे अमेरिकेत प्रकाशित झाली होती. गांधीजींच्या शिष्या मॅडेलिन स्लेड ऊर्फ मीराबेन यांनीही **यंग इंडिया** पत्रकात एक लेख लिहून पोलिसांच्या भयंकर अत्याचारांचे यथार्थ वर्णन करून ठेवले. लाठ्यांच्या प्रहारांनी सत्याग्रहींची डोकी फोडली जात असत. युवकांना नागडे करून मारहाण करण्यात येई. शरीराच्या नाजूक भागात टाचण्या टोचल्या जात. पुरुषांचे जननेंद्रिय पिळून त्यांना बेशुद्ध केले जात असे. जखमींना ओढत नेऊन झुडपात फेकून दिले जाई. रस्त्यात बसलेल्या सत्याग्रहींना तर घोड्यांच्या टापांखाली तुडवण्यात येत असे. लाथाबुक्के हा तर नित्याचा आचारधर्म होता.[२९]

हिंदुस्तानचे होम मेंबर (गृह मंत्री) हेग हे मुंबईतील आंदोलनाची सद्यःस्थिती पाहण्यासाठी जून १९३० मध्ये मुंबईला व पुण्यात येऊन गेले. त्यांना मुंबईत कित्येक हजार निदर्शक दिसले. गांधी टोप्या घातलेल्या निदर्शकांमुळे वाहतुकीची झालेली प्रचंड कोंडी त्यांनी पाहिली. मुंबईतील गोऱ्या लोकांच्या वस्तीत त्यांना भीतीचे वातावरण दिसले. विदेशी माल व दारूच्या दुकानांविरुद्धची निरोधने तर त्यांना

दिसलीच, पण निदर्शकांमध्ये महिलाच अधिक असल्याचे त्यांनी पाहिले. कायदेभंग आंदोलनामुळे मुंबईतील व्यापार घसरला. या हेग महाशयाने आपल्या टिपणात कबूलच केले आहे की, हिंदुस्तानातील सविनय कायदेभंग आंदोलनाची सर्वात मोठी रणभूमी मुंबई ही आहे, असे गव्हर्नरने आपल्याला वारंवार पटवून दिले. येथील राजनिष्ठ घराण्यांमधील युवक व महिलादेखील आंदोलनात सहभागी झालेल्या होत्या.[३०]

## सोलापुरातील लढा

महात्मा गांधींना निष्कारण अटक केल्यामुळे संपूर्ण राष्ट्रात निषेधाचा वणवा पेटला. मुंबईत विराट जनसमुदाय रस्त्यावर उतरल्यामुळे पोलिसांनी माघार घेतली होती. बहुतांश गिरणी कामगार आणि रेल्वे कामगार जनसागरात सामील झाले. कापड दुकानदारांनी सहा दिवसांचा हरताळ घोषित केला. सरकारची आर्थिक कोंडी करण्याच्या योजना आकार घेऊ लागल्या. थोडी फार अशी परिस्थिती सोलापुरात उद्भवण्याची चिन्हे होती. या औद्योगिक शहरावर गिरणी कामगारांचा प्रभाव होत. मागील सात-आठ वर्षांपासून येथील कामगार वर्ग आर्थिक मंदी आणि सरकारच्या मालकधार्जिण्या धोरणाने पिळून निघाला होता. वेतनकपात व कामगारकपातीमुळे कामगार वर्ग बेजार झाला होता. १९३० साली त्यांच्या आर्थिक असंतोषाला राष्ट्रवादाची जोड मिळाली.

१९२०-१९२२ च्या असहकार चळवळीपासून सोलापुरात चांगली जागृती होण्यास प्रारंभ झाला होता. १९३० साली डॉ. कृ. भि. अंत्रोळीकर, परशराम राठी, रामकृष्ण जाजू, व्यंकटराव सोनी, रामभाऊ राजवाडे, तुळशीदास जाधव, गोविंद कन्हैयालाल, हरिहर गुरुनाथ सलगर-कुलकर्णी (कवी कुंजविहारी), जगन्नाथ शिंदे, श्रीकिसन सारडा, अब्दुल रसूल कुर्बान हुसेन (उर्दू पत्रकार), नागोपंत चितळे आणि के. आर. सुमंत यांनी सोलापुरात एक सत्याग्रह मंडळ स्थापन केले. गांधीजींच्या अटकेचे वृत्त समजताच सोलापुरात ५ आणि ६ मे रोजी सार्वत्रिक हरताळ पाळण्यात आला. मिरवणुका निघाल्या आणि जाहीर सभा झाल्या. ७ मे रोजी गिरणी कामगारांनी संपही केला. त्यांनी दारूची दुकाने उद्ध्वस्त करून विदेशी कापडाची होळी केली. दरम्यान उद्भवलेला जातीय तणाव व विवाद काँग्रेसजनांनी शांततेने सोडवला होता.

युवक व कामगारांनी ८ मे रोजी आंदोलनाचा एक भाग म्हणून रूपाभवानीजवळील ताडीची झाडे कापली व दारूचे एक दुकान जाळून टाकले. त्यामुळे पोलीस अधिकारी आणि निदर्शक यांच्यात शाब्दिक बाचाबाची झाली. ताडीची झाडे कापणाऱ्यांना पोलिसांनी अटक केली होती. लोकांचा जमाव त्यांच्या सुटकेची मागणी करू लागला. त्यावरून वातावरण आणखी गरम झाले. वस्तुतः मल्लाप्पा धनशेट्टी हे प्रतिष्ठित पुढारी रागावलेल्या जमावास आवरण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होते. तेवढ्यात शंकर शिवदारे हा मुलगा पुढे सरसावला आणि अटक केलेल्या नागरिकांच्या सुटकेची मागणी करू लागला. शंकरचे हे धैर्य कौतुकास्पद होते. पण एका उद्दाम सार्जंटने सरळ नेम धरून पिस्तुलातून गोळ्या झाडल्या आणि त्याला ठार मारले. शंकर हुतात्मा झाला! त्यामुळे जमाव अधिकच संतप्त झाला आणि चळवळीला हिंसात्मक रूप आले.[३१]

सोलापुरातील या घटनांना सरकारी अधिकाऱ्यांच्या युध्यमान (बेलिजरंट) प्रवृत्तीची पार्श्वभूमी होतीच. सोलापुरातील आंदोलनाची तीव्रता लक्षात घेऊन गांधीजींना अटक करण्यापूर्वीच लष्कराची मागणी करण्यात आली होती. मध्य विभागाचा महसूल आयुक्त, ए. मॅकाय याने पुण्यातील सर विल्यम हेनेकर या ज्येष्ठ सेनाधिकाऱ्याशी चर्चा करून सोलापूरला ६० सैनिकांची तुकडी पाठवण्याची त्याला सूचना दिली होती. शिवाय ही तुकडी कमी पडल्यास अतिरिक्त सेनादल खास रेल्वेने सोलापुरास पाठविण्याचाही त्याने आदेश दिला होता.[३२] ७ मे रोजी अठरा हजार गिरणी कामगारांनी संप करून आगगाड्या व रेल्वेतील गोऱ्या लोकांच्या घरांवर दगडफेक केली. तोपर्यंत गोळीबाराचा आदेश देण्याचे कलेक्टरने टाळले हे खरे. तथापि ८ मे रोजी लोकक्षोभाने थैमान घालताच गोळीबार करून आंदोलन दडपण्याचा कलेक्टर हेन्री नाईट याने निर्णय घेतला.

वस्तुतः शंकर शिवदारेला ठार मारल्यामुळे जमाव संतापला होता. म्हणून जमाव नाईट साहेबांच्या मोटारीवर हल्ला चढवणार असे दिसू लागताच, मल्लाप्पा धनशेट्टी यांनी जमावाला आवरले होते. त्यामुळे नाईट व जिल्हा पोलीस अधीक्षक प्लेफेअर हे दोघे वाचले होते. ते दोघे परत जाताना पोलिसांनी केलेल्या गोळीबारात आणखी

तीन जण हुतात्मा झाले. त्यामुळे अधिकच संतापलेल्या जमावाने मंगळवार पेठेतील मुख्य पोलीस चौकीवर हल्ला चढवला. त्यात दोन मुसलमान शिपाई मरण पावले, आणि त्यातील एकाचा देह आगीत फेकण्यात आला. यानंतर जमावाने जिल्हा न्यायालयाची इमारत जाळून टाकली.

सोलापुरातील तीव्र लोकक्षोभाने घाबरून शहरातील गोरे लोक (२५० ते ३०० बायकामुलांसह) रेल्वे स्टेशनकडे धावले. त्यांच्या संरक्षणार्थ कलेक्टरने शंभर सशस्त्र पोलीस आणि निमलष्करी दलाच्या तीस सैनिकांची तुकडी स्टेशनवर ठेवली. कारण शेकडो भारतीयांपेक्षा एका युरोपियनाच्या जिवाचे मोल मोठे होते! गोऱ्यांनासुखरूप पुण्याला पोहचवणे यास कलेक्टरने प्राथम्यक्रम दिला. कलेक्टर ऑफिस व आपला बंगला जाळून टाकण्याचा जमाव प्रयत्न करेल, अशी नाईटला उगीच भीती वाटत होती. रेल्वे लाईन खंडित करण्याचाही त्याला धोका दिसत होता. रेल्वे व तारांच्या खंडित झाल्यास आपण हतबल होऊ, अशी त्याला भीती वाटत होती.[३३] तथापि नाईटला भय वाटत होते तसे काहीच घडले नाही, आणि घडणारही नव्हते. संदर्भाधीन फाईलचा अभ्यास करता आमच्या लक्षात आले की, हा आय.सी. एस. अधिकारी मुत्सद्दी नव्हता, खंबीरही नव्हता. शंकर शिवदारेंना ठार करणे चुकीचे होते. सोलापुरातील गोऱ्या बायका व मुले सुखरूप पुण्यास पोहोचली. तसेच पुण्याहून सोलापूरला सेनादल येऊन पोचले.

लष्करी कायद्याचा अंमल नसतानाही ८ आणि ९ मे १९३० रोजी सोलापुरात सेनादलाने बेदरकारपणे केलेल्या प्रच्छन्न गोळीबारात ९ निरपराध माणसे ठार झाली व २३ जखमी झाली. त्यांत गॅलरीत उभा असलेला गजानन काशीनाथ रानडे हा शाळकरी मुलगाही होता. **टाइम्स ऑफ इंडिया** पत्रकाचा सोलापुरातील वार्ताहर अगदी चुकीच्या बातम्या पाठवित असे. फक्त **कर्मयोगी** या मराठी पत्रकानेच सोलापुरातील सत्यस्थिती महाराष्ट्राला कळवली होती. विशेष म्हणजे रेल्वे स्टेशनचा थोडासा भाग सोडल्यास सोलापुरावर ९ ते ११ मे हे तीन दिवस काँग्रेस स्वयंसेवकांचाच अंमल होता. 'ब्रिटिशांचे राज्य गेले व गांधीजींचे राज्य आले', अशी लोकभावना होती.

**लष्करी कायद्याचा अंमल :—**अशी लोकभावना झाल्याचे कळताच सिमल्याच्या शिखरावरून १२ मे १९३० रोजी मुंबईला संदिग्ध व आगंतुक तार आली, "सोलापुरात सरकारचा अंमल अतितात्काळ पुन्हा प्रस्थापित करावा". मात्र तेव्हा लष्करी कायद्याबाबत मुंबईचा गृहसचिव व पुण्याचा विभागीय आयुक्त मॅकाय यांच्यात मतभेद होते. मॅकायच्या मते "पोलिसांनी प्रथम गोळीबार केल्यामुळे लोक भडकले आणि सूड म्हणून त्यांनी पोलिसांचे खून केले व सरकारी इमारती जाळल्या. आपल्यापैकी काहींचे खून झाल्यामुळे पोलीसही आता खवळले आहेत". दुसरे असे की, पोलिसांची कामे करण्यासाठीही कलेक्टर लष्कराचा वापर करतो, हे सेनाधिकाऱ्यांना नापसंत होते. अधिकाऱ्यांमध्ये सर्वसंमती नव्हती.[३४]

लष्करी कायद्याची आवश्यकता नसताना १२ मे च्या सायंकाळी सोलापूर नगरपालिकेच्या हद्दीत लष्करी कायदा लागू करण्यात आला. केवळ शक्तिप्रदर्शनाने सरकारचा उद्देश सफल झाला असता, असे भिन्न मत मॅकायने गोपनीय फायलीत नोंदलेले आहे. शिवाय मल्लाप्पा धनशेट्टी यांनी लोकांना भडकावले हे सत्य नाही; ते खादीधारी असले तरी काँग्रेसजन नाहीत असेही मॅकायने नमूद केलेले होते.[३५]

ब्रिटिश सरकारची अंदाधुंदी व स्वच्छंदता पाहा :— लष्करी कायद्याचा अधिकृत वटहुकूम व्हाइसरॉयने १५ मे रोजी निर्गमित केला, पण त्यापूर्वीच तो लागू झालेला होता आणि शांतता प्रस्थापित झालेली होती. तिरंगा झेंडा फडकावणे व गांधी टोपी घालणे हेही लष्करी कायद्यानुसार दंडनीय गुन्हेच मानण्यात येत असत. तुळशीदास सुभानराव जाधव यांना याच आरोपाखाली लष्करी न्यायालयाने शिक्षा ठोठावली होती. प्रकरण १२ मध्ये सोलापूर मार्शल लॉ याविषयीची संपूर्ण कथा सांगितली आहे.

लष्करी कायद्यामुळे सोलापुरात शांतता प्रस्थापित झाली असे मुळीच नव्हे. ती आधीच झालेली होती. मात्र लष्करी कायद्यामुळे सरकारला स्वेच्छानुसारी शिक्षा स्वच्छंदपणे ठोठावणे शक्य झाले. पोलिसांनी पढवलेल्या बारा साक्षीदारांनी कोर्टात साक्ष दिली की, चांद अल्लाउद्दीन आणि दादा जाफर या पोलिसांवर हल्ला करण्याचे कृत्य आम्ही समक्ष डोळ्यांनी पाहिले होते. अशी खोटी साक्ष देणाऱ्या साक्षीदारांची उलटतपासणी घेण्यात आलीच नाही. तसेच बचाव पक्षाच्या वतीने साक्षी होऊ दिल्या

नाहीत. लष्करी कायद्यामुळे प्रचंड दहशत पसरली होती. सरकारी पक्षाने सादर केलेला एकतर्फी व खोटा पुरावा गृहीत धरून सत्र न्यायाधीशाने मल्लाप्पा धनशेट्टी, शिंदे, सारडा आणि अब्दुल रसूल कुर्बान हुसेन यांना ६ जून १९३० रोजी फाशीची शिक्षा फर्मावली. हा खटला भुलाभाई देसाईंनी समर्थपणे चालविला. पण व्यर्थ!

हा निकाल लागण्यापूर्वीच ३१ मे रोजी नवीन कलेक्टर ब्रिस्टो याने तर कहर केला. त्याने गृह सचिवाला लिहिले होते की, सरकारच्या साक्षीदारांना सुरक्षित व बरे वाटावे यासाठी त्या चौघांना सोलापूरच्या भर माणिक चौकातच लोकांसमक्ष फाशी द्यावे. तथापि त्या माथेफिरू कलेक्टरची सूचना शासनाने फेटाळली. आरोपींनी उच्च न्यायालयाच्या खंडपीठाकडे अपील केले. तथापि तिथेही न्या. माडगावकरांचा रास्त अभिप्राय डावलून खंडपीठाने सरकारच्याच बाजूने निर्णय दिला. आणि चौघांनाही फाशी देण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले. त्यानुसार १२ जानेवारी १९३१ रोजी धनशेट्टी, शिंदे, सारडा व कुर्बान हुसेन यांना येरवडा कारागृहात फाशी देण्यात आले.

विशेष म्हणजे १९३० च्या आंदोलनात भारतात फक्त सोलापुरातच लष्करी कायदा लागू केला हे भारतमंत्री वेजवूड बेन यांनी पार्लमेंटला सांगितले होते.[३६]

**लष्करी कायदा काळातील त्या स्मृती भयानक वेदनादायी होत्या. सोलापूर प्रकरणात ब्रिटिशांचे क्रौर्य व सूडबुद्धीचे दुःखद दर्शन घडले होते. शेकडो निरपराध लोकांवर अन्याय तर झालाच होता. शिवाय त्या पन्नास महिलांवर सैनिकांनी पाशवी बलात्कार केले होते.** अशा पाशवी कृत्यांचा आणि चार देशभक्तांना दिलेल्या असमर्थनीय फाशीचा सूड उगविण्यासाठीच वासुदेव बळवंत गोगटे यांनी अर्नेस्ट हॉटसनचा वध करण्याचा प्रयत्न केला.[३७] पण तो आपण नंतर पाहू.

सोलापुरातील शोकांतिकेच्या प्रतिक्रिया हिंदुस्तानभर उमटल्या. तथापि शोकांतिका घडविणाऱ्या इंग्रज सरकारचा सर्वात तीव्र निषेध पुण्यापेक्षा मुंबईनेच केला. काँग्रेसजनांच्या मार्गदर्शनाखाली येथील कामगारांनी निदर्शने केली, निषेधाच्या सभा भरविल्या. अनेकदा संप केले व हरताळ पाळले. मुंबई प्रांतिक काँग्रेस समितीने

सोलापूर शोकांतिकेवर कित्येकदा खास बुलेटिन काढून नागरिकांना मार्गदर्शन केले आणि चळवळीविषयी सूचना दिल्या. शिवाय पोलिसांच्या कारवायांमुळे पीडाग्रस्त झालेल्या कुटुंबांसाठी निधी उभारला. मुंबईच्या युद्धमंडळाने सोलापूर व कित्येक ठिकाणच्या आंदोलनांचे स्मृती दिन पाळले. सोलापूरचा लष्करी कायदा व अत्याचारांचे पडसाद सविनय कायदेभंगाच्या दुसऱ्या सत्रात अधिक तीव्रतेने पडले. कलेनिअल सरकारी दहशतवादाच्या त्या आठवणी सोलापूरकर कधीच विसरू शकले नाहीत. स्वाभाविकपणे १९४२ मध्येही ते इंग्रजांशी अधिक त्वेषाने लढले.

मिठाचा सत्याग्रह पार्ले-जुहूची छावणी, वडाळा अथवा भाटिया बाग येथेच मर्यादित न ठेवता आझाद मैदान, हाजी अली, आणि काँग्रेस भवनाची गच्ची व उघड्या मैदानांवरही मीठ बनविण्यात येई. हे मीठ खाण्यासाठी नसून त्याचा वारंवार लिलाव करून कायद्याचा भंग करण्यात येई.

राष्ट्रीय नेत्यांना अटक झाल्यावरही मुंबईचे युद्धमंडळ कोणत्याही बाबतीत माघार घेण्याच्या मनःस्थितीत नव्हते. विदेशीविरुद्ध स्वदेशीचा लढा तीव्र करण्यात आला. सोलापुरातील अत्याचारांमुळे स्वदेशी कापडास मागणी वाढली. त्यामुळे मुंबईतील विदेशी कापडच नव्हे तर विदेशी मालकी असलेल्या मिलांच्या कापडाची विक्री खूपच कमी झाली. परिणामतः मुंबईतील ब्रिटिश मालकांच्या सोळा गिरण्या बंद पडल्या. शोषक सत्ताधीशांविरुद्धचा हा आर्थिक लढा होता. त्यात काँग्रेसला लक्षणीय यश लाभले.

त्यावर्षी भारतीयांचे देशप्रेम इतके उफाळून आले होते की, स्वातंत्र्यासाठी पोलिसांच्या लाठ्या अंगावर घेणे हा हजारोंना आपला सन्मान वाटत होता. हुतात्म होण्याच्या ईर्षेने शेकडो युवक त्वेषाने पुढे आले. त्यांनी आपल्या नैतिक धैर्याचे दर्शन घडविले. मुंबई, धारासणा व सोलापूरमधील लढा पाहून विलक्षण प्रभावित झालेले ब्रेल्सफोर्ड, वेब मिलर व जॉर्ज स्लोकोंब या विदेशी पत्रकारांनी साऱ्या जगाचे लक्ष या आंदोलनाकडे आकर्षित केले. स्लोकोंबचे अंतःकरण त्याच्या स्वदेशीयांविरुद्ध पेटले होते. म्हणून त्या अगतिक अवस्थेतून मार्ग काढण्यासाठी तो झटतही होता. तो मोतीलाल नेहरू व गांधीजींना (जेलमध्ये) भेटलाही होता. त्यचे

हे वाक्य पाहा :– “Incalculable disaster may yet be avoided by the frank recognition that the imprisoned Mahatma now incarnates the very soul of India”.[३८]

## शिरोडा सत्याग्रह

शिरोडा सत्याग्रह हा एक नमुनेदार संघर्ष मानला जातो. येथून मिठाच्या शेकडो गोण्या हस्तगत करण्यात आल्या होत्या. अप्पासाहेब पटवर्धन, त्र्यंबक देवगिरीकर व सीताराम रानडेंनी गोवा प्रदेशातूनही इथे मीठ आणून कायदेभंग केला होता.येथील सत्याग्रहाचा वृत्तान्त तुरुंगात ऐकून गांधीजींना मोठे समाधान वाटले होते. खाजगी मिठागारांच्या मालकांनी सत्याग्रहींना फारसा विरोध केला नव्हता असे पुराव्यांवरून दिसते. त्यामुळे त्यांच्यापैकी काहींना कारावासही भोगावा लागला.

विलेपार्ले येथील महाराष्ट्र सत्याग्रह छावणीतून सत्याग्रहींच्या तुकड्या वेंगुर्ल्यास बोटीने पाठवल्या जात. तेथून त्यांची पथके चालत शिरोड्यास जात असत. एकूण आंदोलनातील आवेश व नियोजन पाहून शंकरराव देव, अप्पासाहेब पटवर्धन, वा वि. दास्ताने, ग. वि. केतकर, भाऊ रानडे, मीर शुक्रुल्ला, नाथ घाणेकर वगैरेंना शिरोडा सत्याग्रहाच्या प्रारंभापूर्वीच पकडले होते. म्हणून या सत्याग्रहाची सर्व सूत्रे आचार्य शं. द. जावडेकर, वा. वि. आठले, विनायकराव भुस्कुटे यांनी हाती घेतली. मुंबईच्या सत्याग्रह मंडळाने बरेच सत्याग्रही पाठविले होते. गंगाधरराव देशपांडे व अप्पासाहेबांनी वेंगुर्ला, रत्नागिरी, मालवण, मीठबाव, अरवली व रेडी येथे सत्याग्रहींसाठी छावण्या उभारल्या व कोकणात अपूर्व जागृती केलेली होती. त्यामुळे स्थानिक जनतेकडूनही चांगले पाठबळ मिळाले. पुणे येथील संघटनेनेही बरेचसाहाय्य दिले. एकूण ५८३ स्वयंसेवकांपैकी सर्वात जास्त म्हणजे ११६ मुंबईचे तर त्याखालोखाल १०३ जळगाव जिल्ह्यातून आलेले होते. जळगावकरांचे नेते वा.वि. दास्ताने असले तरी स्वयंसेवकांचे नेते सीताराम भाऊजी चौधरी हे बलदंड युवक आघाडीवर होते.

उपरोक्त पुढाऱ्यांव्यतिरिक्त शिरोड्याच्या संघर्षात डॉ. बा. चिं. लागू, धर्मानंद कोसंबी, डॉ. भागवत, सोमण, अण्णासाहेब सहस्रबुद्धे वगैरेंनी बरेच योगदान दिले.

१२ मे १९३० रोजी सत्याग्रहाचा प्रारंभ करून पाऊस पडेपर्यंत तो चालवायची योजना होती. हा सत्याग्रह गांधीजींच्या पद्धतीनुसार करण्यात आला, ही त्याची एक विशेषता होती. स्वतः जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक त्या रणांगणावरच उभे राहून पोलिसी हिंसाचारास मार्गदर्शन करत होते. सत्याग्रहींना उभे राहणे अशक्य होईपर्यंत मारहाण करण्यात येई. चौथ्या दिवशी अनेक स्वयंसेवक बेशुद्ध पडेपर्यंत त्यांच्यावर प्रहार करण्यात आले. राखीव ठेवलेले जळगावचे कणखर पथक येताच त्यांच्यावर पोलीस तुटून पडले. स्वयंसेवकांनी गनिमी युद्ध तंत्रानुसार लढा दिला, आणि त्यांच्यातील शेवटचा स्वयंसेवक अधू होईपर्यंत त्यांनी अत्याचारांचा मुकाबला केला. वीस जण बेशुद्ध पडले तर साठ गंभीर जखमी झाले. या सत्याग्रहासाठी ३०० जणांनी कारावास भोगला.[३९]

विशेष म्हणजे शिरोड्यातील पोलिसांच्या अत्याचारांच्या वार्ता पसरल्यावरही बाहेरून कित्येक स्वयंसेवक येत होते. ते पाहून पोलिसांनी त्यांना बोटीवरच अटक करून माघारी पाठवण्यास सुरुवात केली. त्यामुळे १५ मे रोजी सत्याग्रह थांबवावा लागला. शिवाय पोलिसी अत्याचारांच्या अतिरेकामुळे संघर्ष थांबवण्याची स्थानिकांनी विनंती केली होती. अल्पकाळ टिकला तरीही हा सत्याग्रह नमुनेदार ठरला होता.

महाराष्ट्राच्या सागर किनाऱ्यावरील अशा कित्येक गावांमध्ये काँग्रेसजनांनी जनजागृती करून सत्याग्रह घडवून आणले. ठाणे जिल्हा जमनादास मेहता, गोविंदराव वर्तक, बाबुराव गोखले व भोपटकरांच्या 'कमांड' खाली होता. त्यांनी अनेक पथके उभारली होती. उंबरगावला ५ मे रोजी झालेल्या पहिल्या मिठाच्या सत्याग्रहाचे सेनापतीपद नानासाहेब देवधेकर व कमलादेवी चट्टोपाध्याय यांच्याकडे होते. "ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या अंत्ययात्रेसाठी आम्ही मडकी घेऊन निघालो आहोत" असे कमलादेवी वाटेतील लोकांना सांगत होत्या. बोर्डी गावचे शामराव पाटील तर गांधीजींच्या दांडीयात्रेतही सामील होते. तसेच धारासणा सत्याग्रहातही अधिकारशाहीचा जोरदार मारा त्यांनी सोसला होता. तसेच डहाणूचे वासुदेव करंदीकर, वसईचे कृ. म. सावंत, ठाण्याचे नानासाहेब दामले, घणसोलीत सत्याग्रह छावणी चालवणारे माधवराव काळदाते, भिवंडीचे प. स. भागवत, मोखाडा येथील गणपत सखाराम खरोटे, शहापूरचे गंगाधर

माने, व कल्याणचे जगन्नाथ शिवराम ओक वगैरे युवक १९३० पासून स्वातंत्र्य चळवळीत उतरले.[४०]

पुणे जिल्ह्यात कायदेभंगाचा प्रचार करण्याचे कार्य कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, हरिभाऊ तुळपुळे, वासुकाका जोशी, धर्मानंद कोसंबी आणि केशवराव जेधे यांनी केले. बाळुकाका कानिटकर, त्र्यं. ब. हरोलीकर आणि हरिभाऊ फाटक यांनी पुणे शहरावर लक्ष केंद्रित केले. मात्र न.वि. गाडगीळ, त्र्यं. र. देवगिरीकर, एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, र. के. खाडिलकर वगैरेंनी कोकण, सातारा वैगेरे भागातप्रचार-सभा घेतल्या.

प्रांतिक पातळीवरून पाहता शंकरराव देव, विनायकराव भुस्कुटे, शं. द. जावडेकर वगैरे कायदेभंग लढ्याच्या आघाडीवर होते. प्रचार व संघटन कार्यात या तिघांचे महान योगदान होते. महाराष्ट्रातील पूर्वोक्त दुहीची भरपाई करण्याचा त्यांनीप्रामाणिक प्रयत्न केला. त्यांनी पुणे यूथ लीगच्या नेत्यांना उत्तेजन देऊन त्यांच्या शक्तीचा राष्ट्रकार्यासाठी उपयोग करून घेतला.

## बाबू गेनूचे हौतात्म्य

पुणे जिल्ह्याच्या आंबेगाव तालुक्यातील महाळुंगे पडवळ या गावचा वीस वर्षांचा तेजस्वी युवक बाबू गेनू मुंबईतील कायदेभंग लढ्यात हुतात्मा झाला. हजारोंनाराष्ट्रीय आंदोलनाच्या प्रेरणा देऊन गेला. मँचेस्टरच्या कापड व्यापारी पेढीचा प्रतिनिधी व मुंबईतील मोठा विदेशी कापड व्यापारी जॉर्ज फ्रेझर याचा मूळजी जेठा कापड मार्केटमधील कापडाचा साठा जुन्या हनुमान लेनमधून पोर्ट ट्रस्ट वेअरहाऊसकडे (फ्रेअर रोड, मुंबई) घेऊन जाणाऱ्या मालमोटारीपुढे भांगवाडीजवळ ३०० सत्याग्रहींनी सत्याग्रह केला होता. (१२ डिसेंबर १९३०). त्यात गिरणी कामगार असलेला बाबू गेनू अग्रेसर होता. निधड्या छातीच्या बाबूने समोर जाऊन ट्रक अडविला. तथापि ट्रकच्या संरक्षणासाठी असलेल्या अँग्लो-इंडियन पोलीस अधिकाऱ्याने ड्रायव्हरला ट्रक चालूच ठेवण्यास फर्माविले. प्राणाची पर्वा न करणाऱ्या देशभक्त बाबू गेनूने मार्गावर आडवे पडून हौतात्म्य पत्करले. अंगावरून गेलेल्या ट्रकने बाबूची कवटी फोडली.

या शूर युवकाचा मृतदेह जी. टी. हॉस्पिटलमध्ये नेल्याचे कळताच हजारो मुंबईकरांनी हॉस्पिटलला वेढा घातला. युनियन जॅकच्या ठिकाणी लोकांनी तिरंगा फडकावला. बाबू गेनू हुतात्मा झाल्याने संपूर्ण मुंबई व पुणे जिल्हा चवताळूनउठला. भांगवाडीतील घटनास्थळी लोकांनी हुतात्म्याला श्रद्धांजली वाहताना विदेशी कपड्यांची होळी केली. त्याचा दहनविधी गिरगाव चौपाटीवर टिळकांच्या पुतळयाजवळच किंव निदान वाळकेश्वरच्या बाणगंगा स्मशानभूमीवर तरी करण्याचा मुंबई प्रदेश काँग्रेसने आग्रह धरला होता. कारण वसाहतवादी शोषकांविरुद्धच्या या युवकाला वीरगती प्राप्त झालेली होती. तथापि हेक्कड इंग्रजांनी बाबूचे दहन सोनापुरात केले, सत्याग्रह समितीचा आग्रह डावलून! मात्र वीस हजार लोक असलेल्या प्रेतयात्रेत लीलावती मुन्शी, पेरिन कॅप्टन, सूरजी वल्लभदास, के. एम. मुन्शी, युसुफ मेहेरअली, जमनादास द्वारकादास, के. के. मेनन, एस. के. पुपाला यांचेसारखे मान्यवर होते. सर्वत्र तंग वातावरण, सेनादलाची दंडेली, पण स्वराज्यासाठीचा निर्धार होता. जनसमूहाने ऑपेरा हाऊसवर हल्ला चढविला.

देशभर संतापाची लाट उसळली. युवक अधिक निर्धाराने आंदोलनात सामील झाले. पुणे शहरात व जिल्ह्यात लोकांनी मूक मिरवणुका काढल्या. हरताळ पाळला. काँग्रेस स्वयंसेवक म्हणून सत्याग्रहासाठी आधीच आपले नाव नोंदविलेला बाबू गेनू इंग्रज अधिकाऱ्याच्या क्रौर्याचा बळी ठरला. पण बाबूचे आत्मबलिदान व्यर्थ ठरले नाही. युवक अधिक आक्रमक बनलेत.[४१]

पुणे जिल्ह्यात ओतूरच्या लोकांनी जंगलसत्याग्रहास जसा चांगला प्रतिसाद दिला होता, तसाच जिल्ह्यातील बऱ्याच लोकांनी शिरोडा, बिळाशी, संगमनेर, चिरनेर व सोलापुरातील आंदोलनांनादेखील प्रतिसाद दिला. पुण्याचे वा. वि. साठे, अनंतराव काळे व गिरीनारायण हे युवक सोलापूरला गेले होते ते छातीवर गोळ्या घेण्याच्या तयारीने. नाना पाटलांनी सातारा जिल्ह्यातच नव्हे तर पुण्यातील सासवड भागातही आपल्या रोखठोक घणाघाती भाषणांनी रान पेटवले होते.

## चिरनेर जंगल सत्याग्रह[४२]

कुलाबा जिल्ह्यातील सत्याग्रह छावणी अलिबागला असून तिथे आणि पेणजवळ सामुदायिक सत्याग्रह झाला. तथापि चिरनेरचा जंगल सत्याग्रह हे मोठे उपाख्यान होय. तिथे फार मोठी शोकांतिका घडली. चिरनेरच्या समरात शेकडो गरीब शेतकरी,

आगरी आणि आदिवासींनी आपल्या निसर्गदत्त हक्कांसाठी कायदा धिक्कारून आत्मबलिदान केले. चिरनेर प्रकरणात सरकारी अधिकाऱ्यांच्या प्रामाणिकपणासही कसोटी लागली होती. घटनास्थळी उपस्थित असलेल्या पनवेलच्या मामलेदारास पोलीस निरीक्षकाने स्वतः गोळी घालून ठार केल्याचे एका प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराने न्यायालयात सांगितले होते. म्हणून काँग्रेसने मामलेदार केशव महादेव जोशींना हुतात्मा म्हणून गौरविले होते. चिरनेरला पोलिसांनी केलेल्या बेछूट कारवाईमुळे ब्रिटिश सरकारदेखील गोंधळात पडले होते. पनवेल नगरापासून २२.५ कि.मी. अंतरावर असलेल्या चिरनेरपासून दीड कि.मी. अंतरावर अक्कादेवीच्या डोंगरावर हा सत्याग्रह २५ सप्टेंबर १९३० रोजी करण्यात आला. दिनांक ८ सप्टेंबरच्या पहिल्या चिरनेर सत्याग्रहानंतरचा हा दुसरा सत्याग्रह होता. ऐतिहासिक महत्त्व आलेला सत्याग्रह २५ सप्टेंबरचा होय. या सत्याग्रहात अदमासे ५,००० ते ६,००० लोकांनी भाग घेतला व त्यांच्यापैकी सात जण हुतात्मा झालेत. सात स्वातंत्र्य आंदोलकांव्यतिरिक्त पाच शासकीय कर्मचाऱ्यांनी या आंदोलनात प्राण गमावले. बळी पडलेल्यांमध्ये २०-२२ वर्षांचे तरुणही होते. शिवाय ३८ जण भीषण जखमी झाले. काहींचे तर हातपाय कापून टाकावे लागले होते. घटनास्थळी दुसऱ्या दिवशी पोहोचलेले जिल्हा दंडाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक आणि इतर अधिकाऱ्यांना अक्कादेवीच्या समरभूमीचे भयंकर स्वरूप पाहावयास मिळाले. तेथे दोन मृतदेह तेव्हाही पडलेले होते. तर जवळच्या भात शेतात दोन देह उघड्यावर होते. सर्व देखावा भयानक होता.[४३]

मुंबई सरकारने चिरनेर गोळीबार प्रकरणी केलेली अधिकारी पातळीवरील चौकशी संदिग्ध व पक्षपाती असल्याकारणाने सर्व जनमानसात शासनावर राग धुमसत होता, संशयाचे वातावरण पसरले होते. लोक व वर्तमानपत्रे वस्तुनिष्ठ चौकशीसाठी मागणी करीत होते. त्यानुसार पुण्याच्या सार्वजनिक सभेने पुढाकार घेऊन चिरनेर गोळीबार चौकशी समिती नेमली.[४४]

चिरनेर प्रकरणी मुंबई सरकार लपवाछपवी करत असल्यामुळे महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसने जमनादास मेहता, सेवानिवृत्त न्यायाधीश हुसेन बी. तय्यबजी, बॅ. एम.सी. छागला, मोतीराम वेलकर, नारायण नागूजी पाटील, एल. आर. गोखले आणि

नारायणराव गुंजाळ यांची समिती नेमून चौकशी केली. माधवराव गोडबोले समितीचे सचिव असून तळपदे वकील लोकांकडून माहिती मिळवित होते. या चौकशी समितीपुढे आलेली माहिती आणि अस्सल सरकारी कागदपत्रांच्या आधारे चिरनेर प्रकरणाचा इतिहास खाली देत आहोत.

चिरनेर सत्याग्रहापूर्वी महाराष्ट्र काँग्रेस युद्धमंडळाच्या आकृतिबंधानुरूप पक्षाने **चिरनेर सत्याग्रह मंडळ** निर्माण करून सेवादल उभारले होते. स्वयंसेवकांना सत्याग्रहाचे प्रशिक्षण दिलेले होते. सरकारच्या अबकारी कर कार्यालयाच्या दंडेलीविरुद्ध मंडळाने आंदोलन उभारले होते. तसेच वन विभागाच्या अधिनियमांमुळे लोकांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठविला होता. सरकारविरुद्ध जनमत जागृत करण्यासाठी गांधी सप्ताह, राष्ट्रीय सप्ताह, बहिष्कार व शेतकरी सप्ताह साजरे करण्यात आले. **सत्याग्रह पत्रिका, शेतकरी आठवडा पत्रिका** प्रकाशित करून आंदोलनात लोकांचा पाठिंबा मिळविण्याचे प्रयत्न करण्यात आले होते. सरकारी यंत्रणाही आंदोलनविरोधी प्रचारात कमी नव्हती. स्थानिक काँग्रेसजन मात्र सत्याग्रह शांततापूर्ण झाला पाहिजे यासाठी प्रयत्नशील होते. पनवेल तालुका काँग्रेस समितीने २५ सप्टेंबरच्या सत्याग्रहासाठी आधीच जनमत जागृत करून ठेवले होते. चिरनेर सत्याग्रहाचे प्रमुख नेते होते त्र्यंबक नारायण बेडेकर, प्रभाकर केशव गुप्ते, केशव गणेश गुप्ते व वसंत वेदक. या समितीने जंगल सत्याग्रहाबाबतची योजना जाहीर करून २४ सप्टेंबरला थाळी पिटून सत्याग्रहाची घोषणा केली होती. चिरनेरजवळील अक्कादेवीच्या डोंगरावरील संरक्षित जंगलात भजन करीत जाऊन वनविषयक अधिनियमांचे उल्लंघन करून गवत व लाकूडफाटा कापून आणणे हा मुख्य कार्यक्रम होता. गांधीजींच्या सूत्रानुसार सत्याग्रह करण्याची योजना होती. सत्याग्रहाबाबत लोकांमध्ये कमालीची उत्सुकता होती. मात्र सत्याग्रह दडपण्यासाठी शासकीय यंत्रणा आणि पोलीस निरीक्षक कटिबद्ध होता. तरीसुद्धा दंगा होईल असा काँग्रेस स्वयंसेवकांना अंदाज नव्हता. पनवेलचा मामलेदार व पोलीस निरीक्षक यांनाही दंगा होईल अशी कल्पना नव्हती. किंबहुना सत्याग्रह शांततेत पार पाडावा यासाठी काँग्रेस नेत्यांनी खास खबरदारी घेतली होती.

सत्याग्रहाचे दिवशी सभोवतालच्या गावांमधून आबालवृद्ध आणि शेतकरी माळावर जमले. पोलीस निरीक्षक व मामलेदार २० पोलिसांसह हजर होते. बरोबर तलाठे व वन विभागातील कर्मचारी होते. पाच-दहा हजारांचा जमाव सत्याग्रहाच्या निर्धाराने जमलेला होता. अकारण अटक टाळण्यासाठी भाषणे न करता नेत्यांनी तीन वाजता सत्याग्रहाचा प्रारंभ केला. अदमासे ३०० सत्याग्रहींनी गवत कापण्यास, झाडांच्या फांद्या तोडण्यास सुरुवात करताच "जंगलका कायदा तोड दिया" अशा घोषणा करण्यात आल्या. तेव्हा टेकडीवर २,००० लोक असावेत. सत्याग्रही डोंगर चढू लागल्यावर पोलीस निरीक्षक काही पोलिसांना बरोबर घेऊन त्यांच्या पाठोपाठ गेला. त्याने पायथ्याशी असलेल्या चार-पाच सत्याग्रहींना अटक केली व वर जाताना आणखी काहींना अटक केली. सत्याग्रहींनी अटकेस मुळीच आढेवेढे घेतले नाही. अटक करण्यात आलेल्या सर्व सत्याग्रहींनी अटकेचा प्रतिकार न करताही त्यांच्यापैकी काहींना पोलिसांनी हातकड्या घातल्या. मात्र त्या काढून टाकण्यासाठी काँग्रेसजनांनी निरीक्षकाला विनंती केली. तथापि त्याने विनंती अमान्य तर केलीच, शिवाय विनंती करणाऱ्यांना लाठीचे तडाखे दिले. सत्याग्रहींनी पुन्हा विनविले की, आंदोलकांना विनाकारण प्रक्षुब्ध करू नये. इतक्यात एका स्वयंसेवकाने खाली जाऊन मामलेदारास लाठीमाराची बातमी सांगितली. त्यानुसार मामलेदार काय झाले ते पाहण्यासाठी डोंगरावर गेला आणि हातकड्या काढून टाकण्याबाबत पोलीस निरीक्षकाला सांगू लागला. या बाबीवरून या दोघा अधिकाऱ्यांमध्ये वादावादी झाली. पोलीस निरीक्षकाने अनिच्छेने हातकड्या काढून टाकल्यावर मामलेदार, निरीक्षक व काही पोलीस हवालदार खाली गेले. निरीक्षक मात्र गुरगुरत होता.

ही मंडळी खाली आल्यावर टेकडीवर अचानक गोळीबार झाला. हा आवाज ऐकल्यावर मामलेदाराने खालूनच विचारले की, गोळीबाराचा आदेश कोणी दिला. परंतु इतक्यात मामलेदारालाच एक गोळी लागून तो कोसळला. पोलिसांच्या नंतरच्या दोन गोळ्यांपैकी एक वन विभागाच्या कर्मचाऱ्यास लागली. काही साक्षीदारांनी चौकशी समिती व न्यायालयासमोर दिलेल्या साक्षीवरून दिसते की, खालून पोलीस निरीक्षकाने पोलिसांना इशारा केल्यानुसार त्यांनी गोळीबार केला. निरीक्षकानेच गोळीबाराचा आदेश

दिल्याचा सत्याग्रहींचा समज झाला. गोळीबारामुळे प्रक्षुब्ध झालेल्या लोकांपासून निरीक्षकाला वाचविण्यासाठी त्याला केशव गुप्ते यांच्यासह काही सत्याग्रहींनी झुडपामध्ये लपवून ठेवले. साक्षीदारांनी दिलेल्या माहितीनुसार गोळीबारापूर्वी लोक शांत होते. पण निरीक्षकाने खूण केल्यावर पोलिसांनी गोळीबार केला असे त्यांचे म्हणणे होते. घटनास्थळी हजर असलेल्या देश सेविका संघाच्या विमल गुप्तेंनी उपरोक्त माहितीस दुजोरा दिला. गोळीबारात बळी पडलेल्या मामलेदाराजवळ त्या होत्या. गोळीबारापूर्वी पोलिसांनी लोकांना इशारा दिला नव्हता. हे सर्व घडत असताना पोलीस निरीक्षक गणवेशातच होता. जमाव त्याला ठार मारील या भीतीने काँग्रेसचे गुप्ते व इतरांनी त्याला खादी कपडे घालून संरक्षण दिले. मरणासन्न झालेल्या मामलेदाराला वाचविण्याचा सत्याग्रहींनी खूप प्रयत्न केला, तथापि त्याचे तात्काळ निधन झाले. गोळीबारानंतरदेखील पोलिसांनी इकडे तिकडे पळणाऱ्या लोकांवर बेछूटपणे गोळ्या झाडल्या. त्यात काही मरण पावले आणि बरेच जखमी झाले.

मात्र पोलीस निरीक्षकाने **टाइम्स ऑफ इंडिया** च्या वार्ताहराला दिलेल्या मुलाखतीत स्पष्ट कबूल केले की, 'काँग्रेस आंदोलकांनी अटक करून घेण्याला खळखळ केली नाही ; किंबहुना मामलेदार व आपल्याभोवती कडे करून दोघांना संरक्षण देण्याचा प्रयत्न केला.' आपला गणवेश काढून बचावार्थ आपल्याला खादीचे कपडे घातल्याचेही त्याने मान्य केले. त्याच्या हकिकतीवरून दिसते की, सशस्त्र पोलिसांनी शिस्त पालन न करता विनाआदेश गोळीबार केला व गोळीबार सुरू केल्यावर थांबविला नाही आणि सर्व काडतुसे संपविली. शिवाय घाबरून पळत सुटून पोलिसांनी स्वतःचे वर्तन हास्यास्पद करून घेतले.

२५ सप्टेंबरला सुमारे ४ वाजता गोळीबार झाला तरी २६ तारखेच्या ८-३० पर्यंत जखमी झालेल्यांची सरकारी यंत्रणेने दाखल घेतली नव्हती. उलट काँग्रेसच्या शुश्रूषा पथकाच्या कामात पोलिसांनी अडचणी निर्माण केल्या. बहुतेक जखमींना कमरेच्यावर गोळ्या लागलेल्या असल्याचे मुंबई काँग्रेसच्या तळपदेंनी सांगितले. प्रत्यक्ष जंगल सत्याग्रह शांततापूर्ण पार पडला होता. तथापि पोलीस निरीक्षकाचा आततायीपणा व पोलिसांचा आक्रमकपणा यामुळे लोक संतापले व त्यांनी आपला राग आपल्या पद्धतीने व्यक्त केला.

चिरनेर खटल्याची प्रारंभिक तयारी अलिबागला करण्यात आली. तथापि खटला अलिबाग सत्र न्यायालयात न चालवता ठाणे सत्र न्यायालयापुढे चालवावा असा सरकारने कुटिल हेतूने उच्च न्यायालयाकडून निवाडा मिळवला होता. सरकारने काँग्रेसवरच हिंसाचाराचा आरोप केला. मरण पावलेले सात जण पोलिसांच्या गोळ्यांनी मरण पावले नसून इतर कारणामुळे मारले गेले असा सरकारचा खोटा युक्तिवाद होता. सर्व ४७ आरोपी पनवेल, चिरनेर आणि जवळच्या गावांतील होते. चिरनेर खटल्यातील आरोपींचा न्यायालयात बचाव करण्यासाठी व मरण पावलेल्या किंवा जखमी झालेल्या आंदोलकांच्या कुटुंबीयांना मदत देण्यासाठी मुंबईत चिरनेर बचाव व मदतकार्य समिती स्थापन करण्यात आली.[४५]

महात्मा गांधी-आयर्विन करारानंतर हिंसाचाराचा आरोप नसलेल्या सर्व काँग्रेस राजकीय बंदिवानांना सर्वक्षमा करून सोडण्यात आले होते. त्यानुसार चिरनेर खटला काढून घेण्यात यावा व चिरनेरच्या बंदीवानांना मुक्त करण्यात यावे असे स्वतः महात्मा गांधींनी १७ मार्च १९३१ रोजी मुंबईतील आझाद मैदानावरील सभेत सरकारला आवाहन केले. पुणे सार्वजनिक सभेनेही सर्व म्हणजे ४७ जणांना सर्वक्षमेचा लाभ द्यावा असे आवाहन केले. ही बाब सत्र न्यायालयापुढे मांडण्यात आली. तथापि न्यायालयाने निकाल देताना म्हटले की, गांधी-आयर्विन कराराचा विचार न्यायालयाला करता येणार नाही. पण सरकारने विचार करून ज्यांना कराराचा फायदा देणे शक्य आहे त्यांना तो द्यावा. न्यायालयाच्या ज्युरीने सर्व आरोपींना निर्दोष ठरविले. तथापि सत्र न्यायाधीशाने ४७ पैकी १८ आरोपींना निर्दोष तर २९ जणांना दोषी ठरविले. त्यापैकी चौघांवर शासकीय कर्मचाऱ्यांचा वध केल्याचा आरोप ठेवून हे प्रकरण उच्च न्यायालयाकडे निर्देशासाठी पाठविले. तथापि उच्च न्यायालयाने सत्र न्यायालयाचा निर्देश फेटाळला. या खटल्याला नेहमीचे फौजदारी स्वरूप न राहता सरकार विरुद्ध लोक असे स्वरूप आलेले होते.[४६]

चिरनेर सत्याग्रहात बळी पडलेले सत्याग्रही व सरकारी कर्मचारी यांचे स्मारक चिरनेर गावठाणात खाजगी जागेवर उभारण्यात आले. विशेष म्हणजे मरण पावलेल मामलेदार व चार सरकारी कर्मचारी हे स्वराज्याचे स्वयंसेवक असल्याचे काँग्रेसने

मानले होते. म्हणूनच हुतात्म्यांमध्ये या सरकारी कर्मचाऱ्यांचाही समावेश केलेला होता. तथापि इंग्रज जिल्हाधिकाऱ्याच्या आदेशानुसार चिरनेर स्मारक नष्ट करण्यात आले.[४७] सन १९३७ मध्ये प्रांतिक स्वायत्ततेच्या योजनेखाली काँग्रेस मंत्रिमंडळ अधिकारारूढ झाल्यावर, चिरनेर स्मारक उभारणीचा विषय पुढे आला. हे स्मारक म्हणजे स्वातंत्र्य आंदोलनातील एक प्रेरणास्थान असल्यामुळे त्यास फार महत्त्व आले. म्हणून ब्रिटिश सरकारने नष्ट केलेल्या पहिल्या स्मारकाचे दगड गोळा करून नवीन मिनार बांधण्यात आला. आणि लोकनियुक्त पंतप्रधान (मुख्यमंत्री) बाळासाहेब खेरांच्या हस्ते चिरनेरच्या स्मारकाचे अनावरण ३ जानेवारी १९३९ रोजी करण्यात आले.

## जंगल सत्याग्रहाची प्रगती

संपूर्ण स्वातंत्र्याची लाहोरातून झालेली घोषणा ऐकताच पांडुरंग सदाशिव ऊर्फ साने गुरुजी अमळनेरमधील आपल्या खोलीत विद्यार्थ्यांसह बेभान होऊन नाचले होते. ‘मंगल मंगल त्रिवार मंगल’ ही स्फूर्तिदायक कविता रचून म्हणताना ते नाचले होते. तिच्यात काव्यमय भावविवशता आणि नवचैतन्याचा संयोग होता. स्वातंत्र्याची आस होती. ‘आता उठवू सारे रान’, ‘येथून तेथून पेटू दे सारा देश’ अशी कित्येक स्फूर्तिगीते रचून गुरुजींनी खानदेशातीलच नव्हे तर अखिल मराठी युवकांची मने जिंकली आणि कित्येकांना स्वातंत्र्यलढ्यात आणले. शिरोड्याला पोहोचल्यावर गुरुजींना समजले की, पूर्व खानदेशाचे पथक शिरोडा सत्याग्रहासाठी तेथे येत आहे. म्हणून त्यांनाही त्या पथकासह तेथेच सत्याग्रह करावयाचा होता. पण वि. ग. कुलकर्णींच्या सूचनेनुसार गुरुजी निधी गोळा करण्यासाठी खानदेशात परत आले. जळगावच्या त्या पथकाने इतके नेत्रदीपक दर्शन घडविले की, तेथे हजर असलेले रत्नागिरीचे जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक पार हेलावून गेले होते.

धनाजी नाना चौधरी यांनी १६ जून १९३० रोजी नाशिकच्या पोलीस उप निरीक्षक पदाचा राजीनामा देऊन प्रशासनाला एक धक्का दिला. यास्तव त्यांचा सन्मान करण्यासाठी नाशिकमध्ये काँग्रेसने १५०० जणांची जाहीर सभा भरवली होती (९ जुलै). शासकीय कर्मचाऱ्यांनी पदत्याग करावा, अशी नुसती मागणी करणाऱ्यांवर

राजद्रोहाचा खटला भरण्यात येई व जबर शिक्षा होई. म्हणून त्याकाळी केलेले हे धाडस विशेष होते. चौधरींनी मुंबईत सरदार पटेल, जयरामदास दौलतराम, हंसा मेहता, कृ. प्र. खाडिलकर, जमनादास मेहता, नारायणराव हर्डीकर, कस्तुरबा गांधी, लीलावती मुन्शी, धीरजलाल भट, माधव गोडबोले आणि के. एन. फडके वगैरे पुढाऱ्यांचे मार्गदर्शन घेतले. स्वातंत्र्य आंदोलन व कामगार चळवळीबाबतच्या सभांमधील त्यांच्या भाषणांची नोंद गुप्तचर पोलिसांच्या अहवालात आम्हाला आढळली.[४८]

अल्पावधीत दास्ताने व देवकीनंदन नारायण यांना धनाजी नाना चौधरी व साने गुरुजींची साथ मिळाल्यापासून जळगाव जिल्ह्यात अभूतपूर्व जनजागृती झाली आणि स्वातंत्र्यलढा जोमाने सुरू झाला.

महात्मा गांधींच्या विचारप्रणालीमुळे प्रभावित झालेले ब्राह्मणेतर नेते सविनय कायदेभंगात सहभागी झाले. विशेषतः शंकरराव देव, न. वि. गाडगीळ व सेनापती बापट हे ब्राह्मण पुढारी आणि वि. रा. शिंदे, केशवराव जेधे, बागल, नाना पाटील व कर्मवीर भाऊराव पाटलांच्या पुढाकारामुळे अनेक मराठ्यांचे मतपरिवर्तन होण्यास मदत झाली. ५८ वर्षांचे शिंदे पुण्याहून सत्याग्रहींच्या तुकड्या खेडोपाडी पाठवत असत. या पथकांना निरोप देण्याचे समारंभ त्यांच्या अध्यक्षतेखाली होत. अशी पथके घेऊन शिंदे स्वतःही जिल्ह्यातील गावोगावी जात असत. डफ व तुणतुण्यावर राष्ट्रीय पोवाडे म्हटले जात. विदेशी कपड्यांच्या होळ्या पेटवत. शिंदेंनी पुणे जिल्ह्यातील प्रत्येक मोठ्या गावापर्यंत आंदोलनाचा प्रचार केला. या उलट शिक्षण मंत्रिपद उपभोगणारे ब्राह्मणेतर पक्षाचे मंत्री भास्करराव जाधव यांनी शिंदेंची तुरुंगात भेट घेतली, आणि त्यांना मुक्त करण्याचे आश्वासन देऊन घरी आराम करण्याचा सल्ला दिला होता. पण राष्ट्रभक्त शिंदेंनी हा कुटिल सल्ला साफ नाकारला होता. म्हणूनच शिंदे तुरुंगातून सुटल्यावर त्यांचा पुणेकरांनी यथोचित सत्कार केला.शिंदेंच्या विचारांचा ब्राह्मणेतर पक्षावर प्रभाव पडणे अपरिहार्य होते. जाधवांचा पक्ष त्यांना रोखू शकला नाही.

कर्मवीर शिंदेंच्या खालोखाल बहुजनसमाजाच्या राजकीय मतपरिवर्तनाचे श्रेय तडफदार युवक नेते केशवराव जेधे व त्यांचे बंधू आणि नाना पाटलांना द्यावे लागते. त्यांनी काळाची पावले ओळखली. महात्मा गांधी यांना पर्याय नाही हे त्यांनी जाणून

घेतले. म्हणून ब्राह्मणेतरांनी एकजुटीने काँग्रेसच्या आंदोलनात उतरावे असे त्यांनी आवाहन केले. तत्पूर्वी शेतसारा वाढीला विरोध करण्यासाठी १९२८ सालात जेधेंनी पुण्यात परिषद भरवून शेतकऱ्यांच्या मूळ समस्यांविरुद्ध आवाज उठवला होता. म्हणून त्यांना शेतकरी वर्गात मानाचे स्थान लाभले होते. त्याचाही परिणाम १९३० साली दिसून आला. तात्पर्य, देव, गाडगीळ, बापट व शिंदे यांच्याप्रमाणे जेधे, नाना पाटील, विदर्भातील पंढरीनाथ पाटील आणि दिनकर जवळकर यांनी ब्राह्मणेतर पक्षीयांना इंग्रजनिष्ठ धोरणातून मुक्त करण्यासाठी योगदान दिले. पहिल्या गोलमेज परिषदेवर सडेतोड टीका केल्यामुळे जेधेंना अटक करण्यात आली होती.

**बिळाशीचे बंड** :—इस्लामपूर तालुक्यातील बिळाशीचे बंड हे एक नमुनेदार उपाख्यान होय. या परिसरातील खेडुतांनी वनचराई, वनक्षेत्रातील गवत व लाकूड वापरण्याच्या हक्काकरिता सत्याग्रह केला. सत्याग्रहाचे प्रतीक म्हणून आरक्षित जंगलातील सागाचे एक झाड कापून त्याचा सोट गावात आणला. आणि त्यावर १८ जुलै १९३० रोजी तिरंगा फडकवला. पोलिसांनी तिरंगा काढण्याचा प्रयत्न करताच गावकरी त्वेषाने पेटले. सरकारी अधिकाऱ्यांनी सत्याग्रह मोडून काढणे हा प्रतिष्ठेचा प्रश्न बनविला. वस्तुतः वनसंपत्ती नष्ट करणे हा लोकांचा उद्देश नव्हता. तरीही पोलीस अंमलदारांनी ५ सप्टेंबर १९३० रोजी पुण्याहून १०० व कोल्हापूरहून ३०० सशस्त्र शिपायांसह निःशस्त्र खेडुतांवर चाल केली. त्यामुळे प्रक्षोभ वाढला.

गावाकडे येणाऱ्या सर्व रस्त्यांवर पोलिसांनी नाकेबंदी केलेली होती. पोलीस आले तेव्हा महादेवाच्या देवळात शंभरदोनशे पुरुष व काही बायकामुले होती. राजूबाई कदम नावाच्या महिलेने लाठीचे अनेक तडाखे सहन केले पण झेंडा सोडला नाही. तिला रक्तबंबाळ केल्यावरच पोलिसांनी राष्ट्रध्वज नष्ट केला. त्यानंतर मात्र जमवाने तुफान दगडफेक केली. पोलिसांनी अविवेकीपणे वागून बेछूट गोळीबार केला. सत्याग्रहींनी २४ ऑगस्टपासून सुरू केलेली धडपड ५ सप्टेंबरच्या गोळीबाराने संपली. बिळाशीच्या बंडाचे नेतृत्व करणाऱ्या मारुती विष्णू कुलकर्णी ऊर्फ बाबुराव चरणकरांसह ३९ सत्याग्रही अटकेत पडले, तर सीताराम चांभार आणि धोंडी संतू कुंभार हे सत्याग्रही मरण पावले. बिळाशी बंडाचा खटला तेव्हा महाराष्ट्रभर गाजला

होता. वनोत्पादनावर हक्क सांगणाऱ्या खेडुतांचे हे नमुनेदार बंड होते. इतिहासाला ज्ञात नसलेल्या या गावाने मोठे कार्य करून दाखवले. या बंडाचे सेनापती बाबुराव चरणकर १९४२-१९४३ च्या सातारा प्रति सरकारमध्येही आघाडीवर होते.[४९]

चिरनेर, बिळाशी, बागलाण, संगमनेर वगैरे ठिकाणच्या जंगल सत्याग्रहांचे मर्म समजण्यासाठी इथे सांगितले पाहिजे की, वाणिज्यवादी ब्रिटिशांनी उत्पन्न व महसूल वाढविण्यासाठी १८६६ पासून जंगल व वन उत्पादनांबाबत कडक कायदे केले होते. त्यांनी अनेक निर्बंध लादले. तत्पूर्वी मुघल व मराठा राजवटींमध्ये जनतेला वनोत्पादनांचा अनिर्बंधपणे उपयोग करता येत होता. तथापि इंग्रजांनी जाचक कायदे केले व जंगल खाते निर्माण केले. हेतू फक्त महसूल वाढविणे हाच! याविरुद्ध महात्मा जोतीबा फुले यांनी प्रथम आवाज उठवला होता. याविषयीचा इतिहास मी या मालिकेतील **खंड क्रमांक एक** यामध्ये दिलेला आहे.

**ठिकठिकाणचे सत्याग्रह** : ब्रिटिशांनी जंगलांचे वर्गीकरण करून ठेवले. आरक्षित जंगलात गुरे चारणे, गवत कापणे, वन्य फळे घेणे, शेतीच्या अवजारांसाठी वा घरांसाठी लाकडे घेणे, औषधी वनस्पती मिळवणे इ. बाबींना कायद्याने बंदी घातली. निसर्गाने मानवासाठी निर्माण केलेल्या जंगलावरचा हक्क परकीय सत्ताधीशांनी हिरावून घेतला होता. त्यासाठी वन विभागाकडे खेटे घालून शुल्क भरावे लागे. शिवाय हे शुल्क जबर होते. आदिवासींवर तर ब्रिटिशांच्या जंगल कायद्यांमुळे घोर अन्याय होतच असे. शेतकऱ्यांचे जीवन आणि संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी वनोत्पादनांची नितांत गरज होती. म्हणून कायद्यातील जाचक तरतुदी व जबर शुल्कामुळे लोक गांजले होते. असा वाढता असंतोष लक्षात घेऊनच काँग्रेसने मिठाच्या कायद्याप्रमाणेच जंगलाबाबतच्या कायद्यांचा भंग करण्याचा निर्णय घेतला होता. शिवाय सागर किनारा नसलेल्या प्रदेशात मिठाचा सत्याग्रह प्रभावी ठरण्याची शक्यता कमी होती. म्हणूनच सत्याग्रह मोहिमेची व्याप्ती वाढविण्यासाठी जंगल सत्याग्रहावर जोर देण्यात आला. वनोत्पादने हस्तगत करणे व मादक द्रव्ये बनविण्यासाठी उपयुक्त असणारी मोहाची फुले व ताडीची झाडे नष्ट करणे तसेच वनोत्पादनांचे व कंत्राटांचे लिलाव बंद पाडणे, सरकारचा महसूल शक्य तेवढा घटवणे, आणि अधिकाऱ्यांच्या शिकारीच्या बेतांमध्ये व्यत्यय आणणे वगैरे जंगल सत्याग्रहाची उद्दिष्टे होती.

चिरनेर, उंबरगाव आणि बिळाशी येथील आंदोलनांव्यतिरिक्त महाराष्ट्रात अनेक ठिकाणी जंगल सत्याग्रह करण्यात आले. जून महिन्यात पावसाळा सुरू झाल्यावर स्वयंसेवकांची कित्येक पथके आरक्षित जंगलांमध्ये गेली. सोलापुरातील लढ्याला जंगल सत्याग्रह म्हणता येत नाही. तथापि तिथेही स्वयंसेवकांनी रूपाभवानी नजीकची शिंदीची झाडे तोडल्यावर त्यांना अटक झाली आणि त्या अटकेला गंभीर स्वरूप आले होते.

अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर व अकोला तालुक्यांमध्ये जंगल सत्याग्रहास अनुकूल परिस्थिती होती. म्हणून सत्याग्रह समितीने संगमनेरला केंद्र उघडले. या सत्याग्रहाचे सूत्रधार रामकृष्णदास महाराज (लक्ष्मण हरी वराडकर), लालजी पेंडसे आणि श्रीपाद शंकर नवरे हे होते. लक्ष्मणशास्त्री जोशी, श्रीनिवास सरदेसाई, भाई सठ्ठा यांनीही या सत्याग्रहासाठी कारावास भोगला. संगमनेर व अकोला तालुक्यांमधील सत्याग्रहाची मूळ योजना शंकरराव देवांनी आखून ठेवलेली होती. त्यांनी सत्याग्रहाच्या तंत्रानुसार आमजनतेच्या मागण्यांची सनद सरकारकडे पाठवली होती. रामकृष्णदास महाराज यांना डिक्टेटर म्हणून नेमलेले होते. पण देव, रामकृष्णदास आणि सरदेसाईंना आधीच अटक केल्यामुळे खेडूत चिडले. शेवटी दोन्ही तालुक्यांत एकदम वीसबावीस ठिकाणी एकोप्याने सत्याग्रह सुरू करण्यात आला (२२ जुलै १९३०). सर्वत्र देशभक्तिपर गीते म्हणून आणि गायींची पूजा करून सत्याग्रहाचा प्रारंभ करण्यात आला. हे दृश्य भव्य होते. अदमासे एक लाख पुरुष, स्त्रिया व मुलांनी पोलिसांना आपला राष्ट्रीय बाणा आणि निर्धार व उत्साहाचे दर्शन घडवले. यानंतर या भागात १७ ऑगस्ट रोजी जंगल सत्याग्रहाची दुसरी फेरी सुरू करण्यात आली. या फेरीचे मुख्यालय चन्नपुरी येथे होते. सांगवी, राजूर व कोतूळ गावी मोठमोठ्या सभा भरल्या. आपण आत्मसमर्पण करून, जिवाचे मोल देऊन प्रतिज्ञेचे पालन करू अशा गर्जना शेतकऱ्यांनी केल्या होत्या. त्यांनी शोषण आणि जुलूम करणाऱ्या ब्रिटिश सत्ताधीशांशी गांधीजींच्या अहिंसेच्या तत्त्वानुसार लढण्याचा निर्धार जाहीर केला. अशा रीतीने सत्याग्रहाचा प्रारंभ झाला. पोलिसांनी राष्ट्रध्वजाचा अवमान केल्याचा निषेध म्हणून राजूरच्या सत्याग्रहींनी दीड दिवस उपोषणही केले होते.

या सत्याग्रहाची आणखी दुसरी विशेषता अशी की, सरकारी अधिकाऱ्यांनी केलेल्या दडपशाहीचा निषेध म्हणून या परिसरातील पुष्कळ तलाठी व गावपाटलांनी राजीनामे दिले. या भागातील सरकारची एकूण इभ्रत लयास गेली होती. कोपरगाव व राहुरी तालुक्यांमध्येही जंगल सत्याग्रहाची लाट पसरली होती. चंदनपुरी व सावरगावमध्ये तर अटक करण्यासाठी आलेल्या पोलिसांनाच गावकरी हजारोंच्या संख्येने प्रतिबंध करीत. सरकारला हा अनुभव नवीन होता. सारी जनता सरकारच्या विरुद्ध होती.[५०]

नाशिक जिल्ह्यातील बागलाण, कळवण आणि सटाणा तालुक्यांमधील जंगल सत्याग्रह आणखीच जास्त तीव्र व व्यापक होता. त्या काळी बागलाणला ‘ बार्डोलीची लघु प्रतिकृती ’ म्हणत असत. अवास्तव व वाढता जमीन महसूल आणि जुलमी वसुली पद्धतीमुळे शेतकरी वर्ग संतापलेला होता. त्यामुळे शेतकरी खंड भरण्यास विरोध करत असत. महसुलाच्या प्रश्नामुळे शेतकऱ्यांमध्ये राष्ट्रवादाची भावना पसरली होती. सविनय कायदेभंगामुळे ही भावना प्रबळ झाली. सत्याग्रह समितीने नामपूर येथे मुख्यालय उघडले. सत्याग्रहात सहभागी होण्यासाठी या तालुक्यांमधील एकूण २५० गावपाटलांपैकी २०० पाटलांनी आधीच आपल्या पदांचे राजीनामे देऊन टाकले. स्थानिक सरकारी प्रशासन जवळजवळ कोसळले होते. ही स्थिती काही दिवस तशीच राहिली. ५ ऑगस्ट १९३० रोजी भिलवड (मांगितुंगी) येथे जंगल सत्याग्रहाचे रीतसर उद्घाटन करण्यात आले. दादासाहेब गद्रे हे डिक्टेटर असून लक्ष्मणशास्त्री जोशी, सीतारामशास्त्री (महंत) आणि नरहर शेठ हे प्रमुख नेते होते. नाशिक, धुळे आणि जळगाव जिल्ह्यांमधून आलेल्या एक लाखावरील स्वयंसेवकांनी बागलाणच्या जंगलात नेत्रदीपक सत्याग्रह उभारला. त्यामुळे सरकारी अधिकाऱ्यांचे नीतिधैर्य घसरले. त्यांनी अतिरिक्त बळाचा उपयोग करून छावण्या नष्ट केल्या आणि भयानक अत्याचार केले.[५१]

जवळच्या डांग भागातील महादेव कोळी व ठाकरांनीही या सत्याग्रहात निर्भयपणे भाग घेतला होता. समशेरपूर हे गाव जंगल सत्याग्रहामुळे गाजले होते. अंदमानातील शिक्षा भोगून आलेल्या, जॅक्सन खून खटल्यातील वामन नारायण जोशींना जंगल सत्याग्रहासाठीही शिक्षा झाली. वामनराव समशेरपुरात स्थायिक झाले होते.[५२]

संगमनेर, राहुरी, बागलाण, कळवण या सर्वच ठिकाणच्या सत्याग्रहांना शांततामय अशा सबाल्टर्न लढ्यांचे स्वरूप आले होते. त्या लोकांना महात्मा गांधींकडून प्रेरणा मिळालेली होती. तसेच लालजी पेंडसे व सरदेसाई यांच्यासारख्या कम्युनिस्टांचाथोडा वैचारिक स्पर्श लाभला हेही खरे. मात्र ते वाणिज्यवादी अधिकारशाहीविरुद्ध पेटून उठले आर्थिक शोषणामुळे आणि अन्यायामुळे!

जळगावचे कित्येक कणखर स्वयंसेवक शिरोडा, विलेपार्ले, अलिबाग, चिरनेर वगैरे ठिकाणच्या सत्याग्रहांसाठी पाठविण्यात आले होते. वामनराव दास्ताने व शंकरराव देव हे महाराष्ट्राचे प्रमुख असल्याने तसे करणे स्वाभाविकच होते. खुद्द जळगाव जिल्ह्यातही रावेर, यावल व चाळीसगावजवळ सत्याग्रह झाला. मात्र १७ ऑगस्ट १९३० रोजी साक्री येथे २५,००० लोकांच्या उपस्थितीत या मोहिमेचे उद्‌घाटन झाल्यावर लळिंग व जयंतनगर येथेही जंगल सत्याग्रह करण्यात आले.

सर्वत्र सत्याग्रहाचा उद्रेक झाला होता. **मुंबईचे गव्हर्नर साईक्स साहेब अगतिक होऊन व्हाइसरॉयला सुचवत होते– " एक तर आपण गांधींशी समेट करावा अथवा सेनादलाच्या बळावर सविनय कायदेभंग ठेचून काढावा."** सिमल्यात भरलेल्या गव्हर्नरांच्या परिषदेत त्यांनी हिंदुस्तान सरकारपुढे स्पष्टपणे मागणी सादर केली की " मुंबई इलाख्यात तरी जागतिक महायुद्धकालीन हिंदुस्तान संरक्षण कायद्याचा अंमल त्वरित सुरू करावा, अन्यथा परिस्थिती अनावर होईल" (२१-२५ जुलै १९३०). आंदोलनरूपी वादळाचा एक केंद्रबिंदू मुंबईत तर दुसरा गुजरातमध्ये होता हे खरे. पण सातारा जिल्ह्यातही ३२ ठिकाणी जंगल सत्याग्रह करून काँग्रेसने प्रशासनाला हैराण केले. या आधीही साईक्स महाशयांनी आयर्विन यांना लिहिताना खंत व्यक्त केली होती की, " या ना त्या कारणाने आपणास इथे खास मित्र उरलेलेच नाहीत ". साईक्स साहेबांची खंत वस्तुस्थितीवर आधारलेली होती. तत्पूर्वी ब्रिटिश सत्ताधीश जातीयवादी घटक आणि संस्थानिक, जमीनदार व भांडवलशहांच्या पाठिंब्यावर राज्य करत असत. इतःपर ते आधार कमकुवत होणार असे दिसत होते.

अत्यंत दमलेल्या साईक्सने आयर्विन यांना कबूल केले की, " Those who know Bombay well tell me that they have never

known anti-Government feeling so high and so widespread. The population as a whole seems to have been carried away on a wave of semi-hysterical enthusiasm, and even Parsis and Christians, women and children, are possessed with the mania for martyrdom, and even the most responsible people are infected by it or do not dare to stand against it.[५३]

## मध्यप्रांत-वऱ्हाडमधील आंदोलन

मुंबई प्रांताच्या तुलनेत मध्यप्रांत-वऱ्हाडातील सविनय कायदेभंगाची चळवळ कमी तीव्र होती. तेथील चळवळीने सरकारला फार मोठे आव्हान दिले नाही. शिवाय तेथील आंदोलन मुंबई प्रांताइतके प्रदीर्घ काळ टिकून राहू शकले नाही. इतके मात्र सत्य आहेच की, महात्मा गांधींच्या प्रभावळीत समावेश झालेल्या विदर्भातील निःस्वार्थी निष्ठावंतांनी प्रारंभापासूनच सविनय कायदेभंग आंदोलनास वाहून घेतले. स्वतः गांधीजींनी जमनालाल बजाज यांना मुंबईत पहिले काँग्रेस डिक्टेटर नेमलेहोते. जमनालाल, जानकीदेवी व कमलनयन बजाज दांडी यात्रेत काही दिवस चालले होते. धारासणाच्या सत्याग्रहासाठीही वर्ध्याहून जानकीदेवी, मदालसाबेन, केशव जंगमवार, किटकुले, घासिराम, गणपत उपदेव आणि रामचंद्र परशुराम हे गेले होते. नागपूर प्रांतिक काँग्रेस समितीने चळवळीसाठी युद्धमंडळ नेमून प्रचार सुरू केला होता. त्याकामी सत्याग्रह आश्रमातील कार्यकर्ते आघाडीवर होते. बॅ. मोरेश्वर अभ्यंकर, डॉ. ना. भा. खरे, नीळकंठराव देशमुख, भगवानदीन आणि पूनमचंद रांका वगैरे आंदोलनाचा प्रचार करीतच होते. त्यांनी प्रांतभर सभा गाजवल्या. ठिकठिकाणी युद्धमंडळे स्थापन केली. तथापि या प्रांतास सागर किनारा जवळ नसल्याने मिठाच्या सत्याग्रहाला जोर येणे असंभव होते. म्हणून जंगल सत्याग्रह, विदेशी कापड व दारूच्या दुकानांवर निरोधने करणे आणि आक्षिप्त वाङ्मयाचे जाहीर वाचन अशा उपक्रमांवर भर देण्यात आला.

मध्यप्रांत-वऱ्हाड प्रांतात कायदेभंग चळवळ तीव्र न होण्याचे आणि चळवळ लवकर ओसरण्याचे कारण प्रतिसहकार ऊर्फ राष्ट्रीय पक्षाची उदासीनता हे होय.

या पक्षाचे राघवेंद्रराव आणि रामराव देशमुख प्रांतिक मंत्रिमंडळात मंत्री होते. बाबासाहेब खापर्डे त्या पक्षाचे नेते होते. टिळकवादी माधव श्रीहरी अणे मध्यवर्ती कायदेमंडळात खासदार होते. ते याच पक्षाचे होते. काँग्रेसने सविनय कायदेभंगाचा आणि सर्वच अधिकाराच्या पदांचा त्याग करण्याचा निर्णय घेतल्यावर राष्ट्रीय पक्ष द्विधा मनःस्थितीत पडला होता. कायदेमंडळातील सदस्यांनी तात्काळ आपल्या पदांचे राजीनामे द्यावे, असा काँग्रेस कार्यकारिणीने निर्णय घेतला होता. तो निर्णय अणे यांनी अमान्य केला. त्यांनी आपली खासदारकी चालूच ठेवली आणि अ. भा. काँ. समितीचे सभासदत्व आणि वऱ्हाड प्रांतिक काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन टाकला. याचा अर्थ, अणे काँग्रेसमधून बाहेर पडले. त्यामुळे अणेंच्या ठिकाणी वीर वामनराव जोशी वऱ्हाड प्रांतिकचे अध्यक्ष झाले. मात्र अणेंना काही दिवसांनी उपरती होऊन सरकारी धोरणाचा निषेध म्हणून त्यांनी खासदारकीचा राजीनामा दिला. त्यानंतर बाबासाहेब खापर्डे यांनीही प्रतिसहकार पक्षाचा आणि कायदेमंडळातील राष्ट्रीय पक्षाच्या नेतेपदाचा राजीनामा दिला. तथापि रामराव देशमुख स्वतः राजीनामा देण्याच्या विरोधात होते. त्यामुळे १९३० च्या चळवळीच्या प्रारंभी मध्यप्रांत-वऱ्हाड सरकारने नरमाईचे धोरण अवलंबिले होते. गांधीजी आणि त्यांच्या जनआंदोलनास टिळकवादी प्रतिसहकार पक्षाचा असलेला विरोध सरकारला माहीत होता. म्हणून त्यांना कारावासात टाकण्यात ब्रिटिशांना रस नव्हता.[५४]

अशा परिस्थितीत निष्ठावंत काँग्रेसजनांनी सत्याग्रह केला. ब्रिजलाल बियाणी, डॉ. शिवाजीराव पटवर्धन, पंडित सुंदरलाल, मोरेश्वर अभ्यंकर, व्ही. जी. सहस्रबुद्धे, हरिहर देशपांडे, डॉ. खरे व त्यांच्या पत्नी इंदिराबाई मिठाच्या सत्याग्रहाचा प्रचार करीत. परंतु सरकारने या मोहिमेची फारशी दखल घेतली नाही. त्यामुळे १३ मे पासून मोहीम प्रलंबित करण्यात आली. दरम्यान प्रतिसहकार पक्ष व हिंदुत्ववादी नेते वि. दा. सावरकर यांच्यासारख्यांच्या सरकारने आक्षिप्त ठरवलेल्या साहित्याचे जाहीर वाचन करू लागले. लाहोर कटातील क्रांतिकारक सरदार भगतसिंग, चंद्रशेखर आझाद, राजगुरू व सुखदेव आणि सोलापूरचे चार हुतात्मे यांच्यावर भाषणे झाली. डॉ. सदरलँड यांच्या **इंडिया इन बाँडेज** या पुस्तकातील उतारे वगैरेचे वाचन झाले.

तथापि यामुळे जनआंदोलनास किती उत्तेजन मिळाले यास पुरावा नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आपल्या सभासदांना व्यक्तिगतरीत्या सत्याग्रह करण्यास अनुज्ञा दिली. डॉ. मुंजे यांनी प्रतीकात्मक सत्याग्रह केला. त्यामुळे त्यांना न्यायालयाने त्या दिवशीचे काम संपेपर्यंतच कारावासाची शिक्षा दिली व केवळ पाच रुपये दंड केला होता. डॉ. केशवराव हेगडेवारांनीही जंगल सत्याग्रहात थोडासा भाग घेतला.

मे अखेर प्रांतिक सरकारने नरमाईचे धोरण सोडून अभ्यंकर, वामनराव जोशी व हरिहर देशपांडे यांना अटक केली. भगवानदीनसुद्धा अटकेत पडले. जमनालाल आधीच मुंबईत पकडले गेले होते. डॉ. खरे दारूच्या दुकानांवरील निदर्शनांवरजोर देऊ लागले. याच सुमारास प्रांतिक युद्धमंडळाने जंगल सत्याग्रहाची योजना आखली. सत्याग्रहासाठी तळेगावाला पहिले प्रांतिक केंद्र उघडून गणपतराव टिकेकरांच्या नेतृत्वाखाली तिथे छावणी उभारली (३१ जुलै १९३०). वर्धा जिल्ह्यातील या ठिकाणी ७५,००० चा जनसमुदाय उपस्थित असल्याने जिल्हा पोलीस अधीक्षक व वन विभागाचे कर्मचारीही हजर होते. १ ऑगस्ट रोजी टिकेकर, श्रीधर दाते, डॉ. खरे, ढवळे वकील, बाबासाहेब देशमुख, विभूती महाराज, भोसले व वल्लभदास जाजू यांच्या मार्गदर्शनाखाली हजारो स्वयंसेवकांनी नेत्रदीपक सत्याग्रह केला. या प्रसिद्ध सत्याग्रहात ३०,००० लोकांनी भाग घेतला. तळेगावनंतर मोठा सत्याग्रह झाला केळझरला. पोलिसांची प्रचंड सेना आणि जिल्ह्यातील सर्व बड्या अधिकाऱ्यांच्या हजेरीत ३०,००० ते ४०,००० लोकांचा समुदाय तेथे होता. सत्याग्रहासाठी प्रत्येकी चार जणांचे एक पथक या पद्धतीने शेकडो पथके एकामागून दुसरे असे पाठवण्यात आले. या सत्याग्रहासाठी शेकडो स्वयंसेवक पकडले गेले. स्वयंसेवकांची शिस्त व निर्धार पाहून सनदी नोकरही भारावून गेले होते.[५५] या सत्याग्रहात साहित्यिक ग. त्र्यं. माडखोलकर, आर. एस. एस. चे सभासद व दलित युद्धमंडळ, अनाथ विद्यार्थिगृह यांचे स्वयंसेवक आणि पारशी तरुणही सहभागी झाले होते. तळेगावच्या सत्याग्रहात जवळजवळ ५०० जणांना अटक झाली असा मध्यप्रदेश सरकारच्या एका इतिहास ग्रंथात दावा करण्यात आलेला आहे.[५६]

जंगल सत्याग्रहासाठी गांधीवाद्यांनी आणि वर्धा व नागपुरातील आश्रमवासीयांनी शिंदीच्या झाडांची तोडणी करणे निवडले. शिंदीच्या झाडापासून मद्य तयार करण्यात येई. शिवाय त्या मद्यावर शोषणकर्ते इंग्रज कर बसवून बराच महसूल मिळवत असत. या महसुलाचा उपयोग ब्रिटिश राजवट कायम टिकवण्यासाठी होत असे. शिवाय मद्य तयार करणारे मक्तेदार ब्रिटिश राजवटीचे आधारस्तंभ बनलेले होते. म्हणून दारू हे आर्थिक, राजकीय व सामाजिक शोषणाचे मोठे प्रतीक होते. शिवाय गरिबीचे निर्मूलन आणि कौटुंबिक स्वास्थ्य टिकवण्यासाठी नशाबंदीची आवश्यकता होती. या कारणांसाठी गोपाळराव वाळुंजकर, दत्तात्रेय दास्ताने, कुंदर दिवाण,महादेव अनंत मोघे वगैरे गांधीवाद्यांनी शिंदीची झाडे तोडण्याच्या उपक्रमावर अधिक भर दिला. शिंदीची बहुसंख्य झाडे मालगुजारांच्या अथवा मोठ्या शेतकऱ्यांच्या मालकीची होती. तथापि तेव्हा राष्ट्रीय भावना इतकी जागृत झाली होती की, मालकांनी ती झाडे तोडण्यास अनुमती तर दिलीच. शिवाय ते स्वतःही त्यात सहभागी झाले. गावोगावचे लोक सत्याग्रहींच्या अन्नपाण्याची व निवाऱ्याची व्यवस्था करीत. हा सत्याग्रह म्हणजे मोठे राष्ट्रीय कार्य होय अशी लोकांची धारणा बनली.[५७]

जमनालाल बजाज यांना मुंबईत अटक केल्यामुळे सरकारच्या या कृतीचा तीव्र निषेध वर्धाच नव्हे तर नागपूर, भंडारा, अकोला आणि अमरावती जिल्ह्यांमध्येही करण्यात आला. विनोबा भावेंनी जमनालालजींचे जाहीर अभिनंदन केले. त्यामुळे स्वयंसेवकांचा उत्साह वाढला. मार्गदर्शनासाठी विनोबा भावे मोकळे राहणेच अधिक चांगले असल्यामुळे त्यांनी अटक होण्यासारखा गुन्हा केला नाही. आणि मार्गदर्शकाची भूमिका वठविली. वर्धा, आर्वी व हिंगणघाट भागातील चळवळीचे धुरीण होते :— रामभाऊ श्रोत्री, घटवाई, नीळकंठराव देशमुख, थत्ते, कन्हैयालाल, अडकोबा पाटील, अंबादास देशपांडे, बळीराम जळीत, केशव भुसारी, वल्लभदास जाजू, नारायण वाघ, शिवराज चुडिवाले, काशिनाथ दलाल, साळवे वकील, बॅ. गोविंदराव देशमुख, चिरंजीलाल, मोतीलाल बाबू, श्रीकृष्णदास जाजू, डॉ. आपटे, नानाजी कदम, गुलाबराव वाघ, दीनदयाळ गुप्त, किशोरलाल मश्रूवाला, गोपाळराव राठी इत्यादी. काही कार्यकर्ते जंगल सत्याग्रह करीत तर काही निरोधने आयोजित करीत. विदेशी

कापड व दारूच्या दुकांनासमोरील निरोधने ही तर नित्याची बाब होती. प्रचार साहित्याचे वितरण, सरकारी अधिकाऱ्यांचे मन वळवून आंदोलनास पाठिंबा मिळविणे, पोलिसांचे मतपरिवर्तन आणि सरकारी कर्मचाऱ्यांचे राजीनामे मिळवणे अशा स्वरूपाच्या कार्यात पुष्कळ स्त्री-पुरुषांनी भाग घेतला. या कामी ताराबाई लिमये, कमल देशमुख, विमल अभ्यंकर, गंगुताई वाळुंजकर, जानकीबाई बजाज, शरयू धोत्रे वगैरे महिलांनी मोलाची कामगिरी केली.

काँग्रेसजनांनी वर्धा जिल्ह्यात मालगुजार आणि मुकादमांची परिषद भरवून त्यांना ताडी उत्पादनाचे ठेके न घेण्यासाठी आर्जव केले. या आर्जवास प्रतिसाद न देणाऱ्य ठेकेदारांवर आर्थिक व सामाजिक बहिष्कार घालण्याचा निर्णय या परिषदेत घेतल गेला. या उपक्रमास बरेच यश आले. बरेच ठेके विकले गेले नाही. म्हणून ताडीचे उत्पादन घटले. त्यामुळे अर्थातच सरकारचा महसूल बराच घटला. सविनय कायदेभंगाचा हाही एक उद्देश होताच.[५८]

कार्यकर्त्यांनी विदेशीवरील बहिष्काराबरोबर नशाबंदीसाठीही जिवाचे रान केले ठिकठिकाणी जातपंचायत समित्या स्थापन करून त्यांच्या माध्यमातून मद्यपानविरोधी मोहीम उभारली. त्या पंचायत समित्यांनी मद्यपी लोकांवर सामाजिक बहिष्काराची मोहीम सुरू केली. या सत्याग्रहाचा अपेक्षित परिणाम होऊन दारूची विक्री घटली. स्वयंसेवकांनी बऱ्याच ठिकाणी देशी दारूचे लिलाव बंद पाडले. निदान काही आठवडे तरी बऱ्याच गावांमधील दारूची दुकाने बंद होती. सरकारच्या गोपनीय अहवालांवरून ही वस्तुस्थिती स्पष्ट दिसते. हे आंदोलनाचे यश होते. गांधीजींच्या उपरोक्त अकरा मागण्यांमध्ये नशाबंदीची मागणी होतीच. त्यानुसार गांधीवाद्यांनी नशाबंदीस उचित महत्त्व दिले.

विदर्भातील सविनय कायदेभंगात जंगल सत्याग्रहाने सरकारच्या कायदा आणि सुव्यवस्था राखण्याच्या क्षमतेला जोरदार आव्हान दिले होते. डॉ. मुंजे, अणे, खापर्डे वगैरे कधीच जनआंदोलनात उतरलेले नसले, तरी इतर काँग्रेस कार्यकर्त्यांनी रस्त्यावर जाऊन रान उठविले होते. विशेषतः वर्धा, चंद्रपूर (चांदा), भंडारा व अमरावती जिल्ह्यांत जंगल सत्याग्रह अधिक व्यापक झाला. त्यात हजारो जण भाग घेत. त्यामुळे

काही ठिकाणी हिंसक वळण लागत असे. आर्वी तहशीलमध्ये परिस्थिती सरकारच्या नियंत्रणाबाहेर गेली होती. वर्ध्याच्या पोलीस अधीक्षकाने गृहमंत्र्यांच्या बैठकीतकबूलच केले होते की, आर्वी तहशीलमध्ये काही दिवस सरकारची सत्ता अजिबात नव्हती. वर्धा जिल्ह्यात कित्येक हजार शिंदीची झाडे तोडण्यात आली. "काँग्रेस स्वयंसेवक गावोगाव जातात आणि गावकऱ्यांना झाडे तोडण्यास सांगतात. आणि त्यांचे आदेश गावकरी अमलात आणतात". जिल्हा पोलीस अधीक्षकाची ही कबुली खूपच बोलकी होय.

अमरावती जिल्ह्यातील एलिचपूर, दर्यापूर व मोर्शी तहशिलींमध्येही जंगल सत्याग्रहाने सरकारला बेजार केले होते. एका गोपनीय सरकारी अहवालात कबुली दिलेली आढळली की, "या तीन तहशिलींमध्ये जंगल सत्याग्रहाने हाहाकार माजवला असून सरकारी वनसंपदेची प्रच्छन्न कत्तल करण्यात येत आहे. विखुरलेल्या वनग्रामांमधील सत्याग्रहींना अटक करणे अवघड झालेले आहे. शिवाय सत्याग्रहींना गावकऱ्यांची साथ असल्यामुळे पोलिसांचे काम कठीण झाले आहे". शासन अगतिक झाले होते.[५९]

जुलै १९३० च्या अखेरपर्यंत मुंबई इलाखा आणि मध्यप्रांत-वऱ्हाडात जंगल सत्याग्रहाने व्यापक स्वरूप धारण केले होते. म्हणून जुलैच्या अखेरीस व्हाइसरॉयने सिमल्यात सर्व गव्हर्नरांची एकत्र परिषद घेतली. परिषदेत मध्यप्रांत-वऱ्हाडचे गव्हर्नर सर मॉँटेग्यू बटलर यांनी आपली व्यथा मांडताना कबूलच केले की, नागपूर आणि जबलपूर विभागांमधील परिस्थिती हाताबाहेर गेलेली आहे; आणि चळवळ आणखी फोफावण्याची भीती आहे. खेडूत, बायका व मुले भावविवश होऊन झाडे तोडतात आणि गवत कापून नेतात. "आय शाल हॅव टू हीट हार्ड, अँड मे हॅव टू शूट अ बिट. बट दॅट इज काईंडर अँड मोअर एफिकॅसिअस दॅन इन्डिस्क्रिमिनेट बीटिंग". वस्तुतः परिस्थिती इतकी बिघडली होती की, सहा ठिकाणी पोलिसांनी गोळीबार केला आणि बारा विभागांवर सामूहिक दंड बसविला होता. गव्हर्नर जे करणार म्हणत होता ते नोकरशाहीने आधीच केलेले होते. सामूहिक दंड बलप्रयोगाने वसूल करण्यात आला. पण लढा थांबला नाही.[६०]

अमरावती जिल्ह्यातील वडाळीचा सत्याग्रह नेत्रदीपक मानला गेला होता. काँग्रेस युद्धमंडळाच्या अंदाजानुसार जंगल सत्याग्रहाचा शिखर बिंदू गाठला गेला तेव्हा वऱ्हाडमधील १०६ केंद्रांमध्ये १४६० स्वयंसेवक आणि २२५ कार्यकर्ते सत्याग्रहात गुंतलेले होते. चळवळ खेडोपाडी पोहोचली आणि आदिवासी लोकही चळवळीत सामील झाले. मात्र सत्याग्रहींनी वनोत्पादनांची विक्री केल्यामुळे सरकारी अधिकारी आक्रमक पवित्रा घेऊ लागले.

१९३० सालात मध्यप्रांत वऱ्हाडमध्ये मद्यविक्रीत ३३ टक्के घट झाली. जमीन महसुलाच्या खालोखाल प्रांतिक सरकारला दारूवरील उत्पादन शुल्कातून महसूल लाभत असे. १९३०-३१ या आर्थिक वर्षात उत्पादनशुल्कातून सरकारला फक्त ८६,२७,००० रुपये मिळाले. या स्रोतातून १९२९-३० सालात १,२५,४४,००० इतके उत्पन्न मिळाले होते. त्यामुळे इंग्रज अधिकारी भयंकर अस्वस्थ झाले.**हिंदुस्तानातील दुसऱ्या कोणत्याही प्रांतापेक्षा मध्यप्रांत-वऱ्हाड प्रांतात सरकारमान्य शाळा आणि महाविद्यालयांवर फार मोठ्या प्रमाणात बहिष्कार टाकण्यात आला.** बहिष्काराची ही चळवळ पुष्कळ व्यापक झाली होती. परिणामतः या प्रांतातील सरकारची सर्व महाविद्यालये बरेच दिवस पूर्णतः बंद पडली. तसेच अठरा सरकारी माध्यमिक शाळा आणि चार अँग्लो-व्हर्नाक्युलर मिडल स्कूल बरेच दिवस बंद पडले होते. नागपूरचे वैद्यकीय महाविद्यालय आणि अभियांत्रिकी महाविद्यालय बंद पाडून विद्यार्थी सत्याग्रहात उतरले. ऑगस्ट १९३० मध्ये हजारो जण जंगल सत्याग्रहात जाण्यास कटिबद्ध झाले. खामगावच्या सरकारी हायस्कूलवर तिरंगा राष्ट्रध्वज फडकवण्यात आला. त्यामुळे युवकांचा उत्साह बराच वाढला.[६१]

मे-जून १९३० पासून सरकारने अनेक वटहुकूम अमलात आणले होते. तथापि ऑक्टोबरपर्यंत सरकारला परिस्थिती आटोक्यात आणणे शक्य झाले नाही. काँग्रेस स्वयंसेवकांना तुरुंगाचे भय उरले नव्हते.

जून अखेरी काँग्रेसचा प्रभाव पाहून कायदेमंडळातील प्रतिसहकार पक्षाच्या अनेक आमदारांनी सदस्यत्वाचे राजीनामे दिले. तो पक्ष अधिक पांगळा झाला. त्यामुळे खापर्डेंच्या सूचनेनुसार रामराव देशमुखांनीही पदाचा राजीनामा दिला. कारण त्यांना

राष्ट्रीय प्रवाहातून बाजूला फेकले जाण्याची भीती वाटत होती. अशा परिस्थितीत माधव श्रीहरी अणे यांनी १० जुलै १९३० रोजी पुसदजवळच्या आरक्षित जंगलातील गवत कापणाऱ्या ११ स्वयंसेवकांचे नेतृत्व केले. हाच काय तो लोकनायक अणे यांचा तथाकथित कायदेभंग होय! त्यासाठी त्यांना सहा महिन्यांची सजा झाली. डॉ. मुंजेंना तर फक्त दोन-तीन तासांची सजा व ५ रुपये दंड झाला. न. चिं. केळकरांना तुरुंगात टाकण्याचाही ब्रिटिशांनी विचार केला नाही. कारण त्यांचा गांधीजींना तसेच जनआंदोलनास असलेला विरोध सरकारला माहीतच होता.

प्रतिसहकारवादी पक्षाची ताकद खूपच कमी झाली, तरी या पक्षाने काँग्रेसशी सहकार्य केल्याने आंदोलन व्यापक झाले. अनेकांच्या मनातील संभ्रम दूर होऊन ते चळवळीकडे वळले. नागपूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात सत्याग्रह अधिक पसरला. बुटी-बोरी येथे वसंत बाळकृष्ण बखले आणि द्वारकानाथ धोटे यांच्या नेतृत्वाखाली ५,००० स्त्री-पुरुषांनी जंगल सत्याग्रह केला. गंगाबाई चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली रिंगणाबोर्डी येथे १५,००० लोकांनी जंगलचा कायदेभंग केला. सुकळी, पारडसिंगा आणि कोंढाळी येथे सत्याग्रह करण्यात आले. परसोडीच्या जंगल सत्याग्रहासाठी (२६ ऑगस्ट) काटोलहून सुमारे ८,००० पुरुष व २००० महिला गेल्या होत्या. कोंढाळीजवळील पहाडावर झालेल्या कायदेभंगात अदमासे १२,००० लोकांनी तुकाराम सावजी उमाठे यांच्या नेतृत्वाखाली भाग घेतला. सत्याग्रहात हस्तगत केलेल्या गवताचे आणि लाकडांचे लिलाव केले जात. त्यामुळे सत्याग्रहींना उत्तेजन लाभत असे. कोंढाळीचा सत्याग्रह तेव्हा बराच गाजला होता. त्यात अनेकांना अटक झाली. पवनी आणि चारगावलाही जंगल सत्याग्रह झाले.

नागपुरातील विद्यार्थी शाळा व महाविद्यालयांवर बहिष्कार टाकून प्रामुख्याने नशाबंदीच्या आंदोलनात सामील झाले. सातत्याने व्यापक होत असलेले नशाबंदी आणि जंगल सत्याग्रहाचे आंदोलन चिरडून टाकण्यासाठी उपरोक्त सिमला परिषदेनंतर, गव्हर्नर बटलर यांनी दमननीतीचा अवलंब केला. सत्याग्रहींना फटक्यांची शिक्षा देणे सुरू केले. सरकारी यंत्रणेने दडपशाही सुरू केली. तथापि सरकारला हा लढा दडपून टाकणे ऑक्टोबरपर्यंत शक्य झाले नाही.

बॅ. अभ्यंकर आणि भगवानदीन कारागृहात असताना पोलिसांनी बळावर त्यांच्या अंगठ्याचे ठसे घेतले, अशी बातमी पसरताच प्रांतभर तणाव पसरला. त्या प्रकरणी काही जणांना फटके मारण्यात आले. हे प्रकरण चिघळले आणि नागपुरात कडक हरताळ झाला. कामगारांनी कापड गिरण्या बंद पाडल्या आणि त्यामुळे चळवळ तीव्र झाली.[६२]

उपरोक्त पुढाऱ्यांव्यतिरिक्त विदर्भात दादा धर्माधिकारी, शिवाजीराव पटवर्धन, नीळकंठराव देशमुख, पुरुषोत्तम बळवंत गोळे, रामभाऊ रुईकर, पी. वाय देशपांडे, अनसूयाबाई काळे, दुर्गाबाई जोशी, डॉ. सोमण, दिनकरशास्त्री कानडे, राजाभाऊ डोंगरे वगैरेंनीही कारावास भोगला.

सविनय कायदेभंग आंदोलनात जालियनवाला बाग दिन, गांधी दिन, खुदाई खिदमदगारांच्या स्मरणार्थ असलेला गढवाल दिन, जमनालाल बजाज दिन, टिळक पुण्यतिथी वगैरे प्रसंगांच्या निमित्ताने सभा व मिरवणुका काढल्या जात असत. चळवळीला उत्तेजन देणे हा त्यामागील उद्देश होता. सरकारविरुद्धचा असंतोष, विदेशीवर बहिष्कार, नशाबंदी आणि संपूर्ण स्वातंत्र्याचा जयघोष करण्यात येई. विदेशी कापडाची विक्री काही दिवस बंद पडली होती. देश सेविकांची पथके निरोधनांसठी आल्यावर तेथील दुकानमालक व ग्राहकांना स्वतःची लाज वाटे. त्याचा अपेक्षित परिणाम झाला हे सरकारच्या उपरोक्त आकडेवरूनही दिसतेच. देश सेविका संघाप्रमाणे मुलांची वानरसेना या आंदोलनात खूप सक्रिय झाली होती. कमलनयन बजाज यांचा वानरसेनेत मोठा सहभाग होता. वृत्तपत्रांवरील वटहुकमाला प्रत्युत्तर म्हणून प्रांतिक युद्ध मंडळाच्या देखरेखीखाली **काँग्रेस पत्रिका** सुरू केली होती. तिच्याद्वारे आंदोलनाच्या बातम्या आणि सूचना देण्याचा प्रयत्न करण्यात येई. मात्र **बाँबे काँग्रेस बुलेटिन** या पत्रिकेचा दर्जा भारतातील दुसऱ्या कोणत्याच पत्रिकेला कधीच गाठता आला नाही. **बाँबे काँग्रेस बुलेटिन** व तशा पत्रिका लोकांना सत्याग्रहाबाबत मार्गदर्शन करीत. या कामात विद्यार्थी व महिलांचा मोठा सहभाग होता.

## देश सेविका संघ

मुंबई प्रांतात आणि विशेषतः मुंबई शहरात देश सेविका संघ ही संघटना बरेच विधायक कार्य करीत होती. महात्मा गांधींच्या संकल्पनेनुसार महिलांचा विधायक कार्यातील सहभाग वाढला होता. १९२० च्या असहकार चळवळीपासून महिला राष्ट्रीय चळवळीत सक्रिय झालेल्या होत्या. सविनय कायदेभंग आंदोलनाचा प्रारंभ झाल्यापासून देश सेविका संघ अधिक सुसंघटित करण्यात आला. काही वर्षे मुंबई शहर काँग्रेसच्या अध्यक्ष असलेल्या सरोजिनी नायडू, कमलादेवी चट्टोपाध्याय, पेरिन कॅप्टन, हंसा मेहता, लीलावती मुन्शी, अवंतिकाबाई गोखले, लक्ष्मीबेन दोसानी, लक्ष्मीबाई भिडे रतनबेन मेहता, श्रीमती अबिदअली, गंगाबेन पटेल, गज्जरबेन, रामीबाई कामदार, कुमारी खांडवाला, हरनाम कौर वगैरे प्रबुद्ध महिलांनी कित्येक स्त्रियांना चळवळीत ओढले. त्यांना कित्येक विद्यार्थिनींनी साथ देऊन त्या चळवळीत सामील झाल्या. या महिला सर्वच मोठ्या सभा व मिरवणुकांमध्ये अग्रभागी असत. विदेशी कापडाची व दारूची दुकाने त्यांचे लक्ष्य (टार्गेट) असत. आंदोलनाच्या या अंगाबाबत त्यांनी उत्तम कामगिरी करून दाखविली होती. दुकानदारांना आणि ग्राहकांना त्या प्रथम विनंती करीत. पण विनंती विफल झाल्यास त्या समोर आडव्या पडत. मद्यपींच्या बायकानांही भेटत. वडाळा सत्याग्रहाच्या नेत्या कमलादेवी होत्या, तर धारासणा सत्याग्रहाचे नेतृत्व सरोजिनी नायडू यांनी केले होते.

तथापि मध्यप्रांत-वऱ्हाडमध्ये महिला वर्गात विशेष राजकीय जागृती झालेली नव्हती म्हणून तेथील महिला कायदेभंग आंदोलनात उतरलेल्या दिसणे शक्य नव्हते. त्यातल्या त्यात नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, आर्वी येथील स्त्रिया सत्याग्रहात सक्रिय झाल्या होत्या. जमनालालजींच्या परिवारातील महिला सत्याग्रहात असणे स्वाभाविकच होते. नागपूरच्या अनसूयाबाई काळे, अकोल्याच्या दुर्गाबाई जोशी, अणे परिवारातील राधाबाई, प्रमिला व लीला या भगिनी, ताराबेन मश्रूवाला, मनुताई कोल्हटकर, गंगुताई बापट, अमरावतीच्या पार्वती पटवर्धन, डॉ. कुमारी जावळे, यवतमाळच्या आनंदीबाई दामले, गांधीजींच्या सूनबाई सुशिलाबेन गांधी, ताराबाई लिमये, कमल देशमुख, विमल अभ्यंकर, गंगुताई वाळुंजकर, शरयू धोत्रे, मदालसाबेन

नारायण यांनी सत्याग्रहात मोलाचे कार्य केले. त्यांनी कित्येक महिला व शाळा-कॉलेजामधील मुलींनाही सत्याग्रहाच्या कामी लावले. **विशेष म्हणजे थोर समाजसुधारक गोपाळ गणेश आगरकरांच्या पत्नी यशोदाबाई आगरकर यांनी २१ एप्रिल १९३० रोजी अकोल्यात सविनय कायदेभंग केला होता.** तथापि त्या खूपच वयस्कर असल्याने, पोलिसांनी त्यांना अटक केली तरी तुरुंगात डांबले नव्हते. महाराष्ट्रातील समाजसुधारणांचे विरोधक वगळता इतरांकडून यशोदाबाई आगरकरांचे तेव्हा कौतुक करण्यात आले होते.

वरील विवेचनातील सत्याग्रहींची नावे प्रातिनिधिक होत. ही परिपूर्ण यादी नव्हे. १५ नोव्हेंबर १९३० रोजी मध्यप्रांत-वऱ्हाड प्रातांत कारागृहांमध्ये असलेल्या सत्याग्रहींची आकडेवारी पुढे देत आहोत. मात्र १४ नोव्हेंबरपर्यंत ज्यांच्या शिक्षेचा कालावधी संपून ते मुक्त झाले, त्यांचा यात समावेश नाही. १५ नोव्हेंबर १९३० रोजी या प्रांतातील बंदीवासात २५६३ एकूण कैदी होते. त्यांच्यात चार महिला स्वातंत्र्य सैनिक होत्या. एकूण कैद्यांपैकी २५३६ हिंदू तर २७ मुसलमान होते.[६३]

तथापि या आकडेवारीला फार महत्त्व देण्याचे कारण नाही. एक तर ती एका दिवसापुरती आहे. शिवाय कायदेभंग करणाऱ्यांपैकी सर्वांना तुरुंगात न टाकता हजारोंना मारझोड करून सोडून देण्यात येई. तुरुंगांची संख्या व क्षमता अपुरीपडत असे. बऱ्याच स्त्री-पुरुषांकडून दंड वसूल करून त्यांना सोडून देत. युवकांना फटके मारून व दम देऊन सोडून देत.

## आंदोलनात मुंबई अग्रेसर

कायदेभंग आंदोलनात प्रारंभापासूनच मुंबई शहर अग्रेसर होते. युसुफ मेहेरअली व युवकांचा नॅशनल मिलिशिया व बॉंबे यूथ लीग आणि मुंबई सेवा दल (१९३०) या संघटनांनी जहाल राष्ट्रवादी फळी उभारलेली होती. नौजवान भारत सभेची मुंबई शाखाही आघाडीवर होती. न्यायमूर्ती एम. सी. छागला यांनी म्हटल्याप्रमाणे मेहेरअली यूथ चळवळ आणि समाजवादावर भर देत असल्यामुळे इलाख्यातील जहालांमध्ये लोकप्रिय झालेले होते (**रोझेस इन डिसेंबर,** पृ. ११४-१५). मेहेरअलींचा नारा

“एव्हरी हाऊस अ काँग्रेस हाऊस” १९३० प्रमाणेच नंतर १९४२ मध्येही मुंबईत सर्वमुखी झाला. भारतातील सर्वाधिक देश सेविका मुंबईच्याच होत्या. त्यांनी या आंदोलनात नेत्रदीपक कार्य करून ब्रिटिशांना चकित केले. बनारस हिंदू युनिव्हर्सिटीमधील अर्थशास्त्राचे प्राध्यापक अच्युतराव पटवर्धन आपले पद सोडून मुंबईतील आंदोलनामध्ये सामील झाले. सविनय कायदेभंग लढ्याने मुंबईत अशोक मेहता, पुरषोत्तम त्रिकमदास आणि अच्युतराव या तीन नवीन जहालांची निर्मिती केली. त्यांनी या आंदोलनात लढाऊ भूमिका घेताना मेहेरअली व नरिमन यांना साथ दिली.

गांधीजींनी दांडी येथे आंदोलनाचे रणशिंग फुंकण्यापूर्वीच त्याची रंगीत तालीम मुंबईत घेण्यात आलेली होती. मुंबईतील युद्धमंडळाचे पहिले सर्वाधिकारी जमनालाल बजाज पकडले गेल्यावर अनुक्रमे नरिमन, मेहेरअली, बा.गं.खेर, सरोजिनी नायडू कमलादेवी चट्टोपाध्याय, हंसा मेहता, पेरिन कॅप्टन, अवंतिकाबाई गोखले, अबिदअली जाफरभाई, डी. आर. घारपुरे आणि धर्मानंद कोसंबी हे मुंबईचे सर्वाधिकारी झाले. मेहेरअलींना अटक केल्यावर त्यांची सर्व मालमत्ता सरकारने जप्त केली. त्यामुळेही आंदोलनास अधिक जोर चढला. [६४] लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून पत्रकारितेची पदविका प्राप्त केलेले सदाशिव कान्होजी पाटील आंदोलनाचे सूत्रसंचालन करीत असत. नंतर पाटील मुंबईचे पुढारी झाले. १९४२ च्या क्रांतिलढ्यापेक्षा सविनय कायदेभंगाचे नियोजन व तालीम अधिक पद्धतशीर झालेली होती. गिरगाव चौपाटीवर एकएक लाखाच्या सभा होत. पिकेटिंगमुळे (ऑक्टोबर १९३०) सरकारपुढे गहन समस्या उभ्या राहिल्याची मला गोपनीय अहवालांमध्ये नोंद आढळली. धारासणा सत्याग्रहाची पुनरावृती आझाद मैदानावर करण्यात आली होती. मुंबईतील लढ्याचे समक्ष अवलोकन केलेल्या केंद्रीय गृहमंत्री हेग यांची हतबलता त्यांच्याच शब्दात पाहा :— “The Congress House openly directs the movement of revolt against Government. Gandhi caps fill the streets, volunteers in uniforms are posted for picketing......... as police constables............ . It is not surprising that all this intense feeling with its

open and apparently successful defiance of Government has produced a profound impression on Bombay as a whole. Nothing, perhaps, had done more to deepen the impression than the series of processions that have been organized by the Congress. The numbers, the discipline, the organization and the brushing aside of the ordinary funtions of police control of traffic have combined to produce a vivid impression of the power and success of the Congress movement".[६५]

काँग्रेस व व्यापारी यांचा सहभाग आणि सहकार्यामुळे मुंबईतील आंदोलन अत्यंत परिणामकारक झाले. येथील व्यापाऱ्यांच्या सर्व संघटना आणि विशेषतः इंडियन मर्चन्ट्स चेंबर यांनी सरकारवर जोरदार दडपण टाकून सरकारला गांधीजींशी तडजोड करायला भाग पाडले. मुंबईतील इंग्रज कारखानदारांनाही अशीच भूमिका घ्यावी लागली. यात आंदोलनाचे यश सामावलेले होते. बी.पी.सी. सी. ने राजकारण आणि अर्थकारण यांच्यात निकटचे नाते बांधून ब्रिटिशांना जेरीस आणले. या आंदोलनाने काँग्रेसने प्रथमच भारताचे आर्थिक प्रश्न धसास लावले होते. आणि लवकरच लॉर्ड आयर्विनला काँग्रेसचा अनुनय करावा लागला.

**काँग्रेसच्या अनुनयाचे प्रयत्न :—**सविनय कायदेभंग लढा शिखरावर पोहोचलेला होता, तर सरकार तो सर्व सामर्थ्यासह दडपून टाकण्याचा प्रयत्न करीत होते. त्याच वेळी व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन विभाजनवादी डावपेचांनुसार बॅ. मुकुंदराव जयकर आणि सर तेज बहादूर सप्रू या 'वकिली मध्यस्थांना' काँग्रेस व सरकार यांच्यात समेट घडवून आणण्यासाठी उत्तेजन देत होते. त्या साम्राज्यशहाची ही मुत्सद्देगिरी होती. जयकर व सप्रूंना मुंबईतील पुरषोत्तमदास ठाकूरदास आणि डॉ. अन्सारी यांचेही समर्थन होते. जॉर्ज स्लोकोंब हा विदेशी पत्रकार सदिच्छेच्या भावनेने या प्रयत्नांत सामील झाला. हे मध्यस्थ गांधीजी आणि नेहरू पितापुत्रांना तुरुंगात भेटले. जुलै-ऑगस्ट १९३० मध्ये आंदोलन ऐन भरात असताना या भेटीगाठी झाल्या होत्या.

तथापि काँग्रेसने आपल्या अटी नेमक्या, तंतोतंत व निश्चयी शब्दांत मांडल्या— संपूर्ण स्वातंत्र्य आणि ब्रिटिशांपासून कायमची मुक्ती करून घेण्याचा अधिकार! म्हणून भाबड्या शांततेच्या वाटाघाटी विफल झाल्या. बॅ. जयकर वगैरेंच्या फसव्या आशावादाला गांधी व नेहरूंनी थारा दिला नाही. म्हणून हिंदुस्तान सरकारने वटहुकूम काढून दडपशाहीला आणखी धार आणली.

जवाहरलाल ११ ऑक्टोबर १९३० रोजी कारावासातून सुटल्यावर दुसऱ्याच दिवशी त्यांनी अलाहाबादेतील सभेत जाहीर केले की, "आमचा निर्धार अविचल आहे. आमचा आत्मविश्वास दुर्दम्य आहे. आम्ही कदापि माघार घेणार नाही". शेतसारा बंदी व आयकर बंदीच्या मोहिमेची त्यांनी घोषणा केली. म्हणून पुढच्याच दिवशी नेहरूंना अटक करून दोन वर्षांची सक्तमजुरी देण्यात आली. कमला नेहरूंनाही १ जानेवारी १९३१ रोजी अटक करण्यात आली.[६६]

कायदेभंग लढा अनावर झालेला असल्यामुळे विभाजनवादी उपाय म्हणून तसेच भारतीय सदस्यांना चर्चासत्रांमध्ये अडकवण्यासाठी, इंग्रजांनी १२ नोव्हेंबर १९३० पासून पहिली लंडन कॉन्फरन्स भरवली. हिलाच भारतीय मवाळ पुढाऱ्यांनी राऊन्ड टेबल कॉन्फरन्स म्हणजे गोलमेज परिषद असे नाव दिले. पूर्वोक्त सायमन आयोगाच्या अहवालातील (दोन खंड) शिफारशींच्या आधारावर तोडगा काढणे हा या परिषदेचा माफक उद्देश होता. या पहिल्या सत्रासाठी सरकारनेच निवडलेल्या ८९ प्रतिनिधींमध्ये बॅ. जयकर, ना. म. जोशी, डॉ. मुंजे, श्रीपाद बळवंत तांबे, अण्णासाहेब लठ्ठे, भास्करराव जाधव, डॉ. आंबेडकर हे प्रमुख मराठी भाषिक होते. बॅ. जिना व अनेक संस्थानिकही होतेच. या परिषदेची विफलता आधीच ओळखून काँग्रेसने (गोलमाल) परिषदेवर जाहीरपणे बहिष्कार घातला होता. त्यामुळे परिषदेचे भवितव्य आधीच स्पष्ट दिसत होते. बादशहा पाचवे जॉर्ज यांनी १२ नोव्हेंबर १९३० रोजी परिषदेचे उद्घाटन केल्यावर पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांच्या अध्यक्षतेखाली परिषदेचे काम चालले ते १९ जानेवारी १९३१ पर्यंत. तथापि बहुसंख्य प्रश्नांवर भारतीय सदस्यांमधील फक्त मतभेद व्यक्त झाले आणि ते जगजाहीर झाले. देशातील संस्थानिकांना मात्र

तेथे व्यासपीठ लाभले. हिंदुस्तानात या पहिल्या परिषदेचा निषेध करण्यात आला. कदाचित पंतप्रधानांच्या सूचनेप्रमाणे असेल, परिषद संपण्यापूर्वी दोन दिवस आधी व्हाइसरॉय महाशयांनी काँग्रेस नेत्यांशी वाटाघाटी करण्याचा आपला मनोदय मध्यवर्ती कायदेमंडळात व्यक्त केला. १९ जानेवारी १९३० रोजीची पंतप्रधानांची लंडनमधील घोषणा मात्र संदिग्ध व असमाधानकारक अशीच होती. व्हाइसरॉय मात्र गांधीजींच्या अनुनयाचे प्रयत्न करीत होते.

## गांधी-आयर्विन करार

काँग्रेसने सविनय कायदेभंग लढा दमदारपणे आणि सत्याग्रहाच्या आचारप्रणालीप्रमाणे चालवून आपला प्रभाव सिद्ध केलेला होता. म्हणून गांधीजी व काँग्रेस नेत्यांना विचारविनिमय करणे शक्य व्हावे, यासाठी व्हाइसरॉयच्या आदेशानुसार त्यांना २५-२६ जानेवारी १९३१ रोजी विनाअट मुक्त करण्यात आले. त्यानंतर काँग्रेस कार्यकारिणीचे सर्व सभासद मुक्त झाले. मात्र कारावासात खंगलेले मोतीलाल नेहरू ६ फेब्रुवारीलाच मरण पावले. सुभाषचंद्र बोस व अनेक युवानेत्यांना व्हाइसरॉयशी समझोता करण्याचे धोरण मान्यच नव्हते. मात्र पोलिसांनी केलेल्या अत्याचारांची चौकशी करण्यासाठी सरकारने आयोग नेमावा ; सरकारी नोकरीचा त्याग करणाऱ्यांना पुन्हा सेवेत घ्यावे ; जप्त केलेल्या जमिनी व मालमत्ता परत कराव्या, अशा अनेक मागण्या व्हाइसरॉयकडून मिळवाव्या असा सरदार पटेल व नेहरूंचा आग्रह होता. शिवाय सरदार भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांची फाशीची शिक्षा रद्द करावी, यासाठी गांधीजींनी शर्थीचे प्रयत्न करावे, असे काँग्रेसजन व युवक आग्रहाने प्रतिपादन करीत होते. या मागणीसाठी थोर क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद गुप्तपणे जवाहरलाल नेहरूंच्या घरी जाऊन भेटले होते. याउलट काँग्रेस व महात्मा गांधींच्या या मागण्या अजिबात मान्य करू नयेत असे मुंबईचा गव्हर्नर साईक्स तसेच पंजाब व संयुक्त प्रांतांचे गव्हर्नरही आयर्विनला सांगत होते. नोकरशाहीचा विरोध अत्यंत कडवाझालेला होता. पण १७ फेब्रुवारीपासून बोलणी सुरू झाली.

गांधी-आयर्विन करारानुसार सविनय कायदेभंग लढा थांबवण्यात आला, खरे तर केवळ संस्थगित करण्यात आला. राजबंदी मुक्त झाले. सर्व वटहुकूम मागे घेण्यास सरकार तयार झाले. सरदार भगतसिंग व साथींची फाशी रद्द करण्यासाठी गांधीजींनी अत्यंत शर्थीचे प्रामाणिक प्रयत्न केले. पण त्यांत यश आले नाही. याबाबतचे विवेचन पुढील प्रकरणात!

❑❑

## संदर्भ

१. पट्टाभी सीतारामय्या, **हिस्टरी ऑफ द इंडियन नॅशनल काँग्रेस,** खंड एक, पृ. ३४७.
२. **सिलेक्टेड वर्क्स ऑफ जवाहरलाल नेहरू,** खंड चार, पृ. १९२-९८.
३. ज्युडिथ ब्राऊन, **गांधी अँड सिव्हिल डिसओबिडिअन्स**, १९७७, पृ. ९०-९१.
४. **महात्मा गांधी यांचे संकलित वाङ्मय,** खंड बेचाळीस, गॅझेटिअर विभाग, पृ. ४३४-३५.
५. फोर्टनाईटली रिपोर्ट ऑफ बाँबे पोलीस कमिशनर, फेब्रुवारी १९३०, होम पोलिटिकल (आय), फाईल १८/तीन, १९३०.
६. के. के. चौधरी (संपा.), **सोर्स मटेरिअल**, खंड अकरा, उपरोक्त, पृ. ६-११.
७. **महात्मा गांधी यांचे संकलित वाङ्मय,** खंड त्रेचाळीस, पृ. ५.
८. हिंदुस्तान सरकार, होम पोलिटिकल, फाईल क्र. २५७/ आठ, १९३०.
९. चौधरी, **हिस्टरी ऑफ बाँबे,** पृ. १९०.
१०. मुंबईच्या पोलीस कमिशनरचा गृह सचिवास अहवाल, ८ एप्रिल १९३०.
११. कित्ता, ९, ११, १४, १५ एप्रिल १९३० चे दैनिक पोलीस अहवाल.
१२. ब्राऊन, उपरोक्त, पृ. १०८.
१३. जवाहरलाल नेहरू, **ॲन ऑटोबायोग्राफी,** पृ. २१०.
१४. सुमित सरकार, **मॉडर्न इंडिया,** पृ. २८७.
१५. कित्ता, पृ. २८७-८८.
१६. चौधरी, **क्रांतिपर्व : महाराष्ट्राचे योगदान,** मुंबई, २०१३, पृ. ७१-७२, १३८.
१७. एम. के. गांधी, **मॉडर्न रिव्हू,** जून १९३०.
१८. नेहरू, उपरोक्त, पृ. २१२-१५.
१९. ब्राऊन, उपरोक्त, पृ. ९४-९६.
२०. होम पोलिटिकल, फाईल क्र. २५७/आठ, १९३०, उपरोक्त.
२१. ब्राऊन, उपरोक्त, पृ. १०९, ११६-१७.
२२. मुंबईच्या पोलीस कमिशनरचा गृह सचिवास दैनिक अहवाल, २२ व २८ एप्रिल १९३०.
२३. चौधरी, **ग्रेटर बाँबे गॅझेटिअर,** खंड दोन, पृ. ३५.
२४. चौधरी, **हिस्टरी ऑफ बाँबे,** पृ. १९६.

२५. **बॉंबे कॉंग्रेस बुलेटिन**, ३ जून १९३०.

२६. चौधरी, **हिस्टरी ऑफ बॉंबे,** पृ. १९२-९६.

२७. एच. जी. हेग यांचे हॉटसनला पत्र, २५ मे १९३०, होम पोलिटिकल फाईल क्र. २५७/पाच, १९३०, हिंदुस्तान सरकार.

२८. गव्हर्नर साईक्सचे व्हाइसरॉय आयर्विनला पत्र, २१ मे १९३०.

२९. आर. सी. मजुमदार, **हिस्टरी ऑफ फ्रीडम मुव्हमेंट इन इंडिया,** खंड तीन, १९६३, पृ. ३५८-५९.

३०. हिंदुस्तान सरकार, होम पोलिटिकल फाईल क्र. २५७/पाच, १९३०.

३१. **कॉंग्रेस बुलेटिन,** १३ मे १९३०.

३२. मुंबई सरकार, होम पोलिटिकल स्पेशल ब्रॅंच फाईल क्र. ७५०(१४), बी. ए. मॅकायचे पत्र.

३३. कित्ता, नाईटचे गृह सचिवास पत्र, ८ मे १९३०.

३४. कित्ता, गृह विभागाची तार, १२ मे १९३०, मॅकायचे टिपण, ११ मे १९३०.

३५. कित्ता, मॅकायचे टिपण, १४ मे १९३०.

३६. य. दि. फडके, **विसाव्या शतकातील महाराष्ट्र,** खंड ४, पृ. ६४-६६.

३७. चौधरी, **महाराष्ट्र अँड इंडियन फ्रीडम स्ट्रगल,** पृ. ८९-९१.

३८. कित्ता, पृ. ८३-८५.

३९. कित्ता, पृ. ८८-८९.

४०. ठाणे जिल्हा स्वातंत्र्य समिती, **ठाणे जिल्हा स्वातंत्र्य आंदोलन १८५७–१९४७,** १९८५, पृ. ९.

४१. मुंबई सरकार, होम पोल. (स्पेशल), १९ जानेवारी १९३१ चा अहवाल.

४२. चौधरी, **रायगड गॅझेटिअर,** १९९३ पृ. १६९-७५.

४३. उप विभागीय दंडाधिकाऱ्याचा कुलाबा जिल्हा दंडाधिकाऱ्यास अहवाल, १३ ऑक्टोबर १९३०. सरकारी अहवालातील सात हुतात्म्यांची नावे :—रघुनाथ मोरेश्वर न्हावी, आनंदा माया पाटील, धाकू गवत्या फोफेरकर, परशुराम रामा, आलू बेमट्या म्हात्रे, रामा बामा व हसुराम बुधाजी. नंतर महाराष्ट्र शासनाने या यादीत काही नावांची भर घातली. (पाहा :—**रायगड गॅझेटिअर,** डॉ. चौधरी)

४४. **बॉंबे क्रॉनिकल,** २४ ऑक्टोबर १९३०.

४५. कित्ता, ७ जानेवारी १९३१.

४६. **फ्री प्रेस जर्नल,** २८ नोव्हेंबर १९३१.

४७. कुलाबा जिल्हा दंडाधिकाऱ्याचा आदेश, ४ जून १९३२.
४८. चौधरी (संपा.), **सोर्स मटेरिअल,** खंड अकरा, १९९०, उपरोक्त, पृ. ४२३, ५४९, ७२३, ७४७, ७६९.
४९. चौधरी, **"आधुनिक काळ", सातारा गॅझेटिअर,** १९९९, पृ. १९६-९८.
५०. महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस समिती, **कायदेभंगाचा इतिहास,** पुणे, पृ. ९६.
५१. कित्ता, पृ. १०१, १०५.
५२. बॉं. प्रे. पोलीस ॲबस्ट्रॅक्ट ऑफ इंटेलिजंस, १३ सप्टेंबर १९३०.
५३. ब्राऊन, उपरोक्त, २१ मे १९३० व ४ जुलै १९३० ची पत्रे, पृ. १२२, १३६.
५४. फडके, उपरोक्त, पृ. ७४-७६.
५५. चौधरी, **वर्धा गॅझेटिअर,** १९९२, पृ. ७४-७६.
५६. द्वारकाप्रसाद मिश्रा (संपा.), **हिस्टरी ऑफ फ्रीडम मुव्हमेंट इन मध्यप्रदेश,** नागपूर, १९५६, मध्यप्रदेश शासन प्रकाशन, पृ. ३८८-८९.
५७. गोपाळ राजाराम वाळुंजकर, ग्रामसेवा मंडळाचा इतिहास, हस्तलिखित.
५८. कित्ता.
५९. मिलिटरी अँड पोलिटिकल डिपार्टमेंट, फाईल क्र. सीडीएम/१९३०, राष्ट्रीय अभिलेखागार.
६०. गव्हर्नरांची सिमल्यातील परिषद, २३ जुलै १९३०, (राष्ट्रीय अभिलेखागार).
६१. चौधरी, **महाराष्ट्र अँड इंडियन फ्रीडम स्ट्रगल,** पृ. ९१-९३.
६२. कृ. आ. शेटे, **"आधुनिक काळ",** नागपूर गॅझेटिअर, भाग १, २००५, पृ. २२२-२६.
६३. ब्राऊन, उपरोक्त, पृ. १२४.
६४. कमिशनर ऑफ पोलिसचा मुंबई सरकारला अहवाल, १२ एप्रिल १९३०.
६५. एच. जी. हेगची टिपणी, १३ जून १९३०, होम पोलिटिकल (आय.), फाईल क्र. २५७/पाच, १९३०.
६६. एस. गोपाल, **जवाहरलाल नेहरू ; अ बायोग्राफी,** खंड एक, मुंबई, १९७६, पृ. १४६.

प्रकरण १२

## आंदोलनातील मध्यन्तर

### विरामसंधीनंतरची अशांतता

ब्रिटिश रॉयल अभिलेखागारांतील अतिगोपनीय दस्तऐवजांमधून व्हाइसरॉय आयर्विन तसेच बादशहा पंचम जॉर्ज यांचे खरेखुरे कलोनिअल अंतरंग व कलुषित मने तर दिसतातच. पण त्याचबरोबर त्यांची शृंगापत्ती आणि आत्मवंचनाही स्पष्ट दिसते. सविनय कायदेभंगामुळे हे दोघे व पुढील व्हाइसरॉय लॉर्ड विलिंग्डन आपत्तीच्या शृंगांमध्ये सापडले होते. एका बाजूने साम्राज्यशाहीचा अहंगंड तर दुसऱ्या बाजूने द्विधा मनःस्थिती ! ते दिवास्वप्न पाहण्यातही दंग होते. पेशावरमध्ये काँग्रेसचे प्रतिसरकार स्थापन होऊन इंग्रजांची राजवट निष्प्रभ झाली होती. इंग्रजांना पराभव पत्करावा लागला होता. त्यामुळे आयर्विन यांचा मुखभंग झाला ! त्यांना पंचम जॉर्जला कबुली कळवावी लागली की, “वायव्य सहरद्द प्रांतातील कायदेभंग लढा मुळमुळीत होईल, हा आधीचा समज चुकीचा ठरला. आमचा भ्रमनिरास झाला! त्यामुळे गांधींना अटक करणे अपरिहार्य झाले.” पठाणिस्तान व मुंबई इलाख्यातही भयंकर चिंताजनक स्थिती उद्‌भवली, हे कबूल करावे लागले. पेशावरवरील हुकमत परत मिळविण्यासाठी ब्रिटिशांना गुरखा रेजिमेंटला तैनात करावे लागले. काँग्रेसच्या पठाणांनी सैनिकांच्या बंदुका हिसकून घेतल्या होत्या. सरकारला प्रचंड हानी सोसावी लागली. अगदी जुलै १९३० पर्यंत सत्याग्रहींवर तोफांचा भडीमार आणि विमानांमधून बाँबचा वर्षाव करावा लागला होता.

वस्तुतः लॉर्ड आयर्विन आत्मप्रौढी व अहंमन्यता असलेले सत्ताधीश होते. पण त्यांना बादशहास कबुली द्यावी लागली, “The Bombay Presidency has been in great part sweft off its feet by Gandhi’s personal appeal. In parts of Gujarat the situation is difficult and the officers of Government have been having a very difficult time.” सायमन आयोगाने

मुसलमानांवर अनुग्रह केल्याकारणाने हिंदू लोक मुसलमानांवर हल्ले करतील, अशी आशा आयर्विन बाळगत होते. तथापि त्यांचा भ्रमनिरास झाला. दंगे झाले नाहीत.[१]

गोलमेज परिषदेत सायमनच्या अहवालांच्या आधारेच चर्चा व्हावी, असे आयर्विन यांनी बादशहाला सुचविले.[२] तथापि ते शक्य झाले नाही. हे महोदय दिवास्वप्न बघत होते की, मुंबईतील व्यापारी व भांडवलदार आंदोलन थांबविण्यास व शांतता प्रस्थापित करण्यास गांधींना भाग पाडतील. तसेच आंदोलनासाठी पैसा देणार नाहीत. त्याचप्रमाणे श्रीनिवास शास्त्री व सप्रू हेही गांधींवर दबाव टाकतील अशी त्यांना आशा होती. तथापि आपली आशा व इच्छा व्यर्थ ठरल्याचे आयर्विनला ५ फेब्रुवारी १९३१ रोजी पंचम जॉर्जला कळवावे लागले.[३]

विरामसंधी झाला, पण फलप्राप्ती नाही! आणि शांतताही नाही! पंधरा दिवसांच्या वाटाघाटीनंतर रात्री दोन वाजता महात्मा गांधींशी झालेला विरामसंधी म्हणजे तात्पुरता समेट होता. खऱ्या अर्थी ते सविनय कायदेभंग आंदोलनातील मध्यन्तर होते. विरामसंधीतील गाढ संदिग्धपणा आणि मोघम कलमे व लाहोर व बंगालमधील क्रांतिकारकांना सर्वक्षमा मिळविण्यात गांधीजींना आलेले अपयश आणि निकराने लढविलेल्या कायदेभंग लढ्याची अपुरी फलप्राप्ती यामुळे बरेच काँग्रेस पुढारी व कार्यकर्ते नाराज झाले होते. आघाडीच्या युवकांना हा विरामसंधी म्हणजे फसवणूक व आत्मवंचना वाटली. बूर्झ्वा वर्गाच्या प्रभावामुळे गांधीजींना शांतता करार करावा लागला, असे युसुफ मेहेरअलींसारखे डावे युवक पुढारी म्हणत.

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाच्या इतिहासातील एक कोडे असलेला हा करार सकृतदर्शनी देशप्रेमींना अप्रिय झाला, तरी तो अपरिहार्य होता हे ध्यानात ठेवावे. कोणतेही राष्ट्रव्यापी जनआंदोलन तीव्र स्वरूपात प्रदीर्घ काळ टिकू शकत नाही. जनमानसाची जाणीव असलेल्या गांधीजींनाही करारातील उणिवा दिसत होत्या. संपूर्ण स्वातंत्र्याच्या असंदिग्ध मागणीपासून ते ढळलेले नव्हते. तथापि लोकांच्या शक्तीवर व त्यागावर लढा चालवायचा असल्याने, त्यांना तात्पुरता विराम घेणे

अपरिहार्य वाटत होते. करारानंतर सात आठवड्यांनी भरलेल्या कराची काँग्रेसने हा करार एकमताने मंजूर केला तो उगीच नव्हे. आंदोलनामध्ये मध्यन्तराची आवश्यकता होती.

या ‘ दिल्ली कराराच्या ’ यशापयशाचे आगामी आंदोलनावर दूरगामी परिणाम पडल्यामुळे इथे काही मुद्यांवर प्रकाश टाकावा लागतो. जवाहरलालजींनी आत्मकथेत लिहिल्याप्रमाणे ‘ खबरदारी घेण्याच्या बंधनांविषयीचे करारातील दुसरे कलम ’ त्यांना धक्कादायक वाटले होते. “ काँग्रेसचे संपूर्ण स्वातंत्र्याचे ध्येय बाधित झाले. लाहोरचा संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव आणि २६ जानेवारीची स्वातंत्र्याची प्रतिज्ञा यांचे काय! तसेच वर्षभर लोक इतक्या शर्थीने लढले, हालअपेष्टा भोगल्या, त्यांचे हेच फलित काय ? ” नेहरूंना टी. एस. इलिअटच्या ओळी आठवल्या :— “ This is the way the world ends. Not with a bang but with a whimper. ”

“ आम्ही जोरदार दणका मारून प्रारंभ केला, पण केवळ कुरकुर करून शेवट केला.” तथापि नेहरू विरामसंधीला विरोध करण्यास तयार नव्हते. हा संधी काळ काँग्रेसने आपली हानी भरून काढण्यासाठी आणि सामर्थ्य वृद्धिंगत करण्याच्या कामी लावावा असा नेहरूंनी पवित्रा घेतला.[४] महात्माजींची सत्याग्रहाची रणनीती नेहरूंपेक्षा अधिक तर्कशुद्ध व वस्तुनिष्ठ होती. करारानुसार काँग्रेसने शेतीचा खंड व शेतसारा बंदीची मोहीम प्रलंबित ठेवायची होती. तरीही भूधारकांनी व कुळांनी आर्थिक हाल सोसून खंड अथवा शेतसारा देऊ नये, असे नेहरूंनी जाहीर केले. ज्या शेतकऱ्यांना देणे शक्य आहे त्यांनीच खंड वा कर द्यावे, असे त्यांनी घोषित केले. तसेच प्रांतिक काँग्रेस समित्यांनी आगामी आंदोलनासाठी भक्कम शक्तिसाधना करून विनाविलंब तयारी सुरू करावी, असे परिपत्रक नेहरूंनी निर्गमित केले. त्याबरोबर शहरांप्रमाणे ग्रामीण भागातही संघटना-बांधणीचे काम वेगात सुरू झाले.[५]

जहाल युवकांप्रमाणेच, कारावासात असलेल्या सुभाष बोस यांना व्हाइसरॉयशी वाटाघाटी करण्याची कल्पना मुळातच पसंत नव्हती. ८ मार्च १९३१ रोजी सुटल्यावर ते गांधीजींना मुंबईत येऊन भेटले आणि करारामुळे वाटलेली निराशा

त्यांनी गांधीजींना सांगितली व काही आश्वासने मिळवली. नंतर ते दोघे बरोबर दिल्लीला गेले. सरदार भगतसिंग, राजगुरू व सुखदेव या क्रांतिकारकांची फाशीची शिक्षा सरकार रद्द करण्यास तयार नसेल तर आयर्विनशी झालेला करार रद्द करावा, अशी सुभाष बाबूंची सूचना होती.

मुंबई यूथ लीग व विद्यार्थ्यांच्या सर्व संघटना तसेच र. के. खाडिलकर, एस. एम. जोशी, ना. ग. गोरे यांची पुणे यूथ लीग यांनाही हा करार प्रारंभी तरी मुळीच आवडला नाही. आंदोलन संस्थगित करून केलेला विरामसंधी नौजवान भारत सभा, बंगाल यूथ लीग तसेच दिल्ली, संयुक्त प्रांत आणि आसाममधील बहुतेक सर्व युवा संघटनांना पसंत नव्हता. विशेषतः कामगार व शेतकरी पक्ष आणि कम्युनिस्ट युवक प्रक्षुब्ध झाले. त्या पक्षांच्या संघटना व काँग्रेस स्वयंसेवक यांच्यात ठिकठिकाणी चकमकी झाल्या. डाव्या विचारसरणीचे युवक काँग्रेसच्या व्यासपीठांवर चढून लालबावटा फडकवण्याचा प्रयत्न करीत. कामगार नेते बी. टी. रणदिवे व गणपतराव कांदळकर गांधीजींवर टीका करीत. मीरत खटल्यातील कम्युनिस्टांना मुक्त करण्यात गांधीजी अपयशी झाले म्हणून ते रागावलेले होते.[६]

**भगतसिंग यांना वाचवण्यात अपयश :—** लाहोर कटाच्या खटल्यात वटहुकमाखाली सरकारने नेमलेल्या खास ट्रिब्युनलने सरदार भगतसिंग व क्रांतिकारकांना ‘संक्षिप्त न्याय पद्धतीने’ फाशीची शिक्षा ठोठावलेली होती. व्हाइसरॉय आयर्विनशी वाटाघाटी करताना गांधीजींनी सर्व शक्ती पणाला लावून क्रांतिकारकांचे प्राण वाचवावे, अशी राष्ट्राची आग्रहाची मागणी होती. जहाल विचारप्रणालीच्या युवा संघटनांची मागणी आणखीच जहाल होती. त्यांच्या मते गांधीजींनी हा राष्ट्रीय प्रतिष्ठेचा व आत्मप्रतिष्ठेचा विषय मानून व्हाइसरॉयला मागणी मान्य करायला भाग पाडावे. सविनय कायदेभंग लढा अत्यंत निकराने लढवला गेल्यामुळे आणि त्यात गांधीजींचे राजकीय सामर्थ्य सिद्ध झाल्याकारणाने त्यांची ही मागणी व्हाइसरॉयला मान्य करावीच लागेल अशी यामागील धारणा होती. हे एक गृहीतक होते. ही मागणी निर्विवादपणे योग्य व आवश्यक होती. महात्माजींनाही ती मान्य होती. पण प्रश्न होता गृहीतकाचा!

थोर क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद तेव्हा भूमिगत होते. मात्र ते जवाहरलाल नेहरूंना गुप्तपणे घरी जाऊन भेटले आणि त्यांनी नेहरूंना आश्वासन दिले होते की, " भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांना महात्माजींनी मुक्त केल्यास आम्ही क्रांतिकारक गांधीजींच्याच विचारप्रणालीअनुसार स्वातंत्र्यासाठी लढू. काहीही करा पण त्यांचे प्राण वाचवा." आझादांनी नेहरूंना स्पष्ट सांगितले की, " दहशतवादाने व शस्त्राचाराने देशाचे कल्याण होणार नाही व दहशतवाद अगदी व्यर्थ आहे अशी आमच्या साथीदारांची आता पूर्ण खात्री पटलेली आहे. " " पुढील काळात दणकेबाज संघर्ष करावा लागेल. पण तो लढा म्हणजे दहशतवाद नसेल. हिंदुस्तानच्या स्वातंत्र्यलढ्यात आता दहशतवादाला स्थान उरलेलेच नाही, " याविषयी चंद्रशेखर आझादांच्या मनात आता शंका राहिली नव्हती. शिवाय त्याआधीच्या काही दिवसांतील हिंसक कृत्ये त्यांना केवळ आत्मसंरक्षणासाठी करावी लागली होती, असेही त्यांनी कबूल केले. त्यांच्या प्रतिपादनाचे प्रत्यंतर लवकरच आले. संघटित कार्यपद्धती या दृष्टीने दहशतवाद जवळजवळ नामशेष झाला होता. स्वतः भगतसिंग यांनाही हिंसाचार हा मार्ग व्यर्थ असल्याचे पटलेच होते.[७]

सरदार भगतसिंग यांचे गांधीजींशी मतभेद झाले, हे खरे. तथापि भगतसिंगांच्या अखेरच्या जीवनकाळात त्यांच्या विचारसरणीत विलक्षण परिवर्तन झाले होते. याविषयी सुप्रसिद्ध विचारवंत इतिहासकार बिपन चंद्रा यांनी भगतसिंग यांच्या डायऱ्या, भाषणे व निवेदनांमधून संशोधन करून त्या क्रांतिकारकाच्या विचारप्रणालीचा नव्याने अर्थ लावला आहे. भगतसिंग आणखी थोडे जगले असते, तर ते खरेखुरे गांधीवादी-मार्क्सवादी झाले असते. आधीपासून ते मार्क्सवादी होतेच. त्यांनी मार्क्सवादाचा सखोल अभ्यास केला होता. पण नंतर त्यांना महात्मा गांधींचा सविनय कायदेभंगाचा लढा आणि सर्वोदयाचे तत्त्वज्ञानदेखील आकर्षक वाटू लागले. यातून बिपन चंद्रा यांनी निष्कर्ष काढला की, सरदार भगतसिंग जगले असते तर ते गांधीवादी-मार्क्सवादी झाले असते. देशासाठी हे चांगले झाले असते.

चंद्रशेखर आझादांच्या या भेटीचा वृत्तान्त नेहरूंनी गांधीजींना कथन केलाच असणार. कारण नेहरूंना भगतसिंग व क्रांतिकारकांविषयी आदर वाटत होता. त्यांना जीवदान मिळावे हे गांधीजींनाही मनापासून वाटत होते.

**सरदार भगतसिंग व क्रांतिकारकांच्या फाशीची सजा रद्द करण्यासाठी गांधीजींनी कसोशीने सर्व उचित प्रयत्न केले हे सरकारी अभिलेख व विश्वसनीय पुराव्यांवरून स्पष्ट दिसते.** अनेक विषयांवर गांधीजींशी तीव्र मतभेद असलेल्या सुभाषचंद्र बोस यांनीही आत्मचरित्रात स्पष्टपणे कबूल केलेले आहेच की, गांधीजींनी त्यासाठी शक्य तितके प्रयत्न केले.[८]

गांधीजींना पूर्ण जाणीव होती की, या कामी अपयश आल्यास देशात असंतोष माजेल ; शिवाय लवकरच भरावयाच्या कराची काँग्रेसमध्ये विरामसंधीला सर्वसंमती मिळण्यात अडचणी येतील. म्हणूनही क्रांतिकारकांच्या शिक्षा माफ करण्यासाठी त्यांनी आयर्विन आणि गृहमंत्री इमर्सन यांना विनविले. या प्रकरणी त्यांनी पुष्कळ वकिली केली. फाशीची सजा रद्द करणे शक्यच नसेल तर ती सौम्य करून जन्मपेठेची करावी असाही पर्याय पुढे ठेवला. पण व्हाइसरॉय बधला नाही. यानंतर १९ फेब्रुवारीला गांधीजींनी इमर्सनशी या आणि संबंधित विषयांवर तीन तास वाटाघाटी केल्या. तसेच त्याच दिवशी व्हाइसरॉयला पुन्हा कळकळीची विनंती केली की, फाशीची शिक्षा रद्द करणे अथवा सौम्य करणे शक्य नसेल, तर सरदार भगतसिंग व त्यांच्या साथींची फाशीची सजा काही दिवस तरी प्रलंबित ठेवावी. तथापि राजकीय कारणास्तव तसे करणे अनुचित असून त्यातून वेगळा व चुकीचा संदेश जाईल, असे साम्राज्यवादी व्हाइसरॉयने गांधीजींना उत्तर दिले.[९] पंजाब, संयुक्त प्रांत, बंगाल आणि मुंबई इलाख्यांचे गव्हर्नर आणि गौरकाय नोकरशाहीची इच्छा व्हाइसरॉय अव्हेरू शकत नव्हता. पंजाबचा गव्हर्नर याबाबत कमालीचा आग्रही होता.

भगतसिंग यांना वाचविण्याचा अखेरचा प्रयत्न म्हणून गांधीजींनी आयर्विनला भावनिक अपील केले ते पुढील शब्दांत :—“Since you seem to value my influence such as it is in favour of peace, do not please unnecessarily make my position, difficult as it is, almost too difficult for future work ”.[१०]

सरदार भगतसिंग यांचे चरित्रकार आणि क्रांतिकारक शचींद्रनाथ संन्याल तसेच भूपेंद्रनाथ यांनीही याबाबत निर्वाळा दिला आहे. शिवाय क्रांतिकार्यासाठी दीर्घ काळ कारावास भोगलेले जितेंद्रनाथ संन्याल यांनीही लिहून ठेवलेले आहे की, **भगतसिंग व साथींच्या सुटकेसाठी गांधीजींनी प्रामाणिक प्रयत्न केले. पण ते लोकांना माहीत नाही.**[११] इतके निर्विवाद सत्य आहे की, हिंदुस्तानातील विविध हितसंबंध असलेल्या गटांच्या आणि पक्षांच्या गांधीजींकडून अनेक प्रकारच्या अपेक्षा होत्या. अनेक वेळा त्या अपेक्षा परस्परविरोधी असायच्या. त्या पूर्ण करणे त्यांना बऱ्याच वेळा शक्य होत नसे. शिवाय त्यांचे निंदक अपप्रचार करीतच असत.

२३ मार्च १९३१ रोजी भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना लाहोर जेलमध्ये फाशी दिली. आणि लगेच कराची कॉंग्रेससाठी गांधीजींना २५ मार्चला कराचीत हजर व्हावे लागले. रेल्वे स्टेशनपासून त्यांच्या निवासस्थानापर्यंत त्यांना काळे झेंडे दाखवण्यात आले आणि घोषणाही झाल्या. तथापि त्यापलीकडे जाऊन नौजवान भारत सभेच्या कराची शाखेचे काही सभासद महात्मा गांधींच्या कुटीसमोर जाऊन तारस्वरात ' गांधी बाहेर या ', असे ओरडू लागले. त्यांचा आरडाओरडा ऐकून गांधी बाहेर आलेही. एका युवकाने त्यांना मारण्यासाठी लाठी उगारली होतीच. परंतु जवाहरलाल नेहरूंनी गांधीजींना वाचवले.

दिल्ली करार करताना इंग्रजांनी लाटलेल्या फायद्यांवर तसेच गांधीजींवर सुभाषबाबू भेदक (ट्रेंचन्ट) टीका करत होते. पण त्याचबरोबर सुभाषबाबू ठामपणे बजावत होतेच की, कराराच्या विरोधकांपैकी कोणीही गांधीजींपेक्षा अधिक लाभ मिळवू शकलाच नसता. कराराच्या कारणावरून कॉंग्रेसवर बहिष्कार घालण्याची बेजबाबदार वल्गना करणाऱ्यांना सुभाषचंद्रांनी सुनावले की, कॉंग्रेसमध्ये फूट पाडल्याने बाजू बळकट होईल फक्त ब्रिटिशांची! नौजवान भारत सभेच्या अविचाराकडे नेताजींचा रोख होता. अखिल भारतीय नौजवान भारत सभेच्या बैठकीत नेताजींनी सभेच्या पुढाऱ्यांना सुनावले की, बहिष्कार घालण्यापेक्षा कॉंग्रेसमध्ये आपला प्रभाव वाढवा आणि संघटना ताब्यात घ्या. त्या दिवसांमध्ये

महात्मा गांधी लोकप्रियतेच्या अत्युच्च शिखरावर होते. म्हणून त्यांना विरोध करणे केवळ व्यर्थच नव्हे तर आत्मघातकी ठरेल, अशी सुभाषबाबूंची ठाम खात्री पटलेली होती. शिवाय गांधीजींना विरोध करणे हे राष्ट्रहिताला मारक ठरेल असे त्यांना वाटत होते.[१२]

आघाडीचे युवा नेते युसुफ मेहेरअली यांनीही या करारावर प्रथम घणाघाती टीका केली. आम जनतेच्या त्यागाचा आणि श्रमाचा भांडवलदारांनी स्वार्थासाठी उपयोग करून घेतला व अखेरीस ते साम्राज्यशाहीच्या गोटात कसे जाऊन बसले, यावर त्यांनी कोरडे ओढले. परंतु त्यांच्या टीकेचा रोख गांधीजींकडे नसून बिर्ला, पुरषोत्तमदास ठाकूरदास, वालचंद हिराचंद, लालजी नारायणजी वगैरे भांडवलदार व वसाहतवादी इंग्रजांवरच होता. मुंबई व पुण्यातील यूथ लीग यांची धारणा झालेली होती की, दिल्ली कराराबाबत व्हाइसरॉयची बोलणी चालू असताना हे भांडवलदार गांधीजींच्या संपर्कात होते.

## विरामसंधीची फलश्रुती

राष्ट्रव्यापी जनआंदोलन या दृष्टीने सविनय कायदेभंगास अभूतपूर्व जनाधार लाभला होता. सत्याग्रहाच्या आचारविचार प्रणालीच्या निकषांवर लढा यशस्वी झाला होता. पाश्चात्त्य जगानेही या आंदोलनाकडे मोठ्या उत्कंठेने पाहिले होते. नव्वद हजारांवर स्वयंसेवक कारावासात गेले होते. तुरुंगांमध्ये पुरेशी जागा नसल्यामुळे काही लाख स्वयंसेवकांना फटके मारून सोडून देण्यात आले होते. शेतकऱ्यांची कित्येक हजार एकर शेतजमीन सरकारने अभिहरण करून दुसऱ्यांना विकून टाकली. काँग्रेसजनांनी इतका प्रचंड त्याग करूनही दिल्ली कराराच्या रूपाने निराशाच पदरी पडली.

तथापि सविनय कायदेभंगाची निश्चित गुणवत्ता अशी होती की, या आंदोलनाचा भौगोलिक विस्तार वायव्येकडील पेशावर व कोहटपासून पूर्वेकडे ढाका व चित्तगावच्या ग्रामीण भागापर्यंत आणि उत्तरेतील बारामुल्ला व श्रीनगरपासून कन्याकुमारीपर्यंत पसरला होता. महाराष्ट्रातील डांग वगैरे भागातील निरक्षर आदिवासीदेखील आंदोलनात सहभागी होते. एरव्ही काँग्रेस अधिवेशनांमध्ये केवळ

मिरवणाऱ्या अथवा काँग्रेसविषयी जिव्हाळा नसलेल्या स्वयंघोषित राष्ट्रभक्तांनीही निर्वाळा दिला की, मुंबई महानगर आणि गुजरातच्या बाहेरदेखील हे फार मोठे जनआंदोलन होते. विविध स्तरांतील सामाजिक गट या आंदोलनात ओढले गेले. विशेष म्हणजे सविनय कायदेभंगाने राजकीय जाणिवांचे विविध स्तर निर्माण केले आणि दोन पिढ्यांमध्ये प्रथमच एकात्मीकरण केले. १९२०-१९२२ च्या चळवळीत सरकारमान्य शिक्षणसंस्थांवर बहिष्कार घालण्याचा कार्यक्रम होता. १९३० सालात तसा कार्यक्रम नसूनही विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सरकारी शिक्षणावर बहिष्कार घातला. वरील प्रकरणात म्हटल्याप्रमाणे विदर्भातील बहुतांश शाळा व महाविद्यालये ओस पाडली होती. बंदीवानांची आकडेवारी आणि सरकारी अहवालांवरून विद्यार्थी वर्गाच्या १९३० मधील सहभागाचे प्रत्यंतर येते. इंग्लंडमधून आयात केलेले कापड निम्म्यावर घसरले व इंग्रजांना फटका बसला.

जनआंदोलनाबाबत आस्था नसलेल्या विरोधी तेजबहादूर सप्रू साहेबांनी व्हाइसरॉय आर्यविनला १९ सप्टेंबर १९३० रोजी पत्र लिहून स्पष्ट कबुली दिली, “माझ्या व्यक्तिगत अनुभवामुळे मला आंदोलनाविषयीची माझी स्वतःची मते बदलणे आवश्यक झाले आहे. निःसंशयपणे काँग्रेसने लोकमतावर जबरदस्त प्रभाव प्रस्थापित केला आहे..... स्वतःच्या डोळ्यांनी मी निदर्शने पाहिली आणि माझ्या कानांनी काँग्रेसच्या घोषणा ऐकल्या. लोकमत कमालीचे प्रक्षोभित झालेले आहे. काँग्रेसजन व स्वयंसेवक सभा व संमेलनांव्यतिरिक्त दररोज आगगाड्यांमध्येही भाषणे देतात आणि अविरतपणे प्रचार करतात. त्यामुळे अपूर्व लोकजागृती होऊन लोक सरकारविरुद्ध पेटलेले आहे. त्यांची उक्ती वा कृती सर्वांना समजते असे नाही. तथापि मला संशयातीत सत्य वाटते की, जनमानसात सरकार आणि सरकारी धोरणांविरुद्ध कमालीचा तीव्र असंतोष पसरला आहे.”[१३] आंदोलनाचे हे मूल्यमापन स्वयंस्पष्ट असल्याने त्यावर भाष्य करण्याची गरज नाही. हा लढा बहुतांश सर्वसमावेशक आणि सर्वस्पर्शी झाला होता.

काँग्रेस कार्यकारी समितीला कारागृहांतून मुक्त केल्यावर जानेवारी १९३१ च्या अखेरीस मध्यवर्ती सरकारने राजकीय परिस्थितीचे मूल्यमापन करण्याचे ठरविले.

काँग्रेसच्या दृष्टिकोणातून जसा तात्पुरता युद्धविराम झाला होता, तसाच सरकारच्या बाजूनेही विरामामुळे नोकरशाही व विशेषतः पोलिसांवरील ताण बराच कमी झाला होता. त्या मंडळींना रजा उपभोगता आली नव्हती. म्हणून व्हाइसरॉय युद्धविराम करून वाटाघाटी करण्यास गांधीजींपेक्षा अधिक उत्सुक होता. असो. जानेवारीच्या अखेरीस मध्यवर्ती गृह विभागाने सर्व प्रांतिक सरकारांकडे विचारणा केली की, काँग्रेसने सविनय कायदेभंग "संस्थगित केल्यावर काँग्रेस पक्ष कायदेभंगाचे आंदोलन पुन्हा कितपत उभारू शकेल ; आंदोलनाचे पुनर्संघटन करण्यात काँग्रेसला किती यश मिळेल ; पुनर्संघटनास किती वेळ लागेल." वस्तुतः जेव्हा गृह विभाग ही विचारणा करून भविष्याविषयी अंदाज बांधत होता, तेव्हाही सविनय कायदेभंग दमदारपणे सुरूच होता. सरकारने काँग्रेस कार्यकारिणीला मुक्त केले इतकेच. गांधीजींशी व्हाइसरॉयला विचारविनिमय करणे शक्य व्हावे यासाठीच पुढाऱ्यांना २६ जानेवारीला सोडले होते. तथापि मुंबई व कित्येक ठिकाणी आंदोलन थांबलेले नव्हते. मात्र मध्यवर्ती गृहमंत्र्याला जाणून घ्यायचे होते की, युद्धविरामानंतर काँग्रेसने सविनय कायदेभंग पुन्हा सुरू केल्यास, त्यास तात्काळ प्रतिसाद लाभेल काय ? सरकारच्या युद्धतंत्राचा हा एक भाग होता.

याबाबत सर्वच प्रांतिक सरकारांचे स्पष्ट एकमत होते की, काँग्रेसने सविनय कायदेभंगाचे पुन्हा आवाहन करताच त्यास तात्काळ प्रतिसाद लाभेल आणि लढा अगदी पूर्ववत होईल. मुंबई प्रांतिक काँग्रेस समिती देशातील सर्वोत्तम आणि सुसंघटित काँग्रेस समिती होती. येथील काँग्रेस भवनातून संपूर्ण मुंबई इलाख्यातील आंदोलनाची सूत्रे हलविली जात. येथून प्रचार साहित्य आणि वित्तबळ पुरवले जात असे. मुंबई यूथ लीग साम्राज्यशहांशी वाटाघाटी करू नयेत असे जाहीर सभांमधून प्रतिपादन करत असे. त्यामुळे मुंबईचा गव्हर्नर साईक्स प्रारंभापासूनच गांधीजींशी करावयाच्या संकल्पित वाटाघाटींबाबत निराशावादी होता. साईक्सच्या मते "मध्यवर्ती सरकारचे समेट व दबाव ठेवण्याचे धोरण मुंबई राज्याकरिता निरुपयोगी असून, त्यामुळे येथील सरकार प्रभावहीन होईल. केंद्र सरकारने राजकीय समेट अथवा काँग्रेसला ठेचून काढण्याचा दणका यांपैकी एक पर्याय

निवडावा. " यापुढे जाऊन साईक्सने जागतिक महायुद्धकालीन भारत संरक्षण कायद्यासारख्या जालीम उपायांचीही मागणी केली.[१४]

याचा अर्थ, सरकार मध्यन्तराच्या काळात पुढील प्रतिहल्ल्यासाठी जोरदार तयारी करत होते. आंदोलनाच्या पहिल्या पर्वात आलेले अनुभव आणि राहून गेलेल्या त्रुटी लक्षात घेऊन सर्व स्तरांवरील सरकारी यंत्रणा मजबूत करण्याच्या कामी लागली. अनेक आदेश आणि वटहुकमांचे मसुदे तयार ठेवलेले होते. मध्यवर्ती सरकारच्या वटहुकमांव्यतिरिक्त प्रांतिक सरकारांनीही अतिरिक्त वटहुकूम तयार ठेवले होते. मध्यवर्ती सरकारने शांततेच्या काळातच वर्तमानपत्रांचे अभ्यवेक्षण (सेंसॉरशिप) लादले आणि पोस्टातील पत्रे फोडून वाचण्यासाठी व्यवस्था केली. म्हणूनच काँग्रेसला स्वतःची कुरिअर सेवा सुरू करावी लागली होती. मुंबई सरकार चढाईची पूर्वतयारी करीत असताना बी.पी.सी.सी. आणि शंकरराव देव, शं. द. जावडेकर, देवगिरीकर, न. वि. गाडगीळ, दास्ताने, जमनालाल बजाज, मेहेरअली वगैरे नेते आंदोलनाच्या पुनरारंभासाठी पूर्वतयारी करीतच होते. अनेक गुजराती महिला व अवंतिका गोखलेंनी देश सेविका संघ बराच मजबूत केला.

आयर्विनशी झालेल्या करारान्वये संपूर्ण स्वातंत्र्य लाभले नसले अथवा गांधीजींच्या अकरा कलमी मागण्या मंजूर झाल्या नसल्या, तरी ‘वसाहतीच्या स्वराज्याचे’ तत्त्व ब्रिटिशांना मान्य करावे लागले. ही एक फलश्रुती होतीच. त्यांपेक्षाही अधिक अर्थपूर्ण व महत्त्वाचे असे की, व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विनला भारताच्या राष्ट्रीय पुढाऱ्यास म्हणजे गांधीजींना सौजन्य आणि समानतेच्या नात्याने सन्मानाची वागणूक द्यावी लागली. राजशिष्टाचाराच्या विहित प्रथांमध्ये अशा समानतेच्या नात्यास पूर्वदाखला नव्हता! वाटाघाटींच्या संपूर्ण काळात आयर्विन साहेब गांधीजींशी सौजन्याने वागले. यास गाढ मानसिक महत्त्व होते. इतर ब्रिटिश सत्ताधीश आणि नोकरशाहीने याविरुद्ध नंतर प्रचंड निषेध व्यक्त केला. “राजद्रोही नग्न फकिराबरोबर” बादशहाच्या प्रतिनिधीने समानतेच्या पातळीवरून चर्चा केली, यामुळे साम्राज्यवादी विंस्टन चर्चिलचे ‘पित्त भयंकर खवळले होते.’

त्याने ब्रिटिश पार्लमेंटमध्ये व बाहेरही निषेध केला व आदळआपट केली. मात्र त्या ' नग्न फकिराने ' उभारलेला लढा समक्ष पाहिलेल्या आयर्विनला परिस्थितीवशात महात्मा गांधींना बरोबरीच्या नात्यानेच वागवावे लागले होते. परिणामतः इंग्लंडमधील काँझर्वेटिव पक्षाने आयर्विनच्या जागी लॉर्ड विलिंग्डन यांना स्थानापन्न केले. लवकरच सनदी नोकरशाहीनेही काँग्रेसवर सूड घेतला.

या आंदोलनाच्या गुणवत्तेचा दुसरा पुरावा हा की, सामान्य काँग्रेस कार्यकर्ता कारागृहातून सुटून आपल्या गावात विजयी मुद्रेने परत आला होता. तिथे त्याची मिरवणूक निघाली. त्याचा सत्कार करण्यात आला. १९२२ साली त्याचा भ्रमनिरास होऊन व तो निराश होऊन कारागृहातून परतला होता. मात्र १९३१ मधील ही मानसिक बाजू अर्थपूर्ण होती. त्यामुळे पुढील आंदोलनांमध्ये सामान्य जनांचा सहभाग वाढला. १९३१ मध्ये काँग्रेस संघटनेत उत्साह संचारला. यंत्रणेचा विस्तार झाला. सामान्य काँग्रेस कार्यकर्ते आणि दुसऱ्या फळीतील नेत्यांचे नीतिधैर्य उंचावले. देशासाठी कारावासात जाणे हा स्वाभिमानाचा व सामाजिक प्रतिष्ठेचा विषय बनला. विशेषतः महिला कार्यकर्त्यांचे सामाजिक स्थान उंचावले. दुर्दैवाने या आंदोलनाची आणि कराराचीही ही उज्ज्वल बाजू व वृद्धिंगत झालेले नीतिधैर्य याकडे या आंदोलनाच्या टीकाकारांनी आणि इतिहासकारांनीही दुर्लक्ष केले. **सविनय कायदेभंगाचा जनमानसावर पडलेला प्रभाव छोडो भारतच्या पर्वात उपयोगी पडला हे विसरता कामा नये.**

दुसरी अर्थपूर्ण बाब अशी की, काँग्रेस कार्यकर्त्यांचे वृद्धिंगत झालेले नीतिधैर्य व निर्माण झालेल्या राष्ट्रीय भानांमुळे आयर्विनशी केलेल्या शांतता कराराची बंधने ठिसूळ बनू लागली. जागतिक मंदीमुळे आर्थिक दुरवस्था ओढवलेली होतीच. १९३१ सालात मुंबईतील एक लाख औद्योगिक कामगार बेकार झालेले होते. त्यामुळे कामगार वर्ग आक्रमक झाला. बंगाली युवकांचा अहिंसेबाबत भ्रमनिरास होऊ लागला. महाराष्ट्रात मात्र तसे झाले नाही. १९३१ सालात बंगालमध्ये लढाऊ कारवायांची पूर्वीची सीमा ओलांडली गेली. मिदनापूर व टिपेराचे कलेक्टर आणि इतर सात ब्रिटिश अधिकाऱ्यांचे खून झाले. बंगालमध्ये

अशा ९० घटना घडल्या. शांति घोष व सुनीती चौधरी या शाळकरी मुलींनी टिपेराच्या कलेक्टराचा खून केला. क्रांतिकारी चळवळ चित्तगावच्या नागरी भागातून ग्रामीण भागात पसरली. हे परिवर्तन तेव्हापासून प्रकर्षाने जाणवले.

सरकारने दंडापाई जप्त केलेली शेते विकली होती. ती विकत घेणाऱ्यांविरुद्ध वंचित शेतकऱ्यांनी सामाजिक बहिष्कार घातला. खेडा व बार्डोलीत जोरात सुरू झालेली ही मोहीम मुंबई इलाख्यातील इतर काही गावांमध्ये पसरली. त्या वंचित शेतकऱ्यांवरील अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी गांधीजींनी नवनियुक्त व्हाइसरॉय लॉर्ड विलिंग्डन व गृहमंत्री यांना साकडे घातले. हा अन्याय दूर न केल्यास आपण गोलमेज परिषदेच्या दुसऱ्या सत्रात उपस्थित राहणार नाही, अशी गांधीजींनी धमकी दिली होती.

किसान व जमीनदार यांच्यात काँग्रेसने लवादाची भूमिका पत्करली. वायव्य सरहद्द प्रांतात अब्दुल गफार खान यांच्या खुदाई खिदमतगारांनी ब्रिटिशांपुढे मोठे आव्हान उभे करून ठेवले होते. याच काळात जम्मू व काश्मिरमध्ये शेख अब्दुल्ला व काही मुसलमान पदवीधरांनी संस्थानिकाविरुद्ध चळवळ सुरू केली. मद्रासमध्ये राजगोपालाचारी व के. कामराज तर आंध्र प्रदेशात पट्टाभी सीतारामय्या, एन. जी. रंगा वगैरेंनी कायदेभंग चळवळीचे नेतृत्व केले. के. केलप्पन यांच्या गुरूवायुर मंदिर सत्याग्रहाचा बराच प्रभाव पसरला होता. त्यातून पुढे जहाल पुढारी ए. के. गोपालन उदयास आले.[१५] ऑगस्ट ६ ते ८ रोजी भरलेल्या अ.भा.काँ. समितीने चरख्यासह नवीन तिरंगी राष्ट्रध्वज संमत केला व ३० ऑगस्ट १९३१ रोजी पहिला राष्ट्रीय ध्वजदिन साजरा केला.

## कराची काँग्रेसचे महत्त्व

नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि राष्ट्रीय आर्थिक कार्यक्रम याविषयीच्या ऐतिहासिक ठरावांकरिता कराची काँग्रेस अधिवेशन (१९३१) संस्मरणीय ठरले. काँग्रेसने तोपावेतो आर्थिक हित, नागरी स्वातंत्र्य आणि राजकीय हक्कांसाठी लढा दिला असला, तरी पक्षाने आम जनतेसाठी स्वातंत्र्याचा आशय काय असेल याची निश्चित व्याख्या प्रथमच कराचीला केली. तसेच जनतेचे शोषण कमी

करण्यासाठी राजकीय स्वातंत्र्याबरोबरच आर्थिक स्वातंत्र्यही मिळवून देणे हे ध्येय असल्याचे घोषित करण्यात आले. टी. बी. सप्रू वगैरे उजव्या व मवाळांच्या, तसेच नाराज झालेल्या डाव्यांचा व जवाहरलाल नेहरूंचा जाहीर पाठिंबा मिळविण्याकरिता गांधीजींनी आर्थिक कार्यक्रमाचा ठराव पुढे केला असा आरोप होता. मानवेंद्रनाथ रॉय यांचा या राष्ट्रीय आर्थिक कार्यक्रमाच्या ठरावात मोठा सहभाग असल्याचा नोकरशाहीला संशय होता. मात्र या दोन्ही मतांमध्ये सत्यांश नाही. वस्तुस्थिती इतकीच आहे की, **महात्मा गांधींचा पूर्वोक्त अकरा कलमी कार्यक्रम व काँग्रेसची धोरणे आणि दिल्ली करारावरील प्रतिक्रिया या पार्श्वभूमीवर शेतकरी व कामगाराभिमुख लोककल्याणाचा कार्यक्रम गांधीजींनी कराचीत घोषित केला.** त्यात समाजवादी विचारप्रणाली नव्हती. जमीनदार व भांडवलदारांना दुखवून स्वातंत्र्यलढ्याचे शत्रू वाढवून घेणे तेव्हा गांधीजींना हितकारक वाटत नव्हते. म्हणून वर्गलढ्याला उत्तेजन न देता, स्वतंत्र भारताचे सरकार 'कल्याणकारी राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न करेल', असे त्यांनी घोषित केले होते.

कामगारांच्या हितासाठी आवश्यक तरतुदी, वृद्ध व रुग्ण आणि बेकारांना संरक्षण, महिला व मुलांच्या रक्षणासाठी खास व्यवस्था, जमीनधारा पद्धती व महसूल प्रशासनात आमूलाग्र बदल, मिठावरील कर रद्द करणे, दारूबंदी, सरकारी नोकरांना ५०० रुपये इतकाच पगार, लष्करावरील खर्चात कपात, कापड उद्योगासारख्या भारतीय उद्योगांना संरक्षण, राष्ट्रीय महत्त्वाच्या उद्योगांचे राष्ट्रीयीकरण, जमीन महसुलात भरघोस कपात, शेतमजुरांना श्रमिक संघ स्थापन करण्याचा अधिकार, सावकारीवर निर्बंध, कर्जबाजारीपणाचे निराकरण, चलन विनिमय दरावर सरकारचे नियंत्रण वगैरे मागण्यांचा या ठरावात समावेश केलेला होता. यातील बहुतांश उपाययोजना अकरा कलमी कार्यक्रमातही अंतर्भूत केलेल्या होत्या.

कराची काँग्रेसमध्ये मूलभूत अधिकारांचा ऐतिहासिक ठराव प्रथमच मांडण्यात आला आणि प्रचंड बहुमताने संमत करण्यात आला. या ठरावाचे अनेक मसुदे गांधीजींशी चर्चा करूनच नेहरूंनी तयार केले होते. ३१ मार्च १९३१ रोजी खुल्या

अधिवेशनात हा ठराव स्वतः गांधीजींनी मांडला होता. **२६ जानेवारी १९५० रोजी अमलात आलेल्या भारतीय संविधानातील मूलभूत अधिकारविषयक कलमे व तरतुदींचा मूळ पाया १९३१ मधील कराचीतील ठरावानेच घातलेला आहे.** व्यक्तिस्वातंत्र्य, भाषण व वृत्तपत्र स्वातंत्र्य, कायद्यासमोर समानता, स्त्री-पुरुष समता, पंथ, जाती व धर्मनिरपेक्ष शासन, प्रौढ मताधिकार, सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण वगैरे मूलभूत अधिकार कराचीच्या सनदेतच अंतर्भूत आहेत. या अधिकारांच्या प्राप्तीसाठीच काँग्रेस १९४७ पर्यंत लढत राहिली. कराचीचे ठराव काँग्रेसच्या आगामी काळातील राजकीय आणि आर्थिक कार्यक्रमांचे मूलभूत सूत्र म्हणून कायम राहिले.

पं. मोतीलाल नेहरू, मौलाना महंमद अली, मौलवी मझरुल हक, रेवाशंकर जव्हेरी वगैरेंच्या निधनाबाबत दुखवट्याच्या ठरावानंतर, सरदार भगतसिंग, राजगुरू व सुखदेव या क्रांतिकारकांचे शौर्य आणि महान त्याग याविषयी प्रशंसा करणारा गांधीजींचा ठराव २९ मार्च १९३१ रोजीच काँग्रेसने पास केला. यानंतर गांधी-आयर्विन कराराला मंजुरी देणारा ठराव आला. वस्तुतः हा ठराव खुल्या अधिवेशनात सादर करण्यास प्रारंभी जवाहरलाल नेहरू तयार नव्हते. त्यांच्या मनात किंतु होता हे लपलेले नव्हते. तथापि ऐनवेळी उत्स्फूर्त भाषण करून त्यांनीच हा ठराव मांडला, आणि तो बहुमताने संमत झाला. यानंतर राष्ट्रीय आर्थिक कार्यक्रम व मूलभूत अधिकारांबाबतचे उपरोक्त ठराव आणि इतर ठराव संमत झाले.

कराची अधिवेशन चालू असतानाच संयुक्त प्रांत काँग्रेस समितीचे अध्यक्ष आणि नामवंत सामाजिक व राजकीय पुढारी गणेश शंकर विद्यार्थी कानपुरातील हिंदू-मुसलमान दंग्यात मारले गेले. १६६ जणांचा प्राण घेतलेल्या या भीषण दंगलीत मुसलमानांचे प्राण वाचवताना गणेश शंकर हुतात्मा झाले.

भगतसिंग व साथींना जीवदान न मिळाल्यामुळे गांधीजींवर टीका होऊनही त्यांच्या टीकाकारांनी कबूल केले की, कराचीला गांधीजींचाच अंतिम विजय

झाला. सुभाषबाबूंनी लिहून ठेवले, " Karachi was undoubtedly............ the pinnacle of the Mahatma's popularity and prestige. "[१६] म्हणूनच गोलमेज परिषदेच्या दुसऱ्या सत्रामध्ये काँग्रेसची बाजू मांडण्यासाठी पक्षातर्फे त्यांना एकट्यालाच पाठवण्याचा एकमुखी निर्णय झाला.

## महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचे पुनर्संघटन

महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस समिती न. चिं. केळकर गटाच्या ताब्यात असूनही त्या प्रस्थापितांनी प्रामाणिकपणे सत्याग्रह केला नव्हता. ही मंडळी खरे तर हिंदुमहासभेचे काम करीत. त्यामुळे संघटनेत असंतोष खदखदत होता. पुणे यूथ लीगचे पुढारी एस. एम. जोशी, ना. ग. गोरे व र. के. खाडिलकर यांना ही स्थिती साफ नापसंत होती. २२-२४ डिसेंबर १९३१ ला पुण्यात सुभाषबाबूंच्या अध्यक्षतेखाली यूथ लीगची अखिल भारतीय पातळीवरील परिषद भरली असताना याबाबत चर्चा झाली. तत्पूर्वी कराची काँग्रेससाठी एकत्र आलेल्या महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांच्या बैठकीत काँग्रेसजनांनी केळकर गटाविरुद्ध श्रेष्ठींपुढे तक्रार मांडली होती. त्यानुसार केळकर व ग. वि. केतकरांचे काँग्रेसमधून उच्चाटन करण्याचे ठरले होते. पक्ष श्रेष्ठींनी शंकरराव देव यांची काँग्रेस व गांधीजींवरील निष्ठा व स्वार्थत्याग आणि आंदोलनातील धडाडी वगैरेंचा विचार करून प्रांतिकचे अध्यक्ष म्हणून त्यांना पसंत केले. तथापि यूथ लीगचे युवक व जहालांना देवांची नेमणूक आवडण्याची शक्यता कमी होती. म्हणून महाराष्ट्राच्या अध्यक्षपदासाठी देवांऐवजी नरहर विठ्ठल गाडगीळांची उमेदवारी जाहीर केली. गाडगीळ मुंबई इलाखा यूथ लीगच्या स्थापनेपासून त्या संघटनेच्या कार्यात सहभागी होतेच. म्हणून त्यांना पुणे यूथ लीगचा पाठिंबा होता.

मात्र सात वर्षांची सजा भोगून मुळशी सत्याग्रहाचे झुंजार ' सेनापती ' पांडुरंग महादेव बापट २३ मे १९३१ रोजी सुटून आले होते. त्यांचा झुंजारपणा सर्वमान्य होता. म्हणून स्वतः गाडगीळ आणि हरिभाऊ फाटक यांनी बापटांना प्रांताध्यक्ष निवडावे अशा अर्थाचा लेख **ज्ञानप्रकाश** पत्रकात (२६ मे १९३१) लिहिला.

बापटांचे नाव प्रांतिक काँग्रेसमधील सर्वांनाच पसंत होते. त्यानुसार बापट महाराष्ट्राच्या प्रांताध्यक्ष पदावर निवडून आले (२८ जून १९३१). तथापि या पदावर ते टिकून राहिले फक्त ऑक्टोबरपर्यंतच! हा विरामसंधीचा काळ असला, तरी लोकजागृती, सभासद नोंदणी, सभा, मिरवणुका व रचनात्मक कार्यक्रम चालू होता. प्रांताध्यक्ष होताच बापटांनी नवीन सरचिटणीस सीताराम ऊर्फ भाऊ रानडे यांच्यासह महाराष्ट्राचा दौरा केला.

## अर्नेस्ट हॉटसनच्या खुनाचा प्रयत्न

मे १९३० मध्ये सोलापुरात मार्शल लॉ लागू करण्यापूर्वी आणि नंतरही ब्रिटिशांनी केलेले अविवेकी अत्याचार आणि मल्लाप्पा धनशेट्टी, कुर्बान हुसेन, श्रीकिसन सारडा व जगन्नाथ शिंदे यांना दिलेली फाशीची शिक्षा यामुळे जनमत भयंकर खवळलेले होते. सोलापूर शांत झाल्यावरही सैनिकांनी मार्शल लॉ चा दुरुपयोग करून अत्याचार केले होते. सोलापुरातील शोकांतिकेस मुंबई प्रांताचा गृहमंत्री अर्नेस्ट हॉटसन जबाबदार असल्याची महाराष्ट्रात बरेच दिवस चर्चा चालू होती. सोलापुरात लष्करी राजवटीचा अंमल जारी करण्यास त्यानेच अनुमती दिली हे लपून राहिले नव्हते. धनशेट्टी, कुर्बान हुसेन, सारडा व शिंदे यांना चटकाफटकी जानेवारी १९३१ मध्ये फाशी देण्यासाठी हॉटसनने अनुमती दिली असाही समज पसरला होता. शिवाय मुंबई शहरात सत्याग्रह करणाऱ्या निःशस्त्र देशभक्तांवर पोलिसांनी घोडेस्वार सोडून त्यांना तुडविले होते, आणि त्यांच्यावर प्रच्छन्न हल्ला केला होता. अशा व इतर अनेक अत्याचारांसाठी हॉटसनला जबाबदार धरले जात होते. वरळीच्या तात्पुरत्या कैदखान्यातील स्वातंत्र्य सैनिकांवर पोलिसांनी गोळीबार केला होता. त्याशिवाय भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव या क्रांतिकारकांना २३ मार्चला फाशी दिल्यामुळेही ब्रिटिशांवर सूड उगविण्याचे विचार अनेक जहाल युवकांच्या मनात घोळतच होते.

एका बाजूने राष्ट्रवाद जागृत झालेला तर दुसऱ्या बाजूने सरकार दडपशाही करत होते. त्यामुळे जनमत खवळले व सूड घेण्याची मनःस्थिती पसरली. याच वातावरणात वासुदेव बळवंत गोगटे हा पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजातील २०

वर्षांचा विद्यार्थी प्रभारी गव्हर्नर अर्नेस्ट हॉटसनचा खून करण्याच्या भावनेने पेटला. या वेळी गव्हर्नर साईक्स निवृत्त होऊन इंग्लंडला परत गेल्यामुळे गृहमंत्री हॉटसन प्रभारी होता. गोगटेने हैदराबादमधून दोन रिव्हॉल्व्हर विकत घेतले आणि पुण्याच्या फर्ग्युसन टेकडीवर नेमबाजीचे शिक्षण घेतले. मुंबई कायदेमंडळाचे पावसाळी अधिवेशन पुण्यात २० जुलै १९३१ पासून सुरू झाले. स्वातंत्र्यवीर सावरकर हे गोगटेंचे एक दैवत बनले होते. रत्नागिरीत एकदाच भेट घेतल्यावर गोगटे सावरकरांच्या विचारांनी भारले गेले होते असे दिसते.

अधिवेशनानिमित्ताने हॉटसन पुण्यात असताना त्यांस प्राचार्य ग. स. महाजनी यांनी फर्ग्युसन महाविद्यालयात अनौपचारिकरीत्या बोलावले (२२ जुलै १९३१). पोलीस बंदोबस्त अनावश्यक असल्याचे महाजनींनी आर. एम. मॅक्सवेल यांना आधी पत्राने कळवले होते. हॉटसन २२ तारखेला महाविद्यालयाच्या वाडिया ग्रंथालयात येणार अशी खात्री करून गोगटे तेथे पुस्तक वाचत बसले. त्यांच्याजवळ हॉटसनचा नवाकाळमधील फोटो होता. या ग्रंथालयाला देणगी दिलेल्या वाडिया दांपत्याच्या सुंदर तैलचित्राकडे पाहण्यात हॉटसन गर्क असताना त्याच्या छातीवर गोगटेंनी गोळी झाडली. तथापि हॉटसनने प्रसंगावधान राखून गोगटेंना ढकलले. तरीही गोगटेंनी दुसरी गोळी झाडली. हॉटसन जखमी झाला, पण बचावला. उलट तो गोगटेंच्या छातीवर बसला. त्याच्या अंगरक्षकांनी गोगटेंचे दोन्ही रिव्हॉल्व्हर काढून घेतले. पोलिसांनी गोगटेंना अटक केल्यावर त्यांनी व विद्यार्थ्यांनी जोरदार घोषणा दिल्या. तसेच हॉटसनचा निषेध केला. गोगटेंच्या खोलीत सरदार भगतसिंग, राजगुरू, बटुकेश्वर दत्त यांची छायाचित्रे आणि काडतुसे सापडली होती.

सत्र न्यायालयात गोगटेंनी सरळ गुन्हा कबूल करावा असा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सेनापती बापटांचा गोगटेंना सल्ला होता. परंतु गोगटेंनी बापटांची सूचना मानली नाही. त्यांनी बचावाचा युक्तिवाद केला. तथापि त्यांना दोषी ठरवून आठ वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा झाली (९ सप्टेंबर १९३१). बापटांनी मात्र गोगट्यांच्या शस्त्राचाराचे समर्थन केले.[१७]

**पुन्हा दडपशाही :—**एप्रिल १९३१ च्या तिसऱ्या आठवड्यात व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन यांच्या ठिकाणी लॉर्ड विलिंग्डन यांची नेमणूक होताच, अधिक कठोर आणि दृढ निश्चयी अशा साम्राज्यवादी व दडपशाहीच्या धोरणाचे पुनरागमन झाले. आय.सी.एस. नोकरशाही आपले पाश आवळू लागली. म्हणून काँग्रेसने "नो रेंट नो टॅक्स" मोहीम हाती घेतली असता, सरकारने पूर्वी जप्त केलेल्या जमिनी मूळ मालकांना परत करण्याचा प्रश्न अधिक जटिल बनला. राजीनामे दिलेल्या गावपाटलांच्या व तलाठ्यांच्या फेरनेमणुकीचाही मुद्दा कठीण झाला. संयुक्त प्रांतातील किसानांच्या समस्या हा वादाचा मुद्दा बनला. वायव्य सरहद्द प्रांतातील खुदाई खिदमतगारांचा लढा चिरडून टाकण्याच्या तेथील शासनाच्या दडपशाही योजना होत्या. अशा अनेक समस्यांवर गांधीजींनी व्हाइसरॉयशी सिमल्यात दोनदा चर्चा केली. परंतु त्यातून फारसे साध्य झाले नाही. काँग्रेस कार्यकर्ते व युवक संघटनांचा वाटाघाटींवरचा विश्वास खूप घटला होता. तुरळक हिंसाचारामुळे इंग्रज अधिकारी अधिकच प्रतिहिंसक बनत होते. त्यानुसार कडक कायदे लागू करून त्यांची कठोरपणे अंमलबजावणी सुरू झाली. सरहद्द प्रांताप्रमाणे मुंबई इलाख्यातही अघोषित आणीबाणी आली.

अर्नेस्ट हॉटसनने चिलखत घातले होते म्हणून तो वाचला होता. पण गोगटेंचे उद्दिष्ट सफल न होता त्यांना आठ वर्षांचा कारावास भोगावा लागला. फर्ग्युसनमध्ये एम. ए. च्या वर्गात प्रवेश घेतलेल्या र. के. खाडिलकर, गोरे व जोशींचा या घटनेशी काहीच संबंध नसूनही त्यांना प्राचार्य महाजनींनी कॉलेजमधून काढून टाकले. प्रत्येक घटनेचे पर्यवसान दडपशाहीत होऊ लागले. गोगटे प्रकरणामुळे आणि बापटांच्या स्पष्टवक्तेपणामुळे ते स्वतः पकडले गेले. ठिकठिकाणी बापट करत असलेल्या भाषणांचे वृत्तान्त पोलीस लघुलेखक लिहून मुंबईला गृह विभागाकडे पाठवित असत. वाळवा तालुक्यातील अष्टे गावचे बापटांचे भाषण, तसेच संगमेश्वर, चिपळूण व रत्नागिरीची भाषणे सरकारला राजद्रोहात्मक वाटली होती. या भाषणांमध्ये बापटांनी गोगटेंचे समर्थन केले होते. म्हणून त्यांनी रत्नागिरीला १२ ऑक्टोबर १९३१ रोजी दिलेल्या प्रक्षोभक भाषणाकरिता

त्यांच्यावर खटला भरण्याचा सरकारने निर्णय घेतला. त्यानुसार ठाणे जिल्ह्यातील उंबरगावला जाहीर सभेत भाषण करीत असताना सेनापती बापटांना अटक करण्यात आली (३० ऑक्टोबर). रत्नागिरी सत्र न्यायालयात त्यांच्यावरील खटला सुरू झाला तेव्हा त्यांच्या बचावासाठी प्रसिद्ध वकील रघुनाथ पांडुरंग ऊर्फ दादासाहेब करंदीकर उभे राहिले. तथापि बापटांनी आपला बचाव अथवा युक्तिवाद करण्याला वकिलांना विरोध केला.

परिणामतः बापटांना, खटल्याची सुनावणी झाल्यानंतर दुसऱ्या दिवशीच म्हणजे २४ नोव्हेंबरला सात वर्षांची शिक्षा झाली. त्यांच्या विनंतीनुसारच त्यांना तुरुंगात 'क' वर्ग मिळाला. आत्मसमर्पणभाव व हालअपेष्टा भोगण्याची तत्परता असलेल्या या आगळ्यावेगळ्या क्रांतिकारकाने प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्षपद 'स्वतःहून' गमावले. **महाराष्ट्रातील स्वातंत्र्यलढ्याचा एक थोर सेनापती १९३७ पर्यंत कारावासात राहिला. कारण नसूनही !** काँग्रेसचे पहिले मंत्रिमंडळ अधिकारावर येताच लगेच २३ जुलै १९३७ रोजी बा. गं. खेर यांनी बापट व गोगटे यांना कारावासातून मुक्त केले.

## दिल्ली कराराचे उल्लंघन

माजी व्हाइसरॉयने गांधीजींशी करार करताना लिखित व काही अलिखित आश्वासने दिलेली होती. अनेक प्रकरणी आपण गव्हर्नरांशी चर्चा करून सुयोग्य मार्ग काढू असेही कबूल केले होते. काही प्रकरणी अधिक चौकशी करून समस्या सोडवू असे आश्वासन आयर्विन यांनी दिलेले होते. **सोलापूरच्या बंदीवानांबाबत अधिक माहिती मिळवून त्यांना सोडून देण्याचे स्पष्ट आश्वासन आयर्विन साहेबांनी दिल्ली करारावर सही करण्याआधी गांधीजींना दिलेले होते.** ज्या स्वातंत्र्य सैनिकांवर खटले न भरता त्यांना तुरुंगात डांबून ठेवलेले होते, त्यांच्या प्रकरणांचे पुनर्विलोकन करण्याचे कबूल केलेले होते. मीरत खटल्यातील डांगे वगैरे कैद्यांनाही अनुतोष देण्याची तयारी आयर्विन यांनी दाखवली होती. आंदोलन काळात सरकारने जप्त केलेल्या शेतजमिनी व मालमत्ता मूळ मालकांना परत करण्याबाबत प्रांतिक सरकारांना पत्र लिहिण्याची तयारी त्यांनी व्यक्त केली होती. मात्र करारानंतर महिन्याभरात त्यांचा पदावधी संपला.

तदनंतर नखशिखांत साम्राज्यवादी विचारसरणीच्या लॉर्ड विलिंग्डन याने व्हाइसरॉय पदग्रहण केले आणि १८ एप्रिल १९३१ रोजी आयर्विन मुंबईहून मायदेशी निघाले. त्यांच्याबरोबर त्यांची बरीच आश्वासनेही परागंदा झाली. विलिंग्डन हा पूर्वीची आश्वासने अथवा स्नेहभावाची कदर करणारा नव्हता. तो स्वयंसत्तावादी नोकरशहाच होता. शिवाय जिल्ह्यावर निरंकुश हुकूमत चालवणारा प्रत्येक कलेक्टर हाच तेव्हा खराखुरा व्हाइसरॉय असायचा! कलेक्टरच्या स्वयंसत्तावादावर थोडे बंधन घालण्याचे आणि हिंदुस्तानच्या सरकारचे अल्पसे लोकशाहीकरण करण्याचे १९२९ मधील आयर्विनचे इरादे नोकरशाहीला मुळातच असंमत होते. संपूर्ण स्वराज्य? नाहीच नाही! याकरिता काँग्रेसने एक वर्ष लढा देऊनही आय. सी. एस. नोकरशाहीचे मतपरिवर्तन झाले नव्हते. किंबहुना गांधी-आयर्विन करारामुळे त्या सनदी नोकरशाहीला आपली ‘ इज्जत ’ गेली असे वाटे.

परिणामतः गांधी-आयर्विन कराराचे सरकारकडून उल्लंघन सुरू झालेच. दारूच्या दुकानांसमोरील शांततामय निदर्शनांवरही बंदी आली. बंदिवानांची सुटका करण्याचे बंद झाले. जप्त केलेल्या नवजीवन छापखान्यावरील जप्ती शासनाने मागे घेतली नाही. जप्त केलेल्या वतनजमिनी करारानुसार मूळ मालकांना परत दिल्या नाहीत. आंदोलनास पाठिंबा म्हणून राजीनामा दिलेले मुंबई प्रांतातील दोन उप जिल्हाधिकारी आणि अनेक सरकारी कर्मचाऱ्यांना पेन्शन देण्याचे आयर्विनने गांधीजींना आश्वासन दिले होते. विलिंग्डनने ते पाळले नाही. कित्येक तलाठी व पाटलांना सेवेत परत घेतले नाही. रस्टिकेट केलेल्या आठ मुली व अकरा मुलांना ब्रिटिशांनी शिक्षणापासून कायमचे वंचित केले. सोलापूरकरांवरील अन्याय व अत्याचारांचे कधीच परिमार्जन केले नाही. विशेषतः सरहद्द प्रांत आणि बंगालमधील स्वातंत्र्यसैनिकांवर नोकरशाही व पोलिसांनी अक्षरशः सूड उगविण्याचा विडा उचलला होता. नवीन सरकारने भारतीयांचे नीतिधैर्य खच्ची करण्याचे सर्वतोपरी प्रयत्न केले. मात्र याकामी सरकारला यश आले नाही.

संधिकालात देशात परिस्थिती चिघळत राहिली. महाराष्ट्रापेक्षा बंगाल, संयुक्त प्रांत व वायव्य सरहद्द प्रांतातील वातावरण संघर्ष-प्रवण बनत होते. दिल्ली

कराराचा फायदा न झालेले हजारो राजबंदी तुरुंगातच राहिले. शिवाय स्थानबद्ध कैदी बंदीवासात खितपत पडले होते. बंगालमधील हिजली जेलमधील स्थानबद्धांवर पोलिसांनी गोळीबार करून काही जणांना ठार केले. म्हणून राजकारणात भाग न घेणाऱ्या रविंद्रनाथ टागोरांनीही या सरकारी दहशतवादाचा कोलकात्यातील जाहीर सभेत निषेध केला होता. चित्तगाव जिल्ह्यातील ५२ गावांमध्ये हिंसाचाराच्या घटना घडल्या. वर उल्लेख केल्याप्रमाणे टिपेरा जिल्ह्याच्या कलेक्टरचा बदला घेण्यासाठी शांती घोष व सुनीती चौधरी या शाळकरी मुलींनी कलेक्टरचा खून केला. तरीसुद्धा बंगाल सरकारने समेटाची पर्वा न बाळगता समेटापूर्वीच्या निग्रहाने दडपशाहीचा अंमल चालूच ठेवला. पोलीस व अधिकाऱ्यांनी काँग्रेस कार्यकर्त्यांना कठोर शिक्षा देण्यासाठी सर्वत्र आणीबाणीचा अंमल सुरू केला.

आंदोलन काळात संयुक्त प्रांतातील किसान अधिक जागृत आणि सक्रिय झाल्यामुळे तेथील ' नो रेंट नो टॅक्स ' मोहीम बरीच यशस्वी झाली होती. त्यामुळे खवळलेल्या प्रांतिक सरकारने शेतजमिनी जप्त केल्या. याबाबत फेरविचार करण्याचे आश्वासन आर्यविनने दिले होते. तथापि याबाबत प्रांतिक सरकारने कालहरणाचे धोरण अंगीकारले. शेतकऱ्यांना धाकदपटशा दाखवून जप्ती व जबरदस्तीने वसुलीचे सत्र सुरू झाले. याबाबत चर्चा करून प्रश्न सोडविण्यासाठी स्वतः गांधीजी नैनीतालला जाऊन गव्हर्नर सर माल्कम हेली यांस भेटले. त्यामुळे सरकारने अत्यल्प अनुतोष जाहीर केला. पण त्यानंतर सरकारने दडपशाही करून हजारो किसानांच्या जमिनी जप्त केल्या व त्यांच्यावर अत्याचार केले.

वायव्य सरहद्द प्रांतातील परिस्थिती बंगालप्रमाणेच स्फोटक होती. अगदी शांतता काळातही तेथील राज्यकारभार लष्करी स्वरूपाचाच असे. सविनय कायदेभंग काळातील खुदाई खिदमतगारांचे रसरसणारे राष्ट्रीयत्वाचे तेज आणि अब्दुल गफार खान यांचे खंबीर नेतृत्व पाहून इंग्रज चकित झाले व सरकारचे धाबे दणाणून गेले होते. ' रेड शर्ट्स ' नावाने प्रसिद्ध असलेल्या त्यांच्या संघटनेची इंग्रज सरकारला भीती वाटू लागली. सरकार बेचैन व्हावे इतपत ती संघटना जागृत व बलवान होती.[१८] पण नवीन व्हाइसरॉयने या प्रांतावर सूड घेतला. हा प्रांत १९४७ मध्ये पाकिस्तानमध्ये समाविष्ट करण्यात आला. गफार खान व लोकमताची परवा न करता!

देशभर सरकारविरुद्ध तीव्र असंतोष! सनदी नोकरशाही काँग्रेसचा नक्षा उतरवण्यास कटिबद्ध ! ब्रिटिश मुत्सद्दी लंडनमध्ये कोणत्याही प्रश्नापेक्षा जाती व धर्माच्या प्रश्नाला अग्रस्थानी बसवणार, आणि हिंदू, मुसलमान, दलित वगैरेंमध्ये झुंज लावून देणार याची गांधीजी व नेहरूंना पूर्वकल्पना आलेली होती. सरकारने त्या धोरणानुसारच धूर्तपणे परिषदेचे सदस्य निवडलेले होते. गट-तटांचे कलह वाढविण्यासाठी सरकारने राष्ट्रवादी वृत्तीचे मुसलमान व हिंदू टाळून विरोधी माणसांचीच निवड केली होती. म्हणूनच गांधीजी गोलमेज परिषदेला जाण्यास तयार नव्हते. त्यांनी लिहिले " When I think of the prospects in London ............ there is nothing wanting to fill me with utter dispair .............. There is every chance of my returning empty-handed."[१९]

मुंबई यूथ लीग, पुणे यूथ लीग आणि हिंदुस्तानी सेवा दल या संघटना अगदी प्रारंभापासूनच व्हाइसरॉयशी वाटाघाटी करण्याच्या विरोधातच होत्या. फेब्रुवारीपासून त्यांनी आपला विरोध व्यासपीठ व पत्रके यांद्वारा तसेच नेत्यांना भेटून व्यक्त केला. गोलमेज परिषदेची संभाव्यता दिसताच त्यांच्या विरोधाला धार चढली. या संघटनांप्रमाणेच नौजवान भारत सभेचाही गोलमेजला तीव्र विरोध होता. या संघटनेची मुंबईतही शाखा होती. अ. भा. नौजवान भारत सभेने ६ ऑगस्ट रोजी अ.भा. काँग्रेस समितीच्या सभेबाहेर जोरदार निदर्शने करून गांधीजींना विनंतीही केली की, साम्राज्यवादी, भांडवलशाही आणि जातीयवादी लोकांच्या या जाळ्यात आपण अडकू नये. वरील तिन्ही संघटनांनीही गांधीजींना हीच विनंती केली होती. काँग्रेसच्या परिसीमेतील सर्वच युवक संघटनांना परिषदेचा विलक्षण तिरस्कार वाटत होता.

महाराष्ट्र व कर्नाटकात अनेक शाखा असलेला हिंदुस्तानी सेवा दल ब्रिटिशांशी वाटाघाटी करण्याच्या विरोधातच होता. या दलाने सरकारचे अनेक मनाई हुकूम झुगारून प्रचार सभा भरवल्या. मुंबई प्रांतात सेवा दलाची शिबिरे भरवली. शिबिरांमध्ये शस्त्रांचे प्रशिक्षण दिले जाई. शिवाय क्रांतिकारी विचार-आचारांचे

प्रसारण केले जाई. मुंबई व उपनगरांमध्ये हिंदुस्तानी सेवा दलाच्या मोठमोठ्या प्रभात फेऱ्या निघू लागल्या. यांतून आंदोलनासाठी पोषक असे आक्रमक वातावरण निर्माण झाले. म्हणून मुंबई सरकारने या प्रकारास आवर घालण्याचा आदेश दिला. हिंदुस्तानी सेवा दल हा काँग्रेसचा अधिकृत युवक दल होता. त्याचे विनियमन डॉ. नारायणराव सुब्बाराव हर्डीकर व जवाहरलाल नेहरू करीत.[२०]

प्राप्त परिस्थितीत नेहरूंनी पक्ष अध्यक्ष या नात्याने सर्व प्रांतिक काँग्रेस समित्यांना पत्र लिहून आदेश दिले की, ब्रिटिशांशी नव्याने संघर्ष करण्याची शक्यता निकट येऊन पोहोचली आहे, आणि त्यासाठी विनाविलंब तयारीला लागावे. स्वराज्यासाठीचा लढा येथेच लढावा लागणार आहे, लंडनमध्ये नव्हे. याउलट लंडनमधील धूर्त व मुत्सद्दी सत्ताधीश मात्र सिमल्यास तार संदेश पाठवून व्हाइसरॉयला आदेश देत होते की, काहीही करून गांधीजींना लंडनला पाठवा. म्हणजे गोलमेज परिषद [गोलमाल] हा धूर्त साम्राज्यवादी डाव होता. मात्र तो गांधी-नेहरूंव्यतिरिक्त अनेक काँग्रेसजनांच्या लक्षात आला होता.

तिकडे इंग्लंडमध्ये ब्रिटिश राजकारण्यांपुढे मुख्य समस्या होती जागतिक महामंदीमुळे उद्‌भवलेल्या आर्थिक हालाखीच्या स्थितीची. आर्थिक समस्यांमुळे कावलेले इंग्रज राजकारणी 'राष्ट्रीय सरकारचा' प्रयोग करण्यात अडकलेले होते. म्हणून हिंदू-मुसलमान तणाव व जातीय प्रतिनिधित्व आणि संस्थानिकांचा दुराग्रह वगैरे मुद्यांवरच भारतीय प्रतिनिधींमध्ये लढत लावून देणे हे धूर्त इंग्रजांना हितावह वाटत होते.

## दुसरी गोलमेज परिषद

काँग्रेसचे एकमेव प्रतिनिधी म्हणून महात्मा गांधींना लंडनला पाठविण्याचा काँग्रेस कार्यकारी समितीचा निर्णय सखोल विचारपूर्वक घेतलेला होता. भारतीय राजकारणाचा गुरुत्वमध्य भारतातच असून येथे जशी परिस्थिती बदलेल तसे रंग तिकडे उमटतील, असे काँग्रेसचे मत होते. संपूर्ण स्वराज या मागणीच्या

परिपूर्तीसाठी सद्यःस्थितीत लंडनमध्ये फारसे काही घडण्याची शक्यता दिसतच नव्हती. देशातील परिस्थितीमध्ये निदान बिघाड होऊ नये व काँग्रेस संघटना अबाधित राखावी असे नेहरू वगैरे नेत्यांना वाटत होते. लंडनमध्ये राज्यघटना तयार होणार नव्हतीच. ब्रिटिशांशी मूलभूत बाबतीत समेट झालाच तर त्यावर नंतर विचार करणे शक्य होते. तथापि त्याचीदेखील शक्यता दिसत नव्हती. सरोजिनी नायडूंना हिंदुस्तान सरकारने भारतीय महिलांच्या प्रतिनिधी या नात्याने निमंत्रण दिले, म्हणूनच त्या लंडनला गेल्या. काँग्रेस कार्यकारिणीने त्यांना जाण्यासाठी परवानगी दिली इतकेच ! नेहरूंच्या मते सरकारने नेमलेल्यांमध्ये जिना व आंबेडकरांसारखे काही कर्तबगार नेते सोडल्यास बरेच जण प्रतिगामी, परागतिक व मवाळ होते. काही सभासद तर ब्रिटिश ' डायहार्ड ' वा ज्ञातिनिष्ठ होते. ब्रिटिश साम्राज्याचे कृपाछत्र शिरावर घेऊन स्वहिताचा पंथ आक्रमावा असा काही सदस्यांचा मानस होता. काही जण जातिहिताचे जतन करण्याकरिता कटिबद्ध होते. तथापि त्यांची निवड करताना सरकारने आपलेच हित जपले होते.[२१]

लंडनमध्ये गोलमेज परिषदेचे दुसरे सत्र १९३१ च्या ७ सप्टेंबरला सुरू होण्याआधी तेथील मजूर पक्षाचे सरकार पदच्युत झालेले होते. त्याऐवजी रॅम्से मॅकडोनाल्डच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय सरकार अधिकारारूढ झाले होते. परिषदेचे कामकाज सुरू झाल्यावर ऑक्टोबर अखेरीस ब्रिटनमध्ये सार्वत्रिक निवडणूक झाली आणि हुजूर पक्षाचे ४७० खासदार विजयी झाले. मजूर पक्षाचे मॅकडोनाल्ड हे पंतप्रधान असले तरी मंत्रिमंडळावर प्रभाव हुजूर पक्षाचाच राहिला. वेजवूड बेनच्या ऐवजी सॅम्युअल होअर हा कमकुवत व प्रतिगामी सभासद भारतमंत्री झाला. हा सर्व प्रकार भारतीय स्वातंत्र्याला प्रतिकूल होता.

परिषदेला गेलेल्या ८७ भारतीय प्रतिनिधींमध्ये परस्परांविषयी जिव्हाळा वा सामंजस्य मुळीच नव्हते. राष्ट्रहितापेक्षा जातीय, पंथीय अथवा वर्गीय हितसंबंध प्रस्थापित करण्यासाठी ते प्रयत्न करीत होते. संस्थानिकांनी संघराज्याच्या कल्पनेस विरोध करून ' राज्यसंघाची ' विघातक मागणी केली. ब्रिटिश व्यापाऱ्यांचे

भारतातील प्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांनी परिषदेत निक्षून सांगितले की, आर्थिक बाबींचे बहुतांश अधिकार व्हाइसरॉयकडेच राखीव असले पाहिजेत. घनःशामदास बिर्लांच्या मते याचा अर्थ असा की, प्रस्तावित सरकारच्या १३० कोटी रुपयांच्या महसुलापैकी केवळ पंधरा कोटींच्या व्यवहारावरच हिंदी अर्थमंत्र्याचे परिणामकारक नियंत्रण असेल. तसेच हिंदुस्तानात परकीय गुंतवणुकीला हिंदवासीयांकडून विरोध होऊ नये यासाठी संरक्षणात्मक हमी मंजूर करावी असा बेंथॉल यासारखे ब्रिटिश व्यापाऱ्यांचे प्रतिनिधी परिषदेत जोरदार आग्रह करीत होते. ब्रिटिशांचे भारतातील वाणिज्य हितसंबंध अबाधित ठेवण्यासाठी बॉंबे चेंबर ऑफ कॉमर्सचे प्रतिनिधी गोलमेज परिषदेत अत्यंत आग्रही व आक्रमक झाले होते. राजकीय पातळीवर ब्रिटिश सत्ताधीश ' सायमन विचारसरणीच्या ' पुढे सरकण्यास तयारच नव्हते. कलोनियालिझम हे त्यांचे विचारसूत्र होते.

भारतीय संघराज्याची रचना कशी असावी यावर विचारविनिमय करण्यासाठी नेमलेल्या परिषदेच्या समितीमध्ये गांधीजींनी आठ वेळा भाषणे देऊन काँग्रेसची भूमिका प्रभावीप्रमाणे मांडली. अल्पसंख्य भारतीयांच्या राजकीय हक्कांसाठी नेमलेल्या समितीतही त्यांनी दोनदा भाषण देऊन काँग्रेसची भूमिका स्पष्ट केली. तसेच खुल्या अधिवेशनातही त्यांनी दोनदा व्याख्यान दिले. १७ सप्टेंबरच्या भाषणात गांधीजींनी, विषयाच्या संदर्भात, भाष्य केले की, आपण एकटेच राष्ट्रीय काँग्रेसने म्हणजे लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी असून बाकी इतर सर्व प्रतिनिधींची नियुक्ती सरकारनेच केलेली आहे. त्यामुळे गांधीजी आपल्याला कमी लेखतात आणि ब्रिटिशांची मेहेरनजर आणि कृपादृष्टी यामुळेच आपणास परिषदेस येण्याची संधी लाभली, असे ते ध्वनित करतात, असे अनेक प्रतिनिधींना वाटले होते. निःपक्षपाती इतिहासाच्या दृष्टिकोणातून पाहता गांधीजींच्या वक्तव्यात चूक नव्हती. काँग्रेस ही राष्ट्रव्यापी संघटना असून, तिने गांधीजींना निवडलेले होते. इतरांचे तसे नव्हते. डॉ. आंबेडकर दलितांचे पुढारी होते. पण सर तेज बहादूर सप्रू, बॅ. जयकर, श्रीनिवास शास्त्री वगैरे कोणत्या जनसमुदायाचे नेतृत्व करीत ? हा सवाल होताच. मुसलमानांपैकी अनेक प्रतिनिधींचेही महंमद अली जिना व आगाखान यांच्याशी मतभेद होते. नॅशनॅलिस्ट मुस्लीम पार्टीचे सर्वमान्य नेते

डॉ. एम. ए. अन्सारी राष्ट्रीय मतवादी असल्यामुळे व्हाइसरॉयने त्यांना लंडनला पाठविण्यास नकार दिला होता. लंडनमध्ये ब्रिटिशांनी जमवलेल्या त्या बहुजिनसी मंडळीत गांधीजीच काय पण कोणीही काँग्रेस पुढारी मिसफिट होता. म्हणून परिषदेत गांधीजींनी भाग घेणे व्यर्थ ठरण्याचा रंग आधीपासूनच दिसत होता.

मुसलमान प्रतिनिधींच्या पाठोपाठ अस्पृश्य वर्गातील जाती, अँग्लो इंडियन, हिंदी ख्रिस्ती, युरोपियन लोक वगैरेंनी निवडणुकीसाठी स्वतंत्र मतदारसंघांची मागणी केली. या मंडळींनी लंडनमध्ये एकत्र येऊन आपला एक गट तयार केला. ब्रिटिशांच्या सर्व आर्थिक हितसंबंधांना हिंदुस्तानात संरक्षण देण्याच्या बेंथालच्या स्वार्थीपणाच्या मागणीस मुस्लीम लीगने संपूर्ण पाठिंबा देण्याच्या अटींवर, बेंथालने लीगच्या फुटीर स्वरूपाच्या मागणीस सक्रिय पाठिंबा दिला.

**गोलमेज परिषदेत अशी अनेक कट-कारस्थाने झाली, शुष्क वादविवाद झाले आणि संधिसाधूपणाला ऊत आला. गोलमाल झाला. त्यातच ब्रिटिशांचा विजय झाला.** काँग्रेसच्या धोरणानुसार गांधीजी अस्पृश्य जाती, अँग्लो इंडियन, हिंदी ख्रिस्ती यांच्यासाठी स्वतंत्र मतदारसंघ अगर राखीव जागा देण्यास तयार नव्हते. स्वतंत्र मतदारसंघांमुळे भारतीय समाजाचे विघटन होईल ही त्यांची वैचारिक भूमिका होती.

अशा वादविवादांमुळे गोलमेज परिषदेच्या कामात कोंडी निर्माण झाली. जातीविषयक प्रश्नांच्या कारणास्तव परिषदेचे राज्यसुधारणा विषयक कामकाज खोळंबून ठेवू नये यासाठी गांधींजींनी खूपच प्रयत्न केले. ‘ आमच्या जातीय प्रश्नांवर कलह माजविण्यासाठी आम्ही हजारो मैलांचा प्रवास केलेला नाही, असा निर्वाणीचा इशारादेखील गांधीजींनी उपस्थितांना दिला. ’ ‘ राज्यघटना बनविताना आपण हे सर्व प्रश्न सोडवू. ’ यापुढे जाऊन गांधीजींनी लीगला असाही देकार दिला की, काँग्रेसच्या संपूर्ण स्वराज्याच्या मागणीस मुस्लीम लीगने स्पष्ट पाठिंबा दिल्यास आपण लीगच्या सर्व मागण्या संमत करू. तरीही लीगने हा गांधीजींचा देकार नाकारला. मात्र गांधीजींचे हे औदार्य हिंदुमहासभा व शीख प्रतिनिधींना अजिबात मान्य नव्हते. पंजाबात मुसलमानांना जास्त काही देण्यास दोन्ही पक्ष तयार नव्हते.

संघराज्य विषयक समितीत बोलताना, ब्रिटिशांचे व्यापारविषयक हितसंबंध सुरक्षित राखण्यासाठी १९३० च्या पहिल्या गोलमेज परिषदेत मान्य झालेल्या तरतुदी भारतीय जनतेला हानिकारक आहेत, अशी गांधीजींनी कठोर टीका केली. शिवाय भारतीय अर्थव्यवहारावर ब्रिटिश पार्लमेंटचे नियंत्रण न ठेवता हिंदुस्तान सरकारचेच नियंत्रण असावे अशी गांधीजींनी परिषदेत मागणी केली. या मुत्सद्देगिरीच्या भूमिकेमुळे ब्रिटिश भांडवलशाहीचे हितसंबंध दुखावणार होते. तसेच पार्लमेंटच्या अधिकारांवर गदा येणार होती. त्यामुळे गांधीजी आणि काँग्रेसला मान्य होईल असा तोडगा स्वीकारणे ब्रिटिश सराकारला अशक्य वाटले.

म्हणून १ डिसेंबर १९३१ रोजी पंतप्रधान मॅकडोनाल्डने परिषद गुंडाळण्याच्या पवित्र्यात आपल्या १९ जानेवारी १९३१ च्या घोषणेचाच पुनरुच्चार केला ; सिंध व वायव्य सरहद्द प्रांत या दोन मुसलमान बहुल प्रांतांच्या निर्मितीची घोषणा केली ; आणि मताधिकार, वित्त व्यवस्था आणि संस्थानिकांचे प्रश्न यांवर अभ्यास करण्यासाठी तीन तज्ज्ञ समित्यांची घोषणा केली. तसेच भारतीय समाजाचे विघटन करण्याच्या कुटिल हेतूने रॅम्से मॅकडोनाल्डने असेही जाहीर केले की, “ जातीय प्रश्नाबाबतचा निवाडा आपण देऊ. ”

ब्रिटिश वसाहतवाद्यांची गोलमेज परिषदेबाबतची कूटनीती तसेच आर्थिक महामंदीमुळे धूळधाण झालेली तेथील भांडवलशाही आणि काँझरवेटिव पक्षातील तणाव व त्यांच्याजवळ आलेला तत्त्वभ्रष्ट रॅम्से मॅकडोनाल्ड यांमुळे परिषदेचे अपयश आधीच ठरलेले होते. गोलमाल परिषदेचे सभासद त्या दृष्टीनेच नियुक्त केलेले होते. ब्रिटिशांच्या अपेक्षेनुसार तिथे वादविवाद व कटकारस्थाने झाली. नेहरूंनी म्हटल्याप्रमाणे तिथे परिषदेच्या सदस्यांच्या संधिसाधूपणाला ऊत आला. स्वतः गांधीजींनी म्हटलेच की, इंग्लंडमधील आपले सर्वोत्तम कार्य परिषदेच्या सभागारातील नसून ब्रिटिश लोकमतावर भारताभिमुख प्रभाव पाडण्यातच होते.[२२] **चार्ली अँड्रूज यांनी म्हटल्याप्रमाणे ही परिषद एक “ मॅग्निफिसन्ट फेल्युअर होते. पण तिच्यातील बहुतांश मॅग्निफिसन्स गांधींमुळे होते. ”**

## समेटाची इतिश्री

दिल्ली करार करताना व्हाइसरॉय आयर्विन यांनी महात्मा गांधी यांना समानतेचा दर्जा दिल्यापासून सनदी नोकरशाही दुखावलेली होती. विंस्टन चर्चिल याने गांधीजींना 'नेकेड फकीर' म्हणून आपली घृणा जाहीर केली होती. लंडनमध्ये हुजूर पक्ष अधिकारारूढ होताच धोरणांमध्ये परिवर्तन झाले. काँग्रेसला दडपून टाकण्याचे धोरण अमलात आले. नवीन व्हाइसरॉय विलिंग्डन सलोखा वा तडजोड करण्यास तयार नव्हते. गोलमेजच्या आधीच त्यांनी भारतमंत्री महाशयास सांगितले होते, "There should be no truce or pact. Government must hit hard, must win quickly, decisively and completely".[२३] व्हाइसरॉयची अशी युद्धपिपासू भूमिका असल्यामुळे सनदी नोकरशाहीने काँग्रेसचे संभाव्य आंदोलन चिरडून टाकण्याकरिता राक्षसी योजना आधीच तयार ठेवल्या होत्या. फेब्रुवारी १९३१ पासूनच्या विरामसंधी काळात नोकरशाहीने मध्यवर्ती सरकारकडे दडपशाहीच्या अनेक योजना सादर केल्या होत्या. मुंबई सरकारने तर गांधीजींना एडन अथवा अंदमानच्या कारागृहात पाठविण्याचा प्रस्ताव आधीच दिल्लीला पाठविला होता.

इतकेच नव्हे तर सरकारी सामर्थ्याचे व निर्धाराचे आधीच प्रदर्शन करून दहशत निर्माण केल्यास काँग्रेस आंदोलन करण्याचे धाडस करणार नाही, अशी विलिंग्डनची कल्पना होती. त्याने चार वटहुकूम तयार ठेवले होते. मुंबईचा आक्रमक वृत्तीचा गव्हर्नर साईक्स हा तर युध्यमान पवित्र्यातच उभा होता. सरकारी दस्तऐवजांचा अभ्यास करता मला दिसले की, त्या शांततेच्या काळात मुंबई सरकारने दडपशाहीसाठी लागणारी साधनसामग्री मोठ्या प्रमाणात वाढविली. तत्पूर्वी मे १९३१ मध्ये केंद्रीय गृहमंत्र्याने नोकरशाहीला बजावले होते की, दिल्ली कराराचा काँग्रेसने भंग केला असे आढळताच, काँग्रेसवर अचानक व अतिकठोर हल्ला करण्याकरिता सर्व प्रकारची पूर्वतयारी करून ठेवलीच पाहिजे.

लॉर्ड विलिंग्डन १९१३-१९१८ दरम्यान मुंबईचा गव्हर्नर असताना बऱ्यापैकी समंजस होता. मुंबईतील हाजी अलीजवळच्या प्रसिद्ध विलिंग्डन क्लबला

धनिकांनी त्याचे नाव दिले. तथापि व्हाइसरॉयपदी चढल्यावर तो भयंकर हटवादी व उद्दाम झाला. भारतमंत्र्याने त्याच्या कारवायांना सहमती न दिल्यास पंतप्रधान व पंचम जॉर्जची सहमती मिळविण्यासाठी त्याने कमी केले नाही.[२४] संयुक्त प्रांतातील किसानांचे आंदोलन चिरडून टाकण्यासाठी डिसेंबरात वटहुकूम जारी करण्यात आला आणि पुरुषोत्तमदास टंडन यांना अटक करण्यात आली. तसेच अलाहाबाद शहराबाहेर जाऊ नये असा हुकूम जवाहरलाल नेहरू व टी.ए.के. शेरवाणी यांच्यावर बजावण्यात आला. तथापि तो हुकूम न मानता शेरवाणी व नेहरू हे दोघेही मुंबईस जाण्यासाठी निघाले (२६ डिसेंबर १९३१). पोलिसांनी त्यांची आगगाडी वाटेत थांबवून त्यांना अटक केली. तिकडे सरहद्द प्रांतात खान अब्दुल गफार खान व त्यांचे बंधू डॉ. खानसाहेब यांनाही वटहुकमाखाली अटक केली. आंदोलनापूर्वीच वटहुकमांचा अंमल जारी झाला होता.

संयुक्त प्रांतात सरकारने लादलेल्या आणीबाणीकालीन उपाययोजनांवर मात करून, डिसेंबरात पाच जिल्ह्यांमध्ये शेतसारा बंदी, शेतीच्या खंडात कपात आणि खंडकऱ्यांना संरक्षण यासाठी काँग्रेसने मोठी चळवळ उभारली. अशीच चळवळ गफार खान यांनी सरहद्द प्रांतातही उभारली होती. ती दडपण्यासाठी सरकारने पेशावर शहर लष्कराच्या अमलाखाली आणले होते. २२-२४ डिसेंबर १९३१ रोजी पुणे यूथ लीगने नेताजींच्या अध्यक्षतेखाली पुण्यात युवक परिषद भरवली. याच परिषदेत आगामी आंदोलनात युवकांनी करावयाच्या कामाचा आराखडा बनविण्यात आला.

त्याकाळात राष्ट्रीय चळवळीत सातत्याने सक्रिय असलेली बी.पी.सी.सी. तसेच मुंबई यूथ लिग आणि मुंबई विद्यार्थी संघ या संघटना दिल्ली कराराविषयी कधीच आशावादी नव्हत्या. त्यामुळे काँग्रेसच्या धोरणानुसार विदेशी कापडावरील बहिष्कार आणि दारूच्या दुकानांसमोर अखंडपणे निरोधन चालू ठेवण्यात आले होते. गुप्तपणे विदेशी कापड विकणाऱ्याविरुद्ध वीर नरिमन यांनी मोहीम सुरू केली होती. सरकार स्वतः दिल्ली कराराचे पालन करीत नसल्याने महात्मा गांधींना त्वरित लंडनहून परत बोलवावे आणि सविनय कायदेभंगाचा पुनरारंभ करावा

यासाठी या संघटनांनी सरदार पटेलांना आधीच जोरदार आग्रह केला होता. यासाठी त्यांनी मुंबईत पटेलांची जाहीर सभाही आयोजित केली होती. सरकारने बंगालमध्ये अत्यंत जाचक असा वटहुकूम लागू करून लष्करी कायद्यासारखी भयंकर दडपशाही सुरू केली. तिचा मुंबईने जाहीररीत्या अत्यंत तीव्र निषेध केला होता. उपरोक्त तिन्ही संघटनांव्यतिरिक्त राष्ट्रीय मुस्लीम पक्ष, राष्ट्रीय महिला सभा, देश सेविका संघ, राष्ट्रीय महिला मंडळ, हिंदुमहासभा, मुंबई शीख असोसिएशन, अखिल भारतीय पत्रकार संघ, नौजवान भारत सभा आणि ख्रिस्ती नॅशनल असोसिएशन या सर्व संघटनांनी वटहुकूम व सरकारचा एका जाहीर सभेत निषेध केला.

मुंबई सरकार हिंदुस्तानी सेवा दलावर नेहमी लक्ष ठेवत असे. दलाच्या कार्यकर्त्यांची पत्रे पोस्टात अंतःखंडित करण्यात येत. १९३१ साली डॉ. हर्डीकर व नेहरूंनी सेवा दलाची पुनर्रचना केली. मुंबईतील ५०० आणि महाराष्ट्रातील ५०० स्वयंसेवक प्रशिक्षित करण्याचे उद्दिष्ट होते. दलाची कित्येक शिबिरे घेण्यात आली. नेहरू व हर्डीकर यांच्या योजनेनुसार ‘ महिला सेवा दल ’ उभारण्यात आले. कमलादेवी चट्टोपाध्याय यांना या संघटनेच्या प्रमुख करण्यात आले. त्यांनी महिला सेवा दलाचा देशभर विस्तार केला. हुबळी येथे त्यांच्यासाठी प्रशिक्षण केंद्र उभारले. लीलावती मुन्शी यांनी महिला सेवा दल मोहिमेसाठी महाराष्ट्रभर दौरे केले. मुंबई उपनगर जिल्ह्यात सोफिया सोमजी यांनी या मोहिमेसाठी बरेच काम केले. पुणे व नागपूरपेक्षा मुंबई आणि परिसरात हिंदुस्तानी सेवा दल व महिला सेवा दल आणि देश सेविका संघ राजकारणात अधिक सक्रिय होते. त्यांच्या हालचालींवर गुप्तचरांचे नेहमीच लक्ष असे. गुप्तचरांच्या अहवालांमधून हे आम्हाला आढळून आले. आगामी कायदेभंग लढ्यात या संघटना आक्रमक राहतील हा सरकारचा अंदाज होता.[२५] आणि तो खरा ठरला.

हिंदुस्तानातील स्फोटक परिस्थिती व सरकारने सुरू केलेली दडपशाही तसेच सविनय कायदेभंगासाठी जहाल काँग्रेसजनांची मागणी या पार्श्वभूमीवर सरदार पटेल यांनी ऑक्टोबर १९३१ मध्ये गांधीजींना पत्र लिहिले की, गोलमेज परिषद

सोडून भारतात परत यावे. त्यामुळे गांधीजींनी अमेरिकेला जाण्याचा विचार सोडून दिला व ते मुंबईला परत आले.

## आर्थिक महामंदी व कायदेभंग लढा

असहकार चळवळीचा उत्साहाने पुरस्कार करणाऱ्या मुंबईतील, आणि भारतातीलही, उद्योगपतींनी सविनय कायदेभंगाच्या प्रसंगी घुमजाव करून, त्यांनी त्यांच्या १९१८-१९२० मधील भूमिकेकडे पुच्छगमन केले. असहकार चळवळीतील 'स्वदेशी' चा त्यांनी विपुल लाभ उठवला होता. तथापि जागतिक महामंदीने धुळधाण उडवल्यामुळे १९३० पासून ते काँग्रेसच्या स्वातंत्र्य आंदोलनाचे विरोधक बनले. १९३०-१९३२ सालांमध्ये बी. पी. सी. सी. आणि मुंबई गिरणीमालक संघ यांच्यात वादविवादाच्या प्रचंड फैरी झडल्या. मालकसंघ आणि बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री यांचा सरकारशी असलेला सलोखा अधिक जिव्हाळ्याचा झाला. काही गिरणीमालकांचे काँग्रेसबरोबर सलोख्याचे संबंध असले तरी ते अल्पमतात होते.

उद्योगपती आणि ब्रिटिश सरकारचा आरोप होता की, काँग्रेसच्या सविनय कायदेभंग आंदोलनामुळे आर्थिक महामंदीची तीव्रता अधिकच वाढली. एका बाजूने उत्पादन केलेल्या मालास परदेशातून मागणी नव्हती. देशातूनही मागणी घटली होती. तर दुसऱ्या बाजूने स्वातंत्र्य आंदोलनामुळे कामगार वर्ग जागृत झाला व या वर्गात संघटनशक्ती निर्माण झाली. सरकार व मालकांच्या मते मुंबईत वर्ग जाणिवा निर्माण झाल्याने हा वर्ग हक्कवादी, आक्रमक आणि अनावर बनला. मंदीमुळे गिरणीमालक वेतनकपात, कामगारकपात आणि 'रॅशनॅलायझेशन' करून उत्पादन खर्चात कपात करण्याचा प्रयत्न करीत. त्यास कामगारांच्या संघटना विरोध करीत. या मुद्यांवरून मुंबई, सोलापूर व काही प्रमाणात नागपुरातही संप झाले. मुंबईतील १९२८ व १९२९ मधील सुप्रसिद्ध संपांचे बहुतेक पुढारी जरी कम्युनिस्ट असले, तरी संप व कामगारांना काँग्रेसचा संपूर्ण पाठिंबा असल्याचे स्पष्ट होते. निदान तेव्हा तरी गांधीजींना वर्गलढा हितावह वाटत नसला, तरी बी.पी.सी.सी. ने संपांना मदत दिली होती. गिरणी-मालकांच्या उत्पादन खर्च

कपातीच्या उपाययोजनांमुळे मुंबईतील कामगार विश्वात अशांतता तर निर्माण झालीच, पण शिवाय चळवळीस हिंसक वळण लागले. तेव्हा विदेशी कंपन्या बऱ्याच होत्या. उद्योगपती व बाँबे चेंबर ऑफ कॉमर्सच्या मते विदेशी कंपन्यांवरील बहिष्कारामुळे वितुष्ट अधिकच वाढले.

उद्योगपतींचा युक्तिवाद असा होता की, ‘ काँग्रेसच्या स्वदेशी आणि बहिष्कार मोहिमेमुळे त्यांचे दुर्मिळ भांडवल अडकून पडले ; त्यामुळे महामंदीचे आघात खोलवर जात आहेत ; विदेशी कंपन्यांवरील बहिष्कारामुळे उद्योगपती व व्यापारी वर्गांदरम्यान संघर्ष पेटत आहे ’. तथापि प्रांतिक काँग्रेसने तसेच व्यापाऱ्यांच्या संघटनांनी उद्योगपतींचा हा युक्तिवाद फेटाळून लावला. सविनय कायदेभंगाच्या काळात जागतिक मंदी आणि काँग्रेसचे जनआंदोलन यांची कारणमीमांसा व परस्परसंबंध या विषयांवर मुंबईत तीव्र वादंग माजले होते. सविनय कायदेभंगामुळे आर्थिक मंदीचे आघात वाढलेले नसून, भांडवलशाही अर्थव्यवस्थेशी निगडित असलेल्या ‘ ट्रेड-सायकलच्या ’ चक्रानुसार महामंदी आलेली आहे, असे काँग्रेसने प्रतिपादन केले. ब्रिटिशांनी प्रारंभापासूनच भारतीय अर्थव्यवस्थेची ब्रिटिश भांडवलशाहीशी सांगड घातली आणि तिला ब्रिटिश अर्थव्यवस्थेच्या अधीन करून ठेवलेली होती. त्यामुळे तिकडे होणाऱ्या तेजी-मंदीच्या चक्राचे परिणाम हिंदुस्तानलाही भोगावे लागतात, असा काँग्रेसचा युक्तिवाद होता. या युक्तिवादास अर्थशास्त्राचाही आधार होता.

वस्तुतः ब्रिटिश सत्तेचे अंतर्बाह्य स्वरूप वसाहतवादी शोषण यंत्रणा असे होते. भारतीय अर्थकारण व समाजकारण पूर्णतया ब्रिटिश अर्थव्यवस्थेच्या अधीन करणे आणि भारताला आपल्या हक्काचा ‘ पुरवठादार ’ बनवणे यात वसाहतवादाचे सार होते. इंग्लंड या मातृदेशाची धनसंपदा वाढवण्यासाठी कच्चा माल आणि साधनसामग्री व स्वस्त धान्य मिळवून आपला यंत्रनिर्मित माल विकण्यासाठी हुकमी बाजारपेठ ताब्यात ठेवणे हे ब्रिटिशांचे ध्येय होते. अमेरिकन स्वातंत्र्य युद्धानंतर आणि पुढे कॅनडा व ऑस्ट्रेलियातील गोऱ्यांच्या वसाहती स्वायत्त झाल्यावर अशी **सबसर्व्हिअंट म्हणजे अनुसेवी भूमिका इंग्रजांनी भारतावर**

**लादलेली होती.** भारत आर्थिक क्षेत्रातही परतंत्र झालेला होता. पाश्चात्त्य देशांमधील कापड उद्योगात मंदी येताच महाराष्ट्रातील कापसाला मागणीच उरली नाही. शेतकरी उद्‌ध्वस्त झाला. महाराष्ट्र राज्यातील शेकडो कापूस जिनिंग व प्रेसिंग कारखाने बंद पडले. मुंबई, सोलापूर व नागपुरातील अनेक गिरण्या बंद पडल्या किंवा त्यांनी कामगारकपात केली. महाराष्ट्र ट्रेड सायकलच्या हेलकाव्यात सापडला होता.

मुंबई गिरणीमालक संघ सविनय कायदेभंगाच्या दुष्परिणामांकडे अंगुली निर्देश करीत असताना, घनःश्यामदास बिर्ला, लालजी नारायणजी, अंबालाल साराभाई वगैरे उद्योगपती मात्र काँग्रेसची बाजू घेऊन महामंदी सरकारनेच लादली अशी टीका करीत. किंबहुना खूपच जागृत झालेला मुंबईतील कामगार वर्ग आणि मंदीमुळे अत्यंत हवालदिल झालेली जनता महात्मा गांधींच्या अहिंसेच्या आवाहनामुळेच हिंसेकडून अहिंसेकडे वळली, असे हे तिघे प्रतिपादन करीत असत. बी. पी. सी. सी. आणि बॉंबे यूथ लीग अत्यंत प्रभावीपणे सरकारी प्रचार यंत्रणा व सरकारधार्जिण्या वृत्तपत्रांचा मुकाबला करीत.

वस्तुतः आर्थिक मंदीच्या झळा अधिक तीव्र स्वरूपात लागण्यासाठी सरकारचे ब्रिटिशधार्जिणे वित्तीय धोरणच कारणीभूत झाले, असे काँग्रेसने दाखवून दिले होते. इंग्लंडने गोल्ड स्टँडर्डचा त्याग केला आणि रुपयाची गाठ स्टर्लिंगशी बांधली. त्याबरोबर चलन विनिमयाचा दर वाढविला आणि जबर करवाढ लादली. त्यामुळे १९३१ च्या वार्षिक अंदाजपत्रकाविरुद्ध देशभर गदारोळ झाला. तरीही सरकारने काहीच बदल केला नाही. वस्तुतः मुंबईतील अनेक कापड गिरण्या बंद पडण्याच्या स्थितीत होत्या. १९२९-३० सालात त्यापैकी बारा-तेरा गिरण्या बंद पडल्या वा त्यांचे दिवाळे निघाले होते. ऑक्टोबर १९३० पर्यंत मुंबईतील चोवीस कापड गिरण्या म्हणजे एकूण गिरण्यांपैकी २५ टक्के बंद पडल्या. त्यामुळे हजारो कामगारांना रोजगारास मुकावे लागले. उर्वरित गिरणीमालक टिकून राहण्यासाठी कामगारकपात आणि रॅशनॅलायझेशन करू लागले. त्या कारणाने कित्येक हजारांना रोजगारास मुकावे लागले. परिणामतः मुंबईत भयंकर बेरोजगारी

माजली. १९२७ साली मुंबईतील गिरण्यांमध्ये दैनिक कामगारांची सरासरी संख्या १,५४,३९८ होती. तिच्यात घट होऊन १९३० साली ती संख्या १,३६,७७४ पर्यंत घसरली. पुढील तीन वर्षे कामगारांच्या बेरोजगारीत सतत वाढ झाली. १९३१ मध्ये १,२९,०५७ कामगार नोकरीत होते. त्यांची संख्या १९३२ सालात १,२९,५३४ दिसून आली, तर १९३३ साली ती १,१९,९४३ पर्यंत घसरली. कापड उद्योगातील सहा वर्षांतील अशी घसरण सविनय कायदेभंगामुळे झालेली नव्हती, हे निश्चित. त्याचे कारण कलोनिअल भांडवलशाही हे होते.

आर्थिक मंदीच्या त्या काळात बेकार कामगार आणि लहान व्यावसायिक तसेच ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना उपजीविकेसाठी सोने व चांदीचे दागिने विकावे लागले होते. यास डिस्ट्रेस सेल ऑफ गोल्ड म्हणतात. असे काही हजार क्विंटल सोने व चांदी मुंबई बंदरातून विलायतेत परागंदा झाली. याविरुद्ध काँग्रेसने जोरदार आवाज उठविला होता. हा किमती माल मुंबई बंदरातून निर्यात होऊनही मंदीच्या फटक्यांमुळे मुंबई पोर्ट ट्रस्टचे उत्पन्न घटले होते. विमा कंपन्यांवरही मंदीचे प्रचंड आघात झाले. मात्र मंदीचे सर्वात मोठे आघात झाले ते कापूस व्यापारी, कापूस पिकविणारे महाराष्ट्रातील व गुजरातमधील किसान व गिरणी कामगारांवर! तसेच विदेशी कापडाचे घाऊक व किरकोळ व्यापारी यांनाही मंदीची झळ सोसावीच लागली. १९३१ च्या जनगणनेनुसार बेरोजगारामुळे मुंबईतील दीड लाख लोकांना येथून पलायन करावे लागले होते. हा मंदीचा ‘ प्रसाद ’ होता.[२६]

ब्रिटिश कालात कुटीरोद्योग नष्टप्राय झाल्यामुळे लोकसंख्येचा कृषी व्यवसायावर भार वाढत गेला. तशात कृषी माल पिकवणारा हा देश मंदीच्या चक्रात गुरफटला गेला. मात्र जमीनदार वर्ग सरकारच्या संरक्षणाखाली आपले ओझे लहान किसानांवर ढकलण्यात यशस्वी झाला. म्हणून नेहरूंनी प्रतिपादन केल्याप्रमाणे आर्थिक मंदीमुळे किसान वर्ग काँग्रेसकडे व सविनय कायदेभंगाकडे आकर्षित झाला. किसानांनी काँग्रेसला बळ मिळवून दिले आणि निम्नस्तरातील मध्यमवर्ग काँग्रेसच्या झुंजार सेनेचा कणा बनला. नवीन वातावरणात वरिष्ठ बूर्झ्वा वर्गालाही काँग्रेसशी सलोखा करण्यात स्वारस्य वाटायला लागले. परिणामतः लंडनमधील

गोलमेज परिषदांमध्ये प्रदर्शित झालेल्या शिष्टाईत या वर्गांना विशेष रस वाटला नाही.[२७] त्यामुळे महात्मा गांधी लंडनहून ज्या दिवशी मुंबईला परत आले, तेव्हा संपूर्ण देशातून त्यांच्या स्वागतार्थ हजारो लोक जमले होते. तात्पर्य, महात्मा गांधी व काँग्रेसला जो अपूर्व जनाधार लाभला तो राजकीय प्रमाणेच आर्थिक कारणांमुळेही !

## जातीय राजकारण

**मुस्लीम लीगचे राजकारण :—**गोलमेज परिषदेच्या पहिल्या सत्रासाठी बॅ. जिनांनी मुंबईहून विलायतेस प्रयाण केले (४ ऑक्टोबर १९३०), तेव्हा त्यांचा मुख्य उद्देश प्रिव्ही कौन्सिलपुढचे खटले लढविण्यासाठी लंडनमध्ये कायमचे स्थायिक होणे हाच होता! स्वातंत्र्य चळवळीत त्यांना रस नव्हता. प्रेमविवाह झालेली सुंदर पत्नी रतनबाई पेटिट हिच्या २९ व्या वाढदिवशी तिच्या झालेल्या निधनानंतर (फेब्रुवारी १९२९), बॅ. जिनांना भारतात राहण्यातही रस उरलेला नव्हता. परंतु जिना आपल्या चौदा कलमी मागण्यांबाबत तडजोड करण्यास अजिबात तयार नव्हते. मुसलमानांसाठी स्वतंत्र मतदारसंघ या मागणीवर ते ठाम होते. दरम्यान हिंदुस्तानात मुसलमानांसाठी एक स्वायत्त राज्य असावे अशी मागणी पुढे आली. "सारे जहाँ से अच्छा, हिदोस्तां हमारा.......... हिंदी है हम, वतन है हिंदोस्तां हमारा" हे सुप्रसिद्ध गीत रचणारे कवी महंमद इक्बाल १९३० मध्ये बदलले. तोपावेतो उदात्त विचार असलेले इक्बाल आता म्हणू लागले की, पंजाब, सिंध, वायव्य सरहद्द प्रांत व बलुचिस्तान या मुसलमान बहुल प्रदेशांचे एक वेगळे राज्य असावे. म्हणूनच गोलमेज परिषदेच्या दुसऱ्या व तिसऱ्या सत्रांत विभाजनवादी कवी इक्बाल यांना ब्रिटिशांनी मुद्दाम बोलावले होते.

मुसलमानांचा अनुनय करण्याचे इंग्रजांचे धोरण चालूच होते. तशात जानेवारी १९३३ मध्ये चौधरी रहमत अली या पंजाबी मुसलमान विद्यार्थ्याने केंब्रिजमध्ये एक पुस्तिका छापून 'पाकिस्तान' ही संकल्पना प्रथम मांडली. पंजाब, अफगाण प्रदेश, काश्मीर व सिंध प्रांताची आद्याक्षरे आणि बलुचिस्तान या नावातील इंग्रजी अंत्याक्षरे घेऊन या माणसाने PAKISTAN हा शब्द तयार केला होता. मात्र

हे केवळ स्वप्न आहे, असे तेव्हा जिनांनी म्हटले होते. त्यांनी १९३४ साली रहमत अलीला भेटही नाकारली होती. जिना किंवा दुसऱ्या एकाही मुसलमान नेत्याने १९३३-३४ साली पाकिस्तानची मागणी गंभीरपणे विचारात घेतल्याचे अभिलेखांमध्ये दिसत नाही.

इतकेच नव्हे तर एप्रिल १९३३ मध्ये दिल्लीत भरलेल्या मुस्लीम लीगच्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्षपद जिनांनी नाकारले होते. जिनांनी इंग्लंडमध्ये वकिली व्यवसायात चांगला जम बसवला होता. हाऊस ऑफ कॉमन्सची निवडणूक लढवून जिंकण्यात त्यांना स्वारस्य होते. मात्र ते प्रयत्न यशस्वी होईपर्यंत हिंदुस्तानातील मध्यवर्ती कायदेमंडळाचे सभासदत्व जिनांना कायम ठेवावयाचे होते. मुंबई शहरातील राखीव मुस्लीम मतदारसंघातून ते ऑक्टोबर १९३४ मध्ये बिनविरोध निवडून आले होते. तेव्हा त्यांचे वास्तव्य इंग्लंडमध्येच होते. सतत वीस वर्षे जिना मुंबईतून निवडून येत असत.

लीगने सर्व सामर्थ्य लावून प्रांतिक कायदेमंडळांच्या निवडणुका लढविण्याचे ठरल्यावर पक्षाने जिनांना केंद्रीय संसदीय मंडळाचे अध्यक्षपद दिले. लीगमधील त्यांचे प्रतिस्पर्धी हफीज हिदायत हुसेन आणि फझली हुसेन हे दोघे पैगंबरवासी झाल्यामुळे, तेव्हा जिनांच्या नेतृत्वास आव्हान देण्यास पात्र असलेला कोणीही जबरदस्त मुसलमान प्रतिपक्षी देशात नव्हता. मुंबईतील इस्माईल चुंद्रीगर, संयुक्त प्रांतातील लियाकत अली व महमुदाबादचे राजे, कोलकात्यातील हुसेन सुऱ्हावर्दी आणि उद्योगपती मिर्झा अबुल हसन इस्पहानी हे सर्वच जिनांचे समर्थक होते. नंतर फझलुल हक यांच्या कृषक प्रजा पक्षाशी जिनांनी सख्य केल्याकारणाने मुस्लीम लीगची ताकद वाढली.

१९३७ च्या निवडणुकीत मुसलमानांसाठी राखीव असलेल्या हिंदुस्तानातील ४५० जागांपैकी १०९ लीगला तर २६ काँग्रेसला मिळाल्या होत्या. मुंबई कायदेमंडळात काँग्रेसचा एकही मुसलमान उमेदवार विजयी झाला नव्हता, पण मुसलमानांसाठी राखीव असलेल्या येथील ३१ जागांपैकी २० जागा लीगने मिळविल्या होत्या. मध्यप्रांत वऱ्हाडात मुसलमानांचे लोकसंख्येतील प्रमाण अगदी

कमी होते. तरीही तेथे त्यांना अनुज्ञेय असलेल्या ५ ऐवजी १४ राखीव जागा इंग्रजांनी बहाल केल्या होत्या. बदलती परिस्थिती आणि इंग्रजांच्या अनुग्रहामुळे बॅरिस्टर जिना १९३७-३८ मध्ये मुसलमानांमध्ये लोकप्रिय झाले.[२८]

'वंदे मातरम्' गीत आणि हिंदी भाषेचा प्रचार तसेच देवनागरी लिपीतून हिंदुस्तानी भाषेला उत्तेजन यामुळे मुसलमानी लोकमत काँग्रेसविरुद्ध जात राहिले. वंदे मातरम् गीत लोकप्रिय झाल्यामुळे त्याची पहिली दोन कडवी देशभक्तीच्या भावनेने म्हणण्यात येत. त्यातील वर्णन संपूर्ण हिंदुस्तानला लागू पडत होते. मात्र पुढील कडवी फक्त हिंदूंना लागू पडणारी असल्यामुळे जातीयवादी मुसलमान या गीताला राष्ट्रगीत म्हणून स्वीकारण्यास तयार नव्हते. याउलट हिंदुत्ववादी समाज घटकांची संपूर्ण गीताविषयीची भूमिका खूप आग्रही होती. याचा फायदा मुस्लीम लीगने घेतला. काँग्रेसने या गीताचा स्वीकार केलेला असला तरी राष्ट्रगीत म्हणून औपचारिक निर्णय घेतलेला नव्हता. म्हणून वंदे मातरम् गीताची फक्त पहिली दोन कडवी राष्ट्रीय मेळाव्यांमध्ये म्हटली जावी, असा ठराव ऑक्टोबर १९३७ मध्ये काँग्रेस कार्यकारिणीने केला. पूर्वी पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर काफी रागात संपूर्ण वंदे मातरम् गीत म्हणत असत. १९२८-१९२९ पर्यंत काँग्रेसच्या प्रत्येक वार्षिक अधिवेशनात हे गीत म्हणण्याचा बहुमान पं. पलुस्करांना दिला जाई. जन गण मन राष्ट्रगीत नंतर आले.

येथे मुद्दा हा की, वंदे मातरम् गीताचा प्रसार व उर्दू लिपीची पिछाडी यामुळे मुसलमान लोक लीगकडे आकर्षित झाले. पण तरीही लीग व जिनांची स्थिती बंगालमध्ये बरीच कमकुवत होती, तर सरहद्द प्रांत आणि पंजाबमध्ये क्षुल्लक होती. सिंधमध्ये काँग्रेसच्या पाठिंब्यावर अल्ला बक्ष यांनी मंत्रिमंडळ बनवले (मार्च १९३८). काँग्रेस मंत्रिमंडळांच्या सत्तावीस महिन्यांच्या कार्यकालात मात्र जिना व लीगने काँग्रेसवर जहरी टीकेचा मारा केला. असत्य आरोप करणारे तीनचार अहवाल प्रसिद्ध केले. हिंदुमहासभेच्या कारवाया रोखण्यात काँग्रेसने योग्य कारवाई केली नाही असा आरोप केला. विशेषतः मध्यप्रांत-वऱ्हाडातील कार्यकर्ते व काही पुढारी हिंदुमहासभेचेही सभासद असून हिंदुत्ववादाचा प्रचार करतात हा मुद्दा लीगने

अधोरेखित केला. जातीय दंगे रोखण्यात काँग्रेस अपयशी ठरली आणि ईदच्या दिवशीही गोहत्याबंदी केली असा लीगने अपप्रचार केला. लीगने वंदे मातरम् व उर्दू भाषा अशा भावनिक मुद्यांवरही अपप्रचार करून मुस्लीम लोकमत कलुषित केले.

सर्वच मुद्यांवर निःपक्षपाती चौकशी करण्यासाठी सरन्यायाधीश मॉरिस ग्वाईर यांनी चौकशी करावी असा काँग्रेसने तोडगा सुचवला. पण लीगला चौकशी नको होती. जवाहरलालजी मार्ग काढण्यासाठी जिनांबरोबर चर्चा करण्याचा प्रयत्न करीत होते. पण जिनांनी नेहरूंना भेटण्यास नकार दिला. गांधीजींनी जिनांच्या घरी जाऊन प्रयत्न केला. काँग्रेस अध्यक्ष सुभाष बोसही मे १९३८ मध्ये जिनांच्या घरी जाऊन भेटले. तथापि असंतुष्ट व हटवादी जिनांचे म्हणणे एकच— 'मुसलमानांचे प्रतिनिधित्व करणारी मुस्लीम लीग ही एकमेव संघटना होय.' निदान १९४० च्या मध्यापर्यंत तरी ही जिनांची केवळ कल्पना होती. मात्र अशा हटवादी डावपेचांमधूनच बॅ. जिनांनी आपले नेतृत्व स्थापन केले.[२९]

**हिंदुमहासभेची वाढ :**—१९२४ सालात स्थापन झालेल्या पुणे हिंदुसभेचे रूपांतर १९३१ मध्ये महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेत करण्यात आले. मुख्यतः सामाजिक व धार्मिक प्रचार करणारी ही संघटना हळूहळू राजकारणात भाग घेऊ लागली. वि. दा. सावरकरांवर इंग्रजांनी कडक बंधने लादलेली असल्यामुळे ते निनावी लेख लिहीत. गुप्तचरांचा त्यांच्यामागे अविरत ससेमिरा असायचा. सावरकरांचे पूर्वाश्रमीचे काही सहकारी तुरुंगातून सुटल्यावर काँग्रेसच्या असहकार चळवळीत वा सविनय कायदेभंग लढ्यातही सहभागी झाले होते. सावरकर बंधूंबरोबरच अंदमानच्या यातना भोगून आलेले समशेरपूरचे वामन नारायण जोशी यांनी गांधीजींच्या सविनय कायदेभंगातील जंगल सत्याग्रहात भाग घेऊन कारावास पत्करला होता. खुद्द केशव बळीराम हेडगेवार नागपूर काँग्रेस अधिवेशनासाठी (१९२०) राबले होते व त्यांनी सत्याग्रह केला होता. त्यानंतर १९३० च्या सविनय कायदेभंगात व्यक्तिगत पातळीवर सहभागी होण्यास संघाने परवानगी दिली होती.

तथापि १९३२ मधील सविनय कायदेभंग आंदोलनात सभासदांनी अजिबात भाग घेऊ नये असा हिंदुमहासभेने नियम केला. सरकारने सावरकरांवरील निर्बंध उठवल्यावर (जून १९३७) ते मुंबईत स्थायिक झाले. त्यांनी काँग्रेस समाजवादी पक्षात येऊन चळवळीस योगदान द्यावे यासाठी एस. एम. जोशी आणि अच्युतराव पटवर्धन त्यांना भेटले होते. काही काँग्रेसजन त्यांच्या सत्कार समारंभांमध्येही सहभागी झाले. तथापि वि. दा. सावरकर काँग्रेसऐवजी लोकशाही स्वराज्य पक्षात गेले. मात्र अ. भा. हिंदुमहासभेने १९३७ च्या अहमदाबादमधील (कर्णावती) अधिवेशनाच्या अध्यक्षपदाची माळ विनायकरावांच्या गळ्यात घातली. तेव्हापासून हिंदुमहासभा हा राजकीय पक्ष बनला. या पक्षाने पुढील काळात हिंदुत्व आणि हिंदुराष्ट्राचा प्रचार केला.

१९३७ पासून सतत सहा वर्षे सावरकर हेच या पक्षाचे अध्यक्ष राहिले. पुणे हिंदुसभेचे काम करणाऱ्यांमध्ये नथुराम विनायक व गोपाळ विनायक हे गोडसे बंधू, नारायण आपटे, ह. भा. भिडे, रा. स. भट, अभ्यंकर, वा. ब. गोगटे व जयंतराव टिळक हे सक्रिय होते. सातारा-सांगली भागात पंडितराव दांडेकर, महादेवशास्त्री दिवेकर आणि कोल्हापुरात भालजी पेंढारकर हिंदुसभेचे काम करीत. नगरचे गोपाळ गायकैवारी, विष्णू करकरे आणि नागपूरचे वि. घ. देशपांडे, पु. भा. भावे व बाळशास्त्री हरदास हिंदुमहासभेचे कार्यकर्ते होते. या संघटनेत ब्राह्मणांचाच भरणा असल्यामुळे तिच्यापासून बहुजनसमाज लांब राहिला होता.[३०]

केशव बळीराम हेडगेवारांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्थापन केल्यानंतर १९३०-१९३९ या काळात संघाचा प्रसार झाला. नंतर बनारस हिंदू विद्यापीठाचे एक प्राध्यापक माधव सदाशिव गोळवलकर यांनी संघाचा बराच प्रसार केला.

❑❑

## संदर्भ


१. लॉर्ड आयर्विनचे बादशहा पाचवे जॉर्ज यांना पत्र, ११ जून १९३०, ब्रिटिश रॉयल अभिलेखागार, लंडन, उपरोक्त.

२. कित्ता, २० ऑगस्ट १९३० चे पत्र.

३. कित्ता, ५ फेब्रुवारी १९३१ चे पत्र.

४. जवाहरलाल नेहरू, **ॲन ऑटोबायोग्राफी**, पृ.२५७, २५९.

५. हिंदुस्तान सरकार, होम पोलिटिकल फाईल क्र. ३३/अकरा, १९३१.

६. कित्ता, क्र. ४/२१, १९३२.

७. नेहरू, उपरोक्त, पृ. २६१-६२.

८. सुभाषचंद्र बोस, **नेताजी : कलेक्टेड वर्क्स,** खंड २, १९८१, पृ. २२६.

९. लॉर्ड आयर्विनचे टिपण, १९ मार्च १९३१, उपरोक्त फाईल क्र. ३३/अकरा, १९३१.

१०. **कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी,** खंड पंचेचाळीस, पृ. ३३३-३४.

११. जितेंद्रनाथ संन्याल, **सरदार भगतसिंग**, १९८३, पृ.७३-७४.

१२. सुभाषचंद्र बोस, **द इंडियन स्ट्रगल : १९२०-१९४२,** न्युयॉर्क, १९६४, पृ. २०५-०८.

१३. ब्राऊन, **गांधी अँड सिव्हिल डिसओबिडिअन्स,** पृ.१४६-४७.

१४. कित्ता, पृ. १२२.

१५. सुमित सरकार, **मॉडर्न इंडिया : १८८५-१९४७,** पृ. ३१५-१८.

१६. सुभाषचंद्र बोस, **द इंडियन स्ट्रगल,** पृ. २१३.

१७. य. दि. फडके, **विसाव्या शतकातील महाराष्ट्र**, खंड ४, पृ.८६-८८.

१८. पट्टाभी सीतारामय्या, **हिस्टरी ऑफ द इंडियन नॅशनल काँग्रेस,** खंड एक, पृ. ४६७-७१, ४७८.

१९. **कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी,** खंड सत्तेचाळीस, पृ. ३६९.

२०. मुंबई पोलीस आयुक्त, फोर्टनाइटली रिपोर्ट ऑफ इंटेलिजन्स, ऑग. १९३१, फाईल क्र. १८/आठ, १९३१.

२१. नेहरू, उपरोक्त, पृ. २९१-९३.

## संदर्भ

२२. **कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी,** खंड अठ्ठेचाळीस, पृ. १३९.

२३. विलिंग्डनचे भारतमंत्र्यास पत्र, ४ ऑगस्ट १९३१, होम पोलिटिकल फाईल क्र. १३/आठ, १९३१.

२४. रॉबर्ट पेन, **लाईफ अँड डेथ ऑफ महात्मा गांधी,** लंडन, १९६९. पृ.४३१.

२५. के. के. चौधरी (संपा.) : **सोर्स मटेरियल फॉर हिस्टरी ऑफ फ्रीडम मुव्हमेंट : सिव्हिल डिसओबिडिअन्स मुव्हमेंट,** खंड बारा, पृष्ठ ९३-१०२, पोलीस आयुक्त विल्सनचे गृह सचिव कोलिन्स यास दैनिक अहवाल.

२६. के. के. चौधरी, **हिस्टरी ऑफ बॉंबे : मॉडर्न पिरिअड, पृ.१६७-६८.**

२७. नेहरू, उपरोक्त, पृ.२८२-८३.

२८. फडके, उपरोक्त, पृ. १९९-२०३.

२९. सरकार, उपरोक्त, पृ. ३५५-५६.

३०. फडके, उपरोक्त, पृ. २०६, २०८, २१०, २१२, २१३.

प्रकरण १३

# सविनय कायदेभंगाचे दुसरे सत्र

## आंदोलन अपरिहार्य

'कायद्याचे अधिराज्य' स्थापन केल्याची सदैव शेखी मिरवणाऱ्या इंग्रजांनी कसलाही विधिनिषेध न बाळगता अल्पावधीत प्रशासकीय नीतिमूल्यांची पायमल्ली केली. अमलात असलेले कायदे आणि दंडसंहिता परिणामकारक असूनही दहशत बसवण्यासाठी इंग्रजांनी वटहुकमांचे अधिराज्य प्रस्थापित केले. आणि तेही दिल्ली करार अस्तित्वात असताना! वस्तुतः सरहद्द प्रांत, संयुक्त प्रांत व बंगाल वगळता बहुतांश महाराष्ट्र, मध्य भारत आणि दक्षिण भारत शांत होता. मात्र त्या प्रांतांमधील अन्यायांविरुद्ध लोकलढे तुरळकपणे सुरू होते. तरी पण कोणत्याही निकषानुसार वटहुकूमशाही आणि दडपशाही समर्थनीय नव्हती. म्हणून लंडनहून परतल्यावर दुसऱ्या दिवशी (२९ डिसेंबर १९३१) गांधीजींनी व्हाइसरॉय विलिंग्डनला तार पाठविली की, दडपशाही करणारे अनेक वटहुकूम आणि सरहद्द प्रांत, संयुक्त प्रांत व बंगालच्या प्रमुख नेत्यांना अटक तसेच निर्घृण गोळीबार याचा अर्थ दिल्ली करारातील मैत्रीचा अंत मानावयाचा काय? यानंतर आणखी तारांची चकमक झाली. आणि मग कायदेभंग आंदोलनाचा पुनरारंभ ही एक सिद्ध गोष्ट बनली.

अखिल भारतीय काँग्रेस कार्यकारी समिती २८ डिसेंबरपासून मुंबईत अविरतपणे विचारविनिमय करीत होती. पक्षाने गोलमेज परिषदेकडून एकही चांगली अपेक्षा ठेवलेली नव्हती. म्हणून पुढील लढ्यासाठी संघटनेचे मजबूतीकरण आणि साधनसामग्री उभारण्याचे प्रयत्न सुरू होते. सविनय कायदेभंगाच्या पुनरारंभासाठी वित्तबळ व स्वयंसेवकांची पथके उभारण्याचे प्रयत्न चालू होते. विविध स्रोतांमधून अधिकाधिक साधनसामग्री संकलित करण्याची गरज भासत होती. ग्रामीण भारताच्या मर्यादा लक्षात घेऊन मोठे वित्तबळ व स्वयंसेवक दल उभारण्याची जबाबदारी मुंबई प्रांतिक काँग्रेस समितीवर (बी.पी.सी.सी.) सोपविण्यात आली होती. पंडित नेहरू, अब्दुल गफार खान व शेरवाणी यांची असमर्थनीय अटक

आणि वटहुकमांचे अधिराज्य म्हणजे काँग्रेसला इंग्रजांचे आव्हान होते. शिवाय गोलमेज परिषदेत स्वातंत्र्यप्राप्तीच्या उद्दिष्टात प्रगती न होता जातीय, वर्गीय व पंथीय हितसंबंधांचे हिडीस स्वरूप प्रकट झाले होते. आणि त्यास इंग्रजांनी उत्तेजन दिले. याचा काँग्रेसला विषाद वाटला. तरीही स्वतः गांधीजींना अगदी २ जानेवारी १९३२ पर्यंत कायदेभंगाचा पुनरारंभ करण्याची इच्छा नव्हती. मुंबईतील जाहीर सभा, पत्रकार परिषद व विविध संघटनांना दिलेल्या मुलाखतींमधून त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. गोलमेज परिषद ही केवळ 'डिबेटिंग सोसायटी' ठरली असे सांगून, सरकारने दिलेल्या आव्हानांचा मुकाबला कसा करावयाचा यावर काँग्रेस कार्यकारिणी निर्णय घेईल, असे गांधीजींनी २८ डिसेंबर १९३१ च्या पत्रकार परिषदेत घोषित केले. त्या तारखेपर्यंत युध्यमान वृत्तीच्या व्हाइसरॉय विलिंग्डन साहेबाने एकूण तेरा वटहुकूम प्रख्यापित (Promulgate) करण्याचा पराक्रम केलेला होता. त्याने आयर्विनला याबाबतीत फारच मागे टाकले!

नेहरूंच्या आदेशानुसार संयुक्त प्रांताच्या काही भागात काँग्रेसने 'समांतर प्रतिसरकार' चालविले, असा तेथील गव्हर्नरचा अहवाल होता. अन्यायाने पीडलेल्या किसानांनी सरकारला शेतसारा व कर न देता स्वतंत्र यंत्रणा उभारली होती. त्यांनी सामाजिक सेवा, दवाखाने, न्यायालये वगैरे उभारले. महात्मा गांधींनी त्या शांततामय प्रतिसरकारचे स्पष्टपणे समर्थन केले. तसेच त्यांनी धाडसी, भावनाप्रधान व शूर बंगाली युवकांची प्रशंसा करून पुढे म्हटले की, कॉमन्स सभागृहात त्यांच्यावर आरोप केल्याने ते जहालवादाकडे वळले.[१]

गोलमेजचा घोळ चालू असतानाच विलिंग्डन भारतमंत्र्यांना बजावत होते की, सरकारने हिंदुस्तानला आपली प्रचंड ताकद आधीच दाखवून दिली पाहिजे; करार किंवा विरामसंधी होता कामा नये. त्यांनी लिहिले, " Government must win quickly, decisively and completely, whereas moderate action may lead them into a desperate situation like that reached in Bombay".[२]

मुंबईचा गव्हर्नर लॉर्ड साईक्स हा याच विचारधारेचा सर्वात मोठा अनुचारी होता. त्याने व्हाइसरॉयला आग्रह केला की, 'आपले आक्रमक व खंबीर धोरण अधिक स्पष्ट हवे; धोरणाच्या अंमलबजावणीची आयुधे तयार हवी आणि अगदी सर्वंकष व सर्वस्पर्शी असे वटहुकूम तयार ठेवणे आवश्यक होय'. विलिंग्डन साहेबांचे मत होते की, ऑगस्ट १९३१ मधील उपाययोजना पुरेशी आहे. तथापि साईक्स साहेबाने स्वतःचाच हेका चालू ठेवून व्हाइसरॉयला सांगितले की, शक्य तितक्या वेगाने काँग्रेस पक्ष आणि संघटनेला नेस्तनाबूत करावे.

गांधीजींना विलिंग्डन यांनी भेट नाकारण्याचे धोरण आणि हिंदुस्तान सरकारशी कोणत्याही विषयावर चर्चा करू न देण्याचा निर्णय आधीच घेतलेला होता. या निर्णयात साईक्सचा सक्रिय सहभाग होता. वस्तुतः लंडनमधील टोरी सरकारला इतकी टोकाची भूमिका नको होती. परंतु तरीही गांधीजी यांना कोठे स्थानबद्ध करावे याविषयी मध्यंतरीच्या काळात विलिंग्डनचे सरकार मुंबई सरकारशी विचारविनिमय करीत होते, लंडनची परवानगी न घेताच! मात्र मुंबई सरकार गांधीजींना आपल्या कोणत्याच कारागृहात ठेवण्यास तयार नव्हते. मुंबई सेक्रटेरिएटने दिल्लीला कळविले की, गांधीजींना एडन अथवा अंदमानमध्ये पाठवण्यात यावे. तथापि दिल्लीने थोडा सुज्ञपणे विचार करून पुण्यातील येरवडा जेलमध्ये गांधीजींसाठी व्यवस्था करून ठेवली.[३]

बॉबे चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री आणि मुंबईतील युरोपियन असोसिएशन या गोऱ्या लोकांच्या दोन्ही संघटना गोलमेज परिषद चालू असतानाच मुंबई सरकारवर दडपण आणत होत्या. या देशद्रोही संस्था आग्रह करीत होत्या की, कायदेभंग आंदोलनाचा पुनरारंभ झाल्यास सरकारने काँग्रेसचे आंदोलन चिरडून टाकण्यासाठी विनाविलंब अतिकठोर उपाययोजना करावी. मुंबईतील या संस्था आणि पुण्यातील युरोपियन असोसिएशन यांच्या शिष्टमंडळाने १५ ऑक्टोबर १९३१ च्या अर्जासह मुंबई सरकारच्या गृहसचिवाची भेट घेतली. त्यांची कैफियत अशी होती की, काँग्रेसजनांना व शांतता भंग करणाऱ्यांना दहशत बसेल असे उपाय योजावे; काँग्रेसचा ध्वज फडकवण्यावर बंदी घालावी ; तसेच स्वयंसेवकांचे

संचलन आणि मिरवणुकांवर बंदी घालणे आवश्यक आहे. याबरोबरच कायदेभंगाच्या पहिल्या फेरीत सहभागी झालेल्या सर्वच माणसांना तात्काळ स्थानबद्ध करावे. इतकेच नव्हे तर अशा माणसांपैकी बहुतेकांना युद्धातील शत्रूराष्ट्राचे नागरिक समजून कठोर शिक्षा द्याव्या. त्याचप्रमाणे खास वटहुकूम काढून काँग्रेसला मिळणाऱ्या निधीचे स्रोत शोधून काढावे व या पक्षाचा निधी जप्त करावा. काँग्रेसला अनुकूल असलेल्या कापड गिरण्या व कारखान्यांना रेल्वेची सुविधा नाकारण्यात यावी. शिवाय बहिष्कार आंदोलनाचा देशी कापड गिरण्यांना वा व्यापाऱ्यांना लाभ होऊ नये यासाठी सर्वतोपरी उपाययोजना करावी. यावरून या गौरकाय मंडळींच्या मनात भारतद्वेष किती होता हे दिसते.[४]

दरम्यानच्या काळात टोरी पक्षाचे भारतातील सरकार व त्यांचे भारतीय सहयोगी पक्ष यांनी सिमल्यात खलबते करून संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी फेटाळण्यासाठी कट कारस्थान रचले होते. सप्रू, बॅ. जयकर, ए. पी. पात्रो वगैरेंना काँग्रेसच्या विरुद्ध उभे करणे शक्य न झाल्यास, त्यांना काँग्रेसचे समर्थक तरी होऊ देऊ नये असा प्रयत्न चालू होता. प्रतिगामी मुसलमान नेत्यांचा ब्रिटिशांशी सलोखा झाला. त्यामुळेच सर अली इमाम यांना हैदराबादचे पंतप्रधान पद लाभले. गोलमेज परिषदेत केलेल्या सरकारी सेवेचे बक्षीस म्हणून हिज हायनेस आगाखान यांना आणखी एकाद्या प्रदेशाचे संस्थानिक करण्याचाही प्रस्ताव होता. काँग्रेसविरुद्ध इंग्रज व मुस्लीम लीगचे इतके व्यापक कारस्थान चालू होते.[५]

अशा तणावाच्या स्थितीत विलिंग्डन व काँग्रेस यांच्यात समेट होणे असंभव होते. सरकार वटहुकूम मागे घेण्यास अथवा आक्रमक पवित्रा सोडण्यास तयार नव्हते. हटवादी व दुराग्रही सरकार आणि लढा थांबविण्यास राजी नसलेले काँग्रेस नेते व युवक यांच्यामध्ये सापडलेल्या गांधीजींना अंतिम निर्णय घ्यायचा होता. काहीशा नाखुषीने पण संपूर्ण विचारांती त्यांनी आपल्या विचारप्रणालीप्रमाणे निर्णय घेतला. काँग्रेसमध्ये मतभिन्नता नव्हती, भ्रम नव्हता! मुंबई यूथ लीगचा उत्साह ओसंडत होता. २८ डिसेंबरपासून मुंबईत आणि मणि भवनमध्ये अखंडपणे विचारविनिमय, चर्चा व पुढील योजना आखल्या जात होत्या. शेकडो राजकीय,

सामाजिक कार्यकर्ते आणि युवकांच्या संघटना आंदोलनास सक्रिय पाठिंबा देण्यासाठी व मार्गदर्शन घेण्यासाठी मणि भवनमध्ये येत होत्या. शेकडो व्यापारी व त्यांच्या संघटना आणि कित्येक धनिक व गिरणीमालकांनीही आंदोलनासाठी देणग्या दिल्या. अनेक ठिकाणी प्रार्थना सभा झाल्या. या सत्याग्रहाचे मुख्यालय काही दिवस मणि भवनमध्येच होते. नामवंत देशी व विदेशी पत्रकार राष्ट्रीय नेत्यांना तिथे भेटत.

**समेटाचे प्रयत्न.—**त्या युध्यमान वातावरणात आंदोलन टाळण्याचा सवाल नव्हता, प्रयत्नही नव्हता. तथापि अधिक परिणामकारक लढ्यासाठी उसंत मिळावी यासाठीच गांधीजींचा प्रयत्न होता. म्हणून २९ डिसेंबरला त्यांनी व्हाइसरॉयला तार पाठवून भेटीची विनंती केली. 'सरकारने काढलेले अनेक वटहुकूम आणि सरहद्द प्रांत, संयुक्त प्रांत व बंगालमधील गोळीबारांमध्ये सरकारने केलेली निरपराध नागरिकांची हत्या तसेच राष्ट्रीय पुढाऱ्यांना केलेली अटक या कृत्यांचा अर्थ दिल्ली करारातील मैत्रीचा अंत झाला, असे मानावयाचे काय', असा सवाल गांधीजींनी व्हाइसरॉयला विचारला. तथापि व्हाइसरॉय या खंडप्राय देशाच्या सर्वोच्च पुढाऱ्यास भेटण्यासही तयार नव्हता. व्हाइसरॉयने उर्मटपणे भेट नाकारत खाजगी सचिवामार्फत उत्तर दिले— "सर्व प्रकारची विघातक कृत्ये हाणून पाडण्यासाठी सर्व प्रकारची दंडात्मक उपाययोजना करण्यात येईल." सरकारच्या मते प्रभात फेरी, शांततामय सभा किंवा राष्ट्रध्वज फडकवणे हीदेखील विघातक व घातपाती कृत्ये होती.

या उत्तराने काँग्रेस नेते दुखावले गेले. तरीही १ जानेवारी १९३२ रोजीच्या दुसऱ्या प्रदीर्घ तार संदेशाद्वारे गांधीजींनी व्हाइसरॉयला पुढीलप्रमाणे समज दिली :—"सरकारने जुलमी वटहुकूम लागू करून सांविधानिक सुधारणांचा विषय निरर्थक केला आहे. वटहुकमांचे अधिराज्य निर्माण करून या राष्ट्राचे नीतिधैर्य खच्ची करण्यात येत आहे. सरहद्द प्रांतातील नेत्यांची धरपकड अगदी असमर्थनीय आहे. सरकारच्या या कृत्यांचा निषेध करणाऱ्या निःशस्त्र नागरिकांची हत्या अजूनही सुरू आहे. गफार खान यांनी केलेला संपूर्ण स्वातंत्र्याच्या मागणीचा

पुनरुच्चार हा त्यांचा अपराध नव्हे! तथापि त्यासाठी त्यांना अडकवण्यासाठीच त्यांच्यावर वांशिक द्वेष पसरवण्याचा निखालस असत्य आरोप सरकारने ठेवला. हे निंदनीय होय." असे गांधीजींनी व्हाइसरॉयला फटकारले. वस्तुतः संयुक्त प्रांतातील किसानांचे प्रलंबित राहिलेले प्रश्न सोडविण्याचे सरकारने आश्वासन दिलेले होते. "परंतु त्याबाबत कार्यवाही न करता किसानांचे नीतिधैर्य नष्ट करण्यासाठी सरकार दहशतवादी उपाय योजत आहे. याबाबत किसानांचा कैवार घेणारे जवाहरलाल, शेरवाणी व टंडन यांना अटक करून दडपशाही करण्यात येत आहे," असेही गांधीजींनी सुनावले. त्याचप्रमाणे बंगालमधील काही जहाल युवकांच्या सशस्त्र कारवायांसाठी संपूर्ण बंगालमध्ये वटहुकमांचे अधिराज्य निर्माण केले, असा गांधीजींनी सरकारवर आरोप केला.

या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी अखेरचा एक प्रयत्न म्हणून महात्मा गांधींनी त्या प्रदीर्घ तारेत म्हटले, " या सर्व बाबींवर समक्ष चर्चा करण्याची अजूनही माझी तयारी आहे. पण आम्हाला दिसणारी परिस्थिती पाहता, मला अटक झाल्यास आमजनतेला मार्गदर्शन करण्याची मला संधी मिळणार नाही. म्हणून माझा सल्ला स्वीकारून काँग्रेस कार्यकारी समितीने सविनय कायदेभंग आंदोलनाचा पुनरारंभ करण्याचा ठराव संमत केलेला आहे. या ठरावाची प्रत सोबत पाठवित आहे. व्हाइसरॉय महोदयांचे याला उत्तर येईपर्यंत ठरावाची अंमलबजावणी तहकूब ठेवण्यात येईल."

संपूर्ण स्वातंत्र्याच्या मागणीबाबत ब्रिटिश सरकार भारताची कशी प्रतारणा करीत आहे आणि गोलमेज परिषदेत कसे डावपेच रचले, याबाबत या ठरावात विश्लेषण केलेले आहे. तसेच सरहद्द प्रांत, संयुक्त प्रांत व बंगालमध्ये सरकारने आचरणात आणलेल्या दहशतवादाचा काँग्रेसने आपल्या ठरावाद्वारे तीव्र निषेध केला होता. आपले अस्तित्व टिकवण्यासाठी सरकारने वटहुकमांचे अधिराज्य निर्माण केले, असे काँग्रेसने फटकारले. त्याचबरोबर कायदेभंग आंदोलनासाठी काँग्रेस कार्यकारिणीने बारा मार्गदर्शक निदेश (आदेश) ठरावातच नमूद केले.[६]

आंदोलनाच्या पुनरारंभाचा ठराव काँग्रेस कार्यकारिणीने मुंबईतील मणि भवनात संमत केला. अखंडपणे चाललेल्या या बैठकीत गांधीजी व काँग्रेस अध्यक्ष वल्लभभाई पटेल यांच्याव्यतिरिक्त डॉ. राजेंद्र प्रसाद, मौलाना आझाद, जमनालाल बजाज, जयरामदास दौलतराम, डॉ. अन्सारी, माधवराव अणे, महमद आलम, सईद महमुद व के. एफ. नरिमन हे कार्यकारिणीचे सदस्य आणि आमंत्रित म्हणून सुभाषचंद्र बोस, गोविंद वल्लभ पंत, जी. बी. चौधरी, राजगोपालाचारी, पट्टाभी सीतारामय्या व कोंडा वेंकटपय्या उपस्थित होते. आपापल्या प्रांतात व्यवस्था करण्यासाठी त्यांना १ जानेवारीला जाण्यास सांगितले. मात्र अणे प्रांतिक परिषदेसाठी पनवेल येथे गेले. गांधीजी आणि सरदार पटेल मुंबईतच राहिले.

मुंबई सरकार अचानक झडप घालणार हे अपेक्षित असल्याने बी. पी. सी. सी. ने स्वयंसेवक पथकांची आधीच पुनर्रचना केली होती. लवकरच मुंबईत वटहुकूम जारी करण्यात येईल हे समजताच काँग्रेस भवनातील सर्व दस्तऐवज, कागदपत्र व फर्निचर तीन मोटारींमध्ये भरून इतरत्र नेण्यात आले. महत्त्वाचे कागदपत्र स्वयंसेवकांनी १ जानेवारीपर्यंत गोपनीय ठिकाणी नेऊन ठेवले होते. मुंबई यूथ लीगचे उपाध्यक्ष युसुफ मेहेरअली यांच्याकडे निधी संकलन करणे, आंदोलनाचे सूत्रसंचालन व काँग्रेसला सर्वतोपरी मदत करण्याचे अधिकार देण्यात आले. नौजवान भारत सभेचे प्रादेशिक अध्यक्ष डॉ. गंगाधरराव चिटणीस यांनी १ जानेवारीला सुभाष बोस यांना लॅबर्नम रोडवरील आपल्या घरी बोलवून खलबते केल्याचे मुंबईच्या गुप्तचरांना माहीत होते. पण नेताजींनी जाहीर सभा घेण्यास नकार दिला होता. नौजवान सभा अतिजहाल संघटना असल्याने तिच्या व्यासपीठाऐवजी नेताजींनी **काळबादेवी स्वदेशी प्रचारिणी मंडळाच्या** व्यासपीठावरून स्वदेशी व कायदेभंगावर प्रेरणादायी भाषण दिले. सरकारने चित्तगाव आणि हिजलीमध्ये केलेली कत्तल व स्थानबद्ध जहाल युवकांवर केलेल्या गोळीबारांची कहाणी नेताजींनी मुंबईकरांना सांगितली. याच सभेत जमनादास द्वारकादास व मूलराज कर्सनदास यांनीही स्वदेशी व काँग्रेसचा जोरदार प्रचार केला.

काँग्रेस कार्यकारी समितीने सविनय कायदेभंगाचा ठराव १ जानेवारीला घोषित करून, व्यापारी वर्ग, जमीनदार वर्ग व गिरणीमालकांना तसेच जगातील सर्व राष्ट्रांना भारताची भूमिका मुंबईतून विशद केली. गांधीजींनी असोसिएटेड प्रेस ऑफ इंडियाला मुलाखत दिली. भारतमित्र वेरीअर एल्व्हीन गांधीजींना भेटले. गांधींसारख्या महान राष्ट्रसेवकाला सरकारच्या प्रमुखाने मुलाखत देण्यास नकार देणे हे सर्वच मान्यवरांना हास्यास्पद व उर्मटपणाचे वाटले. अमेरिकन पत्रकारांना गांधीजींनी पुढील संदेश दिला :— "On the eve of embarking on what promises to be a deadly struggle, I would expect the numerous American friends to watch its career, and use influence of the great nation for the sake of the oppressed humanity. This Indian struggle is more than national. It has an internatonal value and importance."[७]

गांधीजींना कोणत्याही क्षणी अटक होण्याची शक्यता होती. आंदोलनाच्या आवेशाने मुंबईचा आसमंत भारला गेलेला होता. तरीही गांधीजी विविध क्षेत्रातील मान्यवरांना मुलाखती देत होते व मदतीची आश्वासने घेत होते. त्यांनी देशापुढे सविनय कायदेभंगाचा कार्यक्रम मांडला व त्यातील कलमे विशद केली. **बॉँबे क्रॉनिकल** पत्रकात सविस्तर कार्यक्रम प्रकाशित करण्यात आला.

३ जानेवारीच्या रात्री गुजरात मेलने गांधीजी आणि सरदार पटेल मुंबईहून अहमदाबादला जाणार होते. त्यासाठी रेल्वे प्रवासाचे आरक्षणही करण्यात आले. ही बातमी कळताच सर कावसजी जहांगीर व काही लिबरल मान्यवरांनी सरदार पटेलांतर्फे गांधीजींचे मन वळवून त्यांना मुंबईतच राहण्याचा आग्रह केला. त्यांच्या विनंतीला मान देऊन गांधीजींनी ठरलेला बेत बदलून रेल्वे आरक्षण रद्द केले (संध्याकाळी ७ वाजता). मात्र गांधीजी अहमदाबादला जाणार ही बातमी २ जानेवारीला मुंबई सरकारच्या गृहमंत्र्याला समजली होती. त्याने नवी दिल्लीस तार संदेशाद्वारे कळविले की, "गांधीजी सोमवारी रात्री आगगाडीने अहमदाबादेस जाणार आहेत. त्यांना अतितात्काळ अटक करण्याची आवश्यकता असल्या-

कारणाने वाटेवरच गाडीत पकडणे श्रेयस्कर वाटते. तसे करण्याने त्यांच्या अटकेस मोठी प्रसिद्धी मिळणार नाही व प्रक्षोभ माजणार नाही. म्हणून आम्हास स्वेच्छानिर्णयाची परवानगी मिळावी." लॉर्ड साईक्सच्या सरकारने मागितलेली ही स्वेच्छानिर्णयाची परवानगी विलिंग्डन यांच्या सरकारने दिली. तथापि गांधीजी व पटेलांनी प्रवासाचा बेत रहित केल्याने त्यांना 'वाटेवर' अटक करणे शक्य झाले नाही. त्यामुळे मुंबईच्या नोकरशाहीची थोडी निराशा झाली.[८]

## प्रातःकालीन झडप

रात्री घडावयाचे ते प्रातःकाली ३ वाजता घडले. ४ जानेवारी १९३२ च्या त्या सोमवारी मुंबईचा पोलीस आयुक्त विल्सन हा मणि भवनवर दाखल झाला. संपूर्ण शहरच नव्हे तर हे भवनही शांत झोपलेले होते. गांधीजी या भवनाच्या गच्चीवरील तंबूत निद्राधीन होते. त्यांना सुपुत्र देवदास गांधींनी जागे केले. त्या दिवशी त्यांचे मौन होते. १८२७ सालच्या पंचवीस क्रमांकाच्या जुनाट रेग्युलेशन अनुसार सरकारने काढलेला पकड वारंट आयुक्ताने दाखवताच त्यांनी स्मितहास्य केले. आणि ३५ मिनिटांत गांधीजी तयार झाले. प्रार्थना झाल्यावर त्यांनी सहकाऱ्यांना काही सूचना दिल्या व ते विल्सनच्या कारमध्ये बसले. तोपर्यंत मणि भवनाबाहेर पुष्कळ लोक जमले. त्यांना संदेश देऊन गांधीजी निघाले. त्यांना थेट येरवड्याच्या कारागृहात नेण्यात आले. काँग्रेस अध्यक्ष वल्लभभाई पटेलांनाही तेव्हाच त्यांच्या निवासस्थानी अटक करून दुसऱ्या कारमधून येरवडा कारागृहातच नेण्यात आले. सुभाषचंद्र बोस यांना कल्याणला बहुधा आगगाडीत अटक झाली. सर्वत्र धरपकड करण्याचे सत्र सुरू झाले. 'सिव्हिल मार्शल लॉ' चा अंमल प्रातःकालीच सुरू झाला.

आधीपासून अमलात असलेल्या तेरा वटहुकमांच्या जोडीला ४ जानेवारी १९३२ रोजी मध्यवर्ती सरकारने पुढील चार वटहुकूम घोषित करून लोकांना नववर्षाची जहरी भेटवस्तू दिली—इमर्जंसी पॉवर्स ऑर्डिनन्स, अन्लॉफूल इंस्टिगेशन ऑर्डिनन्स, अन्लॉफूल असोसिएशन ऑर्डिनन्स आणि प्रिव्हेंशन ऑफ मोलेस्टेशन अँड बॉयकॉट ऑर्डिनन्स! सनदी नोकरशाहीला व पोलीस अधिकाऱ्यांना अमर्याद सर्वाधिकार बहाल करण्यात आले.

माजी व्हाइसरॉयने महात्मा गांधींना दिलेली समानतेची वागणूक आणि केलेला करार नोकरशाहीला व सर्वच गव्हर्नरांना मुळातच आवडलेला नव्हता. ती सूडभावना आता व्यक्त झाली. त्यामुळे अधिकारशाहीच्या निर्धारातून खास न्यायालये, संक्षिप्त न्यायप्रणाली, खास दंड संहिता अशी उपाययोजना करण्यात आली. नवीन प्रणालीनुसार खास न्यायालयांच्या निकालांविरुद्ध अपील करता येत नसे. नोकरशाही बनली सर्वाधिकारशाही! ब्रिटिश सरकारचे हिंदुस्तानातील अस्तित्वच धोक्यात आले अशा संशयाने सरकारला पछाडल्यामुळे वटहुकूमशाही सर्वस्पर्शी आणि समावेशक करण्यात आली. ब्रिटनमध्येही याबाबत लिबरल मंडळींनी सरकारवर टीका केली. तेव्हा भारतमंत्री सॅम्युएल होअर यांना २६ मार्च १९३२ रोजी पार्लमेंटमध्ये कबूल करावे लागले की, "बरेच वटहुकूम भयंकर ड्रॅस्टिक आणि अतिकठोर आहेत. सरकारने भारतीय जीवनातील प्रत्येक कृती वटहुकमांच्या कक्षेत आणून ठेवली."[१] **यामागील लपलेले सत्य असे की, व्हाइसरॉय विलिंग्डन काही वेळा भारतमंत्र्यांऐवजी पंतप्रधान किंवा बादशहा पाचवे जॉर्ज यांच्याकडून हवे तसे आदेश घेऊन मनमानी करीत असे.** सर्व वटहुकूम आंदोलनापूर्वीच तयार ठेवलेले होते. बहुधा पंतप्रधानांच्या मूक संमतीने!

मुंबई प्रांतिक काँग्रेस समितीसह महाराष्ट्र, वऱ्हाड व मध्यप्रांत या चारही प्रांतिक काँग्रेस समित्या, तसेच सर्व जिल्हा, तालुका व शहर काँग्रेस समित्या वटहुकमांनुसार बेकायदेशीर असल्याचे घोषित करण्यात आले. सर्व समित्यांच्या इमारती, मालमत्ता व कागदपत्र सरकारने ताब्यात घेतले. पोलीस उपआयुक्ताने ४ जानेवारीला सकाळी ७ वाजता मुंबईतील काँग्रेस भवन ताब्यात घेऊन इमारतीवर युनियन जॅक फडकवला. मात्र या भवनाची झडती घेताना तेथे पोलिसांना घातपाती साहित्य मिळाले नाही. माटुंग्याचे महिला मध्यवर्ती प्रशिक्षण विद्यालयदेखील पोलिसांनी बळकावले. सर्व राष्ट्रीय शाळा व महाविद्यालये बेकायदा ठरवली. मुंबईचे नॅशनल मेडिकल कॉलेज, पुण्याचे टिळक राष्ट्रीय महाविद्यालय, अमरावती व नागपूरच्या राष्ट्रीय शिक्षण संस्था वगैरेंवर वटहुकमांचा वरवंटा फिरवण्यात आला. विविध नावांनी काँग्रेसशी संबंधित असलेली संपूर्ण

संस्थात्मक संरचना गतप्राण करण्याकरिता ब्रिटिशांनी सर्वाधिकारशाहीचा उपयोग केला. पक्षाचा निधी हस्तगत करण्यासाठी जंगजंग पछाडले. संशय असलेल्या देणगीदारांचाही छळ केला. ब्रिटिशांनी हुकूमशाही प्रस्थापित केली!

राष्ट्रीय काँग्रेस आणि काँग्रेस कार्यकारी समिती व पक्षाची यंत्रणा बेकायदेशीर ठरविण्यासाठी एक स्वतंत्र वटहुकूम काढला. दुसऱ्या वटहुकमांनुसार सविनय कायदेभंग मोहीम, निरोधने, विदेशी मालावर बहिष्कार, स्वदेशीचा प्रसार, संप वगैरे कार्यक्रम सरकार-विरोधी ठरवून ते कडक दंडनीय गुन्हे ठरविण्यात आले.

महात्मा गांधी व काँग्रेस अध्यक्ष सरदार पटेलांना प्रातःकाली ३ वाजता अटक केल्याची वार्ता लगेच मुंबईत पसरली. शहरातील कित्येक काँग्रेस पुढाऱ्यांना सूर्योदयापूर्वी किंवा लगेच अटक करण्यात आली. पकड वारंट आधीच तयार असावेत. मुंबईतील हा हल्ला 'पर्ल हार्बर'सारखा असल्याने ४ जानेवारीच्या दुसऱ्या प्रहरापर्यंत व्यापक निदर्शने झाली. शाळा व महाविद्यालये बंद पडली. दुपारपर्यंत २७ कापड गिरण्यांमधील कामगारांनी गिरण्या बंद पाडल्या असे पोलीस आयुक्ताने गृह सचिवास कळविले. युरोपियन वगळता सर्व भारतीयांनी आपली दुकाने सरकारचा निषेध म्हणून बंद केली. हा प्रतिसाद उत्स्फूर्त होता. शहरातील हरताळही उत्स्फूर्त होता. शहरातून प्रचंड मिरवणूक काढून आझाद मैदानावर सव्वापाच वाजता मोठी जनसभा भरविण्यात आली. वीर नरिमन, नगीनदास मास्टर, विठ्ठलभाई पटेल, जमनादास द्वारकादास, एस. के. वैद्य, के. एम. मुन्शी आणि कस्तुरबा गांधी यांनी सभेद्वारे आंदोलनाचे स्पिरिट जागृत केले.

काँग्रेसच्या निर्णयानुसार प्रत्येक पदाधिकाऱ्याने आपल्या उत्तराधिकाऱ्यांची यादी अटकेपूर्वी तयार ठेवायची होती. त्यानुसार काँग्रेस अध्यक्ष सरदार पटेलांनी त्यांचे उत्तराधिकारी म्हणून डॉ. राजेंद्र प्रसाद यांना नामनिर्देशित केले. त्यांच्यानंतर पटेलांनी डॉ. एम. ए. अन्सारी, शार्दुलसिंग कविशर, अबुल कलम आझाद, सरोजिनी नायडू, गो. आ. देशपांडे, सैफुद्दीन किचलू व राजगोपालाचारी या क्रमाने काँग्रेस अध्यक्ष नामनिर्देशित केलेले होते. प्रत्येक हंगामी काँग्रेस नेत्याने अथवा

पदाधिकाऱ्याने आपली कामगिरी, नेहरूंनी म्हटल्याप्रमाणे, बरीच यशस्वीरीत्या पार पाडली. हंगामी काँग्रेस अध्यक्षांच्या मालिकेत जाऊन बसण्याचा अल्पसा मान पुढे विदर्भातील माधव अणे यांनाही लाभला.

आंदोलनाच्या दुसऱ्याच दिवशी अध्यक्ष राजेंद्र प्रसाद पकडले गेले. सरकार काँग्रेसच्या विरुद्ध प्रचार करीत असे की, 'काँग्रेसकडे पैसा नसल्याने आंदोलन लवकरच कोसळेल ; अखिल भारतीय मुस्लीम परिषद आणि सरहद्द प्रांतातील मुसलमान आता सरकारच्या बाजूला आले आहेत'. ५ जानेवारीच्या चौपाटीवरील जाहीर सभेत अबिदअली जाफरभाई आणि युसुफ मेहेरअलींनी असा सरकारी प्रचार खोटा असल्याचे सिद्ध केले. 'संयुक्त प्रांत आणि सरहद्द प्रांतातील आंदोलनासाठी वित्तदान करण्याचा निर्णय बी. पी. सी. सी. ने घेतलेला असून, आम्ही पैशांची व्यवस्था केलेली आहे' असे स. का. पाटलांनी सभेत ठणकावून सांगितले. चौपाटीवरील याच सभेत मेहेरअली गरजले होते–"आमची क्रांती यशस्वी होणार व मग पोलीस आणि सेनादल स्वतंत्र सरकारच्या नियंत्रणाखाली येणार हे पोलिसांनी ध्यानात ठेवावे." विल्सनने हे गृह सचिव आर. एम. मॅक्सवेल यास कळविले.[१०]

हा सर्व इतिहास मुंबईच्या पोलीस आयुक्ताने गृह सचिवास पाठविलेले दैनिक अहवाल आणि **बॉंबे काँग्रेस बुलेटिनचे** दैनिक अंक यांवर आधारित आहे. प्रस्तुत इतिहासकाराने त्यांतील निवडक अस्सल दस्तऐवजांचे संपादन करून तीन खंड महाराष्ट्र शासनातर्फे प्रकाशित केलेले आहेत.

सरकारने काँग्रेसवर केलेल्या आरोपांचे अत्यंत प्रभावीपणे खंडन करणारे सविस्तर निवेदन वीर नरिमन यांनी ५ जानेवारी १९३२ रोजी प्रसिद्धीला देऊन सरकारसकट सर्वांनाच चकित केले होते. सरकारच्या आरोपांवर प्रतिहल्ला करणारे हे निवेदन म्हणजे स्वातंत्र्य आंदोलनाच्या इतिहासातील एक उल्लेखनीय दस्तऐवज होय. सरकारने मुस्लीम लीग, धर्मवादी व जातिनिष्ठ हिंदू संघटना, लिबरल पक्ष आणि संस्थानिकांना काँग्रेसविरुद्ध फितविण्याचे कसे प्रयत्न केले हे नरिमन

यांनी विशद केले. सनदी नोकरशाही प्रारंभापासून दिल्ली करार करण्याच्या किती विरुद्ध होती हे त्यांनी दाखवून दिले. हा करार करून व्हाइसरॉय आयर्विन यांनी भयंकर 'राजकीय घोडचूक' केली, असे म्हणणारी अधिकाऱ्यांची अनेक पत्रे व परिपत्रके सरदार पटेलांना मिळाली होती. याचा गौप्यस्फोट नरिमन यांनी केला. बहुसंख्य वरिष्ठ अधिकारी, सत्ताधीश आणि हिंदुस्तानातील युरोपियन व्यापारी व उद्योगपतींना काँग्रेसशी समेट करणे पसंतच नव्हते. आणि तरीही आयर्विनने करार केल्यापासून त्याचा भंग करण्यासाठी सरकारी अधिकारी गुप्तपणे विलिंग्डन साहेबांवर कसा दबाव आणत होते, हे नरिमन यांनी सप्रमाण दाखवून दिले.

वस्तुतः विलिंग्डन महोदयांनी कराराचा भंग करण्याच्या आरोपातून गांधीजींना दोषमुक्त ठरविले व त्यांच्या प्रामाणिकतेचे श्रेय त्यांना दिले होते. त्यांचा रोख काँग्रेसमधील जहाल गट म्हणजे नेहरू, पटेल, सुभाषबाबू वगैरेंवर होता. जहालांच्या आग्रहाला गांधीजी "बळी पडले" असे व्हाइसरॉयचे मत बनले. तथापि वस्तुस्थिती कथन करून नरिमन यांनी प्रतिपादन केले की, सत्तास्थानी असलेल्या आणि सत्तास्थानाजवळील युद्धपिपासूंच्या कारवायांना स्वतः व्हाइसरॉय बळी पडले. या सभेनंतरच्या पहाटेस नरिमन, नगीनदास मास्टर, लीलावती व कन्हैयालाल मुन्शी, पुरषोत्तम त्रिकमदास, मेनन, मुकुंद मालवीय, जमनादास द्वारकादास व पेरिन कॅप्टन (दादाभाई नवरोजींची नात) यांच्यासह ५० जणांना मुंबईत कैदेत टाकण्यात आले. त्यांत सात महिला होत्या. ४ ते ६ जानेवारीपर्यंत सरकारने मुंबई शहरातील सर्व काँग्रेस समित्या, युवक संघ, विद्यार्थी मंडळे, राष्ट्रीय विद्यालये आणि काँग्रेसने काढलेली रुग्णालये, कुटीरोद्योग व वाचनालये अशा एकूण ७९ संघटना वटहुकमांखाली बेकायदा ठरविल्या. दहशतीचे वातावरण निर्माण केले. तथापि त्यामुळे आंदोलनास बाधा पोहोचू शकली नाही. वीर नरिमन पकडले जाताच त्यांची जागा आधी ठरल्याप्रमाणे जे. जे. चोक्सी यांनी घेतली. आझाद मैदान व चौपाटीवर दररोज सभा भरत राहिल्या. मिरवणुका, निरोधने, विदेशीचा बहिष्कार आणि दारूच्या दुकानांसमोर निदर्शने हे कार्यक्रम अखंड चालू राहिले.[११]

मुंबई शहराची सात वार्डांत विभागणी करून प्रत्येक वार्डाकरिता युद्धमंडळ व त्याचा प्रमुख म्हणून डिक्टेटर नेमण्यात आला होता. १९३२ च्या मार्च अखेरपर्यंत एकामागून दुसरे अशी वीस युद्धमंडळे पोलिसांनी पकडली. त्यानंतर ही यंत्रणा विखुरली. पण त्यामुळे पोलिसांचे काम अधिक बिकट झाले. पुढारी व कार्यकर्ते पकडले जात असतानाही शहरातील चळवळीचा जोर बरेच महिने टिकून राहिला. पुरुष कैदेत गेल्यावर महिला डिक्टेटर बनल्या. जानकीदेवी बजाज बरेच दिवस मुंबईतील मिरवणुका व सभांचे नेतृत्व करीत राहिल्या.

**मुंबईतील आंदोलनाची एक विशेषता म्हणजे देश सेविका संघाची नेत्रदीपक कामगिरी ही होय.** सरोजिनी नायडू, कमलादेवी चट्टोपाध्याय, हंसा मेहता, पेरिन कॅप्टन, अवंतिकाबाई गोखले, लीलावती मुन्शी, अमृत कौर, कृष्णाबाई सेटलवाड, उर्मिला मेहता, सौ. दळवी, रतनबेन मेहता, गंगाबेन पटेल, जयश्री रायजी, लक्ष्मी भिडे, लक्ष्मी दोसानी, हरनाम कौर, खांडवाला, जानकीदेवी व कस्तुरबा गांधी या महिलांनी स्वदेशीचा शांततापूर्वक प्रचार केला. विदेशी मालावरील बहिष्कार आणि दारूच्या दुकानांसमोरील निदर्शनांमध्ये त्यांची कामगिरी खूपच वीरश्रीपूर्ण असल्याचे चळवळीच्या विरोधकांनाही कबूल करावे लागले होते. कॉलेज विद्यार्थिनी व गृहिणींना बरोबर घेऊन या महिला दुकानांजवळ जात व मद्यपींना प्रथम हात जोडून विनंती करीत. विनंती अमान्य झाल्यास त्या ग्राहकांच्या समोर लोटांगण घालत. तेव्हा मूलजी जेठा कापड बाजार देशातील सर्वांत मोठा कापड बाजार होता. काँग्रेसच्या आदेशानुसार हा बाजार सव्वा तीन महिने पूर्ण बंद राहिला. त्याचे श्रेय काँग्रेसने देश सेविकांना दिले. अखेर ७ एप्रिल १९३२ रोजी सरोजिनी नायडू यांनी मूलजी जेठा मार्केटमध्ये फक्त स्वदेशी कापड विक्रीची परवानगी दिली. प्रत्येक दुकानावर तिरंगा ध्वज फडकत होता. या आणि अशा इतर बाजार पेठांमधील व्यापाऱ्यांचा प्रतिसाद तर चांगला होताच, पण या यशात महिलांचे योगदान मोठे होते, हे ध्यानात घ्यावे. मुंबईतील व्यापारी प्रारंभापासून काँग्रेसमागे भक्कमपणे उभे राहिले.

## आर्थिक राष्ट्रवाद

१९३२ सालात मुंबई काँग्रेसचा सर्वाधिक भर आर्थिक राष्ट्रवादावर आणि ब्रिटिशांचे आर्थिक डावपेच पराभूत करण्यावर होता. प्रांतिक समितीचे वैर लँकेशायर व मँचेस्टरच्या कामगार वर्गाशी नव्हते. तथापि ब्रिटिश कापड उद्योग वाचविण्यासाठी सरकार मुंबईतील कापड उद्योगाला वेठीस धरत होते. त्यामुळे इथे बेरोजगारी वाढली होती. म्हणून ब्रिटिश कापडावर बहिष्कार घालण्यासाठी मूलजी जेठा, मंगलदास मार्केट, लखीमदास मार्केट, शेख मेमण गल्ली वगैरे भागांमध्ये तसेच मोरारजी कापड बाजारात सतत निदर्शने करण्यात येत. मूलजी जेठा कापड बाजार ऑक्टोबर १९३२ पर्यंत मधून मधून विस्थापित राहिला. देश सेविका संघाच्या दक्षतेखाली तेथे स्वदेशी कापडाचा विभाग एप्रिल ७ पासून ऑक्टोबर १९३२ पर्यंत कार्यरत राहिला. त्या महिला चोरून विदेशी कापड विकणाऱ्यांना फटकारत असत. कापड बाजारातील कोंडी फोडण्यासाठी मुंबई गिरणीमालक संघाने सरकारच्या मदतीने १६ मार्च रोजी प्रयत्न केले. तथापि त्या प्रयत्नांना यश लाभले नाही.[१२]

मुंबईच्या पोलीस आयुक्ताने प्रांताच्या व मध्यवर्ती सरकारच्या गृहसचिवांना पाठविलेल्या अहवालांवरून स्पष्ट दिसते की, या शहरातील इंग्रज कापूस व्यापाऱ्यांचा धंदा नष्टप्राय झाला. याविषयी हिंदुस्तानातील तसेच इंग्लंडमधील ब्रिटिश वर्तमानपत्रांनी मोठीच चिंता व्यक्त केली होती. शहरातील सर्वात मोठा असा कापडाचा बाजार पूर्णपणे विसकळीत व स्तंभित झाला होता. गुजराती, मारवाडी व जैन अडते आंदोलनाचे समर्थक झाले. त्यांच्यापैकी कित्येकांनी कारावासही पत्करला. गांधीजींचा प्रभाव असलेल्या बाँबे कॉटन ब्रोकर्स असोसिएशन या संघटनेने मुंबई सरकार आणि गव्हर्नर साईक्सच्या प्रयत्नांना दाद दिली नाही. त्यांनी कापूस बाजारातील संप मागे घेतला नाही. त्यामुळे कापड व सूत गिरण्यांना कापूस मिळत नव्हता. मुंबईचे अर्थमंत्री जी. बी. प्रधान, पुरषोत्तमदास ठाकूरदास, होमी मोदी, फिरोज सेठना, पोचखानवाला, एफ. ई. दिनशा वगैरे भांडवलदार व्यापारी कापूस बाजार सुरू करण्याकरिता प्रयत्न करतच होते. गिरणीमालक

संघ व मुंबई आणि दिल्लीतील सरकार निरनिराळे डावपेच करीतच होते. मात्र त्यात कापूस उत्पादक शेतकरी भरडले जात होते. शेवटी शेतकऱ्यांचे हित, कामगारांचा रोजगार व सरकारने मान्य केलेल्या काही अटी विचारात घेऊन, उपरोक्त असोसिएशननेच कापसाचे व्यवहार आठवड्यातून तीन दिवस करण्यास अनुमती दिली. मात्र काही अटी घातल्याच होत्या. सरकारलाही काँग्रेसचा या व्यवसायावरील प्रभाव मान्य करावा लागला.[१३]

सविनय कायदेभंगाच्या प्रभावामुळे गिरणी कामगार हक्कवादी बनणे स्वाभाविक होते. त्यांच्या मागण्या, आर्थिक मंदी आणि काँग्रेसचे आंदोलन यामुळे १९३२ सालात मुंबईतील २७ कापड गिरण्यांना नुकसान सोसावे लागले. त्यापुढील वर्षातही तोटा झाल्यामुळे, तसेच उत्पादित कापडाला मागणी नसल्यामुळे कित्येक कापड गिरण्या बंद पडल्या. कायदेभंग आंदोलनाचा अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होणे अपरिहार्य होते. किंबहुना इंग्रजांचे महसुली उत्पन्न कमी करणे हे आर्थिक राष्ट्रवादातील एक तत्त्व होते. मुंबईतून होणाऱ्या निर्यातीत पहिला क्रमांक कापसाचा होता. निर्यातीत अर्धा भाग कापसाचा असे. १९२८-२९ सालात मुंबईतून ४८ कोटी रुपयांचा कच्चा कापूस निर्यात झाला होता. १९३१-३२ सालातील निर्यातीचे मूल्य केवळ १६ कोटी रुपये होते. याचे कारण कापूस अडत्यांचा उपरोक्त संप व बहिष्कार हेही होते. त्यामुळे व्यापारी, शेतकरी व सरकारचे फार मोठे नुकसान झाले. १९३१-३२ साली आयात व्यापारातही १३ प्रतिशत घट झाली. या वर्षी निर्यात मालाची किंमत एकदम ४१ प्रतिशत घसरली. १९३२-३३ सालात निर्यातीची किंमत आणखी २६ टक्क्यांनी घसरली. पूर्वोक्त सोन्याची निर्यात (डिस्ट्रेस सेल ऑफ गोल्ड) अतिशय वाढूनही मुंबईतून झालेल्या निर्यातीचे मूल्य इतके घटले होते. १९३१-१९३३ या दोन वर्षात मुंबईतील व्यापार कोसळला. आयकराच्या दरात ५० प्रतिशत वाढ करूनही सरकारला लाभलेले आयकराचे उत्पन्न घटले होते. मुंबईवर कोसळलेली अशी आर्थिक संकटे महाराष्ट्र व गुजरातवरील अरिष्टांचे द्योतक होते.[१४]

कायदेभंगाचा भाग म्हणून लोक सरकारी महसूल व कर भरण्यास नकार देत. अधिकारी वटहुकमांखालील अधिकारांचा उपयोग करीत. करापोटी मालमत्ता जप्त करीत. परंतु तरीही महसूल देणाऱ्या सर्व सरकारी खात्यांचे उत्पन्न पुष्कळ घटले. कृषी मालाच्या कोसळलेल्या किमती व मंदीची लाट आणि जागतिक मंदीमुळे सरकारचे अर्थकारण विस्कळीत झाले हे सत्य असले, तरी कायदेभंग आंदोलनामुळेही ब्रिटिश सरकारच्या कोषागारावर पुष्कळ प्रतिकूल परिणाम झाला. ही आर्थिक घसरण १९२९-३० पासून सुरू झालेली होती. ती वाढत जाऊन तिचा प्रभाव १९३३ पर्यंत कायम राहिला.

मुंबईतील सोने-चांदी विनिमय बाजारात काँग्रेसने कित्येक दिवस सत्याग्रह केला. इंग्लंडची अर्थव्यवस्था सावरण्यासाठी ब्रिटिशांनी रुपयाच्या तुलनेत पौंड स्टर्लिंगचे अवमूल्यन केले आणि गोल्ड स्टँडर्डचा त्याग केला. इकडे मुंबई प्रांत व विदर्भात आर्थिक हलाखीमुळे लोकांना उपजीविकेसाठी आपल्याकडील सोने-चांदी विकणे भाग पडले. हे मौल्यवान धातू व्यापाऱ्यांना बदललेल्या परिस्थितीत इंग्लंडला निर्यात करणे अत्यंत लाभदायक होते. ब्रिटिश व्यापाऱ्यांनी फार मोठ्या प्रमाणात सोने खरेदी करून मुंबईहून इंग्लंडला निर्यात केले. कित्येक टन सोने येथून परागंदा होत होते. याला काँग्रेसने उपरोक्त 'डिस्ट्रेस सेल ऑफ गोल्ड' हे नाव दिले. २६ सप्टेंबर १९३१ पासून ९ जानेवारी १९३२ या अल्पावधीत एकट्या मुंबई बंदरातून ३६,४६,७७,४१९ रुपयांचे सोने इंग्लंडला निर्यात झाल्याची बातमी **काँग्रेस बुलेटिनने** ११ जानेवारी १९३२ रोजी छापली. आणि त्याविरुद्ध सविनय कायदेभंगाच्या दोन्ही सत्रांमध्ये लढा दिला. सोने-चांदीच्या या निर्यातीमुळे भारताची निर्धनता प्रत्यही वाढत असल्याचा प्रचार करून बी. पी. सी. सी. दररोज जव्हेरी बाजारामध्ये आणि निर्यातदारांच्या पेढ्यांपुढे जोरदार निदर्शने करीत असे. मुंबईतील टाकसाळ व विदेशी चलनाचा व्यवहार करणाऱ्या बँका आणि सोने-चांदी खरेदी करणाऱ्या दुकानांसमोर निदर्शने करून व्यवहार बंद करण्याचे प्रयत्न जवळपास दररोज होत. बरेच व्यापारी इतर शहरांमधून खरेदी केलेले सोने इंग्रज निर्यातदारांना गुप्तपणे विकत. त्यामुळे या सत्याग्रहाचे

यश मर्यादित राहणे स्वाभाविक होते. शिवाय मुंबई पोर्ट ट्रस्ट तसेच परकीय चलनाच्या सर्वच बँका इंग्रजांच्या प्रभावाखाली असल्याने मुंबई बंदरातून सोन्या-चांदीची फार मोठी निर्यात झाली. विदेशी औषधांच्या दुकानांवरील बहिष्कारास प्रारंभी यश लाभले. पुढे मार्च १९३२ च्या प्रारंभापासून काँग्रेसने त्या दुकानदारांना आठवड्यातून तीन दिवस औषधे विकण्याची अनुमती दिली. तथापि हा करार लवकर संपला.

मुंबईतील कायदेभंग आंदोलनात विदेशी कपड्यांची होळी आणि मिठाचा सत्याग्रह हे कार्यक्रम भूतपूर्व आंदोलनाप्रमाणेच अत्यंत उत्साहात संपन्न करण्यात आले. या कार्यक्रमाला सरकारने वटहुकमांखाली बंदी घातलेली होती. तरीही बंदी हुकमांचे उल्लंघन करून दादर व गिरगावची चौपाटी आणि जेथे खुली जागा होती तेथे समुद्राचे पाणी उकळून मीठ तयार करण्यात येई. बोरी बंदरजवळच्या भाटिया बागेतही जमाव जमवून मीठ तयार करण्यात येई. परंतु सभाबंदी, जमावबंदी, मीठ तयार करणे व विदेशी कपड्यांची होळी करणे अशा लहानसहान बाबींसाठीही कडक शिक्षा करण्यासाठी सरकारने क्रिमिनल लॉ अमेन्डमेन्ट ॲक्ट नामक दडपशाही करणारा कायदा अमलात आणला (१९३२). या कायद्याखाली युसुफ मेहेरअली, अमृत कौर, लीलावती मुन्शी, अबिदअली जाफरभाई व शहरातील अनेक मान्यवरांवर खटले भरण्यात आले. या कायद्याचा सरकारने फारच दुरुपयोग केला.

कलोनिअल राजवटीने सविनय कायदेभंगाच्या पुनरारंभाला दडपशाही आणि अत्याचारांनी प्रतिसाद दिला. आंदोलन दोन महिन्यांत ठेचून काढण्याचा मुंबईचा गव्हर्नर साईक्स याचा प्रयत्न होता. तर 'काँग्रेसचे बंड' सहा आठवड्यांच्या आत नेस्तनाबूत करण्याचा व्हाइसरॉय विलिंग्डन साहेबांचा निर्धार होता. त्या निर्धारानुसार त्यांना यश मात्र आले नाही. कायदेभंग मोहिमेचा प्रभाव नष्ट करण्यासाठी आणि सर्व संघटना व व्यक्तींना गुंडाळून ठेवण्यासाठी सत्ताधीशांनी नियोजन करून ठेवलेले होते. १९३० साली सरकारने परिस्थिती नियंत्रणाखाली आणण्यासाठी आवश्यक तेवढेच बळ वापरले होते. तेव्हा गांधीजी व अनेक नेत्यांना बरेच

दिवस अटक केली नव्हती. तथापि १९३२ सालातील सरकारी धोरण केवळ आक्रमक नसून युध्यमान व हिंसक होते. सरकारने मुंबई शहर व प्रांत तसेच संयुक्त प्रांत, सरहद्द प्रांत व बंगालमध्ये सिव्हिल मार्शल लॉ सारखी स्थिती निर्माण केली. मुंबई प्रांतात जानेवारी १९३२ मध्ये २२७३, फेब्रुवारीत २८९२, मार्चमध्ये ११८५ आणि एप्रिलात १४८२ काँग्रेसजनांना शिक्षा देण्यात आल्या. जानेवारी १९३२ ते एप्रिल १९३३ या काळात मुंबई प्रांतातील ९३९ महिलांसह १४,१०१ जणांवर खटले भरून सरकारने त्यांना दंड आणि कारावासाच्या शिक्षा दिल्या. हिंदुस्तानातील इतर प्रांतांपेक्षा हे प्रमाण खूपच जास्त होते. त्यात मुंबई शहराचा वाटा सर्वात मोठा होता.[१५] मात्र अनेक वटहुकूम, पोलीस व सेनादल असूनही मुंबई शहरातील कायदेभंग लढा आटोक्यात आणणे सरकारला फेब्रुवारी १९३३ पर्यंत शक्य झाले नाही.

**बॉंबे काँग्रेस बुलेटिन :—**मुंबईतील स्वातंत्र्यलढ्याची आणखी एक खास विशेषता ही की, बी. पी. सी. सी. ने **बॉंबे काँग्रेस बुलेटिन** सुरू करून प्रचार यंत्रणा अत्यंत भक्कम केली होती. तत्कालीन नामवंत वर्तमानपत्रे ब्रिटिशांच्या मालकीची असल्यामुळे ती कोणत्याही आंदोलनाविषयी अत्यंत प्रतिकूल मजकूर छापत. सविनय कायदेभंग सुरू झाल्यापासून **टाइम्स ऑफ इंडिया** वगैरेंनी काँग्रेसविरुद्ध रान उठविले आणि मनात साचत राहिलेले गरळ व पित्त ओकून टाकले. भारतीय राजकारणाविषयी अत्यंत पक्षपाती आणि ब्रिटिशधार्जिणे प्रसारण केले. त्यामानाने देशी वर्तमानपत्रांचे अल्प भांडवल आणि सर्वेसर्वा सरकारचे दडपण वगैरे कारणांमुळे त्यांच्या फार मोठ्या मर्यादा होत्या. नेहरूंनी आत्मकथेत लिहिल्याप्रमाणे **द हिंदू** हे इंग्रजी वर्तमानपत्र तेव्हा भारतात सर्वोत्तम होते. शिवाय वटहुकमांखाली वर्तमानपत्रांची गळचेपी केलेली होती. **बॉंबे क्रॉनिकलवर** तर सरकारची वक्रदृष्टी होती.

अशा काळात **बॉंबे काँग्रेस बुलेटिन** नागरिकांना दररोज आंदोलनाचे वृत्त देत असे. त्यातून लोकांना मार्गदर्शन करण्यात येई. सूचना देण्यात येत. लोकांचे नीतिधैर्य वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत. अज्ञात ठिकाणी छापलेली ही

बातमीपत्रे छापील, चक्रमुद्रित स्वरूपातही असत. त्यावर व त्यांचे वितरण करणाऱ्यांवर गुप्तचरांची अहोरात्र कडक नजर असे. बुलेटिनची प्रचारयंत्रणा गुप्तचरांच्या हाती पडल्यावर दोन-तीन दिवसांचा खंड पडत असे. पण त्यानंतर दुसऱ्या गुप्त केंद्रातून बुलेटिन प्रकाशित होई.

मुंबईच्या पोलीस आयुक्ताने गृह सचिवास नावाने पाठविलेल्या प्रत्येक दैनिक अहवालासोबत हे बुलेटिन सहपत्र स्वरूपात जोडलेले असे. पोलीस अहवाल पाहता या बुलेटिनमधील वृत्तप्रसारण बऱ्याच अंशी वस्तुनिष्ठ असल्याचे प्रस्तुत इतिहासकारास आढळून आले. मात्र बुलेटिनचे ध्येय आंदोलनाचा प्रसार करणे आणि स्वातंत्र्यसैनिकांचे नीतिधैर्य वाढविणे, हेच असल्याने त्या अनुषंगाने बुलेटिनमध्ये जोर दिलेला आम्हाला आढळला. त्यात अखिल भारतातील आंदोलन आणि सरकारी कारवायांची माहिती दिलेली आढळली. केवळ सरकारी दस्तऐवजांवर आधारित इतिहास दिशाभूल करणारा आणि घटनांचा विपरीत अन्वयार्थ लावणारा ठरतो. म्हणूनच या बुलेटिनचा उपयोग केलेला आहे. काँग्रेसच्या विरोधकांनी व काही देशभक्तांनी केलेल्या लेखनात विपर्यास व विस्मृती दोषांमुळे मला बऱ्याच त्रुटी आढळल्या. म्हणून गोपनीय सरकारी दस्तऐवजांच्या जोडीला **बाँबे काँग्रेस बुलेटिन** चा प्रस्तुत इतिहासकाराने यथायोग्य उपयोग केलेला आहे. मात्र भारतातील दुसऱ्या इतिहासकारांनी त्यांचा उपयोग केल्याचे आढळले नाही. त्यांना बुलेटिन उपलब्ध झाले नसावे.

काँग्रेसच्या या बातमीपत्राच्या व्यतिरिक्त मुंबई शहरातील देशभक्त **काँग्रेस प्रभात पत्रिका, कामगार बुलेटिन, बाँबे युनिव्हर्सिटी स्टुडंट्स बुलेटिन** ही पत्रके प्रसंगानुसार प्रकाशित करीत. **बाँबे क्रॉनिकल, फ्री प्रेस जर्नल** ही पत्रकेही कायदेभंग आंदोलनाचे समर्थन करीत. पण त्यांच्या मानेवर वटहुकमांची तलवार टांगलेली होती.

## आर्थिक नाकेबंदी

काँग्रेसने मुंबईत केलेली ब्रिटिशांची आर्थिक नाकेबंदी ही सविनय कायदेभंगाची खास विशेषता म्हणावी लागते. मुंबई काँग्रेसने कलोनिअल राजसत्तेचे व विदेशी

भांडवलशाहीचे अर्थकारण विस्थापित करण्यावर विशेष जोर दिला. काँग्रेसला आर्थिक मंदीमुळे भारतीय व्यापाऱ्यांचा भक्कम पाठिंबा लाभला. मात्र त्याच बरोबर कायदेभंगामुळे मंदीचे दुष्परिणाम वाढले होते. म्हणजे मंदीमुळे चळवळीस पाठिंबा आणि चळवळीमुळे मंदीचे अतिरिक्त आघात असे दुष्टचक्र निर्माण झाले. भारतीय भांडवलशाहीला गांधीजींच्या 'अकरा मागण्यांना' उघडपणे विरोध करणे हितावह वाटले नाही. काँग्रेसचा विरोध ब्रिटिश मालासच व ब्रिटिश कंपन्यांनाच होता. म्हणून भारतीय उद्योगपतींनी काँग्रेसला विरोध करण्याचे धोरण बंद केले. मात्र सरकार त्यांचा अनुनय करू लागली.

भारतातील सर्वांत मोठे मूळजी जेठा मार्केट ४ जानेवारीपासून ७ एप्रिल १९३२ पर्यंत पूर्णतः बंद होते. त्यानंतर मुंबई प्रांतिक काँग्रेस समितीने संमती दिली फक्त स्वदेशी कापड विकण्याची. सरोजिनी नायडू यांनी त्या स्वदेशी विभागाचे उद्‌घाटन केले होते. ऑक्टोबर १९३२ नंतरच हे मार्केट आणि शहरातील इतर कापड बाजार नेहमीप्रमाणे व्यवसाय करू शकले होते.

मुंबईतील कापूस बाजार सुरळीत चालू ठेवणे ब्रिटनमधील कापड उद्योगासाठी आवश्यक होते. याची पूर्ण कल्पना असलेल्या महात्मा गांधींनी कापूस बाजारात आपले उत्तम प्रभाव-क्षेत्र निर्माण केलेले होते. मुंबईच्या पोलीस आयुक्ताने सरकारला प्रांजळपणे कळविले की, 'कापूस बाजारावर सरकारपेक्षा काँग्रेसची हुकूमत अधिक जबरदस्त आहे. तेथील गुजराती, मारवाडी व जैन कापूस अडते पक्के काँग्रेसमन आहेत.' मुंबईचे गव्हर्नर साईक्स यांनीही विलिंग्डन यांना आपली व्यथा पुढीलप्रमाणे कळविली. "Upto the present day they have achieved a considerable measure of success, if success is to be measured by interference with normal trade and influence over a particularly susceptible section of the Bombay Commercial Community." (Sykes to Lord Willingdon, 13 May 1932).

ईस्ट इंडिया कॉटन असोसिएशनने ऑक्टोबर १९३२ पर्यंत कापसाच्या व्यवहारांवर बहिष्कार चालू ठेवला. त्यानंतरही बरेच आठवडे हा बाजार विसकळीत अवस्थेत राहिला. सरकारने सर्व आयुधांचा उपयोग करून पाहिला. जागामालकांनी दुकानांचे घरभाडे निम्म्यावर आणण्याची तयारी जाहीर केली. एकूणपैकी ८० व्यापारी परत आले. तथापि त्यांना आपल्या सहकाऱ्यांची व निदर्शकांची भीती वाटत होती. इंग्रजांच्या कापूस कंपन्यांवर प्रचंड दबाव टाकण्यात आलेला होता. **काँग्रेस बुलेटिनने** बहिष्काराच्या यादीत त्यांचा नामनिर्देश केला होता. ब्रिटिश कंपन्यांशी व्यवहार करण्यास जपानी कंपन्यांचे धैर्यच होत नाही, असे जपानच्या वाणिज्यदूताने कबूल केले. मुंबईतील जर्मन, फ्रेंच व डच कंपन्या काँग्रेसच्या सहकार्यावर अवलंबून राहिल्या होत्या. कारण त्या सरकारची मदत घेण्यास भीत असत. त्यांच्यापैकी काहींनी व्यवहार सुरू ठेवण्यासाठी हिंदी मित्र व काँग्रेसशी वाटाघाटी सुरू केल्या. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनास पाठिंबा व्यक्त करून, कापूस व्यापाऱ्यांशी सलोखा करण्यासाठी एका निवेदनावर स्वाक्षरीदेखील केली होती. मुंबई सरकारचा सक्त विरोध पत्करून त्यांनी काँग्रेसनिष्ठ व्यापाऱ्यांच्या त्या निवेदनावर स्वाक्षरी केली. आणि शिवाय प्रत्येक सोमवारी 'गांधी दिनानिमित्त' सर्व व्यवहार बंद ठेवले. हा काँग्रेसचा विजय होता. कापूस बाजार सुरू झालाच नाही.

कापूस दलालांच्या संघटनेप्रमाणेच, बाँबे नेटिव शेअर अँड स्टॉक ब्रोकर असोसिएशन आणि बाँबे श्रॉफ असोसिएशन या काँग्रेसनिष्ठ संघटनांनीही कायदेभंग आंदोलनात आघाडीवर राहून वाणिज्यवादी सरकारची आर्थिक कोंडी केली होती. शेअर मार्केट प्रदीर्घ काळ बंद होते. जागतिक मंदीमुळे आधीपासूनच ग्रासलेले लॉर्ड साईक्सचे मुंबई सरकार काँग्रेसने केलेल्या आर्थिक नाकेबंदीमुळे खूपच चिंताग्रस्त झाले, अगतिक झाले होते. बडोदा राज्याच्या हायकोर्टाचे सेवानिवृत्त मुख्य न्यायाधीश असलेल्या ७८ वर्षांच्या अब्बास तय्यबजी यांना कारावासात डांबणे नोकरशाहीला सहज शक्य झाले. तथापि साईक्स किंवा विलिंग्डन साहेबांना मुंबईतील हे काँग्रेसनिष्ठ मार्केट बलप्रयोगाने चालू करणे

शक्यच झाले नाही. जमीन महसूल न भरल्याकारणाने गांधीजींचा साबरमती आश्रम सरकारने जप्त केला. त्याचा काही भाग विकून जमीन महसूल वसूल केला. मात्र मुंबईतील व्यापारी वर्गाने त्याबद्दल सरकारला धारेवर धरले होते. त्यामुळे मार्च १९३२ मध्ये सरकारला चांगलेच उमगले होते की, बहिष्कार आंदोलनाविरुद्ध मुंबईत मोठा लढा द्यावा लागेल.[१६]

कापसाच्या व्यापारात हस्तक्षेप करण्याचे आणि बाजारावर आपले नियंत्रण प्रस्थापित करण्याचे मुंबई सरकारचे प्रयत्न बरेच दिवस चालू होते. सरकारने हा प्रतिष्ठेचा प्रश्न मानला होता. त्यासाठी कायद्याचा मसुदा बनवला. सरकारने राजनिष्ठांच्या पाठिंब्यावर सप्टेंबर १९३२ मध्ये बॉंबे कॉटन कॉंट्रॅक्ट्स ॲक्ट १९३२ हा कायदा संमत करून घेतला. तथापि कायदा करून आणि नियंत्रण करण्याचे अधिकार सरकारने स्वतःकडे घेऊनही या मार्केटमधील समस्या सुटणार नाहीत, याची मुंबईतील इंग्रज कापूस दलालांना पूर्ण जाणीव होती. या क्षेत्रातील गांधीजींचा प्रभाव व भारतीय दलालांची कॉंग्रेसवरील निष्ठा इंग्रज दलालांना माहीत होती. म्हणून त्यांनी कायद्यावरच अवलंबून न राहता थेट कॉंग्रेसबरोबर वाटाघाटी केल्या आणि कॉंग्रेसच्या अनेक अटी स्वीकारल्या. शिवाय कापूस उत्पादक किसानांचे हित लक्षात घेऊन कॉंग्रेसने कापूस बाजारावरील बहिष्कार काही अटींच्या बदल्यात शिथिल केला. ही वस्तुस्थिती भारतमंत्री सॅम्युअल होअर यांनी पार्लमेंटच्या कॉमन्स सभागृहात कथन केली होती. त्यातून कॉंग्रेसची आर्थिक क्षेत्रातील इभ्रत आणखीच वाढली.[१७]

दिनांक ४ जानेवारी १९३३ रोजी सविनय कायदेभंगाच्या दुसऱ्या फेरीचे दुसरे वर्ष सुरू झाले. ही घोषणा त्या दिवशी एम. आर. मसानी यांनी पहिल्या गुप्त **कॉंग्रेस रेडिओवर** केली होती.

सविनय कायदेभंग आंदोलनाच्या काळात मुंबईत राजकारण आणि अर्थकारणाची अभेद्य गुंफण निर्माण झालेली होती. ही गुंफण होऊ नये यासाठी आणि ती झाल्यावर विसकळीत करण्यासाठी इंग्रजांनी सर्व प्रकारची नीती अमलात आणली. काही गिरणीमालकांच्या बाबतीत इंग्रजांना प्रारंभी यश आले. तथापि

ही गुंफण उलगडण्यात आणि वाणिज्य वर्गाला काँग्रेसपासून दूर नेण्यात सरकारला कधीच यश लाभले नाही. वाणिज्य वर्गाशी युती हे मुंबई प्रांतिक काँग्रेसच्या यशाचे गमक होते. भारतातील दुसऱ्या कोणत्याही प्रांतिक काँग्रेस समितीला हे जमले नव्हते. मुंबईतील तत्कालीन बहुसंख्य व्यापारी सर्वथा गांधीजी, पटेल, स. का. पाटील आणि नरिमन यांचे समर्थक होते. आणि या चौघा पुढाऱ्यांनी स्वातंत्र्य चळवळीकरिता त्यांचा चांगला उपयोग करून घेतला.

लिव्हरपूलमधील कापसाचा बाजार आणि ब्रिटिश कापड उद्योग बऱ्याच अंशी मुंबईतून निर्यात होणाऱ्या कापसावरच अवलंबून होता. मात्र जानेवारी ते ऑगस्ट १९३२ या काळातील कामाच्या १५९ दिवसांपैकी ९३ दिवस कापूस व्यवहार बंद ठेवून मुंबईच्या व्यापाऱ्यांनी ब्रिटिशांना वेठीस धरले होते. एका बाजूला गव्हर्नर साईक्स यांनी मार्च १९३२ मध्ये मुंबई कायदेमंडळात भाषण केले की, आंदोलनामुळे व्यापार मुंबईबाहेर जाण्याचे धोके दिसत आहेत आणि आर्थिक भरभराटीला हे शहर मुकत आहे. तर दुसऱ्या बाजूने पी. ए. वाडिया आणि व्ही के. आर. व्ही. राव यांच्यासारखे अर्थशास्त्रज्ञ लेखमालिका प्रसिद्ध करून गव्हर्नरचा युक्तिवाद खोडून काढत. **टाइम्स ऑफ इंडिया, इंडियन डेली मेल** ही पत्रके सरकारच्या भूमिकेचे समर्थन करीत. तर प्रा. राव व प्रा. वाडिया आणि **बाँबे क्रॉनिकल** त्यांना राष्ट्रवादी भूमिकेतून उत्तर देत. आणि काँग्रेसची विचारसरणी मांडत असत.

१९३२ या संपूर्ण वर्षात जी. डी. बिर्ला आणि पुरषोत्तमदास ठाकूरदास हे काँग्रेस आणि सरकार यांच्यात मध्यस्थी करण्याचे प्रयत्न करत होते. कारण कायदेभंगामुळे अर्थव्यवस्थेचे नुकसान होत असल्याचे तोपर्यंत स्पष्ट दिसू लागले होते.

मुंबईचा पोलीस आयुक्त पी. ए. केली याने हिंदुस्तानचे गृहमंत्री हेग यांना आपली व्यथा सांगितली की, मुंबईतील गुजराती वस्तीचा भाग पूर्वीसारखाच इंग्रजांशी वैरभाव बाळगून आहे. काँग्रेस केवळ कापड बाजारात निरोधन करीत नसून, आम्ही आटोकाट प्रयत्न करूनही काँग्रेसजन नित्यनियमाने **बाँबे काँग्रेस बुलेटिन** प्रकाशित करतात. मुंबईतील युवकांनी या केली साहेबाला हैराण केले होते.[१८]

मुंबईतील व्यापाऱ्यांच्या संघटना काँग्रेसनिष्ठ आहेत हे मुंबई सरकारला १९२९ पासून माहीतच होते. इंडियन मर्चंट्स चेंबर तर सरकारच्या डोळ्यात सलत होती. फेडरेशन ऑफ बाँबे कमर्शिअल असोसिएशन्स हा ३३ संघटनांचा महासंघ होता. हा महासंघ प्रारंभापासून सातत्याने काँग्रेसला सक्रिय पाठिंबा देत होता. महासंघाने उघडपणे आरोप ठेवला, " ब्रिटिशांनी गांधीजींशी केलेल्या कराराचा भंग केला; गोलमेज परिषदेचे नाटक करून फसवणूक केली; आक्रमक धोरण आखून कारणे न दाखवता राष्ट्रीय पुढाऱ्यांना कारावासात डांबून ठेवले." महासंघाने सरकारचा कडक भाषेत निषेध केला. वटहुकमांचे अधिराज्य लादल्यामुळे सरकारवर खरमरीत टीका केली. हिंदुस्तानातील आर्थिक मंदीला ब्रिटिश सरकारच जबाबदार आहे, असे महासंघाने प्रतिपादन केले. सरकारच्या दडपशाहीमुळे व्यापार व उद्योगधंद्यांना मंदीचा तडाखा सोसावा लागतो, असाही आरोप केला.

महासंघाच्या प्रत्येक सदस्य कंपनीने भारतीय उद्योग, बँका, विमा कंपन्या आणि जलवाहतूक करणाऱ्या उपक्रमांच्या विकासासाठी उत्तेजन द्यावे व त्यांनी अशा नवीन कंपन्या काढाव्या, असे महासंघाने आवाहन केले. परकीयांच्या भारतातील कंपन्या सरकारच्या दडपशाहीला पाठिंबा देतात हे लपून राहिले नव्हते. म्हणून जशास तसे या धोरणानुसार त्यांना धडा शिकवावा, असा फेडरेशनने आपल्या सभासदांना सल्ला दिला. वटहुकमांमुळे व्यापार आणि व्यवसाय करणे अशक्य झाले. त्यामुळे सभासद कंपन्यांनी प्रसामान्य स्थिती येईपर्यंत आपला व्यवसाय शक्य तितका मर्यादित ठेवावा, असा फेडरेशनने सल्ला दिला.[१९]

एकूणच स्वातंत्र्यलढा केवळ राजकीयच नव्हे तर आर्थिक आणि सामाजिक पातळीवरूनही लढण्याचे काँग्रेसचे तंत्र होते. त्याचे हे निदर्शक होते. केवळ राजकीय लढा दिल्याने इंग्रज येथून जाणार नव्हता, याची बी. पी. सी. सी. ला चांगली जाणीव होती.

## सत्याग्रहींवरील अत्याचार

वटहुकमांनी बहाल केलेल्या सर्व अधिकारांचा यथेच्छ उपयोग करून नोकरशाहीने आणि पोलिसांनी दडपशाही केली. किंबहुना वटहुकमांमध्ये संकल्पित नसलेली बरीच हुकूमशाही अमलात आणली. अटक करण्यात आलेल्यांची संख्या प्रचंड होती. पण त्यात भेदभाव होता. कारागृहांमध्ये जागा कमी पडल्यामुळे बंदिवानांसाठी तात्पुरती जेल शिबिरे सुरू करण्यात आली. त्यांत स्वच्छता वा सुविधा नव्हत्या. विसापूर व वरळीसारख्या शिबिरांची अवस्था अंदमान जेलसारखी असल्याचे अनुभवी स्वातंत्र्यसैनिकांनी प्रस्तुत इतिहासकाराला सांगितले. वकील, प्राध्यापक, वर्तमानपत्रांचे संपादक, पुढारी, पदवीधारक, व्यापारी, मोठे जमीनदार व लेखक यांना त्यांच्या सामाजिक स्थानाप्रमाणे कारावासात 'अ' वर्ग अथवा 'ब' वर्ग देण्याचा नियम होता. तथापि अशा मान्यवरांनाही सरकारने सूडबुद्धीने 'क' वर्गात डांबले. १९३२ मध्ये ९५ टक्क्यांहून अधिक सत्याग्रहींना 'क' वर्ग देऊन हिणविले. उदाहरणार्थ, मुंबई कायदेमंडळाचे तीन वर्षे सभासद असलेले नामवंत कायदेपंडित, विद्वान लेखक आणि कादंबरीकार कन्हैयालाल मुन्शी यांना 'अ' वर्ग अनुज्ञेय असूनही 'ब' वर्गात ठेवले होते. निकृष्ट दर्जाचे अन्न, अस्वच्छता, ओलसर जमीन, अपुरे कपडे वगैरेमुळे बंदिवानांचे हाल होत असत. कैद्यांना मारहाण हा नित्याचा प्रकार होता. महिला व मुलांनाही वाईट वागणूक देण्यात येई.

१९३२ मधील लाठीमार पूर्वीपेक्षा अधिक बेसुमार व अमानुष होता. गंभीररीत्या जखमींची संख्या अधिक होती. शांततापूर्ण निदर्शने करणाऱ्यांनाही पोलीस ठोकून काढत. पोलीस अधिकारी गुप्त इंद्रिये देखील पिळून काढत. महिला व मुलांचाही अपवाद करीत नसत. ब्रिटिश सरकारच्या केवळ निर्दयपणाचेच नव्हे तर असंस्कृतपणाचे सत्यकथन करण्यासाठी पुष्कळ लिहावे लागेल. तथापि विस्तारभयास्तव हात आवरावा लागत आहे. तेव्हा तीन प्रकारचे पोलीस होते—नेहमीचे, खास व गुप्त. स्वयंसेवकांना ते जाळ्यात पकडत असत. दडपशाहीने सर्व मर्यादांचा भंग केला होता. देशभर सरकारी दहशतवादाचा फैलाव होत राहिला. इंग्रज अधिकारी आणि भारतीय अधिकारी या दोन्ही प्रवर्गातील अधिकाऱ्यांनी सारख्याच

निर्दयपणे सत्याग्रहरूपी बंड मोडून काढावे, याकडे गोऱ्या वरिष्ठांचा कटाक्ष होता. मात्र सद्विवेकबुद्धी जागृत असलेले काही भारतीय अधिकारी देशबांधवांवर अत्याचार करण्यास नाखूश असत. तथापि त्यांचा आवाज बंद करण्यात आला. देश सेविकांचा विनयभंग करण्याच्याही तक्रारी होत्या. अशा तक्रारी गांधीजींना येरवडा तुरुंगात समजल्यावर त्यांनी भारतमंत्री सॅम्युएल होअरला ११ मार्च १९३२ रोजी पत्र पाठवून कळवल्या होत्या.

सरकार उलथून पाडण्यासाठी काँग्रेस स्वयंसेवक अराजक माजवून खून पाडण्याची शक्यता असल्याने कडक कार्यवाहीची गरज असल्याचे मुंबईचा पोलीस आयुक्त सांगत होता. पण आयुक्ताच्या मूर्ख अंदाजाप्रमाणे मुंबईत एकही राजकीय खून झाला नव्हता. इतके मात्र खरे की, सरहद्द प्रांतातील अनावश्यक गोळीबार आणि सुरत जिल्ह्यात पोलिसांनी केलेले पाशवी अत्याचार यांमुळे मुंबईत भयंकर तणाव निर्माण झाला. सरकारने बार्डोली आश्रम व स्वराज आश्रम ताब्यात घेऊन तेथील बालकांचीही विटंबना केली होती. महात्मा गांधींची कराडी (दांडी) येथील कुटी पोलिसांनी जाळून टाकली. या अत्याचारांची प्रतिक्रिया मुंबईत उमटणे अपरिहार्य होते. १९३० च्या आंदोलनापेक्षा १९३२ साली नोकरशाहीने भयंकर अत्याचार केले. म्हणून आंदोलकांनी त्यांचा प्रतिकार अधिक मोठ्या प्रमाणात केला.[२०]

वस्तुस्थिती अशी असूनही न. चिं. केळकरांनी १९३२ साली तुरुंगवासाच्या यातना भोगलेल्या स्वातंत्र्यसेनानींचा उपहास केला. कधीही तुरुंग न पाहिलेल्या केळकरांना तुरुंगात "सवलती व सुखसोई यांच्यामुळे तुरुंगवास हा एक खेळ होऊन बसला" असे वाटले.[२१] विठ्ठलभाई पटेल, सुभाषचंद्र बोस वगैरे कित्येकांची प्रकृती कारावासात किती बिघडली याचा केळकरांनी विचार केला नाही.

## महाराष्ट्र प्रांतिकची चळवळ

ब्रिटिश सरकारची आकस्मिक चढाई व आक्रमक डावपेच आणि अभूतपूर्व दडपशाही यामुळे मुंबई व्यतिरिक्तच्या महाराष्ट्रातील काँग्रेस पुढारी आश्चर्यचकित

झाले होते. आंदोलन होणार याची पूर्वकल्पना असली, तरी कायदेभंगाचा पुनरारंभ इतका अचानक करावा लागेल, असे त्यांना वाटत नव्हते. त्यामुळे १९३२ च्या चढाईची सूत्रे मुख्यतः सरकारच्या हाती राहून ग्रामीण महाराष्ट्रात काँग्रेसला बचावाचे धोरण पत्करावे लागले. वटहुकमांच्या अधिराज्याखाली समाजजीवनातील अनेक बाबी बेकायदेशीर ठरविण्यात आल्या होत्या. बहुतांश नागरी स्वातंत्र्य नष्ट केले होते. ४ जानेवारीच्या हल्ल्यासाठी दडपशाहीच्या योजनांना अंतिम स्वरूप देताना व्हाइसरॉय विलिंग्डन यांनी भारतमंत्री सॅम्युएल होअर यांना २० डिसेंबर १९३१ च्या पत्रातून लिहिले होते की, **"आय ॲम बिकमिंग अ सॉर्ट ऑफ मुसोलिनी इन इंडिया".** विलिंग्डनला हिंदुस्तानात दोन काळे डाग दिसत होते—मुंबई शहर आणि बंगाल.

सर्व भारतभर जवळजवळ लष्करी कायद्याचे राज्य सुरू झाले. पुढाकार घेण्यास अथवा आंदोलनाचा कार्यक्रम आखण्यास आणि तो गावोगावी पाठविण्यास काँग्रेसला उसंत मिळाली नव्हती. उसंत मिळू नये असा धूर्त व दृष्ट सरकारचा प्रयत्न होताच. स्वतः गांधीजींनी आंदोलनाचा कार्यक्रम **बाँबे क्रॉनिकल** पत्रातून घोषित केला होता. तथापि हे पत्रक मुंबई परिसराबाहेर फारसे जाऊ शकले नाही. शिवाय लगेच वर्तमानपत्रकांचे अभ्यवेक्षण (सेंसॉरशिप) सुरू झाले. त्यामुळे लोकांना अधिकृत कार्यक्रम समजला नाही. गांधीजींना पहाटे तीन वाजता अटक झाल्यावर निघताना ते म्हणाले होते की, सत्याग्रहाचा पूर्ण कार्यक्रम वीर नरिमन यांच्याकडून समजून घ्यावा. अशा परिस्थितीत कार्यकर्ते आश्चर्यचकित झाले होते.

महाराष्ट्राच्या काँग्रेस संघटनेतील अंतर्गत दोष आणि समस्यांमुळे येथील सविनय कायदेभंग आंदोलन कधीही मुंबईइतके प्रभावी अथवा दीर्घकालीन होऊ शकले नाही. महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस समितीत साधारणपणे १९२४ पासून ऐक्यभाव नव्हता. केवळ लोकमान्य टिळकांच्या नावामुळे प्रारंभापासून प्रांतिक समिती न. चिं. केळकर यांच्या संधिसाधू गटाच्या हातात होती. या गटाला सत्याग्रहाविषयी आकर्षणच नव्हते. केवळ देखावा म्हणून केळकर घोषणा करीत. कारण त्यांना फक्त कायदेमंडळामधील अधिकारपदांमध्येच रस होता. त्यांचा

स्वतंत्र असा प्रतिसहकारवादी पक्ष असून कायदेमंडळांमध्ये सरकारशी कधी सहकार्य तर कधी सरकारला विरोध, असे त्या पक्षाचे संधिसाधू धोरण होते. त्यामुळे या प्रांतातील राजकारणात अनेक वेळा विसंगती व बेबनाव होत असत. महाराष्ट्रातील काँग्रेसविषयी काँग्रेस अध्यक्ष मोतीलाल नेहरूंनी वैतागून पूर्वी काढलेले उद्गार—"प्रतियोगी सहकारिता हे विष असून ते स्वराज्य पक्षाच्या एका अंगात पुरते भिनले असल्याने, ते कुजले आहे. आणि म्हणून ते कापून टाकले पाहिजे"—अत्यंत सूचक होते. सरकारला त्यांची अंतर्बाह्य भूमिका माहीत असल्याने केळकरांना कधीच अटक करण्यात आली नाही.

शिवाय महाराष्ट्रात ब्राह्मण-ब्राह्मणेतर या वादामुळे काँग्रेस संघटना बळकट होऊ शकत नव्हती. काँग्रेस म्हणजे ब्राह्मणांचे कारस्थान आहे असा अपप्रचार ब्राह्मणेतर पक्षाचे नेते करीत असत. अशा अनेक कारणांमुळे महाराष्ट्रात कायदेभंग आंदोलन मुंबईइतके तीव्र होऊ शकले नाही. वित्तबळाची उणीव हेही एक कारण होतेच. तथापि केळकर गट व व्यक्तिगत स्पर्धा व मतभेद ही मुख्य कारणे होती.

अशा कारणास्तव संभाव्य आंदोलन लक्षात घेऊन, महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस समितीने वा. वि. साठे यांच्याऐवजी शंकरराव देवांना प्रांतिकचे अध्यक्षपद दिले. देव प्रांतिक आंदोलनाचे सर्वाधिकारी बनल्यावर त्यांनी झंझावाती प्रचार केला. देव, न. वि. गाडगीळ, वि. रा. शिंदे, केशवराव जेधे, माधवराव बागल, नाना पाटील, वा. वि. दास्ताने, देवकीनंदन नारायण, गंगाधरराव देशपांडे, देवगिरीकर, विनायकराव भुस्कुटे, हरीभाऊ तुळपुळे, गो. आ. ऊर्फ तात्यासाहेब देशपांडे, बाळूकाका कानिटकर वगैरेंनी शांततेच्या काळात बराच प्रचार केला होता. देव, शिंदे, जेधे बंधू, नाना पाटील व देशपांडे यांचा जोर ब्राह्मणेतरांना काँग्रेसमध्ये आणून आंदोलनात सहभागी करून घेण्यावर होता. त्यानुसार या काळात कित्येक मराठे व कुणबी वगैरे चळवळीत प्रथमच सहभागी झाले. हे परिवर्तन १९३० पासून प्रकर्षाने जाणवले होते.

सविनय कायदेभंगाचा पुनरारंभ जरी ४ जानेवारी १९३२ रोजी झाला, तरी आंदोलनाच्या पहिल्या फेरीत जे सहभागी झाले होते त्यांच्या याद्या आधीच तयार होत्या. त्यांतील बहुतेक सर्वांनाच सत्याग्रह करण्यापूर्वीच सरकारने कारावासात डांबले. केळकरांच्या गटाचे अण्णासाहेब भोपटकर, दा. वि. गोखले, ग. वि. केतकर वगैरेंचा सत्याग्रह करण्याचा मानस नव्हताच. मात्र १९३० च्या चळवळीत त्यांनी नाममात्र भाग घेतल्यामुळे त्यांची नावे सरकारी यादीत होती. म्हणून १९३२ च्या फेरीत त्यांना अटकेत टाकले. तथापि त्यांची 'नवीन भूमिका' लक्षात येताच त्या सर्वांना तात्काळ मुक्त करण्यात आले. त्यांनी आपापला व्यवसाय चालू केला आणि अधिकाऱ्यांनी लादलेल्या अटींचे पालन केले. काहींनी पुणे नगर पालिका अथवा कायदेमंडळाच्या निवडणुका लढवून अधिकाराची पदे मिळविली. काही हिंदुमहासभेत गेले.

१९३२ मधील सविनय कायदेभंगास न. चिं. केळकरांचा तीव्र विरोध होता. १९३० पेक्षाही आता जास्त विरोध होता. तुरुंगात जाणारे त्यांना नाठाळ वाटू लागले. **गतगोष्टी** या आत्मकथनातील पुढील मजकुरावरून केळकरांची विचारसरणी दिसून येते, "१९३२ साली फिरून काँग्रेसने कायदेभंगाची चळवळ सुरू केली तेव्हा तर मी प्रथमपासूनच मनाने ठरविले की, या चळवळीला दुरूनसुद्धा स्पर्श करावयाचा नाही. कारण १९३० सालच्या पेक्षाही १९३२ ची चळवळ अधिक असमर्थनीय होय असे माझे मत होते. आमच्या पक्षातील लोकांनाही असेच वाटू लागले होते. पण या दुसऱ्या चळवळीत सरकारने लोकांनी कायदा मोडण्याची वाटच पाहिली नाही. सरकारने पूर्वपरिचयावरून याद्याच तयार करून ठेवल्या होत्या. आणि चळवळीची घोषणा होताच त्या याद्यांबरहुकूम धरपकड करून होय-नाही म्हणण्यास कोणाला सवडच ठेवली नाही. यामुळे या चळवळीत काही लोक अनिच्छेने सामील झाले होते, म्हणजे सापडले होते." (पृ. ७४५).

तथापि केळकरांचे हे संकुचित आणि कलुषित मत त्यांना स्वतःला व त्यांच्या चाहत्यांनाच लागू पडणारे होते. महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचा ताबा गमवावा लागला आणि आपण फार मोठे व्यासपीठ गमावले याचे त्यांना दुःख होते. शिवाय

पूर्वीच्या कोणत्याच जनआंदोलनात स्वखुषीने भाग न घेता केवळ पक्षाची शिस्त म्हणून पूर्वी केळकर व भोपटकर वगैरेंनी सत्याग्रह केला होता. त्यांची मते माहीत असल्याने सरकारने केळकरांना कधीच कारागृहात डांबले नाही. चळवळ सुरू झाल्यावर काही दिवसांनी चळवळ ओसरली असा ते आपल्या वर्तमानपत्रांमधून अपप्रचार करीत. कायदेभंग थांबवावा असा लेख त्यांनी १२ ऑगस्ट १९३२ च्या **केसरीत** लिहिला. त्याचे बक्षीस म्हणून सरकारने न. चिं. केळकरांना, सरकारी खर्चाने, गोलमेज परिषदेच्या तिसऱ्या सत्रासाठी लंडनला पाठविले (ऑक्टोबर १९३२) होते.

सविनय कायदेभंग आंदोलन सुरू होताच पुण्यातील निष्ठावंत काँग्रेस पुढारी शंकरराव देव, न. वि. गाडगीळ, हरिभाऊ तुळपुळे, बाळूकाका कानिटकर, वि. रा. शिंदे, केशवराव जेधे, देवगिरीकर वगैरेंना कारावासात डांबण्यात आले. तसेच पुणे यूथ लीगचे नेते श्री. पु. लिमये, श्री. म. जोशी, ना. ग. गोरे, र. के. खाडिलकर यांनाही तुरुंगात डांबण्यात आले. केळकर पक्षाचे ज. स. करंदीकर यांनीही काही दिवस कारावास पत्करला. सरकारच्या नवीन धोरणानुसार या सर्वांना काही अटींच्या अधीन दोन महिन्यांनी मुक्त करण्यात आले. मुक्तता करताना सरकारने अटी घातलेल्या होत्या. तथापि या सर्वांनी अटी झुगारून पुन्हा सत्याग्रह केला. त्यामुळे त्यांचेवर खटले भरून त्यांना दीर्घ मुदतीच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या. पुण्याचे गो. आ. देशपांडे, पाली-अलिबागचे द. का. कुंटे, धारवाडचे द. प. करमरकर वगैरे स्वातंत्र्य सेनानी अटक चुकवून भूमिगत राहिले आणि त्यांनी चळवळ संघटित करण्यासाठी बरेच काम केले. अटक झाल्यावर त्यांना दीर्घ मुदतीची शिक्षा झाली. अच्युतराव पटवर्धन मुंबईत पकडले गेले होते. सेनापती बापटांचे चिरंजीव वामनराव आणि ह. रा. महाजनी यांनी स्वखुषीने कारावास पत्करला.

विनायकराव भुस्कुटे, आचार्य शं. द. जावडेकर, आचार्य स. ज. भागवत, आचार्य विनोबा भावे, लक्ष्मणशास्त्री जोशी आणि स्वतः महात्मा गांधी यासारख्यांनी कारागृहात ज्ञानसाधना आणि ज्ञानप्रसारण केले. तरीही विकृत मनाच्या नरसोबा

चिं. केळकरांनी १९३२ सालच्या सत्याग्रहींचा पुढीलप्रमाणे उपहास केला :– "या सुमारास कायदेभंगाला बरेच विकृत स्वरूप आले होते. काही स्वयंसेवक म्हणविणाऱ्यांनी पैसे घेऊन तुरुंगवास पत्करला. काही काँग्रेसवाले नाइलाजाने नाखुषीने तुरुंगात जात होते......"[२२] केळकरांचे हे मत नुसते असत्य नसून विकृत आणि द्वेषमूलक होते. खरेतर कारावासात बहुतेक युवकांची आणि काँग्रेसजनांचीही ध्येयधारणा व त्यागवृत्ती विकसित झाली. काही जणांवर फेबिअन समाजवादाचा तर काहींवर क्रांतिकारी साम्यवादाचा प्रभाव पडला. १९३२ च्या आंदोलनात पुणे शहर आणि जिल्ह्यातील दोन हजारांहून अधिक युवक आणि काँग्रेस कार्यकर्ते कारावास भोगून आलेत. त्यांच्यावर अनन्वित अत्याचार होऊनही कोणी माफी मागितली नव्हती, याची नोंद वाचकांनी घ्यावी.

१९३० ते १९३९ या कालखंडात ब्राह्मणेतर पक्षाचे विघटन होऊन या पक्षातील भास्करराव जाधव, सिद्दप्पा कंबळी, धनजीशहा कूपर, डोंगरसिंग पाटील यांचा गट निष्प्रभ होत गेला. मात्र कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे व शंकरराव देवांच्या प्रेरणेमुळे त्या पक्षातील केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर, भाऊराव पाटील यांच्यासारखे पुरोगामी विचारसरणीचे पुरुष आधीच काँग्रेसच्या आंदोलनाकडे ओढले गेले होते. १० ते १६ एप्रिल १९३० या सात दिवसांत वि. रा. शिंदे, प्रा. धर्मानंद कोसंबी व केशवराव जेधे यांनी पुण्याच्या पंचक्रोशीतील २६ गावांमध्ये पायी फिरून कायदेभंगाचा प्रचार केला होता. या दौऱ्याची सांगता त्यांनी पुण्यातील शिवाजी मंदिरात केली. या सर्व प्रयत्नांचे चांगले परिणाम होऊन अधिकाधिक मराठा युवक आंदोलनात सहभागी झाले. दिनकरराव जवळकरही सांगत होते की, **"केवळ शिवाजीच्या नावाचा उच्चार करून स्वतःचा मोठेपणा मिरवण्याचे दिवस आता राहिले नाहीत."** स्वदेशी, ब्रिटिश मालाचा बहिष्कार व खादीचा प्रचार केला पाहिजे, असे ते सांगत.

पुणे जिल्ह्यातील सर्व काँग्रेस समित्या, पुणे यूथ लीग, टिळक राष्ट्रीय विद्यालय व सासवडचा आश्रम आणि सर्वच तत्सम संस्था बेकायदा ठरविण्यात आलेल्या होत्या. तरीही प्रांतिक समितीने काँग्रेस सर्वाधिकाऱ्यांची मालिका तयार ठेवली

होती. शंकरराव देवांना पहिले डिक्टेटर म्हणून नेमलेले होते. या आंदोलनात यूथ लीगच्या नेत्यांच्या रूपाने काँग्रेसची नवीन पिढी निर्माण झाली.

मार्च १९३२ पासून वरील स्थानबद्ध काँग्रेस नेत्यांची व पुणे यूथ लीगच्या पुढाऱ्यांची सशर्त सुटका झाल्यावर त्यांनी पुन्हा आंदोलनाचा झंझावाती प्रचार सुरू केला. अखिल भारताप्रमाणे पुण्यातही जालियनवाला हत्याकांडाचा स्मृतिदिन व राष्ट्रीय सप्ताह साजरा करण्यात आला. ६ ते १३ एप्रिल या राष्ट्रीय सप्ताहाच्या निमित्ताने पुणे व महाराष्ट्रातील चळवळीत नवचैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. या सप्ताहात पुण्यातील ३६ जण पकडले गेले. त्यांत शंकरराव देव वगैरे होते. २३ एप्रिल १९३२ रोजी दिल्लीत काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन भरविण्याचा प्रयत्न होता. अर्थातच ते बेकायदेशीर असल्याचे सरकारने घोषित केले. या अधिवेशनासाठी पुण्याहून न. वि. गाडगीळ गुप्तपणे दिल्लीला गेले होते. ८ एप्रिल रोजी अलाहाबादेत मिरवणुकीचे नेतृत्व करणाऱ्या जवाहरलाल नेहरूंच्या म्हाताऱ्या मातोश्री स्वरूप रानी यांच्यावरही पोलिसांनी लाठीमार केला होता. त्यात त्या रस्त्यावरच बेशुद्ध पडल्या होत्या. नेहरूंच्या दोन्ही बहिणीही तुरुंगात होत्या. नेहरूंचे मेहुणे बॅ. रणजित पंडित, गाडगीळ, मदन मोहन मालवीय असे दोन हजार सत्याग्रही २३ एप्रिल १९३२ रोजी पकडण्यात आले. सरकारच्या अशा आक्रमक कारवायांमुळे आंदोलन अधिक तीव्र झाले.

सातारा जिल्ह्यातील सर्व काँग्रेस समित्यांव्यतिरिक्त हिंदुस्तानी सेवा दलाची शाखा आणि टिळक राष्ट्रीय विद्यालय, ग्रामसेवा संघ, एकसळचा शेतकरी संघ, तासगावची गजानन व्यायामशाळा व मसूरचा ब्रह्मचर्याश्रम या संघटना बेकायदेशीर ठरविण्यात आल्या. ७ जानेवारी १९३२ रोजी भाऊसाहेब सोमण, नाथ घाणेकर, अप्पासाहेब आळतेकर, गणपतराव आळतेकर, डॉ. आठले , परचुरे, पांडुरंग शिराळकर, आबासाहेब जोग (तासगाव), भय्यासाहेब वाटवे (वाई), विनायक महाराज (मसूर), लक्ष्मणशास्त्री जोशी यांना अटक करण्यात आली. शासनाची झडप जबरदस्त व वेगवान होती. आंदोलनाची तीव्रता ग्रामीण भागापेक्षा नागरी भागात अधिक होती. आधीच प्रमुख कार्यकर्ते कारावासात गेल्यामुळे नेतृत्वाचा

अभाव जाणवू लागला. कायदेभंगाच्या पहिल्या फेरीपेक्षा या फेरीतील आंदोलन ग्रामीण भागात लवकर ओसरले. मात्र या सत्रातही सातारा, वाई, कराड, तासगाव व वाळवा परिसरातील आंदोलन अधिक जोरदार होते. शिराळा पेट्यातील जंगल सत्याग्रह उल्लेखनीय होता. वाई, सातारा, कराड, वाळवा व तासगावमध्ये स्वराज्याचा जाहीरनामा सार्वजनिकरीत्या वाचण्यात आला.[२३]

**बाँबे क्रॉनिकल** पत्रकाने या जिल्ह्यातील आंदोलनाची प्रशंसा केली होती. फेब्रुवारी १९३२ पासून कराड व वाई भागातील आंदोलनाचा जोर वाढला. शेतसारा-बंदी व जंगल सत्याग्रह यावर भर देण्यात आला. वाळवा तालुक्यातील पांडुरंग गोविंद पाटील ऊर्फ पांडू मास्तर हे काँग्रेस डिक्टेटर असताना त्यांनी पोलिसांना बरेच हैराण केले होते. आधुनिक महाराष्ट्र घडविण्यात बरेच योगदान देणारे यशवंतराव चव्हाण सविनय कायदेभंग आंदोलनात सक्रिय होते. नंतर क्रांतिसिंह नाना रामचंद्र पाटील, पांडुरंग पाटील, यशवंतराव, बापू भाऊ कचरे, बरडे मास्तर आणि अनंत कृष्णा बरडे हे कायदेभंगातील आंदोलक **१९४२-१९४५ च्या सातारा प्रतिसरकारचे पुढारी बनले.**

पुणे जिल्हा व सांगली संस्थानातील काँग्रेसजन स्थानिकांना उत्तेजन देण्यासाठी सातारा जिल्ह्यात येत. याउलट आंदोलनाचा मुकाबला करण्यासाठी जिल्हादंडाधिकारी गावोगाव प्रचारसभा घेऊन, राजनिष्ठांच्या मुखातून चळवळीवर टीका वदवून घेत असे. या दंडाधिकाऱ्याने काँग्रेसवर खोटेनाटे आरोप करण्यासाठी काही ब्राह्मणेतर पुढाऱ्यांचा व सावकारांचाही उपयोग करून घेतल्याचे दिसते. रामचंद्र गणेश सोमण, दत्तात्रय वासुदेव परचुरे, डॉ. वासुदेव आठले, पंढरीनाथ वामन घाणेकर, सदाशिव खंडो आळतेकर, गणपत सदाशिव आळतेकर व पांडुरंग केशव, श्रीपाद रामचंद्र जोग, विनायक शिवराम जोशी आणि महादेव वासुदेव वाटवे हे प्रमुख कार्यकर्ते कारावासातून सुटून आल्यावर त्यांनी पुन्हा सत्याग्रह केला. त्यामुळे त्यांना दीर्घ मुदतीच्या शिक्षा झाल्या. सविनय कायदेभंग आंदोलनात या जिल्ह्याचे योगदान पुष्कळ होते हे खरे. बरेच कार्यकर्ते भूमिगत राहून चळवळ चालवत होते. १९३२ च्या अखेरपर्यंत चळवळ चालू राहिली.[२४]

मुंबईत कायदेभंग आंदोलनाचा पुनरारंभ होण्याच्या तीन दिवस आधी पनवेलमध्ये महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस परिषदेचे अधिवेशन भरले होते. तेथे उपस्थित असलेल्या १५०० प्रतिनिधींमध्ये मुंबई, ठाणे, संपूर्ण कोकण, पुणे, जळगाव, धुळे, सोलापूर व वऱ्हाडातील काँग्रेसजनांचा समावेश होता. माधवराव अणेही तेथे आले होते. त्याआधी स्वदेशी वस्तूंच्या प्रदर्शनासाठी सुभाषबाबूही पनवेलला येऊन गेलेले होते. यामुळे रायगड जिल्ह्यात आगामी चळवळीसाठी पोषक वातावरण तयार झालेले होते. मुंबईतील काँग्रेस प्रचारकांच्या मार्गदर्शनामुळे पनवेलमध्ये सत्याग्रह सर्वाधिक प्रखर बनत गेला. त्याखालोखाल पेण, अलिबाग, महाड, कर्जत, माणगाव, उरण व खालापूरला सत्याग्रह झाला. सासवण्याचा वैश्य विद्याश्रम प्रचारकार्य करीत असे. दडपशाहीमुळे चळवळीला भूमिगत आंदोलनाचे स्वरूप आले. पेणला विदेशी कपड्यांची होळी पेटवण्यात आली. रायगड जिल्ह्यातून सीमापार केलेले द. का. कुंटे गुप्तपणे मुंबईतून या जिल्ह्यातील आंदोलकांशी संपर्क ठेवत. रायगडमधील कायदेभंग आंदोलनात सहभागी असलेल्या शेकडो काँग्रेसजनांची नावे आम्हाला सरकारच्या गुप्त फायलींमध्ये आढळली. तथापि १९३०-१९३३ च्या आंदोलनाची विशेषता ही की, यात पांढरपेशा वर्गाबरोबर शेतकरी व कामकरी वर्गाचेही लोक मोठ्या प्रमाणात सहभागी झाले. अस्पृश्यतानिवारणासही लोक अनुकूल झाले. अलिबागला १९ सप्टेंबर १९३२ रोजी ७०० सवर्ण व अवर्णांनी एकत्र सत्यनारायणाची पूजा केली होती. अशाच पूजा लगेच महाड, कर्जत, रोहा, उरण येथेही झाल्या. राजकीय आंदोलनाची ही सामाजिक फलश्रुती त्या काळी महत्त्वाची होती.[२५]

बार्डोली सत्याग्रह आणि तदनंतरचा शिरोडा सत्याग्रह यांमुळे जळगाव जिल्ह्यात खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य चळवळीचे स्फुल्लिंग जागृत झालेले होते. त्यानंतर गांधीजींच्या आवाहनानुसार पोलीस अधिकारी पदाचा त्याग करून (१६ जून १९३०) धनाजी नाना चौधरी चळवळीत उतरले होते. या पार्श्वभूमीवर जळगाव जिल्ह्यात सविनय कायदेभंग आंदोलन तीव्र झाले. त्यामुळे कलेक्टरने सर्वच काँग्रेस समित्या व पिंपराळे आश्रम, खिरोदा आश्रम, डांगरीचा आश्रम, चोपडे,

चहार्डी वगैरे ठिकाणची खादी निर्माण केंद्रे, जळगावचे काँग्रेस भवन आणि प्रभाकर केशव सोनाळकरांची यूथ लीग वगैरे सर्व संघटना ताब्यात घेतल्या. सर्वत्र ठोकशाही अवतरली. त्यामुळे लोकांना आव्हान दिल्यासारखे झाले. सरकारचा आक्रमकपणा, इंग्लंडचा ताठरपणा व विंस्टन चर्चिल यांनी महात्मा गांधी यांना 'नेकेड फकीर' म्हणून दाखविलेली मग्रुरी आणि गोलमेजचा बोजवारा या कारणांमुळे वातावरण तापलेले होते.

वासुदेव विठ्ठल दास्ताने, देवकीनंदन नारायण, सीताराम बिर्ला, शंकरलाल काबरे, धनाजी नाना चौधरी (१४ जानेवारी १९३२), आपटे गुरुजी वगैरे नेत्यांना तसेच शेकडो स्वयंसेवकांना तुरुंगात डांबण्यात आले. बाळकृष्ण रमाकांत देशपांडे, मोतीराम ओंकार चौधरी, डॉ. कोठारी, रामनारायण आणि रामकृष्ण काबरे, लोढूभाऊ फेगडे, रामभाऊ भोगे, सीताराम भाऊजी चौधरी यांनाही सक्तमजुरीचा प्रसाद मिळाला. यांचेपैकी बरेच जण शिरोडा सत्याग्रहातही होते. विनोबा भावे जळगावमध्ये जगजागृती करीत असताना त्यांना तेथे अटक करून धुळे मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले. विनोबाजींनी १९३० सालातही सविनय कायदेभंग केला होता. तरीही तेव्हा त्यांना सरकारने कारावास घडविला नव्हता. तथापि नवीन दडपशाही धोरणानुसार विनोबांना १९३२ मध्ये इंग्रजांनी तुरुंगात टाकले.

सविनय कायदेभंगाच्या पहिल्या फेरीपेक्षा १९३२च्या फेरीत लढा अधिक तीव्र झाला. शासनाची यंत्रणा जशी अधिक कठोर आणि सूडबुद्धीची बनली तसा स्वयंसेवकांचा प्रतिकार आणि निर्धारही अधिक कडवा बनला. १९३० मध्ये लोक तत्परतेने तुरुंगात गेले. तथापि १९३२ साली कारावास टाळून सरकारला जेरीस आणण्याचे तंत्र होते. पहिल्या फेरीतील बहुसंख्य स्वातंत्र्यसैनिक १९३२ मध्येही सामील झाले. पण त्याव्यतिरिक्त शेकडो नवीन युवक आंदोलनात उतरले. विशेष म्हणजे जळगाव जिल्ह्यात सरकार-विरोधी कारवाया करणे कठीण बनल्यावर बऱ्हाणपूरला 'बाईसाहेबांच्या हवेलीत' भूमिगत सत्याग्रह छावणी उघडण्यात आली होती. मुंबई प्रांताचा गव्हर्नर साईक्स भुसावळला एका पुलाचे उद्‌घाटन

करण्यासाठी आणि एका सरकारनिष्ठ माणसाला रावबहादूर हा किताब देण्यासाठी आला होता. या प्रकाराचा निषेध म्हणून भुसावळमध्ये 'साईक्स गो बॅक' ही चळवळ झाली.

१९३२ साली विनोबा भावे, जमनालाल बजाज, गुलझारीलाल नंदा, खंडूभाई देसाई, बाळुभाई मेहता, साने गुरुजी, आपटे गुरुजी यांच्यासह दास्ताने व धनाजी नाना धुळे जेलमध्ये होते. त्यामुळे तिथे जणू राष्ट्रीय विद्यालय निर्माण झाले होते.[२६]

## सोलापूर मार्शल लॉ

इंग्रज सत्ताधीशांनी मार्शल लॉ लादण्यापूर्वी व लादल्यानंतर सोलापुरात केलेले प्रच्छन्न जुलूम आणि अनन्वित अत्याचार महाराष्ट्र कधीच विसरू शकला नाही. त्याप्रसंगी व्यक्त झालेली इंग्रजांची असंवेदना व क्रौर्य याविषयी बरेच लिहिले गेले. तथापि या वेदनाकारक शोकांतिकेचा संपूर्ण व सूत्ररूप इतिहास प्रकाशित झालेला नाही. म्हणून प्रस्तुत इतिहासकाराने ब्रिटिश सरकारच्या फायली व समकालीन राष्ट्रवादी विचारसरणीच्या वर्तमानपत्रांमध्ये विखुरलेले धागे संकलित करून सत्यकथन करण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

सोलापूरच्या शोकांतिकेतून ब्रिटिशांचा प्रासंगिक खोटारडेपणा, संवेदनशीलतेचा अभाव व असमंजसपणा दिसून येतो. त्यांच्या परस्परांमधील समन्वयाचा आणि विवेकीपणाचा अभाव स्पष्ट होतो. महाबळेश्वरात ऐषआरामात मशगुल असलेल्या गव्हर्नर साईक्सने यथातथा वृत्तीने व बेपर्वाईने मार्शल लॉ जारी करण्यास संमती दिली होती. तेव्हा सिमल्याच्या गारव्यात बसलेल्या व्हाइसरॉय आयर्विनने मार्शल लॉ पुकारण्यास १५ मे १९३० रोजी परवानगी दिली. तथापि त्याआधीच १२ तारखेलाच साईक्सने मार्शल लॉच्या आदेशावर सही केली होती. प्रशासकीय भाषेत व्हाइसरॉयच्या 'अधिकाराचा हा अधिक्षेप' होता. शिस्तभंग होता. सोलापूरचा आय.सी.एस. कलेक्टर नाईट आणि डी.एस.पी. हे दोघेही भयानक अकार्यक्षम व गलथान तर होतेच, शिवाय ते धास्तावलेले व गर्भगळीत झालेले होते. मानसिक

कमकुवत अवस्थेतून त्यांनी आदेश दिले. परिस्थिती हाताळण्यात ते पूर्णतया अपयशी ठरले. वस्तुतः लंडनस्थित प्रिव्ही कौन्सिल हे भारताचे सर्वोच्च न्यायपीठ होते. तथापि या न्यायपीठाने मल्लाप्पा धनशेट्टी व सहकाऱ्यांचे अपीलही दाखल केले नव्हते. शिवाय अपील दाखल न करण्याचे कारण दिले नाही. उत्तराचे सौजन्यही दाखविले नाही.

गांधी-आयर्विन शांतता करार करताना आयर्विन यांनी गांधीजी यांना असंदिग्ध आश्वासन दिले होते की, लष्करी प्रशासनाने स्वेच्छाचारी रीतीने तुरुंगात डांबलेल्या नागरिकांना मुक्त करण्यात येईल. तसेच सोलापुरातील घटनांबाबत आपण सखोल चौकशी करू, असेही गांधीजींना आश्वासन दिले होते. वस्तुतः सोलापुरातील अत्याचारांचे परिमार्जन हासुद्धा गांधी-आयर्विन कराराचा एक अविभाज्य भाग होता. तथापि लॉर्ड विलिंग्डन व्हाइसरॉय झाल्यावर त्याने कराराचे अनुपालन केले नाही. आश्वासन भंग केला! खरेतर विलिंग्डनला तो शांतता करार नापसंत होता.

महात्मा गांधी यांना प्रथम ५ मे १९३० रोजी विनाकारण अटक केल्यामुळे सोलापुरात जनक्षोभ उसळला हे खरे. तथापि गांधीजींना अटक करण्याची सर्व योजना ७ एप्रिल १९३० रोजीच तयार होती आणि मुंबई सरकार केवळ योग्य संधीची प्रतीक्षा करत होते. हे सरकारी गुपित मुंबईचे गृहमंत्री अर्नेस्ट हॉटसन यांनी एका ब्रिटिश पत्रकाराला आधीच सांगितले होते. हा गौप्यस्फोट ११ मे १९३० रोजीच्या इंग्रजी **मराठा** पत्रकाने केला होता. गांधीजींच्या अटकेव्यतिरिक्त जनतेचे आर्थिक शोषण आणि गिरणी कामगारांच्या वेतनात कपात यामुळे सोलापुरात प्रक्षोभ उसळला असा काही वर्तमानपत्रांचा अभिप्राय होता.[२७]

मुंबई कायदेमंडळाचे सदस्य लालजी नारायणजी हे काही काँग्रेसजन नव्हते. तरीही सोलापूर प्रशासनातील नीतिधैर्याचा अभाव आणि बेजबाबदारपणा तसेच कर्तव्यच्युतीमुळे लष्करी कायदा लादला गेला, असा त्यांनी जाहीर आरोप केला होता. आणि तो सत्य होता. त्या सोमवारी सर्वत्र शांतता होती आणि दुकानांचा व्यवहार नेहमीप्रमाणे चालू होता. शिवाय कापड गिरण्यांनी काम सुरू करण्याचे

धोरण घोषित केले होते. राजनिष्ठ **टाइम्स ऑफ इंडिया** च्या वार्ताहरानेही या विधानास पुष्टी दिली. वालचंद हिराचंद यांनीही या वस्तुस्थितीचा निर्वाळा दिला. वास्तव असे असताना लष्करी कायद्याचे प्रयोजन काय असा सवाल **बाँबे क्रॉनिकल** पत्रकाने १४ मे १९३० रोजी विचारला होता. सरकारने समंजसपणा दाखवावा असा सल्लाही दिला होता.

सत्य असे होते की, कलेक्टर व डी.एस.पी. धास्तावलेले व गर्भगळीत झाले होते. गव्हर्नर साईक्स महाबळेश्वरच्या थंड हवेत आराम करीत होता. तेथूनच त्याने मार्शल लॉ पुकारण्यास संमती दिली. कलेक्टरने आपले अधिकार न वापरल्याने लष्कराने मनमानी करून संहारक ताकद उपयोगात आणली. **क्रॉनिकल-केसरी** पत्रकांनी असा स्पष्ट अभिप्राय देऊन त्या अकार्यक्षम कलेक्टरला काढून सोलापूरवर दुसऱ्याची नेमणूक करावी अशी सूचना केली होती. जिल्हा प्रशासन यंत्रणा निष्क्रिय व अकार्यक्षम आणि गोंधळलेली होती, हा देशी पत्रकांचा अभिप्राय होता. मार्शल लॉ अगदी अनावश्यक आणि असमर्थनीय असल्याबाबत महाराष्ट्रात एकमत होते.

काही लोकांनी कोर्टकचेऱ्या जाळल्या हे सत्य. पण संरक्षणासाठी तेथे पोलीस नव्हते. त्याच वेळी पोलीस व सेनादल शहराच्या दुसऱ्या भागात बेछूटपणे गोळीबार करत होते. कोर्टकचेऱ्या दोनतीन तास जळत असताना आग विझवण्याचे प्रयत्न अधिकाऱ्यांनी केले नाहीतच. आग पाहत असलेल्या एका न्यायाधीशाने कलेक्टरला फोन करून अग्निशामक दल पाठविण्याची विनंती केली होती, पण कोणतीही उपाययोजना करण्यात आली नाही. त्यानंतर न्यायाधीशांनी हायकोर्टाला तार पाठविली.[२८]

व्हाइसरॉयने १५ मे १९३० रोजी लष्करी कायदा जारी करण्यास संमती दिली. तथापि मुंबई सरकारने व्हाइसरॉयच्या अधिकाराचा अधिक्षेप करून त्याआधीच १२ मे रोजी लष्करी कायदा लागू केलेला होता. शिवाय लष्करी कायद्याचा अर्थ

स्वेच्छानुसारी पद्धतीने लावून अधिकाऱ्यांनी लोकांना कायदाबाह्य शिक्षा ठोठावल्या. वस्तुतः मल्लाप्पा धनशेट्टी काँग्रेसचे सभासद नव्हते. प्रक्षोभित झालेला जमाव कलेक्टरवर हल्ला करण्याच्या तयारीत असताना, धनशेट्टी यांनी त्याला वाचविले होते. त्याचप्रमाणे जयकिसन सारडा, बंकटलाल सोनी, कवी कुंजविहारी, राजवाडे, माणेकचंद शहा यांचा हिंसाचाराशी अजिबात संबंध नव्हता. अशा अनेकांना विवेकशून्यपणे शिक्षा देण्यात आल्या. कोर्टात कोणालाही वकील देण्याची अथवा ज्यूरीची तरतूद नव्हती. अनावर झालेल्या जमावाने जो हिंसाचार केला त्यासाठी धनशेट्टींना देहदंडाची शिक्षा सुनावण्यात आली. लष्करी कोर्टाचा निवाडा चुकीच्या गृहीतकांवर आधारित होता.

त्या भयानक अत्याचारी लष्करी कायद्याचा अंमल ५१ दिवसांनंतर रद्द झाल्यावरही इंग्रजांनी सोलापुरात जमावबंदी चालू ठेवली होती. राष्ट्रध्वज फडकवणे वा मिरवणूक काढणे यावर बंदी घालण्यात आली. वर्तमानपत्रांवरील बंधने मागे घेण्यात आली नव्हती. सरकारने सोलापुरातून सेनादल पूर्णपणे हटविले नाही. या शहरातील घटनांची एका स्वतंत्र समितीमार्फत चौकशी करण्यात यावी यासाठी नंतर कायदेमंडळात ठराव मांडण्यात आले. तसेच काँग्रेस व इतर पक्षांनी तशीच मागणी केली. पण संवेदनाहीन इंग्रजांनी काहीच केले नाही. देशात न्याय मिळाला नाही म्हणून मल्लाप्पा धनशेट्टी आणि त्यांच्या सहआरोपींनी प्रिव्ही कौन्सिलमध्ये अपील केले. तथापि हे अपील दाखल करण्यास त्या कौन्सिलने नकार दिला. इतकेच नव्हे तर अपील दाखल न करण्याचे कारण सांगण्याचे सौजन्यदेखील ब्रिटिशांनी दाखविले नाही. त्यामुळे सोलापूरचे अंतःकरण कायमचे दुखावले.[२९]

शांतता कराराच्या वाटाघाटी करताना गांधीजींनी सोलापूरच्या उर्वरित बंदिवानांच्या सुटकेची मागणी केली होती. ती व्हाइसरॉय आयर्विन यांनी मान्य केलीही होती. पण वर उल्लेख केल्याप्रमाणे विलिंग्डनच्या सरकारने आश्वासनांची पूर्ती केली नाही.

सविनय कायदेभंग आंदोलनाचा पुनरारंभ झाल्यावर १२ जानेवारी १९३२ रोजी सोलापुरात हुतात्मा दिन पाळून ब्रिटिश-विरोधी भावना प्रज्वलित करण्याची योजना आखण्यात आली. तथापि त्यास प्रतिबंध घालण्यासाठी सरकारने वटहुकमांखाली आधीपासूनच बंदीहुकूम अमलात आणून अतिरिक्त पोलीस बंदोबस्त ठेवला होता. प्रतिबंधक उपाय म्हणून अनेक जणांना आधीच अटक केली होती. सेनादलाचे सामर्थ्य प्रदर्शित करण्यास्तव शहरात मिलिटरी संचलन करण्यात आले. तरीही १३ जानेवारीला सोलापुरात हुतात्मा दिन साजरा झालाच. मात्र त्याआधीच पंढरपूर व मुंबईत हरताळ पाळून १२ जानेवारीलाच हुतात्मा दिनाचे कार्यक्रम करण्यात आले.[३०] इतःपर सोलापूर हुतात्मा दिन हा केवळ भावनिक मुद्दा न राहता तो राष्ट्रीय अस्मितेचा प्रतीक बनला. सोलापूर शोकांतिकेतून काही हार्डकोअर ब्रिटिशांची संवेदनहीनता दिसून आली. त्यांना सत्यासत्याची चाड नव्हती, हे दिसून आले.

गोलमेज परिषदेचे पहिले सत्र जसे विफल झालेले होते, तसेच दुसरे सत्रही निराशाजनक ठरले. आठ वर्षांपूर्वी काँग्रेसचे एक आधारस्तंभ असलेले गांधीवादी शौकत अली लंडनमध्ये मुस्लीम कँपमध्ये सामील झालेले होते. काही निहित हितसंबंध वगळता देशाला स्वातंत्र्याच्या दृष्टीने या परिषदेकडून लाभ झाला नाही. म्हणून गोलमेज परिषद समिती मुंबईत येताच तिचे स्वागत कडवट निषेध आणि काळ्या निशाणांनी झाले. वस्तुतः समितीत शौकत अली आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दोन आदरणीय नेते असल्याकारणाने समितीचा अनादर वा निषेध करण्यात येऊ नये, असे काँग्रेसने घोषित केलेले होते. पण तरीही मुंबईतील युवकांच्या भावना समितीच्या विरोधात होत्या. जमशेड सी. पटेल नावाचा पारशी युवक समितीचे सभासद असलेल्या *एस. एस. मूलतान* बोटीत गेला व तेथे त्याने खिशातील काळा झेंडा सभासदांना दाखविला. समितीचे

सभासद गव्हर्नरच्या बंगल्यावर जात असताना वाटेत ऑपेरा हाऊस, वाळकेश्वर वगैरे ठिकाणी त्यांचा निषेध करण्यात आला. मुंबईतील विद्यार्थी वर्गाने काळ्या व लाल फिती लावून गोलमेजविरुद्धच्या भावना व्यक्त केल्या. पण हा काँग्रेसचा कार्यक्रम नव्हता.[३१]

नागपूरच्या पोलिसांचे पाक्षिक अहवाल पाहताना मला आढळून आले की, पश्चिम महाराष्ट्रापेक्षा वऱ्हाड-मध्यप्रांतातील शहरांमध्ये गोलमेज परिषद समितीचा निषेध अधिक तीव्रपणे करण्यात आला. परिषदेवरील टीका अनेक शहरांमधील जाहीर सभांमधून व्यक्त झालेली दिसते.

## वऱ्हाड-मध्यप्रांतातील आंदोलन

आगामी आंदोलनाचा अंदाज नसल्याने वऱ्हाड-मध्यप्रांतातील काँग्रेस संघटनेने पूर्वनियोजन केलेले नव्हते. प्रतियोगी सहकारवादी पक्षाची आंदोलनाशी बांधीलकी नव्हती. हा पक्ष आणि काँग्रेस यांच्यात ऐक्यभाव नव्हता. सुभाषबाबूंना कल्याणला पकडून नागपूर मार्गे कारागृहात नेत असताना ३ जानेवारीला काँग्रेसला थोडा अंदाज आला. त्यामुळे त्या रात्री नागपूरमध्ये सभा झाली. याच सभेत पूनमचंद रांका यांनी विठ्ठलभाई पटेल व डॉ. अन्सारी यांच्या अटकेची बातमी सांगून ४ जानेवारी १९३२ रोजी हरताळ पाळण्याचे आवाहन केले. या तारखेलाच रामभाऊ रुईकरांनी मॉडेल मिलमध्ये संप घडवून आणला. मात्र महात्मा गांधी व सरदार पटेलांना पहाटे अटक केल्याचे आणि सविनय कायदेभंगाचा पुनरारंभ झाल्याचे वृत्त नागपुरात ४ तारखेला दुपारनंतर समजताच शहरात हरताळ पाळण्यात आला. मध्यप्रांत काँग्रेस समितीचे विसर्जन करून त्याऐवजी प्रांतिक युद्धमंडळ स्थापन करण्यात आले. बॅ. मोरेश्वर अभ्यंकर या मंडळाचे डिक्टेटर तर पूनमचंद रांका सचिव झाले. पहिल्याच दिवशी १०,००० लोकांची सभा झाली व चळवळीचा कार्यक्रम जाहीर केला, असे सरकारचा अहवाल सांगतो. शेतसाराबंदी आणि विदेशी कापडावरील बहिष्कार या दोन्ही कार्यक्रमांना या प्रांतात प्रतिसाद मिळणार नाही, अशी प्रांतिक सरकारची धारणा होती. मात्र युद्धमंडळाचे कोषाध्यक्ष भगवानदीन शर्मा, अभ्यंकर व रांका हे कापड

दुकानदारांचे मन वळवण्याचा प्रयत्न करीत होते. दरम्यान ७-८ जानेवारीला सरकारने काही वटहुकूम अमलात आणले आणि युद्धमंडळ बेकायदेशीर ठरविले.[३२]

बॅ. अभ्यंकर, रांका व भगवानदीन यांच्याव्यतिरिक्त रामभाऊ रुईकर, शंकर त्रिंबक ऊर्फ दादा धर्माधिकारी, अप्पासाहेब तिजारे, राजाभाऊ डांगरे हे पहिल्या युद्धमंडळाचे सभासद होते. वटहुकूम अमलात आल्यापासून धरपकड सत्र अधिक जोरात सुरू झाले. युद्धमंडळाचे सर्व सभासद पकडले गेले. त्यानंतर इतरांनी त्यांची जागा घेतली. आंदोलनाच्या अखेरपर्यंत ती मालिका चालू राहिली. जानेवारी १९३२ च्या पूर्वार्धात विद्यावती देवी, चंद्रभागा पटवर्धन, सुशीला गाडगीळ यांना अटक करण्यात आली. १० जानेवारीपासून सरकारने नागपूरचे टिळक विद्यालय, असहयोग आश्रम आणि काँग्रेसची सर्व कार्यालये ताब्यात घेतली. टिळक विद्यालयातच पोलीस ठाणे सुरू केले. अश्वारूढ पोलीस निदर्शने करणाऱ्या जमावावर बेमुर्वतपणे चाल करून त्यांना तुडवू लागले. वर्धा-नागपूरमध्ये वानरसेना बरीच सक्रिय झालेली होती. वानरसेनेचे प्रमुख प्रभाकर साखरदांडे, बाबासाहेब देशमुख, कर्मवीर पाठक व गंगाबाई चौबे यांना अटक करण्यात आली. १५ जानेवारीपर्यंत नागपुरातील १२५ जण तुरुंगात गेले. सरकारी दडपशाहीचा वरवंटा सातत्याने आणि निर्दयपणे फिरत असताना डॉ. ना. भा. खरे, रविशंकर शुक्ला, द्वारकाप्रसाद मिश्रा, मोरेश्वर अभ्यंकर, गणपतराव टिकेकर, ब्रिजलाल बियाणी वगैरे नेत्यांनी मोठ्या धैर्याने आणि चिकाटीने या आंदोलनाचे नेतृत्व केले.

सरकारने सर्व प्रांतभर दडपशाही करून युद्धमंडळे तुरुंगात डांबली. मवाळ पक्षाचा काँग्रेसला पाठिंबा नव्हता. तरीही त्या पक्षाच्या काही पुढाऱ्यांनी सरकारच्या दडपशाही धोरणाचा निषेध केला. नागपुरातील चिटणीस पार्क, पटवर्धन पटांगण वगैरे ठिकाणी काँग्रेसला सभा घेणे शक्य होऊ नये यासाठी तेथे पोलीस व घोडेस्वार आधीपासूनच दक्षता घेत होते. वानरसेनेच्या मुलांना पोलीस चोप देत असत. लाठीमार करणे हे नित्याचे झाले होते.

२६ जानेवारीला नागपुरात स्वातंत्र्य दिन साजरा करण्याचे प्रयत्न झाले. परंतु त्यासाठी जाणाऱ्या स्वयंसेवकांना पोलिसांनी एक तर हाकलून लावले अथवा पकडून ठेवले. रात्री १० पर्यंत हा प्रकार चालू राहिला. हरताळ पाळून नागपुरात पेशावर दिन साजरा झाला. १५ जानेवारी १९३२ पासून **काँग्रेस बुलेटिन** गुप्तरीत्या प्रकाशित होऊ लागले. त्यामधून आंदोलनाचा कार्यक्रम व मार्गदर्शक सूचना देण्यात येत. बुलेटिनचे कार्यकर्ते पकडण्यासाठी पोलिसांनी प्रयत्नांची शर्थ केली. त्यांनी अनेक स्वयंसेवकांना पकडले. मात्र अल्पजीवी ठरलेल्या या पत्रकाची मुंबईच्या **बाँबे काँग्रेस बुलेटिनशी** तुलना होऊ शकली नाही. काही युवकांनी या पत्रकाच्या प्रती नागपूर सेक्रटेरिअटमध्ये वाटण्याचे धाडस मात्र केले होते. काही दिवसांनी हे पत्रक मराठीतून निघू लागले.

दडपशाही व वटहुकमांच्या भीतीमुळे या प्रांतात उघड प्रचार वा जाहीर सभा कमी भरल्या. मात्र संपूर्ण प्रांतातून व वऱ्हाडातून काही कार्यकर्ते नागपूरला प्रचाराकरिता येत.

रामटेक येथेही स्थानिक युद्धमंडळ कार्यान्वित करण्यात आले. या मंडळाने इतर कार्यक्रम अमलात आणले, पण जंगल सत्याग्रहावर अधिक जोर दिला. काटोल, सावनेर व उमरेडच्या पुढाऱ्यांना आंदोलनाच्या प्रारंभापूर्वीच पोलिसांनी स्थानबद्ध केल्यामुळे तेथे विशेष प्रमाणात आंदोलन झाले नाही.[३३]

चंद्रपूर, वर्धा, वरोरा, हिंगणघाट, आर्वी, अमरावती, अकोला, यवतमाळ व बुलडाणा शहरामंध्ये काँग्रेस कार्यकर्त्यांनी युद्धमंडळे स्थापन केली होती. जिल्हा व तहसील काँग्रेस समित्या सरकारने बेकायदा ठरविल्यामुळे त्यांची जागा युद्धमंडळांनी घेतली. एकामागून दुसरे अशी युद्धमंडळे चळवळ चालवत राहिली. वर्ध्यातील जनतेने सरकारच्या दडपशाहीचा मुकाबला सर्वाधिक प्रभावीपणे केला. प्रांतिक सरकारच्या पाक्षिक आणि त्रैमासिक अहवालांमधून आम्हाला आढळले की, वर्धा जिल्ह्यात स्वयंसेवकांनी विदेशी कापड, सिगारेट, सायकली, साबण वगैरे मालाची विक्री बरेच महिने बंद पाडली. नशाबंदीचा प्रचार करून दारूच्या दुकानांचा व्यवहार बंद पाडला. चंद्रपूरमध्येही याबाबत पुष्कळ कामगिरी झाली

होती. यवतमाळ जिल्हा प्रशासनाला करबंदीच्या मोहिमेचा सामना करावा लागला होता. वरोरा व चंद्रपूरच्या कापड दुकानदारांनी सविनय कायदेभंगास आधीपासूनच पाठिंबा जाहीर केलेला होता.

सविनय कायदेभंगाच्या या फेरीत कारावास पत्करण्यापेक्षा सरकारशी आर्थिक आघाडीवर लढा देण्यावर विशेष भर होता. अहिंसेच्या परिसीमेत राहून सरकारचे जमीन महसुलापासूनचे उत्पन्न, आयकर, उत्पादन शुल्क व वन उत्पादनांवरील उत्पन्न, आयात आणि निर्यातीवरील शुल्क शक्य तितके घटवणे हे या आंदोलनाचे एक प्रमुख उद्दिष्ट होते. त्या अनुषंगानेच विविध प्रकारची निरोधने आयोजित केलेली होती. नशाबंदी जसे सामाजिक उद्दिष्ट होते तसेच वाणिज्यवादी सरकारला वठणीवर आणण्याचे एक हत्यार होते. कापूस व्यापारातील मंदी तेव्हा जीव घेणारी होतीच. पण काँग्रेसने त्याच कारणाखाली विदर्भात शेतसारा-बंदीची मोहीम अमलात आणली. ठिकठिकाणी जंगल सत्याग्रह करून सत्याग्रहींनी वन उत्पादनांचे लिलाव उधळून लावले. त्यामुळे लिलावांमध्ये बोली लावण्यास कंत्राटदार पुढे येत नसत. बऱ्याच जंगलांचे लिलाव झाले नाहीत आणि सरकारचा महसूल बुडाला. सत्याग्रहाचे हे यश मोठे होते.

**वर्धा आघाडीवर :—**सरकारने काँग्रेसला हतबल करण्याचा चंग बांधला असताना, जमनालालजींच्या वर्ध्याने आंदोलनाचा प्रारंभ शिबिरे स्थापन करण्यापासून केला. विदेशी कापड व दारूच्या दुकानांवरील निरोधने अधिक तीव्र व वारंवार करणे सुरू केले. मात्र निदर्शकांना निर्दयपणे मारहाण करून जिल्हा प्रशासनाने दडपशाही सुरू केली. कलेक्टरने जमनालाल बजाज यांचा निवासी बंगला, बाग आणि इतर इमारती जप्त केल्या. अटक करण्याचे सत्र सुरू झाले. १९३२ सालात एकट्या वर्धा तालुक्यातील ३६ काँग्रेस डिक्टेटर एका पाठोपाठ तुरुंगात गेले. विशेष म्हणजे त्यांच्यापैकी नऊ महिला होत्या. आर्वी आणि हिंगणघाट तालुक्यांमध्येही आंदोलनाचा जोर असल्यामुळे तेथेही अनेक डिक्टेटर होऊन गेले. १६ फेब्रुवारी १९३२ रोजी वर्धा शहरात पोलिसांनी केलेल्या अमानुष लाठीमारात अनेक नागरिक गंभीररीत्या जखमी झाल्यामुळे सरकारविरोधी भावना खोलवर

पोहोचली. या शोककारक घटनेचे पडसाद जिल्हाभर पसरले. या घटनेमुळे नागपुरातही लोकमत खवळले होते. वर्धा प्रशासनाला पुढील बंदोबस्तासाठी नागपूरहून सशस्त्र पोलीस व गोरे सेनादल मागवावे लागले होते.

जमनालाल व जानकीदेवी बजाज, गोपाळराव काळे, भाऊ पानसे, गोपाळराव वाळुंजकर, श्रीकृष्णदास जाजू, द्वारकानाथ हरकारे, दत्तात्रय दास्ताने, श्रीधर हरी थत्ते आणि मनोहर बळवंत दिवाण वगैरे गांधीवादी नेते आणि आश्रमवासीयांना सरकारने आधीच तुरुंगात टाकले होते. त्यांच्यापैकी बहुतेकांनी १९३० मध्येही कारावास भोगला होता. १९३० च्या कायदेभंग आंदोलनात भाग घेऊनही विनोबा भावे यांना अटक करण्यात आलेली नव्हती. तथापि लॉर्ड विलिंग्डनचे सरकार अधिक निर्दय आणि सूडबुद्धीचे होते. विनोबाजी १९२१ पासून वर्धा येथील आश्रमात राहून राष्ट्रवादी आणि गांधीवादी कार्य करीत होते. १९३२ मधील सरकारच्या आक्रमक धोरणानुसार हा आश्रम जप्त करण्यात आला. धुळ्याच्या राजवाडे इतिहास संशोधन मंडळाने इतिहासाचार्य विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांच्या स्मारकाच्या उद्घाटनासाठी विनोबा भावेंना निमंत्रित केले होते. जानेवारीच्या सुरुवातीचा हा कार्यक्रम आटोपून ते जळगावला गेले. तेथे अण्णासाहेब दास्ताने यांना अटक केल्याचे कळताच विनोबाजी दास्तानेंच्या पिंपराळे आश्रमात गेले. हा आश्रम वटहुकमाखाली बेकायदा ठरविण्यात आलेला होता. म्हणून त्यात 'प्रवेश केला' या अत्यंत क्षुल्लक आरोपाखाली विनोबा भावे यांना सर्वाधिकारी ब्रिटिशांनी अटक केली. आणि त्यांना सहा महिन्यांची शिक्षा दिली. धुळे कारागृहातील याच वास्तव्यात विनोबाजींनी **गीताईला** अंतिम रूप दिले, आणि त्यांनी दिलेली प्रवचने **गीता प्रवचने** नावाने नंतर प्रकाशित झाली.

वर्धा, आर्वी व हिंगणघाट तालुक्यांमधील आंदोलनामुळे परिस्थिती गंभीर झाली अशी कबुली गृहमंत्री राघवेंद्रराव यांनी १८ जानेवारी १९३२ रोजी मध्यप्रांताच्या कायदेमंडळात दिली होती. हे काँग्रेसचे यश होते.

शासकीय महसूल बुडविण्यासाठी सर्व कार्यकर्ते व युवक निकराने लढले. त्यामुळे सरकारी दडपशाही आणि पोलिसी अत्याचार मागील चळवळीपेक्षा

अधिक कठोर बनले. अल्पावधीतच देश सेविका संघाच्या गंगूताई वाळुंजकर, शरयू धोत्रे, मालती थत्ते व विमल जोग यांना अटक झाली. विदर्भातील वर्धा, नागपूर व अकोला या तीन जिल्ह्यांमध्ये १९३२ च्या आंदोलनाची तीव्रता सर्वाधिक होती. त्यात प्रामुख्याने विदेशी कापड आणि मादक पदार्थांच्या दुकानांविरुद्ध निरोधने करण्यावर भर होता. ग्रामीण भागात वनविषयक कायद्यांचा भंग करण्यावर जोर होता.

वर्धा सत्याग्रह आश्रमातील कार्यकर्ते गावोगाव जाऊन सत्याग्रहासाठी स्वयंसेवकांचे संघटन करण्याची महत्त्वाची कामगिरी करीत. पकडले गेल्यावर स्वयंसेवक आपला पत्ता म्हणून सत्याग्रह आश्रमाचा उल्लेख करीत. त्यामुळे नागपूर जेलमधील बंदिवानांमध्ये ७०० जण वर्धा सत्याग्रह आश्रमातील असल्याचे पाहून वरिष्ठांनाही आश्चर्य वाटले होते. अमरावती आणि धुळे जेलमध्येही बरेच कैदी वर्धा आश्रमवासी आढळले. त्यामुळे सरकारने हा आश्रम जप्त केला. सरकारने २५ डिसेंबर १९३२ रोजी जप्ती हुकूम मागे घेतला. तथापि त्यात विनोबाजींचे मन रमेना. म्हणून त्यांनी नालवाडी येथे नवीन आश्रम स्थापन करून त्यास ‘ग्रामसेवा मंडळ’ असे नाव दिले. त्यात बरेच रचनात्मक कार्य केले जाई असे विनोबाजींचे निकटचे सहकारी गोपाळराव वाळुंजकर यांनी प्रस्तुत इतिहासकारास मुलाखत देताना सांगितले होते.

सविनय कायदेभंग पर्वातील लक्ष वेधून घेणारी आणखी एक बाब ही की, गांधीजींनी महिलांच्या दृष्टिकोणात क्रांती घडविली. आतापर्यंत घरातच बंदिस्त असलेल्या महिला राष्ट्रीय आंदोलनात व समाजकारणात सामील झाल्या. मुंबई व पुण्यापाठोपाठ इतर शहरांमधील महिलाही प्रभात फेऱ्या, मिरवणुका आणि सभांमध्ये येऊ लागल्या. परदेशी कापड व दारूच्या दुकानांवरील निरोधनांचे बरेच श्रेय त्यांना द्यावे लागते. वर्ध्यातील जानकीदेवी बजाज, गंगूताई वाळुंजकर, शरयू धोत्रे, मालती थत्ते, विमल जोग, विमल अभ्यंकर वगैरेंनी जनजागृतीबरोबर स्वयंसेवकांना संघटित करण्याचे मोलाचे कार्य केले. १९३० च्या आंदोलनात वर्धा जिल्ह्यातील सुमारे ५० महिलांनी कारावास भोगला होता. नागपूरच्या अनसूया

काळे, अकोल्याच्या दुर्गा जोशी आणि अमरावतीच्या पार्वती पटवर्धन यांनी महिलांचा आंदोलनातील सहभाग वाढविण्याकरिता बरेच काम केले.

कायदेभंग आंदोलनाची आणखी दुसरी फलनिष्पत्ती ही की, अधिकाधिक जनता राष्ट्रीय प्रवाहात उतरली. टिळक काळात केवळ सुशिक्षित वर्गांपैकी थोडेच लोक स्वराज्याच्या चळवळीत होते. १९३०-१९३२ च्या आंदोलनामध्ये बहुजनसमाजही सामील झाला. **या काळात स्वातंत्र्यसैनिकांच्या लोकसंख्येतील प्रमाणाबाबत वायव्य सरहद्द प्रांतानंतर वर्धा तालुक्याचा हिंदुस्तानात दुसरा क्रमांक होता हे विशेष होय.** काँग्रेसची मुळे ग्रामीण भागातही खोलवर रुजली. त्याचा प्रत्यय १९४२ च्या छोडो भारत प्रसंगीही जाणवला.[३४]

**वऱ्हाडचा सहभाग :—**वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस समितीने सविनय कायदेभंगाचे सर्वाधिकार वऱ्हाड प्रांतिक युद्धमंडळाला बहाल केले होते. वीर वामनराव जोशींना युद्धमंडळाचे अध्यक्ष म्हणजे डिक्टेटर तर ब्रिजलाल बियाणींना युद्धमंत्री करण्यात आले. शिवाजीराव पटवर्धन, का. वि. सहस्रबुद्धे, पुरुषोत्तम झुणझुणवाला, दुर्गाताई जोशी, ताराबेन मश्रूवाला, त्र्यंबक जोशी, गारडगावकर व अंबूलकर हे या युद्धमंडळाचे सदस्य होते. मंडळाचे कार्यालय अकोल्यात ठेवलेले होते. अकोला राष्ट्रीय शाळा व सरस्वती विद्या मंदिर, खामगावचे राष्ट्रीय विद्यालय वगैरे राष्ट्रीय विचारसरणीच्या संस्थांमधील शिक्षक व मुलांचा प्रचारकार्यासाठी चांगला उपयोग करून घेण्यात आला. या प्रांतातील प्रत्येक जिल्हा व तालुका काँग्रेस समितीने आपापले सर्वाधिकारी नेमले व त्यांना आंदोलनाबाबत स्वायत्तता दिली. कायदेभंग आंदोलनाच्या पहिल्या फेरीत सामील झालेले बहुतेक सर्वच कार्यकर्ते दुसऱ्या फेरीतील आंदोलनाच्या तयारीला लागले. मात्र त्यांनी पूर्वनियोजन केल्याचे दिसत नाही.

अकोल्यात २६ जानेवारी १९३२ रोजी स्वातंत्र्यदिन साजरा करण्याची तयारी चालू होती. तथापि २५ तारखेलाच ब्रिजलाल बियाणी, पु. ब. गोळे, दुर्गाताई जोशी, मराठे वकील, दादासाहेब पंडित यांना अटक करण्यात आली. वऱ्हाडात अकोला जिल्ह्यातील दहिहांडा येथेच खाऱ्या पाण्याची विहीर होती. म्हणून तिथेच

१९३० प्रमाणे १९३२ सालातही मिठाचा सत्याग्रह मधून मधून चालू ठेवण्यात आला. १९३० साली चळवळीचा प्रचार करूनही अनेक महिलांना अटक झाली नव्हती. पण १९३२ साली अकोला जिल्ह्यातील २१ महिलांना कारावास घडला असे एका स्थानिक लेखकाने म्हटले आहे. त्यात दुर्गाताई जोशी, सीता इंगळे, ताराबेन मश्रूवाला, राधा ओक, रमा केळकर, मधुरा आपटे, गंगू बापट, मनूताई कोल्हटकर, कमला भागवत, वत्सलाबाई, चंपूताई बनसोड, सरस्वती मेहरे व यमुना ताकवले यांचा समावेश होता. १९३२ साली विदेशी कापड व्यापाऱ्यांचा प्रतिसाद १९३० पेक्षा कमी होता हे खरे. पण तरीही अकोला, बाळापूर, अकोट, वाशीम, तेल्हारा व मूर्तिजापूरच्या व्यापाऱ्यांनी फेब्रुवारी १९३२ पासून नोव्हेंबरपर्यंत कापड सीलबंद करून ठेवले असे दिसते. अकोल्यात चार महिने विदेशी साखर विकली गेली नव्हती. काही ठिकाणी जंगल सत्याग्रह तर काही गावांमध्ये बंदीहुकूम झुगारून राष्ट्रध्वज फडकवण्यात आला होता.

पिकेटिंगला प्रतिबंध घालणारा वटहुकूम प्रथम बुलढाणा जिल्ह्यास १५ जानेवारी १९३२ रोजी लागू करण्यात आला. खामगावच्या राष्ट्रीय विद्यालयाचे विद्यार्थी चळवळीत उतरले. डॉ. पारसनीस, कृष्णराव गारडगावकर, कोर्डे गुरुजी, परांजपे गुरुजी, दत्तोपंत कुळकर्णी, जिजाबाई देशपांडे, रुक्मिणी कोर्डे, पार्वती पत्की, पुरुषोत्तम झुनझुनवाला, आवटे, विनायक देशमुख वगैरेंना शिक्षा करण्यात आल्या. या जिल्ह्यात जंगल सत्याग्रहासाठी १५ जणांना अटक झाली, तर राजकीय परिषद भरविणाऱ्या बिसनदयाल उदासी, केशव सावजी व लक्ष्मण देशमुखांनाही कारावासात जावे लागले.

अमरावती जिल्ह्यात पिकेटिंग आणि आक्षिप्त वाङ्मयाचे जाहीर वाचन व प्रसारण तसेच जंगल सत्याग्रह करण्यात आला. २२ स्वयंसेवकांच्या अटकेनंतर विदेशी कापड व्यापाऱ्यांनी आपला माल बंद करून ठेवला. जिल्ह्यातील वडाळी, बहिरम व चांदूर येथे जंगल सत्याग्रह झाला. विख्यात कादंबरीकार व तत्त्वचिंतक पु. य. देशपांडे, डॉ. पटवर्धन व त्यांच्या पत्नी पार्वतीबाई, डॉ. भोजराज, डॉ. सोमण, हरिहरराव देशपांडे वगैरेंना अटक करून शिक्षा देण्यात आल्या.

यवतमाळचे माधव श्रीहरी अणे यांनी १९३० साली पुसदच्या जंगल सत्याग्रहात भाग घेतला होता, पण निष्ठावंत काँग्रेस पुढारी म्हणून नव्हे! तेव्हा मध्यवर्ती कायदेमंडळात अपमानाचा प्रसंग उद्‌भवल्यामुळे त्यांनी कायदेमंडळाचा राजीनामा दिला, आणि विनयशील होऊन त्यांनी सत्याग्रह केला होता. मात्र १९३२ साली अणे यवतमाळ जिल्ह्याचे पहिले सर्वाधिकारी म्हणून पकडले गेले. त्यांच्याप्रमाणेच दामले वकील, अण्णासाहेब जतकर, बाबासाहेब बापट, सस्तीकर, दाते, मेघराज छल्लाणी वगैरेंना अटक करण्यात आली.[३५] या सत्याग्रहानंतर बापूजी अणे थोडेच दिवस अखिल भारतीय काँग्रेसचे हंगामी अध्यक्ष झाले. तथापि काँग्रेसची विचारधारा व स्वातंत्र्यलढ्याचे डावपेच व गांधीजींची विचारप्रणाली त्यांना मानवणारी नसल्याने अणे काँग्रेसबाहेर फेकले गेले. कुंपणावर बसून राजकारण करणाऱ्या अणेंना काँग्रेसमध्ये नंतर स्थान उरले नाही.

## सविनय कायदेभंगाची फलनिष्पत्ती

सविनय कायदेभंग आंदोलनाचा जोर १९३२ च्या अखेरीला ओसरू लागला. लोकांचा आंदोलनातील सहभाग व प्रतिसाद कमी झाला, तरी त्यांचा काँग्रेसवरील विश्वास कमी झाला नव्हता. हे नंतरच्या घटनांवरून आणि निवडणुकांवरून सिद्ध झाले. संपूर्ण स्वातंत्र्याचे उद्दिष्ट तेव्हा असफल होण्याचे कारण सर विंस्टन चर्चिल यांच्या आत्यंतिक साम्राज्यवादी टोरी पक्षाच्या धोरणात आणि डावपेचांमध्ये होते. हा पक्ष सायमन आयोगाने सुचविलेल्या सांविधानिक चौकटीबाहेर जाण्यास तयार नव्हता. हिंदुस्तानच्या मध्यवर्ती सरकारवरील ब्रिटिशांची कडवी सत्ता किंचितही सैल करण्यास टोरी पक्ष व व्हाइसरॉय तयार नव्हता. शिवाय भारतीयांमध्ये ऐक्यभाव निर्माण होणेही शक्य नव्हते. **ऐक्यभावाची शक्यता कायमची नष्ट करण्याकरिता ब्रिटिश पंतप्रधानांनी ऑगस्ट १९३२ मध्ये 'कम्युनल अवार्ड' म्हणजे जातीय निवाडा नामक डिव्हाइड अँड रूलचा डावपेच घोषित केला. या डावपेचाचा पूर्वरंग लंडनमधील गोलमेजच्या रंगमंचावर खेळला गेला होता.** निवाड्याच्या घोषणेनंतर ऑक्टोबर १९३२ मध्ये गोलमेज परिषदेचे तिसरे सत्र भरले. काँग्रेसमध्ये स्थान न राहिलेल्या न. चिं.

केळकरांसारख्यांना करदात्यांच्या पैशातून लंडनची सफर लाभली. हिंदुस्तानात मात्र अनेक वटहुकमांचे अधिराज्य चालू राहिले. दडपशाहीचा वरवंटा फिरत राहिला. काही भागांमध्ये लष्करी कायद्यासारखी राजवट होती. अशा परिस्थितीत अहिंसावादी जनआंदोलनाच्या मर्यादा होत्या.

मुंबई शहराने समस्यांना तोंड देऊन आर्थिक आघाडीवर कलोनिअल सत्तेची जोरदार नाकेबंदी करून झुंज दिली. मुंबई सरकारचा १९३२-३३ वर्षाचा अहवाल ११ एप्रिल १९३३ रोजी प्रसिद्ध झाला. **त्यातून सविनय कायदेभंग आंदोलनाचे यश दिसून येते. हा अहवाल स्पष्टपणे कबूल करतो की, प्रशासनाच्या दृष्टीने हे वर्ष अत्यंत निराशाकारक ठरले. सरकारच्या प्रत्येक विभागावर मोठ्या प्रमाणात प्रतिकूल परिणाम झाला हे निश्चित.** कायदेभंग आंदोलनामुळे मुंबई सरकारचा उत्पादन शुल्क विभाग, आयकर आणि वन विभागाचा महसूल फारच मोठ्या प्रमाणात घटला होता. आयकरापासूनचे उत्पन्न तर प्रचंड प्रमाणात कोसळले, अशी अहवालात तक्रार केलेली आहे. वारंवार होणारे आणि प्रदीर्घ चालणारे हरताळ यांमुळे व्यापार व उद्योगधंदे बंदच राहत असत. मुंबईतील सर्व महत्त्वाच्या बाजारपेठा आणि व्यापाराची केंद्रस्थाने आणि विशेषतः मूलजी जेठा मार्केट, शेअर बाजार, कापसाचा बाजार आणि सोने-चांदी बाजार यांच्यावर मुंबई काँग्रेसचा निर्विवाद प्रभाव असल्याकारणाने तेथील व्यवहार बरेच महिने बंदच होते. त्यामुळे सरकारचे उत्पन्न बुडाले. पोलीस आयुक्ताने तेथील व्यापाऱ्यांची मनधरणी केली व त्यांना धमक्या देण्याचाही प्रयोग केला. **तथापि मुंबईवर पोलिसांपेक्षा काँग्रेसचाच जास्त प्रभाव आहे, असे आयुक्ताने सरकारला कळविले होते.**

उत्पन्न वाढवण्यासाठी सरकारने आयकराचा दर ५० टक्के केला. परंतु तरीही एकूण आयकर उत्पन्न दोन लाखांनी कमी आले. वन विभागाला महसूल संकलित करणे अशक्य झाले. अहवालात स्पष्ट कबुली आहे की, महसूल गोळा करणाऱ्या सर्वच सरकारी विभागांवर सविनय कायदेभंग आंदोलनाचा प्रतिकूल परिणाम झाला. याउलट आंदोलनामुळे पोलीस आणि कारागृह प्रशासनावरील सरकारी खर्चात मात्र मोठी वाढ झाली. परिणामतः मुंबई सरकारला त्या वर्षी एक कोट अकरा लाख रुपयांची अर्थसंकल्पीय तूट सोसावी लागली.[३६]

**सरकारी अहवालाच्या या कबुलीतून निष्कर्ष निघतो की, सविनय कायदेभंग आंदोलनाने ब्रिटिश सरकारची बरीच आर्थिक कोंडी करून सरकारला जेरीस आणले होते.**

ब्रिटिश सरकारच्या आकडेवारीनुसार एप्रिल १९३३ पर्यंत मुंबई इलाख्यात १४,१०१ जणांनी कायदेभंगाचा गुन्हा केला. त्यांत १३,१६२ पुरुष व ९३९ महिला होत्या. वऱ्हाड-मध्यप्रांतात सरकारने गुन्हेगार ठरविलेल्या ४,०१४ जणांपैकी ३,७१५ पुरुष आणि २९९ महिला होत्या. मात्र याव्यतिरिक्त अगणित स्वातंत्र्यसैनिकांना काही दिवस बंदिस्त करून पोलीस निर्दयपणे मारहाण करून सोडून देत. काहींना फटके मारून सोडून देत. कारण तुरुंगांमध्ये जागा अपुरी पडत असे.

## लॉर्ड विलिंग्डनचे अंतरंग

व्हाइसरॉय विलिंग्डन यांची बादशहा पंचम जॉर्ज यांच्याशी जवळीक होती. त्यांनी बादशहांना पाठविलेल्या अनेक पत्रांमधून त्या दोघांचे दुष्ट अंतरंग दिसून येते. लंडनमधील ब्रिटिश रॉयल अभिलेखागारातून अगदी अलीकडेच मिळविलेल्या गोपनीय फायलींमधून स्पष्ट दिसते की, लॉर्ड विलिंग्डन प्रारंभापासूनच आक्रमक पवित्र्यात उभे राहून सविनय कायदेभंगाचा बीमोड करण्याकरिता कटिबद्ध होते. काँग्रेसला अद्दल घडविण्याचे मनसुबे रचत होते. आयर्विनप्रमाणेच विलिंग्डनही बादशहा पंचम जॉर्जला व्यक्तिगत पत्रे पाठवून आपली फुशारकी मारत असत. पठाणिस्तान व मुंबई प्रांत तसेच बंगालमधील आंदोलन त्यांना 'क्रांतिकारी दहशतवाद' स्वरूपाचे वाटे. म्हणून विलिंग्डन यांनी काँग्रेस नेत्यांना अंदमानऐवजी वेस्ट इंडिजमध्ये कोंडून ठेवण्याचा मनोदय पंचम जॉर्जला कथन केला. दुर्दैव असे की, हा बेत बादशहालाही पसंत पडला. मात्र ते असा आततायीपणा करू शकले नाहीत. मुंबईच्या अर्थव्यवस्थेवर गुजराती व पारशांचे नियमन चालते आणि ते तर गांधींचे भक्कम समर्थक आहेत, याचे व्हाइसरॉयला दुःख होते. मुंबईत वारंवार हरताळ होऊन नुकसान होते, तरीही ते काँग्रेसला सक्रिय पाठिंबा देतात, याचे व्हाइसरॉयला खूप दुःख वाटत होते.[३७]

बंगालमध्ये क्रांतिकारकांचा पगडा असून त्यांचा मुकाबला करण्यात सरकारला अपयश आल्याने विलिंग्डन हतबल झाले होते. त्यांनी पंचम जॉर्जला कळवले की, काही मवाळ बंगाली आपणास भेटले असता सांगतात की, क्रांतिकारकांची माहिती देण्यास ते असमर्थ आहेत. इतकेच नव्हे तर अशा मवाळांच्या घरातही दहशतवादी आश्रय घेतात हेही व्हाइसरॉयला माहीत होते.[३८] गांधीजींना 'इग्रेजिअस लिटल मॅन' हे विशेषण लावणारे विलिंग्डन गांधीजींच्या उपोषणामुळे आनंदी झाले. या उपोषणाला त्यांनी 'स्टार्व्हेशन स्टंट' म्हटले. त्यांचा दुष्टपणा पत्रातही व्यक्त झाला. "Even if Gandhi chooses to kill himself in this way, I think we shall get through this trouble as we have got through many troubles in the past."[३९]

मात्र विलिंग्डन यांनी बादशहापुढे मारलेली फुशारकी सत्याचा विपर्यास करणारी होती. त्यांचे विधान— "काँग्रेसचे सामर्थ्य तळाला गेले आहे, आणि आम्ही सविनय कायदेभंग आंदोलन ठार मारले आहे," अजिबात वस्तुनिष्ठ नव्हते. लवकरच विलिंग्डनचा मुखभंगही झाला. १९३४ च्या निवडणुकीत काँग्रेसला प्रचंड बहुमत लाभले. विलिंग्डन आपले मालक असलेल्या बादशहाची दिशाभूल करीत होते. सर्व भारतीयांची ब्रिटिशांवर गाढ निष्ठा आहे, असे खोटेनाटे ते बादशहाला कळवित. नमुना म्हणून विलिंग्डनचे एक विधान पाहा, "I feel that there is little doubt about the future of India as a most helpful and useful part of Your Majesty's great Empire."[४०]

❑❑

## संदर्भ

१. के. के. चौधरी (संपा.), **सोर्स मटेरिअल फॉर हिस्टरी ऑफ फ्रीडम मुव्हमेंट,** खंड बारा, १९९५, पृ. १०८-०९, ११३, ११६, ११९.

२. हिंदुस्तान सरकार, होम पोलिटिकल, फाईल क्र. ५/५३, १९३१.

३. चौधरी (संपा.) **सोर्स मटेरिअल,** उपरोक्त, पृ. ११-१२.

४. चौधरी, **हिस्टरी ऑफ बाँबे,** पृ. २०८.

५. पट्टाभी सीतारामय्या, **हिस्टरी ऑफ द इंडियन नॅशनल काँग्रेस,** खंड एक, पृ. ५२०.

६. कित्ता, खंड एक, पृ. ५१०-१४.

७. **बाँबे क्रॉनिकल,** ४ जानेवारी १९३२.

८. चौधरी, **हिस्टरी ऑफ बाँबे,** पृ. २०९-१०.

९. सीतारामय्या, उपरोक्त, पृ. ५२३-२४.

१०. चौधरी, **सोर्स मटेरिअल,** खंड बारा, पृ. १३३-३९.

११. कित्ता, पृ. १४०-४७.

१२. पोलीस कमिशनरचा गृह सचिवास अहवाल, १७ मार्च १९३२.

१३. चौधरी, **हिस्टरी ऑफ बाँबे,** पृ. २१६-१८.

१४. ब्राऊन, **गांधी अँड सिव्हिल डिसओबिडिअन्स,** पृ. २९३-९४.

१५. कित्ता, पृ. २८२-८६.

१६. चौधरी, **सोर्स मटेरिअल,** खंड बारा, पृ. १४९-५०, १८७-८८, मॅक्सवेलचे इमर्सन यास १५ मार्च १९३२ चे गोपनीय पत्र.

१७. **बाँबे काँग्रेस बुलेटिन,** २ जानेवारी १९३३.

१८. चौधरी, **हिस्टरी ऑफ बाँबे,** पृ. १७०-७५.

१९. चौधरी, **सोर्स मटेरिअल,** खंड बारा, पृ. १६१.

२०. चौधरी, **हिस्टरी ऑफ बाँबे,** पृ. २१३-१४.

२१. न. चिं. केळकर, **गतगोष्टी,** १९३९, पृ. ७४५.

२२. कित्ता, पृ. ७४५.

२३. मुंबई सरकार, होम डिपार्ट. स्पेशल ब्रँच, फाईल क्र. ८०० (७४) (१४), १९३२-३४.

२४. चौधरी, **"आधुनिक काळ" : सातारा गॅझेटिअर,** पृ. २००-०१.

२५. चौधरी, **रायगड गॅझेटिअर,** १९९३, पृ. १७५-७७.

२६. चौधरी, **जळगाव जिल्ह्यातील स्वातंत्र्यलढा,** १९९७, पृ. ७८-८०.

२७. चौधरी, **सोर्स मटेरिअल,** खंड अकरा, १९९०, पृ. १०५३.

२८. कित्ता, पृ. १०५६-६१.

२९. कित्ता, खंड बारा, १९९५, पृ. ३४३-४४.

३०. कित्ता, पृ. १५४-५६.

३१. कित्ता, पृ. १६३-६४.

३२. कित्ता, पृ. १५७-५८.

३३. **नागपूर गॅझेटिअर,** भाग एक, २००५, पृ. २२८-३१.

३४. चौधरी, **वर्धा गॅझेटिअर,** १९९२, पृ. ७९-८१.

३५. पु. धों. कुलकर्णी, **वऱ्हाडची स्वातंत्र्यसेवा** : १९२०-१९३५, अकोला, १९३५, पृ. १३-१४, ४४-५१.

३६. चौधरी, **सोर्स मटेरिअल,** खंड बारा, पृ. २३१.

३७. लॉर्ड विलिंग्डन यांचे पाचवे जॉर्ज यांना पत्र, ४ जानेवारी १९३२ व २९ फेब्रुवारी १९३२, ब्रिटिश रॉयल अभिलेखागार, लंडन, चोप्रा, उपरोक्त.

३८. कित्ता, विलिंग्डनचे ६ ऑगस्ट १९३२ चे पत्र.

३९. कित्ता, ४ सप्टेंबर १९३२ चे पत्र.

४०. कित्ता, १० मे १९३५ चे पत्र.

प्रकरण १४

# दलित मुक्तिआंदोलन

## सवर्णांचे चळवळीस योगदान

डिप्रेस्ड क्लासेस मिशन म्हणजेच भारतीय निराश्रित साहाय्यकारी मंडळाच्या विद्यमाने कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनी १९२१ ते १९२९ या काळातही पूर्वीप्रमाणेच समर्पण भावनेने आणि निर्धाराने दलितमुक्तीचे कार्य चालू ठेवलेले होते. त्यांनी अस्पृश्यतानिवारणाचे कार्य एक मिशन म्हणून चालविले होते. या कार्यासाठी त्यांनी प्रार्थनासमाज व शाहू महाराज, अनेक संस्थानिक व संघटना आणि काँग्रेस पक्षाचीही मदत मिळविली होती. सयाजीराव गायकवाड यांनी शिंदेंच्या या कार्यास भरघोस मदत व बळ दिले होते. मात्र शिंदेंमुळे दलित लोक जातवार प्रतिनिधित्वास मुकले, असे आंबेडकरांचे मत बनले होते. नागपुरात १ जून १९२० रोजी भरलेल्या अखिल भारतीय बहिष्कृत समाज परिषदेत गणेश आकाजी गवई यांनी 'शिंदे यांच्या मिशनवरील आपला विश्वास उडाला', असे जाहीर केले. ५ जुलै १९२० पासून शिक्षण पूर्ण करण्यास्तव आंबेडकर पुन्हा परदेशी गेले आणि एप्रिल १९२३ मध्ये मुंबईत परतले. दरम्यानच्या काळात कर्मवीर शिंदेंविरुद्ध डावपेच खेळले जात होते. त्यामुळे चळवळीत अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले. काम करणारी माणसे मिशन संस्था सोडून गेली.

प्रार्थनासमाजाचे साप्ताहिक **सुबोध पत्रिका** मात्र शिंदेंचे समर्थन करीत असे. पण काही लोकांनी त्यांच्याविरुद्ध अपप्रचार केला. पाचव्या प्रकरणामध्ये विवेचन केल्याप्रमाणे, ज्या दलितांसाठी आपण पंधरासोळा वर्षे हाडाची काडे केली त्यांना आपण नकोसे झालो, हे शिंदेंच्या जिव्हारी लागले. ते लिहितात, " वाटेवरचे युद्ध घरी आले होते. ज्यांच्यासाठी मी जिवाचे आणि घरदाराचे रान केले होते तेच माझ्यावर असंतुष्ट होते. कारण काय तर, आता मोठमोठ्या इमारती होऊ लागल्या."[१] निराश्रित व दलितांसाठीच सुरू करण्यात आलेले मिशन दलितांनीच

चालवावे अशी मागणी करणे सुरू झाले. पण ती मागणी ताबडतोब मान्य करण्यास कर्मवीर शिंदे तयार नव्हते. शिंदे मराठा जातीचे व काँग्रेसजनही असल्यामुळे अनेकांना ते आपले वाटले नाहीत. अशा परिस्थितीत मिशनच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत कर्मवीरांनी धीर धरला. आणि ऑगस्ट १९२२ मध्ये त्यांनी व कृष्णराव पाताडे यांनी संस्थेतील अधिकारपदाचे राजीनामे दिले. मिशन संस्थेने निवडलेल्या कार्यकारी मंडळात दोन तृतीयांश सदस्य दलितांपैकी होते. दुखावलेले शिंदे व त्यांच्या बहिणीनेही संस्थेतील सर्व अधिकार व अनुज्ञेय असलेल्या पेन्शनवर उदक सोडले.

आम्ही **पहिल्या खंडात** प्रतिपादन केलेले आहे की, अस्पृश्यांना पूर्वपार मिळत असलेला सेनादलात काम करण्याचा अधिकार पुन्हा मिळण्यासाठी कर्मवीर शिंदे खूप झटले होते. चरितार्थाचे हे साधन मिळवून देण्यासाठी त्यांनी काँग्रेसकडे पाठपुरावा केला. काँग्रेसजनांची मनधरणी केली. याकामी त्यांनी गोपाळ कृष्ण गोखलेंची मदत मिळवली होती. शिंदेंनी दलितांच्या कल्याणासाठी सयाजीराव गायकवाडांची मदत घेतली होती. महाराजांनी या प्रकरणी व्हाइसरॉयकडे रदबदली केली. शिवाय काँग्रेस अध्यक्षा ॲनी बेझंट यांना दलितांच्या सेनादलातील प्रवेशाचा विषय पटवून दिला. याविषयी काँग्रेसने मागणी केल्यावर ब्रिटिशांनी अस्पृश्यांना सेनादलात प्रवेश देण्यास अनुमती दिली. शिवाय पहिले महायुद्ध भडकल्याकारणानेही सरकारला दलितविरोधी धोरण तहकूब ठेवावे लागले.

प्रार्थनासमाजाच्या व्यासपीठावरूनही कर्मवीर शिंदे अवर्णांच्या उद्धारासाठी प्रयत्न करीत. या संघटनेचे मुखपत्र असलेले **सुबोध पत्रिका** साप्ताहिक त्यांची बाजू मांडत असे. या पत्रकाने ६ ऑगस्ट १९२२ च्या अंकात म्हटले, " वेगवेगळ्या कारणांस्तव कार्य करणारी माणसे मिशन सोडून गेली ; अस्पृश्यमंडळी स्वतः मिशनच्या कार्यावर अविश्वास दाखवू लागली ; कमिटीच्या सभा बंद पडल्यासारख्या झाल्या. सांपत्तिक स्थिती असमाधानकारक झाली. अशा तऱ्हेने मिशन निद्रावश होऊ लागले."

दलितांचे नेते गणेशराव गवई व पां. न. भटकर यांची तक्रार होती की, शिंदेंची संस्था अवर्णांच्या उच्च शिक्षणाबाबत हयगय करून बोर्डिंग व उद्योगशाळा काढण्यात पैशाचा आणि वेळेचा अपव्यय करीत आहे. तथापि सत्य हेही होते की, स्वतः गवई व भटकर यांना मॅट्रिक झाल्यावर मुंबईतील सेंट झेविअर आणि पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजात शिंदे यांनीच प्रवेश मिळवून दिला होता ; परंतु त्यांनी संधीचा फायदा घेतला नाही. याबाबत खोलात न जाता इतकेच म्हणावयाचे की, कर्मयोगींच्या विरोधकांनी 'अस्पृश्योद्धारक मंडळी' हा सवतासुभा स्थापन केला (१६ एप्रिल १९२१). यामागे किसन सोनावणे, शिवराम जानबा कांबळे व वालचंद कोठारी होते. अशा कारणांमुळे शिंदे व्यथित झाले आणि त्यांनी १९२३ साली निराश्रित साहाय्यकारी मंडळातील आपले सर्व अधिकार सोडून दिले.

मात्र उपरोक्त अहिल्याश्रमाची इमारत बांधून पूर्ण होईपर्यंत त्यांनी तिच्यासाठी अथक प्रयत्न केले. कारण त्यांनी म्हैसूरच्या युवराजांच्या हस्ते ५ सप्टेंबर १९२१ रोजी कोनशिला समारंभ करून घेतल्यापासून इमारतीसाठी निधी गोळा केला होता. संस्थेची इमारत उभारण्याचे त्यांचे स्वप्न पूर्ण झाल्यावर कर्मवीरांनी २८ ऑक्टोबर १९२४ रोजी गव्हर्नर लेस्ली विल्सनच्या हस्ते अहिल्याश्रमाचे उद्‌घाटन केले

कर्मवीर शिंदेंना दलितोद्धार कार्याचे श्रेय लाभले नाही. कारण ते दलित समाजात जन्म पावले नव्हते. मराठा समाज त्यांना महार असे संबोधत असे, तर महारांना ते परके वाटू लागले. शिवाय शिंदेंचा टिळकांनी काँग्रेसच्या चळवळीसाठी पुरेपूर उपयोग करून घेतला होता. मुंबईतील अब्राह्मण कामगार वर्गात टिळकांना स्थान निर्माण करण्यासाठी टिळकांनी शिंदे व व्ही. एम. पवारांचा उपयोग करून घेतला होता. म्हणूनही अब्राह्मण समाजकारणी व राजकारणी शिंदेंकडे संशयाने पाहत. मात्र महात्मा गांधी यांची चळवळ जोरात आल्यावर त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनात स्वतःला झोकून दिले. पुण्याचे केशवराव जेधे व ब्राह्मणेतर पक्षातील माणसांना राष्ट्रीय प्रवाहात व काँग्रेसमध्ये आणण्यात शिंदेंनी मोठे योगदान दिले.

दलितांचा उद्धार करण्यात शाहू महाराजांचे मोठे योगदान होते. त्यांनी दलितांसाठी शिक्षणाच्या सुविधा उभारल्या. वसतिगृह काढले. नोकऱ्या दिल्या. स्वतः आंबेडकरांनाही पुष्कळ उत्तेजन दिले. याबाबतचे विवेचन एका प्रकरणात केलेले असल्याने त्याची द्विरुक्ती इथे नको. सयाजीराव महाराजांचेही या कामी फार माठे योगदान होते. याबाबतही योग्य ठिकाणी विवेचन केलेले आहे.

अस्पृश्यतानिवारण मोहिमेत आणि त्यांच्या शिक्षणासाठी कित्येक ब्राह्मणांनी बरेच कार्य केले होते. कर्मवीर शिंद्यांचे सहकारी दा. ना. पटवर्धन व सोहोनी हे देखील मोहिमेत होते. पहिल्या भारतीय राष्ट्रवादी बाँबचे जनक पांडुरंग महादेव ऊर्फ सेनापती बापट दररोज पहाटे पारनेर गावी झाडू घेऊन रस्ते व शौचकूप साफ करीत. विशेषतः महारवाडा व गावात ग्रामस्वच्छतेसाठी ते निष्ठापूर्वक काम करीत. आजच्यासारखे त्यांनी आपले फोटो काढून घेतले नव्हते. **पूर्वायुष्यात बाँब बनविणारे बापट तितक्याच निष्ठेने हातात झाडू घेऊन ग्रामसफाई करीत.** सकाळची ग्रामसफाई करून बापट रात्री महारवाड्यात जाऊन दलितांना शिकवत. महात्मा फुले व कर्मवीर शिंदे यांचा कित्ता गिरवून ते अवर्णांना विद्यादान करीत. कित्येक वंचितांना त्यांनी साक्षर केले आणि त्यांच्या मुलांना शाळेत जाण्यास उत्तेजन दिले. त्यांचे हे रचनात्मक कार्य समजल्यावर अहमदनगरच्या कलेक्टरने पारनेरच्या मामलेदारास सूचना दिली होती की, बापटांना त्यांच्या ग्रामशिक्षण व ग्रामसफाईच्या कामात सरकारी मदत द्यावी. बापटांच्या अशा विधायक कामामुळे ते चेष्टेचा व कुतूहलाचा विषय झाले होते.

महात्मा गांधींच्या हरिजन कार्यामुळे **सेनापती बापट** प्रभावित झाले. हिंदू समाजाचे विघटन करण्यासाठी गोलमेज परिषदेनंतर (१९३२) पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ देण्याची लालूच दाखवली होती. या डावाला विरोध करण्यासाठी गांधीजींनी येरवडा जेलमध्ये बेमुदत उपोषण सुरू केले होते (२० सप्टेंबर १९३२). म्हणून त्यांना पाठिंबा देण्यासाठी सेनापती बापटांनीही रत्नागिरी जेलमध्ये बेमुदत उपोषण सुरू केले. अशा कित्येक प्रसंगी बापट आपली संवेदना व्यक्त करीत. दलितांविषयी सहवेदना प्रकट करीत. १९३७

साली काँग्रेसचे पहिले मंत्रिमंडळ अधिकारावर येत असताना, बापटांनी शनिवारवाड्यावरील सभेत आवाहन केले होते की, डॉ. आंबेडकर काँग्रेसच्या विरोधात असले, तरी कोणतीही अट न घालता प्रांताच्या मंत्रिमंडळात त्यांना घेण्यात यावे. तसेच "माझ्याऐवजी काँग्रेस समितीचे अध्यक्षपद केशवराव जेधेंनाच देण्यात यावे." काँग्रेसवरील ब्राह्मणांचे प्राबल्य कमी करून बहुजनसमाज व वंचितांना वाव द्यावा अशी बापटांची भूमिका होती.[२] **पण महाराष्ट्राने अशा अनेक गुणिजनांचे कौतुक केले नाही.**

सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. म. माटे हे शाळेतील शिक्षकाचे काम करीत असताना दलितांच्या वस्तीत जाऊन विद्यादान करीत. हे काम त्यांनी वीस वर्षे केले. ब्राह्मणांच्या गोवर्धन शाखेतील देवराव विष्णू नाईक हे १९२१-१९२९ या कालखंडाच्या अखेरीस डॉ. आंबेडकरांचे निकटचे सहकारी म्हणून ज्ञात झाले. महाडच्या चवदार तळे सत्याग्रहात ज्यांच्या हस्ते मनुस्मृतीचे जाहीर दहन करण्यात आले ते गंगाधर नीळकंठ सहस्रबुद्धे चित्पावनच होते. लोकमान्य टिळकांचे सुपुत्र श्रीधरपंत टिळक आंबेडकरांचे मित्र व सहकारी झाले. अशा कित्येक सवर्णांनी व ब्राह्मणांनी दलितांच्या उद्धारासाठी कार्य केले. आंबेडकरांचे सत्याग्रह व चळवळीत सुरबानाना टिपणीस व त्यांचा परिवार सक्रिय भाग घेत असे. तसेच अनंत चित्रे, कमलाकांत चित्रे, द. वि. प्रधान व वसंतराव कर्णिक हे कायस्थ प्रभू आंबेडकरांचे सहकारी होते. दलितांच्या कल्याणासाठी झटणाऱ्या अशा अनेक सवर्ण पुरुषांमध्ये **कर्मवीर भाऊराव पाटील** हे जैन धर्मीय होते. भाऊरावांनी शेकडो मराठा युवकांसह महारांनाही आश्रय दिला व त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था केली. त्यांनी जातिनिहाय वसतिगृह न काढता मिश्रजातींचे वसतिगृह काढले. जातीय सलोखा निर्माण करणे हा त्यांचा उद्देश होता. १९२७ साली गांधीजींनी त्यांच्या वसतिगृहाला भेट देताना भाऊरावांच्या उपक्रमाची व शैक्षणिक कार्याची मुक्तकंठाने प्रशंसा केली होती. भाऊरावांच्या मिश्रवसतिगृहात तेव्हा ३४ निवासी विद्यार्थी असून त्यांच्यात १३ दलित, १३ मराठा व ८ इतर जातींमधील होते.

**महात्माजींचा 'हरिजन दौरा'** विश्वविख्यात आहे. त्याचा संक्षिप्त आढावा याच प्रकरणात कालक्रमानुसार घेण्यात येईल. मात्र महाराष्ट्रातील त्यांच्या सवर्ण अनुयायांनी केलेल्या दलितोद्धार कार्याची दखल घ्यावीच लागेल. गोध्रामध्ये १९१७ साली झालेल्या गुजरात राजकीय परिषदेत गांधीजींनी अस्पृश्यतानिवारण, ग्रामसफाई व स्वदेशीबाबत मार्गदर्शन केले होते. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन भूतपूर्व गंगनाथ विद्यालयातील (बडोदा) माजी शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी अस्पृश्यतानिवारण, ग्रामसफाई व स्वदेशीचे व्रत स्वीकारले होते. गंगनाथमधील शिक्षक दत्तात्रय बाळकृष्ण ऊर्फ काका कालेलकर या कामी पुढे सरसावले. दुसरे शिक्षक विठ्ठल लक्ष्मण ऊर्फ मामा फडके यांनी दलितांना शिक्षण व कुष्ठरुग्णसेवा हे व्रत स्वीकारले. गंगनाथचे विद्यार्थी विनोबा भावे यांचे समाजसेवा आणि रचनात्मक कार्य विश्वविख्यात आहे. कारावासात अथवा बाहेर भंगीकाम करणारे सीताराम पुरुषोत्तम ऊर्फ अप्पासाहेब पटवर्धन स्वतः दलितांनाही शिकवत. बाबा फाटक मेलेली जनावरे फाडून कातडे कमावण्याचे काम करीत. पांडुरंग सदाशिव ऊर्फ साने गुरुजी, वि. न. बर्वे व पालीचे केदारनाथ अप्पाजी कुलकर्णी वगैरे बरेच गांधीवादी कार्यकर्ते दलित कल्याणासाठी काम करीत. महाराष्ट्रातील शेकडो पुरुष गांधीजींच्या हरिजन दौऱ्यात सहभागी झाले होते. त्यांनी दलित वर्गात शिक्षणाचा प्रचार केला. त्यापेक्षाही महत्त्वाचे असे की, त्यांनी सवर्ण वर्गात दलितांविषयी सहानुभूती व सहत्वाची भावना निर्माण करण्याचे प्रयत्न केले. त्यातून सामाजिक प्रक्रिया सुरू होऊन प्रबोधन झाले.

सुरबानाना टिपणीस, सुरेंद्रनाथ टिपणीस, अनंत विनायक चित्रे, गं. नी. सहस्रबुद्धे, शांताराम रघुनाथ पोतनीस, पुरुषोत्तम जोशी, तुळजाराम मेथा, धारीया, केशवराव देशपांडे, वामन पत्की व कमलाकर टिपणीस वगैरे सवर्ण व्यक्तींनी महाडच्या सत्याग्रहात आंबेडकरांना अत्यंत मोलाची मदत केली होती.

दलितांचा उद्धार करू पाहणाऱ्या ब्राह्मणांमध्ये हिंदुमहासभावाल्यांचाही एक लहानसा वर्ग होता. सामाजिक समतेच्या प्रेरणेपेक्षा 'अस्पृश्यतेचे उच्चाटन केल्यामुळे एकसंध आणि बलशाही हिंदुराष्ट्र निर्मितीला मदत होईल' अशी या

वर्गाची विचारधारा होती. हिंदू समाज सामर्थ्यवान बनवण्याची हिंदुत्ववादी पंथाची चिकाटी होती. त्यासाठी आर्यसमाजाच्या तंत्रानुसार 'धर्मांतरितांचे शुद्धीकरण' व अस्पृश्यतानिवारण करण्याचा हा मार्ग होता. भास्करराव व अण्णासाहेब भोपटकर हे बंधू, न. चिं. केळकर, महादेवशास्त्री दिवेकर, चित्रावशास्त्री, ज. स. करंदीकर, बाबुराव गोखले वगैरे या पंथाचे होते. हे सर्वजण याच दृष्टिकोणातून अस्पृश्यतानिवारणास मदत करीत. जानेवारी १९२४ मध्ये वि. दा. सावरकरांची सशर्त मुक्तता करण्यात आल्यावर ते सरकारच्या आदेशानुसार रत्नागिरीत राहत असत. त्यांना राजकारणात भाग घेण्यास मनाई करण्यात आली होती. पण समाजसुधारणा कार्य करण्याची मुभा होती. त्याचा लाभ घेऊन सावरकरांनी अस्पृश्यतानिवारण व शुद्धीची मोहीम हाती घेतली. या कार्यात त्यांनी कर्मठ सनातन्यांच्या रोषाची पर्वा न करता ही मोहीम चालविली. तथापि या मोहिमेमागची त्यांची प्रेरणा हिंदुत्ववाद व बलशाली हिंदुराष्ट्र घडवणे ही होती.

ब्राह्मणेतर व सत्यशोधक चळवळीतील अनेक पुढारी सामाजिक समतेचा पुरस्कार करीत. ते दलितांमध्ये शिक्षणप्रसार व्हावा असा प्रचार करीत. याबाबत केशवराव जेधे, प्रबोधनकार ठाकरे, भाऊराव पाटील वगैरे मार्गदर्शन करीत. त्यांची भूमिका पारदर्शकच होती. तथापि महारांच्या सभेत भाषण करून घरी गेल्यावर आंघोळ करणारेच जास्त होते. वालचंद कोठारींसारखे काही पुढारी लोकक्षोभाच्या भीतीने सहभोजनांमध्ये जेवत नसत. मात्र तरीही समाजसमता संघाच्या सहभोजनांमध्ये काही सवर्ण पुरुष व महिलाही सहभागी झाल्याची उदाहरणे होती. त्याकाळी रोटीबंदी मोडण्याचे धाडस कौतुकास्पद होते. कित्येक सवर्णांनी दलित चळवळीत योगदान दिले हे महत्त्वाचे होते.

**श्रीधर टिळक व दलित चळवळ :—**लोकमान्यांचे चिरंजीव श्रीधर बळवंत टिळक सत्यसमाजिस्ट नसले, तरी सत्यशोधक होते. त्यांची विचारसरणी पुरोगामी समाजसुधारकाची होती. चिपळूणकर-टिळक संप्रदायाच्या वातावरणात राहूनही त्यांनी जोतीबांच्या समतावादाचे रहस्य जाणले होते. राजकीय सुधारणांबरोबरच

सामाजिक व धार्मिक सुधारणाही झाल्याच पाहिजे हा आपला विचार श्रीधर टिळकांनी लोकमान्य हयात असतानाच जाहीरपणे मांडला होता. यादृष्टीने पाहता ते न्या. रानडेंच्या विचारपंथाचे वाटतात. त्यांची राजकीय विचारसरणी मवाळ नव्हती असे आम्हाला वाटते. पुरोगामी सामाजिक भानामुळे श्रीधरपंतांनी सत्यशोधक व दलित नेत्यांशी सहकार्य केले होते. त्यांनी जोतीबांच्या कार्याचा मुक्तकंठाने गौरव केल्यामुळे केसरी पक्षाचे पुढारी त्यांच्यावर फारच संतापलेले होते. श्रीधरप्रमाणेच त्यांचे बंधू रामभाऊ टिळक हेदेखील समाजसुधारणावादी होते. श्रीधर टिळकांचे आंबेडकर, वि. रा. शिंदे, पांडुरंग नथूजी राजभोज, श्रीपतराव शिंदे वगैरे सुधारणावादी माणसांशी संबंध निर्माण झाले. मात्र राजभोज यांच्या श्रीकृष्ण मेळा नामक पथकामुळे सुधारणावादी मंडळी व केसरीच्या विश्वस्तांमध्ये वाद निर्माण झाला.

'समाजकार्य वगळण्यात आपल्या वडिलांची चूक झाली', हे श्रीधरपंतांनी प्रांजळपणे कबूल केले होते. सामाजिक विचारसरणी वगैरे मुद्यांवरून श्रीधरपंतांचा केसरीचे विश्वस्त धोंडोपंत विद्वांस व संपादक न. चिं. केळकर यांच्याशी तंटा झाला. तंटा दुसऱ्या कारणामुळेही विकोपास गेला. अशा वातावरणात श्रीधर टिळकांनी आपल्या वाड्यात श्रीकृष्ण मेळ्याचा कार्यक्रम घडवून आणण्याचा निर्धार केला. तेव्हा ९ सप्टेंबर १९२७ रोजी मध्यरात्री कर्मठांकडून या मेळ्याला टिळकांच्या वाड्यात प्रवेश करण्यास मज्जाव करण्याचा प्रयत्न झाला. केसरीच्या विश्वस्तांनी दहाबारा पोलिसांची तुकडी त्यासाठी तयार ठेवली होती. पोलिसांनी स्वतः श्रीधरपंत आणि मेळ्यातील महार-मांग मुलांना मज्जाव केला व सांगितले की, हा महार-मांगांचा मेळा असल्याने त्यांना आत जाण्यास परवानगी नाही. तथापि पोलिसांकडे फरासखान्याचा तसा लेखी हुकूम नव्हता. तरीही श्रीधरपंत व त्यांच्या बंधूंना धक्काबुक्की व अपमान सहन करावा लागला. मात्र पोलिसांना व कर्मठांना मुलांसकट मेळा आत घ्यावा लागला. याचा अर्थ, श्रीधरपंत टिळकांना स्वतःच्याच वाड्यात महार-मांगासह प्रवेश करताना केसरीच्या विश्वस्तांनी त्यांना पोलिसांकरवी मारझोड करण्यासही कमी केले नव्हते. समाज किती असहिष्णू

होता, याचे हे एक ऐतिहासिक उदाहरण होय. केसरीच्या व्यवस्थापकांनी या प्रसंगी सामान्य शिष्टाचार पाळले नाहीत. धोंडोपंत विद्वांसांचा खुलासा कसा दिशाभूल करणारा आहे, हे श्रीधरपंत व राजभोज यांनीही ज्ञानप्रकाशात पत्राद्वारे प्रसिद्ध केले. या प्रकरणात टिळकबंधूंनी दाखवलेले धाडस व करारीपणा याबद्दल कर्मवीर शिंदे यांनी पुण्यातील जाहीर सभेत त्यांचे अभिनंदन केले. याच सभेत श्रीधरपंत म्हणाले होते, "पुण्याच्या भिक्षुकशाहीला गाडले तरच तरणोपाय आहे."

सहभोजनाचे कार्यक्रम करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी ४ सप्टेंबर १९२७ रोजी समाजसमता संघ ही संघटना सुरू केली. काही ब्राह्मण, कायस्थ, भंडारी, मराठे व शिंपी या संघाचे पदाधिकारी होते. खुद्द लोकमान्य टिळकांच्या दिवाणखान्यात श्रीधरपंतांनी समाजसमता संघाची शाखा स्थापन केली, आणि सहभोजन घडवून आणले. या कार्यक्रमात आंबेडकर, देवराव नाईक, गं. नी. सहस्रबुद्धे, शिवतरकर मास्तर, प्रधान बंधू, कद्रेकर, ज्ञानकोशतर्फे कृ. ग. लिमये, डॉ. नवले, सुभेदार घाडगे, श्रीपतराव शिंदे, व. भ. कर्णिक, धुंडीराज ठेंगडी (कम्युनिस्ट) असे विविध जातींचे लोक सहभागी झाले होते. या सभेत बोलताना आंबेडकरांनी श्रीधरपंतांचे समाज समता संघाविषयीचे धाडस व प्रागतिक विचारसरणीचे कौतुक केले. तसेच हे कार्य जर ते नेटाने करीत राहतील, तर त्यांच्या वडिलांच्या कार्यापेक्षा त्यांचे कार्य अनेक पटीने महत्त्वाचे ठरेल, असा बाबासाहेबांनी अभिप्राय दिला. आंबेडकरांप्रमाणेच सत्यशोधक आणि ब्राह्मणेतर पक्षाच्याही नेत्यांनी श्रीधर टिळकांकडून पार मोठ्या अपेक्षा बाळगल्या होत्या.[३]

तथापि श्रीधरपंतांना केळकरांसारख्या केसरी विश्वस्तांच्या सततच्या विरोधाला तोंड द्यावे लागले. वस्तुतः त्यांच्या रूपाने ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाची तीव्रता कमी होण्याची शक्यता दिसत होती. अस्पृश्य समाजाचा दुरावा कमी करून जवळीक निर्माण होण्यास मदत झाली असती. आंबेडकरांना एक चांगला सहकारी मिळालेला होता. तथापि केसरीच्या विश्वस्तांबरोबरच्या भांडणांना कंटाळून निराश मनःस्थितीत श्रीधरपंतांनी भरधाव चाललेल्या आगगाडीखाली २५ मे १९२८ रोजी आत्महत्या केली. महाराष्ट्राने एक होतकरू समाजसुधारक गमावला.

## महाडचा धर्मसंगर

बाबासाहेब आंबेडकरांच्या दलित मुक्ती चळवळीच्या इतिहासात महाडमधील चवदार तळ्याचा सत्याग्रह आणि मनस्मृतीच्या दहनास फार मोठे महत्त्व आहे. गांधीजींच्या सत्याग्रह तंत्रानुसार घडलेल्या या घटनेचा उल्लेख 'महाडचा धर्मसंगर' असा केला जातो. या घटनेत तीन गोष्टींचा समावेश होता—चवदार तळ्याचा सत्याग्रह, **मनुस्मृती** धर्मग्रंथाचे दहन व कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषदेचे अधिवेशन. यातून दलित मुक्ती आंदोलनाचा पुढील मार्ग दलितांसमोर मांडला गेला आणि सामाजिक समता अभियान आकार घेऊ लागले.

अस्पृश्य लोकांना सार्वजनिक विहिरी, तलाव व पाणवठे खुले करण्यासाठी महात्मा फुलेंपासून प्रयत्न झाले होते. पण यश मात्र आले नव्हते. ब्राह्मणेतर पक्षाचे आमदार सीताराम केशव बोले यांनी मुंबई कायदेमंडळात मांडलेला याबाबतचा ठराव १९२३ साली सरकारने मान्य केला होता. तथापि अनेक ठरावांप्रमाणे हाही ठराव प्रत्यक्षात अमलात आलेला नव्हता. म्हणून बोले यांनी त्याबाबत १९२६ साली पुन्हा एक प्रस्ताव मांडला. तेव्हा ठरावाची अंमलबजावणी न करणाऱ्या संस्थांचे अनुदान बंद करण्याचा सरकारने हुकूम काढला. मात्र त्याआधी ५ जानेवारी १९२४ रोजी महाड नगरपालिकेने आपल्या अधिक्षेत्रातील चवदार नामक तळे सर्वांना खुले असल्याचे जाहीर केले होते. तरीही महाडच्या अस्पृश्यांनी तळ्यावर जाऊन आपला हक्क बजावला नव्हता. त्यामुळे बहिष्कृत हितकारिणी सभेच्या वतीने कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषदेच्या १९ व २० मार्च १९२७ रोजी भरलेल्या अधिवेशनाच्या निमित्ताने समतेच्या लढ्याचा बाबासाहेब आंबेडकरांनी प्रारंभ केला.

चवदार तळे पुष्कळ जुने असले तरी ते कोणी व केव्हा बांधले हे ज्ञात नाही. तथापि महाडला १८६६ मध्ये नगरपालिका स्थापन झाल्यावर, १८६९ मध्ये शासनाने हे तळे नगरपालिकेकडे हस्तांतरित केले आणि तेव्हापासून तळे सार्वजनिक असल्याचे मानले जाऊ लागले. कुलाबा जिल्हाधिकाऱ्याने काढलेल्या शासकीय आदेशानुसार महाड नगरपालिकेने ५ जानेवारी १९२४ चा उपरोक्त

ठराव जाहीर केला होता. डॉ. आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली १९ व २० मार्च १९२७ रोजी भरलेल्या कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषदेच्या अधिवेशनात ३२ (काहींच्या मते ३३) ठराव मंजूर करण्यात आले. अस्पृश्यांची कुलाबा जिल्ह्यातील ही पहिलीच परिषद होती. तिच्यात २५०० हून अधिक लोक हजर होते. दलितांच्या हक्कांसाठी आपणच पुढाकार घेऊन सभा संपल्यावर चवदार तळ्यावर जाऊन नगरपालिकेच्या घोषणेनुसार तळ्याचे पाणी वापरण्याचा अधिकार उपयोगात आणावा असे परिषदेच्या विषय नियामक समितीत ठरले. सभेत काही सवर्ण पुढाऱ्यांचीही भाषणे झाली. सत्यशोधक समाजाच्या विचारसरणीचा प्रसार होणे आवश्यक असल्याचे सभेत सांगण्यात आले. परिषदेच्या समारोपप्रसंगी विषय नियामक समितीच्या ठरावानुसार सुचविण्यात आले की, चवदार तळ्यावर पाणी भरण्याचा प्रघात सुरू करावा आणि सभेतील सर्वांनी अध्यक्षांसह तळ्यात प्रवेश करावा. त्यानुसार परिषदेतील सर्व लोक आंबेडकरांच्या मागोमाग सभामंडपातून बाहेर पडले व एक मोठी मिरवणूक काढण्यात आली. ही मिरवणूक महाडच्या बाजारपेठेतून शांतपणे तळ्यावर गेली व तेथे पाणी घेतल्यानंतर सभामंडपाजवळ परत आली. नंतर परिषदेचे काम संपविण्यात आले.[४]

सत्याग्रह शांततापूर्ण पार पडल्यावर देवळातील गुरवाने खोटी दवंडी पिटून अस्पृश्य लोक वीरेश्वराच्या देवळात घुसणार अशी वार्ता पसरवली. वस्तुतः काही लोक भोजन करीत होते, तर काही भोजन आटोपून आपापल्या गावी जाण्यास निघाले होते. परंतु काही विघ्नसंतोषी लोकांनी दलितांवर मोठा हल्ला केला. डाक बंगल्यात मुक्कामाला असलेले आंबेडकर मामलेदाराच्या सांगण्यावरून आपल्या अनुयायांची भेट घेण्यासाठी भोजन मंडपात आले, तेव्हा त्यांना तेथील नासधूस व जखमी झालेले सत्याग्रही दिसले. बाबासाहेबांनाही २० मार्चची रात्र पोलीस संरक्षणात घालवावी लागली. दंगलीच्या दिवशी निवासी दंडाधिकारी गावात असूनही त्याने दलितांना मारहाण करणाऱ्यांविरुद्ध कारवाई केली नाही. म्हणून पोलीस अधीक्षकाची भेट घेऊन आंबेडकर व अनंतराव चित्रे यांनी दंगलखोरांविरुद्ध तक्रारी नोंदविण्याची व्यवस्था केली, आणि ते मुंबईस परतले.

अस्पृश्यांची सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक प्रगती घडवून आणण्यासाठी सरकारने कोणकोणते उपाय योजावेत याबाबत परिषदेत ठराव करण्यात आले होते. ज्या तळ्यावर मुसलमानांना पाणी भरण्याची मुभा होती तेथे दलितांना मज्जाव असणे अन्यायकारक होते. म्हणून दलितांनाही पाणी भरण्याची मुभा असावी या नैसर्गिक हक्काची मागणी होती.

परिषदेच्या यशामध्ये बाबासाहेब आंबेडकरांव्यतिरिक्त संभाजी तुकाराम गायकवड (स्वागताध्यक्ष), पांडुरंग नथूजी राजभोज, रामचंद्र बाबाजी मोरे, शिवराम गोपाळ जाधव, धोंडीराम नारायण गायकवाड, निवृत्ती तुळशीराम जाधव, सीताराम नामदेव शिवतरकर, बाळाराम आंबेडकर, कोंडीराम श्रीराम खोलवडीकर, सुभेदार सवादकर, शांताराम अनाजी उपशाम, आड्रेकर, भानुदास कांबळे, रामचंद्र शिंदे, तसेच काही सवर्ण पुढारी, विशेषतः अनंत विनायक चित्रे, गं. नी. सहस्रबुद्धे, शांताराम रघुनाथ पोतनीस, पुरुषोत्तम जोशी, तुळजाराम मेथा, धारीया, सुरेंद्रनाथ टिपणीस, इत्यादींचा मोठा वाटा होता. मुंबईच्या सोशल सर्व्हिस लीगच्या सभासदांनी बरीच कामगिरी केली. शिवाय परिषद यशस्वी करण्याचे कामी महाडमधील तरुणांनी खूप मेहनत घेतली. काही ब्राह्मण, ब्राह्मणेतर, चांद्रसेनीय कायस्थ प्रभू, गुजर व मुसलमान या सर्वांनी अस्पृश्यांना या प्रसंगी मदत केली.

तथापि सनातनी लोकांनी सत्याग्रहानंतर विरोध केला. २१ मार्च १९२७ रोजी कर्मठ हिंदू लोकांनी एक हजार कलश पाणी उपसून टाकून आणि तळ्यात पंचगव्य मिसळून वैदिक मंत्रांच्या घोषात तळे शुद्ध करण्याचा विधी पार पाडला. महाडच्या घटनेबाबत काही वृत्तपत्रांनी विपर्यस्त प्रचार केला. त्याला उत्तर देण्यासाठी आंबेडकरांनी **बहिष्कृत भारत** नावाचे पाक्षिक ३ एप्रिल १९२७ रोजी सुरू केले.

महात्मा गांधींनी महाडमधील उच्चवर्णीय लोकांच्या दांडगाईचा तीव्र निषेध केला. त्यांनी आंबेडकरांच्या कृतीचे समर्थन करून अस्पृश्यतेच्या प्रथेवर हल्ला केला तो असा, “Untouchability itself has no reason behind it. It is an inhuman institution. It is tottering and it is sought to be supported by the so-called orthodox party by sheer brute force”.[५]

दलितांचे धाडस पाहून महाड नगरपालिकेने चवदार तळे खुले करण्याचा आपला मूळ ठराव सत्याग्रहानंतर मागे घेतला (४ ऑगस्ट १९२७). नव्या प्रतिगामी ठरावास पाठिंबा असल्याचे दाखविण्यासाठी मतदारांची एक सभा भरविण्यात आली. चवदार तळे सार्वजनिक नसून ते खाजगी मालकीचे आहे असा दावा करण्यात आला. अस्पृश्यांना ते वापरण्यास मनाई करण्याचे प्रयत्न सुरू झाले.

त्यामुळे आंबेडकरांनी आपला समतेचा लढा पुढे चालविण्यासाठी अस्पृश्यांची दुसरी परिषद महाडला भरविण्याची व सत्याग्रह करण्याची घोषणा केली. कर्मठ लोकांना हे कळताच त्यांनी जिल्हा दंडाधिकाऱ्याकडे अर्ज करून मागणी केली की, अस्पृश्यांना तळ्यावर जाण्यास प्रतिबंध करण्यात यावा. त्यावर दंडाधिकाऱ्याने अस्पृश्यांना प्रतिबंध करण्यासाठी शासन मनाईहुकूम काढणार नाही असे स्पष्ट केले ; परंतु सवर्णांना वाटल्यास त्यांनी दिवाणी दावा दाखल करावा, असे त्याने ७ डिसेंबर १९२७ रोजी महाडच्या पुढाऱ्यांना सांगितले. त्यानंतर महाडच्या नऊ जणांनी उपन्यायाधीशापुढे दावा दाखल करून चवदार तळे खाजगी मालकीचे असल्यामुळे अस्पृश्यांना तळ्यावर जाण्यास प्रतिबंध घालण्यासाठी विनंतीअर्ज केला. त्यानुसार न्यायालयाने अंतरिम आदेश देऊन आंबेडकरांना व त्यांच्या सहकाऱ्यांना तळ्यावर जाण्यास प्रतिबंध केला (१४ डिसेंबर १९२७). न्यायालयाचा मनाईहुकूम आंबेडकरांना परिषदेच्या नियोजित तारखांच्या केवळ दोन-तीन दिवस आधी मुंबईत देण्यात आला. त्यामुळे विचारविनिमय करणे व परिषद पुढे ढकलणे यास अवधी नसल्याकारणाने या विषयावर परिषदेमध्येच निर्णय घ्यावा असे ठरविण्यात आले.

सत्याग्रहासाठी आंबेडकरांनी जोरदार तयारी केली होती. सत्याग्रह समिती मुंबई व इतरत्र प्रचार करीत होती. ब्राह्मणेतर पक्षाचे पाठिंबादर्शक पत्रक १९ डिसेंबर १९२७ रोजीच्या **विजयी मराठा** मध्ये प्रसिद्ध झाले. पुण्याचे बाबुराव गोखले व केसरीचे उप संपादक ज. स. करंदीकरदेखील ३० नोव्हेंबर १९२७ रोजी हिंदुसभेचा संदेश घेऊन महाडला आले होते अस्पृश्यांच्या सत्याग्रहाला विरोध

करू नका. महाडच्या अस्पृश्यांवर जो प्रसंग गुदरला काहीसा तसाच प्रसंग कुलाबा जिल्ह्यातील चौलच्या रामेश्वर देवळात कोळी, भंडारी, आगरी, मराठे यांना देवळाच्या गाभाऱ्यात जाण्याच्या मनाईमुळे निर्माण झालेला होता.[६]

**मनुस्मृतीचे दहन :**—महाडचा सत्याग्रह व मनुस्मृती धर्मग्रंथाचे दहन या घटना बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक आंदोलनातील महत्त्वाच्या घटना होत. महाडमध्ये २५ ते २७ डिसेंबर १९२७ रोजी सत्याग्रह परिषद भरविण्याचे ठरलेले होते. त्यानुसार **भाई अनंत चित्रे, सुरबानाना टिपणीस आणि सुभेदार घाटगे** यांनी परिषदेची तयारी केलेली होती. परिषदेसाठी १०,००० लोक जमले. परिषदेतील भाषणात आंबेडकर म्हणाले की, "चवदार तळ्यावर जावयाचे ते केवळ पाणी पिण्याकरिता नव्हे. इतरांप्रमाणे आम्हीही माणसे आहोत हे सिद्ध करण्याकरिताच आपणास तेथे जावयाचे आहे. समतेची मुहूर्तमेढ रोवण्यासाठीच हा सत्याग्रह आहे". या भाषणात त्यांनी फ्रेंच राज्यक्रांतीचे महत्त्व सांगून मानवी हक्कांच्या जाहीरनाम्याविषयी विवेचन केले. 'चातुर्वर्ण्यातील अस्पृश्यता नाहीशी झाल्याशिवाय हिंदू समाजाचा तरणोपाय नाही ; असमानता नष्ट झाली पाहिजे', असे आंबेडकरांनी प्रतिपादन केले.

महाडच्या परिषदेत काही महत्त्वाचे ठराव मंजूर झाले. पहिला ठराव जन्मसिद्ध मानवी हक्कांविषयीचा होता. दलितांना हे हक्क नाकारणाऱ्या कर्मठ हिंदू समाजाच्या विषमतामूलक रचनेचा तीव्र निषेध करण्यात आला. दुसऱ्या ठरावानुसार लोकविग्रही व माणुसकीचा नाश करणाऱ्या मनुस्मृती ग्रंथाचे दहन करण्याचे ठरले. हा ठराव उपस्थित ब्राह्मण व सवर्ण व्यक्तींच्या सहमतीने झाला हे विशेष!

परिषदेच्या मंडपात खास तयार केलेल्या वेदीत २५ डिसेंबर १९२७ च्या रात्री ९ वाजता आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली दलित संत व ब्राह्मण वगैरेंनी मनुस्मृतीचे दहन केले. मंडपात फक्त महात्मा गांधींची एक तसबीर ठेवलेली होती. या प्रतीकात्मक दहनाचे समर्थन करून आंबेडकर म्हणाले की, 'विदेशी कपडे जाळून किंवा मिस कॅथेरिन मेयोच्या पुस्तकाची होळी करून अथवा सायमन कमिशनवर बहिष्कार घालून जे काँग्रेसला साधावयाचे होते तेच आम्हालाही साधावयाचे आहे.'

“द रिव्होल्ट ऑफ द अन्टचेबल्स” या निबंधात आंबेडकरांनी म्हटले की, मनुस्मृतीच्या शिलाखंडावर हिंदू समाजरचना उभारलेली असून, ती हिंदूंना पूज्य वाटते. मनु जाती व अस्पृश्यता यांना केवळ आधारच देत नाही तर त्यांना कायदेशीर मान्यता देतो. म्हणून या ग्रंथाचे दहन हे एक साहस होय. त्यांच्या मते फ्रान्समधील बॅस्टिलचा तुरुंग हे जसे जुन्या फ्रेंच सरंजामशाहीचे प्रतीक होते, तसे मनुस्मृती हे हिंदू समाजातील विषमतेचे प्रतीक होय. म्हणून बॅस्टिलचा पाडाव या घटनेला फ्रेंच व युरोपियन जनतेच्या मुक्ती आंदोलनात जसे महत्त्व आहे, तसेच दलितांच्या मुक्ती आंदोलनाच्या इतिहासात महाडमधील या घटनेस महत्त्व आहे.”

दुसऱ्या दिवशीच्या सभेत डॉ. आंबेडकरांनी साथींसह सत्याग्रह करावा असा ठराव मांडला. सत्यशोधक समाज व ब्राह्मणेतर पक्षातर्फे केशवराव जेधे व दिनकरराव जवळकर आले होते. त्यांची अनुकूल भाषणे झाली. दरम्यान ३,८८४ लोकांनी सत्याग्रह करून कारावास पत्करण्यासाठी नावे नोंदविली. त्यानंतर आंबेडकरांनी महाडमध्ये मुक्काम ठोकलेल्या जिल्हाधिकाऱ्याला पत्राने कळविले की, सत्याग्रह करण्याचा दलितांचा निश्चय आहे ; आपली इच्छा असल्यास आपण सभेस यावे. त्याप्रमाणे जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व इतर अधिकारी सभास्थानी आले. जिल्हाधिकाऱ्याने सभेत सांगितले की, सरकारची दलितांच्या मागणीस सहानुभूती आहे. परंतु हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने आणि नऊ सवर्ण नागरिकांनी हा तलाव खाजगी असल्याचा दावा केल्याने, तसेच दिवाणी न्यायालयाने तात्पुरता मनाई हुकूम दिलेला असल्याकारणाने, अस्पृश्य लोकांनी येथे सत्याग्रह करू नये. प्राप्त परिस्थितीत अस्पृश्यांना तलावावर जाण्यास प्रतिबंध करणे आपणास भाग पडत आहे. जिल्हाधिकाऱ्याने असेही स्पष्ट केले की, आपण दलितांविरुद्ध नाही. परंतु सरकारच्या न्यायालयाची प्रतिष्ठा राखणे आपले कर्तव्य असल्यामुळे कोणी कायदा मोडल्यास त्यास शिक्षा करणे सरकारला भाग पडेल.

सत्याग्रहाबाबत निवडक सहकाऱ्यांची पुन्हा चर्चा झाली आणि परिषदेच्या तिसऱ्या दिवशी आंबेडकरांनी पुढील ठराव सभेपुढे मांडला :—“जे स्पृश्य हिंदू

लोक चवदार तळ्याचे पाणी अस्पृश्य लोकांस घेऊ देत नाहीत, त्यांच्याविरुद्ध सत्याग्रह करण्याकरिता ही सभा बोलविण्यात आली असता, त्याच सवर्ण हिंदूंनी सरकारची पाठ रिघून आयत्या वेळी दिवाणी कोर्टाचा तात्पुरता मनाई हुकूम अस्पृश्य वर्गाच्या विरुद्ध मिळविल्यामुळे या सभेस सरकारविरुद्ध सत्याग्रह करण्याचा प्रसंग आणला. ही गोष्ट ध्यानात घेऊन आणि मे. कलेक्टरसाहेबांनी आपल्या भाषणात याबाबतीत सरकारचा दुराग्रह नसून, समान हक्कांकरिता अस्पृश्यांनी चालविलेल्या झगड्याला सरकारची पूर्ण सहानुभूती आहे, असे भर सभेत दिलेले आश्वासन याचा विचार करून ही परिषद दिवाणी दाव्याचा निकाल होईपर्यंत सत्याग्रह तहकूब करीत आहे."[८]

नंतर तलावापर्यंत मिरवणूक काढण्यात आली. ही परिषद यशस्वी करण्यासाठी ज्या सवर्ण लोकांनी चांगली मदत केली त्यांच्यापैकी पुढील व्यक्तींचे आभार मानण्यात आले :—अनंत विनायक चित्रे, सुरेंद्रनाथ टिपणीस, फत्तेखान मुठोलीकर, शांताराम रघुनाथ पोतनीस, केशवराव देशपांडे, गं. नी. सहस्रबुद्धे, वामन पत्की व कमलाकर टिपणीस. महाड परिषदेसाठी बऱ्याच महार महिलाही आल्या होत्या. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातून महाडच्या सत्याग्रहासाठी लोक आले होते. महाडमध्ये बरीच लोकसंख्या असलेला चांभार समाजही परिषदेच्या कार्यक्रमाने जागा झाला. परंतु त्यांनी सत्याग्रहात भाग घेतलेला दिसत नाही.

चवदार तळ्याचा खटला बरेच दिवस रेंगाळला. या दाव्यात आंबेडकर व चार महार नेत्यांना प्रतिवादी करण्यात आले होते. शेवटी १७ मार्च १९३७ रोजी मुंबई उच्च न्यायालयाने खटल्याचा निकाल जाहीर केला. सदर निकालात म्हटले होते की, 'तळ्याच्या मालकीबाबत आता वादी पक्षाचे काही म्हणणे उरलेले नाही. परंतु लॅन्ड रेव्हेन्यू कोडच्या कलम ३७ प्रमाणे हे तळे सरकारच्या मालकीचे होते व डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल ॲक्टप्रमाणे तळ्याची मालकी महाड नगरपालिकेकडे आहे. तळ्याचा उपयोग मुसलमानदेखील करीत असल्याने फक्त सवर्णांनीच तळ्याचा उपयोग करण्याचा अधिकार त्यांना पोहोचत नाही. केवळ प्राचीन रूढीने वादीला कायदेशीर हक्क पोहोचत नाही. शिवाय ही रूढी प्राचीन आहे असेही

वादी पक्षाला पुराव्यासह सिद्ध करता आले नाही.' अशा रीतीने या खटल्यात डॉ. आंबेडकर विजयी झाले. मार्च १९२७ मध्ये सुरू झालेला हा लढा शेवटी उच्च न्यायालयाच्या निर्णयाने मार्च १९३७ मध्ये यशस्वी झाला.

## महार वतन विधेयक

पेशवे राजवटीपूर्वी गावात बारा बलुतेदार आणि बारा अलुतेदार असे २४ वंशपरंपरागत हुद्देदार असत. पेशवाईत त्यांची संख्या दुपटीने वाढल्यामुळे गोंधळ माजला होता. म्हणून ब्रिटिशांनी १८७४ साली वतन कायदा केला. त्यानुसार पाटील, कुलकर्णी, महार आणि जागल्या हे चार गावकामगार निर्धारित केले व बाकीच्या बलुतेदार आणि अलुतेदारांच्या इनामांवर सरकारने जुडी म्हणजे कर बसविला. चार गावकामगारांपैकी महाराची कामे निश्चित केलेली नव्हती. म्हणून महाराला सरकारी कामाव्यतिरिक्त अधिकाऱ्यांची सरबराई करणे व व्यक्तिगत सेवा, घरकाम व हीन दर्जाचे काम करावे लागे. कायद्यात नमूद नसलेली वेठबिगारीची कामेही त्याला करावी लागत. मेलेली गुरेढोरे ओढून नेणे व त्यांचे कातडे सोलून काढण्याचे काम करण्याचे बंधन सरकारनेच महारांवर घातले होते. लहानशा इनामाच्या मोबदल्यात महारांचे शोषण करण्यात येई. अधिकाऱ्यांच्या लहरीनुसार महारांच्या इनाम जमिनी काढून घेता येत असत. त्यांना नियमितपणे बलुते मिळत नसत. परिणामतः महार स्वाभिमानशून्य झाले. त्यांची नाकेबंदी करून त्यांना गुलामांसारखे वागवण्यात येई.

डॉ. आंबेडकरांनी २३ डिसेंबर १९२७ च्या **बहिष्कृत भारत** पत्रकात लिहिल्याप्रमाणे "वतनामुळे महार लोक स्पृश्याधीन झाले आहेत. त्यांना स्पृश्याधीन होण्याचे कारण असे की, ज्यांच्या हाताखाली महारांना नोकरी करावयाची असते ते अधिकारी सारे स्पृश्य लोकच असतात......... ते आपल्या अधिकाराचा उपयोग, महार लोक पायरीने वागतात की नाही याची खबरदारी ठेवून, त्यांनी पायरी सोडली तर त्यांना शासन करण्यासाठीही त्या अधिकाराचा उपयोग करतात". म्हणून महार वतन खालसा करावे असे प्रतिपादन करण्यासाठी आंबेडकरांनी **बहिष्कृत भारत** पत्रकात लेख लिहिले. वतन गेल्याशिवाय महारांचा

स्वाभिमान जागृत होऊन त्यांची सुधारणा होणे शक्य नाही, अशी आंबेडकरांची धारणा बनली. मुंबई विधिमंडळात विधेयक मांडताना (१९२७) आंबेडकरांनी सुचविले की, वतनदारी जमिनीच्या किमती ठरवून त्यावर शेतसारा पूर्णपणे घ्यावा, आणि वतनाच्या जमिनी रयतेच्या करून टाकाव्या. तसेच वतनदारांची सरकारी नोकरीच्या जाचातून सुटका करावी.

तथापि आंबेडकरांच्या या विधेयकास दलितेतरांचाच नव्हे तर आपल्या जातीमधील लोकांचाही विरोध असल्याचे उघड झाले. अनेकांनी त्यांच्यावर टीका केली. विधेयकाला विरोध करणाऱ्या ५८ पुरुषांनी एक पत्रक काढून ते **दीनमित्र** पत्रकात प्रकाशित केले. सत्यशोधक समाजाचे मुकुंदराव पाटील वगैरे विधेयकाला समर्थन देत होते हे खरे. तथापि ब्राह्मणेतर पक्षाच्या नेत्यांनी या विधेयकाला तीव्र विरोध केला. २१ सप्टेंबर १९२८ रोजी पुण्यातील जेधे भवनात शेतकरी संघाची सभा भरली तेव्हा मोठ्या जमीनमालकांनी बाबासाहेबांच्या विधेयकाला विरोध करण्यासाठी एक ठराव संमत केला. त्यानंतरही महाराष्ट्र शेतकरी संघाचे पदाधिकारी महार वतन विधेयक शेतकऱ्यांच्या हिताविरुद्ध आहे असे म्हणत असत. कुलकर्णी वतन नष्ट करण्यासाठी झगडणारे बरेच ब्राह्मणेतर पक्षाचे पुढारी देखील आंबेडकरांच्या विधेयकावर प्रखर टीका करीत.

बाबासाहेबांच्या मते महारांनी वतनावर पाणी सोडून वनजमिनीत शेती करावी आणि जोडधंदा म्हणून खादी तयार करावी. तसेच गावांमधून बाहेर पडून कारखान्यांमध्ये नोकरी करावी व स्वाभिमानाने जगावे, असे ते सांगत. अनेक बाजूंनी त्यांच्या विधेयकास विरोध होत असता, मूळ विधेयक चिकित्सा समितीकडे पाठवण्यात आले. मात्र त्या समितीने बऱ्याच प्रतिकूल अशा दुरुस्त्या सुचविल्या. म्हणूनही आंबेडकरांनी आपले विधेयकच मागे घेतले. ब्रिटिश सरकारनेही त्यांचे विधेयक पराभूत करण्यासाठी इलाख्यातील ब्राह्मण, अब्राह्मण व मुसलमानांशी छुपे संगनमत केले होते.[९]

## मंदिरप्रवेशासाठी सत्याग्रह

सार्वजनिक हिंदू देवालयांमध्ये अस्पृश्य लोकांनाही स्पृश्य जातींच्या लोकांप्रमाणेच समान हक्क असावेत, अशी मागणी साधारणपणे १९२७ पासून होऊ लागली. या मागणीला महात्मा गांधी, विनोबा भावे व अनेक पुरोगामी विचारवंतांचा पाठिंबा होता. न. चिं. केळकर, ल. ब. भोपटकर, श्री. म. माटे यांच्यासारखे मध्यममार्गी लोक अवर्णांना मंदिरप्रवेश मंजूर करण्यास अनुकूल असले, तरी हा प्रश्न दमादमाने व सामोपचाराने सोडवावा असे ते म्हणत. त्यासाठी सत्याग्रह वा आंदोलन करू नये असे प्रतिपादन करीत. अस्पृश्य लोकांसाठी वेगळे मंदिर बांधून तोड काढण्याचे थोडे प्रयत्नही झाले. तसेच सर्व हिंदू जातींना प्रवेश अनुज्ञेय करणारे नवे देऊळ बांधण्याचाही प्रयोग झाला. भागोजीशेठ कीर या दानशूर भंडारी गृहस्थाच्या देणगीतून वि. दा. सावरकरांनी रत्नागिरीत पतितपावन मंदिर बांधले. तथापि सर्व हिंदूंना पूजा व प्रार्थना करता येईल असे नवीन देवालय बांधण्याचा हा प्रयत्न बरा असला तरी त्यातून मूळ मागणीचा व समतेचा प्रश्न सुटतच नव्हता. शिवाय सावरकरांचा दृष्टिकोण हिंदू संघटन व सामर्थ्य वाढविणे हा होता.

म्हणून अशा प्रयोगाचे आंबेडकरांना आकर्षण वाटले नाही. **बहिष्कृत भारतच्या** २५ नोव्हेंबर १९२७ च्या अंकात त्यांनी लिहिले, "अस्पृश्य लोक देवळात शिरण्याचा जो प्रयत्न करीत आहेत ते केवळ साकाराचे प्रत्यक्ष पूजन करता यावे म्हणून नव्हे. अस्पृश्य लोकांना देवळात प्रवेश करून जी गोष्ट सिद्ध करावयाची आहे ती ही की, त्यांच्या प्रवेशाने देवालय भ्रष्ट होत नाही किंवा देवळातील मूर्तीला स्पर्श केला असता तिचे पावित्र्य कमी होत नाही." अस्पृश्य मानलेल्या लोकांनाही सार्वजनिक मंदिरांमध्ये प्रार्थना व पूजेचा हक्क द्यावा, असे प्रतिपादन करणारे समाजसुधारक तेव्हा शक्यतो मंदिराच्या विश्वस्तांचे मतपरिवर्तन करून, देवालये सर्वांसाठी खुली करण्याचे प्रयत्न करीत. तथापि लिबरल विचारधारा असलेल्या अशा सुधारकांना या कामी अपयश आले. सनातनी व ज्ञातिनिष्ठ लोक वाटाघाटी करून सामोपचाराने मार्ग काढण्यास तयार नव्हते. म्हणूनच मंदिरप्रवेशासाठी सुधारकांना सत्याग्रहाचा मार्ग पत्करावा लागला.

स्वातंत्र्य आदोलनाचा जोर वाढत असताना, राजकीय आंदोलनाबरोबरच धार्मिक व सामाजिक दास्य झुगारून लावण्याची गांधीवादी चळवळ मूळ धरू लागली. दलित बांधवांच्या हुंकारांची सवर्ण पुढाऱ्यांना दखल घ्यावी लागली. नवीनच अवतरलेले अहिंसावादी सत्याग्रहाचे तंत्र आणि जनजागृतीचे साधन समाजरचनेतील समस्या सोडविण्यासाठीही उपयोगात आणण्यास सुरुवात झाली. सत्याग्रहाचे तंत्र कोणी व केव्हा आचरणात आणले हे सर्वश्रुत आहे. भारतीय समाज आणि धार्मिक संघटनांमध्ये सुधारणा करण्याची ही चळवळ वसाहतवादी सत्ताधीशांना आवडत नव्हती. ब्रिटिशांना भारतीय समाजातील परस्पर संघर्ष हितकारक वाटतच होता. म्हणूनच कर्मठ व सनातनी मंडळी आणि अल्पसंख्य घटकांचा पाठिंबा कायम ठेवून राष्ट्रवादाच्या झंझावातास शह देण्यातच ब्रिटिशांना कायम रस होता.

या जाणिवेतून गांधीजींच्या सूचनेनुसार कॉंग्रेसने १९२३ साली अस्पृश्यतानिवारणासाठी ठोस कार्यक्रम आखला होता. त्यानुसार या कार्यासाठी त्यांनी अनेक संघटना निर्माण केल्या.

केरळ प्रांतिक कॉंग्रेस समितीच्या विद्यमाने त्रावणकोरजवळच्या वायकोम येथील मंदिरप्रवेश सत्याग्रह (१९२४-१९२५) संपूर्ण देशभर प्रसिद्ध झाला होता. तसेच याच कॉंग्रेस समितीच्या प्रेरणेतून के. केलप्पन यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या **गुरुवायुर मंदिरप्रवेश सत्याग्रहास** (१९३१-१९३२) अखिल भारतात प्रचंड प्रसिद्धी लाभली होती. नंतर कम्युनिस्ट झालेल्या ए. के. गोपालन यांनी आपल्या आत्मचरित्रात नोंद केल्याप्रमाणे **"गुरुवायुरच्या सत्याग्रहाने हिंदुस्तानभर समाजपरिवर्तनाच्या चळवळीस मोठी चालना दिली. त्यामुळे सर्वत्र मूलभूत परिवर्तनास गती मिळाली"**[१०]. नंतरच्या काळात मोठे कम्युनिस्ट पुढारी झालेल्या ई.एम.एस. नंबुद्रिपाद यांनी आपल्या **हाऊ आय बिकेम अ कम्युनिस्ट** (१९७६, पृ. १२३) या पुस्तकात दिलखुलासपणे कबूल केले की, गुरुवायुर मंदिर प्रवेश सत्याग्रहाने त्यांच्यासारखे हजारो युवक खळबळून जागृत झाले. तसेच आपल्या रास्त हक्कांसाठी आत्मसन्मान राखून लढा देण्यासाठी या सत्याग्रहाने बहुजनसमाजाला प्रेरणा दिली. या दोन्ही मंदिरांमध्ये हरिजनांना प्रवेश मिळण्यासाठी प्रदीर्घ लढा द्यावा लागला होता.

**वर्ध्यातील लक्ष्मीनारायण मंदिरप्रवेश :—**गांधीवादी सामाजिक क्रांतिपर्वात जमनालाल बजाज यांनी वर्ध्यात त्यांच्या आजोबांनी बांधलेले सुप्रसिद्ध लक्ष्मीनारायण मंदिर अस्पृश्यांसाठी खुले करून, हिंदू समाजापुढे एक महान आदर्श ठेवला. कर्मठ विचारसरणीच्या त्या काळी ही घटना महत्त्वाची होती. आधीपासूनच महात्मा गांधी व काँग्रेस अस्पृश्यतानिवारणाचा आग्रह करत होती. हिंदुमहासभेतील एक गट हिंदुत्वाच्या विचारातून पतितपावन मंदिरे बांधण्याचा प्रयत्न करीत होता. पण अस्पृश्य बांधवांसाठी अशी वेगळी हिंदू मंदिरे न बांधता, अस्तित्वात असलेलीच मंदिरे त्यांनाही खुली करण्यात खऱ्या समतेचा विचार होता. या विचारातून, महात्मा गांधींच्या इच्छेनुसार लक्ष्मीनारायण मंदिराचे कार्यकारी विश्वस्त जमनालाल बजाज यांनी मंदिर खुले करण्याचा ठराव पास करून घेतला. त्यानुसार १९०५ सालात बांधलेल्या अत्यंत सुंदर लक्ष्मीनारायण मंदिरात १९ जुलै १९२८ रोजी विनोबा भावे यांनी १२०० अस्पृश्य बांधवांसह प्रवेश केला. आणि मंदिर बंधमुक्त झाले. विशेष महत्त्वाचे असे की, या क्रांतिकारक पावलाविरुद्ध वर्धा परिसरातील सनातन्यांनी विरोधाचा एक शब्द उच्चारला नव्हता.

या घटनेबाबत आपल्या देशातूनच नव्हे तर विदेशातूनही चांगल्या प्रतिक्रिया व्यक्त झाल्या होत्या. या धाडसाबाबत गांधीजींचे पुढील मनोगत मननीय वाटते. "श्रीलक्ष्मीनारायण मंदिरासारखे सुप्रसिद्ध मंदिर अस्पृश्यांना जाहीरपणे खुले करण्यात येत असता सनातन्यांनी विरोधाचा ब्रही काढू नये, हे खरोखर आश्चर्यकारक आहे. आजपर्यंत अत्यंत पवित्र व इतरांना मनाई असलेल्या हिंदू मंदिराचा उंबरठा ओलांडण्यास अस्पृश्य लोक पुढे येत आहेत, हे पाहूनही सनातन धर्माच्या नावाखाली धर्ममार्तंडांनी गोंधळ माजविला नाही हे खरोखरच महत्त्वपूर्ण आहे. अस्पृश्यतेविरुद्ध चालू असलेल्या चळवळीची किती आश्चर्यकारक प्रमाणात प्रगती झाली आहे याचे हे स्पष्ट निदर्शक आहे. सुधारणेच्या खऱ्या चळवळीसाठी दृढनिष्ठा व चिकाटी यांच्याद्वारे कणखर लोकमत कसे बनविता येते, तेही यावरून दिसून येईल. शेठ जमनालाल बजाज व त्यांचे सहकारी

विश्वस्त यांनी हा जो धाडसी उपक्रम केला आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो आणि सबंध हिंदुस्तानभर त्यांचे अनुकरण केले जाईल अशी मी आशा बाळगतो." वर्ध्यातील कर्मठांनी गांधीजी व जमनालालजींच्या प्रभावामुळे मंदिर खुले करण्यास विरोध केला नाही [११]. उर्वरित महाराष्ट्रात मात्र मंदिरांमध्ये प्रवेश खुला करण्यासाठी सत्याग्रहांची प्रदीर्घ चळवळ करावी लागली. त्यात अमरावती, पुणे, नाशिक व पंढरपुरातील सत्याग्रह विशेष गाजले.

**अमरावतीचे अंबादेवी मंदिर :—**अमरावती ऊर्फ उमरावतीच्या या पुरातन मंदिरात प्रवेश मिळण्यासाठी आंबेडकर व गणेश आकाजी गवई वगैरे नेत्यांच्या सूचनेनुसार तेथील महारांनी १९२५ सालात देवस्थान समितीकडे अर्ज केला होता. तथापि १९२६ साली देवस्थान समितीने तो अर्ज फेटाळला. त्यानंतर २७ जुलै १९२७ रोजी दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या दलितांच्या सभेत ठराव करण्यात आला की, एक पंधरवाड्यात अस्पृश्यांना अंबादेवी मंदिरात प्रवेश करण्य़ास मुभा दिली नाही, तर ते सत्यग्रह करतील. पण समितीने नकार दिला. त्यावर बॅ. बागवे यांनी तडजोडीची योजना सुचविली. परंतु देवस्थान समिती बधली नाही. त्यामुळे सत्याग्रह हा एकमेव मार्ग उरला. विदर्भातील ब्राह्मणेतर पक्षाचे पुढारी पंजाबराव देशमुख यांचा सत्याग्रहास पाठिंबा होता. याउलट अस्पृश्यांमधील मातंग लोकांनी सत्याग्रहाला विरोध केला. मात्र महार व मातंगांमधील तेढ मिटवण्यात आंबेडकरांना अंशतः यश मिळाले. काँग्रेसचे नेते डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांचा सत्याग्रहास पूर्ण पाठिंबा होता. पण सत्याग्रह हा निर्वाणीचा उपाय असल्याने त्याआधी संबंधितांचे मन वळवावे असा त्यांनी सल्ला दिला. त्यानुसार समितीला एक महिन्याची मुदत देण्यात आली. परंतु देवस्थान समितीने अनुकूल निर्णय दिला नाही. त्यानंतर सत्याग्रह सुरू झाला. कर्मठांच्या दंडेलीचा वीट येऊन वऱ्हाडातील जळगावच्या पाच हजार महारांनी मार्च १९२९ मध्ये धर्मान्तर करण्याचे जाहीर केले. त्यांच्यापैकी बारा महार प्रत्यक्षात मुसलमान झाल्यामुळे त्यांच्यासाठी दोन सार्वजनिक विहिरी खुल्या करण्यात आल्या. तथापि कर्मठांनी देवळांची दारे खुली केली नाहीत.

**पुण्यातील पर्वती मंदिर सत्याग्रह :**—बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशव्याने १७४९ साली बांधलेले पर्वती मंदिर सार्वजनिक नसून खाजगी मालकीचे आहे, असा मंदिराच्या विश्वस्तांचा दावा होता. वस्तुतः पेशवे परिवारातील एकही पुरुष अथवा स्त्री १९१३ पासून हयात नव्हती. संपूर्ण पेशवे वंश नाहीसा झाला होता. म्हणून खाजगी मालकीचा दावा बेकायदा होता. प्राप्त परिस्थितीत पर्वती मंदिरात प्रवेश करण्यासाठी पुण्यातील सभेत सत्याग्रहाबाबतचा ठराव करण्यात आला. त्यासाठी नेमलेल्या समितीत शिवराम जानबा कांबळे (अध्यक्ष), पांडुरंग नथूजी राजभोज (कार्यवाह) आणि न. वि. गाडगीळ, वा. वि. साठे, विनायकराव भुस्कुटे व ग. ना. कानिटकर हे काँग्रेसजन सभासद होते. सत्याग्रह समितीला केशवराव जेधे, शंकरराव देव आणि यूथ लीगच्या सर्वच सभासदांची सक्रिय मदत होती. देवस्थानाच्या विश्वस्तांनी अस्पृश्यांना मंदिर खुले करण्यास साफ नकार दिला. न. चिं. केळकर, ल. ब. भोपटकर व श्री. म. माटे यांचा गट दलितांना मंदिर खुले करण्यास अनुकूल असला, तरीही हा प्रश्न सामोपचाराने सोडवावा आणि त्यासाठी सत्याग्रहासारखे आंदोलन करू नये, असा हा गट प्रचार करू लागला. वस्तुतः ल. ब. भोपटकरांनी पुणे अस्पृश्यतानिवारक मंडळाच्या वतीने आधीच म्हटले होते की, मंदिराच्या पंचांनी स्वखुशीने हे मंदिर खुले करावे. पण ही मंडळी सत्याग्रहाच्या विरुद्ध होती.

याउलट सनातनवादी भास्करराव भोपटकरांनी गर्जना केली, "मंदिरात प्रवेश मिळण्यासाठी अछूत लोकांनी १०० वर्षे प्रतीक्षा करावी." प्रतिगामी विचारसरणीचे भास्करराव आणि तसेच आहिताग्नी राजवाडे व त्यांच्या कर्मठ बांधवांच्या भूमिकेमुळे पुरोगामी पक्षाने कंबर कसली. पुरोगामी काँग्रेस पुढारी व दलित कार्यकर्त्यांनी लोकमत जागृत करण्यासाठी पुण्यात खूप मेहनत घेतली. १९२७-२८ पासून पुणे यूथ लीगचे कार्यकर्ते म्हणून उदयास आलेले एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, र. के. खाडिलकर, श्री. पु. लिमये (शिरूभाऊ) वगैरे युवा काँग्रेस कार्यकर्त्यांनी व देवांनी सत्याग्रहासाठी बरीच पूर्वतयारी केली. पर्वतीप्रवेश नाकारणाऱ्या देवस्थान पंच मंडळीचे प्रमुख होते सरदार आबासाहेब मुजुमदार, सरदार रास्ते, गोपाळ पटवर्धन वगैरे. दुर्दैवाने त्यांना नारायणराव गुंजाळ, विश्वास

जवरे, बाबुराव फुले, डॉ. जेजुरीकर, गणपत नलावडे वगैरे अब्राह्मण आणि सनातनी हिंदूंचाही पाठिंबा होता. म्हणून पर्वतीचा लढा केवळ ब्राह्मण विरुद्ध दलित असा न राहता सनातनी व सरकारनिष्ठ लोक विरुद्ध पुरोगामी अशा स्वरूपाचा झाला. त्यामुळे मतपरिवर्तनवादी केळकर गटाकडे या प्रश्नाला उत्तर राहिले नाही. स्वाभाविकच डॉ. आंबेडकरांना ब्राह्मणच नव्हे तर ब्राह्मणेतरांचेही अंतरंग दिसल्यावाचून राहिले नाही. म्हणून त्यांनी मुंबईतूनच पर्वती सत्याग्रहास पाठिंबा दिला. अब्राह्मणांचे खरे रूप त्यांनी पूर्वीच अनुभवले होते.

प्रत्यक्ष सत्याग्रह सुरू झाला १३ ऑक्टोबर १९२९ रोजी. कलेक्टर स्वतः देवळासमोर कडक बंदोबस्तासाठी पर्वतीवर हजर होता. ३०० सत्याग्रहींची पथके पर्वतीची टेकडी चढत असताना विरोधक कर्मठांनी त्यांच्यावर दगडाचा मारा केला. कर्मठांनी काहींना खाली निवडुंगांच्या झुडपांमध्ये फेकून दिले. दंगा झाल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली. बरेच सत्याग्रही जखमी झाले. केशवराव जेधे, न. वि. गाडगीळ, भुस्कुटे, पां. न. राजभोज, शिवराम जानबा कांबळे व त्यांची पत्नी, देशदास रानडे, रा. ना. लाड, योगानंद, एस. एम. जोशी, श्रीपतराव शिंदे यांना दगडफेकीला तोंड द्यावे लागले. राजभोज यांना तर इस्पितळात दाखल करावे लागले. या प्रसंगाबाबत एस. एम. जोशींनी गांधीजी व नेहरूंना पत्रे लिहिली. त्यानुसार गांधीजींनी जमनालाल बजाज व स्वामी आनंद यांना निरोप पाठवून सत्याग्रह दोन आठवडे स्थगित करण्यास व समेट घडवून आणण्यास सांगितले. दरम्यान निवडक चौदा सत्याग्रहींची सभा घेण्यात आली. ही सभा कर्मठांनी उधळली व शंकरराव देवांना मारहाण करण्यात आली.

कर्मठांचे बेताल वर्तन व सत्याग्रहींचा बाणा यामुळे पुण्यात बरेच वादंग माजले. एका सभेत एस. एम. जोशींनाही मारहाण करून काही कर्मठांनी जोशींचे खादीचे धोतरच ओढले. तेव्हापासून एस. एम. जोशी धोतराऐवजी पायजमा वापरू लागले. इंग्रजांइतकाच हटवादीपणा कर्मठांमध्येही असल्यामुळे पर्वती सत्याग्रह बरेच दिवस स्थगित करावा लागला. दरम्यान १९३० मध्ये राष्ट्रीय आंदोलन पेटल्याने हा विषय मागे पडला. मात्र या सत्याग्रहाची विशेषता अशी की, दलित, समाजसुधारक,

गांधीवादी नेते, काँग्रेसचे युवक व बरेच ब्राह्मण व ब्राह्मणेतर कार्यकर्ते प्रथमच एका व्यासपीठावर आलेत. आणि तेही पुण्यात! त्यामुळे पुण्यातील कर्मठ लोक तसेच संदिग्ध भूमिका घेणाऱ्यांना चपराक बसली [१२].

महाराष्ट्रातील मंदिरप्रवेश चळवळीत कित्येक ब्राह्मण, ब्राह्मणेतर व सत्यशोधकांनीही योगदान दिले होते. अनेक सवर्ण पुरुष दलितांच्या रास्त मागण्यांसाठी कळकळीने बोलत. प्रार्थनासमाज त्यांच्या आशाआकांक्षांना वाचा फोडत असे. सर्व्हंट्स ऑफ इंडियाच्या रमाबाई रानडे, गोपाळराव देवधर, हरिभाऊ आपटे, शंकरराव देव, देवगिरीकर व वामन मल्हार जोशी दलितांविषयी पोटतिडकेने बोलत. काही प्रसंगी त्यांनी भडक भाषेतही सवर्णांवर कडक टीका केली. हिंदू समाजाविरुद्ध अस्पृश्यांनी बंड केले तर आपल्याला ते हवेच आहे, असे कादंबरीकार हरिभाऊ आपटे एकदा गांधीजींना म्हणाले होते. स्वतः गांधीजींचे दलितोद्धाराचे कार्य, काही पुढाऱ्यांनी पूर्णपणे मान्य केले नसले, तरी गांधीजींचे योगदान खरोखरीच फार मोठे होते. ना. म. जोशींची सोशल सर्व्हिस लीगदेखील मुंबईतील कामगार वर्गासाठी व दलितांसाठी काम करीत असे.

## काळाराम मंदिर सत्याग्रह

नाशिकमधील काळाराम मंदिर अस्पृश्यांना खुले करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी निकराचा लढा प्रदीर्घ काळ चालू ठेवला. ३ मार्च १९३० रोजी आरंभ केलेल्या या सत्याग्रहाची पूर्वतयारी बाबासाहेब व त्यांचे सहकारी अमृतराव रणखांबे, भाऊराव कृष्ण ऊर्फ दादासाहेब गायकवाड, पतितपावनदास, सावळाराम दाणी, पी. जे. रोहम, सुभेदार घाटगे, भा. र. कद्रेकर, देवराव नाईक, सी. ना. शिवतरकर, पां. न. राजभोज वगैरे तीन महिन्यांपासून करीत होते. याच वेळी लाहोरच्या ठरावानुसार महात्मा गांधी व काँग्रेस पक्ष स्वातंत्र्यासाठी सविनय कायदेभंग आंदोलनाची पूर्वतयारी करीत होता. त्यामुळे गांधीजींना मंदिरप्रवेशाविषयी पूर्ण आस्था असूनही, हा प्रश्न तेव्हा आद्यक्रमाचा वाटला नाही. सत्याग्रहाआधी एका भाषणात आंबेडकरांनी आपली भूमिका पुढील शब्दांत स्पष्ट केली, "रामाच्या मंदिरात आम्हाला प्रवेश मिळाल्याने आमचा खराखुरा प्रश्न झटपट

सुटणार आहे असे मुळीच नाही.... पण आम्ही उच्चवर्णीय हिंदू मनाची ही एक परीक्षा घेत आहोत. माणसाला माणूस म्हणून वागवावे ; माणसाला माणुसकीचे अधिकार द्यावेत ; मानवतेची प्रतिष्ठापना करावी या नवयुगातील उच्च प्रेरणा हिंदुमन मानावयास तयार आहे का नाही, याचीच कसोटी लागणार आहे. हेच साध्य करण्यासाठी आम्ही सत्याग्रहाचा निर्णय घेतला आहे"[१३]

दलितांच्या सत्याग्रहास मुंबई सरकारची सहानुभूती मिळण्याची शक्यता नव्हती. गृहमंत्री हॉटसन व मध्य विभागाच्या कमिशनरने मंदिरप्रवेश सत्याग्रहाची घटना शांतता व सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून हाताळावी, अशी कलेक्टरला सूचना केली. कमिशनरने ५ मार्च १९३० च्या पत्रातून नाशिकचा कलेक्टर आर. जी. गॉर्डन यास आदेश दिला की, "महारांना मंदिरात प्रवेश करण्यास जशी आपण मदत करावयाची नाही, तशीच महारांना मंदिराबाहेर ठेवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांनाही आपण साहाय्य करावयाचे नाही". कलेक्टरने मंदिराचे दरवाजे बंद करण्याचा हुकूम आधीच दिला होता. सरकारने उदासीनता व संवेदनशून्यताच दाखवली.

आंबेडकर व दलित नेत्यांखेरीज देवराव विष्णू नाईक, गंगाधर नीळकंठ सहस्रबुद्धे, भालचंद्र विठ्ठल प्रधान, भास्कर रघुनाथ कद्रेकर वगैरे सवर्ण हिंदू या सत्याग्रहात सक्रिय झालेले होते. तसेच बाळ गंगाधर खेर, स्वामी आनंद, बाळकृष्ण जनार्दन मराठे, गोविंद हरी देशपांडे व इतर काँग्रसजनांचाही या सत्याग्रहास पूर्ण पाठिंबा होता. अनेक जण खादीचे कपडे परिधान करून सत्याग्रहस्थळी महात्मा गांधींचा जयजयकार करीत असल्याचे ३ मार्च रोजी कमिशनरने समक्ष पाहिले होते. तशी त्याने अहवालात नोंद केली[१४].

३ मार्च १९३० रोजी आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली निघालेली प्रचंड मिरवणूक शांततेने पार पडली. देवळाचे दरवाजे बंद असल्याने देवळाच्या चारही दिशांच्या दरवाजांसमोर धरणे धरण्यात आले. चांगदेव खैरमोडे यांनी आंबेडकर चरित्रात दिलेल्या १४५ सत्याग्रहींच्या नावांमध्ये ३९ महिलांचाही समावेश आहे. गांधीजींनी १९२० च्या असहकार चळवळीत मिळविलेल्या महिलांच्या सहभागाची ही परिणती मानली गेली होती. काळाराम मंदिर सार्वजनिक नसून खासगी असल्याचा दावा

पुजारी करू लागले. परंतु त्याला दरवर्षी सरकारचे अनुदान मिळत असल्याने त्यांचा दावा फोल होता. या प्रकरणी कलेक्टरने भाऊराव गायकवाडांना भेट देण्यासही नकार दिला होता.

रामनवमीच्या वेळी नाशिकात तणाव वाढला. १ एप्रिलला पुजाऱ्यांनी देवळाचे दरवाजे उघडल्यावर दलितांचा सत्याग्रह पुन्हा सुरू झाला. ३ एप्रिलला राजभोज यांच्यासह बारा जणांना अटक झाली. नंतरच्या दोन दिवसांत ६८ जण पकडले गेले. आंबेडकरांसह २०० सत्याग्रहींची तुकडी ७ एप्रिल रोजी पुजाऱ्यांच्या घराजवळून गेली, तर काही जणांनी देवळात प्रतीकात्मक प्रवेश केला. रथयात्रेच्या वेळी अस्पृश्य लोक रथाच्या मिरवणुकीत सामील झाले. त्यामुळे दोन्ही पक्षांमध्ये बाचाबाची होऊन मारामारी व दगडफेक झाली. जखमी झालेल्यांमध्ये बहुतेक महार होते. सवर्णांनी त्यांच्या काही झोपड्या जाळल्या. मात्र तरीही सनातन्यांनी केलेला हल्ला पूर्वनियोजित होता असा आरोप करण्यास पुरावा नाही, असे कलेक्टरने अहवालात नोंदविले होते. तथापि आंबेडकरांनी गव्हर्नरला लिहिलेल्या पत्रावरून दिसते की, सनातन्यांप्रमाणेच सवर्ण हिंदू पोलिसांनीही दलितांवर हल्ला केला व पक्षपात केला ; शिवाय कलेक्टरचे धोरण दलितविरोधी होते. कलेक्टरने काळाराम मंदिर परिसरात १४४ कलम जारी केले.

गांधीजींच्या मिठाच्या सत्याग्रहाने मुंबई सरकार संत्रस्त झाल्यामुळे गृहमंत्री हॉटसन काळाराम सत्याग्रह थांबवण्यासाठी आंबेडकरांना सांगत होता. तशात २७ एप्रिलला पिंपळगावमध्ये सवर्णांनी महारांना जबर मारहाण केली. या प्रकारांना विटलेल्या ५० महारांनी मुसलमान होण्याचे ठरविले. पण आंबेडकरांच्या निरोपानुसार बहुतेकांनी हा बेत बदलला. मात्र सात महारांनी इस्लामचा अंगीकार केलाच. आंबेडकरांनी लवकरच सत्याग्रह थांबवला. ऑगस्ट १९३० मध्ये कामटीत भरलेल्या अधिवेशनात आंबेडकरांनी गांधीजी व काँग्रेसच्या सविनय कायदेभंग आंदोलनावर विनाकारण टीका केली. तसेच सायमन आयोगाच्या शिफारशींमुळे आमची निराशा झाली व भ्रमनिरास झाला अशीही त्यांनी टीका केली.

नंतर डॉ. आंबेडकर गोलमेज परिषदेच्या पहिल्या सत्रासाठी लंडनला गेले असताना तेथून ते भाऊराव गायकवाड व सीताराम नामदेव शिवतरकर यांना पत्रे पाठवून नाशिकच्या सत्याग्रहाविषयी मार्गदर्शन करीतच होते. ठरल्यानुसार सत्याग्रह झालाच पाहिजे असे त्यांनी गायकवाडांना पुन्हा कळवले. गांधीजी २५ जानेवारी १९३१ रोजी कारावासातून मुक्त झाले होते. राष्ट्रीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या व निकडीच्या विषयांवर वाटाघाटी करण्यासाठी व्हाइसरॉय आर्यविन यांनी महात्मा गांधींना तात्काळ नवी दिल्लीत बोलावलेले होते. किंबहुना त्यासाठीच गांधीजी व काँग्रेस पुढाऱ्यांना कारावासातून मुक्त करण्याचा आर्यविन महोदयांचा आदेश होता. अशा अत्यंत निर्वाणीच्या वेळी काळाराम सत्याग्रहास काँग्रेसचा पाठिंबा मिळविण्यासाठी भाऊराव गायकवाडांनी गांधीजींना पत्र लिहिले. मात्र राष्ट्रीय महत्त्वाच्या विषयावर वाटाघाटी चालू असताना मंदिरप्रवेशाचा प्रश्न हाती घेण्याची ही वेळ नव्हे, असे गांधीजींनी उत्तर दिले.

१५ मार्च १९३१ रोजी काळाराम मंदिर सत्याग्रहाच्या दुसऱ्या फेरीच्या निमित्ताने नाशिकमध्ये पाच हजार लोकांची मिरवणूक निघाली. या मिरवणुकीत भाऊराव गायकवाड, राजभोज, देवराव नाईक आणि काँग्रेसमधील ब्राह्मणेतर पुढारी दिनकरराव जवळकर हे नेतेही होते. सवर्ण लोकांनी मिरवणुकीवर जोरदार दगडफेक केली आणि काहींना खूप मारहाण केली. दिनकरराव वगैरे जखमी झाले होते. रामनवमी २८ मार्च रोजी असल्यामुळे तणाव वाढत राहिला. म्हणून हा नवमीचा उत्सव संपेपर्यंत मंदिराचे दरवाजे बंद ठेवण्यात आले. रथयात्रादेखील काढली नाही. १४४ कलम जारी करण्यात आले. अखेर सरकारी आदेशामुळे दोन्ही पक्षांना संयम पाळावा लागला.

गोलमेज परिषदेच्या दुसऱ्या सत्रातील वाटाघाटींचे गुऱ्हाळ लंडनमध्ये चालू असताना, नाशिक जिल्ह्यात सवर्ण विरुद्ध महार असा तणाव आणि मारामाऱ्या सुरू राहिल्या. २३ सप्टेंबर १९३१ रोजी मुखेड गावी महारांनी पांडवप्रताप ग्रंथाची पालखीतून मिरवणूक काढली असता झालेल्या मारामारीत गायकवाडांसह बरेच महार जखमी झाले.

त्यानंतर महार मंडळींनी नोव्हेंबर १९३१ मध्ये काळाराम मंदिर सत्याग्रहाची तिसरी फेरी सुरू केली. ६ व ७ नोव्हेंबरला पोलिसांनी मारामारीच्या आरोपाखाली काही सवर्ण हिंदू व महारांना अटक केली, आणि न्यायालयाने त्यांना सजा दिली. त्यांच्यात काँग्रेसच्या अस्पृश्यतानिवारक समितीचे चिटणीस स्वामी आनंद हे होते. भाऊराव गायकवाडांनी त्यांच्याकडे मदतीसाठी विनंती केली असता स्वामी आनंद यांनी पत्राद्वारे गायकवाडांना कळवले की, "सद्यःस्थितीत काँग्रेस स्वतःच कारावासात असल्यामुळे नाशिक सत्याग्रहास नैतिक पाठिंबा देण्यापलीकडे काँग्रेस काहीच करू शकणार नाही. शिवाय सामुदायिक सत्याग्रहाचे तंत्र केवळ स्वातंत्र्य मिळवण्यासाठीच वापरणे हे काँग्रेसचे धोरण होय". इतकेच नव्हे तर काँग्रेसने नाशिक सत्याग्रहास जो नैतिक पाठिंबा दिला होता, त्याचा अनेक काँग्रसजनांनी जाहीर निषेध केला होता. दिलेल्या पाठिंब्याचा निषेध म्हणून नाशिकचे ज्येष्ठ काँग्रेसजन वासुदेवराव आकूत, पांडे, आत्माराम रणछोड वगैरे कारावासातून बाहेर पडल्यावर त्यांनी पक्षाचा राजीनामा देऊन निषेध व्यक्त केला. काँग्रेसने या प्रकरणात पडून अपयश पत्करू नये, असे रघुनाथ हरी गद्रे यांच्यासारखे महारांच्या मंदिरप्रवेशाला अनुकूल असलेले काँग्रेस कार्यकर्तेही सरदार पटेल व स्वामी आनंद यांना सांगत होते. नाशिकमधील तणाव वाढून भोसकाभोसकीचेही काही प्रकार झाले. त्यात कवी व नाटककार वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांच्यावरही शहरात असाच हल्ला झाला होता. (फडके, खंड ४, पृ. २७९-८०).

**आंबेडकरांच्या काळाराम व इतर आंदोलनांमध्ये कलोनिअल सत्ताधीशांनी त्यांना कधीच मदत केली नाही, किंवा कधीच सहानुभूती दाखविली नाही. इंग्रज बहुतांश उदासीन राहिले. दलितांच्या सत्याग्रहाकडे अधिकाऱ्यांनी कायदा व सुव्यवस्थेचा विषय याच दृष्टिकोणातून पाहिले.** हेच पाहा ना, मुंबई राज्याचा गृहसचिव आर. एम. मॅक्सवेल याने नाशिकच्या रामकुंडात स्नान करण्यास अस्पृश्यांना परवानगी तर दिलीच नाही. पण त्या परिसरात १४४ कलम जारी करण्याचा आदेश दिला होता. सरकारी दस्तऐवजांमधून मला इंग्रजांचा सत्याग्रहाबाबतचा सतत विरोध दिसून आला. मात्र इंग्रजांनी दलित

नेत्यांचा गांधीजी व काँग्रेसच्या विरुद्ध भरपूर उपयोग करून घेतला. डॉ. आंबेडकरांनी वेळोवेळी गांधीजींवर आणि काँग्रेसवर प्रखर टीका केली. तथापि त्यांना गांधीप्रणीत सत्याग्रहाच्या आचारप्रणालीचाच उपाय व तंत्र आचरणात आणावे लागले. सत्याग्रह करताना कार्यकर्त्यांनी खादीचे कपडे घालावे, असाही सल्ला सत्याग्रहींना देण्यात आला होता. **कलोनिअल सत्तेने निःशस्त्र करून ठेवलेल्या भारतीयांना गांधीवादी सत्याग्रह हाच एक आंदोलनाचा मार्ग उपलब्ध होता.**

१५ व १७ एप्रिल १९३२ रोजी रामनवमी व रथयात्रा असल्यामुळे दलितांनी पुन्हा काळाराम मंदिरात शिरण्याचा व रामकुंडात स्नान करण्याचा प्रयत्न केला. पण पोलिसांनी त्यांना मज्जाव केला. याउलट कलेक्टरने सनातनी लोकांना पुजाऱ्याच्या प्रवेशद्वारातून मंदिरात जाण्यास परवानगी दिली व तसा आदेश काढला. मंदिरप्रवेश करण्याचा प्रयत्न करणाऱ्या महार बायकांना मात्र मारहाण करून पोलिसांनी अटक केली. सरकारचे धोरण मूलतः कर्मठांनाच अनुकूल होते. सत्याग्रहाच्या या फेरीत भाऊराव गायकवाड, रणखांबे, सावळाराम दाणी व हरीभाऊ जाधव यांना अटक करून त्यांना शिक्षा देण्यात आल्या. कलेक्टरने दंड संहितेनुसार चौकशी केली. तथापि चौकशीचा निकाल सनातनी पक्षाच्याच बाजूने लागला. त्यावर दलितांनी मुंबई हायकोर्टात अपील केले. पण तेही नोव्हेंबर १९३२ मध्ये फेटाळले गेले. **सतत तीन वर्षे चळवळ करून व मार खाऊन आणि अनेकांनी कारावास भोगूनही काळारामचा दरवाजा अस्पृश्यांसाठी उघडला नाही. दलितांनी सत्याग्रहाच्या तीन फेऱ्या केल्या. पण यश लाभले नाही.**

इतके मात्र खरे की, या सत्याग्रहामुळे दलितांमध्ये हक्क व आत्मभानाची जाणीव निर्माण झाली. त्यासाठी लढा कसा द्यावा हे शिकवणे हा आंबेडकरांचा हेतू अंशतः सफल झाला. त्यांचे अनुयायी वाढले. महार महिलाही चळवळीत उतरल्या. पुढील चळवळीसाठी कार्यकर्ते तयार झाले. नाशिकमध्ये आंबेडकरी चळवळीचे केंद्र तयार झाले. काळाराममधून आणखीही स्पष्ट झाले की, काही गांधीवादी कार्यकर्ते व केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर, शंकरराव देव व सेनापती बापट यांच्यासारखे वगळता बहुतेक पुढारी मंदिरप्रवेश चळवळीपासून

इतःपर लांब राहू लागले. बहुसंख्य काँग्रेसजन, समाजवादी व कम्युनिस्टांनाही मंदिरप्रवेश हा महत्त्वाचा भाग वाटत नव्हता. खुद्द आंबेडकरांनाही मंदिरप्रवेशापेक्षा दलितांच्या नागरी हक्कांचा विषय अधिक महत्त्वाचा वाटू लागला. जानेवारी १९३३ मध्ये तिसऱ्या गोलमेजनंतर परत आल्यावर आंबेडकर गांधीजींना तुरुंगात जाऊन भेटले. तेव्हा त्यांनी गांधीजींना विनम्रपणे सांगितले की, अस्पृश्यांच्या मंदिरप्रवेशासाठी त्यांनी आपले प्राण पणाला लावू नयेत. कारण देवळे खुली झाल्याने आमचे समाधान होणार नाही ; वर्णव्यवस्था व जातिव्यवस्थाच नष्ट व्हायला हवी.

दुसऱ्या गोलमेज परिषदेत काही भारतीय पुढाऱ्यांनी दाखवलेले आपले हीन अंतरंग तसेच दुही व स्वार्थी राजकारणाचे घृणास्पद दर्शन यामुळे गांधीजी व काँग्रेस व्यथित झाली होती. पंतप्रधानाच्या तथाकथित जातीय निवाड्यामुळे अनेक राजकीय समीकरणे बदलली होती. अस्पृश्यांना 'स्वतंत्र मतदारसंघ' देण्याच्या मुद्यावरून डॉ. आंबेडकर व महात्मा गांधी यांच्यात तीव्र मतभेद झालेले होते. गांधीजी व काँग्रेसच्या मते दलितांना स्वतंत्र मतदारसंघ नाकारणे हा हिंदू समाजात ऐक्यभाव टिकवून ठेवण्याचा मुद्दा होता. स्वतंत्र मतदारसंघांमुळे हिंदू समाजाचे विघटन होईल व त्याची झळ दलितांनाच भोगावी लागेल असे गांधीजी पोटतिडकीने सांगत होते. म्हणून या पार्श्वभूमीवर १९३२-१९३३ या काळात गांधीजींनी केलेल्या देशव्यापी दलितोद्धार कार्याकडे पाहणे उचित होईल.

## गांधीप्रणीत अस्पृश्योद्धार

महात्मा गांधी महाडच्या उपरोक्त उपाख्यानापासून अस्पृश्योद्धार चळवळीस अधिकाधिक योगदान देऊ लागले होते. 'अस्पृश्यतेचे समर्थन होऊच शकत नाही ; ही एक अमानुष प्रथा असून ती कोलमडत आहे, तरी कर्मठ पक्षाचे लोक रानटी बलप्रयोग करून टिकवू पाहत आहेत' असे गांधीजींनी प्रतिपादन केले होते. महाडमध्ये उद्‌भवलेल्या अत्यंत प्रक्षोभक परिस्थितीतही तथाकथित अस्पृश्यांनी प्रशंसनीय संयम राखून हा प्रश्न सोडविण्यासाठी चांगला सत्याग्रह केला याचे गांधीजींनी कौतुकही केले. बऱ्याच सवर्णांनी या कामी योगदान दिले हे सामाजिक परिवर्तनाचे द्योतक असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. विशेषतः आंबेडकरांच्या

भूमिकेचे गांधीजींनी २८ एप्रिल १९२७ च्या **यंग इंडिया** पत्रकात दिलखुलास समर्थन केले. ४ जून १९३१ च्या **यंग इंडिया** मध्येही गांधीजींनी अस्पृश्यतेचा केलेला निषेध आणि व्यक्त केलेली घृणा व धिक्कार हा त्यांच्या अस्पृश्यतेबाबतच्या विचारसरणीचा गाभा मानता येईल. "Untouchability is a sin, a grievous crime and it will eat up Hinduism if the latter does not kill the snake in time. Untouchables should no longer be the outcastes of Hinduism. They should be regarded as honoured members of Hindu Society....." (**Young India**, 4 June 1931).

१९१८ पासून गांधीजी 'अंत्यज' हा शब्द वापरत होते. असे त्यांच्या वाङ्मयावरून दिसते. मात्र नंतर एका सहकाऱ्याच्या सूचनेनुसार त्यांनी हरिजन ही संज्ञा स्वीकारली (६ ऑगस्ट १९३१).

महात्मा गांधींच्या अस्पृश्योद्धार कार्याचे दलित नेत्यांनी त्यांना पुरेसे श्रेय दिलेले दिसत नाही. तथापि दलितोद्धारासाठी नोव्हेंबर १९३३ पासून ऑगस्ट १९३४ पर्यंतच्या दहा महिन्यांत गांधीजींनी वीस हजार किलोमीटरचा 'हरिजन दौरा' केला. उपोषणांत कृश झालेला देह झिजवला. त्यासाठी काँग्रेसच्या राजकारणातून त्यांनी लक्ष कमी केले होते. त्यासाठी नेहरू, पटेल इ. सर्वांचा थोडाफार रोषही पत्करला होता. दलितांच्या उद्धारासाठी गांधीजींनी अनेकदा अन्नसत्याग्रह केले. त्यांनी **यंग इंडिया, हरिजन** वगैरे पत्रकांमधून आवाहने केली, मार्गदर्शन केले व अगणित लोकांच्या शंकांचे निरसन केले. तसेच सनातन्यांचा धिक्कार केला. गांधीजींचे हे विचारधन **यंग इंडियाच्या** अगणित अंकांमध्ये विखुरलेले आहे. बाळासाहेब खेरांचे चिरंजीव व्ही. बी. खेर यांनी त्या अंकांतील उताऱ्यांचे संकलन करून गांधीजींच्या अस्पृश्योद्धार कार्यासंबंधीचे उतारे **सोशल सर्व्हिसः वर्क अँड रिफॉर्म** नामक तब्बल ४६७ पृष्ठांच्या ग्रंथात प्रकाशित केलेले आहेत.[१५] त्याची आंबेडकरवाद्यांनी वा अभ्यासकांनी दखल घेतलेली दिसत नाही! प्रस्तुत इतिहासकाराने मात्र या ग्रंथाचा आधार घेतलेला आहे.

अमृतलाल ठक्कर ऊर्फ ठक्करबाप्पा यांनी आदिवासी आणि पददलितांच्या उद्धारासाठी व अस्पृश्यता निवारणासाठी संपूर्ण आयुष्य वाहून घेतले होते. त्यांच्या महान कार्याचा उचित गौरव करणे आवश्यकच आहे. गांधीजी येरवडा कारागृहात असतानाच त्यांच्या सूचनेनुसार ३० सप्टेंबर १९३२ रोजी उद्योगपती घनश्यामदास बिर्ला आणि ठक्करबाप्पा यांनी मुंबईत हिंदूंची जाहीर सभा भरविली. याच सभेत अस्पृश्यतानिवारण संघ स्थापन झाला. लवकरच या संघाचे **'हरिजनसेवक संघ'** असे नामांतर करून बिर्लांना अध्यक्ष व ठक्करबाप्पा यांना सरचिटणीस करण्यात आले. या संघाच्या बऱ्याच खर्चाची जबाबदारी बिर्लांनी उचलली होती. गांधीजी तुरुंगातूनच मंदिरप्रवेश व अस्पृश्यतानिवारणाची चळवळ चालवत होते. या काळातच केरळातील **गुरुवायुर मंदिर** खुले करण्यासाठी के. केलप्पन वगैरे उपरोक्त अन्नसत्याग्रह करीत होते. त्यांना पाठबळ देण्यासाठी आपणही अन्नत्याग करू, असे पत्रक गांधीजींनी ४ नोव्हेंबर १९३२ रोजी तुरुंगातून प्रसिद्ध केले होते. त्याच काळात तुरुंगात असलेल्या अप्पासाहेब पटवर्धनांनी अन्नसत्याग्रह करून तुरुंगातील सफाईगाराचे काम (भंगीकाम) मिळविले होते. या प्रकरणी गांधीजींनीही उपोषण करून सरकारला नियम बदलायला लावले होते. ठक्करबाप्पा, अप्पासाहेब, बिर्ला या सर्वांचे चळवळीतील महत्त्वाचे योगदान मान्य करावेच लागते. ठक्करबाप्पा यांनी प्रसिद्धीच्या झोतात न येता अस्पृश्यतानिवारण कार्यास वाहून घेतले होते.

तुरुंगातून सुटका झाल्यावर गांधीजींनी अस्पृश्यतानिवारणाचा प्रचार करण्यासाठी ११ फेब्रुवारी १९३३ रोजी **हरिजन** साप्ताहिक सुरू केले. आर. व्ही. शास्त्री या साप्ताहिकाचे संपादक असले, तरी बराचसा मजकूर गांधीजींचा असे. मात्र पहिल्या अंकासाठी संदेश देण्यासही डॉ. आंबेडकरांनी नकार दिला होता. कारण वर्णाश्रमव्यवस्था आणि जातिव्यवस्था संपूर्णतया नष्ट केल्याखेरीज अस्पृश्यता नष्ट होणारच नाही, असे आंबेडकरांचे तेव्हा मत होते. मात्र या वादात शिरण्याचे इथे प्रयोजन नाही.

**गांधीजींचा हरिजन दौरा :—**दहा महिने चाललेल्या २०,००० किलोमीटरच्या हरिजन दौऱ्यात महात्माजींनी संपूर्ण भारतीय उपखंड पालथा घातला. असंख्य

ठिकाणी पदयात्राही केली. प्रतिदिनी त्यांनी पददलितांच्या धार्मिक, सामाजिक व आर्थिक समस्यांचा समक्ष अभ्यास केला. आणि त्या समस्या सोडविण्यासाठी सर्वोत्तम व व्यवहार्य पद्धती सुचविल्या. हा दौरा परिवर्तनवादी थाटाचा असल्यामुळे त्यात हजारो कर्मठांचे मतपरिवर्तन झाले, असे दिसते. या दौऱ्यात अस्पृश्यतानिवारणासाठी त्यांनी आठ लाख रुपयांचा निधी संकलित केला. हा दौरा करीत असतानाच पुण्यात कर्मठांनी गांधीजींचा खून (१९३४) करण्याचाही प्रयत्न केला होता. याबाबतचे विवेचन या ग्रंथात केलेलेच आहे. दुसरी दुर्घटना अजमीरमध्ये घडली. तिथे सनातनी पंथाचे पंडित लालनाथ गांधीजींच्या सभेत आले असताना एका जहाल सुधारक युवकाने लालनाथच्या डोक्यात काठी हाणली होती. याच दौऱ्यात सुप्रसिद्ध गुरुवायुर मंदिरात हरिजनांना प्रवेश देण्यासाठी मतदान झाले होते. मतदान केलेल्या २०,१६३ हिंदू भाविकांपैकी १५,५६३ म्हणजेच ७७ टक्के भाविकांनी गुरुवायुर मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश देण्यास संमती व्यक्त केली व १० टक्के तटस्थ राहिले. तर केवळ १३ टक्के भाविकांनी प्रतिकूल कौल दिला होता. याचा अर्थ, पुरोगामी विचारसरणीची प्रगती अत्यंत उत्साहकारक होती. शिवाय या उपक्रमातील अत्यंत स्तुत्य बाब अशी होती की, एकूण मतदारांपैकी ८००० भाविक महिला होत्या. हे यश नेत्रदीपक होते. शिवाय गुरुवायुरमधील हिंदू लोक नाशिककरांपेक्षा खूपच पुरोगामी आहेत, हेही दिसून आले.

हरिजन दौरा चालू असतानाच अमरावतीचे अंबामातेचे मंदिर अस्पृश्यांना खुले झाले. याकामी १९२६-२७ साली दादासाहेब खापर्डे व इतरांना अपयश आले होते. वऱ्हाडची भूतपूर्व राजधानी असलेल्या एलिचपूरमधील (लोकसंख्या ३८०००) प्रसिद्ध दत्तात्रेय देवालय जमनालाल बजाज व डॉ. शिवाजीराव पटवर्धनांच्या प्रयत्नांनी आधीच जुलै १९२९ मध्ये खुले झालेले होते. बजाज सरचिटणीस असलेली काँग्रेस समिती दलितांच्या कल्याणासाठी देशभर झटत होती. या समितीच्याच विद्यमाने ॲड. सयाजी लक्ष्मण सिलम मुंबईतील हिंदू मंदिरे अस्पृश्यांसाठी खुली करत होते. वऱ्हाड प्रांतात अमरावतीच्या हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या पन्नास शाखा होत्या. अमरावतीतील मुख्य शाखेत

दररोज एक हजार युवक तालीम घेत. या संघटनेत डॉ. पटवर्धनांनी अस्पृश्य मुलांनाही प्रवेश दिला होता.

बऱ्याच सवर्णांच्या घरी अस्पृश्य स्वयंपाकी ठेवण्यास प्रोत्साहन देण्यात आले. एका सभेत गांधीजींनी प्रतिपादन केले, "धिस इज अ मुव्हमेंट फॉर प्युरिफिकेशन ऑफ हिंदुइझम". अस्पृश्यतेच्या धोरणाबाबत बडोदा संस्थान इतर प्रदेशांपेक्षा अधिक प्रागतिक होते. धुळ्यासारख्या शहरातही अस्पृश्यतानिवारण समिती होती. या समितीने एका पत्रकात खुली केलेली मंदिरे व विहिरींची माहिती छापली होती. मात्र अशा पत्रकांमध्ये अतिशयोक्ती असल्याची गांधीजींना कल्पना होती.

महात्मा गांधींचा हरिजन दौरा चालू असताना १६ जानेवारी १९३४ रोजी बिहारमध्ये झालेल्या महाभीषण भूकंपाने वीस हजार माणसे आणि अगणित प्राण्यांना अक्षरशः गिळंकृत केले होते. भूकंपामुळे ४८,००० चौरस किलोमीटर भूभागातील जमिनीची उलथापालथ झाली. ते महाभयानक दृश्य पाहून झालेल्या वेदनातिरेकाने गांधीजी म्हणाले होते, "पददलितांवर समाजाने केलेल्या अत्याचारांसाठी निसर्गाने दिलेली ही शिक्षा होय![१६]

या संपूर्ण कालखंडात औंधचे ब्राह्मण अधिपती पंत प्रतिनिधी सर्वतोपरी विलक्षण पुरोगामी होते. त्याच्याइतका दुसरा प्रागतिक अधिपती महाराष्ट्रात तर नव्हताच, पण भारतातही अगदी अत्यल्प असावेत! पंतांनी १९२३ पासून अस्पृश्योद्धार कार्य हाती घेतले होते. प्रारंभी गरिबी व पारंपरिक अज्ञानामुळे पददलित लोक राजाच्या सुधारणावादी प्रयत्नांना प्रतिसाद देत नसत. मंदिरप्रवेशात त्यांना रस नव्हता. यानंतर थोर समाजसुधारक विठ्ठल रामजी शिंदे व संस्थानाचे कारभारी पंडित सातवळेकर यांनी औंध संस्थानात अस्पृश्यतानिवारण मोहीम उभारली. सर्व ७२ गावांमध्ये प्रचार केला. पंतांच्या आदेशानुसार त्यांनी दलितांसाठी भजने व कथा-कीर्तने आणि मेळावे भरविले. पंतांच्या वजनामुळे या प्रयत्नांना सवर्णांनी हरकत घेतली नाही हे विशेष होय. पंतांनी अस्पृश्यांसाठी शाळा उघडून मोफत शिक्षण दिले. पंडित सातवळेकरांनी गांधीजींना सादर केलेल्या अहवालात (मार्च १९३३) नमूद केले की, संस्थान प्रशासनाच्या

शाळांमध्ये काही हरिजन मुलेही आहेत ; अस्पृश्यांना देवळे खुली झाली आहेत. स्वच्छतेच्या निकषाला उतरलेल्या दलित घरमालकांना राजे पारितोषिके देतात. या उपक्रमामुळे त्यांची घरे व महारवाडा कित्येक सवर्णांच्या घरांपेक्षाही अधिक स्वच्छ दिसू लागला. एकूण १०५ बक्षिसांपैकी निम्मी बक्षिसे हरिजनांनी मिळविली होती. राणीसाहेब हरिजनांच्या घरी जात व विवाह सोहळयांमध्ये हजर असत. त्यांनी संक्रांतीच्या निमित्ताने हरिजन महिलांना राजवाड्यात बोलावून तिळगूळ व भेटवस्तू वाटल्या होत्या.

औंधमध्ये स्पृश्यास्पृश्यतेला थारा राहिला नव्हता. पण तरीही तेथील सवर्ण ब्राह्मणेतरांना हे परिवर्तन फारसे आवडले नव्हते. शिवाय महार लोक स्वतःला मांगांपेक्षा श्रेष्ठ समजू लागले. शहरांमध्ये अस्पृश्यता नसली, तरी खेड्यांमध्ये हा दोष पूर्णपणे दूर झाला नव्हता. उदार मतवादी संस्थानिक व वेदविद्या पारंगत असलेले पं. सातवळेकर यांच्या अस्पृश्यतानिवारण कार्याचा गांधीजींनी उचित गौरव केला व त्यांना धन्यवाद दिले.[१७]

वि. रा. शिंदे देखील अत्यंत तळमळीने अस्पृश्योद्धार कार्य करीत. त्यांनी औंध संस्थानात पायपीट केली. अवर्णांनी पंतांच्या देकारांचा लाभ घ्यावा यासाठी त्यांनी जिवाचे रान केले. प्रारंभी महारांनी त्यांना प्रतिसाद न दिल्याने ते व्यथितही झाले होते. १९२९ मधील पूर्वोक्त पर्वती सत्याग्रह अयशस्वी झाला होता हे खरे. पण त्याचा ध्यास घेतलेले यूथ लीगचे युवक व ब्राह्मण सभा, स्टुडन्ट्स ब्रदरहूड आणि भोपटकरांचे अस्पृश्यतानिवारक मंडळ आपले कार्य करीतच होते. त्यांना गांधीजींचे उत्तेजन लाभले होते. महाराष्ट्र या सुधारणा मोहिमेत आघाडीवर होता.

गांधीजी आपला हरिजन दौरा संदिग्ध हेतूंसाठी करीत आहेत, असे अनेक काँग्रेस पुढाऱ्यांनाही वाटत होते. खुद्द नेहरूंना व जहालांना हे विषयांतर व वेळेचा अपव्यय वाटत होता. म्हणूनच राज्यकर्ते हरिजन दौऱ्यास मदत करीत. मात्र काँग्रेसमधील बऱ्याच सनातनी हिंदू सभासदांना गांधींचा हा उपक्रम नापसंत होता. त्यामुळे मदन मोहन मालवीय व न. चिं. केळकर वगैरे त्यांना सोडून गेले; आणि त्यांनी वेगळे पक्ष काढले. अशाच मंडळींनी सनातन्यांचा अनुनय करण्याच्या

उद्देशाने कायदेमंडळात सरकारी सदस्यांशी हातमिळवणी करून टेम्पल एंट्री बिल पराभूत केले होते (ऑगस्ट १९३४).

तथापि ब्रिटिश दस्तऐवजांवरून दिसते की, गांधीजींच्या हरिजन उद्धार कार्यामुळे राष्ट्रवाद व स्वातंत्र्याचा संदेश ग्रामीण भागात आणि तळागाळातील पददलितांपर्यंत पोहोचला. त्यामुळे काँग्रेसला दलितांची निष्ठा लाभली. काँग्रेस समाजवादी पक्ष स्थापन झाल्यावर गांधीजींनी २ ऑगस्ट १९३४ रोजी नरेंद्र देवांना फटकारले होते की, आपल्या या नवीन पक्षाच्या विहित कार्यक्रमात अस्पृश्यतानिवारणाचा समावेश करण्यास ते कसे विसरले! अस्पृश्यतानिवारण हे हिंदू धर्माच्या शुद्धीकरणाचे अनिवार्य कार्य होय, असे गांधीजी सभांमध्ये सांगत. त्यांनी म्हटले, "माय लाईफ इज अ डेडिकेशन टू धिस कॉज, अँड आय शाल कंसिडर नो पेनांस टू ग्रेट फॉर द विंडिकेशन ऑफ धिस ट्रूथ".[१८]

धर्मावरील या कलंकाचे प्रक्षालन करण्याचे आणि मंदिरप्रवेशाचे त्यांनी तर्कशुद्ध समर्थन केले. त्यासाठी आग्रह धरला."आफ्रिकेतील कृष्णवर्णीयांसाठी व त्यांच्या समान हक्कांसाठी आम्ही जसा लढा दिला, तसाच लढा भारतीय अवर्ण लोकांसाठीदेखील देणे अगत्याचे आहे", असे गांधीजी जाहीर सभांमधून व लिखाणातूनही प्रतिपादन करीत. वंचितांचा लढा चालवताना गांधीजी भारतीयांना अनेक सवाल करीत–"आम्हास स्वराज्य लाभल्यावर त्यात अस्पृश्यांचे स्थान काय असेल? स्वराज्यात जर ते बंधमुक्त होणार असतील, तर आताच आम्ही त्यांना बंधमुक्त का करीत नाही? आणि आता जर आम्ही त्यांचे सामाजिक विमोचन करण्यास असमर्थ असलो, तर स्वराज्यात कसे समर्थ होऊ "? असे अगणित सवाल विचारून गांधीजी हिंदू समाजाच्या डोळ्यात अंजन घालीत. त्याचा इष्ट परिणाम झालाही! कित्येक दलितेतर कार्यकर्ते हिंदू धर्मावरील तो कलंक पुसण्याकरिता काम करू लागले.

तथापि कर्मठांचा अनुनय करण्यासाठी ब्रिटिश सरकार, मंदिरप्रवेश विधेयकात बदल करून, मंदिरात घुसणाऱ्या अस्पृश्यांवरील गुन्हेगारी खटले रद्द करण्यास तयार नव्हते. मंदिर प्रवेशासाठी एका दलितावर मद्रासमधील कोर्टाने ठोठावलेल्या शिक्षेविरुद्ध राजगोपालाचारी यांनी अपील केले व ते जिंकले होते. दलितांचे

आणि सुधारकांचेही दुर्दैव असे की, भारतातील ब्रिटिश कोर्टांनी अस्पृश्यतेला मान्यता दिली होती. इंग्रजांनी बनविलेल्या आय.पी.सी. अनुसार अस्पृश्याने हिंदू देवळात प्रवेश केल्यास तो शिक्षापात्र गुन्हा ठरविला होता. **म्हणून गांधीजी शंभर वेळा बजावत होते की, अस्पृश्यांवर कायद्याने लादलेले मंदिरविषयक बंधन दूर करण्यासाठी संबंधित कायद्यात बदल करणे आवश्यक होय. परंतु कर्मठ पं. मालवीय यांच्यासारख्यांना कायदा करून अस्पृश्य लोकांना सार्वजनिक पाणवठे व मंदिरांमध्ये प्रवेश देणे अमान्य होते.** त्यासाठी कायदा करणे मालवीयांना नापसंत होते. मंदिरप्रवेश विधेयकास या पंडिताने कसून विरोध केला. परिणामतः दलितांना प्रवेश देण्यास बरेच मंदिर विश्वस्त अनुकूल असूनही दलितांना ते समाधान लाभू शकले नाही. या विषयावर चर्चा करण्यासाठी गांधीजींनी न. चिं. केळकरांना बोलावले असता केळकर म्हणाले—हा प्रश्न कायदा करून सुटणार नाही, हा प्रश्न सामोपचाराने सोडवावा. केळकरांची भूमिका मुळातच लोकानुनयी स्वरूपाची होती.[१९]

तरीही उत्तरोत्तर गांधीजींच्या मंदिरप्रवेश चळवळीस यश येऊ लागले. सनातनी समजल्या गेलेल्या मद्रास इलाख्यातील व त्रावणकोर संस्थानातील अनेक सुप्रसिद्ध देवालये अस्पृश्यांना खुली झाली. त्रावणकोरच्या महाराजांसाठी खास घडविलेल्या **पद्‌मनाभ मंदिरात** गांधीजींनी अस्पृश्यांसमवेत प्रवेश केला होता. पण त्यास कर्मठांनी विरोध केला नाही. तत्पूर्वी या मंदिराजवळच्या कोणत्याही रस्त्यावरून दलितांना चालण्यासही परवानगी नव्हती. हा मंदिरप्रवेश म्हणजे स्वप्नपूर्तीच होती. याच संस्थानातील **वायकोमचे देवालयदेखील** खुले झाले होते. तत्पूर्वी गांधीजींना सांगण्यात आले होते—"तुम्ही उत्तरेतील काही मंदिरे दलितांना खुली केली असतील ; तथापि कोचिन आणि त्रावणकोरमधील मंदिरे खुली करण्यात तुम्हाला कदापि यश लाभणार नाही." ही भविष्यवाणी १९३६-१९३७ सालांमध्ये खोटी ठरली. महात्मा गांधींनी **कन्याकुमारीमधील सुप्रसिद्ध देवीच्या मंदिरात** अगणित अस्पृश्य अनुयायांसह भजन म्हणत प्रवेश केला होता. त्या ऐतिहासिक प्रसंगाच्या स्मृती या मंदिरात जतन करून ठेवलेल्या आहेत. प्रस्तुत अभ्यासकाने त्या समक्ष पाहिल्या.

कर्मठपणाचे बालेकिल्ले असे कोसळू लागले. गांधीजींच्या मते पद्मनाभ मंदिराच्या 'जाहीरनाम्याने' सवर्ण व अवर्ण हे दोन्ही प्रवर्ग प्रभावित झाले. मंदिरात जाऊन देवदर्शन घेण्यास अवर्ण प्रवृत्त होऊ लागले. तोपावेतो अवर्ण लोक मंदिरप्रवेशासाठी फारसे उत्सुक नव्हते. त्यांना आर्थिक विमोचन व उन्नती अगत्याची वाटे. मात्र त्रावणकोरच्या या अनुभवाने त्यांचे डोळे उघडले. मंदिरप्रवेशाच्या हक्कामुळे अस्पृश्यता नष्ट झाली. त्यांचा आत्मविश्वास वाढला. त्यांचे दुरित्व दूर झाले. वंचितांचे तिमिर दूर होऊ लागले.[२०]

तंजावरचे मराठा राजे राजाराम भोसले यांच्या अधिपत्याखाली जगप्रसिद्ध **बृहदिश्वर मंदिरासह** ९० देवालये होती. राजाराम महाराजांनी अगदी स्वयंप्रेरणेने व उदार अंतःकरणाने ती सर्व मंदिरे अस्पृश्यांसाठी खुली केली. संगीत, नृत्य, नाटक, साहित्य, स्थापत्य व रंगचित्रकला अशा सर्वच कलांना उत्तेजन देणारे तंजावरचे मराठा राजे पुरोगामी विचारसरणीचेही होते. तंजावरमध्ये रामेश्वरी नेहरू अस्पृश्यतानिवारण मोहीम निष्ठापूर्वक राबवित होत्या. त्यांची इंग्रजी-हिंदीतील भाषणे दुभाषी लोक तामिळमध्ये रूपांतरित करीत. मंदिरप्रवेशाच्या रूपाने त्यांना उत्तम प्रतिसाद लाभला. नेहरू परिवारातील रामेश्वरी नेहरूंच्याच मोहिमेमुळे मदुरा येथील अतिविशाल व सुंदर **मीनाक्षी मंदिरदेखील** लवकरच हरिजनांसाठी खुले झाले (१९३९). हरिजन सेवक संघ व काँग्रेस पुढाऱ्यांच्या मोहिमेमुळे वरील मंदिरांव्यतिरिक्त तामिळनाडू व केरळातील **चिदंबरम्, तिनवेल्ली, श्रीरंगम, पळनी, तिरुपती, कांचिपुरम व गुरुवायुर** येथील मंदिरे हरिजनांसाठी खुली झाली. त्याचप्रमाणे १ जुलै १९४७ रोजी **रामेश्वरचे अतिभव्य मंदिरही** खुले झाले. सनातनत्व जोपासलेल्या दक्षिण भारतातील ही प्रगती निश्चितच नेत्रदीपक होती.

हा झाला महात्मा गांधी व निकटवर्ती यांच्या दक्षिण भारतातील मंदिरप्रवेश चळवळीचा अगदी संक्षिप्त आढावा. मात्र ही चळवळ संपूर्ण हिंदुस्तानभर पसरलेली होती. तिच्यात शेकडो गांधीवादी कार्यकर्ते निष्ठापूर्वक कार्यरत झालेले होते. कर्मठ समाजाचा जीवघेणा विरोध व आडमुठेपणा लक्षात घेता मान्य करावेच लागते की, भारतभरच्या गांधीवादी मंदिरप्रवेश व अस्पृश्यतानिवारण

चळवळीला लाभलेले यश चांगले होते. **बाबासाहेब आंबेडकरांनी मंदिरप्रवेश चळवळ बंद केल्यावर गांधीप्रणीत चळवळ राष्ट्रभर पसरली हे लक्षात घ्यावे लागते.** डॉ. आंबेडकरांनी महात्मा गांधींवर वेळोवेळी केलेली अनाठायी टीका बाजूला सारून, आपल्या या चळवळीच्या संदर्भात गांधीजींनी आंबेडकरांविषयी उदारपणे म्हटले, "Intellectually he is superior to thousands of intelligent and educated caste Hindus. His personal cleanliness is as high as any of us. Today he is an eminent Lecturer in Law. Tommorrow you may find him a Judge of the High Court. In other words, there is no position in Government of this country to which he may not aspire and rise, and to which an orthodox Brahman can rise." (**Harijan**, 20 June 1936).

## पंढरपूर मंदिर सत्याग्रह

तेराव्या शतकापासून विठ्ठलाचे मंदिर महाराष्ट्राचे दैवत मानले जाते. संत ज्ञानेश्वर, नामदेव, जनाबाई, जनार्दन, तुकाराम, रोहिदास, चोखामेळा इत्यादी विविध जातींच्या संतांचे हे आराध्य दैवत! तथापि सवर्णांच्या दुराग्रही प्रतिगामित्वामुळे व कर्मठ आडमुठेपणामुळे या आराध्य दैवताचे समक्ष दर्शन अस्पृश्यांना अनुज्ञेय नव्हते. इतकेच नव्हे तर रोहिदास, चोखामेळा यांसारख्या संतांनादेखील केवळ मंदिराच्या कळसाच्या दर्शनावरच समाधान मानावे लागे. पेशव्यांनी ब्राह्मण बडव्यांना बहाल केलेल्या सनदांमुळे बडव्यांना मंदिराची मालकी प्राप्त झालेली होती. असो. महाराष्ट्राचे हे आराध्य दैवत व मंदिर अवर्णांसाठीही खुले करण्यासाठी १९२० च्या दशकापासून प्रयत्न सुरू झाले. पुणे यूथ लीग व महाराष्ट्र हरिजन सेवक संघ आणि बरेच गांधीवादी कार्यकर्ते मधूनमधून लहानसहान सत्याग्रह करीत. अशा प्रयत्नांना अनेक ठिकाणी चांगला प्रतिसाद मिळून लहानमोठी बरीच देवळे मुक्त झालीदेखील. मात्र पंढरपूरचे बडवे विठोबाचे मंदिर खुले करण्यास तयार नव्हते. शिवाय आय.पी.सी. म्हणजे भारतीय दंडसंहितेतील तरतुदींचा अडसर होताच. ब्रिटिशांना बडव्यांच्या मनाविरुद्ध कायदा बदलण्याची इच्छा नव्हती.

१९३० सालातील नाशिकच्या काळाराम मंदिर सत्याग्रहास बाळ गंगाधर खेर व काँग्रेस पुढाऱ्यांनी पाठिंबा दिला होता. त्याच बाळासाहेब खेरांचे पहिले काँग्रेस मंत्रिमंडळ अधिकारावर आल्यावर त्यांनी १९३८ साली हरिजनांना मंदिरप्रवेश मिळावा यासाठी एक कायदा केला. कोणत्याही मंदिराच्या विश्वस्तांनी हरिजनांना मंदिरात प्रवेश देण्याचा ठराव बहुमताने पास केल्यास तो ठराव या कायद्यानुसार विधिमान्य ठरवण्यात आला होता. याचा फायदा घेऊन साने गुरुजी, जळगावचे सीतारामभाऊ चौधरी वगैरेंनी तसा ठराव करण्यासाठी पंढरपूरच्या बडव्यांचे मन वळविण्याचे प्रयत्न केले. पण कर्मठ बडवे बधले नाहीत. त्यानंतर व्यक्तिगत सत्याग्रह व छोडो भारत लढ्यामुळे हा विषय मागे पडला. १९४६ साली खेर मंत्रिमंडळ पुन्हा अधिकारावर आल्यावर बाळासाहेब खेरांनी मंदिरप्रवेशाचे विधेयक विधानसभेत सादर केले आणि ते चिकित्सा समितीकडे पाठवण्यात आले. या मंदगतीच्या प्रक्रियेला वेग देण्यासाठी १९४६ च्या कार्तिक एकादशीस साने गुरुजींनी बोर्डी येथे उपोषण सुरू केले. गुरुजी हे निष्ठावंत पण जहाल वृत्तीचे सत्याग्रही होते. मात्र त्यांचे निकटवर्ती अच्युतराव पटवर्धन तसेच वारकरी पंथाचे पुढारी प्राचार्य सोनोपंत दांडेकर आणि काँग्रेसजनांनी सानेंना सबुरीचा सल्ला दिला.

अच्युतराव व सेनापती बापट यांच्या कळकळीच्या आवाहनानुसार गुरुजींनी प्राणांतिक उपोषणाचा जहाल प्रयोग तात्पुरता स्थगित केला. नवीन रणनीतीनुसार साने गुरुजी व सेनापती बापट यांनी ७ जानेवारी १९४७ रोजी मुंबईत जाहीर सभा घेऊन मंदिरप्रवेश प्रचार मोहीम सुरू केली. अशीच दुसरी सभा महर्षी धोंडो केशव कर्वे, सेनापती बापट, साने गुरुजी आणि नाना पाटील यांनी पुण्यात भरवली. या सभेचा आशय होता :—'अस्पृश्यतेचे निर्मूलन करून समताधिष्ठित समाज स्थापन झाल्याशिवाय केवळ राजकीय स्वातंत्र्याला अर्थ राहणार नाही'. दरम्यान आपल्या संकल्पित उपोषणाबाबत गुरुजींनी विनोबा भावे यांचाही सल्ला घेतला. विनोबाजींनी उपोषणास अनुमती दिली, पण प्राणांतिक उपोषणाचा जहाल प्रयोग त्यांना आवडला नाही. त्यांना लाक्षणिक उपोषण अभिप्रेत होते.

महाराष्ट्रभर हा एक संवेदनाक्षम विषय बनला. तरीही बडवे आपल्या सनातनी भूमिकेला चिकटून राहिले. म्हणून साने गुरुजींनी १ मे १९४७ पासून प्राणांतिक उपोषणाचा प्रारंभ केला. त्याबरोबर जोरदार हालचाली सुरू झाल्या. गांधीजींनी बाळासाहेब खेर व शंकरराव देव यांच्याशी चर्चा करून सानेंच्या संकल्पित प्राणांतिक उपोषणाबाबत तार पाठवून नापसंती कळविली. पण नंतर पाठिंबा दिला. त्यामुळे मध्यवर्ती कायदेमंडळाचे सभापती ग. वा. ऊर्फ दादासाहेब मावळणकर पंढरपूरला आले. त्यांनी बडव्यांचे मत अजमावून पाहिले असता ८३ बडव्यांपैकी ३०-३२ जण हरिजनांना मंदिरात प्रवेश देण्यास अनुकूल दिसले. मावळणकरांनी पंढरपुरातील ही वस्तुस्थिती गांधीजींना तारेने कळविली. तेव्हा हरिजन सेवक संघाचे प्रमुख वि. न. बर्वे यांनी मावळणकरांशी विचारविनिमय करावा असे गांधीजींनी त्यांना तारेने कळविले. या परिस्थितीचे गांभीर्य ओळखून विठ्ठल मंदिराच्या पंच समितीने १० मे १९४७ रोजी ठराव केला व त्यानुसार विठ्ठलाचे मंदिर हरिजनांनाही खुले करण्याची घोषणा केली. १० मे रोजीच साने गुरुजींनी मावळणकर, रावसाहेब पटवर्धन व श्री. म. जोशी यांच्या उपस्थितीत आपले उपोषण सोडले.

साने गुरुजींसारखे निष्ठावंत समाजसेवक व त्यांना पाठिंबा देणारे गांधीवादी पुढारी तसेच सेनापती बापट यांच्या लढ्यामुळे अस्पृश्यांना विठोबाचे दर्शन झाले (१० मे १९४७). विठोबा सर्वांना खुला झाला. त्यानंतर खेरांनी मांडलेले मंदिरप्रवेश विधेयक नोव्हेंबर १९४७ मध्ये मंजूर होऊन त्याचे कायद्यात रूपांतर झाले. हे विधेयक मंजूर झाले तेव्हा मुंबई विधानसभेत हिंदुमहासभा पक्षाचे रा. ना. मंडलिक हे एकमेव आमदार होते. मात्र त्यांनी या मंदिरप्रवेश विधेयकाला विरोध केला होता. कारण ब्राह्मणांप्रमाणे अस्पृश्यांनी मंदिरात देवपूजा करण्याच्या ते विरोधात होते. ज्ञातिनिष्ठ मंडलिक असेही म्हणाले, "वर्णाश्रमधर्म, जातिधर्म नष्ट व्हावे याला मी संमती देऊ शकत नाही."[२१]

या विषयाचा समारोप करताना म्हणावे लागते की, डॉ. आंबेडकरांव्यतिरिक्त महात्मा गांधींनीच दलितोद्धार कार्यास महान योगदान दिले. त्यांची आचारविचार

प्रणाली वेगळी असली, तरी त्यांचे अंतिम ध्येय सामाजिक दास्य-विमोचन करणे हेच होते. गांधीजी खरेखुरे सर्वोदयवादी होते. मंदिरप्रवेश मोहिमेतील त्यांचे यश अतुलनीय होते.

## येवला परिषदेतील घोषणा

सतत सहा वर्षांच्या आपल्या संघर्षानंतरही नाशिकचे काळाराम मंदिर खुले झाले नाही हा आंबेडकरांना विषाद वाटत होता. त्यामुळेही आंबेडकरांना हिंदू म्हणून जगण्यात स्वारस्य उरले नसावे. मुळातच त्यांना गौतम बुद्धाच्या शिकवणुकीचे आकर्षण वाटत होते असे दिसते. त्यांनी बुद्ध, कबीर व महात्मा फुलेंना गुरू मानले होते. गोलमेज परिषदेसाठी गेले असता हरिसिंग गौर या कायदेपंडिताशी बोलताना आंबेडकरांनी धर्मान्तर करण्याचा मनोदय व्यक्त केला होता. आपला कल गौतम बुद्धाच्या धर्माकडे आहे असे आंबेडकरांनी तेव्हा सुचित केले होते. त्यानंतर अस्पृश्यांच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय प्रश्नांवर विचार करण्यासाठी १३ ऑक्टोबर १९३५ रोजी नाशिक जिल्ह्यातील येवला गावी परिषद भरवण्यात आली.

याच ऐतिहासिक परिषदेत आंबेडकरांनी धर्मांतर करण्याचा आपला मानस घोषित केला. भाषणात ते म्हणाले की, आठ कोटी अस्पृश्यांना गुलामगिरीत डांबणारा, कोट्यवधी बहुजनसमाजाला दारिद्र्य, अज्ञान आणि रूढींच्या अंधारात दडपणारा व असंख्य स्त्रियांना माणुसकीतून उठवणारा हा हिंदू धर्म खरा धर्म नव्हे, या गुलामगिरीच्या शृंखला आहेत. " त्या आम्ही आज तोडावयाच्या ठरविले आहे. केवळ साधे नागरिकत्वाचे हक्क मिळवण्यासाठी व सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि राजकीय बाबतीत समता मिळविण्यासाठी आमच्या अत्यंत गरीब ज्ञातीने आपल्या सर्व शक्ती खर्च केल्या. पण आमचे सर्व प्रयत्न, त्याग व शक्ती सर्व काही व्यर्थ गेले" ! भाषणाच्या शेवटी बाबासाहेबांनी घोषणा केली, " माझ्या दुर्दैवाने मी अस्पृश्य हिंदू म्हणून जन्माला आलो, ही उणीव दूर करण्याचे सामर्थ्य माझ्यात नाही. परंतु अस्पृश्य हिंदू म्हणून मला भोगाव्या लागणाऱ्या अपमानास्पद नियमांपुढे मान वाकवण्याचे, नाकारण्याचे व हिंदू धर्माचा त्याग करण्याचे माझ्या स्वाधीनचे आहे. मी असे जाहीरपणे निक्षून सांगतो की, मी जरी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो, तरी हिंदू म्हणून मरणार नाही."[२२]

या परिषदेतील अनेक ठरावांपैकी एक महत्त्वाचा ठराव असा होता :— "आम्ही अस्पृश्य व स्पृश्य वर्गांमध्ये समता व सहकार्य आणि समन्वय निर्माण करण्यासाठी, शक्ती व वित्तबळ नसूनही, महाडमधील चवदार तळ्यावर व नाशिकच्या काळाराम मंदिरावर सत्याग्रह केला. काळाराम मंदिराची चळवळ तीन वर्षे आम्ही चालविली. तरीही स्पृश्य समाजाचे किंचितही मतपरिवर्तन झाले नाही, सलोखा निर्माण झाला नाही. म्हणून ही परिषद असा ठराव पास करते की, सवर्णांचे मतपरिवर्तन करण्याचे सर्व प्रयत्न विफल होत असल्याने आम्ही त्यासाठी शक्ती खर्च करू नये व सत्याग्रहाची मोहीम बंद करावी. तसेच स्पृश्य वर्गापासून स्वतंत्र राहावे आणि देशातील अन्य समाजामध्ये आमच्यासाठी मानाचे व समतेचे स्थान मिळविण्याकरिता प्रयत्न करावा."

धर्मांतराच्या या घोषणेने देशभर प्रचंड खळबळ माजली. महात्मा गांधींनी १५ ऑक्टोबर १९३५ रोजी निर्गमित केलेल्या पत्रकात म्हटले की, डॉ. आंबेडकरांचा हा निर्णय दुर्दैवी आहे ; धर्मांतराने मूळ हेतू साध्य होणार नाही. म्हणून क्रोध आवरावा व पुनर्विचार करावा, असे सुचविले. न. चिं. केळकर, ल. ब. भोपटकर, सिद्धेश्वरशास्त्री चित्राव आणि श्री. म. माटे यांनीही डॉ. आंबेडकरांना एकत्रितपणे पत्र पाठविले. त्यांच्याही पत्राचा आशय असाच होता की, धर्मान्तरामुळे पददलित समाजाचा फायदा न होता अस्पृश्यतानिवारण मोहिमेची हानी मात्र होईल.

येवल्यात आंबेडकरांनी धर्मांतराचा निर्णय जाहीर केला होता. तथापि बौद्ध धर्म स्वीकारणार हे जाहीर केले नव्हते. त्यामुळे देशभर तर्क वितर्क पसरले. संभ्रम निर्माण झाला.

धर्मांतर करण्याची घाई करू नका ; धर्मांतराने अस्पृश्यांचे प्रश्न व दैन्य संपणार नाही, असा पुरोगामी हिंदू विचारवंतांचा आंबेडकरांना सल्ला होता. त्यांच्या मते खरा प्रश्न धर्म हा नसून गरिबी व अज्ञान हा होता. धर्म बदलून आर्थिक समस्या सुटणे असंभव होते. कॉंग्रेसमधील पुरोगामी मंडळी, समाजवादी व साम्यवादी पुरुषांना धर्मांतराची कल्पना तेव्हा तरी पसंत नव्हती. हिंदुमहासभेचे नेते असलेले

शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी व डॉ. मुंजे यांनी आंबेडकरांना सल्ला देताना सांगितले की, धर्मबदलाचा निर्धार बदलणे शक्यच नसेल तर त्यांनी शीख धर्माचा स्वीकार करावा. मुंजेंनी बाबासाहेबांशी अशी बोलणी केल्यावर त्यांनी रावबहादुर राजा या दलित नेत्याशीही पत्रव्यवहार केला. त्यांच्या मते शीख पंथ हिंदुधर्माच्याच अंतर्गत असल्याने त्याला परधर्म म्हणता येत नाही. त्याप्रमाणे आंबेडकरांच्या मनात शीख होण्याचा विचार काही दिवस घोळत राहिला. त्यामुळे आपला मुलगा यशवंत ऊर्फ भैय्यासाहेब आणि पुतण्या मुकुंद व १६ अनुयायांना आंबेडकरांनी धर्म शिक्षणासाठी अमृतसरला पाठवले होते. त्यातील काहींनी शीख धर्माची दीक्षा घेतली होती. परंतु शिखांमध्येही स्पृश्य-अस्पृश्य असे भेदभाव होतेच. सरदार किशन सिंग यांनी 'शीख धर्माचा स्वीकार करू नका' असा आंबेडकरांना वर्तमानपत्राद्वारे सल्ला दिला. १९३७ च्या उत्तरार्धात शीख मिशनकडून मिळणारी आर्थिक मदत कमी कमी झाली. म्हणून अनेकांचा भ्रमनिरास झाला. त्यामुळे लवकरच शीख धर्म पत्करण्याचा विचार संपला.

दरम्यान आपल्या धर्माची आंबेडकरांनी दीक्षा घ्यावी यासाठी निजाम व काही मुसलमान व ख्रिस्ती पुढारीही प्रयत्न करत होते.

**धर्मान्तरास विरोध :—**धर्मांतराचा निर्णय आचरणात आणण्याआधी जनमताचा कानोसा घेणे व लोकमत घडविणे आवश्यक होते. आंबेडकरांना पूर्णपणे ज्ञात होते की, मातंग, चांभार, ढोर, भंगी वगैरे अस्पृश्य वर्गातील लोक धर्मांतराच्या विरोधात होते. आंबेडकरांचे सहकारी व त्यांच्या सत्याग्रहांमध्ये निष्ठापूर्वक सहभागी असलेले बापूसाहेब राजभोज हे चर्मकार जातीचे नेते होते. परंतु ते धर्मांतराच्या ठाम विरोधात होते. महाराष्ट्रातील दलितांमध्ये महार ही सर्वात मोठी व तुलनेने बरीच संघटित जात होती. पण तरीही धर्मांतराविषयी अनेक जण साशंक व द्विधा मनःस्थितीत होते. धर्म ही अफू आहे, असा अनुभव आला. म्हणून त्या संभ्रम-काळात धर्मांतराचे महत्त्व व गरज पटविण्यासाठी आंबेडकर व सहकारी नेत्यांनी अनेक परिषदा आणि सभा भरविल्या. तथापि समाजमन अनुकूल करणे सोपे नव्हते. जातिविहीन समाजनिर्मितीचे ध्येय साध्य करणे

अवघड होते. मुंबई इलाखा महार परिषदेत (३१ मे १९३६) आंबेडकरांनी दलितांना मुक्तीचा मार्ग दाखवण्यासाठी सांगितले, "हिंदू समाजाची सुधारणा करणे हे आमचे ध्येय नाही. आमचे स्वातंत्र्य मिळवणे हे आमचे ध्येय आहे......धर्मांतराच मार्ग खऱ्या स्वातंत्र्याकडे नेणारा आहे व त्यापासून खरी समता प्राप्त होणार आहे.....अस्पृश्यता घालवल्याशिवाय आर्थिक वा शैक्षणिक उन्नती शक्य नाही."[२३] मात्र आधी आर्थिक उन्नती की धर्मांतर हा महत्त्वाचा वस्तुनिष्ठ प्रश्न आंबेडकरांना निरर्थक वाटला !

आंबेडकरांच्या आवाहनानुसार मातंग, चांभार, ढोर, भंगी वगैरे लोक धर्मांतर करण्यास तयार नव्हते. त्यामुळे चळवळीत एकवाच्यता राहणे अशक्य होते. दरम्यानच्या काळात महारांमधील बैरागी, महंत व बुवांनी दाढी व जटांचा त्याग केला. घरातील हिंदू देवदेवता टाकून दिल्या. परंपरेनुसार पूर्वी महार वारकरी पंढरपूरला जात. ते बहुतांश बंद झाले. तथापि हा बदल १९३५ पासून एकदम झाला असे नव्हे. बदल झाला, पण अत्यंत मंदगतीने. सर्व जातींचे दलित धर्मांतरास राजी नसल्याने डॉ. आंबेडकरांनी त्यांच्या व मजुरांच्या हितासाठी 'स्वतंत्र मजूर पक्ष' स्थापन केला. या राजकीय पक्षाने १९३७ साली मुंबई कायदेमंडळाचीही निवडणूक लढवली. मात्र पक्षाच्या प्रत्येक उमेदवाराला धर्मांतराला जाहीर पाठिंबा देण्याची अट घातली. ही अट मान्य असलेले कृष्णाजी महादेव काळोखे हे मातंग समाजातील महाराष्ट्रातील एकमेव सुशिक्षित उमेदवार होते. या पक्षाच्या निवडणुकीतील यशाचे विवेचन दुसऱ्या प्रकरणात केलेले आहे.

बाबासाहेबांच्या आग्रहानुसार शंकरदास बर्वे शीख झाले होते. पण आपणास वाऱ्यावर सोडले या भावनेने बर्वे यांनी दलित चळवळीचा त्याग केला. धर्मांतर मान्य नसलेल्या मातंग पुढाऱ्यांनी पुण्यात शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांना २८ जून १९३६ रोजी समारंभपूर्वक मानपत्र अर्पण करून आंबेडकरांना जाहीर विरोध केला.

प्रांतिक विधानमंडळाच्या निवडणुकीसाठी स्वतंत्र मजूर पक्षाची उमेदवारी देण्यावरूनही वादंग माजले होते. बाबासाहेबांचे अनेक सहकारी नाराज झाले व दुरावले. ते सरळ काँग्रेस पक्षात गेले आणि स्वतःला 'राष्ट्रीय हरिजन' म्हणू लागले. अमृतराव रणखांबे, डॉ. पी. जी. सोळंकी, मेढे व बिऱ्हाडे, सोलापूरचे

अनुभवी सहकारी उद्धव शिवचरण मास्तर आणि अनेक कार्यकर्ते आंबेडकरांना सोडून गेले. त्यांपैकी काहींनी स्वतंत्र मजूर पक्षाविरुद्धही निवडणूक लढविली, तर अनेकांनी प्रतिपक्षाच्या बाजूने प्रचार केला. रणखांबे व भाऊराव (दादासाहेब) गायकवाड ही जोडी फुटली. रणखांबे यांनी तर आंबेडकरांविरुद्धच्या कडवट आणि भडक प्रचारमोहिमेला १९३८ पासून पैसा पुरविला. अनेक पुस्तिका निघाल्या. सवर्ण हिंदू टीकाकारांनी बाबासाहेबांचे जेवढे चारित्र्यहनन केले नसेल, तेवढे दलित नेत्यांनी केल्याचे आढळते. मुंबईचे प्रसिद्ध क्रिकेटर पी. बाळू (बी. बी. पालवणकर) आधीपासूनच गांधीजींचे चाहते होते. बी. जी. देवरुखकर आणि बापूसाहेब राजभोज यांनीही आंबेडकरांविरुद्ध निवडणूक लढवली होती. मुंबई इलाख्यात अस्पृश्यांसाठी राखीव असलेल्या पंधरा जागांपैकी अकरा जागा स्वतंत्र मजूर पक्षाला लाभल्या होत्या. तथापि मध्यप्रांत-वऱ्हाडमध्ये दलितांची लोकसंख्या बरीच जास्त असूनदेखील आंबेडकरांच्या या पक्षाला केवळ पाच जागा जिंकता आल्या. बाबासाहेबांचे याबाबतचे अंदाज साफ चुकले होते. मुंबई इलाख्याबाहेरच्या भारतात तर बहुसंख्य दलित लोक व नेते काँग्रेसचेच समर्थक असल्याचे दिसून आले.

दलितांसमवेत सहभोजन टाळणारे व घरी गेल्यावर आंघोळ करणारे आणि भरपूर मद्यपान करणारे ब्राह्मणेतर पक्षाचे बरेच सभासद पुणे, सातारा, कोल्हापूर व सोलापूर जिल्ह्यांमध्ये होते. किंबहुना संपूर्ण महाराष्ट्रात होते. वर्ण श्रेष्ठत्वाचा अहंकार, जाती-पोटजातींमधील उच्चनीचत्वाची भावना, मूर्तिपूजा, धार्मिक रूढींशी बांधीलकी इत्यादी अनिष्ट प्रवृत्तींमधून ब्राह्मणेतर पक्षातील बहुतेकांची सुटका झालेली नव्हती. हिंदुमुसलमानांमधील तेढ व शत्रुत्व यापेक्षा हिंदू धर्मांतर्गत दुष्ट प्रवृत्ती अधिक धोकादायक असल्याचे दिसत होते. सुधारणावादी लोक स्वानुभवाने त्या काळीही म्हणत की, अनेक ब्राह्मणेतर पक्षीय लोक स्वतःला दुय्यम दर्जाचे ब्राह्मणच समजतात. क्षत्रियत्वाचा दावा करणारे कमी नव्हते. सरकारी नोकरी मिळवून देण्यापलीकडे त्यांनी समाजहितासाठी फारसे काम केले नाही. हा पक्ष व्यापक सुधारणा व विकासाचा कार्यक्रम राबवू शकलेला नव्हता. मुंबई प्रांतात

अनेक ब्राह्मणेतर नेत्यांनी मंत्रिपदे उपभोगली, परंतु शेतकरी-कामकरींसाठी कायदे पास करून घेण्याचे कष्ट घेतले नाहीत. काही पुढारी सत्याऐवजी सत्तेच्या शोधात दंग झाले. मराठीत 'बहुजनसमाज' हा भारदस्त शब्द रूढ झाला खरा. तथापि एका टोकावर ब्राह्मण व दुसऱ्या टोकावरील दलित यांना वगळून जो समाज उरला तो बहुजनसमाज असा अर्थ अभिप्रेत झाला. म्हणूनच दलितांचा कल बहुजनसमाजाच्या बाजूला असला, तरी बाबासाहेबांनी दलितांची पक्षसंघटना ब्राह्मणेतर पक्षात कधीच विलीन केली नाही.

## दलित चळवळीतील कलह

दलित जातींमध्ये बाबासाहेब भेदभाव करतात वगैरे आरोप निराधार असूनही त्यांचेवर तशी टीका करण्यात येई. शिवाय स्वजातीय घरभेदेही आंबेडकरांवर शरसंधान करीत. दलितांमधील घरभेद्यांमध्ये मातंग, चर्मकार व महारही होते. अमृतराव रणखांबे हे निकटचे सहकारी विधानसभा तिकीट वाटपावरून (१९३७) झालेल्या मतभेदांमुळे दुरावले होते. ते काँग्रेसमध्ये गेले. पण त्यांचे जावई चिंतामण साळवे यांनी तर आंबेडकरांच्या नेतेपदावरही झोड उठवली :— 'आंबेडकर आरामखुर्चीत बसून राजकारण करतात ; कार्यकर्त्यांची परंपरा निर्माण करीत नाही ; त्यांची टीका विध्वंसक असते ; त्यांचे चेले विभूतिपूजेचे देव्हारे मांडतात ; त्यांची चळवळ विसकळीत व पायाहीन आहे', असे आक्षेप साळव्यांनी एका लेखात घेतले होते. 'स्वतंत्र मजूर पक्ष जातिनिष्ठ राजकारण करीत असल्यामुळे तो कधीच राष्ट्रीय पक्ष बनणार नाही' असेही त्यांनी म्हटले. साळवेंच्या जहरी टीकेला बाबासाहेबांनी स्वतः उत्तर न देता, राजाराम हरी गायकवाड यांनी उत्तरादाखल लिहिलेला लेख **जनता** पत्रकात छापला. याबाबत सांगावयाचे इतकेच की, काही महार पुढारी बाबासाहेबांपासून दूर गेले [२४].

महार व मातंग कार्यकर्त्यांमधील तेढ ही दलित चळवळीतील दुसरी समस्या होती. जून १९४१ मधील हरिजन परिषदेच्या दोन दिवस आधी मराठवाड्यातील पाथ्री गावचे मातंग कार्यकर्ते देवीदास नामदेव कांबळे यांनी बाबासाहेबांना विस्तृत पत्र लिहून पुढील व्यथा व्यक्त केली :—"मातंग समाज व महार समाज यांमध्ये

देव-दानव यांच्यासारखे हाडवैर आहे व आपसात वैर, तिरस्कार, द्वेष, मत्सर आणि वाईट भावना आहेत." त्यांचे पत्र म्हणजे मराठवाडा विभागातील पहिल्याच शिक्षित मातंग माणसाने महारांविरुद्ध ठेवलेले आरोपपत्र होते. 'महार लोक मातंगांना तुच्छ व हलके मानतात ; मातंगांनी आमची गुलामगिरी पत्करावी असे महारांना वाटते', असा कांबळेंनी आरोप ठेवला. शिक्षण, वसतिगृहे आणि कायदेमंडळांमध्येही दलितांपैकी महारांचाच अधिक भरणा असल्याचे सांगून या कांबळेंनी आरोप केला की, बाबासाहेब महारांच्या कल्याणाची जास्त काळजी घेतात. श्रद्धा आणि अज्ञानाने महार बाबासाहेबांना ईश्वरी अवतार मानून त्यांच्या छायाचित्राची पूजा करतात, अशीही कांबळेंनी तक्रार मांडली होती. त्या पत्राची भाषा उद्धटपणाची असूनही बाबासाहेबांनी ते संपूर्ण पत्र **जनता** पत्रकाच्या १४ जून १९४१ च्या अंकात छापले. आणि त्याला सविस्तर उत्तर पुढील अंकात छापले. बाबासाहेब महारांचे नेते आहेत अशा प्रकारचा एक आरोप मध्यप्रांत मातंग परिषदेनेही केला होता.[२५] समाजात तीव्र जातिभेद व जातीय अभिनिवेश असल्यामुळे आंबेडकरांना त्यांच्या समाजकारणात आणि राजकारणातही अनेक आरोपांना तोंड देणे भाग पडले. अनेक समस्या सोडवाव्या लागल्या. अंतर्गत कलह ही दलित चळवळीतील बरीच मोठी समस्या होती.

## महार रेजिमेंटची निर्मिती

मराठा काळापूर्वीपासून पेशवाईपर्यंत रामोशी, कोळी, मांग, महार, बेरड व धनगर जातीच्या लोकांना उपजीविकेसाठी लष्करी पेशा हा पर्याय होता. तथापि **पहिल्या खंडात** विवेचन केल्याप्रमाणे, ब्रिटिशांनी १८९२ साली जातींचे लढाऊ व बिनलढाऊ जाती असे वर्गीकरण केले होते. त्यानुसार इंग्रजांनी सर्व अस्पृश्य जाती व ब्राह्मणांना बिनलढाऊ जाती ठरवून त्यांना लष्कर भरतीपासून वंचित केले होते. वि. रा. शिंदे वगैरेंनी काँग्रेसच्या व्यासपीठावरून मागणी केल्यावर, पहिल्या महायुद्धासाठी सैनिकांची गरज म्हणून इंग्रजांनी १९१७ साली दोन महार बटालियन वायव्य सरहद्द प्रांतात पाठवल्या होत्या. तथापि गरज संपल्यावर १९२२ साली त्यांचे विसर्जन करून टाकले. परिणामतः या वंचित वर्गाचा नोकरीचा

पर्याय पुन्हा बंद झाला. पुढे १९२८ पासून आंबेडकर सैनिक भरतीवरील बंदी उठवण्यासाठी अथक प्रयत्न करू लागले. पण त्यांना यश मिळण्याचा काळ खूप पुढे होता.

दुसरे जागतिक युद्ध सुरू झाल्यावर (सप्टेंबर १९३९) आंबेडकरांनी आपली संधी समजून युद्धकाळात इंग्रजांशी बिनशर्त सहकार्य करण्याची भूमिका जाहीर केली. महायुद्धासाठी इंग्रजांनाही सैनिकांची गरज होती. म्हणून आंबेडकरांनी मुंबईचा गव्हर्नर रॉजर लम्ली याच्यामागे सारखा लकडा लावला की, दलितांच्या भरतीवरील बंदी लगेच उठवावी. गव्हर्नर लम्ली यांनी आंबेडकरांचा काँग्रेसविरुद्ध उपयोग करून घेण्याच्या दृष्टीने आणि काँग्रेसच्या युद्धविरोधी धोरणावर मात करण्याच्या हेतूने, आंबेडकरांना मदत करण्याचे धोरण स्वीकारले. लम्ली साहेबाने व्हाइसरॉय लिनलिथगो यांना पत्रे लिहून आंबेडकरांच्या मागणीचा पाठपुरावा केला. केंद्र सरकारनेही ही मागणी मान्य करून बरेच काही साधले. काँग्रेसला शह देणे हा त्यातील प्रमुख भाग होता. त्यानुसार जून १९४१ पासून इंग्रजांनी महारांना लष्करात प्रवेश दिला. लवकरच महार रेजिमेंट उभारली. महारांनी सरकारच्या नवीन धोरणानुसार सेनादलात शिरावे असे लेख आंबेडकरांनी लिहिले व प्रचार केला. विशेष असे की, युद्धानंतरही महार रेजिमेंट कार्यरत राहिली.

## आंबेडकरांना अधिकारप्राप्ती

९ मार्च १९४२ रोजी क्रिप्स मिशनची घोषणा झाल्यावर भारतीय नेमस्त, उद्योगपती व भांडवलदारांप्रमाणे बाबासाहेबही संभाव्य लाभाबद्दल आशा बाळगून होते. तथापि या मिशनभोवतीचे नाटक दुःखपर्यावसायी ठरले. स्वतः आंबेडकर अत्यंत व्यथित झाले. 'क्रिप्सने आपला पूर्ण भ्रमनिरास केला व आपण अपमानित झालो', असे त्यांनी समक्ष भेटीत गव्हर्नर लम्ली यांना सांगितले होते. १९४० सालच्या प्रसिद्ध 'ऑगस्ट डिक्लरेशनमध्ये' दलित वर्गासाठी व्हाइसरॉयने जे लेखी आश्वासन दिले होते, त्याबाबतही क्रिप्स पुच्छगमन करीत होता. त्याचा निषेध म्हणून राष्ट्रीय सुरक्षा समितीचा राजीनामा देण्याचा त्यांचा विचार होता. पण आंबेडकरांनी तो तहकूब ठेवला होता.

इंग्रजांच्या एका दस्तऐवजातून मला दिसले की, आंबेडकरांना तेव्हा बऱ्याच आर्थिक विवंचना होत्या. कर्ज परतफेडीसाठी त्यांच्यामागे सावकारांचा ससेमिरा लागला होता. त्यांचे मन राजकारणालाही विटले होते. त्यांना खिन्नता जाणवत होती. अशा मनःस्थितीतून आंबेडकरांनी राजकारणाचाही त्याग करण्याचा आपला मानस गव्हर्नर लम्ली यांच्याकडे व्यक्त केला होता. म्हणून लम्ली महाशयांनी व्हाइसरॉय लिनलिथगो यांना सविस्तर पत्र धाडले व आंबेडकरांना मध्यवर्ती कार्यकारी मंडळात मंत्रिपद द्यावे, अशी शिफारस केली. या दुर्मीळ गोपनीय दस्तऐवजातील हा उतारा पाहा : "This mood of disgruntlement has been noticeable in Ambedkar for a long time—certainly since he was not taken into the expansion of your Executive Council, as he had hoped......I feel pretty sure that this disgruntlement is largely a personal matter. As you know, his financial position has been worrying him for some time. I have reason to believe that he owes money to certain people who have helped him in the past, and that he is unable to pay any of it back,........As you know, too, he has been, for some time, anxious to obtain a position in the High Court or elsewhere, in which he could have a chance of providing for his own future. He has given me, for some time, the impression of a man who is no longer really interested in the work he is doing for his own followers, and is anxious to reach a different sphere".[26]

म्हणून लम्ली यांनी लिनलिथगोंना शिफारस केली की, " डॉ. आंबेडकरांसाठी काही तरी करावे, आणि त्यांना मंत्रिमंडळात घेण्यात यावे ; शिवाय केवळ व्यक्तिगत कारणांसाठी नव्हे, तर दलित वर्गाचा आपणास पाठिंबा मिळण्यासाठी असे करावे ".[२७] मुत्सद्दी सर रॉजरचा हा सल्ला विचारात घेऊन व्हाइसरॉयने विनाविलंब बाबासाहेबांना हिंदुस्तानचे कामगारमंत्री या पदावर नियुक्त केले.

**१९४१ साली संतापून बाबासाहेबांनी "इंग्रजांची धोकेबाजी" या शीर्षकाचा अग्रलेख जनता पत्रकात छापून धारदार टीका केली होती. तथापि जुलै १९४२ मध्ये मंत्रिपदाचा लाभ होताच त्यांनी आपला पवित्रा बदलला व ब्रिटिशांचे निःसंदिग्ध समर्थन केले.** तेव्हा सर्वत्र चर्चेत असलेल्या छोडो भारत ठरावावर आंबेडकरांनी कडाडून टीका केली. हा ठराव त्यांना 'ट्रेचरी टू इंडिया', 'प्लेइंग द एनिमीज गेम' या स्वरूपाचा वाटला. त्यांनी **टाइम्स ऑफ इंडिया** पत्रकातून आवाहन केले, "राष्ट्रभक्तीचे कर्तव्य या नात्याने सर्व भारतीयांनी आपली संपूर्ण शक्ती व क्षमतेचा परिपूर्ण उपयोग करून काँग्रेसला सविनय कायदेभंग लढा करण्यापासून रोखावे".[२८]

याच पत्रकाच्या २८ जुलैच्या अंकात बाबासाहेबांची खास मुलाखत छापून आली. तिच्यात ते म्हणाले, "गांधींकडून सुसंगत (कंसिस्टंट) धोरणाची अपेक्षा कोणालाही करता येणार नाही. परंतु प्रत्येकाला त्यांच्याकडून जबाबदारपणाची अपेक्षा बाळगण्याचा अधिकार आहे. राष्ट्रव्यापी जनआंदोलन पेटवण्याचा गांधींचा सांप्रतचा प्रयत्न बेजबाबदार आणि वेडेपणाचा (इन्सेन) आहे याबाबत संशय असू शकत नाही......क्रिप्सच्या योजनेनंतर ब्रिटिश सत्तांतर करणार नाहीत, या गांधींच्या मतावर विश्वास ठेवणे अवघड वाटते. हे निखालस असत्य होय......गांधींच्या या अगदी अनावश्यक मोहिमेला सामान्य जनांनी पाठिंबा देण्याची सुतराम गरज नाही. अल्पसंख्य जातींना त्यांच्या सुरक्षेची हमी देण्यास गांधी समर्थ नसल्याने, त्यांनी त्यांच्या मागे जाण्याचे काहीच कारण नाही".[२९]

मंत्रिपद लाभल्यावर लगेच आंबेडकरांनी हे मतप्रदर्शन केलेले होते. त्यात ब्रिटिशांना खूश करण्याचा त्यांचा प्रयत्न होय, असा राष्ट्रवादी घटकांचा व विचारवंतांचा अभिप्राय होता. मात्र ऑगस्टपासूनच्या घटना पाहता जनमतावर आंबेडकरांच्या मतप्रदर्शनाचा अजिबात प्रभाव पडला नाही.

## वेठबिगारी मुक्ती चळवळ

वेठबिगारी हा एक सामाजिक कलंक व आर्थिक शोषणाचा घृणास्पद नमुना होता. हे आफ्रिका व अमेरिकेतील गुलामगिरीच्या प्रथेचे देशी प्रतिरूप होते.

अत्यंत दरिद्री, भोळे व निरक्षर वारली, कातकरी, भिल्ल, कोरकू इ. आदिवासी शतकानुशतके शोषणाचे बळी पडलेले होते. त्यांच्या शेतजमिनी सावकारांनी कर्जाच्या बदल्यात हडप केल्या व त्यांना लाचार बनवले होते. सावकार जमिनीचा लहानसा तुकडा कसण्यास देऊन आपली सर्व प्रकारची कामे त्यांच्याकडून मोफत व सक्तीने करून घेत. इंग्रजांचे सावकारांना संरक्षण होतेच. या शोषणपद्धतीला वेठबिगारी हे नाव पडले. महाराष्ट्रातील ठाणे, रायगड, नाशिक, धुळे, अमरावती, वर्धा, चंद्रपूर वगैरे जिल्ह्यांमध्ये ही शोषणपद्धती होती. मराठापूर्व काळात गोंडवनावर राज्य करणारे गोंड राजे मुघल बादशहांनाही बधले नव्हते. गोंडवनावर राज्य गोंडांचे! पण इतिहासाच्या चक्रात गोंड बनले आदिवासी! हा संशोधनाचा स्वतंत्र विषय आहे. इथे विवेचन करावयाचे आहे ठाणे जिल्ह्यातील वेठबिगारीचे.

ठाणे जिल्ह्यातील उंबरगाव, डहाणू, पालघर तालुके आणि जव्हार संस्थानात वारली नामक आदिवासी जमात आहे. जमीनमालक वारली शेतकऱ्यास कसण्यासाठी निकृष्ट प्रतीच्या जमिनीचा तुकडा देताना तो त्याच्याकडून लेखी करार करून घेत असे. त्यानुसार शेतातील उत्पन्नाचा अर्धा हिस्सा सावकार घेई. शिवाय सावकार वर्षभर त्या शेतकऱ्याकडून सर्व प्रकारची कामे करून घेत असे. हे जमीनदार—सावकार जंगलांचेही मक्तेदार असत. ते वारली वेठबिगारांकडून गवत कापणे, जंगलतोड वगैरे कामे करून घेत. शेतीतील अत्यल्प धान्य संपल्यावर वारली कुटुंबास कंदमुळे, चिंचेचा पाला, मोहाची फुले खाऊन गुजराण करावी लागे. निर्वाहासाठी कर्ज घ्यावे लागे. कर्ज व व्याज फिटेपर्यंत सावकार/जमीनदार लोक वारली जोडप्यास गुलामासारखे वापरून घेई. कर्जात जन्मलेला वारली कर्जातच मरत असे!

बा. गं. खेर यांचे पहिले मंत्रिमंडळ अधिकारारूढ झाल्यावर (१९३७) वारलींच्या दु:स्थितीची प्रथमच दखल घेण्यात आली व सर्वेक्षण करण्यात आले. नंतर मे १९४० मध्ये म्हणजे सत्तात्याग केल्यावर खेरांच्या पुढाकाराखाली शंकरराव देव, स्वामी आनंद, द. ना. वांद्रेकर, आचार्य शंकरराव भिसे व व्ही. व्ही. दांडेकर यांनी आदिवासी सेवा मंडळ स्थापन केले. या मंडळाने मनोर गावी एक आश्रम

स्थापन केला (२९ एप्रिल १९४१). त्या सुमारास एका कंत्राटदाराने ३०-४० आदिवासी कुटुंबांना बोरीवलीच्या जंगलात जबरदस्तीने डांबून ठेवले होते. खेरसाहेब व या मंडळाने त्यांची सुटका केली होती. या मंडळाने आदिवासी लोकांसाठी बरेच विधायक काम केले. मात्र १९४२ चा लढा सुरू झाल्यावर आदिवासी सेवामंडळाचे काम थंड पडले. आदिवासींचे शोषण सुरूच राहिले. मात्र आर्थिक मर्यादा असूनही **अमृतलाल ठक्कर ऊर्फ ठक्करबाप्पा** यांनी आदिवासी कल्याणासाठी वाहून घेतले. गांधीवादी असलेल्या ठक्करबाप्पांना बाबासाहेब आंबेडकरांच्या पक्षाने कधीच साथ दिली नाही, अथवा आदिवासी मुक्ती चळवळीला मदतही केली नाही.

१९४५ सालापासून श्यामराव परुळेकर व त्यांच्या पत्नी गोदावरी यांनी किसान सभेच्या वतीने वारली लोकांमध्ये जागृती करण्याची मोहीम उभारली. त्यांनी या निरक्षर लोकांना संघटित करण्याचे कार्य हाती घेतले. मुळात सधन घराण्यांमध्ये जन्मलेल्या श्यामरावांनी व गोदावरीबाईंनी मुंबईत कामगार चळवळ चालवत असताना कम्युनिझमची दीक्षा घेतली होती. पण पुढे या दांपत्याने वारलींचा लढा उभारला. श्यामराव व गोदाराणी यांनी दळवी, रेडकर, कमा रणदिवे, रूपजी कडू, गोविंद अंधेरे, शिडवा सपाटा, देवजी तांडेल, नवशा बरठा या साथीदारांच्या मदतीने जमीनदार आणि त्यांचे त्राते असलेल्या सरकारी अधिकाऱ्यांची दंडेली झुगारून लावली. आणि वारल्यांना जागृत करून आपल्या हक्कांसाठी लढा उभारण्यास शिकविले. ध्येयवादी श्यामराव व गोदावरी ताई यांनी वारलींचा लढा निर्धाराने लढविला.

हा लढा दडपण्यासाठी जमीनदार-सावकारांनी इंग्रजांच्या मदतीने सर्व प्रकारचे उपाय केले. पण आता आदिवासी धीट झाला. संप करून त्यांनी मालकांना हादरा दिला. मात्र मालकांनी संप फोडून आदिवासींवर गोळीबार घडवून आणण्याचा घाट घातला. गोदाताई तळवाडी येथे भाषण करणार व त्यांच्या जिवाला धोका असल्याची अफवा पसरवली. म्हणून तेथे १० ऑक्टोबर १९४५ रोजी सुमारे ३०,००० आदिवासी जमले. त्यांच्यावर तळवाडीत पोलिसांनी

गोळीबार केला. या गोळीबारात पाच आदिवासी मरण पावले, अनेक जखमी झाले व शंभरावर जणांना पोलिसांनी अटक केली. तरी आदिवासींची चळवळ पुढे चालू राहिली. बाळासाहेब खेरांचे दुसरे मंत्रिमंडळ अधिकारावर आल्यावर (१९४६) 'कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न' निर्माण झाल्याच्या कारणास्तव सुमारे २०० आदिवासींना अटक करण्यात आली. परुळेकर दांपत्याला ठाणे जिल्ह्याबाहेर हद्दपार करण्यात आले. पुढे त्यांना कारावासही घडला. परंतु वारली जागृत व मुक्त झाला. याचे अधिक श्रेय या दांपत्यास व ठक्करबाप्पा यांना देण्यात येते.

जातीय पेचप्रसंग सोडविण्यासाठी आंबेडकरांनी सुचविलेल्या योजनेत कायदेमंडळातील जागांची विभागणी करताना, त्यांनी आपल्या प्रस्तावात आदिवासी जमातींचा समावेश केला नव्हता. यावर ठक्करबाप्पांनी टीका केली होती. त्यावर आपली भूमिका मांडताना बाबासाहेबांनी उत्तर दिले, "आपले आदिवासींशी वैर नाही. परंतु राजकीय सत्ता वापरण्याची कुवत आदिवासींमध्ये अद्याप आलेली नाही. त्यामुळे आपण त्यांचा समावेश केलेला नाही." तथापि ठक्करबाप्पांनी दाखवून दिले की, आंबेडकरांच्या या विधानात सत्यांश नाही. कारण बिहार, ओरिसा व आसामच्या विधानमंडळांमध्ये तेव्हा आदिवासींपैकी शिक्षित प्रतिनिधी होतेच. १९३७ सालात आसाममध्ये एक आदिवासी मंत्री होता. शिवाय काही आदिवासी वकील व पदवीधर असल्याचेही ठक्करबाप्पांनी निदर्शनास आणले. ठक्कर यांनी आंबेडकरांचा युक्तिवाद खोडून काढून, आंबेडकरांनी आदिवासींना योजनेतून वगळणे अनुचित आहे, असे दाखवून दिले. **खरेतर ठक्करबाप्पा हेच महाराष्ट्रातील आदिवासींचा लढा लढवित राहिले.**[३०]

## ब्रिटिशांनी केली प्रतारणा

१९४६ मधील प्रांतिक विधानमंडळांच्या निवडणुकांची धामधूम सुरू झाली. या विधानमंडळांतील निर्वाचित सभासदांना स्वतंत्र भारताच्या घटना समितीचे सदस्य निवडून देण्याचा अधिकार मिळणार होता. मात्र या निकराच्या निवडणुकीत आंबेडकरांच्या शे. का. फे. चा मुंबई प्रांत व वऱ्हाड व मध्यप्रांतातही दारुण पराभव झाला. म्हणून बाबासाहेबांनी घटना समितीसाठीची निवडणूक पूर्व बंगालमधून लढविली व त्यांना त्यात यश लाभले.

डॉ. आंबेडकर त्यांच्या राजकीय करिअरच्या आरंभापासून ते काँग्रेस व महात्मा गांधी यांच्यावर टीकेची झोड उडवित होते. अस्पृश्य वर्गाला राजकीय सत्तेत वाजवी वाटा मिळावा यासाठी त्यांनी मुख्यतः काँग्रेसशी विपुल संघर्ष केलाच. पण याउलट ब्रिटिश सत्ताधीशांशी सहकार्य केले व त्यांना अनुकूल भूमिका घेतली. त्यांनी अनेकदा बॅ. जिना व मुस्लीम लीगशीदेखील सहकार्य केले होते. तथापि सत्तांतराबाबत महत्त्वाच्या वाटाघाटी करण्यासाठी भारतमंत्री पेथिक लॉरेन्स, स्टॅफर्ड क्रिप्स व ए. व्ही. अलेक्झांडर यांचे त्रिमंत्री कॅबिनेट मिशन आल्यापासून बाबासाहेबांना ब्रिटिशांचा अत्यंत कटु अनुभव आला. हे मिशन व व्हाइसरॉय वेव्हेल यांच्याशी ५ एप्रिल १९४६ रोजी झालेल्या बैठकीत बाबासाहेबांनी दलितांसाठी ‘स्वतंत्र मतदारसंघ आणि मध्यवर्ती मंत्रिमंडळात पुरेसे प्रतिनिधित्व व आगामी राज्यघटनेत अस्पृश्यांना संरक्षक तरतुदी’ या तीन मागण्या सादर केल्या. या भेटीची पूर्वतयारी म्हणून त्यांनी एक निवेदनही पाठविले होते. तथापि मिशनने या मागण्यांचा विचारही केला नाही. काँग्रेस व मुस्लीम लीग यांच्यात सहमती घडवून आणली की, हिंदुस्तानातील पेचप्रसंग सोडवता येईल आणि घटना समितीमार्फत राज्यघटना तयार करून घेता येईल, असा मिशनला विश्वास वाटत होता. यासाठी दलितांची अथवा आंबेडकरांची पूर्वसंमती घेण्याची मिशनला आवश्यकता वाटत नव्हती, असे स्पष्ट झाले.

त्याबाबत बाबासाहेबांनी व्हाइसरॉयला पत्र पाठवून आपली नापसंती कळविली. पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. ८ मे १९४६ रोजी व्हाइसरॉयच्या कार्यकारिणीतील मंत्र्यांनी राजीनामे दिल्यावर बाबासाहेब मुंबईला परत आले. १४ मे रोजी त्यांनी अलेक्झांडरला पत्राद्वारे कळविले की, ‘हिंदुस्तानला स्वातंत्र्य दिल्यावर अस्पृश्यांची अवस्था भयानक होईल आणि त्यांना स्वतंत्र मतदारसंघ दिले तरच ती सुधारणे शक्य होईल. अस्पृश्यांना सत्ता लाभणारी अधिकारपदे हवी असून, ती देण्याची नैतिक जबाबदारी ब्रिटिशांवर आहे. कारण वॉरन हेस्टिंग्ज वगैरेंनी स्थापन केलेले ब्रिटिश साम्राज्य त्यांच्यावतीने लढणाऱ्या ‘भारतीय सैन्यातील अस्पृश्य सैनिकांनी स्थापन केले’, अशी आंबेडकरांनी त्या साहेबास आठवण करून दिली. (वसंत मून, संपा. **बाबासाहेब आंबेडकर : रायटिंग्ज**

**अँड स्पीचेस,** खंड ९, पृ. ४७५-७९). नंतर २२ मे रोजी त्यांनी पेथिक लॉरेन्सलाही पत्र पाठविले. स्टॅफर्ड क्रिप्स यांनी तर आंबेडकरांच्या संघटनेची ताकद स्थानिक व मर्यादित स्वरूपाची आहे, म्हणजे केवळ मुंबई आणि वऱ्हाड-मध्यप्रांतातच केंद्रित आहे, असा शिक्का मारला होता. मिशनच्या दृष्टीने आंबेडकरांची उपयोगिता संपली होती.

त्या तिन्ही सत्ताधीशांनी बाबासाहेबांना अजिबात दाद दिली नाही. त्यांनी लिहिलेल्या निवेदनात दलितांना अनुल्लेखाने मारले होते. मुसलमानांना काँग्रेसपासून संरक्षण मिळावे यासाठी कॅबिनेटने पूर्णतः दक्षता घेतली होती. तथापि ब्रिटिशांनी आंबेडकरांना वाऱ्यावर सोडले. अगदी ब्रिटिश राजवटीच्या स्थापनेपासून आतापर्यंत सदैव राजनिष्ठ राहिलेल्या अनुसूचित जातींचा सर्वांत मोठा विश्वासघात इंग्रजांनीच केला, असा शे. का. फे. च्या ४ जून १९४६ च्या ठरावात स्पष्ट उल्लेख आहे. डिव्हाइड अँड रूल या सनातन ब्रिटिश कलोनिअल नीतीनुसार ब्रिटिशांनी दलितांविषयी वरूनवरून सहानुभूती दाखविली. आंबेडकरांचा काँग्रेस व गांधीजींविरुद्ध पुरेपूर उपयोग करून घेतला आणि त्यांच्यात झुंज लावून दिली. त्यांच्याकडून काँग्रेसवर आरोप करवून घेतले. तथापि बाबासाहेबांच्या व दलितांच्या मागण्या मान्य केल्या नाहीत. इंग्रजांनी त्यांचा भ्रमनिरास केला. दलितांच्या मुक्तीसाठी कायदेही केले नाहीत. दलितांनी हक्कांसाठी सत्याग्रह केले तेव्हा ब्रिटिशांनी बाबासाहेबांना सबुरीने घेण्याचा सल्ला दिला होता. तथापि निर्णायक वेळ आली असता त्यांना वाऱ्यावर सोडले. या अहवालात शे. का. फे. ने दलितांवरील अन्याय व अत्याचार कथन करून, ब्रिटिश सत्ताधीश निर्णायक वेळी कसा विश्वासघात करत आहेत, याचे विवेचन केले होते.

आंबेडकरांच्या पत्रास पंतप्रधान ॲटली यांनी पाठवलेल्या उत्तरात (१ ऑगस्ट १९४६) त्यांनी सडेतोडपणे कळवले की, भारताच्या हंगामी सरकारात अस्पृश्यांचे किमान दोन प्रतिनिधी घेण्याची आंबेडकरांची विनंती मान्य करता येणार नाही. १९४६ च्या निवडणुकीचे निकाल वगैरे बाबींचे बाबासाहेबांचे विवेचनही ॲटलींना पटले नाही. घटना परिषदेत तसेच सल्लागार समितीत दलितांना पुरेसे प्रतिनिधित्व देण्याची बाबासाहेबांची विनंतीही ॲटलीने मान्य केली नाही. तरीही कलोनिअल

सत्ताधीशांचे मन वळवण्याचा अखेरचा निकराचा प्रयत्न करण्यासाठी आंबेडकर १५ ऑक्टोबर १९४६ रोजी कराचीहून लंडनला गेले. तिथे त्यांनी पंतप्रधान ॲटली, भारतमंत्री पेथिक लॉरेन्स, माजी पंतप्रधान चर्चिल, सॅम्युएल होअर तसेच मजूर व हुजूर पक्षांच्या काही खासदारांशी चर्चा केली. तथापि तिथे कोणासही त्यांची भूमिका पसंत न पडल्याने निराश मनःस्थितीत बाबासाहेब मायदेशी परतले (१५ नोव्हेंबर).

प्राप्त परिस्थितीत झाले गेले विसरून काँग्रेसने मागितले, तर काँग्रेसबरोबर सहकार्य करावे, असे आंबेडकरांना वाटू लागले. शेवटी त्यांनी सामोपचाराचा पवित्रा घेतला. दलितांसाठी विभक्त मतदारसंघांच्या आपल्या आधीपासूनच्या मागणीचा आग्रह न धरता, अनुसूचित जातींसाठी राखीव जागा लाभल्या तरी चालेल, असे ते म्हणू लागले. शिवाय वरवरची तरी सहानुभूती दाखवण्यास इंग्रज भारतात राहणार नव्हते. बॅ. जिना व मुस्लीम लीगही भारतात राहणार नव्हती. अशा परिस्थितीत स्वतंत्र होणाऱ्या भारतात सत्ताधारी काँग्रेस पक्षाशी सहयोग करण्याशिवाय दुसरा पर्याय राहिला नव्हता. तब्बल २५ वर्षे काँग्रेसशी लढा दिल्यावर, आंबेडकरांना पूर्ण जाणीव झाली की, 'गांधीजी व काँग्रेसशी इतःपर संघर्ष करणे आत्मघातकी ठरेल. त्यांच्याशी सलोखा साधूनच आपला कार्यभाग साध्य करण्यावाचून गत्यंतर नाही. दुसरा पर्याय नव्हता'. म्हणून त्यांनी आपला पवित्रा बदलला.[३१] त्याबरोबर आंबेडकरांचा बदललेला पवित्रा व त्यांचे परिवर्तन गांधीजींच्या ध्यानात आले. म्हणून बदललेल्या परिस्थितीत उदारपणे महात्मा गांधींनी आंबेडकरांना केंद्रीय मंत्रिमंडळात समाविष्ट करण्याची नेहरूंना सूचना केली. त्यानुसार नेहरूंनी आंबेडकरांना रीतसर निमंत्रण दिले. त्यानुसार आंबेडकरांना मंत्रिपदाचा लाभ झाला. (कृपया पृ. ६८०-६८६ सुद्धा पाहा.)

❑❑

## संदर्भ

१. विठ्ठल रामजी शिंदे, **माझ्या आठवणी व अनुभव,** १९४०, पृ ३१६.

२. य. दि. फडके, **सेनापती बापट,** नवी दिल्ली, २००७, पृ. ३१, ३२ ७२, ७३.

३. फडके, **विसाव्या शतकातील महाराष्ट्र,** खंड तिसरा, पृ. २३९, २५४-५६.

४. चांगदेव भगवानराव खैरमोडे, **डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचे चरित्र,** खंड ३, १९९०, पृ. २७.

५. एम. के. गांधी, **यंग इंडिया,** २८ एप्रिल १९२७.

६. के. के. चौधरी, **रायगड जिल्हा गॅझेटिअर,** १९९३, पृ. १६१-६४.

७. प्रकाश विश्वासराव, **डॉ. बाबासाहेब आंबेडकर,** मुंबई, २००८, पृ. ३५-३६.

८. खैरमोडे, उपरोक्त, पृ. १७५-७६.

९. फडके, खंड तिसरा, पृ. २६२-६४.

१०. ए. के. गोपालन, **इन् द कॉज ऑफ द पीपल,** नवी दिल्ली, १९७३, पृ. ३८.

११. चौधरी **(संपा.), वर्धा जिल्हा गॅझेटिअर,** १९९२, पृ. ५१७-१८.

१२. चौधरी, **झुंजार पुणे,** पृ. २५५-५६.

१३. शंकरराव खरात (संपा.), **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे,** पुणे, १९६१, पृ. ४७.

१४. मुंबई सरकार, होम डिपा. स्पेशल, फाईल क्र. ३५५(६४) चार-ए, १९३०.

१५. व्ही. बी. खेर (संपा.), **सोशल सर्व्हिस : वर्क अँड रिफॉर्म,** खंड तीन, नवजीवन, १९७६.

१६. कित्ता, पृ. १७, ३६, ५०, १३२, १३७, १५६, १६२, १८०, २५०, २५१.

१७. **हरिजन,** २५ मार्च १९३३.

१८. कित्ता, २६ ऑगस्ट १९३३.

१९. कित्ता, ११ व १८ फेब्रुवारी १९३३.

२०. कित्ता, २३ जानेवारी १९३७.

२१. **बॉंबे लेजि. कौंसिल डिबेटस्,** खंड १३, १९४७, पृ. १०५-०९.

२२. विजय सुरवाडे (संपा.), **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची निवडक भाषणे,** भाग पहिला, मुंबई, २००२, पृ. १४५-४६.

२३. कित्ता, पृ. १८६.

२४. फडके, खंड पाचवा, पृ. ३७०.

२५. कित्ता, पृ. ३७०-७१.

२६. रॉजर लम्ली यांचे व्हाइसरॉय लिनलिथगो यांना पत्र, २४ जून १९४२, राष्ट्रीय अभिलेखागार, नवी दिल्ली.

२७. कित्ता.

२८. **टाइम्स ऑफ इंडिया,** २३ जुलै १९४२.

२९. कित्ता, २८ जुलै १९४२.

३०. फडके, खंड पाचवा, पृ. २०७-१३, ३९३-९४.

३१. कित्ता, पृ. ४०१-०३, ४०५-०७, ४११, ४१३.

प्रकरण १५

## डावपेचांबाबत मतभेद

## जातीय निवाडा

कायदेमंडळांमध्ये जातीय प्रतिनिधित्व मिळण्यासाठी अल्पसंख्य असलेल्या गटांनी गोलमेज परिषदेच्या दुसऱ्या सत्रात मागण्या मांडल्या होत्या. त्या विवाद्य मुद्यांवर गांधीजींनी काँग्रेसची उदार भूमिका स्पष्ट केली होती. तथापि याबाबत आपण ‘ निवाडा ’ देऊ असा पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी कुटिल हेतूने देकार दिला. वस्तुतः लवाद नेमून निर्णय देण्याची कोणाची मागणी असती तर पंतप्रधानांनी लवादी भूमिका घेऊन निवाडा देणे उचित झाले असते. पण कोणीही तशी मागणी केली नव्हती. ब्रिटिशांच्या कुटिल साम्राज्यशाही डावपेचांनुसार पंतप्रधानांनी १७ ऑगस्ट १९३२ रोजी निर्णय घोषित केला. त्याला ‘ कम्युनल अवार्ड ’ म्हणजे जातीय निवाडा म्हटले जाते. पट्टाभी सीतारामय्या यांच्या **खंड क्रमांक एकमध्ये** हा निवाडा उपलब्ध आहे. काँग्रेसप्रमाणे भारतातील इतर धर्मनिरपेक्ष पक्षांनाही व राष्ट्रवादी लोकांना हे ब्रिटिशांचे ‘ डिव्हाइड अँड रूल ’ धोरण असल्याचे वाटल्यावाचून राहिले नाही. भारतीय समाजाचे विघटन करणे हा कपटी पंतप्रधानांचा उद्देश होता.

हा निर्णय जाहीर होण्यापूर्वी ११ मार्च १९३२ रोजी येरवडा कारागृहातून महात्मा गांधींनी भारतमंत्री सर सॅम्युएल होअर यांना अत्यंत खरमरीत भाषेत इशारा देणारे पत्र पाठविले होते. हे पत्र प्रस्तुत इतिहासकाराने **सोर्स मटेरिअल फॉर हिस्टरी ऑफ फ्रीडम मुव्हमेंट** च्या खंड क्रमांक बारामध्ये प्रकाशित केलेले आहे. या पत्रात गांधीजींनी सरकारच्या दडपशाहीचा, क्रूरपणाचा आणि अतिरेकीपणाचा अत्यंत तीव्र शब्दांत निषेध तर केलाच. पण याशिवाय सरकार स्वतःच ‘ दहशतवादी ’ झाले असल्याचा गांधीजींनी साधार असा आरोप केला होता. या आरोपांव्यतिरिक्त हे पत्र जातीय निवाडा या विषयाच्या संदर्भात अधिक महत्त्वाचे होय. मुसलमान व शीख यांच्याप्रमाणेच तथाकथित अस्पृश्य जातींनाही विभक्त

मतदारसंघ देण्याचा इंग्रजांचा इरादा असल्याच्या वर्तमानपत्रांतील बातम्या वाचून गांधीजी दुःखी झाले होते. म्हणून त्यांनी या पत्रातून होअर महोदयांना गोलमेज परिषदेतील आपल्या भाषणाची आठवण करून दिली. त्यांनी ११ मार्चच्या या पत्रात ठणकावून लिहिले, " I should resist with my life the grant of separate electorate to the Depressed Classes. This was not said in the heat of the moment, nor by way of rhetoric. It was meant to be a serious statement. "[१]

दलितांना कायदेमंडळांमध्ये सर्वतोपरी प्रतिनिधित्व मिळावे ही गांधीजींची ठाम भूमिका होती. प्रत्येक दलित महिला व पुरुषास मताधिकार मिळावा असा त्यांचा आग्रह होता. तथापि विभक्त मतदारसंघांमुळे ' दलित लोक हिंदू समाजापासून विलग पाडले जातील व समाजाचे विघटन होईल; यात जास्त नुकसान दलितांचेच होईल ; म्हणून समाजातील परस्परावलंबित्व समजून घेणे आवश्यक आहे', असे गांधीजींचे मत होते. त्यांनी पत्रात पुढे म्हटले की, ' विभक्त मतदारसंघांमुळे हिंदू समाजाचे विभाजन आणि विघटन होईल. ' असे असूनही बादशहांच्या सरकारने दलितांना विभक्त मतदारसंघ देण्याचा घातक निर्णय घेतला, तर प्राणांतिक उपोषण करून आपण त्यास विरोध करू, असे महात्माजींनी भारतमंत्री होअरला या पत्रातून बजावले होते.[२]

सॅम्युएल होअर हे पंतप्रधानांपेक्षा विवेकी असावेत असे वाटते. त्यांनी गांधीजींना आश्वासन दिले की, जातीय प्रतिनिधित्वाबाबतचा अंतिम निर्णय घेण्याआधी सरकार लॉर्ड लोथिअनच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीच्या शिफारशींप्रमाणेच आपलेही मत विचारात घेईल. पण हे उत्तर म्हणजे विषण्णता वाढवणारी चालढकल होती.

गोलमेज परिषदेच्या दुसऱ्या सत्रात बाबासाहेब आंबेडकर, रावबहादूर श्रीनिवासन आणि एम. सी. राजा या दलित पुढाऱ्यांनी अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघ असावे, अशी मागणी केली होती. तथापि हिंदुस्तानात आल्यावर एम. सी. राजा यांनी डॉ. मुंजे या हिंदुमहासभेच्या नेत्याशी फेब्रुवारी १९३२ मध्ये वेगळा करार

केला. त्यानुसार स्वतंत्र मतदारसंघांच्या ऐवजी दलितांसाठी राखीव जागा असलेले संयुक्त मतदारसंघ हा पर्याय स्वीकारण्यास राजा यांनी संमती दिली. वऱ्हाड-मध्यप्रांताचे दलित नेते आणि पुण्याचे पां. न. राजभोज या नेत्यांनाही राजा-मुंजे करार मान्य झाला. बॅ. जयकर आणि डॉ. मुंजे यांचा अपवाद वगळता हिंदुमहासभा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा जातीय निवाड्याला प्रारंभापासूनच विरोध होता. या विषयावर पंजाब व बंगालमधील हिंदूंच्या खालोखाल महाराष्ट्रातही या संघटनांनी विरोध केला. मात्र डॉ. मुंजेंनी एम. सी. राजा यांच्याशी केलेला करार गवई व राजभोज वगैरे दलित नेत्यांना पसंत पडला. तरीही डॉ. आंबेडकर स्वतंत्र मतदारसंघांबाबत ठाम होते. मे १९३२ च्या शेवटच्या आठवड्यात ते पुन्हा इंग्लंडमध्ये गेले आणि ब्रिटिश मंत्र्यांच्या गाठीभेटी घेऊन त्यांनी स्वतंत्र मतदारसंघांच्या मागणीचा पाठपुरावा केला.

पंतप्रधान मॅकडोनाल्ड यांनी कपटीपणाने १७ ऑगस्ट १९३२ रोजी जातीय निवाडा जाहीर केला. या निर्णयानुसार प्रांतिक कायदेमंडळाच्या कनिष्ठ सभागृहात पुढीलप्रमाणे बारा प्रकारचे वेगवेगळे मतदारसंघ अस्तित्वात येतील असे घोषित केले :—सर्वसामान्य म्हणजे हिंदू, मुसलमान, अस्पृश्य जाती, व्यापार व उद्योग, मजूर, जमीनदार, शीख, युरोपियन लोक, भारतीय ख्रिस्ती, अँग्लोइंडियन, मागासलेले प्रदेश व विद्यापीठे. शिवाय बंगाल व पंजाबात मुसलमान बहुसंख्य असूनही तेथे त्यांच्यासाठी विभक्त मतदारसंघांची तरतूद केली होती. ज्या प्रांतांमध्ये मुसलमान, शीख किंवा हिंदू अल्पसंख्य असतील तेथे त्यांना संख्येच्या प्रमाणापेक्षा जास्त जागा देय केल्या. दलितांना स्वतंत्र मतदारसंघांप्रमाणेच राखीव जागाही जाहीर केल्या. शिवाय त्यांना सर्वसाधारण मतदारसंघांतील जागा लढविण्याचा हक्कही बहाल केला होता. या सर्व सवलती २० वर्षांसाठीच असतील, असे निर्णयात नमूद केलेले होते.

हा कपटी निर्णय जाहीर होताच दुसऱ्या दिवशी (१८ ऑगस्ट) पंतप्रधानांना पत्र पाठवून गांधीजींनी जातीय निवाड्याच्या निषेधार्थ प्राणांतिक उपोषण करण्याची एक महिन्याची रीतसर नोटिस दिली. उत्तरादाखल मॅकडोनाल्ड यांनी लिहिले

की, सर्व जातींमध्ये एकमत झाल्याखेरीज मूळ निर्णयात बदल करणार नाही. तेथेच न थांबता त्या साम्राज्यशहाने गांधीजींवर आरोप केला की, ते दलितांच्या हिताला विरोध करीत आहेत. **हा आरोप निखालस खोटाच नव्हे तर पंतप्रधानांची मनोविकृती व्यक्त करणारा होता.** आणि म्हणून तो लवकरच मोडीत काढला गेला. गांधीजी, सॅम्युएल होअर व मॅकडोनाल्ड यांच्यामधील पत्रव्यवहार लोकांच्या माहितीसाठी १२ सप्टेंबरला प्रकाशित करण्यात आला.

## महात्मा गांधींचे उपोषण

उपोषणाच्या पूर्वसंध्येपासून संपूर्ण भारतातच नव्हे तर जगातही संभ्रम, चिंता व तणाव पसरला होता. चमत्कारिक अगतिकता निर्माण झाली होती. चार्लस अँड्र्यूज, हेन्री पोलॅक व लॅसबरी यांनी ब्रिटमनधील लोकांना संभाव्य संकटाची जाणीव करून दिली. फेबिअन सोसायटीच्या वतीने जॉर्ज बर्नार्ड शॉ, हेराल्ड लास्की, चार्लस चापलिन यांनी रॅम्से मॅकडोनाल्ड यांना कानपिचक्या दिल्या होत्या. लेबर पक्षाचे पंतप्रधान असूनही त्यांचे धोरण धोकादायक आहे, असे त्यांनी सुनावले होते. इंग्लंडमधील चर्चमध्येही गांधीजींच्या प्राणासाठी खास प्रार्थना झाल्या. भारतातील अगणित मंदिरे, चर्च व मशिदींमध्येही खास प्रार्थना म्हणण्यात आल्या. कर्मठांनी हिंदू मंदिरे अस्पृश्यांसाठी प्रथमच खुली केली. गांधीजींच्या उपोषणाच्या पहिल्या दिवशी म्हणजे २० सप्टेंबर १९३२ रोजी संपूर्ण भारतभर अन्नसत्याग्रह व कडकडीत हरताळ पाळण्यात आला. एकूणच देशात सामाजिक क्रांतीचा माहौल होता!

१९ सप्टेंबर १९३२ रोजी विविध पक्षांच्या हिंदू नेत्यांनी मुंबईत परिषद भरवून या प्रकरणी तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरू केले होते. परिषदेत सरदार पटेल, राजेंद्र प्रसाद, सरोजिनी नायडू, अणे, राजाजी, सप्रू, मदन मोहन मालवीय, बॅ. जयकर, जी. डी. बिर्ला, चिमणलाल सेटलवाड, हृदयनाथ कुंझरू व मुंजे यांच्याबरोबर एम. सी. राजा, पी. बाळू (विख्यात क्रिकेटर) आणि आंबेडकर हे दलितांचे नेते तसेच आदिवासींच्या कल्याणासाठी संपूर्ण जीवन वाहिलेले अमृतलाल ठक्कर ऊर्फ ठक्करबाप्पा सहभागी झाले. परिषदेत विविध पर्यायांचा

विचार करण्यात आला. नंतर गांधीजींची भूमिका समजून घेण्यासाठी उद्योगपती घनश्यामदास बिर्ला, मथुरादास वासनजी, चुनीलाल मेहता व पुरषोत्तमदास ठाकूरदास हे येरवड्याला गेले. तेव्हा गांधीजींनी पुन्हा स्पष्ट सांगितले की, 'दलितांना जास्त जागा देण्यास आणि सर्व प्रौढ दलितांना मताधिकार देण्यास आपला पाठिंबा आहेच ; तथापि त्यांना विभक्त मतदारसंघ देण्यास विरोध आहे.'

उपोषणाच्या काळात गांधीजींना, काही अटी घालून एखाद्या खाजगी इमारतीत तात्पुरते राहावयास जाण्याची सरकारने परवानगी दिली. तथापि तशा अटी अथवा सरकारची मेहरबानी गांधीजींना नको होती. म्हणून त्यांनी येरवडा कारागृहातच उपोषणाचे व्रत चालू ठेवले. अस्पृश्यता निर्मूलन करणे हाही उपोषणाचा एक उद्देश असल्याचे पहिल्याच दिवशी गांधीजींनी वृत्तपत्रांच्या वार्ताहरांना सांगितले. कारावासातील या सत्याग्रहामुळे साऱ्या देशभर चिंतेचे आभाळ दाटून आले, असा बहुतेक वर्तमानपत्रांचा अभिप्राय होता. खग्रास सूर्यग्रहणामुळे भर दिवसा सारे आकाश काळवंडून जावे तसे गांधीजींच्या उपोषणामुळे भारताचे झाले, असे रवींद्रनाथ टागोरांनी या प्रसंगाचे वर्णन केले.

सर्वपक्षीय परिषदेच्या पुढाऱ्यांनी संयुक्त मतदारसंघांचा एक पर्याय सुचविला. पण तो आंबेडकरांनी अमान्य केला. एम. सी. राजा, पी. जी. सोळंकी, पी. बाळू वगैरे नेतेही दलितांची पर्यायी भूमिका मांडत होते. विविध नेत्यांमध्ये वाटाघाटी होत राहिल्या. त्याबरोबर चिंताही वाढत राहिली. पुढाऱ्यांचे पुणे-मुंबई दरम्यान येणे-जाणे आणि बोलणी करणे चालू राहिले. मी याविषयीचा कंटाळवाणा तपशील इथे देत नाही. पण संपूर्ण माहिती हवी असेल त्यांनी गांधीजींचे सचिव प्यारेलाल यांचे **द एपिक फास्ट** हे पुस्तक पाहावे. या एका प्रश्नावर देशातील दलितांचे सार्वमत घ्यावे असे आंबेडकरांनी सुचवले.

तथापि अन्नत्यागामुळे गांधीजींची प्रकृती तोपर्यंत चिंताजनक झाली. तरीही सार्वमताच्या अटीवर आंबेडकर अडून बसून त्यांनी करार करण्यास विलंब लावला, तर गांधीजी मरण पावण्याचा धोका होता. अखेर २५ सप्टेंबरला मुंबईत

भरलेल्या सर्वपक्षीय पुढाऱ्यांच्या परिषदेत कराराचा मसुदा मंजूर झाला. सर्वसंमतीने झालेला हा ' पुणे करार ' तार संदेशाद्वारे पंतप्रधान मॅकडोनाल्ड यांना कळविण्यात आला. आणि त्यांचा जातीय निवाडा या करारानुसार बदलावा, अशी विनंती करण्यात आली. ब्रिटिश कॅबिनेटने त्यास १९३२ च्या २६ सप्टेंबरला मंजुरी दिल्यावर त्या दिवशी गांधीजींनी उपोषण सोडले. त्याच दिवशी रवींद्रनाथ टागोर गांधीजींना भेटण्यासाठी मुद्दाम शांतिनिकेतन येथून येरवडा येथे आले होते.

## गांधी व आंबेडकर पुणे करार

या करारास विशेष ऐतिहासिक महत्त्व आहे. ६४ वर्षांचे महात्मा गांधी येरवडा कारागृहाच्या आवारातील आंब्याच्या झाडाखाली लोखंडी पलंगावर प्राणाची बाजी लावून पडलेले होते. ते कलोनिअल पंतप्रधानाच्या अरेरावीपणाचा निषेध करण्यासाठी ! तसेच हिंदू समाजाचे विघटन रोखण्यासाठी ! दलितांना विशेष हक्क देण्यास गांधीजी तत्परच होते. पण स्वतंत्र मतदारसंघ देऊन त्यांना हिंदू समाजापासून विलग करणे गांधीजींना नापसंत होते. वस्तुतः ऑगस्ट १९३१ पर्यंत गांधीजींना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जात माहीत नव्हती. त्यांची आंबेडकरांशी पहिली भेट १४ ऑगस्ट १९३१ रोजी मुंबईत मणि भवनात झाली होती. ही मुलाखत गोलमेज परिषदेच्या दुसऱ्या सत्रासाठी लंडनला जाण्याआधी झाली होती. या भेटीत आंबेडकरांच्या मनात गांधींविषयी किंतु निर्माण झाला असे म्हणतात. असो.

पंतप्रधानांनी दलितांना देऊ केलेल्या मतदारसंघांपेक्षा सुमारे दुप्पट जागा देण्यास गांधीजी प्रारंभापासून तयार होते. त्यानुसार वरील पुढाऱ्यांनी तयार केलेल्या कराराच्या मसुद्याला आंबेडकर व इतर दलित नेत्यांनी संमती दिली होती. त्यानंतरही गांधीजींच्या सूचनेनुसार हा मसुदा मुंबईत भरलेल्या पुढाऱ्यांच्या परिषदेने संमत करणे आवश्यक होते. हे सर्व सोपस्कार पूर्ण करून २५ सप्टेंबरला हा करार सर्वांच्या सहमतीने पास करण्यात आला. तो तारेने लंडनला कळविण्यात आला. त्यानुसार पंतप्रधान मॅकडोनाल्ड यांना आपला मूळचा तथाकथित कम्युनल ॲवार्ड बदलून नवीन करारास ब्रिटिश कॅबिनेटची मंजुरी घ्यावी लागली. लंडनहून मंजुरीची तार आल्यावरच महात्माजींनी उपोषण सोडले.

गांधीजींनी मॅकडोनाल्डच्या मूळ ॲवार्डपेक्षा दलितांना खूपच जास्त जागा व हक्क दिले. या करारानुसार दलितांना देशाच्या मध्यवर्ती कायदेमंडळात १८ टक्के राखीव जागा लाभल्या. प्रांतिक कायदेमंडळांपैकी सिंधसह मुंबई प्रांतात १५; मध्यप्रांत-वऱ्हाड २०; मद्रास ३०; पंजाब ८; बिहार व ओरिसा १८; आसाम ७; बंगाल ३० व संयुक्त प्रांत २०. राखीव जागांचे हे प्रमाण दलितांच्या एकूण लोकसंख्येतील प्रमाणापेक्षा बरेच जास्त होते.[३]

(१) या करारानुसार प्रांतिक कायदेमंडळांमध्ये असलेल्या संयुक्त मतदारसंघांपैकी दलितांसाठी १४८ मतदारसंघ राखीव ठरविण्यात आले. (२) सर्वसाधारण मतदारसंघातील दलित मतदारांना प्राथमिक निवडणुकीत प्रत्येक राखीव जागेसाठी चार उमेदवारांचे पॅनेल निवडून देण्याचा अधिकार देण्यात आला. या पॅनेलमधून नंतर घेतल्या जाणाऱ्या निवडणुकीत आरक्षित जागेसाठी एक उमेदवार निवडण्याची तरतूद करण्यात आली. (३) प्रांतिक कायदेमंडळांप्रमाणेच मध्यवर्ती कायदेमंडळातील राखीव जागांसाठी याच धर्तीवर निवडणूक घेण्यास या कराराने मान्यता दिली. (४) ब्रिटिश हिंदुस्तानात मध्यवर्ती कायदेमंडळाच्या सर्वसाधारण मतदारसंघांतील अठरा टक्के जागा दलितांसाठी आरक्षित करण्यात आल्या. (५) प्रांतिक व मध्यवर्ती कायदेमंडळातील राखीव जागांसाठी स्वीकृत केलेली प्राथमिक निवडणुकीची व्यवस्था दहा वर्षांनंतर किंवा सर्व संबंधित पक्षांच्या एकमताने त्याआधीही संपुष्टात आणण्याची तरतूद करारात होती. (६) लोथियन समितीने सूचित केल्याप्रमाणे जो मताधिकार दिला जाईल तो स्वीकारावा लागेल. (७) सरकारी किंवा स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या नेमणुकांमध्ये अस्पृश्यांविरुद्ध पक्षपात होऊ नये हे पाहावे. (८) शिक्षणासाठी दिल्या जाणाऱ्या अनुदानापैकी काही रक्कम दलितांसाठी देण्यात यावी.

वरील अर्थाची कलमे असलेल्या करारावर मालवीय, डॉ. राजेंद्र प्रसाद, राजाजी, सप्रू, कुंझरू, चुनीलाल मेहता, पी. कोदंडराव, बा. सी. कामत, गोपाळराव देवधर, बॅ. जयकर, आ. रा. भट, रघुनाथराव बखले, अवंतिकाबाई गोखले यांनी सह्या केल्या. दलितांतर्फे बाबासाहेब आंबेडकर, एम. सी. राजा,

गणेश आकाजी गवई, पां. न. राजभोज, श्रीनिवासन्, डॉ. सोळंकी, बी. बी. पालवणकर ऊर्फ पी बाळू (क्रिकेटर) यांनी स्वाक्षऱ्या केल्या. गांधीजी अत्यंत अशक्त झाल्याने करारावर त्यांची स्वाक्षरी घेता आली नव्हती.

२७ सप्टेंबर १९३२ रोजी तिथीप्रमाणे गांधीजींचा ६४ वा वाढदिवस असल्याने त्या दिवसापासून २ ऑक्टोबरपर्यंत अस्पृश्यतानिवारण सप्ताह भारतभर पाळला गेला. देशभरची मंदिरे व पाणवठे खुले करण्यात आले. सहभोजने झाली. सभा झाल्या. भारतात महान जागृती होत असल्याचा भास झाला. पण सर्व माणसांची मने खुलली नाहीत. तात्पुरती उघडलेली अनेक मंदिरांची दारे दलितांसाठी पुन्हा बंद झाली. वर्ध्याचे लक्ष्मीनारायण मंदिर यासारखे अपवाद कमी होते.

महात्मा गांधींना लाभलेली प्रचंड लोकप्रियता व राष्ट्रव्यापी जनाधार पाहून दोनच दिवसांनी त्यांना मुलाखती व भेटी देण्याची सवलत ब्रिटिशांनी रद्द केली. त्यांचा पत्रव्यवहार बंद केला. त्यांच्यावरील सर्व निर्बंध पूर्ववत लागू करण्यात आले. महिन्याभरच्या पत्रव्यवहारानंतर तुरुंगातून फक्त अस्पृश्यतानिवारणाचा पत्रव्यवहार करण्यास ब्रिटिश सरकारने त्यांना अनुमती दिली.

मुंबईतील ३० सप्टेंबर १९३२ च्या जाहीर सभेत उपरोक्त अस्पृश्यतानिवारण संघ स्थापन करण्यात आला. तेव्हा गांधीजी कारावासातच होते. लवकरच त्याला ‘ हरिजन सेवक संघ ’ हे नाव देण्यात आले. या संघाचे अध्यक्ष घनश्यामदास बिर्ला तर सरचिटणीस अमृतलाल ठक्कर हे होते. अस्पृश्यतानिवारणाचे काम निष्ठापूर्वक करणाऱ्या अप्पासाहेब पटवर्धनांनी रत्नागिरी तुरुंगात १९३० व १९३२ मध्येही असताना भंगीकाम करण्याची मागणी केली होती. प्रशासनाने मागणी अमान्य केल्यामुळे त्यांनी कारावासात अन्नसत्याग्रह केला होता. शेवटी सरकारला नियमात बदल करावा लागला. मंदिर, सार्वजनिक पाणवठे व शाळांमध्ये दलितांना आडकाठी असू नये, असे नारायणशास्त्री मराठे, लक्ष्मणशास्त्री जोशी, केशव लक्ष्मण दप्तरी, चिंतामणशास्त्री वैद्य, श्रीधरशास्त्री पाठक वगैरेही म्हणत असत.

## कायदेभंग आंदोलनात कोंडी

राष्ट्रीय जीवनात परिवर्तन घडत असताना १७ नोव्हेंबर १९३२ पासून गोलमेज परिषदेचे तिसरे सत्र सुरू होऊन नाताळापूर्वीच संपले. तेव्हा सर्व काँग्रेस नेते तुरुंगातच होते. १९३३ च्या प्रारंभापासून कायदेभंगाची चळवळ संस्थगित ठेवून कायदेमंडळांमधून सरकारशी लढावे असा एक विचार काही काँग्रेसजनांनी मांडला. तथापि आंदोलन थांबविण्यास सरदार पटेल, नेहरू व गफार खान कसून विरोध करणार, हे दिसतच होते. म्हणून मध्यवर्ती सरकारच्या सल्ल्यानुसार गांधीजींना तुरुंगात भेटण्यावर मुंबई सरकारने अधिक निर्बंध लादले. वस्तुतः भारतमंत्री सॅम्युएल होअर यांनी विलिंग्डन यांना १२ आणि २६ जानेवारी १९३३ रोजी लिहिलेल्या पत्रांमधून कळविले होते की, नवीन संविधान कार्यान्वित होईपर्यंत गांधीजींना कारावासात ठेवणे कडवटपणाचे (अन्‌पॅलेटेबल) आणि असभ्यपणाचेही होईल. तथापि दिल्ली व मुंबईतील सरकारांना हे पटले नाही. कारण त्यातून सर्व राजबंदी लोकांना सर्वक्षमा मंजूर करण्याची मागणी निर्माण होईल, अशी सरकारला भीती वाटत होती. अशा स्थितीत सरकारशी राजकीय संवादाची शक्यताच उरली नाही.[४]

गांधीजी अस्पृश्यतानिवारणास महत्त्व देऊन कायदेभंग आंदोलनावरील लक्ष तिकडे वळवतील अशी काही जणांनी भीती व्यक्त केली. स्वतः नेहरूंनी याबाबत आपले मत आत्मकथेत नमूद केले. प्राप्त परिस्थितीत कार्यकर्त्यांमध्ये गोंधळ निर्माण झाला, काही जण निराश झाले. जमनादास मेहता व रोहित मेहता यांनी चळवळ थांबविण्याची मागणी केली. आतापर्यंत सविनय कायदेभंगास ओहोटी लागलेली होतीच. मात्र ३१ मार्च १९३३ रोजी बेकायदा कलकत्ता काँग्रेस अधिवेशन भरले. पण हंगामी काँग्रेस अध्यक्ष माधव श्रीहरी अणे अधिवेशनासाठी कोलकात्यास जात असताना वाटेतच पकडले गेले. जवाहरलालजींच्या वृद्ध आईला दिलेल्या अमानुष वागणुकीचा मुंबईत तीव्र निषेध करण्यात आला.

गांधीजींनी हरिजन चळवळीसाठी ८ मे १९३३ पासून कारागृहात २१ दिवसांचे उपोषण सुरू केल्यावर त्यांची प्रकृती बिघडली. नेहरू, मालवीय, सईद महमुद, डॉ. अन्सारी, मौलाना आझाद, श्रीप्रकाश आणि के. नटराजन या नेत्यांनी

गांधीजींना उपोषणाबद्दल तीव्र नापसंती व्यक्त करणाऱ्या तारा पाठविल्या. गांधीजींचे मन वळविण्यासाठी राजाजी येरवडा येथे गेले. अगणित तारा व पत्रे येरवड्यात येऊन पडली. गांधीजींच्या प्रकृतीतील बिघाड वाढतच राहिला. " गांधी २१ दिवसांच्या उपोषणातून वाचणे अशक्य असून त्यांचे तुरुंगातील मरण सरकारला फार महाग पडेल ", असे मुंबई सरकारने मध्यवर्ती सरकारला तारेने कळविले. त्यानुसार दिल्लीने गांधीजींना विनाअट मुक्त करण्यास परवानगी दिली. गांधीजींच्या सांगण्यानुसार हंगामी काँग्रेस अध्यक्ष अणे यांनी सहा आठवड्यांसाठी सविनय कायदेभंग आंदोलन स्थगित ठेवले. पण तरीही सत्याग्रह चालूच राहिला. विलिंग्डन साहेब अभिमानाने सांगत की, " आम्ही सविनय कायदेभंगाचा गळा यशस्वीपणे दाबून काँग्रेसचे नीतिधैर्य खच्ची केले. " तथापि आंदोलनाच्या भीतीने ते सरदार पटेल, जवाहरलाल नेहरू, खान अब्दुल गफार खान तसेच सरहद्द प्रांतातील इतर पुढारी सादुल्ला खान आणि काझी अटौल्ला खान यांना जुलै १९३४ पर्यंत कारावासातून मुक्त करण्यास धजत नव्हते.[५]

जे. एम. सेनगुप्ता या झुंजार बंगाली पुढाऱ्यास कारावासातच मरण आले होते. सप्टेंबर १९३४ मध्येही बरेच स्वातंत्र्यसैनिक तुरुंगामध्येच होते. आंदोलन पुन्हा सुरू होण्याची सरकारला सतत भीती वाटे. काँग्रेसचे गुजरात विद्यापीठ, पाटीदार बोर्डिंग, वल्लभ विद्यालय वगैरे पंधरा-वीस राष्ट्रीय संघटनांवरील बंदीहुकूम सरकार रद्द करू शकले नव्हते. संस्थानांमध्ये आश्रय घेतलेल्या शेकडो कार्यकर्त्यांना सरकार ब्रिटिश इंडियात प्रवेश करू देत नव्हते. तसेच संस्थानांच्या नागरिकांनाही इकडे प्रवेश नाकारला जात होता. विशेषतः गुजरातच्या बाबतीत सरकारने कडक धोरण चालू ठेवले. सरहद्द प्रांतातील ' रेड शर्ट्स ' या संघटनेवरील बंदी सप्टेंबर १९३४ पर्यंतही रद्द करण्यात आली नाही. खान अब्दुल गफार खान व त्यांच्या बंधूंना तुरुंगातून सोडल्यावरही त्यांना सरहद्द प्रांतात आणि पंजाबातही प्रवेश देण्यास सरकारने नकार दिला. सरहद्द प्रांताच्या काँग्रेस समितीवरील बंदीहुकूम मागे घेण्यासही सरकारने नकार दिला. या प्रांताच्या सरकारने रेड शर्ट्सचा धसका घेतला होता, हे सरकारी दस्तऐवजांमधून स्पष्ट

दिसते. झुंजार सरहद्द प्रांतास सर्वाधिक दडपशाहीला तोंड द्यावे लागले व अनंत यातना भोगाव्या लागल्या. त्याखालोखाल गुजरात, कर्नाटक, संयुक्त प्रांत व बंगाल या प्रांतांना या आंदोलनात यातना भोगाव्या लागल्या. काँग्रेसने आंदोलन थांबविल्यावरही नोकरशाहीने तिथे सूडबुद्धीने भयंकर अन्याय केले.[६]

दरम्यान नेहरू, पटेल व गफार खान कैदेत असताना काही पुढाऱ्यांनी १२ जुलै १९३३ रोजी पुण्यामध्ये सभा भरवून निर्णय घेतला की, कायदेभंग बिनशर्त मागे घेऊ नये; व्यक्तिगत पातळीवर कायदेभंग करावा ; भूमिगत कारवाया बंद कराव्या आणि युद्धमंडळे बंद करावी. सरकारची भयंकर दडपशाही आणि हुकूमशाही यामुळे हा निर्णय घेणे भाग पडले होते. हटवादी व उर्मट व्हाइसरॉय विलिंग्डन आताही गांधीजींना मुलाखत देण्यास तयार नव्हता. कारण त्याला बादशहा पाचव्या जॉर्जचा पाठिंबा होता. याबाबत वरील एका प्रकरणात विवेचन केलेले आहे.

जनआंदोलनाचे निलंबन केल्याची वार्ता तुरुंगात वाचून नेहरू अत्यंत विषण्ण झाले होते. ज्या आंदोलनासाठी हजारो देशभक्त तुरुंगात गेले आणि लाखो लोक ज्यात गोवले गेले ते आंदोलन मागे घेतल्याचे त्यांना अतीव दुःख झाले. पण अलीपूरच्या कारागृहात असताना बाहेरची वस्तुस्थिती त्यांना माहीत नसावी. खरे तर दुसरा पर्याय नव्हता.

१९३२ सालातील सविनय कायदेभंगाला १९३० मधील आंदोलनापेक्षा कमी लोक-प्रतिसाद लाभला हे खरे. याविषयीची कारणमीमांसा करण्याचे हे स्थळ नव्हे! पण १९३२ मधील व्हाइसरॉयच्या अत्यंत आक्रमक आणि युध्यमान पुढाकाराखाली शासकीय यंत्रणेने निर्घृणपणे दडपशाही व दहशतवादी उपाययोजना केल्या आणि आंदोलन दडपून टाकले. अशा प्रतिकूल स्थितीतही काँग्रेसने हा लढा बराच यशस्वी केला हे मात्र मान्य करावे लागते.

या आंदोलनात हिंदुत्ववादी घटकांना आपल्या छताखाली घेण्यात काँग्रेसला यश न आल्याने महाराष्ट्रातील हिंदुमहासभा काँग्रेसपासून लांब जाऊ लागली. तसेच मवाळ राजकारण्यांनाही आपल्या प्रभावक्षेत्रात कायम ठेवण्यात काँग्रेसला १९३० पेक्षा १९३२-१९३३ मध्ये कमी यश लाभले. या दोन्ही कारणांमुळे काँग्रेसला

वित्तदान करणारा मुंबईतील उद्योगपतींचा वर्ग १९३३ पासून काही काळ तरी काँग्रेसपासून लांब गेला. या सर्व घटकांचा एकत्रित परिणाम म्हणून काँग्रेसला आगामी संविधानाबाबत सरकारशी वाटाघाटी करण्याची तयारी दाखवावी लागली.

तथापि कायदेभंग आंदोलनाच्या दोन्ही फेऱ्यांमधून काँग्रेसने जे सामर्थ्य आणि ऐक्य दाखवून दिले, त्यामुळे ब्रिटिशांनाही काँग्रेसशी वाटाघाटी करणे भाग पडले. शिवाय सविनय कायदेभंगाच्या अहिंसा आचारप्रणालीमुळे साऱ्या जगात भारताची उज्ज्वल प्रतिमा निर्माण झाली. त्यामुळेच ब्रिटिशांना नमते घेणे भाग पडले.

समारोप करताना सांगितले पाहिजे की, सविनय कायदेभंग हा गुंतागुंतपूर्ण लढा अत्यंत गुंतागुंतीच्या काळात उभा करावा लागला होता. जागतिक आर्थिक मंदीमुळे विरोधाभासात्मक परिस्थिती निर्माण झालेली होती. देशाची कृषी अर्थव्यवस्था कोलमडली होती. कारखान्यांच्या मालास मागणी नव्हती. नागरी भागात तीव्र बेरोजगारी होती. जागृत झालेला कामगारवर्ग आपल्या हक्कांसाठी आक्रमक झालेला होता. विविध आर्थिक हितसंबंधांमध्ये संघर्ष निर्माण झाला. अशाही स्थितीत मुंबईतील व्यापारी वर्गाने, वर कथन केल्याप्रमाणे, काँग्रेसला भरघोस पाठिंबा तर दिलाच पण शिवाय ब्रिटिशांची आर्थिक नाकेबंदी केली.

सर होमी मोदी यांचे चरित्रकार डी. आर. मंकीकर यांनी म्हटल्याप्रमाणे होमी मोदी आणि पुरषोत्तमदास ठाकूरदास यांनी मुंबई गिरणीमालक संघ आणि लँकेशायरच्या गिरणीमालकांची अत्यंत प्रभावी संघटना यांच्यात 'उभयपक्षी व्यापार करार' केला होता. या करारानुसार आगामी 'भारत सरकार सांविधानिक कायदा १९३५' यास पार्लमेंटमध्ये लँकेशायर लॉबीने विरोध करू नये, असे ठरलेले होते. पार्लमेंटमध्ये हे विधेयक मांडले गेल्यावर लँकेशायरने मोदी व ठाकूरदासांना दिलेले आश्वासन पाळले. म्हणूनच हे विधेयक विनासायास पारित झाले.[७]

भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला मुंबईने अशा अनेक मार्गांनी प्रचंड योगदान दिलेले आहे. मुंबईतील कायदेभंग आंदोलनाने इंग्लंडला दाखवून दिले की, काँग्रेसचा विरोध पत्करून येथे फार काळ राज्य करणे असंभवनीय! भारतीयांचीही धारणा पक्की झाली की, परकीयांच्या जाचातून मुक्त होणे आपणास लवकरच शक्य होणार आहे.

## कारावासातील वैचारिक जडणघडण

सविनय कायदेभंग आंदोलनासाठी महाराष्ट्रातील हजारो युवकांनी शालेय वा महाविद्यालयीन शिक्षणाचा त्याग केला हे खरे. पण त्याचबरोबर १९३०-१९३२ च्या आंदोलनासाठी कारावास भोगत असताना त्यांची वैचारिक जडणघडण झाली हे महत्त्वाचे होय. कारावासात संस्कार झालेले काही पुरुष पुढे महाराष्ट्राचे शिल्पकार बनले. नाशिक, धुळे, येरवडा, विसापूर व नागपूर कारागृहे एका अर्थी विद्यापीठे ठरली होती. त्याकाळी मार्क्सवाद, कम्युनिझम यांवरील साहित्य मुक्तपणे उपलब्ध नव्हते. मात्र युवकांना त्याविषयी जिज्ञासा वाटत होती. त्याबाबत चर्चा व विचारविनिमय करण्याची संधी कारागृहवासीयांना मिळाली. त्यातून अनेकांची वैचारिक जडणघडण झाली.

धुळे कारागृहात एकाच वेळी आचार्य विनोबा भावे, जमनालाल बजाज, प्यारेलाल, गुलझारीलाल नंदा, खंडूभाई देसाई, मणिलाल कोठारी, साने गुरुजी, आपटे गुरुजी, बाळूभाई मेहता, अण्णासाहेब दास्ताने, लक्ष्मणशास्त्री जोशी होते. याच वास्तव्यात विनोबांनी मराठी **गीताई** च्या हस्तलिखितास अंतिम रूप दिले. तसेच त्यांनी सोबतच्या बंदिवानांपुढे गीतेवर प्रवचने दिली. ही सर्व प्रवचने साने गुरुजींनी तत्परतेने लिहून घेतली, अगदी शब्दशः! नंतर सर्व प्रवचने पुस्तकाच्या रूपात **गीता प्रवचने** नावाने प्रकाशित झाली. अनेक भाषांमध्ये त्यांचे भाषांतरही प्रसिद्ध झाले. अशी प्रवचने, भाषणे व चर्चा ऐकून तुरुंगातील युवकांना नवीन दृष्टी लाभली, पोक्तपणा आला. अनेकांना जगाकडे चिकित्सकपणे पाहण्याची सवय लागली. अभिजात साहित्य व वैचारिक लेखन वाचण्याचे महत्त्व समजले. अनेक जण दुसऱ्या भाषा शिकले. अनेक जणांच्या व्यक्तिमत्वाचा कमीअधिक प्रमाणात विकास झाला. बहुतेकांच्या विचारांची क्षितिजे खूप रुंद झाली. धुळे जेलमधील उपरोक्त प्रत्येक व्यक्तीने आपले राजकीय व सामाजिक स्थान निर्माण केले.

१९३२ च्या आंदोलनामुळे अगणित विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडला होता. अशा विद्यार्थ्यांपैकी कऱ्हाडचे यशवंत बळवंत चव्हाण हे पुढे आधुनिक

महाराष्ट्राची घडण करणाऱ्यांच्या श्रेय नामावलीत विराजमान झाले. यशवंतरावांनी आत्मचरित्रात नमूद केल्याप्रमाणे ' १९३२ साली कारावासात असताना आपण व आपल्या मित्रांनी ह. रा. महाजनी यांच्यासारख्या पंडिताकडून कालिदासाचे **शाकुंतलम्** हे नाटक समजून घेतले '. तसेच त्यांनी भाषांवर प्रभुत्व असलेले आचार्य स. ज. भागवत यांच्याकडून शेक्सपियरची काही नाटके समजून घेतली. काही महिने विसापूर कारागृहात असताना यशवंतराव गुजराती भाषाही शिकले.[८] सेनापती बापटांचे चिरंजीव वामन पांडुरंग बापट तुरुंगात कम्युनिस्ट झाले. त्यांच्याबरोबर सोलापूरचे अनंत केरू भोसले होते. विसापूरमध्ये असलेले दादा म्हणजे यशवंतराव कृष्णा परुळेकर हे स. का. पाटील यांच्यासारख्या इंग्रजीवर प्रभुत्व असलेल्या वक्त्याकडून इंग्रजी भाषा शिकले. शिवाय तुरुंगातील वाचनालयाचे व्यवस्थापन करण्याचे काम त्यांना मिळाल्यामुळे अभ्यासाची संधी मिळाली.

स्वतः गांधीजी व सरदार पटेल येरवडा कारागृहात असल्याने तेथील अनेक बंदिवानांची वैचारिक जडणघडण होणे स्वाभाविकच होते. तेथून गांधीजींनी लिहिलेली हजारो पत्रे व लेख **महात्मा गांधी संकलित साहित्यात** प्रकाशित झाली आहेत. त्या पत्रांमधून त्यांनी स्वातंत्र्यसैनिकांना मार्गदर्शनपर सूचनाही दिल्या होत्या.

नाशिक कारागृहात भुलाभाई देसाई, जयप्रकाश नारायण, मिनू मसानी, अशोक मेहता, मोरारजी देसाई, जे. सी. कुमारप्पा व त्यांचे बंधू अशी बुद्धिवंत मंडळी असल्यामुळे तत्त्वज्ञान, इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र व कायदा या विषयांमधील गुंतागुंतीच्या प्रश्नांवर सतत वादविवाद होत असत. रशियातील बोल्शेविक राज्यक्रांतीनंतरच्या काळात भारतातील काही युवकांवर मार्क्सवादी विचारांचा प्रभाव पडला होता. विशेषतः ब्रुसेल्स आंतरराष्ट्रीय काँग्रेसनंतर जवाहरलाल नेहरू व सुभाषचंद्र बोस तसेच सरदार भगतसिंग यांनी मार्क्सवादी विचारधारेचा अभ्यास केलेला होता. मात्र काँग्रेसला तेव्हा ही विचारसरणी स्वीकारणे शक्य नव्हते. जयप्रकाश नारायण अमेरिकेत शिकत असताना त्यांनी मार्क्सवादी साहित्य वाचले असल्याने, त्यांच्यावर मार्क्सवादाचा प्रभाव पडला होता. हिंदुस्तानात परत आल्यावर जयप्रकाश हे नेहरूंच्या सूचनेनुसार काँग्रेसच्या कार्यालयात काम करू लागले. १९३२ च्या चळवळीत जयप्रकाशजींना मद्रासमध्ये अटक झाल्यावर त्यांना

नाशिक कारागृहात ठेवले होते. याच ठिकाणी भुलाभाई देसाई, मोरारजीभाई, जे. सी. कुमारप्पा व बंधू, मसानी, अशोक मेहता, युसुफ मेहेरअली, अच्युतराव पटवर्धन, ना. ग. गोरे वगैरेंशी जयप्रकाश नारायण यांच्या चर्चा व वादविवाद झाले. नाशिकमधील याच विचारविमर्शातून नंतर १९३४ साली काँग्रेस समाजवादी पक्ष निर्माण झाला.

येरवडा तुरुंगात असलेल्या एस. एम. जोशी यांनीही मार्क्सवादी साहित्य वाचले होते. मात्र जोशी, मसानी, मेहेरअली व पटवर्धन यांच्यावर मार्क्सवादाचा प्रभाव असला, तरी ते कधीच मार्क्सवादी झाले नाहीत. कायदेभंग आंदोलनासाठी कारावासात गेलेले इतर काही राजबंदी कारावासातून मुक्त झाल्यावर कम्युनिस्ट पक्षात गेले. मुळशीच्या सत्याग्रहाचे एक सेनानी विनायकराव भुस्कुटे अनेकदा कारावास भोगल्यावरही १९३० आणि १९३२ सालांमध्येही तुरुंगात गेले होते. येरवडा कारागृहातून सुटल्यावर विनायकराव मार्क्सवादाचा पुरस्कार करू लागले. साताऱ्याचे पंढरीनाथ घाणेकर समाजवादाकडे वळले आणि १९४० नंतर कम्युनिस्ट झाले. लालजी पेंडसे आणि र. के. खाडिलकर यांच्यावर मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारांचा प्रभाव पडलेला होता. वाईच्या प्राज्ञपाठशाळेतील अध्यापक व विद्यार्थी यांपैकी ४४ जणांनी या चळवळीत कारावास भोगला होता. त्यांपैकी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी व महादेव वासुदेव वाटवे आणि १९३२ च्या चळवळीत पकडले गेलेले काही कार्यकर्तेही रॉयवादी झाले. त्याचप्रमाणे वसंतराव भ. कर्णिक व त्यांचे बंधू द्वा. भ. कर्णिक, वामनराव कुळकर्णी, ह. रा. महाजनी, आत्माराम पाटील, अनंत केरू भोसले हे तरुणही रॉयवादी झाले. कारावासात असताना यशवंतराव चव्हाणांवरही रॉयवादाचा थोडा प्रभाव पडला होता.

विचारप्रणालीच्या पातळीवरील आपले विचार व गांधीजींशी असलेले मतभेद व्यक्त करणारे **Whither India** हे पुस्तक नेहरूंनी १९३३-३४ साली लिहिले. संपूर्ण स्वातंत्र्य आणि समाजवादी अर्थव्यवस्था यांची सांगड घालण्यासाठी ते आग्रही होते. मात्र समाजवादाचा आग्रह असूनही नेहरू गांधीजींपासून लांब जाण्यास तयार नव्हते. तसेच काँग्रेस समाजवादी पक्षाच्या स्थापनेसही नेहरूंचा पाठिंबा नव्हता. या पक्षावर प्रेम होते, पण त्यांचा या पक्षाला पाठिंबा नव्हता.

## काँग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना

काँग्रेसने मार्क्सवादी समाजवादी धोरणांचा अंगीकार करावा यासाठी जवाहरलाल नेहरू व सुभाष बाबू यांनीही प्रयत्न करून पाहिले होते. परंतु त्यासाठी त्यांना पक्ष श्रेष्ठींशी संघर्ष करणे शक्य झाले नाही. महाराष्ट्रातील कम्युनिस्टांनी इतर समविचारी व्यक्तींच्या सहमतीने कामकरी व शेतकरी पक्ष स्थापन करून भांडवलशाही आणि ब्रिटिश सरकारशी जोरदार लढा दिला. कधी काँग्रेसच्या साहाय्याने तर कधी स्वतंत्रपणे त्या पक्षाने लढा दिला. याबाबतचे विवेचन वरील एका प्रकरणात आलेले आहेच. मात्र हा पक्ष केवळ नागरी भागातील आणि विशेषतः मुंबई, सोलापूर व नागपुरातील कामगारांच्या कल्याणासाठी लढला. हा पक्ष किसानांपर्यंत पोहोचलाच नव्हता. म्हणून जनताजनार्दनाला हा पक्ष ' आपला ' असा वाटला नव्हता. मीरत खटल्यापासून ब्रिटिशांनी त्याची गळचेपी केली व नंतर त्याचे विघटन झाले.

उपरोक्त नाशिक तुरुंगातील विचारविमर्शानंतर नवीन वैचारिक अभिसरण सुरू झाले. युवक चळवळीत नेहरूंशी निकटचा संपर्क आलेले युसुफ मेहेरअली, कमलादेवी चट्टोपाध्याय, बॅ. पुरषोत्तम त्रिकमदास वगैरे काँग्रेसच्या व्यासपीठावरून १९३३ पासून प्रतिपादन करीत की, काँग्रेसने समाजवादी विचारप्रणालीचा अंगीकार करावा. रांचीमध्ये २-३ मे १९३४ रोजी भरलेल्या काँग्रेस पक्षाच्या बैठकीत मिनू मसानी यांनी शेतकरी व कामगारांना संघटित करण्यावर भर द्यावा, अशी एक दुरुस्ती सुचवली. याबाबत बोलताना त्यांनी मेहेरअली व बॅ. पुरषोत्तम वगैरेंनी तयार केलेला पक्षाचा कार्यक्रम विशद केला. मात्र संकल्पित समाजवादी पक्षाने काँग्रेसचे नाव लावू नये, असे ज्येष्ठ काँग्रेस नेत्यांचे मत होते. समाजवादाचा जोरदार पुरस्कार करणारे जवाहरलालजी अजूनही तुरुंगातच असल्याने समाजवादी युवकांनी सबुरीने घ्यावे, असा गांधीजींनी त्यांना सल्ला दिला होता. गांधीजींचा विरोध नसला तरी समाजवादी पक्ष स्थापन करण्याची वेळ अद्याप आलेली नाही असे त्यांचे व नेहरूंचे मत होते.

अच्युतराव पटवर्धन, मेहेरअली, मसानी, जयप्रकाश नारायण, पुरषोत्तम त्रिकमदास, अशोक मेहता, ना. ग. गोरे व एस. एम. जोशी यांच्याप्रमाणेच संयुक्त

प्रांत व बिहारमधील युवकांमध्येही समाजवादी विचारधारा असलेला एक मोठा गट काँग्रेसमध्ये होता. काशी विद्यापीठाचे कुलगुरु आचार्य नरेंद्र देव त्या गटाचे प्रेरणास्थान होते. विद्याव्यासंगी नरेंद्र देव यांनी मार्क्सवादाचा अभ्यास केलेला होता. भारतीय स्वातंत्र्याचा लाभ शेतकरी आणि कामगारांना व्हायला पाहिजे, आणि त्यादृष्टीने स्वातंत्र्य चळवळीला समाजवादी आचारविचारांची जोड दिली पाहिजे असे त्यांना वाटे. मोहनलाल गौतम, डॉ. संपूर्णानंद, गंगाशरण सिंह, डॉ. राम मनोहर लोहिया, जयप्रकाशजी, कमलादेवी चट्टोपाध्याय आणि महाराष्ट्रातील वरील कार्यकर्ते १७ मे १९३४ रोजी अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या बैठकीसाठी पाटण्यात आले होते. या बैठकीच्या पूर्वसंध्येला पाटण्यातच आचार्य नरेंद्र देवांच्या अध्यक्षतेखाली समाजवादी तरुणांची बैठक झाली. या बैठकीत काँग्रेस समाजवादी पक्ष स्थापन करण्याचा निर्णय झाला. जोशी व गोरे यांनी अशीच बैठक पुण्यात न. वि. गाडगीळ यांच्या घरी १ जुलै १९३४ रोजी घेतली व पाटण्यातील निर्णयाचा पुनरुच्चार केला.

काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन ऑक्टोबर १९३४ मध्ये मुंबईत संपन्न झाले. त्यासाठी संपूर्ण देशातून कार्यकर्ते मुंबईत आलेले होते. हे निमित्त साधून समाजवादी कार्यकर्त्यांनी मुंबईतच काँग्रेस समाजवादी पक्ष रीतसर स्थापन केला. पक्षाचे पहिले अधिवेशन इथेच पार पाडले. हा सोहळा या महानगरात झाल्याने त्यास व्यापक प्रसिद्धी व प्रतिसाद लाभला. तेव्हापासून मेहेरअलींचे राष्ट्रीय आंदोलनातील स्थान खूपच उंचावले. काँग्रेस समाजवादी पक्षाचे पहिले अध्यक्ष झाले आचार्य नरेंद्र देव. सरचिटणीस पदावर जयप्रकाश नारायण यांची निवड करण्यात आली. या दोघा पुढाऱ्यांव्यतिरिक्त राममनोहर लोहिया, युसुफ मेहेरअली, अच्युतराव पटवर्धन, कमलादेवी चट्टोपाध्याय, एस. एम. जोशी. ना. ग. गोरे आणि मिनू मसानी व डॉ. संपूर्णानंद हे या पक्षाचे संस्थापक सदस्य होते.

राष्ट्रीय काँग्रेसमध्येच राहून या मातृपक्षास समाजवादी विचारधारा आणि कार्यक्रम स्वीकारण्यास भाग पाडणे हे या पक्षाचे ध्येय होते. या पक्षाच्या आणि

कम्युनिस्टांच्या धोरणांमध्ये काही अंशी साम्य असले, तरी या पक्षाला भारतीय समाजरचना, समाजमन आणि अर्थव्यवस्थेची अधिक वस्तुनिष्ठ जाण होती. म्हणूनच काँग्रेस या मातृपक्षाचे विभाजन करण्याचे समाजवाद्यांनी टाळले. मात्र आर्थिक धोरणांबाबत समाजवादी गटाचे काँग्रेसशी बरेच मतभेद होते. अनेक मुद्यांवर पक्षांतर्गत वादविवादही होत राहिले. तथापि त्यातून पक्षात बेशिस्त माजली नाही. समाजवादी कार्यकर्ते काँग्रेसमधील डावा गट म्हणून कार्यरत राहिले. त्यांना काँग्रेसमधील ' जिंजर ग्रुप ' असेही म्हटले जाई.

मूळच्या काँग्रेस समाजवादी पक्षात पां. वा. गाडगीळ, साने गुरुजी, केशव ऊर्फ बंडू गोरे, विनायकराव कुलकर्णी, अण्णा साने, गंगाधर ओगले, एम. एल. दातवाला, ग. प्र. प्रधान, शं. द. जावडेकर, अच्युतराव पटवर्धन वगैरेंचा समावेश झाला. नारायणराव गोरे, एस. एम. व अच्युतराव वगैरेंनी मार्क्सवाद आणि फेबिअन सोशालिझमचा अभ्यास केलेला होता. जयप्रकाश नारायण यांच्या **सोशालिझम** या इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद गोरेंनी **समाजवादच का?** या पुस्तकाच्या रूपाने केला. त्या काळात हे पुस्तक आणि आचार्य शं. द. जावडेकर यांचे **आधुनिक भारत** या पुस्तकांची शेकडो मराठी युवकांनी पारायणे केली होती. त्यातून शेकडो युवकांमध्ये राष्ट्रीय प्रेरणा जागृत झाली व ते आंदोलनात उतरले. समाजवादी पक्ष स्थापनेच्या वेळेलाच मुंबईत भरलेल्या काँग्रेस अधिवेशनात या पक्षाने आपली चमक दाखवून दिली. त्यानंतरच्या लखनौ आणि फैजपूर येथील काँग्रेस अधिवेशनांमध्ये समाजवादी कार्यक्रम तसेच पक्षाचे शेतीबाबतचे धोरण स्वीकारण्यासाठी काँग्रेस समाजवाद्यांनी बराच आग्रह धरला. फैजपूर काँग्रेस आणि छोडो भारत आंदोलनातील समाजवाद्यांच्या योगदानाविषयी कालक्रमानुसार विवेचन करण्यात येईल.

## लोकशाही स्वराज्य पक्ष

इंग्रजांनी घटनात्मक सुधारणांविषयीची श्वेतपत्रिका घोषित करताच (१७ मार्च १९३३) महाराष्ट्रात वेगळा घोळ सुरू झाला होता. सत्याग्रह चळवळ न करता कायदेमंडळांत जाऊन सरकारवर टीका करण्याची इच्छा असलेल्या मंडळींनी

नवीन पक्ष स्थापन केला. न. चिं. केळकर, जमनादास मेहता, रामभाऊ मंडलिक आणि रामराव देशमुख यांनी ऑक्टोबर १९३३ मध्ये स्थापन केलेल्या या पक्षास त्यांनी लोकशाही स्वराज्य पक्ष असे नाव दिले. हिंदुमहासभेचे पुढारी डॉ. मुंजे त्यात लवकरच सामील झाले. या पक्षाच्या रूपाने महाराष्ट्रातील काँग्रेस आणि काँग्रेसच्या परिसीमेवर बसलेल्या घटकांमधील वैमनस्य प्रकट झाले. पण त्याशिवाय आगामी नवीन संविधानाच्या अनुज्ञेय फायद्यांचा लाभ काँग्रेसजनांना मिळू नये हाही लोकशाही स्वराज्य पक्ष काढण्यामागे उद्देश होता. नोकरशाहीशी युती करून नवीन कायदेमंडळांत प्राबल्य मिळविण्याचे मुसलमानांचे प्रयत्न हाणून पाडणे हादेखील केळकर आणि हिंदुमहासभेचा प्रयत्न होता. तथापि कायदेमंडळांत प्रवेशाच्या त्यांच्या प्रयत्नांना विरोध करणारे पत्रक डी. डी. साठे आणि गो. आ. देशपांडे यांच्यासह ३९ मराठी काँग्रेस पुढाऱ्यांनी काढले होते. सद्यःस्थितीत कायदेमंडळांत प्रवेश करणे उपयोगी नाही असे काँग्रेसचे धोरण होते. लोकशाही स्वराज्य पक्षाचे नंतर काय झाले हे माहीत नाही.

माधवराव अणे व पं. मदन मोहन मालवीय यांचे काँग्रेस पक्षाशी मतभेद वाढत राहिल्यामुळे त्यांनी पक्षाचा राजीनामा दिला. आणि १८ ऑगस्ट १९३४ रोजी काँग्रेस राष्ट्रीय पक्ष स्थापन केला. मात्र हा पक्ष सुद्धा प्रभावहीन ठरला.

## गांधी हत्येचा पुण्यातील प्रयत्न

गांधीजींनी दलितांसाठी दिलेल्या राखीव जागांबद्दलचा उपरोक्त पुणे करार तसेच १९३३-३४ मध्ये केलेले देशव्यापी अस्पृश्योद्धार कार्य यामुळे महाराष्ट्रातील व विशेषतः पुण्यातील कर्मठ मंडळी महात्माजींवर चिडली होती. गांधींचे हरिजन कार्य व त्यांनी दलितांना दिलेल्या राखीव जागा यांमुळे कर्मठ लोक दुखावले गेले होते. त्यातून सनातनी व गांधीवादी यांच्यात भयंकर संघर्ष पेटला. या तणावग्रस्त वातावरणात **भाला** पत्रकाचे संपादक भास्करराव भोपटकरांनी लेखणी व वाणीच्या द्वारे भर टाकली. अस्पृश्योद्धार कार्याची निंदा केली. गांधीजींना मानपत्र देण्याची घोषणा करणाऱ्या पुणे नगरपालिकेवरही त्यांनी टीका केली. अशाही वातावरणात २५ जून १९३४ रोजी विश्रामबाग वाड्यातील नगरपालिका

सभागृहात नगरपालिकेने गांधीजींचा नागरी सत्कार सोहळा आयोजित केला. हा सोहळा ठीक सात वाजून तीस मिनिटांनी संपन्न होणार होता. त्या वेळेच्या सात मिनिटे आधी **भाला**कारांचे बंधू लक्ष्मण बी. भोपटकरांची गाडी इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळ येताच गैरसमजाने बालवीर बँड पथकाने बँडवर स्वागतपर धून वाजवायला प्रारंभ केला. गांधीजीच आलेत असा सर्वांचा समज झाला. त्यासरशी गांधीजींना ठार करण्यासाठी तेथे येऊन बसलेल्या मारेकऱ्याने गैरसमजुतीच्या घोटाळ्यामुळे इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरून खाली बाँब टाकला. हा खुनी मारेकरी होता दत्तात्रय नरहर साठे. सनातनी कर्मठ वृत्तीचा! तथापि गांधीजींना ठार मारण्याचा हा कट विफल झाला. साठेच्या बाँबमुळे लक्ष्मणराव भोपटकरांसह, नगरपालिकेचे मुख्याधिकारी एस. आर. भागवत, काही नगरसेवक, कर्मचारी, पाच पोलीस, एक महिला व बालक आणि नागरिक असे एकूण चौदाजण जखमी मात्र झाले.

गांधीजी, कस्तुरबा गांधी व त्यांच्या तीन शिष्या असलेली मोटर गाडी सोहळ्याच्या अगदी वेळेवर साडेसात वाजता म्हणजे बाँबस्फोटानंतर सात मिनिटांनी आली. त्यामुळे महात्माजी, कस्तुरबा वगैरे वाचले. सोहळ्यासाठी पुण्याचे सर्व मान्यवर काँग्रेस पुढारी, स्वातंत्र्यसैनिक, प्रबुद्ध नागरिक आणि युवक नेते असे ३००० जण उपस्थित होते. सर्व सोहळा पुढे ढकलावा असे मत व्यक्त झाले. तथापि मरणाला कधीच न घाबरणाऱ्या गांधीजींनी शांतपणे फर्मावले की, माथेफिरू कर्मठ लोकांच्या असल्या निंद्य व भ्याड कृतीला किंमत न देता सोहळा यथास्थित संपन्न करावा. त्यानुसार नगराध्यक्षांनी सन्मानपत्र वाचून दाखविले व गांधीजींनी दलितांसाठी केलेल्या कार्याचा गौरव केला. लहानशा पण अत्यंत प्रभावी भाषणात गांधीजींनी समाजसुधारकांना आवाहन केले की, हा बाँब फेकणाऱ्याबद्दल कोणतीही कटु भावना न बाळगता आपण अस्पृश्यतेच्या सामाजिक कलंकाविरुद्धची लढाई अधिक जोमाने चालवावी.

हल्लेखोराचे टार्गेट महात्मा गांधी व त्यांच्या कार्यांचा विनाश करणे हेच होते यात पोलीस, सरकार किंवा नागरिकांनाही शंका नव्हती. गांधीजींच्या प्राणावरील

हा एका दुर्धारक हिंदूचा प्रयत्न फसला.[१] मात्र ३० जानेवारी १९४८ चा काही पुणेकरांचाच प्रयत्न त्यांच्या कटानुसार सफल झाला. योगायोग असा की, भास्कर भोपटकारांची एक सभा पुण्यातील खुन्या मुरलीधराच्या मंदिरात झाली होती. वस्तुतः बाँबस्फोटाच्या पूर्व-संध्येलाच शनिवारवाड्यासमोरील जंगी सभेतच गांधीजींवर हा बाँब फेकण्याचा साठेचा प्रयत्न होता. तथापि कडक बंदोबस्तामुळे तो फसला होता, असे गुप्तचरांना बऱ्याच महिन्यांनी समजले. मात्र असा प्रयत्न झाला तरी महात्मा सामाजिक क्रांतीची ज्योत विझू देण्यास तयार नव्हता! तो अधिक त्वेषाने कार्य करू लागला.

१९३४-१९३६ चा काळ प्रामुख्याने पुरोगामी सामाजिक विचार व राजकीय ध्रुवीकरणाचा पुढील टप्पा होता. अस्पृश्योद्धार अथवा आर्थिक हलाखीतून दलित तसेच गरीब जनतेच्या विमोचनासाठी इंग्रज काहीच करीत नाही अशी काँग्रेसप्रमाणे दलित नेतृत्वाचीही खात्री पटली. त्या काळात पुण्यातील स्वावलंबन राष्ट्रीय पाठशाळा (चिंचवड), शंकररावांचा सासवड आश्रम व तळेगावच्या समर्थ विद्यालयाने तसेच सर्व्हन्ट्स ऑफ इंडिया सोसायटीने गांधीजींच्या अस्पृश्यतानिवारण व रचनात्मक कार्यास वाहून घेतले. अनेक ध्येयवादी युवकांनीही या कार्यास साथ दिली. त्यांनी सामाजिक पाणवठे दलितांसाठी खुले करण्यासाठी मोहीम उघडली. कर्मठांच्या ज्या समाजात हे कार्य करण्यास विरोध होता व ज्या समाज घटकांतील माथेफिरूंनी गांधीजींना ठार करण्याचा प्रयत्न केला, त्या समाजात परिवर्तन घडवून आणणे महाकठीण होते. स्वातंत्र्य मिळाले तरच या गोष्टी साध्य होतील असा विचार दृढ होऊ लागला. स्वातंत्र्य मिळाल्यावरही खऱ्या उद्दिष्टपूर्तीसाठी समाजवादी समाजरचना आवश्यक असेल हाही विचार उत्क्रांत झाला. या विचारांचा पुरस्कार करणारांमध्ये यूथ लीगचे युवक पुढे होते.

## मुंबईतील काँग्रेस अधिवेशन

सविनय कायदेभंगाचा निकराचा लढा दिल्यानंतर काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन २६ पासून २८ ऑक्टोबर १९३४ पर्यंत मुंबईत संपन्न झाले. ब्रिटिशांनी वटहुकमांखाली बेकायदा ठरविलेला काँग्रेस पक्ष आणि पक्षाच्या हजारो समित्या

व संस्था यांवरील बंदीहुकूम व निर्बंध मागे घेतल्यावर हे अधिवेशन भरले. सरदार पटेल व सरहद्द गांधी नुकतेच कारावासातून सुटले होते. तथापि नेहरू अलीपूर जेलमध्ये बंदीस्तच होते. कराचीनंतर साडेतीन वर्षांचा काळ लोटल्यावर हे नियमित अधिवेशन होते. प्रचंड उत्साह, उत्कंठा पण तणाव अशा वातावरणात मुंबईच्या वरळीत हा सोहळा संपन्न झाला. आणि त्याची सांगता झाली महात्मा गांधींची निवृत्तीची घोषणा आणि त्यामुळे निर्माण झालेल्या दुःख व वेदनांनी!

अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद तर स्वागत समितीचे अध्यक्ष वीर नरिमन हे होते. खुल्या अधिवेशनात प्रचंड जनसमुदाय होता. मंडपात घुसून अधिवेशनाच्या कामकाजात व्यत्यय आणण्याचा रणदिवेंच्या उथळ कम्युनिस्ट गटाने केलेला प्रयत्न विफल ठरला. जातिवंत कम्युनिस्ट नेते मीरत कारागृहात अडकलेले असून त्यांना मुक्त करण्यात गांधीजींना यश आले नाही हे वास्तवाचे भान नसलेल्या बी. टी. रणदिवे यांच्यासारख्यांचे मत होते. मात्र श्री. अ. डांगे, ठेंगडी, उषाताई डांगे यांचा सल्ला झुगारून बाहेर राहिलेल्या कम्युनिस्टांनी कायदेभंग आंदोलनात भाग घेतला नाही हे शल्य मुंबईतील काँग्रेस कार्यकर्ते विसरू शकले नव्हते. त्यांचा वाचाळ रणदिवेंवर रोष होता. शिवाय मालवीय वगैरेंच्या हिदुत्ववादी गटालाही या अधिवेशनात स्थान मिळाले नाही.

युसुफ मेहेरअली, ना. ग. गोरे, र. के. खाडिलकर, जोशी, शं. द. जावडेकर, नरेंद्र देव, जयप्रकाश नारायण वगैरेंनी याच वेळी मुंबईत काँग्रेस समाजवादी पक्ष स्थापन केल्याचे विवेचन वर केलेलेच आहे. या गटाने काँग्रेस अधिवेशनात आपले अस्तित्व व अलगपणा दाखवून दिला. जवाहरलाल नेहरू त्यांचे समविचारी असल्याने त्यांनी या समाजवादी पक्षाचे सभासद व्हावे, यासाठी प्रयत्न करणे अगदी स्वाभाविक होते. तथापि त्यात यश आले नाही. संपूर्ण हिंदुस्तानातील काँग्रेस समाजवादी युवकांचे प्रतिनिधी मुंबईत आलेले होते. त्यांनी आपल्या पक्षाचा कार्यक्रम काँग्रेसने अंगीकारावा यासाठी रास्त प्रयत्न केले. तथापि काँग्रेसमध्ये समाजवादी अल्पसंख्य होते.

काँग्रेस संघटनेत, गांधीजींनी सुचवल्याप्रमाणे, अनेक सुधारणा करण्यात आल्या. प्रतिनिधींची संख्या कमी करून ती दोन हजार असावी आणि त्यात ग्रामीण भागातील ७५ टक्के व शहरी भागातील २५ टक्के असे प्रमाण असावे अशी दुरुस्ती स्वीकारण्यात आली. पाचशे प्राथमिक सदस्यांमधून एक काँग्रेस प्रतिनिधी अ. भा. काँ. समितीसाठी निवडला जावा असा ठराव पारित केला. काँग्रेसच्या क्रीडमध्ये "वाजवी आणि शांततापूर्ण मार्गाऐवजी", "सत्यनिष्ठ आणि अहिंसक मार्ग" अशी शब्दयोजना गांधीजींनी सुचवली. तथापि हा बदल ताबडतोब करण्याऐवजी प्रांतिक काँग्रेस समित्यांच्या विचारार्थ प्रसारित करावा असे ठरले. या अधिवेशनात 'अखिल भारतीय ग्रामोद्योग संघाची' स्थापना करण्यात आली. अखिल भारतीय चरखा संघाप्रमाणेच हा संघही काँग्रेसच्या अंतर्गत असला, तरी मूलतः बिगरराजकीय होता. स्वराज्याविषयीचे आपले स्वप्न साकारण्यासाठी आणि आपले राजकारणातील प्रभावक्षेत्र वृद्धिंगत करण्यासाठी गांधीजींनी या दोन्ही संघटना उभारल्या आणि जोपासल्या.[१०]

याव्यतिरिक्त काँग्रेस संसदीय मंडळ व त्याबाबतचे धोरण आणि विधायक कार्यक्रम, स्वदेशीची मोहीम व अनिवासी भारतीयांचे प्रश्न या विषयांवर या अधिवेशनात ठराव करण्यात आले.

## गांधीजींची काँग्रेसमधून निवृत्ती

मुंबईतील या अधिवेशनातील सर्वांत खळबळजनक आणि वेदनाकारक घटना म्हणजे गांधीजींनी काँग्रेस पक्षातून निवृत्त होण्याची केलेली घोषणा ही होय. काँग्रेसच्या अंतर्गत आणि पक्षाच्या परिसीमेवर वावरणाऱ्या अनेक जणांना कायदेमंडळांमध्ये प्रवेश करण्याचे वेध लागले होते. अनेक जण निवडणुका लढवण्यासाठी अधीर झालेले गांधीजींना दिसत होते. कित्येकांना सत्याग्रहाचा मार्ग पसंत नव्हता. काहींना खादी, नशाबंदी, अस्पृश्यतानिवारण, ग्रामोद्योग हा काँग्रेसचा कार्यक्रम पसंत नव्हता. अथवा पसंत असला तरी तो प्रत्यक्षात आणण्याची त्यांची तयारी नव्हती. मात्र आपण स्वतःच अशा विधायक कार्यावर लक्ष केंद्रित करावे, कुटिरोद्योगांच्या विकासास प्राधान्य द्यावे आणि काँग्रेसमध्ये

ध्येयवादाचा प्रसार करावा असे गांधीजींना वाटत होते. निवडणुका लढवण्यास उतावीळ झालेले अनेक कार्यकर्ते पाहून गांधीजींना विषाद वाटू लागला होता. वीर नरिमन आणि के. एम. मुन्शी यांचाही अशा लोकांमध्ये समावेश असल्याचे पाहून गांधीजींना आश्चर्य वाटले.

पूर्ण स्वराज्य प्राप्तीबरोबरच भारतीय समाजाचे सर्वांगीण उत्थापन करणे हे गांधीजींचे उद्दिष्ट होते. वंचित व दुरित समाजाचे तिमिर दूर करून त्यांना मानाने जगण्याचा अधिकार मिळवून देण्यासाठी त्यांना राष्ट्रव्यापी चळवळ उभारण्याची गरज वाटली. त्यासाठी त्यांनी हरिजन दौरा केला होता. अनेकदा उपोषणे केली. देह झिजवला. काँग्रेस पक्षाच्या दैनंदिन कामाच्या जबाबदाऱ्यांमुळे सामाजिक व विधायक कार्यासाठी आपण पुरेसा वेळ देऊ शकत नाही, अशीही गांधीजींची धारणा झाली होती. शिवाय गांधीजींकडून काँग्रेस पुढाऱ्यांच्या विविध प्रकारच्या आणि काही बाबतीत परस्परविरोधी अपेक्षा होत्या. प्राप्त परिस्थितीत काही अपेक्षा पूर्ण करणे गांधीजींना शक्य नव्हते. म्हणून त्यांनी आपला निवृत्तीचा निर्णय निकटवर्तीयांना सांगितला होता.

गांधीजींना प्रकर्षाने जाणवू लागले की, आपल्या सत्यअहिंसेच्या मार्गाने पूर्ण स्वराज्य प्राप्तीसाठी अद्याप काँग्रेस ही सुयोग्य संघटना नाही. पक्षातील समाजवादी विचारांचे युवक समाजवादी धोरणांची मागणी करत होते. **तथापि कुणीही पुढारी गांधीजींची जागा घ्यावयास तयार नव्हता किंवा त्यांना विरोध करू शकत नव्हता. महात्म्याचे सामर्थ्य देशातील कुणातही नव्हते.** तरीसुद्धा त्यांनी काँग्रेसमधून निवृत्त होण्याचा निर्धार केला. जुलै १९३३ ते फेब्रुवारी १९३४ या काळात नेहरू तुरुंगाबाहेर होते. तेव्हा नेहरू गांधीजींना भेटले होते. त्या भेटीत गांधीजींनी आपला निवृत्तीचा मनोदय व्यक्त केला होता. रणनीतीबाबतच्या दृष्टिकोणात काही मुद्यांवर मतभिन्नता असलेल्या या दोन महान नेत्यांना एकमेकांचा त्याग करणेही शक्य नव्हते. गांधीजींची निवृत्ती स्वीकृत करण्यास नेहरू अजिबात तयार नव्हते. तथापि दोघांनी एकमेकांसाठी आपापल्या विचारप्रणालीनुरूप कार्यक्षेत्राची निवड केली, आणि ऑक्टोबर १९३४ मध्ये

मुंबईतील काँग्रेस अधिवेशनात गांधीजींनी काँग्रेसमधून निवृत्तीची घोषणा केली. काँग्रेसचे चार आण्याचे सभासदत्वही महात्माजींनी रद्द केल्याच्या घोषणेने प्रत्येक व्यक्ती स्तंभित झाली, चकित झाली.

वस्तुतः गांधीजींची निवृत्ती म्हणजे काँग्रेसचा त्याग नसून, काँग्रेसमधील सहकाऱ्यांच्या त्यांच्याकडून अविरत अपेक्षा आणि सरकारची नकारात्मक भूमिका यापासून आत्मविमोचन होते. **सक्रिय राजकारणापेक्षा मार्गदर्शक व सल्लागार आणि प्रबोधनकाराची भूमिका घेऊनच आपण काँग्रेस आणि राष्ट्रासाठी अधिक योगदान करू शकू अशी महात्माजींची धारणा बनली.** शिवाय आपल्या सत्याग्रही मार्गावर श्रद्धा नसलेल्या, पण त्याचा केवळ तंत्र म्हणून वापरणाऱ्या सहकाऱ्यांनाही आपापला मार्ग चोखाळणे शक्य व्हावे, म्हणूनही गांधीजी बाजूला सरले. तथापि निवृत्तीनंतरही गांधीजींचे काँग्रेसमधील स्थान अगदी अढळ राहिले. दुसरे पर्याय उपलब्ध नसल्यामुळे गांधीजी यांच्या सविनय कायदेभंगाचाच मार्ग अनुसरणे काँग्रेसला पुढील काळातही अपरिहार्य वाटले. किंबहुना काँग्रेसच्या दैनंदिन कारभारातून मुक्ती झाल्यामुळे राष्ट्रीय चळवळीबाबतचे आपले तंत्र अधिक परिणामकारकरीत्या राबविणे महात्माजींना शक्य झाले. त्यामुळे वल्लभभाई व राजेंद्र प्रसाद यांसारख्या खास अनुयायांच्या साहाय्याने काँग्रेसमधील आततायी पुढाऱ्यांना एकत्र ठेवून शिस्तबद्ध पक्षसंघटना बांधणे शक्य झाले. एका अर्थी, आपणास अभिप्रेत असलेले राष्ट्रनिर्मितीचे साधन म्हणून काँग्रेसची पुनर्रचना करण्यासाठी आपल्या निवृत्तीचा गांधीजींनी उपयोग करून घेतला.

गांधीजींच्या निवृत्तीमुळेही काँग्रेस पक्षावर अनिष्ट परिणाम झाला नाही. वस्तुतः महात्माजी अधिक प्रभावी झाले. मुंबई अधिवेशनानंतर काँग्रेस पक्ष संसदीय राजकारणाकडे वळला.

याचबरोबर लोकशाही स्वराज्य पक्ष व अणे यांचा काँग्रेस राष्ट्रीय पक्ष व ब्राह्मणेतर पक्ष हेही निवडणुकांच्या स्पर्धेत होते. मात्र १९३४ मधील निवडणूक प्रचारात त्यांच्यातील व्यक्तिगत विरोध व हेवेदावे बाहेर पडले. डॉ. मुंजे यांचा प्रचार करण्यासाठी मदन मोहन मालवीय यांनी नागपुरात एक सभा घेतली होती. तेव्हा गांधीजींची सविनय कायदेभंगाची चळवळ मोडून काढल्याबाबत

'व्हाइसरॉय विलिंग्डनचे अभिनंदन' करणारे डॉ. मुंजेंचे पत्र नायडू नामक माणसाने त्या सभेतच वाचून दाखवले. या पत्राच्या खरेपणाविषयी पं. मालवीय यांनी मुंजे यांना सभेतच विचारले असता, **मुंजेंनी मौन धारण केले. त्यामुळे मुंजेंचे पितळ बाहेर पडले. स्वराज्याच्या चळवळीस मुंजेंचा विरोध असल्याची भावना प्रसारित झाली. त्यामुळे मुंजेंचा पराभव झाला** व बॅ. अभ्यंकर विजयी झाले. तथापि लवकरच २ जानेवारी १९३५ रोजी अभ्यंकर मरण पावले आणि त्या जागी ना. भा. खरे निवडून आले. मुंजे लोकांच्या मनातून पार उतरले.[११]

दरम्यानच्या काळात फ्रेडरिक साईक्सच्या ठिकाणी लॉर्ड ब्रेबर्न यांची मुंबई प्रांताचे गव्हर्नर या पदावर नेमणूक झाली. वऱ्हाड-मध्यप्रातांचे गव्हर्नर हाईड गोवॅन हे होते. ब्रिटिश संयुक्त संसदीय समितीचे अध्यक्ष म्हणून काम केलेल्या लॉर्ड लिनलिथगो यांना ७ ऑगस्ट १९३५ पासून हिंदुस्तानचे व्हाइसरॉय या पदावर नेमण्यात आले. आत्यंतिक कडवा साम्राज्यवादी असलेल्या लिनलिथगोंच्याच कार्यकाळात ब्रिटिशांची हिंदुस्तानावरील जबरदस्त मगरमिठी छोडो भारत आंदोलनाने खिळखिळी केली.

ब्रिटिश पार्लमेंटच्या संयुक्त संसदीय समितीचा अहवाल २२ नोव्हेंबर १९३४ रोजी प्रकाशित झाला. त्या आधारे तयार केलेले १९३५ च्या कायद्याचे मूळ विधेयक २२ जानेवारी १९३५ रोजी प्रसिद्ध झाले. स्वतः विंस्टन चर्चिल यांनाही हे विधेयक असमाधानकारक आणि धैर्य व निष्ठेचा अभाव असलेले वाटले. त्यांच्या मते विधेयकामागे कोणताही निश्चित विचार नव्हता. विधेयकाला उद्देशपत्रिका (Preamble) नव्हती व त्याबाबत एकमतही नव्हते. विधेयकावर चर्चा करण्यात बरेच महिने घालवल्यावर आणि अखेरीस २ ऑगस्ट १९३५ रोजी बादशहांची सही झाल्यावर ' गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट १९३५ ' पास झाला. तथापि सायमन कमिशनपासून गाजावाजा झालेल्या या कायद्यातील संघराज्यविषयक तरतुदी भारतातील सर्वच राजकीय पक्षांना तसेच संस्थानिकांनाही असमाधानकारक वाटत होत्या. त्यामुळे संघराज्याची योजना (फेडरल स्कीम) अमलात न येता कागदावरच राहिली.

१९३५ च्या कायद्यातील प्रांतिक स्वायत्ततविषयक तरतुदी स्वीकारण्याबाबतही काँग्रेसमध्ये तीव्र मतभेद होते. पण ते आपण नंतर पाहू.

## निवडणुकीसाठी हालचाली

जातीय निवाडा व गोलमेज परिषदांमुळे बरेच अल्पसंख्य घटक, भांडवलदार व संस्थानिकांना आणि काँग्रेसेतर गटांना लाभ झाला होता. काँग्रेसने सविनय कायदेभंगाचा लढा संस्थगित ठेवलेला होता. त्यामुळे पक्ष-उपपक्ष वाढीला लागले. १९३४ मधील निवडणुकीसाठी आपापले बळ वाढविण्याचे प्रयत्न सुरू झाले. या निवडणुकीनुसार १९३४ साली मध्यवर्ती कायदेमंडळात काँग्रेस पक्षाचे ४४ खासदार असून त्यांचा मोठा गट होता. मुंबईचे भुलाभाई देसाई कायदेमंडळात पक्षाचे नेते असून मूळचे मराठी भाषिक गोविंद वल्लभ पंत हे उपनेते होते. पक्षाचे चिटणीस सत्यमूर्ती होते तर न. वि. गाडगीळ हे प्रतोद म्हणून निवडले गेले. निवडणुकांच्या मुद्यावर मतभेद झालेल्या मा. श्री. अणेंनी काँग्रेस राष्ट्रीय पक्ष काढला होता. पण त्यांचे खासदार काँग्रेसला साथ देत. अपक्ष व युरोपियन, भांडवलदारांचे प्रतिनिधी आणि सरकारनियुक्त सभासदांव्यतिरिक्त बॅ. जिनांचे नेतृत्व मानणारे ३८ खासदार मध्यवर्ती कायदेमंडळात होते. खरे तर काँग्रेस श्रेष्ठींना निवडणुकीच्या राजकारणात रस नव्हता. गांधीजी, नेहरू व सरदार पटेलांचे निकटवर्ती निवडणुकीत नव्हते. त्यामुळे काँग्रेसचे संख्याबळ मोठे नव्हते.

इथे नमूद करावेसे वाटते की, १९१९ पर्यंत ‘ मुंबईचे प्रिन्स ’ मानले गेलेल्या बॅ. महंमद अली जिनांना १९२१ पासून महात्मा गांधी यांच्या प्रभावाखाली असलेल्या काँग्रेसमध्ये राहणे अशक्य वाटले होते. आधी विवेचन केले आहे की, त्यांची पत्नी रतन हिच्या आग्रहामुळे ते मधूनमधून काँग्रेसला साथ करीत. पण रतनबाईंच्या निधनानंतर ते काँग्रेसपासून दूर गेले. मात्र मुस्लीम लीगशीही त्यांचा सलोखा नव्हताच. पण त्यांनी आपले खासदारपद अबाधित ठेवले होते. जिनांना एकाकीपणा वाटत राहिल्यामुळे त्यांनी लंडनमधील प्रिव्ही कौन्सिलपुढे खटले लढवण्यासाठी लंडनमध्ये कायमचे स्थायिक होण्याचे ठरविले.

मात्र जातीय निवाड्यामुळे बदलेल्या राजकारणात मुस्लीम लीगला जिनांची गरज भासू लागली. त्यानुसार मुसलमानांचे नेतृत्व करण्यासाठी लीगने खुशामत करून जिनांना मुंबईत परत आणले. त्यामुळे उपरोक्त ३८ मुसलमान खासदार निवडून आले होते. पण तरीही १९३८ पर्यंत जिनांच्या मनात ' पाकिस्तान ' मागण्याचा विचार नव्हता.

मात्र आगामी १९३५ च्या कायद्यामुळे निवडणुकीची संधी वाढणार होती. त्यामुळे संघटनशक्ती वाढविणे सुरू झाले.

**प्रांतिक कॉंग्रेस समित्या** :—१९३५ च्या कायद्यानुसार लोकप्रतिनिधित्वाचा अधिक लाभ मिळण्याची शक्यता दिसत होती. त्यामुळे १३ जानेवारी १९३५ रोजी महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस समितीच्या अध्यक्षपदी शंकरराव देवांची पुन्हा निवड करण्यात आली. या समितीने सदस्य नोंदणीची मोहीम हाती घेऊन २८,४२६ सभासद नोंदविले. शंकरराव देवांनी ऑगस्ट १९३४ मध्ये पुण्याजवळ सासवडला काढलेला आश्रम हे मोठे केंद्र बनले. या आश्रमाचे व्यवस्थापन आचार्य स. ज. भागवत आणि प्रेमा कंटक करीत. कॉंग्रेसचे मुखपत्र म्हणून पुण्यात २६ जानेवारी १९३५ पासून **लोकशक्ती** नामक वर्तमानपत्र सुरू करून पत्रकाच्या संपादक पदावर शं. द. जावडेकरांसारख्या विचारवंत पत्रकाराची नेमणूक करण्यात आली. बाळूभाई मेहता व शंकरराव ठकार हे पश्चिम खानदेश आणि अण्णासाहेब दास्ताने व देवकीनंदन नारायण पूर्व खानदेश जिल्हा कॉंग्रेस समित्यांचे काम करीत. मुंबई इलाख्यातील चार प्रांतिक कॉंग्रेस समित्यांनी एकूण ७७,९२७ सभासद नोंदवले. त्यापैकी १७,९०० एकट्या मुंबई शहरात नोंदवण्यात आले होते. हे शहर कायम आघाडीवर राहत असे.

ऑगस्ट १९३५ पर्यंत मध्यप्रांत-वऱ्हाडात नोंदणी झालेल्या एकूण ४०,७१५ कॉंग्रेस सदस्यांमध्ये विदर्भाच्या आठ जिल्ह्यांतील १३,७६५ सदस्य असून बाकीचे महाकोशल भागातील होते. त्यापैकी ५,६०१ वऱ्हाडच्या बुलडाणा, अमरावती, अकोला व यवतमाळ जिल्ह्यांतील होते. मध्यप्रांत मराठी प्रांतिक कॉंग्रेस समितीला ' नागपूर प्रांतिक कॉंग्रेस समिती ' असे सोपे नाव देण्यात आले. नागपूरच्या

प्रांतिकमध्ये ना. भा. खरे यांना पूनमचंद रांका व मंचरशा आवारी यांच्या गटाशी सामना करावा लागे. वऱ्हाडात ब्रिजलाल बियाणी गटाने अमरावतीच्या गटावर मात करून प्रांतिक समितीचे कार्यालय अमरावतीहून अकोल्यास स्थलांतरित केले. या काळात राजकारणातील समीकरणे झपाट्याने बदलू लागली.

## स्वातंत्र्य आंदोलनात सेवाग्राम

सन १९३६ पासून सेवाग्राम भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनाचे मुख्यालय बनले. इथे जणू राष्ट्रवादी राजकारणाची राजधानी बनली. आंदोलनाचे मनसुबे व डावपेच सेवाग्राममध्ये आखण्यात येत. राष्ट्रव्यापी लढ्याचे सूत्रसंचालन येथून करण्यात येई. कारण सेवाग्रामला गांधीजी तर राहत होतेच, शिवाय इथे कार्यकर्ते व निष्ठावान स्वातंत्र्य आंदोलकांची कार्यशाळाच होती. या कार्यशाळेत गांधीजींनी अखिल भारतातील कार्यकर्ते घडविले होते. देशापुढे त्यांनी आदर्श व रचनात्मक कार्यक्रम ठेवला. इंग्लंड व अमेरिकेतीलच नव्हे तर जगातील राजकारणी, पत्रकार व विचारवंत गांधीजींना भेटण्यासाठी येथे येत व राहत असत. गांधीजींनी साबरमतीनंतर सेवाग्राममधून जुलमाविरुद्ध प्रतिकार करण्याचा आणि पारतंत्र्याच्या शृंखलांमधून विमोचन करण्याचा मार्ग भारताला व तिसऱ्या जगाला दाखविला. स्वाभाविकपणे सेवाग्राम भारताची अशासकीय राजधानी बनली.

मार्च १९३० मध्ये साबरमती आश्रमातून दांडीयात्रेला प्रयाण करताना गांधीजींनी प्रतिज्ञा केली होती की, “ पूर्ण स्वातंत्र्य प्राप्त केल्याखेरीज आम्ही साबरमती आश्रमात परत येणार नाही...... ज्या ध्येयाच्या प्राप्तीसाठी कूच करणार आहोत, त्यात आपण एक तर विजयी होऊ, अन्यथा त्या प्रयत्नात नष्ट होऊ ”. (**महात्मा गांधी यांचे संकलित वाङ्मय,** खंड ४३, गॅझेटिअर विभाग). तथापि सविनय कायदेभंग आंदोलनानंतर स्वातंत्र्य न लाभल्यामुळे गांधीजी प्रतिज्ञेनुसार साबरमतीला परत गेले नाहीत. दरम्यान गांधीजींनी काँग्रेसचा राजीनामा देऊन रचनात्मक कार्यास वाहून घेतले. त्यासाठी त्यांनी खेडेगावात राहण्याचा निर्णय घेतला.

जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल व जमनालाल बजाज यांचाही विरोध पत्करून गांधीजींनी आपल्या मुख्यालयासाठी वर्ध्यापासून ८ किलोमीटरवरील सेगावची निवड केली (१७ एप्रिल १९३६). बहुतांश महार वस्ती असलेल्या सेगावची निवड पूर्णपणे कु. मॅडेलिन स्लेड ऊर्फ मीराबेन यांची आहे, असे गांधीजींनी जाहीर केले होते. एप्रिल १९३६ पासून सेगाव त्यांचे मुख्यालय झाले.

गावाचे नाव सार्थ करण्यासाठी गांधीजींनी ५ मार्च १९४० पासून सेगावचे ' सेवाग्राम ' असे नाव ठेवले. या आश्रमात स्वातंत्र्य आंदोलनातील अत्यंत महत्त्वाचे दूरगामी निर्णय घेण्यात आले. १९३५ च्या भारत सरकार कायद्यानुसार प्रांतिक स्वायत्ततेच्या योजनेत सामील होऊन प्रांतांमध्ये काँग्रेस मंत्रिमंडळे स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय येथेच घेण्यात आला होता. खेड्यात भरलेली फैजपूर काँग्रेस, हरिपुरा काँग्रेस, रामगड काँग्रेस आणि त्रिपुरी काँग्रेस यांसाठी बनविलेली कार्यसूची बहुतांशी सेवाग्रामला करण्यात आली होती.

ब्रिटिश सरकारने भारतीयांना विश्वासात न घेता आणि एका शब्दानेही न विचारता सप्टेंबर १९३९ मध्ये महायुद्धाच्या खाईमध्ये भारतास लोटले होते. पारतंत्र्याच्या शृंखलांमध्ये जखडून टाकलेल्या भारताला पश्चिमी जगाच्या स्वातंत्र्ययुद्धासाठी लढण्यास भाग पाडण्याचा क्रूर विनोद ब्रिटिश साम्राज्यवाद्यांनी केला होता. त्याचा निषेध काँग्रेसने सेवाग्रामहूनच केला. ब्रिटिश सरकारच्या या जुलमी कार्यवाहीविरुद्ध १९४०-१९४१ मधील व्यक्तिगत सत्याग्रहाची चळवळ पूर्णपणे गांधीजीप्रेरित होती. क्रिप्स योजना अग्राह्य आणि वैफल्यकारक ठरली होती. प्राप्त परिस्थितीमध्ये जपानने हिंदुस्तान पादाक्रांत करण्यास गांधीजींचा विरोध होता. किंबहुना ब्रिटिशांचे देशातील अस्तित्व हेच मुळी जपानी आक्रमणास निमंत्रण होय अशी गांधीजींची खात्री पटली होती.

अशा परिस्थितीमध्ये ‘ छोडो भारत ’ आंदोलनाची गांधीजींची मनस्वी तयारी झाली ती सेवाग्रामलाच. तेथील नऊ दिवसांच्या प्रदीर्घ चर्चेनंतर १४ जुलैला काँग्रेस कार्यकारी समितीने ‘ छोडो भारत ’ ठराव संमत केला. याच ठरावावर ७-८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईला गोवालिया टँक मैदानावर भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या अधिवेशनात शिक्कामोर्तब करण्यात आले.[१२]

सेवाग्राम सर्वार्थाने खेडेगाव असूनही राष्ट्रीय पुढाऱ्यांचे व आंतरराष्ट्रीय मान्यवरांचे तेथे येणे-जाणे होते. अशा नेत्यांना तेथे जाण्यासाठी जमनालाल बजाज यांनी एक जुनी पुराणी फोर्ड मोटार दिलेली होती. पण ती ओढण्यासाठी बऱ्याचदा एक बैलजोडी वापरावी लागे. म्हणून तिला बजाजांनी विनोदाने ‘ ऑक्सफोर्ड ’ असे नाव दिले होते.

## फैजपूर काँग्रेस अधिवेशन

फैजपूर अधिवेशनाच्या पूर्वसंध्यासमयी देशापुढे अनेक प्रश्न उभे होते. नाझी व फॅसिस्ट सत्ताधीशांच्या आक्रमक कारवाया चालू होत्या. संभाव्य जागतिक महायुद्धाचे ढग आसमंतात होते. स्पेन, ब्रह्मदेश आणि भारताच्या वायव्य सरहद्द प्रांतात भयंकर अशांतता होती. सोविएत रशियाचे नवीन संविधान दोन महिन्यांपूर्वीच संमत झालेले होते. १९३५ च्या कायद्यानुसार प्रांतिक स्वायत्तता येऊ घातलेली होती. या कायद्यानुसार निर्माण व्हावयाची संघराज्याची व्यवस्था कमालीची असमाधानकारक होती. त्याबाबतचा निर्णय काँग्रेसला घेणे भाग होते. प्रांतिक स्वायत्ततेच्या प्रक्रियेत सहभागी होण्याच्या दृष्टीने शर्ती व अटी ठरविणे आवश्यक बनले होते. त्यानुसार व्हावयाच्या निवडणुकांसाठी रणनीती ठरविणे आणि पक्षाचा मॅनिफेस्टो ठरवायचा होता. काँग्रेसचे परराष्ट्र धोरण तयार करणे आवश्यक होते.

लखनौ काँग्रेसमध्ये समाजवादी आर्थिक धोरणाचा उच्चार करण्यात आला होता. काँग्रेस अध्यक्ष नेहरू व सुभाषचंद्र बोस आणि काँग्रेस समाजवादी प्रतिनिधींनी लखनौमध्ये आर्थिक धोरणाचा आग्रह केला होता. पण मतभेद

टाळण्यासाठी ठोस निर्णय झाला नव्हता. जागतिक महामंदीमुळे किसान वर्ग अत्यंत गांजला होता. म्हणून १९३० व १९३२ च्या कायदेभंग आंदोलनांमध्ये किसान वर्ग प्रथमच फार मोठ्या प्रमाणात सहभागी झाला होता. कित्येक हजार किसानांनी कारावास भोगला होता. त्यामुळे काँग्रेसकडून त्यांनी मोठी अपेक्षा बाळगली होती. त्यांच्या अपेक्षांना प्रतिसाद द्यावा तसेच काँग्रेसने पुरोगामी आर्थिक धोरण जाहीर करावे असा नेहरूंचा व समाजवाद्यांचा आग्रह होता. १९३६ साली काँग्रेस, समाजवादी गट व कम्युनिस्टांनी अ. भा. किसान सभा स्थापन करून एक दबाव गट तयार केला.

फैजपूरमध्ये अधिवेशन भरण्याची शक्यता दिसताच सनदी नोकरशाहीने आपले डावपेच सुरू केले. कलेक्टर सय्यद अमीनुद्दिनचा अधिवेशनास विरोध होता. म्हणून सरकारतर्फे सावदा व फैजपूरच्या नगरपालिकांशी संपर्क ठेवण्याची व इतर जबाबदारी डी.एस.पी. पदावरील एम. व्ही. त्रिवेदीवर सोपवण्यात आली. फैजपूरचे फजितपूर होईल व फज्जा उडेल हे पाहण्यासाठी मुंबई सरकार उत्सुक होते. म्हणून गृह सचिव आर. एम. मॅक्सवेल व मुंबईचे गव्हर्नर ब्रेबर्न यांनी तत्परतेने अधिवेशनास परवानग्या दिल्या. हिंदुस्तानचे गृहमंत्री क्रेक यांनी सहकार्याचे नाटक केले. ते पाहून सर्व रेल्वे कंपन्यांनी अधिवेशनास जाणाऱ्यांना तिकिटांत कन्सेशन दिले. हेतू पाताळयंत्री होता.

अखिल भारतीय ग्रामोद्योग मंडळाच्या एका बैठकीत महात्मा गांधींनी काँग्रेस अधिवेशने खेडेगावांमध्येच भरवावी असा विचार मांडला होता. काँग्रेसला महाराष्ट्राने भरघोस योगदान देऊनही १८९५ च्या पुणे काँग्रेसनंतर ४० वर्षे महाराष्ट्रात (तेव्हा मुंबई व नागपूरचा समावेश महाराष्ट्रात करण्यात येत नसे) अधिवेशन भरले नव्हते. म्हणून आगामी अधिवेशन महाराष्ट्रात भरवावे अशी शंकरराव देवांनी लखनौला मागणी केली होती. पण वायव्य सरहद्द प्रांताने सर्वाधिक मार खाऊन यातना भोगल्या या कारणावरून अब्दुल गफार खान व त्यांचे बंधू डॉ. खानसाहेब यांनीही अधिवेशनाची मागणी केली. एस. सत्यमूर्तींचा मद्रासससाठी आग्रह होता. गुजरातने १९१९ पासून सातत्याने प्रत्येक

आंदोलनात उत्तम कामगिरी केली या कारणास्तव सरदार वल्लभभाई पटेलांनी गुजरातची मागणी लावून धरली. शिवाय डिसेंबर १९३६ च्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदाचा सरदार पटेलांनी गांधीजींच्या सल्ल्यानुसार त्याग केला होता.

अशा परिस्थितीत शंकरराव देव यांचाही त्याग व गांधीजींवरील निष्ठा या जोरावर आगामी अधिवेशन महाराष्ट्रात घेण्याचा निर्णय काँग्रेसच्या विषय नियामक समितीने घेतला. मात्र अधिवेशन खेड्यात घेण्यास बहुतांश पुढाऱ्यांचा विरोध होता. ' महाराष्ट्रात काँग्रेसचे अधिवेशन खेड्यात भरवून दाखवीन ' असा संकल्प शंकररावांनी गांधीजींसमक्ष जाहीर केला होता. त्यानुसार २२ मे १९३६ रोजी पुण्यात महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसने अधिवेशन खेड्यात घेण्याचे ठरविले. त्यासाठी सर्वप्रथम पुण्याची मागणी येताच देवांनी ती फेटाळली. सोलापूरचे चार हुतात्मे आणि सोलापूरकरांनी सोसलेले लष्करी कायद्याचे भयंकर अत्याचार या बळावर तेथील कार्यकर्त्यांनीही या अधिवेशनासाठी खूप आग्रह धरला. तथापि खेडे हाच निकष असल्याने सोलापूरला अधिवेशनाचा लाभ झाला नाही. खेडेगावाबद्दलचा निर्णय महाराष्ट्र प्रांतिक समितीत १०७ विरुद्ध ९५ मतांनी आणि प्रांतिकच्या कार्यकारिणीत २१ विरुद्ध १४ मतांनी मंजूर झालेला होता. त्यानंतर अहमदनगर, सातारा आणि पूर्व खानदेश जिल्हा समित्यांचे दावे होते. मात्र प्रांतिकच्या मतदानात अहमदनगरला सर्वात कमी मते मिळाली, तर सातारा व पूर्व खानदेशला सारखीच मते मिळाली. तथापि शंकरराव देवांनी खिरोदा गावातील धनाजी नाना चौधरींचे कार्य समक्ष पाहिलेले होते. म्हणून प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष या नात्याने देवांनी आपले निर्णायक मत पूर्व खानदेशच्या बाजूने दिले. शिवाय १९३४ साली डॉ. राजेंद्र प्रसाद काँग्रेस अध्यक्ष या नात्याने फैजपूरला आले असता, त्यांनी व विनोबा भावे, बजाज वगैरेंनी धनाजी नाना चौधरींचे काम व धडाडी पाहिलेली होती.

यानंतरही फैजपूरचा मार्ग निर्वेध झालेला नव्हता. कारण प्रथम मागणी आली जळगावजवळच्या पिंपराळे गावची. नंतर वासुदेव विठ्ठल दास्ताने व त्यांच्या भुसावळच्या वकील सहकाऱ्यांनी फुलगावकरिता आग्रह धरला. अशा मागण्यांच्या

संघर्षात शंकरराव देव, विनोबा भावे, जमनालालजी बजाज व राजेंद्र प्रसाद या महनीयांनी धनाजी नाना चौधरींच्या खिरोदा गावच्याच बाजूने कौल दिला. काँग्रेस खिरोदा गावी भरणार असे **बाँबे क्रॉनिकल** वर्तमानपत्राने घोषित करूनही टाकले. (मी खिरोदे गावचा असून माझी आई व आमचे कुटुंबीय काँग्रेस अधिवेशनासाठी स्वयंसेवक होते). तथापि खिरोद्यास जाण्यासाठी रस्ताही नसल्याने खिरोद्याचा विचार सोडून तेथून चार-पाच किलोमीटरवरील फैजपूरला काँग्रेस भरविण्याचा अंतिम निर्णय झाला.

धनाजी नानांनी खंडाने घेतलेली फैजपूरजवळील ८५ एकर शेतजमीन देव, दास्ताने, आर्किटेक्ट म्हात्रे व शंकरलाल बँकर यांनी पसंत केली. मात्र संयोजकांपुढे विविध समस्या उभ्या राहिल्या. स्थानिक प्रस्थापित लोक, सावकार व नगरपरिषदांचा काँग्रेसला तीव्र विरोध होता. सावदा व फैजपूरच्या दोन्ही नगरपरिषदांवर ब्राह्मणेतर पक्षाचा प्रभाव होता.

अशा प्रतिकूल वातावरणात मोठी भर पडली ती रस्ते व पाणीपुरवठा, आरोग्य सुविधा आणि शौचगृहांच्या संपूर्ण अभावाची आणि स्थानिक वृत्तपत्रांच्या उदासीनतेची. पाणीपुरवठ्यासाठी गावात फक्त दोन विहिरी होत्या. गावात पदवीधारक डॉक्टर नव्हता. पिठाच्या गिरण्याही कोठे होत्या ? सावदा स्थानकातून येणाऱ्या अत्यंत चिंचोळया व अडगळीच्या एकमेव रस्त्याने यावे लागे. याही रस्त्यावरून गांधीजी-नेहरूंच्या मिरवणुकांना सावदा नगरपालिकेने बंदी घातली. कारण तिला पाठिंबा होता जिल्हा प्रशासनाचा. म्हणून गावाबाहेरच्या प्रातर्विधीच्या जागेवरून श्रमदानाने नानांच्या स्वयंसेवकांना रस्ता तयार करावा लागला. अशा स्थितीत धनाजी नाना चौधरी, साने गुरुजी, दास्ताने इत्यादींनी स्वयंसेवकांचे पथक उभारले आणि अधिवेशनाच्या सिद्धीचे आव्हान स्वीकारले.

कार्यकर्ते अनेकविध समस्यांना तोंड देत असतानाच अवेळी पडत राहिलेल्या पावसाने भयानक अडचणी उभ्या केल्या होत्या. सर्वत्र चिखल, नदी-नाल्यांना पूर, वरून पाऊस, खाली चिखल आणि पाऊस थांबल्यावर पडलेली कडाक्याची थंडी! अशा परिस्थितीत शेकडो शेतकरी, महिला आणि युवकांनी पडेल ते

काम अहोरात्र समर्पित भावनेने केले. वाहतूक सुविधा नसल्याने फक्त बैलगाड्यांचाच उपयोग करणे शक्य होते. विहिरीतून पाणी काढण्यास्तव ठेवलेले डिझेल इंजिन मधूनमधून बंद पडे. म्हणून मोटेने पाणी काढावे लागे. गावोगावच्या महिलांनी श्रमदान करून जात्यांवर दळण दळले. शेतकऱ्यांनी भाजीपाला पुरवला तो मोफत. कारण आमच्या दारी आले महात्मा गांधी, नेहरू! मोटरगाडी नसल्याने काँग्रेस अध्यक्ष नेहरूंना सावदा रेल्वे स्थानकापासून बैलगाडीतून यावे लागले. भुसावळ-यावल रस्त्यावरील तापी नदीचा पूल पुराखाली गेल्याने बाह्य जगाशी संपर्क फक्त सावदा स्टेशनाद्वारेच करणे शक्य होते. बहुतेक पुढारी बैलगाड्यांमधून तर महात्मा गांधी व विनोबा भावे यांसारखे मान्यवर सावदा रेल्वे स्टेशनपासून पदयात्रा करत आले होते.

अधिवेशन भरविण्यासाठी आवश्यक अशी आधारभूत संरचना खिरोदाच नव्हे तर फैजपूरलाही नव्हती. बुऱ्हाणपूरहून सुरतला जाणारा रस्ता व पाच मैलांवरील लहानसे सावदा रेल्वे स्थानक हेच वाहतुकीचे मार्ग उपलब्ध होते. फैजपुरात धर्मशाळा अथवा खाणावळही नव्हती. पाणीपुरवठ्यासाठी नळयोजना नव्हती. सावदा व फैजपूर दरम्यानच्या शेतांमध्ये अधिवेशनासाठी व्यवस्था करणे सोपे नव्हते. दोन्ही ठिकाणच्या नगरपरिषदांचा काँग्रेसला विरोध होता. अशा परिस्थितीत काँग्रेसचे विरोधक उपहास व संशयी नजरेने पाहत होते. तथापि प्रांतिक व जिल्हा काँग्रेस समित्यांनी संरचनाविषयक समस्यांवर मात केली. खेडुतांनी श्रमदान करून रस्ते तयार केले. सर्व राष्ट्रीय पुढारी व काँग्रेस प्रतिनिधींसाठी त्यांनी शेकडो झोपड्या तयार केल्या. त्याच झोपड्यांमध्ये गांधी, नेहरू, पटेल इत्यादी पुढारी राहिले. शौचकूप व साफसफाईची व्यवस्था करण्यात आली. गांधीजींच्या आदेशानुसार अधिवेशनाचा खर्च कमीत कमी करण्यावर संयोजकांचा कटाक्ष होता.

फैजपूर अधिवेशनाची विशेषता अशी की, भोजनव्यवस्था, स्वच्छता व साफसफाई, निवासव्यवस्था वगैरे नेहमीप्रमाणे कंत्राट पद्धतीने न करता स्वयंसेवक, स्वयंसेविका आणि खेडुतांनी श्रमदानाने केली होती. शेतकऱ्यांनी भाजीपाला

मोफत दिला. हातसडीच्या तांदळाचा भात आणि बायकांनी जात्यावर दळलेल्या पिठाच्या पोळ्यांचा गांधीजींनी खास उल्लेख केला. श्रमाचे सौंदर्य हा फैजपूर काँग्रेसचा एक संदेश होता.[१३]

काँग्रेसला ग्रामीण भागात सखोल प्रतिसाद मिळविणे आणि समाजरचनेत परिवर्तन करणे हे गांधीजींचे उद्दिष्ट असल्यामुळे, गावोगावी या अधिवेशनाचा प्रचार करण्यात आला. थोर विचारवंत मानवेंद्रनाथ रॉय फैजपूरला आल्यामुळे त्यांचे अनुयायी व. भ. कर्णिक, द्वा. भ. कर्णिक, एम. आर. शेट्टी वगैरे अधिवेशनापूर्वी तेथे आले आणि त्यांनी काँग्रेसच्या प्रचारकार्यास वाहून घेतले. तसेच श्रीपाद अमृत डांगे, विष्णुपंत चितळे, एस. एम. जोशी यांनीही प्रचारकार्यास हातभार लावला. प्रचारसमितीचे चिटणीस एस. एम. जोशी, साने गुरुजी, धनाजी नाना चौधरी, सीताराम भाऊजी चौधरी, लोढूभाऊ फेगडे वगैरेंनी अक्षरशः पायपीट करून काँग्रेसचा संदेश गरीब व निरक्षर शेतकऱ्यांपर्यंत पोचवला. या अधिवेशनासाठी पुरुषोत्तम हरी पटवर्धन (रावसाहेब) यांनी ७०० जणांचे स्वयंसेवक दल उभारले होते. या दलाची कामगिरी नेत्रदीपक होती. एस. एम. जोशींनी आपल्या आत्मकथेत कबूल केले की, “ राष्ट्रसेवा दल म्हणून पहिल्याने जे काही महाराष्ट्रात उभे राहिले ते रावसाहेब पटवर्धनांच्या नेतृत्वाखाली फैजपूर येथे. ”

प्रेमाबाई कंटक यांनी दीडदोनशे महिलांचे अत्यंत समर्थ असे काँग्रेस सेविका दल उभारले. स्वयंसेविका म्हणून काम करण्यास तयार असलेल्या महिलांचे शिबिर २० ऑक्टोबर १९३६ रोजी कर्मवीर वि. रा. शिंदे, प्रेमा कंटक व आनंदीबाई गाडगीळ यांनी पुण्यात घेतले होते. या सेविका दलातील महिलांनी फैजपूरला केलेले काम व आवेश समक्ष पाहून प्रभावित झालेल्या एका गोऱ्या अधिकाऱ्याने सरकारला कळविले की, “ इंग्लंडसारख्या प्रगत देशातही तरुण मुली इतक्या उघडपणे व निर्भयपणे पुरुषांबरोबर काम करीत नाहीत. ” त्या महिलांच्या समर्पण भावनेची त्याने दिलेली कबुली गोपनीय अहवालात प्रस्तुत इतिहासकारास आढळली. अधिवेशनातील शौचकूप आणि सफाईचे काम अप्पासाहेब पटवर्धनांच्या (रत्नागिरीचे) नेतृत्वाखाली तीनशेहून अधिक स्वयंसेवकांच्या

दलाने पार पाडले. अधिवेशनास अदमासे दीड लाख लोक आले होते. हा सोहळा तीन दिवस चालू राहिला. तरीही त्यांनी टाकलेली घाण स्वयंसेवकांनीच साफ केली होती. या कामासाठी एकही व्यावसायिक भंगी आणला नव्हता, हे विशेष. सरकारच्या अहवालातही याविषयी कबुली आढळली.[१४]

शंकरराव देव, धनाजी नाना चौधरी व साने गुरुजींच्या अंगात तर जणू काय अधिवेशनच संचारले होते. गुरुजींचा उत्साह ओसंडून वाहू लागला. प्रचारासाठी त्यांनी अनेक स्फूर्तिदायक गीते लिहिली. त्यांच्यावर भावुकपणे प्रेम करणाऱ्या खानदेशातील युवकांनी सर्व प्रकारची कामे केली. अ. भा. चरखा संघ, अ. भा. ग्रामोद्योग संघ व काँग्रेसच्या परिवारातील सर्वच संघटनांनी अधिवेशनाला मोठे योगदान दिले. त्रिदल महाराष्ट्रातील काँग्रेस कार्यकर्ते आणि रचनात्मक कार्य करणाऱ्या घटकांना फैजपूरला आणून कामास लावण्याचा शंकरराव देवांचा प्रयास होता. तो पूर्णपणे सफल झाला. पूर्व खानदेशातील हे राजकीय अधिवेशन शेतकऱ्यांचे अधिवेशन ठरावे असा स्थानिक कार्यकर्त्यांचा प्रयत्न होता. म्हणूनही जनता भावनावेगाने अधिवेशनाच्या यशासाठी झटली.

अधिवेशनासाठी स्थानिक समितीने पंधरावीस हजार रुपये गोळा करण्याचे प्रांतिकचे आदेश होते. मात्र या समितीचे एक सदस्य यावलचे माधव मार्तंड देशपांडे यांनी स्वतःहून एकरकमी वीस हजार रुपये दिले होते. त्यामुळे अपेक्षितपेक्षा जास्तच निधी गोळा झाला. सर्व खर्च भागवून तीस हजार रुपये शिल्लक राहिले. त्यातून माधवरावांची देणगी परत करण्याचा निर्णय झाला. तथापि त्यांनी पैसे परत घेतले नाही. म्हणून प्रांतिकने त्यांच्या नावे एक ट्रस्ट स्थापन केला होता.

फैजपूर काँग्रेसचे अध्यक्ष जवाहरलाल नेहरू, स्वागताध्यक्ष शंकरराव देव तर स्वागत समितीचे सरचिटणीस धनाजी नाना चौधरी होते. याशिवाय वा. वि. दास्ताने, गो. आ. देशपांडे, गोकुळभाई भट, शंकरराव ठकार व शंकर काबरा हे पदाधिकारी होते. बाळकृष्ण चिंतामण लागू हे स्वागत समितीचे खजिनदार होते.

शांतिनिकेतनचे विश्वविख्यात कलाकार नंदलाल बोस आणि मुंबईचे प्रसिद्ध वास्तुविशारद म्हात्रे व गुलाटी यांनी टिळकनगरची म्हणजे अधिवेशनाच्या स्थळाची कलापूर्ण रचना केली होती. स्थानिक वस्तूंचाच उपयोग करून सुंदर ‘ बांबू नगरी ’ उभारली होती.

फैजपूर काँग्रेसच्या वेळी एक नवा उपक्रम प्रथमच करण्यात आला. मुंबईतील गोकुळदास तेजपाल पाठशाळेपासून, जेथे काँग्रेसचे पहिले अधिवेशन भरले होते, तेथून ऑलिंपिकसारखी ज्योत आणि झेंडा हाती घेऊन एकाने धावण्यास आरंभ करावयाचा, आणि नंतर टप्प्याटप्प्यावर काँग्रेस कार्यकर्त्यांनी धावण्याच्या रीले शर्यतीत करतात त्याप्रमाणे झेंडा व ज्योत एकाच्या हातून दुसऱ्याने घ्यावयाची, अशी योजना आखण्यात आली. आज सर्वांना परिचित असलेल्या या उपक्रमाची कल्पना तेव्हा प्रथम गोकुळभाई भट यांनी मांडली होती. मुंबई प्रदेश काँग्रेसचे नेते बॅ. के. एफ. नरिमन यांनी ज्योत पेटवल्यावर ती हाती घेऊन प्रथम धावले ते गोकुळभाई, आणि ४८० किलोमीटरचे अंतर धावून काँग्रेस कार्यकर्त्यांनी ती अखेर दिली स्वागत समितीचे चिटणीस तात्यासाहेब देशपांडे यांच्या हाती. तात्या देशपांडे यांनी ती धावत जाऊन शिवाजी प्रवेशदारातून काँग्रेस अधिवेशनाच्या जागी म्हणजे टिळकनगरात आणली. मग ती ज्योत देवांनी स्वीकारली आणि अध्यक्ष जवाहरलाल नेहरूंनी काँग्रेसचा झेंडा फडकावला.

धनाजी नाना, साने गुरुजी आणि मंडळींच्या प्रयत्नांमुळे फैजपूर अधिवेशनाला खेड्यापाड्यांतून दीड लाख लोक आले होते. त्यांचा उत्साह व सर्व प्रकारच्या अडचणी सोसण्याची त्यांची सहनशील वृत्ती आणि पौर्णिमेच्या रात्री डिसेंबरच्या कडक थंडीत कुडकुडत तब्बल साडेचार तास शांतपणे आंतरराष्ट्रीय राजकारणासारख्या गहन विषयावरची नेत्यांची भाषणे ऐकण्याची त्यांची चिकाटी पाहून, सरकारी अधिकारी तसेच सरकारधार्जिण्या वृत्तपत्रांचे प्रतिनिधीही प्रभावित झाल्याशिवाय राहिले नाहीत. तहानभूक विसरून, धूळ खात, डोळे मिटून बसण्याची तयारी असल्यास, फैजपूर अधिवेशनात तक्रार करण्याजोगे काही नव्हते, असा शेरा **टाइम्स ऑफ इंडियाच्या** वार्ताहरालाही द्यावा लागला. रात्रीच्या थंडीत कुडकुडत

नेत्यांची भाषणे ऐकणाऱ्या दीड लाख खेडुतांची त्यालाही दखल घ्यावी लागली. या साऱ्या जनताजनार्दनाला तेव्हा भाडोत्री ट्रकमध्ये कोंबून, पैसे देऊन आणावे लागलेले नव्हते! जनशक्तीचे हे प्रदर्शन पैशाच्या बळावर केलेले नव्हते.

काँग्रेस अधिवेशनाच्या निमित्ताने फैजपूरला भरविण्यात आलेल्या खादी व ग्रामोद्योग प्रदर्शनाचे उद्‌घाटन करताना गांधीजी म्हणाले, "काँग्रेसच्या इतिहासात आज पहिल्यांदाच तुम्हाला बिनसडलेल्या तांदळाचा भात आणि हाताने दळलेल्या गव्हाच्या चपात्या खायला मिळत आहेत. अशी स्वच्छ हवा आणि इतकी पवित्र भूमी शहरात कोठून सापडणार? या ठिकाणी आपण जमलो आहोत ते खेडुतांना लुटण्यासाठी नव्हे, तर त्यांची सेवा आपल्या हातून घडावी म्हणून."

फैजपूर काँग्रेसचे आगळेपण अनेक बाबींमध्ये आढळते. ग्रामीण महाराष्ट्रात लोकजागृती करण्याच्या हेतूने ऑलिम्पिक ज्योतीसारखी ध्वजज्योती गोवालिया टँकपासून स्वयंसेवकांनी धावत येऊन आणली. त्याचप्रमाणे अहमदनगरमधील किसान परिषदेच्या स्वयंसेवकांनी देवळालीपासून फैजपूरपर्यंत पदयात्रा केली. पुणे, भोर संस्थान व सोलापूरचे काँग्रेसजनदेखील शेकडो किलोमीटरचा पायी प्रवास करून फैजपूरला आले होते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ग्रामीण भागात भरत असलेल्या काँग्रेसने प्रभावित झालेले समाजवादी पुढारी व भारतीय किसान परिषदेचे सचिव स्वामी सहजानंद सरस्वती यांनी थेट बिहार प्रांतातून किसानांचा मोर्चा पायी चालत फैजपूरला आणला होता. आजच्याप्रमाणे मालमोटारी किंवा रेल्वेने नव्हे! फैजपूरला आल्यावर स्वामी सहजानंद व मद्रास-आंध्र प्रांतातील पुढारी प्रा. एन. जी. रंगा यांनी किसान परिषदेची ताकद दाखवून दिली.

अखिल भारतीय चरखा संघ व अखिल भारतीय ग्रामोद्योग संघाने फैजपूरला सुंदर प्रदर्शन भरविले. या प्रदर्शनास गांधीजींचे मार्गदर्शन लाभले होते. प्रदर्शनाच्या उद्‌घाटनप्रसंगी त्यांनी सांगून टाकले की, यापुढे प्रत्येक काँग्रेस अधिवेशन खेडेगावातच भरविण्यात यावे. त्यानुसार आगामी तीन अधिवेशने हरिपुरा (गुजरात), त्रिपुरी (मध्य प्रदेश) व रामगड (बिहार) या खेड्यांत भरविण्यात आली. अधिवेशनासाठी लागणारी सर्व साधनसामग्री स्थानिकरीत्या गोळा करावी हा गांधीजींचा दंडक प्रथमच फैजपूरला पाळला गेला.

**फैजपूरची फलश्रुती** :—लखनौ काँग्रेसप्रमाणेच फैजपूरमध्येही महायुद्धाचा संभाव्य धोका, वर्ल्ड पीस, काँग्रेसपुढील प्रश्न, नागरी स्वातंत्र्यापासून भारतीयांना वंचित ठेवल्याचा विषाद, इत्यादी विषयांवर गंभीर चर्चा झाली. रोमा रोलँडच्या आमंत्रणानुसार काँग्रेसचा प्रतिनिधी ब्रुसेल्सच्या वर्ल्ड पीस काँग्रेसमध्ये गेला होता. (सप्टेंबर १९३६). साम्राज्यशाहीकडून गरीब देशांचे शोषण थांबवल्याखेरीज जागतिक शांतता टिकणार नाही हा ब्रुसेल्स काँग्रेसचा निष्कर्ष होता. त्यावर फैजपूरला सखोल विचार होऊन साम्राज्यवाद्यांच्या आगामी युद्धप्रयत्नांना कोणत्याही प्रकारचे साहाय्य न करण्याचा निर्णय झाला.

मात्र फैजपूरला घेतलेल्या सर्वात महत्त्वाच्या निर्णयांमध्ये समावेश होता तो प्रांतिक विधिमंडळांच्या निवडणुका, भारतीय घटना समिती, काँग्रेसचा निवडणूक जाहीरनामा, कृषी विकास कार्यक्रम व ब्रिटिश सम्राटाच्या राज्यारोहण सोहळ्यावर बहिष्कार आणि १ एप्रिल १९३७ चा संकल्पित देशव्यापी हरताळ यांचा. या शेवटच्या निर्णयाचा हेतू १९३५ च्या सांविधानिक कायद्याप्रमाणे इंग्रजांनी देऊ केलेल्या राज्यघटनेचा धिक्कार करणे हा होता. इंग्रजांनी देऊ केलेल्या राज्यघटनेने भारताच्या संपूर्ण स्वराज्याच्या मागणीची प्रतारणा केलेली होती. किंबहुना त्यामुळे भारतीय संघराज्यावर ब्रिटिशांची पकड पक्की होऊन भारताला स्वराज्यप्राप्तीपासून वंचित ठेवण्यास मदत झाली असती. म्हणून १९३५ च्या कायद्यातील फक्त प्रांतिक स्वायत्ततेचा भाग फैजपूरला स्वीकारून संघराज्याबाबतच्या तरतुदी काँग्रेसने झिडकारल्या व त्याविरुद्ध राष्ट्रव्यापी मोहीम हाती घ्यायचे ठरविले. भारताने आपली राज्यघटना स्वतःच तयार करावयाची असून लोकनियुक्त प्रतिनिधींनी तयार केलेल्या संविधानानुसारच भारतीय जनतेकडे सत्तांतर व्हावयास हवे, त्यात परकीयांचा हस्तक्षेप नको, अशी काँग्रेसने ठाम भूमिका घेतली.

फैजपूरचा कृषी विकासाचा कार्यक्रम, खंड व जमीन महसुलात परिस्थितीनुसार कपात, अल्पभूधारकांना सूट, वेठबिगारीस आळा, प्रत्यक्ष कसणाऱ्यांना जमिनीची मालकी, कर्जबाजारीपणातून शेतकऱ्यांची सुटका, शेतकऱ्यांना कूळ म्हणून संरक्षण, शेतमजुरांना कायदेशीर संरक्षण, किसानांच्या संघटना इत्याही बाबी १९३७ च्या काँग्रेस जाहीरनाम्यातच अंतर्भूत करून टाकल्या. फैजपूर काँग्रेसच्या २१ ठरावांपैकी काही ठराव ऐतिहासिक महत्त्वाचे आहेत.

या अधिवेशनात वेगळेच चैतन्य दिसून आले. त्याचे परिणाम रोखण्यासाठी ब्रिटिशांनी नागरी स्वातंत्र्यावर बंधने घालणे सुरू केले. याचा अनुभव फैजपूरलाच आला. ‘ सरहद्द गांधी ’ खान अब्दुल गफार खान यांना त्यांच्या वायव्य सरहद्द प्रांतात प्रवेश करण्याचा नैसर्गिक अधिकार नाकारणारी नोटिस फैजपुरातच दिली होती. हे इंग्रज सरकारच्या सूडबुद्धीचे निदर्शक होते.

काँग्रेसच्या ध्येयधारणेच्या दृष्टीनेही फैजपूरचे अधिवेशन ऐतिहासिक महत्त्वाचे ठरले. तोपर्यंत काँग्रेसने लोकशाही समाजवादी धोरणाचा अंगीकार केलेला नव्हता. १९३४ मध्ये स्थापन झालेल्या काँग्रेस समाजवादी पक्षाचे युवक जुन्या काँग्रेस पुढाऱ्यांवर आपल्या विचारधारेचा प्रभाव पाडण्यासाठी झटत होते. खुद्द काँग्रेसमध्येही जवाहरलाल नेहरू व सुभाषबाबूंचा डावा गट क्रियाशील बनला होता. परंतु तेव्हा डावी विचारसरणी स्वीकारण्यास काँग्रेस पक्ष उत्सुक नव्हता.

अशा पार्श्वभूमीवर काँग्रेस समाजवादी पक्षाचे जयप्रकाश नारायण, डॉ. राम मनोहर लोहिया, युसुफ मेहेरअली, अशोक मेहता, अच्युतराव पटवर्धन, कमलादेवी चट्टोपाध्याय, एम. आर. मसानी, दिनकर मेहता, ठाकोरदास पंड्या, आर. ए. खेदगीकर, एस. एम. जोशी, साने गुरुजी, पी. व्ही घाणेकर आणि विष्णू चितळे तसेच कम्युनिस्ट पक्षाचे श्रीपाद अमृत डांगे, सोली बाटलीवाला आणि ई. एम. एस. नंबुद्रीपाद फैजपूरला उपस्थित होते. मानवेंद्र रॉय व त्यांच्या विचारधारेचे वसंत भ. कर्णिक, द्वारकानाथ भ. कर्णिक, चार्लस मस्करेन्हास हेही फैजपूरला आलेले होते. याशिवाय अखिल भारतीय किसान परिषदेचे कार्यकर्ते आपल्या मागण्यांचा काँग्रेसने स्वीकार करावा यासाठी या अधिवेशनास उपस्थित राहिलेत. काँग्रेसच्या परिसीमेत राहून आपापली ध्येयधोरणे स्वीकृत होण्यासाठी हे सर्व घटक उत्सुक झालेले होते. काँग्रेसच्या जुन्या ध्येयधोरणांबाबत असंतोष व्यक्त करीत होते. फैजपूरमध्ये खूप विचारमंथन झाले. इंग्रजांविरुद्ध करावयाचे पुढील आंदोलन, काँग्रेसचे परराष्ट्रीय धोरण, आगामी आर्थिक धोरण आणि शेतकरी-कामगारांचे प्रश्न अशा गहन प्रश्नांबाबत विचारविनिमय झाला. मानवेंद्र रॉय हे सुप्रसिद्ध क्रांतिकारक बऱ्याच वर्षांचा कारावास भोगून २० नोव्हेंबर १९३६ रोजी

बाहेर पडलेले होते. त्यांच्याभोवती एक वलय निर्माण झालेले होते. म्हणून काँग्रेसच्या व्यासपीठावर आलेले रॉय काय सांगतात याकडे सर्वांचे कान लागले होते.

आपल्या भाषणात रॉय यांनी काँग्रेस समाजवादी व कम्युनिस्टांना परखड इशारा दिला की, प्रत्येक जहालमतवादी (रॅडिकल) गटाची ध्येयधारणा काहीही असली, तरी प्रत्येकाने इतर कोणताही प्रश्न उपस्थित न करता काँग्रेसच्या स्वातंत्र्य आंदोलनास बिनशर्त पाठिंबा द्यावा. त्यांनी जहालमतवाद्यांना ठणकावले की, भारतास स्वातंत्र्य प्राप्त होईपर्यंत समाजवादी आकृतिबंधासाठी लढा देणे आणि समाजवादी प्रणालीची अर्थव्यवस्था आणण्यासाठी समाजाची पुनर्रचना करणे या दोन्ही गोष्टी आज तर्कशुद्ध तर नाहीतच, पण उचितही नाहीत. मानवेंद्र रॉय यांच्या या प्रतिपादनास सोली बाटलीवाला व दिनकर मेहता या समाजवादी जहालांनी आक्षेप घेतला होता. वातावरण चांगलेच तापले. अधिक संघर्षाची भूमिका घेणे अनुचित असल्याचे ओळखून जयप्रकाश नारायण यांनी या वादास आवर घातला व वेळ निभावून नेली.

या काँग्रेसची दुसरी महत्त्वाची फलनिष्पत्ती म्हणजे कृषिअर्थव्यवस्थेबाबतचा काँग्रेसचा ठराव ही होय. रॅडिकल गटांच्या सर्वच मागण्या स्वीकृत करणे काँग्रेस पक्षाला शक्य झाले नाही. तरी शेतीविषयक धोरणांवर काँग्रेस समाजवादी, भारतीय किसान परिषद व कम्युनिस्ट मंडळींचा बराच प्रभाव पडला. डाव्या रॅडिकल मंडळीच्या मागण्यांना प्रतिसाद देणे हा या ठरावामागील उद्देश होता. ही मंडळी आणि खास करून काँग्रेस समाजवादी पुढारी काँग्रेस कार्यकारिणीचे मतपरिवर्तन करण्यात फैजपूरला यशस्वी झाले असे नव्हे. तथापि विचारविनिमयाच्या प्रत्येक फेरीत त्यांनी आपल्या सामर्थ्याचे दर्शन घडविले. **पुढील दीड वर्षात काँग्रेस पक्षाने आर्थिक नियोजनासाठी जे धोरण स्वीकारले त्याचे बीज फैजपूरला पेरले गेले होते.** फैजपूर अधिवेशनाची आणखी एक फलनिष्पत्ती म्हणजे देशातील रॅडिकल युवकांना एक स्वतंत्र व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी **‘ ऑल इंडिया यूथ असोसिएशनची ’** स्थापना ही होय.

वरील विवेचन तत्कालीन अत्यंत गुप्त ठेवण्यात आलेल्या ब्रिटिश **' कॅबिनेट पेपर्स ' मधील एका दस्तऐवजावर आधारित असल्याने महत्त्वाचे आहे.** हे पेपर्स भारत सरकारकडून इंग्लंडमधील मंत्रिमंडळाच्या माहितीस्तव इंग्लंडला पाठविले जात असत.

फैजपूर अधिवेशनाकडे साशंक व उपहासाच्या नजरेतून पाहणाऱ्या ब्रिटिश सत्ताधीशांनाही हे अधिवेशन कमालीचे यशस्वी झाले असे मान्य करावेच लागले. एन. पी. ए. स्मिथ या अंमलदाराने हिंदुस्तान सरकारला पाठवलेल्या अहवालात स्पष्ट कबुली देताना म्हटले आहे की, " दोन लाख लोकांनी काँग्रेसच्या मंडपास भेट दिली असून त्यांतील एक लाख खेडूत होते. त्यांच्यापैकी काही कित्येक मैल अंतरावरून आले होते. संयोजकांनी बरेच संघटन कौशल्य दाखविले. व्यवस्था अपुरी पडली तरी सर्वसाधारणपणे समाधानकारक होती. काटकसर व साधेपणा हे या अधिवेशनाचे ठळक विशेष होते. सतराशे स्वयंसेवकांमध्ये दोनशे स्त्रिया होत्या. त्यामधील उत्साही मुलींचे प्रमाण पाहून मला नवल वाटले. "[१५]

मुंबई सरकारच्या गुप्तचर विभागाने आपल्या अहवालासोबत पाठवलेल्या ८१ पानांच्या परिशिष्टातही कबूल केले होते की, ' अधिवेशनाची व्यवस्था अत्यंत चोख असून प्रत्येक बाबतीत कार्यक्षमता दिसून आली.' **गुप्तचरांनी पुढील निष्कर्ष काढले.** (१) काँग्रेसचे बळ व सामर्थ्य वाढले आहे. (२) काँग्रेसमधील मतभेद मिटविण्यात नेत्यांना यश आले असून पक्षात फूट पडणे संभवत नाही. (३) अधिकार स्वीकारण्याचा निर्णय झाला नाही. पण काँग्रेसने अधिकारपदे घेतली तरी ती राज्यघटना मोडण्यासाठीच घेतली जातील. (४) काँग्रेसमध्ये समाजवाद्यांचे बळ वाढले तरी ते मर्यादित आहे. (५) जनआंदोलन करण्याचा विचार संमत झाला. (६) महात्मा गांधींचा पक्षावर जबरदस्त प्रभाव असून त्यांचे सामर्थ्य वाढते आहे. त्यांच्यामुळेच अधिवेशनात एवढा मोठा जनसमुदाय जमला होता.[१६]

ब्रिटिश कॅबिनेटला पाठविलेल्या गोपनीय कागदपत्रांवरून मला दिसले की, एम. एन. रॉय, कम्युनिस्ट व समाजवादी पक्षांचे पुढारी यांची फैजपूरला नेहरू, सुभाषबाबू व गांधीजी यांच्याशी युती झाल्याने सरकारला भीती वाटू लागली.

शिवाय काँग्रेसला ग्रामीण भारतात अपूर्व प्रतिसाद लाभला, ही सरकारला भयसूचक घटना वाटू लागली. **काँग्रेसने प्रथमच आपले भावी परराष्ट्र धोरण निर्धारित केले. ब्रुसेल्समधील परिषदेबाबत फैजपूरला झालेली चर्चा कलोनिअल सत्ताधीशांना धोकादायक वाटली होती.** फैजपूरचे आणखी महत्त्व यात होते की, रॅडिकल गटांच्या सर्व मागण्या काँग्रेसला संमत करणे शक्य नसले, तरी या पक्षाला कृषिअर्थव्यवस्थेबाबत निश्चित धोरण आखावे लागले. शिवाय गांधीजींनी काँग्रेसचा राजीनामा देऊनही त्यांचे पक्षातील महत्त्व अजिबात कमी झाले नाही, हे सिद्ध झाले.

## स्वतंत्र मजूर पक्ष

दलित व श्रमिक वर्गाच्या हितवर्धनासाठी डॉ. आंबेडकरांनी १५ ऑगस्ट १९३६ रोजी स्वतंत्र मजूर पक्ष (इन्डिपेंडंट लेबर पार्टी) स्थापनेची घोषणा केली. १९३५ च्या कायद्यानुसार मुंबई कायदेमंडळातील एकूण १७५ जागांपैकी ११५ जागा सर्वसाधारण आणि ६० जागा आरक्षित असल्याची तरतूद होती. या ६० पैकी १५ जागा अस्पृश्य वर्गासाठी राखीव होत्या. मात्र सर्व राखीव जागा जिंकल्या तरी कायदेमंडळात आंबेडकरांना अपेक्षित मताधिक्य मिळणे अशक्य होते. म्हणून केवळ अस्पृश्यांचा पक्ष न काढता समविचारी सवर्ण मंडळी आणि कामगार वर्गाचाही समावेश असलेला व्यापक पण झुंजार मजूर पक्ष काढण्याचे त्यांनी निश्चित केले.

**टाइम्स ऑफ इंडियाला** दिलेल्या मुलाखतीत डॉ. आंबेडकर म्हणाले होते की, “आजच्या युगात जातीयवादी पक्ष अनुचित असल्यामुळे माझ्या काही मित्रांच्या इच्छेनुरूप मी पक्षाचे नाव व कार्यक्रम यास व्यापक स्वरूप दिले आहे. याचा मुख्य हेतू असा की, अस्पृश्य वर्ग व इतर वर्गादरम्यान राजकीय सहकार्यास वाव असावा.” आंबेडकरांनी आणखी स्पष्ट केले की, आमचा पक्ष सर्वस्वी स्वतंत्र राहून आवश्यक बाबींमध्ये इतर कोणत्याही पक्षाशी सहकार्य करेल; या पक्षाचा कार्यक्रम श्रमिक वर्गाचे कल्याण साध्य करणे हा राहील. मजूर वर्गात दलितांचाही समावेश होत असल्याने पक्षाला स्वतंत्र मजूर पक्ष नाव दिले, असे

त्यांनी सांगितले. आंबेडकरांनी त्यांच्या **जनता** पत्रकाच्या २२ ऑगस्ट १९३६ रोजीच्या संपादकीयात म्हटले की, "अस्पृश्यतानिवारणाच्या लढ्याचे बाह्य स्वरूप जरी जातिनिष्ठ दिसत असले, तरी तत्त्वतः तो लढा आर्थिक आहे. अस्पृश्यतानिवारणाच्या बाबतीत अस्पृश्य श्रमजीवी जनतेचे हितसंबंध स्पृश्य श्रमजीवी जनतेच्या हितसंबंधाहून वेगळे किंबहुना परस्परविरोधी असल्यामुळे अस्पृश्य वर्गाला आपला लढा स्वतंत्रपणे लढविणे क्रमप्राप्त होते. परंतु आर्थिक लढ्यात स्पृश्य आणि अस्पृश्य शेतकरी व कामकरी वर्गाचे हितसंबंध एकजीव आहेत. अस्पृश्य वर्गाला आपला आर्थिक लढा स्पृश्य शेतकरी व कामकरी वर्गाच्या साहाय्यावाचून स्वतंत्रपणे लढता येणार नाही."[१७]

डॉ. आंबेडकरांनी १९३७ सालच्या निवडणुकीसाठी आपल्या पक्षाचा जाहीरनामा घोषित करताना पुढील ध्येयधोरणांवर भर दिला :—मोठ्या उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण, खोती जमीनधारणा पद्धती नष्ट करणे, शेती कसणाऱ्या कुळांना संरक्षण, घरभाडे व सावकारीवर कायद्याचे नियंत्रण, कामगारांच्या कामाचे तास निश्चित करणे, तसेच कामगारांना बोनस यासाठी कायदे करणे. इतरही काही कल्याणकारी योजनांचा जाहीरनाम्यात समावेश केलेला होता.

निवडणुकीसाठी उमेदवार निवडण्यासाठी आंबेडकरांनी काही निकष लावले होते. त्यानुसार त्यांना अपात्र वाटलेले अनेक सहकारी नाराज झाले व दुरावले. ते काँग्रेसमध्ये येऊन स्वतःस राष्ट्रीय हरिजन  असे संबोधू लागले. त्यांच्यातील अमृतराव रणखांबे, डॉ. पी. जी. सोळंकी, मेढे, बिऱ्हाडे, उद्धव शिवशरण मास्तर वगैरे अनुभवी सहकारी आंबेडकरांविरुद्ध गेले. क्रिकेटर पी. बाळू म्हणजे बी. बी. पालवणकर आणि पां. न. राजभोज हे तर आंबेडकरांचे प्रतिस्पर्धीच बनले होते. १७ फेब्रुवारी १९३७ रोजी नवीन कायद्यानुसार मुंबई प्रांताच्या विधानसभेसाठी निवडणूक झाली. स्वतंत्र मजूर पक्षास सर्व १५ राखीव जागा आणि पक्षाचा पाठिंबा असलेल्या किमान ३० सर्वसाधारण (खुल्या) जागा म्हणजे एकूण ४५ जागा मिळतील असा आंबेडकरांचा अंदाज होता. आणि तसे त्यांनी गव्हर्नर ब्रेबर्न यांना सागितलेही होते. तथापि त्यांचा अंदाज साफ चुकला. त्यांच्या पक्षाने

पुरस्कृत केलेल्या व दलितांसाठी राखीव असलेल्या १५ जागांपैकी ११ जागा स्वतंत्र मजूर पक्षाने जिंकल्या. खुद्द बाबासाहेब भायखळा-परळ मतदारसंघातून निवडून आले होते. दलितेतर प्रवर्गातील चार जागा त्यांना मिळाल्या. तथापि त्यांच्या अंदाजापेक्षा त्यांना फारच कमी जागा मिळाल्या होत्या. मराठी भाषिक महाराष्ट्र व कर्नाटकाच्या भागात बरेच दलित मतदार बाबासाहेबांच्या बाजूला असल्याचे दिसून आले. तथापि मध्यप्रांत-वऱ्हाडात दलितांची संख्या बरीच जास्त असूनही तेथे स्वतंत्र मजूर पक्षास १९३७ साली केवळ पाच जागाच जिंकणे शक्य झाले. हिंदुस्तानच्या इतर भागांमध्ये बहुतांश दलितांनी काँग्रेसच्याच उमेदवारांना मते दिली होती.

आंबेडकरांनी मुंबई विधानसभेत १७ सप्टेंबर १९३७ रोजी वंशपरंपरागत हुद्यासंबंधीचे महारवतन बंद करण्यासाठी कायद्यात दुरुस्ती सुचविणारे विधेयक सादर केले. त्याचप्रमाणे आंबेडकरांनी कोकणातील खोती पद्धती नष्ट करण्याचेही विधेयक विधानसभेत मांडून टिळकांपासून रेंगाळत पडलेल्या या प्रश्नास पुन्हा एकदा वाचा फोडली. मात्र यातही त्यांना यश आले नाही. हे सर्वच प्रश्न काँग्रेस मंत्रिमंडळाने स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच सोडविले.

१९३७ च्या निवडणुकीत पक्षाचे तिकिट न मिळाल्यामुळे रणखांबे, शिवतरकर, देवरुखकर, शंकरदास बर्वे वगैरे बाबासाहेबांच्या चळवळीतून बाहेर पडले व काँग्रेसमध्ये दाखल झाले.[१८] वस्तुतः स्वतंत्र मजूर पक्षाने जातिभेद न मानता कायदेमंडळासाठी उमेदवार निवडले होते. तरीसुद्धा अनेक घरभेद्यांनी दलित चळवळीत फूट पाडण्याच्या कारवाया केल्या. म्हणून ज्ञातिनिष्ठ भारतीय समाजात जाती व वर्णव्यवस्थेचे निर्मूलन करू पाहणाऱ्या आंबेडकरांनी निराश होऊन सार्वजनिक चळवळीतून निवृत्त होण्याची घोषणा केली होती. त्यांना आपले नेतृत्व अछुतांमध्ये प्रस्थापित करण्यास अनेक अडथळे पार करावे लागले होते.

दुसरे महायुद्ध पेटल्यावर १३ सप्टेंबर १९३९ रोजी आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाच्या वतीने ब्रिटिशांना बिनशर्त सहकार्य करू, असे निःसंदिग्ध आश्वासन दिले होते. तथापि व्हाइसरॉय लिनलिथगो यांनी आंबेडकरांच्या या देकारास महत्त्व दिले नाही. लिनलिथगो महोदय गांधीजी व बॅ. जिना यांच्यात समझोता घडवून

आणण्याचे प्रयत्न करीत होते. मात्र काँग्रेसने त्या साम्राज्यशाहीच्या युद्धास मदत करण्यास साफ नकार दिल्यामुळे जुलै १९४१ मध्ये लिनलिथगोंनी आपल्या एक्झिक्युटिव कौन्सिलचा विस्तार करून त्यात आठ नवीन भारतीय सदस्यांचा समावेश केला. तेव्हा एकूण लोकसंख्येत मुसलमानांचे प्रमाण २५ टक्के इतकेच असूनही, संपूर्ण कार्यकारिणीत त्यांना ४३ टक्के प्रतिनिधित्व दिले होते. याउलट पाच कोटी असलेल्या अस्पृश्यांपैकी एकाचाही कार्यकारिणीत समावेश केला नाही. पण आंबेडकर फारच दुखावले जाऊ नये म्हणून राष्ट्रीय संरक्षणविषयक सल्लागार समितीत त्यांची व एम. सी. राजा या दोघांची नियुक्ती केली होती. खरे तर १९४० साली लिनलिथगोंनी दिलेल्या आश्वासनांचा त्यांनी स्वतः भंग केला होता. शिवाय अस्पृश्यांना बिनलढाऊ जातींच्या यादीतून वगळण्यास चालढकल केली होती.

**क्रिप्सशी निराशाजनक भेट :—**आंबेडकर व एम. सी. राजा यांनी ३० मार्च १९४२ रोजी स्टॅफर्ड क्रिप्सपुढे आपली कैफियत समक्ष सादर केली. क्रिप्स महोदयांनी त्यांना सागितले की, या देशातील अस्पृश्यांचा ‘ वांशिक व धार्मिक अल्पसंख्याकांमध्ये ’ समावेश करण्यास ब्रिटन तयार आहे; तसेच त्यांच्यासाठी ‘ संरक्षक तरतुदी ’ करण्यासाठी ब्रिटन तयार आहे. वस्तुतः हे आश्वासन अर्थपूर्ण नव्हते. व्हाइसरॉयच्या कार्यकारिणीत अस्पृश्यांना मंत्रिपद देणे हा खरा मुद्दा होता. याबाबत काहीच ठोस आश्वासन न देता सर स्टॅफर्ड यांनी सांगितले की, व्हाइसरॉयच्या कार्यकारिणीत अस्पृश्य लोकांचा एकतरी प्रतिनिधी घ्यावा की नाही याचा निर्णय व्हाइसरॉय घेतील. “ याच्याशी आमचा संबंध नाही.” यामुळे आंबेडकरांचा पार भ्रमनिरास झाला! तसे राजा आणि आंबेडकरांनी चर्चेच्या वेळी क्रिप्सला सांगितले. १ एप्रिल १९४२ रोजी क्रिप्सला पाठविलेल्या पत्रातही त्यांनी क्रिप्सला बजावले की, “ आपल्या प्रस्तावामुळे अस्पृश्यांचे सर्वात जास्त नुकसान होईल आणि सवर्ण हिंदूंच्या राजवटीत आम्ही भरडले जाऊ.” मुळातच क्रिप्सशी चर्चा झाली तेव्हा डॉ. आंबेडकर हे कामगारांचे प्रतिनिधी की अस्पृश्यांचे, असा सवाल क्रिप्स यांनी अविचारीपणे विचारला होता.

१८-२० जुलै १९४२ रोजी नागपूरला भरलेल्या अ. भा. दलित वर्ग परिषदेत आंबेडकरांनी क्रिप्सशी झालेल्या वाटाघाटींचा वृत्तान्त कथन केला. तेव्हा त्यांनी हेही सांगितले की, क्रिप्सला भेटल्यावर आपणास अ. भा. अनुसूचित जातींतर्फे सुसंघटित चळवळ उभारणे आवश्यक असल्याचे त्याना जाणवले. आंबेडकर म्हणाले, "सर क्रिप्स यांनी भीडमुर्वत न ठेवता जाहीर करून टाकले की, क्रिप्स योजनेत अंतर्भूत असलेला कोणताही घटनाविषयक बदल घडवून आणण्यास केवळ हिंदू व मुसलमानांची संमती पुरेशी आहे. अस्पृश्यांच्या संमतीची गरज नाही! म्हणजे भारताच्या राजकारणात अस्पृश्यांना स्वतंत्र घटक म्हणून मान्यता देण्यासही इंग्रज तयार नाही." म्हणून सर्व भारतीय अस्पृश्यांची मुख्य राजकीय संघटना स्थापन करण्याचा मुद्दा आंबेडकरांनी मांडला.

## अखिल भारतीय शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशन

त्यानुसार याच परिषदेत 'ऑल इंडिया शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशन' स्थापण्यात आली. एन. शिवराज हे अध्यक्ष व पां. न. राजभोज हे सरचिटणीस पदावर नेमले गेले. स्वतः बाबासाहेब हेच संघटनेचे अध्यक्ष होणे स्वाभाविक होते. परंतु लवकरच त्यांना मंत्रिपद लाभल्यामुळे मद्रासचे वकील व प्राध्यापक शिवराज यांना कायदेशीर अध्यक्षपद देण्यात आले.

शे. का. फे.च्या अनेक प्रांतिक शाखा निर्माण झाल्या. मात्र या संघटनेत मराठी भाषिकच बहुसंख्य होते. फेडरेशन हाच अस्पृश्यांचा प्रातिनिधिक पक्ष असल्याचे २४ मार्च १९४६ रोजी आंबेडकरांनी त्रिमंत्री कॅबिनेट मिशनला सांगितले. या मिशनने घटना परिषद व हंगामी राष्ट्रीय सरकारच्या स्थापनेची घोषणा केली. पण या मिशनने अस्पृश्यांचा प्रश्न मुळीच विचारात घेतला नव्हता. म्हणून आंबेडकरांनी ब्रिटिश पार्लमेंटकडे आपली कैफियत पाठवली होती. मात्र ११ मार्च १९४६ रोजी झालेल्या प्रांतिक विधिमंडळांच्या निवडणुकीत शे. का. फे. पक्षाचे उमेदवार पराभूत झाले. या पक्षाची घटना बाबासाहेबांनीच तयार केली होती. १९४२ पासून शिवराज हे अध्यक्ष असले, तरी बाबासाहेब हेच या पक्षाचे सर्वेसर्वा व क्रियाशील नेते होते. बाबासाहेब विलक्षण समर्पण भावना

आणि पोटतिडकीने दलितोद्धारासाठी लढत होते. हा मार्ग खडतर होता. दलितांवरील प्रदीर्घ इतिहासाचे ओझे, कर्मठ समाज व शोषणकर्ते यांच्याशी तर लढावे लागलेच. पण त्याबरोबरच ब्रिटिश सरकार व अंतर्गत मतभेद व गैरसमजांचाही त्यांना प्रतिकार करावा लागला.

पक्षातील मतभेदांमुळे दादासाहेब गायकवाड वगैरे सहकारी मुंबई प्रांतिक विधिमंडळाच्या निवडणुकीत पराभूत झाले. वरील प्रकरणात विवेचन केले आहेच की, ११ मार्च १९४६ रोजी झालेल्या या निर्णायक निवडणुकीत शे. का. फे. चा झालेला पराभव दूरगामी वाईट परिणाम करणारा होता. कारण निवडून आलेल्या सभासदांमधून भारतीय संविधान बनवणारी घटना समिती निवडून यावयाची होती. वऱ्हाड-मध्यप्रांतातही शे. का. फे. पक्षाला यश लाभले नाही. म्हणून डॉ. बाबासाहेबांनी पूर्व बंगाल राज्यातून शे.का.फे. पक्षाचे उमेदवार म्हणून निवडणूक लढविली व ते तेथून घटना समितीवर गेले (१९ जुलै १९४६). ९ डिसेंबर १९४६ रोजी घटना समितीची पहिली बैठक भरली.

११ डिसेंबरला डॉ. राजेंद्र प्रसाद यांची घटना समितीच्या अध्यक्षपदी निवड झाली. समितीत भारतातील श्रेष्ठ घटनातज्ज्ञ, वकील व पुढाऱ्यांचा समावेश होता. या समितीवर बाबासाहेब ज्या खुलना मतदारसंघातून निवडून आले होते, तो बंगालच्या फाळणीमुळे पाकिस्तानात गेला. म्हणून बाबासाहेबांचे सदस्यत्व रद्दबातल ठरले. **तथापि ही समस्या महात्मा गांधींनी सोडविली व त्यांनी आंबेडकरांना घटना समितीवर घेण्यास राजेंद्र प्रसाद व नेहरूंना सांगितले.**[१९] प्रसंगतः मुकुंदराव जयकरांना या समितीचा राजीनामा द्यावा लागला होता. त्या रिक्त झालेल्या जागेवर काँग्रेसने डॉ. आंबेडकरांची घटना समितीवर निवड केली. आंबेडकरांनीही राष्ट्रीय नेत्यांशी सहकार्य करण्याची भूमिका स्वीकारली. त्यांच्या अभ्यासू सवयीमुळे त्यांना घटना समितीच्या ड्राफ्टिंग (मसुदालेखन) समितीचे प्रमुख करण्यात आले.

काँग्रेस व गांधीजी यांच्यावर प्रारंभापासून टीकेची झोड उठवणाऱ्या बाबासाहेबांना तोंडदेखली सहानुभूती दाखविणारे इंग्रज अथवा बॅ. जिना इतःपर भारतात राहणार

नव्हते. शिवाय स्वतः गांधीजींचा बाबासाहेबांबद्दलचा व सर्वच दलितांबाबतचा दृष्टिकोण अत्यंत उदार आहे हे त्यांच्या लक्षात आले. गांधीजींच्या सूचनेनुसार नेहरूंनी बाबासाहेबांना मंत्रिमंडळात घेतले (१९४६). शिवाय त्यांच्या व नेहरूंच्या अर्थकारणविषयक धोरणात बरेच साम्य होते. म्हणून बाबासाहेब आनंदाने काँग्रेस सरकारमध्ये सामील झाले होते.

❑❑

## संदर्भ


१. के. के. चौधरी (संपा.),**सोर्स मटेरिअल फॉर हिस्टरी ऑफ फ्रीडम मुव्हमेंट इन इंडिया,** महाराष्ट्र शासन, खंड बारा, पृ. १८२-८३.

२. कित्ता, पृ. १८२-८४.

३. पट्टाभी सीतारामय्या, **हिस्टरी ऑफ द इंडियन नॅशनल काँग्रेस,** खंड एक, पृ. ५५२-५४.

४. चौधरी, **हिस्टरी ऑफ बाँबे,** महाराष्ट्र शासन, पृ. २२५.

५. कित्ता, पृ. २२५-२७.

६. **कलेक्टेड वर्क्स ऑफ सरदार वल्लभभाई पटेल,** खंड चार, नवी दिल्ली, १९९४ पृ. १९०-९२.

७. चौधरी, **हिस्टरी ऑफ बाँबे,** पृ. १७५-७६.

८. यशवंतराव चव्हाण, **कृष्णाकाठ.**

९. **टाइम्स ऑफ इंडिया,** २६ जून १९३४.

१०. चौधरी, **हिस्टरी ऑफ बॉम्बे,** पृ. २३०-३१.

११. य. दि. फडके, **विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड ४ था,** पृ. १२२.

१२. चौधरी, **लोकसत्ता,** २८ सप्टेंबर १९८६.

१३. भानू चौधरी, **कर्मवीरः धनाजी नाना चौधरी : जीवन आणि कार्य,** खिरोदे, १९९० आवृत्ती, पृ. ९०-१००.

१४. हिंदुस्तान सरकार, होम पोलिटिकल, फाईल क्र. ४/३५/३६, एन. पी. ए. स्मिथचा अहवाल.

१५. कित्ता फाईल, स्मिथचे पत्र, २८ डिसेंबर १९३६.

१६. बाँबे प्रेसिडेंसी पोलीस ॲबस्ट्रॅक्ट ऑफ इंटेलिजन्स, ८१ पानांचे परिशिष्ट.

१७. प्रकाश विश्वासराव, **डॉ. बाबासाहेब आंबेडकर,** मुंबई, पृ. ५४-५६.

१८. फडके, उपरोक्त, पृ. २८८-८९, २९३.

१९. प्रकाश विश्वासराव, उपरोक्त, पृ. ६१-६२.

प्रकरण १६

# प्रांतिक स्वायत्तता व काँग्रेस मंत्रिमंडळे

## नवीन संविधानास विरोध

कलोनिअल सत्ताधीशांनी १९३५ च्या हिंदुस्तान सरकार कायद्यानुसार देय केलेले नवीन संविधान भारताला स्वीकारार्ह वाटत नव्हते. १९३० पासून संपूर्ण स्वातंत्र्यासाठी लढा करणाऱ्या काँग्रेसला आणि विशेषतः महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस व मेहेरअली यांना हे भिक्षादान अपमानास्पद वाटले. हे संविधान स्वयंनिर्णयानुसार अथवा संयुक्त निर्णयानुसार उपजले नव्हते, तर ते ब्रिटनमधील कलोनिअल मुत्सद्दी आणि हिंदुस्तान सरकारातील डायहार्ड साम्राज्यवाद्यांच्या संगनमताने उपजले होते. या मंडळींनी सायमन आयोगाच्या दृष्टिकोणातून पार्लमेंटपुढे विधेयक मांडून ते पास करून घेतले होते. या कायद्याचा एक प्रमुख उद्देश ब्रिटिश राजवट अधिक भक्कम व शाश्वत करणे हा होता. या कायद्यानुसार 'फेडरल स्कीम' म्हणजे संघराज्यात्मक संरचना अशीच होणार होती की, इंग्रजांना जमीनदार, ज्ञातिनिष्ठ पक्ष, जातीयवादी लोक व निहित हितसंबंधीयांचे गट आणि संस्थानिकांच्या पाठिंब्याने भारतावर कायम राज्य करणे शक्य होईल. केंद्र सरकारची महत्त्वाची सर्वच खाती राखीव करण्याचा त्यात संकल्प होता. शिवाय त्यावर व्हाइसरॉयला पसंत असे गोरे मंत्री नेमण्याची त्यात तरतूद होती. अनेक बाबींमध्ये व्हाइसरॉयला सर्वाधिकार देण्यात आले होते. व्हाइसरॉयचा ब्रिटिश साम्राज्यातील दर्जा लंडनमधील पंतप्रधानाइतका ठरविण्यात आला. या आणि इतरही अनेक कारणांमुळे **काँग्रेसने या 'संविधान नामक आपत्तीविरुद्ध' रण उभारले. जवाहरलालजी वगैरे डाव्या गटाने तर हे एक आव्हान म्हणून त्याविरुद्ध संघर्ष केला.**

काँग्रेस व बहुसंख्य भारतीयांची मागणी होती की, आम्ही निवडलेल्या घटना समितीने भारताची राज्यघटना बनवावी. घटना समिती व्यापक असावी असे काँग्रेसचे म्हणणे होते. हा विषय फैजपूर काँग्रेस अधिवेशनात खूप गाजला होता. मात्र सरकारने विरोधाचा विचार न करता नवीन राज्यघटना १ एप्रिल १९३७

रोजी अमलात येणार, असे जाहीर केले. म्हणून काँग्रेसने फैजपूरला ठरविल्यानुसार १ एप्रिल हा दिवस काळा दिवस म्हणून घोषित केला होता. त्यानुसार भारतभर हरताळ पाळला गेला. सामुदायिक उपोषण करण्यात आले. भारत राष्ट्राने सरकारचा निषेध केला. भारतीय समाजमनाने सरकार लादत असलेल्या अवांच्छित व अनिष्ट संविधानाविरुद्ध कौल दिला. काँग्रेसने ठराव केला की, मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळांमधील निवडक सदस्य, अ.भा.काँ. समितीचे पुढारी आणि काँग्रेस कार्यकारिणीने सांविधानिक बाबींवर विचारविनिमय करून सरकारपुढे घटना समितीची जोरदार मागणी सादर करावी.

सायमन कमिशनने आरंभिलेली वळणावळणाची प्रक्रिया व गोलमेज (गोलमाल) परिषदांच्या अनुत्पादक प्रयोगातून मार्च १९३३ मध्ये श्वेत पत्रिका उपजली होती. भारतासाठी ती काळी पत्रिका होती. तिच्यावर ब्रिटिश संसदेत झालेल्या वादळी वादविवादांमधून १९३५ चा कायदा निपजला होता. त्या आठ वर्षांतील हुलकावणीच्या प्रक्रियेतून निपजलेला हा कायदा १९१९ च्या कायद्यापेक्षा जास्त काही देत नाही हे काँग्रेसच्या लक्षात आले. किंबहुना सविनय कायदेभंग आंदोलनाच्या प्रभावाखाली १९३०-३१ साली ब्रिटिशांनी देय केलेल्या अनेक राजकीय सवलती या प्रक्रियेत वितळल्या होत्या. विन्स्टन चर्चिल व लँकेशायर लॉबीच्या दबावामुळे संघराज्य पातळीवर प्रत्यक्ष निवडणुकीऐवजी अप्रत्यक्ष निवडणुकीचे तत्त्व मंजूर करण्यात आले. तसेच केंद्र सरकारचे विशेषाधिकार वाढविण्यात आले. शिवाय अनेक बाबींमध्ये स्वेच्छाधीन अधिकार व संरक्षक उपाययोजनांमध्ये अमर्याद वाढ करण्यात आली हे स्पष्ट झाले.

या कायद्याने प्रांतिक पातळीवर द्विदल राज्यपद्धतीऐवजी ‘जबाबदार राज्यपद्धती’ हाच अर्थपूर्ण बदल केला. तसेच प्रांतिक कायदेमंडळांसाठी मतदानाचा हक्क वाढवून ब्रिटिश इंडियातील मतदार वर्ग ६५ लाखांहून तीन कोटींपर्यंत वाढवला. तथापि गव्हर्नरचे स्वेच्छाधीन अधिकार व नकाराधिकार कायम ठेवले. ही तर अत्यंत आक्षेपार्ह बाब होती. १९३५ च्या कायद्याचा ‘फेडरल पार्ट’ स्वीकारण्यास काँग्रेसच नव्हे तर मुस्लीम लीग व संस्थानिकही राजी नव्हते. स्वतः ब्रिटिशांना

तर कोंडी (डेडलॉक) निर्माण करण्यातच रस होता. १९१९ च्या कायद्यानुसारच केंद्रात अधिकारशाही चालू ठेवून आपली सत्ता अमर्यादित काळ अबाधित ठेवण्याचा इंग्रजांचा प्रयत्न होता.

नोव्हेंबर १९२९ मध्ये लॉर्ड आयर्विन यांनी वसाहतीच्या स्वराज्याचा (डोमिनिअन स्टेटसचा) देकार दिला होता. पण खास नमूद करणे आवश्यक आहे की, १९३५ च्या कायद्याने त्याबाबत मौन पाळले. इतकेच नव्हे तर त्या देकाराचा उल्लेखही केला नाही. राजसत्ता शाश्वत ठेवण्याच्या ब्रिटिशांच्या विचारांना व्हाइसरॉय लिनलिथगोंच्या पुढील उद्‌गारांनी पुष्टीच दिली. " The Act had been framed because we thought that way the best way........ of maintaining British influence in India. It was no part of our Policy........ gratuitously to hurry the handing over the controls to Indian hands at any pace faster than that which we regard as best calculated, on a long view, to hold India to the Empire". (Linlithgow to Lord Zetland, 21st December 1939)[१]

## प्रांतिक कायदेमंडळांची निवडणूक

प्रांतिक कायदेमंडळासाठी महाराष्ट्रातील उमेदवारांची निवड करण्यासाठी काँग्रेस संसदीय मंडळ नियुक्त करून, त्यात प्रांताध्यक्ष शंकरराव देव, खासदार न. वि. गाडगीळ, केशवराव जेधे, अच्युतराव पटवर्धन व रमणिकराय मेहता यांचा समावेश केला होता. मध्यप्रांत-वऱ्हाडच्या संयुक्त संसदीय मंडळात महाकोशलचे दहा तर नागपूर व वऱ्हाड प्रांतिक काँग्रेसचे प्रत्येकी पाच सभासद घेण्यात आले होते. वऱ्हाड प्रांतिक काँग्रेसने मा. श्री. अणेंच्या राष्ट्रीय पक्षाशी आणि लोकशाही स्वराज्य पक्षाशी निवडणूक समझोता केला, तर नागपूर प्रांतिकने फक्त अणेंच्या पक्षाशी समझोता केला होता. आगामी निवडणुकीत काँग्रेसला यश लाभणार नाही, असे ब्रिटिशांचे अंदाज होते. मध्यप्रांत-वऱ्हाडचा नवनियुक्त गव्हर्नर हाईड गोवॅन याने तसे व्हाइसरॉयला कळवलेही होते. मात्र या निवडणुकीपेक्षा संपूर्ण स्वातंत्र्य मिळवण्यामध्येच काँग्रेसला रस होता.

दरम्यान राजपुत्राच्या प्रेम प्रकरणावरून त्याच्या राज्यारोहणाबाबत ब्रिटनमध्ये वादळ उसळले होते. दोन विवाहांनंतर घटस्फोट घेतलेल्या एका अमेरिकन रमणीशी विवाह करण्याच्या हट्टापायी राजपुत्र आठवा एडवर्ड यास ब्रिटिश साम्राज्यावरील आपला हक्क सोडून रातोरात देशत्याग करावा लागला होता. त्यामुळे सहावे जॉर्ज बादशहा झाले. त्यांच्या राज्यारोहणाप्रीत्यर्थ भारतीय संस्थानिक व राजनिष्ठांनी आनंदसोहळे व जल्लोश केले. मात्र काँग्रेस व देशप्रेमींनी अशा प्रकारांमध्ये भाग न घेण्याचा निर्णय घोषित केला होता. या विषयावर फैजपूर काँग्रेसमध्येही बरीच चर्चा झाली. जरी प्रेयसीसाठी राजपदाचा त्याग करावा लागलेल्या आठव्या एडवर्डविषयी कित्येक भारतीयांना आदर वाटत होता, तरी नवीन बादशहा सहावे जॉर्ज यांचा आपण अनादर करू नये अशी काँग्रेसने भूमिका घेतली होती. देशातील सर्व संस्थानिकांनी नवीन बादशहाच्या राज्यारोहणाचा सोहळा मोठ्या थाटात साजरा केला. मुंबईतील धनिकांनी नाचगाण्यांचे सोहळे आयोजित करून आपली राजनिष्ठा व्यक्त केली होती. तथापि देशप्रेमी लोक व काँग्रेसने त्यावर बहिष्कार घातला होता.

भारताला १९३७ च्या निवडणुकीत भाग घेणे भाग होते. नवीन कायद्यानुसार मताधिकार वाढूनही केवळ एकदशांस भारतीयांनाच मताधिकार मिळाला होता. निवडणूक मोकळ्या वातावरणात न होता सरकारी नोकरांच्या दबावाखाली झाली. मतदान गुप्त राहिले नाही. मध्यप्रांत-वऱ्हाडमध्ये विधानसभेच्या असलेल्या एकूण ११२ जागांपैकी काँग्रेसने ७० जागा जिंकून गव्हर्नर हाईड गोवॅन आणि **टाइम्स ऑफ इंडियाला** चपराक दिली. एकूण जागांपैकी ६२.५ टक्के जागांवर काँग्रेसने विजय मिळविला होता. या प्रांतातील ६१ टक्के मतदारांनी काँग्रेसला मतदान केले होते. मुस्लीम लीगला १४ जागा, टिळकभक्तांच्या लोकशाही स्वराज्य पक्षाला ४, आंबेडकरांच्या स्वतंत्र मजूर पक्षालाही फक्त ४, ब्राह्मणेतर पक्षास ३ आणि राघवेंद्रराव यांना मानणाऱ्या स्वतंत्र गटाला १७ जागा जिंकता आल्या. त्या प्रांतात दलितांची लोकसंख्या जास्त असूनही आंबेडकरांच्या पक्षाला केवळ ४ जागा मिळाल्या.[२]

मुंबई प्रांतात विधानसभेच्या १७५ जागा होत्या. निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यावर एम. वाय. नूरी व चक्रनारायण हे आमदार काँग्रेसमध्ये सामील झाले. तसेच सातारा व पूर्व खानदेशात झालेली पोटनिवडणूक काँग्रेस उमेदवारांनी जिंकली व एक अपक्ष आमदार काँग्रेसमध्ये सामील झाला. परिणामतः १७५ पैकी ९० जागा काँग्रेसकडे होत्या. मुंबई विधानसभेतील पक्षीय बलाबल असे होतेः—काँग्रेस ९०, मुस्लीम लीग २५, आंबेडकरांचा स्वतंत्र मजूर पक्ष १४, प्रगती पक्ष १२, शेतकरी व जनता पक्ष १०, शेतकरी व कामकरी पक्ष ९, लोकशाही स्वराज्य पक्ष ५, स्वतंत्र राष्ट्रीय पक्ष ५ आणि अपक्ष आमदार ५.

मुंबई प्रांतातील निवडणुकीचे विशेष हे की, पुणे शहर मतदारसंघात भा.म. गुप्ते यांनी टिळकभक्त ल. ब. भोपटकरांचा चार हजारांहून जास्त मतांनी पराभव केला. दक्षिण साताऱ्यातून आत्माराम पाटील हे शेतकरी कुटुंबातील डाव्या विचारसरणीचे व धडाडीचे उमेदवार ३७,००० हजारांहून जास्त मतांनी विजयी झाले. तसेच यशवंतराव चव्हाणही मोठ्या मताधिक्याने यशस्वी झाले. पांडुअण्णा शिराळकर, डॉ. कृ. भि. अंत्रोळीकर, हरिभाऊ पाटसकर (पूर्व खानदेश), गोविंदराव देशपांडे (नाशिक), हरिभाऊ तुळपुळे (पुणे), कुलाब्यातून द. का. कुंटे, बाळ गंगाधर खेर (मुंबई), ग. वा. ऊर्फ दादासाहेब मावळणकर (अहमदाबाद), केशव गोखले (बेळगाव), नारायण जोशी (बेळगाव), व्ही. एन. जोग (धारवाड) इ. ब्राह्मण उमेदवार काँग्रेसतर्फे निवडून आले होते. मजुरांचे प्रतिनिधी म्हणून रामभाऊ खेडगीकर आणि सरदार व इनामदारांसाठी राखीव जागेवर सरदार विंचूरकर विजयी झाले. असे पंधरा मराठी ब्राह्मण विधानसभेत निवडून आले होते. त्यांच्यातच मुंबईच्या अन्नपूर्णा देशमुख व पुण्याच्या लक्ष्मीबाई ठुसेंचा समावेश होता.

फेब्रुवारी १९३७ मध्ये झालेल्या निवडणुकीत मुंबई व मध्यप्रांत-वऱ्हाडात वरीलप्रमाणे निकाल लागून या प्रांताप्रमाणे बिहार, संयुक्त प्रांत, मद्रास आणि ओरिसातही पहिली लोकनियुक्त काँग्रेस मंत्रिमंडळे अधिकारावर येणार हे स्पष्ट झाले. नवीन राज्यघटना १ एप्रिलपासून अमलात यावयाची होती. तथापि तिच्यात गव्हर्नरांना काही स्वेच्छाधीन विशेषाधिकार देऊन लोकप्रतिनिधींच्या अधिकारांचा

संकोच केलेला होता. म्हणून गव्हर्नरच्या 'स्वेच्छाधीन विशेषाधिकारांचा उपयोग न करण्याची हमी ' व्हाइसरॉयने दिल्याशिवाय सत्ता संपादन करावयाची नाही, असा निर्णय काँग्रेसने जाहीर केला. निवडणूक जाहीरनाम्यातही काँग्रेसने आपले संपूर्ण स्वातंत्र्याचे धोरण स्पष्ट मांडलेले होते. १९३५ चे नवीन संविधान बनविण्याशी काँग्रेसचा संबंध नव्हता. ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या यंत्रणेशी असहकार करण्याचे मूळ धोरण अमलात होतेच. म्हणून राजकीय माहोलानुसार या नवीन संविधानाला विरोध करून काँग्रेसने घटना परिषदेची मागणी केली.

काँग्रेसच्या आमदारांनी दिवाणगिरीसारखे मंत्रिपद न स्वीकारता, कायदेमंडळात विरोधी पक्षाच्या बाकांवर बसून सरकारची अडवणूक करावी, असे काँग्रेसमधील जहाल गटाला वाटत होते. त्या गटात नेहरू व सर्व समाजवादी घटक असून त्यांना गांधीजींचाही पाठिंबा होताच. या भूमिकेला विरोध करणारे पहिले गृहस्थ तेज बहादूर सप्रू होते. मात्र मुंबईचे दोन महान कायदेतज्ज्ञ व माजी महाअभिवक्ता तारपोरवाला आणि डॉ. डी. एन. बहादूरजी यांनी नेहरू-गांधींच्या भूमिकेला उत्स्फूर्त पाठिंबा दिला. खुद्द ब्रिटनमधील राज्यघटना तज्ज्ञ बेरीडेल कीथ यांनीही नेहरू-गांधींच्या भूमिकेचे जाहीर समर्थन केले होते. या विषयावरील विचारमंथन तीन महिने भारतभर चालू राहिले. इंग्लंडमध्ये नेहरूंवर टीका झाली. लॉर्ड झेटलंड आणि आर. ए. बटलर यांनी गैरलागू टीका करून काँग्रेसवर तोंडसुख घेतले.[३]

काँग्रेस आपल्या निर्णयावर ठाम राहिल्यामुळे गव्हर्नरने कायदेमंडळाचे अधिवेशन न बोलवता बिगरकाँग्रेस मंत्रिमंडळ नियुक्त करण्याचा मार्ग पत्करला. एक तर मंत्रिमंडळ अधिकारावर असणे आवश्यक होते, तर दुसऱ्या बाजूला मताधिक्य नसलेल्या मंत्रिमंडळाविरुद्ध अविश्वासाचा ठराव आला असता. अशा परिस्थितीत मुंबईत राजनिष्ठ नेते धनजीशहा कूपर, जमनादास मेहता, सिद्दप्पा कंबळी यांचे अंतरिम मंत्रिमंडळ निर्माण करण्यात आले. त्याचप्रमाणे मध्यप्रांत-वऱ्हाडातही राजनिष्ठ राघवेंद्रराव, बाबासाहेब खापर्डे, रिझवी वगैरेंचे अंतरिम मंत्रिमंडळ नेमण्यात आले. मात्र तरीही घटनात्मक कोंडी (डेडलॉक) टळली नाही.

अखेर तीन महिन्यांच्या वाटाघाटीनंतर 'गव्हर्नर स्वेच्छाधीन विशेषाधिकार वापरणार नाही आणि मंत्रिमंडळास घटनेच्या चौकटीत कारभार करण्यास मुभा देईल' असे व्हाइसरॉयने गांधीजींना ठोस आश्वासन दिले. त्यामुळे लोकनियुक्त मंत्रिमंडळांच्या अधिकारग्रहणाचा मार्ग खुला झाला. तेव्हा उप मंत्रिपदाची तरतूद नव्हती. म्हणून काही राज्यांमध्ये पार्लमेंटरी सेक्रेटरी हे पद होते. काँग्रेसने मुंबई राज्यात सात मंत्री आणि सहा पार्लमेंटरी सेक्रेटरी नेमण्यासाठी नावे दिली. मध्यप्रांत-वऱ्हाड मंत्रिमंडळासाठी काँग्रेसने सात मंत्र्यांची नावे सुचविली होती.

मंत्री व सरकारने काटकसरीनेच कारभार चालवावा आणि जनकल्याणावरच अधिक खर्च करावा, असा गांधीजींनी आदेश दिला. ब्रिटिशांनी भारतावर जगातील सर्वाधिक खर्चिक व उधळपट्टी करणारे सरकार लादले होते. १९२२ व १९३० मध्ये त्यांनी व्हाइसरॉयवर घणाघाती टीका केली होती. **१९३७ मध्येही गांधीजींनी आपल्या विचारप्रणालीनुसार विविध बाबींवरील खर्चाच्या मर्यादा घालून दिल्या. कोणाही काँग्रेस मंत्र्याने ५०० रुपयांपेक्षा जास्त पगार व भत्ते घेऊ नयेत हे बंधन त्यांनी घालून दिले.** १९३५ च्या कायद्यात मुख्यमंत्री हे पद नसून मुख्यास 'प्राईम मिनिस्टर' ही संज्ञा होती. मात्र गांधीजींनी विहित केलेली काटकसरीची योजना ही तारेवरची कसरत होती.

## नरिमन प्रकरण

प्रादेशिक स्वायत्ततेनुसार मुंबई राज्याचे पहिले मंत्रिमंडळ अधिकारारूढ होण्याची प्रक्रिया सुरू झाली तेव्हा नरिमन प्रकरण उद्‌भवले. त्यामुळे भयंकर कडवटपणा निर्माण झाला. के. एफ. नरिमन बऱ्याच वर्षांपासून मुंबई प्रांतिक काँग्रेस समितीचे अध्यक्ष आणि लोकप्रिय काँग्रेस नेते होते. मागील दोन दशकांमधील प्रत्येक आंदोलनात त्यांचा पुढाकार होता. सविनय कायदेभंग आंदोलनातील त्यांच्या आक्रमक भूमिकेमुळे गोरे अधिकारीसुद्धा त्यांना घाबरत असत. गांधीजी व नेहरूंशीही त्यांचे निकटचे संबंध होते. नरिमन यांनी बॅकबे प्रकरणात इंग्रज अधिकाऱ्यांना कमालीचे नामोहरम केले होते. त्यांच्या भीतीने काही वरिष्ठ इंग्रज अधिकारी ब्रिटनमध्ये पळून गेले होते. मात्र काँग्रेस पक्षनेता

निवडण्याच्या प्रसंगी त्यांनी नेतेपदासाठी दावा मांडल्यावर त्यांच्यावरील आरोप मांडण्यात आले. वस्तुतः मुंबईचे हिरो असलेल्या वीर नरिमन यांनी पूर्वोक्त बॅकबे स्कँडलमध्ये इंग्रज अधिकाऱ्यांच्या प्रचंड लाचलुचपतीचे व घोटाळ्यांचे प्रकरण (हार्वे-नरिमन केस) लढवून इंग्रजांना चपराक दिली होती. कर्तबगारीच्या जोरावर तसेच मुंबई प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष असल्यामुळे आपण पक्षनेतापदाचे नैसर्गिक हक्कदार आहोत, अशी नरिमनची धारणा होती. तथापि पक्षनेता निवडण्याची प्रक्रिया सुरू झाल्यावर त्यांच्या पक्षनिष्ठेबाबत संशय व्यक्त करण्यात आले. वल्लभभाई पटेलांकडे आलेल्या तक्रारींनुसार त्यांनाही खात्री वाटत नव्हती की, नरिमन काँग्रेसची विचारप्रणाली व पक्षशिस्तीचे कितपत अनुपालन करतील.

१९३४ च्या मध्यवर्ती कायदेमंडळाच्या निवडणूक प्रसंगी नरिमन यांनी केलेल्या गफलतीमध्ये त्यांच्या भोवतीच्या संशयकल्लोळाचे मूळ होते. १९३४ च्या निवडणुकीसाठी काँग्रेसने मुंबई शहरातून नरिमन आणि डॉ. गोपाळराव देशमुखांना उमेदवारी दिली होती. परंतु निवडणुकीचा खर्च आपणास झेपणार नाही, असे कारण सांगून नरिमनने निवडणूक लढविण्यास नकार दिला होता. मात्र पैशाबाबतचे आश्वासन मिळाल्यावर ते निवडणूक लढवण्यास तयार झाले. तथापि मतदारांच्या यादीतील त्यांचा घराचा पत्ता आणि नरिमनने नामांकन पत्रात नमूद केलेला घराचा पत्ता एक नसून वेगळा होता. ही बाब आधीच त्यांच्या निदर्शनात आणून दिलेली होती. तरीही त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. स्वाभाविकपणे निवडणूक अधिकाऱ्याने त्यांचे नामांकनपत्र अपात्र ठरविले.

त्यामुळे काँग्रेसला गोपाळराव देशमुखांच्या जोडीने के. एम. मुन्शी हे उमेदवार द्यावे लागले होते. त्यांच्याविरुद्ध धनवान पारशी उद्योगपती सर कावसजी जहांगिर हे स्वतंत्र उमेदवार होते. नरिमन यांनी देशमुखांचा प्रचार केला, पण मुन्शी यांचा केला नाही. १९३४ च्या त्या अटीतटीच्या निवडणुकीत गोपाळराव देशमुख यशस्वी झाले, आणि मुन्शी पराभूत झाले. या प्रकरणी नरिमन यांच्यावर पुढील आरोप होतेः— पारशी असलेल्या कावसजींचा विजय व्हावा यासाठी नरिमन

आधी निवडणूक लढवण्यास तयार नव्हते; निवडणूक नामांकन पत्रात त्यांनी हेतूपूर्वक त्रुटी ठेवली; नरिमनने पक्षाचे उमेदवार मुन्शी यांचा प्रचार न करता विरोधी उमेदवार कावसजी जहांगिर यांचा गुप्तपणे प्रचार केला.

१९३४ मधील नरिमनच्या अशा वागणुकीमुळे गंगाधरराव देशपांडे, शंकरराव देव, गाडगीळ व अच्युतराव पटवर्धन हे महाराष्ट्र प्रांतिकचे नेतेच नव्हे तर गांधीजी व सरदार पटेलही नाराज झालेत. म्हणून १९३७ सालात मुख्यमंत्री पदाच्या निवडणुकीत अन्य पर्यायांचा विचार सुरू झाला. पटेलांच्या सूचनेनुसार १२ मार्च १९३७ रोजी देव, पटवर्धन व गंगाधरराव काँग्रेस आमदारांना भेटून त्यांचे मत अजमावू लागले. महाराष्ट्र व कर्नाटकातील बहुतेक सर्व आमदार सॉलिसिटर बाळ गंगाधर खेरांच्या निवडीस अनुकूल होते. तसेच मुंबई व गुजरातच्या काही आमदारांचाही खेरांना पाठिंबा दिसला. १२ मार्च रोजी असे चित्र दिसल्यावर 'आपल्याविरुद्ध प्रचार केल्यामुळे बहुमत आपल्याविरुद्ध गेले आहे आणि त्यामुळे आपण बैठकीस हजर राहणार नाही', असे नरिमन यांनी सरदार पटेलांना सांगितले. नरिमन प्रक्षुब्ध झाले.

मंगलदास पक्वासा यांच्या अध्यक्षतेखाली १२ मार्चच्या सायंकाळी आमदारांची बैठक भरली. या बैठकीत दिसून आले की, गंगाधरराव, शंकरराव, अच्युतराव या ब्राह्मणांनाच नव्हे तर पटेल व गांधीजी आणि महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर आमदारांनाही खेर हे ब्राह्मण पुढारी मुंबई इलाख्याचे पंतप्रधान म्हणून मान्य होते. त्यानुसार खेर पक्षाचे नेते झाले. यानंतर नरिमन यांनी सरदार पटेल, गंगाधरराव, देव वगैरेंविरुद्ध आरोप केले आणि काँग्रेस अध्यक्ष नेहरू यांच्याकडे दाद मागितली. जखमी मनःस्थितीत त्यांनी काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीतही आरोप केले. म्हणून कार्यकारिणीने संपूर्ण नरिमन प्रकरणाची चौकशी करण्याचे काम गांधीजींकडे सोपविले. मात्र एकट्यानेच लवाद मंडळाचे कार्य करणे गांधीजींना अनुचित वाटले. म्हणून त्यांच्या जोडीला मुंबईतील विख्यात कायदेतज्ञ व माजी ॲडव्होकेट जनरल डी. एन. बहादूरजी या वयस्कर पारशी गृहस्थांना देण्यात आले. गांधीजी व बहादूरजी या दोघांनी स्वतंत्ररीत्या नरिमनना दोषी ठरवले. १९३४ तसेच १९३७ मधील निवडणुकांच्या वेळी त्यांनी कर्तव्यपालन केले नाही

हे सिद्ध झाले. शिवाय आपल्या हातून कसोशीने कर्तव्यपूर्ती झाली नाही हे स्वतः नरिमन यांनीही नंतर जाहीरपणे कबूल केले. तथापि त्यानंतरही त्यांनी चिखलफेक करून हसे करून घेतले.

मामासाहेब देवगिरीकरांच्या मते नरिमनवर एकूण २२ आरोप होते. कावसजी जहांगिर यांना निवडून येणे सोपे जावे यासाठी नरिमन पक्षहिताविरुद्ध वागले हे उघड होते. शिवाय काँग्रेस उमेदवार पी. बाळू यांच्या निवडणुकीसाठी जमविलेला पक्षाचा निधी नरिमन यांनी दुसरीकडे वळवला होता. विख्यात क्रिकेटर पी. बाळू हे दलित होते.[४]

नरिमन यांनी सरदार पटेल, देव व इतरांवर केलेल्या प्रत्यारोपांची काँग्रेसला दखल घेण्याचे आणखी एक कारण होते. नरिमन प्रकरणाबाबत मुंबईत तेव्हा मोठे वादंग माजले होते. प्रमुख नागरिकांनी गांधीजींना निःपक्षपाती चौकशी करण्यासाठी विनंती केली होती. त्या अर्जावर २०,००० जणांच्या सह्या होत्या. वर्तमानपत्रांनी धुरळा उडवून दिला. म्हणूनच गांधीजी व बहादूरजींनी प्रत्येक दस्तऐवज व साक्षीदारांची चौकशी करूनच १४ टंकलिखित पानांमधून निकालपत्र तयार केले. हे निकालपत्र त्यांनी नरिमनला समक्ष दाखविले होते. त्यानंतर नरिमन यांनी निकालपत्राशी सहमती व्यक्त केली. मात्र त्यांनी इतःपर काँग्रेसचे कोणतेही पद न स्वीकारण्याचा निर्णय घोषित करणारे आपले पत्रक **मुंबई समाचार** पत्रकात छापून आणले. वस्तुतः हे प्रकरण इथेच थांबायला हवे होते.

तथापि प्रकरण तिथे थांबले नाही. काही अनुयायांनी त्यांना चिथावणी दिल्याप्रमाणे नरिमन यांनी स्वतःचे जाहीर पत्रक मागे घेतले आणि वाद वाढवला. म्हणून काँग्रेस कार्यकारिणीने वर्धा येथे बैठक घेऊन गांधी-बहादूरजींचा अहवाल स्वीकारला आणि ठराव पास केला की, काँग्रेसमध्ये कोणतेही विश्वासाचे व जबाबदारीचे पद देण्यासाठी नरिमन यांना पात्र समजण्यात येऊ नये. तेव्हापासून नरिमन यांचे मुंबई इलाख्याच्या सार्वजनिक जीवनातील महत्त्व कमी झाले. इतके मात्र खरे की, त्यापूर्वी त्यांनी दिलेल्या मोठ्या योगदानाचे स्मरण कायम ठेवण्यासाठी रेक्लमेशनच्या एका भागास नंतर नरिमन पॉईंट आणि पूर्वीच्या चर्चगेट स्ट्रीटला वीर नरिमन मार्ग असे नाव देण्यात आले.[५]

पक्षनेता म्हणून निवड झाल्यावरही (१२ मार्च) काँग्रेसच्या धोरणानुसार बा. गं. खेर यांनी मंत्रिमंडळ बनविले नव्हते. तेव्हा अधिकारावर असलेल्या धनजी-शहा कूपर, जमनादास मेहता व कंबळींच्या ब्रिटिशधार्जिण्या अंतरिम मंत्रिमंडळाने लाचलुचपतीच्या मार्गाने काँग्रेसचे आमदार फोडण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. कुलाबा जिल्ह्यातील राखीव मतदारसंघातून निवडून आलेले काँग्रेसचे कमळाजी राघो तळकर यांना १५०० रुपये देऊन कूपर पक्षाने त्यांना ओढण्याचा प्रयत्न केला. पण तो त्यांनी जाहीरपणे झिडकारला होता. असे अनेक प्रयत्न विफल झाले. कूपर मंडळीने एकच काम केले, ते म्हणजे व्हाइसरॉय लिनलिथगोंच्या सांगण्यावरून वि. दा. सावरकरांवरील बंधने दूर करून त्यांना मुक्त केले (१९३७).

मुंबई कायदेमंडळाच्या दोन्ही सभागृहांतील एकूण २०१ सदस्यांमध्ये काँग्रेसचे १०६ सभासद होते. बाळासाहेब खेरांनी सर्वांच्या सह्यांनिशी कूपर मंत्रिमंडळाविरुद्ध अविश्वासाचा ठराव गव्हर्नरकडे पाठवला आणि ते मंत्रिमंडळ गडगडले.

## आचारसंहिता

सांविधानिक कर्तव्य व जबाबदारी पार पाडीत असताना गव्हर्नरने हस्तक्षेप केल्यास लोकनियुक्त मंत्रिमंडळास लोकाभिमुख कार्य करणे अशक्य होण्याचा धोका दिसतच होता. रॅम्से मॅकडोनाल्ड आणि चर्चिल व व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांच्या काही वक्तव्यांमधून भयसूचक आशय व्यक्त होत होता. म्हणून कोणत्या परिस्थितीत खास विशेषाधिकारांचा वापर केला जाईल याविषयी काँग्रेसला व्हाइसरॉयकडून ठोस आश्वासन हवे होते. बंगाल, पंजाब, सिंध येथील काँग्रेसेतर सरकारांपेक्षा काँग्रेसने चांगला सावध पवित्रा घेतला. गव्हर्नरने विशेषाधिकारांच्या संरक्षणाखाली काँग्रेस मंत्र्यांच्या रास्त कारभारात हस्तक्षेप करू नये आणि मंत्रिमंडळाचा सल्ला नाकारू नये असा आशय असलेला ठराव काँग्रेस कार्यकारिणीने १८ मार्च १९३७ रोजी संमत केला. हा निर्णायक मुद्दा मुस्लीम लीग, हिंदुमहासभा वगैरे पक्षांनी दुर्लक्षित केलेला होता. व्हाइसरॉयशी बऱ्याच वाटाघाटींनंतर गांधीजींना यश लाभले होते. व्हाइसरॉय लिनलिथगो यांनी २२ जून

१९३७ रोजी तसे विस्तृत निवेदन प्रसिद्ध केले. त्यानुसार त्याने आश्वासन दिले की, ' प्रांताच्या प्रशासनात गव्हर्नर मनमानी करून हस्तक्षेप करणार नाही ; काही ठरावीक बाबी वगळता तो मंत्रिमंडळाच्या निर्णयांच्या अंमलबजावणीत अडचणी निर्माण करणार नाही ; गव्हर्नर मंत्र्यांबरोबर तंटे उकरून काढणार नाही ; गंभीर वाद निर्माण झाल्यास गव्हर्नरने मंत्रिमंडळास बडतर्फ न करता मंत्रिमंडळाने राजीनामा द्यावा.'

या आश्वासनांवर विचार करून काँग्रेसने ७ जुलै १९३७ रोजी मताधिक्य असलेल्या सहा प्रांतांतील काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या नेत्यांना अधिकारग्रहण करण्याचे व मंत्रिमंडळ बनविण्याचे आदेश दिले. त्यानुसार बाळासाहेब खेर मुंबई इलाख्याचे आणि डॉ. ना. भा. खरे मध्यप्रांत-वऱ्हाडचे पंतप्रधान झाले. तेव्हापासून मुंबई व मध्यप्रांत-वऱ्हाडमध्ये काँग्रेसची पहिली मंत्रिमंडळे स्थापन होऊन १९३५ च्या कायद्यानुसार प्रांतिक स्वायत्तता अवतरली.

महात्मा गांधींनी १७ जुलै १९३७ च्या **हरिजन** पत्रकात अग्रलेख लिहून काँग्रेसच्या मंत्र्यांसाठी आदर्श आचारसंहिता विहित केली होती. कोणाही मंत्र्याने रेल्वेच्या पहिल्या वर्गाने प्रवास करू नये ; खादीचा भारतीय पोषाखच परिधान करावा ; ५०० रुपयांपेक्षा जास्त पगार घेऊ नये ; साधेपणाने राहावे व इंग्रजांचे अनुकरण करू नये ; मद्यपान वर्ज्य करावे असे नियम घालून दिले. प्रशासनासाठी मार्गदर्शक तत्त्वे विहित करताना गांधीजींनी लिहिले की, सरकारने दारूबंदीचे धोरण ताबडतोब अमलात आणावे ; मीठ करमुक्त करावे ; कारागृहांचे रूपांतर सुधारगृहांमध्ये व उद्योगशाळांमध्ये करावे. नागरी विभागांपेक्षा ग्रामीण विभागांकडे अधिक लक्ष द्यावे असा गांधीजींचा आग्रह होता. गव्हर्नरांसाठी आयोजित केलेले निरोप समारंभ अथवा स्वागत समारंभांमध्ये मंत्र्यांनी सहभागी होऊ नये, तसेच कॅबेरा व नाचगाण्यांच्या कार्यक्रमांमध्येही त्यांनी हजर राहू नये असाही दंडक घालून दिला. मुख्यमंत्र्याच्या अनुमतिशिवाय मंत्र्याने गव्हर्नरला भेटू नये असाही सल्ला दिला. प्रशासनावरील खर्चात काटकसर करून तो पैसा लोककल्याणासाठी वापरावा यावर भर दिलेला होता. शिवाय मंत्रिमंडळ शक्य तितके लहान असावे असा दंडक गांधीजी व पटेलांनीही घालून दिला होता. या धोरणामुळे इच्छुक असलेल्या अनेक जणांना पदांचा लाभ झाला नाही.

अशा अनेक असंतुष्ट कार्यकर्त्यांनी गांधीजींना पत्रे पाठवली अथवा धोरणाचा निषेध केला. अशा लोकांना त्यांनी सुनावताना म्हटले, मंत्रिपद म्हणजे काँग्रेसचे काम करण्याचे पारितोषिक नसून ती लोकसेवेची संधी होय. मंत्रिपद लाभल्यावर ते घट्टपणे पकडून ठेवण्याचा प्रयत्न करू नये, असे सांगायलाही गांधीजी विसरले नाहीत.

मंत्रिमंडळाचा आकार मर्यादित ठेवण्यावर आणि प्रशासनावरील खर्च कमी करण्यावर काँग्रेस श्रेठींचा खूप भर होता. यामुळे अनेक लोकप्रतिनिधी नाराज होते. पगारावरील ५०० रुपयांची मर्यादा गांधीजींना फारच लिबरल वाटत होती. म्हणूनच तेव्हाच्या मंत्र्यांनी ती स्वीकारली होती. पण काटकसरीच्या धोरणांमुळे सनदी नोकरशाही काँग्रेसविरुद्ध गव्हर्नर व व्हाइसरायकडे तक्रारी करत असे. पूर्वी आय.सी.एस. संवर्गातील अधिकारी स्वेच्छाचारी व अरेरावीपणाने वागत असत. **मात्र या संवर्गातील पोलादी चौकटीला १९३६ पासून कळून चुकले होते की, आपले सुवर्ण युग अस्त पावण्याचे दिवस लवकरच येणार आहेत.** म्हणून काही इंग्रज आय. सी. एस. अधिकारी संधी मिळेल त्याप्रमाणे मायदेशी परत जाऊ लागले. काही जण इंग्लंडमधील खाजगी क्षेत्रात गेले. १९३५-३६ पासून आय. सी. एस. मध्ये फार थोडे नवीन इंग्रज येऊ लागले. त्यामुळे या संवर्गात भारतीयांचे प्रमाण वाढू लागले. हा प्रभाव काँग्रेसच्या आंदोलनाचा होता. जवाहरलाल नेहरू तर आय. सी. एस. अधिकाऱ्यांशी नेहमीच फटकून वागत. प्रशासनावरील खर्चात झालेली बचत शिक्षण, आरोग्य व कल्याणकारी योजनांसाठी वापरण्याचे धोरण आखण्यात आले. गांधीजींच्या आदेशानुसार मोरारजी देसाई वगैरे अनेक मंत्री रेल्वेच्या थर्ड क्लासमधून प्रवास करू लागले.[६]

## मुंबईचे काँग्रेस मंत्रिमंडळ

बाळ गंगाधर खेरांचे पहिले लोकनियुक्त मंत्रिमंडळ १९ जुलै १९३७ रोजी अधिकारारूढ झाले. त्यांचे सहकारी व त्यांची खाती पुढीलप्रमाणे होती :— (१) के. एम. मुन्शी—गृह व विधी, (२) अण्णासाहेब लट्ठे—वित्त विभाग, (३) डॉ. एम. डी. डी. गिल्डर—सार्वजनिक आरोग्य व उत्पादन शुल्क, (४)

मोरारजीभाई देसाई—महसूल, (५) एल. एम. पाटील—स्थानिक स्वराज्य संस्था, व (६) एम. वाय. नूरी—सार्वजनिक बांधकाम. तेव्हा उप मंत्री हे पद नसून त्याऐवजी सहा पार्लमेंटरी सेक्रेटरी होते—गुलझारीलाल नंदा, हंसा मेहता, बी. एम. गुप्ते, एम. पी. पाटील, टी. आर. नेस्वी आणि बी. एस. हिरे. त्यांच्यावरील जबाबदाऱ्या मुख्यमंत्र्यांनी विहित केल्या होत्या. या मंत्रिमंडळाचे मुख्यालय ओव्हल मैदानासमोरील दगडी इमारतीच्या सेक्रेटेरिअटमध्ये होते. तेथे आता दिवाणी न्यायालय आहे.

या पहिल्या लोकनियुक्त मंत्रिमंडळाने अधिकारग्रहण केल्यावर पहिल्याच महिन्यात सादर केलेल्या पहिल्या अंदाजपत्रकावर (७ ऑगस्ट) वर्तमानपत्रे आणि जाणकारांनी स्तुतिसुमने उधळली होती. मंत्री, विधानसभा अध्यक्ष, विधानपरिषदेचे सभापती आणि इतर राजकीय पदधारकांचे पगार खूपच कमी करून खर्चाची बचत दाखविली होती. काँग्रेसने निवडणूक जाहीरनाम्यात आश्वासन दिल्याप्रमाणे राज्यात लवकरच दारूबंदी प्रत्यक्षात आणण्याची घोषणा केली. शेतकऱ्यांना अनुतोष देण्यासाठी वनचराईवरील शुल्क रद्द केले व जमीन महसुलात भरघोस सूट दिल्याचे अंदाजपत्रकात घोषित केले. तसेच खेड्यांमधील पाणीपुरवठ्यासाठी दहा लाखांची तरतूद केली. आधीच्या सरकारने या बाबीसाठी केवळ एक लाख रुपयांची तरतूद केलेली होती. दलितांच्या कल्याणासाठी असलेली तरतूदही खेरांच्या सरकारने वाढविली. तसेच कुटीरोद्योगांचा विकास आणि ग्रामपंचायतींचे सक्षमीकरणावर बराच भर दिला. आपल्या पगारात मंत्र्यांनी कपात केल्यामुळे त्यावर्षी १,३१,००० रुपयांची बचत झाली होती. विकास, सामाजिक न्याय व लोककल्याणावर खेरांच्या मंत्रिमंडळाने खास भर दिल्यामुळे अर्थसंकल्पात १७ लाखांहून जास्त तूट दाखवण्यात आली होती. या तुटीच्या अर्थसंकल्पावर माजी मंत्री जमनादास मेहता यांनी टीका केली. मात्र यामागे केवळ द्वेषाचे राजकारण होते. या मंत्रिमंडळात अनुसूचित जातींचा एकही प्रतिनिधी नसल्याची टीका आर. आर. भोळे यांनी केली होती.

प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करणे नवीन सरकारला शक्य झाले नाही, हे खरे. मात्र शिक्षणप्रसारास शक्य तेवढा आद्यक्रम देण्यात आला. नवीन शिक्षण सुविधा निर्माण करून प्रचलित पद्धतीध्ये परिवर्तन करण्यात आले. अनेक योजना सुरू करण्यात आल्या. ग्रामीण अर्थव्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी उपाययोजना केली. सरकारने रयतेवरील करांचे ओझे कमी करण्याचाही प्रयत्न केला.

मुंबईच्या काँग्रेस सरकारने १९३५ च्या हिंदुस्तान सरकार कायद्याचा निषेध करणारा सरकारी निर्णय पास करून उपरोक्त संघराज्यविषयक योजनेचा धिक्कार केला. सविनय कायदेभंग आंदोलनात सक्रिय भाग घेतलेल्या शेकडो स्वातंत्र्यसैकिांच्या जमिनी इंग्रजांनी जप्त करून त्या इतर लोकांना विकून टाकल्या होत्या. त्या जमिनी काँग्रेस सरकारने नवीन मालकांकडून खरेदी केल्या. त्यासाठी अधिनियम केले. आणि बहुतेक जमिनी मूळ मालकांना परत दिल्या. स्वातंत्र्यासाठी जे लढले त्यांना हा अनुतोष (रिलिफ) दिला होता. सरकारने मानद किताब बहाल करणे बंद केले. याबाबत लक्षात ठेवावे की, पूर्वी सक्तीने सैनिकांची भरती करण्यात किंवा ब्रिटिश सरकारला भारतीयांविरुद्ध तऱ्हेतऱ्हेची मदत करणाऱ्यांना इंग्रजांनी रावबहादूर, दिवाणबहादूर, रावसाहेब, खानबहादूर वगैरे किताब दिलेले होते. असे किताबधारक इंग्रजांचे बगलबच्चे व समर्थक म्हणून वावरत असत. या वर्गाचा संकोच करणे हे काँग्रेसचे एक ध्येय होय.

नवीन सरकारच्या कार्यकारी शासनांगाने विशेष कार्य करून दाखविले. व्यक्ति-स्वातंत्र्य आणि राजकीय संघटनांची पायमल्ली करणारा १९३२ चा बाँबे स्पेशल (ईमर्जंसी) पॉवर्स ॲक्ट तसेच १९०८ चा इंडियन क्रिमिनल लॉ अमेन्डमेंट ॲक्ट आणि असे गळचेपी करणारे अनेक कायदे खेर सरकारने निष्कांचित केले. अशाप्रकारचे अन्यायकारक अधिनियम खेरांनी पहिल्या तीन महिन्यांतच रद्द केले. इंग्रज सरकारने जप्त केलेल्या कित्येक हजार मालमत्ता मूळमालक असलेल्या स्वातंत्र्यसैनिकांना परत मिळवून दिल्या. अनेक देशभक्त पेन्शनधारकांचे पेन्शन इंग्रजांनी गोठवले होते, ते त्यांना पूर्ववत चालू केले. आंदोलनात सहभागी झालेल्या सरकारी कर्मचाऱ्यांना इंग्रजांनी निलंबित किंवा डिसमिस केले होते. त्यांची प्रकरणे नवीन सरकारने गव्हर्नरकडे नेऊन त्यांना न्याय मिळवून देणे हाती घेतले.[७]

काँग्रेसच्या निवडणूक जाहीरनाम्यातील आश्वासने व कार्यक्रमानुसार कार्यवाही करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले. ब्रिटिश सरकारने बंदी घातलेली राष्ट्रवादी वर्तमानपत्रके व पुस्तके नवीन सरकारने बंधमुक्त केली.

प्रशासनात कार्यक्षमता वाढविण्यासाठी स्थानिक अधिकाऱ्यांनी जनसंपर्क वाढवावा, आणि अर्जांवर विनाविलंब कार्यवाही करावी, असे सरकारने आदेश दिले. तसेच नागरिकांनीही सरकारी कर्मचाऱ्यांशी सहकार्य करावे आणि अकारण संघर्ष करू नये, असे आवाहन करण्यात आले. सहकार्य आणि सौहार्द राखून सरकार चालवावे असे काँग्रेसचे धोरण होते.

**क्रांतिकारक व राजबंद्यांची मुक्ती** :—काँग्रेसने सत्ताग्रहण करण्याच्या पूर्वसंध्येला भारतातील हजारो राजबंदी व अनेक जातिवंत क्रांतिकारक जर्मनी, जपान वगैरे देशांमध्ये तसेच हिंदुस्तानातील कारागृहांमध्ये खितपत पडलेले होते. ब्रिटिशांची क्षमायाचना न करणारे कित्येक स्वातंत्र्यसेनानी अंदमान, मंडाले, एडनमधील कारागृहांमध्ये हालअपेष्टा भोगत होते. अगणित युवकांवर खटले न भरताच त्यांना डांबून ठेवलेले होते. म्हणून अशा राजबंद्यांची मुक्तता करण्याचे आश्वासन काँग्रेसने १९३७ च्या निवडणूक जाहीरनाम्यात दिलेले होते. अंदमानात डांबलेल्या अनेक बंदिवानांनी गांधीजी व काँग्रेस अध्यक्ष नेहरू यांना तारा अथवा पत्रे पाठविली होती. नागपूर-वर्ध्याचे पांडुरंग सदाशिव खानखोजे, सरोजिनी नायडूंचे बंधू वीरेंद्रनाथ चट्टोपाध्याय, डॉ. अबनी मुखर्जी, महेंद्र प्रताप, सरदार अजितसिंग, मौलवी अबेदुल्लाह, मौलवी अब्दुल्ला खान, काझी अब्दुल वली खान, डॉ. तारकनाथ दास, बसंतकुमार रॉय, पृथ्वीसिंग आझाद, लाला हरदयाल, राश बिहारी बोस, सरदार ऊधमसिंग वगैरे झुंजार गधर नेते व युंगातर पक्षाचे क्रांतिकारक परागंदा होऊन स्वाभिमानाने विदेशांमध्ये हालअपेष्टा भोगत होते. त्यांचे जीवन जितके कष्टमय व संघर्षाने ओतप्रत भरलेले होते तितका त्यांचा भविष्यकाळ अनिश्चित आणि व्यथा-वेदनांनी भरलेला दिसत होता. भारताच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी सर्वस्व गमावले होते. पण त्यांनी क्षमायाचना केली नव्हती.

त्यांची देशभक्ती व त्यागाचे मोल लक्षात घेऊन अ. भा. काँग्रेस समितीने त्यांच्या मुक्तीचा प्रश्न हाती घेतला. या व अशा शेकडो स्वातंत्र्य सेनानींना मायदेशात परत येऊन बंधमुक्त जीवन जगणे शक्य व्हावे यासाठी त्यांच्या प्रकरणांचे पुनर्विलोकन करावे व त्यांना सर्वक्षमा मंजूर करावी असा काँग्रेसने केंद्र सरकारकडे आग्रह धरला. तसेच विदेशात असलेल्या गधर आणि युगांतर पक्षीयांना व इतर भारतीयांना सरकारने आश्वासन द्यावे की, मायदेशी परत आल्यावर त्यांच्या पूर्वीच्या राजकीय कृत्यांबद्दल त्यांच्यावर दडपशाहीचे उपाय लादले जाणार नाहीत. मात्र याविषयीच्या काँग्रेसच्या मागण्या मध्यवर्ती सरकारने मंजूर केल्या नाहीत.[८]

तथापि मुंबई सरकारच्या अधिकारक्षेत्रातील स्वातंत्र्य सेनानींच्या प्रकरणांचे खेर मंत्रिमंडळाने पुनर्विलोकन केले. मधला केवळ साडे-पाच महिन्यांचा काळ (२३ मे १९३१ ते ३० ऑक्टोबर १९३१) वगळता सेनापती बापट १९२४ सालापासून २३ जुलै १९३७ पर्यंत तुरुंगातच होते. म्हणजे जवळजवळ साडेबारा वर्षे त्यांनी कारावास भोगला होता. पूर्वोक्त मुळशी सत्याग्रह व हॉटसन-गोगटे या सत्याग्रह स्वरूपाच्या प्रकरणांमध्ये बापटांना शिक्षा झाल्या होत्या. स्थानापन्न गव्हर्नर हॉटसन यांच्यावर गोळ्या झाडणारे वासुदेवराव गोगटेदेखील तुरुंगात होते. तसेच सरदार भगतसिंग यांचे दोन सहकारी सदाशिवराव मलकापूरकर व भगवानदास माहौर पूर्वोक्त ‘भुसावळ बॉंबस्फोट’ प्रकरणात अडकून कारागृहात बंदीस्त होते. मुंबईतील धोबीतलावाजवळ २६ एप्रिल १९३४ रोजी स्वीटलंड नामक अधिकाऱ्यावर गोळ्या झाडणारे वामन चव्हाण स्थानबद्ध होते. जहाल युवा नेते युसुफ मेहेरअली हेही कारावासात होते. या सर्वांची सुटका करण्यासाठी खेर मंत्रिमंडळाने गव्हर्नरला शिफारस करताच त्यांना मुक्त करण्यात आले.

सेनापती बापट २३ जुलै १९३७ रोजी सुटताच त्याच दिवशी बेळगावमध्ये गंगाधरराव देशपांडेंनी त्यांच्यासाठी सत्कार सोहळा आयोजित केला. पण आपली मुदतपूर्व सुटका आवडली नाही असे बोलून बापटांनी क्रांतिकारकाचा बाणा बोलून दाखवला होता. नंतरच्या प्रत्येक जाहीर सभेत त्यांनी अत्यंत जळजळीत

भाषणांमध्ये क्रांतिकारी विचार व आचारधारा प्रकट केली. त्या आगीची धग सरकारी अधिकाऱ्यांना सहन होत नव्हती. त्यांच्या भाषणांची इतिवृत्ते वाचून बेचैन झालेले इंग्रज अधिकारी बापटांविरुद्ध कारवाई व्हावी, अशी मागणी करीत. भिंगारच्या सभेतील बापटांचे भाषण (२७ ऑगस्ट १९३७) फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १०८ अन्वये खटला भरण्याजोगे असल्याचे नगरच्या कलेक्टरने सरकारला सुचवले होते. तथापि तेरा वर्षांचा कारावास भोगलेल्या बापटांना पुन्हा लगेच शिक्षा देणे सरकारला अनुचित वाटले. या अवलिया क्रांतिकारकाने कलेक्टरला उत्तर पाठवले, “तुमच्या कायद्यानुसार जी कारवाई करणे तुम्हाला आवश्यक वाटेल ती जरूर करा”.[१]

**कामगार विषयक धोरण :—**गृहमंत्री के. एम. मुन्शी क्रांतिकारकांच्या तसेच कम्युनिस्ट कार्यकर्ते आणि कामगार पुढाऱ्यांच्याही बाबतीत उदासीन आहेत, असा समज होता. १९३७-१९३८ सालांतही भारतीय कम्युनिस्ट चळवळीचे सूत्रसंचालन मुंबई शहरातूनच होत असे. अजय कुमार घोष, फिलिप स्प्राट वगैरे कम्युनिस्ट इथे येत अथवा येथून चळवळीचे सूत्रसंचालन करीत. वीस-पंचवीस कम्युनिस्टांची तडीपारी अथवा शिक्षांचे आदेश ब्रिटिश सरकारने पूर्वीच काढलेले होते. मात्र कॉंग्रेस मंत्रिमंडळ अधिकारावर आल्यावर या प्रकरणी नाजूक परिस्थिती निर्माण झाली. कॉंग्रेसच्या जाहीर धोरणानुसार स्थानबद्ध अथवा तुरुंगात असलेल्या किंवा तडीपार झालेल्या सर्व कम्युनिस्टांना मुक्त करण्यास बाळासाहेब खेर अनुकूल होते.

तथापि याबाबत गृहमंत्री मुन्शी यांनी गव्हर्नरला सादर केलेला प्रस्ताव फेटाळताना गव्हर्नर लॉर्ड ब्रेबर्न यांनी लिहिले, “You can do it only on my dead body.” त्या वेळेपर्यंत केशवराव जोगळेकर, शं. वा. देशपांडे, पाटकर, गंगाधरराव अधिकारी, शांताराम सा. मिरजकर, सोली बाटलीवाला वगैरे कम्युनिस्टांवरील निर्बंध रद्दबातल करण्याची प्रकरणे प्रलंबित होती. वस्तुतः ब्रेबर्नच्या हेकेखोरपणामुळे कम्युनिस्टांवरील निर्बंध मागे घेतले गेले नव्हते. मात्र त्यास मुन्शी व खेर जबाबदार असल्याचा गैरसमज निर्माण झाला. जवाहरलाल नेहरूंनी कम्युनिस्टांवरील निर्बंध रद्द करण्याचा कॉंग्रेस कार्यकारिणीच्या

वर्धा येथील बैठकीत (१४-१७ ऑगस्ट १९३७) आग्रह धरला. यानंतर मुन्शी समक्ष भेटले तेव्हा नेहरूंनी त्यांना समज दिली हे खरे. तथापि प्रशासकीय प्रश्नांवरून ब्रिटिश सत्ताधीशांशी लढत देऊन कार्यभाग साधणे मुन्शी यांना शक्य नव्हते.

के. एम. मुन्शी यांची उद्योगपतींशी जवळीक होती हे मान्य. तथापि त्यांच्या टीकाकारांनी वस्तुस्थिती लक्षात ठेवावी की, जागतिक मंदीच्या भयानक दुष्परिणामंमधून उद्योगधंदे नुकतेच बाहेर पडून आर्थिक पुनरुज्जीवन सुरू झालेले होते. अशा स्थितीत मुंबईतील कम्युनिस्ट पुढारी उद्योगपतींशी चर्चा न करता अथवा संपाची पूर्वसूचना न देता, अगदी अचानक संप घडवून आणत. तसेच निष्ठावंत कामगारांनी कामावर जाऊ नये यासाठी गिरणगावात दहशत पसरवत असत. त्यामुळे मध्य मुंबईत तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. प्राप्त परिस्थितीत मुन्शींच्या सांगण्यावरून पोलीस कमिशनरने निष्ठावंत कामगारांना कामावर जाण्यासाठी पोलीस संरक्षणाची व्यवस्था केली होती. विशेष म्हणजे वजनदार कम्युनिस्ट नेते अजय कुमार घोष यांनी मुंबईत अचानक संप घडवून आणण्यासाठी कामगार भागांमध्ये भूमिगत दहशत निर्माण करणाऱ्या यंत्रणेचे नेतृत्व केले होते. मुन्शी यांनी आत्मकथेत नोंद केलेली आहे की, घोष यांनी वेळ ठरवून गुप्तपणे मध्यरात्री आपली समक्ष भेट घेतली. क्रांतिकारकांविरुद्ध पोलिसांचा अजिबात उपयोग करू नये अशी घोषबाबूंनी मुन्शींना विनंती केली. तथापि गृहमंत्री या नात्याने ही विनंती मुन्शींनी अमान्य केली होती.[१०] काही दिवसांनी पोलिसांनी मुंबईतील कामगार जगतावर आपली पकड घट्ट केली. त्यानंतर खेर मंत्रिमंडळाने गव्हर्नर ब्रेबर्नचे मन वळवून कम्युनिस्टांवरील निर्बंध रद्द केले.

कामगार वर्ग हा एक राजकीय घटक झालेला आहे या वस्तुस्थितीची दखल काँग्रेससह सर्वच राजकीय पक्षांना घ्यावी लागली. काँग्रेसचे मंत्रिमंडळ अस्तित्वात आल्याने गिरणी कामगारांच्या आशाआकांक्षा जागृत झाल्या होत्या. त्यांच्या अपेक्षा वाढल्या. म्हणूनच मंत्रिमंडळाने प्रथमच सरकारचे कामगार धोरण घोषित केले. त्यामुळे कामगारांना अपूर्व असा दिलासा मिळाला. जागतिक मंदीमुळे होरपळून निघालेल्या कामगारांना आशेचे किरण दिसू लागले. त्यांच्या मागण्या वाढल्या.

त्याकाळाचे समक्ष अवलोकन केलेले विचारवंत रॉयवादी आणि धडाडीचे कामगार पुढारी वसंतराव भ. कर्णिक यांनी प्रतिपादन केल्याप्रमाणे, कामगारांच्या कल्याणासाठी काँग्रेस मंत्रिमंडळाने सर्वतोपरी उपाय योजिले. त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी सर्व अधिकारांचा उपयोग केला. तत्कालीन आर्थिक समस्या व मध्यवर्ती सरकारचा विरोध यामुळे प्रांतिक सरकारच्या औदार्यावर बऱ्याच मर्यादा पडल्या होत्या. पण तरीही मुंबई सरकारचे कामगार मंत्री गुलझारीलाल नंदा यांनी इंग्रजांची पर्वा न करता बाँबे इंडस्ट्रिअल डिस्प्युट्स ॲक्ट १९३८ मध्ये पास करून अमलात आणला. या कायद्याने कामगार व मालकांमधील विवाद सोडविण्यासाठी समेट आणि लवाद यंत्रणेची तरतूद केली. या यंत्रणेचा निवाडा दोन्ही पक्षांना स्वीकारणे बंधनकारक ठरविण्यात आले. तसेच श्रमिकसंघांना कायदेशीर मान्यता देऊन त्यांच्या माध्यमातून विवाद मिटवण्याची तरतूद करण्यात आली. औद्योगिक संबंधांमध्ये सुधारणा व सौहार्द निर्माण करण्यासाठी असलेला हा कायदा भारतातील पहिला होता. यातूनच मुंबईत देशातील पहिले औद्योगिक संबंध न्यायालय जन्माला आले. या कायद्यात वेळोवेळी काही सुधारणा करण्यात आल्या, मात्र त्यातील मूलभूत तत्त्वे न बदलता!

१९४६ साली या कायद्याची जागा बाँबे इंडस्ट्रिअल रिलेशन्स कायद्याने घेतली. देशातील इतर राज्यांनी याच कायद्याचा आकृतिबंध स्वीकारला, आणि औद्योगिक विवादांचे निराकरण करण्यासाठी मॉडेल म्हणून अनुकरण केले. गुलझारीलाल नंदांचे हे कार्य मूलभूत स्वरूपाचे होते. नंतर नंदा भारताचे गृहमंत्री व काही काळ पंतप्रधानही झाले ते त्यांच्या महान कर्तृत्वामुळे !

मात्र तरीही मुंबईतील कम्युनिस्ट कामगार नेत्यांनी १९३८ च्या कायद्याविरुद्ध प्रचार करून एक दिवसाचा संप घडवून आणला होता. तथापि विवाद सोडविण्यासाठी समेट व लवादाची यंत्रणा नंदा यांनी निर्माण केल्यावर कामगारांनी या यंत्रणेचा उपयोग करून घेतला. परिणामतः कम्युनिस्टांचा विरोध निवळला.[११]

खेर मंत्रिमंडळाला अर्थव्यवस्थेला आलेली मरगळ दूर करण्याच्या प्रयत्नांमध्ये लक्षणीय यश लाभले होते. मुंबई बंदरातून झालेल्या आयात-निर्यातीच्या आकडेवारीवरून असे म्हणता येते. वंचित समाजाच्या कल्याणासाठी मंत्रिमंडळाने अनेक कायदे केले आणि अस्तित्वातील कायद्यांच्या कक्षा वाढविल्या. दहा किंवा अधिक कामगार असलेले सर्व कारखाने फॅक्टरी कायद्याच्या कक्षेत आणले. दुकाने व व्यापारी आस्थापनांमधील नोकरांच्या कामाचे तास नियंत्रित करण्यासाठी मुंबई गुमास्ता कायदा केला. कामगारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी सरकारने १ एप्रिल १९३९ रोजी प्रथमच कामगार कल्याण विभाग सुरू केला. मालमत्ता करामुळे घरभाडे वाढणार होते. त्यावर उपाय म्हणून १९३९ साली भाडे नियंत्रण कायदा करण्यात आला. याचा लाभ गरीब व मध्यम वर्ग व कामगार वर्गास अधिक झाला. मुंबई सरकारने शहर व संपूर्ण प्रांतात औषधी व आरोग्य सुविधा वाढविल्या.

मुंबई सरकारने महानगरपालिकेच्या घटनेत सुधारणा करून मतदानाच्या हक्काचा विस्तार केला. पूर्वी बरेच नगरसेवक सरकारने नियुक्त केलेले असत. साम्राज्यशाहीचा हा अवशेष काँग्रेसने १९३८-३९ सालात नष्ट केला हे विशेष. स्थानिक स्वराज्य संस्थेत प्रथमच लोकशाही अवतरली. मुंबई महानगरपालिकेने विकासाच्या अनेक योजना हाती घेतल्या. काही वर्षे बंद पडलेली बॅकबे योजना पुन्हा जोमाने कार्यान्वित केली. मुंबई हे भरभराटीचे महानगर असूनही इथे आधुनिक क्रिकेट स्टेडिअम नव्हते. काँग्रेस सरकारने १९३७ साली चर्चगेटजवळ प्रशस्त भूखंड देऊन ही उणीव भरून काढली. यालाच गव्हर्नरचे नाव देऊन ब्रेबर्न स्टेडिअम म्हटले गेले.

काँग्रेसच्या धोरणानुसार खेर मंत्रिमंडळाने शहरांपेक्षा ग्रामीण भागाच्या विकासावर अधिक भर दिला. ग्रामपंचायती, तालुका विकास मंडळे व जिल्हा लोकल बोर्ड यांची साखळी व्यवस्थित तयार करून त्यांना निधी व अधिकार देण्यात आले. आधारभूत संरचना उभारणे हे ध्येय समोर ठेवण्यात आले. शिक्षणाचा प्रसार, प्रौढ शिक्षण व साक्षरता प्रसाराकरिता योजना अमलात आणल्या. मोफत शिक्षण देण्याचा सरकारचा मानस होता. पण निधीच्या अभावामुळे ते शक्य झाले नाही.

ध्येय उत्तुंग होते, तथापि समस्या आकाशाएव्हढ्या होत्या. विविध प्रकारच्या समस्या व मर्यादा असताना काँग्रेस मंत्रिमंडळाने सनदी नोकरशाहीशी जुळवून घेतले आणि विधायक कार्यास वाहून घेतले. जनतेच्या पीडानिवारणास उचित अग्रक्रम दिला. किसानांचा पक्ष असा काँग्रेसचा दावा होता. तथापि जमीनदार या शोषक वर्गाविरुद्ध काँग्रेस सरकारने फारसे कठोर निर्णय घेतले नाही. फैजपूर काँग्रेसमध्ये सर्वसहमत झालेला कृषी अर्थव्यवस्थेचा कार्यक्रमही या सरकारने पूर्णपणे अमलात आणला नाही. शिवाय या काँग्रेस मंत्रिमंडळाने पास केलेला कूळकायदा गव्हर्नरने सही न करून अडवून ठेवला. म्हणून हा कायदा अमलात येण्यास १९४८ साल यावे लागले. जमीनदारांप्रमाणेच इंग्रजांचाही या कायद्यास विरोध होता. त्यामुळे स्वातंत्र्यपूर्व काळात कुळकायदा करण्याचे रास्त श्रेय काँग्रेस मंत्रिमंडळास लाभले नाही.

## मध्यप्रांत-वऱ्हाडचे मंत्रिमंडळ

या प्रांताच्या कायदेमंडळातील काँग्रेसचा पक्षनेता म्हणून डॉ. नारायण भास्कर खरेंची निवड झाली खरी. तथापि प्रारंभापासूनच सत्तासंघर्ष व गटबाजीमुळे त्यांचे आसन डळमळीत होते. या स्थितीचा प्रारंभ डॉ. खरेंनी पूनमचंद रांका यांच्याशी केलेली व नंतर मोडलेली तडजोड हिच्यापासून झाला. आपण आमदार झाल्यावर मध्यवर्ती कायदेमंडळातील आपली जागा तुम्हाला देऊ असे खरेंनी पूनमचंद यांना आश्वासन दिले होते. पण खरेंनी आश्वासनभंग केला. पूनमचंद रांकांना उमेदवारी मिळू नये अशा त्यांनी कारवाया केल्या. म्हणून रांका, मंचरशा आवारी, भिकूलाल चांडक नाराज झाले. खरेंनी कायदेमंडळात जास्तीतजास्त ब्राह्मण निवडून आणले असाही त्यांचा दुसरा आरोप होता. तरीही जुलै १९३७ मध्ये डॉ. खरे पंतप्रधान झाले व पं. रविशंकर शुक्ला, पं. द्वारकाप्रसाद मिश्रा, बॅ. रामराव देशमुख, बॅ. एम. वाय. शरीफ, दुर्गाशंकर मेहता आणि पुरुषोत्तम बळवंत गोळे यांना मंत्री करण्यात आले. तथापि अस्पृश्य जातींमधील सात काँग्रेस आमदार असूनही त्यांना मंत्रिमंडळात घेतले नव्हते.[१२]

खरे मंत्रिमंडळात सत्तास्पर्धा व अंतर्गत संघर्ष ओतप्रत भरलेला होता. त्यात जातीयवाद, मराठी-हिंदी भाषावाद आणि प्रांतिक अस्मितांचा संघर्ष सुरू होता. मराठी व हिंदी भाषिक नेत्यांमध्ये स्पर्धा होती. गव्हर्नर सर हाईड गोवॅन हे डॉ. खरेंना वारंवार राजभवनावर बोलावून घेत आणि मंत्रिमंडळात चर्चा होण्यापूर्वीच, खरेंच्या सहमतीने निर्णय घेत असत. शिवाय गव्हर्नर मर्यादाभंग करून पं. शुक्ला आणि पं. मिश्रा यांच्याशी अरेरावीपणे वागू लागले. त्यामुळे ना. भा. खरे हे पंतप्रधान आहेत का गव्हर्नरच्या हाताखालील नोकरशहा आहेत असा अनेकांना प्रश्न पडू लागला. अशा अनेक कारणांमुळे असंतोष वाढत गेला.

प्रस्तुत इतिहासकाराकडे बी. जी. खेरांच्या अप्रकाशित खासगी **कागदपत्रांचा संग्रह आहे.** या संग्रहात वल्लभभाई पटेलांच्या सहीचा तीन पानी खलिता आहे. या खलित्यानुसार पटेलांनी काँग्रेसच्या सर्व पंतप्रधानांना पुढील आदेश दिलेले होते :— (१) प्रत्येक विषयावरील निर्णय मंत्रिमंडळाने गव्हरर्नरकडे सादर करावा ; (२) मंत्र्यांनी मागणी केल्याखेरीज मंत्रिमंडळाच्या बैठकीत गव्हर्नरला आमंत्रित करू नये ; (३) मंत्र्यांनी गव्हर्नरला भेटू नये ; (४) गव्हर्नरसाठी आयोजित केलेले सत्कार समारंभ, निरोप समारंभ अथवा इतर सोहळ्यांमध्ये कोणाही मंत्र्याने उपस्थित राहू नये ; (५) नाचगाणी व भोजन समारंभामध्ये भाग घेऊ नये. याशिवाय पगार, भत्ते, काटकसर, दौऱ्यांमधील मंत्र्यांचे वर्तन वगैरे बंधने घालणारी आचारसंहिता सरदार पटेलांनी विहित केली होती.[१३] ना. भा. खरेंनी या आचारसंहितेचा उघडउघड भंग केला होता.

खरेंचे मंत्रिमंडळ एकमताने कारभार करीत नव्हते. त्याचा गैरफायदा गव्हर्नर आणि बडे अधिकारी घेऊ लागले होते. म्हणून मिश्रा व शुक्ला यांनी खरेंच्या विरोधात प्रचार केला. दरम्यान नागपुरात दोन मुलींवर बलात्कार झाला. त्यातील पकडलेल्या एका गुन्हेगाराला मंत्री एम. वाय. शरीफ यांनी मुदतीआधी मुक्त केले अशी बातमी पसरली. मध्यप्रांतातील काही मंत्री लाच घेतात व वशिलेबाजी करतात, असे आरोप होऊ लागले. मध्यप्रांताचे पंतप्रधान व्हावे अशी खऱ्यांना आरंभापासूनच जबर महत्त्वाकांक्षा होती. त्यासाठी त्यांनी अनेक डावपेच लढवले होते. अनेक तडजोडी केल्या. याबाबत पक्षात चर्चा झाली. वादळ निर्माण झाले.

म्हणून त्यांचे वर्तन पंतप्रधानपदास साजेसे नाही असा काँग्रेस कार्यकारिणीने त्यांच्यावर आरोप केला. त्यांच्या डावपेचांमुळे पक्षाच्या इभ्रतीला धक्का बसला असे पक्षाने जाहीर केले. तसेच काँग्रेस कार्यकारिणीने दुसरा ठराव जाहीर केला की, काँग्रेस संसदीय मंडळाची व कार्यकारिणीची संमती न घेताच गव्हर्नरच्या निमंत्रणावरून खरेंनी दुसरे मंत्रिमंडळ बनविले व शिस्तभंग केला. मंत्र्यांमधील मतभेदांचा गैरफायदा घेऊन गव्हर्नरने मनमानी केली, अशी त्यांच्यावरही कार्यकारिणीने टीका केली. खरेंनी शिस्तभंग केला आणि गव्हर्नरच्या हातातले खेळणे बनून आपली अकार्यक्षमता जगजाहीर केली, असा गांधीजींनीदेखील अभिप्राय दिला. त्यामुळे डॉ. खरेंना राजीनामा देणे भाग पडले.

परंतु मान्य करायला हवे की, डॉ. खरेंच्या कार्यकाळातही काही चांगले निर्णय घेण्यात आले होते. खरे मंत्रिमंडळाने सर्वप्रथम राजबंद्यांच्या सुटकेचे आदेश काढले होते. काहींची बंधपत्रे रद्द केली. ब्रिटिशांनी अनेक वर्तमानपत्रांची जमानत रक्कम जप्त केली होती. अशी प्रत्येक रक्कम काँग्रेस सरकारने परत केली. जंगल परिसरात राहणाऱ्या लोकांचे ब्रिटिशांनी हिरावून घेतलेले वनचराई, गवत कापणे आणि जळाऊ लाकूड वापरण्याचे पारंपरिक हक्क त्यांना परत देण्यात आले. नवीन प्राथमिक व माध्यमिक शाळा उघडण्यात आल्या. जमीन महसुलात साडे बारा टक्के कपात केली. शेतकऱ्यांच्या कर्जाचे प्रश्न समाधानकारकपणे सोडवण्यासाठी नवीन सरकारने समेट व लवाद मंडळे स्थापन केली. सर्व सरकारी कार्यालयांनी सरकार-निर्मित वा प्रांतातच तयार होणारा माल वापरावा असा आदेश दिला. स्थानिक स्वराज्य संस्था व त्यांची कामे याविषयी आमूलाग्र सुधारणा करणारे विधेयक पास करून घेतले. दारूबंदीचे धोरण जाहीर केले. शिक्षणमंत्री रविशंकर शुक्ला यांनी गांधीप्रणीत मूलोद्योग शिक्षण योजनेवर आधारित असलेली ‘ विद्यामंदिर शिक्षण योजना ’ कार्यान्वित केली. साक्षरताप्रसार व प्रौढशिक्षणाचा प्रसार करण्याची ही योजना होती. या खास शाळा आर्थिक बाबतीत स्वयंपूर्ण राहतील अशी योजनेत तरतूद होती. प्रत्येक शाळेला शासनाने शेतजमीन दिलेली होती.[१४]

डॉ. ना. भा. खरे यांच्यावरील उपरोक्त आरोपांबाबत सखोल चौकशी झाली. बहुतांश आरोप सिद्ध झाले. त्यानंतर काँग्रेस कार्यकारिणीच्या वर्धा बैठकीतील ठरावानुसार २५ जुलै १९३८ रोजी पं. रविशंकर शुक्ला यांनी नवीन मंत्रिमंडळ गठित केले. द्वारकाप्रसाद मिश्रा, डी. के. मेहता, संभाजीराव गोखले व छगनलाल भारुका हे त्यांचे सहकारी मंत्री होते. रविशंकरजी गांधीवादी असले तरी इंग्लंडमध्ये शिक्षण घेत असताना ते सावरकरांचे एक मित्र होते. मात्र लवकरच त्यांचे मतपरिवर्तन होऊन ते गांधीजींच्या असहकार चळवळीत सहभागी झाले होते. रविशंकरजी अखेरपर्यंत गांधीनिष्ठ राहिले.

डॉ. खरेंच्या मंत्रिमंडळाने सुरू केलेली लोकोपयोगी कामे आणि विकासाच्या योजना शुक्ला यांच्या सरकारने अधिक कार्यक्षमतेने आणि बांधीलकीच्या भावनेने अमलात आणल्या. नागपूरने शेजारच्या मुंबईतील मंत्रिमंडळाचे बऱ्याच बाबींमध्ये अनुकरण केले. इतके मात्र मान्य करावे लागते की, खरेकालीन राजकारणातील सुंदोपसुंदी आणि डळडळीतपणामुळे प्रांतिक स्वायत्ततेचे काही अपेक्षित फायदे विदर्भाला लाभले नाही. शिवाय रविशंकर मंत्रिमंडळाला काँग्रेस श्रेष्ठींच्या आदेशानुसार ८ नोव्हेंबर १९३९ रोजी राजीनामा द्यावा लागल्यामुळे केवळ १५ महिन्यांचा कार्यकाल लाभला. भूतकाळाचे प्रचंड ओझे होतेच. म्हणून कूळकायदा व सावकारीवर नियंत्रण आणि शैक्षणिक विकास अशी संकल्पित कामे या सरकारला करणे शक्य झाले नाही. काँग्रेसवर मालगुजार व सावकारांचा प्रभाव असल्यामुळे काही मर्यादा होत्या.

डॉ. खरे प्रकरणाचे दुष्परिणाम झालेतच. स्वतः खरे तात्काळ हिंदुमहासभेत गेले आणि उर्वरित आयुष्यभर महात्मा गांधी व काँग्रेसवर अत्यंत कडवट टीका करीत राहिले. बरीच टीका मर्यादा सोडूनही असायची. पश्चिम महाराष्ट्रातही १९३१ पर्यंत काँग्रेसमध्ये हिंदुमहासभावाल्यांचा वावर होता. पण इतिहासाच्या अभ्यासकांनी लक्षात ठेवावे की, मध्यप्रांत-वऱ्हाडमधील अनेक काँग्रेसजन हिंदुमहासभेतही सक्रिय भाग घेत असत. तेथील काँग्रेस संघटनेतील काही पदधारक आणि पुढारी हिंदुमहासभा व आर.एस.एस. मध्येही नेते म्हणून वावरत

असत. असे अनियतरूप (अमॉर्फस) व दुहेरी निष्ठा असलेले राजकारणी सरदार भगतसिंगांप्रमाणे नेहरू, सुभाषबाबू आणि यूथ लीगच्या नेत्यांना अजिबात आवडत नसत. डॉ. खरेंच्या पक्षांतरामुळे हा विषय ऐरणीवर आला. म्हणून काँग्रेस कार्यकारिणीने डिसेंबर १९३८ मध्ये ठराव संमत करून काँग्रेसच्या सभासदांना हिंदुमहासभेचे सभासद होण्यावर बंदी घातली. त्यानुसार हिंदुमहासभेच्या सभासदांना काँग्रेसचे सभासदत्व नाकारण्यात आले.

व्हाइसरॉयच्या सूचनेनुसार वि. दा. सावरकर मुक्त झाल्यावर हिंदुमहासभेचे अध्यक्ष झाले. डिसेंबर १९३८ मध्ये नागपुरात भरलेल्या सभेच्या अधिवेशनात सावरकरांनी जाहीर केले, " We Hindus are a nation by ourselves...... Hindu nationalists should not at all be apologetic to being called Hindu communalists." १९३० च्या दशकात नागपूरच्या तळावरून आर. एस. एस. चा प्रसार संयुक्त प्रांत, पंजाब व इतर प्रांतांमध्ये सुरू झाला. १९४० च्या सुमारास माधवराव गोळवलकरांनी नेतेपद धारण केल्यावर संघाचा प्रसार झाला आणि संघाचे अदमासे एक लाख प्रशिक्षित स्वयंसेवक तयार झाले. जातीयवादी विचारसरणीवर त्यांची भूमिका ठाम राहिली. [१५]

रविशंकरजींचे मंत्रिमंडळ प्रस्थापित झाल्यापासून त्या प्रांतातील काँग्रेसमध्ये मराठी भाषिकांचे महत्त्व खूपच कमी झाले आणि हिंदी भाषिकांचा प्रभाव वाढला. वऱ्हाडमध्ये ब्रिजलाल बियाणी आणि नागपूर प्रांतिकमध्ये जमनालाल बजाज व पूनमचंद रांका यांचा प्रभाव होता. काँग्रेस अध्यक्ष या नात्याने सुभाषचंद्र बोस यांनी स्पष्ट निर्वाळा दिला होता की, डॉ. खरे यांच्यावर मुळीच अन्याय झालेला नाही. या प्रांतात हिंदी भाषिक नेत्यांचे प्राबल्य खूप वाढले हे खरे. रामराव देशमुख यांना नवीन मंत्रिमंडळात घेण्यास रविशंकरजी व सरदार पटेलही तयार होते. परंतु पक्षनेतेपदाची निवडणूक हरल्यानंतर त्यांनी मंत्रिपद नाकारले. वऱ्हाडला सिम समितीने सुचविल्याप्रमाणे खास आर्थिक पॅकेज मिळावे ही त्यांची अट असावी असे दिसते. परंतु रविशंकर व द्वारकाप्रसाद यांना हे अमान्य झाल्यामुळे रामराव मंत्री झाले नाहीत. त्यामुळे प्रांतावरील मराठी प्रभाव आणखीच कमी झाला.

वऱ्हाडवरील अन्याय हे फार जुने दुखणे होते. हैदराबादच्या निजामाने या प्रांताचे शेकडो वर्षे शोषण केले होते. एका कराराच्या निमित्ताने लॉर्ड कर्झनने वऱ्हाड प्रांत निजामाकडून अभ्यर्पित करून घेतला होता. आम्ही **खंड क्रमांक एकमध्ये** सविस्तर विवेचन केल्याप्रमाणे हा प्रांत गोखले व टिळकांच्या जागृत महाराष्ट्रात विलीन न करता त्याची सोयरीक मागास असलेल्या मध्यप्रांताशी केली होती. कर्झनने केलेली बंगालची फाळणी १९११ साली निष्णात मुत्सद्दी साम्राज्यशहांनी निराकृत (ॲब्रोगेट) केली. तथापि वऱ्हाडची अभद्र सोयरीक मोडली नाही, गोपाळ कृष्ण गोखलेंनी सारखा आग्रह करूनही! स्वतः रामराव देशमुख मंत्री असलेल्या खरे सरकारनेही वऱ्हाडवरील अन्याय दूर केला नव्हता. वऱ्हाडातून महसूल जास्त, पण मध्यप्रांतावर खर्च जास्त, ही परंपरा चालू राहिली. याबाबत बापूजी अणेंचा लवाद नेमला होता. पण ते काहीच करू शकले नाही. नेहमीच मध्यप्रांताला फायदेशीर ठरणारे धोरण अंगीकारले जाते या कारणास्तव विदर्भ स्वतंत्र करावा, अशी तेव्हाही आमदारांनी मागणी केली होती. पण आमदारांची रास्त मागणी फेटाळली गेली.

काँग्रेसच्या निवडणुकीत वीर वामनराव जोशी पराभूत झाले. या प्रांतात १९३७ च्या निवडणुकीत ब्राह्मणेतर पक्षाचा पराभव झाल्यानंतरही तो पक्ष काँग्रेसपासून लांब राहण्याचा खटाटोप करीत राहिला. म्हणून पुण्याचे केशवराव जेधे ऑक्टोबर १९३८ मध्ये नागपूरला गेले. त्यांनी विदर्भातील ब्राह्मणेतरांच्या डोळ्यात अंजन घातले होते की, काँग्रेसबाहेर राहणे व्यर्थ व आत्मघातकीपणाचे होय. त्यानंतर पंढरीनाथ पाटील (बुलढाणा) व सहकाऱ्यांनी २० ऑक्टोबर १९३८ रोजी नागपुरात परिषद भरवून ब्राह्मणेतर पक्ष काँग्रेसमध्ये विलीन केला.

## मुंबई इलाख्यातील दारूबंदी

मुंबई काँग्रेस मंत्रिमंडळाने गांधीजींच्या आदेशानुसार दारूबंदीचे धोरण आधीच घोषित करून त्यानुसार प्रशासकीय प्रक्रिया सुरू केलेली होती. या धोरणास काँग्रेस कार्यकारिणीची अनुमती होती. मात्र दारूबंदीच्या धोरणास पारशी आणि या व्यवसायात गुंतलेले उत्पादक व व्यापारी यांचा विरोध होता. के. एफ. नरिमन

यांना मुख्यमंत्रिपद गमवावे लागल्यामुळेही अनेक पारशी काँग्रेसवर नाराज झालेले होते. काँग्रेसच्या स्थापनापूर्वकाळापासून हा समाज राष्ट्रीय चळवळीत असूनही पारशांच्या भावनांची आता कदर होत नाही, असाही प्रचार झाला. दारूबंदीच्या प्रश्नावर पारशी अस्मिता व त्यांचे योगदान यावर मुंबई व गुजरातमध्ये तीव्र भावना व्यक्त करण्यात आल्या. संपूर्ण इंग्रज मंडळींचाही या योजनेला विरोध होताच.

सर्व घटकांचा विरोध पत्करून खेर मंत्रिमंडळाने १ ऑगस्ट १९३९ रोजी मुंबई प्रांतात दारूबंदी अमलात आणण्याचा प्रस्ताव जाहीर केला होता. तथापि काँग्रेसचे अध्यक्षपद गमावल्यावर सुभाषचंद्र बोस गांधीजी व काँग्रेसवर खूप नाराज झाले होते. म्हणून त्यांनी बाळासाहेब खेर सरकारच्या दारूबंदी धोरणावर जुलैच्या प्रारंभी जोरदार हल्ला चढवला. त्यांचा एकच मुद्दा होता की, पारशी लोक अल्पसंख्य जमात असल्याने त्यांच्या भावनांचा व हितसंबंधांचा विचार न करता हे केले जात आहे. वस्तुतः सुभाषबाबू काँग्रेस अध्यक्ष असताना कार्यकारिणीच्या बैठकीत त्यांनी दारूबंदीच्या धोरणाला कधीच विरोध केला नव्हता. अध्यक्षपद गमावल्यानंतर त्यांच्या मनात विकल्प निर्माण झाला. वस्तुतः ते अजूनही पक्षात होते. म्हणून पक्षाच्या या महत्त्वाच्या धोरणावर जोरदार हल्ला करणे पक्षाला अनुचित वाटले. मात्र बाबूजींची ती टीका गांधीजींच्या जिव्हारी लागली.

गांधीजींनी पत्रक काढले, “ अत्यंत काळजीपूर्वक विचार करूनच काँग्रेस कार्यकारिणीने दारूबंदीचे धोरण अमलात आणावे असा मंत्रिमंडळांना आदेश दिलेला होता. मुंबईचे मंत्री मोठ्या धैर्याने या धोरणाचा पाठपुरावा करीत आहेत. त्या मंत्र्यांना अडचणीत आणण्याची सुभाषबाबू अथवा कोणाही काँग्रेस कार्यकर्त्यास मोकळीक देता येणार नाही. ‘अल्पसंख्य जमातीवरील अन्याय ’ अशी आरोळी ठोकून त्यांनी काँग्रेसचे फार मोठे नुकसान केले आहे. दारूबंदीसारख्या शुद्ध नैतिक सुधारणेची जातीय प्रश्नाबरोबर गल्लत करून सुभाषचंद्र अत्यंत धोकादायक खेळ खेळत आहेत ”.[१६] या प्रांताचे अर्थमंत्री अण्णासाहेब लट्ठे यांनीही बाबूजींना उत्तर दिले. सुभाषबाबूंचे चाहते असलेल्या सेनापती बापट यांनीही महाराष्ट्र प्रांतिक

फॉरवर्ड ब्लॉकचे अध्यक्षपद स्वीकारताना आपणास बाबूजींची दारूबंदीबाबतची टीका मान्य नाही असे घोषित केले.

उपरोक्त घटकांचा विरोध, सुभाषचंद्र यांची टीका आणि सनदी नोकरशाहीची उदासीनता पत्करून काँग्रेस मंत्रिमंडळाने १ ऑगस्ट १९३९ पासून दारूबंदी परिणामकारकरीत्या अमलात आणली. विशेष म्हणजे दारूबंदीमुळे सरकारी उत्पन्नात झालेली घट भरून काढण्यासाठी दुसरे कर लादले नाहीत. ही घट सरकारने खर्चातील काटकसरीने भरून काढली याची नोंद घ्यावी.

## सुभाषबाबूंचे मराठी अनुयायी

दारूबंदीवरील दुर्दैवी टीकेच्या पूर्वी सुभाषचंद्र बोसांनी मार्च १९३९ च्या त्रिपुरी काँग्रेसच्या अध्यक्षपदाची निवडणूक लढविली होती. मुंबई, महाराष्ट्र, वऱ्हाड व नागपूर प्रांतिक समित्यांच्या एकूण २६६ मतदारांपैकी २५१ जणांनी मतदान केले. त्यांतील एक मत अवैध ठरले. २५० मतांपैकी ११२ मते सुभाषबाबूंना मिळाली होती. माधवराव अणे, बॅ. नरिमन व डॉ. ना. भा. खरे तसेच महाराष्ट्रातील कम्युनिस्टांनी त्यांना आपला पाठिंबा जाहीर केलेला होता. त्याव्यतिरिक्त एस. एम. जोशी, गो. पां. खरे, वि. म. तारकुंडे, शिरूभाऊ लिमये, अशोक मेहता, मिनू मसानी, सोली बाटलीवाला हे समाजवादी व रॉयवादी सुभाषबाबूंचे समर्थक मानले गेले होते. तसेच सोलापुरातून निवडून गेलेल्या श्रीनिवास सरदेसाई, भाई भोसले, छन्नुसिंग चंदेले वगैरे डाव्या तरुणांनीही बाबूजींना समर्थन दिले असावे असा तेव्हा अंदाज होता.

पुणे यूथ लीगशी सुभाषचंद्रांचे असलेले पूर्वीचे संबंध आता त्यांना उपयोगी पडले. १९३९च्या त्रिपुरी काँग्रेसच्या अध्यक्षपदाची निवडणूक फारच गाजली. या निवडणुकीस डावे विरुद्ध उजवे आणि सुभाषचंद्र विरुद्ध महात्मा गांधी असे रंग देण्यात आले. या वादात न शिरता इतकेच म्हणावयाचे आहे की, गांधीजी व पटेलांना सुभाषबाबूंची कार्यपद्धती पसंत नव्हती. तसेच काँग्रेस कार्यकारिणीतील बहुतेक सदस्यांना सुभाषचंद्रांबरोबर काम करणे कठीण वाटत होते. म्हणून त्रिपुरीच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीबाबत गांधीजी अगदी तटस्थ राहिले होते.

सुभाषबाबू अध्यक्षपदी निवडले गेले. परंतु त्यांची प्रकृती फारच अशक्त असल्यामुळे **त्यांना स्वयंसेवकांनी चाके असलेल्या खुर्चीत बसवून व्यासपीठावर आणले होते. त्यांच्यात अध्यक्षीय भाषण वाचून दाखविण्याचीही शक्ती नसल्यामुळे ते भाषण त्यांच्या बंधूंना (शरदचंद्र बोस) वाचावे लागले होते.** शिवाय खुल्या अधिवेशनातील अध्यक्षीय पदाची भूमिका वठवणेही त्यांना अशक्य झाल्यामुळे ती जबाबदारी त्यांना मौलाना आझादांकडे सोपवावी लागली.[१७] इतकेच काय पण काँग्रेस अध्यक्ष असलेल्या सुभाषबाबूंना काँग्रेस कार्यकारी समिती नेमता आली नाही. कारण उभयपक्षी कमालीचा अविश्वास होता. वस्तुतः 'तुम्हाला हवी तशी कार्यकारिणी नेमा', असे गांधीजींनी सुभाषबाबूंना ३० मार्चला पत्राने कळवले होते. तरीही त्यांना कार्यकारिणी नेमता आली नव्हती. अशा परिस्थितीत २९ एप्रिल १९३९ रोजी कोलकात्यात भरलेल्या अ. भा. काँ. समितीच्या बैठकीत सुभाषचंद्र बोस यांनी काँग्रेस अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. **लगेच ३ मे १९३९ रोजी त्यांनी काँग्रेस अंतर्गत फॉरवर्ड ब्लॉक पक्ष स्थापन केला. देशातील डाव्या गटांचे एकीकरण करणे हा त्यांचा उद्देश होता.**

मार्च १९३९ च्या त्रिपुरी काँग्रेसनंतर महाराष्ट्रातील काँग्रेस समाजवादी पक्षाने सावध पवित्रा घेतला आणि हा पक्ष फॉरवर्ड ब्लॉकपासून लांब राहिला. कम्युनिस्ट व रॉयवादीदेखील लांबच राहिले. अत्यंत चमत्कारिक परिस्थिती निर्माण झाली. अनेक पुढाऱ्यांना आपल्या भूमिकेचे पुनर्विलोकन करावे लागले. अल्पमतात गेलेल्या सुभाषबाबूंना अध्यक्षपदाचा त्याग करावा लागला होता. शेवटी त्यांना राष्ट्रीय काँग्रेसचाही राजीनामा द्यावा लागला. रॉय, समाजवादी व कम्युनिस्टांनादेखील राष्ट्रीय आंदोलनात बाबूजींची विभाजनवादी प्रवृत्ती नापसंत होती. **सुभाषबाबूंचे संशयास्पद डावपेच हा सर्वांना कळीचा मुद्दा वाटत होता.** याबाबत सी. पी. आय. चे सरचिटणीस पी. सी. जोशी यांनी एप्रिल १९३९ मध्ये जाहीर केले की, " The greatest class struggle today is our national struggle, and that the Congress is the main organ of this struggle and that the preservation of its unity was a primary task."[१८]

आय.सी.एस.चा राजीनामा देऊन बाहेर पडलेले हरीभाऊ वि. कामथ या पक्षाचे सचिव झाले. सेनापती बापट, विनायकराव भुस्कुटे, रामभाऊ रुईकर वगैरे मराठी भाषिक बाबूजींचे अनुयायी बनले. नंतर मार्च १९४२ पासून या पक्षाची संघटना मुंबईत खूप सक्रिय झाली. मुंबईतील केनेडी पुलाजवळ फॉरवर्ड ब्लॉकची प्रांतिक संघटना स्थापन झाली (मार्च १९४२ ). गिरधर ठक्कर, ह. वि. कामथ, भूपेंद्र मोतीलाल पटेल, केशव शामराव तळपदे, गौरीशंकर भट, मूलशंकर व्यास, प्रतापसिंग, शिवाजी पटवर्धन आणि बिडेश कुलकर्णी या सभासदांची नावे मुंबई सरकारच्या गृह विभागाच्या गोपनीय फायलीत प्रस्तुत इतिहासकारास आढळली. छोडो भारत संग्रामात या मंडळींनी काँग्रेसच्या बरोबर राहून क्रांतिकार्य केले.[१९]

## दुसरे महायुद्ध व काँग्रेस मंत्रिमंडळे

साम्राज्यवादी युध्यमान राष्ट्रांचे मनसुबे पाहून लवकरच दुसरे महायुद्ध पेटणार अशी भविष्यवाणी काँग्रेसने १९२८ सालातच वर्तवली होती. साम्राज्यवाद्यांच्या युद्धखोरपणास हिंदुस्तानने वित्तबळ वा मनुष्यबळ अथवा साधनसामग्री न देता विरोध करावा अशी काँग्रेसने हाक दिली होती. संभाव्य वाटणारे महायुद्ध १ सप्टेंबर १९३९ रोजी पेटले. बादशहा सहाव्या जॉर्जचे निवेदन ३ सप्टेंबरला आकाशवाणीवरून प्रसारित झाले, आणि हिंदुस्तान महायुद्धात गुरफटला गेला.

त्याच दिवशी व्हाइसरॉय लिनलिथगो यांनी युद्धजन्य आणीबाणीची घोषणा केली. 'हिंदुस्तानही महायुद्धात आपली अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडेल आणि सर्व प्रकारची साधनसामग्री व मनुष्यबळ पणाला लावेल' असे त्यांनी घोषित केले. ब्रिटिशांनी राष्ट्रीय नेते वा प्रांतिक मंत्रिमंडळे अथवा मध्यवर्ती कायदेमंडळांना न विचारता या देशावर महायुद्ध लादले. 'स्वातंत्र्य व लोकशाहीचे संरक्षण करण्यास्तव तसेच हुकूमशाहीचे निर्दालन करण्यास्तव आणि संस्कृतीचे रक्षण करण्यास्तव हिंदुस्तान मनःपूर्वक योगदान देईल', असे लिनलिथगो महोदयांनी मखखपणे घोषित केले. त्यांनी एका सुप्रसिद्ध कथेतील सिंडरेलाची भूमिका भारतीयांवर लादली. लोकशाही राष्ट्रांच्या संरक्षणार्थ भारत या गुलाम

देशाने आहुती द्यावी, असा त्यांचा आदेश होता. विशेष म्हणजे त्या बदल्यात कसलेही आश्वासन दिले नव्हते. त्यात भारतीयांच्या आशाआकांक्षांचा साधा उल्लेखही नव्हता.

याउलट महायुद्ध संपेपर्यंत "संघराज्य" स्थापन करणे शक्य होणार नाही, असे व्हाइसरॉयने स्पष्ट केले. १९३५ चा कायदा पार्लमेंटने रातोरात दुरुस्त करून व्हाइसरॉयला आणीबाणीकालीन सर्वाधिकार बहाल केले. त्यानुसार कोणत्याही प्रांताचा अथवा सर्वच प्रांतांचा कारभार आपल्याकडे घेण्याचा अधिकार व्हाइसरॉयला देण्यात आला. प्रांतिक स्वायत्तता निरर्थक झाली. बहुतांश सत्ताकेंद्रे सरकारकडे गेली. अनेक वटहुकूम निर्गमित करण्यात आले. लोकमताची पर्वा न करता निर्णय घेतले जात असल्याबद्दल युद्ध सुरू होण्यापूर्वीच काँग्रेसने सरकारकडे तक्रार केली होती. शिवाय पक्षाच्या खासदारांनी मध्यवर्ती कायदेमंडळाच्या कामकाजावर बहिष्कार घालावा असा आदेश काँग्रेसने आधीच दिलेला होता.

युद्धजन्य परिस्थितीत जवाहरलालजींनी तयार केलेला मसुदा स्वीकारून काँग्रेस कार्यकारिणीने १४ सप्टेंबर १९३९ रोजी युद्धाविषयीचा ठराव संमत केला. फॅसिस्ट व नाझी राजवटींचा निषेध करून या ठरावात म्हटले होते की, " ब्रिटिशांना युद्धासाठी भारतातील साधनसामग्रीचा व मनुष्यबळाचा उपयोग करावयाचा असेल, तर त्याबाबतचे निर्णय भारतीय जनतेच्या संमतीनेच घेतले पाहिजे. साम्राज्यशाहीच्या हितरक्षणासाठी युद्ध असेल, तर त्यास भारताचा विरोध असेल. ब्रिटन खरोखरीच लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी लढत असेल, तर ब्रिटनने प्रथम हिंदुस्तानात लोकशाही प्रस्थापित करावी आणि भारतीयांना स्वयंनिर्णयाचा हक्क मंजूर करावा. घटना परिषद स्थापन करून त्या परिषदेने सुचविलेली घटना अमलात आणावी ". अशी काँग्रेसची भूमिका होती.

मात्र इंग्रज कोणत्याच बाबतीत भारतीयांना अनुकूल असे काही करावयास तयार नव्हते. प्रांतिक सरकारांना आयकराचा अधिक हिस्सा देण्यासही केंद्र सरकार तयार नव्हते. या मुद्यावरून काँग्रेस मंत्रिमंडळे राजीनामा देतील, असे सरदार पटेलांनी जुलै १९३९ मध्ये सूचितही केले होते. लिनलिथगोंचा सत्तापिपासु हटवादीपणा प्रांतिक सरकारांना असह्य झाला होता.

अशा वातावरणात १७ ऑक्टोबर १९३९ रोजी लिनलिथगोंनी इंग्रजांचे हिंदुस्तानविषयक धोरण एका निवेदनाद्वारे घोषित केले. 'भारताला स्वयंनिर्णयाचा हक्क तर नव्हेच, पण नुसते वसाहतीचे स्वराज्यही देणे शक्य होणार नाही', असा त्यात आशय होता. 'महायुद्धानंतर १९३५ च्या कायद्यात काही बदल करण्यासाठी भारतीय नेत्यांशी चर्चा करण्यात येईल आणि त्यानंतर भविष्यकाळात केव्हातरी वसाहतीचे स्वराज्य देण्याचा निर्णय घेण्यात येईल', असे मोघम आश्वासन लिनलिथगोंच्या निवेदनात होते. भारतातील जातीयवादी घटक व संस्थानिकांना हाताशी धरून राज्यकारभार चालवणे हे त्यांचे ध्येय होते. मात्र लिनलिथगोंची ही कलेनिअल नीती अपवादात्मक नसून इंग्रजांची नित्यनियमित अशी राजनीती होती.

काँग्रेस कार्यकरिणीने २२ ऑक्टोबर १९३९ रोजी दुसरा ठराव करून ब्रिटनला कोणत्याही प्रकारे पाठिंबा देणार नाही असे जाहीर केले. तसेच सर्व काँग्रेस मंत्रिमंडळांनी ३१ ऑक्टोबरपर्यंत राजीनामे द्यावे असा आदेश दिला. कार्यकारिणीच्या आदेशानुसार बाळासाहेब खेरांनी राजीनामा देण्यापूर्वी २५ ऑक्टोबरला ब्रिटिशांचे युद्ध धोरण आणि हिंदुस्तानला स्वातंत्र्य न देण्याच्या धोरणाचा निषेध करण्याचा ठराव कायदेमंडळात पास केला. आणि काँग्रेसच्या आदेशानुसार ४ नोव्हेंबर १९३९ ला खेर मंत्रिमंडळाने राजीनामा दिला. त्यानंतर गव्हर्नर रॉजर लम्ली यांनी १९३५ च्या कायद्याचे कलम ९३ यानुसार जाहीरनामा काढला आणि त्यानुसार सर्व वैधानिक कार्य व प्रशासकीय अधिकार स्वतःकडे घेतले. गव्हर्नरला साहाय्य करण्यासाठी आय. सी. एस. अधिकाऱ्यांचे सल्लागार मंडळ नेमण्यात आले. मध्यप्रांत-वऱ्हाडमधील रविशंकर शुक्लांच्या मंत्रिमंडळानेही अशा प्रकारेच अधिकाराचा त्याग केला.

देशाचे दुर्दैव की, इंग्रजांच्या धोरणाविषयी भारतीय पक्षांमध्ये एकमत नव्हते. काँग्रेसचा निःसंदिग्ध विरोध असला तरी हिंदुमहासभा, लिबरल फेडरेशन, मुस्लीम लीग आणि नरेंद्र मंडळ या पक्षांप्रमाणे आंबेडकरांच्या स्वतंत्र मजूर पक्षानेही इंग्रज सत्ताधीशांना बिनशर्त सहकार्य देऊ केले होते. काँग्रेस मंत्रिमंडळांनी अधिकार-त्याग केल्यामुळे बॅ. जिनांना आसुरी आनंद झाला. त्यांनी सर्व मुसलमानांना आवाहन करून २२ डिसेंबर १९३९ हा मुक्तिदिन (डे ऑफ डिलिव्हरंस) म्हणून साजरा केला आणि सामुदायिकरीत्या अल्लाचे आभार मानले. जिनांप्रमाणे डॉ. आंबेडकरांच्या स्वतंत्र मजूर पक्षानेही २२ डिसेंबर १९३९ हा मुक्तिदिन साजरा केला. शिवाय काँग्रेस मंत्रिमंडळाच्या कारभाराची चौकशी करण्यासाठी बादशाही आयोग नेमावा या मुस्लीम लीगने केलेल्या मागणीसही आंबेडकरांनी पाठिंबा दिला होता. राजकारण असे स्वार्थी असते!

**मंत्रिमंडळाच्या रूपाने काँग्रेसने उभारलेले राजकीय व सामाजिक परिवर्तनाचे भव्यदिव्य स्वप्न भंग पावले! पण स्वार्थी पक्षांना लाभ झाला.**

महायुद्धाची घोषणा झाली त्याच दिवशी डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्ट व संबंधित ऑर्डिनन्स अमलात आणून इंग्रजांनी संपूर्ण नागरी स्वातंत्र्याची पायमल्ली केली होती. विजेच्या वेगाने काँग्रेसवर झडप घालून संपूर्ण संघटना लुळीपांगळी करण्यास्तव मध्यवर्ती सरकारने मे १९४० मध्ये 'रिव्हॉल्युशनरी मुव्हमेंट्स ऑर्डिनन्स' तयार करून, टंकलिखित स्वरूपात सज्ज ठेवला. मात्र हा वटहुकूम अति गोपनीय असूनही गांधीजींना माहीत झाला. १९३२ सालाप्रमाणेच या वेळीही इंग्रज अधिकारी काँग्रेसशी टक्कर देण्यासाठी अधीर झालेले होते. शिवाय १९३२ पेक्षा आता सरकारकडे अमर्याद अधिकार होते. कोणत्याही क्षणी ब्रिटिश अथवा दोस्त राष्ट्रांची फौज मागवून काँग्रेसला नेस्तनाबूत करण्याचे अधिकार प्रशासनाला प्राप्त झालेले होते.

मे १९४० मध्ये ब्रिटनमध्ये वॉर कॅबिनेट म्हणजे युद्धकालीन राष्ट्रीय संमिश्र मंत्रिमंडळ अधिकारारूढ झाले आणि सर विंस्टन चर्चिल हे कडवे साम्राज्यवादी मुत्सद्दी गृहस्थ पंतप्रधान झाले. या अरिष्टसूचक व भयप्रद घटनेत भर पडली ती भारतमंत्री पदावर आलेल्या लॉर्ड अमेरी यांची! या मंत्रिमंडळात लेबर पक्षाचे क्लेमंट ॲटली आणि स्टॅफर्ड क्रिप्स आले हे खरे. पण चर्चिलपुढे त्यांचा निभाव लागणे असंभव होते.

युद्धकाळात ब्रिटनला कोणतेही साहाय्य न देता संप घडवून आणावे व उत्पादनास खीळ घालावी, असे कम्युनिस्टांचे धोरण होते. साम्राज्यवादी सत्तांमधील या युद्धात ब्रिटन व दोस्त राष्ट्रांविरुद्ध प्रचार करून जनमत अधिकाधिक ब्रिटनविरोधी करण्याचा प्रारंभापासून कम्युनिस्टांचा प्रयत्न होता. हे धोरण त्यांनी जून १९४१ पर्यंत कायम ठेवले. अन्नधान्य व उपभोग्य वस्तूंची टंचाई आणि युद्धजन्य महागाईमुळे आम जनता व कामगार वर्गात तीव्र असंतोष पसरलेला होता. याउलट उद्योगपतींच्या नफ्याचे प्रमाण पुष्कळ वाढले होते. त्यामुळे कामगारांच्या मागण्या वाढल्या. विशेषतः मुंबई, सोलापूर व नागपूरमध्ये मालक आणि कामगारांमध्ये कलह वाढून ते तीव्र झाले. त्यात कम्युनिस्ट व कामगार नेत्यांची भूमिका स्पष्ट दिसत होती. मुंबईतील ६४ कापड गिरण्यांपैकी ६० गिरण्यांमधील कामगार ४ मार्च १९४० रोजी महागाई भत्त्यासाठी संपावर गेले. असे संप वारंवार होत असत. म्हणून ११ मार्च १९४० रोजी भारत संरक्षण कायद्याखाली डांगे, मिरजकर व रणदिवेंना येरवडा तुरुंगात डांबण्यात आले. तेव्हापासून कम्युनिस्टांना डांबून ठेवून संप मोडून काढण्याचे सरकारी धोरण अधिक कडवे झाले.

४ ते १५ मार्चपर्यंत मुंबईतील रेशमी व लोकरी कापडाच्या गिरण्यांमध्येही संप झाले. अमळनेरचे कामगारही ४ ते १६ मार्चपर्यंत संपावर गेले. सोलापूरच्या हातमाग कामगारांनीही संप केला. संपकरी कामगारांवर २९ मार्च १९४० रोजी गोळीबार करण्यात आला. अशा वातावरणात शं. वा. देशपांडे, एल. के. ओक, एस. आर. तावडे, श्यामराव परुळेकर, गोदावरी गोखले, भिसे, आर. एम.

जांभेकर, एस. जी. पाटकर, ना. वा. फडके वगैरे कम्युनिस्टांना अटक करण्यात आली. मार्च- एप्रिल १९४० मधील संप अपयशी झाल्यामुळे गंगाधर अधिकारी, पूरणचंद्र म्हणजे पी. सी. जोशी आणि अजय घोष भूमिगत होऊन मुंबईतील चळवळीची सूत्रे हलवीत असत. भारत संरक्षण कायद्याखाली जुलै १९४० मध्ये पकडलेल्या इतर १२ कम्युनिस्टांमध्ये बी. जी. भांडारकर, पी. बी. वैद्य, पी. बी. दोंदे., जे. एस. माहीमकर वगैरे मराठी भाषिक होते. त्याचप्रमाणे नोव्हेंबर १९४० मध्ये श्रीनिवास सरदेसाई, प्रल्हाद कुरणे, भोगले, विठ्ठल चौधरी व बाळकृष्ण (बंडू) गोखले आणि जून १९४१ मध्ये उषाताई डांगे, खंडेराव सुळे, वामनराव बापट, केशवराव जोगळेकर आणि रघुनाथ शिवराम निंबकर हे कम्युनिस्ट नेते पकडले गेले. आणखीही बरेच कार्यकर्ते कैदेत गेले.

मध्यप्रांत- वऱ्हाडात नागपूर, हिंगणघाट, पुलगाव, बडनेरा, अकोला, अचलपूर व बुऱ्हाणपूर येथे दहा कापड गिरण्या होत्या. त्यापैकी एम्प्रेस गिरणीत १४,००० तर मॉडेल गिरणीत ४००० कामगार होते. नागपुरातील कामगार चळवळीचे नेतृत्व फॉरवर्ड ब्लॉकचे नेते रामभाऊ रुईकर समर्थपणे करीत. त्यांच्या मार्गदर्शनानुसार या गिरण्यांमध्ये यशस्वीरीत्या संप होऊन कामगारांना निर्देशांकानुसार महागाई भत्ता मिळाला होता.

काँग्रेसचे रामगड अधिवेशन (१८-२० मार्च १९४०) भरण्यापूर्वी एक सनसनाटीची घटना घडली. जालियनवाला बागेतील भयानक हत्याकांडाचा मुख्य सूत्रधार असलेल्या गव्हर्नर मायकेल ओडवायर या कडव्या साम्राज्यवाद्याची सरदार ऊधमसिंग या शीख क्रांतिकारकाने गोळ्या झाडून हत्या केली (१९४०). लंडनमधील सुप्रसिद्ध कॅक्स्टन हॉलमध्ये ऊधमसिंग यांनी संधी साधली आणि मायकेल ओडवायर याच्यावर सूड घेतला. ऊधमसिंग कृतार्थ मनाने फासावर चढले! १९१९ पासून १९४० पर्यंत अनेक युवक या प्रयत्नात होते. मुंबईच्या चौपाटीवरील सभेत भाषण करताना सेनापती बापटांनी ऊधमसिंग यांच्या कृत्याचे समर्थन केले व तुरुंगाची वाट धरली. १० एप्रिल रोजीच्या या सभेतच युनियन

जॅक जाळला या अपराधासाठी फॉरवर्ड ब्लॉकचे हरीभाऊ वि. कामथ, विनायकराव भुस्कुटे व दत्तोपंत बाभळे यांना अटक करण्यात आली. आणि त्यांना एक वर्ष कारावासाची शिक्षा झाली.

**सुभाषचंद्र बोस निसटले** :— सुभाषचंद्र बोस यांच्या फॉरवर्ड ब्लॉक पक्षास महाराष्ट्रात फारसा प्रतिसाद मिळाला नाही. वसंतराव भगवंत कर्णिक हे एम. एन्. रॉय यांचे सहकारी व सल्लागार यांनी तर रॉय साहेबांना चेतावनीच दिली होती, "आपण सुभाषवर विश्वास टाकू शकत नाही........ तो एक मावळत असलेला तारा आहे. त्याला प्रत्येक जण वाऱ्यावर सोडत असताना त्याचे आपण समर्थन करणे निरुपयोगी ठरेल."[२०] डावी आघाडी संघटित करण्याचे बाबूजींचे प्रयत्न सफल झाले नाही. २२ जून १९४० रोजी बाबूजी मुंबईत आले आणि बॅ. जिना, सावरकर आणि डॉ. आंबेडकरांनाही भेटले. पण व्यर्थ ! २ जुलै १९४० रोजी त्यांना बंगाल सरकारने अटक केली.

कारागृहात केलेल्या उपोषणामुळे सुभाषबाबूंची प्रकृती चिंताजनक झाली होती. सुटका न केल्यास ते तुरुंगात मरण पावतील असा डॉक्टरांनी अभिप्राय दिल्यामुळे त्यांना रुग्णवाहिकेतून कोलकात्यात घरी नेण्यात आले. (५ डिसेंबर १९४०). मात्र भारत संरक्षक कायद्याखाली त्यांना घरातच स्थानबद्ध केलेले होते. काँग्रेस कार्यकारिणी त्यांच्यावरील शिस्तभंगाची कारवाई रद्द करण्यास तयार नव्हती. काँग्रेस समाजवादीदेखील दुरावले होते. मात्र १० जानेवारी १९४१ पर्यंत त्यांचा गांधीजींबरोबर पत्रव्यवहार चालू राहिला. त्यांना पाठिंबा नसल्यामुळे राजकीय वातावरण प्रतिकूल झाल्याचे दिसत होते. प्राप्त परिस्थितीत आपण काही करू शकणार नाही, हे त्यांनी ओळखले. म्हणून १७ जानेवारी १९४१ रोजी पहारा करणाऱ्या पोलिसांची नजर चुकवून सुभाषचंद्र बोस वेषांतर करून घरातून निसटले. आणि भूमिगत अवस्थेत अफगाणिस्तान व रशियामार्गे जर्मनीत गेले. तेथून त्यांचे सर्वाधिक नाट्यमय देशभक्तिपर कर्तृत्व सुरू झाले. "चुकीच्या वाटेने जाणारे देशभक्त" असा त्यांच्याबद्दलचा गांधीजींचा अभिप्राय होता.

## राष्ट्र सेवादल

जयप्रकाश नारायण, नरेंद्र देव आणि शं. द. जावडेकर हे पुण्यातील युवकांचे गुरु होते. आपल्या शंकांचे निरसन करण्यासाठी ते या तिघांचा सल्ला घेत. स्वातंत्र्य आंदोलनास गती येत असताना पुण्यातील यूथ लीग ही संघटना कालबाह्य झालेली होती. काँग्रेस सेवादल मात्र काँग्रेस कार्यकारिणीने विहित केलेल्या आकृतिबंधानुसार कार्यरत होता. याच सुमारास राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या हिंदुत्ववादी संघटनेचा प्रचार आणि प्रसार वाढत चालला होता. या संघटनेने सेनादलात भरती व्हा असा प्रचार करून इंग्रजांच्या युद्धप्रयत्नांना सक्रिय मदत करण्याचे धोरण अमलात आणले होते. आर. एस. एस. आणि हिंदुमहासभेची ही भूमिका स्वातंत्र्य आंदोलनास मारक होती. शिवाय हे दोन्ही पक्ष हिंदुत्ववादी असून त्यांच्याकडे आर्थिक विकासाचा कार्यक्रम नव्हता.

म्हणून युवकांच्या मनावर स्वातंत्र्यवादी, समतावादी आणि पुरोगामी विचारांचे संस्कार करण्यासाठी युवक संघटना आवश्यक आहे, असा विचार पुढे आला. यासाठी पुण्याचे श्रीधर पुरुषोत्तम लिमये व ना. ग. गोरे यांनी पुण्यात बैठक घेतली. तेव्हा एस. एम. जोशी तुरुंगात होते. या बैठकीत ठरल्याप्रमाणे जून १९४१ मध्ये राष्ट्र सेवादलाची स्थापना करण्यात आली आणि जोशींना दलप्रमुख करण्यात आले. या पुणेकरांव्यतिरिक्त रणजित पंडित, वि. म. हर्डीकर, युसुफ मेहेरअली, माथेरानचे विठ्ठल लक्ष्मण कोतवाल वगैरेंचेही राष्ट्र सेवादलाच्या स्थापनेत योगदान होते.

धर्मनिरपेक्ष आणि समाजवादी राष्ट्रवादाचा पुरस्कार करणारा हा सेवादल प्रथम पुण्यात कार्यरत झाला आणि लवकरच त्याचे कार्य पश्चिम महाराष्ट्रात व विदर्भात पसरले. मुंबई प्रांतिक काँग्रेस समितीने राष्ट्र सेवादलास फेब्रुवारी १९४२ मध्ये मान्यता दिली आणि त्या रूपाने स्वातंत्र्यलढ्याची आणखी एक युवा आघाडी सक्रिय झाली. जानेवारी १९४२ पर्यंत सेवादलाच्या ८४ शाखा कार्यरत झाल्या. त्या शाखांमध्ये एकूण ३,२०० प्रशिक्षित सैनिक होते. आगामी छोडो भारत आंदोलनात सेवादलाची भूमिका महत्त्वाची असावी या दृष्टीने १९४२ च्या

प्रारंभापासूनच विचारविनिमय चालू होता. त्या दृष्टीने सेवादलाने पुण्यात एक महिन्याचे शिबिर आयोजित केले. या शिबिरासाठी महाराष्ट्रातून प्रतिनिधींना आमंत्रित केले होते. सुप्रसिद्ध गधर क्रांतिकारक पृथ्वीसिंग आझाद, युसुफ मेहेरअली, अच्युतराव पटवर्धन व श्री. पु. लिमये वगैरेंनी युवकांना आगामी आंदोलनाबाबत मार्गदर्शक सूचना दिल्या. गुप्तचरांच्या अहवालांमध्ये अभिप्राय दिलेला आढळतो की, आगामी छोडो भारत आंदोलनाची रणनीती या शिबिरात ठरविण्यात आली होती. या शिबिरात महाराष्ट्रातील निवडक दीडशे युवक कार्यकर्ते सामील झाले होते. राष्ट्रकार्यात या सेवादलाने पुढील बरीच वर्षे चांगले योगदान दिले. एस. एम. जोशी, साने गुरुजी, वि. ल. ऊर्फ भाई कोतवाल, अशोक मेहता, ना. ग. गोरे व मधू दंडवते अशा अनेक काँग्रेस समाजवाद्यांनी नरेंद्र देव, मेहेरअली व जयप्रकाश नारायण यांच्या मार्गदर्शनानुसार राष्ट्र सेवादलाच्या व्यासपीठावरून स्वातंत्र्यलढ्याबरोबरच लोकशाही समाजवादाचा प्रसार केला. विचारप्रणालीच्या क्षेत्रातील सेवादलाचे योगदान महत्त्वाचे मानावे लागते. काँग्रेस समाजवाद्यांनी छोडो भारत लढा चेतविण्यासाठी पुण्यात घेतलेल्या शिबिरांमध्ये आणि एकूण आंदोलनातही राष्ट्र सेवादलाचे मोठे योगदान होते.

❑❑

## संदर्भ


१. सुमित सरकार, **मॉडर्न इंडिया**, पृ. ३३६-३८.

२. पट्टाभी सीतारामय्या, **हिस्टरी ऑफ द इंडियन नॅशनल काँग्रेस,**खंड दोन, पृ. १२,३५, ३९.

३. कित्ता, पृ. ४५-४७.

४. के. गोपालस्वामी, **गांधी अँड बाँबे**, मुंबई, १९६९, पृ. ३०६.

५. के. के. चौधरी, **हिस्टरी ऑफ बाँबे**, पृ. २४८-४९.

६. बी. जी. खेर कागदपत्र, के. के. चौधरी खाजगी संग्रह.

७. मुंबई सरकार, मुंबई इलाखा प्रशासन अहवाल : १९३७-३८.

८. सीतारामय्या, उपरोक्त, पृ. ६५.

९. **टाइम्स ऑफ इंडिया**, २८ ऑक्टो. १९३७.

१०. के. एम. मुन्शी, **पिलग्रीमेज टू फ्रीडम**, मुंबई, १९६७, पृ. ४९-५०.

११. व्ही. बी. कर्णिक, **स्ट्राईक्स इन इंडिया**, मुंबई, १९६७, पृ. २७८, २८३-८४.

१२. डी. पी. मिश्रा (संपा.), **हिस्टरी ऑफ फ्रीडम मुव्हमेंट इन मध्य प्रदेश,** पृ-४२७-२९.

१३. बी. जी. खेर कागदपत्र, उपरोक्त.

१४. मिश्रा (संपा.), उपरोक्त, पृ. ४२९-३०.

१५. सुमित सरकार, उपरोक्त, पृ. ३५६-५७.

१६. **हरिजन**, २२ जुलै १९३९.

१७. य. दि. फडके, **विसाव्या शतकातील महाराष्ट्र**, खंड चवथा, पृ. १७१, १७३, १७४, १७६.

१८. मुंबई सरकार, होम डिपा. स्पेशल, फाईल क्र. ५४३ (१३) बी (४), १९४१-१९४२-१९४३.

१९. कित्ता.

२०. कित्ता, पोलीस आयुक्ताचे २७ फेब्रुवारी १९४० चे पत्र.

प्रकरण १७

# संस्थानी प्रजाजनांची चळवळ

## ब्रिटिश साम्राज्याचे आधारस्तंभ

निजामासारख्या संस्थानिकांची मध्ययुगीन मानसिकता व झोटिंगशाही आणि त्यांचे कलोनिअल सत्ताधीशांशी असलेले 'लाभ प्रतिलाभ' स्वरूपाचे संबंध समजल्याशिवाय संस्थानी प्रजेच्या चळवळीचे अंतरंग समजणार नाही. व्हाइसरॉय लॉर्ड डफरिन व नंतर लॉर्ड कर्झन यांनी तशा Quid Pro Quo संबंधांचा भक्कम पाया रचलेला होता. ब्रिटिश इंडियातील चळवळीला शह देण्यासाठी इंग्रजांनी संस्थानांच्या अधिपतींची विशिष्ट मानसिकता घडविली, त्यांना गोंजारले. पण गरजेनुसार त्यांना आपले दास बनविले व त्यांचा पाहिजे तसा उपयोगही करून घेतला. थोडक्यात त्यांना ब्रिटिश साम्राज्याचे 'कॉम्प्रेडोर' म्हणजे आधारस्तंभ बनविले. त्या अधिपतींच्या मध्ययुगीन सरंजामशाही प्रवृत्तींना वाव देऊन प्रत्यक्ष ब्रिटिश बादशहाने काही विशेषाधिकार दिले, पण त्यांना अंकित करून ठेवले. मात्र यास काही संस्थानिक अपवाद होते हे निश्चित होय!

ब्रिटिश भारतातील जनतेला इंग्रजांशी लढावे लागले. तथापि संस्थानी प्रजाजनांना इंग्रज व संस्थानिकांशीही लढावे लागले. **हैदराबादमध्ये 'धर्म' हा आणखी गुंतागुंत वाढविणारा अतिरिक्त घटक होता. हैदराबादमध्ये राजेशाहीपेक्षा सरंजामवादी अल्पजनसत्ता म्हणजे फ्युडलिस्ट ऑलिगार्की होती.** या मंडळीवर धर्माचा संकुचित अर्थ लावणाऱ्या घटकांचा प्रभाव होता. त्यामुळे येथील प्रत्येक चळवळीस जातीय स्वरूप येत असे.

पहिल्या महायुद्धात आला हजरत मीर उस्मान अहमद अलीखान याने इंग्रजांना प्रचंड युद्धसामग्री, सेनादल, पैसा व धान्य दिले होते. शिवाय त्याची सेना तुर्कस्तान व अफगाणिस्तानच्या मुसलमान सेनेशी लढली होती. त्यामुळे पाचवे जॉर्ज यांनी त्याला 'हिज एक्झॉल्टेड हायनेस' हा सर्वोच्च किताब दिला होता. इकडे जनता मात्र दुष्काळ व फ्ल्यूच्या भयानक साथीने मरत होती.

भारतमंत्री माँटेग्यू भारतात येऊन त्यांनी राज्यसुधारणांचा मानस व्यक्त केला होता. महात्मा गांधींनी सत्याग्रहाचा युगारंभ केला होता. पण निजामी प्रजाजनांचे भवितव्य मात्र अत्यंत अंधकारमय होते. मुद्रण स्वातंत्र्य तर नव्हेच, पण नागरी स्वातंत्र्यही नव्हते. सभा-संमेलने वा भाषणे तर अशक्यच ! संघटना स्थापन करणे त्यापेक्षाही अशक्य होते ! संघटना ही कल्पना मुळातच निजामाला व महाराष्ट्रातील अनेक संस्थानिकांना असह्य वाटत होती. निजामाला काँग्रेस या शब्दाचा तिरस्कार वाटत असे.

हैदराबाद संस्थान म्हणजे मूर्तिमंत मध्ययुगीन सरंजामशाहीचा अवशेष ! वैचारिक प्रगतीपासून खूप दूर. कालविसंगत ! त्रावणकोर व म्हैसूरमध्ये जरा तरी नागरी स्वातंत्र्य आणि राजकीय हालचाली करण्याची अल्पशी संधी लाभत असे. इथे मात्र नाही. सविनय कायदेभंग आंदोलन स्थगित केल्यावर तेथील संस्थानिकांनीही पुच्छगमन केले व स्वातंत्र्याचा संकोच केला. तथापि नेहरूंनी म्हटल्याप्रमाणे, निजामाने पुच्छगमन करण्याचा प्रश्नच नव्हता, कारण त्याने कधीच एक पाऊल पुढे टाकले नव्हते. हैदराबादमध्ये राजकीय सभा भरवणे अशक्य होते. धार्मिक वा सामाजिक समारंभासाठीही सत्ताधीशांची लेखी संमती घ्यावी लागे. तीही अनेक वेळा मिळत नसे. वर्तमानपत्र म्हणण्याच्या लायकीचे एकही पत्रक, भारतात सर्वात मोठ्या असलेल्या हैदराबाद संस्थानात नव्हते. भारतात **केसरी, बाँबे क्रॉनिकल, द हिंदू** यासारख्या पत्रकांना ब्रिटिशांनी अटकाव घातला नव्हता. तथापि इथे मात्र त्यांना मज्जाव होता. वर्तमानपत्रांद्वारे संस्थानात वैचारिक 'विषाणू' पसरू नये यासाठी येथील प्रशासन सदैव सतर्क असे. नेहरू पुढे लिहितात, "So strict is this policy of exclusion that even Moderate journals are excluded."

१९३४ साली महात्मा गांधी राजकीय चळवळ पेटवण्यासाठी हैदराबादेत गेले नव्हते. वस्तुतः तो त्यांचा हरिजन दौरा होता. २ ऑक्टोबरला गांधी जयंती साजरी करण्यासाठी व त्यांचा सत्कार करण्याकरिता हैदराबादच्या हरिजन सेवक संघाने तेथील विवेकवर्धिनी सभागृहात सभेचे आयोजन केले होते. तथापि प्रशासनाने

अगदी क्षुल्लक कारणावरून २४ तास आधी नोटीस देऊन गांधीजींची सभा घेण्यावर बंदी घातली. हैदराबादेत अगदी स्वतःचे घर असलेल्या सरोजिनी नायडू यांनाही स्वगृही येण्यास काही वर्षे निजामाने मज्जाव केला होता. तसेच मुस्लीम लीगचे पुढारी महंमद अली जिना यांनाही संस्थानात प्रवेश नाकारला होता.[१]

हिंदुस्तानातील एकूण ५६२ संस्थानांपैकी १०८ संस्थाने पहिल्या दर्जाची मानली जात. त्यापैकी केवळ ३० संस्थानांमध्ये कायदामंडळे होती. मात्र त्यांना अधिकार नव्हते. एकूणपैकी पुढील २२ संस्थाने महाराष्ट्राशी संबंधित होती :– जव्हार, जंजिरा, सुरगाणा, डांग, सावंतवाडी, सावनूर, कोल्हापूर, कोल्हापूरच्या जहागिरी, औंध, भोर, फलटण, अक्कलकोट, जत, सांगली, मिरज, मिरजमळा, मुधोळ, जमखिंडी, रामदुर्ग, कुरुंदवाड (मोठी व धाकटी पाती), हैदराबाद आणि सोंडूर. त्यांतील काही आजच्या महाराष्ट्रात समाविष्ट नाहीत.[२]

## हैदराबादमधील सरंजामशाही

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर (१७०७) मुघल बादशहा कमजोर झाले व सुभेदार कमरुद्दीन याने १७२४ साली मुघलांचा विश्वासघात केला. त्याने आपले स्वतंत्र राज्य व सुलतानपद जाहीर केले. त्याने आसफजाह हा किताब धारण केला व राज्यविस्तार केला. मात्र नंतरचा कोणीही निजाम राज्यविस्तार करू शकला नाही. आसफजाह याने 'निजाम-उल-मुल्क' म्हणजे देशाचे प्रशासन चालविणारा सत्ताधीश हा जुना किताब चालू ठेवला. या आसफजाही घराण्याचा सातवा वंशज 'आला हजरत मीर उस्मान अहमद अली खान' हे लांबलचक नाव धारण केलेला माणूस हिंदुस्तान देश स्वतंत्र झाल्यावरही दक्षिणेत एक समर्थ इस्लामी सार्वभौम राज्य, म्हणजे एक अस्सल 'पाकिस्तान आणि मुस्लीम संस्कृतीचे आदर्श केंद्र' निर्माण करण्याचे मनसुबे रचत होता. त्याला 'खलिफा' म्हणजे धर्मगुरू होण्याचीही मनीषा होती.

अफाट राजकीय महत्त्वाकांक्षा आणि आत्मगौरवाच्या मनोविकृतीने बाधित झालेला सातवा व शेवटचा निजाम ऑगस्ट १९११ मध्ये सत्तारूढ झाला होता. तेव्हापासूनच आपला दर्जा ब्रिटिश सम्राटाच्या बरोबरीचा आहे असा त्याचा ठाम

समज होता. आपण बादशहा पाचवे जॉर्ज यांच्या बरोबरीचे असल्यामुळे हैदराबादमध्ये ब्रिटिश रिजंट असूच नये, असा त्याचा दावा होता. म्हणून हा निजाम अधिकारारूढ झाल्यावर केवळ दोनच महिन्यांत म्हणजे ऑक्टोबरमध्ये व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंज यांनी त्याला समज देण्यासाठी एक खलिता पाठविला. त्यात निजामास निक्षून सांगितले की, ‘‘दोन वर्षे आम्ही तुमची परीक्षा पाहू व तुमच्या राज्यकारभाराचे संनिरीक्षण करू. त्यानंतर मात्र हिंदुस्तान सरकारला वाटले तर आम्ही रिजंटची नेमणूक करू ’’. याचा अर्थ, त्याची नेमणूक बिनशर्त नसून प्रोबेशनरी स्वरूपाची होती. तरीही निजामाची अरेरावी चालूच राहिली. त्या कारणाने १९१९ साली व्हाइसरॉय लॉर्ड चेम्सफर्ड यांनी निजामाला ताकीद दिली की, ‘‘तुम्ही शिस्तीनुसार राज्य न केल्यास आम्ही तुमची अरेरावी मुळीच सहन करणार नाही. तुमच्या राज्यकारभारात हस्तक्षेप करण्याचा आमचा सार्वभौम अधिकार बजावल्यावाचून आम्ही राहणार नाही.’’

पहिल्या महायुद्धात इंग्रजांनी निजामाचे सेनादल तसेच वित्तबळ व साधनसामग्री आणि अन्नधान्याचा पुरेपूर उपयोग करून घेतला. तथापि महायुद्ध संपताच निजामाला वठणीवर आणण्याचे उपाय योजिले व आपल्या सर्वाधिकारशाहीचा इंगा दाखवला. म्हणून स्वतः उस्मान अलीने २८ जुलै १९१९ रोजी सादर केलेल्या निवेदनात कबूल केले की, “As regards the appointment of a Minister, he had to consult the Resident and obtain the consent of the Government of India”. हैदराबादचा इंग्रज रेसिडंट विल्यम बार्टन यानेही १९२६ साली व्हाइसरॉयकडे पाठविलेल्या निवेदनात सविस्तरपणे लिहिले होते की, केवळ ब्रिटिशांच्या संरक्षणामुळेच निजाम संस्थान तग धरून राहू शकले. पेशवे व इतर देशी सत्ताधीशांनाही निजाम नेहमीच परकीय वाटत होता. इंग्रजांची मदत नसती तर मराठ्यांनी निजामाचा निभाव लागू दिला नसता.[३]

इंग्रज उस्मान अलीच्या महत्त्वाकांक्षेला आवर घालण्याचे प्रयत्न मधूनमधून करीत असत. १९१९ साली इंग्रजांनी त्याला मंत्रिमंडळासारखे कार्यकारी मंडळ

आणि त्याचा प्रमुख म्हणून पंतप्रधान नेमावा, अशी व्यवस्था स्वीकारावयास भाग पाडले. या व्यवस्थेत इंग्रजांनी ब्रिटिशनिष्ठ सर अली इमामची पंतप्रधानपदी नेमणूक केली होती.

तरीही १९२२ पासून उस्मान अलीने स्वतंत्र हैदराबादचा 'स्वातंत्र्य दिन' साजरा करण्याची प्रथा सुरू केली. मुसलमानांचे खलिफा पदच्युत होऊन फ्रान्समध्ये स्थायिक झाल्यावर त्यांच्या दोन्ही मुलींना निजामाने स्नुषा करून घेतले. शिवाय जगातील मुसलमानांचे खलिफा (धर्मगुरू) होण्याची निजामाने इच्छा व्यक्त केली. इथेच न थांबता निजामाने २० सप्टेंबर १९२५ रोजी व्हाइसरॉय लॉर्ड रीडिंग यांना एक ऐतिहासिक निवेदन पाठविले. त्यातील मतलब पाहा :– "हैदराबाद व ब्रिटिश सरकार यांच्या दरम्यान जे करार झाले ते दोन समान पक्षांमध्ये झाले आहेत. सबब मी (म्हणजे निजाम) इंग्रजांइतकाच सार्वभौम आहे. हैदराबादेत इंग्रज सेना कायम तैनात करण्यासाठी पूर्वी जो खर्च करावा लागला तो व झालेल्या कर्जाची परतफेड म्हणून आम्ही सर्व देय रक्कम दिलेली आहे. म्हणून आमचा वऱ्हाड प्रांत व दक्षिणेकडचे उत्तरी सरकारचे जिल्हे म्हणजे मच्छलीपट्टण वगैरे भाग आता तुम्ही मला परत करावा....". इंग्रजांना हे सहन होणे शक्यच नव्हते. त्यानुसार व्हाइसरॉय रीडिंगने निजामाला दम भरला आणि बजावले की, "तुम्ही सार्वभौम वगैरे काही नाहीत. इतरांसारखेच एक मांडलिक आहात. इंग्रज नसते तर तुम्ही शिल्लक राहिला नसता. तुमची व इंग्रजांची कोणत्याही प्रकारे बरोबरी होऊच शकत नाही, हे लक्षात ठेवा व पूर्वीसारखेच अदबीने वागत चला."[४]

स्वतः निजाम मांडलिक असूनही १९२१ पासून त्याने प्रजेच्या नागरी अधिकारांवर कडक बंधने लादण्यास प्रारंभ केला. त्याने गश्ती निशाण ५२ व ५३ या नावाच्या दोन आदेशांनुसार (१९२१) सभा, संमेलने व मिरवणुकींवर सक्त बंधने लादली. निजामाने खासगी शाळा, ग्रंथालये अथवा व्यायामशाळा काढण्यावर कडक बंधने घातली. दडपशाहीचा अंमल सुरू केला. त्याने नागरी हक्कांची पायमल्ली, सत्तेचे केंद्रीकरण आणि राज्यकारभारात उघड पक्षपात व दंडशक्तीचा बेदरकार वापर सुरू केला. याबरोबरच १९१८ साली उस्मान अलीने आपल्या राज्यारोहणाच्या

स्मृत्यर्थ हैद्राबादमध्ये उस्मानिया विद्यापीठ सुरू केले. तथापि यामागे त्याचा मुख्य उद्देश होता की, आपल्या वंशाचे राज्य चिरकाल टिकावे व आपण या देशातील खलिफा म्हणजे पैगंबराचे प्रतिनिधी बनावे.

## अंधारातील उजेडाची तिरीप

एकोणिसाव्या शतकातील पूर्वोक्त सबाल्टर्न उठवांच्या पार्श्वभूमीवर मराठवाड्यात काँग्रेसपूर्वी आर्यसमाजाचे आगमन झालेले होते. बीड जिल्ह्यातील धारूर गावी १८९१ साली आर्यसमाजाची पहिली शाखा स्थापन झाली. लगेच १८९२ सालात हैदराबाद शहरात या संघटनेची दुसरी शाखा कार्यरत झाली. तेव्हापासून आर्यसमाजाने या संस्थानात हिंदुधर्माच्या संरक्षणासाठी आणि धर्मांतर झालेल्यांच्या शुद्धीकरणाकरिता मोहीम उभारली होती. निजामाच्या इस्लामधार्जिण्या धोरणामुळे आणि इस्लामच्या प्रचारकांमुळे येथील हिंदू प्रजेला धार्मिक संरक्षणाची गरज आहे असा आर्यसमाजाचा दावा होता. पण त्यापेक्षाही हिंदू प्रजेवरील निर्बंध शिथिल करून घेण्याकरिता संघटनात्मक पातळीवरून प्रयत्न करण्याची गरज होती. त्यादृष्टीने आर्यसमाजाने प्रशासनाकडे रास्त मागण्या करण्यावर भर दिला. प्रारंभी ही राजकीय संघटना नव्हती. मात्र आर्यसमाजाने अनेक वाचनालये, व्यायामशाळा, मंडळे आणि खासगी शाळा स्थापन केल्या होत्या.

महाराष्ट्रातील गणेशोत्सव आणि स्वदेशीच्या चळवळींचा संस्थानात मंदगतीने प्रचार होऊ लागला. स्वराज्यासाठी प्रयत्न करण्यापूर्वी धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक उद्‌बोधन करण्याचा तो काळ होता. विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात गोपाळ कृष्ण गोखले आणि लोकमान्य टिळकांचा लहानसा चाहता वर्ग हैदराबाद संस्थानात उदय पावला. आर्यसमाजाच्या निमित्ताने आणि गोखले-टिळकांकडून प्रेरणा घेऊन हैदराबादेत प्रथमच सार्वजनिक जीवन आकार घेऊ लागले. टिळकांचा औरंगाबादमध्ये चार-पाच दिवस मुक्काम असताना त्यांच्या प्रेरणेने आणि आर्यसमाजाच्या प्रयत्नांमुळे काही वाचनालये व खासगी शाळा स्थापन झाल्या. त्या काळी उस्मानाबाद व नांदेड जिल्ह्यांमध्ये आर्यसमाज क्रियाशील असल्याचे पुरावे हैदराबादच्या पुराभिलेखागारात प्रस्तुत इतिहासकारास

आढळले. विशेषतः भारताच्या स्वदेशी चळवळीच्या काळात संपूर्ण मराठवाड्यात अगणित संन्यासी स्वदेशीचा प्रचार करताना राजद्रोह पसरवत आहेत, असे गुप्तचरांचे अहवालही आढळून आले.

बंगालच्या फाळणीमुळे भारतभर लोकक्षोभ पसरला होता. त्याचे एक अपत्य म्हणून राष्ट्रीय शिक्षण जन्माला आले. या लाटेला प्रतिकार करण्यासाठी इंग्रजांनी आणि निजामानेदेखील कायदे करून विद्यार्थी वर्गाला राजकीय चळवळीपासून लांब ठेवण्याचे प्रयत्न केले. मात्र याची प्रतिक्रिया म्हणून युवकांची मानसिकता अधिकच सरकारविरुद्ध झाली. शिवाय इंग्रजांनी निजामाकडून हस्तगत केलेला वऱ्हाड प्रांत महाराष्ट्राला न जोडता मागास असलेल्या हिंदी भाषिक मध्यप्रांतात विलीन केला. त्यामुळे दुखावलेले वऱ्हाडकर इंग्रजांच्या विरोधात गेले आणि मराठवाड्यातील कार्यकर्त्यांच्या चळवळीला थोडेफार उत्तेजन देऊ लागले.

परभणी जिल्ह्यातील केशवराव कोरटकर व वामनराव नाईक यांनी सामाजिक परिषद, हिंदू स्टँडिंग कमिटी, जनता शिक्षण परिषद, रिफॉर्म्स असोसिएशन अशा नेमस्त संघटना स्थापन केल्या. विवेकवर्धिनी (हैदराबाद) व नूतन विद्यालय (गुलबर्गा) या शाळा काढल्यावर संस्थानात शिक्षणाचा मार्ग थोडा तरी खुला झाला. कोरटकर व नाईकांनंतर राघवेंद्रराव शर्मा, पं. श्रीपाद दामोदर सातवळेकर, दत्तो अप्पाजी तुळजापूरकर, लक्ष्मणराव फाटक, दिगंबरराव बिंदू, काशीनाथराव वैद्य, रामचंद्र अंतू, लक्ष्मण गानू व श्रीधर नाईक या मराठी पुढाऱ्यांची पिढी उदय पावली. सरोजिनी नायडू व क्रांतिकारक वीरेंद्रनाथ चट्टोपाध्याय यांचे वडील अघोरनाथ यांच्याकडे तर सर्वच सार्वजनिक कार्याचे नेतृत्व होते. तेव्हापासून प्रबोधन कार्याचा प्रारंभ झाला.

निजामी राजवटीविरुद्धचा असंतोष प्रकट करण्यासाठी १९१८ पासून मराठवाड्यात 'सामाजिक परिषद' हे कोवळेसे माध्यम उदय पावले. सामाजिक परिषदेचे पहिले अधिवेशन १९१८ साली कवाना गावी (नांदेड जिल्हा) भरले. मात्र त्यात मराठवाड्यापेक्षा विदर्भातील सभासदांचाच अधिक मोठा सहभाग होता. या अधिवेशनाचे श्रेय कोरटकर, नाईक व राघवेंद्रराव शर्मा (मराठी भाषिक) यांना

देय ठरते. परिषदेचे दुसरे अधिवेशन १९१९ साली हदगाव (नांदेड जिल्हा) येथे कोरटकरांच्या अध्यक्षतेखाली भरले. तिसरे अधिवेशन वामनराव नाईकांच्या अध्यक्षतेखाली नांदेडला संपन्न झाले. ११ नोव्हेंबर १९२१ ला हैदराबादेत भरलेल्या चौथ्या सामाजिक परिषदेचे अध्यक्षपद समाजसुधारक महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी भूषविले. पाचव्या व सहाव्या अधिवेशनांचा मान बॅ. मुकुंदराव जयकर आणि सरला राणी चौधरी यांना लाभला. ही अधिवेशने अनुक्रमे गुलबर्गा व हैदराबादमध्ये भरली होती. याद्वारे मंदगतीने उद्‌बोधन सुरू झाले.

वस्तुतः ब्रिटिश व निजाम यांच्यातील राजकीय संबंधांमध्ये अनेक प्रकारची विसंगती व परस्पर विरोध होता. परंतु त्या ताणतणावांचा लाभ जनता अथवा नेत्यांना झाला नाही. याउलट त्या दोन सत्ताधीशांमधील अन्योन्य संबंधांमुळे जनतेवर अतिरिक्त ओझे लादले गेले. हेच पाहा ना. 'इस्लामी स्टेट' आणि आसफिया घराण्याची राजसत्ता शाश्वत ठेवण्याचा प्रयत्न करत असलेल्या निजामाची सेना पहिल्या जागतिक महायुद्धात तुर्कस्तानच्या मुसलमानांविरुद्ध लढली. या सेनेने स्वधर्मीयांचे प्राण घेतले आणि तुर्की सेनेकडून मारही खाल्ला.

दैवदुर्गती अशी की, "महायुद्धात इंग्रजांचे प्राण वाचावे व त्यांना अल्लाचे वरदान लाभावे, यासाठी संस्थानातील प्रत्येक मशिदीत मुसलमानांनी खास प्रार्थना कराव्या," असा निजामाने फतवा काढला होता. ब्रिटिशांनी महायुद्धासाठी निजामाकडून प्रचंड वित्तबळ, साधनसामग्री व अन्नधान्य हस्तगत केले. त्याचे सेनादल व रेल्वेसेवा मोफत वापरली. अर्थातच हा सर्व पैसा प्रजेकडून घेतलेला होता. मात्र निजामाच्या या 'कर्तबगारीचे' बक्षीस म्हणून बादशहा पाचवे जॉर्ज यांनी त्यास सर्वोच्च किताब दिला– 'हिज एक्झॉल्टेड हायनेस, फेथफूल अलाय ऑफ ब्रिटिश गव्हर्मेंट'. तथापि युद्ध संपल्यावर लगेच संस्थानाच्या कारभारात हस्तक्षेप करून इंग्रजांनी निजामाला वठणीवर आणण्यास सुरुवात केली.

हा सर्व प्रकार प्रजा अगतिकपणे पाहत होती. सामाजिक परिषदेच्या उपरोक्त सहा अधिवेशनांमध्ये राजकीयपेक्षा केवळ सामाजिक विषयांवरच चर्चा होत राहिली. प्रत्येक अधिवेशनात राजनिष्ठेचा ठराव पास करणे अनिवार्य होते.

हुंडाबंदी, मद्यपाननिषेध व कन्या-विक्रयाचा निषेध, स्त्री शिक्षण व अस्पृश्यतानिवारण अशा विषयांवर ठराव करण्यात येत. याबाबतची अंमलबजावणी मात्र फारच थोडी झाली. सामाजिक सुधारणाही अत्यल्पच झाली.

हैदराबाद शिक्षण परिषदेची अधिवेशने हैदराबाद शहर (१९१६), लातूर (१९१९) व परभणी (१९२०) येथे झाली. तथापि सरकारने त्यांना शासकीय स्वरूप दिल्याने त्यातून फारशी फलप्राप्ती झाली नाही. परिषदेत उर्दू भाषेच्या सक्तीला विरोध झाला. माध्यमिक शिक्षण मातृभाषेतून व त्यापुढे उर्दूबरोबरच इंग्रजी माध्यम अनुज्ञेय असावे, ही परिषदेची एक मागणी होती. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत असावे अशी दुसरी मागणी करण्यात आली. मात्र या मागण्या मान्य झाल्या नाहीत. शिवाय १९२० पासून ही परिषद लुप्त झाली.

निजामाशी प्रत्यक्ष संघर्ष, लढा नव्हेच, करण्याचा क्षण अद्याप आलेला नव्हता. नेत्यांमध्ये तितकी ताकद आलेली नव्हती. सरकारच्या जातीय व भाषिक आक्रमणाचा प्रतिकार व हक्कांची जाणीव इतकीच वाटचाल होती. टिळकांच्या प्रेरणेने मराठवाड्यात गणेशोत्सव मोहीम सुरू झाली. तथापि सरकारी निर्बंध कडक असल्याने तिला चळवळीचे रूप आले नाहीच.

विशेष म्हणजे १९१९ साली फक्त दीड दिवस गांधीजी हैदराबाद संस्थानात फिरले. **मात्र या अल्पशा वास्तव्यात महात्मा गांधी यांनी तब्बल दहा वर्षांचे जागृती कार्य केले, असा अभिप्राय अनंत भालेराव यांनी दिलेला आहे.** गांधीजींची ही भेट निजामाला फारच महाग पडली होती. कारण या भेटीमुळे संस्थानात ब्रिटिशांच्या विरोधातील खिलाफत चळवळ पसरली. गांधीजींना चाहणारा एक वर्ग इथे उदय पावला. १९२० व १९२१ मध्ये खिलाफतीच्या पाठोपाठ असहकार चळवळ रुजण्यास अनुकूल वातावरण निर्माण झाले. संस्थानातील कित्येक नामवंत मुसलमान या चळवळीत सामील झाले. या काळात हिंदू व मुसलमानांमध्ये विशाल ऐक्याचे नवे आशादायक चित्र दिसू लागले. संस्थानातील या धर्मीयांमधील ऐक्यभाव व गांधीजींचा वाढता प्रभाव पाहून सार्वभौम ब्रिटिश सरकारलाही धक्का बसला होता. म्हणून ही चळवळ नष्ट

करण्यासाठी मध्यवर्ती सरकारने निजामाला खलिता पाठविला व चळवळ दडपण्यासाठी सर्वतोपरी उपाययोजना करण्याचा हुकूम दिला. त्या खलित्यात कडक दमबाजीची भाषा होती. त्यानुसार निजामाने कित्येकांना अटक केली, तर काही जणांना नोकऱ्या दिल्या अथवा आमिषे दाखविली. **(भालेराव, हैदराबादचा स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा,** पृ. ५८**).** राष्ट्रीय काँग्रेसची एक शाखा हैदराबादमध्ये १९१८ साली स्थानापन्न झालेली होती. मात्र १९२० पासून तिच्याही हालचालींवर कडक नजर ठेवण्यात आली.

या संस्थानातील जातीय व राष्ट्रीय राजकारणाच्या सीमारेषा खूपच धूसर असून एकमेकीत मिसळलेल्या होत्या. हा दुबळेपणा राष्ट्रीय काँग्रेसला नेहमीच दुःखद वाटत असे. मराठवाड्यातील कित्येक काँग्रेस कार्यकर्ते हिंदुमहासभेतही होते. ऑगस्ट १९२३ मध्ये मदन मोहन मालवीय यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या हिंदुमहासभेच्या अधिवेशनात प्रतिनिधी म्हणून वामनराव नाईक, राघवेंद्र शर्मा, कृष्णस्वामी राय, विश्वेश्वरनाथ व औरंगाबादचे दिगंबरदास चौधरी वकील हजर होते.

**वऱ्हाड प्रकरण :—**थोडे विषयांतर करून सांगायला हवे की, वऱ्हाड प्रांत निजामाला स्वतःकडे हवा होता, तर इंग्रजांनी तो निजामाकडून हस्तगत केलेला होता. मात्र वऱ्हाड महाराष्ट्रात विलीन न करता मध्यप्रांताच्या मागास भागाशी त्याची सोयरीक करण्यात लॉर्ड कर्झनची धूर्त राजनीती होती. या इतिहासाच्या **खंड क्र. एकमध्ये** विवेचन केल्याप्रमाणे गो. कृ. गोखले व टिळकांच्या जागृत महाराष्ट्रात वऱ्हाड विलीन केल्यास तेथे राजकीय जागृती होईल, अशी कर्झन, गृह सचिव व सनदी नोकरशाहीला भीती वाटत होती. म्हणून बंगालच्या फाळणीबरोबरच वऱ्हाडचाही त्यांनी निर्णय घेतला होता. पुढील काळात ब्रिजलाल बियाणी, पु. ब. गोळे वगैरे काँग्रेस नेते स्वतंत्र वऱ्हाड प्रांताची मागणी करू लागले. याबाबत प्रांतिक तसेच मध्यवर्ती कायदेमंडळातही बरीच चर्चा झाली होती. तथापि निजाम मीर उस्मान अहमद अली वऱ्हाड प्रांत परत मिळविण्यासाठी खटपटी करू लागला.

वऱ्हाडच्या प्रकरणाचा पूर्वेतिहास असा की, ईस्ट इंडिया कंपनीकडून निजामाने घेतलेल्या ४३ लाखांच्या कर्जाची परतफेड निजामाने न केल्यामुळे १८५३ साली त्याला वऱ्हाडचा सुपीक प्रदेश कंपनीला एका तहानुसार अभ्यर्पित करावा लागला होता. लॉर्ड कर्झन व्हाइसरॉय असताना १९०२ साली दुसरा तह झाला. या तहानुसार इंग्रजांनी वऱ्हाड प्रांत कायमचा अभ्यर्पित करून घेतला. मात्र इंग्रज सरकार मूळ मालकीहक्काच्या बदल्यात निजामाला २५ लाख रुपये दरवर्षी देऊ लागले. मुळातच हा तह निजामाला लॉर्ड कर्झनच्या प्रचंड दबावाखाली अगदी अगतिकपणे स्वीकारावा लागला होता. यानंतर निजामाने व्हाइसरॉय लॉर्ड रीडिंग यांना २५ ऑक्टोबर १९२३ रोजी पत्र पाठवून वऱ्हाड प्रांत आपणास परत द्या, अशी याचना केली. यानंतरही निजामाने रीडिंग यांना उपरोक्त २० सप्टेंबर १९२५ चे पत्र लिहिले. या पत्रास उत्तर देताना रीडिंग महोदयांनी २७ मार्च १९२६ रोजीच्या पत्राद्वारे निजामास त्याचा मांडलिक म्हणून दर्जा दाखवून दिला, त्याची जागा दाखवून दिली. ब्रिटनच्या अधिराज्यत्वाचा पुनरुच्चार केला. शिवाय दुसऱ्या खलित्याद्वारे व्हाइसरॉयने निजामाला सुनावले की, "वऱ्हाडमधील जनतेची निजामी राजवटीत, म्हणजे मोगलाईत राहण्याची मुळीच इच्छा नसून तेथील लोकांना ब्रिटिश राजवटीतच नांदावयाचे आहे." पतन पावत असलेल्या सरंजामशाहीवर असे आघात पडू लागले. निजामाला ब्रिटिश असे धमकावू लागले.[५]

**साहित्यसंस्था व राजकीय परिषदा :—**मराठवाड्यात खाजगी राष्ट्रीय शाळांनी स्वराज्य व देशप्रेमाची भावना जागृत ठेवण्याला बळ दिले. सरकारचा विरोध असूनही अनेकांनी तसे प्रयत्न केले. मराठी माध्यमातून शिक्षण देण्यास शासकीय यंत्रणा तयार नव्हती. या प्रांताच्या पाच जिल्ह्यांमध्ये १९१६ ते १९३५ दरम्यानच्या काळात केवळ सहा-सात खाजगी शाळा होत्या. शाळा काढण्यासाठी निजामाच्या मंत्रिमंडळाची परवानगी घ्यावी लागे. १९३५ नंतर मात्र अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मराठवाड्यात पंधरा-वीस शाळा निघाल्या. पुढील काळात स्वामी रामानंद तीर्थ आणि रा. गो. ऊर्फ बाबासाहेब परांजपे यांच्या प्रयासामुळे स्थापन झालेल्या शाळांमधून राष्ट्रीय प्रेरणा प्रसारित झाल्या. मराठवाडा मुक्ति-आंदोलनासाठी या शाळांनी कार्यकर्ते घडविले ; स्वातंत्र्यसैनिक तयार केले. मात्र

उर्दूच्या सक्तीमुळे मराठवाड्यात कन्याशाळांना वाव नव्हता. औरंगाबादची शारदा मंदिर कन्याशाळा आणि सुशीला दिवाण यांनी १९४२ साली लातुरात सुरू केलेली मुलींची शाळा यांनी या विभागात कन्याशिक्षणाचा खऱ्या अर्थी शुभारंभ केला. मराठवाड्यात शिक्षण व विशेषतः कन्याशिक्षणास उत्तेजन नव्हतेच.

राष्ट्रीय काँग्रेसच्या काकिनाडा अधिवेशनात (१९२३) निजामी राजवटीची दडपशाही व अरेरावी आणि प्रजेची अगतिकता व मुस्कटदाबी हे विषय प्रथमच राष्ट्रीय स्तरावर मांडण्यात आले. सरोजिनी नायडू यांनी या कामी बरेच उत्तेजन दिले. या काँग्रेस अधिवेशनाला जोडूनच काकिनाडात हैदराबाद राजकीय परिषद घेण्यात आली. तिच्यात झालेल्या निर्णयानुसार संस्थानाबाहेर राजकीय परिषदा घेण्याचे ठरले. हैदराबादच्या पहिल्या राजकीय परिषदेनंतर मुंबईत (१९२६) दुसरे अधिवेशन भरविण्यात आले. परिषदेचे तिसरे अधिवेशन पुण्यात १९२८ साली भरले, तर चौथे अधिवेशन अकोल्यात संपन्न झाले. पण पहिली तिन्ही अधिवेशने परिणामकारक ठरली नाहीत. तोपावेतो राजकारण अर्जविनंत्यांच्या पुढे गेले नव्हते. मात्र अकोल्यातील परिषदेने (१९३१) प्रथमच जबाबदार राज्यपद्धतीची मागणी केली होती. तथापि या मागणीला हैदराबाद संस्थानात प्रवेश करण्यास तब्बल सहा वर्षे लागली. त्यासाठी १९३७ साल उजाडावे लागले. दरम्यान १९२७ मध्ये स्थापन झालेल्या इत्तेहादूल मुस्लीमीन या इंडियन मुस्लीम लीगसदृश जातीय संघटनेने अत्यंत रौद्र आणि विद्वेषी स्वरूप धारण केले. अशा वातावरणात 'महाराष्ट्र परिषद' ही संघटना स्थापन करण्यात आली.

भारतात मार्च १९३० पासून सविनय कायदेभंग लढा जोरदारपणे पसरलेला असताना, संस्थानात लढा सुरू होऊ देऊ नये, अशी व्हाइसरॉय आयर्विन यांनी निजामाला ताकीद दिली होती. त्यानुसार निजामाने बंदी हुकूम काढले होते. संस्थानी प्रजा असे हुकूम मोडण्यास समर्थ नसल्यामुळे या विभागात कायदेभंग लढा झाला नाही. दरम्यान सायमन आयोगाच्या शिफारसींच्या अनुसार गोलमेज परिषद भरविण्याची प्रक्रिया सुरू झाली. या परिषदेच्या आधीच सर अकबर

हैदरीचे शिष्टमंडळ सिमला व लंडनमध्ये जाऊन निजामाचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी ब्रिटिशांशी वाटाघाटी करीत होते. तेव्हा ब्रिटिशांना वाटत होते की, हैदराबाद संस्थानाने ब्रिटिश हिंदुस्तानच्या भावी संघराज्यात सामील व्हावे. कारण त्यामुळे संघराज्याच्या इतर घटक प्रांतांना हैदराबादच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करता येणार नाही. शिवाय इतर घटक प्रांतांबरोबर सलोख्याचे आर्थिक संबंध राहतील आणि निजामाला संघराज्यातील सर्व मुसलमानांचे नेतेपद लाभू शकेल, असा आयर्विनचा सल्ला होता. १२ नोव्हेंबर १९३० रोजी लंडनमध्ये गोलमेज परिषदेचे पहिले सत्र झाले. तेव्हा हैदराबादच्या शिष्टमंडळाचे नेते अकबर हैदरी होते. देशात राज्यपद्धतीबाबतची नवी योजना आखली गेल्यास त्यांनी इंग्रजांना सर्व मदत देण्याची तयारी दाखवली होती. तथापि ऑक्टोबर १९३१ मध्ये हैदरींनी आपली भूमिका बदलली. आणि संघराज्यात सामील होण्यास संस्थान तयार नाही, असे सरकारला सांगितले. शब्दच्छल करून वेळ निभावून नेणे हे हैदरींचे धोरण होते.

## महाराष्ट्र परिषद

भारतात १९३५ चा सांविधानिक कायदा व प्रांतिक स्वायत्ततेचे आगमन होत असल्याचे दिसताच, संस्थानातील प्रजेच्या नेत्यांचे मनोधैर्य वाढले. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण झाला. प्रांतातील अनेक कार्यकर्ते १९३६ च्या फैजपूर काँग्रेसच्या ऐतिहासिक ठरावांमुळे प्रभावित झाले. ते तिथे महात्मा गांधी, नेहरू, पटेल, एम. एन. रॉय, साने गुरुजी, मेहेरअली वगैरेंना भेटल्यामुळे त्यांच्यात नवीन बळ व आशा निर्माण झाल्या. फैजपूरला संपन्न झालेल्या अखिल भारतीय किसान परिषदेच्या अधिवेशनाचा संदेश अनेकांच्या मनावर प्रभाव पाडून गेला. अशा वातावरणात मराठवाड्यात नवे नेतृत्व उदय पावले.

पुण्यातील टिळक विद्यापीठ या राष्ट्रीय महाविद्यालयाचे पदवीधर असलेले व्यंकटेश खेडगीकर म्हणजेच स्वामी रामानंद तीर्थ यांनी नेतृत्वातील पोकळी भरून काढून मराठवाड्याचे नेतेपद स्वीकारले. तत्पूर्वी तुळजापूर तालुक्यातील हिप्परगा गावी ते राष्ट्रीय शाळा चालवत व राष्ट्रवादी प्रबोधन करीत होते. त्यांचे

सहकारी शिक्षक रामचंद्र गोविंद ऊर्फ बाबासाहेब परांजपे, देवीसिंग चौहान, राघवेंद्र दिवाण यांनी नंतर अंबेजोगाई येथेही शाळा चालवतानाच राष्ट्रवादाचा प्रसार केला. तसेच आनंद कृष्ण वाघमारे (**मराठवाडा** साप्ताहिक पुण्यातून चालविणारे) आणि अनंतराव कुलकर्णी यांनीही चळवळीस योगदान दिले. या सर्व कार्यकर्त्यांनी मराठवाड्यातील युवकांना संघटित केले. अशा युवकांमध्ये संघटनाकुशल असलेले गोविंददास श्रॉफ प्रमुख होते. त्या तरुणांमध्ये विनोबा भावे यांचे शिष्य अच्युतराव देशपांडे आणि स. कृ. वैशंपायन, डी. एल. पाठक, लक्ष्मणराव वाळुंजकर, दामोदरदास मुंदडा व नंतर कम्युनिस्ट झालेले व्ही. डी. देशपांडे यांचाही समावेश होता. याव्यतिरिक्त नाशिकचे द. शं. पोतनीस, दत्तोपंत बीडकर व रामभाऊ कडेपूरकर हेही बाहेरून उत्तेजन देत असत. रामानंद तीर्थ व बाबासाहेब परांजपे हे दोघेही अविवाहित होते. या सुमारास राष्ट्रवादी चळवळीस अनेक कार्यकर्ते योगदान देऊ लागले. त्यांच्यात पुढील मान्यवरांचा समावेश करावा लागेल :– गोविंदराव नानल (परभणी), माणिकचंद पहाडे, श्रीनिवास बोरीकर, श्रीधर वामन नाईक, विश्वनाथ रं. तुळजापूरकर, श्रीनिवास शर्मा, बॅ. श्रीधर नाईक, रामकृष्ण धूत, जनार्दन देसाई, रामचंद्र नांदापूरकर, नरहरी भूमकर, शंकर खानापूरकर, वसंत देशमुख, गुंदेराव अलमेलकर, मल्हार धोत्रीकर, अनंत देशमुख, व्यंकट बापूजी जोशी, विनायक प्रयाग, त्रिंबक नाईक, शंकर श्रीनिवास, हणुमंत लक्ष्मण, अनंत कुलकर्णी, गोपाळशास्त्री देव व काशीनाथराव वैद्य.[६]

गोविंदराव नानलांच्या अध्यक्षतेखाली १ ते ३ जून १९३७ रोजी महाराष्ट्र परिषदेचे पहिले अधिवेशन परतूरमध्ये भरले. त्यात किसानांच्या शोषणाविरुद्ध आवाज उठवण्यात आला. २ जून १९३८ रोजी लातूरला बॅ. श्रीनिवास शर्मा (मराठी भाषिक) यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या दुसऱ्या अधिवेशनासाठी परवानगी देताना कलेक्टरने जाचक अटी घातल्या होत्या. त्यांत अध्यक्ष व स्वागताध्यक्षांच्या भाषणांचा मसुदा तसेच अधिवेशनात चर्चा करावयाचे ठराव वगैरे प्रथम कलेक्टरला सादर करावे, आणि कलेक्टरने अनुमती दिलेल्या

स्वरूपातच सर्व मसुदे चर्चेला घेण्यात यावे, अशा अपमानकारक अटी होत्या. त्यानुसार अध्यक्ष व स्वागताध्यक्षांची मुद्रित भाषणे कलेक्टरकडे देण्यात आली. त्यांतील काही भाग आक्षेपार्ह ठरवून तो वाचू नये असा कलेक्टरने हुकूम दिला. गंमत अशी की, अध्यक्षांच्या भाषणाच्या प्रती मूळ स्वरूपातच वाटल्या गेल्या आणि त्यातील काय वाचू नये, हे सांगावे लागले. म्हणजे सरकारने कशावर आक्षेप घेतले हे उघड झाले. कलेक्टर कार्यालयाचा हा अजागळपणा उघड झाला. संस्थानात झालेल्या दंग्यांची निःपक्षपाती चौकशी व्हावी, यासाठीचा ठराव मांडण्यावर बंदी घातली होती. इतकेच नव्हे तर अधिवेशनात झेंडावंदनासाठी वेगळी परवानगी घ्यावी लागेल, असा कलेक्टरने अभिप्राय दिला, आणि तोही शेवटच्या क्षणी! अशा परिस्थितीत चिडलेल्या प्रतिनिधींनी अधिवेशन स्थगित करून प्रशासनाचा निषेध करण्याचा आग्रह धरला. निषेध म्हणून अधिवेशन स्थगितच करावे, या बाजूने १३३ प्रतिनिधींनी मत दिले, तर केवळ ११ जण तडजोडीस अनुकूल होते. प्रशासनाच्या अशा हटवादीपणामुळे लोकमत निजामाविरुद्ध जाण्यास मदत मात्र झाली.

यानंतर महाराष्ट्र परिषदेची अधिवेशने उमरी (१९४१), औरंगाबाद (१९४३), सेलू (१९४५) व लातूरमध्ये (१९४६) संपन्न झाली. महाराष्ट्र परिषदांची एक विशेषता अशी होती की, अध्यक्षांच्या भाषणांमध्ये प्रामुख्याने शेती व शेतकरी, सावकार व कर्जबाजारीपणा, संपूर्ण संस्थानासाठी एक राजकीय संघटना गठित करणे, हरिजन व अस्पृश्यतानिवारण कार्य व नागरी स्वातंत्र्य आणि निजामाच्या छत्राखाली जबाबदार राज्यपद्धती अमलात आणणे या विषयांचा समावेश होता. **लाहोर काँग्रेसची संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा (१९२९) अद्याप तिथे पोहचली नव्हती.**

निजामाच्या राजवटीत प्रशासनाच्या संरक्षणाखाली रोहिले आणि अरब सावकार कर्जदारांना हैराण करीत. शेतमालाचे भाव महाराष्ट्रापेक्षा कमी असत. नैसर्गिक आपत्तीच्या काळात शासन शेतकऱ्यांना कधीच अनुतोष वा मदत देत नसे. याविरुद्ध दिगंबरराव बिंदू व वाघमारे महाराष्ट्र परिषदांमध्ये आवाज उठवित. स्वातंत्र्य म्हणजे सर्वांगीण कल्याण साधणारी राज्यव्यवस्था, असा विचार मांडला जाई. सर्व पुढाऱ्यांना जाणीव होती की, हैदराबाद संस्थानातील विशिष्ट

परिस्थितीमुळे धर्मनिरपेक्षतेचे धोरण अनिवार्य असून व्यापक धोरण अनुसरणेच हितावह होय. त्यानुसार उमरीमधील परिषदेत गांधीजींचा विधायक कार्यक्रम स्वीकारला गेला. तरीही निजामाने महाराष्ट्र परिषदेला जातीय संघटनांच्या यादीत टाकले होते.

साहित्य परिषदा, सामाजिक संघटना व शिक्षणसंस्थांच्या विद्यमाने थोडे राजकीय अभिसरण सुरू असताना निजामाचा हटवादी विरोध वाढतच होता. वस्तुतः मुंबईचे वकील वीर नरिमन तेव्हा काँग्रेसच्या प्रवाहाबाहेर गेलेले होते. तरीही त्यांना संस्थानात येण्यास निजामाने मज्जाव केला. वस्तुतः बॅ. नरिमन दोन हिंदू मुलांच्या केवळ कायदेशीर बचावासाठी वकील म्हणून हैदराबादला जात होते. तेथील जातीय दंग्यात दोन मुसलमानांचा खून केल्याचा त्या युवकांवर असत्य आरोप होता. पण त्यांचे वकील म्हणून हैदराबादला येण्यासही नरिमन यांना मज्जाव करण्यात आला होता. नरिमन यांना प्रवेश नाकारण्याच्या या प्रकरणात नागरी स्वातंत्र्य, हिंदू प्रजेचे हक्क व कायदेशीर मदतीचा अधिकार हे अराजकीय प्रश्न गुंतलेले होते. तरीही हे प्रकरण निजामाच्या पंतप्रधानाकडे नेण्यात आले. पण त्यानेही न्याय दिला नाही. याउलट या प्रकरणी रास्त टीका करणाऱ्या **मराठवाडा, वैदिक संदेश** पत्रकांवर कारवाई करावी, अशी मागणी हैदराबादने मुंबई सरकारकडे केली होती. अर्थातच मुंबई सरकारने ती मागणी झिडकारली. हैदराबादमध्ये अशी दुःखद अथवा हास्यास्पद प्रकरणे नेहमीच घडत असत. काही काळ गांधीजींचा विश्वास संपादन केलेला पंतप्रधान सर अकबर हैदरी हा दांभिक राजकारणी माणूस वचन फिरवत असे, तर कधी विश्वासघातही करत असे. याविषयीचे अस्सल दस्तऐवज आम्ही प्रकाशित केलेले आहेत.[७]

## हैदराबाद स्टेट काँग्रेसवर बंदी

ब्रिटिश हिंदुस्तानात १९३७ साली निवडणुका होऊन मुंबई इलाखा, मध्यप्रांत-वऱ्हाड, मद्रास, संयुक्त प्रांत, बिहार, ओरिसा व वायव्य सरहद्द प्रांत येथे काँग्रेसची लोकनियुक्त मंत्रिमंडळे अधिकारावर आली. तर सिंध, पंजाब व बंगालमध्ये मुसलमान पुढाऱ्यांची मंत्रिमंडळे अस्तित्वात आली. लवकरच आसाममध्येही

कॉँग्रेस अधिकारारूढ झाली. प्रांतिक स्वायत्ततेचे हे स्वदेशी व मर्यादित लोकशाहीचे स्वरूप प्रजाजनांना खूपच सुखद वाटले. ब्रिटिश हिंदुस्तानमध्ये १९३० पासून २६ जानेवारी हा स्वातंत्र्य दिन उत्साहाने साजरा करण्यात येत असे. २६ जानेवारी १९३८ रोजीच्या मुक्त वातावरणात स्वातंत्र्य दिन सोहळा अधिक भव्य प्रमाणात संपन्न झाला. हिंदुस्तानात १९२७ पासून समाजवाद, मार्क्सवाद व साम्यवाद याविषयी विचारमंथन सुरू झालेले होते. कॉँग्रेसचे मुंबई अधिवेशन (१९३४) आणि लखनौ (१९३६) व फैजपूर (१९३६) येथील अधिवेशनांमध्ये हजर असलेल्या मराठवाड्यातील नेत्यांना हे विचारमंथन माहीत झालेले होते. भारतीयांच्या मूलभूत अधिकारांचा कराची कॉँग्रेसचा ठराव (१९३१ मार्च) सर्वश्रुत होता.

या पार्श्वभूमीवर हैदराबाद संस्थानातील अदमासे ५०० पुढारी व युवक फेब्रुवारी १९३८ च्या हरिपुरा कॉँग्रेसमध्ये सामील झाले. सुभाषचंद्र बोस अध्यक्ष असलेल्या या अधिवेशनात सर्वच संस्थानांमधील जनतेच्या हालअपेष्टा व प्रजा परिषदांचा संघर्ष, तेथील विशिष्ट समस्या इ. विषयांवर सविस्तर विचारमंथन झाले. तेव्हा त्रावणकोर व म्हैसुरातील प्रश्न अधिक चर्चेत होते. हैदराबादमध्ये वटहुकमांचे अधिराज्य निर्माण झालेले होते. खुद्द राष्ट्रीय कॉँग्रेसपुढे प्रचंड समस्या होत्या. निजाम संस्थानात धर्म, संस्कृती व राजकारणाच्या सीमारेषा धूसर झाल्या होत्या. आर्यसमाजाची चळवळ धर्मनिरपेक्ष नव्हती. अशा वातावरणात राष्ट्रीय कॉँग्रेसला संस्थानी प्रजेची चळवळ आपल्या अंगावर घेणे उचित वाटले नाही. म्हणून हरिपुरा येथे ठराव करण्यात आला की, ‘संस्थानी जनतेच्या प्रश्नांमध्ये राष्ट्रीय कॉँग्रेसने तूर्त प्रत्यक्षपणे हस्तक्षेप करू नये. तेथील जनतेने आत्मनिर्भर होऊन स्वसामर्थ्य संघटित करावे. तेथील स्वातंत्र्याची चळवळ तेथील लोकांनी सर्वस्वी स्वबळावरच उभारली पाहिजे.’

या ठरावामागे गांधीजींचा विचार होता. धर्मनिरपेक्ष नसलेल्या संस्थानी राजकारणात तूर्त कॉँग्रेसने ढवळाढवळ करू नये, तसेच तेथील चळवळ स्वाभाविकपणे आणि लोकसहभागातून उभी राहू द्यावी, असे गांधीजींचे मत होते. त्यावर अनेकांनी टीका केली होती. तथापि वस्तुस्थिती अशीच होती की, महात्मा गांधी संस्थानांच्या

व तेथील जनतेच्या प्रश्नांत स्वतः लक्ष घालतच असत. हैदराबादबाबत तर गांधीजींनी स्वतः कबूलच केले होते की, **'तेच हैदराबाद स्टेट काँग्रेसचे आणि तेथील जनतेचे नेतृत्व करतात.' स्टेट काँग्रेसची सर्व जबाबदारी त्यांनी निःसंकोचपणे स्वीकारली होती.**

महात्मा गांधी यांचे गुप्तदूत म्हणून सक्रिय असलेले जमनालाल बजाज व सरोजिनी नायडू १९३८ व १९३९ सालांत सतत अकबर हैदरींच्या संपर्कात असत. त्यांचा व अनेक इतरांचा पत्रव्यवहार, गांधीजींचे **हरिजन** पत्रकातील काही लेख व हैदराबादच्या पोलीस महासंचालकाचे गोपनीय अहवाल, हैदराबादच्या गुप्तचरांचे अहवाल आणि सर अकबर व बजाज यांची पत्रे व त्यांची मुलाखत तसेच मुंबई सरकार व मध्यवर्ती सरकार यांच्यातील पत्रव्यवहार वगैरे दुर्मिळ दस्तऐवज आम्ही १९९५ साली प्रकाशित केले. निजामाच्या सरकारने वस्तुस्थितीचा आणि सत्याचा विपर्यास करणारा अहवाल हिंदुस्तान सरकारकडे पाठवला होता. त्याचाही मी **सोर्स मटेरिअल फॉर हिस्टरी ऑफ फ्रीडम मुव्हमेंट** या ग्रंथात समावेश केलेला आहे. त्यातून सर्व वस्तुस्थिती दिसून येईल.[८]

दरम्यानच्या काळात हैदराबाद संस्थानच्या मराठी, तेलुगू व कन्नड विभागांमध्ये प्रांतिक परिषदा कार्यरत झाल्या. त्यांची एक संघटना घडविण्यासाठी महाराष्ट्र परिषदेने पुढाकार घेतला. शासनाची दमननीती व दंडशक्ती जोमाने कामाला लागली. रामानंद तीर्थ, वाघमारे व दिगंबर बिंदू हैदराबादेत एकत्र आले. उस्मानिया विद्यापीठातील हिंदू विद्यार्थी सक्रिय झाले. दुसऱ्या बाजूने सरकारच्या मदतीने इत्तेहादूल मुसलमीन ही जातीयवादी संघटना आक्रमक झाली. अशा वातावरणात २९ जून १९३८ रोजी हैदराबादेत काही नेत्यांनी एक बैठक घेतली. या बैठकीत रामानंद तीर्थ उपस्थित नव्हते. पण याच बैठकीत 'हैदराबाद स्टेट काँग्रेसची' स्थापना करण्यात आली. या संघटनेसाठी एक अस्थायी समिती निवडण्यात येऊन रामकिशन धूत यांना संयोजक नेमण्यात आले. या अस्थायी समितीत बी. रामकृष्णराव, सय्यद सिराजुल हसन तिरमिजी, माडपाटी हनुमंतराव, पांडुरंग जोशी व जी. रामाचारी होते. मात्र लवकरच जनार्दन देसाई, श्रीधर वामन नाईक,

हरिलाल वाघरे, रविनारायण रेड्डी, गोविंदराव नानल व हरिश्चंद्र हेडा यांना संलग्न सदस्य करून घेण्यात आले. अवघ्या एक महिन्याच्या आत या हंगामी समितीने १२०० प्राथमिक सभासद नोंदविले. तथापि समितीने रामानंद तीर्थ यांच्या गटाला एकाकी पाडले होते.

वस्तुतः अस्थायी समितीने ७ ऑगस्ट १९३८ रोजी प्रकाशित केलेल्या पक्षाच्या ध्येय व उद्देशांच्या निवेदनात स्पष्ट म्हटले होते की, " हैदराबाद स्टेट काँग्रेसचा उद्देश एच.ई.एच. द निजाम आणि आसफजाही घराणे यांच्या छायाछत्राखालीच लोकांनी 'जबाबदार राज्यपद्धती' संपादन करणे हा आहे. या उद्देशाची प्राप्ती शांततेच्या व न्यायाच्या मार्गांनीच करावयाची आहे. राष्ट्रीय ऐक्य वाढीला लागेल ; सार्वजनिक वृत्ती जोपासल्या जातील आणि देशाची बौद्धिक, नैतिक, आर्थिक आदी साधने विकास पावतील असे अवधान ठेवूनच या उद्देशासाठी झटावे लागणार आहे." राज्याच्या प्रगतीला बाधा आणणाऱ्या जातीय त्रांगड्याची कल्पना असल्यामुळे, समितीने सर्व जातिधर्मांमध्ये सामंजस्य व सामोपचार वाढीस लावण्याची व त्यांचे परस्परसंबंध दृढतर बनविण्याची गरज प्रतिपादन केली होती. तसेच जातीय तणाव व मतभेद मिटवण्यासाठी जोरदार आवाहन केले. तसेच जातीय संघटनेपेक्षा उच्चतम उद्दिष्ट्ये असणारी आणि जातिजमातींमध्ये सुसंवाद व सौहार्द निर्माण करणारी संघटना उभारणे हे स्टेट काँग्रेसचे ध्येय होय, असे जाहीर करण्यात आले.

यानंतर ५ सप्टेंबर १९३८ रोजी प्रसिद्ध केलेल्या उद्दिष्टांच्या पुनर्निवेदनात समितीने जाहीर केले की, "हैदराबाद स्टेट काँग्रेसचा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसशी कसलाच संबंध नाही. तसेच बाहेरच्या कोणत्याच संघटनेशी आमचा अधिकृत अथवा अनधिकृत संबंध असणार नाही. तसेच ही संघटना सदैव राजनिष्ठ राहून आसफजाही घराण्याशी एकनिष्ठ राहील. शिवाय जातीयताविहीन दृष्टिकोण सदैव समोर ठेवला जाईल." यानंतरही राज्यकर्त्यांच्या शंका-कुशंकांचे निरसन करण्यासाठी स्टेट काँग्रेसने जबाबदार राज्यपद्धतीबाबत खुलासा प्रसिद्ध केला. एक विस्तृत निवेदनही निर्गमित केले.[९]

पण हैदराबादमध्ये केवळ राजेशाही नव्हती. तिथे निजामाच्या जोडीला प्रबळ जातीय अल्पजनसत्ता म्हणजे ऑलिगार्की होती. अमीर-उमराव, मुसलमान सरंजामदार, जमीनदार आणि रोहिले व काबुली सावकारांचे हितसंबंध जोपासण्यासाठी काही प्रबळ माणसे राजसत्तेची सूत्रे हलवत असत. हे बहुतांश 'मध्ययुगीन व्यवस्थेचे' अवशेष होते. याव्यतिरिक्त राजाश्रयाखाली इत्तेहादूल मुसलमीन (मुस्लीमीन) ही आक्रमक संघटना कारवाया करतच असे. शिवाय ब्रिटिशांचे निजामाशी 'गिव्ह अँड टेक' आणि चुंबाचुंबीचे संबंध असत. मुळात निजामाला व या सर्व विरोधी घटकांना 'काँग्रेस' हा शब्दच तिरस्करणीय वाटत होता. ब्रिटिश राजवटीस जेरीस आणणाऱ्या राष्ट्रीय काँग्रेसवर त्यांचा राग होता. म्हणून राष्ट्रीय काँग्रेसची नुसती आठवण करून देणारीही संघटना आपल्या संस्थानात नको, असे त्यांचे म्हणणे होते. वरकरणी शिक्षणप्रेमी व तत्त्वज्ञानी वाटणारा कपटपटु पंतप्रधान अकबर हैदरी हासुद्धा या घटकांच्या दबावाखाली होता. तो सरंजामशाही विचारसरणीचा होता.

अस्थायी समितीने स्टेट काँग्रेसची घटना संमत करून घेण्यासाठी तसेच पक्षाची कार्यकारिणी नेमण्यासाठी ९ सप्टेंबर १९३८ रोजी सर्वसाधारण सभा भरवण्याचे ठरवले. त्याप्रमाणे खुलासा करून सर्व जातीजमातींच्या लोकांना सभेत सहभागी होण्याचे आवाहन केले. तथापि संकल्पित सभा भरण्यापूर्वीच ८ सप्टेंबरला निजामाने विशेष गॅझेट काढले. त्यानुसार सत्ताधीशांनी हैदराबाद स्टेट काँग्रेसवर बंदी घातली. यातील दुःखद बाब अशी की, संघटनेच्या नेत्यांनी धर्मनिरपेक्षतेचा निर्वाळा देऊनही व सर्व बाबींचा खुलासा करूनही जातीय राजसत्तेने गॅझेटमध्ये स्टेट काँग्रेसवर जातीयतेचा आरोप केला. ही संघटना जातीयवादी व घातपाती कारवाया करणारी असल्याचाही असत्य आरोप केला.

याबाबत महात्मा गांधींनी **हरिजन** च्या १७ सप्टेंबर १९३८ च्या अंकात लेख लिहून अकबर हैदरीच्या ढोंगी व प्रतिगामी वर्तनाचा निषेध केला. तसेच स्टेट काँग्रेस ही जातीयवादी संघटना नसल्याचा स्पष्ट निर्वाळा दिला. नंतर महाराष्ट्राचे राज्यपाल झालेल्या अली यावर जंग यांच्याशी सरदार पटेल व सरोजिनी नायडू

यांचीही चर्चा झाली होती. या सर्व प्रकारातून दिसते की, अकबर हैदरी व अली यावर जंग हे दोघेही एकाच वेळी अनेक डावपेच करीत होते आणि अनेक आघाड्या लढवीत होते. दोघेही संशयास्पद व संरजामशाहीचे घाणेरडे राजकारण करीत होते.

**सेनापती बापट सत्याग्रहात :—**महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्ष शंकरराव देव यांनी अकबर हैदरींना पत्राद्वारे इशारा दिला की, संस्थानातील जनतेच्या समस्या व आशाआकांक्षा याबाबत आम्हा सर्वांनाच स्वारस्य आहे. म्हणूनच त्यासाठी करावयाच्या चळवळीस महाराष्ट्राचा पाठिंबा असेल. त्यानुसार सेनापती बापटांनी आपला सत्याग्रही बाणा जाहीर करून एक पत्रक प्रकाशित केले. त्यात त्यांनी सत्याग्रहाचा निर्धार व्यक्त करून आवाहन केले की, संस्थानातील पीडित जनतेच्या मदतीसाठी आणि भारतीय नागरिकत्वाचे कर्तव्य बजावण्यासाठी संस्थानाबाहेरील लोकांनी व विशेषतः महाराष्ट्रीयांनी संस्थानात जाऊन तेथे सत्याग्रह केला पाहिजे (२७ सप्टेंबर १९३८ चे पत्रक). पूर्वी जहाल क्रांतिकारक असलेले बापट मुळशी सत्याग्रहाचे सेनापती होते. प्रदीर्घ कारावासातून नुकतेच मुक्त झालेल्या बापटांनी लगेच निजामी प्रजेच्या मुक्तीसाठी वाहून घेतले. त्यांनी महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये सत्याग्रह मंडळे उभारण्यासाठी झपाटल्यागत प्रचार केला. त्याच सुमारास वि. दा. सावरकरांनी संस्थानातील फक्त हिंदू लोकांना मदत करण्यासाठी निधी गोळा करणे सुरू केले. मात्र हिंदुमहासभा व आर्यसमाजाने निरनिराळी सत्याग्रह मंडळे सुरू केली. बापटांनी सावरकरांच्या निधीला अगत्याने देणगी दिली खरी. तथापि बापटांना सावरकरांची हिंदुराष्ट्राची संकुचित भूमिका मुळातच नापसंत होती. बापटांना हिंदुराष्ट्रवाद अमान्य असून ते धर्मनिरपेक्ष स्वराज्यवादी होते. त्यांना देशातील शेतकरी, कष्टकरी व कामगारांचे हित जपणारी लोकशाही अभिप्रेत होती. तसे पाहिल्यास बापटांचा कल मार्क्सवादाकडे होता. म्हणून ते सावरकरांपासून खूप लांब राहिले.

बापटांनी 'हैदराबाद संस्थान सत्याग्रह साहाय्यक मंडळ' स्थापन करून ते प्रचाराला लागले. सत्याग्रहासाठी आधी जाहीर केलेल्या तारखेपूर्वीच म्हणजे २३ सप्टेंबर १९३८ रोजी बापट पुण्याहून हैदराबादकडे रवाना झाले. त्यांच्याबरोबर

पाच सत्याग्रही होते. २४ सप्टेंबरला ते पोहोचताच त्यांना हैदराबादच्या नामपल्ली रेल्वे स्टेशनातच अटक करून पोलिसांनी पुण्यात आणून सोडले. त्या क्षणापासून बापटांनी व्यापक सत्याग्रह मोहीम उभारण्यास वाहून घेतले. सर्व धर्मांच्या लोकांनी संस्थानातील जनतेशी एकोपा व एकजूट करावी, आणि खालसा मुलखातील लोकांनी व स्थानिक जनतेने एकत्ररीत्या चळवळ करावी असा बापट प्रचार करू लागले. संपूर्ण कष्टकरी वर्गाचे 'संयुक्त भारतीय लोकराज्य' स्थापन करावे हा त्यांचा नारा होता. वैचारिक घोटाळा टाळण्यासाठी उपरोक्त सत्याग्रह साहाय्यक मंडळ सर्वतया काँग्रेसनिष्ठांचे असेल, असे त्यांनी जाहीर केले. मुंबईतही सभा घेऊन स. का. पाटील व प्रा. डी. आर. घारपुरे यांच्या सक्रिय मदतीने तेथेदेखील सत्याग्रह साहाय्यक समिती स्थापन केली. हिंदू नागरिक स्वातंत्र्यसंघ व आर्यसंरक्षक समिती या संकुचित विचारसरणीच्या संघटनांशी असलेले आपले मतभेद त्यांनी स्पष्ट केले. तसेच हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या निर्भेळ राष्ट्रवादी ध्येयाला जाहीर पाठिंबा देण्यासाठी बापटांनी सर्वांना विनंती केली.

बापटांनी रामानंद तीर्थ यांना पत्र पाठवून संस्थानात सत्याग्रह करण्याची आपली योजना कळविली. पुन्हा १ नोव्हेंबर १९३८ रोजी हैदराबादेत प्रवेश करणार आहोत असेही लिहिले. २९ ऑक्टोबरला पुण्यातील शनिवारवाडा पटांगणावर त्यांनी सभा घेतली, तेव्हा राघवेंद्र शर्माही उपस्थित होते. या सभेतच बापटांनी सत्याग्रह प्रतिज्ञेचा मसुदा मंजूर करून घेतला. तसेच अटक झाल्यावर गांधीप्रणीत सत्याग्रहाच्या शिस्तीनुसार आरोप कबूल करावयाचा असल्याने, स्वयंसेवकांनी खटला चालवायचा नाही, असाही बापटांनी दंडक घालून दिला. मात्र बापटांनी विहित केलेल्या अशा अटींनुसार सत्याग्रह करण्यास फारसे स्वयंसेवक पुढे आले नाहीत. ठरल्याप्रमाणे बापट सहकाऱ्यांसमवेत १ नोव्हेंबरला हैदराबादला गेले. परंतु निजामी पोलिसांनी त्यांना पकडून परत पुण्यात आणून सोडले.

यानंतर बापटांनी १ डिसेंबरला गुलबर्गामार्गे संस्थानात तिसऱ्यांदा प्रवेश केला. यावेळी त्यांच्याबरोबर १९ सत्याग्रही होते. सर्वांना १२०० रुपये दंड व दोन वर्षांची शिक्षा झाली. यानंतर गांधीजींच्या सूचनेनुसार स्टेट काँग्रेसने सत्याग्रह स्थगित केल्यावर ८ जानेवारी १९३९ रोजी बापटांची सुटका झाली. मात्र गांधीजींचा तो

सल्ला बापटांना आवडला नाही. त्यानंतरही सेनापतींनी जाहीर केले की, आपण काँग्रेसनिष्ठ असूनदेखील सावरकरांच्या हिंदू प्रतिकार मंडळाच्या मोहिमेला पाठिंबा देत आहोत.[१०]

मात्र या सत्याग्रहाविषयी **सोर्स मटेरिअल फॉर हिस्टरी ऑफ फ्रीडम मुव्हमेंट** दस्तऐवजांमधून वेगळी माहिती मिळते. निजामाच्या अधिपत्याखालील जनता अगतिक झालेली असताना महाराष्ट्रातील स्वराज्यवादी कार्यकर्ते लोकमत जागृत करण्यासाठी सक्रिय झाले. सावरकरांनी उभारलेल्या हिंदू प्रतिकार मंडळात ग. वि. केतकर, ग. म. नलवडे, वि. ब. डावरे, शि. ल. करंदीकर व नथुराम गोडसे होते. हा गट व हिंदू नागरिक स्वातंत्र्य संघ आणि आर्यसमाज, आर्यसंरक्षक समिती वगैरे गट आपापल्या पद्धतीने महाराष्ट्रात प्रचार करू लागले. त्याबरोबरच हैदराबादमध्ये जबाबदार राज्यपद्धती स्थापन करण्यासाठी सविनय कायदेभंग चळवळ उभारावी असे प्रतिपादन करणाऱ्यांचा दुसरा गट महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसमध्ये निर्माण झाला. या गटाचे धुरीण होते सेनापती बापट. त्यांनी पश्चिम व उत्तर महाराष्ट्रात झंझावाती दौरे करून स्वयंसेवक मिळविले. शिवाय त्यांनी शंकरराव देव, न. वि. गाडगीळ व केशवराव जेधेंची मदत मागितली. तथापि अ. भा. काँ. समितीचा निर्णय न झाल्याने ते ठोस मदत देऊ शकले नाही. मात्र विनायकराव भुस्कुटे व काकासाहेब खाडिलकरांनी बापटांना पूर्ण पाठिंबा दिला. ३० सप्टेंबर १९३८ च्या **मराठा** मध्ये बापटांनी सत्याग्रहाची आपली योजना घोषित केली.

सेनापती बापटांनी विविध सत्याग्रही मंडळांचे दोन प्रवर्गांमध्ये वर्गीकरण केले- — धर्मनिरपेक्षतावादी व शेतकरी-कामकरी वर्गाचा कैवार घेणाऱ्यांचे एक मंडळ आणि हिंदुराष्ट्रवादी गटांचे दुसरे मंडळ. प्रत्येक गटाने सत्याग्रह करताना आपापला झेंडा मिरवावयाचा होता. काँग्रेसच्या सत्याग्रह समितीत स्वतः सेनापती बापट, आर. बी. शर्मा, एस. एम. जोशी, सी. ए. तुळपुळे, आर. एन. अभ्यंकर, एस. के. लिमये, एम. एस. खान, नारायण ग. गोरे आणि के. आर. घैसास यांचा समावेश होता. याबाबतचा पुण्याच्या पोलीस अधीक्षकाचा अहवाल प्रस्तुत

इतिहासकारास मिळाला आहे. हे सत्याग्रही २८ ऑक्टोबर १९३८ रोजी पुण्याहून हैदराबादला निघाले होते. त्यांच्यात काँग्रेसजनांप्रमाणे सोशालिस्ट व कम्युनिस्टांचाही समावेश होता.[११]

तिकडे काँग्रेस श्रेष्ठी व विशेषतः जमनालाल बजाज हैदराबाद स्टेट काँग्रेसवरील बंदी मागे घेण्यासाठी पंतप्रधान अकबर हैदरीवर दबाव टाकत होते. बजाज यांनी १८ ऑक्टोबर १९३८ च्या पत्रातून हैदरीला ठणकावले, "As a well wisher of the State, allow me to point out, in all humility, but emphatically, that prudence requires that the ban on State Congress should be lifted without further delay. The policy of the State Congress..... is such as is likely to command sympathy in other parts of the country."[१२]

हैदराबाद संस्थानाच्या गुप्तचर विभागाचा उप संचालक जी. ए. अँडरसन व मुंबई सरकारच्या गुप्तचर खात्याचा उप संचालक एफ. ई. शार्प यांच्या गोपनीय पत्रव्यवहारातून मला आढळले की, अँडरसन अनुचित कारवाई आणि बेकायदा बाबी करण्यासाठी शार्पला विनवित असे. निजामी राजवटीवर टीका करणारे लोक व वर्तमानपत्रे यांच्याविरुद्ध मुंबई सरकारने अतिकठोर कारवाई करून त्यांच्याविषयी माहिती पुरवावी अशी अँडरसन मुंबईकडे मागणी करत असे. निजामाच्या विरोधकांना पकडण्यासाठीही आम्हाला मदत करावी आणि आम्हाला उपयोगी अशी माहिती तारसंदेशाद्वारे पाठवावी अशी अँडरसनची विनंती होती. **केसरी, मराठा, बाँबे क्रॉनिकल** पत्रकांवर कारवाई करावी ; तसेच मुंबई व सोलापुरातील मराठी पत्रकांमधून होत असलेली टीका थांबविण्यासाठी त्यांना दंड करावा असेही अँडरसन सुचवित होता. या दस्तऐवजांमधून प्रस्तुत इतिहासकाराला आढळले की, **बाँबे क्रॉनिकल** व मराठी पत्रकांमधील कडक टीकेमुळे मराठवाड्यातील लोकमताचा प्रक्षोभ झाल्याने हैदराबाद सरकार अत्यंत अस्वस्थ झालेले होते. म्हणून हैदराबादची विनंती होती की, मुंबई सरकारने सर्व संबंधितांवर दंडात्मक कारवाई करावी व तशा पत्रकांवर बंदी घालावी. याबाबत २७ सप्टेंबर

१९३८ च्या पत्रातून शार्पने मुंबई सरकारच्या गृह सचिवास अभिप्राय पाठविला होता की, "हैदराबाद संस्थानात एकतंत्री राजसत्ता असून तेथे हिंदू प्रजेवर अन्याय व पक्षपात होतो किंवा कसे हा वादग्रस्त मुद्दा आहे ; या कारणास्तव मुंबई इलाख्यातील वर्तमानपत्रे व व्यक्तींविरुद्ध कारवाई करण्याचे गुप्तचर विभागाला काहीच कारण नाही."[१३]

हैदराबाद सरकारची मागणी नाकारताना शार्प साहेबाने अँडरसनला सुनावले की, "या विषयीची मुंबई सरकारची भूमिका तुमच्या सरकारसारखी नाहीच. मुंबई सरकार म्हणजे काँग्रेसचे मंत्रिमंडळ असून येथे भाषणस्वातंत्र्य आणि वृत्तस्वातंत्र्य अनुज्ञेय आहे. तुमचे सरकार या स्वातंत्र्याची पायमल्ली करण्याबाबत कटिबद्ध दिसते. विशेषतः हिंदू लोकांच्या हितसंबंधांबाबत तुमच्या सरकारची भूमिका ठाम नकारवादी आहे. अशा कारणांमुळे या इलाख्यातील पत्रके अथवा प्रचारकांच्या कारवाया थांबवणे हे येथील पोलिसांचे कर्तव्य नाहीच. केवळ नित्याच्या कामांबाबत सामान्य माहिती देण्याची माझी तयारी आहे, पण ती तारसंदेशाद्वारे नव्हेच नव्हे!"[१४]

## स्टेट काँग्रेसचा सत्याग्रह

स्टेट काँग्रेसची स्थापना करताना नेमस्त पुढाऱ्यांनी स्वामी रामानंद तीर्थ, गोविंददास श्रॉफ व आनंदराव वाघमारेंना एकाकी पाडले होते. तथापि या संघटनेवर निजामाने बंदी घालताच नेमस्त नेते हतबल व अगतिक झाले, निरुत्तर झाले. त्या निराशाकारक अवस्थेतून मार्ग काढण्याची व संघटनेत जान आणण्याची जबाबदारी स्वामीजी, गोविंददास व वाघमारे या मराठी पुढाऱ्यांनी आणि कर्नाटक व तेलंगणातील जहालांनी पत्करली. काही मराठी भाषिक लोक व्यवसायासाठी हैदराबादेत आलेले होते. त्यांना स्वामी यांनी राजकारणाची दीक्षा देऊन सक्रिय केले होते. वस्तुतः संघटनेवरील बंदीहुकमामुळे व प्रशासन अधिकच आक्रमक झाल्यामुळे परिस्थिती अधिक बिकट झालेली होती. अशा प्रतिकूल परिस्थितीत कोंडी फोडून अगतिक स्टेट काँग्रेसमध्ये प्राण आणण्यासाठी रामानंद तीर्थ व त्यांचे जहाल सहकारी राजकीय मंचावर अवतरले.

गांधीप्रणीत असहकार चळवळ व कायदेभंग आंदोलनात भाग घेतलेले रामानंद तीर्थ एकध्येयानुवृत्तीचे म्हणजे एकाच ध्येय प्राप्तीसाठी झगडणारे होते. आतापर्यंत त्यांना एकाकी ठेवण्यात आले होते. रामानंदांना महाराष्ट्र परिषदांच्या उपक्रमांमध्ये फारसे स्वारस्य वाटत नव्हते. मवाळ नेते हतबल झाल्यावर रामानंद हेच चळवळ संघटित करू शकतील हे महात्मा गांधींनी ओळखले. त्यानुसार गांधीजींनी रामानंदांवर अशी जबाबदारी सोपवली की, त्यांनी उपरोक्त प्रांतिक परिषदांच्या जंजाळात सामील न होता बंदी असलेल्या हैदराबाद स्टेट काँग्रेसचे सक्रिय नेतृत्व करावे, आणि त्यासाठी जे भोगावे लागेल ते भोगावे. गांधीजींची ही आज्ञा सफल करण्यासाठी रामानंदांनी परभणीचे गोविंदराव नानल, दिगंबरराव बिंदू, हरिश्चंद्र हेडा, रविनारायण रेड्डी (कम्युनिस्ट नेते), वाघमारे, गोविंददास श्रॉफ, बाबासाहेब परांजपे वगैरेंना संघटना बांधण्यासाठी आणि जनजागृती करण्यासाठी कामाला लावले. गोविंददासांच्या राजकीय यंत्रणेने सत्याग्रह करण्याची तयारी असलेल्या युवकांना प्रेरणा दिली. सत्याग्रह नोंदणीची केंद्रे गुप्तपणे सुरू झाली. प्रक्षोभक प्रचार पत्रके घरोघरी रात्री वाटण्यात आली.

स्टेट काँग्रेसच्या उपरोक्त मवाळ अस्थायी समितीला त्यांनी सत्याग्रहाबाबत निर्वाणीचा इशारा दिला. त्यानुसार अस्थायी समितीने आपले विसर्जन केले. त्यानंतर स्टेट काँग्रेसची नवीन कार्यकारिणी व कृतिसमिती नेमण्यात आली. गोविंदराव नानलांना कार्यकारिणीचे अध्यक्ष नेमून एच. रामकिशन धूत यांना सरचिटणीसपदी नेमण्यात आले. रविनारायण रेड्डी, श्रीनिवास बोरीकर व जनार्दन देसाई (कर्नाटकचे) यांना सदस्यपदी निवडण्यात आले. २४ ऑक्टोबर १९३८ रोजी दिवाळीचा पाडवा असल्यामुळे त्या मुहूर्तावर **हैदराबाद स्टेट काँग्रेसचे नानल व चार सहकाऱ्यांनी सत्याग्रह सुरू केला. अशा रीतीने या संस्थानातील पहिला अहिंसक प्रतिकार सुरू झाला.**

नानलांच्या पाठोपाठ स्वामी रामानंद तीर्थ स्वतः सत्याग्रहींच्या पहिल्या तुकडीचे सर्वाधिकारी झाले. त्यांनी हैदराबाद शहराच्या पोलीस कमिशनरला पत्र पाठवून सत्याग्रह करण्याचा आपला मानस कळविला. तसेच काँग्रेसवरील बंदी हुकूम

झिडकारून आपण स्टेट काँग्रेसचे कार्य करणार असल्याचे कळविले. पारदर्शक आत्मसमर्पणभाव व ध्येयासक्ती असलेल्या स्वामीजींनी पोलीस कमिशनरास पाठविलेल्या २७ ऑक्टोबर १९३८ च्या पत्रातील निर्धार पाहा :— " I have been nominated by the Working Committee of the Hyderabad State Congress as the first Dictator with all the powers of the Working Committee vested in me. I intend to begin the work of the State Congress today after 3 p.m. near Putli Bowli Police Station with my four Organising Secretaries. I request you to please take notice of this and take necessary steps."[१५]

या पत्रातील आत्मसमर्पण भावना आणि गांधीवादी सत्याग्रही निर्धार स्वयंस्पष्ट असल्याने त्यावर भाष्य करणे अनावश्यक होय. सरकारने नव्याने जारी केलेल्या पब्लिक सेफ्टी रेग्युलेशनविरुद्ध करावयाचे हे युद्ध होते. याच काळ्या अध्यादेशाखाली निजामाने स्टेट काँग्रेसवर बंदी घातली होती. जनतेचे नागरी स्वातंत्र्य पूर्णतः नष्ट केले होते. म्हणूनच रामनंदांनी जनतेला व विशेषतः युवकांना स्वातंत्र्यासाठी बलिदान करण्याचे आवाहन केले. त्याबाबतचे समर्पक निवेदनही प्रकाशित केले. त्यात त्यांनी म्हटले, "सरकारच्या धमक्यांना आम्ही मुळीच भीक घालीत नाही. या सरकारने जनतेचे नैतिक पाठबळ गमावले आहे. एक ना एक दिवस जनतेच्या इच्छेला या सरकारला शरण यावेच लागेल ....."

रामानंदांनी गांधीवादी भूमिकेतून जनतेला सत्य, अहिंसा, नैतिक अधिष्ठान, आत्मबलिदान आणि अन्यायाचा प्रतिकार या तत्त्वांची कास धरावी असे आवाहन केले. या राजकीय चळवळीत धर्मकारणाची सरमिसळ करू नये, हा महत्त्वाचा मुद्दा स्वामीजींनी आपल्या निवेदनामध्ये अधोरेखित केला होता. कारण मुसलमानी राजवटीत हिंदुराष्ट्रवादाचा पुरस्कार आत्मविघातक ठरण्याचाच संभव होता. पुढील दोन महिन्यांनंतर हिंदुमहासभा व आर्यसमाज या हिंदुत्ववादी संघटनाही निजामाविरुद्ध उभ्या राहिल्याने सत्याग्रह चळवळीला जातीय स्वरूप येण्याची शक्यता निर्माण

झाली. **सत्याग्रह स्थगित करण्याचा गांधीजींनी सल्ला दिला तो याच कारणाने!** असो. इथे मुद्दा हा की, स्वामीजींचे धोरण दूरदर्शीपणाचे होते. सत्याग्रहाची घोषणा करताच त्यांना आणि व्यंकटेश बापूजी जोशी, राघवेंद्रराव दिवाण वगैरेंना अटक करण्यात आली. (२७ ऑक्टोबर १९३८).

२४ डिसेंबरला दोन महिने पूर्ण होईपर्यंत एकूण १८ सर्वाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली १८ तुकड्यांनी संस्थानात सत्याग्रह केला. अठराव्या तुकडीचे सर्वाधिकारी म्हणून हैदराबादचे विख्यात कायदेपंडित व नेमस्तांचे अध्वर्यू काशीनाथराव वैद्य हे होते. हैदराबाद संस्थानातील मराठी, तेलुगू व कन्नड या तिन्ही भाषिक नेमस्तांचे वैद्य हे नेते व मार्गदर्शक होते. मात्र नेमस्त असूनही सर्वांचा निर्णय झाल्यावर ते चळवळीत भाग घेत आणि आनंदाने कारावास पत्करत असत. जनार्दन देसाईदेखील तसेच होते.

दरम्यानच्या काळात स्टेट काँग्रेसवरील बंदी मागे घेण्याबाबत जमनालाल बजाज यांच्या पाठोपाठ महात्मा गांधी स्वतः सर अकबर हैदरीवर दबाव आणण्यासाठी पुढे सरसावले. ढोंगी सर अकबर तत्त्वज्ञानीपणाचा आव आणत असला, तरी डावपेच लढवत असे. तो असत्य हेच सत्य असल्याचा आभास निर्माण करीत असे. हैदराबाद स्टेट काँग्रेस ही जातीयवादी संघटना असून, तिच्यातील जहाल हिंदू पुढाऱ्यांमुळे संस्थानातील जातीय सलोखा व हिंदू-मुसलमान यांच्यातील सामंजस्याला भयंकर धोका निर्माण झाला आहे, हा प्रमेय सर अकबरने शिरोधार्य मानला होता. त्याचा गैरसमज दूर करण्याचा गांधीजींनी खूप खूप प्रयत्न केला. पण व्यर्थ! म्हणून नंतरच्या एका पत्रात गांधीजींनी हैदरींना दूषणही दिले की, "मी तुमच्याकडे भाकरी मागितली असता तुम्ही मला धोंडा दिलात". तथापि याचाही उपयोग झाला नाही. निजामाने हैदराबाद स्टेट काँग्रेसवरील बंदी मागे घेतली नाही. एक चमत्कारिक कोंडी निर्माण झाली.

यानंतर १७ नोव्हेंबर १९३८ च्या **हरिजन** पत्रकातून गांधीजींनी इशारा दिला की, "संस्थानिक आपला हटवादीपणा असाच चालू ठेवणार असेल आणि संपूर्ण भारतभर झालेल्या राजकीय जागृतीकडे अविवेकीपणे कानाडोळा करणार असेल,

तर संस्थानिक स्वतःचा विनाश स्वतःच ओढवून घेईल........ (तसेच) प्रजाजनांच्या न्याय्य मागण्या व हक्क दडपण्यासाठी जर संस्थानिक शस्त्रबळाचा उपयोग करणार असेल, तर माझी अहिंसा त्याला वाचवू शकणार नाही........ हैदराबादच्या फतव्यांमुळे मला अतीव दुःख व आश्चर्य वाटले.'' त्यांनी पुढे लिहिले की,

"It is passing strange that Sir Akbar should have lent himself to the reactionary declarations which condemn an organization even before it has begun to function. What can be the meaning of communalism in a State which is overwhelmingly one population according to religion ?......... The State Congress in Hyderabad can never be communal in the sense in which the word is understood in India. .......... The Hyderabad Communique made a subtle distinction and aver that there is presence in the State Congress of persons predominantly Communal in outlook. What is more the State Congress has come out with a statement totally repudiating the suggestion of communalism."[१६]

निजामाच्या सार्वभौमत्वाची भाषा बोलून दांभिक अकबर हैदरीने जमनालाल बजाजांना हैदराबादमध्ये न येण्याचाही सल्ला दिला. कारण काय तर बाहेरील कोणीही तेथे ढवळाढवळ केल्याने निजामाच्या अधिकाराचा अधिक्षेप होतो. ''शिवाय तुमच्या येण्याने जातीयवाद्यांना बळ मिळेल, जातीयवादाला उत्तेजन लाभेल व ते संस्थानाच्या परंपरांशी विसंगत होईल.''[१७]

या सत्याग्रहात २४ डिसेंबरपर्यंतच्या दोन महिन्यांत संस्थानातील एकूण १८ पथके कारावासात गेली. तथापि २४ डिसेंबर १९३८ रोजी अठराव्या तुकडीचे सर्वाधिकारी काशीनाथ वैद्य यांना अटक होत असताना त्यांनी सत्याग्रह स्थगित करण्याची घोषणा केली. या घोषणेमागे गांधीजींची सूचना होती, असे दिसते. यामागची वस्तुस्थिती अशी की, हिंदुमहासभा, हिंदू नागरिक संघ व आर्यसमाज

वगैरे हिंदू संघटनांनीही याच वेळी निःशस्त्र प्रतिकार आणि सत्याग्रह सुरू केल्याने आंदोलनास जातीयवादी वळण लागण्याचा दाट संभव होता. परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी मध्यवर्ती संघटना नव्हती. शिवाय स्टेट कॉंग्रेस व हिंदुमहासभा वगैरे पक्ष यांच्यात सत्याग्रह चालविण्यासाठी समन्वय नव्हता. तसा समन्वय व संघटना घडवण्यासाठी सरकारने मुळातच वाव दिला नव्हता. अशा परिस्थितीत चळवळीला अनुचित जातीय स्वरूप येण्याचा धोका ओळखून, गांधीजींनी स्टेट कॉंग्रेसला सत्याग्रह स्थगित ठेवण्याचा सल्ला दिला. हिंदुमहासभा व आर्यसमाजाची चळवळ आणि स्टेट कॉंग्रेसचा 'सविनय कायदेभंग' यांची गल्लत होऊ नये व कॉंग्रेसवर जातीयतेचा ठपका येऊ नये, म्हणून सत्याग्रह स्थगित करावा, हा गांधीजी व नेहरूंचा सल्ला होता.

जानेवारी १९३९ मध्ये स्टेट कॉंग्रेसने प्रसिद्ध केलेल्या अधिकृत 'स्टेट पीपल्स बुलेटिन' मध्ये याबाबत विस्ताराने कारणमीमांसा केलेली आम्हाला आढळली. पाच-सहा पानांच्या या पत्रकातून दिसते की, दोन महिन्यांनंतरही सत्याग्रहास अपूर्व लोक-प्रतिसाद लाभत होता. आपल्या आशाआकांक्षांना वाचा फोडणारी व हितसंबंध जपणारी स्टेट कॉंग्रेस ही एकमेव संघटना असल्याचे संस्थानातील लोकांना पटले होते. तिच्यावर बंदी घातल्यावरही संघटनेच्या सभांना हजारो श्रोते जमत. २४ डिसेंबरला शेकडो जण कारावासात गेल्यावरही ३५०० जणांनी सत्याग्रही म्हणून नावे नोंदविली होती. लोक-प्रतिसादाचा अभाव हे सत्याग्रह स्थगित करण्याचे कारण नव्हते. मात्र सत्याग्रहाची आचारप्रणाली येथील लोकांना नवी होती.

शिवाय हिंदुमहासभा व आर्य संरक्षण मंडळाने दाखविलेल्या धार्मिक स्वातंत्र्याची काही लोकांवर भुरळ पडली. लोकमतात गलबला झाला. त्यामुळे स्टेट कॉंग्रेसचा सविनय कायदेभंग व जातीयवादी पक्षांच्या चळवळीबाबत जनतेत गोंधळ माजला. त्यातून जातीय दंगे भडकण्याची मोठी शक्यता होती. या परिस्थितीचे भान ठेवून सत्याग्रह समितीने जाहीर केले, "काही गैरसमज दूर करण्यास थोडा अवधी लागेल. त्यानंतर सरकारचा गैरसमज दूर होऊन सरकार चुकांची दुरुस्ती करेल

व स्टेट काँग्रेसवरील बंदी मागे घेईल.'' काँग्रेस समितीच्या निवेदनातील ही वाक्ये पाहा :—"Unfortunately the movements of the Aryan Defence League and the Hindu Civil Liberties Union synchronised with Civil Disobedience of the State Congress. The decisive cause in suspension has been the advice given by Mahatmaji, Pandit Jawaharlal Nehru and other Congress leaders, that in order to make our position absolutely clear it was essential that we should suspend Civil Disobedience. They say that suspension would give the Government of H. E. H. the Nizam an opportunity to review the situation..... No one should run away with the idea that suspension of Civil Disobedience is suspension of the movement for Responsible Government."[१८]

स्टेट काँग्रेस व गांधीजींच्या तर्कशास्त्रामागची वस्तुस्थितीही समजून घेणे आवश्यक होय. मुंबई इलाखा व मध्यप्रांत-वऱ्हाडातून हिंदुमहासभा आणि आर्यसमाजाचे कित्येक जथे संस्थानात जाऊन सत्याग्रह व निदर्शने करीत. त्यातून जातीय संघर्ष पेटण्याचा संभव होता. सरकारने हे कारण पुढे करून संस्थानात जाणाऱ्या सत्याग्रहींच्या पथकांना रोखण्यासाठी १९३४ च्या इंडियन स्टेट्स (प्रोटेक्शन) ॲक्टखाली मुंबई इलाखा व मध्यप्रांत-वऱ्हाड सरकारांना निर्देश द्यावे, अशी निजाम सरकारने मध्यवर्ती सरकारला गळ घातली होती. ही मागणी निजामाने भारतमंत्र्याकडेही केली होती. मात्र मुंबई व नागपुरातही तेव्हा काँग्रेसची मंत्रिमंडळे असल्याने त्यांनी निजामाची मागणी अमान्य केली. शिवाय मुंबई व नागपूरने प्रतिपादन केले होते की, सत्याग्रही हिंसक वा प्रक्षोभक कृत्ये करीत नसल्याने बंधने लादण्याची आवश्यकता वाटत नाही. संस्थानी प्रशासन दडपशाही व अन्याय करीत असल्यानेच सत्याग्रही युवक प्रशासनाचा निषेध करीत आहेत.[१९]

महत्त्वाच्या सरकारी कागदपत्रांचा अभ्यास केल्यावर निष्कर्ष निघतो की, स्टेट काँग्रेसचा सत्याग्रह स्थगित करण्याचा गांधीजींचा सल्ला आणि सत्याग्रह समितीचा

निर्णय स्वाभाविकच होता. १९३९ मधील राजकीय घटनांनीदेखील याची प्रचिती दिली. एक तर मध्ययुगीन सरंजामशाही प्रवृत्तीच्या निजामशाहीला सत्याग्रहाचे मंत्र व तंत्र पचनी पडणारे नव्हते. सत्याग्रह चळवळ हाताळण्याचा तेथील प्रशासनाला व पोलिसांनाही अनुभव नव्हता. सत्याग्रह समितीच्या बहुतेक नेत्यांना सत्याग्रहाचा फारसा अनुभव नव्हता. पुरेशी जनजागृती झालेली नव्हती. शिवाय अनेक नेमस्त व मवाळ नेते सत्याग्रहाबाबत फारसे उत्साही नव्हते. चळवळीत समन्वय व सातत्य नव्हते.

स्टेट काँग्रेसच्या २४ ऑक्टोबरपासूनच्या सत्याग्रहात ५३५ जणांना अटक झाली. तथापि या सत्याग्रहाबरोबरच चळवळ उभारणाऱ्या आर्यसमाज आणि हिंदुमहासभेचे २,३५८ चळवळे अटकेत टाकले असा अहवाल निजाम सरकारने मध्यवर्ती सरकारला सादर केला होता. या दोन्ही संघटना व स्टेट काँग्रेसच्या सत्याग्रहींची सरमिसळ असल्याने पक्षनिहाय गणना करणे पोलिसांना अवघड झाले असावे. निजाम सरकारच्या अहवालानुसार म्हणता येते की, २४ डिसेंबर १९३८ पर्यंत स्टेट काँग्रेसचे ५३५ स्वातंत्र्यसैनिक तुरुंगात गेले. मात्र १५ एप्रिल १९३९ पर्यंत आर्यसमाज व हिंदुमहासभेचे २,३५८ स्वातंत्र्यसैनिक पकडले गेले होते. याशिवाय एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात १,२२५ स्वयंसेवकांना अटक करण्यात आली होती. १० एप्रिल १९३९ पर्यंत स्टेट काँग्रेसच्या सर्व स्वातंत्र्य सैनिकांना बंधमुक्त करण्यात आले.[२०]

स्टेट काँग्रेसच्या सत्याग्रहाचे श्रेय मुख्यतः रामानंद तीर्थ, गोविंदराव नानल, रामचंद्रराव नांदापूरकर, दिगंबर बिंदू, वासुदेव धोत्रीकर, अनंत गोविंद कुलकर्णी, काशीनाथ वैद्य, आनंद वाघमारे, गोविंददास श्रॉफ, गोपाळशास्त्री देव, बोरीकर वगैरेंना दिले जाते. मात्र ही श्रेय नामावली केवळ प्रतीकात्मक होय. विशेष म्हणजे फारच थोडे नेमस्त लोक सत्याग्रहात सहभागी झालेत. संपूर्ण संग्रामात मराठवाडा व मराठी भाषिकच अग्रेसर होते. स्वामीजी कारावासात गेल्यावर गोविंदराव व वाघमारेंच्या जहाल गटाने सत्याग्रहाचा हैदराबाद शहराबाहेर प्रसार केला. त्यांनी औरंगाबादेत सत्याग्रहाचे दुसरे केंद्र कार्यप्रवण केले. तेथून चळवळीचा प्रसार मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये व गावोगावी करण्यात आला.

काँग्रेसनिष्ठ व तत्त्वनिष्ठ असलेल्या सेनापती बापटांनी सत्याग्रहाद्वारे आणि सर्व मार्गांनी संस्थानी प्रजेला कसोशीने मदत केली. तसेच त्यांनी स्पष्ट भूमिका घेतली की, धर्मनिरपेक्ष व राष्ट्रीय दृष्टिकोण असलेल्या स्टेट काँग्रेसच्याच नेतृत्वाखाली सत्याग्रह चालला पाहिजे. निजाम सरकार जुलमी असल्याने आपण या सत्याग्रहात खास लक्ष घालत आहोत, हे बापटांनी एका पत्रकात जाहीर केले होते. याची इतिहासात नोंद करणे आवश्यक होय.

## हिंदू निःशस्त्र प्रतिकार मंडळ

महात्मा गांधींचे सत्याग्रह व अहिंसा हे शब्द देखील नापसंत असलेल्या हिंदुत्ववादी मंडळींनी ११ ऑक्टोबर १९३८ रोजी पुण्यात लोकमान्य टिळकांचे नातू गजानन विश्वनाथ केतकर यांच्या अध्यक्षतेखाली 'हिंदू निःशस्त्र प्रतिकार मंडळ' स्थापन केले. हैदराबादेतील यशवंत जोशींच्या हिंदू नागरी स्वातंत्र्य संघास मदत करणे हा या मंडळाचा उद्देश होता. हिंदुसभा यासाठी प्रचार करू लागली. नथुराम विनायक गोडसे पुण्यातील या हिंदू निःशस्त्र प्रतिकार मंडळाचे सचिव होते. वि. दा. सावरकर, केतकर (अध्यक्ष), डॉ. बा. शि. मुंजे, भा. ब. भोपटकर, गोडसे वगैरे या मंडळाचे प्रमुख होते. गोडसेंच्या नेतृत्वाखाली १२ जणांची पहिली तुकडी १४ नोव्हेंबर १९३८ रोजी हैदराबादला पोहोचताच पोलिसांनी सर्वांना अटक करून एक वर्ष कारावासाची शिक्षा देण्यात आली. त्यानंतर पुण्याचे खडीवाले वैद्य यांच्या आठ जणांच्या पथकाने प्रत्येकी चार-चार जणांचा गट करून १३ आणि १६ डिसेंबरला बंदी हुकमाचा प्रतिकार केला. अर्थातच या केवळ प्रतीकात्मक प्रतिकारासाठी त्यांनाही कारावास घडला. मात्र या हिंदुराष्ट्रवादी गटांपेक्षा हैदराबाद संस्थानातील हिंदुत्वनिष्ठांनी आणि आर्यसमाजाने धार्मिक स्वातंत्र्यासाठी निजामी राजवटीशी अधिक व्यापक व परिणामकारक लढा दिला.

२८-२९ डिसेंबर १९३८ ला सावरकरांच्या अध्यक्षतेखाली नागपुरात भरलेल्या हिंदुमहासभेच्या अधिवेशनात हे हिंदू निःशस्त्र प्रतिकारक मंडळ विसर्जित करण्यात आले. त्याऐवजी जानेवारी १९३९ पासून हिंदुमहासभेच्या वतीनेच प्रतिकार मोहीम सुरू झाली. या संघटनेने पुणे, मुंबई, नागपूर, अकोला आदी ठिकाणी केंद्रे

उघडून तेथून ‘भागानगर निःशस्त्र प्रतिकार’ मोहिमेसाठी प्रतिकारक पाठविले. हिंदुमहासभेच्या समितीने चुकूनही सत्याग्रह, सत्याग्रही आणि अहिंसा ही गांधीवादी परिभाषा न वापरता प्रतिकार, प्रतिकारक व निःशस्त्र असे शब्द वापरले. असो. हिंदुसभेच्या प्रतिकारकांनी भागानगर, गुलबर्गा, बीदर, हदगाव, नांदेड, मुरूम, तुळजापूर, जालना, परभणी, कन्हेरगाव, औरंगाबाद, वैजापूर व पैठण आदी ठिकाणी निदर्शने केली. या संघटनेचे एक सभासद शं. रा. दाते यांचा दावा आहे की, तिचे ४००० स्वयंसेवक तुरुंगात गेले. तथापि अनंत भालेराव व दुसऱ्या अभ्यासकांच्या मते हा आकडा १४०० इतकाच होता. प्रतिकारकांमध्ये पुढील नावे उल्लेखनीय होती :—नथुराम गोडसे, शं. रा. दाते, गो. नी. दांडेकर, विश्वास डावरे, मदनसिंह गागा, ल. ब. भोपटकर, अनंत हरी गद्रे, विंदा करंदीकर (कवी), बाळशास्त्री हरदास इ.

हैदराबाद मुक्तिसंग्रामाचे व्यासंगी अभ्यासक अनंत भालेराव यांनी स्पष्ट निर्वाळा दिला आहे की, या प्रतिकार चळवळीमागची हिंदुमहासभेची “दृष्टी निःसंशय हिंदू-मुस्लिमांच्या संदर्भात जातीय आणि हिंदुत्ववादाचीच होती.” मात्र आर्यसमाज शक्यतोवर आपल्याबरोबर असावा अथवा आपण त्यांच्यासमवेत असावे अशी सावरकरांनी काळजी घेतली. तथापि आर्यसमाजाने हिंदुमहासभेच्या बरोबर न राहता शक्यतो हिंदुमहासभेशी फटकून वागण्याचे ठरविले. “हिंदुमहासभेने केलेले हे हैदराबाद संस्थानातील पहिले व शेवटचे आंदोलन होते.”[२१]

## आर्यसमाजाचे आंदोलन

अखिल भारताच्या तुलनेत हैदराबाद संस्थानात आर्यसमाजाचे अस्तित्व फारच कमी असले, तरी येथील प्रारंभीच्या चळवळीत ही संघटनाच अग्रेसर होती. आर्यसमाजाच्या पूर्वोक्त धारूरच्या शाखेनंतर शाखांची संख्या वाढून १९४१ च्या जनगणनेत संस्थानात एकूण २४१ शाखांची नोंद झाली. १९४१ साली इथे या पंथाचे ४०,००० लोक असल्याचे आढळले होते. त्यांची संख्या मुख्यतः मराठवाडा विभागातच असून उस्मानाबाद व नांदेड जिल्ह्यांमध्ये आर्यसमाजी केंद्रित झालेले होते. दुसऱ्या कोणत्याही संघटनेपेक्षा आर्यसमाजाने आपला लढा सर्वाधिक मोठ्या

प्रमाणात आणि अधिक काळापर्यंत चालू ठेवला. या संघटनेचा लढा दहा महिने म्हणजे २४ ऑक्टोबर १९३८ पासून ७ ऑगस्ट १९३९ पर्यंत चालू राहिला. या कालावधीत आर्यसमाजाचे एकूण १२,००० सत्याग्रही निजामाच्या कारागृहांमध्ये गेले, अशी लेखी कबुली अकबर हैदरींनी गांधीजी व मा. श्री. अणे यांना लिहिलेल्या पत्रांमधून दिली होती. मात्र हिंदुमहासभेने हा आकडा १५९० इतकाच दाखवला आहे. सत्याग्रहींमध्ये बाहेरचे लोकच बहुसंख्य होते हे मात्र खरे. स्टेट काँग्रेस तसेच हिंदुसभा यांच्यापेक्षा आर्यसमाज अधिक सुसंघटित होता.

मुसलमानांनी चालविलेल्या धर्मान्तराच्या मोहिमेला आळा घालून शुद्धीकरण करून घेण्यावर आर्यसमाजाचा कटाक्ष होता. त्यामुळे निजामी प्रशासन त्यांना दडपण्याचा प्रयत्न करीत असे. खालचे अधिकारी या पंथाची हवनकुंडे वा मंदिरे नष्ट करीत. मा. श्री. अणे यांनी आर्यसमाजाच्या धार्मिक स्वरूपाच्या मागण्यांबाबत निजामाचे एक बडे जहागीरदार महाराजा सर किशनप्रसाद बहादूर यांच्याकडे वकिली केली होती. पण व्यर्थ! म्हणून ३० एप्रिल १९३८ रोजी आर्यसमाजाने चौदा मागण्यांचे निवेदन निजाम शासनाला सादर केले. त्यात धार्मिक विधी व समारंभ साजरे करणे, यज्ञशाळा व हवनकुंडे आणि मंदिरे बांधणे याबाबत मुभा असावी अशा मागण्या होत्या. याशिवाय सरकारने धर्मान्तरास उत्तेजन देऊ नये ; प्रचारकांवर बंदी घालू नये ; प्राथमिक व माध्यमिक शिक्षण उर्दूतून घेण्याची सक्ती न करता ते मातृभाषेतून घेण्याची मुभा असावी ; हिंदूंना शाळा, व्यायामशाळा काढण्यास परवानगी असावी, अशा स्वरूपाच्या मागण्या होत्या.

तथापि सरकारने सर्व मागण्या अमान्य करून आर्यसमाजाच्या पुढाऱ्यांनाच टार्गेट केले. सरकारने उदगीरचे पं. बंसिलाल व शामलाल आणि हैदराबादचे पं. नरेंद्र सक्सेना यांना अडकवण्याचे प्रयत्न सुरू केले. ८ ऑक्टोबर १९३८ रोजी नरेंद्र यांच्यावर आक्षिप्त वाङ्मय जवळ ठेवले असा आरोप ठेवून त्यांना तुरुंगात टाकले. सरकारी जुलमांचा असा नंगानाच चालू असल्यामुळे प्रक्षोभ वाढला. उदगीरमधील प्रक्षोभसमयी पोलिसांनी जबर मारहाण केली. त्यात जखमी झालेले माणिकराव व भीमराव हे कार्यकर्ते मरण पावले. यानंतरच्या दंगल

प्रकरणी अटक झालेल्या पं. शामलाल यांना अधिकाऱ्यांनी कपटाने विष देऊन ठार मारले. त्यामुळे जनमत भयंकर खवळले. त्यामुळे गांधीजींच्या विचारप्रणालीनुसार सत्याग्रह करणे हाच पर्याय उरला.

स्टेट काँग्रेस व आर्यसमाज या दोन्ही संघटनांचा सत्याग्रह साधारणपणे एका वेळी सुरू झाला असे मानतात. मात्र ज्यांनी या संस्थानातील अन्यायाचा समक्ष पाहणीतून अभ्यास केला होता ते नारायणस्वामी आर्य प्रतिनिधी सभेच्या पहिल्या तुकडीचे सर्वाधिकारी ठरले. आपल्या सहकाऱ्यांसह ते ३१ जानेवारी १९३९ ला हैदराबादेत आले. त्यांनी गांधीप्रणीत सत्य-अहिंसेच्या मार्गानेच सत्याग्रह करण्याचे निश्चित केले. निजामाने त्यांना अटक करून सोलापुरात नेऊन सोडले. लवकरच ४ फेब्रुवारीला त्यांनी गुलबर्गा शहरात २० सत्याग्रहींसह पुन्हा कायदेभंग करताच सहकाऱ्यांसह त्यांना अटक करण्यात आली. यानंतर भारतातील आर्यसमाजी सर्वाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली संस्थानातील अनेक शहरांमध्ये सत्याग्रह करण्यात आले. सत्याग्रहाचा जोर वाढत असताना एकट्या औरंगाबादच्या सत्याग्रहात ७०० जण होते. सोलापूर, बार्शी, नगर, मनमाड, पुसद, चंद्रपूर, विजयवाडा इ. सीमेवरील शहरी सत्याग्रहाची केंद्रे उभारण्यात आली. तेथून संस्थानात पथके व सामग्री पाठविण्यात येई.

**सोर्स मटेरिअलचा** अभ्यास करता मला आढळले की, ‘निजाम सरकार मुंबई आणि मध्यप्रांत-वऱ्हाडच्या सरकारांकडे तक्रार करीत असे की, त्यांच्या प्रांतांमधून प्रशिक्षित सत्याग्रही संस्थानात पाठविले जातात ; पैसे व साधनसामग्री पाठविली जाते ; पुणे, मुंबई व सोलापूरची मराठी वर्तमानपत्रे भडक भाषेत प्रचारकी साहित्य प्रकाशित करतात. तरीही अशा पत्रकांवर व टीकाकारांवर मुंबई इलाख्यात कारवाई करण्यात येत नाही, इत्यादी’. शिवाय वर उल्लेख केल्याप्रमाणे निजाम सरकारने थेट भारतमंत्री व हिंदुस्तान सरकारकडेही अनेक तक्रारी केल्या. ‘ मुंबई इलाखा, मध्यप्रांत अथवा इतर प्रांतांमधील सरकारे आम्हाला कसलीच माहिती देत नाही ’, अशी लंडनकडे कैफियत पाठविली. तरीही प्रांतिक

सरकारांनी तशा तक्रारींची दखलही घेतली नव्हती. किंबहुना शार्प या गुप्तचर विभागाच्या प्रमुखाने सडेतोड उत्तर देऊन सुनावले होते की, 'येथे काँग्रेसचे सरकार असून भाषण व लेखनस्वातंत्र्य देण्याचे धोरण आहे, म्हणून दिलगीर आहोत'.

भारतमंत्री महोदयांना उत्तर पाठविण्यासाठी हिंदुस्तान सरकारच्या गृह विभागाने सादर केलेल्या टिपणीत दिलखुलासपणे मान्य केले की, " हैदराबाद संस्थानातील हिंदू प्रजेने धार्मिक स्वातंत्र्यासाठी उभारलेली ही चळवळ अगदी विशुद्ध कारणासाठी आहे. उत्तर हिंदुस्तानात प्रभाव असलेला आर्यसमाज व मध्य भारतात जोर असलेली हिंदुमहासभा या चळवळीमागे असली तरी, सोलापुरातील युद्धमंडळ या चळवळीची सर्व सूत्रे हलवीत आहे. घटनात्मक सुधारणांसाठी हैदराबाद स्टेट काँग्रेसने उभारलेला लढा राष्ट्रीय काँग्रेसच्या छुप्या मदतीने उभा राहिला. परंतु त्याची जातीय चळवळीशी सरमिसळ झाली आहे. म्हणून तो बंद करण्यात आला. पण तरीही काँग्रेस नेते व मंत्री आणि सर्व कार्यकर्त्यांची या हिंदू चळवळीस पूर्ण सहानुभूती आहे. मात्र निजाम सरकारने अगदी प्रारंभापासूनच हिंदू चळवळ दडपण्यासाठी आक्रमक दडपशाही केल्याकारणाने शेजारची मुंबई, मध्यप्रांत व मद्रासची सरकारे हैदराबादला पाठिंबा देत नाहीत. " मुंबईनेही (वरीलप्रमाणे) सडेतोड उत्तर दिले होते. पण मुंबईपेक्षाही मध्यप्रांत-वऱ्हाड सरकार निजामी राजवटीच्या जास्त विरोधात होते. वऱ्हाडमधून अनेक जथे मराठवाड्यात गेले होते.

गृह विभागाने पुढे म्हटले की, " हैदराबादच्या ब्रिटिश रेसिडेंटच्या मते त्या राज्यातील मुसलमान पुढारी हिंदूंबाबतच्या धोरणात अजिबात ढिलाई अथवा लिबरल धोरण स्वीकारू नये, असा निजामावर दबाव आणत आहेत ; राज्यातील मुस्लीम राजवटीला धोका पोहोचू नये यावर ते ठाम आहेत. त्यामुळे तेथील सत्ताधीश संभ्रमात पडलेले आहेत ".[२२]

या टिपणीत वस्तुस्थितीचे स्वयंस्पष्ट मूल्यमापन असल्याने त्यावर अधिक भाष्य करण्याची गरज नाही.

हा सत्याग्रह करणाऱ्या 'स्थानिकांमध्ये' ७५ ते ८० टक्के जण मराठवाडा विभागातील होते. या भागातील शेषराव वाघमारे, दिगंबर शिवणीकर, शंकर पाटील, निवृत्ती रेड्डी, दिगंबर लाटकर, गणपत कथले यांचा आम्हाला पथकांचे नेते म्हणून उल्लेख आढळला. पाच जिल्ह्यांपैकी सर्वाधिक आर्य सत्याग्रही उस्मानाबाद जिल्ह्यातील होते. आर्यसमाजाच्या नोंदीनुसार एकूण १२,००० जणांनी या सत्याग्रहात कारावास भोगला होता.

जुलै १९३९ मध्ये आर्यसमाजाशी बोलणी करून निजाम सरकारने बहुतेक सर्व धार्मिक मागण्या संमत केल्या आणि राजकीय सुधारणांची एक योजना १७ जुलै १९३९ रोजी घोषित केली. चळवळ करून आर्यसमाजाने धार्मिक मागण्या पदरात पाडून घेतल्या. हिंदुमहासभेनेही ही योजना मान्य केली. तथापि घटनात्मक परिवर्तनाची व राजकीय सुधारणांची मागणी करणाऱ्या काँग्रेसने निजामाची योजना पूर्णतया फेटाळली. अखेर ७ ऑगस्ट १९३९ ला आर्यसमाजाने सत्याग्रह थांबविला.

या इतिहासात नोंद घेणे आवश्यक आहे की, संस्थानातील आर्यसमाजाचे आंदोलन गांधीप्रणीत सत्य व अहिंसेच्या तत्त्वावर आधारित होते. आपल्या मागण्यांसाठी त्यांनी सविनय कायदेभंग केला म्हणूनही स्वतः गांधीजींनी या सत्याग्रहासंबंधी बरीच आस्था दाखविली होती. नारायणस्वामी वगैरेंना कारावासात झालेल्या यातनांबाबत त्यांनी अकबर हैदरींना पत्रे लिहिली. मात्र हिंदुमहासभेच्या जातीय धोरणापासून आर्यसमाजाने लांब राहावे अशी त्यांनी वेळीच सूचना केली. पुढील काळात या संघटनेने धार्मिक कार्यास वाहून घेतले. पण तरीही हैदराबाद स्टेट काँग्रेसलाच आपल्या निष्ठा वाहिल्या. राजकीय क्षेत्रात आर्यसमाजाने याच संघटनेला पाठिंबा देऊन चळवळीत भाग घेतला. नंतर स्टेट काँग्रेसनेच राजकीय चळवळ चालू ठेवली. आर्यसमाज काँग्रेसच्या चळवळीत सहभागी झाला. मात्र आर्यसमाजाने हिंदुमहासभेच्या राजकारणापासून लांब राहण्याचे धोरण स्थूलमानाने अमलात आणले.

## वंदे मातरम् आंदोलन

ब्रिटिश इंडियात प्रांतिक स्वायत्तता व काँग्रेस मंत्रिमंडळांचे आगमन झाल्यावर संस्थानी भागातील विद्यार्थ्यांच्या आशाआकांक्षा प्रफुल्लित झाल्या. स्टेट काँग्रेसनेही सत्याग्रहाचे रणशिंग फुंकल्यामुळे अनेक युवकांनी सत्याग्रहासाठी नावे नोंदवली होती. युवकांमध्ये अन्यायाचा प्रतिकार करण्याची ताकद आली. एवढ्या मोठ्या संस्थानात हैदराबाद शहराबाहेर मराठवाडा, कर्नाटक व तेलंगणासाठी अनुक्रमे औरंगाबाद, गुलबर्गा व वरंगल येथे इंटरमिडिएट पातळीपर्यंतचे फक्त एकेक कॉलेज होते. जिल्हा मुख्यालयांमध्ये प्रत्येकी एकच सरकारी हायस्कूल होते. मात्र अंबेजोगाई व औरंगाबादी एकेक खासगी माध्यमिक शाळा होत्या. मराठवाड्यात इतकीच शैक्षणिक सुविधा होती. याच पार्श्वभूमीवर वंदे मातरम् आंदोलन संघटित होऊन त्याने देशात नाव मिळविले. मात्र या आंदोलनाची पहिली ठिणगी पडली औरंगाबादमध्येच !

स्वातंत्र्य आंदोलनात बंकिमचंद्रांच्या वंदे मातरम् गीताला स्वयंस्फूर्त प्रतिसाद लाभलेला होता. राष्ट्रभक्तीचे ते प्रतीक झालेले होते. थोडे विषयांतर करून लिहावेसे वाटते की, प्रत्येक काँग्रेस अधिवेशनात थोर गायक पं. विष्णू दिगंबर पलुसकर हे गीत गात. तेथे तो त्यांचाच अधिकार होता. त्यांच्या निधनानंतर हे गीत हिंदुस्तानी संगीतातील दहा-अकरा रागांमधून सादर करण्यात येई. याबाबत वाद निर्माण झाल्यामुळे काँग्रेस अध्यक्ष जवाहरलाल नेहरू यांनी तज्ज्ञांची समिती नेमली होती. अखेरीस हे गीत देस रागात म्हणण्याबाबत बहुमत झाले. बॅ. महंमद अली जिनांनी या गीताबद्दल दुसराच वाद निर्माण केला. म्हणून ६ एप्रिल १९३८ च्या पत्रानुसार पं. नेहरूंनी जिनांना कळविले की, “ वंदे मातरम् किंवा अन्य कोणत्याही गीताचा काँग्रेस पक्षाने राष्ट्रगीत म्हणून स्वीकार केलेला नाही. तरीसुद्धा स्वातंत्र्य चळवळीत जनतेने अगदी स्वयंस्फूर्तपणे वंदे मातरम्ला राष्ट्रगीताचा सन्मान दिलेला आहे. ही सत्यस्थिती कोणालाही नाकारता येणार नाही. म्हणून या गीताची पहिली दोन कडवी म्हणण्यास लोकांना मनाई करणे उचित होणार नाही. ” नेहरूंनी असे बजावल्यावर जिना काही करू शकले नव्हते. प्रारंभी

निजाम सरकारनेही या गीताबाबत आक्षेप घेतला नव्हता. पण मद्रासच्या कायदेमंडळात एका सदस्याने वंदे मातरम्बाबत आक्षेप घेतल्यावर ही बाब निजामी कर्मठांच्या लक्षात आली.

वस्तुतः हैदराबादच्या उस्मानिया विद्यापीठातील हिंदू मुले, त्यांच्यासाठी असलेल्या स्वतंत्र वसतिगृहातील प्रार्थनागृहात, सामायिक प्रार्थना म्हणून वंदे मातरम् गीत म्हणत असत. औरंगाबादची घटना घडेपर्यंत याकडे कोणी लक्ष दिले नव्हते. हैदराबादच्या वंदे मातरम्ची माहिती चार महिन्यांनंतर मिळाल्यावर औरंगाबाद कॉलेजातील मुलांनी १४ नोव्हेंबर १९३८ रोजी वसतिगृहात 'वंदे मातरम्' गीतगायनास प्रारंभ केला. विद्यापीठाच्या वसतिगृहातील वंदे मातरम्चा पूर्वदाखला समोर असल्यामुळे आणि इत्तेहादूल मुसलमीनचे लोक त्यामुळे चिडल्याकारणाने, औरंगाबादच्या मुलांनी या गीतगायनाचा उपक्रम सुरू केला.

शिवाय विद्यार्थ्यांमध्ये अत्यंत लोकप्रिय असलेल्या प्रा. गोविंददास श्रॉफ यांना राजकीय कारणास्तव ९ नोव्हेंबरला बडतर्फ केल्यामुळे विद्यार्थी अधिकच निग्रही बनले होते. औरंगाबादचे हे कॉलेज वसतिगृह सध्याच्या सुभेदारी गेस्ट हाऊसजवळ किलेअर्क परिसरात होते. प्राचार्याच्या आदेशाला मुलांनी अन्नसत्याग्रहाने उत्तर दिले. म्हणून प्राचार्यांनी हैदराबाद गाठले. त्यावर शिक्षणमंत्री व विद्यापीठाचे कुलगुरु या दोन्ही पदांवर असलेल्या मेहदी नवाज जंग यांनी प्राचार्यांना तारेने दिलेल्या १७ नोव्हेंबरच्या आदेशात फर्माविले, " State Government cannot allow Vande Mataram to be sung in hostel or boys to remain on hunger strike on premises after due warning and persuasion. Taluqdar being instructed to give you all assistance in his power. "[२३]

औरंगाबादच्या घटनेनंतर कोणीतरी शिक्षणमंत्र्यांकडे अर्ज पाठवून तक्रार केली की, वंदे मातरम् गीत राजकीय असून त्यामुळे मुसलमानांच्या भावना दुखावल्या जातात. रमजानच्या सुटीनंतर कॉलेजात आलेल्या मुलांना बंदीहुकूम सांगण्यात आला. कुलगुरुच्या २८ नोव्हेंबरच्या फतव्यात म्हटले होते की, वंदे मातरम् गीत राजकीय व धार्मिक स्वरूपाचे व वादग्रस्त असून त्यात मूर्तिपूजा अभिप्रेत

आहे. त्यामुळे अहिंदू विद्यार्थ्यांच्या भावना दुखावल्या जातात. म्हणून विद्यापीठाच्या किंवा कॉलेजच्या प्रार्थनागृहांमध्ये हे गीत म्हटले जाऊ नये.[२४]

म्हणून मुले उघड्यावर वंदे मातरम् म्हणू लागली. आदेशांचे पालन न करणाऱ्यांना कॉलेजातून तात्पुरते काढून टाकण्यात आले. या कृतीचा निषेध म्हणून हैदराबादेतील कॉलेजांमधील हिंदू मुले संपावर गेली. याच सुमारास काही मुसलमानांनी आगीत तेल ओतण्याचे दुष्कर्म केले. मेहबूब कॉलेजच्या एका वर्गातील गांधीजींची तसबीर काढून टाकण्यात आली. एका प्राध्यापकाने त्याच्या गाडीसमोर आडव्या पडलेल्या मुलांच्या अंगावरून मोटर हाकण्याचा प्रयत्न केला. इस्लाम धर्मशास्त्राच्या दुसऱ्या एका प्राध्यापकाने धर्माविषयी प्रक्षोभक विधान करून आगळीक केली होती.

उस्मानिया विद्यापीठाने सर्व विद्यार्थ्यांसाठी मुसलमानी गणवेश विहित करून आगीत अधिक तेल ओतले. निळ्या अथवा काळ्या रंगाची शेरवानी आणि खाली तुमान या गणवेषाची सक्ती केल्यामुळे विद्यार्थी अधिकच चिडले.

या व इतर अनेक कारणांमुळे विद्यार्थी जगतात असंतोष पसरला. ३० नोव्हेंबर १९३८ पासून हैदराबाद शहरातील सर्व महाविद्यालये व औरंगाबाद, गुलबर्गा व वरंगलची इंटरमिडिएट कॉलेजे संपाच्या विळख्यात सापडली. औरंगाबाद, परभणी, नांदेड, बीदर व मेहबूबनगरच्या शाळांमधील मुलेही संपात सामील झाली. आनंद कृष्ण वाघमारे, गोविंदभाई व स. कृ. वैशंपायन त्यांना मार्गदर्शन करीत व उत्तेजन देत. बरेच संपकरी विद्यार्थी हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या राजकीय सत्याग्रहातही सहभागी झाले व कारावासातही गेले.

अस्स्ल दस्तऐवजांचा अभ्यास करता मला आढळले की, औरंगाबादच्या विद्यार्थ्यांनी एक संघटना स्थापन करून ३ डिसेंबर १९३८ रोजी कॉलेजच्या प्राचार्यास पत्र पाठविले. प्रशासनाने हा प्रतिष्ठेचा प्रश्न न मानता आमच्या भावना समजून घ्याव्या अशी विनंती केली. त्यांनी प्राचार्यास सहकार्य करण्याचे आश्वासन देऊन हा प्रश्न सामंजस्याने सोडविण्याची विनंती केली. तरीही हटवादी प्रशासनाने विद्यापीठातील १३० मुलांना रस्टिकेट केले. याची प्रतिक्रिया म्हणून विविध महाविद्यालयांमधील एक हजार मुलांनी संप केला, तर शेकडोंनी अन्नसत्याग्रह

केला. वंदे मातरम्च्या आग्रहासाठी अगणित विद्यार्थी बेमुदत संपावर गेले, आणि हा वणवा राज्यभर पसरला. तरीही अविवेकी अधिकाऱ्यांनी नोटिसा लावून सुमारे १२०० विद्यार्थ्यांना रस्टिकेट केले.

सत्याग्रहात निर्माण झालेल्या चमत्कारिक कोंडीविषयी ' लोक शिक्षण परिषदेच्या ' सचिवाने अकबर हैदरींना लिहिले, " प्रशासनाने दडपशाही करूनही सत्याग्रह काळात विद्यार्थ्यांमध्ये लक्षणीय ऐक्यभाव टिकून राहिला. मुलांनी विलक्षण संयम व धैर्य दाखविले ; आणि हा प्रश्न सामंजस्याने सोडविण्यासाठी चर्चा व सामोपचाराचा मार्ग खुला असल्याचे जाहीर केले. त्यांनी कोणाच्याही धार्मिक भावना न दुखावता प्रार्थना म्हणण्यासाठी विविध पर्याय सुचविले. तथापि प्रशासनातील हट्टी व आडमुठ्या अधिकाऱ्यांनी त्या पर्यायांना प्रतिसाद दिला नाही. वस्तुतः विद्यार्थी आपला संप मागे घेण्यासही तयार होते, मात्र विनाअट नव्हे ! आपला लढा न्यायासाठीच असल्याची त्यांची श्रद्धा असल्यामुळे त्यांना उचित बदलांचे आश्वासन हवे. अन्यथा भविष्यातही त्यांची कदर होणार नाही असे त्यांना वाटते. शिवाय विद्यमान शिक्षण व्यवस्थेतील दोष चालू ठेवणे सर्वथा अनुचित होय. वंदे मातरम् प्रकरण समंजसपणे न सोडवल्यास हैदराबादच्या सत्ताधीशांची पक्षपाती व अरेरावीची वागणूक व त्यांचा अहंगड यांची इतिहासात नोंद होईलच. तसेच, हिंदू व मुसलमान या दोन समाजांमधील तेढ वाढतच जाईल. " असा त्या परिषदेने शासनास इशारा दिला. तरीही सरकारने आपले असहिष्णू व धर्मवेडाचे धोरण बदलले नाही.[२५]

पुढे आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री आणि नंतर भारताचे पंतप्रधान झालेले पी. व्ही. नरसिंहराव हे वंदे मातरम् सत्याग्रहाचे एक आघाडीचे नेते होते. त्यांनी उस्मानिया विद्यापीठातील विद्यार्थ्यांची संघटना उभारून त्यांना प्रथमच अन्यायाविरुद्ध लढ्यात सक्रिय केले होते.

बरेच दिवस सत्याग्रह चालू ठेवल्यावर पुष्कळ विद्यार्थ्यांना अन्य विद्यापीठांकडे धाव घेणे भाग पडले. तथापि अन्नामलाई, मद्रास वा बनारस हिंदू विद्यापीठाने त्यांना थारा दिला नाही. याबाबत हिंदुसभेच्या एका तरुण नेत्याने नागपूर

विद्यापीठाचे कुलगुरु तुकाराम जे. केदार यांची व मुलांची भेट घडवून आणल्यामुळे हैदराबादच्या मुलांना नागपुरात प्रवेश मिळू शकला, अशी भाकडकथा लिहिली गेली. तथापि ती सत्य नाही. सत्य हे आहे की, मध्यप्रांत-वऱ्हाडच्या कॉँग्रेस सरकारनेच हैदराबाद संस्थानातील बाधित व वंचित युवकांविषयी दिलखुलास सहानुभूती घोषित केली होती. कॉँग्रेसच्या धोरणानुसार वऱ्हाड-मध्यप्रांताचे मुख्यमंत्री रविशंकर शुक्ला यांनी नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु तुकारामपंत जे. केदार यांना त्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याविषयी सूचना दिली. केदारांनी हा विषय नागपूर विद्यापाठीच्या कार्यकारी मंडळापुढे मांडला. या मंडळाने याबाबत होकारात्मक निर्णय घेताच केदारांनी त्या विस्थापित झालेल्या मुलांना प्रवेश मंजूर केला.

याबाबतचे वृत्त देताना १७ जानेवारी १९३९ च्या **हिंदू** पत्रकाने केदारांनी उस्मानिया विद्यापीठातून नागपूरमध्ये दाखल झालेल्या ४७२ विद्यार्थ्यांपुढे दिलेल्या व्याख्यानाचा वृत्तान्तही दिला. केदारांनी ठामपणे प्रतिपादन केले होते :—" वंदे मातरम् गीतामुळे कोणत्याही जमातीच्या भावना दुखावण्याचे काहीच कारण नाही ; सार्वजनिक जीवनातील आपल्या २० वर्षांच्या अनुभवात सर्व धर्मांच्या व पंथांच्या लोकांनी या गीताविषयी आदरभाव व्यक्त केला असे मला आढळले. या गीतात मूर्तिपूजेचा आशय असल्याची हरकत फक्त मागील दोन वर्षांतच घेतली गेली. आपण या गीताचा सखोल अभ्यास केला आहे. मध्यप्रांताचे माजी गव्हर्नर सर हाईड गोवॅन हे वंदे मातरम् गीतगायनाच्या प्रसंगी श्रोत्यांसमवेत उभे राहून आदरभाव व्यक्त करीत ", ही आठवणही केदारांनी या भाषणात सांगितली. " आमच्या प्रांतात अनुज्ञेय असलेले हे गीत हैदराबादेत का बेकायदा असावे ! आम्ही मुलांच्या शैक्षणिक भवितव्याचाच विचार केला. त्यांच्या शिक्षणविषयक तळमळीला आम्ही प्रतिसाद दिला."[२६]

उस्मानियामधून नागपूर विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या युवकांमध्ये पी. व्ही. नरसिंहराव प्रमुख होते. याच आंदोलनापासून त्यांच्यावर राजकारणाचे संस्कार होण्यास मदत झाली. नरसिंहराव वंदे मातरम् विद्यार्थी कृती समितीचे तडफदार सदस्य होते. तेव्हापासून नरसिंहराव समाजवादी विचारप्रणालीकडे झुकू लागले.

सुमारे १२०० मुले गटागटाने नागपूरला आल्यावर त्यांची शहरातील दोन्ही महाविद्यालयांमध्ये व्यवस्था करण्यात आली. काहींना जबलपूरच्या रॉबर्टसन महाविद्यालयात जावे लागले. शालांत परीक्षेच्या वर्गातील मुलांना खामगावच्या राष्ट्रीय विद्यालयात प्रवेश देण्यात आला. नववीमधील मुलांना नगरमध्ये तर आठवीतील मुलांना येवल्याच्या आपटे गुरुजींच्या विनय मंदिरात प्रवेश देण्यात आला. **या अत्यंत अवघड कामी नगरचे पुरुषोत्तम हरी ऊर्फ रावसाहेब पटवर्धन यांनी फारच मोलाचे योगदान दिले. गरीब मुलांसाठी अल्पशी आर्थिक मदतही संघटित करावी लागली. असे मदतकार्य व रावसाहेब पटवर्धनांची मदत मिळविण्यात गोविंददास श्रॉफ यांचा पुढाकार होता. किंबहुना वंदे मातरम् आंदोलनाचे गुप्त प्रवर्तक व मार्गदर्शक गोविंददास हेच होते.** गांधीजी व सुभाषबाबूंनी चळवळीस आधीच पाठिंबा दिला होता.

जबलपूरजवळ त्रिपुरी येथे संपन्न झालेल्या १९३९ च्या काँग्रेसमध्ये 'वंदे मातरम् विद्यार्थ्यांचा' एक मेळावा झाला. त्यामुळेही संस्थानातील युवकांच्या समस्या राष्ट्रीयस्तरावर चर्चिल्या गेल्या. पं. नेहरूंनी वंदे मातरम् आंदोलनाची तारीफ केली होती. दरम्यानच्या काळात महात्माजींनी हैदराबादमधील सर्वच आंदोलनाबाबत मौन धारण केले होते, ते उघडपणे बोलले नव्हते. तथापि मौलाना आझादांच्या सहकार्याने गांधीजी स्वतः आर्यसमाज आणि हैदराबादचे मुसलमान मित्र व नेत्यांच्या संपर्कात होतेच. त्यांनी **हरिजन** मधून हा गौप्यस्फोट करताच हिंदुसभेच्या नेत्यांचा आनंद क्षणिक ठरला. कारण दोनच दिवसांपूर्वी म्हणजे १७ ऑगस्ट १९३९ रोजी निजामाने आपल्या वाढदिवशी सर्व राजबंद्यांची सुटका करण्याची घोषणा केली होती. शिवाय निजामाने काही किरकोळ राजकीय सुधारणा जाहीर केल्या होत्या.

वंदे मातरम् प्रकरणाची सर्वात मोठी फलनिष्पत्ती ही की, यातून या प्रांतातील राजकारण व सर्व आगामी आंदोलनांसाठी अनेक नेते व कार्यकर्ते निर्माण झाले. विशेषतः मराठवाड्यात प्रचंड जागृती झाली आणि राजकीय संघटनेचा पाया घातला गेला. स्टेट काँग्रेसवर बंदी असल्याने पूर्वोक्त प्रांतिक परिषदा पुन्हा सक्रिय झाल्या. स्टेट काँग्रेसने आपल्या नावातील काँग्रेस हा शब्द वगळल्यास तिच्यावरील बंदी उठवणे शक्य होईल, असे निजामातर्फे सांगण्यात आले. म्हणून जहालांनी हैदराबाद ' नॅशनल कॉन्फरन्स ' या नावाचा प्रस्ताव अगदी अनिच्छेने मान्य केला. पण त्यातील नॅशनल या शब्दाचेही निजामाला वावडे होते. त्या कारणाने पत्रव्यवहार निष्फळ ठरला. संघटनेवरील बंदी चालू राहिली. तरीही गांधीजींच्या सूचनेप्रमाणे स्वामी रामानंदांनी स्टेट काँग्रेसचे अस्तित्व टिकवून ठेवले. संघटन कार्य चालू ठेवले.

गांधीजी व अकबर हैदरी यांच्यात ४ एप्रिलपासून ७ जूनपर्यंत झालेल्या पत्रव्यवहारातून स्पष्ट दिसते की, पंतप्रधान असलेला हा मनुष्य सत्यापलाप करीत होता. पण त्याहीपेक्षा तो मूळ विषयाला हुलकावणी देऊन फाटे फोडणारी असत्य विधाने करीत होता. वस्तुतः त्याचे ' डाइव्हर्जनरी ' डावपेच आधीच गांधीजींच्या लक्षात आलेले होते. तरीही हैदरी महाशय प्रत्येक पत्रात जातीय समस्यांचा व ताणतणावांची टिमकी वाजवत. 'हिंदू-मुसलमानांमधील तेढ कमी करण्यात आणि त्यांच्यात सलोखा निर्माण करण्यात आम्ही व्यग्र आहोत ; त्यासाठी आपण ब्रिटिश इंडियात प्रयत्न करावे ', अशी ते विनंती करीत. बिहारमधील एका किरकोळ घटनेबाबत गांधीजींनी चौकशी करावी, असेही त्यांनी बापूजींना सुचवले होते. म्हणून बापूजी यांनी त्या महाशयांना सडेतोडपणे सुनावले, " Your letters make a strange reading. Communal unity would never come by generalizations or glossing over serious disturbances ......... But if there was a denial of justice in Bihar, it is no precedent worthy to be copied." (9th May 1940). " You have given me stone where I had asked for bread. ...... As you know, I

have put a gag on myself regarding Hyderabad, but I feel that I must not do so now, if I am to do my duty for the people of Hyderabad ". (14th April 1940). तरीही हैदरी डाइव्हर्जनरी सत्यापलाप व ढोंगबाजी करीतच राहिल्याने गांधीजींनी त्यांना खडसाविले, " I see I have lost caste with you ......... I am guiding the Hyderabad State Congress (now defunct) and restraining them ". (7th June 1940).[२७]

१९४० च्या रामगढ काँग्रेसने हैदराबादबाबतचे अलिप्ततेचे धोरण पूर्णतः बदलले. काँग्रेसने सरळ ठराव करून संस्थानी जनतेतील जागृतीचे स्वागत केले. " संस्थानिकांनी जनतेचा मार्ग अडवू नये. असे झाल्यास काँग्रेसला सर्व बंधने झुगारून संस्थानी जनतेच्या प्रश्नात लक्ष घालावे लागेल." अशा स्पष्ट शब्दांत रामगढ काँग्रेसने हैदराबादला धमकीच दिली. यानंतर काँग्रेसच्या जोडीने सक्रिय झालेली अखिल भारतीय संस्थानी प्रजापरिषदही लक्ष घालू लागली. १९३७ साली पट्टाभी सीतारामय्या या संघटनेचे अध्यक्ष होताच त्यांनी निजाम स्टेट पीपल्स कॉन्फरन्सचे कार्यालय सुरू केले. निजाम राजवटीबाबत ठराव करण्यात आला की, स्टेट काँग्रेसवरील बंदी न हटवल्यास तिथे सत्याग्रह करावा. मात्र त्यांना या संस्थानात प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली.

## मराठवाड्यातील वैयक्तिक सत्याग्रह

दुसऱ्या जागतिक महायुद्धकाळात व्यापक लढा उभारण्यात धोके होते. म्हणून महात्मा गांधींनी ' वैयक्तिक सत्याग्रह ' ही रणनीती स्वीकारली. आचार्य विनोबा भावे यांना भारतातील पहिले सत्याग्रही आणि जवाहरलाल नेहरू यांना दुसरे सत्याग्रही म्हणून गांधीजींनी नामनिर्देशित केले होते. रामानंद तीर्थ सेवाग्राममध्ये गांधीजींना दोनदा भेटले. त्या भेटीत गांधीजींनी रामानंद तीर्थ, बीडचे मोतीलाल मंत्री व हिरालाल कोटेचा, उस्मानाबादचे देवरामजी चव्हाण आणि औरंगाबादचे अच्युतभाई देशपांडे यांची संस्थानातील पहिले पाच सत्याग्रही म्हणून निवड केली. गांधीजींच्या आज्ञेनुसार रामानंदांनी निजामास विनंती केली की, विनाविलंब जबाबदार राज्यपद्धती मान्य करावी आणि स्वतंत्र भारताच्या संघराज्यात सामील

होण्यास तयार असल्याचे घोषित करावे ; तसेच पूर्ण नागरी स्वातंत्र्य जाहीर करावे. अनेक विनंत्यांप्रमाणे ही विनंती झिडकारण्यात आल्यामुळे या पाच जणांनी सत्याग्रहाची विहित प्रतिज्ञा घेऊन निजामाचा व ब्रिटिशांचा धिक्कार केला. त्यामुळे त्यांना १२ सप्टेंबर १९४० रोजी अटक झाली आणि या प्रदेशात वैयक्तिक सत्याग्रहाचा प्रारंभ झाला.

त्यानंतर डॉ. जी. एस. मेलकोटे, रामकिशन धूत, हेडा, गोविंदभाई, आनंद वाघमारे, स. कृ. वैशंपायन, व्ही. डी. देशपांडे, डी. एल. पाठक, सय्यद हबीबुद्दीन, रा. भि. हेमाद्री, गणपत चारठाणकर, रतिलाल वगैरेंना सत्याग्रहासाठी अटक करण्यात आली. दामोदरदास मुंदडा, बॅ. श्रीकृष्ण शर्मा वगैरेंना हद्दपार करण्यात आले. ही यादी केवळ प्रतीकात्मक असून अपुरी आहे. लवकरच ‘ छोडो भारत ’ क्रांतिलढा भारतभर घोंघावू लागला. मराठवाड्यात औरंगाबादचा गोविंदभाईंचा गट २२ महिन्यांच्या स्थानबद्धतेतून २४ ऑक्टोबर १९४२ रोजी मुक्त झाला. त्यांना सोडताना सरकारची अपेक्षा होती की, इतर भारतीय कम्युनिस्टांप्रमाणे गोविंदभाई देखील छोडो भारतला विरोध करतील. तथापि या गटाने सरकारची निराशा केली. जबाबदार राज्यपद्धती व स्टेट काँग्रेसच्या मुद्यांवर त्यांनी सत्याग्रह चालूच ठेवला. कारण त्यांना साम्यवादापेक्षा स्वातंत्र्य अधिक मोलाचे वाटे.

मराठवाड्यातील वैयक्तिक सत्याग्रह व आधीचा वंदे मातरम् लढा हे गांधीवादी अहिंसात्मक प्रतिकार आणि कायदेभंगाचे नमुने होते. वंदे मातरम् लढा केवळ राष्ट्रगीतासाठी नव्हता. राष्ट्रगीत हे केवळ प्रतीक होते, मिठाच्या सत्याग्रहासारखेच ! त्या मुलांना मुसलमान मुलांशी संघर्ष करावयाचा नव्हता. किंवा संमिश्र समुदायात गीत म्हणण्याचा त्यांचा आग्रह नव्हता. तथापि बंदिस्त जागेतही वंदे मातरम् म्हणण्यास प्रतिबंध घालणे हास्यास्पद होते. तो असहिष्णुतेचा नमुना होता. निजामाच्या पक्षपाती व अहंगंडाच्या धोरणाचे हे द्योतक होते. पत्रव्यवहारातून दिसतेच की, अकबर हैदरी मूळ मुद्याला बगल देऊन जातीय प्रश्नांचा वारंवार उल्लेख करीत असत. पण त्यामुळे मराठवाड्यातील शेकडो युवक राष्ट्रीय प्रवाहात उतरले.

## निजाम-इंग्रज संबंध

दुसऱ्या महायुद्धाचा प्रारंभ होताच निजामाला इंग्रजांची अधिकाधिक मर्जी संपादन करण्याची संधी मिळाली. त्याने सक्तीच्या लेव्हीद्वारे धान्य गोळा करून ते इंग्रजांच्या सेनादलास पुरविले. जनतेवर अधिक कर लादून वॉर फंडास प्रचंड पैसा दिला. देशातील वॉर फंडातील सर्वात मोठी रक्कम कंजूस निजामाची होती. डिफेन्स ऑफ इंडिया रूलच्या धर्तीवर निजामाने डिफेन्स ऑफ हैदराबाद ॲक्ट आणला. त्या कायद्याचा मुख्य उपयोग मुक्ती लढा चिरडण्यासाठी केला. कंजूस निजाम इंग्रजांवर उदार झाला. अर्थात औदार्यामागे आपली सत्ता तहहयात चालू राहावी हा एकमेव हेतू होता.

महायुद्धासाठी संस्थानिकांनी दिलेल्या उदार मदतीची प्रशंसा करून सर विन्स्टन चर्चिलने त्यांची " स्ट्रॉंग पिलर्स ऑफ द इंडियन एम्पायर " अशी भलावण केली. व्हाइसरॉयने संस्थानिकांकडून विपुल द्रव्य व शुद्धसाहित्य उपटले. त्या बदल्यात आपले सर्व हितसंबंध जोपासण्यासाठी इंग्रजांनी मेहरबानी करावी, असे निजामाने व्हाइसरॉय लिनलिथगोंना आवर्जून लिहिले (निजामचे १२ मार्च १९४२ चे गोपनीय पत्र).

इंग्रज-निजाम यांचे परस्परसंबंध नेहमीच चुंबाचुंबी स्वरूपाचे असत. लॉर्ड लिनलिथगोंच्या प्रदीर्घ सत्ताकाळात या संबंधांचे स्पष्ट स्फटिकीकरण झाले. त्यात आणखी भर घातली सर स्टॅफर्ड क्रिप्स आयोगाने. क्रिप्सकडून आश्वासन मिळवल्यानंतर छत्तारीचा नबाब म्हणजे अहमद सईद या निजामाच्या मंत्र्याने क्रिप्सला लिहिलेल्या पत्रातील हे वाक्य फारच बोलके आहे. "His Exalted Highness ....desires to express his satisfaction at the assurance that it is not intended to transfer his treaty or other relations with the Crown in the United Kingdom to any other authority without his Highness' consent or affect in any way his status as a Sovereign or his position as a faithful Ally". पुढे अहमद सईद स्पष्ट करतो की, संभाव्य सत्तांतरानंतर निजामाने आपले संस्थान

हिंदुस्तानशी किंवा पाकिस्तानशी संलग्न करावे किंवा करू नये, याबद्दल निर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार क्रिप्सने निजामाला बहाल केलेला आहे. इतकेच नव्हे तर मराठवाडा प्रदेश, संपूर्ण वऱ्हाड प्रांत तसेच इंग्रजांना पूर्वी (१९०२ मध्ये) अभ्यर्पित केलेले जिल्हेदेखील स्वसंरक्षणार्थ आपल्याच ताब्यात असणे जरूर असल्याने, तो संपूर्ण प्रदेश आपणास मिळावा असा निजामाने दावा केला.

निजामाची अशी धूर्त मुत्सद्देगिरी चालू असताना हैदराबाद प्रजा परिषदेने स्टॅफर्ड क्रिप्सकडे पुढीलप्रमाणे कैफियत मांडली :—हे संस्थान अखंड हिंदुस्तानचा अविभाज्य भाग असल्यामुळे, सत्तांतरानंतर येथेही लोकशाही स्थापून हैदराबाद संस्थानाचा दर्जा देशातील इतर राज्यांप्रमाणेच असावा. तरीसुद्धा प्रजा परिषदेची मागणी कागदोपत्रीच राहिली. मात्र क्रिप्स कमिशनमुळे पाताळयंत्री निजामाच्या आशा पल्लवित झाल्या ही वस्तुस्थिती आहे.[२८]

## कोल्हापुरातील चळवळ

महाराष्ट्रातील संस्थानांमधील स्वातंत्र्य लढा ब्रिटिश मुलखातील आंदोलनापेक्षा अधिक गुंतागुंतीचा व खडतर होता. काही लोकांची संस्थानिकांशी निष्ठा होती, तर काहींना स्वातंत्र्य हवे होते. त्यामुळे चळवळीला मोठा लोकप्रतिसाद लाभत नसे. कोल्हापूर संस्थानच्या अधिपत्याखाली इचलकरंजी, विशाळगड, कुरुंदवाड (थोरली पाती), कुरुंदवाड (धाकटी पाती), तोरगळ, जमखिंडी वगैरे उप-संस्थाने किंवा जहागिऱ्या होत्या. तेथील अधिपती व कोल्हापूरचा राजा यांच्यात बरेच संघर्ष होत. कोल्हापूरचे राजे त्यांना मांडलिक मानून त्यांच्यावर आपली पकड अधिकाधिक घट्ट करण्याचा प्रयत्न करीत असत. मात्र ब्रिटिशांचा वरदहस्त कोल्हापूरवरच होता. महाराजांनी याचा फायदा घेऊन १९३१ साली उप-संस्थानांमधील न्यायालयांचे अधिकार कोल्हापूर हायकोर्टाकडे अधिग्रहीत करून घेतले होते. शिवाय कोल्हापुरात लागू असलेले अनेक कायदे उप-संस्थानांमध्ये लागू करण्यास कोल्हापूरने संमती दिली नाही. त्यामुळे तेथील जनतेत असंतोष वाढत राहिला.

वस्तुतः सर्व संस्थाने व उप-संस्थानांमध्ये जमीन महसुलाचे दर ब्रिटिश हिंदुस्तानातील दरांपेक्षा खूपच जाचक होते. पण लोकमत संघटित नसल्यामुळे ही विसंगती चालू होती. मात्र भारतात स्वराज्य चळवळ फोफावल्यावर संस्थानांतही जागृती सुरू झाली. शाहू महाराजांनंतर वेगळे वारे वाहू लागले होते. काही संस्थानिक मराठे तर काही ब्राह्मण असल्याने त्यांच्यात ताण-तणाव निर्माण झाले. बदलत्या राजकीय पर्यावरणात सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळीतील खंदे पत्रकार मुकुंदराव पाटील, माधवराव बागल व दिनकरराव जवळकर जनतेवरील अन्यायाबाबत संस्थानिकांवर टीका करू लागले.

कर्मवीर वि. रा. शिंदे १९२३ पासून या भागात स्वातंत्र्य चळवळीचा प्रचार करीतच होते. १९२४ च्या बेळगाव काँग्रेस अधिवेशनापासून गंगाधरराव देशपांडे, शंकरराव देव, शिंदे व केशवराव जेधे यांचा या भागातील युवकांवर प्रभाव पडू लागला होता. त्यातून माधवराव खंडेराव बागल व रत्नाप्पा भरमाप्पा कुंभार वगैरे तडफदार युवक स्वराज्य चळवळीत सहभागी झाले. अनेक युवक काँग्रेसचे सभासद होऊन १९३० व १९३२ च्या कायदेभंगात उतरले होते. जेधे महाराष्ट्र प्रांतिकचे मोठे पुढारी झाले. १९३८ च्या काँग्रेस अधिवेशनातील ठरावानुसार संस्थानांमध्ये काँग्रेसशी संलग्न अशा प्रजापरिषदा स्थापन करण्यात आल्या. त्यामुळे तिथे नवीन आशाआकांक्षा निर्माण झाल्या.

त्यानुसार ६ फेब्रुवारी १९३९ रोजी डेक्कन स्टेट पीपल्स कॉन्फरन्सच्या मार्गदर्शनाखाली ‘ कोल्हापूर प्रजापरिषद ’ स्थापन करण्यात आली. दक्षिणी संस्थाने प्रजारिषदेचे मुख्यालय पुण्यातील हिंदसेवक समाजाच्या इमारतीत होते. तेथून सर्व संस्थानांमधील प्रजापरिषदांना मार्गदर्शन व साहाय्य मिळत असे. त्यामुळे संस्थानातील चळवळीला उत्तेजन मिळाले. माधवराव बागल व कुंभार तसेच वि. रा. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली कोल्हापूर प्रजापरिषदेचे काम सुरू झाले. केशवराव जेधे त्यांना मदत करीतच असत.

१९३७ साली मुंबई इलाखा व मध्यप्रांत-वऱ्हाडमध्ये, प्रांतिक स्वायत्ततेच्या योजनेनुसार, काँग्रेसची मंत्रिमंडळे अधिकारारूढ झाल्यापासून संस्थानी प्रजाजनांचीही

राजकीय हक्कांची मागणी वाढली होती. म्हणून १८ ऑगस्ट १९३८ रोजी कोल्हापूर दरबारने प्रजेला काही हक्क दिले. पण शेतसाऱ्याचा बोजा तरीही असह्य होता. त्याविरुद्ध लढा उभारण्यासाठी सातारा जिल्ह्यात सभा भरविण्यात आल्या. कारण कोल्हापूर संस्थानात कोणतीही सभा घेण्यासाठी आधी कलेक्टरची परवानगी घ्यावी लागे. शिवाय सभेत राजकीय भाषण करण्यावर बंदी होती. तरीही २५ डिसेंबर १९३८ रोजी बागल व सहकाऱ्यांनी कोल्हापुरात ४००० लोकांचा मोर्चा काढून सभाबंदीच्या कायद्याचा भंग केला. त्यासाठी त्यांच्यावर खटला भरून तुरुंगात डांबले. त्यांच्या पश्चात् नानासाहेब दत्ताजी जगदाळे, रत्नाप्पा भरमाप्पा कुंभार यांनी चळवळ चालू ठेवली. म्हणून १३ जानेवारी १९३९ रोजी कोल्हापूर दरबारने शेतसारा ब्रिटिश मुलखाइतका केल्याचा जाहीरनामा काढला. तथापि नागरी स्वातंत्र्य आणि जबाबदार राज्यप्रणाली देण्यास नकार दिला. लगेच १८ जानेवारीस व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगो कोल्हापुरी येणार असल्याने समारंभाचा रसभंग होऊ नये म्हणून दुसरा जाहीरनामा काढला होता. त्यानंतर माधवराव बागलांना मुक्त केले आणि भाषण स्वातंत्र्यावरील निर्बंध उठवले.

सरकारच्या कोल्हापूर पुराभिलेखागारातील गोपनीय दस्तऐवजांमधून दिसते की, दरबारातील ब्रिटिश रेसिडंट खुद्द राजाराम महाराजांना समित्यांमधील काँग्रेस प्रतिनिधींचे उच्चाटन करण्याचा आग्रही सल्ला देत असे. अशी बंधने असूनही १०,००० शेतकऱ्यांनी आपली रास्त गाऱ्हाणी मांडण्यासाठी जमावबंदीचा हुकूम न जुमानता राजवाड्याजवळ मूक निदर्शने केली व जमीन महसुलाबाबतच्या अन्यायास वाचा फोडली होती.[२९]

तुरुंगातून सुटका झाल्यावर माधवराव बागल जाहीर सभा भरवू लागले. तिकडे पंतप्रधान बाळ गंगाधर खेरांच्या माध्यमातून महात्मा गांधींनी कोल्हापूरकरांच्या रास्त मागण्या व्हाइसरॉयपुढे मांडल्या. त्यामागे शंकरराव देवांचे प्रयत्न होते. अन्यायांचा पाढा वाचताना एका सभेत बागलांनी इशारा दिला की, निषेध म्हणून आम्हास कोल्हापूरची साखर व कापडावरही बहिष्कार घालावा लागेल. त्यांच्या भाषणांना मिळालेला प्रतिसाद पाहून माधवरावांना दरबारने ६ फेब्रुवारी १९३९

रोजी पुन्हा अटक केली आणि १२४-अ कलमाखाली त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरला. शंकरराव देवांनी जयसिंगपूरच्या सभेत या कारवाईचा तीव्र निषेध केला.

बागलांची वकिली पूर्वी ब्राह्मणेतर चळवळीचे खंदे नेते असलेल्या केशवराव बागडे यांनी केली. तरीही त्यांना दोन वर्षे सक्तमजुरी व एक हजार रुपये दंड झाला. तसेच २९ मार्च १९३९ तारखेच्या विशेष राजपत्राद्वारे दरबारने ‘ कोल्हापूर संस्थान प्रजापरिषद ’ या राष्ट्रवादी संघटनेवर बंदी घातली. त्याबरोबरच दडपशाही करणारा ब्रिटिशांचा १९०८ चा क्रिमिनल लॉ अमेन्डमेन्ट कायदा लागू करून, अधिकारशाहीचा अंमल सुरू केला. संस्थानिक किंवा त्यांच्या आदेशांचा अनादर करणाऱ्यांना वा आंदोलन अथवा शांतताभंग करणाऱ्यांना शिक्षा करण्याची उपाययोजना दरबाराने जाहीर केली. शिवाय दरबाराशी एकनिष्ठ असलेल्या अभिजनांवर सामाजिक बहिष्कार घालणेही दंडपात्र गुन्हा असल्याचे दरबाराने घोषित केले. इतकेच नव्हे तर प्रजापरिषदेची जागा, निधी व मालमत्ता जप्त केली. प्रजापरिषदेच्या सामान्य सभासदांना सहा महिन्यांची कैद व क्रियाशील सभासदांना तीन तीन वर्षांची शिक्षा ठोठावली. मात्र ‘रयत सभा’ नामक राजनिष्ठ संघटनेला राजाश्रय देण्यात आला. याचा निषेध म्हणून १५ एप्रिल १९३९ रोजी कुपवाड या खालसा मुलखातील गावी कोल्हापूर प्रजापरिषदेने काँग्रेस पुढारी पट्टाभी सीतारामय्या यांच्या अध्यक्षतेखाली पहिले अधिवेशन भरविले. त्यात १०,००० नागरिक उपस्थित होते. तरीदेखील दरबाराने दडपशाहीचे धोरण बदलले नाही.‘भिंतीवरील अभिलेख वाचा’ हा **हरिजन** पत्रकातील गांधीजींचा सल्ला सत्ताधीशांनी मानला नाही. याउलट दरबाराने ब्रिटिशांची शाबासकी मात्र मिळविली. कोल्हापुरातील छोडो भारत आंदोलनावर प्रकरण-२० मध्ये विवेचन केले आहे.

**इचलकरंजी प्रजासंघ :—**कोल्हापूर दरबाराच्या अधिपत्याखालील इचलकरंजी, कुरुंदवाड (थोरली पाती), कुरुंदवाड (धाकटी पाती), विशाळगड, तोरगळ अथवा जमखिंडी येथील उप संस्थानिकांना कोल्हापूर दरबाराच्या पूर्व अनुमतीशिवाय प्रशासकीय सुधारणा करण्याचे अधिकार नव्हते. या असंगतीमुळे कोणतीही

सुधारणा साध्य करण्यास्तव तेथील प्रजासंघ वा तत्सम संघटनांना आपले अधिपती व कोल्हापूर दरबाराशीही लढा द्यावा लागत असे. शिवाय लगतच्या ब्रिटिश मुलखापेक्षा तेथील जमीन महसुलाचे दर बरेच जाचक होते; वनसंपत्तीच्या उपभोगावर अधिक कडक निर्बंध होते; तिथे जलसिंचन शुल्क जास्त होते; कर्जनिवारण कायदा नव्हता. इचलकरंजीत ७० कारखाने असूनही कामगारांच्या कल्याणासाठी काहीच योजना अथवा कायदा नव्हता

यासाठी डेक्कन स्टेट पीपल्स परिषदेच्या मार्गदर्शनाखाली फेब्रुवारी १९३९ मध्ये इचलकरंजी प्रजासंघ ही राजकीय संघटना स्थापन करण्यात आली. के.आर. पाटील, धोंडिबा तवनाप्पा चिवटे, कालगोंडा तातोबा पाटील, शंकर बाळा तेलशिंगे, नारायण तुकाराम बुगड, पी.आर.परुळेकर, अण्णासाहेब हुळके पाटील, वासुदेवभट जोशी, श्रीपाद भोजे, नारायण लक्ष्मण बडवे, दगडू दादू बेलेकर, शंकर कंठे, शिवगोंडा पाटील, भूपाल चौहान, आत्माराम पाटील, गणपत पोवार व बंडू देसाई प्रजासंघाचे कार्यकर्ते होते. यातील बरेच जण सविनय कायदेभंग आंदोलनासाठी कारावास भोगून आलेले होते. आपल्या रास्त मागण्यांसाठी आणि नागरी स्वातंत्र्यासाठी प्रजासंघाने स्थापनेपासून एप्रिल १९४१ पर्यंत जहागिरीत १२१ सभा भरविल्या होत्या. राष्ट्रीय काँग्रेसच्या धोरणानुसार ब्रिटिशांच्या युद्धप्रयत्नांविरोधी मोहीम उभारली होती. तसेच ब्रिटिश मुलखाशी हक्कांचे समानीकरण करण्यासाठी आणि कोल्हापूर दरबारकडून जहागिरदारास अधिकारांचे प्रत्यायोजन (डेलिगेशन ऑफ पॉवर्स) वाढविण्यासाठीही प्रजासंघाने चळवळ केली.

शंकरराव देव, दिवेकर शास्त्री आणि सोलापूरचे कम्युनिस्ट नेते आर. जी. कराडकर येथील प्रजासंघाच्या व कामगारांच्या चळवळीला मार्गदर्शन करीत असत. याबाबतचे पुरावे आम्हाला कोल्हापूर अभिलेखागारात आढळले. १९४०-४१ च्या व्यक्तिगत सत्याग्रहात येथील बरेच कार्यकर्ते कारावासात गेले. कोल्हापूरपेक्षा इचलकरंजीत काँग्रेसचा व सत्याग्रहाचा जोर अधिक होता. अभिलेखागारामधील दस्तऐवज दाखवतात की, स्वातंत्र्य आंदोलनात कोल्हापूरपेक्षा इचलकरंजीच्या जनतेत अधिक ऐक्य होते. तेथील लोकांच्या आक्रमक पवित्र्यामुळे

कोल्हापूर दरबारने उपरोक्त क्रिमिनल लॉ अमेन्डमेन्ट कायदा (१९०८) याखाली इचलकरंजी प्रजासंघावर बंदी घातली. तसेच काही जनांना अटक तर काहींना तडीपार करण्यात आले.[३०]

सावंतवाडीचे राजे बापूसाहेब यांचा कारभार प्रजाजनांना सुखकर वाटत होता. तरी पण प्रातिनिधिक कायदेमंडळ स्थापन करण्यास ते तयार नव्हते. जतचे राजे डफळे यांनी मात्र १२ नोव्हेंबर १९३८ रोजी कायदेमंडळ स्थापन केले. लगेच डिसेंबरात गंगाधरराव देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली पहिली प्रजापरिषद भरवण्यास त्यांनी अनुमती दिली होती. काळाची पावले ओळखून व समंजसपणा दाखवून प्रजेशी संघर्ष टाळण्याची दक्षता घेणाऱ्या अल्पसंख्य संस्थानिकांपैकी डफळे हे एक होते.

अक्कलकोट व भोर संस्थानांमध्ये मात्र दडपशाही करून प्रजेची मुस्कटदाबी केली जात होती. अक्कलकोटमध्ये विनायक सरदेशमुख व रंगनाथ गोविंद पुजारी यांच्यावर असत्य आरोप ठेवून त्यांना तुरुंगात डांबले होते.

## भोर संस्थानातील प्रजापरिषद

भोर संस्थानात आंदोलन करणे अत्यंत अवघड असल्याने पुणे व शिरवळहून हालचाली होत. पुण्यातील दक्षिणी संस्थान हितवर्धक सभेच्या मदतीने १३ नोव्हेंबर १९२१ रोजी पुण्यातच भोर संस्थान प्रजापरिषद निर्माण झाली. तिच्या विद्यमाने पुणे व कुलाबा जिल्ह्यांतील कार्यकर्ते भोरच्या आंदोलनात सहभागी होत. १९३० च्या सुमारास संस्थानाचा दिवाण असलेल्या रावबहादूर हुल्ल्याळ या अधिकाऱ्याच्या कारभाराने प्रजा पार गांजली होती. अशा परिस्थितीत नागरी हक्क व स्वराज्यासाठी राजाराम गुजर, कृष्णाजी सोनार, अप्पा मुकादम, अंबिके, गोपीनाथ पोतनीस, धोंडोपंत शेटे वगैरेंनी लढा उभारला. म्हणून त्यांना १९३० अखेर अटक करण्यात आली. दरम्यान सक्रिय झालेल्या भोर संस्थान प्रजापरिषदेने मे १९३१ मध्ये कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली अधिवेशन भरविले. संस्थानामधील जनतेची द्विधा मनःस्थिती आणि प्रस्थापितांचे हितसंबंध व जातीवर आधारित तीव्र सामाजिक विभाजन यामुळे तेथील परिस्थिती ब्रिटिश इंडियापेक्षा अधिक

गुंतागुंतीची होती. आंदोलनास जातीय स्वरूप देऊन ते चिरडण्याची संस्थानिकाची प्रवृत्ती होती. त्यामुळेच संस्थानी प्रजेने आपली चळवळ सनदशीर रीतीनेच चालवावी, असे काँग्रेसचे धोरण होते. प्राप्त परिस्थितीत प्रजा परिषदेचे एक नेते धोडोपंत शेटे १९३३ मध्ये व वामनराव पटवर्धन हे प्रजेचे दुसरे नेते फेब्रुवारी १९३९ मध्ये मरण पावल्यामुळे परिषदेचे कार्य थंडावले. भोरशाही म्हणजे बेबंदशाही असा समज झाला असल्याची आठवण कर्मवीर शिंदे यांनी लिहून ठेवली.

१९४६ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळण्याची चिन्हे स्पष्ट दिसताना सर्व्हन्ट्स ऑफ इंडिया सोसायटीतील बैठकीत गांधीजींनी भोर, औंध, फलटण, जमखिंडी, मिरज (थोरली पाती) व कुरुंदवाड (धाकटी पाती) या संस्थानांच्या राजांना सुचविले की, दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानांनी एक संघ स्थापन करावा. त्यानुसार शंकरराव देव व बाळकृष्ण विठ्ठल शिखरे हे दोघे यासाठी खूप प्रयत्न करीत होते. अखिल भारतीय संस्थानी प्रजापरिषदेचे एक सरचिटणीस द्वारकानाथ कचरू हेदेखील यासाठी खूप प्रयत्नशील होते. कोल्हापूरकरांची भूमिका वेगळीच होती. जमखिंडी व औंधचे संस्थानिक हे कचरू व गांधीजींच्या सूचनेस अनुकूल होते, तर इतर केवळ चालढकल करीत होते. हा घोळ १९४७ व्या अखेरपर्यंत चालूच राहिला. शेवटी भोर संस्थानाला मुंबई इलाख्यात विलीन व्हावे लागले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संस्थानातील भोर व वेल्हे हे दोन तालुके पुणे जिल्ह्यात, तर उर्वरित भाग कुलाबा जिल्ह्यात समाविष्ट करण्यात आला. या संस्थानाच्या विलीनीकरणासाठी दि. वि. गोखले, गोविंदराव लिमये, राजाभाऊ चांदोरकर, द. का. कुंटे, मोहन धारिया, हरिभाऊ भडसावळे आणि सदाशिव बागाईतदार यांनी प्रदीर्घ काळापर्यंत मोहीम चालविली होती.[३१]

## सांगली-मिरजमधील चळवळ

सांगली, मिरज, जत व इचलकरंजी संस्थानांमध्ये शंकरराव देव आणि पुण्या-मुंबईचे काँग्रेस पुढारी सार्वजनिक सभा घेत असत. सांगली संस्थानात १९३०-१९३९ या कालखंडात प्रजापरिषदेची सात अधिवेशने भरली होती. सांगली, मिरज आणि कुरुंदवाड यांच्याप्रमाणे जमखिंडी संस्थानचे अधिपतीदेखील पटवर्धन

घराण्याच्या शाखेतील होते. सांगलीच्या पटवर्धनांनी १९३० सालातच ' रयत असेंब्ली ' नामक प्रातिनिधिक कायदेमंडळ निर्माण केले होते. मात्र ब्राह्मणांची लोकसंख्या दहा हजारांहूनही कमी असताना त्यांना निम्म्याहून अधिक प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार दिला होता. मराठे व तत्सम जातींना दोन जागा दिल्या तर अस्पृश्यांसाठी एकही जागा ठेवलेली नव्हती. १९३८ साली सांगलीकरांनी कायदेमंडळातील सदस्यांची संख्या ४० वरून ४५ पर्यंत वाढविली व त्यात लोकनियुक्त सभासदांची संख्या ३० ठेवली, हे विशेष होय. शिवाय त्यांनी एक लोकनियुक्त मंत्री नेमण्यास अनुमती दिली. मिरजमळा (धाकटी पाती) या लहानशा संस्थानानेही १७ मार्च १९३५ रोजी १६ सदस्य असलेली रयत सभा स्थापन केली. तिच्यात ८ लोकनियुक्त सभासद होते. मिरज-जतच्या राजांची भूमिका बरीच उदारपणाची होती. १९४२ चा छोडो भारत लढा चिरडण्यासाठी त्यांनी निजामाचे अनुकरण केले नाही. तथापि ते औंधचे अनुकरण करून जनतेला स्वयंनिर्णयाचा अधिकार देण्यासाठी तयार नव्हते.

सांगलीचे पटवर्धन राजे उदार व सुसंस्कृत असून लोकांच्या आशाआकांक्षांची कदर करीत. रयतेच्या भावना ओळखून ते राजकीय सवलती देण्याची आश्वासने देत. तथापि पटवर्धन आपली राजसत्ता सोडण्यास अजिबात तयार नव्हते. शंकरराव देव व न. वि. गाडगीळ तसेच नाना पाटील, बा. वि. शिखरे वगैरेंच्या सभा सांगलीत भरण्यास त्यांचा विरोध नसे. लोकांना राजकीय अधिकार देण्याचा आव आणून ते दरबारात व कायदेमंडळात भाषणे करीत. पण प्रत्यक्षात घवघवीत असे देत नसत. एका बाजूला इंग्रजांची मर्जी राखावयाची आणि दुसऱ्या बाजूला लोकपरायण राजा अशी आपली प्रतिमा उभी करावयाची, असे त्यांचे मुत्सद्दीपणाचे धोरण होते. अशा धोरणामुळे त्यांना ब्रिटिशांनी १९३० आणि १९३१ सालांतील गोलमेज परिषदांसाठी आमंत्रण दिलेले होते. मात्र मुंबई इलाख्यात १९३७ साली काँग्रेसचे मंत्रिमंडळ कार्यरत झाल्याने महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसच्या प्रभावाखाली कायदेमंडळात सुधारणा करणे पटवर्धनांना भाग पडले होते. त्यांनी छोडो भारत आंदोलनानंतर १९४६ साली सांगलीमधील प्रजेला प्रांतिक स्वायत्तता धोरणानुसार हक्क दिले.

थोडे मागे जाऊन इथे सांगायला हवे की, लंडनमध्ये भरलेल्या तिन्ही गोलमेज परिषदांमधून ब्रिटिशांनी संस्थानिकांच्या आकांक्षा पल्लवित करून ठेवलेल्या होत्या. संस्थानिकांना विशेषाधिकार बहाल करण्याचे तसेच त्यांचे आसन नष्ट न करण्याचे आश्वासन भारतमंत्री व स्वतः पंचम जॉर्ज यांनी दिलेले होते. ' डिव्हाइड ॲण्ड रूल ' धोरणानुसार इंग्रजांनी लॉर्ड डफरिनच्या (१८८४) काळापासून संस्थानिकांची राजनिष्ठ मानसिकता घडविली होती. त्या मानसिकतेतून लॉर्ड लिनलिथगोचा अनुनय करून नरेंद्र मंडळ आपले अस्तित्व कायम करण्यासाठी झटत होते. त्यानंतर स्टॅफर्ड क्रिप्स कमिशनने संस्थानिकांच्या आशाआकांक्षा पल्लवित केल्या आणि निजाम व कोल्हापूरच नव्हे तर सांगली, भोर, जंजिरा वगैरे संस्थानांचे अधिपतीदेखील स्वतंत्र राजे म्हणून आपले अस्तित्व टिकविण्याचे दिवास्वप्न पाहत होते.

## औंध व फलटण पुरोगामी

भारतातील बहुसंख्य संस्थानांच्या तुलनेत औंधचे राजे बाळासाहेब पंतप्रतिनिधी व फलटणचे निंबाळकर फारच पुरोगामी आणि लोकपरायण होते. फलटणच्या राजेंनी जानेवारी १९३१ मध्येच कायदेमंडळ स्थापन केलेले होते. त्यात १२ नोव्हेंबर १९३९ रोजी सुधारणा करून त्यांनी कायदेमंडळाला उदारपणे काही राजकीय हक्क प्रदान केले. त्यानुसार कायदेमंडळातील १५ पैकी दहा सभासद लोकनियुक्त होते. त्यांपैकी एकाला मंत्रिपद देण्यात आले. या संस्थानातील अनेक जणांचा काँग्रेसच्या वैयक्तिक सत्याग्रहात सहभाग होता. महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचे अनेक नेते आणि नाना पाटील व यशवंतराव चव्हाण यांच्यासारखे काँग्रेसजन औंध व फलटणमध्ये उघडपणे जनजागृती करीत असत.

औंधच्या पंतप्रतिनिधींनी तर १९२९ च्या लाहोर काँग्रेसने अंगीकारलेल्या संपूर्ण स्वातंत्र्य या ब्रीदवाक्याचा डिसेंबर १९२९ मध्येच स्वीकार केलेला होता. त्यानुसार राजे भवानराव ऊर्फ बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी पाच वर्षांत रयतेला संपूर्ण स्वराज्य देण्याची घोषणा डिसेंबर १९२९ मध्येच केलेली होती. ७५,००० लोकसंख्या व ७३ गावे असलेल्या या चिमुकल्या संस्थानात मे १९३१ मध्ये

प्रजापरिषद आणि डिसेंबरात प्रातिनिधिक सभा स्थापन करण्यात आली. त्यांनी पंडित श्री. दा. सातवळेकर, ना. गो. चापेकर, वाग्भट नारायण देशपांडे, लक्ष्मणराव किर्लोस्कर व जगन्नाथ महाराज पंडित यांसारख्या कर्तृत्ववान आणि बुद्धिवंतांचा संस्थानाच्या कारभारात सहभाग मिळविला. तसेच रा. रा. काळे, वामन पटवर्धन, रघुनाथराव करंदीकर, गणपत अभ्यंकर वगैरेंची समिती नेमून नवीन राज्यघटना तयार करण्याचे काम आधीच हाती घेतलेले होते.

चित्रकला, नाटक व अभिजात संगीताची जातिवंत अभिरुची असलेल्या बाळासाहेब व युवराज अप्पासाहेब पंत यांनी संस्थानचा कारभार लोकाभिमुख करण्यासाठी नानाविध उपक्रम हाती घेतले. अप्पासाहेब पंतांनी काही ब्रिटिश मित्रांचीही मदत घेतली. औंधमध्येही शेतसारा बराच होता. तो कमी करण्यासाठी शेतकऱ्यांनी बा.वि.शिखरे यांच्या नेतृत्वाखाली मोठा मोर्चा काढल्यानंतर अप्पासाहेबांनी अनुकूल प्रतिसाद दिला व उचित कार्यवाही केली होती.

औंध संस्थानातील पुरोगामी व लोकपरायण धोरणांचा आदर्श इतर अधिपतींनीही स्वीकार करावा आणि त्यांचा आदर्श आचरणात आणावा, अशा शब्दात स्वतः महात्माजींनी राजेसाहेब व अप्पासाहेब पंतांची प्रशंसा करणारा लेख **हरिजन** च्या १२ नोव्हेंबर १९३२ च्या अंकात लिहिला होता.

ब्रिटिश इंडियात १९३७ साली काँग्रेसची मंत्रिमंडळे अधिकारारूढ झाल्यावर २३ नोव्हेंबर १९३८ रोजी बाळासाहेब पंत प्रतिनिधी यांनी, आपल्या ७३ व्या वाढदिवसाची प्रजाजनांना भेट म्हणून, प्रजातंत्र व ग्रामराज्य राजप्रणाली घोषित केली. हे पुरोगामित्व तेव्हा अजोड होते. तेव्हा संस्थानचा इंग्रज रिजन्ट व प्रांताच्या गव्हर्नरने तीव्र विरोध केला होता. परंतु त्यांची पर्वा न करता प्रथम अप्पासाहेब पंत व सातवळेकर वगैरे गांधीजींचा सल्ला घेण्यासाठी वर्ध्याला गेले होते. त्यानंतर स्वतः भवानरावदेखील गांधीजींना डिसेंबरातच समक्ष भेटले. त्यांच्या मतानुसार भवानरावांनी २१ जानेवारी १९३९ पासून औंधमध्ये ग्रामराज्य विचारप्रणालीवर आधारलेली नवीन राज्यघटना अमलात आणली. साक्षरता प्रसारास अग्रक्रम देऊन त्यांनी मे १९३९ पर्यंत ७० टक्के लोकांना साक्षर केले. पुढच्याच महिन्यात

ग्रामपंचायती, तालुका पंचायती आणि प्रतिनिधी सभेच्या निवडणुका घेण्यात आल्या. अप्पासाहेब पंत स्वतः औंधचे पंतप्रधान झालेत. त्याबरोबर औंधमध्ये लोकांना जबाबदार असे शासन कार्यरत झाले. 'ग्रामराज्याचा' हा प्रयोग यशस्वी करण्यासाठी रावसाहेब पटवर्धन, भाऊ धर्माधिकारी व त्यांचे बंधू नाना धर्माधिकारी आणि बा. वि. शिखरे, अण्णासाहेब सहस्रबुद्धे तसेच शंकरराव देव व आचार्य स.ज.भागवत या निष्ठावंत काँग्रेसजनांनी अप्पासाहेब पंतांना मदत केली. तथापि मुंबईतील काँग्रेस मंत्रिमंडळाने राजीनामा दिल्यावर सर्वांनाच कायदेभंग चळवळीचे वेध लागले. तरीही ग्रामराज्य शासन प्रणाली कार्यरत राहिली. [३२]

पुढे 'औंधने काय करावे' हे विचारण्यासाठी ७ ऑगस्ट १९४२ रोजी अप्पासाहेब पंत गांधीजींना मुंबईत भेटले होते. तेव्हा त्यांना गांधीजींनी सांगितले की, "प्रजाजनांच्या पूर्ण सहमतीने हा राजा औंधचे संरक्षण करण्याच्या जबाबदारीतून ब्रिटिशांना मुक्त करीत आहे. पूर्वीचे सर्व करार-मदार आता रद्द समजावे; औंध स्वतंत्र झाले आहे व ते तसेच राहणार", असे पंतांनी व्हाइसरॉयला स्पष्ट लिहून कळवावे. पंतांनी व्हाइसरॉयला असे पत्र पाठविले नाही. पण त्यांनी बेचाळीसच्या आंदोलनात काँग्रेसच्या भूमिगत कार्यकर्त्यांना उत्तम आश्रय दिला. औंध, कुंडल, किर्लोस्करवाडी, सानकिरे, रामापूर, गोंदी, आळसंद, आटपाडी, दुशेरे ही संस्थानातील गावे भूमिगतांचे तळ बनली होती. या संस्थानातील जी. डी. लाड, नाथाजी लाड, श्याम यशवंत लाड, ज्ञानदेव जाधव, आकाराम पवार, शंकरराव निकम, आनंदराव नलावडे, भाऊराव देशपांडे अशा अनेकांनी छोडो भारत क्रांतिलढा चालवला. कुंडलमध्ये हातबाँबही तयार होत असत.

साताऱ्याचा कलेक्टर व जिल्हा पोलीस अधीक्षकाने औंधकरांविरुद्ध मुंबईचे गव्हर्नर सर रॉजर लम्ले यांच्याकडे तक्रारी करणारे बरेच अहवाल पाठवले. त्यावर गव्हर्नरने व्हाइसरॉयला कळविले होते की, "रेल्वेवर घातपात करणारे व पोस्टकार्यालये आणि शासकीय खजिने लुटणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांना औंधचा राजपुत्र (दिवाण) सक्रिय मदत करतो. औंधमध्ये सध्याची राजवट असेपर्यंत

येथील घातपात रोखणे अशक्य होईल", असेही त्यांनी व्हाइसरॉयला लिहिले होते. १९४२-४४ च्या छोडो भारतमध्ये अप्पासाहेब पंत सातारा प्रतिसरकारचे क्रांतिकारक व भूमिगतांना आश्रय आणि सक्रिय प्रोत्साहन देत हे सत्य होते. तसे हिंदुस्तान सरकारच्या पुरेपूर लक्षात आले होते. मुंबई प्रांताच्या गव्हर्नरने व्हाइसरॉयकडे त्याबाबत लेखी तक्रार केली होती की, "सातारा क्रांतिलढ्याचा मोठा तळ औंधमध्ये कार्यरत असून तेथील साधनसामग्रीचा व आश्रयाचा आंदोलनासाठी उपयोग करण्यात येत आहे. सातारा प्रतिसरकारच्या बऱ्याच कारवाया व घातपात औंधच्या सीमा भागात घडत असतात. पोलीस कारवाईत जखमी झालेले अथवा अटक केलेले बरेच स्वातंत्र्यसैनिक औंधचे प्रजाजन आहेत. तेथे कॉंग्रेसच्या सभा निर्वेधपणे होत असतात. संस्थानचे पोलीस मुंबई सरकारच्या पोलिसांना मदतही करीत नाही. " गव्हर्नर सर रॉजर लम्ले यांच्यामते औंधचे प्रशासन जणू काय कॉंग्रेसचेच प्रशासन होते. त्याकारणाने पंतप्रतिनिधी अधिकारारूढ असेपर्यंत सातारा आंदोलन काबूत आणणे अशक्य असल्याचे त्यांनी व्हाइसरॉयला बजावून, औंधविरुद्ध अत्यंत कडक कारवाई करण्याची मागणी केली होती. त्यानुसार नवी दिल्लीने पंतप्रतिनिधींना सक्त ताकीद दिली होती की, "अप्पासाहेबांच्या स्वातंत्र्य लढाविषयक कारवाया न थांबल्यास त्यांना पंतप्रधान म्हणजे दिवाण पदावरून पदच्युत करण्यात येईल व हद्दपार करण्यात येईल." या अत्यंत महत्त्वाच्या दस्तऐवजातून अप्पासाहेब पंतांच्या सक्रिय सहभागावर स्पष्ट प्रकाश पडतो.[३३]

सातारा प्रतिसरकारच्या संग्रामातील औंधच्या योगदानाचे विवेचन स्वतंत्ररीत्या करावे लागेल.

## हैदराबाद स्टेट कॉंग्रेस बंधमुक्त

स्टेट कॉंग्रेसवर निजामाने घातलेली बंदी (१९३८) उठवण्यासाठी तब्बल आठ वर्षांचा काळ जावा लागला. भारतात अनेक घटना घडाव्या लागल्या. त्यांचा परामर्श घेणे आवश्यक आहे. दरम्यान ब्रिटिश इंडियात १९४२-४३ चा क्रांतिलढा धुमसत होता. दिल्लीतील राष्ट्रीय अभिलेखागारातील एका दस्तऐवजातून दिसते की, ५ ऑगस्ट १९४२ रोजी अखिल भारतीय संस्थानी प्रजापरिषदेच्या स्थायी समितीने

मुंबईतील बिर्ला हाऊसमध्ये महात्मा गांधी व नेहरूंची भेट घेतली होती. या गुप्त बैठकीला गांधीजी व नेहरूंव्यतिरिक्त वल्लभभाई पटेल, पंडित गोविंद वल्लभ पंत, सरोजिनी नायडू, मृदुलाबेन साराभाई, प्यारेलाल, महादेवभाई देसाई, डॉ. मेनन, राजेंद्रनाथ व स्वामी रामानंद तीर्थ वगैरे २५ जण उपस्थित होते. या बैठकीत गांधीजींनी छोडो भारत आंदोलनाचे संकल्पित स्वरूप आणि रणनीती विशद केली, असे राजेंद्रनाथांच्या जबानीतून उघड होते.

संस्थानी प्रजाजनांना मार्गदर्शन करताना गांधीजींनी पुढाऱ्यांना पुढील सल्ला दिला :– 'आपल्या संस्थानाधिपतीला त्यांनी खडा सवाल करावा की, तो कुणाच्या बाजूचा आहे. त्याने ब्रिटिशांशी असलेल्या संबंधांचा त्याग करून खंडणी देणे बंद करावे व राष्ट्रीय प्रवाहात यावे, असे प्रजाजनांनी त्याला सुनवावे.' गांधीजी हिंदीतून म्हणाले, "मैं आपसे अपनी अहिंसा नहीं मांगता. मैं तो वही चाहता हूँ जो आप करते आये हो: अच्छी हो या बुरी! आपने यह फैसला करना है कि, आप इस लडाईमे क्या कर सकते है."[३४]

प्रजापरिषदेचे अध्यक्ष या नात्याने नेहरूंनीदेखील स्थायी समितीच्या सदस्यांना आक्रमकपणाचा सल्ला दिला होता. (हिंदुस्तान सरकार, होम पोलिटिकल इंटेलिजन्स, फाईल क्र. ३/७९/४२, १९४२, राजेंद्रनाथ यांची जबानी).

त्यानुसार निजामी प्रदेशात छोडो भारत आंदोलन पेटले. काही ठिकाणी घातपात व मोडतोड झाली. सत्याग्रह झाला. बरीच धरपकड झाली. सरकारने रामानंद तीर्थ, डॉ. जी. एस. मेलकोटे व त्यांची पत्नी, आनंद वाघमारे, भाऊसाहेब वैशंपायन, श्रीनिवास बोरीकर, श्रीधर रंगनाथ कुलकर्णी, पद्‌मजा नायडू व ग्यानकुमारी हेडा वगैरेंना तुरुंगात टाकले. गोविंदभाई श्रॉफ आधीपासूनच कारावासात होते. **ब्रिटिश मुलखातील क्रांतिलढ्याचा जोर पाहून १५ नोव्हेंबर १९४२ रोजी निजामाने भारतीय राष्ट्रीय काँग्रेसवरील बंदीहुकूम मागे घेतला. त्यामुळे हैदराबाद शहरातील राष्ट्रीय काँग्रेसची शाखा कार्यरत झाली.** तथापि हैदराबाद स्टेट काँग्रेसवरील बंदी उठवण्याचे गुऱ्हाळ चालूच राहिले.

ब्रिटिश मुलखातील राष्ट्रव्यापी आंदोलनामुळे तेथील राजकीय परिस्थितीत वेगाने परिवर्तन झाले होते. महायुद्धानंतर ब्रिटनमधील सार्वत्रिक निवडणुकीत चर्चिल यांच्या हुजूर पक्षाचा पराभव होऊन लेबर पक्ष सत्तेवर आला. क्लेमंट ॲटली पंतप्रधान झाले. ब्रिटन भारतातून निघून जाणार, असे त्यांनी सुतोवाच केले. सत्तांतराची प्रक्रिया सुरू झाली. भारतमंत्री पेथिक लॉरेन्स आणि स्टॅफर्ड क्रिप्स व ए. व्ही. ॲलेक्झांडर यांचे त्रिमंत्रिमंडळ हिंदुस्तानचे तुकडे करून सत्तांतर करण्याचा प्रस्ताव घेऊन दिल्लीत आले. जागतिक पातळीवरील ब्रिटनचे राजकीय व आर्थिक महत्त्व घसरले होते. छोडो भारत लढ्यामुळे ब्रिटनचे सामर्थ्य व नीतिधैर्य खूपच ढासळले होते. त्यामुळे इंग्रजांनी १९३५ च्या सांविधानिक कायद्यात सुधारणा करून भारतात निवडणुका घेतल्या (१९४६). त्यामुळे निजामालाही नमते घेणेच भाग पडले. निजामाला १९४० मधील रामगढ काँग्रेसच्या एका महत्त्वाच्या ठरावाचे स्मरण करून देण्यात आले. २० मार्च १९४० च्या रामगढ ठरावानुसार राष्ट्रीय काँग्रेसने संस्थानांबाबतचे अलिप्ततेचे धोरण बाजूला सारून संस्थानिकांना पुढील तंबी दिली होती :—"Sovereignty in India must rest with the people whether in the States or in Provinces, and all other interests must be subordinated to their vital interests. The Congress holds that the difficulty raised in regard to the States is of British creation, and it will not be satisfactorily solved unless the declaration of the freedom of India from foreign rule is unequivocally made". छोडो भारत ठरावावर मुंबईत बोलताना गांधीजींनीदेखील काँग्रेसच्या पूर्वीच्या धोरणात आमूलाग्र बदल झाला, हे स्पष्टच सांगितले होते.

अखिल भारतीय संस्थानी प्रजापरिषदेचे अध्यक्ष जवाहरलाल नेहरू यांनी अधिकच आक्रमक भूमिका घेतली. त्यांनी हैदराबाद संस्थानाचे प्रधान मंत्री मिर्झा इस्माईल यांना १३ जून १९४६ रोजी पत्र पाठवून हैदराबाद स्टेट काँग्रेसवरील बंदी बिनशर्त उठवावी, अशी धमकीवजा मागणी केली. उपरोक्त परिस्थिती व

या धमकीची दखल घेऊन निजामाला ३ जुलै १९४६ रोजी स्टेट काँग्रेसवरील बंदी मागे घेणे भाग पडले. राष्ट्रीय काँग्रेसच्या झंझावातापुढे एकतंत्रवादी सरंजामशाहीला झुकावे लागले.

## मराठवाड्यातील कम्युनिस्ट

तेलंगणात कम्युनिस्ट चळवळीचा प्रभाव असला तरी मराठवाडा विभागात या पक्षाचे अस्तित्व १९४३ नंतरच प्रत्ययास आले. औरंगाबादचे चंद्रगुप्त चौधरी व अंबेजोगाईचे आर. डी. देशपांडे व व्ही. डी. देशपांडे यांनी कम्युनिस्ट पक्षाची शाखा स्थापन केली. हैदराबादच्या कम्युनिस्टांनी छोडो भारत आंदोलनास विरोध करून ब्रिटिशांच्या युद्धप्रयत्नांना पाठिंबा दिला होता. स्वामी रामानंद तीर्थ व गोविंददास श्रॉफ हे महाराष्ट्र परिषदेचे आघाडीचे नेते कम्युनिस्ट विचारप्रणालीचे असल्याचा एक अपसमज होता. सरदार पटेल, राजेंद्र प्रसाद व पट्टाभी सीतारामय्या यांचाही तसा अपसमज करून देण्यात आलेला होता. तथापि त्यात सत्यांश नव्हता. त्यांच्या आक्रमकपणामुळे तसा अपसमज झालेला होता. वस्तुतः स्वामीजींची गांधीजींशी चांगलीच जवळीक व सलोखा होता. महाराष्ट्र परिषदेतच राहून सामान्य कम्युनिस्ट कार्यकर्ते १९४३ पासून शेतकरी, कामकरी व शोषित जनतेच्या समस्यांना वाचा फोडत. नांदेडची उस्मानशाही मिल आणि औरंगाबादच्या कापड गिरणीतील कामगारांच्या युनियन कम्युनिस्टांनी बनविल्या होत्या. गोविंददास यांनी त्यांच्या उभारणीस व कामास मदत दिली हे मात्र खरे.

ऑगस्ट १९४७ पासून रामानंदांच्या नेतृत्वाखाली हैदराबाद स्टेट काँग्रेसचा स्वातंत्र्यलढा सुरू झाल्यावर संस्थानातील कम्युनिस्टांनी काँग्रेसला चांगली साथ दिली व शक्य तेवढे साहाय्य दिले. परंतु तत्पूर्वी १९४६ साली कम्युनिस्टांनी ‘ स्वयंनिर्णयाची ’ भूमिका घेतली होती. त्यांच्या मते निजामाचे राज्य बरखास्त करून हैदराबाद पूर्णतया स्वतंत्र करावे. मात्र हैदराबादसाठी स्वतंत्र आणि सार्वभौम अशी घटना समिती स्थापन करावी अशी त्यांची उपसूचना होती. कम्युनिस्टांच्या तेव्हाच्या या सूचना द्विराष्ट्रवादाचा पुरस्कार करणाऱ्या होत्या. त्या फेटाळून लावल्या होत्याच. नंतर मात्र ते काँग्रेसच्या लढ्याला साहाय्य करू

लागले. या काळातील कम्युनिस्टांचे धोरण व कार्यक्रमावर बरीच टीका करून कन्हैयालाल मुन्शी यांनी कम्युनिस्टांवर अनेक आरोप ठेवले होते. तथापि त्या आरोपांना पुष्टी देणारे पुरावे मुन्शी यांनी दिले नव्हते.[३५] त्यामुळे त्यांच्यावर इतिहासकार विश्वास ठेवू शकत नाही.

❑❑

## संदर्भ


१. जवाहरलाल नेहरू, **ॲन ऑटोबायोग्राफी**, पृ. २७२-७३.

२. न. चिं. केळकर, **संस्थानी राजकारण**.

३. अनंत भालेराव, **हैदराबादचा स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा,** मुंबई, २०१२ आवृत्ती, पृ. २०, २१-२६.

४. लॉर्ड रीडिंगचे निजामास पत्र, २७ मार्च १९२६, राष्ट्रीय अभिलेखागार.

५. जे. यझदानी, **द सेव्हन्थ निजामः द फॉलन एंपायर,** १९८५, पृ. १२८.

६. के. के. चौधरी, **महाराष्ट्र अँड इंडियन फ्रीडम स्ट्रगल,** मुंबई, १९८५, पृ. १०९.

७. चौधरी (संपा.), **सोर्स मटेरिअल फॉर हिस्टरी ऑफ फ्रीडम मुव्हमेंट,** खंड बारा, मुंबई, १९९५, पृ. ३५६-५७, ३८०-८६.

८. कित्ता, पृ. ३५१-४५४.

९. भालेराव, उपरोक्त, ४८६-९४.

१०. कित्ता, पृ. ११९-२१.

११. चौधरी (संपा.), **सोर्स मटेरिअल**, खंड बारा, पृ. ३७४-७६, ३७९-८०.

१२. कित्ता, पृ. ३८१, जमनालाल बजाजांचे हैदरीस पत्र, १८ ऑक्टोबर १९३८.

१३. कित्ता, एफ. ई. शार्पचे गृह सचिव जे. एम. स्लॅडेनला पत्र, २७ सप्टेंबर १९३८, पृ. ३६९.

१४. कित्ता, शार्पचे जी. ए. अँडरसनला पत्र, २७ सप्टेंबर १९३८, पृ. ३६९-७०.

१५. रामानंद तीर्थ यांचे नबाब रहमत यार जंग यास पत्र, २७ ऑक्टोबर १९३८.

१६. गांधीजी, **हरिजन,** १७ नोव्हेंबर १९३८.

१७. अकबर हैदरीचे बजाज यांना पत्र, १६ नोव्हेंबर १९३८.

१८. चौधरी (संपा.), **सोर्स मटेरिअल**, खंड बारा, पृ. ४१२-१६.

१९. मुंबई सरकार, गृह विभागाचा हिंदुस्तान सरकारला अहवाल, ९ डिसेंबर १९३८.

२०. हिंदुस्तान सरकार, होम पोलिटिकल (इंटेलिजंस), फाईल क्र. ४२/३/३९, मे १९३९.

२१. भालेराव, उपरोक्त, पृ. १२१-२८.

२२. होम पोलिटिकल, उपरोक्त फाईल क्र. ४२/३/३९, १९३९.

२३. चौधरी (संपा.), **सोर्स मटेरिअल**, खंड बारा, पृ. ४२७, मेहदी यार जंगची तार.

२४. प्रति कुलगुरुचा २८ नोव्हेंबर १९३८ चा आदेश (गॅझेटिअर कार्यालयात प्रत).

२५. चौधरी (संपा.), **सोर्स मटेरिअल**, खंड बारा, पृ. ४२८-२९, पीपल्स एज्यु. कॉंफरंसचे पत्र, २८ जुलै १९३९.

२६. कित्ता, पृ. ४३२.

२७. कित्ता, पृ. ४४०-४१, गांधीजींची अकबर हैदरींना पत्रे, १४ एप्रिल व ९ मे व ७ जून १९४०.

२८. चौधरी, **महाराष्ट्र टाइम्स**, २० सप्टेंबर १९९८.

२९. कोल्हापूर अभिलेखागार, प्रजापरिषद—१९३८-३९ फाईल.

३०. कित्ता, इचलकरंजी प्रजासंघ—१९३८-३९ फाईल.

३१. चौधरी, **झुंझार पुणे**, पृ. २६९-७०.

३२. य. दि. फडके, **विसाव्या शतकातील महाराष्ट्र**, खंड ४था, पृ. २४७-४९.

३३. हिंदुस्तान सरकार, होम पोलिटिकल (इंटेलिजंस), फाईल क्र. ३/८६/४२, १९४२.

३४. कित्ता, फाईल क्र. ३/७९/४२, १९४२.

३५. भालेराव, उपरोक्त, पृ. ४४२-५०.

प्रकरण १८

# जनआंदोलनाकडे

## महायुद्ध व नवीन राजनीती

दुसरे महायुद्ध ही डोळे उघडणारी घटना होती. महायुद्धाच्या दैवदुर्विलासामुळे अनेक मान्यवरांच्या स्वराज्यवादी निष्ठांना कसोटी लागली. काही जण उजवीकडे झुकले तर काही डावीकडे! तर काहींनी १८० अंशात घुमजाव केले. पूर्वाश्रमीचे क्रांतिकारक मार्गच्युत होऊन १९४२ पासून शत्रूलाच सेनाभरतीद्वारे साहाय्य करू लागले. विनाविलंब स्वराज्य मिळण्यासाठी आधी क्रांतिमार्गाचा अवलंब करणारे आता युद्धसमाप्तीपर्यंत थांबून बातचित करण्यास तयार झाले. कोणत्याही चळवळीपेक्षा सैन्यभरतीचेच धोरण त्यांना श्रेष्ठ वाटू लागले. ब्रिटिश साम्राज्यशाही व भांडवलशाहीचे हाडवैरी असलेल्या कम्युनिस्टांना अचानक जून १९४१ पासून सामाज्यशाहीचे युद्ध लोकशाहीचे युद्ध वाटू लागले. त्यांनी क्रांतीचा नारा त्याज्य ठरवून ब्रिटिशांशी मैत्रीचा नारा पुकारला. युद्धाच्या पूर्वसंध्येपावेतो देशाची फाळणी वा पाकिस्तान या संज्ञा न उच्चारणाऱ्या महंमद अली बॅ. जिनांनी १८० अंशात घुमजाव केले. जन्मजात आत्मकेंद्रित, अहंमन्य व आत्मबडेजाव जोपासलेल्या जिनांच्या राक्षसी महत्त्वाकांक्षा महायुद्धाने प्रज्वलित केल्या. भारतमंत्री लॉर्ड झेटलंड व व्हाइसरॉय लिनलिथगोंनी जिनांच्या महत्त्वाकांक्षांना उत्तम टॉनिक दिले. त्यांनी मुस्लीम लीग व जिनांना व्हेटो म्हणजे नकाराधिकार बहाल केला : काँग्रेसला शह देण्यासाठी आणि युद्धास मदत व्हावी यासाठी !

लिनलिथगोंनी जिना व मुस्लीम लीगची उपद्रवशक्ती वाढविली. जनाधार असलेले सर सिकंदर हयात खान, फझलुल हक, अल्लाबक्ष या अनुक्रमे पंजाब, बंगाल व सिंध प्रांतांच्या वजनदार मुसलमान नेत्यांची उपेक्षा करून लिनलिथगोंनी जिनांना जवळ केले. जिना आणि लीगच्या संमतिशिवाय कोणतीही घटनात्मक सुधारणा व राजकीय बदल केले जाणार नाही, असे अभिवचन लिनलिथगोंनी याच सुमारास जिनांना दिले. १९४० च्या अखेरीस काँग्रेस व मुस्लीम लीगमधील

संघर्ष पराकोटीला पोहोचला तो या पार्श्वभूमीवर. याच काळात लिनलिथगो व बॅ. जिना यांच्यात Quid Pro Quo म्हणजे लाभ-प्रतिलाभ स्वरूपाचे राजकीय नाते निर्माण झाले. महायुद्धात ब्रिटिशांना नैतिक पाठिंबा देणारे रॉयवादी यांचा छोडो भारत आंदोलनास विरोध असला तरी तो तितका नुकसानकारक ठरला नाही. कॉंग्रेसला त्यांचा प्रचार म्हणजे एक प्रकारचा अहितकारी विक्षिप्तपणा या स्वरूपाचा वाटला होता. मात्र भारतीय स्वातंत्र्यास त्यांचा विरोध नव्हता.

ब्रिटिश लेबर पक्ष सत्तारूढ झाल्यावर हिंदुस्तानात लोकनियुक्त घटना समितीकडे पूर्ण सत्तांतर करणार, असे आश्वासन स्टॅफर्ड क्रिप्स व क्लेमंट ॲटली या लेबर पक्षाच्या पुढाऱ्यांनी युद्धापूर्वी जवाहरलाल नेहरू व कृष्ण मेनन यांना दिले होते. जून १९३९ मध्ये क्रिप्स यांच्या घरी क्लेमंट यांच्या समवेत झालेल्या खाजगी भेटीत त्यांनी नेहरूंना आश्वस्त केले होते की, ब्रिटिश हितसंबंध जोपासून व काही अटींच्या अधीन राहून, लेबर सरकार सत्तांतराची प्रक्रिया सुरू करील. तथापि महायुद्धाचा दैवदुर्विलास व अपघातामुळे कॉंग्रेसच्या प्रांतिक स्वायत्ततेचे अपहरण झाले, आणि विन्स्टन चर्चिल साम्राज्याच्या सिंहासनावर आरूढ झाले (मे १९४०). त्याच क्षणी स्टॅफर्ड-क्लेमंट साहेबांचे आश्वासन हवेतच विरले.

तसेच ' कॉंग्रेसकडे सत्तांतर करण्याचा वीट वाटणाऱ्या ' येथील नोकरशाहीला अविरत पाठिंबा देणारा साम्राज्यवादी पंतप्रधान सिंहासनावर बसला होता. त्यानुसार १९४० च्या उन्हाळ्यात कॉंग्रेसला ठेचून काढण्याची रणनीती आली. कोणत्याही क्षणी आणीबाणीकालीन उपाय योजण्यासाठी १९३५ च्या हिंदुस्तान सरकार कायद्यात स्वैरपणे बदल करण्यात आले. या डावपेचांचेच परिणत रूप म्हणजे 'रिव्हॉल्युशनरी मुव्हमेंट ऑर्डिनन्स' व त्यासोबतचा जाहीरनामा ! या अतिगोपनीय वटहुकमाच्या टंकलिखित प्रती तयार होत्या. तथापि अमेरिका नाराज होईल या भीतीने तो ब्रिटिश वॉर कॅबिनेटने रोखून ठेवला. तरीही कॉंग्रेसचे निर्मूलन करण्याचा निर्धार हिंदुस्तान सरकारने सोडला नव्हता. ही वस्तुस्थिती गांधीजींना कळाली होती.[१]

महायुद्ध सुरू झाले त्याच दिवशी ब्रिटिश पार्लमेंटने डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्ट १९३९ मंजूर केला होता. त्यानुसार डिफेन्स ऑफ इंडिया रूल्स (डी. आय.

आर.) जारी करण्यात आले. त्यानुसार हटवादी वाटणाऱ्या कोणालाही अद्दल घडविणे, डांबून ठेवणे व नागरी हक्क नष्ट करण्याचे कडवे धोरण अमलात आले. चळवळीला अवरोध करण्यासाठी सरकारला डी. आय. आर. खाली अतिव्याप्त व अमर्याद अधिकार मिळाले. कठोर अंमलबजावणीसाठी आता देशात पोलीस व सेनादलाव्यतिरिक्त दोस्त राष्ट्रांचे सशस्त्र सैन्य, तोफखाना, रणगाडे व बॉंबर विमाने अहोरात्र सुसज्ज होती. सुसज्ज सेनादल व बॉंबर विमाने अलर्ट पवित्र्यात होती. जागतिक युद्धामुळे ब्रिटनला सर्व दोस्त राष्ट्रांची सहानुभूती होती. खुद्द हिंदुस्तानात मुस्लीम लीग, भांडवलदार, कारखानदार, विविध रंगांचे भारतीय लिबरल पक्ष वगैरे सरकारच्या बाजूचे होते.

२७ मे व ४ जून १९४० रोजी जर्मनीने इंग्लंडला डंकर्कच्या सागरात कंठस्नान घडविले होते. ब्रिटनवरही बॉंबवर्षाव होत होता. इंग्लंडमधील नागरिकांना खंदक व भुयारांमध्ये आश्रय घ्यावा लागे. लगतच्या आठवड्यातच हिटलरने फ्रान्स देश पादाक्रांत केला आणि युरोपात आपल्या विजयाची घोडदौड चालू ठेवली. प्रारंभी कम्युनिस्ट रशियाशी हिटलरचा दोस्तीचा तह झालेला होता. पण २२ जून १९४१ रोजी हिटलरने तहाचा भंग करून उद्दामपणे, अर्थात मूर्खपणानेही, रशियावर हल्ला केला. ८ डिसेंबर १९४१ पावेतो ६०० मैलांपर्यंतचा रशियन भूभाग जर्मन फौजांनी काबीज केला. लेनिनग्राड, मॉस्को, स्टालिनग्राड व सेबॅस्टपूल ही प्रमुख शहरे जरी रशियाच्या अधिकाराखालीच असली, तरी त्यांनाही अहोरात्र जर्मनीचा धोका संभवत होता. याबरोबर महायुद्धाची तीव्रता व व्याप्ती वाढली. परिणामतः ब्रिटन व रशियादरम्यानचे शत्रुत्व नष्ट होऊन हे देश मित्र झाले, काही काळ तरी ! यामुळे महायुद्धाचे स्वरूप पार बदलले व नवीन राजकीय समीकरणे निर्माण झाली. स्वार्थापायी भांडवलशाही व साम्राज्यशाही आणि कम्युनिझम यांची मैत्री झाली. राजकीय अलाइनमेंट म्हणजे संलग्नता बदलल्या. त्याचे हिंदुस्तानातही गंभीर परिणाम झालेत. भारतीय कम्युनिस्टांना, आपली सद्विवेकबुद्धी बाजूला ठेवून, अचानक साक्षात्कार झाला. ते भांडवलशाही इंग्रजांचे दोस्त झाले आणि ते कॉंग्रेसच्या आंदोलनाविरुद्ध लढले. त्या काळात काही हिंदुत्ववाद्यांचेही वेगळे रंग दिसून आले. याबाबत अधिक विवेचन नंतर करण्यात येईल.

इथवर युरोपातच सीमित असलेले युद्ध जपानच्या भयंकर हल्ल्यामुळे खऱ्या अर्थी जागतिक झाले. ७ डिसेंबर १९४१ रोजी १८९ जपानी बाँबर विमानांनी अनपेक्षितरीत्या पर्ल हार्बरमधील अमेरिकन युद्धनौकांच्या प्रचंड काफिल्यावर भयानक हल्ला चढवला. अमेरिकेत हाहाकार उडाला. त्यामुळे तोवर तटस्थ राहिलेल्या अमेरिकेला जपानविरुद्ध युद्ध घोषित करावेच लागले. परिणामतः युद्धाची व्याप्ती फक्त युरोपपुरती न राहता हे वास्तविक अर्थाने जागतिक महायुद्ध बनले.

ऑगस्ट १९४० मध्ये युरोपातील वणवा भडकत व पसरत असताना भारतमंत्री लॉर्ड एल. एस. अमेरी व व्हाइसरॉय लिनलिथगो युद्धाला भारतीय मनुष्यबळ व साधनसामग्री मिळविण्यासाठी भारताला थोड्या राजकीय सवलती देण्यास तयार झाले. त्यालाच **' ऑगस्ट ऑफर '** म्हणतात. वस्तुतः ही ऑफर म्हणजे १७ ऑक्टोबर १९३९ च्या व्हाइसरॉयच्या निवेदनाचे किंचित सुधारलेले रूप होते. 'ऑगस्ट ऑफर १९४०' अनुसार अनिश्चित अशा भविष्यकाळात वसाहतीचे स्वराज्य देण्याचा मानस होता. त्यानुसार मुस्लीम लीग वगैरे अल्पसंख्याक पक्षांना नकाराधिकार मंजूर केलेला होता. लीग वगैरे पक्षांना त्यातून सवतासुभा उभा करण्याची संधी लाभली होती. तथापि त्यात मताधिकाराचे आश्वासन नव्हते. जुलै १९४१ मध्ये व्हाइसरॉयच्या कौन्सिलचा विस्तार करून भारतीय सदस्यांना एकूण बारापैकी आठ मंत्रिपदे देण्यात आली. मंत्रिमंडळात भारतीयांना प्रथमच बहुमत प्राप्त झाले. तथापि या सरकारधार्जिण्या पुरुषांना महत्त्वाची खाती लाभली नाही. आपले स्वामीत्व शाश्वत ठेवणे हेच ब्रिटिशांचे राजकीय नीतिशास्त्र कायम होते. त्यानुसार ॲटली व क्रिप्सच्या उपरोक्त आश्वासनास चर्चिल, अमेरी व लिनलिथगो या त्रिकुटाने सुरुंग लावला. चर्चिलच्या आगमनानंतर पूर्वीच्या अमूर्त औदार्याचाही अंत झाला. चर्चिलचा बाणा होता, " To give the enemy a good beating and a generous treaty."

मार्च १९४० मध्ये काँग्रेसच्या निम्न संवर्गात शिस्त व सुसंगतपणाचा थोडा अभाव भासत होता. आणि याच काळात सरकारने आपले अफाट सेनाबल

व मित्रराष्ट्रांचे सेनादल भारतभर तैनात केलेले होते. डिफेन्स ऑफ इंडिया रूल्स व वटहुकूम जारी केलेले होते. अशा बिकट स्थितीत काँग्रेसने मास मुव्हमेंट उभारल्यास ती दडपून टाकण्याची क्षमता सरकारकडे खचितच होती. भारतीय लोकमानसाची नाडी ओळखणाऱ्या महात्मा गांधींना याची स्पष्ट पूर्वकल्पना आली होती. प्राप्त परिस्थितीत प्रखर राजकीय जाणिवा निर्माण करून व्यापक लढ्यासाठी अनुकूल स्थिती निर्माण करणे त्यांना गरजेचे वाटत होते. संघटनेतील कमकुवतपणा घालवून पक्ष एकसंध बनविणे आवश्यक होते. तद्वतच सत्ताधीशांशी सामोपचाराच्या धोरणानुसार काही साध्य होते काय, हे पाहावयाचे होते. त्यानंतरही सत्ताधीश न बधल्यास आडमुठेपणाचा आरोप सरकारच्याच माथी मारण्याचे गांधीजींचे धोरण होते. त्यानुसार आम जनता जनआंदोलनास पुरेशी सिद्ध व सक्षम आहे, असे दिसल्यावर आणि काँग्रेस संघटना भक्कम अधिष्ठानावर खंबीरपणे उभी राहिल्यावर, काँग्रेस पक्ष आंदोलनाची निर्णायक भूमिका घेईल, असा पक्षश्रेष्ठींनी निर्णय केला. मार्च १९४० च्या रामगड काँग्रेसपुढे कार्यकारिणीने अशा अर्थाचा ठराव सादर केला. त्यातील काही महत्त्वाचे शब्द :—

"Nothing short of Complete Independence can be accepted by the people." ...... "Civil Disobedience as soon as the Congress organization is considered fit enough for the purpose."

श्रेष्ठींच्या या निर्णयाला पक्षातील डाव्यांच्या गटाने आक्षेप घेऊन दुसरा पर्याय मांडला होता. या गटातील सुभाषचंद्र बोस व त्यांचा फॉरवर्ड ब्लॉक आणि काँग्रेस समाजवादी पक्ष व कम्युनिस्ट पक्ष यांना दुसऱ्या महायुद्धाचे संकट म्हणजे भारताला चालून आलेली संधी वाटू लागली. या संधीचा फायदा घेऊन ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध काँग्रेसने लगेच लढा उभारावा आणि हिंदुस्तान स्वतंत्र करावा, अशी डाव्यांच्या गटाची मागणी होती. आम जनता जनआंदोलनासाठी अगदी सज्ज आहे, किंबहुना आंदोलनाची प्रतीक्षाच करीत आहे, असा या गटातील मंडळींचा दावा होता. राजकारणातील जातीय समस्या आणि काँग्रेस संघटनेतील

उणिवांची त्यांनाही जाण होती. तथापि जनआंदोलन पेटताच या समस्या नष्ट होऊन, आंदोलनादरम्यान संघटना मजबूत होईल, हे सुभाषबाबूंचे अजब गृहीतक होते. पण काँग्रेस नेतृत्वाने त्यांच्या आग्रहाकडे दुर्लक्ष केल्याने बाबूजी व कम्युनिस्टांनी काँग्रेसवर असभ्य भाषेत टीका केली होती.

मात्र गंमत अशी की, लढा उभारावा हा आग्रह धरणाऱ्या मंडळीत ऐक्यभाव अथवा परस्पर सामंजस्यही नव्हते. काँग्रेस नेत्यांनी लगेच आंदोलन न उभारल्यास आपण काय करावे, याचा त्यांच्याकडे कृतिआराखडा वा रणनीती नव्हती. तरीही सुभाषबाबूंनी काँग्रेसची दोन शकले करण्याचा विचार मांडला. आपल्याच नेतृत्वाखाली ‘ समान्तर काँग्रेस ’ स्थापन करण्याचा त्यांचा इरादा होता. ‘ काँग्रेसमधील मोठा गट आपणहून मला पाठिंबा देईल ’, या भ्रमात बाबूजी होते. तथापि काँग्रेस विभाजनाचा विचार समाजवादीच नव्हे तर कम्युनिस्टांनाही साफ नामंजूर होता. या दोन्ही गटांची खात्री पटली की, ‘सुभाषबाबू स्वतःबद्दल वृथा कल्पना बाळगत आहेत. तसेच ते डाव्या गटाच्या सामर्थ्याविषयी अतिशयोक्त अंदाज व्यक्त करीत आहेत. महात्मा गांधींनी नेतृत्व स्वीकारल्याशिवाय कोणतेही आंदोलन सफल होणे अगदी असंभव असल्याने, आपण तसे धाडस अजिबात करू नये, अशी समाजवादी व कम्युनिस्टांनी आपली भूमिका मांडली’. सुभाषजींच्या मतानुसार काँग्रेसचे विभाजन करू नये; तसेच सध्याची नॅशनल फ्रंट विस्थापित होऊ नये; तथापि आंदोलन पुकारण्यास गांधीजी व वरिष्ठ नेत्यांचे मन वळविण्यात यावे, असे काँग्रेस समाजवादी व सी.पी.आय. ने ठरविले.[२]

त्यामुळेच काँग्रेसने सुभाषबाबूंवर शिस्तभंगाची कारवाई केलेली होती. त्यांच्या फॉरवर्ड ब्लॉक पक्षाला महाराष्ट्रात फारसे पाठबळ मिळाले नव्हते. सेनापती बापट, विनायकराव भुस्कुटे, दत्तोपंत बाभळे, हरीभाऊ वि. कामथ व रामभाऊ रुईकर हे त्यांचे प्रमुख मराठी अनुयायी होते. लवकरच नागपुरात १८ जून १९४० **रोजी फॉरवर्ड ब्लॉकच्या अधिवेशनात सुभाषबाबूंनी ‘ डाव्या पक्षांची आघाडी करण्याचे आपले स्वप्न भंग पावल्याची ’ प्रांजळ कबुली दिली. डाव्यांचे एकीकरण करून लढा उभारण्यात आपण अपयशी ठरलो, हे**

**त्यांनी जाहीर केले. गांधीजींचा व आपला स्वातंत्र्यप्राप्तीचा मार्ग भिन्न प्रकारचा आहे, हे ओळखून सुभाषचंद्र बोस यांनी राष्ट्रभूमीचा त्याग केला (१७ जानेवारी १९४१).** याविषयी प्रांतिक स्वायत्तता व काँग्रेस मंत्रिमंडळे या प्रकरणात विवेचन केलेले आहे.

## मुस्लीम लीगचा द्विराष्ट्रवाद

काँग्रेसने महायुद्धाच्या संदर्भात आपली पूर्ण स्वातंत्र्याची मागणी आंतरराष्ट्रीय प्रश्नांशी निगडित करून मांडली होती. भारताला स्वातंत्र्य नाकारून जगातील देशांमधील लोकशाहीच्या रक्षणासाठी लढत आहोत, हे सांगण्याचा ब्रिटनला नैतिक अधिकार नाही, अशी काँग्रेसने रामगढला भूमिका घेतली होती. त्यानंतर लगेच लीगने स्वतंत्र व सार्वभौम इस्लामी हिंदुस्तानची स्पष्ट मागणी केली. एकाच आठवड्यातील या दोन मागण्या म्हणजे केवळ योगायोग नव्हता.

मुस्लीम लीगच्या द्विराष्ट्रवादास उत्तेजन देणे हा ब्रिटिशांच्या युद्धनीतीमध्ये विलक्षण महत्त्वाचा घटक होऊन बसला. किंबहुना लीगचा विभाजनवाद जोपासण्याची व जिनांच्या आशा व आकांक्षा पल्लवित करण्याची एकही संधी नवी दिल्लीने दवडली नव्हती. लिनलिथगोंचे १७ ऑक्टोबर १९३९ चे निवेदन आणि 'ऑगस्ट ऑफर' (८ ऑगस्ट १९४०) यामधून स्पष्टच झाले होते की, हिंदुस्तानातील कोणत्याही पक्षाला वा गटाला नापसंत असलेली राज्यपद्धती ब्रिटिश सरकार लादणार नाही. म्हणजे सर्वच पक्षांनी सहमती दिल्यावरच सत्तांतर केले जाईल. **परिणामतः युद्धाच्या प्रारंभापासून महंमद अली जिना करीत असलेली मागणी मान्य झाल्याखेरीज सत्तांतर होणे असंभव होते. लीग या पक्षाला सर्वच मुसलमान प्रजेचा एकमेव 'प्रवक्ता' हा दर्जा लाभला, काँग्रेसला अमान्य असूनही. त्यानुसार जिनांना नकाराधिकार (व्हेटो) लाभला.** लॉर्ड डफरिनपासून इंग्रज मुत्सद्दी म्हणतच असत, "मुस्लीम्स आर अ नेशन बाय देमसेल्फज्". जिनांचा तर हा एक सिद्धांत बनला. त्यानुसार हिंदू व मुसलमानांसाठी स्वतंत्र अशी दोन राष्ट्रे निर्माण करावी ही त्यांची अपरिवर्तनीय मागणी सुरू झाली 'या दोन जमातींमधील संघर्ष हा आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा मुद्दा मानला पाहिजे'

असाही त्यांचा अट्टाग्रह होता. वस्तुतः २२ मार्च १९४० च्या लीगच्या लाहोर ठरवात हिंदुस्तानची फाळणी व स्वतंत्र मुस्लीम राष्ट्राची निर्मिती अभिप्रेत असली, तरी पाकिस्तान हा शब्दही नव्हता.

मार्चमध्ये लाहोर अधिवेशनात लीगने संमत केलेल्या या ठरावाच्या निर्मितीला व्हाइसरॉयची चिथावणी होती व त्यात त्यांचे योगदानही होते. काँग्रेसला शह देण्याची ती खेळी होती! कवी व राजकारणी इक्बाल व चौधरी रहिमत अली हे जरी ' पाकिस्तान ' या नाऱ्याचे जनक मानले जात असले, तरी **तेव्हा स्वतः जिनांना पाकिस्तान हे एक इंपॉसिबल ड्रीम वाटले होते.** जिनांपेक्षाही अधिक मुसलमानांचा जनाधार असलेले पंजाबचे सिकंदर हयात खान व बंगाल-आसामचे मुस्लीम नेते फझलुल हक यांना हिंदुस्तानाबाहेर पाकिस्तान हा प्रस्ताव अजिबात मंजूर नव्हता. त्यांना प्रांतिक स्वायत्तता असलेली फेडरल राज्यपद्धती मंजूर होती

अलीकडे खुल्या झालेल्या लिनलिथगो व लॉर्ड झेटलंड कागदपत्रांमधून ब्रिटिशांची पाकिस्तान निर्मितीमधील भूमिका किती उघड आणि स्वयंस्पष्ट होती, हे सहज उमगते. भारतमंत्री झेटलंडने रहिमत अलीची योजना ' रिडिफाइन ' करून पश्चिम पाकिस्तान आणि पूर्व पाकिस्तान हे दोन देश निर्माण करण्याची कल्पना सुचविली होती. असे या दस्तऐवजांमधून स्पष्ट दिसते. ११ मार्च १९४१ रोजी पंजाबचे मुख्यमंत्री सर सिकंदर हयात खान यांनी पंजाबच्या विधिमंडळात जाहीर केले, " I am opposed to a Pakistan which would mean Muslim Raj here and Hindu Raj elsewhere.......If Pakistan means unalloyed Muslim Raj in the Punjab, then I will have nothing to do with it. " (V.P. Menon, **Transfer of Power in India,** p.463).

सिकंदर साहेबांना व अनेक मुसलमान धुरीणांना हिंदुस्तानचे 'लूज कॉन्फेडरेशन' म्हणजे सर्वसंघ फेडरल स्वरूप हवे होते. पण देशाच्या दुर्दैवाने ते अकाली मरण पावले. ब्रिटिशांना मात्र हिंदुस्तानात सांविधानिक डेडलॉक म्हणजे कोंडी निर्माण करण्याचा उत्तम उपाय लाभला.[३]

ॲरिस्टोक्रॅटीक, श्रीमंत, भपकेबाज व पाश्चिमात्य पद्धतीचे जीवन जगणारे बॅ. जिना १९२१-१९२८ च्या काळात गांधीजी किंवा काँग्रेसपासून लांब गेले, पण ते मुस्लीम राष्ट्रवादाच्या मुद्यावरून नव्हेच नव्हे! काँग्रेसचे जनआंदोलन, पुरोगामी विचारप्रणाली व खादी ग्रामोद्योगासारखे उपक्रम त्यांच्या उच्चभ्रूपणाशी त्यांना विसंगत वाटत होते. महात्मा गांधी हिंदुस्तानचे अद्वितीय पुढारी झालेले पाहणे जिनांना असह्य झाले होते. शिवाय त्यांना गरीब मुसलमानांचे नेतृत्व करणे अशक्य झाल्यानेही, रतनबाईंच्या निधनानंतर वकिलीचा व्यवसाय करण्यासाठी जिना कायम राहण्याच्या इराद्याने इंग्लंडला गेले होते. **रतनबाईंचे अकाली निधन झाले नसते तर कदाचित परिस्थिती वेगळी असती.**

ब्रिटिशांना मुस्लीम लीग नजीकच्या काळात ' उपयोगी आयुध ' वाटले तर दीर्घ काळात आटोक्यात आणता येईल असे पटावरचे सोंगटे वाटत होते. एका चाणाक्ष इंग्रज वार्ताहाराने एका समर्पक टिपणीत म्हटले, "Jinnah's statements rendered the Indian deadlock a little deader and more tightly locked."

एके काळी मुंबईतील कॉलेज विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय असलेले जिना आता अतीव आत्मकेंद्रित, फक्त स्वतःमध्येच रस असलेले गर्विष्ठ व भपकेबाज आणि उच्चभ्रू गृहस्थ बनले. स्वतःची महत्त्वाकांक्षा व स्वार्थ साधण्यापुरताच त्यांना राजकारणात रस होता. आपले ग्रँजर राखण्याइतकीच त्यांची बांधीलकी होती. म्हणूनच त्यांचे अनेक मित्र त्यांना सोडून गेले. भारताच्या सरन्यायाधीशाच्या उच्चपदी पोहोचलेले बॅ.एम.सी. छागला अनेक वर्षे जिनांचे व्यावसायिक साहाय्यक व निकटचे मित्र होते. तथापि जिनांचा आत्मघातकी विभाजनवाद व पाकिस्तानचा हट्टवादी आग्रह यामुळे तत्वनिष्ठ छागलांनी जिनांपासून सुटका करून घेतली. असे अनेक पुरोगामी मुसलमान, पारशी व हिंदू मित्र जिनांना सोडून गेले. मुंबईतील शेकडो बुद्धिवादी मुसलमानांनी जिनांचा त्याग केला.[४]

व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेल यांना जिना अत्यंत संकुचित मनाचे व उद्धट राजकारणी वाटत. काँग्रेसच्या भीतीने व अविश्वासाने जिनांच्या मनात घर केलेले आहे, आणि कोणत्याही पक्षाशी सहकार्य करण्यास जिना असमर्थ आहेत, असे वेव्हेलने

भारतमंत्री अमेरींना कळविले होते. ‘ गांधीजींनी आम्हास पाकिस्तान मिळवून द्यावा ’ असे जिना म्हणत. तथापि पाकिस्तान मिळवण्यासाठी ब्रिटिश फिरंग्यांशी लढा देण्याची जिनांची तयारी नव्हती!

१९४१-१९४२ च्या काळात जिनांना प्रामुख्याने मुंबईतील मुसलमान दुकानदार, कामगार व अप्रबुद्ध वर्गातील मुसलमानांचा पाठिंबा होता. शहरातील इस्माईल आय. चुंद्रीगर, करिमभाई इब्राहिम आणि आमदार अझिझ गफूर काझी हे त्यांचे प्रमुख अनुयायी होते. चुंद्रीगर मुंबई प्रांतिक मुस्लीम लीगचे अध्यक्ष तर करिमभाई उपाध्यक्ष होते. काझी चिटणीसपद सांभाळत. श्रीमंत व्यापारी व उद्योगपती या नात्याने सरकारचा करिमभाईवर लोभ होता. काँग्रेसच्या आंदोलनास बळी पडू नये किंबहुना कसून विरोध करावा असा ही मंडळी प्रचार करीत असत. मुसलमान-बहुल भागात ते पाकिस्तानचा नारा घुमवित असत. **इकबाल, खिलाफत** ही दैनिके लीगची शहरातील मुखपत्रे होती.

तथापि जिनांचा पाकिस्तानच नव्हे तर त्यांचा दुराग्रही व आत्मकेंद्रित बाणा अजिबात पसंत नसलेले हजारो प्रबुद्ध मुसलमान मुंबईत होते. ते गांधीजी व काँग्रेस समाजवादाचा प्रभावीपणे प्रचार करीत. स्वातंत्र्य लढ्यातील त्यांच्या योगदानाचे विवेचन आधीच्या प्रकरणांमध्ये केलेलेच आहे आणि यापुढे येणारच आहे. इथे त्यांपैकी काहींचा नामोल्लेख करतो :—युसुफ मेहेरअली, अबिदअली जाफरभाई, एम.आय.नुरी, सालेभाई अब्दुल कादर, न्या. छागला, नसरतउल्ला अब्बासी, हिफझुर रहमान, अली महमद मेकलाई, कुलसुम सयानी, सोफिया खान, अमतुल सलाम इत्यादी. सोफिया खान या तर सरहद गांधी अब्दुल गफार खान यांच्या भावाच्या सूनबाई असून, देश सेविका संघाच्या मुख्य कमांडर (जी.ओ.सी) होत्या. अमतुल सलाम या सेवाग्राममध्ये राहिलेल्या असून महात्माजींच्या शिष्या होत्या. **इत्तेहाद** या उर्दू साप्ताहिकाच्या संपादिका असलेल्या अमतुलबेन स्वातंत्र्यलढ्याचा चांगला प्रचार करीत. काँग्रेसच्या प्रचारामध्ये जो गुणात्मक दर्जा होता, तसा लीगच्या प्रचारामध्ये नव्हता, असे समकालीन पत्रकांतून स्पष्ट दिसते. जमायत-उल-उलेमा-इ-हिंद या संघटनेचे मुंबईतही बरेच समर्थक असून त्यांनी काँग्रेसला पाठिंबा दिला होता. या संघटनेचा जिनांच्या राजकारणाला सक्त विरोध होता.[५]

## हिंदुमहासभेची भूमिका

विनायकराव सावरकरांचा पूर्वाश्रमीचा राष्ट्रवादी व क्रांतिकारी बाणा आता उरला नव्हता. ते हिंदुमहासभेचे अध्यक्ष झाल्यापासून हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व अशी त्यांनी भूमिका घेतली. हिंदुमहासभा ही जातीय संघटना नसून हिंदूंच्या रक्षणासाठी काढलेला हा एक राजकीय पक्ष आहे, यावर सावरकर भर देत होते. हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व आणि स्वराज्य म्हणजे ज्या राज्यात हिंदूंचे स्वत्व राखता येईल ते राज्य अशी सावरकर व्याख्या करीत होते. मात्र जिनांना देशाची फाळणी हवी होती, तर सावरकरांना अखंड हिंदुस्तान हवा होता. सरकारने काँग्रेस, मुस्लीम लीग यांबरोबर हिंदुमहासभेलाही उचित प्रतिनिधित्व द्यावे असा सावरकरांचा दावा होता. जागतिक युद्धाच्या परिस्थितीचा लाभ घेऊन अधिकाधिक हिंदू युवकांनी ब्रिटिशांच्या सेनादलात भरती व्हावे हा सावरकरांच्या प्रचारातील दुसरा मुद्दा होता. याचा अर्थ ब्रिटिशांच्या युद्ध-प्रयत्नांना मदत करणे हा सावरकरांचा प्रयत्न होता. त्यांना सापेक्ष अहिंसा हा सद्‌गुण वाटत असला, तरी गांधीजींना अभिप्रेत असलेली निरपवाद वा निरंकुश अहिंसा पाळणे हा अपराध ठरेल असे सावरकरांनी मदुरेच्या भाषणात सांगितले होते.

१९४२ मधील काँग्रेसच्या स्वातंत्र्यलढ्यास सावरकरांचा जाहीर विरोध होता. २ ऑगस्टच्या जाहीर सभेत विरोध करताना अखंड हिंदुस्तानच्या स्वातंत्र्यासाठी लढत आहोत, असे निःसंदिग्ध शब्दात आश्वासन आजच काँग्रेसने द्यावे, असा त्यांनी आग्रह धरला. तसेच विविध जमातींना कायदेमंडळात लोकसंख्येच्या प्रमाणातच प्रतिनिधित्व मिळावे, अशी सावरकरांची ‘ प्रीपोस्टरस ’ मागणी होती. तेव्हाची त्यांची अनेक विधाने विसंगत होती. वस्तुतः महात्मा गांधी व काँग्रेसने देशाच्या अविभाज्यतेबद्दलचे आपले धोरण आधीच स्पष्ट केलेले होते, हे निःसंशय ! देश स्वतंत्र झाल्यावरच घटना समिती कायदेमंडळाचे स्वरूप ठरविणार होती.[६]

## रॅडिकल डेमॉक्रॅटिक पक्षाचे धोरण

वस्तुतः फैजपूर काँग्रेसपासून मानवेंद्रनाथ रॉय सुसंगतपणे काँग्रेसमध्ये होते. तत्पूर्वीही १९३१ च्या कराची काँग्रेसमध्येही ते वेषांतर करून सक्रियरीत्या सहभागी झालेले होते. विचारप्रणाली व पुरोगामी कार्यक्रम आखण्याबाबत त्यांनी काँग्रेसला व राष्ट्राला योगदान दिलेले होते. वसंतराव कर्णिक व लक्ष्मणशास्त्री जोशी वगैरे रॉय यांचे बहुसंख्य सहकारी तर १९३० च्या सविनय कायदेभंग आंदोलनापासून काँग्रेसमध्येच होते. रॉय एके काळी जोसेफ स्टालिनचे अत्यंत निकटवर्ती असले, तरी ते कधीच कम्युनिस्ट झाले नाहीत. रॉयवादी पक्ष स्थूलमानाने मार्क्सवादावर आधारित असा समाजवादी व लोकशाहीवादी पक्ष होता, अशी प्रस्तुत इतिहासकारास रॉयवादी मित्रांच्या संपर्कातून जाणीव झाली. आपल्या विचारप्रणालीमुळे रॉय साहेबांची नेहरूंशी जवळीक जमली. रॉय यांचे सर्वात जास्त अनुयायी मुंबई, पुणे व महाराष्ट्रातच होते. काँग्रेसमध्ये राहूनही त्यांचा एक निखळ पुरोगामी वैचारिक गट होता.

फॅसिझमला विरोध हे रॉय यांचे प्रांजळ, अपरिवर्तनीय आणि बिनतडजोडीचे धोरण होते. महायुद्ध संपल्यावर वसाहतीतील लोकांच्या हाती सत्ता देऊन सामाज्यवादी राजवटींना माघार घ्यावी लागेल, असे रॉय साहेबांना वाटत होते. या विचारांवर आधारित वसाहतवाद-विरोधी विचार त्यांनी महायुद्धापूर्वीच मांडला होता. मात्र हा आशावाद किती भारतीयांना पटला हा भाग वेगळा ! इतके मात्र निर्विवाद सत्य की, फॅसिझम व नाझी आक्रमणाला विरोध करण्यासाठीच रॉय यांनी इंग्रजांना पाठिंबा देण्याचे धोरण पत्करले. दुसरे जागतिक महायुद्ध म्हणजे फॅसिझमचे लोकशाहीवर आक्रमण होय, या भूमिकेतून जगातील लोकशाहीच्या रक्षणासाठी इंग्रजांचे हात बळकट करणे आवश्यक होऊन बसले आहे, असे रॉय यांचे तर्कशास्त्र होते. फ्रान्सच्या पतनानंतर (८ जून १९४०) ब्रिटिशांशी बिनशर्त सहकार्य करण्याची त्यांची भूमिका स्पष्ट झाली. म्हणून संयुक्त प्राप्त काँग्रेस समितीने रॉय यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई केली. तोपर्यंत ते काँग्रेसमध्येच होते. सर्वच रॉयवाद्यांचे काँग्रेसने उच्चाटन केले. त्यामुळे

रॉय, वसंतराव व त्यांचे बंधू द्वा. भ. कर्णिक, मणिबेन कारा व वामनराव जोशी यांनी मुंबईत २४ डिसेंबर १९४० रोजी रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टी स्थापन केली.

सभासद संख्येच्या निकषानुसार हा पक्ष फार लहान होता. इतर पक्षांप्रमाणे हा कधीच काँग्रेसचा शत्रुपक्ष नव्हता. मात्र रॉयवाद्यांचा नवा विक्षिप्तपणा काँग्रेसला अहितकारी वाटत असे. रॉयवाद्यांमध्ये पुरोगामी विचारवंत, धर्मनिरपेक्षतावादी प्रचारक, लेखक, पत्रकार आणि निष्ठावंत कामगार पुढारी होते. गोदी कामगारांचा व गिरणी कामगारांचा लढा न्याय व तत्त्वाच्या भूमिकेतून लढविणारे वसंतराव, मणीबेन कारा, एम.आर.शेट्टी, हसन बुखारी व रांगणेकर वगैरेंच्या कार्याची प्रशंसा झाली होती. व्ही. व्ही. फाटक, बी. व्ही. मराठे हेही त्या काळी ज्ञात होते. मुंबईच्या नोकरशाहीने संघटित केलेल्या नॅशनल वॉर फ्रंटच्या विद्यमाने युद्धाला पाठिंबा मिळविण्यासाठी या मंडळींनी मुंबईत प्रचार केला. काँग्रेसच्या आंदोलनास विरोध करण्यासाठी पत्रकार द्वा. भ. कर्णिक वगैरे प्रचारपत्रके निर्गमित करीत. काँग्रेसच्या आंदोलनामुळे हिटलर-मुसोलिनी यांना भारतात आमंत्रण मिळेल आणि रशिया व चीनची प्रतारणा होईल, हे रॉयवाद्यांच्या प्रचाराचे मुख्य सूत्र होते. परिणामकारक प्रचारपत्रके काढणारे द्वा. भ. कर्णिक पुढील काळात नामवंत साक्षेपी पत्रकार म्हणून प्रसिद्धी पावले व **महाराष्ट्र टाइम्सचे** संस्थापक संपादक झालेत.

छोडो भारत क्रांतिलढा भडकल्यावर मात्र रॉय पक्षाचा आवाज म्हणजे अरण्यरुदन ठरले. त्यांचाही काँग्रेसविरोध क्षुल्लक ठरला. मानवेंद्रनाथ व एलन रॉय या दांपत्याने १५ फेब्रुवारी १९४३ पासून पंधरा दिवस मुंबईत अनेक भाषणे दिली. तथापि मुंबईकरांनी त्यांना गांभीर्याने घेतले नाही, असे पोलीस कमिशनरने राज्य सरकारला कळविले होते.[७]

## महायुद्धकालीन कम्युनिस्ट चळवळ

दुसऱ्या महायुद्धामुळे भारतीय कम्युनिस्टांच्या राष्ट्रवादी निष्ठेला कसोटी लागली! त्यांच्यावर फेलो ट्रॅव्हलर असा उपरोधिक आरोप करण्यात आला. महायुद्धाच्या पहिल्या अवस्थेत सी. पी. आय. गांधीजी व काँग्रेसवर दबाव आणत होती की, ‘ काँग्रेसने साम्राज्यवाद्यांवरील संकटाचा विनाविलंब फायदा घेण्यासाठी

राष्ट्रव्यापी लढा उभारावा’. तथापि रशिया आणि हिटलर यांच्यात मित्रत्वाचा तह होताच भारतीय कम्युनिस्टांनी कोलांटी उडी मारली. या घटनेमुळे इतिहासकारांना अनेक दशके कोडे पडले होते. पण नंतर हिंदुस्तान सरकारच्या शेकडो फायली आम्हा इतिहासकारांना नवी दिल्लीतील राष्ट्रीय अभिलेखागारात उपलब्ध झाल्यामुळे याबाबतची सत्यकथा आता सांगणे शक्य झाले आहे.

युद्धाच्या पहिल्या टप्प्यात कम्युनिस्टांना ब्रिटन व जर्मनी यांच्यातील लढाई हा दोन साम्राज्यशाही महासत्तांचा सत्तासंघर्ष वाटत होता. म्हणून ब्रिटनच्या युद्ध-प्रयत्नात व्यत्यय आणणे आणि भारतातून लष्करासाठी मालपुरवठा कमी करणे हे कम्युनिस्टांचे तेव्हाचे धोरण होते. त्यादृष्टीने त्यांनी महागाई, वस्तूंची टंचाई व महागाई भत्ता अशा मुद्यांवर मुंबईत संप घडवून आणले. शहरातील एकूण ६४ कापड गिरण्यांपैकी ६० गिरण्यांमध्ये त्यांनी संप घडवून आणला (४ मार्च १९४० पासून). त्या कारणास्तव सरकारने कॉ. डांगे, रणदिवे व मिरजकर यांना ११ मार्चला डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्टखाली (डी.आय.आर) कारागृहात डांबले. कम्युनिस्टांचा बंदोबस्त करण्यासाठी कलोनिअल सत्ताधीशांनी डी. आय. आर. कायद्याचा प्रच्छन्नपणे उपयोग सुरू केला होता.

त्या संक्रमण काळात राष्ट्रव्यापी आंदोलनासाठी जनमत कितपत अनुकूल आहे आणि लोकमानसाचा कौल काय आहे, याचे गांधीजी निदान करीत होते. लोकमनाची नाडीपरीक्षा घेतल्यावरच गांधीजी आंदोलन सुरू करीत. त्यात भावनांना स्थान नसे! **अशी नाडीपरीक्षा घेण्यासाठीच त्यांनी वैयक्तिक सत्याग्रहाचा प्रयोग केला होता.** त्यावर लढ्यासाठी आक्रमक झालेल्या कम्युनिस्टांनी जबरदस्त टीका केली. आणि म्हटले, गांधीजी व काँग्रेसचे मनोधैर्य खचले व ते ‘डिकडेन्ट’ अवस्थेत पोहोचले. भूमिगत असलेल्या पक्षाच्या सरचिटणिसांनी म्हणजे पूरणचंद्र जोशींनी कुजबुज मोहीम सुरू करून दिली की, काँग्रेसने शत्रू पक्षाशी हातमिळवणी केली असावी. या उत्तर भारतीय जोशीने वैयक्तिक सत्याग्रह व काँग्रेसच्या अनिर्णयशीलतेची टिंगलटवाळी केली, उपहास केला. काँग्रेसला बूर्झ्वाझी म्हटले.

कम्युनिस्टांनी मुंबईत प्रकाशित केलेल्या एका पुस्तिकेत अनाधारित व अभिरुचिहीन टीका केली. नमुना पहा :—

"Gandhism has entered into its decadent phase. At the most critical time of our national history, it is acting as a Fetter on the national struggle ...... Compromising on the issue of war is the biggest danger that faces the national movement, and Gandhism today means the line of that compromise. Compromise with imperialism and disruption of the Congress are today politically synonymous terms "[८]

अशा प्रकारची बेजबाबदार व असत्य विधाने केल्यावरही ही मंडळी थांबली नाही. आपला राष्ट्रवादी बाणा आणि विश्वसनीयता दाखविण्यासाठी कम्युनिस्टांनी मुंबईतून प्रकाशित केलेल्या **कम्युनिस्ट** पत्रकाच्या नोव्हेंबर १९४० व फेब्रुवारी १९४१ च्या अंकांमध्येही टीकेची झोड चालू ठेवली. गांधीजी व काँग्रेसवर तोंडसुख घेताना मर्यादाभंगही केला. पाहा. "Every Congressman must be made to realize that this Satyagraha can lead only to prostration before the enemy." ..... "The national movement under bourgeois leadership has entered into a blind alley. They feared the masses and trusted Imperialism. They handed over the national organisation to Imperialism for safe custody"[९].

मुळातच श्रमसंघवादी असलेल्या कम्युनिस्टांनी कॉ. डांगे व मिरजकरांच्या अटकेनंतर ब्रिटनच्या युद्धप्रयत्नात बाधा आणण्यासाठी मुंबई व सोलापूर येथे संप घडवून आणले. अमळनेरलाही संपाची लागण झाली. २९ मार्च १९४० रोजी सरकारने आंदोलक कामगारांवर गोळीबार केला. या प्रसंगी कम्युनिस्ट नेते शं. वा. देशपांडे, एल. के. ओक, एस.आर. तावडे, श्यामराव परुळेकर, गोदावरी गोखले, भिसे, आर. एम. जांभेकर, एस. जी. पाटकर आणि ना. वा. फडके यांना अटक झाली. संपकाळात कामगारांच्या निर्वाहासाठी निधी संकलित केला

होता. त्याचा विनियोग करण्याची जबाबदारी रघुनाथ निंबकरांवर होती. मात्र निंबकरांनी निधीची अफरातफर केल्याचा पक्षानेच त्यांच्यावर ठपका ठेवला. म्हणून त्यांना पक्षाचा राजीनामाही द्यावा लागला होता.

हा संप असफल झाल्यामुळे गंगाधर अधिकारी, अजय घोष व पूरणचंद्र जोशी हे प्रमुख नेते भूमिगत झाले. मात्र घोष लखनौत पकडले गेले. अधिकारी व जोशी मुंबईत राहूनच गुप्तपणे कम्युनिस्ट चळवळ चालवित राहिले. मार्च १९४० पासून डी. आय. आर. खाली कारागृहांमध्ये बंदिस्त झालेल्या कम्युनिस्टांमध्ये डांगे, मिरजकर, रणदिवे, देशपांडे, ओक, तावडे, जांभेकर, परुळेकर, गोदावरी गोखले, पाटकर, फडके, बी. जी. भांडारकर, पी. बी. वैद्य, जे.एस.माहीमकर, पी. बी. दोंदे, श्रीनिवास सरदेसाई, प्रल्हाद कुरणे, विठ्ठल चौधरी, बाळकृष्ण गोखले (बंडू), उषाताई डांगे, खंडेराव सुळे, केशवराव जोगळेकर, निंबकर आणि सेनापती बापटांचे चिंरजीव वामनराव बापट यांचा समावेश होता. यांव्यतिरिक्त मुंबईचे सोली बाटलीवालादेखील पकडले गेले.

प्रस्तुत अभ्यासकाने मुलाखतींद्वारे मिळविलेल्या माहितीतून दिसले की, कम्युनिस्ट प्रचार पत्रिकांमधून गांधीजी व कॉंग्रेसवर झालेल्या टीकेशी कॉ. डांगे, जोगळेकर, बाटलीवाला, बापट वगैरे विचारवंतांचा काहीच संबंध नव्हता. पी.सी. जोशीसारखे उथळ लोक असे उद्योग करीत. हे उत्तर भारतीय जोशी मुंबईत भूमिगत राहून प्रचार करीत. कम्युनिस्टांच्या ‘ साम्राज्यशाहीचे युद्ध ’ या फेजमध्ये या मंडळींनी गांधीजी व सुभाषचंद्र बोस यांना ‘ आंधळे मसीहा ’ म्हणून दूषणे दिली होती.[१०] **त्यानंतर त्यांनी घुमजाव केले.**

वस्तुतः तेव्हा सर्वच कम्युनिस्ट कॉंग्रेसमध्ये होते. मात्र कामगारांच्या समस्यांबाबत ते अधिक आक्रमक होते. परंतु डांगे व सोली बाटलीवालांना कॉंग्रेसमध्ये राहणेच आवश्यक वाटत होते. नेहरूंशी त्यांची वैचारिक जवळीक होती. म्हणूनही इतके दिवस त्यांचे कॉंग्रेसमधून उच्चाटन झाले नव्हते. आचारप्रणाली वेगळी असली, तरी कम्युनिस्ट व कॉंग्रेसचा महायुद्धाला सारखाच विरोध होता. हे दोन साम्राज्यशाहींचे स्वार्थासाठी युद्ध आहे, असा दोन्ही पक्षांचा दावा होता. कॉंग्रेसला

वाणिज्य वर्गाचा सर्वथा पाठिंबा असला, तरी उद्योगपती काँग्रेसच्या विरोधात होते. म्हणून काँग्रेसचा कम्युनिस्टप्रणीत गिरणी संपांना विरोध नव्हता. शिवाय काँग्रेसला कामगारांचे हक्क मिळवून देण्यात रस होता. म्हणून पक्षाने कम्युनिस्टांवर कारवाई केली नव्हती.

काँग्रेसने कम्युनिस्ट प्रचारपत्रकांतील उपरोक्त टीका फार गांभीर्याने न घेण्याचे कारण असेही असावे :—कॉ. डांगे, निंबकर, जोगळेकर, बाटलीवाला, ठेंगडी यांसारखे खरेखुरे विचारवंत कम्युनिस्ट तेव्हा अटकेत होते. पी. सी. जोशींसारखे वाचाळवीर स्वैरपणे लिहीत. म्हणून त्याकडे काँग्रेसने दुर्लक्ष केले. शिवाय काँग्रेसने राष्ट्रव्यापी वैयक्तिक सत्याग्रह सुरू केलेला असल्याकारणाने जवाहरलालजी, राजेंद्र प्रसाद, सरदार पटेल, मौलाना आझाद वगैरे सर्व पुढारी कारागृहांमध्ये होते. स्वतः गांधीजी सत्याग्रहाचे सूत्रसंचालन करण्यात व्यग्र होते.

दरम्यानच्या काळात रघुनाथ निंबकरांचे पैशाच्या कारणांवरून सहकाऱ्यांशी मतभेद झाले होते. त्यांनी तुरुंगातून केंद्रीय मंत्री सर फिरोजखान नून यांच्याशी पत्रांद्वारे संपर्क साधून स्वतःच्या सुटकेसाठी गळ घातली होती.

महायुद्धाच्या प्रारंभापासूनच महात्मा गांधी व काँग्रेसपुढे समस्या उभ्या करण्यास्तव लिनलिथगो आणि गृहमंत्री रेजिनाल्ड मॅक्सवेल विविध राजकीय आयुधांची चाचपणी करू लागले होते. काँग्रेस अनिर्णित असली, तरी केव्हाही राष्ट्रीय प्रकोप पेटविण्याची गांधीजी यांची क्षमता व निग्रहशक्ती त्यांना सुपरिचित होती. त्यांचा मुकाबला करण्यासाठी व्हाइसरॉय व मॅक्सवेल यांनी बॅ. जिना व सरकारधार्जिणे मवाळ पक्ष आणि जातीय पक्षांच्या नेत्यांना गोंजारले. विशेषतः जिना व मुस्लीम लीगशी लिनलिथगोंचे संबंध Quid Pro Quo म्हणजे लाभ प्रतिलाभ स्वरूपाचे होते. या राजनीतीत दोन्ही पक्षांना राजकीय लाभ झाला. हिंदुमहासभा व सावरकरांना केवळ हिंदूंचे हितरक्षण व सैन्यभरतीत रस होता. त्यानुसार त्यांनी सरकारला आपली उपयुक्तता पटवून देण्याचा कसून प्रयत्न केला. ३० ऑक्टोबर १९४२ रोजी सावरकरांनी लिनलिथगोंना लिहिलेल्या पत्रात समाधान व्यक्त केले होते की, “ हिंदू सैनिकांनी ब्रिटिशांच्या सेनादलात भरती व्हावे यासाठी प्रोत्साहन

देऊन मी स्वतः ब्रिटिश सरकारशी प्रतियोगी सहकार्य केले आहे ". याचा कोणाला काय मोबदला मिळाला, हे मात्र माहीत नाही. तथापि मानवेंद्रनाथ रॉय यांचा ब्रिटिशांना पाठिंबा संधिसाधूपणाचा नव्हता. मात्र त्यांच्या पक्षाच्या कामगार संघटनांनी युद्धकाळात संप केला नाही.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाची प्रारंभीची स्वातंत्र्यलढावादी जहाल भूमिका आणि नंतरची स्वातंत्र्यलढाविरोधी भूमिका हे मात्र मोठे गूढ होते. ग्रेट ब्रिटन युद्धात गुरफटलेले असताना, त्या देशावरील संकट ही आपली संधी मानून, काँग्रेसने राष्ट्रव्यापी प्रखर लढा उभारावा, यासाठी प्रारंभी कम्युनिस्ट नेते गांधीजींवर दबाव आणत होते. पण गांधीजींचा ठाम निर्णय न झाल्याने कम्युनिस्टांनी त्यांना उपरोक्त दूषणे दिली होती.

## कम्युनिस्टांना नवा साक्षात्कार

हेस हिटलरने २२ जून १९४१ रोजी सोवियत रशियावर हल्ला करताच जागतिक राजकारणाच्या रंगमंचावर चमत्कारिक व अचानक परिवर्तन झाले. रशियाने ब्रिटनशी दोस्तीचा करार केला. ब्रिटिश कम्युनिस्टांनी महायुद्धास 'पीपल्स वॉर' ही गोंडस संज्ञा दिली! वस्तुतः कोणतेही युद्ध हे लोकयुद्ध नसते! इकडे भारतीय कम्युनिस्टही किंकर्तव्यमूढ झाले! मात्र त्यांनी राष्ट्रवादापेक्षा आंतरराष्ट्रवादी भूमिका घेतली. साम्राज्यवादी युद्ध त्यांना 'पीपल्स वॉर' वाटू लागले. हे एक कोडे होते. याविषयी प्रस्तुत इतिहासकाराचा मुंबई विद्यापीठाच्या पीएच. डी. पदवीसाठीचा प्रबंध व त्यावर आधारित **क्विट इंडिया रिव्हॉल्युशन** या ग्रंथात सविस्तर विवेचन केलेले आहे.[११]

कम्युनिस्ट काही महिन्यांपूर्वी जोरदार राष्ट्रव्यापी आंदोलनाची सतत मागणी करीत होते. वैयक्तिक सत्याग्रहाचा त्यांनी उपहास केला होता. तथापि महात्मा गांधींनी छोडो भारत चा मानस घोषित करताच कम्युनिस्टांची राजनिष्ठा जागृत झाली. त्यांनी गांधीजी, काँग्रेस, जयप्रकाश नारायण व सुभाषचंद्र बोस (ते भारतात नसूनही) यांच्यावर उपहास, दूषणे व तिरस्काराचा वर्षाव केला. काँग्रेसचे

युद्धविरोधी धोरण व प्रचार त्यांना आत्मघातकी स्वरूपाचा वाटू लागला. पी.सी. जोशींनी छोडो भारत विषयक वर्धा ठरावाविषयी मुंबईतून निघणाऱ्या **पीपल्स वॉर** मध्ये ग्राम्यपणे लिहिले, "After nine days of labour the Working Committee has brought forth an abortion. The Resolution it has produced has bankcruptcy writ large upon it. From the rut of inactivity it now seeks to lead the nation into the politics of blind desperation and disaster." ........ "Congress is leading the nation to a state of moral and political disruption and paralysis, which far from helping the people to get their freedom, can only clear the path of the invader....". **(Peoples War)**[१२]

दहा कोटी मुसलमानांच्या मागण्यांचा अनादर करून कॉँग्रेसने घाईघाईने पावले टाकली, असाही सावळाराम पाटकरांनी आरोप केला. हा लढा म्हणजे 'राष्ट्रीय पातक होय', असाही त्यांच्या पक्षाचा आरोप होता.

सर स्टॅफर्ड क्रिप्स यांनी कम्युनिस्ट व ब्रिटिश सरकार यांच्यातील सलोख्याचा पाया रचला होता. युद्धकाळातील संभाव्य मित्र या दृष्टीने क्रिप्ससाहेब या मंडळींकडे पाहत होते. कम्युनिस्ट पक्ष सरकारशी सलगी करण्याचा प्रयत्न करीत असताना सनदी नोकरशाही मात्र कम्युनिस्टांच्या वाक्ताडनावर विश्वास ठेवण्यास तयार नव्हती. इंटेलिजन्स ब्यूरोचा संचालक डेनिस पिल्डीच हा तर कम्युनिस्टांना तुरुंगातून सोडण्यास वा त्या पक्षावरील बंदी मागे घेण्यास प्रखर विरोध करतच होता. परंतु लबाड धूर्त क्रिप्सने कॉँग्रेसशी चाललेल्या संघर्षात कम्युनिस्टांचा उपयोग करून घ्यावा असा हिंदुस्तान सरकारला सल्ला दिला. तरीही कम्युनिस्टांच्या सलगीबाबत व्हाइसरॉय लिनलिथगोंनी नोकरशाहीला ताकीद दिली :—"One must constantly check the position by asking oneself what exactly the gentry can do to help us".[13]

वस्तुतः व्हाइसरॉयचा कम्युनिस्टांच्या विमोचनास विरोध होता. गुप्तवार्ता विभागाचे संचालक डेनिस पिल्डीच यांनीही या कल्पनेला कसून विरोध केला.

तथापि सर स्टॅफर्ड क्रिप्स यांनी विरोधाला कलाटणी देऊन, युद्धकाळात कम्युनिस्टांना आपले मित्र बनविण्यासाठी अनौपचारिक बोलणी करावी, असा सरकारला सल्ला दिला. काँग्रेसचा मुकाबला करण्यासाठी दादागिरी करणारे बंडखोर म्हणून आपणास त्यांचा उपयोग करता येईल, असे महाधूर्त क्रिप्सने सुचविले. त्यानंतर मध्यवर्ती सरकारने प्रांतिक प्रशासनांना कम्युनिस्ट विषयक धोरणाचे पुनर्विलोकन करण्याच्या सूचना दिल्या. तरीही गृहमंत्री मॅक्सवेल व गृह सचिव रिचर्ड टॉटनहॅम व गुप्तवार्ता विभागाचे जी. अहमद कम्युनिस्टांना मुक्त करण्यास राजी नव्हते. तथापि सरकारच्या मर्जीत असलेल्या ना. म. जोशींनी मॅक्सवेलशी अनेकदा बोलणी केली. एका मुलाखतीत जोशींनी युक्तिवाद केला तो असा :— "७-८ ऑगस्ट १९४२ रोजी अ.भा. काँग्रेस समितीचे अधिवेशन होऊन त्यात छोडो भारत ठरावावर अंतिम निर्णय होईल. त्याप्रसंगी ठरावास विरोध करण्यासाठी आणि काँग्रेसविरुद्ध ओरड व हंगामा माजविण्यासाठी जास्तीत जास्त कम्युनिस्ट आणि किसान सभावाले तिथे हजर असणे उपयुक्त ठरेल". या जोशींनी गृहमंत्री रेजिनाल्ड मॅक्सवेल यांना दिलेल्या अनेक मुलाखतींमधून मनोरंजक पण राष्ट्रवादाच्या दृष्टीने दुखःद गोष्टी दिसून येतात.[१४]

कम्युनिस्ट लोक राष्ट्रवादी भूमिकेतून कामगार चळवळ चालवत असेपर्यंत ते काँग्रेसमध्येच जहाल गट म्हणून होते. त्यांचे मुस्लीम लीगशीही सख्य होते. याउलट इंग्लंडमध्ये ब्रिटिश कम्युनिस्ट पक्ष बहिष्कृत ठरविलेला होता. त्यापासूनच सी. पी. आय. ला विचारधारा व मार्गदर्शन मिळते ही हिंदुस्तान सरकारची खात्री होती. म्हणून हिंदुस्तान सरकारने कम्युनिस्टांना अल्पकालीन मित्र म्हणून स्वीकारले, तरी लंडनमधील सरकार अशा धोरणास आनंदाने पाठिंबा देईल असे दिल्लीश्वरांना वाटत नव्हते. कम्युनिस्टांच्या सद्‌भावपूर्ण परिवर्तनाबद्दल व ब्रिटिशांना प्रामाणिकपणे सहकार्य करण्याच्या आश्वासनाबद्दल मॅक्सवेल साहेबांनाही प्रारंभी दाट संशय होताच. म्हणून त्यांनी प्रथम जोशींना चापलेही होते. शिवाय बंगाल, पंजाब, संयुक्त प्रांत, मद्रास व बिहार राज्यांचे प्रशासन कम्युनिस्टांना मुक्त करण्यास तयारच नव्हते. गुप्तवार्ता विभागाचा संचालकदेखील त्यांना सोडणे इन्‌डिफेन्सीबल मानत

होता. तो कम्युनिस्टांना अविश्वासपात्र व धोकादायक म्हणत होता. स्वतः मॅक्सवेल परागंदा झालेल्या पी.सी. जोशी, गंगाधर अधिकारी व सुंदररामन यांच्यावरील पकडवॉरंट मागे घेण्यास मंजुरी देत नव्हते. परंतु कम्युनिस्टांची सत्त्वपरीक्षा घेण्याचा विचार सुरू झाला.

सतत २४ वर्षे ' एस्टॅब्लिशमेंट मॅन ' अशी प्रतिमा बनविलेले ना. म. जोशी केवळ कम्युनिस्टांच्या प्रेमापोटी त्यांच्या बंधमुक्तीसाठी वकिली करीत होते असे नव्हे! त्यांना आपला स्वार्थ साधावयाचा होता. त्यांचा इंपिरिअल सेक्रेटेरिएटशी कायम सलोखा असायचा. १९४२ मध्ये जोशींना व्हाइसरॉयला आपली उपयुक्तता दाखवून मध्यवर्ती मत्रिमंडळात मंत्रिपद मिळावे असे वाटत होते. 'Brandishing his utility'! अधिकारप्राप्तीसाठीचे जोशींचे हे प्रयत्न गृहमंत्री रेजिनाल्ड मॅक्सवेलच्याही ध्यानात आल्याचे अस्सल दस्तऐवज मी पाहिले आहेत. शिवाय कम्युनिस्टांच्या कामगार संघांमध्येही आपले स्थान कायम टिकविण्यासाठी देखील ते कम्युनिस्टांची वकिली करीत होते. एका बाजूला सरकारला आपली उपयुक्तता दाखवून मंत्रिपद किंवा मोठे लाभकारक पद मिळविणे आणि दुसऱ्या बाजूने कम्युनिस्टांच्या संघटनांमध्ये आपले स्थान कायम ठेवण्याच्या स्वार्थी हेतूने जोशीबुवा वकिली करीत होते.

तथापि रेजिनाल्ड साहेबांनी जोशींवर लगेच विश्वास ठेवला असे नव्हे. मात्र जोशी चिकाटीने रेजिनाल्ड साहेबांच्या शंकांचे निराकरण करीत राहिले. खरेतर जोशींनी क्रिप्स आयोगाच्या आगमनाआधीपासून कम्युनिस्ट व सरकार यांचा सलोखा घडवून आणण्यासाठी कंबर कसली होती. जोशी रेजिनाल्ड यांना पटवून देत होते की, सरकारने कम्युनिस्टांचा पाठिंबा मिळण्यासाठी कम्युनिस्ट व किसान सभेविषयीचे धोरण 'रिॲडजस्ट' करावे. वस्तुतः जोशींचा हा सारा खटाटोप स्वातंत्र्य आंदोलनास मारक होता. तरीही ते गृहमंत्र्यास सांगत की, कम्युनिस्ट व किसान सभाच नव्हे, तर इंडियन लिबरल पार्टी, टी. बी. सप्रू यांचा गट आणि मुस्लीम लीग हे पक्षदेखील आपल्या निष्ठा ब्रिटिशांना वाहण्यासाठी तयार आहेत.

बहुतेक सर्व कम्युनिस्ट तेव्हा कारावासात होते. हिटरलरने रशियावर आक्रमण केल्यावर आणि ब्रिटन व रशियाची दोस्ती झाल्यावरही सरकार आपणास बंधमुक्त करीत नाही, यामुळे ते अस्वस्थ झाले. त्यांनी कारागृहात पीपल्स वॉरच्या घोषणा दिल्या. श्यामराव परुळेकर, सच्चिदानंद घाटे वगैरेंनी आपल्या सुटकेसाठी जोशींनी स्वतःचे वजन वापरून मध्यस्थी करावी, अशी गळ घातली होती. निंबकरांनी स्वतःच्या सुटकेसाठी मुस्लीम लीगचे मंत्री फिरोजखान नून यांना वशिला लावण्याची गळ घातलेली होतीच. ब्रिटिशांच्या दृष्टीने काँग्रेसच्या विरोधात शक्य तितके विरोधक उभे करणे हेच फायद्याचे होते. डिव्हाइड अँड रूल ही सनातन राजनीती!

दरम्यानच्या काळात ना.म. जोशींनी मॅक्सवेलच्या मनातील संशय व भीती दूर करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. शिवाय युद्धप्रयत्नांमध्ये ब्रिटिशांना सर्वतोपरी मदत करण्याचे धोरण व कार्यक्रम दर्शविणारे कम्युनिस्टांचे एक अधिकृत पत्रक त्यांनी सादर केले.[१५]

वर कथन केल्याप्रमाणे स्टॅफर्ड क्रिप्स यांनीही धोरणात्मक बदलास बरीच चालना दिली. त्यामुळेही भा.क.प. वरील बंदी रद्द करण्यास आणि पकडवॉरंट मागे घेण्यास तसेच सहा पुढाऱ्यांव्यतिरिक्त इतर कम्युनिस्टांना मुक्त करण्यास मॅक्सवेलने अनुमती दिली. मध्यवर्ती सरकारच्या आदेशांनुसार तुरुगांत डांबलेल्या कॉ. डांगे, सोली बाटलीवाला, बी.टी. रणदिवे, घाटे, भारद्वाज व शेर जंग यांना मात्र ओलीस ठेवण्यात आले. परंतु मॅक्सवेल साहेबांनी सूचना दिली, "Accept these people as short term allies so far as they help the war, without too much regard to the long term dangers, if any. Let them know at every step that they are still on probation. Let the release be gradual......".[१६]

लवकरच ना. म. जोशी आणि स्वातंत्र्य लढाविरोधी पवित्रा घेतलेल्या लोकांनी या औदार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारी व आभाराची पत्रे मॅक्सवेलना

पाठविली. शिवाय ७ ऑगस्ट १९४२ च्या अ.भा.काँग्रेस समितीच्या अधिवेशनात छोडो भारत ठरावास विरोध करण्यासाठी कॉ. डांगे, घाटे, रणदिवे व भारद्वाज यांनाही त्वरित मुक्त करावे, अशी त्यांनी विनंती केली. मुंबईचा गृह सचिव देखील मध्यवर्ती गृह सचिवाला हाच मुद्दा पटवून देण्याचा प्रयत्न करीत होता. तथापि या कम्युनिस्टांच्या मुक्तीसाठी धडपडणाऱ्या जोशी व दोन्ही गृह सचिवांचे दुर्दैव की, व्हाइसरॉयने सर्वांना सोडण्यास साफ नकार दिला. इतके मात्र खरे की, जोशींच्या हिकमतीला पुष्कळ यश लाभले.

मुस्लीम लीगचे केंद्रीय मंत्री फिरोजखान नून यांच्या मध्यस्थीने प्रथम रघुनाथ निंबकर २७ एप्रिल १९४२ रोजी सुटले होते. त्यांनी कम्युनिस्ट पक्ष सोडला. इंग्रज सरकारचा अनुग्रह प्राप्त करून त्यांनी कायमस्वरूपी लाभाचे पद मिळविले. ना.म.जोशींनी केलेल्या मध्यस्थीमुळे व वकिलीमुळे आणि क्रिप्सच्या शिष्टाईमुळे घाटे, परुळेकर, मिरजकर, अधिकारी, पी.सी.जोशी, सुंदररामन रेड्डी, पाटकर, मिरजकर वगैरेही सुटले. रणदिवे जुलै १९४२ मध्ये सुटले. कारावासात उरलेले भारद्वाज यांना क्षयरोग झाल्याने जानेवारी १९४३ मध्ये आणि सोली बाटलीवालांनाही आजारपणाच्या कारणास्तव फेब्रुवारी १९४३ मध्ये सोडण्यात आले. त्याच महिन्यात सदिच्छा म्हणून डांगे यांना बंधमुक्त करण्यात आले.

दरम्यानच्या काळात भारतातील दुसऱ्या पक्षांच्या भूमिकेवर मात करण्यास्तव कम्युनिस्टांचा निश्चित उपयोग होत असल्यास, त्यांना परिवीक्षाकालीन मित्र मानावे असा सल्ला लंडनने दिला. तथापि याबरोबरच कम्युनिस्ट आपल्या राजवटीवर टीका करणारच नाहीत, ही आशा बाळगून त्यांच्याशी मैत्री करणे व्यर्थ होय, असाही इशारा लंडनने दिल्लीस दिला होता. आपल्या डावपेचांच्या दृष्टिकोणातूनच कम्युनिस्टांच्या प्रचारावर लक्ष ठेवावे, आणि त्यांना प्रचारासाठी थोडाफार पैसा द्यावा असा लंडनने सल्ला दिला. शिवाय हे धोरण अगदी अस्थायी असावे आणि त्याची उपयुक्तता संपताच त्वरित बंद करावे, अशीही लंडनने स्पष्ट ताकीद दिली होती.[१७]

कम्युनिस्टांच्या कोलांट्या उड्या व दिखाऊ कृत्ये मुंबईतील आम जनतेच्या व खास करून कामगार वर्गाच्या लक्षात येण्यास वेळ लागला नाही. त्यामुळे त्यांचे हजारो समर्थक व कामगार पक्षापासून लांब गेले. मुंबईतील त्यांच्या श्रमिक संघांची सदस्यसंख्या रोडावली. कम्युनिस्टांनी आपली विश्वासार्हता गमावली. पक्षाची घसरण सुरू झाली.

ताजा कलम म्हणून कथन करणे आवश्यक आहे की, पूरणचंद्र जोशी स्वतःची व कम्युनिस्ट पक्षाची उपयुक्तताच नव्हे तर उपद्रव मूल्यदेखील ब्रिटिशांना व गृहमंत्री मॅक्सवेल यांना पटवून देण्यासाठी अक्षरशः झटत होते. राष्ट्रीय अभिलेखागारातील अस्सल फायलींच्या आधारे मी याबाबत **क्विट इंडिया रिव्हॉल्युशनः द इथॉस ऑफ इट्स सेंट्रल डिरेक्शन** या ग्रंथात सखोल विवेचन केलेले आहे. त्यामुळे इथे इतकेच प्रतिपादन करावयाचे की, काँग्रेसचा छोडो भारत लढा अयशस्वी करण्यासाठी पी. सी. जोशी मॅक्सवेलला उपाय सुचवत होते. शिवाय कम्युनिस्टांचा उपयोग कसा होऊ शकेल हे ते जून १९४२ मधील पहिल्या समक्ष मुलाखतीपासून पटवून देत होते. अशा त्यांच्या किमान तीन गुप्त मुलाखती झाल्या. **२ डिसेंबर १९४२ च्या दुसऱ्या भेटीत या उत्तर भारतीय पी. सी. जोशींनी छोडो भारत क्रांतिलढ्यास सुरुंग लावण्याची, साबोताज करण्याची आपली रणनीती मॅक्सवेलला सांगितली.** मात्र डांगे, बाटलीवाला व भारद्वाज तेव्हा तुरुंगात असल्याने अशा रणनीतीस त्यांची संमती नसावी. **पीपल्स वॉर** नामक कम्युनिस्ट पत्रकातून आम्ही आमजनतेला कसे फितवत आहोत आणि काँग्रेसविरुद्ध प्रचार करीत आहोत, हे पी.सी.जोशींनी मॅक्सवेल यांना सांगितले. वस्तुतः त्यांच्या प्रचारपत्रकाचा विपरीत परिणाम झाला. **पीपल्स वॉर** पत्रकाच्या मुंबईतील कार्यालयावर जानेवारी १९४३ च्या पहिल्या आठवड्यात बॉंब टाकण्यात आला होता. त्यामुळे मॅक्सवेलची करमणूक झाल्याची गृह विभागाच्या फाईलमध्ये नोंद आहे.

मात्र भारतीय कम्युनिस्ट पक्ष म्हणजे सोविएत युनियनची अधिकृत प्रचारयंत्रणा होय, या ब्रिटिशांच्या आरोपात फारच अतिशयोक्ती होती. १९४२ साली भा.क.प.

चा सोविएत सरकारशी थेट संपर्क नव्हताच. कॉ. डांगे यांची प्रस्तुत इतिहासकाराने मुलाखत घेतली असता त्यांनी पटवून दिले होते की, कम्युनिस्ट पक्ष भारतीय अर्थजीवन व शेतकरी आणि कामगारांच्या प्रश्नांमधूनच जन्माला आला होता. मात्र १९२५ पासून भारतीय कम्युनिस्टांचा ब्रिटिश कम्युनिस्ट पक्षाशी संपर्क होता. या ब्रिटिश संपर्काच्या माध्यमातून भारतीय कम्युनिस्ट पुढील घटकांमार्फत सोविएत प्रचार यंत्रणेशी संपर्क साधतः—(१) पीपल्स पब्लिशिंग हाऊस, (२) इंटरनॅशनल बूक हाऊस, (३) एम.बी.बिलिमोरीया, सर्व मुंबईतील, (४) पुण्यातील इंटरनॅशनल बूक सर्व्हिस, इ. इतके मात्र सत्य आहे की, कम्युनिस्ट पक्ष सोविएत प्रचार साहित्य आणि चित्रफितींचे प्रयत्नपूर्वक प्रसारण करीत असे. पण कम्युनिस्टांना मिळालेल्या रशियन अर्थसहाय्याचा एकही पुरावा आम्हाला उपलब्ध होऊ शकला नाही.[१८]

## वैयक्तिक सत्याग्रह

महायुद्धाच्या १९४१ पर्यंतच्या काळात स्वातंत्र्य आंदोलनात मरगळ येण्यास राजकीय कारणांप्रमाणेच आर्थिक कारणेही होती. याकडे इतिहास लेखकांनी फारसे लक्ष दिले नाही. महायुद्धामुळे सर्वच वस्तू व सेवांची मागणी वाढून विक्रेत्यांचा नफा वाढला. मागील बारा वर्षांमधील आर्थिक मंदीच्या पाशातून सुटकेचा शेतकरी, व्यापारी, उद्योगपती व दलालांना आनंद लाभला होता. कृषिमालाची आयात बंद होऊन निर्यात होऊ लागली. किमती व नफा वाढला. सेनादलाच्या पोषणासाठी हिंदुस्तानातून अन्नधान्य, कापड व चारा निर्यात होऊ लागला. कारखान्यातील मालास अपूर्व मागणी वाढली. सर्व गिरण्या अखंड चालू राहिल्याने मालकांचे भले झाले. कम्युनिस्टांनी पवित्रा बदलल्यानंतर संप झाले नाहीत. गिरणी कामगारांना महागाई भत्ता मिळू लागला. एकूण आयात घटली व निर्यात वाढली. त्यामुळे भांडवलदार व उद्योगपती खूश होते! त्यांना प्रचंड नफा मिळू लागला. गुंतवणूकदारांना घवघवीत मोबदला मिळणे क्रमप्राप्तच होते. १९३९ ते १९४२ दरम्यान देशातील कारखान्यांमधील रोजगारात ३१ टक्क्यांनी वाढ झाली होती. वाढीव महागाई भत्ता देऊन औद्योगिक शांतता राखण्यात आली

होती. अफाट नफ्यामुळे कारखानदारांना युद्ध म्हणजे आनंदपर्व वाटत होते. काळा बाजार करणाऱ्यांना फार चांगले दिवस आले, त्यांचा भाग्योदय झाला. इंग्रज सत्ताधीशांनी तसेच मुसलमान तालुकदारांनी मुस्लीम लीगला खास उत्तेजन दिले. या सर्वांनी संगनमत करून मुसलमानांना लाकूड व बांधकाम साहित्य, कोळसा व रेशनिंगची हजारो कंत्राटे दिले. त्यामुळे हे लाभार्थी राजनिष्ठ बनले. काँग्रेसपासून दूर राहिले.

गांधीजी व नेहरू तेव्हा प्रखर कायदेभंग लढा उभारण्याचे धाडस करीत नव्हते याचे सर्वात मोठे कारण या आर्थिक व सामाजिक वस्तुस्थितीत होते. त्यांचे टीकाकार कम्युनिस्ट व सुभाषबाबूंनीही ही वस्तुस्थिती ओळखली नव्हती. महात्माजी सदैव भारतीयांचा मूड व समाजमनाचा वेध घेत असत व त्यानुसार आंदोलनविषयक निर्णय होत असत. काँग्रेसचे दोन पुढारी भुलाभाई देसाई व राजगोपालाचारी हे तर ब्रिटनच्या फॅसिझमविरुद्धच्या युद्धात काँग्रेसने व्यत्यय आणू नये, या मताचे होते. कारण तसे केल्यास हिटलर व फॅसिझमला मदत केल्यासारखे होईल, असे ते म्हणत. नेहमी आक्रमक भूमिका घेणारे नेहरू यावेळी दोलायमान मनःस्थितीत होते. नेहरू लोकशाही, साम्राज्यवाद व फॅसिझम याभोवतीच्या शृंगापत्तीत सापडले होते. अखेरीस नेहरूंनी गांधीजी यांचा निर्णय स्वीकारून आपली शृंगापत्ती दूर केली. नेहरूंनी सुभाषबाबूंबरोबर राहणे निरर्थक होते. १९४०-४१ मध्ये प्रखर स्वातंत्र्यलढा उभारणे महात्माजींना शक्य वाटत नव्हते.

तथापि भारतीय स्वातंत्र्यलढा अशा निश्चल व सौम्य अवस्थेत फार काळ ठेवणे शक्यच नव्हते. काँग्रेस व स्वराज्यप्रेमी जनता अस्वस्थ झाली. व्हाइसरॉय लिनलिथगो मात्र 'काँग्रेसने प्रथम मुस्लीम लीगशी तडजोड करून सहमती करावी' याच युक्तिवादावर ठाम उभे! अन्यथा सांविधानिक प्रगतीबाबत चर्चा करण्यास लिनलिथगो अजिबात तयार नव्हते. त्यांनी मुस्लीम लीगशी तडजोड करण्याचा भार (ओनस) टाकला काँग्रेसवर! **आताशा लीग, हिंदुमहासभा, रॉयवादी वगैरे ब्रिटनचे मदतगार झाले होते.**

इंग्रजांनी डी. आय. आर. म्हणजे डिफेन्स ऑफ इंडिया रूल्स खाली कित्येक वटहुकूम जारी करून भाषणस्वातंत्र्य व वृत्तस्वातंत्र्याची गळचेपी केली. अनेक पत्रके बंद पडली. काँग्रेस सदस्यांमागे पोलिसांचा ससेमिरा लागला. काँग्रेसने लढा सुरू केल्यास या पक्षाला नेस्तनाबूत करण्याच्या व्यापक योजना आखण्यात आल्या. ब्रिटिश पार्लमेंटच्या मंजुरीनुसार ‘ रिव्हॉल्युशनरी मुव्हमेंट्स ऑर्डिनन्स ’ नामक भयानक गळचेपी आणि दडपशाही करण्याचे अमर्याद अधिकार सरकारला देणारा वटहुकूम टंकलिखित स्वरूपात तयार ठेवलेला होता. तो जारी करण्यास नवी दिल्ली अधीर झालेली होती. मात्र अमेरिकेच्या दबावामुळे तो बंद कपाटात राहिला. पण गोपनीय असूनही तो गांधीजींना माहीत होता.

इतर प्रांतांप्रमाणे महाराष्ट्रातही आंदोलनापूर्वीच सरकारने दडपशाही सुरू केली होती. अशा दडपशाहीची काही उदाहरणे पाहा :– कुलाबा जिल्ह्यातील बिरवाडीच्या शेतकरी परिषदेत युद्धविरोधी भाषण केल्याबद्दल एस. एम. जोशी, केशव ऊर्फ बंडू गोरे, माधव लिमये यांना डी. आय. आर. खाली शिक्षा. या कारवाईचा निषेध केल्याबद्दल रावसाहेब पटवर्धन, प. कृ. भडकमकर, वा.वि. साठे वगैरेंना कारावासाची सजा देण्यात आली. फॉरवर्ड ब्लॉकचेही बरेच सदस्य अशा कारणांसाठी सजा भोगत होते.

सप्टेंबर-ऑक्टोबर १९४० मध्ये काँग्रेसने पुनरपि गांधीजींना आंदोलनाचे आधिपत्य स्वीकारण्याचा आग्रह केला. अहिंसावादी असले तरी गांधीजी अस्सल रणनीतिपटू राजकारणी होते. युद्धकालीन दडपशाहीची बंधने आणि भारतीय पक्षांमधील फुटीरतेमुळे उद्‌भवलेल्या समस्या यांचे भान ठेवून त्यांनी समयोचित रणनीती आखली. सकृतदर्शनी सौम्य व निरुपद्रवी किंबहुना हास्यास्पद वाटणारा हा सत्याग्रह होता. तथापि ज्याची परिणती लवकरच व्यापक जनआंदोलनात होईल असा लढा उभारण्याची ही रणनीती होती. त्याचे रहस्य फारच थोड्या लोकांना आणि इतिहास लेखकांनाही समजले होते.

देशातील प्रत्येक ठिकाणच्या निवडक कार्यकर्त्यांनी व्यक्तिगत पातळीवरून भाषण स्वातंत्र व राष्ट्रीय अस्मिता व्यासपीठावरून घोषित करणे हे गांधीजींना

अभिप्रेत होते. प्रारंभी प्रत्येक सत्याग्रहीची निवड स्वतः गांधीजींनी केली होती. भाषणस्वातंत्र्याची गळचेपी करणाऱ्या ब्रिटिशांचा व कायद्यांचा निषेध करून भाषणस्वातंत्र्याचा अधिकार घोषित करणे हा एक भाग होता. तसेच ब्रिटिशांनी भारतीयांच्या अनुमतीविना या देशावर युद्ध लादले, आणि आमची साधनसामग्री व मनुष्यबळ विनामोबदला वापरले जात आहे, याचा निषेध करणे हा सत्याग्रह प्रतिज्ञेचा दुसरा भाग होता. प्रत्येक सत्याग्रहीने महायुद्धाचा व ब्रिटिशांचा निषेध करावयाचा होता. प्रतिज्ञेतील हे काही शब्द पाहाः- "It is wrong to help the British war-effort with men or money. The only worthy effort is to resist all war with non-violent resistance".

सत्याग्रहाच्या तंत्रानुसार प्रत्येक सत्याग्रहीने आपल्या सत्याग्रहाची वेळ व स्थळ आधीच निर्भयपणे अधिकाऱ्यास कळवण्याचा दंडक घातलेला होता. गांधीजींनी सत्याग्रहाची आखणी सेवाग्राममध्येच केली होती. वैयक्तिक सत्याग्रह हा अभिनव प्रकार असल्यामुळे त्यासाठी निष्ठावान सत्याग्रहींची निवड गांधीजींनीच केली होती. त्यानुसार पहिले सत्याग्रही जवाहरलाल असतील असा सर्वत्र अंदाज होता. तथापि गांधीजींनी पहिले सत्याग्रही म्हणून विनायक नरहर भावेंची निवड केली. दुसरे सत्याग्रही ठरले जवाहरलाल नेहरू व तिसरे म्हणून दिल्लीचे ब्रह्मदत्त यांची निवड केली. तेव्हा मर्यादित क्षेत्रापलीकडे विनोबाजी ज्ञात नव्हते. पेण जवळच्या गागोद्याचे विनायक भावे पूर्वोक्त गंगनाथ विद्यालयात शिक्षक होते आणि तेथून ते गांधीजींच्या साबरमती आश्रमात आले. पुढे ते सेवाग्राममधून विधायक कार्य करू लागले आणि १९३७ साली त्यांनी पवनारला परमधाम आश्रम स्थापन केला होता. एक निष्ठावंत विधायक कार्यकर्ता, पण महान वाचस्पती, संस्कृत पंडित, बृहस्पती, महान धर्मज्ञ, चिकित्सक विचारवंत, इतिहासाचे अभ्यासक आणि बहुभाषाप्रभू इतकीच त्यांची तेव्हा ओळख होती. १९३२ च्या आंदोलनात भाग घेतल्याबद्दल त्यांना धुळे तुरुंगात ठेवलेले होते. तिथे त्यांनी केलेल्या ज्ञानप्रसारणाचे विवेचन वरील एका प्रकरणात केलेले आहे.

विनोबांनी सत्याग्रहाच्या आचारप्रणालीनुसार १७ ऑक्टोबर १९४० रोजी पवनार आश्रमात पहिले युद्धविरोधी भाषण दिले आणि त्याबरोबर अखिल भारतातील

वैयक्तिक सत्याग्रहाचा शुभारंभ केला. त्यांना लगेच अटक झाली नाही. म्हणून विनोबाजींनी वर्ध्याजवळच्या सूरगाव, सेलू व देवळी गावांमध्ये अशीच युद्धविरोधी भाषणे देऊन सत्याग्रहाची व्याप्ती वाढविली. म्हणून त्यांना २१ ऑक्टोबरला अटकेत टाकण्यात आले. १५ जानेवारी १९४१ रोजी सुटून आल्यावर लगेच दोन दिवसांनी त्यांनी पुन्हा सत्याग्रह केला व कारावास भोगला. सहा महिन्यांनी बंधमुक्त झाल्यावर विनोबाजींनी तिसऱ्यांदा सत्याग्रह केला. त्यासाठी त्यांना एक वर्षाचा कारावास भोगावा लागला. बहुसंख्य आश्रमवासी व वर्धा जिल्ह्यातील शेकडो स्त्री-पुरुषांनी सत्याग्रहात हिरिरीने भाग घेतला. या सत्याग्रहात जमनालाल बजाज यांनी तर अत्यंत महत्त्वाची कामगिरी बजावली होती. त्यापूर्वी १९३९ साली त्यांनी जयपूर संस्थानातही आंदोलन उभारले होते. विशेष म्हणजे त्यांचे सुपुत्र रामकृष्ण बजाज या १९४१ मधील सर्वात लहान सत्याग्रहीची निवड स्वतः गांधीजींनी केली होती. तेव्हा त्यांना अठरावे वर्ष लागलेले होते.[१९]

सकृतदर्शनी वैयक्तिक सत्याग्रह निरुपद्रवी व प्रतीकात्मक वाटत असला, तरी सत्याग्रहाच्या स्थळी प्रचंड जमाव जमत असे. वक्त्याच्या भाषणाला श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असे. घोषणाबाजीने आसमंत भरून जाई. भाषण संपल्याशिवाय सत्याग्रहीला अटक करण्याचे पोलीस टाळत. एखाद्याला अटक न केल्यास तो कार्यकर्ता अटक होईपर्यंत ठिकठिकाणी सत्याग्रह करीत असे. “ चलो दिल्ली ” हा नारा उच्चारण्यात येई.

जवाहरलाल नेहरू भारतातील क्रमांक दोनचे सत्याग्रही निवडले गेलेले होते. त्यांचे एक चरित्रकार व थोर इतिहासकार एस. गोपाल म्हणतात, सत्याग्रहाचे उद्दिष्ट “ ॲट अ लो टेंपरेचर अँड व्हेरी स्मॉल डोसेसमध्ये ” ठेवलेले होते. या उद्दिष्टाबाबत गांधीजींनी व्हाइसरॉयला स्पष्टीकरण देताना लिहिले, “ नाझींचा विजय होऊच नये असे कोणाही इंग्रजाइतकेच तीव्रतेने काँग्रेसलाही वाटते. परंतु भारतमंत्री आणि तुम्ही म्हणता की, हिंदुस्थान स्वखुशीने व आनंदाने युद्धप्रयत्नात मदत करीत आहे, हे धादांत खोटे आहे. लोकांना तुमच्या युद्धात अजिबात रस नाही ”. “ They make no distinction between Nazism and the double autocracy that rules India”. सत्याग्रहाचे

तपमान कमी असले तरी भाषणस्वातंत्र्यासाठी आणि युद्धविरोधी भाषण केल्याबद्दल जवाहरलालजींना डी. आय. आर. खाली तब्बल चार वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा देण्यात आली होती. एका भाषणासाठी चार वर्षांची सजा! अभ्यासकांनी यामागील गर्भितार्थ जाणून घेणे इष्ट वाटते.

राष्ट्रव्यापी आंदोलनासाठी भारत पुरेसा तयार नव्हता. दडपशाहीच्या वातावरणात आंदोलनासाठी जनमत अनुकूल नव्हते हेही खरे. पण अशा परिस्थितीतच बहुविध उद्देश असलेल्या वैयक्तिक सत्याग्रहाचे आयोजन केलेले होते. अपमान झालेल्या भारतीयांच्या भावना प्रकट करतानाच, सत्याग्रहामुळे ब्रिटिश सरकारला भारताच्या मागण्या स्वीकारण्याची संधी देणे हाही एक उद्देश आहे, असे नेहरूंच्या भाषणातून व्यक्त झाले होते. गांधी, नेहरू व काँग्रेसचा ब्रिटिशांइतकाच फॅसिझमला विरोध होता. म्हणून ब्रिटिशांच्या अत्यंत बिकट स्थितीचा व अडचणींचा गैरफायदा घेऊन जनआंदोलन उभारण्याची कल्पना त्यांना मंजूर नव्हती. म्हणून ते राष्ट्रव्यापी जनआंदोलन टाळत होते. यापेक्षा महत्त्वाचे असे की, आगामी राष्ट्रव्यापी 'मास मुव्हमेंटसाठी' जनमताची जडणघडण करण्यात गांधीजी गुंतलेले होते. काँग्रेस संघटनेत अधिक बांधीलपणा व क्षमता निर्माण करणे गरजेचे होते. पक्षातील संधिसाधू व भोंगळ पदाधिकाऱ्यांचे आणि पंचमस्तंभीयांचे उच्चाटन करणे चालू होते. आणि सर्वात महत्त्वाचे, आमजनतेला राजकीय शिक्षण देऊन, मोठ्या लढ्यासाठी सुसज्ज करणे आणि राष्ट्रभर नवचैतन्य निर्माण करण्याची प्रक्रिया सुरू झालेली होती. यानंतरच देशव्यापी लढा उभारावा हा गांधीजींचा विचार होता.[२०]

सत्याग्रहाबाबतचे गांधीजींचे निवेदन आणि विनोबांजींचेही पत्रक आम्ही **सोर्स मटेरिअल फॉर हिस्टरी ऑफ फ्रीडम मुव्हमेंट,** खंड बारा यात मूळ स्वरूपात प्रकाशित केले आहे. त्यातून वैयक्तिक सत्याग्रहाबाबतची भूमिका अधिक स्पष्ट दिसते.

अपेक्षेप्रमाणे या सत्याग्रहास सर्वाधिक प्रतिसाद मुंबई शहर व गुजरात भागात मिळाला. सरदार पटेल, युसुफ मेहेरअली, मोरारजी देसाई, बाळासाहेब खेर,

नगिनदास मास्टर, स.का.पाटील, भवानजी अर्जुन खिमजी, अशोक मेहता, सयाजीराव सिलम, सोफिया खान वगैरे नेते सत्याग्रहासाठी पकडले गेले. १९३०-१९३२ च्या सविनय कायदेभंग आंदोलनात काही वेळा कारावास भोगलेल्या काँग्रेसजनांपैकी शेकडो मुंबईकरांनी १९४०-४१ मध्येही तुरुंगवास पत्करला.

दरम्यान मार्च १९४१ मध्ये टी.बी.सप्रू व एम.आर.जयकर वगैरे मवाळांनी मुंबईत ' मॉडरेट लीडर्स कॉन्फरन्स ' नामक परिषद भरवली. आपले अस्तित्व दाखविण्यासाठी ही मंडळी मधूनमधून असे प्रयोग करीत. पण त्यांचा ना प्रभाव पडत असे, ना त्यांना लोकांचा पाठिंबा होता. आता ते काँग्रेस व मुस्लीम लीगच्या पाठिंब्याने अथवा पाठिंब्याविना ' नॅशनल ' सरकार स्थापन करण्याची भाषा बोलत होते. तथापि या दोन्ही पक्षांनी त्यांना अजिबात प्रतिसाद दिला नाही. उपयोगही नव्हता. काँग्रेस व लीगच्या सहभागाविना राष्ट्रीय सरकार स्थापन करण्याची कल्पना हा केवळ विनोद होय, असे मुंबईकर म्हणत. तर मवाळांच्या या पक्षात सर्व जण सेनापती, पण एकही सैनिक नाही, अशी जिनांची मल्लीनाथी होती. युद्धाला व ब्रिटिशांना मात्र या पुरुषांचा शाब्दिक पाठिंबा होता. पण भारतमंत्री अमेरीनेही सप्रूंचा प्रस्ताव फेटाळून लावला होता.[२१]

महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये वैयक्तिक सत्याग्रहास बराच प्रतिसाद लाभला होता. पुण्यातील केशवराव जेधे, न.वि.गाडगीळ, शं. द. जावडेकर, शंकरराव देव, शंकरराव मोरे, एस.एम., शिरूभाऊ लिमये, रणजित पंडित, केशव गोरे, विनायक कुलकर्णी, अच्युतराव पटवर्धन वगैरेंनी या मोहिमेत भाग घेऊन कारावास पत्करला होता. जळगाव जिल्ह्यातील सत्याग्रह संचालनाची जबाबदारी केशव गोविंद लेले यांच्यावर सोपवलेली होती. ते सत्याग्रहींची नावे गांधीजींकडून मंजूर करून घेत. धनाजी नाना चौधरी, देवकीनंदन नारायण, वा.वि.दास्ताने, अब्दुल हमीद काझी, राजमल लखीचंद, हरीभाऊ पाटसकर, डोंगरसिंग धनसिंग पाटील, सुपडू भादू पाटील, उखाभाई वाणी, मोतीराम ओंकार चौधरी, माधव गोटू पाटील, उत्तम गिरधर पाटील, लीलाताई उत्तम पाटील, र. वा. वाडेकर, सीताराम बिर्ला वगैरेंनी सत्याग्रहात भाग घेतला. साने गुरुजी प्रचार करीत असताना पेण इथे पकडले गेले.

रायगडसारख्या जिल्ह्यातही काही डझन काँग्रेसजनांनी या सत्याग्रहात कारावास पत्करला होता. त्यांच्यापैकी काही नावे :— द.का.कुंटे, गोविंद रामचंद्र लिमये, एन.पी.ठोसर, विनायक नारायण लिमये, प.रा.दाते, जनार्दन विष्णू लेले, आचार्य जगन्नाथ ढवण, विनायक गोविलकर, त्रिं.ना.बेडेकर, भाऊसाहेब नेने, वसंत वेदक, तुळजाराम मेहता, भाऊसाहेब राऊत, सीताराम विश्वनाथ टिळक, धुंडिराज वैद्य इत्यादी.

१९३०-१९३२ मधील सविनय कायदेभंग आंदोलनापेक्षा वैयक्तिक सत्याग्रह संख्यात्मक दृष्टीने मर्यादित होता, हे खरे. पण तो जागतिक महायुद्ध काळात असल्याने त्याचे स्वरूप मर्यादित ठेवणे, हे व्यवहार्य होते. मात्र हा सत्याग्रह सत्य व अहिंसा या तत्त्वप्रणालीनुसार करण्यात आल्यामुळे त्याला आगळे महत्त्व दिले जाते. गांधीवादी व्यक्ती या सत्याग्रहाकडे त्या दृष्टीने पाहत असत. हा सत्याग्रह मर्यादित असला तरी १५ मे १९४१ पर्यंत सत्याग्रहात २५००० हून अधिक व्यक्तींवर न्यायालयांमध्ये खटले भरून त्यांना कारावासाच्या सजा देण्यात आल्या होत्या. यातून सत्याग्रहाची व्याप्ती दिसून येते. याशिवाय कित्येक हजार सत्याग्रहींना पोलिसांनी पकडले, पण खटले न भरता सोडून दिले. सत्याग्रह निर्णायक होणार नव्हता. पण विफलही झाला नाही. १९४२ च्या लढ्यासाठी ही गांधीजी व काँग्रेसने घेतलेली ‘ सत्त्व परीक्षा ’ होती. डिसेंबर १९४१ मध्ये सत्याग्रहींच्या तुरुंगवासाची मुदत पूर्ण झाल्यावर त्यांना मुक्त करण्यात आले.

केंद्रीय गृह विभागाने संकलित केलेल्या अंतिम आकडेवारीनुसार या सत्याग्रहात एकूण २६,२०० सत्याग्रहींना प्रत्यक्ष सजा झाली होती. आधीचे राजबंदी व हे कैदी यांनी देशातील सर्व तुरुंग भरून गेले होते. म्हणून शेकडोंना मुक्त करून विशिष्ट सत्याग्रहींना जागा करून देणे सरकारला भाग पडले होते. या चळवळीचा काँग्रेसला कोणता राजकीय लाभ झाला, या प्रश्नाचे उत्तर आम्हाला मध्यवर्ती सरकारच्या टिपणातच आढळले, “ आंदोलनामुळे सरकारविरोधी भावना व राजकीय जागृती अधिकच वाढली. गांधीजी या केवळ एका व्यक्तीचा जनमानसावर किती प्रभाव आहे, हे आंदोलन ज्या प्रकारे चालले त्यावरून सिद्ध होते.”[२२]

या आंदोलनातून गांधीजींनी काँग्रेसजनांची कसोटी पाहिली आणि राष्ट्रव्यापी लढ्यासाठी लोकमत कितपत अनुकूल आहे, याची चाचणी घेतली. **पुढील मोठ्या लढ्याचा म्हणजे छोडो भारतचा हा पूर्वरंग होता.** अनुयायींची कसोटी पाहतानाच महात्मा गांधींनी शक्तिसंचय करून ठेवला.

## धुमसता असंतोष व ढासळती स्थिती

७ डिसेंबर १९४१ रोजी जपानच्या १८९ बाँबर विमानांनी पर्ल हार्बरमधील अमेरिकन युद्धनौकांच्या काफिल्यावर अचानक हल्ला चढवल्यामुळे हाहाकार माजला. तो नाविकदल उद्ध्वस्त झाला. अत्यंत आक्रमक झालेल्या जपानने पॅसिफिक महासागर आणि दक्षिण-पूर्व आशियाई क्षेत्रावर आपले प्रभुत्व प्रस्थापित केले. जपानने या क्षेत्रातील ब्रिटिश व डच वगैरे वसाहतींचा कब्जा घेतला. नजीकच्या काळात जपान हिंदुस्तानच्या सीमेवर पोचणार अशी भीती वाटत होती. फेब्रुवारी १९४२ पासून दक्षिण-पूर्व आशियातील युद्धपरिस्थिती हिंदुस्तानच्या संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत चिंताजनक झाली.

१५ फेब्रुवारीला सिंगापूर पडले. जपानचा विजयीध्वज ७ मार्च १९४२ रोजी रंगूनवर दिमाखात फडकू लागला. २५ मार्च रोजी अंदमान व निकोबार बेटांचा समूह जपानच्या ताब्यात गेला. जागतिक महायुद्ध हिंदुस्तानच्या भूमीपर्यंत येऊन पोहोचले. सावरकर व शीख पुढारी मास्टर तारासिंग हे जपानी सत्ताधीशांशी हातमिळवणी करणार, अशी देशात वदंता पसरली.

देशात चमत्कारिक घबराट पसरली. भयग्रस्त वातावरण, वैफल्याची भावना व हताशपणा पसरला. ब्रिटिश सरकार हिंदुस्तानचे संरक्षण करण्यास कितपत समर्थ आहे याबाबत चर्चा होऊ लागली. ब्रिटिशांच्या सामर्थ्याविषयी संदेह निर्माण झाला. १९४२ च्या उदयापासून काँग्रेसने मुंबईत आणि विशेषतः विद्यार्थी जगतात राजकीय असंतोष व सरकारविरुद्ध संतापाची रुजवात सुरू केलेली होती. राष्ट्रीय महत्त्वाकांक्षा जागृत करण्यावर भर दिला होता.

मुंबईतील विल्सन कॉलजचे प्राचार्य व मवाळ राजकारणी डॉ. प्रा. मॅकेंझी यांनी व्हाइसरॉय लिनलिथगो यांना मुंबईतील जनमानसाची वस्तुस्थिती कथन

करून आवश्यक पावले उचलण्यासाठी पुढीलप्रमाणे इशारा दिला होता :— " या देशाच्या राजकारणातील हिंदू-मुस्लीम कोंडी व सर्व आर्थिक समस्या ब्रिटिश-निर्मितच आहेत, असा विद्यार्थीच नव्हे तर संपूर्ण सुशिक्षित वर्गाचा समाज झालेला आहे. या सामाजिक घटकांमध्ये ब्रिटिशांविषयी अविश्वास, तिरस्कार व तुच्छतेची भावना निर्माण झाली आहे. कोणत्याही सभेत लॉर्ड अमेरी अथवा कोणाही ब्रिटिश राजकारण्याच्या वक्तव्याचा उल्लेख होताच उपरोधिक हास्यस्फोट उसळतो. ब्रिटिशांविषयी विद्यार्थी व सुशिक्षितांच्या मनात अनावर राग असून, त्याचा आता केव्हाही विस्फोट होणे शक्य आहे. कोणी सरकारच्या बाजूने युक्तिवाद केल्यास, त्याला संतापाने व प्रहसनाने उत्तर दिले जाते. म्हणून आपल्या मवाळ हिंदू मित्रांमध्ये आता अपराधाची भावना पसरली आहे. म्हणून ते इतःपर स्वकीयांची प्रतारणा करण्यास तयार होणार नाहीत." म्हणून प्रा. मॅकेंझींनी व्हाइसरॉय लिनलिथगो यांना विनंती केली की, हिंदुस्तानच्या राजकीय भविष्याविषयी स्पष्ट व निश्चित असे धोरण त्वरित घोषित करण्यासाठी चर्चिल यांचे मन वळवावे. त्यांना भारताच्या आकांक्षांबाबत सहानुभूती नसल्याचा इथे समज असल्यामुळे, असे करणे अगत्याचे आहे.[२३] या दस्तऐवजात सत्यकथन होते, हे निश्चित.

मुंबईतील राजकीय प्रक्षोभ अत्यंत धोकादायक पातळीवर जाऊन पोहोचला. म्हणून ब्रिटिशांच्या राजकीय उद्देशांविषयीचे सर्व संशय पंतप्रधानांनी त्वरित दूर करावे, असा सक्त इशारा गव्हर्नर लम्ले यांनीही व्हाइसरॉयला दिला. भिंतीवरील आलेख स्पष्ट दिसत होता. लम्ले यांना मुंबई राज्यातील स्फोटक वातावरणाची स्पष्ट जाण होती. व्हाइसरॉयपेक्षा गव्हर्नरला वस्तुस्थितीचे खरे भान आलेले होते.[२४]

जपानी आक्रमणाच्या संभाव्य धोक्यामुळे मुंबईत घबराट पसरली आणि भयंकर अफवा पसरल्या. शहरातून लोकांचे लोंढे बाहेरगावी पलायन करू लागले. युद्धासाठी उत्पादनात व्यत्यय येऊ नये, यासाठी सर्व कारखाने अविरत चालू ठेवणे हा सरकारचा प्रयत्न होता. मात्र गिरणी कामगारांचे पलायन युद्धप्रयत्नांना मारक होते. मुंबईच्या संरक्षणाची सरकारने जाहीर हमी देऊनही एप्रिल १९४२ मध्ये पलायनाने उच्चांक गाठला. गुप्तचरांनी मुंबई सरकारला सावध केले की,

खातेदारांनी बँकांमधून पैसे काढून घेतले. "देअर इज रन ऑन बँक्स". चलनी नोटांवरील विश्वास उडाल्याने लोक सोने-चांदी विकत घेत होते. आर्थिक जीवनात विलक्षण अविश्वास व अनिश्चितीचे वातावरण पसरले. लवकरच जपान मुंबईवर हवाई हल्ले करणार अशी वदंता पसरली. शहराला जपानी आक्रमणाचा धोका आहे असे नागरिकांप्रमाणेच गुप्तचरांनाही वाटत होते.

एप्रिल-मे १९४२ मध्ये मुंबईत घबराट, हताशपणा व भयसूचक अफवांना ऊत आला. त्या दिवसांत सुभाषबाबूंचे जर्मनीतील आझाद रेडिओवरील प्रसारण मुंबईत खूप लोकप्रिय झाले होते. या प्रसारणामुळे जनतेचे नीतिधैर्य कोसळत असल्याचा मुंबई सरकारचा दावा होता. पण त्यापेक्षाही काँग्रेसच्या 'जहरी' प्रचारामुळे जनमत भयंकर खवळले, असा सरकारचा आरोप होता. १८-२४ एप्रिल १९४२ दरम्यान मुंबईवर बाँबहल्ला होणार, असे जर्मनीतील आझाद रेडिओने वारंवार प्रसारित केले. त्यामुळे नेहमीपेक्षा कित्येक हजार लोकांनी मुंबईतून पलायन केले. १९ एप्रिलपर्यंत तीन लाखांवर लोक शहरातून पळून गेले होते. त्याच दिवशी दोस्त राष्ट्रांच्या बाँबर विमानांनी टोकियोवर हल्ला केला. आणि गव्हर्नरने रेडिओवरून आवाहन केल्यावर बाहेर जाणारे लोंढे थोडे थांबले. तथापि तरीही लोकांचा असंतोष कमी न होता वाढत राहिला. इंग्रजांना येथून घालवावे ही भावना मुंबईत वाढत राहिली.[२५]

जीविताचे व वित्ताचे रक्षण करण्यास ब्रिटिश सरकार असमर्थ आहे, याचा प्रत्यय सामान्य भारतीयांना एप्रिल १९४२ च्या प्रारंभापासून येऊ लागला. ५ एप्रिल रोजी कोलंबोवर जपानी बाँब पडले. आणि ६ तारखेला मद्रास इलाख्यातील काकिनाडा व विशाखापट्टणवर बाँबवर्षाव झाला. त्यात पाच माणसे मरण पावली. प्रचंड पळापळ झाली. बाँबर विमानांपासून संरक्षण करण्यासाठी इंग्रज सरकारजवळ पुरेशा विमानविरोधी तोफाही नव्हत्या. स्वतः गोरे अधिकारी भयभीत होऊन स्थलांतराची मागणी करीत होते.

पूर्व किनाऱ्यावरील मच्छलीपट्टणम्च्या दक्षिणेस कोठेतरी लौकरच जपानी नाविक दलदेखील हल्ला करणार, अशी लष्करी गुप्तचर विभागाला खबर

मिळाली. त्यामुळे त्या भागातून स्थलांतर करण्याचा स्थानिक अधिकाऱ्यांनी आदेश दिला. आमजनतेचे निर्वासन करण्याचे गंभीर परिणाम झालेत. मद्रास इलाख्याचा फक्त गव्हर्नर, मुख्य सचिव व काही सल्लागार अधिकारी मद्रासच्या फोर्ट सेंट जॉर्ज या सुरक्षित किल्ल्यात मुक्काम करून राहिले. मद्रासमधील सरकारी कार्यालये कोइंबतूर, उटकमंड, वेलोर, सालेम, चित्तूर वगैरे समुद्रापासून लांबच्या ठिकाणी स्थलांतरित करावी लागली. मद्रास व विशाखापट्टणम् ही बंदरे बंदच करावी लागली. एकूण कोरोमाँडल किनाऱ्यावरील दोन लाख नागरिकांना लांबवर स्थलांतर करणे भाग पडले होते.

कोलकात्यापर्यंतच्या संपूर्ण पूर्व किनारा भागातील जनजीवन स्थलांतरामुळे अगदी विस्कटले होते. खुद्द प्रचंड कोलकाता महानगर रिकामे करण्याची तयारी सरकार करीत आहे, अशी खबर मुंबईत आली. जपानी सेना कोलकात्यात डायमंड हार्बरमधून प्रवेश करील, असा सरकारचा अंदाज होता. बंगालची सुरक्षा हे ब्रिटिशांपुढे प्रचंड आव्हान होते. कोलकाता शहर रिकामे करायचे तर तेथील लोकसंख्या आणि सर्व कार्यालये संयुक्त प्रातांत व बिहारमध्ये हलवण्याचा विचार चालू झाला. तथापि त्यांचे स्थलांतर करताना तेथील रेल्वे, रस्ते, पूल आणि जमशेडपूरच्या पोलाद कारखान्यासारखे मोठेमोठे कारखाने शत्रूच्या हाती पडणे धोकादायक होते. म्हणून ते उद्ध्वस्त करण्याची योजना सरकारच्या विचाराधीन होती. युद्धात माघार घेताना तेथील आपलीच संपत्ती अशी उद्ध्वस्त करावी लागते. याला **' स्कॉर्च्ड अर्थ पॉलिसी '** म्हणजे दग्धभू धोरण म्हणतात. जनरल मोल्सवर्थच्या या योजनेचा गौप्यस्फोट झाल्याने लोकमत ब्रिटिशविरोधी होण्यात भर पडली. मालमत्ता व लोकांचे संरक्षण करण्यास इंग्रज समर्थ नाही ही भावना पसरली.

सीमावर्ती आसाममधूनही हजारो लोक स्थलांतर करीत होते. कोलकात्याप्रमाणेच जमशेडपुरातील कारखान्यांमधील कामगारदेखील आपल्या मूळगावी पळून जात होते. जमशेडपुरातील अतिरिक्त सेनादल व संरक्षणाच्या उपाययोजनांमुळे तेथील कामगार आणखीच भयभीत झाले. त्याचे पडसाद मुंबई, सोलापूर व अहमदाबादमध्येही पडल्याशिवाय राहिले नाही.[२६]

जपानी आक्रमणाचा अहोरात्र धोका असलेल्या आसाम, बंगाल, ओरिसा, आंध्र व मद्रास प्रांतांमधील तथाकथित संरक्षक उपाययोजनांमुळे तर दळणवळण व जनजीवन पार उद्ध्वस्त झाले. शिवाय निर्दय व निरंकुश नोकरशाहीच्या दडपशाहीचा वरवंटा जनतेवर बेफामपणे फिरू लागला. दळणवळणाची व उत्पादनाची साधने जपानच्या हाती पडू नये म्हणून ती नष्ट करण्याचे धोरण लष्कराने ठरविले. बंगालच्या सीमा भागातील हजारो लोकांना गावांमधून बाहेर काढले होते. या भागांमधील वाहतुकीची मुख्य साधने—नावा, होड्या व सायकली! परंतु त्याही लष्कराने हिसकावून घेणे सुरू केले. पूल उद्ध्वस्त करण्यात येत होते. परिणामतः अनन्वित हाल व अत्याचार झाले. लोकांची घरे, मोटारी वगैरेंचे लष्कराच्या व सरकारच्या उपयोगासाठी जबरीने अधिग्रहण करण्यात आले.[२७]

हिंदुस्तानातील सेनादलाचा जनरल ऑफिसर कमांडिंग जन. मोल्सवर्थ यास शत्रूला रोखणे कठीण दिसत होते. म्हणून त्याने पूर्वेकडून पश्चिम हिंदुस्तानकडे क्रमाक्रमाने विध्वंस करीत माघार घेण्याची योजना आखून तयार ठेवली होती. माघारीचा तो ‘ स्कॉर्च्ड अर्थ प्लॅन ’ अतिगोपनीय असूनही, त्याची प्रत गांधीजींच्या हाती आली होती. त्यामुळेही **ब्रिटिशांना छोडो भारत** असे फर्मावण्याचा गांधीजींचा निर्धार अधिक ठाम होण्यास मदत झाली. लोकप्रिय युवक नेते युसुफ मेहेरअली तेव्हा लाहोरच्या तुरुंगात असताना त्यांची मुंबईचे मेयर म्हणून बिनविरोध निवडणूक झालेली होती. त्यांनी सेनादल प्रमुखांचा हा अघोरी प्लॅन व दग्धभू योजनेची मुंबई महानगरपालिकेच्या सभागृहाला माहिती दिली. याबाबत महानगरपालिकेने निर्णय घेऊन मध्यवर्ती गृहमंत्र्याकडे कडक भाषेत निषेध व्यक्त केला होता. “ हिंदुस्तानचे संरक्षण करण्यास तुम्ही ब्रिटिश असमर्थ असल्याने तुम्ही चालते व्हा ”, असे मेहेरअलींनी गृहमंत्र्यास सुनावले होते.[२८]

इंडियन मर्चंट्स चेंबरनेही व्हाइसरॉयला अशीच ताकीद दिली होती. इंग्रजांच्या येथील राजवटीमुळे आमचे उद्योगधंदे व आर्थिक हित धोक्यात आले आहेत. ते थोक्यात घालण्यास आम्ही तयार नाही, ही चेंबरची भूमिका होती.

त्या काळी आर्थिक समस्यांमुळेही मुंबईत सरकारविरुद्ध प्रचंड असंतोष उसळला होता, हे समकालीन पुराव्यांवरून स्पष्ट दिसते. 'अन्नधान्याची टंचाई व उसळत्या किंमती यामुळे नागरिकांचा सरकारवर भयंकर रोष ओढवला आहे, आणि बहुतांश लोक त्यामुळेच काँग्रेसकडे आकर्षित झाले आहेत', असे लम्ले यांनी लिनलिथगोंना पत्राद्वारे कबूल केले होते. त्या वर्षी शेतीचा हंगामही बरा नव्हता. शिवाय ब्रह्मदेशातील तांदूळ येणे साफ बंद झाल्याने धान्याची टंचाई निर्माण झाली. कामाचा बोजा वाढल्याने व वस्तूंच्या टंचाईमुळे गिरणी कामगारांमध्ये असंतोष पसरला. तो दडपून टाकण्यासाठी गिरणगावात वरचेवर गोळीबार करण्यात आले. त्यामुळे सार्वजनिक असंतोषात भर पडत गेली.[२९] याविषयीच्या बातम्या छापल्याकारणाने बी.जी. हॉर्निमन यांच्या **बॉंबे सेंटिनेल** पत्रकाचा सरकारने लगेच गळा दाबला. उत्तरोत्तर मुंबईत सार्वत्रिक असंतोष इतका शिगेला गेला आणि सरकारी जुलूम इतके क्लेशकारक झाले की, त्यामुळे क्रांतीसाठी अनुकूल स्थिती निर्माण झाली.

युद्धप्रयत्नांच्या प्रचारार्थ सरकारने नॅशनल वॉर फ्रंट, जिल्हा समित्या वगैरे समित्या नेमल्या होत्या. त्यांच्यात रावबहादूर, खानबहादूर, उद्योगपती, भांडवलदार व ब्रिटिशधार्जिण्या लब्धप्रतिष्ठितांचा समावेश होता. तथापि त्या समित्यांवर जनतेचा तर सुतराम विश्वास नव्हता. खुद्द व्हाइसरॉय महोदयांनी देखील त्यांच्याविषयीचा अविश्वास भारतमंत्री अमेरींना कळवला होता. नागपूरच्या समितीच्या सभेतील एक प्रसंग अत्यंत बोलका असल्याने सांगितला पाहिजे. नागपूरचे डेप्युटी कमिशनर सभेत भाषण करायला उभे राहताच त्यांना एका युवकाने उठून विचारले, "नेहरूंना शांततापूर्ण व्यक्तिगत सत्याग्रहाआधीच चार वर्षांची सजा का दिली?" त्या अधिकाऱ्याने उत्तर दिले, " कारण ते क्विसलिंग म्हणजे देशद्रोही आहेत." क्षणार्धात त्या डेप्युटी कमिशनरवर सभेतून खेटरांचा व चपलांचा वर्षाव झाला. महात्मा गांधी व काँग्रेसच्या प्रचंड घोषणा होऊन सभा संपली! राष्ट्रीय स्पिरिटचे हे एक उदाहरण होते.[३०]

सरकारने ‘ अधिक धान्य पिकवा ’ मोहीम सुरू केली होती. सेनादलास पुरेसा धान्य पुरवठा करणे हा या मोहिमेचा उद्देश सर्वश्रुत होता. परंतु या मोहिमेविषयी शेतकऱ्यांना उत्साहापेक्षा अधिक राग वाटत होता. कारण कमी दरात सक्तीने धान्य-वसुली करण्यात येई. काँग्रेस लवकर सत्तेवर येईल असेच दिसत असल्याने सरकारमधील नेटिव्ह अधिकारी वेळ पाहून काम करीत. दिवसेंदिवस ब्रिटिशविरोधी भावना वाढत होती. स्वतः लिनलिथगोंनी विख्यात पत्रकार व लेखक लुई फिशर यांना बोलून दाखविले होते की, “ आज हिंदुस्तानात आहे तेवढी ब्रिटिशविरोधी भावना यापूर्वी कधीच नव्हती.” बिकानेरच्या महाराजांनीही लुई फिशरला सांगितले, “ ब्रिटिश हिंदुस्तान पूर्णपणे ब्रिटिशविरोधी बनला आहे.” अमेरिकेचे प्रेसिडेंट रुझवेल्ट यांचे हिंदुस्तानातील प्रतिनिधी कर्नल जॉन्सन यांनी रुझवेल्टला केबल पाठविली, “ ब्रिटिशांना हिंदुस्तानातून हाकलून लावले पाहिजे, अशी भावना सर्वत्र वाढत असल्याचे दिसते.” ही भावना सार्वत्रिक होती.

मुंबईच्या जनमानसात जपानविषयी भययुक्त प्रेमादराची विचित्र भावना रूजू लागली होती. युद्धाविषयीच्या बातम्या ऐकण्यासाठी लोक सायगाव व टोकियो रेडिओ लावीत. जपान हे आशियाई व बौद्ध धर्मीयांचे राष्ट्र असल्याने ते ब्रिटनपेक्षा बरे अशीही भावना निर्माण झाली. कर्नल जॉन्सनला बंगालच्या पोलीस महासंचालकाने सांगितले होते की, कोलकात्याच्या दारात जपानी आले, तर जनता व पोलीसही त्यांचे स्वागतच करतील. स्वतः गांधीजींनाही याची पूर्ण जाणीव झालेली होती. या जाणिवेतूनही त्यांच्या निर्धारास बळ मिळाले.

## निष्फळ क्रिप्स योजना

महायुद्धासाठी सहा कोटी डॉलरचे साहित्य व हजारो अमेरिकन सैनिक हिंदुस्तानात तैनात करण्यात आलेले असल्याने येथील राजकीय पेचप्रसंगाची उपेक्षा करणे अमेरिकेला शक्य नव्हते. त्यानुसार हिंदुस्तानला त्वरित स्वायत्तता देऊन युद्धोत्तर स्वातंत्र्याचे आश्वासन द्यावे, असा अमेरिकेचे अध्यक्ष फ्रँकलिन रूझवेल्ट यांनी चर्चिल यांना सल्ला दिला होता. तथापि हटेलपणा, निष्ठुरपणा व संवेदनाशून्यतेसाठी विख्यात असलेल्या चर्चिल साहेबांनी ‘ काँग्रेस आमच्या

एन ४१४६—५३

युद्धप्रयत्नांमध्ये बाधा आणेल ’ असे कारण सांगून हा सल्ला धुडकावला. मात्र दिशाभूल करणाऱ्या ब्रिटनच्या अपप्रचारामुळे अमेरिकन लोकमत कलुषित होऊ लागले. तेथील डेमॉक्रॅटिक पक्षाचे सिनेटर भारताचे सहकार्य मिळवावे यासाठी अध्यक्षांवर दबाव आणू लागले. एक सिनेटर तर वॉर कमिटीच्या बैठकीत म्हणाला, “ भारतीयांना स्वातंत्र्य देणे हाच खरा त्यांना युद्धात लढावयास सांगण्याचा एकमेव मार्ग आहे. भारतातील गांधींचे नेतृत्व हे आपल्या युद्धसाधनांपैकीच एक आहे, असे मानून ते अनुकूल करून घेतले पाहिजे.” अमेरिकन सरसेनापती आयसेन होअर यांनीदेखील म्हटले होते की, “ कितीही किंमत देऊन भारताचे सहकार्य मिळवणे अनिवार्य आहे, कारण भारत गमावला तर जपान व जर्मन फौजांची इराणी आखातात हातमिळवणी होईल.” मात्र अमेरिकेने या विषयाचा पाठपुरावा केला नाही.

चीनची आघाडी लढवणारे जनरल चिआंग-कै-शेक १८ फेब्रुवारी १९४२ रोजी कोलकात्यात गांधीजींना सपत्निक भेटले होते. त्यांना या भेटीतून सम्यक स्थितीचे भान आले होते. त्यांनी लगेच २४ तारखेला लंडन व वॉशिंगटनमधील आपल्या राजदूतांमार्फत संदेश पाठवून तेथील सरकारांना पुढील इशारा दिला, “ हिंदुस्तानातील राजकीय प्रश्न तातडीने आणि निकडीने न सोडविल्यास त्या देशाला असलेला धोका रोज वाढत जाणार आहे. जपान भारतावर बॉंबवर्षाव करेपर्यंत आणि भारतीय जनतेचे मनोधैर्य खचेपर्यंत ब्रिटिश सरकार थांबणार असेल तर फारच उशीर केल्यासारखे होईल.” पॅसिफिक महासागरात जपानने विजय मिळवल्यामुळे चीनला युद्धसामग्रीचे ठाणे म्हणून भारताचे युद्धनीतिक महत्त्व वाटत होते.

मात्र अमेरिका व चीनचा दबाव वाढत असल्यामुळे ब्रिटनमधील लेबर व लिबरल पक्ष तसेच वजनदार वर्तमानपत्रे भारताशी तडजोड करावी, असा आग्रह धरू लागली. लेबर पक्षनेते व उपपंतप्रधान क्लेमंट ॲटली यांनी चर्चिलला खडसावले, “ भारताच्या व्हाइसरॉयचा हडेलहप्पी दृष्टिकोण मला मुळीच पसंत नाही. हे धोरण केवळ अदूरदर्शीपणाचेच नव्हे तर ते आत्मघातकीदेखील आहे.

म्हणून तडजोडीचे व्यापक अधिकार देऊन कोणाला तरी हिंदुस्तानात पाठवावे, " अशी ॲटलींनी चर्चिलला सूचना केली.[३१]

ब्रिटिश कुटिल राजनीतीचा एक नमुना पाहा. जन. चिआंग-कै-शेक केवळ काँग्रेस नेत्यांना भेटण्यासाठी स्वतःहून भारतात आले, असे जगाला वाटू नये म्हणून व्हाइसरॉयने त्यांची गांधी, नेहरू आणि मौलाना आझादांप्रमाणेच विरोधकांशीही भेट घालून दिली. काँग्रेस पक्ष मुसलमान व दलितांचे प्रतिनिधित्व करीत नाही, हे खोटेनाटे सांगून व्हाइसरॉयने त्या चिनी साहेबांच्या जिना, सिकंदर हयात खान व डॉ. आंबेडकरांशी मुलाखती घडवून आणल्या. मात्र चिआंगच्या भेटीत जिनांनी पाकिस्तानचा मुद्दा उपस्थित करताच त्या चिनी नेत्याने जिनांना सरळ प्रश्न केला की, " चीनमध्ये दहा कोटी मुसलमान इतर जमातींबरोबर सलोख्याने नांदत आहेत. मग भारतीय मुसलमानांना वेगळा देश कशाला हवा!" आपल्या भारतभेटीचा निष्कर्ष काढताना त्यांनी म्हटले, " भारतावरील सत्ता सोडायची इच्छा नसल्यामुळेच ब्रिटिश मुत्सद्दी हिंदू-मुसलमान प्रश्नाचा बाऊ करीत आहेत." त्यानुसारच त्यांनी चर्चिल यांना वरील निरोप पाठविला होता.

अमेरिकेचे अध्यक्ष व लोकमत आणि आयसेन होअर यांच्या दबावाची उपेक्षा करणे अशक्य झाल्यानेच चर्चिल यांनी सर स्टॅफर्ड क्रिप्स यांचे मंडळ भारतात पाठविण्यास संमती दिली. ॲटली व अमेरिकेचे समाधान व्हावे, पण खरी सत्ता हिंदुस्तानच्या हातात जाणारच नाही, अशी योजना बनवण्याचा चर्चिलने घाट घातला. भारताला तात्काळ व युद्धानंतर काय देता येईल, यासंबंधीच्या जाहीरनाम्याचा एक मसुदा ब्रिटिश कॅबिनेटने तयार केला. भारतीय नेत्यांशी चर्चा न करता लंडनहून व दिल्लीतून एकाच वेळी जाहीरनामा घोषित करावा असा मूळचा विचार होता. पण तो बदलून भारतमंत्री लॉर्ड अमेरींनी त्यावर प्रथम लिनलिथगोंशी विचारविनिमय केला. परंतु सध्या भारताला जास्त काहीच देऊ नये, या हटवादी भूमिकेवर लिनलिथगो महाशय ठाम उभे होते! इतकेच नव्हे तर सद्यःस्थितीतील जाहीरनामा जारी केल्यास आपण राजीनामा देऊ, अशी त्यांनी लंडनला तार पाठविली. स्वतः भारतमंत्री अमेरीदेखील भारताला जास्त काही

देण्यास अनुकूल नव्हतेच. कारण काय तर भारतीय सेनादलावर भयंकर परिणाम होईल, असे हिंदुस्तानच्या सरसेनापतीचे मत होते.[३२]

याच सुमारास महंमद अली जिनांनी चर्चिलना एक निवेदन पाठविले की, अमेरिकेच्या मतानुसार काँग्रेसशी तडजोड करून भारतात ' हिंदुराज्य ' आणण्याचे प्रयत्न झाल्यास युद्धप्रयत्नांवर भयानक परिणाम होतील. लिनलिथगोंच्या चिथावणीने पंजाबचा गव्हर्नर सिकंदर हयात खान व केंद्रीय मंत्री फिरोजखान नून यांनीही अशीच निवेदने चर्चिलकडे पाठविली. अखेर राजीनामा देऊ नये, असे लिनलिथगोंना सांगण्यात आले. तसेच भारतीय नेत्यांशी चर्चा केल्यावरच क्रिप्सने योजनेचा जाहीरनामा घोषित करावा असा ब्रिटिश कॅबिनेटने निर्णय घेतला.

कॅबिनेटमध्ये नुकताच समावेश झालेले लेबर पक्षाचे स्टॅफर्ड क्रिप्स यांच्याकडे पुढील कामगिरी सोपविण्यात आली. वस्तुतः हे समाजवादी गृहस्थ नेहरूंचे मित्र होते. त्यांची पूर्वीची प्रामाणिक मते भारताला व काँग्रेसला अनुकूल होती. ती पाहा :–

"I am convinced that India's salvation remains in a Constituent Assembly". (United Press). "Most of the Indians today are anxiously looking forward for a lead from the Congress. They expect everything from Congress, and they are opposed to Mr. Jinnah's scheme of dividing India". (Pattabhi Sitaramayya,op.cit. Vol-II, p.187).

क्रिप्स २३ मार्च १९४२ रोजी दिल्लीत विराजमान झाल्यापासून त्यांनी विविध पक्षांच्या नेत्यांशी चर्चा केली. प्रारंभापासून मुंबईचे कावसजी जहांगीर, चिमणलाल सेटलवाड, बॅ. जयकर, जमनादास मेहता, आंबेडकर व उद्योगपती या मंडळाकडून फार मोठ्या अपेक्षा बाळगून होते. मात्र नंतर डॉ. आंबेडकर वगैरेंचा फारच भ्रमनिरास झाला. त्याविषयी अन्यत्र विवेचन केलेले आहे. क्रिप्स महोदयांनी माजी प्रधान मंत्री बा. गं. खेर, भुलाभाई देसाई, वि. दा. सावरकर व बॅ. जिना या

मुंबईकरांनाही मुलाखती दिल्या. ब्रिटिशांना न आवडलेली बाब म्हणजे क्रिप्स यांनी पी. सी. जोशी व काही कम्युनिस्टांनाही मुलाखती दिल्या. मात्र त्यांतून क्रिप्सने हेरले होते की, कम्युनिस्टांना थोडी भुरळ पाडल्यास त्यांना आपल्या बाजूला खेचता येईल.

क्रिप्स यांनी आठ दिवसांनंतर ३० मार्च रोजी ब्रिटिश कॅबिनेटची योजना घोषित केली. ही योजना अंशतः आकर्षक, तर अंशतः धोकादायक आणि अंतिमतः भारतभूमीचे शतशः तुकडे करणारी होती. काँग्रेस, मुस्लीम लीग व संस्थानिक या ब्रिटिशांना महत्त्वाच्या वाटणाऱ्या पक्षांना वरपांगी संतुष्ट करण्याचा हा नाट्यप्रयोग होता. युद्धानंतर भारताला ब्रिटिश कॉमनवेल्थमधून फुटून निघण्याचा अधिकार असलेले वसाहतीचे स्वराज्य देण्याचे त्यात आश्वासन होते ; आणि ब्रिटिशांच्या हस्तक्षेपाशिवाय भावी राज्यघटना बनवण्यासाठी घटना समितीची निवड करण्याचे दुसरे आश्वासन होते. ही दोन आश्वासने काँग्रेसला संतुष्ट करण्यासाठी होती. तर आयोगाने लीगला खूश करण्याकरिता अखंड हिंदुस्तानात राहायचे का स्वतंत्र राष्ट्र म्हणून बाहेर राहायचे हे ठरवण्याचा अधिकार बहाल केला. नेहमीच इंग्रजांचे आधारस्तंभ म्हणून जगलेल्या प्रत्येक संस्थानिकाला ब्रिटिशांच्या हिंदुस्तानातून गमनानंतर, आपले स्वतंत्र राष्ट्र म्हणून राज्य करण्याचा अधिकार बहाल करण्याचे आश्वासन या योजनेत होते. शिवाय त्यासाठी आपल्या प्रजेचे मत न घेण्याचेही स्वातंत्र्य दिले होते.

क्रिप्स योजना सकृतदर्शनीच निराशाजनकच नव्हे तर विघातक असल्यामुळे अस्वीकार्य आहे, असे काँग्रेसचे मत बनले. त्या वीस दिवसांत काँग्रेस कार्यकारिणीची दिल्लीत जवळपास सतत बैठक चालू होती. **मात्र निष्फळतेची पूर्वभावना (प्रीमोनिशन) असलेले गांधीजी या योजनेविषयी चर्चा करण्यासाठी क्रिप्सना भेटायलाही अजिबात तयार नव्हते.** भेट विफल ठरण्याची त्यांना खात्री वाटल्याने हा विषय त्यांनी मौलाना आझाद, नेहरू व पंत यांचेवर सोपविलेला होता. तथापि क्रिप्सचीच गांधीजी यांना भेटायची जबर इच्छा होती. म्हणूनच गांधीजी केवळ शिष्टाचार म्हणून भेटले. पण त्यांनी क्रिप्सला स्पष्ट

सुनावले, **“ या घोषणेत आहे यापेक्षा जास्त काही देण्यास आपल्याकडे नसेल, तर पहिले उपलब्ध विमान पकडून आपण इंग्लंडला परत जा! ”** हिरमुसलेले क्रिप्स म्हणाले, “ मी हा विचार करतो.” दिल्लीत थांबणे निरर्थक वाटल्याने गांधीजी त्वरित सेवाग्रामला निघून गेले. पण त्यानंतरही औपचारिक वाटाघाटी चालू राहिल्या.

क्रिप्स योजनेनुसार युद्धानंतर हिंदुस्तानचे दोनच नव्हे तर शेकडो तुकडे होणार होते. भावी राज्यघटना समितीचे प्रतिनिधी निवडण्यासाठी संस्थानिकांना खास अधिकार देय केलेले होते. त्यानुसार नऊ कोटी संस्थानी प्रजेचे प्रतिनिधी प्रजेने नव्हे तर अधिपतींनीच नेमावयाचे होते. याचा अर्थ, एकचतुर्थांश प्रतिनिधी ब्रिटिशधार्जिणेच! अनेक विघातक व निराशाजनक आणि धोकादायक मुद्दे योजनेत होते. पण तरीही वर्तमानकालीन युद्धाच्या स्थितीत ब्रिटिश सरकार जर केंद्रात खरीखुरी प्रभावी सत्ता भारतीयांकडे हस्तांतरित करण्यास तयार असेल, तर काँग्रेस कार्यकारिणी तडजोड करण्यास तयार होती. या दिशेने काँग्रेस अध्यक्ष मौलाना आझाद व नेहरूंनी तीन सूचना केल्या :—(१) व्हाइसरॉयच्या विस्तारित होणाऱ्या कार्यकारी मंडळाचा (मंत्रिमंडळाचा) दर्जा राष्ट्रीय सरकारसारखा असावा; (२) व्हाइसरॉयचा दर्जा इंग्लंडच्या बादशहाइतकाच असावा ; आणि (३) हिंदुस्तानचा संरक्षण मंत्री भारतीय असावा व या देशाच्या संरक्षणाची जबाबदारी पूर्णतः त्याच्याकडेच असावी. मात्र ही तिसरी सूचना क्रिप्सला मान्य नव्हती.

**तथापि वाटाघाटी निर्णायक स्टेजला आल्यावर स्टॅफर्ड क्रिप्स यांनी मौलाना व नेहरू यांना स्पष्ट आश्वासन दिलेः— ‘ व्हाइसरॉयच्या नवीन विस्तारित कार्यकरिणीचा दर्जा कॅबिनेटसारखा असेल, तसेच हिंदुस्तानचा व्हाइसरॉय हा इंग्लंडच्या बादशहाप्रमाणे केवळ घटनाप्रमुख असेल.’ खुद्द क्रिप्सने हे मान्य केल्याने, आपली मागणी मान्य झाली, असे काँग्रेस अध्यक्षांना वाटले.** पण त्याच कारणाने लिनलिथगो भयंकर दुखावले. त्वरित त्यांनी अमेरींशी बोलून राजीनामा देण्याची धमकी दिली. तारायंत्रातून दिल्ली-लंडनदरम्यान खलबते व बातचित झाली, पण दिल्लीत लिनलिथगो-क्रिप्सदरम्यान चर्चा वा भेट झाली नव्हती. या दोघांनी एकमेकांना मुद्दाम पूर्णपणे टाळले होते.

लिनलिथगो यांच्या राजीनामा नाट्यामुळे क्रिप्सला लंडनहून दम भरणारी तार आली, " ब्रिटिश वॉर कॅबिनेटने तयार केलेल्या मूळ मसुद्याचे तुम्ही उल्लंघन करीत आहात. तुम्हाला तो अधिकार नाही ". क्रिप्सना असे बजावले व त्यांचे शब्द गिळायला लावले. वस्तुतः क्रिप्सने नेहरू व मौलाना आझाद यांना उपरोक्त आश्वासन दिल्याची लेखी नोंद आहे. तरीही ' आपण असे बोललो नव्हतो ', असे नंतर क्रिप्सने घुमजाव केले. खरे तर त्यांच्या शत्रूंनी पाठीत खंजीर खुपसला होता. वस्तुस्थिती अशीच होती की, दडपशाही, हुकूमशाही व सत्ताधीश आपल्या मूळ भूमिकेवर तसेच ठाम राहिले.

इतिहासात नोंद करायला हवी की, या योजनेच्या निष्फळतेची पूर्वभावना असलेले गांधीजी दिल्लीत न थांबता, त्यांनी योग्य निर्णय घेण्याची जबाबदारी काँग्रेस कार्यकारिणीवर सोपविली होती. ' प्राणपणाने लढा करून इंग्रजांना घालविल्याशिवाय ते जाणार नाहीत ', असे त्यांना वाटे. मात्र क्रिप्ससारख्या माणसाने " स्वतः सैतानाचे वकील बनावे ", याचे जवाहरलालजींना मनस्वी दुःख झाले. क्रिप्सने आपली फसगत केली, याचे मौलानांना दुःख झाले, आणि आश्वासनभंग केला असा त्यांना विषाद वाटला. वस्तुतः क्रिप्सचा त्याच्या वरिष्ठांनी बळी घेतला होता. वाटाघाटी फिसकटल्याने विन्स्टन चर्चिल, लॉर्ड अमेरी आणि लिनलिथगो यांना दुःख नव्हेच, उलट आनंदच झाला. **आनंदाच्या अतिरेकाने चर्चिल वॉर कॅबिनेटच्या दालनात थयथयाट नाचला होता. कारण भारताला स्वराज्याचे अधिकार देण्याची त्याला मुळीच इच्छा नव्हती.**

रॉयवादी वगळता सर्वच पक्षांनी आपापल्या कारणासाठी क्रिप्स योजना फेटाळली. पाकिस्तानची मागणी तत्त्वतः मान्य झाली, तरी या योजनेत स्वतंत्र सार्वभौम पाकिस्तान संमत झालेला नव्हता. म्हणून बॅ. जिना कुंपणावर बसून राहिले. पाकिस्तान व देशाचे तुकडे करणारी योजना म्हणून सावरकरांनी ती धुडकावली. या मुद्यावर काँग्रेस व सावरकरांमध्ये एकमत होते. शिखांचे स्वतंत्र राष्ट्र न होता पंजाबचे विभाजन होणार, म्हणून मास्टर तारासिंग यांनीही ही योजना अव्हेरली. नवीन राज्यव्यवस्थेत दलितांना कोणतेच संरक्षण देण्याची हमी

नसल्याने, डॉ. आंबेडकर क्रिप्सवर खूपच चिडले होते. शिवाय आंबेडकरांना स्वतंत्र मजूर पक्षाचे पुढारी न मानता केवळ अस्पृश्यांचे प्रतिनिधी असा क्रिप्सने दर्जा दिल्यामुळे बाबासाहेब फार दुखावले गेले.

क्रिप्सने बाबासाहेबांचा भयंकर अपमान केल्यावर ते गव्हर्नर लम्ले यांना भेटले. त्यानंतर लवकरच रॉजर लम्ले यांनी व्हाइसरॉय लिनलिथगोंना पुढील आशय असलेले पत्र लिहिले **:—** "सर स्टॅफर्ड यांनी आंबेडकरांचा भयंकर भ्रमनिरास करून त्यांचा अपमान केला. त्यांना व्हाइसरॉयच्या कार्यकारिणीत न घेतल्यापासूनही ते नाराज आहेत. आता तरी आंबेडकरांसाठी काही तरी करावे. त्यांना व्हाइसरॉयच्या मंत्रिमंडळात घेण्यात यावे." **(ट्रान्सफर ऑफ पॉवर,** खंड १, पृ. ८४६-४७.**)**

गव्हर्नर लम्ले यांच्या शिफारशीनुसार व्हाइसरॉयने आंबेडकरांना मंत्रिमंडळात घेण्याचा आपला निर्णय अमेरींना कळविला (१ जुलै). छोडो भारतचा वर्धा ठराव होताच त्याचा निषेध करणारी पत्रके काढून काँग्रेसविरोधी मोहीम उभारण्यास सरकारने अग्रक्रम दिला. काँग्रेस-विरोधी मोहिमेचा एक भाग म्हणून आंबेडकरांना मंत्री करण्यात आले. त्याप्रमाणे आंबेडकरांनी मजूर खात्याचा पदभार स्वीकारण्यास दिल्लीस प्रयाण करण्यापूर्वी **टाइम्स ऑफ इंडियाला** मुलाखत दिली. जनआंदोलन सुरू करण्याचा गांधींचा विचार अयोग्य व वेडेपणाचा आहे, असा त्यांचा अभिप्राय होता.[३३]

क्रिप्स नाटकाच्या नांदीपासून रंगमंचावर व रंगमंचामागेही अनेक घटना घडल्या. व्हाइसरॉय लिनलिथगोंचा प्रतिसाद विलक्षण थंड किंबहुना विरोधी होता. व्हाइसरॉयला पदावरून हटवावे, अशी विनंती क्रिप्स यांनी लंडनहून निघण्यापूर्वीच चर्चिल यांना केली होती. पण पंतप्रधानांनी ती अमान्य केल्याचे क्रिप्सने त्याच्या अधिकाऱ्यांना सांगितले होते. भारतमित्र व समाजवादी विचारवंत लुई फिशरनाही हे समजले होते. क्रिप्सचा समज होता की, ते भारतात कॅबिनेट स्वरूपाचे सरकार स्थापन करणार! पण त्यांचाही पराभव झाला.

इकडे सप्रू, जयकर, बी. शिव राव मंत्रिमंडळात वर्णी लावून घेण्यासाठी उतावीळ होते, असे इंटेलिजंस ब्युरोचा १ एप्रिल १९४२ चा अहवाल सांगतो. बॅ. जिना वरवर शांत दिसले तरी अत्यंत तणावाखाली होते. त्यांनी दोन दिवस दाढी केली नव्हती. ब्रिटिश हिंदुस्तानात आल्यापासून ते प्रथमच मुसलमानांना विश्वासात घेत आहेत, याचा सिकंदर हयात खानांना आनंद झाला होता. म्हणून काँग्रेसशी लगेच तडजोड करावी, असा त्यांनी लीगच्या बैठकीत प्रस्ताव मांडला. परंतु जिनांनी सर्वांना खडसावले की, कोणाही मुसलमान नेत्याने क्रिप्स योजनेबाबतचा आनंद प्रदर्शित करू नये. **मात्र संस्थानिकांचे मंडळ पाकिस्तानच्या निर्मितीस पाठिंबा देत होते. त्याबदल्यात सर्व संस्थानिकांना इच्छेनुसार स्वतंत्र राष्ट्रांचा दर्जा देण्यास जिना अनुकूल होते, असे इंटेलिजंस ब्युरोचा अहवाल म्हणतो.** बहुधा नेहमी संस्थानिकांची जिनांशी जवळीक असे.

क्रिप्सला कावेबाज, ढोंगी, धोकेबाज, डेव्हिल्स ॲडव्होकेट अशी विशेषणे लावली गेली. तथापि वस्तुस्थिती वेगळीच होती. व्हाइसरॉय व लंडनमधील शत्रूंनी त्यांचा घात केला. क्रिप्सबरोबर आलेल्या ऑक्सफर्ड विद्यापीठातील प्राध्यापक रेजिनाल्ड कूपलँड यांनी ‘ अंदरकी बात ’ सांगितली आहे. ‘ राष्ट्रीय सरकारचे स्वरूप ’ हा खरा महत्त्वाचा निर्णायक मुद्दा होता. याच मुद्याबाबत काँग्रेस व ब्रिटिश दृष्टिकोणांमध्ये संघर्ष निर्माण झाला होता. काँग्रेसला अधिकार असलेले राष्ट्रीय सरकार पाहिजे होते. क्रिप्सनी ही मागणी मान्य केली. तथापि त्यावर ब्रिटिश दृष्टिकोणाने मात करून ही मागणी अमान्य केली. त्यामुळे क्रिप्सला आपले शब्द फिरवावे लागले. हा विषय आपल्या हातात नाही; यासाठी काँग्रेसला व्हाइसरॉयशी वाटाघाटी कराव्या लागतील, असा क्रिप्सना बचावात्मक पवित्रा घ्यावा लागला. क्रिप्सच्या पाठीत खंजिर खुपसला गेला.

अंदरकी बात कथन करताना लुई फिशर म्हणतात, व्हाइसरॉयला व्हेटो पॉवर न देता राष्ट्रीय सरकार देण्याचे क्रिप्सने नेहरू व मौलानांना दिलेले आश्वासन लिखित स्वरूपात होते. परंतु लिनलिथगो व जनरल वेव्हेल यांनी लंडनला आपला

विरोध कळविला. किंबहुना लंडनलाही हे मंजूर नव्हते. काहीही असो. लंडनने क्रिप्सला त्यांचे शब्द गिळायला भाग पाडले. क्रिप्सने हा कळीचा मुद्दा उघड न करता अपयशाची जबाबदारी काँग्रेस-लीग मतभेदांवर ढकलली. पण या अपयशाचे दस्तऐवज ब्रिटिश आणि अमेरिकन सरकारांकडे आहेत, असे फिशर ठामपणे सांगतात.[३४]

## काँग्रेस समाजवाद्यांची पुण्यातील शिबिरे

मुंबईतील काँग्रेस नेते भुलाभाई देसाई व मद्रासचे राजाजी राष्ट्रव्यापी जनआंदोलनाच्या विरोधात होते. काँग्रेस अध्यक्ष आझाद व नेहरूंचा ठाम निर्धार होत नव्हता. अशा स्थितीत समाजवादी गटाच्या आचार्य नरेंद्र देवांना भुलाभाईंच्या ठिकाणी काँग्रेस कार्यकारिणीत घेण्यात आले. १९४२ च्या प्रारंभापासूनच जनआंदोलन उभारण्यासाठी सर्वच काँग्रेस समाजवादी नेते महात्मा गांधींचे मन वळविण्याचा कसून प्रयत्न करीत होते. मेहेरअली, अच्युतराव, डॉ. लोहिया वगैरे आता गांधीजींचे निकटवर्ती झाले. मुंबई इलाख्यातील काँग्रेस पुढाऱ्यांपैकी सरदार पटेल व शंकरराव देव यांनी गांधीजींना सर्वाधिक ठाम पाठिंबा दिला. मुंबईतील आगामी लढ्याची पूर्वतयारी करण्यात पटेल, मेहेरअली, स. का. पाटील, पुरषोत्तम त्रिकमदास, शंकरराव देव, खेर, सरोजिनी नायडू, अशोक मेहता, अबिदअली जाफरभाई, भवानजी खिमजी व अच्युतराव वगैरेंनी मोठे योगदान दिले होते. ही श्रेयनामावली अपुरी असून अधिक नावे माझ्या **क्विट इंडिया रिव्हॉल्युशन** या ग्रंथात दिलेली आहेत.

छोडो भारत आंदोलनासाठी राष्ट्र सेवादल एप्रिल १९४२ पासूनच उत्सुक होता. त्यानुसार भूमिगत चळवळीची पूर्वतयारी करण्यासाठी मे महिन्यात पुण्यात एस. एम. जोशींनी राष्ट्र सेवादलाच्या महाराष्ट्रातील निवडक १५० युवा कार्यकर्त्यांचे शिबिर भरविले होते. शिबिराच्या समारोपाला आलेल्या युसुफ मेहेरअलींनी भूमिगत चळवळीची रणनीती व डावपेच याविषयी मार्गदर्शन केले.

अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये प्रभाव पाडलेल्या मेहेरअलींना राजकारणात मोठे स्थान होते. थोड्याच दिवसांपूर्वी लाहोर कारागृहात असतानाच त्यांची मुंबईचे मेयर म्हणून बिनविरोध निवड झालेली होती. याच शिबिरात अच्युतराव, शिरूभाऊ लिमये, बंडू गोरे, मनोहर कोतवाल वगैरेंनी जयप्रकाश यांच्या देवळी योजनेनुसार कारवाया करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे प्रयत्न सुरू झाले.

जून १९४२ च्या तिसऱ्या आठवड्यात एस. एम. आणि मेहेरअली व शिरूभाऊंनी पुण्यात रास्ता पेठेतील एका कारखान्याच्या जागेत महाराष्ट्रातील निवडक काँग्रेस समाजवाद्यांचे दुसरे गुप्त शिबिर घेतले. त्यात भूमिगत आंदोलनाची कार्यपद्धती व घातपात करण्याविषयी स्पष्ट मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या. ब्रिटिशांची सत्ताकेंद्रे नष्ट करणे, सेनादलाच्या हालचालीत व्यत्यय निर्माण करणे आणि त्यासाठी पूल व तारा तोडणे असा कार्यक्रम आखण्यात आला. शिबिरात प्रामुख्याने युसुफ मेहेरअली व अच्युतराव पटवर्धनांनी मार्गदर्शन केले. फर्ग्युसन कॉलेजच्या परिसरात भरलेल्या शिबिरात आंदोलनाबाबत अधिक ठोस कार्यक्रम व रणनीती ठरविण्यात आली. युवकांनी शिक्षणाचा त्याग करून पुढील आंदोलनात उतरावे, आणि गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी यादवी युद्ध, अराजक व क्रांतिमार्गाचाही मार्ग चोखाळावा, असे मेहेरअलींनी जोरदार आवाहन केले होते. युवक नेते व काँग्रेस समाजवादी पक्षाचे एक जनक आणि गांधी-नेहरूंचे निकटवर्ती म्हणून त्यांना मोठा मान होता. जनरल मोल्सवर्थच्या उपरोक्त दग्धभू धोरणानुसार पलायन करण्याच्या विचारात असलेल्या इंग्रज अधिकाऱ्यांना अटक करण्याचा इरादा मेहेरअलींनी मुंबईचे मेयर या नात्याने व्यक्त केला होता. पुण्यातील या शिबिरास गुप्तचरांनी ब्रेनस्टॉर्मिंग सेशन म्हटले होते.

२५ जुलै १९४२ च्या पुणे शिबिरात मेहेरअलींनी जे जोरदार प्रबोधन केले होते, त्याचे संक्षिप्त शब्दांकन मुंबई इलाख्याचा डी. आय. जी. ऑफ पोलीस याने करून ठेवले होते. ते मला राष्ट्रीय अभिलेखागारात आढळले. त्यातील काही भाग पाहा.—

"... As soon as the struggle is started it would take its own form. Let every Congressman do anything he thinks best... The struggle must be arranged to weaken the British rule in India......... He was thinking of exerting that right (as Mayor of Bombay) by arresting all the White officers under him on the ground that they had arranged to run away from India... Meherally instructed the workers about the ways of making the revolution effective, such as study of social psyche, knowledge of environment for sabotage, good organisation, net-work of spies working in the fold of the enemy and Fifth Column activity. Coming to the practical side of the movement he said that making a revolution is a science as well as an art. ............. All the Departments of the Government and semi-Government offices are going to come to a stop... First to break the fold of the enemy in confusion and disorder by asking the workers of the factories and stores of the Military and the Police to go on strike and to create an anti-British sentiment amongst army itself......... Do not consult Gandhi on each and every detail".[३५]

या गुप्त बैठकीनंतर एस. पी. कॉलेजच्या पटांगणावर झालेल्या विराट सभेतही मेहेरअली व इतर नेत्यांनी लोकांना लढ्यासाठी सर्वस्व पणाला लावण्याचे आवाहन केले होते. या सभेमुळे मुंबई इलाख्यातील नोकरशाही तेव्हा हबकली होती, असे दस्तऐवजांवरून दिसते. **बॉंबे क्रॉनिकलने** याचा निर्वाळा दिला होता.

ही तीन शिबिरे व जाहीर सभेनंतर आणखी एक गुप्त शिबिर पुण्यातीलच रामनारायण बंगल्यात मेहेरअलींच्याच मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. मुंबईतील अ. भा. काँ. समितीच्या अधिवेशनासाठी न जाता श्रीधर पुरुषोत्तम लिमये, केशव गोरे यांनी आयोजित केलेल्या या गुप्त शिबिरात महाराष्ट्रातील निवडक ६० जहाल कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांना मेहेरअली, पुरषोत्तम त्रिकमदास वगैरेंनी मार्गदर्शक तत्त्वे विशद केली व खास सूचना दिल्या. गुप्तचरांना नंतर कळले की, हे शिबिर ६ ते ८ ऑगस्ट दरम्यान भरले होते. या शिबिरातील सूचनांचे ९ ऑगस्टनंतर अनुपालन करण्यात आले, असा नंतर गुप्तचरांना प्रत्यय आल्यावाचून राहिला नाही. मुंबईच्या नोकरशाहीवर मेहेरअलींचा प्रभाव असल्याने त्यांच्या गुप्त कारवायांबद्दल गुप्तचरांनीदेखील सरकारला पूर्ण नावानिशी अहवाल त्वरित न पाठवता नंतरच पाठविला. पुढे तुरुंगात श्री. पु. लिमयेंनी दिलेल्या ऐतिहासिक जबानीवरून मेहेरअली, अच्युतराव व सरदार पटेलांच्या योगदानाविषयी व ऑगस्टमधील पुणे शिबिरांबाबतचे सत्य सरकारला व आम्हा इतिहासकारांना समजले.[३६]

संपूर्ण गांधी युगातील प्रत्येक आंदोलनात पुणे-सासवडच्या शंकरराव देवांनी आत्मसमर्पण भावना, निष्ठा, निरपेक्ष बुद्धी आणि अतिशय तडफदारपणे काम केले. **किंबहुना त्या युगात देवांइतके स्वातंत्र्यलढ्यासाठीचे मोठे कार्य दुसऱ्या कोणाही मराठी पुढाऱ्याने केले नाही, हे ऐतिहासिक सत्य होय. तरीही १९१७ पासूनची त्यांची निष्ठा, त्याग, बांधीलकी व कार्याचे श्रेय देवांना महाराष्ट्राने दिले नाही.** त्यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाचे महाराष्ट्राने न्याय्य मूल्यमापन केले नाही. तथापि सत्य हेच आहे की, १९४२ सालातील अटीतटीच्या काळात शंकरराव हे गांधीजींच्या पाठीमागे भक्कम उभे राहिले, अर्थात सरदार पटेलांच्या खालोखाल. विद्यार्थ्यांना आंदोलनात उतरवण्याचे त्यांचे कार्य इंग्रज पोलीस अधिकाऱ्यांनी नमूद करून ठेवलेले आहे. छोडो भारत आंदोलनाचे गांधीजी व समाजवाद्यांनी संकल्पन केल्यापासून ९ ऑगस्टला मुंबईत अटक होईपर्यंत शंकरराव देव आझाद मैदानापासून महाराष्ट्रभर जनप्रबोधन करण्यात

अग्रेसर होते. ‘ वर्धा ठराव ’ करण्यासाठी त्यांनी जिवाचे रान केले होते. त्याआधी टिळकपंथीय म्हणविणाऱ्यांवर त्यांनी विजय मिळविला होता. ब्राह्मणेतर पक्षीयांनाखील त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनात आणले होते. म्हणूनच कॉँग्रेसमध्ये शंकररावांना मोठा मान होता. १९४२ मध्ये तर ते विलक्षण आक्रमक होते. ब्रिटिश शासन गलितगात्र करण्यासाठी शंकरराव देवांनी मुंबईकर व युवकांना क्रांतिमार्ग अनुसरण्याचा सल्ला दिला होता. एका सभेत देवांनी म्हटले, “ This time it was not a ‘ moral ’ pressure as in 1940, but it would be a sort of a Rebellion. Mahatma Gandhi would emerge as *Bagi* on the day he launches the movement for the freedom of this country”. (Bombay Suburban District Magistrate’s Report, 25 July 1942).

## छोडो भारत संकल्पनेचा उगम

क्रिप्सच्या नाट्यप्रयोगानंतर एका सोमवारी रात्री बापूजींना ही कल्पना सुचली. आपले ब्रिटिश क्वेकर मित्र होरेस अलेक्झांडर यांना २२ एप्रिल १९४२ रोजी लिहिलेल्या पत्रात गांधीजींनी ही संकल्पना सर्वप्रथम मांडली. “ ऑर्डरली ब्रिटिश विथड्रावल... लीव्ह इंडिया टू इंडियन्स इन ॲन ऑर्डरली मॅनर, ” ही त्यातील मूलभूत संकल्पना होती. त्यानंतर २६ एप्रिलच्या **हरिजन** मधून त्यांनी ब्रिटिशांना आपले याबाबतचे तर्कशास्त्र कळविले. त्या दिवसापासून एखाद्या झपाटलेल्या माणसाप्रमाणे गांधीजी लेख, पत्रकारांना मुलाखती, सहकाऱ्यांशी चर्चा आणि भाषणांद्वारे या विषयाबाबत मते मांडू लागले. त्यांच्या राजकीय भूमिकेचा सारांश **:—**‘ दक्षिण-पूर्व आशियातील लोकांच्या युद्धकालिन यातना व शोकांतिकेची पुनरावृत्ती इंग्रजांनी इथे करू नये. सांप्रतचे युद्ध लोकशाहीच्या रक्षणासाठी नसून साम्राज्यवादाच्या शाश्वतीकरणासाठी आहे. अटलांटिक सनद हिंदुस्तान वगैरे देशांना लागू नाही, ही चर्चिलची घोषणा साम्राज्यवाद शाश्वत ठेवणारी आहे. ढोंगीपणा, असत्य व शोषण ही ब्रिटिश राजनीतीची मूलभूत तत्त्वे होत. ब्रिटिश भारतात असल्यामुळेच भारताला जपानी आक्रमणाचा धोका संभवतो. जपानचा धोका टाळण्यासाठीही इंग्रजांना येथून घालविणे आवश्यक !’

जनरल मोल्सवर्थचे 'दग्धभू धोरण' आणि पूर्वेकडून पश्चिमेकडे माघार घेण्याची (रिट्रीट) योजना पाहिल्यावर गांधीजींचा निर्धार अविचल झाला. हिंदुस्तानचे संरक्षण करण्यासाठी सरकारकडे पुरेशी युद्धसामग्री नाही, असे ब्रिटिश सेनानी व मुत्सद्दी स्वतःच कबूल करीत होते.

शिवाय जिनांच्या पाकिस्तानच्या मागणीला ब्रिटिशांचीच फूस होती. म्हणून हे मूळच उपटल्याशिवाय पाकिस्तानचा धोका टळणार नाही. म्हणून गांधीजी सांगत होते की, स्वातंत्र्यलढ्याला विलंब करणे म्हणजे विघटनकारी व विध्वंसक शक्तींना गती देणे होय. आंदोलनाची निकड पटवून देताना गांधीजींनी भारताला ठासून सांगितले :— "आता शरणागती पत्करली तर हे जग भारताची स्वातंत्र्याची मागणी साफ विसरून जाईल. युद्धानंतरच्या वाटाघाटीत आमची बाजू कमकुवत होईल. शिवाय आता संकटात असूनही ब्रिटिश साम्राज्यशहा स्वातंत्र्याची नुसती हमी देण्यासही तयार नाहीत. युद्धात विजय मिळाल्यावर तर ते अधिकच ताठर बनतील."

१९४२ साली ब्रिटिशांविरुद्धचा प्रक्षोभ वाढण्यास आणखीही बरीच कारणे होती. दक्षिण-पूर्व आशियातील युद्धात ब्रिटनची दारुण पीछेहाट झाली. जपानचे आक्रमण रोखणे अवघड दिसत होते. दक्षिण-पूर्व आशियातून माघार घेताना इंग्रजांनी उघडपणे वांशिक भेदभाव चालवला होता. त्यांनी तेथून सर्व गोऱ्या लोकांना सुरक्षित बाहेर काढले होते. मात्र कित्येक हजार भारतीय नागरिकांना व सैनिकांना दक्षिण-पूर्व आशियात वाऱ्यावर सोडले होते. निर्वासित झालेले अगणित भारतीय सैनिक व नागरिक जंगल व डोंगरांमधून पाय घासत व उपासमार सोसत हिंदुस्तानात आले. बर्मा युद्धात जखमी झालेल्या सैनिकांनी भरलेल्या गाड्या पूर्व हिंदुस्तानात येत होत्या. त्यामुळे भारतीयांना, अपवाद वगळता, महायुद्ध म्हणजे ब्रिटिशांनी लादलेले 'संकट वाटत होते'. महायुद्धामुळे जीवनावश्यक वस्तूंची टंचाई वाढून किमती भयंकर वाढल्या. सरकारविरुद्धचा प्रक्षोभ वाढला. ही वस्तुस्थिती पाहून गांधीजी अधिकच आक्रमक झाले!

क्रिप्स नाट्यप्रयोगाने गांधीजींचा ब्रिटिशांवरील अविश्वास अधिकच वाढविला. १९३९-१९४० मध्ये लेबर पक्षाचे नेते ॲटली व क्रिप्स यांनी लोकनियुक्त घटना समिती स्थापन करण्याचे व तिच्याकडे सत्तांतर करण्याचे आश्वासन दिले होते. सेवाग्रामला आले असतानाही क्रिप्स यांनी गांधीजींना तसे आश्वासन दिले होते. नंतरही क्रिप्स मिशन दिल्लीत असताना, ८ व ९ एप्रिल १९४२ रोजी त्यांनी काँग्रेस अध्यक्ष मौलाना आझाद व नेहरू यांच्याशी वाटाघाटी करतानादेखील घटना समिती व सत्तांतराचे आश्वासन दिले होते. तेव्हा कमिशनचे एक सदस्य व ऑक्सफर्ड विद्यापीठातील प्राध्यापक रेजिनाल्ड कूपलँड उपस्थित होते. तथापि क्रिप्सची वरिष्ठ साम्राज्यशहांनी फसवणूक केली. त्याला तोंडघशी पाडले. चर्चिल व अमेरी यांनी “ तुम्हाला तो अधिकार नाही ”, असे बजावले. त्यानुसार क्रिप्सने ‘ आपण तसे बोललो नाही,’ असे घुमजाव केले.[३७]

म्हणूनही ब्रिटिशांच्या आश्वासनांवर विश्वास ठेवणे व्यर्थ होय, अशी गांधीजींनी ठाम भूमिका घेतली.

वैयक्तिक सत्याग्रहातूनही जनमानसाचा प्रत्यय आलेलाच होता. त्यातून गांधीजींनी काँग्रेसजनांची नाडी परीक्षा केली होती. अगदी स्वयंप्रेरणेने २६,२०० पेक्षा जास्त कार्यकर्ते दोनदा वा तीनदा सत्याग्रह करून कारावास भोगून आलेले होते. एकूण परिस्थितीचा वेध घेऊन महात्मा गांधींनी छोडो भारत आंदोलन उभारण्याचा निर्णय घेतला.

शिवाय बॅ. जिना, वि. दा. सावरकर, मुंजे, बाबासाहेब आंबेडकर वगैरे सर्वच नेत्यांनी आपापल्या कारणासाठी क्रिप्स योजना फेटाळली होती. म्हणून ही योजना स्वीकारण्यास राजकीय कारणही नव्हते.

**मुंबईतील गोपनीय बैठक :—** महात्मा गांधींनी आपले आगामी क्रांतीचे तर्कशास्त्र विशद करण्यासाठी १५ मे १९४२ रोजी मुंबईत निवडक नेत्यांची बैठक घेतली. बाळासाहेब खेरांच्या विनंतीनुसार या बैठकीला गोपनीय ठेवण्यात आले होते. तथापि उपस्थित असलेल्या शराफ अथर अली यांनी कम्युनिस्ट मित्र पी. सी. जोशी यांना लिहिलेले पत्र गुप्तचरांनी हस्तगत केले. या पत्रातून

ब्रिटिशांना बापूजींचा क्रांतिलढ्याचा निर्धार व मनसुबे प्रथम समजले. **मात्र इतिहासकारांचे या महत्त्वाच्या बैठकीकडे लक्ष गेलेले नाही.** या बैठकीत बापूजी तब्बल ८५ मिनिटे आपले क्रांतीचे तर्कशास्त्र उलगडून दाखवित होते. त्यावर दिलखुलास प्रश्नोत्तरे झाली. अनेकांच्या शंकांचे त्यांनी निरसन केले.

या बैठकीत सरदार पटेल, खेर, भुलाभाई देसाई, मोरारजीभाई, स. का. पाटील, मेहेरअली, नेहरूंचे मेहुणे हाथीसिंग, शराफ अथर अली, द. ना. वांद्रेकर आणि मुंबई प्रांतिक काँग्रेसचे नेते उपस्थित होते. गुजरातचे काही नेतेही हजर होते.

बापूजींनी अंतःकरण उघडून पुढीलप्रमाणे प्रतिपादन केले :–लढा शक्यतो अहिंसेच्या संहितेनुसार असावा. तथापि परिस्थितीनुसार अराजक सुद्धा निर्माण होऊ शकेल! लढ्याविषयीचे मनोगत व्यक्त करताना बापूजी म्हणाले, ब्रिटिशांना तात्काळ घालविल्याविना भारताची गरिबी कमी होणार नाही. सध्याच्या हतवीर्य अवस्थेपेक्षा तर अराजक बरे! अराजकातूनही वेगळ्या प्रकारची सुव्यवस्था निर्माण होईल. त्यांचे शब्द पाहा, “आय से, लीव्ह इंडिया टू गॉड..........देअरफर आय से, लिव्ह इंडिया टू अनार्की. वुई शाल हॅव टू फेस इट....... आय ॲम प्रीपेअर्ड टू टेक एनी ग्रेट रिस्क”! बापूजींनी असा अविचल निर्धार केलेला होता.[३८]

भारत खंडातील या व्यापक जनआंदोलनासाठी सुयोग्य नारा आवश्यक होता. प्यारेलालजी यांच्या आठवणीनुसार गांधीजींशी बोलण्याच्या भरात एका अमेरिकन पत्रकाराने **क्विट इंडिया** हे शब्द वापरले व ते लोकप्रिय झाले. पण हे खरे नव्हे. साक्षेपी पत्रकार जी. गोपालस्वामी व प्रत्यक्षदर्शी असलेले शांतिकुमार मोरारजी यांनी या नाऱ्याची खरीखुरी व्युत्पत्ती दिलेली आहे. गेट ऑऊट वगैरे शब्द असभ्य वाटले. मात्र युसुफ मेहेरअली यांनी QUIT INDIA अक्षरे कोरलेला धनुष्यबाण बापूजींना सादर केला. क्षणार्धात बापूजी उद्‌गारले आमेन! म्हणजे तथास्तु. हाच क्रांतीचा नारा बनला.[३९]

समकालीन दस्तऐवज दाखवितात की, महात्मा गांधींची आक्रमक भूमिका आणि त्यांचा अनवरत व तुफानी प्रचार याचा काँग्रेस कार्यकर्ते आणि स्वातंत्र्यप्रेमी

जनतेवर विलक्षण प्रभाव पडत होता. गांधीजी झपाट्याने जनमानसात परिवर्तन करीत होते. अगतिकता दूर होऊ लागली. काँग्रेस कार्यकारिणी ठराव संमत करो वा न करो, गांधीजी व निकटवर्ती कार्यकर्ते लढा उभारणारच हा संदेश ८ जुलै १९४२ पर्यंत प्रसारित झाला होता. त्या दिवसांत गांधीजी लोकांच्या मनातील विचार बोलून दाखवित, असे नेहरूंनी **डिस्कव्हरी ऑफ इंडिया** या आपल्या ग्रंथात म्हटले आहे. 'आपले उर्वरित आयुष्य व्यर्थ जाणार की काय याची गांधीजींना जाणीव झाली. प्राप्त परिस्थितीला आपण शरण गेलो आणि आयुष्यभर जे ध्येय अत्यंत मोलाचे मानले, त्याच्या पूर्तीसाठी आपण आता ठोस कृती केली नाही तर, आपले सारे जीवनकार्य व्यर्थ ठरेल' असे त्यांना वाटत होते. जन्मभर उराशी बाळगलेले हिंदू-मुसलमान ऐक्यभावाचे स्वप्नही भंग पावण्याच्या मार्गावर होते. अशा जाणिवांमुळेही गांधीजी उद्रेक उभारण्यासाठी आतुर झालेले होते.[४०]

गांधीजींचा निर्णय ठाम व अपरिवर्तनीय होता. तसेच सरदार पटेल, राजेंद्र प्रसाद, अब्दुल गफारखान, शंकरराव देव, प्रफुल्ल घोष, कृपलानी, हरेकृष्ण मेहताब, पट्टाभी सीतारामय्या वगैरे निष्ठावंत सहकाऱ्यांचे गांधीजींच्या निर्णयाबाबत एकमत होते. सुमारे २७,००० गांधीवादी विधायक कार्यकर्ते सदैव तयारीत होते. काँग्रेस पक्षाच्या व्यतिरिक्त अ. भा. चरखा संघ, नयी तालीम संघ, हरिजन सेवक संघ, अखिल भारतीय खादी ग्रामोद्योग मंडळ आणि अगणित विधायक कार्य करणाऱ्या संघटना ही गांधीजींची स्वतःची प्रचंड ताकद होती. १९२० पासून हजारो कार्यकर्ते अशा संघटनांद्वारे लोकांच्या संपर्कात होते. असे कार्यकर्ते १९४२ च्या प्रारंभापासून गांधीजींचे मनोगत जाणून घेऊ लागले होते. या काळात काँग्रेस समाजवाद्यांची गांधीजींशी जवळीक चांगलीच वाढली होती. अच्युतराव पटवर्धन, मेहेरअली, डॉ. लोहिया, नरेंद्र देव, रामनंदन मिश्र, अशोक मेहता, सतीश दास, अन्नादा चौधरी वगैरे प्रचारात चांगलेच सक्रिय झालेले होते. महाराष्ट्रात काँग्रेस सेवादल व राष्ट्र सेवादल व युवकांच्या संघटना जनजागृतीसाठी प्रचार करू लागल्या होत्या.

मात्र प्रारंभी काँग्रेस कार्यकारिणीतील नेहरू, मौलाना आझाद, गोविंद वल्लभ पंत, बॅ. असफ अली, भुलाभाई देसाई व सय्यद महमूद यांच्या मनात छोडो भारत ठरावाच्या तातडीबद्दल संदेह होता. अलाहाबादच्या बैठकीत मतभेद होऊन गांधीजींच्या मूळ ठरावाचे, ते हजर नसल्याने, विरूपण करण्यात आले होते. यानंतर ७ ते १४ जुलै १९४२ असे आठ दिवस काँग्रेस कार्यकारिणीची वर्धा-सेवाग्राममध्ये बैठक झाली. या बैठकीतील मतभेदांची चर्चा करण्याचे हे स्थळ नव्हे. मात्र बोलण्याच्या ओघात गांधीजींनी काँग्रेस कार्यकारिणीला ठामपणे बजावले होते :— "तुमच्यापैकी कोणी आले नाही, तरी मी पुढे जाईन; लढ्यात ज्यांना सामील व्हायचे असेल त्यांना काँग्रेसने तसे स्वातंत्र्य द्यावे." महात्मा गांधी सडेतोडपणे गरजले होते.

आंदोलनाची चौकशी करणाऱ्या न्या. टी. डी. विकेंडेनच्या मते " Gandhi and the Congress were separate in the beginning, but they gradually merged into one, Congress putting itself under Gandhi's leadership so that there was a complete identification between them".[४१]

नागपूरचा हा इंग्रज न्यायाधीश वर म्हणतो त्यात बराच मोठा सत्यांश असला, तरी ते संपूर्ण सत्य नव्हे. साधकबाधक विचारांती ' वर्धा ठराव ' एकमताने संमत झाला. हा ठराव अ. भा. काँ. समितीने मुंबईतील ७-८ ऑगस्ट १९४२ च्या अधिवेशनात संमत करण्याचे ठरले होते.

मुस्लीम लीग व इतर जातीय पक्ष आणि सत्तास्थानांचे लाभार्थी, निहित हितसंबंधी पक्ष व इंग्रजी वर्तमानपत्रांनी या ठरावास अपेक्षेप्रमाणे विरोध केला. पूर्वाश्रमीचे राष्ट्रवादी टी. बी. सप्रू, एच. एन. कुंझरू, चिमणलाल सेटलवाड, श्रीनिवास शास्त्री, सावरकर, बॅ. जयकर यांनी विरोध केला. सप्रूंनी तर गांधीजींना राजकारणातून निवृत्त होण्याचा उफराटा उपदेश केला. पण ते सर्व प्रभावहीन झालेले होते. त्यांच्या विरोधाला किंमत नव्हती.

## मुंबईतील पूर्वतयारी

भारतातील कोणत्याही काँग्रेस समितीपेक्षा मुंबई प्रांतिक काँग्रेस समिती सर्वाधिक सुसंघटित, बांधीव, जागृत व श्रीमंत होती. या समितीने आधीपासूनच लढ्याची तयारी चालविली होती. बी. पी. सी. सी. वर सरदार पटेल व गांधीजींचा

सतत वरदहस्त होता. या संघटनेवर त्यांची सतत नजर व मार्गदर्शन असे. पटेल व स.का.पाटील यांचे एकमेकांवर विलक्षण प्रेम होते. पटेलांचा प्रत्येक आदेश पाटील अमलात आणत. एके काळी पाटील हे बॅ. जिनांचेही मित्र होते. गांधीजी पाटलांना मुंबईचा बादशहा म्हणत. बी. पी. सी. सी. मध्ये कार्यकुशल संघटकांची मालिका होती :—युसुफ मेहेरअली, खेर, नगिनदास मास्टर, बाबुभाई चिनाई, बी. आर. धुरंधर, दायाभाई पटेल, अबिदअली जाफरभाई, सालेभाई अब्दुल कादर, भानुभाई याज्ञिक, पी. आर. लेले, केशव तळपदे, सयाजीराव सिलम, सदाशिव महाडेश्वर, डॉ. त्र्यंबक नरवणे, डॉ. गिल्डर इत्यादी. या सर्वांच्या अनेक संघटना व मंडळे होती. विशेषतः मुंबईचे वकील, व्यापारी, व्यापारी संघटना व समाजकल्याण संघटना त्यांच्या प्रभावाखाली होत्या. उदाहरणार्थ, बाळासाहेब खेरांची इंडियन सिव्हिल लिबर्टीज युनियन, बॉंबे लिगल एड सोसायटी, आदिवासी सेवा मंडळ, महाराष्ट्र हरिजन सेवक संघ, सोशल सर्व्हिस लीग व सेवा दल अशा त्यांच्या अनेक संस्था होत्या.

स. का. पाटलांचा मुंबईतील व्यापारी जगतावर मोठा प्रभाव होता. सरदार पटेल व पाटलांच्या इशाऱ्यानुसार कॉंग्रेसला निधी मिळत असे. सर्वात मोठे ‘फंड-रेझर’ अशी त्यांची भारतात ख्याती होती. बी. पी. सी. सी. ने जानेवारी १९४२ च्या शेवटी पीपल्स व्हॉलंटिअर बिग्रेड (पी.व्ही.बी.) ही प्रचंड संघटना उभारली होती. नागरी संरक्षण हा तिचा घोषित उद्देश असला, तरी ही लाठीधारी कॉंग्रेस स्वयंसेवकांची प्रशिक्षित अशी संघटना होती. स्वतः स. का. पाटील या संघटनेचे सरचिटणीस, तर अशोक मेहता जी. ओ. सी. व डॉ. एम. डी. डी. गिल्डर मुख्य वैद्यकीय अधिकारी होते. या संघटनेने मुंबईत दहा हजार कॉलेज विद्यार्थी व युवकांची प्रशिक्षित सेना उभारली होती. तिचे मुख्यालय विठ्ठलभाई पटेल रोडवरील कॉंग्रेस भवनात होते. तिच्याकडे ७९,४२० रुपयांचा निधी असून ही संघटना आगामी क्रांतिलढ्यासाठी लोकमत जागृतीचे कार्य करीत असल्याचे गुप्तचरांचे अहवाल मुंबई सरकारकडे आले होते. त्यामुळे अशोक मेहतांवर गुप्तचरांनी खास नजर ठेवली होती.

युसुफ मेहेरअली, अच्युतराव पटवर्धन, डॉ. लोहिया, पुरषोत्तम त्रिकमदास, अशोक मेहता, एम. आर. मसानी, कमला चट्टोपाध्याय, एच. आर. पार्डीवाला, पीटर अल्वारिस, नारायणस्वामी, एम. एल. शहा वगैरे मुंबईतील काँग्रेस समाजवादी नेते लढ्यासाठी १९४२ च्या प्रारंभापासूनच आक्रमक झालेले होते. त्यांच्यापैकी बरेच जण मुंबई प्रांतिक काँग्रेस समाजवादी पक्ष समिती तसेच बी. पी. सी. सी. चेही पदाधिकारी वा सभासद होतेच. गांधीजींनी त्यांचा प्रारंभापासूनच खास उपयोग करून घेतला होता. डॉ. राम मनोहर लोहिया मुंबईतील मारवाडी विद्यालयाचे विद्यार्थी असून १९२५ साली ते मुंबई विद्यापीठातून मॅट्रिक झालेले होते. काँग्रेस कार्यकरिणीचा वर्धा ठराव संमत होण्यापूर्वीच काँग्रेस समाजवादी नेते ठिकठिकाणी समांतर शासन यंत्रणा उभारण्याच्या योजना आखत होते. आंदोलनाचा प्रचार करण्यात ते आघाडीवर होते. मुंबईत पी. व्ही. बी व राष्ट्र सेवादलाचे संचलन होत असे.

पुरषोत्तम त्रिकमदास ऊर्फ पी. टी. मुंबई प्रांतिक ट्रेड युनियन काँग्रेसचे उपाध्यक्ष आणि आयटकचे पदाधिकारी असल्याने कामगार वर्गातही त्यांना मानाचे स्थान होते. समाजकार्य व पक्षकार्यासाठी ते उदारपणे पैसे देत. त्यामुळे व संघटन कुशलतेमुळे पी. टी. यांनी १९४२ च्या आंदोलनासाठी चांगले अनुकूल वातावरण निर्माण करून ठेवले होते. गांधीजींच्या सूचनेनुसार अच्युतरावांना काँग्रेस कार्यकारिणीचे स्वीकृत सदस्य म्हणून नेमण्यात आलेले होते. मेहेरअली वगैरे सर्वच काँग्रेस समाजवादी पुढारी १९४२ मध्ये गांधीजींच्या निकटतम होते. त्यांनी अगदी स्वयंप्रेरणेने ५ ऑगस्ट १९४२ रोजी पी. टी. यांच्या मलबार हिलवरील घरी एकमताने निर्णय घेऊन काँग्रेस समाजवादी पक्ष काँग्रेसमध्ये विलीन केला— गांधीजींचे हात बळकट करण्यासाठी आणि छोडो भारत लढा यशस्वी करण्यासाठी!

सोफिया खान, खुर्शिदबेन नौरोजी, कमलादेवी चट्टोपाध्याय, मृदुला साराभाई, अमतुल सलाम, शांताबाई वेंगसरकर, उषा मेहता, उर्मिला मेहता, सौ. केशव बोरकर इत्यादींचा **देश सेविका संघ** या मुंबईतील महिला संघटनेला हिंदुस्तानात तोड नव्हती. या संघटनेच्या सुमारे ५०० सभासद असून त्यांनी सेवादलाचे

रीतसर प्रशिक्षण घेतलेले होते. सोफिया खान या डॉ. खानसाहेबांच्या सून होत्या. खुर्शिदबेन नौरोजी (दादाभाई नौरोजी यांची नात) या तर गांधीजींच्या निष्ठावंत व धडाडीच्या शिष्या होत्या. १९४२-४३ मध्ये त्या निःशस्त्र क्रांतिकारक बनल्या. १९३९-१९४१ मध्येही खुर्शिदबेन यांनी अत्यंत बिकट परिस्थितीत वायव्य सरहद्द प्रांतात प्राणाची बाजी लावून विलक्षण धडाडीने प्रांतिक सरकारला हैराण केले होते. छोडो भारत आंदोलनात खुर्शिदबेन भूमिगत राहून क्रांतिकार्य करीत राहिल्या. बंगाल व बिहारमधील कोळशाच्या खाणींमधील उत्खनन व वाहतूक बंद पाडून त्यांनी ब्रिटिशांना अक्षरशः हैराण केले होते. मुंबईच्या या शूर कन्येचा मराठी लेखकांनी अनुल्लेख करून इतिहासावरही अन्याय केलेला दिसतो. त्या काळात सरहद प्रांत, बंगाल, बिहार व मुंबईमध्ये खुर्शिदबेन यांच्यामागे पोलिसांचा अविरत ससेमिरा होता. याविषयीचे कित्येक सरकारी दस्तऐवज मी पाहिलेले आहेत. त्याविषयी पुढील प्रकरणात उल्लेख करण्यात येईल.

देश सेविका संघ ही काँग्रेसची महिला आघाडी असून आंदोलनात तिचा युवकांच्या विविध संघटनांशी समन्वय होता. हरताळ, निदर्शने, प्रचार साहित्य, काँग्रेस बुलेटिन व संप घडवून आणण्यासाठी या संघटनांचा उपयोग करून घेण्यात आला.

सुभाषबाबू परागंदा झाल्यावर रामभाऊ रुईकर, हरीभाऊ वि. कामथ, सेनापती बापट, ॲड. केशव श्यामराव तळपदे, गिरधर ठक्कर, मुकुंदलाल सरकार, गौरीशंकर भट्ट, मूलशंकर व्यास, शिवाजी पटवर्धन व बिडेश कुलकर्णी हे फॉरवर्ड ब्लॉकच्या वतीने स्वातंत्र्य आंदोलनाचा प्रचार करू लागले. अ. भा. विद्यार्थी परिषदेचे नेते एम. एल. शहा व तळपदे फॉरवर्ड ब्लॉक व काँग्रेस दरम्यान समन्वय साधत असत. मुकुंदलाल सरकार ३१ मे १९४३ रोजी मुंबईत पकडले गेल्यावर गुप्तचरांनी या पक्षाची येथील संघटना मोडून काढली. मात्र तोपावतो हा पक्ष मुंबईत सक्रिय होता. रामभाऊ रुईकरांचे पोलिसांनी इंटरसेप्ट केलेले पत्र व त्यातील विधान खूप बोलके आहेः- "Forward Block has been declared unlawful, but is reborn through the Congress Working Committee".[४२]

सरकारने रॉयवादी कामगार नेत्या मणिबेन कारा यांना देऊ केलेले कामगार सल्लागाराचे सरकारी पद रघुनाथ निंबकरांनी मिळविले. नंतर ते कम्युनिस्ट किंवा कामगार पुढारी राहिले नाहीत. ७ ऑगस्ट १९४२ पावेतो सुटलेल्या कम्युनिस्टांपैकी श्रीनिवास सरदेसाई, के. एम. अश्रफ, सज्जाद जहीर वगैरे १३ जणांनी मुंबई काँग्रेस अधिवेशनात छोडो भारत ठरावास विरोध करणाऱ्या उपसूचना मांडल्या. मात्र त्यांचा दणदणीत पराभव तर झालाच, पण त्यापेक्षा त्यांनी राष्ट्राची सहानुभूती गमावली !

❑❑

## संदर्भ


१. फ्रँसिस हचिन्स, **स्पाँटॅनिअस रिव्हॉल्युशन : द क्विट इंडिया मुव्हमेंट**, दिल्ली, १९७१, पृ. १८८.

२. बिपन चंद्रा, **इंडियाज स्ट्रगल फॉर इंडिपेंडंस**, पृ. ४५०-५२.

३. सुमित सरकार, **मॉडर्न इंडिया : १८८५-१९४७**, पृ. ३७७-८०.

४. एम. सी. छागला, **रोझेस इन डिसेंबर : अॅन ऑटोबायोग्राफी**, मुंबई, १९७४, पृ. १०२,१०७.

५. के.के. चौधरी, **पीएच. डी. पदवी प्रबंध,** मुंबई विद्यापीठ, १९९०, पृ. ६७,८५,८८.

६. कित्ता, पृ. ८८–८९, ११०-१४.

७. कित्ता, पृ. ८३-८५.

८. हिदुस्तान सरकार, होम पोलिटिकल (आय), फाईल क्र. ७/२/४२,१९४२,**अनमास्क्ड पार्टीज अँड पॉलिटिक्स** पत्रकातील उतारा.

९. कित्ता फाईल, **कम्युनिस्ट** पत्रक, फेब्रुवारी १९४१ अंकातील उतारा.

१०. कित्ता, फाईल क्र. ७/२३/४३, १९४३.

११. चौधरी, **क्विट इंडिया रिव्हॉल्युशन**, मुंबई, १९९६, पृ. १८९-९४.

१२. कित्ता, पृ. १८९.

१३. हिंदुस्तान सरकार, होम पोलिटिकल (आय), फाईल क्र ७/२/४२, १९४२.

१४. कित्ता.

१५. कित्ता.

१६. कित्ता, फाईल क्र. ७/२३/४३.

१७. चौधरी, उपरोक्त, पृ. १९२-९३.

१८. कित्ता, पृ. १९२-९३.

१९. चौधरी, **वर्धा जिल्हा गॅझेटिअर**, १९९२, पृ. ८४-८५.

२०. बिपन चंद्रा, उपरोक्त, पृ. ४५३-५४.

२१. चौधरी, **हिस्टरी ऑफ बाँबे**, पृ. २६४-६५.

२२. हिंदुस्तान सरकार, होम पोलिटिकल (आय.), फाईल क्र. ३/६/४२, १९४२.

२३. **ट्रान्सफर ऑफ पॉवर : १९४२-७**, निकोलस मॅनसर्घ व ई. डब्ल्यू. आर. लुंबी (संपा.), खंड एक, पृ. १७३-७५

२४. कित्ता, पृ. १२९-३०.

२५. मुंबई सरकार, होम डिपार्टमेंट स्पेशल, फाईल क्र. ५४३(१३) बी(४) १९४१-४२-४३.

२६. हिंदुस्तान सरकार, होम पोलिटिकल (आय.), फाईल क्र. १२/२/४२, १९४२.

२७. नेहरू मेमोरिअल संग्रहालय, नवी दिल्ली, फाईल क्र. जी. ३१ (पी २), १९४२.

२८. हिंदुस्तान सरकार, होम पोलिटिकल (आय.), फाईल क्र. १६६/४२, १९४२. युसुफ मेहेरअलींचे गृहमंत्री यास पत्र, १५ मे १९४२.

२९. **ट्रान्सफर ऑफ पॉवर**, खंड दोन, पृ. ४०६.

३०. **नागपूर टाइम्स,** १२ सप्टेंबर १९४१.

३१. **ट्रान्सफर ऑफ पॉवर**, खंड एक, दस्तऐवज क्र. ६०.

३२. कित्ता, दस्तऐवज क्र. २४६.

३३. **टाइम्स ऑफ इंडिया**, २३, २८ जुलै १९४२.

३४. लुई फिशर, **इंपिरिआलिझम अन्मास्कड**, पृ. २६-२७.

३५. डी.आय.जी., पुणे याचा मध्यवर्ती गृहसचिवास अहवाल, राष्ट्रीय अभिलेखागार.

३६. चौधरी, **क्विट इंडिया रिव्हॉल्युशन,** पृ. ३०१-०२

३७. फिशर, उपरोक्त, पृ. २४-२७.

३८. हिंदुस्थान सरकार, होम पोलिटिकल (आय.), फाईल क्र. ३/७९/४२, १९४२, इंटरसेप्ट केलेले पत्र.

३९. चौधरी, **हिस्टरी ऑफ बाँबे,** पृ. २६७.

४०. जवाहरलाल नेहरू, **डिस्कव्हरी ऑफ इंडिया**, नवी दिल्ली, १९९६, पृ. ४७१-७६.

४१. **विकेंडेन रिपोर्ट ऑन क्विट इंडिया मुव्हमेंट,** संपा., पी. एन. चोप्रा, नवी दिल्ली, १९७६, पृ. २९.

४२. चौधरी, **क्विट इंडिया रिव्हॉल्युशन,** पृ. २४-२८, ३१-४२, ३१६-१७. रुईकरांनी हेमंतकुमार बोस यांना लिहिलेले पत्र. गुप्तचरांनी इंटरसेप्ट केले होते.

प्रकरण १९

# छोडो भारत क्रांतिलढा

## आंदोलनाचा संकल्प

भारतावरील सार्वभौम सत्ता शाश्वत ठेवण्याची व महात्मा गांधींशी झटापट (ग्रॅपल) करण्याची चर्चिल महोदयांची मनीषा सर्वश्रुत होती. डिव्हाइड अँड रूल या सनातन नीतीनुसार आत्मपरिरक्षण करण्याची चिवट कलोनिअल वृत्ती नवीन नव्हती. तसेच काँग्रेसचा संपूर्ण स्वातंत्र्याचा निर्धारही नवा नव्हता! मात्र या निर्धाराला १९४२ साली गांधीजींच्या भाषणांनी व लेखनाने नवीन निकड, अफाट उत्कटता व ताकद प्राप्त करून दिली. आपले साम्राज्य शाबूत ठेवण्यासाठी ब्रिटनने दोन लाख भारतीय सैनिकांना प्राणांची बाजी लावण्यास भाग पाडले होते. अगणित किमतीची भारतीय साधनसामग्री व अन्नधान्य भारताच्या अनुमतिशिवाय हस्तगत केले होते. मात्र तरीही भपकेबाज, अवडंबरी अटलांटिक चार्टरचे तिसरे कलम ‘ हिंदुस्तानला लागू नाही, ’ असे चर्चिल यांनी पार्लमेंटला सांगितले होते. हा डंख गांधीजींच्या जिव्हारी लागला होता!

गांधीजी व्यापक आंतरराष्ट्रीय सम्यक्‌दृष्टीनेही (परस्पेक्टीव्ह) विचार करीतच होते, पण भारताच्या भूमिकेतून! त्यांची मूलभूत भूमिका आंतरराष्ट्रवादापेक्षा राष्ट्रवादाचीच होती. ब्रिटनच्या सत्तावादाचा व दडपशाहीचा प्रतिकार! त्यांच्या मते आता शरणागती पत्करल्यास भारताचे स्पिरिट नष्ट होईल. म्हणून कलोनिअल राजनीतीमधील दांभिकपणा व असत्य गांधीजी उघड करू लागले. त्याविषयीची विलक्षण चीड त्यांच्या मनात घर करून होती. सांप्रतचे युद्ध लढण्यासाठी ब्रिटिशांपाशी नैतिक अधिष्ठानच नव्हते. याच वेळी ब्रिटिश राज हे जपानच्या भारतावरील संभाव्य आक्रमणासाठी एक निमित्त होते. म्हणून ब्रिटिशांच्या गच्छंतीने एक आमिष तरी दूर करणे बापूंना आवश्यक वाटले.

१९४२ साली विरोधाभासात्मक परिस्थिती उद्‌भवली होती. ‘दीडशे वर्षांपासून गुलाम असलेल्या हिंदुस्ताननने तक्रार न करता गुलामीच पत्करावी, पण गुलाम

इंडियाने हिटलर व जपानशी प्राणपणाने लढावे आणि जुन्या आक्रमक इंग्लंडला अभय द्यावे ! त्यासाठी भारताने त्याग व आत्मबलिदान करावे, हजारो प्राणांचे मोल द्यावे !' असे इंग्लंडचे उफराटे, स्वार्थी तर्कशास्त्र होते. अशा विरोधाभासात्मक व अरिष्टसूचक परिस्थितीत गांधीजी व भारतापुढे एकमेव पर्याय होता—जुन्या कलोनिअल आक्रमकाविरुद्ध लढा देऊन नवीन आक्रमकापासून बचाव करणे.

त्यानुसार बापूजींनी भारताला बजावले, 'आता शरणागती पत्करली तर सनातन साम्राज्यवादी राजसत्ता व महत्त्वाकांक्षा अधिक प्रभावी होतील आणि भारताची बाजू कमजोर होईल. इंग्लंड संकटात असताना जर त्याला नमवले नाही, तर नंतर तो देश शिरजोर होईल. आता धडक मारली नाही, तर युद्धोत्तर वाटाघाटींमध्ये साम्राज्यवादी देश त्यांचेच हितसंबंध सुरक्षित ठेवतील. परिणामतः जग भारताची स्वातंत्र्याची मागणी साफ विसरून जाईल.' नेहरूंनी म्हटल्याप्रमाणे, गांधीजी यांना भारत देश मातृभूमीपेक्षाही अधिक प्रिय वाटे. जगातील शोषित व वसाहतवाद्यांनी पीडित अशा देशांचे भारत हे प्रतीक होते ! भारत जर गुलामीत राहिला तर सर्व कलोनिअल देशही गुलामगिरीतच खितपत पडतील, अशी महात्मा गांधींची धारणा होती.

गांधीजींची भाषणे व लेखांमुळे देशाचा मूड झपाट्याने बदलला. दुर्मुखलेपणा, दुबळेपणा आणि निष्क्रियतेची जागा चैतन्य, अपेक्षा व उत्तेजित अवस्थेने घेतली. काँग्रेस पक्षाचा निर्णय वा आदेशासाठी 'युवक' थांबणार नव्हते. बापूजींच्या शब्दांनी आणि तर्कशास्त्राने घटनांना गती मिळाली. बापूजी बरोबर का चूक, पण त्यांनीच जनतेचा मूड घडविला होता. याबाबतचा नेहरूंचा अभिप्राय तळटीपमध्ये दिला आहे.[१]

छोडो भारतला विरोध करणाऱ्या राजगोपालाचारींना गांधीजींनी काँग्रेसचा व मद्रास विधानसभेचाही राजीनामा देण्यास भाग पाडले होते. मुंबईच्या भुलाभाई देसाईंनाही राजीनामा द्यावा लागला. सुरुवातीला ठरावाबाबत ठाम भूमिका न घेणाऱ्या मौलाना आझादांनाही काँग्रेस अध्यक्षपद सोडून कार्यकारिणीचे नुसते सभासद राहण्याचा गांधीजींनी सल्ला दिला होता. मात्र हा प्रश्न १३ जुलैलाच

मिटला. ब्रिटिशांनी गच्छंती करावी, याबाबत पुनर्विचारास गांधीजींनी वाव ठेवलाच नाही. जरी सर्वच प्रजाजनांनी अहिंसा अंगीकारली नाही, तरी अहिंसेचा स्वीकार होईपर्यंत प्रतीक्षा न करता प्रत्यक्ष कृती करण्याचा त्यांचा निर्धार होता. बापूंनी राष्ट्रीय युवक संघास सांगितले, "I will prefer anarchy to the present system of administration because this ordered anarchy is worse than real anarchy. I am sure that the anarchy created by our efforts to mitigate this dangerous anarchy will be less dangerous. The violence exerted then would be just a trifle compared to the existing violence." ...... "I would prefer anarchy to the present slavery and consequent impotence of India". (Collected Works of Mahatma Gandhi, Vol. seventy-six, pp.160, 237). हे वाक्य त्यांनी लंडनस्थित रायटर वृत्तसंस्थेच्या वार्ताहरास ऐकवले होते.

वर्धा ठराव संमत झाल्यावर सायंकाळी झालेली पत्रकार परिषद तसेच १५ जुलैच्या विदेशी पत्रकारांच्या परिषदेतही गांधीजींनी छोडो भारत क्रांतिलढ्याची भूमिका व स्वरूप विशद केले होते. आंदोलनाच्या देश-विदेशातील विरोधकांनी तेव्हा गांधीजींची तुलना हिटलरशी केली होती. मात्र हिटलरशी तुलना हा भयंकर सत्यापलाप होता. काहींनी काँग्रेसला हिंदू जायीतवादी पक्ष म्हटले. काँग्रेस प्रो-ॲक्सिस म्हणजे अक्षराष्ट्रधार्जिणा पक्ष असल्याचाही आरोप झाला. तथापि गांधीजींनी प्रत्येक आरोपाला समर्पक उत्तर दिले होते. जपानचा भारतावरील संभाव्य मोठा हल्ला टाळण्यासाठी आणि आपला प्रामाणिक सद्भाव सिद्ध करण्यासाठी, ब्रिटिशांच्या गच्छंतीनंतर, दोस्तराष्ट्रांचे सेनादल भारतात ठेवण्यास काँग्रेसने जाहीर संमती दर्शविली होती. यूनोच्या सर्व प्रयत्नांमध्ये सामील होण्याचेही आश्वासन दिले होते. मात्र भारताची मागणी मूलभूत स्वरूपाची असून राष्ट्रीय अस्तित्वासाठी अपरिहार्य आहे, असे गांधीजींनी ब्रिटनला बजावले. "This is an open rebellion of a non-violent character. There is no question of last chance ...... There is no room

left for negotiations in the proposal for withdrawal ". (Ibid, pp. 295, 297).

**व्हाइसरॉयशी संपर्क साधण्याचा प्रयत्न :—**लिनलिथगोंना भावी आंदोलनाची जाणीव करून देण्यासाठी गांधीजींची दूत म्हणून मिस मॅडेलेन स्लेड ऊर्फ मीराबेन १७ जुलै १९४२ रोजी दिल्लीला गेल्या. मात्र गांधीजींनी व्हाइसरॉयसाठी संदेश दिलाच नव्हता. उर्मट लिनलिथगोंनी त्यांना भेट नाकारली. पण त्यांचे खाजगी सचिव लेथवेट यांनी मीराबेनचे म्हणणे काळजीपूर्वक ऐकले. आपले अंतःकरण खुले करून गांधीजींनी मीराला पढवून ठेवले होते. त्यामुळे मीराबेनच्या प्रभावी विधानांमधील तीव्रता आणि आर्जवी ताकद लेथवेटला पूर्णतः जाणवली होती.

**मीराबेन यांनी स्पष्ट केले :—" भारताला लगेच स्वातंत्र्य देण्याची महात्मा गांधींची मागणी पूर्णतया स्वीकारणे हाच सद्यःस्थितीत एकमेव मार्ग आहे. वेगाने ढासळत असलेली स्थिती अन्यथा सावरणे अशक्य! तुम्हाला कल्पना नसेल इतके लोकमत ब्रिटिशविरोधी बनलेले आहे.** विद्यमान सरकारने लोकांना इतके गांजले (टॉर्चर) आहे की, काँग्रेसदेखील लोकांना आवरू शकणार नाही. म्हणून आपण ब्रिटिशांनी परिस्थितीला आवर घालण्यासाठी कृती केली पाहिजे. *ब्रिटिश सरकार स्फोट न झालेल्या बाँबवर बसलेले असून हे तुमच्या लक्षात येत नाही !* काँग्रेसला मात्र वस्तुस्थितीचे भान आलेले आहे. जनतेची सहनशक्ती संपली आहे. म्हणून जनता आता जिंकू किंवा मरू अशा मनःस्थितीत आहे. सरकार गांधीजींवर जितकी बंधने लादेल तितकी त्यांची ताकद वाढेल."

मीराबेन यांनी इशारा दिला—" ब्रिटिशांनी भारताला स्वातंत्र्य द्यावे अथवा बापूंना ठार मारावे. मात्र त्यांना ठार मारल्यास ब्रिटिशांना या देशात राहणे अशक्यच होईल. " ......... " यू डू नॉट नो द फोर्स ऑफ द स्पिरिट इन हिम अँड व्हॉट इट मिन्स टू द इंडियन मासेस." मीराबेनची ही धमकी नव्हती, पण त्यांनी सरकारला पुढील शोकांतिकेची कल्पना दिली! या खेपेला तुरळक हिंसाचार झाला, तरी गांधीजी लढा थांबवणार नाहीच, अशीही त्यांनी ताकीद देऊन ठेवली.

सर्वोच्च सत्ताधीशाशी झालेल्या या निर्वाणीच्या संवादाचे महत्त्व फार मोठे मानावे लागते. मीराबेनच्या मर्मभेदी इशाऱ्यांचा दोन पानांचा गोषवारा मार्क्विस ऑफ लिनलिथगोंनी लगेच दुसऱ्या दिवशी सकाळी भारतमंत्री अमेरी यांस तार पाठवून कळविला होता.[२]

वस्तुतः काँग्रेसने छोडो भारत ठरावात अहिंसेच्या धोरणाबाबत पुच्छगमन केलेले नव्हते किंवा धोरणातील बदल ध्वनितही केलेला नव्हता. नाझीझम व फॅसिझमचा अत्यंत स्पष्ट व कडक शब्दांत निषेधच केलेला होता. भारताचे स्वातंत्र्य घोषित केल्यास संयुक्त राष्ट्र संघाच्या युद्धप्रयत्नांना सर्वतोपरी साथ व मदत देण्याचे ठरावात नमूद होते. काँग्रेसशी तडजोड करण्यास अमेरिकन राष्ट्राध्यक्ष व अमेरिकन लोकमत अनुकूल होते. काँग्रेसच्या ठरावातील कोणता भाग क्षोभक वाटला हे लिनलिथगोंनी सांगितले नाही. तसेच दुसऱ्या कोणाही इंग्रजाने ठरावातील दोष दाखवून दिला नव्हता. शिवाय ८ ऑगस्टच्या रात्री ठराव पास झाल्यावर लिनलिथगोंशी आपण वाटाघाटी करू, पण त्यांत यश न आल्यास लढा सुरू करू, असे गांधीजींनी भरसभेतच जाहीर केले होते. तथापि इंग्रजांनी काँग्रेसचे सौजन्य, सद्भाव इत्यादी बाबींची दखलही न घेता भयंकर युध्यमान व आक्रमक पवित्रा घेतला. याबाबत खाली स्वतंत्ररीत्या विवेचन केले आहे. तर्कशास्त्राची कसोटी लावून पाहता काँग्रेसच्या ठरावात तिळमात्रही अविचार नव्हता. त्याचे विखंडन करण्याचा सत्ताधीशांनी देखील प्रयत्न केला नव्हता. पण तरीही इंग्रजांनी घायकुतीस येऊन काँग्रेसवर पर्ल हार्बर टाईप निकराचा हल्ला करणे अतिरेकीपणाचे, निदान अविवेकीपणाचे तरी होते.

तथापि भारतमंत्री लॉर्ड अमेरी आक्रमक पवित्र्यात होते. “गांधींनी आंदोलन सुरू करताच त्यांना व इतर पुढाऱ्यांना, माझ्या सूचना मिळण्याची प्रतीक्षा न करता, तात्काळ अटक करावी आणि हिंदुस्तानपासून लांब कोठेतरी पाठवून द्यावे. शिवाय राजकीय दृष्टीने त्यांना निकामी करावे,” असे अमेरींनी लिनलिथगोंना कळविले.[३] सत्तापिपासूंच्या मनात इतका विखार होता. हिंदुस्तान सरकारने मात्र अमेरींना वेगळे उत्तर दिले. वर्धा ठरावाचे निमित्त करून काँग्रेसविरुद्ध तात्काळ कारवाई करण्याचा निर्णय घेतला.

## आंदोलनाची पूर्वतयारी

मुंबई अधिवेशन संपन्न होईपर्यंत गांधीजी अथवा काँग्रेस कार्यकारिणीने आंदोलनासाठी तपशीलवार व नेमका वा निश्चित असा कार्यक्रम विहित केलेला नव्हता. पट्टाभी सीतारामय्या व राम मनोहर लोहिया यांनी असा निर्वाळा दिला आहे. या विद्रोहाची वस्तुनिष्ठ चौकशी करण्यासाठी ब्रिटिश सरकारने नेमलेल्या न्यायमूर्ती टी. डी. विकेंडेन यांनीही निर्वाळा दिला की, अधिवेशनापर्यंत नेमका कार्यक्रम आखलेला नव्हता. या आय. सी. एस. न्यायमूर्तींच्या मते " Gandhi deliberately avoided doing this, because he was working for a situation where the people would take charge and give effectiveness to directions which would be made known only at the psychological moment." विकेंडेनच्या मते यापूर्वीच्या प्रत्येक आंदोलनातील कार्यक्रम अमलात आणावा आणि वेळेवर सुचेल ते सर्व करावे अशा सूचना होत्याच. ८ ऑगस्टला रात्री अधिवेशन समाप्त होताना पुढील घोषणा झाली :– " पुढील सूचना जनतेपर्यंत पोचणे शक्य न झाल्यास, आंदोलनात सहभागी होणाऱ्या प्रत्येक स्त्री-पुरुषाला स्वतःचेच मार्गदर्शक व्हावे लागेल. आणि आजवर ज्या सूचना दिल्या त्यानुसार काम करावे लागेल. " मात्र " डू ऑर डाय " हेच मार्गदर्शक तत्त्व बिंबवण्यात आले.[४]

वर्धा ठरावानंतरच्या २५ दिवसांच्या मध्यन्तरात भारतभरचे काँग्रेस कार्यकर्ते उत्कटतेने आंदोलनाचा प्रचार करीत होते. नियोजन करत होते. महाराष्ट्रात सरदार पटेल, मेहेरअली, स. का. पाटील, बा. गं. खेर, शंकरराव देव, न. वि. गाडगीळ, नाना पाटील, अच्युतराव पटवर्धन, गो. आ. देशपांडे, रविशंकर शुक्ला, मगनलाल बागडी, व्ही. एस. दांडेकर वगैरे उद्बोधक भाषणांनी वातावरण- निर्मिती करीत होते. प्रत्येक जिल्ह्यात व मोठ्या शहरात प्रचाराची रणधुमाळी सुरू होती. गव्हर्नर रॉजर लम्ले यांनी लिनलिथगोंना पाठविलेल्या अहवालात स्पष्ट निर्वाळा दिला होता की, आंदोलनासाठी मुंबईत अफाट उत्साह, आस्था व जोष निर्माण करण्यात सरदार पटेल सर्वस्वी यशस्वी झालेत. त्यांनी येथील विद्यार्थी वर्गाला आंदोलनासाठी

सक्रिय करण्यावर खास लक्ष केंद्रित केले होते. शहरात पटेलांच्या जंगी सभा गाजत राहिल्या. शिवाय त्यांनी कित्येक खासगी बैठका घेऊन मुंबईतील कार्यकर्त्यांना मार्गदर्शक सूचना दिल्या. या आंदोलनात अहिंसा कटाक्षाने पाळली जाणार नाही, असे पटेलांनी अहमदाबादनंतर मुंबईतील एका बैठकीतही सांगितल्याचा लम्लेंनी निर्वाळा दिला. मुंबईच्या चौपाटीवर एक लाखावर नागरिकांची जंगी सभा घेऊन पटेलांनी क्रांतिकारी वातावरण निर्माण केले, असे गुप्तचरांनी गव्हर्नरला सांगितले होते.[५]

गव्हर्नरच्या या मूल्यमापनास गुप्तचरांचे अहवाल, मुंबई उपनगर जिल्हाधिकाऱ्याच अहवाल व काही इंटरसेप्टेड पत्रांमुळेही पुष्टी मिळते. या आंदोलनात गांधीजी १९४० सालाप्रमाणे सरकारवर केवळ नैतिक दबावाचे धोरण न ठेवता, आंदोलन सुरू केल्यावर ' बगावत ' उभारतील, असा शंकरराव देव मुंबईच्या उपनगरांमधील सभांमध्ये प्रचार करीत. या विद्रोहात गांधीजी कदाचित अहिंसेचाही त्याग करतील, असे देव एका सभेत म्हणाल्याचे जिल्हाधिकाऱ्याने अहवालात नमूद केले होते. या आंदोलनात देव हे गांधीजींच्या अति-निकटवर्तीयांपैकी असल्याने त्यांच्या मूल्यमापनास मोठे महत्त्व होते. मुंबईतील अधिवेशनानंतर एक आठवड्याची नोटीस देऊन गांधीजी स्वतःस बागी म्हणून जाहीर करतील, आणि आपण ब्रिटिश प्रजाजन नाही असेही घोषित करून, गांधीजी राष्ट्रव्यापी लढा उभारतील, असे देवांनी सभेत वक्तव्य केले होते.[६]

काँग्रेसमधून परागंदा झालेले कांजी द्वारकादास ससून मिलच्या मालकांतर्फे काँग्रेसच्या मुंबईतील गुप्त हालचालींच्या बातम्या गव्हर्नरपर्यंत पोहोचवत असत. त्यांच्या माहितीनुसार सरदार पटेलांनी २२ जुलैला गुप्त बैठकीत मुंबईतील कार्यकर्त्यांना काँग्रेस अधिवेशनानंतर स्वातंत्र्य घोषित करण्याचे व विद्रोह करण्याचे आवाहन केले होते. प्रत्येक इंग्रज माणूस विधिबहिष्कृत आहे असे सर्व नागरिकांनी त्याला बजावून सांगावे, असा पटेलांचा सल्ला होता. 'पोलिसांनी तुरुंगात टाकल्यावर या वेळी स्वातंत्र्यसैनिकांचे काम संपणार नाही. किंबहुना तिथेही लढा उभारावा. जेलविषयक कायदे धिक्कारावे. आगामी आंदोलन

काँग्रेसपुरतेच मर्यादित न राहाता विद्यार्थी, शेतकरी व कामगार त्यात सहभागी होतील'. सरदार पटेलांनी कार्यकर्त्यांना निक्षून सांगितले की, त्यांनी अधिकृत कार्यक्रम व सूचनांची प्रतीक्षा करू नये. १९१९-१९४१ या काळातील आंदोलनात जो कार्यक्रम व तंत्र अमलात आणले होते, त्यानुसार परिस्थितीप्रमाणे कृती करावी. हरताळ, करबंदी, मीठ कायद्यांचा भंग, सरकारचा आज्ञाभंग, सरकारी सत्तेला विरोध इ. अनुज्ञेय समजावे.

वल्लभभाई पटेलांनी अहमदाबाद व मुंबईतील निवडक कार्यकर्त्यांना बजावले होते (२५ जुलै), 'आंदोलन सुरू झाल्यावर अराजक माजले अथवा यादवी पेटली, तरी आंदोलन मागे घेतले जाणार नाही. सर्व पुढारी अटकेत पडले तरी आमजनतेने लढा चालू ठेवायचा आहे. काँग्रेसजन अहिंसेचे पालन करतीलच, पण इतरांना हे बंधन नाही. १९२२ मधील चौरी चौरासारखी हिंसा झाली तरी आंदोलन थांबणार नाही', असे पटेलांचे विधान गुप्तचरांनी नोंदविले होते.[७]

युसुफ मेहेरअलींनी या आंदोलनासाठी जिवाचे रान केले होते. 'एव्हरी मॅन अ काँग्रेसमन, एव्हरी हाऊस अ काँग्रेस हाऊस' हा त्यांचा नारा तेव्हा सर्वतोमुखी होता. त्यांनी विद्यार्थी व युवकांना आंदोलनात ओढण्यासाठी खास प्रयत्न केले. गांधीजी व काँग्रेसचा संपूर्ण कार्यक्रम राबवण्यासाठी तर मेहेरअली अहोरात्र कटिबद्ध होतेच. पण त्याव्यतिरिक्त त्यांच्या काँग्रेस समाजवादी पक्षाचा अतिरिक्त कार्यक्रम होता. किंबहुना काही ज्येष्ठ काँग्रेस पुढारी छोडो भारत आंदोलन सुरू करण्यास कचरत असताना, जयप्रकाश नारायण, नरेंद्र देव, मेहेरअली व अच्युतराव पटवर्धन यांनी गांधीजींशी युती केली होती. त्यांनी आग्रही भूमिका घेतली होती. वरील प्रकरणात विवेचन केल्याप्रमाणे मेहेरअलींनी पुण्यात युवकांची तीन शिबिरे घेतली होती. विशेषतः २५ जुलै व ७-८ ऑगस्ट रोजी पुण्यात घेतलेल्या समाजवादी युवकांच्या शिबिरांमध्ये छोडो भारत क्रांतीचे तंत्र व कार्यपद्धतीवर सखोल चर्चा झाली होती. श्री. पु. लिमये, केशव गोरे वगैरे मुंबई अधिवेशनास न येता पुण्यातच पूर्वतयारी करीत होते. त्यांनी युवकांना खास मार्गदर्शक सूचना दिल्या आणि प्रचारपत्रके तयार ठेवली होती. खडकीजवळील लष्करी डेपोंमधून स्फोटक रसायने मिळवण्याचे प्रयत्न केले होते.

## ऐतिहासिक अधिवेशन

महात्मा गांधी व जवाहरलाल नेहरू ३ ऑगस्टला मुंबईत आल्यापासून शहरात उत्साहाला भरते आले होते. पीपल्स व्हॉलंटिअर ब्रिगेड, काँग्रेस दल, राष्ट्र सेवादल, नॅशनल गार्ड्स, देश सेविका संघ, कच्छी हलाई लोहाना स्वयंसेवक संघ वगैरे संघटनांनी मिरवणुका काढल्या, प्रचार केला व पडेल ते काम केले. मेहेरअली, लालू शहा, जफर अबिदअलींनी युवकांना कामाला लावले. सोफिया खान, शांताबाई वेंगसरकर, खुर्शिद नौरोजी वगैरेंनी देश सेविका संघाच्या कार्याचे नियोजन केले. स. का. पाटील व मुंबई प्रांतिक काँग्रेस समितीच्या मार्गदर्शनानुसार अधिवेशनाच्या व्यवस्थेसाठी स्वयंसेवक व स्वयंसेविकांच्या प्रचंड संघटना उभारण्यात आल्या. पाटील व शहरातील नेत्यांनी आपले संघटनाचातुर्य पणाला लावले होते.

या सुमारास मुंबईत दोन परस्परविरोधी अफवा पसरल्या. एका बातमीनुसार गांधीजींशी सामोपचाराने बोलणे करण्यास्तव लॉर्ड हॅलिफॅक्स म्हणजे माजी व्हाइसरॉय आयर्विन यांना मुंबईस पाठवून गांधीजींशी तडजोड करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. दुसऱ्या बातमीनुसार अधिवेशनावर बंदी घालण्याचा दिल्लीचा विचार लंडनने नामंजूर केला. शिवाय गांधी, नेहरू व काँग्रेस अध्यक्ष मौलाना आझाद यांच्याविरुद्ध करावयाची कारवाई आमच्या संमतीनेच करावी, असा लंडनचा आदेश होता. मात्र दोन्ही अफवा खोट्या ठरल्या.

काँग्रेस कार्यकारिणीने ४ ऑगस्टपासून मलबार हिलवरील बिर्ला भवनात चर्चा सुरू केली आणि ८ तारखेपर्यंत बैठकांची मालिका जवळजवळ अव्याहत चालू राहिली. समीक्षकांनी दाखविलेले वर्धा ठरावातील दोष वा उणिवा दुरुस्त करण्यात आल्या. छोडो भारतच्या मसुद्यात स्पष्ट करण्यात आले की, प्रारंभी हंगामी स्वरूपाचे संयुक्त सरकार असेल. प्रशासकीय शेषाधिकार प्रांतिक सरकारांकडे राहतील. स्वतंत्र भारताचे परराष्ट्र धोरण तसेच अल्पसंख्य जाती-जमातींविषयीच्या धोरणाचीही रूपरेषा ठरावाच्या मसुद्यात समाविष्ट करण्यात आली. अ. भा. काँग्रेस समितीला ७ ऑगस्टला सादर करावयाचा सुधारित ‘ छोडो भारत ’

ठराव हेतूतः ५ ऑगस्ट रोजी सायंकाळी घोषित करण्यात आला. कलोनिअल सरकारला खोटानाटा अर्थउकल व प्रचार करण्यास आणि खोडसाळपणा करण्यास संधी मिळू नये, हा यामागे उद्देश होता. कारण एप्रिलमधील काँग्रेस कार्यकारिणीच्या अलाहाबादमधील बैठकीच्या अनधिकृत टिपण्या पोलिसांनी रात्री चोरल्या होत्या. त्यांचा विपरीत अर्थ लावून ब्रिटिशांनी गांधी-नेहरूंच्या मतभेदांवर चिखलफेक केली होती.

अधिवेशनामुळे मुंबईकरांच्या भावना विलक्षण उद्दीपित झाल्या, युवक आनंदाने धुंद झाले. पण तणावही वाढला. अनेकांनी बॅ. मु. रा. जयकर व त्यांचे समविचारी मित्र टी. बी. सप्रू यांना पत्रे पाठविली आणि नेहमीप्रमाणे सरकार व काँग्रेस यांच्यात मध्यस्थीचा घोळ घालू नये, असे सुचवले. या दोघांच्या गोंधळाचा व खोळंबा घालण्याचा खूप लोकांना भयंकर वीट आला होता. त्यांच्या व्यावसायिक शिष्टाईमुळे काँग्रेसचा लढा कमकुवत होईल, अशी स्वराज्यप्रेमींना भीती वाटे. राजकारणातील या राजनिष्ठांना संपूर्ण स्वातंत्र्यात रस नसून नसती उठाठेव करण्यात रस होता. (They Wobbled the matters ex tacito). जयकरांना आलेली सर्व पत्रे त्यांनी सप्रूंकडे पाठवून दिली. शिवाय तेव्हाचे वातावरण इतके उद्दीपित व देशप्रेमाने भारलेले होते की, कोणाही वकिलांचे ऐकण्यास मुंबईकर तयार नव्हते.

काँग्रेस समाजवादी हे तर छोडो भारतचे अग्रदूत होते. जयप्रकाशजींच्या देवळी संदेशापासूनच समाजवाद्यांची गांधीजींशी खलबते सुरू होती. छोडो भारतचा निर्णय झाल्यावर त्यांचा उत्साह अमाप वाढला. मेहेरअली, अच्युतराव व शिरूभाऊंनी पुण्यात आयोजित केलेल्या शिबिरांबाबत वरील प्रकरणात विवेचन केलेले आहेच. ५ ऑगस्ट रोजी पुरषोत्तम त्रिकमदास यांच्या मलबार हिलवरील घरी काँग्रेस समाजवादी पक्षाची बैठक झाली. बैठकीस पुरषोत्तम यांच्यासह मेहेरअली, राम मनोहर लोहिया, अच्युतराव, नरेंद्र देव, अशोक मेहता, कमलादेवी चट्टोपाध्याय, श्यामनंदन मिश्र, मालती चौधुरी (ओरिसा), बिरेन भट्टाचार्य (कोलकाता), एम. एल. दातवाला (अहमदाबाद), लिंगराजू (मद्रास), एस. एन.

दुवेदी (ओरिसा), रामनंदन मिश्र व रिझवी (दोघेही बिहारचे) उपस्थित होते. या बैठकीत काँग्रेस समाजवादी पक्ष काँग्रेसमध्ये विलीन करण्याचा निर्णय एकमताने झाला. काँग्रेसबरोबर समर्पण भावनेने काम करणे हा त्यांचा उदात्त हेतू होता. आपला हा निर्णय नेत्यांनी गांधीजींना बिर्ला भवनात जाऊन सांगितला. त्यांच्याप्रमाणेच भारतीय किसान परिषद आणि सुभाषबाबूंच्या फॉरवर्ड ब्लॉक पक्षानेही स्वतःस काँग्रेसमध्ये विलीन केले. रामभाऊ रुइकरांनी हेमंतकुमार बोस यांना लिहिलेल्या, पण गुप्तचरांनी इंटरसेप्ट केलेल्या, पत्रात म्हटले, " सरकारने फॉरवर्ड ब्लॉक बेकायदेशीर ठरवला, परंतु आता काँग्रेस कार्यकारिणीच्या रूपाने यास पुनर्जन्म लाभला आहे."

काँग्रेस समाजवादी व फॉरवर्ड ब्लॉक आणि भारतीय किसान परिषद पक्ष काँग्रेसमध्ये विलीन झाल्यामुळे पक्षाची ताकद वाढली, उत्साह ओसंडू लागला आणि व्यापक क्रांतिलढ्यासाठी जनमत उद्दीपित झाले. भारतातील व विशेषतः मुंबईतील हे वातावरण अपूर्व होते. सरकारी अहवाल, गुप्तचरांची टिपणे, वर्तमानपत्रे व महात्मा गांधी संकलित साहित्यातून दिसते की, ३ ऑगस्टपासून मुंबईत काँग्रेसजनांच्या अनेक बैठका झाल्या. योजना व विचारांचे आदान-प्रदान झाले. देशी-विदेशी पत्रकारांनी गांधी, नेहरू, मौलाना वगैरे बहुतेक नेत्यांच्या मुलाखती घेतल्या. संस्थानी प्रजा परिषदेचे प्रतिनिधी गांधीजी व इतर नेत्यांना भेटले. अर्थातच सर्वांना मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या. गांधी, नेहरू, मेहेरअली व सरदार पटेलांच्या निवासस्थानी अव्याहत खलबते चालू होती. विद्यार्थी संघटनांना प्रोत्साहन देण्यात आले.

ए.आय.सी.सी. चे अधिवेशन गोवालिया टँक मैदानावरील विशाल सभामंडपात ७ ऑगस्ट १९४२ च्या दुपारी सुरू झाले. एक लाख रुपये खर्च करून उभारलेल्या या भव्य मंडपाची आसन क्षमता १०,००० होती. त्यापेक्षा अडीचपट मागणी झाल्यामुळे मंडपात १०,००० व मंडपाबाहेर १५,००० तिकिटधारकांची आसनव्यवस्था करावी लागली होती. ए.आय.सी.सी. च्या ३८३ सभासदांपैकी २५० जण उपस्थित

होते, तर उर्वरित नेते आंदोलनाच्या तयारीसाठी आपापल्या गावी थांबले असावे. पत्रकार कक्षात ३५० पासधारक असून त्यांच्यापैकी ५० पत्रकार ब्रिटन, अमेरिका, रशिया, कॅनडा व चीनमधून आलेले होते. इतर वार्ताहरांना प्रवेश देणे शक्य नसल्याने ते इतरत्र होते. पास अथवा तिकिटे मिळू न शकलेल्या हजारो व्यक्तींसाठी सभामंडपाबाहेर ध्वनिक्षेपकांची व्यवस्था करावी लागली. गोवालिया टँकचा सारा परिसर जनसागराने व्यापला होता. स. का. पाटील व सहकाऱ्यांनी चोख व्यवस्था ठेवली होती. ३००० स्वयंसेवक व ५०० देश सेविकांनी चोख व्यवस्था ठेवली होती. चिकागो रेडियो कंपनीने संपूर्ण ध्वनिक्षेपण यंत्रणा आणि चित्रीकरण यंत्रणा विनामूल्य पुरविली व हे काम चांगल्या पद्धतीने करून दाखवले. मुंबईच्या फेमस सिने लॅबरॅटरीनेही आवश्यक कार्यभार पत्करला. सुप्रसिद्ध गायक मास्टर कृष्णा यांनी 'वंदे मातरम्' नंतर 'हिंदुस्तान हमारा' हे स्फूर्तिगीत गायिले. हे गीत नंतर काँग्रेस रेडिओवरून दररोज ऐकवण्यात येत असे.

अधिवेशनाच्या उद्‌घाटनापूर्वी रॉयल हवाई दलाचे विमान थोडा वेळ सभामंडपावर खाली येऊन घिरट्या घालत होते. आंदोलनाच्या गंभीर परिणामांची ताकीद देणे हा सरकारचा उद्देश असावा, असा त्यातून अर्थ काढलेला होता.[८]

मौलाना आझादांच्या १०० मिनिटांच्या भारदस्त शैलीतील भाषणाने अधिवेशनाचा प्रारंभ झाला. काँग्रेसने आंदोलन केल्यास यादवी निर्माण करू, या बॅ. जिनांच्या धमकीस आझादांनी समर्पक उत्तर दिले. पण जिनांनी प्रत्यक्ष तसे केले नाही. वाटाघाटी करण्यास काँग्रेस तयार आहे, असे सांगून आझाद म्हणाले, " हिंदुस्तानचे स्वातंत्र्य व या देशाचे युद्धात सहकार्य या दोन्ही प्रश्नांचा निर्णय एकाच वेळी झाला पाहिजे. ब्रिटनने आम्हाला स्वातंत्र्य दिल्याचे जाहीर करताच हिंदुस्तान युद्धप्रयत्नात सामील झाल्याची आम्ही घोषणा करू. जे काही करणार असाल, ते आता या क्षणी करा. उद्याच्या वायद्यांवर आमचा विश्वास नाही ".

यानंतर गांधीजींचे पहिले संक्षिप्त भाषण हिंदीतून झाले. त्याचा सारांश :— आम्ही आमच्यासाठी सत्ता मागत नसून, अहिंसेच्या मार्गाने भारतीय स्वातंत्र्यासाठी लढत आहोत. सत्ता जेव्हा लाभेल, ती भारतीय नागरिकांकडे जाईल. ती

कोणाकडे सोपवायची हे नागरिक ठरवतील. आंदोलन एक आठवड्यात निर्णायक ठरेल या सरदार पटेलांच्या कथित वक्तव्याचा उल्लेख करून गांधीजी म्हणाले, " तसे झाले तर तो एक चमत्कारच ठरेल ; आणि ब्रिटिशांचे हृदयपरिवर्तन झाले असे म्हणावे लागेल. "

अल्पशा मध्यन्तरानंतर जवाहरलाल नेहरूंनी छोडो भारत ठराव न वाचता, औपचारिकरीत्या मांडला. कारण तो ५ ऑगस्टलाच जाहीर करून त्याच्या प्रती सभासदांना दिलेल्या होत्या. या ऐतिहासिक ठरावाचा मंजूर झालेला मसूदा अनेक पुस्तकांमध्ये छापण्यात आलेला आहे. पटेलांनी ठरावाला अनुमोदन दिले. नेहरू म्हणाले, " आम्ही सहकार्याचा हात पुढे केला आहे. परंतु काही गोष्टी होणे आवश्यक आहे. आणि तसे झाले नाही तर त्याचे परिणाम काय होतील याचा इशाराही ठरावात दिलेला आहे. स्वतंत्र भारताच्या सहकार्याचे ते आश्वासन आहे. दुसऱ्या कोणत्याही शर्तीवर आम्ही सहकार्य करणे अशक्य आहे. " पोलीस कमिशनरच्या लघु-लेखकांच्या टिपणांमध्ये पुढाऱ्यांची भाषणे प्रस्तुत इतिहासकारास आढळली. त्यातील काही उतारे इथे दिली आहेत. नेहरू गरजले, " हा लढा निर्णायक होईल. पूर्वीप्रमाणे काही दिवस लढा चालेल, मग तो थांबवण्यात येईल आणि वाटाघाटी होतील, असे या वेळी होणार नाही..... काँग्रेसने आता स्वतःला वादळी महासागरात झोकून दिले आहे. काँग्रेस एक तर भारताला स्वतंत्र करेल अन्यथा नष्ट होईल. इट इज गोईंग टू बी अ फाइट टू द फिनिश. "

ठरावात उल्लेख केलेल्या आंतरराष्ट्रीय उद्दिष्टांविषयी देखील नेहरू बोलले. " आम्ही केवळ भारताच्या स्वातंत्र्यासाठी लढत नसून, संपूर्ण जगातील जनतेच्या मुक्तीसाठी, आणि विशेषतः रशिया व चीन यांच्या स्वातंत्र्याकरिताही लढत आहोत. ब्रिटनने हा ठराव संमत केला व त्याप्रमाणे प्रत्यक्ष कृती केली, तर भारतातच नव्हे तर साऱ्या विश्वात एक महान परिवर्तन झाले, असे प्रत्ययास येईल. "

ठरावास अनुमोदन देताना सरदार पटेलांनी केलेले भाषण सर्वाधिक प्रभावी, सडेतोड व उपरोधिक होते, असे **टाइम्स ऑफ इंडियाने** कबूल केले. पटेल

गरजले, “ जोवर गांधीजी रणांगणावर आहेत, तोवर आम्ही त्यांचे आज्ञापालन करावयाचे आहे...... तथापि गांधीजी व सर्व पुढाऱ्यांना प्रारंभीच अटक केल्यास शिस्तशीर उपाययोजनांचा प्रश्नच राहणार नाही! भारतात जन्मलेल्या प्रत्येकाने हा देश बंधमुक्त करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे हे त्याचे अनिवार्य कर्तव्य बनेल. आपण व्यक्तिगतरीत्या, सामूहिकरीत्या अथवा कोणत्याही प्रकारे आंदोलनाचा कार्यक्रम अमलात आणायचा आहे, शक्यतो अहिंसेच्या मार्गाने...... प्रत्येक व्यक्तीने आपण स्वतंत्र भारताचे नागरिक आहोत असेच मानावे. ”
“ No source is to be left untapped, no weapon untried. This is going to be the opportunity of our lifetime.” (Bombay Govt. File No. 1110(1), 1942 ; and **Bombay Chronicle**, 8 Aug. 1942).

८ ऑगस्ट १९४२ रोजी अधिवेशनाचा पुन्हा आरंभ झाल्यावर मूळ ठरावाला काही उपसूचना मांडण्यात आल्या. त्यात राजाजींच्या माजी मंत्रिमंडळातील एक मंत्री व राजाजींचे पाठीराखे डॉ. सुब्बारायन यांची एक उपसूचना होती— ‘ काँग्रेसने मुस्लीम लीगशी तडजोड करून हंगामी राष्ट्रीय सरकार स्थापण्यात पुढाकार घ्यावा ; व छोडो भारतचा संकल्प रद्द करावा. ’ राजाजी यांचेच हे तुणतुणे होते. याच प्रयोजनासाठी ब्रिटिशांनी कम्युनिस्टांना कारावासातून बंधमुक्त केलेले होते. बारा-तेरा कम्युनिस्ट सभासद ठरावास विरोध करण्यासाठी उपस्थित होते. त्यांच्यापैकी श्रीनिवास सरदेसाई, डॉ. के. एम. अश्रफ व सज्जाद झहीर यांनी उपसूचना मांडून मूळ ठरावास विरोध केला. मात्र लोहिया, पटवर्धन, नरेंद्र देव, महेश दत्त, बाळकृष्ण शर्मा, पं. जीवनलाल, सरदार प्रतापसिंग, टी. प्रकाशम व मौलाना नुरुद्दीन बिहारी या सर्वांनी ठरावाचे जोरदार समर्थन करून कम्युनिस्टांच्या कोलांट्या उडीचा फज्जा उडवला. अखेरीस तीन कम्युनिस्ट सोडून इतर सर्वांनी आपल्या उपसूचना मागे घेतल्या. मौलाना नुरुद्दीन बिहारी यांनी कम्युनिस्टांवर तोफ तर डागलीच, पण त्यांनी हजारो मुसलमान या लढ्यात एकदिलाने सामील होतील, अशी ग्वाही दिली. त्या आनंदी वातावरणात हैदराबादचे एक मुसलमान पुढारी डॉ. अब्दुल लतिफ यांनी नवीन भर घातली.

प्रारंभी पाकिस्तानवादी असलेले हे मुसलमान पुढारी सभामंडपात आले. आणि त्यांनी पाकिस्तानच्या मागणीचा धिक्कार केला व ' राष्ट्रीय सरकारची ' कल्पना मांडली. अधिवेशनाच्या आधी ४ ऑगस्टला मुंबईचे अली महमद मेकलाई यांच्यामार्फत निरोप पाठवून महात्मा गांधींनी जिनांचेही सहकार्य मिळविण्याचा प्रयत्न केला होता. तथापि जिनांनी प्रतिसाद दिला नव्हता.[१]

मूळ ठरावावरील चर्चेला नेहरूंनी साजेसे उत्तर दिले. कम्युनिस्टांच्या उपसूचनांवर मतदान झाले असता त्यांना केवळ १३ मते मिळाली. इतर सर्व उपसूचना मागे घेतल्यामुळे ऐतिहासिक छोडो भारत ठराव गगनभेदी आवाजात संमत झाला.

**गांधीजींचे भाषण :—** त्यानंतर गांधीजींचे हिंदीतून व नंतर इंग्रजीतून असे दोन अडीच तास भाषण झाले. बापूजी प्रेषितासारखे बोलले, असे काही प्रत्यक्षदर्शी भाष्यकार म्हणतात. बापूजींच्या ओजस्वी व सारगर्भित शब्दांचा संमोहनकारी प्रभाव पडत होता. त्यांचा प्रत्येक शब्द श्रोत्यांच्या अंतःकरणाला स्पर्श करीत होता, रोमांचित करीत होता, असा प्रत्यक्ष साक्षी गोविंद सहाय यांचा अभिप्राय स्वीकारावा लागतो. गांधीजी यांच्या या भाषणाने विरोधक असलेले बरेच भारतीय नरमले, तर हजारो वरमले, असे प्रस्तुत इतिहास संशोधकास आढळले. कुंपणावर बसलेले अगणित हिंदुमहासभाइट पुरुष वि. दा. सावरकरांच्या आदेशाकडे दुर्लक्ष करून आंदोलनात उतरले. त्यांच्याप्रमाणेच लीगचा आदेश झुगारून बरेच मुसलमान लोक चळवळीला मदत करू लागले. मुसलमानांनी पोलिसांना गुप्त मदत केल्याचे प्रकार फारसे झाले नाहीत.

महात्मा गांधींच्या या उद्‌बोधक भाषणाचे शब्दांकन **कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी,** खंड ७६ मध्ये २० पानांमध्ये सामावलेले आहे. पण तेही परिपूर्ण नव्हे. मात्र विस्तारभयामुळे प्रस्तुत ग्रंथात भाषणाचा केवळ सारांश द्यावा लागत आहे.

छोडो भारतला विरोध करणाऱ्या १३ कम्युनिस्ट ' मित्रांचे अभिनंदन ' करून गांधीजींनी अभिप्राय दिला की, त्यांनी नेहरूंचे स्पष्टीकरण स्वीकारणे उचित झाले असते. आपल्या भाषणातून गांधीजींनी मुसलमान व महंमद अली जिनांशी संवाद

साधण्याचा आणि हिंदू-मुसलमान यांच्यात ऐक्यभाव निर्माण करण्याचा कसोशीने प्रयत्न केला. या दोन समाजांमधील प्रश्न व तेढ गांधीजींच्या जीवनकालातच सुटली पाहिजे, असे हजारो मुसलमान बापूंना सांगत असत. त्यासाठी आपण केलेले महत्प्रयास बापूंनी बोलून दाखवले. “ महंमद अली व शौकत अली अथवा मौलाना अब्दुल बारी आज हयात असते, तर त्यांनी आपल्या प्रामाणिक प्रयत्नांची साक्ष दिली असती. ” कायदे आझम जिनांनाही त्यांनी त्यांच्या पूर्वीच्या धर्मनिरपेक्ष सहकार्याचे स्मरण करून दिले. मनातील संशयाचे भूत दूर करण्याचे आवाहन केले. महात्माजी यांनी जिना व मुसलमानांना कळकळीचे आवाहन केले, “ मी मरण पावल्यावर जिनांना पटेल व तेदेखील मान्य करतील की, मी मुसलमानांच्या हितसंबंधांची कधीच प्रतारणा केली नाही.”

“ माय लाईफ इज एंटायरली ॲट देअर डिसपोजल. दे आर फ्री टू पुट ॲन एंड टू इट.” गांधीजींनी जिनांना सुनावले, “ पाकिस्तान खरोखरच योग्य असेल तर तो जिनांच्या हातात आहे, पण त्यांना पाकिस्तानची ‘ गिफ्ट ’ मिळणार नाही. पाकिस्तानसुद्धा हिंदुस्तानातच आहे. म्हणून प्रथम हिंदुस्तान विदेशी स्वामित्वापासून मुक्त करू.”

यानंतर गांधीजी मुख्यत्वे संकल्पित आंदोलनाविषयी बोलले. आंदोलनाच्या आणखी जास्त तयारीसाठी थांबायला गांधीजी तयार नव्हते. प्रत्यक्ष लढा जरी आज सुरू झालेला नसला, तरी आपण या क्षणापासून बंधमुक्त झालो, असे वागण्याचा त्यांनी सल्ला दिला. “ गुलामाने मालकास सांगावे, आपण मुक्त झालो. आता तडजोड नाही. मागच्या आंदोलनाप्रमाणे या वेळी केवळ मीठ तयार करण्याचा हक्क किंवा नशाबंदी अशा मागण्या मी करणार नाही. मागणी एकच—पूर्ण स्वातंत्र्य ! सारा हिंदुस्थान अहिंसेने लढा करील असा मला विश्वास वाटतो. तथापि तो खोटा ठरला तरी मी माझ्या मार्गापासून ढळणार नाही. शक्यतो अहिंसेने! अहिंसा ही मोठी शक्ती आहे, हे जगाला दाखवून द्यायचे आहे. ”

या आंदोलनात समाजातील प्रत्येक घटकाने योगदान द्यावयाचे आहे, हे सांगताना बापूजींनी वर्तमानपत्रांनी निर्भयपणे लेखणी वापरावी, अन्यथा वर्तमानपत्र

बंद करावे असा सल्ला दिला. संस्थानिकांनी आपल्या प्रजेला सांगावे राज्य तुमचेच आहे, व त्यांनी पोलिटिकल डिपार्टमेंटला सांगावे आता आम्हाला अधिकार दिला आहे तो प्रजाजनांनी, ब्रिटिशांनी नव्हे! जवाहरलाल यांच्या योजनेनुसार स्वतंत्र भारतात विशेषाधिकारांना स्थान नसेल. त्यांच्या मते सर्वच मालमत्ता सरकारच्याच मालकीची आहे. या आंदोलनात काहीही गुप्तपणे करू नये. " धिस इज ॲन ओपन रिबेलिअन."[१०]

" I, therefore, want freedom immediately, this very night, before dawn, if it can be had. Freedom cannot now wait for the realization of communal unity. If that unity is not achieved, sacrifices necessary for it will have to be much greater than would have otherwise sufficed. But the Congress must win freedom or be wiped out in the effort. And forget not that the freedom which the Congress is struggling to achieve will not be for the Congressmen alone, but for all the forty crores of the Indian people. Congressmen must forever remain humble servants of the people".

" ...... I am not going to strike a bargain with the Viceroy for ministries and the like. I am not going to be satisfied with anything short of complete freedom. May be, he will propose the abolition of salt tax, the drink evil, etc. But I will say— ' Nothing less than freedom."

" Here is a Mantra, a short one, that I give you. You may imprint it on your hearts and let every breath of yours give expression to it. **The Mantra is : 'Do or Die'. We shall either free India or die in the attempt; we shall not live to see the perpetuation of our slavery. Every true**

**Congressman or woman will join the struggle with an inflexible determination not to remain alive to see the country in bondage and slavery.**

Let that be your pledge. Keep jails out of your consideration. If the Government keep me free, I will spare you the trouble of filling the jails. I will not put on the Government the strain of maintaining a large number of prisoners at a time when it is in trouble. Let every man and woman live every moment of his or her life hereafter in the consciousness that he or she eats or lives for achieving freedom and will die, if need be, to attain that goal. Take a pledge with God and your own conscience as witness, that you will no longer rest till freedom is achieved and will be prepared to lay down your lives in the attempt to achieve it. He who loses his life will gain it ; he who will seek to save it shall lose it. Freedom is not for the coward or the faint-hearted.

" I have enjoyed the privilege of friendship, as I enjoy today, with Lord Linlithgow. It is a privilege which has outgrown official relationship. Whether Lord Linlithgow will bear me out I do not know..... And yet let me declare here that no personal bond will ever interfere with the stubborn struggle which, if it falls to my lot, I may have to launch against Lord Linlithgow, as the representative of the Empire ......... I have, therefore, pledged the Congress and the Congress has pledged herself that she will Do or Die". (**Collected Works of Mahatma Gandhi,** Vol.76).[११]

मौलाना आझादांनी अधिवेशनाचा समारोप करताना ठरावाच्या प्रती अमेरिकेचे अध्यक्ष रूझवेल्ट व चीन आणि रशियाच्या लंडनमधील राजदूतांना पाठविणार, असे जाहीर केले. अधिवेशन रात्री १० वाजेनंतर आटोपले. मात्र आंदोलन निश्चितप्राय असले, तरी त्याचे भवितव्य आणि प्रारंभाचा दिनांक व्हाइसरॉयशी वाटाघाटी केल्यावरच स्वतः गांधीजी ठरवणार होते. वाटाघाटींच्या प्रक्रियेस काही दिवस लागणार होते. ९ ऑगस्टच्या सकाळी गोवालिया टँक मैदानावर नेहरूंच्या हस्ते झेंडावंदन केले जाणार होते. तेथे स्वयंसेवकांचा मेळावा आयोजित केलेला होता. मौलाना पहाटे ४ वाजता रूझवेल्ट यांना पत्र लिहीत होते. अमेरिकन नभोवाणी कंपनीचे लोक नेहरूंचे भाषण ध्वनिमुद्रित करण्यासाठी सकाळी लवकर येणार होते. ९ ऑगस्टच्याच सायंकाळी दादरच्या शिवाजी पार्कवर गांधीजींची विराट सभा नियोजित केलेली होती. तथापि नवी दिल्ली व लंडनस्थ सर्वशक्तिमान नियंत्यांनी वेगळेच नियोजन केलेले होते. पूर्वनियोजित रणनीतीनुसार सरकारने काँग्रेसवर अमेरिकेच्या पर्ल हार्बरसारखा हल्ला करण्याचे ठरवलेले होते.

## पूर्वरचित सरकारी हल्ला

ब्रिटिश सरकार अपूर्व आक्रमक व युध्यमान पवित्र्यात सज्ज होते. गांधीजींचा लिनलिथगो व त्यांच्या कन्येशी असलेला तथाकथित स्नेहभाव व मैत्री या भावनांना कलोनिअल राजनीतीत स्थान नव्हते. साम्राज्यशाहीची समीकरणे मे-जून १९४२ पासून आखली जात होती. हिंदुस्तानातील सत्ता सोडण्यास चर्चिल कधीच राजी नव्हते. भारतमंत्री लॉर्ड अमेरी व लिनलिथगोंचा मुठी वळण्याचा पवित्रा चर्चिलला साथ देत होता. चर्चिल, अमेरी व लिनलिथगो साम्राज्याच्या शाश्वतीकरणाबाबत ठाम होते!

९ ऑगस्टला सरकारने झडप घातली, पण ती पूर्वरचित होती. बहुसंख्य मराठी लेखकांनी छोडो भारतविषयीचे अस्सल दस्तऐवज न पाहिल्यामुळे इतिहासात खूप त्रुटी राहिलेल्या आढळतात. आपणास तात्काळ अटक करण्यात येईल असे गांधीजींना सांगण्यात आलेले होते. त्यांच्या खाजगी सचिव डॉ. सुशिला नय्यर यांनी हिंदुस्तान सरकारने मुंबई सरकारला लिहिलेल्या पत्राची प्रत दिल्लीतून मिळवून मुंबईला ५ ऑगस्टला आणली होती. त्या पत्रात गांधीजी व निकटवर्ती

यांच्या अटकेचे स्थळ निर्धारित केलेले होते. हे पत्र देवदास गांधी यांनाही माहीत होते. व त्यांनी तसे फोनवरून मुंबईला कळविलेही होते. आसामचे माजी मुख्यमंत्री गोपीनाथ बारडोलोई यांनीही उघड केले होते की, काँग्रेस कार्यकारिणी व गांधीजींना ८ ऑगस्टच्या सकाळीच अटक करण्यात येईल, असे त्यांना ७ तारखेला दिल्लीतून फोनवरून कळविण्यात आले होते. परंतु सकाळी ही बातमी खरी न ठरल्याने सर्व जण आनंदाने हसले होते. तसेच ८ ऑगस्टला सायंकाळी मुंबईच्या एका पोलीस अधिकाऱ्याने सरदार पटेलांना सांगितले होते की, येणाऱ्या सकाळी सर्व पुढाऱ्यांना अटक करण्यात येईल. अशा अनेक बातम्यांमुळे अधिवेशन आटोपते घ्यावे असे बऱ्याच पुढाऱ्यांनी सुचविले. तथापि गांधीजींनी अधिवेशन सर्वतया पूर्ण करण्याचा आग्रह केला. मात्र अधिवेशनानंतर बापूंनी, थोडा वेळ, काँग्रेस कार्यकारिणीशी पुढील कार्यक्रमाविषयी विचारविनिमय केला.[१२]

बापूंच्या अटकेची पूर्वसूचना **बॉंबे क्रॉनिकल** कार्यालयानेही फोनवरून रात्री अकरा वाजता कळविली होती. ८ ऑगस्ट रोजी माजी मंत्री एम. डी. डी. गिल्डर यांनाही बापूंच्या अटकेचे वृत्त मुंबई सेक्रटेरिएटमधून समजले होते. गिल्डर हे वृत्त सांगत असताना बापूंनी त्यांना सकाळी १० वाजता भेटायला या असे सांगितले. 'पण उद्या १० वाजणार नाही' असे गिल्डर म्हणाले होते. काँग्रेस कार्यकारिणीचे सदस्य बॅ. असफ अली यांनाही सेंट्रल सेक्रटेरिएटमधील एका कर्मचाऱ्याकडून २ ऑगस्टच्या सायंकाळीच हिंदुस्तान सरकारच्या आदेशातील आशय समजला आणि त्यांनी ती माहिती आपल्या मुंबईतील सहकाऱ्यांना कळविली होती.

यातून निष्कर्ष निघतो की, ८ ऑगस्टच्या सायंकाळपर्यंत काँग्रेस हायकमांडला आपल्या अटकेची पूर्वकल्पना आलेली होती. तथापि गांधीजी घाई करून अधिवेशन आटोपण्यास राजी नव्हते. मुंबई सरकारचे इंटेलिजन्स अहवालही अधिवेशन घाईने उरकले असे म्हणत नाही. याउलट प्रेम कृष्ण खन्ना व गोपिनाथ बारडोलोई यांच्या कबुलीजबाबामधून दिसते की, अधिवेशनानंतर रात्री काँग्रेस कार्यकारिणी व गांधीजींची बैठक झाली. तिच्यात पुढील कार्यक्रमाबाबत चर्चा झाली. तेव्हा गांधीजींनी जे. बी. कृपलानी यांच्या परिपत्रकाबाबत पसंती दर्शविली.

गांधीजी असेही म्हणाले होते की, हे आम जनतेचे आंदोलन आहे व जनता त्याप्रमाणे कृती करील. आंदोलन पसरल्यावर त्याला गनिमी लढ्याचे स्वरूप येईल. हा खुला विद्रोह असेल. त्यापासून माघार नाही. लढा होणारच! जन-आंदोलनास व्यापक स्वरूप प्राप्त होईल.[१३]

ही वस्तुस्थिती लेखकांनाच माहीत नव्हती.

**सरकारी अपप्रचार.**—गोपनीय फ्रेडरिक पकल परिपत्रकास (१७ जुलै १९४२) सर्वाधिक प्रसिद्धी दिली गांधीजी व काँग्रेसने! राष्ट्रीय लढा दडपण्यासाठी सरकार किती खालच्या पातळीवर गेले, हे त्या परिपत्रकातून दिसते. केंद्रीय सचिव पकलने प्रांतिक सरकारांना प्रचारासाठी पुढील आदेश दिले—"कोणत्याही नैतिक तत्त्वाचा प्रश्नच नाही! प्रसंगपरवशता व इष्टता हाच मुद्दा आहे....... काँग्रेस नेते आता अक्षराष्ट्रांचे (अँक्सीस) हिरो बनले आहेत ....... काँग्रेसचा ठराव हा पक्षाचा जाहीरनामा होय, राष्ट्राचा नव्हे. सविनय कायदेभंगाची धमकी म्हणजे थेट जपानला निमंत्रणच होय. काँग्रेसचा हेतू असफल झाला तर काँग्रेसचे नेते इंडिया हा देश जपानला व जर्मनीला देऊन टाकतील. म्हणून प्रत्येक उपलब्ध उपाय योजून काँग्रेसविरुद्ध लोकमत प्रक्षोभित करावे." चार पानांच्या त्या परिपत्रकात काँग्रेसची प्रतिमा मलिन करणारी व्यंगचित्रे, भित्तिपत्रके, लेख व भाषणे आयोजित करून कुजबूज मोहीम उभारावी असा आदेश होता. वर्तमानपत्रांना पैसा देऊन आपलेसे करावे असे म्हटले होते. आणखीही अशी परिपत्रके राज्य सरकारने काढली होती. त्यांचा समाचार घेताना गांधीजी गोवालिया टँक मैदानावर म्हणाले होते, "These circulars are an additional reason for the cry of Quit India, which comes not from the lips, but from the aching hearts of millions." (H.D.S.B., File No. 1110 (1), 1942).

मुंबई सरकारनेही, मे १९४२ पासून, आंदोलन मुळातच उपटून टाकण्यासाठी मुस्लीम लीगच नव्हे तर कम्युनिस्ट, उद्योगपती, दलित व प्रतिगामी लोकांची खुशामत करून प्रलोभने दाखवण्यास प्रारंभ केला होता. सरकारने नॅशनल वॉर फ्रंट उभारली. आर. पी. मसानी, जे. एम. मेहता, कावसजी जहांगिर व डॉ. आंबेडकरांचा त्यात समावेश केला. **टाइम्स ऑफ इंडिया** तर नेहमीच

स्वातंत्र्य चळवळीच्या विरोधात होता. पण **बाँबे क्रॉनिकलला**देखील विरोधी प्रचार करण्यास उत्तेजन दिले. (हॉर्निमन क्रॉनिकलचे संपादक नव्हते). कम्युनिस्टांच्या कोलांटी उडीमागे गव्हर्नर लम्ले साहेबही होते. रघुनाथ निंबकर वगैरेंचे परिवर्तन कसे झाले, हे तत्त्वनिष्ठ सोली बाटलीवाला यांनाही माहीत होते. काँग्रेसविरुद्ध प्रचार करण्यासाठी व दलितांच्या सहानुभूतीसाठी बाबासाहेबांना मंत्रिमंडळात घेण्याची लम्लेने व्हाइसरॉयला गळ घातली होती. मुंबई सरकारने डिव्हाइड अँड रूल नीतीचा पुरेपूर उपयोग केला. गव्हर्नरने काहींना अशासकीय सल्लागार नेमण्याचे आमिष दाखवले. माजी गृहमंत्री के. एम. मुन्शी यांनाही सल्लागार नेमण्याचा देकार दिला होता. भुलाभाई देसाई यांच्यावरही असाच प्रयत्न करण्यात आला. पण दोघे थोडक्यात 'वाचले'. बॅ. मुकुंदराव जयकरांना ब्रिटिश वॉर कॅबिनेटमध्ये भारताचे प्रतिनिधी म्हणून नेमण्याचा देकार होता. परंतु त्यांना आपला दर्जा व अधिकार निश्चित स्वरूपात हवे होते. म्हणून त्यांची निवड न करता इंग्रजांनी सर रामस्वामी मुदलियार या दुसऱ्या राजनिष्ठ माणसाची निवड केली. मुंबई गोदी कामगारांनी संप करू नये म्हणून जमनादास मेहता व रॉयवादी पक्षास हिंदुस्तान सरकार दरमहा १३,००० रुपये देत असे. मात्र हा पैसा कोणी घेतला हे माझ्या रॉयवादी मित्रांना कधीच समजले नाही.

लिनलिथगो महोदय बहुसंख्य धोरणात्मक निर्णय मंत्रिमंडळातील आंबेडकर, अणे, होमी मोदी इ. भारतीय मंत्र्यांना सांगतच नसत. 'हे गृह विभागाचे गुपित आहे असे सांगून अशी माहिती मिळवण्याचा आग्रह करू नये' असे त्यांना सुनावत! त्यांना सरळ डावलत असत. लिनलिथगो, गृहमंत्री रेजिनाल्ड मॅक्सवेल आणि गृह सचिव रिचर्ड टॉटनहॅम या तिघांनी स्वातंत्र्यलढा चिरडून टाकण्याचा विडा उचलला होता. या त्रिकुटाने साम्राज्य-रक्षणासाठी भले-बुरे मार्ग अवलंबिले होते. मात्र मुंबईचे गव्हर्नर रॉजर लम्ले त्यांना सबुरीचा सल्ला देत.[१४]

**देशाबाहेर तडीपारीची योजना.**—गांधीजींनी लिनलिथगोंच्या स्नेहभावाचा उल्लेख केला, तरी जुलैच्या मध्यापासून त्यांचा लढा दडपण्याची राक्षसी योजना गृहमंत्री व स्वतः लिनलिथगो आखत होते. खुद्द महात्मा गांधींना एडनमध्ये अथवा न्यासालँडमध्ये आणि प्रमुख काँग्रेस नेत्यांना युगांडात बंदिस्त ठेवण्याचा ते विचार

करीत होते. परंतु युगांडात मोठ्या संख्येने भारतीय असल्याने, महात्मा गांधींना तेथे तुरुंगात ठेवल्यास त्याचा विपरीत परिणाम होईल असाही मुद्दा पुढे आला. म्हणून सुदान व पूर्व आफ्रिकन देशांचाही विचार करण्यात आला. लिनलिथगो वा इतर कोणाही सत्ताधीशाला गांधी-नेहरूंची मैत्री वा स्नेहभाव यापेक्षा साम्राज्य व कलोनिअल हित अधिक प्रिय वाटे. **ट्रान्सफर ऑफ पॉवर** दस्तऐवजांमधून सत्ताधीशांचे मनोगत स्पष्ट होतातच. मद्रासचा गव्हर्नर सर ए. होप गांधीजींना मॉरिशिअस अथवा केनियात कैद करून ठेवण्यास उत्सुक होता. स्वतः लिनलिथगोंना प्रारंभापासूनच गांधीजी व पुढाऱ्यांच्या तडीपारीची योजना अधिक पसंत होती— जेणेकरून त्यांचा अनुयायांशी संपर्क तुटेल आणि आज जे लोक डळमळीत मनःस्थितीत आहेत, ते आंदोलनापासून अलिप्त राहातील असे त्यांचे तर्कशास्त्र होते. परंतु गांधीजींची प्रकृती बिघडल्याने त्यांना देशाबाहेर विमान प्रवास झेपणार नाही, असा एक मुद्दा पुढे आला. म्हणून त्यांना बोटीतून एडनला नेण्याची योजना तयार झाली. त्यासाठी मुंबई बंदरात एक जहाज तयार ठेवलेले आहे, असे अमेरींनी लॉर्ड सभागृहाचे नेते लॉर्ड क्रॅनबोर्न यांस कळविले होते. मद्रासव्यतिरिक्त मध्यप्रांत-वऱ्हाड व संयुक्त प्रांताचे गव्हर्नरही देशाबाहेर तडीपारीचा आग्रह करीत होते.[१५]

गांधीजींच्या तडीपारीच्या क्रूर योजनेला विरोध करणारा रॉजर लम्ले हा देशातील एकमेव गव्हर्नर होता. तडीपारीमुळे भारतीय लोकमत प्रक्षुब्ध होऊन सरकारच्या विरोधात जाईल, असा त्यांनी युक्तिवाद केला. आज जो वर्ग राजकारणाबाबत उदासीन आहे, तोही विरोधात जाईल ; मवाळ पक्षही दुखावला जाईल वगैरे विधाने मांडून त्यांनी व्हाइसरॉयचे मतपरिवर्तन करणे सुरू केले. सरदार पटेलांनाही तडीपार करण्यातील धोका त्यांनी दाखवून दिला. पटेलांचे सामर्थ्य व लोकप्रियता लम्ले यांनी समक्ष पाहिलेली असल्याने त्यांनी ताकीद दिली, ‘ पटेलांना डिपोर्ट केल्यास त्यांना हौतात्म्य प्राप्त होईल. म्हणून तशी चूक करू नये. पटेलांना अगदी तात्काळ पकडावे आणि कोणाचाच त्यांच्याशी संपर्क राहू नये म्हणून त्यांना अटकच्या किल्ल्यात डांबून ठेवावे.’ सत्तांतराचे उपरोक्त ब्रिटिश दस्तऐवज

दाखवतात की, लम्ले यांचा अपवाद वगळता कोणताही गव्हर्नर गांधीजी व काँग्रेस हायकमांडला आपल्या प्रांतातील तुरुंगात ठेवायला राजी नव्हताच.

वस्तुतः ब्रिटिश कॅबिनेटने काँग्रेस पुढाऱ्यांच्या तडीपारीचा आग्रह धरला होता. चर्चिल व लॉर्ड अमेरी या उन्मत्त साम्राज्यवाद्यांना गांधीजींचे उपोषण आणि उपोषण करता करता ‘ आत्महत्या वा मरण ’ यांचे सोयरसूतक नव्हते. ३ ऑगस्टला अमेरीने लिनलिथगोंना लिहिलेल्या पत्रात तसा स्पष्ट उल्लेख आहे. तथापि विशेषतः रॉजर लम्ले व बिहारच्या गव्हर्नरशी विचारविनिमय केल्यावर लिनलिथगोंना आपले मत बदलावेच लागले. व्हाइसरॉयला इथे राज्य टिकवायचे होते. लम्ले व बिहारचे गव्हर्नर तसेच केंद्रीय मंत्रिमंडळातील काही मंत्री (होमी मोदी वगैरे) तडीपारीच्या शिक्षेविरुद्ध असल्याने व्हाइसरॉयने विवेकी निर्णय घेतला. त्यानुसार काँग्रेस कार्यकारिणीच्या सभासदांना अहमदनगरच्या किल्ल्यात बंदिस्त ठेवण्याचा निर्णय झाला. लोकमताच्या दृष्टीने व नेत्यांना एकाकी पाडण्यासाठी कोणत्याही कारागृहापेक्षा किल्ला चांगला हे व्हाइसरॉयला पटले. मात्र रॉजर लम्लेंच्या मतानुसार गांधीजींना कार्यकारिणीच्या समवेत न ठेवता, पुण्याच्या वेशीवरील आगाखानच्या बंगल्यात ठेवण्याचा निर्णय झाला. शिवाय सरोजिनी नायडू, महादेव देसाई व मीरा बेन यांना गांधीजींसमवेत राहाण्याची परवानगी दिली. सरकारने हा बंगला जबर भाड्याने घेतलेला होता.[१६]

मुंबई अधिवेशनापूर्वीच सरकारने सर्व उपाययोजनांची आखणी पूर्ण केलेली होती. छोडो भारत ठरावावर शिक्कामोर्तब होताच विजेच्या वेगाने काँग्रेसवर हल्ला करावयाचा आणि काँग्रेस कार्यकारिणी व प्रांतिक काँग्रेस समित्या बेकायदा संस्था म्हणून जाहीर करून, त्यांची कार्यालये ताब्यात घेण्याचे आदेश देण्यात आले. मात्र संपूर्ण काँग्रेस संघटना बेकायदा ठरविण्यात आली नाही. निधी जप्त करणे, धरपकड करणे वगैरे १६ कलमी उपाययोजना निश्चित केलेली होती. ही उपाययोजना ३ ऑगस्टला सिद्ध ठेवून ९ ऑगस्टच्या पहाटे ५ वाजता काँग्रेसवर आक्रमण करण्याचा मुहूर्त ठरला होता. नवी दिल्लीने ८ तारखेला रात्री तारेने ‘ पॅंटलून ’ या सांकेतिक शब्दाद्वारे प्रांतिक सरकारांना आक्रमणाचा हुकूम दिला.

देशभर दहशत व भय निर्माण करण्यासाठी मुंबईवर पर्ल हार्बरसारखा हल्ला केला. वर्तमानपत्रांची गळचेपी करणारा आदेश रातोरात जारी केला. मुंबईतील टेलिफोन यंत्रणा पूर्णपणे बंद केली.

**पुढाऱ्यांची धरपकड.**—सकाळी ४ वाजता पोलीस कमिशनर एच. ए. बटलर व अधिकारी रावबहादूर देसाई बिर्ला भवनावर येऊन त्यांनी गांधीजी, महादेव देसाई व मीराबेन यांना डी. आय.आर. कलम २६ खाली अटक करण्याचा हुकूम बजावला, असे प्रत्यक्ष साक्षी जी. डी. बिर्ला सांगतात. कस्तुरबा गांधी, प्यारेलाल व सुशीला नय्यर यांना विकल्प देण्यात आल्यामुळे मुंबईतील शिवाजी पार्कवरील सभा घेण्यासाठी हे तिघे मागे राहिले. ही सभा पूर्वघोषित असल्याने ती व्हायलाच हवी, असे गांधीजींनी कस्तुरबांना कटाक्षाने सांगितले होते. आंघोळ, प्रार्थना वगैरेसाठी त्यांना दोन तासांचा अवधी दिलेला होता. त्यानंतर गांधीजींनी आपल्या निकटवर्तीयांना काही सूचना दिल्या. बरोबर ६ वाजता बापूजी त्यांच्या बंदिकाराच्या गाडीत चढले. तोपावेतो त्यांच्या अटकेचे वृत्त पसरलेले होते. त्यामुळे बिर्ला भवनाच्या फाटकापाशी त्यांना निरोप देण्यासाठी बराच मोठा जनसमुदाय जमला होता. त्यांनी चार शब्द बोलावे असा लोकांनी आग्रह केला. तेव्हा गांधीजींनी राष्ट्राला अखेरचा संदेश दिला. या संदेशाचे तीन मसुदे मला प्राप्त झाले आहेत. त्यांचा आशय सर्वसाधारणपणे सारखा असला तरी भर देण्यात फरक आहे. त्यापैकी मुंबईच्या गुप्तचर अहवालात नमूद केलेल्या पुढील अंतिम संदेशाचा मसुदा मला अधिक ग्राह्य वाटतो.

" Do or Die. You can go the farthest limit under Ahimsa. All will have to take the pledge that they will set the country free this time. Or else we will die. This should be the common slogan . The entire masses will have to feel as if they are in independent India. British Government is no more here. All will have to think and behave just as they ought to have behaved in independent India. Leaders to speak and

to direct will not be available. Let each individual think himself a leader and let none give up non-violence and peace. All sorts of law disobedience and Satyagraha movements will have to be carried on non-violently and peacefully. Let all Congressmen and Non-Congressmen join this struggle."[१७]

सर्वच पुढाऱ्यांवर झडप घालून त्यांना बेसावध अवस्थेत पकडण्यासाठी मुंबई पोलिसांची ६० पथके पहाटेपासून शहरात धावपळ करत होती. पहाटे कारमायकेल रोडवरील सकिना मंझिलमधील कृष्णा हाथीसिंग यांच्या घरी नेहरू व इंदिरा गांधी अमेरिकन रेडियो कंपनीच्या प्रतिनिधीची प्रतीक्षा करत असताना तिथे पोलीस आले. त्यांनी नेहरू व जी.पी.हाथीसिंग यांना अटक केली. सरदार पटेल व जे. बी. कृपलानी एकाच इमारतीत होते. भुलाभाई देसाई यांच्या घरी मौलाना आझाद स्वतः अमेरिकेचे अध्यक्ष रूझवेल्ट यांना पत्र लिहिण्यात गर्क होते. सरोजिनी नायडू या सोफिया वाडियांच्या मलबार हिलवरील घरी होत्या. माजी मुख्यमंत्री बा.गं.खेर यांचा सकाळचा 'वॉक' अद्याप व्हायचा होता. तोपर्यंत त्यांनी पोलिसांना थांबायला सांगितले. भल्या पहाटे पकडले तरी काँग्रेस पुढारी पोलिसांवर रागावले नाहीत. गोविंद वल्लभ पंतांची झोपमोड केल्यामुळे ते मात्र संतापले होते. पंत, हरेकृष्ण मेहताब व जयरामदास दौलतराम हे काँग्रेस कार्यकारिणीचे सदस्य वगळता संपूर्ण काँग्रेस हायकमांड व मुंबईचे बहुतेक काँग्रेस पुढारी ९ ऑगस्टच्या पहाटेलाच पकडले गेले.

पोलीस कमिशनरचा अहवाल सांगतो की, सर्व काही नियोजित योजनेनुसार पार पडले. बोरीबंदर स्थानकात खास गाडी तयार ठेवलेली होती. या रेल्वेगाडीने ७ वाजून १८ मिनिटांनी बोरीबंदर सोडले. पंत, मेहताब व जयरामदास यांना अटक करण्यास विलंब लागल्यामुळे पोलिसांनी त्यांना सायंकाळच्या आधी अहमदनगरला नेऊन ठेवले. परप्रांतीय काँग्रेसजनांना मुंबई पोलिसांनी अटक करावयाची नव्हती.[१८]

काँग्रेस हायकमांडच्या व्यतिरिक्त मुंबईत युसुफ मेहेरअली, स. का. पाटील, मोरारजी देसाई, नगिनदास मास्टर, अशोक मेहता, शांता वेंगसरकर, सोफिया खान वगैरेंना पहिल्याच दिवशी अटक झाली. (बहुतेक सर्वांची नावे माझ्या **हिस्टरी ऑफ बाँबे** यात दिलेली आहेत). हिंदुस्तान सरकारच्या आदेशानुसार सर्वांना डी.आय.आर. २६ खाली पकडण्यात आले होते. मुंबईतील काँग्रेस भवन आणि अधिवेशनासाठी उभारलेल्या सभामंडपाचा पोलिसांनी ताबा घेतला.

मुंबईत पकडलेल्या पुढाऱ्यांना त्यांच्या बंदिवासाचे स्थान सांगण्यात आलेले नव्हते. गांधीजी, महादेवभाई, सरोजिनी नायडू व मीराबेन यांना पुण्याजवळ चिंचवडला उतरवून आगाखान भवनात नेण्यात आले. मुंबई गटातील नेत्यांसाठी गाडी पुण्याजवळ खडकीला थांबवून त्यांना येरवडा जेलमध्ये नेले. काँग्रेस कार्यकारिणीकरिता अहमदनगरचा चांदबिबीचा किल्ला ठरविलेला असल्यामुळे रेल्वे गाडी पुणे स्थानकात न थांबविता सरळ नेण्याची योजना होती. पण पुण्याच्या रेल्वे यार्डात शंटिंग चालू असल्यामुळे सिग्नलअभावी गाडी प्लॅटफॉर्मवर थांबली. तेथे जमाव होताच. ही संधी पाहून नेहरू व शंकरराव देवांनी वरिष्ठ पोलीस अधिकारी शार्प याला न जुमानून गाडीच्या खिडकीतून प्लॅटफॉर्मवर उड्या मारल्या. त्यांना समक्ष पाहून स्टेशनातील जमावाने पुढाऱ्यांचा जयजयकार केला. नेहरू जमावाकडे धावत जाऊ लागले. शार्प व नेहरू यांच्यात झटापटही झाली. प्रसंग साधून देवांनी शार्पच्या मांडीवर जोरात लाथ मारली. ब्रह्मचाऱ्याची लाथ होती ती ! दुसऱ्या अधिकाऱ्याने नेहरूंना पकडून गाडीत बसविले. गाडी पुढे गेली.

परंतु या प्रसंगामुळे बातमी पसरून पुणे पेटले. राष्ट्र सेवादल व काँग्रेसचे कित्येक कार्यकर्ते भूमिगत झाले. पुण्यात गाडी थांबविण्याचे कारस्थान पूर्वनियोजित असून स्टेशन मास्तर काँग्रेसला अनुकूल असल्याचा सरकारला संशय आला. या प्रकरणाची नंतर चौकशीही झाली.[११] पुढील दिवसांमध्ये मुंबई, सातारा, पुणे, जळगाव, सोलापूर व नाशिकमध्ये डझनावारी सरकारी कर्मचाऱ्यांनी या आंदोलनास विविध मार्गांनी मदत केली.

## मुंबईत क्रांतिलढा पेटला

ए.आय.सी.सी.च्या माध्यमातून मुंबईने काँग्रेसच्या रणनीतीचे बोल ऐकले व अनुभवले होते. या अधिवेशनात व त्याच्या पूर्वसंध्येलाही मुंबईने चित्त उचंबळून टाकणारी भाषणे ऐकली होती. येथे राष्ट्रवादाचे विराट प्रबोधन झालेले होते. त्यामागे ६० वर्षांचा इतिहास होता. युद्धजन्य महागाई व टंचाईमुळे नागरिक संत्रस्त झालेले होते. काँग्रेसची मागणी सर्व राष्ट्राकरिताच असल्याची नागरिकांची धारणा होती. अनेक कारणांमुळे येथील लोकमत काँग्रेसधार्जिणे झालेले होते. सर्वसाधारण मुंबईकर रागावलेला व दुर्मुखलेला झाला होता असे ऑक्टोबर १९४२ च्या गोपनीय अहवालात गृह मंत्रालयानेही मान्य केले.

९ ऑगस्टच्या त्या रविवारी सकाळी चार-सहा हजारांचा जमाव झेंडावंदनासाठी गोवालिया टँक मैदानावर जमला होता. त्यासाठी मौलाना आझाद व नेहरू येणार होते. या कार्यक्रमाचे संयोजन अरुणा असफ अली, देश सेविका संघ व मुंबई काँग्रेस सेवा दलाकडे होते. मात्र पोलिसांनी झेंडावंदनास प्रतिबंध केल्यामुळे संघर्षास तोंड फुटले. तरीही सेवादलाचे प्रमुख वाडिलाल व अरुणा असफ अली यांनी झेंडा फडकावला. तसेच त्यांनी सरकारने काँग्रेस नेत्यांना पकडून अज्ञातस्थळी नेल्याची बातमी घोषित केली. मृदुला साराभाई, धीरजलाल देसाई, टी.ए.अविनाशी लिंगम चेट्टीआर, सी.के.गोविंद नायर, एस.नीलकंठ अय्यर, मणिभाई सेठ वगैरेही उपस्थित होते. पोलिसांनी हे मैदान सेनादलाकडे सोपवून अश्रुधूर सोडला व आततायीपणे लाठीमार केला. राष्ट्रध्वज खाली खेचला. तेव्हा ध्वजाचे रक्षण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या युवकांना बेदम मारहाण करण्यात आली.

गोवालिया मैदानावर पोलीस व सेनादलाने केलेल्या अतिरेकी कारवाईच्या वार्ता मुंबईभर वाऱ्यासारख्या पसरल्या. उत्स्फूर्त हरताळ पाळण्यात आला. युवकांचे घोळके फिरू लागले. प्रक्षुब्ध झालेले जमाव 'छोडो भारत,' 'चले जाव' अशा घोषणा देत व महात्मा गांधींचा अभूतपूर्व जयजयकार करीत फिरू लागले. भयंकर खवळलेल्या त्या जमावाला आवरण्यासाठी पोलीस व सेनादलाचे सैनिक

अश्रुधूर, बेदम लाठीमार व गोळीबार असे उपाय पहिल्याच दिवसापासून करू लागले. म्हणून जमाव प्रचंड दगडफेक करीत सरकारी गोदामे लुटणे, तावडीत सापडलेल्या पोलिसांचे गणवेश जाळणे, ट्राम व बससेवा बंद करणे अशा प्रकारांनी आपला संताप व्यक्त करू लागला. दिवसभर गिरगाव, ताडदेव, वरळी, भायखळा, परळ, दादर व माहीम भागांमध्ये पोलीस व जमाव यांच्यात चकमकी होत राहिल्या. काँग्रेसचाच नव्हे तर सर्व जनतेचा आवाज सरकारने बंद केला होता. दडपशाहीचा नंगानाच सुरू केला. पोलिसांच्या जोडीला गोरे सेनादल तैनात केले.

वस्तुतः काँग्रेसने आंदोलनाची हाक दिलेली नव्हती. बोलणी व वाटाघाटीचे सोपस्कार करण्याचे गांधीजींनी निःसंदिग्धपणे जाहीर केलेले होते. पण ब्रिटिशांनी युध्यमान पवित्रा घेऊन अतिरेक केला. त्यामुळेही जनमत कमालीचे प्रक्षुब्ध झाले. ९ ऑगस्टला संध्याकाळी शिवाजी पार्कवर गांधीजींची सभा आधीच घोषित झालेली होती. या सभेसाठी विराट जनसमुदाय जमणे स्वाभाविकच होते. कल्याण, विरारपासून लोक आलेले होते. दादर भागात तीन लाखांवर जनसमुदाय आला होता. गांधीजींच्या पश्चात् कस्तुरबा गांधी, सुशीला नय्यर, प्यारेलाल वगैरे भाषणे करणार असे जाहीर झाले. मात्र सरकारने त्यांना थोड्या वेळेआधी अटक करून मुंबईत स्थानबद्ध केले. त्यामुळे रागावलेला जनसमुदाय अधिकच अनावर झाला.

शिवाजी पार्क परिसरात पोलीस व मिलिटरीने केलेल्या भयंकर अत्याचारांविषयी खुर्शिदबेन नौरोजी यांनी त्या परिसरातील ५० डॉक्टर, वकील, प्राध्यापक व शास्त्रज्ञांची भेट घेऊन माहिती मिळवली. त्यांनी त्यावर आधारित अहवाल सरकारला पाठवला. त्यात म्हटले होते की, ‘ या भागात मिलिटरी पथके मशिन-गनमधून प्रच्छन्नपणे फायरींग करीत होते; पुरुषांना नागवे करून झोडपण्यात आले; घरांमध्ये घुसून सैनिक मारहाण करीत; नाझी सेनादलाच्या *ब्लॅक अँड टॅन* या अमानुष तंत्राचाही उपचार करीत; या भागातून रणगाडे, तोफाधारी जड वाहने यांचे संचलन करण्यात आले; एका विमानाने खाली येऊन अश्रुधुराचे बॉंब टाकले.’ शिवाजी पार्कवर ब्रिटिशांनी केलेल्या आतंकवादी कारवाईचे अत्यंत

गंभीर परिणाम झाले. विद्यार्थी वर्ग चवताळून उठला. विद्यार्थी कृती समितीने सरकारी यंत्रणा उद्ध्वस्त करण्याचा निर्धार केला.

९ ऑगस्ट रोजी मुंबईतील जनसमुदायाने ट्राम व बस प्रवासव्यवस्था पूर्णतः बंद पाडली, पण एकही वाहन जाळले नाही. पोलीस स्टेशन उद्ध्वस्त केले आणि पोलिसांचे गणवेश व शस्त्रे हस्तगत केली, पण एकालाही ठार मारले नाही. पोलिसांनी अश्रुधूर सोडताच जवळच्या घरांमधील महिला व मुले पाणी मारून धुराची तीव्रता घालवत. पोलीस व नागरिकांमधील संघर्ष अविरत चालू राहिला. पहिल्या दिवसातील संघर्षाचा सर्वोच्च बिंदू शिवाजी पार्कवर झाला. ९ ऑगस्ट रोजी तत्कालीन मुंबईत सहा ठिकाणी गोळीबार झाला. आठ जण हुतात्मा झाले व १६९ जण जखमी झाले. त्यामुळे १० तारखेपासून आंदोलनाची तीव्रता वाढली. तासागणिक परिस्थिती बिघडत राहिली. शहरातील संपूर्ण व्यापारी जगताने उत्स्फूर्तरीत्या बंद पुकारला. सर्व महाविद्यालये व बहुतेक शाळा ओस पडल्या व मुलांनी आंदोलनाची धुरा उचलली. कम्युनिस्टांना धुडकावून राष्ट्रीय गिरणी कामगार संघाने कामगारांना आंदोलनात उतरवले. कामगारांनी आंदोलनाची तीव्रता वाढवली.

१० ऑगस्टपासून मुंबईतील विद्यार्थी व कामगार वर्गाने सरकारचा युद्धप्रयत्न हाणून पाडण्याच्या उद्देशाने कापड गिरण्या बंद पाडण्यावर भर दिला. सरकार शस्त्रबलावर कापड उत्पादन चालू ठेवण्याचा अट्टाहास करीत असल्यामुळे, त्यात व्यत्यय आणणे आंदोलनास पोषक होते. कोहिनूर मिलसारखे काही मालक मिल बंद ठेवण्यास राजी असले, तरी पोलीस अधिकारी त्यांना दरडावून मिल चालू ठेवण्यास भाग पाडत. सरकारला सेनादलासाठी कापडाची गरज होती. म्हणूनही स्वातंत्र्यसैनिकांनी मिलांवर लक्ष केंद्रित केले.

देश सेविकांनी शहरभर भित्तिपत्रके व भुईपत्रिका लिहून प्रचार केला. दादर, माटुंगा, घोडपदेव, भोईवाडा परिसरात लढा अधिक तीव्र झाला. तो दडपण्यासाठी पोलीस असमर्थ ठरल्यामुळे सेनादलाची खास प्रशिक्षित ईस्ट यॉर्कशायर रेजिमेंट तैनात करण्यात आली. सेनादलाने युद्धाप्रमाणे नागरिकांवर गोळ्यांचा वर्षाव केला.

तरीही स्वातंत्र्यसैनिकांचा निर्धार ढळला नाही, असे मुंबईच्या पोलीस कमिशनरने अहवालात कबूल केले. त्यांचे उद्दिष्ट एकच—पोलीस व सेनादलास निष्प्रभ ठरविणे! अफाट जनसमुदायाने पश्चिम व मध्य रेल्वेच्या दादर स्टेशनला वेढा घातला. स्टेशन जाळून टाकण्याचाही काही लोकांचा इरादा होता. पण काँग्रेसजनांनी तो हाणून पाडला. मात्र वाहतूक पूर्णपणे बंद पाडली.

सरकारने दुपारपासून मुंबईभर संचारबंदी लादली. पण उपयोग झाला नाही. केवळ हवेत गोळीबार न करता नेम धरून बंदुका चालविण्याचा पोलीस कमिशनरने आदेश दिला. पण तरीही ११ ऑगस्टला लढा आटोक्यात आला नाही. काँग्रेसजनांची उद्दिष्टे व कार्यपद्धती ९ तारखेप्रमाणेच चालू राहिली. गव्हर्नर लम्ले यांनी आकाशवाणीवरील भाषणातून दमबाजी केली. पण त्याचाही उपयोग झाला नाही. १२ ऑगस्टलाही मुंबईतील सर्व महाविद्यालये, बहुतेक सर्व शाळा व गिरण्या बंद असल्याची कबुली कमिशनरच्या अहवालातच आहे. अनेक विद्यार्थी सेक्रेटेरिएटमध्ये घुसले व त्यांनी तेथील बाके मुंबई विद्यापीठ इमारतीसमोरच्या रस्त्यावर आणून ठेवली होती. आणि रस्ता अडवला होता. राज्याच्या राजधानीच्या मुख्यालयाची अशी अवस्था तर इतर ठिकाणच्या परिस्थितीची कल्पना करावी.

मुंबईतील आंदोलनामुळे अगणित लोकांनी शहरातून पलायन केले. काँग्रेस समितीने कारखाने बंद पाडण्याच्या उद्देशाने, लोकांना आपल्या खेडेगावांमध्ये परत जाण्याचे आवाहन केले होते. सरकारचे कडक प्रतिबंधक हुकूम असूनही १० ऑगस्टपासून मुंबई प्रांतिक काँग्रेस समितीने (बी.पी.सी.) **बॉंबे काँग्रेस बुलेटिन** प्रसिद्ध करण्यास आरंभ केला. दररोज प्रकाशित होणाऱ्या या पत्रकातून आंदोलनाविषयीच्या अधिकृत बातम्या आणि मार्गदर्शक सूचना व उत्तेजनपर लेख प्रसिद्ध होत. १९४२ च्या आंदोलनात व त्यापूर्वीही भारतात कित्येक प्रचारपत्रके निघाली होती. तथापि **बॉंबे काँग्रेस बुलेटिनचा** गुणात्मक दर्जा सर्वश्रेष्ठ होता.

आंदोलनामुळे मुंबईतील कापड गिरण्या व युद्धसाहित्य बनवणारे कारखाने थंडावले. शेअर मार्केट, कापड बाजार, सोने-चांदी व्यापार, धान्य व दवा बाजार बंद पडले. अर्थजीवन विसकळीत झाले. शाळा व महाविद्यालये ओस पडून

विद्यार्थी वर्ग आंदोलनात सहभागी झाला. विद्यार्थिसेना हा चिंतेचा विषय झाल्यामुळे सरकारने मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु बोमनजी वाडिया यांना महाविद्यालये त्वरित उघडण्यासाठी सर्वस्व पणाला लावावे, असा आदेश दिला. वाडियांनी २० ऑगस्टला सर्व प्राचार्यांची बैठक घेतली. त्यावर विद्यार्थी संघटनेने जाहीर पत्रकाद्वारे उत्तर दिले—'शिक्षण थांबू शकेल, पण स्वातंत्र्य आता थांबू शकत नाही.' काँग्रेसच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून मुंबई विमानतळाशी संबंधित ६० पायलटांनी बेमदुत संप पुकारला. पोलीस निरीक्षक कर्णिकांनी नोकरीचा त्याग करून कारावास पसंत केला (१४ ऑगस्ट १९४२). मुंबई सरकारचे महाअधिवक्ता मोतीलाल सेटलवाड व सॉलिसिटर सी.सी.शहा आणि सरकारी वकील आर.ए.जहागिरदार यांनीही पदत्याग करून मुंबई सरकारला हादरा दिला होता. सरकारच्या पर्ल हार्बर टाईप कारवाईमुळे या शहरात पेटलेला वणवा लवकर विझण्याची शक्यता दिसत नव्हती.[२०]

**लढ्यासाठी बारा कलमी योजना :—**आंदोलनाची योजना व कार्यपद्धतीविषयी अभ्यासकांनी अनेक मते मांडलेली दिसतात. वस्तुतः या महत्त्वाच्या विषयाबाबत सखोल संशोधनाची गरज आहे. काँग्रेसचे इतिहासकार पट्टाभी सीतारामय्या म्हणतात, काँग्रेसने आंदोलनाचे पूर्वनियोजन करून ठोस योजना बनवलेली नव्हती. भूमिगत पुढारी डॉ. लोहियादेखील हे वेगळ्या शब्दांत सांगतात. काही भाष्यकारांनी या लढ्यास '**स्पाँटॅनिअस रिव्हॉल्युशन**' ठरवून निश्चित पुढाऱ्यांचा उल्लेख केलेला नाही. पण सादिक अली व सुचेता कृपलानी यांनी घडवलेल्या बैठकीचा त्यांनी उल्लेख केला आहे. सेवाग्राम आश्रमवासींचा निरोप घेताना बापूंनी आंदोलनाविषयी काहीच ठोस सूचना दिल्या नव्हत्या, हे सत्यच आहे. ४ ऑगस्ट १९४२ रोजी बापूंनी मुंबईत काँग्रेस कार्यकारिणीच्या सभासदांसाठी 'सूचना' लिहिल्या होत्या. त्यांवर ८ ऑगस्ट रोजी कार्यकारिणीत थोडी चर्चा झाली, हे सत्य आहे. परंतु त्यांवर ९ तारखेला सकाळी सविस्तर विचारविनिमय करून काँग्रेस कार्यकारिणी निर्णय घेईल, असे ठरले होते. पण तत्पूर्वीच सकाळी ५ वाजता धरपकड झाल्यामुळे निर्णय न होता सूचनांचे कागद कोठेतरी पडून राहिले.

हे कागद नंतर **कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी**, खंड ७६, पृ. ३६४-६७ मध्ये प्रकाशित करण्यात आले.

हिंदुस्तान सरकारचा दावा होता की, या आंदोलनाचे संकल्पन महात्मा गांधी यांनीच केले. त्यांच्याच संकल्पित योजनेचा अन्वयार्थ त्यांच्या सहकाऱ्यांनी आम जनतेपर्यंत पोहोचवला. महत्त्वाच्या सर्व काँग्रेस पुढाऱ्यांनी १४ जुलैपासून ८ ऑगस्टपर्यंतच्या कालावधीत महात्मा गांधींची योजना जनतेच्या डोक्यात भरवली. सरकारने प्रकाशित केलेल्या अहवालात म्हटले होते की, **मुंबईत सरदार पटेल व शंकरराव देवांनी अत्यंत सखोल पूर्वतयारी केली आणि महात्मा गांधींनी काँग्रेस कार्यकारिणीला कार्यप्रवण केले.** याचेच प्रतिबिंब बारा कलमी योजनेत दिसते, असा या सरकारी अहवालाने अर्थ काढलेला दिसतो. सरकारच्या **काँग्रेस रिस्पाँसिबिलिटी फॉर डिस्टर्बंसेस** अहवालात काँग्रेस व गांधीजी यांच्यावर बरेच असत्य आरोप बेजाबदारपणे केलेला होते.[२१]

बारा कलमी योजना व १९४२ च्या क्रांतिआंदोलनाचे स्वरूप समजण्यासाठी सरदार पटेलांनी मुंबईत केलेली सघन पूर्वतयारी समजून घेणे आवश्यक वाटते. दत्तात्रय बाळकृष्ण ऊर्फ काका कालेलकर, जयचंद विद्यालंकार व कांजी द्वारकादास यांची निवेदने स्पष्ट करतात की, छोडो भारत लढ्याचा जो आकृतिबंध तयार झाला तो सरदार पटेलांनी बनविलेला होता. **कालेलकरांनी जबलपूर जेलमध्ये जबानी दिली होती की, पटेलांना खुले बंड व काही समांतर सरकारे अभिप्रेत होती. त्याबाबत त्यांनी गांधीजींशी चर्चा करून निकटवर्ती माणसांना सूचना दिल्या.** अशा माणसांनी त्याप्रमाणे काम केले होते. मुंबईतील बुलेटिनच्या प्रचारावरही गांधीजींइतकाच पटेलांचाही प्रभाव होता. काका कालेलकरांच्या मते, पटेलांनी एकदम सर्वत्र विद्रोह पेटवण्याच्या योजना संमत करून ठिकठिकाणी समांतर सरकारे संघटित करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मुंबईच्या कांजी द्वारकादास यांनीही असेच मत व्यक्त केले होते. डॉ. राजेंद्र प्रसाद यांचे निकटवर्ती व भूमिगत पुढारी **जयचंद विद्यालंकार यांनीही साबोटाज आणि समांतर सरकारे स्थापन करण्याचे श्रेय वल्लभभाई**

**पटेलांना दिले. जबानीत ते म्हणाले की, अटकेपूर्वी एक तासाआधी पटेलांनी वेगळा जहाल कार्यक्रम लिहून एका खास निकटवर्ती माणसाकडे सोपवला होता.** पटेलांचे दुसरे एक निकटवर्ती चंद्रकांत हे समक्ष-साक्षी देखील या कबुली जबाबांची सत्यता पटवतात.[२२]

वस्तुतः ९ ऑगस्ट रोजी सरकारच्या उतावळेपणातून व आततायीपणातून निर्वाणीची स्थिती निर्माण झाली. जनतेपुढेही अरिष्ट उभे राहिले होते. त्या क्षणी लोकांना गांधीजींच्या भाषणांमधील मंत्र व नारे आठवले. सरदार पटेलांनी अधिवेशनातील ७०,००० श्रोत्यांसमोर केलेला जबरदस्त निर्धार लोकांना आठवला— "All the programmes followed since 1920 may be included and many more, collectively and simultaneously in the course of the coming struggle. Every one of us shall feel as a citizen of Free India. No source is to be left untapped, no weapon untried. This is going to be an opportunity of our life time. The struggle must be short and swift.... There is no room left for negotiations. Every one who goes from here shall carry this message. So long as Gandhiji remains free, he is our Commander...... But if he is arrested and imprisoned no one will be responsible for whatever happens in India.... If anarchy comes, that too will be Britain's responsibility..... " (Home Poll (I), File No. 3/44/43).

वस्तुतः जून-जुलैपासूनच महात्मा गांधींची आक्रमक व क्रांतिवादी भूमिका जगजाहीर झालेली होती. 'लीव्ह इंडिया टू गॉड, लीव्ह इंडिया टू अनार्की.' 'धिस इस ॲन ओपन रिबेलिअन.' 'नो सोर्स इज टू बी लेफ्ट अन्टॅप्ड, नो वेपन अन्ट्राईड. धिस इज गोइंग टू बी द अपॉर्च्युनिटी ऑफ अवर लाईफटाईम.' महात्माजी यांचे 'डू ऑर डाय' असे सर्वच मंत्र व नारे सूचक होते, स्वयंस्पष्टच होते. भारत स्वतंत्र करावयाचा अथवा या संघर्षात मरण पत्करावयाचे! सर्वच स्तरांमधील भारतीयांना म्हणजे सरकारी कर्मचारी, विद्यार्थी, संस्थानिक, सेनादलातील

सैनिक, पत्रकार, लेखक, व्यापारी वगैरे सर्वांनाच बापूंनी ८ ऑगस्टच्या भाषणात निश्चित स्वरूपाच्या सूचना दिलेल्या होत्या. ७ ऑगस्ट रोजी बापूंनी काँग्रेस कार्यकारिणीसमोर मांडलेल्या प्रस्तावात शेतकऱ्यांबद्दल सुचवले होते की, ज्या शेतकऱ्यांमध्ये धैर्य असेल त्यांनी सरकारी जमीन महसूल भरण्यास नकार द्यावा. "Congress holds that the land belongs to those who work on it and to no one else." यातूनही पुरेसा संदेश गेलेला होता.

विकेंडेन अहवालात बापूजींचे निकटवर्ती राजिंद्रनाथ, प्यारेलाल, जगत नारायण चोप्रा वगैरे समक्षसाक्षींचे जबाब व निवेदने दिलेली आहेत. गांधीजींच्या संभाव्य अटकेची बातमी रात्री अकरा वाजता समजल्यावर त्यांनी झोपण्यापूर्वी आंदोलनाविषयीच्या सूचना लिहून ठेवल्या होत्या. त्यांनी ते कागद प्यारेलालजींना दिले आणि बजावले होते की, या खेपेला आंदोलनास हिंसाचाराचे गालबोट लागले तरी माघार घेतली जाणार नाही. प्यारेलालजींनी त्या कागदांची एक प्रत राजिंद्रनाथ यांना दिली होती. त्यांनी तिचे उर्दूत भाषांतर करून पंजाबच्या सरदार प्रतापसिंग व राम किशन यांना एक प्रत दिली. गांधीजींच्या सूचनांची बी.पी.सी.सी. च्या नोट पेपरवर लिहिलेली एक प्रत ११ ऑगस्ट १९४२ रोजी बंगालमधील गुप्तचरांच्याही हातात पडली होती, हे विशेष होय.

जगत नारायण चोप्रा यांच्या जबानीतून अधिक भक्कम पुरावा पुढे येतो. गांधीजी व पुढाऱ्यांना अटक झाल्यावर इतर प्रांतांतील काही पुढारी बिर्ला भवनावर येऊ लागले. सकाळी ९ वाजता तिथे काँग्रेस कार्यकारिणीची बैठक होऊन गांधीजी मार्गदर्शन करणार, असे आधी ठरले होते. परंतु पुढील धोका ओळखून सुचेता कृपलानी अथवा खुर्शिद नौरोजी यांनी सर्वांना तेथून जाण्यास सांगितले. लगेच १० वाजता सरदार पटेलांचे चिरंजीव डाह्याभाई पटेलांच्या घरी गुप्त बैठक झाली.

९ ऑगस्टच्या या अत्यंत महत्त्वाच्या बैठकीत प्यारेलाल, अच्युतराव पटवर्धन, राम मनोहर लोहिया, अरुणा असफ अली, सुचेता कृपलानी, सादिक अली,

डॉ. एम.डी.डी. गिल्डर, चोइतराम गिदवाणी, गोपिनाथ बारडोलोई, मोहनलाल सक्सेना, मिहिरलाल चॅटर्जी, कालिपाद मुखर्जी, मिया इफ्तिखार-उद्-दिन, सरदार प्रतापसिंग वगैरे नेते उपस्थित होते. खुर्शिदबेन नौरोजी व राजिंद्रनाथ हेही बैठकीला हजर होते. याच बैठकीत महात्मा गांधी यांनी लिहिलेल्या सूचना, त्यांची अनेक व्याख्याने व वचने यांवर आधारलेला **बारा कलमी कार्यक्रम** तयार करण्यात आला. परंतु हा कार्यक्रम एकट्या काँग्रेस समाजवाद्यांचाच नसून त्यावर महात्मा गांधींचाच प्रभाव असल्याचे न्या. विकेंडेनचे मत बनले होते. मात्र हा कार्यक्रम बराच सखोल असल्याकारणाने तो इतक्या घाईत केलेला नसावा. किंबहुना तो ९ ऑगस्टपूर्वीच तयार असावा असा विकेंडेन यांनी तर्क लढवला. आणि त्याविषयी त्यांना खात्री वाटत होती.[२३]

इतके मात्र निर्विवाद की, १२ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईत प्रकाशित झालेल्या **क्विट इंडिया** पत्रकात साजेशा उद्देशिकेसह (प्रीअँबल) संपूर्ण बारा कलमी योजना प्रसिद्ध झाली. या उद्दशिकेत महात्मा गांधींचा अखेरचा संदेशही छापलेला होता. त्यातूनही देशप्रेमी स्त्री-पुरुषांना स्वातंत्र्यासाठी निकराने लढण्याची प्रेरणा मिळाली. गांधीजींना अटक म्हणजे ब्रिटिशांनी काँग्रेसशी पुकारलेले युद्ध समजून त्यास निकराने तोंड द्यावे, असा त्यातून संदेश मिळाला. **क्विट इंडियाच्या** १२ ऑगस्टच्या अंकात व माझ्या **क्विट इंडिया रिव्हॉल्युशन** या ग्रंथात हा संपूर्ण कार्यक्रम दिलेला आहे.

तत्कालीन सर्व पुरावे विचारात घेता मान्य करावे लागते की, **क्विट इंडिया** पत्रकाच्या आधीच ९ ऑगस्ट १९४२ रोजी बारा कलमी योजनेच्या प्रती मुंबईत छापून वितरित केलेल्या होत्या. अधिवेशनासाठी संपूर्ण भारतातून आलेले कित्येक हजार काँग्रेस कार्यकर्ते ९ तारखेला मुंबईतच होते. सकाळपासून पेटलेला शहरातील विद्रोह त्यांनी समक्ष पाहिला होता. म्हणून बारा कलमी कार्यक्रमाची छपाई तात्काळ करून अंकाच्या प्रतींचे वितरण अतिजलद गतीने करण्यात आले. अनेक स्वयंसेवक व स्वयंसेविकांनी प्रतींचे वितरण केले. पुढील ३/४ दिवसांत या प्रती भारतभर पोहोचल्या होत्या. उदाहरणार्थ, मुंबईहून कोलकात्यात

११ ऑगस्टला पोहोचल्यावर अटक झालेल्या हरीपद सरकार यांच्याकडे पिवळ्या कागदावर छापलेल्या या योजनेची प्रत पोलिसांना मिळाली होती. ज्या प्रांतांमधील कार्यकर्ते मुंबईत आढळले नाहीत, तिथे खास दूतांमार्फत योजनेच्या प्रती पाठविण्यात आल्या. १२-१३ ऑगस्टपर्यंत संपूर्ण देशभर प्रती पोचल्या होत्या. अलगुराय शास्त्री (आझमगडचे आमदार) यांनी स्वतः प्रती नेल्याचे सांगून, पुढे म्हटले की, याव्यतिरिक्त सरदार पटेलांनी साबोटाज, जहाल कारवाया व पोलीस ठाणी ताब्यात घेणे आणि समांतर सरकार संघटित करण्याचा अतिरिक्त कार्यक्रम निर्धारित केलेला होता. **सरदारांनी ८-९ ऑगस्टच्या रात्री ही योजना तयार करून तिच्या वितरणाचे काम गुजराती स्वयंसेवकांवर सोपवलेले होते. या अतिरिक्त योजनेच्या काही प्रती नंतर गुप्तचरांनाही आढळल्या.**

मुंबई शहरात गुप्तपणे प्रचार करणारे डॉ. जीवराज मेहता (के. ई. एम. रुग्णालयाचे डीन), गांधीवादी रंगराव दिवाकर, खुर्शिद नौरोजी, मृदुला साराभाई, अमतुलबेन सलाम, डॉ. गिल्डर व डॉ. साठे यांना साबोटाज पाहणे हा नवा अनुभव होता. बापूजींचे शिष्य किशोरीलाल मश्रूवाला यांच्यावर **हरिजन** पत्रकाची जबाबदारी येऊन पडली.

दरम्यान आगाखान भवनात बंदिवान असलेले महादेवभाई देसाई १५ ऑगस्ट रोजी वयाच्या ५०व्या वर्षी अचानक मरण पावले. उत्तम प्रकृती असलेले महादेवभाई तुरुंगात गेल्यावर केवळ सातव्या दिवशी मरण पावल्यामुळे, देशभर दुःखाबरोबर संशयाचे वादळ उठले. महादेवभाईंच्या पत्नी दुर्गाबेन व सुपुत्र नारायण यांना अंत्यदर्शन घेण्यासही निर्दय सरकारने परवानगी नाकारली. ब्रिटिशांच्या आडमुठेपणाच्या धोरणामुळे महादेवभाईंवरील अंत्यसंस्कार आगाखान कारागृहाच्या आवारातच पोलिसांनीच करावेत, असा लम्ले सरकारचा आदेश आला. म्हणून महात्माजी यांनीच अंत्यसंस्कार केले. सरकारच्या या अविवेकी निर्दयपणाची देशभर तीव्र प्रतिक्रिया उमटली.

बहुधा याचा परिणाम असेल! २३ ऑगस्ट १९४२ च्या **हरिजन** पत्रकात किशोरीलाल मश्रूवालांनी साबोटाज वगैरे धोरणाविषयी स्वतःचे व्यक्तिगत मत प्रदर्शित केले. त्याचा सारांश पाहा—'जीवितहानी न करता अहिंसकपणे वाहतूक बंद पाडणे अनुज्ञेय होय! रेल्वे स्थानके जाळणे आपणास आवडत नसले, तरी

आपण त्यास विरोध करणार नाही. संप करणे उत्तम! अशा आंदोलनात तारा तोडणे, रूळ विसकळीत करणे, लहान पूल पाडणे यास हरकत नाही. मात्र जीवित धोक्यात घालू नये. आपल्या दृष्टीने ब्रिटिश सत्ता व जपान यांच्यात फारसा फरक नाही. अक्ष राष्ट्रांप्रमाणेच ब्रिटनही आक्रमक आहेच. म्हणून अक्ष राष्ट्रांविरुद्ध करावयाच्या उपाययोजना ब्रिटिशांविरुद्धही करावयास हरकत नाही, मात्र अहिंसक मार्गाने '![२४]

किशोरीलाल यांचे हे मत समजताच अनेक जणांनी दळणवळण विसकळीत करण्यास प्रारंभ केला. गांधीवादाचे विश्वविख्यात ज्येष्ठ प्रवक्ते जे.सी.कुमारअप्पा यांनीही ९ ऑगस्टनंतरच्या घटनांचे समर्थन केले. त्यांनी पोलिसांच्या हातातील शस्त्रे हिसकून घेण्याचेही समर्थन केले. त्यामुळे युवकांच्या आक्रमक कारवायांना व साबोटाजला उत्तेजन लाभले. पुरषोत्तम त्रिकमदास, डॉ. गिल्डर, डॉ. मनोहर, सूरजी वल्लभदास, पुरषोत्तम कांजी, हाजी जावर गिलानी, रतनसी चापशी व डाह्याभाई पटेल हे मुंबईतील साबोटाज संघटनेचे संयोजक असल्याचे गुप्तचरांना काही दिवसांनी समजले. कावेरीबेन दिवेच्या या कामासाठी आर्थिक मदत देत असत. मात्र घातपाती कृत्यांची कारणे सरकारच्या क्रौर्यातच दडलेली होती, हे मुंबईतील खालील उदाहरणावरून दिसते.

**देवू गणपतचे हौतात्म्य :**—सर्व लष्करी सामर्थ्यानिशी चळवळ चिरडून टाकण्याची गव्हर्नरने नभोवाणीवरून धमकी दिल्यावर (११ ऑगस्ट), पोलीस मुंबईत स्वैराचार करू लागले. भायखळा बाजारात रस्त्यावर देवू गणपत हा २२ वर्षांचा युवक भाजी विकत होता. पोलिसांची गाडी जात असताना त्याने ' चले जाव ', 'करेंगे या मरेंगे ' अशा घोषणा देताच नेव्हिल पायलीन व स्टॅनली जिलेट या पोलीस उपनिरीक्षकांचे माथे फिरले. त्यांनी तरुण देवूवर गोळ्यांचा वर्षाव करून त्याच्या देहाची चाळण केली. ७५ वर्षांच्या त्याच्या वडिलांना तो एकमेव नातलग होता. निराधार झालेल्या बापाने मुंबई सरकारवर खटला भरला. सरकारच्या कॉरोनरसकट सर्व ज्यूरींनी देवूवर गोळ्यांचा वर्षाव करण्याचे काहीच कारण नव्हते, असा कोर्टात अभिप्राय दिला. तरीही गुन्हेगार पोलीस अधिकारी

हे इंग्रज असल्याने ते निर्दोष सुटले. गोऱ्या पोलीस कमिशनराने पोलिसांच्या या अपकृत्यांचेही समर्थन केले. उलट ज्यूरींचा निकाल विकृत मनोवृत्तीचा आहे असे म्हटले. इंग्रजांविरुद्धच्या प्रकरणात कोणाही भारतीयाला कधीच न्याय मिळत नसे ही वस्तुस्थिती होती. देवूच्या प्रकरणानंतर मुंबईकरांनी भूमिगत चळवळीवर व घातपातांवर लक्ष केंद्रित केले. त्यानुसार मुंबईत साबोटाज, बाँबस्फोट व गनिमी युद्धावर अधिक भर देण्यास प्रारंभ झाला. मात्र मुंबईतील साबोटाज निवडक व सुसभ्यपणाचा होता.

## महाराष्ट्रातील पूर्वतयारी

महाराष्ट्र प्रांतिक आणि वऱ्हाड व मध्यप्रांत काँग्रेस समित्यांचे नेते जुलै १९४२ पासूनच आपापल्या कार्यक्षेत्रात आंदोलनासाठी जनमत अनुकूल करण्यासाठी झटू लागले होते. बहुतेकांनी सेवाग्रामला जाऊन मार्गदर्शन घेतले होते. त्यानुसार प्रांतिक नेत्यांनी कार्यकर्त्यांच्या मार्गदर्शनार्थ ठिकठिकाणी शिबिरे घेतली. युसुफ मेहेरअली, शंकरराव देव, पुरषोत्तम त्रिकमदास, गो. आ. देशपांडे, न. वि. गाडगीळ, विनोबा भावे वगैरे अशा शिबिरांमधून मार्गदर्शन करीत. लोकमानस जागृतीची प्रक्रिया १५ जुलैपासून जोरात सुरू झाली होती. सर्व नेते प्रांतिक व स्थानिक पुढारी यांचे संघटन करून युवकांचा सहभाग व प्रचारयंत्रणा बांधण्यासाठी कामाला लागले. जीवनावश्यक वस्तूंच्या टंचाईचे निमित्त करून ब्रिटनच्या युद्धप्रयत्नात खीळ घालण्यासाठी जनमानस प्रोत्साहित करण्यावर भर देण्यात आला. वर्धा-सेवाग्रामभोवती सरकारचे कान व डोळे भिरभिरत होते. तिथे कोणकोण येऊन गेले याच्या नोंदी घेण्यात आल्या. चरखा संघ, महिला संघ, ग्रामोद्योग मंडळ व अनेक गांधीवादी संघटनांचे कार्यकर्ते गांधीजींच्या मार्गदर्शक सूचना घेऊन गेले होते. कित्येक देशी-विदेशी पत्रकारांनी गांधीजींच्या मुलाखती घेतल्या होत्या.

केशवराव जेधे, शंकरराव देव व बाळूकाका कानिटकरांच्या मार्गदर्शनानुसार मे १९४२ पासून सातारा जिल्ह्यातील रा. ग. सोमण, दिनकरशास्त्री कानडे व जिल्हाध्यक्ष व्यंकटराव पी. पवार यांनीही आगामी चळवळीसाठी मोहीम सुरू केली होती. काँग्रेस सदस्य नोंदणी व समित्यांची बांधणी जूनमध्ये सुरू झाली

होती. दुसऱ्या बाजूने अच्युतराव पटवर्धन व श्री. पु. लिमये हे नाना पाटील, आचार्य शं. द. जावडेकर, रामानंद भारती यांना जहाल योजना आखण्याविषयी सल्ला देत होते. सोमण, कानडे, पवार, बुवा गोसावी, एस. आर. कुलकर्णी व महाराष्ट्र काँग्रेस समितीचे चिटणीस गोविंदराव देशपांडे सातारा जिल्ह्यात तयारीला लागले होते. नाना रामचंद्र पाटील व काही जहाल कार्यकर्ते मुंबईतील अधिवेशनासाठी न जाता संघटना बांधणीसाठी जिल्ह्यातच राहिले होते.

९ ऑगस्टला मुंबईत वरिष्ठ पुढाऱ्यांची धरपकड सुरू होताच साताराचे काँग्रेस कार्यकर्ते मुंबईतील पानबाजारातील बद्रिकाश्रमात गुप्तपणे भेटले. तेव्हा यशवंतराव चव्हाण, के.डी.पाटील, चंद्रोजी पाटील, गौरीहर सिंहासने वगैरे हजर होते. त्यांनी निर्णय घेतला की, स्वैर धरपकड होण्याची शक्यता असल्याने प्रमुख व्यक्तींनी भूमिगत राहून आंदोलनाचे सूत्रसंचालन करावे व लढा चालवावा. बरेच कार्यकर्ते मुंबईतच राहिले आणि यथावकाश कर्मभूमीत परत आले. मुंबईत ते पटवर्धनांच्या संपर्कात होते. कार्यकर्त्यांनी मुंबईतून उपरोक्त बारा कलमी योजनेच्या प्रती मिळवल्या होत्या.

काँग्रेस श्रेष्ठींना अटक होताच कुलाबा (रायगड) जिल्हा काँग्रेसचे कार्यकर्ते मुंबईतील खेतवाडीत जमले आणि त्यांनी सर्व मार्गांनी आंदोलन चालू ठेवण्याचा निर्धार केला. बहुतेक सर्व जण भूमिगत झाले, तर काही जण मुंबईतील पुढाऱ्यांच्या मदतीने लढा चालवू लागले. पण बहुसंख्य कार्यकर्ते जिल्ह्यात परत आले. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका व शहर काँग्रेस समितीचे सभासद व काही हजार कार्यकर्ते अधिवेशनासाठी मुंबईत आलेले होते. त्यांच्यापैकी काहींनी मुंबईत अशाच गुप्त बैठका घेतल्या व पुढील आंदोलनाची रूपरेखा ठरवली. बरेच जण भूमिगत झाले व यथावकाश आपल्या कर्मभूमीत परतले. अनेक कार्यकर्त्यांना उपरोक्त बारा कलमी योजना मिळाली, असे दिसते. महाराष्ट्रातील बरेच जण मुंबईतील सरदारगृह, माधवबाग, नृसिंह हिंदू लॉज अथवा गिरगाव व दादरमधील लॉजेसमध्ये राहत असत. तिथे त्यांच्यात चर्चा झाल्या. ज्येष्ठ काँग्रेस नेते गंगाधरराव देशपांडे व पुंडलिकजी कातगडे यांच्याशी अनेक जणांनी सरदारगृहात विचारविनिमय केला होता. केशव गोरेंनी दादर स्टेशनालगतच्या

विजयनगरसमोरील इमारतीत निवडक समाजवाद्यांची बैठक घेतली होती. ९ ऑगस्टला पटवर्धन यांनी सरदारगृहात यशवंतराव चव्हाण वगैरेंची गुप्त बैठक घेऊन कार्यक्रमविषयक सूचना दिल्या होत्या. काही दिवस असा सिलसिला चालू होता. भूमिगत आंदोलनाचीही रणनीती आखण्यात येत होती.

सरकारने डी.आय.आर. खाली अनेक वटहुकूम काढून जनतेविरुद्ध युद्ध पुकारल्यासारखी स्थिती निर्माण केली होती. सरकारने भारतीय दंड विधानातील तरतुदींचा दुरुपयोग केला. नोकरशाहीने दडपशाही आणि व फटकेशाहीचे राज्य निर्माण केले. व्हिपिंगच्या कायद्याखाली कोणालाही, कोठेही व कशासाठीही फटके मारणे सुरू केले. त्यामुळे आंदोलनास प्रारंभीच हिंसक वळण लागले. आंदोलनाच्या प्रारंभापूर्वीच वरिष्ठ पुढाऱ्यांना अटक केल्यामुळे, जनता आक्रमक झाली व लोकांनी उग्र स्वरूपात निषेध केला.

मुंबईतील ९ ऑगस्टच्या अटक-सत्राची वार्ता प्रथम ठाणे परिसरात पसरली. पुढाऱ्यांना अहमदनगरला घेऊन जाणारी खास रेल्वे गाडी चिंचवड व खडकीला थांबली. ही गाडी पुढे चुकून पुणे स्थानकात थांबली. पोलीस अधिकारी शार्प यास न जुमानता नेहरू व शंकरराव देवांनी प्लॅटफॉर्मवर उड्या मारून शार्पशी झटापट केल्याचे लोकांनी पाहिले होते. त्यामुळे काँग्रेस पुढाऱ्यांच्या अटकेची बातमी पुणे व परिसरात वाऱ्यासारखी पसरली. लोकांचा राग अनावर झाला. सरकारने कमालीची गुप्तता पाळली तरी काँग्रेस कार्यकारिणीचे सदस्य अहमदनगरच्या चांदबिबीच्या किल्ल्यात बंदिस्त आहेत, हे स्थानिक लोकांना माहीत होते. फक्त राजेंद्र प्रसाद आजारी असल्याने अधिवेशनास आलेले नव्हते.

अधिवेशनासाठी विदर्भातून मुंबईला गेलेले रविशंकर शुक्ला, डी.पी.मिश्रा, पूनमचंद रांका, बी.जे.देशमुख वगैरेंना त्यांच्या परतीच्या वाटेतच भुसावळ, मलकापूर स्थानकांत अटक करण्यात आली होती. लवकरच ही वार्ता वाटेतील अकोला, मूर्तिजापूर, अमरावती, वर्धा, नागपूर, भंडारा इत्यादी शहरांपर्यंत पोचली आणि सर्वत्र जनआंदोलन पेटले. सरकारने प्रतिबंधक उपाय योजल्यामुळे आणि आंदोलन चिरडून टाकण्यासाठी सर्वत्र पूर्वतयारी करून ठेवल्यामुळे जनमानस

अधिकच प्रक्षुब्ध झाले. सारी जनता सतर्क झाली. सर्व ठिकाणचे स्थानिक पुढारी व विशेषतः विद्यार्थी पेटून उठले. ब्रिजलाल बियाणींनी एक पत्रक काढून आंदोलन प्रज्वलित केले.

## पुण्यातील लढा

पुण्याचे शंकरराव देव, गाडगीळ, जेधे, भा.म.गुप्ते, वि.कृ.साठे, पोपटलाल शहा, गो.आ.देशपांडे, माधव मेमाणे, हरिभाऊ फाटक, वि.प्र.लिमये वगैरेंना तात्काळ अटक करण्यात आली. पण त्यांनी त्यापूर्वीच जनमत पेटवले होते. गांधीजी व पुढाऱ्यांची बातमी उपरोक्त रेल्वे गाडीमुळे समजलेलीच होती. त्यामुळे लोकांचा राग अनावर झाला. पुण्यातील पूर्वोक्त शिबिरांमधून समाजवादी नेत्यांनी युवकांमध्ये आंदोलनाचे स्पिरिट निर्माण केलेलेच होते. त्यामुळे प्रारंभापासूनच युवक आघाडीवर होते. पुण्यातील पुढारी शंकरराव देव, केशवराव जेधे, न.वि.गाडगीळ वगैरेंना प्रारंभीच अटक केल्यामुळे लोक प्रक्षुब्ध झाले. परिणामतः पुण्यात सरकारचा निषेध करत प्रचंड मिरवणुका निघाल्या. पुणे स्टेशनमध्ये थांबलेल्या त्या रेल्वे गाडीमुळे व तिच्यात बंदिस्त केलेल्या नेत्यांच्या दर्शनामुळे स्टेशन परिसरात प्रचंड प्रक्षोभ पसरला. नेत्यांना अटक केलेल्या पुण्यातील पोलीस स्टेशनसमोर लोक उग्र निदर्शने करू लागले. पोलीस निदर्शकांवर जोरदार लाठीमार करून अश्रुधूर सोडत होते. परंतु तरीही जमाव पांगत नव्हता. आठ-दहा हजारांचा मोर्चा काँग्रेस हाऊसवर चाल करून आला. कारण पोलिसांनी काँग्रेस हाऊस ताब्यात घेतले होते. या कृत्याचा निषेध म्हणून जमावाने पोलिसांवर तुफान दगडफेक केली.

अनावर झालेले कॉलेज विद्यार्थी व लोकांचा जमाव पांगवण्यात पोलीस असमर्थ ठरल्यामुळे कलेक्टरने पुण्यात लष्कर तैनात केले. पुणे शहरातील बंदोबस्ताची सूत्रे हॅमंड नामक कुविख्यात लष्करी अधिकाऱ्याकडे होती. त्याने वि.स.माडीवाले या पत्रकाराच्याही छातीवर पिस्तुल रोखले होते. मात्र लगेच एका फौजदाराने माडीवाले हे वार्ताहर असल्याचे सांगितल्यामुळे माडीवाले बचावले. पिसाळलेल्या हॅमंडने ९ ऑगस्टला काँग्रेस हाऊसकडे जाणारे सर्व रस्ते रोखले

होते. त्याचा निषेध म्हणून उपरोक्त मोर्चा काँग्रेस हाऊसवर चाल करून आला. लाठीमार व अश्रुधूर निरुपयोगी ठरल्यामुळे पोलीस व लष्कराने गोळीबार केला. या कारवाईत हातात तिरंगा झेंडा घेतलेला नारायण दाभाडे मारला गेला. सोळा-सतरा वर्षांचा नारायण व त्याचे साथीदार काँग्रेस भवनात शिरण्याचा प्रयत्न करत होते. हाच काय तर त्यांचा अपराध होता. हॅमंडनेच त्याला ठार मारले. **पुण्यातील जनआंदोलनाचा नारायण दाभाडे हा पहिला हुतात्मा!** ब्रिटिशांनी अशा रक्तरंजित कारवाईची सुरुवात केल्यावर पुणे विद्यानगरीतील कॉलेज युवक पेटू उठले.

फर्ग्युसन, इंजिनीअरिंग व कृषी महाविद्यालयांमधील विद्यार्थी प्रारंभापासूनच आघाडीवर होते. त्यांनी १० ऑगस्ट रोजी एस.पी.कॉलेजातील मुला-मुलींना सहभागी करून घेण्यास्तव मोर्चा नेला. त्यात ४,००० जण सामील असल्याची नोंद मला सरकारी अहवालात आढळली. त्यांच्यावर पोलिसांनी जबर लाठीमार केला. पण त्याचाही उपयोग झाला नाही. म्हणून पोलिसांनी तिथे गोळीबार केला. त्यात सहा जण जखमी झाले. ११ ऑगस्टला पुण्यातील विद्यार्थ्यांनी शाळा-महाविद्यालये ओस पाडली आणि बहुतांश युवावर्ग रस्त्यावर आला. त्यांनी टेलिफोनच्या तारा, विजेचे दिवे फोडून शहरी बस सेवा बंद पाडली. विदेशी पोषाख घातलेल्या व ब्रिटिशांशी निष्ठा राखलेल्या लोकांवर हल्ले केले. काही पोलीस शिपायांना चोप देऊन त्यांचे गणवेष जाळले. परंतु पोलिसांनी गोळीबार करून एक निदर्शक ठार मारला. म्हणून अधिक मोठ्या जमावाने पोलीस चौक्यांची मोडतोड केली व काही चौक्या जाळल्या. लष्कराने त्याचा सूड म्हणून गोळीबार करून दोघांना ठार मारले व दहशत बसवली. त्यामुळे पुण्यातील रस्ते ओस पडले. १२ ऑगस्ट रोजी पोलीस व लष्कराच्या हालचालीमुळे दहशतीचे वातावरण असतानाही, एका ठिकाणी निदर्शकांनी त्यांच्यावर दगडफेक केली. तेव्हा लष्कराने तुफान गोळीबार करून एक पुरुष व दोन महिलांना ठार मारले आणि १३ जणांना जखमी केले. मात्र शहराच्या इतर भागांमध्ये सरकारी मालमत्तेची मोडतोड सुरू राहिली. १२ ऑगस्टपर्यंत पुण्यात सात देशभक्त हुतात्मा झाले!

लोकांना दहशत बसावी यासाठी लष्कराने पुणे शहरभर रणगाडे फिरवले. लष्कराने संचलन केले. तरीही तुरळक चकमकी चालू राहिल्या. चळवळीत साबोटाज सुरू झाला. स्वातंत्र्यसैनिकांनी मुंबई ते मद्रास दरम्यानची टेलिफोन व तारसंदेशांची यंत्रणा बंद पाडली.

१३ ऑगस्टपर्यंत बारामतीमधील आंदोलन अखंडपणे चालू राहिले. जमावाने तेथील पोस्ट ऑफिस जाळल्यावर, बारामती रेल्वे स्टेशन, सिग्नल यंत्रणा व तारायंत्र निकामी केले. शिवाय दोन रेल्वे डबे जाळून टाकले. पुण्यातील काँग्रेस व्यवस्थापनाखाली असलेली एकमेव गिरणी सतत पाच दिवस बंद राहिली. खडकीतील दारूगोळा कारखाना आणि शस्त्रांचा कारखाना प्रथमच १५ ऑगस्ट रोजी सुरू झाला. हे महत्त्वाचे कारखाने सहा दिवस बंद राहिल्याने ब्रिटनच्या युद्धप्रयत्नावर विपरीत परिणाम झाला होता.[२५]

पुण्यातील ११ ऑगस्टच्या विद्यार्थी मोर्चात जी. डी. ऊर्फ बापूसाहेब लाड व दत्ता देशमुख हे होतकरू विद्यार्थी होते. पुढील काळात या दोघांनी अनुक्रमे शेतकरी व कामकारी पक्षाचे नेते आणि लाल निशाण गटाचे नेते म्हणून प्रसिद्धी मिळविली. हेच लाड लवकरच सातारा प्रतिसरकारच्या लढ्यातील एक पुढारी म्हणून गाजले. वस्तुतः एस.पी. महाविद्यालयासमोर झालेल्या गोळाबारात गोळी लागून पंगुत्व आलेले ग.वा.बेहेरे हिंदुत्ववादी असल्यामळे १९४२ च्या आंदोलनात सहभागी नव्हते. अशा अनेक जणांना पोलीस कारवायांमध्ये इजा होत असत. १२ ऑगस्ट रोजी पुण्यातील अप्पा बळवंत चौक ते नातूबाग आणि प्रभात सिनेमागृहापासून दक्षिणाभिमुख मारुतीपर्यंतच्या भागात रणगाडे व ब्रेनगनमधून प्रच्छन्न गोळीबार करण्यात आला. त्यात मधुरा अनंत माटे खिडकीतून पाहत असताना त्यांना सैनिकाने गोळी मारून ठार केले. या गोळीबारात एकूण १७ पुरुष व महिला जखमी झाल्या होत्या. अशा अनेकांचा आंदोलनात सहभाग नसतानाही त्यांना गोळ्या लागल्या होत्या. पोलिसांचा अतिरेक पाहिल्यामुळे विठ्ठल पटवर्धन यांच्यासारखे अनेक युवक आंदोलनात उतरले. श्री. पु. लिमयेंच्या सूचनेप्रमाणे हे पटवर्धन घातपाती कारवायांमध्ये सामील झाले. त्यांच्याप्रमाणेच शाळा-कॉलेजांमधील अनेक विद्यार्थीदेखील हत्यारे व स्फोटक पदार्थ जमवणे आणि त्यांचा उपयोग करणे अशा कारवायांमध्ये सहभागी झालेत.

१३ जुलैपर्यंत या शहरात सात जण हुतात्मा झाले. पण पोलिसी अत्याचारांचा प्रतिकार करताना जमावाने एकाच शिपायाचा बळी घेतला होता.

न.चिं.केळकर व टिळक पक्षाचा छोडो भारतला पाठिंबा नव्हता. लोकमान्य टिळकांचा वारसा सांगणारा हा गट स्वातंत्र्य आंदोलनापासून लांब राहिला. त्यांच्या पत्रकानेही पाठिंबा दिला नाही. तशीच हिंदुमहासभादेखील आंदोलनाच्या विरोधात होती. त्यावेळी नारायण ग.गोरे निजामाच्या तुरुंगातच होते. मात्र पुण्यातील आंदोलन बरेच उग्र केले शिरूभाऊ म्हणजे श्री.पु.लिमये, एस.एम.जोशी, अच्युतराव पटवर्धन, नरूभाऊ लिमये तसेच शंकरराव देव, न.वि.गाडगीळ व केशवराव जेधे वगैरेंच्या अनुयायांनी! हिंदुमहासभा व कम्युनिस्ट पक्ष जरी आंदोलनात नव्हते, तरी या पक्षांच्या काही युवकांनी आंदोलनात भाग घेतला होता. सेनापती बापट व विनायकराव भुस्कुटे यांचा फॉरवर्ड ब्लॉक प्रारंभापासूनच आंदोलनात आघाडीवर होता. एस.एम.जोशी पुण्यापेक्षा जळगाव जिल्हा, पंजाब, सिंध व वायव्य सरहद्द प्रांतात अधिक सक्रिय होते. मरगळ आलेल्या ब्राह्मणेतर पक्षाचा त्याग करून मराठे, कुणबी, माळी वगैरे मंडळी आंदोलनात बरीच सक्रिय झाली.

पुण्याच्या वेशीवरील भाड्याने घेतलेल्या आगाखान भवनात गांधींजी बंदिस्त असल्याचे सरकारने गुप्त ठेवले होते. या भवनाभोवती अभेद्य असा सेनादलाचा वेढा होता. तरीही हे गुपित पुण्यातील लोकांना माहीत होते. येरवडा कारागृह खचाखच भरलेले होते. गांधीजींसह कस्तुरबा, महादेवभाई देसाई, सुशीला नय्यर, सरोजिनी नायडू, प्यारेलाल हेही आगाखान भवनात राजबंदी होते. “ मी येथून पळून जाणार नाही असे सरकारला माहीत असूनही, एवढा प्रचंड फौजफाटा येथे ठेवण्याचे कारण काय ? ” असा त्यांनी व्हाइसरॉयला पत्र पाठवून सवाल विचारला होता. सरकार मात्र निरुत्तर!

**या तुरुंगात ठेवल्यावर अवघ्या सातव्या दिवशी अचानक महादेवभाई देसाई मरण पावले.** कोणतीच पूर्वलक्षणे नसताना त्यांचे झालेले निधन हे एक गूढ वाटू लागले. महादेवभाई देसाई यांच्या गूढ मृत्यूची बातमी पुण्यात येताच

काँग्रेसजनच नव्हे तर संपूर्ण जनता चिडली व सरकारकडे संशयाने पाहू लागली. इंग्रजांनी कस्तुरबाजी व अनेकांचे कारावासात खून केले असावेत अशा अफवा पसरल्या. केवळ पन्नास वर्षांचे महादेवभाई आगाखान तुरुंगात गेले तेव्हा पूर्ण तंदुरुस्त व धडधाकट होते. त्यांच्या निधनाच्या बातमीने पुण्यापेक्षा मुंबईवरअधिक गडद शोककळा पसरली. अटक केलेले पुढारी कोठे आहेत हे सरकारने गुप्त ठेवलेले होते. म्हणून मुंबई नॅशनल मिलिशिया हे युवकांचे पथक शोध घेण्यासाठी अहमदनगरपर्यंत जाऊन आले. अफवा अधिकच पसरल्या. मात्र देसाईंच्या निधनाची तार त्यांच्या पत्नी दुर्गाबाई यांना पाठविण्याबाबतचा निर्णय 'कार्यक्षम' इंग्रज सरकारने तब्बल तेरा तासांनी घेतला. त्यासाठी मुंबईचा गव्हर्नर व दिल्लीची मान्यता घ्यावी लागली. बातमी बाहेर आल्यानंतर लोकांनी गांधीजींना पाठविलेले शेकडो शोकसंदेश व तारा आक्षिप्त ठरवून सरकारने दाबून टाकल्या. तसेच खुद्द गांधीजींनी दुर्गाबाईंच्या नावे पाठविलेली सांत्वनपर तार त्यांना कधीच देण्यात आली नाही. गांधीजींचे सर्वाधिक निकटवर्तीय अशा पुत्रवत् महादेवभाईंचा मृतदेह अज्ञात स्थळी जाळून टाकण्याचा अधिकाऱ्यांचा विचार होता. तथापि महात्म्याने खडसावून सांगितल्यामुळे, दहनविधी कारागृहाच्या परिसरातच एक फौजदार व चार ब्राह्मण पोलीस शिपायांच्या मदतीने गांधीजी यांनी उरकून घेतला. अंत्यसंस्कार विधीसाठी बोलविलेल्या एकमेव ब्राह्मणाकडून ही गुप्तवार्ता पुण्यात फुटली.

**महादेवभाईंच्या कारावासातील निधनाचे मुंबई इलाख्यात तीव्र पडसाद उमटले.** सरकारचा निषेध करण्यासाठी मिरवणुका निघाल्या, हरताळ पाळले गेले व राष्ट्रवाद्यांच्या जखमा खोलवर गेल्या.[२६] १६ ऑगस्टला पुण्यात कडकडीत हरताळ पाळण्यात आला. मुला-मुलींच्या दोन मिरवणुका काढण्यात आल्या. त्याबरोबर टेलिफोन तारा व पोलीस चौक्या उद्ध्वस्त करण्यास जोर आला. पुण्यात उसळलेला उद्रेक अल्पावधीत जिल्हाभर पसरला. शासनाच्या आक्रमक दडपशाहीमुळे स्वातंत्र्यलढ्यास भूमिगत आंदोलनाचे रूप आले. त्यातूनच घातपाती कारवायांचा उगम झाला.

काँग्रेसला आधीपासूनच चांगली साथ असलेल्या बारामती तालुक्यात लढ्याला खूप अनुकूल प्रतिसाद मिळाला. बारामतीचे गायकवाड वकील, डॉ. नरवणे, उद्धवराव इंगोले, करंदीकर वकील, गुलाम अली, राऊत वगैरे कार्यकर्त्यांनी तालुक्यात जानेवारी १९४३ पर्यंत सातत्याने आंदोलन चालू ठेवले. पणदऱ्याचे गुलाबराव मुळीक व भवानीनगरच्या काँग्रेस कार्यकर्त्यांनीही लढा चालू ठेवला. बारामतीला जाणाऱ्या रेल्वे मार्गावर अनेक वेळा घातपात करून त्यांनी अधिकाऱ्यांना जेरीस आणले होते. तालुक्यातील या स्वातंत्र्य सैनिकांनी एक-दीड वर्षांचा कारावास भोगला. इंदापूर तालुक्यातील धडाडीचे कार्यकर्ते नारायणराव कुलकर्णी, ज्ञानेश्वर भोंगळे, चिंतू पंढरी, गारटकर, विनायक कुलकर्णी, जोशी, कुंभार आदींनी आंदोलनाची व्यवस्थित आखणी करून लढा बरेस दिवस चालू ठेवला.

जुन्नर तालुक्यातील श्रीपाद केळकर, खडके, श्यामकांत मोरे, शिवाजी काळे इत्यादींनी चळवळ दीर्घ काळ चालू ठेवली. आंबेगाव तालुक्यातील घोडेगावचे रघुनाथ पातकर या तडफदार देशभक्तामुळे तालुक्यातील चळवळ टिकून राहिली. मावळ तालुक्यातील कृष्णराव कर्वे, तात्या बवरे यांनी डोंगराळ भागातील लोकांना आंदोलनात ओढले व वडगाव, तळेगाव, लोणावळा भागात कारवाया चालू ठेवल्या. खेड तालुक्यातील मामा शिंदकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी आंदोलन चालवून कारावास भोगला. चिंचवडचे जुने काँग्रेस कार्यकर्ते घारेशास्त्री, दौंडचे जगन्नाथ पाटसकर, सासवडचे शंकरराव देवांचे निष्ठावंत अनुयायी दादासाहेब गोळे, प्रेमाताई कंटक, आचार्य स.ज.भागवत, चिंतामणशास्त्री जोशी, चंदनमल मुथा व त्यांचे भाऊ व बहीण शांता, वसंतराव महागावकर, वसंतराव निरगुडे वगैरेंनी पुरंदर तालुक्यात व्यापक चळवळ उभारली. शंकरराव देवांच्या सासवड आश्रमाच्या स्थापनेपासून तेथील कार्यकर्त्यांनी सातत्याने भाग घेतला होता. अनुताई लिमये, इंदू भट, विमल गरुड, कुसुम कारखानीस, मृणालिनी धनेश्वर यांच्यासारख्या अनेक विद्यार्थिनींनी आंदोलनात कारावास सोसला. लक्ष्मीबाई ठुसेंना येरवड्यात स्थानबद्ध करण्यात आले होते.

कम्युनिस्ट पक्षाचा छोडो भारत आंदोलनास विरोध असूनही, श्रीपाद अमृत डांगे यांचे शिष्यत्व पत्करलेल्या श्रीपाद श्रीकृष्ण लिमयेंनी आणि विनायक गणेश ऊर्फ भाऊ फाटकांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनीही या आंदोलनात सक्रिय भाग घेतला होता. त्यासाठी त्यांना कम्युनिस्ट पक्षापासून फारकत घ्यावी लागली. तसेच दत्ता देशमुखही! या तिघांनी नंतरच्या काळात लाल निशाण गट स्थापन करून गरीब शेतकरी, मजूर व एकूण कामगार वर्गासाठी आंदोलने केली. विष्णू चितळे यांनीही कम्युनिस्ट धोरण धिक्कारून या लढ्यात योगदान दिले. सातारा प्रतिसरकारची धुरा वाहणाऱ्या किसन वीरांना येरवडा तुरुंगातून निसटण्यासाठी पैशांची मदत करणारे काँग्रेस कार्यकर्ते होते डॉ. ह. वि. तुळपुळे! पुण्याव्यतिरिक्त पूर्व खानदेशातही भूमिगत कारवायांना मदत करणाऱ्या एस. एम. जोशी, मधू लिमये यांच्या जोडीला पुण्याचे विष्णू चितळे हेही होते. लढ्यातून माघार घेण्याचे कबुलीजबाब लिहून देणारेही काही पळपुटे होते. पण शंकरराव मोरेंसारखे माघार घेणारे पुच्छगामी विरळाच होते.

पुण्यातील उघड आंदोलन दडपण्यात यश आल्याचा दावा जरी जिल्हा दंडाधिकाऱ्याने केला, तरी डिसेंबर १९४२ पर्यंत अनेक ठिकाणी बॉंबस्फोट होतच होते. फर्ग्युसन कॉलेजमध्येही स्फोट होत. २८ सप्टेंबरपासून ५ ऑक्टोबरपर्यंत शहरात संचारबंदी करावी लागली होती. सोळा युवकांनी शहराचा वीजपुरवठा खंडित केला होता. पुणे कँटोनमेंटच्या संरक्षित भागातील फिल्ड कंट्रोलर ऑफ मिलिटरी अकाऊन्टच्या इमारतीस युवकांनी एप्रिल १९४३ मध्ये मोठी आग लावली होती. सामूहिक दंडाद्वारे नागरिकांवर दहशत बसविण्याचे एक उदाहरण देता येते ते बारामतीचे. या शहरावर पन्नास हजार रुपयांचा दंड लादून तो संगिनींच्या टोकांवर पोलिसांनी वसूल केला. बारामतीच्या मुसलमान मंडळींनी आंदोलनात व घातपातातही भाग घेऊन स्वातंत्र्यलढ्यास योगदान दिले. म्हणूनच प्रशासनाने इतर जिल्ह्यांप्रमाणे बारामतीच्या मुसलमानांना दंडातून सूट दिली नव्हती. पुणे-बेळगाव लोहमार्गावर वारंवार घातपात करण्यात येई. त्यामुळे येथील रेल्वे सेवा अनेकदा बंद पडत असे.

**मिलिटरी डेपोंमधील घातपात :—**स्वेच्छाचारी निकाल मिळवण्यासाठी सरकारने लादलेला स्पेशल क्रिमिनल कोर्ट्स ऑर्डिनन्स १९४२ इतर जिल्ह्यांमध्ये लागू केलेला असला, तरी पुण्यासाठी तो अगदी ऑक्टोबर १९४२ पर्यंत लागू नव्हता. कारण पुण्याचे पुढारी अन्यत्र अत्यंत सक्रिय असले, तरी या जिल्ह्यात तोपावेतो घातपात तुलनेने कमी झाले होते. परंतु नोव्हेंबर १९४२ पासून देहू व खडकी येथील लष्कराच्या ॲम्युनिशन डेपोंमध्ये बरेच घातपात झाले. देहू रोड रेल्वे यार्डात ५०० टन दारूगोळ्यास लावलेली भीषण आग अर्धा मैल पसरून तिने अनेक इमारतींना भाजून काढले होते (११ नोव्हेंबर १९४२). मिलिटरी कोर्ट ऑफ इन्क्वायरीत या घातपाताचे धागेदोरे सापडू शकले नाहीत. देहूच्या ऑर्डिनन्स डेपोतून मोठ्या विध्वंसन शक्तीचे अठरा ‘ मिल्स ’ बॉम्ब, फ्यूज माईन्स कॉंटॅक्ट, पिस्तुले, टी. एन. टी., फॉस्फरस, नायट्रिक व सल्फ्युरिक ॲसिड भरलेल्या कित्येक कॅन्स तेथील कर्मचाऱ्यांच्या धाडशी मदतीने पळविण्यात आल्या होत्या.

यामुळे चिंताग्रस्त झालेल्या लष्करी अधिकाऱ्यांनी गुप्तचरांना सक्त ताकीद देऊन चौकशी करायला लावले होते. पुण्यातील एका घराची झडती घेताना उपरोक्त स्फोटक सामग्री तसेच बॉंब बनवण्याचे व त्याच्या उपयोगाविषयीचे साहित्य मिळाले होते. देशातील सर्व दारूगोळा आगारांची यादीही त्यांत मिळाली. त्या घरातील दोन जण कॅंटोनमेंटमधील फिल्ड कंट्रोलर ऑफ मिलिटरी अकाऊंट्स कार्यालयात कर्मचारी होते. डेपो व लष्करी कारखान्यांमध्ये काम करणारे अनेक सरकारी कर्मचारी घातपाती कृत्ये करणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांना उच्च दर्जाची स्फोटके चोरण्याच्या कामी मदत करीत असल्याचे गुप्तचरांना आढळले. ही स्फोटके कशी वापरावी याचेही तंत्रज्ञान ते शिकवत असत. यामुळे गुप्तचरांनी तेथील बरेच कर्मचारी जानेवारी-फेब्रुवारी १९४३ मध्ये पकडले होते. तेव्हाच्या महाराष्ट्रातील बरेच स्फोट व घातपात पुणे-देहूमधील स्फोटकांच्या उपयोगाने घडवून आणले होते हे सरकारच्या लक्षात आल्यावाचून राहिले नव्हते.

सातारा व पुण्यातील मुले पुण्याच्या शुक्रवार, वेताळ वा सदाशिव पेठांमधील कोणत्या तरी घरात प्रचार-पत्रके तसेच स्फोटकांचा साठा करून त्यांचा उपयोग करतात, असा पोलिसांना संशय होता. त्यानुसार पुण्यातील सात व साताऱ्यातील सहा मुलांवर नोव्हेंबर १९४२ मध्ये पुण्यात खटला भरण्यात आला. यालाच **पहिला पुणे बाँब खटला** म्हटले जाते. यात केशव गंगाधर जोशी, दामोदर दिनकर कुलकर्णी (मधुकाका), विद्याधर शंकर गोळे, बाळकृष्ण विष्णू हेळकडे, सदाशिव शंकर बोराटे, बाळकृष्ण भास्कर पानसे, रामचंद्र केशव पटवर्धन, माधव पुरुषोत्तम पोतनीस, नारायण राजाराम पवार, गोविंद शिवराम तेली व त्रिलोकेश गोवर्धन भट यांचा समावेश होता. या खटल्यात सबळ पुराव्याच्या अभावी सर्व जण निर्दोष सुटले. कारण काँग्रेसजन व घातपात करणाऱ्यांना जनतेची पूर्ण सहानुभूती असल्यामुळे त्यांच्याविरुद्ध साक्ष देण्यास पोलिसांच्या प्रलोभनांना कोणी बळी पडले नाही. कोणीही पोलिसांना भूमिगत सैनिकांबद्दल माहिती पुरविली नाही. तोंड बंद ठेवण्याचा जणू काय लोकांनी कट केलेला आहे, असे जिल्हा दंडाधिकाऱ्याने शासनाला कळविले होते. खटल्यांबाबतचे शासनाचे सर्व प्रयत्न विफल झाले कारण जनतेने या लढ्यास आपापल्या परीने पाठिंबा दिला. तथापि कारागृहाबाहेर येताच आरोपींना स्थानबद्ध करण्यात येई.

जनतेच्या सहानुभूतीचा सूड म्हणूनही सरकारने ' कलेक्टिव फाईन्स आर्डिनन्स १९४२ ' अनुसार सामूहिक दंड आकारणी केली. प्रत्येक ठिकाणी दंडाची रक्कम सरकारी नुकसानीच्या बऱ्याच पटीत होती. भेदनीती असलेल्या इंग्रजांनी दंड वसुलीतून मागासवर्गीय, मुसलमान, पारसी, सरकारला मदत करणारे व सरकारी कर्मचाऱ्यांना सूट दिली. आंदोलकांवर कठोर दंडात्मक कारवाई करण्याचा हा भाग होता. कोर्टातील खटल्यांना पुरावे मिळत नसल्याने शासनाने फटके मारण्याचा स्वेच्छाचारी मार्ग अवलंबिला. रस्त्यांची साफसफाई करण्यास लोकांना भाग पाडले. रस्त्यावरून सरपटत जाण्याच्या शिक्षा दिल्या. दडपशाहीला काहीच पारावार नव्हता.[२७]

## प्रादेशिक घातपात केंद्र

ब्रिटिशांनी नाझी अत्याचार पद्धतीचा अंमल सुरू केल्यामुळे अल्पावधीत आंदोलन भूमिगत गेले. तद्वतच लढा प्रदीर्घ काळ चालणार हे स्पष्ट झाल्यामुळे खुल्या आंदोलनास गनिमी लढ्याची जोड देणे अपरिहार्य बनले होते. म्हणूनच अच्युतराव, लोहिया, पी.टी. व अरुणा असफ अली यांनी रणनीती आखून ' बॉंबे प्रॉव्हिन्शल डिस्ट्रक्शन सेंटर ' ही संघटना उभारली. मुंबई शहरात या संघटनेची दोन केंद्रे असून त्यांना **मूषक महाल** व **हडळ हाऊस** ही अलंकारिक सांकेतिक नावे दिली होती. २९७ बेलासिस रोड, भायखळा असा पत्ता असलेल्या इमारतीत उंदरांचा सुळसुळाट असल्यामुळे मूषक महाल हे नाव सार्थच होते. तसेच नळ बाजार भागातील डलास इमारतीतील एका पारशाच्या सदनिकेत एका महिलेचे भूत असल्याच्या समजुतीमुळे तिथे फारसे कोणी जात नसे. म्हणून या सदनिकेला हडळ हाऊस ही संज्ञा दिली होती. मुंबईतील या दोन्ही केंद्रांमध्ये अच्युतराव, लोहिया आणि नंतर जयप्रकाश नारायण वगैरे नेते कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करीत; विचारविनिमय करण्यात येई. इत्यादी.

श्रीधर पुरुषोत्तम लिमये कल्याणपासून बेळगावपर्यंतच्या भागाचे प्रमुख संघटक समजले जात. त्यांच्या जोडीने मामा गोखले, नाना धर्माधिकारी, एस.एम.जोशी, अनंत वासुदेव सहस्रबुद्धे, गोविंदराव देशपांडे, क्रांतिसिंह नाना पाटील, यशवंतराव चव्हाण, भाई कोतवाल वगैरे बरेच जण भूमिगत काम करीत. ते घातपातांव्यतिरिक्त प्रचार साहित्य व निधी संकलनाचेही काम करीत. या कार्यकर्त्यांचा भर रस्ते, रेल्वे व पूल उडवून देणे, तारा तोडणे, रेल्वे बंद पाडणे, स्फोटके मिळवणे, हत्यारे गोळा करणे, विजेचे खांब पाडणे अशा कारवाया करून सरकारी काम विस्थापित करण्यावर होता. त्यांना याबाबतचे मार्गदर्शन मेहेरअलींनी पुण्यातील शिबिरांमधून केलेले होतेच. गुप्तचरांच्या तीन अहवालांमध्ये मला उल्लेख आढळला की, आंदोलनास नंतर जे स्वरूप आले त्याचे संकल्पन व नियोजन मुख्यतः सरदार पटेल व युसुफ मेहेरअलींनी केलेले होते.

अच्युतराव मुंबईतून पश्चिम भारतातील लढ्याचे सूत्रसंचालन करीत. लिमये महाराष्ट्राचे सूत्रसंचालन करीत. एस.एम. यांच्याकडे पंजाब व सिंधमधील आंदोलनात समन्वय साधणे, उत्तेजन देणे हे काम होते. इमाम अली नूरभाई या नावाने व वेषांतर करून ते यशवंत पटवर्धनांसह संचार करीत. जळगाव व सोलापूरही त्यांचेकडे होते. जोशी सिंध व पंजाबात फिरत असताना डॉ. खानसाहेब यांना पेशावरमध्ये भेटले होते. तथापि या प्रदीर्घ दौऱ्यात एस. एम. यांना यश लाभले नाही. महाडच्या विद्रोहानंतर अच्युतरावांनी महाडच्या दिगंबर विनायक ऊर्फ नाना पुरोहितांनाही आंदोलनात जान आणण्यासाठी कराचीला पाठविले होते.

अच्युतराव, शिरूभाऊ लिमये व किसन वीर यांनी चर्चा केल्यानुसार सर्वानुमते काही गनिमी गट संघटित करण्याचे काम नाना पाटील, किसन वीर व यशवंतरावांकडे सोपविण्यात आले. त्यानुसार आंदोलनाची योजना तयार करून यशवंतरावांना साताऱ्याचे पहिले डिक्टेटर म्हणजे सर्वाधिकारी करण्यात आले. लिमयेंना अटक झाल्यावर ग.बा.नेवाळकर सातारकरांशी संपर्क ठेवू लागले.

विशेष म्हणजे प्रसिद्ध गांधीवादी व खादी कार्यकर्ते अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे हेही ऑक्टोबर १९४२ मध्ये या प्रांतिक घातपात संघटनेत दाखल झाले. लिमये, मामा गोखले, नाना धर्माधिकारी यांच्याव्यतिरिक्त मूषक महाल केंद्रातून माधव पी. लिमये, साने गुरुजी, भालचंद्र एन.वायाळ, पी.बी.भोसले, वसंत लिमये, एस.आर.भुरड, बी.एम.फाटक, जे.सी.तलाठी, जे.ए.नेरूरकर, एम.एस.पळनिटकर, के.एन.पाटील, जे.डी.पाटील, मधुकर देशपांडे, पी.जी.भांगवे, जी.एस.मिरजे व पार्वतीबाई या केंद्रातून काम करीत. महाराष्ट्र व अखिल भारतातील अगदी निवडक भूमिगतांनाच या केंद्राचा पत्ता दिलेला होता. येथून बाँब निर्मितीविषयक तंत्रज्ञान, मार्गदर्शक टिपणे, **काँग्रेस बुलेटिन** व प्रचारसाहित्य पुरविले जाई. निजामाच्या गुलबर्गा तुरुंगातून सुटका झाल्यावर ना.ग.गोरे जानेवारी १९४३ च्या सुमारास इथे दाखल झाले. साने गुरुजींचे **क्रांतीच्या मार्गावर** हे पुस्तक येथेच लिहून झाले. **क्रांतिकारी** हे पत्रक येथूनच प्रकाशित होई.

भूमिगत अवस्थेत पालन करावयाची गुप्तता न पाळल्यामुळे गुप्तचरांना राष्ट्रद्रोही खबऱ्यांकडून मूषक महालाची बातमी समजली. त्यानुसार गुप्तचरांनी अचानक छापा टाकून १८ एप्रिल १९४३ रोजी सर्वांना अटक केली. तथापि मूषक महालात नेहमी असणारे अच्युतराव, मामा गोखले व नाना धर्माधिकारी आणि मधून-मधून येणारे जयप्रकाशजी, डॉ. लोहिया, अरुणा असफ अली व एस.एम. त्यावेळी तिथे नसल्याने सुटले. मूषक महालाच्या शोकांतिकेची बातमी नवी दिल्लीच नव्हे तर लंडनपर्यंत गेली व ब्रिटिशांनी सुटकेचा एक निःश्वास सोडला. केशव गोरे मे महिन्यात मुंबईत पकडले गेल्यामुळे सरकारला हायसे वाटले. भूमिगत चळवळीला हे हादरे होते!

स्वतः अच्युतराव, डॉ.लोहिया, एस.एम, मधू लिमये, विनायक कुलकर्णी व परशुराम सखाराम भागवत हे हडळ हाऊसमध्ये राहत असत. जयप्रकाशही तेथे आठ दिवस राहिले होते. मात्र मुसलमान वस्ती असल्याने अरुणादेवींनी तिथे येऊ नये असे ठरले होते. या सदनिकेत खास महाराष्ट्रासाठी प्रचारसाहित्य निर्माण करण्यात येई. मूषक महालापेक्षा ही जागा अधिक सुरक्षित होती. येथेही सर्व गुप्त कारवाया चालत व योजना बनवण्यात येत आणि येथून आंदोलनाचे सूत्रसंचालन करण्यात येई. मूषक महालाच्या छाप्यानंतर पाच महिने म्हणजे एकूण तेरा महिने हडळ हाऊस कार्यरत राहिले. तेथील काही मुसलमानांना हे माहीत असूनही कोणी गद्दारी केली नाही. एकही मुसलमान पोलिसांचा खबऱ्या झाला नाही. तथापि पैशाच्या लोभाने सोनू रामू सुतार या हिंदू माणसाने देशाशी गद्दारी करून गुप्तचरांना खबर दिली. त्यानुसार १८ सप्टेंबर १९४३ रोजी पोलिसांनी मधू लिमये, एस. एम. जोशी, विनायक कुलकर्णी, परशुराम भागवत यांना इथे पकडले. अच्युतराव वगैरे बचावले. परंतु अत्यंत संवेदनाक्षम असा पत्रव्यवहार, प्रचारसाहित्य व माहिती पत्रके पकडली गेली, त्यामुळे अनेक भूमिगत कार्यकर्ते पकडले गेले. स्वाभाविकपणे स्वातंत्र्यसैनिकांचे मनोधैर्य खचू लागले.[२८]

## सिनेमागृहांमधील बाँबस्फोट

लष्कराच्या दडपशाहीमुळे संत्रस्त झालेल्या भूमिगत कार्यकर्त्यांचा लष्करी अधिकाऱ्यांवर खास राग होता. म्हणून गोरे लष्करी अधिकारी जिथे इंग्रजी सिनेमा पाहण्यास जात असत त्या चित्रपटगृहांमध्ये बाँबस्फोट घडवून आणण्याच्या योजना सुरू झाल्या. हिंसा करणे हा हेतू नव्हता. परंतु पुणे व अहमदनगरसारख्या लष्करी छावण्याही सुरक्षित नाहीत, हा संदेश देण्यासाठी असे प्रयत्न करण्यात आले. यासाठी पुण्यातील कॅपिटॉल व वेस्ट एंड व नगरच्या सरोष चित्रपटगृहांची निवड करण्यात आली होती. युद्धजन्य परिस्थितीत ब्रिटिशांनी मुंबईत बरेच युद्धसाहित्य जमवले होते. पण ते धोक्याचे वाटल्याने बरेच साहित्य खडकीच्या डेपोंमध्ये स्थलांतरित केले. त्यात बाँब, सुरुंग, माइन्स, हात-बाँब व बंदुकीच्या गोळ्यांचाही समावेश होता. या डेपोचा प्रमुख जरी इंग्रज असला, तरी डेपोतील साठा नीट लावण्याचे काम भारतीय कर्मचारीच करीत असत. रसायनशास्त्राचे पदवीधर असलेले भास्कर कर्णिक खडकीच्या कारखान्यात पर्यवेक्षकीय पदावर होते. ते मनस्वी देशभक्त व समाजवादी विचारसरणीचे होते. राष्ट्रप्रेमी नारायण विष्णू आठवले हेही देहू रोड डेपोमध्ये नोकरी करीत.

**कॅपिटॉल बाँब प्रकरण :—**वस्तुतः हे बाँबस्फोट प्रकरण विलक्षण गुंतागुंतीचे आहे. हे प्रकरण विविध न्यायालयांमध्ये दोन-अडीच वर्षे चालू होते. एकट्या कॅपिटॉल बाँब प्रकरणात ४० जणांवर सरकारने खटला भरला. या प्रकरणातील कित्येक भूमिगतांना सरकार कधीच पकडू शकले नाही. म्हणून हा इतिहास लिहिणे आम्हाला बरेच अवघड गेले. तरीही गुप्तचरांचे अहवाल व इतर पुरावे शोधून त्या तीन सिनेमागृहांमधील बाँबस्फोटांचा इतिहास पुढे देत आहे.

घातपातांसाठी बाँब व स्फोटक पदार्थ हस्तांतरित करणे हा उद्देश असल्याने भास्कर कर्णिक व नारायण आठवले आणि त्यांचे साथीदार पुण्यातील मिलिटरी डेपोंमधील साहित्याची मुद्दाम नोंद करीत नसत. स्फोटक साहित्याचा तपशील ठेवण्यात ते गफलत करीत असत. अनेक हिकमती व युक्त्या लढवून हे दोघे देशभक्त व त्यांचे साथीदार लालजी कुलकर्णी, राजा राजवाडे, गणपत तेलंग,

लखू देशपांडे, किसन तुळपुळे, मधू मुधोळकर, वसंत आळेकर, चिंतामणी गुप्ते वगैरेंनी भूमिगत क्रांतिकारांना शस्त्रे व स्फोटक साहित्य पुरवले. हे अत्यंत धाडसी कार्य होते. या साहित्यात बाँब, डिटोनेटर, दारूगोळा वगैरेंचाही समावेश होता. युवकांचा एक धाडसी गट ही सामग्री पुणे, मुंबई, सातारा व महाराष्ट्राच्या इतर काही भागांमध्ये पाठविण्याचे काम करीत असे. या कामगिरीत **महुवाला** हे सरकारी कर्मचारी असलेले मुसलमान गृहस्थ बरेच योगदान करीत. गोपाळ घाटे हे त्यांचे सहकारी असून हे दोघे सरकारचा दारूगोळा नष्ट करण्याचेही काम करीत. १४ नोव्हेंबर १९४२ रोजी डेपोला लागलेल्या, खरे तर मुद्दाम लावलेल्या, आगीत देहू डेपोतील बराच दारूगोळा नष्ट झाला. त्यामुळे ब्रिटिश सरकार चिंताग्रस्त झाले होते. भूमिगत काँग्रेसजन या कटात असणार असा सरकारला दाट संशय होता. अहमदनगरच्या सरोष सिनेमागृहात स्फोट केलेला बाँब देहू डेपोतूनच पळवलेला होता. सातारा-सांगली भागातही विस्फोट केलेले बहुतेक बाँब येथूनच मिळवलेले होते.

पुणे कँटोनमेंट विभागातील कॅपिटॉल व वेस्ट एंड सिनेमागृहांमध्ये सुप्रसिद्ध नट गॅरी कूपरचा नवीन चित्रपट पाहण्यासाठी बरेच इंग्रज अधिकारी जाणार या अंदाजानुसार तेथे स्फोट घडवून बऱ्याच इंग्रजांचे प्राण घेण्याची ही योजना होती. या प्रकरणाचे सूत्रधार होते :— शिरूभाऊ लिमये, प्रभाकर शिवराम साळवी, शंकर त्रिंबक कुलकर्णी, रामसिंग परदेशी, दत्ता जोशी, हरिभाऊ व निळूभाऊ लिमये बंधू, बाबुराव विठोबा चव्हाण वगैरे. १९३० पासून २६ जानेवारी रोजी स्वातंत्र्य दिन साजरा करण्याची प्रथा महात्मा गांधींनी सुरू केलेली होती. म्हणूनच तोच मुहूर्त बाँबस्फोटासाठी ठरला होता. तथापि २६ जानेवारी १९४३ रोजी नेहमीपेक्षा अधिक बंदोबस्त असेल असा अंदाज असल्यामुळे कटाची परिपूर्ती २४ जानेवारीला करण्याचे ठरले. त्या दिवशी औंध संस्थानाचे, स्वातंत्र्यलढ्यास सर्वथा मदत करणारे युवराज अप्पासाहेब पंत हे चित्रपट पाहण्यासाठी स्वतः कॅपिटॉल सिनेमात जाणार होते. म्हणून या कटातील एक कार्यकर्ते र.वा.पाठक (पेंटर) यांनी अप्पासाहेबांना तेथे जाण्यापासून परावृत्त केले.

ठरल्याप्रमाणे शंकर त्र्यंबक कुलकर्णी व हरी लिमये यांनी वेस्ट एंड चित्रपटगृहात बाँब ठेवला व तेथून ते निसटले. तथापि हँड-ग्रेनेडमध्येच बदल करून बनविलेल्या बाँबचा स्फोट न होता काही मिनिटांतच त्याच्यातून ज्वाला उसळली. मागच्याच रांगेत बसलेल्या विल्यम रॉबसन या अधिकाऱ्याने तो बाँब निकामी केला. अशा रीतीने हा प्रयत्न विफल झाला.

कॅपिटॉलमधील बाँब ठेवला होता प्रभाकर साळवी, दत्तात्रय जोशी व बाबुराव चव्हाणांनी! मात्र हँड-ग्रेनेडपासूनच बनवलेला हा दुसरा बाँब फुटला व त्यासरशी तीन मोठे इंग्रज लष्करी अधिकारी व काही सैनिक ठार झाले. बरेच जण जखमी झाले. आग लागली. चित्रपटगृहाचे छत फाटले. त्यामुळे सरकारही हादरले. इंग्रजांनी भयंकर धसका घेतला. इतका कडक बंदोबस्त असलेल्या पुणे मिलिटरी छावणीतही आपण इंग्रज सुरक्षित नाहीत हे त्यांनी ओळखले. पुण्यापासून लंडनपर्यंत सर्व इंग्रज अस्वस्थ झाले. त्यांच्या दृष्टीने हा भयंकर राजद्रोह होता.

विशेष म्हणजे या सिनेमागृह कटात यशवंत महादेव डोंगरे व चिंतामणी वासुदेव गुप्ते हे रॉयवादीदेखील सामील होते. महायुद्धात इंग्रजांना पाठिंबा दिलेल्या एम.एन.रॉय यांचे ते शिष्य असूनही त्यांनी हे धाडस केले होते. यशवंत डोंगरेंच्या एका पूर्वजाने लोकमान्य टिळकांविरुद्ध साक्ष देऊन लोकांचा रोष ओढवून घेतला होता. त्याचे आता परिमार्जन करण्याचाही विचार डोंगरेंच्या मनात आला असावा. बाँब प्रकरणातील यशवंत डोंगरे खुद्द शिरूभाऊंचे दूत असावे असे गुप्तचरांना वाटे. चिंतामणी गुप्तेंकडे स्फोटकांचा साठा व वितरणाचे काम सोपविलेले होते. त्यांनी डोंगरेंना मुंबईला पाठवून रसायने मिळवली होती. गुप्तचरांच्या माहितीनुसार पुण्यातील पाध्ये बंगल्यात डोंगरेंनी भाड्याने घेतलेल्या खोलीत शिरूभाऊंनी भूमिगत स्वातंत्र्य सैनिकांची बैठक घेऊन सरकारच्या युद्ध-प्रयत्नांना खीळ घालण्यासाठी घातपातांची योजना समजावून सांगितली होती.[२९]

या प्रकरणी पोलिसांनी अनेकांना अटक केली. श्री.पु.लिमये, बाबुराव चव्हाण, प्रभाकर साळवी, शंकर कुलकर्णी, भालचंद्र बेंद्रे, आगाशे, रामसिंग रतनसिंग परदेशी, भालचंद्र वायाळ, माधव पाटील, माधव काळे वगैरेंना अटक करण्यात

आली. मात्र सकृत्दर्शनी पुरावा न आढळल्याने शिरूभाऊंना आरोपमुक्त केले, पण दीर्घ कारावासात ठेवले. त्यांना येरवड्याच्या भयाण अंधाऱ्या फाशीकोठडीत डांबले. १९४३ च्या क्रिमिनल केस क्रमांक ३० मध्ये याबाबतची संपूर्ण माहिती मिळते. या प्रकरणी सरकारने प्रतिष्ठेचा प्रश्न मानून लिमयेंव्यतिरिक्त उर्वरित चौघांवर पुण्याच्या अतिरिक्त सत्र न्यायाधीशापुढे कसून खटला लढविला. त्यांना फाशीची शिक्षा व्हावी म्हणून जंगजंग पछाडले. साक्षीदारांची संख्या फारच मोठी असल्यामुळे खटला पाच महिने चालला. भारत सरकार हादरले होते. कारण गोऱ्या सेनादलाच्या सुरक्षेबाबत ब्रिटिशांना तीव्र संवेदना वाटत होती. तिन्ही ठिकाणी वापरलेले बॉंब देहूमधीलच असल्याबद्दल सरकारची खात्री होती.

देहू डेपोतील सुपरवायझर नारायण आठवले, भास्कर कर्णिक, लालजी कुलकर्णी व गणपत तेलंगांच्या अटकेनंतर गुप्तचरांना कर्णिकांच्या घरी स्फोटक पदार्थांचा साठा मिळाला व त्यातून पोलिसांनी कटाचे धागेदोरे शोधण्याची पराकाष्ठा केली. पण पोलीस स्टेशनवर नेल्यावर कर्णिकांनी स्वच्छतागृहात जाऊन सायनाईड खाल्ल्यामुळे ते तात्काळ मरण पावले. त्यामुळे चौकशीतील महत्त्वाचा पुरावाच नष्ट झाला. परंतु काही कोवळे ब्राह्मण युवक व भालचंद्र वायाळ यांसारख्या अब्राह्मण युवकांवर पोलिसांनी दडपण आणून त्यांच्याकडून कबुलीजबाब लिहून घेतले व माफीचे साक्षीदार बनवण्याचे आमिष दाखवले. तथापि त्यांची देशभक्ती जागृत झाल्याने तिघांनीही आपले कबुलीजबाब न्यायालयात फिरवले व पोलिसांना तोंडघशी पाडले. पोलिसांनी या प्रकरणी हरी लिमये, दत्ता जोशी हे ब्राह्मण व भालचंद्र वायाळ यांच्या मनात ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाचे विष पेरण्याचाही प्रयत्न केला होता. पण हे युवक फसले नाहीत.

कॅपिटॉल बॉंब प्रकरणी शासनाने ४० भूमिगतांवर खटला भरण्यासाठी जंगजंग पछाडले. तथापि त्यांपैकी ३३ जणांनाच अटक करण्यात पोलीस यशस्वी झाले. उर्वरित वसंत सरवटे, जी. एस. ऊर्फ बाळ गोखले, र. वा. पाठक, विठ्ठल द. पटवर्धन, पी. डी. अभ्यंकर, कांतिलाल पारिख व अनंत मेमाणे हे सात जण पोलिसांच्या हाती लागले नाहीत. वसंत सरवटे हे पीएच.डी.चे विद्यार्थी

अच्युतरावांप्रमाणेच पुढेही कधी गुप्तचरांना पकडता आले नाहीत. खटल्यातील ३३ आरोपींमध्ये कटाचे पुढील मुख्य सूत्रधार होते :- श्रीधर पुरुषोत्तम लिमये, त्यांचेच बंधू माधव, प्रभाकर शिवराम साळवी, अनंत वासुदेव तथा अण्णासाहेब सहस्रबुद्धे, चिंतामणी वासुदेव गुप्ते, अच्युत शंकर आपटे, बाबुराव विठोबा चव्हाण, शंकर त्रिंबक कुलकर्णी, वसंत वामन बापट, वसंत विनायक नगरकर, सदाशिव शंकर बागईतदार वगैरे. हे सर्व स्वातंत्र्यसैनिक विविध सामाजिक प्रवर्गांमधील होते. स्वातंत्र्यप्राप्ती या ध्येयास्तव त्यांनी यापूर्वीही धाडसी कारवाया केल्या होत्या.

ज्युरीने सर्व आरोपी निर्दोष असल्याचा निर्वाळा दिल्याने न्यायाधीशाने सर्वांना दोषमुक्त ठरविले. तथापि हा निवाडा चुकीच्या दिशेने गेल्याचा सरकारने कोर्टावरही आरोप केला. सरकारने त्याविरुद्ध उच्च न्यायालयात अपील केले (१९४४ चे क्रमांक ३१३). उच्च न्यायालयाने बाबुराव चव्हाण, शंकर त्रिंबक कुलकर्णी व रामसिंग परदेशींना निर्दोष सोडले आणि प्रभाकर साळवी यांच्यावर मोठ्या गुन्ह्यांच्या बाबत पुन्हा खटला चालवावा असा निर्णय दिला. त्यानुसार इंडियन पीनल कोड व एक्सप्लोजिव सबस्टंसेस ॲक्ट याखाली पुन्हा खटला भरून शासनाने कंबर कसली (१९४४-४५). मुंबई शासनाने लष्करातील १२ पैकी ७ साक्षीदार कोर्टापुढे उभे केले. तोपावेतो उर्वरित साक्षीदार इंग्लंडमध्ये परत गेलेले होते. पण त्यांच्याशिवाय गुन्हा सिद्ध होण्यासारखा नव्हताच. स्वातंत्र्य सैनिकांनी चित्रपटगृहात मनुष्यवध केला असे सिद्ध होणार नव्हतेच. शासकीय साक्षीदारांमध्ये दोन इंग्रज महिला होत्या. त्यांच्या साक्षीत परस्परविरोध व विसंगती असल्याचे दिसत होते. त्यामुळे पुण्याचा डी.आय.जी., सी.आय.डी. याने शासनास कळवले की, 'खटला पुढे चालविणे व साळवी यांच्यावर पुन्हा खटला भरल्याने काहीच साध्य होणार नाही. तीन वर्षे चाललेल्या या खटल्यातील विसंगती वाढतच जाईल व सार्वजनिक पैसा आणि वेळेचा अपव्यय मात्र होईल' असा अभिप्राय दिला. त्यामुळे इंग्रजांनी खटला काढून घेतला (७ जानेवारी १९४६). तथापि नवीनच जारी केलेल्या रिस्ट्रिक्शन अँड डिटेन्शन ऑर्डिनन्स क्रमांक तीन

१९४४ खाली सरकारने साळवी व सर्वांना स्वेच्छानुसारी पद्धतीने बेमुदत स्थानबद्ध करून ठेवले. हायकोर्टातील हा खटला न्या.एम.एस. लोकूर यांच्यापुढे चालला होता.

हा खटला अतिशय अटीतटीने लढवला गेला. एका बाजूला इंग्रजांचे लष्कर, गुप्तचर यंत्रणा, शस्त्रसाठे व सुरक्षाव्यवस्था उघडी पडली. सरकारला हा प्रतिष्ठेचा प्रश्न वाटू लागला. इंग्रज व अँग्लो-इंडियन लोकांवर दहशत बसली. त्यामुळे प्रमुख कार्यकर्त्यांना फासावर लटकवण्यासाठी सरकार कटिबद्ध होते. त्यासाठी अधिकाऱ्यांनी सर्व मार्गांचे आचरण केले. साम, दाम, दंड व भेदनीती आचरली. माफीचे साक्षीदार बनविले. पण सर्वसामान्य जनतेची सहानुभूती स्वातंत्र्य सैनिकांनाच असल्याने सरकाराला पुरावे मिळाले नाहीत. माफीचे सर्व साक्षीदार खरेखुरे राष्ट्रवादी असल्याने त्यांनी ठरवून कोर्टात साक्ष फिरविली व पोलिसांना अक्षरशः तोंडघशी पाडले. त्यामुळे मनुष्यवधाचा आरोप तर सिद्ध झालाच नाही, परंतु दुसरा कोणताच आरोप कोर्टात टिकला नाही. सर्व जण निर्दोष सुटले. मात्र तरीही सरकारने त्यांना स्थानबद्ध करून ठेवले.

**सरोष चित्रपटगृहातील बॉंबस्फोट** :—अहमदनगर शहरात डिसेंबर १९४२ पर्यंत २५ बॉंबस्फोट झाले होते. त्यापैकी सरोषमध्ये झालेला स्फोट सर्वात गंभीर स्वरूपाचा होता. याव्यतिरिक्त संगमनेर परिसरात तीन व बेलापूर मार्गावर एक स्फोट झाला होता. अहमदनगरच्या किल्ल्यात नेहरू, पटेल वगैरे कॉंग्रेस कार्यकारिणीचे सदस्य अटकेत असल्याने भूमिगतांच्या भावना भडकलेल्या होत्या. म्हणूनही तिथे जहाल कृत्ये घडून आली. अहमदनगरला लष्कराची छावणी असून तिच्यात गोरे सेनाधिकारी होते. २५ डिसेंबर १९४२ रोजी नाताळच्या दिवशी ती मंडळी सिनेमाला येणार असा अंदाज बांधून भूमिगतांनी बॉंबस्फोट करण्याची योजना आखली. त्यांनी दुसऱ्या खेळाच्या मध्यंतरात सरोषच्या आवारात प्रचंड बॉंबस्फोट केला. त्यात एक मुसलमान मरण पावला व सहा जणांची प्रकृती चिंताजनक झाली. आणखी इतर बारा जण जखमी झाले. हा बॉंबही देहू डेपोतूनच पळवलेला होता. म्हणूनच त्याची विध्वंसक क्षमता इतर बॉंबपेक्षा जास्त होती.

या घातपाताचेही मुख्य सूत्रधार श्री. पु. लिमये हेच होते. शिवाय नगरचे भालचंद्र पुरुषोत्तम सप्तर्षी, बळवंत गोपाळ घाटे, राधाकिसन खोमणे, घनःश्याम वऱ्हाडे, पन्नालाल हरिराम, रत्नम पिल्ले आणि हबीबखान महम्मूदखान पठाण हेही या कटात सामील होते. सरकारने या सात आरोपींवर सत्र न्यायालयात खटला भरला. सरोष प्रकरणात लिमये, चिंतामणी गुप्ते, बाळ गोखले व विठ्ठल पटवर्धन यांचाही कोर्टात सरकारने नामनिर्देश केला होता. मात्र ठोस पुरावा नसल्याने त्यांच्यावरील आरोप टिकला नाही.

सरोष प्रकरण पाहता अर्थ निघतो की, बाँबस्फोटाची योजना लिमये, बाळासाहेब भालचंद्र सप्तर्षी आणि प्रांतिक घातपात संघटनेची होती. घाटे यांनी देहू—खडकीच्या डेपोंमधून दोन बाँब मिळवले. त्यातलाच एक सरोष चित्रपटगृहात फोडला. रुग्णवाहिकेचा वाहनचालक हबीबखान पठाण यानेच चित्रपटगृहाच्या आवारात बाँब टाकला, असे सरकार पक्षाने न्यायलयात विधान केले. तथापि सरकारच्या बाजूने साक्ष देणाऱ्यांनी उलट तपासणीत आपले जबाब फिरविले. पोलिसांनी छळ केल्यामुळे आपण सरकारच्या बाजूने जबाब दिले होते असेही अनेकांनी प्रतिपादन केले. अखेरीस न्यायालयाने २० सप्टेंबर १९४३ रोजी सर्व आरोपी निरपराध असल्याचा निर्णय दिला. शिवाय अपील करणेही व्यर्थ ठरणार होते.

चित्रपटगृह बाँब कटांचे सूत्रधार काँग्रेस व राष्ट्र सेवादलाचे धाडसी कार्यकर्ते असले, तरी या उपक्रमात काही रॉयवादी, कम्युनिस्ट आणि हिंदुमहासभेच्या शाखांमध्ये जाणारे युवकही होते. या खटल्यांच्या वेळी सरकारने जातपातीचे राजकारण केले व पैसे देऊन साक्षीदार उभे करण्याचेही प्रयास केले, पण सरकारला त्यात यश लाभले नाही. बाँब प्रकरणांची कसून चौकशी करणाऱ्या इंग्रज पोलीस निरीक्षकाचा दिवेकरांनी भर कोर्टातच खून करण्याचा प्रयत्न केला, पण तो फसला. एकूणच समाजाची स्वातंत्र्य सैनिकांना सहानुभूती होती. हिंदुस्तानभर गाजलेल्या या खटल्यांतील युवकांचा बचाव कोर्टात मोठमोठ्या ध्येयनिष्ठ वकिलांनी केला. बॅरिस्टर के. एफ. नरिमन, के. एम. मुन्शी, बाळासाहेब

करमरकर, के. एन. फडके, सी. बी. अगरवाल, भुलाभाई देसाई, तारकुंडे, डी. ई. परळकर, विनायकराव पराजंपे यांसारख्या ख्यातनाम वकिलांनी विनाशुल्क अथवा अत्यल्प पैसे घेऊन स्वातंत्र्य सैनिकांचे प्राण वाचविले. **पुण्यातच तुरुंगात असलेल्या गांधीजींनी या वा इतर कोणत्याच बाँब-स्फोटाचा निषेध केला नाही,** याचे इंग्रजांना खूप दुःख झाले. या सर्व खटल्यांमध्ये सरकारची मानहानी झाली. तर 'महाराष्ट्र कटाचा खटला' कधीच उभा राहिला नाही. कारण खूप प्रयत्न करूनही सरकारला साक्षीदार मिळाले नाहीत.[३०]

## इतर भागांमधील आंदोलन

पुरुषोत्तम हरी ऊर्फ रावसाहेब पटवर्धन, जनुभाऊ हरी पटवर्धन व अच्युतराव पटवर्धन आणि सेनापती बापट यांचे मूळ गाव असल्याने **अहमदनगरात** राष्ट्रवादी चळवळीची परंपरा होती. १९३०-१९३२ च्या जंगल सत्याग्रहात संगमनेर व अकोले हे दोन्ही तालुके विशेष गाजले होते. अच्युतरावांनी बनारस हिंदू विश्वविद्यालयातील प्राध्यापकाच्या नोकरीचा त्याग करून ते आंदोलनात उतरले होते. तेव्हापासूनच त्यांचा राजकीय प्रभाव वाढतच गेला. नेहरूंच्या आग्रहामुळे यथावकाश त्यांचा काँग्रेस कार्यकारिणीतही समावेश झाला. समाजवादी विचारसरणीच्या अच्युतरावांचा काँग्रेस समाजवादी पक्षाच्या स्थापनेतही पुढाकार होता. विचारप्रणालीच्या पातळीवर त्यांची नेहरूंशी जवळीक होतीच. छोडो भारतचा लढा विनाविलंब सुरू करावा असा गांधीजींना आग्रह करणाऱ्यांमध्ये अच्युतराव व लोहिया होते. अशा विविध कारणांमुळे नगर जिल्ह्यातील काँग्रेसजन व विशेषतः युवकांवर अच्युतरावांचा प्रभाव होता. शिवाय ते १९४२-४४ मध्ये मुंबईतील 'सेन्ट्रल डिरेक्टोरेटचे' महत्त्वाचे पुढारी होते. ९ ऑगस्ट रोजी त्यांनी या जिल्ह्यातील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले होते.

त्यानुसार नगर जिल्ह्यात आंदोलन सुरू झाले व काँग्रेसने सुचविलेली चळवळ चालू झाली. येथेही विद्यार्थी आघाडीवर होते. भास्कर गोविंद दुर्वे यांच्या गटाने तारा तोडणे व तारांचे खांब पाडण्याचे काम परिणामकारकरीत्या पार पाडले. नारायण अहिरे व धर्मा पोखरकर यांच्या गटाने समशेरपूरहून अकोल्याच्या कोशागारात नेण्यात येत असलेली सरकारी कर्मचाऱ्यांकडील रोकड रकमेची थैली हस्तगत केली होती. त्यातील रक्कम लहान असली तरी तिचा उपयोग मोठा होता.

सरोष चित्रपटगृहातील घातपाताव्यतिरिक्त एका कोर्टाला आग लावण्यात आली होती. तीन पोलिसांना पकडून ओलीस ठेवण्यात आले होते. संगमनेर तालुक्यातील १०९ गावांच्या पाटलांनी राजीनामे दिले. करमाळ या तालुक्याच्या गावी सरकारने खरेदी केलेले धान्य तेथून नेण्यास जमावाने विरोध केला होता.

**नाशिक शहरात** पहिले चार दिवस उठाव एवढा उग्र झाला की, शहर लष्कराच्या जवळजवळ अधीन करावे लागले होते. ११ ऑगस्ट रोजी १६ राजबंद्यांना सत्र न्यायालयातून नाशिक सब-जेलमध्ये घेऊन जाणाऱ्या पोलिसांवर जमावाने हल्ला चढवला. त्यामुळे पोलिसांनी गोळीबार केला, परंतु दोन राजबंदी पळाले. जमावाने पोलिसांकडील सर्व शस्त्रे हिसकावून घेतली. नाशिकच्या मध्यवर्ती ठिकाणचे पोस्ट ऑफिस सशस्त्र आंदोलकांनी लुटले. निफाडची महसूल कचेरी जाळली. वामनराव यार्दी, वसंत नारायण नाईक, रावसाहेब ओक, वसंत गणेश उपाध्ये, भाऊसाहेब हिरे वगैरे नाशिक जिल्ह्यातील भूमिगत आंदोलनाचे नेते होते. नाशिकमध्ये अधूनमधून गावठी बाँब आढळत असत. तसेच रेल्वे रूळ उखडणे, तारायंत्र तोडणे व पोलीस ठाणी जाळणे असे प्रकार होत असत. रेल्वेवर घातपात करण्याचे प्रयत्न वारंवार करण्यात येत. मात्र देवळालीची लष्करी छावणी जवळच असल्याने नाशिकभोवती कडक बंदोबस्त होता. तरीही नाशिक, पंचवटी, भगूर, मालेगाव, सिन्नर, चिपदरा व निफाडने चांगला लढा दिला.

**सोलापुरातील** आंदोलनास १९३० मधील लष्करी कायद्याची पार्श्वभूमी होती. त्या काळातील स्मृती भयानक वेदनादायी होत्या. लष्करी कायदा लागू करण्यापूर्वी व लागू केल्यावरही ब्रिटिशांनी केलेले क्रूरकर्म अद्याप लोकांच्या स्मरणात होते. मल्लाप्पा धनशेट्टी, शिंदे, सारडा व कुर्बान हुसेन यांची कुर्बानी ऑगस्ट १९४२ मध्ये लोकांच्या स्मृतिपटलावर उभी ठाकली. मल्लाप्पा यांचे सुपुत्र शंकरप्पा आणि त्यांचे सहकारी रेवणसिद्धप्पा खराडे यांनी जोरदार आंदोलन उभारताच त्यांना अटक करून त्यांच्यावर खटला भरण्यात आला. सोलापूर, पंढरपूर, करमाळा वगैरे शहरांमधील चळवळ भूमिगत झाली. रेल्वे दळणवळण विसकळीत करणे, तारायंत्र तोडणे, पोस्ट कार्यालयांची लूट करणे व बँकांमधील पैसे काढून घेणे

असा कार्यक्रम राबविण्यात आला. पंढरपूरच्या हायस्कूलची इमारत पेटवून देण्यात राजा हरिदास, पुरुषोत्तम अढळकर वगैरे विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला होता. पुरुषोत्तम व सदाशिव या ख्रिस्ती बंधूंनी सिकंदराबादच्या लष्करी छावणीत शिताफीने प्रवेश मिळवून तिथे बाँब ठेवले होते. त्यांच्या स्फोटात छावणीतील काही सैनिक मरण पावले, तर बरेच जखमी झाले.

तुलसीदास जाधव यांनीही आंदोलनास बरेच योगदान दिले होते. सोलापुरातील माधव पाटील पुण्यातील कॉलेजात शिकत असताना त्यांच्या खोलीत भूमिगतांचे एक केंद्र होते. हे पाटील कॅपिटॉल बाँब खटल्यातही एक आरोपी होते. सोलापूरचे छन्नूसिंग आणि मल्लिकार्जुन अप्पा विभूते हे दोघे येरवडा तुरुंगातून निसटले व पुन्हा भूमिगत आंदोलनात सामील झाले होते. सोलापूरची लढाऊ पार्श्वभूमी लक्षात घेऊन सरकारने तिथे अतिरिक्त खबरदारी घेतलेली होती. म्हणून तिथे पोलीस व आंदोलकांमध्ये आमने-सामने असा लढा अपेक्षेपेक्षा थोडा कमी झाला. तथापि गिरण्यांमध्ये वरचेवर बाँबस्फोट होत आणि रेल्वे रूळ खिळखिळे करण्याचे प्रसंग वारंवार घडत. मात्र येथील रेल्वेवर मिलिटरीची सदैव नजर असल्याने मोठा घातपात होऊ शकला नव्हता. विठोबाच्या पंढरपुरात मात्र अपूर्व लढा पेटला. त्यासाठी सरकारने पंढरपुरावर ३०,००० रुपयांचा सामुदायिक दंड ठोठावून तो संगिनीच्या बळाने नागरिकांकडून वसूल केला होता.

भौगोलिक स्थानामुळे पडणाऱ्या मर्यादांमध्ये **रत्नागिरी** जिल्ह्याने आंदोलनात आपली भूमिका वठवली. मुंबई व दक्षिण भारतादरम्यानचे दूरसंदेशवहन तारायंत्र व पोस्ट सेवा विस्थापित करण्यावर रत्नागिरीकरांचा जोर होता. आंदोलनामुळे जिल्ह्यात सरकारला २,१२,१५६ रुपयांचे नुकसान सोसावे लागले. मालवणची मामलेदार कचेरी जाळून टाकण्यात आली व तेथील कागदपत्र नष्ट करण्यात आले. शिवाय सरकारी कोषागारातील ७७,००० रुपयांचे स्टँप व ९२,९४६ रुपये रोकड भूमिगतांनी आंदोलनासाठी पळवली होती. सरकारी दप्तरे जाळण्यात आली

**ठाणे, कल्याण व वसईच्या** शेकडो कार्यकर्त्यांनी मुंबईतील आंदोलनात उडी घेतलेली होती. कित्येक जण ९ ऑगस्टच्या शिवाजी पार्कवरील उद्रेकात होते.

डहाणू, वसई, पालघर, चिंचणी व बोर्डी गावांमध्ये प्रारंभापासूनच शांततापूर्ण निदर्शने व निषेधाच्या सभांवर विशेष भर होता. व्ही. व्ही. दांडेकर, गोविंदराव वर्तक, द. ना. वांद्रेकर, श्यामराव पाटील, आचार्य भिसे आंदोलनासाठी प्रयत्न करीत असतानाच पोलिसांनी चिंचणी येथे निर्दयपणे लाठीहल्ला केला. त्यामुळे तेथील जमाव चिडला, आणि लोकांनी पोलिसांना वठणीवर आणून त्यांना स्वातंत्र्य सैनिकांच्या मिरवणुकीत सहभागी होण्यास भाग पाडले. यानंतर दोन दिवसांनी पोलिसांनी दांडेकर, वर्तक आणि इतर नेत्यांना अटक केली. त्यामुळे विद्यार्थी वर्ग व चिंचणी, पालघर व बोर्डी भागातील आदिवासी लोक अधिकच भडकले होते. त्यांनी चिंचणीचा सरकारी दवाखाना व पोस्ट ऑफिसचा विध्वंस केला. पालघरलाही आंदोलन पेटले. हजारोंचा जमाव तालुका कार्यालयावर चाल करून जात असताना पोलिसांनी स्वैरपणे गोळीबार करून पाच जणांना ठार केले. त्यामुळे रागावलेल्या युवकांनी बोर्डीजवळ रेल्वे सेवा अडवून ठेवली.

त्यावेळेपासून वसई व डहाणू दरम्यान रेल्वेवर घातपात करणे हे नित्याचे होऊन बसले. पोलिसांच्या हिंसक कृतीमुळे आंदोलनास घातपाताचे स्वरूप आले, आणि चळवळ भूमिगत झाली. कलेक्टरने चिंचणीवर आठ हजारांचा सामूहिक दंड ठोठावला. ठाणे जेलमध्ये गांधी जयंती साजरी करणाऱ्या सत्याग्रहींवर अमानुष लाठीमार झाला. सरकारच्या अशा आडमुठेपणामुळे पश्चिम रेल्वे पाच दिवस विसकळीत राहिली. भिवंडीजवळ मालगाडी पाडण्यात आली. कोलवाड व घोलवड स्टेशनांवर आणि एका रेल्वे गाडीवर हल्ला झाला. प्रक्षुब्ध झालेल्या जमावाने ठाण्यातील एका कोर्टाला आग लावली. चिंचणीतील पोलिसांचे गणवेष जाळले. भाई कोतवालांच्या आझाद दस्ता पथकांमध्ये ठाणे जिल्ह्यातील बरेच सैनिक होते.

देशाच्या छोडो भारत आंदोलनाचे नेतृत्व मुंबईने केले हे वादतीत होय. मात्र महाराष्ट्राच्या पातळीवर सातारा, नागपूर, चंद्रपूर (चिमूर), वर्धा (आष्टी), पुणे, जळगाव, धुळे (नंदुरबार), कुलाबा आणि ठाणे जिल्हे आंदोलनात आघाडीवर होते. साताऱच्या जनतेने तर डिसेंबर १९४५ पर्यंत प्रतिकाराची आग विझू दिली नाही.

## आंदोलनातील समन्वय यंत्रणा

कॉंग्रेस हायकमांड बंदिस्त झाल्यावर अचानक उसळलेल्या अराजक स्वरूपातील विद्रोहाचे सूत्रसंचालन करणे अगत्याचे होऊन बसले. विविध घटकांमध्ये समन्वय साधण्यासाठी राष्ट्रीय पातळीवरील यंत्रणा उभारणे अपरिहार्य झाले. ही अतिशय आवश्यक गरज भागवण्यासाठी मुंबईत हंगामी एआयसीसी गठित करण्यात आली. तथापि ही समिती भूमिगत आंदोलनासाठी खरीखुरी सूत्रसंचालन समिती नव्हती. म्हणून **सेंट्रल डिरेक्टोरेट ही वेगळी यंत्रणा मुंबईतच स्थापन करण्यात आली.** प्रत्यक्षात एआयसीसी आणि डिरेक्टोरेट परस्पर सहकार्याने काम करीत. पण सर्व आदेश व कार्य एआयसीसी च्या विद्यमाने करण्यात येत असे. या संघटनेच्या कार्याबाबत पुढील प्रकरणात विवेचन करण्यात येईल. संघटनेचा पश्चिम झोन म्हणजे महाराष्ट्र व गुजरातसाठी असलेल्या विभागाचे सर्वाधिकारी अच्युतराव पटवर्धन हेच होते.

उपरोक्त मूषक महाल आणि हडळ हाऊसमध्ये आश्रय घेतलेले श्री. पु. लिमये, मामा गोखले, नाना धर्माधिकारी, एस. एम. जोशी, अनंत वासुदेव सहस्रबुद्धे, गोविंदराव देशपांडे, माधव लिमये, साने गुरुजी, पी. बी. भोसले वगैरे अच्युतरावांना मदत करीत. त्यांचे आदेश कार्यकर्त्यांकडे पोहोचवत असत. मधू लिमये आणि यशवंतराव चव्हाण सल्ल्यासाठी अच्युतरावांना भेटत. ग. बा. नेवाळकर सेंट्रल डिरेक्टोरेट व सातारकरांमध्ये समन्वय साधत व दूत म्हणून काम करीत. डी. जी. देशपांडे, किसन वीर, चव्हाण व नाना पाटलांनी बनविलेल्या बऱ्याच योजना मुंबईच्या सल्ल्यानुसारच बनवलेल्या होत्या. अण्णासाहेब सहस्रबुद्धे शुद्ध गांधीवादी असूनही सुंदरलाल हे नाव धारण करून मुंबईहून सातारा, पुणे, कुलाबा, सोलापूर व नगर जिल्ह्यांसाठी शस्त्रे व स्फोटक रसायने वितरित करीत. त्यांना पुणे, सातारा, कुलाबा व नगर जिल्ह्यांचे संघटक नेमलेले होते. त्यांच्याच साखळीत असलेले आर. आर. दिवाकर व पुंडलिकजी कातगडे आणि शशिकांत हे नाव धारण केलेले एक विदेशी बॉंब तंत्रज्ञ मुंबईत बॉंब तयार करून देत असत. छोटुभाई पुराणिक व शंकरलाल हे गुजरातीदेखील मुंबई-महाराष्ट्रातील या साखळीत होते. पकडवॉरंट असलेल्या सातारकरांना

मुंबईत आश्रय देण्यात येई. या कामी अच्युतराव व सेंट्रल डिरेक्टोरेट शक्य तितके प्रयत्न करीत असे.

## नंदुरबारचा लढा

नंदुरबारच्या झेंडा चौकात शालेय विद्यार्थी अग्रभागी असलेल्या एका शांततापूर्ण मोर्चावर स्वैरपणे गोळीबार करून पोलिसांनी लोकांचा प्रक्षोभ ओढवून घेतला. मोर्चात अगदी अग्रस्थानी असलेल्या मुलींचा काहीच अपराध नसताना पोलिसांनी त्यांच्यावर संगिनी रोखल्या. त्यामुळे १६ वर्षांचा शिरीषकुमार याने पोलीस अधिकाऱ्यास आव्हान दिले, " मुलींवर हल्ला का करता ? पाहिजे तर माझ्यावर गोळी घाला." विद्यार्थी नेता असलेल्या शिरीषकुमारच्या धैर्याची कदर न करता त्या अधिकाऱ्याने क्षणार्धात शिरीषला ठार मारले. त्यामुळे प्रक्षुब्ध झालेल्या जमावाने दगडफेक केली व त्या अधिकाऱ्याला भोसकले. त्यानंतर बेभान झालेल्या पोलिसांनी भयानक हिंसकपणे व निर्घृणपणे स्वैर गोळीबार केला. त्यांनी पाच माणसे ठार मारली. पळून जात असलेल्या निदर्शकांचा पाठलाग करत गोळ्या संपेपर्यंत पोलिसांनी गोळीबार केला. लोकांना जालियनवाला बाग मानवसंहाराचे स्मरण झाले. त्या वादळी दिवसानंतर नंदुरबार व एकूण खानदेशात ब्रिटिशांविषयीचा राग खदखदत राहिला. तरीही सरकारने त्या भयंकर कृत्याची चौकशी करण्याची मागणी फेटाळून लावली. रा. ना. मंडलिक हे काही काँग्रेसचे आमदार नव्हते. पण त्यांनाही धुळे जिल्ह्यात प्रवेश नाकारला होता.

**सरकारी खजिन्याची लूट.**—सरकारच्या नंदुरबारमधील अत्याचारांमुळे सारा खानदेश दुखावला गेला. भिल्ल, तडवी यांच्यासह सारा समाज रागवल्यामुळे शेकडो युवक भूमिगत झाले. या परिस्थितीतून सरकारी खजिना लुटण्याची खलबते सुरू झाली. या प्रकरणाबाबत काही अभ्यासकांनी फक्त उत्तमराव पाटील व जी. डी. लाड यांनी अनुक्रमे १९८७ व १९८६ मध्ये लिहिलेल्या आठवणींवर आधारित माहिती दिली आहे. परंतु मुंबई सरकारने १९४४ साली सखोल चौकशी करून भारत सरकारला सादर केलेल्या गोपनीय अहवालातील तपशील वेगळा आहे. त्याचाही मी इथे उपयोग केला आहे.

साने गुरुजींचा प्रभाव असलेले डॉ. उत्तमराव गिरीधर पाटील, त्यांच्या पत्नी लीलाबाई, माता वेणूबाई आणि दशरथ व शिवाजी हे त्यांचे भाऊ या आंदोलनात सक्रिय होते. जळगाव जिल्ह्यातील डांगरी गावचे हे कुटुंब राष्ट्र सेवादलाशी संबंध ठेवून होते. शिवाजीराव धुळे जेलच्या भिंतीवरून उडी मारून पळाले होते. लीलाबाई येरवडा जेलमधून शिताफीने निसटल्या आणि उत्तमरावांबरोबर साताऱ्यातील तुफान सेनेत काम करू लागल्या. भारतातील छोडो भारत लढा उतरणीला लागला, तरी नंदुरबारमधील पोलीस अत्याचारांच्या आठवणी कायम होत्या. आंदोलनासाठी वित्तबळाची गरजही होती. त्यातून सरकारच्या इभ्रतीला धक्का लावण्यासाठी सरकारचा खजिना लुटण्यासाठी खलबते सुरू झाली. मुंबई सरकारच्या दस्तऐवजांनुसार खानदेशातील विष्णू सीताराम पाटील, उत्तमराव पाटील, फकिरप्पा देवरे आणि व्यंकट तानाजी धोबी व साताऱ्याचे नागनाथ नायकवडी, जी. डी. लाड, नाथा लाड, इचलकरंजीचे यशवंत कुलकर्णी, आणि कुपवाडचे धोंडीराम माळी या योजनेत होते. शिवाय ओंकार पाटील, बाबूराव गुरव, रामचंद्र पाटील, शिवराम महिपत पाटील व महादेव यांची नावे सरकारच्या फायलीत आहेत. आणखीही पुढील नावांचा उल्लेख केला जातो—अप्पा पाटील, किसन पाटील, वि. बं. कळके व ज्ञानोबा जाधव.

प्रथम साक्रीचा सरकारी खजिना हस्तगत करण्याची योजना होती. तथापि देवरे यांचा मित्र असलेल्या बहुधा दयाराम पाटील नावाच्या पोलिसाने सांगितले की, धुळ्याहून नंदुरबारला पाठवावयाचा खजिना पाच-सहा लाख रुपयांचा असतो. म्हणून १४ एप्रिल १९४४ रोजी धुळ्याहून नंदुरबारला पाठवावयाच्या ५,५१,००० रुपयांच्या खजिन्याची लूट करण्याचा कट रचला. उत्तमरावांनी सर्व नियोजन केले होते. ठरल्याप्रमाणे काही जण सरकारी खजिना नेणाऱ्या बसमध्ये शिरले. तर काही जण पुढे जाऊन चिमठाणे व साळवे गावांदरम्यान रस्त्यातच असलेल्या चढावाजवळ गेले. योजनेनुसार तेथे बस येण्याच्या वेळी त्यांनी रस्त्यावर मारामारीचे नाटक करावयाचे ठरले. चढावाजवळ बसचा वेग मंदावला. शिवाय मारामारीमुळे बस थांबवणे भाग पडले. नागनाथ नायकवडी, जी. डी. लाड, शंकर माळी व किसन पवार मारामारी करत होते. त्यामुळे बस तेथे थांबली.

इतक्यात आत बसलेल्या तिघांनी पैशाच्या पेट्यांवर बसलेल्या पोलिसांवर झडप घातली व त्यांच्या बंदुका हिसकावून घेतल्या. तेवढ्यात बस सुरू झाली. परंतु नायकवडी यांनी बसच्या पायरीवरून चालकावर गोळी झाडली व त्याला जखमी केले. एका पोलिसावरही गोळी झाडून त्यालाही जखमी केले. आतून धोंडीराम माळी यांनीही बस चालक व पोलिसास जखमी केले. या धामधुमीत क्रांतिकारकांनी बसचा ताबा घेतला आणि त्यांनी सरकारी कर्मचारी व कोषागाराचा लिपिक, शिपाई यांना झाडाखाली पहाऱ्यात गप्प बसविले. क्रांतिकारकांनी सर्व आठ पेट्या ताब्यात घेतल्या. त्यांतील ५,५१,००० रुपयांची बंडले गाठोड्यांमध्ये बांधली. बस प्रवासी व कर्मचाऱ्यांनी गडबड करू नये म्हणून काही पैसे तेथेच उधळून टाकले. मूळ रक्कम घेऊन क्रांतिकारक जंगलात पसार झाले.

सातारा प्रतिसरकारने त्या जिल्ह्यात लुटलेल्या 'पे स्पेशल ट्रेन' कोषागारातून मिळविलेल्या रकमेपेक्षा नंदुरबार खजिना लुटीतून क्रांतिकारकांनी अधिक रक्कम हस्तगत करून नेत्रदीपक यश मिळविले. हा ब्रिटिशांच्या इभ्रतीला मोठाच हादरा होता. सरकारी चौकशीत आढळले होते की, लुटलेली रक्कम खानदेशातून प्रथम हैदराबादच्या चरखा संघाच्या कार्यालयात जमा करण्यात आली व तेथून हैदराबाद व मध्यप्रांताच्या खादी भांडारांच्या नावे खर्ची घालण्यात आली. खादी भांडारांची रक्कम दाखवल्यामुळे सरकार काही करू शकले नव्हते.

त्या रकमेच्या विनिमयाची फार मोठी जबाबदारी विख्यात गांधीवादी कार्यकर्ते द्वारकानाथ लेले यांचेवर सोपविलेली होती. एकूण ५,५१,००० रुपयांपैकी या कारवाईचा खर्च वजा जाऊन ४,३१,००० रुपये शिल्लक राहिले. यातील काही रक्कम सेंट्रल डिरेक्टोरेटच्या खर्चासाठी अच्युतरावांकडे दिली. तर काही रक्कम सातारा व पश्चिम खानदेशातील आंदोलनासाठी खर्च करण्यात आली, असे स्पष्ट दिसते.

या आक्रमक कारवाईमुळे सरकारची मानहानी झाली. अद्यापही क्रांतिकारकांचे आव्हान कायम असल्याचे वाटून इंग्रज चवताळले होते. म्हणून सरकारने खबऱ्यासाठी दहा हजारांचे बक्षीस लावले. सरकारने सी.आय.डी. मधील एका

इंग्रज डी.आय.जी. ला या प्रकरणाच्या चौकशीसाठी कामाला लावले. तथापि बहुतेक कार्यकर्ते त्याच्या हाती कधीच लागले नाहीत. उत्तमरावांना पंढरपूरला पकडून कोठडीत ठेवण्यात आले. परंतु त्यांना चौकशीसाठी डाक बंगल्यात नेत असताना, त्यांनी पोलिसाच्या पोटात गुद्दा मारला व ते निसटले. काही दिवसांनी उत्तमराव पुन्हा खादी केंद्रात व नंतर सातारा प्रतिसरकारमध्ये कामाला लागले. नागनाथ नायकवडी पकडले गेले. परंतु ते सातारा तुरुंगातून पसार झाले. मात्र व्यंकट तानाजी धोबी व शंकर माळी यांना प्रत्येकी २० वर्षे आणि धोंडीराम माळींना २७ वर्षांची सक्तमजुरी झाली. मुंबई सरकारने धुळ्याच्या नागरिकांवर सूड म्हणून ६०,००० रुपयांचा सामूहिक दंड वसूल केला होता. मात्र एप्रिल १९४४ मध्येही क्रांतिकारकांचे आव्हान चालू आहेच या जाणिवेतून इंग्रज सरकार फारच अस्वस्थ झाले होते.[३१]

## रायगडमधील धाडसी लढा

आंदोलनाच्या रणनीतीच्या दृष्टीने कुलाबा म्हणजेच रायगड जिल्ह्याचे महत्त्व लक्षात घेऊन काँग्रेसने तेथील विजेच्या तारांचे पायलॉन आणि दूरसंचरण व्यवस्था विस्थापित करण्यावर सर्वाधिक भर दिला. तेव्हा खोपोली, भिवपुरी व भिरा वीज केंद्रांमधील वीज या जिल्ह्यातूनच पुण्या-मुंबईला पुरविली जाई. म्हणून पायलॉन कापून मुंबईतील युद्धसामग्रीचे कारखाने व गिरण्या बंद पाडणे हे उद्दिष्ट होते. तसेच मुंबईपासून पुणे, दक्षिण महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, केरळ व मद्रास प्रांतापर्यंतचे दूरसंचरण रायगडमधूनच होत असल्याने ही यंत्रणा विस्थापित करण्यावर काँग्रेसचा भर होता. दूरसंचरण विस्थापित करण्यात काँग्रेसला इतके यश आले की, १३-१४ ऑगस्ट १९४२ पासून जिल्ह्यातील सर्व तारायंत्र व्यवस्था बंद पडली होती. अलिबागहून व बाहेरून अलिबागला पाठवायचे सर्व तारसंदेश पोस्टाने मुंबईमार्गे पाठवावे लागत. तारायंत्र निकामी झाल्यामुळे वरिष्ठांना माहिती पुरवण्यासाठी खास दूत पाठवावे लागत. परिणामतः पनवेलच्या बंदोबस्तासाठी अलिबागहून पोलीस दल नेण्यास डी.एस.पी. ला ६० तास लागले होते. महाड बंडाच्या वेळीही तारायंत्र बंद असल्याची तार डी.एस.पी.ने पाठविली. पनवेलमध्ये

काँग्रेसची सभा पार पडली व सरकारी इमारतीवर तिरंगा झेंडा फडकवला, पण पोलीस आले एका तासानंतर. मामलेदार घरातच बसून राहिला होता. पनवेलचे पोलीस जमावाला सामोरे जाण्यास तयार नव्हते. म्हणून अस्वस्थ झालेला डी.एस.पी. ६० तासांनी पनवेलला पोहोचला आणि त्याने डी.आय.आर. ५६(४) खाली नेत्यांना अटक करून खटले भरले. त्या गोऱ्या साहेबाला आपल्या पोलीस दलासह पनवेलमध्येच राहावे लागले. पेण, खरवलीसारख्या गावांमध्येही काँग्रेसने धडक मोर्चा काढून नोकरशाहीला आव्हान दिले होते. वरसई गावातील सावकाराच्या घरी राजकीय डाका घालून आंदोलनासाठी सहा हजारांवर रुपये हस्तगत केले होते.

रायगडमधील आंदोलनाची भूमिगत संघटना मुंबईतून आपले काम करीत असे. विठ्ठल लक्ष्मण ऊर्फ भाई कोतवाल, दत्तात्रय काशीनाथ कुंटे, गजानन यज्ञेश्वर म्हसकर, जगन्नाथ गणपत ढवण व दिगंबर विनायक ऊर्फ नाना पुरोहित हे भूमिगत राहून लढा चालवत. सर्वांवर विभागशः जबाबदारी सोपवलेली होती. कोतवालांनी कर्जत तालुक्यातील पायलॉन व रेल्वे दळणवळण खंडित करण्याची जबाबदारी घेतलेली होती. वेदक हे अनुभवी कार्यकर्ते पनवेलमध्ये कार्यरत होते.[३२]

**महाडचे बंड :—**बिरवाडीचे काँग्रेस समाजवादी नेते दिगंबर विनायक ऊर्फ नाना पुरोहित यांच्या नेतृत्वाखाली महाडमध्ये समांतर सरकार स्थापन करण्याची खलबते पूर्वोक्त पुणे शिबिरात युसुफ मेहेरअली यांच्या समवेत झाली होती. समाजवाद्यांनी १९४१ मध्ये बिरवाडी येथे शेतकरी परिषद भरविल्यापासून खोती पद्धती-विरुद्ध-कुळे असा तणाव वाढला होता. त्याला सरकार-विरुद्ध-कुळे असे स्वरूप प्राप्त झाले. नाना पुरोहित गुप्तरीत्या जनमत घडवत असल्याची पोलिसांनाही कल्पना होती. काँग्रेस समाजवादी गटाने पुण्यात बैठक घेऊन १० सप्टेंबर १९४२ रोजी महाडमध्ये प्रचंड मोर्चा काढण्याची योजना आखण्यात आली होती. मोर्चाच्या आधी वाळण खुर्द गावी पुण्यातील राष्ट्र सेवादलाचे युवक व शेतकऱ्यांची छावणी उभारण्यात आली होती. बिरवाडी, शेलटोली, खैरट, नडगाव वगैरे गावांमधील शेतकरी आणि वाळणच्या छावणीतील युवकांचा जथा

शेडावजवळ मोर्चात आला. तेव्हा लोकांना बसमधून जात असलेला अवल कारकून सावंत व नंतर पुढे मंडल निरीक्षक, बेलीफ व एक शिपाई दिसला. लोकांनी त्यांना पकडले आणि खादीचे कपडे घालावयास लावून मोर्चामध्ये सामील करून घेतले. त्यांच्या हातात राष्ट्रध्वज देऊन त्यांना गांधीजींचा जयजयकार करावयास लावले. वरील गावांव्यतिरिक्त सावनी, दहिवड, देवघर, छत्री निजामपूर, वारंगी, माटवण, वाघोली व बोरगावचे शेतकरीही मोर्चात सामील झाले. जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या अहवालात मोर्चाचे वर्णन 'सशस्त्र शेतकऱ्यांचा उठाव' या शब्दांत केलेला मला आढळला.

मोर्चातील लोकांनी प्रथम महाडचे डाकघर हस्तगत करून कागदपत्रांची होळी केली व तारायंत्र निकामी केले. लष्कर भरती कार्यालय उद्‌ध्वस्त केले. फौजदार मांढरे २५ पोलीस घेऊन आला. परंतु सत्याग्रहींनी लाठीमाराचा मुकाबला केला. जमावाने फौजदाराला ताब्यात घेऊन त्यालाही खादी टोपी घालून मोर्चाच्या अग्रभागी चालावयास लावले. मोर्चा विठोबा मंदिराजवळ आल्यावर दुसऱ्या पोलिसांनी जमावावर जोरदार गोळीबार केला. गोळीबारात नथू दौलत टेकावले, अर्जुन कानू भोई, वसंत बळवंत दाते व कमलाकर विठ्ठल दांडेकर हे हुतात्मा झाले. शिवाय मोर्चाच्या अग्रभागी असलेला अवल कारकूनही सरकारच्या बंदुकीचा बळी ठरला. मात्र जमावाने सर्व सहा पोलिसांच्या बंदुका हिसकून घेतल्या. मोर्चा पुढे गेल्यावर महाडचा मामलेदार मोर्चा थांबवण्यासाठी आला. परंतु त्यालाही पुढाऱ्यांपुढे शरणागतीच पत्करावी लागली. या क्षणापर्यंत महाडच्या बंडास चांगला लोकप्रतिसाद लाभला होता.

तथापि थोड्या वेळाने सशस्त्र पोलिसांची तुकडी माणगावहून महाडला आली. त्यांनी गांधार नाक्यापासून जोरदार गोळीबार सुरू केला. नागरिकांना हत्यारबंद तुकडीचा मुकाबला करणे कठीण असल्याने पुरोहितांनी मोर्चा पांगवला. स्वतः पुरोहित व अनेक जण भूमिगत झाले. काही दिवसांनी अच्युतराव पटवर्धन यांच्या सूचनेनुसार पुरोहित कराची, लाहोर व बनारसमध्ये कार्यरत झाले.

तदनंतर ब्रिटिशांनी महाडच्या उठावाचा हरतऱ्हेने सूड घेतला. गरीब गावकऱ्यांकडून ३५,००० रुपयांचा सामूहिक दंड वसूल केला. हवाई दलाची विमाने खाली येऊन महाडवर घिरट्या घालत. महाडचा खटला स्पेशल क्रिमिनल कोर्ट्स वटहुकूम व नंतरच्या दुसऱ्या वटहुकमांखाली चालविण्यात आला. महाडचा उठाव जसा स्वातंत्र्यासाठी होता, तसाच तो वंचितांच्या व शोषितांच्या प्रतिकाराचाही एक नमुना होता. पनवेल, पेण, अलिबाग, खरवली व पेणजवळील वाशी येथेही मोर्चे व निषेध सभा आयोजित करून ब्रिटिशांना छोडो भारत असे बजावण्यात आले होते.[३३]

**भाई कोतवालांचे भूमिगत आंदोलन :—** भाई कोतवाल व गोमाजी पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुमारे ५० क्रांतिकारकांचा 'आझाद दस्ता' रायगडमधील दुर्गम भागात पाच-सहा महिने प्रशासनाची झोपमोड करत होता. भिरा, भिवपुरी, चोला पॉवर हाऊसमधून पुणे व मुंबईला होणारा वीज पुरवठा बंद पाडण्याचे या दोन्ही नेत्यांचे मिशन होते. त्यांचा आझाद दस्ता जयप्रकाश नारायण यांच्या संकल्पनेनुसार सक्रिय राहिला. त्यांनी एकामागून दुसरा असे शेकडो विजेचे पायलॉन पाडून ब्रिटिशांना व टाटा वीज कंपनीलाही हैराण केले होते. पायलॉन पाडण्याचे तंत्रज्ञान त्यांना टाटा कंपनीतीलच दोन इंजिनीअरांनी शिकविले होते. त्या भागातील आदिवासी, कातकरी व ठाकूर लोक त्यांना मदत करीत असत. त्यांच्या पथकातील लोक भाले, तलवारी, तिरकमठे, ठशांच्या बंदुका आणि पोलिसांकडील हिसकून घेतलेल्या बंदुकांचा स्वसंरक्षणार्थ उपयोग करीत. त्यांच्या विद्रोही पथकांत काँग्रेसजनांप्रमाणेच वंचित समाजघटकही होते.

भाई कोतवालांचा आझाद दस्ता म्हणजे आत्मसमर्पणास तत्पर असलेल्या स्वातंत्र्य सैनिकांची बटॅलियन होती. तिच्यात गोमाजी व त्यांचे सुपुत्र हिराजी पाटील आणि हरिभाऊ भडसावळे, आर. बी. पोफळे, रामलाल श्रीवास्तव, भास्कर तांबट, भास्कर पिंपळे, यशवंत देहेरकर, शरद जकातदार, दत्तात्रय दवणे, धोंडू देसाई, भगत मास्तर, नारायण देशमुख व इतर असे ५०-६० सैनिक होते. कुलाबा जिल्ह्यात तेव्हा १९५ किलोमीटर लांबीच्या मुख्य वीजवाहिनी केबल

होत्या. वीजवाहिनी अथवा पायलॉन कापणे व रेल्वे विसकळीत करण्यासाठी कोतवालांनी तीन पथके उभारली होती. अंबरनाथ ते खंडाळा लोहमार्ग त्यांनी अनेक वेळा विसकळीत केला. नेरळ-माथेरान लोहमार्गावरील जुम्मापट्टी स्थानकातील संरक्षित दारू-गोळा लुटून त्यांनी त्या साहित्याचा घातपातासाठी उपयोग करून घेतला. कोतवालांचे साथीदार पोलिसांच्या बंदुका हिसकून घेत व त्यांचा पोलिसांवर उपयोग करीत. मुंबईतील सेंट्रल डिरेक्टोरेटकडून कोतवालांच्या उपक्रमास पैसे मिळत.[३४]

खंडाळा घाटातील क्रमांक ९ चा बोगदा उडवून रेल्वे सेवा बंद करण्याची कोतवालांची धाडसी योजना होती. त्यासाठी जवळच्या धाक जंगल भागातील २००-३०० खेडूत त्यांनी संघटित केले होते. पण सेनादल आल्याने हा बेत फसला. मुंबईपासून भुसावळ, पुणे व सुरत हे तिन्ही लोहमार्ग सेनादलाच्या निरीक्षणाखाली ठेवलेले असूनही तेथे अनेक घातपात झाले. सप्टेंबर १९४२ च्या प्रारंभी वांगणीजवळचा पायलॉन कापल्याने टाटा कंपनीचे तर नुकसान झालेच, पण त्यापेक्षा सरकारची चिंता वाढली. म्हणून पायलॉनच्या संरक्षणासाठी सरकारला सेनादल तैनात करावे लागले होते. तरीदेखील रायगडमध्ये १० ऑक्टोबरला अनेक ठिकाणी पायलॉन कापण्यात आले. यामुळे सरकार चिंताग्रस्त झाले होते. कारण मुंबई व पुणे शहरांचा वीज पुरवठा खंडित झाल्यास ब्रिटिशांच्या युद्धप्रयत्नांना बाधा येऊन जनता व कारखानदारांचे मनोबल कमकुवत झाले असते. मात्र पुढच्याच दिवशी जी. आय. पी. रेल्वेचा मोक्याच्या ठिकाणचा एक महत्त्वाचा पायलॉन आंदोलकांनी जमीनदोस्त केला. स्वतः सरकार रेल्वे व पायलॉन यांना पूर्ण संरक्षण देण्यास असमर्थ होते. म्हणून सरकारने त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी नजीकच्या गावकऱ्यांवर सक्तीने लादून त्यांना गस्त पथके उभारण्यास फर्माविले.[३५]

सेनादल, पोलीस व गावकऱ्यांची पथके अशी विपुल यंत्रणा असूनही आझाद दस्त्याची घातपाती कृत्ये वाढत राहिली. म्हणून गव्हर्नर लम्ले यांनी आपली शस्त्रांनी सुसज्ज अशी गव्हर्नरची खास युरोपियन बॉडीगार्ड सेना नेरळ, वांगणी,

बदलापूर व अंबरनाथ भागात तैनात केली. तरीदेखील २० व २५ नोव्हेंबर दरम्यान आंदोलकांनी तीन धाडसी हल्ले करून पायलॉन कापण्याचे प्रयत्न केलेतच. कोतवालांचे सहकारी प्राणपणाने गनिमी लढाई करीत. ४ डिसेंबरला अंबरनाथजवळील पायलॉनच्या संरक्षणासाठी ठेवलेल्या पोलीस चौकीवर १०० आंदोलकांच्या सशस्त्र पथकाने हल्ला करून तेथील पाच बंदुका व गोळीबाराची सामग्री हिसकून घेतली. आंदोलकांनी सुरक्षा दलाशी निकराचा लढा दिला. या गंभीर प्रकरणाने शासन चिंतेत पडले आणि खास रेल्वे गाडीने अजमेर आर्मी रेजिमेन्टच्या चार पलटणी अंबरनाथ व कर्जतला पाठविल्या. राज्याच्या पोलीस विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि गव्हर्नरला या प्रकरणी खास लक्ष घालावे लागले होते.

नेरळजवळील मानिवली गावाच्या परिसरात भूमिगत आंदोलकांचे केंद्र होते. तथापि सुरक्षा दलाला कोणालाही पकडणे शक्य झाले नाही. अतिरिक्त गृह सचिवाने रेल्वे दूरध्वनीवरून गुप्तचरांना दिलेल्या गोपनीय सूचनांची बातमी भूमिगत पुढाऱ्यांना समजली, म्हणून सुरक्षा दलाचे प्रयास वाया गेले. शासनाला करता आले फक्त आपल्या शक्तीचे प्रदर्शन! लोकांना जरब बसावी म्हणून कर्जत गावात सेनादलाने संचलन केले. तथापि कर्जतच्या दोन पलटणींना धोका असल्याने सरकारला लवकरच त्या अंबरनाथला स्थलांतरित कराव्या लागल्या.

गुप्तचरांची फार कुचंबणा होत असे. जनतेकडून त्यांना कोणतेही सहकार्य किंवा माहिती मिळत नसे. कुणीही तोंड उघडत नसे. याउलट लोक पोलिसांच्या हालचालींची माहिती भूमिगत नेत्यांना पुरवित. शासनाच्या दृष्टीने ही फार मोठी अडचण होती. सशस्त्र पोलिसांवरील हल्ल्याने ठाणे व कुलाबा जिल्ह्यांचे पोलीस अधीक्षक तर फारच गोंधळून गेले होते. लोकांच्या सहकार्याअभावी त्यांचे प्रयत्न विफल होत असत. कर्जतला सेना अधिकारी व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या परिषदा दोन वेळा घेण्यात आल्या. सरकारने वीजतारांच्या संरक्षणासाठी भिरा-धारावी वीजमार्गावर ७१ गाव-गस्त पथके ठेवली. तर खोपोली-परळ लाईनवर ४०, भिवपुरी-धारावीवर २० आणि भिवपुरी-खोपोलीवर २९ पथके तैनात केली. शिवाय या कामी १२ पोलीस पथके आणि सेनादल कार्यरत होतेच. तरीदेखील भूमिगत आंदोलक सुरक्षा अधिकाऱ्यांना हुलकावण्या देत.

भाई कोतवालांचा आझाद दस्ता जसा धाडशीपणे विद्रोह करीत असे, तसेच त्यांचे कार्य नियोजनपूर्वक पद्धतीनुसार चालत असे. त्यांनी या कामी टाटा कंपनीचे कर्मचारी व गावपाटलांशीही संगनमत केले होते. त्यांचे काही सहकारी पायलॉनव्यतिरिक्त कल्याण-पुणे लोहमार्गावर घातपात करण्यातही व्यग्र होते. विशेषतः लष्करी महत्त्वाच्या गाड्यांवर त्यांचा कटाक्ष होता.

कोतवालांचा विद्रोह ३१ डिसेंबर १९४२ पर्यंत अविरत चालू राहिला. तथापि एका चुकीच्या माणसावर विश्वास ठेवून त्यांनी त्याच्या हाती एक चिठ्ठी दिली. तो द्रव्यलोभी माणूस पोलिसांचा खबऱ्या होता. त्याने पैसे घेऊन ठाणे जिल्हा पोलिसांना भाई कोतवालांचा ठावठिकाणा सांगितला. तसेच तो पोलिसांना ३१ डिसेंबरच्या रात्री सिद्धगडावर घेऊन जाण्यास तयार झाला. त्यानुसार ठाण्याचा उप जिल्हा पोलीस अधीक्षक आपली निवडक सशस्त्र दलाची तुकडी घेऊन १ जानेवारी १९४३ च्या रात्री निघाला. ५९ किलोमीटरची रपेट करून हे सशस्त्र दल २ जानेवारीला सकाळी सव्वासहाला बोरवाडीजवळील सिद्धगडावर पोहोचले. हा किल्ला अत्यंत दुर्गम असून तेथे कोतवाल आश्रय घेत असत. त्या प्रातःकाळी कोतवाल व त्यांचे सहकारी बेसावध होते. याचा फायदा घेऊन पोलिसांनी प्रथम हिराजी पाटलांचा बळी घेतला. काही साथीदार अद्याप झोपलेले होते. कोतवालांनी गोळीबारास उत्तर देण्याचा प्रयत्न केला. तथापि काडतुसांचा साठा असलेला साथीदार जवळ नसल्याने कोतवाल आत्मसंरक्षण करू शकले नाही. अशा बिकट परिस्थितीत साहाय्यक पोलीस अधीक्षकाने कोतवालांच्या साथीदारांना घेरले. उप अधीक्षकाने जादा सेनादलाच्या जोरावर भाई कोतवालांचा बळी घेतला. या पोलीस कारवाईत कोतवाल व हिराजी हे हुतात्मा झालेत. हिराजींचे वडील गोमाजी पाटील व सर्व सहकारी पकडले गेले. या कारवाईत पोलिसांना बरीच शस्त्रे व स्फोटके मिळाली होती.

भाई कोतवाल गांधीवादी असूनही त्यांनी शस्त्र व स्फोटके हाती घेतली होती. गांधीवादी असूनही त्यांनी काँग्रेस समाजवादी पक्षाची दीक्षा घेतली होती. कारण कलोनिअल साम्राज्य खिळखिळे करणे हे ध्येय होते. कोतवालांच्या आझाद दस्तामधील २९ जणांचे पोलिसांनी भयानक हाल केले. त्यांच्यावर खटले भरले.

तथापि त्यांच्या पथकाचे काम पुढेही चालू राहिले. त्यांचे सहकारी हरिभाऊ भडसावळे व श्रीवास्तव यांनी पथकाची उभारणी करून घातपात पुन्हा चालू केले. पायलॉनप्रमाणेच रेल्वे मार्गावर घातपात सुरू केले. या पथकाने सातारा प्रतिसरकारच्या नेत्यांशीही परस्परसंबंध प्रस्थापित केला. या मंडळींनी वीर कोतवालांच्या पहिल्या पुण्यतिथीला महत्त्वाकांक्षी योजना आखली होती. पुण्यतिथीच्या दोन दिवस आधी पुणे व मुंबईला वीज पुरवठा करणारे पाच मुख्य पायलॉन एकाच दिवशी कापून हाहाकार माजवण्याची ती योजना होती. त्यानुसार भडसावळेंच्या पथकाने लोणावळा, सुकेळी खिंड व शेडुंगजवळचे पायलॉन ठरलेल्या वेळी कापले. त्यामुळे रात्री ८ वाजता वीजप्रवाह बंद पडून मुंबई व पुणे ही दोन्ही शहरे काळोखात बुडाली होती. बलवान इंग्रज सरकारला हे मोठे आव्हान होते. अशा रीतीने कोतवालांची पहिली पुण्यतिथी साजरी झाली.

यानंतरही कोतवालांच्या निष्ठावंत अनुयायींपैकी हरिभाऊ भडसावळे व रामलाल श्रीवास्तव यांनी कुलाबा जिल्हा, मुंबईची उपनगरे व ठाणे परिसरात घातपाती कारवाया चालू ठेवल्या. स्फोटकांमध्ये पिक्रिक ॲसिडचा उपयोग करून त्यांनी पश्चिम रेल्वेवरील गोरेगाव स्थानकाजवळ दोन रूळ वाकवून मार्ग बंद केला होता. युद्धसामग्रीचे उत्पादन करणाऱ्या गोरेगावजवळील एक्सेल कारखान्यातून त्यांना रासायनिक पदार्थ व सामग्री मिळत असे. याशिवाय डहाणूजवळही त्यांनी घातपात करून सेनादलाच्या सामग्रीस आग लावली. या पथकातील आरोपींच्या खटल्याचे कामकाज ठाणे सत्र न्यायालयात चालू असताना कोर्ट दालनाच्या छतावर त्यांनी टाइम बॉंबचा स्फोट घडवून आणण्याचेही धाडस केले. छोडो भारत आंदोलनात महाराष्ट्रामधील हा बहुधा शेवटचा बॉंबस्फोट असावा असा दावा केला जातो.

कुलाबा जिल्ह्यात १९४२ ते १९४४ पर्यंत झालेल्या घातपातांची यादी बरीच मोठी होती. त्यात आंदोलनास विरोध करणाऱ्या संस्थांच्या शाळांना आग लावणे तसेच नेरळ व भिवपुरी आणि बदलापूर व वांगणी स्थानकांदरम्यान रेल्वे गाड्यांचा वीज प्रवाह तोडणे, पेणच्या न्यायालयास आग लावणे, डाकघरे जाळणे अशा

प्रकारच्या घातपाती कारवायांचा समावेश होता. कोप्रोली, मानिवली, वांगणी, बदलापूर, आंबिवली भागातील बऱ्याच घटनांचाही त्यात समावेश होता. महाड व पनवेलच्या माध्यमिक शाळा आंदोलकांनी जाळून टाकल्या होत्या. साराबंदीची मोहीम गुप्तपणे चालवून सरकारी महसूलही घटवला होता.[३६]

## पूर्व खानदेशातील आंदोलन

फैजपूर काँग्रेसमुळे या परिसरात विपुल राजकीय जागृती झालेलीच होती. साने गुरुजी १९४१ पासून कैदेतच होते. मात्र महाराष्ट्राप्रमाणे इथेही नेत्यांची धरपकड होत असताना ९ ऑगस्टच्या मध्यरात्री साने गुरुजींची रीतसर सुटका झाली. धुळे जेलच्या सहानुभूती वाटणाऱ्या अधीक्षकाने त्यांना सकाळी अमळनेरला आणून सोडले. पण गुरुजींनी भूमिगत होण्यापूर्वी उत्तमराव पाटलांना निरोप पाठविला की, अमळनेर जर निष्क्रिय राहणार असेल तर आपण आत्मदहन करून घेऊ. त्याला प्रतिसाद म्हणून अमळनेर पेटले. गुरुजींनी उठावाकरिता केलेले आवाहन वाचून दाखविताच तेथे संग्राम पेटला. १९४२ मधील जिल्ह्यातील हा पहिला मोठा संग्राम! अमळनेरचे डाकघर, पोलीस चौकी, न्यायालय व रेल्वे स्थानक जळू लागले. गोळीबारात एक जण हुतात्मा झाला. गुरुजींच्या पत्रात सहा जण मरण पावल्याचा उल्लेख सापडतो. (नारायण जोशींना २७ ऑगस्ट १९४२ रोजी गुरुजींनी लिहिलेले पत्र). लोकांनी इमारतीसह अर्धी मालगाडी जाळून टाकली होती. संतप्त कलेक्टरने लोकांवर दहशत बसवण्यासाठी १,५०,००० रुपयांचा सामूहिक दंड ठोठावला. जंगल सत्याग्रह करणाऱ्या आडगावच्या गांधीवादी कार्यकर्त्यांवर पोलिसांनी लपतछपत स्वैर गोळीबार करून तिघांना ठार केले.

सरकारच्या अशा दडपशाहीमुळे आंदोलनाने भूमिगत रूप धारण केले. त्यातून घातपातांचा उगम झाला. अमळनेरची प्रताप मिल, जळगावची खानदेश मिल, गेंदालाल मिल वगैरे बरेच दिवस बंद होत्या. या आंदोलनाची खास विशेषता म्हणजे त्यात विद्यार्थी, विद्यार्थिनी व युवकांचा अपूर्व सहभाग, स्वार्थत्याग आणि ध्येयवाद होय! त्यांनी शाळा बंद पाडल्या व सरकारचा महसूल घटवला.

मात्र किशोरीलाल मश्रूवालांचा उपरोक्त **हरिजन** चा अंक प्रकाशित झाल्यावर खुले आंदोलन व घातपात अशा दोन्ही स्वरूपात लढा चालू राहिला. धनाजी नाना चौधरी, दास्ताने, देवकीनंदन, धनजी महारू बोंडे, सीताराम बिर्ला, सुपडू भादू पाटील हे नेते अटकेत पडलेले होते. म्हणून साने गुरुजी व मधू लिमयेंच्या मार्गदर्शनानुसार उत्तमराव पाटील, रामभाऊ भोगे, बा. र. देशपांडे, भुतेकर, सोनू आनंदा पंडित, माधव धनजी पाटील, झगाभाऊ पाटील, जनार्दन रामचंद्र, गणपत भावडू महाजन, लक्ष्मण गणपत चौधरी, अवचित गोपाळ देशमुख, डॉ. पोळ, सुभान तोताराम पाटील वगैरे ५० जण दळणवळण व लोहमार्गात घातपात करण्यात व्यग्र झाले. नरेंद्र देव व लोहियांच्या विचारसरणीने प्रभावित झालेले हे कार्यकर्ते घातपाताद्वारे सेनादलाच्या व युद्धसामग्रीच्या गाड्या घसरवणे व रेल्वे बंद पाडण्यासाठी प्रयत्न करीत. मध्यंतरी साने गुरुजी पेण, पुणे व नंतर मुंबईत मूषक महाल भूमिगत संघटनेत दाखल झाले व मूषक महालातच पकडले गेले.

खिरोद्याच्या राष्ट्रीय शाळेत जडणघडण झालेले व साने गुरुजींचे अनुयायी रामभाऊ भोगे आणि सोनू आनंदा पंडित या मुख्य सूत्रधारांनी चाळीसगावजवळील वाघळी स्थानकाजवळ सेनासामग्रीची गाडी पाडण्याची योजना आखली होती. भोगेंना भुसावळच्या रेल्वे कर्मचाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार युरोपियन सेनादल व दारूगोळा वाहून नेणारी गाडी वाघळीहून ३ ऑक्टोबर १९४२ च्या पहाटे ४ ते ४ वाजून १५ मिनिटांच्या दरम्यान जाण्याचे संकेत होते. त्याच वेळेत घटनास्थळी गाडी आली. परंतु ती सेनादलाची नसून मुंबई-पेशावर एक्सप्रेस ही प्रवासी गाडी होती. (१९४७ साली पेशावर पाकिस्तानात गेल्यामुळे ही गाडी आता अमृतसरपर्यंतच जाते). **अपघात झाला पेशावर एक्सप्रेसला,** अगदी अनपेक्षितपणे ! रेल्वे इंजिन ड्रायव्हर लोबो याने ब्रेक लावण्यापूर्वीच इंजिन घसरून शेतात घुसले. ही गफलत होण्याचे मुख्य कारण म्हणजे भुसावळ रेल्वे कर्मचाऱ्यांकडून मिळालेली माहिती अचूक नव्हती. शिवाय महत्त्वाच्या मिलिटरी गाडीच्या पुढे सुरक्षिततेच्या कारणासाठी प्रवासी गाडी सोडण्याचे इंग्रज अधिकाऱ्यांचे धोरण होते. सामान्य प्रवाशांपेक्षा युरोपियन सैनिकांची सुरक्षितता अधिक महत्त्वाची

मानली जात असे. दुसरे कारण असे की, मनमाड स्टेशनवरून लष्कराची गाडी मागे ठेवून पेशावर एक्सप्रेस पुढे सोडण्यात आली होती. त्यामुळे हा घोटाळा झाला होता.

पेशावर एक्सप्रेसला घडलेल्या या दुर्दैवी अपघातात गाडीचे इंजिन, तीन प्रवासी डबे व दोन वॅगन रुळांवरून घसरून चक्काचूर झाल्या. रेल्वेने सरकारला कळविलेल्या माहितीनुसार या अपघातात गाडीचा फायरमन व विशेष कामगिरीवरील एका हवालदारासह एकूण १४ जण मरण पावले आणि २९ जणांना भीषण जखमा झाल्या. खरे तर, भीषण जखमी झालेल्यांचा आकडा यापेक्षा बराच मोठा होता. हा अपघात मुंबईपासून चाळीसगाव-वाघळी दरम्यान मैल क्रमांक २०८ जवळ ३ ऑक्टोबर १९४२ च्या पहाटे ४ वाजून ५ ते १५ मिनिटांच्या दरम्यान घडला. गाडी पूर्ण वेगात होती हे विशेष न्यायालयात सांगण्यात आले. बहुसंख्य मरण पावलेले किंवा जखमी झालेले प्रवासी शेतकरी, कामकरी अथवा गिरणी कामगार असून तिसऱ्या वर्गातील प्रवासी होते. वस्तुतः पातोंडा गावचे रेल्वे गस्त पथक या घटनास्थळावरून ३ वाजता गस्त घालून गेल्यावर याच मार्गावरून मुंबई-नागपूर-कलकत्ता मेल सुरक्षितपणे निघून गेलेली होती. म्हणून जिल्हा प्रशासन घातपात करणाऱ्यांच्या चपळाईने गोंधळात पडले होते. कार्यकुशलतेसाठी तेव्हा प्रसिद्ध असलेले नागरी पोलीस व रेल्वे प्रशासन या प्रकरणाने अंतर्मुख झाले होते.

या घातपाताविषयीची माहिती देणाऱ्यास मुंबई सरकारने १०,००० रुपयांचे बक्षीस घोषित केले. गुप्तचरांनी सर्व परिसर पिंजून काढला. तथापि जंगजंग पछाडूनही गुप्तचरांना ठोस पुरावा मिळू शकला नाही. खरे म्हणजे एवढ्या मोठ्या बक्षिसाचे प्रलोभन त्या काळी फार फार मोठे होते. कलेक्टर कोरिन अहोरात्र कानोसा घेतच होता. त्याला कालांतराने खबर मिळाली की, वाघळीचा घातपात व नंतर वाघोडला झालेल्या पंजाब मेलच्या अपघाताचे सूत्रधार एकच आहेत. म्हणून स्वतः कलेक्टर लोकांच्या साक्षी नोदवून घेऊ लागला. मात्र त्यातून त्याचे मत बनले की, वाघोड घातपाताचे सूत्रधार वाघळीच्या कटात सामील नसावेत.[३७]

सरकारने पेशावर एक्सप्रेस अपघात प्रकरण प्रतिष्ठेचे मानून खूप धरपकड केली. देवराम पाटील व सोनू आनंदा पंडित यांच्यासह एक जण पकडला गेला. पुरावा मात्र कोणाच्याही बाबतीत मिळाला नाही. फारसा पुरावा उपलब्ध नसतानाही या प्रकरणी चाळीसगावचे जगन्नाथ हरचंद वाणी, नीळकंठ दत्तात्रय तासे, रावळगावचे अर्जुन झिपरू पाटील, वडाळीचे तुकाराम परशुराम पाटील, सजन नंदू सुरशी, दगडू ताना पाटील, रामदास देवचंद पाटील, नथू दौलत पाटील, नथू भिवसन कोळी, गणपत राजाराम शिंपी आणि हरचंद तुकाराम पाटील या अकरा स्वातंत्र्य सैनिकांवर डिफेन्स ऑफ इंडिया रूल्स आणि इंडियन रेल्वे ॲक्ट व भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांखाली आरोप ठेवण्यात आले. रामभाऊ भोगे पकडले गेले नाहीत, परंतु त्यांच्याच मार्गदर्शनानुसार कटाची आखणी करण्यात आल्याचा सरकारी पक्षाने दावा केला. हा खटला स्पेशल क्रिमिनल कोर्ट्स ऑर्डिनन्स १९४२ अनुसार निर्माण केलेल्या विशेष न्यायालयात दाखल करण्यात आला होता. येथे नमूद करणे आवश्यक आहे की, या ऑर्डिनन्सनुसार निर्माण केलेले विशेष न्यायालय दंडात्मक व संक्षिप्त स्वेच्छानुसारी (आर्बिट्ररी) न्यायपद्धतीचे हत्यार होते.

अशा संक्षिप्त स्वेच्छानुसारी कार्यपद्धतीच्या कोर्टाकडे पेशावर एक्स्प्रेस प्रकरण सुपूर्द केल्यावरही सरकारला हवा तसा निकाल मिळणे अशक्य होऊन बसले. कारण या दाव्यात पोलिसांनी कोर्टापुढे सादर केलेले काही पुरावे संशयास्पद व अविश्वसनीय असल्याचे न्यायाधीशाच्याही लक्षात आले. तसेच तुकाराम परशुराम पाटील, सजन नंदू सुरशी, दगडू ताना पाटील, रामदास देवचंद पाटील, नथू भिवसन कोळी आणि नथू दौलत पाटील या आरोपींच्या जबान्या त्यांनी स्वखुषीने दिलेल्या नाही ; मात्र त्यांच्याकडून बळजबरीने पोलिसांनी पाहिजे तसे जबाब लिहून घेतले, असे न्यायाधीशाचे मत बनले. शिवाय काही जबान्यांचे काही साक्षीदारांनी खंडन केलेले आढळले. शिवाय जबान्यांना पूरक असा पुरावा अथवा आरोपांना परिपोषक पुरावाही शासनाला सादर करता आला नाही. बऱ्याच साक्षीदारांनी सरकारी पक्षाच्या बाजूने दिलेल्या जबान्या अविश्वसनीय होत्या.

आरोप सिद्ध करू शकणाऱ्या नव्हत्या. माफीच्या साक्षीदारांच्या साक्षी परस्परविरोधी असल्याचेही दिसले. विभागीय दंडाधिकारी आणि तालुका दंडाधिकाऱ्यांनी सादर केलेल्या पुराव्यांचा एकत्र विचार करता न्यायालयाला दिसून आले की, आरोपींनी आपल्या जबान्या स्वेच्छेने दिलेल्या नाहीत. या सर्व बाबींचा विचार करून न्यायाधीशाने एकही आरोपी दोषी ठरत नाही असा निकाल दिला. साक्षपुराव्यांचा व्यवस्थित परामर्श घेऊन विशेष न्यायालयाने सर्व आरोपींची मुक्तता केली. हा अत्यंत महत्त्वाचा पण शासनाला अप्रिय असा निर्णय ९ नोव्हेंबर १९४३ रोजी देण्यात आला.

हा खटला मुंबईचे काँग्रेस समाजवादी वकील बॅ. एच. आर. पारडीवाला यांनी सोनूसिंग पाटील, आ. शा. देशपांडे, शिवराम रंगू राणे, अत्रे, तांबोळी या जळगाव-चाळीसगावच्या वकिलांच्या साहाय्याने अत्यंत समर्थपणे चालविला. म्हणूनच आरोपी दोषमुक्त ठरले. या प्रकरणी सरकारचे सर्व प्रयत्न विफल होऊन स्वातंत्र्य आंदोलकांचा मोठा विजय झाला. सरकारी अपयशाचे कारण असे की, काँग्रेसजन व घातपात करणाऱ्यांना जनतेची पूर्ण सहानुभूती होती. म्हणून त्यांच्याविरुद्ध साक्ष देण्यास अथवा पैशाच्या प्रलोभनांना कोणी बळी पडले नाही. क्रांतिकारकांबाबत तोंड बंद ठेवण्याचा जणू काय लोकांनी कट केला होता. शिवाय आंदोलकांबाबत विलक्षण आत्मीयता असलेल्या बॅ. पारडीवालांनी हा दावा कमालीचा समर्थपणे यशस्वी करून दाखविला.

वाघळी घातपात प्रकरणाने सरकार अत्यंत अस्वस्थ झाले. जिल्हाधिकारी समक्ष लक्ष घालून सखोल चौकशी करीत होता. तथापि रामभाऊ भोगे, सोनू आनंदा पंडित व त्यांचे साथीदार देवराम रामजी पाटील हे कधीच पोलिसांच्या हाती लागले नाहीत. तसेच या कारस्थानासाठी युवकांची सेना पुरविणारे भुसावळचे शिक्षक ग. वि. जोशी यांचा पोलिसांना संशयदेखील आला नाही.

वाघळी प्रकरणाच्या आकृतिबंधानुसार २८ ऑक्टोबर १९४२ रोजी दुसरा रेल्वे घातपात जळगाव जिल्ह्यातच रावेरजवळील वाघोडनजीक झाला. वाघळीप्रमाणेच वाघोडला देखील सेनादल व सेनासामग्रीची गाडी घसरवून ब्रिटिशांच्या युद्ध-

प्रयत्नात अडथळा निर्माण करण्याची योजना होती. तथापि भुसावळच्या रेल्वे कार्यालयातून रामभाऊ भोगेंनी मिळविलेली माहिती या वेळेलाही चुकीची ठरली. त्यामुळे २८ ऑक्टोबर १९४२ च्या पहाटे सेनादलाच्या गाडीऐवजी पंजाब मेल वाघोड स्थानकाजवळ घसरून पडली. या **पंजाब मेल** प्रकरणाचे सूत्रधार होते रामभाऊ भोगे, मधू लिमये, सोनू आनंदा पंडित व ग. वि. जोशी. मात्र मुख्य कार्यकर्ते सोनू आनंदा पंडित हे असून जनार्दन रामचंद्र नाईक, सीताराम रतिराम वाणी, लक्ष्मण गणपत चौधरी, गणपत भावडू महाजन, पांडुरंग रावजी शिंपी, अवचित गोपाळ देशमुख, माधव धनजी पाटील, सुभानराव पाटील, मार्तंड रूपला पाटील यांनी कार्यसिद्धी केली.

घातपाती रणनीती यादृष्टीने ही महत्त्वाची योजना होती. तथापि आतील रूळ निखळल्यामुळे भुसावळहून वेगात आलेली पंजाब मेल डाऊन आणि अप लोहमार्गांच्या मधून पुढे सरकत गेली व घसरली. घातपात्यांनी बाहेरचा रूळ काढला असता तर गाडी पुलाच्या कडेवरून कोसळून पूल उद्ध्वस्त झाला असता व भयानक प्राणहानी झाली असती. पण नदीत तसे व्हावे हा उद्देश नव्हता. या दुर्घटनेपूर्वी ४० मिनिटे आधी तेथून मालगाडी गेलेली होती. म्हणजे ४० मिनिटांच्या अवधीत स्वातंत्र्य आंदोलकांनी चपळाईने कार्यभाग साधला. भूमिगतांच्या सांगण्यावरूच वाघोडचे रेल्वे गस्त-पथक कामावर गेलेले नव्हते. त्यासाठी कलेक्टरने पोलीस पाटलास जबाबदार धरून त्याची पाटीलकी रद्दबातल केली. रूळ काढल्याचे गाडीच्या चाणाक्ष ड्रायव्हरच्या लक्षात आल्याने त्याने गाडीचा वेग काबूत आणला होत्या. म्हणूनच प्राणहानी झाली नाही. तरी पण गाडीचे इंजिन आणि सहा डबे घसरल्याने रेल्वे वाहतूक बराच काळ बंद पडली होती.

वाघळीच्या घातपातानंतर २५ दिवसांनी झालेल्या वाघोडच्या या घातपातामुळे इंग्रज सरकार भयंकर चवताळले. मुंबई सरकारने या प्रकारांबद्दल कलेक्टरला खडसावले होते. म्हणून जिल्हा प्रशासनाने संपूर्ण शक्ती पणाला लावून घातपात करणाऱ्यांना पकडले. स्वतः कलेक्टर या प्रकरणात अहोरात्र लक्ष घालीत होता. अशा परिस्थितील खटला उभा करण्यात आला. वस्तुतः हा घातपात इतका

मोठा होता की, स्पेशल क्रिमिनल न्यायालयाने सर्वांना फाशीची शिक्षा दिली असती. तथापि आयरिश नागरिक असलेल्या इंजिन ड्रायव्हरला (नाव माहीत नाही) स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या या इंग्रजविरोधी तरुणांबद्दल अतिव प्रेम वाटत होते. त्यामुळे त्याने न्यायालयात युवकांना अनुकूल अशी साक्ष दिली. या प्रकरणातील गणपतराव महाजनांनी प्रस्तुत अभ्यासकास ही माहिती सांगितली. लोहमार्गाचा बाहेरील रूळ न काढता आतील रूळ काढलेला असल्याने घातपात्यांच्या प्रामाणिक हेतूबद्दल त्याने कोर्टाला ग्वाही दिली. हे कृत्य गुन्हेगारीचे नसून राष्ट्रीय आंदोलनाअंतर्गत केलेला प्रयत्न असल्याचे त्याने न्यायालयास ठासून सांगितले. आयरिश माणसांचा इंग्रजांवर राग होता आणि त्यांना भारतीयांबद्दल सहानुभूती होती. शिवाय स्वातंत्र्यसैनिकांबद्दल स्पेशल न्यायाधीशालादेखील सहानुभूती वाटत होती. म्हणून त्यांना फाशीच्या ऐवजी सक्त मजुरीच्या शिक्षा झाल्या.

या घातपात प्रकरणी दहा क्रांतिकारकांना शिक्षा झाल्या. त्यांपैकी लक्ष्मण गणपत चौधरी यांना २४ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा झाली तर रामभाऊ भोगेंना १६ वर्षे सक्तमजुरी झाली. जनार्दन रामचंद्र नाईक, सीताराम रतिराम वाणी, मार्तंड रूपला पाटील, पांडुरंग रावजी शिंपी, अवचित गोपाळ देशमुख, गणपतराव भावडू महाजन व माधव धनजी पाटील यांना प्रत्येकी १० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली. सोनू आनंदा पंडित मात्र शेवटपर्यंत पोलिसांच्या हाती लागले नाहीत. ते स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत भूमिगत राहिले. रामभाऊ भोगे व माधव धनजी पाटील २६ जानेवारी १९४५ पर्यंत भूमिगत राहून कार्य करीत होते. जिल्ह्यातील या दोन मोठ्या घटनांचे म्हणजे वाघळी व वाघोड घातपातांचे मुख्य सूत्रधार सोनू आनंदा पंडित स्वातंत्र्य मिळेपर्यंत सापडले नाहीत! हा सरकारचा पराजय होता.[३८]

## दहशतीचे अधिराज्य

व्हाइसरॉय लिनलिथगो प्रारंभापासून युध्यमान पवित्रा घेऊन उभे होते. स्टॅफर्ड क्रिप्सचे काँग्रेसशी समेट करण्याचे प्रयत्न त्यांना नापसंतच होते. लिनलिथगोंना गृहमंत्री मॅक्सवेल व गृह सचिव टॉटनहॅमची सर्वस्वी साथ होती. मुंबईतील काँग्रेस

अधिवेशनावरच बंदी घालावी असा गोऱ्या सनदी नोकरशाहीचा प्रस्ताव होता. तथापि अमेरिकेच्या दडपणामुळे लंडनने तो प्रस्ताव अमान्य केला. वर्धा ठराव संमत झाला त्या क्षणापासून सरकारने आंदोलन तुडवून टाकण्याचे नियोजन सुरू केले होते. १७ जुलै १९४२ च्या कुविख्यात पकल परिपत्रकाद्वारे प्रांतिक सरकारांना रणनीतिविषयक आदेश देण्यात आले होते. डावपेचांचा एक भाग म्हणून काँग्रेसच्या विरोधकांना उत्तेजन द्यावे व नेमस्तांना प्रलोभने दाखवून आपलेसे करावे असे हुकूम दिले होते. "आता नीती-अनीती वा तत्त्वाचा सवाल नसून प्रसंग परवशतेनुसार अभ्युपाय अमलात आणावे. काँग्रेसविरुद्धचा लढा जिंकणे हेच सरकारचे उद्दिष्ट होय," असा या चार पानी परिपत्रकाचा मतितार्थ होता. काँग्रेसचे संभाव्य आंदोलन चिरडून टाकण्यासाठी त्यात तपशीलवार सूचना होत्या. त्याची प्रत ६ ऑगस्टला गांधीजींना मिळताच त्यांनी जाहीर केले की, अशा अनैतिक सरकारी धोरणांमुळे छोडो भारतची मागणी अधिकच समर्थनीय ठरली होती. शिवाय गव्हर्नर लम्ले यांनी या परिपत्रकाच्या दुष्परिणांची व्हाइसरॉयला कल्पना दिली.[३९]

गव्हर्नरने मुंबई राज्यातील राजनिष्ठ लोक, मुस्लीम लीग, कम्युनिस्ट, कामगार नेते व शे. का. फे. पक्षाच्या दलित नेत्यांचा अनुनय केला. काँग्रेसला पराभूत करण्यासाठी कम्युनिस्टांना फितवण्यावर भर दिला. गव्हर्नरने रुस्तम मसानी, कावसजी जहांगिर, जमनादास मेहता, पुरषोत्तमदास ठाकूरदास, बॅ. जिना, आंबेडकर, सर करिमभाई इब्राहिम, चिमणलाल सेटलवाड, सर व्हिक्टर ससून, सर आर्देशीर दलाल, जे. आर. डी. टाटा यांना खूश ठेवण्याचा प्रयत्न केला. गव्हर्नरने आंबेडकरांना मंत्री करण्यात पुढाकार घेतलाच होता. गिरणी संप होऊ नये यासाठी सरकारने कम्युनिस्टांचा पुरेपूर उपयोग करून घेतला. या कामी ना. म. जोशींचेही कसब उपयोगात आणले. युद्धप्रयत्न अबाधित ठेवण्यासाठी व काँग्रेसवर टीका करण्यासाठी या सर्व घटकांचा गव्हर्नरने विपुल उपयोग करून घेतला. गव्हर्नरने अनेकांना प्रलोभने दाखवून सरकारधार्जिणे करून घेतले. संयुक्त प्रांत, बिहार, ओरिसा व बंगालपेक्षा महाराष्ट्रात ब्रिटिशांच्या डिव्हाइड अँड रूल राजनीतीला

यश लाभले. तथापि मुंबई शहर, सातारा, कुलाबा, खानदेश, वर्धा व नागपुरात ही कुट नीती फार यशस्वी झाली नाही. मुंबईत बॅ. जिना व इस्माईल आय. चुंद्रीगर यांच्या मुस्लीम लीगला काँग्रेसविरुद्ध भडकवण्याचे इंग्रजांनी खूप खूप प्रयास केले. पण परिणाम इतकाच झाला की, सामान्यतः मुसलमान लोक आंदोलनापासून लांब राहिले. तथापि मुंबईत एकही जातीय दंगा झाला नाही वा मुसलमानांनी स्वातंत्र्यसैनिकांविरुद्ध पोलिसांना मदतही केली नाही. **पण लक्षात ठेवावे की, मुंबई नगरातील एकूण ४० मुसलमान भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनात हुतात्मा झाले. महाराष्ट्र सरकारच्या दप्तरात त्यांची नावे आम्हाला आढळली.** युसुफ मेहेरअली, अबिदअली जाफरभाई, जफर अबिदअली हे तर चळवळीचे नेते होते. डावपेचांचा भाग म्हणून गव्हर्नरने सर चुनिलाल मेहता, मसानी व के. एम. मुन्शी यांना मुंबई सरकारचे सल्लागार हे पद देऊ केले होते. पण व्यर्थ! ब्रिटिश वॉर कॅबिनेटमध्ये हिंदुस्तान सरकारचा प्रतिनिधी या उच्च पदासाठी एम. आर. जयकरांची निवड केली होती. मात्र जयकरांनी आपले स्थान व अधिकारांबाबत अटी घातल्यामुळे त्यांची संधी हुकली. या पदाचा लाभ घेतला सर रामस्वामी मुदलियार यांनी!

गव्हर्नरने काँग्रेसच्या आंदोलनावर दररोज आगपाखड करण्यासाठी **टाइम्स ऑफ इंडिया** व संपादक सर फ्रांसिस लो यांचा पुरेपूर उपयोग करून घेतला. त्यांनी आपली सर्व शक्ती पणाला लावून छोडो भारतचे दुष्परिणाम व कपोलकल्पित धोके रंगविले. त्यांनी काँग्रेसला अक्षराष्ट्रधार्जिणी पार्टी म्हणून लोकशाहीच्या विरोधातील संघटना ठरवले होते. पूर्वीच्या काळात निखळ स्वराज्यवादी असलेले एस. ए. ब्रेलवी यांचे **बाँब क्रॉनिकल** आता आंदोलनास अनुकूल राहिले नव्हते. **केसरी** पत्रकदेखील आंदोलनास अनुकूल राहिले नव्हते. एकूणच चौथ्या स्तंभाचा गळा दाबण्याची करुण कहाणी छोडो भारत लढा ओसरेपर्यंत चालू राहिली. प्रेस सेंसॉरशीपचे धोरण अत्यंत ओंगळ होते.

**शिक्षात्मक उपाययोजना :–** गांधीजी व काही पुढाऱ्यांना न्यासालँड, एडन अथवा काँगोमध्ये तडीपार करण्याच्या सरकारी योजनांवर याआधी विवेचन

केलेलेच आहे. काँग्रेसला आंदोलनाची पूर्वतयारी करण्यासाठी अजिबात अवधी मिळू नये, असा सरकारचा निर्धार होता. ब्लिट्स हल्ला तंत्रानुसार 'पर्ल हार्बर' प्रकारचा हल्ला करण्याचे डावपेच सरकारने आधीच आखले होते. "गव्हर्मेंट मस्ट विन क्विकली अँड डिसिजिवली", हे सूत्र होते. काँग्रेसला चिरडणे व जनतेचे नीतिधैर्य खच्ची करणे हे धोरण होते. रिव्हॉल्युशनरी मुव्हमेंट्स ऑर्डिनन्सवर व्हाइसरॉयने १२ ऑगस्टला सही केली होती. मात्र मध्यप्रांताचा गव्हर्नर वगळता इतर सर्वांनी त्याआधीच कळविले होते की, डी. आय. आर अनुसारही सरकारला अमर्याद अधिकार वापरता येतील. म्हणून नवीन वटहुकूम तहकूब ठेवला. परंतु त्याची प्रिॲम्बल अमलात न आणता वटहुकमानुसारचे सर्वच अधिकार हाती घेण्याचा निर्णय झाला. म्हणून हा वटहुकूम न काढता त्यातील कलमे इतर कायद्यांमध्ये अंतर्भूत करण्यात आली.[४०]

वस्तुतः मुंबई, पुणे, नागपूर वगैरे शहरांमधील गोरे उद्योगपती, गोरे व्यापारी व अभिजन मार्शल लॉ अमलात आणण्यासाठी मागणी करीत होते. मुंबईतील यॉट क्लब, जिमखाने व चेंबर ऑफ कॉमर्स देखील लष्करी अमलाची मागणी करीतच होते. परंतु त्यावर इंग्लंड-अमेरिकेत टीका होईल, असे गव्हर्नरने उत्तर दिले. मात्र आणीबाणीकालीन डी. आय. आर. व त्यास पूरक असे बदल करून पोलीस व प्रशासकीय यंत्रणेला अमर्याद अधिकार देण्यात आले. दोस्त राष्ट्रांचे सेनादलही आधीच तैनात करण्यात आले होते. सेनादलाचे रणगाडे व चिलखती गाड्या अलर्ट स्थितीत सज्ज होत्या. त्यांचा उपयोग मुंबई, पुणे व नागपुरात प्रत्यक्षपणे करण्यात आला. शिवाय पोलीस अथवा लष्कराने केलेल्या अतिरेकांची चौकशी न करण्याचे आश्वासन आधीच रॉजर लम्ले यांनी दिले होते. व त्यांनी ते अखेरपर्यंत पाळले. तरी देखील जालियनवाला बाग हत्याकांडाच्या वेळी काढलेल्या (१९१९) कायद्यासारखा इंडेम्नीटी कायदा करून नोकरशाहीला अभय द्यावे, अशी मागणी सर्व दमन-यंत्रणा करत होती. पण डी. आय. आर. खाली संबंधितांना संरक्षण देण्याची तरतूद आहे, असे लम्ले साहेबांनी स्पष्ट केले.

सरकारने पूर्वीचे अनेक वटहुकूम अमलात आणले. शिवाय परकीय आक्रमणप्रसंगी लागू करावयाचा पेनल्टीज (एन्हँसमेंट) ऑर्डिनन्स १९४२ आणि स्पेशल क्रिमिनल कोर्ट्स ऑर्डिनन्स १९४२ व फटके मारण्यासाठी व्हिपिंग ॲक्ट असे बरेच वटहुकूम अमलात आणले. विशेषतः डी.आय.आर.चे रूल क्रमांक २६ व ५६ यांचा भयंकर दुरुपयोग केला.

भयानक दहशत आणि हिटलरच्या Black-and-Tan Methods चा अंमल करून सरकारने आंदोलन दडपण्याच्या कारवाया अविरत चालू ठेवल्या. हजारो आंदोलक युवकांना स्वैरपणे फटके मारण्यात येत. सरकारच्या फटकेशाहीवर अमेरिकाच नव्हे तर ब्रिटिश कॉमन्स सभागृहातही टीका झाली. मध्ययुगीन राजकीय अत्याचारांचे प्रतीक असलेल्या व्हिपिंग कायद्यामुळे ब्रिटिश वॉर कॅबिनेटमधील लेबर पक्षाचे मंत्री व काही हुजूर पक्षीय सदस्यदेखील रागावले होते. म्हणून अमेरींनी हे प्रकार थांबविण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार व्हाइसरॉयनेही अमानुष फटके मारण्याची शिक्षा थांबविण्याचे रॉजर लम्लेस आदेश दिले. शेवटी आढेवेढे घेत त्याने ही शिक्षा बंद केली.[४१]

आंदोलन करणाऱ्या सर्व गावांवर सरकारने कलेक्टिव फाईन्स वटहुकमाखाली सामूहिक दंड ठोठावला होता. हा दंड संगिनीच्या टोकावर वसूल केला जाई. भेदभाव करून मुसलमान, दलित व राजनिष्ठांना दंडातून मुक्त केले जात असे. चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर गावात पोलिसांनी व सैनिकांनी केलेले अमानुष अत्याचार आणि स्वैर बलात्कारांची शोकांतिका स्वतःस सुसंस्कृत म्हणवणाऱ्या इंग्रजांना भयंकर लाजिरवाणी होती. त्यावर पुढील प्रकरणात विवेचन केले आहे. कायद्याच्या संरक्षणाखाली असे अनेक अत्याचार झाले. पण अत्याचारकांवर इंग्रजांनी काहीच कारवाई केली नाही. अशा अत्याचारांचे वर्णन करताना अ. भा. काँग्रेस समितीने त्यासाठी पुढील शब्द वापरले :—"द हॉरीबल डीडस् ऑफ मॅड स्लॉटर अँड फ्लॉगिंग अँड रेप डन बाय द युझर्पर ब्रिटिश". सरकारी लोकांच्या अत्याचारी कृत्यांबद्दल लिहिण्याची मुभा भारतीय वर्तमानपत्रांना नव्हती. मात्र लंडनमधील **ट्रिबून** या पत्रकाने अत्याचारांचे वर्णन पुढीलप्रमाणे केले :—

" Our armoured cars are going into action against Congress supporters in Bombay. Our political warfare has reached new inspiring heights. We proclaimed a Whipping Act for the people of India. Every step taken by the Government of India since the dawn of the 9th August has been a stab in the back of the men and women who work and fight and die in the cause of freedom....."[४२]

मात्र ब्रिटिशांच्या स्वेच्छानुसारी उपाययोजना व दमन-नीती विधिबाह्य आणि अनैतिक असल्याचे केशव श्यामराव तळपदे आणि वकील जी. एन. जोशी यांनी थेट फेडरल कोर्टात सिद्ध केले. मुंबईचे ख्यातनाम वकील आणि काँग्रेस व फॉरवर्ड ब्लॉकचे कार्यकर्ते असलेले तळपदे यांनी मूले कुठारः घाव घातला. आणि त्यांनी डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्टचा रूल नंबर २६ अधिकारिताबाह्य ठरवला. मुंबईत गाजलेल्या या प्रकरणाने इंग्रज सरकार, आणि विशेषतः लॉर्ड लिनलिथगोवर मोठा आघात झाला. अतिशय निर्णायक असा रूल २६ अधिकारिताबाह्य ठरल्यामुळे तळपदे व महात्मा गांधी वगैरे पुढाऱ्यांनाही बंधमुक्त करण्याचा प्रसंग येऊन ठेपला. के. एम. मुन्शी यांच्या सूचनेनुसार जोशींनी गांधीजींच्या सुटकेसाठी हायकोर्टाकडे अर्ज केला. त्यामुळे सरकारचे व व्हाइसरॉयचे देशभर व इंग्लंडमध्येदेखील हसे झाले. मात्र झालेली नामुष्की झाकण्यासाठी व्हाइसरॉयने अधिकारिताबाह्य ठरलेला रूल विधिग्राह्य करण्यासाठी दुसरा वटहुकूम जारी केला. शिवाय बेकायदा ठरलेल्या सजा कायम करण्यासाठी आणखी तिसरा वटहुकूम काढला. त्यामुळे ब्रिटिशांवर भयंकर नैतिक अधोगतीचे आरोप झाले.

याबरोबरच कलकत्ता हायकोर्टातील बंगाल-ओरिसाच्या एका प्रकरणात फेडरल कोर्टानेच सरकारचा स्पेशल क्रिमिनल कोर्ट्स ऑर्डिनन्सदेखील अधिकारिताबाह्य ठरविला. त्यामुळे न्यायालयांनी लादलेल्या सर्व सजा रद्दबातल ठरल्या. म्हणून व्हाइसरॉयने या वटहुकमाऐवजी नवीन वटहुकूम काढला. या सर्व प्रकरणात ब्रिटिशांची इभ्रत धुळीस मिळाली, व त्यांच्यावर अनैतिकतेचा आरोप झाला.[४३]

## दहशतीचा मुकाबला व प्रत्युत्तर

ब्रिटिशांच्या दहशतीला प्रत्युत्तर देण्यास्तव भारतातील लाखो देशभक्त व विशेषतः विद्यार्थी शक्यतो अहिंसेने, पण प्रसंगवशात प्राण पणाला लावून लढले. विन्स्टन चर्चिल यांनी १९४२ च्या विद्रोहास तिरस्काराने 'चिल्ड्रेन्स अपराझिंग' म्हटले. पण यात युवकांच्या योगदानाचा गौरवही आहे. १९४३ च्या अखेरपर्यंत देशातील ९१,८६३ लोकांनी कारावास भोगला आणि १९४२ च्या अखेरपर्यंत ९३० जण या आंदोलनात हुतात्मा झाले, असे सरकारी अहवालात नमूद आहे. तथापि ब्रिटिशांनी दिलेली ही आकडेवारी विश्वासपात्र नाही. **पंडित जवाहरलाल नेहरूंच्या अंदाजानुसार भारतातील ४०,००० जण हुतात्मा झाले. मात्र या उठावाचे प्रत्यक्ष सूत्रसंचालन करणाऱ्या डॉ. लोहियांच्या अनुमानानुसार हा आक़डा ५०,००० होता.** त्यांनी लिनलिथगोंना पाठवलेल्या खुल्या पत्रात हुतात्म्यांची ही संख्या सांगितली होती. याव्यतिरिक्त तुरुंगात न जाता काही लाख देशप्रेमींनी आंदोलकांना साहाय्य व संरक्षण दिले. अथवा अन्न-पाणी व आश्रय दिला आणि आंदोलनासाठी पैसा दिला. **मुस्लीम लीग तटस्थ राहिली, तरी शेकडो मुसलमानांनी कारावास भोगला. काही जण हुतात्माही झाले.** डॉ. आंबेडकरांचा प्रभाव असलेल्या महाराष्ट्रातील व तामिळनाडूतील दलितांचा अपवाद वगळता, इतर प्रांतांमधील शेकडो दलितांनी गांधीजी व काँग्रेसचे नेतृत्व मान्य केले व उठावात भाग घेतला. महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर या आंदोलनात मनोभावे सहभागी झाले. सावरकरांना न जुमानता काही हिंदुमहासभावालेही कारावासात गेले.

मुंबईतील पोलीस निरीक्षक कर्णिक यांच्यासारखे पोलीस अधिकारी महाराष्ट्रात विरळा की ज्यांनी राजीनामा देऊन १९४२ च्या लढ्यात भाग घेतला. पण बिहारमधील २५० पोलिसांनी राजीनामे दिले. मात्र महाराष्ट्रातील अगणित पोलिसांनी स्वातंत्र्य सैनिकांना अटक न करता सोडून दिले अथवा आश्रय दिला. मुंबई, सातारा, पुणे, जळगाव, नागपूरमधील पोलीस अटक करण्यास जाण्यापूर्वी आंदोलकांना पूर्वसूचना देत. त्यामुळेच अच्युतराव पटवर्धन, अरुणा असफ अली यांच्यासारखे अखेरपर्यंत भूमिगत राहिले. क्रांतिकारकांना चिमठाणे (नंदुरबार)

खजिन्याची पूर्वसूचना एका पोलिसानेच दिली होती. शिरूभाऊ लिमयेंना पकडल्यावर त्यांच्याजवळची अत्यंत सेंसिटिव कागदपत्रे त्यांच्यासमक्ष पोलिसांनी जाळून टाकली. त्यामुळे अनेक गुपिते व काँग्रेसजन वाचले होते. नामवंत भूमिगत नेते अण्णासाहेब सहस्रबुद्धे पोलीस कस्टडीत असताना दोनदा बाहेर असलेल्या अच्युतरावांना भेटले ते पोलिसांच्याच मदतीने!

सरकारी नोकरीचा त्याग करणारे अधिकारी महाराष्ट्रात पाटणा, दिल्ली, अलाहाबादपेक्षा फारच कमी होते. मात्र आय. सी. एस. मधील रा. कृ. पाटील यांनी आंदोलनासाठी त्या वरिष्ठ पदाचा राजीनामा दिला होता. मुंबई सरकारचे ॲडव्होकेट जनरल मोतीलाल सेटलवाड यांनी गांधीजींच्या अटकेचा निषेध करून पदाचा त्याग केला. महाराष्ट्रातील शेकडो गाव-पाटील, पटवारी, दफेदार, चौकीदारांनी नोकरीचा त्याग करून लढ्यात भाग घेतला. रेल्वे गाड्यांना आंदोलकांनी केलेले साबोटाज रेल्वे कर्मचाऱ्यांच्या मदतीनेच शक्य झाले. खडकी व देहू मिलिटरी डेपोंमधील कर्मचाऱ्यांनी लष्कराच्या दारूगोळा कारखान्यांतून आणि डेपोंमधील काही बाँब, डिटोनेटर, स्फोटके व काडतुसे आंदोलनासाठी पुरविली होती. पुण्याचे भास्कर कर्णिक, ठाण्याचे नारायण व्ही. आठवले वगैरेंनी आंदोलनासाठी शस्त्रे व स्फोटके पुरविली. तसेच ब्रिटिशांच्या युद्धप्रयत्नांत अडथळे निर्माण करण्यासाठी त्यांनी युद्धसामग्री निकामी करणे व ती पाठवण्यात दिरंगाई करणे अशा कारवाया केल्या. पकडले गेल्यावर कर्णिकांनी पोलीस स्टेशनमध्येच विष खाऊन आत्महत्या केली. सेनादलास शस्त्रसामग्री मिळू नये यास्तव कर्णिक व आठवले डेपोंमधील साहित्याची नोंद करण्यात मुद्दाम गफलती करीत, नासधूसही करीत.[४४] याविषयीचे विवेचन "सिनेमागृहांमधील बाँबस्फोट" या विभागात केलेले आहे.

मुंबई व उपनगरांतील कामगारांनी कापड, इंजिनीअरिंग माल, विमानांचे सुटे भाग, मोटारींचे सुटे भाग व सिगरेट कारखान्यांमध्ये प्रदीर्घ संप करून सरकारला बेजार केले होते. कारण त्यामुळे युद्धसामग्रीचा पुरवठा खंडित होत असे. देशातील सर्वात मोठा असलेला मुंबईतील शेअर बाजार कित्येक महिने बंद पडला. त्यावर नियंत्रण होते विद्यार्थिनी व मुलांचे! कापूस व्यापाऱ्यांनी गिरण्या व सरकारची

कोंडी केली. मुंबई व नागपुरात काँग्रेसने राजकीय लढ्याबरोबर आर्थिक लढा उभारून इंग्रजांना बेजार केले. मुंबईतील जवळपास संपूर्ण व्यापारी वर्ग काँग्रेसच्या मदतीला धावला. बिर्ला बंधू, ठाकरसी समूह, विजय मर्चन्ट, बजाज समूह, वालचंद हिराचंद, सुमती मोरारजी, लाला श्रीराम वगैरे बडे उद्योगपती आंदोलनास सढळ हाताने आर्थिक मदत देत. सातारा प्रतिसरकारला आरंभीच्या दिवसांत दरोडेखोरांनीही मदत केली होती. नागपुरातील वेश्यांनी तर गांधीजींना पकडल्याची बातमी ऐकल्यावर पंधरा दिवस आपला व्यवसाय बंद ठेवला होता!

आंदोलनासाठी निधीची निरंतर गरज असल्याने क्रांतिकारकांनी धुळे जिल्ह्यातील चिमठाणे गावाजवळ नंदुरबारचा सरकारी कोषागार लुटला. या धाडसी कारवाईतून त्यांनी ५,५१,००० रुपये मिळविले, आणि या कारवाईचा खर्च वगळून ४,३१,००० रुपये आंदोलनासाठी उपयोगात आणले. सातारा प्रतिसरकारच्या क्रांतिकारकांनी देखील सरकारच्या पे स्पेशल आगगाडीतील कोषागार लुटला. आंदोलकांनी रामटेक, कोकणातील मालवण व अनेक सरकारी कोषागारांतील रोकड हस्तगत केली होती. चिमठाणेच्या कारवाईतून मिळालेल्या रकमेची विल्हेवाट करण्याची जबाबदारी थोर गांधीवादी कार्यकर्ते द्वारकानाथ लेले यांच्यावर सोपविली होती.

साधनशुचिता शिरोधार्य असली, तरी भूमिगत जीवनाच्या गरजा भागविण्यासाठी पैसा आवश्यकच होता. सरकारी कोषागारांवर बहुधा अभेद्य सुरक्षा व्यवस्था असे. म्हणून **पुण्याजवळील जेजुरीच्या खंडेराव मंदिरातील रोकड व दागिने लुटण्याची योजना सातारा प्रतिसरकारमधील रत्नाप्पा कुंभार गटाने आखली.** या योजनेमागे असेही समर्थन होते की, इंग्रजांनी महायुद्धासाठी अनेक हिंदू, मुसलमान व ख्रिस्ती देवस्थानांकडून अधिकाराच्या जोरावर अमाप पैसा घेतलेला होता. मग भाविकांचाच पैसा लोकलढ्यासाठी वापरण्यात काहीच गैर नव्हते. शिवाय स्वातंत्र्य लाभल्यावर ही रक्कम परत करण्यात येईल, असेही ठरले होते. रत्नाप्पा कुंभार यांच्या पथकात कोल्हापूर, हुपरी, कागल, मिरज-मालगाव, शिर्डी गावांमधील मेघःशाम पटवर्धन, डॉ. माधव कुलकर्णी, शंकर माने, एस. पी. पाटील, दत्तोबा तांबट वगैरे तेरा जण होते. २७ जुलै १९४४ रोजी हे पथक व्यंकटेश माडगूळकरांसह रात्री देवळात शिरले. पहारेकऱ्यांना

निःशस्त्र करून त्यांनी खंडेराव व म्हाळसा देवीचे तीन-चार लाखांचे दागिने व रोकड हस्तगत केली. त्यांनी लुटीतील माल मोटारीने पुण्यास नेला. या संपत्तीची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी मेघःशाम पटवर्धन वगैरे निष्ठावंत युवकांवर होती. मात्र ही मंडळी मुद्देमालासकट पकडली गेली. सर्वांना दीर्घ मुदतीची शिक्षा झाली. एक जण मात्र माफीचा साक्षीदार झाला.[४५]

महाराष्ट्रापेक्षा बिहार, संयुक्त प्रांत आणि ओरिसात अधिक तीव्र व व्यापक घातपात व विघातक कार्य झाले. त्या प्रांतांमध्ये मोठ-मोठे साबोटाज झाले. सरकारी मालमत्तेचा प्रचंड विध्वंस झाला. तथापि मुंबई शहरात सर्वाधिक संख्येने बाँबस्फोट झाले. मात्र विध्वंस व प्राणहानी करणे हा मुंबईकरांचा उद्देश नव्हता. मुंबईत एकाही इंग्रजाचा वध झाला नाही. इंग्रजांचा निषेध करणे आणि त्यांना 'चालते व्हा' हे निक्षून सांगणे हाच मुंबईकरांचा उद्देश होता. तसेच युद्धप्रयत्न हाणून पाडणे हे ध्येय होते. सरकारी अहवालानुसार १९४३ च्या अखेरपर्यंत हिंदुस्तानात एकूण ६६४ बाँबस्फोट झाले. त्यापैकी ४४७ बाँबस्फोट एकट्या मुंबई शहरात झाले. गांधीजींच्या उपोषणानंतर मात्र अत्यल्प स्फोट करण्यात आले. मुंबई, पुणे व अहमदाबादमध्ये सर्वाधिक स्फोटकांचा साठा गुप्तचरांच्या हाती लागला. नाशिकमध्ये आणि पुण्यातील कॅपिटॉल सिनेमा बॉम्ब प्रकरणात चौकशी करताना गुप्तचरांना बाँब निर्माण पुस्तिका सापडली होती. बंदुका, पिस्तुले वगैरे साधने गोवा, बडोदा, ग्वाल्हेर, नेपाळ व फ्रेंच चंद्रनगर येथून खरेदी केली होती. साताऱ्याचे नाना पाटील, गुजरात-मुंबईचे छोटुभाई पुराणी, कर्नाटकचे चन्नपा वाली, बिहारचे सूरजनारायण सिंह व आसामचे शंकर बारूआ हे देशातील सशस्त्र गनिमी तंत्राचे प्रमुख शिल्पकार मानले गेले. छोटुभाई यांनी ही विद्या मुंबईतील काही युवकांना शिकवली होती. आंदोलनाचा **'कर्नाटक पॅटर्न'** छोडो भारत काळात बेळगाव व धारवाड भागात तसेच महाराष्ट्रातील सातारा, सांगली, पुणे वगैरे जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात अमलात आला होता. भूमिगत गनिमी प्रतिकाराचे हे अहिंसक तंत्र होते.[४६]

❑❑

## संदर्भ

1. He had crystallized the prevailing mood of the people. There was a desperateness in it, an emotional urge.... It was better to jump into the uncharted seas of action and to do something, rather than be the tame objects of a malign fate. It was not a politician's approach but that of a people grown desperate and reckless of consequences ; yet there was always an appeal to reason." (Jawaharlal Nehru, **Discovery of India**, New Delhi, 1996, p. 475).

२. **ट्रान्सफर ऑफ पॉवर**, खंड दोन, व्हाइसरॉय लिनलिथगो यांची भारतमंत्री लॉर्ड अमेरींना तार, १८ जुलै १९४२.

३. कित्ता, खंड दोन, पृ. ३९४, अमेरींची लिनलिथगोंना तार, १६ जुलै १९४२.

४. **विकेंडेन रिपोर्ट : क्विट इंडिया मुव्हमेंट,** पी. एन. चोप्रा (संपा.), नवी दिल्ली, १९७६, पृ. २०८-०९.

५. **ट्रान्सफर ऑफ पॉवर**, खंड दोन, पृ.८०४-०६, गव्हर्नर रॉजर लम्ले यांचे लिनलिथगोंना पत्र, २७ ऑगस्ट १९४२.

६. हिंदुस्तान सरकार, होम पोलि. इंटेलिजंस, फाईल क्र. ३/७९/४२, २५ जुलै १९४२ चा अहवाल.

७. **विकेंडेन रिपोर्ट**, पृ. २४५, २४९.

८. के. के. चौधरी, **क्विट इंडिया रिव्हॉल्युशन**, पृ. ७२-७५.

९. कित्ता, पृ. ५९, ७६-७७ ; आणि चौधरी, **हिस्टरी ऑफ बाँबे,** पृ. २६७.

१०. **कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी,** खंड ७६, पृ. ३८४-८६, ३९३-९४.

११. कित्ता, पृ. ३८४-८९, ३९२-९४, ३९७, ४०१.

१२. **विकेंडेन रिपोर्ट**, पृ. ८९, २५७-५८.

१३. कित्ता, पृ. २५७-५९.

१४. चौधरी, **क्विट इंडिया रिव्हॉल्युशन,** पृ. १०१-०७.

१५. **ट्रान्सफर ऑफ पॉवर**, खंड दोन, पृ. ४३८, ४४३.

१६. कित्ता, पृ. ४३८, ४७५-७६, ५१७, ५५०, ५९७.

१७. मुंबई सरकारने मध्यवर्ती गृह विभागाला पाठवलेला अहवाल, ९ ऑगस्ट १९४२.

१८. पोलीस कमिशनरने मुंबई सरकारला पाठवलेला अहवाल, ११ ऑगस्ट १९४२.

१९. हिंदुस्तान सरकार, होम पोलि. इंटेलिजंस, फाईल क्र. ३/१६/४२, १९४२.
२०. चौधरी, **क्विट इंडिया रिव्हॉल्युशन,** पृ. ८६-९५.
२१. हिंदुस्तान सरकार, **काँग्रेस रिस्पाँसिबिलिटी फॉर द डिस्टर्बंसेस**, पृ.१७, १९, २०.
२२. चौधरी, **क्विट इंडिया रिव्हॉल्युशन,** पृ. १३४-३५, १३८-३९.
२३. **विकेंडेन रिपोर्ट**, पृ. ९१-९२, ९५-९७.
२४. **हरिजन,** २३ ऑगस्ट १९४२.
२५. हिंदुस्तान सरकार, होम पोलिटिकल, फाईल क्र. ३/१५/४३ (केडब्ल्यू पाच).
२६. चौधरी, उपरोक्त, पृ. ९५, १३४, १३६, १४०.
२७. चौधरी, **झुंजार पुणे,** पृ. २८५-८८, २९४-९५.
२८. चौधरी, **क्विट इंडिया रिव्हॉल्युशन,** पृ. ३०४-०६.
२९. मुंबई सरकार, होम स्पेशल, फाईल क्र. १११० (९०) एफ, १९४३.
३०. चौधरी, **झुंजार पुणे,** पृ. २९८-३०२.
३१. मुंबई सरकार, होम स्पेशल, फाईल क्र. ४५, १९४४.
३२. कित्ता, फाईल क्र. १११० (६) ए.
३३. चौधरी, **रायगड जिल्हा गॅझेटिअर, १९९३,** पृ. १७८-८४.
३४. हरिभाऊ धोंडोपंत भडसावळे यांची मुलाखत, २ जून १९९२.
३५. मुंबई सरकार, होम स्पेशल, फाईल क्र. (३७)-१, १९४२-४३.
३६. चौधरी, **रायगड जिल्हा गॅझेटिअर,** पृ. १८६-८९.
३७. मुंबई सरकार, होम स्पेशल, फाईल क्र. १११०(८)-बी (६), १९४२, जे. एम. कोरिनचा अहवाल.
३८. चौधरी, **जळगाव जिल्ह्यातील स्वातंत्र्यलढा**, पृ. १४२-४७.
३९. **ट्रान्सफर ऑफ पॉवर**, खंड दोन, पृ. ८०५-०६, लम्ले यांचे लिनलिथगोंना पत्र, २७ ऑग. १९४२.
४०. हिंदुस्थान सरकार, होम पोलि., फाईल क्र. २५/१/४२; आणि चौधरी, **क्विट इंडिया रिव्हॉल्युशन,** पृ. ११०.
४१. **ट्रान्सफर ऑफ पॉवर**, खंड दोन, पृ. ७३८-३९, ९०१; आणि चौधरी, कित्ता, पृ. ११७-१८.
४२. **ट्रिब्यून**, लंडन, १४ ऑगस्ट १९४२ ; आणि चौधरी, कित्ता, पृ. ११८-१९.
४३. चौधरी, कित्ता, पृ. १२५-२७.
४४. श्रीपाद केळकर, **छोडो भारत,** १९४२, पुणे, २००३, पृ. १०८-१३.
४५. चौधरी, **झुंजार पुणे**, ३०३-०४.
४६. केळकर, उपरोक्त, पृ. ११२-१३, ११७-१९.

प्रकरण २०

## क्रांतिलढ्याचा झंझावात

## भूमिगत काँग्रेस रेडिओ

युद्धकालीन वृत्तपत्र संहिता व कडक बंधने भेदून आंदोलनाचे वृत्तप्रसारण व मार्गदर्शन करण्याचे अवघड काम प्रचारपत्रिकांप्रमाणे काँग्रेस रेडिओने केले. सरकारी वृत्तप्रसारणावर विश्वास ठेवणे कठीण होते. मात्र बर्लिन, टोकियो, सायगाव वगैरे नऊ रेडिओ केंद्रांवरून सुभाषचंद्र बाबूंचा झंझावाती प्रचार चालू होता. त्यावरून राजद्रोहाचे व क्रांतीचे आवाहन करण्यात येत होते. म्हणून रेडिओ सेट विकत घेणारे लोक दुकानदारांना विचारत, 'यावरून जर्मन व जपानी ध्वनिक्षेपण ऐकता येईल काय ? बी.बी.सी. च्या वार्ताहराला असे अनेक लोक मुंबईतही आढळले होते. त्यातून डॉ. राम मनोहर लोहिया, अच्युतराव पटवर्धन व पुरषोत्तम त्रिकमदास या सेंट्रल डिरेक्टोरेटच्या नेत्यांनी काँग्रेस रेडिओची योजना तयार केली. यासाठी पुरषोत्तम ऊर्फ पी. टी. यांनी निधी उभारला. या क्रांतिकारक योजनेला एका न्यायमूर्तीची कन्या उषा मेहता, विठ्ठलदास ऊर्फ बाबूभाई खाकर, विठ्ठल जव्हेरी व चंद्रकांत जव्हेरी यांनी त्वरित प्रतिसाद दिला. भूमिगत रेडिओचे तर्कशास्त्र विशद करताना अच्युतराव नंतर म्हणाले होते की, प्रत्यक्ष आंदोलनाच्या परिमितीच्या बाहेरील बहुसंख्य बिनलढाऊ जनतेची मनोभूमिका बनविण्यासाठी व लोकांना माहिती आणि मार्गदर्शन देऊन लोकमताचा पाठिंबा मिळविण्यासाठी काँग्रेस रेडिओचा प्रपंच होता.

डॉ. लोहिया १९४४ साली मुंबईत पकडले गेल्यावर त्यांनी गुप्तवार्ता विभागाच्या संचालकापुढे कबूल केले की, मुंबईचा अनुभव लक्षात घेऊन आम्ही कोलकाता, दिल्ली, कानपूर व मद्रासमध्येही काँग्रेस रेडिओ केंद्रे स्थापन करण्याची योजना बनविली होती. याबाबत आपण बंगालचे भूमिगत नेते अन्नादा चौधरी यांच्याशी चर्चा करून रेडिओ प्रसारणाचे जाळे उभारण्याची कल्पना मांडली होती. मात्र बंगालमध्ये रेडिओ ध्वनिक्षेक व तंत्रज्ञ उपलब्ध झाले नव्हते. लोहियांनी बनारसमध्येही रेडिओ

स्टेशन उभारण्याचे प्रयत्न केले होते. परंतु ते अपयशी ठरले. त्यानंतर लोहिया व जयप्रकाश नारायण यांनी मे १९४३ मध्ये भारत-नेपाळच्या सीमेवरही रेडिओ स्टेशन सुरू करण्यासाठी मुंबईत जुळवणी केलेला ट्रान्समीटर कोलकात्यात नेला होता. परंतु तेथे त्यांना दुसरी साधनसामग्री मिळू न शकल्याने हाही प्रयत्न अपयशी ठरला.

काही लेखकांनी मुलाखती वा ऐकीव माहितीवर आधारित केलेल्या एकांगी लेखनात काँग्रेस रेडिओविषयी सत्याचा विपर्यास केलेला मला आढळला. वस्तुतः राष्ट्रीय अभिलेखागार, नवी दिल्ली येथे अस्सल दस्तऐवज उपलब्ध आहेत. त्यांत गुप्तवार्ता विभागाच्या अधिकाऱ्यांनी सर्व क्रियाशील कार्यकर्त्यांच्या घेतलेल्या जबान्या, न्या. एन. एस. लोकूर यांच्या न्यायालयातील खटला, सरकारने संकलित केलेली माहिती, गुप्तचरांचे अहवाल आणि विपुल कागदपत्र उपलब्ध आहेत. तसेच अच्युतराव व लोहियांची निवेदनेही संग्रही आहेत. त्या साधनसामग्रीच्या आधारे मी रेडिओविषयी **क्विट इंडिया रिव्हॉल्युशन : द इथॉस ऑफ इट्स सेंट्रल डिरेक्शन** या ग्रंथात सविस्तर विवेचन केलेले आहे.

काँग्रेस रेडिओचे प्रक्षेपण मुंबईतून पुढील तीन कालखंडांमध्ये यशस्वीपणे झाले हे लक्षात ठेवावे :—(१) २७ ऑगस्टपासून १२ नोव्हेंबर १९४२ पावेतो, (२) फेब्रुवारी-मार्च १९४३ मध्ये महात्मा गांधी उपोषण करीत असलेल्या काळात आणि (३) २६ जानेवारी १९४४ रोजी स्वातंत्र्य दिन साजरा केल्यापासून काही दिवस. याशिवाय अच्युतराव व लोहियांच्या प्रयत्नांनुसार पुण्यातही २६ जानेवारी १९४४ पासून २८ मे पर्यंत काँग्रेसची आकाशवाणी अवतरली होती. उषा मेहता पहिल्या कालखंडातच कार्यरत होत्या.

जर्मनी व जपानच्या मदतीने होणारे टोकियो व सायगाववरील आझाद हिंद रेडिओचे प्रक्षेपण मुंबई, पुणे व नागपुरात अधिक स्पष्ट ऐकायला मिळे. त्यातून ब्रिटिशांवर जबरदस्त भडिमार होत असे, हे मान्य. तथापि त्यातील आशय अक्षराष्ट्रांनाच अनुकूल होता. त्याचे स्वरूप ‘ पंचमस्तंभी ’ होते. काँग्रेसला पंचमस्तंभी भूमिका अजिबात मान्य नव्हती. **सुभाषचंद्र बोस यांची अफाट देशभक्ती मान्य करूनही त्यांचे नाझी व फॅसिस्टांशी सख्य हा वादाचा मुद्दा होता.** इथे तो मुद्दा नाही. काँग्रेस रेडिओ स्वातंत्र्यासाठी प्रचार करीत राहिला. त्यावरील प्रसारण प्रतिष्ठितपणाचे व शुद्ध राष्ट्रवादी होते.

सेंट्रल डिरेक्टोरेटच्या या उपक्रमासाठी पी. टी., लोहिया, पटवर्धन, शांतीलाल शहा, उमाशंकर दीक्षित, गिरीधर कृपलानी व विठ्ठलदास खाकर यांच्या समितीने क्रिकेटर विजय मर्चंट, टाटा वगैरे धनिकांकडून पैसे गोळा केले. या क्रांतिकारी योजनेत अनेक धोके होते. हे प्रचंड साहस होते. जोखीम होती. रेडिओ हे नवोदित प्रभावी माध्यम असल्याने जबाबदारीचे भान राखणे अत्यावश्यक होते. माहितीचे संकलन, नेत्यांची भाषणे मिळवून त्यांचे संपादन करणे आणि **बाँबे काँग्रेस बुलेटिन** प्रकाशन यंत्रणेशी समन्वय वगैरे अनेक गोष्टी सत्वर पार पाडणे अपरिहार्य होते. ब्रिटिश सरकारच्या दृष्टीने, महायुद्धाच्या आणीबाणीकाळात, हा महाभयंकर राजद्रोह होता. गुप्तचर व मिलिटरी यंत्रणा आपल्या शोधात असणारच, याचेही कार्यकर्त्यांना भान ठेवावेच लागे.

क्रांती व राजद्रोहाला प्रोत्साहन देणारे हे रेडिओ केंद्र गुप्तचर व मिलिटरीच्या अविरत ससेमिऱ्यातून सुटण्यासाठी मुंबईत ठिकठिकाणी स्थलांतरित करावे लागले. आम जनतेला उत्तेजन व मार्गदर्शन देऊन लढ्याची व्याप्ती व तीव्रता वाढविणे आणि लोकांना धीर देणे हे या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट होते. या माध्यमाने पुढाऱ्यांची भाषणे भारतभर प्रसारित केली. तांत्रिक कारणांमुळे उद्‌भवलेले अल्पकालीन व्यत्यय वगळता हे रेडिओ प्रसारण थेट कोलकाता, दिल्ली व मद्रासपर्यंतही पोहोचू शकत असे हे गुप्तचरांच्या अहवालांमध्ये नमूद आहे.

**क्रियाशील कार्यकर्ते** :—या रेडिओ उपक्रमाच्या ९० दिवसांच्या पहिल्या फेजमध्ये डॉ. उषा हरिप्रसाद मेहता, विठ्ठलदास माधवजी खाकर, चंद्रकांत बाबूभाई जव्हेरी, नानक जी. मोटवानी आणि विठ्ठलदास कंथदभाई जव्हेरी हे प्रमुख क्रियाशील कार्यकर्ते होते. त्यांच्याव्यतिरिक्त नरिमन प्रिंटर, जगन्नाथ रघुनाथ ठाकूर, आर. ए. मेहता, मिर्झा व व्ही. जी. मोटवानी या मुंबईकरांचीही या उपक्रमात महत्त्वाची भूमिका होती. तंत्रज्ञानाच्या बाबतीत त्यांची भूमिका महत्त्वाची होती. रेडिओच्या या कार्यात मोलाचे साहाय्य केल्याबद्दल पुढील मुंबईकरांनाही अटक करून सर्वांवर न्या. लोकूर यांच्या विशेष न्यायालयात खटला भरण्यात आला :— भवानजी मोरारजी तन्ना व त्यांचे बंधू मनुभाई, यशवंत सीताराम मोरे, मनसुखलाल निहालचंद शहा, मनुकुमार मोहनलाल आणि माधवजी सुंदरजी.

गांधीवादी विचारसरणीच्या उषा मेहतांनी न्यायाधीश असलेल्या वडिलांची आज्ञा धिक्कारून एम. ए. चा अभ्यास सोडला. घराचाही त्याग केला, आणि त्या भूमिगत रेडिओच्या उपक्रमात सामील झाल्या. त्यांच्याप्रमाणेच दोन भाऊ प्रा. चंद्रकांत मेहता व जनक मेहता यांच्यावरही पकड वॉरंट होते. नंतर डॉ. उषाबेन मुंबई विद्यापीठात राज्यशास्त्राच्या मुख्य प्राध्यापक झाल्या. त्या प्रारंभापासूनच रेडिओ उपक्रमात सामील झाल्या होत्या. उत्कृष्ट आवाजाची देणगी असल्याने त्या नेत्यांची भाषणे व बातमीपत्रे ध्वनिक्षेपित करीत. विशेष म्हणजे त्यांनी गांधीवादी स्पिरिट कायम ठेवून कोर्टात बचाव न करता सर्व आरोप मान्य केले होते. त्यांच्याविषयी न्या. लोकूर यांचा अभिप्राय पाहा :—" She deserves all the credit for refusing to state a falsehood to save herself "[१].

विठ्ठलदास खाकरही या प्रकल्पात प्रारंभापासून १२ नोव्हेंबरपर्यंत कार्यरत होते. रेडिओ केंद्राचे स्थलांतर करण्यासाठी सुयोग्य जागा मिळवण्यात त्यांचा पुढाकार असे. सरदार वल्लभभाई यांचे सुपुत्र डाह्याभाई पटेल मुंबईत भूमिगत चळवळीचे सूत्रसंचालन करीत. त्यांच्या मदतीने खाकर रेडिओ स्टेशनसाठी सुटे भाग व सामग्री मिळवून देत असत. शिवाय पटेल प्रसारणासाठी साहित्य उपलब्ध करून देत. त्यांची लोहियांशी बरीच जवळीक होती. चंद्रकांत जव्हेरी हे उषाबेन यांच्याबरोबर ध्वनिक्षेपण करतानाच पकडले गेले. विठ्ठलदास जव्हेरी हे सविनय कायदेभंगापासून चळवळीत होते. त्यांनी जगन्नाथ ठाकुरांच्या मदतीने दुसरा रेडिओ ट्रान्समीटर बनविला होता. त्यांच्याकडे रेकॉर्ड्स बनविण्याचे मशिन असून रेडिओ स्टेशनासाठी रेकार्ड्स पुरवण्याचे त्यांनी डॉ. लोहियांना कबूल केले होते. त्यासाठी कोऱ्या रेकार्ड्स चिकागो रेडिओ कंपनीने विनामूल्य दिल्या होत्या.

चिकागो रेडिओ अँड टेलिफोन कंपनीचे संचालक नानक मोटवानी स्वतः चांगले तंत्रज्ञ असून, त्यांचे देशभक्त वडील व भाऊ या सर्वांचे सरदार पटेल व डाह्याभाई पटेल यांच्याशी चांगले संबंध होते. महात्मा गांधींशीही त्यांची जवळीक होती. या कंपनीचे मुंबईत मुख्यालय असून लखनौ, नवी दिल्ली, लाहोर व कोलकात्यात शाखा होत्या. मुंबईतील अखिल भारतीय कॉंग्रेस अधिवेशनातील ध्वनिवर्धन वगैरे

व्यवस्था या मंडळीनेच करून दिली होती. शिवाय संपूर्ण अधिवेशनाची फिल्म बनवून दिली होती. आजही ती चित्रफीत दाखविली जाते.

डाह्याभाई पटेलांच्या सूचनेनुसार मोटवानी यांनीच रेडिओ ट्रान्समीटर पुरविले. त्यांच्या सुट्या भागांवर या कंपनीचे नाव आढळले, असे गुप्तचरांच्या अहवालात नमूद आहे. ट्रान्समीटरची क्षमता व ताकद वाढविण्यासाठी कंपनीने आणखीही काही भाग नंतर दिले. नानक यांनी रेकार्डिंग मशीन व कोऱ्या ग्रामोफोन रेकॉर्ड दिल्यामुळे प्रक्षेपणाचा दर्जा सुधारणे शक्य झाले, असा सरकारी पक्षाचा कोर्टात दावा होता. त्यांनी सरकारच्या अत्यंत कडक निर्बंधांचे कमालीच्या कौशल्याने उल्लंघन केले, असे सिद्ध करण्याचा सरकारी वकिलांनी कसून प्रयत्न केला. मोटवानींनीच दिलेल्या सामग्रीतूनच काँग्रेस रेडिओ उभारला गेला, असे कोर्टात सिद्ध करण्यासाठी गोरे वकील व त्यांचे काळे साहाय्यक प्रयत्नांची पराकाष्ठा करीत राहिले. तथापि न्या. लोकूरांनी ठामपणे सांगितले की, 'हा त्यांचा आरोप पारेख वाडीतील काँग्रेस रेडियोला लागू होत नसून १९ डिसेंबर १९४२ रोजी खांडके इमारतीत पकडलेल्या रेडिओ केंद्राला लागू पडतो ; आणि ती केस माझ्या कार्टाकडे नाही!'

इतके निश्चित की, या प्रकरणी न्या. लोकूरांनी उदार भूमिका घेतली, आणि सर्व संबंधितांना कमीत कमी सजा दिल्या. शिवाय वस्तुस्थिती अशीच होती की, पारेख वाडीतील तसेच खांडके इमारतीतील रेडिओ ट्रान्समीटरांसाठी सर्व आवश्यक सामग्री मोटवानी यांनी दिलेली होती. एकूण काँग्रेस रेडिओस मोटवानींचे फार मोठे योगदान होते.[२]

काँग्रेस रेडिओ प्रकल्पाचा मुख्य तंत्रज्ञ नरिमन आदरबाद प्रिंटर हा एक पारसी इंजिनीअर होता. रावळपिंडीला जन्मलेल्या नरिमन यांनी मुंबईत भायखळा भागात तांत्रिक शिक्षणसंस्था काढली. त्यांनी १९३७ साली इंग्लंडमध्ये रेडिओ-टेलिव्हिजनचे शिक्षण घेतले होते. परत आल्यावर त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी एक ट्रान्समीटर विकत घेतला होता. महायुद्ध सुरू झाल्यावर गुप्तचरांनी त्यांचा ट्रान्समीटर व परवाना जप्त केला. पण तरीही त्यांनी काही भाग लपवून ठेवले. प्रिंटर हे गृहस्थ काँग्रेसजन नव्हते. परंतु लपवलेल्या सामग्रीतून पैसे मिळविण्यासाठी ते या

रेडिओ उपक्रमात आले. त्यांनी या उपक्रमासाठी अत्यंत उपयुक्त काम केले हे सत्य. तथापि बहुधा पैशाच्या लोभाने, त्यांनी या उपक्रमाची माहिती पोलिसांना दिली. या माणसामुळे अनेक जण पकडले गेले. नरिमनप्रमाणेच मिर्झा व आर. ए. मेहता माफीचे साक्षीदार झाले. स्वतः न्या. लोकूर यांनीही याबाबत खेद व्यक्त केला. माफीच्या साक्षीदारांचा राष्ट्रद्रोह लोकूर यांच्या लक्षात आलाच होता.

**रेडिओ स्टेशनचे गूढ :—** ३१ ऑगस्ट १९४२ च्या **बाँबे काँग्रेस बुलेटिनने** जाहीर करेपर्यंत गुप्तचर विभागाच्या विशेष शाखेला काँग्रेस रेडिओ प्रसारणाची काहीच माहिती नव्हती. ही बातमी वाचल्यावर गुप्तचर बुचकळ्यात पडले. बहुधा हा बर्लिनमधील आझाद हिंद प्रसारणाचा उद्योग असावा असा त्यांचा तर्क होता. नंतर ३ सप्टेंबरच्या काँग्रेस बुलेटिनने येथील रेडिओ प्रसारणाची बातमी पुन्हा छापली. त्यानंतर मात्र गुप्तचरांनी ते प्रसारण ऐकले, आणि सरकारने त्याची चौकशी करण्यासाठी मुंबईतील मिलिटरी इंटेलिजंस अधिकाऱ्यास आदेश दिला. मिलिटरी गुप्तवार्ता विभागाला रेडिओ स्टेशनचे गूढ काही केल्या उमजेना. हे रेडिओ स्टेशन सध्या पाकिस्तानात असलेल्या मुलतान व डेरा-इस्माईल खान आणि त्यापलीकडे काबूलच्या पश्चिमेला ५० मैलांवर असावे, असा त्यांनी अंदाज व्यक्त केला. त्यामुळे रेडिओचे रहस्य आणखीच गूढ झाले. म्हणून इलाख्याच्या गृह विभागाने फर्ग्युसन नामक हुशार पोलीस अधिकाऱ्यासही शोध घेण्याच्या कामी जुंपले. हा अधिकारी आणि मिलिटरीचे पथक अहोरात्र पिसाटपणे शोध करू लागले.

**काँग्रेस बुलेटिन** प्रत्येक अंकातून हे ध्वनिप्रक्षेपण ऐकण्याचे लोकांना आवाहन करीत असे. त्यामुळे गव्हर्नर व अतिरिक्त गृह सचिव एच. व्ही. आर. अय्यंगार कमालीचे चिंताग्रस्त झाले होते. या रेडिओविषयी ब्रिटिश संसदेच्या कॉमन्स सभागृहातही भारतमंत्री लार्ड अमेरींवर प्रश्नांची सरबत्ती करण्यात येत होती. चर्चिल महाशय खवळले! म्हणून शोधमोहीम अधिक जोरात! प्रसारित झालेला संपूर्ण मजकूर टिपून घेण्यासाठी सरकारने ९ ऑक्टोबरपासून पोलीस लघुलेखकांना कामाला लावले. प्रस्तुत इतिहासकाराने हे सर्व अनुश्रवण व मॉनिटरिंग रिपोर्ट वचून त्यांचा उपरोक्त ग्रंथात उपयोग केला आहे.

ध्वनिक्षेपणाच्या मीटर बँडबाबतही गुप्तवार्ता पथक बुचकळ्यात पडले होते. सत्य हेच आहे की, २७ ऑगस्ट रोजी हा रेडिओ ४१.७८ मीटर बँडवर सुरू झाला, आणि नंतर ट्रान्समीटरची शक्ती वाढवून तो ४२.३४ बँडवर प्रक्षेपण करू लागला. यामुळे गुप्तचर गोंधळात पडले होते.

नरिमन यांनी मिर्झाच्या मदतीने ट्रान्समीटर प्रथम भायखळ्यातील आपल्या घरी कार्यान्वित केला होता. त्याच्या कार्यक्षमतेची खात्री पटल्यावर तो सी व्ह्यूव इमारतीत बसविण्यात आला. प्रारंभी नरिमन, मिर्झा आणि नंतर खाकर आणि आर. एन. मेहता ट्रान्समीटर चालवत असत. मात्र आळीपाळीने उषा मेहता, खाकर आणि आर. ए. मेहता मायक्रोफोनवर बोलत. एलफिंस्टन कॉलेजमधील इंग्रजीच्या प्राध्यापिका कुमी दस्तूर (विवाहानंतर कमल वूड) इंग्रजी बातम्या सांगत. या पारसी बाईंचे नाव १९४७ पर्यंत गुप्त ठेवण्यात आले. म्हणून त्यांचे नाव खटल्यात येऊ शकले नव्हते. त्यांना नरिमन यांनी कोर्टात संरक्षण दिले होते.

१० सप्टेंबरपासून रेडिओ स्टेशनचे वाळकेश्वर मार्गावरील रतन महलमध्ये स्थलांतर करण्यात आले. १५ दिवसानंतर आर. ए. मेहतांचे निवासस्थान असलेल्या अजीत विलामध्ये स्टेशनचे स्थलांतर झाले. तथापि मेहतांना पोलिसांच्या ससेमिऱ्याची भीती वाटू लागली. म्हणून त्यांनी रेडिओ स्टेशनसाठी सँडहर्स्ट रोडवरील लक्ष्मी भुवनामध्ये एक सदनिका भाडेतत्त्वावर घेतली. इथे आल्यावर डाह्याभाई पटेलांनी नानक मोटवानी यांना विनंती करून ट्रान्समीटर अधिक शक्तिशाली करून घेतला. यांतर लवकरच म्हणजेच १८ ऑक्टोबर १९४२ रोजी रेडिओ स्टेशन पारेखवाडीत नेण्यात आले.

फर्ग्युसन व मिलिटरीचे पथक प्रसारण केंद्राच्या मागावर होतेच. ते खाकर व नरिमनपर्यंत पोहोचले. त्यांनी केलेल्या पूसतपासणीनंतर नरिमन स्वतः इन्स्पेक्टर कोकजेला पारेखवाडीत घेऊन गेला. १२ नोव्हेंबर १९४२ च्या रात्री ८.५० वाजता उषाबेन मेहता आणि चंद्रकांत जव्हेरी बरोबरीने प्रत्यक्ष ध्वनिक्षेपण करीत होते. तेव्हाच पोलिसांनी रेडिओ स्टेशन ताब्यात घेतले.

**इतिहास अभ्यासकांनी ध्यानात ठेवावे की, उषाबेन ध्वनिक्षेपण करीत होत्या तो एकमेव रेडिओ ट्रान्समीटर नव्हता. त्याव्यतिरिक्त मुंबईत खांडके**

**इमारतीतही काँग्रेसचा दुसरा रेडिओ ट्रान्समीटर कार्यरत होताच.** त्यावरील कार्यक्रम स्वतः फर्ग्युसनने ऐकला होता. तथापि सरकारने ते केंद्र तात्काळ ताब्यात घेतले. त्यानंतर तीन महिने काँग्रेसची आकाशवाणी तात्पुरती मुकी झाली.[३]

**पुन्हा काँग्रेस रेडिओ** :–तथापि राम मनोहर लोहिया आणि भूमिगत एआयसीसी पराभव पत्करण्यास तयार नव्हती. त्यांनी रेडिओ चालविण्याचा निर्धारच केलेला होता. लोहियांनी बनारस हिंदू विश्वविद्यालयातील रेडिओ अभियांत्रिकी शिकविणारे प्राध्यापक डॉ. के. एन. गायरोळा यांना मुंबईत दुसरे रेडिओ स्टेशन उभारण्यासाठी आणले. न्या. विकेंडेनच्या अहवालात नमूद आहे की, लोहियांनी मुंबईत चार-पाच रेडिओ ट्रान्समीटर तयार ठेवलेले होते.[४] ६ जानेवारी १९४३ च्या **बॉंबे काँग्रेस बुलेटिनने** पुन्हा रेडिओ प्रसरण करण्याची घोषणाही केली.

**त्यानंतर थोड्या विलंबाने १९ फेब्रुवारी १९४३ पासून काँग्रेस रेडिओ पुन्हा सुरू झाला.** प्रत्येक रात्री थोडा वेळ यावरील प्रक्षेपण ऐकायला मिळू लागले. या केंद्रावरून इंग्रजी व हिंदी बातमीपत्रे व नेत्यांची भाषणे प्रक्षेपित होऊ लागली. तांत्रिक सुधारणांमुळे प्रक्षेपणाचा दर्जा सुधारला. २३ तारखेपासून पोलीस लघुलेखक टिपणे लिहून सरकारला सादर करू लागले. ४२.३ मीटर बँडवरून प्रसारण करणाऱ्या या नवीन रेडिओ केंद्राचाही पोलीस कसून शोध घेत होते. परंतु त्यांना हे केंद्र अखेरपर्यंत सापडले नाही. या रेडिओ केंद्राला अधिक महत्त्व येण्याचे कारण म्हणजे सरकारने केलेल्या असत्य आरोपांना उत्तर म्हणून महात्मा गांधींनी कारावासात सुरू केलेले उपोषण हे होय. १० फेब्रुवारी १९४३ रोजी गांधीजींनी २१ दिवसांच्या प्रायोपवेशनास प्रारंभ केला. लिनलिथगो, चर्चिल व अमेरीने ‘महात्म्याला तुरुंगात मरू देण्याचा निर्णय घेतलेला होता.’ अशा संकटसमयी जनतेचे नीतिधैर्य टिकवून ठेवणे अगत्याचे होते. हिंसक उठावाची शक्यता ओळखून आंदोलनाची रणनीती बदलण्याची आवश्यकता निर्माण झाली होती. अशा परिस्थितीत काँग्रेस रेडिओने अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. डॉ. लोहियांचे सुप्रसिद्ध “ ओपन लेटर टू लॉर्ड लिनलिथगो ” आणि अनेक समयोचित भाषणे लोकांना या माध्यमाद्वारेच ऐकावयास मिळाली होती. ६ मार्च १९४३ पासून मात्र प्रक्षेपण खंडित झाले.

यानंतर २६ जानेवारी १९४४ च्या स्वातंत्र्य दिनी काँग्रेसची आकाशवाणी पुनरपि दमदारपणे मुंबईतून प्रसारित झाली. अच्युतराव व लोहियांची भाषणे व संदेश लोकांना ऐकायला मिळाले. मात्र भूमिगत रेडिओ स्टेशन चालू ठेवणे कमालीचे अवघड व खर्चाचे काम होते. म्हणून प्रसारण रविवार व बुधवारीच चालू ठेवणे शक्य झाले.[५]

**पुण्यातील काँग्रेस रेडिओ :**— मुंबईप्रमाणे पुण्यातही काँग्रेस रेडिओ सुरू करण्याची कल्पना शिरूभाऊ लिमयेंनी प्रथम मांडली होती. त्यानुसार अच्युतराव पटवर्धन व लोहियांनी कॅपिटॉल सिनेमा बॉंब कटातील अच्युत आपटेंकडे एक ट्रान्समीटर पाठविला होता. रेडिओ प्रसारण पुण्यातून का सोलापुरातून हा विचार चालू होता. या विषयाचे जाणकार लक्ष्मण गणेश देशपांडे यांनी त्याची कार्यक्षमता तपासून पाहिली. मात्र ट्रान्समीटर सोलापूरला न पाठवता पुण्यातच कार्यान्वित करण्यात आला. याबाबतचे गुप्त पत्रक वाटल्यावर स्वातंत्र्य दिन साजरा करण्याच्या दिवशी म्हणजे २६ जानेवारी १९४४ रोजी पुणे केंद्राचे ध्वनिक्षेपण सुरू करण्यात आले. लोहिया व पटवर्धनांच्या भाषणांनी पहिल्याच दिवशी रंगत भरली. मुंबई रेडिओप्रमाणेच येथील प्रसारणाचेही अनुश्रवण पोलीस लघुलेखक लिहून सरकारकडे पाठवित.

कविवर्य वसंत बापट व मधुमालती धोपेश्वरकर (विवाहानंतर मधुमालती अच्युत आपटे) हे राष्ट्र सेवादलाचे सैनिक प्रक्षेपण करीत. कस्तुरबा गांधी पुण्यात आगाखान भवनातील कारागृहात २२ फेब्रुवारी १९४४ रोजी मरण पावल्याची बातमी भारतीयांना प्रथम समजली या रेडिओवरूनच! तसेच १४ एप्रिल १९४४ रोजी मुंबई बंदरात स्फोट होऊन महाभीषण विध्वंस झाल्याचीही बातमी प्रथम याच माध्यमातून लोकांना समजली होती. मात्र सरकारी बंधने आणि तंत्रज्ञांच्या अभावी रेडिओ केंद्र चालविणे अवघड झाल्याने हा उपक्रम बंद करावा लागला. मात्र प्रभावी प्रसारमाध्यम या नात्याने काँग्रेस रेडिओने स्वातंत्र्य आंदोलनास मोठे योगदान दिले.

## जनआंदोलनास मुंबईचा प्रतिसाद

ब्रिटिशांची दडपशाही आणि अतिरेकी कारवाईमुळे क्रांतिलढ्याची तीव्रता व व्याप्ती वाढली, हे अमेरिकन पत्रकारांनीही जगाला सांगितले होते. चर्चिल, अमेरी व

लिनलिथगो हे त्रिकुट काँग्रेसचा लढा व काँग्रेसला नेस्तनाबूत करण्यास तर कटिबद्ध होतेच, पण शिवाय गांधीजी तुरुंगात मरण पावले तरी चालेल, असा युध्यमान पवित्रा घेऊन उभे होते. इंग्रजांचे अविवेकी धोरण उघड झालेले होते. **बाँबे काँग्रेस बुलेटिन,** काँग्रेस रेडिओ व अनेक पत्रकांनी याबाबत जनतेला विश्वसनीय माहिती पुरविली. त्यामुळे संयुक्त प्रांत व बिहारप्रमाणेच महाराष्ट्रही पेटला होता. मुंबईत पोलिसांव्यतिरिक्त ब्रिटिश, ऑस्ट्रेलियन व अमेरिकन सेनादल अहोरात्र तैनात केलेले होते. लढाऊ विमाने, रणगाडे व चिलखती गाड्या शूटिंगच्या पवित्र्यात शहरात संचार करीत. तरीही सरकारला लढा दडपून टाकणे अशक्य झाले. इंग्रजांना आपल्या दडपशाहीची फळे भोगावीच लागली. भारताला अनंत काळ ब्रिटिश सत्तेखाली ठेवण्याची जिद्द बाळगलेल्या लिनलिथगोला आपली व्यथा व अगतिकता चर्चिलला खासगी तारसंदेशाद्वारे (३१ ऑगस्ट १९४२) कळवावी लागली. त्यातील लहानसा परिच्छेद पाहा :—

" I am engaged here in meeting by far the most serious rebellion since that of 1857, the gravity and extent of which we have so far concealed from the World for reasons of Military Security. Mob violence remains rampant over large tracts of the countryside, and I am by no means confident that we may not see in September a formidable attempt to renew this widespread sabotage of our war effort. The lives of Europeans in outlying places are today in jeopardy. If we bungle this business, we shall damage India irretrievably as a base for future Allied operations and as a thoroughfare for U.S. help to China. Throughout this most anxious crisis, I have managed to hold together the Indian members of my Executive Council, though several of them are in mortal terror of the possible consequences to themselves of their having supported me in arresting Gandhi and the Working Committee of Congress."[६]

अत्यंत निग्रही व दुराग्रही अशा लिनलिथगोंच्या या मनोगतावरून या क्रांतीची तीव्रता लक्षात येते. **"छोडो भारत" हा केवळ नारा नसून कोट्यवधी व्यथित अंतःकरणांची उत्कट तळमळ होती!**

महाराष्ट्र व बिहारमधील आंदोलनात फार मोठा फरक होता. बिहारमध्ये कुठे काय घडत आहे याची सरकारलाही माहिती मिळत नसे. बरेच दिवस पाटना शहराचा राज्याशी संपर्क तुटला होता. महाराष्ट्रात मात्र विध्वंस घडवून आणणे हे ध्येय नव्हते. मुंबईत बॉम्बस्फोट ही दैनिक घटना असूनही विध्वंस कमी झाला. या शहरात ९ ऑगस्टपासून डिसेंबर १९४२ पर्यंत ४४७ बाँब फुटले वा न फुटता पकडले गेले. बिहार प्रांतात केवळ आठ बाँबस्फोट होऊन प्रचंड हानी झाली होती. तथापि महाराष्ट्रातील युवक विनाशाच्या भावनेने प्रेरित झालेला नसून सरकारच्या ताठरपणावर व युद्धप्रयत्नांवर आघात घालत राहिला. स्वातंत्र्य हे ध्येय आणि आंदोलन हे साधन होते. १५ ऑगस्ट १९४२ पर्यंत शहरातील सर्व कापड गिरण्या, रेल्वे वर्कशॉप व युद्धसामग्री बनवणारे सर्व कारखाने बंद करण्यात आले होते. पण कामगारांनी कारखाने जाळले नाहीत. या शहरातील मूळजी जेठा व मंगळदास हे सर्वात मोठे कापडाचे बाजार, दवा बाजार व दानाबंदर अनेक आठवडे बंदच राहिले. शेअर व बुलिअन मार्केटमधील व्यापाऱ्यांनी काँग्रेसच्या आदेशानुसार दोन महिने हरताळ पाळला. शिवाय त्यानंतरही फक्त पूर्वोनियोजित व्यापारी करारांचे पालन करण्यासाठीच धंदा केला. त्यांनी नवीन व्यवहार केला नाही. ही स्थिती कित्येक महिने कायम राहिली. नागरिकांना वस्तूंच्या टंचाईला तोंड द्यावे लागले. परंतु लोकांनी सहनशीलता दाखविली, स्वातंत्र्याच्या आकांक्षेने!

मुंबईतील भूमिगत चळवळीचे प्रमुख पुरषोत्तम त्रिकमदास यांची मालमत्ता जप्त करण्याचा सरकारने जाहीरनामा काढला. पण तरीही शरण न येता त्यांनी लढा आणखी तेज केला. अखेरीस १९-२० नोव्हेंबरच्या रात्री पोलिसांनी त्यांना बांद्रा उपनगरामध्ये पकडले. त्यांचे साथीदार मोहिनुद्दिन हॅरीस, सी. के. नारायणस्वामी, अण्णासाहेब सहस्रबुद्धे, शशिकांत कडाकिया वगैरे पकडले गेले. के. ई. एम

रुग्णालयाचे डीन डॉ. जीवराज मेहता, उमाशंकर दीक्षित, रोहित मनुशंकर दवे, हाजी जावर गिलानी वगैरेंनाही अटक झाली. डॉ. गिल्डर (माजी मंत्री), पुरषोत्तम कांजी, सूरजी वल्लभदास, चंदुलाल शहा, रतनजी चापशी, डाह्याभाई पटेल (सरदार पटेलांचे सुपुत्र) व जे. सी. कुमारप्पा हे भूमिगत पुढारी काँग्रेस रेडिओपाठोपाठ १८ नोव्हेंबरला पकडले गेले.[७]

मुंबई सरकारने केंद्रीय गृह मंत्रालयास पाठवण्यासाठी मुंबई पोलीस कमिशनरचा अहवाल मागविला होता. या अहवालातून येथील आंदोलनाची कल्पना येते. ९ सप्टेंबर १९४२ पर्यंत पोलिसांनी मुंबईत ७० वेळा गोळीबार केले व त्यांत तब्बल ३४ स्वातंत्र्य सैनिक ठार मारले आणि ३८५ जणांना गंभीररीत्या जखमी केले. पण लोकांनी एकही पोलीस अथवा सरकारी कर्मचारी ठार केला नाही. संयुक्त प्रांत व बिहारमधील आंदोलनात लोकांनी भयंकर विध्वंस केला. परंतु बिहारप्रमाणे मुंबईत एकाही सरकारी इमारतीला आग लावली नाही. इथे नागरिकांनी अगदीच कमी विध्वंस केला. पोलीस चौक्या, वाहतुकीचे सिग्नल व सरकारी धान्य दुकानांचे केवळ १५,७०० रुपयांचे नुकसान केले, असे पोलीस कमिशनर बटलरने अहवालात म्हटले. बेस्ट, मुंबई गॅस कंपनी आणि महानगरपालिकेचे नुकसान फक्त २,०५,९०० रुपयांचे झाले. पोलिसांनी मात्र भारत संरक्षण कायद्याच्या संरक्षणाखाली मुंबईत स्वैराचार केले.

बहुसंख्य समाज आणि विशेषतः सर्व मारवाडी व गुजराती व्यापारी, कारखानदार व दुकानदारांनी आंदोलनास विविध प्रकारे योगदान दिले. शाळा-कॉलेजांमधील मुला-मुलींनी आंदोलनात हरप्रकारे योगदान दिले. सर्व आघाड्यांवर ते आघाडीवर असत. मुंबईभरच्या युवक-युवतींनी खुले तसेच भूमिगत आंदोलन जिवंत ठेवले, असेही बटलरने लिहिले. बॅ. जिनांच्या जाहीर आवाहनानुसार बरेच मुसलमान आंदोलनापासून लांब राहिले, हे अर्धसत्य! पण त्यांनी काँग्रेसच्या विरोधात प्रचार केला नाही. आंदोलनाच्या काळात मुंबईत हिंदुमुसलमान दंगा झाला नाही. काँग्रेसजनांना पकडून देण्यात मुसलमानांनी पोलिसांना मदत केली नाही. परंतु आंबेडकरांच्या आदेशानुसार महाराष्ट्र व तामिळनाडूतील दलित या आंदोलनात

अलिप्त राहिले. पूर्वीपासून स्वातंत्र्य चळवळीस योगदान देणारे पारसी या वेळी उदासीन राहिले. मात्र खुर्शिद नौरोजी व डॉ. गिल्डर यांचे पारसी चाहते या लढ्यातही आघाडीवर होतेच.

डॉक कामगार उदासीन होते हे खरे. परंतु गिरणी कामगार आणि श्रमिक वर्गाने आंदोलनात मोठा भाग घेतला नाही हा बटलरचा अभिप्राय असत्य होता. शहरातील बस व ट्राम वाहतूक बरेच दिवस बंदच राहिली, हे बटलरनेही कबूल केले. पोलिसांनी केलेला अतिरेक अथवा त्यांचे दुर्वर्तन व प्रमाद यांची सरकार चौकशी करणार नाही, असे स्वतः गव्हर्नरने पोलीस कमिशनरला आधीच पत्र लिहिले होते, असे बटलरने कबूल केले. त्यामुळे पोलीस दलाचे मनोधैर्य वाढले, असाही अभिप्राय दिला. काँग्रेस मंत्रिमंडळाने नेमलेल्या अनेक वरिष्ठ पदांवरील अधिकाऱ्यांनी सरकारचा निषेध म्हणून राजीनामे दिले.[८]

यानंतर ब्रिटिश संसदेतील प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी भारतमंत्र्याने आंदोलन विषयक अहवाल मागितला. त्यासाठी मुंबई सरकारने नवी दिल्लीला दिलेली माहिती मी **हिस्टरी ऑफ बॉम्बे** या ग्रंथात दिलेली आहे. मुसलमानांच्या सहभागाविषयी नोकरशाहीचे अहवाल काहीही सांगत असले, तरी मुसलमानांचा या आंदोलनातील सहभाग लक्षणीय होता. कित्येक मुसलमानांनी भूमिगतांना मदत केली, आश्रय दिला. मेहेरअली, अबिदअली जाफरभाई, सालेभाई अब्दुल कादर, अमतूल सलाम, कुलसुम सयानी वगैरेंना मानणारे हजारो मुसलमान या शहरात होतेच. मुंबई व महाराष्ट्रातील कित्येक मुसलमानांनीही कारावास भोगला. वि. दा. सावरकरांनी छोडो भारतला विरोध केला, तरीही हिंदुमहासभेचे शेकडो जण प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष चळवळीत सामील झाले.

## मुंबईतील सेंट्रल डिरेक्टोरेट

अखिल भारतातील छोडो भारत क्रांतिलढ्याचे मुंबईतून केंद्रीय सूत्रसंचालन ही या आंदोलनातील खास उल्लेखनीय विशेषता होय. भारतातील आंदोलनाच्या इतिहासात हा प्रयोग अतुलनीय ठरला. क्रांतिकारकांनी मुंबईत स्थापन केलेल्या

सेंट्रल डिरेक्टोरेटने कोहिमा, चित्तगाव, कन्याकुमारी व पेशावरपर्यंतच्या संपूर्ण हिंदुस्तानातील आंदोलनाचे सूत्रसंचालन करून लढा प्रदीर्घ काळ चालू ठेवला. या संघटनेने कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण केला, मार्गदर्शन केले व समन्वय राखला. शक्यतो येथून निधी दिला. केंद्रीय सूत्रसंचालन नसते तर सामर्थ्यवान ब्रिटिशांनी दोन-तीन महिन्यांत लढा विझवून टाकला असता. काँग्रेस श्रेष्ठी अटकेत पडल्यावर जनतेचा जोश थंडावला असता. परंतु संघटनेने लढा चालू ठेवला. अशी यंत्रणा कार्यरत असणार, असे सरकारला वाटतच होते. म्हणून चौकशीसाठी न्या. टी.डी. विकेंडेन यांची समिती नेमली होती. तथापि सर्वतोपरी प्रयत्न करूनही ही समिती अथवा इंटेलिजन्स ब्युरोलाही या गुप्त संघटनेचा ठावठिकाणा कधीच उकरून काढता आला नाही. सरकारला संशय मात्र होता!

या अतुलनीय उपक्रमाचे सत्य स्वरूप कित्येक दशके अज्ञात राहिले. इतिहासकारांनाही गोपनीय कागदपत्र उपलब्ध नव्हते. मात्र प्रचंड साधनसामग्री उपलब्ध झाल्यावर प्रस्तुत इतिहासकाराने **क्विट इंडिया रिव्हॉल्युशन : द इथॉस ऑफ इट्स सेंट्रल डिरेक्शन** या ग्रंथात या विषयाचे ९५ पानांमध्ये विवेचन केलेले आहे. याबाबत इथेही थोडे! विशेष असे की, नगरच्या किल्ल्यात अटकेत असलेल्या नेहरू, मौलाना आझाद वगैरे नेत्यांनाही ते डिसेंबर १९४५ मध्ये बंधमुक्त होईपावेतो या यंत्रणेची काहीच माहिती नव्हती. म्हणून सुटकेनंतर त्यांनी याविषयी अनुदार शेरे मारले होते. मात्र अच्युतराव व अरुणा असफ अली यांनी त्यांना समर्पक उत्तर दिले. महात्मा गांधींना मात्र संपूर्ण वस्तुस्थिती माहीत होती. सुचेता कृपलानी, अरुणाबेन असफ अली त्यांना आगाखान भवनात गुप्तपणे जाऊन भेटल्या होत्या. अरुणाबेनचे गांधीजींनी दिलखुलास कौतुकही केले होते.

**संघटनेचे प्रमुख पुढारी :—**या केंद्रीय सूत्रसंचालन व्यवस्थेत देशातील कित्येक भूमिगत काँग्रेस कार्यकर्ते होते. संचालनालयाचे प्रमुख म्हणून पुढील पुढाऱ्यांचा अगत्याने उल्लेख करावा लागतो :—डॉ. राम मनोहर लोहिया, अच्युतराव पटवर्धन, अरुणा असफ अली, सुचेता कृपलानी, बाबा राघवदास, सादिक अली, देवदास गांधी, खुर्शिद नौरोजी, डॉ. गिल्डर, गोपिनाथ बारडोलोई, जुगल किशोर

खन्ना, अन्नादा चौधरी, आर. आर. दिवाकर, शिरूभाऊ लिमये, मोहनलाल सक्सेना, मिहीरलाल चॅटर्जी, कालीपद मुखर्जी, एस. एम. जोशी वगैरे. ९ नोव्हेंबर १९४२ रोजी जयप्रकाश नारायण हजारीबाग जेलमधून निसटून आल्यावर या संघटनेच्या कार्यकक्षा अधिक वाढल्या. गिरीधारीलाल कृपलानी, डॉ. बाळकृष्ण व्ही. केसकर, द्वारकानाथ कचरू, रामसेवक पांडे, अण्णासाहेब सहस्रबुद्धे, पुरषोत्तम त्रिकमदास यांचाही या यंत्रणेत सक्रिय सहभाग होता. देवदास गांधी सतत समन्वय साधत असत.

**संघटनेचा शोध :—**आंदोलनाचे सूत्रसंचालन करणारी काँग्रेसची एखादी यंत्रणा असावी असा गुप्तवार्ता विभागाला ऑगस्टच्या अखेरपासून संशय आला. पण काहीच उलगडा होत नव्हता. पूर्वीपासून अशोक मेहतांचे गुप्त पथक होते, असे गुप्तचरांना माहीत होते. पण अशोक मेहता प्रारंभीच पकडले गेले होते. संयुक्त प्रांतात पं. नेहरू, डॉ. के. एन. गायरोळा व राजाराम शास्त्री यांचे एक आक्रमक पथक आणि बिहारातील रामनंदन मिश्र यांचा जथा ज्ञात होता. पण इंटेलिजन्स ब्युरोला त्यातून काहीच बोध झाला नाही. सर्वच माहिती पुसट होती. स्वतः गृह सचिव रिचर्ड टॉटेनहॅमला, कम्युनिस्टांच्या गुप्त कारवायांच्या पद्धतीमुळे, कम्युनिस्टांचाही याबाबत संशय आलाच होता. पण पी. सी. जोशी यांनी त्यांचा भ्रम दूर केला. ऑक्टोबर १९४२ पावेतोच्या कम्युनिस्टांच्या वर्तणुकीतून गृह विभागालाही त्यांच्या राजनिष्ठेची खात्री पटली होती. एकूण ब्रिटिशांची संपूर्ण यंत्रणा निबिड अंधारात काळी मांजर शोधत होती. गुप्तचर व लष्कराचेही हेर अविरत देशभर शोध घेत होते. पण व्यर्थ.

इन्टेलिजन्स ब्युरो व गुप्तचर शोधाशोध करत असताना अलाहाबादचे वकील रामसेवक पांडे, बी. ए., एलएल.बी., मुंबईत संशयावरून पकडले गेले. पांडे स्वतः मुंबईतील केंद्रीय संचालनालयाचे सक्रिय कार्यकर्ते होते. गुप्तचरांच्या पथकाला त्यांनी हुलकावणी देणारी उत्तरे दिली. पण त्यातून गुप्तचरांना संशय आला की, मुंबई प्रांतिक काँग्रेसची भूमिगत यंत्रणा असावी. या यंत्रणेचे एक पत्रक संयुक्त प्रांतात व बिहारमध्येही पकडले गेले. नंतर मुंबईतून पाठविलेले एक पत्र क्षुदीराम चक्रवर्ती यांच्या नावे बाणकुरा शहरात सापडले. त्यात संचालनालयाच्या मुंबईतील मुख्यालयाचा निर्देश होता. आणखी अनेक कार्यकर्ते पकडले गेल्यावर गुप्तवार्ता विभागाला अधिक माहिती मिळाली. शिवाय खुर्शिदबेन नौरोजी यांनी खान अब्दुल

गफार खान यांना लिहिलेल्या पत्रावरून गुप्तचरांची खात्री पटली की, भूमिगत संघटना मुंबईतच असावी. मात्र न्या. टी. डी. विकेंडेनच्या अभ्यासपूर्ण अहवालावरून सरकारची पूर्ण खात्री पटली. **तथापि जंगजंग पछाडूनही काँग्रेसची ही कल्पक योजना व तिचा ठावठिकाणा बुद्धिमान इंग्रजांना कधीच शोधता आला नाही.**

**केंद्रीय संचालनालयाची कार्यपद्धती :—**ही संघटना ९ ऑगस्ट १९४२ रोजी अंतरिम ' एआयसीसी ' या स्वरूपात मुंबईत सरदार पटेलांच्या मुलाच्या घरी सुरू झाली. मात्र २२ ऑगस्ट १९४२ पासून ती व्यवस्थित कार्यरत झाली. सरहद्द गांधी गफार खान यांना खुर्शिदबेन यांनी लिहिलेल्या पत्रातून हे ध्वनित होते. तोपावेतो या केंद्राने पेशावर, लाहोर, दिल्ली, आग्रा, आझमगड, बनारस, गोरखपूर, जौनपूर, लखनौ, पाटना, मिदनापूर, भुवनेश्वर, कोलकाता, मद्रास व म्हैसूरला आंदोलनाचा कार्यक्रम पाठविला होता. लवकरच या यंत्रणेचे सुसज्ज कार्यालय मुंबईतील कॅथेड्रल स्ट्रीटवरील पेटलाधी माळा या इमारतीत सुरू झाले. नंतर ते खेतवाडी मेन रोडवरील गोविंद बिल्डिंगमध्ये हलवण्यात आले.

सादिक अली या कार्यालयाचे प्रमुख असून त्यांना काही मदतनीस होते. रामसेवक पांडे कार्यालयाचे चिटणीस झाले. गुप्ततेच्या कारणास्तव क्रांतिकारकांना रमेश, किकाजी, डॉक्टर (लोहिया), कुसुम (अच्युतराव पटवर्धन), कदम (अरुणा असफ अली), दिदी (बाबा राघवदास), दादी (सुचेता कृपलानी) सत्यप्रकाश, सुशीला वगैरे सांकेतिक नावे दिलेली होती. डॉ. केसकरही नंतर रमेश झाले. कार्यतत्पर युवकांच्या कुरियर जाळ्याद्वारेच संदेशवहन करण्यात येई. या संघटनेस येणारी पत्रे व संदेश मुंबईतील निवडक लोकांच्या पत्त्यावर येत. बाहेरून मुंबईला येणाऱ्या निवडक कार्यकर्त्यांची निवास-व्यवस्था करण्यात येत असे. संघटनेची कार्यपद्धती सांगोपांग रीतीने व अत्यंत कल्पकतेने आखलेली होती.

प्रारंभी पंजाबात आंदोलनाचा जोर कमी असल्याने सरदार भगतसिंग यांच्या हिंदुस्तान रिपब्लिकन आर्मीसाठी बिहारमधून कुमक पाठवण्यात आली. तसेच बंगालमधील कोळशाच्या खाणी व रेल्वे दळणवळण बंद पाडण्यासाठी खुर्शिद

नौरोजी व डॉ. लोहियांनी लक्ष केंद्रित केले होते. तेथे त्यांना नेत्रदीपक यश लाभले होते. नागपूर भागातील **हिंदुस्तानी लालसेना** ही तर हिंदुस्तान रिपब्लिकन आर्मी या भगतसिंग यांच्या संघटनेची उपशाखा होती. लालसेनेचे प्रमुख मगनलाल बागडी व त्यांचे पाच सहकारी मुंबईतच पकडले गेले (ऑगस्ट १९४३). डिरेक्टोरेटचे मुख्यालय मुंबई शहरात ठेवून देशाचे पुढील पाच विभाग निर्माण केले :—(१) पश्चिम विभाग—मुंबई इलाखा ; (२) उत्तर विभाग—दिल्ली, पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत व सिंध ; (३) मध्य विभाग—मध्यप्रांत व वऱ्हाड, संयुक्त प्रांत व बिहार ; (४) पूर्व विभाग—बंगाल, आसाम व ओरिसा आणि (५) दक्षिण विभाग-—केरळ व मद्रास इलाखा. प्रत्येक विभागाचा प्रमुख ठरविलेला होता. संदेशवहन व समन्वय साधण्यासाठी मुंबईपासून बंगाल, आसाम, बिहार, वायव्य सरहद्द प्रांत, मद्रास, पंजाब, सिंध वगैरे प्रत्येक प्रांतासाठी स्वतंत्र लिंक तयार करण्यात आल्या होत्या.[९]

काही देशप्रेमी सरकारी अधिकारी, सरकारचे कंत्राटदार व काही प्रतिष्ठितांच्या मदतीने अरुणा असफ अली, अच्युतराव व लोहिया मुंबईहून देशभर संचार करीत. युद्धकार्यासाठी असलेल्या सरकारच्या विमानांमधूनही अरुणाबेन, बिजू पटनाईकांसरख्या पायलटांच्या मदतीने, ठिकठिकाणी विमानांतून प्रवास करीत. अतिरिक्त गृह सचिव अय्यंगार यांनी सुचेता कृपलानी यांना सरकारी मोटारीतून गांधीजींच्या भेटीसाठी आगाखान पॅलेसमध्ये नेऊन परत आणले होते.

पाच महिन्यांचे शौर्य, वेदना व जखमांनंतर अल्प विराम घेऊन समालोचन करण्याचीही वेळ आली. किती रक्त सांडून काय मिळविले यावर जानेवारी १९४३ च्या प्रारंभी विचार झाला. डिरेक्टोरेटमध्ये मतभेद झाले. ब्रिटिश सत्तास्थळांवर आघात केले, तरी प्रशासन पूर्णपणे मोडकळीस आले नव्हते. व्हाइसरॉय लिनलिथगो ९ ऑगस्टपासून एकही शब्द जाहीरपणे बोलले नव्हते. त्यांनी आपले तोंड प्रथमच १७ डिसेंबर १९४२ रोजी कोलकात्यात उघडले. जयप्रकाश नारायण प्रथमच २९ डिसेंबर १९४२ रोजी सेंट्रल डिरेक्टोरेटच्या दिल्लीतील बैठकीत उपस्थित राहिले व संघटनेचे सभासद झाले. आंदोलनाचा आधीचा जोर ओसरला होता. जानेवारी १९४३ मध्ये संघटनेत गांधीवादी व समाजवादी असे दोन गट

निर्माण झाले. जयप्रकाशजींच्या " टू ऑल फायटर्स ऑफ फ्रीडम " आणि इतर पत्रकांनुसार समाजवादी युवकांनी साबोटाज व आक्रमक कारवायांवर भर दिला. मात्र गांधीवादी गटाने प्रचार, मिरवणुका, संप व निधी संकलन करण्यास भर देऊन साबोटाजलाही पाठिंबा दिला. तथापि ' एम्फसिस ' कशावर द्यावा हाच काय तो दोन्ही गटांमध्ये फरक होता.

तथापि आपल्या विचारप्रणालीचे उल्लंघन केलेल्या डिरेक्टोरेटच्या सभासदांचा वा अन्य स्वातंत्र्यसैनिकांचा गांधीजींनी कधीच धिक्कार केला नाही. या आंदोलनात आत्मसंरक्षणासाठी कार्यकर्त्यांनी केलेला हिंसाचार देखील त्यांनी अनुज्ञेय मानला. भूमिगत कार्याविषयी गांधीजींनी नापसंतीही व्यक्त केली नाही. नंतर पुढे अरुणा असफ अली व अच्युतराव त्यांना जहांगिर पटेलांच्या जुहूमधील घरी भेटले. तेव्हा **गांधीजींनी त्यांना शरण येण्याचा किंवा प्रकट होण्याचा सल्ला दिला नाही. उलट गांधीजी म्हणाले,** " I have been filled with admiration for your courage and heroism".

## गांधीजींचे तुरुंगातील उपोषण

आगाखान भवनातील कारावासात गांधीजींनी केलेल्या २१ दिवसांच्या उपोषणामुळे आंदोलनात नवीन 'फेज' निर्माण झाली. उत्स्फूर्त सामूहिक प्रतिकाराच्या अवस्थेनंतर देशात 'अस्वस्थ अगतिकता' पसरली होती. अशा वेळी अहिंसक प्रतिकाराच्या शस्त्रागारातील अखेरचे शस्त्र गांधीजींनी उचलले. २१ दिवसांचे उपोषण ! **उपोषणाद्वारे गांधीजींनी तुरुंगातून बाहेरील आंदोलनात प्रवेश केला. त्यामुळे राष्ट्रीय संकटाची गडद छाया पसरली. जागतिक सद्‌विवेकबुद्धी जागृत झाली. मात्र ब्रिटिश सत्ताधीशांचा अपवाद !**

आताचे उपोषण वेगळ्या कारणांसाठी होते. गांधीजी व काँग्रेस हायकमांडला कारावासात कोंडून चर्चिलपासून खालचे सर्व सत्ताधीश हिंसाचार व घातपातांचे खापर गांधीजींच्या डोक्यावर फोडत होते. वारंवार बिनबुडाचे व बेफाम आरोप करीत होते. 'देशातील हिंसक आंदोलनाला काँग्रेस व गांधीच जबाबदार आहेत ;

फॅसिस्ट जपानला मदत करण्यासाठीच त्यांनी पूर्वतयारी करून ठेवली', अशा प्रकारचे बेफाम आरोप सत्ताधीश प्रसारमाध्यमांमधून करीत राहिले. वस्तुतः गांधीजींनी मुंबई अधिवेशनातील भाषणात लिनलिथगोंच्या मैत्रीची तारीफ केली होती. त्यानंतर १४ ऑगस्ट व नंतरही त्यांना पत्रे पाठवून गांधीजींनी आपली भूमिका स्पष्ट केली होती. व्हाइसरॉयला पाच पत्रे पाठवून गांधीजींनी काँग्रेसची बाजू मांडली होती.

तरीही लिनलिथगोंच्या सरकारने १ फेब्रुवारी १९४३ रोजी **काँग्रेस रिस्पाँसिबिलिटी फॉर द डिस्टर्बन्सेस** हे ८६ पानी चोपडे छापून काँग्रेस व गांधीजींवरील आरोप तथाकथित पुराव्यांसह जगासमोर मांडण्याचा प्रयत्न केला. हे धादांत खोटे आरोप म्हणजे गांधीजींच्या राजकीय नीतिमत्तेला गंभीर आव्हान होते. म्हणून त्यांनी पत्रांद्वारे सरकारी आरोपांचे व्यवस्थित खंडन केले. पण हटवादी लिनलिथगो व कंपनी माघार घेत नव्हती. शिवाय गांधीजींची निवेदने प्रसिद्ध करण्यावरही सरकारने बंदी घातली. म्हणून व्यथित होऊन गांधीजींनी व्हाइसरॉयला ७ फेब्रुवारीला पत्र पाठवले व १० फेब्रुवारी १९४३ पासून आपले २१ दिवसांचे ' प्रायोपवेशन ' सुरू केले. महात्म्याचे हे जीवनातील सोळावे उपोषण, वयाच्या ७३ व्या वर्षी, जगातील बलाढ्य महासत्तेचे हृदयपरिवर्तन करण्यासाठी होते. भारताच्या स्वातंत्र्यासाठी होते!

ब्रिटिश महासत्तेचे क्रौर्य पाहा. गांधीजींना अटक करण्यापूर्वीच त्यांच्या संभाव्य उपोषणाबाबत ब्रिटिश कॅबिनेट, अमेरी, लिनलिथगो व सर्व गव्हर्नर यांच्यात विचारविनिमय झालेला होताच. तेव्हाच ठरले होते की, तुरुंगात उपोषण केले तरी मुळीच मुक्त करू नये, गांधींना तुरुंगात मरू द्यावे. तथापि आता गव्हर्नर लम्ले यांनी व्हाइसरॉयला लिहिले, " उपवासात गांधी मरण पावल्यास देशात त्यामुळे भयंकर हिंसक प्रतिक्रिया निर्माण होईल. परिस्थिती काबूत आणण्यासाठी अधिक जास्त लष्कर तैनात करावे लागेल." **" Here, Gandhi is a religion to very large numbers of people, and ordinary standards of logic and reason cannot be applied, where he is concerned, without grave risk."**[१०]

ब्रिटिशांवरील रागाने मुंबई शहर पेटले. सर्व बाजारपेठा, शेअर बाजार, कापसाचा व कापडाचा व्यापार बंद पडला. सर्व गिरण्या, कारखाने व शाळा-महाविद्यालये पूर्णपणे बंद पडली. व्यापारी पेठा उघडल्यावरही कित्येक दिवस व्यवहार झाले नाहीत. उपवासकाळात अनेकदा हरताळ झाले. लाखो काँग्रेसजनांनीदेखील उपोषण केले. 'पुण्यातील त्या आत्मयज्ञाचे' मुंबईतील शेकडो वस्त्यांमध्ये अनुकरण करण्यात आले. राज्यातील दुष्काळग्रस्तांना मदत म्हणून प्रचंड निधी उभारण्यात आला. उपोषण काळात **फ्री प्रेस जर्नल, बाँबे सेंटिनेल वगैरे** पत्रकांनी सरकारवर खरमरीत टीका करून वाभाडे काढले. ''[११]

सरकारची अपेक्षा होती की, मुसलमान, पारसी व ख्रिस्ती लोक उपवासाचा उपहास करतील. तथापि त्यांनी सरकारची निराशा केली आणि गांधीजींच्या प्राणासाठी प्रार्थना केल्या. स्वतः लम्ले साहेबांनी कबूल केले, गांधी यांनी उपवास करून लोकांचा अधिकच प्रेमादर पुन्हा मिळवला, हिंदू समाजाप्रमाणे इतरांनाही गांधींचे माहात्म्य पटले. **एच. व्ही. आर. अय्यंगार वरिष्ठ गृह सचिव असूनही त्यांनी स्पष्ट कबुली दिली, " सरकारचा काँग्रेस रिस्पाँसिबिलिटी स्टंट अगदी फसला."** लिनलिथगोंच्या निषेधाची लाट पसरली. देशात ठिकठिकाणी त्यांच्या प्रतिमांचे दहन केले. गांधींना मुक्त करण्याची मागणी देशातूनच नव्हे तर विवेकबुद्धी जागृत असलेल्या परदेशांमधूनही करण्यात आली. केंद्रीय मंत्रिमंडळातील होमी मोदी, माधव श्रीहरी अणे व एन. आर. सरकार यांचीही सद्विवेकबुद्धी जागृत झाली व त्यांनी राजीनामे दिले. तथापि डॉ. आंबेडकरांनी राजीनामा दिला नाही. म्हणून त्यांच्यावर धारदार टीका झाली होती.

महाराष्ट्र, मध्यप्रदेश, बंगाल, संयुक्त प्रांत, दिल्ली, बिहार व गुजरातमधील राजबंद्यांनी प्राणांतिक उपोषण केल्यामुळे त्यांना पोलिसांनी सक्तीने अन्न भरवले. त्यावेळच्या जनमानसाचे स्वतः मुंबई सरकारने पुढीलप्रमाणे वर्णन केले, " ७३ वर्षांचा विरक्त तपस्वी अफाट सामर्थ्य असलेल्या आपल्या राजकीय विरोधकांशी चाललेल्या लढाईत मृत्युशय्येवर पडलेला पाहून, सर्वसाधारण जनतेच्या मनात त्यांच्याविषयी सहानुभूती निर्माण होणे अपरिहार्य आहे."

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रूझवेल्ट यांचे भारतातील नवनियुक्त प्रतिनिधी विल्यम फिलिप्स गांधीजींना भेटू इच्छित होते. पण लिनलिथगोने त्यांना उद्दामपणे परवानगी नाकारली. इतकेच नव्हे तर या व्हाइसरॉयने फिलिप्स यांना सांगितले, " गांधी मेले तरी देशाचे फार मोठे नुकसान होईल असे मुळीच नाही." व्हाइसरॉयची ही माणुसकी!

उपवासाच्या सहाव्या दिवसापासून गांधीजींची प्रकृती ढासळल्यामुळे सरकारने त्यांच्या देहाचे दहन करण्यासाठी कारागृहातच चंदनाची लाकडे आणून ठेवली. मिलिटरीला सज्ज राहण्याचे आदेश दिले. पुण्याचे टेलिफोन दळणवळण बंद ठेवण्याचेही ठरलेले होते. गांधीजींच्या मृत्यूच्या सरकारी बातमीचा मसुदाही तयार ठेवण्यात आला होता.

तथापि आत्मबळाच्या जोरावर महात्मा गांधी २१ दिवसांच्या दिव्यातून यशस्वीपणे बाहेर पडले. त्यामुळे नीच चर्चिल व लिनलिथगो अत्यंत निराश झाले. " द ओल्ड मॅन हॅज डिसीव्हड अस, " असा त्यांचा जळफळाट झाला!

मुंबईचे गव्हर्नर रॉजर लम्ले आणि अतिरिक्त गृह सचिव अय्यंगार हे मात्र वस्तुनिष्ठ विचार करण्याची क्षमता बाळगून होते. वस्तुस्थितीचे भान आल्यावर त्यांनी उपोषणाच्या नाट्यमय परिणामांची कबुली फायलीत नोंदविली. प्रारंभीच्या शंका व संभ्रमानंतर गांधीजींच्या उपोषणाची कारणे व तर्कशास्त्र यावरील मतप्रदर्शन बंद झाले, असे त्यांनी दिल्लीस कळविले. सरकारच्या त्या चोपड्याचा सर्वत्र उपहास करण्यात आला. मुंबईतील विचारशील सरकारी वर्तुळात तेव्हा वेगळाच विचार प्रसारित झाला—भांडवलशाही व साम्यवाद आणि दहशतवादी व घटनात्मक पद्धतीने लढा करणारे अशा गटांमध्ये समतोल साधण्याची क्षमता केवळ महात्माजींकडेच आहे. उपोषणात ते मरण पावल्यास अशा परस्परविरोधी गटांना आवर घालण्याची व त्यांच्यात समन्वय साधण्याची शक्ती कायमची नष्ट होईल, असा अभिप्राय मुंबई सरकारने दिल्लीला कळविला.[१२]

तेव्हाच्या आय.सी.एस. प्रवर्गात आम्हास अगदी अपवादाने समंजसपणा आढळला फक्त एच.व्ही.आर. अय्यंगार साहेबांमध्ये! त्यांनी दिल्लीश्वरांना फेब्रुवारी १९४४ मध्ये फटकारले होते, " The crusty official advisers in New Delhi with the approval of the malignant Mr. Amery in White Hall caused a certain amount of bitterness."[१३]

खरे तर गांधीजींचे उपोषण काँग्रेसजनांना सक्त ताकीद देण्याकरिताही होते. महात्मा राष्ट्रव्यापी आंदोलनात शिथिलता येऊ देण्यास तयार नव्हता. स्वातंत्र्यासाठी अतिरिक्त बलिदान देण्याची गरज असल्याचे त्यांनी लोकांना स्मरण करून दिले. भारताची समस्या जागतिक राजकीय पटलावर व जगाच्या सदसद्विवेक बुद्धीसमोर मांडावयाची होती. भारताचे स्वातंत्र्य केवळ या देशासाठी नसून सर्वच शोषित व वंचित देशांसाठी आहे, हा विचार त्यांना प्रसारित करावयाचा होता. बी.पी.सी.सी. ने असाच प्रचार केला.

गांधीजींच्या उपोषणाचे उद्दिष्ट साध्य झाले होते. त्यामुळे जनतेचे मनोधैर्य उंचावले. ब्रिटिशविरोधी भावना अधिक तीव्र झाली. रस्त्यावरची निदर्शने घटली तरी राजद्रोह लोकमानसात खोल जाऊन बसला. राजकीय कारवाया भूमिगत झाल्या. आंदोलनातील ही अवस्था पोलिसांना अधिक बिकट वाटू लागली. सरकारला कोर्टात साक्षीपुरावे मिळेनासे झाले. महाराष्ट्रात हजारो राजबंद्यांनी कारावासात सत्याग्रह केला.

गांधींच्या उपोषणाने सरकारचा अरेरावीपणा सर्व जगापुढे उघडा पाडला. १९४२ चा विद्रोह दडपण्यासाठी ब्रिटिशांना आगामी काळात पाशवी बळाचा उपयोग कमी करावा लागला. बर्नार्ड शॉ, बर्ट्रांड रसेल, हेराल्ड लास्की यांसारख्या ब्रिटिश विचारवंतांनी गांधीजींच्या विनाअट सुटकेची जोरदार मागणी केली होती.

६ एप्रिल १९४३ पर्यंत ४,७८९ मुंबईकरांना अटक करण्यात आली. उपरोक्त मूषक महलाचा पाडाव झाला (१८ एप्रिल). कर्नाटकचे डी. पी. करमरकर व आर. एस. हुकेरीकर मुंबईतच पकडले गेले. केशव शामराव तळपदे व हरीभाऊ कामथांचा फॉरवर्ड ब्लॉक जून १९४३ मध्येही भूमिगत लढा करीतच असल्याचे गुप्तचरांचे अहवाल आहेत. एका बाजूने लढा दडपून टाकला अशी सरकार बढाई मारत असताना, सरकार मंगलदास पक्वासासारख्या सौम्य नागरिकांनाही बंधमुक्त करण्यास धजत नव्हते. इंग्लंड-अमेरिकेत कठोर टीका होऊनही सरकारने कोणताच वटहुकूम रद्द केला नाही. अल्पकालीन व्यत्यय सोडता **बॉम्बे काँग्रेस बुलेटिन** नित्यनियमाने छापून वितरित होत असे. याबाबतचे पोलिसांचे प्रयत्न यशस्वी होत नसत.

## ऑगस्ट क्रांतीचा पहिला वर्धापन दिन

९ ऑगस्ट १९४३ रोजी ऑगस्ट क्रांतीचा पहिला वर्धापन दिन साजरा करण्याच्या योजना आखण्यात आल्या. मध्यममार्गी व जहालांच्या योजनांमध्ये थोडा फरक होताच. या दिवशी सर्व प्रांतांमधील एक हजार निवडक काँग्रेसजनांचा भव्य जथा आगाखान भवनावर नेऊन गांधीजींची सुटका करेपर्यंत तिथे धरणे धरण्याचा कार्यक्रम होता. तसेच प्रत्येक शहरात व गावात सरकारी इमारतीवर ताबा मिळविणे, सार्वत्रिक हरताळ व तीन दिवस शाळा-महाविद्यालये बंद पाडण्याचा कार्यक्रम होता. याशिवाय काँग्रेस समाजवाद्यांनी संप, निदर्शने, कारखाने व कार्यालये बंद पाडणे, साबोटाज व पोलीस स्टेशनांवर बाँब फेकण्याच्या योजना बनविल्या.

तथापि गुप्तचरांना याचा आधीच सुगावा लागल्याने बहुतेक सर्व संशयितांना जुलैतच पकडण्यात आले. सरकारने प्रतिबंधक स्थानबद्धता कायदा लागू केला. तरीही ९ ऑगस्ट रोजी कडकडीत हरताळ पाळला व निषेध म्हणून मुंबईकरांनी अनेक बाँबस्फोट केले. सरकारच्या पूर्ण लक्षात आले की, लोकांचा इंग्रजांवरील क्रोध तसूभरही कमी झालेला नाही. गृह सचिव अय्यंगार यांनी गोऱ्या सत्ताधीशांना बजावले की, जनतेचा सरकारवरील राग अजिबात घटलेला नाही, तसेच सरकारबाबत काही गटांना वाटणाऱ्या सहानुभूतीत या वर्षात किंचितही वाढ झालेली नाही. याच सुमारास व्हाइसरॉयने केंद्रीय कायदेमंडळात केलेल्या भाषणावर वर्तमानपत्रांनी प्रखर टीका केली. या सत्ताधीशाने भाषणात गांधीजींचा नामोल्लेखही केला नाही. त्याची उलट प्रतिक्रिया झाल्याशिवाय राहिली नाही. या सर्व प्रकारात अय्यंगार यांनी लॉर्ड अमेरी व विन्स्टन चर्चिल यांच्या उद्दामपणावर सडेतोडपणे उपरोक्त अभिप्राय दिला होता.

पुढील काळात आंदोलनाचा झंझावात कमी झाला हे खरे. पण ब्रिटिशांविरुद्ध कमालीची कटुता निर्माण झाली. चिमणलाल सेटलवाड यांच्यासारखे काँग्रेसचे विरोधकही सरकारविषयीची मनातील कटुता लपवू शकले नाही. अशा वातावरणात काँग्रेसने ऑगस्ट क्रांतीचा पहिला वर्धापन दिन व नंतर २६ जानेवारी १९४४ रोजीचा स्वातंत्र्य दिन यथास्थित पद्धतीने साजरे केले. त्याच दिवशी अच्युतराव व डॉ. लोहियांच्या भाषणांनी काँग्रेस रेडिओ पुन्हा सुरू होऊन बोलू लागला. हजारो

नागरिकांनी जाहीररीत्या स्वातंत्र्याची प्रतिज्ञा घेतली. पुणे व मुंबईला वीज पुरवठा करणारे काही पायलॉन कापून भाई कोतवालांच्या अनुयायांनी त्यांची पहिली पुण्यतिथी साजरी केली. आंदोलन ठेचून काढले असे जगाला सांगत असतानाच, इंग्रजांनी नवीन रिस्ट्रिक्शन अँड डिटेन्शन ऑर्डिनन्स (तीन) १९४४ सालात अमलात आणला व स्वतःकडे अमर्याद शासनाधिकार घेतले.

अगदी प्रारंभापासून मुंबईतील क्रांतिलढा संपूर्ण महाराष्ट्र व विदर्भासाठी पथदर्शी ठरला होता. या भूमीने शक्यतो मुंबईचे अनुकरण केले. मुंबईतून आंदोलनासाठी निधी पुरविण्यात आला. पुरषोत्तम त्रिकमदास यांनी साबोटाज कार्यासाठी एक शॅडो कमिटी निर्माण केली होती. या समितीत डॉ. गिल्डर, डाह्याभाई पटेल, डॉ. मनोहर, सूरजी वल्लभदास, पुरषोत्तम कांजी, हाजी जवर गिलानी होते. लवकरच घातपात कारवायांमध्ये महाराष्ट्रात व विदर्भात गुंतलेल्या विठ्ठल लक्ष्मण कोतवाल, द. का. कुंटे, श्रीधर विनायक दातार, नानासाहेब पुरोहित, गंगाधर गुणाजी माने, रंगराव दिवाकर, आर. एस. हुकेरीकर, डी. पी. करमरकर, कमला चट्टोपाध्याय, मगनलाल बागडी व व्ही. एस. दांडेकर यांचा या संघटनेत समावेश करण्यात आला. सातारा प्रतिसरकारचे आंदोलन देखील सेंट्रल डिरेक्टोरेटच्या मार्गदर्शनानुसार चालत असे.

अभ्यासकांनी लक्षात ठेवावे की, चिमठाणेजवळ लुटलेला नंदुरबारचा सरकारी खजिना किंवा जेजुरीच्या खंडोबाचे दागिने काँग्रेसजनांनी द्रव्यप्राप्तीसाठी लुटले नव्हते. तसेच रामटेकचा सरकारी खजिना, मालवण अथवा कोल्हापूर संस्थानातील भूदरगडचा कोषागार यापैकी कोणत्याही कारवाईत द्रव्यप्राप्ती हे उद्दिष्ट नव्हते. सातारा प्रतिसरकारच्या युवकांनी बिचूद-शेणोली दरम्यान पे-स्पेशल ट्रेन लुटली त्यामागेही आंदोलकांचा पैशापेक्षा ब्रिटिश सत्तेला हादरा देणे हाच उद्देश होता. ब्रिटिश सरकार अस्तित्वात नाही, आणि असले तरी आम्ही ते मानत नाही, हे त्यांना दाखवायचे होते. अराजक माजविणे हा दुसरा उद्देश होता.

भारतातील कलोनिअल अधिकारशाहीचा सर्वाधिक प्रखर प्रतिकार मुंबईनेच केला होता. सारे शहर स्वयंस्फूर्तपणे लढले. या शहरावर पोलीस व दोस्त राष्ट्रांच्या मिलिटरीचे भरभक्कम कवच असूनही आम जनता उग्र विद्रोह करून उठली होती. पहिले आठ दिवस या नगरावर जणू राजसत्ता उरली नव्हती. मुंबईतील उपरोक्त सेंट्रल डिरेक्टोरेटने अखिल भारतातील आंदोलनाचे सूत्रसंचालन करून लढा दीर्घ काळ चालू ठेवला. अन्यथा निर्नायकी होऊन आंदोलन तीन महिन्यात थंडावले असते. दिशानिदेशन आणि वित्तबळाच्या अभावी लढा दिशाहीन होऊन हिंसाचार झाला असता. सूत्रसंचालन करणाऱ्या हंगामी एआयसीसीचे मुख्यालय १९४४ पर्यंत मुंबईत कार्यरत राहिले. भूमिगतांनी जमवलेला स्फोटक रसायनांचा प्रचंड साठा गुप्तचरांना नंतर येथेच आढळला. डॉ. लोहिया, अरुणा असफ अली, पटवर्धन, अण्णासाहेब सहस्रबुद्धे, सादिक अली, साने गुरुजी, सुचेता कृपलानी, मगनलाल बागडी वगैरे भूमिगत नेते मुंबईत राहून लढा चालवित. येथूनच आंदोलनासाठी जास्त पैसा मिळाला. देशातील सर्वाधिक बॉंबस्फोट इथेच झाले, पण सार्वजनिक मालमत्तेची हानी कमी झाली. मुंबईत तीन प्रावस्थांमध्ये चालविलेल्या भूमिगत कॉंग्रेस रेडियोला तोड नव्हती. अशा अनेक बाबतीत मुंबईचे योगदान अतुलनीय होते. मुंबईतील पोलिसांपासून **गव्हर्नर रॉजर लम्ले यांच्यापर्यंत सरकारी माणसांचे मत होते की, महात्मा गांधी हेच छोडो भारतचे जनक असले, तरी आंदोलनास जे प्रत्यक्ष स्वरूप आले त्याचे निर्माते युसुफ मेहेरअली आणि सरदार पटेल होते.**

## सातारा प्रतिसरकार

स्वातंत्र्य आंदोलनाच्या इतिहासात मुंबईनंतर सातारा प्रतिसरकारनेही महाराष्ट्राला मानाचे स्थान मिळवून दिले. नाना पाटील यांची भारतातील गनिमी क्रांतिकारक तंत्राच्या प्रमुख शिल्पकारांत गणना करता येते. आम जनतेचा हा लढा १९४५ च्या अगदी अंतापर्यंत चालू राहिला. बंगालमधील मिदनापूर जिल्ह्यातील तामलूकचे 'जातीय' (Jatiy)" म्हणजे राष्ट्रीय सरकार हे स्वतःची सेना, पोलीस दल, शासन

यंत्रणा व न्यायालये असलेले परिपूर्ण सरकार अडीच वर्षे टिकले हे सत्य! पण त्यानजीकचे कौंताई सरकार सुसंघटित नसून अल्पजीवी ठरले. संयुक्त प्रांतातील चितू पांडे यांच्या बलिया सरकारने मात्र संपूर्ण जिल्हाभर महसूल व पोलीस यंत्रणा आपल्या ताब्यात घेतली होती. पांडेंचा प्रभाव जबरदस्त होता. मात्र बलिया प्रतिसरकार अल्पजीवी ठरले. संयुक्त प्रांत व बिहारमध्ये अशी अनेक समांतर सरकारे स्थापन झाली होती. पण त्यांचा टिकाव फार काळ लागला नाही. पलामू, आझमगड, गाझिपूर व बिहारमध्ये अनेक ठिकाणी ग्रामराज्य यंत्रणा स्थापन झाल्या. मात्र त्यांचा फार दिवस टिकाव लागला नाही.

तथापि सातारा प्रतिसरकारच्या नेत्यांनी संपूर्ण जिल्हाभर शासनयंत्रणा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न न करता अनुकूल अशा क्षेत्रातील काही गावांत ग्रामराज्ये निर्माण केली. सार्वजनिक व्यवस्था व रक्षण आणि न्यायदान अशा कामांवर त्यांनी लक्ष केंद्रित केले. खरे तर सातारा प्रतिसरकार म्हणजे 'स्वायत्त ग्रामसरकारचे संघराज्य' होते. जनता त्यास 'काँग्रेस सरकारच' म्हणत असे. म्हणूनच ही यंत्रणा प्रदीर्घ काळ कार्यरत राहू शकली. या यंत्रणेत ग्रामीण जनतेचा सहभाग होता. जनतेला दडपशाही व आर्थिक शोषणातून मुक्ती मिळण्याची शक्यता दिसल्यामुळे या प्रतिसरकारला बऱ्यापैकी प्रतिसाद मिळाला, असे दिसते. कराड, वाळवा, खानापूर व तासगाव या तालुक्यांमधील सुमारे ६०० गावांत प्रामुख्याने प्रतिसरकार होते. भूमिगत क्रांतिकारकांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक कार्यकर्तेच दैनिक कारभार चालवत असत. ब्रिटिश सरकारने नेमलेले पाटील, तलाठी, सरपंच कामावर असले, तरी ते नामधारी होते. गावाचे सर्व प्रशासन लोकनियुक्त पंचांची समितीच करीत असे.

प्रारंभीच नमूद करायला हवे की, इंग्रज सत्ताधीश व राजनिष्ठ भारतीयांना 'प्रतिसरकार' ही संज्ञा अवमानकारक वाटत होती. म्हणूनच त्यांनी सातारा-सांगलीतील समांतर सरकारला 'पत्रीसरकार' ही बदनामीकारक संज्ञा वापरली होती.

मात्र अनेक साहसी घटनांमुळे गाजलेल्या साताऱ्यातील विद्रोहाचा प्रारंभ अकस्मात झालेल्या विस्फोटासारखा झाला नाही. प्रारंभीचे आंदोलन निदर्शने, सभा,

मोर्चे व मिरवणुकांच्या स्वरूपात सुरू झाले. शंकरराव देवांच्या मार्गदर्शनानुसार जिल्हा काँग्रेस समिती पूर्वतयारी करीत होती. आम जनतेमध्ये लोकप्रिय असलेले नाना पाटील मुंबईतील काँग्रेस अधिवेशनासाठी न जाता जिल्ह्यातच संघटन कार्यात व्यग्र राहिले होते. सविनय कायदेभंगापासून आंदोलनात सक्रिय राहिलेले नाना पाटील समाजवादी विचारसरणीचे निःस्पृह वारकरी होती. महाराष्ट्रातील काँग्रेस किंवा समाजवादी नेत्यांमध्ये शहरवासीयांचा जास्त भरणा होता. मात्र सातारा प्रतिसरकारचे बहुतेक नेते ग्रामीण परिसरातील होते. तेही त्यांच्या लोकप्रियतेचे एक कारण होते.

सातारा जिल्ह्यातील नेत्यांनी प्रथम विलक्षण संयम राखून चळवळ अतिशय शिस्तीने आणि नियोजनपूर्ण पद्धतीने चालू केली. पहिल्या पाच-सहा दिवसांतच सर्व अकरा तालुक्यांतील १५१ गावांमध्ये मोठमोठ्या सभा भरवण्यात आल्या. प्रत्येक सभेत आपण स्वतंत्र झालो, असे जनतेने जाहीर केले. चावड्यांवर तिरंगा ध्वज फडकविण्यात आला. कराड तालुक्यात जंगल सत्याग्रह झाला. शिराळा पेट्यातील ६० पाटलांनी पाटीलकीचा त्याग केला. प्रारंभी पोलिसांनी कोठेही आंदोलकांशी संघर्ष केला नाही. काही ठिकाणी जहाल भाषणे करणाऱ्यांना अटक करण्यात आली. तथापि पोलीस सभा-मिरवणुकांना आक्षेप घेत नसत. त्यांनी अनेक सभांचे अहवाल वरिष्ठांना पाठविलेच नव्हते. महायुद्ध काळात या प्रदेशातून फार मोठ्या प्रमाणात लष्कर-भरती होत असल्यामुळे प्रारंभी येथे सरकारने आक्रमक भूमिका घेतली नाही, हे विशेष होय.

ऑगस्ट ठरावानुसार किर्लोस्करवाडीच्या कारखान्यात नाना पाटलांनी संप घडवून आणला होता. चळवळीचा कार्यक्रम म्हणून मामलेदार कार्यालयांवर प्रचंड जनसमुदायाचे मोर्चे आयोजित करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार २४ ऑगस्ट १९४२ रोजी कराडच्या तालुका कार्यालयावर पहिला मोर्चा बाळकू अण्णा पाटील उंडाळकर, काशीनाथ राजाराम देशमुख, ल. ग. कुलकर्णी *ऊर्फ* कासेगावकर वैद्य, यशवंतराव चव्हाण इत्यादींनी नेला. म्हणून मामलेदाराने कचेरीचे काम थांबविले. त्यानंतर पाटणलाही असाच मोर्चा काढण्यात आला. मात्र जिल्ह्यातील पहिली मोठी घटना तासगावचा मोर्चा ही होय (३ सप्टेंबर १९४२).

नाना पाटील यांनीच नियोजन केलेल्या या पाच-सहा हजार शेतकऱ्यांच्या मोर्चाचे नेतृत्व त्यांनी स्वतःकडे न घेता कृष्णा रामा कुऱ्हाडे, वि. स. पागे, गोविंद खोत, डॉ. सोहोनी यांच्याकडे सोपविले. मामलेदार कार्यालयावर चाल करून गेलेल्या या मोर्चाचा मुकाबला करण्यासाठी मामलेदाराकडे ३३ सशस्त्र व नऊ लाठीधारी पोलिसांची तुकडी होती. तथापि मोर्चाची धडक इतकी जोरदार होती की, मामलेदारास मोर्चाचा प्रतिकार करणे शक्य झाले नाही. इतकेच नव्हे तर मामलेदाराने आपल्या कार्यालयाचा मुख्य दरवाजा उघडून कार्यालयावर काँग्रेसचा राष्ट्रध्वज फडकवून झेंडावंदन करू दिले. मामलेदाराने पुढाऱ्यांसमवेत राष्ट्रीय घोषणा दिल्या. तसेच तत्पूर्वीच अटक करण्यात आलेल्या स्वातंत्र्यसैनिकांना अटककोठडीत भेटण्यासाठी पुढाऱ्यांना परवानगीदेखील दिली. तासगाव तालुका न्यायाधीशालाही मोर्चाच्या नेत्यांनी खादी टोपी परिधान करावयास व राष्ट्रीय घोषणा देण्यास भाग पाडले. राजीनामा देण्याचेही न्यायाधीशाने आश्वासन दिले. शासकीय अधिकाऱ्यांनी काँग्रेसच्या मोर्चापुढे पत्करलेल्या अशा शरणागतीने मुंबई इलाख्याचे प्रशासन फारच अस्वस्थ झाले होते.[१४]

दक्षिण विभागाच्या आयुक्ताने नमूद केले की, सांप्रत स्वातंत्र्य आंदोलनाचे पुढारी शाळा व महाविद्यालयीन युवकांना अग्रभागी ठेवून मोर्चे व निरोधने आयोजित करतात.

कराड, पाटण व तासगावच्या जनमोर्चांना जनजागृतीच्या दृष्टीने फार महत्त्व होते. मामलेदार व तालुका न्यायाधीशांसारखे इंग्रज सरकारचे अधिकारी जनआंदोलनापुढे नमते घेत असल्याने लोकांचा उत्साह वाढला. तथापि अधिकाऱ्यांच्या या शरणागतीने शासन अस्वस्थ झाले. सर्व तालुके वेढत वेढत सातारा जिंकण्याची नाना पाटलांची योजना होती. ती रोखण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षकाने प्रत्येक तालुक्याच्या अधिकाऱ्यांना सक्त ताकीद देऊन, कोणत्याही परिस्थितीत तासगावची पुनरावृत्ती होता कामा नये असा हुकूम दिला. अशाही परिस्थितीत इस्लामपूरला मोठा मोर्चा आयोजित करण्यासाठी नाना पाटलांनी आपल्या सहकाऱ्यांना संघटित केले. पूर्व भागातील स्वातंत्र्यसैनिक गोविंदराव खोत यांच्या नेतृत्वाखाली, तर पश्चिम भागातील आंदोलक पांडुरंग गोविंद पाटील ऊर्फ पांडू मास्तर यांच्या

नेतृत्वाखाली आणून इस्लामपूर मामलेदार कार्यालयावर ८ सप्टेंबर १९४२ रोजी प्रचंड मोर्चा नेण्याची नानांची योजना होती.

त्यानुसार पांडुरंग पाटलांचे पथक इस्लामपूरला आधी येऊन त्यांनी मैदानावर सभेला प्रारंभ करताच जिल्हा पोलीस अधीक्षकाच्या आदेशानुसार पोलिसांनी जोरदार लाठीहल्ला केला. अल्पावधीत गोविंदराव खोतांचा मोर्चा येताच पोलिसांनी गोळीबारास सुरुवात केली. यात किर्लोस्करवाडीचे पंड्या इंजिनीअर व कामेरीचे बारबटे धारातीर्थी पडले. या आंदोलनात अप्पासाहेब लाड, नाथाजी लाड, जी. डी. लाड, भगवान पाटील इत्यादीदेखील होते. याचदिवशी वडूजमधील खटावच्या मामलेदार कार्यालयावरदेखील निःशस्त्र मोर्चा नेण्यात आला. औंध, खटाव भागातील शेतकऱ्यांना संघटित करून गौरीहर सिंहासने यांनी परशुराम घार्गे (घाडगे) यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांचा मोर्चा काढला. या जनसमुदायावरही पोलिसांनी अमानुष गोळीबार करून परशुराम घार्गे व त्यांच्या सात सहकाऱ्यांनठार केले.

वडूज व इस्लामपूरच्या मोर्चांनी स्वातंत्र्य आंदोलकांना चांगलाच धडा मिळाला. यावेळी सातारा भूमिगत चळवळीचे डिक्टेटर यशवंतराव चव्हाण होते. गोळीबारामुळे निःशस्त्र मोर्चे व सत्याग्रही स्वरूपाचा लढा थांबविण्याचा विचार पुढे आला. दोन्ही मोर्चांचा नाना पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी अभ्यास करून जिल्ह्यातील चळवळीची दिशा बदलण्याचा विचार केला. अहिंसक मार्गाने आंदोलन चालू ठेवणे अशक्य झाल्याने विचारविनिमय करण्यासाठी नाना पाटील यांनी सप्टेंबरच्या अखेरीस कुंडल गावी काही प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक घेतली. सर्वांनी भूमिगत राहूनच कार्य चालू ठेवण्याचा या बैठकीत निर्णय झाला.

सातारा जिल्ह्यातील छोडो भारत आंदोलनात औंध संस्थान व पंतप्रतिनिधींचे राजपुत्र अप्पासाहेब पंत यांचा सहभाग रणनीतीच्या दृष्टीने फार महत्त्वाचा होता. अप्पासाहेबांचा राष्ट्रवादी दृष्टिकोण व प्रजाजनांना स्वराज्य देण्याची तत्परता यामुळे हे संस्थान स्वातंत्र्य आंदोलकांना आपले आश्रयस्थान वाटे. सातारा जिल्हा पोलीस व इंग्रज सेनादल आंदोलकांमागे अविरत ससेमिरा लावून दडपशाही करीत असल्याने त्यांना औंधमध्ये आश्रय देणे क्रमप्राप्त होते. मुंबई इलाख्याचे शासन

तसेच केंद्र सरकारला दाट संशय होता की, अप्पासाहेब पंत स्वातंत्र्य आंदोलनास उत्तेजन देतात. याबाबत मुंबईच्या गव्हर्नरने केंद्र सरकारकडे कडक शब्दांत तक्रारदेखील केली होती. सदर प्रकरणी चौकशी करण्यास्तव कोल्हापूरच्या रेसिडेंटला तार पाठविण्यात आली होती. सातारा जिल्ह्यातील भूमिगत आंदोलक आपला एक तळ म्हणून औंध संस्थानचा उपयोग करीत असल्याची मुंबईच्या गव्हर्नरला माहिती होती. संस्थानाच्या सीमा भागात घातपाती कारवाया होत. शिवाय जखमी झालेले व अटक करण्यात आलेले बरेच आंदोलक संस्थानातील प्रजाजन होते. औंध संस्थानात काँग्रेसच्या सभा आणि बैठका राजरोसपणे होत. संस्थानाचे पोलीस मुंबई शासनाच्या पोलिसांशी किंवा अधिकाऱ्यांशी असहकार करून त्यांना उडवाउडवीची उत्तरे देत. **संस्थानी राजवट म्हणजे जणू काय काँग्रेसचीच राजवट असून, जोपर्यंत ही राजवट आहे, तोपर्यंत साताऱ्यामध्ये शांतता प्रस्थापित होणे असंभवनीय असल्याचे गव्हर्नर रॉजर लम्ले यांस वाटत होते.** म्हणून ते औंधविरुद्ध कडक कारवाई करण्याची केंद्र सरकारकडे मागणी करीत होते.

याबाबत कोल्हापूरच्या रेसिडेंटने केवळ सारवासारव केल्याबद्दल केंद्र सरकारने आक्षेप घेऊन त्याला पुढील उपाययोजना ताबडतोब करण्यास फर्माविले. तसेच अप्पासाहेब पंतांना दिवाण पदावरून तात्काळ पदच्युत करण्यास तसेच संस्थानातून सीमापार करण्याचाही आग्रह धरण्यास सांगितले. तथापि अप्पासाहेब पंतांचे कोणी काहीच वाकडे करू शकला नाही.

सातारा जिल्ह्यातील लढा सुसंघटितपणे चालविण्यासाठी कार्यकर्त्यांचे पुढीलप्रमाणे पाच प्रमुख गट पाडले होते :– कुंडल गट, शिराळा आणि वाळवा (पश्चिम भाग) गट, कराड गट, उत्तरेचा गट आणि सांगली गट. यापैकी कुंडल गटाचे नेतेपद नाना पाटील यांच्याकडे असून त्यांच्या गटात जी. डी. लाड, अप्पासाहेब लाड, नागनाथ रामचंद्र नायकवडी, नाथाजी लाड, भगवानराव मोरे, धुळ्याचे डॉ. उत्तमराव पाटील व लीलाताई पाटील इत्यादी होते. स्वातंत्र्य सैनिकांची फार मोठी संख्या असलेल्या या गटाचे कार्यक्षेत्र तासगाव व खानापूर तालुके तसेच वाळवा तालुक्यातील काही भागात होते. शिराळा पेटा व वाळवा (पश्चिम भाग) गटात मारुती विष्णू कुलकर्णी

ऊर्फ बाबुराव चरणकर, दादा अप्पाजी ऊर्फ बर्डे मास्तर, बाबुराव पाटणकर इत्यादी व्यक्ती होत्या. कराड व सभोवतीच्या परिसरात कार्यरत असलेल्या गटाचे नेतृत्व प्रथम यशवंतराव बळवंत चव्हाण यांनी केले. आणि त्यांना अटक झाल्यावर ल. ग. कुलकर्णी ऊर्फ कासेगावकर वैद्य आणि माधवराव जाधव यांनी केले. उत्तरेच्या गटाचे नेतृत्व किसन वीर, पांडुरंग बोराटे, बापूराव कचरे, बाबुराव बाळासाहेब घोरपडे, अप्पासाहेब पंत यांच्याकडे होते. सांगली परिसरात कार्यरत असलेल्या सांगली गटाचे पुढारी वसंतराव बंडू पाटील ऊर्फ वसंतदादा होते. याशिवाय काशिनाथ देशमुख, स्वामी रामानंद भारती, भूपाल कत्ते, अमनापूर इत्यादी गट कार्यरत होते. गटांची ही यादी परिपूर्ण नाही. शिवाय गटांची विभागणीदेखील काटेकोर नव्हती. उपरोक्त मुख्य गटांमधून लहान उपगट अस्तित्वात येत असत. काही आंदोलक एकापेक्षा जास्त गटांशी संबंध ठेवीत. ही सर्व चळवळ भूमिगत असल्याने त्याबद्दल दस्तऐवजी पुरावा उपलब्ध नाही.[१५]

इतके मात्र सत्य की, नाना पाटलांची आंदोलनातील १९३० पासूनची बांधीलकी व त्याग यामुळे त्यांना दक्षिण महाराष्ट्रातील भूमिगत आंदोलनाचे स्फूर्तिस्थान मानण्यात आले होते.

दरम्यानच्या काळात परशुराम घार्गे, उमाशंकर पंड्या, विष्णू खंडू बारबट्टे वगैरे हुतात्मा झाले होते. किसन वीर पकडले गेले (१८ सप्टेंबर १९४२). परंतु येरवडा कारागृहातून ते आणि पांडू मास्तर, सोलापूरचे छन्नूसिंग चंदेले व मल्लिकार्जुन विभूते व पुण्याचे बलदेव प्रसाद हे सर्व निसटले. डिक्टेटर असलेले यशवंतराव कार्यकर्त्यांशी चर्चा करीतच होते. ऑक्टोबरच्या उत्तरार्धात हिंसाचारात वाढ झाली. आक्रमक झालेल्या औंध संस्थानातील २०० सशस्त्र स्वातंत्र्य सैनिकांनी नाना पाटलांच्या मार्गदर्शनाखाली सावळजची पोलीस चौकी ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. या लढाईत एका जणास वीरमरण आले. तथापि या कारवाईत काही गावकऱ्यांनी पोलिसांना मदत दिली हे दिसून आले.

या कारवाईनंतर काही दिवसांनी वाईचे न्यायालय व मल्हारपेठचा डाक बंगला जाळण्यात आला. नोव्हेंबरात रेल्वेवर घातपात करण्यावर जोर देण्यात आला.

ऑक्टोबरपासून डिसेंबर १९४२ पावेतो बरेच घातपात झाले. त्या घातपातांमध्ये चार शाळा, नऊ डाक बंगले, दोन चावड्या व सहा रेल्वे स्टेशन आणि ७७ ठिकाणचे टेलिग्राफ व टेलिफोनचे खांब उद्ध्वस्त झाले. अथवा पाडण्यात आले. याच काळात कुंडलची बँक लुटली. अंकलीचे पॉवर हाऊस उडविण्याचा प्रयत्न झाला. तीन मालगाड्या व पेट्रोलची एक गाडी पाडण्यात आली. किर्लोस्करवाडी व भिलवडीदरम्यानही मालगाडी पाडण्यात आली. या घातपातांमुळे पुणे-बंगळुर या मार्गावरील रेल्वे दळणवळण एक महिना जवळपास बंद पडले होते. स्वातंत्र्य सैनिकांनी पोलिसांच्या बंदुका व काडतुसे हिसकून घेतली.

गंमत अशी की, घातपात व विध्वंसनाचे आंदोलन चालू असतानाच भूमिगत नेते गावोगावी जंगी जाहीर सभा घेत असत. भूमिगत असतानाही ते हिंडू फिरू शकत. विवाह समारंभांना ते हजर राहत.

या संक्षिप्त इतिहासात प्रतिसरकारच्या सर्व कारवायांचे विवेचन करणे शक्य नाही. इतके मात्र नमूद केले पाहिजे की, पहिले डिक्टेटर यशवंतराव चव्हाण मुंबई व पुण्यात अच्युतराव, एस. एम. जोशी वगैरे नेत्यांशी चर्चा करून सहकाऱ्यांना सूचना देत असत. डिसेंबर १९४२ पासून यशवंतराव व त्यांचे काही मित्र पुण्यातच होते. फेब्रुवारी १९४३ मध्ये महात्मा गांधी कारागृहात २१ दिवस उपोषण करीत असतानाही, यशवंतराव पुण्यातच होते. मुंबई-पुणे अशी भूमिगत भ्रमंती केल्यावर यशवंतराव आपल्या आजारी पत्नी वेणूताईंना भेटण्यासाठी फलटणला गेले. तिथे ते १७ मे १९४३ रोजी पकडले गेले. एक आक्षेपार्ह भाषण केल्याचा त्यांच्यावर आरोप ठेवून त्यांना सरकारने सहा महिन्यांची शिक्षा दिली. ती भोगल्यावर एक महिन्यानंतर त्यांच्यावर डी.आय.आर. खाली खटला भरून त्यांना १९४५ पर्यंत येरवड्यात डांबून ठेवण्यात आले होते.

**प्रतिसरकार स्थापन :—**यशवंतराव पहिल्यांदा अटकेत असताना १ जून १९४३ रोजी कामेरीजवळच्या शेतात किसन वीरांनी एक बैठक बोलावली होती. या बैठकीत 'प्रतिसरकार' स्थापन करण्याचा निर्णय झाला. तसेच या बैठकीतच शांताराम इनामदार यांनी परममित्र यशवंतरावांचा महत्त्वाचा निरोप सांगितला. तो

असा की, 'भूमिगतांनी आंदोलनाचे काम थांबवून सर्वांनी पोलिसांच्या स्वाधीन व्हावे.' चव्हाणांची भूमिका अशी होती की, घातपातांमुळे लोकांना सामूहिक दंडाची शिक्षा भोगावी लागते. भूमिगतांचा ठावठिकाणा कळावा म्हणून पोलीस कुटुंबीयांचा छळ करतात, वगैरे. तथापि यशवंतरावांची अशी शरणागतीची व पलायनवादी भूमिका जहाल क्रांतिकारक नाना पाटील, बर्डे मास्तर, बापूसाहेब लाड, नागनाथ नायकवडी, वसंत बंडू पाटील ऊर्फ वसंतदादा यांना मुळीच मान्य नव्हती. त्यानंतर केंद्रीय सूत्रसंचालक अच्युतरावांना कोणीतरी दिलेल्या चुकीच्या माहितीबाबत खुलासा करण्यासाठी बर्डे मास्तर व जोशीकाकांना मुंबईस पाठविण्यात आले. आंदोलन थांबविण्याचा यशवंतराव चव्हाणांचा सल्ला एक-दोन अपवाद वगळता कोणालाच मान्य नव्हता. त्यामुळे नेत्यांमध्ये फार मोठे रण माजले होते. **अच्युतराव पटवर्धनांना चव्हाणांचा पलायनवादी युक्तिवाद मान्य नव्हता, अशी नेत्यांनी मुंबईला जाऊन खात्री करून घेतली.[१६] सातारा प्रतिसरकार कार्यरत झाले. त्यात यशवंतराव नव्हते.**

सातारा व सांगली परिसरातील सर्वच गट तारायंत्र विस्थापित करणे, रेल्वे मार्ग उखडणे, स्टेशनांना आग लावणे, रेल्वेवर दरोडे घालणे, पोस्ट बॅगा लुटणे आणि पोलिसांची हत्यारे हस्तगत करून सरकारी यंत्रणा कमकुवत करण्याचा प्रयत्न करीत. मात्र या कामी नाना पाटलांचा कुंडल गट अग्रेसर होता. १० फेब्रुवारी १९४३ पर्यंत अशी अनेक घातपाती कृत्ये घडवून आणली होती. तथापि महात्मा गांधींनी सरकारी आरोप व सरकारच्या दुष्कर्मांचा निषेध करण्यासाठी २१ दिवसांचे उपोषण सुरू केल्यावर क्रांतिकारकांनी देखील आत्मपरीक्षण केले. नाना पाटील अंतर्मुख झाले. त्यांनी आपल्या कार्याचे समालोचन केले. घातपात व विनाशकारी कारवायांवरील भर कमी करून त्यांनी विधायक कार्य हाती घेण्यास प्रारंभ केला. मुंबईतील सेंट्रल डिरेक्टोरेटनेही असा निर्णय घेऊन सर्व प्रांतिक घटकांना तसा आदेश दिला. मूलतः 'सातारा प्रतिसरकार' स्थापनेमागे नाना पाटलांचीही अशीच भूमिका होती. हे अभ्यासकांनी  लक्षात ठेवावे. गनिमी रणनीतीनुसार शोषक व पीडादायी राजसत्तेशी लढा चालू ठेवावा आणि विधायक लोकोपयोगी कार्य करावे, अशी ही योजना होती. नवीन इतिहासशास्त्राच्या परिभाषेत सातारा प्रतिसरकार हा **'सबाल्टर्न लढा'** होता.

**सांगलीच्या पटवर्धन राजांनी छोडो भारतला फारसा विरोध केला नाही.** एक संस्थानिक या नात्याने त्यांनी इंग्रजांना कमीत कमी सहकार्य दिले. सातारा-सांगलीतील आंदोलन बऱ्याच अंशी एकोप्याने लढले गेले. त्यात वसंतदादांचे योगदान फार मोठे होते. क्रांतिकार्यानंतर पकडले गेलेले दादा हिकमती लढवून सांगली जेलमधून निसटले व पुन्हा कार्यरत झाले. साताऱ्यातील भूमिगतांना या संस्थानातही आश्रय मिळे. सांगलीत तीन-चार गट विशेष सक्रिय होते. विश्रामबाग व नांद्रे स्टेशनांतील कागदपत्रे भस्मसात करण्यात आले. माधवनगर रेल्वे पूल नष्ट करण्यात आला. यासाठी खडकी लष्कर डेपोतील बॉम्ब व स्फोटके वापरलेली होती. संस्थानाच्या हद्दीतील चार रेल्वे स्टेशनांचा विध्वंस करण्यात आला होता. धनिकांच्या घरांवर दरोडे घालून आंदोलनासाठी पैसा उभारण्यात आला. भूमिगतांनी दारूची दुकाने नष्ट केली. ऑगस्ट १९४२ पासून नोव्हेंबर १९४३ पर्यंतच्या काळात सातारा-सांगली भागात दळणवळण व वाहतुकीत १५० घातपात घडून आले. १९४३ सालात आंदोलकांनी अतिशय व्यापक व आक्रमक प्रतिकार केला. चरण गावच्या सरकारी रकमेच्या रक्षणासाठी ठेवलेल्या पोलिसांना आंदोलकांनी निःशस्त्र केले. आणि त्यांचे गणवेश उतरवले. त्यांनी कुपवाड गावच्या शेतसाऱ्याची रक्कम तर हस्तगत केलीच, शिवाय गाव पाटलाच्या दोन बंदुका ताब्यात घेतल्या.

टेलिग्राफ तारा तोडल्यामुळे अनेकदा ही यंत्रणा निकामी होत असे. टपाल लुटीमुळे कित्येक गावांतील डाक कार्यालये निष्क्रिय होत असत. लष्करातील सैनिकांच्या मनीऑर्डरी पोलीस बंदोबस्तात देणे भाग पडे. अनेक गावांची सरकारी दप्तरे सुरक्षेच्या कारणास्तव तालुका मुख्यालयांत न्यावी लागली. सातारा-सांगलीतील विद्रोह इतका सार्वत्रिक व उग्र होता की, दक्षिण कराड, तासगाव, वाळवे, शिराळा व दक्षिण पाटण या परिसरात दर पाच मैलावर बंदोबस्तासाठी पोलीस पथक तैनात करावे लागले होते (१९४३ चा डिसेंबर).[१७]

तालुका कोषागारे व पोलीस चौक्यांवरील चढायांना नाना पाटीलच जबाबदार आहेत, अशी मुंबई सरकारची खात्री झालेली होती. तथापि त्यांना पकडण्यासाठी केलेले सर्वच प्रयत्न आणि बरे-वाईट मार्ग व्यर्थ ठरल्याची कबुली सरकारच्या १९ जानेवारी १९४३ च्या अहवालात आम्हाला आढळली. सरकारने प्रयत्नांची पराकाष्ठा केली होती.

प्रारंभापासूनच प्रतिसरकारचे पुढारी सरकारी कोषागारांवर व डाकघरांवर हल्ले करून आंदोलनासाठी वित्तबळ उभारत असत. मात्र या कामात बऱ्याच अडचणी येत. त्यातून मर्यादित रकमा लाभत. म्हणून जी. डी. लाड व नागनाथ नायकवडी **यांनी रेल्वेची पे स्पेशल ट्रेन लुटण्याची धाडसी योजना नाना पाटलांना बनवली.** ही योजना तात्काळ सर्वसंमत झाली. त्यानुसार ७ जून १९४३ रोजी ५० सशस्त्र स्वातंत्र्यसैनिकांनी पुणे-मिरज रेल्वे मार्गावरील बिचूद व शेणोली रेल्वे स्थानकांदरम्यानच्या खिंडीजवळ लोहमार्गावर मोठमोठे दगड ठेवून रेल्वेची पे स्पेशल गाडी अडविली. अत्यंत धाडसी अशा या आक्रमक कारवाईद्वारे प्रतिसरकारसाठी वीस हजार रुपयांचा मोठा निधी उपलब्ध झाला. ही सर्व कारवाई केवळ २८ मिनिटांच्या आत उरकण्यात आली. मात्र कारवाई उरकण्याच्या घाईमध्ये गाडीतील ७,६३३ रुपये असलेली दुसरी एक पेटी कार्यकर्त्यांच्या लक्षात न आल्याने राहून गेली. या धाडसी हल्ल्याने सरकारी यंत्रणा हादरणे स्वाभाविक होते. हे प्रकरण केंद्र सरकार व लंडनमधील इंग्रज सरकारपर्यंत गेले. या प्रकरणी कित्येक लोकांना पकडण्यात आले. त्यात कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयातील इंटर आर्ट्समधील शंकर बयाजी शिंदे पैलवान या युवकाचाही समावेश होता. या पे स्पेशल प्रकरणाने प्रतिसरकारचा आत्मविश्वास वाढला. हे प्रकरण भारतभर गाजले. मात्र त्याबरोबर पोलिसांचे दडपणही वाढले. या रकमेतून गोव्यात रिव्हॉल्व्हर खरेदी करण्यात आले.

पोलिसांचे खबरे प्रतिसरकारच्या स्वातंत्र्यसैनिकांची माहिती पोलिसांना पुरवित. त्यामुळे अनेकांना शिक्षा भोगावी लागे. अशा एका पोलीस खबऱ्याने एका भूमिगत स्वातंत्र्यसैनिकावर हल्ला केला होता. दुसऱ्या एका भूमिगताला हिवरे गावच्या राजनिष्ठ लोकांनी पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. आणि त्याचे एक सहकारी खाशाबा तथा दादा मारुती शिंदे यांना मारझोड करून ठार केले होते. अशा देशद्रोही लोकांमुळे प्रतिसरकारला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले.

वसंतदादा पाटील अगदी आघाडीचे कार्यकर्ते असून त्यांचा बऱ्याच रेल्वे घातपातांमध्ये सहभाग असल्याची गुप्तचरांना माहिती मिळाली होती. म्हणून त्यांच्या

अटकेसाठी १,००० रुपयांचे बक्षीस लावलेले होते. सांगली शहरातील एका घरात वसंतदादा व त्यांचे चार सहकारी पकडले गेले, तेव्हा (२२ जून १९४३) त्यांचेकडे दोन पिस्तुल, दोन दुर्बिणी आणि काही स्फोटके पोलिसांना मिळाली होती. अल्पावधीतच म्हणजे २४ जुलै १९४३ रोजी वसंतदादांनी आपल्या १३ सहकाऱ्यांसह सांगली मध्यवर्ती कारागृहातून पलायन केले होते. याप्रसंगी वसंतदादा व पोलिसांनी परस्परांवर केलेल्या गोळीबारात ते स्वतः जखमी झाले आणि त्यांचा एक सहकारी हुतात्मा झाला. मात्र नऊ जणांना पोलिसांनी पुन्हा पकडले. अशा धाडसी लढ्यामुळे सरकार शिणले असल्याची अतिरिक्त गृह सचिव एच. व्ही. आर. अय्यंगार यांनी कबुली दिली होती. (वसंतदादांना आपण पुन्हा भेटू).

प्रतिसरकारचे काही कार्यकर्ते पोलिसांचा गणवेष परिधान करून जमीन महसूल व निधी गोळा करीत. ते पोलिसांच्या खबऱ्यांना हैराण करीत. याउलट काही सरकारनिष्ठ लोक व खासकरून पोलीस पाटील भूमिगत सैनिकांची माहिती पोलिसांना पुरवित. म्हणून अशा विरोधकांचा समाचार घेण्यासाठी प्रतिसरकारचे कार्यकर्ते तुरळक हिंसाचार करण्यासाठीही प्रवृत्त होत. ते पोलिसांच्या खबऱ्यांच्या तळपायावर मिठाचे पाणी ओतून व काठीचे आघात करून त्यांना चालणे अशक्य करीत. तळपायावर दंडुका किंवा काठीचे आघात करण्याच्या या क्रियेस पोलिसांनी bastinado करणे असा शब्द वापरला होता. जून १९४३ पासूनच्या प्रत्येक गोपनीय अहवालात हा शब्द वापरलेला आढळतो. शिक्षेचा हा प्रकार पत्री लावणे या नावाने ओळखला जात असे. यावरूनच प्रतिसरकारला बदनाम करण्यासाठी पत्री सरकार हे वाईट नाव दिले असावे! मात्र या संघटनेतील कार्यकर्ते अत्यंत धाडसाने इंग्रज सरकार उखडून टाकण्यासाठी करीत असलेल्या संग्रामाला आम जनतेचा पाठिंबा होता. चळवळीतील लोकांबद्दल जनतेच्या मनात आदर होता.

जनाधारामुळेच जून १९४३ पासून डिसेंबर १९४५ च्या अखेरपर्यंत प्रतिसरकार कार्यरत राहिले. या सरकारने लोकन्यायालये स्थापन केली. शेकडो शेतकऱ्यांचे आपापसातील तंटे व दावे सामोपचाराने सोडविले. मद्यविक्रीची दुकाने बंद केली. सावकारांनी लुबाडलेल्या जमिनी या यंत्रणेने शेतमालकांना परत मिळवून दिल्या.

सावकारांवर जबर दंड ठोठावले. साताऱ्याचे प्रतिसरकार 'स्वतंत्र भारत' नावाचे एक पाक्षिक प्रकाशित करीत असे. त्यातून या संघटनेची माहिती तर दिली जात असेच. शिवाय वैचारिक लेख देखील प्रकाशित होत.[१८]

**दरोडेखोरांचा बंदोबस्त :—** पोलीस यंत्रणा आंदोलन दडपण्यात व्यग्र असल्याने यंत्रणेचे नित्याचे कार्य थंडावले होते. शिवाय भूमिगत चळवळीस किंवा घातपातास पायबंद घालण्यात पोलीस व लष्करासही अपयश आल्याने पोलिसांचा समाजकंटकांवरील वचक घटला. गावगुंड, चोर व दरोडेखोर मोकाट सुटले. विशेषतः वाळवा तालुक्यात चोरांच्या टोळ्या दरोडे व खून करू लागल्या. काही ठिकाणी त्यांची पोलिसांशी युती झालेली होती. काही वेळा पोलीस गुंडांना आधीच निर्दोष म्हणून सोडून देत. म्हणून पोलीस संरक्षणाखाली गावगुंड आम जनतेचे शोषण करीत. "गांधीजीकी जय" अशी फसवी घोषणा करून गावगुंड दरोडे घालीत. याचा गैरफायदा घेऊन सातारा प्रशासनाने काँग्रेसला बदनाम करण्याचा कसून प्रयत्न केला. अनेक भूमिगतांना चोरांच्या प्रकरणात अडकवण्यासाठी आटापिटा केला. गिल्बर्ट मूर या गोऱ्या साहाय्यक जिल्हा पोलीस अधीक्षकाने तर धंदेवाईक गुन्हेगारांच्या टोळ्यांशी संधान बांधले. या माणसाच्या मते ' ब्रिटिश राजवटीला धंदेवाईक गुन्हेगारांच्या पथकांपेक्षा सशस्त्र देशभक्त भूमिगतांच्यागटांपासून अधिक मोठा धोका आहे '. म्हणून या माणसाने भूमिगतांना पकडून देण्याच्या अटींवर सातारा जिल्ह्यातील कित्येक फरारी गुन्हेगार व गुंड यांच्यावरील पकडवॉरंट रद्द केले. अनेकांना तुरुंगातून मुक्त केले. गिल्बर्टच्या या कूटनीतीमुळे सातारा जिल्ह्यातील दरोडे व गुंडगिरी वाढली. गुन्हेगार मोकाट सुटले. याचा गैरफायदा घेऊन ब्रिटिश सरकारने तसेच इंग्रजांच्या भारतीय मित्रांनी काँग्रेसची अनुचित बदनामी केली. क्रांतिकारकांचे चारित्र्यहनन केले.

तथापि नंतर दरोड्यांच्या आरोपाखाली सरकारने अटक केलेल्या एकूण १०८ आरोपींमध्ये एकही काँग्रेसजन नव्हता, असे कोर्टात सिद्ध झाले.

सातारा समांतर सरकारच्या नेत्यांनी जून १९४३ च्या सुमारास दरोडेखोर व गुंडांचा धोका ओळखला. या दुराचारांना आळा घालण्यासाठी त्यांनी स्वतः संघटित मोहीम उभारली. काही गुंडांना पकडून भरपूर दम भरला. काहींना मारझोड करून वठणीवर आणले ; काहींना तडीपार केले ; काहींना पोलिसांच्या ताब्यात दिले. तर काहींना वर म्हटल्यानुसार पत्र्या ठोकल्या. मात्र जे गुंड सुधारण्यापलीकडे होते, त्यांना ठार मारण्यात आले. ब्रिटिश सत्ताधीशांना जे जमले नव्हते अथवा करण्याची त्यांना इच्छा नव्हती ते काँग्रेसच्या समांतर सरकारने १९४३ च्या अंतापर्यंत करून दाखविले, हे विशेष होय! त्यामुळे या संघटनेचा आत्मविश्वास तर वाढलाच, पण शिवाय संघटनेला भक्कम जनाधार लाभला. लोकांचा भूमिगतांवरील विश्वास वाढला. जनतेला समांतर सरकार आपले वाटू लागले.

ग्रामसभांमध्ये न्यायनिवाडे होऊ लागले. अनेक ठिकाणी विशेषतः शिराळा भागात नागरिकांनी दारूची दुकाने बंद केली. बेकायदा दारूचे धंदे बंद पाडले. १९४४ सालात शेकडो गावांत पंचसमित्या स्थापन करून त्यांच्याकडे स्थानिक कारभार सोपविला. या वर्षात आक्रमक वा विध्वंसक कार्याऐवजी विधायक कार्य व समांतर सरकारच्या सामाजिक कामांवर भर देण्यात आला. ५०-६० जणांचे सशस्त्र गट प्रतिसरकारच्या विद्यमाने कार्यरत राहिले. फेब्रुवारी १९४४ पासून इंग्रज सरकारने आपले सामर्थ्य पणाला लावले, तरीही येथील लढा ओसरला नाही. म्हणून सरकारने रणनीतीही बदलली [१९]. तथापि जनतेला आता सत्तांतरच हवे होते.

वरील प्रकरणात विवेचन केलेल्या नंदुरबार कोषागार लूट कारस्थानात धुळे व जळगाव जिल्ह्यांतील शूर भूमिगतांसह प्रतिसरकारच्या नेत्यांचाही सहभाग होता. या नमुनेदार क्रांतिकार्यात उत्तमराव पाटील व त्यांच्या पत्नी लीलाबाई, व्यंकट धोबी, फकीरा पाटील, ओंकार पाटील, बाबूराव गुरव, विष्णू पाटील, रामचंद्र पाटील व यशवंत यांच्या जोडीला जी. डी. लाड, अप्पा लाड, नागनाथ नायकवडी, अप्पा पाटील, किसन पाटील, वि. बं. कळके, ज्ञानोबा जाधव, अप्पा एडके, धोंडिराम माळी व गोविंद जोशी हे सांगली-सातारकर सहभागी होते. १४ एप्रिल १९४४ रोजी चिमठाणे-साळवे गावांदरम्यान यशस्वी करून दाखविलेल्या या कारवाईत

५,५१,००० रुपयांची सरकारी रोख रक्कम क्रांतिकार्यासाठी उपलब्ध झाली. शिवाय पोलिसांच्या दोन बंदुका व २० काडतुसेही मिळाली. हे यश फार मोठे होते.

**प्रतिसरकारचे कार्य :—**प्रतिसरकारच्या ग्रामराज्य पद्धतीत पंच समित्या न्यायदान करीत. प्रारंभीच्या काळात सर्व गावकरी एकत्र जमून न्यायदान करीत. मात्र पुढे पंचांच्या बैठकीत फिर्यादी व आरोपींना बोलवून निवाडे देण्याची प्रथा पाडली. न्यायदानासाठी गावपंचायत, गट व जिल्हापातळीपर्यंत त्रिस्तरीय यंत्रणा कार्यरत केली. वरिष्ठ न्याय समितीत बहुतेक सर्व भूमिगत कार्यकर्ते सहभागी असत. आताच्या परिभाषेत त्यास लोकन्यायालय म्हणावे लागेल. प्रतिसरकारची न्याय समिती इतकी लोकप्रिय झाली की, अनेक जणांनी, त्या काळात, आपले सरकारी कोर्टांमधील खटले काढून घेतले आणि ग्रामराज्यांच्या कोर्टांमध्ये दाखल केले. त्यास दोन कारणे होती. न्याय लवकर मिळत असे व खर्चात बचत होत असे. तडजोड करण्यावर भर देण्यात येई. या न्यायप्रणालीमुळे कोर्टबाजी ७५ टक्क्यांनी घटली. दरोडेखोर व काळाबाजार करणाऱ्यांनाही या यंत्रणेने शिक्षा दिल्या. अशा शिक्षांच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्याचे काम तुफान सेनेचे युवक करीत. तुफान सेना, आजाद सेना ही स्वयंसेवकांची पथके होती. हेरगिरी करतानाच ते अंमलबजावणीच्या कामात मदत करीत.

समाजकंटक, सरकारी खबरे व दरोडेखोरांना प्रतिसरकारचे स्थानिक नेते कधी कधी जबर शिक्षा देत आणि हिंसाचारही करीत. तरी ही यंत्रणा प्रदीर्घ काळ टिकून राहिली, ती दहशतीच्या बलावर नव्हे. तिला भक्कम जनाधार व समर्थन लाभल्यामुळेच ती टिकून राहिली. क्रांतिकारकांनी सात गुंड, पोलीस खबरे किंवा दरोडेखोरांची हत्या केली. इतर विरोधकांना किरकोळ शिक्षा दिल्या. शक्यतो मानवहत्या टाळली.

ग्रामराज्य ही जशी स्वातंत्र्य चळवळ होती, तशी समाजसुधारणा चळवळही होती. या संघटनेने ग्रामसफाई, प्रौढ शिक्षण, हुंडाबंदी, दारूबंदी व अस्पृश्यतानिवारण कार्यासाठी पुष्कळ कार्य केले. इतिहासाच्या अभ्यासकाला मान्य करावेच लागते की, गांधीजी व त्यांच्या अनुयायांनी अस्पृश्यतानिवारण कार्यासाठी देह झिजविला.

साताऱ्याच्या भूमिगतांनी विवाह समारंभावरील खर्च कमी करण्यासाठी व शक्यतो सत्यशोधक पद्धतीने साधे विवाह करण्यासाठी प्रयत्न केले. बालविवाहाविरुद्ध प्रचार केला. व्यसनी माणसांवर टीका केली. नाना पाटलांनी काँग्रेसतर्फे कर्मवीर भाऊराव पाटील वगैरे सत्यसमाजिस्टांच्या सहयोगाने सत्यशोधक समाजाचा कार्यक्रम राबविण्याचेही प्रयोग केले. नाना पाटील गांधीवादी राहूनही सत्यसमाजिस्ट, कामगार व शेतकरी पक्षाचे कार्यकर्ते आणि वारकरी पंथीय पण जहाल मताचे पुरोगामी होते. त्यांनी 'गांधी पद्धतीचे विवाह' घडवून आणले. या परिसरात काही काळ दारूबंदी होती. अगदी वाळवा तालुक्यातही! इथे लोकजागृतीमुळे राष्ट्र सेवादलाच्या अनेक शाखा निर्माण झाल्या.

भाऊरावांच्या रयत शिक्षण संस्थेच्या शाळांमधील शेकडो विद्यार्थी व शिक्षक भूमिगत आंदोलकांना अनेक प्रकारे मदत करीत. ग्रामीण भागातील ९० टक्के प्राथमिक शिक्षक आंदोलकांना हरप्रकारे उपयोगी पडत. त्यांना आंधळे, पांगळे, भिकारी, फेरीवाले व मजूरदेखील संदेशवाहक या नात्याने उपयोगी पडत. खेडूत भूमिगत नेत्यांना (त्यांची संख्या सुमारे १५०) चहापाणी व जेवण देत. सातारा जिल्ह्याबाबत एक विशेष गोष्ट अशी की, जिल्ह्यातील हजारो जवान सेनादलात भरती झालेले असल्याने, ब्रिटिशांना येथे भयंकर दडपशाही करणे महागात पडले असते. हे ध्यानात ठेवूनच इंग्रजांनी नरमाईचे धोरण अमलात आणले.[२०]

यशवंतराव चव्हाणांनंतर क्रमशः के.डी. पाटील, कासेगावकर वैद्य, नाथाजी लाड व किसन वीर हे साताऱ्याचे डिक्टेटर होते. तथापि नाना पाटील हेच आंदोलन यंत्रणेचे केंद्रबिंदू व प्रेरणास्थान होते. पांडू मास्तर, बर्डे मास्तर, किसन वीर, अंतुकाका बर्डे, नागनाथ नायकवडी, जी.डी. लाड, नाथा लाड, रघुनाथ रावळ, एस. पी. जाधव, बाबूराव चरणकर व कासेगावकर वैद्य हे चैतन्य देणारे नेते होते.

मात्र मुंबईतील सेंट्रल डिरेक्टोरेटचे पुढारी अच्युतराव पटवर्धन हेच साताऱ्यातील आंदोलनाचे मार्गदर्शक आणि सल्लागार होते. तेथील सर्व भूमिगत गटांशी संपर्क ठेवून त्यांच्यात समन्वय घडवून आणण्यात अच्युतरावांचे मोठे योगदान होते.

अनेक बाबींमध्ये त्यांचा सल्ला घेण्यास्तव बर्डे मास्तर, जोशीकाका वगैरे त्यांना भेटले होते. शिवाय साताऱ्यातील भूमिगतांनी वेळोवेळी अप्पासाहेब पंत यांचा सल्ला घ्यावा, असेही अच्युतरावांनी कासेगावकरांना सांगितले होते. मूळचे साताऱ्यातील चाफळचे मुंबईतील निवासी ग. बा. नेवाळकर हे पटवर्धनाचे दूत म्हणून प्रतिसरकारशी संपर्क ठेवत व समन्वय साधत. त्यांनी गावोगावी जाऊन भूमिगत कार्याचा अहवाल दिला होता. फेब्रुवारी १९४४ मध्ये रणनीतिविषयक विचारविनिमयासाठी कासेगावकर वैद्य, किसन वीर, बर्डे मास्तर, बाबूराव चरणकर, डी. जी. देशपांडे, नाथाजी लाड वगैरे ३०-४० भूमिगत नेते नेवाळकरांसह पटवर्धनांना मुंबईत भेटले. तेव्हा कोल्हापूरच्या रत्नाप्पा कुंभारांना प्रतिसरकारचे अधिकारी नेमून या संघटनेची कार्यकक्षा सातारा-सांगलीप्रमाणे कोल्हापूर संस्थानतही वाढवावी अशी अच्युतरावांनी सूचना केली होती. तथापि अच्युतरावांची ही रणनीती बैठकीतील सातारकरांना पटली नाही. त्यांनी नकार दिला. या बैठकीत ठरल्यानुसार मुंबईतील गिरणी कामगारांकडून दरमहा किमान एक रुपया वर्गणी घेऊन सातारा प्रतिसरकारसाठी निधी जमवावयाचा होता. त्यासाठी सातारा जिल्हा राष्ट्रीय संघ स्थापन करण्यात आला. पण त्याने काय केले हे माहीत नाहीत.

गांधीजींची सुटका झाल्यावर जुलै १९४४ मध्ये बुवा गोसावी त्यांना पाचगणीत भेटले. या भेटीत गोसावींनी सातारा प्रतिसरकारची संपूर्ण कथा कथन केली, आणि अर्थातच, गांधीजींचा अभिप्राय विचारला. गांधीजींनी हिंसाचाराबद्दल नापसंती व्यक्त करून भूमिगतांसाठी पुढील निरोप सांगितला – 'प्रत्येक व्यक्तीने आपापल्या सदसद्‌विवेकबुद्धीला पटेल तसा निर्णय घ्यावा'. हा निरोप गोसावींनी भूमिगतांपर्यंत पोहोचवला. १९४४-४५ सालात बरेच भूमिगत पकडले गेले. जून १९४५ मध्ये सत्र न्यायालयाने या जिल्ह्यातील ९ जणांना ७ ते ९ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली. दरम्यान तीन-साडेतीन वर्षे नाना पाटील भूमिगत राहिले होते. गुप्तचरांच्या अविरत ससेमिऱ्यामुळे नाना आप्तेष्टांनाही भेटत नसत. म्हणून सुरक्षेच्या कारणास्तव कार्यकर्त्यांनी त्यांच्याऐवजी किसन वीर यांना सर्वाधिकारी पदी नेमले.

ऑगस्ट १९४५ मध्ये जपान शरण आल्यावर दुसरे महायुद्ध समाप्त झाले. मात्र तोपर्यंत मुंबई सरकारने सातारा प्रतिसरकारच्या संग्रामाची माहिती वर्तमानपत्रांमध्ये प्रसारित केलेली नव्हती, आणि त्याबाबतच्या प्रसारणावर सक्त बंदी घातलेली होती. कारण समांतर सरकार हा ब्रिटिश सरकारवर भयंकर कलंक होता, काळा डाग होता. हे इंग्रजांना प्रचंड 'आव्हान' होते. ब्रिटिशांची सत्ता निष्प्रभ, निर्माल्य झाली होती. चर्चिलच्या हिंदुस्तानातील प्रतिनिधींना हे कबूल करणे अथवा उघड करणेही अवघड वाटत होते. म्हणून काँग्रेसने प्रतिसरकार स्थापन केले आणि सर्वाधिकारी नेमून भूमिगतांनी कारभार केला, असे न म्हणता त्यांनी खून केले, दरोडे घातले व चौघांचे हातपाय तोडले अशी पत्रके छापली. इंग्रजांना व त्यांच्या देशी मित्रांना 'प्रतिसरकार, समांतर सरकार' या संज्ञा अवमानकारक वाटल्याकारणाने त्यांनी 'पत्री सरकार' अशी बदनामी केली. बदनामी करण्यासाठी पाय तुटलेल्या माणसाचा फोटो वारंवार छापला.

पूर्वी कम्युनिस्ट असलेल्या सोली बाटलीवाला यांनी १२ दिवस सातारा जिल्ह्यात समक्ष अभ्यास करून **बॉम्बे क्रॉनिकल** मध्ये दोन लेख लिहिले होते. त्यांनी पोलिसांच्या अत्याचारांवर झोड उठविली होती. लालजी पेंडसे यांनी **नवशक्ती, भारत ज्योतीत** लेख लिहून समांतर सरकारच्या अनेक अभिनव योजनांची स्तुती केली होती. डाव्या विचारसरणीचे बाटलीवाला व पेंडसे सत्य तेवढेच लिहीत. आचार्य प्र. के. अत्रे मुंबईत असताना त्यांच्या घरी अच्युतराव पटवर्धन, अरुणा असफ अली या भूमिगत असताना कधी कधी राहत असत. अत्रेंनी **नवयुग** साप्ताहिकातून 'साताऱ्याचे आदर्श ग्रामराज्य' अशी स्तुती केली होती. त्यानंतर त्यांनी जिल्ह्याचा दौरा केला व समांतर सरकारची जाहीर तारीफ केली. महाराष्ट्र प्रांतिकचे नेते शंकरराव देव व न. वि. गाडगीळ यांची तर लगेच खात्री पटली की, 'समांतर सरकारने जनतेचा विश्वास संपादन केला व विधायक कार्य केले'.

सोली बाटलीवालांनी जवाहरलाल नेहरू आणि किसन वीर व नाथा लाड यांची मुंबईत पहिली भेट घडवून आणली. दुसऱ्या दिवशी मध्यरात्री नेहरूंनी ताडदेवमधील शिल्पकार व्ही. पी. करमरकरांच्या स्टुडिओत साताऱ्यातील दीड-दोनशे भूमिगतांच्या बैठकीत भाषण करून त्यांच्या योगदानाची तारीफ केली होती.

एप्रिल १९४६ मध्ये बा. गं. खेर यांचे काँग्रेस मंत्रिमंडळ सतारूढ होताच सर्व स्वातंत्र्यसैनिकांच्या मुक्तीची प्रक्रिया सुरू झाली. कारावासींची मुक्ती व भूमिगतांबील पकडवॉरंट मागे घेणे सुरू झाले. २६ एप्रिल रोजी मुंबई सरकारने साताऱ्यातील सर्वांना माफ केल्याचे पत्रक जाहीर केले. नाना पाटील, किसन वीर, पांडू मास्तर वगैरे नेते ५ मे रोजी अच्युतराव पटवर्धनांच्या अध्यक्षतेखाली कोणे नामक गावी (कऱ्हाड तालुका) भरलेल्या सभेत हजारो लोकांसमोर प्रकट झाले. २६ मे रोजी मुंबईच्या शिवाजी पार्कवर नाना पाटील व सहकाऱ्यांचा अपूर्व सत्कार करण्यात आला. आचार्य अत्रेंनी नाना पाटलांवर गौरवांक काढून त्यांना **क्रांतिसिंह** हा किताब बहाल केला.

## संस्थानांमधील लढा

**कोल्हापूर-सांगलीतील चळवळ** :—कोल्हापुरातील राजकीय पर्यावरण उर्वरित महाराष्ट्रापेक्षा भिन्न स्वरूपाचे होते. कोल्हापूर संस्थान प्रजा परिषदेच्या पुढाऱ्यांमध्ये माधवराव बागल व त्यांचे बंधू वसंतराव हे काँग्रेसजनही होते. तरीही काँग्रेसला विरोध करणारे काही मराठे प्रजा परिषदेत होते. काँग्रेस-मराठा लीगच्या परस्परसंबंधात शिरण्याचे हे स्थळ नव्हे. इथे मुद्दा हाच की, निकटच्या प्रदेशाइतकी तीव्र चळवळ या संस्थानात होऊ शकली नाही. रत्नाप्पा कुंभार, के. आर. पाटील, शामराव पाटील काँग्रेस अधिवेशनासाठी मुंबईला गेले होते. कोल्हापूर प्रशासनाच्या आकडेवारीनुसार संस्थानामधील २०७ मराठे, ९८ लिंगायत, ८८ जैन, ४८ ब्राह्मण, २९ मुसलमान, ९ दलित व ३ ख्रिस्ती नागरिकांनी १९४२ च्या लढ्यात भाग घेतला होता. माधवराव बागलांचे १३ ऑगस्टचे भाषण दरबारने आक्षेपार्ह ठरवून त्यांना पन्हाळगडावर स्थानबद्ध केले. अल्पकाळ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असेलेले बॅ. बाबासाहेब भोसले, लाल निशाण गटाचे यशवंत चव्हाण व संतराम पाटील या विद्यार्थी नेत्यांनी कोल्हापुरात आंदोलनाचा वणवा पेटवला होता. त्यानंतर लवकरच रत्नाप्पा मुंबईहून परत आले. कोल्हापूर दरबारने लादलेला सभाबंदीचा हकूम धिक्कारण्यासाठी विद्यार्थ्यांनी मोठी सभा भरवली. त्यानंतर पोलिसांच्या लाठीमाराचे सत्र सुरू झाले. त्यात बिंदुनारायण कुलकर्णी हा सोळा वर्षाचा मुलगा ठार झाला. या विद्यार्थ्याचे स्मरण राहावे म्हणून बिंदुचौक हे नाव देण्यात आले.

या संस्थानात रेल्वे स्टेशने जाळणे, बाँबस्फोट आणि कोषागारे लुटण्याचे प्रकार घडले. १३ डिसेंबर १९४२ रोजी रुकडी व हातकणंगले स्टेशने जाळून टाकण्यात आली. या प्रकरणामध्ये अनेक विद्यार्थी व युवक पकडले गेले.

कोल्हापुरातील भूमिगत चळवळीचे सूत्रधार रत्नाप्पा कुंभार प्रारंभी मुंबईतील नेत्यांबरोबर राहत होते. कोल्हापुरातील विशिष्ट परिस्थितीला अनुरूप अशी रणनीती त्यांनी मुंबईतच आखलेली होती. ऑगस्ट १९४२ च्या अखेरीस कोल्हापुरात परतल्यापासून त्यांनी लढ्यात जोर निर्माण केला. रत्नाप्पा कधीच पकडले गेले नाहीत. त्यांच्या वडिलांचे निधन (३ जून १९४३) झाले, तेव्हाही रत्नाप्पा वडिलांच्या अंत्यदर्शनासाठीही घरी आले नव्हते. म्हणून पोलीस भयंकर निराश व विषण्ण झाले होते. कुंभारांची ध्येयासक्ती व बांधीलकी पाहून अच्युतरावांनी त्यांना सातारा प्रतिसरकारचे एक डिक्टेटर नेमावे अशी सूचना मांडली होती. पण ती स्वीकृत झाली नव्हती. कुंभारांप्रमाणेच गोपाळ बकरे हेही शेवटपर्यंत पोलिसांच्या हाती लागले नाही.

डिसेंबर १९४२ च्या उत्तरार्धापासून कोल्हापुरात सुनियोजित घातपात व कोषागारांची लूट सुरू झाली. गारगोटी तालुका कचेरी ताब्यात घेण्यासाठी गेलेल्या जमावावर पोलिसांनी गोळीबार करून सात आंदोलकांना ठार केले. पन्हाळगडावरील रेसिडेन्सी कार्यालयावर जमावाने हल्ला चढविला. ब्रिटिश सरकारचे ब्रह्मदेशातील निर्वासित कार्यालय कोल्हापुरात होते. तेथील कर्मचाऱ्यांच्या पगाराची मोठी रक्कम घेऊन जाणारा टांगा अडवून त्यातील रक्कम कार्यकर्त्यांनी आंदोलन कार्यासाठी हस्तगत केली होती. स्वतः राजबंद्यांनी जयसिंगपूर कोर्टात पोलिसांची हत्यारे हस्तगत करून पलायन केले. सशस्त्र आंदोलकांचे नऊ भूमिगत गट घातपात कार्यात गुंतलेले होते. भूदरगड, गडहिंग्लज, हातकणंगले, शिरोळ, चंदगड, कागल व रामबाग तालुक्यांमध्ये आंदोलन जोरदार होते.

सांगलीनजीकच्या पद्माळे गावचे वसंतदादा पाटील मुळातच झुंजार मनोवृत्तीचे होते. त्यांनी मुंबई काँग्रेस अधिवेशनाचा संदेश सांगलीकरांना 'पेटा व पेटवा' या शब्दात सांगितला. त्याबरोबर हिंदुराव पाटील, पी. बी. पाटील, जी. डी. पाटील,

पोंक्षे, जिनपाल खोत, ताराचंद शहा, धोंडीराम पाटील, भूपाल कत्ते व पांडू मास्तर या त्यांच्या सहकाऱ्यांनी लढा जोरदार पेटवला. वसंतदादांचा लढा साताऱ्यातील लढ्याच्या आकृतिबंधानुसारच चालू राहिला. २२ जून १९४३ रोजी दादा पकडले गेले. तुरुंग फोडून पलायन करण्याच्या धाडसी प्रयत्नात पाय मोडलेले हिंदुराव पाटीलही पकडले गेले, आणि अण्णा पत्रावळे व बाबूराव जाधव पोलिसांच्या गोळीबारात ठार झाले. वसंतदादा आणि पोलीस यांच्यात झालेल्या चकमकीत दादांना गोळी लागून ते घायाळ झाले. बेशुद्ध असताना दादांना पोलिसांनी पकडले. तुरुंग फोडून निसटण्याच्या अपराधासाठी न्यायालयाने वसंतदादांना सहा वर्षांची शिक्षा ठोठावली (२१ सप्टेंबर १९४४). तत्पूर्वी बेकायदा हत्यारे बाळगल्याबद्दल त्यांना सात वर्षांची सजा दिलेली होती. इतकेच नव्हे तर कारावासात दादांच्या हातापायाभोवती बेड्यांचा पाश घालण्यात आला. दादांचा गट प्रतिसरकारचाच घटक मानला जाई.

१९४६ सालात हिंदुस्तानात राजकीय परिवर्तन सुरू झाले. ब्रिटिश सरकार आपल्या राजकीय विध्वंसनाची मोजदाद घेऊ लागले. सत्तांतराची प्रक्रिया सुरू झाली. अशा पार्श्वचित्रावर ताराचंद शहा, रामानंद भारती व बॅ. नाथ पै वगैरेंनी सांगलीत विराट मोर्चा व सभा भरवून वसंतदादांना बंधमुक्त करण्याची मागणी केली. सभेनंतर राजेसाहेबांच्या बंगल्यावर त्यांनी विराट मोर्चा नेला. आता त्यास विरोध करण्याचे धाडस इंग्रजांमध्ये राहिले नव्हते. राजे पटवर्धनांनी परिस्थिती ओळखून वसंतदादांना बंधमुक्त केले (२४ एप्रिल १९४६).

**औंध व फलटणः—**औंधच्या पंतप्रतिनिधींनी गांधीजी व सरदार पटेलांच्या सूचनेनुसार आपल्या प्रजाजनांना आधीच प्रजासत्ताकाचे अधिकार प्रदान करून ग्रामस्वराज्य स्थापन केलेले होते. ७ ऑगस्ट १९४२ रोजी अप्पासाहेब पंतांनी पुढील काळाविषयी सल्ला विचारताच गांधीजी म्हणाले होते, "औंधचा हा राजा प्रजेच्या संपूर्ण सहमतीने ब्रिटिशांना औंधचे संरक्षण करण्याच्या जबाबदारीतून मुक्त करतो, असे राजेसाहेबांनी व्हाइसरॉयला आता स्पष्ट लिहावे. पूर्वीचे सर्व करार रद्द समजावे. आजपासून औंध स्वतंत्र आहे." राजे भवानराव यांना इतके सडेतोडपणे लिहिणे आवश्यक वाटले नाही. तथापि त्यांनी सर्व कॉंग्रेस कार्यकर्ते व भूमिगतांना संस्थानात

उदार आश्रय दिला, मोकळे रान दिले. सातारा व पुण्यातील भूमिगतांचे येथे ठिकठिकाणी तळ होते. मुंबई सरकारच्या मते 'औंधचे प्रशासन खऱ्या अर्थाने काँग्रेसचेच प्रशासन असून ते सरकारच्या पोलिसांना काहीच काम करू देत नाही. औंधमुळे सातारा व पुणे जिल्ह्यांमधील भूमिगत काँग्रेसजन निर्भयपणे कारवाया करतात. त्यांचा पाठलाग केल्यास ते औंधमध्ये आश्रय घेतात,' अशी गव्हर्नरने व्हाइसरॉयकडे तक्रार केली. तसेच या संस्थानाविरुद्ध कडक कारवाई करण्याची मागणी केली. 'अन्यथा येथील लढा आटोक्यात येणार नाही, असे लिहिले.'

याबाबत केंद्र सरकारने कोल्हापूरच्या रेसिडेन्टला तार पाठवून औंधबाबतची तक्रार पाठविली. तथापि हा ब्रिटिश गृहस्थ अप्पासाहेब पंतांचा मित्रच होता. त्याने पंतांना सपत्निक कोल्हापूरला बोलावून त्यांचा पाहुणचार केला आणि नाना पाटील यांना 'कुंडलमध्ये तुम्ही आश्रय देता' याबाबत पंतांना विचारले. 'तसेच अच्युतराव पटवर्धन, अरुणा असफ अली, जयप्रकाश नारायण यांना तुम्ही भेटलात का' वगैरे सवाल विचारले. वस्तुतः तेव्हा नाना पाटलांवर वीस हजार रुपयांचे बक्षीस सरकारने घोषित केलेले होते. तथापि दिलदार अप्पासाहेबांनी सत्यकथन केले—"नाना पाटलांना कुंडलमध्ये आश्रय मिळतो व उक्त सर्व नेते आपणास भेटतात". त्यांनी सर्व वस्तुस्थिती दिलखुलासपणे मान्य केली. रेसिडेन्टनेही त्यांना दाद देऊन भारत सरकारला तारेद्वारे कळवले की, "साताऱ्याच्या डी.एस.पी. च्या पत्रातून किंवा इतर अधिकाऱ्यांकडून आम्हाला निश्चित माहिती मिळाली नाही; अप्पा पंत चळवळीस उत्तेजन देतात हे मला मान्य नाही." शिवाय दिल्लीतील राजकीय विभागाच्या अधिकाऱ्यांनीही रेसिडेन्टच्या मताचीच भलावण केली.[२१]

अनेक वरिष्ठ इंग्रज अप्पासाहेबांचे दोस्त होते. विशेष म्हणजे कित्येक जखमी व आजारी स्वातंत्र्य सैनिकांना औंध राज्यात उपचार व सुविधा पुरविल्या जात. त्यांत अनेक सातारकर होते. राजबंद्यांची बडदास्त राखणारे औंध हे भारतातील एकमेव संस्थान असावे.

फलटणच्या निंबाळकरांनीही १९४२ च्या आंदोलनाबाबत नरमाईचे धोरण स्वीकारले आणि स्वातंत्र्यसैनिकांच्या कारवायांकडे कानाडोळा केला. सातारा व पुणे जिल्ह्यांमधील भूमिगत सैनिकांना फलटणमध्येही आश्रय मिळत असे. त्यांच्या निवासाची व जेवणाची व्यवस्था करण्यात येत असे.

## नागपुरातील तुंबळ लढा

नागपूर प्रांतात काँग्रेसच्या परिसीमेतीलच हिंदुस्तानी लाल सेना व राष्ट्रीय युवक संघ वगैरे सर्व संघटनांनी छोडो भारतसाठी पूर्वतयारी करून ठेवली होती. मगनलाल बागडी, विनायक सखाराम दांडेकर व श्यामनारायण (श्यामनंदन) काश्मिरी यांनी एप्रिल १९३९ मध्ये स्थापन केलेली हिंदुस्तान रेड आर्मी ही सरदार भगतसिंग, चंद्रशेखर आझाद व सुखदेव यांच्या हिंदुस्तान रिपब्लिकन आर्मीच्या आकृतिबंधानुसर कार्यरत झालेली संघटना होती. अर्थातच ती काँग्रेसपेक्षाही जहाल व समाजवादी विचारप्रणालीची होती. नंतर मंत्री झालेले नरेंद्र तिडके व आनंदराव कळमकरांचा राष्ट्रीय युवक संघ हा आर.एस.एस ला विरोधी असा काँग्रेस युवा संघ होता. राष्ट्रीय शिवाजी मंडळ अशीही संघटना आंदोलनात उतरली. जुलै १९४२ मध्ये वर्ध्यातून आगामी आंदोलनाचे सुतोवाच झाल्याचे कळताच काँग्रेस व या संघटनांचे वर्धा-नागपुरातील कार्यकर्ते तयारीला लागले. मगनलाल बागडी, वि. स. दांडेकर, कृष्णा काकडे, रुईकर, दामोदर नायक वगैरेंनी आंदोलनासाठी चांगले नियोजन केलेले होते. ४ ऑगस्टला बागडींनी नागपुरात बैठक घेतल्यापासून ५५ जण भूमिगत झाले होते. गांधीजी ३ तारखेला सेवाग्रामहून निघून काँग्रेस अधिवेशनासाठी मुंबईला गेले. विदर्भातील कित्येक नेतेही अधिवेशनासाठी मुंबईला गेले होते. नंतर त्यांच्यापैकी विनायक दांडेकर, जे. सी. कुमारप्पा वगैरे मुंबईतच राहून भूमिगत झाले.

अधिवेशनानंतर विदर्भातील अनेक नेत्यांना वाटेतील रेल्वे स्थानकांमध्ये पकडल्याचे कळताच अकोला, अमरावती, वर्धा व नागपुरात सरकारच्या निषेधाच्या तीव्र लाटा उसळल्या. मोठमोठ्या जमावांनी बंदीहुकूम धुडकावून मिरवणुका काढल्या व सरकारचा उस्फूर्तपणे निषेध केला. आंदोलन उत्तरोत्तर भडकले. लाठीमार सुरू झाला. उत्तरोत्तर जनता आक्रमक झाली.

९ ऑगस्टला नागपुरातील सर्व कापडगिरण्या व शाळा-महाविद्यालये ओस पाडून विद्यार्थी व कामगार आंदोलनात उतरले. मगनलाल बागडींनी चिटणीस पार्कवर जंगी सभा भरवली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी देशभक्तीने रसरसलेली गीते खंजिरीच्या तालावर गाऊन श्रोत्यांची मने उद्दीपित केली. सभेत श्रोत्यांच्या आवेशाचा प्रत्यय आला. म्हणून पोलिसांनी लाठीमार करून सभा भंग करण्याचा

प्रयत्न केला व तुकडोजींना अटक केली. त्यामुळे जमाव प्रक्षुब्ध झाला आणि जमावाने बागडींच्या नेतृत्वाखाली नबाबपुरा पोलीस ठाण्यावर हल्ला चढविला. जमावाने तेथील मुख्य जमादारास ठार मारून पाच रायफली ताब्यात घेतल्या. तसेच जमावाने इतवारी, बजारिया व मोमीनपुरा पोलीस ठाण्यांवरही हल्ले करून आणखी आठ रायफली हस्तगत केल्या. यानंतर इतवारी भागातील टपाल कार्यालय व पोलीस ठाणे जाळून टाकले. अधिकाऱ्यांच्या आक्रमकपणाची ही फलनिष्पत्ती होती.

सरकारच्या अनाठायी आक्रमकपणाच्या निषेधार्थ १० ऑगस्टला नागपुरात कडकडीत हरताळ पाळण्यात आला. मात्र लोकक्षोभ धुमसत राहिला. त्याचा ११ व १२ ऑगस्ट रोजी अधिक जोरात विस्फोट झाला. सरकारी मालमत्तेची प्रचंड जाळपोळ आणि नासधूस करण्यात आली. दोन्ही दिवस परिस्थिती सरकारच्या आटोक्याबाहेर गेलेली होती. सिटी पोस्ट कार्यालय, पॉवर हाउस, एक बँक आणि तीन पोलीस ठाणी आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. विजेचे खांब पाडण्यात आले. **मध्यप्रांताच्या या राजधानीवर दोन दिवस ब्रिटिश राज न राहता अराजक होते.** वस्तुतः या प्रांताचा कडवा गव्हर्नर सर हेन्री ट्वायनॅम आधीपासूनच व्हाइसरॉयवर दडपण आणण्याचा प्रयत्न करीत होता की, गांधीजी व काँग्रेसला आंदोलनापूर्वीच ठेचून काढावे व गांधीजींना आधीच न्यासालँड किंवा काँगो वगैरे कोठे तरी डांबून ठेवावे, अशी त्याची पत्रे **ट्रान्सफर ऑफ पॉवर** ग्रंथात ब्रिटिश सरकारने छापलेली आहे. वस्तुस्थिती मात्र अशी होती की, दोन दिवस नागपूरवर इंग्रजांची सत्ता नव्हती. सिव्हिल लाइन्स विभाग वगळता शहरात अराजक माजलेले होते.

नागपूरचे विद्यार्थी, विद्यार्थिनी व नागरिकांनी जिल्हा कोर्ट, सेक्रेटेरिएट आणि तहसील कार्यालयांवर प्रचंड मोर्चे नेले. रस्ते खणून ठेवले. झाडे आणि वीज, टेलिफोन वगैरेंचे खांब पाडून अडथळे निर्माण करण्यात आले. त्यामुळे पोलीस हतबल झाले. अखेरीस नागपुरात लष्कर तैनात करण्यात आले. संचारबंदी लागू करण्यात आली. तरीही लष्कर व पोलिसांवर जमावाने अनेकदा हल्ले केले. १२ ऑगस्टला लष्कराने शहरात सात वेळा गोळीबार केला. नागपूरजवळ एका मालगाडीवर हल्ला करून ती लुटण्यात आली. परिस्थिती अत्यंत गंभीर होती.

जमावाने एक सरकारी धान्यदुकान लुटले. लष्कराच्या गाड्या जाळण्यात आल्या. नागपूर परिसरात पोलीस व रेल्वे स्थानकांवर हल्ले झाल्यामुळे सरकारी अधिकारी चिंताग्रस्त झाले होते.

नागपूर शहर व जिल्ह्यातील बहुतांश विध्वंसन कार्य हिंदुस्तानी लाल सेनेच्या जवानांच्या पुढाकाराने झाले. या संघटनेत सुमारे ३००० जवान असून त्यांच्यात बंदी घातलेल्या खाकसर संघटनेतील सात-आठशे तरुणांचा समावेश आहे, अशी सरकारची माहिती होती. इतके मात्र खरे की, ही बंडखोर संघटना होती. अल्लामा मश्रिकीच्या आदेशानुसार ते युवक लाल सेनेत आलेले होते.[२२]

ज्येष्ठ काँग्रेस कार्यकर्ते दाजीबा महाले पोलिसांच्या गोळीबारात १३ ऑगस्ट १९४२ रोजी जखमी झाले आणि नंतर मरण पावले. त्यामुळे प्रक्षुब्ध झालेल्या नबाबपुऱ्यातील युवकांनी चिटणीसपुऱ्यातील पोलीस ठाण्यावर मोर्चा नेला. त्या युवकांनी तेथील पोलिसांना गणवेश काढावयास लावून त्यांच्या बंदुका हस्तगत केल्या. या मोर्चाच्या अग्रभागी दाजीबांचा सुपुत्र शंकर महाले हा तेजस्वी युवक होता. पोलीस ठाण्यात झालेल्या चकमकीत एक पोलीस शिपाई घायाळ होऊन मरण पावला. मात्र पोलिसास ठार मारले या अगदी असत्य आरोपावरून शंकर महाले व त्याचे चार सहकारी यांना सेशन्स कोर्टाने फाशीची शिक्षा फर्मावली. शंकरच्या चारही सहकाऱ्यांनी हायकोर्टात अपील केल्यावर त्यांची फाशीची शिक्षा कमी करून त्यांना जन्मठेपेची शिक्षा देण्यात आली. तथापि क्रांतिकारक शंकरने अपील न केल्याने हायकोर्टाने त्याच्या फाशीच्या शिक्षेवर शिक्कामोर्तब केले. आणि **१८ वर्षांचा शंकर दाजीबा महाले हुतात्मा झाला.** १९ जानेवारी १९४३ रोजी गांधीजी व भारतमातेचा जयजयकार करीत शंकर फासावर चढला. शंकर व नंदुरबारचा शिरीषकुमार हे एकाच प्रवर्गातील निधड्या छातीचे हुतात्मे होत!

नागपूर शहरातील आंदोलनप्रभावित भागात लष्कर तैनात करण्यात आले असता, हिंदुस्तानी लाल सेना व राष्ट्रीय युवक संघाच्या हजारो तरुणांनी कलेक्टर कार्यालयावरील युनियन जॅकच्या जागी तिरंगा ध्वज फडकवला. तेथेच मोठी सभा झाली. सभेत भाषणे चालू असताना सरकारी फौज आली. लाठीहल्ला व धरपकड

झाली. परंतु तरीही जमावाचे थवे येऊन निदर्शने करू लागले. अश्रुधुराचा फारसा उपयोग न झाल्याने पोलिसांना गोळीबार करावा लागला. वाढत्या हिंसक घटनांना आवर घालण्यासाठी सरकारला संपूर्ण नागपूर शहरावर लष्कराचा अंमल बसवावा लागला. तरीही सीताबर्डी, कापड बाजार, महाल व इतवारी भागांत आंदोलक व लष्कर यांच्यात अनेक चकमकी झाल्या. १२ ते १५ ऑगस्ट दरम्यान नागपुरात २५ वेळा गोळीबार करून त्यात ३० नागरिकांना ठार मारण्यात आले.[२३]

नागपूरमध्ये लष्कर तैनात केले तरी लाल सेनेच्या झुंजार जवानांनी महार पलटणीतील सैनिकांवर हल्ला करून त्यांच्या काही स्टेनगन हस्तगत केल्या. शहराच्या काही भागांमध्ये त्यांनी गोऱ्या लष्करालाही जुमानले नाही. २२ ऑगस्टपासून परिस्थिती हळूहळू सामान्य होऊ लागली. मध्यप्रांत व वऱ्हाड सरकारच्या अहवालानुसार २८ ऑगस्ट १९४२ पर्यंत नागपूर शहरात व जिल्ह्यात १,०८८ जणांना अटक करण्यात आली. पोलीस आणि लष्कराने एकूण ७४ वेळा गोळीबार केला व त्यात ४५६ वेळा फैरी झाडल्या. आणि त्यात ६४ माणसे ठार मारली व १०२ जणांना जखमी केले.[२४] त्यामुळे इंग्रज व प्रजाजनांमध्ये कायमचा दुरावा निर्माण झाला.

रामभाऊ रुईकरांनी नागपुरात कामगार चळवळीची चांगली बांधणी केलेली होती. त्यांचा फॉरवर्ड ब्लॉक पक्ष छोडो भारतमध्ये प्रारंभापासूनच आक्रमक पवित्र्यात होता. त्यामुळे नागपुरातील गिरणी कामगार पेटून उठले. प्रथम त्यांनी बोनसच्या मागणीसाठी संप पुकारले. कापड उत्पादन हा युद्ध-प्रयत्नाशी निगडित विषय होता. हे ओळखून १९ ऑगस्टपासून नागपुरातील सर्व गिरणी कामगार पुन्हा संपावर गेले. त्यांनी २५ सप्टेंबरपर्यंत म्हणजे ३७-३८ दिवस संप चालू ठेवला होता. शिवाय सप्टेंबर अखेरपर्यंत बहुतांश विद्यार्थीदेखील शाळा-कॉलेजांच्या बाहेरच होते. त्यामुळे विद्यार्थी व कामगारांची युती होऊन त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनात मोठे बळ निर्माण केले. रेल्वे मार्गाच्या पूर्वेकडील नागपूरचा भाग स्मशानासारखा दिसतो, असे मला १ सप्टेंबरच्या एका सरकारी नोंदीत आढळले.

आंदोलनाच्या प्रारंभी रामभाऊ रुईकर जबलपूर भागात व वि.स. दांडेकर मुंबईत भूमिगत असले, तरी त्यांनी गांधीजींच्या अटकेपूर्वीच नागपुरात लढ्यासाठी

वातावरण निर्माण करून ठेवले होते. नागपूरच्या गुप्तवार्ता विभागाच्या मते आंदोलनास आलेले स्वरूप व भाषणांचा रोख पाहता आंदोलन पूर्वनियोजित असावे. तसेच शहरातील घातपात व जाळपोळीच्या घटनादेखील पूर्वसंकल्पित असाव्यात असे त्यांचे मत होते. वस्तुतः हे सत्य नव्हते. या प्रांताचा गव्हर्नर ट्वायनॅम याच्याप्रमाणेच प्रशासनालाही वकूब कमी असावा. इतके मात्र खरे की, प्रारंभापासूनच कॉंग्रेस व हिंदुस्तानी लाल सेना व फॉरवर्ड ब्लॉक आघाडीवर होते. मुसलमान वस्ती वगळता सर्वत्र कडकडीत हरताळ झाले. आंदोलनास गिरणी कामगारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. बहुतेक पोलीस चौक्या नष्ट झाल्या. संचारबंदी असूनही रेल्वे स्टेशन व अन्नधान्याची दुकाने लुटली गेली. लष्कराच्या कारवाईत मरण पावलेल्या लोकांच्या संख्येबाबत मात्र पोलीस व गुप्तवार्ता विभागाच्या अहवालांमध्ये एकवाक्यता नव्हती. १५ व १६ ऑगस्ट १९४२ चे गुप्तवार्ता अधिकाऱ्यांचे अहवाल पाहता एकट्या नागपूर शहरात तोपर्यंत पोलीस व लष्कराच्या गोळीबारात २०० नागरिक मरण पावले.

डॉ. ना. भा. खरेंना आंदोलनात उतरण्याचा सल्ला देण्यात आला होता. परंतु १९३७ साली त्यांना मुख्यमंत्री पद न लाभल्यामुळे ते कॉंग्रेसच्या विरोधात गेले. पण तरीही हिंदुमहासभेला आपल्या सभासदांना आंदोलनापासून दूर ठेवणे शक्य झाले नाही. व्यक्तिगतरीत्या अनेक सभाईट आंदोलनात आले. विदर्भातील कम्युनिस्टांपुढे गहन समस्या उभी राहिली. सवाल त्यांच्या अस्तित्वाचा होता. म्हणून काही कम्युनिस्ट व्यक्तिशः लढ्यात उतरले.

नागपूरच्या गुप्तवार्ता अधिकाऱ्याचे कार्यालय व घर युवकांनी पेटवल्यामुळे शहरातील पोलीस चिंतातुर झाले होते. म्हणून नागपुरात तैनात केलेल्या लष्करी अधिकाऱ्यांना अमर्याद अधिकार प्रदान करण्यात आले. त्यामुळे लष्कराने स्वैरपणे शस्त्राचार केले. लष्कराच्या अतिरेकांची चौकशी करण्याची कॉंग्रेसने मागणी केली होती. पण मध्यप्रांत सरकारने ही मागणी चटकाफटकी फेटाळून लावली. इतकेच नव्हे तर संपूर्ण प्रांतास स्पेशल क्रिमिनल कोर्ट ऑर्डिनन्स लागू केला. त्यानुसार नागपुरात खास समरी कोर्ट्स व खास न्यायाधीश नेमण्यात आले.[२५] या वटहुकमानुसार आंदोलकांना न्याय मिळण्याची शक्यता नव्हती. म्हणून दिवसेंदिवस

नागपुरात लष्कराशी झुंज देणे कठीण झाले. त्यामुळे मगनलाल बागडी व त्यांचे सहकारी या परिसरातील लहान शहरांकडे वळले. खुल्या आंदोलनातील विद्यार्थ्यांचा सहभाग कमी झाला. तथापि जनमत धुमसत राहिले. निम-शहरी भाग पेटून उठला.

१३ ऑगस्ट रोजी कोंढाळी गावच्या मोर्चातील प्रमुखांना अटक करण्यास गेलेल्या पोलिसांवर निदर्शकांनी लाठीहल्ला करून दगडफेकही केली. म्हणून स्टेशन हाऊसमधून जादा कुमक मिळविण्यासाठी एक पोलीस जात असता त्याचा गणवेश उतरवून त्यास लोकांनी ताब्यात घेतले. तसेच स्टेशन हाऊसला आग लावण्याचा प्रयत्न केला. पोलीस गोळीबार सुरू झाल्यावर मात्र जमाव परत फिरला. गुमगाव चावडीतील कागदपत्रांना जमावाने आग लावली. लाल सेनेचे बागडी, श्यामनारायण काश्मिरी, बाबूराव गुप्ता यांच्या पथकाने मौदा पोलीस स्टेशनवर हल्ला करून ते काबीज केले. त्यावर तिरंगा फडकावून त्यांनी स्वातंत्र्य घोषित केले. नागपूर जिल्ह्यातील मोहपा, मोवाड व कुही यासारख्या गावांमध्येही पोलिसांवर हल्ले करण्यात आले.

रामटेकमधील सरकारी कार्यालये, रेल्वे स्टेशन व आगगाडीचे डबे पेटवून देण्यात आले. रामटेकच्या सरकारी कोषागारावर झडप घालून ३,५०,००० रुपयांची रक्कम स्वातंत्र्य सैनिकांनी हस्तगत केली असे मध्यप्रांत पोलिसांच्या अहवालात म्हटलेले आहे. काँग्रेसला आंदोलनात दहशतवाद अजिबात अभिप्रेत नव्हता, संकल्पितही नव्हता. तथापि ब्रिटिश सरकारने लिनलिथगो व विन्स्टन चर्चिल यांच्या अंतर्यामातील प्रेरणांचा स्वैरपणे अर्थ लावला आणि आंदोलन सुरू होण्यापूर्वी लोकांवर अमेरिकेच्या पर्ल हार्बरसारखा हल्ला केला. नोकरशाही व पोलिसांच्या युध्यमान पवित्र्यामुळे लोकांचा क्रोध अनावर झाला. म्हणून शक्य असेल तिथे जमावांनी पोलिसांवरही मात केली.

विदर्भातील रामटेक, बेनोडा, आष्टी, चिमूर व यावली येथील रणकंदन पोलीस व नोकरशाहीला दहशत बसावी असे होते. रामटेकमध्ये आंदोलकांनी दोन फौजदारांना ताब्यात घेतले आणि ब्रिटिश सत्तेच्या सर्व प्रतीकांवर सरळ हल्ला केला. रामटेक शहर व तालुक्यातील सरकारी मालमत्ता व सत्ताकेंद्रे नष्ट केली.

एकदा ३०० आंदोलकांच्या सशस्त्र गटाने रामटेकच्या डाक कार्यालयावर आक्रमण करून पोस्ट मास्तरला ताब्यात घेतले. दुसऱ्या जमावाने पोलीस ठाणे काबीज करून फौजदारालाच पकडून त्याला गांधी टोपी घालावयास भाग पाडले. शिवाय पोलीस ठाण्यातील कैद्यांना मुक्त करून ते ठाणे पूर्ण जाळून टाकले. रेल्वे रूळ उखडले. बंदोबस्तासाठी आलेल्या पोलिसांना व फौजदारालाही जमावाने आपल्या ताब्यात घेतले. त्यानंतर दोन्ही जमावांनी संयुक्तपणे तालुका कार्यालयास आग लावली आणि कोषागारातील उपरोक्त रक्कम हस्तगत केली. तदनंतर जमावाने रामटेकमधील कोर्ट, वन अधिकाऱ्याचे कार्यालय आणि अमली पदार्थ विक्रीचे सरकारी दुकान व नगरपालिकेच्या कार्यालयाची नासधूस केली.[२६] रामटेकमध्ये काही दिवस ब्रिटिश राज नव्हते. तथापि लोकांनी एकाही सरकारी कर्मचाऱ्याला ठार मारले नाही.

हिंदुस्तानी लाल सेना या क्रांतिकारक गटात ३००० युवक होते. लढाऊ बाणा असूनही त्यांनी हिंसाचार केला नाही. मात्र सरकारी यंत्रणा हतबल करणे आणि अराजक निर्माण करण्याचा त्यांचा उद्देश होता. मगनलाल बागडींच्या नागपुरातील पहिल्याच सभेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराजही होते, हे अर्थपूर्ण मानावे लागते. मानवहत्या हा लाल सेनेचा उद्देश नव्हता. लाल सेना व गावकऱ्यांनी खापा गावात ब्रिटिश राजसत्तेचे एकही चिन्ह शिल्लक ठेवले नाही. सावनेरचे पोस्ट ऑफिस व रेल्वे स्टेशन जाळून टाकले. जमाव कोर्टात व डाक बंगल्यात शिरल्यावर पोलिसांनी केलेल्या गोळीबारात एक आंदोलक ठार झाला. मौदा पोलीस ठाण्यावरील आक्रमणप्रसंगी तेथील फौजदार व पोलीस भीती वाटून पळून गेले. सिर्सीच्या पोलीस चौकीतील कागदपत्रे नष्ट करून आंदोलकांनी पोलिसांची शस्त्रे हस्तगत केली. केलोद रेल्वे स्टेशन जाळले. पण सरकारी कर्मचाऱ्यांची हत्या केली नाही.[२७]

**राष्ट्रसंत तुकडोजी :—**‘छोडो भारत’ची संकल्पना सूचित झाल्यापासून संत तुकडोजी महाराज श्रोत्यांच्या अंतःकरणात देशप्रेमाचा अंगार फुलवीत होते. काव्यरचनेचे विलक्षण लेणे लाभलेल्या या राष्ट्रसंताने १९३० च्या सविनय कायदेभंग आंदोलनापासून कीर्तन, भजन, प्रवचन व कथाकथनाच्या माध्यमामधून भारतभर

राष्ट्रवादी प्रबोधन केले. पोथी-पुराणातील भाकडकथा आणि निरर्थक साहित्यावर वेळ न दवडता त्यांनी आपली काव्यप्रतिभा व ओजस्वी वाणी राष्ट्रीय प्रबोधन कार्यासाठी वापरली. तुकडोजी स्वरचित किंवा इतरांची आशय-प्रधान कवने सुस्पष्ट आवाजात गाऊन श्रोत्यांना राष्ट्रभक्तीची प्रेरणा देत. म्हणूनच गांधीजी व काँग्रेसने तुकडोजींचा प्रबोधन व राष्ट्रकार्यासाठी उचित उपयोग करून घेतला. गांधीजींची अनेक सूत्रे, रूपक व तात्पर्यकथांचा अर्थ ग्रामीण जनतेला व युवकांना सांगण्याचे कार्य तुकडोजींनी केले. उदाहरणार्थ, "डू ऑर डाय" या मंत्राचा अर्थ उकल करताना ते सांगत, **"चलो जवानो, करके बताओ. अब कहने के दिन बीत गये." "चल उठ भारता, आता वेळ नसे निजण्याची. करी स्वतंत्र देशा आपुल्या, करी स्वतंत्र गावा आपुल्या".** आत्मप्रचिती देणारे तुकडोजींचे बोल व रोखठोक आणि रांगडे सवाल सामान्य जनांच्या काळजाला भिडत असत. म्हणून इतिहासकाराला तुकडोजींच्या महान राष्ट्रीय योगदानाचे श्रेय त्यांना द्यावेच लागते. त्यांना प्रथम ९ ऑगस्ट १९४२ रोजी नागपुरात निष्कारण अटक करून बंधमुक्त केले. नंतर ते आष्टी व चिमूरला जनजागृतीसाठी गेले. या दोन्ही गावांमध्ये जे रणकंदन झाले त्याचा आरोप ठेवून तुकडोजी यांना २८ ऑगस्ट १९४२ रोजी पुन्हा अटक झाली. सरकारला याचे भयंकर दुष्परिणाम भोगावे लागले.

तत्कालीन नागपूर शहर काँग्रेस समितीचे चिटणीस वामनराव जी. गावंडे मला अनेकदा समक्ष भेटत असता, नागपूर भागातील स्वातंत्र्य आंदोलनाबाबत आम्ही सखोल चर्चा केली होती. त्यातून आम्ही निष्कर्ष काढला होता की, जीवितहानी टाळण्याचे काँग्रेसचे धोरण होते. वामनरावांनी काढलेले १२ ऑगस्ट १९४२ चे पत्रक न्या. विकेंडेन यांच्या अहवालासोबत प्रसिद्ध झाले (पृ. ३२३-३२४). त्या पत्रकात सेक्रेटेरिएट, उच्च न्यायालय, जिल्हा न्यायालय व इतर सर्वच न्यायालये व सरकारी कार्यालयांचे कामकाज बंद पाडण्याचे आवाहन होते. त्यात पोलीस ठाणी, सर्व महाविद्यालये, शाळा, गिरण्या व कारखाने बंद पाडून आंदोलनासाठी बँकांमधील पैसा हस्तगत करण्याची सूचना होती. सर्व सरकारी सत्तास्थाने काबीज करणे हे ध्येय सुचविलेले होते. सभाबंदी व जमावबंदीचे उल्लंघन करून स्वातंत्र्याची प्रतिज्ञा

घेण्याचे आवाहन करण्यात आले. मात्र त्यात हिंसक कृत्याचा समावेश नव्हता. त्यात 'करेंगे या मरेंगे' हेच मूलभूत तत्त्व सांगितलेले होते.

**सरकारला शिकवला धडा :—**कारागृहात अडकवलेले महात्मा गांधी काराबाहेर असलेल्या गांधीजींपेक्षा अत्यंत अवघड असे शत्रू आहेत, हे निखळ सत्य स्वीकारण्यास लिनलिथगो महाशय नाखूष होते. **काँग्रेसविरुद्ध योजलेल्या आत्यंतिक उपाययोजनांचे समर्थन करण्यास्तव भारतमंत्री अमेरींनी काँग्रेसपासूनचे भयंकर धोके अतिशयोक्ती करून जगाला सांगितले. मात्र अमेरींनी धोक्यांचे जे भयंकर चित्र रेखाटले, तेच प्रक्षुब्ध जमावांनी समोर ठेवले.** काँग्रेसची योजना असल्याचे लॉर्ड अमेरींनी जे आरोप केले, तेच आम जनतेने आचरणात आणले. संयुक्त प्रांत व बिहारप्रमाणे नागपूर, रामटेक, यावली, बेनोडा आणि साताऱ्यामधील घटनांनी हेच सिद्ध झाले. त्यातून ब्रिटिशांचे फसलेले डावपेच, राक्षसी धोरण व चातुर्याचा अभाव दिसून आला. काही बोलकी उदाहरणे पाहा.

नागपुरावर ७२ तास ब्रिटिश राजवट नव्हती. शंकर महालेला फाशीची शिक्षा फर्मावणाऱ्या न्या. टी. डी. विकेंडेनलाही शंकरच्या धीरोदात्त देशप्रेमाची प्रशंसा केल्यावाचून राहवले नाही. रामटेकमधील सरकारी कचेऱ्यांचा विध्वंस करून कोषागारातील साडेतीन लाख रुपये हस्तगत करणाऱ्या स्वातंत्र्यप्रेमी जमावावर गोळीबार करण्यास प्रत्यक्ष मामलेदारानेच पोलिसांना रोखले होते. म्हणून सरकारने मामलेदारास डिसमिस केले व त्याला पेन्शनही नाकारले. सरकारी गाड्यांना कन्हान नदीवरील पुलावरून जाण्यास लाल सेनेच्या जवानांनी प्रतिबंध घातला होता. 'संरक्षक दल' नामक युवकांचे गट जाहीर करीत—'आता ब्रिटिश राज नाही.' त्यांच्यामागे मगनलाल बागडी व लाल सेना होती.

## यावलीचा संग्राम

अमरावती जिल्ह्यातील यावलीचा संग्राम हा लोकलढ्याचा एक नमुना होता. गोळीबार करून यावलीच्या गावकऱ्यांना धडा शिकवण्याचा प्रयत्न करणाऱ्या इंग्रज कलेक्टरलाही पळ काढावा लागला. तो पळत असताना जमावाने त्याला पकडले. शेवटी शरणागतीची भाषा वापरून त्याने सुटका करून घेतली.

केंद्रीय कायदेमंडळाचे सदस्य व वऱ्हाडचे नेते ब्रिजलाल बियाणी यांनी ११ ऑगस्ट १९४२ च्या **मातृभूमि** पत्रकात गांधीजींचा संदेश छापून सर्व धर्मांच्या व वर्गांच्या लोकांना ब्रिटिश सरकारशी सर्वथा असहकार करण्याचे आवाहन केले होते. सरकारला हतवीर्य, निष्प्राण व निरुपयोगी करण्याची त्यांनी हाक दिली. विद्यार्थी व युवकांना त्यांनी बजावले—" आज थांबायला वेळ नाही. विचार करायला व चर्चा करायलाही वेळ नाही. आज प्रत्यक्ष कृतीची वेळ आलेली आहे. व्यक्तीचे जीवन राष्ट्राच्या जीवनातच समाविष्ट असल्याने, विद्यार्थी वर्गाने राष्ट्रीय आंदोलनाचे नेतृत्त्व करावयाचे आहे." विशेष म्हणजे त्या संवेदनाक्षम वातावरणात अशा पत्रकांचा बराच परिणाम होत असे. त्यानुसार शोषणग्रस्त शेतकरी व कामकरी आणि त्यांच्या मुलांनी अमरावतीपासून वरूडपर्यंतच्या अदमासे १०० किलोमीटरच्या भागातील पाटील, पटवारी व सर्कल कर्मचाऱ्यांची कागदपत्रे हस्तगत केली. आणि त्यांच्या अरेरावीला शह दिला होता.

अमरावतीपासून १४ मैलावरील यावली या २००० वस्तीच्या गावात १९३० च्या आंदोलनापासून स्वातंत्र्य चळवळीची परंपरा होती. लक्ष्मण पाचघरे यांच्या नेतृत्वाखाली येथील गावकऱ्यांनी सविनय कायदेभंग आंदोलन केले होते. तेव्हा वीस वर्षांच्या लक्ष्मण पाचघरेंना पोलिसांच्या निर्दय लाठीमारात गंभीर शारीरिक इजा झाल्या होत्या. त्यांना बळी पडून पाचघरे तुरुंगातच हुतात्मा झाले होते. त्यांच्या सहकाऱ्यांनीही १९३० साली कारावास भोगला होता. बारा वर्षांपूर्वीच्या त्या स्मृती १९४२ साली पुन्हा जागृत झाल्या. त्यानुसार ऑगस्ट १९४२ मध्ये ग्रामसभेत सत्याग्रहींची नोंदणी करण्यात आली. गावाने आंदोलनाची तयारी केली.

१५ ऑगस्ट १९४२ रोजी पंजाबराव यावलीकर (देशमुख नव्हे), राजाराम कांडलकर व अण्णाजी मटघे यांच्या नेतृत्वाखाली गावकऱ्यांनी सरकारी दप्तर, शाळा व जंगल खात्याचे नाके ताब्यात घेतले. आणि जनतेने आपले स्वातंत्र्य घोषित केले. शिवाय जमावाने यावलीपासून दोन-तीन मैलांवरील माहुली पोलीस ठाण्याला वेढा दिला आणि तेथील कागदपत्र नष्ट केले. पंजाबराव यावलीकर व गावकऱ्यांच्या या धाडसाचा बदला घेण्यास्तव स्वतः कलेक्टर व डी.एस.पी.

पोलीस दलासह यावलीस आले (१८ऑगस्ट). खेडुतांनी गोफणीचा उपयोग करून गोटमार केली. खेडुतांनी केलेल्या कडव्या प्रतिकारामुळे कलेक्टर गंभीररीत्या जखमी झाला व बेशुद्ध पडला. मात्र तो शुद्धीवर आल्यावर घाबरून पळू लागला. साहजिकपणे जमावाने त्यास पकडले. मात्र शरणागतीचा बनाव करून त्याने सुटका करून घेतली. मध्यप्रांत पोलिसांच्या अहवालानुसार कलेक्टरला माघार घेणे भाग पडले; पण पोलिसांच्या गोळीबारात गावातील पाच माणसे मरण पावली व १२ जण जखमी झाले. गावकरी व पोलीस यांच्यातील ही १८ ऑगस्टची लढाई पूर्ण चार तास चालू राहिली. पण त्या चार तासांतही कलेक्टरला 'स्वतंत्र यावली' परत घेता आली नाही. बंदुकीच्या गोळ्या संपल्यावर पोलीस व अधिकारी पळून गेले. गावकऱ्यांच्या गोफणी, कुऱ्हाडी व तलवारीपुढे त्यांचा टिकाव लागला नाही. साहजिकच सरकारला भयंकर नामुष्की पत्करावी लागली.

तथापि १९ ऑगस्टला लष्कराने यावली गावास जबरदस्त वेढा दिला. तुंबळ लढा झाला. बळीराम बोराडे, तुळशीराम तडस, कृष्णराव पवार व राजाराम औरंगपुरे यांना लष्कराशी लढताना वीरमरण आले. मोतीरामचे ७० वर्षे वयाचे वडील जयरामजी व गणपत यावले जखमी झाले व नंतर पकडले गेले. चार वर्षांची शिक्षा भोगत असताना जयरामजी कारागृहात मरण पावले. गणपतचे अपील उच्च न्यायालयाने मंजूर करून त्यांची मुक्तता केली. तरी गोळीबारातील जखमा चिघळल्यामुळे गणपतराव सुटून आल्यावर मरण पावले. यावलीतील संग्रामास जबाबदार असल्याच्या आरोपावरून विशेष न्यायालयाने ६२ जणांना दोन ते सात वर्षे मुदतीच्या सक्तमजुरीच्या शिक्षा ठोठावल्या. या निकालाविरुद्धचा खटला डिसेंबर १९४४ पर्यंत चालू राहिला. अपीलात आरोपी दोषमुक्त ठरले. ज्वारीचे पीक जप्त करून सरकारने केलेली सामूहिक दंडाची मागणी सर्वस्वी बेकायदेशीर होती.

## काही नमुनेदार घटना

स्थलसंकोचापायी हजारो गावांमधील आदोलनाचा वृत्तान्त देणे शक्य नसल्याने काही नमुनेदार घटनांचाच वृत्तान्त इथे देणे भाग पडत आहे.

यावलीप्रमाणेच बेनोडा गावातही स्वातंत्र्यलढा पेटलेला होता. या गावातील बळीराम फरकाडे, यादवराव खांडपासोळे व त्यांच्या तीन सहकाऱ्यांना अटक करण्यासाठी आलेल्या फौजदाराला जमावाने विरोध करून परत जायला भाग पाडले. म्हणून त्याने अधिक मोठे पोलीस दल आणून धरपकड सुरू केली. त्यामुळे बेनोडा गावातील लोक तसेच जवळच्या लोणी, वेलोरा, पळसवाडा, सावंगा व इत्तमगावमधील लोकांनी हजारोंचा मोर्चा काढला. हा मोर्चा १६ ऑगस्टला बेनोडा पोलीस स्टेशनवर चाल करून येत असताना धवलगिरी नदी पुलाजवळ त्यावर पोलिसांनी गोळीबार केला. त्यात महादेव बारमासे, विनायक यावले, महादेव फंदाडे, महादेव वाघमारे व पांडुरंग मालपे मरण पावले. शिवाय कारावासात जडलेल्या रोगामुळे दोघे मरण पावले. एकास भूमिगत असताना मरणाने गाठले.

इंग्रजांनी लष्करी बळाचा यथेच्छ उपयोग करून अपूर्व दडपशाहीच्या मार्गांनी खुले आंदोलन आटोक्यात आणण्यात थोडेफार यश मिळविले. तथापि समाजातील काही घटक वगळता सर्व प्रजा दुर्मुखलेली व प्रक्षुब्ध झालेली होती. विदर्भातील मुसलमानदेखील इंग्रजांचे मित्र राहिलेले नव्हते. भूमिगत लढा काबूत आणणे सरकारला अवघड होऊन बसले. नागपूरचा कमिशनर सरकारला सांगत होता की, ‘ दडपशाहीमुळे घातपाती योजना वाढल्या; घातपाताविषयी सरकारला जनतेकडून माहिती मिळत नाही; लोकांनी गप्प राहण्याचाही कट केलेला दिसतो ’.

अकोला भागातील लोहमार्गावर घातपातांचे अनेक प्रयत्न झाले. मूर्तिजापूर-कारंजा स्थानकांदरम्यान रेल्वेच्या टेलिफोन तारा तोडण्यात आल्या. मिलिटरीची खास रेल्वे गाडी घसरवण्यातही भूमिगत आंदोलकांनी यश मिळविले होते. गाडी फार वेगात नसल्याने मोठी जीवितहानी झाली नाही. पण हा सरकारला मोठा हादरा होता. अमरावती-भंडारा दरम्यानच्या रेल्वेच्या टेलिग्राफ ताराही तोडण्यात आल्या. तुकडोजी महाराजांच्या वरखेड गावच्या जवानांनी वर्धा नदीवरील रेल्वे पूल नादुरुस्त करण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

अकोल्यात विद्यार्थी आघाडीवर होते. सावतराम गिरणीचे मालक स्वतःच कामगारांना संपावर जाण्यास प्रवृत्त करतात, हे गुप्तचरांच्याही लक्षात आले.

अकोला पोस्ट ऑफिसात संशयास्पद पत्रे फोडून वाचण्यासाठी सरकारने पोलीस बसवले होते.

१५ सप्टेंबर १९४२ पर्यंत मध्यप्रांतात ४,८५९ जणांना अटक करण्यात आली. स्वैरपणे फटके मारण्याची शिक्षा देण्यात आली. सर्व तुरुंग भरल्यामुळे पाच नवीन तात्पुरते तुरुंग बांधावे लागले. नोकरशाहीच्या अत्याचारांमुळे अक्षराष्ट्रे व जपानचा विजय व्हावा असे विदर्भातील लोकांना वाटते, हे सरकारच्याही लक्षात आले. बेछूट गोळीबार व तारतम्यहीन दडपशाहीमुळे लोकमत सरकारच्या जास्त विरोधात गेले, असा सर्वसाधारण समज झालेला होता. आष्टी व चिमूरच्या सरकारी अत्याचारांचे विदर्भात सर्वत्र दूरगामी परिणाम झाले. संत तुकडोजी महाराजांना अटक केल्यामुळे शोकांतिका अधिकच गडद झाली. त्यांचे आरती मंडळ अधिक लोकप्रिय झाले. अकोल्याचे सरकारी अभियोक्ता वाय. आर. ओक यांनी सरकारी पदाचा राजीनामा देऊन ते चळवळीत सामील झाले होते. [२८]

संयुक्त प्रांत आणि बिहारमध्ये केवळ परपीडा आनंद म्हणून खादी भांडारांना आग लावणारे व बंदुकीच्या गोळीने तिरंगा झेंडा उडवणारे काही आय.सी.एस नोकरशहा होते. नागपुरातही तसाच एक होता. मध्यप्रांत-वऱ्हाड सरकारचा एक नरसंहारक अवर सचिव सुलिवन (Sullivan) याने क्लबात फुशारकी मारून आनंदभरे सांगितले की, त्याने २४ माणसांची हत्या करण्याचा हुकूम दिला होता.

शेतसारा बंदीची चळवळ विदर्भातील फक्त अकोला जिल्ह्यातच करण्यात आली. भंडारा परिसरातही आंदोलनाचा सर्व कार्यक्रम अमलात आणण्यात आला. या शहरातून गव्हाची पोती भरलेला ट्रक नागपूरला नेला जात असताना ५००० च्या जमावाने तो अडविला. जमावाने घोषणा देत अधिकाऱ्यांना बजावले, " आम्हास खायला येथे धान्य नाही. आम्ही आमच्या गावातून धान्य बाहेर जाऊ देणार नाही. " त्यामुळे पोलिसांनी जमावावर गोळीबार केला व त्यात दोन आंदोलकांना ठार मारले. त्यामुळे अधिकच प्रक्षुब्ध झालेल्या आंदोलकांनी भंडारा जिल्हा कार्यालयावर हल्ला केला व पहारा करणाऱ्या एका पोलिसावर गोळी झाडली.

भूतपूर्व हंगामी काँग्रेस अध्यक्ष व टिळकपंथीय असलेले माधव श्रीहरी अणे त्या काळात मध्यवर्ती मंत्रिमंडळात मंत्रिपद उपभोगत होते. त्यांच्यामुळे यवतमाळ

जिल्ह्यातील १९४२ ची चळवळ सौम्य स्वरूपात राहिली असावी. गांधीजींच्या २१ दिवसांच्या उपोषणात त्यांच्या जीवाला भयंकर धोका निर्माण झाला, तरी ब्रिटिश सत्ताधीश त्यांना कारावासात मरू द्यायला तयार होते. तेव्हा राष्ट्रव्यापी लोकमताचा दबाव म्हणून होमी मोदी, अणे आणि एन. आर. सरकार यांनी पदाचा राजीनामा दिला. महाराष्ट्रातील तिसरे मंत्री आंबेडकर यांनी मात्र लोकमताचा अनादर करून राजीनामा दिला नाही. अणेंनी राजीनामा दिला तो केवळ लोकमताच्या दडपणाखाली!

## वर्ध्याचे योगदान

गांधीजी, बजाज व विनोबा भावे यांचे मुख्यालय आणि आश्रम असलेल्या परिसरात आंदोलन अत्यंत तीव्र स्वरूपात पेटणे स्वाभाविकच होते. मार्च १९४२ पासून येथूनच आंदोलनविषयक विचारप्रवर्तनाला प्रारंभ झाला, हे लपलेले नव्हते. छोडो भारतचा निर्णय येथेच झाला. त्याआधीही याबाबतचे आपले मनोगत गांधीजींनी लुई फिशरला येथेच सांगितले होते. दिल्लीत स्टॅफर्ड क्रिप्सला ठणकावून गांधीजी वर्ध्याला परत आले होते. त्यातून तिथे जमलेल्या पत्रकारांना संभाव्य आंदोलनाचा अंदाज आला होता. ब्रिटिश सरकारलाही पुढील धोक्याची जाणीव झालेली होती. गांधीजींनी खुर्शिदबेन नौरोजी, डॉ. लोहिया, मीराबेन, नंदन केवलार, अन्नादा चौधरी वगैरेंना लोकमताच्या समक्ष निरीक्षणासाठी ओरिसा, बंगाल व आसाममध्ये येथूनच पाठविले होते. एप्रिलपासूनच भारतातील अगणित गांधीवादी कार्यकर्ते मार्गदर्शनार्थ इथे येत होते. नंतर काँग्रेस कार्यकारिणीने छोडो भारतचा निर्णय वर्ध्यात घेतल्यापासून देशभर आंदोलनाची पूर्वतयारी सुरू झाली. ब्रिटिश सरकारने तर आधीपासूनच लढा ठेचून काढण्यासाठी नियोजन करून ठेवले होते.

१ मे १९४२ पासूनच मध्यवर्ती गुप्तवार्ता अधिकारी रायसाहेब शुकूल याने वर्धा-सेवाग्रामभोवती गुप्तचरांचे जाळे पसरले होते. त्यानेच १५ मे च्या सुमारास गांधीजींचे मनोगत गव्हर्नर सर हेन्री ट्वायनॅम यांना कथन केले. याविषयीचे वृत्त व्हाइसरॉयला सत्वर कळविताना मध्यप्रांत-वऱ्हाडचे हे गव्हर्नर म्हणतात की, 'गांधीजी आंदोलन उभारण्यास अत्यंत कटिबद्ध आहेत. तथापि स्थानिक काँग्रेसजन आंदोलनास फारसे

उत्सुक व उत्साही नाहीत' (२५ मे १९४२ चे पत्र). त्यानंतर ९ जूनच्या पत्रात सर हेन्री व्हाइसरॉयला लिहितात की, '१९३२ च्या सविनय कायदेभंगाच्या प्रसंगी गांधींना व काँग्रेसला चिरडून टाकल्याकारणाने गांधींना १९३४ साली काँग्रेसमधून निवृत्त व्हावे लागले होते. म्हणून आताही तशीच कठोर कारवाई करून गांधीजींना प्रभावहीन करावे,' अशी हेन्रींनी लॉर्ड लिनलिथगोंना गळ घातली. या पत्रातच ते मूर्खपणे प्रतिपादन करतात की, या प्रांतात गांधीजींचे संकल्पित आंदोलन व्यापक तर होणारच नाही, उलट फुसके ठरेल.

हा इंग्रज गव्हर्नर कितपत मुत्सद्दी होता व त्याची आकलनशक्ती किती होती हा माझा मुद्दा नाही. पण एक तर तो व्हाइसरॉयची दिशाभूल करीत होता अथवा तो आपल्या मूर्खपणाच्या मनोराज्यात रममाण झालेला होता, हे त्याने व्हाइसरॉयला पाठविलेल्या २४ जूनच्या पत्रातूनही दिसून येते. त्याच्या मते वऱ्हाड प्रांत आंदोलनापासून लांबच राहील. त्याची काही वाक्ये पाहा.

" I can count on Berar remaining almost wholly aloof ; in fact, there are large purses waiting for me there, which have been collected without any pressure and which are larger than anything that Gandhi would be able to collect, I venture to say, for any of his schemes.... Then in the Nagpur Division, including Gandhi's home town district of Wardha, there is a large Maratha and Marathi speaking element which thinks on much the same lines as Berar, although demonstrations could be successfully staged in Nagpur City". ट्वायनॅमचा आशावाद वऱ्हाडचे बाबतीतसुद्धा खरा नव्हता. मात्र तेथील काही धनिक व जमीनदारांनी सरकारी युद्धनिधीसाठी मोठमोठ्या रकमा दिल्या होत्या. तथापि अमरावती व वर्धा-नागपूरचे बाबतीत मात्र ट्वायनॅमचा अंदाज साफ खोटा ठरला.

त्याच्या २९ जुलैच्या पत्रातील भाषा बदलली. येऊन ठेपलेले आंदोलन उघड बंड (Open Rebellion) असून त्याविरुद्ध परिणामकारक प्रतिरोधक उपाय

योजावे आणि दहशत बसविण्यासाठी गांधींना देशाबाहेर हद्दपार करावे असा त्याने व्हाइसरॉयला सल्ला दिला. " The latest information available to me indicates that the movement will be designed on the most subversive and dangerous lines.... Firmest possible measures at the start are essential to prevent the movement gaining ground and absorbing the whole time of the Police force."[२१]

पूर्वी आय. सी. एस. नोकरशहा असलेला ट्वायनॅम आंदोलन चिरडून टाकण्यास्तव आधीच कटिबद्ध होता. शून्य तासात प्रकाशित करण्यासाठी त्याने आधीच असाधारण **राजपत्र** आणि सर्व जिल्ह्यांतील अधिकाऱ्यांसाठी सांकेतिक सूचनांचा मसुदा तयार ठेवला होता.

गांधीजींचे **हरिजन** मधील उतारे व वर्धा-सेवाग्राममधील वार्ता दिल्लीस पाठविण्यासाठी शासकीय यंत्रणा तत्पर होती. आधीपासूनच अतिरिक्त पोलीस बळ व सैन्यदल सर्व संवेदनाक्षम भागात तैनात केलेले होते. नागपूरच्या एअर-रेड ऑफिसरला वर्धा जिल्ह्यासाठी विशेष पोलीस अधिकारी म्हणून नियुक्त केले होते. नागपूर सेक्रेटेरिअटमधील दोन अवर सचिव व एका उप सचिवाला वर्ध्यासाठी विशेष दंडाधिकाऱ्याचे अधिकार देण्यात आले. हे अधिकारी पोलीस व सैन्यदलाच्या पथकांबरोबर तैनात करण्यात आले होते. नवीन भरती केलेल्या पोलीस अधिकाऱ्यांना मुंबई, महू व सिकंदराबादला पाठवून प्रशिक्षित करण्यात आले.

**आंदोलन पेटले :—**अधिवेशनानंतर मुंबईहून परत येत असलेल्या बहुतेक पुढाऱ्यांना वाटेतील रेल्वे स्थानकांमध्ये अटक केली होती. जमनालाल बजाज १९४१ सालीच मरण पावले होते. विनोबा भावे ९ ऑगस्टला वर्धा-पवनारमध्ये पकडले गेले. गुप्तचरांच्या अहवालात नमूद आहे की, मुंबईतील ' एआयसीसी ' ने ९ ऑगस्टला प्रसारित केलेला आंदोलनाचा लेखी स्वरूपातील कार्यक्रम वर्धा व देवळीला आणला जमनालाल बजाजांचे सुपुत्र रामकृष्ण बजाज आणि गोपाळराव काळे यांनी. हा कार्यक्रम त्यांनी वर्ध्यातील जाहीर सभेत वाचून दाखविला. या कार्यक्रमात शाळा-कॉलेजांवर बहिष्कार घालण्याचे तसेच रेल्वे व दूरसंचरण व्यवस्था विसकळीत करण्याचे आवाहन होते. सभेजवळ असलेल्या डी.एस.पी.ने.

पुढे जाऊन कार्यक्रमाची प्रत हिसकावून घेतली खरी. परंतु त्यामुळे जमाव आक्रमक होऊन लोकांनी पोलिसांना घेराव घातला. गोविंदराम सेकसरिया वाणिज्य महाविद्यालयाचे गांधीवादी प्राध्यापक ठाकूरदास बंग यांनी जाहीर सभेत पोलिसांच्या अरेरावीचा धिक्कार केला. तसेच त्यांनी जनतेला व विशेषतः दुकानदारांना आवाहन केले की, त्यांनी पोलिसांना जीवनावश्यक वस्तू देऊ नये.

सरकारच्या दडपशाहीमुळे जनमत अधिकच प्रक्षुब्ध झाले. राधाकृष्ण बजाज व दीनदयाल चुडीवाले हे गांधीवादी कार्यकर्ते जमावास आवरण्याचा प्रयत्न करीत. मात्र बाहेरच्या आंदोलनाच्या बातम्या येऊ लागताच लोक अनावर झाले. त्यांनी एकाही सरकारी माणसाची हत्या केली नाही. तरी सरकारचा निषेध करणाऱ्या माणसांवर पोलिसांनी गोळीबार करून ११ ऑगस्टच्या दुपारी जंगलू धोंडबाजी ढोरे यांस ठार केले. १९४२ चा हा जिल्ह्यातील पहिला हुतात्मा ! त्यामुळे लोक अधिकच प्रक्षुब्ध झाले. लढा पसरला. विद्यार्थी अधिकच आक्रमक झालेत, अनावर झालेत. ब्रिजलाल बियाणी यांनी **मातृभूमि** पत्रकातून केलेले उपरोक्त आवाहन सर्वत्र चर्चेचा विषय बनले. त्यास प्रचंड प्रतिसाद लाभला. ९ ऑगस्ट रोजी गांधीजींनी मुंबईतून दिलेला पूर्वोक्त संदेश लोकांपर्यंत पोहोचल्यामुळे त्याचे अनुपालन करणे हे आद्यकर्तव्य होय, असे आश्रमवासी व गांधीवादी कार्यकर्ते लोकांना सांगत होते. ‘ आंदोलनाच्या यज्ञात आपले जीवित साफल्य शोधा ’ असा एक नारा निनादला. त्यामुळे सरकारी बळाची तमा न बाळगता विद्यार्थी, नागरिक व आश्रमवासी वर्धा शहरात व गावोगावी उग्र निदर्शने करू लागले.

प्रा. ठाकूरदास बंग यांनी ११ ऑगस्ट रोजी प्राध्यापकपदाचा त्याग करून आंदोलनासाठी वाहून घेतले. वर्धा वाणिज्य महाविद्यालयाचे आश्रयदाते गोविंदराम सेकसरीया हे स्वतः गांधीभक्त असल्याने या संस्थेवर पोलिसांची कडक नजर होतीच. त्यानुसार सरकारने हे महाविद्यालय ताब्यात घेतले. त्यामुळे विद्यार्थी अधिकच चवताळले. १४ ऑगस्ट रोजी वर्ध्यात तीन वेळा गोळीबार झाला. त्याच दिवशी देवळीत डाकघर व तारायंत्र आणि पोलीस ठाणे भस्मसात करण्यात आले. देवळीतील गोळीबारात एक जण हुतात्मा झाला. प्रारंभापासूनच आंदोलनास देवळीत चांगला प्रतिसाद होता. वर्धा व देवळीनंतर खरांगणा गावीदेखील आंदोलन

तीव्र स्वरूपात पसरले. गांधीजींचे एक अनुयायी महादेव अनंत मोघे या गावी गेल्यापासून (१३ ऑगस्ट) तेथील आंदोलन तीव्र झाले. आगळीक करणारा पोलीस उप निरीक्षक व चार हवालदारांना लोकांनी चोप दिला होता. त्या पार्श्वभूमीवर स्थानिक कार्यकर्ते भानुराव उमक यांनी १५ ऑगस्ट १९४२ रोजी झेंडावंदन करून सरकारविरुद्ध बंड घोषित केले. मात्र सरकारने अतिरिक्त पोलीस कुमक पाठवून खरांगणाचे बंड मोडून काढले.

क्रांतिलढ्यामुळे वर्ध्यातील नवभारत विद्यालय म्हणजे पूर्वीचे मारवाडी विद्यालय सहा आठवडे बंद राहिले. नंतरही या विद्यालयाचे शिक्षक व बरेच विद्यार्थी कारावासात गेल्यामुळे ते बंद पडले. नंतर काही काळ वाणिज्य महाविद्यालयाचे वर्ग तिथे भरत असत. वाणिज्य महाविद्यालय राष्ट्रवादी विचारवंतांच्या प्रभावाखाली असल्याने अदमासे सहा महिने बंद राहिले. येथील २०० पैकी ५० विद्यार्थी आणि बारा प्राध्यापकांपैकी प्राचार्यांसह सहा प्राध्यापकांनी आंदोलनात सामील होऊन कारावास भोगला. प्राचार्य श्रीमन् नारायण अगरवाल व प्रा. ठाकूरदास बंग हे कारावास भोगलेले प्राध्यापक पुढील काळात थोर गांधीवादी विचारवंत म्हणून विख्यात झाले. वाणिज्य महाविद्यालयाचे विद्यार्थी आंदोलनाचा झटून प्रचार करीत राहिले. त्यांच्यापैकी मोतीराम होले अखेरपर्यंत पकडला गेला नाही.

वर्धा व जवळच्या तीन आश्रमांमध्ये सुप्रसिद्ध गांधीवादी विचारवंतांचे व नेत्यांचे मुख्यालय होते. ते सर्वच पकडले गेले. विनोबाजी प्रथम नागपूर जेलमध्ये व नंतर वेलोरमध्ये बंदिस्त होते. काका कालेलकर जबरपूरमध्ये बंदिस्त झाले. जे. सी. कुमारप्पा बरेच दिवस मुंबईतील भूमिगत आंदोलनात कार्यरत राहिल्यावर पकडले गेले. **हरिजन** पत्रक चालवणारे किशोरीलाल मश्रूवाला व गोपाळराव काळे लवकरच पकडले गेले. गोपाळराव वाळुंजकर बरेच दिवस भूमिगत होऊन आंदोलन चालवित राहिले. शंकर त्र्यंबक ऊर्फ दादा धर्माधिकारी, आचार्य आर्यनायकम्, श्रीकृष्णदास जाजू, श्रीमन् नारायण, कुंदर दिवाण, बाबाजी म्हणजे महादेव अनंत मोघे, सदूभाऊ गद्रे, भाऊ पानसे यांच्यासारखे गांधीवादी कार्यकर्तेदेखील घातपाती कारवायांना विरोध करण्याच्या मनःस्थितीत नव्हते. स्वामी सत्यभक्त हे

बोरगाव (मेघे) आश्रमात राहून प्रचार पत्रके काढत व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करीत. सेंट्रल डिरेक्टोरेटचे एक भूमिगत नेते बाबा राघवदास या आश्रमात येऊन गेले होते. येथून अनेकांनी मार्गदर्शन घेतले.

या आंदोलनात विद्यार्थी व महिला आश्रमाची युती झाल्याने आंदोलन अधिक व्यापक व परिणामकारक झाले. बृहत् बजाज परिवार, सत्याग्रह आश्रम, महिलाश्रम, अ. भा. चरखा संघ, ग्रामसेवा मंडळ, अ. भा. ग्रामोद्योग मंडळ, गोसेवा संघ या सर्व विधायक कार्य करणाऱ्या संघटना आंदोलनात अत्यंत सक्रिय झालेल्या होत्या. गांधीवाद मनोभावे स्वीकारूनही त्यांतील कार्यकर्ते परिस्थितिवश होऊन भूमिगत चळवळीतही सहभागी झाले. महिलाही पुरुषांच्या बरोबरीने लढल्या. सिंदी, वर्धा, आर्वी, हिंगणघाट, बल्लारशा भागात रेल्वेवर घातपात करून लोकांनी अधिकाऱ्यांना हैराण केले होते. रेल्वे घातपातांमध्ये महिलांचाही सहभाग होता.

## आष्टी व चिमूरची शोकांतिका

आष्टी व चिमूरला स्वातंत्र्य सैनिकांचे शौर्य, बलिदान व त्यागाचेही दर्शन घडले. महिलांच्या भयानक व्यथा, वेदना व यातनांचेही दर्शन झाले. तसेच ब्रिटिश सरकारचे क्रौर्य, सूडबुद्धी आणि मानवी शोकांतिकेचेही दर्शन घडले. इथे सरकारी यंत्रणेने संस्कृती व सभ्यतेच्या मर्यादांचा भंग केला. सरकारने वर्ध्यातील कॉमर्स कॉलेज बंद करून विद्यार्थांना वसतिगृहातून काढून टाकले होते. त्यामुळे मुले आष्टी व चिमूरला आली ती चवताळून! त्याचप्रमाणे संत तुकडोजींना नागपूरच्या सभेत केवळ देशभक्तीपर गीत गाण्यासाठी अटक केली होती. त्यामुळे लोकमत प्रक्षुब्ध झाले. सुटकेनंतर तुकडोजी आष्टीत येताच आंदोलन पेटले. ऑगस्ट ११ रोजी आष्टीत पहिली गुप्त सभा झाली. पुढील दिवशीच्या सभेत संत तुकडोजींनी मार्गदर्शन केले. आवेशपूर्ण व स्फूर्तिदायक कवनांद्वारे त्यांनी नागरिकांची मने जागृत केल्यावर खडकी, सिरसोली, मोझरी इत्यादी पंधरा गावांमध्ये मने उद्दीपित केली.

आष्टीमधील तेरा ऑगस्टच्या सभेत आष्टीच्या पोलीस ठाण्यावर १७ तारखेला सत्याग्रह करण्याचे ठरले. आष्टीच्या परिसरातील गावांमध्ये प्रचार पत्रके वाटण्यात आली. खडकी गावात पाटील-पटवाऱ्याच्या कागदपत्रांना आग लावण्यात आली.

त्याबरोबर क्रियाशील कार्यकर्ते किन्हाळा, अंतोरा, खंबीत व वडाळ्याकडे निघाले. आरती मंडळ नावाची काँग्रेस स्वयंसेवकांची संघटना कमालीची क्रियाशील बनली. मुंबईत काँग्रेस कार्यकारिणीने पारद केलेल्या ठरावाच्या प्रती स्वयंसेवक वाटत असत. गावोगावी शासकीय कागदपत्रे नष्ट करण्याची व सरकारच्या निषेधाची मोहीम निघाली. १६ ऑगस्टला वडाळ्याचे १००-१५० स्वयंसेवक नियोजित सत्याग्रहासाठी आष्टीला येऊन पोहोचले. विलक्षण स्फूर्तिदायक वातावरणात सर्व सत्याग्रही आष्टीच्या गांधी चौकात जमले. याच स्थळी गांधीजींनी १७ मार्च १९२१ रोजी प्रेरणादायक भाषण दिले होते. त्याची स्मृती म्हणून १७ ऑगस्ट १९४२ रोजी आष्टीचा सत्याग्रह आयोजित केलेला होता. १६ ऑगस्ट १९४२ च्या सकाळी ३००० सत्याग्रही गांधी चौकातून पोलीस ठाण्यावर मिरवणुकीने गेले.

आष्टी ठाण्यावर पोलीस उपनिरीक्षकाच्या दिमतीला सात हवालदार होते. पोलीस ठाण्यावर राष्ट्रीय ध्वज फडकवणे व कागदपत्र नष्ट करणे हा सत्याग्रहींचा उद्देश होता. आंदोलकांनी सत्याग्रही निर्धाराने पोलीस उपनिरीक्षकास आपला उद्देश सांगून खादी पोषाख परिधान करण्यास सांगितले. उपनिरीक्षकास प्रसंगावधान पाळणे भाग असल्याकारणाने त्याने ती सूचना मान्य केली. तथापि त्याने सरकारी कागदपत्रांचे रक्षण करण्याचा निर्धार व्यक्त केला. दरम्यान आंदोलकांच्या एका पुढाऱ्यास पोलिसांनी बंदिस्त केले. त्यामुळे आंदोलक भडकले, आणि काही जणांनी मागच्या बाजूने जाऊन कागदपत्र हस्तगत करण्याचा प्रयत्न केला. तात्काळ उपनिरीक्षकाने हवालदारास गोळीबार करण्यास खुणावले. क्षणार्धात गोळ्यांचा वर्षाव होऊन **सात स्वातंत्र्य सैनिक हुतात्मा झाले.** संकल्पित शांतियुद्धाचा हा पूर्वरंग अशा प्रकारे रक्तरंजित झाला.

गोळीबारामुळे जमाव पांगला. तथापि त्याची प्रतिक्रिया उमटणे स्वाभाविक होते. उपनिरीक्षकाच्या हटवादीपणाचा त्याच्या दोन सहकाऱ्यांनीसुद्धा निषेध केला. सर्व पोलीस ठाण्यातून निघून गेले. तेथे उरला फक्त उपनिरीक्षक. इतक्यात आष्टी परिसरातील गावांमधून शेकडो सत्याग्रही आष्टीस आले. अधिक मोठा जमाव पोलीस ठाण्यावर चाल करून आला—हिंसेचा बदला हिंसेने घेण्याच्या तयारीने.

अशा स्फोटक परिस्थितीतसुद्धा उपनिरीक्षक हिंसक पवित्र्यातच होता. त्याने पुन्हा गोळीबार केला व एका तरुणाला ठार केले. त्यामुळे खवळलेल्या जनसमुदायाने प्राप्त परिस्थितीत स्वाभाविक तेच केले.

सरकारी गोपनीय अहवालामधून दिसते की, आंदोलकांनी पोलिसांना खादी कपडे घालून मिरवणुकीत तिरंगा झेंडा हातात घ्यावयाला भाग पाडले. ही मिरवणूक गावभर फिरवून आंदोलकांनी उपनिरीक्षक व तीन हवालदारांना ठार केले आणि दोन हवालदारांना जिवंत जाळले. सर्वांच्या देहांची विटंबना केली. पोलीस ठाण्यावर तिरंगा फडकवला. ठाणे जाळून खाक केले. त्याचबरोबर गावातील शासकीय विश्रामगृह, शाळा आणि महसूल कार्यालय तसेच डाक घर लूटून जाळून टाकण्यात आले. शिवाय गाव परिसरातील वन विभागाचे आगार व शासकीय कागदपत्रे नष्ट केली. एकूण सात हवालदारांपैकी पाच हवालदारांची व उपनिरीक्षकाची हत्या करण्यात आली.

आष्टी पोलिसांच्या हत्येस्तव ११४ काँग्रेसजनांवर सरकारने खटला भरला. या खटल्यात हिंसाचाराची जबाबदारी काँग्रेसवरच टाकण्यात आली. हे कोर्टाच्या निकालपत्रातील खालील उताऱ्यावरून दिसून येते.

“ At about 11 a.m. a mob consisting of about 250 men came right upto the gate of the Station House shouting the usual Congress slogans. The Sub-Inspector and Head Constable met them at the gate, and the former tried to argue with them in vain. He was even prepared to shout with them the Congress slogans and to permit them to hoist the Congress flag on the Station House building, but the leaders of the mob wanted him to hand over the Station House Records for destruction.........When he declared that he would protect Government property with his life, the leaders ordered the mob to get to their work .......... At this stage, finding the mob uncontrollable,

two constables opened fire knocking down about half a dozen men, out of whom five succumbed to their injuries. The firing had the desired result and the mob fled in disorder".[३०]

समकालीन स्वातंत्र्य आंदोलकांच्या आठवणीनुसार कुणालाही जिवंत जाळण्यात आले नव्हते. उपनिरीक्षकावर जनसमुदायाने मात करून त्याला ठार केल्यावर लपून बसलेल्या पाच पोलिसांना लोकांनी शोधून काढून त्यांची हत्या केली व सर्वांच्या पार्थिव देहांना अग्नी दिला हे मात्र खरे. उपनिरीक्षकाच्या विधवा पत्नीने न्यायालयात अशाच अर्थाची साक्ष दिली. पोलिसांच्या कुटुंबीयांना मारहाणही केली नव्हती.

आष्टीच्या स्वातंत्र्य संग्रामात काँग्रेसजनांव्यतिरिक्त मुसलमानही समाविष्ट होते. हुतात्मा नबाब रशीदखान सहादतखान हा त्यांच्याचपैकी एक देशभक्त होता. तीनचार वीरांगनाही गोळीबारात जखमी झाल्या. गुलाबराव वाघ, पांडुरंग सव्वालाखे, मोतीराम होले, रामभाऊ लोहे व नत्थोबाजी हे तेथील आंदोलकांचे नेते होते.

आष्टीची कन्या शाळा व अँग्लो व्हर्नाक्युलर स्कूल बरेच दिवस बंद ठेवण्यात आले होते. आष्टीच्या शोकांतिकेने सरकारी यंत्रणेचा क्रोध अनावर झाला होता. सूडबुद्धीने भडकलेल्या नोकरशाहीने लोकांना ठेचून काढण्याचा पवित्रा घेतला. गोरे सेनादल व कडवी निवडक भारतीय पलटण आष्टीस आली. पलटणीने धरपकड केली व दहशतीचे वातावरण निर्माण केले. सेनादलाने गावातील बहुसंख्य पुरुषांना ताब्यात घेतले. गावात शिल्लक राहिले फक्त म्हातारे, मुले व महिला. सूडबुद्धीने आष्टी व १० मैलांच्या परिसरातील गावांवर एकूण ५०,००० रुपयांचा सामूहिक दंड ठोठावण्यात आला. दंडाची वसुली हा मूर्तिमंत पाशवी अत्याचार होता. म्हातारे व महिलांच्या छातीवर संगिनी रोखून दंडाची वसुली करण्यात आली. घरातील सामान जप्त केले. गोऱ्या तसेच बऱ्याच काळ्या सैनिकांनी महिलांवर पाशवी दुराचार व बलात्कार केले. **चिमूर व आष्टीच्या अत्याचारांच्या निषेधार्थ प्रा. भंसाळी यांनी केलेल्या उपोषणाची कथा पुढे दिलेली आहे.**

आष्टीप्रमाणेच देवळी आणि आर्वीतही पोलीस व सेनादलाने भीषण गोळीबार केला. विशेष म्हणजे पोलिसांव्यतिरिक्त इतर गोरे मुलकी अधिकारीदेखील सूडाच्या भावनेने गोळीबार करीत. तरीही सरकारी हिंसाचारास न जुमानता सेवाग्राम, पवनार आश्रमातील स्वयंसेवक निर्धाराने लढत राहिले. महिला आश्रमातील महिला मिरवणुका काढून गावकऱ्यांमध्ये उत्साह निर्माण करीत राहिल्या. चंद्रपूर व जबलपूर व शिवनीपर्यंत त्या भूमिगत कार्य करीत. खरांगणा गावावर लोकांनी आपली सत्ता प्रस्थापित केली होती. इंग्रजांनी सेनाबळावर ती परत मिळवली.[३१]

**चिमूरमधील जुलूमशाही :—**चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूरमध्ये बरीच राजकीय जागृती झालेली होती. या गावात काँग्रेसप्रमाणेच हिंदुसभा व राष्ट्रीय स्वंयसेवक संघाच्याही शाख्या होत्या. येथील मुसलमानदेखील आंदोलनात सहभागी झाल्यामुळे सरकारी अधिकाऱ्यांना धक्का बसला होता. चिमूरमध्ये करबंदी व कायदेभंग मोहीम सुरू झाली. येथेही संत तुकडोजी व त्यांच्या आरती मंडळाने आंदोलन तीव्र केले होते. १३ व १४ ऑगस्ट रोजी झालेल्या सभांमध्ये राजद्रोही भाषणे करण्यात आली. तथापि दोन्ही सभांमध्ये भाषणे करणाऱ्या स्थानिक पुढाऱ्यांना पकडण्याचा नायब तहसीलदाराचा हुकूम पुढाऱ्यांनी अक्षरशः धुडकावून लावला. विशेष म्हणजे पोलीस प्रथम लोकांना शरण आले. १६ ऑगस्टपर्यंत चिमूरमध्ये जणू जनताराज होते. चिमूरला वाहन जाण्यासाठी वरोऱ्याहून एकमेव रस्ता होता. १६ तारखेला सशस्त्र पोलिसांची कुमक या गावात दाखल झाली. त्यांनी नेत्यांना पकडले. तरीही आंदोलकांचा एक मोठा जमाव पोलीस ठाण्यावर व दुसरा डाक बंगल्यावर चाल करून आला. तेथे थांबलेल्या नायब तहसीलदारास आणि एस.डी.एम. ला आंदोलकांनी डाक बंगल्यात कोंडून ठेवले. इकडे पोलीस ठाण्यावर चालून आलेल्या जमावावर पोलिसांनी गोळीबार करून काही जणांना जखमी केले. त्यानंतर डाक बंगल्यातील अधिकाऱ्यांची सुटका करण्यासाठी पोलीस तिकडे निघाले. म्हणून जमावाने त्यांचा पाठलाग केला. याप्रसंगी जमाव व पोलीस यांच्यात निकराचा लढा झाला होता.

या सामन्यात फौजदार व एक पोलीस 'महात्मा गांधी की जय' अशा घोषणा देत शरण आले. काही पोलीस पळून गेले. एक आंदोलक मारला गेला. त्याला ठार मारणारा पोलीस निरीक्षक दमून खाली बसला. या निरीक्षकाला लोकांनी शरण येण्याचा पर्याय दिला. पण त्याने शरण येण्यास नकार दिल्यामुळे जमावाने त्याला व दुसऱ्या हवालदारास ठार मारले. प्रक्षुब्ध झालेल्या जमावाने डाक बंगल्यात कोंडलेल्या दोन अधिकाऱ्यांचाही असाच अंत घडविला. जमावाने चिमूरचा डाक बंगला, पोलीस ठाणे, जंगल खात्याच्या चौक्या व डाक कार्यालय आणि महसूल खात्याचे सर्व रेकॉर्ड नष्ट केले. तो नागपंचमीचा दिवस होता. त्या चार मृत सरकारी कर्मचाऱ्यांची प्रेते जमावाने जाळून टाकली.[३२]

तथापि चिमूरच्या शोकांतिकेचा हा फक्त पहिला अंक होता. तीन दिवसांनी सुरू झाली भयानक सूडाची कारवाई! फॅसिस्ट अत्याराचारांचे आणि पाशवी बलात्कारांचे क्रौर्य! जिल्हा दंडाधिकारी १७ ऑगस्टला ५० पोलीस बरोबर घेऊन चिमूरला जाण्यास निघाला. पण वाटेत झाडे पडलेली असल्याने त्याला परत फिरावे लागले. मात्र १९ ऑगस्टला २०० गोऱ्यांचे सेनादल व महार पलटणीतील ५० सैनिक एवढी फौज घेऊन जिल्हा दंडाधिकारी स्पेशल रेल्वे गाडीने पुन्हा वरोऱ्याला गेला. तेथून सेनादलाच्या वाहनांनी हा फौजफाटा चिमूरला पोहोचला आणि सूडाची कारवाई सुरू झाली. घराघरात जाऊन दंडाधिकाऱ्याने अटक करण्यास सुरुवात केली. दिसेल त्या पुरुषास अमानुषपणे मारझोड केली. त्याने भयानक दहशत बसविली. लपून बसलेल्या नागरिकांना बाहेर खेचून बडवले. बायकांना वेठीस धरून पुरुषांचा ठावठिकाणा घेतला. अपंग, म्हातारे व लहान मुलांना वगळून प्रत्येक पुरुषाला अटक करणे हे त्याचे उद्दिष्ट होते. अटक केलेल्या सर्वांना गुरांसाठी असलेल्या गावातील कोंडवाड्यात कोंबण्यात आले—वरून पाऊस व खालून चिखल अशा अवस्थेत ठेवण्यात आले. ही स्थिती आठ दिवस कायम राहिली. नागरिकांवर मारा करण्यासाठी चार तोफाही आणल्या. लोकांचे भाग्य की त्या तोफा पावसामुळे निकामी ठरल्या.

चिमूरमधील इंग्रज जुलूमशाहीचा नंगानाच १९ ऑगस्टपासून २६ ऑगस्टपर्यंत तीन टप्प्यांमध्ये घडून आला. ३५० सैनिक व जिल्हा दंडाधिकाऱ्याने घरोघर जाऊन गावातील सर्व पुरुषांना पकडून गुरांच्या कोंडवाड्यात कोंबले. त्यांनी खेडुतांचे अन्नधान्य व भांडीकुंडी, दूध वगैरे सर्व हस्तगत केले. त्यांनी बाहेरून अन्नधान्य आणलेले नव्हते. सैनिकांनी संगिनीच्या टोकावर लोकांकडील सर्व पैसा व दागदागिने लुटले.

पण त्यापेक्षा सैनिकांनी महिलांवर पाशवी बलात्कार केले. हातात येईल त्या महिलेवर बलात्कार केले. घरांमध्ये व गल्लीबोळांमध्येही ! रात्रीच नव्हे तर दिवसाही ! महिलांनी हात जोडून विनवण्या केल्या. पण व्यर्थ! आपली अब्रू वाचविण्यासाठी काही महिला एकत्र जमून व हातात हात घेऊन रात्र काढत. दिवस भरत आलेल्या गरोदर माता वा नुकत्याच बाळंत होऊन रक्तस्राव होत असलेल्या मातांवरही त्या नरपशूंनी बलात्कार केले. मासिक पाळी असलेल्याही सुटल्या नाहीत. कुमारिका-बालिकांचीही आर्जवे व्यर्थ ठरली. ही करुण व बीभत्स कहाणी लिहिणेही अवघड वाटते. मध्ययुगीन लढायांमधील अत्याचार यापेक्षा अधिक जुलमी नव्हते. महिलांवरील ते पाशवी बलात्कार अव्याहत दोन-अडीच दिवस चालू होते. त्यानंतर एका म्हातारीने धाडस करून गावाबाहेर तळ ठोकून बसलेल्या कलेक्टरला अत्याचारांविषयी सांगितले. स्वतः त्यालाही एका बाईमागे धावत असलेला सैनिक दिसला. कलेक्टरने त्या सैनिकास काही फटके मारण्याची शिक्षा दिली. म्हातारीच्या धाडसामुळे अत्याचारांना आळा घालणे कलेक्टरला भाग पडले.[३३] तथापि त्यानंतरदेखील २६ ऑगस्टपर्यंत चिमूरमध्ये गोरे व काळे सैनिक तुरळक बलात्कार करीतच राहिले. त्या बलात्कारांमधून नंतरच्या काळात कौटुंबिक प्रश्नही निर्माण झाले.

ब्रिटिशांनी सूडबुद्धीने २६ ऑगस्टला चिमूरवर एक लाख रुपयांचा सामूहिक दंड ठोठावला. दंड भरण्याला गावात कोणीच कर्तासवरता पुरुष नव्हता. म्हणून म्हातारे व बायकांना संगिनीचा धाक दाखवून ६-७ दिवसांत सर्व दंड वसूल केला.

मिलिटरी प्रशासनाने चिमूरमधील जुलूम व बलात्कारांचे वृत्त अनेक दिवस बाहेर जाऊ दिले नव्हते. आरोप करणाऱ्या चंद्रपूरच्या वकिलांना सरकारने खोटे ठरविले

होते. जुलमाचे वृत्त बाहेर झिरपल्यावर १९ सप्टेंबर १९४२ रोजी रमा तांबे (माजी प्रभारी गव्हर्नरच्या पत्नी), विमला देशपांडे, विमला अभ्यंकर, द्वारका देऊसकर, डॉ. वझलवार चिमूरला गेल्या व त्यांनी सखोल चौकशी केली. त्यांनी वस्तुनिष्ठ व तपशीलवार असा अहवाल मध्यप्रांत सरकारला सादर केला. आणखीही अनेकांनी तक्रारी केल्या व समक्ष पाहणी अहवाल दिले. तथापि इंग्रज सरकारने सर्वच अहवाल अतिशयोक्त आहेत, असे सांगून त्यांची वासलात लावली. सरकारने १६ ऑक्टोबर १९४२ रोजी एक पत्रक काढून, चिमूरमध्ये मिलिटरीने केलेल्या अत्याचारांची व बलात्कारांची चौकशी करण्यात येणार नाही, असे जाहीर केले. इंग्रजांचे हे आधीच ठरलेले धोरण होते.

**जे. पी. भंसाळी यांचा अन्नसत्याग्रह :—** चिमूरच्या महिलांवरील जुलूम व बलात्कारांनी व्यथित झालेले थोर गांधीवादी प्रा. भंसाळी यांनी त्या महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी जीवनमरणाचा लढा उभारला. त्यासाठी त्यांनी आपल्या प्राणाची बाजी लावली. प्राणांतिक उपोषणाद्वारे भंसाळींनी सैनिकांच्या अत्याचारांना आणि इंग्रजांच्या अन्यायीपणाला जशी वाचा फोडली, तसेच त्यांनी व्हाइसरॉयच्या मंत्रिमंडळातील भारतीय व मराठी भाषिक मंत्र्यांची निर्दय वृत्ती व लाचारी उघड केली. तत्पूर्वी भंसाळी अज्ञात होते. नंतरही ते प्रसिद्धी पराङ्मुख राहिले. लंडन विद्यापीठाचे पदवीधर असलेले भंसाळी मुंबईच्या एलफिंस्टन महाविद्यालयात काही वर्षे प्राध्यापक होते. पण नंतर गांधीजींच्या नयी तालीम व विधायक कार्यासाठी त्यांनी वाहून घेतले. प्रा. भंसाळी काही वर्षे साबरमती आश्रमात व नंतर सेवाग्राममध्ये गरीब व दलितांना साक्षरतेचे पाठ देत असत. राष्ट्रजागृती व मानवतेचा प्रसार करीत.

चिमूरला झालेले हत्याकांड व त्यानंतर झालेल्या महिलांवरील बलात्कारांमुळे त्यांचे मन कमालीचे व्यथित झाले. त्या पीडितांच्या दुःखाला वाचा फोडण्यासाठी व अन्यायांचे परिमार्जन करण्यासाठी त्यांनी वर्धा व नागपुरात अथक प्रयत्न केले. तथापि नोकरशाहीने अजिबात दाद दिली नाही. प्राप्त परिस्थितीत दाद मागण्यासाठी आणि चिमूर व आष्टीच्या त्या व्यथित व अत्याचारित महिलांना न्याय मिळविण्यासाठी

प्रा. भंसाळी व्हाइसरॉयच्या मंत्रिमंडळात मंत्रिपदी असलेल्या माधव श्रीहरी अणेंकडे १ नोव्हेंबर रोजी दिल्लीला गेले. विदर्भातील रहिवासी असलेल्या अणेंनी आपल्या पदाचा उपयोग करून हत्याकांडाची चौकशी करावी, व अन्यायाचे परिमार्जन करण्याचा प्रयत्न करावा, अशी कळकळीची विनंती केली. निदान बलात्कारित महिलांचे सांत्वन करण्यासाठी तरी अणेंनी चिमूर-आष्टीला समक्ष भेट द्यावी, अशीही विनंती केली. तथापि एकेकाळी काँग्रेस पुढारी असलेल्या अणेंनी त्यालाही संमती दिली नाही किंवा चौकशीचे आश्वासनही दिले नाही. **इतकेच नव्हे तर अणेंनी स्वातंत्र्य आंदोलनातील हिंसाचाराबाबत गांधीजींवरच ठपका ठेवला. सेनादल छावण्यांच्या परिसरात असे अत्याचार नित्याचे असल्याने चिमूर-आष्टीच्या अत्याचारांबद्दल आपणास आश्चर्य वाटत नाही, असेही अणेंनी भाष्य केले.**[३४]

त्यावर भंसाळी म्हणाले की, तसे असल्यास ही बाब सत्ताधीशांना अशोभनीय आहे. कारागृहांमधील अत्याचारांचा भंसाळींनी उल्लेख करताच अणे म्हणाले की, ‘‘तुमच्यापेक्षा आपणास अधिक माहिती आहे. तथापि अत्याचारांची जबाबदारी स्थानिक अधिकाऱ्यांची असून त्यांच्या कार्यपद्धतीत आपण हस्तक्षेप करणार नाही.’’ तरीसुद्धा भंसाळी यांनी आर्जवी भाषेत चौकशी समिती नेमण्याची विनंती केली. “Mr. Aney then blamed Mahatma Gandhi and the Congress for all these happenings, since they had started the present struggle despite all his warnings”.[३४] त्या प्रसंगी समक्ष हजर असलेले सत्यन लिहितात, “Prof. Bhansali again appealed to the good sense of Mr. Aney to have these serious complaints investigated. On this the Hon’ble Member got angry and said that he regarded the Congress and those taking part in the movement as his enemies and that he had no sympathy for them”.[३५]

अणेंच्या बेजबाबदार उत्तरांनी प्रा. भंसाळी अधिकच व्यथित झाले आणि ते अणेंना म्हणाले की, आम्ही केलेल्या पर्यायी सूचनांपैकी एकही सूचना आपणास

मान्य नसल्याकारणाने सेवाग्रामला जिवंत परत जाण्यापेक्षा आपण इथेच मरण पत्करू. एकेकाळी काँग्रेसचे अध्यक्ष (१९३३) असलेल्या माधव अणेंनी साध्या चौकशीचेही आश्वासन न देता, अन्यायांच्या परिमार्जनासाठी काहीच करू नये याचे भंसाळींना दुःख वाटले. त्यांचेबरोबर आश्रमवासी बलवंतसिंग आणि सत्यन होते. अणे यांनी भंसाळी व बलवंतसिंग यांना परत जाण्यास सांगितले. त्यामुळे व्यथित होऊन भंसाळींनी अणेंच्या बंगल्यासमोरील पादपथावर त्वरित अन्नसत्याग्रह सुरू केला. तथापि लगेच नोकरशाहीने भंसाळी व बलवंतसिंग यांना डिफेन्स ऑफ इंडिया कायद्याखाली दिल्ली प्रदेशातून तीन तासात बाहेर जाण्याचा हुकूम फर्माविला. हा हुकूम अणे थांबवू शकले नाहीत. परिणामतः साडेपाच वाजता फर्माविलेल्या हुकुमाची पोलिसांनी पावणे दहाला अंमलबजावणी करून दोघा सत्याग्रहींना नवी दिल्ली पोलीस ठाण्यात अटक केली व बंदोबस्तात त्यांची वर्ध्यास रवानगी केली.

१९३३ साली काँग्रेसच्या अध्यक्षपदी राहिलेल्या अणे यांची चिमूर-आष्टी प्रकरणाबाबतची उदासीनता भंसाळींना दुःखकारक वाटली. अणेंवर वृत्तपत्रांमधूनही टीका झाली. **नागपूर टाइम्स** मधील अग्रलेखात म्हटले होते. "Mr. Aney speaks in Amery's voice." मुंबईहून प्रकाशित झालेले **काँग्रेस बुलेटिन** व इतर पत्रकांनीही अणेंवर कडक टीका केली. आंबेडकर वगैरे महाराष्ट्रातील एकाही मंत्र्याने नुसत्या चौकशीचेही आश्वासन दिले नव्हते. आपल्या उपोषणाबाबतची भूमिका स्पष्ट करण्यास्तव प्रा. भंसाळींनी २४ नोव्हेंबर १९४२ रोजी निवेदन प्रस्तृत केले. तथापि सरकारने त्यावर बंदी घातली.

चिमूर-आष्टीची शोकांतिका व सत्ताधाऱ्यांचा निषेध म्हणून ११ नोव्हेंबरपासून भंसाळींनी आमरण उपोषणाचे हत्यार हाती घेतले. त्या दिवशी ते चिमूरला गेले. हेतू असा की, निदान आमरण उपोषणाद्वारे त्या पीडित महिलांचे व अत्याचारितांचे सांत्वन करावे! तथापि पोलिसांनी त्यांना अटक करून १३ नोव्हेंबरला सेवाग्रामला आणून ठेवले. पुन्हा १९ नोव्हेंबर रोजी निघून वर्धा ते चिमूर हे १०० किलोमीटर अंतर पदयात्रा करीत भंसाळी २२ तारखेला चिमूरला पोहोचले. लगेच पोलिसांनी त्यांना पुन्हा अटक करून सेवाग्रामला आणून सोडले (२३ नोव्हेंबर). सत्याग्रही

वृत्तीच्या भंसाळींनी तिसऱ्यांदा चिमूरला जाण्यासाठी २५ नोव्हेंबरला पदयात्रा काढली. तथापि ७२ किलोमीटर चालून गेल्यावर पोलिसांनी त्यांना अटक केली (२७ नोव्हेंबर), आणि वर्धा शहराबाहेर जाण्यास बंदी घातली. विशेष म्हणजे त्यांनी अन्नाबरोबर पाण्याचाही त्याग केलेला होता, आणि अशा परिस्थितीत त्यांनी एवढी मोठी पदयात्रा तीनदा केली. अन्नपाण्याच्या अभावी कालांतराने त्यांची प्रकृती खालावत गेली व त्यांना सेवाग्रामहून बजाज विश्रामगृहात हलविण्यात आले. अनेक हितचिंतकांनी उपोषण समाप्तीसाठी त्यांना आर्जवे केली. तथापि त्यांनी पाणी घेण्यासही नकार दिला. मुंबईहून कन्हैयालाल मुन्शी त्यांचे मन वळविण्यासाठी मुद्दाम आले. शेकडो पत्रे व तारा आल्या. पण भंसाळी यांनी तपस्या चालूच ठेवली.

भंसाळींच्या उपोषणाच्या अत्यंत लहान बातम्या वर्तमानपत्रांतून प्रकाशित होत. वस्तुस्थितीनिष्ठ बातम्या देण्यावर बंदी होती. उपोषणाचे अपुरे वृत्त गांधीजींनी वाचल्यावर त्यांनी मुंबई सरकारच्या गृह विभागाला तार पाठविली की, "कारागृह अधीक्षकामार्फत भंसाळी यांच्याशी तार संदेशाद्वारे संपर्क साधून उपोषणाचे कारण जाणून घेण्याची माझी इच्छा आहे. तसेच उपोषण नैतिकदृष्ट्या असमर्थनीय असल्यास उपोषण सोडण्यासाठी मी त्यांचे मन वळवीन ! मानवतेच्या भूमिकेतून मी ही विनंती करीत आहे." गांधीजींना या तारेचे सहा दिवसांनी उत्तर आले ते नकारात्मक. भंसाळींशी तार संदेशाद्वारे संपर्क साधण्यासाठी केलेली महात्मा गांधींची ही विनंती मुंबई सरकारने अमान्य केली.

भंसाळींच्या उपोषणाचे दुहेरी उद्दिष्ट होते—सेनादल व पोलिसांनी केलेल्या अत्याचारांची न्यायालयीन चौकशी व अत्याचारितांच्या दुःखाचे सांत्वन. तथापि इंग्रज अधिकारी व काही राजनिष्ठ लोक दुष्टपणे प्रचार करीत होते की, माधव श्रीहरी अणे यांना अडचणीत टाकण्यासाठी हा उपोषणाचा उपक्रम आरंभिलेला आहे.

त्या ६३ दिवसांच्या कठोर उपवासात त्या तपस्व्याची प्रकृती अत्यंत क्षीण झाली. सारा वर्धा-चंद्रपूर-नागपूरचा परिसर कमालीचा अस्वस्थ झाला. त्यांच्या प्राणासाठी कित्येक लोक प्रार्थना करीत होते. काही आश्रमवासी लोक उपोषणास प्रसिद्धी देण्याचाही प्रयत्न करीत. तथापि निर्दय व निरंकुश शासनाने उपोषणाबाबतची

कोणतीही बातमी छापण्यावर डिफेन्स ऑफ इंडिया रूल ४१(१) (बी) खाली बंदीहुकूम काढला. बंदीहुकूम काढला हे उघड करण्यावरही बंदी घातली. परिणामतः भंसाळींची प्रकृती इत्यादीबाबतचे वृत्तच वृत्तपत्रातून दिसेनासे झाले. त्यांच्या उपोषणास प्रतिसाद म्हणून मध्यप्रांत-वऱ्हाड प्रांतिक महिला परिषदेच्या २०० सभासदांनी तीन दिवस उपोषण केले. डिसेंबर १९४२ च्या एका सरकारी अहवालात नमूद केलेले आहे की, त्यांची प्रकृती चिंताजनक असून वैद्यकीय अभिप्रायानुसार त्यांचे मरण अटळ आहे. तरीसुद्धा सरकारने आपली निर्दय भूमिका अजिबात बदलली नाही. इतकेच नव्हे तर भंसाळी यांच्या अंत्यविधीची तयारी करून ठेवली व मोजक्याच लोकांना अंत्यविधीमध्ये भाग घेण्यास परवानगी देण्याचे ठरविले.[३६]

हिंदुमहासभेचे नेते डॉ. मुंजे चिमूरच्या अत्याचारांची चौकशी करावी, अशी मागणी करीत होते. अखेरीस डॉ. ना. भा. खरे यांनी गव्हर्नरचे मन वळवून एक आश्वासन मिळविले की, महिलांवरील अत्याचार थांबविण्यासाठी सरकार एक आदेश काढेल. तसेच चिमूर-आष्टीबाबतच्या बातम्यांवरील बंधने रद्द करण्यात येतील. तथापि चिमूर-आष्टी अथवा इतर ठिकाणच्या अशा घटनांची चौकशी करण्यास गव्हर्नरने साफ नकार दिला होता. तथाकथित लोकनायक माधव अणे यांच्याबाबत लोकांचा भ्रमनिरास झाला. शेवटी लोकमताच्या दबावाने या गृहस्थांनी चिमूरला जाण्याचे आश्वासन दिले. पण त्यांनी काहीच केले नाही.

**प्रा. भंसाळी यांनी सर्व गांधीवादी मंडळी व चाहत्यांच्या इच्छेला मान देऊन ६३ व्या दिवशी म्हणजे १२ जानेवारी १९४३ रोजी उपोषणाची सांगता केली. पट्टाभी सीतारामय्या यांनी म्हटल्याप्रमाणे 'प्रो. भंसाळी वूड हॅव फ्यू इक्वलस् इन् हिस्टरी'.**

## नालवाडी-पवनार आश्रम खटला

इंग्रजांनी केवळ आकसाने रचलेला हा खटला सरकारच्या दुराग्रही धोरणाचा एक नमुना होता. केवळ संशयावरून सप्टेंबर १९४२ मध्ये नालवाडी व पवनार आश्रमवासींयांना अटक करण्यात आली होती. अधिकाऱ्यांचा रोख आश्रमाचे व्यवस्थापक राधाकृष्ण बजाज यांच्यावर होता. पण त्यांच्याविरुद्ध काहीच पुरावा न

मिळाल्याने डॉ. मनोहर दिवाण, भाऊ पानसे, गोपाळराव वाळुंजकर अशा १४ गांधीवाद्यांवर खटला भरण्यात आला. वस्तुतः गोपाळराव भूमिगत होते. हा खटला क्रिमिनल कोर्ट ऑर्डिनन्सखाली खास न्यायाधीशापुढे चालला. पुराव्याअभावी बराच रेंगाळल्यामुळे तो सरकारने मागे घ्यावा, असे कोर्टाने सरकारला सुचविले. तरीही नोकरशाहीने नवनवीन पुरावे सादर करण्याचा प्रयत्न चालू ठेवला. प्रांतिक प्रशासनाने हा प्रतिष्ठेचा प्रश्न बनविला व केंद्र सरकारची मदत मागितली. तथापि विशेष न्यायालयाने सर्वच पुरावे पुन्हा अग्राह्य ठरविले आणि खटला पुन्हा निकाली काढला. इतके झाल्यावरही प्रांतिक सरकारने खटल्याचा निकाल राखून ठेवला.

या खटल्यातील नामुष्की व अपयशाचा सूड घेण्यासाठी सरकारने नालवाडी व पवनार आश्रम बेकायदा ठरविले. आणि इंडियन क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्टखाली पोलिसांनी दोन्ही आश्रम जप्त केले. इथेच न थांबता सरकारने सूडबुद्धीतून हा खटला पुन्हा नव्याने साध्या कोर्टापुढे मांडला. खोटेनाटे साक्षीदार उपस्थित केले. सरकारने या आश्रमानंतर एका सप्ताहात ग्रामसेवा मंडळ, सत्याग्रह आश्रम आणि गांधी सेवा संघ या निखळ सेवाभावी संघटनांवरही बंदी घातली. सरकारने आश्रमवासी व काँग्रेसजनांची मुस्कटदाबी करण्यासाठी अनेक अनुचित कारवाया केल्या. तथापि सेशन्स कोर्टाने अंतिम निर्णय दिला की,– 'तथाकथित घातपाताचा कट झालाच नव्हता'.

आय. सी. एस. या सनदी नोकरशाहीचा राजीनामा देऊन (जून १९४३) स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी झालेले रामराव कृष्णराव पाटील यांचा त्याग त्या काळी विशेष उल्लेखनीय होता. इंग्रजांना धक्का देणारा होता. इंग्रजांच्या दडपशाहीचा जाहीर निषेध करण्यास्तव त्यांनी आय.सी.एस. संवर्गातील नोकरीला लाथ मारली. त्यांनी विशेषतः विदर्भातील स्वातंत्र्य सैनिकांच्या कुटुंबांसाठी निधी उभारण्यास वाहून घेतले. त्यांचे कोर्ट खटले चालविण्यास मदत केली. अनेकांचे पुनर्वसन केले.

नागपूरचे मगनलाल बागडी व हिंदुस्तानी लाल सेनेतील त्यांचे सहकारी हे वेगळ्याच दर्जाचे धाडसी क्रांतिकारक होते. बागडी भूमिगत असताना आजारी पडले होते. पण त्यांच्यामागे गुप्तचरांचा अविरत ससेमिरा असल्यामुळे त्यांना

रानावनात राहावे लागले. तेथूनही बागडी सहकाऱ्यांना मार्गदर्शन करीत. परंतु काही दिवसांनी त्यांना विदर्भात कोठेही राहणे धोक्याचे झाले. म्हणून सहकाऱ्यांच्या सूचनेनुसार बागडी नाशिकमार्गे गोवा प्रदेशात गेले. तिथे दोन स्टेनगन व १२ पिस्तुले विकत घेऊन त्यांनी कोलकाता गाठले. बागडींनी तेथून सुभाषबाबूंशी संपर्क साधला. सुभाषबाबूंनी त्यांना रंगूनला जाण्याचा निरोप पाठविला. पण ते शक्य न झाल्याने बागडी मुंबईत आले. अखेर बागडी व त्यांचे सहकारी जुलै १९४३ मध्ये मुंबईच्या काळबा देवी मार्गावरील एका घरात गुप्तचरांच्या जाळ्यात अडकले. कलोनिअल सत्ताधीशांचा हा एक मोठा वैरी त्यांच्या हाती लागला. विशेष न्यायालयाने मगनलाल बागडींना ९० वर्षे कारावासाची सजा ठोठावली. भारत स्वतंत्र झाल्यावरच हा झुंजार क्रांतिकारक बंधमुक्त झाला.

❑❑

## संदर्भ


१. हिंदुस्तान सरकार, होम पोलि. इंटेलिजंस, फाईल क्र. ३/४४/४३, १९४३, पृ. १४१-४२.

२. कित्ता, फाईल.

३. के. के. चौधरी, **क्विट इंडिया रिव्हॉल्युशन,** पृ. २५८-६४.

४. **विकेंडेन रिपोर्ट ऑन क्विट इंडिया मुव्हमेन्ट,** नवी दिल्ली, पृ. ३३८.

५. चौधरी, उपरोक्त, पृ. २६७-६८.

६. **ट्रान्सफर ऑफ पॉवर,** खंड दोन, पृ. ८५३-५४, लिनलिथगोंची पंतप्रधान चर्चिल यांना तार, ३१ ऑग. १९४२.

७. चौधरी, उपरोक्त, पृ. १५१, १५७-५८.

८. पोलीस कमिशनरचा गृह विभागाला अहवाल, १७ सप्टेंबर १९४२ व १३ ऑगस्ट १९४२ ची पत्रे.

९. चौधरी, उपरोक्त, पृ. २८३, २८७, ३४५-४७.

१०. **ट्रान्सफर ऑफ पॉवर,** खंड तीन, पृ. ७५५, गव्हर्नर लम्ले यांचे लिनलिथगोंना पत्र, ४ मार्च १९४३.

११. चौधरी, उपरोक्त, पृ. १७३-७५.

१२. मुंबई सरकार, होम पोलि. (इंटे.) फाईल क्र. १८ फेब्रुवारी १९४३

१३. कित्ता, फाईल क्र. १८/२/४४, १९४४ ; आणि चौधरी, उपरोक्त, पृ. १८२, १८३.

१४. चौधरी, **सातारा जिल्हा गॅझेटिअर,** १९९९, पृ. २०७.

१५. कित्ता, पृ. २०९-१०.

१६. कित्ता, पृ. २१२.

१७. श्रीपाद केळकर, **छोडो भारत : १९४२,** पुणे, २००३, पृ. २४४-४५.

१८. चौधरी, **सातारा जिल्हा गॅझेटिअर,** पृ. २१३-१४.

१९. केळकर, उपरोक्त, पृ. २४५-४७.

२०. कित्ता, पृ. १६७-६९, २४६-४९.

२१. हिंदुस्तान सरकार, होम पोलि. (इंटे), फाईल क्र. ३/८६/४२, १९४२.

२२. केळकर, उपरोक्त, पृ. २३३-३४.

२३. पी. एन. चोप्रा (संपा.), **ब्रिटिश सिक्रेट डॉक्युमेंट्स ऑन क्विट इंडिया मुव्हमेंट,** नवी दिल्ली, १९८६, पृ. ३५.

२४. सेंट्रल प्रॉव्हिन्सेस पोलीस ॲबस्ट्रॅक्ट ऑफ इंटेलिजंस, २९ ऑग. १९४२.

२५. चोप्रा, उपरोक्त, पृ. ३४-३९, ४७-४८.

२६. हिंदुस्तान सरकार, होम पोलि. (इंटे.), फाईल क्र. ३(३१) २-के. डब्ल्यू-दोन.

२७. केळकर, उपरोक्त, पृ. २३५-३६.

२८. चोप्रा, उपरोक्त, पृ. १६३-६६.

२९. **ट्रान्सफर ऑफ पॉवर,** खंड दोन, पृ. ११७-१९, १९५-९६, २६५, ४९१-९२, हेन्री ट्वायनॅमची लिनलिथगो यांना अनुक्रमे २५ मे, ९ जून व २४ जून १९४२ ची पत्रे.

३०. चौधरी, **वर्धा जिल्हा गॅझेटिअर,** १९९२, पृ. ९३; कोर्टाचे निकालपत्र.

३१. कित्ता, पृ. ९४-९५.

३२. केळकर, उपरोक्त, पृ. २३५.

३३. चोप्रा, उपरोक्त, पृ. १८९, २४१-४५.

३४. पट्टाभी सीतारामय्या, **हिस्टरी ऑफ द इंडियन नॅशनल काँग्रेस,** खंड दोन, पृ. ४८९.

३५. **इंडिया रॅव्हेजड्,** पृ. ३८, क्रांतिकारकांचे अत्यंत गाजलेले निनावी पुस्तक. या पुस्तकाशी देवदास गांधींचा निकटचा संबंध होता.

३६. चौधरी, **वर्धा गॅझेटिअर,** पृ. ९७-१००.

प्रकरण २१

## सत्तांतराची प्रक्रिया

### बेचाळीसचे यश

महात्मा गांधींची 'क्विट इंडिया,' 'लीव्ह इंडिया टू इंडियन्स' ही घोषणा म्हणजे ब्रिटिशांनी सत्तांतर करून शांततेने निघून जाण्याचे ब्रिटिशांना निर्वाणीचे आवाहन होते. कलोनिअल महासत्तेची संरचना खिळखिळी करून सत्ताधीशांचे उच्चाटन करणे, ही काँग्रेसच्या क्रांतिलढ्याची रणनीती होती. पारंपरिक अर्थाने काँग्रेसला, आणि गांधीजींना तर नव्हेच नव्हे, राजसत्ता काबीज करून राज्य करण्याची महत्त्वाकांक्षा नव्हती. या दृष्टीने बेचाळीसचा विद्रोह निःसंशयपणे यशस्वी झाला! छोडो भारत ठराव मागे घेण्यास व्हाइसरॉय लिनलिथगो अथवा वेव्हेल यांनीही कधी काँग्रेसला गळ घातली नाही. छोडो भारत क्रांतिलढा माघार घेणे संभवतच नव्हते. १९४४ सालात आंदोलनाची तीव्रता ओसरली हे सत्य. तरीदेखील आंदोलकांची भयंकर धास्ती घेतलेल्या इंग्रजांनी १९४४ पर्यंत नवेनवे वटहुकूम आणून आपले राज्य टिकविण्याचा आटोकाट प्रयत्न केला.

मुंबईचे काँग्रेस व फॉरवर्ड ब्लॉक पक्षांचे कार्यकर्ते केशव शामराव तळपदे यांनी प्रथम मुंबई हायकोर्टात व पुढे थेट फेडरल कोर्टात दावे करून डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्टचा नियम क्रमांक २६ रद्दबातल ठरविला. केशवरावांचे हे यश आकाशाएवढे मोठे होते! त्याचबरोबर स्पेशल क्रिमिनल कोर्टांना मान्यता देणारा दुसरा वटहुकूमही कलकत्ता हायकोर्टाच्या निकालानुसार रद्दबातल ठरला. त्यामुळे इंग्रजांचे अनेक स्वेच्छानुसारी व बेबंद दडपशाही करणारे वटहुकूम व कायदे धोक्यात सापडले. के. एम. मुन्शी, जी. एन. जोशी वगैरे वकील काँग्रेस पुढाऱ्यांची सुटका करण्यासाठी अपील करण्यासाठी धावाधाव करू लागले. लॉर्ड लिनलिथगो मात्र भयंकर दुःखी व भयचकित झाले. त्यांची महाभयानक चूक त्यांना भोवली होती. शेवटी त्यांनी भारत संरक्षण कायद्याखाली दुसरा वटहुकूम काढून अवैध ठरलेला वटहुकूम नव्याने वैध करून घेतला. क्रांतीचे बंड आपण

दडपून टाकले, असे सरकार आपले स्वतःचे सांत्वन करत असे. परंतु सरकारला संदेह वाटतच होता. म्हणून नवनवीन वटहुकूम काढणे चालूच राहिले, अगदी १९४४ पर्यंत! रिस्ट्रिक्शन अँड डिटेंशन ऑर्डिनन्स १९४४ चा तीन हा त्या मालिकेतील आणखी एक होय. या सर्व प्रकारात सरकारचे शासनांग आणि न्यायांग यांच्यात बराच संघर्ष झाला. इंग्रज सरकारच्या इभ्रतीला भयंकर कलंक लागला! प्रजाजनांनी इंग्रज सरकारचा विपुल उपहास केला. आंदोलनाचे हे एक मोठे यश होते. कारण इंग्रजांना भारतात व इंग्लंडमध्येही बचावात्मक पवित्रा घ्यावा लागला.[१]

ब्रिटिश सत्ताधीश आपला पराभव अथवा न्यूनता कधीच कबूल करीत नसत. Thundering though vanquished ही त्यांची विशेषता होती. तथापि छोडो भारत लढा शिखरावर पोहोचण्याआधी व्हाइसरॉय लिनलिथगोंनी चर्चिल साहेबांना पाठविलेल्या खाजगी पण प्रदीर्घ तारेतून साफ कबुली कळविली होती, " I am engaged here in meeting by far the most serious rebellion since that of 1857, the gravity and extent of which we have so far concealed from the world for reasons of military security..... I am by no means confident that we may not see in September a formidable attempt to renew this widespread sabotage of our war effort. The lives of Europeans in outlying places are today in jeopardy." (**Transfer of Power**, Vol. II, p. 853-54, Linlithgow's Telegram to Churchill, 31 August 1942). या वरूनही आंदोलनाच्या जबरदस्त आघाताची कल्पना येते. ऑगस्ट १९४२ पासून १७ डिसेंबर १९४२ पर्यंत व्हाइसरॉय महाशय जाहीररीत्या एकही शब्द बोलले नव्हते.

**हिंदुस्तानातील ब्रिटिश सत्ताधीश क्रांतिलढ्यामुळे घाबरले होते. मध्यवर्ती सरकारच्या गृह विभागाच्या फायलींमध्ये त्यांचे डिफिटिस्ट म्हणजे पराभवपरायण मनोगत व्यक्त झालेले दिसते. अतिरिक्त गृह सचिव रिचर्ड टॉटनहॅमच्या**

**आदेशानुसार सर्व विभागांचे सचिव साम्राज्याचे विध्वंसन किती झाले, याचे सर्वेक्षण करू लागले.** प्रारंभी त्यांनी निष्कर्ष काढले नाहीत. पण सर्वेक्षणातून वैफल्य व पराभवपरायणता स्पष्टपणे व्यक्त झाली. त्यानंतर सप्टेंबरात युद्धसामग्रीचा पुरवठा करणाऱ्या सप्लाय विभागाचा सचिव ई. एम. जेन्किन्स याने अत्यंत स्पष्टपणे डिफिटिस्ट मनोगत व्यक्त करणारा अहवाल सादर केला. अगदी सावधपणे लिहिलेल्या अहवालातही जेन्किन्सने कबूल केले — 'छोडो भारत लढा आणि तदनुषंगिक संचारबंदीच्या आदेशांमुळे मुंबईतील सर्व प्रकारचे औद्योगिक उत्पादन फारच घटले. त्यातही युद्धोपयोगी मालाच्या उत्पादनातील घट अधिक गंभीर आहे; कारखाने व कापड गिरण्या वेळोवेळी बंद पडतात; शिवाय कामाची तिसरी पाळी बंद पडली; प्रत्यक्ष घट ३०-४० टक्के असली, तरी अप्रत्यक्ष घट किती याचा अंदाज करता येत नाही'.[२] जपान भारतावर आक्रमण करणार अशी सर्वत्र वदंता होती. अगदी त्याच वेळी सरकारने काँग्रेसवर अचानक हल्ला केला, आणि पेटलेल्या विद्रोहामुळे सरकारच्या युद्ध प्रयत्नांमध्ये बाधा निर्माण झाली. याविषयी नोकरशाहीला आता पूर्ण जाण आली.

विशेषतः मुंबई, कोलकाता व मद्रासमध्ये पहिल्या क्षणापासूनच काँग्रेसला ठेचून लोळविण्यासाठी कलोनिअल सरकारने दोस्त राष्ट्रांचे सेनाबल व रणगाडे व तोफा तैनात केल्या होत्या. ब्रिटिशांनी जातीयवादी व निहित हितसंबंधी आणि स्वार्थपरायण मंडळींची यंत्रणा काँग्रेसच्या विरोधात उभारली होती. सरकारने प्रचारयंत्रणा व विरोधी वर्तमानपत्रे व्यवस्थित संघटित केलेली होती. खुद्द सरकारने पंचमस्तंभी यंत्रणा उभारली होती. मात्र काँग्रेसने आणि विशेषतः युसुफ मेहेरअली, सरदार पटेल, अच्युतराव पटवर्धन, पुरषोत्तम त्रिकमदास, स. का. पाटील, लोहिया, नरेंद्र देव यांनी राजकीय आंदोलनात आर्थिक युद्धाचे महत्त्व आधीच ओळखले होते. स्वतः गांधीजींनीदेखील संप, हरताळ आणि धरणे धरून सर्व आर्थिक व्यवहार बंद करण्याचे आवाहन आपल्या अंतिम संदेशातून जाहीर केले होते. त्याप्रमाणे मुंबई प्रांतिकचे **बाँबे काँग्रेस बुलेटिन** आर्थिक व्यवहार बंद करण्याचे वारंवार आवाहन करीतच असे. पटवर्धन व लोहियांचे **क्विट**

**इंडिया**देखील याबाबत प्रबोधन करीत असे. सरकारची आर्थिक कोंडी करण्याचे तर्कशास्त्र या पत्रकांनी विशद केले तितके दुसऱ्या पत्रकांनी केल्याचे मला आढळले नाही. सरदार पटेलांचा पुढील संदेश काँग्रेस रेडिओवरून नेहमीच ऐकविला जाई – “No source to be left untapped, no weapon untried. This is going to be an opportunity of our lifetime.” (Home Poll. Intelligence, File No. 3/44/43).

**राजकीय व आर्थिक कोंडी** :– आंदोलन अधिक व्यापक करण्यासाठी काँग्रेसने जी रणनीती अंगीकारली, तिच्यात जनतेच्या आर्थिक समस्या व सरकारच्या शोषक धोरणावर टीका करण्यास उचित स्थान दिले. महायुद्धाचा काळ उद्योगपतींसाठी आकस्मिक अभिवृद्धीचा काळ होता. मात्र मध्यम वर्ग व श्रमिकांसाठी युद्ध हे मोठे आर्थिक अरिष्ट होते. सर्व जीवनावश्यक वस्तूंचे भाव अभूतपूर्व पातळीवर गेले होते. मुंबई राज्यात भीषण धान्यटंचाई निर्माण झाली. उत्पादित अन्नधान्य सक्तीने सेनादलासाठी घेतले जाई. स्वतः शेतकरीही संकटात सापडला होता.

स्वतः गव्हर्नर रॉजर लम्ले यांनी व्हाइसरॉयला ३० डिसेंबर १९४२ च्या पत्रातून आणि नंतरच्या पत्रांमधूनही इशारा दिला होता की, या प्रांतातील परिस्थिती कमालीची गंभीर झालेली असून काळजी करण्याजोगी आहे. लोकांचा प्रक्षोभ वाढतच राहिला. गव्हर्नरने व्हाइसरॉयला बजावले, ‘मुंबई शहरातील गव्हाचा साठा फारच थोडे दिवस पुरेल; पुण्यातील बेकऱ्या एक-दोन दिवसात बंद पडतील; सोलापूर व विजापूर जिल्ह्यांतील लोकांची धान्याअभावी उपासमार होण्याची शक्यता आहे; विजापूरमध्ये ठणठणीत दुष्काळ आहे.’ पण तरीही मध्यवर्ती सरकारने मुंबई इलाख्यासाठी मंजूर केलेले ५०,००० टन धान्य इथे पाठविले नाही, अशी गव्हर्नरनेच तक्रार केली. मध्यवर्ती सरकार असा वेळोवेळी आश्वासनभंग करते, आणि हैदराबाद व मध्यप्रांतातील लोक तेथील धान्य मुंबई प्रांतात येऊ देत नाहीत, असेही गव्हर्नरने तक्रारीत नमूद केले.

गव्हर्नरला धान्यटंचाईमुळे झालेले दंगे दिसत होते. म्हणून त्या पत्रात त्यांनी पुढे म्हटले, " I must not disguise the extreme seriousness of the position...... There is the real danger that we shall not be able to feed the population of Bombay City, and may have to advise large sections of the population to leave the city and distribute themselves over the country districts." (**Transfer of Power**, Vol. III, p. 437, Roger Lumley to Linlithgo, 30th December 1942).

वाणिज्यवादी कलोनिअल धोरणांमुळे मागील तीन वर्षांत भाववाढ दुपटीने झाली आणि रुपयाचे मूल्य निम्म्यापेक्षा घटले वा घसरले होते. सरकारने अधिकारी व लष्कराची 'राजनिष्ठा विकत घेण्यासाठी' पगार वाढविले, असा काँग्रेस प्रचार करत असे. महायुद्धाचा अमाप खर्च जनतेवरच लादलेला हे उघड सत्य होते. आमच्या संमतिविना महायुद्ध लादले हे काँग्रेसने आधीच स्पष्ट करून सांगितलेले होते. कामगारांनी संप करू नये यासाठी सरकार काही राजनिष्ठ पुढाऱ्यांना दरमहा रोख रकमा देत असे. अशा रकमा मंत्री डॉ. आंबेडकरांच्या मजूर खात्यातर्फे दिल्या जात, हे लपलेले नव्हते. ब्रिटिशांनी काँग्रेसशी मुकाबला करण्यासाठी सर्वच जातीयवादी पक्ष व अल्पसंख्याक पक्ष आणि संस्थानिकांचे सहकार्य मिळविले हे खरे.

तथापि सरकारी दस्तऐवजांचा आणि **बाँबे काँग्रेस बुलेटिनच्या** सुमारे पाच-सहाशे अंकांचा अभ्यास केल्यावर **प्रस्तुत इतिहासकाराच्या ध्यानात आले की, उद्योगपतींनी इंग्रजांना केलेले साहाय्य व सहकार्य त्यांना लाख मोलाचे होते.** घनशामदास बिर्ला, वालचंद हिराचंद, धरमसी खटाव, तुलसीदास किलाचंद, जी. एल. मेहता, व्ही. एल. मेहता, ठाकरसी वगैरेंचा अपवाद वगळता, उद्योगधंद्यांतील अभिजातवर्गाने इंग्रज सरकारच्या गरजा पूर्ण करण्याचा मनापासून प्रयत्न केला. बरेच उद्योगपती ज्यू वा इंग्रज होते. त्यांचा व मुसलमान मालकांचा सरकारला सर्वथा पाठिंबा होता. पारसी मालक इंग्रजधार्जिणे नसले, तरी ते

१९४२-४३ मध्ये काँग्रेसकडे उदासीनपणे पाहत. काही उद्योगपती गांधीजी, पटेल व स. का. पाटलांना दिलेली आश्वासने अंशतः पाळत व गुप्तरीत्या काँग्रेसच्या आंदोलनासाठी निधी देत. परंतु इंग्रजांच्या युद्ध-प्रयत्नास हातभार लावत. देशी भांडवलदारांचा मात्र, उद्योगपतींचा नव्हे, हेतू काहीही असो, परंतु त्यांनी गांधीजी, पटेल व पाटलांना दिलेली आश्वासने पाळून छोडो भारतला सर्वतोपरी साहाय्य केले.

**१९४२ मधील ब्रिटिश कलोनिअल राजनीतीचे भान ठेवून मुंबईस्थित सेंट्रल डिरेक्टोरेटने राजकारण व अर्थकारणाची (पोलिटिको-एकनॉमिक) अभेद्य गुंफण करून, आर्थिक स्वातंत्र्य हे अंतिम ध्येय आणि राजकीय स्वातंत्र्य ही पूर्वावश्यकता निर्धारित केली.** या संघटनेने ब्रिटिशांचे युद्ध-प्रयत्न हाणून पाडण्यावर अधिक जोर दिला. १९४२-४३ मधील सुभाषबाबूंचे अत्यल्प चाहते वगळता, कोणीही काँग्रेस समाजवादी व खराखुरा काँग्रेसजन जपानच्या विजयासाठी उत्सुक नव्हता. मात्र ब्रिटनचा युद्ध-प्रयत्न सर्वस्वी पराभूत करावा हा काँग्रेसचा प्रामाणिक अट्टहास होता. यासाठीच युवकांनी जिवाचे रान केले होते.

मुंबईचेच उदाहरण पाहा. आंदोलनाच्या प्रारंभापासून सतत नऊ दिवस या शहरातील ६३ कापड गिरण्या बंद राहिल्या. पुढील काळातही गिरण्या मधूनमधून बंद पडत. कामगार संप करीत किंवा संचारबंदीमुळे कामावर जाऊ शकत नसत. शिवाय तिसरी पाळी बंद झाल्याकारणानेही मुंबईतील कापड उत्पादनात अपेक्षेपेक्षा खूप जास्त घट झाली होती. यामुळे सेनादलासाठी आवश्यक कापड मिळू शकले नव्हते. युवकांनी शिवणकामाचा दोरा निर्माण करणाऱ्या कारखान्यात संप घडवून आणून लष्कराच्या कपड्यांबाबत समस्या निर्माण केल्या. मुंबई प्रांतिक काँग्रेस समिती कापड उद्योग बंद पाडण्यास अहोरात्र प्रयास करीत असे. मात्र कम्युनिस्टांच्या सरकारधार्जिण्या कृतीमुळे काँग्रेसला या क्षेत्रात अपेक्षित यश लाभले नाही. डिसेंबर १९४२ पासून गिरणी कामगारांनी फारसे संप केले नाहीत. तथापि गिरणगावात आर्थिक असंतोष वाढला. **गिरणी कामगार कामावर जात, परंतु कम्युनिस्टांची भाषणे ऐकून नव्हे! किंवा त्यांची पत्रके वाचून नव्हे!**

**महागाईच्या काळात पोट भरण्यासाठी ते कामावर जात! पण गिरणीत काम केल्यावर ते काँग्रेसच्या सभामिरवणुकांमध्ये सामील होत. हे सत्य कम्युनिस्ट नेते सोली बाटलीवाला यांनाही माहीत होते.**

काँग्रेसला कापड उद्योगात जे यश मिळाले नाही, ते इतर उद्योगांमध्ये आणि विशेषतः बाजारपेठांमध्ये लाभले. लष्कराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असलेले जनरल मोटर्स, लिव्हर ब्रदर्स, रॅली ब्रदर्स, रिचर्डसन क्रुडास, गोदरेज, हिंदुस्तान वनस्पती, मुकुंद आयर्न, इंडियन टूल मॅन्युफॅक्चरिंग, बाँबे युनिफॉर्म क्लोदिंग, बाँबे होजिअरी कं., ऑर्डिनन्स डेपो, बर्मा शेल ऑईल कं. वगैरे कारखाने अविरत कार्यरत राहावे, असा सरकारचा कटाक्ष होता. कारण त्यांचे बहुतेक सर्व उत्पादन लष्करासाठी आवश्यक होते. याच कारणासाठी काँग्रेसने हे कारखाने बंद पाडून सरकारची कोंडी करण्याचा खूप प्रयत्न केला.

काँग्रेस समाजवादी नेते बॅ. एच. आर. पारडीवाला हे जनरल मोटर्स व लिव्हर ब्रदर्स कारखान्यांतील श्रमिक संघांचे अध्यक्ष होते. डॉ. लोहिया त्यांच्या घरी राहत असत, आणि १९४४ मध्ये तेथेच पकडले गेले. पारडीवालांनी आधीपासूनच दोन्ही श्रमिक संघांची जहाल राष्ट्रवादी अशी घडवणूक करून ठेवलेली होती. कामगारांचा त्यांच्यावर चांगला विश्वास होता. म्हणून कामगारांनी त्यांच्या आवाहनानुसार प्रारंभी सलग बारा दिवस दोन्ही कारखाने बंद पाडून युद्ध-प्रयत्नात बाधा आणली. त्यानंतर त्यांनी अनेक आठवडे वा मधले अनेक दिवस उत्पादन बंद करून सरकारला रंजीस केले होते. व्हाइसरॉयच्या आदेशानुसार सरकारने कम्युनिस्ट युनियनचे कामगार व लष्करातील जवानांना तेथे कामावर लावले. परंतु मूळ कामगारांनी साबोटाज घडवून अडचणी निर्माण केल्या. ब्रिटनमधील युद्धसामग्रीच्या कारखान्यांसाठी चांदीची नितांत गरज भासत होती. ती भागविण्यासठी सरकाने भारतातून सर्व उपलब्ध चांदी तिकडे पाठविण्याचा सपाटा लावला. या धोरणाचा एक भाग म्हणून सरकारने चांदीची सर्व नाणी चलनातून काढून घेऊन नोटा छापणे सुरू केले. याविरुद्ध काँग्रेसने मोहीम उभारून चांदीची नाणी दडपून ठेवण्याचा व सोनेचांदीचा संचय करण्याचा प्रचार केला. आणि सरकारला जेरीस आणले.

हिंदुस्तानच्या या आर्थिक राजधानीमध्ये काँग्रेसने घडविलेली राजकारण व अर्थकारणाची ही गुंफण १९४३ च्या अखेरपर्यंत टिकून राहिली. सर्वच वस्तूंच्या बाजारपेठांमध्ये काँग्रेसचा प्रभाव प्रस्थापित झाला होता. काँग्रेसने सोनेचांदी बाजार, दाणा बंदर, कापसाचा बाजार, कापड बाजार, शेअर मार्केट कित्येक महिने मृतप्राय केलेले होते. भारतातील हे सर्वात मोठे शेअर मार्केट, काँग्रेसच्या परवानगीने, आंदोलन सुरू झाल्यापासून प्रथमच २३ सप्टेंबर १९४२ रोजी उघडले. पण तेही केवळ कायदेशीर बाब भागविण्यासाठी, आणि एक दिवसच! याच कारणासाठी हे मार्केट पुन्हा १ ऑक्टोबरला एक दिवसासाठी उघडले. विशेष म्हणजे तेथील व्यवहार बंद ठेवण्यासाठी काँग्रेसला पिकेटिंग करण्याचीही गरज वाटली नाही. कारण तेथील बंद ऊत्स्फूर्त होता. तेथे पिकेटिंग सुरू केले ऑक्टोबर अखेरीला! शाळकरी मुली व मुलांची 'वानर सेना' बी. पी. सी. सी. च्या सुचनेनुसार या मार्केटमध्ये पिकेटिंग करीत असे. काही अटी घालून या कमिटीने २४ नोव्हेंबरपासून शेअर मार्केट ठरावीक दिवशी चालू ठेवण्यास परवानगी दिली.

काँग्रेसची कापसाच्या व्यापारावरील हुकमत ब्रिटिश सरकार कधीच कमी करू शकले नाही. अशा प्रभावातून काँग्रेसने युद्ध-प्रयत्नांमध्ये गंभीर व्यत्यय आणून सरकारला भयंकर रंजीस केले होते.[३]

ब्रिटिश साम्राज्य शाबूत ठेवण्यास्तव गृहमंत्री रेजिनाल्ड मॅक्सवेल व व्हाइसरॉय लिनलिथगो प्रयत्नांची परकाष्ठा करीत होते. स्थितिवादी नोकरशाहीचे मूर्तिमंत प्रतीक असलेल्या मॅक्सवेल यांनी भारताच्या इतिहासातील एक प्रकरण घडविले. १९४२ चा क्रांतिलढा ठेचून काढण्यासाठी कटिबद्ध असलेल्या या मुत्सद्दी इंग्रजाची जडणघडण मुंबई इलाख्यातच झालेली होती. खेडा जिल्ह्याचा कलेक्टर असताना त्याने महात्मा गांधी व सरदार पटेलांचे रौलट सत्याग्रह आणि असहयोग सत्याग्रह दडपण्यासाठी आपले कसब वापरले होते. पण सरदार पटेलांनी पुढे बार्डोली सत्याग्रह यशस्वी करून मॅक्सवेल व गव्हर्नर लेस्ली विल्सन यांना नमते घ्यायला लावले होते. नंतर मुंबई इलाख्याचे गृहमंत्री असताना मॅक्सवेल साहेबांनी, सविनय

कायदेभंग आंदोलन संपल्यावरही (१९३३), सरदार पटेलांना बंधमुक्त करण्यास बरेच दिवस नकार दिला होता. अखेरीस मॅक्सवेल हिंदुस्तानचे गृहमंत्री झाले (१९४०-१९४४). गृहमंत्री असलेल्या या हट्टी इंग्रजाने छोडो भारत क्रांतिलढा दडपून टाकण्यासाठी जिवाचे रान केले. तथापि १ मे १९४४ रोजी हताश होऊन त्यांनी हिंदुस्तानातून प्रयाण केले. त्यांना आधीच सत्तांतराची पूर्वकल्पना आलेली होती.

मॅक्सवेल व लिनलिथगो यांनी साम्राज्य रक्षणासाठी अनेक तत्त्वशून्य तडजोडीही केल्या. त्यांनी विविध जातींच्या संघटनांना सरकारी मान्यता दिली. मुस्लीम लीग, ब्राह्मणेतर पक्ष, संस्थानिकांचे नरेंद्र मंडळ वगैरे आधीपासूनच होते. हिंदुमहासभा १९१५ पासून अस्तित्वात असली, तरी तिला ऑगस्ट १९४० मध्ये सरकारी मान्यता दिली. १९३७ च्या निवडणुकीत हिंदुमहासभेला दुःखद अपयश आले, हे त्यामागील कारण मानले जात होते. इतर अनेक जातींचे लोक विभक्त व राखीव प्रतिनिधित्वाची मागणी करीत होते. डॉ. आंबेडकरांनी २३ ऑगस्ट १९४२ च्या दिल्लीतील भाषणात दलितांना मुस्लीम लीगच्या बरोबरीचा राजकीय दर्जा मिळावा, अशी मागणी केली होती. **मात्र विभक्त प्रतिनिधित्व वा राखीव जागांची मागणी न करणारा पारशी हा अत्यल्प संख्या असलेला भारतातील एकमेव समाज होता.**

व्हाइसरॉय लिनलिथगो छोडो भारत लढ्याच्या आघाताने लवकरच हबकले होते. अगदी १७ डिसेंबर १९४२ पर्यंत ते जाहीररीत्या एकही शब्द बोलले नव्हते, अगदी मध्यवर्ती कायदेमंडळातही नाही! फेडरल चेंबर ऑफ कॉमर्सच्या १७ डिसेंबरच्या बैठकीत त्यांनी प्रथम तोंड उघडले. जबरदस्त आंदोलनाच्या संभाव्य यशाची त्यांना पूर्वकल्पना आली असावी. पंतप्रधान चर्चिलला पाठविलेल्या ३१ ऑगस्ट १९४२ च्या उपरोक्त खाजगी तारेतून त्यांनी आपली चिंता व बिकट अवस्था कळविली होती. हिंदुस्तानावर परकीय आक्रमणाची शक्यता असतानाच्या वेळी छोडो भारत आंदोलनाने युद्ध-प्रयत्न पांगळा केला, याचे त्यांना मनस्वी भान आलेले होते. “महात्मा गांधींचे नेतृत्व स्वीकारलेली ‘युवा कॉंग्रेस’

नियंत्रणाबाहेर गेलेली आहे. आणि जुने काँग्रेसजन व इतर पक्षांना आमची बिकट अवस्था याविषयी खेद वा दुःख वाटत नाही," असा व्हाइसरॉयला हादरा बसला होता. लिनलिथगो निराश झाले होते. मुंबई सरकारचे अतिरिक्त गृह सचिव अय्यंगार यांनी तर भारतमंत्री लॉर्ड अमेरी यांस 'मॅलिग्नंट' म्हणण्याचे धाडस केले होते.

**सारांश, छोडो भारत आंदोलनामुळे इंग्रज सरकार हतबल झालेले होते. मुसलमानांनी काँग्रेसच्या आंदोलनास विरोध केला नव्हता. बॅ. जिना किंवा कम्युनिस्टांची पक्षीय भूमिका काहीही असली, तरी त्यांचे तरुण सभासद आंदोलनात सामील होते.** सरकारने हजारो प्रती छापलेल्या **काँग्रेस रिस्पाँसिबिलिटी** चोपड्याचा सुतराम प्रभाव पडलेला नव्हता. महात्मा गांधींच्या २१ दिवसांच्या उपोषणात त्यांना व आंदोलनास सहानुभूतीचाच प्रतिसाद लाभला होता. इंग्लंड, अमेरिका व चीनमधील उपरोक्त विचारवंतांची गांधीजींना व आंदोलनास सहानुभूती लाभली होती. देशात उत्साह वाढला होता. अशा वातावरणात इंग्रज अधिकारी सरकारच्या विध्वंसनाचे गुप्तपणे सर्वेक्षण करू लागले. आपल्या अहवालांमध्ये त्यांनी स्पष्ट कबुली दिलेली आढळली— 'सरकारला आगामी घटनांवर मात करणे किंवा त्यांवर नियंत्रण ठेवणे कठीण जाईल'. यात बेचाळीसचे फलित व यश सामावलेले होते. ऑक्टोबर १९४३ मध्ये लिनलिथगो मायदेशी परत गेले ते निराश होऊन! सीतारामय्या यांनी म्हटल्याप्रमाणे, **" Linlithgow left behind a cumbersome record of frustration and futility to the historian and an unenviable legacy to his successor, and he departed..... the mausoleums of Delhi unhonoured, unwept, unsung", (Pattabhi Sitaramayya, op. cit., Vol. II, p. 561).**

## महात्मा गांधी बंधमुक्त

बंदिवान गांधी बंधमुक्त गांधीजींपेक्षा जबरदस्त व अवघड वैरी आहेत, हे तर्कशास्त्र लॉर्ड लिनलिथगोंना मान्य नव्हते. निदान गव्हर्नरच्या आग्रहास मान

देऊन गांधीजींना देशाबाहेर हद्दपार न करता त्यांना पुण्याच्या वेशीवरील बंगल्यात ठेवण्यात आले होते. गांधीजींना बंदिस्त ठेवण्यासाठी इंग्रज सरकारने जबरदस्त भाडे देऊन आगाखान पॅलेस भाड्याने घेतलेला होता. आपणावर इतका अफाट खर्च केला जातो याची त्यांना सदैव टोचणी वाटत होती. म्हणून पुण्यातील या महागड्या भवनाऐवजी आपणास दुसऱ्या तुरुंगात ठेवावे, यासाठी त्यांनी सरकारकडे अनेकदा मागणी केली. " हा पैसा इंग्रजांचा नसून गरीब भारतीय जनतेचा आहे. दशलक्षावधी लोक भुकेने मरत असताना एवढा पैसा घालविणे " त्यांना गुन्हा करण्यासारखे वाटत असे. " शिवाय मी पळून जाणार नाही असे माहीत असूनही, ते मला बंदिस्त ठेवण्यासाठी इतका पोलिसी व लष्करी बंदोबस्त ठेवत आहेत याचे दुःख वाटते," असे गांधीजींनी कित्येक पत्रांमध्ये लिहिले होते. महायुद्ध संपल्यावरच आपणास बंधमुक्त करतील असा त्यांचा अंदाज होता. सात वर्षांच्या बंदिवासाची त्यांनी मनाची तयारी केलेली होती. तिथेच त्यांनी महादेवभाई देसाई व कस्तुरबांचे निधन पाहिलेले होते. या महागड्या महालात ठेवण्यापेक्षा अहमदनगरच्या किल्ल्यात आपल्या सहकाऱ्यांच्या समवेत आपणास ठेवावे, असाही त्यांनी अर्ज केला. पण व्यर्थ! अट्टाग्रही व्हाइसरॉय तर्कशास्त्र पराङ्मुख झाले होते!

तथापि गांधीजींची कमालीची ढासळलेली प्रकृती व त्यांच्या संभाव्य मरणाच्या भयामुळे इंग्रजांना तर्कशास्त्राची गंभीर दखल घ्यावी लागली. सरकारला सादर झालेल्या गोपनीय सरकारी वैद्यकीय अहवालानुसार गांधीजींची प्रकृती मलेरियामुळे कमालीची गंभीर झालेली होती. ते कोणत्याही क्षणी मरण पावण्याची शक्यता होती. २२ फेब्रुवारी १९४४ रोजी कस्तुरबांचे आगाखान महाल कारागृहातच निधन आणि अंत्यसंस्कार झालेले होते. तत्पूर्वी १५ ऑगस्ट १९४२ रोजी याच कारागृहात गांधीजींचे मानसपुत्र महादेवभाई देसाई यांचे निधन झाले व तिथेच अंत्यसंस्कार करावे लागले होते. आता महात्माही कारावासातच मरण पावल्यास इंग्रजांचा असंस्कृतपणा, असंवेदनशीलता आणि सूडबुद्धी सिद्ध होण्याची शक्यता होती. याबाबत राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय दुष्परिणाम होण्याची मुंबई सरकारला भीती

वाटत होती. म्हणून नवे गव्हर्नर जॉन कोलव्हिल यांनी गंगटोकमध्ये असलेल्या व्हाइसरॉय वेव्हेल यांना तार पाठवून महात्मा गांधींना विनाअट मुक्त करण्याची शिफारस केली. वस्तुतः गांधीजींनी आपल्या मुक्ततेसाठी ना मागणी केली, ना सुटका त्यांना अपेक्षित होती! म्हणून पूर्वसंध्येला सुटकेची पूर्वसूचना देणाऱ्या कर्नल भंडारींना गांधीजींनी विचारले, "आपण गंमत तर करीत नाही?"

**मलेरिया, अतिसार व रक्तपातामुळे अत्यंत क्षीण झालेले गांधीजी ६ मे १९४४ रोजी बंधमुक्त झाले.** पुण्यातील एका मित्राकडे काही दिवस विश्रांती घेतल्यावर महात्माजी जुहूमध्ये (मुंबई) शांतिकुमार मोरारजी यांच्या घरी राहावयास गेले होते.

प्रकृती सुधारण्यासाठी ते जुहूमध्ये मुक्कामी असताना सेंट्रल डिरेक्टोरेटचे नेते अच्युतराव त्यांना अत्यंत गुप्तपणे भेटले. तेव्हा गांधीजी म्हणाले, " हिंसाचाराची चर्चा कशाला? प्रत्येकाने स्वतःला सेनापती समजावे हा तर माझा संदेश होता." अशा सूचक वाक्यांवरून गांधीजींची भूमिका भूमिगतांच्या लक्षात आली. नंतर गांधीजी पुण्यात डॉ. दिनशा मेहतांच्या निसर्गोपचार केंद्रात असताना त्यांना अरुणा असफ अलीदेखील भेटल्या. या भेटीत त्यांनी अरुणाबेनच्या अफाट धाडसाची व कर्तृत्वाची मुक्तकंठाने तारीफ केली. त्या काळात अच्युतराव, अरुणा वगैरे भूमिगत नेते व रंगराव दिवाकर आणि शंकरराव देव, देवगिरीकर, गाडगीळ, अन्नादा चौधरी यांच्यासारखे गांधीवादी त्यांना पुण्यात किंवा पाचगणीत भेटत असत. भूमिगत अरुणाबेन व अच्युतराव यांची पत्रे गांधीजींकडे सुरक्षितपणे येत आणि गांधीजी आपण लिहिलेली उत्तरे पाठविण्याची व्यवस्था करीत. गांधीजी व अरुणा यांचा आंदोलनाबाबतचा गुप्त पत्रव्यवहार चौदा महिने (४ जून १९४४ ते ८ ऑगस्ट १९४५) सुरळीतपणे चालू राहिला.

गांधीजींचा आक्षेप ' जनतेने प्रक्षोभाच्या भरात केलेल्या तत्कालिक हिंसेला ' तितकासा नव्हता, तर आंदोलनात साबोटाज मार्गाने करण्यात आलेल्या 'पूर्वनियोजित आणि हेतूपूर्वक हिंसेला' होता. त्यांनी आपली मते ठाम शब्दांत मांडली. तथापि भूमिगत नेत्यांच्या कारवायांचा अजिबात धिक्कार केला नाही. कारण सरकारने काँग्रेसवर अमेरिकेतील पर्ल हार्बरवरील हल्ल्यासारखाच अत्यंत

अकस्मात हल्ला केला होता. त्याकारणाने प्रक्षोभित झालेल्या जनतेने दडपशाहीशी शक्य त्या मार्गाने मुकाबला केला.[४]

दरम्यान राजबंदी मुक्त होत असताना माजी मुख्यमंत्री बा. गं. खेर यांनी मुंबई इलाखा कायदेमंडळातील ४० आमदारांची विधानभवनात बैठक भरविली. ब्रिटिशांनी सत्तांतराची घोषणा करून येथून त्वरित चालते व्हावे, असा या बैठकीत एकमताचा ठराव मंजूर करण्यात आला. स. का. पाटलांनी काँग्रेस पक्षाचे पुनर्संघटन करण्यासाठी व भावी कार्यक्रम आखण्यास वाहून घेतले. काकासाहेब न. वि. गाडगीळ प्रांतिकचे अध्यक्ष या नात्याने महाराष्ट्र प्रांतिक पक्षाचे बळ वाढविण्याच्या कामी लागले. वऱ्हाड व मध्यप्रांतातही ही प्रक्रिया सुरू झाली. काही काँग्रेसजनांनी विधायक कार्यास वाहून घेतले. बंधमुक्त झालेल्या राजबंद्यांचे गावोगावी अपूर्व सत्कार करण्यात आले.

मुंबईपासून गोंदियापर्यंत होत असलेले स्वातंत्र्य सैनिकांचे सत्कार सोहळे, विजयी मुद्रा व सभा यामुळे कलोनिअल सत्ताधीश अचंबित झाले. सरकारचे सर्व निर्णायक वटहुकूम शक्तिबाह्य व अवैध ठरल्यामुळे सरकारचे सर्वत्र हसे झाले होते. गव्हर्नर कोलव्हिल यांनी व्हाइसरॉयला संपूर्ण वस्तुस्थिती कळविली होती. **ज्या कम्युनिस्टांच्या साहाय्याने सरकारने काँग्रेसपुढे समस्या निर्माण केल्या होत्या, त्या कम्युनिस्टांनी मुंबईत पुन्हा घुमजाव केले.** अभूतपूर्व महागाई व टंचाईमुळेही लोकमत प्रक्षुब्ध झालेले होते. गव्हर्नरने या वस्तुस्थितीचा आढावा घेतला होता.

व्हाइसरॉय फिल्ड मार्शल वेव्हेल यांनी लिनलिथगोंपेक्षा जरा डोळसपणे युद्धजन्य परिस्थिती व छोडो भारत आंदोलनाच्या परिणामांचा आढावा घेतला आणि त्यांनी पंतप्रधान चर्चिलना बजावून सांगितले :– " महायुद्धानंतर लष्करी बळाच्या जोरावर हिंदुस्तान आपल्या कब्जात ठेवणे शक्य होणार नाही; येथील लोकमत आपल्या विरोधात गेलेले आहे; ब्रिटिश लोकमत तसेच जागतिक लोकमत किंवा आपले स्वतःचे हिंदुस्तानातील लष्करदेखील बलप्रयोगाने हिंदुस्तानावर अशीच हुकूमत चालू ठेवण्यास अनुकूल होणार नाही. शिवाय आपल्या लष्करातील भारतीयांच्या सहनशीलतेचा आपण अंत पाहू नये. आयर्लंडबाबत

आपण यापूर्वी तडजोडी केलेल्या आहेतच. तशीच तडजोड हिंदुस्तानाबाबतही करावी. म्हणून युद्ध समाप्तीपूर्वीच आपण सर्व राजबंदींना मुक्त करावे, आणि संबंधितांशी वाटाघाटी कराव्यात." वस्तुतः वेव्हेलांचा प्रामाणिक उद्देश होता की, प्रशासकीय समस्या व लष्करातील असंतोष कमी करून घटनात्मक सुधारणांच्या प्रक्रियेला चालना द्यावी. सप्टेंबर १९४४ पासून वेव्हेल आत्मपरीक्षण करू लागले.[५]

पुन्हा अविवेकीपणाचा झटका आलेल्या चर्चिलने मात्र जुलैमध्येच तार पाठवून तिरसटपणे विचारणा केली होती, " व्हाय गांधी स्टिल नॉट डाईड ". ज्याची-त्याची नीती-अनीती, संस्कृती!

**ट्रान्सफर ऑफ पॉवरच्या** खंड पाचमध्ये प्रकाशित झालेल्या दस्तऐवजांमधून उघड दिसते की, चर्चिल, लॉर्ड अमेरी व लिनलिथगो यांच्यापेक्षा वेव्हेल यांनीच आत्मपरीक्षण केले. ते अधिक विवेकबुद्धीने वागले. ५ सप्टेंबर व २० सप्टेंबर १९४४ च्या पत्रांमधून त्यांनी अमेरींना भारतातील वस्तुस्थितीची कल्पना दिली. त्यासाठी त्यांनी प्रत्येक गव्हर्नरचे मत अजमावले होते. त्याशिवाय वरिष्ठ सनदी नोकरशाहीचे अभिप्राय घेऊन अनेकांशी चर्चा केल्या होत्या. त्या अभ्यासपूर्ण निरीक्षणातून वेव्हेल यांनी अमेरींना अभिप्राय पाठविला होता. अहवालात त्यांनी स्पष्ट कबुली दिली :—" काँग्रेसने प्रदीर्घ काळ चालविलेला निकराचा लढा तसेच महायुद्धाच्या प्रचंड तणावामुळे हिंदुस्तानातील प्रशासन यंत्रणा कमालीची दमलेली, थकलेली आहे. सरकारचे सर्व वरिष्ठ इंग्रज अधिकारी आठ वर्षांहून अधिक काळापासून आपल्या घरी जाऊ शकलेले नाहीत; त्यांना रजा देणे शक्य नव्हते. ते सर्व आता घरी मायदेशी परतण्यास आतुर आहेत. यापैकी बहुतेक अधिकारी सेवानिवृत्तीच्या वयाला पोहोचले आहेत. आय. सी. एस. मध्ये नवीन इंग्रज येण्यास तयार नाहीत. हिंदुस्तानातील सेनादलाच्या अधिकाऱ्यांनाही विश्रांतीची नितांत गरज आहे. सेनादलातील गोऱ्या अधिकाऱ्यांना हिंदुस्तानात राहण्याची अजिबात इच्छा नाही, त्यांना मायदेशी परत जायचे आहे. यात त्यांना विलंब नको. "

**वेव्हेलनी अमेरींना निक्षून सांगितले, " काँग्रेस अजिबात माघार घेणार नाही! राजकीय जागृती झाल्याकारणाने भारतीय लोक कमालीचे ब्रिटिशविरोधी झालेले आहेत. जातीयवादी पक्ष व अल्पसंख्यांक गट अथवा मूठभर मवाळ पंथीय आणि संस्थानिक वगळता आम्हा ब्रिटिशांना आता इथे मित्र उरलेले नाहीत. म्हणून आता काँग्रेसने माघार घेण्याची आशा न बाळगता, आपणच पुढाकार घेऊन राजबंद्यांना त्वरित बंधमुक्त करावे. विशेष म्हणजे पूर्वीपासून विरोधात असलेली सनदी नोकरशाही आता राजकीय परिवर्तनास अधिक अनुकूल झाली, " हेही व्हाइसरॉयने नमूद केले.** त्यांनी भिंतीवरील आलेख वाचला होता. काँग्रेसशी वाटाघाटी करणे हा एकमेव पर्याय त्यांना दिसत होता.[६]

वेव्हेल यांचा **द व्हाइसरॉयज् जर्नल** हा ग्रंथ पाहता ध्यानात येते की, खरेखुरे ' राष्ट्रीय सरकार ' तात्काळ स्थापन करण्याचा त्यांचाही मानस नव्हता. पण त्यांना काँग्रेसने केलेले इंग्रज सरकारचे खिळखिळे स्वरूप दिसत होते. म्हणून काँग्रेस-मुस्लीम लीगचे संमिश्र सरकार स्थापन करून देशात शांतता प्रस्थापित करावी असा त्यांचा मनोदय होता.

एप्रिल-मे १९४५ मध्ये ब्रिटनमध्ये सार्वत्रिक निवडणुका होणार होत्या. भारतविषयक धोरणांमुळे ब्रिटनमध्ये काँझर्व्हेटिव पक्ष व खास करून चर्चिल-विरोधी भावना निर्माण झाली होती. अशा वातावरणात मार्चमध्ये वेव्हेल वॉर कॅबिनेटशी चर्चा करण्यासाठी लंडनला गेले. **छोडो भारत आंदोलनाने केलेली सरकारची दुर्दशा आणि काँग्रेसने कदापि माघार न घेण्याचा घेतलेला ठाम पवित्रा तसेच काँग्रेसने प्राप्त केलेला अपूर्व जनाधार याकडे दुर्लक्ष करणे कॅबिनेटलाही अशक्य झाले.** शिवाय चर्चिलची लोकप्रियता घसरलेली होतीच. ब्रिटिश संसदेच्या आगामी निवडणुकांमध्ये त्यांचा पक्ष अपयशी ठरण्याची संभाव्यता स्पष्ट दिसत होती. म्हणून चर्चिल यांनी वेव्हेल यांना प्रथमच गांधीजी व काँग्रेस नेत्यांशी वाटाघाटी करण्यास परवानगी दिली.

**काँग्रेस कार्यकारिणी बंधमुक्त** :—त्यानुसार अहमदनगरच्या किल्ल्यात डांबलेल्या कार्यकरिणी सदस्यांची रवानगी प्रथम त्यांच्या मूळ प्रांतात करण्यात आली (मार्च-एप्रिल १९४५). जर्मनी शरण आल्यावर ब्रिटिश संसदेच्या निवडणुकांची घोषणा

झाली. वेव्हेलने १४ जून १९४५ रोजी ऐतिहासिक सिमला परिषदेचा कार्यक्रम आकाशवाणीवरून घोषित केला. १५ जूनला १९४५ रोजी मौलाना आझाद वगैरे नेते बंधमुक्त झाले. मुंबईत भरलेल्या काँग्रेस कार्यकारिणीच्या २१ जूनच्या बैठकीत पक्षाचे पुढील धोरण निश्चित करण्यात आले.

**सिमला परिषद :**—२५ जूनपासून १४ जुलै १९४५ पर्यंत चाललेल्या सिमला परिषदेच्या कार्यसूचीवर पुढील प्रस्ताव होते :- (१) व्हाइसरॉय व कमांडर इन चीफ वगळता व्हाइसरॉयच्या कार्यकारिणीतील इतर सभासद 'हिंदू धर्मीय' व मुसलमान असतील; (२) त्यांची संख्या समसमान राहील; (३) आता अस्तित्वात असलेल्या घटनेनुसारच कार्यकारिणी कारभार करील; (४) युद्ध जिंकल्यावरच नवीन राज्यघटनेचा मार्ग खुला होईल. मात्र ही कार्यसूची संकुचित होती हे उघडआहे.

तथापि या परिषदेतील सर्वाधिक आक्षेपार्ह बाब ही की, काँग्रेसला 'हिंदू धर्मीय पक्ष' ठरविण्याचा प्रयत्न मुस्लीम लीगप्रमाणेच ब्रिटिशांनीही केला. हिंदुमहासभेलाही हे मान्य नव्हते. बॅ. जिनांचा भयंकर हटवादीपणा, अहंभाव, तुसडेपणा आणि त्यांच्या 'मेगॅलोमॅनियामुळे' सिमला परिषद कोसळली. ' प्रत्येक मुसलमान' सदस्य निवडण्याचा अधिकार आपणासच आहे, असा या गृहस्थाने अट्टाहास धरला. वस्तुतः काँग्रेस शिष्टमंडळाचे प्रमुख मौलाना आझाद होते. पण नाही! प्रत्यक्षात **वेव्हेलने लिनलिथगोंप्रमाणेच जिनाला व्हेटो म्हणजे नकाराधिकार देऊन ठेवला होता!** त्यामुळे परिषदेचे अपयश पूर्वरचित होते!

या अपयशाचे गांधीजींना दुःख झाले, पण आश्चर्य वाटले नाही. कारण त्यांना नेहरू, पटेलांपेक्षा जिनांची द्विराष्ट्रवादाची भयंकर हटवादी भूमिका माहीत होती. मुंबईत झालेल्या वाटाघाटींच्या वेळी "मीच सर्व मुसलमानांचा एकमेव पुढारी आहे," असे जिनांनी गांधीजींना पूर्वी सांगितलेले सिमल्यातही त्यांच्या स्मरणात होते. तथापि परिषदेत वेव्हेलने वापरलेल्या 'कास्ट हिंदू' या संज्ञेला महात्माजींनी जबरदस्त आक्षेप घेतला. शेवटी परिषदेच्या अपयशाची जबाबदारी व्हाइसरॉय वेव्हलना आपल्याच शिरावर घ्यावी लागली. काँग्रेसने ब्रिटनला आपले सामर्थ्य या वेळीही दाखवून दिले.

## गांधी-जिना वाटाघाटी

गांधीजींनी स्वतःहून केलेला मनोमीलनाचा हा प्रयत्न नव्हता. महात्मा गांधी जिनांना भेटले ते **डॉन** या वर्तमानपत्रातून जिनांनी व्यक्त केलेल्या इच्छेमुळे! तेव्हा वायव्य सरहद्द प्रांत व पंजाबातही जिनांच्या मार्गात अनेक अडथळे होते. खान अब्दुल गफार खान व डॉ. खानसाहेब तर जिनांच्या विरोधात होतेच. पण दोन्ही प्रांतांतील अधिकारारूढ मुसलमान राजकारणीदेखील जिनांना अनुकूल नव्हते. अशा वातावरणात अल्लामा मश्रिकी वगैरे नेत्यांनी महात्मा गांधींना गळ घातली होती की, त्यांनी बॅ. जिनांना भेटून हिंदू-मुस्लीम राजकीय समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करावा.[७] काँग्रेसच्या गोटात हा विचार प्रथम राजगोपालाचारींना पटला होता. त्यांच्या पुढाकारानुसार गांधीजींनी ९ सप्टेंबरपासून २७ सप्टेंबर १९४४ पर्यंत जिनांच्या मलबार हिलवरील माऊन्ट प्लेझन्ट बंगल्यात जाऊन बोलणी केली.

**स्वतः गांधीजींना राजाजींची तडजोडीची योजना मनस्वी पसंत नव्हती. गांधीजींना अखंड भारतास संपूर्ण स्वातंत्र्य हवे होते. धार्मिक, जातीय वा प्रांतिक प्रश्न स्वातंत्र्यानंतर आपसात सोडवावे, ही त्यांची जाहीर भूमिका होती. भारताची फाळणी वा विभागणी हा विचारही त्यांना असह्य होता. स्वातंत्र्याबरोबरच हिंदू-मुसलमान ऐक्य साधणे हे त्यांचे जीवनाचे ध्येय त्यांनी जाहीर केलेले होते. याच विचारसरणीमुळे गांधीजी, राजाजींच्या आग्रहानुसार, जिनांना भेटायला गेले.** मात्र दिवसेंदिवस ताठर होत गेलेले बॅ. जिना त्यांच्या द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांतावर ठाम उभे होते. त्यांच्या मते हिंदू व मुसलमान देशभर विखुरलेले असले, तरी ते एकमेकांहून अगदी भिन्न आहेत; ही दोन राष्ट्रे आहेत. आपला हा प्रमेय स्वीकारावा आणि मुस्लीम लीगच्या १९४० मधील लाहोर ठरावानुसार आमची मागणी मान्य करावी, असा त्यांनी आग्रह धरला. वस्तुतः त्या ठरावात 'पाकिस्तान' हा शब्दही नव्हता. तरीही पंजाब, सिंध, बलुचिस्तान व वायव्य सरहद्द प्रांत मिळून पश्चिम पाकिस्तान आणि बंगाल व आसाम मिळून पूर्व पाकिस्तान मानले जावे, असा जिनांनी युक्तिवाद केला.

गांधीजींनी संपूर्ण भारतीय समाजाची घडण, रचना, परस्परावलंबित्व, आर्थिक समस्या, सामाजिक भावना व सद्‌भाव या आधारावर सविस्तर युक्तिवाद केला.

त्यांनी जमीनदार-कुळांचे प्रश्न, आर्थिक स्थैर्य, अल्पसंख्य जाती व जमातींचे भवितव्य, सामाजिक सामंजस्य, सावकारी, संस्थानिकांचे प्रश्न असे सर्व ज्वलंत व महत्त्वाचे मूलगामी प्रश्न जिनांसमोर मांडले. तथापि या ॲरिस्टोक्रॅटिक आणि अहंकारी वकिलाने या प्रश्नांवर उत्तर देण्यास नकार दिला. **जिनांना प्रथम पाकिस्तान पाहिजे होता व नंतर स्वातंत्र्य! जिना त्यांचा पाकिस्तान गांधीजींना मागत होते! तथापि त्यासाठी त्यांची ब्रिटिशांशी लढायची तयारी नव्हती.**

व्हाइसरॉय वेव्हेल यांच्या मते जिनांसारखा विलक्षण बुद्धिमान मनुष्य द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांताबाबत खरोखर प्रामाणिक आहे, यावर विश्वास ठेवणे कठीण वाटते. "His refusal to answer awkward questions also shows that he has not thought out the implications of Pakistan, or anyway will not disclose his views on them. To take only one example, the North-Eastern Muslim State would amount to very little without Calcutta...... a Hindu City." (**Transfer of Power**, Vol. V, pp. 74-75, Wavell to Lord Amery, 3rd October 1944).

## मुंबई बंदरातील भयानक स्फोट

महायुद्धाचा वणवा पेटलेला असताना आणि महात्मा गांधी कारावासात आजारपणामुळे कमालीचे क्षीण झालेले असताना, मुंबई बंदरात महाभयानक स्फोट झाला होता. सारे शहर भयंकर हादरले. स्फोटामुळे बंदरातील शेकडो टन लोखंडाचे व पोलादाचे तुकडे क्षेपणास्त्रांप्रमाणे दक्षिण मुंबईवर उडत राहिले. १४ एप्रिल १९४४ च्या त्या दुर्दैवी दिवशी दुपारी प्रथम मुंबईच्या व्हिक्टोरिया गोदीत **फोर्ट स्टायकिन** नामक महाकाय जहाजात स्फोट झाले. या जहाजात १२०० टन वजनाची स्फोटक द्रव्ये, रसायने व दारूगोळा आणि युद्धसामग्री होती. जपानच्या संभाव्य हल्ल्याचा प्रतिकार करण्यासाठी ही सामग्री इथे आणलेली होती. दोन मुख्य स्फोट झाले, असे फिल्ड मार्शल वेव्हेल यांनी लॉर्ड अमेरींना लिहिलेल्या खाजगी गोपनीय पत्रात म्हटले. परंतु अनेक स्फोट झाले, असे मला

वर्तमानपत्रांमधून आढळले. स्फोटांमुळे व्हिक्टोरिया डॉक व प्रिंस डॉक या दोन्ही गोद्या जळून खाक झाल्या. महाभयानक आगीने बंदर गिळंकृत केले. जहाजांमधून उतरवलेली आयात युद्धसामग्री व माल आणि येथून निर्यात करावयाचा माल नष्ट झाला. बंदरातील सर्व क्रेन, नलिका, रेल ट्रॅक नष्ट झाले. कित्येक टन वजनाचे लोखंड वा पोलादाचे तुकडे भयंकर वेगाने उडत जाऊन बंदर परिसरातील इमारतींचा विध्वंस करीत होते. उदाहरणार्थ, सेंट जॉर्ज रुग्णालयाच्या इमारतीचीदेखील बरीच हानी झाली होती. कित्येक इमारती कोसळल्या, जळाल्या.

भयभीत झाल्यामुळे मुंबईतील लोकांची पाचावर धारण बसली. अक्षरशः पळापळ सुरू झाली होती. हजारोंनी मिळेल त्या वाहनाने शहरातून पलायन केले. जपानने मुंबईवर हल्ला केला, असा समज होऊन नागरिकांना शहरात राहणे धोक्याचे वाटत होते. इंग्रज सरकारवरील विश्वास आधीच पुष्कळ घसरलेला होता. त्यात या स्फोटाने मोठी भर घातली. स्फोटामुळे विस्तृत भागात महाभयानक विध्वंस झाला, हे व्हाइसरॉय वेव्हेल यांनी समक्ष पाहून मान्य केले. ५१६ पेक्षा अधिक प्राणहानी झाली व २००० जण गंभीररीत्या जखमी झाले, असे त्यांनी मान्य केले. मुंबईतील वीस हजार नागरिक बेघर झाले, कारण इमारती नष्ट झाल्या. जहाजांमधून निर्यात करावयाचा सुमारे ७०,००० टन माल नष्ट झाला. हिंदुस्तानात आधीच अन्नटंचाई होती. तशात ५५,००० टन धान्य या स्फोटात नष्ट झाले. अगणित कोटी पौंड किमतीचा मौल्यवान माल धुळीस मिळाला.

सुदैवाने अलेक्झांड्रा गोदी स्फोटातून वाचली. तसेच नजीकचे डिझेल व पेट्रोलचे प्रचंड साठे वाचले. अन्यथा शहराचा बराचसा भाग आग लागून भस्मसात झाला असता. झाले ते नुकसान महाभयानक होते. स्फोटामुळे जसे आर्थिक नुकसान झाले, तसेच त्याचे जनमानसावरही आघात झाले. विमा कंपन्यांनी भरपाई देण्यास नकार दिला होता. सरकारपुढेही समस्या उभ्या राहिल्या होत्या. अग्निशामक दलाने केलेल्या उत्कृष्ट कामगिरीचे व कौशल्याचे व्हाइसरॉयने मनःपूर्वक कौतुक केले. या दलाच्या कार्यकुशलतेमुळे दक्षिण मुंबईचा बराच भाग आगीच्या तडाख्यातून वाचला होता.[८]

हा स्फोट घातपातामुळे झाला असावा असा अनेकांचा समज झाला, तरी मुख्य न्यायाधीशांच्या चौकशी आयोगाने हा केवळ अपघात असल्याचा निष्कर्ष काढला. गोदीतील भीषण आग विझवण्याच्या पराक्रमात अग्निशामक दलाचे ६४ जवान मरण पावले व ८३ जण जखमी झाले. ३,००० नागरिकांची घरे नष्ट झाली. गोदीतील ५०,००० कर्मचारी बेकार झाले. जळालेल्या दहा जहाजांचे अवशेष नंतर केवळ भंगार म्हणून विकावे लागले. गोदीतील कामकाज पूर्वपदावर येण्यास पुढे सात महिने लागले. मृतांचा आकडा जाहीर ५१६ पेक्षा अडीचपटीने मोठा असल्याचे नंतर दिसून आले. मुंबईला या अपघाताचे दुष्परिणाम एक दशकभर भोगावे लागले.

## काँग्रेसमधून कम्युनिस्टांची हकालपट्टी

गांधीजी बंधमुक्त झाल्यावर असंख्य काँग्रेसजनांनी कम्युनिस्टांच्या विश्वासघातकी कारवायांविरुद्ध गांधीजींपुढे तक्रारी मांडल्या. त्याबाबत स्पष्टीकरण मागण्यासाठी गांधीजींनी कम्युनिस्ट पक्षाचे उत्तर भारतीय चिटणीस पी. सी. जोशी यांच्याशी सविस्तर पत्रव्यवहार केला. मात्र खोटे बोलण्याची सवय असलेल्या जोशींनी स्वतःचा व पक्षाचाही निर्दोषपणा दाखविण्यासाठी गांधीजींना विनवण्या केल्या, खुशामतही केली. तथापि जोशी अपयशी ठरले. म्हणून गांधीजींनी कम्युनिस्टांविरुद्धच्या लेखी तक्रारींची शहानिशा करण्यासाठी त्या सर्व मुंबईचे पुढारी भुलाभाई देसाई यांच्याकडे पाठविल्या. भुलाभाईंनी निर्णय दिला की, 'कम्युनिस्ट पक्षाची स्वतःची असंख्य पत्रके व दस्तऐवज पाहता, या पक्षाने काँग्रेसच्या आंदोलनाविरुद्ध निश्चितच घातक कारवाया केलेल्या आढळतात.'

सर्वच कम्युनिस्ट छोडो भारतच्या विरोधात होते असे नव्हे. वैयक्तिक पातळीवरून अनेकांनी आंदोलनात सक्रिय भाग घेतला. उदाहरणार्थ, कम्युनिस्ट नेते विष्णुपंत चितळे व श्रीपाद कृष्ण लिमये सरळसरळ छोडो भारतमध्ये आणि भूमिगत कार्यात सहभागी झाले होते. लाल निशाण गटाच्या दत्ता देशमुखांनी आंदोलनापायी कारावास भोगला. पुढारी वगळता कार्यकर्ता पातळीवरील अनेक कम्युनिस्टांनी आंदोलनात शिक्षा भोगली. भाई के. एन. फडके पक्ष सदस्य असले,

तरी त्यांनी अनेक आंदोलकांना मदत केली. त्यांनी महाडचे बंड आणि पुण्यातील बॉंबस्फोट खटल्यांमध्ये स्वातंत्र्यसैनिकांची वकीलपत्रे घेऊन अनेकांना सोडवले.

मात्र काही कम्युनिस्टांनी छोडो भारत आंदोलनाच्या विरोधात जाऊन काँग्रेसची व भारताची प्रतारणा केली हे संशयातीत होते. वस्तुतः प्रारंभापासून कम्युनिस्ट कार्यकर्ते काँग्रेसचे सभासद होते. १९२६-२७ पासून हा काँग्रेसच्या अंतर्गत असा 'डावा गट' होता. गांधीजींशी वाद न घालता ते १९३९-१९४० पर्यंत नेहरू व सुभाषबाबूंशी जवळीक साधून होते. तथापि इंग्लंड-रशिया यांच्यात मैत्रीचा करार झाल्याने त्यांना 'पीपल्स वॉर' चा साक्षात्कार झाला होता. वस्तुतः हा साक्षात्कार स्वीकारणे व कोलांटी उडी मारणे कॉम्रेड डांगे, सोली बाटलीवाला या विचारवंतांना नापसंत होते. मात्र अधिक खोलात जाण्याचे हे स्थळ नव्हे.

मुंबईत सर्वात जास्त रोजगार असलेल्या कापड गिरण्या बंद पाडून ब्रिटिशांना हैराण करण्याचा काँग्रेसचा प्रयत्न होता. सरकारचा युद्धप्रयत्न हाणून पाडून सरकारला वठणीवर आणण्यासाठी बी. पी. सी. सी. कसून प्रयत्न करीत होती. असाच कार्यक्रम काँग्रेसने सोलापूर, जळगाव, अमळनेर, नागपूर, हिंगणघाट, पुलगाव व आर्वी येथील गिरण्यांसाठीही आखलेला होता. त्यानुसार काँग्रेसला आंदोलनाच्या प्रारंभीच्या १०-१२ दिवसांत यश लाभलेही. तथापि सरकारने कम्युनिस्टांचे साहाय्य मिळवून कापड उद्योग कार्यरत ठेवण्यात बरेच यश मिळविले. कम्युनिस्टांनी गिरणी कामगारांमध्ये फूट पाडली. त्याचा फायदा झाला इंग्रजांना. पी.सी. जोशींनी विदर्भात रामभाऊ रुईकरांच्या युनियनपुढे अनेक समस्या उभ्या केल्या. हे उत्तर भारतीय जोशी अभिमानाने सांगत, "रुईकर्स गेम वॉज कंप्लिटली स्मॅशड्". जोशींनी पु. य. देशपांडे यांच्यासारख्या सचोटीने वागणाऱ्या कॉम्रेडवरही चिखलफेक केली होती. कारण काय तर देशपांडेंना साम्यवादापेक्षा स्वातंत्र्य मोलाचे वाटे!

**प्रकरण १८** मध्ये विवेचन केलेले आहेच की, गृहमंत्री रेजिनाल्ड मॅक्सवेल यांनी कम्युनिस्टांचा काँग्रेसशी लढण्यासाठी पुरेपूर उपयोग करून घेतला. त्यांना सवलती दिल्या, आमिषे दाखवली. मॅक्सवेलने पी. सी. जोशींची सत्त्वपरीक्षा

पाहण्यासाठी त्यांची खुशमस्करीही केली. त्यात वाहवत गेलेल्या जोशींनी आत्मप्रौढी व फुशारकी मारण्यासाठी तब्बल १२० पाने सिंगल स्पेसमध्ये टाईप केलेला अहवाल मॅक्सवेलला सादर केला होता. शिवाय बढाया मारणारे १९ पानांचे दुसरे निवेदन दिले. या अहवालांमध्ये कम्युनिस्टांनी काँग्रेसचा लढा निष्प्रभ करण्यासाठी प्रत्येक प्रांतात कम्युनिस्टांनी कोणते 'स्प्लेंडिड' कार्य केले याचा तपशील दिला. आपण महान सत्कार्य केले या सुरात जोशींनी अहवाल लिहिले होते. सरकारास व खासकरून मॅक्सवेल साहेबाला आपली उपयुक्तता पटवून देण्याचा जोशींचा प्रयास होता. त्यांनी सुभाषबाबू, लोहिया व अच्युतरावांवर टीकेचे प्रहार केले. **शिवाय त्यांनी महंमद अली जिनांची पाकिस्तानची मागणी अगदी 'न्याय्य व स्वाभाविक' ठरविली होती!**

काँग्रेस कार्यकारिणी बंधमुक्त झाल्यावर (१५ जून १९४५) गांधीजी व भुलाभाई देसाईंनी कम्युनिस्टांविरुद्धच्या सर्व तक्रारी कार्यकारिणीकडे पाठविल्या. आणखीही कित्येक निवेदने आली होती. कार्यकारिणीने सरदार पटेल, नेहरू व जी. बी. पंत यांची उपसमिती नेमली. उपसमितीने सर्व कम्युनिस्ट सदस्यांकडे दोषारोप पत्रे पाठविली. त्यावर कम्युनिस्ट गटाने ३०७ छापील पानांचे उत्तर पाठविले. मात्र कम्युनिस्टांनी काँग्रेसचा विश्वासघात (ट्रेचरी) केल्याचा आरोप या प्रदीर्घ उत्तरातून अधिकच सिद्ध झाला. बचावार्थ पी. सी. हास्यास्पद विधाने करीत राहिले. "सरकारच्या अभिलेखागारामधील दस्तऐवज आम्ही निरपराध आहोत असे सिद्ध करतात" असेही निखालस खोटे सांगून, गांधीजींचा अनुनय करण्याचा या माणसाने प्रयत्न केला. मात्र त्याचा प्रयत्न साफ फसला. असे राष्ट्रीय अभिलेखागारातील समृद्ध संग्रहावरून आम्हाला आढळले.

मुंबईचे सोली बाटलीवाला कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीचे सभासद होते. छोडो भारत आंदोलन सुरू होण्याच्या बऱ्याच आधीपासून जानेवारी १९४३ पर्यंत सोली ब्रिटिशांच्या जेलमध्येच होते. कॉ. डांगेही फेब्रुवारी १९४३ पर्यंत जेलमध्येच होते. टी. बी. चा आजार गंभीर झाल्यामुळे कॉ. सोली बाटलीवालांना सरकारने बंधमुक्त केले होते. मात्र सुटकेपूर्वीच त्यांनी पत्नी नर्गिस बाटलीवाला

यांना लिहिलेल्या पत्रातून कम्युनिस्टांच्या सरकारधार्जिण्या कारवाया आणि राष्ट्रविरोधी मोहिमेविषयी घृणा व्यक्त केली. सुटकेनंतर कॉ. सोली यांनी बी. टी. रणदिवे, प्रल्हाद कुरणे, एस. जी. पाटकर, अमीर हैदरखान, एन. उपाध्याय, पी. सी. जोशी इ. लोकांशी संबंध ठेवले नाहीत. शेवटी त्यांनी पक्षाचाही राजीनामा दिला. काही कम्युनिस्ट सहकाऱ्यांच्या पंचमस्तंभी कारवायांचा त्यांनी निषेध केला.[९]

नेहरू-पटेल-पंत यांच्या समितीने ऑक्टोबर १९४५ मध्ये 'काँग्रेसचे शुद्धीकरण' करून पक्ष एकात्म व एकसंघ करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार कम्युनिस्टांची काँग्रेसमधून हकालपट्टी करण्यात आली. काँग्रेसमध्ये काही हिंदुमहासभाइटही होते. त्यांनाही घालविण्यात आले. मध्यवर्ती कायदेमंडळाची निवडणूक होण्याचा रंग दिसत होता. त्यात हिंदुमहासभा पक्ष काँग्रेसशी निवडणुकीपुरती युती करण्यास तयार आहे, असा प्रस्ताव त्या पक्षाचे अध्यक्ष श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी स्वतः मांडला होता. तथापि सरदार पटेलांनी तो नाकारला, आणि सांगितले की, काँग्रेसला निवडणूक जिंकण्यासाठी त्या पक्षाची गरज नाही. फार तर मुखर्जी यांच्याविरुद्ध काँग्रेस पक्ष उमेदवार उभा करणार नाही, एवढी सवलत देण्यास सरदार तयार होते. कारण वि. दा. सावरकरांनी छोडो भारत आंदोलनात काँग्रेसला उघड विरोध केला, हे कोणीही विसरले नव्हते.

## मध्यवर्ती कायदेमंडळाची निवडणूक

इंग्लंडमधील जुलै १९४५ च्या निवडणुकीत चर्चिलच्या हुजूर पक्षाचा पराभव करून लेबर पक्षाने घवघवीत विजय संपादन केला. नेहरूंशी जुनी मैत्री असलेले ॲटली, स्टॅफर्ड क्रिप्स, पेथिक-लॉरेन्स यांचे सरकार सत्तेवर आले होते. व्हाइसरॉय वेव्हेल यांना याची भीती वाटू लागली होती. कारण एकदा क्रिप्स यांनी उठून स्वतः महात्मा गांधींना पाण्याचा ग्लास भरून दिलेला वेव्हेल साहेबांनी समक्ष पाहिला होता. वस्तुतः ही मैत्री व सद्भाव हा एक पैलू होता. मंत्रिमंडळातील परराष्ट्र मंत्री बेव्हिन पूर्वीप्रमाणेच भारतातील सत्तेचा त्याग करण्यास मनस्वी प्रतिकूल होता. शिवाय हाऊस ऑफ लॉर्डस् अजून चर्चिलच्या प्रभावाखालीच

होते. मात्र लंडनच्या सूचनेनुसार व्हाइसरॉयने हिंदुस्तानात मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळांच्या निवडणुकांची घोषणा केली. यापूर्वी १९३४ सालानंतर मध्यवर्ती कायदेमंडळाची निवडणूक झाली नव्हती. आणि १९३७ नंतर प्रांतिक कायदेमंडळांच्याही निवडणुका घेण्यात आल्या नव्हत्या.

व्हाइसरॉयच्या घोषणेनंतर उमेदवार निवडण्याची प्रक्रिया सुरू झाली. मध्यवर्ती कायदेमंडळात मुंबई प्रांतिक काँग्रेसचा प्रतिनिधी म्हणून पहिली पसंती सदाशिव कान्होबा पाटील यांना होती. त्यांना पटेलांचा पाठिंबा होता. पण त्यांना पक्ष संघटन कार्यासाठी मोकळे ठेवावे असे ठरले. मुंबईतून मिनू मसानी आणि इंडियन मर्चन्ट्स चेंबरसाठी असलेल्या जागेसाठी काँग्रेसने मनू सुभेदार यांना तिकिट दिल्यामुळे, मराठी भाषिक उमेदवाराचा शोध घेणे सुरू झाले. म्हणून शहरातून डॉ. गोपाळराव देशमुखांचे नाव पुढे आले. परंतु काँग्रेस अध्यक्ष मौलाना आझादांनी आक्षेप घेतला की, ‘ या देशमुखांनी पूर्वी महात्मा गांधींविरुद्ध विषारी टीका करणारी पत्रके काढली होती. त्यांनी वेळोवेळी शिस्तभंग केला; त्यांनी देशासाठी त्याग केलेला नाही.’ पटेलांनाही ही टीका ज्ञात होती व पटलेली होती. तथापि दुसरा उमेदवार पुढे न आल्यामुळे व मराठीच्या मुद्यावरून पटेलांनी गांधीजींची संमती घेऊन, देशमुखांनाच उमेदवारी दिली. अशा रीतीने मुंबई शहरातून मिनू मसानी, मनू सुभेदार व डॉ. गोपाळराव देशमुख (पेडर रोडला ज्यांचे नाव दिले), तर महाराष्ट्रातून न. वि. गाडगीळ व भाऊसाहेब हिरे आणि कर्नाटकातून द. पं. करमरकर हे उमेदवार प्रचंड बहुमताने विजयी झाले. सरदार-इनामदारांसाठी असलेल्या राखीव जागेवर काँग्रेसचे हरीभाऊ वि. तुळपुळे हे निष्ठावंत उमेदवार पराभूत झाले आणि अपक्ष असलेले सरदार एन. जी. विंचुरकर निवडले गेले.

वऱ्हाड-मध्यप्रांतातून काँग्रेसचे गणपतराव दाणी, शेठ शिवदास डागा व शेठ गोविंददास निवडून आले. हे दोन्ही शेठ बिनविरोध निवडून आले होते. भारतीय ख्रिस्तींसाठी असलेल्या राखीव जागेवर काँग्रेसचा पाठिंबा असलेले पी. के. साळवे यांची नियुक्ती झाली.

महाराष्ट्रातील या निवडणुकीचे सूत्रसंचालन व व्यवस्थापन मुख्यतः सरदार पटेल यांनी व स. का. पाटील, देव व गाडगीळ यांनी केले होते. नेहरू ‘स्टार स्पीकर’ म्हणून देशभर भाषणे देत. निवडणुकीत काँग्रेसला नेत्रदीपक यश लाभले.

१०२ सदस्य असलेल्या मध्यवर्ती कायदेमंडळात काँग्रेसला ५७, मुस्लीम लीगला राखीव ३०, स्वतंत्र ५, अकाली शीख राखीव २ आणि युरोपियनांसाठी राखीव असलेल्या ८ जागा प्राप्त झाल्या. काँग्रेसला मुस्लिमेतर प्रांतिक विधानसभांच्या मतदारांपैकी ९१.३ प्रतिशत मते लाभली होती. बंगाल, सिंध व पंजाबव्यतिरिक्त सर्वत्र काँग्रेसला घवघवीत यश लाभले. कम्युनिस्टांना ज्योती बसूंव्यतिरिक्त हिंदुस्तानातील केवळ सहा जागा मिळाल्या. मात्र हिंदुमहासभेचा साफ धुव्वा उडाला. राखीव मतदारसंघांमधील मुस्लीम लीगचा मोठा विजय मात्र भारत अखंड ठेवण्याचे स्वप्न भंग करेल, हे अरिष्ट सुचवत होता. लीगला सर्व राखीव जागांवर विजय मिळाला होता. त्यामुळे बॅ. जिना व लीगचा हटेलपणा अधिकच दृढ झाला. मात्र मुसलमानांचा वायव्य सरहद्द प्रांत व आसामध्ये काँग्रेसलाच बहुमत प्राप्त झाले हे विशेष होय.[१०]

## आझाद हिंद फौजेवरील खटले

ब्रिटिशांच्या भारतविषयक धोरणात १९४५-४६ मध्ये निर्णायक असे परिवर्तन सुरू झाले. १९४२ चे जनआंदोलन व त्यामुळे साम्राज्यवादाचे झालेले प्रचंड विध्वंसन, तसेच गांधी-पटेल-नेहरूंचे अविचल धोरण आणि काँग्रेसमधील जोश अशा अनेक कारणांमुळे इंग्लंडमधील लेबर पक्षाचे सरकार अंतर्मुख होऊन विचार करू लागले. अशा वातावरणात हिंदुस्तान सरकारने नोव्हेंबर १९४५ मध्ये आझाद हिंद फौजेच्या सेनानींच्या ट्रायल सुरू केल्या. त्यामागील कारणांची मीमांसा करण्याचे हे स्थळ नव्हे. मात्र या ट्रायल वा खटले अगदी जाहीररीत्या चालविणे अत्यंत गैर होते. शिवाय दिल्लीच्या प्रसिद्ध लाल किल्ल्यात खटले चालविणे चुकीचे, मूर्खपणाचेही होते! एक हिंदू म्हणजे पी. के. सहगल, एक मुसलमान शाहनवाज खान आणि शीख गुरबक्षसिंग धिल्लॉन यांच्यापासून सुरुवात केल्यामुळे तिन्ही धर्मांचे लोक संतापले. अगदी २५ वर्षांनंतर जवाहरलाल नेहरूंनी आपला बॅरिस्टरचा गाऊन पुन्हा घातला. नेहरू, भुलाभाई देसाई, बॅ. असफ अली, टी. बी. सप्रू आणि वरिष्ठ वकिलांचा चमू त्या देशभक्त सेनानींच्या बचावासाठी सरकारी न्यायालयासमोर उभा राहिला. हिंदवासीयांच्या मते सहगल, शाहनवाज,

धिल्लॉन, जगन्नाथराव भोसले, कॅ. लक्ष्मी वगैरे सारेच नायक होते. संपूर्ण आझाद हिंद सैनिकदलाने यातना भोगल्या होत्या. महायुद्धात ब्रिटिशांनी माघार घेताना गौरकाय सेनानी व नागरिकांची सुरक्षितपणे सुटका केली आणि भारतीयांना वाऱ्यावर सोडले होते. भयंकर पक्षपात केला होता. भारतीय सैनिक वणवण फिरत होते.

या खटल्यामुळे शीख व मुस्लीम लीगदेखील सरकारविरुद्धच्या निषेध-मोहिमेत सामील झाली. नोकरशाहीला १९४२ च्या आंदोलनाचे पुनरुज्जीवन होते की काय, याची रास्त भीती वाटू लागली. यावेळी काँग्रेसने विद्रोह उभारल्यास आपला निभाव लागणार नाही, अशी चर्चा होऊ लागली. म्हणून सरकार वरमले.

आझाद हिंद फौजेत महाराष्ट्रातील थोडेच सैनिक दाखल झालेले होते. या फौजेचे एक वरिष्ठ सेनापती जगन्नाथराव भोसलेंनी त्यांच्या सत्कारसमारंभात खेद व्यक्त केला होता की, "महाराष्ट्रीयांकडून आम्हास मदत मिळाली नाही; पण उत्तर भारतातील काही मंडळींच्या मदतीने आम्ही दुसरी आझाद हिंद सेना स्थापन केली." नंतर हिंदी सिनेमात भूमिका करून लोकप्रिय झालेल्या नझीर हुसेन यांनीही अशीच व्यथा माझ्याशी समक्ष बोलताना स्पष्ट शब्दांत व्यक्त केली होती (१९९४). जनरल भोसलेंसह पु. ना. ओक, तुकाराम कोकाटे, रामचंद्र काळे, कॅ. महंमदभाई पटेल, रमेशचंद्र भिवापूरकर, हिरालाल चुनीलाल शहा या आझाद हिंद सैनिकांचे सत्कार करण्यात आले असे आम्हाला वर्तमानपत्रांतून आढळले. आझाद हिंदमध्ये युद्धकैदी व मुसलमानांचा सर्वाधिक भरणा होता. त्यांच्या सुटकेसाठी झालेली चळवळ बंगालमध्ये बरीच जोरात झाली. शेवटी सरकारने नरमाईचे धोरण पत्करले, आणि फक्त खून व सह-बंदिवानांवर हल्ले करण्याचा आरोप असलेल्या सैनिकांवरच खटले भरण्याची घोषणा केली (१ डिसेंबर १९४५). आणि उर्वरित सैनिकांना बंधमुक्त केले.

## नाविक दलाचे बंड

१८५७ नंतर भारतीय सेनादलातील कोणत्याही विभागाने ब्रिटिशांविरुद्ध उघडउघड बंड पुकारले नव्हते. **पहिल्या व दुसऱ्या महायुद्धांमध्ये सर्व सुरक्षा दल सर्वथा राजनिष्ठ राहिली, असे ब्रिटिश सत्ताधीश मोठ्या अभिमानाने सांगत.**

तथापि १९४२ पासून व्यापक जनआंदोलनामुळे खिळखिळी झालेल्या राजसत्तेला मुंबईतील नाविक दलाच्या सैनिकांनी फेब्रुवारी १९४६ मध्ये जबरदस्त हादरा दिला. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील हे एक आगळेवेगळे उपाख्यान ठरले. दुसऱ्या महायुद्धापूर्वी नौदलात राजकीय दृष्टीने मागासवर्गातील लढाऊ जातींच्या युवकांची भरती करण्यात येई. पण युद्धाच्या गरजेनुसार १९३९ पासून सर्व प्रांतांमधील युवकांची भरती झाली. विदेशात संचार केल्यामुळे त्यांना आपल्या स्वत्वाची व मानवी अधिकारांची जाणीव आली. त्यांना स्वातंत्र्याचे भान आले.

तरीही वंशश्रेष्ठत्वाच्या अहंकारातून ब्रिटिश अधिकारी अरेरावी करीत. पगार व इतर सर्व सवलतींबाबतही गोरे-काळे असा उघडउघड भेदभाव करण्यात येई. नित्याच्या जेवणाबाबतही वांशिक भेदभाव होत असे. परंतु काळ्यांची अस्मिता जागृत झाल्यामुळे त्यांच्यात असंतोष घुमसत होता. त्यांच्यात चीड निर्माण झाली. याचा प्रत्यय काँग्रेस अध्यक्ष मौलाना आझादांनाही ठिकठिकाणी आला. १९४२ च्या जनआंदोलनामुळे नाविकांची अस्मिता व स्वातंत्र्याची आकांक्षा जागृत झाल्याचे त्यांना १९४५ साली आढळले. मुंबई व कराची येथील नौदलातील भारतीय अधिकाऱ्यांनी गुप्तपणे मौलाना आझाद यांना भेटून (१९४५) आश्वासन दिले होते की, काँग्रेसने सरकारशी पुन्हा संघर्ष सुरू केला, तर आपण काँग्रेसला साथ देऊ. मौलाना लाहोरला आल्याचे कळताच तेथील विमानतळाजवळच्या बराकींमधून गुरखा रेजिमेंटचे सैनिक त्यांचे दर्शन घेण्यासाठी दुतर्फा उभे राहिले होते. कोलकात्यातील पोलीसही मौलानांना सलाम करू लागले होते. सैनिक व पोलीस उघडपणे काँग्रेसविषयी सहानुभूती व्यक्त करू लागले.

अशा बदललेल्या वातावरणात नाविक दलातील भारतीयांना पगार, जेवण, सवलती व नोकरीच्या सेवाशर्ती याबाबतच्या वांशिक भेदभावांविषयी चीड वाटू लागली. त्याव्यतिरिक्त त्यांनी आझाद हिंद फौजेच्या सैनिकांची सुटका करावी, ही राजकीय मागणी केली. शिवाय इंडोनेशियातील जनता स्वातंत्र्यासाठी लढत असताना तिचा उठाव ठेचून काढण्यासाठी पाठविलेले भारतीय सेनादल लगेच परत बोलवावे, अशी दुसरी राजकीय मागणी त्यांनी केली. त्यांच्या मागण्या मान्य न झाल्याने १८ फेब्रुवारी १९४६ रोजी मुंबईस्थित 'तलवार' नामक

बोटीवरील ३,००० सैनिकांनी संप पुकारला व अन्नसत्याग्रह केला. मुंबईच्या कुलाबा भागातील सिग्नल स्कूलमधील चार-पाचशे जणही संपात सामील झाले. विद्रोह पसरला. सुमारे एक हजार नौदल सैनिक बराकींतून बाहेर पडले, आणि त्यांनी इंग्रज अधिकाऱ्यांना बरीच मारहाण केली. मोडतोड केली. या घटना अभूतपूर्व होत्या![११]

मुंबईत नाविक दलाच्या सैनिकांनी विद्रोह उभारलेला असतानाच १९ फेब्रुवारी १९४६ रोजी पंतप्रधान ॲटली यांनी संसदेच्या कॉमन्स सभागृहात निवेदन करून ब्रिटिश कॅबिनेटमधील तीन मंत्री हिंदुस्तानातील राजकीय पक्षांच्या नेत्यांबरोबर वाटाघाटी करण्यासाठी हिंदुस्तानला जाणार, अशी घोषणा केली. हे कॅबिनेट मिशन १९४२ मधील स्टॅफर्ड क्रिप्सच्या 'टेक इट ऑर लिव्ह इट' मिशनसारखे असणार नव्हते. **अशा निर्णायक वेळी नाविक दलाच्या विद्रोहास पाठिंबा देणे व त्यांना उत्तेजन देणे मुत्सद्देगिरीचे ठरणार नाही, असे गांधीजी, सरदार पटेल व मौलाना आझाद यांना जाणवले. कारण त्यामुळे कॅबिनेटबरोबर करावयाच्या वाटाघाटींत विघ्न निर्माण होईल, अशी त्यांना रास्त भीती वाटत होती.** म्हणून विद्रोह करण्यास ही योग्य वेळ नव्हे, असे सरदार पटेल व आझादांनी ठरविले. गांधीजींनीही त्यांना तसाच सल्ला दिला.

तथापि १९४२ च्या क्रांतिलढ्यामुळे युवकांना प्रिय झालेल्या अरुणा असफ अली यांनी नाविक दलातील जवानांची कड घेतली. सर्वच काँग्रेस समाजवाद्यांनी हे धोरण स्वीकारून ब्रिटिशांबरोबर वाटाघाटी न करण्याची भूमिका घेतली. त्यांना नाविक दल बंडाच्या रूपाने ऑगस्ट १९४२ सारखाच दुसरा तीव्र लढा उभारून इंग्रजांना पळवून लावणे आवश्यक आहे, असे वाटत होते. त्यानुसार अरुणा बाईंनी जवाहरलाल नेहरूंना तार पाठवून अतितात्काळ मुंबईला येण्यास सांगितले. त्यानुसार पहिली गाडी पकडून नेहरू मुंबईकडे निघाले. म्हणून नेहरूंना वस्तुस्थिती सांगण्यासाठी गाडीतून दादरलाच उतरून सर्वप्रथम आपणासच भेटावे, असा पटेलांनी निरोप पाठविला. कारण नेहरूंना भेटण्यासाठी बोरीबंदरला मोठा जमाव जमलेला होता. नेहरू भेटताच सरदार पटेलांनी त्यांना सर्व जाणीव करून दिली, आणि नाविकांच्या बंडात आपण गुरफटून जाऊ नये असे निक्षून बजावले.

मुंबईतील 'तलवार' बोटीवरील घटनेनंतर नौदल प्रमुखांनी चौकशी करणाऱ्या कॅ. कोल यास राजीनामा देण्यास भाग पाडले होते. मात्र हा कोल समंजस असल्याने व त्याला सेवामुक्त केल्यामुळे सैनिक अधिकच चिडले. त्यांनी नौदलाच्या इतर बोटींना बिनतारी संदेश पाठवून संपाचा प्रसार केला. मुंबईत ३००० नाविकांनी बंदरात जोरदार निदर्शने केली, छोडो भारतचा नारा घुमविला व इंग्रजी सत्तेचा निषेध केला. बहुतेक सर्वच नाविक दलाने बंडाचे निशाण उभारले. दोन बोटींवर राष्ट्रध्वज फडकवला. सैनिकांनी तोफांचाही ताबा घेतला. ॲडमिरल गॉडफ्री याने सैनिकांना शरण यावे, असे रेडिओवरील भाषणातून आवाहन केले. २१ फेब्रुवारीस सेनादलाने नाविक सैनिकांवर गोळीबार सुरू करताच नाविकांनीही गोळीबार करून प्रत्युत्तर दिले. आपला लढा चालविण्यासाठी आणि नंतर वरिष्ठांशी वाटाघाटी करण्यासाठी त्यांनी मध्यवर्ती संप समिती नेमली. एम. एम. खान हे समितीचे अध्यक्ष नेमले गेले. समितीने उपरोक्त राजकीय व इतर मागण्या वरिष्ठांकडे पाठविल्या. २१ फेब्रुवारी रोजी त्यांनी बॉंबे कॅसलच्या बराकींमध्ये साठविलेले शस्त्रागार आणि दारू गोळाही हस्तगत करण्यासाठी लढा दिला. सरकारी सेनादल आणि मुंबईतील नाविक सैनिक यांच्यात तब्बल सहा तास तुंबळ लढा झाला. त्यानंतर युद्ध-विराम झाला. पण तत्पूर्वी बंदरात नांगरलेली 'हिंदुस्तान' नामक बोट त्यांनी हस्तगत केलेली होती.

दरम्यान १९ तारखेपासून संप व विद्रोहाचे लोण कराची, कोलकाता, विशाखापट्टणम् व कोचिनपर्यंत पसरले. त्याचा प्रादुर्भाव लोणावळा व दिल्लीतील मुख्यालयातही झाला. संपकऱ्यांना शाही हवाई दलाच्या शीव, मद्रास, अंबाला व कानपुरातील कर्मचाऱ्यांनीदेखील संप करून चांगला प्रतिसाद दिला. नाविक सैनिकांनी प्रथमच उभारलेले हे बंड सर्वथा यशस्वी झाले.

मात्र २३ फेब्रुवारीला सरदार पटेलांनी खंबीरपणे हस्तक्षेप केला आणि आंदोलकांना संपूर्ण संरक्षणाची हमी दिली. त्यांनी सरकारलाही भरपूर सुनावले आणि आंदोलन थांबवले. १८-१९ फेब्रुवारीपासून बंडामुळे कमालीचे अस्वस्थ झालेले गव्हर्नर जॉन कोलव्हिल यांनी सुटकेचा निःश्वास सोडून सरदार पटेलांचे खास आभार मानले. भारत सरकारनेही सरदारांच्या भूमिकेबद्दल त्यांचे ऋण मान्य

केले. लगेच २५ तारखेला हिंदुस्तानचे सरसेनापती जन. ऑकिनलेक यांनी आकाशवाणीवरून भाषण करून नाविकांच्या सर्व प्रश्नांवर तोडगा काढण्याचे आणि त्यांच्याविरुद्ध सामूहिक कारवाई न करण्याचे आश्वासन दिले. इंग्रजांना काँग्रेसच्या व जनतेच्या शक्तीची पूर्ण जाणीव झाल्यामुळे त्यांनी हे प्रकरण सामोपचाराने मिटविले. **मात्र नाविक दलाचे बंड हा स्वातंत्र्य आंदोलनाचा भाग मानला गेला नाही.**[१२] **कारण हे बंड नको तेव्हा झाले.**

**मुंबईतील दंगल** :– सरदार पटेलांच्या मुत्सद्देगिरीनुसार अरुणाबेन, अच्युतराव, जनुभाऊ पटवर्धन व प्रभाकर कुंटे आंदोलनापासून लांब राहिले. बी. पी. सी. सी. ने उठावास आपला पाठिंबा नसल्याचे जाहीर केले. तथापि कम्युनिस्ट पक्षाने कामगार वर्गात आपली गेलेली विश्वसनीयता व पत परत मिळवण्याची संधी म्हणून, नाविकांच्या निमित्ताने मुंबईत चळवळ उभारली. काँग्रेसप्रमाणेच मुस्लीम लीगही या चळवळीविरुद्ध होती. छोडो भारत आंदोलनाच्या विरोधात कम्युनिस्टांनी ब्रिटिशांना अगदी अनुकूल अशी कृत्ये केल्याने त्यांच्या राष्ट्रीय निष्ठा संशयास्पद झालेल्या होत्या. म्हणून त्यांनी आता ब्रिटिशांविरुद्ध चळवळ हाती घेतली, असे नेहरू व पटेलांनी मुंबईतील जंगी सभेत जाहीर केले. कॅबिनेट मिशनशी होणाऱ्या वाटाघाटींपर्यंत देशात शांतता राखण्यासाठी त्यांनी कळकळीचे आवाहन केले.

तरीही २३ व २४ फेब्रुवारीस मुंबई बेट शहराच्या मध्य आणि उत्तर विभागांमध्ये दंगल उसळली. कम्युनिस्टांनी सर्व कापड गिरण्या बंद पाडल्या. संतप्त जमावाने कोहिनूर मिलचा काही भाग जाळून टाकला. दादरला आगगाडीचे दोन डबे जाळून टाकले व माटुंगा स्टेशन जाळण्याचा प्रयत्न केला. २४ फेब्रुवारीस पोलिसांनी केलेल्या गोळीबारात कमल दोंदे (कम्युनिस्ट) मरण पावल्या. नाविक दलाचा उठाव व कम्युनिस्ट-निर्मित दंगलीत मुंबईत २२८ जण ठार झाले, तर १०४६ माणसे जखमी झाली. दोन सरकारी शिपाई मारले गेले व सहा इंग्रज अधिकारी, ३७ पोलीस अधिकारी व ९३ शिपाई जखमी झाले.[१३]

## ब्रिटिश कॅबिनेट मिशन

पंतप्रधानांच्या घोषणेनुसार (१९ फेब्रुवारी) भारतमंत्री पेथिक लॉरेन्स, स्टॅफर्ड क्रिप्स व ए. व्ही. अलेक्झांडर यांचे कॅबिनेट मिशन २४ मार्च १९४६ रोजी दिल्लीत येऊन पोहोचले. हिंदुस्तानातील सर्व संबंधित पक्षांशी बोलणी करून राजकीय सत्तांतराबाबत तत्त्वे व कार्यपद्धती याबाबत सर्वसमावेशक सहमती निर्माण करणे हे मिशनचे उद्दिष्ट होते. विशेषतः काँग्रेस व मुस्लीम लीग या दोन पक्षांमध्ये सहमती निर्माण होण्याची शक्यता अजमावणे हा महत्त्वाचा भाग होता. सत्तांतर करण्याच्या प्रक्रियेचा हा एक भाग होता. **इथे इतके स्पष्ट करायला हवे की, नाविकांच्या बंडामुळे मिशन भारतात आले, असे मुळीच नव्हे! मिशनची घोषणा आधीच म्हणजे १९ फेब्रुवारीलाच लंडनमध्ये झालेली होती.** किंबहुना बंडामुळे मिशनशी व्हावयाच्या वाटाघाटींमध्ये समस्या येऊ नये म्हणून सरदार पटेलांनी कम्युनिस्टांना दमबाजी करून अरुणाबेन यांनाही आंदोलन करण्यापासून रोखले होते.

कॅबिनेट मिशनवर चर्चा करण्याचे हे स्थळ नव्हे! मिशनने सर्व पक्षांचे नेते व अभिजनांशी चर्चा केली. त्यांत मुंबई, पुणे व नागपूरचेही नेते होते. मिशनने १६ मार्चला ‘ स्टेट पेपर ’ नामक निवेदन प्रसिद्ध केले. त्यावर वादविवाद झाले. भारताची मागणी पूर्णांशाने पूर्ण होत नव्हती. पण सत्तांतर व्हावयाचे होते. भारतीयांनी आपली संविधान समिती नेमावयाची होती. काँग्रेसने या समितीत सहभागी होण्यास तत्त्वतः संमती दिली. इथे एक महत्त्वाचे गुपित सांगायला हवे. कॅबिनेट मिशन मुस्लीम लीगपेक्षा काँग्रेसला अधिक अनुकूल होते. यास नेहरू-गांधीजींशी जवळीक हे एक कारण होतेच. परंतु याव्यतिरिक्त व्हाइसरॉय वेव्हेलने आपल्या **जर्नलमध्ये** मुख्य कारण लिहून ठेवले—**‘प्रचंड जनआंदोलन उभारण्याच्या काँग्रेसच्या क्षमतेची मिशनला धास्ती वाटत होती. काँग्रेस अजूनही मोठा क्रांतिलढा उभारण्यास समर्थ आहे. आणि तसा व्यापक लढा नियंत्रणाखाली आणण्याची क्षमता आज आपणाकडे नाही, अशी मिशनला भीती वाटत होती’.** त्याचा भारताला फायदा मिळाला.[१४]

याबाबतचा निर्णय घेण्यासाठी अ. भा. काँग्रेस समितीची महत्त्वाची बैठक मुंबईत झाली. या बैठकीत जयप्रकाशजी व समाजवाद्यांनी घटना समितीत सामील होण्यास विरोध केला. **मात्र जयप्रकाशजींचा हा विरोध देशहिताचा नव्हता.** शेवटी घटना समितीत सामील व्हावे हा महत्त्वाचा ठराव २०४ विरुद्ध ५४ मतांनी संमत झाला. याच बैठकीत जवाहरलाल नेहरूंना काँग्रेस अध्यक्षपदाचा बहुमान प्राप्त झाला. जुलै १९४६ मध्ये घटना समितीसाठी म्हणजेच वास्तविक अर्थाने भारतीय मिनी पार्लमेंटसाठी निवडणुका झाल्या. त्यांत काँग्रेसला प्रचंड बहुमत प्राप्त झाले.

बहुमतानुसार जवाहरलाल नेहरू व पटेलांचे अंतरिम सरकार २२ सप्टेंबर १९४६ रोजी अधिकारारूढ झाले. मुस्लीम लीगने आढेवेढे घेत शेवटी १५ ऑक्टोबरला अंतरिम सरकारमध्ये प्रवेश केला.

## निवडणूक व प्रांतिक मंत्रिमंडळे

या पार्श्वभूमीवर आर्किबाल्ड वेव्हेल यांनी निवडणुकांची घोषणा केली होती. छोडो भारतचे यश आणि स्वातंत्र्य आंदोलनाच्या उत्साहवर्धक कथा यांमुळे सामान्य जनताही प्रभावित झालेली होती. फेब्रुवारी १९४६ पासून निवडणुकीच्या हालचाली सुरू झाल्या. निवडणुकीचे सूत्रसंचालन सरदार पटेलांकडे आले. मात्र नेहरू यांनी देशभर व्याख्याने देऊन निवडणूक प्रचाराची आघाडी सांभाळली.

**मुंबई प्रांत** :– मुंबईचे अनभिषिक्त राजे सदाशिव कान्होबा पाटील यांचे सरदार पटेलांशी अतूट भावबंध असल्यामुळे बी. पी. सी. सी. वर त्यांचा प्रचंड प्रभाव होता. पाटील मुंबईचे मेयरही होते. त्यांचे संघटनाचातुर्य व पक्षासाठी निधी मिळवण्याची क्षमता लक्षात घेऊन काँग्रेसने त्यांचा पक्षसंघटनेसाठी उपयोग करून घेतला. त्यांच्या शिफारशीनुसारच निवडणुकीसाठी उमेदवार निवडण्यात आले. महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस समितीवर शंकरराव देव, मामा देवगिरीकर, केशवराव जेधे व न. वि. गाडगीळ यांचा प्रभाव होता.

१९४६ च्या प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुकीसाठी मुंबईतील गिरणी कामगारांसाठी असलेल्या मतदारसंघात एम. वाय. नूरी यांना काँग्रेसतर्फे तिकिट

देण्यात आले. मुंबई शहरात भारतीय ख्रिस्ती लोकांसाठी राखीव असलेल्या मतदारसंघातून डॉ. जोस अल्बन डिसूझा यांना काँग्रेस-पुरस्कृत उमेदवार निवडले होते. गिरणीमालक मतदारसंघातून सर सोराब सकलातवाला यांनी निवडणूक लढविली. मुसलमानांसाठी राखीव असलेल्या कुलाबा जिल्ह्यातील मतदारसंघातून सरदार पटेलांनी अमीर अल्ली व सातारा जिल्ह्यातून आय. एन. हकीम यांना काँग्रेसची उमेदवारी दिली.

१९४६ मधील निवडणुकीची पूर्वतयारी सुरू झाल्यापासून महाराष्ट्र आणि वऱ्हाड-मध्यप्रांतातही जुना ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद पुन्हा उसळला. महाराष्ट्रातील १९३७ मधील निवडणुकीसाठी ब्राह्मणेतर उमेदवार मुख्यतः केशवराव जेधे यांच्या पसंतीनुसार निवडले गेले होते. तथापि १९४६ च्या निवडणुकीसाठी अब्राह्मण उमेदवार निवडताना शंकरराव देव आपला अधिकार गाजवू लागले, असा आरोप करण्यात आला. १९४० चा सत्याग्रह व छोडो भारत आंदोलनात देवांनी गाजवलेली मर्दुमकी यामुळे त्यांचे स्थान खूप उंचावले होते. देवांनी गांधीजींना सदैव साथ दिली होती.

मात्र मराठ्यांना काँग्रेसमध्ये आणण्यात केशवराव जेधेंनी पुढाकार घेतला ही वस्तुस्थिती होती. कारण काही का असेना देव व जेधे यांच्यात १९४६ सालात कडवट वादावादी झाली. वीस वर्षे ब्राह्मणेतर पक्षात राहिल्यावर काँग्रेसमध्ये आलेले (१९३७ साली) शंकर शांताराम मोरे यांच्या उमेदवारीवरून आता वादात अधिक भर पडली. मोरे यांना इंग्रजी भाषा येत असल्यामुळे ते बहुजनसमाजाचे प्रश्न चांगल्याप्रकारे मांडतील असा जेधे गटाचा युक्तिवाद होता. शिवाय मध्यवर्ती कायदेमंडळासाठी मोरेंऐवजी मालेगावच्या भाऊसाहेब हिरेंना व दुसऱ्या जागेसाठी गाडगीळ यांना निवडून दिलेले होते. म्हणून आता तरी मोरेंना संधी द्यावी, असे जेधे गट म्हणू लागला. तथापि छोडो भारत आंदोलनास मोरेंचा पाठिंबा नव्हता. पोलिसांनी आधीच तयार ठेवलेल्या यादीनुसार मोरे पकडले गेले होते. (१९४२). पण त्यांनी कारावासातून सरकारला पत्र पाठवून आपली मतभिन्नता कळवली, आणि त्यामुळे त्यांची सुटका करण्यात आली होती. शंकरराव देव आणि निष्ठावंत काँग्रेस नेत्यांना हे आवडले नव्हते. म्हणून १९४६ सालात काँग्रेसने

मोरेंना पक्षद्रोहाच्या कारणास्तव उमेदवारी नाकारली. त्यांनी केलेले अपील सरदार पटेलांनीही फेटाळले व त्यांना पक्ष संघटनेचे काम करण्याचा सल्ला दिला.

सविनय कायदेभंग आदोलन किंवा छोडो भारत लढा यांत कारावास अथवा भूमिगत कारवाया हे निकष लावून काँग्रेसने उमेदवारी मंजूर केली होती. मात्र त्यामुळे शंकरराव देव, अच्युतराव पटवर्धन, भाऊसाहेब सोमण वगैरेंवर टीका झाली. प्रांतिक काँग्रेसच्या निवडणूक मंडळात या तिघांचे बहुमत होते. मात्र आचार्य शं. द. जावडेकर यांनी भावी राजकारण बहुजनसमाजाच्या हातात जाणार हे ओळखले. काळाची पावले ओळखून ब्राह्मणांनी थोडा त्याग करून इतरांना अधिक वाव द्यावा, असा जावडेकर सल्ला देत होते.

१९४६ मधील निवडणुकीत बा. गं. ऊर्फ बाळासाहेब खेर यांनी पदवीधर मतदारसंघातून निवडणूक लढवली व ९,६४४ मतदारांपैकी ८,७६२ मते मिळवून घवघवीत यश मिळविले. हिंदुमहासभेचे प्रतिस्पर्धी उमेदवार अ. स. भिडे यांचा त्यांनी पराभव केला होता. प्रांतातील सर्व उमेदवारांची नावे उपलब्ध नसल्यामुळे इथे उपलब्ध नावे देत आहोत. कायदेमंडळाच्या या निवडणुकीत सातारा जिल्ह्यातील यशवंतराव चव्हाण, पु. पां. गोखले, के. डी. पाटील व व्यंकटराव पवार काँग्रेसतर्फे निवडून आले. अहमदनगर जिल्ह्यातील दत्ता देशमुख, रामभाऊ गिरमे, काकासाहेब गरुड व ल. मा. पाटील विजयी झाले. ठाण्यातून गोविंदराव ध. वर्तक विजयी झाले. धनाजी नाना चौधरी, द. का. कुंटे, सोनुसिंग पाटील, भाऊसाहेब राऊत आणि कर्नाटकातील एम. पी. पाटील या विजयी उमेदवारांची नावे आम्हाला उपलब्ध झाली.

मुंबई कायदेमंडळातील एकूण १७५ जागांपैकी १२८ जागा काँग्रेसने जिंकल्या व मुस्लीम लीगला ३० जागा मिळाल्या. कम्युनिस्टांना श्री. अ. डांगे यांच्यासह केवळ दोन ठिकाणी यश मिळाले. रामभाऊ मंडलिक हे हिंदुमहासभेचे एकमेव उमेदवार विजयी झाले. पाच अपक्ष उमेदवार निवडून आले. रॉयवादी पक्षाला एका जागी विजय मिळाला. याव्यतिरिक्त सहा युरोपियन व दोन अँग्लो-इंडियन निवडून आले.

गांधीजी व सरदार पटेलांच्या आशीर्वादाने बाळासाहेब खेर १९४६ मध्येही मुंबई इलाख्याचे मुख्यमंत्री (पंतप्रधान) झाले. एप्रिलमध्ये गुढी पाडव्याला सत्तेवर आलेल्या त्यांच्या मंत्रिमंडळात मोरारजी देसाई, डॉ. एम. डी. डी. गिल्डर, दिनकरराव देसाई, वैकुंठभाई ल. मेहता हे गुजराती भाषिक मंत्री होते. अहमदाबादमध्ये कामगार चळवळ चालवणारे गुलझारीलाल नंदा पंजाबी असले, तरी गांधीजी व पटेलांच्या पसंतीनुसार त्यांचा या मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला. ल. मा. पाटील, गोविंदराव वर्तक व कर्नाटक भागातील एम. पी. पाटील यांचाही मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला. द. का. कुंटे. खेरांचे संसदीय सचिव नेमले गेले. मंत्रिमंडळावर गुजरात्यांचे प्रभुत्व असल्याची टीका झाली. जेधे, राऊत, तुळशीदास जाधव वगैरे बहुजनसमाजाच्या नेत्यांचा मंत्रिमंडळात समावेश नसल्यामुळे टीका होणे स्वाभाविक होते. जेधेंचे खेरांशी धोरणात्मक बाबींमध्ये मतभेद होते.

जुलै १९४६ मध्ये काँग्रेसने घटना समितीचे सदस्य म्हणून १९ जणांची निवड केली. त्यांत रंगराव दिवाकर व ह. वि. पाटसकरांसह चार ब्राह्मण व केशवराव जेधे हे एकमेव मराठा, दोन दलित आणि प्रत्येकी एक सारस्वत, प्रभू, भारतीय ख्रिस्ती व एक अन्य जातींचा प्रतिनिधी आणि सहा गुजराती भाषिक सभासद होते. शंकरराव मोरे यांचा त्यात समावेश नव्हता. विशेष म्हणजे ११ मार्च १९४६ रोजी झालेल्या अंतिम **निवडणुकीत बाबासाहेब आंबेडकरांच्या शे. का. फे. पक्षाच्या उमेदवारांचा दारुण पराभव झाला. त्यामुळे बाबासाहेब घटना समितीचे सदस्य म्हणून मुंबई इलाख्यातून निवडून येणे असंभव होते.** वऱ्हाड-मध्यप्रांतातही शे. का. फे. पक्षाला इच्छित जागा मिळाल्या नव्हत्या. म्हणून बाबासाहेब आंबेडकरांनी पूर्व बंगालमधून निवडणूक लढविली आणि ते बंगालमधून घटना समितीचे सदस्य निवडून आले. वस्तुतः बंगालमध्ये महार जातीचे लोक नव्हते. परंतु दुसऱ्या जातीच्या दलितांनी बाबासाहेबांना भरघोस मते देऊन घटना समितीवर निवडून दिले होते. **बंगालमधील नामशूद्रांच्या साहाय्यामुळे आणि जोगेंद्रनाथ मंडल या नेत्याच्या मदतीमुळे बाबासाहेब पूर्व बंगालमधून घटना समितीचे सदस्य म्हणून निवडून आले.**

बहुजनसमाजाला मुंबई मंत्रिमंडळात तसेच घटना समितीतही पुरेसे प्रतिनिधित्व न मिळाल्यामुळे जेधे, मोरे व राऊत नाराज झाले होते. परंतु प्रांताध्यक्षपदाच्या निवडणुकीत समाजवादी गटाचे रावसाहेब पटवर्धन आणि गांधीवादी गटाचे शंकरराव देव या दोघांचा पराभव करून केशवराव जेधे विजयी झाले (मे १९४६). मात्र तेव्हापासून मंत्रिमंडळ व प्रांतिक काँग्रेस समिती यांच्या संबंधात तणाव वाढत गेला.[१५]

**वऱ्हाड-मध्यप्रांत :-** पश्चिम महाराष्ट्राप्रमाणेच वऱ्हाड-मध्यप्रांतातही ब्राह्मण--ब्राह्मणेतर गटांमध्ये चुरस निर्माण झाली. याव्यतिरिक्त मराठी व हिंदी भाषिकांमध्येही परस्परवाद निर्माण झाला. तथापि या प्रांतात काँग्रेस पक्षाचा जबरदस्त प्रभाव असल्यामुळे वाद चव्हाट्यावर येत नसे. शंकर त्र्यंबक ऊर्फ दादा धर्माधिकारी, श्रीमन् नारायण व गोपाळराव काळे या गांधीवाद्यांनी कायदेमंडळाची निवडणूक लढवावी, असे विनोबा भावे, किशोरीलाल मश्रूवाला व श्रीकृष्णदास जाजू या निष्ठावंत गांधीवाद्यांचे मत होते. मात्र रविशंकर शुक्ला व द्वारकाप्रसाद मिश्रा हे दोघे धर्माधिकारी यांच्याकडे मुख्यमंत्री पदासाठी संभाव्य प्रतिस्पर्धी या दृष्टीने पाहत होते. तसेच या प्रांतात अधिकाधिक मराठी भाषिक उमेदवारांची निवड व्हावी यासाठी बाळासाहेब खेर प्रयत्नशील आहेत, असे रविशंकरजींचे मत बनले होते. आणि त्यांनी सरदार पटेलांकडे तशी तक्रार केली होती. त्यांनी महाकोशलमधील शेठ गोविंददास व मिश्रांशी जुळवून घेतले होते. मात्र शुक्ला यांना दादा धर्माधिकारींची भीती वाटतच होती. नागपूर प्रांतिक काँग्रेसचे सूत्रधार पूनमचंद रांका व जनरल आवारी यांना नागपूर, भंडारा, चांदा (चंद्रपूर) व भंडारा या चार जिल्ह्यांमधील ब्राह्मणेतरांचा पाठिंबा होता. कदाचित त्यामुळे असेल, रविशंकरजी व द्वारकाप्रसाद या कान्यकुब्ज ब्राह्मणांनी रांका व आवारींना पाठिंबा दिला.

वऱ्हाडातील बुलढाणा, अकोला, अमरावती व यवतमाळ जिल्ह्यांमध्ये ब्रिजलाल बियाणींनी पंढरीनाथ सीताराम पाटील (जोतीबा फुलेंचे चरित्रकार), डॉ. पंजाबराव देशमुख, डॉ गोपाळराव खेडकर वगैरे अब्राह्मण नेत्यांशी हातमिळवणी केली.

बियाणींच्या या कृतीचा निषेध म्हणून वीर वामनराव जोशी यांनी विदर्भ संसदीय मंडळाचा राजीनामा दिला.

वऱ्हाड-मध्यप्रांत कायदेमंडळातील एकूण ११२ जागांपैकी ९२ जागा जिंकून काँग्रेसने लोकमतावरील आपला प्रभाव सिद्ध केला. मुस्लीम लीगने विभक्त मतदार संघातील १३ जागा जिंकल्या. उर्वरित सात जागांपैकी प्रत्येकी एक जागा शे. का. फे., अँग्लोइंडियन, युरोपियन, हिंदुमहासभा या पक्षांनी आणि कामगारांसाठी राखीव जागा काँग्रेस पुरस्कृत रामभाऊ रुईकर, एक स्वतंत्र उमेदवार व स्वतंत्र मुसलमान उमेदवाराने जिंकली. मजूर वर्गासाठी असलेली दुसरी जागा व्ही. आर. कल्लाप्पा या काँग्रेस कार्यकर्त्याने मिळविली. हे कल्लाप्पा व रुईकर कामगार पुढारी या नात्याने बरीच प्रसिद्धी पावले.

सरदार पटेलांनी किशोरीलाल मश्रूवाला यांच्या मदतीने वऱ्हाड-मध्यप्रांतातील मध्यवर्ती तसेच प्रांतिक कादेमंडळांसाठी काँग्रेसचे उमेदवार निवडले होते. त्याबाबत वादविवादही झाले. मात्र धर्माधिकारी व गांधीजी यांना योग्य वाटले, त्याप्रमाणेच कार्यवाही झाली. गांधीजी व सरदार पटेल यांच्या आग्रहास्तव दादा धर्माधिकारींनी इच्छा नसताना नागपूर शहरातून निवडणूक लढविली, आणि ते विजयी झाले. या निवडणुकीत पंढरीनाथ पाटील, डॉ. गोपाळराव खेडकर, संभाजीराव गोखले, पुरुषोत्तम काशिनाथ देशमुख, दिनकरशास्त्री कानडे (पूर्वाश्रमीचे सशस्त्र क्रांतीचे पुरस्कर्ते) तसेच डॉ वा. शि. बारलिंगे, रा. कृ. पाटील, दुर्गाशंकर मेहता, पूनमचंद रांका, ब्रिजलाल बियाणी, मा. सां. कन्नमवार, तात्याजी वझलवार, बापुजी पाठक, डॉ. भिवापूरकर वगैरे काँग्रेसचे उमेदवार यशस्वी झालेत.

दादा धर्माधिकारी यांनी मुख्यमंत्री होण्यास नकार दिल्याकारणाने रविशंकर शुक्ला यांची पक्षनेता व मुख्यमंत्री या पदावर निर्वेधपणे निवड झाली. त्यांच्या मंत्रिमंडळात नऊ मंत्र्यांपैकी सहा ब्राह्मण असल्यामुळे जाहीरपणे टीका झाली. स्वतः शुक्ला, गृहमंत्री द्वारकानाथ मिश्रा, मेहता, वा. शि. बारलिंगे, रा. कृ. पाटील (मूळचे गुजरातमधून आलेले) व संभाजीराव गोखले हे सर्व ब्राह्मण होते.

या प्रांतातील वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस समितीचे अध्यक्ष बियाणी असून, नागपूर प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष रांका व महाकोशल प्रांतिकचे अध्यक्ष शेठ गोविंददास होते. काही मंत्री गुजरातमधून, आंध्रमधून अथवा उत्तर भारतातून येऊन इथे स्थायिक झालेले आप्रवासी होते. मात्र त्या काळी प्रांतिकवाद फोफावलेला नसावा, असे दिसते.

घटना समितीचे सदस्य म्हणून वऱ्हाड-मध्यप्रांतातून सर्वसाधारण प्रवर्गातील जागांसाठी पुढील १६ सदस्यांची निवड करण्यात आली होती :— रविशंकर शुक्ला, दादा धर्माधिकारी, ब्रिजलाल बियाणी, भगवंतराव मंडलोई, ठाकूर छेदीलाल, शेठ गोविंददास, हरिसिंग गौर, रुस्तम खरशेटजी सिध्वा, राजकुमारी अमृत कौर, व्ही. आर. कल्लाप्पा, गुरु आगमदास, सेसिल गिबन, लक्ष्मण श्रावण भाटकर, हेमचंद्र जगोबा खांडेकर, पंजाबराव देशमुख आणि ह. वि. कामथ. यांपैकी हरीभाऊ कामथ आणि पंजाबराव देशमुख यांनी इतरांपेक्षा घटना समितीतील विचारविनिमयात अधिक भाग घेतला होता. मुसलमानांसाठी राखीव जागेवर या प्रांतातून काझी सय्यद करीमुद्दीन यांची निवड झाली होती.[१६]

## हैदराबाद स्टेट काँग्रेसचा स्वातंत्र्यसंग्राम

भारताने स्वातंत्र्य मिळवले, पण हैदराबाद संस्थानातील प्रजा मध्ययुगीन प्रवृत्तीच्या राजवटीतच होती. म्हणून भारताचे पंतप्रधान व अखिल भारतीय संस्थानी प्रजापरिषदेचे अध्यक्ष जवाहरलाल नेहरू यांनी हैदराबादचे पंतप्रधान मिर्झा इस्माईल यांना ताकीद दिली होती की, स्वतंत्र लोकशाही भारतात हैदराबाद संस्थानाला वेगळे राहता येणारच नाही. उपाध्यक्ष शेख अब्दुल्ला यांनीही निजामाच्या मध्ययुगीन हटवादीपणावर कडक टीका केली होती. त्यानुसार हैदराबाद सरकारने स्टेट काँग्रेसवरील बंदी उठवून काही राज्यसुधारणा केल्या. तथापि त्या सुधारणा म्हणजे पुढचे पाऊल नसून पुच्छगमन आहे, असे गांधीजींनी मिर्झाला कळवले. १३२ सभासद असलेल्या विधानमंडळात ५६ सदस्य सरकारनियुक्त असून ख्रिस्ती व पारशांचे प्रतिनिधीही सरकारनियुक्त होते. मुसलमानांचे लोकसंख्येतील प्रमाण १२ टक्केच असूनही त्यांच्यासाठी ५० टक्के जागा राखीव होत्या. संपूर्ण विधानमंडळ इत्तेहादुल मुसलमीन या जात्यंध पक्षाच्या मुठीत होते. दुर्दैव असे

की, संस्थानातील दोन्ही दलित नेते निजामधार्जिणे होते. मतदानाचा हक्क अत्यल्प लोकांना होता. हिटलरचे हीणकस रूप असलेला लातूरचा कासीम रझवी व इतर तिघांच्या कारस्थानांमुळे हैदराबादचा पंतप्रधानही हतबल झालेला होता. हा रझवी डिसेंबर १९४६ पासून भारताच्या घटना समितीचा सदस्य झाला. अत्यंत उपद्रवकारक व जात्यंध असलेला इत्तेहादुल मुसलमीन पक्ष आणि कासीम रझवी यांचा मुकाबला करून स्टेट काँग्रेसला स्वातंत्र्याचे उद्दिष्ट गाठावयाचे होते. हे अत्यंत अवघड काम होते.

**गोविंदराव पानसरे यांचा खून :—** स्टेट काँग्रेसचे पूर्णवेळ गांधीवादी कार्यकर्ते व कुशल संघटक गोविंद विनायक पानसरे धान्य लेव्हीबाबतच्या किसानांवरील अत्याचारांविरुद्ध चळवळ करीत. दुसरे महायुद्ध संपल्यावरही संस्थानात लेव्ही आकारणी व त्याबाबतचे अत्याचार थांबले नव्हते. याकामी सरकारी कर्मचारी महिलांचीही विटंबना करीत. या प्रकारांचा जाहीर सभेत निषेध केल्यावरून प्रशासनाने गोविंदरावांना हैदराबाद संरक्षण कायद्याखाली अटक केली (१४ ऑक्टोबर १९४६). त्यांना जामिनावर सोडल्यावर ते बिलोलीहून बैलगाडीतून निघाल्यावर अर्जापूर गावानजीक त्यांच्यावर तलवारींचे वार करून रझाकारांनी त्यांची हत्या केली. त्यांचे शिर धडावेगळे केले. हा खून पूर्वनियोजित होता. गांधीवादी पानसरे अन्यायाच्या परिमार्जनार्थ वारंवार थेट रेसिडेंट आणि व्हाइसरॅयपर्यंत पत्रव्यवहार करीत आणि प्रशासनाला उघडे पाडत. म्हणून निजामी सरकारचा त्यांच्यावर राग होताच! **एका अर्थाने पानसरे हे हैदराबाद राजवटीतील पहिले राजकीय हुतात्मा होते!** मात्र हा खून सरकारला व इत्तेहादला पुढे फार महाग पडला. त्यांच्या बलिदानाने मराठवाड्यात प्रचंड वादळ निर्माण केले. त्यांच्या हौतात्म्याचे प्रतिध्वनी संपूर्ण प्रदेशातच नव्हे, तर तेलंगण व कर्नाटकातही उमटले. निषेधाच्या अनेक सभा झाल्या. महाराष्ट्र परिषदेने पानसरे स्मारक समिती नेमली. याचा सरकारने धसका घेतला होता, असे हैदराबाद पुराभिलेखामधील कागदपत्रांवरून मला आढळले.

हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या नावातील 'काँग्रेस' ही संज्ञा बदलण्याचा सत्ताधीशांचा आग्रह होता. परंतु नेहरूंच्या सूचनेनुसार स्वामी रामानंद यांनी नावात बदल करण्यास नकार दिला. महाराष्ट्र परिषद व तेलंगण व कर्नाटक परिषदांचे स्टेट काँग्रेसमध्ये विलीनीकरण करण्यात आले. मात्र स्टेट काँग्रेसमध्ये काशीनाथ वैद्य, बी. रामकृष्णराव, रामाचार्य, जनार्दन देसाई, रामकिशन धूत वगैरे मवाळ मतवादी होतेच. ते गोविंदभाई श्रॉफ व स्वामीजी यांना कम्युनिस्टधार्जिणे म्हणत. वस्तुतः तेव्हा कम्युनिस्ट लोक भारताला एक राष्ट्र मानावयासही तयार नव्हते. भारत हा राष्ट्रसमूह आहे, असे ते म्हणत. असो. आरोप-प्रत्यारोपांमधून चळवळ उभारली जात होती.

इत्तेहादुल मुसलमीन (मुस्लीमीन) म्हणजे 'मुसलमानांचे ऐक्य'! तथापि ही संघटना मुस्लीम लीगपेक्षा किंवा कोणत्याही पक्षापेक्षा अधिक विषाक्त होती. इत्तेहादुलवाले स्वतःस विजेते राज्यकर्ते आणि परंपरेने शासक मानत. 'मुघलांच्या काळापासून आम्ही राज्यकर्ते आहोत', असा त्यांना भ्रम होता. अलीगड विद्यापीठाची कायद्याची पदवी असलेला कासीम रझवी हा लातूरचा एक वकील! पण तो अत्यंत उर्मट, विद्वेषी व हटवादी स्वभावाचा होता. फौजदारी खटले चालवणाऱ्या रझवीने इत्तेहादुल पक्षाला अत्यंत आक्रमक व अतिरेकी संघटनेचे स्वरूप दिले. तिला त्याने शिस्तबद्ध रझाकार संघटनेची जोड दिली आणि रझाकारांचा उपयोग करून संस्थानात दहशत निर्माण केली. तेथील सत्ताधीशांवर त्याने आपला दबदबा निर्माण केला.[१७]

प्रदीर्घ सत्ताकाल लाभलेला मीर उस्मान अली खान हा अंतिम निजाम अत्यंत कडवा मुसलमान व अतिमहत्त्वाकांक्षी सत्ताधीश व भयंकर अहंकारी मनुष्य होता. पण एक कवी होता. कंजूषही होता! आपल्यामुळेच हिंदुस्तानात मुसलमानांचे नामोनिशाण उरले आहे असा त्याचा दृढ समज, खरेतर गैरसमज होता. बॅ. महंमद अली जिना व मुस्लीम लीग यांच्यापेक्षा तो स्वतःस श्रेष्ठ समजत असल्यामुळे, निजामाला सत्तेच्या राजकारणात कोणीही प्रतिस्पर्धी असणे सहन होत नसे. म्हणून इत्तेहादुलचा एक नेता बहादूर यार जंग याने मुस्लीम लीगच्या संस्थानातील शाखेचे अध्यक्षपद स्वीकारताच निजामाने त्याच्यावर भाषण बंदीहुकूम

लादला. शिवाय त्याचे लष्करातील पद, पगार व किताब तर रद्द केलाच! पण त्याहीपुढे जाऊन निजामाच्या कोठीतच बहादूर यार जंगवर विषप्रयोग करण्यात आला. यार जंगच्या बेगमेलाही हे नंतर समजले. स्टेट काँग्रेसला अशा खुनशी निजामाशी लढावे लागले.

संस्थानी चळवळीचे बहुतेक कार्यकर्ते ब्राह्मण, मारवाडी किंवा बनिये असले, तरी त्यांनी शेतकऱ्यांचे हित डोळ्यासमोर ठेवले, असे दिसते. सक्तीने धान्यवसुली, लाकडाच्या मोळीवरील कर, कसेल त्याची जमीन, विणकरांना रास्त भावात सूट हे त्यांनी प्रतिकाराचे विषय ठेवले होते. पिकांची आणेवारी व लेव्ही या कारणावरून नांदेडमधील मुधोळ तहसिलीतील किरगुळ गावी गावकऱ्यांनी यशस्वी संप केला होता. उत्पादन न झाल्याने लोकांनी वसुलीस नकार दिला. या सत्याग्रहाचे लोण गावोगावी पसरल्याने नांदेडचा कलेक्टर कंटाळून रजेवर गेला. त्यानंतर सशस्त्र दल व लष्कर आले असता सर्व पुरुष मंडळी जंगलात भूमिगत झाली होती.

ब्रिटिश पंतप्रधान ॲटली यांनी २० फेब्रुवारी १९४७ ला अखेरची घोषणा केली की, कॅबिनेट मिशनची योजना मान्य होवो अगर न होवो, जून १९४८ नंतर ब्रिटिश भारतातील सत्तेचा त्याग करणार. त्या घोषणेतून निजाम व इत्तेहादने स्वार्थी अर्थ काढला. 'आपण स्वतंत्र व सार्वभौम बादशाह होणार' असा निजामाने अर्थ लावला. निजामाने आपल्या स्वातंत्र्याची घोषणा करावी यासाठी मजलिसे इत्तेहादुल मुसलमीनने संस्थानात मोहीमच उभारली. लवकरच या पक्षाने 'आझाद हैदराबादची' मोहीम सुरू केली. तेव्हा दिल्लीत काँग्रेस व मुस्लीम लीगचे संयुक्त सरकार अधिकारावर होते. निजामी सत्तेने स्टेट काँग्रेसमध्ये फूट पाडण्यासाठी मवाळांना हाताशी धरून गुप्त करार केला. त्याचबरोबर निजामाने आपले स्वातंत्र्य व सार्वभौमत्वाच्या संदर्भात जेवढी ताठ व कडक भूमिका घेणे शक्य होते, तेवढी जाहीर करून टाकली. त्याने ११ जून १९४७ रोजी ते कुप्रसिद्ध फर्मान जाहीर केले. त्यानंतर अवघ्या पाच दिवसांनंतर हैदराबाद स्टेट काँग्रेसचे पहिले अधिवेशन त्या शहरात भरले.

दरम्यान समाजवाद्यांच्या निमंत्रणानुसार जयप्रकाश नारायण ७ मे १९४७ रोजी हैदराबादी आले. त्यांचे पहिलेच भाषण निजामाला जिव्हारी लागले. आणि पुढील सकाळीच जे. पी. यांना संस्थानाबाहेर काढण्यात आले. या अरेरावीचा निषेध म्हणून हैदराबादेत व अनेक ठिकाणी सत्याग्रह झाला. त्याचे जातीय दंगलीत रूपांतर झाले. ४ माणसे मारली गेली. आताशा स्टेट काँग्रेसचे २,२५,००० नोंदणीकृत सदस्य झाले होते. त्यांपैकी ६०,००० मराठवाडा भागातील होते. गोविंदरावांचा खून व निजामाच्या फर्मानामुळे स्टेट काँग्रेसच्या आंदोलनास नवीन उत्तेजन मिळाले.

## स्टेट काँग्रेस बंधमुक्त

**ऐतिहासिक अधिवेशन :—**हैदराबाद स्टेट काँग्रेसवरील बंदी ३ जुलै १९४६ ला उठली होती. लोकमताचे स्फटिकीकरण झालेले होते. निर्णायक वेळ आलेली होती. निजाम व मजलिसे इत्तेहादुलची स्वार्थांध महत्त्वाकांक्षा रोखावयाची होती. उर्वरित भारताप्रमाणे स्वातंत्र्य मिळवायचे होते. या पार्श्वभूमीवर बंधमुक्त स्टेट काँग्रेसचे अधिवेशन १६ ते १८ जून १९४७ पावेतो भरले. आंदोलनासाठी समर्थ असा नेता म्हणून स्वामी रामानंद तीर्थ यांची प्रचंड बहुमताने निवड झाली. प्रतिस्पर्धी बी. रामकृष्णराव मवाळ म्हणून नाकारले गेले. लोकांचा उत्साह अपूर्व होता. सरकारी अनुमानाप्रमाणे एक लाख लोक उपस्थित होते. स्टेट काँग्रेसचे इतिहासकार अनंत भालेराव यांच्या मते 'अधिवेशनातील प्रत्येक व्यक्ती विलक्षण शक्तीने भारलेली होती. प्रत्येकाला भवितव्याची अनामिक ओढ लागली होती. निजामी राजवट ठेवावयाची नव्हती. संस्थान भारतीय संघराज्यात विलीन करून टाकावयाचे होते. वंश अगर व्यक्तीच्या तथाकथित सार्वभौमत्वाऐवजी जनतेची अधिसत्ता प्रस्थापित करण्याचा पक्षाचा निर्धार होता'.

हे निर्णायक अधिवेशन गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भरले होते. त्यात घ्यावयाच्या निर्णयांवर मात करणे व जरब बसविण्यासाठीच निजामाने पाच दिवसांपूर्वी ११ जून १९४७ चे फर्मान काढले होते. हा कुट राजनीतीचा एक डाव होता. दडपशाही करण्याचीही ती धमकी होती :– " The result in law of the departure of the Paramount Power in

the near future will be, that I shall become entitled to resume the status of Independent Sovereign" [१८]

हैदराबादच्या प्रश्नाला अखिल भारतीय संदर्भ व महत्त्व आल्याकारणाने अ. भा. काँग्रेसच्या नेत्यांना बोलावण्यात आले होते. गांधीजी, नेहरू, पटेल अधिक महत्त्वाच्या पूर्वनियोजित कार्यात व्यग्र असल्याने अधिवेशनाचे उद्‌घाटन अ. भा. काँग्रेसचे सरचिटणीस शंकरराव देव यांनी केले. त्यांच्याव्यतिरिक्त प्रा. एन. जी. रंगा, रंगराव दिवाकर, कमलादेवी चट्टोपाध्याय, ना. ग. गोरे वगैरे मुद्दाम आलेले होते. देवांच्या प्रभावी भाषणानंतर स्वामीजी व इतरांची भाषणे झाली. त्यानंतर हैदराबादचे गृहमंत्री नबाब अली यावर जंग यांनी स्वामीजींना बोलावून सांगितले — "झाली ती भाषणे अत्यंत आक्षेपार्ह झालीच, परंतु उद्या अशी पुनरावृत्ती होऊ देऊ नका. आणि त्यासाठी कमलादेवींसह राज्याबाहेरून आलेल्या कोणालाही बोलू देऊ नका". तथापि या सूचना अमान्य करून स्वामीजींनी नबाबांना सांगितले — "आम्ही जे केले ते विचारपूर्वक! सरकारला वाटेल ते सरकारने करावे!"

ठरल्याप्रमाणे अधिवेशन संपन्न झाले. निर्धार प्रकट झाला! वातावरण भारलेले होते. अध्यक्षीय भाषणात स्वामीजींनी निजामाची "आझाद हैदराबादची" मागणी अनिष्ट असल्याचे सांगून तिचा धिक्कार केला. आणि हैदराबादने भारतीय संघराज्यात विलीन व्हावे, असे जोरदार प्रतिपादन केले. तसेच भारतीय राज्य घटना समितीत भाग घ्यावा, आणि दरम्यानच्या काळात हंगामी मंत्रिमंडळ स्थापन करावे व सर्व प्रकारचे नागरिक स्वातंत्र्य बहाल करावे, अशा मागण्या केल्या. या अधिवेशनात सर्वात महत्त्वाचे तीन मुद्दे होते—भारतीय संघराज्यात अविलंब विलीनीकरण, संपूर्ण स्वातंत्र्य आणि "आझाद हैदराबादला विरोध "!

चळवळीचे सूत्रसंचालन करण्यासाठी स्वामीजी (अध्यक्ष), जे. के. प्राणेशाचार्य (सरचिटणीस), दिगंबर बिंदू, गोविंदभाई, स. कृ. वैशंपायन, आनंद कृष्ण वाघमारे, माणिकचंद पहाडे, जी. एस. मेलकोटे वगैरे १४ जणांची कार्यकारिणी निवडण्यात आली. मात्र तिच्यात एकाही मवाळाचा समावेश नव्हता. संस्थानी

भागात राहून चळवळ करणे अवघड जाणार असल्याने महाराष्ट्र व विदर्भात तसेच नजीकचा कर्नाटक व मद्रास प्रांतात केंद्रे उभारणे गरजेचे होते. त्यानुसार मध्यप्रांत-वऱ्हाडचे मुख्यमंत्री रविशंकर शुक्ला व डी. पी. मिश्रा, वामन शिवदास बारलिंगे व रा. कृ. पाटील वगैरेची मदत घेण्यात आली. त्याचप्रमाणे केशवराव जेधे, रावसाहेब पटवर्धन, डॉ. अंत्रोळीकर, भाई छन्नूसिंग, स. का. पाटील, सयाजीराव सिलम, अच्युतराव, एस. एम. जोशी, शंकरराव देव यांच्या मदतीने पूर्वतयारी केली. या आंदोलनासाठी मुंबईचे समाजवादी पुढारी व वकील बॅ. पुरषोत्तम त्रिकमदास यांनी रु. २५००० चा चेक स्वामीजींच्या हातात ठेवला होता. अधिवेशनापासून जुलै अखेरपर्यंत चळवळीचे नियोजन चालू होते. जुलै अखेरीस हैदराबादेत कार्यकारिणीची बैठक होऊन जनतेला आवाहन करण्यात आले की,—

(१) ७ ऑगस्ट १९४७ हा भारतीय संघराज्यात सामील होण्याचा दिन पाळावा. सभा घ्याव्यात व घरोघरी तिरंगा राष्ट्रध्वज फडकवावा, इ.

(२) विधानसभा, नगरपरिषदा, जिल्हा व तालुका बोर्ड, ग्रामपंचायतींच्या सभासदांनी राजीनामे द्यावे.

(३) हैदराबाद स्टेट बँक व सरकारी बचत खात्यांतील ठेवी काढून घेणे.

(४) धान्यवसुली, सरकारी कार्यक्रमांवर बहिष्कार घालण्यात यावा.

सत्याग्रहाचा हा कार्यक्रम महात्माजींच्या १९२० च्या असहकार चळवळीसारखाच होता. १५ ऑगस्टला भारताचा स्वातंत्र्यदिन साजरा करण्याचे आवाहन केलेले होते. स्टेट काँग्रेसने घोषित केल्याप्रमाणे ७ ऑगस्टला हैदराबादच्या सुलतान बाजार भागातून चळवळीचा प्रारंभ झाला. सविनय कायदेभंग स्वरूपात चळवळ सुरू झाली.

## निजामाची दडपशाही

७ ऑगस्टला स्वामीजींच्या नेतृत्वाखाली हैदराबादच्या सुलतान बाजारात मिरवणूक निघाली व तिथे सभा घेण्यात आली. मात्र लाठीहल्ला करून जमाव पांगवण्यात आला. स्वामीजींना अटक करून लगेच मुक्त करण्यात आले.

मराठवाड्यातील काही ठिकाणी ७ ऑगस्टपूर्वीदेखील सत्याग्रह चळवळ सुरू झाली होती. प्रभात फेऱ्या, जाहीर सभा झाल्या व मागण्यांची पत्रके काढण्यात आली. या संदर्भात नांदेडचे जीवनराव बोधनकर, कंधारचे रामदास कोळनूरकर, गोविंद मोरे, गंगाराम येळगे, रंगराव देशमुख यांचा उल्लेख आम्हाला आढळला. बसमत, कुरुंदा, उमरगा इ. ठिकाणी अनेकांना अटक झाली. दरम्यान पुरुषोत्तम चपळगावकर, रतनलाल कोटेचा, रामलिंग स्वामी, नरहर कुलकर्णी, वामन वझे, काशीनाथ जाधव, नारायण जोशी यांनी बरीच जनजागृती केली होती.

सरकारने प्रारंभापासूनच औरंगाबादमध्ये आक्रमक पवित्रा घेतला होता. अतिरिक्त पोलीस व घोडदळ तैनात केले होते. तरीही विद्यार्थी व युवकांनी प्रचंड प्रभात फेरी काढली. पोलिसांनी विनाकारण लाठीमार केल्याने युवकांनी प्रतिकार केला. वातावरण अधिकच तापले. त्यामुळे शहरातील गिरणी कामगारांनी संप केला. हरताळ झाला. पोलिसांच्या हटेलपणामुळे औरंगाबादमधील परिस्थिती तंग बनली. तिथे पोलीस व इत्तेहादुलचे रझाकार अतिरेकी यांची युती झाल्यामुळे चळवळीला हिंसक स्वरूप आले. स्टेट काँग्रेसच्या कार्यकारिणीचे सदस्य व जिल्हा संघटक असलेल्या माणिकचंद पहाडे यांना बेदम मारहाण करण्यात आली. लाड-सावंगीलाही बरेच रण माजले. परभणी व बीडमध्ये सरकारने फारशी धरपकड केली नाही. परंतु सरकारने औरंगाबाद व नांदेडमध्ये जास्तीत जास्त लोकांना अटक करण्याचे धोरण अनुसरले. नांदेडात तिरंगा झेंड्यावरून भयंकर तणाव निर्माण झाला.

९ ऑगस्टला नांदेड शहर काँग्रेसच्या इमारतीवर तिरंगा ध्वज फडकवला जाणार होता. परंतु ९ ऑगस्टला ईदची मिरवणूक त्याच मार्गावरून जाणार होती. म्हणून मिरवणूक जाईपर्यंत ध्वज उभारू नये अशी अधिकारी व इत्तेहादुल मुसलमीनकडूनही सूचना आली. शिवाय नांदेडचे कलेक्टर व डी. एस. पी. यांनीही जातीय संघर्ष टाळण्यासाठी श्याम बोधनकर, भगवान गांजवे यांच्याशी याबाबत चर्चा केली. तथापि ईद, कडवा धर्मवाद व काँग्रेसचा तिरंगा हा अत्यंत संवेदनाक्षम आणि ज्वालाग्राही विषय बनला. राष्ट्रवादी विचारसरणीचे स्टेट काँग्रेसमन ध्वजाचा आग्रह

सोडत नव्हते. याबाबत विजयवाडा व मुंबईतील भूमिगतांशीही विचारविनिमय झाला. दोन्हीही पक्ष पेटले होते. " नांदेड बेचिराख झाले तरी झेंडा खाली येणार नाही " असा पवित्रा घेण्यात आला. शहराला रणक्षेत्राचे स्वरूप आले. इत्तेहादुल मुसलमीन व निजाम सरकारचीही आक्रमणाची तयारी जोरात होती.

मात्र नांदेड जिल्हा इत्तेहादुलचा अध्यक्ष अखलास हुसेन हा मवाळ असून कासीम रझवीचा विरोधक होता. त्याची भूमिका तडजोडीची होती. त्या दिवशी तो आधीपासूनच काँग्रेस कार्यालयात आला होता. ईदची मिरवणूक आली तेव्हा भगवान गांजवे व अखलास हुसेन यांनी मिरवणुकीतील लोकांना शांतपणे जाण्यास विनंत्या केल्या. शिवाय मिरवणुकीतील लोकांना झेंडा दिसू नये या उद्देशाने हुसेन साहेबाने आपल्या अंगातील शेरवान बरोबर झेंड्यासमोर आडवी धरली. ईदची मिरवणूक शांतपणे गेली. काही का असेना, नांदेड बचावले. ईदचा सण पार पाडला.[१९] रझाकारांमध्ये अखलास हुसेनसारखे समजदार लोक थोडेफार होते.

प्रतिकाराची चळवळ अधिक तीव्र करून तिला कायदेभंगाचे स्वरूप देण्याचे प्रयत्न करण्यात आले.

**कायदेभंगाची चळवळ.**—भारत आपल्या स्वातंत्र्याचा आनंद महोत्सव अपूर्व उत्साहाने साजरा करीत असताना, हैदराबाद संस्थानातील प्रजा मात्र अंधकारमय भवितव्याचा दुःखदंश भोगत होती. तेथील पुढारी जनतेला झेंडे उभारण्यास व रोषणाई करण्यास सांगत! पण त्याच झेंड्यांच्या काठ्यांनी लोकांना बडवण्यात आले! १५ ऑगस्टच्या पूर्वसंध्येला हैदराबादच्या ब्रिटिश रेसिडेंटला अखेरचा निरोप देण्याचा जो समारंभ झाला, त्यात निजामाने जनतेला दुःखद आठवण करून दिली :— "इंग्रज हिंदुस्तानातून जातील तेव्हा मी स्वतंत्र व सार्वभौम बनेन! भारत व पाकिस्तान ही नव्याने कायम होणारी दोन राष्ट्रे कोणताही निर्णय घेवोत, मी मात्र हैदराबादला ब्रिटिश कॉमनवेल्थमध्येच ठेवीन". मुसलमानेतर भारतीयांना हा दुःखदंश असह्य होता. शिवाय हिंदू-मुसलमानांमधील ऐक्यभावाचा अभाव, सरंजामशाही व शैक्षणिक मागासलेपणा यामुळे या प्रांतातील लढा बिकट झाला.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताचा राष्ट्रध्वज फडकवण्याचे स्वामीजींनी आवाहन केले होते. परंतु सरकारने तो अपराध ठरवून त्यासाठी तीन वर्षे कारावासाची शिक्षा भोगावी लागेल, असे जाहीर केले. तरीही स्वामीजी, कृष्णाचार्य जोशी व मेलकोटे यांनी हैदराबादेत राष्ट्रध्वजाची मिरवणूक काढली. त्यासाठी त्यांना तुरुंगात टाकण्यात आले. तेव्हापासून विद्यार्थी व युवकांनी झेंडा सत्याग्रह जोरात सुरू केला. देवीसिंग चौहान, श्रीनिवास अहंकारी, श्रीनिवास मुगळीकर, राजेश्वरकर, दिगंबर पोतदार व शंकर कार्लेकर यांनाही सजा देण्यात आली. स्टेट काँग्रेसचे अध्यक्ष कारावासात असल्यामुळे कृती समितीने कार्यकारिणीचे अधिकार आपल्याकडे घेतले, आणि २ सप्टेंबर हा ध्वजदिन म्हणून साजरा करण्याचे आवाहन केले.

७ ऑगस्टपासून १५ सप्टेंबर १९४७ पर्यंतच्या काळात उस्मानाबाद जिल्ह्यात ५५७ जणांना अटक करण्यात आली, तर बीडमध्ये ३१७, औरंगाबादमध्ये २५९, नांदेडात २०९ व परभणीत १७५ जण राजबंदी झाले. या काळात संस्थानात आठ ठिकाणी गोळीबार करण्यात येऊन त्यात ५१ जण शहीद झाले. या संपूर्ण आंदोलनात तेलंगणापेक्षा मराठवाड्याचे योगदान अधिक होते. साधारणपणे सप्टेंबर १९४७ मध्ये आंदोलनाची एक अवस्था संपली आणि तदनंतर दुसऱ्या अवस्थेचा प्रारंभ झाला असे म्हणता येते.

हैदराबाद मुक्तिआंदोलनाचे स्वरूप भारतीय स्वातंत्र्य लढ्यापेक्षा भिन्न होते. इथे केवळ सरंजामी राजसत्तेशीच लढा नसून इत्तेहादुल मुसलमीन व तिची निमलष्करी रझाकार संघटना यांच्याशीही मुकाबला करावयाचा होता. रझाकार पथके सरकारच्या बरोबरीने तर कधी स्वतंत्रपणेही सरकारी अग्रदल म्हणून काँग्रेसवर हल्ले करीत. रझाकारांनी गावांमधील गरीब हिंदू दलितांचीही पथकांमध्ये भरती केली होती. परिणामतः स्टेट काँग्रेसला भूमिगत किंवा खुल्या आंदोलनासाठी संस्थानाबाहेर केंद्रे काढावी लागली.

ऑक्टोबर १९४७ पासून आंदोलनाची दुसरी अवस्था सुरू झाली. तिच्यात काळानुसार बदल झाले. भारत सरकारने निजामाच्या सरकारशी एक वर्षासाठी जो 'जैसे थे (स्टँड स्टील) करार' केला तो स्टेट काँग्रेसला व जनतेला अजिबात

पसंत नव्हता. स्टेट काँग्रेसने कराराला आपला विरोध जाहीर केला होता. या कराराचे नाटक करून निजाम स्वतंत्र भारत सरकारलाही फसवत होता. पण तरीही परिस्थितीवशात नोव्हेंबर १९४७ मध्ये भारत सरकारने एक वर्षासाठी निजामाशी जैसे थे करार केला होता. याच अवधीत चळवळीची तीव्रता वाढली. कित्येक ठिकाणी जंगल सत्याग्रह झाले. कायदेभंगाच्या कित्येक घटना घडल्या.

रेल्वेवर साबोटाज करण्यात आले. मात्र मराठवाड्यात दोन-तीनच रेल्वे मार्ग होते. महामार्ग तरी कोठे होते! पण वाहतुकीचे जे तुटपुंजे मार्ग होते, तेही वारंवार खंडित करण्यात येत. सक्तीची लेव्ही देण्यास शेतकरी नकार देऊ लागले. गावपाटील, तलाठी यांना राजीनामे देण्यास प्रवृत्त करण्यात आले. किसान दल उभारून रझाकारांचा सामना करण्याचेही प्रयत्न करण्यात आले.

स्टेट काँग्रेसला संस्थानात राहून काम करणे कठीण असल्यामुळे पक्षाचे मुख्यालय मुंबईत स्थलांतरित करावे लागले. स. कृ. वैशंपायन या कार्यालयाचे मुख्याधिकारी झाले. लवकरच वाघमारे त्यांना येऊन मिळाले. मराठवाडा विभागासाठी मनमाडला कार्यालय उघडून त्यावर श्रीनिवास बोरीकरांची नेमणूक झाली. तेलंगणासाठी विजयवाडा व कर्नाटकासाठी गदगला विभागीय कार्यालये सुरू केली. तसेच प्रचार आणि संघटन कार्य, निधी व आंदोलकांना आश्रय देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र भारतात केंद्रे निर्माण केली. ती पुढीलप्रमाणे होती :—उस्मानाबाद जिल्हा–सोलापूर, औरंगाबाद–मनमाड, बीड– अहमदनगर, परभणी–वाशिम, आणि नांदेड जिल्हा–उमरखेड. याव्यतिरिक्त गरजेनुसार सरहद्दीबाहेरील अनेक गावांमध्ये कँप सुरू केले. तरीही अशा प्रकारची बाहेरील संघटना व अंतर्गत संघटना यातील समन्वय साधणे ही समस्या उरली होतीच!

**जंगल सत्याग्रह** :- जंगल सत्याग्रहामुळे मुक्तिआंदोलनास व्यापक स्वरूप आले. प्रथमच आर्थिक जनआंदोलनाचे रूप आले! या संघर्षात ग्रामीण जनता व सरकार एकमेकांसमोर उभे राहिले. त्यास लेव्ही-बंदीची साथ दिल्याने लढ्याचा स्तर उंचावला. नांदेडमधील पाटनूरच्या जंगल सत्याग्रहाने चळवळीला निर्णायक दिशा दिली. कंधार तहसीलमधील टेळकीचा जंगल सत्याग्रह खूपच गाजला व

त्यात झालेल्या गोळीबारात चार जण शहीद झाले. हदगावमधील डोर्ली जंगल येथे सत्याग्रह करणाऱ्यांवरही पोलिसांनी अमानुष गोळीबार करून सहा स्वातंत्र्य-सैनिकांना ठार केले. जिंतूर तहसीलमधील कांडलीच्या सुप्रसिद्ध जंगल सत्याग्रहात दहा हजारांपेक्षा जास्त शेतकऱ्यांनी भाग घेतला होता. त्यांत १५०० महिला होत्या. या सत्याग्रहामुळे निजाम शासनही हादरले होते.

औरंगाबाद जिल्ह्यातील लाडसावंगी व कोलता टाकळी गावांजवळ झालेल्या लढाईची प्रकरणे जंगल सत्याग्रहातूनच निर्माण झाली होती. या भागात मोठ्या प्रमाणात सत्याग्रह झाले. कोलता टाकळी हे अंतर्भागातील गाव असून तेथे मोठी गढी होती. गढीत भूमिगत स्वातंत्र्यसैनिकांनी आश्रय घेतला होता. हे उघड झाल्यावर रझाकार व पोलिसांनी त्यांच्यावर हल्ला केला व त्यास लढाईचे स्वरूप आले. हा सशस्त्र प्रतिकार सबाल्टर्न संघर्षाचा चांगला नमुना होय!

## भूमिगतांची सशस्त्र चळवळ

निजाम सरकार व निमलष्करी रझाकार यांच्याशी करावयाचा लढा सशस्त्र स्वरूपाचा व गनिमी पद्धतीचा होणे स्वाभाविक होते. तिथे तर्कशास्त्राला वाव नव्हता. म्हणून उपलब्ध साधनांचा उपयोग करून भूमिगतांनी घातपाती कृत्ये करण्यावरच भर दिला. ऑक्टोबर १९४७ पासून सप्टेंबर १९४८ मधील भारतीय सेनादलाच्या कारवाईपर्यंत साबोटाज करण्यात आले. मराठवाड्यात रेल्वे, महामार्ग वा पूल फारच कमी होते. पण जे होते ते नष्ट करणे, टेलिफोनच्या तारा तोडणे, अत्यल्प असलेल्या बँका व डाक कार्यालये लुटणे अशा कारवाया चालू राहिल्या. प्रस्तुत संशोधकाने परभणीचे इंग्रजी **गॅझेटिअर** लिहिण्याच्या प्रकल्पासाठी १९६३-६४ मध्ये मराठवाडा विभागातील आर्थिक संरचनेचा अभ्यास केला होता. तोपावेतो या भागात वाहतूक व दळणवळणाची साधने, बँका, हायस्कूल वगैरे अत्यल्प होते. खरे तर निजामाने विकासकार्य म्हणून अत्यल्प केलेले होते. असो. भूमिगतांनी धान्याची सरकारी गोदामे, करोडगिरी नाकी व पोलीस ठाण्यांवर हल्ले चढवले. तसेच रझाकारांची केंद्रे नष्ट करण्याचे प्रयत्न केले. त्यांनी काही ठिकाणची सरकारी कागदपत्रे नष्ट केली. काही रझाकारांनी

गाव सोडून गेलेल्या हिंदूंच्या जमिनी बळकावल्या होत्या. काँग्रेस आंदोलकांनी अशा जमिनी मूळ मालकांना परत मिळवून दिल्या.

निजामी प्रशासन खिळखिळे करण्याच्या योजनेनुसार कुलकर्णी व पाटलांचे राजीनामे घेण्यात आले. काही स्वखुशीने अथवा बलप्रयोगाने! त्यामुळे नांदेडमधील अर्धापूर–भोकर भागातील ५२ गावांमध्ये एकही कुलकर्णी वा पाटील कामावर नव्हता. फितुरी करणारांना आंदोलक शिक्षा करीत. औरंगाबाद, जालना, अंबड व भोकरदन तहसीलींत अनेकांनी राजीनामे दिले. अनेक गावांतील सरकारी दप्तरे जाळण्यात आली.

हैदराबाद संस्थान मुक्त करण्यासाठी नागपूरला नुसते केंद्रच उभारले नव्हते, तर स्वामीजींच्या विनंतीनुसार मुख्यमंत्री रविशंकर शुक्ला व मंत्री रा. कृ. पाटील यांनी अल्पावधीत पन्नास-पंचावन्न हजार रुपये गोळा केले. गांधीवादी नेते दादा धर्माधिकारींनी युवक संघ स्थापन केला. कमलाताई होस्पेट यांनीही मोठी मदत दिली. मध्यप्रदेश सरकार व लष्करी अधिकाऱ्यांनी नागपूर व जबलपूरमधून शस्त्रास्त्रे मिळवून दिली. गोविंदभाई श्रॉफ त्यावर देखरेख ठेवत. सर्वच व्यवहार शुक्लाजी व मिश्राजी यांच्या आशीर्वादाने चालत. स्टेनगन, रायफली, ग्रेनेड वगैरे सामग्री दिली जाई. सरहद्दीवरील छावण्यांना २००-२२५ रायफली पोहोचल्या होत्या. सरकारी डेपोतून काडतुसे पुरवली जात. इतकेच नव्हे तर शुक्ला-मिश्राजींनी एक नवी कोरी प्लायमाऊथ कार मिळवून दिली होती. तेव्हा मंत्र्यालाही कार मिळत नसे. काँग्रेस कँपमध्ये जे सैनिक असत त्यांना नागपूरच्या सीताबर्डी लष्करी शिक्षण केंद्रात प्रशिक्षण दिले जाई. या प्रशिक्षणावर खर्च झालेले अडीच लाख रुपये नंतर मध्यप्रांत सरकारच्या गुप्त फंडातून देण्यात आले. ऑपरेशन पोलोनंतर १४-१५ सप्टेंबर १९४८ ला सर्व सामग्री व शस्त्रे मध्यप्रांत सरकारने जप्त केली व आपली सचोटी सिद्ध केली. (भालेराव, पृ. २९७, ३२४-२६).

## उमरी बँकेवरील कारवाई

हैदराबाद स्टेट बँकेच्या नांदेड जिल्ह्यातील उमरीच्या शाखेवर स्वातंत्र्यवीरांनी केलेला धाडसी हल्ला अनेक दृष्टींनी यशस्वी मानावा लागतो. तत्पूर्वी ४२ च्या क्रांतिलढ्यात रामटेकचा सरकारी कोषागार स्वातंत्र्य सैनिकांनी हस्तगत केला

होता. कोकणातील मालवणचा खजिनाही लुटला होता. कोल्हापूर संस्थानातील भूदरगडचे तालुका कोषागार लुटले होते. सातारा प्रतिसरकारच्या क्रांतिकारकांनी बिचूद-शेणोली रेल्वे स्थानकांदरम्यान पे स्पेशल ट्रेन अडवून लुटली होती. सातारकर व खानदेशी वीरांनी धुळ्यातून नंदुरबारला नेला जात असलेला ५,५१,००० रुपयांचा खजिना चिमठाणे गावाजवळ लढून हस्तगत केला होता. याबाबत मला सांगावयाचे आहे की, या सर्व धाडसी कारवाया केवळ आंदोलनाचा खर्च भागविण्यासाठी नव्हत्या! सर्व रकमांचे हिशेब देण्यात आले होते. गांधीवादी कार्यकर्ते द्वारकानाथ लेले, अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांनी रकमांची चोख व्यवस्था लावली होती. तथापि या सर्व लुटी व धाडसी कृत्यांचा मुख्य उद्देश राजसत्तेवर जबर आघात करणे आणि अराजक निर्माण करणे हाच होता. म्हणून गांधीजींनी त्यांचा कधीच धिक्कार वा निषेध केला नाही.

उमरीच्या कारवाईलादेखील हेच निकष लागू पडतात. ही कारवाई केवळ पैशासाठी नव्हती. मुख्य उद्देश निजामाला व त्याच्या सत्तेला हादरा देणे हा होता. निजामी सत्तेला आम्ही जुमानत नाही, हे दाखवावयाचे धोरण होते. याच कारणास्तव संस्थानातील उर्दू वर्तमानपत्रांनी व रझाकारांनीही निजाम सरकारविषयी तीव्र नापसंती जाहीर केली. स्वतंत्र भारताच्या सरकारनेही निजामावर आरोप केला होता की, 'तुमचे प्रशासन व व्यवस्थापन शिल्लक राहिलेले दिसत नाही'. यात या कारवाईचे यश सामावलेले होते.

मात्र ब्रिटिश इंडियातील लुटींच्या उपरोक्त घटना व उमरी बँकेवरील हल्ला यात बराच फरक होता. उमरीतील कारवाई अधिक धाडसी व धोक्याची होती. कारण निजाम ब्रिटिशांपेक्षा हिंसक वृत्तीचा व निर्दय होता. त्याचे शासन भयंकर अमानुष व निर्घृण होते. उमरी गावात रझाकार मोठ्या संख्येने होते. गावात पोलीस स्टेशनही मोठे होते. मनमाड-सिकंदराबाद रेल्वेमार्गावरील उमरी स्थानक नांदेडपासून जवळच आहे. उमरखेडपासून हे गाव ३५ मैलावर, तर ज्या देवसरीपासून उमरखेडचे सैनिक कारवाईसाठी निघाले तेथून उमरी गाव सुमारे २२ मैल असावे. स्टेट बँकेवर हल्ला करण्याआधी उमरी-नांदेड, उमरी-धर्माबाद,

उमरी-भोकर रेल्वेमार्ग व तारायंत्र विसकळीत करावे लागले. या कारवाईत शे-दीडशे सैनिक होते. त्यांनी प्रथम पोलिसांना हुलकावणी देणारे काम केले. उमरीतील पोलीस ठाणे आधीच निष्क्रिय करण्याचाही प्रयत्न केला. त्यानंतर मुख्य कारवाई केली.

स्वामी रामानंद २६ जानेवारी १९४८ रोजी पकडले गेल्यावर ३० जानेवारी १९४८ रोजी उमरीची कारवाई करण्यात आली. तिच्याविषयी गोविंदभाईंना माहिती नसावी असे दिसते. मात्र याबाबतचे नियोजन काही दिवसांपासून चालू असणार. सोमवार ३० जानेवारीस बँकेत जास्त रक्कम असेल, असा अंदाज होता. म्हणून तो दिवस निवडला होता! उमरखेडस्थित स्वातंत्र्यसैनिक पेणगंगा नदी काठावरील देवसरी गावातून चार गटांमध्ये आयुधे घेऊन निघाले. प्रत्येक गटात सुमारे ३५ जण असून त्यांच्या कामाची विभागणी केलेली होती. सर्वांचे काम सारखेच महत्त्वाचे होते. स्टेट बँकेवर हल्ला करणारांमध्ये अनंत भालेराव, आबासाहेब लहानकर, साहेबराव देशमुख बारडकर, बन्सीलाल तोष्णीवाल, किशोर शहाणे, दिगंबर उत्तरवार, शंकरलाल शर्मा, बन्सीलाल मालाणी, धनराज पुरोहित वगैरे होते. दुपारी ४-३० वाजता हल्ले झाले. पोलिसांना चकविण्यासाठी दुसरीकडे घातपात घडवून आणला होता. त्याचा मुकाबला करण्यासाठी बरेच पोलीस तिकडे गेलेले होते. म्हणून इकडे काम सोपे झाले. जे अरब पहारेकरी व पोलीस हजर होते त्यांना आंदोलकांनी ठार केले. बाहेरील आंदोलकांनी गावातील रझाकारांना बाहेर थोपवून धरले. आत लपून बसलेले सुरक्षा रक्षक व कॅशियर वगैरेंना ठार मारले. या कारवाईत हिंसाचार बराच झाला. मात्र मृतांचा आकडा मिळू शकला नाही.

हस्तगत केलेली बँकेतील रक्कम काही पोत्यांमध्ये भरण्यास व कारवाईची निरवानिरव करण्यास दोन-अडीच तास लागले. संदेशवहनाची सर्वच साधने व माध्यमे आधीच निकामी करून ठेवल्यामुळे पोलिसांना बाहेरून कोणतीही मदत मिळाली नव्हती. सर्व पैसा तीन बैलगाड्यांमध्ये भरला आणि आंदोलकांसाठी आणखी १५ बैलगाड्या घेण्यात आल्या. विजयाच्या आनंदात सर्व मंडळी देवसरीला परत आली.

उमरी बँकेवरील कारवाईतून २०,६३,७१९ निजामी रुपये म्हणजेच १७,६८,९०२ भारतीय रुपये हस्तगत झाले होते. ही सारी रक्कम स्टेट काँग्रेसच्या सोलापुरातील कार्यालयात जमा करून ती हैदराबाद ट्रस्टच्या स्वाधीन करण्यात आली. तत्कालीन कायद्याची बंधने पाळून हिशेब तपासण्यात आले. शिवाय अ. भा. काँग्रेस समितीच्या आदेशानुसार अ. भा. काँग्रेसचे सरचिटणीस शंकरराव देवांनी जाणकार तपासनीसाच्या मदतीने ते पुन्हा तपासले. त्यांनी अभिप्राय दिला होता की, 'एकंदरीत हिशेब समाधानधारक ठेवले गेले आहेत.'

इत्तेहादुल मुसलमीनचे मुखपत्र असलेल्या **रहबरे दकन** या वर्तमानपत्राने उमरी प्रकरणी निजाम सरकारच्या नाकर्तेपणावर टीका केली होती. अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय लायकीविषयी संशय व्यक्त केला. निजाम सरकारची बेहद नामुष्की झाली.[२०]

३० जानेवारी १९४८ रोजी उमरीमध्ये स्वातंत्र्य सैनिकांनी मोठे यश संपादन केले. तथापि त्याच दिवशी महाराष्ट्राची व भारताचीच नव्हे, तर अखिल मानवजातीची एक शोकांतिका घडली. त्याच दिवशी नथुराम विनायक गोडसे या पुण्याच्या हिंदुत्ववादी माणसाने महात्मा गांधी यांचा नवी दिल्लीत खून केला. दुसऱ्या एका पुणेकराने १९३४ साली केलेला प्रयत्न फसल्यावर ३० जानेवारीचा प्रयत्न यशस्वी झाला होता. भारत शोकसागरात बुडाला होता.

## स्थानिक लोकलढे

प्रसंगवशात लढा हिंसक बनत गेला. मूळचा भालकी तालुक्यातील सौळदाब या गावचा नारायण पंढरीनाथ पवार हा रेल्वेतील कर्मचारी बॅ. जिनांच्या भयंकर हिंदू-विद्वेषी भाषणाने भडकला होता. जुलै १९४७ मध्ये जिनांनी हैदराबादेतील सभेत काढलेल्या विषारी उद्‌गारांनी आर्यसमाजी नारायणराव दुखावले गेले. त्यांच्या मनात सूडाची भावना पेटली. त्यातून त्यांनी व दोन साथीदारींनी निजामावर बाँब टाकण्याचा कट रचला. त्यानुसार त्या तिघांनी ४ डिसेंबर १९४७ रोजी निजामाच्या मोटर गाडीवर बाँब टाकला. पण निजाम पुरून उरला. नारायणरावांवर खटला भरून त्यांना फाशीची शिक्षा देण्यात आली. मात्र

निजामी सत्ता संपुष्टात आल्यावर नारायणराव मुक्त झाले. सरदार पटेल त्यांना गमतीने म्हणाले, 'तुला निजामावर बाँब फेकावा लागला, तर मला गोळीबार करावा लागला.'

उमरीमध्ये निजामाचे प्रशासन व त्याच्याही इभ्रतीला जोरदार आव्हान दिल्यामुळे स्वातंत्र्यसैनिकांचे मनोबल व आत्मविश्वास वाढला. तथापि त्याबरोबरच पोलीस आणि रझाकारांनी अनन्वित अत्याचार सुरू केले. काही पोलीस ठाणी भक्कम होती, तर रझाकार कँप त्यांना पूरक होते. नांदेड जिल्ह्यामधील इस्लापूर असेच एक ठाणे असून तेथे रझाकारांचे मोठे वर्चस्व होते. किनवट या एकाकी तहसीलमधील इस्लापूरला ३००-४०० हत्यारबंद रझाकारांचा तळ होता. रझाकार लुटालुटीव्यतिरिक्त सामाजिक अत्याचारही करीत. म्हणून त्यांचा प्रतिकार करण्यासाठी उमरखेडच्या तळावरील शंभरेक हत्यारबंद काँग्रेसजन चाल करून आले (३० जून १९४८). या हातघाईच्या लढाईत दोन्ही पक्षांचे बरेच जण ठार झाले. यानंतर हैदराबाद राज्यात संघर्षाची अंतिम अवस्था सुरू झाली.

मुक्तिआंदोलनाच्या या अंतिम फेजमध्ये स्वतंत्र भारताचे सार्वभौम सरकार आणि हुलकावण्या देणारा व अविश्वासपात्र निजाम यांच्यात वाटाघाटींचे गुऱ्हाळ चालू होते. **गव्हर्नर जनरल लॉर्ड माऊन्टबॅटन निजामाशी स्वतंत्रपणे वाटाघाटी करून जवाहरलाल नेहरू व सरदार पटेलांचा मार्ग अधिकच अडचणीचा करीत होते. त्यामुळेही निजाम आझाद हैदराबादच्या दिशेने प्रयत्न करीत होता. तो पाकिस्तानातून शस्त्रास्त्रांची मदत मिळवण्याचाही प्रयत्न करीत होता.** रझाकारांचे अत्याचार वाढले होते.

अशा बिकट राजकीय परिस्थितीत राष्ट्रीय काँग्रेसच्या पाठिंब्याने स्टेट काँग्रेसने जनमानसात धैर्य व आत्मविश्वास निर्माण केला. मुंबई प्रांतिक काँग्रेस, काँग्रेस समाजवादी नेते व मध्यप्रांत-वऱ्हाडच्या सरकारने हैदराबाद काँग्रेस कृती समितीला अर्थसाहाय्य दिले. त्यानुसार कृती समितीने शक्य तेथे स्वातंत्र्याचे स्फुल्लिंग प्रज्वलित केले. अनेक गावांना आपले स्वातंत्र्य घोषित करण्यास प्रवृत्त केले. नागपुरातील सरकारने पुरविलेल्या शस्त्रांच्या बळावर अनेक गावांनी निजामी सत्ता

झुगारून लावली. गावकऱ्यांनी जनराज्ये चालविण्यासाठी किसान दले उभारली. अशाच गोवर्धन सारोळा (औरंगाबाद जिल्हा) जनराज्यात आठ गावे असून तिथे तिरंगा फडकत राहिला. स्टेट काँग्रेस कृती समितीचे अध्यक्ष दिगंबर बिंदू यांच्या अहवालानुसार दिसते की, जून १९४७ पासून लष्करी कारवाईच्या प्रारंभापर्यंत स्वतंत्र झालेल्या मराठवाड्यातील गावांची जिल्हानिहाय आकडेवारी पुढीलप्रमाणे होती :- परभणी १००, नांदेड २४, औरंगाबाद १९ व उस्मानाबाद ५५. मात्र हा अहवाल अतिरंजित असल्याचे गुप्तचरांचे अभिप्राय होते.

रझाकारांच्या छळातून व निजामाच्या गुलामगिरीतून सुटका करण्यास्तव झालेल्या लढ्यात परभणी जिल्हा अग्रेसर होता. तिथे ५१ स्वातंत्र्यसैनिकांनी हौतात्म्य पत्करले. स्वातंत्र्यानंतर शासनाने त्यांची १५ ठिकाणी स्मारके उभारली. ही माहिती मी **परभणी जिल्हा गॅझेटिअर** १९८८ मध्ये दिलेली आहे. या जिल्ह्यातील आजेगावमध्ये सुमारे १२५-१५० रझाकार दहशतवादाच्या बळावर खंडणी वसूल करीत. म्हणून हे गाव स्वतंत्र करण्याचे प्रयत्न सुरू झाले. याचा सुगावा लागताच निजामाची सेना तिथे आली. परिणामतः निजामी सेना व रझाकार आणि स्वातंत्र्यसैनिक यांच्यात पाच तास गोळीबार झाला. अशाच प्रकारचा दुसरा मोठा संग्राम गुंडा नामक गावी झाला. त्यात सात जण शहीद झाले. वाकोडी गावी लोकांनी शिंदीची झाडे तोडली व प्रचार साहित्य वाटले या कारणास्तव रझाकारांनी गोळीबार करून काही माणसे मारून टाकली. येळेगाव तुकाराम येथे जंगल सत्याग्रह करणारांना ठार करण्यात आले, तर काही जणांना सक्तमजुरीची सजा देण्यात आली. मुक्ती संग्राम समितीने रझाकारांच्या अत्याचारांना पायबंद घालून गावमुक्ती करण्यासाठी पांगरा शिंदे व बापटी भागात भूमिगत सशस्त्र कँप स्थापन केला. तेथील निकराच्या लढाईत चार जण शहीद झाले.

१२ मार्च १९४८ रोजी महाशिवरात्रीला औंढा नागनाथ या पवित्र ज्योतिर्लिंगाच्या उत्सवप्रसंगी ५०,००० भाविकांनी रथाची मिरवणूक काढली होती. तेव्हा माथेफिरू रझाकारांनी रथापुढे बाँब टाकून तिघांची हत्या केली, लुटालूट केली. परभणी जिल्ह्यातील रामेश्वर तांडा, पाथरी, सेलू, गुंडा, आखाडा बाळापूर, शेवाळा,

येळेगाव तुकाराम, वाकोडी, कळमनुरी, पांगरा शिंदे, औंढा नागनाथ, जिंतूर, चिखलठाणा, चारठाणा व आजेगाव येथे महाराष्ट्र शासनाने हुतात्मा स्मारके उभारली आहेत.[२१]

परभणीप्रमाणे मराठवाड्यातील इतर जिल्ह्यांमध्येही कमीअधिक प्रमाणात लोकलढे झाले. हा विद्रोह प्रामुख्याने स्टेट काँग्रेसने पेटविला होता. शेकडो खेडूत काँग्रेसचे सभासद असून वा नसून त्यात सहभागी झाले होते. त्यात आर्यसमाजी लोकांचाही सहभाग होता. पण त्यांची स्वतंत्र माहिती उपलब्ध नाही. मात्र या वेळी हिंदुमहासभा अधिकृतपणे सहभागी नव्हती. समाजवादी पक्ष पुणे, मुंबई, नगर व जळगावातून सर्व प्रकारची मदत करीत असे. मराठवाड्यात कम्युनिस्ट असे कोणी नव्हते. पण जमीनदारांचा प्रभाव असलेल्या तेलंगणात कम्युनिस्टांनी निजामविरोधी आंदोलनास जमीनदारविरोधाची जोड दिली.

## ऑपरेशन पोलो

संस्थानातील राजकीयच नव्हे तर सकल समाजजीवन वेदनामय झालेले होते. सर्वत्र अराजक व दडपशाहीचे साम्राज्य पसरले होते. निजाम इरसाल सौदेबाजाच्या निग्रहाने आपल्या मूळ भूमिकेला चिकटून बसला व नवनवे उद्योग करीत होता. स्वामी रामानंद कारावासात असल्याने दिगंबर बिंदू व डॉ. मेलकोटे हे राष्ट्रीय नेत्यांच्या संपर्कात होते. पं. नेहरू व सरदार पटेल अधूनमधून सांगत की, हैदराबाद कधीच स्वतंत्र राष्ट्र म्हणून राहू शकणार नाही, त्याला भारतात सामील व्हावेच लागेल! अडथळा होता गव्हर्नर जनरल लॉर्ड माऊंटबॅटनचा! एकदा नाराज होऊन दिगंबरराव बोलत असताना त्यांना **सरदार पटेलांनी सांगितले. “माऊंटबॅटन लंडनला परत जाईपर्यंत तुम्हाला कळ काढावी लागेल. ते गेले की हैदराबादचा प्रश्न सुटेल”. माऊंटबॅटन आणि इंग्रज वकील, मीर लायक अली, छत्तारीचा नबाब, अली यावर जंग वगैरे कारस्थानी माणसांच्या साहाय्याने निजाम आपले सार्वभौमत्व प्रस्थापित करण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होता.** तथापि त्यात यश न आल्याने निजाम पाकिस्तानात सामील व्हावयास तयार झाला. मात्र त्यासाठी त्याला स्वतः बॅ. जिनांच्या सहीचे पत्र हवे होते. तथापि जिनांच्या आजारामुळे ते शक्य झाले नाही

नंतर २१ जून १९४८ रोजी माऊंटबॅटन भारत सोडून लंडनला परत गेले व एक अडथळा दूर झाला. तसेच सरदार पटेलांना राजगोपालाचारींचा तडजोडीचा सल्ला आवडला नाही. सरदार बलदेवसिंग तेव्हा संरक्षण मंत्री होते. पटेल व बलदेव सिंग या दोघांनी निजामाला वठणीवर आणण्याचे ठरवले. त्यांनी दबावाला बळी न पडण्याचा आधीच निर्धार केलेला होता. पण पाकिस्तान याचा फायदा घेईल व प्रतिकार करील अशी नेहरू व राजाजींना भीती वाटत होती, असे पत्रकार दुर्गादास म्हणतात. वस्तुतः जानेवारी १९४८ पासून भारत सरकार सशस्त्र कारवाईच्या दिशेने तयारीला लागले होते. सरदार पटेलांनी जनरल चौधरींना डेहराडूनला बोलावून समक्ष विचारले होते की, हैदराबादवर लष्करी कारवाई करावी लागल्यास तुम्हाला किती दिवस लागतील? जन. चौधरींनी सात दिवस असे उत्तर दिले होते!

भारतीय संघराज्याच्या सरकारने केलेले सामोपचाराचे सर्व प्रयत्न विफल ठरल्याने सरकारने या संस्थानावर १३ सप्टेंबर १९४८ रोजी पोलीस कारवाई केली. योगायोग असा की, हैदराबादची राजकीय समस्या अधिकच गहन करणारे महंमद अली जिना आदल्याच दिवशी म्हणजे १२ सप्टेंबरला मरण पावले होते. **या कारवाईचे नाव पोलीस कारवाई असले तरी ही मिलिटरी ॲक्शन होती. तिला ऑपरेशन पोलो हे नाव दिले जाते.** तिचे मुख्य संचालक लेफ्ट. जन. राजेंद्रसिंहजी व मेजर जनरल चौधरी वगैरे इतर अधिकारी होते.

सामर्थ्यवान भारतीय सैन्यापुढे निभाव न लागल्याने १०९ तासांतच मुजोर व वल्गनाखोर निजामाचा साफ पराभव झाला (१७ सप्टेंबर १९४८). आसफिया घराण्याची राजसत्ता अमर ठेवण्याची जबर महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या आणि अरबी-पर्शियन भाषांमधील वीस-पंचवीस किताब मिरवणाऱ्या मीर उस्मान अली खानला आपल्या सल्तनतीचे विसर्जन स्वहस्ते करावे लागले. स्वमुखे शरणागती पत्करावी लागली. त्याच्या सर्वच वल्गना झूट ठरल्या. हवेत विरून गेल्या.

मेजर जनरल चौधरींनी लष्करी प्रशासक या नात्याने सर्व प्रशासन ताब्यात घेतले. प्रत्येक जिल्ह्यासाठी कलेक्टर, जिल्हा पोलीस प्रमुख वगैरे अधिकारी नेमले.

स्वतः चौधरी लष्करी गव्हर्नर नेमले गेले. आय.सी. एस. अधिकारी डी. एस. बखले यांना राज्याचे मुख्य नागरी प्रशासक तर डी. आर. प्रधान यांना अतिरिक्त मुख्य नागरी प्रशासक पदावर नेमण्यात आले.

अत्यंत प्रतिगामी, जात्यंध व मध्ययुगीन सरंजामशाही वृत्तीच्या सल्तनतीतून मराठवाडा मुक्त झाला! १७ सप्टेंबर १९४८ पासूनचा तो आनंदोत्सव या प्रांतात अपूर्व होता. शेकडोंच्या बलिदानाचे आणि हजारोंच्या त्यागाचे ते फलित होते! आंदोलनाच्या सर्व अवस्थांमध्ये गांधीजी स्वतः स्वामी रामानंद तीर्थ वगैरेंना सल्ला देत आणि निजामाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना फटकारत असत. तथापि भारताचा हा भाग व येथील प्रजाजनांची मुक्ती पाहण्यास महात्मा गांधी हयात नव्हते.

स्वतंत्र झाल्यावर १९५६ साली मराठवाडा मुंबई राज्यात समाविष्ट करण्यात आला. भाषावार प्रांतरचनेच्या मागणीनुसार १ मे १९६० पासून मराठवाड्यासह संयुक्त महाराष्ट्र राज्य निर्माण झाले. मराठवाड्यावर २३५ वर्षांच्या निजामी राजवटीत झालेल्या अन्यायांच्या जखमा लवकर भरून येण्यासारख्या नव्हत्या. मात्र १९४८-४९ मध्ये प्रगतीच्या वाटा खुल्या झाल्या. मुक्तिआंदोलनास अखेरपर्यंत कडवा विरोधच करणारे व निजामाचे निकटवर्ती असलेले नबाब अली यावर जंग नंतर स्वतंत्र भारताचे १५ वर्षे राजदूत राहिले. शेवटी शेवटी ते महाराष्ट्राचे राज्यपाल झाले [२२]. राजकारणाची लीला विचित्र असते!

# समारोप

## स्वातंत्र्याचा आनंदोत्सव

भारतीयांचे स्वप्न व ध्येयपूर्तीचा तो अपूर्व जल्लोष गुरुवार १४ ऑगस्ट १९४७ पासूनच ओसंडत होता. दिल्ली व मुंबईत थवेच्या थवे आनंदसागरात पोहत होते. साडेतीन लाख वर्षे भारतात संचार करणाऱ्या मानवाने पूर्वी असा सोहळा पाहिला नव्हता. १४ ऑगस्टला रात्री ११ वाजता प्रथमच नवी दिल्लीतील पार्लमेंट हाऊसमध्ये स्वातंत्र्यसैनिक सुचेता कृपलानी व नंदिता कृपलानी यांनी **वंदे मातरम्** गीत म्हटल्यावर डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी महात्मा गांधींच्या महान योगदानाचा गौरव केला. त्यानंतर पं. नेहरूंचे समयस्फूर्त **'ट्रीस्ट विथ डेस्टिनी'** हे प्रसिद्ध भाषण झाले. ठीक १२ वाजता घटना समितीचे अध्यक्ष या नात्याने डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी सत्ताग्रहण केल्याचा निर्णय घोषित केला. हा निर्णय व्हाइसरॉय लॉर्ड माऊंटबॅटन यांना कळविण्याचा व त्यांनाच भारताचे पहिले गव्हर्नर-जनरल नेमण्याचा औपचारिक ठरावदेखील विदित करण्याचे ठरले. त्यानुसार राजेंद्रबाबू व नेहरू व्हाइसरॉय पॅलेसमध्ये गेले. स्वतंत्र भारताचे पहिले सरन्यायाधीश न्या. हरिलाल कनिया यांच्या अध्यक्षतेखाली माऊंटबॅटन यांचा शपथविधी झाला. तदनंतर माऊंटबॅटन यांनी नेहरू व त्यांच्या मंत्रिमंडळास शपथ दिली.

राजधानीतील मुघलकालीन व ब्रिटिशनिर्मित स्मारकशिल्पे व ऐतिहासिक वास्तू फुलमाला व रोषणाईने नटलेल्या होत्या. त्या नगराचे हे मोहमयी रूप कोणीच पूर्वी पाहिले नव्हते. जामा मशीददेखील झगमगून निघाली. भंगी कॉलनीत जेथे गांधीजी राहत, तेथे प्रथमच दिवाबत्ती आली. इंडिया गेटवर पाच-सहा लाखांच्या उपस्थितीत मुख्य ध्वजवंदन व आनंदसोहळा होता. उत्साही गर्दीमुळे तिथे राजशिष्टाचाराची बंधने तुटली. लॉर्ड माऊंटबॅटन शाही बग्गीतून उतरू शकले नाहीत, म्हणून त्यांनी व्यासपीठावरील नेहरूंनाच राष्ट्रध्वज फडकवण्याची विनंती केली. या प्रसंगी माऊंटबॅटन यांनी इंग्लंडचे बादशाह व आपले मामेभाऊ सहावे जॉर्ज यांचा संदेश वाचून दाखवला.

राजधानीतील महोत्सव दिमाखदार खरा! मात्र स्वातंत्र्य मिळवून देण्यात अग्रभागी असलेले महात्मा गांधी या आनंदमहोत्सवात अजिबात सहभागी नाहीत, हा दुःखदंश जाणवणारेही हजारो लोक दिल्लीत होते. पण त्यासाठी सोहळा थांबणार नव्हता. राष्ट्राचा पुनर्जन्म झाला. महात्माजी, रानडे, वासुदेव बळवंत फडके, नेहरू, पटेल, सुभाषबाबू व लाखोंच्या जीवनयज्ञाची ती सांगता होती.

मात्र स्वातंत्र्याचा आनंदोत्सव मुंबईने ज्या उत्कटतेने आणि उत्साहाने साजरा केला, तसा भारतात कोठेही साजरा झाला नाही! राज्यात चार दिवस सुटी होती. ऑगस्ट १९४२ मध्ये मुंबईचे रस्ते हुतात्मे व जखमी देशभक्तांच्या रक्ताने निसरडे झाले होते! त्याच रस्त्यांवर १४-१५ ऑगस्ट १९४७ रोजी मुंबईकरांनी आनंदाने बेहोष होऊन जल्लोष केला. मुंबईचे बॅ. महंमद अली जिना व इस्माईल इब्राहिम चुंद्रीगर यांनी देशाची फाळणी करून पाकिस्तान निर्माण केला. तथापि जिनांची एकमेव कन्या दिना (वाडिया) वडिलांच्या पाकिस्तानात न जाता मुंबईतच कुलाब्यातील आपल्या घरी राहिली. दिनाप्रमाणेच मुंबईतील बहुसंख्य मुसलमानांनी भारतात राहणेच पसंत केले. पंजाब, वायव्य प्रांत, सिंध व बंगालमध्ये भयानक जातीय दंगे होत असताना, मुंबई शांत होती. मुंबई मुस्लीम लीगने जातीय सलोख्यासाठी सभा घेतल्या. शहराच्या मुसलमान बहुल भागातही रोषणाई झाली. 'हिंदुस्तान जिंदाबाद' हा नारा निनादला! हिंदुमुसलमानांनी एकमेकांना पेढे भरविले.

स. का. पाटील व मेहेरअलींच्या आवाहनानुसार मुंबईत रम्यमनोहर रोषणाई व सौंदर्यीकरण केलेले होते. गॉथिक वास्तुशिल्पातील कावसजी जहांगिर सभागार व राजाबाई टॉवर, व्हेनिशिअन शिल्पकलेचे तेव्हाचे सेक्रटेरिएट, गॉथिक शैलीतील बोरीबंदर व महानगरपालिका, रोचक शैलीतील पश्चिम रेल्वेची इमारत, फ्लोरा फाऊंटन, व्हेनिशिअन-गॉथिक एलफिंस्टन कॉलेज, विजापूर-मूरिश शैलीतील घुमटाचा म्युझियम व बिझंटाईन शिल्पाचा कौन्सिल हॉल वगैरे इमारती नखशिखांत नटलेल्या होत्या.

सरकारी सोहळ्यानंतर स. का. पाटील व युवक नेत्यांनी रात्री हजारो मशाली व ध्वजज्योतींची मिरवणूक चौपाटीवरील टिळक पुतळ्यापर्यंत नेली. त्यात कित्येक हजार युवक-युवती, स्वातंत्र्यसैनिक व कामगार होते. मात्र मुंबईतील महोत्सवाने शिखर गाठले ते गोवालीया मैदानावरून ओव्हलवर सायंकाळी आलेल्या रंगतदार मिरवणुकीने व तिथे झालेल्या मानवंदना समारंभाने! या मिरवणुकीत स्वातंत्र्यसैनिक, प्रोग्रेसिव गटाचे लेखक, पृथ्वीराज कपूरचे कलापथक व सर्व स्तरांतील स्त्री-पुरुष होते. या मिरवणुकीत सजवलेल्या बैलगाड्या, घोडेस्वार, मोटरगाड्या व रंगतदार पोषाखातील नागरिक होते. देशसेविका संघ व सेवादलाने आयोजित केलेल्या या विराट मिरवणुकीच्या मार्गात अनेक ठिकाणी कलापथकांचे कार्यक्रम होते. पूर्वी कलोनिअल भयामुळे भारतीय लोक ओव्हल मैदानावर जात नसत. तेथे स्वातंत्र्यदिनी आमचे लोक आनंदाने बेहोष होऊन नाचले. ही विराट मिरवणूक ओव्हलवर पोहोचली तरी शेवटचे टोक गोवालिया टँक मैदानावरच होते. ओव्हलवर बाळासाहेब खेर व गव्हर्नर जॉन कोलव्हिल यांनी सेनादलाची मानवंदना स्वीकारली. अशीच विराट मिरवणूक नरे पार्कपासून शिवाजी पार्कवर नेली. सर्वत्र सभासंमेलने झाली.

मुंबईतील प्रत्येक धर्माच्या लोकांनी 'भारतीय लोकशाही चिराऊ होवो' अशा खास प्रार्थना घडवून आणल्या. काही सभांमध्ये महात्मा गांधी व जिनांच्या तसबिरी ठेवलेल्या होत्या. ही नवी दीपावली, नवी ईद, नववर्षाची पूर्वसंध्या! मुंबईतील महोत्सवात भारतातील सर्व उत्सवांचे संमिश्रण होते! समाजवादी नेते जयप्रकाश नारायण मुद्दाम या सोहळ्यासाठी मुंबईला आलेले होते.

शहरात रोषणाई, आनंदोत्सव, नृत्य व कॅबेरांची रेलचेल असली, तरी तीन दिवस नशाबंदी होती.

पुणेकरांनी आपला आनंद वरील पद्धतीव्यतिरिक्त अभिनव प्रकारानेही व्यक्त केला. स्वातंत्र्याचा संदेश देण्यासाठी त्यांनी गुरुवारी मध्यरात्री सिंहगडावर व शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेल्या शिवनेरी गडावर तसेच पुरंदर किल्ल्यावर प्रचंड होळ्या पेटविल्या. त्या लांब अंतरावरील खेडुतांनी पाहिल्या. पुण्याच्या

आगाखान पॅलेसवरील रोषणाई नयनरम्य होतीच. पण त्या भव्य वास्तूने महादेवभाई देसाईंचे अचानक झालेले निधन व कस्तुरबांचेही निधन आणि महात्माजींचा जर्जर झालेला देह पाहिला होता! त्या स्मृती जागृत झाल्या. अहमदनगरच्या गडावरील १५ ऑगस्ट १९४७ च्या ध्वजवंदनानेही अनेक आठवणींना उजाळा दिला.

मुंबई इलाख्याने जॉन कोलव्हिल यांनाच गव्हर्नरपदी चालू ठेवले. मात्र १५ ऑगस्टला मध्यप्रांत-वऱ्हाडचे गव्हर्नर म्हणून मुंबईचे मंगलदास पकवासा यांचा व पंतप्रधान (मुख्यमंत्री) म्हणून रविशंकर शुक्ला यांचा शपथविधी झाला. मुंबईप्रमाणेच राजधानी नागपुरातही सत्तांतराचे सोपस्कार, ध्वजारोहण, सेनादलाची मानवंदना, देशासाठी प्रार्थना वगैरे कार्यक्रम करण्यात आले. स्वातंत्र्यसैनिक व क्रांतिकारकांना सर्वक्षमेचा लाभ देण्यात आला. तसाच जल्लोष, तसाच उत्सव! सरकारी इमारती व स्मारकशिल्पांवर सुंदर रोषणाई, फुलमाला व आतषबाजी! मराठवाडा मात्र आशानिराशांच्या व्यथा व वेदना भोगत होता. या विभागाचा मुक्तिदिन उजाडला १७ सप्टेंबर १९४८ रोजीच्या सायंकाळी.

❑❑

## संदर्भ

१. के. के. चौधरी, **क्विट इंडिया रिव्हॉल्युशन,** पृ. १२५-२७.

२. हिंदुस्तान सरकार, होम पोलि. इंटेलिजंस फाईल क्र. ३/३३/४२, १९४२, जेन्किन्सचा टॉटनहॅमला अहवाल.

३. चौधरी, उपरोक्त, पृ. ३८७-९७.

४. श्रीपाद केळकर, **छोडो भारत : १९४२**, पृ. १८३.

५. **आर्चिबाल्ड वेव्हेल, द व्हाइसरॉयज् जर्नल,** पेंडरल मून (संपा.), ऑक्सफर्ड, १९७३, पृ. ९७-९८.

६. **ट्रान्सफर ऑफ पॉवर**, खंड पाच, पृ. १०, ३७, वेव्हेल यांची अमेरींना पत्रे, ५ व २० सप्टेंबर १९४४

७. पट्टाभी सीतारामय्या, **हिस्टरी ऑफ द इंडियन नॅशनल काँग्रेस,** खंड दोन, पृ. ६०७.

८. **ट्रान्सफर ऑफ पॉवर**, खंड चार, पृ. ९२५-२६. वेव्हेल यांचे अमेरींना पत्र, २६ एप्रिल १९४४.

९. चौधरी, उपरोक्त, पृ. १९४, २००-०२,२०५-०७.

१०. सुमित सरकार, **मॉडर्न इंडिया**, पृ. ४२६.

११. हिंदुस्तान सरकार, होम पोलिटिकल फाईल, क्र. ५/२१/४६, नाविक सैनिकांचे पत्र, फेब्रुवारी १९४६.

१२. चौधरी, **हिस्टरी ऑफ बाँबे,** पृ. ३०४-०७.

१३. मुंबई सरकार, गृह विभागाची दिल्लीस तार, २५ फेब्रु. १९४६.

१४. वेव्हेल, उपरोक्त, पृ. २३२.

१५. य. दि. फडके, **विसाव्या शतकातील महाराष्ट्र**, खंड पाचवा, पृ. १९६-९७, १९९-२०१, ४०५-०६. घटना समिती हा शासनमान्य शब्द आहे.

१६. कित्ता, पृ. २२०-२५.

१७. अनंत भालेराव, **हैदराबादचा स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा**, मुंबई, २०१२, पृ. २२६-२७, २४०-४१.

१८. कित्ता, पृ. २६४,२६६.

१९. कित्ता, पृ. २८७-८९.

२०. कित्ता, पृ. ३२४-२६, ३४६-५२.

२१. चौधरी, **परभणी जिल्हा गॅझेटिअर**, १९८८, पृ ७३-८०.

२२. भालेराव, उपरोक्त, पृ. ३८६-८९, ४०५, ४६३.

# संदर्भ ग्रंथ सूची

## मूळ अस्सल दस्तऐवज

### (अ). अप्रकाशित सरकारी दस्तऐवज –

१. पोलीस कमिशनरचे मुंबई सरकारला दैनिक अहवाल, १९३० ते १९३२, १९४२ ते १९४४

२. मुंबई सरकारचे हिंदुस्तान सरकारला पाक्षिक अहवाल, १९४२, १९४३

३. मुंबई सरकार, गृह विभाग, स्पेशल ब्रँच फायली, १९४१ ते १९४५

४. काँग्रेस सिक्रेट रेडियो, मॉनिटरिंग रिपोर्ट, १९४२, १९४३, १९४४

५. मध्यप्रांत-वऱ्हाड सरकारचे हिंदुस्तान सरकारला अहवाल, १९४२, १९४३

६. मध्यप्रांत-वऱ्हाड सरकार, गृह विभाग, स्पेशल ब्रँच फायली, १९४१ ते १९४५

७. हिंदुस्तान सरकार, होम पोलिटिकल इंटेलिजंस फायली, १९३० ते १९३२, १९३७ ते १९४५, राष्ट्रीय अभिलेखागार, नवी दिल्ली

८. महाराष्ट्र सरकारचे अभिलेखागार मुंबई, नागपूर, कोल्हापुरातील संग्रह

९. हैदराबाद अभिलेखागारातील फायली, १९३७ ते १९४८

१०. बाँबे प्रेसिडेंसी पोलीस ॲबस्ट्रॅक्ट्स ऑफ इंटेलिजंस, संबंधित वर्षे

११. सी. पी. पोलीस ॲबस्ट्रॅक्ट्स ऑफ इंटेलिजंस, संबंधित वर्षे

१२. मुंबई सरकार व मध्यप्रांत सरकार, गृह, कायदा, महसूल, शिक्षण व सार्वजनिक बांधकाम विभागांच्या फायली, राज्य सरकारचे अभिलेखागार

१३. नेहरू मेमोरिअल ग्रंथालय व वस्तू संग्रहालय, निवडक फायली, नवी दिल्ली

### (ब) अप्रकाशित खाजगी कागदपत्र –

१. टिळक कागदपत्र, पुणे

२. डॉ. के. के. चौधरी खाजगी संग्रह

३. बी. जी. खेर कागदपत्र, के. के. चौधरी यांच्या संग्रहात

## संदर्भ ग्रंथ सूची

### (क) बाँबे लेजिस्लेटिव्ह कौन्सिल व असेंब्ली डिबेट्स संबंधित वर्षे –

### (ड) वर्तमानपत्रे व नियतकालिके–

| | |
|---|---|
| बाँबे काँग्रेस बुलेटिन | यंग इंडिया |
| बाँबे क्रॉनिकल | हरिजन |
| फ्री प्रेस जर्नल | क्विट इंडिया |
| टाइम्स ऑफ इंडिया | बाँबे सेंटिनेल |
| इकॉनॉमिक अँड पोलिटिकल विकली | हितवाद |
| इलस्ट्रेटेड विकली ऑफ इंडिया | ट्रिब्युन |
| अमृत बझार पत्रिका | मराठा |
| हिंदुस्तान टाइम्स | नाईन्थ ऑगस्ट |
| वॉर ऑफ इंडिपेंडंस | पीपल्स वॉर |
| सलायवतीज न्यूजलेटर | स्टार |
| केसरी | विजयी मराठा |
| नवाकाळ | हिंदु पंच |
| ज्ञानप्रकाश | जागृती |
| सुबोध पत्रिका | प्रबोधन |
| महाराष्ट्र टाइम्स | हंटर |
| लोकसत्ता | संदेश |
| लोकराज्य | दीनमित्र |
| लोकमत | |

**(E) British Government Reports on Freedom Struggle –**

1. History of the Civil Disobedience Movement : 1940-41, Government of India, 1942
2. Congress Responsibility for the Disturbances : 1942-43, Government of India, 1943
3. Some Facts about the Disturbances in India : 1942-43, Government of India, 1943

**(F) English Books –**

Alexander Horace : Gandhi Through Western Eyes, Bombay, 1969

Algernon Rumbolt : Watershade in India : 1914-1922, London, 1979

Andrews C. F. and Mukherji Girija : Rise and Growth of the Congress in India, London, 1938

Azad Abul Kalam : India Wins Freedom, New York, 1960

Bakshi S. R. : Congress and Quit India Movement, New Delhi, 1986

Bamford P. C. : Histories of the Non-Co-operation and Khilafat Movements, Delhi, 1925

Bipan Chandra : Essays on Colonialism, New Delhi, 1999

: Rise and Growth of Economic Nationalism in India, New Delhi, 1984

: Nationalism and Colonialism in Modern India, New Delhi, 1987

: Modern India, New Delhi, 1969

Bipan Chandra and Others : India's Struggle for Independence, 1857-1947, New Delhi, 2011

Bipan Chandra, Amales Tripathi and Barun De : Freedom Struggle, NBT, New Delhi, 2011

Bose N. K. : My Days with Gandhi, Calcutta, 1953

Bose Subhaschandra : Collected Works, Vols. I, II, 1981

: The Indian Struggle : 1920-1942, New York, 1964

Brendon J. A. : Dictionary of British History, Delhi, 1983

Brown Judith M. : Gandhi's Rise to Power : Indian Politics : 1915-1922, Cambridge, 1972,

: Gandhi and Civil Disobedience : The Mahatma in Indian Politics : 1928-34, Cambridge, 1977

: Modern India : Origins of an Asian Democracy, Delhi, 1984

Cashman Richard : The Myth of the Lokamanya : Tilak and Mass Politics in Maharashtra, University of California Press, 1975

## संदर्भ ग्रंथ सूची

Chandavarkar G. L. : A Wrestling Soul : Story of Honourable Sir Pherozeshah Mehta, Allahabad, 1905

Chaudhari K. K. : History of Bombay : Modern Period, Maharashtra Govt., 1987

: Maharashtra and Indian Freedom Struggle, Maharashtra Govt., 1985

: Quit India Revolution : The Ethos of its Central Direction , Mumbai, 1996

: Quit India Movement in Bombay City, Ph. D. Degree Thesis, Bombay University, 1990

Chaudhari K. K. (ed) : Greater Bombay Gazetteer, Vol. I, Vol. II, Vol. III, Maharashtra Govt., 1986, 1987, 1988

: Thana District Gazetteer, Maharashtra Govt., 1982

: Source Material for a History of Freedom Movement : Khilafat Movement, Vol.X, Maharashtra Govt., 1982

: Source Material for a History of Freedom Movement : Civil Disobedience Movement : Part I, Vol.XI, 1990

: Source Material for a History of Freedom Movement : Part -II, Vol.XII, 1995

Chhagla M. C. : Roses in December : An Autobiography, Bombay, 1974

## संदर्भ ग्रंथ सूची

Chopra P. N. (ed.) : Quit India Movement : British Secret Report (Wickenden's Report), New Delhi, 1976

: Quit India Movement : British Secret Documents, New Delhi, 1986

: Secret Papers from British Royal Archives In London, Delhi, 1998

Coupland Reginald : The Cripps Mission, London, 1942

: Indian Politics : 1936-1942, London, 1944

Dandavate Madhu : Yusuf Meherally, New Delhi, 1988

Dange S. A. : Gandhi versus Lenin, Bombay, 1922

: AITUC — Fifty Years, New Delhi, 1973

Desai Sanjeev (ed.) : Calender of the Quit India Movement in Bombay Presidency, Maharashtra Govt., 1985

Dongerkery S. R. : A History of the University of Bombay : 1857-1957, Bombay, 1957

Enthoven R. E. : Castes and Tribes of Bombay State, Vols. 1,2,3 , Delhi, 1975 reprint

Fischer Louis : A Week with Gandhi, London, 1943

## संदर्भ ग्रंथ सूची

: The Life of Mahatma Gandhi, Part I, Part II, Bombay, 1959

: Imperialism Unmasked, Bombay

Francis Gunther : Revolution in India, Allahabad, 1946

Gadgil D. R. : Poona : A Socio-Economic Survey, Vols. I, II, Poona, 1945, 1952.

Gandhi M. K. : An Autobiography, Navjivan Publishing House, Ahmedabad

: Gandhi's Correspondence with the Government, Ahmedabad, 1957

: Political and National Life and Affairs, Vols. I, II, III, edited by V. B. Kher, Navjivan, Ahmedabad, 1967, 1967, 1968

: Social Service, Work and Reform, Vols. I, II, III, edited by V. B. Kher, Navjivan, Ahmedabad, 1976

: Collected Works of Mahatma Gandhi, Vols. 60 to 76, Govt. of India, New Delhi.

Gillian Tindall : City of Gold : The Biography of Bombay, London, 1982

Gokhale G. K. : Speeches and Writings of Gopal Krishna Gokhale, Madras, 1916

Gopal S. : British Policy in India : 1858-1905, Cambridge, 1965

: Jawaharlal Nehru : A Biography, Vol. I, Vol. II, Bombay, 1976

## संदर्भ ग्रंथ सूची


Gopalan A. K. : In the Cause of the People, New Delhi, 1973

Gopalswami K. : Gandhi and Bombay, Bombay, 1969

Gordon A. D. D. : Businessmen and Politics : Rising Nationalism and a Modernising Economy in Bombay : 1918-1933, New Delhi, 1978

Gordon Johnson : Provincial Politics and Indian Nationalism : Bombay and the Indian National Congress : 1880-1915, Cambridge, 1973.

Gupta Manmathnath : History of the Indian Revolutionary Movement, New Delhi, 1972

Hutchins Francis G : India's Revolution : Gandhi and the Quit India Movement, Harvard University, 1973

: Spontaneous Revolution : Quit India Movement, Delhi, 1971

Jayakar M. R. : The Story of My Life, Vol. I, Bombay, 1958

Jayprakash Narayan : Towards Struggle, Bombay, 1946

Joshi P. L.(ed.) : Political Ideas and Leadership in Vidarbha, Nagpur, 1980

Kamalesh Mohan : Militant Nationalism in the Punjab : 1919-1935, New Delhi, 1985

## संदर्भ ग्रंथ सूची

Kamat M. V. and V. B. Kher : The Gentleman Premier, Bombay, 1989

Karnik V. B. : Indian Trade Unions : A Survey, Bombay, 1966

: N. M. Joshi : The Servant of India, Bombay, 1972

: Strikes in India, Bombay, 1967

: M.N. Roy : A Political Biography, 1978

Kerr James Chambell : Political Trouble in India : 1907-1917, Calcutta, 1973

Kher B. G. : The Pageant of Life, Ahmedabad, 1959

Kripalani Krishna : Gandhi : A Life, New Life, 1969

Kunte B. G. (ed.) : Source Material for History of Freedom Movement in India, Vol. VII, 1978; and Vol. III, Mahatma Gandhi in Maharashtra : 1915 to 1946, Maharashtra Govt., 1980.

: Nashik District Gazetteer, 1975

: Aurangabad District Gazetteer

: Dhulia District Gazetteer

: Nagpur District Gazetteer

Lathe A. B. : Memoirs of His Highness Shri Shahu Chhatrapati Maharaja of Kolhapur, Kolhapur, 1924

## संदर्भ ग्रंथ सूची

Majumdar R. C. : History of Freedom Movement in India, Vol. III, 1963

Mansergh Nicholas and Lumby E. W. R. (eds.) : The Transfer of Power : 1942-7, Vo1. I, Vol. II, Vol. III, Vol. IV, Vol. V, Her Majesty's Stationery Office, London, 1970, 1971, 1971, 1973, 1974

Meherally Yusuf : Quit India, Bombay, 1942

: The Price of Liberty, Bombay, 1948

Mishra D.P. (ed.) : History of Freedom Movement in Madhya Pradesh, Nagpur, 1956

Moon Penderel (ed.) : Wavell Archibald : The Viceroy's Journal, Oxford, 1973

Moon Vasant (ed.) : Dr. Babasaheb Ambedkar : Writings and Speeches, Vol. I (1979), Vol. 9 (1990), Vol. 10 (1991), Vol. 13(1994), Maharashtra Govt.

Moore R.J. : Churchill, Cripps and India, Oxford Clarendon Press, 1979

Namboodripad E. M. S. : History of Freedom Struggle, Trivendrum, 1986

Nehru Jawaharlal : An Autobiography, New Delhi, 2001 reprint

: The Discovery of India, New Delhi, 1996 reprint

: Selected Works of Jawaharlal Nehru, editor S. Gopal, New Delhi, relevant volumes

## संदर्भ ग्रंथ सूची

Newman Richard : Workers and Unions in Bombay : 1915-1929, Canberra,1981

Omvedt Gail : Cultural Revolt in a Colonial Society : The Non-Brahman Movement in Western India : 1873-1930, Bombay, 1976

Palande M. R. and Phatak N. R. (eds.) : Source Material for a History of Freedom Movement in India, Vol. II, Bombay Govt., 1958

Pandita Ramabai : The High-Caste Hindu Woman, Maharashtra Govt., 1981

Patel Vallabhbhai : Collected Works of Sardar Vallabhbhai Patel, relevant Volumes.

Payne Robert : Life and Death of Mahatma Gandhi, London, 1969

People's Publishing House : Unmasked Parties and Politics, Bombay, 1940

Phatak N. R. (ed.) : Source Material For a History of Freedom Movement in India, Vol. III, Part I : 1915-1922, Maharashtra Govt., 1965

Prasad Amba : The Indian Revolt of 1942, Delhi, 1958

Pyarelal : Mahatma Gandhi : The Last Phase, Vols. I, II, Ahmedabad, 1956, 1958

Sahai Govind : 42 Rebellion : Review of the Great Upheaval of 1942, Delhi, 1947

Sahani Bhisham : Jallianwala Baugh, New Delhi, 2003.

Sarkar Sumit : Modern India : 1885-1947, New Delhi, 2001 Edition

Sen S. P.(ed.) : Dictionary of National Biography, Vols. I to IV, Calcutta, 1972, 1973, 1974.

Shinde A. B. (ed.) : Parallel Government of Satara : A Phase of Quit India Movement, New Delhi, 1990

Sitaramayya Pattabhi : History of the Indian National Congress, Vol. I, Vol. II, Padma Publications, Bombay, 1946, 1947 edition

Slade Madeleine : The Spirit's Pilgrimage, London, 1960

Srivastav Harindra : Five Stormy Years : Savarkar in London, New Delhi, 1983

Tindall Gillian : The Biography of Bombay, London, 1982

Tope T. K. : Bombay and Congress Movement, Bombay, 1986

Venkatarangaiya M. (ed.) : Freedom Struggle in Andhra Pradesh, Vol. IV, Andhra Govt., 1974

Yajdani J. : The Seventh Nizam : The Fallen Empire, 1985

Hindustan Times : India Unreconciled, New Delhi, 1943 (Proscribed)

Indian Express : India Ravaged, Madras, 1943 (Proscribed)

(ग) **मराठी ग्रंथ —**

करंदीकर अ. ज. : क्रांतिकारक टिळक व त्यांचा काळ, पुणे, १९६९

करंदीकर शि. ल. : सावरकर चरित्र (कथन), पुणे, १९४७

कंटक प्रेमा : सत्याग्रही महाराष्ट्र, पुणे, १९४०

कातगडे पुंडलिकजी : भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील छोडो भारत पर्व, १९७०

कानिटकर मा. ज. (संपा.) : नागपूर प्रांताचा इतिहास : १८८५:१९३५, भाग २

कुलकर्णी पुरुषोत्तम धोंडो : वऱ्हाडची स्वातंत्र्यसेवा : १९२०-१९३५, अकोला, १९३५

कुलकर्णी ल. ग. (कासेगावकर वैद्य) : सातारचे प्रतिसरकार, मुंबई,१९८८

कुलकर्णी वि. ह. : अच्युतराव बळवंत कोल्हटकर : चरित्र आणि वाङ्मय, पुणे, १९७९

कुंटे नाना : वाटचाल, मुंबई, १९८२

केळकर न. चिं. : समग्र केळकर वाङ्मय, खंड ६, पुणे, १९३८

: लोकमान्य टिळक यांचे चरित्र, खंड १ ते ३, पुणे, १९२३, १९२८

: गतगोष्टी अर्थात माझी जीवनयात्रा, पुणे, १९३९

केळकर श्रीपाद : छोडो भारत : १९४२, पुणे, २००३ आवृत्ती

खरात शंकरराव (संपा.) : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे, पुणे, १९६१

खाडिलकर कृ. प्र. : खाडिलकर-स्मरणी, मुंबई, १९४९

खाडिलकर र. के. : गेले ते दिवस, पुणे, १९८०

खापर्डे बा. ग. : दादासाहेब खापर्डे यांचे चरित्र, पुणे, १९६२

खैरमोडे चां. भ. : भीमराव रामजी आंबेडकर चरित्र, खंड ३, १०, ११, मुंबई, १९८९, १९९०

गाडगीळ न. वि. : पथिक, खंड १, पुणे, १९६४

गांधी महात्मा : महात्मा गांधी संकलित वाङ्मय, मराठी भाषांतर, गॅझेटिअर विभाग, महाराष्ट्र शासन, संबंधित खंड

गांधी मोहनचंद करमचंद : आत्मकथा, भाषांतरकार सी. पु. पटवर्धन, अहमदाबाद, २००५ पुनर्मुद्रण

गायकवाड नरेंद्र : मराठवाड्यातील दलित चळवळ आणि हैदराबादचा स्वातंत्र्यसंग्राम, पुणे, १९९०

गोखले द. न. : क्रांतिवीर बाबाराव सावरकर, पुणे, १९७९

घाटे विठ्ठलराव दत्तात्रय : दिवस असे होते, मुंबई, १९६१

घोरपडे बा. बा. : चले जाव आंदोलन, मुंबई, १९८८

चव्हाण यशवंतराव : आत्मचरित्र : कृष्णाकाठ, खंड १, पुणे, १९८४

चव्हाण श. तु. : भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील झुंजार क्रांतिवीर भाई कोतवाल, मुंबई, १९८९

चौधरी के. के. : झुंजार पुणे : ब्रिटिश वसाहतवाद व सामाजिक विषमतेशी लढा, पुणे, २००८

: जळगाव जिल्ह्यातील स्वातंत्र्यलढा, मुंबई, १९९७

: क्रांतिपर्व : महाराष्ट्राचे योगदान, मुंबई, २०१३

चौधरी के. के. (संपा.) : रायगड जिल्हा गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन, १९९३

: परभणी जिल्हा गॅझेटिअर, १९८८

: कोल्हापूर जिल्हा गॅझेटिअर, १९८९

: वर्धा जिल्हा गॅझेटिअर, १९९२

: जळगाव जिल्हा गॅझेटिअर, १९९४

: ठाणे जिल्हा गॅझेटिअर, १९८२

: महाराष्ट्र : भूमि व लोक, राज्य गॅझेटिअर, १९९६

: कुलाबा, रत्नागिरी, सातारा, पुणे (३ खंड), नाशिक, खानदेश, वर्धा इ.ब्रिटिशकालीन गॅझेटिअर ग्रंथांच्या पुनर्मुद्रित आवृत्ती

जोशी न. म. : महाराष्ट्राचे शिल्पकार : महर्षी धोंडो केशव कर्वे, मुंबई, २००७

जोशी एस. एम. : मी – एस. एम., पुणे, १९८४

जोशी वीर वामनराव व अभ्यंकर ना. रा. : राष्ट्रपिता महात्मा गांधी, मुंबई, १९५५

टिकेकर अरुण (संपा.) : शहर पुणे : एका सांस्कृतिक संचिताचा मागोवा, खंड १, २, पुणे, २०००

टिळक देवदत्त नारायण : महाराष्ट्राची तेजस्विनी : पंडिता रमाबाई, नाशिक, १९६०

टिळक बाळ गंगाधर : समग्र लोकमान्य टिळक, खंड ३ ते खंड ७, केसरी संस्था, पुणे, १९७६

ठाकरे केशव सीताराम (प्रबोधनकार) : समग्र वाङ्मय : प्रतापसिंह छत्रपति आणि रंगो बापूजी, महाराष्ट्र शासन, १९९८

: माझी जीवनगाथा, महाराष्ट्र शासन, १९९७

तळवलकर गोविंद : सत्तांतर : १९४७, खंड २, मुंबई, १९८३

दिवाण विजय : महाराष्ट्राचे शिल्पकार : गोविंदभाई श्रॉफ, मुंबई, २००४

देवगिरीकर त्र्यं. र. : वासूकाका जोशी व त्यांचा काळ, पुणे, १९४८

देव शंकरराव : दैव देते पण कर्म नेते, पुणे, १९७६

देशपांडे गंगाधर बाळकृष्ण : माझी जीवनकथा, मुंबई, १९६०

देशपांडे ह. वा. : यावलीचा स्वातंत्र्यसंग्राम : १९४२, नागपूर, १९८८

धर्माधिकारी भा. वि. : वसंतदादा : सातारा, विश्वकर्मा प्रकाशन

: क्रांतिवीर, सातारा, १९९०

नरवडे एस. एस. : डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हैदराबाद संस्थान, पुणे, १९८८

नेहरू जवाहरलाल (ना. ग. गोरे अनुवादक) : आत्मकथा, पुणे, २००१

पंडित नलिनी : महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास, मुंबई, १९५५

पटवर्धन विठ्ठल द. : आलेख संचिताचा, नागपूर, १९८९

परुळेकर गोदावरी : जेव्हा माणूस जागा होतो, मुंबई, १९८२

पाध्ये प्रभाकर व टिकेकर श्री. रा. : आजकालचा महाराष्ट्र, मुंबई, १९३५

पाटील उत्तमराव : क्रांतिपर्व, मुंबई, १९८७

पोतदार वसंत ब. : हैदराबादचा स्वातंत्र्यसंग्राम, मुंबई, १९८४

प्रकाश विश्वासराव : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मुंबई, २००८

प्रधान ग. प्र. : महाराष्ट्राचे शिल्पकार : एस. एम. जोशी, मुंबई, २००१

: ना. ग. गोरे, मुंबई, २००६

प्रधान ग. प्र. व पाटील अनंतराव : पुणे जिल्ह्यातील स्वातंत्र्यलढा, मुंबई, १९९५

फडके य. दि. : लोकमान्य टिळक आणि क्रांतिकारक, पुणे, १९८५

: शाहू छत्रपती आणि लोकमान्य, पुणे, १९८६

: शोध बाळगोपाळांचा, पुणे, १९७७

: शोध सावरकरांचा, पुणे, २०००

: विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड तिसरा, १९९१, ४था, १९९३, खंड पाचवा, २००८

: सेनापती बापट, नवी दिल्ली, २००७

फाटक नरहर रघुनाथ : आदर्श भारतसेवक : गोपाळ कृष्ण गोखले यांचे चरित्र, मुंबई, २०११

: लोकमान्य, मुंबई, २००६ आवृत्ती

: मुंबई नगरी, मौज प्रकाशन, मुंबई, १९८१

बापट सेनापती : समग्र ग्रंथ, खंड दुसरा, महाराष्ट्र शासन, १९७७

बिवलकर राम : नाना पुरोहित, मुंबई, १९७४

भट वि. म. : अभिनव भारत अथवा सावरकरांची क्रांतिकारक गुप्त संस्था, १९५०

भालेराव अनंत : पेटलेले दिवस, पुणे, १९८५

: हैदराबादचा स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा, मुंबई, २०१२ आवृत्ती

भुस्कुटे वि. म. : मुळशी सत्याग्रह, पुणे, १९६८

मंगळवेढेकर राजा : महाराष्ट्राचे शिल्पकार : साने गुरुजी, मुंबई, २००२

: स्वातंत्र्यलढ्यातील तरुणाई, मुंबई, १९९२

महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस समिती : कायदेभंगाचा इतिहास, पुणे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ, मुंबई, २००६

माडीवाले वि. स. : अशी ही बिकट वाट, पुणे, १९७२

मेदककर प्रकाश : स्वामी रामानंद तीर्थ, मुंबई, २००३

मोने नाना : मुंबई : राज ते स्वराज, मुंबई

रामानंद तीर्थ : हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामाच्या आठवणी, मुंबई, १९७६

लेले रा. के. : मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, पुणे, १९८४

लाड जी. डी. : पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य, पुणे, १९८६

लिमये शिरुभाऊ : निवडुंगाची बोंडे, पुणे, साधना, १९९३

शिंदे विठ्ठल रामजी : माझ्या आठवणी व अनुभव, १९४०

: धर्म, जीवन व तत्त्वज्ञान, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९७९

सन्याल शचिंद्रनाथ : बंदी जीवन (हिंदी), १९६३

सन्याल जितेंद्रनाथ : सरदार भगतसिंग, १९८३

सावरकर वि. दा. : माझी जन्मठेप, मुंबई, १९९४ आवृत्ती

: शत्रूच्या शिबिरात, मुंबई, २००० आवृत्ती

सिंग जगमोहन, चमनलाल (संपा.) : भगतसिंग और उनके साथीयों के दस्तावेज, नई दिल्ली, १९८६

सुरवाडे विजय (संपा.) : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची निवडक भाषणे, भाग पहिला, मुंबई, २००२

श्रीवास्तव रामलाल : हुतात्मा कोतवाल : स्वातंत्र्य संग्रामातील एक पर्व, नेरळ, १९७५.

❑❑

अकरा कलमी सनद . . ४११-१३
अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ . . ६५९
अखिल भारतीय खादी व ग्रामोद्योग मंडळ . . ८५०
अखिल भारतीय चरखा संघ . . ८५०
अगरवाल श्रीमन् नारायण . . १०१६
अजितसिंग . . ३७५, ७०४
अडवाणी दुर्गादास . . १३०
अणे माधव श्रीहरी . . ४८, ४९, ५२, ९९, २५०, २८३, ५७०, ६९१, १०२५, १०२८.
अधिकारी गंगाधर . . ३६४
अधिकारी जगन्नाथ मोरेश्वर . . ४०२
अन्सारी मुख्तार अहमद . . ११, १२, ७१, २४३, ४२७
अबिदअली जाफरभाई . . १४९, १५२, ४२०, ८४२, ८५२, ९६५
अभ्यंकर मोरेश्वर . . १५३, २५०, २७४, ५६२, ५६३
अमतुल सलाम . . ८०४, ८९५
अमेरी, भारत मंत्री . . ७९८, ८३५, ८६३, १००७
अमृतसर काँग्रेस, महत्त्व . . ४१
अय्यंगार कस्तुरीरंग . . ४७, ७०, २४३
अय्यंगार रंगास्वामी . . १३१, २५१
अय्यंगार एच. व्ही. आर. . . ९६९, ९७३
अरुणा असफ अली . . ८८६, ८९३, ९४७, ९६६-६७, ९६९-७०,१०४२, १०४४, १०६०
अल्लाबक्ष . . ७९५
अलेक्झांडर होरॅस . . ८४६
अशफाकऊल्ला, क्रांतिकारक . . ३८१
असफ अली, बॅ . . ६६, ८५१, १०५७
असहकार चळवळ, यशापयश . . ७६, ७७, ११२, ११७-२०

असहकार चळवळ, विरोधक . . १०६
असहयोगाश्रम . . ९७
अली यावर जंग . . ७४८-४९, १०८८, १०९०
अत्रे प्र. के. . . ९९४
ॲटली क्लेमन्ट . . २७८, ८३४-३५, ८४८, १०५५, १०६०, १०७३
आगरकर यशोदाबाई . . ४६९
आझाद अबुल कलाम, मौलाना . . ९१, ८४२, ८५२, ८८४, १०५९
आझाद चंद्रशेखर . . ९२, २९०, २९५, २९८, ३०४, ३०५, ३०८, ३१०, ३७४, ४८३
आझाद पृथ्वीसिंग, क्रांतिकारक . . ७२७
आठवले नारायण . . ९१२, ९१५
आर्थिक महामंदी . . ५१०-१४, ३५१, ६४८
आर्थिक राष्ट्रवाद . . ८६-८७, ५३५-३९
आंदर व्हॅली पॉवर कंपनी . . १३७
आनंद भवन . . ४२६
आंबेडकर भिमराव रामजी . . १८९, २८५, २८८, २९६, ३४३, ५०४, ५८५, ५८७, ५८८, ६०१-०७, ६१९, ६२२, ६२६-२८, ६३१-३४, ६३८, ६४०, ६८०, ६८३-८४, ७२२, ८४०, ९४२, ९६४, १०१२, १०६७.
आपटे अच्युत . . ९१६
आवारी मंचरशा . . १४८, १५२, १५४
आयर्विन, व्हाइसरॉय . . ४२२, ४२७, ४७९, ४८०
आर्यसमाज, स्वातंत्र्य लढा . . ७३४, ७५९, ७६०, ७६२-६६
आर्यनायकमजी . . १०१६
आयसेन होअर, भारताविषयी . . ८३४
आसवले आर. एस. . . ३३४
आळेकर वसंत . . ९१३
इक्बाल . . ८०२

इंग्रजांचे समर्थक . . ९४२-४३
इंडिपेंडंस ऑफ इंडिया लीग . . २८३, ३७८
इंडियन मर्चन्टस् चेंबर . . ५४५
इंडियन पीपल्स थिएटर . . ४००
इंग्रज-मुसलमान सलोखा . . ५२४
इत्तेहादूल मुस्लीमीन . . ७४०, ७६८
उधमसिंग, क्रांतिकारक . . ३६, ७२४
उपाध्ये वसंत . . ९२०
उमक भानुराव . . १०१६
एडवर्ड आठवे . . ६९२
एम्प्रेस मिल, सत्याग्रह . . ३४६
ओक एल. के. . . ३६४
ओक पु. ना. . . १०५८
ओक रावसाहेब . . ९२०
ओक वाय. आर. . . १०११
ओडवायर मायकेल . . ७, १९, २१, २६, ३०, ३२, ३४, ३५
औद्योगिक न्यायालय, देशातील पहिले . . ७०८
औरंगपुरे राजाराम, हुतात्मा . . १००९
कचरू द्वारकानाथ . . ९६७
कचरे बापूराव . . ९८३
कच्छी हलाई लोहाना संघ . . ८६७
कर्झन . . ७१५, ७३९
कंटक प्रेमाबाई . . ६७२
कडाकिया शशिकांत . . ९६३
कर्णिक द्वारकानाथ भ. . . ६५१, ६७२, ८०७
कर्णिक भास्कर, हुतात्मा . . ९१२, ९१५, ९४८
कर्णिक वसंतराव भ. . . ३५२, ३५३, ३६४, ३६५, ५८१, ६५१, ६७२, ७०८, ८०७.

कत्रे भूपाल . . ९९७
कद्रेकर भा. र. . . ६०१
कन्नमवार मा. सां. . . १०६९
कन्याकुमारी मंदिर प्रवेश . . ६१४
कम्युनिस्ट व काँग्रेस . . ३२३-२६, ३३६-३७, ३८८
कम्युनिस्ट, छोडो भारतविरोधी . . ८७२
करमरकर डी. पी. . . ९७४
करंदीकर ज. स. . . १४०, १४३
करंदीकर रघुनाथ पांडुरंग . . २५०, ७८६
करंदीकर विंदा . . ७६२
करंदीकर शि. ल. . . ७५१
कराडकर आर. जी. . . ७८१
करिमभाई इब्राहिम . . ८०४
कर्वे धोंडो केशव . . १८५, ७३६
कल्लप्पा व्ही. आर. . . ३४८, १०६९, १०७०
कविशर शार्दूलसिंग . . २८९
कळमकर आनंदराव . . ९९९
काकडे कृष्णा . . ९९९
काकिनाडा काँग्रेस . . ३६९
कांचिपुरम मंदिर प्रवेश . . ६१५
कांजी द्वारकादास . . ३३२
काझी सय्यद करीमुद्दीन . . १०७०
कांडलकर राजाराम . . १००८
कातगडे नारायण त. . . २४
कातगडे पुंडलिकजी . . ९२३
कानडे दिनकरशास्त्री . . ८९७, १०६९
कानपूर कट खटला . . ३२४, ३२५, ३२७
कानिटकर गजानन नारायण . . २४, १४१, १४२, १४३, १६०, ४०९, ५४९, ५५१

कानिटकर काशीबाई . . १८५
कानुनगो हेमचंद्र दास . . १३०
कानेटकर एम. जे. . . ६९, ९८
काबरा शंकर . . ६७३
कांबळे शिवरामपंत . . ५७९
कामगार कायदे व युनियन . . ३४०-४२
कामगार चळवळीत फूट . . ३४२
कामगार व शेतकरी पक्ष . . ३३१
कामत बाळकृष्ण सीताराम . . १५५
कामथ हरीभाऊ वि. . . ७१९, ९७४, १०७०
कामदार रामीबाई . . ४३०
कामराज के. . . ४९१
कायदेभंग चळवळ . . ४२२, ५२१, ५७१-७२
कायदेमंडळाची निवडणूक . . ६९१-९४
कारखानीस कुसुम . . ९०५
कारागृहांमध्ये अत्याचार . . ५४६-४७
कारा मणिबेन . . ३५२, ३५३, ३६५, ३९७
कालेलकर दत्तात्रय बाळकृष्ण . . १३, २४, १६२, ८९१, १०१६
कावसजी जहांगिर . . ६९६-९७, ९४२
काश्मिरी श्यामनारायण . . ९९९, १००४
काशी विद्यापीठ . . ६५
काळभोर गंगाजी . . ५०, २१६
काळाराम मंदिर व असहकार लढा . . ६०१-०५
काळे अनसूयाबाई . . २६२
काळे गोपाळराव . . १०१४, १०१६
काळे या. मा. . . २७४
कॅप्टन पेरिन . . ४२१, ५३४

काँग्रेस पक्ष घटना . . ७२-७३
काँग्रेस मंत्री, आचारसंहिता . . ७००-०१
काँग्रेस रेडिओ, १९३२ . . ५४३
काँग्रेस रेडिओ, १९४२-४४ . . ९५३-६१
काँग्रेस सत्याग्रह समिती . . ७४९-५२
काँग्रेस समाजवादी पक्ष . . ६५१-५२, ६७७
किर्लोस्कर लक्ष्मणराव . . ७८६
क्रिप्स स्टॅफर्ड, योजना . . ७९६, ८१६, ८२६, ८३६, ८४१-४२
किसन वीर . . ९२३, ९८३
किसान सभा . . ६६
कुंझरू हृदयनाथ . . ६४०, ८५१
कुंटे द. का. . . ५५१, ७८३, ९२८, १०६६, १०६७
कुंटे प्रभाकर . . १०६२
कुर्बान हुसेन, हुतात्मा . . २३६, ४४१, ४९५
कुंभार रत्नाप्पा . . ७७८, ७७९, ९४९, ९९५, ९९६
कुमारप्पा जे. सी. . . ८९६, ९६४, ९९९, १०१६
कुऱ्हाडे कृष्णा रामा . . ९८०
कुलकर्णी अनंतराव . . ७४२
कुलकर्णी केदारनाथ अप्पाजी . . २४
कुलकर्णी त्र्यंबक शंकर . . ९१४
कुलकर्णी दामोदर दिनकर व साथी . . ९०८
कुलकर्णी बिंदुनारायण . . ९९५
कुलकर्णी माधव . . ९४९
कुलकर्णी यशवंत. . ९२५
कुलकर्णी ल. ग. . . ९७९, ९८३
कुलकर्णी लालजी . . ९१२, ९१५
कुलकर्णी विनायक . . ८२५, ९११

कुलकर्णी सोनोपंत रामचंद्र . . १७९
कुलकर्णी हरिहर, कवी कुंजविहारी . . १४२
कृपलानी गिरीधर . . ९५५
कृपलानी जे. बी. . . ९२, ८५०, ८८४
कृपलानी सुचेता . . ८९३, ९६६, ९६८, ९६९, १०९१
कृषी अर्थव्यवस्थेचा ठराव . . ६७८
केतकर ग. वि. . . ७५१, ७६१
केदार तुकाराम ज. . . २७३, ७७१
केलप्पन के. . . ४९१, ५९६
केसकर बाळकृष्ण . . ९६७, ९६८
केसरी . . २२०-२१
केळकर न. चिं. . . ४३, ४७, ४८, ५६, ५७, ७३, ८३, ९०, १३७, १३८, १३९, १४५, १५२, २४६, २४७, २५०, २७७, ४१३
केळकर, सत्तासंघर्ष . . २४६-४७ ; काँग्रेसमधून उच्चाटन ४९४ ; विरोधात ५५०
कोकाटे तुकाराम . . १०५८
कोठारी वा. रा. . . २१४, २१५
कोतवाल मनोहर . . ८४३
कोतवाल विठ्ठल लक्ष्मण (भाई) . . ९२८, ९३०-३४
कोटेचा हिरालाल . . ७७४
कोरटकर केशवराव . . ७३५
कोलते वि. भि. . . १८४, १९०
कोलव्हिल जॉन . . १०९४
कोल्हटकर अच्युत बळवंत . . २५, ५७
कोसंबी धर्मानंद . . २३४
कोहटचा उद्रेक . . २५५
कौर राजकुमारी अमृत . . १०७०
खन्ना जुगल किशोर . . ९६६-६७

खराडे रेवण सिद्धाप्पा . . ९२०
खरे ग. ह. . . १४७
खरे नारायण भास्कर . . १५३, २६१, २७३, २७४, ३४८, ५६३, ७००, १००३
खरे मंत्रिमंडळ . . ७११-१२
खरे हिंदुमहासभेत . . ७१३
खरे ल. ग. . . १३, २०, १०८
खाकर विठ्ठलदास . . ९५३, ९५५, ९५६, ९५९
खांडपासोळे यादवराव . . १०१०
खाडिलकर कृष्णाजी प्रभाकर . . १, १३, ५६, २४७, ४२१
खांडेकर हेमचंद्र ज. . . १०७०
खान अब्दुल गफारखान . . ६४, ४२३-२४, ५२१, ६४६, ६६८, ६७७, ८५०
खान अली बहादूर . . ४२०
खानखोजे पांडुरंग सदाशिव . . ७०४
खापर्डे गणेश श्रीधर . . १४, १६, १७, ३७, ४७, ४८, ५२, ७०
खापर्डे बा. ग. . . २७२, २७४
खिलाफत चळवळ . . ४२, ४५, १११
खुदाई खिदमदगारांचा लढा . . ४२३-२४, ५००
खेडकर गोपाळराव . . १०६८, १०६९
खेदगीकर आर. ए. . . ४०३
खेर बाळ गंगाधर . . ३८, १५९, २८१, ४०३, ६१७, ६९७, ७००, ७०९-१०, ७२१, ८२४, ८४९, ८५२, ८८४, १०४५, १०६७, १०९३
खोत गोविंदराव . . ९८०, ९८१
खोमणे राधा किसन . . ९१८
गंगनाथ विद्यालय . . ९७
गद्रे सदूभाऊ . . १०१६
गधर क्रांतिकारक . . १२
गरूड विमल . . ९०५

गवई गणेश आकाजी . . २१४, ५७९
गाडगीळ आनंदीबाई . . ६७२
गाडगीळ नरहर विठ्ठल . . १३, ३८, ९५, १४५, २२८, २३७, ४०५, ४०९, ४९४, ५४९, ५५१, ६९१, ८९७, ९००, ९०३, १०४४, १०४५, १०५६, १०६४
गाडगीळ पां. वा. . . १४३
गांधी इंदिरा . . ८८४
गांधी कस्तुरबा . . ९६१, १०९४
गांधी देवदास . . ९६६
गांधी मणिलाल, धारासणा सत्याग्रह . . ४३६
गांधी मोहनदास करमचंद . . १-६, ११, १७, २२-२३, ३७, ३९, ४१-४९, ६३-६५, ६८, ७०, ७२-७३, ७७-७८, ९५-९७, ९९-१००, १०३, ११०, ११२, ११४, १६१, २०३, २०६, २०७, २२७-२८, २४२, ४०५, ४०९, ४११-१६, ४३३-३७, ४८०-८२, ४९१-९४, ५०४-०७, ५२२-२९, ५५१, ५८८, ६३८, ६५०, ६६०, ६७१, ६७५, ६९७-९८, ७००-०१, ७३०-३१, ७३७-३८, ७४१, ७४६, ७५४, ७५६-५९, ७७२-७४, ७८०, ७८३, ७८६, ७८७, ७८९, ८०४, ८०७, ८०८, ८२०, ८२१, ८२४, ८२७, ८३३, ८४२, ८४६-५२, ८५९-६६, ८६९-७१, ८७३-८५, ८९१-९४, ९५४, ९६०, ९६६, ९७०, ९९३, ९९७, १०१२, १०३५, १०३८, १०४४, १०५२-५४, १०६०, १०६३, १०६९, १०७०, १०९०, १०९१.
गांधी, असहकार चळवळीचे यश . . ९५-१०४
गांधी, आर्थिक राष्ट्रवाद . . १००-०५, ११३, १२४-२७
गांधी-आयर्विन कराराचे उल्लंघन . . ४९९-५०२
गांधीजींची उपोषणे . . ६४०-४२, ६४५-४६, ९७०-७४
गांधी-कम्युनिस्ट संबंध . . ३२७
गांधीजी कॉंग्रेसबाहेर . . ६५९
गांधीजी धर्मबदलाविरूद्ध . . ६२०

गांधीजी, भगतसिंगांना वाचवण्याचे प्रयत्न . . ३०६, ४८२, ४८४-८५
गांधीजींची हत्या . . ६५५-५७, १०८५
गांधीजी, हरिजन दौरा . . ६०७–१६
गांधी संकलित साहित्य . . ६५०
गानू लक्ष्मण . . ७३५
गायकवाड भाऊराव . . ६८५
गायकवाड सयाजीराव . . ४३, १६६-६९, १८६-८७, १९४, १९९, २०७, २१७, ५७७.
गायकवाड भाऊराव कृष्ण . . ६०१
गायरोळा के. एन. . . ९६०
गावंडे वामनराव . . १००६
गुजर राजाराम . . ७८२
गुजरात विद्यापीठ . . ६५, ६४६
गुंजाळ नारायणराव . . २१७
गुप्ते चिंतामणी . . ९१३
गुप्ते बी. एम. . . ७०२, ९००
गुरुवायुर मंदिरप्रवेश . . ६०९, ६१०, ६१५
गोखले अच्युत . . ३२०
गोखले अवंतिका . . १३, २०, २४, ७९, ३२०, ४२०, ४२१, ४२९
गोखले गोदावरी . . ३६४
गोखले बबनराव . . १३, १४
गिडवाणी चोइतराम . . २८२
गिरणी कामगार संप (१९२८) . . ३८९-९०
गिरी व्ही. व्ही. . . ३४८
गिल्डर (डॉ.) . . ७०१, ८५२, ८७८ ८९५, ९६४, ९६६, १०६७
गिलानी हाजी जावर . . ९६४
गोखले गोपाळ कृष्ण . . २, १६५, ५७८

गोखले दि. वि. . . ७८३
गोखले पु. पां. . . १०६६
गोखले संभाजीराव . . ७१३, १०६९
गोगटे वासुदेव बळवंत . . ४९५-९८
गोडसे नथुराम . . ७५१, ७६१, १०८५
गोदरेज ए. बी. . . ७७
गोपालन ए. के. . . ४९१, ५९६
गोपालस्वामी जी. . . ८४९
गोरे केशव (बंडू) . . ६५४, ८२१, ८२५, ८४३
गोरे ना. ग. . . ५५१, ६५२, ७२६, ९१०
गोलमेज परिषदा . . पहिली ५०१, दुसरी ५०२-०६, ५२१, ५२२
गोसावी माधव आर. . . ८६
गोळे पुरुषोत्तम बळवंत . . ९९, १५३, ७३८
घटवाई नीळकंठ . . ६९, ९८
घार्गे गौरीहर . . ९८१
घार्गे परशुराम . . ९८३
घाटगे रामचंद्र . . १७८
घाटगे सुभेदार . . ५९०, ६०१
घाटे बळवंत . . ९१८
घारपुरे दत्तोपंत . . १४०
घारपुरे डी. आर. . . ४२०
घोरफडे बाबुराव . . ९८३
घोष अजय . . ३६४, ४००
घोष प्रफुल्ल . . ८५०
घोष बारींद्रकुमार . . १३०
घोष शांति . . ४९१, ५००
चर्चिल विंस्टन . . ५७०, ७७६, ७९६, ७९८, ८३३-३४, ८३९, ८५९

चट्टोपाध्याय अघोरनाथ . . ७३५
चट्टोपाध्याय कमलादेवी . . ४२०, ४२१, ४२९, ४६८, ५०९, ५३४, ८५३
चट्टोपाध्याय विरेंद्रनाथ . . ३२६, ७३५
चतुर्वेदी माखनलाल . . १५०
चंदावरकर नारायण गणेश . . ४३, ६७, ७५, १८३, १८६, १८७.
चवदार तळे सत्याग्रह . . ५८६-९०
चव्हाण देवरामजी . . ७७४
चव्हाण यशवंतराव ब. . . ६४९, ८९८, ९२३, ९७९, ९८१, ९८३, ९८४-८५, १०६६.
चव्हाण यशवंत (कोल्हापूर) . . ९९५
चॅटर्जी मिहीरलाल . . ९६७
चांदवडकर . . १३०
चापेकर ना. गो. . . ७८६
चार्लस चापलिन . . ६४०
चिकोडी पंडितप्पा . . २१६
चितळे विष्णुपंत . . ६७२, ९०६
चित्रे अनंत . . ५८१, ५८२, ५८७, ५८८, ५९०
चिटणवीस गंगाधर . . ५२, २५१
चिटणवीस एस. एम. . . ५२, २५२
चिदंबरम् मंदिर प्रवेश . . ६१५
चिनाई बाबुभाई . . ८५२
चिमूरमधील अत्याचार . . १०२२-२४
चिरनेरचा लढा . . ४४६-५०
चुंद्रीगर इस्माईल . . ५१५, ८०४
चेम्सफर्ड, व्हाइसरॉय . . ६, ७, ३१, ३२, ३४, ३५
चोप्रा जगत नारायण . . ८९३
चौगुले अण्णाप्पा . . २१६
चौधरी अन्नादा . . ९५३, ९६७, १०४४

चौधरी धनाजी नाना . . १६०, ५५६, ६६९, ६७२, ६७३, ८२५, ९३६, १०६६
चौधरी मोतीराम ओंकार . . ८२५
चौधरी, मेजर जनरल . . १०८९
चौधरी रहिमत अली . . ८०२
चौधरी लक्ष्मण गणपत . . ९३६, ९४०
चौधरी सरला रानी . . ७३६
चौधरी सुनीती . . ४९१, ५००
चौधरी सीताराम भाऊजी . . ४४३, ६७२
चौरी चौरा प्रकरण . . ९०-९१
चौहान देवीसिंग . . ७४२, १०७९
छन्नूसिंग . . ९२१
छागला एम. सी. (न्या) . . २०८, ८०३, ८०४
छोटानी मिया महंमद . . ३८, ९०
जकातदार शरद . . ९३०
जंग अली यावर . . ७४८-४९, १०८८, १०९०
जंग बहादूर यार . . १०७२, १०७३
जंगल सत्याग्रह . . ४५४-५९, ५६५
जमनादास द्वारकादास . . १३, २०, ३८, १८७
जयकर मुकुंद रामराव . . २, ४६, ४९, ७९, ८३, ८६, ९०, १०२, १८७, २४७, ७३६, ८४१, ८६८.
जयकर-मुंजे प्रभावहीन . . २९५
जयकरांचा मोतीलालजींशी संघर्ष . . २६६
जयप्रकाश नारायण . . ३९७, ६५०-५१, ८६६, ९५४, ९६७, ९६९, १०६४, १०७४
जयरामदास दौलतराम . . ९२, २८२, ८८४
जवळकर दिनकरराव . . २१४, २१८, २३५, २३६, ५५२

जव्हेरी चंद्रकांत . . ९५३
जव्हेरी विठ्ठल . . ९५३, ९५६
जस्टिस पार्टी . . २०९, २१०
जहागिरदार आर. ए. . . ८९०
जमायत-उल-उलेमा-इ-हिंद, जिनाविरोधी . . ८०४
जाजू श्रीकृष्णदास . . ५६६, १०१६
जाधव तुलसीदास . . ४३७, ९२१
जाधव काशिनाथ . . २१७
जाधव खासेराव . . २१७
जाधव पांडुरंग . . ५०, २१६
जाधव बाबुराव . . ९९७
जाधव भास्कर . . १७१, १७४, १८६, २१२, २१५, २३४, २८०
जाधव माधवराव . . ९८३
जांभेकर आर. एम. . . ३६४
जालियनवाला हत्याकांड . . २८-३२, १४८-४९
जावडेकर शंकरराव . . ५८, ३८२, ६५४, ८९८
जॉर्ज जोसेफ . . १५०
जॉर्ज पाचवे . . ३५-३६, ४७९
जॉर्ज लॉयड . . १२०
जॉर्ज सहावे . . १०९१
जॉर्ज स्लोकोंब . . ४३१, ४३२
जिनवाला . . ३१९
जिना महंमद अली . . २, १६, ४३, ४९, ६९, ७०-७९, ७४, २०३, २५८, २८०, २८१, ३२०, ५०४, ५१४, ५१५, ५१७, ६६३, ६६४, ७९५, ७९६, ८०१-०४, ८११, ८३६, ८३९, ८४१, ८४८, ८५२, ९४२, १०४८-५०, १०७२, १०८८, १०८९, १०९२
जिना रतन . . ६९, ७०, ७१, ५१४, ८०३

जेठमल परसराम . . १३०
जेधे केशव मारुती . . १००, २१६, २१८, २३४, २३६, २३७, २३८, २३९, २८०, ३८३, ५४९, ५५१, ५७९, ६९१, ७७८, ८२५, ९००, १०६४
जेधे बाबुराव . . २१६, २३५
जेन्किन्स ई. एम. . . १०३५
जेराजनी विठ्ठलदास . . १५०
जोग विमल . . ५६७
जोगळेकर केशव . . ६०, ९९, ३६४, ३७१, ३८१, ४०३, ४०५, ८११
जोगळेकर निळकंठ . . ३८
जोशी जी. एन. . . १२६, ९४६, १०३३
जोशी दुर्गा . . ५६८
जोशी नारायण मल्हार . . २५०, २८३, ३१६, ३१९, ३२०, ३२८, ३३४, ३४८, ८११, ८१४-१७, ९४२
जोशी पी. सी. (कम्युनिस्ट) . . ३६४, ४००, ७१८, ८१०, ८१८, ८४८, ९६७, १०५२-५५
जोशी मोरोपंत . . ५२, १५०
जोशी लक्ष्मणशास्त्री . . १६०, ५५१, ६५१
जोशी वामनराव . . ६८, ९८, १३०, १५३, १०६९
जोशी वासूकाका . . ५६, १४२, १४३, १४४, १५०
जोशी वासुदेव . . ७८०
जोशी एस. एम. . . २३४, ४९४, ५५१, ६५२, ६७२, ८२१, ८४३, ९१०, ९११, ९२३, ९६७
जोसेफ बॅप्टिस्टा . . ३१९
झुणझुणवाला पुरषोत्तम . . ५६८
झेटलंड कागदपत्र . . ८०२
टंडन पुरषोत्तमदास . . ९१, १५०
ट्वायनॅम हेन्री . . १०००, १०१२-१४

टागोर रवींद्रनाथ . . ३७, ९६, ६४२
टाटनहॅम रिचर्ड . . १०३४
टाटा जमशेटजी . . १३५
टाटा पॉवर कंपनी . . १३६
टाटा रतन दोराबजी . . १३७-३८
टिपणीस कमलाकर . . ५८२
टिपणीस सुरबानाना . . ५८१, ५९०
टिपणीस सुरेंद्रनाथ . . ५८२, ५८८
टिळक बाळ गंगाधर . . २, २५, ४३, ४४, ४६, १६९, १८८, ३१३-१४, ३७७
टिळक पर्वाचा अस्त . . ३७, ३८
टिळकभक्त . . ११६, २७७, ९०३
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ . . ५८, ९७, ५५३
टिळक श्रीधर . . ५८३-८४
ट्रिबून पत्रक . . ९४५
टेकावले नथू दौलत . . ९२९
ठक्कर अमृतलाल ऊर्फ ठक्कर बाप्पा . . २०५, ६०९, ६३०, ६३१, ६४०
ठकार शंकरराव . . ६७३
ठाकरसी हंसराज प्रागजी . . १३, २०
ठाकरे केशव सीताराम . . १७२, १७६, १९९-२०३, २१४, २१६, २२०, २३६
ठाकूर जगन्नाथ . . ९५५
ठुसे लक्ष्मीबाई . . ९०५
ठेंगडी धुंडीराजपंत . . ६०, ३२३, ३४७, ३८०, ८११
डागा शेठ शिवदास . . १०५६
डांगे उषा . . ३४२, ३४५, ३६४
डांगे श्रीपाद अमृत . . ३८, ५३, ६०, ७९, ९२, ९५, ९९, १०८, ३२२-२३, ३२५, ३२८, ३२९, ३३४, ३३७, ३५२, ३५६, ३६०, ३८१, ३९१, ३९४, ६७२, ८०९-११, १०५३, १०५६

डावरे वि. ब. . . ७५१
डायरचा खूनशीपणा . . २७-३३
डिसूझा जे. ए. . . १०६५
डोंगरे महादेव . . १७२, २१५, ९१४
ढवण जगन्नाथ . . ८२६
तडस तुळशीराम . . १००९
तरूण मराठा . . २१३
तलाठी गोपाळदास . . १४९
तळपदे केशव शामराव . . ८५२, ९४६, ९७४, १०३३
तांबट दत्तोबा . . ९४९
तांबट भास्कर . . ९३०
तांबे रमा . . १०२४
तांबे श्री. ब. . . २५३, २५९-६१, २७३
तालचेरकर हरिश्चंद्र . . ३१५, ३१९
तावडे एस. आर. . . ३६४
तुकडोजी महाराज . . ९९९-१०००, १००५-०६, १०११, १०१७, १०२१
तुळजापूरकर दत्तो अप्पाजी . . ७३५
तुळपुळे किसन . . ९१३
तुळपुळे ह. वि. . . ५४९, ९०६, १०५६
तिजारे अप्पासाहेब . . ५६३
तिडके नरेंद्र . . ९९९
तिनवेल्ली मंदिर प्रवेश . . ६१५
तिरुपती मंदिर प्रवेश . . ६१५
त्रिमंत्री योजना . . ७९०
तेजा सिंग, गधर क्रांतिकारक . . ३२६
तेरसी लक्ष्मीदास . . १३, २०
तेलंग गणपत . . ९१२, ९१५

तेलंग पंढरीनाथ काशीनाथ . . १३, २०

तेलशिंगे शंकर . . ७८१

तोष्णीवाल बन्सीलाल . . १०८४

थत्ते मालती . . ५६७

थत्ते श्रीधर हरी . . ५६६

दत्त बटुकेश्वर . . ३०१-०२

दत्त भूपेंद्रनाथ . . ३२६

दयाराम गिडुमल . . १८५

दलित नेते, आंबेडकरविरोधी . . ६२३

दलित नेते, काँग्रेस समर्थक . . ६२३

दलितांमधील घरभेदे . . ६२४

दस्तूर कूमी . . ९५९

दवणे दत्तात्रय . . ९३०

दवे रोहित . . ९६४

दांडी मोर्चा . . ४१२-१६

दांडेकर कमलाकर . . ९२९

दांडेकर गो. नी. . . ७६२

दांडेकर व्ही. व्ही. . . ९२२

दांडेकर विनायक सखाराम . . ९८, ८६४, ९९९, १००२

दाणी गणपतराव . . १०५६

दाणी सावळाराम . . ६०१

दाते प. रा. . . ८२६

दाते वसंत बळवंत . . ९२९

दानी जयनारायण इंदुमल . . ७७

दाभाडे नारायण, हुतात्मा . . ९०१

दामले सीताराम केशव . . १४२, १४३

दास्ताने वासुदेव वि. . . ३८, ५४, ८६, ९२, १४१-४३, ५५६, ६६९, ६७३, ८२५, ९३६
दास चित्तरंजन . . ५, ३२, ३३, ४३, ४७, ६४, ६५, ७०, ८३, ८६, १११, २४२, २४३, २४७, २५९.
दास जतिंद्रनाथ . . २९५, ३०२, ४०६
दास वासंतीदेवी . . २९०
दिवाकर रंगराव . . २९०, ८९५, ९२३, ९६७, १०४४, १०७५
दिवाण कुंदर . . १०१६
दिवाण चमनलाल . . ३४८
दिवाण मनोहर . . ९९, ५६६, १०२९
दिवाण राघवेंद्र . . ७५६
दिवाण सुशीला . . ७४०
दिवेकर शास्त्री . . ७८१
दीनमित्र . . १७१, २१३
दीक्षित उमाशंकर . . ९५५, ९६४
देवकीनंदन नारायण . . ३८, ५४, १५९, ५४९, ८२५, ९३६
देवगिरीकर त्र्यंबकराव . . ५४, १५९, ५४९, ५५१, १०४४, १०६४
देवधर गोपाळ कृष्ण . . १८५, २०३
देव शंकरराव . . १३, २४, ३८, ५४, ५६, ७०, ८२, ९२, ९५, १३६, १३९, १४२-४५, १४७-४८, १५९, २२८, २४३, २४७, ४०९, ५४९, ५५१, ६६४, ६६८-७०, ६७३, ६९१, ७४९, ७७८-८१, ७८४, ८४२, ८४५, ८५०, ८६४, ८८५, ८९१, ८९७, ९००, ९०३, ९७९, १०४४, १०६४, १०६६, १०७५
देव नरेंद्र . . ६५३, ८४२, ८६८-६९, १०३५
देवू गणपत . . ८९६
देशपांडे अच्युत . . ७४२, ७७४

देशपांडे केशव . . १३, २४
देशपांडे गंगाधरराव . . २४, ५४, ५६, ९२, १५९, १६१, १६२, २४७, ३७०, ५४९, ७७८, ८९८
देशपांडे गो. आ. . . ५४९, ५५१, ६७३, ८६४, ८९७, ८९८, ९००
देशपांडे पु. य. . . ५६९
देशपांडे बा. र. . . ९३६
देशपांडे माधव . . ६७३
देशपांडे लखू . . ९१३
देशपांडे व्ही. डी. . . ७९१
देशपांडे शं. वा. . . ७९
देशपांडे एस. व्ही. . . ३४८, ३६४
देशपांडे हरिहरराव . . ५६९
देशमुख अवचित . . ९४०, ९४१
देशमुख काशीनाथ राजाराम . . ९७९
देशमुख गोपाळराव . . १०५६
देशमुख दत्ता . . ९०२, ९०६, १०६६
देशमुख नीळकंठराव . . ९८, १४९, १५२
देशमुख पंजाबराव . . १०६८, १०७०
देशमुख रामराव . . २१७
देश सेविका संघ . . ४२९-३०, ४३१, ४६८-६९, ५३४, ८५३-५४, ८६७
देसाई गोपाळराव . . ५०
देसाई धीरजलाल . . ८८६
देसाई जनार्दन . . ७५४, १०७२
देसाई दिनकरराव . . १०६७
देसाई दूर्गाबेन . . ९०४
देसाई भुलाभाई . . १२६, १८७, ४२१, ६६३, ८४२, ८५१, १०४३, १०५७
देसाई महादेव भाई . . ८९५, ९०३-०४, १०४३

देसाई मोरारजी . . ७०२, ८२४, ८४९, ८८५, १०६७
देहेरकर यशवंत . . ९३०
दोंदे कमल . . १०६२
दोंदे पी. बी. . . ३६४
धनशेट्टी मल्लाप्पा . . २३६, ४४१, ४९५
धनेश्वर मृणालिनी . . ९०५
धर्मसंगर, आंबेडकर . . ५८६-९३
धर्माधिकारी शंकर त्रिंबक (दादा) . . ५६३, ९२३, १०१६, १०६८, १०६९, १०७०, १०८२
धारासणा सत्याग्रह . . ४२६
धारिया मोहन . . ७८३
धुरंधर बी. आर. . . ८५२
धूत रामकिशन . . ७४६, ७५४, १०७२
धोत्रे शरयू . . ५६७
धोबी व्यंकट तानाजी . . ९२५, ९२७, ९९०
नगिनदास मास्टर . . ८५२, ८८५
नझीर हुसेन . . १०५८
नटराजन . . ९०
नंदा गुलझारीलाल . . ३५९, ७०२, ७०८
नंबुद्रिपाद ई. एम. एस. . . ५९६
नयी तालीम संघ . . ८५०
नरवणे डॉ. . . ८५२
नरसिंहराव पी. व्ही. . . ७७०, ७७१
नरिमन के. एफ. (वीर) . . ३८, १०८, १२१-२३, १५५, १५९, २४१,२६६-६७, २६९, २८७,४२०, ५३२, ५३३, ६९५-९८, ७४४, ९१८-१९
नरे भिमाजी रामजी . . ३१५
नलावडे ग. म. . . २१९, ७५१

नवजीवन पत्रक . . ४१
नॅशनल मेडिकल कॉलेज . . ५३-५४, ९७, ५३०
नॅशनल लिबरल फेडरेशन . . २८०
नाईक जनार्दन रामचंद्र . . ९४०, ९४१
नाईक देवराव . . ६०१
नाईक वसंतराव . . ९२०
नाईक वामनराव . . ७३५
नाईक श्रीधर . . ७३५
नांदापूरकर रामचंद्र . . ७६०
नानल गोविंदराव . . ७४२, ७५४, ७६०
नायक दामोदर . . ९९९
नायकवडी नागनाथ . . ९२५, ९२६, ९२७
नायडू पद्मजा . . ७८९
नायडू सरोजिनी . . १३, २०, १०८, १४०, १५९, ३३४, ४२१, ४६८, ५०३,५३४, ६४०, ७४०, ८८४, ८८५
नारायणस्वामी सी. के. . . ८५३, ९६३
निजाम, मीर उस्मान अहमद अलीखान, आला हजरत . . ७२९, ७३१, ७३२
निंबकर रघुनाथ शिवराम . . ५३, ९९, २८१, ३२०, ३३४, ८११, ८१६, ८८०
निंबाळकर कीर्तिवान . . ५०, २१४, २१५
नूरी एम. वाय. . . ७०२, ८०४, १०६४
नेरूरकर जे. ए. . . ९१०
नेवाळकर ग. बा. . . ९२३, ९९३
नेहरू कमला . . ४२६
नेहरू राज्यघटना समिती . . २८२-८४
नेहरू जवाहरलाल . . ३०-३१, ७४, ८४-८५, ९१, ९५, ११२, १३५, १५०, २९१-९३, ३१०-११, ३४५, ३६८, ३७२, ३८०, ३९७,४००, ४०५, ४०७-१०, ४२२, ५०३, ५२१, ६४६-४७, ६५०, ६७१, ६७३, ७२०, ७३०, ७४१, ७५९, ७८९, ७९६, ८२३, ८६०, ८६७, ८६९, ८७१, ८८४, ९९४, १०६०, १०६३, १०६४, १०७०, १०८०, १०८८, १०९१, १०९२

नेहरू मोतीलाल . . ३२, ४८, ६४, ७०, ७२, ८६, ९०, १२६, १२७, २४२, २४३, २५०-५१, २६१, २८२-८४, २९४, ३२०, ४२६, ४७३, ४९३
नेहरू स्वरूप रानी . . ४२६, ५५३
नौजवान भारत सभा . . २७८, २८८, ३७४-७६, ३८१, ४१०, ४२३
नौरोजी खुर्शिद, क्रांतिकारक . . ८५३-५४, ८९४-९५, ९६६-६९, १०१२
पकल परिपत्रक . . ८७९, ९४२
पक्वासा मंगलदास . . ९७४, १०९४
पंजाब मेल प्रकरण . . ९४०-४१
पटनाईक बिजू . . ९६९
पटवर्धन अच्युतराव . . ६५२, ६९१, ७८३, ८२५, ८४२, ८४३, ८५३, ८६४, ८९३, ८९८, ९०३, ९०९-११, ९२४, ९४७, ९५३, ९५४, ९६६-७०, ९७५, ९८५, ९९२, ९९३, १०३५, १०४४, १०६२
पटवर्धन जनुभाऊ . . १०६२
पटवर्धन डॉ. . . ५६९
पटवर्धन पार्वती . . ९८, ५६६
पटवर्धन पुरुषोत्तम हरी . . ६७२, ७७२, ८२१
पटवर्धन सीताराम (अप्पासाहेब) . . १६०, ४४३, ५८२
पटवर्धन मेघःशाम . . ९४९
पटवर्धन वामन . . ७८६
पटवर्धन शिवाजी . . ५६८
पटेल गंगाबेन . . ४३०
पटेल दायाभाई . . ८५२, ९५६, ९५७, ९६४
पटेल जहांगीर बी. . . ४६
पटेल वल्लभभाई . . ९२, १२६, १५०, १५१, १५६-५७, ४०६, ५३१, ६४०, ६४६, ६६९, ८२४, ८४२, ८४९, ८५१, ८५२, ८६४-६६, ८७१-७२, ८८४, ८९१-९२, ८९५, ९०९, ९५६, ९५९, ९७७, १०३५, १०५५, १०६०-६४, १०८८-८९, १०९२
पटेल विठ्ठलभाई . . ९०, १०७, १५०, १५६, १८७, २४३, २४७, २५०, ४१३
पंडित जगन्नाथ . . ७८६

पंडित रणजित . . ५५३, ८२५
पंडित विजयालक्ष्मी . . ४२६
पंडित सोनू आनंदा . . ९३६, ९३९, ९४०, ९४१
पंढरपूर मंदिर प्रवेश . . ६१६
पंत अप्पासाहेब . . ७८५, ७८६, ७८७, ७८८, ९८१, ९८२, ९८३, ९९८-९९
पंत गोविंद वल्लभ . . ९१, २९२-९३, ६६३, ८५१, ८८४
पंतप्रतिनिधी भवानराव . . ७८५, ७८६, ७८७, ९९७
पद्मनाभ मंदिर प्रवेश . . ६१४
पन्नालाल हरिराम . . ९१८
परमानंद भाई . . १३०
परांजपे रामचंद्र गोविंद . . ७३९, ७४२
परांजपे रा. गो. . . ७५४
परांजपे रघुनाथ पुरुषोत्तम . . ४३, ५०, २२५
परांजपे शिवराम महादेव . . १३, २४, ५५, ५६, १३६, १३८, १४२, २४७, ३१३
परुळेकर गोदावरी . . ६३०, ६३१
परुळेकर श्यामराव . . ३३४, ३६४, ६३०, ६३१
पर्वती मंदिर सत्याग्रह . . ५९९-६०१
पवार किसन . . ९२५
पवार कृष्णराव . . १००९
पवार नारायण . . १०८५
पहाडे माणिकचंद . . १०७५
पळनिटकर एम. एस. . . ९१०
पळनी मंदिर प्रवेश . . ६१५
पर्ल हार्बर, हल्ला . . ७९८
प्रतियोगी सहकारिता . . ५५
प्रधान गोविंदराव . . २८३

प्रधान डी. आर. . . १०९०
प्रबोधन पत्रक . . २१३
पागे वि. स. . . ९८०
पाचघरे लक्ष्मण, हुतात्मा . . १००८
पाटकर एस. जी. . . ३६४
पाटणकर बाबुराव . . ९८३
पाटसकर हरीभाऊ . . ८२५
पाटील उत्तमराव गिरीधर . . ८२५, ९२५, ९२७, ९३६, ९८२, ९९०
पाटील कालगोंडा . . ७८१
पाटील के. डी. . . ८९८
पाटील के. एन. . . ९१०
पाटील के. आर. . . ७८१
पाटील गोमाजी . . ९३०, ९३३
पाटील डोंगरसिंग . . ८२५
पाटील जी. डी. . . ९९६
पाटील जे. डी. . . ९१०
पाटील झगाभाऊ . . ९३६
पाटील देवराम रामजी . . ९३९
पाटील धोंडीराम . . ९९७
पाटील नाना रामचंद्र . . १००, २३३, २८१, ५४९, ५५४, ७८४, ८६४, ८९८, ९२३, ९५०, ९७७, ९७९, ९८१-८३, ९८५, ९९२
पाटील पंढरीनाथ सीताराम . . २३८, ७१५, १०६८, १०६९
पाटील पांडुरंग गोविंद (पांडू मास्तर) . . ५५४, ९८०, ९८१, ९९७
पाटील पी. बी. . . ९९६
पाटील बाळकू अण्णा . . ९७९
पाटील भगवान . . ९८१
पाटील भाऊराव . . १००, १७९-८१, १९९, २०३-०६, २१६, २३५, २८१, ५८१, ९९२

पाटील माधव धनजी . . ९३६, ९४०, ९४१
पाटील एम. पी. . . ७०२
पाटील मार्तंड रूपला . . ९४०, ९४१
पाटील मुकुंदराव . . १७१, २१४, २१६
पाटील रामराव कृष्णराव . . १०२९, १०६९, १०७६, १०८२
पाटील ल. मा. . . १०६६
पाटील लीलाबाई उत्तमराव . . ८२५, ९२५, ९८२, ९९०
पाटील वसंत दादा . . ९८३, ९८५, ९८६, ९८८, ९९७
पाटील विष्णू सीताराम . . ९२५
पाटील श्यामराव . . ९२२
पाटील एस. पी. . . ९४९
पाटील सदाशिव कान्होबा . . ३८, ७८, १५५, २८१, ४२१, ४२९, ६५०, ८२५, ८४२, ८४९, ८५२, ८६४, ८८५, १०३८, १०४५, १०५६, १०६४
पाटील सुपडू भादू . . ८२५, ८३६
पाटील सुभान तोताराम . . ९३६, ९४०
पाटील सोनुसिंग . . १०६६
पाटील हिंदुराव . . ९९६, ९९७
पाटील हिराजी . . ९३०, ९३३
पाठक डी. एल. . . ७४२
पाठक बापूजी . . १०६९
पांडे चितू . . ९७८
पांडे रामसेवक . . ९६७, ९६८
पानसरे गोविंदराव . . १०७१
पानसे भाऊ . . १०१६, १०२९
पारडीवाला एच. आर. . . ८५३, ९३९
पारेख शंकरलाल . . १५०
पाल बिपिनचंद्र . . ४७, ११०, १८७

पालवणकर (पी. बाळू) . . ६२३, ६४०, ६८१
पाळेकर भगवंत . . २१४
पार्वतीबाई . . ९१०
प्रार्थनासमाज . . ५७७, ५७८, ५८०
प्राणेशाचार्य जे. के. . . १०७५
पिंपळे भास्कर . . ९३०
पिल्ले रत्नम . . ९१८
पीपल्स वॉर, पत्रक . . ८१२
पीटर अल्वारिस . . ८५३
पीपल्स व्हॉलंटिअर ब्रिगेड . . ८५२, ८६७
प्रिंटर नरिमन . . ९५५, ९५७
पुजारी रंगनाथ . . ७८२
पुराणिक छोटुभाई . . ९२३
पुरषोत्तम कांजी . . ९६४
पुरषोत्तम त्रिकमदास . . ३६०, ३६१, ६५२, ८४२, ८४५, ८५३, ८६८, ८९७, ९५३, ९६३, ९६७, १०३५, १०७६
पुरषोत्तमदास ठाकुरदास . . ४३४
पुरोहित दिगंबर विनायक . . ९२८, ९२९
पुरोहित धनराज . . १०८४
पुणे बॉंब खटला . . ९०८
पुणे युथ लीग . . २७८, २८१, ३७९, ३८५-८६
पेंडसे लालजी . . १४५, ३४२, ३४४-४५, ३५२, ४०३
पेशावर एक्सप्रेस कट . . ९३६-३९
पेशावर, काँग्रेस राज . . ४७९
प्यारेलाल . . ४३६, ८४९, ८९३
पै नाथ . . ९९७
पोतनीस गोपीनाथ . . ७८२

पोतनीस शांताराम रघुनाथ . . ५९२
पोदार आनंदीलाल . . ७७
पोफळे आर. बी. . . ९३०
फडके ना. सी. . . ६०, १४०
फडके मामा . . १३
फडके विठ्ठल लक्ष्मण . . २४, ५८२
फंदाडे महादेव . . १०१०
फरकाडे बळीराम . . १०१०
फॅक्टरी कायदा . . ३४०, ७०९
फाटक बी. एम. . . ९१०
फाटक लक्ष्मण . . ७३५
फाटक विनायक गणेश . . ९०६
फाटक वि. दा. . . १४२
फाटक हरीभाऊ . . ५६, १४३, ९००
फातिमा हसरत मोहानी . . ७०
फॉरवर्ड ब्लॉक पक्ष . . ७१८, ८५४, ८६९
फिशर लुई . . ८३३, ८४०, ८४१-४२
फुले जोतीबा . . १६५, १६७, १६९, २२४
फुले सावित्रीबाई . . १६७
फ्रँक स्लाय . . १५०, १५१
फेगडे लोढूभाऊ . . ६७२
फेडरल स्कीमला नकार . . ६८९
फेरवादी-नाफेरवादी संघर्ष . . २४३, ४१६-१८
फैजपूर अधिवेशन, काँग्रेसचे धोरण . . ३९९-४००, ६६७-६८, ६७६-८०
बर्कनहेड, भारतमंत्री . . ११८, २७९
बखले डी. एस. . . १०९०
बखले रघुनाथ . . ३२८

बंग ठाकूरदास . . १०१५, १०१६
बजाज जमनालाल . . ३८, ४७, ५५, ६७, ६८, ७३, ७९, ९०, ९२, ९७, ९८, १४९, १५१-५२, २६१, ४१९, ५६६, ६७०, ७४६, ७५७
बजाज जानकी . . ५६७
बजाज राधाकृष्ण . . १०२८
बजाज रामकृष्ण . . १०१४
बटलर माँटेग्यू . . २७२
बडवे नारायण . . ७८१
बर्डे मास्तर . . ९८३
बंदसोडे किसन फागू . . ३४६
बरकतउल्ला खान . . ३२६
बंसिलाल . . ७६३
बहादूरजी डी. एन. . . ६९७-९८
बहिष्कार चळवळ . . १००-०६
बहिष्कृत भारत . . २१४
बॅकबे रेक्लमेशन, भ्रष्टाचार . . १२०-२३
बँकर शंकरलाल . . १३, २०, ३८
बॅनर्जी सुरेंद्रनाथ . . ४७, ११२
बागडी मगनलाल . . ८६४, ९६९, ९९९, १००४, १००५, १०२९-३०
बागल खंडेराव . . १००, २२८
बागल माधव खंडेराव . . २३५, ५४९, ७७८, ७७९, ९९५
बागल वसंतराव . . ९९५
बागाईतदार सदाशिव . . ७८३, ९१६
बाटलीवाला सोली . . ६७८, ८१०, ८११, ९९४, १०३९, १०५३, १०५४, १०५५
बार्डोली सत्याग्रह . . ११०, २७७
बापट पांडुरंग महादेव, सेनापती . . २४, ३८, ९२, ९५, १३९, १४०-४५, ३१९, ४९४-९५, ४९७, ४९८, ५८०-८१, ६१७, ६१८, ७०५-०६, ७१९, ७४९-५१, ७६१

बापट वसंत . . ९१६, ९६१

बापट वामन . . ३६४, ६५०

बाबू गेनू, हुतात्मा . . ४४५-४६

बारडकर, साहेबराव . . १०८४

बारडोलोई गोपिनाथ . . ९६६

बारबट्टे विष्णू . . ९८३

बारमासे महादेव . . १०१०

बारलिंगे वा. शि. . . १०६९

बारा कलमी योजना . . ८९०

बारामती, चळवळीत . . ९०५

बारूआ शंकर . . ९५०

ब्राऊन ज्युडिथ . . ९६

बाँबे काँग्रेस बुलेटिन . . ५३२, ५३९-४०, ८८९

बाँबे चेंबर ऑफ कॉमर्स . . ५२३

बाँबे टेक्सटाईल वर्कमेन युनियन . . ३२८, ३३२-३३

बाँबे प्रेसिडेंसी यूथ लीग . . २७७, २७८, २८५, ३७७, ३७९

ब्राह्मणेतर पक्ष व कलोनिअल राजनीती . . १३५, २०९-२७

ब्राह्मणेतर काँग्रेसकडे . . २२७, २३४-३९

ब्राह्मणेतर वर्तमानपत्रे . . २१३-१५

बिंदू दिगंबर . . ७३५, ७४३, ७४६, ७५४, ७६०, १०७५, १०८८

बिर्ला बंधू . . ९४९

बिर्ला घनश्यामदास . . ५१२, ६४०

बिर्ला सीताराम . . ८२५, ९३६

बिहार विद्यापीठ . . ६५

बियाणी ब्रिजलाल . . ३८, ९९, १५३,२८७, ५६३, ५६८, १००८, १०१५, १०६९, १०७०

बुगड नारायण . . ७८१

बृहदिश्वर मंदिर प्रवेश . . ६१५
बेझंट ॲनी . . २, १०, १४, २०, ४७, ६३, ३२०
बेडेकर त्रिं. ना. . . ८२६
बेळवी दत्तोपंत . . २५०
ब्रेलवी एस. ए. . . ९४३
बोंडे धनजी महारू . . ९३६
बोराटे पांडुरंग . . ९८३
बोराडे बळीराम . . १००९
बोरीकर श्रीनिवास . . ७५४, ७८९, १०८०
बोले सीताराम केशव . . ५०, २१५, २६७, ३१५, ३१९, ५८६
बोस सुभाषचंद्र . . ६५, ९१, ९६, २५३, २९७, ३४५, ३४८, ३६८, ३७२, ४०५, ४०७, ७१४, ७४५, ८००-०१, ८२०, ८५४, १०३०
बोस सुभाषचंद्र, काँग्रेसचा राजीनामा . . ७१६, ७१८
देशातून निसटले . . ७२५
बोरीकर श्रीनिवास . . ७८९
भगतसिंग . . ९२, २५६, २७८, २८१, २८८-९१, २९५, २९८-३०२, ३०४, ३०८, ३६७, ३७४-७५, ९६९, ९९९
भगतसिंगांना गांधीजींविषयी नितांत आदर . . ३०७-०८ ; त्यांना वाचवण्यासाठी गांधीजींचे प्रयत्न . . ३०६, ४८२-८५
भगवानदीन . . ९८, १४९, १५२
भट गोकुळभाई . . ६७३
भडसावळे हरिभाऊ . . ७८३, ९३०, ९३४
भवानी . . १४२
भंसाळी जे. पी., उपोषण . . ४६, १०२०, १०२४-२८
भागवत परशुराम सखाराम . . ५५, ९११
भागवत स. ज. . . ५५, ५८, ५५१
भांगवे पी. जी. . . ९१०

(शा.म.मु.) एन ४१४६—७३ (११००—१०-२०१८)

भाटकर लक्ष्मण . . १०७०
भारती रामानंद . . ९९७
भारुका छगनलाल . . ७१३
भालेराव अनंत . . १०७४, १०८४
भावे विनोबा . . १३, २४, ९८, १४९, ५५१, ५६६, ६४९, ६७०, ८२२-२४, ८९७, १०१६, १०८४
भिसे आचार्य . . ९२२
भुस्कुटे विनायक . . १३८, १३९, १४०,१४२, १४३, १४५, ३९८, ४०९, ५४९, ६५१, ७१९
भोई अर्जुन कानू . . ९२९
भोगे रामभाऊ . . ९३६, ९३८, ९३९, ९४०, ९४१
भोजे श्रीपाद . . ७८१
भोपटकर अण्णासाहेब . . ५७, १०२, १३८
भोपटकर भा. ब. . . ७६१
भोसले जगन्नाथराव . . १०५८
भोसले पी. बी. . . ९१०, ९२३
भोसले बाबासाहेब . . ९९५
मर्चंट विजय . . ९४९
मंडलिक रामभाऊ . . १३, २०
मंत्रिमंडळ, काँग्रेसचे . . ७००-०५, ७१०-१५
मंत्री मोतीलाल . . ७७४
मध्यप्रांत-वऱ्हाडला प्रांताचा दर्जा . . ५१
मराठा शिक्षण परिषद . . १७१
मराठे नारायणशास्त्री . . १६०
मरीवाला . . १३०
मरे जे. एच. . . १३१
मलकापूरकर सदाशिव रघुनाथ . . २९१, ३०४, ३०८, ३०९, ३१०

मश्रिकी अल्लामा . . १००१
मश्रूवाला किशोरीलाल . . ८९५, ८९६, १०१६, १०६९
मश्रूवाला तारा . . ५६८
मसानी मिनू . . ३६०, ३६१, ५४३, ६५२, ८५३
मसानी रुस्तम . . ९४२
मसानी मिनू . . १०५६
महंमद अली . . ४२, ६९, ७०, ४९३
महंमद इक्बाल . . ५१४
महंमद शफी . . २८१
महाजन गणपत भावडू . . ९३६, ९४०, ९४१
महाजनी ग. स. . . ४९६, ४९७
महाजनी ह. रा. . . ६५१
महाडेश्वर सदाशिव . . ८५२
महार, सेनाप्रवेश . . ६२५-२६
महाराष्ट्र सत्याग्रह मंडळ . . ४१८
महाले दाजीबा, हुतात्मा . . १००१
महाले शंकर, हुतात्मा . . १००१, १००७
महिला सेवा दल . . ५०९
महुवाला . . ९१३
मॅकडोनाल्ड रॅम्से . . ४१३, ४१४, ५०६, ६०७-०८, ६३९
मॅकेंझी प्रा. . . ८२७-२८
मॅक्सवेल रेजिनाल्ड . . १०४०-४१
माऊंटबॅटन . . १०८६, १०८८-८९, १०९१
माटे श्री. म. . . ५८१
मॉंटेग्यू एडविन . . ७, ८, १९, ३१, ३४, ७३०
माडगुळकर व्यंकटेश . . ९४९
माडपाटी हनुमंतराव . . ७४६

मादन बी. एफ. . . १२६
माने शंकर . . ९४९
मायकेल ओडवायरचा वध . . ७२४
मारवाडी विद्यालय . . ५३
मालपे पांडुरंग . . १०१०
मालवीय मदन मोहन . . २, ९, ४३, ४७, ६९, ९०, २५४, २५६, २८९, ३७६, ६४०
माहीमकर जे. एस. . . ३६४
माहौर भगवानदास . . ३०८, ३०९
माळी धोंडीराम . . ९२५, ९२६, ९२७
माळी शंकर . . ९२७
मावळणकर गणेश वासुदेव . . २४
मिरजकर शांताराम . . ६०, ७९, २८१, ३३४, ३६३, ८०९, ८१०
मिरजे जी. एस. . . ९१०
मिर्झा इस्माईल . . ९५८, १०७०
मिश्रा द्वारकाप्रसाद . . ६७, ५६३, ७१३, ८९९, १०६८, १०६९, १०७६
मिश्रा श्यामनंदन . . ८६८
मीनाक्षी मंदिर प्रवेश . . ६१५
मीर उस्मान अली (निजाम) . . १०७२, १०७८, १०८८-८९
मीर लायक अली . . १०८८
मीरत खटला . . ३३९-४०, ३९१, ३९५
मीराबेन, मॅडेलेन स्लेड . . ६६६, ८६२, ८८५, १०१२
मुखर्जी कालीपद . . ९६७
मुखर्जी श्यामाप्रसाद . . १०५५
मुंजे बा. शि. . . ५६, २६०-६२, २७२, २७४, ६२१, ६३८, ६६२, ७६१
मुतालिक सरदार . . २५०
मुंदडा दामोदरदास . . ७४२

मुधोळकर मधू . . ९१३
मुधोळकर रघुनाथराव . . २४१
मुनशीराम तथा स्वामी श्रद्धानंद . . १८
मुन्शी प्रेमचंद . . ९१
मुन्शी के. एम. . . ४२९, ७०१, ७९२, ९४३, १०३३
मुन्शी लीलावती . . ४२९
मुंबई औद्योगिक विवाद कायदा, देशातील पहिला . . ७०८
मुंबई यूथ लीग . . ३७७, ५२४
मुस्लीम लीग . . ५१४-१७
मुष्टी फंड, भाऊराव पाटील . . १७९
मूकनायक . . २१४
मूलभूत अधिकारांचा ठराव . . ४९२-९३
मूळजी जेठा मार्केट . . ५४१
मूषक महाल, घातपात केंद्र . . ९०९-११
मेकलाई अली महमद . . ८०४
मेमाणे माधव . . ९००
मेलकोटे जी. एस. . . ७७५, ७८९, १०७५, १०७९, १०८८
मेहता अशोक . . ६५०, ६५१, ८२५, ८४२, ८५२, ८५३, ८८५
मेहता उषा . . ९५३, ९५४, ९५५, ९५६, ९५९
मेहता चंद्रकांत . . ९५६
मेहता जनक . . ९५६
मेहता जमनादास एम. . . १३, २०, ३८, ४६, २४७
मेहता जीवराज . . ८९५, ९६४
मेहता डी. के. . . ७१३
मेहता तुळजाराम . . ८२६
मेहता दिनकर . . ६७८
मेहता दुर्गाशंकर . . १०६९

मेहता रतनबेन . . ४३०
मेहता रमणिकराय . . ६९१
मेहता वैकुंठलाल . . १०६७
मेहता हंसा . . ४२१, ५३४, ७०२
मेहताब हरेकृष्ण . . ८५०, ८८४
मेहेरअली युसुफ . . ९५, १५५, १५९, २७७, २८१, २८६, २९७, ३८१, ३८२, ३९८, ४०५, ४२०, ४७०, ५३२, ६५३, ७४१, ८०४, ८२४, ८३१, ८४२-४५, ८४९, ८५३, ८६६, ८६८, ८८५, ९२८, ९४३, ९६५-६६, ९७७, १०३५, १०९२
मोघे महादेव अनंत . . १०१६
मोटवानी नानक . . ९५५, ९५९
मोटवानी व्ही. जी. . . ९५५
मोदी सर होमी . . ३४२, ३९०
मोरारजी सुमती . . ९४९
मोरे शंकरराव . . २३८, ८२५, ९०६, १०६५
मोल्सवर्थ जन. . . ८४७
मोहरीर स. नी. . . ९९
मोहिनुद्दिन हॅरीस . . ९६३
यशपाल . . २८९
यशोदाबाई आगरकर . . ४६९
यंग इंडिया, पत्रक . . ४१
यंग इंडिया सोसायटी . . ३७६, ६०८
यंग नॅशनॅलिस्ट लीग . . ५३
युद्धमंडळे व डिक्टेटर . . ५३४
युवक आक्रमक . . ७८-७९
युवक संघटना . . २७७
यार्दी वामनराव . . ९२०

यावलीकर पंजाबराव . . १००८
यावले विनायक . . १०१०
याळगी गोविंदराव . . २४, ५६, १६१
याळगी कृष्णराव . . १६२
याज्ञिक भानुभाई . . ८५२
येवला परिषद, धर्मान्तराचा मनोदय . . ६१९-२१
रंगा एन. जी. . . ४९१, ६७५, १०७५
रझवी कासिम . . १०७१, १०७२, १०७८
रणखांबे अमृतराव . . ६०१, ६२२-२३, ६२४, ६८१
रणदिवे बी. टी. . . ३६३, ८०८, ८१०
रतनजी चापशी . . ९६४
रशीदखान सहादतखान, हुतात्मा . . १०२०
रसेल बर्ट्रान्ड . . ९७४
रॅडिकल डेमॉक्रॅटिक पक्ष . . ३६५
राऊत भाऊसाहेब . . ८२६
राऊंड टेबल कॉँफरंस . . ४०७
रांका पुनमचंद . . ६९, १५०, ५६२, १०६८, १०६९, १०७०
राखीव जागा, मागणी . . २११-१२
राघवदास बाबा . . ९६६, ९६८, १०१७
राघवेंद्रराव . . २७१, २७२, २७३
राजकारण व अर्थकारण . . १२४
राजगुरू शिवराम हरी . . २९०-९१, २९५, २९८-९९, ३०२, ३०३, ३०४, ३०५
राजगोपालाचारी . . ७२, २४३, ६४०, ८४२, ८६०
राजभोज पां. नं. . . ६०१, ६२१, ६२३, ६३९
राजवाडे राजा . . ९१२
राज्यघटना समितीची मागणी . . ६९०
राजा एम. सी. . . २८१, ६३८, ६४०

राजाराम महाराज . . २५२
राजेंद्रप्रसाद डॉ. . . ६३, ९१, ९६, १५०, २४३, ६४०, ६५८, ६७०, ८५०, १०९१
राजेंद्रसिंहजी . . १०८९
रानडे देशदास . . १४१
रानडे न्या. महादेव गोविंद . . १६५, १६६, १६७, १०९२
रानडे रमाबाई . . १८५, २२४
रानडे शंकर . . १३८
रामकृष्णराव बी. . . ७४६, १०७२, १०७४
रामप्रसाद बिस्मिल . . २९०, ३८१
रामाचार्य . . १०७२
रामानंद भारती . . ९८३
रामेश्वर मंदिर प्रवेश . . ६१५
रॉय मानवेंद्रनाथ . . ३२२, ३५२, ३५३, ३६४, ३९८, ४९२, ६७२,६७७-७८, ७४१, ८०६-०७.
रॉयवादी पक्ष . . ७९६
राष्ट्र सेवादल . . ७२६, ८६७
राष्ट्रीय युवक संघ . . ९९९, १००१
राष्ट्रीय विद्यालये . . ५४-५५, ७८, ९६
राष्ट्रीय शिवाजी मंडळ . . ९९९
रीडिंग लॉर्ड, व्हाइसरॉय . . ९५, ११८
रुईकर रामभाऊ . . ६८, ९८, १५३, २६१, २७४, ३४७-५०, ३६१, ५६२, ५६३, ८५४, ८६९, ९९९, १००२, १०६९
रूझवेल्ट फ्रँकलिन, राष्ट्राध्यक्ष . . ८३३
रेड्डी रविनारायण . . ७५४
रेड शर्ट संघटना, क्रांतिकारक . . ४२३, ४२४, ६४६
रौलटची सेडिशन कमिटी . . ३, ७, ९, १०-१२
लाला लजपतराय . . ४७, ७०, ९२, २५६, २८९-९०, २९४, २९५, ३१९

लठ्ठे अण्णासाहेब . . ५०, २१५, २३७-३८, ७०१
लम्ले रॉजर . . ८२८, ८८१-८२, ९४२, ९७१, ९७२, ९७३, १०३६-३७
लक्ष्मीनारायण मंदिर प्रवेश . . ५९७
लाड अप्पासाहेब . . ९८१, ९८२, ९८५, ९८७, ९९०
लाड जी. डी. . . ७८७, ९०२, ९२५, ९८१, ९८२, ९८५, ९८७, ९९०
लाड नाथाजी . . ७८७, ९२५, ९८१, ९८२, ९८५, ९८७, ९९०, ९९४
लास्की हेराल्ड . . ६४०, ९७४
लाहोर कट खटला . . ३०२-०८
लाहोर घोषणा . . ४०८
लिगाडे शामराव . . ५०, २१६
लिनलिथगो . . ८३३, ८३५, ८३६, ८३८, ८६२, ८६३, ८८०-८२, ९६२-६३, ९७३, १०३३, १०३४, १०४१-४२
लिमये अनुताई . . ९०५
लिमये गोविंद रामचंद्र . . ७८३, ८२६
लिमये नरुभाऊ . . ९०३
लिमये मधू . . ९११, ९२३, ९४०
लिमये माधव पी. . . ९१०, ९१६, ९२३
लिमये वसंत . . ९१०
लिमये वि. प्र. . . ९००
लिमये श्री. पु. (शिरूभाऊ) . . ३८२, ५५१, ७२६, ८२५, ८४३, ८४५, ८६६, ८९८, ९०३, ९०९, ९१०, ९१३, ९१४-१६, ९१८, ९२३, ९४८, ९६७
लिमये हरी . . ९१४
लीग अगेंस्ट इंपिरिअलीझम . . २८८
लेले द्वारकानाथ . . ९२६, १०८३
लेले पी. आर. . . ८५२
लोककल्याण कार्यक्रम . . ४९२
लोकूर, न्या. एम. एस. . . ९१७, ९५४, ९५६, ९५७, ९५८

लोखंडे नारायण मेघाजी . . ३१४
लोहिया राम मनोहर . . ६५३, ८४२, ८६८-६९, ८९३, ९०९, ९११, ९५४, ९६०, ९६१, ९६६, ९६८, ९६९, ९७५, १०१२, १०३५
लोहे रामभाऊ . . १०२०
लोहोकरे कृष्णाजी गो. . . २५०
वर्कर्स अँड पीझंट्स पार्टी . . ३२७, ३२९, ३८६
वकील सी. एन. . . १२६
वर्तक गोविंदराव . . ९२२, १०६६
वझलवार तात्याजी . . १०६९
वटहुकूम राज . . ५२१-२४, ५२९-३१
वंदे मातरम् गीत . . ५१६
वर्मा भगवतीचरण . . २८९
वऱ्हाडे घनःश्याम . . ९१८
वाघ गुलाबराव . . १०२०
वाघमारे आनंद कृष्णा . . ७४२, ७४६, ७५३, ७५४, ७६०, ७६९, ७८९, १०७५
वाघमारे महादेव . . १०१०
वाडिया दिना . . १०९२
वाडिया पी. ए. . . १२६
वाणी सीताराम रतिराम . . ९४०, ९४१
वांद्रेकर द. ना. . . ६२९, ८४९
वायकोम मंदिर प्रवेश . . ६१४
वायाळ भालचंद्र एन. . . ९१०, ९१५
वारली जमात . . ६२९
वाल्टर थॉर्नटन . . ४३३
वालचंद हिराचंद . . ९४९
वाली चन्नाप्पा . . ९५०
वाळुंजकर गंगूताई . . ५६७
वाळुंजकर गोपाळराव . . ५६६, १०१६, १०२९
वाळुंजकर लक्ष्मण . . ७४२
विकेंडेन टी. डी., छोडो भारतवरील अहवाल . . ८५१, ८६४, ८९३, ९६८, १००६, १००७
विचारे दाजीराव . . ५०, २१६

विंचुरकर एन. जी. . . १०५६
विजयी मराठा, पत्रक . . २१३
विदर्भ मिल . . ३४७
विदर्भ, जंगल सत्याग्रह . . ४६४-६६
विदर्भ साहित्य संघ . . ७३
विदेशी कपड्यांच्या होळ्या . . ७७-७८
विद्यार्थी गणेश शंकर . . ९१, ३७१, ४९३
विद्यालंकार जयचंद . . ८९१
विभूते मल्लिकार्जून . . ९२१
विलिंग्डनचा लढाऊ पवित्रा . . ४७९, ५०७, ५४८
वीर किसन . . ९८३
वेंगसरकर शांताबाई . . ८५३
वेदक वसंत . . ८२६
वेब मिलर, अमेरिकन पत्रकार . . ४३६
वेलकर मोतीराम . . १३, ३८
वैद्य काशिनाथ . . ७३५, ७५६, १०७२
वैद्य चिंतामणराव . . ५६
वैद्य पी. बी. . . ३६४
वैशंपायन आनंदीबाई . . २४
वैशंपायन स. कृ. . . ७४२, ७६९, १०७५, १०८०
शंकर दाजीबा महाले, हुतात्मा . . १००१, १००७
शंकरप्पा . . ९२०
शंकरलाल . . ९२३
शर्मा राघवेंद्र . . ७३५
शर्मा शंकरलाल . . १०८४
शर्मा श्रीनिवास . . ७४२
शराफ अथर अली . . ८४९
शहाणे किशोर . . १०८४
शहा प्रा. के. टी. . . १२६
शहा चंदुलाल . . १४९, ९६४
शहा ताराचंद . . ९९७
शहा पोपटलाल . . ९००

शहा एम. एल. . . ८५३
शहा शांतीलाल . . ९५५
शार्दूलसिंग कविश्वर . . ४२०
शार्प एफ. ई. . . ७५२-५३
शाहू महाराज . . १६५-७३, १७९, १८५, १९०, १९५-९९, २०२, २१०-१५, २१९-२१, ५८०
शॉ जॉर्ज बर्नार्ड . . ६४०, ९७४
शिंदे जगन्नाथ . . २३६, ४४१, ४९५
शिंदे जगन्नाथ, फाशी . . ४९५
शिंदे विठ्ठल रामजी . . १००, १७४, १८२-९०, २०३, २०४, २१६, २१८, २२०, २३४, २८०, ३८२-८३, ५४९, ५५१, ५७७, ५७९, ६११, ६१२, ६२५, ६७२, ७७८, ७८२
शिंदे श्रीपत लक्ष्मण . . २१४, २१८
शिंपी पांडुरंग रावजी . . ९४०, ९४१
शिरीषकुमार, हुतात्मा . . ९२४, १००१
शिवस्मारक वाद . . २२३-२४
शिवतरकर सी. ना. . . ६०१
शुकूल बी. डी. . . १७
शुक्ला रविशंकर . . ३८, ६७, ६८, ६९, २७२, ५६३, ७१३, ८६४, ८९९, १०६८, १०६९, १०७६, १०८२, १०९४
शेख अब्दुल्ला . . ४९१, १०७०
शेख इब्राहिम (धुळे) . . १४४
शेटे धोंडोपंत . . ७८२, ७८३
शेठ गोविंददास . . १०७०
शौकत अली . . ४२, ४४, ४९, ६९, ७७, २८१
श्रॉफ गोविंददास . . ७४२, ७५३, ७५४, ७६०, ७६८, ७७५, १०७२, १०७५, १०८२
श्रीमन् नारायण . . १०१६, १०६८
श्रीरंगम मंदिर प्रवेश . . ६१५
श्रीवास्तव रामलाल . . ९३०, ९३४
सकलातवाला शापूर्जी . . ३२७
सकलातवाला सोराबजी . . १०६५

सक्सेना मोहनलाल . . ९६७
संतोक सिंग, गधर क्रांतिकारक . . ३२६
सत्यपाल डॉ. . . १८
सत्यभक्त . . ३२७, ३७१
सत्याग्रह, तत्त्वे . . २१
सत्याग्रह सभा . . १०-१३
सन्याल सचिंद्रनाथ . . १३०
सप्तर्षी भालचंद्र पुरुषोत्तम . . ९१८
सप्रू तेजबहादूर . . ११२, १३२, २८०, ६४०, ८२५, ८५१, १०५७
सत्यशोधकांचे जलसे . . १७८
समर्थ विद्यालय . . ५९
समाजवादी युवक . . ९९-१००
समिउल्ला खान . . ६९, १५३, २७४
सॅम्युअल होअर . . ५०३
सबाल्टर्न लढा, सातारा . . ९८५-९४
सयानी कुलसुम . . ८०४
सय्यद महमूद . . ८५१
सय्यद सिराजुल हसन तिरमिजी . . ७४६
संयुक्त मानापमान नाटक . . ६१-६२, ७९
सरदेशमुख विनायक . . ७८२
सरदेसाई श्रीनिवास . . ३६४
सलाम अमतुल . . ८०४
सर्व्हन्टस् ऑफ इंडिया सोसायटी . . १८५
सव्वालाखे पांडुरंग . . १०२०
सहस्रबुद्धे अण्णासाहेब . . ९४८, ९६३
सहस्रबुद्धे अनंत वासुदेव . . ९२३
सहस्रबुद्धे गंगाधर नीलकंठ . . ५८१, ५८८
साईक्स, कासावीस . . ४२८, ४३४
साठे दत्तू . . १३८
साठे दिनकर धोंडो . . १३, २०, ३८, ७०, ३२०, ४२१
साठे वि. कृ. . . ९००
सातवळेकर श्रीपाद दामोदर . . ६१२, ७३५, ७८६

सादिक अली . . ८९३, ९६६, ९६८
साने गुरुजी . . ३६०, ४५२, ६१७, ६१८, ६४९, ६७०, ६७३, ८२५, ९१०, ९२३, ९२५, ९३५
साबरमती आश्रम जप्त . . ५४३
सायमन आयोग, बहिष्कार . . २७७-७९, २८६, २८७, २८८
साराभाई मृदुला . . ८८६, ८९५
सारडा श्रीकिशन . . २३६, ४४१, ४९५
सालेभाई अब्दुल कादर . . ८०४, ८५२
सावरकर नारायण . . १३, २०
सावरकर बंधू, सुटका . . ११३, ११४, १२७-३२
सावरकर वि. दा. . . २५७, ५१८, ८०५, ८११-१२, १०५५
सावरकर, हिंदू प्रतिकार मंडळ . . ७५१
सावरगावकर श्रीराम . . २९०, २९८, ३०४
साळवे पी. के. . . १०५६
साळवी प्रभाकर . . ९१३, ९१४, ९१६
सिंग रतन . . ३२६
सिकंदर हयात खान . . ७९५, ८०२, ८४१
सिलम सयाजी लक्ष्मण . . ६१०, ८२५, ८५२
सिंह सूरजनारायण . . ९५०
सिंहासने गौरीहर . . ९८१
सीतारामय्या पट्टाभी . . १५५, ४९१, ८५०, ८६४
सुखडवाला दामोदरदास . . १८३
सुखदेव, क्रांतिकारक . . ३०२, ३०३, ३०५
सुभेदार मनु . . १३, २०, १०५६
सुंदरलाल . . ४२०
सुमंत कमलाकर . . १४२, १४३
सुतार सोनू रामू . . ९११
सुलिवन, जुलमी अधिकारी . . १०११
सुरजी वल्लभदास . . ९६४
सुर्वे आनंद नारायण . . ५०, २१५
सूर्य सेन . . ३६७
सेकसरीया गोविंदराम . . १०१५

सेटलवाड मोतीलाल . . ८९०
सेंट्रल डिरेक्टोरेट . . ९६५-७०, १०३८
सेन सूर्य, क्रांतिकारक . . ४२२
सेवाग्राम . . ६६५-६७
सोनार कृष्णाजी . . ७८२
सोफिया खान . . ८०४, ८२५, ८५३-५४
सोभानी उमर, दानशूर गांधीभक्त . . १३, २०, २३, ३८, ७६-७७, १०२
सोमण बाबासाहेब . . १६२
सोमण रा. ग. . . ८९७, ८९८
सोमण सदाशिव लक्ष्मण . . २४
सोलापूर, अत्याचार . . ४३७-४३, ४९५-९६
सोशल सर्व्हिस लीग . . २०१, २०३, ३३४
सोळंकी पी. जी. . . ६८१
सैफुद्दीन किश्चलू . . १८
स्वतंत्र मजूर पक्ष . . ३६०
स्वामी आनंद . . ६०५, ६२९
स्वामी रामानंद तीर्थ . . ७३९, ७४१, ७४६, ७५३, ७५४, ७५५, ७६०, ७७४, ७८९, १०७२, १०७४-७६, १०७९, १०८२, १०९०
स्वामी सत्यभक्त . . १०१६
स्वराज्य पक्ष, धोरण . . २४४
स्वराज्य सभा . . ४९
स्वराज फंड . . ४८, ४९, ६१, ६२
स्कॉटचा वध . . २९१
स्ट्रॅची जॉन . . २७९
हक फझलुल . . ६४, ९१, ५१५, ७९५, ८०२
हक मझरुल . . ४९३
हकीम अजमलखान . . १८, ८३, २४३
हकीम आय. एन. . . १०६५
हडळ हॉऊस, घातपात केंद्र . . ९०९, ९११
हबीबखान महमूदखान पठाण . . ९१८
हरकारे द्वारकानाथ . . ५६६
हरदयाल लाला . . ३७१

हर्डीकर नारायण . . १४९, १६१, १६२, २८१, ३७०, ३७२
हरिजन दौरा, गांधीजींचा . . ६०७-१६
हरिजन, पत्रक . . ६०८, ६०९
हरिजन सेवक संघ . . ८५०
हरोलीकर त्र्यं. ब. . . १४९, १५२
हंटर कमिशन, फसवणूक . . ३४
हसरत मोहानी . . ७०, ८४, ३७१
हंसराज लाला . . २८९
हॅमंड . . ९०१
हाथीसिंग . . ८४९
हॉटसन अर्नेस्ट . . ४९५, ४९६, ४९७
हॉर्निमन बेंजामिन . . १३, २०, ३०, ३७, ४१, २६९, ८३२
हिंदू निःशस्त्र प्रतिकार मंडळ . . ७६१
हिंदुमहासभा . . ५१७-१८, ७२२, ७५८, ९०३, १०४१
हिंदुस्तान सोशालिस्ट पार्टी . . ३२४
हिंदुस्तानी लालसेना . . ९६९, ९९९, १००१, १००५
हिंदुस्तानी सेवादल . . २८१, ३६९-७४, ५०२
हिफझुर रहमान . . ८०४
हिरे बी. एस. . . २३७, ७०२, १०५६, १०६५
हुकेरीकर आर. एस. . . ९७४
हेग, गृह मंत्री . . ४३६-३७
हेडगेवार केशव बळीराम . . ६८, २५६, ५१७, ५१८
हेडा हरिश्चंद्र . . ७५४
होमरूल लीग . . ११
होले मोतीराम . . १०२०
होस्पेट कमलाताई . . १०८२
हैदरी अकबर . . ७४१, ७४४, ७४६, ७४८, ७४९, ७५२, ७५६, ७५७, ७७३
शात्रजगद्‌गुरु . . २१९

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई